सत्यमेव जयते

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

लातूर जिल्हा

भाग १ व भाग २

लातूर जिल्हा गॅझेटिअर ई-बुक आवृत्ती

लातूर जिल्हा गॅझेटिअरची ई-बुक आवृत्ती काढताना मनापासून आनंद होत आहे. निजामकालीन मराठवाड्याचा विचार करता सन १८८४ मध्ये औरंगाबाद जिल्हा गॅझेटिअरची निर्मिती झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सन १९७२ साली उस्मानाबाद जिल्हा गॅझेटिअरचे प्रकाशन करण्यात आले ज्यामध्ये आताच्या लातूर जिल्ह्याचा समावेश होता. लातूर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर प्रथमच ही दर्शनिका ती देखील लातूर जिल्ह्यासाठी मराठी भाषेमध्ये तयार करण्यात येत आहे.

यापूर्वी विभागाद्वारे प्रकाशित झालेल्या सर्व ब्रिटिशकालीन गॅझेटिअर आणि स्वातंत्र्यानंतर प्रकाशित झालेले सर्व सुधारीत जिल्हा गॅझेटिअर शासनाच्या www.maharashtragov.in या संकेतस्थळावर अधिकृतपणे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

लातूर जिल्ह्याने निर्मितीनंतर रौप्यमहोत्सवी वर्षापर्यंत केलेल्या सर्वांगिण प्रगतीचा आढावा घेण्याचा प्रयत्न या दर्शनिकेमध्ये करण्यात आला असून ती आता ई-बुकच्या स्वरूपात उपलब्ध करून देत आहोत. ती शासनाच्या उपरोल्लेखित संकेत स्थळावर उपलब्ध असेल. यामुळे जगभरातील सर्व मराठी भाषिकांना हा महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ उपलब्ध असेल.

सौ.मनीषा म्हैसकर, सचिव, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी लातूर जिल्ह्यावर तयार केलेली सी.डी. उपलब्ध करून दिल्याबद्दल आभारी आहे. याकामी सतत प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणाऱ्या सर्व संपादक मंडळ सदस्यांचे तसेच मा.मुख्यमंत्री, श्री.विलासरावजी देशमुख, उद्योग, खनिकर्म व सांस्कृतिक कार्य मंत्री मा.श्री.अशोकरावजी चव्हाण, राज्यमंत्री, मा.श्री.राणा जगजीतसिंह पाटील, अतिरिक्त मुख्य सचिव, डॉ.जॉयस शंकरन यांचे मी ऋण व्यक्त करतो.

दिनांक : १७ सप्टेंबर, २००८
मुंबई

डॉ. अरुणचंद्र शं.पाठक
कार्यकारी संपादक व सचिव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

लातूर जिल्हा

भाग १

लातूर जिल्हा

[भाग १]

Maharashtra State Gazetteers

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

महाराष्ट्र शासन

लातूर जिल्हा

[भाग १]

संपादक

अरुणचंद्र शं. पाठक

(एम.ए., एम.फिल., पीएच.डी.)

Maharashtra State Gazetteers

दर्शनिका विभाग

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,

महाराष्ट्र शासन,

मुंबई, २००८.

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर
लातूर जिल्हा
प्रथम आवृत्ती (मराठी), २००८
जिल्हा दर्शनिका, खंड-आठ.

प्रकाशक :
डॉ. जॉयस शंकरन
अध्यक्ष, संपादक मंडळ, दर्शनिका,
अपर मुख्य सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
महाराष्ट्र शासन, मुंबई.
(सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन)

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई.

कार्यालय :
दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन,
२७, बरजोरजी भरुचा मार्ग,
फोर्ट, मुंबई ४०० ०२३.

संकेतस्थळ : www.maharashtra.gov.in.
ई-मेल : stategazetteers_maharashtra@yahoo.co.in.

ग्रंथ मिळण्याची ठिकाणे :
१. शासकीय ग्रंथ भांडार, नेताजी सुभाष रोड,
मुंबई-४०० ००४.
२. शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर-४४० ००१.
३. शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथ भांडार,
पुणे-४११ ००१.
४. शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार,
औरंगाबाद-४३१ ००१.
५. शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.
किंमत : रुपये ३७०/-

टीप : सर्व पूर्व प्रकाशित ग्रंथाच्या ई-बुक आवृत्ती कार्यालयात उपलब्ध

या गॅझेटिअरमधील नोंदी तज्ज्ञ सहयोगकर्ते लेखक तसेच कार्यालयातील संदर्भ साहित्य, शासकीय, निमशासकीय कार्यालयांनी पुरविलेल्या माहिती आधारे केल्या असून त्या संपादक मंडळ सदस्यांनी तपासल्या आहेत.

Maharashtra State Gazetteers

आभार

लातूर जिल्हा दर्शनिकेची निर्मिती होत असताना कार्यरत असणाऱ्या संपादक मंडळाचा मी आभारी आहे. याशिवाय या जिल्हा दर्शनिकेशी संबंधित असलेल्या या पूर्वीच्या संपादक मंडळातील ज्येष्ठ सदस्य डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या सहकार्य व मार्गदर्शनासाठी मी ऋण व्यक्त करतो.

डॉ. म. के. ढवळीकर

डॉ. रा. श्री. मोरवंचीकर

श्री. स. दि. महाजन

डॉ. भा. ल. भोळे

डॉ. नागोराव कुंभार

डॉ. के. बी. पाटील

डॉ. एस. जी. देवगावकर

डॉ. भागवतराव डेंगळे

डॉ. श्रीनिवास ओमनवार

डॉ. जयकुमार मगर

डॉ. शेषराव मोरे

डॉ. सूर्यनारायण रणसुभे (स्वीकृत सदस्य, लातूर जिल्हा)

डॉ. प्रभाकर देव (स्वीकृत सदस्य, नांदेड जिल्हा)

प्रा. मदन धनकर (स्वीकृत सदस्य, चंद्रपूर जिल्हा).

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

पृष्ठ

प्रस्तावना . . . . . सात

ऋणनिर्देश . . . . . पंधरा

प्रकरण १ : **भूगोल** १

भौगोलिक सीमा २; प्राकृतिक रचना ४; प्राकृतिक विभाग ५; नद्या ५; भौगोलिक प्रदेश ८; भूशास्त्र व खनिज संपत्ती १०; किल्लारी भूकंप १६; हवामान २३; वनसंपदा २४; मत्स्यव्यवसाय विकास ४७; तक्ते ५०.

प्रकरण २ : **इतिहास** ५५

प्राचीन काळ ५५

मौर्य सातवाहन पर्व ५७; वाकाटक कालखंड ५८; बदामी चालुक्य कालखंड ५९; राष्ट्रकूट कालखंड ६१; कल्याणी चालुक्य कालखंड ६४; यादव वंश ६७; इस्लामी राजवट ६८; प्रशासन विभाग ६९.

मध्ययुगीन काळ ७६

सुलतानकालीन मराठवाडा ७६; बहमनी कालखंड ७८; गुलबर्गा कालखंड ७९; बिदर कालखंड ८०; बहमनींची अखेर ८१; बिदरची बरीदशाही ८२; अहमदनगरची निजामशाही ८४; विजापूरची आदिलशाही ८७; मुघल कालखंड ९०; मराठ्यांच्या लातूर जिल्ह्यातील हालचाली ९७; निजाम कालखंड १०४.

आधुनिक काळ ११४

लातूर जिल्ह्याची निर्मिती व व्याप्ती ११४; निजाम घराण्याचा इतिहास ११४; सामाजिक सुधारणा व प्रबोधन १२५; लातूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलन १२८; लातूरची महिला परिषद १३१; हैद्राबाद हिंदू महासभा १३२; १९४२ चे आंदोलन १३६; इत्तेहद-उल-मुसलमीन (इत्तेहादूल मुस्लिमीन) संघटना १३८; परिशिष्ट १४९.

प्रकरण ३ : **लोक** १६३

लोकसंख्या १६३; लोकसंख्येतील परिवर्तन १६४; भाषा १७१; राहणीमान १७७; धार्मिक प्रथा १७९; सण व उत्सव १८२; करमणूक १८४; प्रमुख जाती व जमाती १८५.

प्रकरण ४ : **कृषि व जलसिंचन** २२७

पर्जन्य २२७; मृदा २२८; शेती हंगाम २३१; जमिनीचे उपयोजन २३३; मृदसंधारण २३३; पिके २३६; तृणधान्ये २३६; कडधान्ये २४३; तेलबिया २४६; तंतुमय पिके २५०; मसाल्याची पिके २५३; अन्य पिके २५४; खते २५७; जलसिंचन २५९; मध्यम प्रकल्प २६२; लघुपाटबंधारे २६५; पशुसंवर्धन २६६; दुग्ध व्यवसाय २७२; कुळवहिवाट व भूधारणा पद्धती २७६; शासकीय योजना २८४; तक्ते २९०.

नैसर्गिक आपत्ती ३०१

दुष्काळ ३०१; अतिवृष्टी ३०३; भूकंप ३०५; भूकंपाची कारणमिमांसा ३०९; पुनर्वसनातील वैविध्य ३११; संभाव्य आपत्ती व्यवस्थापन ३२२; भूकंप क्षतिग्रस्त सांस्कृतिक वारश्याचे जतन व पुनर्वसन ३२३; परिशिष्ट ३३१.

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ५ : **उद्योगधंदे** ३४३

औद्योगिकरणाचा इतिहास ३४३; वीज निर्मिती व वितरण ३४५; खाद्य पदार्थांचे उत्पादन ३५१; पेये, स्पिरीट व तंबाखूची उत्पादने ३८३; वस्त्रोद्योग ३८५; लोकर व रेशीम उद्योग ३९६; रसायने व रासायनिक पदार्थ ३९९; रबर व प्लास्टिक उत्पादने ४०१; कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण प्रकाशने व संबंधित उद्योग ४०२; मूलभूत व मिश्र धातू ४०७; धातूच्या वस्तू व सुटे भाग ४०७; परिवहन सामग्री, यंत्रसामग्री व सुटे भाग ४१०; अधातू खनिज उत्पादने ४११; लाकडाच्या वस्तू आणि फर्निचर ४१३; भांडवली वस्तू व यंत्रसामग्री दुरुस्ती ४१३; औद्योगिक वसाहती ४१४; ग्रामोद्योग व कुटिरोद्योग ४१६; कामगार चळवळ ४२६; तक्ते ४२९.

प्रकरण ६ : **बँक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य** ४४९

सावकारी ४५०; सहकारी चळवळ ४५६; सहकारी बँका ४५८; भूकंपग्रस्त भागात बँकेने केलेले कार्य ४६२; उद्योगांना आर्थिक सहाय्य ४७१; वाणिज्य बँका ४७६; बँक पत योजना ४७८; राष्ट्रीय बचत योजना ४८०; व्यापार ४८२; विनियमित बाजारपेठा व घाऊक व्यापारी केंद्र ४८६; सहकारी विपणन ४९६;राज्य व्यापार व रास्त भावाची दुकाने ४९७; किरकोळ व घाऊक व्यापार ४९९; आठवडे बाजार ४९९; यात्रा ४९९; वजन व मापे ५००; तक्ते ५०१.

प्रकरण ७ : **वाहतूक व दळणवळण** ५११

ऐतिहासिक पार्श्वभूमि ५११; रस्ते विकास ५१३; प्रमुख राज्य महामार्ग ५१५; प्रमुख जिल्हा मार्ग ५२२; इतर जिल्हा मार्ग ५२४; ग्रामीण मार्ग ५२५; नागरी रस्ते ५२७; पूल ५२७; वाहतूक प्रगणना ५२८; हवाई धावपट्टी (विमान तळ) ५२९; लोहमार्ग ५३०; वाहने ५३२; पर्यटकांसाठी सुविधा ५३३; विश्रामगृहे ५३३; राज्य परिवहन ५३३; बसमार्ग ५३७; डाक, तार आणि दूरध्वनी सेवा ५३९; आकाशवाणी ५४२; दूरदर्शन ५४३; तक्ते ५४४.

प्रकरण ८ : **आर्थिक विकास** ५७९

उपलब्ध साधन सामग्री ५७९; कृषि अर्थव्यवस्था ५८०; विविध कल्याणकारी योजना ५८७; आर्थिक नियोजन ५९८; मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद ६०२; वेतन पातळी ६१०; तक्ते ६१४.

प्रकरण ९ : **प्रशासन** ६३३

प्रास्ताविक ६३३; प्राचीन प्रशासन विभाग ६३५; मध्ययुगीन प्रशासन ६३६; स्वातंत्र्योत्तर काळातील प्रशासन ६४३; लोककल्याणकारी योजना ६५१; जमीन महसूल ६५२; भूमि अभिलेख विभाग ६६१; पोलीस ६६४; न्यायलये ६६८; स्थानिक स्वराज्य संस्था ६७४; पंचायत राज ६७६; जिल्हा परिषद ६७७; पंचायत समिती ६८०; ग्रामपंचायती ६८६; जलस्वराज्य ६९०; नगरपालिका ६९१; तक्ते ६९८; परिशिष्ट ७०९.

संदर्भ सूची : ७१९

सूची : ७२९

छायाचित्रे :

प्रकाशनांची यादी : ७७७

Maharashtra State Gazetteers

अंतर्भूत असलेले नकाशे व छायाचित्रे

नकाशे व आलेख

१. लातूर जिल्हा-भारतातील स्थान
२. लातूर जिल्हा प्राकृतिक
३. लातूर जिल्हा-प्राकृतिक स्वरूप व भौगोलिक वैशिष्ट्ये
४. लातूर जिल्हा उठावदर्शक आराखडा
५. लोकसंख्या विषयक आलेख
६. लातूर जिल्ह्यातील प्रमुख जलसिंचन प्रकल्प
७. किल्लारी भूकंप (३० सप्टेंबर १९९३) समकंप नकाशा
८. लातूर जिल्ह्यातील महामार्ग व लोहमार्ग

छायाचित्रे

१. भूकंपामुळे झालेली हानी, किल्लारी
२. कोसळलेले बांधकाम, किल्लारी
३. उद्ध्वस्त गाव, उत्का
४. क्षतिग्रस्त गाव, जवळगा (पोमादेवी)
५. भूकंपानंतर भूगर्भातील पाण्याच्या पातळीत झालेला बदल
६. लाकडी जोडणीचे खांब, किल्लारी
७. दुभंगलेली जमीन, निम्न तेरणा धरण
८. पुनर्वसनापूर्वीचे लामजना
९. पुनर्वसनानंतरचे लामजना
१०. लातूर जिल्हा निर्मिती उद्घाटन, दि. १६ ऑगस्ट १९८२
११. लातूर जिल्हा निर्मिती रौप्यमहोत्सवानिमित्त राष्ट्रपतींची भेट (दि. १८-०१-२००८)
१२. दि. २६-२-२००६ लातूर-कृषि व पशू प्रदर्शनास मान्यवरांची भेट
१३. दि. २६-९-२००७ रोजी लातूर-उस्मानाबाद या विशेष रेल्वे गाडीचा शुभारंभ
१४. मांजरा साखर कारखाना
१५. विकास साखर कारखाना, निवळी
१६. नगरपरिषद, लातूर
१७. मुख्य प्रशासकीय इमारत, लातूर
१८. जिल्हा परिषद कार्यालय, लातूर
१९. पीक संशोधन केंद्र, लातूर
२०. लातूर येथील उड्डाण पूल
२१. भूयारी मार्ग, शिवाजी चौक, लातूर
२२. नवीन ब्रॉडगेज
२३. दयानंद शिक्षण संस्था, लातूर
२४. महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

Maharashtra Gazetteers

(सहा)

२५. महात्मा बसवेश्वर महाविद्यावय, लातूर
२६. श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर
२७. राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
२८. सूत गिरणी, लातूर
२९. नवीन रेल्वे स्थानक, लातूर
३०. गंजगोलाई, लातूर
३१. मांजरा धरणाचे दरवाजे
३२. भूकंपग्रस्तांची नवीन वसाहत
३३. भूकंपात मृत्यूमुखी पडलेल्यांसाठीचा स्मृतीस्तंभ, किल्लारी
३४. भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन
३५. औषधी वनस्पती असलेली वडवळ नागनाथ येथील टेकडी
३६. एक प्रथा-मेंढीचे लग्न
३७. अंबुलगा साठवण तलाव, ता. चाकूर
३८. निम्न तेरणा प्रकल्प, ता. औसा
३९. देवर्जन मध्यम प्रकल्प, ता. उदगीर
४०. मसलगा मध्यम प्रकल्प, ता. निलंगा
४१. देवणी जातीचे वळू.

Maharashtra State Gazetteers

प्रस्तावना

लातूर जिल्हा दर्शनिका प्रकाशित करताना मनस्वी आनंद होत आहे. शासनाने गॅझेटिअरसाठी ' दर्शनिका ' हा मराठी शब्द स्वीकारला असून जिल्ह्याचे यथार्थ स्वरूप ज्यात व्यक्त होते, दाखविले जाते तो ग्रंथ म्हणजे जिल्हा दर्शनिका (District Gazetteer) होय. या विभागाने केलेल्या सामुहिक परिश्रमाची ही फलश्रूती आहे. वास्तवित गॅझेटिअर ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा झाली आहे. गॅझेटिअरच्या मूळ संकल्पनेत होणारे परिवर्तन स्वाभाविक आहे. गॅझेटिअर म्हणजे प्राकृतिक भूस्वरूप, नद्या, वनसंपदा, स्थळांची भौगोलिक माहिती, लोकांच्या चालीरीती, राजघराण्याचा इतिहास, आर्थिक व्यवस्था, महसूल, प्रशासन आणि पुरावशेषांचा तपशील देणारा कोश ही मूळ संकल्पना प्रमाण मानून गॅझेटिअरच्या कक्षा संकुचित करणे उचित ठरत नाही. नवनवीन संशोधनातून उपलब्ध झालेल्या माहिती आधारे प्रत्येक विषयाच्या विविध पैलूंचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून विवेचन करणे आवश्यक ठरते. नवीन उपलब्ध ज्ञानाआधारे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर नवा प्रकाश टाकणे अपरिहार्य आहे आणि याच दृष्टिकोनातून 'लातूर दर्शनिका' लिहिण्याचा प्रयत्न झाला. मराठी जिल्हा गॅझेटिअर मालिकेतील हे आठवे पुष्प आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात बॉम्बे प्रेसिडेंसीमधील जिल्ह्यांसाठी ग्रंथ निर्मिती झाली. पण निजाम डोमिनिअन्समधील मराठवाड्यासाठी केवळ 'औरंगाबाद जिल्हा गॅझेटिअर' १८८४ मध्ये प्रकाशित झाले. हा ग्रंथ पुनर्मुद्रित स्वरूपात विभागाच्या वतीने सन २००६ मध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे. एम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया, प्रोव्हिन्शिअल सिरिज हैद्राबाद स्टेट या मालिकेत अत्यंत त्रोटक स्वरूपात मराठवाड्यातील तत्कालिन जिल्ह्यांच्या नोंदी झाल्या होत्या. तथापि, परिपूर्ण गॅझेटिअर असे तयार झाले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने निश्चित केलेल्या आकृतीबंधाप्रमाणे तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्यासाठी (१९७२) जिल्हा गॅझेटिअर इंग्रजी आवृत्ती करण्यात आली. याचे संपादन डॉ. भ. ग. कुंटे यांनी केले. यामध्ये तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्यात अंतर्भूत असलेल्या लातूर जिल्ह्याची माहिती दिली आहे. तथापि, या आकृतीबंधाच्या स्वत:च्या अशा काही मर्यादा होत्या. महाराष्ट्रात नव्याने निर्माण झालेल्या जिल्ह्यांपैकी लातूर जिल्ह्यासाठी प्रथमच जिल्हा दर्शनिका प्रकाशित करण्यात येत आहे. हे काम करताना स्वाभाविकपणे विविध क्षेत्रात विशेषत: विद्यापीठ पातळीवर झालेल्या मूलगामी स्वरूपाच्या संशोधनाची तसेच जिल्ह्याच्या विकासविषयक वाटचालीची नोंद घेण्यात आली आहे.

लातूर जिल्हा निर्मितीचाही मोठा इतिहास आहे. सन १९०५ पर्यंत औसा तालुक्यातील एक गाव आणि मोठी बाजारपेठ असलेले हे शहर विकासाच्या दृष्टीने वाटचाल करत असताना दिनांक १६ ऑगस्ट १९८२ रोजी जिल्हा मुख्यालय झाले. १९९९ पर्यंत याचा विस्तार होत दहा तहसिल केंद्रांचा अंर्तभाव असलेला हा जिल्हा झाला. लातूरला उज्ज्वल अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. मराठवाड्यातील हा जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेस आहे. साधारणत: जिल्ह्याची आग्नेय सीमा कर्नाटकातील बिदर जिल्ह्याशी संलग्न आहे. जिल्ह्याचा बहूतेक भाग हा बालाघाट पठारी प्रदेशाचा आहे. मांजरा आणि तिची उपनदी तावरजा, तेरणा तसेच मन्याड, तिरू, घरणी या नद्यांनी हा भाग सुजलाम केला आहे.

मांजरा नदीच्या काठावर अश्मयुगीन काळातील मानवी अस्तित्त्वाच्या खूणा व सुमारे पन्नास हजार वर्षांपूर्वीचे हत्ती, गेंडा, रानम्हैस यांचे जीवाश्म सापडले आहेत. स्वाभाविकपणे या प्राण्यांच्या अस्तित्त्वासाठीचे योग्य पर्यावरण त्या वेळी येथे होते. किल्लारी भूकंपामूळे एकूणच महाराष्ट्राच्या भौगोलिक जडणघडणीचा नव्याने विचार सुरू झाला. आर्कियन खडकामध्ये असलेल्या प्राचीन भ्रंशावर नव्याने हालचाली झाल्यामुळे हा

भूकंप झाला असे मत व्यक्त केले गेले. वास्तवात आर्कियन खडकात साठवलेली ऊर्जा केव्हाच मुक्त झाली आहे. या मृत भूस्तर भ्रंशाचे पुनर्जीवन होऊन नव्याने हालचाली (Reactivation) होत आहेत. नव्याने भूस्तर हालचालींमुळे उत्क्रम भूभ्रंश (Rerersedault) झाले. महाराष्ट्र हा भूप्रदेश भूकंपदृष्ट्या स्थिर आहे ही धारणा नव्याने तपासण्यासाठी ही घटना कारणीभूत ठरते. शिवाय याविषयीची सज्जता हा एक न संपणारा विषय ठरतो. स्थलांतर हा याचा पर्याय ठरू शकत नाही हे देखील स्पष्ट झाले. या सर्व दृष्टीने लातूर जिल्ह्याचे योगदान निश्चितच नोंद घेण्यासारखे आहे. भूकंपग्रस्तांचे इतक्या मोठ्या प्रमाणात नियोजनबद्ध रीतीने झालेले पुनर्वसन हे संपूर्ण देशात आदर्शवत मानले जाईल. सर्व मानवी प्रवृत्तींचे दर्शन होऊनसद्धा निर्मितीक्षम कार्याची क्षमता लातूर जिल्ह्याने स्पष्ट केली हे विशेष.

प्राचीन भारतातील सोळा महाजन पदांपैकी अश्मक या जनपदात लातूरचा समावेश होता. कालांतराने अश्मकाच्या दक्षिण भागाला कुंतल हे नामाभिधान प्राप्त झाले. स्वाभाविकपणे लातूरचा समावेश कुंतल जनपदात झाला. मौर्य काळात इ. स. पू. चौथ्या शतकात या भागाचा अंतर्भाव कर्नाटकातील सन्नती (सुवर्णगिरी) या प्रशासकीय विभागात होई. लातूरजवळील तेर (तगर) ते सन्नती यांना जोडणारा राजमार्ग या जिल्ह्यातून जात होता. शिवाय बलिपट्टण या स्थानाशी सुद्धा सातवाहन काळात या प्रदेशाचा संपर्क होता. लातूरच्या सांस्कृतिक इतिहासाचा तेव्हापासून प्रारंभ होतो असे मानता येते. विशेषत: तगर येथे आढळलेल्या जनपदाच्या स्वतंत्र नाण्यावरून असेही मानता येईल की, ' तगर-लत्तलूर ' ते एक स्वतंत्र जनपद असावे. सातवाहन काळात लातूर जिल्ह्याचा भूभाग या जनपदाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असावा. वाकाटक काळामध्ये वत्सगुल्म शाखेचा देवसेन याच्या प्रभुसत्तेखाली लातूर परिसर होता. ' नांगरकट-उत्तरामार्ग ' या प्रशासकीय विभागात हा भाग येई. इ. स. ६८२ मध्ये सातव्या शतकाच्या उत्तरार्धात लातूर हे राष्ट्रकूटांचे मूळ स्थान असल्याचे श्री. अ. स. अळ्तेकर यांच्यासारख्या ज्येष्ठ संशोधकाने स्पष्ट केले आहे. बदामीच्या चालूक्य काळात ' उच्छिव चत्वारिंशत ' औसा हा चाळीस स्थानांचा अंतर्भाव असणारा एक स्वतंत्र प्रशासकीय विभाग होता. बोरगाव ताम्रपटात याविषयी नोंद आहे. हा विभाग 'नलवाडी' (नळदूर्ग) या मुख्य विषयविभागाचा उपविभाग असावा. एकूण आजच्याच प्रमाणे विविध प्रशासकीय विभागाची निर्मिती व त्यांच्या कमीअधिक होणाऱ्या सीमारेषा विविध राजवटीच्या काळातही आढळतात.

राष्ट्रकूट राजवंशाच्या काळात लातूर राजकीय हालचालीचे केंद्र होते. मानूरच्या राष्ट्रकूटांनी लातूर येथे येऊन वास्तव्य केले. त्यांनी येथे गढीवाड्यांची उभारणी केली. यावेळी लातूर स्थलमहात्म्यातील नोंदीप्रमाणे 'रट्टगिरी' या नावाने ओळखले जाई. रट्टनौर-लत्तनौर-लत्तलूर-लातूर या क्रमाने या स्थानाच्या नावात झालेले परिवर्तन स्पष्ट होते. या वंशातील बलाढ्य असलेल्या दंतीदूर्ग या राष्ट्रकूट राजाची मूळ शाखा लातूर येथीलच होती. दंतीदूर्गाने वेरूळ येथील लेण्यांची निर्मिती केली. कर्नाटकातील मयुरखंडी (मोरखंडी) येथील गोविंदपुत्र अमोघवर्ष हा 'लत्तलुरपूरवराधीश्वर' आणि 'लत्तलूरपूरपरमेश्वर' अशी बीरुदे धारण करीत असे. या राजांच्या दानलेखातून स्पष्ट होते की यांचा लातूर क्षेत्राशी निकट संबंध होता. सन ८०० च्या नंतर लातूर क्षेत्रात राष्ट्रकूटांचे सत्ताकेंद्र आणि त्याचबरोबर शैक्षणिक कार्यासाठी त्यांनी दिलेले अग्रहार विकसित झाल्याचे दिसतात. अहमदपूर तालुक्यातील झरीका (नवकुंडझरी), उमरगा तालुक्यातील लोहारा बुद्रुक तसेच अगदी सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड आणि एरंडोली या स्थानांची नोंद यादृष्टीने उल्लेखनीय आहे. राष्ट्रकूटांची मूळ शाखा जवळपास अर्धशतकापेक्षा जास्त काळ लातूर येथे नांदली. पुढे ८५० मध्ये त्यांनी मान्यखेट येथे स्थलांतर केले. प्रसंगोत्पात त्यांनी मोरखिंडी तसेच मालखेड (जि. बिदर, कर्नाटक), कंधार (जि. नांदेड), बोधन (जि. निजामाबाद, आंध्रप्रदेश) याठिकाणी सत्ताकेंद्र विकसित केले. सुगंधावती (जि. बेळगाव) येथील सौदंतीच्या रट्ट

Maharashtra State Gazeteers

घराण्यातील कान्हरदेव हा स्वत:ला 'लत्तलूरपूरविनिर्गत' म्हणवतो. याच शाखेचा मूळ पुरुष कृष्ण हा 'कंधारपूरवराधिश्वर'असे बिरुद धारण करतो. हे मूळ लातूरचे होते. राष्ट्रकूट राजकन्या कल्याणीच्या चालूक्यांना दिली होती. तर लातूरच्या रट्टांनी आंध्रातील कुल्पक आणि ओरिसातील संभलपूर येथे राज्य संपादन केले. याविषयीची नोंद त्यांच्या अभिलेखातून उपलब्ध आहे. विशेष म्हणजे कल्याणीच्या चालूक्यांचा महासामंत राणक धाडिदेव हा लातूरचा होता. त्याचा दंडनायक हाही लातूरचाच होता. या बाबी या स्थानावरील विजिगुषु व महत्त्वाकांक्षी राजपुरुषांची नोंद करतात. कल्याणीच्या चालुक्याच्या अकराव्या शतकातील पाप विनाशक मंदिरातील लेखात या स्थानाची नोंद 'लत्तलौर' अशी करून हे नगर दिव्य, पूरश्रेष्ठ व वेदविद्येचे केंद्र असल्याचे नोंदवले आहे.

या जिल्ह्यात मिळालेल्या एकूण शिलालेखापैकी अनेक लेख कल्याणीच्या चालूक्य राजवटीशी संबंधित असून कन्नड लिपित आहेत. चालूक्य राजा सहावा विक्रमादित्य याचा सेनापती भीम आणि त्याचा दण्डनायक पुत्र कालिदास याने हिप्पळगाव व गणेशवाडी येथे अनेक मंदिरे उभारली. तसेच पाठशाळा व जलाशयाची निर्मिती केली. महाराष्ट्राच्या जलव्यवस्थापनात आवर्जून नोंद घ्यावी असा 'भीमसागर' हा जलाशय गणेशवाडी येथे सन ३० नोव्हेंबर १०९९ मध्ये निर्माण करण्यात आला. याविषयीचे पुरातत्त्वीय अवशेष व शिलालेख या स्थानावर उपलब्ध आहेत. येथे पाशुपत शैवपंथीयांचे तसेच पर्वतावली आम्नायाच्या शिवलिंगी संतान शाखेचे वास्तव्य होते. पुढे बसवेश्वराने वीरशैव पंथाचे पुनर्संघटन केले. त्याविषयीची पार्श्वभूमी शिवलिंगी संतान व सरस्वती मंडपाद्वारे गणेशवाडी येथून तयार होत होती असे म्हणता येईल. पाचवा भिल्लम या यादव राजाने कल्याणीच्या चालूक्य राजावर आपले प्रभूत्व निर्माण केले. याचवेळी वरंगळ येथे काकतीय राजवंशाची स्थापना झाली. स्वाभाविकपणे या परिसरात यादव व काकतीयांच्या परस्पर प्रभुसत्तेसाठीचा संघर्ष झाल्याचे जाणवते. यादवांचा सेनापती खोलेश्वर याच्या नियंत्रणाखाली ' औसदेश ' आणि ' उदगीरदेश ' हे विभाग होते. याविषयीची नोंद अंबाजोगाई लेखात उपलब्ध आहे. काकतीयाच्या गणपती याने काही काळ नांदेड जिल्ह्यातील भोकर व लातूर जिल्ह्यांतील उदगीर येथे ताबा मिळविला. पुन्हा हा प्रदेश कान्हरदेव यादवांनी सन १२५८ मध्ये हस्तगत केला.

जिल्ह्याशी संबंधित अभिलेखाचा जरी विचार केला तरी वाकाटकराजा देवसेन, बदामी चालुक्याचा पहिला विक्रमादित्य, विनयादित्य, राष्ट्रकूट वंशातील ध्रुव, तिसरा गोविंद, पहिला अमोघवर्ष, दुसरा विजयसिंह, सोमेश्वर पहिला, विक्रमादित्य सहावा, सोमेश्वर तिसरा, यादव राजवंशातील सिंघनयादव, कान्हरदेव आणि सौदंतीचे रट्ट या विविध राजवंशातील राजांचा प्रत्यक्ष या भागांशी संपर्क होता हे स्पष्ट होते.

प्राचीनकाळात तगर प्रमाणेच धाराशिव व अन्य क्षेत्राचा विकास होत होता. लातूर परिसरातील या स्थानांबरोबरच खरोसा लेण्याची निर्मिती बदामीच्या चालूक्य काळात झाली. या लेण्या बौद्ध, जैन व हिंदु धर्मांचे प्रतिनिधित्व करतात. राष्ट्रकूट व उत्तरकाळात जैन आणि पुढे लिंगायतांचा प्रभाव जाणवतो. औसा येथे प्रमुख जैनपीठ होते. करकण्डचरियु या ग्रंथाचा कर्ता कनकामर याचे वास्तव्य कल्याणीच्या चालूक्य काळात औसा येथे होते. जैन धर्मीयांसंबंधीची सविस्तर नोंद रामलिंग मुद्‌गड येथील शिलालेखात आली आहे. येथे मुनी दामनंदी सिद्धांतदेव याच्या आधी दिवाकरनंदी घनकिर्ती आणि अभयनंदी या जैन आचार्यांची नोंद उपलब्ध आहे. श्वेतांबर व दिगंबर पंथीयांचा समन्वय साधणाऱ्या 'यापनीय' संघाच्या अनुयायांचे वास्तव्य लातूर परिसरात आढळते.

या क्षेत्रात लातूर येथील सिद्धेश्वर मंदिर, केशवराज मंदिर, भूतेश्वर मंदिर तसेच निलंगा येथील नीलकंठेश्वर मंदिर, पानगाव येथील विठ्ठल मंदिर, औसा तालुक्यातील बोरगाव, तसेच बोरी, बल्लाळ चिंचोली, मुरुड आणि

(दहा)

गंगापूर याशिवाय अहमदपूर तालुक्यातील झरी बुजुर्ग आणि शिरुर अनंतपाळ, रामलिंग मुदगड, निठूर, भूतमुंगळी येथील विविध मंदिरे या क्षेत्रांच्या दहाव्या ते तेराव्या शतकांपर्यंत होत जाणाऱ्या विकासाची साक्ष देतात. विविध धर्मांच्या बरोबर शैक्षणिक केंद्र पाठशाळा व त्यासाठी म्हणून दिलेले अग्रहार हे या क्षेत्रातील शैक्षणिक परंपरा अधोरेखित करतात.

मध्ययुगात इस्लामिक सत्तेचा प्रभाव या क्षेत्रात होता. खिलजी नंतर बहमनीची सत्ता येथे नांदली . पंधराव्या शतकात गुलबर्गा व बिदर येथे बहमनीच्या विघटनातून नवीन सत्ताकेंद्रे अस्तित्वात आली. औसा येथील सुभेदार कासिम बरीद याने बरीदशाहीची स्थापना केली. या कालखंडात औसा व उदगीर किल्ल्याने विविध संघर्ष अनुभवले यातूनच येथील किल्ल्यांचा विकास झाला. लष्करी व महसूल केंद्रा बरोबर मध्ययुगीन नगररचनेचे उत्तम उदाहरण म्हणून या स्थानांची नोंद करता येते. सतराव्या शतकाच्या प्रारंभी मलिक अंबर याने औसा ताब्यात घेतले. इ. स. १६३६ मध्ये निजामशाहीची अखेर होऊन लातूर जिल्ह्याचा समावेश मोगल साम्राज्यात झाला. उत्तर काळात हैद्राबादचा निजाम आणि पेशवे यांच्यातील संघर्ष उदगीर तांदुळजा परिसरात झाला. याच काळात जिल्ह्यात विविध गढी-वाड्यांची निर्मिती झाली. उत्तर मध्ययुगीन संस्कृतिचे एक वैशिष्ट्य म्हणून याची नोंद प्रथमच या दर्शनिकेत घेण्यात आली आहे. यानंतर झालेल्या स्वातंत्र्याच्या लढ्यातसुद्धा या गढीवाड्यांचे स्वतःचे असे वेगळेपण जाणवते.

निजामी सत्तेविरुद्धचा सर्वंकश संघर्ष हे एक रोमहर्षक पर्व होते. साधारणत: सन १९३८ पूर्वीचा इतिहास हा उद्योगपर्व या सदरात येईल. १९३८ ते १९४६ हे आंदोलनाचे पर्व होते. १९४६ ते ४७ प्रक्षोभक पर्व मानावे लागते तर १९४७ ते ४८ हे प्रत्यक्ष मुक्ती पर्व होय. हैद्राबाद संस्थानाला आणि पर्यायाने आजच्या लातूर जिल्ह्याला १७ सप्टेंबर १९४८ रोजी जे स्वातंत्र्य मिळाले त्याचे श्रेय आर्य समाज, महाराष्ट्र परिषद व स्टेट काँग्रेस यांना द्यावे लागते. समाजातील सर्व घटक या आंदोलनात सहभागी होते. अनेकांनी यासाठी आत्माहुती दिली या आंदोलनाला विविध पैलू असल्याचे दिसतात. गेल्या काही दशकात या संदर्भात विद्यापीठ पातळीवर होणाऱ्या बहुविध संशोधनामुळे अनेक बाबी नव्याने स्पष्ट होत आहेत. निजाम शासनाच्या धोरणाविरुद्ध जनतेचा सर्वंकष उठाव वैशिष्ट्यपूर्ण होता.

साधारणत: १८५१ नंतर वहावी ही एक प्रभावी चळवळ होती. तिचा हेतू इंग्रज व निजामांची सत्ता उलटून टाकणे हा होता. लातूर जिल्ह्यातील मुबारीज उद्दौला व त्याच्या सहकाऱ्यांनी उठाव केला. शेख अब्दुल्ला हे या चळवळीचे नेतृत्व करीत. उदगीर येथील अब्बास अली खान यांनी केलेल्या कामगिरीचा परिणाम म्हणून त्यांची जहागीर काढून घेण्यात आली. १८५७ च्या आंदोलनाचे पडसाद हैद्राबादप्रमाणे लातूर जिल्ह्यामधील उदगीर व निलंगा येथे उमटल्याचे दिसते. १८५७ ते १८६४ पर्यंत सशस्त्र उठावाची एक मालिका सुरू होती. यात रामराव उर्फ जंग बहाद्दुर हे नेतृत्व करत. लातूरचा नेकराम टेलर, बाजीराव पाटील, विठोजी खंडोजी यांसारखी मंडळी यात सहभागी होती. परिणामी ब्रिटिशांनी कोर्टमार्शल करून अहमदाबाद येथे बहात्तर लोकांना फाशी दिली.

याच काळात आर्य समाजाची चळवळ सामाजिक प्रबोधनाचे कार्य करीत होती. उदगीर येथील पं. बन्सीलाल आणि पं. श्यामलाल या बंधूंचे काम विशेष उल्लेखनीय होते. शासकीय दडपशाहीविरुद्ध समाजप्रबोधनाचे काम करतानाच नागरी स्वातंत्र्य व समाजप्रबोधनासाठीही लढा दिला गेला. सन १९३८-३९ मध्ये आर्य समाजाने केलेल्या सत्याग्रह आंदोलनात जवळपास १२००० लोकांचा सहभाग होता. निलंग्याचे शेषराव वाघमारे, लातूरचे दिगंबरराव शिवणगिकर, अहमदपूरचे निवृत्ती रेड्डी, दिगंबरराव लाटकर नेतृत्व करीत होते. याच काळात लातूर येथे लोकमान्य टिळकांनी भेट दिली होती. १९१५ मध्ये हैद्राबाद येथे सोशल

सर्व्हिस लीगची स्थापना झाली. १९१९ मध्ये लातूर येथे पाचवी शिक्षण परिषद झाली. यातून शैक्षणिक सामाजिक व आर्थिक सुधारणांची मागणी होत होती. यात हिंदूंबरोबर मुसलमानांचाही मोठ्याप्रमाणात सहभाग होता. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आंदोलनाचा विस्तार होत होता तसतसे या भागातील केशवराव कोरटकर, वामनराव नाईक, देवीसिंह चौहान अशा अनेकांचा सहभाग घडून आला. १९३७-३८ या दोन वर्षांत विविध घडामोडींना वेग आल्याचे दिसते. महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन १ व २ जून १९३८ रोजी लातूरला झाले. बॅ. श्रीनिवासराव शर्मा हे अध्यक्ष होते. याच वेळी लातूरला महिला परिषदही झाली. राजकीय जागृतीच्या प्रयत्नांबरोबरच निजामी सत्तेविरुद्धचा जो संघर्ष सर्वच थरांत झाला त्यात आर्य समाजाबरोबर हिंदू महासभेचाही सहभाग होता. याच वेळी सुरू असलेले ' वंदे मातरमचे ' आंदोलन व विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी नागपूर विद्यापिठाने घेतलेली भूमिका याची नोंद घ्यावी लागेल. या सर्व बाबींची नोंद 'ईस्टर्न टाईम्स', 'डेक्कन टाईम्स' सारख्या वृत्तपत्रांमधून होत होती. 'इत्तेहद-उल-मुसलमीन' ही संघटना स्वातंत्र्य आंदोलनात अत्यंत उपद्रवकारक ठरली. कासिम रझवी हा लातूर येथीलच होता. परिणामी तीव्र दडपशाही होत होती. उलट याचा प्रतिकार जनतेतून उत्स्फूर्तपणे होत होता. आर्य वीर दल, किसान वीर दल यासारखे तरुणांचे गट अन्यायाविरुद्ध प्रतिकार करीत. हाडोळीचे मोहनराव पाटील यांचा लढा उल्लेखनीय ठरतो. ७ ऑगस्ट १९४७ ला मुक्तीसंग्रामाचे शेवटचे पर्व सुरू झाले. स्वामी रामानंदतीर्थ यांनी 'हिंदी संघराज्य समावेश दिन' म्हणून ७ ऑगस्ट घोषीत केला. परिणामी आंदोलन तीव्र झाले. २ सप्टेंबर १९४७ राष्ट्रीय ध्वज दिन पाळण्याचे ठरविण्यात आले. लातूर येथील गोलाईतील टॉवरवर तिरंगा झेंडा लावण्याचे श्रेय रघुवीर शिंदे, श्यामराव किल्लारीकर, करणसप्पा हांडे यांच्याकडे जाते. १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन साजरा करणे, जंगल सत्याग्रह, साराबंदी आंदोलन, शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, खेडी स्वतंत्र करणे, लेव्ही भरण्यास नाकारणे यासारख्या अनेक बाबींतून संघर्ष तीव्र होत गेला. दिगंबरराव बिंदू यांनी दिल्ली येथे महात्मा गांधींबरोबर चर्चा करून सरहद्दीबाहेर सशस्त्र कॅम्प उभारण्याचा मनोदय स्पष्ट केला होता. निजामी राज्याच्या सीमेवर उभारलेले कॅम्प प्रत्यक्ष कृती करणारे होते. चिंचोली, गोडेगाव, वाघोली यांसारखे कॅम्प कार्यरत होते. १५ ऑगस्ट १९४८ च्या स्वातंत्र्यदिनाचा पहिला वाढदिवस साजरा करण्यासाठी फुलचंद गांधी यांच्या नेतृत्वाखाली पासष्ट गावांच्या समूहाचे मूक्तीपूर स्वराज्य स्थापन करण्यात आले. यांसारख्या अनेक बाबींचा परिणाम म्हणून १७ सप्टेंबर १९४८ ला लष्करी कार्यवाही होऊन मराठवाडा स्वतंत्र झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत मराठवाड्याचे कुठल्याही अटीशिवाय असलेला सहभाग व त्यातून पुढे झालेली वाटचाल महत्त्वपूर्ण ठरते. आज महाराष्ट्राचे नेतृत्व करणारा व देशपातळीवर नेतृत्व पुरविणारा लातूर जिल्हा सर्व क्षेत्रात अग्रेसर आहे.

लातूर जिल्ह्याला अभिमानास्पद असा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. 'रत्नपूर महात्म्य' या स्थल महात्म्यात मयूरध्वज व त्याचा पूत्र ताम्रध्वज या पौराणिक राजवंशांचा संबंध रत्नपूर स्थानाशी दाखविला आहे. ऐतिहासिकदृष्ट्या राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष पहिला हा लत्तलूर या नगरीचा अधिपती होता. राष्ट्रकूट, चालूक्य व यादव काळात हे एक संपन्न नगर होते. जिल्ह्यामध्ये जैन, महानुभाव, वारकरी, लिंगायत, रामदासी, गानपत्य, दत्त या संप्रदायाबरोबरच नागेश संप्रदायाचे अस्तित्त्व किल्लारी येथे होते. विनयादित्याच्या (इ. स. ५९९) कासारशिरसी ताम्रपटाची नोंद दर्शविते की, चालुक्य काळात येथे विद्वानांना वेदाभ्यासासाठी दान दिले होते. विक्रमादित्य सहावा याच्या काळातील गणेशवाडी येथे सन १०९९ चा शिलालेख आहे. या लेखात शिवलिंगी-संतान परंपरा तसेच लाकुलेश्वरमत व पर्वतावली संप्रदाय या शैव परंपरा येथे अध्ययन व अध्यापन करीत होत्या. यासाठी गणेशमंदिर व पाठशाळा उभारण्यात आल्या. तसेच विशेष अनुदान उपलब्ध करून देण्यात आले होते. या जिल्ह्यात विद्येची आराधना आजही सुरू आहे.

संत परंपरेचा विचार करता नागेश संप्रदायातील संत कवी, तसेच सारसा येथील शिवकालीन गणेशनाथ महाराज यांचा 'गोरक्षबोध' हा ओवीबद्ध ग्रंथ. उदगीर येथील वीरशैव संप्रदायातील हवगीस्वामी यांचा मठ, निलंगा येथील वीरनाथ महाराज ज्यांनी वीर शैव आणि वारकरी संप्रदायाचा समन्वय घडवून आणला व लिंगायत वारकरी संप्रदायाची स्थापना केली. मल्लनाथ महाराजांनी ही परंपरा पुढे चालविली. याच मालिकेत रंगनाथ कृष्ण दीक्षित उर्फ सेलूकर महाराज यांची नोंद करावी लागते. यांनी सोमयागी यज्ञ परंपरा चालवली. किशन महाराज साखरे हे पानचिंचोली ता. निलंगा येथील होते. त्यांनी ज्ञानेश्वरीची ताम्रपटावर मुद्रित प्रत तयार केली. अशा कितीतरी संतांची भूमी म्हणून याचा उल्लेख करावा लागतो.

साहित्यिकांच्या परंपरेत या जिल्ह्याचे योगदान उल्लेखनीय आहे. सेतू माधवराव पगडी निलंगा येथील होते. श्री. देवीसिंह चौहान यांचे प्राच्यविद्येतील योगदान उल्लेखनीय आहे. तसेच प्राचार्य ना. य. डोळे, श्री. प्र. इ. सोनकांबळे, डॉ. चंद्रकांत देऊळगावकर, डॉ. विनय अपसिंगेकर, प्रा. प. भ. शहाशिंदे, प्रा. कृष्णचंद्र ज्ञाते, श्री. शंकर झुल्पे, श्री. रा. र. बोराडे, डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. सूर्यनारायण रणसुभे, डॉ. नागोराव कुंभार, अशा अनेकांनी विविध क्षेत्रात केलेले काम उल्लेखनीय आहे. नव्या पिढीतील अतुल देऊळगावकर आणि जयदेव डोळे सारखी मंडळी हा वारसा पुढे चालवित आहेत. अर्थात ही नोंद प्रातिनिधीक आहे.

एकूणच जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्ये, इतिहास आणि सांस्कृतिक परंपरा, लोकजीवन, कृषी व जलसिंचन यातील नवीन प्रयोग, नैसर्गिक आपत्तीसाठी स्वतंत्रपणे घेतलेला सर्वंकश आढावा आणि उद्योगधंदे, सहकारी साखर उद्योगांचे यश, फळबाग उत्पादनाची होणारी परदेशी निर्यात, बँक व्यवसाय व्यापार व वाणिज्य, वाहतूक व दळणवळण या क्षेत्रातील उपलब्धी आणि आर्थिक विकासाचा वेग, प्रशासन, सामाजिक सेवा क्षेत्रातील कार्य आणि संपूर्ण जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा ज्यात कला, नाट्य, क्रीडा साहित्य परंपरेचा सर्वंकष वेध घेण्याचा प्रयत्न झाला आहे. जिल्ह्यातील पर्यटन स्थळे, ज्यात ऐतिहासिक व धार्मिक महत्त्वाची स्थाने यांचा परिचय आला आहे.

मूलत: गॅझेटिअरसारख्या ज्ञानशाखेची सातत्याने होणारी वाटचाल आणि पुनरावृत्ती ही निरंतर सुरू असणाऱ्या संशोधन प्रक्रियेचा एक भाग ठरतो. विभाग प्रमुखांसह सर्व सहकाऱ्यांनी केलेले प्रत्यक्ष सर्वेक्षण विविध पातळीवरील शासकीय व निमशासकीय संस्था तसेच व्यक्तींकडून प्राप्त झालेली माहिती याचे संकलन व संपादन करताना संपादक मंडळाचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन यातून साकारलेला हा ग्रंथ आहे. जिल्हा निर्मितीची पंचवीस वर्षे होताना पूर्ण झालेले लातूर गॅझेटिअर ऐतिहासिक संदर्भ साहित्यात मोलाची भर घालेल असा विश्वास आहे.

लातूर जिल्हा दर्शनिका (गॅझेटिअर) प्रकाशित करताना त्यात जाणीवपूर्वक विविध क्षेत्रातील विकासविषयक माहिती दिली असून या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणून ज्याची नोंद करता येईल अशी ग्रामनिर्देशिका दिली आहे. परिणामी ग्रंथाची पृष्ठसंख्या विचारात घेता ग्रंथ हाताळण्याच्या दृष्टीने सोईचा व्हावा या दृष्टीने ही दर्शनिका नागपूर जिल्हा दर्शनिकेप्रमाणे दोन भागात प्रकाशित करण्यात येत आहे. प्रथम भागात प्रकरण १ ते ९ याचा समावेश करण्यात आला असून दुसऱ्या भागात प्रकरण १० ते १२ आणि ग्रामनिर्देशिकेचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

या विभागाच्या वतीने सर्व पूर्व प्रकाशित राज्य व जिल्हा दर्शनिका तसेच ब्रिटिश कालिन जिल्हा गॅझेटिअर्स यांचे ई-बुक आवृत्तीमध्ये रूपांतर करण्याचे काम पूर्ण झाले असून महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर (www.maharashtra.gov.in.) ते उपलब्ध करून देण्यात आले आहे. या क्षेत्रात विभागाने केलेले काम निश्चितच उल्लेखनीय आहे. राज्य दर्शनिका मालिकेत महाराष्ट्रातील "वनस्पतीशास्त्र आणि

वनसंपदा'' या ग्रंथाचे प्रकाशन झाले असून ''औषधी वनस्पती'' या राज्य गॅझेटिअरची दुसरी आवृत्ती आम्ही नुकतीच प्रकाशित केली आहे ही बाब विशेषत्वाने नोंदविता येईल तर 'लँड ॲण्ड इट्स पिपल' या गॅझेटिअरचे मुद्रण सुरू आहे. जिल्हा गॅझेटिअर ग्रंथामध्ये नांदेडचे काम सुरू आहे.

विविध विषयांतील माहिती संकलन करताना प्रकाशनास विलंब होत असल्याची जाणीव व विभागाच्या मर्यादा लक्षात घेऊन आम्ही ही दर्शनिका प्रकाशित करीत आहोत. मूळात एक भौगोलिक कोश या प्रारंभिक संकल्पनेपासून ब्रिटिशांना प्रशासनासाठी माहिती पुरविणारा ग्रंथ आणि आज बदलत्या दृष्टिकोनातून समाजाभिमुख शासन या संकल्पनेचा स्वीकार केल्यावर विविध क्षेत्रातील विकासविषयक संकल्पनांचा आराखडा मांडताना सहाय्यभूत ठरणारा ग्रंथ म्हणून ही दर्शनिका अपेक्षित आहे. या दृष्टीने झालेला प्रयत्न सर्व स्तरांतील संशोधक, विद्यार्थी, अभ्यासू नागरिक आणि प्रशासक यांना उपयुक्त ठरेल अशी आशा व्यक्त करतो.

मुंबई,
महाराष्ट्र दिन,
१ मे, २००८
(चैत्र, कृष्ण ११, शके १९३०).

डॉ. अरुणचंद्र शं. पाठक,
कार्यकारी संपादक व सचिव.

Maharashtra State Gazetteers

ऋणनिर्देश

भारतामध्ये गॅझेटिअर निर्मितीसाठी म्हणून तत्कालिन ब्रिटिश शासनाने बॉम्बे प्रेसिडेन्सी आणि सेंट्रल प्रोव्हिन्सेस अशा दोन स्वतंत्र केंद्रांसाठी काम केले. यातून गॅझेटिअर निर्मितीच्या दोन स्वतंत्र परंपरा रूढ झाल्या. असे असले तरी निझामी अंमलाखाली असलेल्या मराठवाड्यासाठी जिल्हानिहाय, विस्तृत गॅझेटिअर लिहिली गेली नाहीत. केवळ औरंगाबाद जिल्ह्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात गॅझेटिअर लिहिले गेले. हे या विभागाने २००६ मध्ये पुनर्मुद्रित स्वरूपात उपलब्ध करून दिले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तत्कालिन मराठवाड्याच्या ५ जिल्ह्यांसाठी भारत सरकारने निश्चित केलेल्या आकृतीबंधाप्रमाणे इंग्रजीमधून जिल्हा गॅझेटिअर ग्रंथाची निर्मिती करण्यात आली. आजच्या लातूर जिल्ह्याचा अंतर्भाव प्रामुख्याने तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्यात होत असे.

तथापि नव्याने अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्रातील एकूण जिल्ह्यांपैकी लातूर जिल्ह्यासाठी प्रथमच जिल्हा दर्शनिका प्रकाशित करण्यात येत आहे. स्वाभाविकपणे संपूर्णतः नव्याने लिहिलेली ही दर्शनिका प्रकाशित करताना जिल्ह्याच्या सर्वांगिण वैशिष्ट्यांचा परिचय व्हावा या दृष्टीने प्रयत्न झाला. असे असले तरी ग्रंथातील माहिती संकलित केल्यानंतर प्रकाशनास बराच विलंब होत असल्यामुळे यामध्ये अपरिहार्यपणे मंदन अवधी (Time Lag) गेलेला आहे. हे मी नम्रपणे नमूद करतो. वस्तूतः प्रत्यक्ष ग्रंथ प्रकाशित होईपर्यंतच्या प्रक्रियेत विविध पातळ्यांवर अनेकांचे सहकार्य लाभले आहे. विविध शासकीय कार्यालये, निम-शासकीय कार्यालये व संस्था तसेच अनेक मान्यवर जिज्ञासू अभ्यासक व जाणकार मार्गदर्शक, संपादक मंडळ सदस्य यांच्या मदत, मार्गदर्शन व सक्रिय सहभागाशिवाय ग्रंथ पूर्ण करणे शक्य नव्हते. सर्व पातळीवर हा सहभाग लाभला. या ग्रंथाचे काही वेगळेपण म्हणून ठळकपणे अधोरेखित करता येईल. त्यात कृषी व जलसिंचन प्रकरणांतर्गत स्वतंत्र प्रकरणच व्हावे या पध्दतीने नैसर्गिक आपत्तीविषयीचे व त्यानंतर लातूर जिल्ह्याचे एकूण योगदान याची विस्तृत नोंद केली आहे. ही नोंद आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात सर्वांसाठी आदर्श ठरावी अशीच आहे. तसेच जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामविषयीचे तपशील पुरविणारी ग्रामनिर्देशिका (Directory of Village and Towns) दिली आहे. यासाठी प्रामुख्याने जिल्हा परिषद व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या गटविकास अधिकारी (बी.डी.ओ.) आणि ग्रामसेवकांनी दिलेले सहकार्य निश्चित मोलाचे आहे.

लातूर जिल्हा गॅझेटिअर ग्रंथनिर्मितीची संकल्पना आणि प्रत्यक्ष ग्रंथ निर्मिती या कालावधीमध्ये दोन संपादक मंडळांचे मार्गदर्शन लाभले. प्रथम संपादक मंडळातील डॉ. जनार्दन वाघमारे सर, निवृत्त कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड यांचे योगदान मोलाचे राहिले.

डॉ. वाघमारे सर केवळ संपादक मंडळ सदस्य म्हणूनच नव्हे तर एक जाणकार व्यक्ती, साहित्यिक व योग्य मार्गदर्शक अशा विविध स्वरूपामध्ये ग्रंथ निर्मितीमागे होते. नवीन संपादक मंडळामध्ये डॉ. के. बी. पाटील, कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यासह ज्येष्ठ सदस्य म्हणून डॉ. म. के. ढवळीकर, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, डॉ. भा. ल. भोळे, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. सूर्यनारायण रणसूभे, डॉ. जयकुमार मगर, प्राचार्य स. दि. महाजन, प्राचार्य डॉ. भागवतराव ढेंगळे, डॉ. प्रभाकर देव, डॉ. श्रीनिवास ओमनवार, डॉ. एस. जी. देवगावकर, डॉ. शेषराव मोरे यांचे योगदान लाभले. विशेषतः जिल्ह्याशी संबंधित असणारे ज्येष्ठ साहित्यिक व कृतीशिल कार्यकर्ते म्हणून मी डॉ. नागोराव कुंभार व डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांचा विशेषत्वाने उल्लेख करू इच्छितो.

Maharashtra Gazeteers

विद्यमान ग्रंथामध्ये सहयोगकर्ते लेखक म्हणून पुढील मान्यवरांनी योगदान दिले आहे.

भूगोल प्रकरण एक मध्ये जिल्ह्याचे भौगोलिक वैशिष्ट्य या भागाचे लेखन डॉ. जयकुमार मगर यांनी केले आहे. डॉ. र. सु. पप्पू यांनी भूशास्त्र व खनिज संपत्ती यावर लेखन केले आहे. किल्लारी भूकंपाच्या पार्श्वभूमीवर यांनी शास्त्रीय पध्दतीने या भागाचा मागोवा घेतला. डॉ. वा. ना. नाईक यांनी वनसंपदा या भागाचे लेखन केले असून वडवळ येथील औषधी वनस्पतींची विस्तृतपणे नोंद घेतली आहे.

इतिहास या प्रकरणात प्राचीन काळाविषयीचे लेखन डॉ. हरिहर ठोसर यांनी केले आहे. हे लेखन करताना त्यांनी जिल्ह्याच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून घेतलेला आढावा प्रथमच या दर्शनिकेत घेण्यात आला. मध्ययुगीन इतिहासाचे लेखन प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे व डॉ. सुनिल पुरी यांनी केले आहे. आधुनिक कालखंडासंदर्भात मूळ लेखन डॉ. पी. व्ही. काटे यांनी केले असून ते परिपूर्ण करण्यासाठी म्हणून संपादक मंडळ सदस्य डॉ. भागवतराव ढेंगळे सर व डॉ. शिवराज बोकडे यांनी योगदान दिले आहे. याच प्रकरणामध्ये लातूर जिल्ह्याशी संबंधित कोरीव लेखांची तालिका व कोरीव लेखातील स्थलनामे हे परिशिष्ट डॉ. हरिहर ठोसर यांनी करून दिले आहे. तर लातूर जिल्ह्यातील मध्ययुगीन शिलालेख व नाणी या विषयीची नोंद श्री. दिलीप बलसेकर यांनी केली आहे.

कृषि व जलसिंचन या प्रकरणात नैसर्गिक आपत्तीविषयी विशेषत: भूकंपप्रवण क्षेत्र व त्यानंतरचे कार्य या संदर्भातील नोंद डॉ. अ. शं. पाठक यांनी केली आहे. तर जिल्ह्यातील क्षतिग्रस्त स्मारकांचे जतन यासंदर्भात श्री. के. दे. कावडकर यांनी लेखन केले आहे. या प्रकरणातील भूकंपाची ऐतिहासिक नोंद हे परिशिष्ट महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक यांनी केले आहे. संस्कृती या प्रकरणामध्ये जिल्ह्याच्या सांस्कृतिक वारशाचा सर्वांगानी नोंद करण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. सु. ग. जोशी यांनी लातूर जिल्ह्यातील वैदिक परंपरा व प्राचीन वाङ्मयाचा परिचय करून दिला आहे. तसेच शिलालेख व ताम्रपटामधून व्यक्त होणाऱ्या साहित्य परंपरेची त्यांनी नोंद केली आहे. जिल्ह्यातील साहित्य व संत परंपरा याविषयीचे लेखन प्रा. भगवान काळे यांनी केले असले तरी त्या जिल्ह्यातील जाणकारांबरोबर केलेल्या चर्चेनंतर काही अधिक माहितीची नोंद डॉ. सूर्यनारायण रणसूभे, श्री. नागोराव कुंभार यांसारख्या मान्यवरांनी केली आहे. हिंदी साहित्याच्या संदर्भात डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी केलेली नोंद उल्लेखनिय आहे. जिल्ह्याच्या संगीत परंपरेसंदर्भात स्थानिक मान्यवरांबरोबर झालेल्या प्रत्यक्ष मुलाखतीनंतर अधिक नोंद केलेली आहे. नाट्यक्षेत्राच्या संदर्भात प्राचार्य क. हे. पुरोहित, प्राचार्य विभाकर मिरजकर यांच्याबरोबरच श्री. श्रीराम गोजमगुंडे यांच्याशी झालेला संवाद तसेच दै. लोकमतचे संपादक श्री. जयप्रकाश दगडे यांनी वेळोवेळी काढलेल्या विशेषकांचीही नोंद घेण्यात आली आहे. चित्रपटक्षेत्रात या जिल्ह्याचे योगदान विशेष उल्लेखनिय आहे. शिल्पकला व चित्रकला याविषयी श्री. महारुद्र मंगनाळे, प्रा. पंडितराव देशमुख यांच्या लेखनाचा उपयोग झाला असून श्री. दत्ता बनसोडे तसेच श्री. लहरीकांत शहा यांनी आपली चित्रे या दर्शनिकेसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रासंदर्भातील विस्तृत नोंद प्रा. नंदकुमार मेगदे यांनी केली आहे. याप्रमाणे विविध तपशील देण्याचा प्रयत्न झाला असला तरीही या सर्वंकष नोंदी नसून प्रातिनिधीक नोंदी आहेत असेच मानावे लागेल. जिल्ह्यातील वृत्तपत्र व पत्रकारिता याविषयीची नोंद करताना श्री. सुधाकर कुलकर्णी व अन्य मान्यवर यांच्याशी झालेला संवाद तसेच उदगीर येथील श्री. दिनकर कुलकर्णी, श्री. सुभाष देशपांडे, डॉ. सुधाकर देशमुख तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची मदत झाली आहे. दर्शनिकेतील प्रकरणे संपादक मंडळ सदस्य तसेच जिल्ह्याशी संबंधित स्वीकृत सदस्यांनी पाहिली आहेत. शिवाय डॉ. र. पु. कुरुलकर व सुभाष देशपांडेसारख्या अभ्यासकांनी संबंधित प्रकरणे पाहिली आहेत. प्रेक्षणीय स्थळे या

प्रकरणामध्ये डॉ. सुनील पुरी यांनी मध्ययुगीन गढी-वाड्यांविषयी लेखन केले असून ही नोंद या दर्शनिकेचे वेगळेपण ठरावे. जिल्ह्यातील हुतात्मा स्मारकांची तालिका जिल्हाधिकारी कार्यालयाने उपलब्ध करून दिली असून ग्रामनिर्देशिकेचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या सहकार्याने शक्य झाले आहे. याप्रकारे गॅझेटिअर निर्मिती प्रक्रियेत अनेकांचा सहभाग राहिला असल्याने या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

गॅझेटिअर लेखनाच्या प्रक्रियेत या कार्यालयातील सर्वश्री दि. प्र. बलसेकर, सहसंपादक, रा. र. हनवतकर, उपसंपादक, श्री. त्रिं. मा. केंद्रे, श्री. प्र. रा. गवळी, ध. जि. नावडकर, हे संशोधन अधिकारी तसेच के. झिं. राऊत, सु. श्री. गायकवाड, रा. स. कुंभार, शा. का. मर्गज, अं. रा. पवार, तु. भा. सुकाळे, वै. व. पुजारी, दि. वि. भगत, चा. पां. शेवाळे, रा. र. वळवी, श्री. श. दराडे, स्व. शै. फडके या सर्व सहायक संशोधन अधिकाऱ्यांबरोबरच कार्यालयातील लघुलेखक, सहायक तसेच विविध स्तरावरील कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे व महाराष्ट्र सदुर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांनी जिल्ह्याचे नकाशे पुरविले असून व्यंकटराव नाईक बावणे यांचे छायाचित्र व निलंगा येथील शिल्पपट याचे छायाचित्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संग्रहालय यांच्या सौजन्याने देत आहोत. ग्रंथाची सुबक छपाई एका मर्यादित वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल श्री. प. ज. गोसावी, संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशन, मुंबई तसेच व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व त्यांचे सर्व सहकारी यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

हे गॅझेटिअर व्हावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करून आग्रही रहाणारे मा. ना. श्री. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री, श्री. अशोक चव्हाण, मंत्री, सांस्कृतिक कार्य, श्री. राणा जगजितसिंह पाटील, राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचा मी ऋणी आहे. या विभागास सातत्याने प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणारे डॉ. जॉयस शंकरन, अपर मुख्य सचिव व श्री. भूषण गगराणी, सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचा मी ऋणी आहे.

Maharashtra State Gazetteers

मुंबई,
महाराष्ट्र दिन,
१ मे, २००८
(चैत्र, कृष्ण ११, शके १९३०).

डॉ. अरुणचंद्र शं. पाठक,
कार्यकारी संपादक व सचिव.



प्रकरण १: भूगोल

- भौगोलिक सीमा
- प्राकृतिक रचना
- प्राकृतिक विभाग
- नद्या
- भौगोलिक प्रदेश
- भूशास्त्र व खनिज संपत्ती
- किल्लारी भूकंप
- हवामान
- वनसंपदा
- मत्स्यव्यवसाय विकास
- तक्ते

प्रकरण १

भूगोल *

लातूर जिल्हा हा मराठवाडा विभागातील एक असून तो १७° ५२′ ते १८° ५०′ उत्तर अक्षांश आणि ७६° १८′ ते ७९° १२′ पूर्व रेखाशांत पसरलेला आहे. सन १९९१ च्या जनगणना अहवालानुसार जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७.१५७ चौ.कि.मी. असून २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या २०,८०,२८५ होती. १९९१ च्या जनगणनेनुसार राज्यात क्षेत्रफळानुसार जिल्ह्याचा २६ वा आणि लोकसंख्येनुसार २४ वा क्रमांक लागतो. राज्याच्या क्षेत्रफळापैकी २.३३ टक्के क्षेत्र आणि २.१२ टक्के लोकसंख्या जिल्ह्यात आहे. औरंगाबाद विभागातील क्षेत्रफळापैकी ११.३४ टक्के क्षेत्र लातूर जिल्ह्याचे आहे.

जिल्हा नामाची व्युत्पत्ती : कल्याणचा चालुक्य राजा भूलोकमल्ल याचा लेख १०४९ प्रवंगनाम संवत्सर, फाल्गुन शु.८. शुक्रवार इ.स.१०, फेब्रुवारी ११२८ चा आहे. यातील नोंदीनुसार राष्ट्रकूट वंशातील पहिला अमोघवर्ष आणि सौंदतीच्या रट्ट राजांनी स्वत:ला लत्तलूरपुरपरमेश्वर, लत्तलूरपुर व राधीश्वर अशा पदव्या धारण केल्या होत्या. लातूर या मूळ स्थानाची नोंद इ.स.च्या सातव्या शतकापासून ते चौदाव्या शतकापर्यंत विविध अभिलेखांत लत्तलूर, लत्तनूर आणि लत्तलौर अशाप्रकारे उपलब्ध होते व हेच नाव पुढे लातूर या नावाने रूढ झाले. या स्थानाशी राष्ट्रकूट सौंदतीचे रट्ट, कल्याणीचे चालुक्य, यादव यांच्या संबंधातील स्पष्ट नोंद उपलब्ध आहे, तर पुढील काळात बहमनी, त्यांच्या शाह्या, निजामशाही, नंतर मोगल आणि हैद्राबादचा निजाम यांची सत्ता या प्रदेशात होती. मोगल काळात लातूरला ' लाटपूर ' हे नाव होते.[१]

जिल्हा निर्मितीचा इतिहास : निजामाच्या कारकिर्दीत १८६० ते १९०४ पर्यंत नळदुर्ग हे जिल्ह्याचे ठिकाण होते. त्यानंतर सन १९०४ मध्ये उस्मानाबाद जिल्हा अस्तित्वात आला. सन १९०५ मध्ये नळदुर्ग आणि वाशी या दोन तालुक्यांच्या मुख्यालयात बदल करून वाशी ऐवजी कळंब व नळदुर्गऐवजी तुळजापूर हे तालुके झाले. लातूर त्यावेळी औसा तालुक्यातील एक गाव होते. औसा या तालुक्याच्या ठिकाणाचे मुख्यालय लातूरला आणले व लातूर या तालुक्याची निर्मिती झाली.

हैद्राबादच्या निजामी राज्यात उस्मानाबाद हा सर्वात मोठा जिल्हा होता. दिनांक १७ सप्टेंबर १९४९ मध्ये हा प्रदेश भारतात विलीन झाला. सन १९५० मध्ये सर्व तालुक्यांची पुनर्रचना करण्यात आली. त्यावेळी औसा व उमरगा हे दोन तालुके निर्माण केले. पूर्वी बिदर जिल्ह्यातील अहमदपूर, निलंगा व उद्गीर हे तीन तालुके उस्मानाबाद जिल्ह्यास जोडले होते. सन १९५६ मध्ये उस्मानाबाद जिल्हा तत्कालीन मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ ऑक्टोबर १९८१ रोजी लातूर जिल्हा निर्मितीची घोषणा केली. त्यानंतर या कामासाठी दिनांक १७ एप्रिल १९८२ रोजी उच्चाधिकार समिती नेमली. जिल्ह्याच्या सीमा निश्चित करणे व इतर कायदेशीर तरतुदी पूर्ण करण्यासाठी उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महसूल व वनविभागाचे सहायक सचिव यांच्या उपसमितीने ठिकठिकाणी भेटी

---

* डॉ. मगर, जयकुमार, निवृत्त प्रपाठक भूगोल विभाग, मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद, यांनी या भागाचे लेखन केले आहे.

१. हबीब इरफान, ॲन ॲटलॉस ऑफ दि मुघल एम्पाअर, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली, १९८२ पृष्ठ ६१. एचएफ ४१३७—२अ

देऊन तेथील विविध संघटना, समित्या, स्थानिक जनता यांच्या सूचना ऐकून घेऊन अभ्यास केला आणि लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने जिल्हा, तालुके व गावे यांच्या सीमा निश्चित करून उस्मानाबाद, बीड आणि सोलापूर या तीन जिल्ह्यातील काही भागाचे विभाजन करून दिनांक १६ ऑगस्ट १९८२ पासून लातूर जिल्हा निर्माण करण्यात आला.[२] सध्या लातूर जिल्ह्यात असलेल्या तालुक्यातील स्थित्यंतरे ही उस्मानाबाद जिल्ह्यांशी संबंधित आहेत.

जिल्हा निर्मितीच्या वेळी या जिल्ह्यात लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा, आणि औसा या पाच तालुक्यांचा तसेच बीड जिल्हयातील अंबेजोगाई तालुक्यातील रेणापूर महसूल मंडल मधील ४३ गावे आणि ११ वाड्यांचा समावेश करण्यात आला. ती गावे पुढीलप्रमाणे :- १. मोरवड, २. चाटगाव, ३. मोटेगाव, ४. वांगदरी, ५. पळसी, ६. लखमापूर, ७. भोकरंबा, ८. डिघोळ देशमुख, ९. डिघोळ देशपांडे, १०. इट्टी, ११. खानापूर, १२. कुंभारी, १३. शेरा, १४. आंदलगाव, १५. सिंधगाव, १६. सांगवी, १७. बावची, १८. कोळगाव, १९. गव्हाण, २०. बोरगाव (बु.), २१. इंद्रठाणा, २२. पोहरेगाव, २३. नागापूर, २४. निवाडा, २५. रेणापूर, २६. दवणगाव, २७. बीटरगाव, २८. कामखेडा, २९. टाकळगाव, ३०. सुमठाणा, ३१. समसापूर, ३२. आरजखेडा, ३३. महापूर, ३४. खरोळा, ३५. हारवाडी, ३६. पानगाव, ३७. मुरढव, ३८. मूर्ती, ३९. गरसुळी, ४०. फरदपूर, ४१. वाला (वाडा), ४२. हनमंतवाडी, ४३. आनंदवाडी (शिवाय धनसरगाव, टाटापूर, भंडारवाडी, माणस मारवाडी, पाथरवाडी, मुसळेवाडी, फावडेवाडी, रामवाडी, कुंभारवाडी, रामवाडी, बंजारवाडी, ह्या अकरा वाड्या ही समाविष्ट)

दिनांक १५ ऑगस्ट १९९२ ला अहमदपूर, लातूर आणि उदगीर तालुक्यांची पुनर्रचना करून चाकूर आणि रेणापूर हे दोन तालुके निर्माण करण्यात आले.[३]

पुढे लातूर जिल्ह्यातील उदगीर आणि अहमदपूर या तालुक्यांची पुनर्रचना करून जळकोट[४] तालुका तसेच उदगीर तालुक्याची पुनर्रचना करून देवणी[५] तालुका आणि निलंगा तालुक्याची पुनर्रचना करून शिरुर-अनंतपाळ[६] या तीन नवीन तालुक्यांची निर्मिती करण्यात आली.[७] त्यामुळे जिल्ह्यात सध्या लातूर, चाकूर, रेणापूर, औसा, अहमदपूर, उदगीर, निलंगा, देवणी, जळकोट आणि शिरुर-अनंतपाळ हे दहा तालुके आहेत. तसेच लातूर आणि उदगीर हे दोन उपविभाग आहेत. जिल्ह्यात महसूल प्रशासनाच्या सोयीसाठी १९ महसूल विभाग, १६८ तलाठी सजे आणि १,४३,९१९ खातेदार आहेत.

लातूर जिल्ह्यात एकूण ९८६ गावे आहेत. त्यापैकी ७८६ ठिकाणी ग्रामपंचायती आहेत. २३ गावे ओसाड आहेत. शहरांची एकूण संख्या ५ आहे.

भौगोलिक सीमा : या जिल्ह्याचे अगदी पूर्वेकडील स्थान व अगदी पश्चिमेकडील स्थान यातील अंतर १०६ कि.मी., तर अति उत्तरेकडील व अति दक्षिणेकडील स्थान या दरम्यानचे अंतर १०९ कि.मी. आहे.

---

२. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण मध्ये दिनांक १३ ऑगस्ट १९८२ ला महसूल आणि वन विभागाच्या प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार क्रमांक-आरईएन-४३८१/ ४५६७ (९८७) एम-१० नुसार लातूर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली.

३. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण मध्ये दिनांक १४ ऑगस्ट १९९२ ची महसूल व वन विभागाची अधिसूचना क्रमांक आरईएन-४३९२/सीआर-१३१/एम-१०.

४. महसूल व वन विभाग अधिसूचना क्र.आरईएन-४३९९/अ/प्र.क्र.७५/म.१०, दिनांक २५ जून १९९९.

५. महसूल व वन विभाग अधिसूचना क्र.आरईएन-४३९९/अ/प्र.क्र.७१/म.-१०, दिनांक २३ जून १९९९.

६. महसूल व वनविभाग अधिसूचना क्र.आरईएन-४३९९/अ/प्र.क्र.७२/म.१०/दिनांक २३ जून १९९९. ह्या अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात (असाधारण) प्रसिध्द झाल्या आहेत.

७. कित्ता.

लातूर जिल्ह्याच्या उत्तरेस परभणी जिल्हा, ईशान्येस नांदेड जिल्हा, पूर्व व आग्नेयेस कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा, दक्षिणेस व पश्चिमेस उस्मानाबाद जिल्हा, तर वायव्येस बीड जिल्हा आहे. उत्तरेकडील परभणी जिल्ह्याची लातूर जिल्ह्यास जोडलेली सीमा सुमारे ३० कि.मी. आहे, तर ईशान्येस नांदेड जिल्ह्याची सीमा ९६ कि.मी. आहे. पूर्वेकडे सुमारे २०६ कि.मी. लांबीची कर्नाटक राज्याची सीमा लातूर जिल्ह्यास जोडलेली आहे. दक्षिणेस व पश्चिमेस सुमारे ११२ कि.मी. लांबीची उस्मानाबाद जिल्ह्याची सीमा आहे तर, वायव्येस बीड जिल्ह्याचा ७६ कि.मी. चा भाग सीमेवर आहे.

लातूर जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवर उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब व उस्मानाबाद तालुक्यांचा भाग येतो. या भागात कोणतीही नैसर्गिक सीमा नाही. औसा तालुक्याच्या पश्चिम भागात उस्मानाबाद तालुक्याच्या पूर्व सीमेवर तसेच औसा तालुक्याच्या दक्षिण सीमेवर व उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्याच्या उत्तर सीमेवर तेरणा नदी वाहते. या नदीमुळे उस्मानाबाद व लातूर जिल्हा या दरम्यानची ३६ कि.मी. सीमा निश्चित झाली आहे. लातूर जिल्ह्याच्या वायव्य किंवा लातूर तालुक्याच्या उत्तर सीमेवर आणि बीड जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवरून मांजरा नदी वाहते. लातूर जिल्हा व बीड जिल्हा या दरम्यानची २२ कि.मी.लांबीची सीमा व कर्नाटक राज्याची सीमा या दरम्यान मांजरा नदीचा ४३ कि.मी. चा प्रवाह आहे.

एकूण या जिल्ह्याच्या सीमांचे निरिक्षण केल्यास या जिल्ह्यास नैसर्गिक सीमा फारसी लाभलेली नाही असे आढळून येते. बहुतांशी सीमा या ऐतिहासिक घटनांशी संबंधीत असून त्या प्रशासकिय व स्वेच्छा प्रकारच्या आहेत.

जिल्ह्यात लातूर व उदगीर हे दोन प्रशासकीय उपविभाग असून दहा तालुके आहेत. लातूर उपविभागात लातूर, औसा, रेणापूर हे तीन तालुके आणि उदगीर उपविभागात उदगीर, अहमदपूर, चाकूर, निलंगा, देवणी, जळकोट, आणि शिरुर-अनंतपाळ हे सात तालुके आहेत. खालील विवरणपत्रात[८] तालुके, क्षेत्रफळ, गावांची संख्या आणि एकूण लोकसंख्या दिली आहे.

अ.क्र.	तालुका	क्षेत्रफळ (चौ.कि. मी.)	शहराची संख्या	एकूण लोकसंख्या (२००१)
१	उपविभाग, लातूर			
	लातूर	१,००४.००	१	५,४२,४१४
	औसा	१,२४८.६१	१	२,८०,२४०
	रेणापूर	५८०.००	-	१,२२,१९२
२	उपविभाग, उदगीर			
	उदगीर	७८५.८०	१	२,६१,५२१
	देवणी	४३५.००	-	८८,३६२
	जळकोट	३५३.००	-	६९,१९८
	अहमदपूर	७८३.१५	१	१,९९,०५३
	चाकूर	६८८.००	-	१,५७,१३५
	निलंगा	१,०४८.८६	१	२,८६,०८९
	शिरुर-अनंतपाळ	३३०.००	-	७४,०८१
	एकूण १०	७,१५७.००	५	२०,८०,२८५

८. जिल्हाधिकारी, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

प्राकृतिक रचना

जिल्ह्याचा बहुतांश भाग हा बालाघाट पठाराचा असून भूभागाची समुद्रसपाटीपासूनची उंची ४५० ते ७३० मी. च्या दरम्यान आहे. बालाघाट पठाराचा हा प्रदेश गोदावरी व भिमा नद्यांच्या खोऱ्यांच्या दरम्यान असून या जलनिस्सार प्रारुपांचा बालाघाट पठार जलविभाजक आहे. बालाघाट पठार उस्मानाबाद व बीड जिल्ह्यांतून पूर्वेस लातूर जिल्ह्यात पसरले आहे. जिल्ह्यातील या पठाराचा भाग म्हणजे त्याची उत्तरेकडील कडा आहे. त्याची दक्षिणकडा ही उस्मानाबाद जिल्ह्यात आहे.या पठाराचा सर्वसाधारण उतार पूर्वेस व ईशान्येस आहे. या पठाराचा एक भाग दक्षिणेस व नंतर पूर्वेस विस्तारलेला आढळत असून पठाराचा उठाव प्रदेश दक्षिणेस चाकूर तालुक्याच्या पूर्व विभागात आहे व तेथून पुढे उदगीर तालुक्यातून आग्नेय दिशेत जिल्ह्याबाहेर कर्नाटक राज्यात गेलेला आहे. तसेच पठाराचा काही भाग नांदेड जिल्ह्यात कंधार, मुखेड भागात गेला आहे.

जिल्ह्याचा आग्नेय व दक्षिण भाग तेरणा व तावरजा या नदी खोऱ्यांचा आहे. तेरणा व मांजरा नद्यांच्या खोऱ्यांचा बालाघाट पठार हा जलविभाजक आहे. तसेच मांजरा व मन्याड नदी निस्सार प्रारुप दरम्यान बालाघाट डोंगर रांगा आहेत. उदगीर तालुक्यातून एक जलविभाजक जातो. परळी-उदगीर मार्गे कर्नाटक राज्यातील बिदरला जाणारा लोहमार्ग व रस्ता या जलविभाजकाच्या कटकावरून गेलेला आहे. या जलविभाजकाची वायव्य भागात उंची जास्त असून आग्नेयेकडे ती कमी होत गेली आहे. हा प्रदेश साधारणत: ६२५ मीटर उंचीचा असून लातूर रोड रेल्वे स्थानकाजवळ याची उंची ६४५ मीटर आहे. येथून पूर्वेस उतार प्रवणता कमी आहे. कमी उंचीच्या पठाराची एक भुजा चाकूरजवळून ईशान्येकडे गेलेली आहे. ती शिरुर ताजबंदपासून २ कि.मी. पर्यंत असून पुढे ती पूर्वेस व नंतर ईशान्येस वांजरवाडा जवळून जिल्ह्याच्या बाहेर जाते. या भागात त्याची उंची ५६० मीटर आहे. या कटकावर लातूर-नांदेड रस्ता आहे. हा कटक मन्याड व तिरु नदीचा जलविभाजक आहे.

परळी-उदगीर लोहमार्गाच्या उत्तरेस पश्चिम-पूर्व विस्ताराचा एक भू-उठाव आहे. या भू-उठावावरून अनेक लहान-लहान जलप्रवाह उत्तर दिशेस वाहतात. जिल्ह्याचा उत्तर व ईशान्य भाग मन्याड नदी खोऱ्याचा असून या प्रदेशाची उंची समुद्रसपाटी पासून ५०० मीटर पर्यंत आहे. गुगदळ व हगदळ येथे ४८० मीटर उंचीचा भाग आहे. एकंदरीत, बालाघाट पठाराचा भाग सपाट माथ्याचा, मंद उताराचा असून त्यावर वाहणाऱ्या अनेक लहान-लहान जल-प्रवाहांमुळे त्याचे अपक्षरण झालेले आहे. त्यामुळे या प्रदेशात कमी उंचीचे काही डोंगर किंवा कड्यासारखी भूरुपे दिसून येतात.

डोंगर व टेकड्या : चाकूरच्या पश्चिमेस ५-६ कि.मी. अंतरावर वडवळ नागनाथजवळ ७३३ मीटर उंचीचा, तर जानवळजवळ ७२६ मीटर उंचीचा डोंगर आहे. वडवळ व जानवळ डोंगरांना स्थानिकरित्या " वडवळ बेट " व " जानवळ बेट " म्हणतात. वडवळ व जानवळ-चाकूर-उदगीर-औसा हा उठावाचा भाग एक जलविभाजक आहे. या भागातून अनेक लहान जलप्रवाह उत्तरेस मांजरा नदीस व दक्षिणेस तेरणा नदीस मिळतात. मन्याड नदी खोऱ्याचा भाग सपाट व कमी उंचीचा आहे, पण त्या भागातही काही स्थानिक टेकड्या आहेत. अहमदपूरजवळ ५४० मीटर उंचीची टेकडी आहे. निलंग्याजवळ उत्तर भागात ५९९ मीटर उंचीची टेकडी आहे, तर त्याच्या पूर्व भागात जिल्ह्याच्या सीमेलगत ५७९ मीटर उंचीचा डोंगर आहे. निलंग्याच्या उत्तर भागात प्रदेशाची उंची जास्त आहे. आंबेवाडीच्या दक्षिणेस २ कि.मी. अंतरावर

अनुक्रमणिका

६८३ मीटर उंचीचा डोंगर आहे. तसेच आनंदवाडीजवळ ६७३ मीटर व ६४७ मीटर उंचीचे डोंगर आहेत. मांजरा नदीच्या खोऱ्यात विशेषत: या नदीकाठाच्या प्रदेशाची उंची ५५० मीटर ते ५६० मीटरपर्यंत आहे. औसाच्या आग्नेय भागात एक टेकडी असून तिची उंची ६८७ मीटर आहे. औसापासून आग्नेयेस ७ कि.मी. अंतरावर मालुंब्रा, मंगरूळ, हसलगन या गावांच्या परिसरात एक डोंगर आहे, तर निलंगाच्या दक्षिण भागात या जिल्ह्याच्या सीमेवर वाडी कासारशिरशी भागात एक लहान टेकडी आहे. लातूर जिल्ह्यात उंच डोंगर किंवा टेकड्या कमी आहेत. या टेकड्या किंवा डोंगराचा उतार फार तीव्र स्वरूपाचा नाही.

प्राकृतिक विभाग : प्राकृतिक रचनेच्या दृष्टीने लातूर जिल्ह्याचे चार विभाग पडतात.

१. **मन्याड नदीचे खोरे :** हा प्रदेश समुद्रसपाटीपासून ४५० ते ६०० मीटर उंचीचा आहे. अहमदपूर जवळच्या लहान-लहान टेकड्या वगळता संपूर्ण प्रदेश साधारणपणे सपाट मैदानाचा असून पूर्वेस व उत्तरेस या मैदानाचा उतार मंद आहे. या विभागात रेणापूर तालुक्याचा ईशान्य भाग, अहमदपूर तालुका, उदगीर तालुक्याचा उत्तर व पूर्व भाग आणि चाकूर तालुक्याचा उत्तर व ईशान्य भाग येतो.

२. **मांजरा नदीचे खोरे :** जिल्ह्याचा साधारणपणे मध्यवर्ती सखल भाग मांजरा खोऱ्याचा आहे. बालाघाट पठाराच्या उत्तर व दक्षिण कटकांच्या दरम्यान हा मैदानी प्रदेश आहे. या प्रदेशाची उंची वायव्येकडून आग्नेयकडे कमी होत गेली आहे. या खोऱ्यात लातूर तालुक्याचा उत्तर, पूर्व व दक्षिण भाग येतो. तसेच रेणापूर तालुक्याचा पश्चिम व दक्षिण भाग येतो. निलंगा तालुक्याचा उत्तर, पूर्व भाग मांजरा नदी खोऱ्यात येतो.

३. **तेरणा नदीचे खोरे :** या नदी खोऱ्याचा उत्तर व दक्षिण भाग बालाघाट पठाराच्या कटकांचा आहे. पश्चिमेकडून पूर्वेकडे या भूभागाचा उतार मंद होत जातो. या प्रदेशात औसा तालुक्याचा दक्षिणेकडील काही भाग व निलंगा तालुक्याचा बराचसा भाग समाविष्ट होतो.

४. **बालाघाट पठाराचा प्रदेश :** लातूर जिल्ह्याचा साधारणपणे पश्चिमेकडील प्रदेश बालाघाट पठाराचा आहे. रेणापूर तालुक्याचा वायव्य व ईशान्य भाग, चाकूर तालुक्याचा बहुतांश भाग, लातूर व औसा तालुक्याचा पश्चिम भाग, निलंगा तालुक्याचा मध्य व दक्षिण भाग तसेच उदगीर तालुक्याचा मध्य व दक्षिण भाग याचा समावेश होतो. सपाट माथ्याचा व सामान्यपणे पूर्व भागात मंद उताराचा हा प्रदेश आहे.

नद्या : हा जिल्हा मांजरा व तिच्या उपनद्या यामुळे जलनिस्सारित झालेला आहे. मांजरा जलनिस्सार प्रारुप हा गोदावरी या प्रमुख जलनिस्सार प्रारूपाचा मुख्य उपविभाग आहे. मांजरा व तिच्या उपनद्या, तेरणा, तावरजा व घरणी या लातूर जिल्ह्यात बालाघाट पठारावर दक्षिण व मध्यभागात वाहतात. तर मन्याड, तिरू, लेंडी या व इतर लहान नद्या बालाघाट पठाराच्या उत्तर भागात वाहतात व पुढे उत्तरेस किंवा पूर्वेस वाहत जातात.

मन्याड : ही नदी बीड जिल्ह्यात बालाघाट पठाराच्या ईशान्य उतारावर धर्मापुरीजवळ उगम पावते व सुकणी गावाजवळ लातूर जिल्ह्यात प्रवेश करते. ही नदी अहमदपूर शहराच्या पश्चिम भागात वाहते. या नदीची वाहण्याची दिशा पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. नंतर तिची दिशा सर्वसाधारणपणे ईशान्येस आहे. या नदीचा जिल्ह्यातील प्रवाह ४० कि.मी. लांबीचा आहे. ही नदी अहमदपूर तालुक्यातून पुढे नांदेड जिल्ह्यात कंधारपर्यंत वाहते. पुढे पूर्व व नंतर आग्नेय दिशेने वाहत जाऊन ही नदी मांजरा नदीस मिळते.

अनुक्रमणिका

वाकी : ही मन्याड नदीची उपनदी असून तिचा उगम चापोली या गावाजवळ होतो. प्रथम ही नदी उत्तरेस वाहते व अहमदपूर शहराजवळून अहमदपूर तालुक्यातूनच पुढे वाहत जाते. या नदीची लांबी २५ कि.मी. आहे. अहमदपूरच्या उत्तरेस सेंद्री गावाजवळ ही नदी मन्याड नदीस मिळते.

तिरु : चाकूरजवळील बालाघाट पठाराच्या कटकाच्या उतारावर या नदीचा उगम होतो. ही नदी साधारणपणे पूर्वेस वाहते. तिरु नदीचा लातूर जिल्ह्यातील प्रवाह ५६ कि.मी. लांबीचा आहे. तिरु नदी चाकूर व उदगीर तालुक्यांत वाहते. ही नदी पूर्वेस नांदेड जिल्ह्यात खैरका येथे लेंडी नदीस मिळते. उदगीर तालुक्यात वाढवणा येथे तिरु नदीवर धरण बांधले असून येथील जलाशयाचा उपयोग २,३४८ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी होतो.

लेंडी : ही नदी उदगीरजवळील पठाराच्या कटकावर उगम पावते. उदगीर शहराच्या दक्षिण भागातून ही नदी वाहते. हा प्रवाह पूर्वेस जातो. उदगीर तालुक्यात ही नदी प्रवाहित असून तिचा लातूर जिल्ह्यातील प्रवास सुमारे २० कि.मी. आहे. नांदेड जिल्ह्यात लेंडी नदीस तिरु नदी येऊन मिळते व लेंडी नदी देगलूर तालुक्यातील मंतगा गावाजवळ मांजरा नदीस मिळते.

मांजरा : बालाघाट पठाराच्या उत्तर काठावर बीड जिल्ह्यात पाटोदा तालुक्यातील गौरवाडी गावाजवळ मांजरा नदी उगम पावते व आग्नेय दिशेस वाहते आणि कानडी बोरगावजवळ लातूर जिल्ह्यात प्रवेश करते. मांजरा नदी लातूर तालुक्याच्या उत्तर सीमेवर वाहते. बीड जिल्हा व लातूर यांच्या सीमेरेषेचा काही भाग मांजरा नदीच्या प्रवाहामुळे निश्चित झाला आहे. या भागात मांजरा नदीची दिशा पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे व नंतर ही नदी लातूरच्या ईशान्य भागात आठ-दहा कि.मी. अंतरावर असलेल्या चिखलठाणा व भातखेडा येथे दक्षिणेस वळते. लातूरच्या आग्नेय भागात शिवणी खुर्द व सेलु बुद्रुकजवळ या नदीस तावरजा नदी येऊन मिळते. पुढे मांजरा नदी औसा तालुक्याच्या ईशान्य सीमेवरून वाहते, पुढे फाकरानपूरजवळ निलंगा तालुक्यात प्रवेश करते. या भागात मांजरा प्रामुख्याने पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते व निलंग्यापासून १६ कि.मी. वर ईशान्य भागात शिरोला व गिरीकचाळ येथे उत्तरेकडे वळण घेते. नंतर शिऊर व वालसांगवी पासून दक्षिणेस वाहते. औराद शहाजनी गावाच्या पूर्वेस २ कि.मी. अंतरावर मांजरा नदीस तेरणा नदी येऊन मिळते. येथून ही नदी पूर्वेस कर्नाटक राज्यात वाहते. निलंगा तालुक्यातील आकुलगा व वंजारवाडा या गावाच्या दरम्यान या नदीच्या पात्रात लहान बेट तयार झाले आहे. लातूर जिल्ह्यात मांजरा नदीचा प्रवाह सुमारे १९५ कि.मी. लांबीचा आहे.

रेणा, घरणी, तावरजा व तेरणा या लातूर जिल्ह्यातील मांजरा नदीच्या उपनद्या आहेत. रेणा व घरणी या मांजरा नदीला डाव्या काठावर मिळणाऱ्या उपनद्या असून तावरजा व तेरणा या उजव्या काठावर मिळतात.

मांजरा नदीच्या उजव्या काठावर कानडी बोरगाव, टाकळगाव, गांजूर, तडकी, खुलगापूर, कासरखेडा, शिवनी खु. इत्यादी गावे आहेत. तसेच तिच्या डाव्या काठावर साई, चिखलठाणा, भडगाव, रमझानपूर ही गावे आहेत. ही सर्व गावे लातूर तालुक्यातील आहेत. निलंगा तालुक्यात मांजरा नदीच्या

डाव्या काठावर वांजरखेडा, हलकी, अकुलगा आणि उजव्या काठावर हिसमाबाद, बसपूर, वंजारवाडा, वालसांगवी, चिंचोदी इत्यादी गावे आहेत. मांजरा नदी लातूर जिल्ह्यातून वाहत पुढे कर्नाटक राज्यातून आंध्रप्रदेशात जाते व परत राज्याच्या सीमेवर येऊन ती नांदेड जिल्ह्यात संगम गावाजवळ गोदावरी नदीस उजव्या बाजुने मिळते.

मांजरा नदीवर लातूर पासून ६ कि.मी. अंतरावर धनेगाव येथे मोठा सिंचन प्रकल्प आहे. याच्या धरणाची उंची २५.६८ मीटर व कालव्याची लांबी १६८ कि.मी. आहे. या प्रकल्पामुळे १८,२२३ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येते.

रेणा : बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई तालुक्यातील डोंगराच्या पश्चिम भागात सावरगावजवळ या नदीचा उगम होतो. लातूर जिल्ह्यात या नदीचा प्रवाह उत्तर-दक्षिण असा आहे. या नदीकाठावर रेणापूर तालुक्याचे मुख्य ठिकाण वसले आहे. रेणा नदी मांजरा नदीस निलंगा तालुक्यातील भातांगळी येथे मिळते.

घरणी : या नदीचा उगम अहमदपूर तालुक्यात नैर्ऋत्य भागात २५ कि.मी. अंतरावरील वडवळ राजुरा पासून उत्तरेस ३ कि.मी. अंतरावर होतो. तेथून ही नदी दक्षिणेकडे वाहते व निलंगा तालुक्यात प्रवेश करते. घरणी ही मांजरा नदीची डाव्या काठावर मिळणारी उपनदी आहे. या नदीचा प्रवाह जिल्ह्यात सुमारे ४० कि.मी. आहे. घरणी नदी घुगी, सांगवी या गावाजवळ निलंगा तालुक्यात मांजरा नदीस मिळते. वडवळ, घरणी व नालेगाव इत्यादी घरणी नदीच्या पश्चिम काठावरील गावे आहेत. घरणी या गावाचे नाव घरणी या नदीवरूनच पडले असावे.

घरणी नदीवर निलंगा तालुक्यात जोगीयाळ येथे धरण बांधले आहे. हे मातीचे धरण असून त्याची लांबी २,१३५ मीटर आहे व धरणाची उंची १४.९० मीटर आहे. या मध्यम सिंचन प्रकल्पामुळे २,८३४ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. या नदीचा जोगीयाळ गावाजवळ डावा व उजवा कालवा असून प्रत्येक कालव्याची लांबी २४ कि.मी. आहे.

देवण : मांजरा नदीची डाव्या काठावर मिळणारी देवण ही उपनदी आहे. या नदीचा प्रवाह जिल्ह्यात २० कि.मी. इतका आहे. उदगीर तालुक्यात रोहिणा गावाजवळ या नदीचा उगम होतो. प्रथम ही नदी दक्षिणेकडे व नंतर आग्नेयेकडे वाहते या नदीच्या उजव्या काठावर म्हणजे नदीच्या दक्षिणेस देवणी गाव आहे. देवण नदी उदगीर तालुक्यात वाहत जाऊन पुढे सेवनी गावाजवळ कर्नाटक राज्यात प्रवेश करते. या नदीची लांबी जिल्ह्यात १०५ कि.मी. आहे. तोंडार गावाजवळ एक जलप्रवाह उगम पावतो व तो पुढे आग्नेय दिशेस वाहत जातो. तो देवण नदीस सुखणी गावाजवळ मिळतो.

तावरजा : या नदीचा उगम लातूर तालुक्यात मुरुड गावाजवळ होतो. लातूर जिल्ह्यात तावरजा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. लातूर तालुक्याच्या दक्षिण व औसा तालुक्याच्या उत्तर सीमेवरून ही नदी वाहते. लातूर जिल्ह्यात या नदीचा प्रवाह ५० कि.मी. आहे. ढाकणी, एकुरगा, कव्हा, पेठ इत्यादी गावे तावरजा नदीच्या डाव्या काठावर वसली आहेत. तावरजा नदीच्या उजव्या काठावर तूलनेत मोठ्या प्रमाणात गावे वसली आहेत. तावरजा नदीच्या एका उपनदीच्या काठावर औसा शहर वसले आहे. तावरजा नदीवर लातूर तालुक्यात शिऊर येथे धरण असून ३,६०३ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येते.

अनुक्रमणिका

तेरणा : ही मांजरा नदीची उपनदी असून तिचा उगम उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यात तेरखेड येथे होतो. तेरणा नदी उस्मानाबाद जिल्ह्यातून आग्नेय दिशेने वाहते व औसा तालुक्यात उजणी गावाजवळ लातूर जिल्ह्यात प्रवेश करते. औसा तालुक्याच्या दक्षिण व तसेच लातूर जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवर ही नदी वाहते. या भागात तेरणा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. नंतर निलंगा तालुक्यातून औराद शहाजनीजवळ पूर्वेस मांजरा नदीस मिळते. निलंगा तालुक्यात या नदीचा प्रवाह ६५ कि.मी. लांबीचा आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील माकणी येथे मोठे धरण असून त्याचा उपयोग लातूर जिल्ह्याला विशेषत: औसा तालुक्याला होतो.

भूकंपाचे केंद्र असलेल्या किल्लारी गावाच्या दक्षिणेस तेरणा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. किल्लारीवाडीकडून एक जलप्रवाह किल्लारी गावाच्या नैर्ऋत्येस एक कि.मी. अंतरावर तेरणा नदीस मिळतो. हत्तर गावाजवळ तेरणा नदीचा जलप्रवाह विभागतो व दोन कि.मी. वर पुन्हा एकत्रित येतो.

भौगोलिक प्रदेश

प्राकृतिक रचना : मृदा, हवामान, वनस्पती, पीकप्रणाली इत्यादी घटकांच्या आधारे भौगोलिक प्रदेश व्यक्त केला जातो. लातूर जिल्ह्याचे (१) बालाघाट पठारी प्रदेश आणि (२) मांजरा खोऱ्याचा प्रदेश असे दोन प्रमुख भौगोलिक प्रदेश पाडता येतात.

(१) बालाघाट पठारी प्रदेश : बालाघाट पठारी प्रदेशात लातूर, औसा व निलंगा या तालुक्यांचा पश्चिम भाग, उदगीर तालुक्याचा दक्षिण भाग आणि रेणापूर तालुक्याचा काही भाग यांचा समावेश होतो. हा पठारी प्रदेश पश्चिमेस उंच, तर पूर्वेस कमी उंचीचा आहे. या भागात या पठाराची समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची ६१० मी. असून अनेक जलप्रवाह आहेत. त्यातील काही जलप्रवाह उत्तरेस, काही पूर्वेस व काही दक्षिणेस वाहत असलेले आढळतात. या जलप्रवाहांमुळे पठारी भागाचे क्षरण झाले आहे. उदगीर शहर या पठारावरच वसले असून तेथील पठारी कटकाचे जलप्रवाहामुळे शीर्ष क्षरण झाले आहे. याच भागात बांध घालून तलाव केला आहे. पठारावरील व त्याच्या उतारावरील मृदा खडकाळ व उथळ आहे. गडद तांबडी ते गडद पिवळसर तांबडी मृदा खडक तुकड्यांच्या संरचनेपासून बनलेली आहे. या मृदेचा थर कमी जाडीचा आहे. त्यात सकस द्रव्याचे प्रमाण कमी आहे. सर्व प्रकारच्या खतास ही मृदा उत्तम प्रतिसाद देते. या मृदेस योग्य पाणीपुरवठा असल्यास खरीप पिके घेण्यासाठी ती उपयुक्त ठरते. परंतु अशी मृदा जिल्ह्यात अत्यंत कमी प्रमाणात साधारणपणे डोंगर व टेकड्यांच्या प्रदेशात आढळते. जिल्ह्यात वनक्षेत्र मुळातच अत्यंत कमी असून ते प्रामुख्याने बालाघाट पठारी प्रदेशात आहे. पठाराच्या माथ्याचा प्रदेश व उतारावरील भागात गवत आढळते. बोर, बाभूळ, हिवर, खैर ही काटेरी झुडपे असलेली वने आहेत. या भागात पिवळी ज्वारी व तुरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. या प्रदेशातील ज्वारी हे प्रमुख पीक असून खरीप ज्वारीचे उत्पादन भरपूर होते. काही भागात बाजरीची लागवड केली जाते. विशेषत: निलंगा, लातूर व औसा तालुक्यातील पठारी प्रदेशात बाजरीचे पीक घेतले जाते. तसेच तूर व मूग ही डाळवर्गीय पिकेही घेतली जातात.

अनुक्रमणिका

बालाघाट पठारावर उगम पावणाऱ्या नद्या उत्तरेकडे तसेच पूर्व व दक्षिण भागाकडे वाहतात. त्यामुळे नद्यांचा उपयोग शेजारील जिल्ह्यास जास्त होतो.

(२) मांजरा नदी खोऱ्याचा प्रदेश : मांजरा ही प्रमुख नदी व तिच्या उपनद्यांमुळे मांजरा जलनिस्सार प्रारुप तयार झाले आहे. मांजरा व तिच्या उपनद्यांच्या जलप्रवाहाने प्रभावित झालेले क्षेत्र हे मांजरा खोरे म्हणून ओळखले जाते. जिल्ह्याचा बहुतांशी भाग मांजरा खोऱ्यांचा आहे. या प्रदेशात अहमदपूर तालुक्याचा बहुतांश भाग, रेणापूर तालुक्याचा ईशान्य भाग, चाकूर तालुक्याचा उत्तर तसेच ईशान्य भाग, उदगीर तालुक्याचा उत्तर व पूर्व भाग, लातूर तालुक्याचा उत्तर, पूर्व व दक्षिण भाग, निलंगा तालुक्याचा काही भाग, औसा तालुक्याचा दक्षिणेकडील अरुंद भाग मांजरा खोऱ्याचा आहे. मांजरा खोऱ्याचे तीन उपविभाग पडतात.

पहिला उपविभाग जिल्ह्यातील वायव्येस असून अहमदपूर, चाकूर, उदगीर तालुक्यांचा बहुतांश भाग या प्रदेशात आहे. ह्या उपविभागामध्ये मन्याड, तिरु व लेंडी या नद्यांच्या निस्साराचा आहे.

दुसरा उपविभाग मुख्य मांजरा नदी निस्साराचा आहे. रेणा, घरणी, तावरजा या तिच्या उपनद्या, व त्यांची खोरे यात समाविष्ट होतात. लातूर तालुक्याचा उत्तर व पूर्व भाग मांजरा निस्सार क्षेत्राचा व दक्षिण भाग तावरजा नदी जलनिस्सार क्षेत्राचा आहे. लातूरचा पश्चिम व मध्य भाग वगळता इतर भाग मांजरा खोऱ्यात येतो. तसेच रेणापूर तालुक्याचा मध्य व दक्षिण भाग या खोऱ्यात आहे. निलंगा तालुक्याचा उत्तर भाग घरणी व मांजरा नदी खोऱ्याचा आहे. निलंगा तालुक्याचा दक्षिण व मध्य भाग वगळून इतर भाग मांजरा खोऱ्यात समाविष्ट होतो. औसा तालुक्याचा उत्तरेकडील अरुंद पट्टा मांजरा खोऱ्यात आहे.

मांजरा खोऱ्याचा तिसरा उपविभाग तेरणा खोऱ्याचा आहे. औसा तालुक्याचा दक्षिणेकडील भाग व निलंगा तालुक्याचा मध्य भाग तेरणा खोऱ्यात समाविष्ट होतो. मांजरा खोऱ्यातील मृदा मध्यम काळी व खोल काळी चिकण पोयटयाची आहे. ही मृदा अत्यंत सुपीक आहे. मन्याड, मांजरा, तेरणा या नद्या व इतर उपनद्या यांच्या काठांवरील मृदा काळी सखोल व सुपीक आहे. ही मृदा भारी असल्याने तेथे रबीची पिके घेतली जातात.

हा प्रदेश खरीप ज्वारीस अत्यंत अनुकूल असा आहे. काही भागात रबी ज्वारी घेतली जाते. या खोऱ्यातील लातूर व निलंगा तालुक्यात कापसाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. या प्रदेशात तूर हे डाळीचे प्रमुख पीक आहे. मांजरा, तेरणा खोऱ्यांच्या प्रदेशात गव्हाची लागवड केली जाते. उडीद पीकही मोठ्या प्रमाणात घेतले जाते.

इतर भौगोलिक माहिती : लातूर जिल्हा बालाघाट पठारावर वसलेला असून या पठाराचे त्या भागातील जलप्रवाहाने अपक्षरण केलेले आहे. संपूर्ण जिल्हा हा दख्खन प्रस्तराचा व बेसॉल्ट खडकांचा बनलेला असून मध्यम काळी व खोल काळी " रेगूर " प्रकाराच्या मृदा या जिल्ह्यात आढळतात. मांजरा, तेरणा नद्यांच्या खोऱ्यातील मृदा अत्यंत सुपीक, सखोल आहे. त्यामुळे खरीप व रबी दोन्ही हंगामात पिके घेतली जातात. लातूर जिल्ह्यात वनक्षेत्र नगण्य आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ०.५३ टक्के क्षेत्र वनाखाली आहे, त्यामुळे जमिनीची धूप जास्त होते व अपक्षय जास्त होत असल्याने जलप्रवाहामुळे क्षरणाची क्रिया प्रभावीपणे घडते. परंतु बालाघाट पठारावर उगम पावणाऱ्या नद्यांमुळे क्षरणाने तयार झालेली मृदा नद्यातून नांदेड, परभणी व कर्नाटकातील बिदर जिल्ह्यात वाहून जाते. लातूर जिल्ह्यात बेसाल्ट खडक जास्त प्रमाणात असल्याने भूजल साठ्याचे प्रमाण कमी आहे. जिल्ह्यातील भूजलाची पातळी सर्वसाधारणपणे १५.९० मीटरपर्यंत आढळते. निलंगा तालुक्यात ती सर्वात खोल म्हणजे १८.६० मीटरवर आहे, तर औसा तालुक्यात १३.५ मीटरवर आढळते.

अनुक्रमणिका

तेरणा, मांजरा, तावरजा, घरणी इत्यादी नद्यांवर बांध बांधून जलाशय तयार करण्यात आले आहेत. त्याशिवाय जिल्ह्यात काही तलाव आढळतात. त्यांचा उपयोग पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीसाठी केला जातो. शिवणीच्या दक्षिणेस व मालेगावच्या उत्तरेस २ कि.मी. अंतरावर मालेगाव तलाव आहे. ननन्द गावापासून ३ कि.मी. अंतरावर ननन्द तलाव आहे. एक तलाव चिंचोली तापसे गावाजवळ असून तो चिंचोली तलाव म्हणून ओळखला जातो. मुगलेवाडीच्या पश्चिमेस अपचुन्दा तलाव आहे.

जिल्ह्याचे हवामान साधारणपणे उष्ण व बहुतांश कोरडे असते. फक्त नैऋत्य मान्सून काळात हवामान दमट असते. बहुतांश पाऊस याच काळात जून ते सप्टेंबर या महिन्यात होतो. हा जिल्हा पर्जन्याच्या दृष्टीने आश्वासित क्षेत्रात येतो. वार्षिक सरासरी पाऊस ९०० मि.मी. असून किमान तापमान १३.७° सें. तर कमाल तापमान ३८.२° से. असते.

जिल्ह्याची अर्थव्यवस्था कृषिवर आधारित आहे. जिल्ह्यात खरीपाची पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. ज्वारी हे प्रमुख खरीप पीक आहे. एकूण खरीप पीकांचे लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण ९०% आहे.

जिल्ह्यातील ९३.१४% क्षेत्र लागवडीलायक आहे. त्यापैकी ८१ टक्के क्षेत्र निव्वळ लागवडीखाली आणले जाते. ज्वारी हे पीक खरीप व रबी या दोन्ही हंगामात घेतात. तांदुळाचे पीकही मोठ्या प्रमाणात घेतले जात आहे. तूर, मुग, ऊस, कापूस ही पिकेही घेतली जातात. ज्वारीखाली ३३% क्षेत्र आहे.

जिल्ह्याची सन २००१ च्या जनगणने प्रमाणे लोकसंख्या २०,८०,२८५ इतकी असून महाराष्ट्राच्या लोकसंख्येतील हे प्रमाण २.१५ टक्के आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता २९१ आहे. सर्वात जास्त घनता (५४०) लातूर तालुक्यात आहे. सुमारे ७६.४३ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. महिलांचे पुरुषांशी गुणोत्तर प्रमाण दर हजार पुरुषांमागे ९३५ स्त्रिया असे आहे. जिल्ह्यात एकूण ६०.३१ टक्के लोक साक्षर आहेत. महाराष्ट्राच्या तुलनेने हे प्रमाण कमी आहे.

भूशास्त्र व खनिज संपत्ती [९]

लातूर जिल्ह्यातील सर्व प्रदेशाची सविस्तर भूशास्त्रीय पाहणी झालेली नाही. काही भागाचे सर्वेक्षण भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने केले असून पाहणीचे काम अद्यापही चालू आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या भूविज्ञान व खाणकाम विभागाने जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या महत्वाच्या असलेल्या खनिजांची पाहणी केली आहे.

जिल्ह्यातील किल्लारी, (तालुका औसा) येथे व तेथील परिसरात ३० सप्टेंबर १९९३ रोजी भूकंपाचा मोठा धक्का बसला. या घटनेनंतर भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने या परिसराचा तपशीलवार भूशास्त्रीय अभ्यास केला. राष्ट्रीय भूभौतिक संशोधन संस्था, हैद्राबाद यानी भूभौतिक पद्धतीचा अवलंब करून वरील परिसरात सखोल भूभौतिक सर्वेक्षण केले. २४ डिसेंबर १९९३ रोजी हैद्राबाद येथे भारतीय

९. डॉ.र.सु.पप्पु, निवृत्त प्रपाठक, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्था, पुणे यांनी सहयोगकर्ता लेखक म्हणून हे लेखन केले आहे.

भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने या भागातील भूकंप निर्मितीमागील कारणे कोणती असावीत हे समजून घेण्याच्या उद्देशाने चर्चासत्र आयोजित केले होते.[१०]

औरंगाबाद येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील भूशास्त्र [भू विज्ञान] विभागाचे प्रमूख व प्राध्यापक डॉ.बी.एम.करमरकी यांनी भूकंपग्रस्त तेरणा खोऱ्याची भूशास्त्रीय दृष्ट्या सखोल पाहणी केली. या पाहणीचा प्रमुख उद्देश उपग्रह प्रतिमेवरुन दिसून येणाऱ्या भूरुपीरेखांचे निश्चित स्वरुप समजून घेणे व या भूरुपीरेखा या भागातील भूकंपाशी संबंधीत आहेत का तसेच भूरुपीरेखा दर्शविणारा भाग पुनर्वसनास योग्य आहे का हे ठरविणे हा होता.

जिल्ह्याचा संपूर्ण भूप्रदेश " डेक्कन ट्रॅप " या नावाने ओळखल्या जाणाऱ्या बेसाल्ट जातीच्या ज्वालामुखी खडकांनी व्यापलेला आहे. जिल्ह्याच्या पूर्व भागात काही ठिकाणी बेसाल्ट खडकाचे जांभा खडकात रुपांतर झाल्याचे दिसून येते. तसेच नद्याकाठी चतुर्थक कालीन गाळाचे थर दिसून येतात.

डेक्कन ट्रॅप बेसाल्ट : जिल्ह्यात सर्वत्र विस्तीर्ण क्षेत्रात आढळणारे खडक प्रकार म्हणजे उत्तर क्रेटेसस ते पूर्व इओसीन या कालखंडात तयार झालेले बेसाल्ट लाव्हाचे थर हे होत. या खडक प्रकारांना " डेक्कन ट्रॅप " ही संज्ञा दिली आहे. लांब अंतरावरून पाहिल्यास या खडकांचे थर जिन्याच्या पायऱ्याप्रमाणे दिसतात. त्यामुळे पायरी अथवा जिना या अर्थाच्या स्विडीश शब्दावरून या खडकाच्या थरांना " ट्रॅप " हे नाव दिले गेले.

भारतीय द्वीपकल्पाच्या दक्षिण भागात प्रामुख्याने आढळून येत असल्याने त्याना " डेक्कन ट्रॅप " ही संज्ञा प्राप्त झाली. या खडकाचा महाराष्ट्रातील विस्तार पश्चिमेला मुंबईपासून ते पूर्वेला नांदेडपर्यंत व दक्षिणेला बेळगांवपासून ते उत्तरेला नागपूरपर्यंत म्हणजे जवळजवळ २ लक्ष ६२ हजार चौ.कि.मी.इतका आहे. या खडक थरांची दृष्य स्वरूपातील एकूण जाडी पश्चिमेला समुद्र सपाटीपासून ते कळसूबाई शिखरापर्यंत जवळ जवळ १,९०० मी.एवढी आहे.

क्रेटेशस या कालखंडाच्या अखेरीस ६ ते ७ कोटी वर्षांपूर्वी पश्चिम व दक्षिण भारतातील विस्तृत क्षेत्रात लांब व चिंचोळ्या भेगातून बेसाल्टी लाव्हारसाचे लोट पृष्ठभागावर पसरले गेले. भेगी उद्रेकातून बाहेर पडणारा लाव्हा रस अत्यंत तरल व प्रवाही असल्याने एकेक थर कित्येक किलोमीटर लांबी-रुंदीच्या प्रदेशात दूरवर पसरला गेला. प्रदीर्घ काळापर्यंत म्हणजे पूर्व इओसीन कालापर्यंत (४ कोटी वर्षांपूर्वीपर्यंत) हे लाव्हा उद्रेक होत राहिले व त्यामुळे पूर्वीच्या खडकांचे रूप पूर्णपणे झाकले गेले. लाव्हा रस निवून थंड झाल्यावर सध्याचे दख्खनचे पठार निर्माण झाले.

---

१०. या चर्चासत्रात भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग, राष्ट्रीय भूभौतिक संशोधन संस्था व भारतीय वातावरण विज्ञान संस्था या तीन प्रमूख संस्थानी व भूकंपाविषयी संशोधन करणाऱ्या इतर अनेक संस्थातील व विद्यापीठातील शास्त्रज्ञानी भाग घेतला. एकूण १४० शास्त्रज्ञ या चर्चासत्रात सहभागी झाले होते. या चर्चासत्राविषयीचा सविस्तर वृत्तांत शोधनिबंधाच्या रुपाने भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने एक विशेष प्रकाशन म्हणून प्रसिद्ध केला (Geological survey of India-Special publication No.27- 1994) बेंगलोरच्या भारतीय भूविज्ञान संस्था यानी " लातूर अर्थक्वेक " हा डॉ.एच्.के.गुप्ता यानी संपादित केलेला ग्रंथ १९९४ मध्ये प्रसिद्ध केला. या ग्रंथात यावेळी किल्लारी येथील भूकंपाच्या समस्येविषयी अनेक महत्वपूर्ण शोधनिबंध आहेत. भारतीय भूकंप तंत्रविद्या संस्था, पुणे शाखा या संस्थेने भूकंपाविषयी ११ डिसेंबर १९९३ रोजी चर्चासत्र आयोजित केले होते. यात प्रामुख्याने पुणे विद्यापीठातील भूशास्त्र विभागातील प्राध्यापक व संशोधक तसेच पुण्यातील इतर अनेक भूकंपाविषयी संशोधन करणाऱ्या संस्थेतील शास्त्रज्ञांनी व इतर महाविद्यालयातील भूशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांनी भाग घेतला. या चर्चासत्राचा संक्षिप्त वृत्तांत ग्रंथ स्वरूपात प्रसिद्ध झाला आहे.

डेक्कन ट्रॅप यातील सर्वसाधारण खडक हा ऑगाइट बेसाल्ट हा आहे. सिलीकाचे प्रमाण ४९ ते ५२ टक्यापर्यंत आहे. प्लॅनिओक्लेज व ऑगाइट ही आवश्यक खनिजे असून त्यांची टक्केवारी अनुक्रमे ५० व ३६ एवढी आहे. या शिवाय मॅग्नेटाइट व इतर लोहयुक्त खनिजे व काचमय पदार्थ हे गौण घटक असून त्यांचे प्रमाण १३ टक्यापर्यंत आहे. खडकाचे विशिष्ट गुरुत्व २.५८ ते २.८० एवढे असून त्यांच्यात रंग आणि पोत या बाबतीत थोडीफार भिन्नता दिसून येते. सर्वात जास्त प्रमाणात आढळणारा रंग करडसर काळा असून पूर्ण काळ्या अथवा तांबूस व जांभळसर छटा असणारे खडकही काही ठिकाणी आढळून येतात. या जिल्ह्यात सर्वत्र प्रामुख्याने घट्ट व सूक्ष्मकणी बेसाल्ट आढळून येतो. काही थोड्या प्रमाणात कुहरीयुक्त बेसाल्ट, ज्वालामुखी संकोणाश्म व तांबडा टॅकिलाईट दिसून येतात. कुहरीमध्ये द्वितीयक म्हणजे नंतर तयार झालेली खनिजे आढळून येतात. खडकांच्या पोकळ्यात आणि भेगांतून आढळणाऱ्या द्वितीयक खनिजात झिओलाईटचे काही प्रकार आणि क्वार्टझ, चाल्सीडोनी, अगेट, ओपल, चर्ट इत्यादी स्फटिकी आणि गूढस्फटिकी सिलिका तसेच कॅलसाईट, ग्लोकानाईट, इत्यादी खनिजे यांचा समावेश होतो.

थरांची संख्या, जाडी व विस्तार : भारतीय भूसर्वेक्षण विभागाने या जिल्ह्यात किल्लारी परिसरात ८ ते १० बेसाल्ट लाव्हाचे थर रेखांकीत केले आहेत. थरांची जाडी १० ते ३० मीटर दिसून येते. दोन लाव्हा थरांमध्ये रेडबोल अथवा भाजक्या विटासारखा दिसणारा खंगरी बेसाल्ट आढळून येतो. लाव्हाचे थर " आ आ " प्रकारचे गुणधर्म दाखवितात.

डॉ. करमरकर यानी भूकंपग्रस्त भागातील तेरणा नदीच्या खोऱ्यात माकणी धरणापासून ३२ कि.मी. वर असलेल्या धनोरावाडी गावापर्यंत २,४०० चौ.कि.मी. एवढ्या भागाचे सविस्तर भूशास्त्रीय सर्वेक्षण केले. या भागात सर्वत्र घट्ट, सघन व सूक्ष्मकणी बेसाल्ट दिसून आले. दोन थरांमधील स्पर्शरेषा खालील निष्कर्ष वापरून ठरविली गेली.

१. संघन बेसाल्टच्या थरांचा वरचा भाग थोड्या जाडीपर्यंत मोठ्या प्रमाणात कुहरीयुक्त असतो व या भागावर जल औष्णिक क्रियेचा परिणाम होऊन तो जांभळ्या रंगाचा झालेला दिसतो.

२. काही लाव्हा थरांच्या कुहरीयुक्त असलेल्या वरच्या भागात अनियमित आकाराचे तांबड्या टॅकिलाईटचे अंतर्भेद दिसून येतात.

३. काही ठिकाणी दोन बेसाल्टच्या लाव्हा थरामध्ये तांबड्या टॅकिलाईटचे कमी जाडीचे (पातळ) खंडीत पट्टे आढळतात.

४. काही ठिकाणी दोन सघन लाव्हा थरामध्ये संकोणाश्माचा पट्टा दिसून येतो. या संकोणाश्माच्या पट्ट्यांमधील घटक अणकुचीदार अथवा उपकोनीय असून ते चूर्ण झालेल्या तांबड्या टॅकिलाईट अथवा झीओलाइटच्या लुकणाने एकत्र सांधलेले दिसून येतात.

नदीच्या वरच्या टप्यातील भागात जेथे नदी खडकावरून वाहते अशा ठिकाणी अथवा नवीनच खणलेल्या विहिरीत अथवा रस्ता करण्यासाठी बेसाल्ट खडकातून घेतलेल्या छेदामध्ये दोन थरातील स्पर्शरेषा स्पष्टपणे दिसून येते. या भागात लाव्हा थराची जाडी १० ते २० मी. एवढी दिसून आली.

किल्लारी सभोवतालच्या बेसाल्ट खडकाची दृष्य व पृष्ठभागाखालील एकूण जाडी अजमावण्यासाठी

भूभौतिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला. एकूण १६ ठिकाणे या पद्धतीने सर्वेक्षण करण्यासाठी उमरगा-औसा (दक्षिण-उत्तर दिशेने) व निलंगा-खेड (ईशान्य-नैऋत्य दिशेने) या किल्लारी परिसरातील २५ ते ३० कि.मी. त्रिज्येभोवतालच्या प्रदेशातील निवडण्यात आली. बेसाल्ट थराची जाडी या भागात ३०० ते ४०० मीटर एवढी असावी असे अनुमान या सर्वेक्षणावरून काढण्यात आले. या सर्वेक्षणासाठी प्रतिरोध सर्वेक्षण व विद्युत चुंबकीय सर्वेक्षण या पद्धती उपयोजिल्या गेल्या. भूपृष्ठाखाली विद्युत चुंबकीय लहरी सोडण्यात आल्या. चुंबकीय क्षेत्रे मोजली गेली. प्रत्येक खडक प्रकारची प्रवाहक शक्ती वेगवेगळी असते. या भागात ३०० ते ४०० मीटर खोलीनंतर प्रवाहक शक्तीत बदल झाल्याचे दिसून आले.

या सर्व केलेल्या अन्वेषण व सर्वेक्षणावरुन असे दिसून येते की, या भागात बेसाल्ट लाव्हा थरांची एकूण जाडी ३०० ते ४०० मीटर एवढी आहे. वैयक्तिक थरांची जाडी ५ ते ४० मीटर एवढी दिसून येते. लाव्हाचे थर सर्वत्र आडवे सपाट व जवळ जवळ क्षितिज समांतर पसरलेले दिसून येतात.

संधी : बेसाल्ट थरामध्ये चार उभ्या प्रकारच्या संधी आढळून आल्या. या सर्वसाधारणपणे उ.४५° प-द ४५° पू., उ.७०° पू- द ७०° प, उ २०° प-द २०° पू व उ ३०° पू-द ३०° प या दिशात आहेत. काही ठिकाणी लाव्हा थरांना समांतर असलेल्या आडव्या संधी दिसून आल्या. काही थरांमध्ये स्तंभाकृती प्रकारच्या अविकसित संधी आढळून आल्या. किल्लारी परिसरातील बेसाल्ट थरांची नति अत्यंत सौम्य म्हणजे १:६०० इतकी असून ही दक्षिण अथवा आग्नेय दिशेस आहे. या भागात बेसाल्ट खडकांना कोठेही तडे गेलेले दिसून येत नाहीत. तसेच खडकात भ्रंश आढळून येत नाहीत. थरांमध्ये भित्ती कोठेही घुसलेल्या दिसून आल्या नाहीत तसेच दोन बेसाल्टच्या थरांमध्ये इंटर ट्रॅपियन (आंतरस्तरीय) अवसादी गाळाचे थर आढळून आले नाहीत.

भूस्वरुप (भरूप) : या भागात दिसून येणारी भूस्वरुपे खडक प्रकार व हवामान यांच्याशी संबंधीत आहेत. या जिल्ह्यातील हवामान निमशुष्क स्वरुपाचे असून पावसाचे वार्षिक सरासरी प्रमाण ७५० ते ९०० मि.मी. इतके आहे. या जिल्ह्यात कमी डोंगराळ भाग उदगीर व निलंगा या तालुक्यात असून डोंगर रांगांची सर्वसाधारण उंची समुद्रसपाटीपासून ४५० ते ७३० मी.एवढी आहे. नद्यांच्या खोऱ्यातील सरासरी उंची ५५० ते ६०० मी. एवढी आहे.

या भागातील घट्ट व पक्क्या बेसाल्ट थराचा वरील भाग कुहरीयुक्त असून वातावरण क्रियेने मऊ झालेला दिसतो. वरील प्रकारचा थर जर पृष्ठभागावर असला तर जमिनीचा उतार सौम्य असतो. बेसाल्ट थरांचा मधला भाग घट्ट व टणक असल्याने त्याचा वातावरणीय क्रियेने अपक्षय कमी प्रमाणात होतो. मंचाच्या अथवा पायऱ्याच्या आकाराचे भूरूप तयार होते. किंवा रुंद विस्तीर्ण पठारे तयार झालेली दिसून येतात. लाव्हा थरांच्या मधल्या कठीण भागाची वातावरण क्रियेमुळे विशिष्ट प्रकारची झीज होते. सुरूवातीला या खडकातील संधीलगतचा भाग मोठ्या प्रमाणात झिजून कोपरे गोलसर होतात आणि नंतर या खडकाचे बाहेरून आत एकामागून एक पापुद्रे सुटे होऊ लागतात. वर्तुळाकार गोल आकाराचे कवचयुक्त धोंडे तयार होतात. या क्रियेस " गोलकाभ अपक्षय " असे म्हटले जाते. या जिल्ह्यात सर्वत्र उघड्या पडलेल्या भागात अथवा सौम्य डोंगर उतारावर अथवा पायथ्याशी गोल आकाराचे मोठमोठे धोंडे सुटे होऊन जमिनीवर विखरून पडल्याचे दिसून येते.

अनुक्रमणिका

जांभा : उष्ण कटिबंधातील प्रदेशात एका आड एक येणाऱ्या उन्हाळी व पावसाळी अशा अत्यंत विरोधी हवामानामुळे बेसाल्ट खडकांचे रासायनिक अपघटन होऊन त्यांचेपासून जांभा खडक तयार होतो. खडकाचे रासायनिक अपघटन होताना आत्यंतिक ऑक्सिडायझेशनच्या परिस्थितीत अल्कली, कॅल्शियम व मॅग्नेशियम आणि सिलीका हे विघटन विलयनातून निघून जातात आणि लोह, मँगेनीज व ॲल्युमिनियम यांची हायड्रॉक्साइडे शिल्लक राहतात. सामान्यत: जांभा खडकाचा रंग तांबुस अथवा तपकिरी असतो व यात लहानमोठी कुहरे व पोकळ्या भरपूर प्रमाणात असतात.

या जिल्ह्यातील उत्तर व पूर्व भागातील औसा, उदगीर व निलंगा या तालुक्यातील पठारी प्रदेशात ६५० ते ७०० मीटर उंचीवर हा खडक प्रकार भरीव पट्ट्याच्या स्वरूपात आढळतो. त्याची जाडी १५ ते ३० मीटर एवढी दिसून येते. या खडकाच्या उभ्या छेदाची पाहणी केल्यास तीन भाग आढळून येतात. वरचा पृष्ठभाग कठीण असतो. त्याखालील भाग चिकणमातीचा मऊ प्रकारचा असतो व सर्वात खालील भाग विघटन झालेल्या बेसाल्टचा असतो.

जांभा खडक सर्वसाधारणपणे ज्या ठिकाणी पावसाचे वार्षिक प्रमाण १,००० ते १,२०० मि.मी. पेक्षा जास्त आहे अशा ठिकाणी तयार होतो. महाराष्ट्रात हा खडक प्रकार विस्तृत प्रमाणात कोकणात व सह्याद्री पर्वताच्या घाटमाथ्यावर आढळतो. सध्या निमशुष्क हवामान असलेल्या या जिल्ह्यात हा खडक प्रकार आढळून येत असल्याने त्याला पुराहवामान अभ्यासाच्या दृष्टीने विशेष महत्व आहे. हा खडक प्रकार केवळ या जिल्ह्यात नव्हे, तर या जिल्ह्याला लागून असलेल्या कर्नाटकातील बिदर जिल्ह्यात व आंध्र प्रदेशमधील मेदक जिल्ह्यात अखंड भरीव पट्ट्याच्या स्वरूपात दिसून येतो. हा खडक पूर्व चतुर्थक कालखंडात तयार झाला असावा असे आतापर्यंत गृहीत धरले होते. गेल्या दशकात भारतातील जांभा खडकांचे वयोमान पुराचुंबकीय भूभौतिक पद्धतीने काढण्यात आले आहे व त्यानुसार हा खडक प्रकार पूर्व टर्शरी (तृतियक) कालखंडात तयार झाला असावा. या जिल्ह्यातील खरोसा (ता.औसा) येथे असलेली बौद्धकालीन लेणी या खडकात कोरली आहेत.

चतुर्थककालीन गाळांचे थर : जिल्ह्यातील मांजरा, तेरणा, घरणी, तावरजा, मन्याड, लेंडी इत्यादी नद्यांच्या काठावर गाळांचे थर आढळून येतात. हे अवसादी थर मुख्यत्वे करून जलोढ स्वरूपाचे आहेत. त्यांची जाडी २० मीटर पेक्षा जास्त नसून नद्यांच्या दोन्ही किनाऱ्यावर त्यांचा विस्तार १ ते १.५ कि.मी. एवढा दिसून येतो. या थरांच्या तळाकडील भागात बहुतकरुन गोट्यांचे आणि वाळूचे थर असतात व वरच्या भागात बारीक वाळू, पिवळ्या व भुऱ्या रंगाची माती आढळून येते. दगडगोट्यांच्या थरात अश्मयुगीन हत्यारे व पूर्वीच्या प्राण्यांचे जीवाश्म मिळतात. या थरामध्ये कॅलशियम कार्बोनेटचे (चुनखडी) संधित बऱ्याच प्रमाणात असतात व त्यामुळे थर घट्ट झालेले आढळून येतात. पुराजीवाश्माच्या अभ्यासावरून व काही उपलब्ध असलेल्या रेडीओ कार्बन १४ पद्धतीने काढलेल्या तारखांवरून हे गाळांचे अवसादी थर १ लाख ते १० हजार वर्षांपूर्वीचे म्हणजे उत्तर प्लायस्टोसीन कालखंडातील आहेत.

मृदा : जिल्ह्यात आढळणारी मृदा जागोजागी वेगवेगळ्या प्रकारची व जाडीची असते. जिल्ह्यातील बहुतांश भागात काळी मृदा आढळून येते. त्यात प्रामुख्याने " मॉटमोरलाभाईट " नावाचे खनिज असते. तिची जाडी १ ते १.५ मीटर इतकी असते. तिच्या खालच्या भागात चुनखडीचे थर दिसून येतात. बेसाल्ट थराच्या कठीण व सधन भागाच्या विघटनामुळे काळी कसदार मृदा तयार होते. नद्यांच्या खोऱ्यात ५ ते ८ मीटर जाडीचे काळ्या मृदेचे थर दिसून येतात. हे थर नदीने वाहून आणलेल्या गाळापासून तयार झालेले आहेत. डोंगराच्या सौम्य उतारावर व पायथ्याशी उथळ व कमी जाडीची मुरुमयुक्त मृदा दिसून येते. जांभा खडक असलेल्या भागात या खडकाच्या अपक्षयामुळे तांबड्या अथवा तपकिरी रंगाची मृदा तयार होते. त्यात चुनखडीचे थर अजिबात नसतात.

आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे खडक व खनिजे : जिल्ह्यात सर्वत्र आढळणारा सूक्ष्मकणी व सघन बेसाल्ट घडविण्यास योग्य असतो. त्यामुळे त्याचा पूल, धरणे, इमारती, देवळे, नदीचे घाट, इत्यादींच्या बांधकामासाठी चांगला उपयोग होतो. या खडकाची खडी रस्त्यासाठी लोहमार्गावर रुळाखाली स्थैर्यभारासाठी तसेच सिमेंट काँक्रीटमध्ये वापरली जाते. जिल्ह्यात अनेक ठिकाण कठीण व टणक जातीच्या बेसाल्टच्या खाणी आहेत.

जिल्ह्यातील पूर्व व उत्तर भागात जांभा खडक सापडतो, त्याचा उपयोग घरे बांधण्यासाठी सर्वत्र केला जातो. जांभा खडकाचे विटासारखे चौकोनी तुकडे करणे सोपे जाते, या कारणाने घर बांधण्यासाठी त्याचा उपयोग केला जातो.

नदीकाठी आढळून येणाऱ्या गाळाच्या थरात अनेकदा कंकरच्या स्वरुपात चुनखडीचे लहान मोठे थर आढळतात. या चुनखडींपासून चुना तयार केला जातो.

बेसाल्ट खडकाच्या कुहरीत पोकळ्यातून आणि शिरेमधून सिलीका समूहातील अगेट, चाल्सीडोनी, जस्पर, चर्ट इत्यादी खनिजे आढळतात. या जिल्ह्यातील बेसाल्टमध्ये कुहरी व शिरा कमी प्रमाणात असल्याने द्वितीयक खनिजे कमी प्रमाणात मिळतात.

भूजल : सर्वसाधारणपणे ट्रॅप खडकात पाणी साठविण्याची पात्रता कमी असते. या जिल्ह्यातील बेसाल्ट खडक अकुहरी व सघन आहेत. अशा खडकात भरपूर प्रमाणात उभ्या संधी असल्यास ते जलधारक असतात. बेसाल्ट खडकाच्या तळाकडील भागात दिसून येणाऱ्या आडव्या संधी पाणी एका ठिकाणाहून दुसरीकडे वाहून नेण्यास उपयुक्त ठरतात. उभ्या संधी मोठ्या प्रमाणात असलेल्या खडकात खणल्यास पाणी भरपूर लागण्याची शक्यता असते. दोन थराच्या स्पर्शपातळीवर बऱ्याच वेळा पाझर आणि झरे दिसून येतात. लाव्हा थराच्या संकोणाश्मनांच्या भागाची विघटणास सुरुवात झालेली नसते अशा वेळी ते पाणी वाहून नेण्यास अप्रवेश्य असतात. जांभा खडकात असंख्य छिद्रे असल्याकारणाने पाणी सहजरित्या झिरपत जाते व जेथे चिकणमातीचा थर लागतो तेथे झऱ्याच्या स्वरूपात बाहेर पृष्ठभागावर येते. गाळांचे थर उत्तम प्रकारचे जलभूत प्रस्तर असतात.

किल्लारी भूकंप

लातूर जिल्ह्यातील औसा व उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील तेरणा नदीच्या खोऱ्यात ३० सप्टेंबर १९९३ रोजी भूकंपाचा मोठा धक्का बसला. या भूकंपाचे अधिकेंद्र किल्लारी या ठिकाणी आढळून आले. भूकंपाचे प्रचल खालीलप्रमाणे निश्चित केले आहेत.

अधिकेंद्र	- किल्लारी, ता.औसा, जि.लातूर
अक्षांश	- १८° ०७" उ
रेखांश	- ७६° ६२" पू
वेळ	- पहाटे ३ वाजून ५५ मिनिटे ४७ सेकंद भारतीय प्रमाण वेळ
दिनांक	- ३०-९-१९९३
भूकंप केंद्राची खोली	- १२.० (३.०) कि.मी.
महत्ता	- ६.३ रिश्टर श्रेणी
तीव्रता	- [IX मर्क्याली मापन श्रेणी]

भारतीय व्दीपकल्पाचा भाग भूकंपदृष्ट्या स्थिर व किमान तीव्रतेचा मानला जातो. दख्खनचे पठार अत्यंत कणखर असल्याची कल्पना आतापर्यंत होती व विनाशकारी भूकंप या भागात होतील असे वाटले नव्हते. ऐतिहासिक कालखंडात देखील या भागात भूकंप झाल्याची नोंद नाही[११].

भारतीय द्वीपकल्पाचा प्रदेश स्थिर पट्टयात मोडतो. आडव्या दाबामुळे होणारे जास्त महत्त्वाचे भूकंप या प्रदेशात सहसा होत नाहीत. गेल्या दोन शतकात या स्थिर मानल्या गेलेल्या भागात ६ पेक्षा जास्ती महत्ता असलेल्या ९ भूकंपाची नोंद आहे. यातील दोन - कोयनानगर (१९६७,-६.८ महत्ता) व किल्लारी (१९९३ - ६.३ महत्ता) - हे महाराष्ट्रातील आहेत.[१२]

भूकंपाचा तीव्र धक्का बसण्या अगोदर किल्लारी परिसरात वर्षभर आधी म्हणजे १ ऑक्टोबर १९९२ ते २९ सप्टेंबर १९९३ या संपूर्ण कालावधीत लहान व मध्यम स्वरूपाचे धक्के जाणवत होते. १८ ऑक्टोबर १९९२ रोजी ४.३ महत्तेचा धक्का बसला होता व २० ते २५ घरांची पडझड किल्लारी परिसरात झाली होती. २ ते ४ महत्तेचे ८-१० धक्के १८ ऑक्टोबर १९९२ ते २ नोव्हेंबर १९९२ मध्ये बसल्याची नोंद २२० कि.मी. अंतरावर असलेल्या हैद्राबाद येथील भूकंप मापन केंद्राने केली होती.

---

११. जगात काही ठराविक प्रदेशात नेहमी भूकंप होत असतात व भूकंपाचे दोन प्रमुख पट्टे पॅसिफिक महासागरी पट्टा व भूमध्य सागरी पट्टा हे ओळखले गेले आहेत. जगातील ९५ टक्के भूकंप या दोन पट्ट्यातच प्रामुख्याने होतात. हे दोन पट्टे भूशास्त्रीय संरचना आणि भूशास्त्रीय इतिहास यावर आधारित आहेत. पृथ्वीच्या पृष्ठभागाची भूकंपप्रवण अस्थिर भाग व कमी प्रमाणात भूकंप होणारा स्थिर भाग अशी विभागणी केली आहे. भारतातील हिमालयाचा प्रदेश अस्थिर पट्टयात मोडतो. या भागात भूकंपाचे धक्के विशेष तीव्रतेने व वारंवार जाणवतात. हिमालय पर्वत वलीकरणामुळे निर्माण झाला आहे. पर्वत निर्मितीस कारणीभूत असलेले आडवे दाब अजूनही या भागात कार्यरत आहेत.

१२. स्थिर समजल्या गेलेल्या जगातील इतर भागात देखील भूकंपाचे ६ ते ८ महत्तेचे धक्के बसल्याची नोंद आहे. इतर प्रदेशातील काही महत्त्वाचे भूकंप खालीलप्रमाणे आहेत. १. न्यू माद्रीद, मध्य अमेरिका (१८१२ - महत्ता ८.२), २. टेनांट क्रीक, ऑस्ट्रेलिया (१९८८ - महत्ता ६.३ ते ६.७). ३. उंगावा, कॅनडा (१९८९ - महत्ता ६.३)

अनुक्रमणिका

भूकंपाची जास्तीत जास्त तीव्रता पृष्ठभागावरील अपिकेंद्राजवळ जाणवते. कारण भूकंप उगमस्थानापासून निघालेली शक्ती (उर्जा) ही लंबरूपात भूपृष्ठावर असलेल्या या अधिकेंद्रावर उभ्या रेषेत प्रथम येते. अधिकेंद्राच्या परिसरातील प्रदेशात असलेल्या खेड्यांची पाहणी करून घरावर व बांधकामावर भूकंपाचा झालेला परिणाम ठरविण्यात आला. सारखाच परिणाम झालेली गावे एकाच रेषेने जोडली गेली. या रेषेवर असलेल्या प्रत्येक ठिकाणाची तीव्रता सारखी असते. या रेषेला समकंप रेखा असे म्हटले जाते. किल्लारी भोवतालच्या प्रदेशाचा या प्रमाणे समकंप रेखा नकाशा बनविण्यात आला. किल्लारी सभोवतालच्या ६ कि.मी. त्रिज्येत असलेल्या व ११० चौ.कि.मी. भाग व्यापलेल्या १७ खेड्यात भूकंपाचे तीव्र परिणाम जाणवले. या भागाला महत्तम कंप (Meizoseismal Area) असे म्हटले जाते. या भागातील ९० टक्के घरे जमीनदोस्त झाली. या भागातील परिणामाची तीव्रता मर्क्याली मापन श्रेणीनुसार [X एवढी आहे]. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील किल्लारी, किल्लारीवाडी, गुबल, मंजरुळ, तळणी, गाजनखेड, येळवट व उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील सास्तुर, चिंचोली, रेबे, राजेगाव एकोंडी व पेठ सांगवी या गावात घरांची पडझड आत्यंतिक प्रमाणात झाली. अपिकेंद्रापासून जसजसे दूर जावे तसतसे तीव्रतेचे परिणाम कमी होत गेलेले दिसून आले. समकंप रेखा IX व VII या मधील भागत (अधिकेंद्रापासून ६ ते १० कि.मी. त्रिज्येमधील प्रदेश) भूकंपाचे परिणाम निश्चितपणे जाणवले पण तीव्रता थोडीफार कमी झालेली दिसून आली. या भागातील ६५ ते ७० टक्के घरांची पडझड झाली. समकंप रेखा VIII व VII या मधील भागात (अधिकेंद्रापासून १० कि.मी. ते २० कि.मी. त्रिज्येमधील प्रदेश) पडझडीचे प्रमाण एकदम कमी होत गेले व १५ ते २५ टक्के घरांची पडझड झालेली दिसून आली. किल्लारी भूकंपावर आधारित काढलेल्या समकंप रेषा थोड्याफार वेड्यावाकड्या पण सर्वसाधारपणे लंबगोलाकृती असून उ ५०° पू - द ५०° प या दिशेत आहेत.

भूकंपाची उगमस्थानाची खोली पृष्ठभागापासून ८ ते १० कि.मी. एवढी आहे. खोली फार नसून उथळ आहे. या कारणाने भूकंपाच्या तीव्रतेचे परिणाम अपिकेंद्रापासून थोड्या म्हणजे १५ ते २० कि.मी. अंतरापर्यंत विशेष करून जाणवले. या अंतरानंतर भूकंपाची तीव्रता एकदम कमी होत गेली. भूकंपाचे धक्के मात्र सर्वसाधारणपणे ८०० कि.मी. अंतरापर्यंत जाणवले. महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेश या राज्यांत धक्के सर्वत्र जाणवले. गुजरात, मध्यप्रदेश, तामीळनाडू व केरळ राज्यांतील काही भागात धक्के जाणवले. इतक्या मोठ्या अंतरापर्यंत धक्के जाणवले यावरून असे दिसून येते की, भूकंप लहरीचे परिवहन पृष्ठभागाखालील खडकातून चांगल्या प्रकारे झालेले आहे.

या भूकंपात मरण पावलेल्या व्यक्तींची संख्या अधिकृत आकडेवारीनुसार ७,६०० इतकी आहे व जखमींची संख्या १२,००० एवढी आहे. भूकंपात सुमारे २ लाख घरांना नुकसान पोचले. ह्यातील १९,००० घरे पूर्णतया उध्वस्त झाली. भूकंपामध्ये एवढी मोठी वित्त व प्राणहानी झालेला महाराष्ट्रातला हा पहिलाच प्रसंग आहे. जी घरे उध्वस्त झाली ती भूकंपाच्या धक्याने झालीच पण सदोष घरबांधणीच्या कारणाने अधिक प्रमाणात झाली असे आढळून आले आहे. वेडेवाकडे मोठ्या आकाराचे दगड व माती वापरून बांधलेल्या भारवाही संरचना असलेल्या घरांचे रुपांतर भूकंप धक्यानंतर ढिगाऱ्यात झाले. लाकडी चौकटीची संरचना असलेल्या घराचा सांगाडा टिकून राहिला. चिरेबंद दगड वापरून सिमेंटमध्ये बांधलेल्या भिंती भूकंप धक्यात व्यवस्थित टिकून राहिल्या. भूकंप पहाटेच्या वेळी झाल्याने व सर्व लोक निद्राधीन असल्याने मृतांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येते.

किल्लारी येथे भूकंपाचा मोठा धक्का बसून गेल्यावर नंतर काही काळ या भागात लहान व मध्यम स्वरूपाचे धक्के बसल्याचे आढळून आले. किल्लारीपासून जवळ असलेले भूकंपमापनकेंद्र हैद्राबाद येथे

आग्नेयेला २२० कि.मी. अंतरावर आहे. भूकंपाच्या मोठ्या धक्क्यानंतर किल्लारी परिसरातील ५० कि.मी.च्या अंतरात ३० तात्पुरत्या स्वरूपाची भूकंपमापन यंत्रे निरनिराळ्या ठिकाणी बसविण्यात आली. या केंद्रांवर जानेवारी १९९४ अखेरपर्यंत २०० भूकंप धक्क्याची नोंद झाली. या धक्क्यांची महत्ता रिश्टर श्रेणीनुसार १.५ ते ४.५ एवढी असल्याचे दिसून आले. या सर्व लहान व मध्यम स्वरूपाच्या भूकंपाचा केंद्रबिंदू तेरणा खोऱ्यात किल्लारी परिसरातच केंद्रीत झाल्याचे दिसून आले व केंद्रबिंदूचे स्थलांतर झालेले दिसून आले नाही.

भूकंपाच्या मोठ्या धक्क्यानंतर ३-४ आठवड्यांच्या कालावधीत अपिकेंद्रापासून २०० कि.मी. अंतरापर्यंत भूकंपाचे विविध परिणाम दिसून आले. हे परिणाम धुर, वाफ व वायुचे उत्सर्जन, जमिनीखालून आवाज येणे व जमिनीला भेगा पडणे या स्वरूपाचे होते. हे परिणाम महाराष्ट्रातील लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, बीड व सोलापूर या जिल्ह्यांत, तर कर्नाटकात गुलबर्गा, बिदर व विजापूर जिल्ह्यांत व आंध्र प्रदेशातील मेदक व निझामाबाद या जिल्ह्यांत अनेक ठिकाणी दिसून आले. या सर्व परिणामांची व्यवस्थितपणे नोंद व सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

भूकंप निर्मितीची कारणमीमांसा : भारतीय द्वीपकल्पाचा त्रिकोणी भूभाग व विशेषत: महाराष्ट्र राज्याचा दख्खन पठाराचा भूभाग हा स्थिर मानला गेला आहे. वरील प्रदेशात कोयनानगर येथे जेव्हा ११ डिसेंबर १९६७ रोजी ६.८ क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला तेव्हा भूशास्त्रज्ञांच्या दृष्टीने ही गहन समस्या होती. ३० सप्टेंबर १९९३ रोजी किल्लारी येथे झालेल्या ६.३ महत्तेच्या भूकंप धक्क्याने ही समस्या आणखी बिकट झाली. भूकंपदृष्ट्या अत्यंत सुरक्षित व स्थिर मानल्या गेलेल्या भूभागात भूकंपाचे धक्के का बसत आहेत व हा प्रदेश खरोखरीच प्रवण आहे का हे जाणून घेण्यासाठी भूशास्त्रज्ञांनी कोयनानगर येथील भूकंपानंतर सतत संशोधनाव्दारे प्रयत्न चालू ठेवले. आधुनिक अभ्यास व तंत्रपध्दतीचा वापर करून गेल्या २५-३० वर्षांत भूशास्त्रीय व भूभौत्तिक संशोधन करण्यात आले. या सर्व अभ्यास व संशोधनामुळे दख्खन पठारावर झालेल्या भूकंपासंबंधीच्या समस्यांचा उकल करण्यात समाधानकारक प्रगती झाली आहे.

भूकंप निर्मिती अनेक कारणाने होत असली तरी प्रामुख्याने पृष्ठभागाखाली असलेल्या खडकांत होणाऱ्या हालचाली ९० ते ९५ टक्के भूकंपाना कारणीभूत ठरतांत. गेल्या ३०-४० वर्षांत झालेल्या संशोधनामुळे असे निदर्शनास आले आहे की, पृथ्वीचे कवच हे अखंड नसून त्याला अनेक तडे गेलेले आहेत व कवच एकूण ७ मोठ्या व ८ लहान कवचखंडांनी तयार झालेले आहे. भारतात व विशेषत: महाराष्ट्रात होत असलेल्या भूकंपाचे कारण समजण्याच्या दृष्टीने यातील " इंडो-ऑस्ट्रेलियन प्लेट " व " युरेशियन प्लेट " ही दोन कवचखंड महत्त्वाची आहेत. या दोन कवच खंडांतील हालचालीमुळे निर्माण झालेल्या दाबाने हिमालय हा वलीपर्वत निर्माण झाला आहे. या दोन कवचखंडांची एकमेकांना समोरासमोर रेटण्याची क्रिया अजूनही सतत चालू असल्याने हिमालयाचा भूभाग हा अत्यंत भूकंपप्रवण असून या भागात भूकंप सतत होत असतात.

भारतीय द्विपकल्प हा " इंडो-ऑस्ट्रेलियन " कवचखंडाचा एक भाग आहे. हे कवचखंड २५ ते ३० दशलक्ष वर्षांपासून सतत ईशान्येला म्हणजे सैबेरियाकडे सरकत आहे व सरकण्याचा वेग दरवर्षी ५ सें.मी. ते १० सें.मी. इतका असतो. बहुतांश भूकंप कवचखंडाच्या कडेकडील भागात होत असतात. भारतीय द्विपकल्प कवचखंडाच्या मध्यभागी असल्याकारणाने या भागात खरे पाहता भूकंप व्हावयास नकोत. ज्याअर्थी या भागात भूकंप झाले आहेत तेव्हा त्यामागील कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. इंडो-ऑस्ट्रेलियन कवचखंडाचा भाग एकसंघ नसून तो अनेक तुकड्यांचा बनलेला आहे. जेव्हा मुख्य कवचखंडाची

अनुक्रमणिका

हालचाल होते तेव्हा हे तुकडे वेगवेगळ्या वेगाने पुढे सरकत असतात. या तुकड्यामध्ये आपापसात सरकासरकीच्या व रेटारेटीच्या रुपाने हालचाली होत असाव्यात. या हालचाली जेव्हा भूस्तरभ्रंशावर होतात तेव्हा कोंडली गेलेली उर्जा कुहरीच्या रुपाने निर्माण होऊन ती भूकंपरूपाने बाहेर पडते.

भूकंपाच्या कारणाचा उद्‌गम पूर्णत: भूपृष्ठाखाली खोलवर होत असल्यामुळे भूपृष्ठाखाली असलेल्या खडकांची संरचना कशी आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. किल्लारी हे गाव महाराष्ट्राच्या सीमावर्ती प्रदेशात कर्नाटकाला नजीक आहे. भूशास्त्रीय दृष्ट्या देख़ील हा भाग सीमाप्रदेश आहे कारण तेथून थोड्याच म्हणजे ५० ते ६० कि.मी. दक्षिणेला प्राचीन खडक (आर्कियन) आढळून येतात. या भागात आढळून येणाऱ्या डेक्कन ट्रॅप बेसाल्टची जाडी ३०० ते ४०० मीटर दरम्यान आहे. या बेसाल्टखाली कोणते खडक प्रकार आहेत हे जाणून घेणे जरुरीचे आहे कारण या खडकात झालेल्या हालचालीमुळे या भागात भूकंप झाले आहेत.

राष्ट्रीय भूभौतिक संशोधन संस्था, हैद्राबाद व अणुशक्ती संशोधन केंद्र, खनिज विभाग, हैद्राबाद या संस्थांनी किल्लारी या ठिकाणी विंधन छिद्र पाडले. या संशोधनाचा मुख्य उद्देश बेसाल्टची या भागातील अचूक जाडी व बेसाल्ट थराखाली कोठले खडक प्रकार आहेत व त्यांची जडणघडण व संरचना कुठल्या प्रकारची आहे हे जाणून घेणे हा होता. पृष्ठभागापासून ३३८ मीटर खोलीपर्यंत बेसाल्टचे थर दिसून आले. बेसाल्टचे एकूण १२ ते १५ थर दिसून आले व त्यांची जाडी १५ ते ५० मीटर एवढी आहे. बेसाल्टच्या थरांखाली ८ मीटर जाडीचे म्हणजे ३३८ ते ३४६ मीटर खोलीपर्यंत इन्फ्रॅट्रॅपीयन प्रकारचे अवसादी खडक प्रकार आढळून आले. वालुकाश्म, शेल व पिंडाश्म हे या अवसादी खडक प्रकारांचे प्रमुख घटक आहेत. ३४६ मीटर खोलीनंतर आर्कियन खडक प्रकार सुरू झाले. ग्रॅनाईट व ग्रॅनाईट नाइस हे यातील प्रमुख खडक प्रकार होत. या संशोधनाने बेसाल्ट लाव्हा थराखाली आर्कियन खडक प्रकाराचे अस्तित्व निश्चितपणे आता सिध्द झाले आहे. या खडकांची नती ८०° एवढी आहे. खडकामध्ये अनेक भेगा, व भंजने दिसून आली. भरीव प्रकारच्या ग्रॅनाइटचे अस्पष्ट प्रकारचे सुभाजन दाखवणाऱ्या खडकात रुपांतर झाले आहे. काही ठिकाणी खडकात पायराईट व मॅग्नेटाईट स्फटिकांची निर्मिती झाल्याचे दिसून आले. खडकांचे बऱ्याच प्रमाणात सेरीसीटायझेशन व क्लोरायटीझेशन झालेले आहे. मूळ खडकात बरेच बदल झालेले दिसून येतात व हे बदल जलऔष्णिक क्रिया व खडकात निर्माण झालेल्या दाबामुळे झालेले आहेत. या सर्व लक्षणावरून ग्रॅनाईट खडकामध्ये हालचाली व निश्चितपणे विक्रियशीलता झाली आहे हे दर्शविते. खडकात झालेले बदल भूकंप निर्मितीस कारणीभूत आहेत.

बेसाल्ट खडकाखाली असलेल्या प्राचीन खडकांच्या (आर्कियन) संरचनेविषयी व या खडकात झालेल्या हालचालीसंबंधी अनुमाने मुख्यत्वेकरून भूभौतिक पध्दतीचा अवलंब करून काढण्यात आली. खालील भूभौतिक पध्दतीचा गुरुत्वीय भूकंपन पुराचुंबकीय, भौम चुंबकीय (Megneto tellurid) प्रतिरोध, इत्यादी अवलंब करण्यात आला. भौमचुंबकीय पध्दतीने काढलेला महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे पृष्ठभागापासून ६ ते १० कि.मी. खोलीवर असंगत व उथळ विद्युत वाहक असलेला भाग आढळून आला. हा प्रवाहक भाग पवा-पूआ या दिशेत आहे. १० ते १५ कि.मी. अंतरावर हा प्रवाहक भाग वरील खोलीवर आढळून आला नाही. या प्रवाहक भागाचे केंद्रीकरण किल्लारी येथेच झाले आहे. पृष्ठभागाखाली कवचाच्या वरील भागात आढळून आलेला हा प्रवाहक भाग द्रवयुक्त व तरल असावा. या द्रवयुक्त भागामुळे प्राचीन खडकांमध्ये कमकुवतपणा आला असावा व झालेल्या हालचालीमुळे दाब निर्मिती होऊन तो भूकंप लहरीच्या रुपाने बाहेर पडला असावा.

अनुक्रमणिका

किल्लारी भागात गुरूत्व पध्दतीचा अवलंब करण्यात आला. या अभ्यासावरुन बेसाल्ट थरांच्या खाली असलेल्या आर्कियन खडकात भ्रंश आहेत हे दिसून आले. किल्लारी परिसरातील २० x २० चौ.कि.मी.भागाची गुरुत्वशक्ती अनेक ठिकाणी उपकरणाच्या सहाय्याने मोजली गेली. अपेक्षित गुरुत्वशक्ती आणि प्रत्यक्ष गुरुत्वशक्ती यामधील फरकाला गुरुत्व असंगती (Gravity anomoly) असे म्हणतात. या पध्दतीत बुगर या शास्त्रज्ञाने काही सुधारणा सुचविल्याने सुधारीत पध्दती ही " बुगर असंगती " म्हणून ओळखली जाते. या भागाचा बुगर असंगती नकाशा तयार करण्यात आला. प्रमुख गुरुत्व असंगती उ प - द पू या दिशेने असलेली आढळून आली. दोन ठिकाणी - किल्लारी व कवठा या गावांमधील भाग व सास्तुरच्या दक्षिणेला ४-५ मिलगॅल एवढी उच्च असंगती आढळून आली. या दोन भागांमध्ये नीच असंगतीचा भाग दिसून आला. या भागामध्ये सास्तुर, किल्लारी, राजेगाव, एकोंडी इत्यादी भूकंपग्रस्त गावे येतात. या भागातील गुरुत्व असंगती किल्लारी भागाची अस्थिरता दर्शविते. या भागाचे उत्थान (upliti) झाले असावे व या उत्थानाला भ्रंश कारणीभूत असावेत.

डेक्कन ट्रॅप बेसाल्ट लाव्हा थराचा पुराचुंबकीय अभ्यास करण्यात आला. हा अभ्यास कुर्डुवाडी ते लातूर या पूर्व - पश्चिम १३० कि.मी. अंतराच्या पट्टयात अनेक ठिकाणी करण्यात आला. येडशी या गावाजवळील बेसाल्ट लाव्हा थर नियमित (Normal) ध्रुवता दर्शवितात. इतर ठिकाणचे लाव्हा थर उलटी (Reverse) ध्रुवता दर्शवितात असे आढळून आले. समुद्रसपाटीपासून एकाच उंचीवर असलेली येडशी व लातूर यामधील स्थाने विरुध्द (उलटी) ध्रुवता दर्शवितात. आढळून आलेली ही लक्षणे या भागात गट भ्रंशन (Block faulting) झाले आहे हे सुचविते.

उपग्रह प्रतिमा (Satellite imagery) अभ्यासपध्दती ही छायाचित्रणाची शाखा अलिकडेच विकसित झाली आहे. उपग्रहावरुन भूभागाचे घेतलेल्या छायाचित्रांच्या अभ्यासावरुन भूभागावरील विविध भूरुपांचे स्वरुप जाणून घेणे आता शक्य झाले आहे. विविध भूरुपे रेषेच्या स्वरुपात या प्रतिमेवर दिसून येतात. या रेषांना भूरुपीरेषा (Lineaments) असे संबोधिले जाते. पृष्ठभागावरील तडे, भेगा, भ्रंश, नदी व नाल्याचे प्रवाह या छायाचित्रात रेषेच्या स्वरुपात आढळून येतात. उपग्रहावरुन घेतलेल्या छायाचित्रांच्या अभ्यासावरून महाराष्ट्रात गोदावरी, घोड, कोयना, पनवेल, कुर्डूवाडी इत्यादी भूरुपीरेखा असल्याचे मानले जाते. किल्लारी भागाच्या उपग्रह प्रतिमेच्या अभ्यासावरून त्याभागात दोन प्रमुख भूरुपीरेखा वायव्य-आग्नेय व दक्षिण-उत्तर या दिशेत आहेत असे मानले जाते. याशिवाय इतर दिशेत अनेक भूरुपीरेखा ओळखल्या गेल्या आहेत. काही भूशास्त्रज्ञांच्या मते या भूरुपीरेखा भ्रंश अथवा भूपृष्ठाखाली असलेल्या खडकातील कमकूवतपणा दर्शवितात. या भूरुपी रेखांचा किल्लारी भूकंपाशी संबंध जोडण्यात आला आहे व भूकंप निर्मितीसंबंधी महत्वाची अनुमाने काढण्यात आली आहेत.

काही भूशास्त्रज्ञांच्या मते या भूरुपी रेखा म्हणजे छायाचित्रात दिसणाऱ्या सरळ रेषा होत व या विशिष्ट भूरचना एका रेषेत आहेत एवढेच दर्शवितात. यापलिकडे त्याना विशेष अर्थ नाही. भूकंपानंतर जेव्हा किल्लारी भागातील खेड्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा ज्या भागात भूरुपीरेखा छायाचित्रात दिसतात तो भाग पुनर्वसनास योग्य आहे की नाही हे ठरविणे आवश्यक होते. महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाने (औरंगाबाद विभाग), डॉ.बी.एम्.करमरकर, भूशास्त्र विभाग प्रमुख शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद याना या भागाची तपशीलवार भूशास्त्रीय पाहाणी करण्यास सुचविले. डॉ. करमरकर यानी तेरणा खोऱ्यातील भूकंपग्रस्त भागातील २,४०० चौ.कि.मी.भूप्रदेशाची पाहणी करुन भूशास्त्रीय अहवाल शासनास सादर केला. त्यांच्या मते उपग्रह प्रतिमेवर दिसून येणाऱ्या बहुतांश रेषा

या भागातील नद्या व नाले यांचे प्रवाह दर्शवितात. अवकाशातून घेतलेल्या छायाचित्रांमध्ये लिनियामेंट्स कशामुळे दिसते त्याचा जमिनीवर तपासणी करुन पडताळा केल्याशिवाय या चित्रित रेषाना काहीही महत्व नाही व तो प्रदेश धोकादायक आहे असे समजण्याचे कारण नाही. वरीलप्रमाणे भूशास्त्रज्ञांमध्ये भूरुपीरेखा संबंधी दोन विरुध्द टोकांची मते आहेत. भूरुपी रेखाना भूशास्त्रीय अभ्यासात निश्चितपणे महत्व आहे. तरी देखील त्याची जमिनीवर प्रत्यक्ष तपासणी करुन मग योग्य निष्कर्ष काढणे महत्वाचे ठरेल.

किल्लारी येथे झालेला भूकंप त्या भागात असलेल्या माकणी धरणामुळे होत आहे अशी शक्यता सुचविण्यात आली आहे. जेव्हा १९६७ मध्ये कोयनानगर येथे भूकंप झाला तेव्हादेखील हीच शंका उपस्थित केली होती. माकणी धरण तेरणा नदीवर किल्लारीपासून पश्चिमेला १५ कि.मी. अंतरावर आहे. धरणाचा आणि भूकंपाचा संबंध जोडणे कितपत योग्य आहे हे ठरविण्यासाठी साठविलेल्या पाण्याचा दाब किती आहे व या भागात धरणाखाली असलेल्या खडकांची दाब सहन करण्याची क्षमता किती आहे हे तपासून पाहिले पाहिजे. माकणी धरणात साठविलेल्या पाण्याचा स्तंभ जास्तीत जास्त १५ ते १६ मीटर इतकाच असू शकतो. या परिसरात बेसाल्टचे जे खडक सापडतात त्यांची दाब सहन करण्याची क्षमता दर सें.मी.वर २००० कि.ग्रॅ. इतकी प्रचंड आहे. त्यामुळे माकणी धरणामुळे खडकावर पडलेला दाब अगदी नगण्य आहे. १० कि.मी. खोलीवर असलेल्या उगमस्थानाशी या दाबाचा संबंध जोडणे बरोबर नाही. या व्यतिरिक्त या भागातील बेसाल्ट हे बहुतांशी अपार्य आहेत व या खडकातून पाणी खोलवर मुरु शकत नाही. खडकात असलेल्या संधी व भेगा या १५ ते २० मीटर अंतरानंतर बंद होतात. या भागातील बेसाल्ट खडकात कोठेही तडे, भ्रंश अथवा मोठ्या भेगा दिसून येत नाहीत. तेरणा नदी ही भ्रंशावरुन वाहते हा समज चूकीचा आहे. वरील सर्व कारणामुळे धरणामुळे भूकंप होतात ही चुकीची व अशास्त्रीय कल्पना आहे.

भारतीय द्विपकल्पाचा भाग असलेल्या व भूकंपदृष्ट्या स्थिर मानल्या गेलेल्या महाराष्ट्रातील काही भागांत गेल्या २५-३० वर्षांत ६ पेक्षा जास्ती महत्ता असलेल्या भूकंपाचे धक्के बसल्याने महाराष्ट्राला यापुढे भूकंप प्रवण प्रदेश म्हणणे योग्य आहे का ? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. किल्लारी या भूकंपग्रस्त गावाच्या परिसरात बेसाल्ट खडक प्रकार आहेत. त्यांची जाडी ३०० ते ४०० मीटर एवढी आहे. या खडकात कोठेही भेगा, तडे अथवा भ्रंश दिसून येत नाहीत. या भागात झालेल्या भूकंपाचे उगमस्थान हे बेसाल्ट खडकांच्या थराखाली असलेल्या प्राचीन खडक प्रकारात आहे. हे खडक प्रकार आर्कियन प्रकारचे आहेत हे या भागात घेतलेल्या विंधन छिद्रावरुन सिध्द झाले आहे. बेसाल्ट खडकांची निर्मिती ६ ते ७ कोटी वर्षांपूर्वी झालेली असून त्या खाली असलेल्या खडकांची निर्मिती ३०० कोटी वर्षापूर्वी झालेली आहे. या दोन खडक प्रकाराच्या निर्मितीच्या कालावधीत प्रचंड अंतर आहे. विंधन छिद्रातून बाहेर काढलेल्या आर्कियन खडकाच्या अभ्यासावरून या खडकाच्या संरचनेविषयी थोडी फार कल्पना येते. आर्कियन खडक हे किल्लारीपासून दक्षिणेला ८० ते १०० कि.मी. अंतरावर कर्नाटक राज्यात बेसाल्ट खडकांना लागून जमिनीवर उघडे पडलेले आहेत. या खडकांचा सविस्तर अभ्यास झालेला आहे. या खडकाची संरचना गुंतागुंतीची असून खडकात अनेक प्रस्तरभ्रंश आहेत. या खडकात उभ्या व आडव्या हालचाली झालेल्या दिसून येतात.

बेसाल्ट खडकांच्या थराखाली असलेले आर्कियन खडक प्रकारांची संरचना व जडण-घडण जाणून घेण्यासाठी किल्लारी परिसरात भूभौतिक पध्दतीचा अवलंब करण्यात आला. या भागात वापरल्या गेलेल्या पद्धतीचा परामर्श या अगोदर घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील निरनिराळ्या भागात भूभौतिक पध्दतीचा अवलंब करुन असे अनुमान काढण्यात आले आहे की बेसाल्ट लाव्हा थराखाली मुख्यत: चार ठिकाणी

खचदऱ्या किंवा भूस्तरभ्रंश असावेत. सोन-नर्मदा-तापी खोरे, कोकण किनारी पट्टा, गोदावरी खचदरी व कुर्डूवाडी खचदरी हे चार प्रदेश होत. यातील कुर्डूवाडी खचदरी किल्लारी भूकंपाला कारणीभूत असावी. ही खचदरी पुण्याच्या दक्षिणेकडून कुर्डूवाडीपर्यंत पृष्ठभागाखाली ३० कि.मी. खोलीवर असावी. जिची रुंदी ६० ते ८० कि.मी. व लांबी अंदाजे ४००-४५० कि.मी. असावी असे मानले जाते. या खचदरीचे भूगर्भात असलेले अस्तित्व गुरुत्वीय पध्दतीने १९७२ साली काढण्यात आले.

किल्लारी परिसरात जो भूकंप झाला आहे तो आर्कियन खडकामध्ये असलेल्या प्राचीन भ्रंशावर नव्याने हालचाली झाल्याने झाला असावा. विनाशकारी भूकंप सर्वसाधारणपणे आडव्या दाबामुळे होतात. या भागात ५० कोटी वर्षापूर्वीच आडवे दाब पूर्णपणे नाहीसे झाले आहेत. या कारणाने उभ्या दाबामुळे खालीवर हालचाली भूस्तरभ्रंशावर झाल्या असाव्या व त्यामुळे भूकंप झाला असावा. प्राचीन आर्कियन खडकातील भूस्तरभ्रंश हे मृत स्वरूपाचे आहेत. प्राचीन खडक व बेसाल्ट खडक यांच्यामध्ये इतका प्रचंड कालावधी लोटला आहे की आर्कियन खडकात साठलेली उर्जा केव्हाच मुक्त झालेली आहे. या मृत भूस्तरभ्रंशाचे पुन्हा पुनर्जीवन होऊन नव्याने हालचाली होत आहेत. या अती प्राचीन खडकातील क्रियाशीलता पुन्हा नव्याने उत्तेजित झालेली दिसून येते. (Reactivation) काही भूशास्त्रज्ञांच्या मते किल्लारी परिसरात नव्याने भूस्तरभ्रंशावर हालचाली होऊन उत्क्रम भूभ्रंश (Reverse fault) किंवा गट भूभ्रंश (खंडभ्रंश) (Block Faulting) झाले असावेत.

महाराष्ट्राचा भूप्रदेश भूकंपदृष्ट्या स्थिर आहे असे मानले जाते. गेल्या ३०-४० वर्षांमध्ये महाराष्ट्रातील विविध प्रदेशात केलेल्या भूशास्त्रीय पाहणीत कोठेही अस्थिरतेची लक्षणे, भूस्तरभ्रंश, तडे, वलि, मोठ्या भेगा इत्यादी स्वरूपात दिसून आली नाहीत. महाराष्ट्रात जे भूकंप झाले आहेत ते बेसाल्ट खडकाखाली असलेल्या प्राचीन आर्कियन खडकामध्ये जेथे खचदऱ्या अथवा भूस्तरभ्रंश आहेत अशा ठिकाणी केंद्रित झाले आहेत. वरील कारणाने संपूर्ण महाराष्ट्राला भूकंप प्रवण प्रदेश म्हणणे योग्य नाही. तथापि ही वस्तुस्थिती मान्य केली पाहिजे की महाराष्ट्रातील काही भागात ६ पेक्षा जास्ती महत्ता असलेले भूकंप झाले आहेत व महाराष्ट्राचा काही भाग थोड्या फार प्रमाणात भूकंप प्रवण आहे. हा भाग कोठला हे समजून घेण्यासाठी महाराष्ट्रातील विविध भागात सखोल भूशास्त्रीय व भूभौतिक संशोधन होणे आवश्यक आहे.

भूकंपाचे पूर्वनिदान करण्यासाठी भूकंप प्रवण देशातील शास्त्रज्ञ प्रयत्नशील आहेत. अद्यापी भूकंपाचे अचूक भाकित करण्याची शास्त्रीय पध्दती उपलब्ध नाही. गेल्या ३०-४० वर्षांत भूशास्त्रात विशेषत: भूकंप शास्त्रशाखेत बरेच संशोधन झाल्याने उल्लेखनीय प्रगती निश्चित झाली आहे. तरी अजून बऱ्याच उणीवा आहेत. काही बिकट समस्यांची ठाम उत्तरे मिळत नाहीत. या पुढील कालातील भूशास्त्रीय संशोधनाधारे अधिक पुरावा उपलब्ध झाल्यावर भूकंपा संबंधीच्या अनेक समस्यांची समाधानकारक उकल होणे शक्य आहे.

भूजल सर्वेक्षण - महाराष्ट्र शासनाने भूजल वापर व संवर्धनासाठी राज्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा दिनांक १६ जुलै १९७१ पासून अस्तित्वात आणली. या यंत्रणेमार्फत प्रत्येक गावातील भूगर्भातील पाण्याचा शोध घेऊन गावांचे भूजल नकाशे तयार केले जातात. ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी कठीण म्हणून वर्गीकृत केलेल्या गावांसाठी ही यंत्रणा विंधण विहिरी खोदण्याचे काम करते. जिल्ह्यात भूजलाच्या केलेल्या सर्वेक्षणानुसार सुमारे ८०,८६५ एचएएम (ham) भूजलसाठा उपलब्ध असून सुमारे ६३,९६३ एचएएम शिलकी भूजल साठा असून त्यासाठी ३६,५३६ अतिरिक्त विहिरी

बांधल्या जावू शकतील. जिल्ह्यात १९९८ पर्यंत एकूण ८४८१ विंधण विहिरी खोदल्या असून त्यांपैकी ७,०४६ यशस्वी विंधण विहिरी असून ४,८८८ हातपंप आणि १६२३ वीजपंप बसविण्यात आले आहेत.[१३]

हवामान [१४]

लातूर जिल्ह्यातील हवामानाची विशेषता म्हणजे पावसाळा ऋतु वगळता वर्षभर हवामान कोरडे असते. वर्षाची चार ऋतूत विभागणी केली जाते :- हिवाळा डिसेंबर ते मध्य फेब्रुवारी, उन्हाळा मार्च ते मे अखेर, पावसाळा जून ते सप्टेंबर आणि मान्सूनोत्तर काळ ऑक्टोबर ते नोव्हेंबरपर्यंत.

पर्जन्यमान : जिल्ह्यातील अहमदपूर, औसा, निलंगा व उदगीर या चार पर्जन्यमापक केंद्रांची १० ते ३७ वर्षांची पर्जन्यविषयक आकडेवारी उपलब्ध आहे. या चार पर्जन्यमापक केंद्रांची व संपूर्ण जिल्ह्याची पर्जन्यविषयक आकडेवारी तक्ता क्रमांक-१ आणि २ मध्ये दिली आहे.[१५] जिल्ह्याचे सरासरी वार्षिक पर्जन्य ८६१.७ मिमी. आहे. जिल्ह्यातील पर्जन्य नैऋत्येकडून ईशान्येकंडे वाढत जाते. जिल्ह्यात एकूण वार्षिक पर्जन्याच्या ८४ टक्के पर्जन्य पावसाळा ऋतूत पडतो. ऑगस्ट आणि सप्टेंबर हे पावसाचे महिने आहेत. जिल्ह्यात वार्षिक पर्जन्यमानातील वर्षागणिक फरक मोठ्या प्रमाणावर आढळत नाही. सन १९५१ ते १९९० या कालावधीत प्रसामान्य वार्षिक पर्जन्याच्या १६५ टक्के जास्त पर्जन्य सन १९५५ मध्ये झाले तर प्रसामान्य पर्जन्याच्या तुलनेत ३४ टक्के कमी पर्जन्य १९७२ मध्ये झाल्याची नोंद आढळते. सन १९५१ ते १९९० या काळात प्रसामान्य पर्जन्याच्या ८० टक्के (कमी) पर्जन्य एकूण ८ वर्षात झाले. या काळातच लागोपाठच्या दोन वर्षी कमी पर्जन्य तीनदा झाले. तक्ता क्रमांक २ वरुन असे दिसून येते की, ३७ वर्षापैकी २९ वर्षे पर्जन्य ६०१ ते १२०० मिमी. दरम्यान झाले होते.

जिल्ह्यात वर्षाला सरासरी ४७ पर्जन्यदिन (२.५ मिमीपेक्षा जास्त पर्जन्य झालेले दिवस) असून औसा येथे ४२ आणि अहमदपूर व उद्गीरला ४९ पर्जन्य दिन आहेत. जिल्ह्यात २४ तासात जास्तीत जास्त पर्जन्य ९ ऑक्टोबर १९६१ ला अहमदपूरला १६५.३ मिमी झाल्याची नोंद आहे. तक्ता क्रमांक-३ मध्ये जुन्या उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रसामान्य आणि कमाल पर्जन्यमान आणि तक्ता क्रमांक-४ मध्ये जुन्या उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्जन्यमानाची वारंवारता दर्शविली आहे.

तापमान : जिल्ह्यात वेधशाळा नसल्यामुळे जिल्ह्यातील हवामानविषयक माहिती जवळच्या जिल्ह्यात असलेल्या वेधशाळेच्या नोंदीवर आधारित आहे. जिल्ह्यात नोव्हेंबरच्या शेवटी तापमानात जलदगतीने घट होण्यास प्रारंभ होतो. डिसेंबर हा सर्वाधिक थंडीचा महिना असून त्यावेळी सरासरी दैनिक कमाल तापमान २९° सेल्सिअस तर सरासरी दैनिक किमान तापमान १३.५° सेल्सिअस असते. हिवाळ्यात काहीवेळा तापमान ४.° सेल्सिअसपर्यंत खाली येते. मध्य फेब्रुवारी ते मे महिन्यापर्यंत तापमानात सातत्याने वाढ होत असते.

---

१३. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित.
१४. ॲडीशनल डायरेक्टर जनरल ऑफ मिटिऑरालॉजी (रिसर्च), इंडिया मिटिऑरालॉजीकल डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, पुणे यांचेकडून एप्रिल २००५ मध्ये प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित.
१५. तक्ते या प्रकरणाच्या शेवटी दिलेले आहेत.

मे हा सर्वाधिक उष्ण महिना असून सरासरी दैनिक कमाल तापमान ४०° सेल्सिअस तर सरासरी दैनिक किमान तापमान २५° सेल्सिअस असते. उन्हाळ्यातील उष्णता तीव्र असून काहीवेळा कमाल तापमान ४७° सेल्सिअसपर्यंत पोहचते. काही दिवशी काहीवेळा मेघगर्जनेसह सरी पडत असल्यामुळे तापमान काहीवेळ तरी सुसह्य होते. जूनच्या प्रारंभी पावसाळ्याची सुरुवात होत असल्यामुळे तापमानात मोठी घट होते. पावसाळा संपल्यानंतर ऑक्टोबरच्या सुरुवातीस दिवसाच्या तापमानात हळूहळू वाढ होण्यास प्रारंभ होतो. तर नोव्हेंबरमध्ये दिवस व रात्रीच्या तापमानात घट होण्यास सुरुवात होते.

आर्द्रता : पावसाळ्यात हवा फार आर्द्र असते. विशेषता सकाळच्या वेळी सापेक्ष आर्द्रता ७५ ते ८० टक्के असते. पावसाळ्याव्यतिरिक्त संपूर्ण वर्षात हवा कोरडी असते. उन्हाळा ऋतू म्हणजे कोरड्या हवेचा काळ असून त्यावेळी सापेक्ष आर्द्रता ३० टक्क्याच्या वर असते.

मेघाच्छादन : पावसाळ्यात आकाश मोठ्या प्रमाणावर मेघाच्छादित असते. मात्र पावसाळ्यानंतर उर्वरित वर्षभरात आकाश निरभ्र असते किंवा काहीवेळा हलके मेघाच्छादन आढळते. उन्हाळ्यात दुपारनंतर मेघाच्छादनात वाढ होत असते.

वारे : जिल्ह्यात साधारणपणे मध्यम गतीचे वारे वाहतात. परंतु मध्य उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात वाऱ्याच्या गतीत वाढ होत असते. पावसाळ्यात साधारणपणे नैऋत्य आणि वायव्य दिशांमधून वारे वाहतात. पावसाळ्यानंतर आणि हिवाळ्यात वारे कमी वेगाने आग्नेय आणि ईशान्य दिशांमधून वाहतात. उन्हाळ्याच्या सुरवातीस जिल्ह्यात पश्चिमेकडून वारे वाहतात आणि पुढे पुढे पश्चिम आणि वायव्यकडील वाऱ्यांचे वर्चस्व वाढत जाते.

विशेष हवामान घटना : झंझावत उन्हाळ्यात व पावसाळ्यात उद्‌भवत असले तरी पावसाळ्यात त्यांचे प्रमाण अधिक असते. हिवाळ्यात क्वचितप्रसंगी धुके आढळून येते तर उन्हाळ्यात कधी कधी धुळीची वादळे उद्‌भवतात.

वनसंपदा

जिल्ह्यात वनक्षेत्राचे अत्यल्प प्रमाण आढळते. सन २००२-२००३ मध्ये ३ चौ.कि.मी.राखीव व ३७ चौ.कि.मी. अवर्गीकृत वनक्षेत्र होते. परंतु झाडे मात्र विखुरलेली आहेत. बाभूळ, खैर, बेल, आपटा, बोर, हिवर ही झाडे आणि घायपात आढळतात. पठारी भागात व डोंगरावर गवत आढळते. अहमदपूर तालुक्यातील वडवळ गावाजवळ बेट नावाच्या डोंगरावर अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती सापडतात.

वनक्षेत्र जास्त नसल्यामुळे वनोत्पादन सुध्दा अगदी नगण्य आहे. तेंदूच्या पानांपासून मात्र १९८२-८३, १९८४-८५, १९९४-९५, १९९८-९९ व २००३-२००४ या वर्षांत अनुक्रमे १,७२.६० हजार १,१० हजार, ३७४.८५ हजार, १२९ हजार आणि २०४ हजार रुपयाचे उत्पन्न मिळाले. सन १९९८-९९ मध्ये ११५ मे. टन गवत विक्रीपासून २० हजार रुपये तर २००३-२००४ मध्ये विडी पानांच्या विक्रीपासून १७१ हजार रूपयांचे उत्पन्न मिळाले. [१६]

१६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा संबंधित वर्षे.

लातूर जिल्ह्याची वनश्री[१७] (Vegetation) आणि तिची वैशिष्ट्ये (general characters) :

लातूर जिल्ह्याच्या वनश्रीचे ढोबळ मानाने दोन प्रमुख प्रकार दिसून येतात ते असे

१. डोंगराळ प्रदेशातील जंगले, आणि

२. गवताळ प्रदेशातील वनश्री.

१. डोंगराळ प्रदेशातील जंगले (Hill Forests) : ही जंगले जिल्ह्यातील डोंगराळ प्रदेशात विखुरलेली आढळतात. विशेषत: लातूर, अहमदपूर आणि उदगीर तालुक्यात काही ठिकाणी काहींशी दाट जंगले आढळतात. या भागात डोंगर माथा सहसा उजाड आणि वृक्षहिन अवस्थेत आढळतो. दक्षिण पठारावरील सर्वच भागात अत्यल्प पावसाचे प्रमाण असून जमीन खडकाळ आहे. तसेच हवेतील ऊष्णतामान उन्हाळ्यात बरेच (सुमारे ४२° से.) असून आर्द्रता फारच कमी असते. उन्हाळ्यात सोसाट्याचे वारे वहात असतात. या सर्व कारणांमुळे झाडे - झुडुपे तेथे तग धरू शकत नाहीत. परन्तु डोंगर उतार, दऱ्या यातून बऱ्यापैकी वृक्ष संख्या आढळते. हे वृक्ष देखील क्षुद्र पर्णी, काटेरी आणि पानझडी (Deciduous) प्रकारचे असतात.

लहान कांटेरी वृक्ष आणि कांटेरी झुडुपे यांची मोठी संख्या असलेल्या या जंगलात सामान्यपणे *Anogeissus latifolia* (धावडा), *Acacia chundra* (लाल खैर), *A.nilotica* (बाभूळ) *A.leucophloea* (हिवर), *A forta, Aegle Marmelos* (बेल), *Annona squamosa* (सीताफळ), *Balanites aegyptiaca* (हिंगण), *Bauhinia racemosa* (आपटा), *Bombay ceiba* (कांटे सावर), *Boswellia serrata* (साळई), *Butea monosperma* (पळस), *Canthium* coromandelicum (कारबिट), *Capparis grandis* (पाचुंदा), *Cassia fistula* (बहावा), *Cassine albens* (भूतपळ), *Catunaregam spinosa* (मदन फळ), *Cordia sinensis* (गोंदणी), *C.dichotoma* (भोकर), *Dalbergia latifolia* (शिसवी), *Dichrostachg s cinerea* (सिगमकाटी) , *Diospyros melanoxylon* (टेंभुर्णी), *Dolichandrone falcata* (मेढशिंगी), *Erythrina suberosa* (पांगारा), *Euphorbia caducifolia, E.neriifolia, E.nivulia* (निवडुंग प्रकार), *Ficus hispida* (भुई उंबर), *Flacourtia indica, Grewia spp, Ikora pavetta, Lannea coromandelica* (मोई), *Phoenix sylvestris* (शिंदी), *Pongamlapinnaba* (करंज), *sapindus emarginatus* (रिठा), *Terminalia alata* (आईन), *T-arjuna* (अर्जुन), *Ziziphus Mauribiana* (बोर), *Z.oenoplia* (बुरगी) हे वृक्ष आढळतात.

या वृक्षांच्या बरोबर अनेक झुडुपे वाढताना दिसतात. त्यात प्रामुख्याने *Abutilon indicum* (पेटारी), *Acacia campbellii, Caesalpinia bonduc* (सागरगोटा) C. decapetala (चिलार), *Calotropis gigantea* (रुचकी), *C.procera* (रुई), *Capparis sepiaria, C.zeylanica, c.decidua* (करील), *Carissia congesta* (करवंद), *Cassia auriculata* (तरवट), Cissus pallida, *Clerodendrum serratum* (भारंगी), *Gardenia resinifera* (डिकेमाळी), *Grewia spp. Helicteresisora* (मुरडशेंग), *Jatropha curcas* (मोगली एरंड), *Lantana camara* var *aculeata* (घाणेरी), *Maytenus emarginata* (हेंकळ), Mimosa hamata, *Morinda pubescens* (बारतोंडी), *Opuntia elation* (फड्या निवडुंग), *Phyllanthus reticulatus*

१७. डॉ. वा. ना. नाईक, सहयोगकर्ता लेखक, यांनी लातूर जिल्ह्यातील वनसंपदाचे लेखन केले आहे.

(कामोणी), *Plumbago Zeylanica* (चित्रक), Rhus *sinuata* (आमटी) *Securinega leucopyrus, S.virosa* (पांढरफळी) *Vitex negundo* (निर्गुडी), *Woodfordia fruticosa* (धायटी), *Ziziphus caracutta* इत्यादींचा समावेश होतो.

वरील झाडा-झुडुपांवर अनेक प्रकारच्या वेली पसरलेल्या आढळतात. त्यात प्रामुख्याने *Acacia forta, Ampelocissus latifolia, Asparagus racemosus var.javanicus* (शतावरी), *Aspidopterys cordata*, *Cajanus scarabaeoides*, *Canavalia catharfica, Cessampelos pareira* (पहाडवेल), *Cissus vitiginea*, *Clitorea ternatea* (गोकर्ण), *Cocculus hirsutus* (वासन वेल), *Corallocarpus epigaeus, Cryptolepis buchanani* (पांढरी कावळी), *Cryptostegia grandiflora, Dioscorea bulbifera* (वराही कंद), *Diplocyclos palmatus* (शिवलिंगी), *Dregea volubilis, Gloriosa superba* (कलावी), *Hemidesmus indicus* (अनंत मूळ), *Ipomoea Spp., Merremia spp., Mucunapruriens* (खाजकुहिली), *Pergularia daemia* (उतरण), *Rivea hypocrateriformis, Tinospora glabra* (गुळवेल) इत्यादिंचा समावेश होतो.

लहान आणि वर्षायु रोपटी तसेच गवत आणि लव्हाळ्याचे प्रकार पावसाळ्यात सर्वत्र मुबलक प्रमाणात आढळतात. त्यांच्या मुळेच सर्वत्र हिरवळ दिसून येते. ही हिरवळ जुलै-ऑगस्ट महिन्यापासून सुरु होऊन वाढत वाढत ऑक्टोबर महिन्यात चांगली फोफावते व पावसाळ्या नंतर हळूहळू वाळू लागते. डिसेंबर-जानेवारी महिन्यापर्यंत ती थोडीफार टिकून राहते आणि नंतर मात्र पूर्णपणे वाळून जाते. फेब्रुवारी नंतर केवळ वृक्ष आणि मोठी झुडुपेच काय ती शिल्लक उरतात परन्तु पानझडीमुळे पर्णहीन वृक्ष आणि उजाड झुडुपे दृष्टीस पडतात.

या जंगलांमध्ये २० ते ३० प्रकारचे वृक्ष, ३५ ते ४० प्रकारची झुडुपे, १५ ते २० प्रकारच्या वेली आणि १०० हून अधिक प्रकारच्या वर्षायु, क्षुद्र रोपटी आणि गवत-लव्हाळ्याचे प्रकार आढळतात. या क्षुद्र वनस्पती गवताळ प्रदेशात देखील आढळतात त्यामुळे त्यांचा विस्ताराने उल्लेख पुढे दिला आहे.

२. गवताळ प्रदेश : जिल्ह्याचा बराच भूभाग विस्तीर्ण असा गवताळ प्रदेशाने व्यापला आहे. त्यात लहान टेकड्या, नद्या-नाले, रस्ते यांचा देखील समावेश आहे. या प्रदेशात प्रामुख्याने गवत, लव्हाळे, वर्षायु रोपटी, क्षुद्र वनस्पती यांची संख्या मोठी असून अधून मधून वृक्ष, झुडुपे, वेली यांचे समुह दूर दूर अंतरावर आढळतात. अशा प्रदेशात आढळणारे प्रमुख वृक्ष प्रकार म्हणजे *Azadirachta indica* (कडू लिंब), *Acacia* spp(बाभळी), *Butea monosperma* (पळस), *Dolichandrone falcata* (मेढशिंगी), *Albizia lebbeck* (शिरीष), *Mangifera indica* (आंबा), *Ziziphus mauritiana* (बोर), *Ficus benghalensis* (वड) इत्यादि. या वृक्षांसोबत *Canthium coromandelicum* (कारबिर), *Cassia auriculata* (तरवट), *Cissus pallida, Capparis Zeylancia* (वाघाटी), *Carissa congesta* (करवंद) *Erythrina suberosa* (पांगारा), *Euphorbia spp.* (निवडुंग), *Flacourtia indica* वगैरे झुडुपे समुह करुन वाढतात.

गवत, लव्हाळे, क्षुद्र रोपटी, वर्षायु, रोपटी यांची संख्या आणि प्रजाती तर विपुल प्रमाणात आढळतात. सामान्यत: आढळणा-या प्रजाती खालीलप्रमाणे आहेत. *Abutilon indicum* (पेटारी), *Acalypha Ciliata, A.indica* (खोकली), *Acanthospermum hispidum, Achyranthes aspera*

(आघाडा), *Aechynomene indica, Ageratum conyzoides* (ओसाडी), *Alternanthera sessilia, Alysicarpus spp., Apluda mutica, Argemone mexicana* (पिवळा धोत्रा), *Aristida spp., Arthra xon spp, Biophytum sensitivum* (लाजरी), *Blumea spp, Boernavia diffusa* (खापरा), *Brachiaria spp., Caesulia akillaris*, *Caralluma adscendens* (माकड शिंग), *Cardiospermum helicacabum* (कपाळ फोडी), *Cassia spp., Celosia argentea* (कुरडू), *Chloris Virgata*, *Chryopogon fulvus, cleome Chryopogon* spp., *commelina* spp., *Corchorus* spp., *Crotalaria* spp. *Cyanotis cristata, C. fasciculata, Cyathocline purpurea, Cymbopogon martinii, cyperus* spp., *Datara inoxia, D. metel, Desmodium* Spp., *Dichanthium* spp., *Digera muricata, Digitaria* spp., *Dinebra retroflexa, Echinochloa colonum, Echinops echinatus, Eclipta prostrata, Eleusine indica, Emilia sonchifolia* (सदमंदी), *Enicostema axillare* (मामिज्वा), *Eragrostis* spp., *Euphorbia* spp., *Glinus lotoides, Glossocardia bosvallea, Goniogyna hirta, Heteropogon contortus* (कुसळी गवत), *Hedyotis* spp., *Indigofera* spp., *Ipomoea* spp., *Iseilema anthephoroides, Justicia* spp., *Lavandula bipinnata, Leucas* spp., *Leonotis nepetifolia, Lophopogon tridentatus, Ocimum* spp., *Panicum* spp., *Paspalidium geminatum, Pennisetum* spp., *Setaria* spp., *sida* spp., *Solanum* spp., *Striga* spp., *Tribulus terrestris*, Typha domingensis, *Urochloa panicoides, Vetiveria lawsonii, Xanthium indicum, Zornia diphylla* आणि इतर अनेक.

या दोन प्रमुख प्रकाराखेरीज इतर काही वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती समुह जिल्ह्यात पहावयास मिळतात ते असे :

(अ) नदी-नाले यांच्या काठावरील वनश्री : जिल्ह्यातील बहुतेक लहान मोठ्या नद्या वर्षातील ८ ते १० महिने कोरड्याच असतात. पावसाळ्यात दोन ते चार महिने त्यांच्या मध्ये पाणी असते. मोठ्या नदी काठी कांही ठराविक झाडा-झुडुपांचा समुह दिसतो. सामान्यपणे नदीकाठच्या वृक्षांमधे *Acacia nilotica* (बाभूळ), *Phoenix sylvestris* (शिंदी), *Pongamia pinnata* (करंज), *Syzygium cumini* (जांभूळ), *Terminalia alata* (आईन), *T.arjuna* (अर्जून) हे प्रामुख्याने आढळतात. झुडुपांपैकी *Clerodendrum phlomides* (टाकळण), *Combretum albens, Ixora pavetta, Lantana camara var.aculeata* (गंधारी), *Morinda pubescens* (बारतोंडी), *Phyllanthus reticulatus* (कार्माणी), *Vitex negundo* (निर्गुडी), *Woodfordia fruticosa* (धायटी) आणि *Ziziphus oenoplia* (बुरगी) वगैरे सामान्यपणे आढळतात. काही ठिकाणी नदीच्या पात्रात *Tamarix esicoides* हे वैशिष्टपूर्ण झुडुप आढळते.

पावसाळ्यात नदी काठी क्षुद्र, वर्षायु रोपटी आणि गवत, लव्हाळे यांच्या प्रजातींची मोठी गर्दी आढळते. सामान्यपणे *Alternanthera sessilis*, *Alysicarpus* spp. *Ammannia baccifera, Bacopa Monnieri* (ब्राह्मी), *Barleria prionitis* (कोरांटी), *Canscora decurrens, Coix gigantea* (कवडी गवत), *Cyperus* spp., *Desmodium triflorum, Dichanthium* Spp., *Echinochloa colonum, Eclipta prostrata* (पाका), *Eragrostis gangetica, Fimbristylis* spp.,

Fuirena wallichiana, Hoppea dichotoma, Imperata cylindrica, *Indigofera* spp., *Leucas* spp., *Oxalis corniculata* (चांगेरी), *Paspalidium geminatum, Pennisetum hohenackeri, Polygonum glabrum, Rotala serpyllifolia Saccharum spontaneum, Setaria pumila, S. tomentosa, Sida acuta, Sopubia delphinifolia, Sorghum deccanense* (कोकळा), Typha domingensis, आणि *Urochloa panicoides* यांचा समावेश होतो.

काही ठिकाणी जमिनीवर वाढणारे ऑर्किड कुलातील *Habenaria marginata*, *Eulophia ramentacea*, आणि *Zeuxine strateumatica* या प्रजाती आढळतात. या खेरीज कधी कधी *Chrysopogon fulvus, Commelina spp., Crotalaria spp., Exacum pedunculatum Hemigraphis latebrosa, Rumex dentatus, Verbena officinalis, Veronica anagallis aquatica* आणि *Vigna trilobata* या प्रजाती देखील आढळतात.

एकूण वृक्ष, झुडुपे आणि क्षुद्र रोपटी यांचे सरासरी प्रमाण अनुक्रमे १:२:१२ असे असते.

(आ) तळी-तलाव-जलाशय यांच्या भोवतालची वनश्री : तळी, तलाव, जलाशय, डबकी वगैरे वर्षातील ८ ते १० महिने कोरडी असली तरी पावसाळ्यात त्यांच्या भोवताली ठराविक वनस्पती आढळतात. गवत आणि लव्हाळ्याच्या अनेक प्रजाती पावसाळ्याच्या सुरवातीपासून उगवायला सुरवात करतात आणि सप्टेंबर अखेर पर्यंत त्यांच्या प्रजाती आणि संख्या यांची चांगली वाढ होते. बहुतेक क्षुद्र किंवा वर्षायु वनस्पतीच या ठिकाणी आढळतात. त्यात प्रामुख्याने *Aeschynomena indica, Alternanthera sessilis, Caesulia axillaris, Cleome chelidonii,* C.simplicifolia, Coix gigantea Cyperus spp., Echinochloa colonum, Eleocharis atropurpurea, Fimbristylis spp. *Hygrophila schulli* (कोळसुंदा), *Sesbania bispinosa, Setasia pumila, Urochloa panicoides, Vigna trilobata* इत्यादींचा समावेश होतो. *Marsilea minuta* हा पाण्यातील नेचे प्रकार सर्वत्र आढळतो.

पाण्याच्या पृष्ठभागावर *Lemna* spp., आणि *Wolffia* spp., या सूक्ष्म वनस्पती वाढताना दिसतात तर पाण्यात बुडालेल्या केवळ दोनच प्रजाती, *Najas graminea* आणि *Ceratophyllum demersum* लातूर जिल्ह्यात सापडतात.

वरीलपैकी बहुतेक प्रजाती पाणी असेपर्यंत जिवंत राहतात आणि नंतर थोड्याच काळात वाळून नामशेष होतात. वाळलेल्या तळ्यात नंतर नविनच प्रजाती उगवू लागतात. साधारण फेब्रुवारी पर्यंत त्या टिकून राहतात व नंतर वाळून जातात. या नव्या वनस्पतींमध्ये सामान्यत: *Commelina* spp., *Dopatrium junceum*, *Eriocaulon* sp., *Oldenlandia* sp.वगैरेंचा समावेश होतो. तर तळी पूर्णपणे वाळल्यावर कोरड्या चिखलात *Chrozophora prostrata, Cyathocline purpurea, Erigeron sublyratus, Euphorbia* spp., *Gunus lotoides, Gnaphalium polycanlon, Heliotropium spp., Polygonum plebejum* आणि *Sphaeranthus senegalensis* या सारख्या प्रजाती वाढताना दिसतात.

वनस्पतींचे हे निरनिराळे समुह तळ्यांमध्ये एका मागून एक आपली हजेरी लावत असतात आणि उन्हाळ्यात सर्व तळी पुन्हा निर्जीव झालेली दिसून येतात.

(इ.) पडित जमिनीवरील वनसंपदा : जिल्ह्यातील पडित जमिनींचे वर्गीकरण केल्यास त्यांचे खालील प्रमाणे प्रकार आढळतात.

(क) रस्त्याकडेची तसेच लोहमार्गाच्या बाजूची पडित जमीन : अशा जमिनीवर सामान्यपणे आढळणा-या वनस्पती म्हणजे *Acanthospermum hispidum, Argemone mexicana, Aristida depressa, A.funiculata, Baliospermum solanifolium Blumea oxyodonta, Calotropis procera, Cassia obtusifolia, Cassia fora* (टाकळा), *C.auriculata* (तरवट), *Cleome viscosa, C.gyrandra, Cynodon dactylon* (हराळी), *Echinops echinatus* (उटकंटक), *Eleusine indica, Eragrostiella brachyphylla, Eragrostis pilosa, Euphorbia hirta* (नायटी), *E.indica, Glossocardia bosvallea* (खडक शेपू), *Meteropogon contortus* (कुसळी गवत), *Indigofera* spp., *Iseilama anthephoroides, Justicia* spp., *Kyllinga bulbosa, Lophopogan tridentatus, Hedyotis Corymbosa, Setaria pumila, Solanum virganianum, Tephrosia purpurea, Trichodesma indicum, Tridax procumbens* (दगडी पाला), Vernonis Cinera (सहदेवी) आणि Xanthium indicum(संकेश्वर).

(ख) खेड्यातील पडित जमीन : खेड्यामधील घरांच्या आसपास सहसा सापडणाऱ्या वनस्पती म्हणजे *Abutalon indicum* (पेटारी), *Achyranthes aspera* (आघाडा), *Ageratum conyzoides* (ओसाडी), *Alternanthera pungens* (चुबुक कांटा), *Amaranthus tricolor* (चौळाई), *A.viridis* (माठ), *A.spinosus* (कांटे माठ), *Aristida* Spp., *Boerhavia diffusa* (खापरा), *Calotropis gigantea* (रुई), *Cassia sophera* (कासविंदा), *Cleome viscosa* (पिवळी तिळवण), *C.gynandra* (पांढरी तिळवण), *Commelina benghalensis* (केना), *Cynodon dactylon* (हरळी), *Gomphrena serrata Indigofera tinctoria* (नील), *Lagascea mollis, Peristrophe paniculata* (काक जंघा), *Phyllanthus* spp., *Polygala arvensis, Portulaca oleracea* (घोळ), *Setaria tomentosa, S.vesticillata* (कुत्र), *Sida acuta* (तुपकडी), *Solanum anguivi* (डोर्ली), *S.nigrum* (काक माची), *Sonctus asper* (म्हातारी), *S.oleraceus, Jephrosia hirta, T.purpurea* (उन्हाळी), *Trianthema portulacastrum* (वसु), *Tribulus terrestris* (सराटे), *Tridax procumbens* (दगडी पाला) आणि *Verbascum chinense* (कुटकी).

(ग) उकिरडे : उकिरडयांवर खास करुन *Abutilon indicum* (पेटारी), *Alterananthera pungens* (चुबुक, काटा), *Amaranthus spinosus* (कांटे माठ), *Brassicanigra* (काळी मोहरी), *Datura inokia* (धोत्रा), *Martynia annua* (वाघनखी), *Verbascum chinense* (कुटकी) आणि *Xanthium indicum* (संकेश्वर) यांचा समावेश होतो.

(घ) बागा आणि शेत जमिनी भोवतालची पडिक जमीन : अशा पडिक जमिनीमध्ये असंख्य क्षुद्र वनस्पती आढळतात. त्यात *Abutilon hirtum, Acalypha Ciliata, A.indica* (खोकली), *Alysicarpus* spp., *Boerhavia chinese, Brassica nigra* (काळी मोहरी), *Cassia tora* (टाकळा), *Cyperus* spp., *Digera muricata Emilia sonchifolia* (सदमंदी), *Euphorbia*

prunifolia, E.hirla, E.indica, E. prostrata, *Flaveria repanda, Goniogyna hirta, Hibiscus panduriaefprmis, Indigofera* spp., Justicia Sppl., *Malvastrum coromandelianum, Ocimum americanum, Opuntia elatior, Phyllanthus* spp., *Psoralea coryllifolia* (बावची), *Portulaca quadrifida, Setaria verticillaba* (कुत्रा), *Sida acuta* (तुपकडी), *Sida alba* (कांटेबला), *S.glutinosa, Solanum nigrum* (काकमाची), *Triumfetta rotundifolia* आणि *Vicoa indica* (सोनेकाडी).

(च) जुन्या किल्ल्यातील पडित जागा : जिल्ह्यात काही जुने किल्ले असून ते बव्हंशी पडझड झालेल्या अवस्थेत आहेत. या किल्ल्यांमध्ये सहसा *Azadirachta indica* (कडूनीम), *Bidens biternata, Capparis* spp., *Cassia sophera* (कासविंदा), *Cleome viscosa* (पिवळी तिळवण), *C.gynandra* (पांढरी तिळवण), *Euphorbia, prostrata, Ficus benghalensis* (वड), *Hibiscus lobatus, Indigofera linnaei, Lantana camara var.aculeata* (घाणेरी), *Leucas urticifolia, Lophopogon tridentatus, Lepidagathis subarmata, Oplismenus burmanni, Sida cordata* (भुईबला), *Sonchus asper* (म्हातारा), *Jamarindus indica* (चिंच), *Zinnia peruviana* इत्यादि वनस्पती आढळतात.

(छ) खडकांवर वाढणा-या वनस्पती : कांही वनस्पती अगदी उघड्या खडकांवर वाढताना आढळतात. कांही वनस्पती खडकांच्या कपारीत उगवतात. या वनस्पतींपैकी *Aerua lanata,* A.sanguinolenta, Cappans decidua (करील), Cyanotis cristata, Euphorbia hirta (नामरी), *Indigofera linnaei, Melanocenchris jacquemontii, Polycarpaea corymbosa, Polygala erioptera, Woodfordia fruticosa* (धायटी) आणि *Ziziphus* spp., या प्रमुख आहेत.

(ज) भिंतीवरील वनसंपदा : जिल्ह्यात अनेक ठिकाणी पडक्या भिंती, मातीने सारवलेली घरे, पत्र्यांनी झाकलेले छत आणि कच्च्या बांधकामाच्या घरांची विपुलता आहे. तसेच भूकंपामुळे उध्वस्त झालेल्या इमारती देखील आहेत. अशा ठिकाणी प्रामुख्याने *Chloris virgata* नावाचे गवत विपुल प्रमाणात वाढताना आढळते. त्याच बरोबर *Acalypha indica* (खोकली), *Aesva sanguinolenta, Ageratum conyzoides* (ओसाडी), *Amaranthus tricolor* (चौलाई), *A.spinosus* (कांटे माठ), *Aristida depressa, A.funiculata* (माठ), *Aristida depressa, A.funiculata* (पांढरे कुसळ), *Arthvaxon lanceolatus Blainvillea acmella, Boeshavia diffusa* (खापरा), *Cyperus* spp., *Eragrotis* spp., *Euphorbia* spp., *Glossocardia bosvallea* (खडक शेपू), *Heteropogon cotortus* (कुसली गवत), *Indigofera* spp., *Lagascea mollis, Leucas* spp., *Lophopogan tridentatus, melanocenchris jacquemontii, Oplismenus burmanni, Peristrophe paniculata* (काक जंघा), *Setaria* spp., *Sida* spp., *Tribulus terrestris* (सराटे), *Tridax procumbens* (दगडी पाला), *Ver cnincse bascun* (कुटकी), *Vernonia cinerea* (सहदेवी), *Zinnia peruviana, Ziziphus mauriticina* (बोर) आणि *Z.oenoplia* (बुरगी) इत्यादि वनस्पती सामान्यपणे आढळतात.

अनुक्रमणिका

(झ) तण : असंख्य तण प्रजाती सर्वत्र आढळून येतात. त्यांचे दोन प्रमुख प्रकार आहेत १) खरीपाच्या पिकातील तण आणि २) रबीच्या पिकातील तण.

खरीपाच्या पिकातील तण : या तण प्रजाती सामान्यपणे जुलै ते ऑक्टोबर या दरम्यान म्हणजे पावसाळ्यात आढळतात. ज्वारी, भूईमूग, आणि ऊस या पिकांमध्ये त्यांचे प्रमाण सर्वाधिक असते. असंख्य प्रजातीपैकी काही अतिसामान्य प्रजातींची यादी खालीलप्रमाणे आहे. *Acalypha indica Acanthospermum hispidum, Ageratum conyzoides, Alternanthera pungens, A.sessilis, Alysicarpus heyneanus, Amaranthus* spp., *Anotis montholoni, Aristida app., Blainvillea acmella, Brachiaria eruciformis, Caesulia axillaris, Cardiospermum helicacabum, Cossia* spp., *Celosia argentea* (कुरडू), *Cleome viscosa, Commelino* spp., *Corchorus* spp., *Crotalaria* spp., *Cucumis callosus, Cyperus* spp., *Digera muricata, Digitaria* spp., *Dinebra retroflexa*, *Echinochloa colonum*, *Eclipta prostrata* (माका), *Eleusine indica, Emilia sonchifolia, Enicostema axillave Eragrostis* spp., *Gomphrena serrata, Goniogyna hirta*, *Hemidesmus indicus* (उपळसरी), *Indigofera* spp., *Lagascea mollis, Launaea procumbens* (पाथरी), *Leucas* spp., *Catharanthus pusillus, Malvastrum coromandelianum, Ocimum americanum, Oxalis corniculata* (चांगेरी), *Panicum* spp., *Phyllanthus* spp., *Physalis minima* (पोपटी), *Polygala arvensis* (फुटाणी), *Portulaca oleracea* (घोळ), *Rhynchosia minima, Sesbania bispinosa, Setaria pumila, Sida* spp., *Striga* app., *Urochloa panicoides, Vernonia cinerea* आणि *Xanthium indicum.*

रबीच्या पिकातील तण : खरीप पिकातील तण संख्येच्या तुलनेत या तणांची संख्या कमी असते. त्यात प्रामुख्याने *Ageratum conyzoides* (ओसाडी), *Ammannia baccifera* (भार जांभूळ), *A.multiflora bergia ammannioides, Biophytum sensitivum, Canscora decurrens, Chrozophora prostrata, Cyathocline purpurea, Desmodium* spp., *Dichanthium* spp., *Eriocaulon duthiei, Euphorbia* spp., *Exacum pedunculatum, Flaveria trinervia, Goniocaulon indicum* (करडकुसुंब), *Gnaphalium polycaulon Gantelbua urens, Ipomoea esiocarpa, Ischaemum pilosum, Melilotus indica, Polygonum plebejum, Spilanthes paniculata, Stemodia viscosa Rotala* spp., *Sutera dissecta, Tricholepis glaberrima, Vahlia dichotoma, Vicoa indica* इत्यादिंचा समावेश होतो.

औषधी वनसंपदेतील ऋतुजन्य बदल : विषम हवामानामुळे वर्षायु आणि क्षुद्र वनस्पतींच्या (औषधी वनसंपदा) संख्येत आणि प्रकारात खूप मोठे बदल घडून येतात. बहुतेक औषधींचा जीवन क्रम पावसाळ्याच्या शेवटी समाप्त होतो. काही औषधी तर एक तें दोन महिन्यातच दिसेनाशा होतात तर काही अधिक काळ म्हणजे ६ ते ८ महिने टिकाव धरून राहतात. सर्वसाधारणपणे औषधी वनस्पतींची संख्या आणि प्रकार सप्टेंबर-ऑक्टोबर या काळात सर्वात जास्त असतात आणि एप्रिल-मे महिन्यात सर्वात कमी असतात.

मे आणि जून महिन्यात वळीव सुरू होतात आणि अनेक औषधी जमिनीच्यावर डोकाऊ लागतात. हळूहळू त्यांची संख्या आणि प्रजाती वाढत जातात. हिवाळ्याच्या सुरूवातीपासून पुन्हा त्यांची संख्या आणि प्रजाती घटत जाऊन उन्हाळ्यात त्यांची संख्या आणि प्रजाती नगण्य असतात. औषधींच्या संख्येचा उल्लेख जून ते ऑक्टोबर चढत्या क्रमाने दिसतो आणि नोव्हेंबर ते मे उतरत्या क्रमाने असतो.

जिल्ह्याच्या वनसंपदेचे सांख्यिकी विश्लेषण :

खालील काही तक्ते जिल्ह्याच्या वनसंपदेची आकडेवारी स्पष्ट करतात.

गट	व्दिदल वनस्पती	एकदल वनस्पती	एकूण
Families	८८ or ८३%	१८ or १७%	१०६
Genera	३६८ or ७७.९%	१०६ or २२.१%	४७४
Species	६२८ or ७८.१%	१७६ or २१.९%	८०४

तक्ता क्र.१ वनसंपदेतील विविध गटांची आकडेवारी

	Families	Genera	Species
Polypetalae	५१	१६५	२९८
Gamopetalae	२४	१६०	२३७
monochlamydeae	१३	४३	९३
monocots	१८	१००	१७६
Total	१०६	४७२	८०४

तक्ता क्र.२ वनसंपदेतील विविध गट

	लातूर जिल्हा	भारत देश
१	Fabaceae	Orchidaceae
२	Poaceae	Fabaceae
३	Asteraceae	Poaceae
४	Euphorbiaeae	Rubiaceae
५	Cyperaceae	Euphorbiaceae
६	Acanthaceae	Acanthaceae
७	Lamiaceae	Asteraceae
८	Malvaceae	Cyperaceae
९	Convolvulaceae	Lamiaceae
१०	Solanaceae	Urticaceae

तक्ता क्र. २ लातूर जिल्हा आणि भारत देश या मधील पहिल्या दहा प्रभावी कुलांची तुलना.

अनुक्रमणिका

तक्ता क्र.१ वरून सहज लक्षात येते की लातूर जिल्ह्याची वनसंपदा सर्व सामान्य असून वनस्पतींची एकूण संख्या देखील बेताचीच आहे. तसेच एकदल वनस्पतींच्या प्रजाती आणि द्विदल वनस्पतींच्या प्रजाती यांचे प्रमाण ३.५६ : १ असे आहे.

तक्ता क्र.२ वरून विभक्त दल (Polypetalae) आणि सलगदल (Gamopetalae) यांच्या कुलांचे (Families) प्रमाण जरी साधारण २:१ असले तरी त्यांच्या जाती (Genera) आणि प्रजाती (Species) यांचे प्रमाण जवळजवळ १:१ असे आहे. म्हणजेच लातूर जिल्ह्यातील विभक्तदल वनस्पती फारशा प्रगत अवस्थेत नाहीत.

लातूर जिल्ह्यात जाती : प्रजाती यांचे प्रमाण १ : १.७ आहे. भारतात हे प्रमाण १ : ७ असे आहे व जगात ते १:२४ असे आहे.

तक्ता क्र. २ वरून असे लक्षात येते की लातूर जिल्ह्याची वनसंपदा संपूर्ण भारताच्या वनसंपदेपेक्षा बरीच वेगळी आहे. फक्त Acanthaceae या कुलाबाबतच त्यांच्यात सारखेपणा आढळतो.

बहिरस्थ आणि लागवडी खालील वनस्पती : जिह्यातील नैसर्गिक वनसंपदेबरोबरच बहिरस्थ (Exotix) आणि लागवडीखालील (Cultigens) वनस्पतींची संख्या बरीच मोठी आहे. लागवडीखालील वनस्पती बहुतेक बाहेरील देशांतून किंवा प्रांतातून आणलेल्या आहेत. त्यांचे प्रकार असे.

१. **अन्नधान्ये**, २. गळिताची धान्ये, ३. तंतू जन्य वनस्पती, ४. भाजी पाला, ५. नगदी पिके, ६. फळझाडे, ७. इमारती लाकूड देणारी झाडे, ८. शोभेच्या वनस्पती, ९ मसाल्याच्या वनस्पती, १०. औषधी वनस्पती.

(१) **अन्नधान्ये** - यात मुख्यत्वे ज्वारी, बाजरी, गहू, मका, साळी, कडधान्ये यांचा समावेश होतो.

(२) **गळिताची धान्ये** - यात भूईमूग, करडी, सूर्यफूल, काराळे, तीळ, जवस वगैरेंची लागवड करतात.

(३) **तंतूजन्य वनस्पती** - यात कापूस, ताग, अंबाडी, घायपात (केकताड) वगैरे.

(४) **भाजीपाला**- आलू, मेथी, पालक, चंदन बटवा, चुका, कोबी, माठ, चौलाई, घोल, राजगिरा इत्यादी पाले भाज्या तसेच अबई, गवार, भेंडी, भोपळा, ढबू मिरची, दोडका, दुध्या, गिलके, काकडी, कारले, कार्टोली, काशी फळ, कोहळा, मटर, पडवळ, शेवगा, टोमॅटो, तोंडली, वाल, वांगी इत्यादी फळ भाज्या लागवड करतात.

(५) **नगदी पिके** - यात कापूस, ऊस, सोयाबीन, फुल कोबी, बटाटे, गाजर, रताळी यांचा समावेश होतो.

(६) **फळझाडे** - आंबा, चिकू, पेरु, पपई, द्राक्षे, चिंच, मोसंबी, संत्री, लिंबू, अंजीर, उंबर, आवळा, बेहडा, बिब्बा इत्यादी अन्य प्रमाणात लागवड करतात.

(७) **इमारती लाकूड** - सागवान, शिसवी, बांबू, शिवण यासारखी काही मोजकी झाडे जिल्ह्यात दिसतात.

(८) **शोभेच्या वनस्पती** - अलिकडे बागकामाची आवड निर्माण झाल्यामुळे घराभोवती, बागेत, कार्यालये, शाळा, महाविद्यालये इत्यादी ठिकाणी तसेच रस्त्याचे दुतर्फा अनेक शोभेच्या वनस्पती

लावण्यात येत आहेत. कांही सामान्य शोभेच्या वनस्पती म्हणजे :- *Acalypha hispida, A.wilkesiana, Agava vera-cruz, Ailanthus excelsa, Albizia lebbeck, Alea rosea, Allamanda cathacrtica, Aloe vera, Antigonon leptopus, Antirrhinum majus, Artabotrys hexapetalus, Barteria cristata, Basella rubra, Bauhinia purpurea, B.variegata, Bougainvillea spectabilis, Caesalpinia pulcherrima, Caladium bicolor, Calendula officinalis, Callistephus chinensis, Canna* spp., *Cassia fistula, C.javanica, C.siamea, Casuarina equisefifolia, Catharanthus roseus, Celosia cristala, Cestrum nocturnum, Clerodendrum philippinum, Cliforia ternatea, Codiaeum variegatum, Coleus amboinicus, C.Scutellarioides, Cordyline terminalis, Cosmos bipinnaus, Crinum asiaticum, Crossandra infundibuliformis, Dahlia pinnata Dalbergia sissoo, Delonix elata, D.regia, Dodonaea angustifolia, Dracaena* spp.,*Duranta eracta, Erythrina variegata, Eucalyptus* spp., *Eupatorium triplinerve, Euphorbia antiquorum, E.milii, E.neriifolia, Enivulia, E.tirucalli, Ficus* spp., *Galphimia gracilis, Gendarussa vulgaris, Gomphrena globosa, Grevillea robusta, Hamelia patens, hibiscus* spp., *Holmskioldia sanguinea, Hymenocallis tenuiflora, Ipomoea* spp., *Ixora spp., Jasminum* spp., *Kalanchoe* spp., *Lawsonia inermis, Leucaena leucocephala, Malvaviscus arboreus, Melia azedarach, Mentha spicata, Michelia champaca, Millingtyonia hortensis, Mimusops elengi, Mirabilis jalapa, Muehlenbeckia platyclados, Murraga koenigii, Nerium cleander, Nyctanthes arbor-tristis, Ocimum tenuiflorum, Parkia biglandulosa, Parkinsonia aculeata, Passiflora edulis, Pedilanthus tithymaloides, Peltophorum pterocarpum, Petunia hybrids, Pithecellobium dulce, Plumeria rubra, Polianthes tuberosa, Polyalthia longifolia, Portulaca* spp., *Prosopis juliflora, Pseuderanthemum bicolor, Quisqualis indica, Rhoeo spathacea Rosa* spp., *Russelia equisetiformis, Samanea Saman, Salvia* spp., *Sansevieria* spp., *Scindapsus aureus, Stachytarfetta jamaicensis, Sterculia foelida, Tabernacmontana* spp., *Tagetes* spp., *Tecoma stans, Terminalis catappa, Thevetia peruviana, Tithonia diversifolia, Tropaeolum majus, Verbena bipinnatifida, Yuccaglosiosa, Zebrina pendula, Zephyranthes grandiflora, Zinnia elegans* आणि इतर अनेक.

(९) **मसाल्याच्या वनस्पती** - आले, हळद, कोथिंबीर, बडीशेप, ओवा, लसूण, कांदा इत्यादी वनस्पती अल्प प्रमाणात लागवड करतात.

(१०) **औषधी वनस्पती** - लातूर जिल्ह्यात नैसर्गिकपणे वाढणाऱ्या अनेक औषधी वनस्पती आहेत. लातूर शहराजवळ असलेले वडवळ नागनाथ हे ठिकाण वनौषधींसाठी प्रसिध्द आहे. या खेरीज अलिकडे काही तुरळक ठिकाणी वनौषधी लागवडीचे प्रयोग चालू आहेत.

अनुक्रमणिका

वडवळ नागनाथ हे ठिकाण लातूर रोड रेल्वे स्टेशन पासून चार किलोमीटर दूर असून गावाजवळच तीन टेकडया, एक तलाव आणि नागनाथांचे मंदिर आहे. उत्तरा नक्षत्रात येथे मोठी यात्रा भरते आणि देशाच्या विविध भागातून असाध्य रोगांनी पछाडलेले रुग्ण या जत्रेत सहभागी होतात.[१८]

वडवळ नागनाथाची प्रस्तुत लेखकाने तेथील औषधी वनस्पतींचे काळजीपूर्वक निरिक्षण केले. परन्तु तेथे उपलब्ध असणा-या वनौषधी जिल्ह्यात इतरत्र सुध्दा आढळतात. तेथे उपलब्ध असणाऱ्या वनौषधींचीच विस्तृत यादी खाली दिली असून त्यांचे औषधी गुणधर्म देखील दिले आहेत.

येथील वनौषधींच्या गुणांबाबत एवढेच म्हणता येईल की :-

१. यात्रेकरूंची श्रध्दाच त्याना रोगमुक्त करीत असावी. २. तीन दिवस उपास आणि त्या काळात ताजी हिरवी पाने खाल्ल्यामुळे स्वाभाविकच प्रकृती सुधारणे. ३. अनेक औषधी वनस्पतींचा एकत्रित गुण आणि ४. फिरण्याचा व्यायाम, शुध्द हवा आणि मिताहार या सर्व गोष्टींचा अपेक्षित लाभ रुग्णांना मिळत असावा.

वडवळ नागनाथ येथे उपलब्ध होणा-या उत्तरा नक्षत्रातील वनौषधी :

१. Abelmoschus ficulneus (L) Wt. And Arn.

मराठी नाव : रान भेंडी कुल : Malvaceae

उपयोग : मूत्र कृच्छ, मूत्रावरोध व अश्मरीत भेंडीचा काढा खडीसाखरेबरोबर देतात. जुनाट आंवेल फळांची भाजी चांगली परिणामकारक आहे.

२. Abrus precatorius L.

मराठी नाव : गुंज कुल : Fabaceae

उपयोग : खोकला व मूत्र रोगात इतर औषधांबरोबर मूळ देतात. पाला वाटून व्रण शोथावर व व्रणावर बांधल्याने थंड वाटून शोध कमी होतो. स्वप्न भंगात पाल्याची गोळी तोंडात धरतात. पाला विड्याच्या पानातून खातात.

३. Abutilon indicum (L.) Sweet

मराठी नाव : पेटारी, मुद्रा, शिक्का कुल : Malvaceae

उपयोग : हिरड्या दुखत असल्यास पानांच्या काढ्याने गुळण्या करतात. अर्श रोगात पोट साफ होण्यास बिया देतात. पितातिसारात पानांचा रस तुपाबरोबर देतात. बस्ती शोथात पानांचा काढा किंवा बिया देतात. प्रमेहात लघवी साफ होण्यास सालीचे चूर्ण दुधाबरोबर देतात.

४. Acacia chundra (Ro xb) Willd.

मराठी नाव : लाल खैर कुल : Mimosaceae

उपयोग : जीर्णज्वरात बल येण्यासाठी खैर साल व चिराईत यांचा काढा देतात. रक्तपित्तात सालीच्या काढ्याने गुळण्या केल्यास दातातून रक्त वाहणे कमी होते. त्वचा रोगात सालीचा काढा पोटात देतात. कुष्ठरोग, संग्रहिणी, अतिसार वगैरे दोषात कात सर्व श्रेष्ठ औषध आहे. कफ रोगात काताचे पाणी अत्यंत उपयोगी आहे.

---

१८. यात्रेकरूंचा असा समज आहे की वडवळ येथील टेकड्यांवर औषधी वनस्पती आहेत. रुग्ण यात्रेकरू सकाळी लवकर उठून प्रातर्विधी आवरून नागनाथाच्या दर्शनास जातात आणि दिवसभर आजूबाजूला हिंडून तेथील वनस्पतींची पाने खातात. दिवसा अन्न-पाणी घेत नाहीत आणि सायंकाळी गावात परतून भाकरी-भाजी असा साधा आहार घेऊन विश्रांती घेतात. असा क्रम ३/४ दिवस करतात. यामुळे ते रोगमुक्त होतात.

५. Acacia nilotica (L.) Del. Subsp.indica (Benth.) Brenan.

मराठी नाव : बाभूळ कुल : Mimosaceae

उपयोग : सालीच्या काढ्याने मुखरोग, दांत हालणे व घशाच्या शिथिलतेत गुळण्या करतात. गुद्रभ्रंशात बाहेर आलेल्या आंतड्यावर काढयात कपडा भिजवून लावतात. सालीचा कोळसा राखुंडीसाठी वापरतात. डिंक तोंडात धरल्यास घशाची कोरड कमी होते, कोरडा खोकला कमी होतो. मूत्रकृच्छात डिंक पाण्यात घोटून देतात. अतिसारात कोवळी पाने खाण्यास देतात.

६. Acalypha indica L.

मराठी नाव : खोकली कुल : Euphorbiaceae

उपयोग : लहान मुलांना उलटी करवण्यास हे फार योग्य औषध आहे. श्वास नलिकांच्या शोथात खोकली विशेष उपयोगी आहे. मुलांच्या कफ रोगात याच्या ताज्या फांद्या व पानांबरोबर कडुलिंबाच्या पाल्याचा रस देतात. खोकली व लसणीने पोटातील कृमी पडतात. सुक्या पानांचा क्वाथ मिठाबरोबर दिल्यास शौचास साफ होते. दमा, फुप्फुसरोग व क्षय रोगात खोकलीचा रस देतात. जुलाब होण्यास याचे मूळ गरम पाण्यात वाटून देतात. पानांची गोळी करून मुलांच्या गुदात घातल्याने मळाच्या गांठी पडतात. खरुज, गजकीर्ण, नायटा वगैरे त्वचा रोगात रस अंगास चोळतात. कान दुखीत याचा रस कानात घालतात.

७. Achyranthes aspera L.

मराठी नांव : आघाडा कुल : Amaranthaceae

उपयोग : जेवणापूर्वी भूक वाढविण्यासाठी तर जेवणानंतर आघाडा देतात. पिताश्मरी व अर्शरोगात अत्यंत उपयोगी. गुल्म आणि शूल रोगात उपयोगी. शरीरातील नको असलेले क्षार मूत्रावाटे बाहेर टाकण्यास आघाडयाच्या क्षाराचा वापर करतात. हृदय रोगात, मूत्र दाह शयन करण्यासाठी तसेच मूत्रेंद्रियाच्या रोगात आघाड्याबरोबर ज्येष्टमध, गोखरू व पहाडमूळ देतात. आघाडा विष नाशक आहे. रातांधळेपणात आघाडयाच्या मुळाचे चूर्ण रात्री निजताना देतात. कानदुखीवर आघाड्याचा क्षार तेलात मिसळून कानात घालतात. सांधे दुखीवर पाने ठेचून बांधतात. आघाड्याचे पंचांग उकळून त्या पाण्याने अंग धुतल्यास कंड नाहीशी होते.

८. Adhatoda zeylanica Medic.

मराठी नाव : आडुळसा कुल : Acanthaceae

उपयोग : दमा, श्वास, खोकला यावर आडुळशा सारखे उत्तम औषध नाही. क्षय रोग्यास फुलांचा गुलकंद देतात. मुळाची साल, पाने, फुले व फळे पोटातील कृमींवर गुणकारी आहेत. अतिसार, आंव यावर पानांचा रस देतात. ताज्या जखमा, सांधेदुखी व सूज यावर पानांचे पोटीस बांधतात. त्वचा रोगावर पानांचा काढा करून लावतात.

९. Aegle marmelos (L.) Corr.

मराठी नाव : बेल कुल : Rutaceae

उपयोग : वात रोगात हृदयाची धडधड होत असल्यास, उदासीनता, निद्रानाश व वेडेपणात बेलाचे मूळ वापरतात. विषयज्वरात मुळाच्या सालीचा क्वाथ देतात. वीर्य पातळ

अनुक्रमणिका

झाल्यास मुळाची साल व जिरे वाटून तुपातून देतात. विषारी सापाच्या दंशावर मुळाचा लेप करतात. लहान मुलांना उलटया व जुलाब होत असल्यास मूळ तांदळाच्या पेजेत उकडून ती पेज साखर घालून देतात. सर्व तऱ्हेचे कर्णदोष नाहीसे करण्यासाठी मुळाचा वापर करतात. बेलाचे मूळ दशमूळांपैकी एक आहे.

अभिष्यंद शोथ, कफ रोग, नेत्राभिष्यंद या रोगात पानांचा रस पोटात देतात. पोटातील अल्सर रोगावर पानांचा काढा पिण्यास देतात.

अपचन, मलावरोध, पोटफुगी, जुलाब अशा आंतडयाच्या विकारात पिकलेल्या फळाचे सरबत फार उपयोगी पडते. आंव, जळवात यावर फळांचा उपयोग करतात.

पानापासून काढलेले तेल जीर्ण सर्दी-खोकल्यात उपयोगी आहे.

१०. Ageratum conyzoides L.

मराठी नांव : ओसाडी कुल : Asteraceae

उपयोग : ज्वरात घाम येण्यासाठी ओसाडीचा रस अंगास चोळतात. याची दोन पाने, तुळशीचे १ पान व मिऱ्याचे २ दाणे एकत्र कुटून चार चार तासांनी ज्वरात देतात. जखमेवर पाल्याचा लेप केल्यास रक्तस्त्राव बंद होऊन जखम चांगली भरून येते. गुदभ्रंशात पाल्याचा लेप करतात.

११. Ailanthus excelsa Roxb.

मराठी नाव : महारुख कुल : Simaroubaceae

उपयोग : या वृक्षाची साल औषधात वापरतात. सालीची पेज बाळंतपणात शक्ती येण्यास देतात. जीर्णज्वर किंवा अशक्तपणात सालीची खीर दिल्यास पुष्टी येते. धनुर्वातात पानांचा वाफारा देतात.

१२. Albizia lebbeck (L.) Willd.

मराठी नाव : शिरीष कुल : Mimosaceae

उपयोग : फुले रेत स्तंभनार्थ देतात. बिया याच कारणासाठी दूध साखरे बरोबर देतात. सालीचे चूर्ण पुष्टीवर्धक आहे. सालीच्या काढ्याने गुळण्या केल्यास दात घट्ट होतात. गंडमालेत बियांचा लेप करतात व पोटात देतात. रातांधळेपणात पानांचा काढा पोटात देतात व रसाचे अंजन करतात.

१३. Aloe vera (L.) Burm.f.

मराठी नांव : कोरफड कुल : Liliaceae

उपयोग : यकृतावर याचा विशेष परिणाम होतो. यकृत व प्लीहा यांची क्रिया सुधारते म्हणून काविळीत याचा उपयोग करतात.

सर्दी-खोकल्यावर भाजलेल्या पानांचा गर मधाबरोबर देतात. संधीवात, वातविकार यात पानांतील गर पोटात देतात. सर्व प्रकारच्या कुपचनात व मलावरोधात तसेच

मुलांच्या पोटातील कृमी मारण्यास पानांचा रस देतात. सूज, दुखणे यावर ताज्या पानांचा गर लावतात. पानांच्या गरापासून निरनिराळे पदार्थ बनवतात. कुपचन, खोकला, अनार्तव, मलावरोध, रक्ताल्पता, कातडीचे व चेहऱ्याचे आरोग्य यात हे पदार्थ उपयोगी आहेत.

१४. Amaranthus spinosus L.

मराठी नाव : कांटे माठ कुल : Amaranthaceae

उपयोग : मूळ औषधात वापरतात. पानांची भाजी करतात. परमा रोगात मुळांचा क्वाथ देतात. अत्यार्तव, श्वेतप्रदर या दोषात मुळाचा चांगला उपयोग होतो. गर्भपात होण्याची खोड कांटे माठामुळे मोडते. इसबाची आग कमी होण्यास पाने वाटून लेप करतात. गळवे लवकर पिकण्यास मुळांचा लेप करतात.

१५. Ammannia baccifera L.

मराठी नाव : भारजांभूळ कुल : Lythraceae

उपयोग : ताजी पाने वाटून अंगास लावल्यास अंगावर बारिक फोड येऊन ताप उतरतो. ज्वरात, प्लीहावृद्धीत याच्या पंचांगाचा क्वाथ देतात. त्वचा रोगात याची राख तेलातून लावतात. डोके लाल होऊन दुखत असल्यास पंचांग तेलात उकळून ते तेल कानशीलास लावतात.

१६. Argemone Mexicana L.

मराठी नाव : पिवळा धोत्रा कुल : Papaveraceae

उपयोग : मूळ, चीक, बिया व त्यातील तेल औषधात वापरतात. उदरशूलात मूळ व तेल विरेचन म्हणून देतात. चपटे कृमी पोटात झाल्यास मुळाचे चूर्ण खाण्यास देतात. मुळाचा रस रक्त शोधक आहे. कुष्ठ व विषमज्वरात मुळाचा रस किंवा चीक देतात. खरूज झाल्यास चिकाचा लेप फार गुणकारी ठरतो. काविळीत चिकाचा चांगला उपयोग होतो.

१७. Asparagus racemosus Willd.var.javanicus Baker

मराठी नाव : शतावरी कुल : Liliaceae

उपयोग : शतावरी त्रिदोषनाशक आहे. पित्तप्रकोप, कुपचन आणि जुलाब यात मधातून देतात. वात रोगात मध, दूध व पिंपळी बरोबर देतात. कफरोगात शतावरीचा खडपाक देतात. कोणत्याही रोगात शक्ती येण्यास शतावरीची दुधातून पेज करून देतात. शतावरीमुळे काम वासना वाढते.

लघवीच्या त्रासात शतावरीचा रस देतात. मुतखड्यावर देखील याचा उपयोग होतो. महिलांच्या प्रदर रोगात शतावरी चूर्ण देतात. शतावरीच्या तेलास नारायण तेल असे म्हणतात. हे तेल सर्व प्रकारच्या वातावर गुणकारी आहे. हे तेल पोटात घेतल्यास अर्धांगवायू, संधिवात, फेफरे या दोषांवर गुणकारी ठरते. नारायण तेलाच्या बस्तीने सर्व प्रकारचा वायू नाहीसा होतो.

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazeteers

१८. Azadirachta indica A.Juss.

मराठी नाव : कडूनिंब कुल : Meliaceae

उपयोग : वृक्षाचे सर्व भाग औषधात वापरतात. पानांचा उपयोग शोथघ्न, त्वचेस उत्तेजक, त्वचा दोषहारक, उत्तम व्रणशोथक, व्रणरोपक, कृमिघ्न व मोठ्या मात्रेत वामक म्हणून करतात.

तेल वातहर, पूतिहर, उत्तम कुष्ठघ्न असे रसायन आहे. आंतर सालीचे चूर्ण, पानांचा रस यांचा देखील औषधात उपयोग करतात. तेलापासून उत्तम जंतूनाशके तयार करतात. याखेरीज या वृक्षाचे अनेकविध इतके उपयोग आहेत की त्यास अत्यंत मौलिक असे गणले गेले आहे.

१९. Bacopa Monnieri (L.) Wettst.

मराठी नाव : नीर ब्राह्मी कुल : Scrophulariaceae

उपयोग : लहान मुलांच्या सर्दीत, खोकल्यात चमचाभर स्वरस देतात. डांग्या खोकल्यात ब्राह्मीचा लेह देतात. ब्राह्मी अल्प मात्रेत हृदयास बल देणारी आहे. ज्वरात भ्रम, प्रलाप, उन्माद इत्यादी लक्षणे असल्यास ब्राह्मीचा लेह देतात. मनोदौर्बल्य दूर करुन बुद्धिवर्धनासाठी, पित्तशमनासाठी, मूत्र दाह, शूल, लघवीतून रक्त पडणे, मूतखडा होणे यामध्ये ब्राह्मीचा वापर करतात. अशी ही ब्राह्मी अनेक उपयोगांसाठी औषधात वापरतात.

२०. Balanites aegyptiaca (L.) Del.

मराठी नाव : हिंगण बेट कुल : Balanitaceae

उपयोग : औषधात फळ व बियांचे तेल वापरतात. फळ स्त्रंसक, कृमिघ्न, कफघ्न आणि कुष्ठघ्न आहे. जीर्ण कफ रोगात फळातील गर बदामाच्या तेलात घोटून देतात. बियांचे तेल जखमेवर व भाजलेल्या व्रणावर लावतात.

२१. Barleria prionitis L.

मराठी नांव : कांटे कोरांटी कुल : Acanthaceae

उपयोग : गळवावर व गाठीवर मुळाचा लेप करतात. जखमेवर व व्रणावर पंचांगाचे तेल लावतात. दात जखमेवर व व्रणावर पंचांगाचे तेल लावतात. दात किडून दुखत असल्यास हिरड्यांवर पाने व मीठ यांचा लेप करतात. त्वचा रोगात पानांचा रस पोटात देतात व पाने वरून लेप करतात. मुलांना जुलाब होत असल्यास कोरांटीच्या पानांचा रस देतात.

२२. Bauhinia racemosa Lamk.

मराठी नाव : आपटा कुल : Caesalpiniaceae

उपयोग : साल, पाने व कोवळी फुले औषधात वापरतात. पाने दसऱ्याच्या दिवशी सोने म्हणून व विड्या तयार करण्यास वापरतात. लघवीच्या त्रासात पानांचा रस

दूध-साखरे बरोबर देतात. गंडमाळा, गंडरोग, गलगंड, कंठरोग, व्रण यात पानांचा काढा देतात. अतिसार व आंव यात पानांचा किंवा फुलांचा रस मिरी व कांद्याबरोबर देतात. ज्वरात डोकेदुखी असल्यास कोवळी पाने वाटून लेप करतात.

२३. Biophytum sensitivum (L.) DC.

मराठी नाव : लाजरी कुल : Oxalidaceae

उपयोग : औषधात पंचांग वापरतात. रक्तपित्त, अतिसार आणि योनी रोगात या वनस्पतीचा उपयोग करतात. मूळव्याधीत पाला वाटून मोडावर लावतात. डांग्या खोकल्यात मूळ मधातून देतात. नेत्ररोगात घोड्याच्या मूत्रात पाने वाटून अंजन करतात. योनी भ्रंश, अंडवृद्धी यात पाने वाटून बांधतात. मूतखडा व परमा रोगात मुळाचा काढा देतात.

२४. Blepharis repens (Vahl) Roth

मराठी नांव : हडसन कुल : Acanthaceae

उपयोग : औषधात पंचांग वापरतात. वातकारक दुःखात हडसनची भाजी खातात. ज्वरात पंचांगाचा काढा किंवा चूर्ण देतात. कंबरदुखीमध्ये याची भाजी विशेष उपयोगी आहे.

२५. Boerhavia diffusa L.

मराठी नाव : खापरा, पुनर्नवा कुल : Nyctaginaceae

उपयोग : पंचांग औषधात वापरतात. खापरा जलोदर, आंतरशोथ, बाह्यशोथ, हृद्रोगातील कास, श्वास व पायाची सूज या विकारात देतात. कावीळीत मुळांचा काढा देतात. दमा व श्वास नलिका शोथात वेखंडा बरोबर काढा देतात. कुपचनात पाल्याची भाजी देतात.

नेत्र रोगात ताजी मुळी मधात उगाळून डोळ्यात घालतात तसेच पोटात देतात. खापरा रेचक असून शरीरात थंडावा आणतो. भरपूर लघवी होण्यासाठी पंचांगाचा काढा देतात. ज्वरात घाम येण्यास खापरा देतात. त्वचा रोगात मूळ उगाळून लेप करतात.

२६. Butea monosperma (Lamk.) Taub.

मराठी नांव : पळस कुळ : Fabaceae

उपयोग : कफनाश करण्यास कषायरस देतात. पाने व फुले मुत्रावरोधात बस्तीप्रदेशी बांधतात. वेदना व शोथयुक्त विकारात पाने गरम करून बांधतात. अपस्मारात बियांच्या चूर्णाचे नस्य करतात. विंचू चावल्यास बी उगाळून लावतात.

२७. Caesalpinia bonduc L. emend Dandy et Fexel.

मराठी नाव : सागरगोटा कुल : Caesalpiniaceae

उपयोग : हिवतापात पाल्याचा रस व हिंग किंवा बियांचे चूर्ण आणि मिरे देतात. सूतिकाज्वरात सागरगोटा बहुमोल आहे. रक्तस्त्राव बंद होण्यास सागरगोटा वापरतात. सूजेवर सागरगोटा एरंडेल तेलात वाटून लावतात. सागरगोट्याचे तेल जखमेवर, कानदुखीवर व तारुण्य पीटिकांवर लावतात.

२८. Calotropis gigantea (L.) R.Br.

मराठी नाव : रुई, रुचकी कुल : Asclepiadaceae

उपयोग : त्वचा रोगात मुळाची साल वापरतात. बद, कुष्ठरोग, गंडमाळा यात साल पोटात देतात व चिकाचा लेप करतात. सर्व त्वचा रोगात साल पाण्यात वाटून लावतात. सर्व तऱ्हेच्या फुप्फुस रोगात मुळाची साल वापरतात. पोटाच्या तक्रारीत सालीचे चूर्ण देतात. जीर्णज्वर, सांधेदुखी, जीर्ण आमवात यात सालीचे चूर्ण अथवा फांट देतात. खोकला आणि दमा यात फुले काकवीत उकडून देतात. शिवाय रुईचे अनेक उपयोग आहेत.

२९. Capparis zeylanica L.

मराठी नांव : वाघाटी कुल : Capparaceae

उपयोग : फळे पितनाशक व वातहारक आहेत. सुतिका ज्वरात वाघाटीचा क्वाथ देतात. उष्णतेमुळे अंगावर उठणाऱ्या गळवावर मूळ थंड पाण्यात उगाळून लेप करतात.

३०. Cardiospermum helicacabum L.

मराठी नाव : कपाळ फोडी कुल : Sapindaceae

उपयोग : मूळ दीपक, रेचक व वापक आहे. नवीन आमवातात कपालफोडी हे मौल्यवान औषध आहे. पाने एरंडेल तेलात वाटून सुजलेल्या सांध्यांवर बांधतात. महिलांचा विटाळ वाढण्यास पानांचा रस देतात. कानदुखीमध्ये पानांचा रस कानात घालतात.

३१. Cassia auriculata L.

मराठी नाव : तरवट, तरोटा कुल : Caesalpiniaceae

उपयोग : फांद्यांचे दातवण करतात. मधुमेहात फुलांचा चहा किवा पंचांगाचे चूर्ण किवा नुसत्या बियांचे चूर्ण देतात.

३२. Cassia fistula L.

मराठी नाव : बाहवा कुल :Caesalpiniaceae

उपयोग : मूळ, पाने व शेंगांमधील गर औषधात वापरतात. उष्णतेच्या विकारात बाहवा रेचक म्हणून वापरतात. घसादुखीवर सालीचा काढा करून त्याच्या गुळण्या करतात. मुळव्याधीवर शेंगेतील गर इतर औषधांबरोबर देतात. सर्दी, पडसे यात मुळे जाळून त्याचा धूर हुंगतात. त्वचा रोगावर पानांचा रस चोळतात.

३३. Cassia fora L.

मराठी नाव : टाकळा कुल : Caesal piniaceae

उपयोग : सर्व तऱ्हेच्या त्वचा रोगावर पाल्याची भाजी खाण्यास देतात व बिया वाटून लेप करतात. लघवीच्या विकारात टाकळ्याची फुले समभाग खडीसाखरेबरोबर खातात. अतिसारात पानांचा रस देतात.

३४. Catharanthus roseus (L.) G.Don

मराठी नाव : सदाफुली कुल : Apocynaceae

उपयोग : मधुमेहावर पाने खातात. तांबड्या फुलांची सदाफुली रक्तदाबावर अत्यंत गुणकारी आहे. या विकारात सहा पाने पाण्यात भिजवून त्याचा फांट देतात. कर्क रोगावर सदाफुली गुणकारी आहे.

३५. Cayratia trifolia (L.) Domin

मराठी नाव : आंबट वेल कुल : Vitaceae

उपयोग : गळवांवर मुळांचा काळ्या मिऱ्यांबरोबर लेप करतात.

३६. Celastrus paniculata L.

मराठी नाव : मालकांगोणी कुल : Celastraceae

उपयोग : बी व बियांचे तेल औषधात वापरतात. वातरक्त, आमवात, वातरोग, जळवात आणि त्वचा रोगात मालकांगोणीचा विशेष उपयोग होतो. बुद्धि व स्मृती वाढण्यास तेल पोटात देतात. सुजून येणाऱ्या व्रणावर बिया वाटून लावतात.

३७. Celosia argenta L.

मराठी नाव : कुरडू कुल : Amaranthaceae

उपयोग : औषधात मूळ, बी व पाने वापरतात. बी शीतल, स्नेहक व पौष्टिक आहे. मूळ मूत्रजनक व पाने सारक आहेत. कामशक्ती वाढविण्यास बियांचे चूर्ण देतात. मुतखडा विरघळण्यासाठी मुळाचा काढा देतात. जुलाब होत असल्यास बियांचा काढा व लघवी बंद झाल्यास बिया खडीसाखरेबरोबर देतात. शांत झोप येण्यास पानांची भाजी खातात.

३८. Cissampelos pareira L. var. hirsuta (DC.) Forman

मराठी नाव : पहाडवेल कुल : Menispermaceae

उपयोग : मुळे औषधात वापरतात. मूत्रेंद्रियाचे रोगात पहाडवेलाच्या मुळांचा वापर करतात. बस्तिशोथ, मूत्रकृच्छ, रक्तमूत्र, सान्द्रमेह, कुपचन, पोटदुखी, जुलाब, रक्तआंव, अतिसार यात मुळाची अल्प मात्रा देतात. सर्व विषारात मुळांचा लेप करतात. व्रणावर पाने वाटून लावतात.

३९. Cleome viscosa L.

मराठी नाव : पिवळी तिळवण कुल : Cleomaceae

उपयोग : पाने व बिया औषधात वापरतात. स्वेदजनक, उत्तेजक, कोष्ठवात प्रशमक व कृमिघ्न असे हिचे गुण आहेत. जंत पडण्यास बिया खातात. बहिरेपणात पानांचा रस तेलात मिसळून कानात घालतात. ज्वर, जुलाब व डोकेदुखीत बिया वापरतात.

Maharashtra State Gazetteers

४०. Clerodendrum serratum (L.) Moon.

मराठी नांव : भारंग कुल : Verbenaceae

उपयोग : भारंग मूळ ज्वर किंवा कफ असलेल्या रोगात देतात. सर्दी, घशातील सूज, कफयुक्त दमा यात सुंठ अथवा वेखंडाबरोबर देतात. अशक्त मुलांच्या फुफ्फुसाच्या रोगात भारंग मूळ पोटात देतात व छातीवर लेप करतात. पानांची भाजी मधुमेहीना देतात. ती पाचक आणि वातहारक आहे.

४१. Cliforia ternatea L.

मराठी नाव : गोकर्ण कुल : Fabaceae

उपयोग : मूळ, फुले व बिया औषधात वापरतात. मूळ व बी उदर रोगात आणि मूत्र रोगात मूळ वापरतात. शुक्रमेह व बस्तिशोथात मुळाने शौचास होते, लघवीचे प्रमाण वाढते व लघवीतील कफाचे प्रमाण कमी होते. कफ विकारात व आमवातात मूळ मोठ्या मात्रेत देतात. पानांचा रस आल्याच्या रसाबरोबर दिल्यास घाम येणे बंद होते. त्वचा रोगात पानांचा फांट देतात. उर्ध शिशीत मुळाच्या रसाचे नस्य करतात.

४२. Cocculus hirsutus (L.) Diels.

मराठी नाव : वासन वेल कुल : Menispermaceae

उपयोग : मुळे व पाने औषधात वापरतात. मुळांचा काढा पिंपळी, सुंठ याबरोबर जुनाट आमवातात देतात. सांधेदुखी आणि त्वचा रोगात या काढ्याचा वापर करतात. नवीन परमा रोगात पानांचा रस देतात. सूज, मार, ठेच, डोकेदुखी या विकारात पाने ठेचून बांधतात. सर्व प्रकारच्या प्रमेहात मूळ वापरतात.

४३. Corchorus olitorius L.

मराठी नाव : मोठे चोचे कुल : Tiliaceae

उपयोग : पाने व बिया औषधात वापरतात. ज्वरात पानांचा फांट देतात. आंवेत सुकी पाने हळदीबरोबर व अतिसारात सुंठ व मधाबरोबर देतात. पानांच्या हिमाने भूक लागते, अन्न पचते व शक्ती वाढते. गुल्म रोगात पंचांगाची राख मधातून देतात. मूत्रकृच्छ, परमा व जीर्ण बस्तीशोथात फांट देतात.

४४. Crotalaria verrucosa L.

मराठी नाव : खुळखुळा कुल : Fabaceae

उपयोग : औषधात पाने वापरतात. त्वचा रोगात पानांचा लेप करतात, पाने पोटातही देतात. पाल्याच्या रसाने मुलांची लाळ वाहणे कमी होते.

४५. Curculigo orchioides Gaerth.

मराठी नाव : काळी मुसळी कुल : Hypoxidaceae

उपयोग : औषधात दोन वर्षांच्या वनस्पतीची मुळे वापरतात. काळ्या मुसळीची दुधाबरोबर केलेली पेज परमा, मूत्रकृच्छ आणि अत्यार्तवात देतात. काळी मुसळी बल देणारी आहे.

४६. Cuscuta reflexa Roxb.

मराठी नाव : अमर वेल कुल : Cuscutaceae

उपयोग : संपूर्ण वनस्पतीचा औषधात उपयोग करतात. अमरवेल व मिरी यांची चटणी शौच्यास साफ होण्यासाठी देतात. भूक नसल्यास हिचा रस व आल्याचा रस खडीसाखरेतून देतात. याने वातही कमी होतो. यकृत वाढीवर अमरवेल झटपट काम करते. त्वचा रोगात हिचा लेप करतात. ताप उतरण्यास तसेच कफ पडण्यास फळांचा वापर करतात.

४७. Cynodon dactylon (L.) Pers.

मराठी नाव : दुर्वा कुल : Poaceae

उपयोग : पंचांग औषधात वापरतात. हे शीतल, रक्तस्कंदक, व्रण रोपक व मूत्र जनक आहे. मुळांचा काढा वेदनास्थापक व मूत्र जनक आहे. म्हणून बस्तीशोथ, परमा व मूत्रमार्गाचा दाह होत असल्यास देतात. खरूज, जखमा यावर पानांचा लेप करतात. नाकातून रक्त येत असल्यास पानांचा रस नाकात घालतात. जुलाब, पित्त आणि आंव यावर अंगरस पोटात देतात. रक्तार्शात पंचांग वाटून दह्यातून देतात. ज्वरात पंचांगाचा फांट देतात.

४८. Cyperus rotundus L.

मराठी नाव : मोथा कुल : Cyperaceae

उपयोग : सुवासिक कंद औषधात वापरतात. अरुची, आमातिसार, रक्तार्श व कुपचन या रोगात मोथा उपयोगी आहे. बाळंतीणीस दूध येण्यास व दुधाची शुद्धी होण्यास मोथा पोटात देतात व स्तनावर लेप करतात. मुळ्यांचा लेप दाहनाशक आहे.

४९. Datura metel L.

मराठी नाव : काळा धोत्रा कुल : Solanaceae

उपयोग : श्वास मार्गाच्या संकोचविकास प्रधान रोगात धोत्रा वापरतात. कफ पडण्यासाठी पाने चिलमीतून ओढण्यासाठी देतात.

पाळीने येणा-या हिवतापात धोत्र्याच्या बिया ताप येण्यापूर्वी देतात तसेच पोटशूळ, पित्ताश्मरी शूळ व मूत्रपिंडाचा शूळ यातही धोत्रा देतात. स्तनशोथ, शोथयुक्त अर्श व डोकेदुखी यास पाने गरम करून बांधतात. कनकासव हे दम्यावरील प्रसिध्द औषध धोत्र्यापासून तयार करतात. महाविषगर्भ तेलात धोत्र्याचे पंचांग वापरतात.

५०. Drimia indica (Roxb.) Jessop.

मराठी नाव : रानकांदा कुल : Liliaceae

उपयोग : रानकांदा प्रामुख्याने फुफ्फुसाच्या रोगात वापरतात. सर्व तऱ्हेच्या कफ रोगात, जीर्ण श्वासनलिका शोथात याचा विशेष उपयोग होतो.

Maharashtra State Gazetteers

५१. Echinops echinatus L.

मराठी नाव : उत्कंटकारी कुल : Asteraceae

उपयोग : त्वचा रोगात पंचांगाचा काढा देतात व फुलांच्या गुच्छाची राख तेलात मिसळून वरून लावतात. वीर्य पातळ झाल्यास बी देतात. मुळे वाजीकर आहेत.

५२. Eclipta prostrata (L.)L.

मराठी नाव : माका कुल : Asteraceae

उपयोग : यकृताची क्रिया बिघडल्यास, कावीळ झाल्यास, प्लीहा वृध्दी, मूळव्याध, उदररोग व कुपचन या व्याधीत माका गुणकारी आहे. आमवात, भोवळ, डोकेदुखी, दृष्टीमांद्य आणि विविध त्वचा रोगात माका पोटात देतात व वरून लेप करतात. माक्याच्या सेवनाने व लेपनाने केस काळे होतात व त्यांची चांगली वाढ होते. लहान मुलांच्या कफावर माका हे उत्तम औषध आहे. असा हा माका म्हणजे रसायन आहे.

५३. Emilia sonchifolia (L.)DC.

मराठी नाव : सदमंदी कुल : Asteraceae

उपयोग : पंचांग औषधात वापरतात. यकृताच्या रोगात याचा विशेष उपयोग होतो. ज्वरात पंचांगाचा फंट देतात. रातांधळेपणात व नेत्राभिष्यंदात पानांचा रस डोळ्यात घालतात.

५४. Enicostema axillare (Lamk.) Raynal

मराठी नाव : लहान किराईत कुल : Gentianaceae

उपयोग : जीर्ण आमवातात किंवा संधेसुजीत हे चांगले औषध आहे. व्रण शोधात पोटात चूर्ण देतात व पाण्यात कालवून सूजेवर लावतात. विषमज्वरात तूप साखरेबरोबर चूर्ण देतात किंवा काढा देतात. मधुमेहींना लिंबाच्या रसात पाने वाटून देतात.

५५. Erythrina suberosa Roxb.

मराठी नाव : पांगारा कुल : Fabaceae

उपयोग : औषधात साल व पाने वापरतात. रक्तमिश्रित आंवेत साल देतात. नेत्राभिष्यंदात पापण्यांवर सालीचा लेप करतात. सूज, बद, सांधेदुखी व व्रणांवर पानांचा लेप करतात. बाळतंपणात आर्तव साफ पडण्यास तसेच दूध वाढण्यास नारळाच्या रसाबरोबर पाने उकडून देतात. दांत दुखी व कानदुखीत पानांचा अंगरस वापरतात.

५६. Euphorbia hirta L.

मराठी नाव : दुधाणी, मोठी नायटी कुल : Euphorbiaceae

उपयोग : दुधाळीची क्रिया मज्जातंतूवर होते. हृदय व फुफ्फुसे यात दुधाणी बधीरता आणते. श्वासनलिका शोथ, दमा, सर्दी या त्रासात दुधाणीने चांगला गुण येतो. रक्तमिश्रित आंव व पोटशूळ यात दुधाणीचा रस देतात. नायट्यावर रस चोळतात. चामखीळ नष्ट करण्यास रस वरून लावतात. उलटी थांबण्यास मुळांचा उपयोग करतात.

५७. Euphorbia thymifolia L.

मराठी नाव : धाकटी दुधाणी, लहान नायटी कुल : Euphorbiaceae

उपयोग : लहान नायटी विशेष रेचक असून उत्तेजक आहे. नायटा व गजकर्णात हिचा रस लावतात. डोक्यातील चाईस हिचा रस नवसागराबरोबर लावतात. कफ व पित्त पडण्यास रस दुधाबरोबर देतात. अनार्तवात मुळे देतात.

५८. Evolvulus alsinoides (L.) L.

मराठी नाव : सांखवेल, निळी शंखावली कुल : Convolvulaceae

उपयोग : सांखवेल ज्वरात व ज्वरानंतर पौष्टिक म्हणून वापरतात. ज्वरात झोप येण्यास हिचा फांट देतात. मुलांच्या विषमज्वरात मूळ वाटून देतात. आंवेत पंचांगाचा फांट देतात. रक्तस्त्राव बंद होण्यास अंगरस देतात.

५९. Ficus racemosa L.

मराठी नाव : उंबर कुल : Moraceae

उपयोग : नाकावाटे व लघवीतून रक्त जात असल्यास, आंव, गर्भपात आदी विकारात उंबराची फळे खाल्ल्याने फायदा होतो. मधुमेहात फळे पाचक व पौष्टिक म्हणून देतात. चीक रक्त आंवेत गुणकारी आहे. देवी, गोवर या त्रासानंतर दाह कमी करण्यास फळे देतात. लहान मुलांना अन्न पचत नसल्यास किंवा उलट्या जुलाब होत असल्यास चिकाचे दहा दहा थेंब दूधसाखरेबरोबर देतात. कंबर दुखी आणि दम्यात वरून थापण्यासाठी चीक वापरतात.

आंव झाल्यास मूळ देतात. मुळातून निघणारे पाणी शीतल, स्तंभक व पौष्टिक आहे. हे पाणी रक्त वाहणाऱ्या सर्व रोगांत उपयोगी पडते.

पानांवरील फोड दुधात वाटून मधाबरोबर दिल्यास तोंडातील फोड, देवी, गोवर या दुखण्यात लाभ होतो.

६०. Ficus religiosa L.

मराठी नाव : पिंपळ कुल : Moraceae

उपयोग : कोवळी पाने दुधात उकडून परम्यात देतात. सांकळलेले रक्त फांकण्यासाठी कोवळी पाने मधातून देतात. काविळीत पिकलेले अर्धे पान विडयाच्या पानातून देतात. सालीची राख पाण्यात कालवून ते पाणी निवळल्यावर उचकी व उलटी बंद होण्यासाठी देतात. त्वचा रोगात सालीचा फांट देतात. हृदय रोगात पिंपळाच्या पानांचा फांट देतात. पंच कल्ककांचा म्हणजे पिंपळ, वड, उंबर, पाथर आणि कडुलिंब यांच्या सालीचा काढा, व्रण धुण्यास, गुळण्या करण्यास व धुपणीत पिचकारी करण्यास वापरतात.

मलावरोधात पिंपळाच्या सुकलेल्या पानांचे चूर्ण ओवा व गूळ घालून देतात. हगवणीवर पिंपळाची कोवळी पाने व कोथिंबिरीची पाने समभाग घेऊन साखरेबरोबर चाऊन खातात. असा हा पिंपळ बहुगुणी वृक्ष आहे.

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazetteers

वर उल्लेख केलेल्या वनस्पतीखेरीज इतर अनेक औषधी वनस्पती लातूर जिल्ह्यात आणि वडवळ नागनाथ येथे सापडतात. त्यापैकी प्रमुख म्हणजे अर्जुन सादडा, अजगंधा, अबोली, अनंतमूळ, अंबाडी, अंबुटी, आवळा, आंबटी, उतरण, उन्हाळी, उंदीरकानी, एरंड, कडू चोंचे, कडू दुधी, कढी लिंब, कणेर, करडी, करंज, कवढ, कांटे बला, कांटेसावर, कांडोळ, कुटकी, केकताड, कोळसुंदा, खजुरी, खडकशेपू, खाजुकुहिली, खूरचाफा, गुलबक्षी, गुळवेल, गोखरु, गोजीभ, गोंडाळ गवत, गोंदणी, गोरखमुंडी, घणसपात, घायमारी जोंकमारी, टेमरु, डोर्ली, ढोरगुंज, ताग, तिखाडी, त्रिपंखी, त्रिधारी निवडुंग, तुती, तुपकडी, तुळशी, तुंम्बा, तोंडली, दगडी पाला, दोडका, धणे, धामण, धायटी, नंदीवृक्ष, नागवेल, नाग दवणा, नागलकुडा, निर्गुडी, निलगिरी, निर्विषी, निवडुंग, नीळ, पाथरी, पाणकणीस, पानघोळ, पारिजातक, पिवळी कणेर, पुत्रजीव, पुदिना, पुवण, फांद, बकाणा निंब, ब्रहमदंडी, बावची, बांडगुळ, बिब्बा, बुधकेशी, बोर, भुई आवळी, भुई उंबर, भुई रिंगणी, भोकर, मदन घंटी, माचिपत्री, मातीसूळ, मायाळू, मुयी, मुरडशेंग, मूग, मुगी, मेंदी, मोगली एरंड, मोहरी, रक्तवसू, रतवेल, रानतुळस, राय आवळा, रिठा, वड, शिंदी, शेर, शेवगा, शेवंती, सबजा, सहदेवी, साग, सापसण, सिगमकाटी, सोनचाफा, सोनसळी, हदगा, हळद आणि इतर काही.[१९]

मत्स्यव्यवसाय विकास[२०]

लातूर जिल्ह्यात मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी १९९८-९९ मध्ये एकूण १०,३०६ हेक्टर जलक्षेत्र उपलब्ध असून त्यात ६३ पाटबंधारे तलावांचे ७,९१३ हेक्टर, जिल्हा परिषदेअंतर्गत १५९ तलावांचे १,११३ हेक्टर, रोजगार हमी योजनेखालील २६८ तलावांचे १,१९६ हेक्टर, ३७ ग्रामपंचायत तलावांचे ३० हेक्टर आणि ४ नगरपरिषद तलावांचे ५४ हेक्टर जलक्षेत्राचा समावेश आहे. जिल्ह्यात मांजरा, तेरणा, तावरजा आणि मन्याड या नद्या असून जिल्ह्यातील त्याची लांबी ५१९ कि.मी. आहे. जिल्ह्यात मच्छिमारांची संख्या १९८२, १९८५, १९९०, १९९५ १९९८, २००२ आणि २००४ या वर्षात अनुक्रमे ७००, ९००, ११००, १,३००, १,४००, १,४८० आणि १,६७६ होती. मासेमारीसाठी डिस्कळ जाळे, गिल नेट जाळे आणि गळांचा उपयोग करतात. जाळी नायलॉन धाग्यापासून तयार करतात. मासेमारी करणाऱ्यांत प्रामुख्याने कोळी, भोई, मुसलमान, मराठा इत्यादी जातींचा समावेश आहे. जिल्ह्यात १९८५, १९९०, १९९५ , १९९८ आणि २००४ मध्ये अनुक्रमे २११, ८६०, १,६०० आणि १,८०० आणि १,८७० मे.टन मत्स्योत्पादन झाले.

जिल्ह्यात सन २००४ मध्ये ७७ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यरत असून सन १९९०, १९९५ आणि १९९८, आणि २००४ मध्ये त्यांचे शासकीय भागभांडवल अनुक्रमे १५,००० रू., २५,००० रू. आणि १६,००० रूपये आणि २५,००० रूपये होते. जिल्ह्यातील मत्सव्यवसायामध्ये जलक्षेत्र १३,४१६ हेक्टर झाले आहे.

जिल्ह्यातील काही मत्स्यजातींची माहिती खाली दिली आहे :—

मरळ (Channa marulius) : सापाच्या डोक्याप्रमाणे चपट्या डोक्याचा असलेला हा मासा लांबट पण तोंड व शेपटीकडे निमुळता आकाराचा असतो. अंगावरील खवले, काळपट तपकिरी किंवा हिरवट रंगाचे असून पाठीवर एकसंघ पर असतो. शेपटीचा पर गोलाकार असतो. यास ओळखण्याची महत्वाची खूण म्हणजे याच्या शेपटीच्या पराच्या मुळावर नेत्र गोलासारखे एक दुहेरी वलय असते. पोटाकडील भागावर करड्या रंगाचे पाच-सहा पट्टे असतात. हा मासा मत्स्यभक्षक असल्याने इतर जातींच्या माशाबरोबर याचे मत्स्यसंवर्धन करीत नाहीत.

---

१९. यांची लॅटीन , संस्कृत, हिंदी नावे, उपयोग, उपलब्धी, या विषयी सखोल माहिती वा. ना. नाईक यांच्या **मराठवाडयातील सामान्य वनौषधी** (१९८८, औरंगाबाद) या ग्रथांत मिळू शकेल. एकूण वडवळ नागनाथ येथे एकत्रिणपणे उपलब्ध या बहुविध वन औषधी व भेट देणाऱ्यांची श्रद्धा यांचा अनुकुल परिणाम होतो.

२०. जिल्हा मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीच्या आधारे.

मागूर (Clarias batrachus) : हिरवट तांबूस रंगाच्या या माशाचे डोके चपटे आणि जबडा मोठा असतो. वरच्या जबड्यास चार आणि खालच्या जबड्यास चार अशा आठ मिशा असतात. पाठीवर लांब पर असून तो शेपटीच्या पराशी जोडलेला असतो. पोट व कटीवर लहान खवले असतात मात्र अंगावर खवले नसतात.

शिंगी : या माशाचे शरीर लांबट तोंडाचा आकार निमुळता आणि चपटा असून त्यास लाल रंगाच्या आठ मिशा असतात. पाठीवर एक लहान बिन काट्यांचा पर असतो. तर गुद्पर मोठा असतो. शेपटीचा पर गोलाकार असून कुक्षिपराला एक दातेरी काटा असतो. अंगावर खवले नसतात.

शिंगाळा (Mustus Seenghala) : मध्यभागी जाड मांसल व शेपटीकडे बारीक होत जाणाऱ्या माशाचा वरचा जबडा खालच्या जबड्यापेक्षा किंचित लांब व छिन्नीच्या आकारासारखा असतो. याला आठ मिशा आणि पाठीवर दोन पर असतात. त्यापैकी मागील पर चरबीयुक्त असून त्यावर एक काळा ठिपका असतो. शेपटीचा पर दुभगलेला असतो आणि वरचे टोक खालच्या परापेक्षा लांब असून पुढील पृष्ठ पराच्या आणि कुंक्षिपराच्या सुरुवातीला एकेक दातेरी काटा असतो.

शिवडा (Wallago attu) : या माशाचे डोके व जबडा रुंद असतो. जबड्यात तिक्ष्ण दात असतात. लांबट आकार व बाजूने चपट्या असलेल्या या माशाला चार मिशा असतात. पाठीवर एकच लहानसा पर असतो. गुद्पर बराच लांब शेपटीपर्यंत पोहोचणारा असतो, पण त्याला जोडलेला नसतो. शेपटीचा पर दुभगलेला असून वरचे टोक खालच्यापेक्षा लांब असते. शरीरावर खवले नसतात.

कटला (Catla Catla) : या माशाचे डोके मोठे व रुंद असते. शरीराचा मध्यभाग रुंद व फुगीर असतो. अंगावर मोठे खवले असतात. ओठाच्या ठेवणीवरुन सहज ओळखता येतो. तोंड वरच्या बाजूस वळलेले असते. खालचा ओठ जाड असतो. याला मिशा नसतात व खालचा ओठ मऊ, दातेरी नसतो. या माशाचे प्रमुख खाद्य प्राणी व वनस्पती प्लवंग आहे. तलावाच्या वरच्या थरातील अन्न खात असतो. हा मासा सर्वात जलद गतीने वाढणारा आहे. जलद वाढ, चांगली किंमत आणि प्रजननास सोपा यामुळे मत्स्यशेतीसाठी किफायतशीर ठरला आहे.

रोहू (Labeo rohita) : या माशाचे शरीर प्रमाणबद्ध व लांबट असते. अंगावरचे खवले लालसर असतात. या माशाच्या ओठाच्या ठेवणीवरुन ओळखला जातो. खालचे ओठ जाड असून त्याची किनार मऊ दातेरी असते. वरच्या जबड्यास दोन लहान मिशा असतात. तोंड किंचित खालच्या बाजूस वळलेले असते. मत्स्यसंवर्धनासाठी हा मासा सर्वत्र वापरला जात असून प्रेरित प्रजननासाठी सोपा असतो.

मृगळ (Cirrhina Mrigala) : माशाचे शरीर जास्त लांबट असते. तोंड खालच्या बाजूस वळलेले व रुंद असते. ओठ पातळ व खालच्या जबड्यावर दोन मिशा असतात. हा मासा तलावाच्या तळाजवळ राहतो आणि तेथे कुजणारे वनस्पतीजन्य अन्न, शेवाळ, प्राणिप्लवंग हे अन्न घेतो. याचे प्रजनन मत्स्यबीज केंद्रावर घेता येते.

अनुक्रमणिका

सीप्रिनस (Cyprinus Carpio) : जगात सर्वत्र मत्स्यशेतीसाठी वापरला जाणारा हा मासा असून माणसाळलेला आहे. शरीराच्या घेरापेक्षा किंचित लांब असलेल्या या माशाचे काळसर, पिवळा, सोनेरी, लालसर असे विविध रंग आढळतात. या माशाच्या तोंडांची विशिष्ट ठेवण असून खाण्यासाठी ते काहीशे लांबविता येते. खालच्या व वरच्या जबड्यास मिळून एकूण चार मिशा असतात. पृष्ठपर लांब असतो व त्याच्या सुरुवातीला एक किंचित दातेरी काटा असतो. अंगावरील खवल्याच्या ठेवणीवरुन त्याच्या तीन पोटजाती पडतात.

(अ) **स्केल कार्प :** या माशाचे शरीर खवल्यांनी संपूर्णपणे झाकलेले असते. खवले एकसारख्या आकाराचे असतात. त्यांच्यात हिरवट, पिवळा, सोनेरी, लालसर रंग आढळतात.

(ब) **मिरखा कार्प :** या माशाचे खवले मोठे, विखुरलेले असून त्याच्या कडा चकाकणाऱ्या असतात.

(क) **लेदर कार्प :** या माशाच्या अंगावर अजिबात खवले नसतात क्वचित खवल्याची एक ओळ आढळते.

चंदेरी किंवा कार्प : या माशाच्या पूर्ण शरीरावर बारीक चंदेरी खवले असल्यामुळे याला चंदेरा म्हणतात. याचे शरीर मध्यभागी चपटे असून डोके जरा निमुळते होत जाते. खालचा जबडा वरच्यापेक्षा किंचित लांब असतो. पोटावर चाकूच्या पात्याप्रमाणे मांसल पाते असते. जलाशयाच्या वरच्या थरात राहणारा हा मासा वनस्पती प्लवंग आणि शेवाळ खातो. एका वर्षात याचे वजन एक कि. ग्रॅ.पर्यत वाढते. वयाच्या दुसऱ्या वर्षी प्रजननास योग्य होतो. इतर कार्प माशाबरोबर संवर्धन करण्यास अतिशय उपयुक्त आहे.

निलंगा तालुक्यात (घरणी) शिवपर येथे मत्स्यबीज उत्पादन केंद्र असून १९९०, १९९५, १९९८, २००० आणि २००४ या वर्षात अनुक्रमे ७.७५ लक्ष, ३४.४५ लक्ष, २७.४८ लक्ष, ५२.४४ लक्ष आणि ७०.४२ लक्ष मत्स्यबीजाचा पुरवठा करण्यात आला. मत्स्य विकासासाठी १९८५, १९९०, १९९५, १९९८, २००० व २००४ मध्ये अनुक्रमे ६ हजार रुपये, ३६ हजार रुपये, ६१ हजार रूपये, ३० हजार रुपये, ३९,९५५ रुपये आणि १८,८६१ रुपये अर्थसहाय्य करण्यात आले.

जिल्ह्यात मत्स्य व्यवसायासंबंधी एक महिन्याचे प्रशिक्षण मत्स्यबीज उत्पादन केंद्र घरणी येथे दिले जाते. वरील केंद्रात १९८५, १९९०, १९९५, १९९८, २००२ आणि २००४ या वर्षी अनुक्रमे ७, ९, २५, ५, ५ आणि ५ प्रशिक्षणार्थीनी लाभ घेतला. तर वरील वर्षी अनुक्रमे २११ मे. टन, ८६० मे. टन, १६०० मे. टन, १८०० मे. टन, २९४५ मे. टन आणि १८७० मे. टन माशांचे उत्पादन झाले.

तक्ता क्रमांक : १

लातूर जिल्ह्यातील पर्जन्यमान

पर्जन्य मापक केंद्रे	वर्षांची संख्या	अ व	जाने. वारी	फेब्रु. वारी	मार्च	एप्रिल	मे	जून	जुलै	ऑगस्ट	सप्टें. बर	ऑक्टो. बर	नोव्हें.	डिसें.	वार्षिक	कमाल	किमान	२४ तासा जास्ती जास्त झालेले पर्जन्यमान [२१]	
																वार्षिक पर्जन्यमानाची प्रसामान्याशी टक्केवारी आणि वर्ष [२२]			
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)	(१५)	(१६)	(१७)	(१८)	(१९)	(२०)
अहमदपूर	३७	अ	२.३	४.३	८.५	७.९	१८.८	१५५.८	२३६.९	२२३.२	१७४.४	७१.०	९२.५	२.७	९२५.३	१६४	४०	१८५.३	९ ऑक्टोबर
		ब	०.२	०.३	०.५	०.८	१.३	८.३	११.६	१२.२	८.९	३.९	०.९	०.३	४९.२	(१९८८)	(१९७२)		१९६१
औसा	१०	अ	४.७	०.६	७.८	५.१	२९.८	१४३.४	१५१.०	१६७.५	१८०.७	६६.१	१४.३	३.२	७७४.२	५५३	५६	१५५.०	१५ ऑगस्ट
		ब	०.३	०.१	०.३	०.७	२.२	७.१	८.७	८.७	९.०	३.७	१.०	०.२	४२.०	(१९९०)	(१९८२)		१९९०
निलंगा	१०	अ	२.१	०.०	९.६	३.१	२८.९	१३८.३	१४६.०	१६६.३	२३५.२	७६.९	१४.८	९.८	८३१.०	१५०	४९	१३.०	१५ ऑगस्ट
		ब	०.०	०.०	०.३	०.५	१.७	८.३	९.७	९.९	११.२	३.४	०.८	०.६	४६.५	(१९८३)	(१९८४)		१९९०
उदगीर	३४	अ	३.०	३.१	८.५	१०.०५	२२.९	१५३.४	२८७.८	२१६.६	१८३.३	७८.०	२२.४	६.७	९१६.२	१६३	२४	१५७.७	२७ सप्टेंबर
		ब	०.२	०.२	०.६	०.८	१.४	९.१	११.६	११.६	८.५	३.६	१.२	०.५	४९.३	(१९५५)	(१९७२)		१९५४
लातूर		अ	३.०	२.०	८.६	६.७	२५.१	१४७.७	१८५.४	१९३.४	१९३.४	७३.०	१७.८	५.६	८६१.७	१६५	३४	. .	. .
जिल्हा		ब	०.२	०.२	०.४	०.७	१.७	८.२	१०.४	१०.६	९.४	३.७	१.०	०.४	४६.९	(१९५५)	(१९७२)		

अ = प्रसामान्य पर्जन्य मिमी. मध्ये

ब = सरासरी पर्जन्य दिन (२.५ मिमी पेक्षा जास्त पर्जन्याचे दिन)

२१. १९९६ पर्यंत उपलब्ध असलेल्या आकडेवारीवर आधारित.

२२. कंसातील नोंद कमी जास्त पाऊस झालेल्या वर्षाची आहे.

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक - २[२३]

लातूर जिल्ह्यातील वार्षिक पर्जन्यमानाची वारंवारता

(१९५१ ते १९९०) [२४]

कक्षा (मिमी.)	वर्षांची संख्या	कक्षा (मिमी.)	वर्षांची संख्या
२०१-३००	१	९०१-१०००	४
३०१-४००	०	१००१-११००	६
४०१-५००	०	११०१-१२००	४
५०१-६००	३	१२०१-१३००	२
६०१-७००	४	१३०१-१४००	१
७०१-८००	५	१४०१-१५००	१
८०१-९००	६		

२३. ॲडिशनल डायरेक्टर जनरल ऑफ मिटिऑरालॉजी (रिसर्च), इंडिया मिटिऑरालॉजिकल डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, पुणे, यांचेकडून एप्रिल २००५ मध्ये प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित.

२४. फक्त ३७ वर्षांची आकडेवारी उपलब्ध आहे.

तक्ता क्रमांक ३

तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रसामान्य आणि कमाल पर्जन्यमान*

[सन १८९५ ते १९५८ मधील]

(मि. मी मध्ये)

पर्जन्यमापन केंद्रे	वर्षांची संख्या	जाने-वारी	फेब्रु. वारी	मार्च	एप्रिल	मे	जून	जुलै	ऑगस्ट	सप्टें. बर	ऑक्टो-बर	नोव्हें-बर	डिसेंबर	वार्षिक	जास्तीत जास्त वार्षिक पर्जन्य-मापनाची प्रसामान्य पर्जन्याशी टक्केवारी आणि वर्ष **	कमीत कमी पर्जन्य-मापनाची प्रसामान्य पर्जन्याशी टक्केवारी आणि वर्ष **	पर्जण्याचे प्रमाण (मी.मी)	२४ तासातील जास्तीत जास्त पर्जन्य आणि त्याचा दिनांक*
उस्मानाबाद	६०(अ)	४.६	३.३	७.६	१७.३	२६.४	१५३.७	१४४.७	१५५.२	२०८.८	५६.६	२४.१	७.४	८३९.७	१६८ (१९२६)	५१ (१९१८)	२४७.१	७ सप्टेंबर १८९५
	६०(ब)	०.३	०.३	०.७	१.७	२.१	८.७	१११.९	१०.६	१०.६	३.८	१.३	०.५	५२.५				
परांडा	३१ (अ)	०.३	४.८	२.५	९.९	२५.१	१०१.१	१५३.३	११६.१	२१०.६	८३.१	२२.६	३.८	७२८.२	१३१ (१९५६)	६० (१९५२)	१५१.९	७ सप्टेंबर १९५०
	११(ब)	०.०	०.३	०.२	१.३	२.५	६.४	८.९	८.३	९.९	४.७	०.७	०.२	४३.५				
उदगीर	११(अ)	१.३	५.६	७.९	१३.५	३५.८	१८४.४	३०१.०	२२६.६	२१८.९	७५.२	८.४	०.५	१,०७९.१	१३८(१९५५)	६८ (१९६०)	१५७.७	२७ सप्टेंबर १९५४
	११(ब)	०.२	०.४	०.७	१.५	२.५	९.६	१२.५	११.८	९.७	४.०	०.९	०.१	५३.१				
कळंब	११(अ)	०.०	१.८	३.८	५.८	३१.०	१३४.६	१९०.३	१४५.८	१४४.२	६३.१	२०.३	१.३	७७६.०	१४७ (१९५६)	६० (१९५२)	१०३.४	२७ सप्टेंबर १९५९
	११(ब)	०.०	०.१	०.३	०.६	१.९	८.४	११.३	८.९	१०.२	३.६	१.२	०.२	४६.७				
अहमदपूर	११(अ)	०.०	२.३	४.३	१३.५	१९.८	१४५.०	२६२.१	१८१.९	१४७.०	५३.६	१३.७	०.०	८४३.२	१५५ (१९५५)	७५ (१९५९)	१५८.२	१७ सप्टेंबर १९५४
	११(ब)	०.०	०.२	२.५	१.४	१.५	७.५	१२.८	१०.४	१०.२	३.६	०.५	०.०	५०.६				
तुळजापूर	११(अ)	०.३	२.८	८.९	१९.६	४०.४	१३८.४	२६८.५	१९६.९	२१२.३	९९.१	१०.४	३.८	१,००१.४	१४० (१९५६)	६१ (१९६०)	१४३.५	१ जुलै १९५८
	११(ब)	०.०	०.३	०.९	१.४	२.३	७.८	१२.७	१२.५	११.३	५.३	०.६	०.२	५५.३				
उस्मानाबाद	(अ)	१.१	३.४	५.८	१३.३	२९.७	१४२.९	२२३.३	१७०.४	२००.३	७२.५	१६.६	२.८	८८२.१	१६८ (१९२६)	५१ (१९१८)		
जिल्हा:	(ब)	०.१	०.३	०.९	१.३	२.१	८.१	११.७	१०.४	१०.३	४.२	०.९	०.२	५०.५				

अ=प्रसामान्य पर्जन्य मि.मी. मध्ये
*१९६० पर्जंतच्या आकडेवारीवर अधारित.

ब=सरासरी पर्जन्य दिनांची सरासरी संख्या (२.५ मि.मी. पेक्षा अधिक पर्जन्याचे दिवस)
** कंसात वर्ष दिलेली आहेत.

गॅझेटीअर ऑफ इंडीया महाराष्ट्र स्टेट मालीकेतील उस्मानाबाद जिल्हा गॅझेटीअर (१९७२) मधिल हे तक्ते दिले आहेत.: पृ.११ व १२ यामध्ये आजचे लातूर जिल्ह्याचा मोठा भाग अंतर्भूत होता.

अनुक्रमणिका

MaharashtraGazeteers

तक्ता क्रमांक ४

जुन्या उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्जन्यमानाची वारंवारीता
(१९०१ ते १९६० पर्यंतची आकडेवारी)

कक्षा (मि. मी.)	वर्षाची संख्या
४०१-५००	१
५०१-६००	५
६०१-७००	१५
७०१-८००	१०
८०१-९००	५
९०१-१,०००	१३
१,००१-१,१००	५
१,१०१-१,२००	४
१,२०१-१,३००	१
१,३०१-१,४००	०
१,४०१-१,५००	१

Maharashtra State Gazetteers



प्रकरण २ : इतिहास

प्राचीन काळ

- मौर्य सातवाहन पर्व
- वाकाटक कालखंड
- बदामी चालुक्य कालखंड
- राष्ट्रकूट कालखंड
- कल्याणी चालुक्य कालखंड
- यादव वंश
- इस्लामी राजवट
- प्रशासन विभाग

प्रकरण २

इतिहास

प्राचीन काळ*

अजून या प्रदेशाला लातूर नाव मिळायला कित्येक हजार वर्षे लोटावी लागणार होती. पारिभाषिक शब्दांत सांगायचे तर पुराश्मयुग, मध्याश्मयुग, नवाश्मयुग, ताम्रपाषाणयुग यांच्या नंतरच्या ऐतिहासिक कालापर्यंत येण्यास अवकाश होता तेव्हाही या भागात मानवी वस्ती होती. या भागातून वाहणाऱ्या मांजरा नदीच्या परिसरात पुराश्मयुगीन हत्यारे आणि अवजारे सापडली, ती मानवनिर्मित होती. त्या काळच्या मानवाने या परिसरात वास्तव्य केले तेव्हा नित्योपयोगी वस्तू त्याने पाषाणातूनच निर्माण केल्या होत्या. तेरणा नदीवरील तेर या ठिकाणी दोन-तीन वेळा जी पुरातत्त्वीय उत्खनने झाली, त्यातून आणि त्या परिसरात झालेल्या अन्वेषणातून नवाश्मयुगीन अवशेषही उपलब्ध झाले आहेत. लातूरपासून १५ कि.मी. अंतरावरील लातूर-आंबेजोगाई मार्गावर हरवाडी या गावाजवळ सुमारे ५० हजार वर्षांपूर्वीच्या हत्ती, हिप्पोपोटेमस इत्यादी प्राण्यांची वस्ती होती असे आता उघडकीस आल्यामुळे ह्या भागात जलस्रोत लक्षणीय प्रमाणात होते हे कळते. तात्पर्य असे की, या परिसरात मानवी वस्तीसाठी आवश्यक अशी सामुग्री होती, त्यामुळे अश्मयुगापासून येथे माणसाचा वावर सुरू झाला असावा.

आताच्या लातूर शहराच्या नावासंबंधात इ.स.च्या ७-८ व्या शतकापर्यंत मागे जाऊन मागोवा घेता येतो. महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या एका बलिष्ठ अशा घराण्याचा मूळ पुरुष येथला होता. त्यावेळी या शहराला लत्तलूर असे म्हणत याचा पुरावा तत्कालीन अभिलेखांतून मिळतो. ते घराणे होते राष्ट्रकुटांचे. त्यांच्या अनेक अभिलेखातून त्यांचे लत्तलूरपुरवराधीश्वर असे बिरूद येते. हे लत्तलूर म्हणजेच आजचे लातूर होय. कालांतराने लत्तलूरचे महत्त्व मध्ययुगात कमी झाले होते; पण इ.स.च्या २० व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत त्याची व्याप्ती, लोकसंख्या आणि महत्त्व खूपच वाढल्यामुळे त्याला जिल्ह्याचे स्थान मिळाले. १९८१ मध्ये महाराष्ट्रातील आकाराने मोठ्या ठरलेल्या ज्या जिल्ह्यांचे विभाजन झाले, त्यामध्ये मराठवाड्यातील उस्मानाबाद (प्राचीन धाराशिव) हा एक जिल्हा होता. त्याचे विभाजन होऊन लातूर एक स्वतंत्र जिल्हा करण्यात आला.[१] त्यात पूर्वेकडील औसा, लातूर, निलंगा, उदगीर आणि अहमदपूर या तालुक्यांचा समावेश केला गेला. लातूर व सभोवतालच्या परिसराचा फार प्राचीन काळापासूनचा विचार करायचा झाल्यास पुरातात्त्विक संशोधनाचा पुरावा उपलब्ध व्हायला हवा. मात्र कारणपरत्वे तसे संशोधन या भागात पाहिजे त्या प्रमाणात न झाल्यामुळे तुटपुंज्या माहितीवरच विसंबून राहावे लागते.

---

* या विभागाचे लेखन डॉ. हरिहर ठोसर यांनी केलेले आहे.

१. लातूर जिल्ह्यातील निलंगा आणि उदगीर या तालुक्यांचे विभाजन होऊन अलिकडे शिरुर-अनंतपाळ, देवणी, व जळकोट इत्यादी नवे तालुके निर्माण करण्यात आले आहेत. परंतु गावांच्या तालुक्याचा आधार १९९१ पूर्वीच्या जनगणना निर्देशग्रंथानुसार घेण्यात आलेला आहे.

इतिहासपूर्व काळातील लातूरचा विचार पुराश्मयुगापासून करता येतो. प्रत्यक्ष या भागात त्या काळासंबंधीचे फारसे संशोधन झाले नसले तरी महाराष्ट्र व शेजारच्या सीमेलगतच्या राज्यात या काळासंबंधीची जी माहिती उपलब्ध झालेली आहे, ती विचारात घेता येते व या परिसरातल्या पुराश्मयुगापासूनच्या मानवी जीवनाचा आढावा घेता येतो. त्याचे कारण असे की, सगळ्या अश्मयुगीन (पुरा-मध्य-नवाश्मयुगीन) काळातील मानवी जीवन शे-दोनशे कि.मी. परिसरात तरी एकाच तोंडवळ्याचे असणार, त्या त्या काळातील एखादे अवजार वा हत्यार लातूरला मिळाले काय किंवा आंबेजोगाई, परळी येथे मिळाले काय, त्याचा उपयोग व तंत्र साधारणत: सारखेच असणार !

पुराश्मयुग म्हटले की, त्याचा काळ सुमारे तीन लाख वर्षे इतका जुना मानावा लागतो. या काळातील मनुष्य दगडी हत्यारे व अवजारे वापरीत असे. लातूरजवळ मांजरेच्या काठी अशी हत्यारे व अवजारे प्राप्त झाली आहेत. ही क्वार्टझाईट या प्रकारच्या दगडांची होती. हातकुऱ्हाड नि फरशी या दोनच प्रकारची ती असत. जगात सगळीकडे यांना ॲबेव्हिलियन म्हणून ओळखतात. वन्यप्राण्यांची हत्त्या करायची ती ओबड्धोबाड दगडी हत्याराने आणि कंदमुळे, फळे कापायची तीही दगडी अवजारानेच. या पुढील काळातही माध्यम दगडच राहिले. मात्र अवजारे आणि हत्यारे यांची घडण अधिक सफाईदार झाली; शिवाय दगडांचे भिन्न प्रकारही वापरात आणले गेले. हा झाला ॲश्युलिअन हत्त्यार-अवजाराचा काळ. या काळापर्यंत पुराश्मयुग मागे पडले होते. चर्ट या जातीचा दगड आता वापरात आला. ती हत्त्यारे करण्याच्या तंत्रातही सुधारणा झाली. तासण्या, अणकुचीदार टोक असलेली हत्यारे तसेच छोट्या छिन्नीसारखी हत्यारे घडविली गेली. ती ४०,००० वर्षांइतकी प्राचीन असल्याचे रेडिओ-कार्बन पद्धतीने ठरले आहे.

येथून पुढचा काळ नवाश्मयुग म्हणून ओळखला जातो. मानवी जीवनात स्पष्ट जाणवणारा फरक आता आढळतो. ते प्रगतही झाले होते नि स्थिरही. एक प्रकारे क्रांती घडवून आणणाराच हा काळ होता असे म्हणावे लागते. आता येथील मानव राहाण्यासाठी झोपड्या उभ्या करू लागला आणि साठवणीसाठी मातीची भांडी घडवू लागला. त्याला अग्नीचा शोध लागला होता आणि चाकावर मडकी करून ती भाजण्याचे तंत्रही त्याला अवगत झाले होते. या नवाश्मयुगाचे अवशेष शेजारच्या आंध्रात उपलब्ध झाले असले, तरी वर म्हटल्याप्रमाणे त्याच प्रदेशात त्यांचे असणे मर्यादित नसणार. शिवाय महाराष्ट्रात त्यावेळी त्या नंतरचे म्हणजे ताम्रपाषाणयुग अवतरले होते हे नेवासे, जोर्वे-नाशिक, दायमाबाद, इनामगाव इत्यादी ठिकाणच्या उपलब्धीवरून कळते. मात्र या काळच्या संस्कृतीची माहिती वाङ्मयातून मिळणे शक्यच नाही. ती उत्खननातून आणि अन्वेषणातून मिळालेल्या अवशेषांच्याद्वारे अनुमानता येते.[२]

प्रागैतिहासिक काळात लातूर परिसरातील जनजीवनाचे स्थूल स्वरूप येथपावेतो पाहिले. ऐतिहासिक काळाच्या प्रारंभीच मौर्य घराण्याची स्थापना झाली. या घराण्यानेच भारतातील पहिले साम्राज्य स्थापन केले. उत्तर भारतात स्थापन झालेल्या या साम्राज्याचा प्रभाव महाराष्ट्राच्या काही भागावर नक्कीच होता हे शिलालेख व इतर तत्कालीन अवशेषांधारे दाखवता येते. लातूर परिसरात या काळात मानवी संस्कृतीचा विकास झपाट्याने व अखंडपणे झाल्याचे आढळते. लातूरपासून फार दूर नसलेल्या तेर (प्राचीन तगर) या ठिकाणी झालेल्या उत्खननाद्वारे नि सापडलेल्या अवशेषांधारे येथल्या प्रगतीवर चांगलाच प्रकाश पडतो. तेर हे ज्या तेरणा नदीच्या काठी वसलेले आहे, ती पुढे लातूर जिल्ह्यातूनच वाहते. शिवाय तेर आणि शेजारच्या आंध्र व कर्नाटक या राज्यांना जोडणारा राजमार्गही लातूर जिल्ह्यातूनच जात असे. इ.स.च्या आगे-मागे तेर

२. देव, शां. भा., **महाराष्ट्र-एक पुरातत्त्वीय समालोचन**, मुंबई, १९६८, पृ. १६.

येथे असलेल्या समृद्ध जीवनावरून तत्कालीन लातूर-परिसरातील प्रगत मानवी जीवनमानाचे आकलन होऊ शकते. तेरणा, मांजरा आणि तावरजा या सध्याच्या लातूर जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांच्या काठी अनेक प्राचीन स्थळे असली, तरी त्या ठिकाणी पुरातत्त्वीय संशोधन झालेले नसल्यामुळे त्याचा सविस्तर विचार करता येत नाही. मात्र तेरणा नदीतून केवळ पाणी वाहून गेले असे नसून संस्कृतीस्रोतही दूरवर पोचवले गेले असणार यात काही शंका नाही. तेर येथे सापडलेल्या देशी-परदेशी वस्तूंवरून हे स्पष्ट होते की, इतिहासकाळाच्या उषःकालीच लातूर परिसर एका समृद्ध जीवनाचा अनुभव घेत होता. तेर ते रोम हा मार्ग या परिसरातूनच गेला होता.

मौर्य-सातवाहन पर्व : तसे तर लातूर परिसराचा विचार ऐतिहासिक काळासंबंधात याही आधीपासून करता येईल. भारताच्या इतिहासातील प्राचीन कालखंडाचा प्रारंभ इ.स.पूर्वीच्या सहाव्या शतकापासून मानतात. या काळात भारतात एकूण १६ महाजनपदे होती. पैकी दोन - अश्मक आणि मूलक ही दक्षिण गोदावरीच्या खोऱ्यात नांदत होती. यातील अश्मकाची राजधानी होती पोदनपूर-पोडन-बोधन[३] (आताच्या निझामाबाद जिल्ह्यात) आणि मूलकाची होती प्रतिष्ठाण (पैठण, जि. औरंगाबाद) येथे. लातूर वसलेय ते मांजरा नदीच्या परिसरात आणि तिचेच काठावर अश्मकाची राजधानी बोधन वसलेले आहे. लातूर नि बोधन ही एकमेकापासून फार दूर नाहीत हे लक्षात घेतले की, लातूरही अश्मक जनपदात समाविष्ट असावे असे मानावे लागते. कालांतराने अश्मकाच्या दक्षिण भागाला कुंतल हे नामाभिधान प्राप्त झाले नि स्वाभाविकपणे लातूरचा समावेश कुंतलात होऊ लागला.

इ.स. पूर्वीच्या ४ थ्या शतकात स्थापन झालेले मौर्य साम्राज्य जेव्हा दक्षिण भारतापर्यंत पसरले, तेव्हा प्रशासन सुकरतेसाठी इकडच्या प्रदेशाचे मुख्यालय सुवर्णगिरी येथे केले गेले. कर्नाटकाच्या गुलबर्गा जिल्ह्यात भीमा नदीकाठीचे सध्याचे सन्नती म्हणजेच प्राचीन सुवर्णगिरी असावे[४] असे तेथे नव्याने उपलब्ध झालेल्या त्याकाळातील अवशेष व अभिलेखांमुळे बहुतांश संशोधकाचे मत आहे. लातूर जवळील त्याकाळी भरभराटीस आलेले तेर व सन्नती यांना जोडणारा राजमार्ग लातूर जिल्ह्यातून जात होता हे लक्षात घेता लातूरचाही समावेश मौर्य-प्रशासित प्रदेशात होत असावा हे मानावे लागते. येथे उपलब्ध झालेल्या मौर्य सम्राट अशोक याच्या शासनाच्या (एडिक्ट) आवृत्ती लक्षात घेता या प्रदेशाचे तत्कालीन महत्त्व कळते. शिवाय या प्रदेशावर प्रशासक म्हणून आर्यपुत्र म्हणजे अभिषिक्त मौर्य कुमार (राजपुत्र) याची झालेली नेमणूक या प्रदेशाकडे मौर्य सम्राटांचे विशेष लक्ष होते याकडे संकेत करते. सन्नती येथे उपलब्ध झालेल्या सातवाहनकालीन एका लेखामध्ये बलबदर येथील व्यापाऱ्याने सन्नतीस भेट दिल्याचा उल्लेख बाल्टिपट्टण वा बलिपट्टण असा केलेला आहे. तेच हे बंदर होय. येथून भारताचा रोमशी व्यापारी संपर्क होत असे. सन्नती आणि बलिपट्टण यांच्यातील संपर्क लातूर आणि तेर मार्गे होत असे ही वस्तुस्थिती येथे लक्षात घ्यायला हवी.[५] तेर येथील उत्खननात मौर्यकालीन अवशेष हाती लागले आहेत, म्हणजेच लातूर परिसराच्या सांस्कृतिक इतिहासाचा प्रारंभ त्या काळापासून झाला असावा.

---

३. यझदानी, गुलाम (संपा.) **'अर्ली हिस्ट्री ऑफ दि डेक्कन'**, ऑक्सफर्ड, १९६०, पृ. ५६.

४. सर्मा, आय. के आणि जे. वरप्रसादराव, **'अर्ली ब्राह्मी इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम सन्नती'**, जर्नल ऑफ दि एपिग्राफिकल सोसायटी ऑफ इंडिया, १९९७, खंड २३, पृ. ७९-८४.

५. ठोसर, हरिहर, **'आयडेंटिफिकेशन ऑफ सुवर्णगिरी अॅण्ड इसिला'**, भारतीय स्थलनाम परिषद, २२ वे अधिवेशन, उडुपी (कर्नाटक), २००२.

सातवाहन राजे हे मौर्यांचे दक्षिणेकडील उत्तराधिकारी होत. त्यांच्या कारकिर्दीत तेर हे एक अत्यंत भरभराटीस आलेले नगर होते हे सर्वमान्य आहे. याची कारणे दोन : (१) उज्जैन इ. उत्तरेकडील नगरे आणि भोकरदन, पैठण, तेर, भडोच इत्यादी नगरांना जोडून पाश्चात्य देशांशी संपर्क साधणारा व्यापारी मार्ग आणि (२) रोम, ग्रीस इत्यादी देशांशी त्या वेळी झालेला व्यापार. तेरचा उल्लेख ग्रीक वाङ्मयात आढळतो आणि तेर येथील उत्खननातून प्राप्त झालेल्या अवशेषांची त्याला पुष्टीही लाभलेली आहे. विशेष म्हणजे तेथे आढळलेल्या तगर जनपदाचा उल्लेख असलेल्या नाण्यांवरून अर्थातच त्यावेळचे लत्तलूर (लातूर) हे तेर (तगर) जनपदाचा एक भाग होते हे स्पष्ट होते.[६]

उपरोल्लेखित सन्नति (जि. गुलबर्गा) येथे सातवाहन घराण्याच्या अधिपत्याखालील प्रशासन विभागाची राजधानी असावी. तेथून उपलब्ध झालेल्या अभिलेखांवरून असे म्हणता येते. हे अभिलेख आहेत गौतमीपुत्र सातकर्णी, वाशिष्ठपुत्र सातकर्णी, आणि शिवश्री पुलुमावी यांचे. कुंतल सातकर्णी हा एक येथील प्रशासकच होता. सातवाहन कालखंडात लातूर परिसर त्यांच्याच अधिपत्याखाली असणार. कारण तेर आणि सन्नती या दोन नगराशी या परिसराचा संपर्क होताच.[७]

वाकाटक कालखंड : सातवाहनानंतर दक्षिणेतील मातबर राजवंश म्हणजे वाकाटक राजवंश होय. या राजकुलातील (प्रथम) प्रवरसेन या महापराक्रमी राजाने संपूर्ण दक्षिणापथ त्याच्या अधिपत्याखाली आणला होता. त्याच्या नंतर या घराण्याच्या चार शाखांपैकी ज्या दोन शाखांची माहिती सध्या उपलब्ध आहे, त्यापैकी वत्सगुल्म (सध्याचे वाशिम) येथे राजधानी असलेल्या शाखेच्या राज्यात पश्चिम विदर्भ, मराठवाडा व सीमेवरील आन्ध्र आणि कर्नाटकाचा भाग याचा समावेश होता. मराठवाड्यातील इतर काही जिल्ह्यांप्रमाणे लातूरचा समावेशही या वत्सगुल्म शाखेच्या राज्यात होई. देवसेन वाकाटक राजाच्या 'इंडिया ऑफिस' ताम्रपटातील स्थलनामांची निश्चिती योग्यपणे केल्यावर हे असे सिद्ध झाले आहे. त्याचप्रमाणे याच देवसेन राजाच्या बिदर ताम्रपटातील स्थलनामांची निश्चिती औसा व लातूर तालुक्यातील म्हणूनच केलेली आहे. उदाहरणार्थ, वेल्पकोंडा म्हणजे बेलकुंड पसापलकल्ल म्हणजे हसाळा, क्रेरिंचकल्ल म्हणजे केज आणि डोणिथोंब म्हणजे धानोरी. यावरून असे स्पष्ट होते की, देवसेनाच्या (वत्सगुल्म शाखेच्या) ताब्यात लातूर परिसर होता नि तो **'** नांगरकटक-उत्तरमार्ग **'** च्या प्रशासन विभागात मोडत होता. खरे तर वाकाटकांच्या (वत्सगुल्म शाखा) आपत्काळात लातूर-उस्मानाबाद-बिदर परिसरानेच त्यांना आसरा दिला असेही इतर ताम्रपत्राआधारे दिसते.[८] याशिवाय तेर येथे राज्य करणारे विद्याधरवंशीय राजे सातवाहनांचे मांडलिक होते असेही कलिंग राजा खारवेल याच्या इ.स. पू. पहिल्या शतकांतील हाथीगुंफा लेखावरून कळते. तेर पासून जवळ असलेला लातूर परिसर त्यांच्या प्रभावाखाली असणार हे स्पष्टच आहे.

महाराष्ट्र, आन्ध्र आणि कर्नाटक यांच्या सीमारेषेवर सध्याचा लातूर जिल्हा आहे. सातवाहन व वाकाटक यांच्या अस्तानंतर या प्रदेशावर राज्य करणाऱ्या सगळ्या राजवटींचा साहजिकच या प्रदेशावर अंमल असावा

---

६. शास्त्री, अजयमित्र, **'** ए नोट ऑन तगर कॉइन्स **'**, जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी, खंड १६, पृ. २२३-२४४.

७. ठोसर, हरिहर, **'** तेरच्या प्राचीन इतिहासातील काही अज्ञात दुवे **'**, **तेर गौरव ग्रंथ**, २००१.

८. ठोसर, हरिहर, एपिग्राफिकल सोसायटीचे २८ वे अधिवेशन, उडुपी (कर्नाटक), एप्रिल, २००२.

असे अनुमान करता येते. इ.स.च्या चौथ्या शतकात कुंतल नामक प्रदेशावर (महाराष्ट्र नि कर्नाटक यांच्यातील संलग्न प्रदेश) मानपूरच्या राष्ट्रकुटांची सत्ता होती. या राज्यात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि कर्नाटकातील बेळगांव जिल्ह्यातील प्रदेशाचा समावेश होता हे अभिलेख-सिद्ध आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील कुंतलगिरी या जैन बसतीमुळे प्रसिद्धीस आलेल्या स्थलनामावरून मानपूरच्या राष्ट्रकुटांच्या कुंतल राज्यात उस्मानाबाद-लातूर प्रदेशाचा समावेश होत असावा असे अनुमानिता येते. श्री.ग.ह.खरे यांनी लातूर या नावाची व्युत्पत्ती रट्ट वा राष्ट्रकूट या राजवंशाच्या नावातून झाल्याचे दाखविले आहे.[९] बदामी चालुक्यांच्या कर्नूल आणि दायंदिने ताम्रपटातील स्थलनामांच्या पुनर्निश्चितीवरून लातूर आणि राष्ट्रकूट राजघराण्याचा संबंध इ.स.च्या सातव्या शतकापर्यंत मागे नेता येतो. या लेखातून आलेली नावे - नलवाडी विषय म्हणजे नळदुर्ग परिसर, तलयखेड म्हणजे लातूर जिल्ह्यातील तळीखेड (तेरणा नदी काठी, ता. निलंगा), रट्टगिरी वा रत्नागिरी म्हणजे लातूर (रत्नपूर महात्म्यानुसार म्हणजेच लातूर महात्म्यानुसार लातूरचे प्राचीन नाव रत्नपूर होते), लतनौर म्हणजेच रट्टनौर असा उल्लेखही ताम्रपटात येतो. तसेच चिंचवली म्हणजे चिंचोली (जि. लातूर) शिवाय अंजिरिका नदी म्हणजे वांजरा किंवा मांजरा नदी होय. (वास्तविक मांजरा ही पूर्ववाहिनी, पण लातूर जवळ ती दक्षिणाभिमुख होते) आणि उच्छल म्हणजेच उस्तुरी (जि. लातूर). थोडक्यात असे म्हणता येईल की, चालुक्यांच्या काळातही लातूर परिसरावर हा अंमल होता तो राष्ट्रकुटांचा. हा काळ आहे इ. स. ६८२ चा[१०] म्हणजेच सातव्या शतकाच्या उत्तरार्धातला. खरे तर लातूर हे राष्ट्रकुटांचे मूलस्थान असल्याच्या श्री. अळतेकरांच्या प्रतिपादनास या पुराव्यावरून पुष्टीच मिळते.

बदामी चालुक्य कालखंड : चालुक्य विक्रमादित्याचा उपरोल्लेखित कर्नूल लेख आणि विनयादित्याचा दायंदिने [११] लेख लातूर परिसरातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थितीवर चांगलाच प्रकाश टाकतात. या लेखांत लातूर येथील व त्या जिल्ह्यातील विद्वान, वेदविद्या पारंगत ब्राह्मणांना दाने दिल्याची माहिती आहे. त्यावरून येथील शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनाची कल्पना येते. विनयादित्यानंतर राज्यावर आलेल्या विजयादित्याच्या ताम्रपत्रातून माहिती येते ती विद्वान व वेदविद्येचे अध्ययन व अध्यापन करणाऱ्या ब्राह्मणांना अग्रहार म्हणून दिलेल्या ग्रामदानांची. ही ताम्रशासने बोरगाव व कासारशिरसी या निलंगा तालुक्यातील गावांत उपलब्ध झाली. यात उल्लेखिलेली गावे याच तालुक्यात आहेत. बोरगांव ताम्रपत्रात उच्छिव चत्वारिंशत असा चाळीस गावांचा समावेश असलेला एक छोटा प्रशासन विभाग उल्लेखिलेला आहे. उच्छिव म्हणजे "औसा" हे आजचे तालुक्याचे गाव. हा बहुधा नलवाडी (नळदुर्ग) विषयांतर्गतचा उपविभाग असावा. यावरून बदामीच्या चालुक्यांच्या राजवटीत लातूर परिसरातील प्रशासन विभागांची कल्पना येते. तसेच शैक्षणिक केन्द्राचीही माहिती मिळते. याशिवाय लातूर-बिदर परिसर म्हणजेच चलुक्य देश आणि यावरूनच बदामी येथील राजवंशाचे चालुक्य राजवंश असे अनुमान केले गेले. कासारशिरसी (ता. निलंगा) या चालुक्यांच्या ताम्रपत्रात चल्लिकी वा चलुक्य देश असा उल्लेख असून, त्यात आलेल्या सर्व गावांची ओळख लातूर व बिदर जिल्ह्यातील

९. खरे, ग.ह., **सिलेक्ट आर्टिकल्स**, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, पृ.७७-८२.

१०. फ्लीट, जे.एफ., **जर्नल ऑफ दि बॉम्बे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी, मुंबई,** खंड १६, पृ. २२३-२४४.

११. पंचमुखी, आर. एस., **एपिग्राफिया इंडिका**, न्यू दिल्ली, खंड २२, पृ. २९.

गावे अशीच झालेली आहे. या स्थितीचा विचार केल्यास लातूर परिसर बदामीच्या चालुक्य राजवटीच्या सुरुवातीपासूनच राजकीय हालचालींच्या महत्त्वाच्या स्थानी होता असे मानावे लागते. उपरोल्लेखित ताम्रपटावरून लातूर परिसराच्या सांस्कृतिक प्रगतीमध्ये बदामीच्या चालुक्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते हे स्पष्ट होते. लातूर आणि औसा ही इ.स.च्या सातव्या शतकातील या प्रदेशातील महत्त्वाची नगरे होती. वर उल्लेखिलेल्या कर्नूल ताम्रपत्रातील भूमिदान सेंद्रकवंशीय देवशक्तिराज नावाच्या सामंताच्या विनंतीनुसार करण्यात आले होते आणि ती दानभूमी लातूर कडील होती. या दोहोंचा पारस्परिक संबंध लावला की, देवशक्तिराज हा नलवाडी विषयाचा प्रशासक असावा असे अनुमानिता येते.

बदामीच्या चालुक्य काळातील आणखी एका सांस्कृतिक घटनेचा उल्लेख अपरिहार्य आहे. त्यांनी ऐहोळे, पट्टदकल आणि बदामी येथे स्थापत्य कलेला आसरा दिला त्याचे मनोरम पडसाद साऱ्या दक्षिणेत उमटले. त्याला लातूर परिसरही अपवाद नव्हता हे खरोसा येथील डोंगरातील लेणीमुळे कळते.[१२]

ही खरोसा लेणी टेकडीवरील ठिसूळ प्रकारच्या दगडात कोरलेली असल्यामुळे लेणीचे स्थापत्य आणि आतील शिल्पे नि मूर्ती झिजून गेल्या आहेत. निसर्गाने झोडपून काढले आणि मानवाने दुर्लक्ष केले म्हणजे उत्तम कलाकृतींची काय गत होते हे येथे कळते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जेम्स बर्जेस आणि फर्ग्सन यांनी लेणींची पहाणी करून जो वृत्तांत प्रसिद्ध केला त्यावरून येथील मूर्तिशिल्पांची सुदैवाने चांगली माहिती त्यांच्या अहवालावरून कळते ती अशी—

खरोसा लेणी बदामी येथील चालुक्यकालीन लेणींच्या समकालीन म्हणजे इ.स.च्या सहाव्या शतकातील आहेत. येथे बौद्ध, ब्राह्मणी आणि जैन लेणी (वेरूळ येथील लेणीप्रमाणे) असून या पंथांचे अनुयायी या परिसरात गुण्या-गोविंदाने नांदत असत. हे अर्थातच सहिष्णू वृत्तीचे द्योतक होय. बौद्ध लेणीत स्तूप आणि बुद्ध व बोधिसत्त्वांच्या प्रतिमा कोरलेल्या असून, देवतामध्ये ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांची प्रतिमा आणि गर्भगृहे आहेत. शिवाय कार्तिकेय, गणेश, महिषासुरमर्दिनी, उभ्या सप्तमातृका (सध्या तरी सहाच आढळतात) आणि नाग देवतांच्या प्रतिमा आढळतात. या बरोबरच जैन पंथातील तीर्थंकरांच्या प्रतिमाही येथे आहेत. येथील काही लेणींच्या प्रवेशदाराच्या आजुबाजूस द्वारपालही कोरलेले आहेत. येथील लेणीत शैवलेणी संख्येने अधिक आहेत. या लेणींतून रौद्र आणि सौम्य अवस्थेतील शिवाच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. त्यात अंधःकासूरवधाच्या शिल्पपटातील शिवाचा आवेश, शिव-पार्वती विवाह, रावणानुग्रहमूर्ती या उठून दिसतात.

शैवलेणीतील सर्वात मोठे लेणे महादेव लेणे म्हणून ओळखले जाते, तर आणखी एका लेण्याला 'लाकुल' असे संबोधिले जाते. लकुलीश म्हणजेच पाशुपत शैवपंथाचा प्रभाव त्यावरून लक्षात येतो. या शिवाय येथील अनेक छोट्या-छोट्या लेणींतून शिवलिंग प्रतिष्ठापित केल्याचे आढळते. विष्णू, विष्णू-लक्ष्मी यांच्या, त्याचबरोबर विष्णूच्या दहाही अवतारांच्या प्रतिमा येथे कोरलेल्या आहेत. यावरून भागवतपंथाचे अस्तित्व आणि लोकप्रियता याची कल्पना करता येते. सामान्यतः मराठवाड्यातील आणि प्रामुख्याने लातूर परिसरातील लोकांच्या धार्मिक जीवनासंबंधी आणि उपासनापंथासंबंधी लेणीतून आढळणाऱ्या या देवता-प्रतिमांवरून कल्पना येते.

---

१२. गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट**, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९७२, पृ. ७६६-७७४.

लातूर परिसर संस्कृति-समृद्ध करण्याला प्रारंभ झाला तो बदामीच्या चालुक्यांच्या कार्यकाळात हे ऐतिहासिक पुराव्यावरून पाहिले. विलक्षण योग असा की, यांच्या नंतर येथे अधिराज्य गाजवणारे राष्ट्रकूट आणि हा चालुक्य वंश यांच्यामधील निर्णायक लढायाही याच परिसरात झाल्या. यातील भीमेच्या काठावर वसलेल्या सन्नती येथे झालेली लढाई [१३] थोडी दूरची, पण दुसरी भंडारकवठे[१४] (जि. सोलापूर) येथे झालेली लढाई अगदी अंगणात झाल्यासारखी आणि परिणामतः चालुक्य सत्तेचा अंतिमतः ऱ्हास झाला. लातूर परिसराच्या जडण-घडणीची ठोस सुरुवात बदामीच्या चालुक्य राजवटीपासून झाली व त्यानंतरच्या राष्ट्रकूट, कल्याणी चालुक्य, आणि यादव राजवटीत येथील राजकीय आणि सांस्कृतिक प्रगतीला गती प्राप्त झाली.

राष्ट्रकूट कालखंड : चालुक्यानंतर दक्षिणेत सत्तेवर आलेल्या राष्ट्रकूट वंशातील राजांनी लातूरचे स्थान ऐतिहासिक पटलावर अधिक ठळक आणि विशेषपणे स्थिर केले. शैक्षणिक क्षेत्रातील प्रगती, सांस्कृतिक क्षेत्रातील हालचाली आणि राजकीय क्षेत्रातील उलाढाली यांचे एकमहत्त्वाचे केन्द्र म्हणून या काळच्या लातूरची ओळख करून द्यावी लागते. लातूर आणि राष्ट्रकूट यांचा परस्पर संबंध इ.स.च्या सातव्या शतकापर्यंत मागे नेता येतो हे आपण मागे कर्नूल ताम्रपत्राधारे पाहिले आहे. राष्ट्रकुटांच्या सर्व शाखांचे मूलस्थानच मुळी लातूर हेच होय. मानपूरच्या राष्ट्रकुटांनी कारणवशात सत्ता गेल्यावर लातूरकडे धाव घेतली असावी व तेथे किल्ला वा गढी बांधून वास्तव्य केले असावे असे अनुमान लातूरच्या प्राचीन रट्टगिरी या नावावरून करता येते.

लत्तलूर किंवा लतनौर ही रट्टनौर या कानडी नावाची तद्भव रुपे असल्याचे श्री. ग. ह. खरे यांनी पटवून दिले आहे. याचा अर्थच असा की, लातूर हे गावच मुळी त्यांनी नावारुपाला आणले होते, वसविलेही असावे. म्हणजेच लातूरचे पूर्वीचे नाव रत्नपूर (रट्टनपूरचे संस्कृत रूप) असून ते मांजरा नदीवर वसलेले होते (रत्नपूर माहात्म्य). या परिसराच्या अन्वेषणात येथील टेकड्यांवर प्राचीन वस्तीच्या खुणा आजही आढळतात. मांजरा नदीच्या पुरामुळे वा अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे ही वस्ती आजच्या लातूरच्या गावठाणात स्थलांतरित झाली व गावाच्या विस्तारामुळे रट्टनपूर-लतनौर-लतलौर-लातूर अशा क्रमाने त्याचे नामांतर होत गेले. पुढे येथील राष्ट्रकुटांपैकी काही महत्त्वाकांक्षी व्यक्ती नशीब काढण्यासाठी इतर प्रांतात गेल्याचे इतिहास सांगतो.

लातूरच्या राष्ट्रकूट घराण्यातील महत्त्वाकांक्षी व्यक्ती म्हणून आपणास दन्तिवर्मन याचे नाव घेता येईल. वेरूळ येथील क्र.१५ च्या दशावतार लेणीतील दंतिदुर्गाचा शिलालेख ही माहिती देतो. अलीकडेच प्राप्त झालेल्या ताम्रपटावरून कळते ते असे की, दंतिवर्मनच्याही आधीच्या दोन पिढ्यांचे राज्य वेरूळ-औरंगाबाद परिसरावर होते. या दोन पिढ्यांतील राज्यकर्त्या व्यक्ती म्हणजे अकालवर्ष कृष्ण आणि इन्द्र या होत. ही नावे कर्नाटकातील गंगराजाच्या मेरकारा ताम्रपटात येतात, तसेच ती कल्याणी चालुक्यांच्या अनेक ताम्रपटांतही आढळतात. या ताम्रपटांतून बदामी चालुक्यांचा आलेला संदर्भ इतिहासानुसार असल्याचा निर्वाळा के.व्ही.रमेश यासारख्या पुराभिलेखतज्ज्ञाने दिलेला आहे. इ. स. ४६६ च्या मेरकारा ताम्रपटातील उल्लेख पहाता अकालवर्ष कृष्ण हा या राष्ट्रकूट शाखेचा मूळ पुरुष मानावा लागतो.[१५] हा मानपूरचा लातुरास येऊन स्थायिक झालेला राष्ट्रकूट राजा असणे शक्य आहे.

---

१३. रमेश, के. व्ही., **चालुक्याज ऑफ वातापी,** दिल्ली, १९८७.

१४. कित्ता.

१५. ठोसर, हरिहार, **जर्नल ऑफ दि एपिग्राफिकल सोसायटी ऑफ इंडिया,** खंड १९, पृ. १०३-११४.

अनुक्रमणिका

इ.स.च्या पाचव्या शतकाच्या उत्तरार्धात वेरूळ-औरंगाबादचा परिसर वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेच्या राज्यात समाविष्ट होता. त्या वेळच्या अस्थिरतेचा लाभ उठवून अकालवर्ष-कृष्णाने तो प्रदेश ताब्यात घेऊन वेरूळ येथे आपली राजधानी स्थापन केली. अकालवर्षाचा पुत्र इन्द्र याला जिंकून मांडलिकत्व स्वीकारण्याच्या अटीवर त्याचे राज्य परत दिले ते चालुक्य जयसिंहाने. वेरूळच्या दन्तिदुर्ग राष्टकुटाचे पूर्वज या इन्द्राचे वंशज होत. हे थोड्या तपशिलाने सांगायचे कारण असे की, राष्ट्रकुटांच्या सर्व शाखांमध्ये सर्वात बलाढ्य ठरलेली ही सम्राट राष्ट्रकुटांची शाखा लातूरच्या राष्ट्रकूट वंशाचीच होती व पुढील काळातील या शाखेतील व्यक्तींच्या वास्तव्य स्थानावरून ती मूलक किंवा मालखेडचे राष्ट्रकूट म्हणूनही ओळखली जाऊ लागली.

या राष्ट्रकूट वंशाच्या कोरीव लेखांवरून कळते ते असे की, इ.स.च्या नवव्या शतकापर्यंत (इ.स. ८००) वेरूळ येथेच यांची राजधानी होती. नवव्या शतकाच्या पहिल्या दशकात राष्ट्रकूट नरेश तिसरा गोविंद यांने ती कर्नाटकाच्या बिदर जिल्ह्यातील मयूरखंडी (आताचे मोरखंडी) येथे हलविली. गोविंदाचा पुत्र व उत्तराधिकारी अमोघवर्ष याचे "लत्तलूरपुरवराधीश्वर" असे बिरूद होते. लातूर हे मोरखंडीपासून जवळच असून या राष्ट्रकुटांचे ते पैत्रक गावच होते. गोविंदराजाने दान दिलेल्या गावांची व भूमिदानांची स्थलनिश्चिती उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा व तुळजापूर आणि लातूर जिल्ह्यातील औसा व अहमदपूर या तालुक्यातूनच होते. असे एकूण चार ताम्रपट उपलब्ध झाले आहेत. या लेखी पुराव्यावरूनही या राष्ट्रकूट शाखेचा लातूरशी असलेला निकटचा संबंध लक्षात येऊ शकतो. राष्ट्रकूट तिसरा गोविंद याचे आणखी दोन ताम्रपट लातूर परिसराशी निगडित आहेत. पैकी एक आहे इ.स. ८०३ चा झरिका म्हणजे अहमदपूर तालुक्यातील झरी बुजुर्ग किंवा नवकुंड झरी येथला व दुसरा इ.स.८१२ चा शिरसी-लोहारा येथला. यातील उल्लेखित ग्रामदाने धाराशिव निवासी ऋष्यप्पभट्ट यास दिलेली होती. झरिका हे लातूर जिल्ह्यातील (तालुकाही लातूरच) पौना या विषयातले गाव होते. लातूर तालुक्यातील चाकूर जवळील आता ओस पडलेले होनाळी म्हणजे पौना विषयाचे मुख्य गाव असावे. या ताम्रपटात उल्लेखिलेली इतर गावेही लातूर तालुक्यातलीच होत. यावरून राष्ट्रकूट काळात लातूर जिल्ह्याचा उत्तर आणि ईशान्य भाग पौना विषयात समाविष्ट होता अशी माहिती मिळते; तर शिरसी-लोहारा ताम्रपटातील ग्रामदाने मुरूम्ब विषयातील होती. बृहत लोहाराग्राम हे त्यातील मुख्य गाव. उस्मानाबाद जिल्ह्याच्या उमरगा तालुक्यात आज असलेली लोहारा खुर्द व लोहारा बुजुर्ग म्हणजेच त्या वेळची बृहत् लोहाराग्राम आणि लघु लोहारग्राम होत.[१६] या ताम्रपटात उल्लेखिलेले सागरिपल्ल हे गाव म्हणजे औसा तालुक्यातील साकराळे गाव होय. यावरून लातूर जिल्ह्याच्या नैऋत्य भागाचा समावेश राष्ट्रकूट काळात मुरूम्ब विषयात होत असे हे स्पष्ट होते. तृतीय गोविंदाने धाराशिव (उस्मानाबाद) निवासी ब्राह्मणाला ग्रामदाने दिल्याचे उल्लेख त्याच्या चार ताम्रपटांतून आढळतात. विशेष म्हणजे त्याने मयूरखंडी येथे राजधानी हलविल्यानंतरचे हे ताम्रपट आहेत. याचा अर्थच असा की, याच्या काळातही लातूर परिसराचे महत्त्व टिकून राहिले होते.

---

१६. ठोसर, एच. एस., **स्टडीज इन दि हिस्टॉरिकल ॲण्ड कल्चरल जिऑग्राफी ऑफ मराठवाडा,** अप्रकाशित प्रबंध, औरंगाबाद, १९७७, पृ. ७२.

अशा प्रकारे इसवी सन ८०० च्या नंतर लातूर परिसर परत राष्ट्रकुटांच्या राजकीय व सांस्कृतिक हालचालींचे केन्द्रस्थान होता. राष्ट्रकूट काळात शैक्षणिक कार्यासाठी विद्वान ब्राह्मणांना अग्रहाराच्या रूपाने ग्रामदाने दिली जात. विद्यार्थ्यांना धार्मिक आणि व्यावहारिक विषयांचे शिक्षण दिले जात असे. लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यातील झरिका (नवकुंड झरी) हा अशा अग्रहारांपैकी एक गाव होता. उमरगा तालुक्यातील 'लोहारा बुजुर्ग' हा या परिसरातील आणखी एक अग्रहार होता. तृतीय गोविंदाच्या चारही ताम्रपटांत धाराशिव निवासी ऋष्यप्पभट्ट याचाच उल्लेख आढळतो. बहुधा तो तृतीय गोविंदाचा कुलगुरू असावा. त्याच्या सांगण्यावरून व याच्याकरवी कराड (जि. सातारा) आणि एरण्डोली येथील ब्राह्मणांना अग्रहार दिल्याची नोंद आढळते.

अमोघवर्ष हा तृतीय गोविंदाचा पुत्र राज्यावर आला तेव्हा अल्पवयीन होता. त्याच्या कारकिर्दीत तर लातूरला विशेष स्थान प्राप्त झाले होते. त्याच्या शिरूर आणि निलगुंद येथील कोरीव लेखातील "लत्तलूरपुरवराधीश्वर" आणि "लत्तलूरपुरपरमेश्वर" या बिरूदांवरूनही ते स्पष्ट होते. सम्राट राष्ट्रकुटांचे घराणे मूळचे लातूरचे हे सर्वमान्य आहे. परंतु या घराण्यातील अमोघवर्षाशिवाय एकाही राष्ट्रकूट राजाने ही बिरुदे धारण केली नाहीत. त्याचे ऐतिहासिक स्वरूपाचे कारण असे की, हा अल्पवयीन असल्याचा विकृत लाभ उठवून मांडलिकांनी व मंत्र्याने बंड करून मयूरखंडी या राजधानीवर ताबा मिळविला तेव्हा त्याला बहुधा लातूर येथे वास्तव्य करावे लागले असावे. त्याने इ.स. ८५० मध्ये गुलबर्ग्याजवळच्या मालखेड (मान्यखेट) येथे राजधानी हलविली होती तरी त्याचे वास्तव्य बहुधा लातूरलाच असावे. त्याची ६४ वर्षांची प्रदीर्घ कारकीर्द ध्यानी घेता लातूरचे साहचर्य त्याला महत्त्वाचे वाटले असावे आणि त्यामुळे लातूरलाही अपार महत्त्व प्राप्त झाले असावे. त्या वेळच्या वास्तूंचा मात्र सध्याच्या लातुरात मागमूसही लागत नाही. शक्यता ही की, मांजरा नदीच्या काठावरील टेकाडात त्या गाडल्या गेल्या असाव्यात. येथे पुरातत्त्ववेत्त्यांचे लक्ष गेले पाहिजे.

सम्राट राष्ट्रकूट शाखेच्या व्यक्तींनी लातूरहून निघून वेरूळ, मोरखंडी (जि.बिदर), मालखेड (जि. गुलबर्गा), कंधार (जि. नांदेड), बोधन (जि. निझामाबाद, आंध्रप्रदेश) इत्यादी ठिकाणी राजधान्या केल्यामुळे विविध शासकांचे वास्तव्य त्या त्या ठिकाणी राहिले. परंतु सत्तेवर नसलेल्या या शाखेतील व्यक्ती लातुरासच वास्तव्य करून राहिल्या. चालुक्यांचे मांडलिकत्व स्वीकारून या व्यक्तींनी व त्यांच्या वंशजांनी दक्षिणेत अनेक ठिकाणी सत्तास्थाने निर्माण केली अशी माहिती कल्याणी चालुक्यांच्या अभिलेखातून आढळते. राष्ट्रकुटांच्या अशा शाखांमध्ये कर्नाटकाच्या बेळगांव जिल्ह्यातील सुगंधावती म्हणजेच सौंदत्तीच्या रट्टांचा समावेश होतो. या शाखेच्या कोरीव लेखात ते आपणास 'लत्तलूरपुरविनिर्गत' म्हणवितात. त्याचप्रमाणे या शाखेचा मूळपुरूष कृष्ण याचे वर्णन[१७] 'कंधारपुरवराधीश' असे केले गेले आहे. यावरून ही शाखा मूळची लातूरची होती हे स्पष्ट होते. या शाखेचा मूळ पुरूष कृष्ण हा द्वितीय कृष्ण होय (तृतीय नव्हे) हे आता सिद्ध झाले आहे. हा अमोघवर्षाचा पुत्र व उत्तराधिकारी (इ.स.८८० ते ९१४) होता. सौंदत्तीच्या रट्टांनी पुढील तीन शतके, अगोदर कल्याणी चालुक्यांचे व नंतर देवगिरीच्या यादवांचे मांडलिक म्हणून कोल्हापूर-बेळगांव परिसरावर राज्य केले.

लातूरच्या महारट्ट कुळातील कान्हरदेव हा कल्याणी चालुक्य राजा दुसरा जयसिंह याचा मांडलिक असल्याची इ.स. १०१९ मधील ताम्रपटावरून माहिती मिळते. तो 'भोगवर्धन ७००' या विभागाचा शासक होता.

१७. ठोसर, एच.एस., **स्टडीज इन दि हिस्टॅरिकल ॲण्ड कल्चरल जिऑग्राफी ऑफ मराठवाडा,** पूर्वोक्त, पृ.७२. एचएफ ४१३७—६

अनुक्रमणिका

तो स्वत:स ' लत्तलूरपुरविनिर्गत ' (म्हणजे मूळचा लातूरचा) आणि महारट्ट मम्मह याचा वंशज (बहुधा प्रपौत्र) म्हणवितो. या मम्महाच्या मुलीशी[१८]-राणी जाकव्वा तथा लक्ष्मी हिच्याशी कल्याणी चालुक्य राज्याचा संस्थापक दुसरा तैलप (इ.स. ९७३ ते ९९७) याचा विवाह झाला होता. वरील १०१९ च्या ताम्रपटावरून लातूरच्या आणखी एका म्हणजे या राष्ट्रकूट शाखेची माहिती प्रकाशात आली[१९] आणि लातूर ही कल्याणी चालुक्य राजवंशाच्या संस्थापकाची सासुरवाडी होती हे कळले. याशिवाय लातूरच्या रट्ट प्रमुखांनी आन्ध्रातील कुल्पक आणि ओरिसातील संभलपूर विभागात देखील राज्ये संपादन केल्याची नोंद स्थानिक कोरीव लेखात करण्यात आली आहे.[२०]

लातूरहून अन्यत्र जाऊन अधिकारपदे सांभाळणारी मंडळी लातूर आणि तेथील कार्यक्षम मंडळींना विसरलेली नव्हती असे पुरावेही हाती आलेले आहेत. इ. स. १०८७ च्या सीताबर्डी (मूळचा चंद्रपूरचा) लेखातील माहितीवरून चालुक्य सहाव्या विक्रमादित्याचा विदर्भातील महासामंत राणक धाडिदेव हा लातूरचाच आणि त्याचा दण्डनायक वासुदेव हा काण्वशाखीय ब्राह्मणही लातूरचाच होता हे स्पष्ट झाले.[२१]

कल्याणी चालुक्य कालखंड : इ.स.च्या दहाव्या शतकाच्या अखेरीस दक्षिणेची सार्वभौम सत्ता राष्ट्रकुटांकडून कल्याणीच्या चालुक्यांकडे गेली. सत्तेत बदल झाला तरी प्रारंभी चालुक्यांनी मालखेड येथून राजधानी हलविली नाही. अकराव्या शतकाच्या मध्यात चालुक्य राजा पहिला सोमेश्वर याने ती कल्याणपूर (कल्याणी किंवा आत्ताचे बसवकल्याण, जि. बिदर, कर्नाटक) येथे हलविली. बसवकल्याण हे लातूर पासून जवळच असल्यामुळे चालुक्य काळात लातूर परिसरातील राजकीय आणि सांस्कृतिक हालचालींना विशेष गती मिळाली. कदाचित त्यामुळेच लातूर जिल्ह्यात आजवर प्राप्त झालेल्या कोरीव लेखांपैकी अर्ध्याहून अधिक कल्याणी चालुक्य राजवटीतील होत. या कालावधीत चालुक्यांच्या कित्येक सामंतानी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लातूर परिसरात अनेक मंदिरे उभारली, त्याचप्रमाणे पाठशाळा (घटिकास्थान) आणि जलाशय निर्माण केले. ही सर्व माहिती या अभिलेखांतून मिळते. विशेष म्हणजे या लेखांत नमूद केलेली मंदिरे, पाठशाळा आणि जलाशय अवशेष स्वरूपात का होईना, आजही त्या त्या ठिकाणी पहायला मिळतात.

चालुक्य सहाव्या विक्रमादित्याचा सेनापती भीम आणि त्याचा दण्डनायक पुत्र कालिदास यांनी हिंपळगाव आणि गणेशवाडी (ता.अहमदपूर, जि. लातूर) येथे अनेक मंदिरे उभारली. तसेच पाठशाळा, जलाशय निर्माण केल्याची सविस्तर माहिती गणेशवाडी येथे उपलब्ध झालेल्या इ. स. १०९९ च्या तीन प्रदीर्घ शिलालेखांतून मिळते.[२२] हिंपळवाडी येथील शिवालय याची आजही साक्ष देत उभे आहे. अध्यात्मक्षेत्रातील आणखी एक मोलाची माहिती गणेशवाडी-लेखात मिळते अन् लातूर परिसराला उजाळा मिळतो. ही माहिती आहे या परिसरातील पाशुपत शैव पंथासंबंधीची. गणेशवाडी हे या पंथाचे महत्त्वाचे पीठ असून त्याच्या

---

१८. धोपाटे, एस.जी., **लत्तलूरपुर ताम्रपट,** भारतीय पुराभिलेख परिषद, कुर्तालम् ,२८ वे अधिवेशन.

१९. आळतेकर, ए. एस., **राष्ट्रकुटाज ॲण्ड देअर टाईम्स,** पृ. १२७.

२०. गोपाल, बी. आर., **दि चालुक्याज ऑफ कल्याणी ॲण्ड दि कळचुरीज,** कर्नाटक युनिव्हर्सिटी, धारवाड, १९८१, पृ. २७५ मजुमदार, आर. सी., **द स्ट्रगल फॉर एम्पायर,** भारतीय विद्याभवन, बॉम्बे, १९६६, पृ. २२१,

२१. **एपिग्राफिया इंडिका,** खंड ३, पृ. ३०४-३०६.

२२. कोलते, वि. भि., **महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख,** मुंबई, १९८७, पृ. १५९-१८४.

उपपंथातील पर्वतावली आम्नायाच्या 'शिवलिंगी संतान' शाखेच्या अनुयायांचे येथे वास्तव्य होते. पर्वतावली आम्नायाचे मूळ पीठ आन्ध्रातील श्रीशैल्य मल्लिकार्जुन हे असून गणेशवाडी येथे त्याची शाखा होती हे स्पष्ट आहे. या पंथाच्या आचार्यांची येथील निवासी पाठशाळेच्या संचालनासाठी नियुक्ती केल्याची नोंदही वरील लेखांत आढळते. यांची म्हणजे तत्पुरूष पंडितांची आणि त्यांच्या आधीच्या आचार्यांची प्रशस्ती वरील तीन पैकी एका लेखात आढळते. ही पाठशाळा सेनापती भीमाने तयार करवून घेतलेल्या ' भीमसमुद्र ' नामक तलावाच्या काठावरील गणेश मंदिरात (हेरंबधाम) भरविली जात असे. पाठशाळेतील विद्यार्थ्यांच्या योगक्षेमासाठी भीमाने दिलेल्या जमिनीच्या सिंचनासाठी व वस्तीला पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी या जलाशयाचा उपयोग होई. येथून जवळच उभारलेल्या त्रैपुरूष मंदिराची नोंद मिळते.

विशेष म्हणजे पुढे इ. स. च्या १२ व्या शतकात बिज्जल कलचुरी राजाचा मंत्री असलेल्या बसवेश्वराने वीरशैव तथा लिंगायत पंथाची स्थापना केली ; खरे तर पुनर्संघटन केले. त्यासाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी लातूर परिसरातील गणेशवाडी येथील शिवलिंगी संतान व त्याचे पाठ देणाऱ्या सरस्वती मंडपाद्वारे तयार करण्यात आली होती.

निलंगा तालुक्यातील शिरूर-अनंतपाळ हे गाव आता तालुक्याचे गाव झाले आहे. येथील कोरीव लेखावरून चालुक्यांच्या काळात हे एक महत्त्वाचे स्थान होते हे कळते.[२३] येथे अनंतेश्वर वा अनंतपाळ आणि सोमनाथ अशी दोन देवालये उभारली होती. पैकी आजतागायत अस्तित्वात असलेल्या अनंतेश्वर मंदिरात एक घटिकास्थान म्हणजे पाठशाळा चालत असे. याचे श्रेय सहाव्या विक्रमादित्याचा दण्डनायक अनंतपाळ नामक एका गुर्जर वंशीय मंत्र्याकडे जाते. मौज म्हणजे सोमनाथ मंदिराची पडझड झाल्यावर दण्डनायक एलेयादित्य याने त्याची दुरूस्ती केल्याची नोंद प्रस्तुत शिलालेखात झालेली आहे. ही वास्तू नंतर एलेयमठ म्हणून संबोधिली गेली. शिरूर अनंतपाळाचे महत्त्व तेथील विखरून पडलेल्या मंदिरावशेष आणि मूर्ती यांच्या द्वारे लक्षात येते.

लातूर परिसर आणि जैनपंथ : बदामी चालुक्याच्या काळात लातूर परिसरात जैन, बौद्ध आणि हिंदू या धर्मपंथांचे अनुयायी वस्तीला होते. पुढे बौद्धपंथीय राहिले नाहीत. मात्र राष्ट्रकुटांचा काळ राजाश्रयामुळे जैन पंथीयांस पोषक ठरला. पहिला अमोघवर्ष आणि दुसरा कृष्ण हे दोघेही या पंथाचे अनुयायी होते. याचे प्रत्यंतर पुराभिलेखीय आणि वाङ्.मयीन साधनांवरून येते. औसा, उदगीर आणि रामलिंग मुद्गड या तीन गावांचा यासंबंधात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. लातूर जिल्ह्यातील औसा येथे एक प्रमुख जैन पीठ होते. 'करकण्डचरियु' या ग्रंथाचा कर्ता मुनी कनकामर याचे वास्तव्य कल्याणी चालुक्य काळात औसा येथेच होते. या ग्रंथात औसाचा उल्लेख 'असाईनगरी' असा आहे.[२४] औसा आणि लातूर परिसराच्या प्राचीन इतिहासाच्या विशेषत: सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो. औसाप्रमाणेच लातूर जिल्ह्यातील उदगीरचाही प्रमुख जैनपीठ असा उल्लेख जैन वाङ्.मयात आढळतो. जैनांसंबंधी अधिक सविस्तर माहिती रामलिंग मुद्गड या गावातील अभिलेखावरून मिळते. येथे बाराव्या शतकात एक

२३. शेळके, जी.सी., **ए हिस्ट्री ऑफ मराठवाडा रिजन,** अप्रकाशित प्रबंध, धारवाड विद्यापीठ, १९७९, लेख क्र. ४ आणि ९.

२४. ठोसर, हरिहर, **स्टडीज इन दि हिस्टॉरिकल ॲण्ड कल्चरल जिऑग्राफी ऑफ मराठवाडा,** पूर्वोक्त, पृ.१६१.

भरभराटीला आलेली जैनबसती होती. हिचे प्रमुख आचार्य होते मुनी दामनंदी सिद्धांतदेव.[२५] यांच्या आधी दिवाकरनंदी, घनकीर्ती आणि अभयनंदी या जैन आचार्यांची माहिती लेखात आढळते. श्वेतांबर आणि दिगंबर या दोन जैनपंथांत समन्वय साधणाऱ्या यापनीय संघाचे अनुयायी दक्षिणेतील इतर भागाप्रमाणे लातूर परिसरातही होते हे ही येथील लेखावरून कळते. कोरीव लेखातून निरनिराळ्या काळी या बसतीला दिल्या गेलेल्या दानाच्या माहितीवरून जैनपंथाच्या येथील अस्तित्वातील सातत्य कळते. मात्र कालांतराने हे नाहीसे झाले. आता उरलेत ते मंदिराचे विखुरलेले अवशेष, भग्न मूर्ती इत्यादी.

मंदिरे, पाठशाला, जलाशय यांनी सुजलाम् सुफलाम् झालेला लातूर परिसर : कल्याणी चालुक्य काळात राजांनी व मुख्यत: त्यांच्या मंत्र्यांनी व अधिकाऱ्यांनी या परिसराला शोभिवंत आणि कल्याणकारी परिसराचे स्वरूप प्राप्त करून दिले होते हे या जिल्ह्यात सापडलेल्या अनेक कोरीव लेखांधारे म्हणता येते. इतकेच नव्हे, तर उल्लेख असलेले लेख अद्याप उजेडात आले नसले, तरी स्थापत्य शैलीवरून या काळातील ठरतील अशी अनेक मंदिरे या जिल्ह्यात ठायी ठायी उभारली गेली होती असे दिसते. प्रत्यक्ष लातूर येथील सिद्धेश्वर मंदिर, केशवराज मंदिर व भूतेश्वर मंदिर, औसा तालुक्यातील बोरगाव येथील नकुलेश्वर मंदिर, निलंगा येथील नीलकंठेश्वर, पानगाव येथील विठ्ठल मंदिर (मूळचे विष्णू मंदिर), शिवाय बोरी, बल्लाळ चिंचोली, मुरूड आणि गंगापूर येथील मंदिरे आणि सध्याच्या अहमदपूर तालुक्यातील झरी बुजुर्ग येथील प्राचीन देवालये, यांची दखल या बाबतीत घेता येईल. वर उल्लेख आलेली शिरूर-अनंतपाळ या गावातील अनंतेश्वर, सोमनाथ ही मंदिरे, तसेच गणेशवाडी येथील गणेश मंदिर आणि त्रैपुरूष मंदिर, पिप्पलग्राम येथील शिवालय, शिरूरची दोन मंदिरे यांचे उल्लेख तर अभिलेखात आहेतच; मात्र यापैकी अनेक मंदिरे सध्या पडझड झालेल्या वा जीर्णोद्धारीत स्वरूपात दिसतात हे लक्षात घ्यायला हवे.

मंदिर म्हटले की, गाभाऱ्यातील मुख्य देवतेची मूर्ती, स्तंभांवर कोरलेल्या देव-देवता प्रतिमा, मंदिरांच्या बाह्य भिंतीवरील मूर्ती व सुरसुंदरीची शिल्पे, ओघाने येतातच. लातूर जिल्ह्यातील आज घटकेला निलंगा येथील नीलकंठेश्वर आणि पानगाव येथील श्रीविठ्ठल मंदिर यांचा या संबंधात उल्लेख करावाच लागतो. येथील हर-गौरीची अनोखी देखणी प्रतिमा, अंधःकासूरवधशिवाची, नटराजाची, चामुण्डेची, उमामहेश्वर आलिंगनमूर्ती, त्रिविक्रम, ब्रह्मा यांची आवर्जून दखल घ्यावी लागते. मूर्तिशास्त्र आणि शिल्पकला यांच्या अभ्यासकांना नवीन माहिती देणाऱ्या या प्रतिमा आहेत. या शिवाय सुरसुंदरींच्या मोहक, प्रबोधक अशाही प्रतिमा येथे आहेत. पैकी नीळकंठेश्वराच्या बाह्यभिंतीवरील डालमालिका, केतकीभरणा, पद्मगंधा, मर्दला, शुकसारिका, जया, कर्पूरमंजिरी, दर्पणा यांचा उल्लेख अटळ आहे. तसेच पानगाव येथील गौरी (पार्वती नव्हे) स्त्री आणि माकड, स्त्री आणि मुंगूस व साप, स्त्री व विंचू या सुरसुंदरीही लक्षवेधक आहेत.

पाठशाळामध्ये गणेशवाडी येथील सरस्वती मंडप, शिरूर-अनंतपाळ येथील पाठशाळा आणि रामलिंग-मुद्‌गड येथील जैन बसती यांचा उल्लेख करावा लागेल. या पाठशाळा (घटिकास्थाने) निवासी स्वरूपाच्या होत्या. येथे येऊन शिक्षण घेणारे विद्यार्थी आसपासच्या गावातून येत असत. त्यांच्या योगक्षेमाची उत्तम व्यवस्था

---

२५. शेळके, पूर्वोक्त, क्र. ६.

केलेली असे. मुख्य म्हणजे तत्कालीन नामवंत आचार्यांची (वर उल्लेख आलेले आहेतच) या पाठशाळांमधून नियुक्ती झालेली आहे. येथील नागरिकांनी कार्यतत्पर व्हायचे असेल तर ज्ञान संपादन करणे भाग होते. कर्माचे डोळे ज्ञान ! ते निर्दोष होआवे !! ही या मागची भूमिका असावी. येथील रहिवासी विहितकर्मे, नित्यकर्मे, नैमित्तिक कर्मे, काम्यकर्मे तत्परतेने करण्यास योग्य ठरावेत ही त्या मागील भावना असावी.

जलाशयांची निर्मिती प्रजेच्या स्वास्थ्यासाठी केलेली असावी. यापैकी बरीचशी माहिती उपलब्ध होते ती गणेशवाडी शिलालेखातून. येथील भीमसमुद्र आणि विशेष म्हणजे सध्या तो गाळाने भरून/बुजून गेला असला तरी त्याचे अस्तित्व आढळते. दोन नैसर्गिक टेकड्यांच्या मधोमध दगडी बांध घालून बांधलेल्या या धरणाच्या भिंतीची बाहेरील दगडी बाजू अजूनही दिसते. अशाच प्रकारचा दुसरा जलाशय या भीमनाथ सेनापतीने कलंबर (प्राचीन कलुंबरक), ता. कंधार, जिल्हा नांदेड येथेही निर्माण केला होता. या शिवाय लातूर येथील पापविनाशनतीर्थ, सिद्धेश्वर मंदिराजवळील तलाव, झरीबुजुर्ग व अन्य ठिकाणची कुंडे, ही सारी जलसिंचन आणि दैनंदिन उपयोगासाठी पाण्याच्या उपलब्धतेसाठीच असावी. येथील राजे, मंत्री नि अधिकारी प्रजाहितदक्ष असून ते कल्याणकारी राज्य करण्याचा प्रयत्न करीत होते असे दिसते.

यादव वंश : यादव घराण्याच्या पाचव्या भिल्लमाने इ.स.च्या बाराव्या शतकात कल्याणी चालुक्य राजवटीचा शेवट केला आणि त्यांच्या राज्याच्या उत्तरेकडील प्रदेशावर सत्ता प्रस्थापित केली. त्याने कल्याणपूर हे राजधानीचे शहर जिंकून आपल्या राज्यास जोडल्यामुळे लातूर परिसर यादवांच्या राज्यात समाविष्ट झाला. तिकडे आंध्रात वरंगलच्या काकतीय वंशाचे राज्यही याच सुमारास प्रस्थापित झाले होते. लातूर परिसरापासून काकतीय राज्याच्या सीमा फार दूर नसल्यामुळे सत्तास्पर्धेतून यादव आणि काकतीय यांच्यात वारंवार लढाया होऊ लागल्या. त्यामुळे यादव नरेश दुसरा सिंघण याने प्रख्यात सेनापती खोलेश्वर याची या प्रदेशावर नियुक्ती केली होती. त्यास बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे नगर इनाम दिले. याच्या अमलाखाली बीड, उस्मानाबाद आणि लातूर जिल्ह्यातील सलग प्रदेश असल्याची माहिती आपणास सिंघणाच्या आंबे शिलालेखावरून मिळते.[२६] याने आपल्या अमलाखालील प्रदेशात मंदिरे बांधली, अग्रहार बसविले व सत्पात्री भूमीचे व गावाचे दानही दिले. त्यापैकी लातूरच्या अगदी जवळ मांजरेच्या उत्तर तीरावर असलेल्या महापूर (ता. रेणापूर, जि. बीड) ह्या अग्रहाराचा उल्लेख करता येईल. तसेच याच्या म्हणजे खोलेश्वराच्या अमलाखालील प्रदेशात औसदेश (औसा) आणि उदगिरीदेश (उदगीर) या देशांचा समावेश होता याचीही नोंद आढळते. या दोन्ही ठिकाणी 'बिड' म्हणजे यादव सैन्याच्या छावण्या होत्या. पूर्वेकडील काकतीयांच्या आक्रमणापासून संरक्षण व्हावे म्हणून हे आवश्यकच होते. दोन घराण्यांत लढाया होत आणि परिणामतः सरहद्दीमध्ये तात्पुरता का होईना बदल होई. उदाहरणार्थ, काकतीयांच्या गणपतीने नांदेड जिल्ह्यातील भोकर नि लातूर जिल्ह्यातील उदगीरवर ताबा मिळविल्याचा उल्लेख त्यांच्या उपरपल्ली लेखात आलेला आहे. यादवांनी हा प्रदेश पुन्हा परत मिळविला अशी माहिती कान्हरदेव यादवाच्या इ. स. १२५८ च्या कान्हेगाव लेखातून मिळते.[२७]

२६. खरे, ग. ह., **दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने,** खंड १, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३० पृ. ५५.

२७. **हैद्राबाद आर्किऑलॉजिकल सिरीज,** हैद्राबाद, क्रमांक ३, पृ. १४.

कान्हरदेव यादवाच्या एका शिलालेखानुसार लत्तनौरनिवासी गोपालदेव राष्टौड हा या विभागाचा शासक होता.[२८] त्याने यज्ञप्रसंगी दान दिलेल्या गावांची नावे या लेखात आली आहेत. ही गावे उदगीर व अहमदपूर (जि.लातूर) या तालुक्यातील तसेच उमरगा (जि.उस्मानाबाद) व कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील आहेत. कान्हरदेवाच्या काळात लातूरचे राजकीय आणि प्रशासकीय महत्त्व वाढल्याचे यावरून कळते. सिंघणाच्या काळात ज्याप्रमाणे अंबाजोगाई हे अनेक देशविभागांचा समावेश असलेल्या मंडळ विभागाचे मुख्य ठिकाण होते, त्याप्रमाणे कृष्णदेव यादवाच्या कारकिर्दीत लातूर हे कंधार, उदगीर आणि उमरगा इत्यादी देशविभागांचा समावेश असलेले मंडळ विभागाचे मुख्यालय होते.

महानुभाव साहित्यातील नोंदीवरून आणि महिकावतीच्या बखरीनुसार रामचंद्र यादवाचा मुलगा भीम (सहावा भिल्लम) उदगीर देशाचा शासक असल्याची माहिती मिळते.[२९] यादव राज्याच्या शेवटानंतर तो कोंकणात गेला. मुंबई येथील माहीमचा राजा बिंब म्हणजे तोच होय.

इस्लामी राजवट : इ. स. १३१८ मध्ये देवगिरीसह दक्षिणेवर दिल्लीच्या खिलजी सुलतानांची सत्ता प्रस्थापित झाली. साहजिकच दख्खनचा भाग असलेला आजचा लातूर जिल्हाही दिल्ली सल्तनतीचा एक भाग बनला. पुढे चौदाव्या शतकाच्या मध्यात अस्तित्वात आलेल्या बहामनी सत्तेची राजधानी गुलबर्गा (कर्नाटक राज्य) येथे हलविली गेली. त्यामुळे लातूर परिसर पुन्हा राजकीय हालचालीचे केन्द्रस्थान बनला. नंतर १५ व्या शतकात गुलबर्ग्याहून राजधानी बिदरला स्थलांतरीत केली गेली. गुलबर्ग्याहून लातूर जवळ होते, पण बिदरहून तर ते अधिकच जवळ आहे. सुलतान कमकुवत असल्यामुळे सुभेदारांचे फावत असे. औसाचा सुभेदार कासिम बरीद हा मातब्बर होता. पुढे बहामनी राज्याचे विघटन झाल्यावर तर याने स्वतंत्र सत्ता बिदर येथे स्थापन केली (१५१८), तीच बिदरची बरीदशाही होय, मात्र यानंतरचा काळ लातूर परिसराच्या दृष्टीने अधिक धामधुमीचा ठरला.

कासिम बरीद नंतरच्या सुलतानांचे कुतुबशाही, निजामशाही, आदिलशाही आणि विजयनगरचे हिंदू राजे यांच्याशी वारंवार संघर्ष होत. नगरच्या बुऱ्हान निजामशहाने अशाच एका संघर्षात लातूर जिल्ह्यातील औसा आणि उदगीर येथील किल्ले जिंकले व सभोवतालचा परिसर आपल्या ताब्यात घेतला. ही ठिणगी होती. पुढील वणव्यात आदिलशहाने बरीदशाहीच्या सुलतानांच्या नाकी दम आणला. शेवटी आदिलशाही व निजामशाहीने बरीदशाही बुडवून ते राज्य वाटून घेतले. सतराव्या शतकाच्या प्रारंभी नगरच्या मलिकअंबरने औसा ताब्यात घेतले. इ. स. १६३३ मध्ये निजामशाहीची अखेर होऊन लातूर जिल्ह्याचा समावेश मोगल साम्राज्यात झाला.

लातूर परिसरातील पर्वत, नद्या, नगरे व प्रशासन विभाग : प्राचीन सांस्कृतिक इतिहासाचे आकलन करून घ्यायचे तर त्या प्रदेशातील वा परिसरातील भौगोलिक व ऐतिहासिक भूगोलाचे ज्ञान आवश्यक ठरते आणि म्हणून जिल्ह्यातील/परिसरातील पर्वत, नद्या, नगरे, ग्रामे आणि प्रशासन विभागांची माहिती आवश्यक ठरते. ही माहिती लातूर जिल्ह्याच्या इतिहासाशी संबंधित असलेल्या अभिलेखातून मिळते.

---

२८. तुळपुळे, शं. गो., **प्राचीन मराठी कोरीव लेख,** पुणे विद्यापीठ, पुणे, १९६३ क्रमांक ३१.

२९. राजवाडे, वि. का., (संपा.), **महिकावतीची बखर,** पुणे, १९२४.

गिरीपर्वत : बालाघाटाच्या पठारावर लातूर जिल्ह्याचा भाग येतो. राजशेखरच्या काव्यमीमांसेत बालाघाटाच्या संदर्भात मंजर आणि पाल ही नावे आढळतात. 'मंजर' म्हणजे बालाघाटाच्या उत्तरेकडील बीड जवळील पर्वत रांग; तर पाल ही दक्षिणेकडील पर्वत रांग होय. आजचे बालाघाट हे नावच मुळी पाल नावातून व्युत्पन्न झालेले आहे. वस्तुत: या जिल्ह्याचा संपूर्ण प्रदेशच पठारी आहे. त्यामुळे पर्वत या सदरात मोडणाऱ्या उंच टेकड्या येथे दुर्मिळच. कोरीव लेखांत म्हणूनच 'पर्वत' असे उल्लेख नसून स्थलनामांची उपपदे म्हणूनच केवळ उल्लेख आढळतात. उदाहरणार्थ, रत्नगिरी (रट्टांचा पर्वत) किंवा रट्टगिरी हे लातूर जवळ मांजरा नदीच्या काठावर असलेल्या या गावाच्या जुन्या वस्तीजवळील टेकडीचे नाव होय. रट्टवंशातील व्यक्तींनी येथे वस्ती केली त्यावरून तिला रट्टगिरी वा रत्नगिरी (प्रत्यक्षात रट्टगिरी) हे नाव प्राप्त झाले. सातव्या शतकातील बदामीच्या राजाच्या कर्नूल लेखात हा उल्लेख येतो. दुसरे उदाहरण 'चलुक्य' किंवा 'चलिक्य पर्वत' याचे देता येईल. बदामीच्या चालुक्य घराण्याच्या कार्यक्षेत्राशी संबंधित हा असल्यामुळे त्याचे लातूर जिल्ह्यात असणे हे विशेष ठरते. औसा जवळील चालुक्यकालीन लेणी असलेल्या खरोसा येथील टेकडीस कदाचित 'चलुक्य पर्वत' म्हणत असावेत.

उदगिरी किंवा उदयगिरी अशा आणखी एका पर्वताचा उल्लेख यादवकालीन कोरीव लेखात आढळतो. सध्याच्या उदगीरचे हे प्राचीन नाव असावे. उदगीरच्या भोवती बालाघाटाच्या ज्या टेकड्या आहेत, त्यातील मुख्य टेकडीचे हे नाव आहे. तिच्या पायथ्याशी असलेले गाव पुढे उदगीर म्हणून ओळखले जाऊ लागले.

नद्या : मांजरा आणि तेरणा या लातूर जिल्ह्यातील दोन प्रमुख नद्यांच्या नावांचे उल्लेख कोरीव लेखात आढळतात. यापैकी मांजरा ही जिल्ह्यातील सर्वात मोठी नदी असून बीड जवळील बालाघाटातील मांजरसुंबा येथे तिचे उगमस्थान आहे. मंजर हे बालाघाटाच्या या रांगेचे प्राचीन नाव असून या नदीच्या नावाची व्युत्पत्ती त्यातून झालेली असावी. याचेच दुसरे नाव वंजर. त्यावरून व्युत्पन्न झालेल्या या नदीच्या नावाचे वंजरा, वंजुला आणि अंजरिका असे भेद लातूर जिल्ह्याशी संबंधित कोरीव लेखात आढळतात. प्राचीन काळी लातूर या नदीच्या काठावर वसलेले होते. ही नदी पुढे बिदर आणि निजामाबाद जिल्ह्यातून वाहत जाऊन नांदेड जिल्ह्यातील बिलोलीजवळ गोदावरीस मिळते. तेरणा या नदीच्या नावाची व्युत्पत्तीच 'तगर' (तेर, जि. उस्मानाबाद) या दक्षिणेतील एका प्राचीन महानगराच्या नावावरून झाली आहे. कारण या नदीचे उगमस्थान तेरजवळ तर आहेच, शिवाय हे प्राचीन शहर या नदीच्या दोन्ही काठावर वसले असल्याचे येथील उत्खननावरून स्पष्ट झाले आहे. लातूर जिल्ह्याच्या दक्षिण भागातून ती वाहते आणि कर्नाटकातील बिदर जिल्ह्यात मांजरा नदीला मिळते. नलंदनदी हे बहुधा औसा तालुक्यातील तेरणा नदीस मिळणाऱ्या ओढ्याचे नाव असून तो नणंद गावाजवळ होता.

प्रशासन विभाग

नांगरकटक : लातूर जिल्ह्याशी संबंधित सर्वात प्राचीन प्रशासन विभाग 'नांगरकटक उत्तरमार्ग' याचा उल्लेख इ.स.च्या पाचव्या शतकातील वाकाटकांच्या ताम्रपटात आढळतो. नांगरकटक म्हणजे उस्मानाबाद जिल्ह्याच्या उमरगा तालुक्यातील नारंगवाडी होय. प्रमुख नगरांच्या नावावरील कित्येक प्रशासन विभागांचे

उल्लेख वाकाटकांच्या ताम्रपटात आढळतात. उदा. 'नंदिकट उत्तरमार्ग' (नांदेड व परभणी जिल्ह्याच्या उत्तरेकडील संलग्न प्रदेश) 'पद्मपुर, पूर्वमार्ग', 'पद्मपुर अपर मार्ग' इत्यादी. यावरून वाकाटकांच्या प्रशासन व्यवस्थेत काही मोठया नगरांच्या नावावरून ओळखले जाणारे विभाग असून त्यांच्या चारी दिशांचे प्रदेश त्या नगराच्या नावास दिशेच्या नावाचे उपपद जोडून ओळखले जात. प्रस्तुत ताम्रपटात नांगरकट उत्तरमार्गाचा उल्लेख असून त्यात लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील संलग्न प्रदेशाचा समावेश होता. नांगरकट दक्षिण मार्गात बहुधा सोलापूर आणि पूर्वमार्गात कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील संलग्न प्रदेश समाविष्ट असावा.

'नांगरकवटिके' या कल्याणीच्या चालुक्य काळातील नारंगवाडीच्या नावातील 'कवटिके' हे उपपद 'कार्वटिक' या संस्कृत शब्दापासून व्युत्पन्न झाले असावे. 'कार्वटिक' म्हणजे राजकीय किंवा आर्थिक घडामोडींचे प्रमुख स्थान. इंडिया ऑफिस ताम्रपटातील नांगरकट म्हणजे नारंगवाडीच होय या अनुमानास आणखी बळकटी देणारा हा पुरावा आहे. तसेच वत्सगुल्म शाखेतील दुसऱ्या विन्ध्यशक्तीचे उत्तराधिकारी दुसरा प्रवरसेन आणि दुसरा सर्वसेन यांची ती आपत्कालातील राजधानी असावी या तर्कासही वरील पुरावा उपोद्बलक ठरतो.

बदामीच्या चालुक्यकालीन कोरीव लेखात लातूर जिल्ह्याशी संबंधित असलेल्या तीन प्रशासन विभागांचे उल्लेख आढळतात. ते म्हणजे नलवाडी विषय आणि चल्लिकीदेश हे मोठया आकाराचे व उच्छिव चत्वारिंशत हा चाळीस गावांचा समावेश असलेला विभाग. यापैकी नलवाडी विषयात लातूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील विभागाचा समावेश असून 'उच्छिव चत्वारिंशत' हा त्याच्या अंतर्गत असलेला उपविभाग असावा. नलवाडी विषयाचे मुख्यालय उस्मानाबाद जिल्ह्याच्या तुळजापूर तालुक्यातील नलदुर्ग हे असून उच्छिव चत्वारिंशत विभागाचे मुख्य ठिकाण औसा येथे होते. लातूर जिल्ह्याच्या पूर्वेकडील भागाचा समावेश चल्लिकी किंवा चलिक्य देशात असून त्याचे मुख्यालय बहुधा बिदर जिल्ह्यातील मोरखण्डी येथे होते. अशा प्रकारे बदामीच्या चालुक्य काळातील परस्परासमान असलेल्या 'विषय' आणि 'देश' या मोठया व संख्यावाचक उपपदासह ओळखल्या जाणाऱ्या छोट्या प्रशासन विभागांचे लातूर जिल्ह्यातील अस्तित्व यावरून स्पष्ट होते.

राष्ट्रकूट काळात देखील 'विषय' हा मोठ्या आकाराचा प्रशासन विभाग असून त्या खालोखाल 'भुक्ती' हा विभाग असे. भुक्तीचा उपविभाग १२ गावांचा समावेश असलेला छोटा संख्यादर्शक विभाग असे. लातूर जिल्ह्याच्या संदर्भात चालुक्य काळातील 'नलवाडी विषयाची' जागा 'मुरूम्ब' विषयाने घेतली व उस्मानाबाद जिल्ह्याच्या उमरगा तालुक्यातील मुरूम हे मुख्यालय असलेल्या या प्रशासन विभागात लातूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागाचा समावेश असल्याचा संकेत राष्ट्रकूट तिसऱ्या गोविंदच्या लोहारा ताम्रपटावरून मिळतो. याच राजाच्या झरिका ताम्रपटावरून लातूर जिल्ह्याच्या उत्तर भागाचा समावेश 'पोना' विषयात असून त्याचे मुख्यालय होनाळी (ता.अहमदपूर) किंवा खुद्द अहमदपूर येथे असल्याची माहिती मिळते.

कल्याणीच्या चालुक्य राजवटीत मोठ्या आणि छोट्या संख्यादर्शक प्रशासन विभागांची संख्या वाढत गेली. त्याचबरोबर पूर्वीच्या काळातील प्रदेशवाचक प्रशासन विभागही काही प्रमाणात अस्तित्वात असल्याची

माहिती समकालीन कोरीव लेखांवरून मिळते. उस्मानाबाद जिल्ह्याच्या उमरगा तालुक्यातील मुरूम येथील दहाव्या शतकातील एका कोरीव लेखात "चालुंके" असे या भागाचे वर्णन आले आहे. वर उल्लेख केलेल्या बदामीच्या चालुक्य काळातील "चलिक्य" किंवा "चल्लिकी" देशनामाचा तो या काळातील अवशिष्ट भाग आहे हे निश्चितच. परंतु प्रशासन विभागनिदर्शक असण्याऐवजी तो प्रदेशवाचक उल्लेख असावा असे वाटते, कारण मुरूम येथील कल्याणीच्या चालुक्य कालीन इतर कोरीव लेखात "आळंदे १०००" आणि "गज्जे ७००" अशा मोठया संख्येने दर्शविलेल्या प्रशासन विभागांचीही नोंद करण्यात आली आहे. त्यापैकी "आळंदे १०००" या विभागाचे मुख्यालय कर्नाटकाच्या गुलबर्गा जिल्ह्यातील "आळंद" हे असून लातूर जिल्ह्याच्या आग्नेय भागाचा त्यात समावेश होता हे समकालीन कोरीव लेखांवरून सिद्ध होते. या मोठ्या विभागाचे विभाजन अनेक छोट्या विभागात करण्यात येत असून त्याचा उल्लेख त्या विभागाच्या मुख्यालयाच्या नावाशी त्यात समाविष्ट असलेल्या गावांची संख्या जोडून केला जात असे. मुक्तरबाड (कानडी भाषेतील ३६ संख्या निदर्शक) हा "आळंदे १०००" चा अशा प्रकारचा उपविभाग असून त्यात लातूर जिल्ह्याच्या निलंगा तालुक्यातील मुत्तल गावच्या भोवतालच्या छत्तीस गावांचा समावेश होता. लातूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागाचा समावेश "गज्जे ७००" या प्रशासन विभागात होत होता. "गज्जे ७००" हे "आळंद १०००" या मोठ्या विभागाचा उपविभाग असल्यामुळे ते गुलबर्गा जिल्ह्यास लागून म्हणजे लातूर जिल्ह्यात असले पाहिजे. "गज्जे ७००" म्हणजे लातूर जिल्ह्याच्या निलंगा तालुक्यातील "गुंजोटी" असावे. ते आळंदला लागून असलेल्या परिसरात आहे. गुंजोटी हे गाव एक हजार वर्षांपासून ज्ञात आहे. मोठ्या प्रशासन विभागाचे मुख्यालय बहुधा त्या विभागाचा शासक असलेल्या सामंताच्या वास्तव्य स्थानावरून निश्चित केले जात असे.

यादवांच्या प्रशासन व्यवस्थेत मण्डल, देश आणि खंपण या नावांनी ओळखले जाणारे तीन प्रमुख विभाग होते. लातूर जिल्ह्यातील औसा आणि उदगीर ही देशविभागाची मुख्यालये असल्याची माहिती खोलेश्वराच्या अंबे शिलालेखावरून मिळते. यावरून सिंघणाच्या काळात जिल्ह्याचा पूर्व भाग उदगीर देशात, तर पश्चिम भाग औसा देशात समाविष्ट होता हे सिद्ध होते.

प्राचीन नगरे : आजच्या लातूर जिल्ह्यातील भूप्रदेशात स्थिर संस्कृतीचा प्रारंभ ऐतिहासिक काळात झाला असल्यामुळे "पुर" आणि "नगर" या सदरात मोडणारी गावे पूर्वीच्या काळी फारच मोजकी होती. बराच भूप्रदेश ११-१२ व्या शतकापर्यंत जंगलमय होता. ११ व्या शतकातील गणेशवाडी शिलालेखानुसार या गावाच्या आसपास त्यावेळी दाट अरण्य असून शिलालेखात त्याचा उल्लेख "महावन" या नावाने करण्यात आला आहे. लातूर जिल्ह्याशी संबंधित कोरीव लेखांत जवळपास ७० पेक्षा अधिक ग्रामनामांचे उल्लेख आलेले आहेत. परंतु त्यातील बरीचशी गावे इतर जिल्ह्यातील आहेत. तथापि, ४० पेक्षा जास्त स्थलनामे आजही लातूर परिसरात अस्तित्वात आहेत. कोरीव लेख आणि ग्रामनामांची माहिती दोन स्वतंत्र परिशिष्टात शेवटी दिलेली आहे. त्यापैकी किमान तीन स्थलनामे प्राचीन नगरांची असून त्यांनी लातूर जिल्ह्याच्या सांस्कृतिक इतिहासात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. कोरीव लेख, वाङ्मयीन साधने आणि स्थलमहात्म्य किंवा प्रचलित आख्यायिकांच्या आधारे या नगरांविषयी आपणास पुढीलप्रमाणे माहिती मिळते.

अनुक्रमणिका

औसा : लातूर जिल्ह्यातील औसा हे बहुधा जिल्ह्यातील सर्वात जुने नगर असावे. कनकामर विरचित "करकण्डचरियु" या ग्रंथात याचा उल्लेख आहे. विजयादित्याच्या बोरगाव ताम्रपटानुसार औसाचे बदामीच्या चालुक्य काळात "उच्छीव" असे नाव असून ते चाळीस गावांचा समावेश असलेल्या छोट्या प्रशासन विभागाचे मुख्यालय होते. सातव्या आठव्या शतकात तरी औसा हे या भागातील प्रमुख नगर असल्याचा संकेत मिळतो.

जैन वाङ्मयात या नगराला "औच्छ" असे म्हटले आहे, तर यादवकालीन कोरीव लेखात "औस" या नावाने त्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे, जो प्रचलित नावाशी जवळचा आहे. करकण्डचरियु या ग्रंथात मात्र या नगराचे प्राचीन काळापासून "औस" किंवा "औच्छ" असे नाव असून त्याची व्युत्पत्ती "उच्छीव" या संस्कृत नावातून झाली असे दिसते.

जैन वाङ्मयातील औसा विषयीच्या वर्णनावरून या नगराच्या प्राचीन काळातील सांस्कृतिक योगदानाची यथार्थ कल्पना येते. राष्ट्रकूट सम्राट अमोघवर्षाचा गुरू जैन मुनी जिनसेन याने औच्छ नगराचा समावेश दक्षिणेतील प्रमुख जैन पीठात केला आहे. अमोघवर्षाचे आणि जिनसेनाचे जवळचे संबंध लक्षात घेता आणि लातूर येथील या राष्ट्रकूट राजाचे वास्तव्य लक्षात घेता औसाला जैनधर्मपीठाचे स्थान प्राप्त करून देण्यास त्याचे व जिनसेनाचे योगदान असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

राष्ट्रकूट काळातील औसाचे जैनधर्मपीठ म्हणून असलेले स्थान कल्याणीच्या चालुक्य राजवटीतही कायम असल्याचे प्रत्यंतर आपणास औसा येथे वास्तव्य करून असणाऱ्या जैन मुनी कनकामर लिखित "करकण्डचरियु" या ग्रंथातील औसाच्या सविस्तर वर्णनावरून मिळते. कल्याणीचा चालुक्य राजा पहिला सोमेश्वर हा जैन धर्माचा आश्रयदाता आणि पुरस्कर्ता होता हे त्याच्या काळातील मुरूम आणि रामलिंग मुद्‌गड येथे बांधल्या गेलेल्या जैन बसत्यांवरून स्पष्ट होते. परंतु कल्याणीच्या कलचुरींच्या राजवटीत बिज्जलाचा मंत्री बसवेश्वर याने बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्थापन केलेल्या वीरशैव पंथाच्या व यादव काळात प्रचंड लोकप्रियता लाभलेल्या वारकरी पंथाच्या प्रभावामुळे या काळात जैन धर्माचा लोकाश्रय कमी होत गेला. मध्ययुगीन काळात देगलूर (जि.नांदेड) येथील श्री.गुंडामहाराज यांचे शिष्य औसा येथील वीरशैव संत वीरनाथ महाराज, यांनी वारकरी पंथाचे अनुयायित्त्व स्वीकारून वीरशैव आणि वारकरी संप्रदायांचा समन्वय घडवून आणणाऱ्या लिंगायत वारकरी संप्रदायाची स्थापना केली व या पंथाचे पीठ म्हणून औसाला मठ स्थापन केला. या पंथाचे अनुयायी प्रामुख्याने दक्षिण महाराष्ट्र आणि कर्नाटकातील आहेत. दरवर्षी माघ मासात वारीसाठी औसा येथून पंढरपूरला पालखी नेण्यात येते.

राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रात औसा हे बदामीच्या चालक्य राजवटीपासून मध्ययुगीन काळातील मोगल राजवटीपर्यंत निरंतर अग्रेसर होते. बदामीच्या चालुक्य प्रशासनात औसा हे नलवाडी विषयांतर्गत असलेल्या छोट्या प्रशासन विभागाचे मुख्यालय असून त्यात औसा सभोवतालच्या ४० गावांचा समावेश होता. राष्ट्रकूट काळातील प्रशासन व्यवस्थेत औसाचा समावेश मुरुम्ब विषयात होता. कल्याणच्या चालुक्य काळात त्याचा समावेश "गज्जे ७००" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रशासन विभागात होता. यादव राजवटीत औसा हे "देश" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रशासन विभागाचे मुख्य केंद्र होते. त्याचप्रमाणे तेथे यादवांच्या सैन्याची कायम छावणी होती. या देशविभागाचे मुख्यालय बहुधा औसा येथील किल्ल्याच्या परिसरात असावे. त्यापूर्वीच्या काळातील "उच्छिव" हे नगर देखील किल्ल्याच्या परिसरातच असले पाहिजे.

अनुक्रमणिका

बहामनी काळात औसाचे राजकीय आणि प्रशासकीय महत्त्व आणखी वाढले. कारण बहामनी राजवटीच्या अखेरच्या काळात बहामनी प्रशासनावर ज्याचे वर्चस्व होते तो कासिम बरीद मुळात औसाचा सुभेदार होता. त्याचे वास्तव्य औसा येथे असल्यामुळे सध्या दिसणारे किल्ल्याचे दगडी बांधकाम याच काळात करण्यात आले. बिदर ही अगोदर बहामनी राज्याची व नंतर बरीदशाही राज्याची राजधानी असल्यामुळे व औसा हे बिदरपासून जवळ असल्यामुळे राजधानीच्या संरक्षणासाठी पश्चिमेकडील महत्त्वाचे ठाणे म्हणून औसाला या काळात आणखीनच महत्त्व प्राप्त झाले. बरीदशाही, निजामशाही आणि आदिलशाही सल्तनतीच्या काळात औसावर प्रभुत्त्व प्रस्थापित करण्याची या सुलतानांमध्ये सतत स्पर्धा चालू होती व त्यामुळे याठिकाणी त्या काळातील कित्येक लढाया झाल्या.

बरीदशाहीच्या पतनानंतर औसावर काही काळ आदिलशाह व बराच काळ निजामशाहचे स्वामित्त्व होते. निजामशाहीच्या अखेरच्या काळात मोगलांच्या बलाढ्य सैन्याशी संघर्ष करणाऱ्या मलिक अंबर या निजामशाही सरदाराचे वास्तव्य येथे असून ते "अंबरापूर" म्हणून ओळखले जात असे.

लातूर : जिल्ह्याचे मुख्यालय असलेले लातूर हे बदामीच्या चालुक्य काळात अस्तित्वात असल्याचे विक्रमादित्याच्या कर्नूल ताम्रपटातील या स्थलनामाच्या उल्लेखावरून सिद्ध होते. सातव्या शतकात ते रत्नगिरी (रट्टनगिरी) आणि रट्टगिरी या नावांनी ओळखले जात होते. रत्नपूर माहात्म्यात लातूरचे प्राचीन नाव रत्नपूर असे असून ती ताम्रध्वज राजाची राजधानी असल्याची माहिती नमूद करण्यात आली आहे. तसेच येथील वस्ती त्या काळात मांजरा नदीच्या काठावर असल्याचे म्हटले आहे. ही माहिती म्हणजे केवळ आख्यायिका नसून ती ऐतिहासिक घटनावर आधारित आहे हे कर्नूल ताम्रपटातील रत्नगिरी या लातूरच्या चालुक्यकालीन नावावरून स्पष्ट होते. तसेच लातूरजवळ मांजरा नदीच्या काठावर जे ओस पडलेल्या वस्तीचे अवशेष दिसतात, त्यावरून रत्नपूर माहात्म्यातील हे नगर मुळात नदीकाठावर असल्याच्या माहितीस दुजोरा मिळतो. विक्रमादित्याच्या काळातील रत्नगिरी किंवा रट्टगिरी हे बहुधा लातूरच्या जुन्या वस्तीचे नाव असावे.

या स्थलनामाची व्युत्पत्ती "रट्ट" किंवा "राष्ट्रकूट" राजवंशाच्या नावाशी निगडित आहे हा कै.ग.ह.खरे यांचा अंदाज कर्नूल ताम्रपटातील रट्टगिरी या नावावरून खरा ठरला आहे. राष्ट्रकूट तिसऱ्या गोविंदाने लातूरजवळील मोरखण्डी येथे राजधानी हलविल्यानंतर त्याचा व त्याचा युवराज अमोघवर्ष याचा या नगराशी संपर्क वाढत गेला व हे ग्रामाचे "पुर" बनले. अमोघवर्षाची ही बहुधा निवासी राजधानी असावी. रत्नपूर माहात्म्यातील ताम्रध्वज म्हणजे राष्ट्रकूट अमोघवर्षच असला पाहिजे. स्थलमाहात्म्यातील आख्यायिकांतील नावे बदलली तरी तिच्यामागे ऐतिहासिक घटना असतात हे "वेरूळ शिवालय माहात्म्यातील" राष्ट्रकूट पहिल्या कृष्णाच्या एलराजा या नावावरून स्पष्ट झाले आहे. तथापि, राष्ट्रकूटकाळात निवासी राजधानी असून देखील केवळ अमोघवर्षाच्या शिरूर आणि मुळगुंद कोरीव लेखाव्यतिरिक्त राष्ट्रकुटांच्या इतर कुठल्याही साधनात या नगराचा उल्लेख आढळत नाही. या कोरीव लेखात लातूरला "पुरूर" म्हणजे श्रेष्ठ नगर असल्याचे जे विशेषण लावले आहे, त्यावरून नवव्या शतकात लातूर हे त्या काळातील शहराच्या परिमाणानुसार मोठे नगर असल्याचे प्रतीत होते.

अनुक्रमणिका

लातूर नगराचा उल्लेख असलेले बहुतेक कोरीव लेख कल्याणीच्या चालुक्य राजवटीतील होत. खुद्द लातूर येथे जे दोन शिलालेख उपलब्ध झाले आहेत, त्यापैकी एक कल्याणीचा चालुक्य राजा तिसऱ्या सोमेश्वराच्या काळातील म्हणजे बाराव्या शतकाच्या पूर्वार्धातील आहे. त्यात लत्तलूरचे वर्णन "दिव्य" आणि "पुरश्रेष्ठ" या विशेषणांनी करण्यात आले आहे. तसेच वेदविद्येत पारंगत असलेल्या ५०० "महाजनांचे" येथे वास्तव्य असल्याची माहिती त्यात नमूद करण्यात आली आहे. यावरून लातूर हे कल्याणच्या चालुक्य राजवटीत विद्वानांचे माहेरघर व शैक्षणिक केंद्र असल्याची माहिती मिळते. त्याच शिलालेखात येथील भूतेश्वर शिवमंदिर आणि पापविनाशन तीर्थाचाही उल्लेख असून ते आजही त्याच ठिकाणी अवशिष्ट स्वरूपात का असेना, परंतु अस्तित्वात आहे.

येथील राष्ट्रकूट वंशातील विविध व्यक्तींनी बाहेर जाऊन कर्नाटकातील बेळगाव जवळील सौंदत्ती, तसेच महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा विभागात छोटी राज्ये किंवा सामन्त आणि प्रशासनाधिकाऱ्यांची पदे प्राप्त केली. परंतु लातूरचे राजकीय किंवा प्रशासकीय महत्त्व मात्र वाढले नाही. परंतु या काळात ते धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र मात्र होते. लातूर येथील सिद्धेश्वर मंदिर बहुधा याच काळात बांधले गेले असावे.

यादव राजवटीत लातूरला सर्वप्रथम राजकीय आणि प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाल्याची माहिती कान्हरदेव यादवाच्या कान्हेगाव येथील शिलालेखावरून मिळते. त्यानुसार गोपाळ राष्ट्रौड हा या काळात यादवांचा प्रशासनाधिकारी असून त्याच्या अधिकार क्षेत्रात लातूर जिल्ह्यातील उदगीर आणि नांदेड जिल्ह्यातील कंधार देशांचा समावेश होता. गोपाळ राष्ट्रौड याचे वास्तव्य लातूर येथे होते. त्यावरून लातूर हे या काळात देश विभागांचा समावेश असलेल्या मंडळ विभागाचे मुख्य केंद्र असावे असे दिसते.

उदगीर : लातूर जिल्ह्यातील प्राचीन नगरांपैकी आणखी एक म्हणजे या जिल्ह्यातील एका तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेले व लातूरच्या खालोखाल दुसरी बाजारपेठ म्हणून ख्यात असलेले उदगीर हे होय. औसाप्रमाणेच उदगीर येथेही बहामनी काळातील किल्ला असून त्याच्या आतील भागात जी महंत उदागिरी स्वामींची समाधी आहे, त्यांच्या नावावरून या शहरास उदगीर असे नाव पडले अशी स्थानिक आख्यायिका आहे. परंतु ह्या आख्यायिकेत तथ्य नसावे. कारण जैन वाङ्मयात या धर्माचे एक पीठ म्हणून उदगीर नगराचा उल्लेख येतो. तसेच तेराव्या शतकातील अंबाजोगाई आणि कान्हेगाव येथील यादवांच्या कोरीव लेखात त्याचा सध्याप्रमाणेच उदगीर आणि त्याचे संस्कृत रूप उदयगिरी असा उल्लेख आलेला आहे. परंतु ती मध्ययुगीन काळातील वाटते. त्यामुळे उदगीरच्या नावाविषयीची ही व्युत्पत्ती मुस्लिम राजवटीत रूढ झाली असावी असे वाटते. वास्तविक ज्याप्रमाणे देवगिरीच्या टेकडीवरून त्याच्या पायथ्याशी असलेल्या नगरास "देवगिरी" हे नाव पडले, त्याप्रमाणे उदगीरच्या भोवती असलेल्या बालाघाटाच्या रांगेचे नाव उदयगिरी असावे व त्यावरून या नगरास "उदगीर" हे नाव मिळाले असणे अधिक स्वाभाविक वाटते.

यादव राजवटीत उदगीर हे औसाप्रमाणेच देशविभागाचे मुख्य केंद्र असून काकतीयांच्या सरहद्दीवरील ठाणे असल्यामुळे तिथे यादव सैन्याची छावणी (बिड) अस्तित्वात होती. ही छावणी बहुधा सध्याच्या उदगीर येथील किल्ल्याच्या परिसरातच असावी. काकतीयांच्या एका कोरीव लेखातील माहितीवरून यादव आणि

काकतीय यांच्यात झालेल्या लढाईत निदान काही काळ तरी उदगीरवर काकतीयांचा ताबा प्रस्थापित झाला होता. परंतु यादवांनी उदगीर परत जिंकून घेतले. सिंघण यादवाच्या कारकिर्दीत उदगीरचा समावेश सेनापती खोलेश्वराचे वास्तव्य असलेल्या "अंबादेश मंडळात" होता. कान्हरदेव यादवाच्या राजवटीत खंदार (कंधार, जि.नांदेड) व उदगीर हे लातूर येथे वास्तव्य असलेल्या गोपाल राष्ट्रौड याच्या अधिकारक्षेत्त समाविष्ट होते. रामचंद्र यादवाचा पुत्र सहावा भिल्लम हा यादव राजवटीच्या अखेरीस उदगीरचा शासक होता.

बहामनी सल्तनत आणि त्यानंतरच्या बरीदशाही राजवटीत उदगीर हे या जिल्ह्यातील एक महत्त्वाचे ठिकाण होते. उदगीर येथील किल्ल्याचे सध्या अस्तित्वात असलेले बांधकाम हे याच काळात झाले. पंधराव्या आणि सोळाव्या शतकात दक्षिणेतील सल्तनतींच्या सत्तास्पर्धेच्या रस्सीखेचीत उदगीर परिसरात अनेक लढाया झाल्या. विशेषत: उदगीरचा समावेश बरीदशाहीत झाल्यावर आणि ही सल्तनत सर्वात कमकुवत असल्यामुळे उदगीरवर आदिलशाही आणि निजामशाही सुलतानांनी अनेक वेळ स्वाऱ्या करून काही काळ त्यावर आपला ताबाही बसविला होता. बरीदशाहाने राजधानी बिदर गमावल्यामुळे काही काळ उदगीरच्या किल्ल्याचा आश्रय घेतला होता व इमादशाहाच्या मध्यस्थीने आदिलशाहाकडून आपले राज्य परत मिळविले.

सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात उदगीर अहमदनगरच्या निजामशाहाच्या अंमलाखाली होते. त्यानंतर उदगीर मोगलांनी जिंकले. मोगल साम्राज्याचा दक्षिणेतील सुभेदार निजाम-उल-मुल्क याने अठराव्या शतकात दक्षिणेत आपले स्वतंत्र राज्य प्रस्थापित केल्यामुळे यापुढील काळात उदगीर हे हैद्राबाद संस्थानाचा एक भाग बनले. १७६० मध्ये मराठे व निजाम यांच्यात उदगीर जवळ लढाई होऊन तीत निजामाचा पराभव झाला व उदगीरच्या तहानुसार त्याला मराठ्यांना उदगीर सभोवतालचा ६० लक्षांचा मुलूख देण्याचे मान्य करावे लागले. परंतु पानिपतच्या लढाईमुळे या तहाची अंमलबजावणी झाली नाही व उदगीर निजामाच्या ताब्यात राहिले.

वरील तीन प्राचीन नगरांखेरीज लातूर जिल्ह्यातील शिरूर-अनंतपाळ, रामलिंग-मुदगड आणि नवकुंड झरी ही देखील महत्त्वाची गावे असल्याची माहिती या प्राचीन स्थलाशी संबंधित असलेल्या उपलब्ध कोरीव लेखांवरून मिळते. झरीका ताम्रपटातील पोना विषय हे सध्याच्या अहमदपूरचे प्राचीन नाव असल्यास त्याचा समावेशही जिल्ह्यातील प्राचीन नगरांत करावा लागेल. त्याशिवाय कोरीव लेखाचा आधार नसलेल्या, परंतु कल्याणीच्या चालुक्य काळातील उत्कृष्ट मंदिरे असलेल्या जिल्ह्यातील निलंगा, मुरूड इत्यादी गावांचा समावेशही प्राचीन स्थळांत होऊ शकेल.

या व्यतिरिक्त लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ज्याचा समावेश आज नाही, परंतु सरहद्दीवर असलेले नारंगवाडी (ता.उमरगा, जि. उस्मानाबाद) हे देखील या परिसरातील एक प्राचीनतम नगर होते. नांगरकटक या त्याच्या प्राचीन नावाच्या आधारे प्राचीन काळी ते सैनिकीदृष्ट्या व प्रशासकीयदृष्ट्या सातवाहन काळातील एक महत्त्वाचे स्थान होते. वाकाटकांच्या प्रशासन व्यवस्थेत ते एक प्रशासकीय मुख्यालय असून लातूर जिल्ह्यातील लातूर आणि औसा या तालुक्यांतील गावांचा त्यात समावेश असल्याविषयीची चर्चा आपण केली आहे. नारंगवाडी जवळील मुळज येथे तेर प्रमाणे पांढरीच्या जुन्या टेकड्या असून त्यात सातवाहन काळातील अवशेष आढळतात. सन्नती आणि तगर या दोन प्राचीन नगरांना जोडणारा राजमार्ग लातूर जिल्ह्यातून जात असून मुळात नांगरकटक हे त्या मार्गावरील एक महत्त्वाचे ठिकाण असावे.

अनुक्रमणिका

प्रकरण २ : इतिहास

मध्ययुगीन काळ

- सुलतानकालीन मराठवाडा
- बहमनी कालखंड
- गुलबर्गा कालखंड
- बिदर कालखंड
- बहमनींची अखेर
- बिदरची बरीदशाही
- अहमदनगरची निजामशाही
- विजापूरची आदिलशाही
- मुघल कालखंड
- मराठ्यांच्या लातूर जिल्ह्यातील हालचाली
- निजाम कालखंड

मध्ययुगीन काळ - (इ.स. १२९४ ते १८१८)•

सुलतानकालीन मराठवाडा : इ.स. च्या १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात देवगिरीच्या यादवांनी जवळजवळ संपूर्ण महाराष्ट्र आपल्या अधिपत्याखाली आणला होता. एवढेच नव्हे, तर त्यांच्या राज्याच्या चतु:सीमा शेजारच्या कर्नाटक व आंध्र प्रदेशातही विस्तारल्या होत्या. यावेळी दक्षिणेतील प्रबळ सत्ता बनू पाहणाऱ्या यादवांकडील अमाप संपत्तीच्या कहाण्या दिल्लीतील सुलतानाच्या कानी पोहोचल्या होत्या. त्यामुळे संपूर्ण दक्षिण पादाक्रांत करण्याच्या मोहिमेत मुख्य यादव सैन्य गुंतले असता दिल्लीच्या खिलजी सुलतानाचा पुतण्या अलाउद्दीन खिलजी याने इ.स. १२९४ मध्ये देवगिरीवर प्रचंड सैन्यानिशी स्वारी केली. यावेळी देवगिरीत मोजकेच सैन्य असल्याने यादव राजा रामचंद्रदेव याचा पराभव झाला. प्रचंड संपत्ती देऊन त्याने अलाउद्दीनशी तह केला व वार्षिक खंडणी देण्याचे मान्य केले. अलाउद्दीनच्या या स्वारीचे व तत्कालिन घटनांचे वर्णन फार्शी इतिहासकार अमीर खुस्रो, जियाउद्दीन बरनी व इसामी यांच्या लेखनात आढळते.[३०] देवगिरीच्या स्वारीत मिळालेल्या लुटीच्या बळावरच अलाउद्दीनने सुलतान जलालुद्दीनचा खून करून दिल्लीची गादी बळकाविली.

रामचंद्रदेवाच्या मृत्युनंतर इ.स. १३१२ मध्ये त्याचा मुलगा तिसरा सिंघण किंवा शंकरदेव यादव राजा बनला. त्याने अलाउद्दीनची सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यास वठणीवर आणण्यासाठी अलाउद्दीनने मलीक काफूर यास सैन्यासह देवगिरीवर पाठविले. झालेल्या लढाईत सिंघणास ठार करण्यात आले. मलीक काफूर यानंतर काही काळ देवगिरीस राहिला व तेथेच मुस्लिम सत्तेचे दक्षिणेतील पहिले केंद्र स्थापन केले. दक्षिणेतील बहुतांश राजसत्तांकडून त्याने खंडणीही वसूल केली.

दरम्यान अलाउद्दीनच्या आजाराची बातमी आल्यामुळे मलीक काफूरने देवगिरी ऐन-उल-मुल्क च्या हाती सोपवून इ.स. १३१५ मध्ये दिल्लीस प्रयाण केले. अलाउद्दीनच्या मृत्यूनंतर मलीक काफूरचाही खून होऊन त्यानंतर दिल्लीच्या तख्तासाठी झालेल्या बंडाळीत अलाउद्दीनचा तिसरा मुलगा मुबारिक खिलजी याने बाजी मारली व स्वत:ला सुलतान घोषित केले. त्याने ऐन-उल-मुल्क यास देवगिरीहून दिल्लीस बोलावून घेतले. त्यामुळे दक्षिणेतील अनेक हिंदू राजे स्वतंत्र झाले. रामचंद्रदेवाचा जामात हरपालदेव यानेही इ.स.१३१४ मध्ये देवगिरीचे राजपद ताब्यात घेऊन दिल्ली सल्तनतीविरुद्ध बंड केले. तथापि मुबारिक खिलजीने इ.स. १३१८ मध्ये देवगिरीवर स्वारी करून हरपालदेवास ठार केले.[३१] देवगिरीचे स्वातंत्र्य आणि संस्कृती रक्षणासाठी प्रयत्न करणारा यादव राज्यातील हा शेवटचा योद्धा होय. दक्षिण आपल्या अंकित ठेवण्यासाठी यानंतर मुबारक खिलजीने वऱ्हाड, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात प्रमुख ठिकाणी आपली सत्ता केंद्रे स्थापन केली. तसेच ऐन-उल-मुल्कची सुभेदार म्हणून पुन्हा देवगिरीला नियुक्ती केली.[३२]

• या भागाचे लेखन डॉ.सोमनाथ रोडे (निवृत्त प्राचार्य, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर) यांनी केलेले असून प्रा.डॉ.सुनिल पुरी (श्री.कुमारस्वामी महाविद्यालय, औसा) यांनी याकामी सहाय्य केलेले आहे. याची संपादकीय तपासणी संपादक मंडळ सदस्य डॉ.रा.श्री.मोरवंचीकर व डॉ.भागवतराव ढेंगळे (निवृत्त प्राचार्य, यशवंत महाविद्यालय, नांदेड) यांनी केली आहे.

३०. पगडी, सेतुमाधवराव, **महाराष्ट्र आणि मराठे**, जोशी आणि लोखंडे प्रकाशन पुणे, १९६३, पृ.१.

३१. इलिएट, एच.एम. ॲण्ड जे. डॉसन, **हिस्टरी ऑफ इंडिया ॲज टोल्ड बाय हिज ओन हिस्टोरियन्स**, खंड-३, लंडन, १८६६, पृ.५५८; ब्रिग्ज, जे., **फेरिस्ता**, खंड १, लंडन, १९२९.

३२. नगरकर, वसंत (अनु.), **भारतीय मुसलमान** (मूळ लेखक- प्रा.मुजीब, **दि इंडियन मुस्लिम**), म.रा.सा.सं.मं., मुंबई, १८८९, पृ.२७-२८; हेग वुल्स्ले (संपा.), **केंब्रिज हिस्ट्री ऑफ इंडिया**, व्हॉ. III, एस. चांद ॲण्ड कं., नवी दिल्ली, १९६५, पृ.९६-११६;

अनुक्रमणिका

तुघलकांनी खिलजी घराण्याचा शेवट करून दिल्ली काबीज केल्यानंतर या घराण्याचा ग्यासुद्दीन तुघलक हा सुलतान झाला. त्याच्या काळात त्याचा राजपुत्र महंमद तुघलक हा इ.स.१३२३ मध्ये देवगिरीमार्गे वरंगळच्या मोहिमेवर गेला होता.[३३] याच महंमद तुघलकाने दिल्लीचा सुलतान बनताच दक्षिणेकडे जाणाऱ्या मार्गावरील देवगिरी किल्ल्याचे महत्त्व ओळखून व आपल्या साम्राज्याचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून आपली राजधानी दिल्लीहून देवगिरी येथे आणली होती. हिंदुस्थानातील मुस्लिम राजवटीखालील सर्व प्रदेशाचे राजकारण आणि प्रशासन सन १३२७ पासून देवगिरीहून पाहिले जाई. याच काळात देवगिरीचे दौलताबाद असे नाव ठेवले गेले. इ.स.१३३५ च्या सुमारास सुलतानाने देवगिरीची पुनर्रचना आणि विस्तारही केला. या काळात मराठवाड्यातील दौलताबाद, कंधार आणि आजच्या कर्नाटकातील बिदर व गुलबर्गा प्रांताचा कुत्लघखान हा सुभेदार होता.[३४] यातील गुलबर्गा प्रांतात सध्याच्या लातूर जिल्ह्याचा काही भाग होता.

महंमद तुघलकाचे राज्य त्याच्या कारकिर्दीच्या पूर्वार्धात लहान-मोठ्या २३ प्रांतांमध्ये विभागले होते. संपूर्ण उत्तर भारत आणि दक्षिणेकडे मदुरेपर्यंत त्याचे वर्चस्व होते. जाजनगर (ओरिसा), मन्हाठ (महाराष्ट्र), तिलंग (तेलंगण), बिदर, कंपिली, द्वारसमुद्र, माळवा वगैरे भागही त्याच्या अंकित होते.[३५]

महंमद तुघलकाच्या काळात त्याच्या विक्षिप्त धोरणामुळे साम्राज्यात विविध ठिकाणी बंड होऊ लागले. पहिले बंड त्याचा मामेभाऊ बहाउद्दीन गुर्शास्प याने इ.स.१३२७ मध्ये केले. तो सागर येथे जहागीरदार होता. आपल्या अधिकाऱ्यांमध्ये त्याने स्वत:चे अनुयायी तयार केले आणि बंडाचा झेंडा उभारला. सुलतानाने ख्वाजा-इ-जहान, मलिक अहमद अयाझ आणि मुजीउद्दीन अबू रिझा यांच्या मदतीने देवगिरीजवळ त्याचा पराभव केला.[३६]

इ.स.१३३७ मध्ये बिदरचा सुभेदार शिहाब-इ-सुलतानी नुस्रतखान याने ठरलेला कर खजिन्यात जमा करण्याचे नाकारले आणि स्वत: राजा झाल्याचे जाहीर केले.[३७] परंतु दौलताबादचा सुभेदार कुत्लघखान याने त्यास पकडून त्याची दिल्लीस सुलतानाकडे रवानगी केली. इ.स.१३४० मध्ये अलिशाह याने बंड केले. अलिशाह नत्थू हा सुलतान अलाउद्दीन खिलजी याचा नायब मलिक हिझबुद्दीन जफरखान ह्याचा पुतण्या होता. कुत्लघखान याने त्याला गुलबर्ग्यास कर वसुलीसाठी पाठविले होते. पण ते करण्याऐवजी त्याने धारुर येथे अलाउद्दीन मलिकशाह असे नाव घेऊन आपण राजा झाल्याचे जाहीर केले. हसन गंगू, अहमद व महम्मद हे त्याचे तिघे भाऊ त्याला येऊन मिळाले. सर्वांनी सुलतानाचा विश्वासू अधिकारी भेरुन (भैरव) यास ठार मारून बिदर व सागर येथे आपला अंमल बसविला. परंतु कुत्लघखान याने मलिकशाह याचा धारुर येथे पराभव करून व पकडून सुलतान महंमद तुघलकाकडे पाठविले. सुलतानाने मलिकशाहास पुढे गझनीला पाठवून दिले. कुत्लघखानाने दक्षिणेतील बंडाचा यशस्वी पाडाव केला होता. दक्षिणेतील त्याच्या उत्कृष्ट कारभारामुळे त्याला सुलतानासारखा मानमरातब मिळत होता. त्यामुळे कुत्लघखानाच्या विरोधी गटाने सुलतानाचे कान

३३. कल्याणी येथे सापडलेल्या सुलतान ग्यासुद्दीनच्या इ.स.१३२३ च्या शिलालेखावरून या मोहिमेची कल्पना येते. राजपुत्र मुहम्मदाने या भागावर वर्चस्व मिळविले होते. याजदानी, **बिदर-इटस् हिस्ट्री ॲण्ड मॉन्युमेन्टस्**, पृ.३.

३४. कुंटे, भ.ग. (अनु.), **गुलशने इब्राहिमी** (मूळ लेखक-फेरिस्ता), महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ, मुंबई, १९८२, पृ.८६.

३५. सरदेसाई, गो.सं., **मुसलमानी रियासत**, भाग-१, चौथी आवृत्ती, मुंबई, १९५९, पृ.१५१; कुलकर्णी, गो. त्र्यं. (संपा.), **मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास**, म.रा.सा.सं.मं.,मुंबई,२००१, पृ.१७.

३६. शास्त्री, निळकंठ, **दक्षिण भारत का इतिहास** (अनु. विरेंद्र शर्मा), बिहार हिंदी अकादमी, पटना, ५ वी आवृत्ती, १९९६, पृ.१९९-२००.

३७. शर्मा, एस.आर., **दि फाऊंडिंग ऑफ मराठा फ्रिडम**, ओरिएन्ट लॉंगमन लि., नवी दिल्ली, १९६४, पृ.४६-४९.

भरवून कुत्लघखानास दक्षिणेतून दिल्लीस बोलावण्याविषयी मन वळविले. परंतु कुत्लघखान सुलतानाचा लहानपणापासूनचा शिक्षक होता आणि अशी आज्ञा त्यास करणे सुलतानाला अवघड वाटत होते. म्हणून त्याने त्याचा मान ठेवण्यासाठी एक विशेष दूत बद्र-इ-चाच याला रवाना केले. तो दिनांक ८ डिसेंबर १३४४ रोजी दिल्लीहून निघाला व रमजानच्या मध्यास दौलताबादेस पोहोचला. महंमद तुघलकाने त्याच्या जागी कुत्लघखानाचा भाऊ निजामुद्दीन (अली-उल्-मुल्क) याची हंगामी सुभेदार म्हणून नेमणूक केली. तो इकडे येईपर्यंत दरम्यानच्या काळात सुलतानाने दक्षिणच्या सुभ्याचे गुलबर्गा, दौलताबाद, बिदर व माहूर असे चार तरफ किंवा प्रांत बनविले. त्यावर मलिक सरवतदार, मलिक मुख्खिस-उल्मुल्क, युसूफ बघ्रा आणि अझीझुद्दीन खम्मार या चौघांची नेमणूक केली. बर्नी याने हे सर्व चांगले कारभारी असल्याचे लिहिले आहे.[३८] सुलतान महंमदच्या कारकिर्दीत दक्षिणेतील सर्व सरदार सुलतानाकडून होणाऱ्या जुलुमामुळे त्रासून गेले होते. या सर्वांनी सुलतानाविरुद्ध बंड करावयाचे ठरवून दौलताबादचा किल्ला हस्तगत केला. अशाप्रकारे सुलतानास वारंवार बंडखोरांच्या प्रखर विरोधास तोंड द्यावे लागले.

बहमनी कालखंड : दौलताबादच्या किल्ल्याचा ताबा घेतल्यानंतर बंडखोरांनी ईस्माईलखान अफगाण याची आपला बादशहा म्हणून निवड केली आणि त्यास 'नासिर-उद्दीन' हा किताब दिला. हा देवगिरीच्या अमीरांमध्ये सर्वात श्रेष्ठ होता. याच्या अधिपत्याखाली २,००० खेडी होती. त्याचा मोठा भाऊ मलीक येल अफगाण हा महंमद-बिन-तुघलक याचा मोठा सरदार होता व माळवा येथील सुलतानाच्या सैन्याचा प्रमुख होता. नवीन सुलतानाने सर्व अधिकाऱ्यांना मानसन्मानाची खैरात केली. पुढे बहमनी राज्याची ज्याने स्थापना केली, त्या हसन गंगू बहमनीस 'जाफरखान', व नुइद्दीन यास ख्वाजा-इ-जहान अशा पदव्या दिल्या. महंमद तुघलक हे बंड मोडून काढण्यासाठी स्वत: दौलताबादला आला. झालेल्या लढाईत बंडखोर अमीरांचा पराभव होऊन त्यांनी रणांगणावरून पळ काढला व किल्ल्यात आश्रय घेतला. सुलतानाने दौलताबादला वेढा दिला. किल्ल्यातील शिबंदी शरण येणार असे चिन्ह दिसत असतानाच सुलतानाला दिल्ली येथील बंडाची बातमी समजली. त्यामुळे तो त्वरेने दिल्लीकडे गेला. त्यामुळे दक्षिणेतील अमीरांनी अतिशय जोर लावून वेढा उठविला. नासिरुद्दीनच्या राज्यरोहणानंतर दोन महिन्यानी गुलबर्ग्याचा अधिकारी कंधर याचा ख्वाजा-इ-जहान याने बिमोड केला. जाफरखान हा २०,००० घोडेस्वार घेऊन बिदरकडे गेला होता. यावेळी बिदरचा ताबा इमाद-उल-मुल्क ताब्रिजीकडे होता. जाफरखानने त्यास ठार मारले व मलीक सैफुद्दीन घोरी याला बिदर आणि कंधारचा किल्ला काबीज करण्यासाठी मागे ठेवले व तो स्वत: दौलताबादकडे आला. त्यानंतर नासिरूद्दीनने राज्याचा कारभार स्वेच्छेने सोडून जाफरखानास सुलतान म्हणून घोषित केले.[३९] अशा रीतीने दिनांक १२ ऑगस्ट १३४७ ला जाफरखानाच्या (हसन गंगू) नावे खुत्ब्याचे वाचन करण्यात आले.[४०] त्याचा २८ शाबान, शुक्रवार हिजरी ७४८ (दिनांक ३ डिसेंबर १३४७) रोजी राज्याभिषेक होऊन त्याने सुलतान अलाउद्दीन हसनशहा अल-वल्ली-अल-बहमनी असा किताब धारण केला. महंमद तुघलकाने ज्यावेळी कुत्लघखानाला दौलताबादच्या सुभेदारीवर नेमले, त्यावेळी त्याच्या बरोबर दक्षिणेत जाणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये हसन गंगू हा एक होता. अशा रीतीने दक्षिणेतील एका नवीन मुस्लीम सत्तेची स्थापना मराठवाड्यातील दौलताबाद (देवगिरी) येथे झाली. बहमनींचा राज्यविस्तार गुलबर्गा, विजापूर, अहमदनगर, वऱ्हाड, औसा, कंधार व तेलंगण प्रांतात झाला होता. बहमनींची

---

३८. कुलकर्णी, गो.त्र्यं.(संपा.), **मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास**, म.रा.सा.सं.मं.,मुंबई,२००१,पृ.१७-२१.

३९. सरदेसाई, गो.स., **मुसलमानी रियासत**, भाग-१, के.बी.ढवळे, मुंबई, १९५९, पृ.२०६ कुंटे, भ.ग., **बहमनी राज्याचा इतिहास,** मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९६६, पृ.४-५.

४०. फेरिश्ता, **गुलशने इब्राहिमी** (अनु.मोडक,बा,ह,), पुणे, १८९१, पृ.१९.

राजधानी म्हणून दौलताबादचे स्थान काही वर्षेच होते. उत्तरेकडील संभाव्य आक्रमणाच्या सततच्या भीतीमुळे हसनने आपली राजधानी गुलबर्गा येथे स्थलांतरीत केली होती. पण प्रत्यक्ष दरबार मात्र दौलताबाद येथेच होता.[४१] अलाउद्दीन हसनने मराठवाड्यातील दौलताबाद, बीड, पैठण यामध्ये पसरलेला मराठी प्रदेश आपला भाऊ अमीरअली याचा मुलगा महंमदखान याच्या अधिपत्याखाली दिला. ईशान्येकडील रामगीर, वऱ्हाडचा काही भाग व माहूर या भागावर इ.स.१३५७ मध्ये सफदरखान सिस्तानी याची नेमणूक केली. महाराष्ट्रात सध्याच्या विदर्भ (वर्धेच्या अलीकडील) आणि मराठवाड्यात बहमनींची पकड जास्त दृढ होती.[४२]

मलिक सैफुद्दीन घोरी हा सुलतानाचा 'वकील-इ-मुतालिक' होता. पूर्वीचा राजा शम्सुद्दीन इस्माईल याला काही पदव्या देऊन सुलतानाचा खाजगी कारभारी नेमले होते. अलीशाह यास सुलतानाच्या नेमणूक समारंभाचा अधिकारी म्हणून व गंगू या ब्राह्मणाची प्रमुख हिशेबनीस म्हणून नेमणूक झाली. अलाउद्दीनने आपल्या सत्तेला जिथे विरोध होत आहे अशा ठिकाणी आपले अधिकारी पाठविले. हुसेन गुर्शास्पला कोटगिर व कंधारकडे पाठविले. थोड्याच काळात सर्व गुलबर्गा प्रदेश ताब्यात घेतला. इ.स.१३५७ मध्ये दक्षिणेकडील हे राज्य गुलबर्गा, दौलताबाद, बिदर आणि माहूर या चार प्रांतांत विभागले होते.[४३] या प्रांतांना 'तरफ' असेही म्हणत. आजचा मराठवाडा हा या चार विभागात विभागला होता. माहूर हे तरफ विभागाचे मुख्य ठिकाण होते. नांदेड परिसर हा बिदर व तेलंगणाचा भाग होता.[४४] उस्मानाबाद जिल्ह्याचा परिसर हा गुलबर्ग्याचा भाग होता. त्यात आजच्या लातूर जिल्ह्याचा समावेश होता. मलीक सैफुद्दीन घोरी हा गुलबर्गा विभागाचा तरफदार होता. आजचे अहमदपूर, निलंगा, उदगीर हे तालुके पूर्वी बिदर जिल्ह्यात होते. गुलबर्गा विभागात सोलापूर, गुलबर्गा, विजापूर, रायचूर, मुदगल, सागर आणि नळदुर्ग हा भाग मोडत होता.[४५]

गुलबर्गा कालखंड (१३७४-१४२२)[४६] : दौलताबाद येथे बहमनी राज्याची स्थापना झाल्यानंतर अलाउद्दीन बहमनीने गुलबर्ग्यास आपली राजधानी कायम केली. इ.स.१३५८ मध्ये अलाउद्दीनच्या मृत्यूनंतर अनुक्रमे अलाउद्दीन मुजहिद (२१ एप्रिल १३७५ ते १६ एप्रिल १३७८), पहिला दाऊद (१६ एप्रिल १३७८ ते २१ मे १३७८) व दुसरा मुहम्मद (२१ मे १३७८ ते २० एप्रिल १३९७) यानी राज्य केले. या चार सुलतानांच्या काळात मलिक सैफुद्दीन घोरी हा पंतप्रधान होता. तोही एप्रिल १३९७ मध्ये मरण पावला. दुसऱ्या मुहम्मदानंतर घियासुद्दीन तहम्तान (२० एप्रिल १३९७ ते १४ जून १३९७), दुसरा शम्सुद्दीन दाऊद (१४ जून १३९७ ते ११ नोव्हेंबर १३९७) व ताजुद्दीन फिरोजशहा (१६ नोव्हेंबर १३९७ ते १८ सप्टेंबर १४२२) या बहमनी सुलतानांचा शेजारच्या विजयनगरशी सतत संघर्ष चालू होता. त्याचबरोबर इ.स.१३९८-९९ मध्ये खेडल्याचा राजा नरसिंहराय याच्याबरोबर ताजुद्दीन फिरोजशहा याचा संघर्ष झाला. फिरोज बहमनी हा बहमनी राज्याच्या गुलबर्गा कालखंडातील यशस्वी सुलतानांपैकी एक होता. फिरोजने आपला भाऊ अहमदखान याला

---

४१. कुंटे,भ.ग., (अनु.), **गुलशने इब्राहिमी**, पूर्वोक्त, पृ.५५८.

४२. पगडी, सेतुमाधवराव, पूर्वोक्त, **महाराष्ट्र आणि मराठे**, पृ.६.

४३. पुरी,बी.एन., **हिस्ट्री ऑफ इंडियन ॲडमिनिस्ट्रेशन,** व्हॉ.२, मेडीवल पिरीअड, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९७५, पृ.२६७; कुंटे, भ.ग., **बहमनी राज्याचा इतिहास**, पूर्वोक्त, पृ.२२, तळटीप.३

४४. **गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट**, बॉम्बे, १९७२, पृ.५२.

४५. **इम्पेरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया**, प्रॉव्हिन्सियल सिरिज, हैद्राबाद स्टेट, अटलांटिक पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, न्यू दिल्ली, १९०९, पृ.२४१-२८९.

४६. मजुमदार, आर.सी.(संपा.), **दिल्ली सल्तनत**, व्हॉ.६, द्वितीय आवृत्ती, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९६७, पृ.२४८-२७०.

खान-इ-खानान केले आणि आपला शिक्षक मीर फज्लुल्लाह इंजू याला मलिक नायब व वकील म्हणून नेमले.[४७]

बिदर कालखंड (१४२२ ते १५३८) : फिरोज बहमनीनंतर दिनांक २२ सप्टेंबर १४२२ मध्ये पहिला शहाबुद्दीन अहमद गादीवर आला. त्याने खल्फ हसन बसरी यास मलिक-उत-तुजार हा किताब देऊन राज्याचा वजीर केले. ऐन्-उल्-मुल्क होशियार व निजाम-उल्-मुल्क बेदार यांना आपल्या बाजूस वळवून अनुक्रमे अमीरुल उमरा आणि दौलताबादचा सरलष्कर अशा पदांवर नेमले. याच्या काळातच इ.स.१४२४ मध्ये राजधानी गुलबर्ग्यावरून बिदर येथे हलविण्यात आली.[४८]

इ.स.१४२४ मध्ये मलिक-उत्-तुजार हा सदरील आदेशानुसार दक्षिणेत बहमनी सत्तेचे अधिपत्य प्रस्थापित करण्यासाठी गेला. त्याने त्या भागातील गावांची आणि खेड्यांची आपल्या सोयीनुसार पुनर्रचना केली.[४९]

अहमदशहाच्या काळातच बहमनींचा गुजरात व माळव्याच्या बादशहाशी संबंध आला. अहमदशहाचा मृत्यू दिनांक १४ जुलै १४३६ ला झाला. त्यानंतर त्याचा मोठा मुलगा अलाउद्दीन अहमद द्वितीय हा गादीवर आला या काळातच त्याचा भाऊ महमद आणि दाऊद यांनी विजयनगरच्या राज्याच्या साह्याने मुद्गल, रायचूर, सोलापूर, विजापूर आणि नळदुर्ग या भागांवर वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न केला. अलाउद्दीन अहमदचा मृत्यू दिनांक ३ एप्रिल १४५८ ला झाला. त्याच्यानंतर हुमायूनशहा अहमद[५०] (दिनांक ७ मे १४५८ ते दिनांक ४ सप्टेंबर १४६१) आणि निजामुद्दीन अहमद तृतीय (दिनांक ४ सप्टेंबर १४६१ ते दिनांक ३० जुलै १४६३) यांनी राज्य केले.

हुमायूनशहाने 'ख्वाजा-इ-जहान तुर्क' महमूद गावान याला जुम्लतुल्मुल्क वझीर-इ-कुल व विजापूरचा तर्फदार आणि ख्वाजा-इ-जहान तुर्क यास वकील व तेलंगणचा तर्फदार अशा किताबती दिल्या. हुमायूनचा राजदरबार हा विद्वानांचे व राजनिष्ठांचे आश्रयस्थान बनला होता. यापैकी महमूद गावान हा पूर्वी व्यापारी होता. तो इ.स.१४५३ मध्ये व्यापारी म्हणून दाभोळ बंदरात उतरला होता. पुढे आपल्या कर्तृत्वाने तो बहमनींचा वजीर बनून प्रसिद्ध पावला. त्याच्या कर्तृत्वामुळे दक्षिणेच्या सांस्कृतिक जीवनातही काही महत्त्वाचे बदल झाले.[५१] हुमायून सुलतानाच्या काळात माळव्याचा सुलतान महमूद खिलजीने इ.स.१४६२ मध्ये दख्खनवर स्वारी केली. विजापूर, वऱ्हाड, दौलताबाद येथील सैन्यासह महमूद गावान, ख्वाजा-इ-जहान, सिकंदरखान व स्वत: सुलतानाने महमूद खिलजीच्या सैन्याचा प्रतिकार करावयाचे ठरविले. दोन्ही सैन्याची गाठ कंधार येथे पडली. प्रत्यक्ष युद्धात बहमनी सुलतान विरूद्ध महमूद खिलजी, ख्वाजा-इ-जहान विरूद्ध चंदेरीचा महाबतखान

---

४७. कुलकर्णी,गो.त्र्यं.(संपा.), पूर्वोक्त, **मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास**, पृ.६८.

४८. यझदानी, **बिदर-इटस् हिस्ट्री ॲण्ड मॅन्युमेंटस्,** ऑक्सफर्ड प्रेस, लंडन, १९४७, पृ.४,५; कुंटे, भ.ग., **बहमनी राज्याचा इतिहास**, पूर्वोक्त, पृ.६६.

४९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.५२.

५०. हुमायूनशहाचा एक ताम्रपट मौजे चौबळी, शिरुर-ताजबंद, ता.अहमदपूर येथील अण्णाराव पाटील यांच्याकडे सापडला आहे. तो हिजरी ८६७ (इ.स.१४५८) चा आहे. चौबळीचा हणमंत पाटील यास इनामी जमीन व पाटीलकीची सनद देण्याची त्यात नोंद आहे. शिवाय परगण्यातील सर्व अधिकाऱ्यांचा त्यात उल्लेख आहे. पहा- सु.ग.जोशी (संपा.) **वार्षिक,** मराठवाडा संशोधन मंडळ, राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन, शिरुर-ताजबंद, १९७५, पृ.६८-७०.

५१. मजूमदार,आर.सी.(संपा.),पूर्वोक्त, **दिल्ली सल्तनत**, पृ.२६०.

आणि जहीरुल्मुल्क तसेच निजाम-उल्-मुल्क विरूद्ध निजाम-उल्-मुल्क घोरी व शहाजादा घिसुद्दीन अशा समोरासमोर गाठी पडल्या. यात बहमनीचा पराभव करून महमूद खिलजीने बिदर शहराचा ताबा घेऊन किल्ल्याला वेढा दिला व वऱ्हाड, बीड व दौलताबादच्या प्रदेशावर वर्चस्व मिळविले. परंतु गुजरातचा सुलतान महमूद याने बहमनीस मदत केली. गावान बरोबर दिलेले ६,००० घोडदळ बीडमार्गे जात असता गुजरातच्या सैन्यास मिळाले. गावानने आपल्या सैन्याची जुळवाजुळव केली व बिदरकडे कूच केले. फिरोजाबादेहून ख्वाजा-इ-जहानही बिदरकडे वळला. त्यामुळे महमूद खिलजीस माळव्याकडे परतणे भाग पडले. हुमायून सुलतानचा मृत्यू दिनांक ३० जुलै १४६३ ला झाला. त्याच्या नंतर तिसरा शम्सुद्दीन मुहम्मद लगेचच गादीवर आला. बहमनीच्या काळातील सर्वात कर्तृत्ववान वजीर महमद गावान हा त्याचाही वजीर होता. बहमनीच्या या कर्तृत्ववान वजीराची छाप संपूर्ण मध्ययुगीन मराठवाड्यावर पडलेली दिसते. या काळात उदगीर, औसा, नळदुर्ग, परांडा आणि कंधार हे किल्ले बांधले गेले होते. यापैकी लातूर जिल्ह्यातील उदगीर व औसा आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील परंडा हे किल्ले महमूद गावानने तो बहामनींचा मुख्य वजीर असताना बांधले.[५२] महमूदशहा बहमनीच्या काळात बहमनींचा राज्यविस्तार मोठ्या प्रमाणात झालेला होता. यापूर्वी बहमनी राज्याची विभागणी चार तरफ अथवा प्रांतामध्ये झाली होती. प्रत्येक प्रांतावर चार सुभेदार नेमण्यात आले होते. हे चार प्रांताचे गाविल व माहूर, दौलताबाद, जुन्नर, विजापूर, अहसनाबाद, गुलबर्गा, राजमहेंद्री आणि वरंगळ हे आठ विभाग होते.[५३] लातूर हा गुलबर्गा विभागाचा भाग होता. यापैकी गाविलवर फतेउल्ला इमाद-उल-मुल्क आणि माहूरवर खुदावंदखान हबशी याच्या नेमणुका करण्यात आल्या. दौलताबादचा ताबा युसूफ आदिलखानकडे देण्यात आला. अहसनाबाद, सागर, नळदुर्ग आणि सोलापूर यांचा ताबा दस्तुर दिनार या हबशी खोजाकडे देण्यात आला.[५४] महमूद गावानने केलेल्या प्रांतांच्या सुधारणांमुळे महत्वाकांक्षी सरदारांमध्ये असंतोष निर्माण झाला. याचा परिणाम महमूद गावानच्या खुनामध्ये झाला (दिनांक ५ एप्रिल १४८१). त्याच्या मृत्यूनंतर त्याची विजापूरची जहागीर युसूफ अदिलखानाला देण्यात आली. महमूदशहाच्या कारकिर्दीतच दस्तुर दिनार या सरदाराने बंड केले. त्याचा पाडाव कुली कुतुबशहाने केला म्हणून महमूदशहाने कुली कुतुबला वैयक्तिक खर्चासाठी उदगीरचा किल्ला एक वर्षासाठी दिला होता.[५५]

बहमनींची अखेर : महमूदशहा बहमनीच्या कारकिर्दीत दख्खनी मुसलमान आणि परदेशी मुसलमान यांच्यातच संघर्ष होऊ लागला. महमूद गावानच्या मृत्युनंतर बहमनी राजवटीला उतरती कळा लागली. महमूद गावान या वजिराचा बहमनी राज्य टिकविण्यात सिंहाचा वाटा होता. त्याच्या मृत्युनंतर महमूदशहाही मरण पावला. या नंतर दिनांक २६ मार्च १४८२ रोजी शहाबुद्दीन महमूद गादीवर आला. त्यावेळी त्याचे वय १२ वर्षाचे होते. हा अल्पवयीन असल्यामुळे सुलतानाला आपल्या वर्चस्वाखाली ठेवण्याचा प्रयत्न अनेक सरदारांमध्ये होऊ लागला. या सर्वांमध्ये इमाद-उल-मुल्क, निजाम-उल-मुल्क, युसूफ अदिलखान, कुली कुतुबशहा आणि कासीम बरीद हे प्रमुख सरदार होते. महमूद गावानच्या मृत्युनंतर काही वर्षातच म्हणजे इ.स.१४८७ पासूनच इमाद-उल-मुल्क, निजाम-उल-मुल्क आणि युसूफ अदिलखान या सरदारांनी बहमनी सत्तेचा त्याग करून इ.स. १४९० मध्ये आपण स्वतंत्र असल्याचे जाहीर केले. कासीम बरीद हा महमूदशहाचा प्रमुख सल्लागार होता. राजधानी

---

५२. कुंटे,भ.ग., (अनु.), **गुलशने इब्राहिमी**, पूर्वोक्त, प्रस्तावना, पृ.३९.

५३. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.५३.

५४. कुंटे,भ.ग., पूर्वोक्त, **गुलशने इब्राहिमी,** पृ.२४३.

५५. बेंद्रे,वा.सी., **गोवळकोंड्याची कुतुबशाही**, पुणे, १९३४, पृ.४८ आणि, राठोड,पी.सी., **उदगीर:एक सांस्कृतिक अभ्यास,** अप्रकाशित एम.फिल.प्रबंध, डॉ. बा.आं,म.वि., औरंगाबाद, १९८६, पृ.२६.

बिदरमध्ये परदेशी मुसलमान आणि दख्खनी मुसलमान यांच्यात मोठी दंगल झाली. ही परिस्थिती योग्य तऱ्हेने हाताळल्याबद्दल इ.स. १४९२ मध्ये महमूदशहाने कासीम बरीदला उदगीर, कंधार व औसाचा किल्ला जहागीर म्हणून दिला.[५६] कासीम बरीद महमूदशहाच्या नावाने प्रत्येक सरदारास हुकूम देत असे. महमूदशहाचा मृत्यू दि. २७ डिसेंबर १५१८ ला झाला. त्यानंतर चौथा अहमद (दिनांक २७ डिसेंबर १५१८ ते दिनांक १५ डिसेंबर १५२०), अलाउद्दीनशाह (दिनांक २८ डिसेंबर १५२० ते दिनांक ५ मार्च १५२३), वलिउल्लाह (दिनांक ५ मार्च १५२३ ते १५२६) व शेवटचा कलीमुल्लाह (इ.स.१५२६ ते १५३८) हे बहमनी सुलतान होऊन गेले. बहमनींच्या शेवटच्या कालखंडातील सुलतानांवर बिदरच्या बरीदशहाचे संपूर्ण वर्चस्व होते. शेवटचा सुलतान कलीमुल्लाह याने बाबर बादशहाची मदत मागितली होती व त्याबद्दल वऱ्हाड व दौलताबाद हे प्रांत देण्याची तयारी दर्शविली होती. परंतु हा कट उघडकीस आला. आपला जीव धोक्यात आहे हे पाहून कलीमुल्लाह इ.स.१५२६ मध्ये प्रथम विजापूरला पळाला व तेथून तो अहमदनगरच्या बुऱ्हाण निजामशहाच्या आश्रयाला गेला. अहमदनगर येथे लवकरच त्याचा अंत झाला. त्याच्या मृत्यूनंतर बहमनी घराणे संपुष्टात आले. वास्तविक कलीमुल्लाहच्या मृत्यूपूर्वीच दक्षिणेची विभागणी विजापूरची आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, वऱ्हाडची इमादशाही, अहमदनगरची निजामशाही आणि बिदरची बरीदशाही या पाच शाह्यांमध्ये झाली होती. त्यातील बिदरमध्ये सध्याच्या लातूर जिल्ह्याच्या काही भागाचा समावेश होता.

बिदरची बरीदशाही : बरीदशाही घराण्याचा संस्थापक कासीम बरीद हा मूळचा तूर्क होय. त्यास गुलाम म्हणून ख्वाजा शहाबुद्दीन अली येजदी याने बिदर येथे आणले आणि गुलाम म्हणून त्याला सुलतान महमूदशहाला नजर केले. तेथे तो स्वत:च्या कर्तृत्वाने सरदार बनला. महमूदशहाच्या कारकिर्दीत पैठण आणि चाकण येथील मराठा बंडखोरांनी पुंडाई माजविली होती. तिचा बिमोड करण्यासाठी कासीम बरीद याला पाठविण्यात आले होते. या कामगिरीतील शौर्याने कासीम बरीद महमूदशहाचा विश्वासू सरदार बनला. राजधानी बिदर येथे माजलेली बंडाळीही योग्य रितीने हाताळल्याबद्दल महमूदशहाने इ.स.१४९२ मध्ये त्यास उदगीरचा किल्ला जहागीर म्हणून दिला.[५७] कासीम बरीदने उदगीरवर खानसाहेब यास किल्लेदार म्हणून नेमले होते. सुलतान महमूदशहा बहमनीच्या कारकिर्दीत इतर अमीरांप्रमाणे त्याच्याही मनात आपल्याला राजकीय सत्ता प्राप्त व्हावी अशी इच्छा उत्पन्न झाली. म्हणून त्याने आदिलशहा, निजामशहा आणि इमादशहा यांच्या सल्ल्यावरून औसा, कंधार आणि उदगीर हे किल्ले बळकावले[५८] आणि बहमनी सुलतानाकडे बिदर शहरे आणि बिदरचा किल्ला ठेवून स्वत:च्या नावे खुत्बा वाचला आणि नाणीही पाडली. परंतु त्याच्या इतर सरदारांनी उठाव केला. या सरदारांच्या संयुक्त फौजांनी त्याचा देवणी येथे पूर्ण पराभव केला.[५९] त्यानंतरही इ.स.१४९९ मध्ये कासीम बरीदने महमूदशहा बहमनीस गादीवरून बाजूला सारण्याचा बेत केला. युसूफ आदिलशहा, मलिक अहमद आणि इमाद-उल-मुल्क यांना हे कळताच त्यांनी सुलतान कुली कुतूबच्या मदतीने कासीम बरीदवर आक्रमण केले. तेव्हा कासीम बरीदने माघार घेतली. झालेल्या वाटाघाटीत महमूदशहाकडे राज्यकारभार सोपवावा व कासीम बरीदने औसाच्या किल्ल्यात रहावे असे ठरले. परंतु त्यानंतरही महमूदशहाची आगळीक काढण्याचा त्याने प्रयत्न केला. हे पाहून युसूफ आदिलशहा व इतर सरदार मदतीस धावून आले. सुलतान कुतुब-उल-

५६. यझदानी, **बिदर-इटस् हिस्ट्री ॲण्ड मॉन्युमेन्टस्**, पृ.११ आणि शेरवानी, एच.के. ॲण्ड पी.एम.जोशी, **हिस्ट्री ऑफ मेडीवल डेक्कन,** हैद्राबाद, १९७४, पृ.१९६.

५७. फेरिश्ता, **गुलशने इब्राहिमी,** पृ.५४४-५४७.

५८. कुंटे,भ.ग., **अहमदनगरची निजामशाही**, मुरली प्रकाशन, मुंबई, १९६२, पृ.९२.

५९. कुंटे, भ.ग., पूर्वोक्त, **बहमनी राज्याचा इतिहास**, पृ.१८३, तळटीप-१.

मुल्कने मदतीस येऊन कासीम बरीद यास पिटाळून लावले. ही घटना इ.स.१५०४ मधील आहे. त्यानंतर कासीम बरीद औसाच्या किल्ल्यात जाऊन राहिला.

इ.स.१५०४ मध्ये कासीम बरीद मरण पावला. त्याची जागा त्याचा मुलगा अमीर बरीद याने घेतली. विजापूरच्या इस्माईल आदिलशहाची बहीण बिबी मशिदी हिचा विवाह अहमदनगरचा राजपुत्र अहमद याच्याशी ठरला होता. त्याप्रमाणे विवाह झाला. या विवाहासाठी बिदरहून महमूदशहा आला होता. त्यासोबत ईस्माईल आदिलशहाने ५,००० स्वार दिले होते. हे पाहून अमीर बरीद बिदरहून औसाच्या किल्ल्यात जाऊन राहिला होता. इ.स.१५१७ मध्ये अमीर बरीदने सुलतानास घेऊन माहूरवर चाल केली. कारण खुदावंदखानाचा मुलगा शारजाखान याने कंधार व उदगीरची लुटालूट केली होती.[६०] माहूरच्या या लढाईत माहूरचा किल्लेदार खुदावंदखान हबशी यास ठार मारण्यात आले. हे पाहून अलाउद्दीन इमादशहा खुदावंदखानाच्या कुटुंबियांच्या मदतीस आला. इमादशहाबरोबर युद्ध टाळावे म्हणून अमीर बरीद याने माहूर व रामगीर या दोन किल्ल्यांवर खुदावंदखानाच्या मुलांच्या नेमणुका केल्या. परंतु इमादशहाने शेवटी दगाफटका करून माहूर व रामगीरवर कब्जा केला.[६१]

पुढे इ.स.१५२८ मध्ये ईस्माईल आदिलशहाने बिदरवर हल्ला केला. तेव्हा अमीर बरीद उदगीर येथे होता. बरीदच्या मदतीस कुतुबशहाचे दहा हजार सैनिक होते. तरीही यावेळच्या लढाईत या वेळी विजापूरचा सरदार असदखानाने अमीर बरीदला कैद करून विजापूरला नेले. विजापूर येथे त्याला अपमानस्पद वागणूक देऊन ठार मारण्याचा कट केला आहे हे समजताच अमीर बरीदने उदगीरचा किल्ला व बहमनीचा खजिना देण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे अमीर बरीदला जीवदान देण्यात आले. परंतु अमीर बरीदचा मुलगा अली बरीदने बिदर किल्ल्याच्या बाहेर सैन्य जमवून युद्धाची तयारी केली होती. त्यामुळे अमीर बरीदने वरील अटी मान्य करून बिदरचा किल्ला आदिलशहाच्या ताब्यात देऊन उदगीर किल्ल्याचा आश्रय घेतला.[६२] यानंतर कंधार व कल्याणीचा किल्ला आदिलशहाकडे देण्यात आला. उदगीर हे अमीर बरीदला देण्यात आले. अमीर बरीद विजापूरचा मांडलिक बनला. पुढे बुऱ्हाण निजामशहाच्या सहाय्यार्थ जात असताना अमीर बरीद एकाएकी आजारी पडला व दौलताबाद येथे मरण पावला. अमीर बरीदनंतर अली बरीद हा गादीवर आला. इ.स. १५४८ मध्ये बुऱ्हाण निजामशहाने दर्या इमादशहाच्या मदतीने कंधार , उदगीर व औसा येथील किल्ले जिंकले[६३] व पूर्वी ठरल्याप्रमाणे उदगीर किल्ला दर्या इमादशहाच्या ताब्यात दिला. दर्या इमादशहाने बरीदशहावर दया दाखविली आणि उदगीरचा किल्ला त्याला बक्षीस म्हणून दिला. त्यामुळे उदगीर किल्ला बरीदशहाच्या ताब्यात राहिला. तो पुढे मुर्तजा निजामशहा (पहिला) याच्या काळात निजामशाही राज्यात समाविष्ट झाला. या वेळेपर्यंत बिदरच्या राज्याचा बहुतेक सर्व मुलूख निजामशाहीने आपल्या वर्चस्वाखाली आणला होता. अली बरीदशहाच्या ताब्यात वार्षिक चार लाख होन उत्पन्न येईल येवढा मुलूख जेमतेम राहिला. अली बरीदचा मृत्यू इ.स.१५७९ मध्ये झाला. अली बरीदनंतर इब्राहिम बरीदशहा, कासीम बरीदशहा दुसरा, मिर्जा अली बरीदशहा, अमीर बरीदशहा दुसरा यांनी बिदरवर राज्य केले. परंतु त्यांचा लातूर जिल्ह्याशी संबंध राहिला नाही.

---

६०. मोडक, बा.ह., **बहामनी उर्फ ब्राम्हणी राज्याचा इतिहास**, (आधार-फेरिस्ता), पुणे, १८९१, पृ.२३६.
६१. हेग, वुल्स्ले, पूर्वोक्त, पृ.४३०-४३१.
६२. राठोड, रा.था., **उदगीर : इतिहास आणि स्मारके**, उदगीर, १९६८, पृ.१४.
६३. कुंटे, भ.ग., **अहमदनगरची निजामशाही**, पूर्वोक्त, पृ.९२-९३.

अहमदनगरची निजामशाही : बहमनींच्या अधिपत्याखालील बिदर व गुलबर्गा प्रांतात सध्याच्या लातूर जिल्ह्याचा समावेश होता. अहमदशहा बहमनीच्या काळातील महमूद गावान या बहमनी वजीराचा बहमनी राज्य टिकविण्यात सिंहाचा वाटा होता. पण त्याच्या वधानंतर बहमनी राज्याचे तुकडे झाले. महमद बहमनी (तृतीय) याचा मृत्यू इ.स.१४८२ साली झाला. त्याने मलिक नायब यास राज्याचा विश्वस्त आणि आपल्या अज्ञात मुलाचा (महमूदशहाचा) पालक नेमले होते. हा दख्खनी मुसलमान होता. बिदरमध्ये त्यावेळी परदेशी मुसलमान व दख्खनी मुसलमान यांचे वितुष्ट होते. मलिक नायबने आपल्या मुलाची (अहमद) दौलताबादहून जुन्नरला बदली केली. त्याचबरोबर बीड आणि दौलताबाद प्रांताचे बरेचशे परगणे जुन्नरला जोडले. त्यामुळे बहमनींचा मुख्य प्रधान किंवा वजीर महमूद गावान याच्या मनात मलिक नायब आणि त्याचा कर्तृत्ववान आणि महत्त्वाकांक्षी मुलगा मलिक अहमद यांच्या राजनिष्ठेविषयी शंका निर्माण झाली. त्यातच या दोघांविरोधात दरबारातील अमीर बादशहाजवळ नेहमी कागाळ्या करीत. मलिक नायबला आपल्या विरूद्ध चाललेल्या कटाचा सुगावा लागताच त्याने सुलतानाच्या छावणीतून पळ काढला आणि बिदर शहराचा अधिकारी पसंदखान यावर विश्वास ठेवून बिदर येथे आश्रय घेतला. परंतु पसंदखानाने त्यास ठार मारले. हे कळताच मलिक अहमदने आपले सैन्यबळ वाढविले व तो जुन्नरला गेला. तथापि, त्याचा सरदार इमीखान याने सुलतानाच्या सैन्याचा परंडा येथे पराभव केला. मलिक नायबचा मृत्यू, मलिक अहमदविरूद्ध दरबारात चाललेली कारस्थाने आणि त्याच्यावर होणाऱ्या सततच्या स्वाऱ्या यामुळे मलिक अहमदने इ.स.१४८६ पासून स्वतंत्रपणे कारभार करावयास सुरुवात केली. सुरुवातीस मलिक अहमदच्या ताब्यात पुणे, नगर आणि बीड इतकेच प्रदेश होते.[६४] मलिक अहमदचा मृत्यू इ.स.१५०८ मध्ये झाला. त्यानंतर त्याचा सात वर्षाचा मुलगा बुऱ्हाण निजामशहा हा गादीवर बसला. त्याचा मुख्य प्रधान मुकम्मीलखान हा होता. त्याचा मुलगा मिया जलालुद्दीन यास 'अजीज-उल-मुल्क' हा किताब देऊन त्याची सरनौबतीच्या जागेवर नेमणूक करण्यात आली. बुरहाण निजामशहाच्या काळातच पाथरी, दौलताबाद, माहूर, परंडा किल्ला यावर निजामशहाचे वर्चस्व निर्माण झाले.

बुऱ्हाण निजामशहाचे औसा, उदगीर किल्ल्यावर वर्चस्व (इ.स.१५४८) : बुऱ्हाण निजामशहाचा वकील शहाताहीर याचा बरीदशहाच्या दरबारात बरीदशहाचा भाऊ खानखानान याने अपमान केलेला होता. त्याचा बदला घेण्यासाठी निजामशहाने बिदरवर आक्रमण केले. त्यासाठी त्याने वऱ्हाडच्या दर्या इमादशहाची मदत घेतली. आक्रमणाची सुरुवात त्याने औसाच्या किल्ल्याला वेढा देऊन केली. बिदरच्या अली बरीदने इब्राहिम आदिलशहाची मदत मागितली व त्या बदल्यात कल्याणीचा किल्ला देण्याचे कबुल केले. इब्राहिम आदिलशहा व अली बरीदशहा यांनी संयुक्तपणे बुऱ्हाण निजामशहावर औसा येथे हल्ला चढविला. ही लढाई किल्ल्यापासून चार मैल अंतरावर झाली. परंतु बरीदशाही व आदिलशाही फौजेला यश आले नाही. निजामशाही सैन्याने किल्ला जिंकण्यासाठी सुरुंग व तोफांचा वापर अधिक प्रमाणात केला. त्यामुळे किल्ल्यातील लोक दर्या इमादशहाच्या मध्यस्थीने निजामशहाला शरण आले. यावेळी निजामशहाचा सरदार गालीबखान गरीब याने मोठा पराक्रम केला. ही मोहीम इ.स.१५४८ मध्ये झाली. बुऱ्हाण निजामशहाने त्यानंतर उदगीरचा किल्ला जिंकून घेतला व पूर्वी ठरल्याप्रमाणे दर्या इमादशहाच्या हवाली केला.[६५] यावेळी सध्याच्या लातूर जिल्ह्याच्या

६४. कुंटे, भ.ग., **अहमदनगरची निजामशाही**, पूर्वोक्त, पृ.१९.

६५. शेरवानी, एच.के. ॲण्ड पी.एम. जोशी, पूर्वोक्त, **हिस्ट्री ऑफ मेडीवल डेक्कन,** पृ.२४१-२४२. फेरिस्ता कासिम, **हिस्ट्री ऑफ दि राईज ऑफ दि मोहमेडन पॉवर इन इंडिया**, (अनु. जॉन ब्रिग्ज), व्हॉ. III, अटलांटिक पब्लिशर्स, न्यू दिल्ली, १९८९, पृ.१४१-४२.

बहुतांश भागावर बुऱ्हाण निजामशहाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. बुऱ्हाण निजामशहाचा मृत्यू दिनांक ३० डिसेंबर १५५३ रोजी झाला. त्यानंतर त्याचा मुलगा मीरानशहा हुसैन हा दिनांक १ फेब्रुवारी १५५४ मध्ये हुसेन निजामशहा असा किताब धारण करून गादीवर आला.

इ.स.१५५९ नंतर अहमदनगरवर विसापूर, गोवळकोंडा व विजयनगरच्या सैन्याने आक्रमण केले. परंतु या संयुक्त सैन्यात फूट पडली. त्यामुळे हुसेन निजामशहाला वऱ्हाडच्या इमादशहाच्या मदतीने अहमदनगरचा वेढा उठविणे शक्य झाले. आदिलशाही व विजयनगरच्या सैन्याने आष्टी येथे तळ दिला. तेथे त्यांनी आपल्या सैन्याची एक तुकडी परांड्यावर व दुसरी तुकडी औसावर हल्ला करण्यासाठी पाठविली. यानंतर हुसेन निजामशहा व विजयनगरचा रामराजा यांच्यामध्ये तह झाला. इ.स.१५६२ मध्ये निजामशहावर रामराजा, आदिलशहा, अली बरीद व इमादशहा यांनी संयुक्तपणे हल्ला चढविला. त्यामुळे निजामशहाने आपला जनाना औसाच्या किल्ल्यात पाठविला.[६६] यावेळी औसाचा किल्लेदार खान तुर्कखान हा होता. त्याच्या काळात किल्ल्यातील लोहबंदी दरवाजा उभारण्यात आला. याची नोंद किल्ल्यातील शिलालेखात आहे.[६७] या शिलालेखात (सुहूर सन ९६६) इ.स.१५६५ अशी नोंद आहे. हुसेन निजामशहाचा मृत्यू दिनांक ६ जून १५६५ रोजी झाला. त्यापूर्वी आदिलशहा, कुतूबशहा, निजामशहा, बरीदशहा व मुघल यांनी एकत्र येऊन दिनांक २ जानेवारी १५६५ च्या तालिकोटच्या भीषण लढाईत विजयनगरचे साम्राज्य नष्ट केले होते. हुसेन निजामशहानंतर त्याचा मोठा मुलगा मुर्तझा निजामशहा हा गादीवर आला. याच्या कारकिर्दीत वऱ्हाडच्या इमादशाहीचा सरदार तुफालखानाने बंड पुकारून इमादशहाला कैदेत ठेवले होते. या बंडाचा बिमोड करण्यासाठी अली आदिलशहा आणि मुर्तजा निजामशहाने औसाच्या किल्ल्यात परस्परांची भेट घेतली.[६८] दोघांनी मिळून तुफालखानावर स्वारी करावी असे ठरले. ही मोहीम इ.स.१५६६-६७ मध्ये काढण्यात आली होती. त्यात तुफालखानाचा पराभव होऊन त्याने माहूरकडे माघार घेतली व नंतर गाविलगडचा आश्रय घेतला. याच सुमारास कंधार प्रांतात निजामशहाचे जे सैन्य होते, त्यावर कुतुबशहाच्या सैन्याने हल्ला केला. निजामशाही फौजांनी माघार घेतली. हे कळताच मुर्तजा निजामशहाने माहूरच्या वेढ्यात गुंतलेल्या सैन्यास घेऊन कंधारकडे जाऊन कुतुबशहाचा प्रतिकार करावा अशी वहिरीखानास आज्ञा दिली. या सैन्याने दिनांक ११ मे १५७३ रोजी कुतुबशाही सैन्याचा कौलास जवळ पराभव केला व ते सैन्य कंधार प्रांताकडे परत आले. निजामशहा यावेळी माहूर प्रांताकडे होता. दिनांक १२ एप्रिल १५७४ ला तुफालखानाला ठार करून निजामशाही सैन्याने वऱ्हाडवर ताबा मिळविला व इमादशाहीचा शेवट केला (दिनांक १५ एप्रिल १५७४). यावेळी निजामशाही सैन्याची काही पथके कंधार व उदगीर परिसरात होती.[६९]

या मोहिमेनंतर मुर्तजा निजामशहाने बिदरवर मोहीम काढली. अली बरीदने आपल्या वकिलामार्फत बोलणी करून ही मोहीम थांबविण्याचा प्रयत्न केला व त्यात त्याला यशही आले. युद्ध न होताच वेढा उठविण्यात आला. पुढे मुर्तजा निजामशहाचे सैन्य उदगीरच्या दिशेने रवाना झाले. यावेळी खानसाहेब हा सरदार या प्रदेशातील प्रजेचा छळ करत होता. त्याचा बंदोबस्त निजामशहाने केला व उदगीरला एक दिवस मुक्काम केला. तेथे एक सुंदर महाल बांधण्याचा आदेश दिल्याची नोंद त्या किल्ल्यातील इमारतीवरील

---

६६. फेरिश्ता, **गुलशने इब्राहिमी,** पृ.३१७.

६७. पठाण, यु.म., **मराठवाड्यातील मराठी शिलालेख,** डॉ.बा.आं.मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,१९८९. पृ.५९.

६८. कुंटे, भ.ग., **अहमदनगरची निजामशाही,** पूर्वोक्त, पृ.१४१.

६९. कित्ता, पृ.१७१ ते १७५.

शिलालेखात आहे. त्या फार्सी भाषेतील लेखातील मजकूर असा आहे- "शाहे आलम मुर्तजा निजामशहा सुलतानाच्या काळात या इमारतीचा भाग तयार झाला. ही इमारत या राजाच्या शुभ काळातच तयार होऊ शकली."[७०] इ.स.१५८४ मध्ये इब्राहिम आदिलशहाने अहमदनगरबरोबर युद्ध पुकारले व औसाच्या किल्लाला वेढा दिला. इब्राहिम आदिलशहाची बहीण खुदिला हिचा विवाह मीरान हुसेन निजामशहाबरोबर ठरविण्यात आला होता. हा विवाह लवकर करण्यात यावा म्हणून इब्राहिम आदिलशहाने हे युद्ध पुकारले होते.[७१]

मुर्तजा निजामशहाचा मृत्यू दिनांक १४ जून १५५८ या दिवशी झाला. यानंतर मीरान हुसेन निजामशहा हा मिर्जाखानाच्या मदतीने गादीवर आला. त्याने राज्यकारभाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. त्यामुळे प्रजेत असंतोष निर्माण होऊन बंड होण्याची परिस्थिती निर्माण झाली. वजीर मिर्जाखान आणि सरदार अंकुसखान यांच्यातील वैराने बंडाला खतपाणी घातले. याचा परिणाम म्हणून अहमदनगर येथे परदेशी मुसलमानांची कत्तल झाली. मीरान हुसेनचा खून झाला व त्याच्या जागी बुऱ्हाण निजामशाह दुसरा याचा मुलगा ईस्माईल हा दिनांक १ एप्रिल १५८९ रोजी गादीवर आला. ईस्माईल बादशहाचा बाप बुऱ्हाण निजामशहा (दुसरा) हा बंगश (बंगश हे गाव हिंदुस्थान आणि काबूलच्या दरम्यान आहे) येथे मुघलसम्राट अकबराच्या चाकरीत होता.[७२] अकबराच्या मदतीने तो दक्षिणेत आला. खांडवा येथे आल्यावर त्याने दक्षिणेतील इतर सुलतानांची मदत मागितली. त्याप्रमाणे इब्राहिम आदिलशहा मदतीस आला. त्याच्या मदतीने त्याने ईस्माईल निजामशहाचा सेनापती जमालखानास दिनांक ७ मे १५९१ रोजी ठार केले. आपल्या मुलाला सिंहासनावरून हुसकावून तो स्वत: बादशहा झाला. बुऱ्हाण निजामशहा (दुसरा) याचा मृत्यू दिनांक १५ मे १५९४ रोजी झाला. त्याच्यानंतर इब्राहिम निजामशहा गादीवर आला. परंतु दिनांक २२ ऑगस्ट १५९५ रोजी झालेल्या चकमकीत तो मारला गेला. यानंतर अहमदनगर राज्यावर मुघलांचे आक्रमण सुरू झाले. या वेळी अहमदनगरच्या गादीसाठी चार गट निर्माण झाले होते.[७३] पहिला गट सरदार मियामंजू आणि अहमदशहा यांचा होता. अहमदशहा यावेळी औसा येथे होता. तेथून त्याने इब्राहिम आदिलशहा आणि मोहम्मद कुतुबशहा यांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. दुसरा गट चांदबिबी व इब्राहिम निजामशहाचा मुलगा बहादूर याचा होता. तिसरा गट इखलासखानाचा होता. त्याने दौलताबाद नजीक छावणी दिली होती व तेथून मोती नावाच्या एका मुलाला पुढे करून तोच अहमदनगरच्या गादीचा कायदेशीर वारस आहे असे जाहीर केले होते. चौथा गट नेहंगखान हबशी याचा होता. तो आदिलशाही मुलुखात अज्ञातवासात होता. तेथे पहिल्या बुऱ्हाण निजामशहाचा मुलगा शहाअली याने त्याला विजापूरमधील अज्ञातवासातून बाहेर पडून बादशहा होण्यास प्रवृत्त केले होते.

दिनांक २३ डिसेंबर १५९५ ला मुघलांच्या आक्रमणामुळे मियामंजू अहमदनगर किल्ला सोडून बीड प्रांताकडे निघून गेला. त्यानंतर अहमदनगरच्या किल्ल्याची सुत्रे चांदबिबीने आपल्या हातात घेतली. चांदबिबीने अहमदनगरचा किल्ला मोठ्या शौर्याने लढविला. परंतु किल्ल्यात रसद कमी असल्यामुळे चांदबिबीने मुघलांशी तह केला. त्या तहानुसार वऱ्हाड प्रांत मुघलांना देण्यात आला.[७४] परंतु चांदबिबीच्या खुनानंतर अहमदनगरचा किल्ला दिनांक १९ ऑगस्ट १६०० रोजी मुघलांच्या ताब्यात गेला. निजामशाही बादशहा व राजघराण्यातील सर्वांना कैद करण्यात आले. तथापि, आपला बादशहा कैद झाला, तरी त्याची तमा न बाळगता निजामशाही

७०. राठोड, रा.था., पूर्वोक्त, **उदगीर: इतिहास आणि स्मारके,** पृ.१५-१६.

७१. फेरिश्ता, **गुलशने इब्राहिमी,** पृ.३३५.

७२. कित्ता, पृ.३४५.

७३. कित्ता, पृ.३५७, ३५८, आणि **हिस्ट्री ऑफ दि राईज ऑफ दि मोहमेडन पॉवर इन इंडिया**, व्हॉ. III (अनु. जॉन ब्रिग्ज) पृ.१७९.

७४. कुलकर्णी, गो.त्र्यं., (संपा.), **मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास,** पूर्वोक्त, पृ.१४९, १५०.

सरदारांनी शहा अलीचा मुलगा मुर्तजा निजामशहा दुसरा याच्या नावाने सुलतान म्हणून द्वाही फिरविली आणि काही काळ परांड्याला आपली राजधानी स्थलांतरित केली.

भूतपूर्व निजामशाही राज्यातील ज्या दोन व्यक्तींनी आपले धाडस आणि कर्तृत्व याच्या बळावर लौकिक कमाविला, त्यापैकी एक म्हणजे मलिक अंबर हा हबशी सरदार व दुसरा मियामंजू (राजू) दख्खनी. या दोघांनी यावेळी दक्षिणेत असलेल्या प्रचंड मुघल फौजेपासून निजामशाही राज्य वाचविले होते. पुढे या दोन सरदारांत मतभेद झाले. आपली राजनिष्ठा व्यक्त करण्यासाठी त्यांनी मुर्तजा निजामशहाच्या वास्तव्यासाठी औसाचा किल्ला दिला. याशिवाय त्यास बीड, धारूर आणि औसा व काही खेड्यांचा महसूल नेमून देण्यात आला.[७५] इ.स.१६०२ मध्ये निजामशाही राजधानी औसा येथे होती.[७६] या काळात मुर्तजा निजामशहाबरोबर आजमखान, मलिक हसन, सोहर, जोहरखान असे काही परदेशी सरदार होते.[७७] याच सुमारास व्यंकटराव कोळी, फरहादखान, मोवलिद आणि मलिक संदाल खोजासरा यांनी व इतर काही सरदारांनी मलिक अंबरची साथ सोडली आणि ते औसा येथे दुसऱ्या मुर्तजा निजामशहास जाऊन मिळाले. तेथे त्यांनी मोठी फौज जमविली. आपल्याला सोडून गेलेल्या या सरदारांवर मलिक अंबरने औसा किल्ल्याच्या तटबंदीखालीच हल्ला करून त्यांची पांगापांग केली. या लढाईत व्यंकटराव कोळी याला मलिक अंबरने कैद केले. इतर सरदार मुर्तजा निजामशहास घेऊन किल्ल्यात पळून गेले. दुसऱ्या दिवशी त्यांनी मलिक अंबरबरोबर तह केला.[७८] या काळातच मलिक अंबरने औसाचे नाव अंबरपूर असे ठेवलेले असावे.[७९] परंतु पुढे औसा, हेच नाव कायम राहिले.[८०] मुर्तजा निजामशहाच्या वास्तव्याच्या काळात येथील तोफांवर निजामशहाची नावे कोरलेली आहेत. औसा किल्ल्याच्या तटबंदीची दुरूस्ती मुर्तजा निजामशहाने केली. औसा किल्ल्याच्या पश्चिमेकडील बुरूजावर दोन शिलालेख आहेत. यात मुर्तजा निजामशहाचे नाव व शके १५२९ असा उल्लेख आहे. या शिलालेखांत आजमखान, मलिक हसन, सोहर, जोहरखान अशा निजामशाही सरदारांची ही नावे आहेत.[८१] औसाच्या तहानंतर मलिक अंबरने निजामशाही राजधानी परांड्यास आणली. पुढे इ.स.१६०७ नंतर जुन्नरला निजामशाहीची राजधानी बनविण्यात आले. दरम्यान मलिक अंबर व मियामंजू या दोन सरदारांत दौलताबाद येथे लढाई होऊन त्यात मियामंजूचा पराभव झाला व त्याला कैद करण्यात आले. त्यानंतर निजामशाही राजधानी दिनांक ३० जानेवारी १६१० रोजी दौलताबाद येथे हलविण्यात आली.[८२] त्यामुळे मुघलांबरोबर असलेला संघर्षाचा केंद्रबिंदू दौलताबाद (नवीन राजधानी) कडे सरकला.

विजापूरची आदिलशाही : दक्षिणेत बहमनी सत्ता स्थापन झाल्यापासून या भागावर बहमनींचे राज्य होते. पुढे बहमनींच्या ऱ्हासानंतर अहमदनगर येथे निजामशाही, बिदर येथे बरीदशाही, वऱ्हाडात इमादशाही, गोवळकोंडा येथे कुतुबशाही आणि विजापूर येथे आदिलशाही अशा पाच शाह्या उदयास आल्या. या सर्व

---

७५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.६४.

७६. तामसकर, बी.जी., **लाईफ ॲण्ड वर्क ऑफ मलिकअंबर**, दिल्ली, १९७८, पृ.३३३ आणि फेरिस्ता कासिम पूर्वोक्त, पृ. १८९.

७७. बेग, मिर्झा आगा, **हकिकते मलिकअंबर** (उर्दू), औरंगाबाद, १९९१, पृ.८७.

७८. फेरिश्ता, **गुलशने इब्राहिमी,** पृ.३७१.

७९. **इम्पेरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया**, **प्रोव्हिन्शियल सिरीज, हैद्राबाद स्टेट गॅझेटिअर**, कलकत्ता, १९०९, पृ.२७०.

८०. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७५५.

८१. बेग, मिर्झा आगा, उपरोक्त, पृ.८७. बशीरूद्दीन, अहमद, **वाकियाते मुमालिकते विजापूर** (उर्दू), हैद्राबाद, १९१५, पृ.७९.

८२. तामसकर, बी.जी., पूर्वोक्त, **लाईफ ॲण्ड वर्क ऑफ मलिकअंबर**, पृ.२३३.

शाह्यांमध्ये सतत संघर्ष होत राहिले. त्यात आदिलशाही सर्वात जास्त प्रभावी राहिली.[८३] या घराण्याचा संस्थापक अबुल मुजफ्फर युसूफ आदिलशहा हा बादशाही घराण्यातील होता. बिदर येथे बहमनी राज्याचा वजीर महमूद गावानाने शाही शरीररक्षक दलात त्याची नेमणूक केली.[८४] आपल्या अंगच्या हुशारीमुळे युसूफ आदिलशहाने कर्तृत्व गाजविले. पुढे परदेशी आणि दक्षिणी मुसलमानांच्या यादवीत परदेशी सरदार व सैनिकांचे नेतृत्व करून व संधी साधून विजापूर येथे स्वतंत्र राज्याची स्थापना केली.[८५] महमूद गावानने त्याला पुत्रवत मानले होते. बहमनीचा राज्यकारभार सुरळीतपणे चालावा यासाठी महमूद गावानने बहमनी राज्याची विभागणी आठ प्रांतात केली होती. त्यावेळी दौलताबाद प्रांतावर युसूफ आदिलशहा, माहूरवर खुदावंदखान हबशी व अहसनाबाद, गुलबर्गा, सागर, नळदुर्ग आणि सोलापूर या भागावर दस्तुर दिनार याची नेमणूक केली होती. यातील नळदूर्ग प्रांतात सध्याच्या लातूर जिल्ह्याचा काही भाग होता. महमूद गावानच्या मृत्युनंतर त्याची विजापूरची जहागीर युसूफखानला देण्यात आली.[८६] इ.स.१४८९ मध्ये युसूफ आदिलशहाने बहमनीपासून दूर होऊन स्वतंत्ररित्या राज्यकारभार करावयास सुरुवात केली. आपल्या नावाने सार्वजनिकरित्या खुत्बा वाचला. इ.स.१४९२ मध्ये कासीम बरीदने औसा, उदगीर व कंधारचा किल्ला बळकावला होता. कासीम बरीदनंतर अमीर बरीदकडे उदगीर व औसा हे किल्ले होते. इ.स.१५२८-२९ मध्ये ईस्माईल आदिलशहाने बिदरवर हल्ला केला. त्यावेळी अमीर बरीद उदगीर येथे होता.[८७] आदिलशाही सरदार असदखान याने आपल्या शौर्याच्या जोरावर अमीर बरीदचा पराभव केला. अमीर बरीदला कैद करण्यात आले.[८८] एक वर्षानंतर आदिलशहाने अमीर बरीदला कैदेतून सोडले. मात्र बिदरवर आपले मांडलिकत्व प्रस्थापित केले. पुढे इ.स. १५४७ साली बुऱ्हाण निजामशहाने उदगीर व औसा हे किल्ले जिंकले. लातूर जिल्ह्यातील निलंग्याचा किल्ला व परिसरावर आदिलशहाचे वर्चस्व होते.

नळदुर्ग, तुळजापूर, उमरगा, निलंगा, धाराशिव, ढोकी, तेर, गुंजोटी, लोहारा, देगलूर हा प्रदेश विजापूरच्या आदिलशाहीत तर, भूम, परांडा, औसा, लातूर, उदगीर, रावणगाव, वडवळ,[८९] राजूर (अहमदपूर), कळंब, बीड, गेवराई, आष्टी, पाटोदा, अंबाजोगाई, रेणापूर, सिरसाळा, केज (धारूर), दौलताबाद, खडकी, औरंगाबाद, जालना, जाफराबाद, सिल्लोड, अजिंठा, कन्नड, वैजापूर, गंगापूर हा प्रदेश अहमदनगरच्या निजामशाहीत मोडत होता.

कोंदि-द-लिज्ज्यारिस या पोर्तुगीज विजरईने आपल्या रोजनिशीत १० मे १६३४ या तारखेखाली पुढील प्रमाणे नोंद केली आहे-- "एक लाख महसुलाचा निलंग्याचा किल्ला व प्रदेश, त्याचबरोबर निजामशहाच्या सिद्दी रैहान नावाच्या बंडखोर सरदाराकडे सहा लाख पॅगोडे महसुलाचा सोलापूरचा प्रदेश आणि एक लाख महसुलाचा औसा किल्ला यांचा पूर्ण कब्जा आहे. पण तेथे तो आदिलशाही सरदार म्हणून आहे. त्यात तो त्याच्या मनुष्याखेरीज इतरांना येऊ देत नाही."[९०]

---

८३. सरदेसाई, गो.स., **मुसलमानी रियासत**, पुणे, १९२७, पृ.२६०.

८४. फेरिश्ता, **गुलशने इब्राहिमी,** पृ.३७५, ३७७.

८५. मजुमदार, आर.सी., (संपा.), **दि मुघल एम्पायर,** मुंबई, १९७४, पृ.४४५.

८६. मोडक, बा.ह., (अनु.), **बहामनी उर्फ ब्राह्मणी राज्याचा इतिहास** (गुलशने इब्राहिमी-फेरिश्ता लिखित), पृ.१९७-१९८.

८७. राठोड, रा.था., **उदगीर:इतिहास आणि स्मारके,** पूर्वोक्त, पृ.१३.

८८. बेंद्रे, वा.सी., **विजापूरची आदिलशाही,** मुंबई, १९६८, पृ.४५.

८९. वडवळ परगणा इ.स.१५४८ मध्ये आदिलशाहीत होता. काळे, ल.गो., **मोगल अमलातील मराठवाडा**, मराठवाडा इतिहास परिषद, खंड-१, औरंगाबाद, १९८५, पृ.७४.

९०. मेंहदळे, गजानन, **राजा शिवछत्रपती**, खंड-१, भाग-१, मेहंदळे प्रकाशन पुणे, १९९६, पृ.५३५, ५३६.

अनुक्रमणिका

औसावर आदिलशहाचा ताबा काही काळच असावा. कारण पुढे दिनांक १९ ऑक्टोबर १६३६ रोजी औरंगजेबाने त्यावेळचा निजामशाही किल्लेदार भोजपाल याच्याकडून तो जिंकला होता.[९१]

औसा येथील किल्ल्यामध्ये "अमल ऊ साज दौलत आदिल" अशा आशयाचा एक लेख आढळतो. हा लेख औसा किल्ल्यावर आदिलशहाचे वर्चस्व निर्माण झाल्यावर कोरला असावा.[९२]

निलंगा पगरण्यासंबंधी फर्मान[९३] : मुहम्मद आदिलशहा, अली आदिलशहा दुसरा आणि सिकंदर आदिलशहा यांच्या इ.स.१६३५ ते १६७२ या एकत्रित काळातील ६२ फर्मानांचा एक गठ्ठा निलंगा येथे काही वर्षांपूर्वी प्राप्त झाला. या कागदपत्रांमध्ये तत्कालिन राजकीय इतिहास फारच त्रोटकपणे नोंदलेला असला, तरी त्यातून आदिलशाही प्रशासनाचे स्वरुप व राज्याच्या महसुलाचे स्रोत यांची माहिती मिळते. या काळात आदिलशाही प्रशासन अस्थिर व डळमळीत असले, तरी काळाच्या गरजेप्रमाणे बदलत असल्याचेही या फर्मानांमधून जाणवते. काही अधिकाऱ्यांना, व्यक्तिंना विविध वतने देणे, तर काहींची वतने, इनाम रद्द करणे, पुन्हा देणे असे प्रकार आदिलशाहीत प्रचलित होते. याचे एक उत्तम उदाहरण या फर्मानांमध्ये आढळते. कोयाजी जसवंतराव घाटगे हा इ.स.१६३६ मध्ये मरण पावल्यावर तीन आठवड्यात त्याचे निलंगा परगण्यातील २९ खेड्यांचे वतन रद्द करण्यात आले. परंतु दुसऱ्या फर्मानाद्वारे तीन आठवड्यात ते वतन त्याच्या पुत्राला बहाल करण्यात आले (फर्मान नं.२ व ३). संपूर्ण निलंगा परगणा घाटगे बंधूंना मोकासा म्हणून दिलेला होता. इ.स.१६४२ मध्ये तो त्यावरील सर्व अधिकार-हक्कांसहीत राजघराण्याकडे वर्ग करण्यात आला. तथापि, हा आदेश पाच आठवड्यानंतर रद्द करुन पुन्हा तो परगणा घाटगेंकडेच देण्यात आला. पुन्हा दुसऱ्याच आठवड्यात या परगण्याचे मोकासा अधिकार राजकुटुंबाला देण्यात आले (फर्मान नं.८, ९, १०). त्यानंतर पुन्हा हे अधिकार घाटगेंना देण्यात आले (नं.११). अशाप्रकारे इनाम वतने रद्द करून ती दुसऱ्या किंवा याच व्यक्तिंना देण्याचे प्रकार या काळात वारंवार होत होते. (फर्मान नं.१४ ते १६, ५१ ते ५३ व ५५ ते ६२).

वरील उदाहरणांवरून या परगण्यात आदिलशाही प्रशासन कसे उदासीन होते हे समजून येते. या दस्तऐवजांवरून दिसून येते की, परगण्याचे मोकासा अधिकार एखाद्यास देतांना त्यासंबंधी काही हक्क राजा स्वत:कडे राखून ठेवत असे व त्याबदल्यात वतनदार व इनामदारांना काही कर व अधिकारात सूट देत असे.

या परगण्यातील काही खेडी सेनाधिकारी, सरकारी अधिकारी किंवा धार्मिक कार्य पार पाडणाऱ्या व्यक्तिंच्या पगारासाठी राखून ठेवण्यात आली होती. काही वेळा मोकासदारांच्या उत्पन्नाचे स्रोत वतनदार किंवा राज्याचे अधिकारी जाणूनबुजून बळकावित व उत्पन्न मिळवित. प्रशासनातील अशा प्रकारचा अडथळा दूर करण्यासाठी राजाची फर्माने निघत. थोडक्यात, निलंगा परगण्यातून महसूल किंवा अन्य कर गोळा करणे सोपे काम नव्हते. तसेच मध्यवर्ती सत्ता कमजोर झाल्याने राजा काहीवेळा राजकीय दबावापोटी अशी फर्माने काढीत असे व ती अल्पावधीत रद्दही करीत असे असे दिसते. पण याचा विपरित परिणाम राज्याच्या तिजोरीवर होत असे.

---

९१. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.६९. वाकियाते मुमलिकते विजापूर या ग्रंथात अली आदिलशहाच्या काळात जमादार इहतशाम याची औसा किल्ल्याचा किल्लेदार म्हणून माहे रमजान ९१० हिजरी: (इ.स.१५०३) रोजी नियुक्ती केल्याची नोंद आहे, पण हा काळ जुळत नाही.

९२. दहेलवी, बशीरुद्दीन अहमद, **वाकियाते मुमालिकते विजापूर**, हैद्राबाद, १९१५, पृ.७९.

९३. कुलकर्णी, ए.आर.ॲण्ड,पी.बी.देशपांडे, **निलंगा फर्मान्स** पृ.२२८-२३६. बुलेटिन ऑफ दि डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूट, व्हॉ. XXXI, पार्ट-I, १९७०-७१, पार्ट-२, १९७१-७२, पुणे-१९७३.

या फर्मानांचा उपयोग त्या काळात प्रचलित असणाऱ्या २० प्रकारच्या करांची माहिती करून घेण्यासाठी होतो. तत्कालिन मराठी कागदपत्रांतून अशा कित्येक करांची नोंद आढळते. १७ व्या शतकात निलंगा परगण्यात जकात तेपबर्ग, तंबाकू, निकलू, थळमोड, पैसालू, थलभरीत विसवा, फस्की, सेवा, युद्धकर अशा प्रकारचे १३ पेक्षा जास्त कर, व सुलेमान पट्टी, सदिरवार, मेजबानी, पायपोशी, कोतवाली, ठाणेदारी, पोतदारी, रोजमास, नेक सारखे अन्य करही असावेत. ते या फर्मानांमधून ज्ञात होतात. याशिवाय काही करांचे दरही समजतात. राजाशी संबंधितही काही विशेष कर होते. असे असले तरी, हे कर नियमित गोळा केले जात की नाहीत, तसेच करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची टक्केवारी किती हे या दस्तऐवजांवरून समजत नाही.

मुघल कालखंड (इ.स.१६३६ ते १७२४) : मुघलांनी इ.स.१६०० मध्ये अहमदनगरचा किल्ला जिंकून घेतला आणि निजामशाही समाप्त झाल्याची घोषणा केली. परंतु निजामशहाचा सुप्रसिद्ध सेनापती मलिकअंबर याने मुघलांचा प्रखर प्रतिकार केला. जहांगीरच्या काळात मुघलांच्या मोहिमांना पाहिजे तसे यश येईनासे झाले. मलिकअंबरच्या मृत्यूपर्यंत मुघल वऱ्हाड ओलांडून बीड जिल्ह्यापर्यंत येऊ शकले. पण निजामशाही पूर्णपणे खालसा करणे शक्य झाले नाही. उलट मलिकअंबरने वऱ्हाड, बुऱ्हाणपूर, गुजरात या प्रांतांत धडका मारून मोगलांना हैराण करून सोडले.[९४] मलिकअंबरचा मृत्यू (इ.स.१६२६) झाल्यानंतर वर्षभराने जहांगीर मरण पावला.[९५] त्याच्या जागी शहाजहान गादीवर आला. त्याच्या कारकिर्दीत त्याचा दक्षिणेतील सुभेदार खानजहान लोधी याने बंड केले. ते मोडून शहाजहानने निजामशाही पूर्णपणे संपवून टाकण्याचा प्रयत्न केला. निजामशहाचा वजीर फत्तेखानने दुसऱ्या मुर्तजा निजामशहाला ठार मारले व हुसेन नावाच्या दहा वर्षाच्या एका मुलास गादीवर बसवून त्याच्या नावे खुत्ब्याचे वाचन केले (१६३२). यानंतर मुघल सेनापती महाबतखानाने दि. १७ जून १६३३ रोजी दौलताबादचा किल्ला ताब्यात घेतला. हुसेन निजामशहास कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यात पाठविण्यात आले.[९६] याचवेळी शहाजीराजे भोसले यांनी निजामशाही घराण्यातील एका राजपुत्राला बादशहा म्हणून जाहीर करून लढा चालू ठेवला. लातूर जिल्ह्यातील उदगीर, औसा ही ठिकाणे निजामशाही सरदारांच्या ताब्यात होती. या ठिकाणांचा ताबा मुघलांच्या हाती देण्यास ते तयार नव्हते. या सर्व घडामोडींचे केंद्र परांडा हे ठिकाण होते.[९७]

निजामशाही सल्तनतीच्या अवशिष्ट भागाविरूद्धच्या मोहिमेचे स्वतः सूत्रसंचालन करावे असे ठरवून शहाजहान दि. २० सप्टेंबर १६३५ रोजी अकबराबादहून (आग्रा) निघाला. दि. ४ जानेवारी १६३६ रोजी त्याने हांडिया येथे नर्मदा पार केली. आदिलशहाने शहाजीला व इतर निजामशाही बंडखोरांना मदत करणे थांबवावे आणि नवरोजपर्यंत (म्हणजे दि. १० मार्च १६३६ पर्यंत) दौलताबादला पोहोचेल अशा बेताने खंडणी पाठवून द्यावी अशी मागणी करणारे एक फर्मान शहाजहानने हांडिया येथून दि.१ जानेवारी १६३६ रोजी मक्रमतखानाबरोबर आदिलशहाकडे पाठवून दिले. त्यावर आदिलशहाने पाठविलेले शेख दबीर व अन्य वकील दि. १९ जानेवारी १६३६ रोजी शहाजहानला भेटले. त्यानंतर निजामशाही मुलूख काबीज करण्याकरिता ५ फेब्रुवारी १६३६ रोजी शहाजहानने दौलताबादच्या परिसरातून खानदौरान, खानजहान आणि शायस्ताखान यांच्या हाताखाली

---

९४. मजुमदार, आर.सी., **दि मुघल एम्पायर**, पृ.४३५-४४४.

९५. एलियट ॲण्ड डॉसन, **दि हिस्ट्री ऑफ इंडिया ॲज टोल्ड बाय इट्स ओन हिस्टोरियन्स,** व्हॉ.६, पृ.४३५-४३८.

९६. कुंटे, भ.ग., (अनु.), **दिल्लीच्या शहाजहानचा इतिहास** (मूळ लेखक-बी.पी-सक्सेना), मुंबई, १९८९, पृ.१६९-१७७.

९७. कित्ता, पृ.१७७.

फौजेच्या तीन तुकड्या रवाना केल्या. खानदौरान यांच्या हाताखाली सुमारे २० हजार स्वारांची एक फौज रवाना केली. तिची बक्शीगिरी व वाकियानवीस इसहाक बेग याला दिलेली होती.[९८] इकडून आदिलशहाने मीर अबुल हसन आणि काजी अबू सईद हे आणखी दोन वकील शहाजहानकडे पाठविले. त्यांनी दि.१ एप्रिल १६३६ रोजी शहाजहानची भेट घेतली. त्यांना दि. ६ मे १६३६ रोजी शहाजहानने विजापूरला परत जाण्याची अनुज्ञा दिली.[९९] त्यांच्या सोबत त्याने आदिलशहाला दि. १४ मे १६३६ च्या सुमारास एक अभयपत्रवजा फर्मान पाठविले होते. हे फर्मान आदिलशहास दि. २० मे १६३६ रोजी मिळाले.[१००] या द्वारे बादशहाने आदिलशहाला राज्यकारभाराबाबत विविध अटी घालून आपल्या अंकित करून ठेवले होते. पण नाईलाजाने या फर्मानावर आदिलशहाने सही-शिक्का करून ते मुक्रमतखानाबरोबर हिरे, माणिके, हत्यारे, हत्ती वगैरे पेशकशीसह दि. १ जून ला परत केले.[१०१]

खानदौरानची स्वारी (मार्च-जून १६३६)[१०२]: वरील घटनेपूर्वी शहाजहानच्या हुकूमावरून खानदौरान कंधारला पोहोचला. आपल्या रसदीच्या मार्गाच्या रक्षणासाठी ठिकठिकाणी ठाणी बसविल्यानंतर त्याने उदगीरकडे कूच केले. बिदरच्या बाजूने आदिलशाही मुलुखात आक्रमण करून तो उद्ध्वस्त करावा असा शहाजहानचा हुकूम दि. ६ मार्च १६३६ रोजी खानदौरानला तो उदगीर पासून एक कोसावर असताना मिळाला. तेव्हा त्याने आपले सामानसुमान मांजरा नदीच्या काठी ठेवले आणि ९ मार्चच्या रात्रीच्या प्रारंभी तिथून कूच करून तो सकाळी कल्याणीला थडकला. कल्याणी लुटून तो भालकीच्या किल्ल्यात आला. आजुबाजूचा प्रदेशही त्याने उद्ध्वस्त केला. या सुमारास बहलोलखान, याकूत व रणदौलाखानाचा चुलता खैरियतखान हे आदिलशाही फौज घेऊन बिदरजवळ पोहोचले आणि तेथून त्यांनी दोन हजार स्वार खानदौरानच्या फौजेवर पाठविले. खानदौरानच्या फौजेतील आघाडीच्या तुकडीचा सरदार जयसिंह याने त्यांना पिटाळून लावले. त्यानंतर खानदौरान भालकीहून उदगीरपासून तीन कोसावरील देवणी या गावी आला. तेथून त्याने आपले सामानसुमान नांदेडला पाठविले व तो विजापूरला गेला. विजापूरकरांनी शाहपूरचा तलाव फोडून टाकला आहे आणि तेथे अन्नपाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले आहे असे मुक्रमतखानाचे पत्र खानदौरानला फिरोजाबादला मिळाले. नंतर त्याने कुतुबशाही सीमेपर्यंतचा आदिलशाही मुलूख उद्ध्वस्त केला. मुघल सरदार सय्यद खानजहान यास प्रतिकार करीत असलेल्या रणदौलाखानाच्या मदतीकरिता शत्रुची एक फौज आपल्यापासून बारा कोसांवरून जात आहे अशी बातमी खानदौरानला येथे समजली. म्हणून त्याने तेलंगणातील कोतकुरच्या किल्ल्यात आपले सामान ठेवले व शत्रुला गाठण्यासाठी त्याच दिवशी सोळा कोस अंतर कापून तो देगलूरला आला. दुसऱ्या दिवशी चोवीस कोसांची मजल मारून व उदगीरचा घाट ओलांडून तो औसाजवळ येऊन पोहोचला. शत्रुची फौज येथून जवळच आहे अशी बातमी त्याला दुसऱ्या दिवशी मिळाली. म्हणून त्याने रात्री तेथेच मुक्काम केला. रणदौलाखान सोलापूरकडे माघार घेत आहे, अशीही बातमी त्याच दिवशी मिळाली. 'आदिलशहाने तह केला आहे, त्यामुळे खानदौरानने यापुढे आदिलशाही मुलुखाची खराबी करू नये आणि उदगीर व औसा हे किल्ले काबीज करावेत' असे शहाजहानचे फर्मान खानदौरानला याच वेळी मिळाले म्हणून दि. १७ जून १६३६ रोजी त्याने उदगीरच्या रोखाने कूच केले.

---

९८. मेहंदळे, गजानन, पूर्वोक्त, **राजा शिवछत्रपती,** पृ.३९४, ४०१, तळटीप-१४२५.

९९. कित्ता, पृ. ५४९ ते ५५१.

१००. कित्ता, पृ.५६२-५६४, वा.सी.बेंद्रे यांच्या **मालोजीराजे आणि शहाजीराजे** या ग्रंथात फर्मानाची तारीख २० मे १६३५ अशी आहे. पहा. पृ.३०७, ३०९.

१०१. बेंद्रे, वा.सी., **मालोजीराजे आणि शहाजीराजे,** पुणे, १९६०, पृ.३०७-३१०.

१०२. मेहंदळे, गजानन, पूर्वोक्त, **राजा शिवछत्रपती,** पृ.५५२ ते ५५३.

सय्यद खानजहानची स्वारी : मार्च-मे १६३६[१०३] : निजामशाही विरूद्धच्या मुघलांच्या मोहिमेतील सय्यद खानजहान शाहगड व बीडमार्गे धाऊरला आला. त्याने दिनांक २४ ते २६ मार्च या काळात शिरढोण काबीज केले. दि. २७ मार्च १६३६ ला तो धाराशिव येथे आला. त्यानंतर दि. २ एप्रिल १६३६ रोजी रणदौलाखान याजबरोबर त्याची लढाई झाली. त्यानंतर दि. १९ एप्रिल १६३६ ला त्याने औसापासून दोन कोसावर छावणी केली. या छावणीवर शत्रुने दि. २६-२७ एप्रिलच्या रात्री तीन प्रहरी (सुमारे तीन वाजता) दारूचे बाण सोडण्यास सुरुवात केली. परंतु मुघल सैन्य सतर्क होताच शत्रू पळून गेला. मुघलांनी त्यांचा दोन वेळेस पाठलाग केला. पावसाळा जवळ आल्यामुळे खानजहानने बीडकडे जाण्याचे ठरविले. परंतु शहाजहानने खानजहानला बोलाविल्यामुळे तो आपल्या काही मनसबदारांसह धारूरला गेला व तेथून दि. ३० मे १६३६ रोजी औरंगाबादला दरबारी पोहोचला.

दौलताबाद येथे शहाजहानने आपल्या सैन्याचे तीन विभाग केले होते. त्यापैकी खानदौरान आणि राजा जयसिंग याच्या हाताखाली बारा हजार सैनिकांची एक तुकडी विजापूर व गोवळकोंडा यांच्या संयुक्त सरहद्दीवर नजर ठेवण्यासाठी म्हणून कंधार आणि नांदेडकडे पाठविली. शत्रूकडून धोक्यात आलेल्या ठिकाणांना कुमक पोहचविण्यासाठी आणि उदगीर व औसा यांचा पाडाव करण्याच्या तयारीत राहण्याचा आणखी एक हुकूम या तुकडीला देण्यात आला होता.

उदगीरचा पाडाव (२८ सप्टेंबर १६३६) : आदिलशहाकडून शरणागती मिळविल्यावर राजपुत्र औरंगजेब याची दक्षिणेचा सुभेदार म्हणून नियुक्ती करून शहाजहानने दौलताबाद सोडले. शहाजीच्या ताब्यातील अनेक ठिकाणांचा ताबा घेतल्यावरही, शहाजीच्या हालचाली अजून मुघलांच्या आवाक्यापलीकडच्या आहेत असे औरंगजेबाला आढळून आले. उदगीर व औसा हे किल्ले शत्रूच्या ताब्यात होते. विजापूरकरांशी तह झाल्यानंतर खानदौरानने या किल्ल्यांचा ताबा शांततेच्या उपायांनी मिळविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यात अपयश आले. त्यामुळे त्याने उदगीरवर हल्ला करण्याचे ठरविले व दि. १७ ऑगस्ट १६३६ रोजी किल्ल्याला वेढा दिला. त्याने किल्ल्याच्या तटबंदीखाली सुरुंग पेरले आणि त्यापैकी एकाला बत्ती दिली. त्यामुळे तटबंदीला खिंडार पडले. पण आत घुसण्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग नव्हता. मुघलांनी एकदम हल्ला केल्यास किल्ल्यात असलेल्या दुसऱ्या इब्राहिम आदिलशहाच्या नातवाला धोका पोहोचू नये म्हणून त्याने इतर सुरुंग उडविले नाहीत. त्याऐवजी त्याने किल्ल्यातील शिबंदीच्या एका प्रतिनिधीला बोलावून घेतले आणि त्याला आपली सर्व सैनिकी तयारी व तटबंदीची अवस्था दाखविली. हा प्रतिनिधी किल्ल्यात परत गेल्यानंतर त्याने किल्लेदाराला किल्ल्याच्या तटबंदीच्या भयंकर अवस्थेबद्दल सांगितले. त्यामुळे तेथील किल्लेदार सय्यद मिफ्ताह हबशी याने दि. २८ सप्टेंबर १६३६ रोजी शरणागती पत्करली.[१०४] मुघलांनी उदगीरचा किल्ला २८ सप्टेंबर १६३६ रोजी जिंकला याचा उल्लेख उदगीरच्या किल्ल्यातील काळ्या दगडाच्या कमानीच्या डाव्या बाजूस फार्सीमध्ये एका शिलालेखात आहे.[१०५] हा लेख लिहिणाऱ्याचे नाव जैनोल आबेदिन असे आहे आणि लेखाच्या चारही कोनात यामोईन, याफताह, यारफी, याकरीम अशी पवित्र नावे कोरलेली आहेत. मराठीमध्ये या लेखाचा अर्थ खालीलप्रमाणे आहे.—

'शहाजहानच्या काळात दिनांक सात जमादिउल आवलला (हिजरी-१०४६, इ.स.१६३७) या शुभवेळी उदगीरच्या किल्ल्याचा फत्ता बुरुज शहाजहानच्या हुकुमान्वये जिंकला गेला आणि त्याच महिन्याच्या चार तारखेला ह्या शाही घराण्याचा गुलाम मोगलखाँ जैनखाँ कोका यांच्या ताब्यात दिला गेला. या किल्ल्याचा संपूर्ण अधिकार हिजरी-१०४७ (इ.स.१६३८) मध्ये घेतला गेला.'

---

१०३. मेहेंदळे, गजानन, पूर्वोक्त, पृ.५४४.

१०४. सय्यद, अनिस जहान, **औरंगजेब**, सोमय्या पब्लिकेशन्स प्रा.लि., मुंबई, १९७७, पृ.१८.

१०५. राठोड, राजाराम, पूर्वोक्त, पृ.१७.

अनुक्रमणिका

हा लेख ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचा आहे. इ.स.१६३६ ला शहाजहानने खानदौरान याला उदगीर किल्ला हस्तगत करण्यासाठी पाठविले होते. या लेखामध्ये फक्त तारखेची चूक दिसते, ती म्हणजे सात जमादिउल आवल १०४६ ला किल्ला जिंकला गेला आणि त्याच महिन्याच्या चार तारखेस तो मोगलखाँ कोकाच्या ताब्यात दिला गेला. कदाचित हा किल्ला दिनांक चार जमादिउल आवलला जिंकला गेला असावा आणि त्याच महिन्यात सात तारखेला मोगलखाँच्या ताब्यात दिला असावा. यावेळी मुघलांतर्फे खानदौरान, नसरतजंग, मुबारकखान नियाजी आणि त्याचे इतर अफगाण सरदार यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

शहाजहानने आता दक्षिणेच्या सुभ्याची पुनर्रचना करून त्यावर औरंगजेबाची सरसुभेदार म्हणून दिनांक १४ जुलै १६३६ रोजी नेमणूक केली. मुघलांचे दक्षिणेतील मुख्य ठाणे म्हणून खडकी या शहराची निवड केली व त्यास आपल्या मुलाच्या-औरंगजेबाच्या नावावरून 'औरंगाबाद' असे नाव दिले.[१०६]

दक्षिणेचे सुभे खानदेश, सुभे वऱ्हाड, सुभे तेलंगण आणि सुभे दौलताबाद असे चार सुभे पाडण्यात आले.[१०७] सुभे दौलताबादमध्ये लातूर जिल्ह्याचा बहुतांश भाग मोडत होता. लातूर जिल्ह्यातील निलंग्याचा भाग विजापूर राज्यात राहिला. दौलताबाद सुभ्याचे मुख्य ठाणे दौलताबाद किल्ल्यात होते. किल्ल्यापासून काही मैल अंतरावर खडकी येथे मलिकअंबर याने मुलकी ठाणे वसविले होते. औरंगजेबाच्या कारकिर्दीत त्याची वाढ होऊन भरभराट झाली. या प्रांताच्या उत्तरेला अजिंठ्याचे डोंगर आणि पैनगंगा नदी होती. या प्रांताची पूर्व सरहद्द नांदेड-कंधार आणि उदगीरपर्यंत मांजरा नदीच्या काठाकाठाने होती. उदगीरपासून या सरहद्दीने औसापर्यंत पश्चिमेच्या दिशेने बांक घेतला होता. त्यानंतर ही सरहद्द विसापूर, पारनेर आणि जुन्नर या किल्ल्यापासून थेट पश्चिमेच्या घाटापर्यंत भिडलेली होती. दौलताबाद सुभ्यात शहाजहानच्या कारकिर्दीच्या शेवटपर्यंत आठ मुघल सरसुभेदार होते.[१०८]

औरंगजेब दुसऱ्यांदा सरसुभेदार म्हणून आल्यावर गोवळकोंडा व विजापूर या राज्यावर केलेल्या स्वाऱ्या सोडल्या, तर त्याने सुभेदारीची चार वर्षे औरंगाबाद येथेच घालवली. आतापर्यंत मुघलांनी विजापूरकरांच्या सरहद्दीचा भंग केला नव्हता. पण महम्मद आदिलशहाचा मृत्यू होऊन त्याचा मुलगा अली आदिलशहा गादीवर आल्यावर औरंगजेबाने विजापूरवर आक्रमण केले. त्याने विजापूरकरांचे बिदर व कल्याणी हे किल्ले जिंकले (दि. १ एप्रिल १६५७ आणि दि. १ ऑगस्ट १६५७). निलंग्याचे ठाणेही याच सुमारास मुघलांनी काबीज केले. पण ते लवकरच त्यांच्या हातातून गेलेले दिसते.[१०९] मीर जुम्लाने उदगीरच्या किल्ल्याजवळील काही गावे आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला होता.[११०] या घडामोडीच्या दरम्यान शहाजहानच्या आझेने औरंगजेबाने विजापूरकरांशी तह करून अल्पावधीत दि. ५ फेब्रुवारी १६५८ रोजी दिल्लीच्या सिंहासनासाठी निकाली

---

१०६. सरकार, जदुनाथ, **औरंगजेबाचा इतिहास** (अनु.कोलारकर श.गो.) मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९९, पृ.१०.

१०७. कित्ता, पृ.४०२.

१०८. १. औरंगजेब-दि.१४ जुलै १६३६ ते दि. २८ मे १६४४. २.खानदौरान-दि.२८ मे १६४४ ते दि. २२ जून १६४५. ३.जयसिंह-(हंगामी) दि. १७ जुलै १६४५ पर्यंत. ४.इस्लामखान-दि. १७ जुलै १६४५ ते दि.२ नोव्हेंबर १६४७ पर्यंत. ५.शहानवाजखान-(हंगामी) दि. १५ जुलै १६४८ पर्यंत. ६.राजपुत्र मुरादबक्ष-दि. १५ जुलै १६४८ ते दि. ४ सप्टेंबर १६४९. ७.शायस्ताखान- दि. ४ सप्टेंबर १६४९ ते जुलै १६५२. ८.औरंगजेब-नेमणूक - दि. १७ जुलै १६५२, सुभ्यात दाखल दि. १ जानेवारी १६५३. पगडी, सेतुमाधवराव, **महाराष्ट्र आणि मराठे**, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६३, पृ.५८.

१०९. कित्ता, पृ.५८, ५९.

११०. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७०.

सामना देण्यासाठी औरंगाबाद सोडले. तत्पूर्वी त्याने विजापूरकरांना पत्र लिहून मदत मागितली व ठरलेल्या खंडणीचा चौथा हिस्सा सोडून देऊन कल्याणी व परांडा प्रांतही विजापूरकरांस परत केले. त्याने आपला मुलगा मुअज्जम यास दख्खनचा सरसुभेदार म्हणून नेमले.

औरंगजेबाच्या राजवटीतील मराठवाडा : इ.स.१६५८ मध्ये औरंगजेबाने दिल्लीचे सिंहासन मिळविण्यासाठी दख्खन सोडले. तेव्हापासून इ.स.१६८२ च्या मार्चमध्ये दक्षिणेत परत येईपर्यंत एकंदर २४ वर्षांचा कालखंड लोटला होता. या दरम्यान दक्षिणचा मुघल सुभा नऊ सरसुभेदारांनी सांभाळला.[१११] लातूर प्रदेशही या सुभ्यातच समाविष्ट होता.

औरंगजेब स्वत: दक्षिणेत इ.स.१६८२ पासून ते इ.स. १७०७ मध्ये त्याचा मृत्यू होईपर्यंत होता. खुद्द बादशहाच दख्खनमध्ये असल्याने या काळात दख्खनच्या सरसुभेदारास महत्त्वच उरले नव्हते.

मिर्झाराजा जयसिंह आणि शिवाजी महाराज यांच्यातील पुरंदरच्या तहानंतर मुघल आणि मराठ्यांनी संयुक्तरित्या दि. २५ नोव्हेंबर १६६५ रोजी विजापूरच्या आदिलशाहीविरूद्धच्या मोहिमेसाठी आगेकूच केली. या संयुक्त सैन्याने आदिलशाही सैन्याचा पराभव केला. या लढाईत मुघलांच्या बाजुने लढलेला मराठा सरदार दत्ताजी जाधव व त्याचा पुत्र नौबतराव हे निलंगा येथे मारले गेले. त्याच्या सोबतच काही मराठा सरदारही मारले गेले. दत्ताजी जाधव हा चार हजारी मनसबदार होत. त्याच्या मृत्युनंतर मिर्झाराजा जयसिंह याने दत्ताजी जाधवचा दुसरा मुलगा जगदेवराव याला मनसब दिल्याचे दिसून येते. या संघर्षात दत्ताजीचा दुसरा एक मुलगा राघोजी गंभीररित्या जखमी झाला.[११२]

आदिलशाहीशी संघर्ष करीत असतांना मिर्झाराजा जयसिंह याचा दि. १० जून १६६६ पासून भूम या ठिकाणी जवळपास साडेतीन महिने तळ होता. या काळात मिर्झाराजा जयसिंहाने आदिलशाहीविरूद्ध चार युद्ध मोहिमा आखल्या. त्यात मुघलांनी ढोकी, गुंजोटी आणि निलंगा हे प्रदेश आपल्या ताब्यात घेतले.[११३]

दि. १४ मे १६७७ मध्ये बहादूरखान खानजहानच्या काळात मुघलांनी नळदुर्गचा किल्ला जिंकला. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील निलंगा व उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा, तुळजापूर, उस्मानाबाद हे तीन तालुके मुघलांच्या हाती आले. थोडक्यात, सन १६७७ मध्ये मुघलांच्या ताब्यात संपूर्ण मराठवाडा आला.[११४]

औरंगजेबाच्या राजवटीच्या उत्तरार्धात म्हणजे इ.स.१६८२ नंतर स्वराज्यावर झालेल्या औरंगजेबाच्या आक्रमणाचा छत्रपती संभाजी महाराजांनी यशस्वीरितीने मुकाबला केला. परंतु विश्वासघातामुळे त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना पकडण्यात आले. त्यांच्या कुटुंबियांना दौलताबादच्या किल्ल्यात कैदेत ठेवण्यात आले होते.

---

१११. १)राजपुत्र मुअज्जम-दि. ५ फेब्रुवारी १६५८ पासून जुलै १६५९. २) शायस्ताखान-जुलै १६५९ ते जानेवारी १६६४. ३) राजपुत्र मुअज्जम-जानेवारी १६६४ ते जानेवारी १६६५. ४) मिर्जाराजा जयसिंग-जानेवारी १६६५ ते मे १६६७. ५) राजपुत्र मुअज्जम-मे १६६७ ते जून १६७२. ६) बहादूरखान खानजहान बहादूर कोकलताश-जून १६७२ ते सप्टेंबर १६७७. ७) दिलेरखान-(हंगामी)-सप्टेंबर १६७७ ते ऑक्टोबर १६७८. ८) राजपुत्र मुअज्जम (उर्फ शहाआलम)-ऑक्टोबर १६७८ ते मे १६८०. ९) बहादूरखान खानजहान-मे १६८० ते १६८२.

११२. या लढाईच्या सविस्तर वर्णनासाठी पहा :- महाजन, द.बा.(संपा.), **सिंदखेडकर जाधवरावांची बखर**, म.रा.सा.सं.मंडळ, मुंबई, १९६८, पृ. १९-२२, देशपांडे, प्र.न., "शिवकालाच्या इतिहासाचे दुय्यम साधन-दत्ताजी जाधवरावांचा पोवाडा" **संशोधक**, त्रैमासिक, डिसेंबर, १९९७, अंक ४, राजवाडे संशोधन मंडळ, पुणे, १९९७, पृ. ३९-४६.

११३. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७२, ७३.

११४. कित्ता, पृ.५८, ५९ आणि सेतुमाधवराव पगडी, **हिंदवी स्वराज्य आणि मोगल,** पृ.३१.

दरम्यानच्या काळात औरंगजेबाने गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीचा शेवट करून (इ.स.१६८५-८६) सुलतान अबुल हसन उर्फ तानाशहा याला दौलताबाद येथे कैद करून ठेवले. त्यानंतर त्यास ग्वाल्हेरला कैदेत ठेवण्यात आले होते. छत्रपती संभाजी महाराजांनंतर राजाराम महाराज छत्रपती झाले. संभाजी महाराजांच्या वधानंतर ते इ.स.१६९० मध्ये कर्नाटकात जिंजीकडे गेले. इकडे मराठ्यानी औरंगजेबास जेरीस आणले. याकाळात मराठ्यांची सैन्ये तामिळनाडू व दक्षिण कर्नाटक सोडून उत्तरेकडे सरकू लागली. औरंगाबाद, नांदेड, वऱ्हाड, खानदेश, हैद्राबाद या सुभ्यांतूनही मराठ्यांची सैन्ये संचार करू लागली. त्यामुळे मराठ्यांना दक्षिणेच्या सुभ्याच्या बाहेर जाऊ न देण्यासाठी व त्यांचे उरलेले किल्ले जिंकून घेण्यासाठी औरंगजेबाने आपल्या सरदारांना कार्यक्षेत्रे वाटून दिली. त्यांना त्या त्या भागाच्या संरक्षणासाठी जबाबदार ठरविण्यात आले. औरंगाबाद सुभ्याच्या संरक्षणाची व्यवस्था पुढीलप्रमाणे करण्यात आली.[११५]

सुभ्याचे पाडण्यात आलेले विभाग, त्याच्या चतु:सीमा व अधिकारी

(१) औरंगाबादचा फौजदार नजाबतखानाकडे जालना, अंबड, वैजापूर, कन्नड तसेच खाली गोदावरीपर्यंत (शहागडपर्यंत) व उत्तरेस फर्दापूरचा घाट (अजिंठ्याजवळ) एवढा जवळ जवळ पन्नास कोस लांब व बेचाळीस कोस रुंदीचा प्रदेश देण्यात आला.

(२) बीडचा फौजदार इल्तिफातखानाकडे उत्तरेस शहागडपर्यंत (गोदावरीपर्यंत), दक्षिणेस ब्रह्मपुरीच्या छावणीपर्यंत, पुढे फतेहाबाद व शेगाव असा साठ कोस लांब व चाळीस कोस रुंदीचा प्रदेश देण्यात आला.

(३) धारूरचा किल्लेदार उजबेगखानाकडे-चव्वेचाळीस कोस लांब व छत्तीस कोस रूंद असा औसा, निलंगा, नळेगाव, गोदावरीपर्यंतचा प्रदेश सुपूर्द करण्यात आला.

(४) नळदुर्गचा किल्लेदार व फौजदार मिहीदीखानाकडे बत्तीस कोस लांब व बत्तीस कोस रुंदीचा गुलबर्गा, सोलापूर, अक्कलकोट, अफजलपूर व धाराशिव (उस्मानाबाद) असा प्रदेश देण्यात आला.

छत्रपती संभाजी राजांच्या वधानंतर स्वराज्याचा बिमोड करण्याच्या उद्देशाने मराठ्यांचा पाठलाग चालू रहावा व किल्ले निर्विघ्नपणे घेता यावेत म्हणून औरंगजेबाने झुल्फिकारखानाला बोलावून घेतले. छत्रपती राजाराम महाराज वऱ्हाडच्या दिशेने जात आहेत असे कळताच शहजादा बेदारबख्त, झुल्फिकारखान व चीनकुलीचखान यांनी छत्रपती राजाराम महाराजांचा पाठलाग करून त्यांना परांड्याजवळ गाठले. त्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांना वऱ्हाडवर चालून जाण्याचा बेत सोडून विशालगडकडे परतावे लागले. इ.स.१६९९ ते १७०० या कालखंडात मराठा सेनापती धनाजी जाधवाच्या हालचाली महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यापासून पुण्यापर्यंत चालू होत्या. परांड्यापासून दोन कोसावर धनाजी जाधव व शहजादा बेदारबख्त यांची दि. १० नोव्हेंबर १६९९ रोजी लढाई झाली होती. परांडा तालुक्यातील उंदगाव येथील बादशाही खजिन्यावर हल्ला करून दि. २५ जानेवारी १७०० रोजी मराठ्यांनी झुल्फिकारखानाशी लढाई केली होती. पुढे इ.स.१७०६ मध्ये औरंगाबाद परिसरातही मराठ्यांनी विलक्षण उच्छाद मांडला होता. हे पाहून बादशहाने नुस्रतजंग, झुल्फिकारखान आणि फिरोजजंग (निजाम-उल-मुल्कचा बाप) यांस आज्ञा केली की, मराठे औरंगाबादेच्या प्रांतात पसरले आहेत, त्यांचा मोड करावा. नुस्रतजंग मराठ्यांविरूद्ध चाल करून गेला. फिरोजजंगचा मुक्काम शहागड येथे होता. ते पाहून धनाजी जाधव व इतर मराठे परळी वैजनाथच्या बाजूने निघून गेले. त्यांनी धर्मापुरी घाट ओलांडला. झुल्फिकारखानाने मराठ्यांचा पाठलाग सुरु केला. मराठ्यांना हे कळल्यावर ते रात्रंदिवस मजला मारत औसा, तुळजापूर, परांडा या गावावरून पुढ गेले व मोठ्या कष्टाने भीमापार झाले.[११६]

---

११५. पगडी, सेतुमाधवराव, **मोगल दरबारची बातमीपत्रे**, मुंबई, १९७८, खंड १, प्रस्तावना, पृ.४.

११६. गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, **बीड डिस्ट्रिक्ट**, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९६९, पृ.७३.

औरंगजेबाचे मराठ्यांशी सुरू झालेले युद्ध जवळपास २५ वर्षे चालले व ते त्याच्या मृत्युनेच समाप्त झाले. औरंगजेबाचा मृत्यु दिनांक २० फेब्रुवारी १७०७ या दिवशी अहमदनगर येथे झाला. औरंगजेबाच्या मृत्युनंतर दक्षिणेच्या राजकारणाने वेगळेच वळण घेतले. औरंगजेबानंतर त्याच्या तीन मुलांमध्ये सत्तासंघर्ष सुरू झाला. यावेळी राजपुत्र आझम हा दक्षिणेत होता. मुघल फौज प्रामुख्याने दक्षिणेतच असल्यामुळे ही फौज घेऊन तो त्वरेने उत्तरेकडे निघाला. जाताना त्याने शाहू व त्याच्या कुटुंबातील इतर मंडळीनांही सोबत घेतले व वाटेत दिनांक ८ मे १७०७ रोजी झुल्फिकारखानाच्या सल्ल्यावरून शाहूची सुटका केली.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बादशाही तख्तासाठी झालेल्या यादवीत औरंगजेबाचा थोरला मुलगा राजपुत्र मुअज्जम याने आपल्या अन्य भावांचा खून करून तख्त बळकावले व बहादूरशहा असा किताब धारण करून तो मुघल बादशहा बनला. बहादूरशहाचा मृत्यु दिनांक १७ फेब्रुवारी १७१२ रोजी झाला. त्यानंतर जहाँदरशहा व त्यानंतर फर्रुखसियर हा दिल्लीचा बादशहा झाला. फर्रुखसियर हा दिनांक १८ फेब्रुवारी १७१९ पर्यंत दिल्लीच्या गादीवर होता. यावेळी दक्षिणेत बादशाही मुलखाचे बऱ्हाणपूर (खानदेश), वऱ्हाड, हैद्राबाद, बिदर, विजापूर, औरंगाबाद असे सहा सुभे होते. या सर्वांचा मुख्य सरसुभेदार बहुधा औरंगाबाद येथे असे. त्याचा दिवाण मुलकी काम पाहत असे. यावेळी लातूर जिल्हाचा काही भाग औरंगाबाद व बिदर सुभ्यात समाविष्ट होता. इ.स.१७०८ मध्ये दक्षिणेतील सुभेदारी झुल्फिकारखानाकडे होती. पुढे झुल्फिकारखान दिल्लीस गेल्यावर दक्षिणेच्या सुभेदारीचा कारभार दाऊदखान पन्नी हा झुल्फिकारखानाचा दुय्यम अधिकारी पाहू लागला. त्याने दक्षिणेचा कारभार जानेवारी १७१३ पर्यंत केला.[११७] नंतर त्याची बदली गुजरातमध्ये झाली.

निजामाची दक्षिणेच्या सुभेदारीवर नेमणूक : चिनकिलीचखान, मीर कमरूद्दीन व निजाम-उल-मुल्क या नावाने इतिहासात प्रसिद्ध असलेला मुघल सरदार हाच हैद्राबादच्या निजामशाही राज्याचा संस्थापक होय. त्याचे आजोबा ख्वाजा अबिदअली हे शहाजहान बादशहाच्या काळात दिल्लीस आले व तेथेच स्थायिक झाले. त्यांचा पुत्र शहाबुद्दीन हा पुढे गुजरातचा सुभेदार झाला. त्याचा पुत्र म्हणजेच निजाम-उल-मुल्क होय. अंगी असलेल्या धाडसामुळे तो वयाच्या १४ व्या वर्षापासून मुघलांच्या लष्करी मोहिमांत भाग घेत असे. औरंगजेबाच्या काळात त्याने इ.स.१६४८ मध्ये पुणे व सुपे प्रांतात यशस्वी मोहीम केल्याबद्दल त्यास १०० स्वारांची मनसब देण्यात आली होती. पुढील सात वर्षे त्याने दक्षिणेत तुंगभद्रा नदीपर्यंत संचार करून येथील प्रदेशाची योग्य माहिती करून घेतली. औरंगजेबानेच त्याला "चिनकिलीचखान" हा किताब बहाल केला होता. अंगच्या कर्तृत्वामुळे इ.स. १६९९ मध्ये तो तीन हजारी, तर इ.स.१७०५ मध्ये पंचहजारी मनसबदार बनला. बहादूरशहाच्या काळात म्हणजे इ.स. १७०८ ते १७११ पर्यंत तो अयोध्येचा सुभेदार होता. या काळात त्याला खानदौरान बहादूर असा किताब मिळाला. फर्रूखसियर बादशहाच्या काळात त्यास खानखानान निजाम-उल-मुल्क फतेहजंग किताब देऊन त्याची दख्खन सुभ्यावर नेमणूक करण्यात आली. त्याच्या मदतीस मुलकी दिवाण म्हणून हैदर कुलीखान याची नेमणूक झाली. दख्खनचा सुभेदार असताना त्याचा छत्रपती शाहू महाराज व पेशव्यांशी राजकीय संबंध येणे अनिवार्यच होते.

इ.स.१७१५ च्या एप्रिलमध्ये निजामाची दक्षिणेच्या सुभेदारीवरून उत्तरेस बदली झाली व त्याच्या जागी सय्यद हुसेन याची नेमणूक झाली. तो इ.स.१७१६ च्या आरंभी औरंगाबादेस आला. सय्यद बंधुनी दिनांक २९ सप्टेंबर १७१८ रोजी मराठ्यांशी तह केला. या काळात सय्यद बंधुंचे दिल्ली दरबारात वर्चस्व प्रस्थापित झाले होते. त्यांनी निजामाला माळव्याची सुभेदारी दिली. माळवा येथे निजामाने मराठ्यांशी लढाईचे निमित्त

११७. खोबरेकर, वि.गो., **मराठा कालखंड**, (१७०७-१८१८), भाग-२, मुंबई, १९८८, पृ.३४, ३५.

करून स्वत:च्या सामर्थ्यात वाढ करावयास सुरुवात केली. सय्यद बंधुंनी दिलावरअली खान आणि दक्षिणेचा यावेळचा सुभेदार आलमअली खान या दोघांना निजामाचा बंदोबस्त करण्यासाठी सांगितले. परंतु निजामाने त्यांना ठार मारले. सय्यद बंधुच्या पाडावानंतर निजामाची दि. २० फेब्रुवारी १७२२ रोजी दिल्लीच्या वजीरपदी नेमणूक झाली. परंतु निजामास दूर दक्षिणेच्या सुभेदारीवर काम करण्यात जास्त रस होता. म्हणून माळव्यात शिरलेल्या मराठ्यांचा बंदोबस्त करण्याच्या निमित्ताने निजामाने दिल्ली सोडली व संधी साधून इ.स.१७२४ मध्ये दक्षिणेत एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली. हेच हैद्राबादचे निजामशाही राज्य होय. निजामाचे घराणे आसफजाही घराणे म्हणून ओळखले जात असे. सध्याचा लातूर जिल्हाही या राज्याचा एक भाग होता. मराठवाड्यावर या राज्याचा दि. १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत प्रभाव होता.

मराठ्यांच्या लातूर जिल्ह्यातील हालचाली (इ.स.१६६० ते १७२४) : शहाजी राजांनी सध्याच्या लातूर जिल्ह्याच्या सीमेपासून जवळच असलेल्या परांडा किल्ल्यावरून मुघलांशी लढा दिला होता. अहमदनगरच्या निजामशाहीच्या पाडावानंतर दक्षिणेत आदिलशाही आणि कुतुबशाही या सत्तांनी मुघलांचे मांडलिकत्व पत्करले होते. अशा राजकीय परिस्थितीमध्ये महाराष्ट्रात शिवाजी महाराजांचा उदय झाला.

शिवाजी महाराजांचा सेनापती नेताजी पालकर याने इ.स.१६६० मध्ये नांदेड, बीड, परतूर, रेणापूर, वडवळ या प्रदेशात घुसून लुटालूट केली होती. या कामी नांदेड सरकारातील वडवळचा देशमुख दावल याने शिवाजी राजांच्या सैन्यास मदत केली होती.[११८] इ.स.१६६३ मध्ये शायिस्तेखान पुण्यात तळ देऊन राहिला असताना नेताजी पालकर मुघलांना शह देत बालाघाट, परांडा, हवेली, कलबर्गे, आवसे (औसा) व उद्गीर वगैरे गावे लुटीत, जाळपोळ करीत व खंडण्या घेत गोदावरीच्या तीरापर्यंत गेला होता.[११९] इ.स.१६७० मध्ये शिवाजी महाराजाचे सैन्य औसा किल्ल्याला वेढा देण्यासाठी आले होते अशी तक्रार औसाचा किल्लेदार बर्खुदारखान याने औरंगजेब बादशहाकडे केली होती (दि. २३-२४ जानेवारी १६७०).[१२०] अशीच तक्रार उदगीरचा किल्लेदार सुहराबखान याने औरंगजेबाकडे केली होती. ते पत्र दि. २० जानेवारी १६७१ चे आहे. सुहराबखान लिहितो, "मुघल व गनिम (मराठा) यांच्यातील युद्धाने उदगीरच्या परगण्यातील पिकांची नासाडी झाली आहे. लुटमार चालू आहे. त्यामुळे लोक हवालदिल झाले आहेत. त्यांना येथे सुरक्षित वाटत नाही. त्यामुळे हा भाग हातातून निघून जात आहे."[१२१] या अगोदरच्या पत्रात तो लिहितो की, 'डिसेंबर १६७० मध्ये रात्रीच्या वेळी सहा-सात हजार स्वार व काही हजार पायदळ असे सैन्य किल्ल्याजवळ आले. मी सावध होतो.' याचा अर्थ असा की, उदगीरचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी शिवाजी महाराजांच्या सैन्याने प्रयत्न केला होता.[१२२]

इ.स.१६८४ ते १६८५ या काळात औसाचा किल्ला ताजुद्दीन उर्फ मुर्शीद कुलीखान याच्या अधिकारात होता.[१२३] संभाजी महाराजांच्या वधामुळे मराठ्यांच्या राज्याची घडी विस्कटलेली होती. तरीपण मराठ्यांचे सैन्य मुघल प्रदेशात धुमाकुळ घालत होते. दि.२२ ऑक्टोबर १६९३[१२४] मधील बातमीपत्रावरून असे समजते की, मराठ्यांचा सरदार माणकोजी याने एक हजार स्वार व पायदळ घेऊन मुघली प्रदेशात धुमाकूळ घातला होता.

---

११८. काळे, ल.गो., **मोगलकालीन मराठवाडा**, मराठवाडा इतिहास परिषद, खंड-१, औरंगाबाद, १९८५, पृ.७७.
११९. केळुस्कर, कृ.अ., **छत्रपती शिवाजी महाराज**, वरदा बुक्स, पुणे, १९९१ (आ. ५ वी) पृ.२४०.
१२०. खरे, ग.ह., **ऐतिहासिक फार्सी साहित्य**, खंड-६, पृ.६५.
१२१. पगडी, सेतुमाधवराव, **प्रतोद,** दिवाळी अंक, नांदेड, १९७४, पृ.१३.
१२२. कित्ता, पृ.१४.
१२३. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७६.
१२४. पगडी, सेतुमाधवराव, **मोगल दरबारची बातमीपत्रे**, भाग २, पृ.२४.

त्याचा बंदोबस्त करण्यासाठी नांदेडचा सुभेदार अब्दुलखान यास ताकीद देण्यात आली. मराठ्यांच्या फौजा छत्रपती राजाराम याच्या काळात सुद्धा औसा परिसरात होत्या. यावेळी औसाचा किल्लेदार ख्वाजा नसदुल्ला होता. मराठ्यांचे सरदार हणमंतराव हे सैन्य घेऊन या भागात धुमाकूळ घालीत होते. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नांदेडचा सुभेदार अब्दुलाखान याला ताकीद देण्यात आली अशी माहिती मुघल दरबारच्या बातमी पत्रावरून मिळते. हे बातमीपत्र दि. १९ जून १६९४ चे आहे.[१२५] उदगीर जवळील नळेगावच्या[१२६] जहागीरदाराच्या सैन्याने त्यांच्याशी चांगलीच झटापट केली. जहागीरदार व गुमास्ता गढीत जाऊन लपून बसले. त्यानंतर मराठ्यांनी नळदुर्गवरही जाऊन जाळपोळ व लुटालूट केली.

इ.स.१७०० मध्ये मराठ्यांच्या फौजा औसा भागात होत्या. या वेळी औसाचा किल्लेदार मुईनखान याने बादशहाकडे किल्ल्याच्या बाहेर पडून हल्ला करण्याची परवानगी मागितली होती.[१२७] याच वर्षी मुघल सरदार झुल्फिकारखानाने मराठा सरदार धनाजी जाधव यांच्या मागे आपल्या फौजा परांडा, आष्टी, नांदेड, औसा, उदगीर व पुढे हैद्राबाद सुभ्याच्या सरहद्दीपर्यंत पाठलागावर पाठविल्या होत्या.[१२८]

औरंगजेबानेही मे १७०६ मध्ये पुन्हा एकदा आपल्या फौजा धनाजी जाधवांच्या पाठलागावर पाठविल्या. धनाजी जाधव यावेळी धर्मापुरी घाट, परळी, औसा, तुळजापूर मार्गे महादेवाच्या डोंगरात निघून गेले.[१२९] पण मराठ्यांचे स्वराज्य नामशेष करून दक्षिण हिंदुस्थान मुघल साम्राज्यात समाविष्ट करण्याचे औरंगजेबाचे स्वप्न साकार होऊ शकले नाही. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (इ.स.१७०७) बादशहा मुअज्जम दिल्लीस निघाला. मुघलांचा ताबेदार म्हणून राज्य करावे या अटीवर शाहू महाराजांची सुटका केली. पुढे दिल्लीत सत्ताबदल झाल्यानंतर पेशवा बाळाजी विश्वनाथ याने इ.स.१७१५ मध्ये सय्यद बंधूंकडून एका तहाने दक्षिणेच्या सहा सुभ्यात मराठ्यांनी चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे हक्क मिळविले.[१३०] त्याच्या बदल्यात मराठ्यांनी १५,००० सैन्य मुघलांच्या तैनातील ठेवावे असे ठरले. मुघलांचे दक्षिणेतील सुभे खानदेश, वऱ्हाड, बिदर, विजापूर, औरंगाबाद आणि हैद्राबाद असे होते. यापैकी यावेळी विजापूर सुभ्यात औसाचा समावेश होत होता. यामुळे युद्ध न करता मराठ्यांचे औसावर प्रभुत्व निर्माण झाले. औसाचे संरक्षण, नियंत्रण, वसुली करण्याचा अधिकार मराठ्यांना मिळाला. त्याची सनद दि. २० मार्च १७१९ रोजी पेशवा बाळाजी विश्वनाथ याने दिल्लीवरून आणली.

चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मिळाल्यावर पेशव्यांनी औसा परगण्यावर वसुलीसाठी काही अधिकारी नेमले होते. त्यातील काहींची नावे पुढीलप्रमाणे आहेत. ही नावे इ.स.१७०७ ते इ.स.१७४९ पर्यंतची आहेत.[१३१]

---

१२५. पगडी, सेतुमाधवराव, **मोगल दरबारची बातमीपत्रे**, मुंबई, १९८३, भाग २, पृ.२४.

१२६. राठोड, पी.सी., पूर्वोक्त, पृ.४२.

१२७. पगडी, सेतुमाधवराव, पूर्वोक्त, पृ.२१५.

१२८. **बीड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७३. पवार, जयसिंगराव, **महाराणी ताराबाई**, ताराराणी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, १९७५.

१२९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.८२.

१३०. ब्रिज, किशोर, **ताराबाई ॲण्ड हर टाईम्स**, बॉम्बे, १९६३, पृ.१४९-१५१.

१३१. खोबरेकर, वि.गो., **शाहू दप्तरातील कागदपत्रांची वर्णनात्मक सूची,** खंड १, भाग-२, शासकीय मुद्रणालय, नागपूर, १९७०, पृ.५७०-५७७.

खंडोजी बंडगर, चिमणाजी माणकेश्वर, जगजीवन परशराम, गोपालराम, होनाजी अनंत, रजाजी विश्वनाथ, पदाजी व हैबत बंडगर, त्र्यंबक ढमढेरे, जिवला बिटणीस, व्यासराव, सुर्याजी पांढरे, खानाजी, पदाजी व महादजी बंडगर आणि नरहरी रामचंद्र.

औसा येथील मुघल किल्लेदार : औरंगजेबाने इ.स.१६३६ मध्ये औसा किल्ला जिंकल्यानंतर त्या ठिकाणी मुबारकखान नियाजी याची तेथील किल्लेदार म्हणून नियुक्ती केली. त्याने इ.स.१६३६ पासून इ.स. १६४२ पर्यंत औसाची किल्लेदारी केली असावी. याचे घराणे मूळचे पठाणांचे. या घराण्यातील मुहंमदखान नियाजी हा अकबराच्या काळात मोठा मनसबदार होता. इ.स.१६४२ मध्ये त्याची औसाच्या किल्लेदारीवरून काबूल प्रांतात बदली करण्यात आली.[१३२] दि. १४ ऑगस्ट १६४० रोजी शहजादा औरंगजेब याच्या शिफारशीनुसार इहतमामखान याची खेरला ठाण्याच्या रक्षणावर नेमणूक झाली आणि औसा किल्ल्याचा किल्लेदार म्हणून मुबारकखान नियाजी याची नेमणूक झाली. औरंगजेब त्यावेळी दक्षिणेचा सुभेदार होता. उजबेकखान असा किताब असलेल्या नजर बेग याची औरंगजेबाच्या विनंतीनुसार हजारी जात (१,००० स्वार) अशा वाढीने दोन हजारी जात (२,००० स्वार) अशी मनसब देऊन मुबारकखानाच्या जागी औसाचा किल्लेदार म्हणून दि.२९ डिसेंबर १६४० रोजी नेमणूक झाली.[१३३] शहाजहान बादशहा असताना त्याने औसा, उदगीर, कंधार, फतेहाबाद येथील किल्लेदारांना धान्य खरेदी विषयीचा आदेश दिला होता. ही नोंद २५ जून १६४४ ची आहे.[१३४]

औसा येथील किल्लेदार बर्खुदारखान याच्या दि. २३ जानेवारी १६७० च्या नोंदीनुसार शिवाजीराजांचे २० हजार स्वार व पायदळ या प्रांतात येऊन लुटालूट करीत होते. तशी तक्रार त्याने औरंगजेब बादशहाकडे करून जादा कुमक पाठविण्याची मागणी केली होती. या धामधुमीत त्याने किल्ल्याची दुरूस्ती केली होती.[१३५]

इ.स.१६७१ मध्ये सुद्धा शिवाजी महाराजांचे सैन्य या भागात आले होते. किल्लेदार बर्खुदारखानाने बादशहाजवळ युद्धसाहित्याची मागणी केली होती अशी नोंद दि. २३ जानेवारी १६७१ च्या पत्रात आहे. बर्खुदारखान बादशहाला लिहितो, 'शिवाजीचे सैन्य औसा गाव उद्ध्वस्त करण्याच्या उद्देशाने चालून आले होते. बादशहाच्या कृपेने मी त्याचा प्रतिकार केला. त्यामुळे ते गावाजवळ व किल्ल्याजवळ येऊ शकले नाही. त्यांनी माझी जहागिरी उद्ध्वस्त केली आहे. त्यामुळे मला बंदोबस्तासाठी, तोफांसाठी व लोखंडी गोळे तयार करण्यासाठी म्हणून आराखडा पाठविण्यात आला होता. परंतु त्याऐवजी दगडी गोळे करावयाचे ठरविले आहे. पण मला किल्ल्यात लोखंडी गोळे आवश्यक आहेत.' यावर बादशहाने उम्ब-तुल-मुल्क येईपर्यंत कार्यवाही स्थगित करण्याचा हुकूम दिला. बर्खुदारखानाने किल्ल्यासाठी लागणारी सामग्री व शिबंदीचा पगार यांचा तपशील पाठविला होता. त्याची व्यवस्था करण्यात यावी अशी विनंती त्याने बादशहाला केली होती. यावर बादशहाने व्यवस्था करण्यात यावी असा हुकूम दिला. 'पूर्वी किल्ल्यात एक हजारी व बारा-तेरा स्वार सद्दीवाल्याचे असत. (सद्दी म्हणजे शंभर). पण अलीकडे चार सद्दीवाले नेमले गेले आहेत. तेव्हा दोन जाटाच्या ऐवजी दोन स्वार नेमण्यात यावे. याशिवाय अतिशय पाऊस पडल्यामुळे खंदकाजवळील ओढा वाहू लागला आहे. त्यामुळे खंदकातले पाणी वाहून जात आहे ते बंद करणे आवश्यक आहे.' असे कळवून त्यासाठी आवश्यक ती मदत करण्यात यावी असे त्याने बादशहास कळविले होते. परंतु बादशहाने यावर काहीच हुकूम दिला नाही.[१३६]

---

१३२. पगडी, सेतुमाधवराव, **प्रतोद**, दिवाळी अंक, १९७४, नांदेड, पृ.१ ते १३.

१३३. मेहंदळे, गजानन, **राजा शिवछत्रपती,** पृ.४३०, तळटीप १५२८.

१३४. **सिलेक्टेड डॉक्युमेंटस् ऑफ शाहजहान**, गव्हर्नमेंट ऑफ आंध्रप्रदेश, हैद्राबाद, पृ.१२४.

१३५. खरे, ग.ह., **ऐतिहासिक फार्सी साहित्य**, खंड-६, पुणे, १९७३, पृ.६५.

१३६. **सिलेक्टेड डॉक्युमेंटस ऑफ औरंगजेब**, हैद्राबाद, १९५३, पृ.९०-९१.

सुहराबखान हा इ.स.१६८१ पूर्वी औसाचा किल्लेदार होता असे दिसते.[१३७] सुहराबखानाचे घराणे इराणी होते. मुमताज महलची आई (वजीर असफखान याची पत्नी) ही सुहराबखानच्या बापाची आतेबहीण होती. याच्या काळात औसा येथील जामा मशीद बांधली गेली. या मशिदीसाठी औरंगजेबने आर्थिक सहाय्य केले होते.[१३८] मशिदीमधील शिलालेखात[१३९] सुहराबखानाचा उल्लेख आहे.

दिनांक २० ऑक्टोबर १६८० रोजी सय्यद अन्वरखान याने औसाची किल्लेदारी मिळावी म्हणून अर्ज केला होता. त्याप्रमाणे त्याला दि. २० जून १६८१ ला औसाची किल्लेदारी मिळाली.[१४०] कामात कुचराई केल्याबद्दल सय्यद अन्वरखान यावर ठपका आलेला दिसतो. दि.१४ जानेवारी १६८३ च्या नोंदीनुसार खानास २५०० जात व १५०० स्वार अशी मनसब होती. त्यापैकी पाचशे जात व दोनशे स्वार कमी केल्याचे फर्माविले. त्यानंतर त्याच्या मनसबीत वाढ केल्याचा हुकूम झाला.[१४१] ताजुद्दीन उर्फ मुर्शद कुलीखान हा इ.स.१६८५ मध्ये औसाचा किल्लेदार होता.[१४२] पण तो अल्पकाळच किल्लेदार असावा. इ.स.१६९४ मध्ये औसाचा किल्लेदार व फौजदार नसरुल्ला याला फिरोजगडच्या किल्लेदारीवर व फौजदारीवर नेमण्यात आले. त्याच्या जागी मुहम्मद सादुल्लाखान याला औसाच्या किल्लेदारीवर नेमण्यात आले. त्याला ५०० जात व १०० स्वार अशी मनसब होती. तीत २०० स्वारांची भर घालण्यात आली, असे औरंगजेबाच्या दरबाराच्या बातमीपत्रावरून दिसते.[१४३]

मुईनखान दि. ३ ऑगस्ट १६९७ पासून औसाच्या किल्लेदारीवर होता. हैद्राबादच्या दप्तरखान्यात नळदुर्गचा किल्लेदार सय्यद यादगार हुसेन याचा पत्रसंग्रह सापडला आहे. त्यात औसाचा किल्लेदार मुईनखान याची काही पत्रे आढळली. त्या पत्रांतील मजकूर पुढीलप्रमाणे आहे :-

पत्र क्र. ९ : औसाचा किल्लेदार मुईनखान याचे बक्षी उल्मुल्कला पत्र-आपला निरोप घेऊन मी निघालो, तो औसाला येऊन पोहचलो, मी औसाच्या किल्ल्याचा किल्लेदार म्हणून आणि भोवतालच्या इलाख्याचा फौजदार म्हणून काम करू लागलो आहे.

पत्र क्र. १० : औसाचा किल्लेदार मुईनखान याजकडून बक्षीच्या नावे-आपल्या पदरचे हत्ती व घोडे औसात ठेवले होते. त्यांना धान्य आणि चारा मिळत नसल्यामुळे त्यांची उपासमार होत आहे. जुम्लतुल्मुल्क मुअज्जमखान आणि इतर सरदार यांच्या जहागिरीतूनही धान्य आणि चारा यांचा पुरवठा होणे शक्य होत नाही. बेजबाबदार अधिकारी जनावरांना रयतेच्या शेतात चरण्यासाठी सोडत आहेत. या कृत्याला आळा घालणे आवश्यक आहे.

---

१३७. खरे, ग.ह., पूर्वोक्त, खंड ६, पृ.१२७.

१३८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७५६.

१३९. हा शिलालेख पुढीलप्रमाणे-

दर जमान शाह दीन औरंगजेब गो बागिती ।
साया लुफ खुदा अस्त ॥
बंदा अश असमान वो दिल सोहराबखान ।
बाबी इ-मशिद नुसहत फजाहस्त ॥
शुद रकम अज बहेर तारिख बिना ।
मजिद वाघ मकान दिल कुशस्त १०९४ हि. ॥ दहलवी, बशिरुद्दीन, **वाकियाते मुमालिकते विजापूर,** हैद्राबाद, १९१५, पृ.८४.

१४०. खरे, ग.ह., पूर्वोक्त, पृ.९७.

१४१. कित्ता, पृ.२५२.

१४२. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७.

१४३. पगडी, सेतुमाधवराव, **मोगल दरबारची बातमीपत्रे**, भाग-१, मुंबई, १९७८, पृ.५७.

पत्र क्र. ३७ : औसाचा परगणा तनखा जहागीर म्हणून देण्यात येईल असे आश्वासन या पत्रात आहे.

पत्र क्र. ३८ : औसाचा मुशरफ (हिशेब अधिकारी बाळाराम) आणि ख्वाजा पसंद याची शिफारस असून त्याचा विचार व्हावा अशी या पत्रात विनंती आहे.

पत्र क्र. ४० : मी औसाच्या किल्ल्यात एकेचाळीस जुलूस पंचवीस मुहरम (हि.११०९, शुक्रवार, ३ ऑगस्ट १६९७) रोजी पोहचलो. औसाचा किल्लेदार आणि औसा प्रांताचा फौजदार म्हणून मी काम पाहण्यास सुरुवात केली. योग्य चौकशी केल्यानंतर मी तेथील परिस्थितीसंबंधी अहवाल सादर करेन. शत्रुंची (मराठ्यांची) सैन्ये नेहमी या प्रांतातून फिरत असतात. माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीने आणि परमेश्वराच्या कृपेने मी त्यांचा मोड करीन.

भेट म्हणून पाठविण्याजोगी एखादी वस्तु सध्या उपलब्ध नाही. काही काळाने हुक्का किंवा समई अशा प्रकारची एखादी वस्तू पाठवून देईन.

पत्र क्र. ४१ : औसा परगण्यात एक चौकी आणि त्यासाठी घोडे यांची व्यवस्था करण्यात यावी असे सूचविले.

पत्र क्र. ५० : मला औसाचा किल्लेदार आणि औसा आणि लगतचे महाल याचा फौजदार म्हणून नेमण्यात आले. माझी मनसब वाढविण्यात आली आणि मला खान ही पदवी देण्यात आली. माझ्या बरोबर असलेले सैन्यही पुरेसे आहे.[१४४]

इ.स.१६९९ मध्ये मराठ्यांचे उरलेले किल्ले जिंकून घेण्यासाठी औरंगजेब स्वत: निघाला होता. मराठ्यांना दख्खन सुभ्याच्या बाहेर जाऊ न देण्यासाठी त्याने आपल्या अधिकाऱ्यांना कार्यक्षेत्रे वाटून दिली. दि.९ ऑगस्ट १६९९ ला धारुरचा फौजदार उजबेकखान याकडे औसा, निलंगा हा भाग सोपविण्यात आला.[१४५]

औरंगजेबाने आपल्या दक्षिणेच्या प्रदेशावर राज्य करण्यासाठी काही सुभ्यांची निर्मिती केली होती. त्यात नांदेड-बिदर हा एक सुभा होता. त्यानंतर त्याला सुभे मुहमदा-बिदर असे नाव पडले. नोव्हेंबर, १६९९ मध्ये वऱ्हाडचा सुभेदार अस्करखान याची सुभे बिदरवर नेमणूक केली. या सुभ्यात नांदेड, औसा, उदगीर हे मराठी भाषिक प्रदेश मोडत होते.[१४६]

इ.स.१७०३ च्या अगोदर औसाचा किल्लेदार व फौजदार असदुल्ला हा होता. हा मरहुम हमजाखान याचा मुलगा होता. त्याला कंधारच्या किल्लेदारीवर पाठविले व औसाचा किल्लेदार म्हणून परांड्याचा किल्लेदार इज्जतखान याला औसाच्या फौजदारीवर पाठविण्यात आले असे दि.९ फेब्रुवारी १७०३ च्या नोंदीवरून दिसते.[१४७]

---

१४४. पगडी, सेतुमाधवराव, **नळदुर्ग व बेळगाव किल्ल्याबद्दलची पत्रे**, अंक, भारतीय इतिहास आणि संस्कृती मंडळ, (संपा., न.र.फाटक आणि वि.गो. खोबरेकर), मुंबई, ऑक्टो.१९७३, पृ.४३-७६.

१४५. पगडी, सेतुमाधवराव, **मोगल दरबारची बातमीपत्रे**, भाग १, पृ.४.

१४६. कित्ता, पृ.५.

१४७. कित्ता, भाग-२, मुंबई, १९८९, पृ.२२.

दि. २ मार्च १७०३ रोजी औसाच्या किल्लेदारीवर हुजूरात याला बोलाविण्यात आले.[१४८] सजावरखान हा औसाच्या किल्लेदारीवर व फौजदारीवर होता. त्याला एक हजार जात व पाचशे स्वार अशी मनसब होती. तीत १०० स्वारांची वाढ करण्यात आल्याचे दि. २७ सप्टेंबर १७०४ च्या मोगल दरबारच्या बातमीपत्रात म्हटले आहे.[१४९]

नोव्हेंबर, १७०४ ला गयूर उर्फ इज्जतखान याला औसाची किल्लेदारी व फौजदारीवर पूर्ववत नेमण्यात आले. या अगोदरचा किल्लेदार सजावरखान याला नळदुर्गच्या किल्लेदारीवर नेमण्यात आले.[१५०]

इ. स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा दक्षिणेत मृत्यू झाला. यानंतर दक्षिणेत औरंगजेबाचा सरदार चिनकिलीचखान याने निजाम-उल-मुल्क ही पदवी धारण करून हैद्राबाद येथे इ. स. १७२४ मध्ये स्वतंत्र राज्याची स्थापना केली. याची हकिकत यापूर्वी आलेली आहेच.

उदगीर येथील मुघल किल्लेदार : मुघलांनी दि. २८ सप्टेंबर १६३६ रोजी उदगीरचा किल्ला जिंकल्याचा उल्लेख उदगीरच्या किल्ल्यात काळ्या दगडाच्या कमानीवर फार्सीमध्ये असलेल्या एका लेखात आढळतो. हा लेख युद्धानंतर एका वर्षाने कोरलेला असावा. 'हिजरी १०४६ सात जमादिउल आवलला किल्ल्याचा फत्ता बुर्ज व शहाजहानच्या हुकूमान्वये किल्ला जिंकला गेला' असा या लेखाचा अर्थ आहे.[१५१]

या किल्ल्यावर मोगलखान याची किल्लेदार म्हणून नेमणूक केली गेली. मोगलखान हा जैनखान कोका या प्रसिद्ध सरदाराचा पुत्र होता. मुघलानी किल्ला सर केल्याची आणि त्या ठिकाणी त्याची नियुक्ती केल्याची माहिती असलेला शिलालेख किल्ल्यात उपलब्ध आहे.[१५२] त्याने काही नवीन इमारती बांधल्याचाही उल्लेख आहे. इ.स. १७७३ मध्ये मासीरुल उमरय्या कल्या (अब्दुलखान) याने लेख वाचून आपल्या ग्रंथात लिहिले आहे की, उदगीरचा किल्लेदार (समसामथोला) याने अनेक इमारती जातीने बांधून घेतल्या.[१५३] किल्ला मजबूत असावा म्हणून तटबंदी केल्याचा उल्लेखही आहे.

हुसामोद्दीन मिर्झा हा इ.स. १६४८ ते १६५७ पर्यंत उदगीरचा किल्लेदार होता. पुढे हैद्राबादच्या निजामी राजवटीतही याच घराण्याकडे किल्लेदारी होती.[१५४]

हुसामोद्दीन खानाचे घराणे मूळचे इराणचे. त्याचे आजोबा मिर्झा गियासुद्दीन आणि आसफखान हे दोघे अकबराच्या काळात हिंदुस्थानात आले. त्याचा बाप अक्कामुल्ला दावतदार कन्वीनी हा इराणच्या शहाच्या दरबारी प्रतिष्ठीत पदावर होता.[१५५] तो जेव्हा हिंदुस्थानात आला तेव्हा त्याचा एक भाऊबंद उज्जमान हाही त्याच्या बरोबर होता. हुसामोद्दीनला मुघलांनी उदगीरचा किल्लेदार म्हणून नेमल्यानंतर किल्लेदार या नात्याने त्याने सरहद्दीवरील किल्ल्याचा उत्तम बंदोबस्त ठेवला.

---

१४८. **मोगल दरबारची बातमीपत्रे**, भाग १, पृ.१७४.
१४९. कित्ता, पृ.४२२.
१५०. कित्ता, पृ.४६६.
१५१. राठोड, रा.था., **उदगीर : इतिहास आणि स्मारके,** पूर्वोक्त, पृ.१७.
१५२. पगडी, सेतुमाधवराव, **प्रतोद,** दिवाळी अंक, पूर्वोक्त, पृ.७.
१५३. कित्ता, पृ.१३.
१५४. राठोड, रा.था., पूर्वोक्त, पृ.२०.
१५५. पगडी, सेतुमाधवराव, पूर्वोक्त, पृ.१२.

इहतमामखान हा इ.स.१६५७ मध्ये उदगीरचा किल्लेदार म्हणून आला. त्यावेळी औरंगजेब बादशहा झाला होता. बिदर, कल्याणी यासारख्या महत्त्वाच्या ठिकाणावर त्याची नजर होती. निजामशाही नष्ट झाल्यावर व तिचा काही भाग वाटून घेऊन मुघलांचे अधिपत्य पत्करल्यावर आदिलशाहीकडून मुघलांना वेळेवर खंडणी येत होती. परंतु औरंगजेबला हे मान्य नव्हते.[१५६] शहाजहानकडून पत्रे येऊनही युद्ध थांबत नव्हते. विजापूरच्या आदिलशाहीला नष्ट करून तो प्रदेश त्याला आपल्या राज्यात समाविष्ट करून घ्यावयाचा होता. त्यानुसार औरंगजेबाने बिदर, कल्याणी जिंकून घेऊन दख्खनच्या किल्ल्यांची पुनर्रचना केली. आता मुघल सत्तेच्या सीमा विस्तारल्यामुळे नांदेड सुभ्यात बिदर या नव्या सुभ्याची निर्मिती करण्यात आली. उदगीर हे नांदेड-तेलंगण सुभ्यामध्ये होते.[१५७] त्याला सुभे बिदरमध्ये समाविष्ट करण्यात आले. त्या अगोदर दि. ३१ मार्च १६५७ रोजी बिदर मुघलांच्या म्हणजे आलमगीर बादशहाच्या हाती गेले. त्यानंतर वरील प्रमाणे ४ मे १६५७ रोजी मुघलांनी कल्याणी घेतली व वरीलप्रमाणे प्रदेशाची व्यवस्था लावण्यात आली.[१५८]

इहतमामखान स्वत: रोजनिशी लिहीत होता. त्याची अनेक पत्रे हैद्राबादच्या दप्तरखान्यात आहेत. त्याच्या कचेरीचे काम त्याने व्यवस्थितपणे हाताळले होते. मुघली सैन्याचा खर्च व शिबंदीची तयारी ठेवण्याचे कार्य त्याच्याकडे होते. त्याचे कार्यालय प्रांतातील सुव्यवस्था ठेवत होते. वेगवेगळ्या फौजदारांतर्फे त्याचा कारभार चालत असे. उदगीरपासून जवळ असणाऱ्या लोहारा गावी अंबाजी या शेतकऱ्याचे शेत लुटले जात असतांना चोरास ठार मारले. याबाबतीत फौजदारास सतर्क व कडक राहण्यास त्याने बजावले होते. तो दररोज गावाबाहेरील महमुद्दीन बागेत जात होता असे त्याच्या किल्ल्याच्या बातमीपत्रात म्हटले आहे. दि. १९ ऑक्टोबर १६६२ रोजी किल्ल्यात दिवाणखान्यास लागून असलेल्या खोलीत तो झोपला असतांना मुर्शीद कुलीखानाचा पुत्र गुलाम अनीस याने इहतमामखानास भोसकून ठार केले. तेव्हा त्याच्या कुल्वे नावाच्या मुलाने सर्व कारभार हाती घेऊन किल्ल्यात पहारेदारांची नेमणूक केली व गुलाम अनीसला ठार केले.[१५९] इहतमामखानाचे शव दफन करण्यासाठी औरंगाबादेस आणले होते.

इ.स. १६८१ मध्ये खातमखानास उदगीरचा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले. तो याआधी खानदेशातील जळगांव येथे फौजदार होता. त्याचे पूर्वज तुर्क होते. त्याचा काही त्रोटक पत्रसंग्रह हैद्राबादच्या दफ्तरखान्यात आहे. त्याने उदगीरच्या किल्ल्यात अनेक महालांची उभारणी केली. त्यातील एका महालावर शिलालेख आहे. त्याचा मराठीत अर्थ असा होता की, 'आलमगीरच्या काळात या किल्ल्याची किल्लेदारी प्राप्त झाली. आलमगीरला माझ्यासारख्या य:कश्चित खातमखाँवर अत्यंत विश्वास होता'. हा लेख लिहिणाऱ्याचे नाव महंमद अरिफ होते.

त्याने बांधलेल्या दुसऱ्या एका इमारतीवर एक लहान शिलालेख[१६०] कोरलेला आहे. त्यात ही इमारत खातमखाँ हिदवस्तबेग मोगल याच्या काळात तयार झाली असे नमूद केले आहे. याच इमारतीवर एक फार्सी भाषेत शेर[१६१] कोरलेला आहे. त्याचा मराठीत अर्थ असा की, 'आम्ही आपली पूर्ण हयात संसारासाठी लावली, परंतु विलक्षण आध्यात्मिक शक्ती ठेवणारेच लोक अशा इमारती तयार करू शकतात.' मोगली कागदपत्रात

---

१५६. पगडी, सेतूमाधवराव, पूर्वोक्त, **प्रतोद**, पृ.१३.
१५७. बेंद्रे, वा.सी., **विजापूरची आदिलशाही**, पूर्वोक्त, पृ.५६.
१५८. पगडी, सेतुमाधवराव, पूर्वोक्त, **प्रतोद**, पृ.१३.
१५९. कित्ता, पृ.१४.
१६०. शिलालेख - वल्द दोस्त बैग कौय मोगल ।
सुदा तयारचो कजीस्ता मकान ॥ राठोड, रा.था., पूर्वोक्त, पृ.२१.
१६१. शेर - तवाकरदन तमामउम्र रॉ मसरूफ आबऔगील ।
के शायद यकक्षमी साहब दिल्ली दश्मी कुब्द मंजील ॥ कित्ता.

अनुक्रमणिका

खातमखानच्या बदलीचे फर्मान सापडले आहे. त्यात म्हटले आहे की, खातमखानची बदली करून त्या जागी उदगीरचा किल्लेदार म्हणून सय्यद जैनुबाबीधीन याची नियुक्ती करण्यात येत आहे. खातमखानाला मराठ्यांविरुद्ध हाती घेण्यात आलेल्या मोहिमेवर पाठविण्यात आले, तेव्हा झालेल्या संघर्षात तोरणा किल्ल्यावर तो मारला गेला, असे मोगल दरबारच्या बातमीपत्रावरून दिसते.[१६२] यानंतर मुघल किल्लेदार म्हणून सय्यद मुस्तफाची नेमणूक करण्यात आली. त्याने अनेक मशिदी बांधल्याचे आपल्या कागदपत्रात नमूद केले आहे. लोकांच्या सोयीसाठी अधिक तरतूद केली जावी अशी मागणी त्याने केली होती. सय्यद मुस्तफा हा इ.स.१६९३ पर्यंत उदगीरचा किल्लेदार होता. मराठ्यांचे सैन्य अचानकपणे हल्ला करून लूट घेऊन जातात असे त्याने म्हटले आहे. सय्यद मुस्तफाच्या काळात फौजदार असलेल्या महंमद याह्या यास उदगीरचा मुघल किल्लेदार म्हणून नियुक्त करण्यात आले[१६३] अशी माहिती औरंगजेबाच्या 'फार्सी अखबार' मध्ये आली आहे.

महंमद याह्यानंतर उदगीरचा किल्लेदार म्हणून इ.स.१७०१ मध्ये हुसामोद्दीन याच्या घराण्याकडे पुन्हा किल्लेदारीची जबाबदारी सोपवण्यात आली. हुसामोद्दीन हा सोहराबखानाचा पुतण्या होय. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघल राजवटीस उतरती कळा लागली व मराठे आणि निजाम यांचे बळ वाढू लागले. हैद्राबादला निजामी राजवटीची पायाभरणी चालू होती. उदगीरच्या किल्लेदारीत मात्र फारसा फरक पडलेला दिसत नाही.

उदगीरला हुसामोद्दीनची घराणेशाही अबाधित राहिली. अब्दुल कय्युम हुसामोद्दीन नंतर इ.स.१७२४ मध्ये उदगीरचा किल्लेदार म्हणून मीर निजामुद्दीन अली काम पाहू लागला. यानंतर मुघलांचा हैद्राबादचा सुभेदार असलेल्या निजामाकडे उदगीर किल्ला[१६४] व प्रांत राहिला.

निजाम कालखंड (इ.स.१७२४-१८२०) : औरंगजेबाच्या शेवटच्या दोन वर्षात दख्खनमध्ये मराठ्यांचे वर्चस्व होते. धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, दादो मल्हार, संभाजी निंबाळकर आदी सरदार यावेळी मराठ्यांच्या मोहिमांचे नेतृत्व करीत होते. मे १७०६ मध्ये औरंगजेबाने धनाजीच्या बंदोबस्तासाठी झुल्फिकारखानास रवाना केले. त्याने मराठ्यांचा बीडपर्यंत पाठलाग केला. मराठे धर्मापुरी घाटावरून परळी, औसा, तुळजापूर व परांडा असे कूच करीत भीमेपलिकडे महादेव टेकड्यांमध्ये विसावले. झुल्फिकारखानही कंटाळून अहमदनगरच्या शाही तळावर परतला. या काळात मराठा व मुघल संघर्ष शीगेला पोहोचला होता. त्यातच मराठ्यांनी सळो की पळो करून सोडलेल्या औरंगजेबाने इ.स. १७०७ मध्ये शेवटचा श्वास घेतला.

मुघल काळात दख्खनची खानदेश, बेरार, औरंगाबाद, बिदर, विजापूर व हैद्राबाद अशा सहा सुभ्यात विभागणी झालेली होती. सध्याच्या लातूर जिल्ह्याचा काही प्रदेश अंतर्भूत असलेला तत्कालिन उस्मानाबाद विभाग परांडा आणि नळदुर्ग अशा दोन जिल्ह्यात विभागला होता. हे जिल्हे नंतर औरंगाबाद आणि विजापूर सुभ्यास जोडले गेले. नळदुर्ग विजापूर सुभ्यात सामावला गेला तरी नळदुर्ग हेच जिल्ह्याचे ठिकाण होते. मुनिमखान औरंगाबादीच्या 'सवाने दक्कन' या पर्शियन भाषेतील पुस्तकात परांडा व नळदुर्ग या दोन जिल्ह्यातील संस्थांचा व महसुलाबाबतचा वृत्तांत आढळतो. त्यानुसार नळदुर्ग हा आठ तालुक्यांचा व ३८९ खेड्यांचा, तर परांडा हा १९ तालुके व ६२८ खेड्यांचा जिल्हा होता. नळदुर्गचा महसूल १०,२५,३६३ रुपये होता व तो दर सहा महिन्यांने वसूल केला जात होता.

---

१६२. पगडी, सेतुमाधवराव, पूर्वोक्त, **प्रतोद,** पृ.१५.
१६३. पगडी, सेतुमाधवराव, **मोगल दरबारची बातमीपत्रे**, भाग १, पूर्वोक्त, पृ.२९.
१६४. पगडी, सेतुमाधवराव, पूर्वोक्त, **प्रतोद,** पृ.१३.

औरंगजेबाच्या मृत्युनंतर दोन वर्षांनी १७०९ मध्ये झुल्फिकारखानाचा दुय्यम अधिकारी दाऊद खान पन्नी हा दख्खनचा सुभेदार होता. इ.स.१७१३ मध्ये मुघल बादशहा फर्रुखसियरच्या काळात चिन-किलीच खान हा निजाम-उल-मुल्क या नावाने दख्खनचा सुभेदार झाला. तो दोन वर्षे सत्तेवर होता. त्यानंतर सय्यद बंधुंपैकी सय्यद हुसेन अलीखानला ही सुभेदारी मिळाली. तथापि, बादशहा व निजाम हे दोघेही सय्यद बंधुंचा तिरस्कार करीत. इ.स.१७२० मध्ये मुहम्मद शाह गादीवर बसल्यानंतर त्याने एप्रिल १७२० मध्ये निजाम-उल्-मुल्कला पुन्हा दख्खनची सुभेदारी दिली. पण दोनच वर्षानी म्हणजे १७२२ मध्ये त्याला मुघल साम्राज्याचा वजीर म्हणून नेमले. तथापि, दरबारी कारस्थानांना कंटाळून तो दख्खनमध्ये परतला व स्वतंत्र होण्याची कारस्थाने करू लागला. बादशहाने हैद्राबादचा सुभेदार मुबारिजखानला त्याजवर पाठविले. ऑक्टोबर १७२४ मध्ये साखरखेडाजवळ लढाई होऊन त्यात निजामाचा विजय झाला व त्याने स्वत:चे स्वातंत्र्य घोषित केले. अशा तऱ्हेने जवळजवळ शतकभर दिल्ली बादशाहीच्या अंकित असलेला लातूर प्रदेश अंतर्गत उस्मानाबाद जिल्हा निजामाच्या सार्वभौमत्त्वाखाली आला.

यापूर्वी सय्यद बंधुनी मराठ्यांना दख्खनमधील सहा सुभ्यात चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्याचे अधिकार बहाल केलेले होते. या अधिकारांमुळे निजामाच्या दख्खनमधील सार्वभौमत्त्वाला मराठ्यांकडून आव्हान दिले जाऊ लागल्याने त्यांच्यामध्ये संघर्ष अटळ ठरला. त्यातच निजामाने कोल्हापूरच्या छत्रपतींना पाठिंबा दर्शविल्याने त्याची व मराठ्यांची पालखेडनजीक फेब्रुवारी १७२८ मध्ये लढाई झाली. पहिल्या बाजीराव पेशव्याने त्याला नमविल्यामुळे निजामाने मराठ्यांचे वरील हक्क मान्य केले. तथापि, त्याने मराठ्यांविरुद्धचे वैर आपल्यामध्ये धगधगतच ठेवले होते. संधी मिळताच तो मराठ्यांच्या अंत:स्थ कारभारात हस्तक्षेप करीत असे. त्याने पेशव्यांविरुद्ध त्र्यंबकराव दाभाडे या सरदारास मदत केली. एप्रिल १७३१ मध्ये डभई येथे झालेल्या लढाईत पेशव्याने दाभाडेंसह निजामास पराभूत केले. त्यानंतर दि. २७ डिसेंबर १७३२ रोजी पेशवा व निजाम यांची लातूरपासून आठ मैलावरील रूई-रामेश्वर येथे ऐतिहासिक भेट झाली.

रूई-रामेश्वरची भेट : सन १७२८ पासून सन १७३२ पर्यंतच्या पाच वर्षात बाजीराव व चिमाजी आप्पा या दोघा बंधुनी माळवा, गुजरात, बुंदेलखंड या तीन प्रांतांत मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. निजामाने वरील वस्तुस्थिती ओळखली. दक्षिणेतील प्रत्येक व्यक्तीची व राजकारणाची त्याला जितकी माहिती होती, तितकी त्यावेळी दुसऱ्या कोणालाही नसेल. निजामाने मराठ्यांची ही वाढती ताकद ओळखून त्यांच्यापासून आपले राज्य सलामत राखण्यासाठी तडजोड म्हणून शाहूकडे निरोप पाठवून आपली व बाजीरावाची भेट मुद्दाम घडवून आणली.

पण बाजीरावास निजामाच्या भेटीस जायचे नव्हते. निजामाने हैद्राबादेस आपल्या मुलुखात राहून पूर्वीचे करार पाळल्यास, आपण त्याच्यावर स्वारी करणार नाही किंवा दक्षिणेतून त्यास साफ उखडून काढण्याचीही आपली इच्छा नाही हे त्याचे धोरण होते. सबब, प्रत्यक्ष भेट टाळावी असा त्याचा स्वत:चा विचार होता. परंतु सुमंत नारबाबा यांच्यामार्फत निजामाने शाहूकडे भेटीसाठी पुन्हा आग्रह धरला. अखेरीस शाहूने बाजीरावास निजामाकडे जाण्याची आज्ञा केली. तेव्हा नाईलाज होऊन निजामाच्या भेटीस जाणे बाजीरावास भाग पडले.

या भेटीचे वैशिष्ट्य म्हणजे या भेटीमागे शाहू व निजामाचा काहीतरी डाव आहे, निजामाच्या मनात भयकंर कावा आहे, भेटीच्या निमित्ताने बाजीरावाचा घात करावा, यासाठी तसा योग जुळविण्यासाठी निजामाने शाहू महाराजास दोन कोटी रुपये लाच देऊ केला आहे, महाराजांनाही बाजीरावाचा शिरजोरपणा दु:सह झाला आहे, तेव्हा परभारे काटा निघाला तर उभयतांना बरेच झाले असा शाहू राजांचाही मनोदय असल्याच्या

अफवा जनतेत पसरल्या होत्या. त्यामुळे या भेटीस जाऊ नये असा प्रत्यक्ष बाजीरावाच्या जवळच्या नातेवाईकांनीही आग्रह धरला होता. प्रत्यक्ष शाहू राजांनाही ही वार्ता कळली असावी असे त्यांनी याबाबत आनंदराव सोमवंशी यास लिहिलेल्या पत्रातील मजकुरावरून कळते. या मुद्यावरून बाजीरावाचा ब्रम्हेंद्रस्वामीनेही निषेध केला होता.

तथापि, त्यापूर्वीच दसऱ्याच्या मुहूर्तावर चिमाजी आप्पा, शिंदे, होळकर, पिलाजी जाधव वगैरे प्रमुख सरदार उत्तर हिंदच्या स्वारीस रवाना झाले होते. पण स्वत:च्या मनाच्या व प्रसंगास तोंड देण्याच्या धाडशी वृत्तीमुळे बाजीरावाने धन्याची आज्ञा शिरसावंद्य मानली. अशा भेटी नेहमी औरंगाबाद सारख्या परिचित ठिकाणी होत. पण प्रस्तुतची भेट औसा नजीक मांजरा नदीच्या काठी रुई-रामेश्वर येथे निजामाने ठरविली होती. हे ठिकाण लातूरच्या उत्तरेस आठ मैलावर आहे. सुदैवाने मुघली काव्यानुसार दगाबाजीचा अवलंब न होता भेट सुव्यवस्थित प्रकारे सिद्धीस गेली. दावलजी सोमवंशी, संताजी व शंभुसिंग जाधव हे सरदार भेटीप्रसंगी हजर होते. "पौष व.७, छ. २०, रजब बुधवार, (ता.२७ डिसेंबर, सन १७३२) ते दिवशी पंतप्रधान व नवाब यांच्या भेटी मांजरेच्या काठी रोहे रामेश्वर येथे जाल्या. पहिले भेटीचे समयी रायास एक हत्ती व एक मोत्याची जोडी, दोन घोडे, ७ पंचे वस्त्र व एक पंचा ऐसे दिल्हे. स्वामी यशस्वी होऊन परत आले. वर्तमान अंबाजी पंतानी परमहंस स्वामीस कळविले. बहुत समाधान पावले आणि पाच तोफा सोडल्या. नौबत वाजविली. शर्करा वाटली. बहुत उत्सव केला. नानांनी खुबीचे वर्तमान चिमाजी आपांस लिहून पाठविले. प्रत्यक्ष छत्रपतीस व मातुश्रींस आनंदाच्या कोटी उत्पन्न जाल्या."

बाजीराव-निजामाची ही प्रसिद्ध व महत्त्वाची चौथी भेट होय. या भेटीचा प्रत्यक्ष वृत्तांत स्वत: बाजीरावाने आपला बंधु चिमाजी आप्पास पत्र लिहून कळविला. त्यात आपल्या भेटीस निजाम कसा उत्सुक होता व नंतर भेट कशी झाली, त्या प्रसंगाचे तपशीलवार वर्णन असून सावधगिरी, बंदोबस्त व देकार होऊन भेट प्रसंग कसा झाला याची माहिती दिली आहे. ही भेट महत्त्वाची व स्मरणीय झाली हे नि:संशय. पेशव्याचे हे पत्र देवर-अण्हे (सातारा जि.) येथील पागेवाले चिपळूणकर यांच्या घराण्यात मिळाले.[१६५] ह्या भेटीत, "बोलाचालीचा मजकूर जाहला नाही. मोघम भाषणे झाली," असे बाजीराव लिहितो. निजामाने आदरसत्कार खूप केला. यावेळी निजमाने आपल्याकडील मराठे सरदार चंद्रसेन जाधव, सुलतानराव निंबाळकर वगैरेंचीही आपल्याशी भेट घडवून आणली हेही पेशवा कळवितो. पण कोणत्याही कलमाचा त्यात उल्लेख नाही.

ह्या भेटीचा निष्कर्ष एल्फिन्स्टनने पुढीलप्रमाणे काढला आहे- 'बाजीराव पेशव्याच्या बरोबर ही जी निजामाची भेट झाली, त्यात गुप्तपणे मराठ्यांनी निजामास असे आश्वासन दिले असावे की, आम्ही दक्षिणेत धामधुम करणार नाही. फक्त सरदेशमुखी व चौथ वसूल करू आणि निजामाने कबूल केले असावे की, उत्तर हिंदुस्थानात मराठे ज्यावेळी चढाई करतील त्यावेळी आपण तटस्थ राहू. मात्र मराठ्यांनी खानदेशला उपसर्ग पोचविता कामा नये.'[१६६]

यानंतर काही वर्षे दोन्ही सत्तांमध्ये शांतता होती. परंतु मराठ्यांच्या उत्तरेतील वाढत्या महत्वाकांक्षेमुळे निजामाला काळजी वाटू लागली होती. परिणामी डिसेंबर १७३७ मध्ये दोघांमध्ये भोपाळ जवळ संघर्ष होऊन निजाम पुन्हा पराभूत झाला.

---

१६५. हे पत्र भारत इतिहास संशोधन मंडळ, ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, पुणे, ९४६, पत्र क्र.६/६ ता.१२/११/१७३३ यामध्ये प्रकाशित झालेले आहे.

१६६. खोबरेकर, वि.गो., **महाराष्ट्राचा इतिहास**, (मराठा कालखंड), भाग-२, (१७०७-१८१८), मुंबई, १९८८, पृ.११६,११७.

निजामाच्या मृत्यूनंतर (दि. २१ मे १७४८) त्याचा पुत्र नासिरजंग व मुलीचा पुत्र मुजफ्फरजंग यांच्यात सिंहासनासाठी संघर्ष झाला. त्यात मुजफ्फरजंग विजयी ठरला. पण त्याला काही पठाणी सरदारांनी ठार केले. त्यानंतर फ्रेंच सेनापती बुशीच्या नेतृत्वाखाली फ्रेंचांनी निजामाचा द्वितीय पुत्र सलाबतजंग यास गादीवर आणले. यावेळी हैद्राबादचा कारभार फ्रेंचाच्या अमलाखाली चालत असे. बाळाजी बाजीराव पेशव्यांनी (नाना पेशवे) या स्थितीचा लाभ उठवून दिल्लीहून आसफजहाँचा ज्येष्ठ पुत्र गाझीउद्दीन फिरोजजंगला दख्खनमध्ये आणण्याचे ठरविले. यावेळी पहिल्या निजामाचा एक अधिकारी सय्यद लष्करखान याच्यावर वर्चस्व प्राप्त करण्यासाठी पेशव्यांनी प्रयत्न सुरू केले. लष्करखान पेशव्याला चकविण्यासाठी हैद्राबाद सोडून परांड्याला रवाना झाला. परांडा ही जानोजी निंबाळकरांची जहागीर होती. तेथून त्याने निजामास मदत करण्यासाठी पेशव्यांना विनविले. पेशव्यांनी ते मान्य केले. पण त्याचवेळी फिरोजजंगलाही मदत करण्याचे आश्वासन देऊन, होळकरांना विनंती केली की, त्यांनी फिरोजजंगला लवकर दख्खनला आणावे. लष्करखानाने सलाबतजंगला कळविले की, तो पेशव्यासह त्याला येऊन मिळेल. तथापि, त्याचवेळी त्याने आपला बक्षी मीर शमसुद्दीनखान सोबत फिरोजजंगच्या मदतीस सैन्याची एक तुकडी पाठवून सोबत फिरोजजंगला बक्षीस म्हणून एक हत्ती पाठवून दिला. फिरोजजंगला मराठ्यांचे मदतीचे आश्वासन मिळताच दख्खनच्या उत्तर जिल्ह्यांचा त्याने महसूल दिला. तथापि, लवकरच फिरोजजंग मरण पावल्यामुळे पुढील संघर्षाना विराम मिळाला. त्यानंतर मराठ्यांनी भालकीजवळ निजाम सलाबतजंगला वेढून खानदेश प्रांत त्याच्याकडून मिळविला. दरम्यानच्या काळात निजामाने बुस्सीचे दरबारातील वाढते वजन पाहून त्यास सावनूर येथे सेवामुक्त केले. पण बुस्सीने हैद्राबादवर आक्रमण करून प्रबळ तोफखान्याच्या बळावर निजामास नमविले व स्वत:स पुन्हा दरबारी सेवेत घेण्यास भाग पाडले. पेशव्यांनी या स्थितीचा फायदा घेऊन दि. २७ ऑगस्ट १७५७ रोजी पुणे सोडून औरंगाबादच्या दिशेने ससैन्य कूच केले. सिंदखेडजवळ त्यांची व निजामाची गाठ पडली. दि.१२ डिसेंबर १७५७ पासून चार दिवस घनघोर लढाई होऊन शेवटी दि. १७ डिसेंबर रोजी निजामाने पराभव मान्य केला व नळदुर्ग परिसरातील नळदुर्ग किल्ल्यासह २५ लाखाचा मुलूख मराठ्यांना तोडून दिला. याचवेळी इंग्रजांनी दख्खनमधील सत्तास्पर्धेत फ्रेंचांचा पराभव केला व सलाबतजंग एकाकी पडला. सलाबतजंगाने त्यामुळे आपले सर्व प्रशासकीय अधिकार निजाम अलीस बहाल केले. याचदरम्यान अहमदनगरचा सरदार कवी जंग याला पेशव्यांनी पैसा व जहागिरीची लालूच दाखवून आपल्याकडे वळवून घेतला. यामुळे निजाम व मराठ्यांचा पुन्हा नव्याने संघर्ष सुरू झाला.

उदगीरची लढाई[१६७] : निजामाने आपल्या सेवेतून बडतर्फ केलेल्या इब्राहिमखान गारदी यास पेशव्याने आपल्या सेवेत घेऊन व त्यास तोफखाना प्रमुख नेमून मराठ्यांचा तोफखाना मजबूत केला. हा तोफयुद्धात अत्यंत कसलेला व वाकब्गार असा वीर होता. ही पुढील संघर्षाची नांदी आहे हे ओळखून निजाम सलाबतजंग

---

१६७. उदगीरच्या मोहिमेच्या वृत्तांताचे साधन-साहित्य विपुल आहे. तथापि, सर्व साधनात साधारणत: साम्य आढळत असल्याने त्या सर्व साधनांचा येथे परामर्श घेणे आवश्यक वाटत नाही. पेशवे दप्तराचा समग्र पहिला खंड, खंड २५ ची पत्रे, (ले.२००, ३७५), राजवाडेकृत खंड १, (ले.१५४-१६५) वगैरे कागद तसेच बखरी, शकावल्या वगैरे साहित्यही मुबलक आहे. या लढाईबद्दल **खजाने अमिरा, तारीखे जफरा, तुजके आसफिया** आणि **हदीकतुल आलम** या फार्शी साधनग्रंथात तसेच डॉ.भ.ग.कुंटे (अनु.) **औरंगजेबाचा इतिहास**, **मराठे व निजाम,** सेतुमाधवराव पगडी (अनु.) **मोगल दरबारची बातमीपत्रे,** (खंड १ ते ३), **मराठे व निजाम**, गो.स.सरदेसाईंच्या **मराठी रियासत,** अ.रा.कुलकर्णी व ग.ह.खरे (संपा.) **मराठ्यांचा इतिहास** या मराठी ग्रंथांमध्येही विपुल माहिती उपलब्ध आहे. या लढाईचा एक नकाशा "पेशवे दप्तरातून निवडलेले कागद" भाग-१ (गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३०) यात प्रकाशित झालेला आहे.

व निजाम अलीने उदगीरला येऊन तळ ठोकला. नोव्हेंबर १७५९ मध्येच हालचाली सुरू झाल्या. या लढाईसाठी पेशव्यांनी सदाशिवराव भाऊ यांच्या नेतृत्वाखाली मराठी फौजा बिदरच्या रोखाने पाठविल्या व स्वत: देखरेखीसाठी नगरच्या किल्ल्यात येऊन राहिले. वाटेत पेडगावचा बहादूरगड घेऊन भाऊ पुढे निघाले. सदाशिवराव भाऊंबरोबर विठ्ठल शिवदेव, अंताजी माणकेश्वर, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, बाबाजी नाईक वगैरे प्रमुख सरदार होते. याशिवाय भाऊंनी निजामाकडील हणमंतराव व जानोजी निंबाळकर, लक्ष्मणराव खंडागळे वगैरे सरदार फितूर केले. रामचंद्र जाधव मात्र निजामाशी एकनिष्ठ राहिला. पेशव्यांनी या मोहिमेत नागपूरकर भोसल्यांना ससैन्य बोलविले होते. पण भोसले बंधुंमधील अंत:स्थ कलहामुळे ते वेळेवर येऊ शकले नाहीत.[१६८] निजामाकडे १२,००० ची फौज होती. त्यात १,००० हजार गारदी होते. सोबत १०० तोफाही होत्या. उदगीरवर पेशव्यांची ४०,००० ची खास फौज व इब्राहिमखानाचे १०,००० कवायती पायदळ होते.[१६९] निजामाच्या चौगीर्द फौजा बसवून मराठे लढाईस उतरले. दि.११ जानेवारी १७६० पासून उदगीरनजीक निजाम व मराठ्यांचा संघर्ष सुरू झाला. आरंभी थोड्याबहूत चकमकी होऊन दि.१९ व २० जानेवारी १७६० रोजी लातूर तालुक्यातील तांदुळजा येथे मोठी लढाई झाली. इब्राहिमखानाच्या तोफांनी अचूक गोळाफेकीने व पायदळाने निजामी सैन्यास अत्यंत हैराण केले. सर्व बाजूंनी मुघलांस घेरीत मराठ्यांनी त्यांची दाणावैरण बंद पाडली.[१७०] यावेळी धारुर येथे व्यंकटराव निंबाळकराच्या नेतृत्वाखाली ७-८ हजार मराठी फौजा निजामाच्या सहाय्यार्थ जमा झाल्या होत्या. त्यांना मिळण्याकरीता मुघल उदगीरहून निघाले होते. त्या दोघांचा मिलाफ झाल्यास आपणास भारी पडेल अशा विचाराने दि.२ व ३ फेब्रुवारी १७६० रोजी मराठ्यांनी निजाम औसाजवळ असता तोफा डागून मुघलांची पिछाडी साफ बुडविली. यात कादरखान गारदी, शौकतजंग वगैरे ७-८ निजामी सरदारांना जीव गमवावा लागला. प्यादे व गारदी यांची गणतीच नव्हती. मराठ्यांना निजामाकडील १० हत्ती व १५ तोफा मिळाल्या. मराठ्यांकडीलही बराणजी मोहिते, केशव लक्ष्मण पानसे हे सरदार व इतर १००-१५० लोक मारले गेले, तर ३००-४०० लोक जखमी झाले. नाना फडणीस, गोविंदराव तात्या खासगीवाले व इतर अनेक तरुण आयुष्यातील लढाईचा पहिला अनुभव या औसा-उदगीर संग्रामात मिळवित होते.[१७१] या लढाईत निजामाचा पूर्ण पराभव होऊन तांदुळजाच्या बावने सरदारांच्या गढीत तह झाला. या गढीतील दिवाणखान्याची जागा तहाची जागा म्हणून अद्याप ओळखली जाते. हाच तह उदगीरचा तह म्हणून इतिहास प्रसिद्ध आहे.[१७२]

---

१६८. सरदेसाई, गो.स., **मराठी रियासत**, भाग-६, (संपा. स.मा.गर्गे) पेशवा बाळाजी नानासाहेब (इ.स.१७४९-१७६१) के.बी.ढवळे, मुंबई, १९५३, पृ.१५९.

१६९. सरदेसाई, गो.स., **मराठी रियासत,** खंड ४, पेशवा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब, पुण्यश्लोक शाहू, छत्रपती रामराजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०, पृ.३४५ ते ३५२, ५७२.

१७०. सरदेसाई, गो.स., **मराठी रियासत**, भाग ६, पूर्वोक्त, पृ.१३०. **सनपुरीची बखर**, प्रकाशक दफ्तरे दिवानी खाते, हैद्राबाद, १९५०, पृ.२२ आणि सेतुमाधवराव पगडी, **एटीन्थ सेंच्युरी-डेक्कन**, पॉप्युलर प्रकाशन, बॉम्बे, १९६३, पृ.२६९-२७३.

१७१. पेशवे बखर, पृ.५२.

१७२. कानोले, वि.अ., 'तांदुळग्याचे नाईक बावने सरदार व मराठ्यांच्या इतिहासातील त्यांची कामगिरी', **भारत इतिहास आणि संस्कृती,** त्रैमासिक, एप्रिल १९९६, मुंबई, पृ. ५६-६९.

या लढाईची चक्षुर्वैसत्यम् हकिगत पेशवे दप्तरात नोंदलेली आहे.[१७३] ती पुढीलप्रमाणे :- "मध्ये मोगल, उजवे बाजूस भाऊसाहेब व डावे बाजूस दादासाहेब ऐसे दररोज झुंजत चालले, धारुर नजीक आल्यावर त्रिवर्गाही मिळून मनसुबा केला की, मोगल बळ धरुन जबरदस्तीने मारामारी करुन धारुरास पोहोचतो, मग हातास येत नाही. कुमक पोंचली नाही, तो हल्ला करुन झुंज द्यावे. अशी मसलत करुन तमाम सरदारांस बोलावून रात्रीस सांगितले की, सर्वांनी हिय्या करुन उदईक बळकट झुंज द्यावे. प्रात:काळी रोजच्या प्रमाणे मोगल गोल करुन भोवता तोफखाना देऊन चालला असता, पिछाडीचेच तोंडावर घोडे घातले. सर्वच हिम्मत धरुन हल्ल्यास उठले . तोफेची रंजक एक उडाली. उजवीकडून भाऊसाहेब व रावसाहेब व डावेकडून दादासाहेब ऐसे मारामार करीत खाशांचे हौद्यापर्यंत पोचले. एक प्रहरपर्यंत उत्तम युद्ध झाले. मोगल कचरला, हिंमत सोडली. आणखी चार घटका दम धरुन झुंज दिले असते तर गर्दीस मिळवून दिला असता. परंतु संध्याकाळ होत आला. बहुत लोक पडले व जखमी झाले, मोगलाने जवळ येऊन मुक्काम केला (शरणांगती पत्करली), यश आले. बहुत संतोष जाला. श्रीमंतांस खुशालीचे वर्तमान लिहून सांडणीस्वार पाठविले. श्रीमंत नगराहून आंबेपडदुरावर अगोदरच आले होते.[१७४] तेथे वर्तमान ऐकून संतोष पावले. सांडणीस्वारास सोन्याचे कडी व पोषाख बक्षीस दिले. संध्याकाळी मोगलांची मसलत करुन वकील सलूख करण्यास दुसरे दिवशी पाठविले. त्यांजला भाऊसाहेबांनी कळविले, क्रोड (कोटी) रुपयांचा मुलूख व दौलताबाद द्यावी. तेव्हा दिवाण विठ्ठल सुंदर याजपाशी शिक्के कटार देऊन यांचे डेऱ्यास पाठविला. त्याजवरुन बहुत रदबदली करुन साठ लक्षांचा मुलूख व किल्ले व शहरे घेऊन तह केला. मोगलाने सल्ल्यावर घातले. (१) साठ लक्षाची जागीर द्यावी. (२) अशीरगड व दौलताबाद असे दोन किल्ले आणि (३) विजापूर व बऱ्हाणपूर ही दोन शहरे याप्रमाणे सलूख जाला."

उदगीर तहाचे वर्णन पेशवे दप्तरात पुढीलप्रमाणे आढळते-[१७५] "प्रस्तुत किल्ले उदगीरीवर मोगल कोंडून ठेविला आहे. आपल्या फौजेच्या सभोवार गराडा असून घास-दाणा साफ बंद झाल्याने निरुपायास्तव निजाम अलीस तह करणे भाग पडले. महंमद कबीरखान, गुलाम सैदखान व रामराया बोलीचा पैगाम घेऊन आले. बहुत बजीद होऊन बोलले. प्रथम पंचेचाळीस लाखाचा प्रदेश देण्याचे ठरले, पण मागाहून सदाशिवरावाने आणखी पंधरा लाख वाढविले." हे जास्ती वाढविण्याचे कारण सदाशिवराव लिहितो, 'विठ्ठल सुंदरास बरतर्फ करावे अशी मागणी केली. त्यावर विठ्ठल सुंदरानी बजीद होऊन कळविले, मी सर्व प्रकारे पदरचा आहे. कृपा करावी चाकरी करुन दाखवीन, निष्ठेने वर्तणूक करीन, तेव्हा ती गोष्ट मान्य करुन पंधरा लक्ष जागीर वाढविली व दौलताबाद किल्ला घेतला. विठ्ठलपंतानी निजाम अली खानापाशी राहून आपले मर्जीप्रमाणे

---

१७३. पेशवे दप्तर, २५,२८१ आणि **मराठी रियासत**, भाग ४, पूर्वोक्त, (संपा., स.मा.गर्गे), पृ.३४५-३५४.

१७४. सरदेसाई, गो.स., पूर्वोक्त, **मराठी रियासत**, भाग ६, पेशवा बाळाजी नानासाहेब (इ.स.१७४९-१७६१), के.बी.ढवळे, मुंबई, १९५३, पृ.१३१.

१७५. सरदेसाई, गो.स., **मराठी रियासत**, खंड ४, (संपा. स.मा.गर्गे), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०, नवीन आवृत्ती, पृ.३४६-३५०. उदगीर प्रकरण-१७६०, पेशवे दप्तरातील निवडलेले कागद, सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३०, पृ.१-६० (एकूण पत्रे ८८). राजवाडे, वि.का., **मराठ्यांच्या इतिहासाची साधने**, खंड १, पृ.१५०-१५७. विजापूरकर, वि.गो., **पेशव्यांची शकावली**, खंड २, श्री.समर्थ प्रसाद प्रकाशन, कोल्हापूर, १९९०, पृ.२३६-२६७. पगडी, सेतुमाधवराव, **महाराष्ट्र आणि मराठे**, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६३, पृ.१९९-२००, पगडी, सेतुमाधवराव, **जर्नल ऑफ इंडियन हिस्ट्री**, व्हॉल्यूम xxxviii, भाग २, १९६०, पृ.३१५. **जर्नल ऑफ बॉम्बे युनिव्हर्सिटी**, व्हॉल्यूम xxvii, भाग ४, १९५८, पृ.१०.

वर्तणूक करावी तिलमात्र अंतर पडू देऊ नये. याप्रमाणे शपथपूर्वक केले'. थोडक्यात, साठ लक्षाचा[१७६] मुलूख देण्याचे ठरले. तहाचा निश्चय हा ता.११ फेब्रुवारी १७६० चा म्हणजे शेवटच्या लढाईनंतर आठ दिवसांचा आहे.[१७७]

उदगीर ते राक्षसभुवन[१७८] : उदगीरच्या मोहिमेत निजामाचा पराभव करून पेशव्यांनी त्याजकडून साठ लाखाचा मुलूख मिळविला, परंतु तो प्रत्यक्ष ताब्यात घेऊन त्याची व्यवस्था लावण्यास सदाशिवरावास फुरसत मिळाली नव्हती. उदगीरचे राहिलेले काम नानासाहेबाने बरेचशे उरकले. सन १७६१ च्या जानेवारीत पानिपतावर रणकंदन होत असता राघोबा दादा नांदेडवरून हैद्राबादच्या बाजूस आला. दादाने निजामाची भेट घेऊन कलह करण्याचा निश्चय केला. परंतु मराठ्यांची फौज अंगावर आलेली पाहून निजामाची त्यांजबरोबर लढण्याची छाती झाली नाही. 'निजाम औसाचे मुकामी आहे. त्याचा रोख कळत नाही. बिघाड जालिया परिणाम कठीण आहे.'[१७९] पुढे पानिपतच्या पराभवाच्या बातम्या ऐकून निजामाने डोके वर काढण्याचा विचार केला. नीळकंठराव पटवर्धनाने निजामास काहीसे धाकात ठेवले. तरी सन १७६१ च्या जून महिन्यात निजामाने नळदुर्गास येऊन व पेशव्याचे ते ठाणे घेऊन चव्हाणास दिले. उदगीरचा पराजय निजामास असह्य होत होता. महाराष्ट्राच्या पूर्वेकडील हातचा गेलेला मोठा विस्तृत प्रदेश कोणत्याही उपायाने परत मिळवावा असे त्याने धोरण स्वीकारले. पानिपतवर मराठ्यांची मुख्य फौज नाश पावली व नानासाहेब पेशव्याचा मृत्यू झाला. त्यामुळे त्यास मोठा हुरूप आला. त्यात प्रथम मराठ्यांचा जम बसला नाही, तरी शेवटी मराठ्यांची सैन्ये एकत्र झाली व 'चांभार गोद्यांच्या' बाजूस एक दोन ठिकाणी निजामाचा पराभव होऊ शकला. याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की, रामचंद्र जाधवराव हा सरदार व मीर मोगल हा निजामाचा भाऊ असे दोघे फुटून मराठ्यांना सामील झाल्यामुळे निजामास तह करणे भाग पडले. तथापि, या तहाच्या अटी ठरविताना पेशवे दरबारातील मुत्सद्यांत तीव्र मतभेद झाले. परिणामी पुढे राघोबादादाने निजामाची मदत घेऊन माधवराव पेशव्याचा पराभव केला. त्या बदल्यात राघोबादादाने निजामास ८५ लक्षाची जागीर व दौलताबाद किल्ला देऊ केला. यावरून उदगीरच्या वेळी घेतलेली ४५ लक्षांची व घोडनदीच्या वेळची ४० लक्षांची मिळून ८५ लक्षांची जहागीर यावेळी निजामास परत देण्यात आली.

तथापि, एवढ्याने निजामाची भूक शमण्याऐवजी उलट द्विगुणित झाली. त्यातच गोपाळराव पटवर्धन, गमाजी यमाजी व जानोजी भोसले यासारखे फौजबंद मराठे सरदार पेशव्यांचा आश्रय सोडून निजामास

---

१७६. निजामाने किती लाखाचा मुलूख दिला याविषयी इतिहासकारांत एकवाक्यता नाही. कै.वासुदेवशास्त्री खरे यांनी ऐतिहासिक लेख संग्रहात ६२ लक्षांचा आकडा दिला आहे (पृ.२२) व रियासतकारांनी साठ लक्षाचा आकडा सांगितला आहे. **(मराठी रियासत,** मध्य विभाग, खंड ४, पृ.३), पण अस्सल पत्रातून ४५ लक्षाचा आकडा सापडतो. 'मोगलाने सला केला. बऱ्हाणपूर व विजापूर ऐसे (सुभे) व असेरीचा किल्ला दिला. एकूण ४५ लक्षांचा सरंजाम हली मोगलांनी पेशव्यास दिला. तह जाला'. या म्हणण्यास दुजोरा देणारे भाऊसाहेबाचे पत्र पेशवे दप्तर, भाग २५, नं.२७४ मध्ये छापले आहे. त्यावरून ही जहागीर मुख्यतः औरंगाबाद सुभ्यात आणि बेदर व विजापूर सुभ्यात द्यावयाची आणि शिवाय अशेर व मुल्हेर हे किल्ले, त्याचप्रमाणे बऱ्हाणपूर व विजापूर ही शहरे द्यावयाची असे ठरले. आपटे, द.वि., '**उदगीर ते राक्षसभुवन**', भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, वर्ष-१६ वे, अंक २ रा, सप्टेंबर,१९३५, पृ.४०.

१७७. सरदेसाई, गो.स., पूर्वोक्त, **मराठी रियासत**, भाग ६, पृ.१३३ आणि पेशवे दप्तर, १.८६.

१७८. आपटे, द.वि., पूर्वोक्त, पृ.३९ ते ४४.

१७९. सरदेसाई, गो.स., **मराठी रियासत**, मध्य विभाग-४ (१७६१ ते १७७४) गणेश महादेव आणि कंपनी, मुंबई, १९२५, पृ.५.

मिळाल्यामुळे पेशव्यांचा बराच मुलूख हस्तगत करण्यास ही चांगली संधी जुळून आली आहे असे त्याला वाटले. परंतु या प्रसंगाने माधवराव व राघोबा यांची एकजूट होऊन पेशव्यांचे सैन्य हैद्राबाद राज्यात शिरले. निजाम व जानोजीच्या फौजा त्यांचा पाठलाग करत होते. पेशव्यांचे मुक्काम पुढील प्रमाणे होते- पैठण ३० मार्च, नळदुर्ग १० एप्रिल, तेथून २३ एप्रिल उदगीर[१८०], १० मे मेदक, १५ मे हैद्राबाद, १७ जून चितापूर, २३ जून गुलबर्गा, पुढे जुलैमध्ये बार्शी पानगाववरून ८ ऑगस्टला मुक्काम बीड येथे. तेथून १० ऑगस्टला राक्षसभुवनचा संग्राम झाला. वर्ष १७६३ चे मार्च ते ऑगस्ट हे सहा महिने उभय पक्षांच्या हालचालींनी असे व्यस्ततेत गेले.

औसाकडे विठ्ठल सुंदराचे गाव होते ते पेशव्यांनी जाळले, म्हणून सखाराम बापूचे सासवडनजीकचे गाव विठ्ठल सुंदराने जाळले.[१८१] छावणीसाठी मराठी मुलूखात राहण्याची निजामाची सोय नव्हती आणि स्वत:च्या मुलूखातही पेशव्यांच्या फौजा अंगावर असल्यामुळे सामना केल्याशिवाय गत्यंतर नाही हे त्याच्या लक्षात आले. पण पेशवे लढाई करीत नाहीत किंवा सलूखही का करीत नाहीत, याची उमज निजामास पडेना. जुलै महिन्यात दोघेही बलवान शत्रु दहा-वीस कोसाच्या अंतराने दोन मदोन्मत हत्तीप्रमाणे एकमेकांशी टक्कर घेण्याच्या विचारात होते. पुण्याहून छावणीसाठी बिदर गाठावे म्हणून भीमाकाठाने कूच करून औसा-धारूरपर्यंत गेल्यावर पेशवे आपणास अडविणार हे ओळखून निजाम परत औरंगाबादकडे चालू लागला. निजामाचा तोफखाना उत्कृष्ट असल्यामुळे त्याच्यावर एकदम हल्ला करणे पेशव्यास सोयीस्कर वाटले नाही. परंतु गोदावरीचा पूर पाहून निजामाने आपली मुख्य फौज विठ्ठल सुंदराच्या हाताखाली अलीकडच्या काठावर राक्षसभुवनच्या जवळ धोंडराई येथे ठेवली. ही माहिती पेशव्यांना मिळताच त्यांनी याचा फायदा घेतला. दि.१० ऑगस्ट १७६३ रोजी मराठ्यांनी राक्षसभुवनास निजामाच्या फौजेस अकल्पित गाठून तिचा पराभव केला. मुसदखान हा निजामातर्फे तहाची बोलणी करू लागला. पेशव्यांतर्फे होळकरांचा दिवाण गंगाधार यशवंत चंद्रचूड वाटाघाटी करीत होता. धारुर, खंदार (कंधार), अंतूर, नळदुर्ग व औसा हे पाच किल्ले व पंच्याऐंशी लक्षाचा मुलूख पेशव्यास निजामाने द्यावा अशी मागणी होती.[१८२] परंतु शेवटी उदगीरच्या तहाप्रमाणे साठ लाखाचा मुलूख, त्याशिवाय नवीन बावीस लक्षाचा मिळून ब्याऐंशी लक्षावर तह कायम झाला. नवीन किल्ले पेशव्यास मिळाले नाहीत. हा तह २५ सप्टेंबर १७६३ रोजी कायम झाला. हा तह पुढे ३६ वर्षे म्हणजे खर्ड्याच्या लढाई पावेतो चालला.

माधवराव पेशवा अल्पायुषी ठरून दि.१८ नोव्हेंबर १७७६ रोजी मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर नारायणराव पेशवा झाला. परंतु लवकरच त्याचा खून झाला. राघोबादादा पेशवा झाल्यानंतर नागपूरच्या गादी प्रसंगी दादाने रघुजी व साबाजी या दोन भोसले बंधुंपैकी रघुजीची बाजू घेतली. साबाजी भोसले व निजाम यांचे संगनमत होते. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी राघोबादादाने दि.५ नोव्हेंबर १७७३ रोजी नळदुर्गास मुक्काम केला. त्याच्या बरोबर ४० हजार फौज होती. तेथे निजामाचा वकील येऊन बोलणी चालू झाली. तेव्हा साबाजीचा मिलाफ सोडून द्या अशी मागणी दादाने केली. ती निजामाने मान्य केली नाही. तेव्हा निजामाचा औसा किल्ला हस्तगत करून दादाने बेदरकडे चाल केली.[१८३] शेवटी दोघांमध्ये तह झाला. इकडे बारभाई कारस्थान होऊन पुण्यात सवाई माधवरावाच्या नावे राज्यकारभार सुरू झाला. सन १७९५ च्या सुमारास मराठे व निजाम यांच्यात युद्ध होऊन त्यात निजामाचा पराभव झाला. संबंध बिघडविण्यास निजामाचा कारभारी

---

१८०. सरदेसाई, गो.स., **मराठी रियासत**, खंड ५, (संपा.स.मा.गर्गे), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०, पृ.५६,५७.
१८१. सरदेसाई, गो.स., **मराठी रियासत**, मध्य विभाग, खंड ४, पृ.४८ ते ५४.
१८२. कित्ता, पृ.६०.
१८३. कित्ता, पृ.३५६.

मुशीर-उल्मुल्क हा जबाबदार होता. त्याचा बंदोबस्त करण्याची मागणी नाना फडणीसाने केली होती. मुशीराने स्वत: आपला दिवाण हरी नारायण नेमिवंत यास परशुरामभाऊशी बोलणी करण्याकरीता पाठविले होते. त्यात त्याने-मुशीराने कारभारातून निघून आपल्या औसाच्या किल्ल्यात जाऊन राहावे असा पर्याय सुचविला होता. परंतु त्याला मान्यता मिळाली नाही. शेवटी मुशीर स्वत: मराठ्यांच्या स्वाधीन झाला. निजाम खर्ड्याहून पारनांदूर, पारगाव, अडळ, बोरगाव, कलंब, सुरडी, खडकी या मार्गाने बेदरकडे परत गेला. निजामाने उदगीरच्या तहाप्रमाणे ठरलेला प्रदेश मराठ्यांना देण्याचे मान्य केले.[१८४] त्यात सध्याचा जवळ जवळ संपूर्ण मराठवाडा समाविष्ट झाला होता. खर्ड्याच्या विजयानंतर सवाई माधवरावाच्या आकस्मिक मृत्यूमुळे (दि.२७ ऑक्टोबर १७९५) निर्माण झालेल्या गोंधळात नाना फडणीसास आपली जागा टिकविण्यासाठी मुशीर, उल्मुल्कला सोडून द्यावे लागले. खर्ड्याच्या लढाईनंतरच्या तहाने घेतलेला मुलूख निजामास परत द्यावा लागला. अशा रीतीने मराठवाडा पुन्हा निजामाच्या अधिपत्याखाली गेला.[१८५]

या काळात इंग्रजांचेही आक्रमक राजकारण चालू होते. दि. १२ ऑक्टोबर १८०० रोजी ईस्ट इंडिया कंपनीने निजाम अलीबरोबर तैनाती फौजेचा तह करून त्याचे स्वातंत्र्य संपविले. या तहाने इंग्रजांचे वर्चस्व हैद्राबादवर प्रस्थापित झाले. निजामाच्या राज्याचे संरक्षण करण्यासाठी इंग्रजाची फौज सिकंदराबादला कायमची ठेवण्यात आली. इंग्रजांनी निजामाचे सैन्य सुधारण्यासाठी इंग्रज अधिकारी नेमले. इंग्रजांनी हळूहळू या सैन्यांत आपल्या मनाप्रमाणे भरती करून घेतली. या सैन्याचे नाव 'निजाम्स कंटिजेंट' असे ठेवले. या काळात हैद्राबाद राज्यात स्थानिक लष्कराने निजाम सत्तेविरुद्ध बंड केले. काही सैनिकांनी राजा रावरंभा निंबाळकर आणि नूर-उल्-उमरा या प्रसिद्ध सरदारांशी संबंध प्रस्थापित करून निजाम सत्तेविरुद्ध कारवाया सुरू केल्या. त्यामुळे निंबाळकर याची औसा येथे त्याच्या जहागिरीकडे हकालपट्टी करण्यात आली,[१८६] तर नूर-उल्-उमरा यास नोकरीतून बडतर्फ करून नंतर औसा येथील किल्ल्यात बंदिस्त करण्यात आले.[१८७] या दरम्यान इ.स.१८०३ मध्ये निजाम अलीखानचा मृत्यू होऊन त्याचा पुत्र सिकंदरजहॉ त्याचवर्षी निजाम बनला. इ.स.१८०८ ते १८४३ पर्यंत राजा चंदुलाल हा हैद्राबाद राज्याचा जवळजवळ सर्वाधिकारी होता. इंग्रजांना खूष ठेवणे, राज्यकारभार सुधारण्यासाठी काहीही प्रयत्न न करणे आणि राज्यात बंडे उद्भवली की, इंग्रज अधिकाऱ्यांच्या हाताखाली तयार झालेल्या फौजेद्वारे ती मोडून काढणे याशिवाय त्याने दुसरे काहीच केले नाही. त्याचा परिणाम म्हणून पुढे राज्यात सर्वत्र निजामी राज्याविरुद्ध व इंग्रजांविरुद्ध उठाव होऊ लागले.

सन १८१९ व १८२० या दोन्ही वर्षी हैदराबादच्या लष्करात अनेकदा बंडाळी माजली. त्यात उदगीरच्या शिवलिंगप्पा देशमुखाचे बंड[१८८] विशेष गाजले. त्याची हकिगत पुढीलप्रमाणे :-

डिसेंबर १८२० मध्ये सुसज्ज अशा १७० घोडेस्वारांची एक तुकडी उदगीर येथे आणण्यात आली व लेफ्टनंट जनरल सदरलँड यास उदगीरचा ताबा घेऊन त्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्यास फर्मावण्यात

---

१८४. शेजवलकर, त्र्यं.शं., **निजाम-पेशवे संबंध** (१८ वे शतक), कै.न.चिं.केळकर व्याख्यानमाला, पुणे, १९५४, पृ.१३४ ते १३८.

१८५. खोबरेकर, वि.गो., पूर्वोक्त, पृ.५१०.

१८६. कुंटे, भ.ग., **स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष**, मराठवाडा विभाग, दर्शनिका विभाग, मुंबई, १९७६, प्रास्ताविक, पृ.२.

१८७. **गॅझेटिअर ऑफ इंडिया**, महाराष्ट्र स्टेट, **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट**, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९७२, पृ.८९.

१८८. कित्ता, पृ.९०.

आले. २२ डिसेंबर रोजी तो येथे येताच त्यास दिसले की, देशमुख येथील तालुकदाराकडून दंडेलीने येथील किल्ल्याचा ताबा घेऊन व त्यावर सशस्त्र शिबंदी ठेवून बंडखोरी करीत आहे.

ले.ज.सदरलँडने एक पत्र पाठवून त्यास आपल्या तळावर येण्याची विनंती केली. पण ती देशमुखाकडून फेटाळली गेली. त्यामुळे सदरलँडने सुलीअलीकडे दि.२४ रोजी सकाळीच मोर्चा वळविला. तथापि, त्यास किल्ल्यावरील देशमुखाच्या पहिल्या फळीच्या सैनिकांकडून प्रतिकार झाल्याने त्याने पुढे न जाता तेथेच डेरा टाकला. नंतर त्याने देशमुखाला निरोप पाठविला की, ही तुकडी त्याला त्याच्या गुन्ह्याची शिक्षा देण्यासाठी आलेली नसून स्थानिक सरकारी अधिकारी, जो तालुकदार, त्याची त्या पदावर त्याने पुनःस्थापना करावी व त्याच्या सैन्याने शस्त्रे खाली ठेवावीत हे सांगण्यासाठी आली आहे.

तथापि, या निरोपाचा परिणाम देशमुखावर झाला नाही. सदरलँण्ड लिहितो, 'आमच्या घोडेस्वारांना शत्रुच्या गोळीबाराला प्रत्युत्तर न देण्याची आज्ञा होती. देशमुखाचे घातपात करू पाहणारे सैनिक दुपारी आमच्या उघड्या तळावर येतांना दिसले. मी १०० सैनिकांसह निघून अतिशय शिताफीने ठाण्यावरील शिबंदीसह खोल व वृक्षांनी वेढलेल्या दरीत त्यांना न दिसता उतरलो. ही दरी पुढे तटबंदीच्या दिशेने मोकळ्या मैदानात प्रवेशते. सैन्याला योग्य त्या ठिकाणी उभे करून आम्ही गोळीबार केला व चकमक करू पाहणाऱ्या देशमुखाच्या शिबंदीस धुळीस मिळविले. तेवढ्यात त्यांच्या मदतीस दुसरी शिबंदी आल्यामुळे आम्ही तेथून माघार घेऊन त्यांच्या पिछाडीवर हल्ला केला. हे पाहताच गोंधळ उडून किल्ल्याच्या द्वाररक्षकांनी किल्ल्याचे दरवाजे बंद करून आपल्या शिबंदीस जणू आमच्या हाती दिले. आमच्या घोडेस्वारांनी तटबंदीखाली जमा होऊन पिस्तुलाने बुरुजांवरील कित्येक सैनिकांना टिपले. बुरुजांच्या माचीवरून गोळीबार करणाऱ्या सैनिकांच्या गोळ्या आम्ही बुरुजाच्या तळाशी असल्याने आम्हाला न लागता आमच्या डोक्यावरून जात. मी यावेळी बुरुजाकडील घोडेस्वारांना हटवले. पण पूर्वीच तयार करून ठेवलेल्या, तटास लावण्याच्या शिड्या वेळीच न मिळाल्याने मला पुढील हल्ला करता आला नाही. शत्रुची पहिली फळी व त्यानंतर मदतीस आलेली शिबंदी यात ऐंशीपेक्षा जास्त लोक नव्हते. चकमक करणारे काहीजण दरीमध्ये पळून गेले, तर काहींनी जवळपासच्या घरांमध्ये आश्रय घेतला. या चकमकीत बरेचसे लोक जखमी व मृत्यू पावले. त्यात मालजी कोल्का हा या भागातील एक नतद्रष्ट मनुष्य होता'. हा वीर योद्धा ब्रिटिशांना उपद्रवक्षम राहिल्यामुळे त्याची नोंद त्यांनी नतद्रष्ट अशी केली आहे.

सदरलँड पुढे लिहितो की, 'रात्री शिवलिंगप्पाने किल्ला खाली करून गावजेगावचा प्रमुख मेघशाम याच्याकडे आश्रय घेतला. हा एक दरोडेखोर होता व तो येथील एका मजबूत व उंच तटभिंती असलेल्या किल्ल्यात रहात होता. तोफा किंवा पायदळ नसल्याने येथे आपणास हल्ला करणे शक्य नव्हते. याचा फायदा घेऊन शत्रुने येथून रात्री पलायन केले. आम्ही जिल्ह्यात दुसऱ्या जागी असलेल्या काही किल्ल्यांवर हल्ले करून त्यांची तोडमोड केली व सुव्यवस्था निर्माण केली'.

रेसिडेंटने पत्र पाठवून सदरलँडचे अभिनंदन केले व निजामी राज्यास धोका पोहोचू पाहणाऱ्या दंगेखोरांना नष्ट करण्याची त्यास मोकळीक दिली. याविषयीचा अधिक तपशील याच प्रकरण अन्यत्र आला आहे.

एचएफ ४१३७—९अ

अनुक्रमणिका

प्रकरण २ : इतिहास

आधुनिक काळ

- लातूर जिल्ह्याची निर्मिती व व्याप्ती
- निजाम घराण्याचा इतिहास
- सामाजिक सुधारणा व प्रबोधन
- लातूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलन
- लातूरची महिला परिषद
- हैद्राबाद हिंदू महासभा
- १९४२ चे आंदोलन
- इत्तेहद-उल-मुसलमीन (इत्तेहादूल मस्लिमीन) संघटना
- परिशिष्ट

आधुनिक काळ (इ.स.१८१८ ते १९४८)*

लातूर जिल्ह्याची निर्मिती व व्याप्ती : महाराष्ट्र शासनाने उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून दि. १६ ऑगस्ट १९८२ रोजी लातूर जिल्ह्याची निर्मिती केली. या जिल्ह्याचा इतिहास समजण्यासाठी लातूर जिल्ह्याच्या सीमा कशा बदलत गेल्या हे लक्षात घेणे आवश्यक आहे. निजामी राजवटीतही सत्तेतील स्थित्यंतराप्रमाणे प्रादेशिक बदल होत गेलेले आहेत. निजामी राजवटीत सध्याचा लातूर जिल्हा तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात समाविष्ट होता. इ.स.१८५३ च्या तहानुसार निजामाने ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्जापोटी वऱ्हाड, नळदुर्ग व रायचूर हे जिल्हे ब्रिटिशांना दिले होते. ते इ. स. १८६० मध्ये ब्रिटिशांनी पुन्हा निजामास सुपूर्द केले. त्यातील नळदुर्ग जिल्ह्यात सध्याच्या लातूर जिल्ह्याचा बराचसा भाग अंतर्भूत होता व या जिल्ह्याचे मुख्यालयही नळदुर्ग येथेच होते. इ.स.१८७० मध्ये निजामाचा पंतप्रधान सर सालारजंग (प्रथम) याने राज्यातील जिल्ह्यांची पुनर्रचना केली. त्यानंतर इ.स.१९०४ मध्ये या जिल्ह्याचे नामकरण उस्मानाबाद असे करण्यात आले व मुख्यालयही उस्मानाबाद येथे नेण्यात आले. त्यात वाशी, औसा, कळंब, तुळजापूर, नळदुर्ग व उस्मानाबाद हे तालुके समाविष्ट होते. त्यापैकी औसा तालुक्यात लातूरचा समावेश होता. इ.स.१९०५ मध्ये औसा तालुक्याचे मुख्यालय लातूरला नेऊन लातूर हा नवीन तालुका निर्मिण्यात आला. इ.स.१९४८मध्ये निजामाची सत्ता संपुष्टात आल्यानंतर इ.स.१९५० मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुक्यांच्या हद्दी पुन्हा नव्याने निश्चित करण्यात आल्या. यावेळी भूम, परांडा यासह एकूण ११ तालुके उस्मानाबाद जिल्ह्यात होते. त्यानंतर इ.स.१९५६ च्या राज्य पुनर्रचनेंतर्गत हा जिल्हा मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला. यावेळी अहमदपूर, निलंगा आणि उदगीर हे बिदरमधील तालुके उस्मानाबाद जिल्ह्यात हस्तांतरित करण्यात आले. त्यानंतर दि.१६ ऑगस्ट १९८२ रोजी या जिल्ह्यातील लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा व औसा या पाच तालुक्यांचा समूह वेगळा करण्यात येऊन सध्याचा लातूर जिल्हा निर्माण करण्यात आला. पुढे इ.स.१९९२ मध्ये अहमदपूर तालुक्यातील चाकूर सर्कल क्षेत्रास व बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई तालुक्यातील रेणापूर सर्कल क्षेत्रास तालुक्याचा दर्जा देऊन हे दोन्ही तालुके लातूर जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले. त्यानंतर पुन्हा १९९९ मध्ये निलंगा, उदगीर व अहमदपूर या तालुक्यांची पुनर्रचना करून शिरूर-अनंतपाळ, देवणी व जळकोट हे तालुके निर्माण करून ते लातूर जिल्ह्यात वर्ग करण्यात आले.

निजाम घराण्याचा इतिहास : हैद्राबाद संस्थानातील उस्मानाबाद जिल्ह्याचा भाग असलेल्या आजच्या लातूर जिल्ह्यावर निजामाची सत्ता होती. या निजाम घराण्याचा संस्थापक मीर कमरुद्दीन उर्फ निजाम-उल्-मुल्क (उल्मुल्क) हा होय. त्याचे आजोबा ख्वाजा अबिदअली मक्केच्या यात्रेसाठी म्हणून हिंदुस्थानात आले असताना राजा शहाजहान बादशहाच्या कृपेने दिल्लीतच स्थायीक झाले. त्यांचा पुत्र शहाबुद्दीन यास गुजरातचा सुभेदार म्हणून नेमणूक मिळाली होती. तो इ.स.१७१० मध्ये मृत्यू पावला. त्याचा पुत्र म्हणजेच मीर कमरुद्दीन हा होय. इ.स. १७१३ मध्ये त्याचीच दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली. दिल्ली दरबारातील सत्ता संघार्षाचा फायदा घेऊन त्याने दक्षिणेत आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्याचे उद्योग आरंभले. त्याच्या दीर्घोद्योगांना आळा घालण्यासाठी दिल्ली दरबाराने हैद्राबादचा सुभेदार मुबारिजखान यास पाठविले, पण निजाम-उल-मुल्काने त्याचा वऱ्हाडमधील साखरखेड्याच्या लढाईत इ.स.१७२४, पराभव केला आणि हैद्राबाद येथे स्वत:चे

* या भागाचे लेखन डॉ. पी. व्ही. काटे (निवृत्त प्रपाठक व इतिहास विभाग प्रमुख, नुतन महाविद्यालय, सेलू, जि.परभणी) यांनी केले आहे. संपादक मंडळ सदस्य डॉ.भा.शं.ढेंगळे यांनी याची तपासणी केली असून डॉ.ढेंगळे व डॉ.शिवराज बोकडे यांनी यातील काही भागांच्या नोंदी नव्याने केल्या आहेत.

अनुक्रमणिका

स्वतंत्र राज्य स्थापन केले. मुघल सम्राट फर्रूखसियर याने याच कमरुद्दीनला 'निजाम-उल-मुल्क फिरोजजंग चिन किलिचखान' ही पदवी दिलेली होती. निजाम या शब्दाचा अर्थ व्यवस्था किंवा बंदोबस्त असा आहे. देशाची व्यवस्था लावणारा तो 'निजाम-उल-मुल्क' होय. तो अतिशय चाणाक्ष गृहस्थ होता. महमूदशहा याने निजामास 'आसिफजाह' ही पदवी दिली होती. आसिफ हा सॉलोमनचा मंत्री होता. आसिफजाह म्हणजे आसिफच्या तोडीचा. तेव्हापासून हैद्राबादच्या निजाम घराण्यास 'आसिफजाह घराणे' संबोधले गेले.[१८९]

निजामाला साखरखेड्याच्या युद्धात मराठ्यांचे साह्य लाभले होते. त्याबद्दल निजामाने शाहूचे आभार मानलेले होते. त्याचवेळी दिल्लीचा बादशहा महमूदखान यासही पत्र पाठविले होते. आपण मराठ्यांच्या आक्रमणाला पायबंद घालून दक्षिणेत शांतता प्रस्थापित करीत आहोत असे आश्वासन दिले होते. म्हणजेच निजाम स्वत:ला पूर्णत: स्वतंत्र मानीत नव्हता. त्याने मराठे आणि दिल्ली दरबारला खुश ठेवण्याचे धोरण अंगिकारले. हेच निजामाच्या राजकारणाचे रहस्य होते.[१९०] निजाम स्वतंत्र झाला असला तरी त्याने स्वत:ला राजा संबोधले नाही. कारण त्यास ते सोयीचे नव्हते. अल्पावधीतच त्याने पूर्वेकडील प्रांतात आपली सत्ता प्रस्थापित केली.

निजामास मराठ्यांबरोबर लढावे लागले. त्याचा दि. २५ फेब्रुवारी १७२८मध्ये पालखेड (औरंगाबाद-जिल्हा, वैजापूर जवळ) येथे बाजीरावाकडून पराभव झाला. चौथाई वसूल करण्याचे मराठ्यांचे अधिकार त्याने मान्य केले. दि. २७ डिसेंबर १७३२ रोजी पहिला बाजीराव आणि निजाम-उल्-मुल्क यांची भेट लातूर जवळील रूई-रामेश्वर याठिकाणी झाली होती. या भेटीचा स्वत: बाजीरावाने आपल्या भावाला लिहिलेल्या पत्रात उल्लेख आहे.[१९१] त्यानंतर इ.स.१७३७ मध्ये भोपाळ येथे निजामास मराठ्यांकडून पराभव पत्करावा लागला. निजाम व पेशवा यांच्यात भालकी येथे १७५२, सिंदखेड येथे १७५७-५८, उदगीर (तांदुळजा) १७६०, राक्षसभुवन १७६३ आणि खर्डा येथे १७९५ साली लढाई झाली.

निजाम हा अनियंत्रित राजा असला तरी त्याने जनतेच्या कल्याणासाठीही प्रयत्न केले. "ईश्वराने आपल्याकडे जनकल्याणाची जबाबदारी सोपविली असल्याने प्रशासनाकडे आपण लक्ष दिले पाहिजे" अशी त्याची निष्ठा होती. मुघलांचे दक्षिणेत पुढीलप्रमाणे सहा सुभे होते. (१) खानदेश (यात सहा जिल्ह्यांचा समावेश होता.), (२) औरंगाबाद (बारा जिल्हे), (३) वऱ्हाड (१२ जिल्हे), (४) बिदर (सात जिल्हे), (५) विजापूर (२३ जिल्हे), आणि (६) हैद्राबाद (३८ जिल्हे).[१९२] यापैकी निजामाकडे प्रत्यक्ष वरंगल (२५ तालुके), औरंगाबाद (२४ तालुके), गुलबर्गा (२६ तालुके), मेदक (२४ तालुके) असे चार प्रांत होते.

प्रशासनासाठी दिवाणी दफ्तर व मालदफ्तर असे दोन भाग होते. दिवाणाद्वारे राज्यकारभार सांभाळला जात असे. सुरुवातीच्या काळात अन्वरूल्लाखान (१७३६) आणि पूरणचंद (१७४७) हे निजामाचे दिवाण होते. त्यांनीच प्रशासन सांभाळले. निजामाने राज्यात स्थैर्य व शांतता प्रस्थापित केली. या काळाचे वैशिष्ट्य म्हणजे निजाम-उल-मुल्काने इंग्रज आणि फ्रेंच सत्तांना सतत झुलवत ठेवून उभयतांच्या अंतर्गत संघर्षापासून स्वत:स

---

१८९. कार्क, डी.एफ., **फेबुलस मोगल**, लंडन, १९५५, पृ.२०.

१९०. काटे, पी. व्ही., **मराठवाडा अंडर दि निजाम्स, (१९२४-१९४८)**, मित्तल पब्लिकेशन्स, दिल्ली, १९८७, पृ.१४.

१९१. **गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट**, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९७२, पृ.९३.

१९२. वहिदखान, एम.ए., **ब्रीफ हिस्टरी ऑफ आंध्र प्रदेश**, स्टेट आर्काइव्हज्, गव्हर्नमेंट ऑफ आंध्र प्रदेश, हैद्राबाद, पृ.४७; सिराज अली, **डेक्कन अंडर सालारजंग** (खंड १ व २) १८८१.

अलिप्त ठेवले. आपण कोणत्या पक्षाचे आहोत हे त्यांना कळू दिले नाही.[१९३] निजामाने स्थिर शासन प्रस्थापित केले होते[१९४]. त्याने आपल्याबरोबर माळव्यातून काही हिंदू आणि मुसलमान सरदार आणले. त्यांना जहागिरी देऊन त्यांच्या साह्याने राज्यकारभार सांभाळला.[१९५] दि. २१ मे १७४८ रोजी पहिला निजाम बऱ्हाणपूर येथे मरण पावला.

निजाम-उल-मुल्काच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा नासिरजंग (१७४८-५०) व नातू मुज्जफरजंग यांच्यात वारसा हक्कासाठी संघर्ष सुरू झाला, पण लवकरच नासिरजंगाचा खून झाल्यामुळे त्याचा भाऊ सलाबतजंग (१७५१) हा हैद्राबादच्या गादीवर आला. पण तोही अल्पकाळच सत्तेवर राहिला. शेवटी निजाम अलीखान प्रत्यक्षात प्रशासन प्रमुख बनला. त्याच्याच काळात निजाम आणि मराठे यांच्यात सध्याच्या लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे जाने.१७६० मध्ये युद्ध झाले. त्यालाच उदगीरची लढाई असे म्हणतात. या लढाईपूर्वी औसा व लातूर तालुक्यांमधील भातांगळी व भातखेडा परिसरात निजामाच्या लष्करी हालचाली चालू होत्या.[१९६] या लढाईत निजामाचा पराभव झाला. या लढाईनंतर लातूरजवळील तांदुळजा येथे ज्या वाटाघाटी झाल्या (११ फेब्रुवारी १७६०), त्याप्रमाणे साठ लक्ष रुपये किंमतीचा प्रदेश- ज्यात नळदुर्ग (ज्यात आजच्या लातूर जिल्ह्यातील बराच भाग होता.), अहमदनगर, दौलताबाद, बऱ्हाणपूर व विजापूर या जिल्ह्यांचा समावेश होता- त्यावर निजामास पाणी सोडावे लागले.[१९७]

उदगीरच्या तहामुळे निजाम दुखावला गेला होता म्हणून त्याने मराठे सरदारात फूट पाडण्याचे कारस्थान सुरू केले. रघुनाथराव पेशव्यांच्या स्वभावामुळे काही मराठे सरदार निजामास जाऊन मिळाले. मराठ्यांच्या अंतस्थ कलहाचा फायदा घेऊन निजाम अलीने इ.स.१७६३ मध्ये पुण्यावर स्वारी केली व पुणे जाळले. त्यामुळे मराठे संतापले. त्यांनी संघटित होऊन निजामावर आक्रमण केले. पैठण जवळ गोदावरी नदीकाठी राक्षसभुवन येथे मराठ्यांनी निजामाचा पराभव केला (१७६३). निजामाने मराठ्यांना ८२ लक्ष रुपयांच्या उत्पन्नाचा प्रदेश दिला. दि. ५ नोव्हेंबर १७७३ रोजी रघुनाथरावाचा नळदुर्ग येथे चाळीस हजार सैन्यानिशी मुक्काम होता. तेथे निजामाच्या वकिलासोबत त्याने महत्वपूर्ण बोलणी केली. तथापि, रघुनाथरावाच्या मागण्यांवर निजामाच्या वकिलाने फारसा विचार केला नाही. तेव्हा रघुनाथरावाने निजामकडील औसा किल्ला हस्तगत करून बिदरकडे कूच केल्याचे दिसते.[१९८] इ.स.१७९० मध्ये टिपू सुलतान आणि इंग्रज यांच्यात झालेल्या युद्धात निजाम, मराठे व इंग्रज यांनी संयुक्तपणे टिपूचा पराभव केला. टिपूच्या राज्याची वाटणी निजाम, मराठे व इंग्रज यांच्यात करण्यात आली.[१९९] इ.स.१७९५ मध्ये परत निजामास मराठ्यांबरोबर लढा द्यावा लागला. त्या लढाईस "खर्ड्याची लढाई" असे संबोधतात. त्यात निजामाचा पराभव झाला म्हणून निजामाने मराठ्यांना तीन कोटी रुपये व परंड्यापासून उत्तरेकडील प्रदेश दिला.

खर्ड्याच्या लढाईत इंग्रजांनी आपणास साह्य केले नाही ही गोष्ट निजामाच्या अंत:करणास झोंबली होती म्हणून त्याने फ्रेंचांशी मैत्री वाढविण्याचा प्रयत्न सुरू केला. तोपर्यंत वेलस्ली हिंदुस्थानात आला. त्याने

१९३. रेगानी, सरोजिनी, **हायलाईटस् ऑफ दि फ्रिडम मुव्हमेंट इन आंध्रप्रदेश**, गव्हर्नमेंट ऑफ आंध्रप्रदेश, हैद्राबाद, १९७२, पृ.१७.

१९४. वहिदखान, एम.ए., पूर्वोक्त, पृ.४७.

१९५. ग्रीबल, जे.डी.बी., **ए हिस्टरी ऑफ डेक्कन**, व्हॉ.३, पृ.५.

१९६. उदगीर प्रकरण-१७६०, **पेशवे दप्तरातील निवडलेले कागद**, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, बॉम्बे, १९३०.

१९७. वहिदखान,एम.ए., पूर्वोक्त, पृ.५०.

१९८. सरदेसाई, गो.स., **मराठी रियासत**, खंड-५ (संपा. स.मा.गर्गे), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०.

१९९. चौधरी, कि.का. (संपा.), **परभणी जिल्हा गॅझेटिअर**, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ.६१.

अनुक्रमणिका

निजामाच्या दरबारात आपले बस्तान चांगलेच बसविले. त्याने, १ सप्टेंबर १७९८ रोजी निजामाशी तह केला. स्वत: निजाम अली इंग्रजांचा द्वेष करीत असे, परंतु तो अर्धांगवायुने ग्रस्त होऊन दिवाण मश्रुन्मुल्क याच्या सल्ल्याने वागत होता. त्यामुळे खरी सत्ता त्याच्याच हाती होती. हा मश्रुन्मुल्क मराठ्यांच्या व्देषाने जळफळणारा, पण इंग्रजांविषयी मोठे प्रेम बाळगणारा होता. मराठ्यांचा पाडाव करण्यासाठी तो निजामाचे वाटेल ते नुकसान सोसण्यास सिद्ध होता. म्हणूनच हा तह झाला.[२००]

इ.स.१७९९ मध्ये निजामाने इंग्रजांबरोबर तह केला. त्यानुसार फ्रेंच सैनिकांऐवजी इंग्रजांचे सैनिक ठेवण्याचे ठरले. हा तह निजाम आणि इंग्रज यांच्या संबंधात क्रांतिकारक बदल करणारा ठरला. कारण या तहाने इंग्रजांचे वर्चस्व हैद्राबादेत प्रस्थापित झाले आणि निजामाचे स्वातंत्र्य संपले.[२०१] निजामाने ईस्ट इंडिया कंपनीबरोबर १२ ऑक्टोबर, १८०० रोजी तैनाती फौजेचा तह करून स्वत:च्या स्वातंत्र्याचे बलिदान केले.[२०२] या तहान्वये हैद्राबाद संस्थानचे रुपांतर नेहमीसाठी संरक्षित राज्यामध्ये झाले. निजामाच्या वर्चस्वाखाली असलेला मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यांतर्गत लातूर जिल्ह्यातील प्रदेशही संरक्षित राज्याचा घटक बनला. या तहामुळे तैनाती फौजेची पहिली अंमलबजावणी इंग्रजांचा दोस्त-निजामावर झाली. तो दोस्त तर खराच, पण वस्तुत: त्यांचा दास बनला.[२०३] पहिल्या निजामाच्या मृत्यूनंतर दुसरा निजाम म्हणून निजाम अली सत्तेवर आला. तोपर्यंत प्रशासनात अस्थिरता व अराजकता होती. या काळात शहानवाजखान (१७४८-१७५०), रघुनाथदास (१७५०-१७५१), सय्यद लष्करखान यांनी दिवाणपदे सांभाळली. या काळात राज्याचे प्रशासनासाठी पायगा, सर्फेखास, खालसा व जहागीर असे चार घटक होते. राजा हा अनियंत्रित सत्ताधिश होता. जाहगीरदारांचे प्राबल्य वाढू नये म्हणून पायगा (Horse hold Troops) या घरगुती लष्कर पद्धतीचा श्रीगणेशा करण्यात आला. "पायगाह" म्हणजे रक्षक. पायगाचा खर्च भागविण्यासाठी प्रचंड जमिनीची मालकी संबंधितांना देण्यात आली. पायगा-अमीर घराण्याचा मूळ पुरूष अबू-खैर-तेजजंग हा होता. त्याच्याकडेच दुसऱ्या निजामाने रक्षणाची जबाबदारी सोपविली होती. जहागीरदाराचे सामर्थ्य आपल्यापेक्षा अधिक वाढू नये म्हणून निजामाने पायगा पद्धत सुरू केली होती.[२०४]

इ.स.१८०३ मध्ये निजाम अली मरण पावल्यानंतर तिसरा निजाम म्हणून त्याचा मुलगा सिकंदरजहॉ (सिकंदरजा) हा राजा झाला. हा निजाम व्यसनी व सुमार बुद्धीचा होता. राज्याच्या कारभारात त्याने स्वत: कधीच लक्ष घातले नाही.[२०५] त्याची कारकीर्द म्हणजे इंग्रज आणि निजाम यांच्या संबंधांना भिन्न दिशा देणारा कालखंड होय. आतापर्यंत निजामाने इंग्रजांबरोबर केलेल्या विविध तहांमुळे निजामी शासनावरील इंग्रजांची पकड वाढलेली होती. निजामाचा दिवाण अरिस्तोजाह हा इ.स.१८०४ मध्ये मरण पावला. त्याची जागा मीरआलम याने घेतली. तो इंग्रजांशी अत्यंत एकनिष्ठ होता. त्यामुळे प्रशासनाचे स्वरुप इंग्रज धार्जिणे बनले. सिकंदरजहॉ याला राज्यकारभारातील इंग्रजांचा वाढता हस्तक्षेप आवडत नव्हता. पण मीरआलम हा इंग्रजनिष्ठ असल्यामुळे त्याने राज्यकारभाराची सुत्रे आपल्या हातीच ठेवण्याची धडपड केली.

---

२००. सरदेसाई, गो.स., **ब्रिटिश रियासत**, खंड-२, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.१७२.

२०१. कित्ता, पृ.१७४.

२०२. कुंटे, भ.ग. (संपा.), **स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष**, महाराष्ट्र राज्य, मराठवाडा विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७६, पृ.२.

२०३. सरदेसाई, गो.स., **ब्रिटिश रियासत**, खंड २, पूर्वोक्त, पृ.१७५.

२०४. वहिदखान, एम.ए., पूर्वोक्त, पृ.५५.

२०५. सरदेसाई, गो.स., पूर्वोक्त, पृ.२४१.

इ.स. १८०८ मध्ये मीरआलम मरण पावला. त्यानंतर मुनीर-उल्-मुल्क हा दिवाण झाला. राजा चंदूलाल हा पेशकार म्हणून काम करीत असे. त्याला इंग्रजांचा पाठिंबा होता. त्यामुळे राज्यकारभाराची सुत्रे खऱ्या अर्थाने चंदूलालच्याच हाती होती. निजाम सिकंदरजहॉने राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केले. त्याचा परिणाम म्हणजे चंदूलालने पेशकार आणि दिवाणीचे अधिकार वापरून सर्व काही स्वत:च्या मनाप्रमाणे केले.

सर जॉन के (kaye) याने तत्कालिन प्रशासनाचे स्वरुप रेखाटलेले आहे, "सर्व प्रशासन सडलेले असून त्यात असंख्य दोष होते. भ्रष्टाचाराशिवाय कशाचीही भरभराट होत नव्हती. शासन केवळ नावाचेच उरलेले आहे."[२०६] प्रशासनाची सुत्रे चंदूलालद्वारे ब्रिटिशांच्या हाती गेली.[२०७]

या काळातच विल्यम पामर नामक इंग्रजाने निजाम राज्यात पामर कंपनी नामक पेढी उघडली होती. या पेढीने निजामास शेकडा २५ टक्के दराने कर्ज दिले. हेन्री रसेल हा इ.स.१८११ ते १८२० पर्यंत हैद्राबादेत इंग्रज रेसिडेंट होता. त्याने चंदूलाल मार्फत पामर पेढीतून कर्जाऊ रकमा वारंवार निजामास देऊन त्याच्या अडचणी भागविल्या. हे कर्ज सतत वाढत गेले. शेवटी सर्व राज्य पेढीच्या हाती गेले. पामर कंपनीच्या कर्जामुळे हैद्राबादच्या सर्व जिल्ह्यातील परिस्थिती गंभीर बनली. लातूर जिल्हाही त्याला अपवाद नव्हता.

निजाम सरकार आणि त्यांचे अधिकारी राज्यातील अराजकतेला जबाबदार होते. लातूर जिल्ह्यातही सर्वत्र अस्थिरता व अशांतता होती. उदगीर येथे शिवलिंगप्पा देशमुखाने बंड पुकारले होते. ही अराजकता नष्ट करण्यासाठी डिसेंबर १८२० मध्ये इंग्रज लष्करातील अधिकारी सदरलँड यास सैन्यासह उदगीरला पाठवावे लागले. त्याने लष्कराच्या साह्यानेच लातूर जिल्ह्यात शांतता प्रस्थापित केली. चंदूलालने पामर कंपनीकडून २५ टक्के दराने सैन्याचा पगार देण्यासाठी कर्जाऊ रक्कम घेतली. तसेच स्थानिक सावकाराकडूनही कर्ज काढले. त्याच्या मोबदल्यात त्यांना महसूल गोळा करण्याचे अधिकार दिले. स्वाभाविकच प्रशासनात गैरव्यवहाराचे प्रमाण वाढले. इंग्रज रेसिडेंट रसेल व त्याचा उत्तराधिकारी सर चार्लस मेटकाफ यांनी युरोपियन अधिकाऱ्यांची नियुक्ती करून जिल्ह्याच्या प्रशासनात सुधारणा करण्याची धडपड केली, पण फारसा उपयोग झाला नाही.

लॉर्ड विल्यम बेंटिक या नवीन गव्हर्नर जनरलने संस्थानातील प्रशासनात हस्तक्षेप न करण्याचे धोरण प्रतिपादन केल्यामुळे सर चार्लस मेटकाफला पद सोडावे लागले. एकूण ब्रिटिशांची तटस्थ प्रवृत्ती व चंदूलालची सुधारणा विरोधी भूमिका यामुळे प्रशासनात सुधारणा झाली नाही.[२०८] चंदूलालने निजामशाहीचा कारभार सन १८०८ ते १८४३ पर्यंत म्हणजे पस्तीस वर्षे संपूर्ण मुखत्यारीने केला. इंग्रज म्हणतील त्यास मान वाकवून व सर्व विरोधकांस वाटेल तसे पैसे चारून त्याने आपला अधिकार टिकविला. त्याचा तनखा दररोज एक हजार रुपये होता. तो स्वत: हुशार, उदार व धर्मनिष्ठ होता, परंतु न्यायान्याय न पाहता केवळ पैसा उकळण्याकडे त्यांच्या बुद्धीचा व्यय झाल्याने रयत मात्र अत्यंत हैराण झाली. गोविंदबक्षाने उत्तर प्रांत व चंदूलालने दक्षिण प्रांत असे दोघांनी दोन विभाग आपल्या नियंत्रणाखाली ठेवले.[२०९] आजचा लातूर जिल्हा दक्षिण प्रातांत समाविष्ट होता. त्यामुळे तेथील जनतेचे आर्थिक शोषणच झाले.

---

२०६. फतेउल्लाखान, एम., **हिस्टरी ऑफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रिफॉर्मस इन हैद्राबाद स्टेट**, पृ.२४-२५.
२०७. वहिदखान, एम.ए., **ब्रीफ हिस्टरी ऑफ आंध्र प्रदेश**, पूर्वोक्त, पृ.५९.
२०८. सरदेसाई, गो.स., **मराठी रियासत**, खंड ८, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ.३९१.
२०९. सरदेसाई, गो.स., **ब्रिटिश रियासत**, खंड-२, पूर्वोक्त, पृ.२४२.

अनुक्रमणिका

दि. २१ मे १८२९ रोजी सिकंदरजहॉचे निधन झाले. तदनंतर त्याचा पुत्र नासिर उद्दौला हा राजा झाला (सन १८२९-१८५७). या काळात मोघल सत्ता नामधारीच होती, तरीही नासिर उद्दौलाने आपण निजाम (म्हणजेच सुभेदार) झाल्याची मान्यता मुघल सम्राटाकडून मिळविली. आपल्या अर्जासोबत त्याने १०१ सोन्याच्या मोहरा आणि अनमोल मोत्याचा एक कंठा नजराणा म्हणून पाठविला होता.[२१०] यावरून निजाम स्वत:ला राजा संबोधित असला तरी मुघल सत्तेचा हस्तकच मानीत होता हे दिसते. या काळात चंदूलाल हाच कारभारी होता. सैनिकांचा पगार थकला होता. शिवाय कर्जामुळे राज्याचे इतर खर्च भागविणे अशक्य झाले होते. म्हणून दि. ६ सप्टेंबर १८४३ रोजी चंदूलाल यास राजीनामा देणे भाग पडले. चंदूलाल यास वार्षिक ३०,०००/- रुपये पेन्शन देण्यात आली. पुढे सन १८४५ मध्ये तो मरण पावला.

चंदूलालच्या राजीनाम्यानंतर राज्याच्या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी अनेक व्यक्तींची दिवाणपदी नियुक्ती करण्यात आली. त्यात राजाराम बक्ष (इ.स.१८४३-१८४६), नबाब सिराज-उल्-मुल्क (इ.स.१८४६-१८४८) यांच्यानंतर अमजद-उल्-मुल्क व शम्स-उल-उम्रा या उभयतांनी इ.स. १८४९ पर्यंत दिवाण पदाची धुरा सांभाळली. इ.स.१८४९ मध्ये परत राजाराम बक्ष याची दिवाणपदी नेमणूक करण्यात आली. इ.स.१८५१ मध्ये सिराज-उल्-मुल्कानेही पुन्हा दिवाणपद स्वीकारले. त्याची इंग्रजांवर फार निष्ठा होती. पण नासिर उद्दौलाचा त्यावर काडीमात्र विश्वास नव्हता. दिवाणपदी नियुक्त झालेल्या व्यक्ती सतत बदलल्यामुळे प्रशासनात अनंत अडचणी निर्माण झाल्या. प्रशासनावरील जनतेच्या विश्वासास तडे गेले. त्यातच तत्कालिन इंग्रज रेसिडेंट फ्रजर याने आक्रमक धोरणाचा पुरस्कार केल्यामुळे त्यास राजीनामा द्यावा लागला. कर्नल लो हा नवीन इंग्रज रेसिडेंट झाला. या काळात वहाबी चळवळ प्रभावी बनली. या चळवळीचा रोख हा इंग्रजाची आणि त्या अनुषंगाने निजामाची सत्ता उलथून टाकण्याकडे होता.[२११] या चळवळीचा भाग म्हणून आजच्या लातूर जिल्ह्यातील उदगीर या ठिकाणी मुबारीज उद्दौलाच्या हस्तकानी उठाव करण्याचे प्रयत्न केले. त्यांचा मुख्य हेतू इंग्रज फौजेतील शिपायांना इंग्रज सत्तेविरुद्ध बंड करण्यासाठी चिथावणी देण्याचा होता.[२१२] ही चळवळ जशी निजामाविरूद्ध होती, तशी ती इंग्रज सत्तेविरूद्धही होती. तिचे नेतृत्त्व शेख अब्दुल्ला करीत होते. उदगीरचा अब्बास अली खान त्यांना मदत करीत होता. म्हणूनच इंग्रजांनी निजामाच्या मदतीने त्याची जहागीर बरखास्त केली.

हैद्राबाद राज्यात या घटना चालू असताना हैद्राबादची आर्थिक स्थिती डबघाईला आलेली होती. हैद्राबाद राज्याला १८५० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचे कवायती फौजेच्या पोटी ६४ लाख रुपयांचे कर्ज झालेले होते. त्यापैकी १९ लाख रुपयाची परतफेड करण्यात आली. तरी १८५३ मध्ये ४५ लाख रुपये कर्ज बाकी राहिलेले होते. या कर्जापोटी १८५३ मध्ये निजामाने तहान्वये वऱ्हाड, नळदुर्ग (उस्मानाबाद) व रायचूर हे जिल्हे इंग्रजांना तोडून दिले. यापैकी नळदुर्ग जिल्ह्यातच सध्याच्या लातूर जिल्ह्याचा बराचसा भाग होता. या सर्व जिल्ह्यांचे एकूण महसूली उत्पन्न ५० लाख रुपये होते. या तहाप्रमाणे इंग्रजांनी ५,००० पायदळ, २,००० घोडदळ व चार तोफखान्याचे विभाग निजामाच्या मदतीसाठी तयार ठेवण्याचे मान्य केले. या तहाचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्वीच्या तहातील कलमाप्रमाणे युद्धकाळात इंग्रजांना मदत करण्याची अट रद्द करण्यात आली.

---

२१०. भालेराव, अनंत, **हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा**, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, १९८७, पृ.६.

२११. कुंटे, भ.ग. (संपा.), **स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश**, पूर्वोक्त, पृ.४.

२१२. कित्ता.

या तहानंतर दिवाण सिराज-उल-मुल्क मरण पावला. त्याच्या जागी सालारजंग पहिला याची नेमणूक झाली (१८५३ ते १८८३). हा केवळ २४ वर्षांचा होता. हैद्राबाद संस्थानातील आधुनिक युगाचे जनक म्हणजे सर सालारजंग होत. कोणत्याही समाजाच्या उन्नतीला पहिल्या प्रथम शांतता व सुबत्ता ही आवश्यक असतात. या गोष्टी सालारजंगाच्या कारकिर्दीत घडून आल्या. त्याने हैद्राबाद राज्याच्या न्याय, महसूल, पोलीस, लष्कर, अर्थ, चलन, टपालखाते, शिक्षण, आरोग्य व सार्वजनिक बांधकाम या विविध क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा केल्या. मराठवाड्यातील जमिनीची मोजणी व आकारणी पूर्ण करण्यात आली. मुलकी व फौजदारी न्यायालये स्थापन केली. एकूण संस्थानाला चांगली व्यवस्था लाभली.

इ.स. १८५७ च्या आंदोलनाचे पडसाद हैद्राबादप्रमाणे लातूर जिल्ह्यातही उदगीर व निलंगा येथे उमटले. याच वेळेस निजाम नासिरउद्यौला मरण पावला. त्यामुळे अफझल उद्यौला (सन १८५७ ते १८६९) हा पाचवा निजाम झाला. इ.स. १८५७ च्या बंडाच्या वेळी निजामाने इंग्रजांना प्रचंड साह्य केले. त्याचे बक्षिस म्हणून इ.स. १८५३ च्या तहात सुधारणा करून १८६० चा तह करण्यात आला. त्यानुसार उस्मानाबाद (नळदुर्ग) व रायचूर हे २१ लाख रुपये उत्पन्नाचे जिल्हे निजामास परत देण्यात आले. त्यामुळे सध्याच्या लातूर जिल्ह्याचा बहुसंख्य भाग निजामाकडे सोपविण्यात आला होता. इ.स. १८५७ ते १८६७ पर्यंत सशस्त्र उठावाची मालिका मराठवाड्यात चालूच होती. त्यात निलंगा, लातूर येथील लोक सहभागी होते. त्यांचा नेता रामराव ऊर्फ जंगबहादूर हा होता. तो मूळचा साताऱ्याचा होता. छत्रपतींच्या सांगण्यावरून ब्रिटिश व निजाम सत्तेविरुद्ध लोकांना चिथावणी देऊन सैन्य उभारीत होता. त्याला लातूरचा नेकराम टेलर, बाजीराव पाटील, औसाचा पाटील हे सहकार्य करीत होते. त्याने उठाव केल्याचे संदर्भ उपलब्ध असून त्यात लातूर जिल्ह्यातील बऱ्याच लोकांच्या सहभागाची नोंद आहे. निलंगा तालुक्यातील विठोजी खंडोजी याने केलेल्या चळवळीची नोंद ब्रिटिशांना घ्यावी लागली. इंग्रजांनी त्यास पकडून औरंगाबाद येथे क्रांती चौकात तोफेच्या तोंडी दिले, तर ७२ सैनिकांचे नेतृत्व करणारे फिदाअली यांचे कोर्ट मार्शल झाले.[२१३]

सालारजंग याने, इ.स. १८६७ मध्ये जिल्हाबंदी नावाची योजना कार्यान्वित केली. या योजनेप्रमाणे राज्याची विभागणी पाच विभागात व चौदा जिल्ह्यात केली गेली. विभाग, जिल्हे व तहसील यावर पगारी नोकरांच्या नेमणुका करण्यात आल्या. राज्यातील जिल्ह्यांच्या पुनर्रचनेप्रमाणे पुढील पाच विभाग अस्तित्वात आले.[२१४]

(१) उत्तर पश्चिम विभाग — औरंगाबाद, बीड, परभणी.

(२) पश्चिम विभाग — बिदर, नांदेड, नळदुर्ग.

(३) पूर्व विभाग — नलगोंडा, खम्मम.

(४) दक्षिण विभाग — सोलापूर, पूर्व रायचूर, पश्चिम रायचूर.

(५) उत्तर विभाग — मेदक, इंदूर, येलगंडल.

वरील व्यवस्थेप्रमाणे सध्याच्या लातूर जिल्ह्याचा बहुसंख्य भाग नळदुर्ग जिल्ह्यात, तर काही भाग बिदर जिल्ह्यात व अल्पसा भाग बीड जिल्ह्यात मोडत होता.

---

२१३. ढेंगळे, बी.एस., **मराठवाडा डयुरींग निजाम, १८५७**, शोधनिबंध, म.इ.प.अधिवेशन, औरंगाबाद.

२१४. वहिदखान, एम.ए., **ब्रीफ हिस्टरी ऑफ आंध्रप्रदेश**, स्टेट आकाईव्हज्, गव्हर्नमेंट ऑफ आंध्रप्रदेश, हैद्राबाद, पृ.६६.

अनुक्रमणिका

अफझल उद्दौला इ.स. १८६९ मध्ये मरण पावला. त्याच्या जागी मीर महबूब अलीखान हा निजाम म्हणून गादीवर आला. हा अज्ञान असल्यामुळे राज्यकारभार चालविण्यासाठी सर सालारजंग याला राजमुखत्यार म्हणून नेमले गेले. त्याला साह्य करण्यासाठी नबाब शम्स-उल उम्रा याची सहराजमुखत्यार म्हणून नेमणूक करण्यात आली. राज्याच्या कल्याणासंबंधी इंग्रज रेसिडेंटचा सल्ला घेण्याची पद्धत सुरू करण्यात आली. इ.स.१८६८ मध्ये न्याय, महसूल, पोलीस व इतर किरकोळ खात्यांसाठी मंत्र्यांची नेमणूक करण्यात आली. त्यांना सद्र-उल महाम असे म्हणत. इ.स. १८७७ मध्ये शम्स-उल-उम्रा मरण पावला. त्यामुळे त्याचा सावत्र भाऊ विकार-उल-उम्रा याची नेमणूक सहराजमुखत्यार म्हणून करण्यात आली. त्याचे इ.स. १८८१ मध्ये निधन झाले. त्यानंतर सर सालारजंग यानेच इ.स. १८८३ पर्यंत प्रशासक पदाची धुरा संभाळली. या काळात ब्रिटिश हिंदुस्थानमध्ये ज्या प्रकारची प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित झालेली होती, तशाच प्रकारची प्रशासकीय यंत्रणा हैद्राबादच्या राज्यात निर्माण झाली. याद्वारे मागील काही वर्षांत हैद्राबाद संस्थानच्या अर्थव्यवथेची विस्कटलेली घडी नीट करण्यात आली. इतकेच नव्हे, तर संस्थानच्या अर्थव्यवस्थेस स्थैर्य प्राप्त झाले.

सालारजंगाच्या काळात अनेक विद्वान अनुभवी प्रशासक हैद्राबाद राज्यात आणले गेले. त्यात मौलवी मेहदीअली खान (मुहासीन-उल-मुल्क), मौलवी मुस्ताक हुसेन (विकार-उल-मुल्क) यांचा समावेश होता. या सर्वांना हैद्राबादला आणण्याचे श्रेय अलीगड येथील मोहमेडन कॉलेजमधील सर सय्यद अहमदखान यांच्याकडे जाते. त्यांच्या सूचनेमुळेच हे विद्वान हैद्राबाद राज्यात आणले गले. याच काळात प्रामुख्याने नोव्हेंबर १८८२ मध्ये कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या अधिकारात वाढ करण्यात आली. किरकोळ गोष्टींचे निर्णय स्थानिक पातळीवर घेण्याचे अधिकार त्यांना प्रदान करण्यात आले. या विविध सुधारणांचा लाभ संस्थानातील सर्व जिल्ह्यातील प्रशासनास झाला. इ.स.१८८३ मध्ये सालारजंगचा मृत्यू झाला. त्यामुळे संस्थानाचे मोठे नुकसान झाले.

मीर महबूब अलीखान वयात आल्यानंतर, दि. ५ फेब्रुवारी १८८४ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड रिपन याच्या हस्ते त्याला राजपदाची वस्त्रे प्रदान करण्यात आली. दुसरा सर सालारजंग याची मुख्य दिवाण म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याने आपल्या वडिलांची सुधारणेची परंपरा पुढे चालू ठेवली. याच काळात दरबारी भाषा म्हणून पर्शियन भाषेऐवजी उर्दूचा वापर सुरू करण्यात आला. हैद्राबादच्या जनतेने ही नवीन विचारांचे स्वागत केले. मोहिब हुसेन हे समाज सुधारणेचे पुरस्कर्ते होते, तर सईद ह्यांना काँग्रेस विचारसरणी आवडत असे. तत्कालिन उर्दू वर्तमानपत्रे इंग्रज धोरणावर टीका करीत असत. हैद्राबाद सरकार मात्र इंग्रजधार्जिणे असल्यामुळे काँग्रेसच्या चळवळीवर ताशेरे ओढीत असे.

एप्रिल १८८७ मध्ये दुसऱ्या सालारजंगाने दिवाणपदाचा राजीनामा दिल्यामुळे नबाब अस्मानजहॉ हा दिवाण बनला. निजामाने इ.स.१८९३ मध्ये "कानूनचा-ए-मुबारक" हे प्रशासनात सुधारणा करणारे फर्मान काढले. त्यानुसार सत्तेचे विभाजन आणि आर्थिक सुधारणा अभिप्रेत होत्या. पण अस्मानजहॉस हे आवडले नाही म्हणून त्याने राजीनामा दिला. त्यानंतर नबाब विकार-उल-उमरा दिवाण झाला. त्याचे व निजामाचे मतभेद झाल्यामुळे त्याने पदत्याग केला (१९११). निजामाने महाराजा किशन प्रसाद याची दिवाणपदी नियुक्ती केली. दि. ६ मार्च १९०२ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन स्वत: हैद्राबादला आला. त्याच्या प्रभावामुळे निजामाशी तह झाला (१९०२). या तहान्वये वऱ्हाड कायम भाडेपट्ट्याने इंग्रजांनी घेतला. निजामाला त्याच्या मूळ मालकी हक्काबद्दल वर्षाला २५ लाख रुपये देण्याचे कबूल केले. मीर महबूब अलीखान याने व्हाईसरॉय कर्झनच्या दडपणामुळे हा तह मान्य केला. तो इ.स.१९११ मध्ये मरण पावला. त्यानंतर नवाब मीर उस्मान अलीखान २६ व्या वर्षी सातवा निजाम म्हणून गादीवर आला. याचे शासन म्हणजे एकतंत्री, लहरी व अनियंत्रित होते. हा इतर निजामाच्या तुलनेत अनेक बाबतीत वेगळा होता. तो अत्यंत महत्वाकांक्षी, कुशाग्र बुद्धीचा व श्रेष्ठ दर्जाचा

अनुक्रमणिका

मुत्सद्दी होता. इ.स.१९१२ मध्ये महाराजा किशन प्रसाद याने दिवाणपद सोडले. म्हणून सालारजंग तिसरा (नवाब मीर युसूफ अलीखान) हा दिवाण झाला. पण त्याने इ.स. १९१४ मध्ये राजीनामा दिला म्हणून निजामाने प्रशासनाची सर्व सुत्रे आपल्या हाती घेऊन पुढील पाच वर्षे कारभार सांभाळला. त्याने इ.स. १९१४ ते १९१९ पर्यंत अनिर्बंध सत्ता उपभोगली.

दि. १७ नोव्हेंबर १९१९ रोजी निजामाने नवीन प्रशासकीय सुधारणा जाहीर केल्या. त्याप्रमाणे हैद्राबाद संस्थानचा कारभार एका कार्यकारी मंडळाकडे सोपविण्यात आला. त्यास 'बाब-ए-हुकूमत' (Executive Council) म्हणत असत. कोणतीही योजना मंजूर नामंजूर करण्याचे "व्हेटो" चे अंतिम अधिकार स्वत:कडे ठेवून निजामाने राज्यकारभार बाब-ए-हुकूमत कडे सोपविला होता. त्यात अधिकाराचे विभाजन करण्यात आले होते. या कार्यकारी मंडळात अध्यक्षाव्यतिरिक्त इतर सात सभासदांची तरतूद होती. कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष म्हणून सर अली इमाम यांची नेमणूक करण्यात आली.

आर्थिक स्थिती : हैद्राबाद संस्थानातील अर्थव्यवस्थेचा गाभा सरंजामी पद्धतीचा होता. निजाम-उल-मुल्काने म्हणजे पहिल्या निजामानेच याचा श्री गणेशा केलेला होता. त्याने आपल्याबरोबर अनेक हिंदू व मुस्लीम सरदार माळवा प्रांतातून आणले. हिंदू सरदारांना प्रशासनाच्या महसूल विभागात नियुक्त केले, तर मुस्लीम सरदारांना जहागिरी देऊन त्यांच्यावर संरक्षणाची जबाबदारी सोपविली. याशिवाय ज्या लोकांनी निजामाला युद्धात किंवा प्रशासनात साह्य केले त्यांनाही जहागिरी देण्यात आल्या. उदाहरणार्थ, गोपाळसिंगाला कंधारची (जि.नांदेड), तर जानोजी निंबाळकर याला परांड्याची (उस्मानाबाद जिल्हा) जहागीर दिली होती. जहागिरीमध्ये सर्फेखास, पायगा, जहागीर व संस्थाने असे चार प्रकार होते.

सर्फेखास : ही खुद्द निजामाची जहागीर होती. त्याचे सर्व उत्पन्न निजामालाच मिळत असे. सर्फेखासच्या बहुतांशी जमिनी सुपीक होत्या. भूतपूर्व उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा, कळंब व उस्मानाबाद हे तालुके सर्फेखासमध्ये होते. आजच्या लातूर जिल्ह्यात सर्फेखास जहागिरीचा प्रदेश अस्तित्वात नव्हता.

पायगा जहागीर : "पायगाह" या शब्दाचा अर्थ रक्षक असा होतो. पायगा अमीर घराण्याचा मूळ पुरुष अबूखैर तेजजंग हा होता. निजामाने त्याच्याकडे आपल्या संरक्षणाची जबाबदारी सोपविलेली होती. जुन्या उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर तालुक्यात लोहारा, गुंजोटी, लाडसांवगी व आपसिंगा या पायगा जहागिरी होत्या. नवनिर्मित लातूर जिल्ह्यात हा प्रकार नव्हता.

इतर जहागिरी : यात मोठे व छोटे जहागीरदार होते. त्यांना निजामाचा धाक होता. सध्याच्या लातूर जिल्ह्यात कोणते जहागीरदार होते याची निश्चित माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. तथापि, जिल्ह्यातील अस्तित्वात असलेल्या विविध गढीवाड्याच्या संदर्भात विचार करता इतके मोठे बांधकाम हे विविध जहागिरीमुळे शक्य झाल्याचे दिसते. याच ग्रंथात त्याची स्वतंत्र नोंद दिली आहे.

संस्थाने : लातूर जिल्ह्यात एकही संस्थान नव्हते.

या जहागिरीव्यतिरिक्त दिवाणी अथवा सरकारी जमीन होती. या जमिनीचे सर्व उत्पन्न सरकारी तिजोरीत जमा होत असे. लातूर जिल्ह्यातील एकूण गावांपैकी तीस टक्के गावे जहागीरदारांच्या मालकीची होती. त्यांना आपल्या जहागिरीच्या गावासंबंधी सर्व मुलकी व लष्करी अधिकार होते, किंबहुना ते त्यांच्या जहागिरीत राजेच असत. जनतेकडून किती सारा वसूल करावयाचा हे सर्वस्वी त्यांच्या इच्छेवरच होते.

अनुक्रमणिका

शेती व शेतसारा : लातूर जिल्ह्यात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. ज्वारी, कापूस, गहू, हरभरा, कडधान्ये व गळिताची धान्ये ही पिके घेतली जात. पाणीपुरवठ्याची साधने फारच थोडी होती. पिकांचे दर-एकरी उत्पादन अत्यंत कमी होते. शेतकरी व शेतमजूर यांची आर्थिक स्थिती दयनीय होती. यावेळी कोरडवाहू जमिनीवर सरासरी दोन रुपये, तर जास्तीत जास्त तीन रुपये असा साऱ्याचा दर होता. ओलिताखालील जमिनीवर तो अनुक्रमे आठ ते पंधरा रुपये होता. इ.स.१९०१ मध्ये निलंगा तालुक्यातून १.६ लाख व उदगीर तालुक्यातून ३.१ लाख रुपये महसूल गोळा झाला होता.

हैद्राबाद संस्थानातील इतर जिल्ह्यांप्रमाणे लातूर जिल्ह्यातही शेतकऱ्यांकडून किती शेतसारा वसूल करावा यावर इ.स. १८५३ पर्यंत कोणतेच नियंत्रण नव्हते. दिवाणी प्रदेशात निजाम सरकारने सर्व मुलूख निरनिराळ्या इसमांना इजाऱ्याने दिला होता. जो कोणी सरकारला जास्त रक्कम देईल त्यास "इजारा" मिळावयाचा. इजारदारांनी वाटेल तसे रयतेस नागवून पैसा उकळला. लोक अन्नास मोताद झाले.[२१५] इजारा पद्धत (Revenue farming plan or Amani Talukdari) रुढ असताना देशमुख, देशपांडे, सरदेशपांडे व मोहरील हे वंशपरंपरागत अधिकारी शेतसारा (महसूल) वसूल करण्यास साह्य करीत असत. गोळा झालेल्या शेतसाऱ्यापैकी देशमुखास साडेतीन टक्के, देशपांड्यास अडीच टक्के, तर सरदेशपांड्यास एक टक्का रक्कम दिली जात होती. मोहरील लेखनाचे काम करीत असे. शेतसारा वसुली अतिशय निर्दयपणे करण्यात येत असे.

या काळात हैद्राबाद संस्थानात विविध जिल्ह्यातील चलनामध्ये एकसूत्रता नव्हती. त्याचा फायदा इजारदार घेत असत. १८२५ मध्ये अमीर नवाज खान याच्याकडे उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतसारा वसूल करण्याचे अधिकार होते. त्याने उस्मानाबाद जिल्ह्यातील चलनात शेतसारा वसूल केला. पण ती रक्कम हैद्राबाद मधील चलनदराने सरकारी तिजोरीत भरली. त्यास भरपूर फायदा झाला. शेतसारा वसुलीचे काम आपल्यालाच मिळावे म्हणून त्याने दोन लाख रुपयांच्या भेटी हैद्राबादेतील अनेक अधिकाऱ्यांना दिल्या.[२१६] गरीबीमुळे शेतसारा देण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैसे नसत. तेव्हा सावकारांकडून ते कर्ज घेत असत. दुष्काळ प्रसंगी सरकार (खालसा) दिवाणी प्रदेशातील शेतकऱ्याला शेतसाऱ्यामध्ये पंचवीस टक्के सूट देत असे. पण जहागिरीमधील शेतकऱ्याला त्याचा लाभ मिळत नसे. निलंगा व औसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक दुर्दशेची माहिती मेडोज टेलर याने नोंद केलेली आहे. 'इजारदारांमुळे शेतकऱ्याचे आर्थिक शोषण होत आहे. इजारदारांनी धुमाकूळ घातला असून शेतकऱ्याची गुरेढोरे व पिके त्यांचे भक्ष्य बनलेले आहे'.[२१७] परिणामी प्रसंगी गावपाटील प्रतिष्ठेसाठी आपले वतनाचे हक्क इतरांना विकून पैसे सरकारात जमा करत असत असे दिसते.[२१८]

निजामाने इ.स.१८०० मध्ये तहामुळे गमावलेला प्रदेश इ.स. १८५७ नंतर परत मिळवला होता. या काळातही जनतेच्या आर्थिक स्थितीमध्ये काही सुधारणा होऊ शकली नाही.

---

२१५. सरदेसाई, गो.स., **ब्रिटिश रियसत**, खंड २, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.२४२.

२१६. **गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, बीड डिस्ट्रिक्ट**, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९६९, पृ.८१-८२.

२१७. मेहदीअली, मौलवी सईद, **हैद्रावाद अफेअर्स**, व्हॉ.२, पृ.७००-७०५.

२१८. पाठक, अ.शं., 'अंबड महजरनामा' **संशोधक**, वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, वर्ष ५४, अंक ४, डिसेंबर १९८६, पृ.१ ते १३ व 'जगापूर ताम्रपट', **संशोधक**, वर्ष ५७, अंक ४, डिसेंबर १९८९, धुळे, पृ.१ ते १३.

सर सालारजंग याच्या कारकिर्दीत सर्वच क्षेत्रात सुधारणा झाल्या. इ.स. १८६६ पासून जिल्हा प्रशासनाची जबाबदारी तालुकदार व तहसीलदार या अधिकाऱ्यांकडे सोपविली गेली. तेव्हापासून रोखीने शेतसारा घेण्याची रयतवारी पद्धत सुरू झाली. इ.स. १८७६ मध्ये महसूल विषयक सर्वेक्षणाला आरंभ झाला. हे काम इ.स. १८८२ पर्यंत चालले. इ.स. १९१९ नंतर निजाम सरकारने शेतसाऱ्यात प्रचंड वाढ केली. औसा तालुक्यात ३० टक्के शेतसारा वाढविला.[२१९]

निजाम सरकारने सामाजिक जीवनावरही विविध निर्बंध लादलेले होते. जनतेला उच्चार स्वातंत्र्य अथवा संघटना स्वातंत्र्य नव्हते. महाराष्ट्रातून प्रसिद्ध होणारी केसरी, ज्ञानप्रकाश, काळ ही वृत्तपत्रे बंदीमुळे संस्थानात येऊ शकत नसत. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक,वाङमयीन व सांस्कृतिक जीवनात घडणाऱ्या घटनांचे ज्ञान येथील जनतेला मिळू शकत नव्हते. लातूर जिल्ह्यातही सामाजिक जीवन बंदिस्त झाले होते. उर्दू भाषेच्या सक्तीमुळे बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित राहिला. दहा टक्के लोकसंख्या असणाऱ्या मुस्लिमांना व उच्चवर्णियांनाच शिक्षणाचा लाभ मिळाला. अस्पृश्य समाजास तर जातीबंधने, अज्ञान, दारिद्रय व सामाजिक शोषण यामुळे गुलामगिरीच्या शृंखलेतच जीवन कंठावे लागले. तत्कालिन समाजजीवनाचे वर्णन आ.कृ.वाघमारे यांनी पुढील शब्दात केलेले आहे. - 'आमच्या सर्व समाजाची स्थिती तर अत्यंत हिन दीन अशी बनलेली आहे. त्यांना शिक्षण नाही, मान नाही, त्यांना जबाबदारीची जाणीव नाही व आत्मविश्वास नाही'.[२२०]

मराठवाड्यातील समाज मागासलेला होता. लातूर जिल्ह्यातील ९० टक्के लोक हिंदू होते, तर १० टक्के मुसलमान होते. तत्कालिन समाजावर धर्माचा जबरदस्त पगडा होता.

पहिल्या पाच निजामांनी परधर्मसहिष्णुतेचे धोरण अंगिकारले होते. त्याकाळी हिंदूंच्या धार्मिक स्थळांना पूर्ण स्वातंत्र्य होते. पण सहाव्या निजामाने इ.स.१८८५ पासून सहिष्णू धोरणाचा त्याग करून हिंदूंना जाचक असे धोरण जाहीर केले. इ.स.१८८५ मध्ये दसरा व मोहरम एकाचवेळी आले होते. पण निजामाने हिंदूंवर अनेक निर्बंध लादले होते. या धोरणाचे प्रतिबिंब पुढे काढण्यात आलेल्या गस्ती निशान ५२ (१) व गस्ती निशान ५३ या परिपत्रकावर पडलेले होते.

इ.स. १९११ मध्ये मीर उस्मानअली (सातवा निजाम) गादीवर आला. इ.स. १९१७ मध्येही दसरा व मोहरम एकाचवेळी आले. निजाम सरकारने धार्मिक बाबतीत इ.स. १९१७ मध्ये कडक नियम (१३ अजूर १३२६ फसली) जाहीर केले. त्यात पाच आदेश होते. त्या आदेशांचा हेतू पूर्णत: अन्यायकारक होता. त्यात हिंदूंबाबत स्पष्टपणे दुजाभाव व्यक्त झालेला होता. हिंदूंच्या सभा, मिरवणुका व धार्मिक स्वातंत्र्यावर त्यात बंधने घालण्यात आली होती. त्या नियमांचे अवलोकन केल्यास हे स्पष्ट होते की, निजाम सरकारने धार्मिक बाबतीत भेदभाव केला. निजाम सरकारच्या या धोरणाचा परिणाम म्हणजे हैद्राबाद संस्थानातील समाजात शांततेऐवजी अशांतता, प्रेमाऐवजी व्देष, सहकार्याऐवजी सूड व न्यायाऐवजी अन्याय इत्यादींचेच अधिक पीक

---

२१९. भालेराव, अनंत, **हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा**, पूर्वोक्त, पृ.८८.

२२०. वाघमारे, आ.कृ., **संघर्ष**, खंड १ (संपा.स.मा.गर्गे), जयहिंद प्रिंटिंग प्रेस, औरंगाबाद, १९७४, पृ.७६.

येऊ लागले. या धोरणामुळे लातूर जिल्ह्यातील हिंदू जनतेच्या मनात असंतोषाचे अंकुर फुटले.[२२१] त्यामुळे आंदोलनाला हिंदुत्ववादी रंग चढू लागला.

सामाजिक सुधारणा व प्रबोधन : निजामशाहीतील नागरी स्वातंत्र्य, सभा संमेलने, व्याख्याने, वाचनालये, वृत्तपत्रे, उत्सव, व्यायामशाळा, यज्ञ-होमहवन, धर्मग्रंथाचे सामुहिक वाचन या विविध गोष्टींवरील जाचक निर्बंधामुळे संस्थानातील इतर जिल्ह्यांप्रमाणे लातूर जिल्ह्यातील सामाजिक जीवन कुंठीत झाले होते. त्यामुळे समाजाच्या भावनांचा कोंडमारा होत होता. कसेतरी जगावयाचे ही भावना प्रबळ होऊ लागली, पण या पोलादी तटबंद्या भेदून हैद्राबाद संस्थानात व पर्यायाने लातूर जिल्ह्यातही सामाजिक सुधारणांना आरंभ झाला.

आर्यसमाज : आर्यसमाजाची स्थापना दयानंद सरस्वती यांनी मुंबई येथे दि. ६ एप्रिल १८७५, बुधवार रोजी केली.

हैद्राबाद संस्थानात धार्मिक व सामाजिक कार्य करणाऱ्या संघटनांना बंदी नव्हती. त्यामुळे मराठवाड्यातील धारूर (जिल्हा बीड) येथे इ.स. १८९१ मध्ये आर्यसमाजाची शाखा सुरू झाली. (पंडित नरेंद्र हे आपल्या " हैदराबाद के आर्यों की साधना और संघर्ष " या ग्रंथात ही नोंद १८८० अशी करतात.) त्यानंतर जुन्या उस्मानाबाद जिल्ह्याच्या उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे आर्यसमाजाची स्थापना झाली. इ.स. १९०४ ते १९२१ पर्यंत केशवराव कोरटकर हे हैद्राबाद आर्यसमाजाचे अध्यक्ष होते. त्यांनी आर्यसमाजाच्या कार्याला चालना दिली. आर्यसमाज म्हणजे चारित्र्य, सचोटी, त्याग, बलिदान व राष्ट्रीयता या मुल्यांचे प्रतिक मानले जात असे. आर्यसमाजाने आंतरजातीय विवाह, मंदिर प्रवेश, हॉटेल प्रवेश, सार्वजनिक विहिरी अस्पृश्यांसाठी खुल्या करणे, सहभोजन, अस्पृश्यता निवारण, विद्वानांची प्रबोधनपर व्याख्याने अशा सामाजिक सुधारणा राबविल्या. आर्यसमाजाच्या शाखा बहुतेक सर्व जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे लातूर जिल्ह्यात उदगीर (१९२४), निलंगा (१९३०) व लातूर (१९३८) येथे आणि उस्मानाबाद जिल्ह्यात उस्मानाबाद (१९२४) व औरादशहाजनी (१९२८) या ठिकाणी शाखा स्थापन झाल्या. आर्यसमाजाने समाज प्रबोधन प्रक्रियेत मौलिक कार्य केलेले आहे. धार्मिक स्वातंत्र्यावर अनेक निर्बंध लादल्यामुळे आर्यसमाजाने धार्मिक स्वातंत्र्यासाठी लढा दिला. आर्य समाज चळवळीत निलंगा येथील श्री. शेषराव वाघमारे यांचे मोलाचे योगदान होते.

लातूरला आर्यसमाजाची स्थापना झाली याचे श्रेय प्रामुख्याने लक्ष्मीनारायणजी बाजपेई, दिगंबरराव शिवणगीकर, किशनराव सौताडेकर, दिगंबरराव धर्माधिकारी, इरसंगप्पा अंकलकोटे व भृगुरामजी चामले यांच्याकडे जाते. इ. स. १९३२ मध्ये आर्यसमाजाने "मूर्तीपूजा" व "विधवा विवाह" या दोन विषयांवर स्वामी कर्मानंद व काळारामशास्त्री यांच्यात शास्त्रार्थ घडवून आणला.[२२२] शामलाल वकील व मंगलदेवशास्त्री यांनी लातूर येथे आपल्या व्याख्यानात कालबाह्य सामाजिक रुढींवर टीका केली व धर्माचे सत्यस्वरुप जनतेला समजावून सांगितले. आर्यसमाजाचे विद्वान आपल्या प्रवचनांतून प्रस्थापित अनिष्ट धार्मिक रुढींवर कडाडून टीका करीत. सनातनी मंडळी आपली भूमिका मांडीत असत. या वाद-प्रतिवादामुळे लातूर जिल्ह्यातील जनतेच्या प्रबोधनास गती प्राप्त झाली.

---

२२१. देऊळगावकर, वि.पा.(अनु.), **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी** (लेखक-स्वामी रामानंद तीर्थ), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७६, पृ.६४.

२२२. **स्मरणिका**, मराठवाडा साहित्य संमेलन, लातूर, १९६८.

मराठवाड्यातील उदगीरचे पंडित बन्शीलाल आणि पंडित शामलाल या दोघा बंधुनी मराठवाडा, हैद्राबाद व कर्नाटकात आर्यसमाजाचे कार्य जोरात सुरू केले. उदगीर येथे माणिकराव या आर्यसमाजी कार्यकर्त्यावर हल्ला करण्यात आला. माणिकराव गंभीर जखमी झाले पण त्यांचा बचाव करीत असताना त्यांचे आर्यसमाजी मित्र भिमराव मात्र या हल्ल्यात मरण पावले. माणिकरावांना हैद्राबादमधील अफजलगंज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले व तेथेच त्यांचा मृत्यू झाला. माणिकराव यांच्या अंत्ययात्रेस मोठे व प्रक्षोभक स्वरुप प्राप्त झाले होते. हजारो लोक त्यात सहभागी झाले होते. निजामाच्या विरोधाची ही संधी लोकांनी पुरेपूर वापरली. यापाठोपाठ उदगीरला ऐन दसऱ्यात हिंदू-मुस्लिम दंगल उसळली. तिच्यावरूनच आर्यसमाजाचे कार्य ज्यांनी अतिशय जोमाने सुरू करून मराठवाडा व कर्नाटकात चांगलेच वाढवले होते, ते पंडित शामलालजी (उपप्रधानमंत्री, निजाम संस्थान, आर्यप्रतिनिधी सभा) पोलिसांच्या नाराजीचे कारण बनले. या अगोदर काही प्रकरणात त्यांच्यावर खटले भरण्यात आले होते. यावेळेस त्यांना इतर सतरा जणांसह अटक करून बिदरच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तेथेच त्यांचा, १७ डिसेंबर १९३८ रोजी मृत्यू झाला. या घटनेचे पडसादही हैद्राबाद राज्यात तीव्रतेने उमटले आणि आर्यसमाजाची निजामविरोधी चळवळ अधिक गतिमान झाली. त्यामुळेच १९३८ मध्ये झालेल्या आर्यसमाजाच्या सत्याग्रहामध्ये जवळपास ११ हजार लोकांनी सत्याग्रही म्हणून नावे नोंदवली होती. या सत्याग्रहात मराठवाड्यातील जवळपास ७५ ते ८०% लोक सहभागी होते. त्यात निलंग्याचे शेषराव वाघमारे, लातूरचे दिगंबरराव शिवणगीकर, अंधोरीचे शंकरराव पाटील, अहमदपूरचे निवृत्ती रेड्डी व दिगंबरराव लाटकर इत्यादिंनी स्थानिक तुकड्यांचे नेतृत्त्व केले होते.[२२३]

त्याकाळी "तब्लीगजमात" ही संघटना ईस्लाम धर्माचा प्रचार व धर्मांतरास प्रोत्साहन देत असे. आर्यसमाजाने शुद्धी आंदोलन व सामुहिक भोजन हे कार्यक्रम घडवून आणले.[२२४] नांदेड जिल्ह्यात कंधार, हतगाव, तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात निलंगा, लातूर व उदगीर, गुंजोटी, बिचकुंडा तसेच बीड जिल्ह्यामध्ये धारुर याठिकाणी मोठ्या प्रमाणावर विविध मागण्या केल्या गेल्या. आर्य समाजाच्या उदारमतवादी सहानुभूतीपूर्ण वागणुकीमुळे अस्पृष्यांना भक्कम आधार मिळाला होता. आर्य समाजाने प्रामुख्याने धार्मिक स्वातंत्र्य, समाज जागृती, अस्पृश्यता निवारण या क्षेत्रात लक्षणीय काम केले. समाजाच्यावतीने गायिले जाणारे एक गीत "लो अच्छुतों को छाती से लगाओ हिंदुओं, वरना ये लाल औरों के घर जायेंगे!"[२२५] लोकप्रिय होते. याचवेळी लो.टिळक यांनी लातूर येथे भेट देऊन नरसिंग जिनिंग मिलमध्ये सभा घेतली.

लातूर जिल्ह्यात बलभीम वाचनालय, लातूर (१९३०), मारवाडी वाचनालय, लातूर (१९३९), शिवानंद मोफत वाचनालय, चाकूर (१९३५), संग्राम वाचनालय, उदगीर (१९४२) व औसा येथे वाचनालये सुरू करून आर्यसमाजाने लोकजागृतीस साह्य केले. या वाचनालयांत तुळजापूरकर यांचे 'माझे रामायण', हरिभाऊ आपटे यांचे 'उषःकाल', स्वातंत्र्यवीर सावरकर यांची 'माझी जन्मठेप', व बंकीमचंद्रांची 'आनंदमठ' ही कादंबरी, हे क्रांतिकारी विचारांना खतपाणी घालणारे ग्रंथ ठेवले होते. आर्यसमाजाने लातूर, अहमदपूर, अंधोरी, चाकूर, येलदरी व उदगीर या ठिकाणी व्यायामशाळा व आखाडे सुरू करून बलसंवर्धनास उत्तेजन दिले.

---

२२३. दगडे, जयप्रकाश, "स्वातंत्र्याचे सुवर्णपान" **दै.लोकमत** सोबतचा विशेषांक, दि.१७ सप्टेंबर, १९९८; अबुस सलीम, **व्हेअर, हाऊ अॅण्ड व्हाय आर्यसमाज**, १९३८.

२२४. बाजपेयी, चंद्रशेखर, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मी**, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९५, पृ.५५.

२२५. कित्ता, पृ.५५-५६.

सामाजिक परिषदा : इ.स.१९१५ मध्ये हैद्राबाद सोशल सर्व्हिस लीगची (सामाजिक परिषद) स्थापना झाली. या लीगच्या वतीने १९१८ पासून सामाजिक सुधारणा परिषदेची सहा अधिवेशने घेण्यात आली. या परिषदेची अनुक्रमे नांदेड १९१८, कवाना १९१९ व हदगाव १९२० अशी पहिली तीन अधिवेशने नांदेड जिल्ह्यात झाली. या परिषदांनी प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, स्त्रीशिक्षण, ग्रंथालयांची स्थापना व अस्पृश्योद्धार इत्यादी प्रश्नांवर ठराव मंजूर केले. त्यामुळे सामाजिक जागृतीच्या प्रक्रियेला गती मिळाली. गुलबर्गा येथे सामाजिक परिषदेचे चौथे अधिवेशन दि. २२ व २३ एप्रिल १९२३ रोजी झाले, तर पाचवी परिषद हैद्राबादला १९२७ मध्ये झाली. याविषयीची नोंद 'निजाम विजय' या वृत्तपत्रात मिळते. या परिषदांतून विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह, अस्पृश्यता निवारण व धर्मांतर (पतित परावर्तन) या विषयांवर सुधारक आणि सनातनवादी यांच्यात मतभेद झाले. उस्मानाबाद येथील विठ्ठल रंगराव देशपांडे यांनी सुधारणावादी विचारांना पाठिंबा दिल्याचे आढळते. "ज्याने सर्व प्रजेचे धारण होते तो धर्म होय" या विचाराचा त्यांनी पुरस्कार केला होता. त्यांच्या पुरोगामी विचाराचे लोण आजच्या लातूर जिल्ह्यात पोहोचले होते.[२२६]

शैक्षणिक परिषदा : हैद्राबाद शिक्षण व आर्थिक परिषदेच्या एकूण सहा परिषदा झाल्या. त्यापैकी पाचवी परिषद इ.स.१९१९ मध्ये लातूरला झाली. यापूर्वी शिक्षण परिषद १९१५ आणि १९१८ मध्ये औरंगाबाद येथे झाली. अशा परिषदांद्वारे हिंदू, मुस्लिम संघटित होत आहेत हे निजाम सरकारला आवडले नाही. हैद्राबाद संस्थानात हिंदूंची संख्या अधिक असल्यामुळे पुढे या संस्थांवर हिंदूंचेच प्रभुत्त्व स्थापित होईल, ही भीती निजाम सरकारला वाटू लागली, म्हणून निजाम सरकारने अशा परिषदांवर शासनाचे प्रभुत्त्व निर्माण करून परिषदांना सरकारी स्वरुप दिले. लातूरच्या परिषदेत माध्यमिक शिक्षण मातृभाषेतूनच असावे व मुसलमानांप्रमाणेच हिंदू विद्यार्थ्यांनाही धार्मिक शिक्षण द्यावे हे ठराव मंजूर करण्यात आले. फनखानिया रुलिदिया व दार-उल-उम्र-पद्धतीचे शिक्षण याकाळी सुरू होते. उर्दू राज्यभाषा होती. मराठवाड्यात आठ हायस्कूल्स होती. स्त्रियांचा शिक्षणातील सहभाग अत्यल्प होता. तैतानीया (सातवीपर्यंत) आणि फोकानिया (मॅट्रिकपर्यंत) शाळा असत.[२२७]

या परिषदेचे सहावे अधिवेशन परभणी येथे दि. २६ व २७ नोव्हेंबर १९२० रोजी झाले. या परिषदेस उस्मानाबाद व लातूर येथील मुलींच्या शाळेच्या संचालिका श्रीमती द्वारकाबाई व श्रीमती सीताबाई ह्या मुद्दाम आल्या होत्या.[२२८] या परिषदेची सर्व व्यवस्था सरकारी अधिकाऱ्यांच्या हाती गेल्यामुळे जनतेने "हैद्राबाद जनता शिक्षण परिषद" नावाने वेगळी संस्था स्थापन केली. त्या परिषदेची पाच अधिवेशने झाली. त्यात निजाम सरकारच्या शिक्षण योजनेवर प्रभावी टीका करण्यात आली. शिक्षण क्षेत्रात खाजगी संस्थांचे प्रयत्न सुरू झाले. त्याचा श्रीगणेशा उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा या गावी १९२१ च्या विजयादशमीला झाला. औसा येथील अनंतराव कुलकर्णी व त्यांचे बंधू व्यंकटराव देशमुख या तरुणांनी हिप्परगा येथे एक निवासी माध्यमिक शाळा सुरू केली. बाबासाहेब परांजपे यांच्याबरोबर या शाळेत व्यंकटेश भगवानराव खेडगीकर ऊर्फ स्वामी रामानंद तीर्थ हे १९२९ मध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले. पुढे त्यांनी मुख्याध्यापक म्हणूनही काम पाहिले. श्री.देवीसिंग चौहान या शाळेचे विद्यार्थी व काही काळ शिक्षक होते.

---

२२६. जोशी, द.पं., **काळाच्या पडद्याआड**, खंड-१, महाराष्ट्र साहित्य परिषद, हैद्राबाद, आंध्रप्रदेश, १९९२, पृ.१२८.
२२७. ढेंगळे, बी.एस., **हैद्राबाद फ्रिडम स्ट्रगल,** कल्पना प्रकाशन, नांदेड, १९९८, पृ.२१-२२.
२२८. जोशी द.पं., पूर्वोक्त, पृ.१.

लातूर जिल्ह्यात शिक्षणाच्या सोयी फारच थोड्या होत्या. म्हणून चाकूर (स्थापना-१९३७) व उदगीर (स्थापना-१९३७) या ठिकाणी प्रत्येकी एक व लातूरला (स्थापना-१९३७ व १९४९) अशा दोन शाळा निघाल्या. मराठवाड्याप्रमाणे लातूरमध्येही स्त्री-शिक्षणाची दुर्दशाच होती. उर्दू माध्यमामुळे मुलींचे शिक्षण बंद पडे म्हणून १९४२ मध्ये सौ. सुशिलाबाई दिवाण यांनी 'महिला विद्या मंदिर' ही मुलींची शाळा स्थापन केली. याच शाळेचे १९४६ मध्ये 'गोदावरी कन्या पाठशाळेत' रुपांतर झाले.[२२९] १९३५ नंतर मराठवाड्यात ज्या शाळा निघाल्या त्यांना स्वामीजी व बाबासाहेब परांजपे यांचीच प्रेरणा होती. मराठवाड्यातील शैक्षणिक संस्थानीच राजकीय जागृतीचा पाया घातलेला आहे. मराठवाड्यात औरंगाबादनंतर स्वतंत्र अशा शाळा स्थापन करण्याचा प्रयत्न सौ. सुशिलाबाई दिवाण यांच्या प्रेरणेतून झाला. यापूर्वी १९१५ मध्ये औरंगाबाद येथे सरस्वती भवनाची स्थापना झाली होती. तर बळवंत मोफत वाचनालय श्री. म. के. धोंडो कर्वे, आ. कृ. वाघमारे व श्रीमती आशाताई वाघमारे यांनी सुरू केले होते.

'निजाम प्रांतिय मराठी परिषदेची' स्थापना १९३७ मध्ये झाली. या परिषदेच्या अधिवेशनास मराठवाड्यातील व पर्यायाने आजच्या लातूर जिल्ह्यातील काही लोक उपस्थित रहात असत. परिषदेतील भाषणे, ठराव व चर्चा यामुळे लातूर जिल्ह्यातील वैचारिक विकासाला हातभार लागलेला आहे. "निजाम विजय" हे हैद्राबाद संस्थानातील पहिले मराठी साप्ताहिक १९२० पासून दिगंबर बिंदू व लक्ष्मणराव फाटक यांनी सुरू केले. त्यांनी आपल्या नियतकालिकाद्वारे हैद्राबाद-मराठवाड्यातील व पर्यायाने लातूर जिल्ह्यातील समाजजीवन गतिशील व पुरोगामी करण्याचा समर्पित वृत्तीने प्रयत्न केलेला आढळतो.

लातूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलन : हैद्राबाद संस्थानातील निजामाचे राज्य हे बहुजन समाजाचे राज्य नव्हते. निजामाने इ.स.१८०० मध्ये ब्रिटिशांबरोबर तह करून स्वत:चे अस्तित्व समर्पित केले होते. त्यातच १८५३ मध्ये कर्जाची परतफेड करण्यासाठी निजामाने ब्रिटिशांना (नळदुर्ग) उस्मानाबाद जिल्हा अभ्यार्पित केला. १८५७ च्या आंदोलनाचे प्रतिध्वनि लातूर जिल्ह्याच्या उदगीर आणि निलंगा परिसरात उमटले होते. १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना 'ब्रिटिश हिंदुस्थानात' झाल्यामुळे नवीन पर्वाचा आरंभ झाला. राष्ट्रीय काँग्रेसचा सुधारणावादी दृष्टिकोन हैद्राबादमधील सर सईद अहमद आणि त्याच्या प्रभावळीतील मंडळीला आवडला नाही, पण हैद्राबादच्या जनतेने राष्ट्रीय काँग्रेसच्या विचाराचे स्वागत केले. त्यात प्रामुख्याने अघोरनाथ चट्टोपाध्याय, मुल्ला अब्दूल कायुम, रामचंद्र पिल्ये आणि मोहिन हुसेन यांचा समावेश होता.

इ.स. १८९५ मध्ये हैद्राबादमध्ये गणेशोत्सव सुरू झाला. केशवराव कोरटकर, अघोरनाथ चट्टोपाध्याय, श्रीपाद दामोदर सातवळेकर यांनी आर्यसमाज चळवळीस भरघोष पाठिंबा दिला. १९०५ मध्ये अब्दुल कायुम यांनी अघोरनाथ चट्टोपाध्यायांच्या सहकार्याने स्वदेशी चळवळीचा श्री गणेशा केला. १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांना अटक व शिक्षा झाली. नाशिकच्या जॅक्सन कलेक्टरचा खून झाला (१९०९). त्यांचे प्रतिध्वनी सर्वत्र उमटले. दत्तो आप्पाजी तुळजापूरकर वकील हे राष्ट्रीय लिखाण करीत असत म्हणून त्यांना दि. ४ ऑगस्ट १९०८ रोजी निजाम सरकारने हद्दपार केलेले होते. उस्मानाबाद येथे सुरू झालेल्या नवीन शाळेत राजकीय जागृतीचे अंकूर रुजत आहेत म्हणून चार्ल्स नायडू या विशेष अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती. त्याच्याकडे शिक्षण विभागातील नोकरांवर कडक नजर ठेवण्याची जबाबदारी सोपविली होती.[२३०] राष्ट्रीय

---

२२९. घारपुरे, जोत्स्ना, **अशा झुंजलो आम्ही**, साहित्यसेवा प्रकाशन,औरंगाबाद, १९९४, पृ.५०.

२३०. रमेशन्, एन., **फ्रिडम स्ट्रगल इन हैद्राबाद**, खंड ३, हैद्राबाद स्टेट कमिटी, हैद्राबाद, पृ.१८७.

काँग्रेसच्या सुरत येथील अधिवेशनास वामनराव नाईक व केशवराव कोरटकर उपस्थित होते. त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव मराठवाड्यातील व पर्यायाने लातूर जिल्ह्यातील समाज प्रबोधनावर पडलेला आहे.

हैद्राबाद संस्थानच्या सार्वजनिक कार्यात राघवेंद्र शर्मा, पंडित सातवळेकर, दत्तो अप्पाजी तुळजापूरकर, लक्ष्मणराव फाटक, दिगंबरराव बिंदू, काशिनाथराव वैद्य, रामचंद्रराव अंतू, लक्ष्मणराव गानू, बॅ.श्रीधरराव नाईक, बॅ.विनायकराव कोरटकर यांचा समावेश होता. हैद्राबाद ही संस्थानची राजधानी होती. म्हणून मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटक या तिन्ही विभागातून अनेक लहान मोठी कर्तबगार माणसे तेथे गेली. त्यांनी हैद्राबादमध्ये आणि सर्व जिल्ह्यांतून जनजागृतीचे काम केले.

मराठवाड्यातील जनतेने केशवराव कोरटकर, वामनराव नाईक, स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदराव नानल, दिगंबरराव बिंदू, मुकुंदराव पेडगांवकर, भाऊसाहेब वैशंपायन, गोविंदभाई श्रॉफ, देवीसिंग चौहान, काशिनाथराव वैद्य, बाबासाहेब परांजपे, राघवेंद्र दिवाण, अनंत भालेराव, श्रीनिवास शर्मा, श्रीधरराव नाईक, फूलचंद्र रामचंद्र गांधी यांना आपले नेते मानले व त्यांच्या हाकेनुसार स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होऊन आपले कर्तृत्त्व पणास लावले. लातूर जिल्ह्यातील जनतेला व्यापक राजकीय आंदोलनापूर्वी धार्मिक आणि शैक्षणिक आघाडीवरच लढावे लागले. १९१९ मध्ये महात्मा गांधी हैद्राबादला आले होते. त्यांच्या दोन दिवसांच्या वास्तव्यामुळे राजकीय जागृतीला बहुमोल मार्गदर्शन लाभले. गांधीजीनी खिलाफत चळवळीला पाठिंबा दिला होता. परभणी, औरंगाबाद व वरंगल जिल्ह्याप्रमाणे तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्यात खिलाफत आंदोलनाचा प्रसार झाला होता.[२३१] मात्र खिलाफतचा फारसा प्रभाव पडू शकला नव्हता.[२३२]

हैद्राबादच्या स्वातंत्र्य संग्रामाचा आरंभ बिंदू सन १९२० हा मानला जातो.[२३३] सन १९२३ ते १९३१ या काळात काकीनाडा (१९२३), मुंबई (१९२६), पुणे (१९२८) व अकोला (१९३१) येथे राजकीय परिषदा घेण्यात आल्या. या राजकीय परिषदांपैकी अकोला अधिवेशनाचे अध्यक्ष मराठवाड्यातील रामचंद्र नाईक होते. स्वागताध्यक्ष सर्व मराठवाड्यातीलच होते. वामनराव नाईक यांनी काकीनाडा परिषदेस आपल्याबरोबर अनेक मित्र नेलेले होते. या परिषदांत संस्थानी राजवटीतील प्रजेबाबत विचार झाला. नागरिक स्वातंत्र्य, लोकशाही व शिक्षण याबद्दल चर्चा व ठराव करण्यात आले.

महाराष्ट्र परिषद : इ.स. १९२९ मध्ये गस्ती निशाण ५३ या नावाने गाजलेले काळे परिपत्रक प्रसिद्ध झाले. तसेच १९३१ पासून राजकीय सभांवर बंदी घालणारे कायदे अधिक व्यापक करण्यात आले. १९३२ नंतर हिंदुस्थानात प्रांतिक स्वायत्तता आणि संघराज्य पद्धती निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली. गोविंदराव नानल व वामनराव नाईक यांनी हैद्राबादचा भारतीय संघराज्यात समावेश व्हावा म्हणून लोकजागृती करण्यासाठी **महाराष्ट्र परिषदेची** स्थापना केली. पण दि. २१ मे १९३२ रोजी केशवराव कोरटकरांचा मृत्यू झाला. तसेच दि. ९ नोव्हेंबर १९३६ रोजी वामनराव नाईक मरण पावले. त्यामुळे हैद्राबाद संस्थान व मराठवाड्यातील सामाजिक व राजकीय चळवळीचे अतोनात नुकसान झाले.

हैद्राबाद व मराठवाड्याच्या स्वातंत्र्य आंदोलनात १९३७ व १९३८ ही दोन वर्षे अत्यंत घडामोडीची मानली जातात. याच काळात राजकीय विचारांना स्थैर्य प्राप्त होऊन त्यांना एक विशिष्ट रुप प्राप्त झाले. खऱ्या

---

२३१. रमेशन्, एन., पूर्वोक्त, खंड ४, पृ.२५.

२३२. भालेराव, अनंत, **हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा**, पूर्वोक्त, पृ.६६.

२३३. कुरूंदकर, नरहर, (संपा.) **हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन**, महाराष्ट्र साहित्य परिषद, हैद्राबाद, आंध्रप्रदेश, १९८५, प्रस्तावना.

अर्थाने राजकीय जीवनास प्रारंभ झाला असे म्हणावयास हरकत नाही.[२३४] दि. १ जून १९३७ मध्ये परतूर (आता जालना जिल्हा) येथे महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन झाले. यावेळी गोविंदराव नानल अध्यक्ष होते. या अधिवेशनास लातूर जिल्ह्यातील भास्करराव वकील नळदुर्गकर व दत्तात्रयराव लातूरकर वकील उपस्थित होते. परतूर येथे मराठवाड्यातील अनेक अपरिचित व्यक्ती आल्या होत्या. तेथेच प्रागतिक मतप्रणाली व जहालमतवादी असे दोन पक्ष अस्तित्वात असल्याचे उघड झाले.[२३५] जनतेच्या धार्मिक हक्काची पायमल्ली करण्यात आल्यामुळे प्रखर विरोध सुरू झाला होता.

महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन दि. १ व २ जून १९३८ रोजी लातूर येथे घेण्यात आले. या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण व मांडले जाणारे ठराव जिल्हाधिकारी अमीर-अलीखान यांनी अत्यंत काळजीपूर्वक तपासले होते. इतकेच नव्हे, तर ते स्वतः लातूर येथे तळ ठोकून होते. राजकीय प्रश्नांवर चर्चा केली जाणार नाही ही अट संघटकांना नाईलाजाने मान्य करावी लागली होती. निजाम सरकारने पोलिसांची एक तुकडी लातूरला मुद्दाम पाठविली होती.

हैद्राबादचे बॅ.श्रीनिवासराव शर्मा हे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले होते. श्री.भास्करराव वकील नळदुर्गकर हे स्वागताध्यक्ष होते.[२३६] उभयतांची भाषणे कलेक्टरकडे मान्यतेसाठी देण्यात आलेली होती, पण ऐनवेळी त्या भाषणातील काही ठराविक मजकूर वाचू नये असा आदेश काढण्यात आला. त्यामुळे अडचण निर्माण झाली. या अधिवेशनाची गंमत अशी की, कलेक्टरने अध्यक्षीय भाषणाच्या छापील प्रती वाटण्यास परवानगी दिली, पण आक्षेपार्ह मजकूर वाचू नये असा हुकूम काढला. त्यामुळे पहिली बैठक तंग वातावरणात पार पडली.

स्वागताध्यक्ष भास्करराव वकील यांनी आपल्या भाषणात सांगितले, की, निजाम संस्थानाबाहेर आपणास काँग्रेसच्या कर्तबगारीची माहिती व जयजयकार ऐकू येतो. आपल्या आंध्र बंधूंनीही सुसूत्र चळवळ सुरू केलेली आहे, पण निजामप्रांतीय महाराष्ट्रीयन मागे आहेत. लेखन व मुद्रण स्वातंत्र्य, शिक्षण संस्था, व्यायामशाळा व वृत्तपत्रे यावरील बंदीमुळे येथील जनतेची उपासमार होत आहे. सरकारने योग्य सुधारणा करून जनतेस न्याय द्यावा. चळवळीसाठी द्रव्यसंचय आणि हिंदू-मुस्लीम ऐक्यावर त्यांनी भर दिला.

बॅ. श्रीनिवासराव शर्मा यांनी आपल्या तडफदार अध्यक्षीय भाषणात संस्थाने व फेडरेशन, हिंदू-मुस्लीम दंगे व त्याची कारणे, शिक्षण, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेतमालाला अधिक किंमत देणे, हरिजनांचे प्रश्न, मद्यपानबंदी इत्यादी प्रश्नांवर चर्चा केली. त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरुंचे हैद्राबाद संस्थानाबद्दलचे पुढील मत स्पष्ट केले. "राजकीयदृष्ट्या सर्वात जास्त मागासलेले व पुराण पद्धतीने चाललेले संस्थान म्हणजे दक्षिण हैद्राबाद होय, ज्याला हिंदुस्थानात पहिल्या प्रतीचे संस्थान म्हणवून घेण्याचा मान मिळाला आहे. हे ऐकून कोणालाही खेदच होईल. आमच्या सरकारने यावर जरुर विचार करावा. कारण हे आमच्या संस्थानच्या कीर्तीस शोभण्यासारखे नाही".[२३७]

---

२३४. तीर्थ, स्वामी रामानंद, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७६, पृ.१४.

२३५. चौधरी, कि.का. (संपा.), **परभणी जिल्हा गॅझेटिअर**, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ.७१.

२३६. फाईल क्र.१५, पोलिटिकल ॲण्ड कॉन्स्टिट्यूशनल, ए.पी.स्टेट अर्काइव्हज, हैद्राबाद, १९३८. यामध्ये अधिवेशनातील कार्यकारिणी विषयीचे तपशील उपलब्ध आहेत. तसेच ब्रम्हनाथकर, वि. गो., **हिंदू अस्मितेचा हुंकार**, भारतीय इतिहास संकलन समिती, २००० पृ.३१४.

२३७. जोशी, द.पं., **काळाच्या पडद्याआड**, खंड ३, पूर्वोक्त, पृ.४४९.

अनुक्रमणिका

लातूर येथे उपस्थित असलेल्या प्रतिनिधींमध्ये तरुणांची संख्या अधिक होती. त्यात भिन्न विचार प्रवाहाचे लोक होते. या ठिकाणी महाराष्ट्र परिषदेची घटना तयार करतांना त्यात राजकीय उद्दिष्टांचा समावेश करण्यात आला होता.[२३८] या अधिवेशनात पुढील प्रमुख ठराव होते. १. धूळपेठ येथील दंग्याची चौकशी करावी, २. जनतेला नागरी स्वातंत्र्य देण्यात यावे, ३. जबाबदार राज्यपद्धती अंमलात आणावी. हिंदू समाजावर जे अन्याय केले जात आहेत त्याची चौकशी करावी.

हे प्रस्ताव परिषदेपुढे मांडण्यास स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांनी बंदी घातली. कलेक्टरशी झालेल्या प्रदीर्घ चर्चेनंतर नागरी स्वातंत्र्याच्या ठरावास परवानगी देण्यात आली.[२३९] या अधिवेशनात अनेक प्रतिनिधींनी कायदेभंगाची तयारी जाहीर केली व आपण कारागृहात जाण्यास तयार आहोत असे सांगितले. शांत वृत्तीच्या व हिशेबी लोकांना मात्र सबुरीचे धोरण स्वीकारावे असे वाटत होते.

पुढे महाराष्ट्र इतिहास परिषदेचे तिसरे अधिवेशन दि. २९ ते ३० मे १९४१ रोजी नांदेड जिल्ह्यातील उमरी येथे झाले. यावेळी काशिनाथराव वैद्य हे अध्यक्ष होते.औरंगाबाद येथे चौथे अधिवेशन दि. १ ते ३ जून १९४३ रोजी बॅ. श्रीधरराव वामन नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झाले, तर पाचवे अधिवेशन दि. २४ व २५ मे १९४५ रोजी सेलु या ठिकाणी संपन्न झाले. यावेळी दिगंबरराव बिंदु परिषदेचे अध्यक्ष होते. परिषदेचे सहावे अधिवेशन दि. १५ व १६ मे १९४६ रोजी लातूर येथे संपन्न झाले. यावेळी आ. कृ. वाघमारे हे अध्यक्ष होते. या अधिवेशनावर जहाल विचारांचा प्रभाव स्पष्ट जाणवत होता.[२४०]

महाराष्ट्र परिषदेच्या लातूर अधिवेशनामध्ये जबाबदार राज्य पद्धतीची तसेच शोषणरहित अर्थव्यवस्था निर्माण करण्याची मागणी केली गेली. नागरी स्वातंत्र्य प्रदान करावे आणि कर्नाटक, आंध्र व महाराष्ट्र या तिन्ही परिषदांचे एकत्रिकरण व्हावे अशा राष्ट्रीय तसेच आर्थिक व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या बाबींची चर्चा झाली. परिषदेत श्री. वाघमारे यांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा ठराव सर्वप्रथम मांडला ही बाब लातूरच्या इतिहासात एक महत्त्वपूर्ण घटना ठरते. विशेषत: किसान मेळाव्यात श्री. आ. कृ. वाघमारे, शंभुगिरी महाराज व व्यंकटराव जाधव यांची भाषणे झाली. या मेळाव्याचे अध्यक्ष हैद्राबादचे विद्यार्थी नेते श्री. के. व्ही. नृसिंहराव होते. विद्यार्थी मेळाव्यासमोर स. कृ. वैशंपायन, रामचंद्र नांदापूरकर यांचीही भाषणे झाली. एकूण सर्वच परिषदांमधून शेतकऱ्यांचे प्रश्न, विणकरांचे प्रश्न, सामाजिक सुधारणा आणि नागरी स्वातंत्र्य व जबाबदार राज्य पद्धतीकडे लक्ष वेधल्याचे दिसते.

लातूरची महिला परिषद : लातूरच्या महाराष्ट्र परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे येथे महिलांचे संमेलन घेण्यात आले. या संमेलनाच्या अध्यक्षा सौ.काशीबाई किर्लोस्कर होत्या व स्वागताध्यक्ष, सौ. सुशिलाबाई दिवाण होत्या. काशीबाईंनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठवाड्यात साक्षरतेचे प्रमाण शेकडा तीन टक्के आहे व स्त्रियांत तर ते शेकडा एक टक्कासुद्धा नाही याबद्दल खेद व्यक्त केला. "स्त्री ही जीवनातील एक अमोघ शक्ती आहे. मुलांना उत्तम प्रकारचे नागरिक बनविण्याचे काम माताच करू शकते. अर्थात मनुष्यास उत्तम नागरिक

---

२३८. देऊळगावकर, वि.पा. (अनु.), **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी**, (ले. स्वामी रामानंद तीर्थ), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७६, पृ.७५.

२३९. कित्ता, पृ.७७.

२४०. धारुरकर, वि.ल., **मुक्ति संग्राम** : १९३६-१९४८ (संपा. लक्ष्मीकांत देशमुख धारुरकर), मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, १९८८, पृ.४८. या ग्रंथात याविषयीचा तपशील विस्ताराने उपलब्ध आहे. भालेराव, अनंत, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा**, पूर्वोक्त, १९८७, पृ.२१८.

बनविणे म्हणजे शील, देशाभिमान, मनोधैर्य, चिकाटी, स्वातंत्र्यप्रियता इत्यादी सद्‌गुण त्याच्यात भिनले पाहिजेत व यावरच देशाची उन्नती अवलंबून आहे. कौटुंबिक सौख्य तिच्याच कर्तृत्वावर अवलंबून आहे".[२४१] असे सांगून त्यांनी आपल्या भाषणात सामाजिक सुधारणेवर भर दिला. आम्ही तात्विक नि केवळ बौद्धिक काथ्याकुटमध्ये रूतून बसल्यामुळेच क्रियादुर्बल होऊन पडलो आहोत असे सांगून सर्व भगिनींनी तात्काळ कार्यास लागावे असे आवाहन केले.

महिला परिषदेने एकूण बारा ठराव पास केले. त्यात साक्षरता प्रसार, स्त्रियांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे, विवाहाच्या वयोमर्यादेत वाढ, सामुदायिक उपासना, दानधर्माचा ओघ सार्वजनिक संस्थाकडे वळवावा, मुलींचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून असावे, मुलींच्या शाळा काढण्यास कोणत्याही प्रकारची अट असू नये, स्त्रियांसाठी प्रसुतिगृहे व मोफत औषधालये इत्यादी महत्त्वाचे ठराव होते.

महिला परिषदेची जबाबदारी सौ. सुशिलाबाई दिवाण, सौ.लक्ष्मीबाई औसेकर इत्यादींनी अत्यंत तन्मयतेने सांभाळली. लातूरच्या अधिवेशनात बहुसंख्य प्रतिनिधींनी सुचविले की, स्वामी रामानंद तीर्थ यांनी शिक्षणक्षेत्र सोडून राजकीय प्रश्नावर जनशक्ती संघटित करावी. त्याप्रमाणे दि. ९ जून १९३८ पासून स्वामीजींनी राजकीय क्षेत्रात पदार्पण केले. त्यामुळे मराठवाड्याच्या व हैद्राबादच्या राजकारणास एक योग्य दिशा लाभली. स्वामीजींनी सर्वत्र भ्रमण करून निष्ठावान राजकीय कार्यकर्त्यांची एक सेनाच तयार केली. त्यातील गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, आ. कृ. वाघमारे, आशाताई वाघमारे, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शामराव बोधनकर, फूलचंद गांधी, राघवेंद्र दिवाण, निलकंठराव कुलकर्णी, दत्तात्रयराव शिवणगीकर, भगवानराव गांजवे, श्रीनिवास बोरीकर अशी कितीतरी नावे सांगता येतील. महाराष्ट्र परिषदेच्या लातूर अधिवेशनामुळे राघवेंद्र दिवाण, दत्तात्रयराव शिवणगीकरांसारखे नेते तयार झाले. त्यांनी या परिसरातील जनतेस राजकीय दृष्टी दिली. राष्ट्रसेवादल, स्टडी सर्कल, साक्षरता वर्ग, चरखा संघ इत्यादी विधायक कार्याला चालना मिळाली.[२४२]

खरे तर १९३८ च्या लातूर येथील अधिवेशनामुळे हे स्पष्ट झाले की, समाज अस्वस्थ होता व या अस्वस्थतेतून बाहेर पडण्याची तो वाट पहात होता. आपले हक्क व अधिकार हे सांगून, लिहून, भाषणे देऊन मिळणारे नव्हते. नव्या पिढीमध्ये आघात करून स्वत:ची अस्मिता व कर्तृत्व दाखविण्याची उर्मी दाटली होती. ती उर्मी १९३८ च्या सत्याग्रहाच्या निमित्ताने व वंदे मातरम्‌च्या चळवळीच्या रुपाने प्रकट झाली.[२४३]

निजाम राज्यातील परिस्थिती १९२० पासूनच बदलत चालली होती. निजाम सरकारने विविध कायदे करून समाजजीवनावर अनेक निर्बंध लादल्यामुळे हिंदूंची गळचेपी वाढत गेली. त्याला विरोध करण्यासाठी काही संस्था उदयास आल्या.

हैद्राबाद हिंदू महासभा : ही हिंदू महासभा म्हणजे अखिल भारतीय हिंदू महासभा नव्हे. हैद्राबाद हिंदू महासभेची स्थापना दि. २३ मार्च १९२३ रोजी (गुढीपाडवा) हैद्राबादेत झाली. निजामाच्या दडपशाहीला प्रतिरोध करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली. हिंदूंच्या तक्रारी दूर करणे व हिंदूसाठी विधायक

---

२४१. जोशी, द.प., **काळाच्या पडद्याआड**, पूर्वोक्त, खंड ३, पृ.४२५.
२४२. **स्मरणिका**, मराठवाडा साहित्य संमेलन, लातूर, पृ.१८.
२४३. जोशी, द.पं., पूर्वोक्त, खंड-३, प्रस्तावना, पृ.८.

सामाजिक कार्य करणे हा या संस्थेचा हेतू होता. हैद्राबाद राज्याच्या संघटित राजकीय जीवनाच्या चळवळीचा हा आरंभ बिंदू होता.[२४४]

हैद्राबाद संस्थानातील समाजजीवन १९३० नंतर अधिकच बिकट झाले होते. निजाम राज्यातील हिंदू सभेने अन्यायाविरुद्ध लढा उभा केला, तर महाराष्ट्र हिंदूसभा त्यास पाठिंबा देईल असे आश्वासन दि. १५ ऑक्टोबर १९३८ रोजी नांदगाव (जिल्हा नाशिक) येथे भरलेल्या हिंदूसभेच्या परिषदेत देण्यात आले होते. त्यापूर्वी महाराष्ट्र हिंदूसभेचे नेते श्री.अण्णासाहेब भोपटकर यांनी श्री. शंकर रामचंद्र दाते व श्री. शिवराम विष्णु मोडक यांना निजाम राज्यात जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती पाहून निवेदन करण्यास सांगितले होते. त्यांनी परांडा, तडवळे, तुळजापूर, उस्मानाबाद, लातूर, उदगीर, कळंब, अंबेजोगाई, परळी-वैजनाथ, औरंगाबाद, बीड, गेवराई, गुलबर्गा व हैद्राबाद या ठिकाणांना भेटी दिल्या. त्यांनी आपल्या दौऱ्यात बार्शी व लातूर येथील तसेच प्रवासात प्रतिष्ठित वकील, व्यापारी, शिक्षक व शिक्षण संस्थाचालकांच्या भेटी घेतल्या. त्यातून त्यांना हिंदू समाजाच्या दुर्दैवी जीवनाची हृदयद्रावक माहिती मिळाली. ते सर्व वृत्त केसरीच्या अंकातून प्रसिद्ध झाले. दि. ८ जुलै १९३८ च्या केसरीच्या अंकात अग्रलेखही छापण्यात आला. त्यामुळे जनमत प्रक्षुब्ध बनले.[२४५]

मुक्ती संग्रामामध्ये हिंदू महासभेचे योगदान लक्षणीय होते. ऑक्टोबर, १९३८ ते ऑगस्ट, १९३९ पर्यंत हिंदू महासभेने दिलेल्या लढ्यात संस्थानातील चार हजार स्वयंसेवक तुरुंगात गेले. यापैकी चारशे जणांना कारावासाची शिक्षा भोगावी लागली. १४ कार्यकर्त्यांना प्राणत्याग करून हौतात्म्य पत्करावे लागले. मराठवाड्यात सोलापूर सीमेजवळ तुळजापूर, नळदुर्ग, उमरगा, बिदर या क्षेत्रामध्ये भूमिगत स्वरुपात मोठे काम सुरू होते. आर्य समाज, हिंदू महासभा, स्वयंसेवक व सैनिक या तिघांच्या एकत्रित लढ्यामुळे मुक्ति लढ्याला बळकटी मिळाली.[२४६]

निजाम राज्यातील हिंदू समाजानेही 'भागानगर हिंदू नागरिक स्वातंत्र्य संघ' स्थापन करून आपल्या मागण्या सरकारकडे सादर केल्या होत्या. हैद्राबाद हिंदू सभेतर्फे दि. २१ ऑक्टोबर १९३८ रोजी वीर यशवंतराव जोशी, दत्तात्रय जुक्कलकर, सदाशिव दुसंगे, सत्यनारायण प्रभुतींनी सत्याग्रह केला. हा हैद्राबाद राज्यातील पहिला सत्याग्रह होय. पोलिसांनी त्यांना अटक केली व त्यांच्यावर खटले भरून त्यांना तुरुंगात पाठविले.[२४७]. आर्यसमाजाने आरंभीच्या काळात निजामाला जी निवेदने दिलेली आहेत त्यावरून त्यांचा लढा धार्मिक स्वातंत्र्यासाठी होता हे स्पष्ट दिसते. दि. २३ जानेवारी, १२ एप्रिल व २९ एप्रिल १९३४ च्या परिपत्रकाद्वारे निजाम सरकारने आर्यसमाजावर अनेक निर्बंध लादले. मिरवणुकी, पूजास्थानांची बांधणी अथवा दुरुस्ती यात अडथळे आणले. तसेच आर्यसमाज कार्यकर्त्यांवर खटले भरले. दि. ७ डिसेंबर १९३४ पासून हैद्राबादला 'वैदिक आदर्श' साप्ताहिकाचे प्रकाशन सुरू झाले. या साप्ताहिकाची संपूर्ण जबाबदारी पं. नरेंद्रजींवर सोपविण्यात आली. निलंगा आर्यसमाजात पं. नरेंद्रजींनी 'कुराण मे तजल्ली ए वेद' या विषयावर व्याख्यान दिले. त्यामुळे मुसलमानांच्या भावना दुखावल्या या कारणावरून त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला. त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली.

---

२४४. जोशी, द.पं., पूर्वोक्त, खंड-३, प्रस्तावना, पृ.१८.

२४५. **काळ**, साप्ताहिक, दि. १९ मे १९७५, अंक १३, पुणे.

२४६. धारुरकर, वि.ल. 'हैद्राबाद मुक्तिसंग्रामात हिंदुत्ववादी संघटनाचा सहभाग,' **मराठवाडा मुक्तिसंग्राम-एक मागोवा,** म.मु.सं. समिती, औरंगाबाद, १९९८, पृ.१२ ते १६.

२४७. परळीकर, अशोक, **हैद्राबादचा पहिला सत्याग्रह**, सत्यार्थ प्रकाशन, परभणी, १९८८, पृ.४०.

अनुक्रमणिका

आर्यसमाजाचा लढा : हैद्राबादचे बॅ.विनायकराव कोरटकर हे आर्यसमाजाचे अध्यक्ष होते. भाई शामलाल यांनी १९२६ मध्ये उदगीरला आर्यसमाजाची स्थापना केली होती. समाजाचे मुख्य कार्यालय मराठवाड्यातील उदगीर (लातूर जिल्हा) येथे होते. बन्सीलाल हे मुख्यमंत्री होते.

सन १९३५ मध्ये मिर्झा महंमद (कलेक्टर, जिल्हा-बिदर) यांनी निलंग्याचे आर्यसमाज मंदिर पाडले. हवनकुंड खोदून फेकून दिले. संस्थेचे साहित्य जप्त केले. त्यामुळे जनतेत प्रक्षोभ निर्माण झाला व आंदोलन करण्यात आले. परिस्थिती आवाक्याबाहेर जाऊ नये म्हणून राज्याचे गृहसचिव नवाब जूलकदरजंग यांनी समाज मंदिर पुन: बांधून देण्याचा व जप्त केलेले साहित्य परत करण्याचा दि. २८ सप्टेंबर १९३५ रोजी आदेश दिला.[२४८]

निजाम सरकारने १९३८ मध्ये सरकारच्या परवानगीशिवाय कोठेही हवनकुंड तयार करू नये व आर्यसमाज मंदिर बांधू नये असा आदेश काढला (दि. २६ जानेवारी १९३८ गृहखात्याचे परिपत्रक क्र.३७६). त्यामुळे आर्यसमाजाने प्रखर आंदोलन सुरू केले. उदगीर येथील श्री.माधवराव घोणशीकर यांनी निजामाच्या वाढदिवशी कंधारमध्ये बंद पाळला. तेव्हा त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. आर्यसमाजी कार्यकर्त्यांनी चौदा मागण्या सरकारकडे सादर केल्या. पण सरकारने दखल घेतली नाही. म्हणून दि. २१ ऑक्टोबर १९३८ पासून आर्यसमाजाने सत्याग्रह सुरू केला.

निजाम सरकारने आपली दडपशाही वाढविली. आर्यसमाजी नेत्यांच्या घरांची झडती घेण्यात आली. समाज मंदिरे व हवनकुंडे उद्ध्वस्त करण्यात आली. पण आर्यसमाजाने आपला सत्याग्रह चालूच ठेवला. या सत्याग्रहात लातूर जिल्ह्याचा सहभाग मोलाचा होता हे लक्षात घेतले पाहिजे. निलंग्याचे श्री.शेषराव वाघमारे, लातूरचे दिगंबरराव शिवणगीकर, अंधोरीचे शंकरराव पाटील, अहमदपूरचे निवृत्ती रेड्डी, दिगंबरराव लाटकर यांनी सत्याग्रहाच्या स्थानिक तुकड्यांचे नेतृत्व केले. सत्याग्रहींना कारागृहात अतिशय घृणास्पद वागणूक दिली जात होती.

हा लढा दि.२१ ऑक्टोबर १९३८ पासून दि. १५ ऑगस्ट १९३९ पर्यंत चालला. यासाठी विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात सत्याग्रही सहभागी झाले. शासनाने हे आंदोलन निष्ठूरपणे दडपले. त्यासाठी बऱ्याचदा टोकाचा मार्ग सुद्धा अवलंबिलेला दिसतो. स्वधर्म रक्षणाच्या कामासाठी म्हणून तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यातील खालील व्यक्ती बळी पडल्या किंबहुना त्यांना हौतात्म्य प्राप्त झाले अशी नोंद करावी लागेल.

(१) रामकृष्ण (रामा मांग) १९३२, उस्मानाबाद, (२) वेदप्रकाश आर्य (दासप्पा), १९३७, गुंजोटी, (३) माणिकराव दि. २७-१०-१९३८, हुपला, ता.उदगीर, (४) लिंबाजी मारोती, गोरकेवाडी, (५) भाई श्यामलाल उदगीर येथे दि. १७-१२-१९३८ रोजी मारले गेले, तर बाबुराव सिताराम, तळेगाव, ता. अहमदपूर यांना अपंग केले. याविषयीचा अत्यंत विदारक असा तपशील तत्कालीन कागदपत्रांतून उपलब्ध होतो.[२४९] तत्कालीन लातूर जिल्ह्यातील सत्याग्रहामध्ये सहभागी झालेल्या सत्याग्रहींची व त्यांच्या कार्याची नोंद तसेच व्यक्तींची नावे, त्यांना झालेल्या शिक्षा उदा. उमरी, निलंगा, लातूर, अहमदपूर, तुळजापूर, कळंब उमरगा,

---

२४८. काळे, भगवान (संपा.), **मराठवाडा-काल आणि आज**, संकेत प्रकाशन, जालना, १९८६, पृ.२९३.

२४९. पोतदार, वसंत, **'हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम-आष्टा (कासार)**, जि.उस्मानाबाद', वसंत पोतदार प्रकाशन, १९८४, पृ.३७. तसेच देशपांडे, ग.द. **संस्थान हैद्राबादचे : स्वातंत्र्य आणि लोकस्थिती** साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९८ या ग्रंथात याविषयीच्या तपशीलवार नोंदी उपलब्ध आहेत. पृ.१४४.

औसा, उदगीर, उस्मानाबाद, भूम या व अशा तालुका क्षेत्रातील अनेक गावांत झालेल्या उठावांची तपशीलवार केलेली नोंद गेल्या दशकात झालेल्या संशोधनातून स्पष्ट होते.[२५०] दि. २३ डिसेंबर १९३९ ला निजाम सरकारने आंदोलकांच्या सर्व मागण्या मान्य केल्या व सुधारणांची घोषणा केली. हैद्राबादच्या स्वातंत्र्य आंदोलनात आर्यसमाजाची चळवळ म्हणजे जनजागृतीच्या दृष्टीने एक अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. आर्यसमाजी लोकांनी अत्यंत निकराचा आणि निर्धाराचा संग्राम केला त्याला तोड नाही. म्हणूनच हैद्राबाद संस्थानातील तानाशाही संपुष्टात आणण्याच्या प्रक्रियेत आर्यसमाजाचे योगदानही महत्त्वाचे होते.

निजाम प्रांतिक वीरशैव परिषद : या परिषदेची स्थापना सन १९३५ मध्ये उदगीर येथे होऊन त्यावर्षी व सन १९३६ मध्ये उदगीर येथे व सन १९३७ मध्ये लातूर येथे परिषदेचे अधिवेशन भरले होते.

१९३८ चा सत्याग्रह : इ.स. १९३८ हे वर्ष हैद्राबादच्या राजकीय जागृतीत एक महत्त्वाचा टप्पा ठरले. हिंदू महासभेने आरंभिलेला भागानगर निःशस्त्र सत्याग्रह, आर्यसमाजाने सुरू केलेले आंदोलन, हैद्राबाद स्टेट काँग्रेसने आरंभिलेला सत्याग्रह, विद्यार्थ्यांनी सुरू केलेली वंदेमातरम्‌ची चळवळ आणि बहादूर यारजंग या मुसलमान नेत्याने गतिमान केलेली मुसलमानांची राजकीय चळवळ हे त्याचे ठळक पाच घटक होते.[२५१] इ.स. १९३८ ला हैद्राबाद स्टेट काँग्रेसची स्थापना झाली, पण निजाम सरकारने दि. ८ सप्टेंबर १९३८ रोजी 'पब्लिक सेफ्टी रेग्युलेशन ॲक्ट', आधारे यावर अधिकृतपणे बंदी घातली. कारण दि. ९ सप्टेंबर रोजी प.जी.रामचारी यांच्या बंगल्यावर स्टेट काँग्रेसच्या सभासदांची आमसभा होणार होती व पदाधिकाऱ्यांची नावे निश्चित होणार होती. त्याच्या एक दिवस आधी जन्माला येण्यापूर्वीच स्टेट काँग्रेस बेकायदा ठरविण्यात आली.[२५२] काँग्रेस संघटनेचे स्वरुप भारतव्यापी होते म्हणून निजाम सरकारने त्यावर बंदी घातली. इ.स.१९३८ च्या शेवटी ब्रिटिश हिंदुस्थानात प्रांतिक मंडळे सत्तेवर आलेली होती, पण हैद्राबाद संस्थानात मात्र परिस्थिती गंभीरच होती. स्टेट काँग्रेसवरील बंदीच्या विरोधात एक फार मोठा सत्याग्रह हैद्राबाद राज्यात झाला. हैद्राबाद स्टेट काँग्रेस व १९३८ च्या सत्याग्रहाची सर्व जबाबदारी स्वामी रामानंद तीर्थ यांच्यावर सोपविण्यात आलेली होती. हैद्राबाद येथे हरिश्चंद्र हेडा यांच्या निवासस्थानी एक सत्याग्रह केंद्र सुरू करण्यात आलेले होते. दि. २४ ऑक्टोबर १९३८ च्या दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी हैद्राबाद येथे जो सत्याग्रह झाला, त्यात सर्वप्रथम लातूरहून सत्याग्रही गेले होते. त्यात अर्ध्यापेक्षा अधिक सत्याग्रही भूतपूर्व उस्मानाबाद जिल्ह्याचे होते. लातूर जिल्ह्यातील सत्याग्रहींमध्ये राघवेंद्र दिवाण, व्ही.एन.पत्की, सी.एम.पुरोहित, नरहर भूमकर, शंकरराव वामनराव खंडापूरकर, जगन्नाथ नरहर जोशी, किशन भागवत भातलवंडे, सिद्रामप्पा शिंपी यांचा समावेश होता. आजच्या लातूर जिल्ह्याचे केंद्र सोलापूर येथे स्थापन करण्यात आले होते. तेथे देवीसिंग चौहान हे केंद्रप्रमुख होते. लातूर नंतर या जिल्ह्यात चाकूरचे केंद्रही फार कार्यक्षम होते. आजच्या लातूर जिल्ह्यातील सत्याग्रहींमध्ये दत्तात्रय तांदूळवाडीकर, वसंत जोशी, वसंत गोविंदपूरकर, त्रिंबक नाईक, किशनराव अयाचित, कृष्णाजी आबाजी वैद्य, दत्तोपंत पाठक यांचा समावेश होता. दि. २४ ऑक्टोबर १९३८ पासून सत्याग्रह सुरू झाला. या सत्याग्रहात अठरा तुकड्या तुरुंगात गेल्या. दि. २३ डिसेंबर १९३८ रोजी महात्मा गांधीजींच्या आज्ञेप्रमाणे हा सत्याग्रह स्थगित करण्यात आला. तरुणांना हा गांधीजींचा सल्ला मुळीच आवडला नाही, कारण जनतेत जागृती होत होती. तथापि १९३८ ते १९४८ मधील हैद्राबाद संस्थानातील लढ्याला निश्चित दिशा देण्याचे काम स्टेट काँग्रेसनेच केले.

---

२५०. भालेराव अनंत, **'हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा'**, स्वा.रा.ती.सं.सं.१९८७, पृ.१४८. तसेच पोतदार वसंत, पूर्वोक्त, पृ.४४-४५. अधिक माहितीसाठी या ग्रंथातील तपशील पाहावेत.

२५१. कुरुंदकर, नरहर, **'हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन'**, महाराष्ट्र साहित्य परिषद, हैद्राबाद, १९८५, पृ.१६.

२५२. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ.१११.

अनुक्रमणिका

वंदे मातरम् : विद्यार्थी आंदोलन (१९३८) : डिसेंबर १९३८ चे वंदे मातरम् विद्यार्थी आंदोलन हे हैद्राबाद संस्थानच्या आणि मराठवाड्याच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे आहे. उर्दू माध्यम, मातृभाषेला उर्दूच्या तुलनेत दुय्यम स्थान, उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांना घालावा लागलेला गणवेश, नीतिशास्त्राचा अभ्यास व वंदे मातरम् या गीताच्या सामुहिक गायनावरील बंदी यामुळे विद्यार्थी चिडलेले होते. वंदे मातरम् आंदोलन प्रथम शासकीय इन्टरमिडिएट महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहणाऱ्या १२ विद्यार्थ्यांनी दि. १६ डिसेंबर १९३८ रोजी सुरू केले. नंतर उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी हैद्राबाद येथे वंदे मातरम्साठी बेमुदत संप पुकारला. त्याचे लोण सर्व राज्यभर पसरले. दि. ६ डिसेंबर १९३८ हा हरताळाचा सातवा दिवस होता म्हणून हैद्राबाद येथील वसतिगृहातील काढून टाकलेल्या विद्यार्थ्यांनी एक दिवस उपवास पाळला होता.[२५३] लातूर जिल्ह्यातील काही विद्यार्थी हैद्राबाद, औरंगाबाद व गुलबर्गा येथे शिक्षण घेत होते. त्यांनी या आंदोलनात स्वतःस झोकून दिले.[२५४] वंदे मातरम् ही हैद्राबाद राज्यातील तरुणांची चळवळ होती. अन्यायाच्या प्रतिकाराचे हे प्रतिक होते. परिणामाची खंत न बाळगता हे विद्यार्थी या आंदोलनात पडलेले होते. निजाम सरकारने हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करून टाकले. त्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी इतरत्र जावे लागले. मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री पं.रविशंकर शुक्ला यांनी वंदे मातरम् सत्याग्रहातील विद्यार्थ्यांना जानेवारीत त्या राज्यातील शाळा-महाविद्यालयात प्रवेश देऊन हैद्राबाद संस्थानातील राष्ट्रवादी चळवळीस उत्तेजन दिले. त्यामुळे हे राष्ट्रवादी तरुणांना वरदानच ठरले.[२५५] नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु ले.कर्नल डॉ.टी.जे.केदार यांनी वंदे मातरम् चळवळीतील सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळले. या आंदोलनात ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीही मदत केली. वंदे मातरम्च्या नावाने झालेला हा लढा राष्ट्रीयत्वाचा लढा होता. अन्यायामुळे धुमसणाऱ्या संतापाचा तो उद्रेक होता. पुढे त्याचे रुपांतर वणव्यात झाले. वंदे मातरम् चळवळीमुळे लढाऊ वृत्ती, सैनिकी बाणा, राष्ट्रीयत्वाची भावना व प्रामाणिक कणखर निष्ठा बाळगणाऱ्या अशा तरुण कार्यकर्त्यांची सेना नकळत तयार झाली आणि आपण होऊन जोमाने, त्वेषाने, जिद्दीने पुढे सरसावत गेली.[२५६] हैद्राबाद संस्थानातील जनआंदोलनाच्या बडग्यामुळे निजामाने १९३८ मध्ये दिवाण बहादूर अय्यंगार यांच्या अध्यक्षतेखाली घटनात्मक सुधारणा सुचविण्यासाठी एक समिती (अय्यंगार रिफॉर्मस कमिटी) नियुक्त केली. या समितीने विविध वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारी विधानसभा नियुक्त करण्याची शिफारस केली. पण त्यास इत्तेहादूल या मुस्लिम संघटनेने प्रखर विरोध केला. कारण या योजनेमुळे मुसलमानांची मक्तेदारी नष्ट होणार होती. पुढे १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाल्यामुळे घटनात्मक सुधारणांचे केवळ आश्वासन दिले गेले.

१९४२ चे आंदोलन : दि. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत काँग्रेसच्या अखिल भारतीय अधिवेशनात भारत छोडो ठराव संमत झाला. दि. ९ ऑगस्ट १९४२ पासून ब्रिटिश हिंदुस्थानात "चलेजाव" (भारत छोडो) चळवळ सुरू झाली. या घटनेचे प्रतिध्वनी हैद्राबाद संस्थानातही उमटले. १९४२ च्या चलेजाव आंदोलनात राघवेंद्रराव

२५३. जोशी, द.पं., **'काळाच्या पडद्याआड'**, पूर्वोक्त, खंड-३, पृ.४९७.

२५४. बाजपेयी, चंद्रशेखर, **'हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मी'**, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९५, पृ.४७.

२५५. कित्ता, पृ.४८.

२५६. पटेल, शंकरभाई, **'हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम'**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, १९९३, पृ.३७.

अनुक्रमणिका

दिवाण, मदनलाल जोशी, चंद्रशेखर बाजपेयी, शंकरराव अस्तुरे, लक्ष्मणराव बिदरकर इत्यादी लातूर जिल्ह्यातील लोक सहभागी झाले होते.[२५७] दि. १८ सप्टेंबर १९४२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अमीर अलीखान यांनी निजाम सरकारकडे गुप्त अहवाल पाठविला होता. त्यात लातूर हायस्कूलमधील दोन विद्यार्थ्यांनी सत्याग्रह केल्याची माहिती असून मुख्याध्यापक श्री.अय्यर हे काँग्रेस विचारसरणीचा प्रसार करतात म्हणून त्यांची त्वरित बदली करण्यात यावी असे सुचविले होते.[२५८]

या जिल्ह्यातील राजकीय जागृतीसाठी डॉ. निलकंठराव कुलकर्णी, चंद्रशेखर बाजपेयी, राघवेंद्रराव दिवाण (जिल्हा संघटक, लातूर), बाबुराव कानडे, श्रीनिवासराव अहंकारी, शेषराव वाघमारे (निलंगा), निवृत्ती रेड्डी, माणिकराव पागे (अहमदपूर), देवीसिंग चौहान (धोंडूसिंग नागरसोगेकर किंवा गुरुजी), व्यासाचार्य संधीकर (औसा), माधवराव धोणसीकर (उदगीर), किशनराव वकील, कालिदासराव देशपांडे, फुलचंद गांधी, दासराव बोकील, कॅप्टन व्यं. बा. जोशी (जिल्हा संघटक), नारायणराव चाकूरकर (औसा), विश्वंभरराव हराळकर इत्यादी असंख्य कार्यकर्त्यांनी कार्य केलेले आहे. सर्वांचा नामोल्लेख करणे शक्य नसले तरी त्यांचा या कार्यातील सहभाग मोलाचा होता.

लातूर येथे अनंत राजाराम जैन, गुरुसंग व काशिनाथ भोई यांनी रेल्वे व टेलिफोन व्यवस्थेच्या विरोधात मोडतोडीचे काम केले. त्यांना अटक होऊन दहा महिन्यांची शिक्षा झाली व इंदूरच्या तुरुंगात पाठविण्यात आले. पोलीस कारवाईनंतर त्यांची सुटका झाली.[२५९] या लढ्यात हिंदूंच्याबरोबर मुसलमान सहभागी होते. बाबासाहेब परांजपे, किसन सदाशिव यांच्या बरोबर अनंतराव गजमुखी, राघवेंद्रराव दिवाण (यांनी वकिली सोडून चळवळीत भाग घेतला.), अब्दुल रझाक दिंडार, अब्दुल हमीद सारख्या अनेकांचा सत्याग्रहात सहभाग होता. या चळवळीमध्ये मराठवाड्यातील जवळपास ४०० सत्याग्रहींना अटक झाल्याचे दिसते.[२६०]

यात जबाबदार राज्यपद्धतीला मान्यता देणे, राजबंदींना मुक्त करणे, हैद्राबाद स्वातंत्र्य करणे व येथून रेसिडेन्टला परत पाठवणे, नागरी स्वातंत्र्य देऊन हैद्राबाद स्टेट काँग्रेसची बंदी उठविणे यासारख्या मागण्या केल्या गेल्या.[२६१] उमरगा परिसरामध्ये १९४२ च्या आंदोलनामध्ये अनेकांनी सहभाग घेतला. त्यात देवीसिंग चौहान, श्रीनिवास अहंकारी, शंभुगिरी महाराज यांचे कार्य उल्लेखनीय होते. याचा जनमनावर मोठा परिणाम झाला. औराद शहाजानी येथे प्रखर लढा देणारे लातूरचे देशबंधु, पं. वीरभद्र आर्य आडप्पा (देवदत्त) आणि व्यंकोबा माळवदकर या तिघांना दिनांक १४ फेब्रुवारी १९४२ रोजी गुलबर्गा सुभा कोर्टात रझाकार नेता कासिम रझवी याच्या समक्ष सात वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा दिली गेली. अन्य सहकाऱ्यांना सुद्धा कमीअधिक दंड झाला. या क्षेत्रातील झालेल्या आंदोलनांविषयीचे तपशील उपलब्ध आहेत.[२६२]

निजामाच्या विरुद्ध सुरू असलेल्या आंदोलनाचा एक भाग म्हणून लातूरच्या टॉवरवर फडकत असलेला आसफअलीचा आसफजाही झेंडा काढून तेथे तिरंगा झेंडा फडकविण्यात आला. या कामी दाखवलेल्या साहसामध्ये शंकरराव अस्तुरे, विश्वनाथ आप्पा कापसे, रघुवीर शिंदे, मदनलाल जोशी, भीमराव वाबळे,

---

२५७. **स्मरणिका**, मराठवाडा साहित्य संमेलन, लातूर, पृ.१८-३४.

२५८. रमेशन्, एन., **'फ्रिडम स्ट्रगल इन हैद्राबाद'**, व्हॉ.४, पृ.२३९.

२५९. भालेराव अनंत, **'हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा'**, पूर्वोक्त, पृ.१९०.

२६०. फाईल क्र.१०८१, पोलिटिकल ॲण्ड कॉन्स्टिट्यूशनल, ए.पी.स्टेट आर्काइव्हज, हैद्राबाद, १९४२, पृ .८७.

२६१. ढेंगळे बी.एस. **'लातूर इन दि हैद्राबाद फ्रिडम स्ट्रगल, १९३८-१९४८,'** निवडक शोध निबंध, खंड ५, मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, २०००, पृ.३१.

२६२. पोतदार, वसंत, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम**, **आष्टा (कासार)**, पूर्वोक्त, १९८४, पृ.१२८.

अनुक्रमणिका

श्यामराव किल्लारीकर यांचा सहभाग होता. पुढे त्यातील तिघांचा शोध घेऊन सक्तमजुरीची शिक्षा दिली गेली, तरीही क्रांतिकारी विचाराची मंडळी कार्यरत होती. भूमिगत असलेले श्यामराव किल्लारीकर व रघुवीर शिंदे यांनी लातूर जवळील दोन-तीन मैलावरील रेल्वे रुळाच्या फिशप्लेटचे नटबोल्ट काढून रेल्वे उडविण्याचा प्रयत्न केला. अर्थात याचा सुगावा रेल्वे कर्मचाऱ्यांना लागल्यामुळे होणारी दुर्घटना टळली व रेल्वे हरंगुळ येथे थांबविली गेली.[२६३]

निजाम संस्थानामध्ये रझाकारी अत्याचार वाढले होते. कासिम रझवी हा लातूर येथे असल्यामुळे या जिल्ह्यामध्ये रझाकारी अत्याचार अधिक प्रमाणामध्ये होत होते. तत्कालीन नियतकलिकांतून याविषयीच्या बातम्या येत. 'डेक्कन टाइम्स' या उर्दू दैनिकात लातूर व निलंगा येथील आर्य समाजाची चळवळ महत्त्वाची असल्याविषयीची नोंद केली गेली. या ठिकाणी पोलिसांचा हस्तक्षेप गरजेचा आहे असे नोंदविले गेले. याच संदर्भामध्ये 'ईस्टर्न टाईम्स' मधील 'मुस्लीम प्लाईट इन मुफ्तसिल्स' तसेच मुसलमानांचे अन्य प्रकाशित रिपोर्ट बरेच बोलके आहेत. इत्तेहदच्या लोकांनी मुस्लिम तरुणांना विघातक कृत्याकडे वळवले होते.[२६४] रझाकारी अत्याचारींनी निलंगा, औरादशहाजनी, कोळखेड, तोंडचीर, हरदाळ, रावणगाव, आंबुलगा या ठिकाणी हल्ले करून अनन्वित अत्याचार केला. त्यामध्ये आंबुलग्याचे महाजन सगर यांस तसेच लातूर येथील भुजंगराव देशपांडे हे एका बैठकीसाठी गंजगोलाई येथे गेले असताना त्यांना हत्तेपानदणीच्या वाटेवर ठार मारले.[२६५] असे प्रकार अनेक ठिकाणी घडत होते. चिलवडी, धानोरे, नांदगाव अशी गावे जाळली गेली. परिणामी या रझाकारांचा विरोध सर्व थरातून मोठ्या प्रमाणामध्ये होऊ लागला होता.

निजामी अत्याचाराला बळी पडलेल्या स्थानांची एक विस्तृत यादी वसंत पोतदार यांनी 'हैद्राबाद मुक्ति संग्राम-आष्टा (कासार)' या ग्रंथात नोंदविली आहे.

इत्तेहाद-उल-मुसलमीन (इत्तेहादूल मुस्लिमीन) संघटना : हैद्राबाद संस्थानच्या स्वातंत्र्य आंदोलनात इत्तेहाद-उल-मुसलमीन संघटनेची कामगिरी अत्यंत उपद्रवकारक ठरलेली आहे. या संघटनेची स्थापना, १९२६ मध्ये मुहम्मद नवाझखान यांनी केलेली होती. या संघटनेचा हेतू समाजाचे ऐक्य करून सेवा करणे हा होता. सुरुवातीला ही सेवाभावी संघटना होती. निजाम सरकारला पाठिंबा देणे हे देखील तिचे ध्येय होते. पण १९३७ पासून ही संघटना आक्रमक बनली.

बहादूर यारजंग यांच्यासारखा प्रभावी नेता या काळात या संघटनेला लाभला. हैद्राबाद संस्थान हे इस्लामी राज्य आहे व मुसलमान समाज हा राज्यकर्ता वर्ग असून निजाम हा मुसलमानांच्या अधिसत्तेचे प्रतिक आहे या भूमिकेचा प्रसार बहादूर यारजंग हे करीत असत.[२६६]

इ. स. १९४० मध्ये बहादूर यारजंग यांनी हैद्राबाद येथे रझाकर संघटना स्थापन केली होती. त्या संघटनेला इत्तेहादच्या कार्यकारिणीने मान्यता दिली. "रझाकार" म्हणजे धुळीत पडलेल्यांना वर उचलणारा स्वयंसेवक. पुढे रझाकार व अत्याचार हे समानार्थी शब्द बनले.[२६७] रझाकार ही संघटना प्रतिक्रियावादी व जातीयवादी संघटना होती. या संघटनेने गावोगावी उग्र निदर्शने करून जनतेत दरारा निर्माण केला होता.

---

२६३. पोतदार वसंत, पूर्वोक्त, पृ.१८७.

२६४. ढेंगळे, बी.एस., पूर्वोक्त, पृ.३३.

२६५. बिसेन, जोगेंद्रसिंह, 'लातूर, धाराशिवचा सहभाग-मुक्ति संग्राम: एक मागोवा', (संपा.), सुधीर देशपांडे, 'मराठवाडा मुक्तिसंग्राम सुवर्णजयंती विशेषांक', औरंगाबाद,१९९८, पृ.४०.

२६६. बिंदू, दिगंबरराव, **'हैद्राबाद राज्याचे विसर्जन'**, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८६, प्रस्तावना, पृ.३४.

२६७. गायकवाड, नरेंद्र, **मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम**, पृ.७१.

अनुक्रमणिका

दि. २३ मे १९४१ रोजी रझाकारांचा नेता कासिम रझवी हा औराद शहाजनी येथे गेला होता. तेथील एका सभेत त्याने हिंदूंचा उल्लेख "आझाद हैद्राबाद मे रहनेवाले काफीर" असा केला. दुसऱ्या दिवशी रझाकारांनी औरादमध्ये अत्याचाराचे थैमान मांडले. या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी पंडित वीरभद्रजी आर्य आपली रायफल घेऊन सज्ज झाले. त्यांचे सहकारी व्यंकटराव भंडारे अडप्पा उर्फ देवदत्त, व्यंकोबा माळवदकर, दादाराव बगदुरे इत्यादिंनी दुपारपासून रात्री नऊ वाजेपर्यंत कडवा संघर्ष केला. त्यात पंडित वीरभद्रजींच्या घरासमोरच व्यंकटराव भंडारे यांना वीरमरण प्राप्त झाले. रझाकारांनी संपूर्ण गावात धुमाकूळ माजविला. आठवडाभरातच निजामी पोलिसांनी औरादमध्ये येऊन वीरभद्रजी आणि १२ कार्यकर्त्यांना अटक केली. औरादच्या या लढ्यात लक्ष्मीनारायणजी व्यास, तुळजारामजी राजपूत, गोपाळराव तांभाळे, मोरोपंत कुलकर्णी, रामचंद्र शामराव, नागाबाई अंबेसंगे आदी शेकडो लोक सहभागी झाले होते.[२६८] दि. २१ एप्रिल १९४८ रोजी 'हिंदुस्थान टाईम्स' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याप्रमाणे उस्मानाबाद जिल्ह्यात जिहाद पुकारण्यात आला होता आणि रझाकारांकडून लोकांची कॉंडी केली जात होती. बार्शी ते लातूर मार्गावर धावणारी 'बार्शी लाईट रेल्वे' लातूर ते ढोकी या मार्गावर सातत्याने थांबविली जात होती आणि रेल्वेतील प्रवाशांवर रझाकारांकडून अत्याचार केले जात होते. 'अमृतबझार पत्रिके'मध्ये देखील उस्मानाबाद आणि लातूरच्या बाबतीत रझाकारांच्या अत्याचाराचे असेच वर्णन आल्याचे दिसून येते.[२६९]

आर्यवीर दल, किसानवीर दल :

हाडोळीचे मोहनराव पाटील यांनी अत्याचाराविरुद्ध लढा दिला. त्यांनी या परिसरातील पेटसांगवी, सरवडी, जवळगा, गुगळी, रामलिंग मुदगड आणि मदनसुरी या गावांना संरक्षण देण्याचे काम केले.[२७०] मोहनराव पाटील व सहका-यांनी किल्लारी, कोकळगाव याही ठिकाणी प्रखर संघर्ष करून रझाकारांना नामोहरम केले. याच प्रकारे तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध लोक स्वयंस्फूर्तीने लढा देऊ लागले होते. याबाबतीत आर्यवीर दल, किसान दल नावाने कार्य करणाऱ्या संघटित तरुणांच्या कार्याची नोंद घ्यावी लागते. मोहनराव पाटील यांनी १९४७-४८ मध्ये हाडोळी सभोवताली चौदा-पंधरा मैलांच्या टापूत रझाकारी अन्यायाचे पारिपत्य केले. त्यांनी १९४७ पासून निजामाला गावात सारा व लेव्ही वसूल करू दिली नाही. त्यांनी एक संघटित समूह उभा केला होता. जनजागृती करणाऱ्या आर्यवीर दलांला जनतेच्या सर्व स्तरातून सहानुभूती व मदत मिळत होती. उदगीर तालुक्यातील तोरणा, भालकी, देलूर, निलंगा, गोडूल आणि होसूर परिसरात त्यांनी प्रभावी संघर्ष केला. हत्तीबेट या उदगीर तालुक्यातील स्थानावर त्यांनी दिलेला लढा उल्लेखनीय आहे. रझाकार आणि मुळात हिंदू असलेल्या पण त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या स्थानिक प्रतिष्ठितांना वास्तवाचे भान करून देऊन अन्यायाचा प्रतिकार करणे हे किसानवीर दल व आर्यवीर दल यांच्या कामाचे लक्ष्य होते. दिनांक २७ सप्टेंबर १९४७ ला हत्तीबेटावर झालेल्या संघर्षात निजामाचे शिपाई मोठ्या प्रमाणामध्ये मारले गेले. या परिसरामध्ये आर्यवीर दलाने आपला वचक निर्माण केला होता. स्वत:ला वाचविण्यासाठी वेगवेगळ्या जागांचा आश्रय घेणे व आपल्या परिसरामध्ये अन्यायाविरुद्ध संघर्ष करणे यासारखे काम ते करत होते. त्यांची एक तुकडी मदनूर व दुसरी जांब जळकोट येथे होती. दिनांक १० ऑगस्ट १९४८ला किसानदलाने

---

२६८. दगडे, जयप्रकाश, "स्वातंत्र्याचे सुवर्णपान", दै. लोकमत सोबत दि. १७ सप्टेंबर १९९८ रोजीचा **विशेषांक**.

२६९. **निवडक शोध निबंध**, मराठवाडा इतिहास परिषद, २०००, खंड-५, पृ.३५.

२७०. पोतदार, वसंत, पूर्वोक्त, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम-आष्टा (कासार),** १९८४, पृ.१३५-१३६ आणि सूर्यवंशी व्ही.एस. यांनी घेतलेल्या मुलाखती आधारे.

कुमदाळच्या रझाकारी ठाण्यावर हल्ला केला.[२७१] दिनांक १२ ऑगस्ट १९४८ रोजी तोंडचीर रामघाट येथेही संघर्ष झाला. यामध्ये माणिकराव मुळे, यार महम्मद खान, दत्तूगिर यांनी हिंमतीने लढा दिला होता. यामध्ये बऱ्याचवेळा किसानदलाचे अनुयायी हौतात्म्य स्वीकारीत. किसानदलच्या कार्यात अनेकांचा सहभाग होता. त्यात तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.घाटे सारख्या शासकीय अधिकाऱ्यांची सहानुभूती त्यांना मिळत होती असे दिसते.[२७२] या दलाच्या प्रभावाने त्रिवेणीबाई पाटील सारख्या निलंगा तालुक्यातील महिला सुद्धा प्रेरणा घेऊन त्यांना मदत करीत.

१९४४ मध्ये बहादूर यारजंग पैगंबरवासी झाले. नोव्हेंबर, १९४५ मध्ये गुलबर्गा येथे इत्तेहदचे अधिवेशन झाले. लातूर जिल्ह्याचा रहिवाशी असलेला कासिम रझवी यास 'सिद्दीके दकन' (दक्षिणेचा सच्चा मित्र-सत्यव्रत) हा किताब याच अधिवेशनात देण्यात आला. त्याने आपली मालमत्ता, रोकड, दागदागिने संघटनेला अर्पण केले. तो अत्यंत माथेफिरू आणि उर्मट स्वभावाचा होता.[२७३] तो लातूरला वकिली करीत असे.१९४४-४६ या काळात इत्तेहदचा अध्यक्ष नांदेड येथील अखलाख हुसैन हा होता, तर १९४६-४८ या काळात इत्तेहदचे अध्यक्षपद कासिम रझवी यांने बळकावले होते. हा रझाकार संघटनेचा आधारस्तंभ, निजामाचा हस्तक व स्वातंत्र्य संग्रामाचा कट्टर शत्रू असून तो लातूर जिल्ह्याचाच होता. त्यानेच ही संघटना भडक व अतिरेकी बनविली. या संघटनेने पशुतुल्य क्रौर्य, अनन्वित अत्याचार व पिसाट धर्मवेड यांचा पुरस्कार केला.

हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम १९४५ पासून गतीमान होऊ लागला. आ.कृ.वाघमारे यांची लेखणी व बाबासाहेब परांजपे यांची वाणी यांच्या संयोगाने मराठवाड्याची भूमी उत्तरोत्तर संघर्षमय होत गेली.[२७४] प्रांतिक परिषदांद्वारे जबाबदार राज्यपद्धतीची मागणी चालूच होती.

लातूर येथे दिनांक १६ व १७ मे १९४६ रोजी मराठवाडा महिला संमेलन (दुसरे अधिवेशन) झाले. सौ.पानकुंवर फिरोदिया-कोटेजा अध्यक्ष होत्या. सौ.शैलजाबाई कुलकर्णी, सौ. ताई दुरुगकर, सौ. उषा भूमकर या स्वागत मंडळातील महिला होत्या. त्यांनी आपल्या भाषणात जबाबदार राज्यपद्धती व भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी संघटितपणे, आत्मविश्वासाने सर्व भगिनिंनी प्रयत्न करावेत असे सुचविले. लातूर जिल्ह्याच्या स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांनीही आपल्या परीने धडपड केलेली आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. सरकारने दिनांक ३ जुलै १९४६ रोजी स्टेट कॉंग्रेस वरील बंदी उठविली. भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा होताच निजामाने स्वतंत्र राहण्याची घोषणा केली. हे स्टेट कॉंग्रेसला प्रचंड आव्हानच होते. कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन हैद्राबाद शहरात दिनांक १६ ते १८ जून १९४७ ला झाले. या अधिवेशनातच स्वामी रामानंद तीर्थांनी हिंदी संघराज्यात विलिनीकरण आणि संस्थानात लोकनियुक्त सरकारची स्थापना या दोन मागण्या जाहीर केल्या.

दिनांक ७ ऑगस्ट १९४७ ला हैद्राबाद मुक्ति संग्रामाचे शेवटचे पर्व सुरू झाले. स्वामीजींनी दिनांक ७ ऑगस्ट १९४७ ह्या दिवसाला "हिंदी संघराज्य समावेश दिन" संबोधले होते. त्यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात हा दिवस फार गाजला. विद्यार्थी, मजूर, कामगार, नागरिक व व्यापारी या सर्वांनी संप पुकारून ठिकठिकाणी

२७१. पोतदार, वसंत, पूर्वोक्त, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम-आष्टा (कासार),** पृ.१५४-१५८. या ग्रंथात अनेक संदर्भ नोंदविलेले आहेत.

२७२. कित्ता, पृ.१५६, १६१.

२७३. भालेराव, अनंत, पूर्वोक्त, पृ.२६६.

२७४. भालेराव, अनंत, **स्वामी रामानंद तीर्थ**, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, १९८९, पृ.७८.

अनुक्रमणिका

प्रभातफेऱ्या काढल्या व तिरंगी झेंडे लावले. या कार्यक्रमामुळे निजाम सरकारचे धाबे दणाणून गेले. झेंडा उभारण्यास बंदी घालण्यात आली, पण लोकांनी बऱ्याच सरकारी इमारतींवर, कोर्टांवर व पोस्टांवर तिरंगी झेंडे लावले. जनतेला भयभीत करण्यासाठी इत्तेहादने आपले तांडवनृत्य सुरू केले.[२७५] राष्ट्रीय झेंडे काढून टाकण्यात आले, तर काही ठिकाणी झेंड्यांवर गोळ्या झाडण्यात आल्या. त्यामुळे जनतेने सत्याग्रह सुरू केला. लातूर जिल्ह्यातील औसाचे शंभृगीरी महाराज यांनी १२५ लोकांसह ७ ऑगस्टला उमरगा येथे सत्याग्रह केला. त्या सर्वांना बेदम मारण्यात आले.[२७६] जिल्ह्यामध्ये सर्वत्र कार्यकर्त्यांची धरपकड सुरू झाली. श्री. व्यासाचार्य संदीकर हे लातूरच्या सत्याग्रह कार्यक्रमाचे पूर्णवेळ संघटक होते. पोलिसांनी त्यांच्या घरावरील पत्रे जप्त केले व त्याचा लिलाव केला. तसेच प्रक्षोभक भाषणांबद्दल श्रीनिवासराव अहंकारी, देवीसिंग चौहान, श्रीनिवासराव मुगळीकर, दिगंबरराव पोतदार, शंकरराव कोर्लेकर यांना अटक करण्यात येऊन प्रत्येकाला दोन वर्षांची शिक्षा व एक हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. देवीसिंग चौहान व अहंकारी हे स्टेट काँग्रेसचे पूर्णवेळ कार्यकर्ते होते म्हणून त्यांना उस्मानाबाद तुरुंगात ठेवले होते. पण अहंकारी तुरुंग फोडून पळून गेले. देवीसिंग चौहान मात्र तुरुंगातून पळून जाताना पकडले गेले.[२७७] बंदीवासातील सत्याग्रहींना भयंकर छळ सोसावा लागला.

स्टेट काँग्रेसच्या कृती समितीने दिनांक २ सप्टेंबर १९४७ रोजी राष्ट्रीय ध्वजदिन पाळण्याचा आदेश देऊन निजामी राजवटीस सुरुंग लावला. राष्ट्रध्वजाच्या सत्याग्रहाने जिल्ह्यात अभूतपूर्व लोकजागृती झाली. असहकाराची प्रचंड लाट लातूर जिल्ह्यात सर्वत्र पसरली. या लढ्यात स्वामीजींच्या नेतृत्वाखाली स्टेट काँग्रेस, कम्युनिस्ट, आर्यसमाज, महाराष्ट्र परिषद या सर्वांच्या समन्वयामुळे आंदोलन प्रखर व गतिमान बनले. निजामी पोलीस व रझाकार यांनी जिल्ह्यात ठिकठिकाणी जाळपोळ व अत्याचाराचे सत्र सुरू केले. लातूर, अहमदपूर, निलंगा या तालुक्यात लुटालूट केली. इतकेच नव्हे, तर रझाकारांनी निलंगा हे गाव जाळले. रझाकारांच्या या अत्याचारामुळे जनतेचे मनोबल खचले नाही हे या चळवळीचे वैशिष्ट्य होय. जनतेने सर्व क्षेत्रातील अत्याचाराचा निर्भयपणे प्रतिकार करण्याचा दृढनिश्चय केला. लातूरमध्ये निजामी राजवटीत तिरंगा झेंडा गोलाईतील टॉवरवर लावण्याचे श्रेय रघुवीर शिंदे, शामराव किल्लारीकर व करनसप्पा हंडे यांच्याकडे जाते.

स्टेट काँग्रेसच्या कृती समितीने आंदोलनासंबंधी एक कृती कार्यक्रम नागरिकांना दिला. १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन साजरा करणे, सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, सारा‌बंदी, शासकीय कामात अडथळा, खेडी स्वतंत्र करणे, लेव्ही भरण्यास नकार देणे या गोष्टींचा त्यात समावेश होता. ऑगस्ट, १९४७ मध्ये कृती समितीने भूमिगत कार्यकर्त्यांमार्फत सशस्त्र लढा सुरू केला. त्यासाठी हैद्राबाद संस्थानच्या हद्दीबाहेर संपर्क कार्यालय काढले. सर्वप्रथम उस्मानाबाद जिल्ह्याचे कार्यालय सोलापूर येथे जुलै, १९४७ मध्ये सुरू केले. सशस्त्र लढ्याच्या समन्वयासाठी तीन प्रांतप्रमुख नेमले होते. मराठवाड्यासाठी बाबासाहेब परांजपे यांची नेमणूक करण्यात आली होती.

उस्मानाबाद जिल्ह्यासाठी सात कॅम्पस् उघडले होते. पोलीस ठाणे उद्ध्वस्त करणे, रझाकार केंद्र नष्ट करणे, रेल्वेच्या तारा तोडणे, जकातनाकी उद्ध्वस्त करणे, शिंदीची झाडी तोडणे, खेडी स्वतंत्र करणे इत्यादी कामे स्वातंत्र्यसैनिकांनी अत्यंत उत्साहाने केली.

---

२७५. **गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट**, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९७२, पृ.२.

२७६. बाजपेयी चंद्रशेखर, **'हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मी'**, पूर्वोक्त, पृ.७०.

२७७. भालेराव अनंत, **'हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा'**, पूर्वोक्त, पृ.३२६.

झेंडा सत्याग्रह (लातूर, औसा, उमरगा) : दिनांक ९ ऑगस्ट १९४७ रोजी भारतीय संघराज्य समावेश दिन साजरा करण्यासाठी झेंडा सत्याग्रह प्रारंभ झाला. मराठवाड्याच्या विविध जिल्ह्यांप्रमाणे उस्मानाबाद व लातूर भागातही हे लोण पसरले. देवीसिंग चौहान, श्रीनिवासराव अहंकारी, दिगंबरराव पोतदार हे तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रभावी नेते होते. त्यांनी लातूर, औसा, उमरगा येथे झेंडा सत्याग्रह केल्यामुळे त्यांना अटक झाली. त्यांनी तुरूंगाच्या भिंती ओलांडून सुटकाही करून घेतली व पुन्हा सत्याग्रहात सहभाग घेतला. त्यांना या कार्यासाठी खूप मारहाण झाली व दुसऱ्यांदा पकडून कैदेत टाकले गेले. तत्कालीन उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात त्यावेळी अनेक केंद्रातून अशी कृत्ये झाली.[२७८] लातूर जवळच्या लहानखेडी या गावी १०० कार्यकर्त्यांनी भारतीय संघराज्यात सामील होण्याचा दिवस म्हणून झेंडा सत्याग्रह साजरा केला.

जिल्हाभर सामुहिक बैठका झाल्या. त्यात प्रल्हाद सखाराम, पांडुरंग सिताराम, नानासाहेब वकील (उमरगा) यांनी सभांना संबोधित केले. म्हणून ते पकडले गेले. प्रभात फेऱ्यांचे आयोजन, मिरवणुका यासाठी बंद आणि हरताळ पाळल्यामुळे जनतेत उत्साह व निजाम विरोधी वातावरण तयार झाले. उस्मानाबाद जिल्ह्यात इतरही लोकांना पकडले गेले. सत्याग्रह चळवळ परभणी, औरंगाबाद, नांदेड व नंतर उस्मानाबाद, बीडमध्ये अशा प्रकारे प्रभावी होत गेली.[२७९]

तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यातील झेंडा सत्याग्रहामुळे लातूर येथील पोस्ट ऑफीसवर लावलेला संघराज्याचा ध्वज जबरदस्तीने काढला गेला. उस्मानाबादला पांडुरंग दरबार येथील ध्वजही काढला गेला. मुरूम येथील ध्वजावर तर गोळ्याच झाडल्या गेल्या. मात्र निजाम सरकारने भारत सरकारच्या चौकशी करण्याच्या भूमिकेला पत्रकाद्वारे उत्तर देऊन कळविले होते की, संस्थानात कुठेही ध्वजाच्या अपमानाच्या घटना घडल्या नाहीत.[२८०] मराठवाड्याच्या जनतेने मोठ्या प्रमाणात सर्वत्र कृती कार्यक्रम केले. त्याचे पडसाद तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यावर उमटले. कळंब तालुक्यात अप्पासाहेब कवडे आणि अहमदपूरमध्ये कालिदासराव देशपांडे यांनी सर्वत्र प्रचार करून अनुकूल असे वातावरण तयार केले. रामराव जाधव चिलवडीकरांनी ३०० जणांसह तिरंगा झेंड्याची मिरवणूक काढली. सर्वत्र सभा घेतल्या जिल्ह्यात शासकीय व खाजगी शाळा मधून विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने हा दिन साजरा केला. अनेक जागी तिरंगे झेंडे फडकविले गेले. लातूर विद्यार्थी संघाच्या चिटणीसाला पकडले गेले. जनतेच्या भावनेच्या विरोधात इत्तेहाद व रझाकारांनी झेंड्यांचा जाणीवपूर्वक अपमान केला. अहमदपूरचे कालिदासराव देशपांडे, येणेगूरचे कॅ. व्य. बा. जोशी यांना अटक झाली. तथापि, चळवळ वाढतच होती. लातूरला डॉ. निळकंठराव व दासराव बोकील, लोहारा येथे नारायणराव वकील, व्यंकटराव हिप्परगेकर, मनोहरराव देशपांडे, आनंदराव ढगे, शरणप्पा डूमे, किसनराव लोखंडे यांनी सत्याग्रह केल्यामुळे त्यांना अटक झाली. याच बरोबर मुरूमचे करबस अप्पा ब्याळे, रूद्राप्पा चनशेट्टी, गुरूलिंगप्पा पाटील आणि बाबुराव कुलकर्णी यांनी ७५ साथीदारांच्या दोन तुकड्यांसह सत्याग्रह केला होता.[२८१] तुळजापूरला

---

२७८. बाजपेयी, चंद्रशेखर, 'स्वतंत्र मुक्तापूर स्वराज्य,' मराठवाडा – स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव विशेषांक, औरंगाबाद १९९८, पृष्ठ ६१.

२७९. ढेंगळे, बी.एस., **हैद्राबाद फ्रिडम स्ट्रगल**, कल्पना प्रकाशन, नांदेड, १९९८, पृ.१९४.

२८०. कित्ता, पृ.१९५.

२८१. भालेराव, अनंत, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा,** स्वा.रा.ती.सं.संस्था, औरंगाबाद, १९८७, पृ. ३२३,३२४.

अनुक्रमणिका

विश्वंभरराव हराळकर सह २७ जणांनी, अचलेरला महादप्पा पुजारी सह २५ जणांनी आणि अंदूरला रामराव मुळे सह २० जणांनी सत्याग्रह केला. त्याचबरोबर निलंग्याला किसनराव औरादकर, गोविंदलाल राठी, माधवाचारी सह १५ जणांनी सत्याग्रह केला. तसेच कळंब भागातील ३५, ईट भागातील ३५, खामसवाडी ४५, गौर १५, अहमदपूर ५०, वडवळनागनाथ २०, लोहाऱ्यातील आशीव २०, उमरगा तालुक्यातील माडज २०, किल्लारी १९, औसा ५० अशा संख्येने सहभाग घेऊन लोकांनी यशस्वी सत्याग्रह केले.[२८२] यावेळी सलगरा, जेवळी, येणेगुरे, चांदोळ, अंजन सोंड, घार पिंपरी, हसलगण, नायगाव, मातोळा, ढोकी, तेर, उदगीर, हिप्परगा, तुगाव, सास्तूर व इतर गावातून बरेच सत्याग्रही पकडले गेले होते.[२८३] उमरगा प्रकरणी अहंकारी व देवीसिंग यांच्यासोबत तुकाराम गोरे, डॉ. गुलाबचंद माळी, विरभद्रअप्पा चिंचोली, तुकाराम शिंदे, गणपतराव सगर व विश्वनाथराव शिंदे यांना पकडून उस्मानाबादच्या तुरुंगात डांबले होते.[२८४] झेंडा सत्याग्रहासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील ९५० जणांना तुरुंगवास भोगावा लागला होता.[२८५] अशा प्रकारे झेंडा सत्याग्रहाच्या माध्यमातून तत्कालीन उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात निजाम विरोधी संघर्षाला सुरुवात झाली होती.

जंगल सत्याग्रह : ग्रामीण भागातील लढ्याला अधिक स्फोटक व व्यापक स्वरूप जंगल सत्याग्रहापासून प्राप्त झाले. याचा परिणाम म्हणून अनेक खेडोपाडी जंगल सत्याग्रह झाले. काही सामुदायिक होते तर काही व्यक्तिगत स्वरूपाचे होते. जंगल सत्याग्रहापासूनच सरकार आणि जनता एकमेकांच्या समोरासमोर मैदानात उतरली होती.[२८६] निजाम संस्थानाला ताडी आणि शिंदी या दोन प्रकारच्या दारू उत्पादनाच्या विक्री करातून प्रचंड आर्थिक फायदा मिळत होता. केवळ मराठवाड्यातून ८,२४,८९७ गॅलन दारू उत्पादन होत होते. सरासरी ९० माणसांमागे एक दारूचे दुकान होते. त्यामुळे सामजिक सुरक्षितता व नैतिकता धोक्यात आली तरी [२८७] यामुळे निजामी राज्यास १७,८५,७९०४ रूपयांचे उत्पन्न होई. हा प्रकार निजामी संस्थानाने प्रोत्साहन देऊन जोपासला होता. स्वामीजींनी जंगल सत्याग्रह घोषित करून शासनाचा कायदा मोडला. प्रत्येक गावाजवळील अशी ताडी व शिंदीची झाडे तोडली गेली. विद्यार्थी, वकील, कामगार, स्त्रिया व शेतकरी, शेतमजूर इत्यादी नागरी व खेड्यापाड्यातील लोकांनी ऑगस्ट, १९४७ ते सप्टेंबर, १९४८ दरम्यान हा सत्याग्रह प्रभावीपणे केला.[२८८] या जंगल सत्याग्रहात एकूण २१ हजार लोकांनी सहभाग घेतला व १३ महिने लढा चालविला होता.[२८९] उस्मानाबाद जिल्ह्यातही जंगल सत्याग्रहाने प्रभाव वाढविला होता. औसा व उमरगा भागात ताडीची

---

२८२. बाजपेयी, चंद्रशेखर, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मी**, पूर्वोक्त, पृ. ७०,७१.

२८३. भालेराव, अनंत, **हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा**, पूर्वोक्त, पृ. ३२-५८.

२८४. बाजपेयी, चंद्रशेखर, पूर्वोक्त, पृ. ७१.

२८५. भालेराव, अनंत, पूर्वोक्त, पृ. ३४१.

२८६. मुलाखत-तुकाराम शिंदे, मुलाखतकार- प्रा. शिवराज बोकडे, उमरगा दि.१७.९.२००२. ('हैद्राबाद मुक्तीसंग्रामात जुन्या उस्मानाबाद व लातूर जिल्ह्याचे योगदान : एक विशेष अभ्यास' स्वा.रा.ती.म.वि. नांदेड, २००२ या अप्रकाशित प्रबंधात ही मुलाखत नोंदविली आहे.)

२८७. ढेंगळे, बी. एस., **'हैद्राबाद फ्रिडम स्ट्रगल'**, पूर्वोक्त, पृ.२१-२२.

२८८. कित्ता, पृ.२९६-२९७.

२८९. **धारूरकर, वि.ल., मुक्तिसंग्राम १९३६-४८१, मुक्तिसंग्राम,** (संपा. देशमुख/धारूरकर) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, १९९८, पृ. ६५.

जंगले होती.[२९०] तेरखेडा व कळंब भागात सत्याग्रह झाले. शंभुगीरी महाराज यांनी उमरगा भागात सत्याग्रह केला. म्हणून त्यांना व साथीदारांना पोलिसांनी बेदम चोप दिला. कळंब येथे लक्ष्मण विठ्ठलराव चाकूरकर यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह झाला. इतर तुकड्यांचे प्रमुख म्हणून श्यामलाल, राघवेंद्रराव दिवाण आणि निवृत्ती रेड्डी व तात्या पाटील यांनी प्रभावी कार्य केले.[२९१]

तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात इटले, निवळी, माडज, देऊळगाव, सरवडी, चिंचोली, चाकूर, काथरी, ढोकरी, रौळगाव, शिंदफळ आणि सांगवी या गावी जंगल सत्याग्रह घडून आले होते.[२९२]

भूमिगत रेडिओ केंद्राची उभारणी व लढ्यास मार्गदर्शन : एस. के. वैशंपायन यांच्या नेतृत्वाखाली लढ्यास मार्गदर्शन करण्यासाठी व भूमिगत केंद्राना सूचना देऊन समन्वय साधण्यासाठी मुंबई या ठिकाणी गुप्तरीत्या रेडिओ केंद्राची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे या लढ्यास मार्गदर्शन मिळाले व लढा यशस्वी होण्यास मदत झाली.[२९३]

लातूर जिल्ह्याच्या स्वातंत्र्य आंदोलनातील भूमिगत चळवळीस आकार देण्याचे खरे श्रेय बाबासाहेब परांजपे यांचे होय. त्यांच्याप्रमाणे लातूर जिल्ह्याच्या संग्रामात देवीसिंग चौहान यांचाही मोलाचा वाटा आहे. स्वामीजी, बाबासाहेब व देवीसिंग या तिघांमुळे येथील तरुणांनी स्वत:स आंदोलनात झोकून दिले. बाबासाहेबांच्या प्रेरणेमुळेच येथील भूमिगत चळवळ प्रभावी बनली. उस्मानाबाद जिल्ह्याच्या सरहद्दीवर पुढील कॅम्पस् उघडले होते.[२९४]

सरहद्दीवरील लढाऊ कॅम्पस् : निजामी राजवटीचा प्रतिकार करण्यासाठी जो लढा लढला गेला त्यात सरहद्दीवरील लढाऊ कॅम्पस्चे योगदान महत्त्वाचे होते. मुळात स्वामी रामानंद तीर्थ आणि हैद्राबाद स्टेट काँग्रेस समितीचे अध्यक्ष दिगंबरराव बिंदू यांनी दिल्ली येथे महात्मा गांधीजींची भेट घेऊन सरहद्दीबाहेर सशस्त्र कॅम्पस् उभे करण्याची परवानगी घेतली. सरहद्दीलगत ११५ कॅम्पस् उभारले होते. त्यावेळी प्रत्येक जिल्ह्यात १५ कॅम्पस् उभारण्यात आले होते.[२९५]

गौडगाव कॅम्पस् : हे कॅम्पस् निजामी राज्याच्या सरहद्दीवर उभारण्यात आलेले असल्यामुळे प्रत्यक्ष निजामाच्या नियंत्रित क्षेत्राच्या बाहेर होते. गौडगाव येथील कॅम्पचे प्रमुख रामभाऊ जाधव व नरहरराव मालखरे होते. विशेषत: या कॅम्पचे बहुसंख्य कार्यकर्ते समाजवादी विचाराचे होते.[२९६] या कॅम्पमध्ये सैनिकांची संख्या १५० होती. हा एक कृतिशील कॅम्प होता.[२९७]

---

२९०. मुलाखत-विठ्ठल सांगवे, उमरगा, दि. १७.९.२००२, मुलाखतकार-प्रा. शिवराज बोकडे.

२९१. ढेंगळे, बी. एस., पूर्वोक्त, हैद्राबाद फ्रिडम स्ट्रगल, पृ.१९९.

२९२. निरखी, विजय, मराठवाडा स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव विशेषांक, औरंगाबाद,१९९८, पृ. ८१.

२९३. मुलाखत-एस. के. वैशंपायन, मुलाखतकार-डॉ. ढेंगळे, बी. एस., औरंगाबाद, १९७७.

२९४. **गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट,** गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९७२, पृ. ४-५.

२९५. ढेंगळे, बी.एस., **'लातूर इन हैदराबाद फ्रिडम स्ट्रगल'**, १९३८-४८, पूर्वोक्त, पृ. ३६.

२९६. देशपांडे, ना.वि., **'**हैद्राबाद मुक्तिसंग्राम सशस्त्र केंद्र,**'** **मुक्तीसंग्राम**, (संपा. देशमुख/धारुरकर) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, १९९८, पृ. २२७.

२९७. मालखरे, नरहर, **'**उस्मानाबाद जिल्ह्याची राजकीय पार्श्वभूमी,**'** मराठवाडा स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव विशेषांक, १९९८, पृ. ५८. यांनी यांची सविस्तर यादी दिली आहे.

अनुक्रमणिका

चिंचोली कॅम्प : या कॅम्पचे प्रमुख रामचंद्रमंत्री, चंद्रशेखर बाजपेयी व श्रीधर वर्तक हे होते. त्यात २५० मुक्तिसैनिक होते. या कॅम्पवरून निजामी क्षेत्रात ५०-५५ मैल आत जाऊन बर्दापूर पोलीस ठाण्यावर हल्ला केला गेला होता. तसेच सेंदुरी पोलीस ठाण्यावर हल्ला करण्याची योजना केली होती. पण नंतर सेंदुरीऐवजी आपसिंगा येथील रझाकारी केंद्रावर हल्ला करण्याचे ठरविले. या हल्ल्यामध्ये श्रीधर वर्तक हे मुक्तिसैनिक मारले गेले.[२९८]

वाघोली कॅम्प : वाघोली कॅम्प हा गौडगाव व चिंचोली कॅम्पच्या दरम्यान होता. या कॅम्पचे प्रमुख वसंतराव देशमुख व राजेंद्र देशमुख हे होते. या कॅम्पमध्ये ४७ सैनिक होते. त्यांनी सारोळा येथे असलेल्या रझाकार केंद्रावर हल्ला करून रझाकारांचा अड्डा कायमचा बंद केला. परंतु तेथील चकमकीत या कॅम्पचा मुक्तिसैनिक विश्वनाथ भिसे हा हुतात्मा झाला. त्या बदल्यात या कॅम्पच्या मुक्तिसैनिकांनी बेंबळी पोलीस ठाण्यावर हल्ला करून तेथील एका अरबाला यमसदनी पाठविले. त्याचबरोबर एकदा निजामी पोलीस काही कार्यकर्त्यांना अटक करून बसमधून घेऊन जात असताना त्या बसवर हल्ला करून त्यांना या कॅम्पच्या मुक्तिसैनिकांनी सोडविले होते.[२९९]

अंबेजवळगा कॅम्प : अंबेजवळगा हा कॅम्पसुद्धा गौडगाव व चिंचोली कॅम्पच्या दरम्यान होता. या कॅम्पचे प्रमुख नामदेवराव नाडे होते. या कॅम्पवर ६० मुक्तिसैनिक होते. या कॅम्पच्या मुक्तिसैनिकांनी अंबेहोळ, जुनवणी, घांटगरी येथे कारवाया केल्या होत्या. या कॅम्पचे मुक्तिसैनिक उस्मानाबादपर्यंत धडकत असत.[३००]

कौडगाव कॅम्प : कौडगाव या कॅम्पचे प्रमुख वासुदेव तेरकर होते. या कॅम्पवर ३० मुक्तिसैनिक होते. हा कॅम्प चिंचोली कॅम्पच्या मार्गदर्शनाखाली चालत असे.[३०१]

वागदरी कॅम्प : अण्णाराव पाटील (आळंद), विश्वंभरराव हराळकर (तुगाव), गोपाळदेव शास्त्री (कल्याण), नानासाहेब चिंचोळीकर वकील (उमरगा) या प्रमुख व्यक्तींनी श्री. बाबासाहेब परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली वागदरी कॅम्प उघडला होता. आरंभी १०-१५ स्वातंत्र्यसैनिक होते. पण पुढे सैनिकांची संख्या ६०-७० पर्यंत गेली होती. रझाकारांच्या एका चकमकीत गोपाळदेव शास्त्री यांना गोळी लागली. तेव्हा अण्णाराव पाटलांकडे या कॅम्पचे सर्वाधिकार आले. त्यांनी ही जबाबदारी निष्ठेने पार पाडली. त्यांनी कॉलेजमध्ये इंटरला असताना भाई बंसीलालजी यांचे हैद्राबाद संस्कृत युनियनतर्फे आयोजित केलेले भाषण ऐकून कॉलेज शिक्षणाला रामराम ठोकला आणि स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला.

विश्वंभरराव हराळकर हे हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेचे विद्यार्थी होते. त्यांनी ब्रह्मचर्य व्रत अंगीकारून देशाच्या स्वातंत्र्यासाठी जीवन समर्पित करण्याची प्रतिज्ञा घेतली होती. त्यांनी सरहद्दीवरील सर्व कॅम्पस्ना भेटी देऊन त्यांच्या अडचणी दूर करून मार्गदर्शन केले. कॅम्पस् कार्यान्वित राहिले पाहिजे म्हणून दादांनी अहोरात्र परिश्रम घेतले.

---

२९८. बाजपेयी, चंद्रशेखर, पूर्वोक्त, पृ. ७९.

२९९. खोत, श्रीनिवास, 'हुतात्म्यांच्या रक्ताने माखलेली अपसिंग्याची भीषण लढाई', मराठवाडा स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव विशेषांक, औरंगाबाद १९९८, पृ. ६०.

३००. मालखरे, नरहर, पूर्वोक्त, पृ. ५८.

३०१. कित्ता, पृ. ५८.

नानासाहेब चिंचोलीकर वकील हे निजामी सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी बाहेर पडलेले तरुण होते. त्यांनी सरहद्दीवरील कॅम्पस्ना भेटी देऊन हत्यारे पुरविण्याचे कार्य केले. गुंडाप्पा मुरुमकर हे गांधीवादी तरुण सत्य, राष्ट्रप्रेम ही तत्त्वे आचरणात आणणारे त्यागी देशसेवक होते. त्यांनी वागदरी कॅम्पवर निष्ठेने कार्यालयीन काम पाहिले. वागदरी कॅम्पच्या मुक्तिसैनिकांनी आळंदच्या पोलीस ठाण्यावर बॉम्ब टाकून ठाणे उद्ध्वस्त केले. नाईचाकूरचे पोलीस ठाणे लुटण्याची योजना येथेच आखण्यात आली होती. पडसावलगी, सरसंबा, जामगा, हिरोळी (रझाकारांचे मुख्य केंद्र), घोडवाडी या ठिकाणच्या रझाकारांना त्यांनी पळवून लावले. या सैनिकांनीच हिरोळीच्या पठाणांच्या घोळक्यात तीन बॉम्ब टाकले. या चकमकीत अण्णाराव पाटील, गुरुनाथ बाबाजी ढगे (आळंद), मुकुंदा (गुंजोटी), शाहूराज जाधव, गोविंद पवार, नाना जावडे, कृष्णराव वामनराव चौधरी (का.शिरसी) इ. आघाडीचे सैनिक होते. घोसळगाव कॅम्प हा वाघदरी कॅम्पच्या नियंत्रणाखाली होता.[३०२]

मुस्ती कॅम्प : दिनांक १५ फेब्रुवारी १९४८ मध्ये मुस्ती कॅम्पची स्थापना झाली होती. या कॅम्पचे प्रमुख श्रीनिवास अहंकारी हे होते. वागदरी कॅम्पवर मुस्तीचे ५०-६० तरुण होते. मुस्तीचे अण्णाराव गणपतराव पाटील यांचे सर्व दृष्टीने सहकार्य होते. लालचंद मेहता यांच्या वाड्यात हा कॅम्प होता.[३०३] सोलापूरचे कलेक्टर घाटके यांच्या कृपेने मुस्तीला काही परवान्याच्या बंदुका मिळाल्या होत्या. अण्णाराव पाटलांच्या नेतृत्वाखाली गावकरी तरुण कॅम्प सैनिकांच्या बरोबरीने सरहद्दीवर असलेल्या रझाकार केंद्रांवर हल्ले करीत असत.[३०४] या मुस्ती कॅम्पवर हणमंतराव बेलूरकर, रामराव गायकवाड व विठ्ठलराव पाटील (माडज) हे साहसी तरुण होते. लोहाऱ्याचा बळीराम पाटील हा कणखर माणूस मुस्ती कॅम्पवर होता. मुस्तीचे धालप्पा जमादार, लालचंद मेहता, अंबाजी शिवलिंग कोळी, दादाराव आबाराव पाटील आदी तरुण गावकरी कॅम्पला सदैव सहकार्य करीत.[३०५]

मुरुड कॅम्प : रझाकार कारवाईचे प्रमुख केंद्र मुरुड येथे होते.[३०६] निजाम सरकारने मुरुड येथे आपली लष्करी छावणीदेखील स्थापन केली होती व सैन्य आणि रझाकार यांचे संयुक्त कार्य मुरुड येथे चालू होते. त्यामुळे खूप मोठी दहशत या भागात निर्माण झाली होती. अनेक लोकांनी गावातून स्थलांतर केले होते. पण सर्वांना गाव सोडणे शक्य नव्हते. चिंचोली येथील हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन मुरुडच्या लोकांना धैर्य व हिंमत प्राप्त करून दिली होती. चिंचोलीहून डॉ. भोपटकर यांच्या नेतृत्वाखाली ६२ स्वातंत्र्य सैनिकांची एक तुकडी मुरुडला पोहचल्यानंतर तेथील हिंदूधर्मीय स्त्री-पुरुषांना आत्मविश्वास निर्माण झाला. मुरुड येथे श्री.राघवेंद्रराव दिवाण, बाबासाहेब परांजपे यांच्या भाषणामुळे स्वयंस्फूर्तपणे खूप मोठ्या देणग्या गोळा केल्या व त्यातून नवीन शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी अमूल्य मदत झाली. श्री. विश्वंभरराव हराळकर, श्री. शेषराव वाघमारे, श्री. लक्ष्मणराव चाकूरकर, श्री. बापूराव मास्तर व श्री. शंकरराव राऊत या सर्वांनी सहभागी होऊन मुरुडच्या लोकांना आत्मविश्वास निर्माण करून दिला होता.[३०७]

---

३०२. मालखरे, नरहर, पूर्वोक्त, पृ. ५८.

३०३. पोतदार, वसंत, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम-आष्टा (कासार),** श्री. वसंत पोतदार प्रकाशन, १९८४, पृ. १९६.

३०४. कित्ता, पृ. १९७.

३०५. मुलाखत-शाहीर हनमंतराव बेलुरकर, मुलाखतकार-प्रा. शिवराज बोकडे, माडज, ता. उमरगा, १९.२.२००२.

३०६. ढेंगळे, बी. एस., **'हैदराबाद फ्रिडम स्ट्रगल'**, पूर्वोक्त, पृ. २२४-२२५.

३०७. कित्ता, पृ. २२५-२२६.

अनुक्रमणिका

चिलवडी कॅम्प : सरहद्दीवरील इतर कॅम्पप्रमाणेच चिलवडी येथे स्वातंत्र्य सैनिकांचे एक केंद्र होते. या ठिकाणच्या स्वातंत्र्य सैनिकांनी एका पोलीस कॉन्स्टेबलला ठार केले. त्यामुळे इतर पोलीस चिलवडी येथून पळून गेले. अशाच घटना किल्लारी, येळी, वाकोडा व मातोळा या ठिकाणी घडून आल्या. यापैकी अनेक घटनांमध्ये श्री. माधवराव पाटील आघाडीवर असल्याचे दिसून येते. या सर्व घटनामध्ये अनेक रझाकारांचा मृत्यू घडून आला. त्याचबरोबर चार स्वातंत्र्य सैनिकांनाही आपल्या प्राणाचे मोल द्यावे लागले. चिंचोली व कौडगाव कॅम्प येथून ६२ सैनिकांनी करोडगिरी नाका व पोलीस ठाण्यावर हल्ला करून अनेक गावे मुक्त केली. त्यात पारा, वडगाव, सारेफळ, मौज, गौर, गौर वाघोली, मोहा, खंबासवाडी, तडवळा, ढोकी, सोनगाव, बाणेगाव, डारधानोरा, मदाचीवाडी, मई, भाडसीवाडी, युसफ नंदगाव, खेर्डा, धानोरी, मालकारंजा इत्यादी ठिकाणच्या रझाकार केंद्रांवर हल्ले केले होते.[३०८]

जुन्या उस्मानाबाद व लातूर परिसरातील क्रांतिकारकांनी नाईचाकूर पोलीस स्टेशन लुटले : निजाम सरकारने आपल्या संस्थानातील नागरिकांना हत्यार वापरण्यास बंदी घातली होती. त्यामुळे नाईचाकूरच्या पोलिसांनी घराघरात झडती घेऊन हत्यारे जप्त करून ठाण्यात जमा केली.

नाईचाकूरचे पोलीस ठाणे मोठे होते. या ठाण्याखाली ७०-८० गावे येत होती. या ठाण्यात १२ पोलीस, एक जमादार, एक मोहरीर आणि आमीनसाब असा स्टाफ होता. यांनी निजामाच्या हुकुमाप्रमाणे हत्यारे गोळा केली होती. ही सर्व हत्यारे मागच्या दाराने रझाकार संघटनेस पुरविली जाणार होती. नाईचाकूर पोलीस स्टेशनमध्ये जमा केलेल्या हत्यारात ३०० बंदुका व एक गाडी, तलवारी होत्या. ४-८ दिवसांत ही सर्व हत्यारे रझाकारांना पोहचती केली जाणार होती. म्हणून दि. १५ जानेवारी १९४८ रोजी रात्री आठ-नऊच्या सुमारास माडज, सरवडी, कौठा, हरिजवळगा, चिंचोली, नंदी हत्तरगा, हाडोळी व मदनसुरी या गावाचे लोक सिंदबन तोडण्यासाठी म्हणून नाईचाकूरजवळ एका मारवाड्याच्या मळ्यात एकत्र जमले. त्यामध्ये नाईचाकूरचे शाहूराज जाधव, गोविंद पवार, माडजचे राम गायकवाड, किसनसिंग रजपूत, माधवराव शहापुरे, नाबीराज जैन, सदानंद सुतार, शंकर सुतार, चिरेवाडीचा लक्ष्मण वाघमोडे, हाडोळीहून मोहनराव पाटील, मदनसुरीचे शिवाजीराव धानुरे, गोपाळराव जमादार, शेलार मामा, लक्ष्मण जमादार वगैरे होते.[३०९] श्री. गोविंद पवार, शाहूराज जाधव व राम गायकवाड यांनी निवडक सहकाऱ्यांना घेऊन पोलीस स्टेशनवर हल्ला केला. नंतर पोलीस स्टेशनला आग लावली व हत्यारे ताब्यात घेतली.[३१०]

मुक्तापूर स्वराज्याची स्थापना : दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला, परंतु हैद्राबाद संस्थान निजामाच्या अधिपत्याखाली पारतंत्र्यातच होते. हैद्राबाद संस्थानातील जनता निजामाच्या अन्यायी, अत्याचारी, जुलमी राजवटीला कंटाळली होती. त्याचवेळी हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या कृती समितीने स्वातंत्र्य आंदोलनाच्या शेवटच्या चरणात निजाम हद्दीतील खेडी स्वतंत्र करावीत असा आदेश दिला होता. त्यानुसार भारतीय स्वातंत्र्याचा पहिला वाढदिवस निजाम हद्दीत, पण स्वतंत्र भूमीत साजरा करायचा या विचाराने मुक्ति सैनिक सरसावले व त्यांनी उस्मानाबाद व सोलापूर या दोन जिल्ह्यांच्या मध्यभागी मानेगाव, जांबगाव या दरम्यानच्या पट्ट्यात असलेली निजामी संस्थानातील एकूण ६५ गावे जिंकून घेतली. श्री. फूलचंद गांधी यांनी या ६५ गावांचा एक तालुका घोषित करून या नव्या तालुक्याला मुक्तापूर स्वराज्य असे नाव दिले होते. या ६५ गावांचे प्रमुख म्हणून श्री. फूलचंद गांधी यांचे नाव जाहीर करण्यात आले होते. दि. १५ ऑगस्ट १९४८ हा भारतीय स्वातंत्र्याचा पहिला वाढदिवस स्वातंत्र्य सैनिकांनी मुक्तापूरच्या भूमीत साजरा केला.

---

३०८. ढेंगळे, बी. एस., पूर्वोक्त, **हैदराबाद फ्रिडम स्ट्रगल**, पृ. २२५-२२६.

३०९. पोतदार वसंत, पूर्वोक्त, पृ.१०३.

३१०. मुलाखत- किसनसिंग राजपूत, मुलाखतकार-प्रा. शिवराज बोकडे, माडज, दि. १९.९.२००२.

अनुक्रमणिका

लातूरच्या भुजंगराव देशपांडे यांना कासिम रझवी व त्याच्या रझाकारांनी ठार मारले. तसेच अनंतराव अराध्ये यांनाही रझाकारांनी ठार मारले. यासोबतच रेणापूरचे मुर्गप्पा खुमसे यांना अंबाजोगाईच्या तुरुंगात खितपत पडावे लागले. आगळगावच्या कॅम्पमध्ये काम करताना त्यांनी फेब्रुवारी १९४८ मध्ये पानगाव ते कारेपूर दरम्यान तीन ठिकाणी डायनामाईटने रेल्वे लाईन उडविली होती. तसेच पानगावची निजामाची "तह तायनिया" ही शाळाही बॉम्बने उडवली होती.[३११]

हैद्राबाद संस्थानच्या निजामाने संघराज्यात विलीन होण्याचे नाकारले. रझाकारांनी त्यास पाठिंबा दिला म्हणून जातीय दंगली झाल्या. हैद्राबाद काँग्रेसने सत्याग्रह करून निजाम सरकारला त्रस्त करून सोडले. हजारो सत्याग्रहींना तुरुंगात डांबण्यात आले. कारागृहात सत्याग्रहींना घृणास्पद वागणूक दिली गेली. लातूर जिल्ह्यातील अनेक सत्याग्रहींनी स्वत:चे बलिदान देऊन ही स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित ठेवली. १९३८ च्या सत्याग्रहापेक्षा या सत्याग्रहाचे स्वरूप विशाल होते.परिस्थिती आवाक्याबाहेर जात आहे हे लक्षात येताच भारत सरकारने दि. १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय फौजा हैद्राबादेत पाठविल्या व रझाकारांचा मोड करून परिस्थिती काबूत आणली. दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी स्वतंत्र झालेला मराठवाडा हा द्विभाषीय राज्य स्थापनेनंतर व पुढे संयुक्त-महाराष्ट्रात हा भाग विनाशर्त सामील झाला. दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम शरण आल्यामुळे हैद्राबाद संस्थान व पर्यायाने लातूर जिल्हा निजामाच्या जोखडातून मुक्त झाला. लातूर परिसरातील मांजरा-तेरणेकाठच्या लोकांनी पन्नास वर्षांपूर्वी भोगलेल्या यातनांच्या कथा खेड्यापाड्यातून ऐकावयास मिळतात. त्याआधारे तत्कालिन ऐतिहासिक घटनांची जुळवाजुळव करणे शक्य होते.

नानज व गाणगापूर येथील रझाकारी हल्ले : सोलापूर, उस्मानाबाद सरहद्दीवर असलेल्या नानज गावावर व भारतीय पोलिसांवर रझाकारांनी हल्ला करून लुटमार व जाळपोळ केली. या प्रसंगावरून रझाकार व संघराज्याच्या सैन्यात संघर्षाची ठिणगी पडली. त्यामुळे भारत सरकारने हैद्राबाद संस्थानाच्या मुक्तीसाठी ॲक्शन घेण्याचे निश्चित केले.[३१२] गाणगापूर - मंगावती सोलापूर रेल्वे लाईनवर रझाकारांनी रेल्वे लुटली व स्त्रियांवर अत्याचार केले त्यामुळे भारतीय सरहद्दीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला. या दोन्हीही कारणांमुळे भारतीय सैन्याने सोलापूर - बिदर मेन ड्रायव्हिंग थर्स्ट कायम करून पोलीस ॲक्शन घेतली. १३ सप्टेंबर १९४८ ते १७ सप्टेंबर १९४८ या काळात भारतीय सैन्याने हैद्राबादच्या निजामाला शरण येण्यास भाग पाडले.[३१३]

हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनातील सन १९३८ पूर्वीचा इतिहास हे उद्योगपर्व होते, १९३८ ते १९४६ हे आंदोलन पर्व होते, १९४६ ते १९४७ हे प्रक्षोभ पर्व होते, तर १९४७ ते १९४८ हे मुक्ती पर्व होते. हैद्राबाद संस्थानाला आणि पर्यायाने आजच्या लातूर जिल्ह्याला जे स्वातंत्र्य मिळाले, त्याचे श्रेय आर्यसमाज, महाराष्ट्र परिषद व स्टेट काँग्रेस यांचे आहे. भारतीय सेनेने निजाम राजवटीच्या वृक्षावर शेवटचा घाव घातला. समाजाच्या सर्व थरातील लोक आंदोलनात सहभागी झाले होते. यात सामील झालेला प्रत्येकजण असामान्य वीर होता. सर्वांच्या सामुहिक कर्तृत्वाचे, त्यागाचे व या स्वातंत्र्यसमरात हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांच्या हौतात्म्याचे ते फलित होते.

---

३११. दगडे, जयप्रकाश, 'स्वातंत्र्याचे सुवर्णपान' दै. लोकमत, पूर्वोक्त.

३१२. टाइम्स ऑफ इंडिया, दैनिक, दि. २८ जुलै १९५४, पृ. ९.

३१३. प्रसाद, एम. एन., ऑपरेशन पोलो, पोलीस ॲक्शन अगेन्स्ट हैदराबाद, मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, १९४८, पृ. ५१.

अनुक्रमणिका

परिशिष्ट* (अ)

लातूर जिल्ह्याशी सबंधित कोरीव लेखांची यादी

अ.क्र. (१)	नांव (२)	काल (३)	शासक (४)	संदर्भ (५)
१	इंडिया ऑफिस ताम्रपट	इ. स. चौथ्या शतकाचा उत्तरार्ध	वाकाटक देवसेन	वा.वि.मिराशी, कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम, खंड ५.
२	बिदर (हैद्राबाद) ताम्रपट	इ.स. चौथ्या शतकाचा उत्तरार्ध	वाकाटक देवसेन	पी.बी.पी.शास्त्री, जे.ई.एस.आय.
३	कर्नूल ताम्रपट	इ.स. ६७५	चालुक्य पहिला विक्रमादित्य	जर्नल ऑफ दि बॉम्बे ब्रॅन्च ऑफ रॉयल एशियाटिक सोसा. खं.२६, पृ.२२३-२२४.
४	कर्नूल ताम्रपट	इ.स. ६८५	चालुक्य पहिला विक्रमादित्य	जर्नल ऑफ दि बॉम्बे ब्रॅन्च ऑफ रॉयल एशियाटिक सोसा.खं.२६,पृ.२२३-२२४.
५	दायंदिने ताम्रपट	इ. स. ६९२	चालुक्य पहिला विनयादित्य	एपि. इंडिका,खं.२२, पृ.२९.
६	कासारशिरसी ताम्रपट	इ. स. ६९७	चालुक्य पहिला विजयादित्य	विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक,१९६६, पृ.१७-३७.
७	बोरगाव ताम्रपट	सातवे शतक	चालुक्य पहिला विजयादित्य	द.म.इ.सा.,खं.२,पृ.२३.
८.	कासारशिरसी ताम्रपट	इ. स. ७८३	राष्ट्रकूट ध्रुव	जे. ए.एस.बी. खं.१, पृ. ९५-१०५.
९	झरिका ताम्रपट	इ. स. ८०३	राष्ट्रकूट तिसरा गोविंद	वि.भि.कोलते, महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख मुंबई, १९८७, पृ.१८५-२०२.
१०	शिरसो लोहारा ताम्रपट	इ. स. ८१२	राष्ट्रकूट तिसरा गोविंद	एपि.इंडिका,खं.२२, पृ.२१२-२२२.
११	निलगुंद शिलालेख	इ. स. ८६६	पहिला आमोघवर्ष	एपि.इंडिका,खं.६, पृ.९८-१०८.
१२	शिरूर शिलालेख	इ. स. ८६६	पहिला अमोघवर्ष	एन्शन्ट इंडिया, खं.१२, पृ.२१८.

* परिशिष्ट (अ) व (ब) डॉ. हरिहर ठोसर यांनी तयार करून दिलेली आहे.

परिशिष्ट (अ)—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१३	अंजनेरी ताम्रपट	इ. स. १०१९	चालुक्य दुसरा जयसिंह	भारतीय पुराभिलेख परिषद, कुर्तालम, इ. स.२००१ प्रा. एस. जी. धोपाटे.
१४	मुरूम शिलालेख	अकरावे शतक	पहिला सोमेश्वर	आर्केऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, वार्षिक वृत्तांत, १९६४-६५, पृ. ८९.
१५	शिरूर अनंतपाळ शिलालेख	बारावे शतक	सहावा विक्रमादित्य	ए हिस्ट्री ऑफ मराठवाडा रिजन, श्री. शेळके यांचा अप्रकाशित प्रबंध, धारवाड, १९७८, क्र.४६९.
१६	हिप्परसोगा शिलालेख	बारावे शतक	सहावा विक्रमादित्य	ए हिस्ट्री ऑफ मराठवाडा रिजन, श्री.शेळके यांचा अप्रकाशित प्रबंध, धारवाड, १९७८, क्र.४६९.
१७	रामलिंग मुद्‌गड शिलालेख	बारावे शतक	सहावा विक्रमादित्य	ए हिस्ट्री ऑफ मराठवाडा रिजन, श्री.शेळके यांचा अप्रकाशित प्रबंध, धारवाड, १९७८, क्र.४६९.
१८	सिंताबर्डी शिलालेख	इ. स. १०८७	सहावा विक्रमादित्य	एपि. इंडिका, खं.३, पृ. ३०४-६
१९	गणेशवाडी शिलालेख	इ. स. १०९९	सहावा विक्रमादित्य	कोलते, उपरोक्त, पृ.१५१.
२०	लातूर पापविनाश तीर्थ शिलालेख	१२वे शतक	तिसरा सोमेश्वर	द. म. इ. सा., खं.२,पृ.८४-९०
२१	लातूर सिद्धेश्वर मंदिर शिलालेख	१२वे शतक	तिसरा सोमेश्वर	द. म. इ. सा., खं.२,पृ. ८४-९०
२२	कासार शिरसी बनावट ताम्रपट	१२वे शतक	चालुक्य विनयादित्य	कोलते, उपरोक्त, पृ. ८४.
२३	आंबे सकलेश्वर मंदिर शिलालेख	इ. स.१२२८-२९	यादव सिंघण व्दितीय	द. म. इ.सा. ,खं. १,पृ. ५५.
२४	उपरपल्ली शिलालेख	इ. स. १२३५	यादव सिंघण व्दितीय	हैद्राबाद आर्केऑलॉजिकल सिरीज, क्र. ३, पृ.१४.
२५	कान्हेगाव शिलालेख	इ. स. १२५८	यादव कृष्णदेव	तुळपुळे, प्रा. म. को. ले. क्र. ३१
२६	सौंदत्तीच्या रट्टांचे कोरीव लेख	इ. स. ११ वे शतक		हरिहर ठोसर यांचा अप्रकाशित प्रबंध, औरंगाबाद, पृ.२००.

या शिवाय अहमदपूर तालुक्यातील हडोळती, शिरूर-ताजबंद, हिंपळगाव आणि झरी तसेच निलंगा तालुक्यातील निटूर, शिरूर व कोराळी याठिकाणी तसेच देवणी तालुक्यातील जवळगा येथे कानडी शिलालेख आहेत.

परिशिष्ट (ब)

कोरीव लेखातील स्थलनामे

अ. क्र. (१)	कोरीव लेखातील नाव (२)	सध्याचे नाव (३)	तालुका (४)	जिल्हा (५)
१	अम्बयग्राम	आमला	औसा	लातूर
२	अंजरिका (नदी)	मांजरा नदी	लातूर	लातूर
३	आरी	अर्वी	लातूर	लातूर
४	अर्जुनी	अजनी	निलंगा	लातूर
५	औस-उच्छिव	औसा	औसा	लातूर
६	चल्लिकि देश-चालुंके	लातूर-बिदर-उस्मानाबाद जिल्ह्याचा सलग प्रदेश		लातूर
७	धानर	धानोरा	औसा	लातूर
८	जमलग्राम	माने-जवळगा	निलंगा	लातूर
९	जवलग्राम	जवळगा (पोमादेवी)	औसा	लातूर
१०	झरिका	झरी बु. (नवकुण्ड)	अहमदपूर	लातूर
११	करवरणे	कारवनाळी	उदगीर	लातूर
१२	करंजग्राम	करंजगाव	औसा	लातूर
१३	कोणेयग्राम	कान्हेगाव	उदगीर	लातूर
१४	कोरअर	कोराळी	निलंगा	लातूर
१५	कुमारीखैल	करमेळ	औसा	लातूर
१६	कुरम्ब	कुर्डुवाडी	औसा	लातूर
१७	लत्तलूर-लत्तलपुर-लत्तलौर-लत्तनौर	लातूर	औसा	लातूर
१८	मल्लरूडिगे	मल्लारवाडी	निलंगा	लातूर
१९	मोदगोलु-मुदगनाडु	रामलिंग-मुदगड	निलंगा	लातूर
२०	मारग्राम	महालुंगी	अहमदपूर	लातूर
२१	मुग्गलि	ताडमुगळी	निलंगा	लातूर
२२	मुण्डिग्राम	दाऊदपूर	औसा	लातूर
२३	मुरुम्बिका	मुरूम्बी	अहमदपूर	लातूर
२४	मुवत्तरम बिड	मुत्तलगाव	निलंगा	लातूर
२५	नगरशैगे	नागरसोगे	औसा	लातूर
२६	नलंदनदी	नणंद	औसा	लातूर

परिशिष्ट (ब)—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२७	नलवाडी विषय	नळदुर्ग	तुळजापूर	उस्मानाबाद
२८	पिप्पलग्राम	हिंपळगाव	अहमदपूर	लातूर
२९	पोणविषय	होनाळी किंवा अहमदपूर	अहमदपूर	लातूर
३०	रत्नतटाक	टाका	औसा	लातूर
३१	रत्नगिरी-रट्टगिरी	लातूर	लातूर	लातूर
३२	साकरीपल्ल	साकराळे	निलंगा	लातूर
३३	सरववल	साकोळ	निलंगा	लातूर
३४	सिरूरी	शिरूर-अनंतपाळ	निलंगा	लातूर
३५	शिवपुर	शिऊर	निलंगा	लातूर
३६	शुष्कग्राम	सुगाव	अहमदपूर	लातूर
३७	तगरनदी	तेरणा	निलंगा	लातूर
३८	तलनी	तळणी	अहमदपूर	लातूर
३९	तलयखेडग्राम	तळीखेड	निलंगा	लातूर
४०	तालुती	तळेगाव	अहमदपूर	लातूर
४१	तुंगीग्राम	तुंगी	औसा	लातूर
४२	उदगिरी-उदयगिरी	उदगीर	उदगीर	लातूर
४३	उजलम	उजलंब	अहमदपूर	लातूर
४४	उच्छिव चत्वारिंशत	औसा	औसा	लातूर
४५	वंजरा-वंजुरा नदी	मांजरा नदी	लातूर	लातूर
४६	वैरिवल	विरोळी	औसा	लातूर
४७	विदुराम्र	आंबुलगा	अहमदपूर	लातूर
४८	वुल्लवादलि	बोरमुरी	निलंगा	लातूर
४९	यप्पज	अपचुंदा	औसा	लातूर
५०	वेल्पकोंड	बेलकुंड	औसा	लातूर
५१	पसापकल्ल	हसाळा	औसा	लातूर
५२	सिरिमंडपक	दाऊदपूर (मंडी)	औसा	लातूर
५३	केरिंचकल्ल	केज (कवठा)	औसा	लातूर
५४	डोणीथोम	धानोरी	लातूर	लातूर

Maharashtra State Gazetteers

परिशिष्ट-(क)
लातूर जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण मध्ययुगीन नाणी व शिलालेख*

मुद्राशास्त्राच्या दृष्टिकोनातून लातूर जिल्ह्याला महत्त्वाचे स्थान आहे. मध्ययुगीन कालखंडात या जिल्ह्यात औसा व उदगीर येथे प्रमुख टांकसाळी होत्या. या टांकसाळीत पाडल्या जाणाऱ्या नाण्यांद्वारे तत्कालिन राजघराण्यांचा इतिहास व संस्कृती तसेच चलन पद्धतीचा बोध होतो. या दोन्ही टांकसाळी मुघल काळात सुरू झाल्या. येथील नाणी साधारणपणे निजाम काळापर्यंत प्रचलित होती असे दिसते.

औसा येथील टांकसाळीत पाडलेली काही प्रमुख नाणी

औसा हे गाव सन १६३६ च्या आसपास मुघल बादशहा शहाजहान याच्या ताब्यात होते. या ठिकाणची मुघल शासकांची नाणी खालीलप्रमाणे आहेत :—

(१) शाहआलम पहिला

तारीख : हिजरी ११११२ (२)/राज्य सिंहासन वर्ष ४; धातु चांदी, रुपया, वजन ११.३१ ग्रॅम.

या व्यतिरिक्त शाहआलम पहिला याची काही नाणी हिजरी ११२२ मधील परंतु राज्य सिंहासन वर्ष ३ आणि ५ या तारखांची काही नाणी प्रकाशित आहेत.

शाहआलम नंतर जहांदरशाह याचे हिजरी ११२४ व प्रथम राज्यसिंहासन वर्षातील नाणे देखील प्रकाशित आहे.

(२) फरुखसियर याच्या काळात नाण्यांवरील टांकसाळीचे नाव ' औसा ' ऐवजी बदलून ' फारुखनगर औसा ' असे आढळते. कदाचित फरुखसियरच्या कार्यकाळातच हा बदल झाला असावा. हे नाणे पुढील प्रमाणे होय.[१]

---

* परिशिष्ट (क) आणि (ड) चे लेखन श्री.दिलीप बलसेकर, संशोधन अधिकारी, भारतीय मुद्रा शास्त्र शोध संस्था, अंजनेरी, जि. नाशिक यांनी केले आहे.

१. ओरिएंटल न्युमिस्मॅटीक सोसायटी न्यूज लेटर नं ९४-९५, यु. के., एप्रिल १९८५.

धातु चांदी, रुपया, वजन ११.२३ ग्रॅम, टांकसाळीचे नाव-फारुखनगर औसा.

(३) मुहम्मदशाह -

टांकसाळीचे नाव औसा. धातु चांदी, वजन ११.३० ग्रॅम, आकार २.७० x २.२० सेंमी.

हे नाणे पटना संग्रहालयात संग्रही असून, त्याचा पंजीकृत क्र. ५९२२ हा आहे.

(४) आलमगीर दुसरा (हिजरी-११६७-७३, इ.स. १७५४-५९)

टांकसाळीचे नाव : औसा, तारीख ११७२, राजवर्ष ५, वजन १०.८४ ग्रॅम, आकार २.१ सेंमी.

वरील नाण्यांप्रमाणेच एका नाण्यावर २ किंवा ६ असे राज वर्ष आढळते. कदाचित या काळात औसाचा काही भाग हैद्राबादच्या निजामाच्या अधिपत्याखाली असावा. कारण वरील नाण्यावर देखील चंद्र व तारा हे दोन्ही सराफाचे चिन्ह असल्याने हे नाणे निजामांचे असावे या पुराव्याला पुष्टी मिळते.[२]

उदगीर टांकसाळीतील नाणी

इ.स.१६३८ पासून १७२४ पर्यंत उदगीर मुघल राज्यकर्त्यांच्या अधिपत्याखाली होते. त्यामुळे येथील नाणी प्रामुख्याने मुघल राज्यकर्त्यांची आहेत.

औरंगजेब - तारीख : १०९८ हिजरी, रुपया, यावर टांकसाळीचे नाव 'दारु-स-जफर किल्ला उदगीर' असे पहावयास मिळते. फरुखसियरचे राज्यवर्ष पहिले[३] चे, त्याचप्रमाणे मुहम्मदशहाचे देखील या टांकसाळीत पाडलेले नाणे आढळते. यापैकी मुहम्मदशहाचे नाणे खालीलप्रमाणे आहे.[४]

धातू चांदी, वजन ११.३७ ग्रॅम, रुपया, तारीख राजवर्ष ७१. परंतु ही तारीख १७ असावी.

राज्यसिंहासन वर्ष १०९८ ही मुहम्मदशहाची तारीख म्हणजेच इ.स.१७३५-३६ हा काळ होय. या काळात उदगीरचा किल्ला हैद्राबादच्या निजाम-उल-मुल्क असफ जाह याच्या ताब्यात होता. परंतु त्याने नाणे मात्र मुघल बादशहाच्या नावानेच चालवले. यावरून हे स्पष्ट होते की, वरील नाणे प्रत्यक्षात मुघलांचे नसून निजामाचे आहे.

---

२. ऑक्शन न्यूज, ओरिएंटल न्युमिस्मॅटीक सोसायटी न्यूज लेटर, नं. १५२,यु.के. स्प्रिंग, १९९७, पृ. ५.

३. न्यूमिस्मॅटीक सप्लीमेंट, खंड XLV, १९३४, पृ. ८८-८९.

४. इंडीयन कॉइन सोसायटी न्यूज लेटर, नं. ९, नागपूर, जुलै १९९१.

परिशिष्ट (ड)
शिलालेखांची सूची

क्र.	स्थळ	शासन	राज्यकर्ता	हिजरी वर्ष	इ.स. वर्ष	लिपी	आशय
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
	औसा[५]						
१	किल्ल्यावरील बंदुकीवर	निजाम-शाही	बुऱ्हाण निजाम शहा	९५(६)	१५४९-५०	फार्सी	अबुल गाझी निजामशहा याचा संदर्भ, बंदूक बनविणाऱ्याचे नाव : हुसेन रूमी याचा मुलगा मुजफ्फर उस्ताद.
२.	किल्ल्याच्या बाहेर पूर्वेकडील घुमट	-	-	१०३४	१६२४-२५	फार्सी	एका स्त्रीच्या मृत्युविषयी. (निनावी) आणि तेथे बांधलेल्या घुमटाविषयी.
३	पश्चिम भिंत मदार-बावली	मुघल	औरंगजेब	१०५६	१६४६-४७	फार्सी	उजबेक खान गाझी याच्याकडे विहीर उत्खननासाठी सुपूर्द करण्यात आली.
४	अब्दूल रइझाक पटेल घराच्या पश्चिम बाजूस	मुघल	औरंगजेब	१०७४ १०८७, ८८	१६६३-६४ १६७६, १९७७	फार्सी	जुन्या विहिरीचे बांधकाम व लोकांसाठी वापर करण्याच्या हेतूने, जी सय्यद सादत दर्गाजवळ आहे.
५	जामा मस्जिदची मध्य कमान	मुघल	औरंगजेब	१०९१	१६८०-८१	फार्सी	सुहराबखान अधिकाऱ्यास मस्जिद बांधकामाचे काम.
६	जामा मस्जिदची मध्य कमान	मुघल	औरंगजेब	-	१६८०-८१	फार्सी	सदर मस्जिद नूरमहम्मद याच्या निगराणीत बनविली गेली.
७	जामा मस्जिदच्या उजव्या खांबावर	मुघल	औरंगजेब	-	१६८०-८१	फार्सी	सय्यद बाबू हा दर्गाह-ई-वामीर म्हणून नियुक्त होता.
८	सय्यद सादतच्या दर्ग्याजवळ	-	-	११९२	१७७८-७९	फार्सी	नक्षबंदी बेगम यांच्या मृत्यू-बद्दलची माहिती.

५. झेड.ए.देसाई, अरेबिक, पर्शियन ॲण्ड उर्दू इन्स्क्रिप्शन ऑफ वेस्ट इंडिया. टोपोग्राफीकल लिस्ट, न्यू दिल्ली, १९९९, औसा पृ.क्र.३७-३८ (क्र.३५१-३६१), काटी पृ.क्र.१३६ (क्र.१२९२-१३१४), निलंगा, पृ.क्र.१८० (क्र.१६६५-१६६६), उदगीर, पृ.क्र.२२५-२७७ (क्र.२०८०-२०९७).

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
९	किल्ल्याच्या किल्लेदाराच्या घराच्या दरवाज्यावर	-	-	१२०५	१७९०-९१	फार्सी	दाऊद अलीच्या काळात इशरत महाल बांधण्यात आल्यासंबंधी.
	काटी						
१०	जामा मस्जिदची मध्यवर्ती कमान	-	-	९३१	१५२४-२५	अरेबिक	कुराणातील ओळी
११	याकुतच्या पत्नीची मस्जिद	-	-	१०१२	१६०३	फार्सी	बुऱ्हाणशहाचा घुमट व याकुतच्या पत्नीने बांधलेल्या मस्जिदविषयी.
१२	जामा मस्जिदचा मध्यवर्ती खांब	-	-	१०१२	१६०३-४	फार्सी	याकुतखान व बिलाल खान या दोघांकडून बांधकामातून खराबी झालेल्या भागाविषयी.
	निलंगा						
१३	हजरत पिर पाशाच्या दर्ग्याच्या प्रवेशद्वारावर	-	-	११९९	१७८४-८५	फार्सी	मुमताज यांनी नुरूद्दीन नूर-अल-हक्क याच्या मृत्यू-बाबतची माहिती.
१४	हजरत पिर पाशाच्या दर्ग्याच्या प्रवेशद्वारावर	-	-	११९९	१७८४-८५	फार्सी	वरील माहिती आणि पुढे त्या संताचे संपूर्ण नाव सय्यद नूर-अल-हक्क नुरानी पिर कादरीया हैदरी.
	उदगीर[६]						
१५	चांदसाहीब मस्जिद	मुघल	शहाजहान	१०६४	१६५३-५४	फार्सी	मस्जिद बांधकामाबाबत
१६	हकीमखान फलेस (तहसीलदार ऑफीस)	मुघल	औरंगजेब	१०९४	१६८२-१६८३	फार्सी	उदगीर किल्ला - बांधकाम कामी हतीम खानची नियुक्ती.
१७	मुनसीफ कोर्ट, किल्ल्याजवळील इमारत	-	-	१०९४	१६८२ डिसें. २१	फार्सी	बांधकाम करणारा दयावतखान मुर्शीद कुलीखानचा पुत्र याच्या संदर्भात.
१८	ख्वाजा दर्ग्याच्या घुमटावर	-	-	११०६	१६९४ ऑक्टो. २५	फार्सी	कमाल मुलतानीच्या मृत्यू विषयी.
१९	ख्वाजा दर्ग्याच्या घुमटावर	-	-	११०९	१६९७-९८	फार्सी	अब्दुल्ला बेगच्या शहीद होण्यासंदर्भात, ज्याने आपले आयुष्य धर्मासाठी घालविले.

६. राजाराम धावरा राठोड, उदगीर इतिहास आणि स्मारके, प्रथमावृत्ती, पुणे. १९६८ या ग्रंथातून उदगीर येथील काही शिलालेखांचे संदर्भ घेतले आहेत.

Maharashtra State Gazeteers

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१९	पेटाह दरवाजा	-	-	११११०	१६९८ ऑगस्ट २८	फार्सी	किल्ल्याच्या बांधाकामा संदर्भात.
२०	बेगची मस्जिद, कंधारगेटच्या बाहेरील बाजूस	-	-	११५२	१७३९-४०	अरेबिक-फार्सी	मस्जिद बांधकाम पूर्णत्वाच्या संदर्भात माहिती.
२१	मस्जिद जवळील विहिरीवर	-	-	११५२	१७३९-४०	अरेबिक-फार्सी	विहीर बांधकामासंबंधी माहिती.
२२	विभागीय कोर्टाजवळील शिळा	-	-	११६३	१७४९-५०	फार्सी	बांधकामाविषयी लेख
२३	ट्रॅव्हलर बंगला	-	-	फसली ११९९	१७७८	फार्सी	मुसाफीर बंगला-ई-उदगीर
२४	कंधार गेटवर	-	-	हिजरी १२१५	१८००	फार्सी	मुख्य दरवाजा आणि खाक-इ-माबारची बाल्कनी (सज्जा) बांधकामासंबंधी आदेश.
२५	ट्रॅव्हलर बंगल्यावरील घुमट	-	-	१२१९	१८०४	फार्सी	मुहम्मद खलील खान काझवानी याचा मुलगा मुहम्मद हसन खान याच्या मृत्यूविषयी.
२६	ट्रॅव्हलर बंगल्या-जवळील विहीर	-	-	१२२०(१)	१८०५	फार्सी	बडे साहेब यांच्याकडे विहिरीच्या कामासंबंधी.
२७	सजावारूल-मुल्कच्या घराच्या मुख्य प्रवेशव्दारावर	-	-		१६ वे शतक	अरेबिक	सिंहाच्या आकारात नाद-ई-अली असे लेखन.
२८	किल्ल्याच्या चांदनी बुरूजामधील ताम्रधातूची बंदूक	निजाम-शाही	अबुलगाझी-निजामशहा	-	-	फार्सी	बंदूक बनविणाऱ्याचे नाव मुहम्मद हुसेन रुमी.
२९	उद्‌गीर किल्ल्याच्या कमानीवर	मुघल	शहाजहान	हिजरी १०४६	इ.स. १६३७	फार्सी	उदगीर किल्ल्यावर शहाजहानचा ताबा दाखविणारा अभिलेख.
३०	उदगीर किल्ल्यावरील इमारतीवरील लेख -(तीन हिरव्या दगडांवर)	मुघल	औरंगजेब	१०९४	१६८५	फार्सी	(अ) हा महल दिल-कुशा हिजरी १०९४ मध्ये बांधण्यात आला त्यासंबंधी माहिती. (ब) ही इमारत खातमा खाँ हिदवस्त बेग मोगल यांच्या काळात तयार झाली असे वर्णन.

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
							(क) उदगीर किल्ल्यात औरंगजेब बादशहाच्या काळात बांधलेली इमारत. विलक्षण अध्यात्मिक शक्ती असलेले लोकच अशी इमारत तयार करू शकतात असा शेर.
३१	उदगीर शहरातील कंधार वेशीवरील उजव्या कमानीवरील लेख	-	नवाब मुस्तेस्ताब जहाँ	१२१०	-	फार्सी	शेर असलेले लेखन या कमानीवरील लेखात आले आहे.
३२	पेठ दरवाजा, व्दाराच्या उजव्या कमानीवरील लेख	-	कासमखाँ किल्लेदार	-	-	फार्सी	कासमखाँ याच्या कालखंडात हा दरवाजा तयार करण्यात आला.
३३	खातमखाँच्या घरावरील हिरव्या दगडावर	मुघल	औरंगजेब	१०९४	-	फार्सी	आलमगीरच्या काळात यास किल्लेदारी मिळाली, आलमगीरचा खातमखाँवर अत्यंत विश्वास होता आणि हा महल दिलकुशा हिजरी १०९४ मध्ये बांधण्यात आला.
३४	सजावारूल मुल्कच्या घरावरील लेख	निजाम-शाही	मुर्तजा निजामशहा, अहमदनगर	-	-	-	(अ) उजव्या कमानीवर- शाहआलम मुर्तझा निजामशहा सुलतानीच्या काळात या इमारतीचा भाग तयार करण्यात आला. (ब) ही इमारत या राजाच्या काळात तयार होऊ शकली., अन्यथा अशी भव्य इमारत कोणी तयार करू शकले नसते.
३५	बाग-ए-मेहमुदीत बांधलेल्या भव्य व सुंदर स्नान गृहावरील एक लेख	-	-	११६३	-	-	हिस्सामोद्दीन खान म्हणजे लुतफ आहे. याच्या उदारतेने आणि कृपेने हा विशाल आणि सुंदर स्वच्छ व चमकदार हौद तयार झाला असे वर्णन आहे. (सध्या हा लेख सुरक्षिततेसाठी उदगीर किल्ल्यात तहसील कचेरीसमोर ठेवलेला आहे.)

Maharashtra State Gazetteers

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
३६	बाग-ए-हिस्साम मधील पहिली भव्य इमारत व त्यावरील चार लेख हे हिरव्या दगडांवर आहेत.	-	-	-	-	-	(अ) पहिल्या इमारतीवरील पहिला लेख. ही इमारत किती वर्ष टिकेल हे फक्त ईश्वर सांगू शकतो. त्याच्या आशीर्वादाने ही कितीही दिवस राहू शकेल. (ब) दुसरा शिलालेख-ही इमारत शहाजहानच्या शांततेच्या व समृद्धीच्या काळात हिजरी १०५९ (इ.स.१६५४) मध्ये शहाजहानच्या कृपेने तयार झाली. (क) हिसामोद्दीन खानाच्या कृपेने आणि उदारतेने हा सहलीचा स्वर्गासारखा बाग तयार झाला. (ड) हिसामोद्दीन खानाने यांची वंशावळ दिलेली आहे. (इ) इमारतीच्या खाली असलेल्या एका लहान दगडी हौदावर कोरलेला लेख. हिजरी १०५९ मध्ये हा नवीन बाग तयार झाला. हा लेख अबजत पद्धतीने कोरलेला आहे.

Maharashtra State Gazetteers

परिशिष्ट (इ)

लातूर जिल्ह्यातील हुतात्मा स्मारकांवर नोंदण्यात आलेल्या हुताम्याची माहिती

हुतात्मा स्मारक लातूर, तालुका -लातूर, जिल्हा-लातूर

अ.क्र.	हुतात्म्याचे नाव	जन्म दिनांक	मृत्यू दिनांक	गाव	तालुका
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	माणिक हरिपंत आयचित	१९२०		लातूर	लातूर
२	भुजंग नागोराव देशपांडे	१९०८	२१-३-१९४८	लातूर	लातूर

(हे स्मारक जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय, लातूर या संस्थेकडे देखभालीसाठी सुपूर्द करण्यात आले आहे.)

हुतात्मा स्मारक किल्लारी, तालुका -औसा, जिल्हा-लातूर.

अ.क्र.	हुतात्म्याचे नाव	जन्म दिनांक	मृत्यू दिनांक	गाव	तालुका
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	रामराव बळीराम भोसले	१९१३	१२-७-१९४८	किल्लारी	औसा
२	महादप्पा ईश्वरप्पा दलाल	१९१०	१२-७-१९४८	किल्लारी	औसा
३	महरप्पा लिंबाजी कोडवार.	. .	. .	किल्लारी	औसा

(या स्मारकास १९९३ च्या भूकंपात हानी पोहोचलेली आहे.)

हुतात्मा स्मारक निलंगा, तालुका -निलंगा, जिल्हा-लातूर.

अ.क्र.	हुतात्म्याचे नाव	जन्म दिनांक	मृत्यू दिनांक	गाव	तालुका
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	नरसिंग वामनराव भातुंबरेकर	१९०४	१९४०	निलंगा	निलंगा
२	राधीका रावजी पाटणकर	१९३६	१९४७	निलंगा	निलंगा
३	महारुद्र काशिनाथ कुंडुबके	१९२२	१९४८	निलंगा	निलंगा
४	नागप्पा बसप्पा फुलारी	१९२०	१९४८	निलंगा	निलंगा
५	नामदेव वेनूनाथ वैजवाडे	१९२०	१९४८	निलंगा	निलंगा
६	गंगाराम बाबु खोमने	. .	१९४८	निलंगा	निलंगा
७	सत्यनारायण सिदप्पा	. .	. .	निलंगा	निलंगा

(हे स्मारक महाराष्ट्र सार्वजनिक वाचनालय, निलंगा या संस्थेकडे देखभालीसाठी सुपूर्द करण्यात आलेले आहे.)

हुतात्मा स्मारक औराद (शा.), तालुका -निलंगा, जिल्हा-लातूर

अ.क्र. (१)	हुतात्म्याचे नाव (२)	जन्म दिनांक (३)	मृत्यू दिनांक (४)	गाव (५)	तालुका (६)
१	व्यंकट आनंदा भंडारे	१०-४-१९१९	२४-५-१९४१	औराद (शा.)	निलंगा

(हे स्मारक विरभद्रप्पा आर्य विद्यालय, औराद-शहाजनी या संस्थेकडे देखभालीसाठी सुपूर्द करण्यात आलेले आहे.)

हुतात्मा स्मारक उदगीर, तालुका -उदगीर, जिल्हा-लातूर

अ.क्र. (१)	हुतात्म्याचे नाव (२)	जन्म दिनांक (३)	मृत्यू दिनांक (४)	गाव (५)	तालुका (६)
१	मणिकराव नरसप्प उलगडे	१०-६-१९२८	१३-८-१९४८	उदगीर	उदगीर
२	हंबीरराव आप्पाराव पाटील	१५-४-१९०३	१३-८-१९४८	उदगीर	उदगीर

(हे स्मारक नगरपालिका वाचनालय, उदगीर या संस्थेकडे देखभालीसाठी सुपूर्द करण्यात आलेले आहे.)

हुतात्मा स्मारक तोंडचिर, तालुका -उदगीर, जिल्हा-लातूर

अ.क्र. (१)	हुतात्म्याचे नाव (२)	जन्म दिनांक (३)	मृत्यू दिनांक (४)	गाव (५)	तालुका (६)
१	हणमंत शेलप्पा आग्रे	१२-६-१९२०	२-८-१९४८	तोंडचिर	उदगीर
२	किशनगीर रामगीर गोसावी	१५-५-१८९८	३-८-१९४८	तोंडचिर	उदगीर
३	देवराव हणमंतराव गोसावी	४-७-१९२६	१०-८-१९४८	तोंडचिर	उदगीर

हुतात्मा स्मारक कौळखेड, तालुका -उदगीर, जिल्हा-लातूर

अ.क्र. (१)	हुतात्म्याचे नाव (२)	जन्म दिनांक (३)	मृत्यू दिनांक (४)	गाव (५)	तालुका (६)
१	विश्वनाथ शिवप्पा कोडमारे	२०-१-१९२०	११-८-१९४८	कौलखेड	उदगीर
२	विश्वनाथ ऊर्फ महालिंग सिदप्पा मुळे	१०-७-१९१६	११-८-१९४८	कौलखेड	उदगीर
३	देवराव कालबा जाधव	. .	. .	. .	. .

हुतात्मा स्मारक घोन्शी, तालुका जळकोट, जिल्हा-लातूर

अ.क्र. (१)	हुतात्म्याचे नाव (२)	जन्म दिनांक (३)	मृत्यू दिनांक (४)	गाव (५)	तालुका (६)
१	राम ऊर्फ रामन्ना नरसिंग कोळी	१८८०	८/१९४७	घोन्शी	जळकोट

(हे स्मारक शंभू शिक्षण संस्था संचलित संभाजी विद्यालय, घोन्शी या संस्थेकडे देखभालीसाठी सुपूर्द करण्यात आलेले आहे.)

हुतात्मा स्मारक तिरुका, तालुका -जळकोट, जिल्हा-लातूर

अ.क्र. (१)	हुतात्म्याचे नाव (२)	जन्म दिनांक (३)	मृत्यू दिनांक (४)	गाव (५)	तालुका (६)
१	सिंधु तुका कराड	६-२-१९१५	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट
२	नामदेव सोबा गवंडी	४-३-१९१२	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट
३	नरसिंग महादु चव्हाण	८-९-१९३०	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट
४	पांडुरंग महादु तिडके	२५-७-१९०७	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट
५	पांडुरंग सगना नाडुरगे	१२-६-१८८७	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट
६	संग्राम आत्माराम पांडे	२-१०-१९१२	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट
७	गोविंद रामा महार	३-८-१९०७	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट
८	चंपा नागनाथ मांग	७-२-१९२८	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट
९	गणपती जळबा मांग	५-९-१९२३	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट
१०	शेरबा भिमा वडार	१९१२	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट
११	धानवड तुकाराम सदरेडडी	५-४-१९०२	ऑगस्ट १९४७	तिरुका	जळकोट

(हे स्मारक चंचल भारती विद्याविकास मंडळ, अहमदपूर संचलित क्रांती विद्यालय, तिरुका या संस्थेकडे देखभालीसाठी सुपूर्द करण्यात आले आहे.)

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या कागदपत्रांतून तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्याकडून ही माहिती पडताळून घेतली आहे. काही हुतात्म्यांची जन्म-मृत्यू विषयीची नोंद उपलब्ध झालेली नाही. स्मारकाची देखभाल करणा-या संस्थांची नोंद कंसात दर्शविली आहे.

Maharashtra Gazetteers

प्रकरण ३ : लोक

- लोकसंख्या
- लोकसंख्येतील परिवर्तन
- भाषा
- राहणीमान
- धार्मिक प्रथा
- सण व उत्सव
- करमणूक
- प्रमुख जाती व जमाती

प्रकरण ३

लोक

लोकसंख्या

२००१ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २,०८०,२८५ होती. एकूण लोकसंख्येपैकी १,५९०,०२४ लोक ग्रामीण भागातील तर ४९०,२६१ लोक नागरी भागातील होते. या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्या तक्ता क्रमांक १ मध्ये दिली आहे.[१]

तक्ता क्रमांक १

लातूर जिल्ह्यातील लोकसंख्या, २००१

तालुका	एकूण ग्रामीण नागरी	लोकसंख्या		
		एकूण व्यक्ती	पुरुष	स्त्रिया
(१)	(२)	(३)	(४)	(५)
लातूर	एकूण	५४२,४१४	२८२,३२९	२६०,०८५
	ग्रामीण	२४२,४२९	१२५,७८२	११६,६४७
	नागरी	२९९,९८५	१५६,५४७	१४३,४३८
रेणापूर	एकूण	१२२,१९२	६३,०००	५९,१९२
	ग्रामीण	१२२,१९२	६३,०००	५९,१९२
	नागरी	०	०	०
अहमदपूर	एकूण	१९९,०५३	१०३,१७१	९५,८८२
	ग्रामीण	१६३,२४८	८४,३१९	७८,९२९
	नागरी	३५,८०५	१८,८५२	१६,९५३
जळकोट	एकूण	६९,१९८	३५,५८१	३३,६१७
	ग्रामीण	६९,१९८	३५,५८१	३३,६१७
	नागरी	०	०	०
चाकूर	एकूण	१५७,१३५	८१,१२३	७६,०१२
	ग्रामीण	१५७,१३५	८१,१२३	७६,०१२
	नागरी	०	०	०
शिरूर-अनंतपाळ	एकूण	७४,०८१	३८,२२०	३५,६८१
	ग्रामीण	७४,०८१	३८,२२०	३५,६८१
	नागरी	०	०	०
औसा	एकूण	२८०,२४०	१४४,३४६	१३५,८९४
	ग्रामीण	२९४,३६४	१२८,४९३	१२०,७८१
	नागरी	३०,८७६	१५,८५३	१५,०२३
निलंगा	एकूण	२८६,०८९	१४६,७२४	१३९,३६५
	ग्रामीण	२५४,४२७	१३०,२८०	१२४,१४७
	नागरी	३१,६६२	१४,४४४	१५,२१८

१. **सेंसस ऑफ इंडिया, २००१,** महाराष्ट्र, प्राथमिक जनगनना सार, (सीडी), रजिस्टर जनरल, इंडिया, मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स, न्यू दिल्ली, आधारे.

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazetteers

(१)	(२)	(३)	(४)	(५)
देवणी	एकूण	८८,३६२	४५,१८६	४३,१७६
	ग्रामीण	८८,३६२	४५,१८६	४३,१७६
	नागरी	०	०	०
उदगीर	एकूण	२६१,५२१	१३५,५७७	१२५,९४४
	ग्रामीण	१६९,५८८	८७,४२९	८२,१५९
	नागरी	९१,९३३	४८,१४८	४३,७८५

तक्ता क्रमांक २

लातूर जिल्हा लोकसंख्येतील फरक, १९०१* ते २००१

वर्षे	लोकसंख्या			दशकातील	दशकातील
	पुरुष	स्त्रिया	एकूण	फरक	फरकाचे शेकडा प्रमाण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१९०१	२१३,९१२	२०९,६९७	४२३,६०९	. .	. .
१९११	२५७,७३६	२४८,८१३	५०६,५४९	+ ८२,९४०	+ १९.५८
१९२१	२४७,३०५	२३२,४१८	४७९,७२३	- २६,८२६	- ५.३०
१९३१	२७७,९८८	२६२,०३१	५४०,०९१	+ ६०,२९६	+ १२.५७
१९४१	३०९,२३७	२९१,१३६	६००,३७३	+ ६०,३५४	+ ११.१८
१९५१	३३९,३७९	३२१,४४४	६६०,८२३	+ ६०,४५०	+ १०.०७
१९६१	४१९,५४७	३९८,६१३	८१८,१६०	+ १५७,३३७	+ २३.८१
१९७१	५४०,०४३	५०८,५७५	१,०४८,६१८	+ २३०,४५८	+ २८.१७
१९८१	६६०,०४५	६३२,८३७	१,२९२,८८२	+ २२४,२६४	+ २३.२९
१९९१	८६३,२०३	८१३,४३८	१,६७६,६४१	+ ३८३,७५९	+ २९.६८
२००१	१,०७५,२७५	१,००५,०२८	२,०८०,२८५	+ ४०३,६४४	+ २४.०७

लोकसंख्येतील परिवर्तन

१९९१ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्याची लोकसंख्या १,६७६,६४१ इतकी होती. २००१ मध्ये २,०८०,२८५ एवढी वाढली. म्हणजेच २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येत २४.०७ एवढी ५.६ टक्क्यांनी वाढ झाली.

नागरी लोकसंख्या : इ.स.१९०१ मध्ये जिल्ह्यातील नागरी लोकसंख्या २२,४८९ होती. २००१ मध्ये ती ४९०.२६१ झाली. १९०१ पासून २००१ पर्यंत नागरी लोकसंख्येतील वाढीचा तपशील तक्ता क्र.३ मध्ये दिला आहे.

* (१९०१ ते १९८१ उस्मानाबाद जिल्ह्यात लातूर अंतर्भूत असतांना)

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक ३
लातूर जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येतील वाढ, १९०१ ते २००१

जनगणना	नागरी लोकसंख्या	दशकातील फरक	दशकातील फरकाची टक्केवारी	जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९०१	२२,४८९	. .	. .	१.३४
१९११	२०,२३३	- २,२५६	- १०.०३	१.२०
१९२१	३२,८९४	+ १२,६६१	+ ६२.५८	१.९६
१९३१	५६,७८४	+ २३,८९०	+ ७२.६३	३.३८
१९४१	५५,२९३	- १,४९१	- २.६३	३.२९
१९५१	८४,२१८	+ २८,९२५	+ ५२.३१	५.०२
१९६१	८६,६२८	+ २,४१०	+ २.८६	५.१६
१९७१	१३८,५३९	+ ५१,९११	+ ५९.९२	८.२६
१९८१	२१३,०४९	+ ७४,५१०	+ ५३.७८	१२.७०
१९९१	३४१,८६८	+ १२८,८१९	+ ६०.४६	२०.३९
२००१	४९०,२६१	१४८,३९३	+ ४३.४०	२४.३२

जिल्ह्यात १९९१ मध्ये पाच शहरे होती. त्यांची संख्या पुढे दहा झाली. हे बदल शासनाच्या धोरणानुसार झालेत. जिल्ह्यातील शहरांची लोकसंख्या १९८१, ९१ व २००१ च्या लोकसंख्येनुसार तक्ता क्रमांक ४ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक ४
लातूर जिल्ह्यातील शहरांची लोकसंख्या, जनगणना वर्षे १९८१ ते २००१.

शहर	१९८१	१९९१	२००१
(१)	(२)	(३)	(४)
लातूर	३४८,४१९	४८९,३८५	५२४,४१४
अहमदपूर	२४६,९५६	३२२,१८७	१९९,०५३
उदगीर	२७४,६३६	३४९,२८०	२६१,५२१
निलंगा	२४०,७८२	२९९,८६०	२८६,०८९
औसा	१८२,०८९	२२५,९२९	२८०,२४०
रेणापूर	-	-	१२२,१९२
जळकोट	-	-	६९,१९८
चाकूर	-	-	१५७,१३५
शिरूर-अनंतपाळ	-	-	७४,०८१
देवणी	-	-	८८,३६२
एकूण . .	१२,९२,८८२	१,६७६,६४१	२,०६२,२८५

अनुक्रमणिका

लातूर जिल्ह्यातील शहरांची २००१ च्या जनगणनेनुसार स्त्रिया व पुरुषांची आकडेवारी तक्ता क्रमांक ५ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक ५
लातूर जिल्ह्यातील शहरांची लोकसंख्या, २००१

शहर	लोकसंख्या		
	एकूण	पुरुष	स्त्रिया
(१)	(२)	(३)	(४)
लातूर	५४२,४१४	२८२,३२९	२६०,०८५
रेणापूर	१२२,१९२	६३,०००	५९,१९२
अहमदपूर	१९९,०५३	१०३,१७१	९५,८८२
जळकोट	६९,१९८	३५,५८१	३३,६१७
चाकूर	१५७,१३५	८१,१२३	७६,०१२
शिरूर-अनंतपाळ	७४,०८१	३८,२२०	३५,८६१
औसा	२८०,२४०	१४४,३४६	१३५,८९४
निलंगा	२८६,०८९	१४६,७२४	१३९,३६५
देवनी	८८,३६२	४५,१८६	४३,१७६
उदगीर	२६१,५२१	१३५,५७७	१२५,९४४

तक्ता क्रमांक ५ वरून असे दिसून येते की लातूर हे जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर होते. २००१ च्या जनगणना वर्षात मात्र लातूर शहराची लोकसंख्या सर्वात अधिक आढळते.

तक्ता क्रमांक ६
लातूर जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येच्या फरकाची टक्केवारी, १९८१ ते १९९१

शहर	१९८१	१९९१
लातूर	८.६६	११.७७
अहमदपूर	१.२७	१.५४
उदगीर	३.९१	४.२०
निलंगा	१.३३	१.४८
औसा	१.२९	१.३८

ग्रामीण लोकसंख्या :— २००१ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्या १,५९०,०२४ आहे. त्यात ८१९,४१३ पुरुष व ७७०,६११ स्त्रियांचा समावेश आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या ७६.४३ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. १९०१ मध्ये लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्या ४०१,१२० होती. २००१ मध्ये ती १,५९०,०२४ झाली. तक्ता क्रमांक ७ आणि ८ मध्ये जिल्ह्यातील १९९१ मधील लोकसंख्या प्रमाणानुसार खेडी व तेथील लोकसंख्या दिलेली आहे. तक्ता क्रमांक ९ मध्ये लातूर जिल्ह्यातील १९०१ ते १९९१ पर्यंत ग्रामीण भागातील लोकसंख्या वाढीसंबंधी आकडेवारी दिली आहे.

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक ७

लोकसंख्या प्रमाणानुसार खेड्यांची संख्या, लातूर जिल्हा १९९१.

लोकसंख्या प्रमाण (१)	खेड्यांची संख्या (२)	लोकसंख्या (३)
२०० पेक्षा कमी	१३	१,८४८
२००-४९९	१२७	४७,२०७
५००-५९९	२६७	१,९६,८७२
१,०००-१,९९९	३३३	४,७५,९९७
२,०००-४,९९९	१५०	४,२३,४०६
५,०००-९,९९९	१८	१,१५,६४१
१०,००० पेक्षा जास्त	६	७३,८०२
एकूण	९१४	१३,३४,७७३

तक्ता क्रमांक ८

लोकसंख्या प्रमाणानुसार तालुकानिहाय खेडी व त्यांची लोकसंख्या, जिल्हा लातूर १९९१

तालुका	वस्ती असलेली एकूण खेडी	लोकसंख्या	२०० पेक्षा कमी		२०० - ४९९		५००-९९९	
			खेडी	लोकसंख्या	खेडी	लोकसंख्या	खेडी	लोकसंख्या
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)
लातूर जिल्हा	९१४	१,३३४,७७३	१३	१,८४८	१२७	४७,२०७	२६७	१९६,८७२
लातूर तालुका	१७८	२८१,९७७	०	-	२०	७,७९२	३९	३०,३०३
अहमदपूर तालुका	२२८	२९६,३०९	३	४३३	४०	१४,८९८	८५	५९,९२८
उदगीर तालुका	१९१	२७८,८२७	१	१४८	२३	८,६२६	६०	४५,२८९
निलंगा तालुका	१९०	२७४,९७७	८	१,१६८	२७	९,९९८	५५	४०,७९०
औसा तालुका	१२७	२०२,६८३	१	९९	१७	५,८९३	२८	२०,५६२

Maharashtra State Gazeteers

तक्ता क्रमांक ८- (चालू)

तालुका	१,०००-१,९९९		२०००-४,९९९		५००० - ९,९९९		१०,००० पेक्षा कमी	
	खेडी	लोकसंख्या	खेडी	लोकसंख्या	खेडी	लोकसंख्या	खेडी	लोकसंख्या
(१)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)	(१५)	(१६)	(१७)
लातूर जिल्हा	३३३	४७५,९९७	१५०	४२३,४०६	१८	११५,६४१	६	७३,८०२
लातूर तालुका	८६	११९,७६४	२८	७९,५४६	३	१९,१८०	२	२५,३९२
अहमदपूर तालुका	६३	८६,२३५	३१	८४,२२७	४	२६,४७१	२	२४,११७
उदगीर तालुका	७२	१०४,५९६	३०	८६,२५५	५	३३,९१३	०	०
निलंगा तालुका	६२	९१,७६२	३३	९४,६५०	४	२५,५२४	१	११,०८५
औसा तालुका	५०	७३,६४०	२८	७८,७२८	२	१०,५५३	१	१३,२०८

तक्ता क्रमांक ९

लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्या वाढ, १९०१ ते १९९१.

जनगणना वर्षे	ग्रामीण लोकसंख्या	दशकातील फरक	दशकातील फरकाची टक्केवारी	ग्रामीण लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९०१	४०१,१२०	. .	. .	२३.९२
१९११	४८६,३१६	+ ८५,१९६	+ २१.२४	२९.००
१९२१	४४६,८२९	- ३९,४८७	- ८.१२	२६.६५
१९३१	४८३,२३५	+ ३६,४०६	+ ८.१५	२८.८२
१९४१	५४५,०८०	+ ६१,८४५	+ १२.८०	३२.५१
१९५१	५७६,६०५	+ ३१,५२५	+ ५.७८	३४.३९
१९६१	७३१,५३२	+ १५४,९२७	+ २६.८७	४३.६३
१९७१	९१०,०७९	+ १७८,५४७	+ २४.४१	५४.२७
१९८१	१,०७९,८३३	+ १६९,७५४	+ १८.६५	६४.४०
१९९१	१,३३४,७७३	+ २५४,९४०	+ २३.६१	७९.६०
२००१	१,५९०,०२४	+ २,५५,२५१	+ १९.१२	७६.४३

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazeteers

लोकसंखेची घनता :— १९९१ मध्ये लातूर जिल्ह्यातील दर चौरस कि.मी. लोकसंख्येचे प्रमाण २३४ एवढे होते. १९९१ मध्ये जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७,१५७.०० चौरस कि.मी. होते. त्यानुसार प्रती चौरस किलोमीटर क्षेत्रामागे २३४ व्यक्ति राहत होत्या. तालुकानिहाय नागरी व ग्रामीण भागातील लोकसंख्या घनता तक्ता क्रमांक १० मध्ये दिली आहे. त्यावरून असे दिसून येते की, सर्वात जास्त घनता लातूर तालुक्याची (३३२) आहे. तर सर्वात कमी घनता औसा तालुक्याची (१८२) आहे. लोकसंख्या घनता ही प्रदेश आणि शहरी लोकसंख्या वृध्दी ह्यावर अवलंबून असते.

तक्ता क्रमांक १०

लातूर जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येची घनता, १९९१

तालुका	एकूण/ग्रामीण/ नागरी	क्षेत्रफळ (चौ.कि.मी.)	राहत्या घरांची संख्या	घरकुलांची संख्या	लोकसंख्या	घनता (प्रती चौ. कि.मी.ला)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
लातूर	एकूण	७,१५७.००	२८१,४८४	२८३,७५७	१,६७६,६४१	२३४
जिल्हा	ग्रामीण	७,०८९,५८	२२४,०२८	२२६,०१५	१,३३४,७७३	१८८
	नागरी	६७.४२	५७,४५६	५७,७४२	३४१,८६८	५,०७०
लातूर	एकूण	१,४४३.५९	८२,६७०	८३,६६६	४८९,३८५	३३२
तालुका	ग्रामीण	१,४२२.५९	४७,८०२	४८,७२६	२८१,९७७	१९८
	नागरी	२१.००	३४,८६८	३४,९४०	१९७,४०५	९,४००
अहमदपूर	एकूण	१,६८५.५९	५४,३५४	५४,८६१	३२२,१८७	१९१
तालुका	ग्रामीण	१,६६७.४४	५०,०२८	५०,५३०	२९६,३०९	१७८
	नागरी	१८.१५	४,३२६	४,३३१	२५,८७८	१,४२६
उदगीर	एकूण	१,५०८.०३	५६,६४४	५६,८३७	३४९,२८०	२३२
तालुका	ग्रामीण	१,५०२.२३	४५,८९९	४६,०५०	२७८,५२७	१८६
	नागरी	५.८०	१०,७४५	१०,७८७	७०,४५३	१२,१२६
निलंगा	एकूण	१,३३८.२०	४९,०२९	४९,५०२	२९९,८६०	२२४
तालुका	ग्रामीण	१,३३१.३४	४५,२८६	४५,६०६	२७४,९७७	२०८
	नागरी	१६.८६	३,७४३	३,८९६	२४,८८३	१,४७६
औसा	एकूण	१,२४१.०४	३८,७८७	३८,८९१	२२५,९२९	१८२
तालुका	ग्रामीण	१,२३५.४३	३५,०१३	३५,१०३	२०२,६८३	१६४
	नागरी	५.६१	३,७७४	३,७८८	२३,२४६	४,१४४

स्त्रीपुरुष गुणोत्तर :— २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात १,००० पुरुषांमागे ९३५ स्त्रिया असे प्रमाण होते. १९०१ ते १९९१ पर्यंत जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाणासंबंधी आकडेवारी तक्ता क्रमांक ११ मध्ये दिली आहे.

वयमानानुसार लोकसंख्या :— जिल्ह्यातील वयमानानुसार लोकसंख्येची माहिती तक्ता क्रमांक १२ मध्ये दिली आहे. तर वय व वैवाहिक दर्जासंबंधीची सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक १३ मध्ये दिली आहे.

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक ११

महाराष्ट्र राज्य व लातूर जिल्ह्यातील १९०१ ते १९९१ पर्यंत स्त्री-पुरुष गुणोत्तर*

वर्षे	लातूर जिल्हा			महाराष्ट्र		
	एकूण	ग्रामीण	शहरी	एकूण	ग्रामीण	शहरी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१९०१	९८०	९८२	९४५	५७८	१,००३	८६२
१९११	९६५	९६४	९८८	९६६	१,०००	७९६
१९२१	९४०	९४३	८९६	९५०	९९४	७७६
१९३१	९४३	९५०	८८३	९४७	९८७	७९०
१९४१	९४१	९४२	९३५	९४९	९८९	८१०
१९५१	९४७	९५१	९२४	९४१	१,०००	८०७
१९६१	९५०	९५५	९०९	९३६	९९५	८०१
१९७१	९४२	९५३	८७०	९३०	९८५	८२०
१९८१	९५९	९७१	८९९	९३७	९८७	८५०
१९९१	९४२	९५४	८९८	९३४	९७२	८७५

तक्ता क्रमांक १२

वयमान गटावरून लातूर जिल्ह्यातील लोकसंख्येची विभागणी, * २००१

अ. क्र.	वयमान गट	एकूण	ग्रामीण	नागरी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	०-६	२,५९,७८२	२,१४,४१३	४५,३६९
२	७-१४	४,११,७४६	३,१९,०७७	९२,६६९
३	१५-१९	१,४९,५८६	१,१४,८४०	३४,७४६
४	२०-२४	१,३४,२७८	१,०३,६००	३०,६७८
५	२५-२९	१,२०,३५३	९४,४५९	२५,८९४
६	३०-३४	१,९६,६९०	८५,८५६	२३,८३४
७	३५-३९	९७,५०८	७६,४४०	२१,०६८
८	४०-४९	१,५६,९११	१,२८,९९५	२७,९१६
९	५०-५९	१,०४,८८५	८८,८४०	१६,०४५
१०	६० वर्षावरील	१,१९,१०७	१,०१,६१३	१७,४९४
११	वय अनिर्देशित	१५,७९५	९,६४०	६,१५५
	सर्व वयोगट एकूण	१६,७६,६४१	१३,३४,७७३	३,४१,८७८

तक्ता क्रमांक १३

वयमानानुसार वैवाहिक दर्जा, १९९१ **

वयमान	अविवाहित		विवाहित		विधुर किंवा विधवा		घटस्फोटित किंवा विभक्त		अनिश्चित	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
सर्व वयांचे	४,८८,२९९	३,७६,२०१	३,६३,५०२	३,८२,१७६	१०,५५१	५२,७०१	६००	२,३३०	२५०	३०
०-९	२,३६,९०३	२,३०,४६७	०	०	०	०	०	०	०	०
१०-१४	१,०६,७१४	९४,१६४	१,१९०	१,८९०	१०	२०	१०	४०	९०	३०

* एक हजार पुरुषांशी स्त्रियांचे प्रमाण

* जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई, २००४, २००५ पृ. ११.

** आधार ' सेंसस ऑफ इंडिया ', १९९१, सोसिओ—कल्चरल टेबल्स, सिरीज १४ पार्ट-४-अ-सी सिरीज, पेज ११५ ते ११७

अनुक्रमणिका

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
१५-१९	७९,९१६	३७,५६०	४,६००	२७,२४०	१०	११०	१०	१३०	२०	०
२०-२४	४०,२१०	४,९३०	२६,४१९	६१,६७९	३०	६००	६०	३३०	५०	०
२५-२९	९,८५७	९१०	४७,६६४	६०,६०२	९०	७७०	७०	३४०	०	०
३०-३४	२,२७०	४४०	५२,०५०	५३,२४०	२००	१,०८०	९०	३२०	२०	०
३५-३९	९०४	१६०	४९,०७०	४४,९३४	२९०	१,७९०	४०	३००	०	०
४०-४४	७७०	२४०	४३,४७५	३७,९२१	४९०	२,७४५	८०	२९०	०	०
४५-४९	४६०	१२०	३३,८२०	२९,९१०	५२०	२,८५०	६०	१६०	०	०
५०-५४	५००	७०	३२,८१७	२४,५९०	९९०	५,३७३	३०	२२०	०	०
५५-५९	३००	५०	२०,३६३	१४,०५०	९१०	४,५३२	४०	५०	०	०
६०-६४	२२०	५०	२२,७०५	१२,४१०	१,७७०	१०,४७१	८०	९०	०	०
६५-६९	११०	२०	११,४७०	६,२५०	१,३४०	६,०७०	१०	३०	१०	०
७०-७४	१३०	७०	९,३४०	४,१५०	१,६५०	७,७२०	१०	३०	०	०
७५-७९	११०	२०	३,३७०	१,४८०	५७०	२,५८०	०	०	१०	०
+ ८०	३३०	१००	४,९९०	१,६६०	१,६८१	५,९९०	१०	०	१०	०
वयाचा उल्लेख नसलेले	८,५९५	८,८३०	१६०	१७०	०	०	०	०	४०	०

भाषा : १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात प्रमुख अकरा भाषांनुसार प्रत्येक तालुका आणि शहर यामधील लोकसंख्या भाषानुसार वेगवेगळी दाखविली आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण व नागरी क्षेत्रानुसार होणारी भाषांची विभागणी खालीलप्रमाणे देता येईल. (उस्मानाबाद जिल्ह्यात लातूर अंतर्भूत असतांना)

अ. क्र.	भाषा	एकूण लोक संख्येची टक्केवारी			प्रत्येक भाषेची टक्केवारी	
		एकूण	ग्रामीण	नागरी	ग्रामीण क्षेत्र	नागरी क्षेत्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१.	बंजारी	०.९२	०.९७	०.५६	९३.५२	६.४८
२.	गुजराती	०.१६	०.१२	०.५१	६५.७१	३४.२९
३.	हिंदी	०.९४	०.६१	३.७१	५८.०९	४१.९१
४.	कैकाडी	०.०५	०.०६	०.०३	९४.४९	५.५१
५.	कन्नड	२.७८	२.३८	६.१४	७६.६६	२३.३४
६.	मराठी	८३.९७	८६.८६	५९.४७	९२.५१	७.४९
७.	पारधी	०.०७	०.०७	०.०३	९५.८९	४.११
८.	तेलगू	१.१०	१.०२	१.७६	८३.०६	१६.९४
९.	उर्दू	९.९१	७.८४	२७.४३	७०.७३	२९.२७
१०.	इतर	०.१०	०.०७	०.३६	६३.१०	३६.९०
११.	सर्व भाषा	१००.००	१००.००	१००.००	८९.४२	१०.५८

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazetteers

मराठी ही जिल्ह्यातील प्रमुख भाषा असून जवळजवळ ८४ टक्के लोकांची ती मातृभाषा आहे. ग्रामीण क्षेत्रात ८६.९ टक्के लोक मराठी बोलणारे आहेत तर नागरी क्षेत्रात त्यांची टक्केवारी फक्त ५९.५ आहे. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येमध्ये उर्दू बोलणाऱ्यांची संख्या ९.९ टक्के आहे. उर्दू भाषा नागरी क्षेत्रात अधिक बोलली जात असून तेथे उर्दू भाषिकांची संख्या ग्रामीण भागात ७.८ टक्के तर नागरी भागात २७.४ टक्के आहे. कन्नड भाषा बोलणाऱ्यांचा जिल्ह्यात तिसरा क्रमांक लागतो. कन्नड भाषिकांची संख्या एकूण लोकसंख्येमध्ये २.८ टक्के आहे. नागरी क्षेत्रात टक्केवारी ६:१ आहे तर ग्रामीण क्षेत्रात २:४ टक्के आहे. वंजारी, कैकाडी, आणि पारधी या भाषा बोलणारे लोक मात्र ग्रामीण क्षेत्रात अधिक आहेत. हिंदी भाषा ही नागरी आणि ग्रामीण क्षेत्रात बोलली जाते.

१९०१, १९५१ आणि १९६१ मधील भाषांची एकूण लोकसंख्येशी तुलनात्मक टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	भाषा	एकूण लोकसंख्येशी टक्केवारी		
		१९०१	१९५१	१९६१
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	बंजारी	०.१५	०.७७	०.९२
२	गुजराती	०.१५	०.१२	०.१६
३	हिंदी	१.०६	०.९२	०.९४
४	कैकाडी	०.०७	०.०७	०.०५
५	कन्नड	४.३६	३.२८	२.७८
६	मराठी	८४.२२	८४.१५	८३.९७
७	पारधी	०.०४	०.०९	०.०७
८	तेलगू	०.५५	१.२२	१.१०
९	उर्दू	९.३०	९.२१	९.९१
१०	इतर	०.१०	०.१७	०.१०
	सर्व भाषा	१००.००	१००.००	१००.००

मराठी भाषिकांची टक्केवारी १९०१ साली ८४.२२ टक्के होती. ती १९६१ मध्ये ८३.९७ टक्क्यांपर्यंत वधरली. उर्दू भाषिकांचे प्रमाण १९०१ मध्ये ९.३० टक्के झाले ते १९५१ मध्ये ९.२१ पर्यंत घटले. मात्र १९६१ मध्ये ते ९.९१ पर्यंत वाढत असल्याचे दिसते. कन्नड भाषिकांचे प्रमाण १९०१ मध्ये ४.३६ टक्के होते. परंतु १९५१ आणि १९६१ मध्ये ते २.७८ पर्यंत घटत गेले. गुजराती, पारधी, कैकाडी आणि हिंदी भाषिकांचे प्रमाण शेवटच्या साठ वर्षात घट व काही प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. तेलगू भाषिकांचे प्रमाण १९०१ मध्ये ०.५५ टक्के होते. तर १९५१ मध्ये त्यात वाढ होऊन ते १.२२ पर्यंत आले. मात्र १९६१ मध्ये त्यात घट होऊन ते १.१० टक्क्यांवर आले. सन १९९१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या १६,७६,६४१ होती. एकूण लोकसंख्येपैकी हिंदू १३,७९,८८५ मुसलमान २,१९,८७६ बौध्द ७१,७९१, जैन ४,३९७, शीख ४७, ईसाई ५१५, इतर ९३, आणि धर्म न सांगणारे ३७ होते.

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazetteers

धर्मानुसार लोकसंख्या : २००१ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्यातील धर्मानुसार लोकसंख्या खालीलप्रमाणे होती.*

अ.क्र. (१)	धर्म (२)	वर्षे (२००१) (३)	पुरुष (४)	स्त्रिया (५)
१	हिंदू	१७,००,६७९	८,७९,३६२	८,२१,३१७
२	मुसलमान	२,९२,९९८	१,५०,९५९	१,४२,०३७
३	ईसाई (ख्रिश्चन)	१,४९४	७७३	७२१
४	शीख	१,४३५	७९९	८३६
५	बौध्द	७४,३५१	३८,४५३	३५,८९८
६	जैन	६,१२३	३,२४८	२,८७५
७	इतर	८७३	४६५	४०८
८	धर्म न सांगणारे	२,३३४	१,१९८	१,१३६

धर्मानुसार लोकसंख्या : २००१ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्यातील धर्मानुसार लोकसंख्या

अ.क्र. (१)	धर्म (२)	वर्षे (२००१) (३)	एकूण (४)	एकूण लोकसंख्या (५)	पुरुष (६)	स्त्रिया (७)
१	सर्व धर्म	२००१	एकूण	२०,८०,२८५	१०,७५,२५७	१०,०५,०२८
			ग्रामीण	१५,९०,०२४	८,१९,४१३	७,७०,६११
			नागरी	४,९०,२६१	२,५५,८४४	२,३४,४१७
२	हिंदू	२००१	एकूण	१७,००,६७९	८,७९,३६२	८,२१,३१७
			ग्रामीण	१३,७६,८७९	७,१०,१९४	८,६६,६८५
			नागरी	३,२३,८००	१,६९,१६८	१,५४,६३२
३	मुसलमान	२००१	एकूण	२,९२,९९८	१,५०,९५९	१,४२,०३७
			ग्रामीण	१,६३,१६४	८३,२७८	७९,८८८
			नागरी	१,२९,८३२	६७,६८१	६२,१५१
४	ईसाई (ख्रिश्चन)	२००१	एकूण	१,४९४	७७३	७२१
			ग्रामीण	६५८	३३४	३२४
			नागरी	८३६	४३९	३९७
५	शीख	२००१	एकूण	१,४३५	७९९	८३६
			ग्रामीण	९२०	५२६	३९४
			नागरी	५१५	२७३	२४२
६	बौध्द	२००१	एकूण	७४,३५१	३८,४५३	३५,८९८
			ग्रामीण	४३,४७२	२२,४८८	२०,९८४
			नागरी	३०,८७९	१५,९८५	१४,९१४
७	जैन	२००१	एकूण	६,१२३	३,२४८	२,८७५
			ग्रामीण	२,८०६	१,५०२	१,३०४
			नागरी	३,३१७	१,७४६	१,५७१
८	इतर	२००१	एकूण	८७३	४६५	४०८
			ग्रामीण	२२७	१२१	१०६
			नागरी	६४६	३४४	३०२
९	धर्म न सांगणारे	२००१	एकूण	२,३३४	१,१९८	१,१३६
			ग्रामीण	१,८९८	९७०	९२८
			नागरी	४३६	२२८	२०८

* आधार : **सेंसस ऑफ इंडिया, १९९१ धर्म, सारणी** ग- ९ पृष्ठ २८१.

अनुक्रमणिका

मागासवर्गीय जाती-जमाती :— २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील मागासवर्गीय जाती व जमातींची लोकसंख्या ४,५२,०८७ होती. २००१ ची आकडेवारी खाली दिली आहे.

प्रकार	वर्षे	एकूण	ग्रामीण	नागरी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
अनुसूचित जाती	२००१	४०४,२५१	३२५,२९८	७८,९५३
अनुसूचित जमाती	२००१	४७,८३६	४०,६५४	७,१८२

जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींचे २००१ च्या जनगणनेनुसार
निवास स्थळ व स्त्री पुरुष प्रमाण

अ. क्र. (१)	जिल्हा (तालुका) (२)	निवास स्थळ (३)	स्त्री पुरुष (४)	एकूण लोकसंख्या (५)	अनुसूचित जाती (६)	अनुसूचित जमाती (७)
	लातूर जिल्हा	एकूण	व्यक्ती	१,५९०,०२४	३२५,२९८	४०,६५४
			पुरुष	८११,४१३	१६७,५४२	२१,०६०
			स्त्रिया	७७०,६११	१५७,७५६	१९,५९४
		ग्रामीण	व्यक्ती	४९०,२६१	७८,९५३	७,१८२
			पुरुष	२५५,८४४	४०,६९१	३,७२९
			स्त्रिया	२३४,४१७	३८,२६२	३,४५३
		नागरी	व्यक्ती	५४२,४१४	९६,१८१	९,०१६
			पुरुष	२८२,३२९	४९,७०९	४,७६६
			स्त्रिया	२६०,०८५	४६,४७२	४,२५०
१	तालुका लातूर	एकूण	व्यक्ती	२४२,४२९	४८,७१७	४,५७५
			पुरुष	१२५,७८२	२५,१८९	२,४४५
			स्त्रिया	११६,६४७	२३,५२८	२,१३०
		ग्रामीण	व्यक्ती	२९९,९८५	४७,४६४	४,४४१
			पुरुष	१५६,५४७	२४,५२०	२,३२१
			स्त्रिया	१४३,४३८	२२,९४४	२,१२०
		नागरी	व्यक्ती	१२२,१९२	२१,१९९	२,१०९
			पुरुष	६३,०००	१०,८८९	१,०९७
			स्त्रिया	५९,१९२	१०,३१०	१,०१२
२	तालुका रेणापूर	एकूण	व्यक्ती	१२२,१९२	२१,१९९	२,९०९
			पुरुष	६३,०००	१०,८८९	१,०९७
			स्त्रिया	५९,१९२	१०,३१०	१,०१२
		ग्रामीण	व्यक्ती	१२२,१९२	२१,१९९	२,९०९
			पुरुष	६३,०००	१०,८८९	१,०९७
			स्त्रिया	५९,१९२	१०,३१०	१,०१२
		नागरी	व्यक्ती	०	०	०
			पुरुष	०	०	०
			स्त्रिया	०	०	०
३	तालुका अहमदपूर	एकूण	व्यक्ती	१९९,०५३	३९,८१२	४,८१९
			पुरुष	१०३,१७१	२०,५५४	२,५०२
			स्त्रिया	९५,८८२	१९,२५८	२,३१७
		ग्रामीण	व्यक्ती	१६३,२४८	३४,६३९	४,४३८
			पुरुष	८४,३१९	१७,८८३	२,३१९
			स्त्रिया	७८,९२९	१६,७५६	२,११९
		नागरी	व्यक्ती	३५,८०५	५,१७३	३८१
			पुरुष	१८,८५२	२,६७१	१८३
			स्त्रिया	९६,९५३	२,५०२	१९८

अनुक्रमणिका

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
४	तालुका जळकोट	एकूण	व्यक्ती	६९,१९८	१७,९४७	१,६०१
			पुरुष	३५,५८१	९,२३१	८३३
			स्त्रिया	३३,६१७	८,७१६	७६८
		ग्रामीण	व्यक्ती	६०,१९८	१७,९४७	१,६०१
			पुरुष	३५,५८१	९,२३१	८३३
			स्त्रिया	३३,६१७	८,७१६	७६८
		नागरी	व्यक्ती	०	०	०
			पुरुष	०	०	०
			स्त्रिया	०	०	०
५	तालुका चाकूर	एकूण	व्यक्ती	१५७,१३५	३२,२०९	३,९१८
			पुरुष	८१,१२३	१६,६४०	२,१०९
			स्त्रिया	७६,०१२	१५,५६९	१,८९९
		ग्रामीण	व्यक्ती	१५७,१३५	३२,२०९	३,९१८
			पुरुष	८१,१२३	१६,६४०	२,०१९
			स्त्रिया	७६,०१२	१५,५६९	१,८९९
		नागरी	व्यक्ती	०	०	०
			पुरुष	०	०	०
			स्त्रिया	०	०	०
६	तालुका शिरूर-अनंतपाळ	एकूण	व्यक्ती	७४,०८१	१८,४०५	२,८२५
			पुरुष	३८,२२०	९,५२२	१,४०२
			स्त्रिया	३५,८६१	८,८८३	१,४२३
		ग्रामीण	व्यक्ती	७४,०८१	१८,४०५	२,८२५
			पुरुष	३८,२२०	९,५२२	१,४०२
			स्त्रिया	३५,८६१	८,८८३	१,४२३
		नागरी	व्यक्ती	०	०	०
			पुरुष	०	०	०
			स्त्रिया	०	०	०
७	तालुका औसा	एकूण	व्यक्ती	२८०,२४०	४६,४०१	३,५०७
			पुरुष	१४४,३४६	२३,८५१	१,८५०
			स्त्रिया	१३५,८९४	२२,५५०	१,६५७
		ग्रामीण	व्यक्ती	२४९,३६४	४२,८७५	३,३२८
			पुरुष	९२८,४९३	२२,०५५	१,७५१
			स्त्रिया	१२०,८७१	२०,८२०	१,५७७
		नागरी	व्यक्ती	३०,८७६	३,५२६	१७९
			पुरुष	१५,८५३	१,७९६	९९
			स्त्रिया	१५,०२३	१,७३०	८०
८	तालुका निलंगा	एकूण	व्यक्ती	२६८,०८९	३,५२६	१७९
			पुरुष	१४६,७२४	१,७९६	९९
			स्त्रिया	१३९,३६५	१,७३०	८०
		ग्रामीण	व्यक्ती	२५४,४२७	४६,७२२	९,८४२
			पुरुष	१३०,२८०	२३,८६२	५,१९६
			स्त्रिया	१२४,१४७	२२,८६०	४,७२६
		नागरी	व्यक्ती	३१,६६२	६,०२८	५६१
			पुरुष	१६,४४०	३,१३०	२९७
			स्त्रिया	१५,२१८	२,८९८	२७४

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
९	तालुका देवणी	एकूण	व्यक्ती	८८,३६२	१८,१४७	३,४३५
			पुरुष	४५,१८६	९,३६३	१,७१२
			स्त्रिया	४३,१७६	८,७८४	१,७२३
		ग्रामीण	व्यक्ती	८८,३६२	१८,१४७	३,४३५
			पुरुष	४५,१८६	९,३६३	१,७१२
			स्त्रिया	४३,१७६	८,७८४	१,७२३
		नागरी	व्यक्ती	०	०	०
			पुरुष	०	०	०
			स्त्रिया	०	०	०
१०	तालुका उदगीर	एकूण	व्यक्ती	२६१,५२१	६१,२००	६,२०३
			पुरुष	१३५,५७७	३१,४८२	३,२०५
			स्त्रिया	१२५,९४४	२९,७१८	२,९९८
		ग्रामीण	व्यक्ती	१६९,५८८	४४,४३८	४,५८३
			पुरुष	८७,४२९	२२,९०८	२,३६६
			स्त्रिया	८२,१५९	२१,५३०	२,२१७
		नागरी	व्यक्ती	९१,९३३	१६,७६२	१,६२०
			पुरुष	४८,१४८	८,५७४	८३९
			स्त्रिया	४३,७८५	८,१८८	७८१

जिल्ह्यातील, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींचे २००१ च्या जनगणनेनुसार प्रमुख शहरांचे स्त्री पुरुष प्रमाण.*

क्रमांक	शहर जिल्हा तालुका	निवास स्थळ	स्त्री-पुरुष	एकूण लोकसंख्या	अनुसूचित जाती	अनुसूचित जमाती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१	लातूर (शहर)	नागरी	व्यक्ती	२९९,९९५	४७,४६४	४,४४१
			पुरुष	१५६,५४७	२४,५२०	२,३२१
			स्त्रिया	१४३,४३८	२२,९४४	२,१२०
२	अहमदपूर	नागरी	व्यक्ती	३५,८०५	५,१७३	३८१
			पुरुष	१८,८५२	२,६७१	१८३
			स्त्रिया	१६,९५३	२,५०२	१९८
३	उदगीर	नागरी	व्यक्ती	९१,९३३	१६,७६२	१,६२०
			पुरुष	४८,१४८	८,५७४	८३९
			स्त्रिया	४३,७८५	८,१८८	७८१
४	औसा	नागरी	व्यक्ती	३०,८७६	३,५२६	१७९
			पुरुष	१५,८५३	१,७९६	९९
			स्त्रिया	१५,०२३	१,७२०	८०
५	निलंगा	नागरी	व्यक्ती	३१,६६२	६,०२८	५६१
			पुरुष	१६,४४४	३,१३०	२८७
			स्त्रिया	१५,२१८	२,८९८	२७४

* आधार : **सेंसस ऑफ इंडिया २००१,** सिरीज-२८ महाराष्ट्र, फायनल टोटल पाप्युलेशन पृ. ११३-१४.

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazetteers

घरे : गेल्या शंभर वर्षांत घरांची रचना व बांधणी यात पुष्कळच फरक पडला आहे. सामाजिक चालिरिती, सांपत्तिक परिस्थिती, सुरक्षिततेच्या व आरोग्यविषयक कल्पना तसेच गृहरचनेसाठी उपलब्ध होणारी सुधारलेली सामग्री इत्यादी गोष्टीमुळे हे फरक आले आहेत.

ग्रामीण भागातील घरे व्यवस्थित योजनाबध्द नसतात. जुन्या पद्धतीचे वाडे मुख्यत्वे दिसून येतात. वाड्यात ओटी, पडवी, माजघर, स्वयंपाकघर, देवघर, स्नानगृह, शौचालय, झोपण्याच्या खोल्या इत्यादी बाबी दिसून येतात. गुरांचा गोठा मागील बाजुस, तसेच परसात फुलझाडे, घरासमोर तुळसी वृंदावन आढळतात. घरास मोठ्या आकाराचे दरवाजे व खिडक्या असतात. बहुतेक घरे ही चिखल व दगडविटांपासून बांधलेली आहेत. आर्थिक परिस्थितीनुसार बांधलेली घरे ही विटा, चुना, फरशी, लोखंड इत्यादींचा वापर करून बांधलेली आहेत. धाब्यांच्या घरांचे प्रमाण बरेच आढळते. या घरांची छपरे मजबुत तुळ्यांवर मातीचा पेंडा घालून लिपून तयार करतात. सामान्य शेतकऱ्याचे घर असेच पण लहान असते. अगदी गरीब लोक झोपड्यातच राहतात. अलीकडे श्रीमंत लोकांचे बंगलेही आहेत. बांधकामात भाजलेल्या विटा वापरलेल्या असतात. शहरातून सिमेंटची अनेक मजल्यांची दोन अथवा चारपाच खोल्या असलेली घरे प्रचारात येत आहेत. मध्ययुगीन काळापासून प्रामुख्याने एक मोठी गढी, गावाला तटबंदी वेस अशी मोठ्या गावाची रचना आढळते. गढी हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. आज आधुनिक पध्दतीचे मोठाले आर.सी.सी. बंगलेपण गेल्या काही दशकात बांधले गेले आहेत.

अन्न : लातूर जिल्ह्यात सर्व लोकांचा मुख्य आहार म्हणजे ज्वारीची भाकरी, गहू व तांदूळ सुध्दा त्यांच्या आहारात असतो पण त्यांचे स्थान दुय्यम आहे. कडधान्यात तूर, हरभरा, मूग, मटकी, उडीद आणि वाल वापरात आहेत. करडई, भूईमूग आणि जवस यांचे तेल वापरतात. हिरव्या पालेभाज्यांमध्ये अळू, अंबाडी, चाकवत, कुका आणि मेथी तर फळभाज्यांमध्ये देवडांगर, भुईकोला, वाळूक आणि दुधीभोपळा इत्यादी वापरतात. मिरची, मिरी, कोथींबीर व लसूण वापरतात. ब्राह्मण, जैन, लिंगायत व काही मराठे परंपरेने शाकाहारी असतात. इतर सर्व मुख्यत: शाकाहारीच पण कधीमधी मांसाहार करतात.

आर्थिक परिस्थितीनुसार अन्नाचा दर्जा ठरत असतो. लातूर जिल्ह्यात दुधदुभत्याचे प्रमाण बरेच आढळते. जातीपरत्वे, ऐपतीप्रमाणे व सामाजिक प्रतिष्ठेप्रमाणे मेजवाण्यासारख्या प्रसंगी खास पक्वाने बनविली जातात. पुरणपोळी, लाप्सी, साखरभात, बासुंदी, श्रीखंड वगैरे पदार्थ विशेष प्रसंगी अथवा बड्या पाहुण्यांचे अतिथ्य करण्यासाठी करतात.

हिंदू दिवसातून दोन वेळा जेवण करतात. सकाळी आणि संध्याकाळी शहरातील लोक सकाळी चहा नास्ता व दुपारी जेवण करतात. सकाळच्या जेवणात ज्वारीची भाकरी असते. भाकरीबरोबर चटणी, लोणी, तुप असते. एकंदरित आहारात भाकरी, पोळी, वरण, भात, एक दोन भाज्या दुध लोणी इत्यादी पदार्थ असतात. शेतकरी, कारागीर या श्रमिक वर्गाच्या आहारात " चटणी " बहुतेक असते. लसूण मिरची आणि मीठ एकत्र वाटून तयार करतात. हे दिवसातून तीन वेळा जेवण करतात. सकाळी न्याहारी करतात. त्यावेळेस भाकरीबरोबर चटणी खातात. दुपारी भाकरीबरोबर एखादी भाजी तर संध्याकाळी भाकरी, भात, भाजी, दुध, दही इत्यादी आहार असतो. कधी-कधी अंडे, मटण, कोंबडीचे मटण, आणि मासे यांचा आहार असतो.

मुस्लीमांना दररोज मांसाहार चालतो. परंतु दररोज मांसाहार त्यांना परवडत नाही. श्रीमंत मुस्लीम दिवसातून तीन वेळा जेवण करतात. सकाळी नास्ताबरोबर चहा, कॉफी व इतर पदार्थ घेतात. दुपारी, पाव, चपाती, खिमा, भात, भाजी, चहा, सरबत इत्यादी आहार असतो. संध्याकाळी ज्वारीची भाकरी, भात खिचडी, मटण फुलाव आणि मटण कढी इत्यादींचा समावेश असतो. मध्यमवर्गीय मुसलमानात सकाळी नास्ताबरोबर चहा बिस्कीट तर दुपारी ज्वारीची भाकरी, पोळी, मटण, भाजी, मलई इत्यादी. संध्याकाळच्या जेवणात ज्वारीची भाकरी, मटण, भाजी कढी, डाळ, भात, डाळकढी व पुलाव इत्यादी आहार असतो. मुस्लीमात गरीब वा श्रीमंत लोकजेवण म्हणून " बिर्याणी ", " जर्दा ", " पुलाव ", " बिस्मिला " आणि " अकिका " चा आहार असतो.

पोषाख : जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात पेहरावाच्या बाबतीत फारसा फरक आढळत नाही. परंतु आर्थिक परिस्थितीनुसार शहरी भागात नवनवीन भूषाप्रकार दिसून येतात.

लहान मुलांचा पोषाख : लहान अर्भकांसाठी लंगोट, टोपरे, कुंची, आंगडे (झबले) हे पारंपारिक कपडे वापरतात. दोन किंवा तीन वर्षाच्या मुलींसाठी बंडी, पेटी, सदरा शर्ट वापरतात. त्याच्याहून मोठ्यास चड्डी, तुमन, कोलना घालतात. सात वर्षाच्या वरील मुलीस परकर, चड्डी, पोलका, फ्रॉक आणि जांग इत्यादी प्रकारचे कपडे तर चौदा वर्षाच्या मुर्लीना साडी आणि चोळी व मुलांना मुख्यत्वे शर्ट, पँट, धोतर, पायजमा इत्यादी प्रकारचे पोषाख वापरतात.

पुरुषांचा पोषाख : ग्रामीण भागातील पुरुष (प्रौढ) अजुनही धोतर वापरतात. उच्चभ्रू वर्गातील ब्राह्मण व मराठी बोलणारे लोक धोतर दुमडून निटनेटकेपणाने नेसतात. हिंदूंमध्ये वरच्या वर्गात धोतराबरोबर सदरा (पैरण) घालतात. मराठा जातीत तुमन (लेहंगा) किंवा सफेद पैरण वापरतात. याशिवाय कोट, सदरा, डोक्यावर टोपी किंवा रुमाल बांधतात. समारंभाच्या वेळी नेहरू शर्ट, झब्बा व गांधी टोपी इत्यादी कपडेही वापरतात. अलिकडील काळात शहरी भागात पोषाखात बराच बदल झालेला आढळतो. त्या बदलात कोट, नेक टॉय, बुट आणि पायमोजे इत्यादी बदल दिसून येतो.

स्त्रियांचा पोषाख : जिल्ह्यातील बहुतेक स्त्रियांचा पोषाख पारंपारिक पद्धतीचा दिसून येतो. त्या आठवारी व नऊवारी साड्या नेसतात. ग्रामीण भागातील स्त्रिया जाडीभरडी लुगडी नेसतात. लुगड्याच्या पदराला भरतकाम केलेले असते तो पदर डोक्यावरून घेतात. शहरी भागावरील मुली ह्या परकर, झंपर, पोलका, व अंगात घट्ट चोळी घालतात. याशिवाय लहान बाह्यांचा झंपर व नवीन पध्दतीचे गोल गळ्यांचे ब्लाऊज वापरतात. शहरातील सुशिक्षित मुली पंजाबी ड्रेस, जीन्स पॅन्ट व सलवार कमीज असेही वेष परिधान करतात. पेहरावात विशेषत: तरुण वर्गाच्या नवनवीन फॅशनचा प्रभाव जाणवतो.

दागदागिने (अलंकार) : जिल्ह्यात बहुतेक सर्व समाजात अलंकार वापरण्याची प्रथा आढळून येते. प्रत्येक समाजातील अलंकरणाच्या पध्दती वेगवेगळ्या आहेत. त्यातही महिला, पुरुष व मुले यांचे अलंकार भिन्न भिन्न प्रकारचे आढळतात. हे अलंकार डोके, कान, नाक, गळा, बाहू, मनगट, अंगुली, कमर, पाय आणि पायाचे बोट इत्यादी शरीराच्या विविध भागांवर घातले जातात. समारंभाच्या वेळी विविध प्रकारचे अलंकार वापरतात. परंतु असे दिसून येईल की प्राचीन समाजात ज्या प्रकारचे दागिने (अलंकार) वापरत होते त्यात आणि आज बराचसा बदल झालेला आहे. पुर्वी संपत्तीवरून त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्जा ठरत होता. एक फॅशन म्हणून दागिने (अलंकार) वापरत नाही तर एक वैभवाचा भाग म्हणून वापरतात. पुरुष गळ्यात कांथी (गोप), हातात सोन्याची चांदीची, तांबे, पितळे यांच्या अंगठ्या वापरतात. श्रीमंत कुटुंबातील मुलांसाठी गळ्यात साखळी किंवा सारपोली वापरतात.

अनुक्रमणिका

स्त्रिया आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार सोन्याचे व चांदीचे दागिने वापरतात. पायात वाळे, साखळी, पैजण, गळ्यात बोरमाळ, पुतळ्यांची माळ, मोहेरांची माळ, सरी आणि गळेसार, नाकात नथ, कानात कर्णफूल (कुड्या) व बोटात अंगठी घालतात. जुने झालेले दागिने सोनाराकडे नेऊन त्याचा आकार बदलवून नवीन दागिने बनवून घेतात. त्यात केसांमध्ये लावावयाचे अलंकार, रत्नखचित साडीपीन, फुलेन, मूद अग्रफूल, बिंदी, बिजोर, नागगोडे इत्यादी, स्त्रियांचा महत्त्वाचा दागिना (अलंकार) म्हणजे मंगळसूत्र होय, मंगळसुत्राबरोबर काळे मनीही वापरतात. स्त्रियांच्या गळ्यातील दागिन्यात प्रामुख्याने सोन्याची चैन, चंद्रहार, एकदानी, कोल्हापूरी साज, मोहनमाळ, चपलाहार, बकुळीहार, पोहेहार इत्यादी. या अलंकाराव्यतिरिक्त स्त्रिया अलंकार वापरतात त्यात गोठ, पाटल्या, बांगड्या, Vankya बाजुबंद इत्यादी दागदागिने वापरतात. आता नवीन बंगाली कलाकुसराची दागिणेपण लोकप्रिय होत आहेत.

धार्मिक प्रथा

वैज्ञानिक प्रगती, पाश्चिमात्य शिक्षण आणि आधुनिक दृष्टिकोनामुळे पूर्वीच्या रूढी व धार्मिक प्रथांमध्ये परिवर्तन झालेले आहे. तथापि धार्मिक संस्कार सर्वस्वी नाहिसे होणे शक्य नाही. हिंदू धर्मशास्त्रानुसार १६ नित्य व २४ नैमित्तिक संस्कार विहित केलेले आहेत. नैमित्तिक संस्कार बहुतांशी नामशेष होण्याच्या मार्गावर असले तरी नित्य संस्कारापैकी नामकरण, कर्णवेध, उपनयन उर्फ मुंज, विवाह आणि अंत्यविधी हेच संस्कार प्रचलित आहेत. जन्म मृत्यू आणि स्त्रियांच्या बाबतीत गरोदरपणाचे काही विधी तेवढे अजून करण्यात येतात.

उपनयन (मुंज) : उपनयन, व्रतबंध व मौजीबंधन अशी तीन नावे सामान्य व्यवहारात या संस्काराला मुंज असे म्हणतात. अशा प्रकारचा पवित्र संस्कार ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनाच फक्त हा संस्कार विहित समजला जात असे. धर्मशास्त्रानुसार बालक आठ, दहा अथवा बारा वर्षाचे झाल्यावर त्याला गुरूगृही विद्याध्ययनासाठी पाठविण्याचा हा दीक्षा समारंभ आहे. विद्यमान काळात तो फक्त इष्टमित्रांना बोलावून मेजवाणी देण्याचा हौसेचा प्रकार म्हणून ठरला आहे. आता पाच वर्षांची मुले प्राथमिक शाळेत जातात व त्यापुर्वी बालवाडी वर्गात शिकू लागतात. तरीही नाममात्र संस्कार ब्राह्मणादी पांढरपेशा जातीत तो अजून रूढ आहे.

मुंजीच्या वेळी विवाहासाठी घालतात तसा मंडप घालतात. इष्टमित्रांना निमंत्रणे जातात. आप्तेष्ट मुलाला व त्याच्या मातापितरांना गडगनेर अथवा केळवण करतात. मुलाची पत्रिका पाहून मुहूर्त ठरतो. अक्षता देण्यात येते. घाणी, पुण्यहवाचन, नांदीश्राध्दघटिकापात्र घंगाळत घालून ठेवणे हे सर्व विधी होतात. मुलाला व त्याच्या आईला अभ्यंगस्नान घालतात. मुलाचे केस सभारंभपुर्वक कापतात. मातृभोजनाचा सोहळा मोठा हौसेचा प्रकार समजला जातो. मुहूर्त जवळ आला म्हणजे सर्व निमंत्रित मंडपात जमतात. मुलगा व बाप यांच्यामध्ये अंतरपाट धरला जातो. ब्राह्मण मंगलाष्टके म्हणतात. निमंत्रित मंगलाक्षता टाकतात. मुहूर्ताच्या बरोबर अंतरपाट काढल्यावर मुलगा बापाच्या पायावर डोके ठेवतो आणि तो त्याला उचलून आपल्या मांडीवर बसवतो. मंगल वाद्यांचा गजर सुरू असतो. निमंत्रितांना पान-सुपारी, अत्तर, गुलाब देतात. अलिकडे या प्रसंगी मुलाला काही भेटवस्तू निमंत्रितांना द्यावी अशी प्रथा सुरू झाली आहे.

यानंतर उपनयनाच्या खऱ्या धार्मिक विधीस प्रारंभ होतो. मुलगा बापाच्या डाव्या बाजूस बसतो. बापासमोर स्थंडिल तयार करून त्यावर दर्भ पसरून होमाची तयारी होते. पुरोहित तेल हळदीत बुडविलेल्या एका दोरीत मृगजीनाचा एक तुकडा गोवून त्याच्या गळ्यात अडकवितो. तूप, तिळ व सात प्रकारच्या समिधा

होमामध्ये टाकण्यात येतात. मुलाला होम व आपला बाप याच्यामधून जायला सांगून त्रिवार आचमन करायला लावून तो मुलगा बापाच्या उजव्या बाजुला पायावर असतो. मग उभा राहून आचार्यांना वंदन करून ब्रह्मचर्याश्रमाची दिक्षा देण्याला विनवितो. आचार्य त्याची विनंती त्याला यज्ञोपविस व पलाशवृक्षाची काठी देऊन मान्य करतात. त्याला सूर्यदर्शन करवून गायत्रीमंत्र शिकविण्यात येतो व विद्यार्जन कसे करायचे याबद्दल सूचना देण्यात येतात. अग्नि, सूर्य व इंद्र यांची प्रार्थना करून विद्यातेज व बल यांची मागणी बटू करतो. मेधाजतन म्हणजे बौध्दिक व मानसिक सामर्थ्य बटूच्या ठायी उत्पन्न व्हावा म्हणून करण्याचा शेवटचा धार्मिक विधी या संस्कारात करतात. गुरुगृही बारा वर्षे राहून विद्याभ्यास संपवून गृहस्थाश्रमाची दीक्षा घेण्यासाठी करण्याचा जो विधी असे त्याला समावर्तन असे म्हणतात. पण हल्ली तो उपनयनानंतर एक-दोन दिवसातच उरकून घेतात. सामान्य परिभाषेत त्याला " सोडमुंज " असे म्हणतात. ती झाल्यावर त्याला नवा पोषाख, छत्री व जोडा देण्यात येतो व काशीयात्रेला निघाल्याचा तो बहाणा करतो. पण पुरोहित अथवा त्याचा मामा त्याला आपली मुलगी देण्याचे आश्वासन देऊन काशियात्रेला जाण्यापासून परावृत्त करण्याचे नाटक करतात. मग तो घरीच राहतो.

विवाह : हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे विवाह हा अत्यंत महत्त्वाचा पवित्र व मानव वंशवृध्दीसाठी आवश्यक असा संस्कार आहे. या शास्त्राप्रमाणे विवाहाचा विच्छेद होऊ शकत नाही. त्यामुळे असे म्हणता येईल की विवाह हा स्त्री-पुरुष यांच्यात घालून दिलेले अपरिहार्य व पवित्र बंधन आहे. विवाहामध्ये गोत्रप्रवर अथवा कुळी देवकाचा विचार महत्त्वाचा मानला जात असे. पूर्वी आंतरजातीय विवाह होत नव्हते. तथापि आता जातिभेदाची तीव्रता कमी झाल्यामुळे आंतरजातीय विवाह होऊ लागले आहेत. पूर्वी विवाह समारंभ मोठ्या थाटात आणि चार ते आठ दिवस चालत असे. आता मात्र आटोपशीर व आल्पकालीन झाला असून त्यात फक्त आवश्यक धार्मिक संस्कारच करतात. नोंदणी पध्दतीने विवाह करणे अजुन फारसे रूढ झाले नाही. जिल्ह्यात आजही डामडौलात लग्नविधी करण्याची प्रवृत्ती आढळते.

हिंदुधर्मशास्त्रानुसार लग्नविधी समीप आल्यावर श्रीगणेशाच्या साक्षीने पत्रिकापूजन होते. त्यावेळेस पुरोहित वधू व वराचे नाव एका कागदावर लिहून बंधन जोडतो. त्याचवेळेस इष्ट मित्रांना निमंत्रण देऊन बोलावतात या समारंभाला " अक्षत " म्हणतात. लग्नाच्या आदल्या दिवशी " घाणा " नावाचा विधी करतात. त्यात प्रामुख्याने विवाहीत स्त्रियांचाच सहभाग असतो. हळद, गहू व सुपारी या वस्तू घेऊन त्यांच्या दोन राशी करतात. नंतर गणेश व सरस्वती या देवतांची पुजा करतात. विवाहीत स्त्रिया सामुहिक रितीने मिळून एका बांबुच्या टोपलीत हळद, गहू, सुपारी, तांदूळ, रुई इत्यादी वस्तू कापडात गुंडाळून घेऊन मुसळाने कांडतात. पुढे विवाहित जोडप्याने आयुष्यभर हे धर्माचरण करायचे असते त्याचे प्रतिक म्हणजेच हा घाणा नावाचा विधी असतो. विवाहाचा धार्मिक विधीसी काही संबंध नसलेला दुसरा कार्यक्रम म्हणजे हळद व तेलवण समारंभ. काही सुवासिनी स्त्रिया वाजतगाजत आपल्याबरोबर ओली हळद, सुवासिक तेल व साडी-चोळी बरोबर घेऊन वधूच्या घरी जातात. तिला तेलहळद लावून गरम पाण्याने स्नान घालतात. नवीन हिरवी साडी चोळी नेसवितात व उरलेली तेलहळद वराच्या घरी आणून त्याच्या अंगाला चोळून त्याला स्नान घालतात. वधुपिता वरास नवे कपडे देतो आणि नंतर तो वाजतगाजत मिरवणूकीने वधूगृही विवाह समारंभासाठी जातो.

लग्नसमयी इतर धार्मिक विधी बरोबर विवाहास मंडपप्रतिष्ठा, देवकप्रतिष्ठा, गणेशपुजन, पुण्याहवाचन, नांदीश्राध्द आणि गृहमुख इत्यादी विधी होतात. गोमुत्राने सर्वत्र सडासंमार्जन व रांगोळी घालण्यात येते. देवकप्रतिष्ठेकरिता दोन्ही घरी आवश्यक उपचार केले जातात. त्याप्रसंगी वंशवृध्दीसाठी व देवपितरांचे ऋण

फेडण्याकरिता प्रस्तृत विवाह योजिलेला आहे अशी प्रतिज्ञा घेण्यात येते. विवाहसमारंभ निर्विघ्न पार पडावा म्हणून गणपती, कुलदेवता आणि नवग्रह यांची प्रार्थना करण्यात येते. नातेवाईक व इष्टमित्र वधू-वरांना विवाहापूर्वी मेजवान्या देतात, त्यांना "गडगनेर" अथवा "केळवण" म्हणतात. विवाह ठरला हे औपचारिकपणे जाहीर करण्याचा "वाड्.निश्चय", म्हणून होणारा विधी वधूच्या घरी होतो, त्यास वाड्.निश्चय असे म्हणतात. वधूवरपिते उभयपक्षांच्या नावाचा व गोत्रप्रवरांचा उच्चार करून तसे जाहीरपणे बोलतात. वधूस नवीन वस्त्रालंकार घालून सर्वांच्या समोर तिच्या पित्याजवळ व नंतर वराच्या पित्याजवळ बसवितात. वधूस एक नारळ व विड्याचे पान देऊन तीन वेळा जाहीर करतात की माझ्या मुलास मुलगी देण्यास अनुमती घेतात. त्यानंतर पानसुपारी वाटल्यावर हा वाड्.निश्चय विधी संपतो. विवाहपूर्वी वराला मिरवणूकीने वाजतगाजत मुंडावळ्या बांधून वधूगृही आणण्यापूर्वी वधूपिता स्वागतासाठी इष्टमित्रांसह सिमेवर तयार राहतो. सिमेवर करावयाचा विधी म्हणून त्यास सीमांतपूजन असे म्हणतात. मंडपाच्या व्दाराशी वधूची आई व इतर स्त्रिया वराच्या पायावर पाणी व हळद घालून त्याला समारंभपूर्वक बोहल्यापाशी घेऊन जातात. विवाह मुहूर्त जवळ आलेला असतो व उपाध्याय घटिकापात्राकडे नजर लावुन बसलेले असतात वधु गौरीहराची पुजा करून पतीला दिर्घायुष्य द्यावे म्हणून प्रार्थना करीत असते.

मुहूर्ताला थोडा अवधी असतांना वधुवरांना स्वास्तिकचिन्ह काढून तांदळाच्या राशी केलेल्या पाटावर उभे करण्यात येते व त्या दोघांमध्ये अंतरपाट धरला जातो. स्वास्तिवाचक मंगलाष्टकांचे पठण उपाध्याय व इतर मंडळी सुरू करतात. वधूवरांवर अक्षता टाकून त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात येते. मुहूर्त धरून घटिका पाण्यात बुडताच अंतरपाट काढून घेऊन उपाध्याय टाळी वाजवितात व मंगलवाद्यांचा गजर सुरू होतो. वधू-वर एकमेकास पुण्यमाला व लग्न लागले असे मानतात. यानंतर केला जाणारा विधी म्हणजे "मधुपर्क" होय. वरपुजनाचा हा खास प्रकार आहे. वधूचे मातापिता दोन पाटावर अधिष्ठित होऊन समोर चौरंगावर वराला बसवून त्याचे पादप्रक्षालन करतात. वधूपिता त्याला पुष्पे अर्पण करून त्याच्या हातावर पळीभर मद्य व दही घालतो. वर ते प्राशन करतो. नंतर वधूवरांचे हात एकमेकात घालून त्यावर जलप्रक्षालन करण्यात येते. व त्याच्याबरोबर काही सुवर्णमुद्रा अथवा चांदीची नाणी घालण्यात येतात. या विधीला "कन्यादान" असे म्हणतात. हा विधी हिंदू गृहस्थाश्रमी लोकांच्या दृष्टीने मोठा पुण्यकारक मानला जातो. यानंतर वराला नवीन वस्त्रालंकार व इतर नजराणा देण्यात येतो. वर वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधतो. गणेशपुजनानंतर ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्यात येते. "सप्तपदी" पाणिग्रहण व "कंकणबंधन", हे विधी यानंतर पाठोपाठ करतात. ध्रुवताऱ्यांचे दर्शन पुरोहित वधूवरांना करवितात. तेव्हा त्यांचे हात एकमेकांत गुंफलेले असतात. परस्परांशी त्यांनी अचल ध्रुवताऱ्याप्रमाणे एकनिष्ठ राहावे असा संकेत त्यात अभिप्रेत आहे.

विवाह झाल्यावर वर वधूस आपल्या स्वगृही घेऊन गेल्यानंतर केला जाणारा विधी म्हणजे "वरात" होय. समवयस्क स्त्रिया नवीन सुनेच्या तोंडात साखर घालून तीचे तोंड बघतात. वरातीनंतर वधूचे म्हणजे नव्या सुनबाईचे स्वागत सासूबाई तिच्या अंगावर नवे अलंकार व वस्त्रप्रावरणे घालून करते. विवाह संस्कारातील शेवटचा विधी म्हणजे "देवकोत्थापन", त्यावेळेस ब्राह्मणांना दक्षिणा व उपस्थितांना जेवण देतात.

पूर्वी बरेच दिवस रेंगाळणारे विवाहविधी आता बहुधा एका दिवसात संक्षिप्तपणे संपविण्यात येतात. सोळा संस्कारापैकी विवाह हाच आता ठळकपणे पाळण्यात येतो. बाकी सर्वांचा, उपनयनाचा देखील संक्षेप झाला आहे. त्यांचे महत्त्व फारसे कोणी मानीत नाही.

अनुक्रमणिका

अंत्य संस्कार : हिंदूमध्ये प्रेत दहन करण्याचीच मुख्यत: वहिवाट आहे. परंतु आठ वर्षाखालील मृतांचे मात्र दफन होते. मरणोन्मुख झालेला माणुस जर शुध्दीवर असेल तर तो रामनाम घेत राहतो अथवा त्या - त्या दुसऱ्या कोणत्या उपास्य दैवतेचे स्मरण करतो. तो शुध्दीवर नसेल तर त्याच्यासाठी इतर लोक असे करतात. मरणकाल अगदी समीप आल्यावर त्याचे शिर त्याचा वडील मुलगा अथवा त्याची पत्नी आपल्या मांडीवर घेते. गंगाजल व तुलसीजल मुखात घालण्यात येते. सुवर्ण व मौक्तिकही मुखात घालण्याचा प्रघात आहे. प्रेताला स्नान घालून ते तिरडीला घट्ट बांधतात व पांढरा कपडा सर्व अंग झाकेल असा टाकतात. फक्त तोंड उघडे ठेवतात. मृताचा मुलगा अथवा जवळचा आप्त प्रेतयात्रेच्या अग्रभागी हातात विस्तवाचे मडके धरुन चालतो. स्मशानात पोहचल्यावर चिता रचण्यात येऊन त्यावर प्रेत ठेवण्यात येते. (त्यासाठी लाकूड, चंदनाचे तुकडे, तुळशीची पाने व गोवऱ्या आदि साहित्य वापरतात.) त्यानंतर प्रेतास अग्नी देण्यात येतो. चितेभोवती तीन प्रदक्षिणा घालून मुलगा चितेच्या उत्तर टोकासी उभा राहतो. सर्वजन प्रेताची कवटी फुटून तसा आवाज होईपर्यंत बसून राहतात.

यानंतर प्रेतयात्रेत सहभागी झालेले सर्व लोक घरी परत येतात. जेथे मृत व्यक्तिला मरण आलेले असते तेथे एक दिवा लावून ठेवतात. तिसऱ्या दिवशी मुलगा व त्याचे इष्टमित्र स्मशानात जाऊन रक्षा व अस्थि गोळा करून आणतात व शक्यतो गोदावरी नदीत किंवा पवित्र स्थळी विसर्जित करतात. दहाव्या दिवशी मुलगा क्षौर करतो. त्यानंतर स्मशानातून मृताचा प्रतिनिधी म्हणून जो आम (दगड) आणलेला असतो त्यावर पंचगव्य त्याला पिंडदान करतात. अकराव्या दिवशी पंचगव्य घेऊन सर्व नातेवाईक शुध्द होतात. नवीन यज्ञोपवीते धारण करण्यात येतात, व बाराव्या दिवशी सपिंड श्राध्द नावाचा विधी होतो. त्यानंतर मृत व्यक्ति आपले वडील व आजोबा यांच्या समवेत पितृत्रयीत सामील होते. तेराव्या दिवशी उत्तरक्रिया होते. तेव्हा सर्व नातलग व इष्टमित्रांना भोजनासाठी निमंत्रित करण्यात येते. यानंतर ज्या दिवशी मृत व्यक्ति निधन पावली असेल त्या दिवशी पुढे दरवर्षी श्राध्द करण्याची प्रथा आहे.

सण व उत्सव

हिंदूमध्ये सण व उत्सव आणि उपवास हे प्रतिवर्षी येणारे असून त्यात कुठल्याही प्रकारचा बदल होत नाही.

गुढी पाडवा : नववर्षाच्या सुरुवातीस शालिवाहन शक पाळणाऱ्या हिंदूच्या दृष्टीने गुढीपाडवा हीच वर्षे प्रतिपदा होय. चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील हा पहिला दिवस. प्रत्येक घरी "गुढी" म्हणजे सजवलेली एक बांबुची काठी उभारली जाते आणि तिची पुजा करून तिला बहुधा पुरुणपोळीचा अथवा इतर पक्वानांचा नैवेद्य दाखविला जातो. काठीच्या टोकाला एखादे रेशमी अथवा जरीचे वस्त्र बांधून त्यावर भांडे ठेवतात. यास गुढी उभारणे असे म्हणतात. चैत्र शुध्द प्रतिपदा या शानिवाहन शकाच्या नववर्षे दिनी रामाने चौदा वर्षे वनवास आणि लंका-विजयानंतर याच दिवशी अयोध्येत प्रवेश केला अशी कथा रूढ आहे. याच दिवशी ब्रह्मदेवाने जग निर्मिती केली अशीही समजूत आहे. या शुभ दिवशी नवीन कामाचा आरंभ करतात. वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक शुभमुहूर्त मानला जातो.

रामनवमी : चैत्र शुध्द नवमीला दुपारी १२ वाजता राममंदिरात रामजन्मोत्सव साजरा करतात. या दिवशी कित्येक लोक उपवास करतात. त्यावेळी रामाला पाळण्यात घालून कीर्तनकार आईची भूमिका बजावून त्याला झोके देतो. सर्व भक्तांना सुंठवडा व तीर्थप्रसाद देण्यात येतो. रात्रंदिवस भजन-कीर्तन चालते. प्रतिपदेपासून ते सुरू झालेले असते.

अनुक्रमणिका

हनुमान जयंती : चैत्र शुध्द पौर्णिमेला सुर्योदयाबरोबर हनुमानजयंती साजरी करतात.

बसव जयंती : वैशाख शुध्द व्दितीयेस लिंगायत लोक बसव जयंती साजरी करतात.

अक्षयतृतीया : अक्षयतृतीया ही वैशाख शुध्द तृतीयेस येत असून साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी यास अर्धा मुहूर्त समजतात. यादिवशी देवपूजन व पितृपूजन करण्यात येते. शेतकरी शेतीच्या कामाचा शुभारंभ या दिवशी करतात.

वटपौर्णिमा : जेष्ठ शुध्द पौर्णिमेस वटपौर्णिमा म्हणतात. हिंदू स्त्रिया या दिवशी उपवास करून वडाची पूजा करतात व पतीला दिर्घायुरारोग्य (दिर्घायुष्य) मिळावे म्हणून प्रार्थना करतात. सावित्रीने हे व्रत करून आपल्या पतीचे (सत्यवानाचे) प्राण यमाकडून परत मिळविले म्हणून तिच्या स्मरणार्थ हे व्रत करण्यात येते.

आषाढी एकादशी : आषाढ शुध्द एकादशीला वारकरी पंथाचे लोक उपवास करतात. या दिवशी चातुर्मासाला प्रारंभ होतो व कार्तिक शुध्द व्दादशीला तो संपतो. कीर्तनाचे कार्यक्रम होतात. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम इत्यादी संताचे अभंग गातात. वारकरी पंथाचे विठोबाचे उपासक या दिवशी पंढरपुरी प्रस्थान ठेवतात. जिल्ह्यातून वारकऱ्यांची मोठी पालखी पंढरपुरास जाते.

नागपंचमी : श्रावण शुध्द पंचमीला नागपंचमी येते. या दिवशी नागाची आकृती पाटावर काढून तिची पूजा करतात. खेडेगावात स्त्रिया मुंग्याच्या वारुळाशी जाऊन तीथे नागपुजा करतात. वारुळाशी दूध व साखर नागाला पिण्यासाठी ठेवण्यात येते. नांगरणे, खणणे, खोदणे वगैरे कामे या दिवशी बंद ठेवतात.

नारळी पौर्णिमा (राखी पौर्णिमा) : श्रावण शुध्द पौर्णिमा ही नारळी पौर्णिमा अथवा राखी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. या दिवशी ब्राह्मण व इतर लोक श्रावणी करतात व नवीन यज्ञोपविते धारण करतात. पुरोहित आपल्या यजमानांच्या मनगटात राखी बांधतात.

गोकुळाष्टमी : श्रावण वद्य अष्टमी ही गोकुळाष्टमी अथवा जन्माष्टमी म्हणून ओळखली जाते. या दिवशी श्रीकृष्णाची पूजा विशेष प्रकारे होते. बरेच लोक उपवास करतात. जन्मोत्सव मध्यरात्री होतो. यावेळी कृष्णस्तुतीपर भजने, गौळणी व अभंग म्हणतात. रात्री बारा वाजता लहानशा सजविलेल्या पाळण्यात कुंचीत नारळ घालून पाळणा गीत म्हणतात. दुसऱ्या दिवशी दहीहंडी (दहिकाला) होते.

पोळा : श्रावण अमावस्येला पोळा हा सण साजरा करतात. शेतकरी लोकात याचे महत्त्व विशेष आहे. या दिवशी बैलांना पूर्ण विश्रांती मिळते. त्यांच्या शिंगांना रंग लावून त्यावर बंगड आणि रंगीबेरंगी फिती लावून सजवितात. पुरणपोळी खाऊ घालून त्यांची पूजा करतात.

गणेशचतुर्थी : भाद्रपद शुध्द चतुर्थी ही गणेश चतुर्थी म्हणून ओळखली जाते. गणपतीची मातीची मुर्ती समारंभपुर्वक प्राणप्रतिष्ठा करून बसविली जाते व तिची पूजा करण्यात येऊन मोदकांचा नैवेद्य दाखविला जातो. कुलाचाराप्रमाणे दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस अथवा दहा दिवस मुर्ती ठेवून तिची सांजसकाळ पूजा होते. अलीकडच्या काळात शहरातील लोक एकत्र येऊन वर्गणी गोळा करून सार्वजनिक ठिकाणी आकर्षक देखावे तयार करून गणपतीची स्थापना करतात व संयुक्तपणे उत्सव साजरा करतात. नंतर विसर्जन करतात.

अनुक्रमणिका

दसरा : नवरात्र म्हणजे दसरा आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षातील पहिले दहा दिवस दुर्गा देवीचा हा उत्सव असतो. पहिले नऊ दिवस नवरात्रचे समजले जातात. पहिल्या दिवशी घटस्थापना करतात व देवीच्या नावे घट बसवितात. त्यानंतर दरदिवशी नित्यनेमाने पूजा करतात. दसऱ्याचा मुहूर्त बघून कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात या दिवशी करण्याची पध्दत आहे. आपट्याची पाने सोने म्हणून एकमेकांना देऊन भेटतात.

दिवाळी : दिवाळी अथवा दिपावली म्हणजेच दिव्यांचा उत्सव. आश्विन वद्य त्रयोदशीला प्रारंभ होऊन भाऊबीज म्हणजे कार्तिक शुध्द व्दितीयेपर्यंत त्याची मुदत असते. विष्णूने नरकासुराचा वध केला म्हणून हा दिपोत्सव प्रथम करण्यात आला. पण चार पाच उत्सवांचा संगम दिवाळीत होतो. धनत्रयोदशीला धनाची पूजा करतात. नरक चतुर्दशीच्या दिवशी सर्व लोक अभ्यंगस्नान करतात. अमावस्येला लक्ष्मीपूजन होते. व्यापारी वर्गात या दिवसाच सर्वात जास्त महत्त्व असते. नवे हिशेब व व्यवहार या दिवशी सुरू होतात. बलिप्रतिपदा म्हणजे विक्रम संवताचा पहिला दिवस. भाऊबीज हा बहिणीने भावास ओवाळण्याचा बंधुभगिनींना एकमेकास शुभचिंतन करण्याचा व बहिणीस सप्रेम भेट देण्याचा दिवस. दिपावलीच्या पाच दिवसांत घरोघरी आकाश कंदील व मातीच्या पणत्या लावतात. लाडू, करंज्या, चकल्या, चिवडा इत्यादी फराळाचे पदार्थ तयार करतात.

तुळशीचे लग्न : कार्तिक शुध्द एकादशी म्हणजे कार्तिकी एकादशी. या दिवशी चातुर्मास समाप्ती होते. या नंतरच्या दिवशी तुलसीविवाह होतो. तुलसीच्या लग्नानंतर लग्नकार्याचा प्रारंभ होतो.

मकरसंक्रांत : मकर राशीत सूर्य प्रवेश करतो तो दिवस मकरसंक्रांत म्हणून पाळतात. मिष्टान्न भोजन होते व सायंकाळी स्त्री-पुरुष सणाचा पोषाख करून मित्रांना व नातेवाईकांना भेटतात व तिळगूळ देतात.

महाशिवरात्र : माघ वद्य त्रयोदशी अथवा चतुर्दशीला महाशिवरात्री असते. त्या दिवशी उपवास व शिवार्चन करतात.

होळी : फाल्गुन पौर्णिमेला होळी साजरी करतात. होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. पुरणपोळी हे होळीचे विशेष मिष्टान्न मानले जाते. दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण असतो. त्यावेळेस एकमेकांवर रंग उधळून त्याचा आनंद घेतात.

करमणूक

प्रतिवर्षी येणाऱ्या सण व उत्सवांमध्ये प्रामुख्याने देवालयांमध्ये कीर्तने, प्रवचने व भजने करतात. देवादिकांच्या व साधूसंतांच्या जयंत्या साजऱ्या करण्यासाठी कीर्तने करतात. श्रावण महिन्यात अशा कार्यक्रमांत भजनी मंडळी आढळते. सणांच्या दिवशी आणि एकादशीला भजनी मंडळींचे मंदिरात किंवा सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रम होतात. त्यावेळेस भाविक आवर्जून उपस्थित राहतात. भजन कीर्तनाप्रमाणेच गोंधळी लोक देवी अंबाबाईच्या नावाचे गोंधळ घालतात. त्याच्याबरोबर तीनचार मदतनीस असतात. एक संबळ, दुसरा तुणतुणे, तिसरा झांज वाजवितो आणि चवथा दिवटी धरतो. रात्रभर चालणाऱ्या या गोंधळात सर्व अबालवृद्ध हजेरी लावतात. जिल्ह्यात लग्न मुंजीसारखे कार्यक्रम पार पडल्यावर गोंधळ्यांना बोलावून गोंधळ घालण्याची प्रथा अनेक हिंदू कुटुंबात आहे. याशिवाय जिल्ह्यात उपलब्ध असलेली सिनेमागृहे, दूरदर्शन केंद्रामधून प्रसारित होणारे कार्यक्रम करमणूक म्हणून बघणे.

अनुक्रमणिका

ओतारी : धातूचे ओतकाम करणारी एक भटकी जमात. त्यांच्या व्यवसायावरून त्यांना हे नाव मिळाले आहे. ओतनकर, ओतकर, वतारी, ओझारी असेही म्हणतात. जिल्ह्यात यांच्यात चौधरी, म्हाळगी, गडेकार, कांबळे अशी आडनावे आहेत. समान आडनावात विवाह करीत नाहीत. मामेबहिणीशी लग्न करतात. विधवा विवाह रूढ असला तरी अविवाहिताला विधवेशी लग्न करता येत नाही. हे लोक पैठणच्या कालकादेवीला कुलस्वामीनी मानतात. याशिवाय ते आंबाबाई, नरसोबा, बहिरोबा, खंडोबा, भवानी, नागजी इत्यादी देवतांनाही भजतात. मृतांना जाळतात व काही पुरतात. वार्षिक श्राध्द करतात यांना मद्यमांस चालते.

कलाल : एक जात. या जातीत संस्कृत कल्यपाल, कलवार, कलार, कलान अशी नावे आहेत. जिल्ह्यात यांच्यात वंजारी, होळी, साबने, हातांगळे, खटाळे, डोंगळे, गंगेण, टोणपे, भुजंगे इत्यादी आडनावे आढळतात. यांच्यात अनेक पोटजाती आहेत. हे लोक उत्तरेकडून इकडे आले असावेत. पुर्वी हे लोक दारू गाळण्याचा धंदा करीत परंतु आता ते अन्य व्यवसायही करू लागले आहेत. देवी कालिकेच्या अनुज्ञेवरून आम्ही दारू गाळण्याचा व विकण्याचा धंदा पत्करला आहे असे हे लोक म्हणतात. आजही या व्यवसायात ते प्राधान्याने आढळतात. काही लोक मोलमजुरी करू लागले आहेत. हे लोक गुरेढोरेही पाळतात. स्वभावत: हे लोक इमानी व विचारशील आहेत.

यांच्यात पुर्वी मुलींची लग्ने लहानपणीच करीत परंतु आता त्यांच्यात बदल झाले आहेत. देज घेत नाहीत. मात्र वधूचे आईवडील गरीब असतील तर वरपक्ष त्यांना आर्थिक मदत करतो. लग्न हे ब्राह्मण पुरोहिताकडून लावली जातात. काडीमोड व विधवाविवाह रूढ आहे. खंडोबा, भैरोबा, देवी ही त्यांची उपास्य दैवते असून हिंदूच्या देव देवतांनाही ते भजतात. कलाल शाकाहारी मांसाहारी व मद्यसेवन करणारे आहेत. धोतर, जाकीट व मराठी धाटणीचे पागोटे असा त्यांचा साधा पेहराव आहे. बहुतेकांची घरे ही झोपड्या असतात.

कासार : तांब्यापितळेची भांडी बनविणे, विकणे व बांगड्या भरणे हा धंदा करणारी एक जात. कास्यकार या संस्कृत शब्दापासून कासार शब्द बनला आहे, असे काहीजण मानतात. विश्वकर्म्यापासून आपली उन्नती झाली आहे असे ते मानतात. जिल्ह्यात यांच्यात रासने, साळवे, धातोंडे, देवगिरे, चिलवंत, खुडाळे, लोखंडे, नानाकर, त्रिभूवने, नरोटे, वनकर इत्यादी आडनावे आहेत. कासारात अंगिरस, अत्री, भारव्दाज, भृगु, गौतम जामदग्न्य आणि काश्यप गोत्रे आढळतात. एकाच देवकात व गोत्रात विवाहसंबंध होत नाहीत. विधूर विवाहास मान्यता असून विधवा विवाहास मान्यता नाही. कुलदैवत कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील नृसिंहास मानतात. याशिवाय कालिका, बहिरी, चंडिका, एकविरा, कुमारिका, खंडोबा, महालक्ष्मी या देवतांनाही भजतात. कासारांना मांसाहार व मद्यपान निषिध्द आहे. मृत व्यक्तिस ताटीवर नेऊन नंतर जाळतात.

कुणबी : एक शेतकरी जात. कुणबिकी म्हणजे शेती करणाऱ्या लोकांना कुणबी म्हणतात. तरी देखील कालांतराने कुणबी ही एक स्वतंत्र जात निर्माण झाली. कुणबी शब्द कुळंबी अथवा कौटुंबिक या शब्दावरून आला आहे. पंडित भगवानलाल इंद्रजी यांच्या मते या शब्दाची व्युत्पत्ती संस्कृत शब्द कुटुंबिन

पासून झाली असावी. त्यांच्या मते प्राचीन काळापासून कुटुंबिन हे उपपद शेतकऱ्यांच्या नावामागे लावण्याचा प्रघात आहे. एकाच ठिकाणी घर करून राहून शेतीचा व्यवसाय व पशुपालन करणाऱ्या सामाजिक गटाला उद्देशून हा शब्द वापरला जातो.

कुणबी जातीत मराठा कुणबी, कोकणी कुणबी, खानदेशी कुणबी, तलहेरी (तल्हेरी) कुणबी व काळे कुणबी असे प्रादेशिक गट आहेत. जिल्ह्यातील मराठा कुणब्यांची आडनावे पुढीलप्रमाणे आहेत. जाधव, गुंजरगे, सपाटे, कोकाटे, काळे, लोंढे, सुरवशे, पवार, धुमाळ, लखणे, टोणपे, नाईकवाडे गवारे, गोमणे, मोरे, बिराजदार इत्यादी. यांच्यात एकाच कुळात व देवकवाल्यात सोयरीक होत नाही. शक्यतो नात्यातील स्थळाला अधिक पसंती देतात. मामेबहिणीशी लग्न लावीत नाहीत. यांच्यात पूर्वी बालविवाहाची प्रथा होती परंतु आता बालविवाह केला जात नाही. मराठा कुणब्यांची विवाहपध्दती मराठ्यांप्रमाणेच आहे.

स्त्रीचे पहिले बाळंतपण तिच्या माहेरी होते. सातव्या महिन्यात चोरचोळी हा विधी करतात त्यावेळेस गरोदर स्त्रीची ओटी भरून तीस साडी चोळी देतात. मुल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी पांचवीपुजन (सटवीपुजन) करतात. बाराव्या दिवशी मुलाचे नामकरण करतात.

मराठा कुणब्यांची खंडोबा, भवानी, शिदोबा, ही प्रमुख दैवते आहेत. याशिवाय ते ज्योतिबा, नरसोबाची वाडी, पंढरपूर इत्यादी ठिकाणी ते यात्रेस जातात. हिंदूच्या इतर देवतांनाही भजतात. नागपंचमी, पोळा, दसरा, दिवाळी, गुढीपाडवा, होळी, चतुर्थी इत्यादी सण साजरे करतात. मृतास जाळतात. लहान मुल मृत पावल्यास त्यास पुरतात. अस्थींचे विसर्जन आसपासच्या नदीत किंवा पवित्र स्थळी करतात. तेराव्या दिवशी तेरवी करतात त्यावेळेस जातिबांधवांना भोजन देतात. भाद्रपदातील पितृपक्षात वार्षिक श्राध्द करतात.

कुंभार : एक इतर मागासवर्गीय जात व गावगाड्यातील बलुतेदार, मातीची भांडी घडविणारी ही धंदेवाईक जात. संस्कृत कुंभकार या शब्दावरून कुंभार हा शब्द बनलेला आहे. या जातीच्या कुळांसंबंधी अनेक दंतकथा प्रचलित आहेत. प्रचलित असलेल्या अनेक दंतकथा सोडून दिल्या तरी ऋग्वेदात मातीच्या भांड्यांचा उल्लेख आहे यावरून कुंभारांचा धंदा अत्यंत प्राचीन काळीही होता एवढी गोष्ट सिध्द होते.

यांच्यात अहीर किंवा लहानचाके, बळदे, भांडु, चागभैस, गरेते, गुजर, गोरेमराठे, हातघडे, किंवा भोंडे किंवा भोंडेकर, हातोडे, कडु, कन्नड, कर्नाटक अथवा पंचम किंवा लिंगायत, खंभाटी, कोकणी, लाड किंवा थोरचाके, लाडभुजे, माळवी, मराठी किंवा घाटी, परदेशी, रजपूत, सोरठिया, वरिया आणि वाटलिया अशा तेवीस कुळ्या आहेत. या सर्व कुळ्या मराठा, कोंकणी, गुजराती व परदेशी या चार प्रकारात समाविष्ट होतात. २३ कुळांत आपापसात रोटीबेटीव्यवहार होत नाही.[२]

जिल्ह्यात मराठा कुंभार, तेलंगी कुंभार, लिंगायत कुंभार, तेलगू कुंभार, परदेशी कुंभार इत्यादी पोटजाती आहेत. जिल्ह्यातील कुंभारांची आडनावे पुढीलप्रमाणे आहेत. बेल्लाळे, शिरोळे, तेलंगे, कानगुले, कामगुनवार, पळनाटे, पांगशेकर, चौकटे, तहाडे, शेवाळे, आपृपल्ले, देवळे, रावळे, लोखंडे, न्हावकर,

२. **महाराष्ट्रीय ज्ञानकोश,** खंड ११, पृ. ५५३

नागपूर्णे, गुंजरगे, विभूते, सालघंटे, मुलगे, कटकुरे, घटकार, पोचापुरे, दुधाळे इत्यादी. जिल्ह्यातील कुंभारामध्ये लिंगायत कुंभार व तेलंगी कुंभार हे स्वत:ला श्रेष्ठ समजतात. सर्वेक्षणाव्दारे असे आढळून आले की मराठा कुंभार हा एक बारा बलुत्यांपैकी असून तो घागरी (मडकी), दुधाणे, ताकाचा डेर, सुगडे, वेळण्या, पंथ्या, चिटकी (कोरड्यासाची) रांजण, कोथळी इत्यादी जिनसा शेतकऱ्यास देतो त्याबद्दल शेतकरी बलूते म्हणून धान्याच्या स्वरूपात देतो.[3] त्यांची पांचपालवी, कुऱ्हाड, सौंदळ, आपटा, चाक, खापटी ही देवके आहेत.

लग्न हे मराठा कुणब्यांप्रमाणेच करतात. लग्नात, मंडप, देवक, रुखवत, बोहल्ले सप्तपदी असते. ब्राह्मण लग्न लावतो. कुंभारात घटस्फोट व पुनर्विवाह होतात. कुंभारांची खास कुलदैवते म्हणजे शिंगणापुरचा महादेव, सोनारीचा भैरोबा, तुळजापूरची भवानी व जेजुरीचा खंडोबा ही होत. लग्नानंतर कुलदैवतांना जातात. स्त्रीचे पहिले बाळंतपण तिचे माहेरी होते. मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी सटवीपुजन (पाचवी) करतात व बाराव्या दिवशी बारसे करतात. मृतास जाळतात. अस्थिविसर्जन धार्मिक स्थळी करून तेराव्या दिवशी तेरवी करतात.

कुंभार समाजात गाढवाला महत्त्व आहे. नांदेड जिल्ह्यात माळेगावला खंडोबाची यात्रा भरते त्यावेळेस गाढवांचा बाजार भरतो. गाढवांची किंमत हजार ते दीड हजार असते. खंडोबाच्या यात्रेच्या वेळी कुंभार आपल्या घरी गाढवांची पूजा करतात. मातीची मडकी रोख तसेच धान्याच्या मोबदल्यात विकतात. शहरात स्थलांतरित झालेले कुंभार स्वत:च्या व्यवसायाबरोबर इतरही व्यवसाय करतांना दिसतात. कुंभारांची बायका मुले याच कामी मदत करतात.

कैकाडी : जिल्ह्यात आढळणारी एक विमुक्त जमात असून आपण मूळचे तेलंगणातील असल्याचे ते सांगतात. त्यांची भाषा तेलुगू आणि कन्नड यांचे मिश्रण आहे. यावरून ते खरे असावे. पूर्वी गावोगाव भटकणारे होते. परंतु आता ते स्थायी होऊ लागले आहेत. त्यांच्या धुतले किंवा धोतले, माकडवाले किंवा कोंचीकोरवा, बोरीवाले, कामाठी किंवा लाल बाजारवाले, काईजी, लमाण, ऊर कैकाडी, वायबसे व भामटे अशा नऊ पोटजाती आहेत. त्यांची जिल्ह्यात बोरीवाले, धनवाले, कामाठी, काईजी, लमान, माकडवाले, उरुकैकाडी, आईअेस, भामरे, मानफडे, कचराळे, जुमसरे, सपाटसरे, सारडाई, बुंदरा, चांदखाने, निष्ठुरे, माने, जाधव, पवार, फुलारी, कावाडी, बिजले, देशमाने, माकडे, कांबळे, गायकवाड, जाधव, बुद्राळे कायसरो, दिष्टे, जुमालसर, खुपसट, लोडे, पुरतो, घ्यावगिरे, गनसोडी, नागोर, काडेर, नेरी, मानके, मिन्नू, इत्यादी आडनावे आढळतात. बोरीवाले आणि वायबसे घरदार करून स्थायिक झालेले आहेत. कामाठी टोपल्या करतात. माकडवाले माकडांचे खेळ दाखवित गावोगाव हिंडतात. काईजी जादूचे खेळ करतात. लमाण बैलांची खोगिरे करतात. ऊर कैकाडी वाजंत्री वाजवण्याबरोबर टोपल्याही विणतात.

यांच्यात पूर्वी जातपंचायत होती. काही ठिकाणी अस्तित्वात आहे. जातपंचायतीच्या प्रमुखास मुखियॅा म्हणतात. त्याने दिलेला निर्णय हा अंतिम समजतात.

---

३. आत्रे त्रिं. ना., **गावगाडा,** 'वरदा' सेनापती बापट मार्ग पुणे, १९८९ पृ. १११

लग्न जमवितांना दोन्हीकडून पुढाकार घेतात. (वर व वधू पक्ष) मात्र जास्त मुलाकडील माणसे पुढाकार घेतात. जातीतील लोक स्वत:च्या उपजातीतच लग्नविधी करतात. एकाच कुळाच्या मुला मुलींची लग्ने होत नाहीत. आतेबहिण, मावसबहिण यांच्याशी लग्न जुळत नाहीत. लग्न ठरवितांना वराच्या बापाच्या हातून वधूच्या बापाच्या हाती माप दिले जाते आणि पंचांच्या साक्षीने वधू निश्चित झाल्याचे सांगितले जाते त्याला " परदडट शाई " म्हणजे कुंकू लावणे असे म्हणतात. कुंकू लावल्यानंतर "वागीसना यल्ला" होतो. या जातीमध्ये दोन वागिसने असतात. एक मामाच्या घरचा व दुसरा माहेरघरचा. मामाघरच्या वागिसन्यास "सुलकसेनयल्ला" म्हणतात. या विधीत पंचांना दारू पाजतात. या सगळ्या विधीत मुलीच्या मामाचा आणि बापाचा मान फार मोठा असतो. यानंतर वरपक्षाकडून जेवण घेतले जाते. या लोकांची लग्ने पावसाळ्यात होतात. कारण या दिवसात सर्व लोक आपआपल्या मुक्कामास आलेले असतात. पूर्वी वधूपक्षाच्या घरासमोरच सुताडा, घोंगडी, किंवा गोधडी यांचा मांडव टाकून त्याच्यावर जाई, आंबा, जांभूळ, चंदन, आराठी इत्यादी पाच झाडांच्या डहाळ्या ठेवीत. त्यालाच "पाच पालवी" म्हणत. सध्या मात्र ऐपती-प्रमाणे मांडव घालतात. हळद लावणे विधी होतो व लग्न ब्राह्मण पुरोहितामार्फत लावले जाते. वधूस लपवणे, सुपारी खेळणे इत्यादी कार्यक्रम होतात.

यांच्यात "घरजावई" म्हणून राहण्याची वैशिष्ट्यपूर्ण प्रथा होती. आता ही पध्दत कमी होत चालली आहे. घटस्फोट, पुनर्विवाह व विधवाविवाहास मान्यता आहे. विधवा वहिनीबरोबरही लग्नाची मान्यता आहे. स्त्री प्रसुत झाल्यावर पाचवी पुजण्याच्या वेळी ऐपतीप्रमाणे मुलगा झाल्यास बोकड व मुलगी झाल्यास बकरी किंवा पाट बळी देत. सर्वसाधारण कुटुंबे दाळरोटीचे जेवण देतात. बारसे करण्याची प्रथा नव्हती. पाचव्या दिवशीच मुलाचे नाव ठेवत. परंतु सध्या हे लोक स्थायी झाल्यामुळे इतर जातींप्रमाणेच रीतीरिवाज पाळतात. बाळंतपणाचे "सुहेर" सद्या सात दिवस पाळतात.

कुलदैवते : उरअम्मा (गावदेवी किंवा लक्ष्मी), वासुला कुलअम्मा (व्दारदेवी), शेडी-देऊरअम्मा (वृक्षदेवी) फिरस्ती अम्मा (फिरस्ती देवी), आरकुल अम्मा (जलदेवी) म्हशाय ताईअम्मा (स्मशानदेवी), देव्हांरकुल अम्मा (कुलदेवी) इत्यादी त्यांची कुलदैवते आहेत. हे लोक गावदेवी फिरस्तीदेवी आणि कुलदेवीची पूजा करतात. फिरस्तीदेवीचा कौल घेतल्याशिवाय हे लोक आपला मुक्काम हलवित नाहीत, किंवा कोणत्याही कामगिरीला निघत नाहीत. ते अंधश्रध्दाळू असतात.

या समाजात स्त्रियांना गोंधण्याची फार आवड आहे. प्रत्येक स्त्रीने गोंधून घेतलेच पाहिजे असा दंडक आहे. स्त्रिया हातावर तसेच कपाळावर तर पुरुष हातावर गोंधून घेतात.

पूर्वी मृतास पुरत. परंतु आता जाळण्याची प्रथा रूढ झाली आहे. पूर्वी मृताचे सुतक (अशौच) पाच दिवस पाळीत. प्रेत नेणारे श्राद्ध होईपर्यंत मृताच्या घरी राहत असत. अंत्यसंस्कार तिसऱ्या आणि पाचव्या दिवशी पार पाडतात. तिसऱ्या दिवशी मृत व्यक्ति पुरुष असेल तर कोंबडा आणि स्त्री असेल तर कोंबडी बळी देतात. जमलेल्या लोकांना जेवण देतात. दहाव्या दिवशी बकरा किंवा बकरी बळी देतात. आता ही प्रथा बंद केली असून आता साधे जेवण दिले जाते. मृत वाडवडिलांचे "टाक" करून ठेवतात व त्यांची पुजा करतात. वर्षश्राध्द करण्याची प्रथा नाही.

अनुक्रमणिका

कोमटी : एक व्यापारी जात. कोमटी हे नाव या जातीत कसे पडले याविषयी भिन्न भिन्न मते दिसून येतात. को-मति गो-मति अशा तऱ्हेच्या संज्ञा पुढे आलेल्या आहेत. कोमट्यांच्या कन्यकापुराणात शिवाने यांना गाईप्रमाणे वागविले म्हणून मोगति असे नाव दिल्याचे लिहिले आहे. पूर्वी गोदावरीच्या तीरी हे रहात असत असे म्हणतात. गो-मति किंवा गोम्ती असे त्यांचे त्याठिकाणचे नाव आहे. तेव्हा गोमतींचे तेलगूंत कोमटी असे अपभ्रष्ट रूप झाले असावे.

कोमट्यांत गवर (गौर) आणि कलिंग या दोन जाती आहेत. विजयनगरच्या उत्तरेस असणारे गौर व दक्षिणेस असणारे कलिंग होत. गौर कोमट्यात कोणी शैव, कोणी वैष्णव व कोणी माध्वपंथी पोटजाती आहेत. धंद्यावरूनही अनेक पोटजाती उत्पन्न झाल्या आहेत. यांची प्राणी व वनस्पती ही देवके आहेत. जिल्ह्यात बेजगमवार, बेडवबिडवाई, मद्रेवार, परशेवार, मुकावार, पदमवार, बलशेटवार, पपशेटवार, गडम, वलशेटवार, कोंडवार, चिद्रेवार, पेकमवार, चेऊलवार इत्यादी आडनावे कोमट्यांत आढळतात. त्यांची बोलीभाषा कानडी, तेलगू, मल्याळम ह्या असून मराठीही बोलतात.

कोमट्यात लग्न ब्राह्मण लावतो. लग्नानंतर वर-वधू कुलदैवताच्या दर्शनास जातात. विधवाविवाह रूढ नाही. स्त्रीच्या पहिल्या बाळंतपणा अगोदर तिसऱ्या महिन्यात चोरचोळी व सातव्या महिन्यात डोहाळे जेवण करतात. मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवीपुजन व बाराव्या दिवशी बारसे करतात. जिल्ह्यातील सर्व कोमटी " कन्यकापरमेश्वरी " या कुमारी देवतेला भजतात. याशिवाय ते बालाजी व हिंदू देवतांचिही पुजा करतात. मृतास दहन करतात व अस्थी गोळा करून पवित्र स्थानी त्यांचे विसर्जन करतात.

कोमटी मोठे व्यापारी, वाणी आणि सावकार म्हणून प्रसिध्द आहेत. बहुतेक व्यवहारी, मेहनती असतात. त्यामुळे त्यांचा कारभार चांगला असतो.

कोष्टी : एक विनकर जात. यांच्यात हळवी, लाड, कोष्टी, गधेवाल, देशवार, देवांग, पटवी, हंडगर, खाते, देवांग, मराण, हाडपुरी आणि निहात. इत्यादी अनेक उपजाती आहेत. ते हार, दागिन्यांचे रेशमी दोर करणे, घोडे व पालख्यांसाठीही रेशमी दोर वळणे, याशिवाय रेशमी कापड व साड्या विणणे हा व्यवसाय करतात. जिल्ह्यात कोष्टी लिंगायतामध्ये होट्टे, हराळे, उडगे, बोबले, हटके, धमगुंडे, पिचे, जिडगे, गड्डे, बिरादर, पाटील, महाजन, आमलापुरे, कमलापुरे, तिरजपुरे, पंचगल्ले, हद्दलगावे, बापुरे, आचारे, मेहत्तरे, हळले, थोटे, खेळगे, चिंदे, निम्ने, यथोडे, निरने, बमणे नंदगे, मुदूडगे, नळगे, ताटफळे, रायफळे, दस्तापुरे, बारहत्ते इत्यादी आडनावे आहेत. समान आडनावात विवाह होत नाही. मामेबहिण व आतेबहिण विवाह करता येतो. लग्नात उपाध्य जंगम अथवा स्वामी असतो. विधुर व विधवा विवाह रूढ आहे. यांची देवता चांडेश्वरी आहे. मृत व्यक्तिस पुरतात. त्यासंबंधी श्राध्द विधी करीत नाहीत.

गवंडी : ही एक इतर मागासवर्गात मोडणारी जात होय. यांच्यात मराठा, जिरे, कामाठी, कानडी व कडिया असे पोटभेद असले तरी जिल्ह्यात बहुतांश मराठी भाषीक गवंडी आढळतात. क्वचित जिरे आणि कामठीही आढळतात गवंड्याचे रीतीरिवाज कुणब्यांप्रमाणेच आहेत. परंतु गवंड्याचा धंदा करू लागल्याने स्वतंत्र जात निर्माण झाली असावी. जिरे गवंडी मूळचे मराठा होत. त्यांनी विजापूर आदिलशाही घराण्यातील सुलतानांचे कबरी बांधल्यामुळे त्यांना जातिबहिष्कृत करण्यात आल्याने ही स्वतंत्र पोटजात निर्माण झाली. कामाठी गवंडी लिंगायत आहेत. ते धर्मकार्यात जंगमांना बोलावतात. जिल्ह्यात सगर, मर्ढे, मतदुमले, नलबले, चात्रे, आलुरे, उपलगे इत्यादी आडनावे आढळतात.

अनुक्रमणिका

कुणब्यांप्रमाणेच यांच्यातही सकूळात तसेच समानदेवक असलेल्या कुळांमध्ये विवाह करीत नाहीत. देवके साधारणत: मराठा-कुणब्यांसारखीच असतात.

मामेबहिणीशी विवाह अनुज्ञेय असला तरी आते व मावस बहिणीशी विवाह निषिध्द मानतात. ब्राह्मण पौराहित्य करतात. विधवा व विधुर विवाह मान्य आहे. त्यास म्होतुर म्हणतात. घटस्फोटास व पुनर्विवाहास मान्यता आहे.

तुळजाभवानी, नृसिंह, मारुती, विठोबा इ. देवतांची पूजा करतात. मृतास जाळतात. तिसऱ्या दिवशी राख सावडतात. बाराव्या दिवशी दिवस घालतात. व सात दिवस सुतक पाळतात.

गोसावी : एक भटकी जमात होय. गोसावी हा शब्द "गोस्वामीन" या संस्कृत शब्दापासून आलेला आहे.[४] हा एक हिंदू जातींचा वर्ग असून तो गासाई, गुसाई व गोस्वामी अशाही नावांनी ओळखला जातो. ही नावे गोस्वामीन् या संस्कृत शब्दापासून आली आहेत. इंद्रियावर ज्याचे स्वामित्व तो गोसावी हा अर्थ येथे आला आहे. यांच्यात बावा, बैरागी, भारती, गिरी गोसावी, भारती गोसावी, सरस्वती पर्बत, सागर, बान किंवा वान तीर्थ आश्रम, अरण्य धरभारी, संन्यासी आणि नाथपंथी गोसावी अशा पोटजाती आहेत. ही भटकी जमात आपली उत्पत्ती कपिल ऋषीपासून झाल्याचे सांगते. गोसाव्यांची जातपंचायत आहे. त्यांच्यात शैव व वैष्णव असे दोन भेद आहेत. थोड्याफार फरकाने साडेबारा पंथ आढळतात.

यांच्यात प्रथम वधू पिता वर पित्याच्या घरी वरास बघावयास जातो नंतर वर वधूस बघायला जावून वधू पसंत पडल्यास जवळच्या नात्यातील माणसे एकत्र येवून लग्न पक्के करतात. विशेष प्रथम पसंती म्हणून आतेबहीण व मामेबहीण यांना देतात. लग्न ब्राह्मण पुरोहित लावतो. मुलीच्या पहिल्या गर्भारपणात चौथ्या महिन्यात "चारचोळी" व सातव्या महिन्यात डोहाळे जेवण होते. पहिले बाळंतपण माहेरीच करतात. मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी सटवीपुजन व बाराव्या दिवशी मुलाचे नाव ठेवतात. गाणगापूर आणि माहूर येथील दत्तात्रय व महादेव या देवतांना ते मानतात व तेथील जत्रांना हमखास जातात. मृतास पुरतात व तेराव्या दिवशी तेरवी करतात.

लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यात गोसावी जमातीची संख्या जास्त आढळते. गोसावी सकाळी उठून कपाळ, हात व सर्वांगावर विभूतीचे पट्टे व गंध लावणे, गळ्यात रुद्राक्षाची माळ घालणे व गावोगाव पोट भरण्यासाठी भिक्षा मागत फिरणे. यांच्यातील काही स्थानिक झालेली कुटुंबे सोडली तर बहुसंख्य लोक अजुनही भटक्यांचेच जीवन जगतात. भटकेपणामुळे (फिरस्तेपणामुळे) मुलामुलींना शाळेत घालणे शक्य नसते. त्यामुळे कमालीचे अज्ञान आणि रुढीप्रियता असते. मूळ भिक्षा मागण्याच्या धंद्याबरोबरच इतरही छोटेमोठे व्यवसाय हे लोक करु लागले असले तरी त्यात अजून ते रमले नाहीत. मोलमजुरी करण्याकडे त्यांची प्रवृत्ती नाही. त्यामुळे गावोगाव भटकणे त्यांच्या नशिबी उरते. स्थायिक झालेल्या गोसाव्यांची स्थिती मात्र सुधारत आहे.

---

४. **सातारा जिल्हा गॅझेटिअर,** १९९९, पृ. २७३

गोंधळी : ही एक भटकी जमात असून यांच्यात अनेक जातींच्या लोकांचा समावेश होत असून देवास नवसासाठी वाहिलेल्या मुलांचा भरणा त्यात विशेष आहे. जमदाग्नी ऋषी व रेणुका यांपासून आपली उत्पत्ती झाली असून मूळ स्थान माहूर आणि तुळजापूर येथे आहे असे ते सांगतात. सुमारे चारशे वर्षांपूर्वी आपण महाराष्ट्रात आलो असेही ते सांगतात. ते आपणास भवानीदेवीचे पुत्र अथवा भक्त म्हणवितात. गळ्यात भवानी कवड्यांची माळ घालतात. हे देवीचे भक्त असल्याने हिंदूंमधील कनिष्ठ जातीतील लोक ह्यांना मान देतात. मराठी राज्य स्थापनेच्या प्रारंभी हे पोवाडे म्हणून लोकरंजन करीत तसेच लोकांना देशाभिमानाची स्फुर्ती देत. पूर्वी गोंधळी राजे व सरदारांच्या कीर्तीची कवने करून गात व डंका वाजवित. हल्ली ते मुख्यत्वेकरून गोंधळ करून आणि भवानीच्या नावाने भिक्षा मागून उपजीविका करतात. जिल्ह्यात रेणुकाराई गोंधळी व कदमराई गोंधळी या दोन पोटजातीच आढळतात. यांच्यात पाचांगे, नवरखेले, ढवळे, काळे, घोगरे, घोडके, आंबले, वाघमारे, श्रीखंडे, तरटे, धुमाळ, नेकनोर, तोरखेड, बडगे, विंगवे इत्यादी आडनावे आढळतात.

गोंधळी, गोंधळ घालतांना प्रथम गोंधळासंबंधी संपूर्ण मांडणी करून गोंधळ घालतात. दिवटी दोन राईची करतात. संबळ, तुनतुनी, कवठ्याच्या माळा, तांबडा फेटा इत्यादींचा वापर करतात. गोंधळ करतांना पहिली पूजा देवीची करतात.

यांच्यात पोटजातीमध्ये विवाह होत नाहीत. मामाच्या मुलीशी, आत्याच्या मुलीशी व भाचीशी (मोठ्या बहिणीची मुलगी) विवाह होतो. मात्र मावसबहिणीशी विवाह होत नाही. विवाह विषयक बाकी सर्व विधी ते मराठ्यांप्रमाणेच करतात. घटस्फोट, पुनर्विवाह व विधवा विवाहास मान्यता आहे. गोंधळी लोक दररोज मारुती, अंबाबाई आणि भवानीची पूजा करतात. मृत व्यक्तिस जाळतात.

घिसाडी : ही एक भटकी जमात होय. जिल्ह्यात चव्हाण, जाधव, पवार, साळुंके, सुर्यवंशी, शिंदे, ऊकंडे, देजमोर, हुनाने, सोळंकी इत्यादी आडनावांचे (कुलांचे) घिसाडी आढळतात. मात्र वरील आडनावांमध्ये चव्हाण, साळुंके, पवार, जाधव यांना अधिक मान दिला जातो. पूर्वी यांच्यात जातपंचायत होती. जातप्रमुखास "मुखिया" म्हणत.

घिसाडी म्हणजे लोहारांसारखी भटकी जमात असून ते घिसाडकाम लोखंडाचे नाल, कोयते, कुऱ्हाड, कुदळ, चमचे, सांडशी, पळ्या, शेतीची अवजारे इत्यादी तयार करतात. कानडी घिसाडींना बैलने कुंबार असेही म्हणतात. ते घरात अपभ्रष्ट गुजराथी भाषा बोलतात. त्यावरून ते मूळचे गुजरातेतून आले असावेत. ते पावसाळा सोडून बाकीचे आठ महिने गावोगाव भटकत असतात व पालांतून राहतात.

आतेबहिणीशी व मामेबहिणीशी लग्न करता येते. मावसबहिणीशी लग्न करीत नाही. विधवा विवाहास मोकळीक आहे. अविवाहितास विधवेशी लग्न करता येत नाही. यांच्यात सोडचिठ्ठी देता येत नसे. आता कायद्यानुसार देता येते. पूर्वी बालविवाह होत.

साखरपुडा हिंदुप्रमाणेच करतात. ह्या जमातीमध्ये आजही पाच दिवस लग्न करतात. लग्नात देवक बसवतात व हे देवक नवराबायको धरतात, त्यांना हळद लावतात व त्यावेळी लग्नाची गाणी म्हणतात. लग्न हे दोन्ही पक्षाकडे (वधू-वर) पार पाडू शकतात. ऐपतीप्रमाणे वऱ्हाड आणण्यासाठी "म्होरके" निघतात त्यामध्ये सर्वात मोठा म्होरका "चव्हाण" याला मानतात. वऱ्हाड आणणेसाठी चव्हाणची सुवासिनी असावीच लागते. जातांना त्यांच्याबरोबर वऱ्हाडांसाठी पानसुपारी, विडी, हळदीकुंकू देऊन एकमेकांच्या तोंडात साखर घालतात व त्यांना वाजंत्री वाजत गाजत आणतात.

लग्नविधी :- यांच्यात लग्नविधी पाच दिवस चालतो. पहिल्या दिवशी वऱ्हाड जमा होते. त्यानिमित्ताने त्यांना गोड जेवण देतात. दुसऱ्या दिवशी " चव्हाणाची " सुवासीण आणायची व त्या दिवशी मांसाहारी जेवण देतात. तिसऱ्या दिवशी नवरानवरीचे आईबाप व इतर नातेवाईक तुळजापूरला जातात. तीथे जावून आईला "भोगी" घ्यायची. (भोगी म्हणजे नैवेद्याबरोबर १०० रूपये किंवा नियमाप्रमाणे घ्यायची.) नंतर तेथील पुजारी पाच वस्तू, पेरू, नारळ, केळी, सुपारी, खारीक म्हणून देतो, म्हणजे गोंधळ घालण्यास मुभा मिळाली असे मानतात.

रात्रभर जागरण असल्यामुळे वधू-वराने त्यावेळेस जागून मशालीवर तेल टाकायचे असते. चौथ्या दिवशी पहाटेला म्हणजे तिसऱ्या दिवसाचे गोंधळी गेल्याबरोबर हळद लावण्यास प्रारंभ करतात. हळदीच्या दिवशी उपस्थितांना गोड जेवण देतात. पाचव्या दिवशी ठरलेल्या तिथीला नवरदेवाकडचे मारुतीच्या पारावर शेवंती करून लग्नास वधूगृही आणतात. लग्न पार पडल्यावर वरात काढतात.

जाधव, पवार, चव्हाण या तीन्ही आडनावांत स्त्री जर गरोदर असेल तर सातव्या महिन्यात "ढवाळजेवण" करतात. साळुंके आडनावात "ढवाळजेवण" होत नाही. ढवाळजेवणास मुलीचे आईवडील सर्व साहित्य (पुजेचे, धान्य, कपडे वैगरे) घेऊन मुलाकडे येतात. कार्यक्रम पार पाडतात. पुत्रप्राप्तीसाठी नवस वगैरे करत नाहीत. स्त्री बाळंत झाल्यास पाचवी पुजन होते. त्यावेळेस जाधव, पवार, चव्हाण या आडनावात पाचवीच्या दिवशी मांसाहारी जेवण देतात. साळुंके आडनावात मांसाहारी जेवण देत नाहीत. विटाळ साधारणपणे एक महिना पाळतात. मुलाचा "जावळ" सटवाईच्या जवळ काढतात. त्यावेळेस मुलाच्या डोक्यावरील केस मामा काढतो. मामाला टॅावेल टोपी देतात.

विवाहित मृतास जाळतात. तर अविवाहित मृतास पुरतात. मात्र लग्न झालेल्या व्यक्तिस झोळीतून नेतात. घिसाडी वारकरी तसेच कबीर पंथी आहेत. त्यांची कुलदैवते बहिरी, गिरीचा बालाजी, भवानी, खंडोबा, सटवाई, यमाई, कलम्मा, अंबाई व यल्लमाही आहेत. उपाध्ये स्थानिक ब्राह्मण असतात. यांच्यात मांसाहार व मद्यपान वर्ज्य नाही. मृत व्यक्तीचे बारा दिवस सुतक पाळतात. हिंदूंचे सर्व सण साजरे करतात.

चांभार : कातड्याचे काम करणारी व पादत्राणे बनवणारी एक जात. या लोकांना मोची, चमार, चमगार व समगार अशीही नावे आहेत. चर्मकार या संस्कृत शब्दापासून चमार, चांभार हे शब्द आले आहेत. चांभारात असंख्य पोटजाती असून त्यापैकी जटिया, जैस्वार, धारिया, चौधरिया, बुंदेला, चामर, दोहर, कुरिल, पूर्विया, कोरी किंवा कोली, अहिरबार, छुसिया किंवा धुसिया इत्यादी प्रमुख होत. विशेषत: शेती व्यवसायाला उपयुक्त असणारी चामड्यांची अवजारे, मोट, बैल्यांच्या गळ्यातील पट्टे इत्यादी कामे करतात. जिल्ह्यात मोची, दोहर,

चांभार, लिंगायत इत्यादी पोटभेद आहेत. त्यांच्यात सातपुते, आंबीलपुरे, पवले, टिके, सूर्यवंशी, कांबळे, राजगुरु, शेखरखाने, दामावले, बनसोडे, शेवाळे, शिंदे, पाखरे, साबळे, भोसले, वाघमारे, मितनगरे, दळवी, धनेश्वर, बळी, तुळघरे, खुरे, लोकरे इत्यादी आडनावे आढळतात.

यांच्यात गोत्रे व देवके असून एकाच गोत्रात किंवा देवकात लग्ने होत नाहीत. विवाहातील मुख्य विधी म्हणजे लग्नमंडपात एक खांब उभारलेला असतो. त्या खांबा भोवती सात फेऱ्या (फेरे) घालणे हा होय. इतर सर्व विधी हिंदू पद्धतीप्रमाणेच केले जातात. हिंदूंचे सर्व सण साजरे करतात. मृतास पुरतात तर काही जाळतात. श्राद्ध विधी करतात.

जोशी : ही भटक्या जमातीपैकी एक जात होय. जिल्ह्यात भोसले, वाकोडे, वाघमारे, अटक, इंगळे, कंबळे, धुवै, शिंदे, इगवे, नवरखेले, भगाडे, सर्वेदे, चौगुले, भोळे, गावित, गरड इत्यादी आडनावे आढळतात. यांच्यात बुडबुडकी, डमरुवाले, कुडकडे, मेढंगी, सरोदे सहदेव जोशी, सरवेदे, सरोदा ह्या उपजाती आहेत. यांची लातूर जिल्ह्यात खुद्द लातूर खोरीगल्ली येथे जातपंचायत भरते. भिक्षा मागतांना पुरुष काखेत झोळी आणि डोक्याला फेटा बांधतात. तर स्त्रिया मोलमजूरी करतात.

विवाह जमवितांना समान कुळात लग्न होत नाहीत. मामेबहीण, आतेबहीण, भाची यांच्याशी लग्ने होतात. मावसबहिणीशी विवाह होत नाही. कुंकू लावतात. लग्न पक्के झाल्यावर हळदविधी होतो.

हळदविधी : प्रथम नवऱ्याच्या आईवडीलांना ५ बोटे लावतात. त्यानंतर नवरदेवास व नंतर नवरीस तीच हळद लावतात. त्यावेळेस नवरीचा बाप नवऱ्याच्या बापास २६ रुपये देतो. त्यातील २५ पैसे वधूपित्यास परत देतात. "नाणकांकण" म्हणजे नात्यातील वडीलधाऱ्यांना माने म्हणून रूपये २५-२५ देऊन हा विधी करतात. लग्नात बाशिंग, अंतरपाट वापरतात व लग्न पुरोहिताद्वारे लावतात. लग्नानंतर खंडोबा, अंबेचा व मारुतीच्या नावे गोंधळ घालतात. व सत्यनारायण करतात.

विधवाविवाह : जातीचा देवक्या त्यांची गाठ बांधतो. (विधवेची व दुसरा विवाह करणाऱ्या पुरुषाची) विधवेचा बाप त्यावेळेस रूपये १८५, १२५, २५० याप्रमाणे ऐपतीप्रमाणे पैसे घेतो *. हा गाठ बांधण्याचा विधी अमावस्येस करतात. एकमेकांना त्यावेळेस कपडे देतात. देवक्याला २५० रुपये द्यावे लागतात. (देवक्या हा एकपत्नी असलेलाच होवू शकतो.) विधूरविवाह होतात. काडीमोडासाठी पंच म्हणून भोसल्यांना दोन्हीकडचे (वधू-वर पक्ष) ऐकून नवऱ्याच्या गुन्ह्यासाठी १५ रुपये दंड घेतात व मुलीच्या गुन्ह्यासाठी ७.५० रुपये द्यावे लागून त्यांना नांदण्यास प्रवृत्त केले जाते. दुसऱ्या जातीच्या मुलाशी मुलीचे अनैतिक संबंध असल्यास तिच्या बापाकडून ४.२५ रुपये दंड घेतात. व तिला जातीबहिष्कृत करतात. जर पुरुष जातीतला असेल व त्याचे परजातीच्या स्त्रीशी अनैतिक संबंध सिद्ध झाल्यास त्याचेवर ४.२५ रुपये दंड आकारतात व त्यालाही जातीच्या बाहेर काढतात. जातीच्या पुरुषाशी जातीच्या मुलीचे अनैतिक संबंध असल्यास पुरुषाकडून ६० रुपये दंड घेतात. मुलगा व मुलगीला कपाळावर रुपयाचा डाग देतात व पुरुषाची "गरड" नावाच्या जोशीकडून अर्धी मिशी काढली जाते तर मुलीची डाव्या बाजुची केसाची बट कापतात. व त्या दोघांनाही जातीबहिष्कृत करतात. जातीच्या लोकांत भांडणे होतात तेव्हा १५ रुपये दंड घेवून त्यांची भांडणे मिटवितात.

*. भोसले, विश्वनाथ संतराम ता. चाकूर यांच्या मुलाखतीवर आधारित कार्यालयीन सर्वेक्षणाच्या वेळी (डिसेंबर १९९६) संबंधीत रक्कमा सांगितल्या आहेत. कालपरत्त्वे त्यात बदल/वाढ होऊ शकते.

वरील बाबी समाजाच्या नितिमत्तेविषयीच्या धारणा स्पष्ट करतात. तसेच त्यांची आर्थिक क्षमताही दर्शवितात.

गरोदरपणातील विधी सर्व मराठ्यांप्रमाणेच करतात. त्यांची कुलदैवते तुळजापूरची भवानी, खंडोबा, मरीमाता, हुदाडे, महाराज, बालाजी व मशाची आई ही आहेत.

बहुतेक लोकांची घरे ही कुडाची आहेत. भाषा मराठी, व साक्षरतेचे प्रमाण कमी आहे त्यामुळे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगतात.

ढोर : अनुसूचित जातीमधील एक. गुरांची कातडी कमावित असल्यामुळे यांना ढोर (गुरुं) हे नाव पडले असावे. यांच्या बुधलेकरी, बुंदेलखंडी, हिंदुस्थानी, केकय्या, कर्नाटकी, खेतरफेडी व मराठा या सात पोटभेदांपैकी जिल्ह्यात मराठा व कर्नाटकी हे दोनच भेद आढळतात. त्यातही बहुतांश मराठी भाषीक ढोर आहेत. जिल्ह्यात कठके, इंगळे, साबणे, दरवेशी, गजापोळ, सावरकर, कोकणे इत्यादी आडनावे आढळतात. ही सर्व कुळे आहेत. यांच्यात जातपंचायत आहे. भांडण तंटे सोडविण्यासाठी जातपंचायतीचा आधार घेतात. जात पंचायतीने दिलेला निर्णय महत्त्वाचा मानतात.

पूर्वी लग्न बाल वयात होत असत, आता होत नाहीत. समान आडनावात, मावस बहिण, भाची यांच्याशी लग्न करता येत नाही. यांची उंबर, जांभूळ वेल, परशा इत्यादी देवके असून समान देवकात विवाह होत नाही. आते व मामे बहिणीशी लग्न करता येते. लग्न पक्के झाल्यावर सुपारी फुटली असे म्हणतात. या कार्यक्रमांनंतर दोन्ही पक्षाकडून आप्तस्वकीयांना पेढे वाटून सोयरीक जमल्याचे सांगितले जाते. त्यास "कान सुनावनी" म्हणतात.

लग्न वराकडे होते. लग्नाच्या एक दिवस अगोदर वराकडील मंडळी नवरीस वराकडे नेताना ऐपतीनुसार कपडे व दागिने देतात. लग्नात देवक बसवून एरंडीच्या फांट्यांचा मांडव घालतात. कुंभाराकडून सात कोरी मडकी आणून मांडवात चौफेर ठेवून व त्याला दोरा गुंडाळून त्यामध्ये नवरा नवरीस अंघोळ घालतात. लग्न लागण्यापूर्वी सर्वांना आहेर देतात व त्यानंतर विधीपूर्वक लग्न लावले जाते. लग्न लागण्यापूर्वी सर्वांना आहेर देतात व त्यानंतर विधीपूर्वक लग्न लावले जाते. लग्नात गोड जेवण देतात.

लग्न विधी पार पडल्यानंतर पायधुणी, कंकण सोडणे, "साडे" (साडे म्हणजे वधू वरांस आणलेली उंची वस्त्रे) इत्यादी विधी पार पाडतात. यांच्यात घटस्फोट, विधवा पुनर्विवाहास मंजूरी आहे. बाळंतीण झालेल्या स्त्रीस जर मुलगा झाला असेल तर पाचवीपूजन ७ व्या दिवशी व मुलगी असेल तर २० व्या दिवशी पाचवीपूजन व न्हाणी पुजतात. विटाळ १२ दिवस पाळतात. त्यांची कुलदैवते कौंडण्यपूरची भवानी, जेजुरीची जनाई, खंडोबा, शिंगणापूरचा महादेव व पंढरपूरचा विठोबा ही होत. मृतास पुरतात. तिसऱ्या दिवशी माती सावडण्याचा कार्यक्रम करतात.

तेली : तैल किंवा तौलिक या संस्कृत शब्दावरून तेली हे नाव पडले आहे. या शब्दाची तीळीपासून व्युत्पत्ती झाली असावी. तेल गाळणे हा त्यांचा परंपरागत मुख्य व्यवसाय होय. तेली जातीची निर्मिती शनी या ग्रहापासून झाली आहे असा एक समज आहे. तेली जातीत पंचम किंवा लिंगायत, कानडे, लाड,

गुजर, आयर, कडू, कांडी, शनिवारे, शुक्रवारे, राठोड, परदेशी व तिळवण, सोमवारे आणि गांधी ही अर्धी पोट जात अशा एकूण साडेबारा पोटजाती आहेत. या सर्व पोटजाती विविध कलांमध्ये विभागल्या गेल्या आहेत ही कुळे बहिर्विवाही गट आहेत.

जिल्ह्यात उद्योग तेली, तीरमळ तेली, परदेशी तेली व लिंगायत तेली या पोटजाती आहेत. लोखंडे, व्यवहारे, शिरसागर, राऊत, गवळी, नऊगिरे, कलशेटी, हेरकर, बेदरे, कोरे, देशमाने इ. आडनावे यांच्यात आढळतात. विवाहविधी हिंदू पध्दतीप्रमाणेच असतो. यात साखरपुडा, हळदी, देवकार्य, शेवंतीपुजन, बहुले, रुखवत, गुगुळ, पायधूनी. इत्यादी विधी पार पाडतात. यांच्यात विधवा व विधूर विवाह रूढ आहे.

पहिले बाळंतपण सामान्यत: माहेरी होते. सातव्या किंवा नवव्या महिन्यात चोरचोळी व डोहाळे जेवणाचा कार्यक्रम होतो. या कार्यक्रमात सुवासिनीकडून गर्भवतीची ओटी भरून साडी-चोळी दिली जाते. त्यावेळेस गर्भवतीचे कौतुक करतात. आवश्यकता असेल तरच बाळंतपण प्रसुतीगृहात करतात. थोडे सुशिक्षित वगळता बाळंतपण घरीच करतात. खेड्यातील महिला अगदी बाळंतपणापर्यंत घरगुती व शेतीची कामे करतात. बाराव्या दिवशी किंवा सव्वा महिन्यानंतर नामकरण करतात. मृतास पुरतात. बाळंतीण किंवा गरोदर महिला मृत पावल्यास प्रेत जाळतात.

तेली हे शुध्द शाकाहारी आहेत त्यामुळे त्यांच्या आहारात ज्वारीची भाकरी, वरण, भात, चपाती, पिठलं, शेंगदाण्याची चटणी, दही, ताक, पुरणपोळी, गव्हाची खीर, तांदळाची खीर, हुलपल्ली (ताकाची कढी) शेवयाचा भात इत्यादी प्रकार आढळतात. बहुतांश तेली गव्हाळ वर्णाचे, मध्यम बांधा व उंचीचे असून त्यांची राहणी, वेशभूषा कुणब्यांप्रमाणेच दिसून येते. शिक्षणाचा प्रसार झाल्याने या समाजातील लोक शासकीय नोकरीत आढळतात.

धनगर : महाराष्ट्रात सर्वत्र आढळणारी जात. धनगर शब्दाची उत्पत्ती धेनु (गाय) या संस्कृत शब्दापासून अथवा धन (संपत्ती) या शब्दापासून झाली असावी. कन्नड भाषेत धनगरांना दनगार म्हणतात. दन म्हणजे गुरेढोरे, त्यावरूनही धनगर शब्द बनला असावा. जमीन नांगरताना शेळ्या व मेंढ्या वारुळातून बाहेर येऊन शेतकऱ्यांना पिकांची नासधूस करू लागल्याने यातून सुटका होण्यासाठी त्यांनी महादेवाची प्रार्थना केली असा समज असल्याने ते दिवाळीच्या दिवशी वारुळाची भक्तिभावे पूजा करतात. तसेच शेळ्या-मेंढ्या हाकताना हरहर असा उद्‌गार करतात. हरहर हे महादेवाचे नाव आहे.

परंपरागत हे मेंढपाळ असून मेंढ्यांशिवाय ते गाई-म्हशीही पाळतात. ते मेंढ्या बकऱ्यांची पैदास करून विकतात. मैदानात राहणारे काही धनगर घोड्यांचीही पैदास करतात. ते गुरांचा व्यापारही करतात. काही शेळीचे दूध विकतात. काही धनगर घोंगड्या विणण्याचा व्यवसाय करतात. शेतीव्यवसाय करणारे धनगर स्थायिक झालेले दिसतात. हवामानात होणारे फेरबदल व जंगलातील वनौषधींचीही त्यांना माहिती असते. त्यामुळे काही धनगर वनौषधी विकतात.

यांच्यात पुढील बावीस पोटजाती आहेत. अहिर, अस्सल किंवा मराठा, बनजी, बरगे बंदे किंवा मेटकरी, ढंगे, गडगे, गवळी, धोग-तुन्य, हटकर किंवा झेंडेवाले, होळकर, कंगर, खिक्री, खिल्लारी किंवा थिलारी, खुटे किंवा खुटेकर, कुकटेकर, लाड, मेंढे, म्हसकर, सनगर, शिळोत्या व उटेगर. यातील

हटकर ही घोंगड्या विणणारी पोटजात असून हटकर मराठवाड्यात व अकोला विशेषतः वाशीममध्ये बहुतकरून आढळतात. वाशीम भोवतालच्या डोंगराळ प्रदेशात जेव्हा त्यांचा अंमल होता तेव्हा त्यांना बरेच महत्व प्राप्त झाले होते. हे हटकर आपणास बरगे म्हणजे भाला वापरणारे असे म्हणवितात. हटकरांना बारगी म्हणूनही ओळखले जाते. मजबूत बाह्याचे कृष्णवर्णी हटकर शिवाजीच्या सैन्यात मोठ्या संख्येने होते. ते मराठाकाळात चांगले लढवय्ये म्हणून नावारूपास आले. त्यांना नाईक किंवा राव हे उपपद लावण्यात येते. हटकरांचा एवढा दरारा होता की, त्यांची भिती निजामालाही वाटत होती व म्हणून त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी निजामाने ब्रिटिश सैन्याची मदत घेतल्याचे इतिहासात नमूद आहे. हटकरांत पूर्वी दाढी-मिशा न काढण्याची प्रथा होती. जिल्ह्यात सुटेकर धनगरही आढळतात. खिल्लारी गावोगाव हिंडतात.

धनगर हे देवकवादी असून यांच्यात सूर्यफूल, कमळ, पांचपालवी, इत्यादी देवके आहेत. त्यांच्यात आडनावांनी दर्शविली जाणारी अनेक कुळे आहेत. कूळ व देवक एकच असेल तर लग्न जमवित नाहीत. मामेबहिणीशी लग्न करता येते. आते व मावसबहिणीशी लग्न निषिध्द मानले जाते. पूर्वी बालविवाहाची प्रथा होती. ब्राह्मणांकडून मुहूर्त काढून लग्न करतात. विधवा विवाहास व सोडचिठ्ठीस मोकळीक आहे. पत्नीचे निधन झाल्यास तिच्या धाकट्या बहिणीशी लग्न करण्याची पध्दती आहे. यांच्यात वधूमुल्य आणि वरदक्षिणा देण्याची प्रथा आहे. पुनर्विवाह जातपंचायतीच्या संमतीने होतात.

लग्नानंतर आहेर करतात. नवरदेव वधुला घेऊन गावी जातो त्यानंतर ते देवाला जातात व सत्यनारायणाची पुजा करतात. किंवा गोंधळ घालतात.

गरोदर स्त्रिला ४ थ्या महिन्यात नवऱ्याच्या घरी चोरचोळी घालतात. डोहाळे जेवण करतात. जावयाला आहेर करतात. मुलीचे बाळंतपण माहेरी होते. पाचवीपुजन करतात. बाळाचे बारसे करतात व विटाळ बारा दिवस पाळतात.

जातीतील पुरुष व स्त्रीचे अनैतिक संबंध आढळल्यास त्यांच्याकडून १०००/१२०० रुपये दंड आकारून जातीच्या लोकांना जेवण दिल्यास त्यांना जातीत घेतले जाते. परंतु मुलीचे परजातीच्या पुरुषाशी अनैतिक संबंध आढळल्यास तिला जातीबाहेर काढतात. तसेच जातीच्या पुरुषाचे परजातीच्या स्त्रीशी अनैतिक संबंध असल्यास त्यालाही जातिबहिष्कृत करतात. अजुनही ही पध्दती सुरू आहे.

शेतात मेंढ्या बसवण्यासाठी जे लोक मेंढ्या राखतात त्यांना शेतकरी दोनवेळची भाकरी देतात. मेंढ्यांची लोकर सहा महिन्यातून एकदा कापतात व लोकर साधारणपणे दहा रूपये किलो विकतात. यांची घरे मातीची असून छपरावर पत्रे असतात. तर काही लोक झोपड्यात राहतात. शिक्षणाचे प्रमाण फारच कमी दिसून येते. कुलदैवते म्हणून जेजुरीचा खंडोबा व सिध्दाजी यास मानतात. मृत व्यक्तिस जाळतात व तेराव्या दिवशी तेरवी करतात.

लातूर जिल्ह्यात सुर्वे, वेजक्वले, केराळे, बने, बोकरे, कोरडे, होळकर, सुर्यवंशी, डुकरे, व्यवहारे, सरोदे, भोकटे, बाडगर, मदने, बनकर, शिंदे, शेंडगे, डोंबरे, पावले, खांडेकर, गादेकर, पांढरे, कांबळे, गायकवाड, बनसोडे, चांदडकर, थोरात, कोळेकर, दुधमाने, चौरे, कोकाटे, गोडखे, अडसूळ, काळे, मुळे, सौदागर, हिंगळे, हटकर, नाडकर, बिंगे, बेराडे, शेळके, सुर्भे, वाकडे इत्यादी आडनावे आढळतात.

बहुतेक धनगर भटके जीवन जगून पावसाळ्यात घरी वास्तव्य करतात त्यामुळे त्यांचे विवाह बहुधा पावसाळ्यातच होतात. लग्नाच्या आधी कुंभाराकडून मुंजाचा डाक घालतात.

अनुक्रमणिका

धनगरांची खास दैवते म्हणजे महादेव, खंडोबा, विरोबा आणि रानदेवी होत. याखेरीज ते विठोबर, मारुती, सटवाई, जनाई, म्हसोबा इत्यादी देवतांची उपासना करतात. कोल्हापूरजवळील वाशीचा विरोबा, जेजूरी व पालीचा खंडोबा व सांगली जिल्ह्यातील झरे येथील विरोबा या दैवतांना ते फार मानतात व तेथील जत्रांना हमखास जातात. खंडोबाची बानुबाई नायक पत्नी धनगर जातीची होती असे म्हणतात. म्हणून तिला मेंढ्या अर्पण करतात. एक विषेश प्रथा लातूर जिल्ह्यात आढळते. दिपावलीच्या दिवशी समारंभपूर्वक मेंढ्यांचे लग्न लावतात.

धनगर काटक, कष्टाळू व आतिथ्यशील असतात. वर जाडसर अंगरखा कमरेच्या पुढच्या बाजूस त्रिकोणी पडदा सोडलेली लंगोटी, डोक्याला पागोटे, हातात जाड काठी व पायात जाड वहाणा असा त्यांचा पोशाख असतो. भाकरी, चटणी, कांदा व डाळ हा त्यांचा आहार होय. काही पुरुष उजव्या हातात चांदीचे कडे व कानात बाळी घालतात. महिलाही चांदीचे दागीने वापरतात.

न्हावी : एक इतर मागासवर्गीय जात. नापित या संस्कृत शब्दापासून न्हावी या नावाची उत्पत्ती झाली असावी. एका दंतकथेनुसार शिवाच्या मानेला वेष्टून राहिलेल्या शेषापासून किंवा शिवाच्या नाभीपासून आपली उत्पत्ती झाली असे ते सांगतात.

जिल्ह्यात मराठा न्हावी, लिंगायत न्हावी, तेलंगी न्हावी या पोटजाती असून त्यांच्यात सुर्यवंशी, शिंदे धोमडे, गायकवाड, गवळी, सोळुंके, जाधव, साखरे, राऊत, हेमाडे, बंडे, कचरे, शिरसागर, पवार, चौधरी, कवटेकर, काळे, यादव, शेंद्रे, कस्तुरे इत्यादी आडनावे आढळतात. मराठा न्हावी कपाळास गंध लावतात परंतु लिंगायत न्हावी भस्म लावून गळ्यात किंवा दंडावर लिंग बांधतात. धार्मिक विधीसाठी जंगम पुरोहितास बोलावितात. मराठा न्हाव्यांचे धार्मिक विधी ब्राह्मण करतात. त्यांचे धार्मिक रितीरिवाज कुणब्यांप्रमाणे आहेत. खंडोबा, नृसिंह ही त्यांची कुलदैवते आहेत. याशिवाय ते बालाजीसही पुजतात. हिंदूंचे सर्व सण साजरे करतात.

व्यवसायामुळे न्हाव्यांचा सर्वांशी निकटचा संबंध येत असल्याने ही जात हुशार व सर्वांचे मर्म जाणणारी असल्याचा प्राचीन लौकिक आहे. त्यामुळे पूर्वीच्या काळी विवाह जमविण्याच्या कामात त्यांचा इतरांना उपयोग होत असे. केस कापणे, दाढी करणे, मुलांचे जावळ काढणे. अजुनही मुंजीत बटुचे मुंडन करणे व मृत व्यक्तींच्या मुलांचे केस कापणे अशा कामांसाठी न्हाव्यांना बोलाविले जाते.

परीट : एक इतर मागासवर्गीय जात. धोबी व परीट नावाने ओळखली जाते. परंपरेने कपडे धुणे, इस्त्री करणे हा व्यवसाय करतात. याशिवाय बलुत्याची कामे करतात. धोबी हे नाव म्हणजे धुणे या संस्कृत शब्दापासून पडलेले असावे. यांच्यात देशी परीट, कोकणी परीट, परदेशी व कामाठी या पोटजाती आहेत. जिल्ह्यात यांच्यात मडोळे, मुळे, पवार, जाधव, तेलंगे, वाघमारे, शिंदे, राऊत, सरपाळे, चव्हाण, चौगुले, देशमुख, पिंपळे, पोपटे, कापडे, शेळके, इत्यादी आडनावे आढळतात. त्यांच्यात परंपरेने रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. मात्र देवक बहिर्विवाह पध्दती आहे. एकच देवक असणाऱ्या मुला-मुलींचे विवाह होत नाहीत. आतेबहिण मामेबहिण भावंडांचा विवाह प्रथेप्रमाणे होतो. घटस्फोट व विधवा पुनर्विवाहाची पध्दती आहे. विधवेला मयत पतीच्या कुळात विवाह करता येत नाही.

अनुक्रमणिका

पारधी : पारधी हा शब्द पारध म्हणजे शिकार या व्यवसायावरून प्राप्त झाला आहे. यांच्यात गाव पारधी व फासे पारधी असे दोन प्रमुख पोटभेद असून त्यातही फांसपारधी, फासेपारधी, चितापारधी, लंगोलीपारधी, टकणकर, बहेलिया, बहेल्लिया, शिकारी, आडवी चिंचेर, टाकिया असे प्रकार आहेत. याशिवाय हरणपारधी, मोरपारधी, कोस्पर पारधी, वाघरीपारधी, मेवारीपारधी, टकारीपारधी, पालपारधी, राजपारधी, कोरचरपारधी, भिल्लपारधी, लंगोलीपारधी, गायपारधी इत्यादी त्यांच्या अनेक पोटजाती आहेत. हे सर्व प्रकार व्यवसायावरून पडले असावेत.

यांच्यात पोटजातीत तसेच समान देवकात लग्न करीत नाहीत. आतेबहिण, मावसबहिण व मामेबहिण यांच्याशी विवाह करता येतो. विधवाविवाह व बहुपत्नीत्वास परवानगी आहे. अराई झुडुपाचे काटे, बोरीच्या झाडाचे काटे, शमीची पाने, जांभूळ, आंब्याची पाने आणि उंबर ही त्यांची मुख्य देवके आहेत. मरीआई, मांढरदेवी, भवानी, जरीमरी, खंडोबा, लक्ष्मी, दुर्गा, सप्तशृंगी ही त्यांची उपास्य दैवते आहेत.

पारध्यांच्या वस्तीस पारधवाडा म्हणतात. गावाच्या कोपऱ्यात तात्पुरती वस्ती उभारुन राहतात. त्यांचे घर म्हणजे गवताचे किंवा जाड कापडाचे पाल असतात. राहणीमान साधे असते. पारधी वाघरी भाषा बोलतात. त्यांच्या भाषेत सांकेतिक शब्द असतात. मृत व्यक्तिस जाळतात व पुरतात. मात्र बाळंतपणात मेलेल्या स्त्रियांना जाळतात. दहा दिवस सुतक पाळतात व अकराव्या दिवशी नातेवाईकांस भोजन देतात.

पांचाळ : जिल्ह्यात आढळणारी एक जात. पंच आळ म्हणजे पाच हुन्नर यावरून हा शब्द आला आहे. सुतार, सोनार, कासार (तांबट), लोहार व शिल्पकार (पाथरवट) या पांच कारागीर जातींचा समुदाय, गट मिळून पांचाळ हे नाव मिळाले आहे. जिल्ह्यात यांच्यात सुवर्णकार, रतकार, विश्वकर्मा, चौधरी, सुतार, आगलावे, पांचाळ इत्यादी आडनावे आढळतात. पांचाळ लोक स्वतःला ब्राह्मण मानतात. जानवे घालतात व ब्राह्मणांप्रमाणे सगळे संस्कार करतात. पांचाळांच्या पाच वर्गात परस्पर विवाहसंबंध होतात. सुपर्ण दैवज्ञ, अवनुभवन त्वष्ट, प्रस्थन शिल्पी, सनग मनू व संतन मय अशी त्यांची पाच गोत्रे आहेत. ही नावे विश्वकर्माच्या पाच पुत्रांच्या नावावरून पडली आहेत.

लग्नसंबंध ठरवितांना आईवडीलांचा पुढाकार असतो. आतेबहिण व मामेबहिणीशी लग्न करण्याची पध्दत आहे. लग्न हे ब्राह्मणांसारखेच करतात. पांचाळांची कालिका ही कुलदेवता असून गणपती, सूर्य, खंडोबा, बहिरोबा या देवतांनाही ते भजतात. पांचाळ हे कारागीर असल्याने ते आपल्या हत्यारांची पुजा करतात. मृतास जाळतात. सर्व अंत्यसंस्कार ब्राह्मणांप्रमाणेच करतात.

ब्राह्मण : महाराष्ट्रात ब्राह्मणांच्या एकूण शाखांपैकी प्रामुख्याने जिल्ह्यात देशस्थ ब्राह्मणांची संख्या सर्वाधिक आहे. सर्वच ब्राह्मण वेदप्रामाण्यवादी आहेत. वेदाभ्यास किंवा धर्मशास्त्राचा अभ्यास करणारे ब्राह्मण अत्यल्प आहेत. यांच्या सर्व शाखा परंपरेनुसार स्वतंत्र आंतर्विवाह गट असून त्यांच्यात मिश्रविवाह अनुज्ञेय नाही. तथापि सामाजिक पर्यावरणाचे दृष्टीने सर्व ब्राह्मण शाखा म्हणजे एक सजातीय समूह आहे.

अनुक्रमणिका

देशस्थ : देशस्थ हे सर्वात जुने रहिवासी मानले जातात. जिल्ह्यात देशस्थांत ऋग्वेदी व यजुर्वेदी हे गट आहेत. ऋग्वेदी स्मार्त (शिवभक्त) किंवा वैष्णव असतात. यजुर्वेदींमध्ये शुक्ल यर्जुवेदी व कृष्ण यजुर्वेदी या पोटशाखा आहेत. पूर्वी शुक्ल यजुर्वेदी व कृष्ण यजुर्वेदी यांच्यात मिश्रविवाह होत नसत. तथापि अलीकडील काळात परंपरेची बंधने शिथिल झालेली आहेत. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांत अगस्त्य, अंगिरस, अत्री, कपी, भृगु, काश्यप, वासिष्ठ, विश्वामित्र, कौशिक, गौतम, जामदग्न्य, भारव्दाज, शांडिल्य इत्यादी ५२ गोत्रे आढळतात. शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेची १३० गोत्रे आहेत. सर्वसाधारणपणे गोत्र म्हणजे वंशप्रमुखाचे नाव आणि प्रवर म्हणजे गोत्रांचे पूर्वज असे म्हटले जाते. हे दोन्ही रक्तसंबंध दर्शवितात. त्यामुळे सगोत्र, सप्रवर व सपिंड विवाह निषिध्द मानले जातात. देशस्थ ऋग्वेदी शाक्ल शाखेचे असून त्यांचे कर्मकांड आश्वलायन गृहसूत्राप्रमाणे होतात. त्यांचे उपाध्यय स्वजातीय असतात. स्मार्त लोक शंकराचार्याचे अनुयायी आहेत. शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण शृंगेरी पीठाचे अनुयायी आहेत. या व्यतिरिक्त रामदासी, दत्त गाणपत्य व भागवत संप्रदायाचे लोकही यांच्यात पुष्कळ आहेत.

देशस्थ ऋग्वेदींमध्ये मामेबहिणीशी विवाह करण्यास अनुज्ञा आहे. शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण विवाहासाठी मातूलगोत्र वर्ज्य मानत असल्यामुळे त्यांच्यात मातूल कन्यापरिणय (मामाच्या मुलीशी लग्न करणे) रूढ नाही. लग्न निश्चित झाल्यावर सीमांतपूजन हा पहिला कार्यक्रम असतो. त्यानंतर विवाहाचा संकल्प करून गणपतिपूजन, कुलदेवतापूजन, मातृकापूजन, ग्रहमुख, पुन्याहवाचन, वाङःनिश्चय, मधुपर्क वगैरे विधी करतात. कन्यादान, लाजा होम, सप्तपदी हे प्रमुख विधी झाल्यावर ऐरणीदान, वरात, लक्ष्मीपूजन वगैरे उपचार होतात व विवाहसमारंभ संपतो.

देशस्थ भटजींचे, भिक्षुंकी व पौराहित्य करतात तथापि आज ते सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत. देशस्थामध्ये स्मार्त व वैष्णव हे भेद त्यांच्या उपास्य दैवतावरून उद्‌भवलेले आहेत. लातूरमधील बहुसंख्य देशस्थ ब्राह्मण सोनारीचा भैरोबा, तुळजापूरची भवानी, माहुरची रेणुका, आंबेजोगाईची योगेश्वरी, जेजुरीचा खंडोबा, तिरुपतीचा नृसिंह (बालाजी) आणि व्यंकटेश इत्यादी देवदेवतांची पुजा करतात.

हे मूळतः शाकाहारी असून शुध्दतेला महत्त्व देतात.

कोकणस्थ : जे ब्राह्मण कोकणातून आलेले आहेत त्यांना कोकणस्थ किंवा चित्पावन ब्राह्मण असे म्हणतात. परंतु काही विव्दानांच्या मते असा लावलेला अर्थ बरोबर नाही. आजतरी चित्पावन म्हणजे कोकणस्थ असे समीकरण रूढ आहे. आणखी एका मतानुसार कोकणस्थांचे (चित्पावनांचे) मूळ वसतिस्थान मराठवाडा भागातील बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई हे गाव होय. कोकणस्थांना चित्पावन हे नाव त्यांच्या चिपळूण येथील वसाहतीमुळे प्राप्त झाले असावे.

कोकणस्थांच्या पोटजाती नाहीत. मात्र ऋग्वेदीय व हिरण्यकेशीय असे दोन प्रकार आहेत. उदाहरणार्थ आठवले, परांजपे, फडके, कुंटे, टिळक, बर्वे, केळकर, काणे इत्यादी घराणी ऋग्वेदीय, आश्वलायन सूत्र शाकल शाखीय होत. त्याचप्रमाणे लिमये, बोडस, नेने, ओक, देवधर, साठे, खरे, जोग, मोडक, बापट, लेले इत्यादी घराणी कोकणस्थच, परंतु यजुर्वेदीय हिरण्यकेशी तेत्तरीय शाखीय होत. दोन्ही शाखांचे बेटीव्यवहार होतात. त्यांचे मौंज, विवाह व अत्येंष्टि आणि संस्कार समान असले तरी प्रयोग निराळे असतात. कोकणस्थ व देशस्थांची गोत्रे समान आहेत.

कराडे : हे ब्राह्मण मूळचे कृष्णा-कोयनेच्या संगमावर असलेल्या कराड या गावचे आहेत. त्यांना कऱ्हाडे असेही म्हणतात. हे सर्व स्मार्त असून ऋग्वेदी व आपस्तंब आहेत. कऱ्हाडे ब्राह्मण संकेश्वर पीठाच्या शंकराचार्याचा धर्मविषयक अधिकार मानतात. त्यांची गोत्रे देशस्थ व कोकणास्थाप्रमाणेच आहेत.

अनुक्रमणिका

बुरुड : ही एक अनुसूचित जात होय. बांबूच्या पट्टयांपासून सूप, टोपल्या, दुरड्या, करंडी व चटई विणण्याचे काम तसेच वेताच्या खुर्च्या, शिड्यासारख्या वस्तू करण्याचे काम परंपरेने बुरुड जातीचे लोक करतात. जिल्ह्यात यांच्यात मोरे, जगताप, पवार, बुरवसे, कोबंडे, भावे, वाघे. सोनवणे, कोरडे, खैरे, सोनवणे, वडकिले, मोहिते, देवके, पळसे, सर्वशे इत्यादी बहिर्विवाही कुळे आढळतात. यांच्यात जातपंचायत होती. पूर्वी बालविवाह होत असत. आता होत नाहीत. साखरपुड्यात मुला व मुलीला नवीन कपडे देतात व उपस्थितांना गोड जेवण देतात. लग्न व धार्मिक विधीस ब्राह्मणांना व अंत्यविधीस जंगमास बोलावतात. लग्नाआधी खंडोबा किंवा अंबाबाईच्या नावे गोंधळ घालतात.

बुरुड देवकवादी तसेच चेतनवादी आहेत. त्यांची देवके मोरपिस, होला, कोंबडा, (डुक्कर) तरवड, रुई, खैर, पिंपळ, वड इत्यादी आहेत. समान देवकात विवाह करीत नाहीत.

घटस्फोट, पुनर्विवाह व विधवाविवाहास मान्यता आहे. गरोदर स्त्रीचे सातव्या माहिन्यात "डोहाळे जेवण" करतात. पहिले बाळंतपण आईच्या घरीच होते. पाचवीपुजन होते.

खंडोबा, जोतिबा, बहिरोबा, भवानी, राम मारुती व विठोबा यांची पुजा करतात. हिंदूंच्या सर्व देवदेवतांची पुजा करतात. ते पिरास पुजतात. "पेळ अमावस्या" साजरी करतात. उपाध्ये ब्राह्मण असतात.

बौध्द धर्म : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ मध्ये आपल्या लाखो अनुयायांसह बौध्द धर्माची दीक्षा घेतल्यामुळे बौध्द धर्माच्या पुनरुत्थानाला चालना मिळाली. महाराष्ट्रात महार जातीच्या लोकांनी त्यावेळी मोठ्या प्रमाणावर बौध्द धर्म स्वीकारला. लातूर जिल्ह्यातही या धर्मांतरामुळे त्यांच्या जीवनात बराच बदल घडून आला. बौध्द धर्माचे अनुयायी झाल्यामुळे तद्वत ते आता जाती अथवा पोटजाती मानीत नसले तरी व्यवहारात अजुनही जाती पोटजातीचे अवशेष आहेत. जिल्ह्यातील बौध्दांची आडनावे पुढीलप्रमाणे आहेत. कांबळे, करवंजे, गायकवाड, गवळी, सुकाळे, जोगदंड, धरणे, चपडे, कुटवाळ, नलवाडे, भोसले, शिंदे, हुद्दाळे, साळुंके, सगर, पाटील, लाडे, खंदाळे, सावंत, वाडकर, मोटेगावकर, नरवाडे, पांढवडे, सुर्यवंशी, जाधव, शिरसागर, पवार, शेख, पांचाळ, गाडेकर, गीर, स्वामी, मुळे, मोरे, कासारकर, चव्हाण, घाडगे, चक्रे, कदम, बोडके, वाघमारे, दाभाडे इत्यादी.

सर्वसाधारणपणे मुलीचे व मुलाचे लग्नाचे वय अनुक्रमे १८ व २१ वर्षाचे असून बालविवाहाची प्रथा बंद होत आहे. मुलीची निवड झाल्यावर मुलाचे आईवडील आपले निवडक नातेवाईक आणि काही प्रमुख व्यक्तींसह साखरपुड्यासाठी मुलीच्या घरी जातात. एका उच्चासनावर भगवान बुध्द व डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेसमोर अगरबत्या व मेणबत्या लावतात. सुवासिनी नियोजित वधूला कुंकूम तिलक लावतात. वधूवराने पांढरी नवी वस्त्रे परिधान केलेली असतात. बौध्दाचार्य किंवा भिक्षू नियोजित वधूवरांना प्रतिमांना फुले अर्पण करावयास लावून त्रिसरण व पंचशील प्रदान करतो. यानंतर त्रिरत्न वंदना म्हटली जाते. वधूवरास समोरासमोर उभे करतात. परिस्थितीनुरुप (ऐपतीनुसार) सोन्याच्या अंगठ्या एकमेकांच्या बोटात घालतात व पुष्पगुच्छ देतात. मात्र साखरपुडा केलाच पाहिजे असे कोणतेही धार्मिक बंधन माही. ते आपल्या ऐपतीवर अथवा इच्छेवर अवलंबून आहे.

अनुक्रमणिका

विवाह समारंभ मुलीच्या घरी उभारलेल्या मंडपात किंवा मंगलकार्यात होतो. लग्नप्रसंगी वधूवर पांढरे वस्त्र परिधान करतात. उच्चासनावर भगवान बुध्द व डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमा ठेवून त्यांच्यापुढे अगरबत्या व पाच मेणबत्या लावतात. प्रतिमांसमोर पाण्याने भरलेला मातीचा नवीन कुंभ असतो. त्यात बोधिवृक्षाची अथवा नागवेलीची पाने ठेवतात. कुंभाच्या तोंडाला तीन किंवा पाच पदरी पांढरा धागा गुंडाळलेला असतो. वधूवर प्रतिमांना फुले अर्पण करतात व त्यांच्यापुढे एकमेकांसमोर तोंड करून उभे राहतात. भिक्षू कुंभाच्या टोकाला गुंडाळलेल्या धाग्याचे एक टोक आपल्या हातात धरतो. दुसरे टोक वधु वरांच्या हातात असते. नंतर भिक्षू त्रिसरण व पंचशील म्हणतो आणि त्याच्या मागे वधूवर म्हणतात. यानंतर भिक्षू त्रिरत्न वंदनपाठ करतो. त्रिरत्न वंदना झाल्यावर वधूवराच्या हातातील धागा काढून घेऊन तो कुंभात सोडतात, व त्यांच्या हातात पुष्पमाला देतात. भिक्षू किंवा बौध्दाचार्य जयमंगल अष्टगाथा म्हणण्यास प्रारंभ करतो. शेवटची गाथा संपल्यावर भिक्षू पहिल्यांदा साधू म्हणतो यावेळी वधुवराच्या गळ्यात पुष्पहार घालून त्याचा पती म्हणून स्वीकार करते. भिक्षू दुसऱ्यांदा साधू म्हटल्यावर वर वधुच्या गळ्यात पुष्पहार घालतो व तो तिसऱ्यांदा साधू म्टल्यावर गाथेच्या शेवटी प्रत्येक उपस्थित लोक वधूवरांवर पुष्पवृष्टी करतात. नंतर वाद्यांचा गजर होतो, त्याचवेळी लोक टाळ्या वाजवतात. वधूवर प्रतिमांसमोर हात जोडून उभे राहतात व भिक्षू काही गाथांचे पठन करून वधूवरांचे अभिष्टचिंतन करतो. त्यावेळेस कुंभातील धागा वधूवरांच्या हातात बांधतो.

१४ एप्रिल व ६ डिसेंबर अनुक्रमे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिन व महापरिनिर्वाणदिन म्हणून पाळतात. दुसरा किंवा १४ ऑक्टोबर धम्मचक्रप्रवर्तनदिन म्हणून व वैशाख पौर्णिमा बुध्द जयंती म्हणून मोठ्या उत्साहाने साजरे करतात. या प्रसंगी मिरवणुका व जाहीर सभा घेतल्या जातात.

मृतास अंघोळ घालून, वस्त्राने अंग झाकून तिरडीवर बांधतात. स्मशानात नेऊन मृतास अग्नी देतात किंवा पुरतात. तिसऱ्या दिवशी मृताच्या अस्थी गोळा करून नदीत विधीवत विसर्जन करतात. त्याचवेळेस आर्थिक ऐपतीनुसार ज्ञातीबांधवांना भोजन देतात.

भोई : एक जात. मेणे व पालख्या वाहणे हा पूर्वी यांचा धंदा होता. त्यामुळे हा व्यवसाय करणाऱ्या इतरही अनेक जातीच्या लोकांना हे नाव मिळाले आहे. उदा. कहार व मल्हार लोक आपल्याला भोई म्हणवून घेतात. भोई लोक मासेमारी करीत असल्यामुळे त्यांना काही वेळा कोळी असेही म्हणतात. मुळात कोळी व तत्सम लोकांपैकी काहींना मेणे व पालख्या वाहून नेण्यासाठी निवडण्यात आले होते, असे यावरून दिसते.

यांच्यात पुढील पंचवीस पोटजाती आहेत. झिंगा भोई, परदेशी भोई, राजभोई, भोई, कहार, गोडिया कहार, धुरिया कहार, किरात, मधुआ, मांझी, जातिया, केवट, ढीवर, धीवर, धीमर, पालेवार, मछेंद्र, नावाडी, मल्हार, बोई, गाढव भोई, खाडी भोई, खारे भोई, ढेवरा.

मुलाचे वडील मुलीला मागणी घालतात. विवाह हिंदू पध्दतीप्रमाणे करतात. पहिल्या गर्भारपणात सातव्या महिन्यात गर्भवतीची ओटी भरतात. तिला माहेरी आणून हिरवी साडीचोळी व हिरवा चुडा घालतात. पहिले बाळंतपण सर्वसाधारणपणे माहेरीच करतात. पाचवी व षष्टी आणि बाराव्या दिवशी मुलाचे नामकरण करतात. भोईंचे खास दैवत म्हणजे महादेव होय. याखेरीज ते म्हसोबा, मारुती व विठोबा या देवतांची उपासना करतात. जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी या दैवतांनाही ते फार मानतात. मृतदेह पुरण्याची प्रथा आहे. ऐपतदार मृताचे दहन करतात. मृत्यू संस्कार इतर हिंदू लोकांप्रमाणेच केला जातो.

अनुक्रमणिका

मराठा : मराठ्यांची काही प्रमुख घराणी पंधराव्या व सोळाव्या शतकात विजापूरच्या अदिलशाही व अहमदनगरच्या निजामशाहीत सरकार वा अधिकारी पदावर होती. उदाहरणार्थ निंबाळकर, घारपुरे व भोसले आणि बहुतकरून त्यांचे भाऊबंद विविध शाह्यांच्या सेवेत होते. शिवाजी महाराजांनी औरंगजेबाशी पुकारलेल्या गनिमी युद्धात प्रामुख्याने ते प्रसिद्धीस आले.[५] मराठे स्वत:स राजपूत क्षत्रिय वंशाचे म्हणवून घेत असून त्यांचे पूर्वज राजपूतांमधील चौहान, पवनार, सोलंकी आणि सुर्यवंशी घराण्यांमधील मानतात.

मराठा हा विषमजातीय समाज आहे. त्यांत वंशीय सजातीयतेचा अभाव जाणवतो. मराठ्यांमध्ये दोन पोटजाती आहेत. कुणबी हा शब्द व्यवसायदर्शक नावाने प्रचलित आहे. जो शेती व्यवसाय करतो तो कुणबी, या अर्थाने हा शब्द प्रचलित आहे. मराठे राजपूत वंशाचे असून, त्यांच्या सूर्य, सोम, ब्रह्म, व शेष अशा चार शाखा आहेत. अस्सल मराठ्यांमध्ये ९६ कुळे आहेत.

चालुक्य, यादव, कदंब, शिलाहार, मौर्य, नळ, मानव्य, कलचुरी, मल्लसुर, गुर्जर, पल्लव, परमार, शालिवाहन या इतिहासप्रसिध्द संस्कृत नावावरून देशमुख, चाळके, जाधव, कदम, शेलार, मोरे, नलवडे, माने, कळचुरे (कचरे), मालुसरे, गुजर, पालव, पवार, साळवी या नावांची व्युत्पत्ती झाली असावी. जिल्ह्यात मराठ्यांमध्ये देशमुख, जाधव, खोंडके, बोराडे, जोगदंड, भोसले, चव्हाण, सुर्वे, घोरपडे, साळुंके, शितोळे, निंबाळकर इत्यादी बहिर्विवाही कुळे आढळतात. मराठ्यांची कुळे हीच त्यांची आडनावे असतात.

मराठ्यांचे कुलीन, लेकावळे व अकरमासे असे तीन पोटभेद आहेत. पूर्वी स्त्रिया पडदा पाळत असत. पूर्वी मराठ्यांमध्ये विवाहविच्छेदन आणि विधवाविवाह करणे निषिद्ध मानले जाई. शैक्षणिक सुधारणा व वैचारिक परिवर्तनाबरोबर मिश्रविवाहास पुर्वीसारखा विरोध राहिला नाही. किंबहुना सामाजिक रूढीची बंधने सैल होत असल्याचे आढळते.

मराठे देवकवादी आहेत. त्यांच्या देवकांमध्ये झाडे, पशूपक्षी आणि विविध वस्तू यांचा समावेश असतो.[६] उदाहरणार्थ आंबा, आघाडा, आपटा, हरिण, कासव, कुऱ्हाड, रुईचे फूल, मोर, मोरपीस इत्यादी. विवाहप्रसंगी उपरोक्त देवकांची उपासना केली जाते. ब्राह्मणांप्रमाणेच मराठे कुळांचीही गोत्रे आहेत. त्यांच्या काही गोत्रांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. अगस्ति, अंगिरस, अत्री, कौंडिण्य, कौशिक, माल्यवंत, भारव्दाज, दाल्भ्य, गग, गौतम, जामदग्नी, पराशर, शांडिल्य, वैरुण्य, वसिष्ठ, विश्वामित्र इत्यादी.

मराठ्यांमध्ये अंतर्विवाह अथवा बहिर्विवाहास रूढीचे बंधन नाही. त्यांच्यात सगोत्र विवाह होत नाहीत. तथापि गोत्रांना तेवढे महत्व देत नाहीत. मात्र समान देवक असलेल्यांमध्ये म्हणजेच समान कुळांमध्ये विवाह करीत नाही. पूर्वीच्या काळी बहुपत्नीत्वास अनुमती होती. व्दिभार्या पद्धतीचा काही जमीनदार, सावकार अवलंब करीत असत. तथापि व्दिभार्या प्रतिबंधक कायदा अमलात आल्यापासून बहुपत्नीत्वास बंदी आहे. त्यामुळे वरचेवर होणारे विवाहविच्छेद कमी झाले आहेत. आता विधवाविवाहास विरोध खूपच कमी झाला आहे. पूर्वीप्रमाणे बालविवाहही अलीकडे होत नाहीत.

---

५. रसेल, आर. व्ही. ॲण्ड हिरालाल, **दि कास्टस् ॲण्ड ट्राइब्स ऑफ दि सेंट्रल प्रोव्हिन्सेस ऑफ इंडिया खंड. ४** एशियन एज्यूकेशन सर्व्हिसेस, दिल्ली, मद्रास, १९९३, पृ. १९९.

६. कित्ता, पृ. १९९.

मराठा लोक, शाक्तपंथी असल्याने प्रामुख्याने महादेव व देवीचे उपासक आहेत. स्वाभाविकपणे खंडोबा, भैरव, मैलार, अशा भिन्न रुपात ते शिवोपासना करतात. अंबा, भवानी, दुर्गा, शितळा, लक्ष्मी, जोगाई, बोलाई या रुपात ते देवीची पूजा करतात. याव्यतिरिक्त ते राम, मारुती, विठोबा, गणपती व अनेक ग्रामदेवता यांनाही भजतात. मराठवाड्यातील बहुसंख्य मराठे वारकरी संप्रदायाचे असल्यामुळे पंढरपूरच्या विठोबास भजतात. लातूर जिल्ह्यातून आषाढ व कार्तिक महिन्यात वारकऱ्यांच्या पालख्या पंढरपूरला जातात. ज्यांचे कुलदैवत खंडोबा आहे ते वीरांची पूजा करतात. शूर पूर्वजांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून हा विधी केला जातो. वीरपूजा हा मराठ्यांचा सांस्कृतिक गुणविशेष आहे. शुभ कार्यात वाघ्या व मुरळी यांचे जागरण हा एक अनिवार्य विधी मानला जातो. दसऱ्याला आयुधे व कुलदैवतांची पूजा करून गोंधळ घालण्याचा विधी साजरा करतात. शेतकरी मराठे दसऱ्याच्या दिवशी कृषी अवजारांची पूजा करतात. मराठे दसरा, दिवाळी, सक्रांत, होळी व पोळा हे सण मोठ्या प्रमाणावर साजरे करतात.

पुरुषामध्ये भरदार मिशा ठेवण्याची प्रथा पूर्वी मोठ्या प्रमाणावर होती. डोक्याला पागोटे, कमरेला चोळणा किंवा धोतर अंगात बाराबंदी किंवा सदरा व त्यावर उपरणे आणि पायात वहाणा या पुरुषांच्या पारंपारिक पोषाखात अलिकडे बराच बदल झालेला आढळतो. शेतकऱ्यांमध्ये अंगरखा किंवा सदरा व धोतर किंवा पायजामा असा पोषाख आढळतो. तरुणांमध्ये व पांढरपेशा वर्गात बहुतांशी शर्ट व पँट असा पोशाख वापरतात. ग्रामीण मराठा महिला अंगात खणाची चोळी व नऊवारी लुगडे नेसतात. डोक्यावरून पदर घेण्याची चाल अद्याप रूढ आहे. त्या कपाळावर ठसठशीत कुंकू लावतात. हातावर थोडेसे गोंदून घेण्याची प्रथा आहे. केस नीटनेटके विंचरुन अंबाडा घालतात. मराठा स्त्रियांना दागिन्यांची आवड आहे. त्यांच्या दागिन्यांमधील वैशिष्ट्यपूर्ण दागिना म्हणजे नाकातील नथ सांगता येईल. नागरी भागाशी वाढता संपर्क, अनेक आर्थिक व सामाजिक स्थित्यंतरे इत्यादी बाबींमुळे स्त्रियांच्या पोषाखातसुद्धा बदल झाला असून महिला बहुतांशी साडी चोळी असा पोशाख वापरु लागल्या आहेत. आता सर्वच बाबतीत झपाट्याने बदल घडून आल्याचे दिसते.

मराठ्यांमध्ये मामेबहिणीशी लग्न करणे अनुज्ञेय आहे. मात्र मावसबहीण तसेच आतेबहिणीशी लग्न करणे निषिद्ध मानले जाते. मृत पत्नीच्या बहिणीशी विवाह करता येतो. पूर्वी विधवाविवाह निषिद्ध मानला जात असे. लातूर जिल्ह्यात वाड्.निश्चयाला "वाघीनसा" असे म्हणतात. त्यालाच महाराष्ट्रात अन्यत्र साखरपुडा असे म्हणतात. वाघीनसा हा विधी वधूपक्षाकडे साजरा केला जातो. या प्रसंगी सोयरिक संबंधीची बोलणी पक्की केली जातात. वरपक्षाकडे "टिळा लावणे" हा विधी संपन्न केला जातो. त्याला शालमुदी असेही म्हणतात. ह्यावेळी वधुपक्षाकडील मंडळी वरपक्षात हुंडा,* सोने, अंगठी, वगैरे जिन्नस देऊन लग्नमुहूर्त ठरवितात. पत्रिकापूजन, अक्षत, घाणा, हळदी, तेलवण, देवक बसवणे, वाग्दान, सीमांतपूजन व गौरीहरपूजन हे विधी मुख्य विवाहविधीपूर्वी केले जातात. विवाहदिनी वरपक्षाकडील मंडळी वधूपक्षाकडे आल्यावर, तेथील मारुतीच्या देवळात सीमांतपूजन करतात. त्यालाच "शेवंती" असे म्हणतात. नंतर वाजत गाजत, शक्यतो घोड्यावरून मिरवणुकीने नवऱ्या मुलास मंडपात आणले जाते. त्यानंतर लगेच देवकप्रतिष्ठा केली जाते. क्रमाक्रमाने अक्षता, मंगलाष्टके व शुभ मुहूर्तावर टाळी वाजविणे हे विधी होतात. लग्न झाल्यानंतर लाजा होम, सप्तपदी, कन्यादान, सूनमुखदर्शन, पायरावणी हे विधी होतात. सामान्यपणे लक्ष्मीपूजन हा अंतिम विधी असतो. त्यानंतर मुलीस मुलाच्या घरी घेऊन जातात. वधू-वर स्वगृही आल्यावर त्यांची वरात काढतात.

*हुंडा घेण्यास कायद्याने बंदी असली तरी ही प्रथा प्रचलित असल्याचे आढळून आले.

अनुक्रमणिका

दुसऱ्या दिवशी सत्यनारायणाची पूजा करण्याची प्रथा आहे. ज्यांची कुलस्वामिनी भवानी आहे ते लोक गोंधळ घालण्याचा कार्यक्रम आयोजित करतात. खंडोबा हे कुलदैवत असलेले वाघ्या व मुरळीचे जागरण घालतात.

विधूर आणि विधवा ह्यांच्या पुनर्विवाहास मोहतूर असे म्हणतात. विधूर व कुमारिका ह्यांचा विवाह नेहमीच्या लग्नासारखा होतो. विधवा व कुमार ह्यांच्या विवाहास गांधर्वविवाह असे म्हणतात. पुर्वी घटस्फोट निषिध्द असला तरी आता तद्‌विषयक कायद्याच्या चौकटीत संमतिपूर्वक घटस्फोट घेता येतो. घटस्फोट घेतलेल्या महिलेशी झालेल्या विवाहासुद्धा गांधर्वविवाह किंवा पाट लावणे असे म्हणतात. मोहतूर विवाह फक्त अमावस्येच्या रात्री बारा वाजताच केला जातो. मोहतूरात प्रथम रुईच्या झाडाबरोबर वराचे लग्न लावतात. मोहतूर विवाहप्रसंगी फक्त वस्त्रगाठ मारुन लग्न लावले जाते. लग्न लागल्यानंतर लगेच घरभरणी (मधुचंद्र) करतात.

कन्येचे पहिले बाळंतपण माहेरी करण्याची परंपरा आहे. मुलगा झाल्यास पाचवी उत्सव साजरा करतात. पाचव्या दिवशी पाचवी व सहाव्या दिवशी सटवाईची पूजा करतात. अकराव्या दिवशी सुहेर संपवितात. बाराव्या दिवशी बारसे करतात. अलीकडे आपल्या सोयीनुसार बारसे करतात.

मराठा समाजात मृत्यूनंतर प्रेत जाळण्याची प्रथा आहे. मृत्यू संस्कार इतर हिंदूप्रमाणेच आहेत. मोठी वयस्क व्यक्ती मरण पावल्यास त्याच्या तिरडीपुढे वाजंत्री वाजवितात. स्मशानात प्रेत जाळतात. जिल्ह्यात अंत्यसंस्काराला जाण्यास मातीला जाणे असे म्हणतात. मृत्यूनंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी रक्षा व अस्थी गोळा करतात. अस्थिविसर्जन मोठ्या नदीत किंवा कोणत्याही तीर्थक्षेत्री करतात. दहाव्या दिवशी पिंडदान करतात. अकराव्या दिवसापर्यंत सूतक पाळले जाते. त्या प्रसंगी आप्तेष्टांना भोजन देतात. मासिक व वार्षिक श्राद्ध करण्याची प्रथा आहे.

मसणजोगी* (जोगी) : भिक्षा मागून उदरनिर्वाह करणारी ही भटकी जमात होय. खरे तर जोगी हा पंथ असून त्यात जे पोटभेद आहेत त्याच पोटजाती समजल्या जातात. हा नाथसंप्रदायी पंथ असून त्याची स्थापना गोरख नाथाने केल्याचे सांगतात. भिक्षा मागताना अंगास चितेची राख फासून डोक्यावर मोरपिशी टोपी, हातात लोखंडाची घाटी (त्रिशुळासारखे पण वाजणारे) आणि शंख, गळ्यात रुद्राक्षांच्या माळा, कपाळावर भस्म व काखेत एक-दोन झोळ्या असा यांचा पेहराव असतो. या पंथातील लोक आपल्या कानांना मोठी भोके पाडतात. म्हणून त्यांना कानफाटे किंवा नाथ असेही म्हणतात.

जोग्यांमध्ये गुजराती जोगी व मराठा जोगी असे प्रांतपरत्वे पोटभेद आहेत. मराठा जोग्यांमध्येच कानडी जोग्यांचाही समावेश होतो. गुजराती जोगी पंथानुयायी व संसारी असे दोन भेद आहेत. पंथानुयायी भिक्षा वृत्तीने राहतात. संसारी जोगी भिक्षा मागण्याबरोबरच शेती, शेतमजुरी, म्हशी व कुत्र्यांची पैदास, आदि हे व्यवसाय करतात. यांच्यात ऊरे, बलगार, भोरपी, डोंबारी, दवरजी, जोगार, केर, किनरी, कुरुब, मेंदर आणि मुरुद असे बारा पोटभेद आहेत. गोरखनाथाच्या बारा शिष्यांनी स्थापिलेल्या बारा पंथांवरून त्यांच्यात कुळे झालेली आहे. एकाच कुळात स्त्री पुरुषाचा शरीरसंबंध होत नाही. मुलगा बारा वर्षाचा झाला म्हणजे त्याला त्याच्या पंथाची दीक्षा दिली जाते. त्यांचे आचारविचार व इतर धार्मिक चालिरिती व रूढी आजूबाजूच्या

* मुकटमोरे, लक्ष्मण गोविंदराव ता. चाकूर यांच्या मुलाखतीवर आधारीत माहिती.

शेती करणाऱ्या जातींप्रमाणेच असते. जोगी हे चेतनवादी व प्राणपुजक आहेत. लातूर जिल्ह्यातील मसणजोगी नावाने ओळखले जाणारे जोगी हे उपरोक्त पोटभेदांपैकी कोणत्या पोटभेदाची आहेत हे सांगता येत नाही तथापि येथील जोग्यांना मसणजोगी असे नाव प्रचलित आहे.

पूर्वी हे लोक स्मशानात पाली टाकून राहायचे व संध्याकाळी शंख वाजवायचे. आताही यांच्यातील काही लोक स्मशानात राहतात. त्यांचा मंत्रतंत्रावर विश्वास आहे. पूर्वी हे लोक पुरलेल्या गरोदर महिलेची कवटी काढून ती स्वत:च्या गळ्यात अडकवित. अजूनही काही लोक या कवटीचा उपयोग मंत्र तंत्राने ताईत भारण्यासाठी करतात ताईत धारणकरणाऱ्यास भुतबाधा किंवा रोगाची लागण होत नाही अशी अंधश्रद्धा आहे. भूतबाधा, सर्पदंश व विंचूदंश उतरविण्यासाठी मंत्राचा उपयोग करतात त्यासाठी ते पैसे घेत नाहीत. हे मंत्र तंत्र ते परंपरेने पूर्वजाकडून शिकून घेतात. काही ठराविक तिथींना वा दिवशी मंत्रांची उजळणी करतात. यांच्यातील मांत्रिक काही पथ्ये पाळत असतात. जिल्ह्यात यांची संख्या लातूर, मुरुड या ठिकाणी दिसून येत असली तरी बरेच जोगी भटके जीवन जगतात.

जिल्ह्यांत यांच्यात मुकटमोरे, शेणरोड, सिरगिरे, कल्लेमोड, बाजोड, मामळगे, उबदोड, कळमीचोड, सनकोड, सीरवाठोड इत्यादी आडनावे (कुळे) आढळतात. समान आडनावात लग्ने होत नाहीत. बहिणीच्या (भाची) मुलीशी लग्न होते. मात्र आतेबहिण, मामेबहिण, मावसबहिण यांचेशी विवाह होत नाहीत. साटेलोटे विवाह व मेहुणीशी विवाह करतात. वरपिता सोयरीक शोधून पक्की करण्यासाठी चारपाच जणांसह तीन ते सात दिवस मुलीच्या गावी सोयरीक होईपर्यंत मुक्काम करतात. मुलीकडील होकार मिळाल्यावर मुलाचे वडील मुलीकडील ज्ञातीबांधवांना डाळभाताचे आणि मुलीच्या आईबापास कोंबड्याचे जेवण व वधूमातास कपडे देतो. यावेळीच मुलीला कुंकू लावतात व लग्न पक्के झाले असे समजतात. लग्नाच्या वेळेस १०९ रुपये हुंडा देतात.* लग्नविधी स्वत:च ठरवितात. लग्न केव्हाही करतात, लग्नाचा एक दिवस ठरविला जातो. त्या दिवशी सर्व पाहुणे व नवरदेव मुलीच्या गावी येतात. पहिल्या दिवशी वर-वधूला एकत्र अंघोळ घालतात व हळद लावतात. हळदीचे जेवण म्हणून दोन्ही पक्ष डाळ-भाताचे जेवण देतात. लग्नाच्या वेळी जातपंचायत प्रमुख मंत्र म्हणतो.

विधवा विवाहास मान्यता असून तो अविवाहिताशी तसेच विधुराशी विवाह करू शकतो. घटस्फोट व पुनर्विवाहास मान्यता आहे. यांच्यात बहुपत्नीत्वाची पद्धत आहे. काडीमोड होऊ नये यासाठी जातपंचायत प्रमुख प्रयत्न करतो. काडीमोड झालाच तर दोन्ही पक्षांकडून दंड वसूल करतो. मात्र घटस्फोटाचे प्रमाण फार कमी आहे. पूर्वी लहानपणी लग्ने होत असत. हल्ली बालवयात लग्न झाल्यास मुलगी वयात येईपर्यंत माहेरीच राहते.

गर्भारपनात कोणतेही विधी नसतात. बाळंतपन नवऱ्याकडेच जातीतील सुईण करते. बाळंतपनाच्या दुसऱ्या दिवशी पाचवी पुजन करतात. बाळंतपणीचा तीन दिवस विटाळ पाळतात व त्यानंतर बाळंतीण कामाला लागते. पुत्रप्राप्तीसाठी मंत्रतंत्रांचा उपयोग करतात. यल्लमा, पोचमा, बेतालस्वामी (सामी), गंड:मशामा, बालाजी इत्यादी देवतांची पुजा करतात.

गावातील कोणतीही व्यक्ती मृत्यू पावली तर त्यांना बलुत्याचे बारा रुपये मिळतात. जातपंचायतीच्या प्रमुखास सरपंच म्हणतात. मृत व्यक्तीस पुरतात. तीन दिवसांनी विटाळ काढतात. तिसऱ्या दिवशी मांसाहारी जेवण देतात. हे लोक भटके असल्यामुळे पालामध्ये राहतात. त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण फार कमी असून दारिद्र्य रेषेखालील जीवन जगतात.

---

* डिसेंबर १९९६ मध्ये कार्यालयीन सर्वेक्षणाच्यावेळी संबंधित रक्कमा सांगितल्या आहेत. कालपरत्वे त्यात बदल/वाढ होऊ शकते.

महादेव कोळी : एक अनुसूचित जमात, यांच्यात डोंगर भागात महादेव कोळी अथवा डोंगर कोळी आढळतात. जिल्ह्यात यांच्यात पेठकर, चितलकर, येणजेवाड, चामलेवाड, गुडपल्ले, पल्ले, बुइनवाड, निलेवाड, आहिलवाड, लांतेटवाड, इत्यादी आडनावे आहेत. पूर्वी बालविवाह करीत. अलीकडे मुलगी वयात आल्यानंतर लग्न जमवितात. प्रथम साखरपुडा होतो. लग्न वधूपक्षाकडे मांडवात होते. पूर्वी यांच्यात पाच दिवस लग्नासाठी कालावधी असे मात्र आता एका दिवसात लग्न आटोपतात. लग्नात मांडव घालणे, हळद लावणे, देवक बसविणे इत्यादींचा अंतर्भाव असतो. लग्नासमयी प्रथम मुलगा (वर) मारुतीच्या मंदिरात येऊन बसतो. तेथेच शेवंतीपुजन होते. त्यावेळेस वधुपित्याने नवरदेवाला दिलेले नवीन कपडे परिधान करून वरासह सर्वजन वाजतगाजत मांडवात येतात. वधूवर समोरासमोर उभे करून व अंतरपाट धरून ब्राह्मण पुरोहित लग्न लावतो. उपस्थितांना त्यावेळेस गोड जेवण देतात.

यांच्यात गरोदर स्त्रिला पाचव्या किंवा सहाव्या महिन्यात वधूकडील मंडळी वराकडे जाऊन डोहाळे जेवन करतात. त्यासाठी होणारा खर्च वधूकडील मंडळी करते. पहिले बाळंतपण बहुधा माहेरीच होते. पुत्रप्राप्तीसाठी नवस करतात. प्रसूती झाल्यावर पाचव्या दिवशी पाचवी करतात. व बाराव्या दिवशी बारवी करतात. त्यावेळेस गोड जेवण देण्याची प्रथा आहे. सुहेर बारा दिवस पाळतात.

यांची खंडोबा, एकविरा देवी ही मुख्य दैवते असून ते मारुती, बालाजी, महादेव, अंबाबाई, नृसिंह, गणपती, इत्यादी हिंदूच्या सर्व देवदेवतांनाही भजतात. हिंदूचे सर्व सण साजरे करतात. मृत व्यक्तिस जाळतात व पुरतातही.

महादेव कोळी प्रामुख्याने शेतकरी, पशुपालक व शेतमजूर आहेत.

मारवाडी : महाराष्ट्रात सर्वत्र आढळणारी एक जात. व्यापार हा त्यांचा मुख्य व्यवसाय असल्याने सर्व भागात पसरलेले आहेत. त्यामुळे त्यांना वाणी म्हणूनही ओळखले जाते. यांच्यात अग्रवाल, ओसवाल, खंडेलवाल, पोरवाल, मेश्री, माहेश्वरी, सरावगी, पुनपाळे, सोमाणी, भुतडा, मालपाणी, सोणी अशा अनेक पोटजाती आहेत. तसेच ब्राह्मणही आहेत. त्यांच्यातील ब्राह्मण आपणांस छज्ञाती ब्राह्मण म्हणवितात. शर्मा, जोशी अशी त्यांची आडनावे आहेत. आपली सहा प्राचीन ऋषींपासून उत्पत्ती झाली असे ते मानतात. दध्ववस, गूजरगोड, खंडेलवाल, पारीख, शिरवळ व सारस्वत अशी त्या पोटजातींची नावे आहेत. यांच्यात लग्नसंबंध होत नाहीत.

मारवाडी लोक मेहनती, शांत, मित्तव्ययी असून व्यापाराबरोबरच सावकारी व दलाली करून बरेच श्रीमंत झाले आहेत. त्यांची भाषा मारवाडी ही आहे. हे लोक बहुतेक शाकाहारी असून, डाळरोटी व तूप हे त्यांचे मुख्य अन्न आहे.

माहेश्वरी : ही एक मारवाडी बनियांची पोटजात असून आता ती एक वेगळी जात बनली आहे. महेश या शब्दावरून माहेश्वरी हे नाव आलेले आहे. मुळात हे लोक मूळचे राजस्थानातील असले तरी सर्व भागात जाऊन स्थायिक झालेले आहेत. मारवाडी किंवा राजस्थानी ही त्यांची मुख्य भाषा असून माहेश्वरी लोक पंजाबी, गुजराती, मराठी, तेलगू, बंगाली इत्यादी प्रादेशिक भाषा उत्तमरित्या बोलतात.

अनुक्रमणिका

जिल्ह्यात यांच्यात सोणी, भुतडा, राठी, सारडा, जाजू, चितलांगे, बजाज, बाहीती, काबरा, मालू, काळू, कलाणी, मंत्री, लड्ढा, खटोल, भंडारी, तापडीया, दरगड, भांगडीया, कचोळ्या, नांवदर, सोमाणी, बिर्ला, बियाणी, परताणी, दागा, इनानी, होलानी इत्यादी आडनावे आढळतात. यांच्यात समान आडनावात बेटी व्यवहार होत नाही. प्रथम मुलीकडील पाहुणे येऊन मुलासाठी मागणी घालतात. मुलामुलीच्या पसंतीनंतर लग्न जमविले जाते. अलीकडे मुलामुलीला बोलावून मुलीस साडी चोळी व मुलास नवीन कपडे देऊन हळद व कुंकुवाचा टिळा लावून साखरपुडा विधी करतात.

यांच्यात लग्नविधीसाठी ब्राह्मण पुरोहिताला बोलाविले जाते. पुरोहितास श्रेष्ठ मानून त्यांना दक्षिणा देतात. वधू वरास बाशिंग बांधतात. त्यास जिल्ह्यातील माहेश्वरीमधील स्थानिक नावे आहेत. नवरीकडील बाशिंगास मोड व नवरदेवाच्या बाशिंगास 'पेचीतूरा' असे म्हणतात. लग्नात रूखवत करतात. त्यास बॅरीबरना (बरीन्नवरीकडील व बरना = नवरदेवाकडील) असे म्हणतात. हा एकत्र केला जातो. त्यानंतर सप्तपदी हा विधी करतात. सप्तपदीस चौऱ्या म्हणतात. त्यावेळेस ८० श्लोक म्हणून वधू वरांचे होकार घेतले जातात. लग्नात बहुधा गोड जेवन असते. गृहप्रवेशाच्या वेळी चौकटीत तांदूळ भरून माप ठेवले जाते ते वधूने उजव्या पायाने घरात लवंडावयाचे असते. पुढे घरामध्ये लहान मोठ्या सात पराती (सुरूवातीस लहान या प्रमाणे) मांडलेल्या असतात त्या पराती नवरी मुलीने न वाजविता उचलावयाच्या असतात. न वाजविता उचलल्याने वधू मुलीस शुभ मानले जाते.

गृह प्रवेशानंतर नवऱ्या मुलाकडे होमाऐवजी सत्यनारायणाची पूजा करतात. स्थानिक नातलग, मित्रमंडळींना भोजनास आमंत्रण दिले जाते. या पुजेच्या वेळेस देवक उठविले जाते. देवक उठवितांना स्थानिक देवांच्या (देवतांच्या) पाया पडून आमचा पूर्ण कार्यक्रम यथासिध्दी पार पडला आपण आहे त्या ठिकाणी स्थिर राहून आम्हाला मार्गदर्शन द्यावे, आम्ही वधू-वर तुम्हाला विसरणार नाही अशी देवास प्रार्थना करून देवक उठविले जाते.

गर्भारपणात स्त्रिला धार्मिक ग्रंथाचे पठन व सात्वीक आहार देतात. सातव्या महिन्यात डोहाळे जेवण होते. मुल जन्मल्यानंतर पाचवी व सठीपूजन होते. माहेश्वरी लोक मुख्यतः शिवोपासक असले तरी ते विष्णूची उपासनाही करतात. याशिवाय ते सुर्यपूजा, अग्नीपूजा, बालाजी, गणपती व गाय इत्यादी देवतांची प्रामुख्याने नित्यनेमाने पुजा करतात. हे हिंदूंचे सणाव्यतिरिक्त तीज व संकष्टी चौथ हे दोन सण साजरे करतात. तीजसाठी भाद्रपद वद्य तृतीयेला विवाहित स्त्रिया उपवास करून पतीला प्रदीर्घायुष्य मिळावे अशी प्रार्थना करतात. अविवाहित स्त्रिया चांगला पती मिळावा म्हणून हे व्रत करतात. नवीन लग्न झालेल्या जावयास बोलावून मानपान करतात. त्यांचे जेवण बहुतेक शाकाहारी असून डाळ, रोटी, तूप, कमी मसाल्याचे पदार्थ हे त्यांचे मुख्य अन्न आहे.

मृतास स्नान घालून नेण्यासाठी ताटी बांधतात त्यास स्थानिक नाव पालखी किंवा चलाव आहे. प्रेतास शक्यतो जाळतात.

माहेश्वरी लोक फक्त व्यापारात पुढे आले होते, पण सांप्रत त्यांच्यातील बऱ्याच कर्तबगार लोकांनी मोठमोठे उद्योगधंदे व कारखाने चालविले आहेत. बिडला, सोमाणी, लखोटिया, बांगुर, जाजू, तोष्णिवाल, राठी, दामाणी इत्यादी अनेक कर्तृत्ववान पुरुष या जातीत निपजले आहेत.

माळी : माळी हा शब्द संस्कृतमधील मालाकार म्हणजे फुलांचा हार करणारा याचे संक्षेप रुप आहे. मराठीत माळ या शब्दावरुन माळी हे नाव आले.

यांच्यात फुलमाळी, हळदेमाळी, बनकर किंवा कासमाळी, काचामाळी, कडूमाळी, बावनेमाळी, अधप्रभूमाळी, अघशेटीमाळी, जिरेमाळी, पाडेमाळी, उंडेमाळी आणि लिंगायत माळी या अंतर्विवाही पोटजाती आहेत. जिल्ह्यात फुलमाळी, लिंगायतमाळी आढळतात. त्यांच्यात शीरसागर, डाके, कांबळे, राऊत, वंजे, मेहजे इत्यादी आडनावे आढळतात. माळ्यांत समान कुळ व देवक असलेल्यांमध्ये लग्नसंबंध होत नाही. आतेबहिण व मामेबहिणीशी लग्न करण्याची प्रथा आहे. विधवा पुनर्विवाह व घटस्फोट या प्रथा माळी जातीत आहेत. विवाह विधी मराठ्यांप्रमाणेच करतात. माळ्यांची सूर्यफुल, वासनवेल, खोऱ्या, पांचपालवी, मर्यादवेल, पाणकणीस, साळूंखीचा पंखा, जांभूळ, आंबा, उंबर व पळसाची फांदी इत्यादी देवके आढळतात. खंडोबा व सप्तशृंगी देवी ही त्यांची कुलदैवते आहेत. याशिवाय ते अंबा, भवानी, जनाई, तुकोबा, भैरोबा, नृसिंह या देवतांना भजतात. यांच्यात मृत व्यक्तिस अग्निसंस्कार करतात.

हे लोक प्रामुख्याने शेती करतात. फुले, फळे, भाज्या पिकवतात व शेतमजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्या बायका व मुले शेतीच्या कामात फुले, फळे आणि भाजीपाला विकण्यास मदत करतात. माळी जातीत संत सावतामाळी व महात्मा फुले यांना भूषण मानतात.

मांग (मातंग) : एक अनुसूचित जात. हे सर्वत्र विखुरलेले असून आपली उत्पत्ती जंब ऋषीपासून झाली आहे असे सांगतात. यांची शारिरीक ठेवण आदिवासी जमातींशी अधिक साम्य दाखविते.[७]

ग्रामीण भागात मांग हा एक बलुतेदार गणला जातो. मांग जातीचा परंपरागत प्रमुख व्यवसाय वाखापासून दोर बनविणे हा होय. ते जनावरांना बांधण्यासाठी लागणारे दोर, कासरा, मोटेसाठी लागणारे नाडे, चाबूक, शिंदीच्या केरसुण्या, वगैरे वस्तू तयार करतात. याखेरीज विवाह व धार्मिक उत्सवात वाद्य वाजविण्याचे कामही ते करतात. मांग-गारुडी या मांग जातीतील पोटजातीचा व्यवसाय म्हशी भादरणे व त्यांची खरेदी-विक्री करणे हा आहे म्हणून त्यांना म्हैसभाद्रे असेही म्हणतात. तमाशा कलावंतांमध्ये बरेच मांग जातीचे लोक दिसतात. पूर्वी काही गावचे पहारेकरी मांग असत. या कामासाठी त्यांना इनाम जमीन मिळत असे. बरेच मांग झाडूवाल्याचेही काम करतात.

महाराष्ट्रात मांगांमध्ये अस्सल किंवा मराठा मांग, ढोर, घडशी, होलगे किंवा होलार, जिनगर, जिराईत, बाळे, बुरुड, चपलसुंडे, दाबकर, देसूर, ढकलवार किंवा वाजंत्री मांग, काकर, कोकलवार, मानभाव, मांग-गारुडी, ताडे, मोर्चा, परीट, पेंड, शिवटे, तेलंगी, ढोकर कोडे आणि झरे असे चोवीस अंतर्विवाही गट आढळतात. या गटांमध्ये परस्परांत विवाहसंबंध होत नाहीत. शिवाय या गटांची विभागणी

७. **राज्य गॅझेटिअर : भूमि व लोक,** १९९६, पूर्वोक्त, पृ. ८५

मराठा, कुणबी, नवबौध्द व महारांच्या आडनावांसमान आडनावांची म्हणजेच कुळांनी ओळखल्या जाणाऱ्या बहिर्विवाही गटांमध्ये झालेली आहे. यांच्यात घटस्फोट, पुनर्विवाह व विधवाविवाहास मान्यता आहे. विधवाविवाह गांधर्व पध्दतीने कृष्णपक्षात रात्री लावला जातो. त्यास पाट लावणे म्हणतात. पूर्वीची बालविवाहाची प्रथा आता लोप पावत आहे. विवाह हिंदू पध्दतीनुसार कुणब्यांप्रमाणेच होतात उपाध्ये, जंगम पौरोहित्य करतात. मरीआई व यल्लमा या देवतांखेरीज मांग, बहिरोबा, म्हसोबा, काळूबाई, अंबाबाई, विठोबा या देवतांचीही पूजा करतात. ते बहूतकरून शैव असून महादेवाला भजतात. आळंदी, देहू, कोंडणपूर (कौडण्यपूर), शिंगणापूर, पंढरपूर इत्यादी क्षेत्रांच्या यात्रा असतात. ते देवकवादी असल्याने लग्नात देवक बसवितात व चेतनवादी असल्याने अंधश्रध्दा व जादूटोण्यावर विश्वास ठेवतात.

मृतदेहाला पालथे पुरण्याची प्रथा मांगांमध्ये होती. अलीकडे ही प्रथा लोप पावत आहे. यांच्यात श्राध्द करण्याची प्रथा नाही. मांग महिला लुगड्याचा कासोटा घालीत नाहीत. हातावर गोंदवून घेण्याची प्रथा आहे. ज्वारीची भाकरी, चटणी व वरण हे त्यांचे मुख्य अन्न होय. बकरे व इतर प्राण्यांचे व पक्षांचे मांस खातात. मद्यपानास मनाई नाही.

पूर्वी मुलीचे वय होऊनही लग्न न झाल्यास पुढे लग्न करू देत नसत व ती जोगतीण होत असे.

मांग गारुडी * : ही एक अनुसूचित जात होय. पूर्वी यांच्यात जात-पंचायत होती व आताही आहे. सध्या सकट आडनाव असणाऱ्याकडे पंचायत आहे. यांच्यात पंचायतीच्या प्रमुखास पाटील म्हणतात. जिल्ह्यात यांच्यात सकट, काळे, लोंढे, कसबे, कांबळे, उपाडे, उरकले (काळे), देहे (तपासे), नाठे, रोकडे, बोडके, खलसे, अल्हाद, पात्रे, हतामळे, उमप, फाझगे, अवचार, ढालवाले, विंचुरकर, खंदारे, भाले, भिसे, अंकुशी, शेंडे, रागपसरे, रणभिसे, सोनवणे, जाधव, पेंढारे, गायकवाड, चौगुले इत्यादी कुळनावे आहेत.

जातपंचायत असल्याने रितीरिवाजाप्रमाणे काम करतात. त्यामुळे लग्नसमारंभात सकट, लोंढे, उकरडे, कांबळे, आणि कसबे या पाच कुळनावात अधिकार आहेत. जातीत एकाने गुन्हा केल्यास दोन्ही पक्षाकडील मंडळींना बोलवून त्यांना न्याय देतात. एकाद्या मुलाने लग्नापूर्वी दुसऱ्या जातीच्या मुलीशी संबंध ठेवल्यास त्याचा दंड त्याच्या पित्यास करतात. त्यावेळेस दंड म्हणून जातपंचायत २.२५ रुपये, ११ रुपये, किंवा २२ रुपये एवढा दंड पाटील (जातपंचायत) करतो.

समान आडनावात विवाह करीत नाहीत. पूर्वी बालविवाह होत असत. आता होत नाहीत. लग्न जमवितांना प्रथम मुलाचे वडील मुलीच्या बापाकडे जातात. त्यावेळेस शक्यतो मामेबहिण, आतेबहिण यांना प्रथम पसंतीस्थान देतात. जातीतील कसाब, चौगुले यांनी मध्यस्थी करून व पाच पंच बसून मुलीची विचारणा करतात. मुलीच्या बापाकडून दारु, खोबरे, घेऊन पाठवतात ते जर मुलाच्या बापाने स्वीकारले तर लग्न जमले असे समजतात. मुलगी द्यावयाची कबूल झाल्यावर "देजमान" एक प्रकारचा हुंडा पूर्वी ७ ते १६ रुपये देत. आता ३०५ रुपये मुलीच्या वडीलांना देतात. त्याचवेळेस जातपंचायतीस बारा भाउचे म्हणून बारा रुपये देतात. नंतर मुलीला कुंकू लावून साडी चोळी देऊन ओटी भरतात. पूर्वी लग्नाची तिथी कसबाकडून ठरवत मात्र आता ब्राह्मणांकडून ठरवून विवाह मुलीकडे होतो. अगोदर मुलास हळद लावतात व नंतर मुलीस त्यानंतर दोघांनाही नवीन कपडे देऊन बाशिंग बांधतात व नंतर लग्न लावतात. लग्नात गोड जेवण देतात.

* कार्यालयीन सर्वेक्षण डिसेंबर १९९६ (गवेषण) मल्हारी विठ्ठल काळे दलित मित्र गौरव पुरस्कार (लातूर) यांच्या मुलाखातीवर आधारित.

Maharashtra State Gazetteers

लग्नाच्या दुसऱ्या दिवशी नवरीस लपवून ठेवायचे व नवरदेवास हुडकावयास सांगायचे. असा विधी असतो. त्यामागचा एकच उद्देश असायचा तो म्हणजे नवरी पळाली तर आणता येईल. यांच्यात विधवा विवाह आहे त्यासच हे मोहतूर म्हणतात. गरोदरपणात यांच्यात कुठल्याही प्रकारचा विधी करत नाही. फक्त पाचवीला 'कणाच्या' (गुळ व ज्वारी टाकून) बनवितात. सुहेर बारा दिवस पाळतात. हिंदूंचे सर्व सण साजरे करतात. महादेव, ताईजोई, मरिआई, लक्ष्मी, खंडोबा, दुर्गाई या कुलदैवतांची पुजा करतात. मृतास पुरतात वा जाळतात.

मुसलमान : लातूर जिल्ह्यातील मुसलमानांत त्यांची विभागणी दोन गटात करता येईल. सय्यद, शेख, मुघल व पठाण यांचा एक गट आणि पारंपारिक व्यवसायावरून आडनावे धारण केलेल्यांचा दुसरा गट.

हजरत महमंद पैगंबराची कन्या फतिमा व जावई अली यांचे आपण वंशज आहोत असा सय्यद म्हणविणारांचा दावा आहे. हा भेद ते आपल्या नावाच्या आधी सय्यद, मीर अथवा नंतर शाह असे उपपद लावून दाखवितात. स्त्रिया आपल्या नावापूर्वी बेगम ही उपाधी लावतात. काही शियापंथी मुसलमान आहेत. पण बहुसंख्य सुन्नी आहेत. मुघल हे प्रायः हुसेनी सय्यद आणि शिया असतात. ते गौरवर्णाचे असतात व दक्षिणी मुसलमानांसारखा पोषाख करतात, स्त्रियांना गोषामध्ये ठेवतात आणि बहुधा शेती करतात. काही आपल्या नावाचे अगोदर मिर्झा व नंतर बेग हे उप पद लावतात. त्यांच्या स्त्रिया आपल्या नावापुर्वी खानम हे उपपद लावतात. पठाणांचे पूर्वज अफगाण असल्याने ते आपल्या नावापुढे खान ही पदवी लावतात. व स्त्रिया खातून अथवा खालू ही पदवी लावतात.

जिल्ह्यातील इतर मुसलमान विविध प्रकारचे व्यवसाय करतात. व्यापारी, कारागीर, शेतमालक व शेतकरी आणि सरकारी व खाजगी क्षेत्रातील कर्मचारी अशी त्यांची वर्गवारी करण्यासारखी आहे. त्यांच्या नावावरूनच असे स्पष्ट होते की, काही परदेशी वंशाचे व काही धर्मांतर केलेले मूळचे हिंदू आहेत. बोहरा हे मुख्यत्वे व्यापारी पेशाचे आहेत. सुन्नी, आलिया, दाऊदी व सुलेमानी असे त्यांचे चार पोटभेद आहेत. अत्तार, कुंभार, जरा, कसाई, मोमण, नालबंद, शिकलगार, तांबटगार, लोहार, मणियार, सुतार, टकारा, कागशी व दर्जी रंगारी अशा त्यांच्या आणखी शाखा आहेत. अत्तार म्हणजे सुगंधी फुलांपासून अत्तरे, दंतमंजन, सुरमा, केशवर्धक तेले वगैरे जिन्नस तयार करणारे. जरा किंवा धुलधोया हे सोनारांच्या दुकानात झाडलोट करून सोन्याचे व चांदीचे बारीक कण जमा करणारी अशी एक मिश्र शाखा आहे. उत्तर हिंदुस्थानी व दक्षिणी गायकसाई ही एक जमात आहे. त्यांचा बेटीव्यवहार होतो. विणकरांचा व शेतीचा व्यवसायही ते करतात. खाटीक म्हणजे बकरे कापणारे. परंपरेनुसार हे गायकसायांबरोबर रोटीव्यवहार अथवा बेटीव्यवहार करीत नाहीत. खाटीक मटन विकतात पण गोमांस विकत नाहीत. शेती व धान्याचा म्हणजे भुसारी व्यापार ते करतात. मोमिन अथवा जुलाहा हे धोतरे, साड्या, पागोटी, चादरी व असेच भरड कापड विणतात. हिंदूमधील अनेक जातीमधून मुसलमान झालेले हे शियापंथी आहेत. काही मुसलमान दर्जी म्हणजे शिंपी आहेत. रकडिया म्हणजे गवंडी. हे मूळचे हिंदू पण धर्मांतर करून मुसलमान झालेले आहेत. ते आपसात हिंदीमिश्रित उर्दू व बाहेर मराठी बोलतात व एक जथ्था करून राहतात. नालबंद हे इतर मुसलमानांबरोबर बेटीव्यवहार करतात. ते विजापूराकडून लातूर जिल्ह्यात आलेले आहेत. शिकलगार पूर्वी सैन्यासाठी लागणाऱ्या शस्त्रांना धार लावणे व दारूकाम करीत. तांबटगार हे लाखेच्या बांगड्या बनवतात. टकार म्हणजे दळणाची जाती बनविणारे व दुरूस्त करणारे आणि कागशी म्हणजे कागदाच्या वस्तू तयार करणारे. यांचे वंशपरंपरागत व्यवसाय काहीसे नष्टप्राय झाल्याने ते आता मुसलमानांत मिसळून गेले आहेत.

अनुक्रमणिका

जमीनदार, शेतकरी व पशुसंवर्धन करणाऱ्या लोकांस बडे जमीनदार आढळतात. पूर्वीच्या सरदारांचे ते वंशज आहेत आणि पूर्वी बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यांना जमिनी बहाल करण्यात आलेल्या आहेत. बागवान हे बागायती जमिनीत खपतात आणि भाजीपाल्याचा घाऊक व किरकोळ व्यापार करतात. मुलतानी हेही जमीनदारी व पशुसंवर्धनात गुंतलेले आहेत. इतिहासकालीन मुघल फौजांबरोबर आलेल्या व सैन्याला दाणागोटा पुरविणाऱ्या लोकांचे ते वंशज आहेत. काही मुसलमान सरकारी अथवा खाजगी नोकरीत आहेत. धार्मिक वृत्तीचे मुसलमान फकीर अवलीयाच्या रूपात गावोगाव फिरतात. दर्गे,मशिदी, कबरी वगैरेशी संबंध असलेले ते शेख किंवा खादीम असतात. पूर्वी एखादा मुसलमान साधा एखाद्या ठिकाणी कायमचे वास्तव्य करी आणि मग त्याच्या स्मरणार्थ त्याच्या मृत्यूनंतर तेथे कबर बांधण्यात येत असे. त्याचे शिष्य व भक्त काही निधी गोळा करीत आणि कबरीच्या देखभालीसाठी जमीन म्हणून मिळवित असत. मुजावर, मुल्ला, खतीब, मौलाना व काझी अशा संज्ञा मशिदी व दर्गे यासारख्या ठिकाणी असणाऱ्यांना प्राप्त होतात. फकीर हे सांगूनसवरून भिक्षेवर आणि धर्मादायावर आपला निर्वाह करणारे असतात. बेशारा म्हणजे कायद्यापलीकडचे व बाशारा म्हणजे कायद्याच्या अंतर्गत असे त्यांचे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारचे शादी करून कुटुंबवत्सल न राहता भटकत राहतात. दुसऱ्या प्रकारचे विवाहीत होऊन कुटुंबवत्सल जीवन जगतात व धार्मिक कार्यात जीवन व्यतित करतात. कलंदर हे पहिल्या वृत्तीचे तर दरवेशी आणि नक्शाबंदी हे दुसऱ्या प्रकारचे. दरवेशी हे अस्वले व वाघ यांचे खेळ करीत गावोगावी भटकतात. ते आपल्याला हनाफीपंथी सुन्नी असे म्हणवितात. आपसात किंवा इतर भिक्षेकऱ्याबरोबर विवाह करतात व स्वतंत्र जमात म्हणून राहतात. नक्शाबंदी हे ख्वाजा बहाउद्दीन नक्शाबंदी नावाच्या साधुपुरूषाचे अनुयायी आहेत. हातात जाडजूड पितळेचा दिवा घेऊन, त्यात मोठी वात पेटवून त्या साधूच्या प्रशंशापर गाणी गात फिरत असतात. पूर्वी कलंदर हे हव्या तशा मागण्या करीत फिरत असत. ते आपल्या सर्वांगावरचे, भुवयांचे केस देखील काढून टाकतात.

मुस्लीम रूढी : गरोदरपणा, जन्म, वाङ्.निश्चय, विवाह आणि मृत्यू याबद्दलचे मुसलमानी विधी व संस्कार पुढे दिले आहेत. हिंदूंप्रमाणेच विनापत्य मृत्यू येणे हे मुसलमान देखील मोठे दुर्भाग्य समजतात. म्हणून लग्नानंतर दोन-तीन वर्षात स्वाभाविकपणे संतान झाले नाही तर मुसलमान स्त्रिया त्याबद्दलचे दुसरे उपाय म्हणजे गंडे, दोरे, ताईत, औषधे यांचा उपचार करतात. यासाठी मृत अथवा जिवंत साधुंची करूणा भाकण्यात येते. मांत्रिक लोक कागदाच्या तुकड्यावर देवाचे नाव लिहून तो गुलाबपाण्यात बुडवून ते पाणी पिण्याला देतात. अनेक बंधने व शर्ती गर्भिणीने पाळाव्या लागतात. प्रसुतीसुलभ व्हावी म्हणून काही अशुभ घटना अथवा पीडा होवू नये म्हणून काळजी घेण्यात येते. बीजेला चंद्र प्रथम दिसतो तेव्हा आणि गुरुवारी गर्भिणीने घराबाहेर पडण्यावर बंधन असते. तसेच सूर्यास्तकाळी केव्हाच बाहेर पडू नये आणि वृक्षराई व नदी किनाऱ्यावर फिरू नये. गरोदरपणात गर्भिणीने वेणीफणी, प्रसाधन, अलंकार घालणे वगैरे वर्ज्य करावेत. सातवा महिना आला म्हणजे खेडेगावात दंपतीला जवळ बसवून स्त्रिया गाणी म्हणतात व मौजमजा करतात.

पहिल्या बाळंतपणासाठी सर्वसाधारणपणे पत्नी ही माहेरी जाते. मुलगा असो अगर मुलगी जन्मत:च त्याला सुपात ठेवण्यात येते आणि आईकडे अगोदर लक्ष पुरविण्यात येते. जन्मदात्या ईश्वराचे नाव जन्मत:च त्याच्या कानावर पडावे म्हणून अर्भकाचा बाप किंवा इतर आप्तेष्ट आझान प्रार्थना म्हणतो. "अल्लाहो अकबर" असे त्या प्रार्थनेच्या सुरवातीचे शब्द आहेत. मुलाच्या कानांना आवाजाची सवय व्हावी म्हणून तांब्याची किंवा पितळेची थाळी त्याच्या कानाजवळ वाजविण्यात येते. तकबीर किंवा प्रार्थनेची हाक बापाने देण्यापूर्वी हे करण्यात येते. त्याचप्रमाणे त्याला काटक व सोशिक बनविण्यासाठी स्नानापूर्वी त्याच्या अंगावर

थंड पाणी शिंपडण्यात येते. पहिले स्नान झाल्याबरोबर मुलाच्या मनगटावर काळे दोरे जरा आवळून बांधण्यात येतात. पायावरही बांधतात. कोणाची नजर लागू नये म्हणून हा उपचार करण्यात येतो. दररोज सकाळी व संध्याकाळी ऊद, राई-इसाद व मोहरी जाळून सात-आठ वेळा आईच्या व बाळाच्या अंगावरून ओवाळण्यात येते. सटवाईची पूजा खेडेगावात विशेषत: पाचव्या व सहाव्या दिवशी करतात. ती देवी बाळाचे भवितव्य ठरविते अशी समजूत आहे. सहाव्या दिवशी बाळ व बाळंतिण यांना पूर्ण स्नान घालतात व नवीन कपडे घालतात. ईश्वर कृपेसाठी सर्वांना भोजन देतात व भिक्षा वाटतात. साधारणत: पहिल्या किंवा सहाव्या दिवशीच मुलाचे नामकरण होते. बाप, आजा आणि नातेवाईक मिळून कुराणाचे कोणतेही पान उघडतात. त्यावरील तिसऱ्या ओळीतील पहिल्या शब्दाचे जे पहिले अक्षर असेल त्याने मुलाच्या नावाचा प्रारंभ झाला पाहिजे असा संकेत आहे. ज्याची मुले जगत नाहीत ते आपल्या मुलांना काहीतरी अथवा क्षुद्र अर्थाची नावे ठेवतात. आकिका या नावाचा केवळ मुसलमानी समारंभ सातव्या, चवदाव्या किंवा एकविसाव्या दिवशी करतात. एकाच वेळी दोन क्रिया घडवून आणण्याचा हा विधी आहे. न्हाव्याने मुलाच्या डोक्यावर वस्तरा फिरविताच, बापाने अथवा दुसऱ्या कोणी बकऱ्याच्या गळ्यावर सुरी फिरविणे म्हणजे आकिका.

सालगिराह म्हणजे मुलाचा पहिला वाढदिवस. श्रीमंत लोक त्याप्रित्यर्थ मेजवानी देतात. मुलाच्या अगर मुलीच्या वयाला चार वर्षे, चार महिने व चार दिवस झाले म्हणजे बिस्मिला नावाचा विधी होतो. सहाव्या किंवा सातव्या वर्षी सुंता करतात. हिंदू व मुसलमान यांना ओळखण्याची ही मोठी खूण आहे. सुंता केल्यामुळे येणारा आजार बरा होताच बडे लोक मोठा उत्सव करतात. त्याचप्रमाणे जेव्हा मुलगा अथवा मुलगी प्रथमच रमझानचे उपवास करू लागतात तेव्हा मोठा आनंदोत्सव करण्यात येतो. मुलगी वयात येते तेव्हा मुसलमानात काही धार्मिक वा सामाजिक विधी करण्याची प्रथा नाही.

विवाह (निकाह) : सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी करण्याचा एक करार म्हणजे विवाह होय. पूर्वी लहान वयात लग्न करीत असत. पण अलिकडे लग्नाचे वय वाढले आहे. मुलाचे साधारणपणे एकवीसाव्या व मुलीचे अठराव्या वर्षी लग्न करतात. विवाहपूर्व ओळख किंवा प्रेम हा प्रकार मुसलमानांना संमत नाही. हिंदूच्या काही चालीरिती व जातिनिर्बंध खेड्यापाड्यातून पाळण्यात येतात. गेल्या तीस वर्षात विवाह विधी पुष्कळच साधा व जुन्या रूढीपेक्षा जरा भिन्न असा झाला आहे. वराकडील मंडळी वधूगृही जाऊन वधूला मागणी घालतात. तेव्हाच मेहेर रुपाने द्यावयाची रक्कम ठरते. बऱ्या स्थितीतील लोक वर्ष-सहा महिने अगोदर वाङ्‌निश्चय करून ठेवतात. माँझा प्रकाराने विवाह समारंभाला सुरूवात होते. माँझा म्हणजे औपचारिकपणे वधूला बैठकीवर बसवून घरातील स्त्रियांनी रज्जक म्हणजे तीन दिवस-रात्री अल्लाच्या प्रशंसापर गाणी म्हणत असणे. ढोलकीच्या तालावर ती म्हणतात व त्यात ईश्वराची स्तुती असते. नंतर हळद लावण्याचा समारंभ करतात व त्यानंतर बियापारी म्हणून ओळखली जाणारी मेजवानी होते. त्यावेळी अल्लाच्या नावाने ऊद जाळण्यात येतो. यानंतर मेंदीची पाने वधूला नजर करण्यात येतात. त्याचवेळी तिला लग्नाचा अहेर करण्यात येतो व मेंदीची पाने वाटून तिच्या हाता-पायांना लावण्यात येतात.

विवाहविधीमधील मुख्य भाग म्हणजे निक्का. हा अरबी शब्द आहे, व त्याचा अर्थ एक्य अथवा संगम असा आहे. करार असाही त्याचा अर्थ करण्यात येतो. निक्का अथवा लग्नविधीला दोन पुरूष साक्षीदार असावे लागतात. ते सरळ वधूकडे जातात व तिला वराचे नाव आणि वय सांगुन त्याला पती म्हणून पत्करण्याला तिची तयारी आहे किंवा नाही असे विचारतात. तिचा जबाब एकूण त्याप्रमाणे काजीला व जमलेल्या इतर लोकांना सांगतात. मग काजी मुलीच्या बापाला व वराला समोरासमोर बसावयास सांगतो व खास नोंदणीपुस्तकात लग्नाची नोंद करतो. मुलीला जो मेहेर देण्याचे ठरले असेल त्याचीही नोंद तो

करतो. आणि सर्वासमक्ष वर जाहीर करतो की, सदरहू रक्कम देऊन वधूला मी निवडली आहे व पत्नी म्हणून मी तिचा स्वीकार करतो. हे झाल्यावर सासरे, जावई एकमेकास आलिंगन देतात. हजर असलेल्या मंडळीना खजूर व मिठाई वाटण्यात येते व सरबत देण्यात येते. श्रीमंत घराण्यात त्याप्रसंगी गायनाची मेहफिल होते. प्रात:काळी वधूचा भाऊ वराला अंत:पुरात बोलावून घेतो व तेथे जलवा नावाचा विधी करण्यात येतो. तो विधी करण्यामागे एकच उद्देश असतो आणि तो म्हणजे वधू-वरांचा एकमेकांशी परिचय करून देण्याचा हेतू असतो. त्यावेळेस एकमेकांचे चेहरे त्यांना आरशात पाहण्यास सांगण्यात येते आणि दोघांनाही लिहिता-वाचता येत असेल तर ती दोघे मिळून शांति या विषयावरील अध्याय वाचतात. त्यात अखेरचा विधी म्हणजे निरोप घेण्याचा. तो घेऊन वधू पतीगृही जाते. परंपरेनुसार पहिल्या चार शुक्रवारी (चार जुमानी) लग्नानंतर वधूवरांना वधूच्या माहेरी मेजवानीला बोलविण्यात येत असे.

जवळच्या नातेवाईकात सहसा लग्न करीत नाही. पण चुलतभावंडे, मावसभावंडे व आतेमामेभावंडे यात विवाहाला हरकत नसते. एखाद्याला आपल्या दाईबरोबर अथवा दाईच्या मुलीबरोबर लग्न करता येत नाही. बहिणीची मुलगी म्हणजे भाची विवाहार्थ नसते. पत्नीच्या बहिणीशी तिच्या ह्यातीत लग्न करता येत नाही. पण तिला घटस्फोट दिलेला असेल तर हरकत नसते.

घटस्फोट (तलाक) : मुसलमानात घटस्फोट घेणे हे नवऱ्याच्या मर्जीवर अवलंबून असते. परंतु सभ्य समाजात असे क्वचित घडते, कारण ते कमीपणाचे समजले जाते. आपल्या मर्जीवरून नवऱ्याला बायकोशी काडीमोड घेता येतो आणि कुराणशरीफ त्याबद्दल कोणत्याही समर्थनाची मागणी करीत नाही. पण काडीमोड देतांना तिच्याबद्दल घेतलेला मेहेर मात्र परत करावा लागतो. वाईट वागणूक, अन्नवस्त्राबाबत होणारे हाल आणि पतीचे नपुसकत्व ही कारणे देऊन पत्नीला देखील घटस्फोटाची मागणी करता येते. मुसलमानी कायदा अनेक प्रकारच्या घटस्फोटांना मान्यता देतो. अशा तलाकापैकी तलाक-इ-अहसान आणि तलाक-ई-रजाई हे दोन प्रत्यावर्ती (रद्द होण्यासारखे) असतात. तलाक-इ-हुस्न या प्रकारात नवरा तीन निरनिराळ्या वाक्यात तीन वेळा काडीमोडाचा उच्चार करतो आणि तो मात्र मग रद्द होण्यासारखा नसतो. काडीमोडानंतर तीन महिने पुरे होईपर्यंत पत्नीला दुसरा घरोबा करता येत नाही व हा इद्दत कालावधी पूर्ण होईपर्यंत नवऱ्याला तिला अन्नवस्त्र द्यावे लागते. प्राय: स्त्री घटस्फोटाची मागणी करीत नाही. तिला काजीकडे जाऊन लग्नमोडीचा अर्ज करावा लागतो. अशा मागणीला खाला म्हणतात. मुसलमानी कायद्याप्रमाणे त्याचा अर्थ तिने स्वखुषीने नवऱ्याशी संबंध तोडण्याची मागणी केली आहे असा होतो. त्यावेळी मेहेरवर तिचा हक्क रहात नाही. सर्वसाधारणपणे कनिष्ट समाजात घटस्फोटीत स्त्रीकडे अगर पुरूषाकडे निंदास्पद दृष्टीने पाहात नाही आणि उभयतांना नवीन घरोबा करण्याला अडचण पडत नाही. विधवाविवाह अगदी अनिर्बंध होतात आणि तरूण विधवा बहुधा पुन:लग्न करतातच. प्रथमच लग्न करणारा पुरूष बहुधा विधवेशी लग्न करीत नाही. तथापि त्याला कोणतीही हरकत मात्र नाही. तसेच प्रथमच विवाह करणाऱ्या मुलीने देखील विधुराशी लग्न करण्यास हरकत नाही.

अंत व अंत्यसंस्कार : मरणोन्मुख माणसाला कुराणातील सुरा-ए-यासिम हा अध्याय मंद आवाजात ऐकविला जातो. या अध्यायाला मृत्यू व मृत्यूनंतर मुसलमानाला प्राप्त होणारी गती यांचे विवेचन आहे. कलमा म्हणजे ला-इलाह-इल-लल्लाह, महमद उर रसुल-उल्-लाह ही प्रार्थना सतत ऐकवली जाते. क्षमा केली जावी याबद्दलची प्रार्थना व ब्रीदवाक्य वारंवार ऐकविल्या जातात आणि मरणोन्मुख व्यक्तीच्या मुखात मधाचे काही थेंब सोडण्यात येतात. प्रार्थना ऐकत असता त्यानेही ती मनात म्हणावी अशी अपेक्षा असते. देहावसान झाल्यानंतर डोळे व तोंड बंद करण्यात येते आणि अंत्यसंस्काराची व्यवस्था विलंब न लावता करण्यात येते.

अनुक्रमणिका

एका लाकडी तक्त्यावर मृतदेह ठेवण्यापूर्वी मृतदेहास स्नान घालून सुवासिक द्रव्ये चोपडण्यात येतात नंतर त्यावर पांढऱ्या कापडाचे आच्छादन घालण्यात येते. पुरुषाचा देह पुरूषच धुतात व स्त्रीचा देह स्त्रिया स्वच्छ करतात. पुरुषाचा देह कफनात गुंडाळतात. स्त्रीच्या बाबतीत कफनाशिवाय आणखी ओढणी ठेवण्यात येते. मृत्यू जर रात्री झाला असेल तर सकाळ झाल्याखेरीज मृतदेह हलविण्यात येत नाही. एरवी त्यावर आच्छादन घातल्याबरोबर आणि इष्टमित्रांनी अखेरचे दर्शन घेतल्याबरोबर देह जनाझावर ठेवण्यात येतो. जनाझावर ठेवताच इतर लोकांपैकी चौघे तो उचलून खांद्यावर घेतात. दफन भूमीवर पोहचेपर्यंत प्रेतयात्रेतील सगळे लोक खांदेपालट करीत राहतात. आणि तोंडाने ला-हलाह-इल-इल्लाह म्हणत असतात. उत्थापनापुर्वी आई व जरूर तर मृताची पत्नीदेखील आमचा आता काही अधिकार राहिला नाही असा उच्चार करतात. मृत व्यक्ति पुरुष असेल तर शवपेटीवर हिरवी अथवा इतर गडद रंगाची चादर टाकतात व स्त्री असेल तर तांबड्या (लाल) रंगाची चादर टाकतात. त्यानंतर मशिदीजवळ शव पेटी उतरवून ठेवतात व अल्ला हो अकबर ही प्रार्थना म्हणतात. मग कबरीजवळ नेऊन अखेरची प्रार्थना होते, आणि कबरीच्या खड्यात शिर-उत्तरेकडे करून व उजव्या बाजुला झुकवून प्रेत ठेवण्यात येते. म्हणजे चेहरा मक्केकडे होतो. वर पवित्र मातीची ढेकळे ठेवतात व सगळेजण त्यावर माती लोटतात. कबर पूर्ण भरल्यावर हजर असलेल्यातील विव्दान किंवा पेश इमाम कुराणातील काही मंत्राचे (कलमा) पठण करतात. नंतर सर्वजण मृताच्या घरी परत येतात आणि दरवाजापाशी त्याच्या आत्म्याला शांति मिळावी म्हणून प्रार्थना करतात. मृताच्या घरी तीन दिवस स्वयंपाक करीत नाहीत. त्यामुळे नातेवाईक जेवण तयार करून आणून देतात. दहाव्या व चाळीसाव्या दिवशी, चवथ्या, सहाव्या व नवव्या महिन्यात आणि वर्षाच्या अखेरच्या दिवशी इष्टमित्रांना भोजनास बोलविण्याची प्रथा आता नामशेष झाली आहे. वर्षाकाठी एका ठराविक दिवशी प्रार्थना करणे, खैरात वाटणे, अनाथ मुलांना भोजन देणे अशी कृत्ये मृताच्या स्मरणार्थ करण्यात येतात. त्या दिवशी कबरीचे दर्शन घेण्याचीही प्रथा आहे.

धर्म (इस्लाम) : लातूर जिल्ह्यात मुसलमानांमध्ये शिया व सुन्नी असे दोन पंथ आहेत. सुन्नी बहुसंख्य असून शिया हे अल्पसंख्य आहेत. अबुबकर, उमर, आणि उस्मान हे सुन्नीचे तर हसन आणि हुसेन हे शियाचे कायदेशीरदृष्ट्या उत्तराधिकारी होत.

इस्लामांची पाच मुलभूत तत्वे आहेत. १. ईश्वर हा एकच असून महमंद हा त्याचा प्रेषित आहे. २. धर्मादाय (दया) व औदार्य ३. मक्केची एकदा यात्रा करावी ४. रमझानचे उपवास आणि ५. प्रार्थना करणे. महमंदपंथीय धर्म माननाऱ्यामध्ये दोन शाखेत विभाजन झाल्याचे दिसते. ईश्वरावर, त्याच्या दूतावर, प्रेषितावर व कुराणावर विश्वास, मृतांचे पुनरूत्थान सर्वाच्या कयामतचा दिवस येतो व ईश्वराच्या निरपवाद आज्ञा हा धर्मश्रध्देचा भाग आहे. तर प्रार्थना, दया, रमझानचे उपवास व मक्केची यात्रा यावर विश्वास म्हणजे मुसलमानी धर्मोपचार आहे. दिवसाकाठी करण्याच्या पाचही प्रार्थनांचे नमुने निरनिराळे आहेत. शुक्रवारी, रमझान, व बकरी-ईद यावेळी प्रार्थना म्हणणे अल्ला हो अकबर हेच शब्द सतत म्हणत राहणे. इद-उल-फितरचा उपवास समाप्ती समारंभाच्या वेळी देखील हेच शब्द वारंवार उच्चारतात. अतिगौरव म्हणून मुस्लीम लोक ईश्वरास (अल्लास) अनेक शब्द वापरतात, प्रामुख्याने अल्ला हो अकबर, ला इलाह, इल्लालाहो, अल्ला हो अकबर, वा लिल्लाहिल हम्द अशा स्वरूपात अल्लाची स्तुती करतात. किंवा धर्माज्ञा पाळण्यात तत्पर असतात.

जिल्ह्यात औसा, उदगीर, निलंगा, किल्लारी, अहमदपूर, रेणापूर आणि लातूर येथे मशिदी आहेत. इदगा अथवा नमाजगामध्ये सुन्नी मुसलमान जातात. तेथे सामान्यत: रमझान-ईद व बकरी-ईद या प्रार्थना होतात. इमामवाडे फक्त शियाच वापरतात. मोहरमच्या दिवसात येथे करबला कबरीच्या प्रतिकृती ठेवण्यात येतात आणि करबला येथे हौतात्म्य आलेल्या हुतात्म्यांचे स्मरण तेथे कृतज्ञतेने व प्रशंसापर गीतांनी केले जाते.

अनुक्रमणिका

पोषाख : मुसलमानात प्रत्येक जमातीच्या पोषाखाची तऱ्हा वेगवेगळी दिसून येते. प्रौढ मुसलमान सामान्यतः फेटा वापरतो. प्रतिष्ठित सय्यद प्रायः नास्तालिक म्हणून ओळखला जाणारा पसरट सफेद फेटा वापरतात. जमीनदार, सरकारी नोकर, अत्तार, गंधी, सुतार हे डोक्याला साधा रूमाल गुंडाळतात. पण त्याचा रंग साधारणपणे लाल असतो. मेमण लोक रेशमी व जरीकाठी फेटे बांधतात. काही सुती अथवा गर्भरेशमी फेटे रोज वापरतात आणि समारंभासाठी रेशमी व जरतारी फेटे घालतात. काही मुसलमान घट्ट पायजामे घालतात. शहरातील लोकात शेरवाणी आणि पायजमा हा सामान्य पोषाख आहे. पंजाबी व उत्तर हिंदुस्थानी मुसलमानांच्या अनुकरणाने चुडीदार, पायजमा व शेरवाणी वापरणारे पुष्कळ मुसलमान आहेत. जमीनदार आणि श्रीमंत लोक मलमलीचा मुसलमानी कुडता वापरतात तो खाली गुडघ्यापर्यंत पोचणारा असतो. त्यावर एक घट्ट जाकीट व अंगरखा घालतात. अथवा मुघली बटनांचा कोट चढवितात. परंतु आता मुसलमानांच्या तरूण पिढीत पँट व बुशशर्ट प्रसार पावत आहेत. श्रीमंत मुसलमानांच्या स्त्रिया ओढणी, कुडता, अंगिया व घट्ट पायजमा असा पोषाख करतात. त्यावर कलाकुसरीचे, काशिद्याचे काम केलेले असते. फक्त विधवा स्त्रिया सफेद कपड्यात राहतात. बाहेर जाताना बुरखा घेण्याची वहिवाट आहे. बहुतेक दक्षिणी मुसलमानांच्या स्त्रिया साड्याचोळ्याच वापरतात. पोषाखविषयक परंपरा काही अंशी बदलून आर्थिक स्थितीनुसार सुटसुटीत कपडे घालण्याची पध्दत रूढ होत आहे.

अन्न : मुसलमानांची मांसाहाराला हरकत नसते. परंतु दररोज मांसाहार त्यांना देखील परवडत नाही. सार्वजनिक मेजवान्यांच्या प्रसंगी मुसलमानांचा मुख्य खाद्यपदार्थ बिर्याणी हा असतो. जरदा हा पदार्थ भातात तूप, साखर, केशर, बदाम, वेलदोडे, लवंगा, दालचिनी व मिरी घालून बनवितात. मध्यम प्रतीचे लोक पुलाव करतात व त्याच्यावर मटण करी, डाळ व भाज्या असतात. अशा मेजवान्या विवाह, बिस्मिला व अकिका अशा प्रसंगी देण्याची वहिवाट आहे.

उत्सव : इस्लामने काही थोडेच उत्सव प्रसंग नेमून दिलेले आहेत. परंतु हिंदूच्या साहचर्याने ते सुध्दा काही सण पाळतात. मुसलमानी वर्ष मोहरम महिन्यापासून सुरू होते. करबला येथे झालेल्या हुसेनच्या मृत्यूचा वर्षादिन म्हणून मोहरम पाळला जातो. पुष्कळ लोक ताजिया अथवा ताबूत तयार करतात. काही दिवस हे घरी ठेवून नवव्या दिवशी रात्री त्याची गावातील मोठ्या रस्त्यातून मिरवणूक काढतात. दहाव्या दिवशी मोठ्या समारंभाने या ताबूताचे नदीत अथवा तलावात विसर्जन होते. महंमद पैगंबराच्या मृत्यूच्या दिवसाला वक्त असे म्हणतात. रबि-उल-अव्वाल महिन्याच्या बाराव्या दिवशी ईद-ए-मिलाद म्हणून हा दिवस पाळण्यात येतो. ही ईद सुन्नी मुसलमानांत फार मोठ्या प्रमाणावर साजरी होते. पैगंबराचा जन्मदिवस याच महिन्याच्या सतराव्या दिवशी साजरा करण्यात येतो. त्याला मौलाद असे म्हणतात. शाबान महिन्याच्या चौदाव्या दिवशी सायंकाळी शाबए-बारात किंवा सर्व आत्म्यांचा दिवस असतो. या रात्री जन्माला येणाऱ्या आत्म्यांची नोंद स्वर्गात होते असे म्हणतात. वर्षाचा नववा महिना रमझान आहे. या महिन्यात मुसलमान लोक दररोज उपवास (रोजे) करतात. महिनाअखेर म्हणजे शव्वालच्या पहिल्या दिवशी ईद-उल्-फितर येते. या दिवशी मोठ्या समारंभाने उपवास संपविला जातो. हा दिवस रमझान-ईद म्हणून ओळखला जातो. मुसलमानांच्या फार मोठ्या उत्सवापैकी रमझान-ईद हा एक आहे. दुसरा मोठा उत्सव म्हणजे ईद-उल-जुहा कुर्बान उर्फ बकरी-ईद हा झिल-हिज्जा महिन्याच्या दहाव्या तारखेला येतो.

राजपूत (क्षत्रिय) : राजपुत्र या शब्दापासून राजपूत हा शब्द बनलेला असून हे लोक आर्यवंशीय क्षत्रिय आहेत, असे सामान्यपणे मानले जाते. राठोड, भाटी, चौहान, कछवाहा, सीसोदिया, पवार, सोळंकी, पडिहार, संवर, झाला, चावडा, चुडासमा, जेठवा, जाडेजा, गोहिल, नातरायत, बुंदेल, परमार व वाघेला इत्यादी प्रमुख जाती असून सर्व जातींचे पोटभेदही बरेच आहेत. जिल्ह्यात ठाकूर, चव्हाण, चंदेल, बायस, मिसेन, बाजपायी, मिश्रा, परदेशी इत्यादी आडनावे यांच्यात आढळतात. लग्नपध्दती व इतर विधी हिंदू धर्माप्रमाणेच करतात.

अनुक्रमणिका

पूर्वी राजपूत लोक क्षात्रवृत्तीचे होते. राजे, सेनापती, सरदार, सैन्यातले निरनिराळे अधिकारी व सामान्य सैनिक याव्यतिरिक्त अन्य व्यवसाय ते करीत नव्हते. त्यामुळे ही जात शूर, लढाऊ मानली जाते म्हणूनच त्यांची सैनिकी परंपरा तेजस्वी आहे. राजपूत लोक उंच, सुदृढ व देखणे असतात. त्यांच्या स्त्रिया सौंदर्य, नाजुकपणा, गौर वर्ण व सुबक बांधा याविषयी प्रसिद्ध आहेत. पुरूष अंगरखा, अचकन, चोळणा, डोक्याला साफा व गळ्याभोवती रूमाल असा राजपूतांचा सरदारी थाटाचा पोषाख असतो. स्त्रिया घोळदार लेहंगा, पोलक्यासारखी कोपरापर्यंतची चोळी आणि डोक्यावर ओढणी असा वेष करतात. त्यांच्या अंगावर खूप दागिने असतात.

दसरा, दिवाळी, होळी-रंगपंचमी याशिवाय आहेरिया उत्सव, वसंतोत्सव, गौरी उत्सव, कामदेव उत्सव, धाकटी गौर उत्सव आदि सण व उत्सव साजरे करतात. हे लोक मुख्यतः शिव आणि शक्ती यांचे उपासक आहेत. शक्तीची उपासना म्हणून दुर्गा, गौरी, अन्नपूर्णा, शाकंभरी, आशापुरी इत्यादी अनेक नावांनी करतात. याशिवाय गणपती, हनुमान या देवतानांही भजतात. राजपूत लोक प्रेते जाळतात. मृताशौच दहा दिवस पाळतात. तेराव्या दिवशी ज्ञातीभोजन असते.

येल्लम रेड्डी : एक शेकऱ्याची जात. राट म्हणजे राजा या शब्दाचा रेड्डी हा अपभ्रंश आहे. लातूर जिल्ह्यात रेड्डी आंध्रप्रदेशातून आले असावेत. शेती हा रेड्डींचा परंपरागत व्यवसाय आहे. यांच्यात जातपंचायत पूर्वीही नव्हती व आताही नाही. यांच्यात गोळावार, मोढायल्लम, चिटबोने, आयतलवाड, राघमोडे, नसुलवाडे, घुमे, कासार, कुंभार, देवणे, ईस्तारे, बोदरवाड, बीबलवाड, भिंगेवाड, लिंगणवाड, गाडे, गल्लेवाड, बरुफुले, पुरे, जंगवाड, यल्लवाड, शिरगे, माडगे, पप्पलवाड, जख्खलवाड, हांडे, घिरुटे, जक्कलवाड, मुम्मईवाड, बंडरेवाड इत्यादी आडनावे आढळतात.

लग्न जमवावयाचे झाल्यास दोन्हीकडील (वधू व वर) मंडळी एकमेकांच्या घरी जातात, व त्यानंतर एकत्र बसून लग्न पक्के करतात. प्रथम साखरपुडा होतो व लग्न पक्के ठरले असे समजतात. लग्न बहुधा मुलीच्या घरी होते. पूर्वी लग्ने पाच दिवस चालत, मात्र आता दोन दिवसात आटोपतात. यांच्यात आतेमुलीशी, मामेमुलीशी लग्न करता येते. मावस बहिणीशी व चुलत बहिणीशी विवाह होत नाही. लग्नात शेवंती, रूखवात व बहुले असते. लग्न ब्राह्मण पुरोहित लावतो. यांच्यात विधवा विवाहास व घटस्फोटास मान्यता आहे. लग्नानंतर संध्याकाळी वराच्या घरी वरात काढतात. वरातीनंतर "पाळणा" हा विधी वराच्या घरी होतो.

गर्भारपणात सातव्या किंवा नवव्या महिन्यात डोहाळे जेवण करतात. त्यावेळेस मुलीच्या घरची मंडळी मुलाच्या घरी येऊन सर्व खर्च करतात. उपस्थितांना व मुला-मुलीस मानपान व कपडे देतात. त्यानंतर मुलाचे बारसे व नामकरणविधी करतात. यांची कुलदैवते, बालाजी, नृसिंह आणि खंडोबा ही असून ते हिंदूंच्या सर्व देवदेवतांची पूजा करतात. हे लोक शेतकरी असल्याने वेळ अमावस्येला पाच चिखलांच्या लक्ष्मी मूर्ती बनवून खीर, भजी, ताकाची आंबील, कडव्याची कोष करून नैवेद्य दाखवून पूजा करतात.

काही मृतास जाळतात तर काही पुरतात. त्यांच्या अस्थिविसर्जन गंगाखेडसारख्या गोदाकाठच्या गावात करतात. यांची बोलीभाषा कन्नडी व मराठी आहे.

अनुक्रमणिका

लिंगायत : शिव व गुरूच्या ठिकाणी निष्ठा असलेला संप्रदाय होय. त्यांना लिंगायत, लिंगागी, लिंगवत, वीरशैव, लिंगधारी, लिंग, बळीजा, बंजीगारू, वाणी, गुरू हस्तूल, महाजन, देवधरू अशी ही नावे मिळाली आहेत. शिवोपासक असल्यामुळे त्याचे प्रतिक म्हणून लिंग पाषाणाचे असते व चांदीच्या डबीत रेशमी दोऱ्याने गळ्यात बांधतात किंवा शरीरावर धारण करीत असल्यामुळे त्यांना लिंगायत म्हणतात. लिंगम या शब्दावरून लिंगायत हा शब्द प्राप्त झाला असावा.[८] इसवीसनाच्या बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात बसवेश्वराने या संप्रदायाची स्थापना केली अशी समजूत होती. परंतु अलीकडे मिळालेल्या अनेक शिलालेखांवरून व ताम्रपटांवरून असे सिद्ध झाले आहे की हा पंथ लकुलीश नावाच्या विख्यात धर्मगुरूने अकराव्या शतकाच्या सुरूवातीस स्थापन केला आणि बसवेश्वराने त्याचा प्रसार केला.[९] काही लिंगायत विद्वानांच्या मते हा पंथ ब्राह्मणी धर्माइतकाच जुना आहे.

लिंगायत लोक शिवोपासना करतात. ते इतर हिंदू देवतांची पुजा करीत नाहीत. शैव पंथीयांमध्ये दोन भेद आढळून येतात. एक लिंग धारण करणारे व दुसरे लिंग धारण न करणारे. लिंग धारण करणारे लिंगायत होत. लिंगायतांन मुख्य तीन वर्ग आहेत (१) पंचमसाळी - यात उपाध्ये, जंगम आणि व्यापारी बंजिग यांचा समावेश होतो.

जंगम : जिल्ह्यात जंगमाचा भरणा असून यांच्यात बेडा जंगम, माला जंगम, बुडगा जंगम इत्यादी पोटजाती आहेत. दिक्षिवंत, चिलवंत, जोगी, मठपती, मठवाले, धोटीवाले, पुजारी, मरकुंदे, पंचाक्षरी, गरमपल्ले, साळीगार, हिरेमठकर, विभूते, गणाचार्य, हिरेमठ, काळगे, स्वामी, कोळल्ले, मंडे, चोळखणे, श्रीफळे इत्यादी आडनावे यांच्यात आढळतात. जिल्ह्यात जंगम हे स्वामी आडनाव लावतात. हे लोक स्वत:ला सर्व लिंगायतांत श्रेष्ठ मानतात. नंदी, भृंगी, वृष, वीर व स्कंद अशी या वर्गाची पाच गोत्रे आहेत. या सर्व पोटभेदात रोटीव्यवहार चालतो मात्र समान कुळात विवाह होत नाही. मुलीचे वडील वर पित्याकडे जाऊन लग्नासंबंधी बोलणी करतात. लग्न पक्के झाल्यावर कुंकू लावणे हा विधी करतात. ऐपतीनुसार मुलीस साडी चोळी व दागिने करतात. उपस्थितांना गोड जेवण देतात. लग्नाच्या आदल्या दिवशी देवकार्य करतात. त्यावेळेस ते कुलदैवताची पूजा करतात. हे स्वत: जंगम असल्यामुळे स्वत:च लग्नविधी निश्चित करतात. लग्नात हळद लावणे, सुपारी खेळणे, देवाची गादी घालणे, आदि विधी करतात. जंगमच मंगलाष्टके म्हणून लग्न लावतो. लग्नानंतर वधू-वर कुलदैवतास जातात.

यांच्यात विधवा व विधुर विवाहास मान्यता आहे. घटस्फोट घेता येतो पण त्याचे प्रमाण फार कमी आहे. पहिले बाळंतपण माहेरी होते. बाळंतपण झाल्यावर पाचव्या दिवशी पाचवीला बाळास लिंग धारण करतात.

मृतदेहाला पुरण्यात येते. लिंगायत प्रेताचे क्रियाकर्मांत करीत नाहीत.

जंगम लोक सकाळी स्नान करून कपाळावर दररोज विभूती लावतात. लहान मुले व स्त्रियापण कपाळावर विभूती लावतात. पूर्वी जंगम लोक भगवे कपडे वापरीत परंतू आता इतरांसारखेच कपडे वापरतात. सर्वांच्या गळ्यात लिंग असते. सर्व जंगम शाकाहारी असून गूळ घालून केलेली गव्हाची खीर, पुरणपोळी, तांदळाची खीर, हुलपल्ली (ताकाची कढी), वरण, भात, चपाती, पिठलं, शेंगदाण्याची चटणी, ज्वारीची भाकरी, दही, ताक व शेवयाचा भात इ. त्यांचे आवडीचे पदार्थ आहेत.

---

८. सय्यद सिराज उल हसन, **दि कास्ट ॲण्ड ट्राईब्स ऑफ एच.इ.एच. दि निजाम डोमिनिअन्स, खंड ११** बॉम्बे, दि. टाईम्स प्रेस १९२०, पृ. ३८३.

९. **परभणी जिल्हा गॅझेटिअर** पृ.१९८८ पृ.१२१

वीरशैव संप्रदाय : सिद्धागम, वीरागम, वातुलागम आदि अठ्ठावीस शैवागमांच्या उत्तर भागांमध्ये वीरशैव तत्त्वज्ञान, आचार, संस्कार यांची चर्चा केलेली आहे. लिंगधारणा हे वीरशैव सांप्रदायिकाचे प्रमुख भूषण असून गुरूप्रदत्त इष्टलिंग दीक्षापूर्वक सोने, चांदी, वेत लाकूड किंवा कापडापासून तटसर केलेल्या सज्जिकेत (बेल्यात) धारण केले जाते. लिंग धारणेनंतर व्यक्तिव्यक्तीमधील भेद नष्ट होतो, म्हणून

ब्राह्मणा : क्षत्रिया, वैश्या : शूद्रायेच अन्यजातय : ।

लिंग धारणमात्रेण शिव एव न संशय : ॥ (पारमेश्वराम, १.५८) असे मानले जाते. लिंग धारणेच्या जोडीला मस्तकी व सर्वांगावर भस्मधारण करणे, तसेच अष्टावरण व पंचाचाराचे पालन करणे महत्त्वाचे ठरते. "ओम नमः शिवाय" किंवा नमः शिवाय हा सांप्रदायिक मंत्र असून तो गुरूमुखातून ऐकल्यावरच फलद्रूप होतो, ही पंथीय श्रद्धा आहे.

सर्व व्यक्तींना समान मानणे, पंचसूतके न मानणे, सात्विक आहारसेवन, अहिंसा, एकेश्वरवाद, सदाचार, सत्संगतीचे जाणिवपूर्वक पालन करणे या गोष्टींना आचार संहितेत मानाचे स्थान आहे. कारण वर्णाप्रमाणे प्राप्त झालेले कर्म केव्हाही टाकता येत नाही. ज्ञान प्राप्त झाल्यावर सुद्धा फळाची अभिलाषा सोडून कर्म केलेच पाहिजे. कर्मानुष्ठान म्हणजेच शिवाज्ञापालन होय. असा त्यांचा विश्वास आहे.

वीरशैव धर्म - संप्रदाय ही शैवदर्शनाची एक प्रमुख शाखा. कामिकवातुलादि आगमांच्या उत्तरभागात वीरशैव तत्त्वदर्शन आढळते. अर्थात स्वतंत्र धर्मग्रंथ, स्वतंत्र धर्मसंस्थापक शक्ति विशिष्टाद्वैता सारखी विशेष तत्त्वसंकल्पना आदींचा विचार करता वीरशैव हा भारतभूमीतील प्राचीनतम धर्म मानला जातो. म्हणूनच भारतातील पाच प्रमुख धर्मांपैकी वीरशैव धर्माची स्वतंत्र नोंद झालेली आढळते.

श्री.बसवेश्वर हे बाराव्या शतकातील एक महान व्यक्तिमत्त्व. ते कन्नड भाषेतील श्रेष्ठ कवी म्हणून तर मानले जातातच. शिवाय एक थोर संत, समाजसुधारक आणि प्रेषित म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत. श्री. बसवेश्वर वीरशैव संप्रदायाचे संस्थापक होते. त्यांची वचने कन्नड भाषेचा अमूल्य ठेवा आहेत.

बसवेश्वर यांचा जन्म विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावी झाला. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांच्यातील बंडखोरीचा कुटुंबीयांना प्रत्यय आला. त्यांनी मुंज करून घेण्याचं नाकारल. बसवेश्वर आपल्या मतांशी आयुष्यभर चिकटून राहिले. बसवेश्वरांनी वीरशैव धर्माचा झेंडा खांद्यावर घेऊन वेगळी वाट चोखाळली. शिव हा एकमेव ईश्वर असल्याची भूमिका त्यांनी स्वीकारली. एकाच देवाची भक्ती करा, भूतदया बाळगा, प्रेमाने वागा, परोपकार करा अशी शिकवण त्यांनी दिली. दया, अहिंसा, सत्य, सदाचार, नीती आणि शील यांचा त्यांनी आग्रह धरला.

वर्णभेद, जातिभेद आणि धर्मातील कुप्रथांना तिलांजली देण्यासाठी बसवेश्वरांनी विविध पातळ्यांवर प्रयत्न केले. बसवकल्याण या गावी त्यांनी शिवानुभवमंडप नावाची संस्था स्थापन केली. "कायकबे कैलास" म्हणजे " शारीरिक श्रम हाच स्वर्ग " हा सिद्धांतही त्यांनी मांडला. त्यांनी अनेक ठिकाणी मठ बांधले व धर्मसुधारणेचे प्रयत्न सर्वत्र जारी ठेवले. त्यांनी कन्नड भाषेतून "षट्स्थलवचन", "कालज्ञान", "मंत्रगौप्य", आणि विद्यारत्नवचन असे धर्मग्रंथ लिहिले.

वीरशैवांच्या प्राचीन ग्रंथाद्वारे श्रीसिद्धान्तशिखामणी च्या आधारे सांगायचे तर हा धर्मसंप्रदाय वैदिक ठरतो आणि म.बसवेश्वरांच्या समाजक्रांतीमुळे त्याला अवैदिक मानले जाते. अर्थात समन्वयशीलता आणि परंपराशरणता हे मराठी वीरशैवांचे विशेष आहेत.

अनुक्रमणिका

वीरशैवांच्या आचारधर्मात गुरू, लिंग, जंगम, विभूती, रूद्राक्ष, मंत्र, पादोदक आणि प्रसाद हे अष्टावरण आणि शिवाचार, लिंगाचार, सदाचार, भूत्याचार आणि गणाचार हे पंचाचार यांना विशेष महत्त्व आहे. षट्स्थल ही वीरशैवाची महत्त्वाची तत्त्वसंकल्पना योग आणि भक्तीचा संगम साधणाऱ्या या कल्पनेत जीवाचा शिवाकडे होणारा सहा अवस्थामधला, टप्प्यांमधला प्रवास वर्णन केलेला आहे. भक्तस्थल, माहेश्वरस्थल, प्रसादिस्थल, प्राणलिंगिस्थल, शरणस्थल आणि ऐक्यस्थल ही षट्स्थळे आहेत.[१०]

२) पंचमसाळ्यांच्या बाहेरचे कोष्टी, तेली, गवंडी, धनगर, शेतकरी इत्यादि व्यावसायिक लोक या वर्गात येतात. यांच्यात पोटभेद निर्माण झाले असून यांच्यात रोटीबेटीव्यवहार होत नाही.

यापैकी जिल्ह्यात लिंगायत तेली आणि लिंगायत कोष्टी आहेत. लिंगायत तेली हे व्यावसायिक लोक. यांच्यात उद्योगतेली, तीरमल तेली, परदेशी या पोटजाती आहेत. लोखंडे, व्यवहारे, शिरसागर, राऊत, गवळी, नऊगिरे आदि आडनावे आढळतात. विवाहविषयक सर्व विधी जंगमाप्रमाणेच करतात. तर लिंगायत कोष्ट्यांचा व्यवसाय हातमागावर कपडे विणणे हा होय. यांच्यात पटनावळ ही एक पोटजात आढळते. पटनावळ म्हणजे कपडा विणणे. होट्टे, हराळे, उडगे, बोबले, हरळे, पावसेरे, धमगुंडे, पिचे, जिडगे, गड्डे, बिरादर, पाटील इत्यादी आडनावे आढळतात. यांच्यात समान आडनावात रोटीबेटीव्यवहार होत नाही. लातूर, चाकूर आणि किल्लारी येथे यांची संख्या जास्त आढळते. ते हनुमानाबादच्या वीरभद्रेश्वरास आपले कुलदैवत मानतात. इतर सर्व विधी जंगमाप्रमाणे करतात.

३. धोबी, चांभार, कुंभार, कोळी या लोकांचा या वर्गात समावेश होतो. यांना अष्टावरणाचा अधिकार नाही. लिंगायत धोब्यांची वस्ती प्रामुख्याने लातूर, मुरूड याठिकाणी आढळते. यांच्यात शिंदे, वाघमारे, राऊत, सरपाळे, चव्हाण, चौगुले, देशमुख इत्यादी आडनावे आहेत. कपडे धुणे व इस्त्री करणे हा व्यवसाय करतात. लग्नाच्या वेळी श्रीमंत लोक त्यांना कपडे भेट देतात. बलुत्याची कामे हे अजूनही करतात. लिंगायत चांभारांची संख्या प्रामुख्याने लातूर, वलांडी, मुरूड याठिकाणी आढळते. आंबीलपूरे, राजगुरू, शेरखाने, बनसोडे, शिंदे, वाघमारे, नितनवारे, दळवी, बळी, तुलघरे, सुरे इत्यादी आडनावे यांच्यात आहेत. लिंगायत कुंभारांचा व्यवसाय हा फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. बेल्लाळे, शिरोळे, तेलंगे, कानगुल्ले, कामगुनवार, पळनाटे, पांगरीकर, चौकटे, तहाडे, शेवळे, आपृपल्ले, देवळे इत्यादी आडनावे आढळतात. यांची वस्ती लातूर, निलंगा, निटूर याठिकाणी आढळते. एखादी व्यक्ति मृत पावली असेल तर त्यावेळेस हे जंगमांना विधीच्या वेळेस मदत करतात किंवा जंगमांचे करम करतात. मुलांच्या वाढदिवसासाठी त्यांना आमंत्रित करतात.

लिंगायतांच्या महत्त्वाच्या धार्मिक विधीस अष्टावरण किंवा अष्टवर्ण म्हणतात. जीव हा मूलतः शिवरूप आहे. पण अज्ञानरूपी आवरणाखाली तो झाकलेला किंवा बद्ध राहतो. जीवाला शिवैक्य प्राप्त करण्यासाठी अंगाच्या गुणांपासून मुक्त होऊन लिंगत्त्व प्राप्त करावे लागते त्यासाठी जी साधना करावी लागते त्या प्राप्तीस साहायक अशा आठ गोष्टी मानलेल्या आहेत. त्या अशा १) गुरू २) लिंग ३) जंगम ४) पादोदक ५) प्रसाद ६) विभूती ७) रूद्राक्ष ८) मंत्र या आठ गोष्टीवरून अष्टावरण किंवा अष्टवर्ण ही संज्ञा पडली आहे. यांच्यात अष्टवर्णाइतकेच पंचाचारालाही महत्त्व आहे. पंचाचार म्हणजे पाच. सदाचार, गणाचार, नित्याचार, शिवाचार व लिंगाचार असे हे पंचाचार आहेत. लिंगायतांच्या वस्तीत त्यांचे मठ असतात. हे मठ पंचाचार्यांपैकी एखाद्या आचार्यांच्या परंपरेतले असतात व त्या त्या आचार्यांचे अनुयायी त्या मठांशी सलग्न असतात. यांच्यात दोन धार्मिक मिरवणुका वैशिष्ट्यपूर्ण आहेत. १) नंदीकोडू म्हणजे नंदीशृंग व २) व्यासंतोल म्हणजे व्यासहसा.

---

१०. घोणसे श्यामा, **वीरशैवांचे मराठी-हिंदी वाङ्मय, एक अभ्यास** शैवभरती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी, २००२, पृ.१७.

अनुक्रमणिका

विवाहप्रथा : समान आडनावात विवाह करीत नाहीत. मावसबहिण किंवा मोठ्या बहिणीची मुलगी यांच्याशी लग्न करता येते. वरपिता वधूपित्याकडे जाऊन मुलीला मागणी घालतो. तो संबंध दोन्ही पक्षात संमत ठरल्यास ज्ञातीबांधवांसमक्ष सोयरीक पक्की करतात. त्यावेळेस वधू-वरास पोषाख देतात. उभयपक्षी विडे दिले जातात. त्यास साक्षीविडे म्हणतात. लग्नाच्या आधी वधू पिता वरपक्षाला मेजवानी व पोषाख देतो त्यास बाशनगी म्हणतात. लग्नाआधी गुग्गुळविधी असतो. त्यानंतर अरशन, देवकार्य, गुरूची पाद्यपूजा इत्यादी कृत्ये होतात. साखरपुड्यासाठी जंगमाला घेऊन वधूच्या घरी जातात. त्यावेळी साडी-चोळी, दोन नारळ, पाच हळकुंडे, पाच लिंबे आणि पाच विडे एवढे साहित्य बरोबर घेतात. वधूसाठी कांबळे अंथरतात. त्यावर तांदूळ घालतात. वधू फुलांचा मुकुट घालून त्या कांबळ्यावर बसते. मग आणलेल्या वस्तूंनी तिची ओटी भरतात. सुवासिनी घोंगडीवरचे तांदूळ घेऊन ते वधूच्या गुडघे, खांदे व मस्तक यावर तीन वेळा टाकतात. नंतर साखर व विडे वाटतात. वधूकडचा एखादा मोठा माणूस नियोजित वराला वधू दिल्याची घोषणा करतो. त्यावर वरपक्षाकडून स्वीकाराची घोषणा होते. लग्नसमारंभ सामान्यपणे चार दिवस चालतो. पहिल्या दिवशी पितरांची पूजा होते. त्यावेळेस रक्षक देवता म्हणून ते वीरभद्राची पूजा करतात. दुसऱ्या दिवशी तेल व तांदूळ मठाकडे पाठवून नातेवाईकांनाही देतात. तिसऱ्या दिवशी पाच मुख्य आचार्यांची प्रतिके म्हणून पाच कलश देवघरात स्थापतात. चार कोपऱ्यांना चार एक मध्य अशी त्यांची मांडणी असते. त्यावर नारळ, खजुर विडा आणि नाणे ठेवतात. या पाचांच्या साक्षीनेच लग्नविधी व्हायचा असतो. बोहल्याच्या चारही बाजूंना सूत्रबेष्टित असे चार कलश मांडतात. बोहल्यावर वराला पाच सुवासिनींनी तेलहळद लावल्यावर प्रौढ स्त्री वधू-वरांना नवीन वस्त्रे नेसायला देते. सजविलेल्या वरास बैलावर बसवून शिवमंदिरात नेतात. तेथे त्याला बाशिंग बांधतात. यांच्यात अंतरपाट पध्दत नाही. वर गुरूच्या पुढे असतो. वधू-वराच्या डाव्या बाजुला बसते. गुरू त्या दोघांचे हात दर्भानी बांधतो आणि त्यावर पाणी घालून फुले व बिलपत्रे वाहतो. त्यानंतर दोघांच्या मनगटात तो सुत्रबंधन करतो व "सुमूहूर्त सावधान" म्हणतो. उपस्थित असलेले स्त्री-पुरूष वधूला स्पर्श करून उभयतांना आशीर्वाद देतात. वराने वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधल्यावर सर्व मंडळी वधू-वरांवर अक्षता टाकतात. लग्नानंतर इष्टमित्रांना भोजन घालतात. चौथ्या दिवशी बैलावरून वरात काढतात. वरात परत फिरतांना वधू-वर एकमेकांवर सुवासिक गुलाल उधळतात. वधू-वर आपल्या मनगटांचा सूत्रबंध सोडून तो उंबरठ्यावर ठेवतांना पाच सुवासिनींचा सत्कार करतात.

लिंगायतात घटस्फोट व पुनर्विवाह यांना मान्यता आहे. हे लोक शिव हा प्रमुख देव आणि परम आराध्य मानतात. तोच निर्माता, कर्ता, धर्ता, संहर्ता असे समजतात. त्याचे प्रतिक म्हणून लिंगाची व त्याचे वाहन म्हणून नंदीची पूजा करतात. याशिवाय ते हनुमान, गणपती व यल्लमा या देवतांनाही भजतात. बसव कल्याणप्रमाणेच बीड जिल्ह्यातील मानूर येथे लिंगायतांचे प्राचीन श्रद्धा स्थान आहे. लिंगायतांच्या आहारासंबंधी माहिती याअगोदर जंगमामध्ये दिली आहे.

मर्तिकप्रथा : क्षौरविधी जंगमाकडून करून घेतात. मृताला बसवून सुगंधलेपन व वस्त्र परिधान करतात. प्रेताला स्मशानात नेल्यावर सहा हात लांबीरूंदीचा खड्डा खणतात. खड्यात मृताला उत्तराभिमूख बसवितात. त्यावेळेस जंगम हे शिवा, तू आपल्या भक्ताला कैलासात स्थान दे अशा मजकूराची चिठ्ठी मृताच्या गळ्यात बांधतो. डाव्या हाती लिंग मृतास नारिंगी वस्त्राने गुंडाळतात. प्रेत बसलेल्या स्थितीतच पुरतात. मृत अविवाहीत असल्यास त्याचे प्रेत कलते ठेवून पुरतात. खड्डा बुजल्यावर जंगम ठरलेले दान घेऊन खड्ड्यावर उभा राहतो व मृत इसम कैलासाला गेल्याचे जाहीर करतो. लिंगायत प्रेताचे क्रियाकर्मांतर करीत नाहीत.[११]

११. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** १९८८, पृ. १२२.

लोहार : धंद्यावरून बनलेली एक जात. लोह म्हणजे लोखंड आणि त्याचे काम करणारे ते लोहार होत. ते शेतीसाठी लागणारे फाळ, कुळवाची पास, गाडीच्या धावा, कणे, लोखंडी, मोटा, कुदळी, ठिकाव, कुऱ्हाडी, पहारी, खुरपी, विळे, वेळ्या, घमेली, जात्याच्या खुंट्या आदि वस्तूंच्या दुरूस्त्या आणि धार लावण इत्यादी कामे करतात. लोहारामध्ये मराठा, पांचाळ, कन्नड, कोकणी व गुजराती अशा पाच पोटजाती आहेत. जिल्ह्यात लोहारांमध्ये लोखंडे, चाफे, पिंगरे, लोहार, कानोडे, फटमासे, कळसे, लाडकर, थोरात, टाकसाळे, डोंजे, रणदिवे, पकाले, कळसाहितकर, आव्हाड, हारणे, अंकुशे, पोपलाई, लाड, दिशागत, पोफळे, चाफेकानडे, पवार, लोहारे, चौधरी, गाडेकर, देशमुख, टिंमरे, नवगण, पोफळगट, कोठे, कांबळे, चव्हाण, चाफेकर, कळसाईत, सुर्यवंशी इत्यादी आडनावे आहेत.

यांच्यात मामेबहिणीशी लग्न करता येतो. सांडस, चिमटा, हातोडा व पंचपल्लव ही त्यांची देवके आहेत. विवाह ब्राह्मण पुरोहित लावतो. यांच्या बहुतेक चालीरीती मराठ्यांप्रमाणे आहेत. घटस्फोट आणि पुनर्विवाह रूढ आहेत. विश्वकर्मा, खंडोबा, अंबाबाई, गणपती, भैरोबा, महादेव ही त्यांची दैवते आहेत. हिंदूचे सर्व सण साजरे करतात. विशेष सण म्हणून खंडोबाचा उत्सव साजरा करतात. मृतास जाळतात आणि पुरतातही.

वडार : एक भटकी विमुक्त जमात. दगडमातीत काम करणारी ही जमात. ओड किंवा वड्डा हा शब्द कानडी भाषेतील ओड्डू म्हणजे सांधणे या शब्दावरून निघाला आहे. कर्नाटकातील या लोकांची भाषा आणि चालीरीती यावरून ही जात मूळ द्रविड असावी. हे सर्वत्र विखुरल्याने यांच्यात पुष्कळ जातीच्या लोकांची भरती झाली असावी. ते स्वतःस क्षत्रियोत्पना मानत असले तरी ते उद्योगप्रधान आहेत हे निश्चित. महाराष्ट्रात वडारांमध्ये (१) मराठा आणि कानडी, (२) गुजराथी आणि (३) परदेशी असे प्रांतिक पोटभेद आढळत असले तरी लातूर जिल्ह्यात फक्त मराठा आणि कानडा वडारच आढळतात. मराठा आणि कानडी वडारांमध्ये (१) भोज किंवा उरू, (२) माती, (३) दगड किंवा पाथरवट आणि (४) गाडी असे चार पोटभेद आढळतात. उरू वडार कोळसे विकतात. माती वडार मातीचे काम करतात. दगड किंवा कल्ल वडार पाथरवटाचे काम करतात. गाडी किंवा भंडी वडार खटारे हाकण्याचे व जाती करण्याचे काम करतात. भोज किंवा उरू इतर पोटभेदांशी रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत. उर्वरित तीन पोटभेद परस्परात रोटी-व्यवहार करतात. मात्र बेटी व्यवहार करीत नाहीत. कानडी वडारांमध्ये बेडगू आणि मराठा वडारांत कुळे आहेत. एकच बेडगू अथवा कुळ असलेल्यात शरीरसंबंध होत नाहीत. आते-मामे-बहिणीशी विवाह करता येतो. मावसबहिणीशी नाही. घटस्फोट, पुनर्विवाह व विधवाविवाहास मंजुरी आहे.

जिल्ह्यात इटकर, झाकणीकर, कुऱ्हाडे, मुंजुळे, पवार, लष्कर, दंडगोले, जाधव, भांडेकर, बंडगर, कुसळवार, मुदगल, शिरोळे, काळे, शिंदे, सुर्वे, झाकणे, धोतरे, मासुळे, फाळे, राखुडे इत्यादी आडनावे आढळून येतात.

पूर्वी यांच्यात जातपंचायत होती व आताही आहे. एखाद्या गोष्टीविषयी निवाडा करायचा असेल तर तो जातपंचायत करते. जातप्रमुखाच्या प्रमुखास "नायक" म्हणतात. नायकाने दिलेला न्याय सर्वांना मान्य करावा लागतो. जातपंचायतीचा निर्णय नाकारल्यास त्यास आजही वाळीत टाकण्याची पद्धत आहे.

हे हिंदू देवतांना भजतात. त्यांची कुलदैवते व्यकंटरमण, नरसोबा, महादेव, मारूती, जनाई, सटवाई,

मुरगव्वा, नागम्मा व यल्लमा ही आहेत. धर्मविधी जातीतील जाणते चालवितात. मृतास ऐपतीनुसार जाळतात. किंवा पुरतात. मृतांच्या तृप्त्यर्थ वर्ष प्रतिपदेस, नवरात्रीत वस्त्रे व बकरे किंवा कोंबडी अर्पण करतात.

वंजारी : जिल्ह्यात आढळणारी एक जात. बंजारा, ब्रिंजारी, लमाण, लंबाडी अशी निरनिराळ्या प्रदेशांत त्यांना निरनिराळी नावे आहेत. पूर्वी यांचा मुख्य धंदा बैलावरून माल वाहून नेण्याचा होता. पण आता ते स्थायिक झाले असून शेती, पशुपालन, लाकडे व गवत यांचा व्यापार, सावकारी इत्यादी उद्योग करू लागले आहेत. यांच्यात जातपंचायत पूर्वी नव्हती व आजही नाही.

जिल्ह्यात मुंडे, चाटे, केंद्रे, दराडे, घुटे, ढाकणे, भताणे मुरकुटे, कराड, जायबाटे, कागणे, दिघोळे, सोनवणे, भांगे, कांदे, लहाणे, फड, शिरसाट, मुसळे, नागरगोजे इत्यादी आडनावे यांच्यात आढळतात. समान आडनावात विवाह करीत नाही. मामाच्या मुलीशी विवाह करतात मात्र आत्याच्या मुलीशी, भाचीशी व मावसबहिणीशी लग्न करीत नाहीत. लग्नासाठी प्रथम मुलीचा बाप पुढाकार घेतो. मुलाच्या घरी जाऊन लग्नासंबंधी बोलणे ठरवितात. लग्न पक्के झाल्यावर "कुंकू" लावणे हा विधी होतो व नंतर लग्नाची तीथी ठरवितात. वर-वधूला पहिल्या दिवशी आपआपल्या घरी हळद लावतात. लग्नात टिकोऱ्याला आंब्याच्या फांद्या, समदड बांधून आणतात त्यासच ते देवक समजतात. दुसऱ्या दिवशी ब्राह्मण पुरोहितांव्दारे लग्न लावतात.

लग्नानंतर वधू-वर स्थानिक देवधर्मास जातात. तदनंतर वधूस पाच वार उपवास करावयास सांगतात. यांच्यात विधवा व विधुर विवाहास मान्यता आहे. पहिल्या बाळंतपणी सातव्या महिन्यात डोहाळे जेवण करतात. मुल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवी व तेराव्या दिवशी सुहेर पाळतात. सुहेर किंवा विटाळ घालविण्यासाठी घुगऱ्या घालून, गाणे म्हणून विटाळ काढतात. यांचे कुलदैवत जेजुरीचा खंडोबा आहे. दरवर्षी ते जेजुरीला जाऊन त्यास नवस करतात. याशिवाय ते भवानी, बहिरोबा, मारूती आदि देवतांनाही भजतात. शेतकरी लोक पीक आल्यानंतर वेळ अमावस्याच्या वेळी मळणी करून धाण्याची रास करतात. त्यावेळेस ते बकरे किंवा कोंबडे याचा बळी देतात त्यास ते "ढवारा" असे म्हणतात. वंजारी स्त्रियांनी मांस खावू नये त्यामुळे त्यांचा वंशज होतच नाही अशी समजूत आहे.

मृत व्यक्तिस अंघोळ, नवीन कपडे घालून ताटीवर स्मशानात नेतात. मृतास अग्नीडाग देतात. १३ व्या दिवशी तेरवी करतात त्यावेळेस पुरूषांचे डोक्यावरील केस काढतात व उपस्थितांना गोड जेवण देतात.

वासुदेव : भटक्या जमातीपैकी एक जात होय. जिल्ह्यात धुर्वे, हादवे, वाकोडे, पेंढारकर, डोईजड, पाचंगे, रोडगे, कुंभार, अनवले, इत्यादी आडनावे आढळतात. यांच्यात पोटजाती नाहीत. जातपंचायत आहे. पोशाख पांढरा फेटा, बाराबंदी, धोतर, हडपी, टाळ, कपाळावर विशिष्ट आकाराचा गंध, बुक्का आणि डोक्यावर मोरपिसांची टोपी असते. भक्त प्रल्हाद व बहिण भावांची गाणे म्हणतात. बायकांचे वेगळे पोशाख नसतात व स्त्रिया भिक्षा मागत नाहीत. यांची नांदेड जिल्ह्यातील माळेगाव यात्रा भरते त्यावेळी जातीतील लोक एकत्र येवून लग्न जमवितात व भांडणतंटे मिटवितात. यांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे भिक्षा मागणे होय. त्यामुळे ते राष्ट्रीय गाणी, देवाधर्माची गाणी गाऊन भिक्षा मागतात. त्यांची भिक्षा मागण्याची गावे ठरलेली असतात. त्यामुळे दुसऱ्या व्यक्तिने जर त्याच्या इलाख्यातील गावात भिक्षा मागितली तर त्याला जातबहिष्कृत करतात.

आंतरजातीय विवाह, अनैतिक व्यवहार, अनैतिक संबंध केल्यास जातबहिष्कृत करतात. परत जातीत घ्यायचे झाल्यास मांसाहारी जेवण व दारू घेतात.

विवाह : यांच्यात समान कुळात तसेच मावसबहिण, भाची यांच्याशी विवाह होत नाहीत. मात्र आतेबहिणीशी विवाह होऊ शकतो. प्रथम मुलीचा बाप नवरा बघतो. पूर्वी बालपणी विवाह होत असत. परंतु आता होत नाहीत. मुलीच्या बापाने मुलगा बघितल्यावर सर्व नातेवाईकांसमक्ष लग्न पक्के करतात. यांच्यात हुंडा पद्धती आहे. मुलीच्या बापाकडून वडीलांकडून हुंडा घेतात. तो हुंडा म्हणजे मुलाला भिक्षा मागण्याची गावे हुंडा म्हणून देतात. तसेच पैसे व दागिने ऐपतीप्रमाणे देतात. कुंकू लावणे, साखरपुडा हे कार्यक्रम होतात. लग्न हे मुलाच्या घरी होते व लग्नाचा खर्च मुलाचे वडील करतात कारण मुलीच्या वडीलांनी आधीच लग्नाचा खर्च दिलेला असतो. लग्न हे ब्राह्मण पुरोहित लावतो.

लग्न झाल्यानंतर "रूखवत" तोडणे कार्यक्रमाच्या अगोदर "खुशाली" हा कार्यक्रम होतो. त्यावेळेस वरवधूपक्षाकडील (दोन्हीकडील) मंडळी जातपंचायतीच्या लोकांना "खुशाली" म्हणून पैसे देतात. मिळालेल्या पैशाचे बकरे घेवून मेजवानी (दारूसह) करतात. व त्यानंतरच रूखवत तोडतात. यांच्यात विधवा व विधुर विवाह मान्य आहे. विधुर पुरुष कुमारिकेशी विवाह करू शकतो मात्र विधवेला कुमार पुरूषाशी विवाह करता येत नाही.

वासुदेव जमातीच्या पुरूषांनी दुसऱ्या जातीच्या मुलीशी लग्न केल्यास त्याच्यावर दंडात्मक कारवाई करून त्याला जातीत घेतले जाते. परंतु जातीच्या स्त्रीने दुसऱ्या जातीच्या स्त्री-पुरूषाशी लग्न केल्यास तिला जातीत घेतले जात नाही.

लग्न झाल्यानंतर नवरी वराकडे आल्यावर त्यांना देवीच्या दर्शनाला पाठवितात. दर्शनाहून आल्यानंतर खंडोबाच्या नावाने गोंधळी गोंधळ घालतात किंवा सत्यनारायणाची पूजा करतात. लग्न झाल्यानंतर वर जेव्हा पहिल्यांदा वधूच्या घरी जातो तेव्हा त्याला कपडे घेतात व तो ज्या वस्तुला पहिल्याप्रथम हात लावील ती वस्तू त्यास भेट देण्याची प्रथा आहे. मेहुणा किंवा मेहुणीच्या लग्नात मोठे जावई रूसतात त्यावेळी त्यांना अंगठी भेट देतात. ही प्रक्रिया पिढ्यानपिढ्या चालू असते.

मुलीला दिवस गेल्यावर सातव्या महिन्यात डोहाळे जेवण करतात. त्यावेळी तिच्या नवऱ्याचा रूसवा काढतात व त्यात पेहराव किंवा वस्तू देतात. पहिले बाळंतपण मुलीच्या आईवडीलांच्या घरी असते. त्यावेळी ऐपतीप्रमाणे जावई खर्च करतो. पाचवी (सटीपुजन) होते. बाराव्या दिवशी बारसे करतात. त्यानिमित्ताने गव्हाच्या घुगऱ्या देतात. बाळाची आजी, किंवा आत्या बाळाला सोन्याची अंगठी व पेहराव भेट देते. मुले होत नसतील तर दुसरे लग्न करतात किंवा देवाकडे जाऊन नवस करतात.

देवासाठी वेगळी खोली बांधलेली असते. त्यात मरीआई, खंडोबा, जोतीबा (ज्योतीबा) तुळजाबाई, रेणूकाबाई, इत्यादी देवतांच्या पितळी मूर्त्या आणि जुने चलन (पैसे, नाणे) ठेवतात. यांची पूजा दर मंगळवारी दुपारी करतात. मंगळवारी उपवास करतात.

बोलीभाषा : खिवारी भाषा बोलतात. उदा. "दंडीगाम" बांड्ग = तरूण, बांडगी= तरूणी, निबळण = पळणे, लुभणे = चोरणे. मृत व्यक्तीस पुरतात व काही जाळतात. मृताची तेरवी करतात.

वैदू : एक औषध विकत फिरणाऱ्या लोकांची जात होय. वैदुंमध्ये भोई, धनगर, कोळी, माळी आणि फ़लमाळी इत्यादी निरनिराळ्या जातींचे लोक दाखल झाले आहेत. असे एन्थोवेन आर.इ. यांनी म्हटले आहे. पूर्वी वनौषधी घेऊन गावोगावी फिरणाऱ्या अनेक जातींतील लोकांचा जो वर्ग होता त्यातून एक वेगळी जात निर्माण झाली असल्याची शक्यता त्यांच्या उपजातींचे स्वरूप त्याचप्रमाणे त्यांची आडनावे पाहिली तर वाटते. वैदूत तीन प्रमुख पोटभेट आहेत. १. झोळीवाले-झोळी वापरणारे २. दाढीवाले - दाढी ठेवणारे आणि ३. चटईवाले-चटया विणणारे. दाढीवाल्यात पुन्हा दहा पोटजाती आहेत. भोई, धनगर, खुटेकर, कोळी, माळी, मिरजमाळी, फुलमाळी, रावळ, वाघमुंडी, झिंगा इत्यादी, झिंगा या पोटजातीत परस्परांमध्ये रोटीव्यवहार असला तरी बेटीव्यवहार मात्र होत नाही. दाढीवाले वैदू यांच्याशिवाय इतर दाढी वाढवत नाहीत. जिल्ह्यात शिंदे, धनगर, लोखंडे, घोरपडे, कोळी, काळे, चव्हाण इत्यादी आडनावे आढळतात.

विवाहप्रथा : लग्नासाठी वरपिता बाप मुलीसाठी मागणी घालतो, व तिच्यासाठी वधूपित्याला देज द्यावे लागते. लग्नाचा सगळा खर्च मुलाकडील मंडळी करतात. यांच्यात अलीकडे सामूहिक लग्न करण्याची पद्धत रूढ होऊ लागली आहे. लग्नविधी पाच दिवस चालतो. लग्न जातीप्रमुखाकडून किंवा गाव जोश्याला बोलावून लावतात. लग्नविधी चालू असतांना निरनिराळी सोंगे आणून नाचण्याची प्रथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. घोंगडी अंगावर घेऊन आणि मुखवटे लावून ही सोंगे घेतली जातात. जमलेल्या जातीबांधवांचे रंजन करणे हाच त्याचा उद्देश असतो. लग्नाच्या वेळी टिळा लावण्याला "कोहिणूर काप" असे म्हणतात. "कोहिणूर काप" ला जातपंचायतीस ११ रुपयापासून पुढे पैसे देण्याची पद्धत आहे. या पैशातून समाजाकरिता बोकड कापून जेवण देतात. लग्नकार्यात दारू पिणे याला विशेष महत्त्व दिले जाते. लग्न किंवा इतर अशाच स्वरूपाच्या विधीमध्ये जातपंचायतीच्या मानपानाला फार महत्त्व आहे. लग्न झाल्यावर पान सुपारीचा जो कार्यक्रम असतो तेथे हे मानपान केले जातात. जातीचे सगळे लोक भोवताली बसून मध्ये घोंगडी व त्यावर ज्वारीची लहानशी रास ठेवतात. त्यानंतर मानकऱ्यांना एकानंतर एक बोलावून मानाचे पान देतात. हा मान पान, अर्धा पान, पाव पान, किंवा पानाचा एक लहान तुकडा असे निरनिराळे असतात.

मुल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवी करतात. त्याच दिवशी सगळ्या स्त्रियांना बोलावून सुवासिनीची ओटी भरतात. वैदू स्त्रिया निराळे बारसे करत नाहीत. पाचवीच्याच दिवशी नाव ठेवण्याचा कार्यक्रम होतो. बाळाचे जावळ दोन तीन वर्षानंतर केव्हातरी काढतात. जावळ काढतांना ज्या देवतेचा नवस केला असेल तो नवस फेडतात. वैदुंमध्ये कान टोचून घेण्याची प्रथा आहे.[१२] हे लोक व्यंकोबा, मरिअम्म, म्हैसामदेव, शंकर, हनुमान, फिरस्ती माता इत्यादी देवतांना भजतात.

व्यवसाय : यांच्याजवळ गाढवे, शेळ्या, कोंबड्या व शिकारी कुत्रे असतात. ते रानात जाऊन ससे, तरस, घोरपडी, साप, माकडे, उंदीर, घुशी, बेडूक, रानमांजरे, कलिंदरे इत्यादी प्राण्यांना पकडण्याचा उद्योग करतात. पुरुष व बायका वनस्पतीची औषधे, भस्मे, रांगोळी, सुया, दाभण, बिब्बे विकतात. पुरुष शस्त्रक्रिया करून तुंबड्या लावतात. पुरुष, बायका, पोरे गावांमध्ये भाकरी, कपडे आणि शेतात धान्य मागतात.[१३]

---

१२. मांडे, प्रभाकर, **गावगाड्याबाहेर** परिमल प्रकाशन, औरंगाबाद १९८३, पृ.१४२

१३. अत्रे, त्रि. नां. **गावगाडा,** वरदा, सेनापती बापट मार्ग, पुणे, १९८९ पृ. ११९-२०

टीप—आता सर्वच वांशिक गटाबाबतची पूर्वीची समीकरणे बदलत असून नव्याने त्याचा विचार होत आहे. हे सर्वच वांशिक गट स्थानिय किंवा एतदेशीय मानववंश असल्याचा अभ्यासकांचा कल आहे.

अनुक्रमणिका

मर्तिकप्रथा : वैदू लोक मर्तिकास पुरतात. मृतास एका लांब काठीला एक झोळी अडकवून त्यात मर्तिकाला पद्मासन घालून बसवतात. त्या काठीला दोन्हीकडून दोन मानसे खांद्यावर उचलून स्मशानापर्यंत नेतात. मर्तिकाला पुरण्यासाठी आधीच तयार केलेल्या खड्यात बसलेल्या अवस्थेत पुरतात. मर्तिकाचे सुतक तीन दिवस पाळतात.

शिंपी : परंपरेने कपडे शिवणारी एक जात. पुर्वी या जातीचे लोक कपडे रंगविण्याचे कामही करीत असत. परंतु कपडे रंगविणे हे काम त्यांनी सोडून दिले व आता शिवणकाम करणे हाच परंपरागत व्यवसाय राहिला आहे.

यांच्यात अहीर, भावसार, चतुर, कोकणी, मराठा, नागलिक, नामदेव, रंगारी, पंचम, शेतवाल, श्रावक अथवा जैन आणि एक टाके अशा एकूण बारा पोटजाती आहेत. समान आडनावात विवाह होत नाही. मामेबहिणीशी विवाह होतो. परंतु मावसबहिणीशी विवाह होत नाही. त्यांची कात्री, सुया, गज, पंचपालवी ही देवके आहेत. लग्न ब्राह्मण पुरोहित लावतो. विधवा पुनर्विवाहाची आणि घटस्फोटाची प्रथा आहे. शिंपी जातीतील प्रसिद्ध संत नामदेव हे आपल्या जातीचे संस्थापक आहेत असे बहुतांशी शिंपी मानतात. हे लोक बहिरोबा, गिरीचा बालाजी, भवानी, जनाई, जोतिबा, खंडोबा, विठोबा इत्यादी देवतांनाही भजतात.

मृत व्यक्तिस जाळतात. त्यासंबंधी अत्यंक्रिया व श्राद्ध करतात.

साळी : विणकामाचा धंदा करणारी एक जात. जिल्ह्यातील साळी हे कर्नाटकातून इकडे आले असावे असे अभ्यासकांचे मत आहे. साळ्यांमध्ये अनेक पोटजाती आहेत. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील. १. शुक्ल साळी, २. अहीर साळी, ३. गुजर साळी, ४. लकूळ किंवा नकूळ साळी, ५. शुका साळी ६. आरे साळी, ७. सुकीम साळी, ८. पद्मसाळी, ९. चांभार साळी, १०. ठिकळे साळी, ११. पटोळगर साळी, १२. जैन साळी इत्यादी [१४]

जिल्ह्यातील पद्मसाळ्यांमध्ये साळी, अमृतवार, बड्डावार, शिखरपुरवार, बत्तलवार, रोखेवार, क्यातमवार, कोकुलवार, इत्यादी आडनावे आढळतात. समान आडनावात विवाह होत नाही. मामेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा आहे. विवाहात देवक बसवण्यापुर्वी हातमागाचा दोरीचा एक तुकडा, दगडी दिवा आदि साहित्य घेऊन मारूती मंदिरात जातात. तेथील पुजेनंतर घरी विवाह सोहळा संपन्न होतो. घटस्फोट व विधवा विवाहास मान्यता आहे. परंतु विधवेने नवऱ्याच्या कुळात विवाह करू नये असा दंडक आहे. मृत व्यक्तिस काही जाळतात तर काही पुरतात.

होलार : ही एक अनुसूचित जात होय. होलार किंवा होलिया ही मुख्यत्त्वे करून कर्नाटकातील जात कर्नाटकाला जिल्हा जवळ असल्याने येथेही आढळते. त्यांना जंबू किंवा वलेर असेही म्हणतात. कन्नड शब्द होला म्हणजे शेत किंवा होले म्हणजे विटाळ यापासून या शब्दाची व्युत्पत्ती झालेली असावी. वंशपरंपरागत ते खेड्यातील रखवालदार आहेत. यांच्यात निरलिंगे, धनवट, आयवले, गारोडे, गिजगे, गोलंग, गुलीक, जाबीर, कामळे, कर्डे, हालमणे, मानवत, नमदामे, पार्शा व वागार हे अंतर्विवाही पोटभेद आहेत. यांच्यात

१४. सय्यद, सिराज उल हसन **"दि कास्ट ॲण्ड ट्राईब्स ऑफ एच.इ.एच दि निजाम डोमीनियन्स"**, बॉम्बे दि टाईम्स प्रेस, १९२०, पृ. ५७७.

अनेक कुळे आहेत. यांची जिल्ह्यात गोरवे, कांबळे, केंगार, आयवेळ, होनमणे, तोरणे, नामदास, गेजणे, हात्तीकट, ढोबळे, बंडगे इत्यादी आडनावे (कुळे) आढळतात. यांच्यात पुर्वी जातपंचायत होती व आजही आहे. जातीतील भांडणतंटे मिटविण्याचे काम जातपंचायतच करते. पंचांचा निर्णय अमान्य केला तर त्यास वाळीत टाकण्याची व त्यासोबत कोणताही व्यवहार न करण्याची पध्दत आहे.

समान देवक व समान आडनावात लग्ने होत नाहीत. मामाची मुलगी व भाची यांच्याशी लग्न करता येते. साखरपुड्यात वधुस साडी चोळी व उपस्थितांना गोड जेवण देतात. साखरपुड्यालाच टिळा लावणे म्हणतात. मात्र हा कार्यक्रम वराच्या घरी असतो. हळदीच्या आधी खंडोबाच्या नावे गोंधळ घालतात. खंडोबासमोर बळी देऊन खारे (मांसाहारी) जेवण देतात.

यांची आंब्याची डहाळी, कुऱ्हाड, सुर्यफूल इत्यादी देवके आहेत. होलार हे प्राणपूजक (animist) असून ते हिंदूंच्या मुख्य देवांना भजत नाहीत. त्यांच्या कुलदेवता घामब्वा, दुर्गव्वा, उडचव्वा, यल्लव्वा, मर्गब्वा, हिमोड्या आणि व्यंकटरमण या आहेत.

वऱ्हाड घेऊन येण्यासाठी लग्न घरची मंडळी पाण्याची घागर, साखर, नारळ, पानसुपारी हळद कुंकु घेऊन त्यांची भेट घेतात व त्यांना मानाने वाजतगाजत लग्नमंडपात आणतात. वरास मारूतीच्या पारावर शेवंती चढवतात व वधूस लग्नमंडपात आहेर म्हणून साडीचोळी हातात देतात. लग्न ब्राह्मण पुरोहिताव्दारा लावले जाते. व उपस्थितांना जेवण देतात. लग्नानंतर वरात काढतात, त्यानंतर घरभरणी, मांडव परतणी, कांकण सोडणे इत्यादी कार्यक्रम होतात. कांकण सोडणीच्या वेळी दोन्हीकडील मंडळी एकमेकांना कपडे देतात.

यांच्यात घटस्फोट, पुनर्विवाह आणि विधवाविवाहास मान्यता आहे. विधवा विवाहास म्होतुर असे म्हणतात. हे लोक मृतास पुरतात. श्राध्द करीत नाहीत.

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

प्रकरण ४ : कृषि व जलसिंचन

कृषि व जलसिंचन

- पर्जन्य
- मृदा
- शेती हंगाम
- जमिनीचे उपयोजन
- मृदसंधारण
- पिके
- तृणधान्ये
- कडधान्ये
- तेलबिया
- तंतुमय पिके
- मसाल्याची पिके
- अन्य पिके
- खते
- जलसिंचन
- मध्यम प्रकल्प
- लघुपाटबंधारे
- पशुसंवर्धन
- दुग्ध व्यवसाय
- कुळवहिवाट व भूधारणा पद्धती
- शासकीय योजना
- तक्ते

प्रकरण ४

कृषि व जलसिंचन

उस्मानाबाद जिल्ह्यातील काही तालुके एकत्र करून व काही नवीन तालुके निर्माण करून प्रशासकीय सोईसाठी सन १९८२ मध्ये लातूर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. सन १९६१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्याची लोकसंख्या १४,७७,६५६ इतकी होती. त्यापैकी ५५.२३ टक्के कुटुंबे शेती करत होती. १९६१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात ४६.६६ टक्के पुरुष व स्त्रिया शेतकरी होते तर ३६.८६ लोक शेतमजूर होते. त्याचवेळी महाराष्ट्रामध्ये शेतकरी ४६.११ व २३.८० टक्के लोक शेतमजूरीचे काम करीत होते.[१]

लातूर जिल्हा कृषिप्रधान असून बहुतांश लोक शेतीवर निर्भरित आहेत. १९९१ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्यात शेतकरी व शेतमजूर यांची एकूण संख्या ५,१५,१०० इतकी होती. त्यामध्ये शेतकऱ्यांची संख्या २,५८,४२८ होती. त्यामध्ये १,६९,५८० पुरुष व ८८,८४८ महिला होत्या. जिल्ह्यातील लोकसंख्येमध्ये हे प्रमाण ३९.३८ इतके होते तर त्याच वेळी महाराष्ट्रातील शेतकरी व शेतमजुरांची संख्या १,८४,८५,३३१ इतके असून त्यांचे प्रमाण ३२.८१ व २६.८१ टक्के होते. तसेच जिल्ह्यामध्ये शेतीवर काम करणाऱ्या शेतमजुरांची संख्या २,५६,६७२ इतकी होती, व त्यामध्ये अनुक्रमे १,२३,६३६ पुरुष व १,३३,०३६ स्त्रीया होत्या. जिल्ह्यातील लोकसंख्येनुसार त्याचे एकूण प्रमाण ३९.१ इतके होते. त्यामध्ये पुरुषांचे प्रमाण २९.४१ तर महिलाचे प्रमाण ५६.४० टक्के होते, तर महाराष्ट्रामध्ये शेतकरी १,०१,७२,१०८ आणि शेतमजुरांची संख्या ८३,१३,२२३ इतकी होती व त्यांचे राज्यातील शेकडा प्रमाण शेतकरी ३२.८१ व शेतमजूर २६.८१ इतके होते.[२]

Maharashtra State Gazetteers

पर्जन्य

भारतातील शेती ही प्रामुख्याने पावसावर अवलंबून असते. या उक्तीमध्ये कृषि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने पावसाचे महत्त्व किती आहे हे ध्वनीत होते. लातूर जिल्हा त्याला अपवाद नाही या जिल्ह्यात खरीप हंगामात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. तर रब्बी हंगामात ईशान्य मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. जिल्ह्यात पावसाचे प्रमाण सर्वत्र सारखेच नाही. जिल्ह्यातील सरासरी पर्जन्यमान ७०४ ते ९१० मि.मि.पर्यंत आहे. लातूर जिल्हा हा कृषि हवामानविषयक विविध प्रकारांपैकी निश्चित पावसाच्या क्षेत्रामध्ये मोडतो. लातूर येथे वेधशाळेचे केंद्र नसल्याने हवामानविषयक माहिती जवळच्या उस्मानाबाद केंद्राची घ्यावी लागते. सन १९९६ या वर्षात, जिल्ह्यात सरासरी १०१९ मि. मि. पर्जन्यवृष्टी झाली होती. पुढील तक्त्यामध्ये जिल्ह्यातील वर्षनिहाय पर्जन्यमानविषयक माहिती दिली आहे.

---

१. **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ उस्मानाबाद,** १९६१, पृष्ठ २४७

२. **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ लातूर,** १९९१, पृष्ठ ३४.

(पर्जन्यमान मि.मी.मध्ये)*

तालुके	वर्षे			
	१९८५-८६	१९९०-९१	१९९५	२००३
लातूर	७९८	७०४	७५८.७	७७५.०
अहमदपूर	८१८	८७२.४	९००.	८८४.९
उदगीर	७९५	११५६.८	८५५.९	८५३.८
निलंगा	६२९	९४६.००	८०५.९	६९७.०
औसा	७०५	१०४५.००	६०३.७	३७७
रेणापूर	. . .	. . .	७५८.७	६९८
चाकूर	. . .	. . .	८७९.३	८९३.८
जळकोट	. . .	. . .	. . .	९८६
शिरुर अनंतपाळ	. . .	. . .	. . .	५७९

लातूर जिल्ह्यात एकूण अवर्षप्रवण क्षेत्र १.६० लक्ष हेक्टर असून सुखटनकर समितीच्या शिफारसी नुसार या जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील फक्त ५० गावे अवर्षन प्रवन क्षेत्रात येतात. भूरचनेच्या दृष्टीने जिल्ह्याचे दोन भाग पडतात. ईशान्येकडील भाग हा साधारणतः पठारी प्रदेश असून उर्वरित भाग सखल आहे.

विशेषतः लातूर हा हमखास पाऊस पडणारा जिल्हा होय. सरासरी पावसापेक्षा कमी किंवा अधिक पाऊस पडण्याचे प्रमाण जरी पुष्कळ असले तरी आवश्यक इतका पाऊस बहुतांशी वर्षामध्ये पडत असतो. तथापि पर्जन्यमानामध्ये बऱ्याच वेळेला सातत्याचा अभाव दिसून येतो. पर्जन्यराजाची लहर व सातत्याचा अभाव यामुळे कृषि अर्थव्यवस्थेवर बऱ्याच वेळा अनिष्ट परिणाम होतात. वर्षाकाठी पर्जन्य प्रमाण जरी सरासरीपेक्षा फारसे कमी किंवा अधिक नसले तरी जर त्यामध्ये प्रमाणशीरपणा व सातत्य नसले तर त्याचा खरीप पिकांवर अनिष्ट प्रभाव पडतो. बऱ्याच वेळेला गरजेइतका पाऊस न पडता जास्त दिवस उघडीप पडते. त्यामुळे पिके वाळून जाण्याची शक्यता उद्‌भवते. बऱ्याच वेळेला आवशक्यता नसताना अकाली पाऊस पडतो. त्यामुळेही काही पिकांची बरीच हानी होते.

विशेषतः सप्टेंबर-ऑक्टोबर या महिन्यांमध्ये पडणाऱ्या सरींपासून कापूस व खरीप ज्वारी या पिकांची मोठ्या प्रमाणात हानी होते. कापसाच्या पिकांची फुले व बोंडे झडून पडतात. त्याचप्रमाणे ज्वारीचे कणसावरील फुलोरा अकाली पावसाने धुतला जातो. त्याचा कृषि उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो.

मृदा

लातूर जिल्ह्याचा समावेश बेसॉल्टीक खडकजन्य भूप्रदेशात होतो. या जिल्ह्यातील जमीन काळी चुनखडीयुक्त मॅग्नेशीयम, लोह, अल्कली अशा पोषक द्रव्याने संपन्न आहे. त्यामुळे या जमिनीत कोरडवाहू

* पर्जन्यमानाची माहिती जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन लातूर जिल्हा १९८५-८६ पृष्ठ २१-२२, १९९०-९१ पृष्ठ २० व १९९५ ची माहिती पृष्ठ ५ यातून तसेच २००३ ची माहिती कृषि विभाग जिल्हा परिषद लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

पिके चांगली येतात. पाण्याने भिजली असता ही जमीन फुगते व चिकट बनते आणि नंतर कोरडी होताना ती अंकुचित पावते. त्यामुळे तिच्या पृष्ठ भागावर अनेक भेगा पडतात जमिनीची प्रत व खोली यात देखील ठिकठिकाणी बराच फरक आढळतो. स्थूलमानाने जिल्ह्याचे पुढीलप्रमाणे विभाग पडतात. लातूर, रेणापूर, औसा, निलंगा, उदगीर, अहमदपूर, चाकूर या तालुक्यात काही भागात अत्यंत सुपीक व काळ्या पोताची जमीन आढळते, तर काही भागात उदगीर, अहमदपूर, चाकूर, निलंगा या तालुक्यात मध्यम भारी व काही प्रमाणात हलक्या पोताची जमीन आढळून येते.

जिल्ह्याच्या इतर भागात मात्र स्थल रचना उंच सखल असल्यामुळे मातीच्या थरांच्या खोलीमध्ये स्थल परत्वे तफावत आढळते. मृदांची रासायनिक वैशिष्ट्ये तक्ता क्रमांक १ मध्ये दिली आहे. तेथील माती काळ्या रंगाची असली तरी तिच्या पोतामध्ये भिन्नता आढळते. डोंगराळ प्रदेशात रेताड जमीन आढळते हलक्या प्रकाराच्या जमिनीमध्ये संकरीत ज्वारी, बाजरी, तूर इत्यादी पिकांच्या वाढीसाठी योग्य आहेत. खोल व भारी जमिनीत ज्वारी, हरभरा, गहू, करडई, मूग, उडीद, सोयाबीन, ऊस इ. पिके भरघोस काढतात.

मुख्यत्वे जिल्ह्यातील जमीन भारी, मध्यम व हलक्या अशा तीन प्रकारात मोडते, जिल्ह्यातून तेरणा व मांजरा या नद्या वाहत असल्यामुळे त्यांच्या खोऱ्यातील भागात बहुतांश जमिनी भारी व मध्यम प्रकारच्या आहेत. जमिनीच्या दुसऱ्या वर्गीकरणानुसार लातूर जिल्ह्यातील जमिनीचे खरबड मध्यम काळी आणि चोपन असे प्रकार पडतात. खरबड जमीन पर्वत उतरणीच्या भागात आढळते. तेथील माती वाळूमिश्रित चिकण माती तसेच लोह मृदा प्रकारातील असून रंग तपकिरी काळा आहे. ही जमीन बेसॉल्ट खडकापासून तयार झाली असल्याने त्यात मुरमाचा थर आढळतो. उंच भुभागावरील अशाप्रकारच्या जमिनीत पाण्याचा निचरा चांगल्याप्रकारे होतो.

मातीचा रंग काळा व गर्द काळा असून तिच्यात चुनखडीचे प्रमाण जास्त असते. तिच्यात ओलावा धारण करण्याची क्षमता जास्त असते. काळी जमीन प्रामुख्याने मांजरा व तेरणा नदीच्या भागात आढळते. या जमिनी फार काळापासून सुपीक असून ओलीतामुळे त्यात क्षाराचे प्रमाण टिकून आहे.

चापन प्रकारची जमीन लहान लहान ओंढ्याच्या काठाजवळील भागात आणि सखोल भागाच्या अरुंद अशा पट्ट्यात आढळते, ही रंगाने तांबूस किंवा गर्द तपकिरी असून टणक असते. सुकल्यावर जमिनीला भेगा पडतात. आणि ओली असताना चिकट अशी असते. लातूर तालुक्यात २१,८२४ हेक्टर हलकी जमीन ७,४९२ हेक्टर मध्यम, २७,८२१ हेक्टर भारी जमीन आहे. रेणापूर तालुक्यामध्ये ५,४९९ हेक्टर जमीन हलकी आहे. तर ३,६१२ हेक्टर जमीन मध्यम प्रतीची व १६,१७९ हेक्टर जमीन भारी प्रतीची आहे. औसा तालुक्यात ३७,४५४ हेक्टर जमीन हलकी आहे. ११,९७० हेक्टर जमीन मध्यम प्रतीची आहे, तर ३२,०८१ हेक्टर जमीन भारी जमीन आहे. निलंगा तालुक्यात ४३,१७१ हेक्टर जमीन हलकी आहे. १८,९०३ हेक्टर जमीन मध्यम प्रकाराची आहे, तर ४१,११४ हेक्टर भारी जमीन आहे. उदगीर तालुक्यात १९,५२६ हेक्टर जमीन हलकी आहे. १४,२०९ हेक्टर मध्यम जमीन आहे. व १४,७०२ हेक्टर भारी जमीन आहे. अहमदपूर तालुक्यात ४,०६१ हेक्टर जमीन हलकी आहे. १,९४८ हेक्टर मध्यम जमीन आहे. ३५५ हेक्टर भारी जमीन आहे. चाकूर तालुक्यात ४,३२३ हेक्टर जमीन हलकी आहे. १,८४६ हेक्टर जमीन मध्यम प्रकाराची आहे. ३,९०० हेक्टर जमीन भारी प्रकाराची आहे.

साधारणपणे लातूर जिल्ह्यात १,३२,०३४ हेक्टर जमीन हलकी आहे. तर ५८,६४७ हेक्टर मध्यम प्रकाराची जमीन आहे व १,३०,८४४ हेक्टर भारी जमीन आहे. सर्वसाधारणपणे भूपृष्ठावरील मातीचा रंग करडा आणि पोत चिकन माती सारखे आणि संरचना ब्लॅकी आहे तत्संबंधीचा तपशील खालील प्रमाणे आहे :—

अन्नघटक	पार्श्वरेखा-१	पार्श्वरेखा -२
P२०५	०.०५	२२३.६१
K२०	९	५७
N	०.०३	२.२५

खालील विवरणामध्ये लातूर जिल्ह्यातील १९८१ ते २००५ पर्यंतचा सुपीकता निर्देशांक, तालुकानिहाय खालीलप्रमाणे आहे :—

अ.क्र.	तालुका	नत्र	स्पष्टीकरण	स्फुरद	स्पष्टीकरण	पालाश	स्पष्टीकरण
१	लातूर	१.७६	सा.भरपूर	१.१८	कमी	२.९१	अत्यंत भरपूर
२	रेणापूर	१.४१	मध्यम	१.०५	कमी	२.८३	अत्यंत भरपूर
३	औसा	१.६८	मध्यम	१.१३	कमी	२.८७	अत्यंत भरपूर
४	निलंगा	१.६१	मध्यम	१.११	कमी	२.९१	अत्यंत भरपूर
५	उदगीर	१.८६	सा.भरपूर	१.२६	मध्यम	२.८८	अत्यंत भरपूर
६	अहमदपूर	१.८९	सा.भरपूर	१.२४	कमी	२.८९	अत्यंत भरपूर
७	चाकूर	१.३४	मध्यम	१.१	कमी	२.८६	अत्यंत भरपूर
८	लातूर	१.६५	मध्यम	१.१५	कमी	२.८८	अत्यंत भरपूर

दिवसेंदिवस पाण्याची पातळी खोल जात असून जमिनीची धूपही मोठ्या प्रमाणावर होत आहे. पाणी व माती अडविण्यासाठी जलसंधारण विभागामार्फत मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रकाराची कामे हाती घेतली आहेत. पाणलोटात तीन भागांचा समावेश होतो. पाणलोटाचा वरील भाग, मधला भाग, खालचा भाग भागनिहाय साधारणपणे खालीलप्रमाणे कामे करण्यात येतात :—

(१) वरील भाग.—वहितीत अयोग्य, सलग समतल चर, लुज बोल्डर स्ट्रक्चर.

(२) मधला भाग.—कंटूर बंडींग अर्दन स्ट्रक्चर, मोठे लुज बोल्डर स्ट्रक्चर.

(३) खालील भाग.—मातीनाला बांध, सिमेंट नाला बांध, कंटूर बर्डींग, शेत तळे इत्यादी.

शासनाने १९९२-९३ पासून जलसंधारण योजनेचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. सन १९९२-९३ पासून २००३-२००४ पर्यंत लातूर जिल्ह्यात जलसंधारणाची खालीलप्रमाणे कामे करण्यात आली आहेत :—

अ.क्र.	बाब	संख्या/हेक्टर	खर्च [रु. लाखात]
१	मातीचा नाला बंडिंग	३,२८०	३७२५.२१
२	सिमेंट नाला बंडिंग	२,६७९	२६६०.५३

अनुक्रमणिका

अ.क्र.	बाब	संख्या/हेक्टर	खर्च [लाखात]
३	कंटूर बडींग/जैविक बांध	५९,२०४	१३६०.०२
४	चिबड जमीन सुधारणा	८,८००	२६८.६३
५	सलग समतल चर	१२,६९५	५५२.९२
६	नाला सरळीकरण	११९	८६.३७
७	लुज बोल्डर स्ट्रक्चर	१५,०६५	३३५.९५
८	अर्दन स्ट्रक्चर	९,९६६	११७.९८
९	गॅबियन	२६	२.००
१०	भुमीगत बंधारे	२५४	७४.६
११	शेत तळे	१,०६४	३११.७०

सन २००२-०३ मध्ये एकूण लागवडीयोग्य जमीन ३,२१,५२५ हेक्टर होती. ह्या जमिनीचे प्रकारानुसार क्षेत्र व टक्केवारी खालीलप्रमाणे होती :—

बाब	जमिनीचा प्रकार (क्षेत्र हेक्टर मध्ये)			
	हलकी	मध्यम	भारी	एकूण
क्षेत्र	१,३२,०३४	५८,६४७	१,३०,८४४	३,२१,५२५
टक्केवारी	१८.४५	१८.४५	१८.४५	१८.४५

लातूर जिल्ह्यामध्ये जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर होत असते. काही ठिकाणी बांध बंदिस्तीचा अभाव, तुरळक वनस्पती आच्छादन, तुरळक झाडीही त्याची मुख्य कारणे संभवतात उन्हाळ्यात जमीन खूप तापते. सुरुवातीलाच जर जोरदार पर्जन्यवृष्टीचा मारा झाला तर जमिनीच्या वरील थराची मोठ्या प्रमाणावर धूप होते. तद्वतच काही नद्यांच्या काठावरील जमिनीला संरक्षण नसल्यामुळे पुरामुळे देखील मोठ्या प्रमाणावर धूप होते. धूप होण्याचे प्रमाण पावसाळ्याच्या सुरुवातीला अधिक असते. मांजरा व उपनद्यांच्या पुरामुळे जमिनीची मोठ्या प्रमाणावर वर्षानुवर्षे धूप होत आहे. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होत आहे. मृदसंधारण विभागाद्वारे धूपीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी जिल्ह्यात विविध बांध व बंदिस्तीच्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. त्यामुळे भविष्यकाळात धूप होण्याचे प्रमाण घटेल.[३] तक्ता क्रमांक २ मध्ये जिल्ह्यातील मृदेची पार्श्वरेखा दिली आहे. तर तक्ता क्रमांक ३ मध्ये जिल्ह्यातील २००४-०५ तालुकानिहाय जमीन प्रकार क्षेत्र व त्यांची टक्केवारी दिली आहे.

शेती हंगाम

शेतीचे हंगाम मुख्यत: पर्जन्यमान व जमिनीचे प्रकार यावर अवलंबून असतात. लातूर जिल्ह्यामध्ये मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. वार्षिक पावसाचे प्रमाण ७०४ ते ९१० मि.मी.इतके असते. वर्षामध्ये अदमासे ५२ ते ५४ दिवस पावसाळी दिवस मानले जातात. पावसाळी दिवसाचे प्रमाण लातूर, रेणापूर ५२ तर निलंगा, औसा ५४ असून अहमदपूर येथे ६३ दिवस असते. या जिल्ह्यामध्ये जमिनीचे प्रकार व पर्जन्यमान यानुसार खरीप व रबी असे दोन हंगाम आढळतात. लातूर जिल्हा नवनिर्मित असल्याने १९८२-८३ ते २००३-०४ पर्यंत जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. सन १९८२-८३ मध्ये जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र ६,६७,४०० हेक्टर होते तर सन २००३-०४ मध्ये या क्षेत्रामध्ये

३. वरील माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर, यांनी पाठविलेल्या माहितीच्या आधारे देण्यात आली आहे.

वाढ होऊन ते ७,१६,००० हेक्टर इतके झाले. सन १९८२-८३ मध्ये लागवडीखाली निव्वळ क्षेत्र ५,०३,७०० हेक्टर होते तर २००३-०४ मध्ये त्यामध्ये वाढ होऊन ते ५,९७,००० हेक्टर झाल्याचे दिसून येते. जिल्ह्यात खरीप व रबी हंगामामध्ये वेगवेगळी पिके घेतली जातात.

खरीप हंगाम : या हंगामातील पीकांची पेरणी नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून पडणाऱ्या पावसावर केली जाते. सर्वसाधारणपणे जून-जुलैमध्ये खरीप हंगामातील पीके पेरली जातात मे महिन्यातील पावसाचा पूर्व-मशागतीसाठी उपयोग होतो. तथापि, मे महिन्यामध्ये नेहमीच पाऊस पडतो असे नाही. क्वचित वेळा पाऊस पडतो. त्यामुळे जमिनीची मशागत चांगली होते. सामान्यत: जूनच्या तिसऱ्या आठवड्यात पावसाला सुरुवात होते. सुरुवातीला जर पाऊस पुरेसा पडला तर जूनच्या तिसऱ्या आठवड्यात खरीप पीकांच्या पेरणीला प्रारंभ होतो. क्वचितच प्रसंगी नैऋत्य मान्सून वाऱ्याचे आगमन उशिरा झाल्यामुळे जुलै महिन्यापर्यंत सुद्धा पेरण्या लांबतात. जुलै आणि ऑगस्ट या महिन्यामध्ये अधिकाधिक पाऊस पडतो. खरीप हंगामात मुख्यत: कापूस, ज्वारी, बाजरी, भुईमूग, तीळ, मूग, भात व गळीताची पीके घेण्यात येतात. नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून सर्वसाधारणपणे ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत पाऊस पडतो. खरीप पिकांची कापणी व मळणी डिसेंबर महिन्यापर्यंत संपुष्टात येते. खरीप हंगामातील मुख्य पिकांची पेरणी व कापणी खालीलप्रमाणे केली जाते :—

पीक	पेरणीचा समय	कापणीचा समय
भात	जून-जुलै	ऑक्टोबर-नोव्हेंबर
खरीप ज्वारी	जून-जुलै	नोव्हेंबर-डिसेंबर
भुईमूग	जून-जुलै	ऑक्टोबर-नोव्हेंबर

जुलै-ऑगस्ट महिन्यात पडणाऱ्या पावसामुळे पीकांची वाढ चांगली होते सप्टेंबरच्या अखेरीस पावसाचा जोर ओसरतो. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यानंतर पाऊस पडल्यास कापूस, ज्वारी व तूर या पीकांची हानी होण्याचा संभव असतो. तथापि, ऑक्टोबरमधील पाऊस रबी पीकांसाठी उपयुक्त ठरतो. या जिल्ह्यात १९९१-९२ मध्ये भाताखाली २६,६०० हेक्टर, ज्वारी खाली २,०७,००० बाजरी १०,००० हेक्टर तृणधान्ये २,५२,००० भुईमूग, ३१,३०० हेक्टर कापूस, २८,३००, उसाखाली १३,२०० हेक्टर क्षेत्र होते.

रबी हंगाम : रबी हंगामात ईशान्य मान्सून वाऱ्यांपासून पाऊस पडतो. या हंगामातील पीके सर्वसाधारणपणे सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा ऑक्टोबर महिन्यात घेतली जातात. मान्सूनच्या उत्तरार्धात पडणाऱ्या पावसावर पेरणी केली जाते. या हंगामात रबी, ज्वारी, हरभरा, गहू, तूर, फळभाज्या व पालेभाज्या ही पीके घेतली जातात. या हंगामातील पीकांना जलसिंचनाची सोय उपयुक्त ठरते. पाटाच्या पाण्यावर भरघोस पीके घेतात. ओलसरपणा धरून ठेवणारी काही जमीन तसेच नदीकाठची सुपीक जमीन रबी पिकांसाठी अतिशय योग्य असते. मुख्यत: गोदावरी खोरे, तेरणा, तावरजा, रेणा, लेंडी, तिरु इ. नद्यांच्या

खोऱ्यातील गाळाची सुपीक जमीन तसेच ओलसरपणा धरून ठेवणारी काळी कापसाची जमीन यामध्ये इतर रबी पीकेही पेरली जातात. अशा प्रकारच्या जमिनीत ओलावा साठवून ठेवण्याची क्षमता असल्याने पीके चांगली वाढतात. या हंगामातील महत्त्वाची पीके व त्यांच्या पेरणीच्या आणि कापणीच्या वेळा खालीलप्रमाणे येतात :—

पीक	पेरणीचा काळ	कापणीचा काळ
गहू	ऑक्टोबर	मार्च
रब्बी ज्वारी	सप्टेंबर	फेब्रुवारी
हरभरा	ऑक्टोबर	मार्च

ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांमध्ये पडणाऱ्या पावसाच्या सरी पीकांना लाभदायक ठरतात. १९९१-९२ मध्ये तृणधान्याखाली २,५२,००० हेक्टर तर १९९५-९६ मध्ये एकूण तृणधान्याखाली २,५६,०४६ हेक्टर क्षेत्र होते.

सन २००४-०५ मध्ये खरीप तृणधान्याखाली १,४९,९०० हेक्टर क्षेत्र होते व १,२५,६०० टन उत्पादन झाले. तर रबी हंगामात या पीकाखाली ५१,५०० हेक्टर क्षेत्र असून ३५,८०० टन इतके उत्पादन झाले. वेगवेगळ्या पिकाखालील सन १९८२-८३ ते २००२-०३ ची माहिती व सांख्यिकीय आकडेवारी पिके या सदरात दिली आहे.

जमिनीचे उपयोजन

लातूर जिल्ह्याची निर्मिती उस्मानाबाद जिल्ह्यातील काही तालुके वेगळे करून मुख्यत्वे करण्यात आलेली आहे. १९८२-८३ मध्ये या जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र ६,६७४ हजार चौरस हेक्टर होते, तर २००२-०३ मध्ये या क्षेत्रात वाढ होऊन ते ७,१६० हजार चौरस हेक्टर झाले. १९८२-८३ मध्ये जिल्ह्यात ५,०३७ हजार चौरस हेक्टर क्षेत्र लागवडीखाली होते, तर २००२-०३ मध्ये त्यात वाढ होऊन ते ६,६४५ हजार हेक्टर झाले. २००३-०४ मध्ये ७,१६० हजार हेक्टर होते. तक्ता क्रमांक ४ मध्ये १९८२-८३ ते २००२-०३ या मधील काही वर्षांचे जमिनीचे उपयोजन दिले आहे.

मृदसंधारण

लातूर जिल्ह्याची निर्मिती सन १९८२ मध्ये झाली व या जिल्ह्यासाठी सन १९८४ मध्ये स्वतंत्र मृदसंधारण विभाग सुरू करण्यात आला.

संपूर्ण लातूर जिल्हा बालाघाट पठारावर बसलेला आहे. समुद्र सपाटीपासून सुमारे ५४० ते ६३८ मीटर उंचीवर आहे. उंचवट्याच्या दृष्टीने जिल्ह्याचे दोन भाग पडतात. अधिक उंची असलेला डोंगराळ भाग जिल्ह्यात पश्चिम व दक्षिणेकडे पसरलेला असून त्यात लातूर, औसा व निलंगा तालुक्यांचा समावेश आहे. कमी उंचीच्या पट्ट्यात अहमदपूर व उदगीर तालुक्यातील मन्याड लेंडी नदीच्या खोऱ्याचा प्रदेश तसेच मांजरा व तावरजा नद्यांच्या खोऱ्याचा व तेरणा खोऱ्याचा समावेश आहे.

सामान्यपणे जिल्ह्यातील जमीन समतल असून किंचित उताराची आहे. जिल्ह्यातील जमीन साधारणपणे दोन भागात विभागलेली आहे, हलकी व मध्यम हलकी, भारी काळी जमीन अहमदपूर, उदगीर लातूर, व औसा तालुक्यातील काही भागातील जमीन हलकी व मध्यम हलकी प्रकारात मोडते. निलंगा तालुक्यातील काही जमीन तांबड्या रंगाची (जांभा) खडकाळ आहे. भारी काळ्या जमिनीमध्ये

लातूर व औसा तालुक्यातील काही भाग येतो. ही जमीन भारी व काळी असून तेथे रबीची पिके घेतात. जिल्ह्यात जूनच्या मध्यापासून ऑक्टोबर अखेरपर्यंत पावसाळा, नोव्हेंबर ते फेब्रुवारी पर्यंत हिवाळा व मार्च ते जूनच्या मध्यापर्यंत उन्हाळा असतो.

या कार्यक्रमाअंतर्गत मृद व जलसंधारणाची कामे म्हणजे बांध बंदिस्ती, माती नाला बंडिंग, वनीकरण, समपातळी व ढाळीची बांध बंदिस्ती, सिमेंट नालाबांध, मातीचे नालाबांध, भुमिगत बंधारे, कुरण विकास, जमीन सपाटीकरण, चिबड जमीन सुधारणा, फलोद्यान, रवस गवत लागवड, शेत तळे, जवाहर विहिरी, लुज बोल्डर इ. योजना हाती घेण्यात आल्या. १९९१-९२ व त्यापूर्वीच्या सततच्या दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी झाली, तसेच अनियमित व अमर्याद पाण्याच्या वापरामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने खाली गेली, त्यामुळे अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची परिस्थिती चिंताजनक झाली ही बाब लक्षात घेऊन गाव हा विकासाचा घटक धरून शासनाने ५.८.१९९२ च्या शासन निर्णयाअन्वये पाणी आडवा पाणी जिरवा या तत्त्वावर जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेतली.

(१) **नाला बांध बंदिस्ती योजना.**—या याजनेंतर्गत जरूरी प्रमाणे नाल्याच्या पात्रात लहान-लहान बांध घालून पाण्याचा साठा केला जातो. अशा बांधामुळे सभोवतालच्या क्षेत्रातील भू-पृष्ठाखालील पाण्याच्या पातळीत वाढ होते व त्यामुळे धूप थांबते. कामासाठी पाणलोटाचे क्षेत्र ४० ते ५०० हेक्टर पर्यंत, तळाचा उतार तीन टक्के व पात्राची रुंदी ५ ते १५ मीटरपर्यंत असलेले नाले निवडले जातात. ही कामे मुंबई जमीन सुधारणा अधिनियम, १९४२ (सुधारित) मधील तरतुदीनुसार केली जातात. एका नाल्याच्या बांध बंदिस्तीमुळे जवळ-जवळ सात विहिरींना फायदा मिळतो. लातूर जिल्ह्यामध्ये १९८४-८५ मध्ये बांध बंदिस्तीचे लक्ष्य २,९९६ असून ६,०३९ कामे पूर्ण करण्यात आली असून त्यासाठी शासनाने ४४.८७ लाख रुपये खर्च केले, तसेच १९९०-९१ मध्ये ४,१९० लक्ष्य ठरवून ६,८०७ साध्य पूर्ण करून त्यासाठी १,०१.८० लाख रुपये खर्च केले. तसेच १९९२-९३ मध्ये ५००० लक्ष्य ठरवून २,३०,२३ इतके साध्य ठरविले व त्यासाठी २९२.६१ लाख रुपये खर्च केले. वेगवेगळ्या योजनांचा तपशील तक्ता क्रमांक ५ मध्ये दिला आहे.

(२) **मातीचे नाला बंडीग.**—उताराच्या जमिनीला मातीचे नाले बांधून त्या ठिकाणी पाणी आडवून ठेवले जाते त्यामुळे जमिनीची धूप थांबते तसेच नाला बंडिंगच्या खालील भागात ज्या विहिरी असतात त्याना त्या बंडीग मधून साठलेले पाणी झिरपून विहिरींमध्ये जमा होते, व त्याचा उपयोग पिकांसाठी होतो. सन १९८४-८५ मध्ये लातूर जिल्ह्यासाठी १० नाला बंडिंगचे लक्ष्य होते पण प्रत्यक्षात ४४ मातीचे नाला बंडिंग भराव बांधले गेले. त्यासाठी १४.८२ लाख रुपये खर्च करण्यात आले. १९९०-९१ मध्ये लक्ष्य १४२ होते तर ७१ कामे पूर्ण करण्यात आली. त्यासाठी ४१.६८ लाख रुपये खर्च केले. तर १९९३-९४ चे लक्ष्य ५६३ होते त्यापैकी ३३१ कामे पूर्ण केली. त्यासाठी १६९.०४ लाख रुपये खर्च करण्यात आले. सुरूवातीपासून मार्च, २००० अखेर मातीचा बांध बंदिस्तीची जिल्ह्यामध्ये २,८७९ कामे पूर्ण झाली.

(३) **सिमेंट नालाबांध.**—ज्या ठिकाणी मातीचे नालाबांध घेण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य जागा उपलब्ध नाही अशा ठिकाणी सिमेंटचे नालाबांध बांधून पाणी साठा केला जातो. यामुळे भूपृष्ठामध्ये पाण्याचे पातळीत वाढ होण्यास मदत होते. ही कामे १९८९ पासून शास्त्रोक्त पद्धतीने सुरू करण्यात आली. जिल्ह्यामध्ये सन-१९९२-९३ मध्ये सिमेंट नाल्याचे लक्ष्य १० होते परंतु यावर्षी २९० कामाचे साध्य पूर्ण केले असून त्यासाठी १७९.२० लक्ष रुपये खर्च करण्यात आले तसेच सुरुवातीपासून मार्च, २००० अखेर या जिल्ह्यामध्ये २,३०१ कामे पूर्ण करण्यात आली.

अनुक्रमणिका

(४) **समतल सलग चर.**—राज्यातील पडीक जमीन विकास कार्यक्रमांतर्गत बिगर शेती खालच्या जमिनीत मातीसारख्या अमुल्य अशा विकास माध्यमाचे संरक्षण करणे, मृद व जलसंधारण करणे तसेच वृक्ष व चारा यांचे माध्यमातून स्थानिक लोकांच्या गरजा भागवणे व पर्यावरण संतुलन करणे हा सर्व-साधारण हेतू आहे. कमीत कमी मृद व जलसंधारण करण्यासाठी सलग समपातळी चर घेऊन वृक्ष लागवड केली जाते. या कामासाठी जमिनीचा उतार व पर्जन्यमान विचारात घेऊन त्यांचे निरनिराळे ८ नमुने तयार करण्यात आले असून त्याप्रमाणे कामे करण्यात येत आहेत. सन १९९२ ते २००० वर्षाअखेर जिल्ह्यामध्ये ८,२१४ कामे पूर्ण करण्यात आली.

(५) **जैविक बांधासह समपातळी/ढाळीचे बांधबंदिस्ती.**—मृदसंधारणाच्या ज्या अभियांत्रिकी उपाययोजना आहेत, त्या अत्यंत खर्चीक असून त्यांचे परिणामही कालांतराने दिसून येतात. यासाठी कमी खर्चीक व लवकर परिणाम देणारी उपाययोजना म्हणून जैविक बांधाचे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. जैविक बांध म्हणजे मातीच्या किंवा दगडाच्या बांधाऐवजी समपातळी रेषेवर गवत किंवा घायपात या सारख्या वनस्पतींची घट्ट लागवड करून भूपृष्ठावरून वाहणाऱ्या पाण्यास अडथळा निर्माण करणे, की जेणे करून पाण्याबरोबर वाहून येणाऱ्या मातीचे कण या ठिकाणी अडतील व स्वच्छ पाणी त्या बांधातून संथपणे वाहून जाईल. पाणी या वनस्पतीच्या जाळ्यातून वाहून जावू शकत असल्यामुळे या बांधास विशिष्ट प्रकारच्या सांडव्याची किंवा बांधास ढाळ देण्याची आवश्यकता राहत नाही. मातीच्या बांधामुळे हे बांध वाहून जाण्याची किंवा फुटण्याची शक्यता नसल्याने ते कोणत्याही प्रकारच्या तीव्र उतारांच्या जमीनीवर देखील घालता येतात. जिल्ह्यामध्ये सन १९९३-९४ मध्ये या प्रकाराच्या बांधबंदिस्तीचे लक्ष्य ३०४० असून त्यापैकी २,५५९ कामे पूर्ण करण्यात आली असून त्यासाठी २५.१४ लाख रुपये खर्च करण्यात आले. जिल्ह्यामध्ये १९९२ ते २००० अखेर ७,१९५ कामे पूर्ण केली होती.

(६) **अनघड दगडाचे बांध (Loose Boulder Structure).**—ओघळीचे रुपांतर लहान नाल्यात झाल्यानंतर त्यातून वाहणाऱ्या पाण्याचा वेग व परिमाण जास्त होतो. अशा ठिकाणी शेतातील दगड गोळा करून त्याचा नाल्याच्या रुंदी एवढा बांध घालण्यात येतो. या बांधासाठी नाल्याच्या पात्रात पाया खोदावा लागतो. यामुळे दगडांना बळकटी येते. दगड रचताना ते पडू नयेत यासाठी बांधाला दोन्ही बाजूनी उतार देण्यात येतो.अशा दगडाच्या बांधाची संख्या, ओघळीची लांबी, उतार व शेत परिस्थितीप्रमाणे ठरविण्यात येते. जिल्ह्यामध्ये सन १९९२-९३ चे लक्ष्य २२१ व साध्यही २२१ असून त्यासाठी १२.३४ लाख रुपये खर्च झाले. सन १९९२ ते २००० अखेर या जिल्ह्यात १०,५८८ कामे पूर्ण झाली.

(७) **भू संरक्षण आणि फलोद्यान विकास योजना.**—या योजनेंतर्गत जास्त पावसाच्या प्रदेशामध्ये कसण्यास अयोग्य असलेल्या शेतकऱ्यांच्या, खाजगी मालकांच्या टेकड्यांच्या उतारावर चर खोदणे आणि लहान ओघळी बांधणे यासारखी जमीन सुधारण्याची कामे करण्यात येतात. उतारावरील जमिनीची धूप न होताच जमिनीत पाणी मुरविले जाते, आणि त्या ठिकाणी आंब्यांची लागवड करण्यात येऊन शेतकऱ्यांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यात येते. आंब्यांच्या झाडांबरोबरच शिताफळे, बोरे इत्यादी वृक्षांची लागवड केली जाते. जिल्ह्यामध्ये १९९०-९१ मध्ये फलोत्पादन विकासाचे लक्ष्य १,१४४ असून या वर्षाचे साध्य १,३१३ असे आहे. तर या कामासाठी ३८.३४ लाख रुपये खर्च करण्यात आले.[४]

४. वरील माहिती मृदसंधारण विभाग लातूर व कार्यक्रम अंदाजपत्र महाराष्ट्र शासन यावर आधारित आहे.

पिके

लातूर जिल्ह्यातून मुख्यत्वे तेरणा, मांजरा या मुख्य नद्या वाहत असल्यामुळे त्यांच्या खोऱ्यातील भागात बहुतांशी जमिनी भारी व मध्यम काळ्या प्रकारच्या आहेत. जिल्ह्याचा इतर भाग स्थलरचना उंचसखल असल्यामुळे मातीच्या थराच्या खोलीमध्ये स्थलपरत्वे तफावत आढळते. जिल्ह्यात मुख्यत्वे खालील पिके घेतली जातात.

तृणधान्ये

ज्वारी : ज्वारी हे लातूर जिल्ह्यातील मुख्य पीक आहे. तृणधान्य पिकांमध्ये ज्वारीचा प्रथम क्रमांक लागतो. हे पीक जिल्ह्यात खरीप व रबी या दोन्ही हंगामात घेतले जाते. हे पीक मुख्यत्वे तेरणा व मांजरा नद्यांच्या खोऱ्यात मोठ्या प्रमाणात घेतले जाते. तर काही ठिकाणी हे पीक रबी हंगामातच घेतले जाते. खरीप हंगामामध्ये या पिकाचे क्षेत्र रबी हंगामापेक्षा जास्त आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या पाहिल्यास ज्वारी हे पीक मूळचे भारतीय नाही. ज्वारीचा प्रसार भारतामध्ये आफ्रिकेमधून झाला असावा असे विश्वकोशकारांनी म्हटले आहे. लातूर या पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्यात हे पीक केव्हा प्रसारित झाले हे सांगणे कठीण आहे. एवढे मात्र खरे की, रामायण-महाभारताच्या काळापासून ते या जिल्ह्यात प्रचलित असले पाहिजे. जिल्ह्यातील विविध पिकाखालील क्षेत्र याची माहिती तक्ता क्रमांक ६ मध्ये दिली आहे.

सन १९९३-९४ मध्ये लातूर जिल्ह्यामध्ये खरीप ज्वारी खाली १,७७,४६५ हेक्टर तर रबी ज्वारी खाली ३७,८८२ हेक्टर क्षेत्र होते. व एकूण क्षेत्र २,१५,२६७ हेक्टर होते. तालुकानिहाय ते पुढील प्रमाणे होते. लातूर खरीप २४,७०० रबी ज्वारी ९,३६३, अहमदपूर खरीप २४,४०० रबी १,७६२ व एकूण २६,१६२ हेक्टर, उदगीर खरीप २७,६७८ तर रबी १,६४९ व एकूण २९,३२७ हेक्टर, निलंगा ३८,७५५ हेक्टर तर रबी ११,३६५ हेक्टर एकूण ५०,१२८ हेक्टर, औसा खरीप २५,७३८ व रबी ८,४३४ हेक्टर व एकूण ३४,१७२ हेक्टर, रेणापूर तालुक्यात एकूण क्षेत्र २०,२५९ हेक्टर मध्ये १५,९६० खरीप तर रबी पिकाखाली ४,२९९ हेक्टर, चाकूर तालुक्यामध्ये एकूण क्षेत्र २१,१५४ हेक्टर असून त्यापैकी २०,२३४ हेक्टर खरीप पिकाखाली तर ९२० हेक्टर क्षेत्र रबी पिकाखाली होते. १९९८-९९ मध्ये जिल्ह्यात या पिकाखाली एकूण क्षेत्र २,२९,२१८ हेक्टर होते. तर २००२-०३ मध्ये खरीप क्षेत्र १,७६,४०० हेक्टर तर रबी पिकाखालील क्षेत्र २८,९०० हेक्टर होते.

ज्वारीचे पीक मुख्यत्वे पावसावर अवलंबून आहे. प्राचीन काळापासून ह्या पिकाला जलसिंचनाचा लाभ झाल्याचा कोठेही पुरावा आढळत नाही. अलिकडे मात्र पाटबंधाऱ्यांच्या सोयी अधिकाधिक प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळे ज्वारीच्या पिकाला विशेषत: रबी पिकाला जलसिंचन केले जाते. मांजरा तेरणा प्रकल्पाद्वारे ज्वारीच्या रब्बी पिकाला जलसिंचन केले जाते. जिल्ह्यात काही भागात खरीप ज्वारीचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात घेतले जाते. काही वेळा पुरेसा पाऊस न झाल्याने खरीप पिकाचे नुकसान होते किंवा उतार कमी होतो.

सर्वसाधारणपणे एप्रिल-मे महिन्यामध्ये शेतीची नांगरणी करून मशागत करतात खरीप ज्वारीची पेरणी नैऋत्य मान्सून पाऊस सुरू झाल्यावर जून किंवा जुलै मध्ये केली जाते. पिकामध्ये उडीद किंवा मूग ही मिश्र पिके घेण्याची प्रथा आहे. पारंपारिक पध्दतीने दर एकरी अदमासे साडेचार किलो इतके

अनुक्रमणिका

बियाणे वापरले जाते. पेरणीनंतर मधूनमधून कोळपणी करावी लागते. पिकांमध्ये तणांचा प्रादुर्भाव झाल्यास निंदणीची आवश्यकता असते. तथापि जिल्ह्यातील बरेचसे शेतकरी निंदणीकडे दुर्लक्ष करतात. लहान शेतकरी भांगलन करून तण काढतात. अर्थात तणांचा नायनाट केला नाही तर त्यांचा उत्पादन क्षमतेवर विपरित परिणाम होतो. खरीप पीक साधारणपणे नोव्हेंबर महिन्यात कापणीस योग्य होते. रबी ज्वारीची पेरणी सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यामध्ये होऊन ती फेब्रुवारी-मार्च महिन्यापर्यंत कापणीस योग्य होते. मराठवाडा विभाग महाराष्ट्रामध्ये समाविष्ट केल्यानंतर शासनाने पुणे पध्दत नावाच्या सुधारित मशागत पध्दतीची शिफारस केली होती. त्या पध्दतीनुसार ताटांच्या दोन रांगामध्ये अधिक अंतर ठेवून पेरणी करणे श्रेयस्कार आहे असे सुचविले. तथापि या पध्दतीचा लातूर जिल्ह्यात फारसा अवलंब झाल्याचे आढळले नाही. मागील ८/९ वर्षामध्ये परभणी कृषि विद्यापीठाने काही सुधारित पध्दतीचा प्रचार करून शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष प्रयोग करून उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यामध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्यक्रम हाती घेतले आहेत. पूर्वापार लातूर जिल्ह्यात व-हाडी जातीचे पीक लोकप्रिय होते. परंतु त्यापासून मिळणारे उत्पादन कमी असल्यामुळे शासनाने पीजे-४-के ही जात पेरण्याबद्दल उत्तेजन दिले. नंतरच्या काळामध्ये कृषि विद्यापीठाने अनेक नव्या जाती निर्माण केल्या आहेत. त्यामध्ये खरीप ज्वारी साठी पीजे-४-के, पीजे-८ के व पीजे-१६ के तर रबी ज्वारी साठी पीजे-४ आर, एम-३५-१ ही बीयाणे प्रामुख्याने वापरतात. या नव्या जातींचा पुरवठा जून महिन्यात शेतकऱ्यांना केला जातो. अदमासे १९६५-६६ पासून महाराष्ट्रात संकरित ज्वारीचा प्रसार झाला. सध्याच्या लातूर जिल्ह्यामध्येही त्या काळापासून संकरित ज्वारीचा प्रसार सुरू झाला. संकरीत ज्वारीचा फायदा म्हणजे त्या ज्वारीची ताटे कमी उंचीची असल्यामुळे त्यांची हेक्टरी संख्या जास्त ठेवता येते. वारा किंवा वादळापासून ताटांना फारसा उपद्रव होत नाही. पीक लवकर परिपक्व होते. संकरित ज्वारी रासायनिक खतांना भरपूर प्रमाणात प्रतिसाद देते. आणखी महत्त्वाचे म्हणजे ज्वारीच्या ताटांची पाने शेवटपर्यंत हिरवी राहत असल्यामुळे कर्बग्रहण शक्ती (फोटो सिन्थेसिस) टिकून राहते. या सर्वांचा परिणाम असा होतो की, ज्वारीचे दर हेक्टरी उत्पादन पारंपारिक प्रकारांपेक्षा अदमासे चौपट असते.

इ.स.१९८२-८३ मध्ये खरीप हंगामात २,०६,००० हेक्टर आणि रबी हंगामात ४०,९०० हेक्टर जमिनीत लागवड करण्यात आली होती. खरीप हंगामात १९८२-८३ साली ज्वारीचे सरासरी उत्पादन दर हेक्टरी १०९२ कि.ग्रॅम तर रबी हंगामात सरासरी उत्पन्न हेक्टरी ५७२ किलो ग्रॅम झाल्याचे दिसून येते. लातूर जिल्ह्यातील काही वर्षातील खरीप व रब्बी ज्वारीची माहिती खाली दिली आहे.

वर्ष	खरीप			रबी		
	क्षेत्र (००.हेक्टर)	उत्पादन (००.मे.टन)	सरासरी उत्पन्न हे.कि.ग्रॅ.	क्षेत्र (००.हेक्टर)	उत्पादन (००.मे.टन)	सरासरी उत्पन्न हे.कि.ग्रॅ.
१९८२-८३	२०६०	२२४९	१०९२	४०९	२३४	५७२
१९८५-८६	२१०५	१५५१	७३७	४८४	१७३	३५७
१९९०-९१	१९९४	२३५५	११८१	३८९	२९८	७६७
१९९५-९६	१६६९	३०९८	१८५६	३०६	२१३	६९६
२००२-०३	१७६४	२४२०	१५६५	२८९	२११	७०८
२००३-०४	१५६७	२२९१	१४६२	. .	. .	. .

ज्वारीच्या पिकाला मुख्यत्वेकरून खोडमाशी, खोडकिडा, मावा व तुडतुडे, लाल कोळी, लष्करी अळी, कणसातील अळी व मीजमाशी यापासून मोठ्या प्रमाणावर उपद्रव होतो, आणि परिणामी उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटण्याची शक्यता असते. किडीमुळे पोंगे मरतात व रोपास बुंध्यापासून नवीन तुरे येतात.

अनुक्रमणिका

त्यामुळे कणीस भरत नाही आणि पीक परिपक्व होण्यास वेळ लागतो. खोड माशीच्या प्रतिबंधासाठी पेरणीच्या वेळी दर हेक्टरी बियाण्याचे प्रमाण अधिक असते. उपद्रव झालेली रोपे नष्ट करावी लागतात आणि प्रतिबंधक उपाय म्हणून पेरणीच्या वेळी एक किलो बियाण्यात १०० ग्रॅम पाण्यात कार्बोफ्युरॉन हे औषध चांगले चोळावे लागते. त्यानंतर जर किडीचा उपद्रव झाला तर प्रभावी जंतुनाशकांचा उपयोग करतात. खोडकिडीचा उपद्रव रोप २५ ते ३० दिवसाचे झाल्यापासून ते तयार होईपर्यंत होऊ शकतो. या किडीमुळे पीक लहान असताना पोंगे मरतात व ताटे खुंटतात त्यामुळे कणसांमध्ये दाणा भरत नाही. किडींच्या बंदोबस्तासाठी इंडोसल्फान व इतर प्रभावी जंतुनाशकांची मधूनमधून फवारणी करतात. मावा व तुडतुडे यामुळे पानांवर चिकटा पसरलेला दिसतो. त्यामुळे वाढ खुंटते काही वेळा कणसे निसवण्यास अडथळा येतो. पाने अकाली वाळतात, व उत्पादनामध्ये फार मोठी घट दिसून येते. रबी हंगामामध्ये थंडी जास्त काळ टिकून राहिल्यास चिकटा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो. लाल कोळी (माईटस्) याचा उपद्रव मुख्यत: पीक ३० ते ४० दिवसांचे झाल्यानंतर दिसून येतो. त्यामुळे पिकांच्या खालील बाजूस भुरकट जाळी दिसून येतात व पाने तांबडी पडतात. ही कीड पानातील रस शोषून घेते. त्यामुळे ताटांच्या वाढीवर व दाणे भरण्यावर अनिष्ट परिणाम होतो. हा उपद्रव फार वेगाने पसरण्याची शक्यता असते. लष्करी अळ्या रात्री पाने कुरतडून खातात. व दिवसा पोंग्यामध्ये लपून बसतात. मोठ्या प्रमाणावर कीड पडल्यास कीड पान पूर्ण खाते व पानांच्या फक्त शीराच शिल्लक राहतात. रोगनियंत्रणाखाली कार्बरिल व इतर प्रभावी जंतुनाशकांचा अवलंब करावा लागतो. कणसातील अळ्या कणसामध्ये जाळी तयार करतात व कणसातील दाणे खातात. त्यांच्या आधीच्या पिढ्या गवतावर व इतर पिकांवर येतात. संकरित ज्वारीच्या पिकांवर हा रोग फार मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो व त्याच्यावर वेळीच उपाय न योजल्यास पीक नष्ट होण्याची शक्यता असते. संकरित ज्वारी घेण्यास सुरुवात झाल्यापासून कणसावरील मीजमाशी या किडीचा उपद्रव वाढता आहे. पोटरीतून कणसे बाहेर पडल्यावर फुलोऱ्यास सुरुवात होताच या किडीचा उपद्रव होतो. ही माशी दिसण्यास डासासारखी पण डासापेक्षा लहान असते. माशी खोडात एक अंडे घालते. त्यातून एक दोन दिवसात अळी बाहेर पडते व ती बीजांड कोषावर उपजीविका करते. यामुळे बीजांड कोष मरतो आणि त्याचे दाण्यात रुपांतर होत नाही. रोगट ज्वारीत दाणे भरत नाहीत. या किडीमुळे ज्वारीचे पीक आणि विशेषत: संकरित ज्वारीचे पीक नष्ट होण्याचा फार मोठा धोका असतो. या किडीचे निर्मूलन ही समस्या होऊन बसलेली आहे. वरील किडीशिवाय कणसांच्या काणी व दाणे काणी ह्या रोगांपासून ज्वारीला फार मोठा उपद्रव होत असतो. या रोगामुळे कणसात काणी निर्माण होते व संबंध कणसाचे रुपांतर काणीमध्ये होते. या रोगावर फारसे उपाय उपलब्ध नाहीत.

परभणी येथील ज्वारी संशोधन केंद्र अखिल भारतीय समन्वयक प्रकल्पाचे महाराष्ट्रातील प्रमुख संशोधन केंद्र आहे. खरीप व रबी मोसमासाठी अधिक उत्पादन देणाऱ्या जाती व संकरित वाण निर्माण करणे आणि त्यासाठी योग्य अशा लागवड पध्दतीची व पीक संरक्षणाची शिफारस करणे हा संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे. शासनाच्या एकात्मिक क्षेत्रविकास योजनेनुसार लहान शेतकऱ्यांना सुधारित बियाणे, रासायनिक खते, जंतुनाशकद्रव्ये वगैरेसाठी शासनाकडून मदत दिली जाते. त्यामुळे पूर्वीपेक्षा सध्या ज्वारी उत्पादनात निश्चितच वाढ झालेली आहे.

गहू : ज्वारी नंतर गहू हे पीक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात घेतले जाते. हे पीक जिल्ह्यात बहुतेक सर्व तालुक्यात घेण्यात येते. ज्या ठिकाणी पाटबंधारे योजनेअंतर्गत पाण्याचा उपयोग होत नाही, अशा ठिकाणी लहान धरणे विहिरीद्वारे पाणी देऊन गव्हाचे पीक घेतले जाते. हे पीक प्रामुख्याने लातूर, उदगीर, निलंगा,

औसा, रेणापूर व चाकूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात घेतले जाते. सन १९९३-९४ मध्ये या पिकाखाली अनुक्रमे लातूर ७,५०५, उदगीर, १,३८१, निलंगा ३,९२०, औसा ५,२९५, रेणापूर २,२१४ तर चाकूर तालुक्यात ८८९ हेक्टर क्षेत्रामध्ये हे पीक घेतले होते. खालील विवरणामध्ये क्षेत्र, उत्पादन, सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ/दर हेक्टर दिले आहे.

वर्ष	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी दर हेक्टरी उत्पन्न कि.ग्रॅ.
१९८२-८३	२०७	१९६	९४७
१९८५-८६	२२१	१९८	९००
१९९०-९१	२४४	२३५	९९२
१९९५-९६	१९०	२२१	११६३
२००२-२००३	२२८	२६०	१२५१

गव्हाची पेरणी प्रामुख्याने रबी हंगामात जलसिंचनाखालील क्षेत्रात करतात. अधिक उत्पादन देणाऱ्या गव्हाच्या सुधारित जातीच्या लागवडीमुळे गव्हाखालील क्षेत्रात अलिकडे लक्षणीय वाढ होत आहे. गव्हाच्या स्थानिक जातींची पेरणी सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये तर सुधारित व अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची पेरणी नोव्हेंबरमध्ये करण्यात येते. नोव्हेंबर मध्ये पेरणी केलेल्या गव्हास जलसिंचनाची आवश्यकता असते. लागवडीसाठी तयार केलेल्या जमिनीस पेरणीपूर्व सिंचन करण्यात येते. नंतर जमिनीत २० ते २२ से.मी. खोलीवर पेरणी करतात. मात्र जलसिंचनाची सोय नसलेल्या ठिकाणी बियाणे जास्त खोल पेरण्यात येते. पेरणी करतांना दोन ओळीतील अंतर अदमासे ४० सेंटीमीटर ठेवण्यात येते. पूर्वी महाराष्ट्र शेती विभागाने विकसित केलेले एन ५९, एचवाय ६५, एन-आय-१४६ या गव्हाच्या जातीची पेरणी करीत परंतु आता भरघोस पीक देणाऱ्या प्रामुख्याने निफाड-५९, तसेच सुधारित व अधिक उत्पादन देणाऱ्या कल्याणसोना-१५९३, एस-२२७, सोनोलिका-१५५३ व ३०८, एच.डी.-२०२१ ह्या जातींच्या बियाण्यांची लागवड अधिक प्रमाणावर करण्यात येते. एच.डी.-२०२१ जातीचे उत्पादन कल्याणसोना अतिरिक्त इतर जातींपेक्षा जास्त असल्याचे दिसते. साधारणपणे १५ ते २५ दिवसांचे अंतराने पीक तयार होईपर्यंत ४ ते ७ वेळा पाणी देण्यात येते. पिकास कंपोस्ट खत, शेंगदाण्याची पेंड तसेच रासायनिक खतेही देण्यात येतात. बागायती गव्हास खताव्यतिरिक्त पेरणीनंतर ३०,४५,६० दिवसांनी दर हेक्टरी ११.२९ लिटर या प्रमाणात मॅक्रोलीकची तीन वेळा फवारणी करतात. गव्हाची कापणी व मळणी फेब्रुवारी-मार्च महिन्यात करण्यात येते. खळ्यात बैलांच्या पायाखाली मळणी करून लोंब्यातून दाणे काढले जातात. उपनेरच्या सहाय्याने दाणे भूसकटापासून वेगळे केले जातात. हल्ली बऱ्याच ठिकाणी मळणी यंत्राच्या किंवा ट्रॅक्टरच्या सहाय्याने करण्यात येते.

कीड रोगांपासून संरक्षणासाठी पिकावर किटकनाशक औषधे आवश्यकतेनुसार फवारतात. या पिकावर प्रामुख्याने तांबेरा, करपा, मर, काणी काजळी या रोगांचा आणि खोडकिडा, वाळवी (हुमणी) इत्यादी किडींचा प्रादुर्भाव होतो. उंदीरांपासूनही पिकास मोठ्या प्रमाणात उपद्रव पोहोचतो. काही प्रकारची कीड व रोग आणि त्यावरील उपाययोजना याबद्दल माहिती खाली दिली आहे :—

तांबेरा (हळद्या किंवा गेरवा).—देठावरील काळा तांबेरा व पानांवरील नारंगी तांबेरा असे रोगाचे दोन प्रकार आहेत. डिसेंबर-जानेवारी मध्ये नारंगी तांबेऱ्याचा पिकावर प्रादुर्भाव होतो. पुढे काही दिवसांनी काळ्या तांबेऱ्याचा प्रादुर्भाव होतो. हवेतील आर्द्रतेचे प्रमाण ८० टक्क्याहून जास्त झाले म्हणजे या रोगाची वाढ होते अशा प्रकारची आर्द्रता हिवाळ्यात पडलेल्या पावसामुळे निर्माण होते. पीक

पोटरीत आल्यापासून दाणे भरेपर्यंत केव्हाही रोगप्रसार होतो. काळ्या तांबेऱ्यामुळे लांबट गोलाकार लालसर किंवा विटकरी रंगाचे कोड पानावर येतात. हे कोड वाढून पुढे फुटतात व त्यातून विटकरी रंगाचे बिजाणू बाहेर पडतात. पुढे हे कोड खोडावर व ओंब्यावर पसरतात. यामुळे रोपे कुरटी राहून ओंब्या (लोंब्या) लहान पडतात व दाणे भरत नाहीत. नारिंगी तांबेऱ्याचे कोड सुरुवातीस पानाच्या वरील बाजूस दिसतात, पुढे ते संपूर्ण पानावर विखुरलेले दिसतात. काळ्या तांबेऱ्याप्रमाणे कोड एकमेकात मिसळत नाहीत, कोडामध्ये नारिंगी रंगाचे बिजाणू असतात. पुढे स्थित्यंतर होऊन कोडामध्ये काळे बिजाणू तयार होतात. सुरुवातीलाच नारिंगी तांबेऱ्याचा प्रादुर्भाव असल्यामुळे त्यापासून ६० ते ७५ टक्क्यापर्यंत नुकसान होण्याची शक्यता असते. यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतात. रोगप्रतिकार जातीची लागवड करण्यात येते तसेच प्रतिबंधक उपाययोजना म्हणून गव्हाचे पीक पोटरीत असताना दर हेक्टरी आयनेब (डायथेन झेड-७८) १८७५ ग्रॅम, ५०० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारण्यात येते. अशाच प्रकारची दुसरी फवारणी १५ दिवसांनी पुन्हा करण्यात येते. तांबेऱ्यापासून संरक्षणासाठी शासनातर्फेही किटकनाशके फवारणी मोहिम राबविण्यात येते.

काजळी किंवा काणी.—हा बुरशीजन्य रोग असून त्याचा प्रार्दुभाव जानेवारी-मार्च दरम्यान होतो. दाणे भरण्याऐवजी दाण्याच्या भोवती काळ्या बुरशीच्या गाठी तयार होतात. गाठींमध्ये असंख्य बिजाणू असतात. वाऱ्याबरोबर बिजाणूचा प्रसार होत असतो. रोगामुळे रोपांची वाढ खुंटते, रोगाच्या तीव्रतेनुसार बरेच नुकसान होऊ शकते. रोग संक्रमण थांबवणे आवश्यक असते. रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यास्तव पुढीलप्रमाणे उपाय योजतात. पेरणीसाठी रोगमुक्त बियाणे वापरण्यात येते. बियाण्यावर प्रतिकिलो २०५ ग्रॅम व्हॅटाबॅकस या बुरशी नाशकाची बीज प्रक्रिया करण्यात येते.

मर.—ह्या रोगाचा प्रादुर्भाव जमिनीतील बुरशीमुळे होतो. पीक फुलोऱ्यात असतांना रोगाची लक्षणे दिसून येतात. प्रथम रोपांची पाने निस्तेज होऊन हळूहळू रोप वाळू लागते. रोगट रोप उपटून पाहिल्यास खोडाच्या खालील भागावर काळसर बुरशीची वाढ झालेली आढळते. रोगापासून संरक्षणासाठी रोग प्रतिबंधक जातीची लागवड करण्यात येते. पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशक औषध लावण्यात येते. चक्री पीक पद्धतीने रोगाचा संभव कमी करता येतो.

खोडकिडा.—ह्या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास रोपे उपटून जाळून टाकतात. त्याचप्रमाणे पीक निसवण्यापूर्वी १५ दिवस अगोदर प्रति हेक्टरी २० टक्के द्रवरूप एंड्रिन (१२५० मि.लि.) ५०० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारतात. उपद्रव वाढल्यास १५ दिवसांनी दुसरी फवारणी करतात. एंड्रिन ऐवजी कार्बारिल अगर बी.एच. सी.चा वापरही करण्यात येतो.

वाळवी (हुमणी).—ही कीड गव्हाच्या रोपाची मुळे खाऊन नष्ट करते. त्यामुळे रोपे वाळतात. पूर्व प्रतिबंधक उपाययोजना म्हणून क्लोरडेन किंवा हेप्टॅक्लोर ५ टक्के ही भुकटी दर हेक्टरी ६५ किलो किंवा १० टक्के बी.एच.सी भुकटी १२५ किलो या प्रमाणात शेतात पसरून जमिनीत चांगल्या प्रकारे मिसळण्यात येते.

तांदूळ (भात) : जिल्ह्यात तृणधान्ये पिकांमध्ये भाताच्या पिकाचा तिसरा क्रमांक लागतो. पूर्वी उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये तुळजापूर, निलंगा, अहमदपूर आणि उमरगा तालुक्यामध्ये प्रामुख्याने भाताचे पीक घेतले जात असे. लातूर जिल्हा निर्मिती नंतर लातूर जिल्ह्यात १९९५-९६ मध्ये या पिकाखाली २२,८०० हेक्टर क्षेत्रामध्ये भाताचे पीक घेतले होते. त्यामध्ये उदगीर ४,४८३ हेक्टर, अहमदपूर ४,०७१ हेक्टर, निलंगा

३,६९७ हेक्टर लातूर ३,६५० हेक्टर औसा तालुका २,६४५, चाकूर ३,१६४ हेक्टर तर रेणापूर तालुक्यांमध्ये २,३१७ हेक्टर क्षेत्रामध्ये हे पीक घेतले होते. प्रामुख्याने जून-जुलैमध्ये भाताची पेरणी करण्यात येते. पेरणीसाठी दर एकरी १३.५९ ते १८.१२ किलोग्रॅम बियाणे वापरण्यात येते. कापणी व मळणी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये करण्यात येते. भाताचे जिल्ह्यातील दर हेक्टरी सरासरी उत्पादन ७०१.७५ किलोग्रॅम इतके आहे. पिकावर या जिल्ह्यात टिक्या नावाच्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. त्यापासून संरक्षणासाठी पेरणीपूर्वी बियाणावर रोग प्रतिबंधक औषधाची प्रक्रिया करण्यात येते. पीक फुलोऱ्यावर येईपर्यंत एक-दोन वेळा बोर्डेक्स मिक्श्चर ३:३:५ या प्रमाणात फवारतात. रोग प्रतिकारक जातींची लागवड करण्याकडे अलिकडे कल दिसतो. खालील विवरणामध्ये जिल्ह्यातील भात क्षेत्र, उत्पादन व सरासरी उत्पादन दर हेक्टरी दिले आहे :—

वर्ष	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ./हेक्टर
१९८२-८३	१९८	१२३	६२१
१९८५-८६	२१४	९७	४५३
१९९०-९१	२२४	२७८	११३८
१९९५-९६	२२८	१३५	५९५
२००२-०३	२०९	१६१	८१८
२००३-०४	२०५	६७	३२७

बाजरी : तृणधान्ये पिकांमध्ये बाजरी हे पीक सर्व तालुक्यांमध्ये घेतले जाते. तरी प्रामुख्याने पठारी व डोंगरी भागामध्ये कमी पावसाच्या भागात हे पीक घेतले जाते. १९९३-९४ साली जिल्ह्यात बाजरी पिकाखाली ११,९७३ हेक्टर क्षेत्र होते. तर १९९५-९६ मध्ये पिकाचे प्रमाण वाढून ते १५,२२६ हेक्टर इतके झाले होते. जिल्ह्यात प्रामुख्याने लातूर २,२१० हेक्टर, उदगीर ३,९३७, निलंगा ४,३५८, रेणापूर १,३८४ हेक्टर तर चाकूर तालुक्यामध्ये १,६१९ हेक्टर मध्ये हे पीक घेतले होते. बहुधा हे पीक कोरडवाहू जमिनीतच घेण्यात येते. खरीप ज्वारी जेथे जेथे पिकवली जाते तेथे बाजरीचे क्षेत्र आढळून येते. उन्हाळ्यात नांगरणी केल्यावर पाऊस पडल्यानंतर पुन्हा एकदा वखरणी करण्यात येते. जून-जुलैमध्ये तिफणीच्या सहाय्याने बी पेरण्यात येते. दर एकरी २.७० ते ३.६० किलोग्रॅम बियाणे वापरण्यात येते. रासायनिक खतांचा वापर अलिकडे वाढला आहे. कापणी-मळणी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये करतात. मळणी ज्वारीच्या मळणीसारखीच करतात.

हल्ली जिल्ह्यात संकरित बाजरीची लागवड होऊ लागली असून संकरित बाजरीस दर हेक्टरी ८० किलो नत्रखत दोन हप्त्यात समप्रमाणात विभागून देतात. खताचा पहिला हप्ता पेरणीच्या वेळेस तर दुसरा हप्ता पेरणीनंतर तीन आठवड्यांनी देतात बाजरीचे अरगट ह्या रोगापासून संरक्षणासाठी पीक सरंक्षक औषधेही फवारतात. अरगट हा रोग बाजरीच्या अधिक उत्पादन देणाऱ्या काही संकरित जातीवर दिसून येतो. रोगाची लक्षणे दाणे भरत असताना दिसतात. फुलातून चिकट पांढरा द्रव बाहेर पडतो व त्याच्या तपकिरी रंगाच्या गाठी बनतात. हवा, कीड व रोगट बियाण्यांद्वारे या रोगाचा प्रसार होतो. त्यावर उपाय म्हणून पेरणीपूर्वी बीयाणे ३० टक्के मीठ असलेल्या द्रावणात बुडवितात पाण्यावर तरंगणारे दाणे काढून टाकतात. नंतर बियाणे दोन वेळा स्वच्छ धुऊन सावलीत वाळवून पेरणीसाठी वापरतात.

खालील विवरणामध्ये लातूर जिल्ह्यात बाजरी ह्या उत्पादनाखालील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पन्न कि.ग्रॅ. दिले आहे :—

वर्ष	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ./हेक्टर
१९८२-८३	११५	५३	३४६
१९८५-८६	१०३	१९	१८५
१९९०-९१	११२	४६	४१२
१९९५-९६	१३९	८६	६१७
२००२-०३	८९	५६	७३६
२००३-०४	८१	३६	४४४

वरील तृणधान्ये पिकांव्यतिरिक्त या जिल्ह्यात मका, वरी, नाचणी, भाढळी इत्यादी पिके अल्प प्रमाणात घेण्यात येतात. यापैकी खरीप हंगामात मक्याचे पीक जलसिंचन उपलब्ध असलेल्या जमिनीत घेतात. वरीचे पीक डोंगराळ भागातील जमिनीत घेण्यात येते. वरीचे पीक संपूर्णत: खरीप हंगामातच घेण्यात येते तर नाचणीचे पीकही डोंगरी भागात घेतले जाते. सन १९९३-९४ मध्ये मका या पिकाखाली जिल्ह्यात ४,१७२ हेक्टर तर वरी पिकाखाली ३३२ हेक्टर तर नाचणी भाढळी पिकाखाली ४५८ हेक्टर क्षेत्र होते. मका पिकासंबंधी खालीलप्रमाणे माहिती देता येते :—

मका : मका हे पीक महत्त्वाचे नसले तरी थोड्या फार फरकाने जिल्ह्यात सर्वत्र घेतले जाते खालील सांख्यिकीय आकडेवारी वरून हे दिसून येते. सर्वात जास्त पीक लातूर, चाकूर, उदगीर तालुक्यात घेतले जाते.

सन १९९३-९४ मध्ये जिल्ह्यात या पिकाखाली ४,५८६ हेक्टर क्षेत्र होते तर १९९८-९९ त्यामध्ये घट होऊन या वर्षी जिल्ह्यात फक्त १,५१० हेक्टर क्षेत्र होते. मक्याचे पीक प्रामुख्याने सन १९९३-९४ मध्ये लातूर तालुक्यात ७५० हेक्टर चाकूर ४२८ हेक्टर, उदगीर ४७८ हेक्टर, रेणापूर ४५८ हेक्टर, निलंगा १,६७८ हेक्टर, औसा ३१६ हेक्टर, अहमदपूर ४७८ हेक्टर क्षेत्रामध्ये पीक घेतले होते तर सन १९९८-९९ मध्ये जिल्ह्यात फक्त १,५१० क्षेत्र पिकाखाली असून तालुकानिहाय लातूर ४७१ हेक्टर, अहमदपूर ९० हेक्टर, उदगीर ३२७ हेक्टर, निलंगा ३२७ हेक्टर, औसा २१० हेक्टर, रेणापूर ८५ हेक्टर, चाकूर मध्ये हे पीक फारच थोड्या क्षेत्रात घेतले होते. याचा उपयोग जनावरास ओला चारा म्हणून केला जातो. सन २००३-०४ मध्ये जिल्ह्यात या पिकाखाली ३,९०० हेक्टर क्षेत्र होते व त्यापासून १५०० टन उत्पादन झाले. हेक्टरी उत्पादन फक्त ३८५ किलो ग्रॅम होते. खालील माहितीमध्ये जिल्ह्यातील मका पिकाखालील क्षेत्र उत्पादन व सरासरी दर हेक्टरी उत्पन्न याची माहिती दिली आहे.

वर्ष	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ./हेक्टर
१९८२-८३	१	१०	३१७
१९८५-८६	२८	२३	८२१
१९९०-९१	३२	४१	१२८१
१९९५-९६	१७	२०	११७६
२००३-०४	३९	१५	३८५

अनुक्रमणिका

कडधान्ये

तृणधान्यानंतर खाद्य पिकांमध्ये कडधान्याचा क्रमांक लागतो. कडधान्यामध्ये या जिल्ह्यात तूर, मूग, हरभरा, उडीद, वाल, कुळीथ, मटकी, चवळी इत्यादी पीके कमी जास्त प्रमाणात घेण्यात येतात. वरील पीकामध्ये प्रामुख्याने तूर, मूग, हरभरा, उडीद ही पिके मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात घेतली जातात. या पीकांची सविस्तर माहिती खाली दिली आहे.

तूर : तूर हे कडधान्यामधील प्रथम क्रमांकाचे पीक असून ते जिल्ह्यात सर्वत्र घेण्यात येते. प्रामुख्याने हे पीक सन १९९३-९४ मध्ये खालील तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात घेतले गेले होते. उदा. औसा तालुक्यामध्ये १२,८६७ हेक्टर मध्ये तर लातूर १०,५०० हे., अहमदपूर ७,४५६ हे., चाकूर ६,६२६ हे., निलंगा ६,३९२ हे., उदगीर ११,९४६ हे. व रेणापूर तालुक्यात ४,०१५ हेक्टर इतक्या क्षेत्रात घेतले होते.

हे पीक जिल्ह्यात सर्वत्र खरीप हंगामात घेण्यात येते. या पिकाखाली १९९३-९४ साली ५९,८०३ हेक्टर इतके क्षेत्र होते. हे पीक सर्वात मोठ्या प्रमाणात औसा व लातूर तालुक्यांमध्ये घेतले जाते. तर सर्वात कमी प्रमाणात रेणापूर तालुक्यात घेतले जाते. हे पीक बऱ्याच प्रमाणात कापूस किंवा भुईमूगामध्ये मिश्र पीक म्हणून घेण्यात येते. मिश्रपीक म्हणून घेण्यात येत असल्यामुळे कापूस किंवा भुईमुगाच्या पेरणी बरोबरच जून-जुलैमध्ये तुरीची पेरणी करतात.

तुरीची पेरणी जुलैच्या पहिल्या आठवड्यात करण्याची कृषि तज्ज्ञांनी अलिकडेच शिफारस केली आहे. त्यासाठी मुख्य पिकाच्या ३० ओळी नंतर एक ओळ याप्रमाणे तुरीची पेरणी करण्यात येते. तुरीच्या रोपांची वाढ मुख्य पीक तयार होईपर्यंत मंदगतीने हिवाळ्यापर्यंत होत असते. रोपांना अदमासे दोन महिन्यांनी फुले येतात व नंतर शेंगा लागतात. शेंगा परिपक्व होऊन कोरड्या झाल्यावर जानेवारी-फेब्रुवारीमध्ये पिकाची कापणी (सोंगणी) करण्यात येते. तुरीचे जिल्ह्यातील सरासरी दर हेक्टरी उत्पादन ४०० ते ४५० किलोग्रॅम होते. तुरीच्या पिकावर मर नावाच्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. त्यापासून संरक्षणासाठी रसायणे फवारतात. तसेच रोगप्रतिकारक सी-११, सी-३६, सी-२ या जातींच्या बियाणांची लागवड करतात. कृषि विद्यापीठाने या पीकाबाबत बरेच संशोधन केले आहे. १९६२-६३ मध्ये पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर, अहमदपूर व उदगीर तालुक्यांमध्ये जिल्ह्यातील एकूण कडधान्य पिकापैकी ४५.०३ टक्के क्षेत्र या पिकाखाली होते. खालील विवरणामध्ये जिल्ह्यातील तुरीचे क्षेत्र उत्पादन व दर हेक्टरी उत्पन्न दिले आहे :—

वर्ष	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ./हेक्टर
१९८२-८३	५१४	२०१	३३६
१९८५-८६	५६६	२३९	४२२
१९९०-९१	६९३	१४१	२०४
१९९५-९६	६७५	४३९	६५०
२००२-०३	६५१	६४५	८५१
२००३-०४	७०८	४५२	६३८

अनुक्रमणिका

उडीद : कडधान्यामध्ये उडीद या पिकाचा दुसरा क्रमांक लागतो. हे पीक जिल्ह्यात सर्वत्र मुख्यत्वे खरीप हंगामात घेतात. १९८२-८३ मध्ये या पिकाखाली लातूर जिल्ह्यात २२,४०० हेक्टर क्षेत्र होते तर १९९४-९५ मध्ये ६८,२२५ हेक्टर क्षेत्रामध्ये हे पीक घेतले होते व जिल्ह्यामध्ये उदगीर तालुक्यामध्ये १४,११४ हेक्टर, निलंगा १२,६२६ हेक्टर, लातूर ९,३५० हे., चाकूर ८,८०० हेक्टर, औसा ७,३८२ हेक्टर, अहमदपूर ८,७०१ हेक्टर, इतक्या क्षेत्रामध्ये हे पीक घेतले होते. ज्वारीबरोबर मिश्र पीक म्हणूनही उडीद घेतात. जून-जुलैमध्ये पेरणी करून सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये मळणी करतात. प्रत्येक रोप समूळ उपटून काढतात व नंतर ते खळ्यावर काही दिवस वाळवितात. त्यानंतर बैलांच्या पायाने तुडवून अथवा काठीने झोडपून मळणी करण्यात येते. दर हेक्टरी ४३० ते ४५० किलोग्रॅम उत्पादन येते. पिकावर मर व भुरी हे रोग पडतात. जिल्ह्यातील पीकासंबंधी खालील माहिती देता येते :—

वर्ष	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ./हेक्टर
१९८२-८३	२२४	७८	२२४
१९८५-८६	४६९	१३३	२८३
१९९०-९१	३६४	१६३	४४८
१९९५-९६	६५०	४८६	७४८
२००३-०४	८२५	३९२	४७५

मूग : मूग हे कडधान्यामधील तिसऱ्या क्रमांकाचे पीक असून ते जिल्ह्यात सर्वत्र घेतले जाते. सन १९९४-९५ मध्ये जिल्ह्यामध्ये या पिकाखाली ३३,८८२ हेक्टर क्षेत्र होते. हे पीक खरीप ज्वारी व बाजरी या पीकाच्या मध्ये ठराविक ओळी सोडून मध्ये घेतले जाते. काही भागात हे पीक माढे घेतात. लातूर जिल्ह्यात सर्वात जास्त क्षेत्र लातूर तालुक्यामध्ये आहे. १९९४-९५ मध्ये खालील प्रमाणे या पिकाखालील क्षेत्र होते. लातूर ७,९८८ हेक्टर, निलंगा ६,१५६ हेक्टर, उदगीर ५,९९९ हेक्टर, अहमदपूर ४,२८३, औसा ३,९८५ हेक्टर, रेणापूर ३,८६८ हेक्टर, चाकूर २,४९१ हेक्टर, मुगाचे पीक मुख्यत्वे काळ्या कसदार जमिनीत खरीप हंगामामध्ये घेतात. ह्याशिवाय उन्हाळ्यात वैशाखी मुगाचे पीक जलसिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणीही घेतात. मुगाच्या लागवडीसाठी जमिनीची दोन वेळा नांगरणी करतात. नंतर वखरांच्या सहाय्याने ढेकळे फोडून जमीन तयार करतात. जिल्ह्यात मुगाच्या लवकर तयार होणाऱ्या जातीचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. कारण हे पीक काढून झाल्यावर या जमिनीत रबी ज्वारी किंवा गव्हाचे पीक घेतात. जून महिन्यात अरगड्याच्या सहाय्याने बी पेरणी करतात. पेरणीसाठी दर हेक्टर १६ किलोग्रॅम बियाने वापरण्यात येते. पेरणीनंतर एक आठवड्याने पिकाची रोपटी दिसू लागल्यावर निंदणी व उवरणी (कोळपणी) अदमासे वीस दिवसांच्या अंतराने करतात. सप्टेंबरमध्ये पीक तयार होते. प्रत्येक रोप समूळ उपटून काढतात व नंतर ते खड्ड्यात काही दिवस वाळवतात. त्यानंतर बैलांच्या पायाने तुडवून अथवा काठीने झोडपून मळणी करण्यात येते. सध्या यंत्राच्या सहाय्याने धान्ये काढतात. जिल्ह्यात दर हेक्टरी सरासरी ३८३ किलोग्रॅम उत्पादन होते. तर मिश्रपीक म्हणून घेतल्यास उत्पादन कमी येते. शासनाने जिल्ह्यासाठी मुगाची चायना मूग ७८१ या सुधारित जातीची शिफारस केलेली आहे. ह्या जातीचे पीक ६५ दिवसांत तयार होते. मुगाच्या मुळावर नैट्रोजनच्या ग्रंथी तयार होत असल्याने नंतर घेतलेल्या पिकास चांगला उपयोग होतो.

अनुक्रमणिका

पिकावर मर व भूरी या रोगांचा प्रादुर्भाव होतो. मर रोग जमिनीत असणाऱ्या बुरशीपासून होतो. त्यामुळे पीक फुलात असतांना रोपे एकदम कोमेजतात व पाने कोरडी होतात. यासाठी उपाययोजना म्हणून मर प्रतिबंधक जातीच्या बियाण्याची लागवड करण्यात येते.पेरणीपूर्वी बियाण्यास एक टक्का पारायुक्त बुरशी नाशक रसायन एक किलो बियाण्यात ३ ग्रॅम या प्रमाणात चोळतात. भूरी रोगामध्ये पानावर पांढरवट बुरशी दिसते. रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाल्यास पाने गळून पडतात. हा रोग असलेली रोपे लांबून सुद्धा ओळखता येतात. त्यावर उपाय म्हणून ३०० मेश गंधक २० किलो प्रति हेक्टर फवारतात किंवा ८० टक्के पाण्यात मिसळावे. गंधक १,२५० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारतात. काही वर्षातील खरीप मूग पीकाचे क्षेत्र उत्पादन व दर हेक्टरी उत्पादन याची माहिती दिली आहे.

वर्ष	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ./हेक्टर
१९८२-८३	२१८	६२	२८६
१९८५-८६	२१६	८३	३८३
१९९०-९१	२२७	७६	३३५
१९९५-९६	२५५	९८	३८४
२००३-०४	२४७	२१२	८५८

हरभरा : हरभरा हे पीकही जिल्ह्यामध्ये सर्वत्र घेतले जाते. लातूर जिल्ह्याच्या निर्मिती पूर्वी सन १९६० ते १९९३ दरम्यान राज्यामध्ये सर्वाधीक पीक उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये घेतल्याची नोंद आहे. त्या दरम्यान हे पीक ५३,९६०.४२७ हेक्टर मध्ये घेण्यात आले होते. सध्या कडधान्यामध्ये हरभऱ्याच्या पीकाचा चौथा क्रमांक लागतो. हे मुख्यत्वे रबी पीक आहे. सन १९९४-९५ मध्ये या पीकांखाली २८,९६१ हेक्टर क्षेत्र होते. लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यामध्ये त्याचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे. तालुका लातूर ५,७५० हेक्टर, निलंगा ५,४५६ हेक्टर, औसा ४,४३५ हेक्टर, उदगीर २,५४४ हेक्टर, चाकूर १८३२ हेक्टर, रेणापूर १२५८ हेक्टर, तर अहमदपूर ४८६ हेक्टर, तसेच या जिल्ह्यातील पीकाचे ओलीता खालील क्षेत्र ४४७१ हेक्टर होते. सध्या सर्वात मोठ्या प्रमाणात हे पीक लातूर, निलंगा व औसा तालुक्यामध्ये घेतले जाते. काही ठिकाणी माढे पीक घेतात, तर काही ठिकाणी रबी ज्वारी व गहू या पीकांमध्ये मिश्रपीक म्हणूनही हरभरा पेरतात. पेरणीसाठी दर हेक्टरी ५४ किलोग्रॅम बियाणे पेरतात. पेरणी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये करून रोपांची चांगली वाढ होण्यासाठी फुले येण्याआधी झाडांचे शेंडे खुडून टाकतात. त्यामुळे रोपांची वाढ चांगल्या प्रकारे होते. फेब्रुवारीमध्ये पीक तयार होते. तेव्हा रोपे मुळापासून उपटून खळ्यावर नेतात. तेथे बैलांच्या पायाखाली तुडवून अथवा काठीने झोडपून मळणी करतात. सध्या यंत्राच्या साह्याने मळणी करतात. जिल्ह्यात दर हेक्टरी ५९५ किलोग्रॅम पर्यंत हरभऱ्याचे उत्पादन येते. लातूर जिल्ह्यात हरभऱ्याची चाफा नावाची जात प्रसिध्द असून तिचे इतर जातीपेक्षा उत्पादनही जास्त येते. चाफा जातीची पेरणी केल्यानंतर सुमारे ४५ दिवसांनी व ७५ दिवसांनी जलसिंचन करतात. त्यामुळे उत्पादन अधिक येते.

हरभऱ्यावर दोन प्रकारच्या बुरशीमुळे मर नावाचा रोग येतो. त्यामुळे पेरणी केल्यावर रोपे वाळतात. शेंगांचा प्रादुर्भाव पीक फुलात असताना सुद्धा दिसून येतो. रोगावर उपाय म्हणून एक टक्का पारायुक्त बुरशीनाशक रसायन एक किलो बियाण्यास २.५ ग्रॅम या प्रमाणात चोळून लावतात. खालील विवरणामध्ये

जिल्ह्या निर्मीती नंतर वेगवेगळ्या वर्षातील या पिकाखालील क्षेत्र, उत्पादन व सरासरी दर हेक्टरी उत्पन्न याची माहिती दिली आहे.

वर्ष	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ./हेक्टर
१९८२-८३	२५०	८४	३३६
१९८५-८६	३१५	७९	३१५
१९९०-९१	२८९	११३	३९१
१९९५-९६	२७६	१६६	५९५
२००२-०३	२८६	१४९	५५७

तेलबिया

तेलबिया पीके जिल्ह्यातील नगदी पिके असून सन १९९३-९४ जिल्ह्यामध्ये या पिकाखालील क्षेत्र १,४७,९३७ हेक्टर होते तर १९९८-९९ मध्ये या पिकाखाली १,६८,१९४ हेक्टर क्षेत्र होते. सन २००३-०४ जिल्ह्यात एकूण खरीप गळीत धान्याखाली १,५६,७०० हेक्टर क्षेत्र होते व उत्पादन १,३५,१०० टन झाले होते. नगदी पीकामध्ये प्रामुख्याने सूर्यफूल, भूईमूग, करडई, जवस, कारळे व इतर गळीत धान्ये यांचा समावेश होतो. या पीकामध्ये सूर्यफुल, भुईमूग,ही महत्त्वाची पीके असून तीळ, करडई, जवस व एरंडी ही दुय्यम पीके आहेत. महत्त्वांच्या पिकांची माहिती खाली दिली आहे.

लातूर येथे गळीतधान्ये संशोधन केंद्र आहे. वेगवेगळ्या पीकावर संशोधन करून नवीन अधिक उत्पादन देणाऱ्या पीकावर संशोधन केले जाते. मुख्यता सूर्यफुल,भुईमूग, तीळ, कारळे, एरंडी इत्यादी पिकावर येथे संशोधन चालू आहे. तसेच रब्बी हंगामात जवस व करडई या पिकावर संशोधन केले जाते. सुर्यफूलाचे पीक या जिल्ह्यात दोन्ही हंगामामध्ये घेतले जाते.*

सूर्यफूल : सूर्यफुलाचे पीक या जिल्ह्यात दोन्ही हंगामामध्ये घेतले जात असले तरी रबी हंगामामध्ये हे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. तर १९९३-९४ मध्ये जिल्ह्यामध्ये या पिकाखाली ९१,०४४ हेक्टर क्षेत्र होते. तर १९९८-९९ मध्ये या पिकाखाली २९,७०१ हेक्टर क्षेत्र होते. लातूर जिल्ह्यामध्ये १९९३-९४ मध्ये तालुकानिहाय क्षेत्र खालील प्रमाणे होते. लातूर १९,८०० हेक्टर, अहमदपूर १३,५३८ हेक्टर, उदगीर ६,३५४ हेक्टर, निलंगा २०,५७९ हेक्टर, औसा १५,८४७ हेक्टर ,रेणापूर १०,३८१ हेक्टर, चाकूर ४,५४५ हेक्टर होते. महाराष्ट्र शासनाने सूर्यफूल लागवडीसाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना कार्यान्वित केल्यामुळे या पीकाला फार मोठे उत्तेजन मिळाले आहे. शासकीय मदतीचा असंख्य शेतकरी लाभ घेत आहेत. जिल्ह्यातील हवामान सुद्धा या पिकास अत्यंत पोषक आहे. उत्तम निचऱ्याच्या मध्यम ते साधारण प्रतीच्या जमिनीत हे पीक घेण्यात येते. पिकासाठी जमीन तयार करतांना प्रथम नांगरणी करून नंतर दोन वेळा वरवरणी करतात. हे पीक दोन्ही हंगामात घेता येत असले तरीसुध्दा या जिल्ह्यात खरीपाच्या हंगामातच मुख्यत्वे घेण्यात येते. केवळ अल्पसंख्य शेतकरी दुसोट्याचे पीक म्हणून घेतात पेरणी जून महिन्यात करतात. पेरणीसाठी दर हेक्टरी १० ते १२ किलो बियाने वापरतात. पेरणी करतांना जमिनीच्या

* अधिक माहितीसाठी कृषी संशोधन आणि शिक्षण यामध्ये सविस्तर माहिती दिली आहे.

अनुक्रमणिका

मगदुरानुसार दोन ओळीत ४५ ते ६० से.मी. अंतर ठेवतात. पेरणीनंतर १० ते १६ दिवसांनी विरळणी करून एका ठिकाणी फक्त एकच चांगले जोमदार रोप ठेवण्यात येते. या पीकास दोन ते तीन वेळा कोळपणी करतात. शेवटची कोळपणी झाडास फुले येण्यापूर्वी देतात. रासायनिक खतांचा उपयोग करणे लाभदायक ठरते. जलसिंचनाची सोय आहे त्या ठिकाणी शेतकरी गरजेनुसार दोन-तीन वेळा पाणी देतात. त्यामुळे उत्पादन अधिक येते. पीक संरक्षक औषधांची फवारणी करतात. हे पीक साधारणपणे साडेतीन ते साडेचार महिन्यात तयार होते. पीक तयार झाले म्हणजे फुलांची कापणी करतात. नंतर २ही फुले वाळवितात व काठीने झोडपून बी वेगळे करण्यात येते. सूर्यफुलांच्या तेलबियांचे उत्पादन जमिनीच्या प्रतवारी प्रमाणे दर हेक्टरी ८ ते १२ क्विंटल येते. त्यापासून शेतकऱ्यास घरगुती वापरासाठी तेल तसेच बिया विकून रोख रक्कम मिळते. या पीकापासून शेतकऱ्यास बऱ्यापैकी लाभ होतो. १९८२-८३, १९८५-८६, १९९०-९१,१९९५-९६ व २००२-०३ वर्षातील जिल्ह्यातील खरीप व रबी हंगामातील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पन्न याची माहिती खाली दिली आहे.

वर्ष	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ./हेक्टर
१९८२-८३	२००	११३	५६५
१९८५-८६	६५४	२५३	३८७
१९९०-९१	९०७	५९६	६५७
१९९५-९६	८८४	५८२	६५८
२००२-०३	५३०	३३०	६३९

जिल्ह्यात २००३-०४ मध्ये खरीप सूर्यफुलाचे उत्पादन १५,१०० हेक्टर क्षेत्रामध्ये घेण्यात आले असून उत्पादन ७,४०० टन झाले व दर हेक्टरी सरासरी ४९० किलो इतके उत्पन्न झाले.

लातूर येथे १९९१ मध्ये संकरीत सूर्यफुल संशोधन प्रकल्प सुरू करण्यात आला असून संशोधन केंद्राने प्रसारित केलेले एलडीएमआरएसएच-१ आणि ३ हे वाण केवडा या घातक रोगास प्रतिबंध करणारे असून त्याची उत्पादन क्षमता १५-१६ क्विंटल/दर हेक्टरी आहे. त्यानंतर एलएस-११ हा अशादायक वाण प्रचलित मॉर्डन आणि ई.सी.६८४१४ पेक्षा उत्पादनात सरस आढळून आला असून त्याचे हेक्टरी उत्पादन १५०० किलो इतके आहे.

भुईमूग : जिल्ह्यात हे पीक बऱ्याच शतकापासून लागवडीखाली आहे. या पीकास गाळाची भूसभूसीत जमीन तसेच काळी चिकण मातीची जमीन लागते. जिल्ह्यात हे पीक खरीप व रबी हंगामामध्ये घेतले जाते. प्रामुख्याने खरीप हंगामामध्ये मोठ्या प्रमाणात घेतले जाते. सन १९९३-९४ मध्ये या जिल्ह्यात १९,४१२ हेक्टर इतके क्षेत्र या पिकाखाली होते. तर १९९८-९९ मध्ये या पिकाखाली जिल्ह्यात सुमारे १७,०३० हेक्टर इतके क्षेत्र होते. १९९३-१९९४ मध्ये वेगवेगळ्या तालुक्यातील क्षेत्र खालीलप्रमाणे होते. लातूर ३,२७५ हेक्टर, अहमदपूर १,३१३ हेक्टर, उदगीर २,१९७ हेक्टर, निलंगा ५,०१२ हेक्टर, औसा १,७०८ हेक्टर, रेणापूर २,९५१ हेक्टर आणि चाकूर २,९५६ हेक्टर प्रामुख्याने उदगीर, निलंगा, लातूर तालुक्यामध्ये या पीकाचे क्षेत्र जास्त होते. १९९३-९४ मध्ये एकूण क्षेत्रापैकी ५८९ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली

होते. जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी कपाशी किंवा ज्वारीच्या पिकानंतर चक्री पीक म्हणून भुईमूग पेरतात. पाण्याचा उत्तम निचरा होणाऱ्या जमिनीतच हे पीक घेणे लाभकारक असते. लागवडीसाठी जमीन तयार करतांना प्रथम नांगरणी व नंतर वखरणी करतात. त्यामुळे जमीन भुसभुशीत होते. जून-जुलैमध्ये भुईमूगाची पेरणी मोगड्याच्या सहाय्याने करतात. बियाणाच्या भरमसाठ किंमतीमुळे टोकन पध्दतीने पेरणी करतात. त्यामुळे बियाण्यांची बचत होते. मोगडयाच्या सहाय्याने पेरणीसाठी दर हेक्टरी १०० किलोग्रॅम बियाणे लागते. या जिल्ह्यात भुईमूगाच्या पसऱ्या उपटया पंजाब-१,एस.जी.३८६ अशा विविध जाती प्रचलित आहेत. पसऱ्या भुईमूगावर पुरक संशोधन प्रकल्प १९८५ मध्ये सुरू करण्यात आला असून या संशोधन प्रकल्पापासून भुईमूग पीकावर संशोधन करून अधिक उत्पन्न देणारी लातूर नं.३३ आणि १९ हे पसऱ्या वाण प्रसारीत करण्यात आले आहे. तसेच एल.जी.एन-२ या वाणाने खरीप हंगामामध्ये हेक्टरी १५ क्विंटल उत्पादन दिले असून उन्हाळी हंगामात ३० क्विंटलही उत्पादन दिले आहे. हा वाण १२५ दिवसात तयार होतो. पी.बी.एन.जी.१८ हा वाण उन्हाळी हंगामासाठी योग्य असून उत्पादनास सरस आढळला असून त्याची उत्पादन क्षमता हेक्टरी २४०० किलो असून त्याचा कालावधी १२० दिवस आहे. सन १९८२-८३ ते २००२-०३ पर्यंतच्या लातूर जिल्ह्यातील क्षेत्र, उत्पादन सरासरी उत्पन्न दर हेक्टरी किलोग्रॅम दिले आहे.

वर्षे	खरीप			उन्हाळी		
	क्षेत्र	उत्पादन	सरासरी उत्पन्न	क्षेत्र	उत्पादन	सरासरी उत्पन्न
	(०० हे.)	(०० मे. टन) (वाळलेल्या शेंगा)	(कि.ग्रॅ./हे.)	(०० हे.)	(०० मे.टन)	(कि.ग्रॅ./हे.)
१९८२-८३	२९४	१८७	६२४	६	. .	. .
१९८५-८६	३५६	१३७	३८१	४	. .	. .
१९९०-९१	३०३	१०२	३३५	२६	२६	१०००
१९९५-९६	१९८	१३५	६८०	९	१०	११५५
२००२-०३	१७२	८१	५३०	उ.ना.	उ.ना.	उ.ना.
२००३-०४	१२४	२४	१९४	उ.ना.	उ.ना.	उ.ना.

उ.ना. म्हणजे उपलब्ध नाही.

करडई : करडईचे पीक जिल्ह्यात सर्वत्र घेतले जाते. परंतु उदगीर व निलंगा या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात घेतले जाते. सन १९९३-९४ लातूर तालुका ३,७०० हेक्टर, उदगीर ४,९६१ हेक्टर, अहमदपूर १,३६१ हेक्टर, निलंगा ६,५०० हेक्टर, औसा ४,०३९ हेक्टर, रेणापूर १,१५५ हेक्टर, चाकूर १,०५६ हेक्टर असे एकूण या पिकाखालील जिल्ह्यातील एकूण क्षेत्र २२,७७२ हेक्टर होते. तर १९९८-९९ मध्ये या पिकाखाली १२,६९४ हेक्टर क्षेत्र होते त्यामध्ये लातूर तालुक्यात हे पीक ४,००० हेक्टर मध्ये घेतले गेले होते. ते मुख्यत: रबी पीक असून काही ठिकाणी रबी ज्वारीच्या शेताभोवती कुंपण म्हणूनही हे पीक घेतात. काही ठिकाणी गव्हाबरोबर मिश्रपीक म्हणूनही हे पीक घेतात. ऑक्टोबर मध्ये पेरणी करतात. करडीचे पीक फेब्रुवारी महिन्यात तयार होते. संशोधन केंद्राकडून " शारदा " या वाणाची रबी हंगामासाठी शिफारस करण्यात आली आहे. या वाणाचे कोरडवाहू क्षेत्रात १० ते १२ क्विंटल प्रति हेक्टरी उत्पादन क्षमता असून पाण्याखाली या

वाणाने १८ क्विंटल दर हेक्टरी उत्पन्न झालेले आहे. या पिकावर पानावरील ठिपके हा रोग येऊ शकतो. अल्टेरनेरीया या बुरशीमुळे पानावर गोलाकृती ठिपके दिसतात. रोगाचा प्रादुर्भाव जास्त असेल तर पाने गळून पडतात व रोपाची वाढ खुंटते. पीक संरक्षणासाठी ताम्रयुक्त बुरशी नाशक फवारतात शारदा या वाणास रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होत नाही. लातूर जिल्ह्यामध्ये या पिकाखाली क्षेत्र, उत्पादन, हेक्टरी उत्पन्न या संबंधी माहिती दिली आहे.

वर्षे	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ./हेक्टर
१९८२-८३	१५१	५८	३८४
१९८५-८६	१५४	४८	३१०
१९९०-९१	१७०	६२	३६२
१९९५-९६	१७८	९८	५४९
२००२-०३	१८७	१३९	६२३

तीळ : जिल्ह्यात तीळाचे पीक थोड्या प्रमाणात घेतले जाते. सन १९९४-९५ मध्ये जिल्ह्यात या पिकाखाली १३,०३२ हेक्टर क्षेत्र होते. त्यापैकी लातूर तालुक्यामध्ये ४,५०० हेक्टर, अहमदपूर मध्ये २,४६९ हेक्टर, रेणापूर १,९९२ हेक्टर, चाकूर १,६६६ हेक्टर होते. तर१९९८-९९ मध्ये जिल्ह्यातील या पिकाखालील क्षेत्रात वाढ होऊन ते १९,३३२ हेक्टर इतके झाले. त्यामध्ये लातूर तालुक्यामध्ये ६,००० हेक्टर, अहमदपूर ४,७०० हेक्टर, उदगीर २,४९० हेक्टर, रेणापूर २,०३५ हेक्टर, निलंगा १,८६० हेक्टर, औसा ८९० हेक्टर, चाकूर १,३५७ हेक्टर क्षेत्र होते. हलकी, वाळू मिश्रीत व चिकणमातीची जमीन या पीकास उत्तम समजली जाते. स्थानिक तिळाच्या वाणाशिवाय संशोधन केंद्राने तयार केलेल्या ओपीएन-८२-४ या आशादायक वाणाने प्रचलित वाण फुले तिळ-१ पेक्षा जास्त उत्पादन दिले असून त्याची प्रति हेक्टरी ५-६ क्विंटल उत्पादन क्षमता आहे. सन १९८२-८३, १९८५-८६, १९९०-९१, १९९५-९६, २००२-०३ या वर्षातील या पीकाचे क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पन्न याची माहिती खाली दिली आहे.

वर्षे	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न कि.ग्रॅ./हेक्टर
१९८२-८३	७९	२१	२६९
१९८५-८६	१२६	२७	२१३
१९९०-९१	१९५	२४	१२३
१९९५-९६	१६८	५४	३२०
२००२-०३	१७२	३९	२८९
२००३-०४	८२	२२	२६८

या तेलबिया शिवाय जिल्ह्यात जवस, कारळा याचेही उत्पादन घेतले जाते. सन १९९३-९४ मध्ये जवस या पिकाखाली जिल्ह्यात ६,२६७ हेक्टर तर १९९८-९९ मध्ये ५,४२५ हेक्टर क्षेत्र होते. त्यामध्ये प्रामुख्याने लातूर तालुक्यामध्ये ५०० हेक्टर, अहमदपूर २,९०० हेक्टर व औसा तालुक्यामध्ये १,०९० हेक्टर क्षेत्र होते.

अनुक्रमणिका

तसेच कारळे पिकाखाली सन १९९३-९४ मध्ये १८,३९३ हेक्टर क्षेत्र होते. त्यापैकी अहमदपूर ४,२६५ हे., उदगीर ४,७८९ हेक्टर निलंगा ३,७६३ हेक्टर, औसा ४,१०१ हेक्टर क्षेत्र होते. इतर तेलबियानांच्या उत्पादनात वाढ झाल्याने सन १९९८-९९ मध्ये या पिकाखालील कमी झाले असून ते ८,३५२ हेक्टर क्षेत्र होते तर १९९८-९९ मध्ये जिल्ह्यात एकूण गळीत धान्याखाली १,२३,५६३ हेक्टर क्षेत्र होते.

संशोधनाद्वारे या जिल्ह्यात जवसाच्या आर.एल.पी-४ हा वाण दहिया व तांबेरा या रोगास प्रतिकारक असून त्याचे उत्पन्न रबी हंगामात ६ ते ७ क्विंटल प्रति हेक्टरी इतके आहे. सन २००३-०४ मध्ये जिल्ह्यात खरीप गळीत धान्याखालील १,५६,७०१ हे. क्षेत्र होते व त्याचे उत्पादन १,३५,१०० टन इतके झाले.

तंतुमय पिके

तंतुमय पिकाखाली जिल्ह्यात १९९३-९४ मध्ये ३,४३१ हेक्टर क्षेत्र होते तर १९९८-९९ मध्ये या पीकामध्ये वाढ होऊन हे क्षेत्र २७,५६६ हेक्टर इतके झाले. त्यामध्ये प्रामुख्याने कापूस हे मुख्य पीक असून १९८३-८४ मध्ये जिल्ह्यात कापसाखाली २४,७४५ हेक्टर क्षेत्र होते तर सन १९९८-९९ साली या पिकाखाली २५,७९५ हेक्टर क्षेत्र होते. तर इतर तंतूमय पीकाचे क्षेत्र १,७७१ हेक्टर होते. त्यामध्ये प्रामुख्याने अंबाडीचे पीक घेतले जाते. सन १९९३-९४ मध्ये कापसाखालील क्षेत्र खालील प्रमाणे होते. लातूर ९५० हेक्टर, अहमदपूर ११,१९२ हेक्टर, उदगीर ९,७१८ हेक्टर, रेणापूर १,६३२ हेक्टर व चाकूर १,२५३ हेक्टर क्षेत्र होते. तर १९९८-९९ मध्ये प्रामुख्याने अहमदपूर १२,६५० हेक्टर, उदगीर ७,७४२ हेक्टर, रेणापूर ३,००० हेक्टर व चाकूर तालुक्यामध्ये २,३६५ हेक्टर क्षेत्र होते. कापूस या पीकाची माहिती खाली दिली आहे.

कापूस : कापसाचे पीक मुख्यत्वेकरून खरीप हंगामात घेतले जाते. भूईमुगानंतर कापूस पेरणे लाभदायक ठरते. त्यासाठी जमीन लागवडी योग्य करण्यासाठी जमिनीच्या प्रतवारीप्रमाणे नांगरणी व वखरणी करून दर हेक्टरी ३० ते ४० बैलगाड्या शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळण्यात येते. काही ठिकाणी पेरणीपूर्वी जमिनीत भुईमूगाची पेंड मिसळतात. जून महिन्यात तिफणीने पेरणी करण्यात येते. कीड व रोगापासून संरक्षणासाठी बियाण्यास पेरणीपूर्वी शेण, माती व काही रसायने लावतात. पेरणीसाठी दर हेक्टरी १६ ते १८ किलोग्रॅम बी वापरतात. रासायनिक खते पेरणीनंतर देण्यात येतात. पेरणीनंतर अदमासे चार आठवड्यानंतर विरळणी करून रोपामध्ये २५ सें.मी. अंतर ठेवण्यात येते. त्यानंतर आवश्यकतेप्रमाणे दोन-तीन वेळा कोळपणी व निंदणी करतात. कापसाची वेचणी ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू होऊन डिसेंबर पर्यंत चालू असते.

सन १९६१-६२ उस्मानाबाद जिल्ह्यात प्रामुख्याने उदगीर, अहमदपूर आणि लातूर तालुक्यामध्ये कापसाचे पीक प्रामुख्याने घेतले जात होते. परंतू त्यावेळी स्थानिक गावराण कापसाचे उत्पादन घेतले जात असे. त्यानंतर १७०-सी ओ-२, तसेच १४२२ आणि जी-४६ या कापसाच्या सुधारित जातीचे उत्पादन घेण्यात आले. हल्ली गावरानी-६ व गावरानी-१२ या जातींच्या ऐवजी अनुक्रमे गावरानी- १९४६ व गावरानी-१४१२ जातींची लागवड करतात. उपरोक्त जाती व्यतिरिक्त जिल्ह्यात संकरित-४, संजय (सी.जे.-७३) व जी.कॉट-१० (एस.आर.-१) या जातीची लागवड करतात.

अनुक्रमणिका

सन १९८२-८३ ते २००२-०३ पर्यंत जिल्ह्यात कापसाचे क्षेत्र व उत्पन्न याची माहिती दिली आहे.

वर्षे	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पादन (०० मे.टन)
१९८२-८३	२८१	१५१
१९८५-८६	२०६	१३२
१९९०-९१	२३५	१०३
१९९५-९६	३३४	२३७
१९९८-९९	३१६	२५५
२००२-०३	३२१	११४

जिल्ह्यात कापसाचे पिकावर करपा कवडी, पानावरील ठिपके व मूळकुजव्या हे रोग पडतात. त्याची माहिती खाली दिली आहे.

करपा किंवा भुज्या काळ्या पडणे : हा रोग स्थानिक व सुधारित बियाण्यांच्या पिकावर पडू शकतो. रोग उद्‌भवल्यास पानाच्या खालच्या बाजूस शिरांशेजारी हिरवे ठिपके पडतात. नंतर हे ठिपके तांबूस होऊन काळसर होतात. रोपांचे खोड, फांद्या व शिरावर सुरूवातीस तेलकट ठिपके पडतात. पुढे काळसर होतात. रोगप्रसार मुख्यत्वे रोगट बियाणे शेतीतील रोगट रोपांचे अवशेष यामुळे होतो. उपाययोजना म्हणून पेरणीपूर्वी बियाण्यास एक टक्का पारायुक्त रसायन चोळतात. रोग प्रकट होताच कॉपर ऑक्सीक्लोराईड हे बुरशीनाशक पाण्यात मिसळून फवारतात.

कवडी : हा रोग देखील करपा रोगाप्रमाणे स्थानिक व संकरित प्रकारच्या कापसावर पडतो. प्रारंभी रोपावर गोलाकार तांबूस ठिपके पडतात. तसेच कोवळ्या देठावर व्रण अथवा चट्टे पडतात. त्यामुळे रोप वाळून नष्ट होऊ शकते. दुसऱ्या अवस्थेत हा रोग कपाशीच्या बोंडावर दिसून येतो. बोंडावर व पानावर तेलकट तपकिरी रंगांचे चट्टे पडतात. त्यामुळे बोंडातील कापसाच्या कवड्या बनतात व बोंड फुलत नाही. प्रतिबंधक उपाय म्हणून गतसालाच्या पिकाचा पालापाचोळा नष्ट करणे आवश्यक असते. पेरणीपूर्वी एक किलोग्रॅम बियाण्यास सात ग्रॅम या प्रमाणात २ टक्के पारायुक्त औषध चोळतात. रोगाची लक्षणे दिसताच पिकावर कीटकनाशक रसायनांची फवारणी करतात.

पानावरील ठिपके : हा रोग बुरशीजन्य असून त्याचा प्रादुर्भाव प्रामुख्याने सुधारित अमेरिकन जातीच्या कापसावर होतो. प्रारंभी पानावर तपकिरी रंगाचे गोल ठिपके पडतात. रोगपिडीत रोपांना नवीन पाने व बोंडे फुटत नाहीत. बोंड आल्यावर रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास कापसाचा दर्जा खालवतो. यावर उपाय म्हणून रोग दिसताच प्रभावी बुरशीनाशक रसायने दर हेक्टरी ५०० लिटर पाण्यात १,२०० ग्रॅम याप्रमाणात मिसळून फवारतात.

मूळकुजव्या : हा रोग जमिनीतील बुरशीमुळे होतो. हा भयंकर पीक संहारक रोग असून सर्व प्रकाराच्या कापसाच्या जाती यास बळी पडतात. त्यामुळे रोपांची मुळे कुजतात व साल चटकन निघते. मूळांचा व खोडाचा भाग तपकिरी किंवा काळा होतो व त्यावर जंतूच्या बारीक गाठी दिसतात. यामुळे रोप कोरडे होण्याची प्रक्रिया सुरू होते. प्रतिबंधक उपाय म्हणून पेरणीपूर्वी बियाण्यास एक टक्का पारायुक्त बुरशीनाशक

अनुक्रमणिका

औषध चोळतात. पिकास योग्य वेळी पाणी देतात व पाण्याचा योग्य निचरा करतात. यामुळे रोगाचा प्रादुर्भाव कमी होतो. रोग प्रसाराची चिन्हे दिसताच ५० टक्के कॉपर ऑक्सीक्लोराईड पाण्यात मिसळून त्याचे द्रावण रोगट रोपांच्या खोडाजवळ टाकतात.

लातूर जिल्ह्यासाठी परभणी येथे कापूस संशोधन केंद्र आहे. कापूस संशोधन व प्रात्यक्षिकासाठी परभणी कृषि विद्यापीठाच्या विद्यमाने बरीच उपयुक्त कामगिरी झालेली आहे. राज्य शासन तसेच केंद्र सरकारने देखील याकामी मोठा हातभार लावला आहे.

ऊस

पूर्वीपासून उस्मानाबाद जिल्ह्यात ऊसाचे उत्पादन घेण्यात येते. लातूर जिल्हा निर्मिती नंतर जिल्ह्याचे एकूण उत्पादन घटल्याचे दिसते. सन १९९३-९४ मध्ये या पिकाखाली ११,८१५ हेक्टर इतकेच क्षेत्र होते. १९९८-९९ मध्ये या पिकाखालील क्षेत्रामध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. सन १९९८-९९ मध्ये या पीकाखाली २१,९८२ हेक्टर क्षेत्र होते. लातूर जिल्ह्यात सन १९९३-९४ मध्ये तालुकानिहाय क्षेत्र खालील प्रमाणे होते. लातूर तालुका ५,५०० हेक्टर, औसा १,५९८ हेक्टर, निलंगा १,४०३ हेक्टर, रेणापूर १,१६५ हेक्टर, चाकूर १०७१ हेक्टर, उदगीर ६२१ हेक्टर, तर अहमदपूर तालुक्यामध्ये सर्वात कमी क्षेत्र होते ते फक्त ४५७ हेक्टर होते. सन १९९८-९९ मध्ये तालुकानिहाय क्षेत्र पुढील प्रमाणे होते. लातूर तालुका ८,००० हेक्टर, निलंगा ४,२३० हेक्टर, औसा ३,१३० हेक्टर, उदगीर २,३०८ हेक्टर, चाकूर २,१९८ हेक्टर, रेणापूर १,१९० हेक्टर तर अहमदपूर तालुक्यामध्ये सर्वात कमी क्षेत्र या पिकाखाली होते ते फक्त ९२६ हेक्टर होते. ऊसाला वर्षभर पाण्याची गरज असते त्यामुळेच वरील तालुक्यामध्ये हे पीक मोठ्या प्रमाणात घेण्यात येत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात पूर्वी पाडेगाव येथे संशोधित केलेल्या ऊसाच्या जातीची लागवड करीत होते. सध्या परभणी जिल्ह्यातील बसमत येथे कृषि विद्यापीठाचे उस सशोधन केंद्रातून तयार झालेले उसाचे बीयाणे वापरतात.

या जिल्ह्यात ऊसाचे पीक काळी कसदार जमीन, तसेच चिबड जमिनीत घेण्यात येते. चिबड जमिनीत दुसऱ्या कुठल्याही पिकापेक्षा ऊसाचे पीक चांगले येते. पीक घेतल्यावर त्याजमिनीत पुन्हा तीन वर्षे तेच पीक घेत नाहीत. ऊसाच्या पिकासाठी ट्रॅक्टरच्या सहाय्याने किंवा लोखंडी नांगराने जमीन सखोल नांगरतात. दर एकरी ३० ते ४० बैलगाड्या इतके कंपोस्ट किंवा शेणखत देऊन पुन्हा जमिनीची नांगरणी करतात. त्यामुळे खत चांगल्या प्रकारे मिसळले जाते व शेतातील ढेकळे फुटतात. त्यानंतर वखरणी करून ऊसाच्या लागवडीसाठी चऱ्या पाडतात. चऱ्यांमध्ये पाणी सोडून त्यात ऊसाचे बेणे ठराविक अंतरावर लावतात, आणि नंतर तिसऱ्या दिवशी पिकास पहिले पाणी देण्यात येते. सातवे दिवशी पुन्हा पाणी देण्यात येते. त्यानंतर दर आठ दिवसांनी पाणी देण्यात येते. पावसाळ्यात वरचेवर पाऊस पडत असेल तर पाणी देण्याची आवश्यकता नसते. आवश्यकतेनुसार निंदणी करण्यात येते. या पिकास मोठ्या प्रमाणात रासायनिक खते तसेच शेंगदाण्याची पेंड आवश्यक असते. कीड व रोगापासून संरक्षणासाठी कृषी तज्ञांचे मार्गदर्शन मिळते. शासन व कृषी विद्यापीठाच्या द्वारे यानी बरेच उपयुक्त काम केले आहे.

हे पीक साधारणत: एक वर्षानंतर कापणीसाठी तयार होते. सन १९९८-९९ मध्ये लातूर जिल्ह्यात मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. चिंचोली राववाडी, ता.लातूर, शिवाजीराव पाटील-निलंगेकर सहकारी साखर कारखाना लि. जाजनूर झरी ता.निलंगा, शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.किल्लारी, ता.औसा, जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना लि.नळेगाव, ता.चाकूर येथे तसेच विकास शेतकरी सहकारी साखर कारखाना बोरगाव (काळे), ता.लातूर येथे काढण्यात आला आहे. सन १९९८-९९ मध्ये या पिकाखालील ओलिताचे क्षेत्र २१,९८२ हेक्टर इतके होते. यासर्व कारखान्याची गळीत क्षमता ६,२५० मे.टन इतकी होती परंतू या वर्षी प्रत्यक्ष गाळप १२,१९,६६२ मे.टन झाले होते या साखरेचे उत्पादन

१,४१,८२०.९२५ मे.टन इतके होते. या वर्षाचे जिल्ह्यातील साखर कारखाने यांचे सरासरी उत्पादन १,४२,००० मे.टन इतके होते तर महाराष्ट्र राज्याचे सरासरी एकूण उत्पादन ५,२१,७००० मे.टन होते. सन २००३-०४ या पिकाखाली क्षेत्र १२,६०० हेक्टर होते तर उत्पादन ६,३०,००० मे.टन झाले.

मसाल्याची पीके

लातूर जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने मिरची, धने, हळद, लसूण ही महत्त्वाची पीके घेतली जातात. सन १९९१-९२ मध्ये जिल्ह्यात मसाल्याच्या पिकाखाली ४,२७८ हेक्टर क्षेत्र होते तर १९९३-९४ मध्ये ५,३४७ हेक्टर आणि १९९८-९९ मध्ये या पिकाखाली ४,६५३ हेक्टर तर १९९९-२००० मध्ये ५,१९२ हेक्टर इतके क्षेत्र होते. महत्त्वाच्या पीकांची माहिती खाली दिली आहे.

मिरची : मिरची या जिल्ह्यातील मसाल्याच्या पिकांतील महत्त्वाचे पीक आहे. हे या जिल्ह्यातील नगदी पीक असून सर्व तालुक्यात थोड्याफार प्रमाणात घेण्यात येते. सन १९९४-९५मध्ये या पिकाखाली २,८६३ हेक्टर क्षेत्र होते. त्यामध्ये लातूर तालुका ५४० हेक्टर, निलंगा ५६० हेक्टर, अहमदपूर ४०० हेक्टर, उदगीर ४१२ हेक्टर, औसा ३७९ हेक्टर, रेणापूर ३९७ हेक्टर व चाकूर तालुक्यात फक्त १७५ हेक्टर क्षेत्रामध्ये हे पीक घेतले होते. सन १९९८-९९ मध्ये या पिकाखालील क्षेत्र कमी झाल्याचे दिसून येते. या वर्षी जिल्ह्यातील या पिकाखालील क्षेत्र १,९३९ हेक्टर होते. रेणापूर, औसा, लातूर तालुक्यामध्ये या पीकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतल्याचे दिसून येते. यावर्षी रेणापूर तालुक्यात ६५० हेक्टर तर औसा तालुक्यात ४३० हेक्टर व लातूर तालुक्यात ३२५ हेक्टर क्षेत्रामध्ये हे पीक घेतले होते. हे पीक बहुधा ओलिताचे पीक म्हणून घेण्यात येते. मिरचीच्या लागवडीसाठी रोपे तयार करतात. जूनमध्ये मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडल्यावर बी पेरतात. रोपे अदमासे एक महिन्याची झाल्यावर ठराविक अंतरावर रांगेत लावतात. लागवडीपासून साधारणत: दोन महिन्यानंतर पीक फूल धरण्यास प्रारंभ करते. मिरच्यांची तोडणी मधूनमधून करतात. शेणखताव्यतिरिक्त रासायनिक खतेही देतात. आवश्यकतेनुसार पीक संरक्षक औषधेही फवारतात. हिरव्या मिरचीचे अधिक उत्पन्न येण्यासाठी एम.पी.-४६ ही जात ठराविक अंतरावर लावून त्यास दर हेक्टरी एक क्विंटल नत्र खत दोन हप्त्यात द्यावे अशी तज्ज्ञांनी शिफारस केली आहे.

लातूर जिल्ह्यातील खालील वर्षांचे क्षेत्र, उत्पादन, सरासरी दर हेक्टरी उत्पन्न किलो ग्रॅम दिले आहे.

वर्ष	क्षेत्र (०० हेक्टर)	उत्पाद (०० मे.टन)	सरासरी उत्पन्न दर हेक्टरी ओली व वाळलेली कि.ग्रॅ.
१९८२-८३	२८	७ वाळलेली	२७१
१९८५-८६	३१	१०	३३४
१९९०-९१	३३	११	३३४
१९९५-९६	२८	९	३२२
१९९८-९९	१८	६	३४१

मिरचीवर फुलकिडे, कोळी, मावा, खोड कुडतडणाऱ्या आळींचा उपसर्ग व करपा भूरी मिरच्या कुजणे, पानावर काळे ठिपके पडणे आणि शेंडे वाळणे या रोगांपासून नुकसान होते.

अनुक्रमणिका

हळद : हळद हे एक मसाल्याचे पीक जिल्ह्यामध्ये घेतले जाते. हे नगदी पीक म्हणून घेतात. चांगल्या प्रतीच्या व जेथे पाण्याची सोय उपलब्ध आहे अशा जमिनीमध्ये हे पीक घेतले जाते. सन १९९४-९५ या पिकाखाली फक्त ९८ हेक्टर क्षेत्र होते. त्यामध्ये प्रामुख्याने उदगीर ४८ हेक्टर, निलंगा २० हेक्टर लातूर १८ हेक्टर तर चाकूर तालुक्यामध्ये फक्त १२ हेक्टर क्षेत्रामध्ये हळदीचे पीक धेतल्याचे दिसून येते. तर सन १९९८-९९ मध्ये फक्त लातूर तालुक्यामध्ये १० हेक्टर क्षेत्रामध्येच हे पीक घेतले होते. मे महिन्याच्या सुरुवातील हळदीच्या लागवडीसाठी तयार केलेल्या जमिनीत दोन ओळीत अंतर ठेवून लागवड करण्यात येते. डिसेंबर मध्ये पीक काढतात. ह्या पिकास साधारणत: भरखते देतात. सन १९९८-९९ मध्ये हळद या पिकाखाली जिल्ह्यात १०० हेक्टर तर १९९९-२००० मध्ये फक्त १३ हेक्टर क्षेत्रामध्ये हे पीक घेतले होते.

या मुख्य मसाल्याच्या पिकाशिवाय जिल्ह्यात धने व आले याचे पीक थोड्या प्रमाणात घेतले जाते. सन १९८२-८३ व १९८५-८६ मध्ये धने या उत्पादनाखाली जिल्ह्यात २९०० हेक्टर क्षेत्र होते. तर १९९०-९१ मध्ये १२०० हेक्टर व १९९५-९६ मध्ये २१०० हेक्टर क्षेत्र होते. १९९८-९९ मध्ये या क्षेत्रामध्ये घट झाली असून ते फक्त ७०० हेक्टर इतक्या क्षेत्रात घेतले होते. सन १९९०-९१ मध्ये या क्षेत्रामध्ये जिल्ह्यात ८७९ किलो ग्रॅम आल्याचे उत्पादन झाले होते.

अन्य पिके

औषधी व मादक द्रव्ये पिकामध्ये जिल्ह्यात तंबाखू व ओवा तसेच विड्याची पाने ही पिके अल्पशा प्रमाणात घेतली जातात. तंबाखू या पिकाखाली सन १९९३-९४ मध्ये ५ हेक्टर तर १९९५-९६ मध्ये १२१ हेक्टर क्षेत्र होते. तर १९७८-९९ मध्ये १०० हेक्टर क्षेत्र होते. यातील बहुतेक क्षेत्र ओलीताखाली होते.

फळे व भाजीपाला : फळे व भाजीपाला या पीकाचे उत्पन्न जिल्ह्यात होते. जिल्ह्यात मुख्यत्वेकरून आंबा, केळी, वांगी, बटाटा, कांदा, भेंडी, टमाटो, पेरु, बोरे यांचे उत्पादन घेतले जाते. सन १९९४-९५ मध्ये एकूण फळे व भाजीपाला या पिकाखाली २,५७० हेक्टर क्षेत्र होते. आंबा या पिकाखाली एकट्या उदगीर तालुक्यामध्ये आंब्याखाली ३,९५३ हेक्टर इतके क्षेत्र होते तर १९९८-९९ मध्ये फळे व भाजीपाला या पिकांखाली ७,०९९ हेक्टर इतके क्षेत्र होते. केळीचे उत्पादन मुख्यत: अहमदपूर व कांद्याचे उत्पादन उदगीर तालुक्यात घेतले जाते.[५]

रोजगार हमी योजनेद्वारे फळबाग लागवड योजना १९९०-९१ पासून सुरू केली असून सलग क्षेत्रावर फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत आंबा, काजू, बोर, सिताफळ, चिकू, आवळा, बोर संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, पेरु, डाळींब, अंजीर, चिंच इत्यादी फळपिकाचा समावेश आहे. या योजनेत अल्प, अत्यल्प,भूधारक तसेच आदिवासी,अनुसूचित जाती व जमातीतील तसेच नवबौध्द शेतकऱ्यांना व महिलांना सहभागी करून तसेच लहान व मोठ्या शेतकऱ्यांनाही त्यात सामावून १९९०-९१ ते २००३-०४ या कालावधीत १८,८७८.५० हेक्टर क्षेत्रावर विविध फळ पिकांसाठी लागवड केली आहे. सध्या लातूर जिल्ह्यामध्ये एकूण फळबाग लागवड २३,०७९.५० हेक्टर क्षेत्रावर झाली आहे. सन १९९०-९१ ते २००३-०४ या कालावधीत रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत विविध फळपिकाखालील झालेली लागवड खालीलप्रमाणे आहे. आंबा (क) ४१२०-१० हेक्टर, आंबा (रो) ६८२२.०० हेक्टर, नारळ ४१ हेक्टर, चिकू ७८० हेक्टर,

---

५. वेगवेगळ्या पिकांची सन १९९३-९४, १९९८-९९ या वर्षाची माहिती जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन लातूर जिल्हा १९९६-९७ व १९९८-९९ मधून घेण्यात आली आहे. तसेच वेगवेगळ्या पीकाचे क्षेत्र, उत्पादन व सरासरी उत्पन्न सन १९८२-८३, १९८५-८६, १९९०-९१, १९९५-९६ ही सांख्यिकीय आकडेवारी सिजन ॲण्ड क्रॉप रिपोर्टमधून घेतली आहे. तर सन २००२-०३ ची माहिती कृषि अधिकारी, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

संत्रा ३८ हेक्टर, मोसंबी ५४५ हेक्टर, पेरु ३८९ हेक्टर, डाळींब ६६६ हेक्टर, अंजीर १६३ हेक्टर, बोर २५९९ हेक्टर,सिताफळ ५७७ हेक्टर, चिंच १०.२० हेक्टर, कवठ १ हेक्टर,आवळा ९६ हेक्टर, का.लिंबू १९७ हेक्टर,काजू (क) १० हेक्टर आणि औषधी वनस्पती ३.२० हेक्टर.[६]

जिल्ह्यातील १९९०-९१ ते २००४-२००५ पर्यंतच्या रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीचे लक्ष्य व साध्य पुढीलप्रमाणे आहे.

रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड योजना

वर्ष	लागवड लक्षांक (हे.)	लागवड साध्य (हे.)	प्राप्त अनुदान रुपये (लाखात)	खर्च अनुदान रुपये (लाखात)
१९८९-९०	२,७७९	२८८१.०३	९१.००	८६.८७
१९९१-९२	३,११४	२५४४.१३	१६२.००	१४५.६५
१९९२-९३	२,५९०	२९२२.९५	१४१.२५	१३९.६८
१९९३-९४	३,२२०	१६६४.५९	११०.५०	१०८.७५
१९९४-९५	१,३१०	९२४.४५	१००.००	८२.८०
१९९५-९६	३,०००	१४२४.३५	१०७.००	९२.६०
१९९६-९७	२,०००	१३३३.४५	९६.७८	७५.०३
१९९७-९८	१,४५५	७००.४०	९६.९४	६६.८७
१९९८-९९	९५०	१०१३.३५	९२.४९	५४.९५
१९९९-२०००	९७२	८६३.३५	१४८.००	१३६.०७
२०००-२००१	८२३	८८२.९५	९५.००	९३.९७
२००१-२००२	८२५	७१३.२५	१००.९०	९४.२५
२००२-२००३	६६०	५९८.३५	८१.५०	८१.३८
२००३-२००४	८००	६१३.५०	-	-
२००४-२००५	६२०	४१९.३०	१८५.७९	१८५.५९
एकूण	२५,११८	१९२९९.४०	१६१२.१५	१४४४.४६

परदेशात निर्यात होणारी कृषि उत्पादने : आज महाराष्ट्रातील कृषि फळबाग उत्पादनात लातूर जिल्हा अग्रेसर होवू पाहत आहे. जिल्ह्यातील द्राक्षे, आंबे, डाळींब उत्पादन उत्तम प्रतिची निर्यात क्षमता असलेले आहे. जगाच्या विविध भागात त्याची मोठ्या प्रमाणात निर्यात होते. विविध फूलांचे उत्पादन, निर्यातीच्या दृष्टीने होत आहे. जागतीक बाजारपेठ उपलब्ध करून घेण्याची स्वत:ची क्षमता या जिल्ह्याने दाखवून दिली आहे.

लातूर जिल्हा हा प्रामुख्याने आंबा या प्रमुख फळपिकांचा निर्यात झोन म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे. त्याच बरोबर द्राक्ष व डाळींब या फळपिकांची निर्यात जिल्ह्यातून होत आहे. त्यामुळे आंबा द्राक्ष व डाळींब या पिकाखालील क्षेत्र लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढत असून ही फळपिके परकीय चलन मिळवून देणारी महत्त्वाची पिके ठरत आहेत.

६. रोजगार हमी योजनेद्वारे फळबाग लागवडीची १९९०-९१ पासूनची माहिती कृषि अधिकारी लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

Maharashtra State Gazeteers

लातूर जिल्ह्यात २००१-०२ पर्यंत द्राक्षाखाली ३९० हेक्टर क्षेत्र होते. या वर्षी ७ कंटेनर म्हणजे ९८ मे. टन द्राक्षाची निर्यात झाली तर सन २००३-०४ मध्ये १०२ कंटेनर तर २००३-०४ मध्ये १७९ कंटेनर, सन २००५-२००६ मध्ये २१५ कंटेनर म्हणजे जवळपास २८०० मे.टन द्राक्षाची निर्यात करण्यात आली. ही निर्यात प्रामुख्याने यु.के., जर्मनी, हॉलंड, बेल्जीयम व रशिया, इत्यादी देशात झालेली आहे. या निर्यात द्राक्षांमध्ये थॉमसन सिडलेस या प्रमुख जातीचा समावेश असून माणिक चमन फ्लेम या वाणाचाही समावेश आहे.

लातूर जिल्ह्यात नोंदणीकृत एक द्राक्ष बागायतदार संघ कार्यरत आहे. द्राक्ष उत्पादन शेतकऱ्यांनी द्राक्ष निर्यातीकरीता राष्ट्रीय बागवानी मंडळ व अपेडा यांच्या मदतीने जिल्ह्यामध्ये वेस्टर्न गृह १५, पुर्वशितकरण गृह ११, शितगृह ११, प्रतवारी गृह १०, इत्यादी पायाभूत सुविधा निर्माण केलेल्या आहेत. लातूर जिल्ह्यात प्रामुख्याने किल्लारी परिसर (ता.औसा) आष्टा नळेगाव, जवळपूर (ता.चाकूर) तळणी, मोहगाव भंडारवाडी, पानगाव (ता.रेणापूर), पेठ, चांडेश्वर परिसर (ता.लातूर), औराद, नदीहत्तरगा, अंबुलगा परिसर, (ता.निलंगा) आणि माळेवाडी परिसर (ता.उदगीर), ही द्राक्षे निर्यात क्षेत्रे आहेत.

जिल्ह्यात नोंदणीकृत द्राक्ष निर्यात धारक खालील प्रमाणे आहेत.—

(१) के.बी.ॲग्रो एक्सपोर्टस् (२) अंबरखाने ॲग्रो एक्सपोर्टस् (३) आर.पी. ॲग्रो एक्सपोर्टस् (४) राजहंस ॲग्रो एक्सपोर्टस् (५) श्री. गणेश ॲग्रो एक्सपोर्टस् (६) ओ. माऊली ॲग्रो एक्सपोर्टस् (७) शिवप्रकाश ॲग्रो एक्सपोर्टस् (८) अल्बाट्रॉस ॲग्रो एक्सपोर्टस् (९) महेश ॲग्रो एक्सपोर्टस् (१०) आशिर्वाद ॲग्रो एक्सपोर्टस् (११) बिराजदार ॲग्रो एक्सपोर्टस् (१२) प्रयाग ॲग्रो एक्सपोर्टस् (१३) कृषि विकास एक्सपोर्टस् (१४) अशितोष ॲग्रो एक्सपोर्टस् (१५) अर्थमेड ॲग्रो एक्सपोर्टस् (१६) शिवराम ॲग्रो एक्सपोर्टस् (१७) नेचर वेल्थ ॲग्रो एक्सपोर्टस् (१८) पनसिया एनरजायझर प्रा. लि. (१९) बिटेज ॲग्रो एक्सपोर्टस् (२०) महालक्ष्मी ॲग्रो एक्सपोर्टस्.

निर्यातक्षम द्राक्ष मण्याचा आकार १४ ते १६ मि.मि. पासून पुढे मोठा व घडाचे वजन २५० ते ३५० ग्रॅम पर्यंत असावे लागते. द्राक्ष निर्यातीबाबत शेतकऱ्यांना कृषि विभाग तसेच द्राक्ष बागायतदार संघाकडून वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असल्याने तसेच निर्यातक्षम द्राक्षासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होत असल्याने द्राक्ष निर्यातीकडे शेतकरी वळत आहेत. सरासरी निर्यात द्राक्षास वाहतूक खर्च वजा जाता प्रतवारीनुसार रूपये ३० पासून ६८ प्रति किलो भाव मिळत असल्याने लाभार्थींना चांगला फायदा होत आहे.

द्राक्षानंतर आंबा उत्पादन संघाची सन २००५-०६ मध्ये नोंदणी झाली आहे. या संघाचे जवळपास १२० आंबा केशर उत्पादक शेतकरी सभासद आहेत. आंबा केशरचे ४५० हेक्टर लागवड क्षेत्र असून या पैकी ३०० हेक्टर आंबा केशर उत्पादनक्षम क्षेत्र उपलब्ध आहे. सन २००२-२००३ या वर्षात जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकरी श्री. उत्तम भगवानराव जाधव रा. कडमुळी ता. चाकूर यांनी १४ मे. टन आंबा केशर इंग्लंडला तर २००५-२००६ मध्ये श्री. पंडितराव शेळके रा. मोघा, ता. अहमदपूर यांनी आंबा केशर ६०० किलो हाँगकाँग येथे निर्यात केला या शेतकऱ्यांना चांगला आर्थिक लाभ मिळालेला आहे. लातूर जिल्ह्यामध्ये आंबा केशरचा चार बागा युरोगॅप प्रमाणित केलेल्या असून त्याखालील क्षेत्र ५० हेक्टर आहे.

तसेच डाळींब उत्पादक संघ स्थापन करण्यासाठी संबंधीताकडे प्रस्ताव सादर केला आहे. डाळींब (भगवा,आरक्ता) या जीतीचे फळे निर्यातीसाठी डाळींब उत्पादक शेतकरी व कृषि विभाग प्रयत्नशील आहेत.

अनुक्रमणिका

लातूर जिल्ह्यात प्रामुख्याने गुलाब, शेवंती ॲस्टर, झेंडू इत्यादी फुलपिके खुल्या वातावरणात घेतली जातात. या फूलपिकांचे जवळपास १२५ ते १५० हेक्टर क्षेत्र आहे. तसेच कार्नेशन व जर्बेरा ही फलपिके नियंत्रीत वातावरणात (पॉलीहाऊस) मध्ये घेतली जातात. सध्या लातूर जिल्ह्यात ५ गुंट्याचे २ पॉलीहाऊस उभारणी करून त्यात कार्नेशन व जर्बेराची लागवड करण्यात आलेली आहे. सदर फूले स्थानिक व हैद्राबाद येथे विक्री केली जातात. त्यापासून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक लाभ होत आहे. तसेच सामुहिक पद्धतीने फुलांची शेती करण्यासाठी कृषि विभागाकडून राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत अनुदान दिले जाते.

खते

खतांचे प्रामुख्याने दोन प्रकार पाडता येतील. (१) सेंद्रिय खते (२) रासायनिक खते. आपल्या देशातील शेतकऱ्यांना फार प्राचीन काळापासून सेंद्रिय खताच्या वापराचे ज्ञान अवगत होते. रासायनिक खते वापरण्याची पध्दत प्रामुख्याने स्वांत्र्यानंतरच प्रचलित झाली. सेंद्रिय खतांना नैसर्गिक खते किंवा भरखते असेही म्हणतात. सेंद्रिय खतांमध्ये प्रामुख्याने गवत पालापाचोळ्यापासून तयार केलेले कंपोस्ट खत, शेणखत, सोनखत, हिरवळीपासून तयार केलेले खत यांचा समावेश होतो. पारंपारिक पध्दतीने तयार केलेल्या शेणखतात अर्धा टक्का नत्र असते. जनावरांचे मलमूत्र व शेतातील पालापाचोळ्यापासून सुधारित पध्दतीने कंपोस्ट खत तयार केल्यास त्यापासून एक टक्का नत्र, एक टक्का स्फुरद व १.०५ टक्के पालाश आणि झाडांच्या वाढीस सुक्ष्म प्रमाणात आवश्यक असलेली बहुतेक सर्व पोषक द्रव्ये मिळू शकतात.

परंपरेने शेणखत हेच मुख्य सेंद्रिय खत होय. त्यात जमिनीची सुपिकता वाढविणाऱ्या द्रव्यांचे सर्वाधिक प्रमाण असते. सेंद्रिय खतांमध्ये खालीलप्रमाणे घटकद्रव्ये असतात.

	खत प्रकार	कोरड्या हवेतील शेकडा प्रमाण		
		नत्र	स्फुरद	पालाश
१	जनावराचे शेण	१.०६-१-९७	०.४०-१.२६	१.२३-१.८७
२	मेंढ्यांच्या लेंड्या	१.१५-१.३६	०.४४-१.२९	०.५८-१.०१
३	घोड्याची लीद	०.७३-१.४६	०.७४-०.८४	०.५८-१.९९
४	जनावरांचे मूत्र	१.००-१.१४	किंचित	०.१८-०.२४
५	मेंढ्यांचे मूत्र	.६९-१.९७	—“—	०.२९-१.०३
६	तळ्यातील गाळ	०.६७	७.३१	. .
७	मासळी खत	५.९५	५.२०	१.३६
८	हाडांचे खत	३.८८	२१.५६	. .

सेंद्रीय खतामधील पीक उत्पादनाचे गुणधर्म सुमारे चार वर्षांपर्यंत टिकून राहतात. एका जनावरापासून प्रतिवर्षी अंदाजे पावणेदोन ते दोन टन शेणखत मिळू शकते.

लातूर जिल्ह्यात पशुगणना १९८७ च्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात एकूण पशुधन संख्या १०,४१,१४२ इतकी असून त्यापासून मोठ्या प्रमाणात शेणखत उपलब्ध होऊ शकते. परंतु बऱ्याचशा शेंणाचा वापर इंधनासाठी केला जात असल्यामुळे बरेच शेणखत वाया जाते. यावर उपाय म्हणून शासनाने निरनिराळ्या योजना आखल्या आहेत. शेणापासून गोवऱ्या न करता गॅस निर्मितीसाठी खादी ग्रामोद्योग गोबर गॅस योजना

१९८२-८३ मध्ये सुरू केली. त्यात वापरलेले शेण वाया तर जात नाहीच परंतु त्यातील शेणापासून तयार झालेल्या खताची परिणामकारकता पारंपारिक शेणखतापेक्षा अधिक असल्याचे आढळून आले. सन १९९८-९९ मध्ये लातूर जिल्ह्यात राष्ट्रीय बायोगॅस विकासाद्वारे जिल्ह्यात लक्ष ३०० होते, ते त्याच वर्षी साध्य केले.

व्हमीकल्चर : गांडूळ खत प्रकल्पाद्वारे जिल्ह्यात सन १९९४-९५ वर्षामध्ये एकूण २९५ पेट्या व ५० वाफ्यांतून गांडूळ खत तयार करण्यात आले असून पाणलोटातील फळबागधारक शेतकऱ्याना वाटप करण्यात आले.

रासायनिक खते : सन १९९१-९२ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात निरनिराळ्या पिकांसाठी सुधारित वाण व रासायनिक खताचे शेकडा प्रमाण खालीलप्रमाणे होते.

पिकाचे नाव	सुधारित वाणाचा वापर	रासायनिक खताचा वापर
खरीप ज्वारी	७५ %	९५%
रबी ज्वारी	६६%	१००%
गहू	१००%	१००%
हरभरा	८३%	९१%

जिल्ह्यातील रासायनिक खतांचा १९८६-८७ ते २००४-२००५ पर्यंतचा वापर खालीलप्रमाणे होता:—

(मे.टन)

वर्षे	नत्र	स्फुरद	पालाश	एकूण
१९८६-८७	२,४००	१,१००	७००	४,२००
१९८७-८८	४,७५७	३,००५	७८१	८,५४३
१९८८-८९	८,१७५	६,२०५	२,१५८	१६,५३८
१९९०-९१	१८,९६५	१३,२६९	४,४२५	३६,६५९
१९९१-९२	२०,०००	१०,५००	३,५००	३४,१००
१९९२-९३	१८,२००	१०,६००	२,९००	३१,७००
१९९५-९६	२०,३६३	१७,७३६	६,३४७	४४,४४६
२०००-२००१	३२,०००	१६,८९३	६,२८८	५५,१८१
२००२-२००३	३६,०८०	२७,८०३	७,४२७	७१,३१०
२००३-२००४	२९,७२५	२५,२९२	६,५५७	६१,५७४
२००४-२००५	२७,४३२	२३,२९१	५,४२३	५६,१४६

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

शेतकऱ्यांना नियंत्रित संस्था व खाजगी संस्थामार्फत रासायनिक खताचे वाटप केले जाते. सन १९९८-९९ मध्ये नियंत्रित संस्थांकडून खालीलप्रमाणे रासायनिक खतांचे वाटप करण्यात आले. लातूर २८,७५५ मे.टन, अहमदपूर १४,००० मे.टन, उदगीर २३,००० मे.टन, निलंगा १३,००० मे.टन, औसा १५,००० मे.टन, रेणापूर १०,००० मे.टन, चाकूर ११,२६२ मे.टन अशा प्रकारे जिल्ह्यात एकूण १,१५,०१७ मे.टन इतक्या रासायनिक खताचे वाटप केले होते.[७] सन २०००-२००१ मध्ये रासायनिक खते वाटपाचे लक्ष पुढीलप्रमाणे होते. नत्र ३२.१ हजार टन, स्फुरद २२.९ हजार टन, पालाश ८.० हजार टन तर या कालावधीत जिल्ह्यात प्रत्यक्ष वाटप पुढीलप्रमाणे करण्यात आले. नत्र ३०.५ हजार टन , स्फुरद २०.५ हजार टन, पालाश ८.० हजार टन होते.[८] तर पीक संरक्षण मोहिमेअंतर्गत शासनाने जमिनीवरील फवारणी व धुरळणी मोहिम हाती घेतली असून शेतकऱ्यांना योग्यवेळी प्रतिबंधक निवारक उपयोजना करण्यासाठी शेतकऱ्यांना उद्युक्त करणे मुलत: आवश्यक आहे. काही प्रसंगी ही कार्यवाही शासनाकरवी करणे आवश्यक ठरते.

सन २००३-०४ मध्ये रासायनिक खतांचा सरासरी वापर मे.टनामध्ये करण्यात आला. युरिया ३०,००० मे.टन, खरीप पिकासाठी व १२,६८९ मे.टन रबी पिकासाठी. डिएपी खरीप २५,६६७ तर रबी पिकासाठी ८,०५४ एसएसपी खरीप १२,००० व रबी ८,४७७ एमओपी १,९०० व ८,४७७, १५.१५.१५ खरीप पिकासाठी ४,६६७, रबी पिकासाठी १,३०८, २०.२०.० खरीप पिकासाठी ९,३३३ तर रबी पीकासाठी २,९८५ याशिवाय १०.२६.२६, २३.२३.०, १७.१७.१७, १२.३२.१६, १८.१८.१०, २०.१०.१०, १४.३५.१४, इत्यादी खतांचा वापर केला गेला. जिल्ह्यात खरीप हंगामासाठी १,०५,२६७ मे.टन, तर रबी हंगामासाठी ४०,१२१ मे.टन खताचा वापर झाला तर २००५ सालासाठी वरील रासायनिक खताची मागणी व पुरवठा आराखडा खालीलप्रमाणे आहे. मागणी १,८२,४६४ मे.टन तर पुरवठा आराखडा ६४,२४० मे.टन इतका आहे.[९]

मशागतीच्या निरनिराळ्या पध्दती , यंत्रे, रसायने, जैविके यांचा वापर तसेच अधिनियम याव्दारे पीक संरक्षणाचे कार्य करण्यात येते. मशागतीच्या इतर बाबीप्रमाणेच आपआपल्या पिकांचे किड, रोग यांचे स्वरूप ओळखून त्यासाठी करावयाची नियंत्रण योजना त्यासाठी तांत्रिक सल्ला देणे, काही विवक्षित किडी, रोग यांची पाहणी करणे व त्यांचे नियंत्रणसंबंधी शेतकऱ्यामध्ये जरुर तो प्रचार करणे व प्रसिध्दी करणे इत्यादी बाबी कृषि विभागाकडून करण्यात येतात. यासाठी शासनाने लातूर जिल्ह्यासाठी १९९९-२००० सालासाठी खालीलप्रमाणे कार्य केले आहे. वरील वर्षासाठी जिल्ह्यातील क्षेत्राचे लक्ष ११,७०५ एकर होते व साध्य ८,७०५ इतके झाले. यासाठी किटक नाशकाचा खर्च १,८८३ हजार रुपये आला. अनुदानावरील खर्च ७९३ हजार रुपये होता.

जलसिंचन

लातूर जिल्हा गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद विभागात मोडतो. जिल्ह्यातील प्रमुख नद्या मांजरा व मानार या आहेत. तर त्याच्या उपनद्या तेरणा, तारवजा,रेणा, लेंढी, व तिरु या आहेत. जिल्ह्यातील पर्जन्यमान सरासरी ४५५ ते ७५५ मि.मिटर पर्यंत असून जिल्ह्यात प्रामुख्याने ज्वारी, गहू, भूईमूग, मका, ऊस, हरभरा, तूर, मूग, फळे व भाजीपाला इत्यादी पिके घेतली जातात.

जिल्ह्यात सर्वत्र सारखा पाऊस पडत नसल्याने जलसिंचनावर अवलंबून राहावे लागते.

---

७. **जिल्हा परिषद लातूर वार्षिक प्रशासन अहवाल,** १९९८-९९ पृष्ठ -७७.

८. कार्यक्रम अंदाजपत्र २००१-०२कृषि, पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग (कृषि) महाराष्ट्र शासन पृ. ११७.

९. सदर माहिती कृषि विभाग, कृषि उत्पादन कार्यक्रम २००५-०६ विभागीय आढावा बैठक, औरंगाबाद महसूल विभाग यातून घेतली आहे. पृष्ठ ३०.

कृषि अर्थव्यवस्थेत जलसिंचनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जलसिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध होणे हे त्या जिल्ह्यातील नैसर्गिक व भौगोलिक स्थानावर अवलंबून असते. तसेच त्या जिल्ह्यातील जमिनीत पाणी किती प्रमाणात खोलवर आहे यावर अवलंबून असते. लातूर जिल्ह्यात सर्वसाधारणपणे १५.९० मीटर वर पाण्याची पातळी आढळून येते. तसेच वेगवेगळ्या तालुक्यामध्ये पाण्याच्या पातळीमध्ये तफावत दिसून येते. औसा, लातूर, अहमदपूर तालुक्यांमध्ये ती सरासरी १३.५० मीटर ते १३.९० असून निलंगा, अहमदपूर, तालुक्यामध्ये ती सरासरी १८.६० मीटर व १६.८० मीटर दिसून येते. जलसिंचनाची कल्पना फार पुरातन असली तरी आताच्या काळात जलसिंचनाच्या साधनामध्ये विलक्षण परिवर्तन झाले आहे. पूर्वी जलसिंचन केवळ विहिरीद्वारे होत असे, तलावांचा उपयोग बहुतांशी पिण्याच्या पाण्यासाठी होत असे. त्यामुळे शेती व्यवसाय सर्वस्वी पावसावरच अवलंबून होता. शिवाय जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अनियमित असल्यामुळे कृषि उत्पादन फारसे निघू शकत नसे व त्याचा तद्नुषंगाने जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होत असे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी शासनाने जमीन सुधारणा कार्यक्रमात जलसिंचन योजनांना अग्रक्रम दिला. आणि उपलब्ध नद्या, तलाव, विहिरी इत्यादींचा उपयोग जलसिंचनासाठी करण्याच्या दृष्टीने धोरण आखले. त्यानुसार जिल्ह्यात मोठ्या व मध्यम जलसिंचन योजना तसेच लघु पाटबंधारे, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, उपसा सिंचन योजना, सहकारी उध्दरण जलसिंचन योजना कार्यान्वित केल्या त्या बाबतची माहिती खालील प्रमाणे देता येते :—

मोठे व मध्यम प्रकल्प.—जिल्ह्यात दोन मोठे प्रकल्प असून १२ मध्यम प्रकल्प आहेत त्याची माहिती खालील प्रमाणे :—

मांजरा प्रकल्प : बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात धनेगाव येथे मांजरा नदीवर मांजरा प्रकल्पास शासनाने २० ऑगस्ट १९७५ या प्रकल्पासाठी १७१४ लाख रुपयांची अंदाज पत्रकामध्ये प्रथम प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. त्यानुसार मांजरा धरणाचे बांधकाम १९८२ मध्ये तर त्यावरील कालव्याचे व वितरण व्यवस्थेची कामे १९८६ मध्ये पूर्ण करण्यात आली. या प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्र २३७१ चौ.कि.मी.असून जलसंचय २५०.७० द.ल.घ. मीटर एवढा आहे. धरणाचा उपयुक्त साठा १७३.३२ द.ल.घ.मी.आहे. या धरणापासून दोन कालवे काढले असून डावा कालवा ९० कि.मीटर व उजवा कालवा ७८ कि.मीटर लांबीचा असून एकूण लाभक्षेत्र १८,२२३ हेक्टर आहे. मांजरा प्रकल्पाच्या रु.३०६०.४१ लाखाच्या अंदाजित किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक ३० ऑगस्ट १९८३ मध्ये देण्यात आली त्या अन्वये मांजरा धरणाची उंची वाढविणे, कालवे व वितरिकांचे अस्तरीकरण करणे व मांजरा धरणा खालील बिंदगिहाळ पर्यंतचे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे मांजरा प्रकल्पात समाविष्ट करून त्यापैकी १४ बंधाऱ्यांचे नूतनीकरण करणे इ.कामे समाविष्ट करून १७६.०२ कोटी रकमेचा सुधारित अंदाजित किंमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता शासनाने दिनांक ९ जानेवारी २००३ रोजी प्रदान केली आहे.

मांजरा प्रकल्पावरील पाण्याचा प्रत्यक्ष सिंचनासाठी पाणी वापर सन १९८० पासून सुरू झाला. या प्रकल्पावर महत्तम सिंचन १६,१४८ हेक्टरर्स एवढे सन २००० ते २००१ या सिंचन वर्षात करण्यात आले. प्रकल्पाच्या सुधारित नियोजनानुसार उपलब्ध पाण्यामध्ये बिगर सिंचन पाणी वापराचीही तरतूद करण्यात आली आहे. उदा.घरगुती वापरासाठी, औद्योगिक क्षेत्रासाठी.[१०]

डाव्या कालव्याची एकूण लांबी ९० कि.मी.असून त्यातील ० ते ५० कि.मी.लांबीचा कालवा बीड जिल्ह्यात येतो, तर ५० ते ९० कि.मी.म्हणजे ४० कि.मी.लांबीचा कालवा लातूर जिल्ह्यात येतो. तर उजव्या कालव्याची लांबी ७८ कि.मी.असून त्यातील ०.ते १८ कि.मी.लांबीचा कालवा उस्मानाबाद जिल्ह्यात आहे व

१०. वरील माहिती जलसंपदा विभाग, मंत्रालय यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

१८ ते ७८ म्हणजे ६० कि.मी.लांबीचा कालवा लातूर जिल्ह्यातून जातो. या दोन्ही कालव्यांपासून लातूर जिल्ह्यातील १६,७४३ क्षेत्र ओलीताखाली येते. लातूर ता. ९०,७० हेक्टर, रेणापूर तालुक्यातील ७,६७३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते.[११]

लातूर जिल्ह्यात दुष्काळी पट्ट्यातून मांजरा नदी प्रवाहीत आहे. मांजरा नदीवर सहा ठिकाणी जिल्ह्यात बॅरेजचे बांधकाम करण्यात येत आहे. यामुळे नदीच्या प्रवाहात बारमाही पाणी राहील. हे पात्र बारमाही वाहते राहील. ही एक महत्वाकांक्षी योजना आहे.

निम्न तेरणा प्रकल्प : हा प्रकल्प तेरणा नदीवर उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील माकणी गावाजवळ आहे. बीड पाटबंधारे मंडळ परळी वैजनाथ पाटबंधारे योजनाची प्रगती आणि सध्य:स्थिती लातूर जिल्हा २००४ मध्ये या प्रकल्पाची बांधकाम चालू प्रकल्प अशी नोंद केली आहे.

या प्रकल्पाच्या कामाची सुरुवात १९५९ मध्ये करण्यात आली त्यावेळी या प्रकल्पासाठी ८०.३० लाख रुपये खर्च झाले होते व धरणाची लांबी १,६७७.५०० मीटर होती. तसेच धरणाची उंची १७.६९० मीटर होती. उजव्या कालव्याचे काम त्याचवर्षी पूर्ण करण्यात आले. त्यानंतर या धरणातून डावा कालवा काढण्यात आला व त्याची लांबी १६.०९० कि.मी. इतकी करण्यात आली.[१२] निम्न तेरणा प्रकल्पासाठी संधारित शासकीय मान्यतेनुसार २५ जून १९९३ मध्ये १६,५२१ लक्ष रुपये तरतूद तर दिनांक ११ डिसेंबर २००० द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार १६,३३३.२५ लक्ष रुपये केली. या धरणाची साठवण क्षमता १६०.४० द.ल.घ.मीटर.असून सध्या या धरणाचा पाणी उपयुक्त साठा ११३.९५ द.ल.घ.मीटर आहे व मृत साठा ४१.५१ द.ल.घ.मीटर आहे. या धरणातून दोन कालवे काढले असून उजव्या कालव्याची लांबी १०३ कि.मी.असून ० ते ३० कि.मी.लांबी उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये येते. ३० ते १०३ म्हणजे ७३ कि.मी.लांबीचा कालवा लातूर जिल्ह्यातून जातो. डाव्या कालव्याची लांबी ९२ कि.मी.असून हा संपूर्ण लातूर जिल्ह्यातून जातो. या दोन्ही कालव्याद्वारे लातूर जिल्ह्यातील एकूण सिंचन क्षमता २५,५१८ हेक्टर असून सध्या औसा तालुक्यातील ३,१४६ हेक्टर, निलंगा तालुक्यातील ७,८५९ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येते. या प्रकल्पाद्वारे मुख्यत्वेकरून खरीप पीकासाठी पाण्याचा उपयोग केला जातो. सध्या या प्रकल्पाच्या एकूण ११,६१० हेक्टर सिंचन क्षेत्रापैकी जून २००४ पर्यंत एकूण ८,७७५ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे. जून २००५ पर्यंत उर्वरित १,८३५ हेक्टर सिंचन निर्मिती करण्याचे नियोजन होते. २००३-०४ पर्यंत या प्रकल्पावर अंदाजे २०९.२१ कोटी रुपये खर्च झाले आहेत.

आशीव उपसा सिंचन योजना : या योजनेचाही गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद, पाटबंधारे योजनांची प्रगती आणि सध्य:स्थिती लातूर जिल्हा जून २००४ नुसार मोठ्या परंतु काम चालूमध्ये अंर्तभाव केला आहे. या उपसा सिंचन योजनेसाठी सन २००३-०४ पर्यंत अंदाजे २१२.२१ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून या योजनेखाली एकूण सिंचन क्षमता सुमारे १५,१०७ हेक्टर असून औसा ८,९५७ हेक्टर, निलंगा ६,१५० हेक्टर इतकी आहे. सध्या औसा तालुक्यात ३,५२४ हेक्टर, निलंगा २,६२६ हेक्टर तर उमरगा तालुक्यात २,८०७ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आणण्याचे नियोजित असून सध्या जून २००४ अखेर या योजनेद्वारे औसा तालुक्यातील ३,५२४ हेक्टर, निलंगा २,६२६, उमरगा ६,१५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. या उपसा योजनेतील एकूण पाणी साठा ८.०० द.ल.घ.मीटर.असून त्यातील एकूण उपयुक्त पाणी साठा ९.०० ल.क्ष.घ.लि. असून काही पाणी औद्योगिक वापरासाठीही वापरले जाते. महाराष्ट्र शासनाने २००० मध्ये निम्न तेरणा प्रकल्पाप्रमाणेच आशीव उपसा सिंचन योजनेसाठी १२,०२१.७५ लक्ष रुपये इतकी तरतूद केली आहे. वरील दोन्ही प्रकल्पासाठी

११. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद लातूर जिल्हा पुस्तिका जून २००४. पृष्ठ १३.

१२. **उस्मानाबाद जिल्हा गॅझेटिअर,** १९७२, पृष्ठ ३९५.

अद्यावत किंमत रुपये ३३,७००.८९ लक्ष रुपये असून यामध्ये निम्न तेरणा प्रकल्प प्रवाही करिता रु.२०,७०७.२० लक्ष व उपसा सिंचन योजनेसाठी रु.१२,९९३.६९ लक्ष केली आहे. वरील दोन्ही प्रकल्पांची मोठ्या व बांधकाम चालू प्रकल्पामध्ये नोंद बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी (वैजनाथ) पाटबंधारे योजनेची प्रगती आणि सध्य:स्थिती लातूर जिल्हा, जून २००४ मध्ये आहे.

मध्यम प्रकल्प

लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रकल्पाशिवाय खालील मध्यम प्रकल्प आहेत. तसेच काही प्रकल्पाद्वारे जलसिंचन होते परंतु त्याचे काम पूर्ण झाले नाही, असेही काही प्रकल्प जिल्ह्यामध्ये आहेत. त्याची माहिती खालील प्रमाणे देता येईल. या प्रकल्पापासून प्रामुख्याने जिल्ह्यातील ऊस व रबी पीकांना पाण्याचा वापर केला जातो.[१३]

(१) धरणी (ता. शिरुर अनंतपाळ) : धरणी नदीवर हे धरण जोगळा येथे बांधले असून या प्रकल्पाचे काम १९६६ मध्ये पूर्ण झाले. या प्रकल्पासाठी अंदाजे खर्च १.०२३ कोटी रुपये झाला असून या धरणाची उंची १४.९० मीटर आहे. तसेच या धरणापासून निघणाऱ्या कालव्याची लांबी २५ कि.मी.इतकी आहे. एकूण पाणी साठा २५.०८ द.ल.घ.मीटर तर एकूण उपयुक्त पाणी साठा २२.४६ द.ल.घ.मीटर आहे. यातील २२.४६ द.ल.घ.मीटर पाणी सिंचना- करिता वापरले जाते तर ५.८३ द.ल.घ.मीटर पाणी पिण्यासाठी वापरले जाते. या प्रकल्पाद्वारे शिरुर अनंतपाळ तालुक्यातील २,८३४ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे.

(२) तिरु प्रकल्प : तिरु नदीवर हे धरण वाढोणा येथे सन १९७१ मध्ये बांधण्यात आले आहे. या प्रकल्पाचा अंदाजे खर्च १.२२७ कोटी रुपये आला आहे. या धरणाची उंची २१ मीटर इतकी आहे. या धरणापासून काढलेल्या कालव्याची लांबी २९ कि.मी.इतकी आहे. या धरणातील एकूण पाणीसाठा २३.३२ द.ल.घ.मीटर असून एकूण उपयुक्त पाणी साठा १५.२९ द.ल.घ.मीटर आहे. सिंचनासाठी १५.२९ द.ल.घ.मीटर पाणी वापरले जाते तर पिण्यासाठी या प्रकल्पाद्वारे ७.२९ द.ल.घ.मीटर पाणी वापरले जाते. सध्या लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातील ३,२८९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे.

(३) तावरजा : हे धरण तावरजा नदीवर सन १९८६ मध्ये बांधण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी आतापर्यंत ५.५४ कोटी रुपये खर्च केले आहेत. या धरणाची उंची १४.२७ मीटर इतकी आहे. तसेच या धरणापासून काढलेल्या कालव्याची लांबी २० कि.मी. इतकी आहे. या धरणातील एकूण पाणी साठा २७.७३ द.ल.घ.मीटर असून एकूण उपयुक्त साठा २०.३५ द.ल.घ.मीटर आहे. त्यापैकी सिंचनासाठी २०.३५ द.ल.घ.मीटर पाण्याचा वापर केला जातो तर पिण्यासाठी ६.४२ द.ल.घ.मीटर पाणी वापरले जाते. लातूर जिल्ह्यात या धरणापासून ४,०४० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले असून लातूर तालुक्यातील १,९८९ हेक्टर तर औसा तालुक्यातील २,०५१ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आहे. पाण्याचा उपयोग ऊस तसेच रब्बी ज्वारी, भुईमूग, पालेभाज्या इत्यादी पीकांसाठी केला जातो.

---

१३. मध्यम प्रकल्पांची माहिती जलसंपदा विभाग, मंत्रालय व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ परळी (वैजनाथ) पाटबंधारे योजनांची प्रगती आणि सद्य:स्थिती दर्शविणारी पुस्तिका लातूर जिल्हा जून २००४ मधून घेतली आहे.

(४) औराद को.प.बंधारा : हा बंधारा निलंगा तालुक्यामध्ये असून या बंधाऱ्याचे बांधकाम १९८२ मध्ये पूर्ण करण्यात आले. या प्रकल्पासाठी सन २००३-०४ पर्यंत ०.७८ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या बंधाऱ्याची उंची ४.९५ मीटर इतकी असून धरणातील एकूण पाणी साठा ३.४६ द.ल.घ.मीटर इतका असून एकूण उपयुक्त पाणीसाठा ४.४६ द.ल.घ.मीटर आहे. त्यापैकी सिंचनाकरीता ३.४६ द.ल.घ.मीटर पाणी व ०.१४ द.ल.घ. मीटर पाणी पिण्यासाठी वापरले जाते. या धरणापासून निलंगा तालुक्यातील १,२७० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे.

(५) गिरकचाळ को.प.बंधारा : हा प्रकल्प निलंगा तालुक्यामध्ये गिरकवाळ येथे असून या प्रकल्पाचे काम सन १९८१ मध्ये सुरू केले व सन १९८२ मध्ये पूर्ण करण्यात आले. या बंधाऱ्याची उंची १०.६५ मीटर इतकी आहे. या बंधाऱ्यातील एकूण पाणी साठा ९.२७ द.ल.घ.मीटर व एकूण उपयुक्त पाणी साठाही तितकाच आहे. या बंधाऱ्यापासून सिंचना साठी ९.२७ द.ल.घ.मीटर पाणी वापरले जाते. तसेच ०.१५ द.ल.घ.मीटर पाणी पिण्यासाठी वापरले जाते. या बंधाऱ्यापासून निलंगा तालुक्यातील २,१४० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आहे.

(६) व्हटी म.प्रकल्प : या प्रकल्पाचे काम १९७७ मध्ये सुरू होऊन ते १९९८ मध्ये पूर्ण झाले. या प्रकल्पासाठी अंदाजे २.४१ कोटी रुपये खर्च झाले आहेत. या धरणाची उंची १२.८६ मीटर इतकी असून धरणापासून काढलेल्या कालव्याची लांबी १९.१२ कि.मी.इतकी आहे. या धरणातील एकूण पाणी साठा ९.५१ द.ल.घ.मीटर असून त्यापैकी एकूण उपयुक्त पाणी साठा ८.२७ द.ल.घ.मीटर असून सिंचनासाठी ८.२७ द.ल.घ.मीटर पाणी वापरले जाते व ०.१५ द.ल.घ.मीटर पाणी पिण्यासाठी वापरले जाते. या प्रकल्पाद्वारे लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील १७६० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे.

(७) रायगव्हाण : हा प्रकल्प उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील रायगव्हाण येथे आहे. या प्रकल्पाचे काम सन १९८२ मध्ये पूर्ण झाले. या प्रकल्पाद्वारे १९.५० कि.मी.लांबीचा कालवा काढण्यात आला आहे. सन २००३-०४ पर्यंत या प्रकल्पासाठी ९.५१ कोटी रुपये अंदाजे खर्च आला आहे. जून २००४ पर्यंत निर्माण झालेली सिंचन क्षमता १७६० इतकी आहे. या धरणातील एकूण पाणी साठा १२.०४ द.ल.घ.मीटर असून एकूण उपयुक्त पाणी साठा १०.३५ द.ल.घ.मीटर असून त्यातील सिंचनासाठी १०.३५ द.ल.घ.मीटर पाण्याचा वापर केला जातो. या प्रकल्पाद्वारे लातूर तालुक्यातील ८९६ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे.

या प्रकल्पांशिवाय जिल्ह्यात काही प्रकल्पांची कामे हाती घेऊन जवळ जवळ पूर्णत्वास आली असून ते खालीलप्रमाणे आहेत.

(८) साकोळ मध्यम प्रकल्प : लातूर जिल्ह्यातील मांजरा नदीच्या धरणी या उपनदीवर शिरुर अनंतपाळ तालुक्यातील तिपराळा गावाच्या वरील बाजूस ०.५० कि.मी.अंतरावर हा प्रकल्प बांधण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माती धरणाचे काम सन १९७९ मध्ये सुरू झाले व प्रकल्पाची कंदरभरणी सन १९९३ मध्ये पूर्ण करण्यात आली. या माती धरणाची एकूण लांबी ११९५ मीटर असून महत्तम उंची १७.५० मीटर आहे. सांडव्याची लांबी १५० मीटर असून ते दगडी बांधकामात बांधलेले आहे. या प्रकल्पासाठी

सन २००३-०४ पर्यंत १७.७८ कोटी रुपये खर्च झाले आहेत. या धरणातील एकूण पाणी साठा १२.६८९ द.ल.घ.मीटर इतका असून एकूण उपयुक्त पाणी साठा १०.९४९ द.ल.घ.मीटर आहे, व हा साठा शेतीच्या सिंचनाकरिता वापरला जातो. तर २.०४७ द.ल.घ.मीटर पाणी पिण्यासाठी वापरले जाते. या प्रकल्पास दोन कालवे असून उजवा कालवा ७.५० कि.मी.तर डावा कालवा २०.०० कि.मी.इतक्या लांबीचा आहे. उजव्या कालव्याद्वारे ४७६ हेक्टर तर डाव्या कालव्याद्वारे १,५८८ हेक्टर असे एकूण २,०६४ हेक्टर प्रकल्पीय सिंचन क्षेत्रास लाभ होतो, त्यामध्ये देवनी तालुक्यातील ७१५ हेक्टर व शिरुर अनंतपाळ तालुक्यातील १,३४९ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे. या प्रकल्पामुळे वरील दोन्ही तालुक्यांमध्ये ज्वारी, भूईमूग, कापूस, गहू मालदांडी, हरभरा, भाजीपाला, गहू इत्यादी पिकासाठी उपयोग केला जातो.

(९) मसलगा : हा प्रकल्प लातूर जिल्ह्यातील मांजरा नदीच्या सोळ उपनदीवर निलंगा तालुक्यातील मसलगा गावाजवळ बांधण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माती धरणाचे काम सन १९८१ मध्ये सुरू होऊन कंदरभरणी सन १९९४ मध्ये पूर्ण करण्यात आली आहे. या माती धरणाची एकूण लांबी २,०७७ मीटर असून महत्तम उंची १२.३९ मीटर इतकी आहे, तर सांडण्याची लांबी १५० मीटर असून ती दगडी बांधकामात बांधलेले आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे २००३-०४ पर्यंत एकूण खर्च २४.७०२ कोटी रुपये आला असून या प्रकल्पापासून दोन कालवे काढले आहेत. उजव्या कालव्याची लांबी १२.३० कि.मी. असून, डाव्या कालव्याची लांबी ६.८० कि.मी. इतकी आहे. या धरणातील एकूण पाणी साठा १४.६७६ द.ल.घ. मीटर असून त्यापैकी उपयुक्त साठा १३.५९९ द.ल.घ. मीटर आहे. या धरणापासून सिंचनाकरिता १३.५९९ द.ल.घ. मीटर पाणी वापरले जाते तर पिण्यासाठी ३.५४४ द.ल.घ. मीटर पाण्याचा वापर केला जातो. या प्रकल्पातील कालव्यामुळे निलंगा तालुक्यातील एकूण १,३६४ हेक्टर क्षेत्र पिकाखाली आले असून उजव्या कालव्याद्वारे ८१९ हेक्टर तर डाव्या कालव्याद्वारे ५४५ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे.

(१०) देवर्जन प्रकल्प : हा प्रकल्प उदगीर तालुक्यातील देवर्जन गावाजवळील देव नदीवर बांधण्यात आला आहे. या माती धरणाचे काम सन १९७७ मध्ये सुरू होऊन कंदरभरणी सन १९९२ मध्ये पूर्ण करण्यात आली आहे. माती धरणाची एकूण लांबी १५३५ कि.मीटर असून धरणाची महत्तम उंची १५.२० मीटर आहे . सांडव्याची वक्र लांबी २०३ मीटर असून ते दगडी बांधकामात बांधलेले आहे. या धरणासाठी २००३-०४ पर्यंत १६.३२ कोटी रुपये खर्च आला आहे. या धरणातील एकूण पाणी साठा १२.४११ द.ल.घ. मीटर इतका असून एकूण उपयुक्त पाणी साठा १०.६८१ द.ल.घ.मीटर आहे व हा साठा जलसिंचना साठी वापरला जातो. तर ३.२४१ द.ल.घ.मीटर पाणी पिण्यासाठी वापरले जाते. या प्रकल्पास एकच उजवा कालवा असून त्याची लांबी २७.०० कि.मी.इतकी आहे. या कालव्याद्वारे एकूण १,८८२ हेक्टर प्रकल्पीय लाभक्षेत्रास सिंचनाचा लाभ होतो. या लाभ क्षेत्रात देवणी तालुक्यातील वरील क्षेत्र येते.

(११) रेणापूर : हा प्रकल्प जिल्ह्यातील मांजरा नदीच्या रेणा या उपनदीवर रेणापूर तालुक्यातील कामखेडा-भंडारवाडी गावाजवळ बांधण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माती धरणाचे काम सन १९९२ मध्ये सुरू होऊन कंदरभरणी सन २००० मध्ये पूर्ण करण्यात आली आहे. या माती धरणाची एकूण लांबी २,६५४ मीटर असून महत्तम उंची १०.०२ मीटर आहे. मध्यवर्ती सांडव्याची लांबी ८४.५० मीटर

असून दगडी बांधकामात बांधण्यात आला आहे. प्रकल्पीय साठवण क्षमता २१.६८१ द.ल.घ. मीटर असून जिवंत पाणी साठी २०.५५५ द.ल.घ.मीटर आहे. या प्रकल्पातून ५.०२४ द.ल.घ. मीटर पाणी पिण्यासाठी वापरतात व २०.५५५ द.ल.घ. मीटर पाणी सिंचनासाठी वापरले जाते. या प्रकल्पासाठी २००३-०४ पर्यंत ६९.७२ कोटी रुपये खर्च आला आहे.

या प्रकल्पाद्वारे लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील ४,४०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. १.४.२००४ साली या प्रकल्पासाठी उर्वरीत कामाची अंदाजीत किंमत १७.५७६ कोटी इतकी आहे. या प्रकल्पास दोन कालवे असून उजवा कालवा ९.२० कि.मी. तर डावा कालवा ११.३० लांबीचा आहे. उजव्या कालव्याद्वारे ६५५ हेक्टर व डाव्या कालव्याद्वारे ३२७ हेक्टर तसेच रेणा नदीवर अस्तित्वात असलेले चार को.प. बंधारे व चिकलठाणा येथे नवीन बांधलेल्या को.प.बंधाऱ्यावर १४६३ हेक्टर असे एकूण २,४४५ हेक्टर प्रकल्पीय सिंचनक्षेत्र निर्माण करण्यात आले आहे, त्यामुळे सन २००० पासून रेणापूर तालुक्यातील २,२४६ हेक्टर व लातूर तालुक्यातील १९९ हेक्टर लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनांचा लाभ होत आहे. हा प्रकल्प २००५ पर्यंत पूर्णत: पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(१२) उर्ध्व मानार उपसा सिंचन योजना : ही योजना नांदेड जिल्ह्यातील मानार मध्यम प्रकल्पातील पाणी साठ्यातून उपसा सिंचनाद्वारे अहमदपूर तालुक्यातील ३,००० हेक्टर सिंचन क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी प्रस्तावित केलेली आहे. या योजनेचे पंपगृह व उद्धरण नलिका मानार प्रकल्पाच्या जलग्रहण क्षेत्रातील अहमदपूर तालुक्यातील सांगवी गावाजवळ असून सन १९९६ मध्ये सुरू करण्यात आले आहे व मार्च २००५ पर्यंत पूर्ण करणे नियोजित होते. या प्रकल्पासाठी अंदाजे २००३-०४ पर्यंत ३६.६७ कोटी रुपये खर्च झाले असून ही योजना पूर्ण होण्यासाठी आणखी २७.७३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पास दोन कालवे असून उजवा कालवा ८.४० कि.मी. व डावा कालवा १६.०० कि.मी.असून कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत. उजव्या कालव्याद्वारे ९५० हेक्टर व डाव्या कालव्याद्वारे २,०५० हेक्टर असे एकूण ३००० लाभ क्षेत्र हे पूर्णत: अहमदपूर तालुक्यातीलच असून ते सिंचनाखाली येणार आहे. हा प्रकल्प पूर्णत: जून २००६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

लघु पाटबंधारे

उस्मानाबाद जिल्हा निजाम राजवटीखाली असल्याने जलसिंचनाबाबत १९४८ पर्यंत विशेष सुधारणा झालेल्या नव्हत्या. १९५०-५१ सालापर्यंत पाटबंधाऱ्याखालील एकूण क्षेत्र ६०,१०० एकर किंवा पिकाखालील एकूण क्षेत्राच्या २.८९ टक्के होते. इंपिरियल गॅझेटिअरमध्ये १९०१ साली पाटबंधाऱ्याखालील क्षेत्र ७६ चौ.मैल म्हणजे ४८,६०० एकर, किंवा पिकाखालील क्षेत्राच्या ४.२ टक्के असल्याची नोंद आहे. १९५९-६० या वर्षी पाटबंधाऱ्याखालील एकूण क्षेत्राचे पिकाखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण ४.७७ टक्के होते तर महाराष्ट्रातील तेच प्रमाण ६.२३ टक्के होते.[१४] शासनाची पहिली योजना १९५१-५८, दुसरी योजना १९५६ ते ६१ व वार्षिक योजना १९६६ ते ६९ व पाचवी योजना १९७४ ते १९७८ पर्यंत शासनाकडून लघु पाटबंधारे विषयक भरीव काम झाल्याचे दिसून येत नव्हते, परंतु द्वैवार्षिक योजना १९८० ते १९८५ या कालावधीत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात लघु पाटबंधारे योजना आखण्यात आल्या व त्या पूर्ण करण्यात आल्या. जून २००४ अखेर लातूर जिल्ह्यात एकूण ८० लघुपाटबंधारे योजनांचे काम पूर्ण करण्यात आले होते. तर ४५ लघु पाटबंधारे योजनेचे काम चालू होते. सन २००७ पर्यंत जिल्ह्यात राज्यस्तरीय योजने अंतर्गत ९२ आणि स्थानिक पातळीवर ६१ लघु पाटबंधारे योजना कार्यान्वित झाल्या असून त्यामुळे अनुक्रमे ४,५६७ हेक्टर व ६,००१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. तक्ता क्रमांक ७ मध्ये जिल्ह्यातील लघु पाटबंधारे योजनेचे नाव, तालुका, सिंचन क्षमता हेक्टर मध्ये दिली आहे.

---

१४. **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ,** उस्मानाबाद १९६१, पृष्ठ ३५.

उपसा सिंचन योजना : जिल्ह्यात उपसा सिंचन योजनेद्वारे ही शेतीसाठी जलसिंचन केले जाते. जून २००४ अखेर जिल्ह्यात पुढीलप्रमाणे उपसा सिंचन योजना कार्यान्वित होत्या. उपसा सिंचन योजना राज्यस्तर व स्थानिक स्तर योजनेमार्फत राबविण्यात आल्या आहेत. राज्यस्तर आशिवसह २५० हेक्टर पेक्षा जास्त जलसिंचन करण्याच्या ३ योजना जिल्ह्यात होत्या. त्याद्वारे ६,९३६ हेक्टरक्षेत्र पिकाखाली होते. तर उपसा सिंचन योजना स्थानिक स्तरावर म्हणजे १०१ ते २५० हेक्टरपर्यंत जलसिंचन करण्याच्या ७ योजना जिल्ह्यात जून २००४ मध्ये अस्तित्वात होत्या या सर्व योजनेमार्फत जिल्ह्यात १०२० हेक्टर क्षेत्र पिकाखाली हाते. वरील दोन्ही योजनेद्वारे जिल्ह्यात ७,९५६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली होते. जर काही बांधकाम चालू असलेल्या योजना व काही प्रस्तावित योजना आहेत.

कोल्हापूर पद्धतीचे पाटबंधारे : जिल्ह्यात २००७ पर्यंत राज्यस्तर योजनेअंतर्गत ९ आणि स्थानिकस्तर पातळीवर २०९ कोल्हापूर पद्धतीचे पाटबंधारे कार्यान्वित झाले असून त्याद्वारे अनुक्रमे ३,४६८ व ८,७७९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. काही योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून अद्याप या योजनेसाठी आर्थिक तरतूद व्हावयाची आहे अशा काही योजना आहेत. जिल्ह्यात २००७ अखेर १,१८१ पाझर तलाव बांधण्यात आले असून त्याद्वारे ३४,३२६ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे.

विहिरीद्वारे जलसिंचन : विहिरीद्वारे जलसिंचन पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. किंबहूना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपर्यंत विहिरी हेच जलसिंचनाचे एकमेव साधन होते. पुरातन काळी काही तलावही जिल्ह्यात होते. लातूर जिल्ह्यातील प्राचीन जलाशय गणेशवाडी येथे असून तो कल्याणीचे चालुक्य राजा याचे काळातील म्हणजे अकराव्या शतकातील आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार जवाहर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना विहिरीसाठी अनुदान दिले जाते. १९९१-९२ मध्ये जिल्ह्यात २१,७२१ विहिरीद्वारे सिंचन होत होते. त्यामध्ये २२८ विहिरीवर डिझेल पंपाद्वारे, तर १९,३७५ विहिरीवर विजेचे पंप बसविले होते. १९९५-९६ मध्ये १७,३६८ विहिरीद्वारे सिंचन केले गेले होते. त्यामध्ये ११५ विहिरीवर डिझेल पंप तर १८,७७३ विहिरीवर विजेचे पंप बसविले होते. या विहिरीशिवाय सन १९९१-९२ मध्ये वापरात नसलेल्या सिंचन विहिरी ७,५३५ होत्या, व इतर विहिरींची संख्या ३,७७७ इतकी होती. शासनाकडून नवीन विहिरी खोदणे, जुन्या विहिरींची दुरुस्ती करणे तसेच विद्युत पंप किंवा ऑइल इंजिन खरेदीसाठी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यात येतो. या सवलतीस जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळालेला आहे.

सन १९९८-९९ मध्ये जिल्ह्यात खालीलप्रमाणे शासकीय कूपनलिका आणि विहिरीची संख्या अनुक्रमे ३,७४९ त्यामध्ये काही कूपनलिका खाजगी कूपनलिका ३,१२८ व एकूण ६,८७७ होत्या. शासनाद्वारे उपयोगात आणलेल्या इतर विहिरी पक्क्या २,२६१ व कच्च्या २३९ तर सिंचनासाठी वापरासाठी असलेल्या पक्क्या ८,५४६ इतक्या तर १७,८७५ कच्च्या विहिरी होत्या. जिल्ह्यातील विहिरीद्वारे या वर्षी ४३,९०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले होते.

पशुसंवर्धन

पशुधनाचा अभ्यास, संशोधन आणि संवर्धन करण्याच्या हेतूने शासनाने १९८२ मध्ये पशुवैद्यक विभाग निर्माण केला. सन १८८६ मध्ये मुंबईत पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय सुरू केले. त्यावेळी महाविद्यालयातून बाहेर पडलेल्या पदवीधरांना लष्करी सेवेत घेतले जात असे. मुंबई इलाख्यातील पहिले पशु पैदास प्रक्षेत्र १९०० मध्ये छारोडी (गुजरात) येथे सुरू केले. सन १९४७ मध्ये पशुसंवर्धन काम कृषि संचालनालयाकडून पशुवैद्यक विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले. पशुगणना १९१६ पासून सुरू झाली. सन १९६२ नंतर पशुसंवर्धनाच्या योजना राज्य शासन, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमार्फत राबविणे सुरू झाले.

अनुक्रमणिका

पशुपालन कृषि अर्थव्यवस्थेमध्ये फार महत्त्वाचे स्थान आहे. जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकरी शेतातील कामासाठी बैल तसेच दुधदुभत्यांसाठी गाई-म्हशी इत्यादी जनावरांचे संगोपन करतात. भूमिहीन मजूर देखील उपजीविकेचे साधन म्हणून पशुपालन करतात. महाराष्ट्र शासनाने दुग्धविकास आणि पशुपालन यांचा विकास होण्याच्या दृष्टिने ऑपरेशन फ्लड (दुधाचा महापूर) ही योजना कार्यान्वित करून ह्या व्यवसायास उर्जित व्यवस्था देण्यासाठी निरनिराळे कार्यक्रम आखले. पशुपालनाद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्था आणि गरीब शेतकऱ्यांचे उत्पन्न तसेच राहणीमान सुधारण्याच्या दृष्टीने योजनाबद्ध प्रयत्न करावेत हे ह्या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. ह्या कार्यक्रमाला शासनाने " धवल क्रांती " हे यथार्थ नाव देऊन आर्थिक सुधारणांच्या प्रयत्नामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले आहे. जिल्ह्यातील परंपरागत पशुधन हे निकृष्ट दर्जाचे आहे. मराठवाड्यातील पशुधनाचा अभ्यास केल्यानंतर पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्थेच्या अर्थशास्त्रज्ञांनी जे निष्कर्ष काढले त्यानुसार या भागातील बरेचसे पशुधन हे फारसे लाभधारक व आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नाही. ह्या अभ्यासानुसार या जिल्ह्यातील पशुसंख्या तेथील उपलब्ध चारा व वैरण यांच्या मानाने फार मोठी असून अनावश्यक आहे. चाऱ्याच्या एकूण गरजेपैकी काहीच चारा या प्रदेशामध्ये उपलब्ध असल्यामुळे बहुसंख्य जनावरांची उपासमार होते. शेतीच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या बैलांस देखील कडबा व चारा यांचा पुरेसा पुरवठा उपलब्ध नाही. यास्तव पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्थेच्या अर्थ शास्त्रज्ञांनी असे सुचविले आहे की, एका बाजूला भाकड जनावरांची संख्या कमी करावी व दुसऱ्या बाजूने सुधारित व आर्थिकदृष्ट्या किफायतशीर अशा पशुधनाचे संगोपन वाढवावे. परंपरागत जातीचे बैल हे शेती कामास अत्यंत उपयुक्त असले तरी त्यांच्या दर्जामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील परंपरागत गाई व म्हशी यांची दुग्धोत्पादन क्षमता फारच कमी आहे. बहुतांशी गाई व म्हशींचा दूध देण्याचा कालावधी फक्त आठ ते नऊ महिने एवढाच असून त्या कालावधीत त्यांच्याकडून दररोज मिळणारे दुग्धोत्पादन गाईचे एक लिटरपर्यंत असून म्हशींचे दोन लिटरपर्यंत आहे. यामधून अर्थातच गाई किंवा म्हशींच्या संगोपनासाठी होणारा खर्च जेमतेम भागू शकतो. तथापि त्यातून शेतकऱ्यांना उत्पन्नाचे म्हणून त्याचा फारसा उपयोग होत नाही. किंबहुना बहुसंख्य शेतकरी गाई आणि म्हशींपासून मिळणाऱ्या दुधाच्या उत्पन्नापेक्षा त्यांच्यापासून मिळणाऱ्या शेणखतासाठीच त्यांचे संगोपन करतात. म्हणजेच दुधाच्या किंमतीमधून त्यांच्या संगोपनाचा खर्च भागून शेतकऱ्याला फारसा लाभ होत नाही, पण शेतकऱ्याला मुख्य लाभ होतो तो त्यांच्या शेणखतापासून.

लातूर जिल्ह्यामध्ये जनावरांच्या जातीमध्ये " देवणी " आणि " जर्सी " व होलस्टन फ्रिजन या तीन प्रमुख जाती आहेत. भारतातील निरनिराळ्या ज्या पशुंच्या नामांकित जाती आहेत त्यात देवणी जातीच्या गाईचे व वळूचे स्थान मानाचे आहे. भारतात भरविलेल्या पशुप्रदर्शनात गेल्या ५० वर्षात या गायीने अनेक वेळा सर्वोत्कृष्ट पशु म्हणून बक्षिसे प्राप्त केली आहेत. या जातीच्या गायीची दूध उत्पादन क्षमताही जास्त आहे. देवणी ही मध्यम ठेवणीची गीर जातीशी साम्य असलेली जात असून गायीचा रंग गडद पांढरा व तोंडास वानेरा असून भव्य व उभार भालप्रदर्शन (कपाळ), डोळे किंचित झाकलेले, शिंग आखूड व झोक बाजूस व मागे आलेले झुकलेले कान, आतून काळे व वक्राकार टोक, भरदार छाती, बाकदार घेर व सरळ पाठ, मोठी व जाडसर कळंब व पुष्ट पुठ्ठे असते, तर वळूमध्ये आखूड पोटास चिकटलेले बोंबूट, खूर एकदम काळे, मजबूत पाय, शेपटी लांब काळ्या गुच्छासह अशी त्यांची शरीररचना असते. जर्शी ही जात इ.स.१९८२ साली जिल्हा निर्माण झाला त्यावेळी कमी होती, परंतु आता हे प्रमाण खूप वाढले आहे. लातूर जिल्ह्याचा बहुतांश भाग डोंगराळ असल्यामुळे जर्सी गोपैदासीसाठी तसे वातावरण पुरक आहे. देशी गायीमध्ये विदेशी जातीचे १०० टक्के विर्य वापरुन जर्सी जनावरांची पैदास केली आहे. जर्सी ही जात अमेरीकेतून जर्सी या बेटात उगम

Maharashtra State Gazeteers

पावलेली असून आपल्या देशात संकर करून पैदास केली जाते. या जातीच्या जनावरांचा बांध मध्यम असून रंग तांबूस व मिश्र आहे. या गायीच्या दूधात स्निग्धांशाचे प्रमाण ७.०० असते. ही गाय तोंडाकडे आकाराने निमुळती असून मागचा भाग पुट्ठा भरलेला असतो. डोळे पाणीदार, कांती तेजदार तर शिंगे उभे व पुढे झोक असलेले बारीक आकाराची असतात. या जातीच्या गायीचा भाकडकाळ कमी असतो. भारतीय तापमानाला ५० टक्के संकरीत जर्सी गायी उत्कृष्ट गुणवत्ता दाखवतात. होलस्टन फ्रिजन ही जात भारतात लोकप्रीय असून लातूर जिल्हा याला अपवाद नाही. दुधासाठी या जातीचे संकर करून गोपैदास केली जात आहे. या जातीच्या गायीचा बांधा मोठा व रुबाबदार असून रंग काळा पांढरा व मिश्र असतो. रोगराईस सामना करण्याची क्षमता जास्त आहे. भाकड काळ कमी असून खालेल्ल्या अन्नाचे दूधात रुपांतर करण्याची क्षमता जास्त आहे. जर्सी जनावरापेक्षा दूध देण्याचे प्रमाण जास्त असते हिरवा चारा असेल तर दुधाचे प्रमाण जास्त असते.

जनावराची उलाढाल होण्यासाठी बाजाराची सोय लागते. लातूर जिल्ह्यात पुढील ठिकाणी जनावराची खरेदी विक्री होते त्याचे ठिकाण वार व तालुका पुढील प्रमाणे लातूर येथे शनिवार, रेणापूर शुक्रवार , मुरुड मंगळवार, औसा गुरुवार,उजनी शनिवार, निलंगा शुक्रवार, औराद शनिवार, उदगीर गुरुवार, हंडरगुळी रविवार, देवणी सोमवार.

जिल्ह्यामध्ये जनावरासाठी खाद्य म्हणून ज्वारीचा कडबा, बाजरी, कडबा, भुईमूग, भात,याचा पाला, उसाचे वाढे, कडधान्ये याचा भूसा वगैरे खरीप व रबी मिळून खाद्य स्थानिकरित्या होते. ओलीताच्या ठिकाणी कडवळ लुसर्न बरसीम वगैरे चाऱ्याची पिके घेतली जातात.

सन १९८५-८६ मध्ये लातूर जिल्ह्यात जिल्हा परिषद अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाने १९, पशुप्रथोमपचार केंद्रे ६० होती. अशी एकूण ७९ पशुवैद्यकीय संस्था होत्या. त्यापैकी ७२ संस्थात कृत्रिम रेतनाची उपलब्धता करून दिली होती. या कृत्रिम रेतन केंद्रापैकी १२ केंद्रावर अत्याधुनिक गोठवलेल्या बियांची सोय केली होती. या वर्षी एकूण पशुधन घटकाचे पदवीधराशी प्रमाण १ : २७००० तर संस्थेचे १ : ६४०० इतके होते. सन २०००-२००१ मध्ये जिल्हा परिषद लातूर अंतर्गत जिल्ह्यात श्रेणी १ चे पशुवैद्यकीय दवाखाने ३५ होते. तर श्रेणी २चे ६४ दवाखाने आहेत. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद योजनेमधून पशुवैद्यकीय दवाखानाश्रेणी २ (१) दवाखाना असे एकूण १०० दवाखाने कार्यरत आहेत. या मार्फत पशुसंगोपन, पशु आरोग्य संसर्गजन्य रोग प्रतिबंधात्मक लसीकरण तसेच पशुसंवर्धन विषयक संकरित गाय व सुधारित म्हैस पैदास शेळी मेंढी विकास इत्यादी योजना राबविण्यात येतात. राष्ट्रीय कृषि आयोगाच्या शिफारशीनुसार दर ५००० पशुधन घटकामागे १ पशुवैद्यकीय पदवीधर संस्था उघडण्याचे आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व नियोजन करण्यात येत आहे. या संस्थेद्वारे जिल्ह्यातील आजारी जनावरांना औषधोपचार, फिरतीवर औषधोपचार, शस्त्र क्रिया, लसीकरण, खच्चीकरण करणे कृत्रिम रेतन कार्य, योग्य पशु उत्पादना अधिक प्रमाण याशिवाय जिल्ह्यात शिबीरे घेणे, ग्रामसभाद्वारे मार्गदर्शन करणे इत्यादी कामे केली जातात. या शिवाय कुक्कुट विकास,वैरण विकास, शेळी व मेंढी विकास व मार्गदर्शन केले जाते. ग्रामसभा, तांत्रिक शिबिरे घेऊन पशुसंवर्धन विषयक सविस्तर मार्गदर्शन केले जाते. उदा. संकरीत गोपैदास करून जास्तीत जास्त दूध उत्पादन वाढविणे, सुधारित जातीच्या कोंबडी पालनाचे महत्त्व सांगून कुक्कुट विकासास गती निर्माण करणे, वैरण विकासास गती निर्माण करणे, वैरण विकासात हिरव्या चाऱ्याचे महत्त्व, शेळी व मेंढी पालनाचे महत्त्व त्याच बरोबर विविध साथीच्या व संसर्गजन्य रोगाविषयी माहिती देवून प्राथमिक औषधोपचाराबाबत उपाय योजना सुचविणे, गावठी गोण्याचे १०० टक्के खच्चीकरण करणे इत्यादी कामे केली जातात.

अनुक्रमणिका

पुढील तक्त्यात जिल्ह्यातील १९८७ व २००३ च्या पशु गणनेनुसार जिल्ह्यातील तालुकानिहाय पशुधनाची सांख्यिकीय माहिती दिली असून तक्ता क्रमांक ८ मध्ये जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागाच्या तांत्रिक कामाचा सन १९८३-८४ ते २००४-०५ पर्यंतचा आढावा दिला आहे.

पशुगणना १९८७, १९९७ आणि २००३ च्या पशुगणनेनुसार जिल्ह्यातील तालुकानिहाय माहिती खालीलप्रमाणे :—

वर्ष	तालुका	गायवर्ग	म्हैसवर्ग	शेळ्या	मेंढ्या	डुकरे	कुत्रे	कोंबड्या (बदकासह)	घोडे व गाढवे	उंट	एकूण
१९८७		७८,८३६	३१,३४३	४१,३३७	९,१४०	२,५२१	९,२०४	३१,०७३	४६४	-	२,०३,९१८
१९९७	लातूर	५५,१५८	३२,०१९	३०,३९२	६,६२४	२,४११	१०,७३८	४३,२९८	४५६	०८	१,८१,१०३
२००३		४७,०११	३५,५८५	२४,४९१	४,१०३	४३१	८,२०७	५५,४०५	१५७	४	१,७५,३९४
१९८७		६८,८२४	२०,५३६	३८,६८४	११,५४२	२,०३८	४,२२२	३७,२९२	९९३	५०	१,८४,१६९
१९९७	औसा	६५,३०२	२८,८८६	३४,२८०	९,२४६	३००	९,११५	३३,०६०	३१	-	१,८०,२२०
२००३		६९,९७३	३६,१५१	२८,११८	६,७६८	२,५४८	७,३९१	१,१०,६९३	१२४	-	२,६०,३७६
१९८७		७८,६०७	३१,३२६	३२,७६९	११,७६२	१,२११	८,२४९	४३,५१२	५७८	५	१,९९,०८०
१९९७	निलंगा	७९,६५२	४६,२७८	३३,२५९	१२,६६९	३,३८२	११,५६९	५१,५११	२७२	-	२,३८,५९२
२००३		६०,५८०	३५,२६५	२५,२८७	८,३७७	२,५४८	५,२५५	७४,३१५	२२२	३	१,४६,७१४
१९८७		८३,४१९	-	३९,२६४	९,२६४	२,४३६	७,१४७	५२,२५१	१,२०२	१६	२,३९,००७
१९९७	उदगीर	७१,३३६	४३,३०८	४५,०६४	११,९९२	२,१८५	८,१६३	७१,९८४	७४३	३	२,५८,९८६
२००३		४२,३१६	४७,१५६	२१,२७४	५,७५७	२,५१३	४,९०४	४०,४०९	४२५	-	२,१५,८५२
१९८७		९४,१२४	-	-	५,८४९	८५६	८,८४०	३६,६७३	२३९	-	२,१४,९६८
१९९७	अहमदपूर	५४,१२२	३९,०६७	२९,३२०	७,४९६	१,७४१	४,४७५	४१,०६७	३३	-	१,६४,९६४
२००३		४७,३८६	३१,९४०	२४,०९०	१,२३३	७१६	३,१५०	२७,१३८	११२	-	१,२७,५१८
१९८७		-	-	-	-	-	-	-	-	-	-
१९९७	रेणापूर	३३,५५३	१७,३६१	१८,२४१	१,८९४	१५३	६,७९४	१९,७४३	१०२	-	७४,८४१
२००३		२५,०५९	१४,९५८	१२,९३२	१,१३१	३४४	३,८२९	२१,०६७	१२	-	७९,३३२
१९८७		-	-	-	-	-	-	-	-	-	-
१९९७	चाकूर	३५,५६३	२४,६६८	१४,३०४	४,२४४	२९९	४,०४२	२१,९१५	६३	-	१,०५,०९८
२००३		४१,२९१	३०,००७	१९,३९२	५,२६५	५७७	५,९२३	२९,४३५	१०९	-	१,३१,९९९
१९८७		-	-	-	-	-	-	-	-	-	-
१९९७	शिरुर अ.	-	-	-	-	-	-	-	-	-	-
२००३		१६,३५७	१२,३४४	६,९५७	२,५१५	२८०	२,६३७	१७,२३६	२३३	-	५८,५५९
१९८७		-	-	-	-	-	-	-	-	-	-
१९९७	देवणी	-	-	-	-	-	-	-	-	-	-
२००३		१९,५३६	१५,१४५	८,५३७	१,५७५	३८७	१,१४०	६,५८६	२३३	-	५६,७३९
१९८७		-	-	-	-	-	-	-	-	-	-
१९९७	जळकोट	-	-	-	-	-	-	-	-	-	-
२००३		१७,०६८	९,८४७	९,०५७	५,६३८	३७७	२,४१३	१६,०१८	३१६	२	६०,७३६
१९८७		४,०३,८१०	१,६५,६४०	१,८१,३७४	४८,२१७	९,०६२	३७,६६२	१,९१,८४२	३,४५६	७९	१०,४१,१४२
१९९७	एकूण	३,९४,६८६	२,२८,६६८	१,९९,५९०	५४,१६९	१०,४७१	५४,८९६	२,८२,५७८	१,६९९	११	१२,२६,८०४
२००३		३,८६,५७७	२,४५,६६०	१,७६,५८६	४५,९६२	९,३३१	४८,८४९	३,९८,३०४	१,९४३	०२	१३,१३,२१९

सन २००७ मध्ये लातूर जिल्ह्यात पशुधन ८.९० लक्ष आहे. यामध्ये गोवंश ३.९४ लक्ष म्हैसवर्ग २.२९ लक्ष शेळ्या १.९९ लक्ष व मेंढी ०.५५ लक्ष आहे.

अनुक्रमणिका

लातूर जिल्ह्यात १९८७ च्या पशु गणनेनुसार १,९१,८४२ एवढी कोबंड्याची संख्या होती. सुधारित जातीच्या कोंबड्या निर्माण करणेसाठी जिल्ह्यात मुरुड येथे कुक्कुट पालन प्रशिक्षण केंद्र सुरू केले असून त्यामध्ये कोंबडी पालनाच्या पध्दती, कोंबड्याच्या सुधारित जाती, प्रतिबंधक लसीकरणाबाबत माहिती, विविध रोगांविषयी माहिती व त्यावर औषधोपचार तसेच कुक्कुट पालनाबाबत आवड निर्माण व्हावी म्हणून पंचायत समितीमार्फत एक दिवसाचे पिल्ले वाटप तसेच अंडी उबविण्याचे प्रशिक्षण दिले गेले. त्यामुळे अधिक अंडी व मांस उत्पादनास मदत होते. लातूर जिल्ह्यात १९८७ च्या पशुगणनेप्रमाणे एकूण मेंढ्यांची संख्या ४८,२१७ होती. तर २००३ मध्ये ती ४५,९६२ इतकी झाली. जिल्ह्यात पशुवैद्यकीय संस्थामार्फत अंत्रविषार लस, आजारी मेंढ्यांना औषधोपचार व कळपामध्ये सुधारित जातीचे बोकड सोडून चांगल्या जातीचे मांस व लोकर इत्यादी बाबतही मदत व मार्गदर्शन केले जाते.

३०.९.१९९३ रोजी झालेल्या भूकंपामुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पशुहानी झाली. त्यासाठी दिनांक ३०.९.१९९३ ते २०.११.१९९३ पर्यंत जिल्ह्यात एकूण १२,४५० जनावरांवर औषधोपचार करण्यात आले. त्यासाठी जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील ३४ अधिकारी व ४६ कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात आली. भूकंपामुळे मृत पावलेल्या १०९६ जनावरांची विल्हेवाट लावण्यात आली. रोगराईचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून घटसर्प, फऱ्या, अंत्र इत्यादी रोगांच्या प्रतिबंधासाठी एकंदर ६७,४७४ जनावरांना लसीकरण करण्यात आले. तसेच भूकंपग्रस्त जनावरांसाठी छावण्या उभारण्यात आल्या. भूकंपामुळे भूकंपग्रस्त भागातील तळणी, किल्लारी, उजनी येथील पशुवैद्यकीय संस्थेच्या इमारती पूर्णपणे निकामी झाल्या होत्या. तर लामजना, सारोळा, मोगरगा, निटूर, मातोळ, मदनसुरी येथील इमारतीना मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या होत्या. भूकंपग्रस्त भागामध्ये एकंदर १२,२०६ जनावरे मृत झाली असून पशुसंवर्धन खात्याने केलेल्या सर्वेक्षणानुसार त्याचे मुल्यांकन ९५,२०,६०० रुपये इतके होते. ज्यांची जनावरे भूकंपामुळे मृत झाली त्यांना संकरित गायी, म्हशी, शेळ्या इत्यादीचे वाटप करण्यात आले. लातूर जिल्ह्यामध्ये १,१२९ संकरित गायी, १,२३९ म्हशी व दोन्ही जिल्ह्यांमध्ये मिळून १५,२६७ शेळ्या, मेढ्यांचे वाटप करण्यात आले.

जिल्ह्यातील पशुधन अनेक प्रकारच्या रोगराईना बळी पडते. त्यामुळे शेतकऱ्यांची फार मोठी आर्थिक हानी होते. जिल्ह्यात प्रचलित असलेल्या रोगाबाबत माहिती खालीलप्रमाणे.:—

(१) फऱ्या.—हा रोग जिवाणू पासून होतो. विशेषत: म्हैस व गाय वर्गातील लहान जनावरामध्ये या रोगाचे प्रमाण जास्त असते. या रोगामध्ये १०४ ते १०६ डिग्री पर्यंत ताप असतो. मागील पायाच्या किंवा पुढील पायांच्या फऱ्यावर सुज येते. सुजेवर हात ठेवल्यास करकर असा आवाज येतो. जनावर खाणे व पाणी पिणे बंद करते. त्यावर तात्काळ उपचार न झाल्यास जनावर मृत्यूमुखी पडते. या रोगाचा प्रादुर्भाव झाला तरच उपचार केले जातात. या रोगावर पेनीसीलीनची इंजेक्शने ६ तासाच्या अंतराने दिल्यास रोग बरा होऊ शकतो. यामध्ये प्रतिबंधक लस टोचून घेणे सर्वात उत्तम उपाय आहे.

सन २००१ मध्ये वेगवेगळ्या रोगावर उपचार केलेल्या जनावराची संख्या ३,१०,६४० इतकी होती. तर जिल्ह्यात बाधीत गावांची संख्या ६३ होती. जिल्ह्यामध्ये २०००-२००१ मध्ये फऱ्या रोगांसाठी जिल्ह्यात ९४,५३० जनावरांना रोगप्रतिबंधक लस टोचण्यात आली, तर सन २००४-०५ मध्ये १,३२,५०७ जनावरास फऱ्या प्रतिबंधक लस टोचण्यात आली. २००० ते २००५ पर्यंत एकूण २,२७,०३७ इतक्या जनावरास फऱ्या रोगाविषयी रोगप्रतिबंधक लस टोचणी केली होती.

(२) घटसर्प.—हा रोग सुद्धा विशिष्ट प्रकारच्या जिवाणू पासूनच होतो. या रोगाची लागण झाल्यास व वेळीच उपचार न झाल्यास जनावरे तात्काळ मृत्युमुखी पडतात. या मध्ये १०४ ते १०६ डिग्री पर्यंत ताप असतो. जनावर खाणेपिणे बंद करते. श्वास घेण्यास त्रास होतो. घशास सूज येते, तोंडावाटे लाळ गळते, सूजेवर हात ठेवल्यास ती जागा गरम लागून जनावरास वेदना होतात व काही तासातच

अनुक्रमणिका

जनावर औषधोपचार होऊनसुध्दा मरण्याची शक्यता असते. यावर प्रतिबंधक लस टोचून घेणे सर्वात चांगले. सन २०००-२००१ मध्ये घटसर्प रोगाची लागण रोखण्यासाठी १,११,३२२ जनावरास रोग प्रतिबंधक लस टोचण्यात आली. तर सन २००४-०५ मध्ये १,१२,८४६ जनावरास ही लस टोचण्यात आली.

(३) फाशी (ॲथ्रॉक्स).—हा रोग सुद्धा जिवाणूपासूनच होतो. हा एक महाभयंकर साथीचा रोग असून लागण झाल्यास या रोगात औषधोपचाराचा पाहिजे तेवढा उपयोग होत नाही. विशेषत: मेंढ्यांमध्ये हा रोग मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. या रोगात जनावरास १०४ ते १०६ डिग्री पर्यंत ताप असतो. जनावर खाणेपिणे बंद करते. तोंड गुदद्वार वगैरे ठिकाणाहून काळे रक्त येते व जनावर अचानक मरते. प्रतिबंधक लसीकरण करणे सर्वात चांगला उपाय आहे.

(४) लाळ खुरकुत.—हा रोग विषाणू पासून होतो व एका जनावरापासून इतरास होतो. त्यामुळे संसर्गजन्य या रोगात मोडतो. या रोगात जनावरांचा १०४ ते १०५ डिग्री पर्यंत ताप असतो. तोंडात, जिभेवर व जबड्यास पुरळ येवून फुटतात. त्यामुळे जनावरास खातापिता येत नाही. जनावर लाळ गाळते, लंगडते, खुरी नसतात, दुधाळ जनावरे असल्यास आटतात. गाभण जनावरे गाभ टाकतात. कामाच्या बैलांची उत्पादन क्षमता कमी होते. या रोगावर औषधोपचाराकरिता रोग प्रतिबंधक लसीकरण वर्षातून दोन वेळा करणे अत्यंत आवश्यक आहे. या रोगाची लागण झालेल्या जनावरावर एंटीबायोटिक्सची इंजेक्शने देवून पुढील संभाव्य धोका टाळता येतो. तसेच पोटॅशियमच्या पाण्याने तोंड, खुरी धुवून त्यावर बोरॅक्स व ग्लीसरीन लावल्यास बऱ्याच प्रमाणात लागण आटोक्यात आणता येते. सन २०००-२००१ मध्ये लाळखुरकुत रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने जिल्ह्यात ३४,०८५ जनावरास रोगप्रतिबंधक लस टोचण्यात आली तर सन २००४-२००५ मध्ये ५१,४८१ जनावरास ही रोग प्रतिबंधक लस टोचण्यात आली. तसेच अन्न विषारसाठी सन २०००-२००१ मध्ये २४,३०४ तर २००४-०५ मध्ये १४,१५१ जनावरावर उपचार केले. देवीरोगासाठी सन २०००-००१ मध्ये ५१,६८२ तर २००४-२००५ मध्ये २९,१५५ रोग प्रतिबंधक लस टोचणी केल्या. तसेच कोंबड्यांना होणाऱ्या माणमोडी रोगापासून संरक्षण होण्यासाठी सन २०००-२००१ मध्ये १,४९,३१८ तर सन २००४-/००५ मध्ये ९१,९९६ कोंबड्यावर रोग प्रबिबंधक लस टोचणी करण्यात आली. सन २००४-२००५ मध्ये लासोटा या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने १०,०२४ रोग प्रतिबंधक लस टोचणी करण्यात आली.

(५) बुळकांडी. —हा रोगसुध्दा विषाणूजन्य असून संसर्गजन्य आहे. या रोगात जनावरे पातळ पाण्यासारखे संडास करतात. त्याचा घाण वास येतो. जनावरास १०४ ते १०६ डिग्रीपर्यंत ताप असतो. जबड्यावर व तोंडात अल्सर सारखे पुरळ येतात. जनावर खाणेपिणे बंद करते. अशक्त होऊन शेवटी मृत्युमुखी पडते. या रोगात प्रतिबंधक लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. औषधोपचाराचा म्हणावा तेवढा फायदा होत नाही.

लातूर जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या रोगासाठी लस टोचणी करण्यात आली. सन २००४-२००५ मध्ये जिल्ह्यात २५,४०,८६४ पशुधन होते. त्यापैकी ९,१२,८४१ जनावरास लस टोचण्यात आली होती. ती पुढील प्रमाणे घटसर्प २,२२,१६६, फऱ्या रोगासाठी २,२७,०३७, लाळखुरकुत ८५,५६६, अन्न विषार ३८,४५५, देवी ८०,८३७, मानमोडी २,४१,३१४ तर लासोटा या रोगासाठी १५,२४२ व श्वान दंशासाठी २२२ जनावरांना रोगप्रतिबंधक लस टोचण्यात आली होती. [१५]

१५. वरील माहिती लातूर जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

लातूर जिल्ह्यातील श्वानाच्या कारवान व पश्मी जाती .—

महाराष्ट्रामध्ये कुत्र्यांच्या अनेक जाती आहेत. त्यापैकी कारवान व पश्मी या शिकारी जातीच्या कुत्र्यांची पैदास लातूर जिल्ह्यात १९२५ पासून करण्यात येत असल्याची नोंद दिसून येते. या जातींच्या कुत्र्यांना कर्नाटक, आंध्र प्रदेश व मध्य प्रदेशातून मोठी मागणी असते.

कारवान ही, तपकिरी विटकरी, अंगावर पांढरट काळे पट्टे असणारी अत्यंत चपळ शिकारी जात आहे. याची कातडी पातळी तजेलदार, लहान केस, सडसडीत बांधा तसेच पोट बारीक व मागे निमुळते असते. याचे पाय लांब असल्याने ते दीड ते दोन फूट उंचीची सहज उडी मारतो. या जातीच्या कुत्र्यांचे कान पडलेले व लहान असतात. तर शेपूट कडक व वळलेले असते. त्याचे डोळे तजेलदार तर नाकपुड्या बारीक असतात. या श्वानांना मान थोडी उंच ठेवण्याची सवय असते. बांधा आटोपशीर असल्याने कारवान मादी एकावेळी तीन ते सहा पिलांना जन्म देते.

जिल्ह्यात पश्मी ही पूर्ण पांढरी किंवा काळी असणारी दुसरी जात आहे. या जातीचे कुत्रे केसाळ असतात. केसांची लांबी जास्त असल्याने ही श्वान जात गुबगुबीत दिसतात. तसेच मांसळता असल्याने ही जात भेदक व भारदस्त असते. अल्सेशियन प्रमाणे बांधा असणाऱ्या या श्वानांचे तोंड गोलाकार शेपूट जाड पोट बांधेसूद असते. याचे पाय पसरट, डोळे तपकिरी, कान केसाळ तर मेदवृद्धीमुळे मोठी झालेली कातडी दिसून येते. या जातीच्या कुत्र्यांना गंधज्ञान व बुद्धीमता फार असते. तसेच पळण्याची गती यामुळे ही जात नामांकित आहे. अनेक पिढ्यांच्या पैदाशीतून या जातींचे श्वान निर्माण झाले आहेत. लातूर जिल्ह्यात प्रामुख्याने चाकूर, जानवल, महाळंगी, अहमदपूर व आसपासच्या भागात या कारवान व पश्मी जातींच्या श्वानांचे संगोपन केले जाते.

दुग्ध व्यवसाय

महाराष्ट्र शासनाने दुग्ध व्यवसायाचे जाळे खेड्यापर्यंत पसरविण्याचे कार्य हाती घेतले आहे. त्यानुसार १९५५-५६ पासून ग्रामीण भागातून संघटित दुग्ध व्यवसायाला सुरुवात झाली. सन १९५८ मध्ये या व्यवसायाचे महत्त्व ओळखून दुग्ध व्यवसाय विकास विभाग निर्माण केला. शेतकऱ्यांना या व्यवसायावर कायम रोजगार मिळावा व दुधास वर्षभर बाजारपेठ उपलब्ध व्हावी या दृष्टीने शासनाने दुधावर प्रक्रिया करण्यासाठी शासकीय दुग्धशाळा व दूध वितरण केंद्रे स्थापन केली. उदगीर येथे १९६५ मध्ये शासनाने दुधावर प्रक्रिया करणारा मलई प्रकल्प कार्यान्वित केला. दुग्ध व्यवसाय शेतकऱ्यांना, नव भूधारक, शेतमजूर व कृषक यांना शेतीस पूरक असा जोड व्यवसाय मिळून त्यांच्या छोट्या-छोट्या आर्थिक गरजा भागविण्यास साहाय्य व्हावे यासाठी दुग्ध व्यवसाय हा फार सोयीचा मार्ग आहे.

महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याच्या तुलनेने लातूर जिल्हादेखील या व्यवसायात मागे नाही. जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता व तेथील परंपरागत दुभत्या जनावरांची संख्या पाहता दूध-दुभत्यासाठी या जिल्ह्यातील काही भाग सुयोग्य असाच आहे. लातूर जिल्ह्यात माहे सप्टेंबर ते मार्च या सात महिन्यात दुधाच्या संकलनात वाढ झालेली दिसून येते. तर एप्रिल ते ऑगस्ट या पाच महिन्यात दूध संकलनात घट झाल्याचे दिसून येते. जिल्ह्यात जास्तीत जास्त दूध उत्पादनाचे विभाग उदगीर, रेणापूर, मुरुड हे आहेत. सन १९८७, १९९७ व २००३ मध्ये जिल्ह्यात पशुधन एकूण अनुक्रमे १०,४१,१४२, १२,२६,८०४ व १३,१३,२१९ इतके होते. त्यामध्ये गायवर्ग अनुक्रमे ४,०३,८१० व ३,९४,६८६ आणि ३,८६,५७७ तर म्हैसवर्ग १,६५,६४०, २,२८,६६८ व २,४५,६६० इतका असल्याचे दिसून येते. सन २०००-२००१ मध्ये जिल्ह्यात संकरित दुभत्या गायी १०,४४३ होत्या. प्रतिपशुधनापासून ६.७०० लिटर दूध मिळत होते. तर देशी दुभत्या गायींची संख्या ५७,०८४ असून प्रतिगायी १.६०० लिटर दूध मिळत होते. आणि दुभत्या

म्हशी ८०,७३० इतके असून प्रत्येकी २.७०० लिटर दूध मिळत असे. अशा प्रकारे सर्व दूध-दुभत्या जनावरापासून ३,७९,२६४ लिटर दूध मिळत असे. असे असले तरी रेणापूर व मुरूड भागात खरिप व रबी ज्वारीचे पिक मोठ्या प्रमाणावर घेतले जात असल्याने दुधाळ जनावरास बारमाही चारा उपलब्ध होतो. तसेच उदगीर तालुक्यातील बराचसा भाग गवती, डोंगराळ भाग असल्यामुळे दुधाळ जनावरास पावसाळ्यात मुबलक हिरवा चारा उपलब्ध होत असून शेतकरी, शेतमजूर दुधाळ जनावरांचा सांभाळ अत्यंत चांगल्या प्रकारे करीत आहेत. उदगीर तालुक्यातील देवणी गायीची जात भारतात प्रसिद्ध आहे. लातूर जिल्ह्यात दुधाळ जनावरापासून मिळणारे एकूण दूध सर्वसाधारणपणे ३,५७,००० लिटर आहे, त्यापैकी सहकारी माध्यमातून सरासरी ३०,००० लिटर दुधाचे संकलन होत असून शिल्लक राहिलेले दूध बाजारात खाजगी विक्रेतामार्फत विक्री केले जाते. जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातून सकाळ संध्याकाळ अनुक्रमे दूध संकलन केंद्राद्वारे संकलित केले जाते. नंतर ते मुंबईकडे महासंघामार्फत विक्रीसाठी पाठविले जाते. सन १९९३-९४ मध्ये जिल्ह्यात ६१४ नोंदणीकृत संस्था होत्या. व त्यांची सभासद संख्या ३२,९८० होती. तर एकूण भाग भांडवल ९.६१ लाख रुपये होते. तर २००२-०३ मध्ये जिल्ह्यात ८३६ नोंदणीकृत संस्था असून त्यांची सभासद संख्या ४२,३६८ होती व भाग भांडवल ४.२६३८ लक्ष रुपये होते. तर २००४-०५ मध्ये जिल्ह्यात ८८५ नोंदणीकृत संस्था व ४५,१३५ सभासद तर ४.९८४६ लाख रुपये भाग भांडवल होते. जिल्ह्यातील वेगवेगळ्या दूध योजनांची संक्षिप्त माहिती खाली दिली आहे :----

शासकीय दूध योजना उदगीर : लातूर जिल्ह्यात पहिली दूध उत्पादन सहकार संस्था उदगीर तालुक्यातील तोंडार दूध व्यावसायिक सहकारी संस्था ही ९ डिसेंबर १९६१ पासून सुरू झाली. सुरुवातीस तिचे भाग भांडवल फक्त ३३,५०० रुपये होते. सन १९९३-९४ मध्ये या संस्थेचे दूध संकलन २८० लिटर प्रतिदिन होते. लातूर जिल्ह्यात सन १९६५ मध्ये मलई प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. ग्रामीण भागातील दूध उत्पादकांनी उत्पादन केलेल्या दूधास खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध व्हावी, तसेच शहरी भागातील ग्राहकांना मुबलक प्रमाणात दूध उपलब्ध व्हावे, या दृष्टीने दिनांक ५ नोव्हेंबर १९७१ पासून या मलई प्रकल्पाचे रूपांतर दूध योजनेत करण्यात आले. दूध योजनेत रूपांतर केल्यामुळे संकलित केलेल्या दुधावर प्रक्रिया करून, दुधाची टिकाऊ क्षमता वाढवून ते दूध मुंबईसारख्या शहरी भागात पाठविण्यात येऊ लागले. लातूर जिल्ह्यातून व मराठवाड्यातील इतर जिल्ह्यातून दुधाचे संकलनामध्ये भरीव वाढ झाल्याने अतिरिक्त शिल्लक असलेल्या दुधापासून सन १९७८ मध्ये १० मे. टन क्षमतेचा दूध भूकटी प्रकल्प उदगीर येथे कार्यान्वित करण्यात आला. सध्या जिल्ह्यात मूलभूत सुविधा असलेले पाच दूध शीतकरण केंद्रे व एक दूध प्रक्रिया व दूध भूकटी प्रकल्प कार्यान्वित आहेत. जिल्ह्यातील एकूण प्रतिदिनी हाताळणी क्षमता १.४० लाख लिटर इतकी आहे. शासकीय दूध योजना यांची हाताळणी क्षमता १,२०,००० लिटर इतकी असून प्रत्यक्ष हाताळणी पुढीलप्रमाणे झाली. सन १९९१-९२ मध्ये ५,२०१ लिटर, १९९२-९३ मध्ये ७९,४३१ लिटर, १९९३-९४ मध्ये ८४,३७४ लिटर, १९९५-९६ मध्ये, ४६,६०२ लिटर, २०००-२००१, मध्ये ७९,७३० लिटर. २००२-०३ मध्ये ३२,२३१ लिटर तर २००३-०४ मध्ये १४,४५८ लिटर आणि २००४-०५ मध्ये प्रत्यक्ष हाताळणी १७,६३२ लिटर होती. शासकीय दूध योजना व दूध भुकटी प्रकल्प उदगीर येथे वापरलेले दूध व उत्पादित दूधजन्य पदार्थ यांची सन १९९३-९४ ते २०००-२००१ पर्यंतचा वार्षिक दूध हाताळणी, दूध भुकटी उत्पादन, पांढरे लोणी याची माहिती खाली दिली आहे :—

वर्षे	वार्षिक दूध हाताळणी सरासरी प्रतिदिनी (लिटर)	दूध भूकटी उत्पादन मे. टन	पांढरे लोणी उत्पादन मे. टन
१९९३-९४	८४,३७५	२१.३३.६	१२३२.३४
१९९४-९५	१९,५५५	२०८०.१७	१३८९.२४
१९९५-९६	४६,६०२	६१८.६७	५३०.८०
१९९६-९७	५२,५१८	१३६३.९६	८००.०८
१९९७-९८	५५,४८५	१४६५.९६	८९६.३६
१९९८-९९	४५,५७५	१२००.२८	७२१.७८
१९९९-२०००	७८,८२५	२२०६.८२	१२९६.०६
२०००-२००१	८८,९९२	२११६.४३	१२२४.२३

अहमदपूर डेस्को युनिट : या प्रकल्पाची स्थापना १२ जून १९७८ मध्ये करण्यात आली. या प्रकल्पाची दूध हाताळणी क्षमता २००० लिटर एवढी असून सन १९९१-९२ मध्ये ५६९ लिटर प्रत्यक्ष हाताळणी झाली. १९९२-९३ मध्ये ६९२ लिटर, १९९३-९४ मध्ये १५६० लिटर, १९९५-९६ मध्ये १०२५ लिटर, २०००-०१ मध्ये १५५७ लिटर, २००२-०३ मध्ये ८९५ लिटर, २००३-०४ मध्ये ३८४ लिटर. २००४-०५ मध्ये ८३३ लिटर इतकी आहे.

शिरूर ताजबंद डेस्को युनिट : याची स्थापना ११ नोव्हेंबर १९७८ साली करण्यात आली असून याची दूध हाताळणी क्षमता २००० लिटर आहे. सन १९९१-९२ मध्ये या युनिटद्वारे ८१८ लिटर दूध हाताळणी करण्यात आली. १९९२-९३ साली ६६५ लिटर, १९९३-९४ साली १७४५ लिटर, १९९५-९६ मध्ये २०२० लिटर, २०००-०१ मध्ये २६६९ लिटर, २००२–०३ मध्ये २०६८ लिटर, २००३-०४ मध्ये १,११३ लिटर तर सन २००४-०५ मध्ये फक्त ६०८ लिटर दुधाची हाताळणी केली गेली.

औसा डेस्को युनिट : या युनिटची स्थापना १९ जुलै १९७७ मध्ये करण्यात आली असून याही युनिटची हाताळणी क्षमता २००० लिटर इतकी आहे. सन १९९१-९२ मध्ये या युनिटद्वारे ५९५ लिटर, १९९२-९३ मध्ये ३७२ लिटर १९९३-९४ मध्ये ७१२ लिटर, १९९४-९५ मध्ये १११४ लिटर, २०००-०१ मध्ये १४१४ लिटर, २००२-०३ मध्ये १६०९ लिटर, २००३-०४ मध्ये १४३६ लिटर तर २००४-०५ मध्ये १९८० लिटर दुधावर प्रत्यक्ष हाताळणी केली.

लातूर डेस्को युनिट : या युनिटची स्थापना लातूर येथे २९ डिसेंबर १९९० मध्ये करण्यात आली असून त्याची दूध हाताळणी क्षमता ४००० लिटर इतकी आहे. सन १९९१-९२ मध्ये या युनिटद्वारे २४३४ लिटर, १९९२-९३ मध्ये २५५५ लिटर, १९९३-९४ मध्ये ५०६८ लिटर तर दिनांक २४ ऑगस्ट १९९८ मध्ये येथे दूध प्रक्रिया सयंत्र बसविण्यात आले.

त्यामुळे त्याची हाताळणी क्षमता ५०,००० लिटर झाली. सन २०००-०१ मध्ये या योजनेद्वारे १८,९३३ लिटर दुधाची प्रत्यक्ष हाताळणी करण्यात आली व दिनांक २० जानेवारी २००३ पासून हे दूध प्रक्रिया केंद्र महानंदाकडे वर्ग करण्यात आले. सन २००३-०४ मध्ये ४,४९० लिटर प्रत्यक्ष दुधाची हाताळणी केली.

अनुक्रमणिका

निलंगा शीत व डेस्को युनिट : या युनिटची स्थापना ७ जून १९७८ साली करण्यात आली आहे. तसेच या युनिटची दूध हाताळणी क्षमता १०,००० लिटर असून सन १९९१-९२ मध्ये या युनिटद्वारे १७८७ लिटर दूध हाताळणी केले गेले. सन १९९२-९३ मध्ये १४८७ लिटर, १९९३-९४ मध्ये २४८१ लिटर, १९९५-९६ मध्ये ४३८२ लिटर, २०००-०१ मध्ये ३६२२ लिटर तर २००२-०३ मध्ये ४४२३ लिटर, २००३-०४ मध्ये ३८२४ लिटर आणि २००४-०५ मध्ये ४१९२ लिटर प्रत्यक्ष दूध हाताळणी करण्यात आली.

याशिवाय लातूर जिल्ह्यात सहकारी माध्यमातून दूध गंगा दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संस्था मु. मुरुड, ता. जि. लातूर या संस्थेचे १०,००० लिटर क्षमतेचे शीतकरण केंद्रे कार्यान्वित आहे. ते उस्मानाबाद जिल्हा दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ मर्यादित, उस्मानाबाद मार्फत चालविण्यात येत असून दूध थंड केल्यानंतर मुंबई येथे महासंघामार्फत दूध विक्रीसाठी पाठविले जाते.

लातूर जिल्ह्यामध्ये प्राथमिक दूध संकलनाचे कार्य जिल्हा दूध संघ आणि लातूर तालुका संघामार्फत करण्यात येते. याशिवाय खाजगी कपिला डेअरी लातूर मार्फत १०,००० लिटर इतक्या क्षमतेची डेअरी असून याद्वारे १००० ते १२०० लिटर दूध प्रतिदिनी संकलित व वितरित केले जाते. मारुती डेअरी, लातूर हरंगुळ रोड या डेअरीची क्षमता ५००० लिटर असून याद्वारे ७०० ते ८०० लिटर प्रतिदिनी दुधात संकलन होते.

अशा प्रकारे दुग्ध व्यवसायाची संबंधित एकूण अंदाजे ७ ते ८ हजार लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. सन २००३-०४ मध्ये जिल्ह्यांतर्गत दूध वाटप सरासरी ६०६ लिटर होते तर २००४-०५ मध्ये ते ८६८ लिटर झाले व दर लिटरला दर अनुक्रमे ११.५० व ११.८० रुपये होता.

खालील तक्त्यामध्ये लातूर जिल्ह्यातील २००४-०५ या वर्षाची दूध नोंदणीकृत संस्था (संख्या), सभासद संख्या, भाग भांडवल व प्रतिसंस्था सरासरी दूध संकलन लिटर यांची सांख्यिकीय आकडेवारी दिली आहे [१६]

अ.क्र.	तालुका	नोंदणीकृत संख्या	सभासद संस्था	भाग भांडवल (लाख रुपये)	प्रति संस्था सरासरी दूध संकलन लि. प्रतिदिनी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	निलंगा	१६१	८२११	०.९२३२	२४
२	शिरूर अनंतपाळ	३६	१८३६	०.२०२०	१४
३	देवणी	६७	३४१७	०.३७५९	१५
४	उदगीर	९८	४९९८	०.५४९७	२३
५	जळकोट	३६	१८३६	०.२०२०	. .
६	लातूर	१०६	५४०६	०.५९४६	१०
७	रेणापूर	७३	३७२३	०.४०९५	१६
८	औसा	११६	५९१६	०.६५०७	२०
९	चाकूर	७५	३८२५	०.४२०७	०६
१०	अहमदपूर	११७	५९६७	०.६५६३	०५
	एकूण	८८५	४५१३५	४.९८४६	१४.८

२००७ अखेर मत्स्यव्यवसायामध्ये जलक्षेत्र ३,५६२ हेक्टर होते ते आता १३,४१६ हेक्टर झाले आहे. एकूण मत्स्यमारी सहकारी संस्था ७९ आहेत. (मत्स्य उत्पादनाबाबत अधिक माहिती प्रकरण १ मध्ये दिली आहे.

१६. वरील माहिती लातूर जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

कूळवहिवाट व भूधारणा पद्धती

सतराव्या शतकाच्या सुरुवातीला उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये मलिक अंबरने नियोजित केलेली जमीन महसूल पद्धती रूढ होती. मलिक अंबरची पद्धती राजा तोडरमलच्या मूळ पद्धतीची सुधारित आवृत्ती होती. मलिक अंबरने जमिनीची सुपीकता व स्थान यावरून महसुलाचे दर ठरविले.[१७] १८५३ मध्ये उस्मानाबाद जिल्हा ब्रिटिश सरकारच्या तात्पुरता स्वाधीन केला होता. तो १८६० मध्ये हैद्राबाद राज्याकडे परत देण्यात आला. या जिल्ह्याचे मुख्यालय पूर्वी नळदुर्ग येथे होते व १९०४ पर्यत तो नळदुर्ग जिल्हा म्हणून ओळखला जात होता. नळदुर्ग जिल्हा रद्द करण्यात आला व उस्मानाबाद नावाचा नवीन जिल्हा स्थापन करण्यात आला. त्याचे मुख्यालय उस्मानाबाद (पूर्वीचे धाराशीव) असे ठेवण्यात आले. दक्षिणेत अकबराच्या राजवटीत राजा तोडरमलने सर्व जमिनीची मोजणी करून व त्या जमिनीची प्रतवारी ठरवून सारा निश्चितीसाठी "असल-इ-जमा-इ" नामक पद्धती सुरू केली होती. अशा तऱ्हेने वसूल केल्या जाणाऱ्या साऱ्यास " तनख्वाह " म्हणत.[१८]

सरंजामशाही अर्थव्यवस्था हाच निजामी राजवटीचा मूळ गाभा होता. सर्व निजामांनी प्रजेला आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी कटाक्षाने सरंजामशाही अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. पहिला निजाम हाच या सरंजामशाहीचा जनक होय. त्याने माळवा प्रांतातून अनेक हिंदू व मुसलमान सरदार आपल्या राज्यात आणले, युद्धात अथवा प्रशासनात राजसत्तेस साहाय्य करणाऱ्यांना जहागिरी दिल्या. या जहागीरदारापैकी बहुसंख्य मुस्लिम सरदार होते. त्यांना जहागिरी देऊन त्यांच्यावर राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली होती. अशा जहागीरदारात काही हिंदू जहागीरदारही होते, पण त्यांचे प्रमाण नाममात्र होते. संरक्षणाची जबाबदारी जहागीरदारांवर सोपविलेली असल्यामुळे ते सत्तेचे आधारस्तंभ बनले. तत्कालीन अर्थव्यवस्थेचे प्रमुख दोन भाग होते. त्यापैकी एक सरकारी अथवा दिवाणी जमीन व दुसरा भाग जहागिरी हा होता. सरकारी अथवा दिवाणी जमिनीचे उत्पन्न सरकारच्या प्रत्यक्ष तिजोरीत (कोषात) जमा होत असे. त्याची व्यवस्था व नियंत्रण प्रधानाकडे (दिवाणाकडे) होते. सालारजंग या प्रधानाच्या महसूल सुधारणा या क्षेत्रातच करण्यात आल्या होत्या. जहागीरदारीमध्ये सर्फ-इ-खास, पायगा, जहागीर व संस्थाने असे चार प्रकार होते. सर्फ-इ-खास ही खुद्द निजामांचीच जहागीर असून त्याचे उत्पन्न निजामाच्या खर्चासाठी असे व त्यापासून निजामाला वार्षिक एक कोटी रुपये मिळत होते. सर्फ-इ-खास मध्ये जमिनी फार सुपीक असत. राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी १०% क्षेत्रफळ सर्फ-इ-खासची जहागीर होती. मराठवाड्यातील सर्फेरवास मध्ये खुलताबाद सिल्लोड (जि.जालना), पालम (जि.परभणी), पाटोदा (जि.बीड) उस्मानाबाद, कळंब आणि परांडा यांचा समावेश होता. पायगा "पायगाह" या शब्दाचा अर्थ "रक्षक" असा होतो. निजामाने त्यांच्याकडे आपल्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली होती. हैद्राबाद संस्थानाचा ५% भाग हा पायगा जहागिरीने व्यापलेला होता. या जहागिरीचा मोठा भाग कर्नाटकात तर फार थोडा भाग मराठवाड्यात होता. जहागीर यात मोठे व लहान जहागीरदार होते. त्यांना निजामाचा धाक होता. मोठ्या जहागीरदारांकडे प्रचंड जमिनी होत्या. तसेच त्यांचे राजघराण्याशी वैवाहिक संबंधही होते. देशमुख, देशपांडे, पाटील, पटवारी (कुलकर्णी) यांना वतनदार म्हणून सरकारी तिजोरीतून पैसा मिळत असे. त्यास "रुसुम" असे म्हणत.

---

१७. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** १९८८, महाराष्ट्र शासन, पृष्ठ २००.

१८. **इम्पीरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** १९००, प्रोव्हिन्शिअल सीरीज, हैद्राबाद स्टेट, पृष्ठ ६०.

मराठवाड्यातील जहागीरदारीचे विश्लेषण व खेड्यांची संख्या खालीलप्रमाणे होती.

जिल्हा	दिवाणी	सर्फ-इ-खास	विविध सवलती असलेल्या जहागिरी	विविध सवलती नसलेल्या जहागिरी	एकूण
औरंगाबाद, जालना	१,४४९	९२	८२	४०३	२,०२६
परभणी, हिंगोली	१,२६५	१५०	१२३	१००	१,८३८
नांदेड	१,१४३	११	११३	१५८	१,४२५
बीड	७९२	८३	४८	१२७	१,०५०
उस्मानाबाद व लातूर	२४३	३७७	२६०	२१	९०१
एकूण	४,८९२	७१३	६२६	८०९	७,०४०

मराठवाड्यातील जहागीरदारीचे विश्लेषण केल्यास हे स्पष्ट होते की, मराठवाड्यात ७०४० खेडी होती त्यापैकी दिवाणी भागात ४,८९२ खेडी तर सर्फ-इ-खास मध्ये ७१३ खेड्यांचा समावेश होता. सर्फ-इ-खास ही निजामाची खाजगी मालमत्ता होती. त्यामुळे हा प्रदेश विकासापासून वंचित राहिला. उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यामध्ये ३७७ खेडी सर्फ-इ-खास खाली होती, तर २४३ खेडी दिवाणीखाली होती. सर्फ-इ-खास मधील उत्पन्नाचा विनियोग हैद्राबाद शहराचा विकास करण्यासाठी केला. त्यामुळे मराठवाड्यातील सर्फ-इ-खास मधील जनतेची उन्नती होऊ शकली नाही. सर्फ-इ-खास मधील जमिनी फार सुपीक, निजामाला भरपूर उत्पन्न मिळत असे. संस्थानातील दिवाणी भागातील खेडी अधिक होती.[१९]

तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्यात हैद्राबाद राज्याचे जमीन महसूलाबाबतचे नियम व कायदे लागू होते. ते मुंबई राज्यातील मुंबई जमीन महसूल अधिनियमावर आधारित होते. याच नियमाना त्यावेळी दस्तूर-अल्-अमल म्हटले जात होते. इ.स.१९०७ पूर्वी प्रशासकीय जमीन महसूल पध्दती कायदेशीरपणे अमलात आलेली नव्हती. इ.स.१९०७ मध्ये हैद्राबाद लँड रेव्हेन्यू ॲक्ट, VIII, (१३१७ फसली) हा जमीन महसुलीसंबंधीचा कायदा लागू करण्यात आला. हा कायदा मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ वर आधारित होता. या कायद्यानुसार जमिनीची दोन गटात विभागणी करण्यात आली होती.

(१) दिवाणी किंवा खालसा जमीन : या जमिनीचे व्यवस्थापन सरकारकडे असल्याने महसूल सरकार जमा होत असे. आणि २) विशिष्ट कारणासाठी या जमिनीवर पूर्ण किंवा कमी दराने महसूल आकारण्यात येत असे अशी जमीन या दुसऱ्या गटातील जमिनीचे दोन प्रकार होते. पहिल्या प्रकारात जमिनी सर्फ-इ-खास ही निजामाची जमीन व दुसऱ्या प्रकारात जागीर व इनाम जमीन होती. सर्फ-इ-खास वरील महसूल १९४९ पर्यंत निजामाच्या तनख्यात जमा होत असे. सर्फ-इ-खास हा प्रकार सर्फ-इ-खास विलीनीकरण अधिनियम, १९४९ अन्वये रद्द करण्यात आला. इनाम व जागीरच्या जमिनीवर महसूल आकारणी केली जाऊ लागली. तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्यातील अदमासे १/३ भाग जागिरीखाली होता. इ.स.१९४९ मध्ये या जागीरी खालसा करून त्याचे व्यवस्थापन हैद्राबाद जागीर अबॉलिशन रेग्युलेशन १९४९ खाली आणले. इनाम जमिनी महसूल मुक्त होत्या. देवस्थाने, मशिद, इतर धार्मिक संस्था व धर्मादाय संस्थांची इनामे सोडून इतर सर्व इनामे (मश्रूतुल खिदमत इनामे सोडून) जमीन सुधारणेच्या निरनिराळ्या अधिनियमाखाली खालसा करण्यात आली. अशा जमिनी आता रयतवारी पध्दतीखाली आल्या.

१९. काटे, पी. व्ही. ; **मराठवाड्याचा इतिहास,** १९९९, पृष्ठे १०९-११२

इनामे ही व्यक्ती किंवा संस्थानी केलेल्या कार्यासाठी आमदनी किंवा मोबदला म्हणून किंवा धर्मादाय दाननिधी म्हणून मानली गेली. तेव्हाच्या हैद्राबाद संस्थानामध्ये इनामे आणि जागिरी अभिहस्तांकित केल्या होत्या. इनाम व जागिरीची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. परिणामत: त्यांच्या चौकशीतून १८६५ ते १९०३ च्या दरम्यान जी इनामे विधिग्राह्य सिध्द झाली ती पुढे चालू ठेवण्यात आली आणि इतर सरकारी मार्गदर्शनाप्रमाणे न्यायप्रविष्ट करण्यात आली. इनामे रद्द करण्याच्या दृष्टिकोनातून इनाम अमलबंजावणी कायदा, १९५२ तयार करण्यात आला. या कायद्याअंतर्गत जी इनामे सेवेखातर दिली जात नव्हती अशी रयतवारीमध्ये बदलून पूर्ण कर लावण्यात आला. हा कायदा हैद्राबाद अबॉलिशन ऑफ इनामस ॲक्ट १९५४ नुसार रद्द करण्यात येऊन या कायद्यानुसार धार्मिक किंवा धर्मादाय कार्य तसेच विशिष्ट शासकीय सेवेसाठी दिलेली इनामे सोडून सर्व इनामे रद्द करण्यात आली. व त्या सर्व जमिनीवर सारा आकारण्यात आला. संस्थानाच्या ३०% पेक्षा जास्त भागामध्ये सहा प्रकारच्या जागिरी होत्या. हैद्राबाद अबॉलिशन ऑफ जागिर रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ अन्वये जागिरी परत घेण्यात आल्या. इनामे आणि जागिरी अबॉलिशन ॲक्टचा परिणाम म्हणून मराठवाडा विभागातील देवस्थान आणि धार्मिक देणगी सोडून कोणाच्याही नावावर जमीनी नव्हत्या. उस्मानाबाद जिल्ह्यात खालील इनाम अबॉलिशन कायदे लागू करण्यात आले होते.

(१) दि हैद्राबाद अबॉलिशन ऑफ कॅश ॲक्ट, १९५२

(२) दि हैद्राबाद अबॉलिशन ऑफ इनाम्स ॲण्ड कॅश ग्रँटस् ॲक्ट, १९५४

(३) दि बॉम्बे इनफेरिअर व्हिलेज वतन अबॉलिशन ॲक्ट, १९५८

(४) दि महाराष्ट्र रेव्हेन्यू पाटील्स ॲक्ट, १९६२.

शेतसारा आकारणी : संस्थानातील इतर जिल्ह्याप्रमाणे मराठवाड्यातील शेतकऱ्याकडून किती शेतसारा वसूल करावयाच्या संबंधी १८५३ पर्यंत कोणतेच बंधन नव्हते. दिवाणी (सरकारी) प्रदेशातही निजाम सरकारने सर्व मुलूख वार्षिक लिलाव पध्दतीने विविध इसमांना देण्यात आलेला होता. जो कोणी सरकारला अधिक रक्कम देईल त्यास "इजारा" (Revenue Farming plan to Amani Talukadari) म्हणजे शेतसारा वसूल करण्याचे गुत्ते मिळत असे. लिलावात तालुके व जिल्हे घेणारे बहुतेक हैद्राबादमध्ये रहात असत व देशमुख, देशपांडे, सरदेशपांडे, मोहरील याच्यामार्फत शेतसारा गोळा करीत असत. इ.स.१८६६ पूर्वी दरवर्षी निरनिराळ्या क्षेत्रात विभागणी केली जाऊन महसुलाच्या वसुलीसाठी कंत्राटे दिली जात व त्या वसूली बद्दल कंत्राटदारांना कमिशन दिले जाई. इ.स.१८६६ मध्ये ही पध्दत जाऊन जिल्ह्यासाठी व तालुक्यासाठी महसूल अधिकारी नेमण्यात आले. मूळ जमीन मोजणी व जमाबंदीचे काम १८८० मध्ये सुरूवात होऊन इ.स.१८८४ मध्ये पूर्ण करण्यात आले. तेव्हापासून जिल्ह्यात रयतवारी पध्दतीला सुरुवात झाली, मूळ साऱ्याच्या दराबाबत ३० वर्षाची हमी देण्यात आली व नंतर पहिल्या फेरपाहणीचे काम पूर्ण करण्यात आले. तथापि अहमदपूर, उद्गीर व निलंगा या तालुक्यांच्या बाबतीत १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर उरलेल्या १५ वर्षाकरीता १२.५ टक्के वाढ द्यावी लागेल ही अट घातली होती. मूळ जमाबंदीच्या वेळी प्रत्येक प्रकाराच्या जमिनीची वर्गवारी वेगवेगळी लक्षात घेऊन त्याप्रमाणे जमिनींची प्रत ठरविण्यात आली होती. मात्र साऱ्याची सर्वसाधारण पातळी ठरविताना प्रत्येक भागातील पावसाची अनिश्चितता, पिकांचे प्रकार, सरासरी उत्पादन, किंमती, खंडाचे प्रमाण, बाजारापासूनचे अंतर, दळणवळणाच्या सोयी आणि इतर तत्सम गोष्टी विचारात घेण्यात आल्या. जमाबंदीच्या कुठल्याही फेरपाहणीच्या वेळी वेगवेगळ्या जमिनीची प्रथमत: केलेली वर्गवारी बदलण्यात आली नाही आणि जमाबंदीच्या

मुदतीत जमीन मालकांनी जमिनीमध्ये सुधारणाचा फायदा कर न आकारता साधारणपणे त्यांना घेऊ देण्यात आला. त्यामुळे जमिनीच्या प्रत्येक तुकड्यामागे साऱ्याचे तुलनात्मक प्रमाण जमाबंदीच्या पहिल्या फेर पहाणीच्या वेळी होते तेवढेच साधारणपणे राहिले आणि दोन जमाबंदीच्या वेळी करण्यात आलेली वाढ सर्व विभागात सारखीच लागू करण्यात आली. या जिल्ह्यातील शेतसारा आकारणी पध्दती स्थूलमानाने महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याप्रमाणेच होती. विहिरी, छोटे पाटबंधारे आणि सरकारी कालव्यांमुळे भिजणाऱ्या जमिनीना पुरवठा केलेल्या पाण्याचा आकार जमीन महसुलात समाविष्ट करण्यात येई.[२०]

कूळ संरक्षण : ज्या पध्दतीखाली वहिवाटदार जमीन धारण करतात त्याला वहिवाटदारी जमीन धारणा पध्दत म्हणतात. या पध्दतीत अप्रतिबंधित व प्रतिबंधित जमीन असे दोन प्रकार आहेत. पैकी पहिल्या प्रकारात जमीन दुसऱ्याकडे हस्तांतरित करण्यास, विकण्यास किंवा गहाण ठेवण्यास प्रतिबंध नाहीत. तर दुसऱ्या प्रकारात अशी बाब फक्त जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीनेच होऊ शकते. सन १९६० पूर्वी मराठवाडा विभागात प्रतिबंधित वहिवाटदारी नव्हती. महाराष्ट्रात इनामदार, मालगुजर, जमीनदार आणि खोत यांच्याकडे जमीन मालकी व शेतसाराविषयक अनेक प्रकारचे हक्क होते. मराठवाड्यात रयतवारी पध्दतीचे प्राबल्य असले तरी इजारा, कौल, इनाम व जागीर सारखी वहिवाटदारीही होती. अप्रतिबंधित वहिवाटदारीमध्ये वर उल्लेखिल्याप्रमाणे जमीन इतरांना हस्तांतरित करता येत असल्यामुळे व अशा जमिनी इनामदार, खोत, जमीनदार वगैरे संपन्न वर्गाकडे असल्यामुळे स्वत: जमीन न कसता कुळांकडून जमीन कसणाऱ्याचा एक वर्ग १९ व्या शतकाच्या अखेरीस निर्माण झाला. हा वर्ग जमिनीचा वापर शेतीऐवजी व्यापारी गुंतवणूक म्हणून करू लागल्याने तो व प्रत्यक्ष जमीन कसणारी कुळे यांच्यातील असंघटितपणा वाढत जाऊन वहिवाटदारी पध्दती निर्माण झाली. यातून जमीनमालकांकडून भाडेतत्वावर जमीन घेऊन कसण्याची स्पर्धा निर्माण झाल्याने पर्यायाने शेतीउत्पन्न कमी होऊन महसुली उत्पन्न कमी होऊ लागले. यातून मार्ग काढण्यासाठी नियोजन मंडळाने कुळांना जमीन मालक बनविण्यासाठी काही तरतुदी सुचविल्या. त्यानुसार सरकारने सरकार व कुळांमधील मध्यस्थ नष्ट करण्यासाठी असलेल्या असामी शिक्मी ॲक्ट, १३५४ फसली, (१९४५) च्या जागी अधिक परिणामकारक असा हैद्राबाद टेनन्सी ॲण्ड ॲग्रिकल्चरल लॅण्डस् ॲक्ट, १९५०, हा कायदा गठीत केला. त्यातूनही अपेक्षित फलनिष्पत्ती न झाल्याने १९५४, १९५७ व १९५९ चे सुधारणा (अमेंडमेंडस्) कायदे करण्यात आले. त्यानुसार जमीन मालकांकडून जमीन मालकी व शेतसाऱ्याचे हक्क काढून घेऊन प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यास (कूळ) ते माफक रक्कम भरपाई म्हणून भरल्यावर बहाल करण्यात आले. या कायद्यांमुळे कसेल त्याची जमीन हे तत्व लागू केल्याने बऱ्याच जमिनी कुळांच्या मालकीच्या झाल्या. शिवाय जमीन मालकांची जमीनधारणाही या कूळ कायद्यांमुळे मर्यादित झाली. परिणामी कृषिविकास सुलभ झाला.

कुळाने द्यावयाच्या खंडाची कमाल मर्यादा निश्चित करणे आणि कुळांना त्यांच्या वहिवाटीसंबंधात सुरक्षितता प्राप्त करून देणे हा कूळविषयक कायदे करण्याचा मुख्य उद्देश होता. मुदत संपल्यावरही कूळवहिवाट रद्द होत नसे, तसेच कायद्याने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा कुळाने द्यावयाचा खंड शेतसाऱ्याच्या तीन ते पाच पटीपेक्षा जास्त असू नये असे बंधनही घालण्यात आले. पुढे सन १९६० मध्ये सरकारने

२०. **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, उस्मानाबाद,** १९६१, पृ. ३ मधून.

भूमिहिनांनाही जमीन देण्याचे धोरण अवलंबिले. त्यानुसार काही तरतुदी सूचवून व त्यात सुधारणा करून त्या १९६० च्या कायद्यात रुपांतरित केल्या. या सुधारणांमुळे मराठवाड्यातील वहिवाटदारी पध्दती ही पश्चिम महाराष्ट्रातील वहिवाटदारी पध्दतीसारखी झाली.

कमाल जमीन धारणा अधिनियमन : व्यक्तिगत जमीनधारणेवर कमाल मर्यादा निश्चित करण्यासाठी शासनाने शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ हा २६ जानेवारी १९६२ पासून महाराष्ट्रात कार्यान्वित केला. त्यानुसार सिंचनाखालील जमिनीचे पाण्याच्या उपलब्धतेनुसार कमाल क्षेत्र १८ ते ४८ एकर असे ठरविण्यात आले. कोरडवाहू जमिनीबाबत राज्याची एकूण सात प्रकारच्या स्थानिक क्षेत्रात विभागणी करून त्या प्रत्येक क्षेत्रासाठी ६६ ते १२६ एकर अशी कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. पुढे ही मर्यादाही कमी करण्याच्या उद्देशाने वरील १९६१ च्या कायद्यात १९७५ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानुसार सुधारित कमाल मर्यादा क्षेत्रासाठी व्यक्तिऐवजी कुटुंब हा बदल समजण्यात येऊन बागायत जमिनीसाठी १८ ते ३५ एकर, तर कोरडवाहू जमिनीच्या बाबतीत निश्चित पावसाच्या क्षेत्रातील भातलागवडीखालील जमिनीकरिता ३६ एकर व इतर जमिनीकरिता ५४ एकर एवढी कमाल मर्यादा ठरविण्यात आली. इ.स. १९६१ चा मूळ कायदा व सन १९७५ चा सुधारित कायदा यान्वये अतिरिक्त जमिनी ताब्यात घेऊन त्या जमीनधारकांना नुकसानभरपाई देण्यात आली.

आदिवासी लोकांच्या अज्ञान व कर्जबाजारीपणामुळे त्यांच्या जमिनी बळकावण्याच्या प्रकारास आळा घालण्यासाठी शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ नुसार काही निर्बंध घालून हे प्रकार न थांबल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि कूळवहिवाट विधी (सुधारणा) अधिनियम, १९७४ तसेच महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित कार्यवाही अधिनियम, १९७४ असे दोन अधिनियम संमत केले, पैकी पहिला अधिनियम दिनांक ६ जुलै १९७४ पासून अमलात आलेला आहे. यात संबंधित कायद्यांच्या तरतुदींचा भंग करून दिनांक ६ जुलै १९७४ पूर्वी आदिवासींच्या मालकीची जमीन बिगर आदिवासींच्या ताब्यात असल्यास ती मूळ आदिवासी मालकाला परत करण्याची तरतूद आहे. अशा जमिनींचे शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय केलेले हस्तांतर बेकायदेशीर ठरविण्यात आले आहे. शेतकऱ्यांना खातेपुस्तिका देण्याचे काम चालू आहे.

सन १९९०-९१ ते २०००-०१ या दोन्ही वर्षी मूळ कायद्यानुसार जिल्ह्यात अतिरिक्त जमिनीचे क्षेत्र २१९७.२९ हेक्टर इतके होते. त्यापैकी १८७९ हेक्टर ४६ आर क्षेत्र शासनाच्या ताब्यात आहे. वरील वर्षामध्ये अतिरिक्त जमिनींपैकी ८७०.३५ हेक्टर क्षेत्र अनुसूचित जाती २१.३६ हेक्टर क्षेत्र अनुसूचित जमाती व ९७८.७५ हेक्टर क्षेत्र इतर भूमिहिनांना वाटण्यात आल्या. असे एकूण १८७९.४६ हेक्टर क्षेत्राचे वाटप करण्यात आले.

गळीत संशोधन केंद्र लातूर[२१] : या केंद्राची स्थापना लातूर येथे सन १९५६ मध्ये झाली असून सुरुवातीच्या काळात फक्त १६ एकर क्षेत्रावर पसऱ्या भुईमुग, तीळ, कारळ व सोयाबीन इत्यादी गळीत पिकांचे चाचणी प्रयोग घेतले जात होते. सन १९७० पासून संशोधनात बरीच चालना मिळून पसऱ्या भुईमुगावर संशोधन करण्याचे मुख्य काम येथे सुरू आहे. संशोधन विस्तारीकरणामध्ये या केंद्रास कृषि विद्यालय, लातूर कडून ६९ एकर जमीन मिळाली असून या केंद्राकडे ८५ एकर जमीन उपलब्ध आहे. या केंद्राच्या

२१. वरील माहिती गळीत धान्ये विशेषतज्ञ, गळीतधान्ये संशोधन केंद्र, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

अधिपत्याखाली अंबाजोगाई जिल्हा बीड येथे एक गळीत धान्ये संशोधन उपकेंद्र कार्यरत असून तेथे ३० एकर क्षेत्र आहे. सन १९८९ मध्ये या केंद्रास भारतीय कृषि अनुसंधान संस्था, नवी दिल्ली याचेकडून अखिल भारतीय समन्वईत गळीत धान्ये संशोधन केंद्र म्हणून मान्यता मिळाली तेव्हापासून येथे सूर्यफूल व भुईमूग या दोन मुख्य पिकांवर संशोधन करण्यासाठी वेगवेगळ्या विषय तज्ज्ञांची नेमणूक करण्यात आली.

या संशोधन केंद्रावर खालीलप्रमाणे वेगवेगळे संशोधन प्रकल्प अस्तित्वात आहेत,—

(१) पसऱ्या भूईमूग पूरक संशोधन प्रकल्प हा सन १९८५ मध्ये सुरू झाला. (२) अखिल भारतीय समन्वईत गळित धान्ये संशोधन प्रकल्प १९८७ मध्ये. (३) गळीत धान्ये पिकाचे मुलभूत बिजोत्पादन प्रकल्प १९९०. (४) संकरित सूर्यफूल संशोधन प्रकल्प, १९९१. येथे सूर्यफूल, भुईमूग, तीळ, कारळ व एरंडी इत्यादी पिकांवर संशोधन केले जाते. तसेच रबी हंगामात जवस व करडई या पिकांवरही संशोधन केले जाते.

(१) भुईमूग : या पिकामध्ये या संशोधन केंद्रातून लातूर नं.३३ आणि १९ हे संशोधन करून पसऱ्या वाण म्हणून प्रसारीत करण्यात आले. एल.जी.एन २ ही वाण खरीप हंगामात निमपसऱ्या म्हणून अखिल भारतीय चाचणी प्रयोगात जास्त उत्पादन देणारी असून याचे खरिपामध्ये हेक्टरी १५ क्विंटल उत्पादन १२५ दिवसांत मिळते. उन्हाळी हंगामात याचे उत्पन्न ३० क्विंटल मिळते. तसेच पी.बी.एन.जी.१८ (आशादायक वाण) ही उन्हाळी हंगामासाठी उत्पादनास सरस असून त्याची उत्पादन क्षमता हेक्टरी २४०० किलो एवढी असून त्याचा कालावधी १२० दिवस आहे.

(२) सूर्यफूल : या संशोधन केंद्राने प्रसारित केलेले एलडीएमआरएसएच-१ आणि ३ हे वाण केवडा घातक रोगास प्रतिबंध करणारे असून उत्पादनही हेक्टरी १५-१६ क्विंटल होते. सुधारीत एलएस-११ हा आशादायक वाण प्रचलित वाण मॉर्डन आणि ई.सी.६८४१४ पेक्षा उत्पादनात सरस आढळून आला असून त्याची हेक्टरी उत्पादन १५०० किलो इतके आहे.

(३) करडई : करडई या पिकात या संशोधन केंद्रावरुन "शारदा" या वाणाची रबी हंगामासाठी शिफारस करण्यात आली आहे. या वाणाचे कोरडवाहू क्षेत्रात १०-१२ क्विंटल प्रति हेक्टरी उत्पादन क्षमता असून पाण्याखालील जमिनीमध्ये हेक्टरी १८ क्विंटल उत्पादन मिळते.

(४) तिळ : ओपीएन-८२-४ या आशादायक वाणाने प्रचलित वाण फुले तिळ-१ पेक्षा जास्त उत्पादन मिळत असून त्याची प्रति हेक्टरी ५-६ क्विंटल उत्पादन क्षमता आहे.

(५) जवस : आर.एल.सी.४ हा वाण दहिया व तांबेरा या रोगास प्रतिकारक असून त्याचे उत्पन्न रबी हंगामात ६-७ क्विंटल प्रती हेक्टरी होते.

कृषि शास्त्र व किटकशास्त्र विभागात झालेल्या संशोधनाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.

(अ) किडींच्या बंदोबस्तासाठी भुईमूग पेरल्यावर न्यूआक्रान ०.०५ % ची पहिली फवारणी पीक उगवल्यावर १५ दिवसानी व दुसरी फवारणी ४५ दिवसांनी केल्यास भुईमुगाचे सर्वाधिक उत्पादन मिळते.

(ब) सुर्यफुलाच्या कणसातील अळीच्या नियंत्रणासाठी (घाटे अळी) एन्डोसल्फॉन ३५% प्रवाही ०.०५ % हे कीटकनाशक प्रभावी आढळून आले असून त्याची शिफारस करण्यात आली आहे.

(क) खरीप हंगामात सूर्यफूल पेरणीस जुलैचा पहिला आठवडा व रबी हंगामात ऑक्टोबरचा पहिला पंधरवडा योग्य आढळून आला आहे. त्याचप्रमाणे प्रति हेक्टरी ६० किलो नत्र दिल्याने अधिक उत्पादन मिळते.

अनुक्रमणिका

दरवर्षी खरीप व रबी हंगामात गळीतधान्ये पिकांचे उत्पादन वाढीसाठी सुधारीत तंत्राची माहिती शेतकऱ्यांना प्रात्येक्षिका तर्फे या केंद्रात तज्ज्ञाव्दारे करून दिली जाते. तसेच शेतकरी मेळावे व चर्चासत्रे घडवून शेतकऱ्यांचे गळीत धान्ये उत्पादन वाढीबाबतचे शंका निरसन करून त्यांना योग्य मार्गदर्शन केले जाते.

सध्या या केंद्रावर विविध विषयाचे तज्ज्ञ शास्त्रज्ञ काम करीत असून त्यांचे हुदे खालीलप्रमाणे आहेत. गळीतधान्य विशेषज्ञ, पैदासकार, कीटकशास्त्रज्ञ, सह कीटकशास्त्रज्ञ, सह वनस्पती विकृती शास्त्रज्ञ, सह कृषि विद्यावेता, इत्यादी अधिकारी येथे काम करतात.

कापूस संशोधन केंद्र सोमनाथपूर (ता.उदगीर) [२२] **:** या उपकेंद्राची स्थापना लातूर येथे मध्यवर्ती कापूस समिती तर्फे सन १९३४ मध्ये करण्यात आली. सन १९५४ पासून कापूस पैदास केंद्र म्हणून वरील समितीने या केंद्रास मान्यता दिली होती. सदर केंद्र सन १९६२ मध्ये सोमनाथपूर ता.उदगीर येथे स्थलांतरीत करण्यात आले, आणि १८ मे १९७२ मध्ये मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत हस्तांतर करण्यात आले. या केंद्रावर कापूस, ज्वार, साळ इत्यादी पिकांवर कापूस संशोधन केंद्र नांदेड व कापूस संशोधन केंद्र परभणीमार्फत चाचणी प्रयोग घेतले जातात. हे उपकेंद्र असल्यामुळे येथील प्रक्षेत्रावर कापूस, ज्वार व साळ यावरील प्रयोगाचे वर्षभरातील निष्कर्ष काढून नांदेड व परभणी येथे पाठविले जातात. या केंद्रावर कापूस या पिकाचे अमेरिकन व देशी कापूस या जातीचे विविध प्रयोग राबविले जातात. वरील पिकांच्या प्रयोगात धाग्यांची लांबी, रुईचे प्रमाण व उत्पादन क्षमता या भागासाठी निष्कर्ष काढले जातात. ज्वारी, साल या पिकांबाबत उत्पादन यासंबंधी विविध निष्कर्ष काढले जाऊन पायाभूत बिजोत्पादनाचा कार्यक्रमसुद्धा राबविण्यात येतो व इतर वाणाचे ट्यूथफूल बियाने तयार केले जाते व हे बियाणे या भागातील गरजू शेतकऱ्याना बि-बियाणे उगवण शक्ती उपलब्ध असल्यावरच विक्री केली जाते.

पशुवैद्यकिय महाविद्यालय उदगीर (स्थापना १९८७) [२३] **:** लातूर जिल्ह्यातील उदगीर या तालुक्याच्या ठिकाणी पशुवैद्यक व पशुविधान महाविद्यालय स्थापण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला व सन १९८७ साली उदगीरला मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत पशुवैद्यक व पशुविद्यान महाविद्यालय सुरू झाले. उदगीर शहरानजीक निडेबन परिसरात १९५२ साली सुरू केलेले " देवणी पशुपैदास प्रक्षेत्र " महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी पशुसंवर्धन विभागाकडून मराठवाडा कृषि विद्यापीठास वर्ग करण्यात आले. पशुवैद्यकीय महाविद्यालयास उदगीर परिसरात ६५० एकर तर अहमदपूर तालुक्यातील सुनेगाव परिसरात १७५ एकर प्रक्षेत्र मिळाले.

पशुवैद्यकीय महाविद्यालयाची शिक्षण, संशोधन आणि विस्तारसेवा अशी प्रमुख तीन उद्दिष्टे आहेत. कृषि, सांख्यिकी व अर्थशास्त्र इत्यादी कृषि-संलग्न विषय विभागाचे महाविद्यालयात कार्य चालू आहे. पशु विस्तार विज्ञान विभागही महाविद्यालयात आहे. या महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ३२ आहे. महाविद्यालयात पदव्युतर शिक्षण कार्यक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव आहे.

---

२२. वरील माहिती सहायक कापूस संशोधन अधिकारी सोमनाथपूर (उदगीर) यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

२३. वरील माहिती सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

या महाविद्यालयात सुसज्ज रोगनिदान प्रयोगशाळा असून लातूर जिल्हा व आसपासच्या परिसरातील पशु उपचार केंद्राकडून आलेल्या रक्त, लघवी, दूध, शेण इत्यादींची प्रयोगशाळेत तपासणी होऊन अहवाल दिला जातो. विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या रोगी जनावरांवर औषधोपचार, शल्यचिकित्सा, गर्भधारणा तपासणी तसेच वंधत्व निवारण करता यावे म्हणून पशुसर्वचिकित्सालय सर्व सोयींनी युक्त करण्यात आले आहे. या सर्व चिकित्सालयात विद्यार्थ्यांना रोगी जनावरांवर उपचार पद्धतीचे शिक्षण व मोफत औषधोपचार शल्यचिकित्सा याद्वारे पशु-विस्तार सेवा दिली जाते. क्ष-किरण तपासणी व कृत्रिम रेतन सुविधा नजीकच्या काळात सुरू होणार आहेत. दररोज तपासणीसाठी येणाऱ्या जनावरांच्या संख्येत वाढ होत आहे.

महाविद्यालयातर्फे उदगीर व परिसरात नियमित पशुचिकित्सा शिबिरे, दुर्गम भागातील पशुधनाची सेवा सुश्रूषा, अत्यावश्यक शल्यचिकित्सा, साथीच्या रोगांसाठी उपाय योजना करण्यासाठी या महाविद्यालयात " फिरते पशुवैद्यकीय पथक " सेवा उपलब्ध आहे.

पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर हे एक शैक्षणिक व संशोधन केंद्र म्हणून नावारूपात आणण्यासाठी व महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनासह संस्था व उदगीरचे नागरीक प्रयत्नशील आहेत.

कृषि महाविद्यालय, लातूर [२४] : लातूर येथे कृषि महाविद्यालय १९८७-८८ मध्ये मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी यांच्या नियंत्रणाखाली सुरू करण्यात आले. या महाविद्यालयाकडे ६६ हेक्टर जमीन असून त्यात महत्त्वाच्या पिकांवर संशोधन केले जाते. या महाविद्यालयात कृषि-रसायन व मृदशास्त्र, उद्यानविद्या, कृषि अभियांत्रिकी, कृषिकिटकशास्त्र, वनस्पतिविकृतीशास्त्र, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र, कृषि अर्थशास्त्र, कृषिविस्तार विभाग व वनस्पतीशास्त्र हे विभाग कार्यरत आहेत.

कृषि संचालक कृषिखात्यातील कृषिग्रामविस्तारकांमधून दरवर्षी ३५ विद्यार्थी ३-१/२ वर्षाच्या प्रतिनियुक्तीवर या महाविद्यालयात पाठवितात, तसेच मराठवाडा कृषि विद्यापीठ दरवर्षी १२ वी विज्ञान परीक्षा उत्तीर्ण झालेले ६४ विद्यार्थी या महाविद्यालयात कृषि पदवीसाठी पाठवितात. येथे वसतिगृहाची सोय उपलब्ध आहे.

या महाविद्यालयातर्फे वेगवेगळ्या पिकांवर संशोधन करण्यात येत असून टोमॅटोच्या देवगिरी वाणावरील फळकुजण्या रोगावरच्या नियंत्रणासाठी नवीन अंतरप्रवाही बुरशी-नाशकांची (५० टक्के पाण्यात विरघळणारी ॲक्रोबॅट) दोन वर्षांची चाचणी पूर्ण केली.

कृषि विद्यालय, लातूर [२५] **:** हे कृषि विद्यालय, लातूर-नांदेड रोडवर लातूर पासून ६ कि.मी.अंतरावर आहे. या विद्यालयाकडे २७.१६ हेक्टर क्षेत्र असून १२.८१ क्षेत्र लागवडीखाली आहे. ८.८३ हे. क्षेत्रावर सामाजिक वनिकरण केले आहे. ३० आर क्षेत्रावर डाळींब, अंजिर, पेरु, कागदी लिंबू, बोरे इत्यादी फळझाडाचे मातृवृक्ष कलमे तयार करण्यासाठी वापरले जाते. तसेच ५.५२ हेक्टर क्षेत्रावर विद्यालयाची इमारत व रस्ते आहेत. शेतीसाठी हंगामी पाण्याची सोय एका विहिरीतून व दोन बोअरवेल द्वारे केली आहे. कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचीही सोय केली आहे.

---

२४. वरील माहिती सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कृषि महाविद्यालय, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

२५. वरील माहिती अधीक्षक, कृषि महाविद्यालय, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

शेतकरी व शेतमजुरांच्या मुलांना कृषि विषयांचे प्रात्यक्षिकाभिमुख शिक्षण देऊन त्याचा शेतीविषयी आत्मविश्वास वाढवणे. त्यामुळे विद्यार्थी स्वत:ची शेती करण्यास प्रवृत्त होतात. सुधारीत तंत्राच्या वापरामुळे उत्पादन वाढविण्यास मदत होते. विद्यार्थ्याकडून गावातील शेतकऱ्यांना शेतीविषयी मार्गदर्शन मिळते. कृषि पदविका धारकास कृषि सहाय्यक, ग्रामसेवक किंवा शेती कामासंबंधीच्या इतर योजनेत सेवा करता येते. कृषि विद्यालयात प्रत्येक वर्षी शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ६० विद्यार्थांना गुणानुक्रमे दोन वर्षासाठी प्रवेश दिला जातो. ५० विद्यार्थांना प्रती महा १०० रुपये विद्यावेतन दिले जाते. १० विद्यार्थांना विनाविद्यावेतनधारक म्हणून प्रवेश दिला जातो. तसेच अनूसुचित जाती, अनूसुचित जमाती, भटक्या विमुक्त जातीच्या विद्यार्थांना जिल्हा समाजकल्याण अधिकारी व विभागीय अदिवासी विकास अधिकारी यांच्याकडून भारत सरकारची शिष्यवृत्ती दिली जाते. कृषि विद्यालयाच्या परिसरात १२० विद्यार्थांना सर्व सोयीयुक्त वसतिगृहाची मोफत सोय आहे. या कृषि विद्यालयामध्ये उच्चशिक्षीत प्राध्यापक वर्ग आहे.

या विद्यालयात खालील विषय शिकविले जातात. जमीनव्यवस्थापन (सॉईल मॅनेजमेंट) यामध्ये शेतीच्या मशागतीसाठी लागणाऱ्या सुधारीत अवजारांचा अभ्यास, अधिक उत्पादन वाढीसाठी जमीन-पाणी यांचे नियोजन व व्यवस्थापन यासंबंधी माहिती दिली जाते. पीक-संवर्धन (क्रॉप हजंबंड्री) यामध्ये पीक लागवडीच्या आधुनिक पद्धती, पिकांच्या सुधारीत जाती, खते, बियाणे याविषयी माहिती दिली जाते. उद्यान विद्या (हॉर्टीकल्चर) या मध्ये फळझाडे, भाजीपाला, फुलझाडे, शोभेची झाडे, यांच्या लागवडी संबंधी माहिती दिली जाते. तसेच फळे व भाजीपाला टिकविण्याच्या आधुनिक पध्दती प्रात्यक्षिकेव्दारे शिकविले जाते. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (ॲनिमल हंजबंड्री आणि डेअरी सायन्स) व्दारे देशी, विदेशी गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या, वराह पालनविषयी माहिती दिली जाते, तसेच दुध व दुधापासून तयार होणारे पदार्थ शिकविले जातात. तसेच दुग्धजन्य पदार्थ टिकवून ठेवण्याच्या पध्दती शिकविल्या जातात. पीक संरक्षण (प्लॅन्ट प्रोटेक्शन) व्दारे पिके, भाजीपाला, फुलझाडे यावर पडणारी किड व रोगांचे नियंत्रण, रेशीम उद्योग, मधुमक्षीका पालन या बाबत माहिती दिली जाते. सहकार व कृषि बाजार माल व्यवस्था (को-ऑपरेशन व ॲग्रीकल्चरल मार्केटिंग) व्दारे सहकारी शेती, उद्योग, वखार महामंडळ, बँकेचे शेतीक्षेत्राशी असलेले महत्त्व व शेतीमाल बाजार व्यवस्था या संबंधी माहिती दिली जाते. ग्रामीण-समाज-शास्त्र (रुरल सोशिऑलॉजी) व्दारे ग्रामीण समाजाचा अभ्यास, कृषि विषयक सुधारणा कायदे इत्यादी संबंधी माहिती दिली जाते. कृषि विस्तार (ॲग्रीकल्चरल इक्सटेंशन) व्दारे कृषि संशोधन केंद्रावर विकसीत होणाऱ्या आधुनिक शेती तंत्राची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहचविणे व या तंत्राच्या उपयुक्तेबाबत शेतकऱ्यांना खात्री करून देणे त्यासाठी आवश्यक कृषि विस्तार शिक्षण दिले जाते.

शासकीय योजना [२६]

केंद्र पुरस्कृत ऊस विकास कार्यक्रम : लातूर जिल्ह्यात केंद्र पुरस्कृत ऊस विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत २००४-०५ मध्ये ऊसाखाली क्षेत्र १३,९०० हेक्टर असून उत्पादन ५,५६,००० टन व दर हेक्टरी सरासरी उत्पन्न ४८ मे. टन होते. ऊस विकास कार्यक्रमाचे उद्दिष्ट ऊसाचे प्रती हेक्टरी उत्पादन वाढवून त्यासाठी येणारा खर्च कमी करणे हा आहे. त्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा प्रचार, प्रात्यक्षिके, जमीन सुधारणा कार्यक्रम, सुधारित बियाणे, शेतकरी आणि कर्मचारी प्रशिक्षण, पीक संरक्षण या महत्वाच्या बाबी कार्यक्रमांत अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत. या योजनेसाठी २००४-०५ मध्ये केंद्र शासनाकडून १२१.१३ हजार रुपये तर राज्य शासनाकडून ३८.३१ हजार रुपये अनुदान मिळाले.

२६. वरील वेगवेगळ्या योजनाची माहिती कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद लातूर व कृषि विभाग, कृषि उत्पादन कार्यक्रम सन २००५-०६ विभागीय आढावा बैठक औरंगाबाद महसूल विभाग अहवालातून घेतली आहे.

या योजनेसाठी केलेली तरतूद व प्रत्यक्ष खर्च याची माहिती खाली दिली आहे :—

वर्षे	प्राप्त तरतूद रुपये	खर्च रुपये
१९९९-२०००	५,४१,७६०	५,४१,१९३
२०००-२००१	२,०२,५००	१,९२,१२३
२००१-२००२ अभिकरण योजना	३३,०००	३२,५१३
२००२-२००३ अभिकरण योजना	१,८०,०००	१,३७,१५५
२००३-२००४ अभिकरण योजना	२,१९,०००	२,१६,०२९

केंद्र पुरस्कृत कडधान्य विकास कार्यक्रम : जिल्ह्यातील कडधान्याचे क्षेत्र सन २००४-०५ मध्ये १,५५,२०० हेक्टर असून सरासरी दर हेक्टरी उत्पादकता वाढविण्यासाठी प्रात्यक्षिके व शेतकरी प्रशिक्षण, शेतीशाळा, जैविक प्रात्यक्षिके, गट प्रात्यक्षिके घेण्यात येतात. मार्च २००५ अखेर जैविक खते, शेती औजारे, तणनाशके, जिप्सम, तुषार सिंचन, एचडीपीई पाईप व अभिकरण या सर्व बाबी व कृषिविकास अधिकारी स्तर यावर केंद्र शासनाद्वारे २५१.५६ हजार रुपये तर राज्य शासनाव्दारे ८१.८६ हजार रुपये अनुदान प्राप्त झाले. कडधान्य विकास कार्यक्रम अंतर्गत तूर, शेंगा, पोखरणारी अळी, नियंत्रणाखाली एडोसल्फान ३५, ईसी ४८० लिटर रुपये १.०८ लाख एवढ्या किंमतीची किटकनाशके पंचायत समिती स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

या योजनेसाठी प्राप्त अनुदान व खर्च याची माहिती खाली दिली आहे :—

वर्षे	प्राप्त तरतूद रुपये	खर्च रुपये
१९९९-२०००	५,६८,९६०	४,०८,६८७
२०००-२००१	५,३६,२४०	५,०८,५४३
२००१-२००२	६,०१,२४०	५,९२,५१४
२००२-२००३	१,६६,२७०	१,९५,२०७
२००३-२००४	१,०८,६००	१,०८,६००

केंद्र पुरस्कृत गळीत धान्य विकास कार्यक्रम : या पिकाखाली सन २००४-०५ मध्ये २,६७,५०० हेक्टर क्षेत्र होते. पीकाचे सरासरी उत्पन्न वाढविण्यासाठी प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, बिजोत्पादन क्षेत्रीय शेतीशाळा, एकात्मिक कीड व्यवस्थापन, शेतकरी प्रशिक्षण, प्रमाणित बियाणे, बियाणे मिनिकिट तसेच पीक संरक्षण औषधे, जैविक खते, सुधारित शेती औजारे, पीक संरक्षक औजारे, हस्तचलित, यंत्रचलित तसेच तणनाशके, जिप्सम, तुषार सिंचन एचडीपीई पाईप व अभिकरण इत्यादींसाठी केंद्र व राज्य शासनाचे अनुदान देय आहे. त्यामध्ये ७५ टक्के केंद्र व २५ टक्के राज्य शासनाचे अनुदान असते. इ. स. २००१-०२ पासून जिल्ह्यात सोयाबीन पिकाखालील क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. मार्च २००५ अखेर जिल्ह्यात केंद्र शासनाकडून १६०२.४७ हजार रुपये तर राज्य शासनाकडून ५०४.४२ हजार रुपये अनुदान प्राप्त झाले.

या योजनेसाठी प्राप्त अनुदान व खर्च याची माहिती खाली दिली आहे :—

वर्षे	प्राप्त तरतूद रुपये	खर्च रुपये
१९९९-२०००	४०,१०,३६०	३५,९४,०६२
२०००-२००१	१३,९६,९१०	१३,६९,७४४
२००१-२००२	२३,५९,४००	२३,०६,१२०
२००२-२००३	३,११,६००	३,०४,७०९
२००३-२००४	९,१२,४९२	९,१२,४९२

केंद्र पुरस्कृत सधन कापूस विकास कार्यक्रम : प्रामुख्याने अहमदपूर, उदगीर, जळकोट, रेणापूर या तालुक्यांमध्ये कापसाचे पीक घेतले जाते. सन २००४-०५ मध्ये या पिकाखाली ११,८०० हेक्टर क्षेत्र होते. कापसाचे उत्पादन वाढविण्यासाठी या योजने अंतर्गत कापसाचे उत्पादन वाढविण्यासाठी तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, शेतकरी प्रशिक्षण, सव्हेलन्स फेरोमन, आयपीएस प्रात्यक्षिके, प्रमाणित बियाणे पीक संरक्षण औजारे तुषार सिंचन इत्यादी बाबी शेतकऱ्यांना पुरविण्यात येतात. माहे मार्च २००५ अखेर या योजनेसाठी केंद्र शासनाकडून १९३.१६ हजार व राज्य शासनाकडून ६४.३९ हजार रुपये अनुदान मिळाले.

या योजनेखाली प्राप्त झालेले अनुदान व खर्च याची माहिती खाली दिली आहे :—

वर्षे	प्राप्त तरतूद रुपये	खर्च रुपये
१९९९-२०००	११,८६,४००	११,१७,६५९
२०००-२००१	२,४८,०००	२,००,५४०
२००१-२००२	२१,८०,०००	२१,४८,७२९
२००२-२००३	६२,२५०	५२,९६३
२००३-२००४	२,२४,०००	२,५३,०४०

केंद्र पुरस्कृत तृणधान्य विकास योजना :— या पिकाखाली जिल्ह्यात २००४-०५ मध्ये १,९३,७०० हेक्टर क्षेत्र होते. या योजनेनुसार दरडोई तृणधान्याची आवश्यकता ४३५ ग्रॅम इतकी असून ती भरुन काढण्यासाठी प्रति हेक्टरी उत्पन्न वाढविण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेव्दारे पीक प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, उत्कृष्ट बियाणे, मनुष्यबळ विकास, शेतकऱ्यांच्या क्षेत्रीय शेतीशाळा, जैविक किटकनाशके, जैविक हिरवळीच्या खतांचा वापर, एकात्मिक कीड व्यवस्थापन, क्षेत्रीय भेटी इत्यादी बाबी राबविण्यात येतात. इ.स.२००४-०५ मध्ये जिल्ह्यात तृणधान्य वाढीसाठी १४६ प्रात्यक्षिके झाली व त्यासाठी २,९२,००० इतके रुपये खर्च झाले.

राष्ट्रीय कृषि विमा योजना २००४-०५ : या योजनेनुसार खरीप हंगामातील पीकासाठी जिल्ह्यातील १,२६,३९८ शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यात आले. तर ४,२४,८६० बिगर कर्जदार सभासद होते. या दोन्ही सभासदांची संख्या ५,५१,२५८ इतकी होती. या दोन्हीची विमा संरक्षित रक्कम २०,२६२ हजार रुपये होती. त्यामध्ये विमा संरक्षित रक्कम ४३८०.२२ हजार होती तर बिगर कर्जदार सभासद रक्कम १५,८८१.७८ हजार रुपये होती.

कृषि क्षेत्रात महिलांचा सहभाग : ही योजना केंद्र पुरस्कृत असून २००३-०४ पासून जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात प्रथम राबविण्यास सुरुवात झाली. इ.स.२००५ मध्ये ही योजना औसा तालुक्यात सुरू करण्यात आली. ही योजना शेती करणाऱ्या महिलांना अत्याधुनिक प्रगत तंत्रज्ञान अवगत व्हावे व शेती उत्पादनात जास्तीत जास्त वाढ व्हावी या उद्देशाने राबविण्यात आली. ही योजना कृषि खात्यामार्फत सुरू असून त्यामध्ये स्वयंरोजगार निर्मितीस प्राधान्य देण्यात येते. इ.स.२००४-०५ मध्ये या योजनेअंतर्गत ६५ महिला संघटन गट स्थापन करण्यात येऊन त्यावर ३,२५,००० रुपये खर्च झाले.

बायोगॅस योजना : या योजनेनुसार अत्यल्प, महिला, भूमिहीन शेतमजुरासाठी प्रती संयंत्र ३५०० रुपये व इतर लाभधारकांना २७०० रुपये अनुदान दिले जाते. तसेच शौचालय जोडलेल्या संयंत्रास ५०० रुपये अतिरिक्त अनुदान दिले जाते. इ.स. १९८५-८६ ते २००३-०४ पर्यत जिल्ह्यातील बायोगॅस संबंधीची माहिती खाली दिली आहे :—

वर्ष	लक्ष्य	साध्य	टक्केवारी
१९८५-८६	१,२००	१,३०८	१०९
१९९०-९१	६००	६०२	१००.३
१९९५-९६	२५०	२७५	११०
१९९६-९७	२५०	२५१	१००.४
१९९९-२०००	३००	३००	१००
२०००-२००१	३००	३००	१००
२००३-२००४	२५०	२५३	१०१

विशेष घटक योजना : या योजनेव्दारे दारिद्र्य रेषेखालील शेतकऱ्यांना नवीन विहीर या जुनी विहीर, बैलजोडी, औजारे इत्यादीसाठी आर्थिक मदत दिली जाते. नवीन विहीरीसाठी ५० हजार रुपयापर्यंत तर जुनी विहीर दुरुस्तीसाठी ३० हजार रुपयापर्यंत अनुदान दिले जाते. ही योजना राज्यपुरस्कृत असून २००३-०४ मध्ये ३०९ नवीन विहीरी, १९ जुन्या विहीरी, ३८७ शेतकऱ्यांना सुधारित औजारेसाठी व २५ शेतकऱ्यांना बैलजोडीसाठी अनुक्रमे ५९,६२,२८८ रुपये,व ७६,००० रुपये, १६,६४,१०० रुपये व १,१२,५०० रुपये दिले.

इ.स.१९९९ ते २००३-०४ पर्यतची आकडेवारी खाली दिली आहे :—

वर्षे	तरतूद रुपये	खर्च रुपये
१९९९-२०००	१,११,६६,१००	१,१८,७५,१६४
२०००-२००१	९१,८८,०००	१०,४५,७७०
२००१-२००२	६८,१२,०००	६८,०५,३७६
२००२-२००३	१,३३,३६,०००	१,३४,०३,५०९
२००३-२००४	१,०७,९३,०००	१,०७,९४,६९३

जनजाती क्षेत्राबाहेरील आदिवासी उप योजना : या योजने अंतर्गत आदिवासी, अनुसुचित जाती, नवबौध्द शेतकरी, अनुसूचित जमाती, तेथील दारिद्र्य रेषेखालील शेतकऱ्यांना या योजनेनुसार नवीन विहिरीसाठी ५०,००० रुपये तर जुनी विहिर दुरुस्तीसाठी ३०,००० रुपये अनुदान दिले जाते. शेतकऱ्यांना नवीन विहीरी खोदणे, जुन्या विहिरी दुरुस्ती, पाईप लाईन, बैलजोडी, बैलगाडी, सुधारित शेती औजारे, विद्युत पंप इत्यादींसाठी आर्थिक मदत केली जाते. सन २०००-०१ मध्ये या योजनेअंतर्गत २१,६०,००० रुपये मंजूर अनुदान होते. त्यापैकी शेती औजारेसाठी ३५,१५४ रुपये, पीक संरक्षण औजारेसाठी २,७८,३०० रुपये, विद्युत पंपासाठी १,९६,९५६ रुपये व नवीन विहीरीसाठी १,८७,७७६ रुपये खर्च करण्यात आले,या योजनेसाठी २००३-०४ केंद्रशासनाकडून १६,००,००० रुपये तर राज्य शासनाकडून ५,२२,००० रुपयाचे वाटप करण्यात आले.

पीक स्पर्धा योजना : या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांमध्ये पीक स्पर्धा आयोजित करून त्यांना कृषिभूषण व शेतीनिष्ठ हा सन्मान दिला जातो. सन २०००-०१ मध्ये जिल्ह्यातील ८८ शेतकऱ्यांनी भात, खरीप ज्वारी, बाजरी, भुईमूग, तूर, मूग, उडीद, तसेच खरीप सूर्यफुल, रबी ज्वारी, गहू, हरभरा, करडई, ऊस, तीळ इ. पीक स्पर्धेत भाग घेतला होता. इ.स. २००३-०४ मध्येही तालुकास्तर, जिल्हास्तर, राज्यस्तर पीक स्पर्धांमध्ये शेतकऱ्यांनी भाग घेऊन उत्तम प्रतिसाद दिला.

कृषि निविष्ठा व्यवस्थापन : पीक उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच शेतकऱ्यांना बियाणे, खते, किटकनाशके आदी निविष्ठा वेळेवर तसेच दर्जेदार स्वरूपात उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे आहे. या दृष्टीने मराठवाड्यातील जिल्ह्यांसाठी मार्च, २००५ अखेर एकूण कृषि निविष्ठा विक्री केंद्रे २३,२१३ होती. त्यापैकी लातूर जिल्ह्यात १,८८१ कृषि निविष्ठ विक्री केंद्रे होती. बियाणे व खते विक्रीत गैरप्रकार होऊ नयेत व कोणत्याही वाणाची टंचाई भासू नये यासाठी विभागात, फिरती पथके स्थापन करण्यात आली. निविष्ठाची उपलब्धता, त्याची गुणवत्ता व किंमत यावर नियंत्रण ठेवण्याचे काम पथकामार्फत केले जाते.

राष्ट्रीय कृषि विमा योजना : राष्ट्रीय कृषि विमा योजना महाराष्ट्र राज्यासाठी रबी हंगाम १९९९ पासून शासनाने लागू केली आहे. पूर्वीच्या सर्वंकष पिक विमा योजनेमध्ये असलेल्या उणिवांमध्ये सुधारणा करून नवीन राष्ट्रीय कृषि विमा योजना अंमलात आणली आहे. इ.स.२००१ मध्ये या योजनेअंर्तगत जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना ६४७४.८४ लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात आली. इ.स.२००४-०५ मध्ये खरीप व रबी हंगामात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांची संख्या व विमा संरक्षित रक्कम खाली दिली आहे.

तपशील	क्षेत्र हेक्टर	सहभागी शेतकरी	विमा संरक्षित रक्कम रुपये	विमा हप्ता रक्कम (लाखात)
कर्जदार शेतकरी	९३,००१	१,४९,४५३	५५५०.७५	१७३.२९
बिगर कर्जदार शेतकरी	२,२१,९०४	४,४९,१४६	१६,९५८.२३	६१४.०४

अनुक्रमणिका

पत पुरवठा : सन २००४ मध्ये जिल्ह्यात ५८२ कृषि पतपुरवठा सहकारी संस्था होत्या. त्यांनी खरीप पीकासाठी ६१.८१ कोटी रुपये कर्ज वाटप केले .

महाराष्ट्र कृषि तंत्रज्ञान प्रचार व प्रसार प्रकल्प : महाराष्ट्र कृषि व तंत्रज्ञान व प्रचार प्रकल्पातर्गत महाराष्ट्र कृषि व फलोत्पादन माहिती व तंत्रज्ञान अभियानाद्वारे २००४-०५ मध्ये जिल्ह्यात २७,३२८ कृषि सैनिकांची नियुक्ती केली. याच वर्षी उती संवर्धनावर आधारित ऊस विकास प्रकल्पातर्गत चांगल्या प्रतीचे बेणे तयार करणारे ५ कारखाने सुरू होते व उत्पादित बेणे वापरून २७ हेक्टर जमिनीवर ऊसाची लागवड केली, तसेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती देणे, पीकांचे रोगनिदान केंद्र, पिकांबाबत सल्ला केंद्र व शेतकरी प्रशिक्षण केंद्र या सुविधा तीन चिकित्सालयाद्वारे पुरविण्यात आल्या. याच वर्षी कमी किंमतीची ५ हरितगृहे उभारण्यात आली.

या शिवाय जिल्ह्यात (२०००-०१ ते २००४-०५ मध्ये) केंद्र पुरस्कृत फलोत्पादन योजनेअंतर्गत औषधी व सुंगधी वनस्पती विकास, मसाला पीक विकास, पुष्पोत्पादन विकास, भाजीपाला विकास, एकात्मिक फळांचा विकास, कृषि संपर्क कार्यक्रम व केंद्र पुरस्कृत ठिबक योजना सुरू होत्या. त्या योजनांची सन २०००-०१ व २००४-०५ या वर्षाची माहिती खाली दिली आहे.

(रुपये लाखात)

योजनेचे नाव	(२०००-०१) लक्षांक		साध्य		(२००४-०५) लक्षांक		साध्य	
	भौतिक	आर्थिक	भौतिक	आर्थिक	भौतिक	आर्थिक	भौतिक	आर्थिक
१. भाजीपाल विकास	१	०.०१५	१	०.०१५	४३७	२.९९	४३७	२.९८
२. पुष्पोत्पादन विकास	७	०.७७	७	०.७७	१५८	३.०२५	१५८	३.०२५
३. फळांचा एकात्मिक विकास	७	१.२०	७	१.२०	६०८	४.६८	६०८	४.६९
४. ग्रामीण भागात पौष्टीक फळबाग	१४००	०.३५	१४००	०.३५	-	-	-	-
५. औषधी व सुंगधी वनस्पती विकास	-	-	-	-	१६६	२.५२५	१६१	२.५२
६. मसाला पीक विकास	-	-	-	-	१३०	१.३६	१३०	१.३६
७. ठिबक/तुषार विकास	१५३९	१९७.९२	१२९८.७९	१६३.८४	४४	५.७६	७७	५.७७

तक्ता क्रमांक १

लातूर जिल्ह्यातील काही मृदांची रासायनिक वैशिष्ट्ये

ठिकाण	पीएचमूल्य		ई.सी		ऑर्गनीक कॉर्बन		किलो ग्रॅ/हे.		किलो ग्रॅ/हे.	
	श्रेणी	सरासरी	श्रेणी	सरासरी	श्रेणी	सरासरी	श्रेणी	सरासरी	श्रेणी	सरासरी
लातुर	७.६२-८.३४	७.९८	०.१९-०५२	०.३५५	०.३-६.००	३.१५	०.०५-२२३.६१	१११.८३	८.४०-४४.४०	२६०४
जळकोट ४४.६१	७.१-८.५	७.८	०.१०-०६८	०.३९	०.१४-६६.००		३३.०७०.०८-०.२८		०.१८ ९.२३	

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक २

लातूर जिल्ह्यातील मृदेची पार्श्वरेखा

(कंसातील आकडे इंगामध्ये आहेत)

								रासायनिक विश्लेषण							
समस्तर होरीजॉन	जाडी मि.मि.	वर्ष	पोत स्ट्रक्चर	संरचना स्ट्रक्चर	सम सहिता कारसी-स्टंरसी	संकिर्ण करकरीत मुळ्या, ओलावा इत्यादी	नमुना दाखल खोली मि.मि.	कॅल्शीयम कार्बोनेट	सेंद्रिय घटक	ओलावा	जाडी करडी वाळू	तलम वाळू	गाळ	चिकण माती	पी.एच मूल्य	एकूण द्रवनशील क्षार टक्क्यां मध्ये
खोल मृदा १	२१.० (७.७८)	करडी	चिकण	काळी	कठीण	दोन फुटा पर्यंत शुल्क मुळ्या	२.०० (७.८७)	३५३	०.६६	६.१	३.१८	१३.५२	३३.१५	४४.७४	७.८५	०.३१
२	९८० (७.०८)	फिकट पिवळा	चिकण	अनिय मित	सैल	ओलसर	१.८० (७.८७	४४२	०.६६	५.२६	५	१६.०५	३१.५७	४४.७३	७.७२	०.३२
मध्यम खोल मृदा १	२०० (८.२६)	करडी	चिकण	काळी	कठीण	दोन फुटा पर्यंत शुल्क मुळ्या	२.१ (८.२६)	३८४	१.२	५.८२	६.३५	८.४७	३१.७४	५०.२६	६०.७८	०.२५
२	९८० (७.०८)	राखाडी	चिकण	काळी	कठीण	ओलसर	१.८ (७.०८)	४०३	१.५	७.८२	३.७७	८.५६	३५.०४	५२.५६	७.८५	०.४८
३	२९० (८.२६)	राखाडी	चिकण	काळी	थोडी कठीण	थोडा ओलासर	२.१ (८.२६)	३८४	०.७५	६.६७	१६.८	१०.१३	२६.६६	४४	७.८९	०.४७
४	१९० (७.४८)	करडी मिश्रित	वाळू मिश्रित	अनिय मित	सैल	ओलसर	१.९ (७.४८)	४९२	१.८	५.२६	८.१६	१०.७८	३०.२६	४८.६८	८.०९	०.४२

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक ३

तालुकानिहाय जमीन प्रकार क्षेत्र व प्रमाण २००४-०५

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

तालुका	हलकी मुरमाड जमीन		मध्यम काळी जमीन		खोल काळी जमीन	
	क्षेत्र	टक्केवारी	क्षेत्र	टक्केवारी	क्षेत्र	टक्केवारी
लातूर . .	२१,८२४	३६	७,४९२	१२	२७,८२१	४५
रेणापूर . .	५,४९९	२१	३,६१२	१४	१६,१७९	६२
औसा . .	३७,४५४	४४	११,९७०	१४	३२,०८१	३८
निलंगा . .	४१,८९८	४२	१७,६४५	१८	३७,११४	३७
उदगीर . .	२४,३४७	४२	१४,७३१	२५	१७,६०४	३०
अहमदपूर . .	४,०६१	६२	१,९४८	३०	३५५	५
चाकूर . .	४,३२३	४१	१,८४६	१८	३,९००	३७
जिल्हा एकूण . .	१,३९,४०६	४०	५९,२४४	१७	१,३५,०५४	३९

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक ४

जिल्ह्यातील जमिनीचे उपयोजन

(आकडे ' ०० ' हेक्टरमध्ये)

अ. क्र.	वर्गीकरण	१९८२-८३	१९८५-८६	१९९०-९१	१९९५-९६	२००४-०५
१	एकूण भौगौलिक क्षेत्र . .	६,६७४	६,६७४	६,६७४	७,१५७	७,१६०
२	जंगलव्याप्त क्षेत्र . .	८	३	६	३५	३,४६
३	बिगर वापराखालील असलेली जमीन . .	१३१	१७०	१३३	१८२	१८०
४	नापीक व लागवडीखाली नसलेली जमीन . .	७३	११५	९५	१०२	१८०
५	कायम गुरे चरणे व इतर कुरणे . .	१८७	१३९	१२७	१५९	१६०
६	झाडेझुडपाखालील जमीन व आंबराया . .	७५	१७	२०	२७	३०
७	लागवडीलायक पड . .	२९२	१९८	१११	२०९	२५०
८	चालू पड . .	३२४	२०६	२८७	५००	२३०
९	इतर पड . .	५४७	३०३	२४७	२५२	२४०
१०	लागवडीखालील निव्वळ क्षेत्र . .	५,०३७	५,५२३	५,६४८	५,६९१	५,९७०
११	एकापेक्षा अधिक वेळा लागवड केलेले क्षेत्र . .	१,०८९	१,४२२	१,५५८	१,१९०	९९०
१२	लागवडीखालील एकूण क्षेत्र . .	६,१२६	६,९२५	७,२०६	६,८८१	६,०९६

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक ५

मृद संधारण योजनाअंतर्गत सन १९९५-९६ ते २००४-०५ पर्यंत जिल्ह्यात झालेल्या कामाचा तपशील

(आकडे ' ०० ' हेक्टरमध्ये)

	१९९५-१९९६			१९९६-१९९७			१९९७-१९९८			१९९८-१९९९			१९९९-२०००			२०००-२००१		
	लक्ष्य	साध्य	खर्च	लक्ष्य	साध्य	खर्च	लक्ष्य	साध्य	खर्च	लक्ष्य	साध्य	खर्च	लक्ष्य	साध्य	खर्च	लक्ष्य	साध्य	खर्च
सलग समतळ चर (हे.)	२५००	३१३७	६७.५२	२५४३	२	०.४६	१२५०	७८५	२८.४४	१४६०	५९४	३७.९६	१०००	३०२	२३.९६	१०००	३१०	११.०५
समपातळी/ढाळीचे बांध	४०७०	३१७७	४.३१	३४८८	३९	०.६७	५३	५१	१.०४	२१००	२२२	३.५१	१४००	९८९	११.५९	१४००	८०३	२२.६२
वुश वुड डॅम	. .	. .	. .	९०	१०	०.०१	६००	३६१	०.४१	७००	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
लाईव्ह चेक डॅम	. .	. .	. .	. .	. .	. .	३१०	२४२	०.४४	४००	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
लुज बोल्डर स्ट्रक्चर	३९७१	५९८	१६.६७	३५००	८३	१.७७	२३००	८७२	१०.२८	३३००	९२१	१७.४१	२८००	१३०	३.५०	२८००	१७८	३.८४
अर्दन स्ट्रक्चर	२५२१	५१८	९.०७	१७९४	२९९	३.८२	५०००	१६७१	१५.७६	६५००	१३९६	१६.९७	४०००	२१०	२.४७	४०००	३८९	४.६४
गॅबियन स्ट्रक्चर	३०	. .	. .	२५	१	०.०३	४९	. .	. .	७०	२	०.१६	३	. .	. .	३	. .	. .
मातीनाला बांध	४६९	६६	३७५.९९	४६८	९८	६०.७०	१६७	१७५	१९९.३२	२७७	३९	१८२.३१	२५३	९६	१९२.९२	२७४	१२६	१५३.४२
सिमेंट नाला बांध	३४९	३२२	३३४.२१	३८५	१७९	२४५.८०	१८२	९८३	२७७.१४	२००	४९	१०५.३९	१७५	१११	२४७.४८	१८०	९६	१११.६५
भुमीगत बंधारे	८५	२३	७.२९	९०	१३	५.१३	४८	१०	३.३०	३०	७	२.४८	२५	१२	५.०३	२५	९	४.५७
शेततळे	५०	१	०.०८	२४	१	०.४५	७५	६	०.९६	७०	२८	५.१४	१११	४	१.०८	१११	२	०.५१
नाला सरळीकरण	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
कच्चे बंधारे	. .	. .	९	०.२१	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
वनीकरण	. .	. .	९७	०.८०	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
पुनर्भरण चर	. .	. .	२०	४.२६	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
खोदतळे	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	१००	६	१.२३	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
एकूण	. .	. .	८२०.४१	. .	. .	३१८.८४	. .	. .	४६८.३२	. .	. .	३७१.७३	. .	. .	४९६.०३	. .	. .	३१६.३४

अनुक्रमणिका

MaharashtraGazetteers

मृद संधारण योजना अंतर्गत सन १९९५-९६ ते २००४-०५ पर्यंत जिल्ह्यात झालेल्या कामाचा तपशिल

(आकडे ' ०० ' हेक्टरमध्ये)

	२००१-२००२			२००२-२००३			२००३-२००४			२००४-०५		
	लक्ष्य	साध्य	खर्च	लक्ष्य	साध्य	खर्च	लक्ष्य	साध्य	खर्च	लक्ष्य	साध्य	खर्च
सलग समतळ चर (हे.) . .	५६०	८१४	५७.५८	६००	१०१०	५९.९५	११३१	२३४७	१८३.६६	१२३१	२१५१	१६४.३४
समपातळी/ढाळीचे बांध . .	११२०	८४६	२६.७२	१५००	३३८२	११०.६७	१५००	२३,५८९	८२४.७१	५०००	४६,१५६	१४२८.५२
बुश वुड डॅम . .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
लाईव्ह चेक डॅम . .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
लुज बोल्डर स्ट्रक्चर . .	८१०	७२०	१७.०७	८००	११९१	२६.३९	२९२४	२३८८	५२.१५	१०००	२४२३	६९.८१
अर्दन स्ट्रक्चर . .	१३००	६६५	९.०८	१५४०	५६७	५.७७	१५३०	२४२४	२९.२८	१५००	२२०६	२७.४८
गॅबियन स्ट्रक्चर . .	. .	. .	. .	. .	१	०.०९	. .	. .	. .	१०	. .	. .
मातीनाला बांध . .	२८७	२३६	३५७.३०	१६५	४७६	५४३.८३	२८६	४६०	८६३.५४	४६०	३८९	६९४.९५
सिमेंट नाला बांध . .	७०	८४	१४३.१२	७०	२१८	२१७.९५	१२९	५९	९४.९९	८८	७७	९६.८८
भूमीगत बंधारे . .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
शेततळे . .	२५	२	०.२६	१००	२९	५.६९	३११	९८३	२९६.५२	१०००	९७२	३३६.३८
नाला सरळीकरण . .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	९	२०.९९	. .	२०	६८.१५
कच्चे बंधारे . .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
वनीकरण . .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
पुनर्भरण चर . .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
खोदतळे . .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
एकूण . .	. .	. .	६११.१३	. .	. .	९७०.३४	. .	. .	२३६४.२७	. .	. .	२८८६.५१

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक ६

लातूर जिल्ह्यातील विविध पिकांखालील क्षेत्र

(क्षेत्र ०० हेक्टरमध्ये)

पिके	१९८२-८३	१९८५-८६	१९९०-९१	१९९५-९६	२००२-०३	२००४-०५
भात	१९८	२१४	२४४	२२६	२०९	७१
गहू	२०७	२२१	२३७	१९०	२२८	उ.ना.
ज्वारी	२,४६९	२,५८९	२,३८३	१,९७१	१,९५३	१,२२७
बाजरी	१५३	१०३	११२	१३९	८९	७९
मका	३१	२८	३२	१७	उ.ना.	४७
एकूण तृणधान्ये . .	३,१०७	३,२०५	३,०५८	२,५६०	२,६४५	१,४२८
हरभरा	२५०	२५१	२८९	२७९	२८६	३३१
मूग	२१८	२१६	२२७	२५१	उ.ना.	१५६
तूर	५१४	५६६	६९३	६७१	६५१	६८३
उडीद	३४९	४६९	३६४	६५०	उ.ना.	३३६
मसूर	७	१३	७	६	उ.ना.	उ.ना.
एकूण कडधान्ये . .	१,४१७	१,५६५	१,६१७	१९००	१,६६६	१,५०६
एकूण अन्नधान्ये . .	४,५२४	४,७७०	४,६७५	४,४६०	३,७८४	२,९३४
ऊस	९२	७७	११४	२५०	२३४	१३९
मिरची	२८	३१	३३	२८	उ.ना.	उ.ना.
धने	२९	२९	१२	२१	उ.ना.	उ.ना.
मसाला वर्गीय पिके. .	६१	६३	५१	५४	उ.ना.	उ.ना.
एकूण भाजीपाला . .	१०	११	४४	२४	उ.ना.	उ.ना.
एकूण खाद्यपीके . .	४,६८९	४,९२२	४,९२३	४,८०४	उ.ना.	उ.ना.

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazeteers

पिके	१९८३-८३	१९८५-८६	१९९०-९१	१९९५-९६	२००२-०३	२००४-०५
कापूस	२८१	२०६	२३५	३३४	३२१	११८
ताग	१	२८	उ.ना.	उ.ना.	उ.ना.	उ.ना.
अंबाडी	९३	११७	८३	४३	उ.ना.	उ.ना.
एकूण तंतूमय पीके . .	३७७	४२४	३१९	३७८	उ.ना.	११८
भुईमूग	३००	३६०	३२९	२०७	१७२	५९
तीळ	७९	१२६	१९५	१६८	१७२	६७
करडई	१५१	१५४	१७०	१७९	१८७	२०१
सूर्यफूल	२००	६५४	९०७	८८४	५३०	६४१
जवस	७९	७४३	७०९	४१	३७	उ.ना.
काळा कारळा	२०८	११६	१५४	१४५	११३	६०
एकूण तेलबिया . .	१,०३०	१,५७६	१,९४०	१,६८२	१,४३२	१,०२८
एकूण पीकाखालील क्षेत्र . .	५,०३७	६,९४५	७,२०६	६,८८१	६,६४५	६,०९६

उ.ना. म्हणजे उपलब्ध नाही.

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक ७

लातूर जिल्ह्यातील लघु पाटबंधारे प्रकल्प जून, २००४ अखेर

अ.क्र. (१)	बंधाऱ्याचे नाव (२)	तालुका (३)	सिंचन क्षमता हेक्टर (४)
१	भुतेकरवाडी	अहमदपूर	८०९
२	सोनखेड	अहमदपूर	४७६
३	वाकी	अहमदपूर	८५८
४	मेघा	अहमदपूर	१२५५
५	नागठाणा	अहमदपूर	१५७८
६	बायगाव पायलट	अहमदपूर	३२८
७	धासवाडी	अहमदपूर	३३०
८	तेलगाव	अहमदपूर	२६५
९	येस्तार	अहमदपूर	४६७
१०	येलदरी	अहमदपूर	२९१
११	कोपरा किनगाव	अहमदपूर	१७१
१२	कौडगाव	अहमदपूर	३६०
१३	थोडगा	अहमदपूर	९४०
१४	चिंचोली तपसे	औसा	६८१
१५	तुंगी	औसा	५२६
१६	अपचुंदा	औसा	५९४
१७	नणंद	औसा	५९८
१८	कार्ला	औसा	२५५
१९	चिंचोली जोगन	औसा	५२३
२०	सोमदुर्ग	औसा	३८८
२१	सारोळा	औसा	६६४
२२	बेलकुंड	औसा	६६४
२३	माळकोंडजी	औसा	४८४
२४	वानवडा	औसा	३७८
२५	शिवणी को.प.ब.	औसा	२८९
२६	देवंगरवाडी	चाकूर	४८६
२७	झरी	चाकूर	४५५
२८	शिवणखेड	चाकूर	४५६
२९	गांजूर	चाकूर	२६३
३०	बोथी	चाकूर	४२९
३१	आनंदवाडी	चाकूर	३९७
३२	राचन्नावाडी	चाकूर	१०४०
३३	जढाळा	चाकूर	२५४
३४	अरसनाथ	देवणी	३६३
३५	दवण हिप्परगा	देवणी	४२५

अनुक्रमणिका

(१)	(२)	(३)	(४)
३६	बोकणी	देवणी	९५५
३७	देवणी को.प.ब.	देवणी	४८६
३८	टाकळी को.प.ब.	देवणी	३३७
३९	ढोरसांगवी	जळकोट	४७४
४०	घोणसी	जळकोट	२५७
४१	हळद वाढोणा	जळकोट	५६०
४२	घेरा	जळकोट	१८५६
४३	गोदेगाव	लातूर	७०९
४४	चिकुर्डा	लातूर	३५१
४५	वासनगाव	लातूर	४४५
४६	निवळी	लातूर	३१३
४७	कातपूर	लातूर	७००
४८	निवळी	लातूर	२५५
४९	रमजानपूर को.प.ब.	लातूर	२५६
५०	कासारखेडा को.प.ब.	लातूर	३७३
५१	माळेगाव	निलंगा	६६८
५२	कासार बालकुंदा	निलंगा	६६८
५३	शेडोळ	निलंगा	३५९
५४	हाडगा	निलंगा	३५९
५५	केदारपूर	निलंगा	४९६
५६	बडूर	निलंगा	४८०
५७	हंगरगा	निलंगा	४८०
५८	मदनसूरी को.प.ब.	निलंगा	२८९
५९	सोनखेड को.प.ब.	निलंगा	२५९
६०	औराद (वा) को.प.ब.	निलंगा	३०९
६१	औराद (श) उ.सि.यो.	निलंगा	३०८
६२	शिरुर उ.सिं.यो.	निलंगा	४७८
६३	गोताळा	रेणापूर	७०१
६४	गरसोळी	रेणापूर	४८९
६५	सुकणी	रेणापूर	७९३
६६	मोरवड	रेणापूर	८६२
६७	पांढरवाडी	शिरुर (अ)	४६७
६८	पिंपरी	उदगीर	७६७
६९	कल्लूर	उदगीर	४२२
७०	एकूरगा	उदगीर	४२२
७१	नागलगाव	उदगीर	३२६
७२	केसकरवाडी	उदगीर	२६८
७३	निडेबन	उदगीर	३१०
७४	गुरधाळ	उदगीर	४७०

तक्ता क्रमांक ८

जिल्ह्यातील पशुसंवर्धनाबाबत कामाचा आढावा *

(१)	१९८३-८४ (२)	१९८६-८७ (३)	१९८९-९० (४)	१९९२-९३ (५)	१९९५-९६ (६)	१९९८-९९ (७)	१९९९-२००० (८)	२००१-२००२ (९)	२००४-२००५ (१०)
औषधोपचार	२,३३,९३३	३,३६,४००	३,०४,७९५	४,१५,८२४	४,४०,३४०	५,१६,३०९	४,८०,०८९	३,३९,६९९	२,६१,१०८
खच्चीकरण	२५,३४४	२५,२०६	२८,३०२	३४,६५७	३४,१७६	३१,९४५	३०,१०४	२८,५२३	२४,५३८
लसीकरण	७,३१,४२२	८,२८,८१४	९,९०,१७०	११,५३,८२७	७,५५,३४४	६,८३,२९३	६,६९,१९९	६,१६,४६२	४,३७,२६७
शस्त्रक्रिया	२२,३७०	२७,५१०	२६,७२४	३९,२६२	६९,१४८	७९,१९८	७४,०९१	३१,८७७	२६,०४१
कृत्रिम रेतन कार्य	१३,२८३	२०,४०७	२३,१२८	२३,५८१	३१,५८७	४०,३६८	४४,५६७	४७,४९१	४९,३४३
कृत्रिम रेतनाने जन्मलेली वासरे	२,२४१	३४९	४,९४२	७,८६६	८,६५५	११,१०९	१२,०४२	१४,८११	१५,०६०
गर्भपरिक्षण	२३,१५३	२८,६७८	३३,१७१	४६,५८४	४१,७२०	५०,३०२	५३,५९३	३४,५१६	३४,५७७
वंध्यत्व तपासणी	१३,५२९	१४,९३०	१५,२८३	२३,४४३	१९,९९७	२७,४६६	२७,४२६	१७,१११	१५,४६८

* वरील माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ४ : नैसर्गिक आपत्ती

नैसर्गिक आपत्ती

- दुष्काळ
- अतिवृष्टी
- भूकंप
- भूकंपाची कारणमिमांसा
- पुनर्वसनातील वैविध्य
- संभाव्य आपत्ती व्यवस्थापन
- भूकंप क्षतिग्रस्त सांस्कृतिक वारश्याचे जतन व पुनर्वसन
- परिशिष्ट

नैसर्गिक आपत्ती

दैनंदिन जीवनामध्ये आपणास दुष्काळ, पूर, अतिवृष्टी, वादळ साथीचे रोग, दरडी कोसळणे, आकस्मित आगीच्या घटना तसेच भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तींना मानवाला वेळोवेळी तोंड द्यावे लागते. त्याचप्रमाणे रस्ते, अपघात, औद्योगिक अपघात, कधी कधी दंगली इ. सारख्या मानवनिर्मीत आपत्तीनाही तोंड द्यावे लागते. उपरोक्त आपत्तीपैकी काही आपत्तींचे पुर्वानुमान करणे शास्त्रीय प्रगतीच्या आधारे शक्य झाले आहे. नैसर्गिक आपत्ती थांबविणे मानवाला शक्य नाही. खऱ्या अर्थाने भूकंपासारख्या आपत्तीचे पूर्वानुमान करण्याची सोय अद्याप उपलब्ध झालेली नाही. कोणतीही आपत्ती असली तरीही त्यात मोठ्या प्रमाणावर जिवित हानी होते, तसेच मालमत्तेची हानी देखील दीर्घकाळ भरुन येत नाही. गेल्या २० वर्षात आपत्तीमुळे ३० लाख लोक मृत्यूमुखी पडले. लातूर जिल्हाही याला अपवाद नाही. लातूर जिल्हयामध्ये किंवा महाराष्ट्रामध्ये बरेच दुष्काळ पडले. तसेच ३० सप्टेंबर १९९३ मध्ये झालेल्या भूकंपामुळे लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये फार नुकसान झाले याची क्रमशः माहिती खालीलप्रमाणे देता येते.

दुष्काळ : प्राचीन साहित्यात येणाऱ्या वर्णनावरून भारतात ६००-१००० या काळात पुष्कळ वेळा दुष्काळ पडले असावेत असे वाटते. वायुपुराणात अशाच एका दुष्काळामुळे वाराणसी कशी उजाड झाली याचे वर्णन आहे, आणि वामनपुराणात नद्यांच्या प्रवाहात वाळूच्या टेकड्या निर्माण झाल्यामुळे, म्हणजेच प्रवाह आटल्यामुळे, त्यांच्या काठी असलेल्या पवित्र स्थळांचे महत्त्व कसे कमी होऊ लागले हे सांगितले आहे. इथिओपियात पाऊस पडतो तो मान्सूनमुळे. आपल्याकडील नैऋत्य मान्सून तिकडे जातो आणि त्यामुळे तेथे पाऊस पडतो. तेव्हा नाईलला चांगला पूर म्हणजे आपल्या कडेही चांगला पाऊस. तसेच नाईलची पातळी खाली गेली म्हणजे आपल्याकडे दुष्काळ हे शास्त्रज्ञांनी सिध्द करून दाखविले आहे. जेष्ठ पर्यावरणतज्ञ फ्रँक सुलमन याच्या मते ज्या वेळी युरोपात कडक थंडी असते, त्यावेळी भारतासारख्या विषुववृत्तीय प्रदेशात दुष्काळ पडतात. विल्यम मोरलँड या ब्रिटिश इतिहासकाराने मोगल साम्राज्याचा आर्थिक इतिहास लिहिला आहे त्यामध्ये ते म्हणतात, मध्ययुगात भारताची आर्थिक स्थिती कधी नव्हे इतकी खालावली होती. संस्कृत साहित्यात गुप्तोत्तर काळातील दुष्काळांचे वर्णन येते. भयानक दुष्काळ वारंवार पडत. अशा एका दिर्घकाळ बारा वर्षे, टिकणाऱ्या दुष्काळाचे वर्णन दण्डिनच्या "दशकुमारचरितात" आहे. त्याचे पूर्वज विदर्भातले, पण तो दक्षिणेत पल्लवांच्या राज्यात जाऊन राहिला. परमेश्वरवर्मन पहिला (इ.पू.६७०-७००) आणि दुसरा नरसिंहवर्मन राजसिंह (इ.पू.७००-७२८) यांच्या दरबारी तो होता. त्याचे "दशकुमार चरित" इ.स.७०० च्या आसपास लिहले असावे. त्यातील एका कथेत त्याने दुष्काळाचे अत्यंत हृदयद्रावक वर्णन केलेले आहे. ते इतके भयानक आहे की, त्याने तो दुष्काळ प्रत्यक्ष पाहिलेला असावा असे वाटते. परकीय प्रवाशांपैकी हयूएन त्संग (इ.स.पू.६२९-४१) व फा हियान (इ.स.पू.३९३-४१४) हे भारतात आले होते व त्यानी केलेल्या वर्णनामध्ये पूर्वी जेथे वस्ती होत्या त्या ठिकाणी जंगल माजले होते. फारच वस्ती विरळ होती. त्यामानाने वाटमारी करणाऱ्यांच्या टोळयाच अधिक होत्या.[२७]

भारतातील बऱ्याच भागात इ.स.९४१, १०२२ व १०३३ या वर्षामध्ये दुष्काळ पडला होता. यात असंख्य लोक मृत्यूमुखी पडून मानवकलेवर भक्षणापर्यत पाळी आली होती. सन ११४८ ते ११५९ या कालावधीत भारतातील काही भागात सतत ११ वर्षे दुष्काळ पडला होता. यावेळी राजघराण्यांना देखील अन्न सामग्री

२७. ढवळीकर मधुकर केशव, **पर्यावरण आणि संस्कृती,** पूणे २००४, पृष्ठे १३०-३१, १३३, १३६, १६३.

मिळविणे कठीण झाले होते. असंख्य लोक मृत्यूमुखी पडले होते.[२८] सन १३९६ ते १४०७ पर्यंत सतत १२ वर्षे नर्मदेच्या दक्षिणेकडील भागात पडलेला भीषण दुष्काळ पहिला दुर्गादेवीचा दुष्काळ या नावाने प्रसिद्ध आहे. या वेळी अनेक लोकांनी अन्यत्र स्थलांतर केले होते. दुर्गादेवीच्या दुष्काळाच्या सुरूवातीच्या वर्षात महमदशहा बहमनी दुसरा (१३७८-१३९७) याने दक्षिणेतील प्रदेशासाठी गुजरातमधून धान्य आणण्याकरिता १०,००० बैलांची सोय केली होती. तसेच त्याच्या राज्यातील चौल, दाभोळ, एलिचपूर, दौलताबाद, बिदर, गुलबर्गा व कंधार या शहरामध्ये दहा अनाथाश्रमे सुरू केली होती. दुष्काळामध्ये अनेक लोक परागंदा झाले होते. इ.स.१६५९ व १६८५ मध्ये संपूर्ण मराठवाडयात पिकांची हानी बरीच मोठ्या प्रमाणात होऊन तीव्र टंचाईची स्थिती निर्माण झाली होती. अठराव्या शतकामध्ये मराठवाड्यात १७१३, १७४७ आणि १७८७ मध्ये दुष्काळजन्य स्थिती निर्माण झाली होती. सन १८०४ साली दुष्काळ फार तीव्र स्वरुपाचा होता. खरीप पिके पूर्णपणे नष्ट झाली होती. काही ग्रामस्थ आपापली गावे सोडून इतरत्र उपजिविकेच्या साधनाकरिता स्थलांतर करून गेले होते.

पर्जन्यमानाच्या दृष्टीने लातूर जिल्हयाची तुलना फारशी वाईट नाही. तरी अनिश्चित पावसामुळे किंवा जिल्हयातील काही भागात कमी पाऊस असल्याने दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होते. संपूर्ण लातूर जिल्हा बालाघाट पठारावर वसलेला असून समुद्रसपाटीपासून ५४० ते ६३८ मीटर उंचीवर आहे. उंचवटयाच्या दृष्टीने जिल्हयाचे दोन भाग पडतात. अधिक उंची असलेला डोंगराळ भाग जिल्हयात पश्चिम व दक्षिणेकडे पसरलेला असून त्यात लातूर, औसा व निलंगा तालुक्यांचा समावेश आहे. कमी उंचीच्या पट्टयात अहमदपूर व उदगीर तालुक्याचा समावेश होतो. या खोऱ्यात मन्याड लेंडी तसेच मांजरा व तावरजा, तेरणा नद्यांच्या खोऱ्याचा समावेश आहे. लातूर जिल्हयात मुख्यत्वे मान्सुनचा पाऊस पडतो. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ८०२.६ मिली मीटर असून काही वेळी अतिवृष्टीमुळे (उदा.२००५) देखील कृषि अर्थव्यवस्थेला धोका पोहचू शकतो.

उस्मानाबाद जिल्हयामध्ये १७ व्या शतकामध्ये इ.स.१६२९ ते १६८५ पर्यत ८ वेळा दुष्काळ पडले होते त्यातील चार वेळा अवर्षणामुळे तर चार वेळा लढाईमुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. अठराव्या शतकामध्येही जिल्हयात चार वेळा दुष्काळ पडले, त्यापैकी १७०२ मध्ये अतिवृष्टीमुळे पिकाचे नुकसान झाले. तर १७१३ व १७४७ आणि १७८७ मध्ये पावसाअभावी दुष्काळ पडले होते. त्या काळी दळणवळणाच्या सुविधा अपुऱ्या असल्यामुळे लोकांना दुष्काळाची तीव्रता मोठ्या प्रमाणात सोसावी लागली. एकोणिसाव्या शतकामध्ये १८२५ मध्ये जिल्हयात अतिवृष्टीमुळे पिकाचे फार नुकसान झाले. इ.स.१८०४ ते १८७७ दरम्याने अकरा वेळा अवर्षणग्रस्त स्थिती, कमी पावसामुळे जिल्हयात निर्माण झाली होती. त्या वेळी जिल्ह्यातील लोकांना दुष्काळा बरोबरच कॉलरा,देवी ताप या संकटाला सामोरे जावे लागले. इ.स.१८९१ आणि १९०१ या दहा वर्षात संपूर्ण हैद्राबाद राज्यामध्ये अत्यल्प पाऊस पडल्यामुळे अवर्षणग्रस्त स्थिती निर्माण झाली होती. तसेच १८९९ मध्ये राज्यात सरासरी ३९३.७० मीटर (१५.५ इंच) पाऊस पडला होता. इ.स.१८९४ पासून चालू असलेली अपतग्रस्त स्थिती, इ.स.१८९७ पर्यंत चालूच राहिली. त्यानंतर १९०० मध्येही मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळामुळे उस्मानाबाद जिल्हयातील लोकांचे अतोनात हाल झाले. या शतकाच्या पहिल्या दशकात जिल्ह्यात अवर्षणाबरोबरच कॉलरा, देवी, मलेरिया, हगवण इत्यादी रोगामुळे २, ७६० लोक मृत्यूमुखी पडले. तसेच १९०२, १९०३ व १९०४ मध्येही उस्मानाबाद जिल्ह्यात प्लेगच्या साथीने अनेक लोक मृत्यूमुखी पडले.

२८. केतकर व्य.श्री., **महाराष्ट्रीय ज्ञानकोश** पूणे खंड १५वा १९२५, पृष्ट १३४.

इ.स.१९११ ते १९२१ या दोन दशकामध्ये अत्यल्प व अनियमित पर्जन्य झाल्याने लोकांचे फार हाल झाले. इ.स.१९१६-१७ मध्येही कमी पाऊसामुळे पीकाचे उत्पन्न घटल्यामुळे धान्यांच्या किंमतीमध्ये वाढ झाली. त्यातच प्लेग, कॉलरा आणि विषमज्वर यासारख्या साथीच्या रोगाने थैमान घातले होते. इ.स.१९४६ मध्ये परांडा तालुक्यामध्ये दुष्काळग्रस्त स्थिती निर्माण झाली. इ.स.१९५० मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात दुष्काळ पडला. इ.स.१९४१ ते १९५१ या दशकात जिल्ह्यात प्लेग, कॉलरा, देवी या साथीच्या रोगामुळे ११,२४३ लोक मृत्यूमुखी पडले.[२९]

इ.स.१९७२ मध्येही कमी पाऊस झाल्याने दुष्काळग्रस्त स्थितीला सामोरे जावे लागले. परंतु यावेळी शासनाने दुष्काळग्रस्त गावाना टँकरव्दारे पाणीपुरवठा केला तसेच रोजगार हमी योजनेखाली वेगवेगळ्या तलावाची कामे सुरू करून लोकांना रोजगार पुरविला त्याचप्रमाणे सुखडी हे विशेष खाद्य वाटप करून लोकांना संकटापासून बाहेर पडण्यास मदत केली. तसेच १९८२-८३ मध्येही कमी पावसामुळे दुष्काळ पडला होता. इ.स. १९८५-८६ मध्ये जिल्ह्यातील काही भागात दुष्काळ व टंचाई सदृष्य परिस्थिती निर्माण झाली होती. यावर्षी जिल्ह्यातील ६३१ गावामध्ये अवर्षणग्रस्त परिस्थिती होती त्याची झळ जिल्ह्यातील ८,४९,१३१ लोकांना पोहचली. त्यावेळी वरील ६३१ गावांना जमीन महसूलामध्ये पूर्ण सवलत देण्यात आली. यावेळी पाझरतलाव यासारखी ४७८ लहान मोठी कामे घेऊन ८६,२०० लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. त्यासाठी शासनाने १२,६०,०५,८२६ रुपये खर्च केले. इ.स.१९९०-९१ मध्ये जिल्ह्यातील काही गावामध्ये अपुरा पाऊस पडल्यामुळे ती गावे टंचाईग्रस्त घोषीत करून त्यांना शासनाने सर्वोतोपरी मदत केली. तर इ.स. १९९१-९२ मध्ये दुष्काळ टंचाईसदृश्य ७८८ गावातील शेतकऱ्यांना जमीन महसुलामध्ये पूर्ण निलंबन दिले. इ.स.२००३-०४ मध्ये दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे निलंगा तालुक्यात रु. १५००० किंमतीच्या पशुधनाची हानी झाली. दुष्काळ व तीव्र टंचाईसाठी शासनाने ५१ कामे हाती घेतली होती. जिल्ह्यामध्ये जानेवारी २००३ ते जानेवारी २००४ या कालावधीत अवेळी पाऊस, अतिवृष्टी व गारपीटीमुळे ५०% पेक्षा जास्त नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची संख्या १४२४ होती. या शेतकऱ्यांना निविष्ठांच्या स्वरूपात २०७.५०० मे. टन रासायनिक खताचे वाटप केले. तर मार्च २००५ मध्ये ५०% पेक्षा जास्त नुकसान झालेल्या एका गावातील एक शेतकऱ्याचे ०.८० हेक्टर क्षेत्रामध्ये फळपिकाचे नुकसान झाले.[३०] एप्रिल २००४ मध्ये दुष्काळग्रस्त गावाना १३२ टँकर्सव्दारे पाणी पुरवठा करून ६७० रोजगार हमी योजनेची कामे सुरू केली. तसेच ५४,०५५ लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला.[३१] तसेच सप्टेंबर २००५ मध्ये जिल्ह्यातील काही भागात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची शेती व पीकांच्या नुकसानीची नोंद शासनाच्या पातळीवर घेण्यात आली आहे.

अतिवृष्टी : सन २००५ मध्ये २१ जुलै पासून महाराष्ट्राच्या कोकण आणि पश्चिम घाटांच्या किनारपट्टीला मुसळधार पावसाने झोडपायला सुरुवात केली होती. रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात या पावसामुळे अनेक शहरात आणि गावात पाणी साचून पूर परिस्थिती निर्माण झाली. २६ जुलै रोजी तर राज्यात १०० वर्षात झाला नाही इतका धुवांधार पाऊस पडला. २६ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजल्यापासून २७ जुलैच्या सकाळी ८.३० वाजेपर्यंत सांताक्रुज ९१४.२ मि.मी.तर कुलाबा येथे ७३.४ मि.मी.पावसाची नोंद झाली. तसेच १८ तासात मुंबई उपनगरामध्ये ९४४ मि.मी. पाऊस झाला. कोयना आणि उजनी धरणातून पाणी सोडल्यामुळे सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावाना पुराच्या पाण्याने वेढले. मराठवाड्यातही अतिवृष्टीचा तडाखा बसला. मराठवाड्यातील नांदेड परभणी भागात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टीचा तडाखा

२९. **उस्मानाबाद डिस्ट्रिट गॅझेटिअर**, १९७२, पृष्ठे ४३०-४३२.

३०. कृषि उत्पादन कार्यक्रम सन २००५-०६ विभागीय आढावा बैठक, औरंगाबाद महसूल विभाग अहवाल पृ. ४५.

३१. तिसरी फसल. मराठवाड्यातील दुष्काळ संपर्क २००४, पृष्ठ ११.

बसला. मराठवाड्यातील नांदेड परभणी भागात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टीटा तडाखा बसला. गोदावरी दुथडी भरून शेजारच्या अनेक गावात आणि शहरात पाणी शिरले.

या पुरामुळे महाराष्ट्रातील ११०० लोकांना प्राण गमवावे लागले. त्यामध्ये मुंबई उपनगरातील ४४७ लोकांनी मृत्युला कवटाळले तर नवी मुंबई ६६, ठाणे १८०, कोल्हापूर २६, परभणी ६, नांदेड १३, यवतमाळ ११, सातारा ११, औरंगाबाद ७, बीड ७, पुणे १९ तसेच या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील ५.५ लाख हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले. तर अतिवृष्टीमुळे राज्यात २६,३३९ जनावरे मृत्युमूखी पडली. ३,५७ , ९१७ घराचे अंशत: नुकसान झाले तर १४,१४२ घरे पूर्णत: पडली. या अतिवृष्टीमुळे सुरक्षित स्थळी हलविलेल्या लोकांची जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे कोल्हापूर ९२,८११, सातारा १६,०२८, सांगली २,१२,८३६, पुणे ९०,५७९, सोलापूर ८२,१७२, परभणी १,२००, नांदेड २५,०००, रायगड १०,११२, जालना ५,५००, बीड ६,००० अशाप्रकारे एकूण ५,४२,२३८ लोकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे लागले. शासनाने तात्काळ पुरग्रस्त क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मदतकार्य केले. अतिवृष्टीमुळे निराधार झालेल्या व्यक्तींना ३५० कोटी रूपयांचे वाटप तसेच पुरग्रस्तांना २ लाख क्विंटल धान्य वाटप व मृतांच्या वारसांना ६ कोटींचे वाटप करण्यात आले.

सप्टेंबर व ऑक्टोबर २००५ मध्ये लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांची माहिती खाली दिली आहे.

अ.क्र. (१)	पीक (२)	क्षेत्र (हेक्टर) (३)	एकूण (रुपये) (४)
१)	ऊस	५७२.००	५७,२०,०००
२)	भात	१५२.४०	७,६२,०००
३)	इतर पिके	१७,३४७.९७	६,०७,१७,८९५
४)	फळबाग	७.४०	७४,०००
५)	जमीन खरडून जाणे	६८६.३२	६८,६३,२००
	एकूण	१८,७६६.०९	७,४१,३७,०९५

शासनाकडून ७.५० कोटी रुपये अनुदान मंजूर झाले व मंजूर अनुदान कृषि विभागामार्फत बाधीत शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे ३७६ बाधीत गावे होती व शेतकऱ्यांची संख्या ३२,९२८ व पूर्णत: पडलेल्या घरांची संख्या ५९९ होती, तसेच अंशत: पडलेल्या घरांची संख्या ४,७१७ होती. यावेळी मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींची संख्या ४ व जनावरांची संख्या १५ होती.

Maharashtra State Gazeteers

भूकंप*

लातूर जिल्ह्यातील भूकंप प्रवण क्षेत्र

लातूर जिल्ह्यात दि.३० सप्टेंबर १९९३ पहाटे ३.५५ वा. भूकंप झाला. याचे केंद्र १८° १' अक्षांश, ७६° ३४' रेखांश (एकोंडी) होते.[३२] भूकंपाचे उगमस्थान जमिनीच्या पृष्ठभागापासून ६ ते १२ कि.मी. असून त्याची तीव्रता ६.४ होती. राष्ट्रीय भूभौतिकी संशोधन संस्था, हैद्राबाद यांनी लातूर जिल्ह्यातील भूकंपाविषयी केलेली ही नोंद. यानंतर ४.३० वा. भूकंपाचा दुसरा धक्का बसला

पूर्वमान्यता : भारतीय द्विपकल्पातील महाराष्ट्राचा बहुतांश भूभाग लाव्हा रसापासून बनला असून बेसॉल्ट खडकांनी व्यापलेला आहे. भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्राचे कोकण किनारपट्टी, पश्चिमेस सह्याद्री पर्वताच्या रांगा, मध्यभागात पूर्व-पश्चिम पसरलेल्या सातपुडा पर्वताच्या रांगा आणि पठारी प्रदेश हे तीन मुख्य भाग होत. दख्खनचा पठार हा भूवैज्ञानिकांच्या दृष्टीने भूकंपीय घडामोडीपासून सुरक्षित व स्थिर समजला गेला.

साधारणत: सन १५९४ पासून या क्षेत्रात भूकंप झाल्याची नोंद नाही. इंडियन स्टॅण्डर्ड IS १८९३-१९८४ प्रमाणे लातूर जिल्ह्यातील हा भाग सेस्मिक झोन १ मध्ये येत असल्याने येथे भूकंप होण्याची शक्यता कमीतकमी मानली जाई. प्रत्यक्षात किल्लारी भूकंप धक्क्याची तीव्रता गृहीतकाच्या तुलनेत खूप जास्त होती. किल्लारी भूकंप धक्का हा इंट्राप्लेट (Intraplate or mid plate) भूकंप धक्का होता म्हणजे ज्ञात भूकंपपट्ट्याहून आतील भागात हा भूकंप धक्का झाला. या प्रकारच्या भूकंप भागांना स्टेबल कॉन्टिनेन्टल रिजन (Stable Continental Region) भूकंप संबोधले गेले. अर्थात काही तज्ज्ञांच्या मते या क्षेत्रात इ.स.१२०० ते १२१० मध्ये ६.० ते ६.३ महत्तेचा भूकंप धक्का झालेला होता व त्यानंतर इ.स.१५७३ ते १५७५ या काळात पुन्हा एकदा मोठ्या भूकंप धक्क्याचा अनुभव या परिसराने घेतला. असे असले तरी सुमारे ४०० वर्षे तरी आम्ही अशा अनुभूतीपासून वंचित होतो आणि त्यामुळे बिनधास्तही होतो. ११ डिसेंबर १९६७ कोयना नगर येथील भूकंप अपवादात्मक मानला गेला. महाराष्ट्राने अनुभवलेल्या एकूण भूकंपासंबंधात एक विस्तृत यादी सन १२०१ पासून संदर्भासाठी स्वतंत्रपणे परिशिष्टात दिली आहे.

---

* पाठक अ. शं.,कार्यकारी संपादक व सचिव यांनी या भागाचे लेखन केले आहे.

३२. राष्ट्रीय भूभौतिकी संशोधन संस्था, हैद्राबाद यांची नोंद.

भूकंपाची पार्श्वभूमी : किल्लारी परिसरामध्ये १९९२ च्या सुमारास जमिनीत आवाज येत, हादरेही बसत. क्रमशः या आवाजाचे व हादऱ्यांची संख्या व तीव्रताही वाढली. या सुमारास भूगर्भातील पाण्याच्या पातळीत बदल जाणवू लागला. किल्लारी येथील नीळकंठेश्वर मंदिरातील शिवलिंगाच्या खालील पाणी अचानकपणे नाहीसे झाले. स्वाभाविकपणे या परिसरातील लोकांच्या मनात काहीशी भिती निर्माण झाली होती. दि.१८ ऑक्टोबर १९९२ रोजी या परिसरात ४.८ महत्तेचा भूकंपाचा धक्का जाणवला. [३३] तर १९ ऑक्टोबर रोजी ३.८ महत्तेचा (रिस्टरचा) भूकंप झाला होता. याविषयी किल्लारीचे सरपंच डॉ.शंकर पडसलगी यांनी निवेदन दिले होते. उस्मानाबाद जिल्ह्यातील एकोंडीला १९९२ मध्ये भूकंपाचे धक्के बसले होते. १९९२ मध्ये १७ व १८ नोव्हेंबरला झालेल्या जोरदार पावसामुळे घरांना भेगा पडून त्यांची अवस्था दयनीय झाली. जिल्हाधिकारी प्रवीण परदेशी यांनी २० नोव्हेंबर १९९२ रोजी पुनर्वसन सचिवांना कळविले होते की भूकंपामुळे घरांना तडे गेले आहेत. दोन इंच पावसानंतर या परिसरातील घरे कोसळत आहेत. रहिवाशांना इतरत्र हलवावे लागेल. परिणामी पुनर्वसन विभागाच्यावतीने भूसंपादनाचे आदेश महाराष्ट्र शासनाने ४ मार्च १९९३ च्या राजपत्राद्वारे निर्गमित केले. २५ ऑक्टोबर १९९२ मध्ये भारतीय हवामानशास्त्र विभागाचे भूवैज्ञानिक डॉ.आर.के.दुबे यांनी किल्लारी-एकोंडी परिसरातील घरे व विहिरी, तसेच तेरणा नदीचा परिसर पाहिला व असे छोटे छोटे धक्के दक्षिण भारतामध्ये अनेक ठिकाणी अनेकवेळा बसतात. भूस्तरांची जडणघडण होताना असे धक्के बसू शकतात, तथापि यामुळे घाबरण्यासारखे फारसे काही नाही असा दिलासा दिला. परिणामी लोक बिनधास्त होते.[३४]

३० सप्टेंबर १९९३ रोजी पहाटे भूकंप झाला. आदल्या दिवशी अनंत चतुर्दशी होती श्रीगणेशाचे विसर्जन करून लोक झोपले होते. तर लातूरची मिरवणूक शेवटच्या टप्प्यात होती. किल्लारी येथील पोलीस उप निरिक्षक कोडिंबा नावंदे यांनी याविषयीची सर्वप्रथम नोंद लातूर येथे नियंत्रण कक्षाला कळविली व जोरदार भूकंपाने जवळपास संपूर्ण किल्लारी जमीनदोस्त झाली आहे. किमान पाचशेजण मरण पावले व अडकलेल्या जखमींची संख्या मोठी आहे. त्यांना सोडविण्यासाठी मनुष्यबळ सामग्रीसह पाठवा असे नोंदवले. शासकीय यंत्रणा आणि अन्य स्वयंसेवी संस्था, संघटना प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन लगोलग मदतीला धावले.

भूकंपांचा झालेला परिणाम म्हणून किल्लारी, तळणी, गांजणखेडा, संकराळ, येळवट, मंगरूळ, एकोंडी, कवठा, सास्तूर, चिंचोली, राजेगाव, होळी तांडा, होळी, पेठसांगवी, मराशिदपूर, उदतपूर, तावशी या क्षेत्रात फार मोठी हानी झाली. आत्यंतिक पडझड झालेले क्षेत्र म्हणून याची नोंद घ्यावी लागते. यानंतर नांदुरगा, बाणेगाव, लिंबाळा, अमनतांडा, नंदीहतरगा, बोरी, नांगरवाडी, मातोळा, पेठसांगवी, होळी, मुरशीदपूर, माकणी, कोंड जीगड, समुद्राळ येथे जास्त पडझड झालेले क्षेत्र म्हणून नोंदवले गेले व यानंतरचा परिघ मध्यम पडझड असलेले क्षेत्र व त्यानंतर अल्प प्रमाणात पडझड झालेले क्षेत्र अशाप्रकारे एकूणच भूकंप प्रवण क्षेत्राची नोंद करावी लागते. असे असले तरी सर्वप्रथम पूर्वपार्श्वभूमीमुळे किल्लारीकडे मोठ्या प्रमाणामध्ये लक्ष वेधले गेले. तत्कालीन सर्व प्रशासकीय अधिकारी विशेषतः निवासी जिल्हाधिकारी जगदीश पाटील, उप जिल्हाधिकारी कमलाकर फंड, जिल्हा शल्यचिकित्सक व अन्य सर्व रुग्णालयाचे डॉक्टर्स व त्यांचे सहकारी, पोलीस अधीक्षक बिपिन बिहारी मदत कार्यास स्वत:ला वाहून घेत होते. मुख्यमंत्री श्री.शरद पवार, मुख्य सचिव रघुनाथन, यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मदतकार्य सुरू केले. प्रसार यंत्रणेने विशेषतः बी.बी.सी.च्या वृत्तामुळे सर्व जगभर ही बातमी पसरली. लातूरच्या शासकीय रुग्णालयात सकाळी ५.३० वा. पहिला जखमी दाखल झाला होता. असे असले तरी मदतीचा ओघ संपूर्ण राज्यातून येऊ लागला तसेच एकूण १२,२६४ लोकसंख्या असलेल्या किल्लारीत दुपारपर्यंत एक लाखाच्या वर लोक पोहोचले. परिणामी मदतकार्यास अडथळे निर्माण होऊ लागले.

---

३३. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) महाराष्ट्र शासन, नाशिक यांचेकडून प्राप्त माहिती आधारे.

३४. देऊळगावकर अतुल , **डळमळले भूमंडळ**, नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली (प.), मुंबई २००५,पृ.२४-२५

दि. ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या मुख्य भूकंपाच्या संदर्भात विविध पातळीवर विश्लेषण केले गेले. भूकंप केंद्र बिंदूपासून १५ कि.मी. अंतरावर असलेल्या लोअर तेरणा धरणास (माकणी धरण) किरकोळ स्वरूपाची हानी पोहोचली. या पलिकडील क्षेत्रात असलेल्या धरणांना मात्र कुठलीही क्षिती पोहोचली नाही. माकणी धरणाची हानी सुद्धा वरवरच्या स्वरूपाची होती. Longitudinal cracks on top of either earth flanks of the masonry spillway portion. Opening of the joints at the top surface between the non-overflow section and the each flanks. भूकंपक्षेत्रातील आर.सी.सी.पध्दतीने बांधकाम झालेली घरे व्यवस्थितपणे तग धरून होती. माती वापरून बांधलेली भारवाही संरचना असलेल्या घरांचे मोठे नुकसान झाले. या भागातील पूल, कलवट, पाण्याच्या टाक्या, भूकंपात टिकून राहिल्या. अपवादात्मकपणे कवठा गावातील पाण्याची टाकी मात्र कोसळली. भूकंपानंतर या क्षेत्राची सर्वंकष पाहणी करून एक नकाशा Isoseismal तयार करण्यात आला. एम. एम. आय. नुसार ८ रिस्टर इतकी तीव्रता काढण्यात आली. भूकंपाच्या मिझोसेस्मल भागात कुठेही लिक्विफॅक्शनचा परिणाम आढळून आला नाही.[३५] साधारणपणे ६.४ महत्तेचा भूकंप फारसा हानीकारक ठरत नाही. तथापि किल्लारी परिसरातील नुकसान झाले त्यास अन्यही काही घटक जबाबदार ठरतात.

वस्तूत: भूकंप झाला त्या मिझोसेस्मल भागामध्ये भूकंप ३० सेकंद इतका जाणवला. भूकंपाची खोली १२ कि.मी. होती. या उथळ खोलीमुळे याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर जाणवला. तेरणा किनाऱ्यावरील घरांचा पाया हा भुसभूशीत काळ्या मातीत होता. बहुसंख्य घरे माती व डबर बांधकामातील भारवाही संरचना असलेली होती. भूकंपात ही घरे कोसळली. छताचा भाग अनावश्यक जाड असल्यामुळे तो कोसळून जीवित हानी मोठ्या प्रमाणावर झाली. सर्वसाधारणपणे लाकडी चौकटी असलेली घरे टिकून राहिली. घरांची रचना जवळजवळ असल्यामुळे घरातून निघून मोकळ्या जागेत सहजपणे जाणे शक्य नसल्यामुळेही अनेकांना जीव गमवावे लागले. पहाटेची वेळ असल्यामुळे अनेकांना झोपेतच मृत्यूला सामोरे जावे लागले.

वास्तविक पाहता १९७३ साली डॉ.जनार्दन नेगींनी 'कुर्डवाडी खचदरी (भूभ्रंश) सिद्धांत' यात म्हटले होते की अतिशय कमकुवत भूस्तरामुळे या परिसरात भूभ्रंश (लिनियामेट) तयार झालाय. किल्लारी, परळी, बीड हा भाग त्या भूभ्रंशावर आहे. याविषयी विविध विचारधारा असल्यातरी साधारणत: अग्निजन्य खडकापासून बनलेले दख्खनचे पठार भूकंपापासून पूर्णपणे सुरक्षित मानले जाई. भूकंपीयता नकाशात संवेदनशीलतेच्या प्रतवारीनुसार विभाग पाडले जातात त्यात सर्वात कमी भूकंप शक्यता असलेला विभाग-१ तर अतिशय भूकंपप्रवण भागास ४ असे मानले जात. स्वाभाविकपणे प्रथम वर्गात मोडणारा हा भाग समजल्यामुळे फारसे गांभीर्याने या भागाकडे पाहिले गेले नाही. यासंदर्भात भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या भूकंपशास्त्र विभागाचे निर्देशक एस.एन.चटर्जी यांनी नोंदवले. 'अतिशय दुर्मिळ प्रकारचा भूकंपशास्त्राला गुंग करणारा हा भूकंप आहे.'

भूकंपानंतर लगोलग शासकीय आणि अशासकीय संस्था मदतीला धावल्या. त्यामध्ये अंबाजोगाईची 'मानवलोक', माजलगावची 'मानवी हक्क अभियान', केरवाडीची 'स्वप्नभूमी', लातुरच्या 'ग्रामीण विकास शिक्षण संस्था' व 'नागरी प्रबोधन मंच' , देवणीची 'खेडी विकास मंडळ', कळमनुरीची 'कयाधू' ह्या संस्थांचे कार्यकर्ते व यांना एकत्रित करणारे नागपूर येथील 'ऑक्सफॅमचे अधिकारी' तसेच ऑक्सफर्डचे अधिकारी याचबरोबर 'अखिल भारतीय जैन संघटना', सीताराम ट्रस्ट, बालाजी मंदिर, तरुण कार्यकर्ते सर्वत्र फिरत होते. लातूर येथील एम.आय.टी. वैद्यकीय महाविद्यालय, राजस्थान विद्यालय, छत्तीसगड मुक्ति मोर्चा, नर्मदा

३५. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक यांच्याकडून प्राप्त नोंदी आधारे.

बचाव आंदोलन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अ.भा.वि.प., व्हॉलंटरी हेल्थ असोसिएशन ऑफ इंडिया, कासा, कॅरिटास, रामकृष्ण मिशन, सीताराम ट्रस्ट, स्वामी नारायण विश्वस्त या धार्मिक संस्था, तसेच विवेकानंद हॉस्पिटलचे कर्मचारी, शक्य ती मदत करत होते.

हैद्राबाद येथील टास्क फोर्सचे कमांडर मीर झिया लष्कराची पहिली तुकडी घेऊन लगोलग हजर झाले. भूकंपानंतर दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५.०० च्या सुमारास सास्तूर व परिसरात ढगांची दाटी झाली व प्रचंड गडगडाटासह पाऊस पडत होता. तडाखेबंद पावसाने दुसऱ्या दिवशीपर्यंत ७२ मि.मी.ची नोंद केली. काळ्या मातीतून चिखलामुळे आणि अचानक आलेल्या पावसामुळे एकूण मदत कार्याची दैना उडाली होती. याही स्थितीत लष्कराने मोठ्या प्रमाणात जखमी आणि मृतांना बाहेर काढले. एकूण क्षेत्रात मिळून १६०० मृतदेह काढून देण्याचे कठीण काम अत्यंत अवघड वेळेत लष्कराने केले. ६००० प्रेतांवर अंत्यक्रिया केल्या. भूकंप झाल्या झाल्या विमोचनाचं अप्रतिम काम तडफेने आणि झपाट्याने स्वयंसेवी संस्थांनी केले. शासन पातळीवर वाटप यंत्रणेसाठी ५६ आय.ए.एस.उप जिल्हाधिकारी, तहसीलदार राज्यभरातून तातडीने या क्षेत्रात मागविले. भूकंपामुळे झालेल्या हानीचा जिल्हानिहाय तक्ता शासनाच्यावतीने प्रकाशित करण्यात आला. १९ ऑक्टोबर १९९३ रोजी भूकंपामुळे हानी पोहोचलेल्या व्यक्तींची संख्या उस्मानाबाद जिल्ह्यात ७९,११६ तर लातूर जिल्ह्यात १,०३,५७४ होती. तर भूकंपग्रस्त गावं एकूण ८४ गावांपैकी उस्मानाबादमध्ये ३३ तर लातूरमध्ये ५१ होती. जखमींमध्ये उस्मानाबादमध्ये १०,०१९ तर लातूरमध्ये ६,२८३ होते. मृत्यूमुखी पडलेल्या एकूण ८,०८९ लोकात लातूर जिल्ह्यात ३,६७० होते. कोसळलेल्या घराची एकूण संख्या ३२,३६७ होती. पैकी उस्मानाबाद जिल्ह्यात १३,७७६ तर लातूर जिल्ह्यात १८,५९१ होती.

भूकंपामुळे एकूण ५२ गावातील संपूर्ण जनजीवन उद्ध्वस्त झाले होते. ८,०८९ लोक मृत्यूमुखी पडले, १६,००० पेक्षा अधिक लोक जखमी झाले. तेव्हा पुनर्वसनविषयक कार्यक्रमामध्ये या गावातून २६,९५४ इमारतींचे आधुनिक पद्धतीने बांधकाम केले गेले. लातूर बरोबर उस्मानाबाद, सोलापूर, सांगली, बीड, परभणी, अहमदनगर, नांदेड, कोल्हापूर, औरंगाबाद, पुणे आणि नाशिक अशा एकूण तेरा जिल्ह्यांतील घरांची भूकंपामुळे पडझड झाली. या एकूण क्षेत्रात २,४०० गावांतून सुमारे २,११,००० घरांना क्षिती पोहोचली व त्यांच्या दुरुस्तीविषयक कार्यक्रम हाती घेण्यात आला. मूळ भूकंप क्षेत्रातील भागात पुनर्वसित गावात २६२ कि.मी.लांबीचे रस्ते विविध ठिकाणी १३१ मोऱ्या आणि लहान पुलांची दुरुस्ती तसेच क्षितीग्रस्त २०९ सार्वजनिक इमारती, शिवाय १,४१६ जिल्हा परिषदेच्या इमारतींचे मजबुतीकरणाचे काम हाती घेतले. २४५ विहिरींची दुरुस्ती केली गेली. २२८ कोल्हापूर टाईप बंधाऱ्यांचे बांधकाम केले. कायम स्वरूपी पाणीपुरवठ्यासाठी ४७.४८ कोटी रुपयांच्या प्रादेशिक योजना राबविल्या गेल्या. भूकंपाच्या पुनर्वसनासाठी वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घेऊन आवश्यक त्या समित्यांचे गठन केले गेले. योग्य पातळीवरील अधिकाराचे वितरण आणि कामाला गती देणे, कामावर नियंत्रण ठेवणे यासाठी शासन निर्णय निर्गमित होत होते.

शासनाने ज्या विविध बाबी पूर्ण केल्या त्यात मृतांच्या नातेवाईकांना तातडीने मदत देणे, अज्ञानांचे पालकत्व, अनाथांची व्यवस्था, भूखंडांचे वाटप व भूकंपग्रस्तांसाठी बांधावयाची घरे, आश्रमशाळा, वसतिगृहे, समाजमंदिरे, शाळा, दुकाने, रस्ते, स्मशानभूमी अशा अनेक तातडींच्या बाबींवर निर्णय घेतले. भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी साधारणत: त्याच्या मूळ मिळकतीचा व नुकसानीचा अंदाज घेवून २५०, ४०० व ७५० चौ.फूटांची घरे बांधण्याचे ठरवले गेले. यापैकी २५० चौ.फूट क्षेत्रापर्यंतचे बांधकाम शासनाच्या वतीने करून देण्यात आले. उर्वरित कामासाठी शासन व अन्य संस्थांच्या वतीने अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. यासाठी म्हणून जागतिक बँकेकडून सुमारे १,०८७ कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर करून घेण्यात आले व

आवश्यक शासन निर्णय निर्गमित केले गेले. मानवी स्वभावाप्रमाणे या काळात अत्यंतिक उदारतेचे दर्शन सर्वत्र होत होते. तर काही अपप्रवृत्तीसुद्धा कालांतराने स्पष्ट होऊ लागल्या आणि त्यासाठीसुद्धा लाभार्थींना मिळालेल्या अनुदानातून महिन्याभरात दुरुस्ती न झाली तर अनुदान वसुली करणे किंवा मदत व बांधकाम साहित्य यासंदर्भात दंडात्मक उपाययोजना करण्याविषयीचे कठोर निर्णयसुद्धा घेतले गेले.[३६]

मदतीचा ओघ

भूकंपामुळे अन्न, वस्त्र, निवारा या बाबीबरोबरच शारीरिक आणि मानसिक पुनर्वसनाची गरज निर्माण झाली. फार मोठा मानसिक आधार या लोकांवर झाला होता. यातून अनेक समस्या निर्माण होत होत्या. एकूण लोकसंख्येपैकी मृतव्यक्ती, जखमी, घराची स्थिती, विधवा, अपंग, अनाथ या प्रत्येकाचे वेगळे प्रश्न होते. यांची माहिती जमा करण्यात आली होती. सास्तूर, माखणी, किल्लारी ही स्थाने आधीपासूनच नदीच्या किनाऱ्याजवळ असल्याने बागायती शेतीने संपन्न होती व आता एकदम उध्वस्त जीवनाला सामोरे जाताना अनपेक्षितपणे आवश्यक व बऱ्याचदा आवश्यकतेपेक्षा जास्त मदत मिळणं हेही वेगळे प्रश्न निर्माण करीत होते. मुख्यमंत्र्यांनी स्वत: दहा दिवस या क्षेत्रात थांबून लोकभावना समजावून घेण्याचा प्रयत्न केला. तरी कुठलाही निर्णय सर्वसंमतीने होतांना वेळ लागत असे. पंतप्रधानांच्या कार्यालयाकडे संपूर्ण जगातून विचारणा होत होती. जपान, इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, स्पेन, नेदरलँड यांसारख्या देशातून औषधं, वैद्यकीय उपकरणं, तंबू, खाद्यपदार्थ, ब्लँकेट यांसारख्या वस्तू पाठविल्या गेल्या. तात्पुरते निवारे उभारण्यात आले पण नव्याने पुनर्वसन आवश्यक होते.

भूकंपाची कारणमिमांसा

मूळात भूकंपाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी म्हणून जे प्रयत्न झाले त्याचा परिणाम म्हणून हैद्राबाद येथे २४ डिसेंबर १९९३ रोजी बाळकृष्ण सुरी सभागृहात देशातील दोनशे शास्त्रज्ञांनी ३० सप्टेंबर १९९३ चा 'मराठवाडा भूकंप' याविषयी कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न केला. भारतीय संरक्षण केंद्राच्या ए.के.राय यांनी या परिषदेचे अध्यक्ष या नात्याने मत व्यक्त केले की, भूकंपासंबंधी अचूक भाकित वा विश्लेषण करण्याचा दावा कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेनी करू नये. आपण अपुरे पडलो हे मान्यच केलं पाहिजे. विस्मयजनक घटना म्हणून आपली सुटका करून घेता येणार नाही. इथून पुढे कुठल्याही व्यक्ती किंवा संस्थेनं भूकंपाच्या शक्याशक्यतेबद्दल जाहीर मत व्यक्त करू नये. जनतेमध्ये अनेक गैरसमज पसरतात. आपण विश्वास निर्माण करू शकलो नाही तरी भीती वाढवण्यास हातभार लावू नये. अनेक गृहितकांचा अभ्यास करून, एकत्र बसूनच शास्त्रीय मत द्यावे. हल्ली प्रत्येक शास्त्रीय घटना लोकप्रिय भाषेत सांगण्याची प्रथा रूढ होतेय. हे काम शास्त्रज्ञांचं नाही. पत्रकार-प्रसारमाध्यमांना त्यांचं काम करू दे. तरच चुकीच्या अपुऱ्या माहितीवर आधारित विश्लेषणं पसरायला आळा बसेल.

डॉ. ए. के. राय यांनी भूकंप विश्लेषणासाठी लघु आणि दीर्घ मुदतीच्या कार्यक्रमासाठी सूचना केल्या. लातूर भूकंपाचा अन्वयार्थ तातडीनं लावणं शक्य नसलं तरी दोन वर्षांत याविषयीचे काम व्हावे. भूकंपीय-भूसांरचनिक नकाशा देशपातळीवर असतो. भूकंपप्रवण भागासाठी जिल्हावार नकाशे करून, संवेदनशील क्षेत्रं ठळकपणे दाखवावीत त्यानंतरच त्या भागातील लोकांचं संभाव्य संकटाविषयी प्रशिक्षण करता येईल. यासाठी

३६. भूकंपग्रस्त भागातील व घर दुरुस्ती महाराष्ट्र शासनाचे धोरण स्पष्ट करणारी पुस्तिका. यामध्ये वेळोवेळी घेतलेले निर्णय व त्यासंबंधी काढलेले सर्व शासन निर्णय नोंदवले आहेत.

आपसातील क्षुद्र भिंती पाडून सर्वांनी एकत्रपणे काम करावं.[३७] यासंदर्भात झालेल्या मूलगामी चर्चेविषयीची नोंद याच गॅझेटिअरच्या भूगोल या प्रकरणामध्ये डॉ.पप्पू यांनी स्वतंत्रपणे केली आहे.[३८]

लातूरला मुख्य भूकंपानंतर वारंवार भूकंप होत होते. त्यानंतर २ ऑक्टोबरला मोठा पाऊस झाला. नंतरच्या दिवाळीत ५.२ रिश्टरचा धक्का जाणवला. ५ व ६ डिसेंबर १९९३ रोजी पडलेल्या थंडी व पावसामुळे तापमान १० सेल्सियसवरून ७ सेल्सियसपर्यंत खाली आले. १४ डिसेंबर १९९५ रोजी सकाळी ९.४० वा. पुन्हा ४.२ रिश्टरचा धक्का जाणवला. भूकंपानंतर या परिसरामध्ये भू-भौतिक संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांनी भूकंपग्रस्त भागात जर्मनीतील अत्याधुनिक उपकरणं बसवली होती. भूकंप संवेग, तीव्रता, भूकंप केंद्राचं अंतरमापन त्यामुळे शक्य झालं. छोट्या धक्क्यांचीही नोंद तेथे होऊ लागली. ३० सप्टेंबर १९९३ पूर्वीच्या नोंदी उपलब्ध नव्हत्या. हैद्राबाद येथील भूकंपमापन केंद्रावर २ रिश्टरपेक्षा जास्त धक्क्याची नोंद होत होती. ३० सप्टेंबर १९९३ नंतर लहान मोठे ११३ धक्के नोंदवले गेले. १० ते १६ कि.मी.वर असणारे भूकंप केंद्र प्रत्येकवेळी थोडेफार बदलत असे. या धक्क्यामुळे घाबरण्यासारखे काही नाही अशी धारणा होत गेली. त्यामुळे १९९५ नंतर क्रमशः बसविण्यात आलेले सहा भूकंपमापन यंत्र अस्थायी स्वरूपात होते ते पुढे कार्यरत ठेवणे आवश्यक वाटले नाही. लातूर येथील यंत्रसुद्धा पूर्ण क्षमतेने कार्यरत नसून त्यावर भूकंपाची तीव्रता व केंद्र समजत नाही. भूकंप झाला एवढे समजते.

भूकंपानंतर सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता तो पुनर्वसनाचा व या अनुषंगाने विविध बाबी स्पष्ट होत होत्या. प्रारंभी विविध व्यक्ती व संस्थांना या संदर्भात काम करण्याविषयी सांगण्यात आले. जमिनीचे चुंबकीय विद्युत भौतिक भूशास्त्रविषयक शास्त्रज्ञाकडून आलेले अभ्यासपूर्ण अहवाल उपग्रहाद्वारे प्राप्त छायाचित्र यांचा या कामी उपयोग होणार होता. लातूर जिल्ह्यात सुदूर संवेदन उपयोजन केंद्राकडून प्राप्त छायाचित्राच्या सहाय्याने निवडलेल्या पुनर्वसनविषयक स्थानांना शास्त्रीय आधार होता. अशी छायाचित्रे हैद्राबादहून आंध्र प्रदेश रिमोट (Remote) सेन्सिंग एजन्सीचे संचालक राजेंद्र राव यांच्याकडून जिल्हाधिकारी यांनी मागविले होते. अर्थात भूभ्रंशाच्या परिणामाबाबत एकमत नव्हते. डेहराडूनच्या वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिऑलॉजीचे डॉ.सुरेंद्रकुमार यांनी मत नोंदवले की, भूभ्रंश सगळीकडेच छोट्या मोठ्या प्रमाणात असतात त्यापासून सुटका नाही. भूभ्रंशापासून दोन कि.मी.ची जागा सुरक्षित असत नाही. तेव्हा निवासाची जागा बदलणे फारसे उपकारक नसते. लॉस एंजल्स,कॅलिफोर्निया येथे अशी स्थलांतरे झाली नाहीत. याच आशयाचे मत पद्मनाभय्या उच्चस्तरीय समितीचे सदस्य लॉरी बेकर व डॉ.आनंद स्वरूप आर्य यांनी मांडले.

संरचना अभियंते स्ट्रक्चरल इंजिनियर आरोमार रवी व राजेंद्र देसाई 'तरू' (द ॲक्शन रिसर्च युनिट फॉर डेव्हलपमेंट) अहवालामध्येसुद्धा भूकंपामुळे गावं हलवणं अशास्त्रीय व खर्चिक आहे. सुरक्षित, शास्त्रशुद्ध घरं बांधून भूकंपाशी मुकाबला कसा करता येईल. तडे जातील पण कोसळून मृत्यू न होणारी घरं बांधणं सहज शक्य आहे, अस मत त्यांनी नोंदवले.[३९] तथापि, भूकंपाच्या अनुभवानंतर समाज मनाचा विचार करणे पण गरजेचे होते.

---

३७. लातूर अर्थक्वेक,२४ डिसेंबर १९९३, हैद्राबाद वर्कशॉप जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया यांचा अहवाल.

३८. या गॅझेटिअरचे प्रकरण १ भूगोल पहा.

३९. कंपरेटिव्ह ॲनॅलिसिस ऑफ प्रोसेस इफेक्टिव्हनेस इन पोस्ट अर्थक्वेक रिहॅबिलिटेशन इन इंडिया, अरोमार रवी-तरू अहवाल आधारे.

सदोष बांधकाम

मूळात किल्लारी परिसरात झाला त्यापेक्षाही तीव्र असे भूकंप यापूर्वी अन्यत्र झाले. १९८३ मध्ये तुर्कस्थानमध्ये भूकंप झाला त्यात १३०० लोक मृत्यू पावले. हा धक्का ७.१ असा होता. कॅलिफोर्नियाला १७ जानेवारी १९९४ ला ६.४ रिश्टरचा धक्का बसला त्यात ५७ जण दगावले. जपानमध्ये कोबेमध्ये १७ जानेवारी १९९५ ला ६.९ रिश्टरच्या धक्क्याने ५४७० मृत्यू झाले. रशियाच्या नफ्तेगोर्स्कला २८ मे १९९५ ला ७.५ रिश्टरच्या विनाशकाली धक्क्यात २००० लोक मेले. एकूण मालमत्तेचे प्रचंड नुकसान होऊनही मृत्यूची संख्या येथे तुलनेत कमी होती. किल्लारी येथील चित्र मात्र पूर्णत: वेगळे होते. एवढ्या मनुष्यहानीला भूकंपाच्या धक्क्याबरोबरच घराचे सदोष बांधकाम हेही एक कारण झाले असे मत नोंदवले गेले. लॉरी बेकर यांनी या परिसरात फिरून अभ्यास केला. त्यांच्या मते जुने वाडे चुकीच्या पद्धतीने बांधले होते. लातूर भागात चुना अतिशय कमी मिळतो. पांढऱ्या मातीचा वापर भरपूर होतो. ही माती सर्वत्र मिळत नाही. तेव्हा पांढऱ्या मातीच्या ऐवजी काळ्या मातीत घरे बांधली गेली. काळी माती पाणी शोषल्यावर फुगते व वाळल्यावर तडकते. बांधकामासाठी ती अतिशय वाईट सामग्री मानली जाते अशा मातीत बांधलेली घरे तेरणा काठी होती. शिवाय दगड रचताना आवश्यक सांधेमोड झाल्याचे आढळले नाही. भिंती बांधताना दोन दगडांच्या सांध्याखाली दुसऱ्या ओळीतील दगडाचा मध्यभागच आला पाहिजे. तसे न केल्याने सगळे सांधे एका रेषेत आले. भूकंपातल्या तरंगाणी ह्या भिंती सरळ रेषेत दुभंगल्या.

दर्शनी बाजूला दर चौ.मी. मध्ये पूर्ण रुंदीभर जाणारी अखंड लादी ठेवल्यास तेवढा भाग एकसंध धरून ठेवते. अशी लादी (हैदर) वापरलेली दर्शनी भिंतीत सगळ्यांनी चिरे (घडवलेले दगड) वापरले ते सुद्धा फक्त दर्शनी बाजूलाच होते. आतमध्ये चक्क वेगवेगळ्या आकाराचे गोटे रचले गेले व हे गोटेच न्हासाला जबाबदार झाले. एखादी तटबंदी असावी तशा ३ ते ५ फूट जाडीच्या भिंती घराला असत. खर तर भिंती न म्हणता दगड धोंडे आणि मातीनी भरलेली ही खिळपट भूकंपात अंगावर कोसळल्या. घराच्या छताचही असच होत. तीन टन मातीचा भराव पाहावयाला मिळाला. लाकडी माळवद खांब व तुळईच्या सहाय्याने उभे असते. प्रतिवर्षी दुरुस्ती करताना त्यावर मातीच्या थरांची भर पडत गेली. यामुळे लाकडी चौकडीचे कोपरे कमकुवत झाले. त्यामुळे छताखाली दबून मृत्यू पावलेल्यांची संख्या वाढली. याच भागात मजबूत चौकटी मात्र पडल्या नाहीत. भूकंपात एकही झोपडी पडली नाही. तेव्हा घर आणि दगडांच्यामुळे हानी झाली असे म्हणण्यापेक्षा यांच्या सदोष बांधकामामुळे हे घडले ही वस्तुस्थिती होती. लॉरी बेकरचे स्थानिक सामुग्री व कारागिरावर प्रचंड विश्वास. पारंपारिक पद्धतीने उत्तम घर उभे राहू शकते व ते स्वस्तही पडते असे ते नोंदवतात.

पुनर्वसनातील वैविध्य

केंद्रीय शहर विकास खात्याचे सचिव के.पद्मनाभय्या यांनी पुनर्वसन कार्याला दिशा देण्यासाठी म्हणून अनेक तज्ज्ञांना बोलावले. तरू (द ॲक्शन रिसर्च युनिट फॉर डेव्हलपमेंट) ही संस्था घर बांधणीचे सखोल सर्वेक्षण करून कार्यपद्धती सुचवत होती. त्यांनी पुनर्वसनासाठी अनेक पर्याय सुचविले होते. बिहार व राजस्थानच्या पाणीपुरवठा योजनांसाठी आराखडा केला होता. वास्तुशिल्पी, अभियंते, भूवैज्ञानिक, व्यवस्थापन तज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांच्या सहभागामुळे तरू यांचे अहवाल सर्वंकष असत. यांना तीन आठवड्यात म्हणजे २४ ऑक्टोबर १९९३ पर्यंत अहवाल सादर करण्याची जबाबदारी सोपविली गेली. रूरकी येथील केंद्रीय बांधकाम संशोधन संस्थेचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भूकंपतज्ज्ञ डॉ.आनंदस्वरूप आर्य हेही एका बैठकीला होते. त्यांनी अभ्यास करून सहकार्य करायचे ठरवले. मोठ्या प्रमाणात करावयाच्या बांधकाम व पुनर्वसनासाठी

पद्मनाभय्या उच्चस्तरीय केंद्रीय सल्लागार समिती स्थापली. महाराष्ट्र शासनाला पुनर्वसनात सल्ला देण्याचे काम करण्यासाठी प्रतिभावंत वास्तुशिल्पी लॉरी बेकर, डॉ.आनंदस्वरूप आर्य, हुडकोचे व्ही.सुरेश, डेव्हलपमेंट अल्टरनेटिव्हचे डॉ.अशोक खोसला, सुमा चिटणीस अशा अनेकांचे सहकार्य होत होते. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्त भागाच्या पुनर्रचनेची कार्यपद्धती ' तरू ' यांनी केलेला प्रदिर्घ अहवाल, त्यातील पर्याय व केंद्रीय सल्लागार समितीच्या सूचनांची दखल जागतिक बँकेने घेऊन त्याचा विचार करण्याचा सल्ला राज्य सरकारला दिला. जागतिक बँकेने बांधकाम साहित्य तंत्रज्ञान विकास परिषदेने (बी.एम.टी.पी.सी.) केलेल्या अहवालाची स्तुती केली. बँकेने सांगितल्याप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापनेसाठी ३ जानेवारी १९९४ रोजी शासन आदेश निर्गमित झाला. याचबरोबर टाटा कन्सल्टन्सी यांना सर्वेक्षण काम दिले गेले.

शासनाच्या या कामात महसूल व वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, पाणीपुरवठा व मलनिस्सारण विभाग, वीज महामंडळ, जिल्हा परिषद, सांस्कृतिक कार्य, सामाजिक वनीकरण व जलसंवर्धन, कृषी, पशुधन, उद्योग, तांत्रिक शिक्षण, महिला व बालकल्याण या खात्यांचा सक्रीय सहभाग झाला. या क्षेत्रात करावयाच्या कामासाठी पुढे येणाऱ्या देणगीदार संस्थांची यादीही बरीच मोठी आहे. तर महाराष्ट्र राज्य भूकंपग्रस्त पुनर्वसन योजनेंतर्गत सल्लागार व मानधन तत्त्वावर टाटा कन्सल्टन्सी, किर्लोस्कर कन्सल्टन्सी, म्हाडा, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायंसेस यासारख्या जवळपास २१ संस्था सहभागी होत.

जागतिक बँकेकडून मदत घेत असताना त्यांनी या भागाची पाहणी केली. राज्य सरकारला काही सूचना दिल्या. त्यांच्या पाहणी पथकामध्ये श्रीलंकेचे चंद्रा गोदावितर्ने हे पथकप्रमुख होते. ते वाहतूक अभियंता म्हणून ज्ञात आहेत. युगोस्लाव्हियाच्या यलेना पेंटॅलिक या संरचना अभियंता होते. हे दोघेही बँकेचे प्रतिनिधीत्व करीत होते. जागतिक बँकेनं युगोस्लावियाच्या डॉ.स्वेतलाना निकोलिक यांना घरबांधणी सल्लागार नेमलं. त्यांनी घरबांधणीच्या महाकाय प्रकल्पासाठी मार्गदर्शिका सूची शासनास दिली.

घराची वर्गवारी

भूकंपप्रवण क्षेत्रामध्ये पुनर्वसित घरांसाठी म्हणून शासनाच्या वतीने म्हाडा यांची सल्लागार म्हणून नेमणूक केली. त्यांनी पुनर्वसित जागेची निवड घराचे संकल्पचित्र ठरविताना प्रत्यक्ष लाभार्थींच्या व समाजातील सर्व स्तरातील लोकांचा सहभाग मिळविण्याचा प्रयत्न केला. यांनी पुरविलेल्या योजनेनुसार प्रत्येकासाठी आराखड्यात १६१४ चौ.फुट २५८२ चौ.फूट ५१६५ चौ.फूट याप्रमाणे तीन आकाराचे भूखंड वितरीत करण्याचे ठरविले. या भूखंडावर अनुक्रमे अ गटामध्ये २५० चौ.फू., ब गटात ४०० चौ.फू. व क गटात ७५० चौ.फू. चटई क्षेत्राचे घर बांधणे अपेक्षित होते. प्रत्येक घरासाठी लिचपीट पध्दतीचा संडास असणार होता. सदरहू घरांचा पाया दगडी बांधकामात जोत्यापर्यंत काँक्रीट, विटाचे बांधकाम व आर.सी.सी. स्लॅब असून लोखंडी दारे खिडक्या बसवणे व भिंतीला गिलावा करणे खोलीमध्ये शहाबादी फरशीची जमीन तसेच अंतर्गत विद्युत वायरिंग अर्थिंगसह असणे, घर भूकंपरोधक व्हावे म्हणून जोत्यावर व लिंटल पातळीवर आर.सी.सी. बँड टाकलेला असणे या बाबी मान्य केल्या गेल्या. या बांधकामामध्ये अ सदरात लाभार्थींना आणखी तीन खोल्या एक कोठी व घर जनावरांच्यासाठी शेड बांधण्यासाठी जागा उपलब्ध होती. ब सदरात लाभार्थी आपले घर आणखी सात खोल्यांनी वाढवू शकत होता. म्हणजे त्याचे घर चौसोपी वाड्याप्रमाणे झाले असते. क सदरात लाभार्थी आणखी चार खोल्या आणि एक मजला बांधू शकत होता. याप्रकारे आदर्श आराखडे तयार झाले.[४०]

४०. शासन निर्णय क्र.इक्यूआर-१०९३/प्र.क्र.७१ भूकंप, दि.३ नोव्हेंबर १९९३,परिशिष्ट ८ आणि मंगनाळे महारुद्र (मुख्य संपादक) भूकंपायण, लातूर, मार्च १९९७, पृ.४९-५०

या क्षेत्राचे वैविध्यपूर्ण प्रयोग झालेत. त्यात जागतिक किर्तीच्या वास्तुशास्त्रज्ञांपैकी लॉरी बेकर याची नोंद करावी लागते. शासनाने मूळ घरमालकाच्या मालकी क्षेत्राचा विचार करून घराच्या आकारमानाआधारे विविध गट केले होते. तर पूर्णत: नव्याने बांधकाम करावयाचे क्षेत्र आणि अंशत: क्षितिग्रस्त झालेल्या वास्तू व वसत्या यांचे मजबुतीकरण अशाप्रकारची विविध स्वरूपाची कामे हाती घेतली होती.

मल्याळम मनोरमा : भूकंपानंतर ' मल्याळम मनोरमा ' ह्या केरळच्या वृत्तपत्रसमूहाने बाणेगाव,ता. औसा, जि. लातूर येथे १६० घरे बांधण्यासाठी लॉरी बेकरचा सहभाग घेण्याचे ठरविले. ऑक्सफॅमन यांनी भूकंपग्रस्त भागातील घरे का कोसळली व पुढील घरे कशी असावी याविषयी अभ्यास करण्याची विनंती केली. मूळात स्थानिक साहित्य व बांधकाम यातून उभ्या राहिलेल्या अस्सल वास्तूरचना त्यांनी जाणून घेतल्या होत्या. प्रत्येक भागातील सामग्री व गरजा वेगळ्या असतात व त्यानुसार उत्तम, देखणी व मजबूत घरे बांधता येतात यावर त्यांचा विश्वास होता. लातूर परिसरातील सदोष बांधकाम पध्दतीमुळे हानी झाली व ही बाब टाळता येऊ शकते हेही त्याने स्पष्ट केले. बाणेगावमध्ये लॉरी बेकर याने बराच काळ काम केले. त्यांना मानणारे अभियंते व वास्तुविशारद सर्वत्र आहेत. स्वस्त, सुंदर व निसर्ग जपणाऱ्या घरांची संकल्पना त्याने केरळमध्ये रुजवली. मूळात कृषी संस्कृतीतल्या घरातील मुख्य वावर मोकळ्या अंगणात असतो. घराभोवती भिंतींच कुंपण असत, त्यामुळे घराला, जनावरांना सुरक्षितपणा लागतो, गोठा, स्वयंपाक, धान्य वाळवणं, अशा कित्येक गोष्टी खुल्या जागेतच केल्या जातात. या परिसरातल्या शेतकऱ्यांच घर भूकंपापूर्वी असेच होते. तेव्हा शहरी पध्दतीच्या रचनेत त्यांना इच्छेविरुद्ध घेऊन जाणे संयुक्तिक नव्हते ही लॉरी बेकरची धारणा. ती त्याने गावकऱ्यांसमोर ठेवली. ग्रामस्थांनी जुन्या गावासारखीच रचना स्वीकारली. शहर रचनेमध्ये २७०० मीटर लांबीचे रस्ते बेकरच्या रचनेत १२०० मीटर एवढेच झाले. गलिच्छ सांडपाणी वाया न घालवता ते वनीकरणासाठी उपयोगात येणार होते. साधारणत: १८० रु.चौ.फूट या दरात होणारे बांधकाम फरशी, गोठा, हौद, भिंतीच कुंपण एवढं सार देणार होत. अर्थात काही तांत्रिक कारणांनी मनोरमा कंपनीने स्वत:च बांधकाम करण्याचा निर्णय घेतला व तसे लॉरी बेकरला २० मार्च १९९४ रोजी कळविण्यात आले.[४१]

भूकंपग्रस्त भागात सिमेंट कॉंक्रिटमधील बांधकाम झपाट्याने वाढत होते. नवे प्रयोग, स्वस्त पर्याय, निसर्गाबरोबर संवाद याबाबी फारशा गती घेत नव्हत्या. ऑक्सफॅमने लॉरी बेकरला पुन्हा काम करण्याची विनंती केली. जिल्हाधिकारी परदेशी हेही बेकरच्या तत्त्वप्रणालीला अनुकूल होते. इको सेन्सिटिव्ह अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट सेंटर (इ.एस.डी.सी.) ही केरळमधील संस्था. त्यांनी उजनी गावात घरं बांधण्याचे ठरविले. दलित वस्तीत ५० घरे बांधावयाची होती. गवड्यांना प्रशिक्षण देण्यासाठी इ.एस.डी.सी.शी करार केला गेला. १९९५ च्या जानेवारीत जयगोपाल हे अभियंते आपल्या सहकाऱ्यांसह कामाला लागले. उजनी गावाच्या प्रवेशालगत असलेल्या स्थानावर जोड घराचे बांधकाम सुरू झाले. सुरेख विटांच्या जाळीदार भिंती, दगडांचा अप्रतिम वापर, मूळात असलेले वृक्ष कायम ठेवून दोन खोल्यालगत अंगण, बाहेर संडास, न्हाणीघर, बसायला झाडाशेजारी पार अशी रचना होती. तीन महिन्यात दोन नमुना घरे उभी राहिली. शासकीय अधिकारी व बँक यांनी भूकंपग्रस्त भागातील आदर्श घर म्हणून त्याची नोंद घेतली. परिसरात होणारी अन्य कामे पाहताना सर्वांनाच याचा स्वीकार करावासा वाटला नाही. काही तांत्रिक मुद्दे पुढे आले. उजनीत प्रकल्प व्यवस्थापन गटाला नमुना घर बांधायचे असल्याने त्यांनी बांधकाम सुरू केले. सहा फूट खोल पाया घेतला. बांधकाम खात्याच्या नियमानुसार काळ्या मातीत स्तंभिका (पाईल) घालून पाया करावा लागे. तुलनेत इ.एस.डी.सी.चा पाया तीन फूटच होता. जुन्या खिल्लारी व इतर गावात मूळात पाया एक फूटच होते. पाया

४१. देऊळगावकर अतुल, **डळमळले भूमंडळ,** नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली (प.), मुंबई ,द्वितीय आवृत्ती,एप्रिल २००५ पृष्ठ ८६.

खणून पांढरी माती टाकली जायची. पायाचा उद्देश काळ्या मातीला बांधकामापासून दूर ठेवायच हा असे. काळी माती पाण्याने फुगते.ओल गेली की तडकते, त्यामुळे बांधकामावर दाब येऊन भेगा जाऊ शकतात. हे टाळण्यासाठी मुरुम किंवा पांढरी माती टाकून पायापासून काळ्या मातीला दूर ठेवायचे. पडलेलं पाणी मुरुम, पांढरी माती अडवून धरत नाही. मग अशा पायावर दोन मजली घरसुध्दा बांधता येतात. ही बाब गोदावरीसारख्या नदी किनाऱ्यावर असलेल्या इमारतीच्या संदर्भातही लागू पडते. एकूण जयगोपाल यांनी १८ घरे बांधली. या संदर्भात सुद्धा काही तांत्रिक मुद्दे उपस्थित झाले.

विविध प्रयोग

भूकंपप्रवण क्षेत्रात जे विविध प्रयोग झाले त्यात प्रारंभी १७ x १० चौ.फूटांची पत्र्यांनी वेढलेली जागा आता तात्पुरत्या निवाऱ्यासाठी होती. त्यानंतर पक्क्या बांधकामासाठी चांगल्या स्वरूपाच स्वस्त अस बांधकाम साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. बंगलोरमधील भारतीय विज्ञान संस्था (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स) येथे काम करणाऱ्या पर्यावरणप्रेमी अभियंत्यांनी एकत्र येऊन ॲस्ट्रा (अप्लाइड सायन्स अँड टेक्नॉलॉजी इन रुरल एरिया)ची स्थापना केली. ग्रामीण भागात स्वस्त, उपयोगी व कार्यक्षम तंत्रज्ञानाचा विकास व प्रसार करण्यासाठी सतत प्रयोग करतात. याच पध्दतीने भूकंपग्रस्त भागात घर बांधकामासाठी पर्याय शोधताना वरोरा येथील आनंदवनचे डॉ. विकास आमटे यांनी आनंदवनातील कुष्ठरोग्यांच्या सहाय्याने उजाड माळावर हिरवळ निर्माण केली होती. ॲस्ट्राची माती व सिमेंटनं स्थिरावलेली विट आणि औरंगाबाद येथील जमील मिस्त्रीची रचना एकत्र करून विकास आमटेने आनंदवनात ४० रु.चौ. फूट इतक्या स्वस्त पध्दतीने घर बांधले होते. विकास आमटेनी जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून या भागात तात्पुरत्या निवाराच्या ऐवजी घुमटाकार घरांची रचना करण्याचा प्रयोग किल्लारी तांड्यात केला. बाबा आमटे यांनी येथे भेट देऊन मी काय तुम्हाला मनोबल देणार, आपत्ती सहन करून तुम्ही दाखवलेली जिगीषावृत्ती मी घ्यायला आलो असं म्हणत त्यांनी भूकंपग्रस्तांच्या व्यथा ऐकल्या.

इजिप्तचे वास्तुशिल्पी हसन फार्दीच्या चरित्राने घुमूटाकार रचनांची प्रेरणा आमटेंना मिळाली. औरंगाबादच्या जमील मिस्त्रींच्या लेखांचाही त्याने उपयोग केला. घुमुटाकार छतासाठी पत्र्यांचा साचा केल्याने खडबडीतपणा निघून जाऊन दर्शनी भाग गुळगुळीतपणा येतो. केवळ विटांची रचना बदलून भक्कमपणा आणता येतो. असा झिगझॅग आकाराचा बंध (रॅट टॅप बॉंड) त्यांनी तयार केले. आनंदवन प्रमाणे हा प्रयोग होता. माती-सिमेंटच्या विटा ह्या विशिष्ट मिश्रणामुळे स्वस्त पडत. या विटा चांगल्या असल्याविषयी एकमत होत. घुमटाकार घर भूकंपाच्या दृष्टीने संरचना स्थापत्यांना सुरक्षित वाटत नव्हते. कमान (आर्च) कमी लांबीची असल्यास मजबूत असते. परंतु कमानीची लांबी वाढली की (व्हॉल्ट) भूकंपातल्या भूपृष्ठ तरंगांनी ते कोसळण्याची शक्यता असते. अर्धघुमट हा धनुष्यासारखा आहे, त्याला स्थिर करण्यासाठी एक तर दोरीसारखे तिरपे आधार द्यावे लागतील किंवा चक्क सळ्या टाकून रिइनफोर्समेंट करावी लागते. जागतिक बँकेच्या सल्लागार स्वेतलाना व यलेना ह्या देखील आकाराबाबात धोका पत्करायला तयार नव्हते. तेव्हा अशा अर्धघुमटाकार घरात रिइनफोर्समेंट करण्याचा अभिकल्प स्वीकारला गेला. तज्ज्ञांनी या घराच्या आकाराला नकार दिला.

गुबाळ येथील घरे : गुबाळ येथे ॲड्रा ही संस्था पुनर्वसन करत होती. भूकंपरोधक तत्त्वासाठी एकसंध संरचनेचा डोम ॲड्राने निवडला. टूंड्रा प्रदेशातील एस्किमोंच्या इग्लुसारखी डोमची रचना असते. डोमचे जनक अमेरिकेतील अभियंते बकमिन्स्टर फुलर (क्रिटिकल पाथ चे लेखक) त्रिकोण ही मजबूत भौमितिक रचना आणि गोल ही उष्णता, वारा यांना कमीतकमी अडथळा आणणारी रचना असल्यानं त्रिकोण रचत पंचकोन व त्यातून घुमट तयार केला जातो. फुलरनी त्याला जिओडेसिक डोम अस म्हटल. मुंबईचे डॉ. कळबाग हे या रचनेने प्रभावित झाले होते. डॉ. कळबाग यांनी मूळ सांगाडा उभारल्यावर त्याभोवती

जाळी लावून काँक्रिटचा थर देणे या पध्दतीने डोम उभारला. सळ्यांना नटबोल्ट लावून षटकोन तयार केले व असे अनेक षटकोन जोडून घुमट झाला. खिडक्यांसाठी त्रिकोणी जागा सोडल्या. जाळी बांधून घेतली. काँक्रिटचा थर मारल्यावर पोत्यांन बांधून ठेवून त्यावर पाणी मारल. साधारणपणे दहा दिवसात डोम तयार होई. गुबाळमध्ये झालेल्या प्रयोगातून चटकन नजरेत येणारी एक मोठी खोली व घुमटाकृती छत असे याचे स्वरूप आहे.

असे विविध प्रयोग या परिसरात होत होते. कमी खर्चाची घरे या संकल्पनेतून मशाल या संस्थेने जोत्यापर्यंत दगडी काम करून वर बांबूची भिंत बांधण्याचा प्रयोग केला. या बांबूच्या भिंतीला पांढरी माती, शेण, अंबाडी, गुळ, तुरटी यांचा लेप लावला. छतासाठी पत्रेच वापरले. अर्थात ग्रामस्थांना या स्वस्त पर्यायापेक्षा सिमेंट काँक्रिटचीच घरे योग्य वाटली.

मुंबईतील कृ. रा. दाते यांनी बांधकामातील ऊर्जेची बचत करण्यासाठी लोखंडाचा वापर कमीतकमी करून त्याऐवजी बांबू आणि लाकूड वापरला. अणदूर, औसात दातेंच्या अभिकल्पानुसार घरे बांधली. या घरांचं छत तुकड्या तुकड्यांत पूर्वरचित करून नंतर सांधलं जाई. नमुना प्रकल्पा पलिकडे याची अंमलबजावणी फारशी झाली नाही.

मंगरूळ : महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रिज यांनी मंगरूळ येथे बांधलेल्या घराच्या भिंतीत दर २० सें.मी.अंतरावर १२ सें.मी.व्यासाची गोलाकार पोकळी ठेवली. शिवाय भिंतीतून आलेल्या उभ्या सळ्या छतावरील सळ्याबरोबर घट्ट बांधल्यामुळे एकजिनसीपणा निर्माण झाला. अशी मंगरूळची घरे जागेवरच रचलेली (कास्ट इन सिट) आहेत. पत्र्याच्या आधाराने काँक्रिट ओतून भिंती तयार करत. आतमध्ये सळ्या ठेवत. दोन पत्र्याच्या मध्ये सिमेंट ओतताना आधी पाईप ठेवून नंतर ते काढून घेतल्याने भिंतीत पोकळीही राहते. बचत होई. तसेच उष्णतारोधकताही येते. सद्या भूकंपात न पडणारे घर एवढाच हा एकमेव निकष असल्याने लोकांना ही घरे मनापासून आवडली. याचीच मागणी होऊ लागली. मंगरूळी घर हव असा आग्रह वाढू लागला. घराच्या भिंतीत कोठेही कप्पा, कोनाडा अजिबात नाही. गांजणखेडा, तळणीच्या काँक्रिटचे ब्लॉक वापरलेल्या घरातही हीच अडचण आहे.

मूळात पारंपारिक पध्दतीची घरे वर्षानुवर्षांच्या सवयी व त्याप्रमाणे स्वाभाविक वाटणाऱ्या गृहरचना नवीन बांधकामामध्ये लुप्त झाल्या होत्या. शिवाय भूकंपाविषयीची दहशत दीर्घकाळ रेंगाळली. परिणामी कुल्याही पध्दतीने बांधलेल घर सामान साठवणुकीसाठी उपयोगात येऊ लागल्या आणि घरालगत पत्र्याच्या आधारे केलेल्या आडोशात खऱ्या अर्थाने संसार उभा राहिला असे चित्र या परिसरात दिसते.

भूकंपरोधक बांधकाम तंत्रातील विविधता : कॉंक्रीटचे छत असलेले कॉलम बीमचे बांधकाम- अशी घरे सिरसल येथे बांधली गेली. याचा बांधकाम खर्च २५०/- रु.प्र.चौ.फू. आला. सिमेंट ब्लॉक (गट्टू) च्या भिंतीवर सलोह काँक्रीटचे छत असलेले, कॉलम बीमचे बांधकाम-अशी घरे राजेगांव येथे बांधली गेली.या बांधकामासाठी रु.२५०/- प्रति चौ.फू. आला. सिमेंट ब्लॉक (गट्टू) च्या भिंतीवर पत्र्याचे उतरते छत असलेले, कॉलम बीमचे बांधकाम- या पध्दतीची घरे बांधताना घराचे खांब काँक्रीटनी भरल्यानंतर जास्तीचे आवरण असलेल्या पत्र्याचे छप्पर असून उतरती छपराची बांधणी करताना इंग्रजी जे आकाराच्या बोल्टनी घट्ट बांधले जातात. आतल्या बाजूस उष्णतारोधक छोटे छप्पर केलेले असते. अशी घरे तळणी, हत्तरगा याठिकाणी पाहायला मिळतात. सिमेंटचे पोकळ ब्लॉक (गट्टू)च्या भिंतीवर सलोह काँक्रीटचे छत असलेले बांधकाम - असे काम कासा या देणगीदार संस्थेने गांजनखेडा, सारणी, बाभळसूर आणि सय्यद हिप्परगा या ठिकाणी नवीन वसाहतीच्या जागेवर केले. यात छत सलोह काँक्रीटचे असते. ही पध्दत भूकंप झाला तरी भार पेलण्यास सक्षम मानली जाते.[४२]

४२. मंगनाळे महारूद्र (मुख्य संपा.) भूकंपायण, लातूर,१९९७, पृ.४०-४१

रेबेचिंचोली : जनकल्याण समितीच्या वतीने पुनर्वसनाचे काम गावच्या मूळ जागेपासून २ कि.मी. अंतरावर नवीन भूखंडावर केले गेले. यासाठी मूळ संकल्पनेच्या ऐवजी म्हाडा यांनी मान्य केलेला आराखडा स्वीकारला गेला. वास्तू उभारताना केंद्रीय बांधकाम संशोधन संस्था, रुडकी यांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब केला गेला. उच्च प्रतीचे बांधकाम साहित्य, कुशल तंत्रज्ञ यांचा उपयोग करून बांधलेल्या वास्तुसाठी वाळू व खडी हे मुख्य घटक स्थानिक पातळीवर उपलब्ध होते. पूर्वरचित भिंती व छतांच्या निर्मितीमध्ये पोकळी ठेवली त्यामुळे त्याचे वजन कमी झाले तसेच बांधकाम साहित्यातही बचत झाली. शिवाय या तंत्रज्ञानामुळे तीव्र प्रकारच्या उष्ण व थंड हवामानापासून सुरक्षितता प्रदान करण्याची क्षमता अशा घरातून निर्माण झाली. घराशिवाय त्यांनी रस्ते, सांडपाणी निचऱ्याची व्यवस्था, प्राथमिक शाळा, मंदिरे, ग्रामपंचायत कार्यालये व वीजे सारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या.[४३]

हरेगाव : जवळगावाडी या ठिकाणी रामकृष्ण मिशनच्यावतीने घरे बांधण्यात आली. हरेगाव येथे ४२४ घरे, जवळगावाडी ला ५५ घरे, कवळी येथे १६७ घरे बांधण्यात आली. रामकृष्ण मिशनचे वतीने या क्षेत्राची मोठी मदत केली गेली. त्यावर प्रारंभी मदती व्यतिरिक्त गावाचे पुनर्वसनामध्ये त्यांनी सहभाग घेतला. साधारणपणे ४.७० कोटी प्रारंभिक तात्काळ मदती व्यतिरिक्त मूलगामी स्वरूपाचे काम केले. यांनी वास्तू उभारणीसाठी उपयोगात आणलेल्या तंत्रातले वैशिष्ट्य म्हणजे भूकंप प्रतिरोधक वास्तुच्या दृष्टीने प्रारंभी पाया खोदून खाली जाड वाळूचा थर दिला व त्यावर आरसीसीचे सलोह काँक्रीटचे कॉलम व बांधकाम केले आहे. यामुळे भूकंप क्षेत्रातील सर्वोत्तम डिझाईन म्हणून या कामाला मान्यता मिळाली. तुलनेत हे काम खर्चिक असले तरी यामुळे कोणताही वेगळा वाद निर्माण झाला नाही. केवळ निवासी संकुलापुरती याची योजना मर्यादित नव्हती तर पाणी साठविण्यासाठी मोठाले हौद, शाळा, बालोद्यान याची सर्व सोयीनी युक्त अशी निर्मिती केली गेली. शाळामध्ये फर्निचर, ग्रंथालये याही बाबी उपलब्ध करून दिल्या गेल्या. शिवाय पुनर्वसनाचा भाग म्हणून विवेकानंद ग्रामच्या वतीने विविध प्रकारच्या संस्कारविषयक कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.[४४]

नवीन वसाहत

भूकंपानंतर नवीन वसाहतीसाठी तातडीने जे प्रयत्न झाले त्यातील विविध व्यक्ति व संस्थांनी ज्याप्रकारच्या घराच्या प्रतिकृती निर्माण करून दिल्या त्यामध्ये बहुतेकांनी पूर्ण भिंतींना एकत्रितपणे धरून ठेवणाऱ्या आर.सी.सी.च्या कड्यांचा समावेश केला. साधारणतः जोत्याच्या वर, त्यानंतर भिंतीची उभारणी अर्ध्यापर्यंत झाल्यावर आणि छताच्या खाली अशा तीन कड्यांचा समावेश करून भूकंपप्रतिरोधक घरांचे आराखडे मांडले गेले. गृहरचनेमध्ये जे वैशिष्ट्य होते त्यात पूर्वरचित (प्रीकास्ट) जागीच रचित (कास्ट इन सिट) तुळई-खांब (फ्रेम स्ट्रक्चर) याप्रकारांचा समावेश होता. पूर्व कामाचा अनुभव गतीने काम करणारी आवश्यक यंत्रणा व किमान किंमतीत होणारे काम याला प्राधान्य मिळणे स्वाभाविक होते. या निर्माण प्रक्रियेमध्ये लोकसहभाग असावा असे मत जागतिक बँकेच्या सल्लागारांनी व्यक्त केले. स्वयंसेवी संस्थांना कामाची संधी देणे आणि प्रत्यक्ष निर्माण प्रक्रियेत लोकसहभाग घेणे या दोन्ही गोष्टी एक वैशिष्ट्य म्हणून नोंदवाव्या लागतात.

---

४३. विवेक इन्टरनॅशनल, मुंबई या पुस्तिकेतील नोंदी, पृ.१०-१२

४४. स्वामी विष्णुपादानंद, सहसचिव, रामकृष्ण मिशन, मुंबई यांच्या वतीने उपलब्ध माहिती आधारे.

अनुक्रमणिका

नवीन गावठाण हे स्वाभाविकपणे जुन्या गावठाणापेक्षा किमान पाच पटीने मोठं होणे अपेक्षित होते. यादृष्टीने जमीन संपादन करताना होणाऱ्या कार्यवाहीवर कास्तकारावर परिणाम होणे स्वाभाविक होते. विविध सेवाभावी संस्थांनी व शासनाने पुनर्वसित गावामध्ये योग्य रस्ते, सांडपाण्याच व्यवस्थापन, समाज मंदिर, शाळा, मंदिरे, आवश्यक सुविधा यांचा विचारही केला.

जुन्या घरांचे मजबुतीकरण

पूर्णत:पडझड झालेल्या घराशिवाय अ-४ या दर्जाच्या अंशत: पडझड झालेल्या दीड लक्ष घरांची दुरुस्ती होणे अपेक्षित होते. यादृष्टीने भूकंपरोधक घरासंबंधी संशोधन रूरकीला केंद्रीय बांधकाम संशोधन संस्थेत (सी.बी.आर.आय.) होत होते.डॉ.आनंदस्वरूप आर्य यांनी पुढाकार घेऊन भूकंपप्रवण भागातील घर बांधकामाच्या मार्गदर्शिका भारतीय मानक संस्थेसाठी तयार केले. दगड गोट्यांच्या घरांसाठी ते पूर्ण न पाडता जागीच मजबुतीकरण (रिट्रोफिटिंग) करण्याचे ठरले. या पध्दतीतून औसा तालुक्यातील मोगरगामध्ये पहिल्या घराचे मजबुतीकरण झाल. अशी घरे पाहून बँक अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

यासाठी अशास्त्रीय पध्दतीने बांधलेल्या घराचे दोष मजबुतीकरणात कमी केले जातात. भिंतीच्या रूंदीभर जाणाऱ्या लाद्या (हैदर) वापरल्या जात नव्हत्या. आता एक चौरस मीटर अंतरावर पहारीनं भोक पाडून त्यात सळई व काँक्रिट भरल जातं. असे हैदर ठिकठिकाणी टाकून भिंत मजबूत होते. बाहेरच्या (दर्शनी) बाजूनं संपूर्ण भिंतभर छताच्या खाली दोन फूट बारीक जाळी पसरवून ठोकली जाते. त्यावर काँक्रिटचा थर मारल्यानं संपूर्ण भिंत एकसंध ठेवणारा आर.सी.सी.पट्टा तयार होतो. खांबांना तिरपे आधार देऊन कोपरे मजबूत केले. छताचं वजन प्रचंड असायचं. आता छताची जाडी चक्क एकतृतीयांशावर आणून ठेवलीय. माती काढून टाकली. पाणी आत झिरपू नये म्हणून पॉलिथिनचा उपयोग केला गेला. या सर्व बाबी जाणीवपूर्वक केल्या गेल्या.

डॉ.आर्य यांच्या प्रयोग चाचणीत हे स्पष्ट झाले की असे पुन्हा मजबूत केलेले जुने घर ७ रिस्टर क्षमतेच्या भूकंपाला सुद्धा तोंड देऊ शकते.[४५]

भूकंपामध्ये भूकंप प्रतिरोधक घरासाठी म्हणून केलेल्या विविध प्रयोगांच्यापैकी काही निवडक नोंदी वर दिल्या आहेत. अनेक संस्थांनी केवळ घरे न बांधता गांवातील रस्ते,सांडपाण्याची व्यवस्था, प्राथमिक शाळा, वीज व अन्य पायाभूत सुविधांबरोबरच समाजकल्याण मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय सुद्धा बांधून दिली. याशिवाय शौचालय, बायोगॅस पुरवठा, विविध ठिकाणी विहिरी व हापशाची व्यवस्था करून दिली गेली. पाण्याच्या टाकीचे नव्याने बांधकाम केले गेले हे विशेष. ही कामे अधिकृत पणे २८ ऑक्टोबर १९९४ मध्ये पूर्ण झाली.

पारधेवाडीचा प्रयोग : ज्या भूकंपप्रवण क्षेत्रात तातडीने कामे करणे अपेक्षित होते तेथे ती होत होती. तथापि यापलिकडील क्षेत्रात असलेल्या गावांनाही भूकंपासारख्या घटनेनंतर योग्यप्रकारे पुनर्वसन करण्याची गरज जाणवत होती. बलसूर तांड्यानही रामपूरप्रमाणे सर्वांनी एकत्र येऊन जागा विकत घेवून स्वत:चे पुनर्वसन स्वत:च करून घेतले. तर लातूर किल्लारी रस्त्यावर किल्लारीपासून तीन कि.मी. अंतरावर उजव्या बाजूला दोन कि.मी.च्या आत पारधेवाडी आहे. १६२ घरे व ७३१ लोकसंख्या असलेले हे गाव दुष्काळी गाव म्हणूनच ज्ञात होते. या परिसरातील जे प्रश्न पुढे आले त्यात मानसिक पुनर्वसन आरोग्यविषयक प्रश्न, पर्यावरणाचा प्रश्न, पाणीव्यवस्थापन यासारख्या अनेक बाबी होत्या. त्याही दृष्टीने विविध सेवाभावी

४५. देऊळगांवकर अतुल , **डळमळले भूमंडळ**, पृ.१५८ व **बखर पर्यावरणाची**, मौज प्रकाशन, मुंबई २००६, पृ.११

संस्था कार्यरत होत्या. त्यांना कमीअधिक प्रमाणात यश मिळत होते. पारधेवाडी ग्रामस्थांनी लोकसहभागातून स्वत:च पुनर्वसन करण्याचा निर्णय केला. मानवलोक सारख्या संस्था व शासन अंशत: का होईना पाठीशी होत. दहा महिन्यात पारधेवाडीचे बांधकाम पूर्ण झाले. सामायिक भिंती, मोफत निरिक्षण, सामानाची एकत्रित खरेदी यामुळे खूपच माफक किंमतीमध्ये यांचे काम होत होते. प्रत्येकाने आपल्या अंगणाचा सुरेख वापर करून दगडी भिंतीच कुंपण रचून घेतलं. गावातली काम होत असताना परिसरातील शेतीचाही विचार केला गेला. गावाजवळच्या तळ्यातला गाळ साफ करण्यात आला. प्रत्येकाच्या शेतात दोन इंचपर्यंत तळ्यातल्या सुपीक मातीचा गाळ बसविला गेला. स्वाभाविकपणे शेतीच्या मधून येणारे पीक अनेक पटीत वाढले. निसर्गप्रेमींनी सर्वंकष वनीकरणाचा आराखडा तयार केला. विहिरीचा गाळ काढून दुरुस्तीची कामे पूर्ण केली. एकाच गावात अनेक तज्ज्ञ ज्यांच्या बौध्दिक ज्ञानाचा, अनुभवाचा पुरेपूर फायदा पारधेवाडीला मिळला. त्यांची ग्रामपंचायत निवडणूक ही बिनविरोध झाली. बँक अधिकारी पुनर्वसन सचिव, मुख्य अभियंता सारख्यांनी याची नोंद घेतली. जिल्हाधिकारी प्रवीण परदेशी म्हणाले, स्थलांतरित गावांच्या घरबांधणीचा प्रश्न अवघड नव्हता. दुरुस्ती मजबुतीकरणाची काळजी होती. जागेची दुरुस्ती व पुनर्बांधणी करायला गाव तयार नव्हती. आम्हाला पारधेवाडीन वाट दाखवली. आम्ही पाच हजार घरांना पंचवीस टक्क्याऐवजी ९० टक्के अनुदान द्यावयाचे ठरविले. परिणामी हळदुर्ग, कण्हेरी यासारखी गाव पुनर्वसनात वेग घेऊ शकली. पारधीवाडी मुळे जागेवरच घरे बांधणाऱ्या गावचं उदाहरण देता आले. लोकसहभागही स्पष्ट झाला.

लातूर जिल्ह्यातील पुनर्वसन

भूकंपामुळे ३,६७० लोक व ८,५०० जनावरे मृत्यूमुखी पडले. किल्लारी परिसरातील १४,००० पेक्षा अधिक घरे व नागरी सुविधा पूर्णत: नष्ट झाल्या. लगतच्या परिसरात जवळपास १,२०,००० घरांचे कमी-अधिक नुकसान झाले. लातूर जिल्ह्यातील २७ गावांमध्ये १४,३२७ घरांचे बांधकाम शासन व देणगीदार संस्थांच्या वतीने हाती घेण्यात आले. शासनाच्या वतीने ८,४४४ घरांचे बांधकाम हाती घेतले गेले. पैकी लातूर जिल्ह्यात 'अ' वर्गात बांधलेल्या घरांची संख्या खालीलप्रमाणे - आशिष १,१७४, आशिष तांडा- ३५, बानेगाव - १८३, चिंचोली जोगन - १५१, गोंटेवाडी - ४०, चिंचोली तपसे - ५३२, गाढवेवाडी - १८६, दापेगाव - २६५, गांजनखेडा - ११६, गुबाळ - २६०, हारेगाव - ५३०, हासलगन - ६०४, जवळगा पो.दे. - ४६६, कवळी - १७१, लिंबाळादाड - ४४५, लिंबाळा तांडा - ४१, माळकोंडजी - ३५९, मंगरूळ ५४६, नदिहत्तरगा - ४४४, नांदुर्गा - ६०६, नांदुर्गातांडा - ७९, जवळगवाडी - ६०, सक्राळ - ११०, सारणी - २०८, सरवडी - ६५६, सिसल - ३०२, तळणी - ६४९, तुंगी बु. - ५४२, उत्का - ३९०, उत्कातांडा - ४५, येळवट - १४६. घरांच्या बांधकामाशिवाय पाणीपुरवठा, रस्ते, नागरी सुविधा, विद्युत पुरवठा यासारख्या सोयी शासनाच्या वतीने पुरविण्यात आल्या. जुन्या गावामध्ये ज्या इमारती भूकंपाच्या पूर्वी होत्या त्या सर्व वास्तूंचे बांधकाम नवीन गावातही करून देण्यात आल्या.

लातूर जिल्ह्यामध्ये 'ब' वर्गाच्या अंतर्गत देवताळा २२८, वरवडा २७४, माळुंबा १२७, जावळी-मुगळेवाडी ६००, तांबरवाडी-राजेवाडी ५००, लोहटा मसलगा १६९, उजनी १,२३०, हिप्परगा कावळी ४७३, मुदगड एकोजी ६००, दाऊतपूर ४६४ असे एकूण ४,६६५ घरांचे पुनर्बांधकाम करून देण्यात आले. शासनाच्या वतीने विद्युत पाणीपुरवठा यासाठी प्रत्येक घरासाठी ६२,००० रुपये अनुदान दिले गेले. घर बांधकामामध्ये स्वयंसेवी संस्थांचा सहभागही लक्षणीय राहिला. 'क' वर्गाअंतर्गत लातूर जिल्ह्यात ७४९ गावात १,१२,२६३ लाभार्थीना घर दुरुस्ती व मजबुतीसाठी प्रत्येकी रु.१७,५०० व ३४,००० असे अनुदान दिले गेले.[४६]

---

४६. अतिरिक्त जिल्हाधिकारी (भू.पू.) लातूर यांनी पाठवलेली भूकंप व पुनर्वसन योजनेबाबतची संक्षिप्त टिपणी, जि.लातूर याच्या आधारे.

किल्लारी गावाचे पुनर्वसन

किल्लारी (ता.औसा) या ठिकाणी विशेषत्वाने लक्ष वेधले जात होते. ग्रामस्थांच्या मागणी नुसार लातूर -उमरगा रोडवर किल्लारी भाग १ चे पुनर्वसन १७८.०७ हेक्टर जमीन संपादन करून करण्यात आले. यासाठी शेतकऱ्यांना जमिनीची किंमत म्हणून रु.८३,०८,३८७/- अदा करण्यात आली. किल्लारी भाग २ चे पुनर्वसन तळणी रोडवर करण्यात आले. यासाठी १४.७४ हेक्टर जमीन संपादन करण्यात आली व शेतकऱ्यांना ५७,८३,०५९/- रुपये वाटप करण्यात आले. किल्लारी भाग १ मध्ये एकूण २,३७३ घरे व भाग २ मध्ये १७८ घरांचे बांधकाम शासनाच्या वतीने होणार आहे. किल्लारी येथे शासनाच्या वतीने ग्रामपंचायत, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, अंगणवाडी, समाजमंदिर, महिला केंद्र, वाचनालय, तलाठी कार्यालय, बालवाडी, पशुवैद्यकीय चिकित्सालय, व्यायामशाळा, कोंडवाडा, कत्तलखाना, सोसायटी गोडाऊन इ. सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तसेच व्यापारी संकुल बांधण्यात आले असून ३०२ गाळ्यांचे वाटप झाले आहे. धार्मिक स्थळांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली. गावामध्ये सहारा इंडिया या देणगीदार संस्थेने ६६ घरांचे बांधकाम पूर्ण केले. किर्लोस्कर कन्सल्टन्स या संस्थेने किल्लारी भाग २ मध्ये १७८ घरे तर किल्लारी भाग १ मध्ये युनिक सर्व्हिस ट्रस्ट या संस्थेने ५७२ घरे बांधली.

शासन आणि विविध सेवाभावी संस्था यांच्या वतीने भूकंपप्रवण क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर घर व अन्य बाबींचे बांधकाम करण्यात आले.

जनकल्याण समितीच्या वतीने लातूर जिल्ह्यात भूकंपानंतर निवासी विद्यालय हरंगुळ बु. येथे सुरू करण्यात आली. यामध्ये प्रारंभी ४०० विद्यार्थ्यांची सोय करण्यात आली. तर लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यात मिळून एकूण २० गावात भारतमाता मंदिर प्रकल्प राबवला गेला. ज्यामध्ये नंदी हत्तरगा, मंगरूळ, किनीनवरे, यलोरी, माळकोंडजी, हसलगन ही लातूर जिल्ह्यातील गावे होत. भारतमाता मंदिरामध्ये सेवावृत्ती कार्यकर्त्यांचे वास्तव्य असते. संस्कार वर्ग, बालवाडी, अभ्यासिका, वाचनालय, महिला बचत गट, किशोर विकास यासारखे उपक्रम राबवले जातात.

नवीन वसाहतीचे स्वरूप : साधारणत: पाच वर्षांमध्ये बाराशे कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून पन्नास स्थलांतरित गावात पन्नास हजार नवीन घरं, जिल्ह्यातील एक लाख ऐंशी हजार घरांची दुरुस्ती करणारं पुनर्वसन कार्य पूर्ण केल. कुठल्याही आपत्तीमुळे हानी पोहोचलेल्या क्षेत्रात शासन मदत करत. सहसा अशी मदत नुकसानभरपाईच्या स्वरूपात दिली जाते. लातूर भूकंपानंतर मात्र शासनाने स्वत: पुढाकार घेऊन व्यापक प्रमाणात मोठं काम केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात असे काम केल्याची अन्यत्र कुठेही नोंद नाही. या कार्यामुळे जागतिक बँकेने महाराष्ट्र शासनाची मुक्त कंठाने स्तुती केली.

पुनर्वसन योजनेमुळे किंचित पडझड झालेल्या घरांनासुद्धा अनुदान मिळाल व भूकंपरोधक सलोह कॉंक्रिटच कड असलेली किमान एक खोली मिळाली. स्वत: शासनान प्रत्येक गावातून आपत्तीग्रस्तांचा शोध घेतला ही विशेषत्वाने नोंद करणारी बाब होय. याशिवाय प्रत्यक्ष वसाहतीशी संबंधित नसणाऱ्या पण सांस्कृतिक वारसा सांगणाऱ्या पुरातत्त्वीय स्मारकांचे जतनविषयक कामसुद्धा मोठ्या प्रमाणात करण्यात आले.

पुनर्वसनामुळे मूळ गावांचे स्वरूप बदलले. गावाच्या प्रतिष्ठीचे लक्षण असलेली गढी व गढीवाडे इतिहासजमा झाले. वर्ण, वर्ग आणि श्रेणीप्रमाणे असलेली गृहरचना संपली. तात्पुरत्या छावण्यात तर सर्व गाव एका पातळीवर आले. सरपंच आणि शेतमजूर सगळ्यांच्या गृहरचनेत समानता आली. पारंपरिक वैशिष्ट्ये संपली तसेच परंपरेने आलेल्या भेदाच्या भिंतीही पडल्या आणि सामाजिक समरसतेच्या दृष्टीने सहजपणे अनेक गोष्टी घडून आल्या. माणूस धीट झाला. निसर्गाच्या प्रकोपाने त्याला शहाणपण दिल आणि तो न्याय हक्कासाठी निर्भीडपणे बोलायला शिकला. विविध स्वयंसेवी संस्थांच्यामुळे ग्रामविकासाला चालना

मिळाली. जुन्या पिढीला या परिवर्तनाशी जुळवून घेताना थोडा वेळ लागला तरी उगवत्या पिढीला ते सहजपणे अंगवळणी पडले. म्हणून नवीन वसाहत अनेक दृष्टीने जुन्या वसाहती इतकी आदर्श नसली तरी ती आधुनिकतेला जास्त जवळ जाणारी व त्यामुळे चांगली आहे. भूकंपामुळे कष्टकरी व मजूर वर्गाच विश्व बदलले. त्यांची आर्थिक स्थिती झपाट्याने सुधारली. उपयुक्ततेचा निकष लावून तपासले तर गुबाळच्या ॲड्रानने बांधलेले डोम किंवा रेबेचिंचोलीचे हायटेक घरे किंवा अन्य सर्वच कामे सर्वार्थाने परिपूर्ण मानता येतील असे नव्हते. असे असले तरी यातूनच गावाचा नवीन आकार साकारला गेला.

भूकंपग्रस्तांची निष्क्रियता, उदासीनता हा कुठल्याही नैसर्गिक आपत्तीनंतरचा परिणाम मानावा लागतो. याचं समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय विश्लेषण व्हायला हवं. मानवी स्वभावातील रागरंग आणि वृत्तीप्रवृत्तीच दर्शन सर्वच क्षेत्रात होत असते तेव्हा हा भाग त्यापासून वेगळा काढता येणार नाही.

अर्थक्वेक इंटरनॅशनल, रिस्क इंजिनिअरिंग, वुडवर्ड क्लाइड इंजिनिअरिंग अशा जागतिक कंपन्या आपत्तीला तोंड देण्यासाठीच्या व्यवस्थापनाला सल्ला आराखडा देतात. केंद्र शासनाचे व राज्य सरकारचे स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसनविषयक विभाग कार्यरत आहेत. असे असले तरी त्या त्या ठिकाणी स्थानिक समस्या ह्या आपले वेगळे स्वरूप घेऊन व्यक्त होत असतात. त्यांचा शोध घेण ही तत्कालीन प्रशासनाच्या कार्यकुशलतेची खरी परीक्षा ठरते व या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच काम निश्चितच उल्लेखनीय ठरले आहे.

आरोग्यविषयक प्रश्न : भूकंपामुळे अपंगत्व प्राप्त झालेल्या व्यक्तीची नोंद शासनाने केली ती अशी----लातूर जिल्ह्यात १२ व्यक्तींना तर उस्मानाबाद जिल्ह्यात ७७ व्यक्तींना कायमचे अपंगत्व आले. तर लातूर जिल्ह्यात ४०७ व उस्मानाबाद जिल्ह्यात २५८ व्यक्ती क्षितिग्रस्त झाल्यात. यांना एकूण लातूर जिल्ह्यात ४३.०७ आणि उस्मानाबाद जिल्ह्यात ४५.०५ लाख रुपये अनुदान दिले गेले.

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस यांनी केलेल्या सर्व्हेक्षणानुसार उस्मानाबाद व लातूर या दोन्ही जिल्ह्यात मिळून ८,०८९ इतक्या व्यक्ती मरण पावल्या.यापैकी लातूरमध्ये ३,५५७ व्यक्ती होत्या. तर ९,१०० जण जखमी झाले. त्यापैकी ४,८८० लोकांच्यावर लष्कराच्या किंवा इतर डॉक्टरांनी गावात उपचार केले. ४,८२० जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले. पॅरॅप्लेझिया, अर्धांगवायू, डोक्याला व पाठीला जबर मार, हातपायांना अपंगत्व, बहिरेपणा, अंधत्व अशा अनेक जखमा भूकंपामुळे झाल्या आहेत. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील जखमी व आजारांची स्थिती अशी .

आजाराचे स्वरूप : श्वसनाचा त्रास ३०३, मानसिक असंतुलन ७८४, हृदयविकार १७२, गर्भपात २९, जुलाब, अतिसार ३,२००, ताप २,५००, वेदना ५,६०० तर अपंगत्वाचे स्वरूप असे होते. हाताचे हाड तुटणे ३५८, हाताच्या हाडांना गंभीर जखमा ८५, पायाचे हाड तुटणे ६२०, पायाच्या हाडांना गंभीर जखम १५०, अंशत: बहिरेपण ४५, पूर्णत: अंधत्व ५६, अंशत: बहिरेपण १९, अंशत: अर्धांगवायू २१९, पूर्ण अर्धांगवायू ५२, पाठीच्या मणक्यास गंभीर जखम ८८७, इतर गंभीर जखम ९३ यासारखी नोंद केली गेली. असे असले तरी भूकंपानंतर जखमी दगावला नाही. रोगराई पसरली नाही याचे श्रेय आरोग्य विभागालाच जाते.

मानसिक पुनर्वसनाची गरज होती, भितीमुळे माणसे स्वप्नातून दचकून उठत, लहानमोठ्या आवाजाला घाबरत, नैराश्य व वैफल्यग्रस्तता या बाबी जाणवत होत्या. सामाजिक संस्थांनासुद्धा मानसिक समस्यांचे गांभीर्य लगेच जाणवले नाही. नांदत गाव, घर आणि संसार उध्वस्त झाल्यामुळे, झालेली अस्वस्थता स्वाभाविक होती. त्यातून कोणी आत्यंतिक दु:ख व्यक्त करत तर कोणी क्षोभ व्यक्त करत होती. पुण्याची महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ, दिल्लीची व्हॉलंटरी हेल्थ असोसिएशन ऑफ इंडिया, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे लोक, प्रश्न समजावून घेण्याचा प्रयत्न करीत होते. मुंबईचे प्रदीप पाटकर, साताऱ्याचे उदय दाभोळकर, लातूरचे डॉ. दिनेश व वर्षा पाटील, डॉ. मोहन आगाशी हे या दिशेने कार्यरत होते.

डॉ. धों. मा. यंदे हे एकटेच सर्वत्र फिरत, मानसिक तणावाचा शोध घेत होते. तळणी, मगरूळ, गांजणखेड या सारख्या खेड्यात घराघरात जाऊन हा प्रश्न समजावून घेत. त्यांना मदत करीत. दीर्घकाळ रेंगाळणारे हे प्रश्न होते. पॅराप्लेजिक रुग्णांच्या भीषण त्रासांची माहिती करून घेत. निराशेने ग्रासलेल्या तरुणांना पुन: कामाला लावण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

विविध प्रकारच्या अपंगांना लागणारे उपचार व मदत करण्यासाठी म्हणून सेवाभावी संस्थांनी मोठा सहभाग दिला. यामध्ये व्हॉलंटरी हेल्थ असोसिएशन ऑफ इंडिया, जनार्थ, कॅथॉलिक हेल्थ असोसिएशन ऑफ इंडिया, मानवलोक, फिनिक्स, विवेकानंद रुग्णालय ह्या सेवाभावी संस्था अपंगांना भेटून त्यांना उपचार देत होत्या. उमरग्यात डॉ. अशोक अहंकारी, किल्लारी चे डॉ. यंदे, लातूरचे डॉ. दिलीप देशपांडे, श्रीकांत गोरे यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. बेल्जियमचे फिलिप फॉटनेल, डॉ. मार्टिन सास्तूर येथे काही काळ राहिले. ते दररोज ठराविक गावांना भेटी देत. त्यांनी काही व्यायामाचे प्रकार आवश्यकतेप्रमाणे शिकवले.

मनोविकार तज्ज्ञ, अस्थिव्यंग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ यांची गरज या क्षेत्रात पुढील काळात वाटू लागली. या संदर्भात विविध पातळीवर आवाज उठवले गेले. प्रसंगी न्यायालयात लोक गेले. दिल्लीची बी फ्रेंडस आणि महाराष्ट्र शासनाच्यावतीने महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ मेंटल हेल्थ ह्या संस्था अनेक गावात मनोरुग्णाचा शोध घेऊन उपचार करत होते. भूकंपानंतर महिन्याभरातच बहुतेक विदूरांची लग्ने झाली. विधवाविवाह फक्त दोन नोंदवले गेले. दोन्ही जिल्ह्यातून ९३२ विदूर व ४४४ विधवांची नोंद झाली आहे.

भूकंपानंतर शासन स्तरावर ज्या हालचाली केल्या गेल्या त्यात नव्या उमेदिने या क्षेत्रात माणसे कामाला लागावीत यासाठी ३० सप्टेंबर १९९३ ला भूकंप झाल्यानंतर अत्यावश्यक कामे पूर्ण करून २४ ऑक्टोबरपासून नवीन वसाहतीच्या उभारणीसाठी प्रारंभ करण्याविषयीचे प्रयत्न झाले. दसऱ्याला भूमिपूजन व २६ जानेवारीला गृहप्रवेश अशाप्रकारे घोषणा करून शासन कामास लागले. तर शेतीसाठी म्हणून शासनाच्या वतीने लातूर जिल्ह्यात १७,००३ तर उस्मानाबादमध्ये १०,०४६ शेतकऱ्यांना ३,००० क्विंटल बियाणं वाटली. स्वयंसेवी संस्था व खाजगी व्यक्ती यांचे एकूण ४० ट्रॅक्टर्स जनहितार्थ कार्यरत होते. हरेगाव-राजेगाव येथे जनार्थ, पेठसांगवी-एकोंडीत मराठवाडा शेती सहाय्यक मंडळ, मंगरूळ-गांजणखेडा-तळणी-सालेगाव अशा २२ गावात मानवलोक यांच्यावतीने मनुष्यबळ, बैलगाड्या आणून पेरणी केली. हाही पुनर्वसनाचाच एक भाग. लोकांच्या मनातील मरगळ दूर करणे व गावगाडा पुन्हा चालू करण्यासाठी हे आवश्यक होते. भूकंपामुळे २८० मुले अनाथ झाली. ४८५ बालकांनी आईला आणि ४९० बालके पित्याला पारखी झाली व यातून परिसरातील एकूण ५०० बालकांना पुण्याच्या बालग्राममध्ये हलवल गेलं. लातूरलासुद्धा नगरपालिकेच्या मदतीला बालग्रामची शाखा सुरू झाली.

शाळा सुरू व्हाव्यात यासाठी बालभारतीच्या वतीने पुस्तक पुरवली गेली. विश्वसंस्था, जनकल्याण संघटना, राष्ट्र सेवादल यांसारख्या संस्थांनी फळा, दप्तर, गणवेश, वह्या, पुस्तके पुरवली.तर शांतीलाल मुथा यांनी, अखिल भारतीय जैन संघटनच्या वतीने चिंचवडच्या नवीन निवासी शाळेत उत्तम शिक्षण देण्यासाठी म्हणून या क्षेत्रातील मुले नेली. याला शासनानेही मदत केली. विवेकानंद हॉस्पिटलमध्ये नुकत्याच जन्मलेल्या बालिकेला स्वीकारले. तिचे ' निवेदिता ' हे नामकरण करून तिचा प्रतिपाल केला गेला.

याप्रकारे सर्वांगीण पुनर्वसनाचे प्रयत्न झाले यामध्ये भौतिक, मानसिक तसेच सामाजिक, आर्थिक स्तरावरील पुनर्वसन होत होते. या नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने मानवी जीवनाच्या विविध अंगांचा परिचय एकत्रितपणे झाला व त्यांचे योग्य पुनर्वसन करण्याचा प्रयोगसुद्धा यशस्वीपणे केला गेला असेच म्हणावे लागते. मानसिक स्वास्थ्यासाठी भागवतसप्ताहापासून अनेकविध गोष्टी करण्यात आल्या.

या भूकंपानंतर महाराष्ट्र आपत्कालीन भूकंप पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात आला व कायमस्वरूपी आपत्कालीन व्यवस्थापन योजनाची आखणी केली गेली. यासाठी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ डॉ.फ्रेडरीक क्रिमगोल्ड, श्रीमती मार्जोरी ग्रीन व डॉ.लिओनार्डो सीबर तसेच राष्ट्रीय तज्ज्ञ डॉ.व्ही.जी.पानवलकर व डॉ.प्रसाद मोडक यांची नियुक्ती करण्यात आली. अशा योजनेंच्या अंमलबजावणीसाठी म्हणून समन्वय संस्था या नात्याने यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी संस्था (यशदा) यांची नियुक्ती केली गेली.[४७] नंतर ६ ते ८ मे १९९५ मध्ये मुंबई येथे आपत्ती व्यवस्थापनावर एक कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत गावपातळीवर व्यवस्थापनाचे महत्त्व मान्य करण्यात आले. तर जुलै, १९९८ मध्ये मुंबईसह महाराष्ट्रातील भूकंप प्रवणक्षेत्र असलेल्या ११ जिल्ह्यांसाठी म्हणून ' महाराष्ट्र नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन योजना ' तयार करण्यात आली. आलेल्या आपत्तीतून भविष्याचे सुयोग्य नियोजन आणि प्राप्त परिस्थितीचा सक्षमपणे सामना करण्याची क्षमता शासन व समाजाकडून स्पष्ट झाली हे विशेष.

संभाव्य आपत्ती व्यवस्थापन

नैसर्गिक आपत्तीची शक्यता लक्षात घेऊन योजनापूर्वक एक कृती आराखडा तयार करावा यादृष्टीने भारत सरकार आणि संयुक्त राष्ट्र संघ विकास कार्यक्रम अंतर्गत आपत्ती जोखिम व्यवस्थापन कार्यक्रम हाती घेण्यात आला.(२००२-२००७) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा उद्देश आपत्तीच्यावेळी वस्तुनिष्ठ नियोजन करणे त्या संदर्भात योग्य पूर्वतयारी करणे हा आहे. यासाठी भारतातील आपत्तीप्रवण बारा राज्यातील १२५ जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून महाराष्ट्रातील चौदा जिल्ह्यांचा समावेश त्यात करण्यात आला आहे. औरंगाबाद महसुली विभागातील लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रातील जो भाग सेसमीक झोन २३४ मध्यम ते तीव्र भूकंपप्रवण हे क्षेत्र मानले जाते. त्याचा प्राधान्याने विचार करण्यात आला असून या कार्यक्रम अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली आपत्ती व्यवस्थापनबाबत विविध स्तरातील व्यक्तींनी सक्षम करणे, जनजागृती करणे, विविध पातळीवर प्रशिक्षण देणे, त्यासाठी लागणारी आवश्यक सामग्री उपलब्ध करून देणे, विशेषत: आपत्ती प्रवण क्षेत्रातील राज्य, जिल्हा, तालुका, गाव पातळीवर विविध आपत्तीपूर्व काळातील व आपत्तीनंतरच्या काळातील करावयाच्या कार्याविषयी योग्य जाण व क्षमता निर्माण करणे हा आहे. लातूर जिल्हा अंतर्गत जिल्हा पातळीवर तसेच पंचायत समित्या व गाव पातळीवरील योग्य मार्गदर्शक आणि प्रशिक्षित व्यक्तींची निवड करणे, त्यांना सक्षम करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखड्याचे नूतनीकरण व अद्ययावतीकरण करण्यात येत आहे. याचबरोबर शहरी भूकंप संवेदनशीलता न्यूनीकरण प्रकल्प राबविण्यात महाराष्ट्र शासनाने आपत्ती व्यवस्थापन प्रभाग (Dissater Management Unit) मदत व पुनर्वसन खाते, मंत्रालय तसेच स्थानिक नगरपालिका सक्रिय भाग घेत आहेत.

केंद्र सरकारच्या अखत्यारीतील देशपातळीवरील आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्र (CRPF) आणि त्याच व्यवस्थापनाखालील चाकूर येथील सीमा सुरक्षा बलांचे केंद्र (BSF) यामुळे राष्ट्रीय पातळीवर जिल्ह्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

लातूर जिल्ह्यामध्ये अशा नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाण्यासाठी गाव व वाडी-वस्तीच्या पातळीवरील संपूर्ण माहिती स्वतंत्रपणे एका पुस्तिकेद्वारे संकलित करण्यात आली असून भूकंप, अतिवृष्टी, अनावृष्टी किंवा वीजेसारख्या नैसर्गिक आपत्ती यावेळी प्रत्यक्षपणे करावयाच्या कामासाठी आपत्ती संदर्भामध्ये योग्य प्रशिक्षण दिले जात आहे. उदा.आपल्या जवळ वीज येत आहे हे समजताच आपल्या अंगावरील केस उभे राहतात व त्वचा थरथरते असे होत असेल तर वीज आपल्या अंगावर येत आहे असे समजावे व तात्काळ जमिनीवर पडावे. यासारख्या मूलगामी बाबींचा तपशील प्रशिक्षणार्थींना पूरवून सर्वच क्षेत्रात योग्य अशी पूर्वतयारी करून देण्यात येत आहे. ह्या बाबी भूकंपाचा पूर्वानुभव लक्षात घेऊन योग्य दिशेने संवेदनशील शासनाने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल मानावे लागते.

---

४७. भूकंपग्रस्त भागातील घरबांधणी व घरदुरुस्तीविषयी महाराष्ट्र शासनाचे धोरण स्पष्ट करणारी पुस्तिका ज्यामध्ये शासनाने वेळोवेळी घेतलेले निर्णय व त्यासंबंधीचे शासन निर्णय याविषयीची नोंद आहे.

भूकंप क्षतिग्रस्त सांस्कृतिक वारश्याचे जतन व पुनर्वसन*

संस्कृतीची माहेरघरे असलेली प्राचीन ऐतिहासिक स्मारके जेथे एकेकाळी वैभवसंपन्न जीवन बहरले, जी स्मारके गत इतिहासाचा प्रत्यक्षदर्शी पुरावा म्हणून आजही अवशेष रूपाने अस्तित्वात आहेत. भूकंपामुळे त्यांचेही आतोनात नुकसान केले.

अशा या घटनेची केंद्र व राज्य शासनांनी ताबडतोब दखल घेतली. शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या अखत्यारित कार्यरत असलेल्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभागाने भूकंप प्रभावित भागाची पहाणी करून व प्राचीन ऐतिहासिक स्मारकांना पोचलेल्या हानिविषयीचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला.

केंद्र व राज्य सरकारांतर्फे भूकंप पीडितांना तात्काळ मदत करण्याची घोषणा करण्यात आली. जागतिक बँकेच्या नैसर्गिक विपत्ति व्यवस्थापन पथकाने ही महाराष्ट्रातील भूकंप प्रभावित भागाची विशेषकरून लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यांची प्रत्यक्ष पहाणी केली, व भूकंपग्रस्त भागाला सर्वसंभव सहाय्य करण्याचे आश्वासन देऊन १ जुलै १९९४ ते ३१ मार्च १९९७ या त्यावेळी ठरविलेल्या कालावधीकरिता एक विशेष प्रकल्प कार्यान्वित करण्याचे मान्य केले.

या प्रकल्पाच्या कार्यान्वयनाकरिता राज्य शासनाने महाराष्ट्र अत्यावश्यक भूकंप पुनर्वसन कार्यक्रम (MEERP-Maharashtra Emergency Earthquake Rehabilitation Programme) तयार केला. या कार्यक्रमाचे प्रमुख घटक. ढोबळमानाने या प्रमाणे निश्चित करण्यात आले.

१) गृहनिर्माण २) अंतर्गत कार्ययंत्रणा ३) सामाजिक पुनर्वसन ४) आर्थिक पुनर्वसन ५) सामुदायिक पुनर्वसन ६) तांत्रिक सहाय्य, प्रशिक्षण व यंत्रसामग्री

या कार्यक्रमाची व्याप्ती मराठवाड्यातील लातूर उस्मानाबाद जिल्ह्यांसह महाराष्ट्रातील इतर सर्व भूकंप प्रभावित भागापर्यत ठरविण्यात आली. तसेच उपयुक्त. तीन आर्थिक वर्षां दरम्यान राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची अनुमानित लागत १०,८७० दशलक्ष रुपये इतकी दर्शविण्यात आली. ज्याची आपूर्ति ही खाली दाखविल्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आली.

	अमेरिकन डॉलर (दशलक्ष)	टक्केवारी (%)
अ. अंतरराष्ट्रीय विकाससंस्था	२४६	७५
ब. महाराष्ट्र शासन	४०	१२
क. केंद्र शासन	०१	०.५
ड. दानशील संस्था	४१	१२.५
	३२८	१००

यासंबंधीच्या विकास पत करार नाम्यावर (Development credit Agreement) केंद्र सरकार व अंतरराष्ट्रीय विकास संस्था यांच्यातर्फे व २४६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची पत महाराष्ट्र शासनास उपलब्ध करून देण्यासंबंधीच्या, प्रकल्प अंमलबजावणीच्या करारनाम्यावर अंतरराष्ट्रीय विकाससंस्था व महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे ९ एप्रिल १९९४ रोजी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

* कावडकर.के.दे. निवृत्त संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी या भागाचे लेखन केले आहे.

भूकंपप्रभावित भागाचे तथाकथित सर्वांगीण पुनर्वसन विषयक कार्यक्रमाचे काही आधारभूत तत्वही निश्चित करण्यात आले. तसेच महाराष्ट्र अत्यावश्यक भूकंप पुनर्वसन कार्यक्रम यशस्वी व प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी कार्यक्रम व्यवस्थापन घटक (PMU- Programme Management unit) अशा एका विशिष्ट कार्यकारीगटाची शासनातर्फे स्थापना करण्यात आली या ' पीएमयु ' नावाने संबोधल्या जाणाऱ्या गटात शासनाच्या वेगवेगळ्या यंत्रणेतून अनुभवी अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्तिवर नेमणूक करण्यात आली. तसेच या गटाला पुरेसे अधिकार प्रदान करण्यात येऊन कार्यक्रम राबवितांना त्यांच्या जबाबदाऱ्याही ठरविण्यात आल्या.

सांस्कृतिक वारसा

१९९३ च्या उपरोक्त भूकंपामुळे जशी प्राणहानि व वित्तहानि झाली तशीच त्याभागात अस्तित्वात असलेल्या विविध स्वरूपातील व कालखंडातील ऐतिहासिक इमारतींचीही मोठ्या प्रमाणात पडझड होऊन राष्ट्राच्या सांस्कृतिक वारश्याचेही आतोनात नुकसान झाले. राज्य सरकारच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये या विभागानेही भूकंपग्रस्त भागातील प्रभावित ऐतिहासिक इमारतींचीही सखोल पहाणी करून आधी उल्लेख केल्याप्रमाणे संदर्भित अहवाल शासनाकडे सादर केला. त्यानुसार सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रस्तावाप्रमाणे भूकंप प्रभावित ऐतिहासिक स्मारकांचे जतन व पुनर्वसन कार्य तात्काळ हाती घेण्याकरिता शासनाने एका तज्ञ समितीची स्थापना केली आणि तज्ञसमितीने आपल्या पहाणीवर आधारित खाली दर्शविलेल्या १६ऐतिहासिक स्मारकांचे जतन व पुनर्वसन करण्याची शासनाकडे शिफारस केली.

अ. लातूर जिल्ह्यातील स्मारके

स्मारकाचे नांव	ठिकाण	तालुका
१. देवी मंदिर	किल्लारी	औसा
२. औसा किल्ला	औसा	औसा
३. उद्‌गीर किल्ला	उद्‌गीर	उद्‌गीर
४. खरोसा लेणी	खरोसा	निलंगा

उस्मानाबाद जिल्ह्यातील स्मारके

५. मकबरा (घूमट)	सास्तूर	उमरगा
६. नलदुर्ग किल्ला	नलदुर्ग	तुळजापुर
७. परांडा किल्ला	परांडा	परांडा
८. धाराशिव लेणी	धाराशिव	उस्मानाबाद
९. शिवगुरुस्वामि समाधि मंदिर	धाराशिव	उस्मानाबाद
१०. महादेव मंदिर	उमरगा	उमरगा
११. त्रिविक्रम मंदिर	तेर	उस्मानाबाद
१२. उत्तरेश्वर मंदिर	तेर	उस्मानाबाद
१३. कालेश्वर व नीलकंठेश्वर मंदिर	तेर	—
१४. महालक्ष्मी मंदिर व बारव (पुष्करणी)	जागजी	—
१५. गढी	निलेगांव	तुळजापुर
१६. गढी	भूम	भूम

प्रस्तुत यादीतील निलेगांव व भूम येथील गढ्या खाजगी मालकीच्या असल्यामुळे व त्या पुरातत्व विभागाच्या कसल्याही नियंत्रणात नसल्यामुळे यादीतून वगळण्यात आल्या व एकूण १४ स्मारकांचाच या योजनेत विचार करण्यात आला.

ऐतिहासिक स्मारके व पुरातत्वीय स्थळे आणि प्राचीन अवशेषांचे जतन व संरक्षण ही केंद्र सरकार तसेच राज्यसरकार या दोघांच्या कार्यकक्षेतील बाब (संयुक्तसूचीतील) असून राष्ट्रीय महत्त्वाच्या अशा सांस्कृतिक ठेव्याचे संरक्षण व जतन केंद्र सरकारच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण या खात्याची आणि राज्य, प्रादेशिक व स्थानिय स्तरांवरील सांस्कृतिक वारश्याचे अर्थातच प्राचीन ऐतिहासिक स्मारकांचे संरक्षण व जतन ही राज्य शासनांतर्गत पुरातत्व विभागाची जबाबदारी आहे. त्यानुसार महाराष्ट्रात राष्ट्रीय महत्त्वाची घोषित करण्यात आलेली ऐतिहासिक स्मारके व पुरातत्वीय स्थळांची संख्या सुमारे २८५ च्या जवळपास असून राज्य संरक्षित ऐतिहासिक स्मारके व पुरातत्वीय स्थळे व अवशेष यांची संख्या ३०० च्या वर आहे. त्यापैकी एकट्या मराठवाड्यात सुमारे १७५ च्या जवळपास राज्यसंरक्षित ऐतिहासिक स्मारकेव पुरातत्वीय स्थळे व अवशेष असून त्यांचे दैनंदिन संरक्षण व जतन महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाकडून करण्यात येते.

मराठवाड्यातील उपयुक्त १७५ पैकी लातूर जिल्ह्यात ५ व उस्मानाबाद जिल्ह्यात २४ राज्य संरक्षित स्मारके व पुरातत्वीय स्थळे व अवशेष आहेत. सप्टेंबर १९९३ च्या भूकंपात यापैकी काही संरक्षित स्मारकांबरोबरच असंरक्षित स्मारकांचेही प्रचंड नुकसान झाले. त्यामुळे तज्ज्ञ समितीच्या शिफारशीत त्यांचाही समावेश करण्यात आला. आणि त्यानुसार उपयुक्त १४ ऐतिहासिक स्मारकांचे विहीत पध्दतीत जतन करण्याविषयीचा शासनातर्फे निर्णय घेण्यात आला. या प्रकारे या प्रस्तावित योजनेचा समावेश महाराष्ट्र अत्यावश्यक भूकंप पुनर्वसन कार्यक्रम यात करण्यात आला. त्याप्रमाणे जागतिक बँकेच्या या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी संबंधी मार्गदर्शक तत्वानुसार राज्य पुरातत्व विभागातर्फे सदरहू कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याकरिता एक सल्लागार सेवा (Consultancy) या नात्याने त्यावेळी दिल्ली व मुंबई येथे कार्यरत जेपीएस असोसिएट्स अँड मॅनेजमेंट कंसल्टट्स या स्वतंत्र, स्वायत्त व एक अग्रणी सल्लागार अशा नांव लौकिक असलेल्या अनुभवी संस्थेची नेमणूक करण्यात आली. आणि या संबंधीच्या करारनाम्यावर महाराष्ट्र शासनातर्फे सांस्कृतिक कार्य सचिव व जेपीएस अशोसिएट्स अँड मॅनेजमेंट कंसल्टँट्स यांच्या (नोव्हेंबर १९९५ च्या सुमारे) स्वाक्षऱ्या झाल्यावर प्रस्तुत करारनामा अंमलात आला.

त्याप्रमाणे भूकंपप्रभावित ऐतिहासिक स्मारकांचे जतन व पुनर्वसन कार्य तातडीने हाती घेण्याच्या हेतुने पुरातत्व विभागातील वरीष्ठ अधिकारी आणि जेपीएस सल्लागार संस्था यांच्यातर्फे क्षतिग्रस्त स्मारकांचे प्राथमिक निरीक्षण करण्यात आले व त्यासंबंधी धोरण निश्चित करून सल्लागार संस्थेची पुढे करावयाच्या कामाची खाली दर्शविल्याप्रमाणे दोन टप्प्यात आखणी करण्यात आली.

पहिला टप्पा :

१. तज्ज्ञ समितीच्या शिफारशीप्रमाणे पुरातत्व विभागाने सुनिश्चित केलेल्या भूकंपप्रभावित व किंचित दुर्लक्षित १४ स्मारकांसंबंधी सविस्तर माहिती व तथ्यांकन (doumentation) तयार करणे.

२. भूकंपामुळे झालेल्या क्षति व्यतिरिक्त विपरीत हवामान, रासायनिक अपहसन व कालमानाने इमारतींची होणारी झीज व इतर नैसर्गिक व अनैसर्गिक दोषांचे स्वरूप समजून घेवून त्यांच्या निवारणार्थ उपाय योजना निश्चित करविणे.

३. पुरातत्वज्ञ, जतन व परिरक्षण कार्यकारी, स्थापत्यविशारद, बांधकाम अभियंता व भूकंप, विशेषज्ञ यांच्यासारख्या तज्ञांचे विचार जाणून घेण्याकरिता एक कार्यशाळा आयोजित करणे.

४. नियोजित कामाच्या संदर्भात पुरातत्व विभागाचे धोरण पडताळून पहाणे. या कामास लागणाऱ्या कर्मचारीवर्गाचे स्वरूप ठरविण्याविषयी शासनाकडे शिफारश करणे. जतन व पुनर्वसन कामासाठी पुरेशा निधिचे प्रमाण स्पष्टपणे अनुमानित करणे आणि सांस्कृतिक वारश्यांचा प्रस्तावित जतनकामात लोकांच्या सहभागाची शक्यता पडताळून पहाणे.

अनुक्रमणिका

दुसरा टप्पा :

१. स्मारकांचे सर्वेक्षण व जतनकामाविषयीचे सविस्तर नकाशे तयार करणे. जतन व दुरुस्ती कामाविषयक अंदाजपत्रक तयार करणे, निविदापत्रक व संबंधित दस्तऐवज तयार करणे.

२. भूकंपक्षतिग्रस्त ऐतिहासिक स्मारकांचे जतन व पुनर्वसन कामाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकरिता सक्षम तज्ञसंस्था व कंत्राटदार यांच्या उपलब्धते विषयीचा योग्य जाहिरातीव्दारे आढावा घेणे.

३. वरील प्रमाणे अपेक्षित कार्यकारी यंत्रणा सुनिश्चित झाल्यावर प्रत्यक्ष जतन व पुनर्वसन कामाचे पर्यवेक्षण करणे.

४. विहीत पध्दतीने पूर्ण करण्यात आलेल्या जतनकामाचे तथ्यांकन करून अंतिम कार्यपूर्ति अहवाल तयार करणे.

नियोजित जतन व पुनर्वसन प्रकल्पाचे उपयुक्त प्रकारे दोन टप्पे ठरविल्यानंतर पुरातत्व विभाग व सल्लागार संस्था यांचे गरजेनुसार वेळोवेळी संयुक्त व स्वतंत्र असे पहाणी दौरे आयोजित करण्यात आले व प्रभावित स्मारकांचे छायाचित्रण, व्हिडियोफिल्मिंग व स्थापत्यानुरूप नकाशे इत्यादि स्वरूपांचे जतनकामापूर्वी (before conservation) चे तथ्यांकनाचे काम लगेच हाती घेऊन पूर्णही करण्यात आले.

तसेच पुढील प्रमाणे जतनकामातील अग्रक्रमही ठरविण्यात आला :---

१. **प्राथमिक स्तराचे जतनकार्य** (primary conservation)

अ. प्रथम ऐतिहासिक स्मारकांच्या परिसरातील ढासळलेल्या इमारतींचा मलबा हटविणे.

ब. इमारतींवर उगवलेली व वाढलेली झाडे झुडूपे तोडून समूळ नष्ट करणे.

क. भूकंपामुळे होणाऱ्या क्षतिस कारणीभूत अवशेषांच्या ढासळणाऱ्या व पडावयास आलेल्या भागास सावधानीपूर्वक उतरवून बाजूस सुरक्षितपणे रचून ठेवणे.

ड. स्मारकांच्या कमकूवत झालेल्या भागास तात्पुरता आधार देवून ढासळण्यापासून वाचविणे.

२. **बळकटीकरण** (consolidation)

अ. जीर्ण झालेल्या बांधकामापैकी शिथिल व कमकूवत झालेल्या भागाची दरजबंदी (pointing) करणे. इमारतीच्या भिंती व छतांमध्ये पडलेल्या भेगा भरणे (grouting करणे.)

ब. खिळखिळा झालेला भाग उतरवून पुन्हा जशास तशा बांधून काढणे (underpinning and reselting).

३. **पूर्वरुपीकरण** (Restoration)

अ. झालेल्या पडझडीमुळे इमारतींच्या गळून पडलेल्या महत्वाच्या भागाचे आंशिक पण प्रमाणबध्द पूर्वरूपीकरण करणे, या प्रसंगी काल्पनिक अथवा स्वैर स्वरूपाच्या बांधकामास मान्यता अजिबात शक्य होणार नाही.

ब. स्मारकांचे विशेष परिस्थितित प्रत्यारोपण (transplantation) करणे.

स्मारकांच्या जतन व पुनर्वसन विषयीचा उपयुक्त अग्रक्रम ठरविण्यात आल्यानंतर त्यांच्या प्रत्यक्ष दुरुस्तीस लागणारी आर्थिक तरतूद उपलब्ध करून घेण्याच्या गरजेने त्यांचे स्मारक निहाय अंदाजपत्रक व निविदापत्रकही तयार करण्यात आले.

अनुक्रमणिका

अंदाजपत्रक तयार करण्याच्या संदर्भात एका महत्त्वाच्या मुद्दांचा खुलासा करणे आवश्यक वाटते ते असे की, सर्वसामान्यपणे जीर्ण झालेल्या इमारतीची दुरुस्ती व ऐतिहासिक स्मारकांचे शास्त्रसंमत जतनकाम (arehaeological conservation) यात बराच फरक असतो. म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या दरपत्रक व्यतिरिक्त ही अधिक बाबींचा समावेश संदर्भित जतनकामाच्या अंदाजपत्रकात करावा लागतो. भूकंप क्षतिग्रस्त स्मारकांचे जतन व पुनर्वसन हे तर नेहमीच्या जतनकामापेक्षाही विशेष व अतिदक्षतापूर्वक करावयाचे काम असते. यात तांत्रिक बाबींच्या बरोबरच अतिरिक्त कालावधींचाही विचार करावा लागतो. तसेच विविध कारणांनी जीर्ण व कमकूवत झालेल्या स्मारकांच्या, केवळ बाहेरून दिसणाऱ्या व्यंग व विद्रूपांच्या प्रस्तावित निवारणांवर आधारित अंदाजपत्रकात सहजपणे लक्षात न येणाऱ्या आतील दोषांच्या (unforeseen defacts) व्याप्तिच्या प्रमाणबध्द अंदाज लावता येत नसल्याने त्याविषयी निश्चित स्वरूपाची आर्थिक तरतूद प्रस्तावित करणे कठीण असते. तेव्हा सामान्य नागरी बांधकाम दरपत्रकानुसार अनुमानित खर्चापेक्षा सदरहू नियोजित जतन व पुनर्वसन कामात जास्तीचा खर्च संभावित असल्यामुळे संदर्भित अंदाजपत्रकात सुमारे ४५% अतिरिक्त आर्थिक तरतूदीचा अंतर्भाव करावा लागला आणि नियोजित जतन व पुनर्वसन कामाचे महत्त्व, हे काम तातडीने हाती घ्यावयाची गरज, कुशल प्रशिक्षित व अनुभवी तांत्रिक कामगार इत्यादिंचे औचित्य लक्षात घेवून जागतिक बॅंकेनेही या अंदाजपत्रकात अनुमानित व त्या प्रमाणे प्रस्तावित खर्चास मान्यता दिली.

प्रस्तावित ऐतिहासिक स्मारकांच्या जतन व पुनर्वसनकामाची अंमलबजावणी

महाराष्ट्र अत्यावश्यक भूकंप पूनर्वसन कार्यक्रम अंतर्गत लातूर जिल्ह्यातील ज्या भूकंपग्रस्त ऐतिहासिक स्मारकांचा समावेश करण्यात आला ती स्मारके खाली दर्शविल्याप्रमाणे आहेत.

१. उद्‌गीर किल्ला, २. औसा किल्ला, ३. खरोसा लेणी, ४. देवी मंदिर किल्लारी

या स्मारकांचे जतन व पुनर्वसन विषयीचे विवरण थोडक्यात याप्रमाणे आहे.

उदगीर किल्ला : उद्‌गीर हे ठिकाण लातूर पासून पूर्वेस समारे ६५ कि.मी. अंतरावर वसले असून यादव राजवटीत देशविभागाचे मुख्यालय व सैन्याचे तळ होते. येथील भुईकोट किल्ला बहमनी शासनकालात इ.स.१४९३ च्या सुमारास बांधला गेला. हा किल्ला येथील प्रख्यात संत उद्‌गीर महाराजांच्या समाधिमुळे प्रसिद्ध आहे. बहमनींच्या नंतर आदिलशाही, मोगल, मराठे व शेवटी हैद्राबादच्या निजामाच्या नियंत्रणाखाली हा किल्ला होता. चिनीमहाल,जनानामहाल, खासमहाल, रंगमहाल, बालाहिसार इत्यादि किल्ल्यातील प्रसिद्ध इमारती आहेत.

भूकंपामुळे तटबंदी व आतील इमारतींचे बरेच नुकसान झाले. पूर्वनिश्चित कार्यक्रमानुसार पहिल्या टप्प्यात येथील चिनीमहाल, खास महाल आणि बालाहिसार या इमारतीमधील व परिसरातील साचलेले ढिगारे साफ करण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

दूसऱ्या टप्प्यातील कामाकरिता क्षतिग्रस्त इमारतींच्या जतनकामाचे अंदाजपत्रक तयार करून निविदाही मागविण्यात आल्या परंतु काही अपरिहार्य तांत्रिक अडचणींमुळे पुढील दुरूस्तीकाम होऊ शकले नाही.

औसा किल्ला : राष्ट्रकूट चालुक्य काळात दक्षिणेतील एक प्रमुख जैनपीठ म्हणून प्रसिद्ध असलेले सद्याचे तालुक्यांचे केंद्र औसा हे लातुरपासून दक्षिणेस २० कि.मी.च्या अंतरावर वसलेले आहे. आठव्या शतकातील वाड्.मयात " औच्छ " व " करकंडचरित्र " या जैनग्रंथात असाईनगरी या नावाने औसा या

गावाचे उल्लेख पहावयास मिळतात. येथील किल्ल्याचे बांधकाम बहामनीकाळात झाले. निजामशाहीच्या पडत्या काळातील संरक्षक मलिक अंबर याचे औसा येथे हा किल्ला जिंकल्यानतंर काही काळ वास्तव्य होते. त्या दरम्याने याचे नामाभिधान " अंबरापुर " असेही करण्यात आले होते. या किल्ल्यातील पाश्चात्य असलेली बाराबडरी ही इमारत मिडास टेलर याने ब्रिटिश राजवटीत बांधली.

औसा हे ठिकाण भूकंपाचे केंद्र असलेल्या किल्लारी या गावापासून फारसे दूर नसल्यामुळे किल्ल्याचे व आतील इमारतींचे बरेच नुकसान झाले. म्हणून अधिकांश इमारतींचे जतनकाम करण्याचे अगत्याचे असण्याविषयी पहाणीतून आढळून आले. त्याप्रमाणे जतनकामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करून, आवश्यक त्या निविदाही मागविण्यात आल्या परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे हे काम हाती घेता आले नाही.

तरी पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार या किल्ल्याचे पहिल्या टप्याचे प्रस्तावित काम म्हणून येथील तहसिल कोर्ट इमारतीतील व सभोवतालचे जामी मशीदीच्या जवळील आणि तटबंदीच्या आतील भागातील कटोराबारव, तवाबारव इत्यादि भागातील साचलेला मलबा हटविण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

खरोसा लेणी : औसा येथून दक्षिण-पूर्वेस सुमारे १६ कि.मी. अंतरावरील खरोसा या गावांच्या ईशान्येस असलेल्या डोंगरात एकूण १२ पश्चिमाभिमुखी लेणी आहेत. लेटराइट हेमेटाइट प्रकारच्या खडकात बहुतांशी हिंदूधर्मिय असलेली ही लेणी ९ व्या शतकाच्या दरम्यान राष्ट्रकूट काळात कोरली गेली.

लेटराइट-हेमेटाइट खडकातील विघटनशीलतेमुळे यांमध्ये ठिसूळपणा व सच्छिद्रपणा जास्त आढळतो. परिणामत: ही स्मारके अत्यंत जीर्णावस्थेत आहेत. १९९३ च्या भूकंपामुळे बहुतांशी लेणींचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे.

ठरलेल्या कार्यक्रमानुसार लेणींच्या आतील व बाहेरील साचलेला मलबा संपूर्णपणे बाहेर काढून परिसराबाहेर हटविण्यात आला व लेणींचे परिसर स्वच्छ करण्यात आले.

देवीमंदिर किल्लारी : लातूर पासून जवळच भूकंपाचे केंद्र असलेल्या किल्लारी गावात नीलकंठेश्वर देवालयाशेजारी येथील प्रसिद्ध देवीमंदिर आहे. तेराव्या शतकाच्या सुमारे यादव कालखंडात निर्मित या मंदिराची रचना गर्भगृह, अंतराळ, सभामंडप व मुखमंडप अशी असून यातील खांबांच्या आकारात व नक्षीकामावरून यावर चालुक्य स्थापत्यशैलीचा प्रभाव जाणवतो. मंदिर पूर्वाभिमुखी आहे.

मंदिराचा गर्भगृहाचा संपूर्णभाग नामशेष झाला आहे. अंतराळास पश्चिमेकडून भिंत बांधून आत महिषासुरमर्दिनीचे शिल्प प्रस्थापित केल्यामुळे यास देवीमंदिराचे स्वरूप प्राप्त झाले. वस्तुत: गर्भगृहाच्या प्रवेशद्वारशाखेचे जे कोरीव दगड येथे उपलब्ध आहेत त्यावर शैवद्वारपालांचे अंकच आहेत. त्यावरून मूलत: हे शिवमंदिर असावे असे दिसते.

किल्लारी हे स्वत:च भूकंपाचे केंद्र असल्यामुळे या गावातील मोठ्या प्रमाणातील पडझडी बरोबरच देवीमंदिराचेही आतोनात नुकसान झाले. मंडपाच्या छतातील दगडी तुळ्या तुटल्या तसेच उत्तरदक्षिण भागातील भिंतींना भेगा पडून त्यातून दगड निखळून पडलेत. मुखमंडपाच्या छताचे बांधकाम पूर्णत: सुटून ढासळण्याच्या अवस्थेत आले. अंतराळ व मंडपाच्या भागाची फरशी व चतुष्कीच्या भागातील दगडांमध्येही भेगा पडल्या. मंदिराच्या खांबांना व स्तंभशीर्षासह छताला भूकंपाच्या तीव्रतेचा जोराचा धक्का बसून त्यांनी आपापल्या मूळ जागा सोडल्या.

देवीमंदिराची झालेली अपरिमित हानि पहाता त्याची ठिकठिकाणी डागडुजी करणे फारशे उपयुक्त नसल्यामुळे ही बाब तज्ज्ञ समितीच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर व समितीने केलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे मूळ जागेवरच मंदिराचे प्रत्यारोपणे (transplantation) ठरविण्यात आले.

तत्पूर्वी मंदिराच्या परिसरात भूकंपामुळे पडलेल्या इमारतींचे व पूर्वीपासून साचलेले मातीचे ढिगारे काढणे जरूरीचे होते म्हणून आधीच ठरल्याप्रमाणे पहिल्या टप्प्यात मंदिराच्या आसपास ५० मीटर पर्यंतचा परिसर ढिगारे हटवून साफ व सपाट करण्यात आला.

किल्लारी येथील देवीमंदिराच्या प्रत्यारोपणाचे काम अचूकपणे पार पडावे या हेतूने प्रथम, वर्ष १९७३-७४ साली पैठणजवळ गोदावरी नदीवर बांधण्यात येणाऱ्या जायकवाडी धरणाच्या प्रस्तावित पाणलोट क्षेत्रातील शेवता व सावखेडा या गावांतील यादवकालीन मंदिरांचे राज्यपुरातत्व विभागाच्या औरंगाबाद येथील कार्यालयाने कार्यान्वित केलेल्या त्या मंदिरांच्या प्रत्यारोपणाच्या पहिल्या टप्प्यातील कामाविषयीच्या अहवालाचा व तत्संबंधी नकाशे व छायाचित्रांचा अभ्यास करण्यात आला. तसेच आंध्रप्रदेश येथील श्रीशैलम व आलमपूर या ठिकाणी करण्यात आलेल्या मंदिरांच्या प्रत्यारोपण कामाविषयीची आवश्यक ती माहिती प्राप्त करण्यात आली.

अशाप्रकारे या भूकंपक्षतिग्रस्त स्मारकांचे प्रत्यारोपण करण्याचा निर्णय होताच त्याच्या सविस्तर तथ्यांकनांचे काम दूसरा टप्पा या स्वरूपात लगेच प्रारंभ करण्यात आले. त्यानुसार मंदिराच्या प्रत्येक भागाच्या प्रत्येक दगडाला स्थापत्य विभागानुसार ऑइलपेंटने क्रमांक देण्यात आले आणि मंदिराचे संपूर्ण छायाचित्रण, व्हिडियो फिल्मिंग सविस्तर नकाशे इत्यादि काम पूर्ण करण्यात आले. त्यानंतर मंदिराच्या प्रत्येक भागाचे बांधकाम काळजीपूर्वक खाली उतरविण्यात येऊन स्थापत्य विभागानुसार उदा. मुखमंडप, सभामंडप, अंतराळ याप्रमाणे सर्व दगड विहीत पद्धतीने आखून दिलेल्या आराखडयातील संबंधित खाण्यात रचून ठेवण्यात आले. तसेच भग्न झालेले दगड वेगळे काढण्यात आले.

मंदिराच्या मूळरचनेत क्रमश: मुखमंडप, सभामंडप, अंतराळ आणि गाभारा (गर्भगृह) या चारही भागांचा अंतर्भाव असल्याचे लक्षात आल्यावर त्याच्या नाहीशा झालेल्या गाभाऱ्यांचे मंदिराच्या प्रत्यारोपणाच्या आराखड्यात समावेश करण्यात आले.

किल्लारी हे भूकंप प्रवण क्षेत्र असल्याने अनुभवी वास्तुशास्त्रज्ञांचा व स्थपतींचा सल्ला घेऊन त्याचप्रमाणे भूकंपरोधी तंत्राचा वापर करून मंदिराचा पाया सुदृढ करण्यात आला. त्याचप्रकारे भिंतीचे फरशीचे व खांबांच्या तळखड्यांचे भूकंपामुळे खंडित झालेले दगड बाहेर काढून नेवासा (जि. अहमदनगर) येथील खाणीतून आवश्यक आकारमानाप्रमाणे, कुशल कारागिरांकडून नवीन दगड घडवून मंदिराच्या प्रत्यारोपणाच्या वेळी वापरण्यात आले. तसेच मूळ स्थापत्यात कसलाही गारा किंवा चूना वापरण्यात आला नव्हता, फक्त एक दुसऱ्यावर पक्के बसतील अशा खाचा (socket and groove) करून दगडाचे थरावर थर योग्यप्रकारे घडवून, व्यवस्थितरीत्या बसविण्यात आले होते व दगड आपल्या मूळ जागेवरून इतरत्र निसटणार नाही या करिता प्रत्येक दोन दगडात किंचित छिद्र करून लोखंडीपट्टयांसारखे खिळे घट्ट रोवलेले होते, असे मंदिराचे मूळ बांधकाम उकलतांना व खाली उतरवितांना (lowerig down) लक्षात आले. मंदिराच्या प्रत्यारोपणाच्या वेळी अत्यावश्यक प्रमाणातच सिमेंटचा वापर करून तथाकथित हीच स्थापत्यशैली तंतोतंत अनुसरण्यात आली आणि मूळ रचनेप्रमाणे संपूर्ण मंदिर रेखाचित्रण व छायाचित्रणाच्या मदतीने मूळ आराखड्यावर हूकूम पुनर्बाधणी करून प्रत्यक्ष प्रत्यारोपणाचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

त्यानंतर सुरक्षेच्या दृष्टिने परिसराच्या भोवताल सिमाभिंत बांधण्यात आली. आणि अंतिमत: तात्पुरत्या स्वरूपात इतरत्र ठेवण्यात आलेल्या देवीप्रतिमे (महिषासुरमर्दिनी) ची विधिवत प्राणप्रतिष्ठा करून या मंदिराचे पुनर्वसन सार्थक करण्यात आले. पूर्णत्वास जाईपर्यंत या प्रत्यारोपण पुनर्वसन कामात सुमारे तीस लक्ष रुपयांचा खर्च आला असावा असा अंदाज आहे. अशी स्मारके " महत्वाचा सांस्कृतिक ठेवा " अशा स्वरूपाची असल्याने त्यांच्या जतन व पुनर्वसन कार्याचा येथे ओझरता उल्लेख देत आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील क्षतिग्रस्त स्मारकांपैकी नळदुर्ग व परांडा येथील किल्ले व धाराशिव येथील लेणींच्या परिसरातील साचलेला मलबा हटविण्याचे व झाडेझुडपे काढण्याचे पहिल्या टप्प्याचे काम मोठ्या प्रमाणावर पार पाडून स्मारकांचा परिसर साफ करण्यात आला. त्यामुळे त्यांच्या सौंदर्यात भर पडली, अभ्यासकांना त्यांचे निरीक्षण करणे सोयीचे झाले. परिणामी पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली.

उर्वरित स्मारकांमध्ये तेर येथील त्रिविक्रम, उत्तरेश्वर, कालेश्वर व नीलकंठेश्वर या विटांच्या प्राचीन मंदिरांचे व धाराशिव लेणींच्या सान्निध्यात असलेल्या शिवगुरुस्वामी समाधिमंदिर, जागजी येथील महालक्ष्मी मंदिर व त्यासमोरील पुष्करणी चे आणि या बरोबरच सास्तूर येथील घूमटाचे पहिल्या टप्प्याचे अर्थातच परिसरातील साचलेला गलबा हटविण्याचे आणि दुसऱ्या टप्प्याच्या स्वरूपात त्यांचे सविस्तर जतन व पुनर्वसन काम यशस्वीपणे पार पाडण्यात आले, यात तेर येथील त्रिविक्रम व उत्तरेश्वर या मंदिरांचे जतनकाम व जागजी येथील संपूर्णपणे ढासळलेल्या व विस्कळित झालेल्या पुष्करणीचे यथातथ्य प्रत्यारोपणाचे काम अत्यंत वैपुण्याचे असून विशेष उल्लेखनीय आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील उपयुक्त स्मारकांच्या दोन्ही टप्प्यातील जतनकामात सुमारे एक कोटी पंधरालक्ष तसेच लातूर जिल्ह्यातील स्मारकांचे जतनकाम, सल्लागार संस्थेची फी, तज्ज्ञ समितीच्या अनुषंगाने झालेला खर्च, आणि इतर प्रशासकीय व तांत्रिक स्वरूपाचा खर्च धरून या भूकंप प्रभावित ऐतिहासिक स्मारकांच्या जतन व पुनर्वसन कामात एकंदरित पैाने दोन ते दोन कोटी रुपयांचा खर्च झाला असावा असा अंदाज आहे.

लातूर-उस्मानाबाद जिल्ह्यातील १९९३ सालच्या भूकंप क्षतिग्रस्त ऐतिहासिक स्मारकांचे जतन व पुनर्वसनाचे काम तज्ज्ञांच्या सल्ल्याप्रमाणे, पुरातत्व विभागाद्वारे यशस्वीरीत्या पार पाडण्यात आले प्रस्तुत काम चालू असतांना शासनाची उच्चस्तरीय समिती, " पीएमयु ",जागतिक बँकेचे अधिकारी, तज्ज्ञ समितीचे सदस्य, " जेपीएस " सल्लागार संस्था या सर्वासनी जतन कामाची वारंवार पहाणी केली. या व्यतिरिक्त काही भूगर्भशास्त्री, राष्ट्रीय भूभौतिकीय अनुसंधान संस्था व हैद्राबाद येथील वैज्ञानिकांनीही या कामाची पुरातत्व संचालकांसोबत व स्वतंत्रपणे पहाणी केली. या सर्वाच्या पहाणी व मार्गदर्शक सूचनांचा विभागास आपले काम अधिक कुशलतेने पार पाडण्यात फायदाच झाला.

तज्ज्ञांच्या तथाकथित निरीक्षणभेटी बरोबरच सांस्कृतिक वारश्याचे जतनकाम प्रगतिपथावर असतांना " लासा " (lea Associates South Asia Pvt. Ltd.) नवी दिल्ली या जागतिक बँकेने नेमलेल्या " दर्जा नियंत्रण संस्थे " च्या तज्ज्ञांनीही संदर्भित कामाच्या प्रत्येक अवस्थेची पहाणी करून समाधान व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाव्दारे पार पाडण्यात आलेले जतन व पुनर्वसन काम देशातील इतर क्षेत्राकरिता आदर्श स्वरूपात प्रेरणादायक ठरेल असे वाटते.

अनुक्रमणिका

परिशिष्ट-१[१]

भूकंपाचे स्वरूप

३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या मुख्य भूकंप धक्क्याची महत्त्वाची माहिती.

१) नांव	:	किल्लारी भूकंप
२) उगमस्थान	:	ता. मि. से.
(वेळ IST)	:	३ ५५ ४७.५
३) केंद्रबिंदु	:	१८°.०७" उ.
	:	७६°.६२" पू.
४) खोली	:	१२.० (३.०) कि.मी.
५) प्रवेग	:	४५% g (गुरुत्व)
६) तीव्रता (I०)	:	IX on msk मापनानुसार VIII on MMI मापनानुसार
७) फॉल्ट प्लेन	:	थ्रस्ट फॉल्ट स्ट्राइक २९९ , डिप ४९ , स्लिप ८८ Taxis : PLG ८६ Azm.१८८ Paxis : PLG ४ Azm.३१ (भारतीय मौसम विभागाकडून)
८) पूर्वधक्का	:	१८ ऑक्टोबर १९९२ महत्ता : ४.८ (मेरी नुसार)
९) पश्चातधक्के	:	एक ते दीड वर्षात बऱ्याच प्रमाणात घट (Decayed in few year)

Maharashtra State Gazetteers

१. परिशिष्ट २ आणि ३ हे महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, महाराष्ट्र शासन, नाशिक यांच्यावतीने उपलब्ध माहिती मधून दिले आहे.

परिशिष्ट-२

भूकंपाचा दृश्य परिणाम

१) भूकंपाचा भौगोलिक बाबींवर दृष्य परिणाम	:	१) केंद्रबिंदूनजिक जमिनीस भेगा पडल्या २) तळणी गावानजीक (जमीन) सुमारे २ किमी. लांब व ३ फूट उचलली गेली. ३) भूगर्भाच्या पाण्याच्या पातळीत बदल दिसून आले ४) माकणी धरणानजिक जमिनीस तडे/भेगा पडल्या
२) मिझोसेस्मल भाग (केंद्रबिंदू नजिकचा भाग)	:	सुमारे ११० स्क्वेअर से.मी.
३) भूकंप जाणवल्याचे अंतर	:	केंद्रबिंदूपासून सुमारे ७०० किमी.
४) मृत व्यक्तिंची संख्या[१]	:	७,९३२
५) जखमी व्यक्तिंची संख्या	:	१६,०००+
६) पूर्णपणे उध्वस्त झालेल्या गावांची संख्या	:	६७
७) अंशतः पडझड झालेल्या गावांची संख्या	:	२,५६८
८) पूर्णपणे उध्वस्त झालेल्या घरांची संख्या	:	१८,७९७
९) अंशतः पडझड झालेल्या घरांची संख्या	:	२,१७,३१९

१. मृत व्यक्तिंच्या संदर्भात (अ) भूकंपग्रस्त भागातील घरबांधणी व घरदुरुस्ती महाराष्ट्र शासनाने धोरण पुस्तिका, पृ. ९ वर एकूण ८,०८९ लोक मृत्यूमुखी पडल्याची नोंद केली गेली आहे. ती ग्राह्य मानायला हवी. तसेच टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायंसेस यांच्या सर्व्हेक्षणामध्ये पण ८,०८९ हीच संख्या नोंदवली गेली आहे.

Maharashtra State Gazetteers

परिशिष्ट-३

लातूर-उस्मानाबाद भूकंप : खर्च *

	रुपये (कोटींमध्ये)
घरबांधकाम	५२९.६
५२,६०० घरांसाठी	३२.००
स्थलांतरित गावांतील १७,५०० घरे	१२६.२
देणगीदार संस्थांची ५,५०० घरे	४३.७
जुन्या गावांतील २९,६०० घरे	१५९.१
मजबुतीकरण व दुरुस्ती	३.२
पथदर्शी मजबुतीकरण प्रकल्प	५.०
पायाभूत सेवा (रस्ते, पूल, शाळा, तात्पुरत्या छावण्या, स्मारक, सार्वजनिक ठिकाणे, नागरी सुविधा, इ.)	२३९.६
आर्थिक पुनर्वसन	१६.८
सामाजिक पुनर्वसन	२८.३
तांत्रिक सहाय्य, उपकरण, प्रशिक्षण	७७.२
एकूण	८९०.५
आकस्मिक खर्च	२३.१०
अभिकल्प व निरीक्षण	५५.५
भाववाढ (गृहीत)	७५.५
एकूण	१०४४.६

* देऊळगावकर अतूल : **डळमळले भूमंडळ,** ग्रंथावरून साभार उद्धृत, पृ. १७६

Maharashtra State Gazetteers

परिशिष्ट-४

भूकंप पुनर्वसन देणगीदार संस्था / शासन यांनी बांधलेल्या घरांची गावनिहाय संख्या *

अ.क्र.	गावाचे नांव	देणगीदार संस्थेचे नांव	घरांची संख्या
१	आशिव	महाराष्ट्र शासन	११७४
२	आशिव तांडा	सुर्यालक्ष्मी स्वयंसेवी संस्था, हैद्राबाद	३५
३	बाणेगाव	मल्याळम मलोरमा देणगीदार संस्था, हैद्राबाद	१६३
	बाणेगाव	महाराष्ट्र शासन	८६
	बाणेगाव	स्तुप स्वयंसेवी संस्था	१७
४	चिंचोली जो.	महिला उद्योग देणगीदार संस्था, मुंबई	५८
	चिंचोली जो.	अवेअर व रोटरी क्लब, हैद्राबाद, स्वयंसेवी संस्था	९३
५	गाढवेवाडी/चिंचोली तप.	हुडको देणगीदार संस्था	५२७
	गाढवेवाडी/चिंचोली तप.	सुर्यालक्ष्मी व रोटरी क्लब स्वयंसेवी संस्था	१८६
	गाढवेवाडी/चिंचोली तप.	महाराष्ट्र शासन	१४
६	दापेगांव	कॅरिटास इंडिया	२५८
	दापेगांव	महाराष्ट्र शासन	७
७	गांजनखेडा	कासा देणगीदार संस्था	११२
	गांजनखेडा	कासा स्वयंसेवी संस्था	४
८	गुबाळ	आड्रा अमेरीका देणगीदार संस्था	११५
	गुबाळ	महाराष्ट्र शासन	१४५
९	हरेगांव	रामकृष्ण मिशन देणगीदार संस्था	४२४
	हरेगांव	महाराष्ट्र शासन	१०६
१०	हासलगन	केरळ शासन देणगीदार संस्था	४८८
	हासलगन	महाराष्ट्र शासन	८५
११	जवळगा पोदे.	महाराष्ट्र शासन	४७१
	जवळगा पोदे.	रामकृष्ण मिशन देणगीदार संस्था	५५
१२	कवळी	रामकृष्ण मिशन देणगीदार संस्था	१६७
	कवळी	महाराष्ट्र शासन	५
१३	किल्लारी	महाराष्ट्र शासन	१९११
	किल्लारी	सहारा इंडिया देणगीदार संस्था	६०

* लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांचे भूकंप पुनर्वसन योजनेबाबत संक्षिप्त टिपणीच्या आधारे.

अनुक्रमणिका

अ.क्र.	गावाचे नांव	देणगीदार संस्थेचे नांव	घरांची संख्या
१४	किल्लारी वाडी	वर्ल्ड व्हिजन देणगीदार संस्था	१२०
	किल्लारी वाडी	टाटा हाऊसिंग देणगीदार	१९३
१५	लामजना/गोटेवाडी	महाराष्ट्र शासन	११५४
१६	लिंबाळादाऊ	शिवसेना देणगीदार संस्था	३९६
	लिंबाळा तांडा	महाजनम देणगीदार संस्था	३०
	लिंबाळादाऊ २	महाराष्ट्र शासन	४८
१७	माळकोंडजी	इफीकोर देणगीदार संस्था	३३६
	माळकोंडजी	महाराष्ट्र शासन	२३९
१८	मंगरुळ	महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग देणगीदार संस्था	२३१
	मंगरुळ	महाराष्ट्र शासन	२१५
१९	नदीहत्तरगा	कॅरीटॉस इंडिया देणगीदार संस्था	४१०
	नदीहत्तरगा	महाराष्ट्र शासन	२५
२०	नांदूर्गातांडा	कॅरीटॉस इंडिया	७७
	नांदूर्गातांडा	महाराष्ट्र शासन	६०८
२१	संक्राळ	इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ मॅनेजमेंट पांचोड देणगीदार संस्था	११०
२२	सारणी	कासा देणगीदार संस्था	२०७
२३	सरवडी	महाराष्ट्र शासन	६५६
२४	सिरसल	हिंदुस्थान/भारत पेट्रोलियम देणगीदार संस्था	३०५
२५	तळणी	कॅरीटॉस देणगीदार संस्था	५३३
	तळणी तांडा	कॅरीटॉस स्वयंसेवी संस्था	८०
२६	तुंगी बु.	हुडको देणगीदार संस्था	३७२
	तुंगी बु.	महाराष्ट्र शासन	१६२
२७	उत्का	हुडको देणगीदार संस्था	३६०
	उत्का तांडा	महाराष्ट्र शासन	७६
२८	येळवट	वेस्टर्न कोल फील्ड देणगीदार संस्था	१४४

परिशिष्ट-५

देणगीदार संस्थांनी बांधलेली घरे (उस्मानाबाद)

अ.क्र.	गाव	भूकंपापूर्वीची घरे	बांधावयाची घरे	देणगीदार संस्था
१	होळी	३३४	३३८	हाऊसिंग डेव्हलपमेंट कार्पोरेशन, मुंबई.
२	राजेगाव	१८२	२०४	टाटा रिलिफ कमिटी, मुंबई
३	सालेगाव	३६२	३७३	रोटरी इंटरनॅशनल, सोलापूर
४	कवठा	६०८	८२८	लायन्स क्लब, मुंबई
५	कोंडजीगड	१८८	२०८	महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस, मुंबई
६	मातोळा	१०१	९२	आनंदमार्गी युनियन रिलिफ ट्रस्ट
७	समुद्राळ	१८७	२१०	स्वामी नारायण मंदिर, मुंबई
८	रेबे चिंचोली	११५	१२१	जनकल्याण समिती, मुंबई
९	एकोंडी (लोहार)	१९५	१६६	कासा (चर्चेस ऑक्झल्री फॉर सोशल ॲक्शन).
१०	सय्यद हिप्परगा	१९७	२१९	कासा
११	बाभळसूर	१०५	१११	कासा
१२	मूर्शदपूर	२२७	१९७	अवेअर, हैदराबाद.

Maharashtra State Gazetteers

परिशिष्ट-६
भूकंपाची ऐतिहासिक नोंद

महाराष्ट्रात झालेल्या एकूण भूकंप धक्क्यांची जी नोंद विविध ऐतिहासिक साधनांतून व भूकंपमापन उपकरणाद्वारे उपलब्ध झाली आहे त्यामध्ये महाराष्ट्र राज्य व राज्यलगतचा १०० कि.मी.परिसर अंतर्भूत आहे. या सूचीसाठी उपयोगात आणलेल्या विविध साधनग्रंथांचे संक्षेप संदर्भ म्हणून नोंदवले आहे. यासाठी उपयोगात आणलेला मूळ संदर्भ आणि त्यापुढे कंसात संक्षेप नोंदवला आहे.

[एकनाथी भागवत- (एभा), केळकर वाय.एन. यांचा ग्रंथ (१९६८)- (केळकर), ओल्डहॅम यांचा ग्रंथ, (१८८३)- (ओल्डहॅम), कोयना भूकंप १० डिसेंबर १९६७ तज्ज्ञ समितीचा अहवाल -(रिपोर्ट),मिल्नेचा ग्रंथ (१९११)-(मिल्ने), दैनिक वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया -(टाऑइ), स्टेटसमन कलकत्ता-(स्टेटसमन), आंतरराष्ट्रीय भूमकंपीय समरी-(आयएसएस), भारतीय मौसम विभाग-(आएमडी), भारतीय भूसर्वेक्षण विभाग-(जीएसआय), सिंग व सेतुमाधवन यांचा ग्रंथ (१९६५)-(केएआर), कोस्ट ॲन्ड जीओडेटीक सर्व्हे -(सीजीएस), केंद्रीय जल तथा विद्युत सनुसंधान केंद्र, पुणे -(सीडब्ल्यूपी), राष्ट्रीय भूभौतिकी अनुसंधान केंद्र, हैद्राबाद - (एचवायबी), महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक-(मेरी), युनायटेड स्टेटस जीओलॉजिकल सर्व्हे- (युएसजी), श्रीवास्तव एच.एन.इ.(१९८६)- (एसआरआय).]

महाराष्ट्र राज्यात झालेल्या भूकंप धक्क्यांची सूची (ऐतिहासिक व उपकरणाद्वारे नोंदलेले)
(महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगतचा १०० किमी परिसर समाविष्ट)
(मार्च-२००५ पर्यंत)

अ.क्र.	वर्ष	महिना	दिवस	अक्षांश उ.	रेखांश पू.	ठिकाण	तीव्रता एमएम	महत्ता	संदर्भ
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१	१२०१	-	-	१८.७	७५.२	आपेगाव,पैठण	-	-	एभा
२	१५९४	-	-	१९.४	७२.८	वसई	IV	३.७	केळकर
३	१६१८	०५	२६	१८.९	७२.९	मुंबई	IX	६.९	ओल्डहॅम
४	१६७८	-	-	१९.४	७२.८	वसई	VI	५.०	केळकर
५	१६८४	-	-	२१.२	७२.९	सुरत	IV	३.७	ओल्डहॅम
६	१७०२	-	-	-	-	उत्तर कोकण	-	-	केळकर
७	१७५१	१२	०९	१९.१	७२.९	सेल्सेट	V	४.३	केळकर
८	१७५२	०१	०५	१९.१	७२.९	सेल्सेट	V	४.३	केळकर
९	१७५२	०२	०५	१८.७	७३.४	लोहगड	V	४.३	केळकर
१०	१७५७	१०	३१	१८.२	७४.२	टोका, धोम	V	४.३	केळकर
११	१७६०	-	-	१८.५	७३.६	पुणे	IV	३.७	केळकर

परिशिष्ट ६—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१२	१७६४	०८	-	१८.०	७४.१	लोणंद	VII	६.०	केळकर
१३	१७९२	०५	२९	१८.५	७३.०	रेवदंडा	V	४.३	केळकर
१४	१८१२	०२	२३	१८.५	७३.६	पुणे	IV	३.७	केळकर
१५	१८२६	०३	२०	१६.१	७३.६	मोरावडे	VI	५.०	केळकर
१६	१८२८	०८	२२	१५.९	७३.५	वेंगुर्ला	V	४.३	ओल्डहॅम
१७	१८३२	०६	०२	१८.७	७३.४	लोहगड (अलीबाग)	IV	३.७	ओल्डहॅम
१८	१८३२	१०	०४	१८.७	७३.०	उगते (अलीबाग)	VI	५.०	केळकर
१९	१८३५	०१	०४	१८.७	७३.४	लोहगड	IV	३.७	ओल्डहॅम
२०	१८३५	०१	१४	१८.७	७३.४	लोहगड	IV	३.७	ओल्डहॅम
२१	१८४३	०४	०१	१५.२	७६.९	बेल्लारीजवळ	VII	५.८	ओल्डहॅम
२२	१८४९	१२	२६	१८.९	७२.९	मुंबई	III	३.०	ओल्डहॅम
२३	१८५४	११	-	१८.९	७२.९	मुंबई	III	३.०	ओल्डहॅम
२४	१८५४	१२	०८	१८.९	७२.९	मुंबई	IV	३.७	ओल्डहॅम
२५	१८५६	१२	२५	२०.०	७२.७	डहाणु	VII	५.७	मिल्ने
२६	१८५८	१२	३१	२१.०	७५.०	खानदेश	III	३.०	ओल्डहॅम
२७	१८६०	०४	२७	२१.२	७२.९	सुरत		३.७	ओल्डहॅम
२८	१८६२	११	१८	२०.९	७४.८	धुळे	IV	३.७	टाऑइं
२९	१८६३	११	०८	२१.८	७५.३	बरौनी	VII	५.७	ओल्डहॅम
३०	१८६५	१२	३१	१७.५	७६.०	सोलापूर	III	३.०	टाऑइं
३१	१८६९	०७	०४	२०.०	७३.८	नाशिक	IV	३.७	ओल्डहॅम
३२	१८६९	०७	१२	२०.९	७४.८	धुळे	IV	३.७	ओल्डहॅम
३३	१८७१	०१	३१	२०.५	७३.०	सुरत	IV	३.७	टाऑइं
३४	१८७२	०७	१२	२०.९	७४.८	धुळे	III	३.०	टाऑइं
३५	१८७७	१२	-	१८.९	७२.९	मुंबई	IV	३.७	टाऑइं
३६	१८८३	०७	२७	२१.५	७९.०	नागपूर	II	२.३	टाऑइं
३७	१८८६	०५	१३	१६.७	७४.२	कोल्हापूर	III	३.०	टाऑइं
३८	१८९१	०५	०६	१८.९	७२.९	मुंबई	III	३.०	स्टेटसमन
३९	१८९६	०१	०३	१९.४	७४.७	भोरवाडी	-	-	युएसजी
४०	१८९६	०४	३०	-	-	लोणावळा	III	३.०	स्टेटसमन
४१	१८९८	१०	१६	१५.९	७४.६	बेळगाव	-		युएसजी

अनुक्रमणिका

परिशिष्ट ६—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
४२	१९००	०१	१६	२०.४	७२.९	पश्चिम किनारा	-	-	युएसजी
४३	१९२९	०२	१६	१८.०	७३.०	दक्षिण मुंबई	V	४.२	आयएसएस
४४	१९३५	०७	२०	२१.०	७२.४	दुमस जवळ	VII	५.७	आयएमडी
४५	१९३५	०९	१६	१९.१	७३.०	ठाणे जवळ	III	३.०	आयएमडी
४६	१९३८	०३	१४	२१.५	७५.७	खंडवा	VIII	६.२	आयएमडी
४७	१९४१	०५	२८	१८.०	७३.०	श्रीवर्धन	V	४.३	आयएमडी
४८	१९४२	-	-	-	-	उत्तर नांदेड	IV	३.७	जीएसआय
४९	१९५१	०४	०९	१७.३	७३.२	जयगड	V	४.७	रिपोर्ट
५०	१९५३	-	-	१९.०	७५.८	बीड जिल्हा	IV	३.७	जीएसआय
५१	१९५५	-	-	१८.१	७५.२	उजनी	IV	३.७	जीएसआय
५२	१९५६	१०	-	-	७७.३	भालकी	IV	३.७	जीएसआय
५३	१९५७	०८	२५	२२.०	८०.०	गोंदीया	VII	५.५	आयएमडी
५४	१९५७	१०	१७	२१.५	७९	नागपमर खापा	IV	४.०	आयएमडी
५५	१९६२	०९	२८	१७.०	७३.५	रत्नागिरी	V	४.३	केएआर
५६	१९६३	०३	२४			मुंबई	IV	३.७	आयएमडी
५७	१९६५	०६	०४	१७.०	७३.४	रत्नागिरी	VI	५.४	आयएमडी
५८	१९६५	११	१९	१८.८	७३.१	अलीबाग	-	-	सीजीएस
५९	१९६५	१२	१३	१९.२	७३.०	कल्याण	IV	३.७	आयएमडी
६०	१९६६	०१	२२	१८.३	७२.७	कुलाबा	-	-	आयएमडी
६१	१९६६	०५	०४	१८.७	७३.०	अलीबाग	V	४.३	रिपोर्ट
६२	१९६६	०६	१४	१७.०	७३.०	रत्नागिरी	VI	४.८	सीडब्लूपी
६३	१९६७	०१	०६	२२.०	७४.३	रायपुर	-	४.३	आयएसएस
६४	१९६७	०२	१७	१९.३	७३.०	कल्याण	-	-	आयएमडी
६५	१९६७	०४	१९	१८.१	७३.४	महाड	-	४.७	सीडब्लूपी
६६	१९६७	०४	२५	१८.२	७३.४	महाड	VII	५.६	आयएमडी
६७	१९६७	०५	१८	१७.९	७३.०	जंजीरा	IV	३.६	सीडब्लूपी
६८	१९६७	०५	१९	१७.०	७३.५	रत्नागिरी	V	४.३	सीडब्लूपी
६९	१९६७	०६	२०	१८.७	७३.०	अलीबाग	V	४.३	सीडब्लूपी
७०	१९६७	०९	१३	१७.४	७३.७	कोयना	VII	५.८	सीडब्लूपी
७१	१९६७	१२	११	१७.४	७३.७	कोयना	IX	६.५	रिपोर्ट

परिशिष्ट ६—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
७२	१९६७	१२	२५	१७.४	७३.७	कोयना	VI	५.०	सीडब्लूपी
७३	१९६८	०७	२१	२१.४	७७.८	अमरावती	-	३.६	एचवायबी
७४	१९६८	१०	२९	१७.४	७३.७	कोयना	VI	५.२	सीडब्लूपी
७५	१९६८	११	०४	१६.२	७४.०	सावंतवाडी	-	३.५	आयएमडी
७६	१९६८	११	१४	२१.८	७८.०	बेतूल	-	४.२	एचवायबी
७७	१९६९	०३	०७	१७.२	७३.६	संगमेश्वर	-	४.७	सीडब्लूपी
७८	१९६९	०५	०८	१८.९	७२.९	मुंबई	-	-	सीडब्लूपी
७९	१९७०	०२	२०	१९.७	७५.२	पैठण	-	२.९	एचवायबी
८०	१९७०	०३	२३	२१.७	७३.०	भरोच	-	५.४	सीजीएस
८१	१९७०	०८	०९	२१.७	७३.०	भरोच	-	३.५	एचवायबी
८२	१९७०	०८	३०	२१.६	७२.२	भरोच	-	४.१	एचवायबी
८३	१९७०	०९	१०	२१.६	७२.७	भरोच	-	३.४	एचवायबी
८४	१९७२	०४	२१	२०.७	७७.०	अकोला	-	४.३	एचवायबी
८५	१९७३	१०	१७	१७.३	७३.६	कोयना	-	५.२	सीडब्लूपी
८६	१९७४	०४	१७	१७.५	७३.१	पश्चिम किनारा	-	५.०	आयएमडी
८७	१९७४	१०	२०	२१.५	७४.२	तळोदा	-	४.६	एचवायबी
८८	१९७५	०७	०३	१८.५	७९.५	काझीपेठ	-	३.२	एचवायबी
८९	१९७५	०९	२५	२०.८	७४.२	धुळे	-	४.२	एचवायबी
९०	१९७६	०१	२०	१९.५	७९.२	विरुर	-	२.७	एचवायबी
९१	१९७६	०१	२०	१९.५	७९.२	विरुर	-	२.७	एचवायबी
९२	१९७६	०३	१०	१६.९	७३.४	लांजा जवळ	-	४.०	सीडब्लूपी
९३	१९८०	०१	०६	१९.८	७३.७	नाशिक जवळ	-	२.८	एचवायबी
९४	१९८०	०१	०८	२०.९	७५.१	उत्तर-पूर्व धुळे	-	३.५	एचवायबी
९५	१९८०	०२	०१	२१.०	७६.२	उत्तर-पश्चिम अकोला	-	३.१	एचवायबी
९६	१९८०	०३	३०	२०.६	७६.०	बुलढाणा	-	३.३	एचवायबी
९७	१९८०	०५	०१	२१.०	७६.०	पूर्व जळगाव	-	४.१	एचवायबी
९८	१९८०	१२	३०	२२.१	७६.६	बीड	-	३.४	एचवायबी
९९	१९८१	०५	०६	२०.२	७४.३	मनमाड जवळ	-	३.९	एचवायबी
१००	१९८३	०८	१७	१९.६	७३.६	खर्डी	-	४.४	मेरी

अनुक्रमणिका

परिशिष्ट ६—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१०१	१९८३	०९	१५	१९.७	७३.६	खर्डी	VI	४.९	मेरी
१०२	१९८४	०५	१४	२०.५	७३.९	नाशिक जवळ	-	३.०	मेरी
१०३	१९८४	१०	११	१८.१	७४.६	बारामती	-	३.४	मेरी
१०४	१९८६	०२	२६	२०.६	७३.३	बलसाड	-	४.३	आयएमडी
१०५	१९८६	०४	२७	२०.६	७३.३	बलसाड	-	४.६	श्रीवास्तव
१०६	१९८७	०४	१८	२१.१	७९.१	नागपूर	-	३.८	मेरी
१०७	१९८७	०६	०५	१७.०	७३.०	रत्नागिरी	-	३.५	मेरी
१०८	१९८७	०७	०३	१८.५	७३.६	पुणे	-	३.०	मेरी
१०९	१९८९	०३	१६	२१.६	७४.४	शहादा	-	३.०	मेरी
११०	१९८९	०६	२१	१९.९	७२.६	पालघर	-	३.६	मेरी
१११	१९९०	०३	०७	१७.०	७३.०	रत्नागिरी	-	४.०	मेरी
११२	१९९०	०६	०२	१९.६	७३.४	खर्डी	-	४.०	मेरी
११३	१९९२	१०	१८	१८.२	७६.६	किल्लारी	-	४.८	मेरी
११४	१९९३	०९	३०	१८.१	७६.६	किल्लारी	VIII	६.३	मेरी
११५	१९९३	०९	३०	१८.०	७६.४	किल्लारी	-	५.०	आयएमडी
११६	१९९३	१०	०९	१८.०	७६.६	किल्लारी	-	५.२	आयएमडी
११७	१९९३	११	१२	१८.०	७६.५	किल्लारी	-	५.०	आयएमडी
११८	१९९३	१२	०८	१७.२	७३.८	कोयना	-	५.१	मेरी
११९	१९९४	०१	०९	१९.९	७३.१	मेढी	-	३.८	मेरी
१२०	१९९४	०२	०१	१७.३	७३.७	कोयना	-	५.४	मेरी
१२१	१९९४	०७	२९	२१.४	७४.२	नंदुरबार	III	३.०	मेरी
१२२	१९९४	०८	१२	२१.४	७९.३	रामटेक	-	३.२	मेरी
१२३	१९९४	०८	२६	२१.२	७९.७	भंडारा	-	३.२	मेरी
१२४	१९९४	११	२९	१६.५	७४.६	दक्षिण-पूर्व कोल्हापूर	-	४.२	मेरी
१२५	१९९५	०७	२२	१७.८	७३.३	दापोली जवळ	-	२.८	मेरी
१२६	१९९५	०७	२९	१७.१	७३.१	जयगड जपळ	-	३.९	मेरी
१२७	१९९५	११	०५	२०.५	७३.८	दळवट	-	३.०	मेरी
१२८	१९९५	११	०७	१९.९	७८.८	यवतमाळ	-	३.६	मेरी
१२९	१९९६	०२	०२	१९.३	७४.१	बोटा	-	३.५	मेरी
१३०	१९९६	०३	०१	२१.२	७९.७	भंडारा	-	३.१	मेरी

अनुक्रमणिका

परिशिष्ट ६—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१३१	१९९६	०६	०३	२०.४	७७.४	वाशीम	-	३.३	मेरी
१३२	१९९६	१२	१०	२०.४	७३.७	वणी	-	३.३	मेरी
१३३	१९९७	०३	१६	२०.२	७३.४	वणी	-	३.२	मेरी
१३४	१९९७	०५	२२	२३.२	८०.०	जबलपूर	-	५.४	आयएमडी
१३५	१९९८	०५	३१	१९.१	७३.१	ठाणे-वाशी	-	३.९	मेरी
१३६	१९९८	०६	२९	१८.७	७९.८	सिरोंचा	-	४.१	मेरी
१३७	१९९८	०९	०२	२०.२	७३.०	सिल्व्हासा	-	३.६	मेरी
१३८	२०००	०३	१२	१७.१५	७३.७५	कोयना	-	५.२	मेरी
१३९	२०००	०६	१९	१८.०	७६.५	किल्लारी	-	४.३	मेरी
१४०	२०००	०६	२२	१९.९	७८.९	चंद्रपूर	-	४.४	मेरी
१४१	२०००	०९	०५	१७.२	७३.८	कोयना	-	५.२	मेरी
१४२	२००१	०१	२६	२३.४	७०.३	भूज	XI	७.६	मेरी
१४३	२००१	०२	०६	२२.२	७४.८	पूर्व धुळे	-	३.२	मेरी
१४४	२००१	०२	१३	२०.५	७३.८	दळवट		३.१	मेरी
१४५	२००१	०५	१५	१८.०	७६.५	किल्लारी	-	३.३	मेरी
१४६	२००१	११	१६	१९.०७	७३.०	ठाणे	-	३.०	मेरी
१४७	२००१	१२	२२	१९.७	७३.२	पालघर	-	३.४	मेरी
१४८	२००२	०२	६	२२.२	७४.७	नंदुरबार		३.२	मेरी
१४९	२००२	०५	१९	२१.२	७५.०	मध्य प्रदेश सीमा		३.८	मेरी
१५०	२००२	११	०२	२१.९	७५.२	मध्य प्रदेश सीमा		३.१	मेरी
१५१	२००२	१२	०१	२०.४	७३.२	धरमपूर		३.१	मेरी
१५२	२००३	०३	१०	२०.३	७७.१	अकोला एरिया		३.८	मेरी
१५३	२००३	०७	०३	२१.७	७४.६	गुज-महा-मप्र सीमा		४.०	मेरी
१५४	२००३	११	२२	२१.५	७६.०	मध्य प्रदेश सीमा		३.५	मेरी
१५५	२००४	०५	१८	१८.५	७३.९	पुणे जिल्हा		३.१	आयएमडी
१५६	२००४	०७	०६	१८.९	७३.१	बेलापूर जवळ		३.१	आयएमडी
१५७	२००५	०३	१४	१७.२	७३.७	कोयना-वारणा		५.१	मेरी
१५८	२००७	०९	०६	१८.°	७६.५	किल्लारी परिसर		४.१	मेरी

ही संपूर्ण नोंद महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक यांनी पुरवलेल्या माहिती वरून दिलेली आहे.

प्रकरण ५ : उद्योगधंदे

- औद्योगिकरणाचा इतिहास
- वीज निर्मिती व वितरण
- खाद्य पदार्थांचे उत्पादन
- पेये, स्पिरीट व तंबाखूची उत्पादने
- वस्त्रोद्योग
- लोकर व रेशीम उद्योग
- रसायने व रासायनिक पदार्थ
- रबर व प्लास्टिक उत्पादने
- कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण प्रकाशने व संबंधित उद्योग
- मूलभूत व मिश्र धातू
- धातूच्या वस्तू व सुटे भाग
- परिवहन सामग्री, यंत्रसामग्री व सुटे भाग
- अधातू खनिज उत्पादने
- लाकडाच्या वस्तू आणि फर्निचर
- भांडवली वस्तू व यंत्रसामग्री दुरुस्ती
- औद्योगिक वसाहती
- ग्रामोद्योग व कुटिरोद्योग
- कामगार चळवळ
- तक्ते



प्रकरण ५

उद्योगधंदे

औद्योगिकरणाचा इतिहास

प्राचीन काळापासून शेती क्षेत्र हे या जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार राहिला आहे. प्रारंभीक ऐतिहासिक काळापासून खेड्यांमध्ये जीवनावश्यक वस्तू व शेतीची अवजारे घडविण्याचा व्यवसाय वंशपरंपरेने चालत असे. कृषि उत्पादनाच्या आधारावर जिल्ह्यात पूर्वी हातमाग विणकाम आणि तेलघाण्यावर तेल गाळणे हा कुटिरोद्योग अनेक ठिकाणी चालत असे. एकंदर मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाबाबत हैद्राबाद संस्थानाच्या उदासीनतेच्या धोरणामुळे हा जिल्हा देखील औद्यागिक दृष्ट्या मागास राहिला. याखेरीज लातूर हे हैद्राबाद संस्थानातील एक अग्रगण्य कापूस खरेदी केंद्र होते. सन १८९१ मध्ये लोकमान्य टिळकांनी लातूर मध्ये जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी सुरू केली. टिळकांच्या उद्योगाबरोबर त्यांचे स्वातंत्र्याचे वारेही या परिसरात वाहू लागले. याची दखल घेऊन हैद्राबाद सरकारला लातूर येथे १८९४ मध्ये मुन्सफी कोर्ट सुरू करावे लागले. त्यानंतर १८९९ मध्ये लातूरहून बार्शीला जाणारा सिमेंटचा रस्ता तयार झाला. आयात निर्यातीला अधिक चालना मिळू लागली. टिळकांच्या जिनिंग फॅक्टरीनंतर लातूर येथे १९०७ मध्ये आणखीन एक जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी सुरू झाली. यापुढील दशकात लातूर ते कुर्डूवाडी नॅरोगेज रेल्वे सुरू झाली. पुढे १९३० नंतर हैद्राबाद सरकारने येथे उद्योग विभाग सुरू केला. सन १९४६ मध्ये लातूर येथे सुधाकर प्रिंटिंग प्रेस सुरू झाली.

सन १९४८ मध्ये हैद्राबाद संस्थानातून हा जिल्हा किंवा एकंदर मराठवाडा मुक्त होऊन मुंबई राज्यात सामील झाल्यानंतर जिल्ह्यातील औद्योगिकरणाच्या मार्गातील अडथळे दूर होण्यास सुरुवात झाली. सन १९५८ मध्ये लातुरात धुलाईचे साबण तयार करण्याचे दोन कारखाने,१९५९ मध्ये मिठाईचा कारखाना,१९६० मध्ये औसा येथे हाताने बनविण्यात येणाऱ्या कागदाचा कारखाना हे सुरू झाले. सन १९६३ मध्ये लातूर येथे डालडा तयार करणारी कोऑपरेटिव्ह ऑईल मिल सुरू झाली. याच वर्षी लातूर इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्ह वसाहत सुरू झाली. सन १९६४ मध्ये लातूर येथे जवाहर सहकारी कापूस उत्पादक सूत गिरणी सुरू झाली. सन १९६५ मध्ये ढोकी येथे मराठवाड्यातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन झाला. त्याच वर्षी मुरूड येथे सिमेंटचे खांब तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. १९६७ पासून लातूरहून चंपावती नावाचे साप्ताहिकची आवृत्ती प्रकाशित होऊ लागली. त्याच वर्षी लातूर येथे मयूर पेन्टस् हा पेन्टचा कारखाना सुरू झाला. लातूर येथे सन १९७० मध्ये मे.एलोरा इंडस्ट्रिज हा बिल्डिंग हार्डवेअरचा, १९७२ मध्ये मे.गणेश इंडस्ट्रिज हा लोखंडी सळई तयार करण्याचा, मे.पपरुनिया इंडस्ट्रिज, मे.कांचन ऑईल इंडस्ट्रिज हे खाद्य तेलाचे कारखाने सुरू झाले. सन १९७४ मध्ये हलगरा (ता.निलंगा) येथे हनुमान खांडसरी शुगर मिल्स हा खाजगी कारखाना, लातूर येथे १९७५ मध्ये मे. कपील ऑईल मिल, मे.बस्वेश्वर स्टील इंडस्ट्रिज हा ट्रॅक्टर ट्रॉलीचा कारखाना, सन १९७८ मध्ये उदगीर येथे दूध भुकटीचा शासकीय प्रकल्प हे प्रमुख व अन्य काही उद्योग नव्याने लातूर जिल्हा निर्मिती होईपर्यंत सुरू झाले.

अनुक्रमणिका

सन १९८२ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन लातूर जिल्ह्याची निर्मिती झाली. लातूर जिल्हा निर्मितीस सन २००७ मध्ये २५ वर्षे पूर्ण झाली. या कालावधीतील जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाबाबत दृष्टिक्षेप टाकला असता काही महत्त्वाचे उद्योग धंदे जिल्ह्यात सुरू झालेले आढळतात ते पुढीलप्रमाणे.

नळेगाव (ता.चाकूर) येथील जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना (१९८२), लातूर येथील महेश बुक्स हा कारखाना (१९८२), लातूर जवळ चिंचोलीराव (वाडी) येथील मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना (ज्याने आजपर्यंत जिल्ह्यात नेत्र दिपक प्रगती केली असा हा साखर कारखाना) (१९८४), उदगीर जवळ लोणी येथे मे.पांडूरंग मेटल इंडस्ट्रिज हा पितळ व तांब्याची भांडी तयार करण्याचा कारखाना (१९८६), लातूर येथे स्नेहा ऑफसेट ही जिल्ह्यातील पहिली ऑफसेट प्रेस (१९८८), अंबुलगा (ता.निलंगा) येथे शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना (१९८९), उजना (ता.अहमदपूर) येथे बालाघाट शेतकरी सहकारी साखर कारखाना (१९९०), लातूर येथे इंदिरा सहकारी सूत गिरणी (१९९०), लातूर येथे प्रियदर्शनी अनुसूचित सहकारी सूत गिरणी (१९९१), अहमदपूर येथे शेतकरी सहकारी जिनिंग ॲन्ड प्रेसिंग फॅक्टरी (१९९१), तॉंडार (ता.उदगीर) येथे प्रियदर्शनी शेतकरी सहकारी साखर कारखाना (१९९४), लातूर येथे वत्सला बळीराम प्रकाशन केंद्र, ऑफसेट प्रिंटर्स ही छपाई व प्रकाशन उद्योग संस्था (१९९५), लातूर येथे मे दिनेश इंडस्ट्रिज हा स्टील कपाटे तयार करण्याचा कारखाना (१९९७) व मे.लक्ष्मी इंडस्ट्रिज हा स्टील फर्निचरचा कारखाना (१९९८), पानगाव (ता.रेणापूर) येथे पन्नगेश्वर शुगर मिल्स हा कंपनी क्षेत्रातील साखर कारखाना (१९९९), निवळी (ता.लातूर) येथे विकास सहकारी साखर कारखाना आणि बेलकुंड (ता.औसा) येथे श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना (२०००), निवाडा (ता.रेणापूर) येथे रेणा सहकारी साखर कारखाना (२००१) इत्यादी प्रमुख कारखाने तसेच अन्य अनेक उद्योग सुरू झालेले आहेत त्यांची सविस्तर माहिती या प्रकरणात दिलेली आहे. जिल्ह्यात सन २००७ पर्यंत सहकारी क्षेत्रात ९, कंपनी क्षेत्रातील १ व खाजगी क्षेत्रातील १ साखर कारखाने सुरू आहेत. येथील साखर उद्योगामुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला कलाटणी मिळाली आहे.

लातूर जिल्ह्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाच औद्योगिक वसाहती व तीन सहकारी औद्योगिक वसाहती स्थापन करण्यात आल्या आहेत. मुरूड येथे ग्रामीण सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन केलेली आहे. सद्या जिल्ह्यात १,३८६ (सन २००६) लघु उद्योग सुरु आहेत. त्यामध्ये रु.८६ कोटीची गुंतवणूक झाली आहे व २,३५३ लघु उद्योग प्रस्तावीत असून त्यात रु.१८६ कोटीची गुंतवणूक अपेक्षित आहे. सद्या जिल्ह्यात १७ मोठे उद्योग सुरू असून त्यात एकूण गुंतवणूक रु.३८९ कोटी आहे. जिल्ह्यात बहुसंख्य उद्योग शेती मालावर आधारित आहेत. लातूर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला दिशा व गती निर्माण होण्यास जिल्ह्यातील दृष्टे नेतृत्वाचे योगदान राहिले आहे.

लातूर येथे एक विमानतळ आहे. तेथे नाईट लॅन्डींगची सुविधा लवकरच सुरू करण्याबाबत काम सुरू आहे. सद्या जिल्ह्यात १४८ कि.मी.लांबीचा रेल्वेमार्ग आहे. ८४५ कि.मी.लांबीचे राज्यमहामार्ग आहेत. तर १,५२४ (सन २००७) कि.मी. लांबीचे महत्त्वाचे जिल्हा मार्ग आहेत. नव्याने व्हिडीओकॉन कंपनीने ३५० कोटी रुपयांची गुंतवणूक करून लातूर एम.आय.डी.सी.मध्ये २,००० लोकांना रोजगार मिळवून देणारा इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा प्रकल्प उभा करण्याचा निर्णय घेतला आहे. याबरोबरच बॉम्बे रेयान कंपनीने रु.२५० कोटीचा प्रकल्प लातूर येथे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे परिसरातील विशेषत: महिलांना मोठया प्रमाणावर रोजगाराची संधी मिळणार आहे. तसेच रॅमकी कंपनी (गुंतवणूक रु. ७० कोटी), सुप्रीम इंडस्ट्रिज ही कृषि उद्योगातील प्लास्टिक साहित्य बनविणारी कंपनी (गुंतवणूक रु.१०० कोटी), अयेर प्रॉपर्टीज कंपनी (गुंतवणूक रु.१०० कोटी), या अन्य तीन कंपन्यांनीही लातूर येथे मोठे प्रकल्प सुरू

अनुक्रमणिका

करण्याचा निर्णय घेतला आहे. अशा प्रकारे सुमारे रु.६०० कोटी गुंतवणूकीच्या व ११ हजार लोकांसाठी रोजगार संधी उपलब्ध होणाऱ्या या पाचही मोठ्या उद्योगाच्या प्रकल्पाचे लातूर एम.आय.डी.सी. येथे दि.१६ जानेवारी २००८ रोजी भूमीपूजन झाले. यामुळे लातूर शहराची ओळख प्रगत औद्योगिक शहर म्हणून होणार आहे.

भारत सरकारच्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षण आकडेवारीचा या प्रकरणात पुरेपूर उपयोग केला आहे. त्यानुसार जिल्ह्यात खाद्यपदार्थ, पेये, तंबाखू व तंबाखूचे पदार्थ, वस्त्रोद्योग, रसायने व रासायनिक पदार्थ, रबर व प्लास्टिकची उत्पादने, कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण व प्रकाशन, धातूच्या वस्तू व सुटे भाग, परिवहन सामग्री, यंत्रसामग्री, इलेक्ट्रिक यंत्रसामग्री, साधने, उपकरणे व सुटे भाग, लाकडाच्या वस्तू व फर्निचर इत्यादी प्रमुख उद्योगाबाबत नोंद घेतली आहे. काही प्रमुख उद्योगाचे प्रतिशत प्रमाण तक्ता क्रमांक १ मध्ये दिले आहे. सन १९८१-८३ ते १९९६-९७ दरम्यानच्या काही वर्षातील वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार आकडेवारी तक्ता क्रमांक २ ते ८ मध्ये दिलेली आहे. तर त्यापुढील वर्षांची माहिती संबंधित विभागाने पुरविलेल्या माहितीआधारे दिलेली आहे.

वीज निर्मिती व वितरण

विजेचा वापर हे औद्योगिक विकासाचे गमक मानले जाते. उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून दिनांक १६ ऑगस्ट १९८२ रोजी लातूर या नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. हा जिल्हा निर्माण होण्यापूर्वी उस्मानाबाद जिल्ह्यात राज्याची १९५६ मध्ये पुनर्रचना होण्याच्या अगदी काही काळ अगोदरपर्यंत फक्त लातूर आणि तुळजापूर या शहरांना खाजगी वीजनिर्मिती कंपनीकडून विद्युत पुरवठा करण्यात येत होता. लातूरचे व्यापार व वाणिज्य दृष्ट्या असलेले महत्त्व आणि तुळजापूरचे धार्मिकदृष्ट्या असलेले महत्त्व, केवळ याच कारणांमुळे तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात प्रथम वीज पुरवठा करण्यात आला.

इ.स.१९५६ मध्ये राज्य पुनर्रचना झाल्यावर १ फेब्रुवारी १९५७ रोजी मुंबई राज्य विद्युत मंडळाची स्थापना करण्यात आली. त्यात राज्यातील सर्व लहान वीज निर्मिती केंद्रे विलीन करण्यात आली. राज्य विद्युत मंडळाव्दारे जिल्ह्यात सर्वप्रथम लातूर शहराला १९५९ मध्ये वीज पुरवठा करण्यात आला. मंडळाने लातूर येथे आणखी एक असे दुसरे विद्युतनिर्मिती केंद्र सुरू केले. या दोन्ही विद्युतनिर्मिती केंद्रांची एकूण क्षमता ५४४ कि.वॅ.होती. मंडळाने १९५९ मध्ये उस्मानाबाद येथे १०० कि.वॅ.क्षमतेचा वीज पुरवठा सुरू केला. पुढे भूम व मुरुम येथे स्वतंत्र वीजनिर्मिती केंद्रे स्थापन करण्यात आली. येथून परंडा आणि उमरगा येथेही वीज पुरवठा करण्यात येत होता. तसेच निलंगा आणि औसा (यांचा समावेश नवनिर्मित लातूर जिल्ह्यात आहे.) या शहरांना लातूर येथील वीजनिर्मिती केंद्रातून वीज पुरवठा करण्यात येत होता. हे सर्व वीज निर्मिती संच डिझेल या इंधनावर चालत असत. उदगीर व अहमदपूर या शहरांना राज्य विद्युत मंडळापूर्वी कोणत्याही खाजगी वीजनिर्मिती कंपनीव्दारे वीज पुरवठा करण्यात येत नव्हता. पुढे दिनांक २० जून १९६० रोजी मुंबई राज्य वीज मंडळाचे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ झाल्यावर या मंडळांकडून जिल्ह्यात वीज पुरवठा करण्यात येऊ लागला. लातूर येथे इ.स.१९५९ मध्ये सुरू झालेल्या वीजनिर्मिती केंद्रात इ.स.१९६३-६४ मध्ये ५ वीज निर्मिती संच कार्यरत होते. त्यातून निर्माण करण्यात येणारी वीज लातूर, रेणापूर, औसा, निलंगा, किल्लारी, नागरसोगा, मुरूड, हरंगूळ, नांदगाव, चिखुर्डा, लामजना या गावाना पुरविण्यात येत असे. या केंद्राव्दारे ९७ मैल अंतराच्या वीजवाहक तारा टाकल्या होत्या. सदर ५ संचाची एकूण स्थापित क्षमता १,६४२ कि.वॅ.ची होती. या केंद्रात एकूण ५७ कामगार कार्यरत होते. त्या वर्षात केंद्राव्दारे उद्योगधंद्याना ५५,६६१ कि.वॅ./तास आणि घरगुती वापरासाठी ५४,१६५ कि.वॅ./तास विजेचा पुरवठा करण्यात आला.

अनुक्रमणिका

राज्य विद्युत मंडळाने इ.स.१९६१ मध्ये उदगीर शहराला डिझेलवर चालणाऱ्या ५ वीजनिर्मिती संचाव्दारे वीजपुरवठा सुरू केला. हा पुरवठा फक्त उदगीर शहरास करण्यात येत होता. या वीजनिर्मिती केंद्राची इ.स.१६६३-६४ मध्ये स्थापित क्षमता ६०० कि.वॅ. ची होती. येथे २ मैल अंतर वीजवाहक तारा टाकण्यात आल्या होत्या. त्यावर्षी येथे १६ कामगार कार्यरत होते. इ.स.१९६३-६४ मध्ये या केंद्राव्दारे उद्योगधंद्याना १,८२२ कि.वॅ./तास आणि घरगुती वापरासाठी १०,५२९ कि.वॅ./तास विजेचा पुरवठा करण्यात आला. या संचाव्दारे १९६९ पर्यंत उदगीर शहराला विजेचा पुरवठा करण्यात येत होता. इ.स.१९६९ या वर्षी उदगीरला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे वतीने कोयना विद्युत प्रकल्पाव्दारे विजेचा पुरवठा करण्यात आला व इ.स.१९७० या वर्षापासून अद्यापपर्यंत परळी वैजनाथ (जिल्हा बीड) येथील औष्णीक विद्युत केंद्रातून ग्रीडव्दारे विजेचा पुरवठा केला जात आहे. याचवेळी अहमदपूर शहरालाही परळी वैजनाथ येथील औष्णीक विद्युतकेंद्रातून विजेचा पुरवठा करण्यात येऊ लागला.[१]

जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने कोयना जलविद्युत केंद्रातून निर्माण होणाऱ्या विजेचा पुरवठा केला. हा पुरवठा प्रथम १९६२ मध्ये देगाव-सोलापूर अति उच्चदाब केंद्रातून केला. सद्या लातूर जिल्ह्यात परळी औष्णीक उपकेंद्र व चंद्रपूर-कोयना वीज निमिती केंद्राकडून ग्रीड मार्फत गिरवली उपकेंद्रामार्फत विजेचा पुरवठा केला जातो. हा पुरवठा सुरू झाल्यामुळे लातूर व उदगीर येथील डिझेल इंजिन विद्युत केंद्रे बंद करण्यात आली.

जिल्ह्यात इ.स.२००५ पर्यंत प्रामुख्याने परळी औष्णीक वीज निर्मिती केंद्राव्दारे खालील उच्च दाब उपकेंद्राना विजेचा पुरवठा केला गेला. त्या उपकेंद्राव्दारे जिल्ह्यातील ३३ के.व्ही उपकेंद्रांना व तेथून गावांना वीजपुरवठा केला जातो.

परळी औष्णीक वीज निर्मिती केंद्रातून खालील उच्चदाब उपकेंद्राना वीज पुरवठा केला जातो.

अ.क्र. (१)	उच्चदाब उपकेंद्राचे नाव (२)	सुरू झाल्याचा दिनांक (३)
१	१३२ के.व्ही., कोयना-लातूर	११.५.१९७०
२	१३२ के.व्ही., उजनी	२४.९.१९७६
३	१३२ के.व्ही., उदगीर	१३.३.१९८५
४	१३२ के.व्ही., एम.आय.डी.सी.,लातूर	२७.२.१९९१
५	१३२ के.व्ही., निलंगा	१४.१०.१९९१
६	२२० के.व्ही., मुरूड	३०.११.१९९३
७	१३२ के.व्ही., अहमदपूर	६.१.१९९५
८	१३२ के.व्ही., रेणापूर	२६.२.२००२
९	१३२ के.व्ही., औसा	२३.३.२००२
१०	१३२ के.व्ही., किल्लारी	९.४.२००२
११	२२० के.व्ही., हरंगूळ	३०.८.२००४
१२	१३२ के.व्ही., चाकूर	२९.५.२००५

१. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ.४४०.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून इ.स.१९९४ पर्यंत जिल्ह्यातील विद्युत पुरवठ्यासाठी गिरवली ते लातूर १३२ के.व्ही.प्रवाह शक्तीच्या ३४ कि.मी.लांबीच्या डबल सर्कीट वाहिण्या (तारा), लातूर ते उजनी १३२ के.व्ही.प्रवाह शक्तीच्या ४३ कि.मी.लांबीच्या डबल सर्कीट वाहिण्या, लातूर ते उदगीर १३२ के.व्ही.प्रवाह शक्तीच्या ६० कि.मी.लांबीच्या सिंगल सर्कीट वाहिण्या, टॅप टु गिरवली-लातूर, १३२ के.व्ही.प्रवाह शक्तीच्या ८ कि.मी. लांबीच्या सिंगल सर्कीट वाहिण्या, लातूर ते निलंगा १३२ के.व्ही. प्रवाहशक्तीच्या ३७ कि.मी. सिंगल सर्कीट वाहिण्या, परळी ते मुरूड २२० के.व्ही.प्रवाहशक्तीच्या ४० कि.मी.लांबीच्या सिंगल सर्कीट वाहिण्या टाकण्यात आल्या आहेत. या खेरीज जिल्ह्यात ३३ के.व्ही., ११ के.व्ही. व लघुदाब शक्तीच्या वाहिण्यादेखील आहेत. इ.स.१९९३-९४ मध्ये त्यापैकी ३३ के.व्ही.प्रवाह शक्तीच्या ६८० कि.मि., ११ के.व्ही. प्रवाह शक्तीच्या ४,८०५ कि.मी.आणि लघुदाब प्रवाहशक्तीच्या १०,७०० कि.मी. लांबीच्या वाहिण्या टाकण्यात आल्या होत्या. तर इ.स.२००५ च्या मार्च अखेरपर्यंत ३३ के.व्ही.प्रवाहशक्तीच्या वाहिण्यामध्ये वाढ होऊन त्यांची लांबी ६,५३९ कि.मी.झाली. आणि लघुदाब प्रवाह शक्तीच्या वाहिण्यामध्येही वाढ होऊन त्यांची लांबी १२,८१९ कि.मी.झाली.

जिल्ह्यातील ग्राहक वर्गवारीप्रमाणे वापरण्यात आलेल्या विजेची दशलक्ष युनिटस् मध्ये काही वर्षांची माहिती खालील प्रमाणे आहे.

(दशलक्ष युनिटस)

अ.क्र.	वर्ष	घरगुती	व्यापारी पेढ्या	कृषि	औद्योगिक	सार्वजनिक
१	१९८०-८१	७.६१२	३.१९७	३५.४९३	३६.४१६	५.८
२	१९८५-८६	१२.७२८	३.६६५	६४.८९१	२३.९३१	३.५४२
३	१९९०-९१	३.६६३	६.३९७	९२.२७१	२८.७६४	८.५७५
४	१९९३-९४	४१.७१०	११.८९०	१८२.१९२	३८.४५०	१०.७१०
५	२००३-०४	९३.४८	२२.२९	३८५.७०	५०.९६	३४.६१
६	२००४-०५	९०.०७	२३.५६	३२५.९२	६८.९२	३६.६२

वरील आकडेवारीवरून जिल्ह्यातील वीज वापरात सर्वच क्षेत्रात १९८०-८१ ते २००३-०४ पर्यंत सतत वाढ होत गेली असली तरी इ.स.२००४-०५ मध्ये विजेच्या घरगुती आणि कृषि वापरात मात्र थोडीशी घट झाल्याचे दिसून येते यास काही अंशी वीजटंचाईमुळे करण्यात येणारे भार नियमन कारणीभूत आहे.

इ.स.१९९३-९४ मध्ये जिल्ह्यात ३३/११ के.व्ही.ची ३४ उपकेंद्रे होती. त्यात एकूण ४८ पावर ट्रान्सफॉर्मर्स् (रोहित्रे) होती. त्यांची एकूण क्षमता १५६.६ एम.व्हि.ए. होती व त्यापुढे गावोगावी वीज वितरण करणारे ११/०.४४ के.व्ही चे ३,४४५ रोहित्रे होती. त्यांची एकूण क्षमता २,५०,३७५ के.व्ही.ए. होती. इ.स.२००५ पर्यंत जिल्ह्यात वीजपुरवठा करणाऱ्या रोहित्रांची (ट्रान्सफॉर्मर्स्ची) संख्या ५,८४२ झाली आहे. त्यांची क्षमता ४,९५,२७० के.व्ही.ए. इतकी आहे.[२]

सद्या मंडळाचे जिल्ह्यात कोठेही वीज निर्मिती केंद्र नाही. लातूर जिल्ह्याला मोठया प्रमाणावर परळी, तालुका परळी, जि.बीड येथील औष्णीक वीजकेंद्रातून विजेचा पुरवठा होतो व तो पुढे जिल्ह्यातील वेगवेगळ्या अतिउच्च दाब व उच्चदाब केंद्राव्दारे वितरीत करण्यात येतो.

२. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडल, मंडल कार्यालय लातूर व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, संवसु मंडल यांच्याकडून आलेल्या माहितीवर आधरित.

याशिवाय जिल्ह्यातील काही साखर कारखान्यांमध्ये ऊस गाळप हंगामामध्ये त्यांचे स्वत:चे टर्बाईन जनरेटींग संच तसेच डिझेल वापर जनरेटिंग संच आवश्यक त्या संख्येत चालवून ते स्वत:ची वीज निर्माण करतात. असे असले तरी अद्याप जिल्ह्यातील कोणत्याही साखर कारखान्याने मंडळास विजेची विक्री केलेली नाही.[३]

जिल्ह्यात २००१ च्या जनगणनेनुसार ओसाड गावे वगळून गावांची संख्या ९२२ होती आणि ५ शहरे होती. या सर्वांचेही इ.स.१९९५-९६ पूर्वीच १०० टक्के विद्युतीकरण पूर्ण झालेले आहे.

जिल्ह्यात कृषि पंप वीज पुरवठा अंतर्गत पुढीलप्रमाणे वर्षनिहाय कृषिपंपाना वीज पुरवठा करण्यात आला.

अ.क्र.	वर्ष	वीजपुरवठा केलेले पंप	अ.क.	वर्ष	वीजपुरवठा केलेले पंप
१	१९८०-८१	३,४७८	५	१९९३-९४	१,८६४
२	१९८५-८६	२,६०७	६	२००१-०२	९२३
३	१९९०-९१	२,८३२	७	२००३-०४	९४१
४	१९९२-९३	१,६८७	८	२००४-०५	१,१७८

महाराष्ट्रामध्ये सद्या विजेची मागणी १२,००० मेगावॅट पर्यंत पोहचली आहे परंतु निर्मिती मात्र ९,००० ते ९,५०० मेगावॅटपर्यंत केली जात आहे. परिणामत: खेडी व अनेक शहरांमधून वीज पुरवठ्याचे भारनियमन करावे लागत आहे. त्यास लातूर जिल्हा देखील अपवाद नाही. या क्षेत्रात वीजगळती, वीज चोरी व वीज बिलांची थकबाकी हा सर्वत्र भेडसावणारा प्रश्न आहे. एकूण वीज निर्मितीच्या ३३ टक्के वीज गळती आणि वीजचोरीमध्ये खर्ची पडते. यावर उपाय योजना म्हणून वीज निर्मिती आणि वीज वितरण तसेच प्रशासन व्यवस्थेत कार्यक्षमता वाढावी म्हणून केंद्राच्या निर्देशानुसार राज्य विद्युत मंडळाचे चार कंपन्यामध्ये जून २००६ पासून विभाजन करण्यात आले आहे. यावर उपाय योजना करण्यासाठी राज्य विद्युत वितरण कंपनीव्दारे स्वतंत्र 'गावठाण फिडर' योजना व 'सिंगल फेज' योजनेचे कार्य हाती घेतले आहे.

स्वतंत्र 'गावठाण फिडर' व 'सिंगल फेज' : दिनांक ३० ऑगस्ट २००६ रोजी मा.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यातील पहिल्या 'स्वतंत्र गावठाण फिडर' ३३ कि.वॅ.क्षमतेचे उपकेंद्र मुरूड जि.लातूर येथून उद्घाटन झाले. जिल्ह्यात 'स्वतंत्र गावठाण फिडर' अंतर्गत नवीन ११ कि.वॅ.ची लाईन करकट्टा गावापर्यंत नेण्यात आली. गावामध्ये तीन नवीन ट्रान्सफॉर्मर्स् (रोहित्रे) बसवून शेतीपंप ग्राहक व इतर ग्राहकांचा विद्युत पुरवठा वेगळा करण्यात आला. जुन्या ट्रान्सफॉर्मरवरून शेतीपंप ग्राहकांना वीज देण्यात येत आहे, तर नवीन लाईनवरील नवीन ट्रान्सफॉर्मरवरून गावातील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक, पाणीपुरवठा ग्राहकांना वीज पुरवठा होत आहे. 'स्वतंत्र गावठाण फिडर' व जुने फिडर हे दोन्ही फिडर उपकेंद्रामधून स्वतंत्रपणे चालू किंवा बंद करता येण्याची व्यवस्था आहे. त्यामुळे लोडशेडींग (भारनियमन) च्या वेळेला फक्त जुने फिडर (AG फिडर) बंद केले जाते व स्वतंत्र 'गावठाण फिडर' चे नवीन फिडर चालू ठेवले जाते. यामुळे गावामध्ये भारनियमन अतिशय कमी होणार आहे. रात्रीच्या वेळेस गावठाण अंधारात असणार नाही. औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा मिळणार आहे.

सिंगल फेज योजना व **स्वतंत्र गावठाण फिडर** या दोन योजनांमध्ये मुलभूत फरक आहे. **'सिंगल फेज'** योजनेव्दारे सिंगल फेज ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येतात. भारनियमनाच्या वेळेला श्री फेज सप्लाय बंद होऊन सिंगल फेज ट्रान्सफॉर्मरव्दारे सिंगल फेज (एकाच तारेतील) सप्लाय देण्यात येतो. फक्त एकच

३. सन २००६-०७ मधील दर्शनिका विभागाच्या सर्वेक्षणावर आधारित.

फेजव्दारे वीजपुरवठा सुरू असल्यामुळे थ्री फेज ग्राहक म्हणजे औद्योगिक, पाणीपुरवठा इ.ग्राहकांचा वीज पुरवठा बंद होतो.

स्वतंत्र गावठाण फिडर योजनेमध्ये पूर्ण थ्री फेज वीजपुरवठा करण्यात येतो. त्यामुळे गावातील पिठाच्या गिरण्या, पाणी पुरवठा इ.ग्राहकांना भारनियमनाचा फटका बसत नाही.

मौजे करकट्टा येथील 'स्वतंत्र गावठाण फिडर' साठी अंदाजे २० लाख रुपये खर्च आला आहे. याव्दारे नवीन ११ कि.वॅ.लाईन-५ कि.मी., नवीन एल.टी.लाईन-२ कि.मी., नवीन ट्रान्सफॉर्मर संख्या-३ इत्यादी नवीन कामे करण्यात आली आहेत. हे काम हैद्राबाद येथील 'नागार्जुन कन्स्ट्रक्शन कंपनी' या कंत्राटदार कंपनीकडून करण्यात आले आहे. मुरूड उपविभागातील गुंफावाडी, माटेफळ इत्यादी गावांसाठी ही योजना तातडीने राबविण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे.[४]

लातूर जिल्ह्यामध्ये मंडल कार्यालयाअंतर्गत विभागाची मालमत्ता इ.स.१९९३-९४, २००१-०२, व २००५-०६ यावर्षी अनुक्रमे रु.९,७६२.९८ लाख, रु.२२,४९४.४६ लाख, रु.२६,२९०.१८ लाख व २७,७६७.०४ लाख रुपयांची होती. तर वीज विक्रीपासूनचे उत्पन्न (महसूल) इ.स.१९९३-९४, २००१-०२, २००३-०४ व २००४-०५ या वर्षी अनुक्रमे रु.२,४४२.७७ लाख, १०,५८२.७५ लाख, रु.१४,०५८.८६ लाख व १४,२७२.९९ लाख रुपये होते आणि जिल्ह्यात झालेला वार्षिक खर्च इ.स.१९९३-९४, २००१-२००२, २००३-०४, व २००४-०५ या वर्षी अनुक्रमे रु.१,३९४.९५ लाख, रु.५,८३६.०२ लाख, रु.१२,०६०.९३ लाख व ११,१३६.९३ लाख रुपये होता.[५]

अपारंपरिक ऊर्जा निर्मिती : अलिकडच्या काळात वीज मागणीच्या तुलनेत पुरवठ्यातील तफावत आणि विजेचा वाढता खर्च हे लक्षात घेऊन अनेक हॉटेल इत्यादी सारख्या आस्थापनांमधून भारनियमनाच्या कालावधीत त्यांना वीज पुरवठा उपलब्ध व्हावा म्हणून कमी क्षमतेचे डिझेल किंवा पेट्रोलवर चालणारी जनित्र वापरली जातात किंवा पाणी गरम करण्यासाठी तसेच विजेच्या दिव्यासाठी सौर ऊर्जा संच लावून अल्प प्रमाणात ऊर्जा मिळवली जाते. आशिया खंडातील मोठे क्षेत्रफळ असलेला व अधिक ऊर्जा निर्मिती क्षमता असलेला सौरसंहतक सयंत्राचा **अरुण** सौर ऊर्जा प्रकल्प लातूर येथील महानंद दुग्धशाळा या उद्योग संस्थेव्दारे राबविला जात आहे. लातूर येथे डेअरी उद्योगासाठी वरदान ठरलेल्या आणि इतर उद्योगाना उपयुक्त ठरणाऱ्या **अरुण** सौर सयंत्र या लातूर महानंद डेअरी प्रकल्पामध्ये विकसित करण्यात आलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या महत्वाच्या वैशिष्ट्यांची माहिती येथे देण्यात येत आहे.

अरुण : औद्योगिक क्षेत्रासाठी सौर ऊर्जा प्रकल्प[६] : औद्योगिक क्षेत्रासाठी पर्यायी इंधन म्हणून सौर ऊर्जेकडे पाहण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. देशात शिर्डी किंवा तिरुपतीसारख्या ठिकाणी सौर ऊर्जेवर ५ हजार लोकांचा स्वयंपाक होत आहे. यापूढे जाऊन लातूर येथे मात्र औद्योगिक क्षेत्रासाठी सौर ऊर्जा प्रकल्पाची यशस्वी चाचणी पूर्ण झाली आहे. या आगळ्यावेगळ्या परंतु जगाशी स्पर्धा करणाऱ्या प्रकल्पासाठी केंद्रीय अपारंपरिक ऊर्जाखाते, महाराष्ट्रातील मुंबईच्या क्लिक डेव्हलमेंट प्रा.लि., आय.आय.टी. आणि महानंद दूध डेअरी यांनी मिळून भारतातील सर्वात मोठा सौरसंहतक लातूर येथे उभा केला आहे. या सौर संहतकाचे अरुण असे नामकरण करण्यात आले आहे.

४. सहाय्यक अभियंता, महावितरण उपविभाग, मुरूड, जि.लातूर यांच्याकडून आलेल्या माहितीवर आधारित.

५. कार्यकारी अभियंता, मंडल कार्यालय, लातूर यांच्याकडून आलेल्या माहितीवर आधारित.

६. महानंद दुग्धशाळा, लातूर यांचेकडून आलेल्या माहितीवर आधारित व लोकराज्य, एप्रील २००६, पृ.क्र.२, ३ आणि जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

'अरुण' या सौर संहतकाच्या माध्यमातून ८० ते २५० अंश सेल्सियस डिग्रीपर्यंतची प्रक्रिया उष्णता निर्माण करता येते. पूर्णपणे भारतीय संसाधनांचा वापर करून ८५० डिग्री इतके स्थगन तापमान या संहतकातून मिळविले आहे. १६० वर्गमीटरच्या एकाच मोठ्या छत्रीसारख्या आरशाचा वापर करून ५० ते ८० किलोवॅट इतकी प्रचंड सौर ऊर्जा प्रथमच एकत्र केली जात आहे. यापूर्वी भारतात तयार करण्यात आलेले सौरसंहतक हे पूर्णपणे सूर्याभिमुख नसल्यामुळे ऊर्जा कमी मिळत असे. या संहतकात मात्र सर्व सूर्यकिरणांचा पुरेपूर वापर केला गेला आहे. यामुळे हा संहतक रोज ८ ते ९ तास चालू शकतो आणि जवळपास ४ ते ५ लाख किलोकॅलरी इतकी ऊर्जा रोज निर्माण करू शकतो. लातूर येथील महानंद डेअरीत ७२ ते ७६ डिग्री तापमानापर्यंत दूध तापवून ते एक मिनिट ठेवले जाते. त्यानंतर ४ डिग्रीपर्यंत तातडीने त्याचे तापमान खाली आणले जाते. हे करण्यासाठी यापूर्वी फर्नेस ऑईल, डिझेल याचा वापर करून बॉयलर मधून पाण्याचे तापमान वाढवले जात होते. आता मात्र या पारंपरिक व आयात कराव्या लागणाऱ्या इंधनाऐवजी सौर संहतकाचा वापर सुरू आहे. 'अरुण' या संहतकामार्फत १०० ते २०० डिग्रीपर्यंत पाणी २० किलोग्रॅम प्रति चौरस सेंटीमीटर दाबाखाली वाफरले जाते. या संहतकामुळे महानंद दूध डेअरीचे रोज ५० ते ७० लिटर फर्नेस ऑईल वाचेल. २४ तासात केव्हाही सौर संहतकातून मिळणाऱ्या उर्जेचा वापर करता येईल अशी सुविधा 'अरुण' मध्ये निर्माण करण्यात आलेली आहे. लातूरसारख्या ठिकाणी ३६५ दिवसांपैकी जवळपास ३२० दिवस सूर्यप्रकाश भरपूर असतो. त्यामुळे या सौर संहतकाचा उपयोग तेवढे दिवस नक्कीच होऊ शकतो आणि पावसाळ्याच्या दिवसांत बॉयलरमार्फत प्रक्रिया सुरू ठेवता येईल अशी सुविधाही या सौर संहतक 'अरुण' मध्ये करण्यात आली आहे. या सौर सहंतकाचा खर्च साधारणत: २५ ते ३० लाख रुपये आहे. याचे वार्षिक वापराचे तास ३,२०० ते ३,३५० दरम्यान राहणार आहेत. यामुळे दरवर्षी २० हजार लीटर इंधनाची बचत होणार आहे तसेच १६० हजार युनिट वीज प्रतिवर्षी वाचणार आहे. दिवसभरात निर्माण होणारी उष्णता साठवून दिवसा व रात्री कोणत्याही वेळी ती वापरण्याची सोय देखील यात केली आहे.

असे हे देशाला ऊर्जानिर्मिती क्षेत्रात अग्रेसर बनविण्याची क्षमता असणारे सौर संहतक लातूर मध्ये तसेच राज्यात अन्यत्र येथील दूध प्रक्रिया उद्योगाप्रमाणेच अन्य विविध उद्योगांमध्ये वापरता येईल. लातूर मध्ये तेलगिरण्या मोठ्या प्रमाणात आहेत. अशा तेलगिरण्या, अन्न प्रक्रिया उद्योग, रासायनिक उद्योग, औषध इत्यादी उद्योगांमध्ये बाष्पकांना पूरक म्हणून इंधन बचतीसाठी सौर संहतक वापरता येईल. जेथे जेथे १५० ते २५० डिग्री सेल्सियसपर्यंत वाफ अथवा गरम तेलाचा औद्योगिक प्रक्रियेसाठी उपयोग होतो तेथे या सौर संहतकांचा वापर होऊ शकेल. आज, लातूरमध्ये औद्योगिक वापरासाठी जरी एकच संहतक बसविले असले तरी अशी अनेक संहतके बसवून त्यांची उष्णता एकत्र करून औद्योगिक प्रक्रियांना पुरविण्याची सोय यात आहे. यामुळेच हळूहळू सौरशेतीकडे आपण जाऊ शकतो. प्रत्येक गावच्या माळरानावर जर असे सौर ऊर्जा प्रकल्प उभे राहिले तर प्रत्येक गावात एक शीतगृह उभे राहू शकते, त्या गावातील दवाखाना, कार्यालय यांना स्वस्तातील वीजपुरवठा करता येऊ शकतो. अशा प्रकारची सौर ऊर्जा शेतीला शासनाकडून मोठया प्रमाणावर प्रोत्साहन देऊन सौर उर्जेचा वापर हा औद्योगिक आणि कृषि विकासासाठी जोडला गेल्यास या क्षेत्राचा विकास दर वाढवता येणे शक्य होणार आहे.

अलिकडे ग्रामीण व शहरी भागात अपारंपारिक उर्जेच्या कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी लातूर जिल्ह्यात जिल्हा परिषद स्तरावर कृषि विभागांतर्गत मोठया प्रमाणात प्रयत्न सुरू

आहेत. जिल्ह्यात सन २००६-०७ मध्ये २४३ गावांमध्ये ३४२ सौर पथदिवे आणि १६१ सुधारित शवदाहीनी अस्थापित केल्या आहेत. जिल्हा परिषदेने ऊर्जा विकास कार्यक्रमाअंतर्गत स्वनिधीतून अपारंपारिक ऊर्जा योजनेसाठी सन २००५-०६ मध्ये रु.३ लाख ११ हजार, सन २००६-०७ मध्ये रु.११ लाख तरतूद उपलब्ध करून दिली आणि सन २००७-०८ करिता रु.३५ लाखाची तरतूद ठेवली आहे. लातूर जिल्हा परिषदेने २००४-०५ मध्ये राबविलेल्या अपारंपारिक ऊर्जा योजनेसाठी शासकीय संस्थांच्या गटातून राज्य स्तरावरील प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

पवन-सौर संकरित सयंत्र : लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात १० किलोवॅट क्षमतेचे सयंत्र कार्यान्वित करण्यात आले आहे. त्याची पवन जनित्र क्षमता ३.२ किलो वॅट, सौर पॅनल क्षमता ६.८ किलो वॅट असून सयंत्राची एकूण किंमत रु.२८.८० लाख असून त्यासाठी केंद्राकडून रु.२० लाखाचे अनुदान मिळाले आहे व रु.८ लाख ८० हजार लाभार्थीचा हिस्सा आहे. या सयंत्रातून दररोज २५ ते ३० युनिट वीज निर्माण होते. ही वीज जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागांना देण्यात आली.

खाद्यपदार्थाचे उत्पादन

या प्रवर्गात साखर, गूळ, खाद्यतेल, डाळी, मिरची व मसाला पावडर, बेकरी, बिस्किट व गोळ्या, लोणची, पाश्चराईज्ड दूध तयार करणे, दुग्धजन्य इतर पदार्थ तयार करणे, आईस्क्रीम, बर्फ तयार करणे, फळे व पालेभाज्या टिकविणे, फळे व पालेभाज्यांचे ज्यूस (अर्क) तयार करणे, जाम, जेली, सॉस तयार करणे, मुरब्बे तयार करणे, चहावरील प्रक्रिया, तांदूळ बनविणे, पशुखाद्य तयार करणे इत्यादी खाद्यवस्तू तयार करणाऱ्या कारखान्यांचा समावेश आहे.

खाद्यपदार्थांचे उत्पादन यांत्रिक साधनांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर तयार करण्याचे कार्य खऱ्या अर्थाने विसाव्या शतकात सुरू झाले. तत्पूर्वी अनेक प्रकारच्या खाद्य पदार्थांचे उत्पादन पारंपारिक पध्दतीने केले जात असे. जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला जी काही गती प्राप्त झाली ती खऱ्या अर्थाने उस्मानाबाद जिल्ह्याचे व्दिभाजन होऊन लातूर जिल्हा निर्मितीनंतर प्राप्त झाली आहे. येथे देण्यात येत असलेली सन १९८२ पूर्वीची माहिती ही पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्याशी संबंधित म्हणजेच आजच्या लातूर जिल्ह्यात समाविष्ट असलेल्या भागाशी संबंधित आहे. तथापि, त्या काळातील माहिती देखील खाद्यपदार्थाचे उत्पादन या प्रवर्गातील उद्योगाची माहिती ही अधिक प्रमाणात आजच्या लातूर जिल्ह्यातील क्षेत्राशी संबंधित आहे. पूर्वीचा उस्मानाबाद जिल्हा किंवा त्याचे व्दिभाजन होऊन निर्माण झालेला लातूर जिल्हा हे कृषिप्रधान अर्थव्यवस्था असणारे जिल्हे आहेत. जे महत्त्वाचे उद्योग निर्माण झाले ते प्रामुख्याने खाद्य पदार्थाशी संबंधित कृषि उत्पादनावर आधारित तसेच कृषि पुरक व्यवसायातील उत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योग आहेत. अगदी अलिकडच्या काळात औद्योगिक विकासास खऱ्या अर्थाने सुरुवात झालेली आहे. औद्योगिक विकासाची ही प्रक्रिया उशीरा सुरू होण्यास कारणीभूत काही अंशी तंत्रज्ञांचा अभाव तर काही अंशी मराठवाड्यातील औद्योगिक विकासाबाबत पूर्वीच्या हैद्राबाद संस्थानाची असलेली संपूर्ण उदासीनता होय.या संस्थानाशी संबंधित 'द इम्पेरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया, व्हॉल्यूम-१९' या १९०८ मध्ये प्रकाशित झालेल्या गॅझेटिअर मधील माहितीनुसार जिल्ह्यात कोणताही महत्त्वाचा उद्योग चालविला जात नव्हता. स्थानिक पातळीवर जाडेभरडे सुती कापड विणकाम, काही कापूस वटण गिरण्या व चर्मोद्योग सुरू होते. या कालावधीत खाद्य पदार्थांशी संबंधित प्रक्रिया करणारे मोठ्या प्रमाणावरील उद्योग जिल्ह्यात नव्हते. परंतु त्यानंतरच्या पुढील दशकात मात्र काही उद्योग उदयास आले. सन १९३० नंतर हैद्राबाद सरकारने उद्योग विभाग सुरू केला

परंतु या विभागाने उस्मानाबाद जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात अत्यल्प मदत केली. तथापि, १९४८ मध्ये मराठवाडा व्दिभाषिक मुंबईमध्ये सामील झाल्यानंतर त्यावेळच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील व सद्याच्या लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे १९५० च्या सुमारास फिरोज सेठना इंडस्ट्रिज सुरू झाली. त्यात सद्याही खाद्यतेल निर्मिती केली जाते. त्यात ४ एक्स्पेलर आहेत. या मिलची रोज २० टन खाद्यतेल निर्मिती क्षमता आहे. तसेच कापूस हंगामात या मिलमध्ये कापूस जिनिंग व प्रेसिंगचेही काम चालते.

सन १९५१ मध्ये जिल्ह्यात खाद्यपदार्थ उद्योगात २०४ व्यक्ती व धान्य व डाळी तयार करण्याच्या कार्यात ४४५ व्यक्ती कार्यरत होत्या. याचवर्षी खाद्य तेल उत्पादनामध्ये वर नमूद इतर उद्योगांपेक्षा सर्वात जास्त म्हणजे १,४०४ व्यक्ती कार्यरत होत्या. सन १९५९ मध्ये लातूर येथे मिठाईचा जिल्ह्यातील एकमेव मध्यम कारखाना सुरू झाला. या कारखान्यात विविध प्रकारच्या टॉफी, बिस्किटे, पाव इत्यादी उत्पादने होत असत. या कारखान्याची उत्पादने जिल्ह्यात आणि जिल्ह्याबाहेर विकली जायची. या कारखान्याचे १९६४ मध्ये स्थिर भांडवल सुमारे रु.१ लाख होते. यात कच्चा माल उधारीवर खरेदी केला जात असल्याने कच्चा माल खरेदीत कमी गुंतवणूक होत असे. त्यावेळी कारखान्यात ३० कामगार होते. कुशल कामगारांना रु.१०० ते रु.२०० च्या दरम्यान मासिक पगार दिला जात असे. अकुशल कामगारांपैकी काहीजण रोजंदारीवर काम करत होते. दैनिक मजूरीचा दर रु.१ ते रु.२ च्या दरम्यान होता. या कारखान्याने १९६३-६४ मध्ये रु.१०,०००/- रोजंदारीच्या रुपात दिले होते. या कारखान्यात त्या काळात इंधन म्हणून कोळसा आणि जळाऊ लाकडाचा उपयोग केला जात होता. यात बिस्किटे बनविण्यासाठी गहू, ज्वारीचे पीठ, साखर, हायड्रोजनाईज्ड आणि वनस्पती तेले (डालडा व खाद्य तेले) इत्यादी कच्चा माल वापरण्यात येत असे, तर मिठाई बनविण्यासाठी साखर, ग्लुकोज, सायट्रिक ॲसिड, सरसाची (डिंक) भुकटी आणि मेन्थाल स्फटिक वापरले जात होते. पाव तयार करण्यासाठी मैद्याचा वापर केला जात होता. या कारखान्यात या काळात सर्व कच्च्या मालावरील एकूण खर्चापैकी वर्षाला सुमारे रु.२,००,००० केवळ साखरेवर खर्च होत असत. या कारखान्याची उत्पादनक्षमता प्रतिदिवशी ३० क्विंटल मिठाई, ३ क्विंटल बिस्किटे आणि अर्धा क्विंटल पाव इतकी होती. या कारखान्याच्या उत्पादनास वाढती मागणी होती. जिल्ह्यात सन १९६१ मध्ये किरकोळ स्वरुपाचे खाद्यपदार्थ तयार करण्याच्या घरगुती किंवा कौटुंबिक स्वरुपाच्या व्यवसायात एकूण १,०७४ पुरुष कार्यरत होते,तर त्यापेक्षा काहीशा मोठ्या स्वरुपातील बिगर घरगुती (non house hold) उद्योगात १,४३० पुरुष आणि १०० स्त्रिया कार्यरत होत्या[७] सन १९६१ मध्ये लातूर येथे मोठे उद्योगक्षेत्रातील दोन तेलगिरण्या सुरू होत्या. त्यात अनुक्रमे ७५ व ९५ कामगार होते. या कालावधीत तत्कालीन जिल्ह्यात नोंदणी केलेले २४ लहान कारखाने होते. त्यातील बहुतेक खाद्यपदार्थ निर्मिती करणारे होते. त्यात मेवा, मिठाई, तेल, पेंड इत्यादी खाद्यपदार्थ तयार केले जात असत.[८] तत्कालीन जिल्ह्यात लातूर परिसरात गुळाचेही उत्पादन केले जात असे. सन १९६३-६४ मध्ये लातूर बाजारपेठेतून रु.१,३९,४९,३१४ किंमतीच्या १,५४,७९४ क्विंटल गुळाची अन्य जिल्ह्यात निर्यात झाली. हा माल दूरवरच्या बाजारपेठांना जसे मुंबई, बार्डोली, पुणे, अहमदाबाद, बारामती, अकलूज, सोलापूर, नांदेड, रायपूर इत्यादी बाजारपेठांमध्ये पाठविला गेला.[९]

---

७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४३३ ते ४३६, ४४७ व सन २००६-०७ मधील दर्शनिका विभागाचे सर्वेक्षणावर आधारित.

८. **भारतीय जनगणना, जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, उस्मानाबाद,** १९६१, पृ.४२, २२६-२२७.

९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४९५.

अनुक्रमणिका

अलिकडे वाढत्या शहरीकरणामुळे प्रक्रियायुक्त पदार्थांच्या निर्मितीस मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळाले आणि बिस्किट, ब्रेड, पाव या सारख्या प्रक्रियायुक्त खाद्य पदार्थांची मागणीही वाढत गेली, परिणामत: तत्कालीन जिल्ह्यातही अनेक बेकरीज सुरू झाल्या. सन १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात मिठाई, कँडी यांच्या निर्मितीसोबतच बेकरी पदार्थ बनविण्याच्या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तिंची संख्या ३२७ होती. त्यामध्ये मिठाई बनविणाऱ्याचे प्रमाण अधिक होते. बेकरीज बनविण्यासाठी गव्हाचे पीठ, साखर, यीष्ट, बटर, चवीचे इतर घटक आणि अंडी या कच्च्या मालाचा उपयोग केला जातो. या सर्व वस्तू स्थानिक स्तरावर उपलब्ध होतात व त्या बहुधा घाऊक प्रमाणात खरेदी केल्या जातात. याच काळात मिठाई किंवा गोड पदार्थ बनविणे हा देखील तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात भरभराटीस आलेला व्यवसाय होता. मिठाईची दुकाने ही लातूर, उस्मानाबाद आणि तुळजापूर येथे मोठ्या प्रमाणावर होती. पहिली दोन ठिकाणे ही मुख्य बाजारपेठेची ठिकाणे होती. तर तुळजापूर हे तीर्थयात्रेचे स्थळ होते.

मिठाई बनविणे हा व्यवसाय देखील पूर्वी परंपरेने चालणारा व्यवसाय होता. हा व्यवसाय मालकाकडून कुटुंबातील सदस्याच्या मदतीने चालविला जात असे. काही मोठ्या दुकानातून अकुशल कामासाठी बाहेरील मजूर मदतनीस म्हणून घेतले जात.[१०]

डाळ, धान्यगिरणी व अन्य खाद्यपदार्थ : सन १९५० ते १९६५ या काळात या भागात पावसाचे प्रमाण वाढते होते. त्यामुळे भुईमूग पिकात वाढ होऊन या भागात मोठ्या प्रमाणात ऑईल मिल सुरू झाल्या. काही वर्षानी पावसाचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे येथील शेतकरी तुरीचे पीक घेऊ लागले. परिणामत: डाळ (लातूर भागात दाळ असा शब्द वापरतात) मिल सुरू झाल्या.[११] पुढे हरभरा, मूग, उडिद, वाटाणा ही कडधान्ये देखील मोठ्या प्रमाणात घेण्यात येऊ लागली. या काळात शासनाने देखील सहकारी तत्त्वावर कृषि उत्पादनावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. या क्षेत्रातील उद्योगसंस्था १९६३ मध्ये स्थापन झाली होती. तिचे कामकाज जानेवारी ते मे महिन्या दरम्यान हंगामी स्वरुपात चालत असे. या उद्योगसंस्थेतील स्थिर भांडवल रु.७०,००० होते, तर खेळते भांडवल रु.१,००,००० होते. त्यात उभारण्यात आलेल्या यंत्रसामग्रीत एलीव्हेटर, हल्लर,गोलाकार चाळण्या, इलेक्ट्रिक मोटार आणि भूसा पाखडण्याचे पंखे यांचा समावेश होता. आवश्यक असणारा कच्चा माल (कडधान्य/दाळीचे धान्य) स्थानिक बाजारपेठेत खरेदी केला जात असे. तसेच हा कच्चा माल लातूर व गेवराई येथून आणला जात असे.सन १९६४ मध्ये या उद्योगसंस्थेत खरेदी करण्यात आलेल्या एकूण कच्च्या मालाची किंमत रु.१,००,००० होती. या संस्थेची वार्षिक उत्पादनक्षमता १०,००० क्विंटल होती. यातील उत्पादित माल मुंबई, कोल्हापूर, हुबळी, बेळगाव आणि पुणे परिसरातील बाजारपेठांमध्ये पाठविला जात असे. तत्कालीन जिल्ह्यात तुळजापूर (सद्याच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील) तालुक्यातील अन्दोरा या मोठ्या खेड्यात राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने १९६६ मध्ये यशवंत सहकारी भात गिरणीची स्थापना केली.[१२] सन १९६९ मध्ये लातूर येथे 'मे.कलंत्री डाळ मिल' आणि 'मे.जयशंकर डाळ मिल' ह्या डाळ व होसेस बनविणाऱ्या दोन गिरण्या सुरू झाल्या. सन १९७२ मध्ये 'मे.दुर्गा इंडस्ट्रिज' ही डाळी बनविणारी गिरणी लातूर येथे सुरू झाली. सन १९७९ मध्ये लातूर येथे 'मे.करिना डाळ मिल' ही डाळी व होसेस तयार करणारी गिरणी सुरू झाली.

---

१०. कित्ता, पृ.५७२.

११. भिंगे, सुभाष, दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित.

१२. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२. पृ.४४६.

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार १९८१-८३ मध्ये जिल्ह्यात खाद्यपदार्थ आणि पेय वस्तूंचे उत्पादन करणारे व या सर्वेक्षणाअंतर्गत येणारे एकूण १० उद्योग घटक कार्यरत होते. त्यामधील एकूण स्थिर भांडवल रु.२ कोटी १५ लाख ८९ हजार व खेळते भांडवल रु.१ कोटी ६ लाख १४ हजार होते. त्यातील कर्मचाऱ्यांची संख्या २,२४१ होती. त्यापैकी १,६७४ कामगार होते. त्यांचेकडून ३७ कोटी, २२ लाख ७ हजार मनुष्य दिवस काम झाले. कामगारांना रु.४० लाख ४४ हजार मजूरी देण्यात आली. या कारखान्यांमध्ये उत्पादनासाठी वापरण्यात आलेल्या कच्च्या मालाची किंमत रु.८ कोटी ७८ लाख ३० हजार होती तर मुख्य उत्पादनाची किंमत रु.१० कोटी ५८ लाख ७५ हजार होती.

सन १९८४-८५ मध्ये लातूर येथे पाच डाळ मिल्स, उदगीर येथे तीन मिल्स व अहमदपूर, निलंगा व औसा येथे प्रत्येकी एक डाळ मिल होती. सन १९८६ मध्ये लातूर येथे 'मराठवाडा फ्राईड ग्राम' ही दाळवा बनविणारी तसेच लोणी येथील सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये 'मे.आशीर्वाद डाळ मिल' आणि 'राजेश दाळ मिल' सुरू झाल्या. लोणी येथील दोन्ही डाळ मिलमध्ये २००४-०५ मध्ये एकूण गुंतलेले भांडवल रु.९३ लाख होते व ५७ कामगार होते. त्यात वापरण्यात आलेल्या कच्च्या मालाची किंमत अनुक्रमे रु.५० लाख व रु.१५ लाख तर, उत्पादनाची किंमत अनुक्रमे रु.७० लाख व रु.४३ लाख होती. सन १९८७ मध्ये उदगीर तालुक्यात 'मे.गणेश डाळ इंडस्ट्रिज' ही डाळीचे उत्पादन करणारी फॅक्टरी सुरू झाली. त्यात २००४-०५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल रु.५७ लाख व १९ कामगार कार्यरत होते. त्यात रु.४२ लाख किंमतीचा कच्चा माल उपयोगात आणून रु.४४ लाख किंमतीचे उत्पादन झाले. सन १९८८ मध्ये उदगीर तालुक्यातील लोणी येथे 'मे. पांडुरंग बेंगल ग्राम मिल' ही फुटाणा बनविणारी मिल सुरू झाली. त्यात २००४-०५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल रु.३३ लाख व ८ कामगार कार्यरत होते. त्यावर्षी त्यात कच्च्या मालावर रु.३० लाख खर्च झाले परंतु उत्पादन मात्र रु.२६ लाख किंमतीचे झाले. सन १९८९ मध्ये उदगीर तालुक्यात 'मे.मानीसंगका पल्सेस' ही डाळी तयार करणारी मिल सुरू झाली. या मिलमध्ये २००४-०५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल रु.२९ लाख व २५ कामगार कार्यरत होते. यावर्षी त्यात रु.२६ लाख किंमतीचा कच्चा माल उपयोगात आणून रु.५० लाख किंमतीचे उत्पादन झाले. सन १९९० मध्ये उदगीर तालुक्यात लोणी येथे 'मे.अन्नपूर्णा डाळ मिल' ही डाळीचे उत्पादन तयार करणारी मिल सुरू झाली. या मिलमध्ये २००४-०५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल रु.४१ लाख व २० कामगार कार्यरत होते. यावर्षी या मिलमध्ये कच्च्या मालावर रु.२५ लाख खर्च होऊन रु.४० लाख किंमतीचे उत्पादन झाले. याच वर्षी लोणी येथेच 'मे.पंकडा डाळ' ही डाळींचे उत्पादन करणारी मिल सुरू झाली. त्यात २००४-०५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल रु.४१ लाख व २५ कामगार कार्यरत होते. त्यावर्षी या मिलमध्ये रु.४२ लाख किंमतीचा कच्चा माल उपयोगात आणून रु.४० लाख किंमतीचे उत्पादन झाले. लातूर येथे बर्फ तयार करणारी 'मे.महावीर आईस' फॅक्टरी १९९० मध्ये सुरू झाली. या वर्षी लातूर येथे मोठ्या उद्योग क्षेत्रातील तुर व इतर डाळी तयार करणारी 'गणेश डाळ' मिल सुरू झाली. त्यात २००५ मध्ये गुंतविलेले भांडवल रु.७१ लाख व खेळते भांडवल रु.७१ लाख होते. या मिलमध्ये एकूण कर्मचारी ३० होते त्यापैकी २२ कामगार होते. त्यावर्षी त्यात ४,३७९ मनुष्य दिवस काम झाले व कामगारांच्या वेतनावर रु.३ लाख खर्च झाले. सन १९९१ मध्ये उदगीर येथे 'श्री गणेश शेंगदाणा मिल' ही भुईमूगापासून शेंगदाणा बियाणे काढणारी गिरणी सुरू झाली. या मिलचे १९९२-९३ मध्ये स्थिर भांडवल रु.१ लाख ७० हजार होते व खेळते भांडवल रु.३ लाख होते. त्यात ७ मजूर कामावर होते. त्यावर्षी उत्पादित करण्यात आलेल्या उत्पादनाची किंमत रु.१५ लाख होती. या उद्योगाची बाजारपेठ ही स्थानिक स्वरुपाचीच आहे. मिरची व मसाला पावडर तयार करणारी 'गणेश कांडप उद्योग' ही लहान स्वरुपाची मिल १९९१ मध्ये प्रकाशनगर लातूर येथे सुरू

अनुक्रमणिका

झाली. यातील उत्पादनही स्थानिक बाजारपेठेतच विकले जाते. याच वर्षी रामगल्ली लातूर येथे पापड तयार करणारा 'श्री पापड उद्योग' हा लहान स्वरुपाचा व्यवसाय सुरू झाला. या उत्पादनासाठी स्थानिक बाजारपेठ उपलब्ध आहे. या वर्षी उदगीर येथे 'प्रशांत डाळ इंडस्ट्रिज' ही तुर, मुग, उडिद या डाळी तयार करणारी मिल सुरू झाली. या मिलचे १९९२-९३ मध्ये स्थिर भांडवल रु.१४ लाख ५२ हजार व खेळते भांडवल रु.२० लाख होते आणि उत्पादित झालेल्या मालाची किंमत रु.१४९ लाख ५० हजार होती. त्यात १२ कामगार कार्यरत होते. औद्योगिक वसाहत लातूर येथे 'राधिका इंडस्ट्रिज' ही सर्व प्रकारच्या डाळी तयार करणारी मिल १९९१ मध्ये सुरू झाली. या मिलचे १९९२-९३ मध्ये स्थिर भांडवल रु.२ लाख, खेळते भांडवल रु.२० लाख व उत्पादित मालाची किंमत रु.६६० लाख होती. यामध्ये ९ कामगार कार्यरत होते. तसेच १९९१ मध्येच लातूर येथे मसाले तयार करणारा 'सोनल फुड प्राडक्टस्' कारखाना तसेच ब्रेड, केक, बिस्किट तयार करणारा 'गुड फुडस्' कारखाना व 'कांचन फ्राईड ग्राम' हा दाळवा तयार करणारा कारखाना आणि उदगीरजवळ लोणी येथे डाळी तयार करणारा मे.पुनम अँग्रो इंडस्ट्रिज हा कारखाना सुरू झाला. या चार कारखान्यांपैकी 'सोनल फुड प्रॉडक्टस्' व 'गुड फुडस्' या कारखान्यांचे सन १९९२-९३ मध्ये स्थिर भांडवल अनुक्रमे रु.२ लाख व रु.१ लाख १५ हजार, खेळते भांडवल अनुक्रमे रु.२ लाख व रु.२ लाख होते. उत्पादनाची किंमत अनुक्रमे रु.६ लाख ८० हजार आणि रु.१० लाख २० हजार होती. या कारखान्यांत अनुक्रमे ६ आणि ३ कामगार होते. यातील उत्पादने स्थानिक व जिल्ह्यातील बाजारपेठेत विकली जातात. उपरोक्त कांचन फ्राईड ग्राम आणि 'मे.पुनम अॅग्रो इंडस्ट्रिज' या कारखान्याचे सन २००४-०५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल अनुक्रमे रु.८ लाख व रु.३३ लाख आणि कच्चा मालावरील खर्च अनुक्रमे रु.१० लाख व रु.३५ लाख होता. त्यावर्षीच्या एकूण उत्पादनाची किंमत अनुक्रमे रु.११ लाख व रु.५५ लाख होती. त्यातील कामगारांची संख्या अनुक्रमे ६ व २५ होती.

लातूर जिल्ह्यात सन १९९१ मध्ये धान्य गिरणी उत्पादने उत्पादित करणारे नोंदणी झालेले १५ कारखाने होते. त्यापैकी १४ कारखाने सुरू होते. या कार्यरत कारखान्यांपैकी ४ कारखान्यात ४५ कामगार (पु.१९, स्त्री २६) होते. त्यांनी या वर्षी ९,९५३ श्रमदिन काम केले. उर्वरित कार्यरत १० कारखान्यात एकूण १४७ कामगार होते.

सन १९९२ मध्ये लातूर येथील एम.आई.डी.सी.मध्ये 'शिव शंकर उद्योग', उदगीर येथे 'तालुका शेतकरी डाळ मिल' आणि लोणी येथे 'मे.ओम दाल इंडस्ट्रिज' व 'मे.विष्णू दाल मिल', 'मे.उदय अॅग्रो इंडस्ट्रिज', 'मे.सचिन दाल मिल्स' हे डाळीचे उत्पादन करणारे सहा कारखाने सुरू झाले. 'शिवशंकर उद्योग'व 'तालुका शेतकरी डाल मिल' चे १९९२-९३ मध्ये अनुक्रमे स्थिर भांडवल रु.७.३४ लाख, रु.१०.४६ लाख, खेळते भांडवल रु.८ लाख, व रु.१५ लाख होते. उत्पादित मालाची किंमत अनुक्रमे रु.१ कोटी २ लाख ६० हजार व रु.१ कोटी १० लाख होती. या कारखान्यामध्ये अनुक्रमे १४ व १३ कामगार होते. उपरोक्त सहापैकी उर्वरित ४ डाळ कारखान्यांतील सन २००४-०५ मधील एकूण गुंतविलेले भांडवल अनुक्रमे रु.३९ लाख, रु.२८ लाख, रु.२८ लाख व रु.३० लाख होते. यावर्षी कारखान्यांमध्ये वापरण्यात आलेल्या कच्च्या मालाची किंमत अनुक्रमे रु.२५ लाख, रु.१५ लाख, रु.२८ लाख व रु.२८ लाख होती. त्यातील उत्पादित मालाची किंमत अनुक्रमे रु.४८ लाख, रु.२४ लाख, रु.५५ लाख आणि रु.५५ लाख होती. या कारखान्यांतील कामगारांची संख्या अनुक्रमे २०,१९,२० व २५ होती.

लातूर जिल्ह्यात १९९२ मध्ये धान्य गिरणी उत्पादने तयार करणारे नोंदणी झालेले १९ कारखाने होते, त्यापैकी १ कारखाना बंद होता. या कार्यरत असलेल्या १८ कारखान्यांपैकी ९ कारखान्यांत ९६

कामगार (८७ पुरुष व ९ स्त्री) होते. त्यावर्षी या कामगारांनी २७,९२० श्रमदिन काम केले. उर्वरित ९ कारखान्यांतील कामगारांची संख्या ८७ होती.

सन १९९३ मध्ये लातूर येथे 'मे.गंगा आईस' हा बर्फ तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. या कारखान्यात २००४-०५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल रु.५ लाख होते. त्यावर्षी त्यात रु.३ लाख ५० हजार किंमतीचा कच्चा माल उपयोगात आणून रु.८ लाख किंमतीच्या मालाचे उत्पादन केले. या कारखान्यात ६ कामगार कार्यरत होते. उदगीर येथे 'आशिष इंडस्ट्रिज' हा सर्व प्रकारच्या डाळी तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यावर्षी त्यातील स्थिर भांडवल रु.१८ लाख २६ हजार, खेळते भांडवल रु.२० लाख होते, तर उत्पादित मालाची किंमत रु.२ कोटी ५० हजार होती. या करखान्यात १४ कामगार कार्यरत होते. यावर्षी लातूर येथे 'सरस्वती डाळ मिल' आणि औराद (शा.) येथे 'बसवेश्वर डाळ उद्योग' हे सर्व प्रकारच्या डाळी तयार करणारे कारखाने सुरू झाले. त्यातील अनुक्रमे स्थिर भांडवल रु.४ लाख ९७ हजार व रु.१३ लाख ७० हजार, खेळते भांडवल रु.४ लाख व रु.२० लाख होते. त्यातील उत्पादित मालाची किंमत अनुक्रमे रु.२० लाख व रु.२ कोटी होती. या कारखान्यातील कामगारांची संख्या अनुक्रमे ६ आणि १० होती. सन १९९४ मध्ये लातूर येथे 'मे.माणिक उद्योग' हा डाळी तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन २००४-०५ मध्ये त्यात एकूण गुंतविलेले भांडवल रु.१५ लाख होते. त्यात रु.१ लाख किंमतीचा कच्चा माल उपयोगात आणून रु.१८ लाख किंमतीच्या मालाचे उत्पादन झाले. त्यात ७ कामगार कार्यरत होते. तसेच याचवर्षी उदगीरजवळ लोणी येथे 'मे.उषा ॲग्रो इंडस्ट्रिज' हा डाळी तयार करण्याचा कारखाना सुरू झाला, त्यात २००४-०५ मधील एकूण गुंतवणूक रु.४८ लाख होती. वापरण्यात आलेल्या कच्च्या मालाची किंमत रु.४२ लाख होती तर उत्पादित मालाची किंमत रु.५५ लाख होती. त्यावर्षी एकूण २९ कामगार कार्यरत होते. सन १९९४ मध्ये लातूर येथेच 'पी.पी.ॲग्रो इंडस्ट्रिज' हा डाळी तयार करणारा मोठा कारखाना सुरू झाला. त्यात २००५ मध्ये गुंतविलेले भांडवल रु.१ कोटी २६ लाख व ३२ कामगार होते.

सन १९९५ मध्ये लातूर जिल्ह्यात धान्यगिरणी उत्पादने तयार करणारे नोंदणी झालेले २५ कारखाने होते. त्यापैकी २ कारखाने बंद होते. कार्यरत २३ कारखान्यांपैकी १७ कारखान्यांमध्ये १४१ कामगार (८२ पुरुष व ५९ स्त्रिया) होते. त्यानी ३०,५९१ श्रमदिन काम केले. उर्वरित ६ कारखान्यात एकूण १०३ कामगार कार्यरत होते. सन १९९६ मध्ये लातूर येथे 'मे.कीर्ती दाल मिल लि.' हा डाळी तयार करणारा मोठा कारखाना सुरू झाला. त्यात २००४-०५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल रु.८ कोटी १३ लाख व ४५ कामगार होते. त्याची उत्पादन क्षमता प्रतिदिन १५० मे.टन होती. तसेच उदगीरजवळ लोणी येथे 'मे गोपिका ॲग्रो इंडस्ट्रिज' 'मे.ईश्वर इंडस्ट्रीज' हे डाळी तयार करणारे कारखाने १९९६ मध्ये सुरू झाले. त्यात २००४-०५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल अनुक्रमे प्रत्येकी रु.५९ लाख होते. त्यामध्ये वापरण्यात आलेल्या कच्च्या मालाची किंमत अनुक्रमे रु.४२ लाख व रु.४८ लाख होती आणि उत्पादित मालाची विक्री किंमत अनुक्रमे रु.४३ लाख व रु.६४ लाख होती. त्यात कार्यरत असलेल्या कामगारांची संख्या अनुक्रमे २८ आणि ३० होती.

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षण १९९५-९६ अन्वये लातूर जिल्ह्यात विद्युतशक्तिवर चालणाऱ्या भात गिरण्या व डाळी तयार करणाऱ्या सुरू असलेल्या मिलची संख्या २१ होती. त्यातील स्थिर भांडवल रु.१ कोटी २० लाख ३४ हजार, एकूण गुंतविलेले भांडवल रु.३ कोटी २० लाख ३ हजार, खेळते भांडवल रु.२ कोटी ५४ लाख ३५ हजार होते. त्यात २८५ कामगारांनी त्या वर्षात १ लाख १४ हजार ९६६ श्रमदिन काम केले.

अनुक्रमणिका

कामगाराना रु.३३ लाख ७४ हजार एकूण मजूरी देण्यात आली व एकूण उत्पादनाची किंमत रु.५४ कोटी ७७ लाख ५ हजार होती.

सन १९९६ या वर्षातच लातूर येथे 'मे.पार्वती आईस' हा बर्फ तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यात २००४-०५ मध्ये रु.४ लाख किंमतीचा कच्चा माल उपयोगात आणून रु.५ लाख ५० हजार रुपये किंमतीच्या बर्फाचे उत्पादन झाले. त्या वर्षी या कारखान्यात ६ कामगार कार्यरत होते. सन १९९८ मध्ये लोणी येथे 'मे.साईकृपा उद्योग'हा फूटाणा तयार करणारा कारखाना, 'मे.तिमा मुरकुल' हा मुरकुल (चकलीसारखा पदार्थ) तयार करणारा कारखाना, 'मे.उदयशंकर ॲग्रो इंडस्ट्रिज' हा मुरमुरा तयार करणारा कारखाना असे तीन कारखाने सुरू झाले. त्यात २००४-०५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल अनुक्रमे रु.२८ लाख, रु.१५ लाख व रु.३२ लाख होते. त्यातील उत्पादनाची विक्री किंमत अनुक्रमे रु.४० लाख, रु.३० लाख व रु.४० लाख होती. त्यातील कामगारांची संख्या अनुक्रमे ८, ९ व १२ होती. यापूर्वी सन १९९७ मध्ये लातूर येथे 'अमोल उद्योग' हा सर्व प्रकारच्या डाळी तयार करणारा मोठा कारखाना सुरू झाला. त्यात २००५ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल रु.१ कोटी ३१ लाख व २० कामगार होते. सन २००० मध्ये दापका येथे 'तुळजाभवानी आईस प्लॉन्ट', उदगीर येथे 'साईराज आईस इंडस्ट्रिज' हे बर्फ तयार करणारे कारखाने सुरू झाले. त्यातील सुरुवातीची गुंतवणूक अनुक्रमे रु.६ लाख, ५० हजार व रु.३ लाख ७५ हजार होती. त्यात अनुक्रमे ५ आणि १० कामगार कार्यरत होते. याच वर्षी औराद शाहाजनी येथे 'गुरुकृपा दाल उद्योग' हा डाळी तयार करणारा कारखाना सुरू झाला. त्यातील सुरुवातीची गुंतवणूक रु.१५ लाख होती. त्यात ४ कामगार होते. याच वर्षी विराल या गावी 'समर्थ धोंडूतात्या महाराज गूळ उद्योग' हा गूळ तयार करणारा लघुउद्योग सुरू झाला. त्यातील सुरुवातीची गुंतवणूक रु.४ लाख ९३ हजार होती. त्यात १८ कामगार होते. तसेच वरील वर्षी शिवणी या गावी 'भागीरथी जॅगरी', खुंटेगाव, ता.औसा येथे 'पांडुरंग गूळ उद्योग' व 'माऊली गूळ उद्योग', टेंभुर्णी या गावी 'आनंद गूळ उद्योग' हे गूळ तयार करणारे उद्योग सुरू झाले. त्यातील सुरुवातीची गुंतवणूक अनुक्रमे रु.४ लाख ५० हजार, रु.१ लाख ६० हजार, रु.१ लाख ३१ हजार व रु.१ लाख ६० हजार होती. त्यातील कामगारांची संख्या अनुक्रमे ४, २२, २२ आणि २२ होती. सन २००१ मध्ये लोणी येथे 'मे.व्यंकटेश महिला औद्योगिक संस्था' हा सुखडी (सुखदा) तयार करणारा उद्योग सुरू झाला. परंतु पुढे तो बंद पडला. सन २००१ मध्ये खाद्यपदार्थ तयार करणारा 'शक्ति फूड प्रॉडक्टस्' (लातूर) हा कारखाना सुरू झाला. त्यातील सुरुवातीची गुंतवणूक रु.७ लाख होती व १० कामगार होते. याच वर्षी 'नितीन फुड प्रॉडक्टस्' (लातूर) हा रु.३० लाख गुंतवणूक असलेला व १८ कामगार असलेला कारखाना सुरू झाला. या वर्षी जिल्ह्यात मटापूरा या गावी 'पटेल गूळ उद्योग' हा गूळ तयार करणारा रु.३ लाख ५० हजार गुंतवणूक व ४५ कामगार असलेला कारखाना, शिवणी या गावी रु.३ लाख ४४ हजार गुंतवणूक व ५९ कामगार असलेला 'कोहिनूर गूळ खांडसरी' हा कारखाना व जिल्ह्यात उमरगा या गावी रु.३ लाख ५५ हजार गुंतवणूक असलेला व ९ कामगार असलेला 'सदानंद गूळ उद्योग' हे गूळ तयार करणारे उद्योग सुरू झाले. सन २००१ मध्ये अहमदपूर येथे 'सौदागर आईस फॅक्टरी' हा बर्फ तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यातील गुंतवणूक रु.३ लाख ५० हजार होती व १२ कामगार होते. याचवर्षी उदगीर येथे रु.५ लाख ५० हजार गुंतवणूक व १९ कामगार असलेला बेकरी तयार करण्याचा 'न्यू कोहिनूर बेकरी इंडस्ट्रिज' हा कारखाना सुरू झाला. वरील वर्षी लातूर मध्ये कातपूर रोडजवळ 'सुभाष ॲग्रो इंडस्ट्रिज' हा तुर, मुग इत्यादी डाळी तयार करणारा मोठा कारखाना सुरू झाला. त्यात २००५ मध्ये स्थिर भांडवल रु.३६ लाख, गुंतविलेले एकूण भांडवल रु.१ कोटी २६ लाख व खेळते

भांडवल रु.(-) १० लाख होते. त्यात ५० कामगार कार्यरत होते. त्यांनी १५,३३० श्रमदिवस काम केले. त्यावर्षी कामगारांना रु.१० लाख मजूरी देण्यात आली. या कारखान्याची उत्पादन क्षमता दिवसाला ३ टन इतकी होती.

सन २००२ मध्ये जिल्ह्यात अहमदपूरमध्ये रु.१२ लाखाच्या गुंतवणूकीसह 'नॅशनल आइस फॅक्टरी' हा बर्फ तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यात १२ कामगार होते. याच वर्षी लातूर येथे डाळीचे उत्पादन करणारा 'निलेश उद्योग', 'शाम उद्योग' व 'विष्णू डाळ मिल' सुरू झाली त्यातील गुंतवणूक अनुक्रमे रु.३१ लाख ४३ हजार, रु.३०लाख व रु.२७ लाख होती. निलेश उद्योगात यावर्षी १८ कामगार होते. याच वर्षी लातूरमध्ये औद्योगिक वसाहतीत 'ग्रोयिल्ड फिडस् प्रायव्हेट लिमिटेड' हा पशुखाद्य तयार करणारा महानंद कंपनीचा कारखाना सुरू झाला. सन २००३ मध्ये अहमदपूर तालुक्यातील शिरूर ताजबंद येथे 'रॉयल बेकरी', निलंगा तालुक्यातील कासारशिरसी येथे 'गुलजार आईस इंडस्ट्रिज', उदगीर येथे नॅशनल आईस इंडस्ट्रिज, ढालगाव येथे 'मित्रप्रेम मुरमुरा फॅक्टरी', उदगीरजवळ लोणी येथे 'मे कोहिनूर फ्रेड ग्राम मिल' हा फुटाणा तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यातील एकूण भांडवल गुंतवणूक रु.५४ लाख होती. त्यावर्षी त्यात रु.३४ लाख किंमतीचे उत्पादन झाले. त्यात १० कामगार होते. लोणी येथे या वर्षी 'मे. नागेश ॲग्रो इंडस्ट्रिज' व 'पुनम ॲग्रो इंडस्ट्रिज' हे फुटाणे तयार करणारे दोन कारखाने सुरू झाले.

सन २००४ मध्ये लातूर येथे डाळी तयार करण्याचे 'तिरुपती डाळ उद्योग', 'अनिल ॲग्रो इंडस्ट्रिज', 'लॉय पल्सेस', 'शुभलक्ष्मी फुडस' हे कारखाने व 'मनीष ॲग्रो इंडस्ट्रिज' हा सर्व प्रकारच्या धान्यांना पॉलिश करणारा कारखाना सुरू झाला. याच वर्षी लोणी येथे 'मे.वैष्णवी ॲग्रो इंडस्ट्रिज' हा डाळी तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सावेवाडीरोड, लातूर येथे सन २००४ मध्ये 'हेमंत आईस फॅक्टरी' हा बर्फाचा कारखाना सुरू झाला. तसेच लातूरमध्ये जुनी कापडलाईन येथे 'रामचंद्र एकनाथ उकंडे पोहा मिल' सुरू झाली. ती सद्या बंद आहे.

सन २००४ मध्ये जिल्ह्यात धान्य गिरणी उत्पादने व इतर धान्य उत्पादने तयार करणारे नोंदणी झालेले ४१ कारखान्यांपैकी ३२ कारखाने चालू होते. त्यात एकूण २,१५९ कामगार कार्यरत होते. या उद्योगामध्ये पाव, बिस्किटे, केक वगैरे अन्न पदार्थाचे उत्पादन तयार करणारे ६ कारखाने जिल्ह्यात सुरू होते.[१३] जिल्ह्यात खाद्यपदार्थ निर्मिती क्षेत्रात प्रामुख्याने खाद्यतेल निर्मिती व डाळी निर्मिती करणाऱ्या कारखान्यांची संख्या अधिक आहे. खाद्यतेल निर्मिती कारखान्यांची माहिती स्वतंत्रपणे पुढे देण्यात आलेली आहे. तथापि केंद्रशासनाच्या वतीने करण्यात येणारे प्रत्येक जिल्हावार वार्षिक औद्योगिक सर्वेक्षण १९९६-९७ नंतर बंद होऊन पुढे सँपल निवड पध्दतीने काही शहरांचेच सर्वेक्षण करणे सुरू झाल्यामुळे सन १९९४-९५ आणि १९९६-९७ या वर्षाची वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील शक्तिवर चालणारे (या सर्वेक्षणाच्या निकषात बसणारे) डाळी तयार करणाऱ्या कारखान्यांची सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक ९ मध्ये दिली आहे.

---

१३. १. महा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित. उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा,** सन १९९१-९२, पृष्ठ-६१, सन १९९२-९३, पृ.६२, सन १९९५-९६ पृ.६३, सन २००३-२००४ पृ.५९ सन २००४-२००५ पृ.९१.

साखर उद्योग : जिल्ह्यात कृषि उत्पादनावर आधारित जे उद्योग आहेत त्यात सर्वाधिक गुंतवणूक असणारा उद्योग हा साखर उद्योग आहे. सन १९९६-९७ च्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात ३ साखर कारखाने कार्यरत होते. ते सर्व सहकारी क्षेत्रातील होते. याशिवाय १ खांडसरी साखर कारखाना सुरू होता. जिल्ह्यातील साखर उद्योगाचा थोडक्यात इतिहास खाली दिलेला आहे.

सन १९५० नंतर तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात ऊसाखालील क्षेत्र सतत वाढत गेले आणि परिणामत: ऊसापासून गूळ तयार करणारे अनेक लहान घटक ऊस शेतीच्या परिसरात सुरू झाले. ते गूळ व खांडसरी लहान प्रमाणावर तयार करीत असत. त्यावेळी हा तयार होणारा गूळ स्थानिक बाजारपेठेत विकला जाई, तसेच तो लगतच्या जिल्ह्यामध्येही निर्यात केला जात असे. सन १९६३-६४ मध्ये एकट्या लातूर बाजारपेठेतून रु.१ कोटी ३९ लाख ४९ हजार ३१४ किंमतीच्या १ लाख ५४ हजार ७९४ क्विंटल गुळाची निर्यात झाली होती. गूळ उत्पादकांनी मंगरूळ, गोविंदपूर, खंबासवाडी, जेवळी, चाकूर, तुगाव, अन्दोरा आणि नल-चाकूर येथे अनेक सहकारी उद्योग संस्था स्थापन केल्या होत्या. जिल्ह्यातील ऊसाखालील क्षेत्र सतत वाढत गेल्यामुळे सन १९६५ मध्ये ढोकी येथे 'तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना' स्थापन करण्यात आला. तेव्हा या कारखान्याचे भाग भांडवल रु.२७ लाख ७२ हजार होते व रु.२५ लाखाच्या कर्जासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. जमीन अधिग्रहणाची प्राथमिक प्रक्रिया पूर्ण होऊन इमारत बांधकाम पूर्ण झाले होते आणि १९६७ च्या शेवटी उत्पादन सुरू होणे अपेक्षित होते. त्यानुसार हा तत्कालीन जिल्ह्यातील तसेच मराठवाड्यातील पहिला सहकारी साखर करखाना होय.[१४] त्यानंतर औसा तालुक्यामधील किल्लारी येथे 'शेतकरी सहकारी साखर कारखाना लिमिटेड' हा १,२५० मे.ट.प्रतिदिन गाळपक्षमतेचा साखर कारखाना दिनांक ६ जून १९६९ रोजी स्थापन झाला. त्याचे प्रत्यक्ष उत्पादन १९७२-७३ मध्ये सुरू झाले. सन १९७४ मध्ये निलंगा तालुक्यातील हलगरा या ठिकाणी 'हनुमान खांडसरी शुगर मिल्स', हा खाजगी खांडसरी साखर कारखाना स्थापन झाला. सुरवातीला प्रतिदिन २०० मे.टन व सद्या ४०० मे.टन गाळपक्षमता असलेल्या या काखान्याचे प्रत्यक्ष उत्पादन १९७४-७५ मध्ये सुरू झाले.[१५] त्यानंतर १९८० मध्ये उदगीर व अहमदपूर येथे प्रत्येकी एक खांडसरी साखर तयार करण्याचे उद्योग सुरू होते परंतु ते पुढे बंद पडले.[१६] सन १९८२ मध्ये पूर्वीच्या अहमदपूर तालुक्यातील आणि सद्याच्या चाकूर तालुक्यातील नळेगाव या गावी 'जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना लि.', हा १,२५० मे.ट.प्रतिदिन गाळप क्षमता असणारा साखर कारखाना स्थापन झाला. त्याचे प्रत्यक्ष उत्पादन कार्य सन १९८५ मध्ये सुरू झाले.[१७] दिनांक ११ जानेवारी १९८४ रोजी लातूरच्या पश्चिमेस १० ते १२ कि.मी. अंतरावर चिंचोलीराव (वाडी) येथे 'मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान लि.', ह्या १,२५० मे.ट.गाळपक्षमता असणाऱ्या कारखान्याची स्थापना मा.ना.विलासरावजी दगडोजी देशमुख यांच्या पुढाकाराने झाली. या कारखान्याने सन २००४-२००५ पर्यंत राष्ट्रीय व राज्य पातळीवर ४७ पुरस्कार प्राप्त केलेले असून साखरेच्या उताऱ्यात राज्यात विक्रम प्रस्थापित करणे, उत्कृष्ट नियोजन, व्यवस्थापन, यंत्र व मनुष्यबळ यांचा पूर्ण क्षमतेने वापर, काटकसर इत्यादी बाबतीत रुपेरी कामगिरी करणारा व पश्चिम महाराष्ट्रामध्ये जसे सहकार क्षेत्र यशस्वी ठरले तसे मराठवाड्यातील विक्रमवीर ठरलेला हा सहकारी साखर कारखाना होय. या कारखान्यामधील प्रत्यक्ष उत्पादन

---

१४. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४५१.

१५. शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., किल्लारी आणि हनुमान खांडसरी शुगर मिल्स, हलगरा यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१६. तोंडारे, एस.जी. **लातूर जिल्ह्यातील शेतीवर आधारित उद्योग,** उदगीर प्रिंटिंग प्रेस, उदगीर, पृ.२१.

१७. जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना लि., नळेगाव यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

चाचणी १९८७ मध्ये घेण्यात आली.[१८] या दरम्यानच्या कालावधीमध्ये खोपेगाव ता.जि.लातूर येथे 'मराठवाडा खांडसरी उद्योग', हा खांडसरी साखर तयार करणारा खाजगी कारखाना सुरू झाला, परंतु तो पुढे लवकरच बंद पडला. त्यानंतर निलंगा तालुक्यात शिवपूर येथेही 'न्यू मराठवाडा खांडेश्वरी शुगर मिल', हा खांडसरी साखर तयार करणारा खाजगी कारखाना सुरू झाला. हा कारखानादेखील पुढे बंद पडला.[१९]

दिनांक ३० जून १९८६ रोजी जिल्ह्यात सहकारी क्षेत्रातील ३ साखर कारखाने सुरू होते. त्यातील सभासद संख्या ३० हजार ४३६ होती. त्यांचे भागभांडवल रु. ७ कोटी ८३ लाख ६४ हजार होते. या कारखान्यातील खेळते भांडवल रु. २४ कोटी १६ लाख ८ हजार होते आणि राखीव व इतर निधी रु.२ कोटी ६८ लाख ५१ हजार होते. त्या वर्षी या कारखान्यांमधून फक्त ९६ हजार टन ऊसाचे गाळप होऊन ८ हजार टन साखरेचे उत्पादन झाले.[२०]

सन १९८९ मध्ये निलंगा तालुक्यात निलंगा शहरापासून सुमारे १० ते १५ कि.मी. दरम्यान अंबुलगा या ठिकाणी शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पुढाकारातून "शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना" स्थापन झाला. परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे कारखाना उभारणीस विलंब होऊन प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्यास स्थापनेपासून १० वर्ष कालावधी लागला आणि १९९८-९९ मध्ये २,५०० मे.ट.प्रतिदिन गाळपक्षमता असलेल्या या कारखान्यातील प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात झाली.[२१] सन १९९० मध्ये अहमदपूर तालुक्यात उजना या गावी 'बालाघाट शेतकरी सहकारी साखर कारखाना' स्थापन झाला. परंतु या कारखान्याच्या उभारणीस देखील काही तांत्रिक आणि आर्थिक अडचणींमुळे विलंब होऊन प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्यास स्थापनेपासून जवळपास ९ ते १० वर्ष लागली आणि १९९९-२००० मध्ये मात्र चाचणी गाळप हंगाम यशस्वीरित्या पार पाडून १ लाख २५ हजार टन ऊसाचे गाळप करून १ लाख २४ हजार ६९१ साखर पोती तयार केली. या साखर कारखान्यातील सरासरी साखर उतारा १०.१२% होता. यावर्षी कारखान्यातील भागभांडवल रु. १२ कोटी ४३ लाख ३ हजार ६७४ व राखीव व घसारा निधी रु. ४ लाख ३३ हजार ६२० होता. हा कारखाना २००१-२००२ मध्ये ऊसाअभावी व आर्थिक अडचणींमुळे गळिप हंगाम पूर्ण करू शकला नाही. यावर्षी या कारखान्याचे एकूण भागभांडवल रु. १४ कोटी ३१ लाख १० हजार ९८६ व राखीव व इतर निधी रु.७ कोटी ९८ लाख १९ हजार ४२७ होता आणि त्यावर्षी वेतन व मजूरीवर रु. १ कोटी ७४ लाख ७५ हजार ३५७ इतका खर्च करण्यात आला. या वर्षीचे उत्पादित साखरेचे मूल्य रु. २१ कोटी १६ लाख ७८ हजार ७९७ होते व उपपदार्थाचे उत्पादन मूल्य रु. १ कोटी ४६ लाख १२ हजार १४३ होते. आर्थिक अडचणींमुळे व काही प्रमाणात ऊसाअभावी हा कारखाना पुढे बंद पडला.[२२] तथापि २००६-२००७ मध्ये हा कारखाना 'इंडो शुगर्स लि.', कंपनीने भाडेतत्वावर घेऊन या वर्षाचा गाळप हंगाम सुरू केला.[२३]

---

१८. पाटील, श्रीराम **मायबोलीचा मराठवाडा,** योगेश प्रकाशन, औरंगाबाद २००४, पृ.२५८-५९ आणि 'मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.', चिंचोलीराव (वाडी) यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१९. उपसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, औरंगाबाद यांच्या माहितीवरून.

२०. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा लातूर**, सन १९८५-८६, पृ.९९.

२१. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना, अंबुलगा यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

२२. बालाघाट शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., उजना यांचा वार्षिक अहवाल सन १९९९-२०००, पृ.७,१२, सन २०००-२००१, २००१-२००२, पृ.६, १८, १९.

२३. सन २००६-२००७ च्या दर्शनिका विभागाच्या कार्यालयीन सर्वेक्षणावर आधारित.

अनुक्रमणिका

सन १९९०-९१ च्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात ३ साखर कारखाने सुरू होते. हे सर्व कारखाने सहकारी क्षेत्रातील होते. (या सर्वेक्षणाच्या निकषामध्ये खाजगी कारखाने येऊ न शकल्यामुळे त्यांचा समावेश नाही.) या तीन कारखान्यातील स्थिर भांडवल रु.१२ कोटी ७२ लाख ३५ हजार, खेळते भांडवल रु.२१ कोटी ४९ लाख २४ हजार, गुंतलेले भांडवल रु.५० कोटी ४२ लाख ३५ हजार होते. यावर्षी यातील एकूण कर्मचाऱ्यांची संख्या १,७०१ होती. त्यापैकी ८९६ कामगार होते. या कामगारांनी ५ लाख ६४ हजार ५५९ श्रमदिवस काम केले. कर्मचाऱ्यांचे वेतनावर रु.४ कोटी ४१ लाख १७ हजार खर्च करण्यात आले. त्यापैकी कामगारांचे वेतन रु.१ कोटी ४२ लाख ७८ हजार होते. वापरण्यात आलेल्या इंधनाचा खर्च रु.७६ लाख ९७ हजार होता. या कारखान्यांमध्ये रु.४६ कोटी ९६ लाख ७८ हजार किंमतीचा कच्चा माल (ऊस) वापरण्यात येऊन रु.६१ कोटी ३०लाख ९० हजार किंमतीचे मुख्य उत्पादन (साखर) आणि रु.८३ लाख ३ हजार किंमतीचे अन्य दुय्यम उत्पादन झाले. कारखान्यातील यंत्र व सयंत्राची एकूण किंमत रु.१९ कोटी ५ लाख १२ हजार होती. त्यावर्षी कारखान्यांना रु.५ कोटी ४८ लाख ४७ हजार निव्वळ नफा झाला.

राष्ट्रीय निकषानुसार जो साखर कारखाना १८० दिवस ऊसाचे गाळप करू शकतो त्याने गाळप क्षमतेचा १०० टक्के वापर केलेला आहे असे समजण्यात येते. मात्र भारतातील इतर घटक राज्याच्या तुलनेने महाराष्ट्रात, साखर उताऱ्याचे प्रमाण जास्त असल्याने महाराष्ट्रासाठी हा निकष अलिकडे १६० दिवस गाळपाचा मानण्यात येऊ लागला आहे.[२४]

या पुढील भागात सन १९९० नंतर सुरू झालेले लातूर जिल्ह्यातील कारखाने व त्या अनुषंगाने तक्त्यामध्ये देण्यात आलेली आकडेवारी आणि वरील निकषानुसार त्यानी केलेल्या गाळप क्षमतेचा वापर व मिळालेल्या साखर उताऱ्याची आकडेवारी इत्यादीसंबंधी माहिती देण्यात आली आहे.

काही कारखान्यांचा अपवाद वगळता विशेष म्हणजे मराठवाड्यातील साखर कारखान्यांनी गाळप केलेल्या ऊसापैकी काही ऊस मराठवाड्या बाहेरील किंवा त्याच्या कार्यक्षेत्राबाहेरील असतो. तो काही प्रमाणात खानदेश व पश्चिम महाराष्ट्रातील लगतच्या जिल्ह्यातून आलेला असतो. तर काही कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून आणण्यात येतो.

सन १९८६-८७ ते १९९०-९१ या कालावधीत जिल्ह्यातील ३ साखर कारखान्यांनी मराठवाड्या बाहेरून आणलेल्या ऊसाची आकडेवारी खाली दिली आहे.

(मे.टन)

अ.क्र. (१)	साखर कारखान्याचे नाव (२)	१९८६-८७ (३)	१९८७-८८ (४)	१९८८-८९ (५)	१९८९-९० (६)	१९९०-९१ (७)
१	शेतकरी सहकारी साखर कारखाना, किल्लारी.	७१,२७०	४३,५७०	३१,३९४	३,१८२	१,४७९
२	जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना, नळेगाव.	४०,००९	४६,५३०	५६,८७७	६३,३०१	८,७१२
३	मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, लातूर.	८,४०७	७६,७९२	१,०१,१८८	१८,४२०	२५२

२४. तुपे, सु.दा. **मराठवाड्याचा आर्थिक विकास आणि समस्या,** साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद-१९९४, पृ.४७ ते ५१.

सन १९९० मध्ये मान्यता देण्यात आलेल्या नवीन सहकारी साखर कारखान्यांची सरकारच्या नवीन धोरणानुसार हे कारखाने अर्थक्षम ठरविण्यासाठी गाळप क्षमता प्रत्येकी २,५०० मे.टन असेल. त्यामुळे या साखर कारखान्यासाठी जास्त जमीन लागवडीखाली आणावी लागेल. केंद्र सरकारच्या नवीन नियमाप्रमाणे २,५०० मे.टन गाळप क्षमतेच्या साखर कारखान्याच्या क्षेत्रात किमान १६ हजार एकर जमीन ऊसाच्या लागवडीखाली असावयास पाहिजे त्यानुसार त्यावेळेस नवीन मान्यता देण्यात आलेल्या दोन साखर कारखान्यांसाठी ३२ हजार एकर जमीन नव्याने लागवडीखाली आणावी लागणार होती. परंतु सन १९९३-९४ मध्ये सबंध लातूर जिल्ह्यामध्ये ऊसाखालील एकूण क्षेत्र २९ हजार ५३७ एकर (११ हजार ८१५ हेक्टर) होते. यावरून जिल्ह्यातील उपरोक्त उत्पादन सुरु असलेले व उभारणीखाली असलेले कारखाने यांना प्रचलित नियमाप्रमाणे आवश्यक असणारे ऊसाखालील क्षेत्र व प्रत्यक्ष उपलब्ध क्षेत्र यातील फरक लक्षात घेण्याजोगा आहे. सन १९९८-९९ मध्ये जिल्ह्यातील ऊसाखालील क्षेत्र वाढून ५४ हजार ९५३ एकर झाले तर सन २०००-२००१ मध्ये त्यात वाढ होवून ६१ हजार २५० एकर (२४ हजार ५०० हेक्टर) झाले.[२५]

सन १९९० च्या सुमारास स्थापन झालेले जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने उभारणी खाली असताना जिल्ह्यातील उदगीर तालुक्यातील तोंडार या गावी "प्रियदर्शनी शेतकरी सहकारी साखर कारखाना लि." या २,५०० मे.टन प्रतिदिन गाळपक्षमता असणाऱ्या सहकारी क्षेत्रातील साखर कारखान्याची सन १९९४ या वर्षी स्थापना झाली. या कारखान्याने प्रत्यक्ष उत्पादनास २००२-२००३ मध्ये सुरुवात केली.[२६] सन १९९९ या वर्षी जिल्ह्यात रेणापूर तालुक्यामधील पानगाव या ठिकाणी "पन्नगेश्वर शुगर मिल्स लि." या खाजगी क्षेत्रातील प्रतिदिन १,००० मे.टन गाळक्षमता असणाऱ्या साखर कारखान्याची स्थापना झाली. या कारखान्यातील प्रत्यक्ष गळीतास एप्रील २००१ मध्ये सुरुवात केली.[२७]

दिनांक १८ जुलै २००० रोजी औसा तालुक्यातील बेलकुंड येथे 'श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना मर्यादित.' हा प्रतिदिन १,२५० मे.टन गाळपक्षमता असलेला कारखाना स्थापन झाला. या कारखान्यातील प्रत्यक्ष उत्पादनास दिनांक १७ नोव्हेंबर २००२ पासून सुरुवात केली.[२८] सन २००० या वर्षीच जिल्ह्यात लातूर तालुक्यामध्येच निवळी येथे 'विकास सहकारी साखर कारखाना लि.' हा प्रतिदिन १,२५० मे.टन गाळप क्षमता असलेला सहकारी क्षेत्रातील साखर कारखाना स्थापन झाला. श्री.अमित देशमुख यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली या कारखान्याची उभारणी अत्यंत जलद गतीने करण्यात येऊन २००१-२००२ मध्ये या साखर कारखान्याने प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात केली. सन २००१ मध्ये जिल्ह्यात रेणापूर तालुक्यातील निवाडा येथे 'रेणा सहकारी साखर कारखाना लि.' हा सहकारी क्षेत्रातील साखर कारखाना दिलीपराव देशमुख यांचे पुढाकाराने स्थापन करण्यात आला. या १,२५० गाळप क्षमता असलेल्या साखर कारखान्यातील प्रत्यक्ष उत्पादन २००३ मध्ये सुरु झाले.[२९] यावरून १९६९ ते २००७ या कालावधीत जिल्ह्यात सहकारी तत्वावरील साखर कारखान्यांची झपाट्याने वाढ झाल्याचे लक्षात येते.

सन १९९८-१९९९ मध्ये जिल्ह्यात ६ सहकारी साखर कारखाने कार्यरत होते. त्यातील सभासदांची संख्या ३१,८१३ हाती, त्यात भागभांडवल रु.१४ कोटी ७ लाख ४ हजार, राखीव आणि इतर निधी रु.२६

---

२५. तुपे, सु.दा. पूर्वोक्त, पृ.५१ ते ५५.
२६. प्रियदर्शनी शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., तोंडार यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
२७. पन्नगेश्वर शुगर मिल्स लि., पानगाव यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
२८. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
२९. विकास सहकारी साखर कारखाना लि., निवळी आणि रेणा सहकारी साखर कारखाना म., निवाडा यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

कोटी ४४ लाख १० हजार आणि खेळते भांडवल रु.१०० कोटी ३७ लाख ७३ हजार होते. त्यांचेकडून सदर वर्षी १,०५४.१३६ हजार मे.टन (सुमारे १० लाख ५४ हजार मे.टन) ऊसाचे गाळप होऊन १०२.९८ हजार मे.टन (सुमारे १ लाख ३ हजार मे.टन) साखरेचे उत्पादन झाले. तर सन २००२-२००३ मध्ये जिल्ह्यात एकूण ११ साखर कारखान्यांपैकी सहकार क्षेत्रातील ९ साखर कारखाने कार्यरत होते. या कार्यरत कारखान्यांतील एकूण सभासद संख्या ५०,१७१ होती. त्यांतील एकूण भागभांडवल रु.१५ कोटी ५१ लाख २२ हजार, खेळते भांडवल रु.१०६ कोटी ४३ लाख ६८ हजार इतके होते. त्यांचेकडून ३१ मार्च २००४ अखेर ४,३६९.९२ हजार मे.टन (सुमारे ४३ लाख ७० हजार मे.टन) ऊसाचे गाळप करण्यात येऊन ३३३३.४७ हजार मे.टन (सुमारे ३३ लाख ३३ हजार मे.टन) साखरेचे उत्पादन झाले.[३०]

उपरोक्त कारखान्यांच्या उभारणीमध्ये सभासदांव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, आयुर्विमा महामंडळ व लातूर जिल्हा सहकारी बँकेचा तसेच अन्य काही वित्तीय संस्थांचा मोलाचा वाटा आहे.

जिल्ह्यात १९८५-८६ ते २००४-२००५ मधील निवडक वर्षामध्ये उत्पादन करीत असलेल्या ११ साखर कारखान्याचे भागधारक (एका खाजगी साखर कारखान्यात भागधारकांचा संबंध नाही), भांडवल इत्यादीविषयी माहिती तक्ता क्रमांक १० मध्ये दिली आहे. या साखर कारखान्यांपैकी मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याने २०००-२००१ मध्ये एकाच दिवसात १४.६७ टक्के साखर उतारा मिळवून भारतात उच्चांक गाठला होता. परंतु तक्त्यातील सदर वर्षीच्या माहितीमध्ये हंगामातील सरासरी उतारा १३.०७ टक्के दर्शविण्यात आला. जिल्ह्यातील १९८५-८६ ते २००४-२००५ मधील निवडक वर्षामधील सर्व साखर कारखान्यांतील साखरेचे व मळीचे उत्पादनाची माहिती तक्ता क्रमांक ११ मध्ये दिलेली आहे.

उत्पादित साखर विक्रीबाबत शासनाच्या धोरणानुसार या कारखान्यांना विहित प्रमाणानुसार उत्पादनाचा काही भाग खुल्या बाजारात विकता येतो व उर्वरित भाग शासन नियंत्रित दराने सार्वजनिक वितरण यंत्रणेला द्यावा लागतो.[३१] साखर उत्पादनासाठी लागणाऱ्या रासायनिक द्रव्यांचा पुरवठा महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई यांचेकडून व स्थानिक व्यापाऱ्यांकडून होतो. जिल्ह्यातील साखर कारखाने कार्यक्षम बनावित यासाठी काही साखर कारखान्यानी वैशिष्ट्यपूर्ण व प्रयत्नपूर्वक विविध योजना राबविल्या आहेत व या प्रयत्नामुळे त्यांची वाटचाल वैशिष्ट्यपूर्ण ठरत आहे. अशा काही कारखान्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

शेतकरी सहकारी साखर कारखाना किल्लारी[३२] : या सहकारी क्षेत्रातील साखर कारखान्याची स्थापना १९६९ मध्ये झाली आणि प्रत्यक्ष उत्पादन १९७४-७५ मध्ये सुरू झाले. या कारखान्याची ऊस गाळप क्षमता सुरुवातीपासून १,२५० मे.टन प्रतिदिन आहे. या कारखान्याचे सन १९८०-८१ मध्ये ७,७०५ सभासद होते. त्यावेळी कारखान्यातील भाग भांडवल रु.११८ लाख १३ हजार होते. त्यावर्षी कारखान्याने एकूण २ लाख १८ मे. टन ऊसाचे गाळप करून १०.३०% उतारा येऊन २ लाख ६ हजार ५१० साखरपोते उत्पादन झाले (त्याची विक्री किंमत रु.७ कोटी ९१ लाख ४४ हजार होती). त्यावर्षी कारखान्यात ७२६ कामगार होते. त्या वर्षी कारखान्यास रु.२७ लाख ८२ हजाराचा तोटा सहन करावा लागला. सन

३०. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा लातूर**, १९९८-९९, पृ.११२, ११३, २००४-२००५ पृ.९३,९४.

३१. **कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर,** १९८९, पृ.२७५.

३२. शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., किल्लारी यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित व कारखान्याचे वार्षिक अहवाल सन १९९९-२०००, पृ.२, ३, ७, ८. सन २००२-२००३ व २००३-२००४, पृ.१, २, ३.

१९९०-९१ मध्ये या कारखान्यातील सभासदांची संख्या ११,५५० झाली व एकूण भागभांडवल रु.१७२ लाख ७७ हजार झाले. यावर्षी २ लाख ७२ हजार १२१ मे. टन ऊसाचे गाळप करण्यात येऊन २ लाख ९८ हजार ८४० क्विंटल साखर उत्पादन झाले आणि ११.११% साखर उतारा मिळाला. यावर्षीची साखरविक्री किंमत रु.१५ कोटी ७७ लाख होती. यावर्षी रु. ३ लाख ७३ हजाराचा तोटा झाला. दिनांक ३० सप्टेंबर १९९३ चे भूकंपानंतर कारखान्याने उमरगा-लातूर रोड लगत कारखाना साईटवर शॉपिंग सेंटर १ व २ मध्ये प्रत्येकी २६ गाळे आणि किल्लारी येथील स्टेट बँक ऑफ इंडिया व जनता सहकारी बँक यांचेसाठी इमारती बांधून भाड्याने दिल्या. सन १९९९-२००० मध्ये पर्जन्यमान चांगले राहिल्यामुळे या कारखान्यास एकूण ८ लाख ७३ हजार ९०० मे.टन ऊस उपलब्ध झाला. हा ऊस गाळप होणे कारखान्याच्या १,२५० प्रतिदिन गाळप क्षमतेच्या आवाक्याबाहेर असल्याने कारखान्यातील काही मशिनरीचे आधुनिकीकरण करून ती क्षमता काही प्रमाणात वाढविण्यात आली. हंगामात ३ लाख १६ हजार ९७६ टन ऊसाचे गाळप करून ३ लाख ६१ हजार ८०० क्विंटल शुभ्र दाणेदार साखरेचे उत्पादन केले. त्याचा सरासरी उतारा ११.४४% होता. हा हंगाम १८४ दिवस चालला. यावरून यावर्षी गाळप क्षमतेच्या १००% गाळप क्षमता वापरात आणल्याचे दिसून येते. यावर्षी ऊस पुरविणाऱ्या सभासदांना रु.६१९ प्रतिटन दर देण्यात आला. तसेच सभासदांना पाडेगांव संशोधन केंद्र, पाडेगांव व व्ही.एस.आय. पुणे येथून फौंडेशन सीडचे को.सी.६७१ को.८६०३२ या जातीचे ७५,००० टिपरी ऊस बेणे रोख रक्कम घेऊन पुरविण्यात आले. याशिवाय टिश्यू कल्चर रोपे पुरवठा उपक्रमाखाली व्ही.एस.आय. पुणे येथून को.सी.६७१ जातीचे ५००० रोपे पुरविले. कारखान्याने याच वर्षी औसा, उमरगा व निलंगा तालुक्यातील २८ सभासदांचे ४० हेक्टरवर ठिबक संच बसवून दिले व त्यांना हेक्टरी ५ मे.टन बेणे उधारीवर दिले. त्याचप्रमाणे सभासदांना उत्पादित प्रेसमडची (मळी) विक्री अल्पदराने केली. याचवर्षी तत्कालीन खासदार गोपाळराव पाटील यांचे खासदार निधीतून कारखाना साईटवर एक सांस्कृतिक सभागृह बांधण्यात आले. सन २०००-२००१ मध्ये कारखाना कार्यक्षेत्रात एकूण ६ लाख ९४ हजार ५२५ मे.टन ऊस उपलब्ध असतानाही दिनांक ९ डिसेंबर २००० रोजी गळीत हंगाम सुरू झाला. परंतु कारखान्याचे ऊस वाहतूक करणारे ट्रक मालक व कामगारांनी दिनांक ५ मार्च २००१ रोजी अचानकपणे निरनिराळ्या मागण्यांसाठी गाळप थांबवून बेमुदत संप केला. हंगामात संप न मिटल्याने या कालावधीत १ लाख १७ हजार २७८ टन ऊसाचे गाळप झाले. यामुळे कारखान्याचे तसेच सभासदाचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले. यावेळी सरासरी साखर उतारा ११.१४% प्राप्त होऊन १ लाख ३० हजार क्विंटल साखरेचे उत्पादन झाले. ऊसाला रु.६६० प्रतिटन दर देण्यात आला. कामगारांच्या संपाबाबत व्यवस्थापनाने तडजोडी करून दि.२० जून २००१ रोजी संप मिटवला. सन २००२-२००३ या वर्षी कारखान्याने १ लाख ९६ हजार ९३५ टन ऊसाचे गाळप केले. सरासरी साखर उतारा ११.००% प्राप्त होवून २ लाख २४ हजार ०८१ क्विंटल साखरेचे उत्पादन झाले. यावर्षी कारखान्याने ऊस उत्पादकांना रु.६६० प्रतिटन दर दिला. या हंगामात १३५ दिवस कारखान्याचे गाळप चालले. सन २००३-२००४ मध्ये या कारखान्याचा गळीत हंगाम फक्त ८७ दिवस चालला या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात २५२ गावे असूनही फक्त ५० हजार १०४ पूर्ण टनी ऊसाचे गाळप होऊन ५१ हजार २५१ क्विंटल साखर उत्पादन झाले व सरासरी साखर उतारा १०.०१% मिळाला. या हंगामात एकूण ६८२ कामगार होते. यावर्षी ऊस उत्पादकाना कारखान्याने ऊसाला रु.६६० प्रतिटन असा दर दिला. या वर्षी कारखान्यातील सभासदांची संख्या १९ हजार ७३० होती व भागभांडवल रु.५ कोटी ७ लाख ७५ हजार १२९ होते. इ.स.२००४ मध्ये कारखान्याने वीज प्रकल्प सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर केला.

अनुक्रमणिका

मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., (चिंचोलीराव) वाडी [३३]: या कारखान्याची स्थापना विलासराव देशमुख यांनी १९८४ मध्ये केली. तथापि, या कारखान्याचे १९८७-८८ मध्ये उत्पादन सुरू झाले. त्यावेळी या कारखान्याची प्रतिदिन गाळप क्षमता १,२५० मे. टन होती. कारखान्याने २००१-०२ मध्ये यंत्रसामग्रीचे आधुनिकीकरण व विस्तारीकरणावर रु.१४,२०.१७ लाख खर्च करून दैनिक गाळप क्षमता १,२५० मे.टन वरून २,५०० मे.टन केली. या वर्षी कारखान्याचे गळीत हंगामात ६,४८,५०० मे.टन ऊसाचे गाळप करून ८ लाख ७ हजार १८५ क्विंटल साखरेचे उत्पादन केले. तसेच रु.७ कोटी १२ लाखांची अर्कशाळा व बायोगॅस प्रकल्प व कोजनरेशन (सहवीज निर्मिती) व सांडपाणी शुध्दीकरण हे प्रकल्प उभे केले. या कारखान्याने २००३ मध्ये अद्ययावत यंत्रसामग्रीसह इथेनॉल प्रकल्पाची उभारणी करून तो २००४ पासून सुरू केला. सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यात अत्यल्प पाऊस असतानाही कारखान्याने ३ लाख १० हजार ९५७ मे. टन ऊसाचे गाळप करून ३ लाख २८ हजार २७० क्विंटल साखरेचे उत्पादन केले. यावर्षी कारखान्याने ऊस पुरवठादारास १,१६० रु. मे.टन प्रमाणे रक्कम दिली. त्यात ६५७ कर्मचारी होते. त्यापैकी कामगारांची संख्या ३४५ होती. यावर्षी कारखान्याने महाराष्ट्रातील ऊस संशोधन केंद्राकडून ऊसाचे बेणे उत्पादक सभासदांना उपलब्ध करून दिले. तसेच २०० सभासदांना तुषार सिंचन संचाचा पुरवठा केला. या कारखान्याने २००५-०६ मध्ये ४ लाख १८ हजार ०६५ मे. टन ऊसाचे गाळप करून ४ लाख ३१ हजार ०४० क्विंटल साखरेचे उत्पादन केले.

सन २००४-०५ पर्यंत या कारखान्यास राज्य व देश पातळीवरील विविध गुणवत्तेची एकूण ४७ पारितोषिके मिळालेली आहेत. तपशील खालील प्रमाणे आहे.

१. वसंतदादा शुगर इन्स्टीट्यूट, पुणे.	२५
२. महाराष्ट्र राज्य सहकारी सा.का.संघ लि., मुंबई	१०
३. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्ली	१२
	४७

कारखाना पूर्ण गाळप क्षमतेने चालवण्यासाठी आवश्यक असणारा, जादा साखर उतारा देणारा व शेतकऱ्यांना किफायतशिर ठरणारा ऊस कार्यक्षेत्रातून उपलब्ध व्हावा, या उद्देशाने कारखान्याने ऊस विकासाच्या विविध योजना राबवलेल्या आहेत. त्यामध्ये जमिनीतील माती तपासणी, शेती औजारे पुरवठा योजना, पाणी पुरवठ्यासाठी विहिरीतील गाळ उपसा योजना, इलेक्ट्रिक मोटार व पाईप लाईन योजना, ठिबक व तुषार सिंचन संच पुरवठा योजना, बेणे पुरवठा, रासायनिक सूक्ष्मद्रव्य व सेंद्रिय खत पुरवठा, ऊस फवारणी इ. विविध योजना कारखान्याने राबविलेल्या असून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ऊसाचे उत्पादन घेण्यासाठी कार्यक्षेत्रात ऊस परिषद, मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करून शेतकऱ्यांना तज्ञांच्या मार्फत मार्गदर्शन केलेले आहे. तसेच सर्वाधिक ऊस काढणाऱ्या शेतकऱ्यांना ऊस पीक स्पर्धेअंतर्गत रोख पारितोषिके सन्मानपूर्वक देऊन प्रोत्साहन देण्यात येत आहे.

सांस्कृतिक क्षेत्रास प्रोत्साहन : जिल्हा राज्य व राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येत असलेल्या कुस्ती स्पर्धेतील विजेत्यांना, कारखाना कार्यक्षेत्रातील पैलवानांना जिल्हा कुस्तगीर परिषदेचे शिफारशीनुसार त्यांच्या

३३. १) मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., चिंचोलीराव (वाडी) यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित व वार्षिक अहवाल सन २००४-०५, पृ. १,३, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित, सन २००६-०७ मधील दर्शनिका विभागाच्या सर्वेक्षणावर आधारित.

सकस आहारासाठी (खुराकासाठी) कारखान्यामार्फत रोख आर्थिक मदत व गणवेष प्रतिवर्षी देण्यात येऊन पैलवानांना प्रोत्साहन देण्यात येते. तसेच लातूरचे ग्रामदैवत श्रीसिध्देश्वर यात्रेनिमित्त दरवर्षी आयोजित करण्यात येत असलेल्या कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांकाने विजयी होणाऱ्या पैलवानास कारखान्यामार्फत सिध्देश्वर केसरी म्हणून एक किलो वजनाची चांदीची गदा प्रतिवर्षी देऊन गौरविण्यात येते. तसेच राज्यस्तरीय व्हॉलीबॉल सामान्यांचे वेळोवेळी आयोजन करून विजेत्या गटास रोख पारितोषिकांची रक्कम दिली जाते.

विकास सहकारी साखर कारखाना लि., निवळी : (स्थापना २०००) या कारखान्याने अल्प कालावधीत कारखान्याची उभारणी करून सन २००१-०२ मध्ये साखर उत्पादनास सुरुवात केली. या शिवाय जानेवारी २००७ पासून कारखान्यातील उत्पादित होणारे उपउत्पादन मोलेसेस यावर प्रक्रिया करून रेक्टिफाईड स्पिरीट तयार करण्याचा प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पाची उत्पादन क्षमता ३० हजार लिटर्स प्रतिदिवस इतकी आहे. दि.१६ ऑगस्ट २००७ अखेर या प्रकल्पातून ५५ लाख ७६ हजार लिटर्स रेक्टिफाईड स्पिरीटचे उत्पादन घेण्यात आले असून याच कालावधीत ५० लाख ७४ हजार ५०० लिटर रेक्टिफाईड स्पिरीटची विक्री करण्यात आली. तसेच विकास सहकारी साखर कारखान्याने सन २००६-०७ च्या हंगामात १६ जून अखेर ५ लाख ५३ हजार १२०.५०५ मे.टन ऊसाचे गाळप करून ६ लाख ८२ हजार ६६० क्विंटल साखरेचे उत्पादन केले. यात १२.३३ टक्के साखर उतारा मिळविला. या साखर कारखान्याने १७ जानेवारी २००८ रोजी एका दिवसात ३,५१५ मे.टन ऊसाचे गाळप करून साखर कारखानदारीत नवा उच्चांक प्रस्थापित केला.[३४]

पन्नगेश्वर शुगर मिल्स लि., पानगाव : गोपीनाथराव मुंडे यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली पानगाव येथे 'पन्नगेश्वर शुगर मिल्स लि., पानगाव' या बिगर सहकारी परंतु कंपनी क्षेत्रातील साखर कारखान्याची १९९८ मध्ये कंपनी कायद्यानुसार नोंदणी होऊन दि. ९ मार्च १९९९ ला कंपनीचे रजिस्ट्रेशन मिळालेल्या कारखान्याची १ एप्रिल २००० मध्ये पायाभरणी झाली. १० ते ११ महिन्याच्या कालावधीत १,००० मे.टन प्रतिदिन गाळपक्षमता असलेल्या साखर कारखान्याची उभारणी करून दि.८ एप्रील २००१ रोजी चाचणी गळीत हंगामास सुरुवात केली.

या साखर कारखान्याची उभारणी पुणे येथील मे.वालचंदनगर इंडस्ट्रिज लिमिटेड, पुणे यांचेकडून करवून घेण्यात आली असून संपूर्ण यंत्रसामुग्री भारतातच तयार झालेली वापरण्यात आलेली आहे. सन २०००-०१ मध्ये आवर्षणग्रस्त स्थितीमुळे अपुऱ्या ऊस उपलब्धतेमुळे चाचणी हंगामात कारखान्याने फक्त १३,६५१ मे.टन ऊस गाळप करून १४,३५१ क्विंटल साखरेचे उत्पादन केले व १०.५० टक्के साखर उतारा मिळविला. या वर्षी कारखान्याने ३९ लाख रुपये किंमतीची २८१ मे.टन साखर विकली.[३५] आवर्षणग्रस्त परिस्थितीतही पन्नगेश्वर साखर कारखान्याचा २००१-०२ मध्ये प्रथम गळीत हंगामाचा शुभारंभ दि.२२ नोव्हेंबर २००१ रोजी तत्कालीन खासदार प्रमोद महाजन यांच्या हस्ते झाला. या हंगामात १ लाख ९६ हजार ३५० मे.टन ऊसाचे गाळप करून २ लाख २६ हजार ६४० क्विंटल साखरेचे उत्पादन केले व सरासरी साखर उतारा ११.५५ टक्के इतका मिळविला. हा गळीत हंगाम १६७ दिवस चालला. सन २००१-०२ मध्ये रु.१३,२३.३४ लाख रुपये किंमतीची १०,६४२.५० मे.टन साखरेची विक्री झाली. त्यापैकी विदेशात साखरेची निर्यात करून रु.२५.२० लाख परकीय चलन मिळविले. या वर्षी केंद्र शासनाच्या साखर विकास निधीमधून ऊस विकास योजनांसाठी रु.३ कोटीची मागणी केली. या योजने अंतर्गत ८१ लाभधारक

३४. विकास सहकारी साखर कारखाना लि., निवळी यांचेकडून प्राप्त माहितीवरून.
३५. पन्नगेश्वर शुगर मिल्स लि., पानगाव यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

शेतकऱ्यांना तुषार ठिंबक सिंचन संच उपलब्ध करून दिले. त्यामुळे ११९.६० हेक्टर क्षेत्र ऊसाखाली आले. याशिवाय ३० लाभधारक शेतकऱ्यांच्या १४.२० हेक्टर क्षेत्रात टिश्यू कल्चर ऊस लागवड करण्यात आली.[३६]. सन २००५-०६ मध्ये कारखाना क्षेत्रातील १३९ गावांचे पानगाव, भोकंरबा व किनगाव असे ३ विभागात विभागवार व गटवार मेळावे आयोजित करून एकात्मिक ऊस विकास योजना राबविली. याच वर्षात दि.८ सप्टेंबर २००५ रोजी कारखान्यास आय.एस.ओ. ९००१ : २००० हे प्रमाणपत्र मिळाले. याच वर्षी कारखान्याने स्वत: पूरती वीज निर्मिती केली.

पन्नगेश्वर साखर कारखान्याने २००६-०७ अखेरपर्यंत केलेले ऊस गाळप, साखर उत्पादन व विक्रीची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	वर्ष	एकूण गाळप (मे.टन)	साखर उत्पादन (क्विंटल)	साखर उतारा (टक्के)	एकूण साखर विक्री (मे.टन)	एकूण साखर विक्री किंमत (लाख रु.)	नफा (लाख रु.)
१	२००२-०२००३	१,७०,६५५	१,८१,४२५	१०.६२	१७,१४०.२०	२,०९३.२६	---
२	२००३-२००४	१,४१,३४१	१,४४,९२५	१०.२५	----	----	---
३	२००४-२००५	१,५६,३७१	१,६७,०००	१०.६८	२३,१९४.५०	३,५६२.३०	३.०५
४	२००५-२००६	२,५५,५५०	२,८३,१५०	११.०९	२४,४८४.२०	३,९३८.६७	१५.२७
५	२००६-२००७	३,८८,०८२	४,४७,२००	११.५३	२४,६३५.२५	३,८६४.९०	१८.००

या साखर कारखान्याची दैनिक गाळप क्षमता १,००० मे.टन असली तरी जास्तीत जास्त गाळप क्षमतेने ऊस गाळप करण्याचा या कारखान्याचा प्रयत्न आहे. सन २००५ अखेरपर्यंत या साखर कारखान्यात एकूण ४ लाख २० हजार क्विंटल साखर साठवणूकीची व्यवस्था करण्यात आलेली होती. अलिकडे कमी होत असलेल्या पर्जन्यमानामुळे ऊसाखालील क्षेत्रात प्रत्येक वर्षी घट दिसून आली. या संकटास तोंड देण्यासाठी कारखान्याने कार्यक्षेत्रात व कार्यक्षेत्राबाहेर ८० कि.मी. पर्यंत ज्या शेतकऱ्यांना हमखास पाण्याची सोय आहे, अशा शेतकऱ्यांना 'बेसलडोस' योजनेअंतर्गत ऊस लागवडीसाठी बेणे व आवश्यक खते पुरविली व याचा परिणाम म्हणजे एकूण १,४०० हेक्टरवर नवीन लागवडीचा ऊस तयार झाला. सन २००६-०७ या वर्षी पन्नगेश्वर साखर कारखान्याची एकूण सभासद संख्या २,५६१ असून कारखान्याचे एकूण प्रत्यक्ष भागभांडवल रु.१२ कोटी १७ लाख ७९ हजार इतके आहे.

सहवीज निर्मिती : कारखान्याच्या दैनिक १,००० मे.टन गाळप क्षमतेचा विचार करून (स्वत: पुरते) ६ मे.वॅ.चा सहवीज निर्मिती प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. कारखान्यासाठी वीज वापरून अतिरिक्त वीज शिल्लक राहिल्यास वीज खरेदीचा करार महाराष्ट्र राज्य वीज मंडळाशी करण्यात आलेला आहे.

उपउत्पादन प्रक्रिया प्रकल्प : कारखान्यात तयार होणाऱ्या मोलॅसेस या उपउत्पादनावर प्रक्रिया करणारी डिस्टीलरी व इथेनॉल प्रकल्प सुरू करण्यास मान्यता मिळविण्यासाठी प्रस्ताव करण्यात आले आहेत. तथापि, अद्याप हे प्रकल्प सुरू करण्यात आले नाहीत. त्यामुळे कारखान्यात तयार होणारे मोलॅसेस हे उप उत्पादन परळी येथील बैद्यनाथ कारखान्यातील इथेनॉल प्रकल्पास तसेच औरंगाबाद व धर्माबाद इत्यादी ठिकाणी पाठविले जाते.[३७]

३६. पन्नगेश्वर शुगर मिल्स लि., पानगाव यांचा वार्षिक अहवाल, सन २००१-२००२, पृ. ८,१०,३२.

३७. पन्नगेश्वर शुगर मिल्स लि., पानगाव यांचेकडून प्राप्त माहिती आणि सन २००६-२००७ मधील दर्शनिका विभागाच्या सर्वेक्षणावर आधारित.

खाद्य तेलाचे उत्पादन : अगदी अलिकडच्या काळापर्यंत घाण्यावर तेल गाळणे हे येथील तेल्यांच्या उपजीविकेचे साधन होते. घाणीतेलाची चव यंत्रावर गाळलेल्या तेलापेक्षा अधिक रुचकर असते म्हणूनच या उद्योगात अनेक स्थित्यंतरे होऊनही काही प्रमाणात ग्रामीण तेल उद्योग टिकून आहे. तेलगिरण्यांपुढे तेलघाणीचा निभाव न लागल्याने त्या हळूहळू बंद पडू लागल्या. त्यांच्या पारंपरिक उद्योगाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्रीय खादी ग्रामोद्योग आयोगाने ग्रामीण तेल उद्योगाला खास प्रोत्साहन दिले. त्यांच्या उत्पादनात वाढ व्हावी यासाठी खादी ग्रामोद्योग आयोगाने संशोधन करून बैलघाणी ऐवजी विजेवर चालणा-या घाणीचे वितरण सुरू केले.[३८] या योजने अंतर्गत त्यांना जिल्ह्यात देण्यात आलेल्या आर्थिक साह्याची माहिती कुटिरोद्योग या शीर्षकाअंतर्गत 'ग्रामीण तेल उद्योग' या उपशीर्षकाखाली पुढे देण्यात आली आहे.

इ.स.१९५१ च्या जनगणनेनुसार तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात या उद्योगात एकूण १,४०४ व्यक्ती कार्यरत होत्या. तर १९६१ च्या जनगणनेनुसार खाद्यतेल गाळण्याच्या उद्योगात एकूण ९६९ व्यक्ती कार्यरत होत्या. त्यापैकी ८७७ पुरुष तर उर्वरित महिला कामगार होते.[३९]

सन १९५० नंतर उदगीर येथे सुरू झालेल्या फिरोज सेठना इंडस्ट्रिज या जिनिंग कारखान्याचे दरवर्षी जिनिंगचे हंगामी स्वरुपाचे काम संपले की उर्वरित काळात खाद्य तेल निर्मिती करण्याचे कार्य केले जाई. त्या कारखान्यात ४ एक्स्पेलर होते. या कारखान्याची दररोज २० टन खाद्यतेल निर्मितीची क्षमता होती.[४०]

सन १९६१ मध्ये जिल्ह्यात वनस्पतीजन्य तुपाखेरीज इतर खाण्याच्या तेलाचे उत्पादन करणारे १५ कारखाने सुरू होते. त्यापैकी माहिती देणाऱ्या ११ कारखान्यात काम करणारे प्रौढ व तरुण पुरुष आणि स्त्रिया यांची एकूण संख्या ७४५ होती. या वर्षी सदर कारखान्यांमध्ये या सर्व कामगारांकडून १ लाख १० हजार ७५५ श्रमदिवस काम झाले. माहिती न दिलेल्या ४ कारखान्यांतील कामगारांची संख्या ५० होती.[४१]

तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा हा भुईमूग उत्पादन करणारा महत्वाचा भाग होता. सन १९६१-६२ मध्ये जिल्ह्यातील लागवडीखाली असलेल्या एकूण निव्वळ २५ लाख ७७ हजार ५०० एकर क्षेत्रापैकी भुईमूग पिकाखालील क्षेत्र जवळपास ३ लाख १३ हजार ७०० एकर इतके होते. तर जवसाखालील क्षेत्र ५९ हजार २०० एकर होते. यामुळे साहजिकच तेल गाळण्याच्या उद्योगाला प्रोत्साहन मिळाले. १९५० ते १९६५ या काळात या भागात पावसाचे प्रमाण चांगले राहिले. त्यामुळे या काळात जिल्ह्यात ऑईलमिल (तेलगिरण्या) मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या व हा उद्योग जिल्ह्यातील प्रमुख उद्योगांपैकी एक महत्वाचा उद्योग बनला. याच काळात चाकूर या खेडेवजा गावातही एक तेलगिरणी सुरू झाली होती. पुढे काही वर्षांनी पावसाचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे शेतकरी पर्यायाने डाळीचे पीक अधिक घेऊ लागले. तथापि, शेतकरी सूर्यफूल, सोयाबीन, जवस, करडई अशी कमी पाण्यावर येणारी खाद्यतेल बियांची पिके घेण्याकडे वळणे क्रमप्राप्त होते. सन १९६१ याच वर्षी जिल्ह्यात लातूर येथे मध्यम उद्योग क्षेत्रातील दोन तेलगिरण्या सुरू होत्या त्यात अनुक्रमे ७५ व ९५ कामगार कामास होते. सन १९६३ पासून जिल्ह्यात खऱ्या अर्थाने मोठ्या उद्योगाची सुरुवात झाली आणि तेही प्रामुख्याने सहकारी क्षेत्रातील उद्योगाची सुरुवात झाली. कृषि उत्पादकांचा आर्थिक विकास घडवून आणणे हा त्यामागचा उद्देश होता. ९ ऑगस्ट १९६३ रोजी लातूर येथे 'को-ऑपरेटिव्ह ऑईल मिल लि., लातूर' या संस्थेची नोंदणी करण्यात आली. ती पुढे सन १९७८ मध्ये बंद पडली.

---

३८. तोंडारे, एस.जी. लातूर जिल्ह्यातील शेतीवर आधारित उद्योग,उदगीर प्रिंटिंग प्रेस, उदगीर, पृ.२२, २३.
३९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ.४४५.
४०. सन २००६-०७ च्या दर्शनिका विभागाच्या सर्वेक्षणावर आधारित.
४१. **भारतीय जनगणना**, **जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ-उस्मानाबाद**, १९६१, पृ.२२६-२७.

इ.स.१९६४ मध्ये जिल्ह्यात १७ तेलगिरण्या उत्पादनाखाली होत्या. त्यापैकी ८ तेलगिरण्या एकट्या लातूरमध्ये कार्यरत होत्या. वरील १७ पैकी काही तेल गिरण्यांमध्ये कापसाचे जिनिंग आणि प्रेसिंग मशीन देखील होत्या. अशा तेलगिरण्यांमधील कापसाचे वटणी व दाबणी घटकांचे कार्य हे हंगामी स्वरुपाचे होते. काही फॅक्टरी ह्या भुईमूग शेंगा फोडण्याचे कार्य देखील करत असत. वरील लातूर येथील तेलगिरण्यांच्या संख्येत सहकारी क्षेत्रातील उपरोक्त डालडा फॅक्टरीचाही समावेश होता. सदरील माहिती प्राप्त १७ खाद्यतेल उद्योग संस्थांचे एकत्रित स्थिर भांडवल रु.१ कोटी ४१ लाख ६४ हजार ६८३ इतके होते. खेळते भांडवल रु.५३ लाख २० हजार इतके होते. या उद्योगसंस्थातील काम हे कमी-अधिक प्रमाणात हंगामी स्वरुपाचे होते. त्यामुळे कामगार हंगामी स्वरुपात कामावर घेतले जात असत. कुशल कामगारांना त्याकाळात (१९६४-६५) त्यांच्यावर सोपविण्यात येणाऱ्या कामाच्या स्वरूपावर आधारित रु.१२५ ते रु.३०० दरम्यान प्रतिमहिना मजूरी दिली जात होती. अकुशल पुरुष कामगारांना रु.१.७५ ते रु.२.०० दैनिक मजूरी दिली जात असे. तर, अकुशल स्त्री कामगारास दैनिक मजूरी रु.१.२५ ते १.५० या दरम्यान दिली जात असे.[४२]

लातूरचा उस्मानाबाद जिल्ह्यात समावेश असतानाही लातूर ही भुईमूगाच्या व्यापाराची महत्त्वाची बाजारपेठ होती. १९६९-७० च्या सुमारास जिल्ह्यात (आजच्या लातूर जिल्ह्यातील इतर भागात आणि लातूर तालुक्यातही) मोठया प्रमाणावर क्षेत्र तेलबियांच्या पिकाखाली होते. त्यात भुईमूग, करडई, जवस इत्यादी गळीतांची पिके होती. त्यावर्षी लातूर तालुक्याच्या एकूण लागवड योग्य क्षेत्राच्या १८.७०% पेक्षा जास्त क्षेत्र तेलबीयाखाली होते. तर भुईमूग हे पीक लातूर तालुक्यात लागवड योग्य क्षेत्राच्या ८.३६ % क्षेत्रात घेतले गेले. म्हणजेच तालुक्यात ४,३१५ हेक्टर क्षेत्रात भुईमूग घेतले गेले. भुईमूग हे पीक नगदी पीक मानले गेले. येथील तेलबीयांच्या मोठया प्रमाणावरील उत्पादनामुळे येथे तेलबीयाच्या प्रक्रिया व तेल काढण्याच्या उद्योगाला लातूरच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान निर्माण झाले.

सन १९६९ मध्येही लातूरात ८ तेल गिरण्या सुरू होत्या. त्याबाबत वर थोडक्यात सांख्यिकीय माहिती आलेली आहेच. सदरील काळात लातूर बाजारपेठेतून भुईमूगाची व उपरोक्त तेलगिरण्यातील उत्पादित भुईमूग तेलाची इतर भागात निर्यात केली जात असे. हे खाद्यतेल बॉम्बे (मुंबई), पुणे, सोलापूर, जालना आणि अमळनेर येथे निर्यात केले जाई. भुईमूगाच्या ढेपीला (पेंढ) पुणे, अहमदनगर, कोल्हापूर व औरंगाबाद येथे चांगली मागणी होती.

लातूर येथे सन १९६४ मध्ये अस्तित्वात आलेल्या लातूर सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये उभारण्यात आलेल्या काही उद्योगांचे उत्पादन १९६८ ला सुरू झाले. त्यात लघुउद्योग क्षेत्रातील ३ तेलगिरण्यांचे उत्पादन १९६८ ला सुरू झाले होते. या तीन तेलगिरण्यांमध्ये ३१ मार्च १९७१ रोजी एकूण १४ कामगार कामास होते. तीन तेल गिरण्यातील १४ कामगारापैकी ३ प्रशासकीय कामावर, ३ कुशल कामगार व ८ अकुशल कामगार अशी त्यांची वर्गवारी होती. या तीन तेलगिरण्यांचे त्यावर्षी एकूण भांडवल रु.१ लाख १० हजार ४२३ इतके होते. त्यापैकी एकूण स्थिर भांडवल रु.७६ हजार ८०० होते तर एकूण खेळते भांडवल रु.३३ हजार ६२३ होते.[४३]

---

४२. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ.४४४ ते ४४६ आणि भिंगे, सुभाष, दयानंद कला महाविद्यालय,लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

४३. कुलकर्णी, पुरुषोत्तम रामचंद्र यांचा अप्रकाशित शोधनिबंध (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद), 'इंडस्ट्रिअल इस्टेट इन मराठवाडा रिजन'-१९७३, पृ.२५७-५८, २६९ ते २७५ आणि **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**-१९७२, पृ.४९३.

इ.स.१९६७-६८ मध्ये लातूर सहकारी औद्योगिक वसाहतीत 'किशोर ऑईल मिल' व 'किरण ऑईल मिल' या दोन तेलगिरण्यांचे उत्पादन सुरू झाले. या तेलगिरण्यात खाद्य तेलबियांपासून खाद्य तेल व पेंढीचे उत्पादन तयार करण्यात येते. या दोन्ही तेलगिरण्यांमध्ये सन २००४-०५ मध्ये गुंतविलेले एकूण भांडवल रु.४ लाख ५० हजार होते. या गिरण्यांमध्ये या वर्षी एकूण रु.३ लाख ५० हजाराचा कच्चा माल वापरून एकूण रु.५ लाख ५० हजार किंमतीचे उत्पादन तयार करण्यात आले. सन १९७२ मध्ये लातूर येथे 'मे.पपरूनिया इंडस्ट्रिज' आणि 'मे.कांचन ऑईल इंडस्ट्रिज' या दोन खाद्य तेल व पेंढ तयार करणाऱ्या तेलगिरण्या सुरू झाल्या. सन १९७५ मध्ये लातूर येथे 'मे.कपील ऑईल मिल' सुरू झाली. १९८१ मध्ये लातूर येथे 'मे.व्यंकटेश उद्योग' या नावाने खाद्य तेल निर्मितीची तेलगिरणी सुरू झाली. सन १९८२ मध्ये 'भानू ऑईल मिल', १९८३ मध्ये 'गोदावरी ऑईल मिल', १९८५ मध्ये 'मे.ललित ऑईल मिल' हया खाद्य तेल व पेंढ तयार करणाऱ्या तेलगिरण्या लातूर येथे सुरू झाल्या. सन १९८६ मध्ये उदगीरजवळील लोणी येथे उदयगिरी सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये 'मे.कुमारस्वामी ऑईल मिल' ही खाद्य तेल व पेंढ तयार करणारी तेलगिरणी सुरू झाली. सन १९७२ पासून सुरू झालेल्या वरील नावे दिलेल्या ८ तेलगिरण्यांतील सन २००४-०५ मधील गुंतविलेले एकूण भांडवल रु.८६ लाख ५० हजार इतके होते. त्यात या वर्षी रु.६९ लाख ४० हजार किंमतीचा कच्चा माल वापरण्यात आला व तयार झालेल्या उत्पादनाची किंमत रु.१ कोटी ७ लाख ५० हजार इतकी होती. या सर्वांमध्ये मिळून काम करणाऱ्या एकूण कामगारांची संख्या ४३ होती.[४४]

जिल्ह्यातील कृषिबाजारपेठेत सन १९८४-८५ मध्ये तेलबियांची आवक २ लाख ५९ हजार ३६९ क्विंटल इतकी होती. त्यात सूर्यफूल व भुईमूग यांची आवक सर्वात जास्त होती. त्यावरूनही जिल्ह्यात खाद्यतेल तयार करणाऱ्या कारखान्यांना मोठया प्रमाणावर वाव होता हे दिसून येते. सन १९८४-८५ च्या सुमारास लातूर जिल्ह्यात तेलघाणी व तेल गिरण्या यांची संख्या बरीच होती. जिल्ह्यात एकूण ११८ तेलघाणी व ४९ तेलगिरण्या सुरू होत्या. त्यापैकी लातूर तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे १०८ तेलघाणी (मुरूड येथेही तेलघाणी होत्या) आणि ३५ तेलगिरण्या सुरू होत्या. उदगीर येथे २ तेलघाणी व १२ तेलगिरण्या सुरू होत्या. अहमदपूर येथे ५ तेलघाणी सुरू होत्या. निलंगा तालुक्यात एक तेलगिरणी आणि ३ तेलघाणी सुरू होत्या. औसा तालुक्यात एक तेलगिरणी सुरू होती परंतु यावर्षी तेथे एकही तेलघाणी सुरू नव्हती. या उद्योगामुळे जिल्ह्यात सुमारे ८०० ते ९०० स्त्री-पुरूषांना रोजगार उपलब्ध झाला.[४५]

इ.स.१९८९ मध्ये लातूर येथे 'मे.एस.के.ऑईल मिल' व उदगीर जवळील लोणी येथे 'मे.सरस्वती ऑईल मिल' या दोन तेल गिरण्यांचे उत्पादन सुरू झाले. या दोन तेलगिरण्यांमध्ये सन २००४-०५ मध्ये गुंतविलेले एकूण भांडवल रु.५८ लाख होते त्यामध्ये (दोन्ही गिरण्यांमध्ये) एकूण रु.६१ लाख किंमतीचा कच्चा माल वापरण्यात आला आणि एकूण रु.९२ लाख किंमतीचे उत्पादन तयार करण्यात आले. या दोन्हीमध्ये एकूण २७ कामगार कामास होते. सन १९९१ मध्ये लातूर येथे 'अंबर ऑईल मिल', 'कंठे उद्योग', 'बि.एन.पोखरणा ऑईल मिल', देवणी येथे 'न्यू बालाजी ऑईल मिल', अशा चार तेलगिरण्या सुरू झाल्या. सन १९९२ मध्ये लातूर येथे 'अन्नपूर्णा उद्योग', 'राच्चमा ऑईल', हे खाद्य तेल व पेंढ तयार करणारे कारखाने सुरू झाले. सन १९९१ पासून सुरू झालेल्या वरील नावे दिलेल्या ६ तेलगिरण्यांतील सन २००४-०५ मधील एकूण स्थिर भांडवल रु.१२ लाख ६६ हजार होते. एकूण खेळते भांडवल रु.२६ लाख होते.सदरील ६ तेलगिरण्यांमध्ये उत्पादित झालेल्या उत्पादनाची एकूण किंमतरु.३कोटी ८८ लाख ८२ हजार होती आणि त्यावर्षी या सर्व तेलगिरण्यांमध्ये मिळून एकूण ४६ कामगार कामावर होते. या तेल

४४. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
४५. तोंडारे, एस.जी. पूर्वोक्त, पृ.२३.

अनुक्रमणिका

गिरण्यांपैकी दोन खाद्यतेल उत्पादन करणाऱ्या कारखान्यांतील उत्पादन रु.१ कोटीपेक्षाही अधिक होते. त्यांचा उत्पादित माल अन्य शहरांमध्येही पाठविला जातो तर इतर तेलगिरण्यांचे उत्पादन स्थानिक पातळीवर विक्री करण्यात येते.[४६] सन१९९४ मध्ये जिल्ह्यातील सर्व शहरात व मोठ्या खेड्यात२० ते ६० अश्वशक्तीवर चालणारे ऑईल एक्स्पेलर्स होते. अलिकडे द्रावण पध्दतीने तेल तयार करणारे निर्यातक्षमता असलेले दोन मोठे खाद्यतेल प्रकल्प जिल्ह्यात उभारण्यात आलेले आहेत. दोन्ही प्रकल्पांची प्रतिदिन सुमारे ७०० टन कच्चा माल कन्झ्यूम करण्याची क्षमता आहे. या दोन प्रकल्पांपैकी एक प्रकल्प'मे.किर्ती सॉल्वेक्स लि.'लातूर हा आहे. तर दुसरा प्रकल्प 'टिना ऑईल अॅन्ड केमीकल्स लि.,' लातूर हा आहे. सन १९९८ मध्ये या दोन्ही मोठया उद्योगक्षेत्रातील कारखान्यांतील एकूण गुंतवणूक रु.१५ कोटी ९८ लाख होती. सन २००३-०४ मध्ये 'मे.किर्ती सॉल्वेक्स लि.' या खाद्य तेल निर्मिती कारखान्यात एकूण गुंतविलेले भांडवल रु.५ कोटी १९ लाख होते. त्यात त्यावर्षी ३५ कामगार कामावर होते. यात सॉल्व्हंट एकस्ट्रक्शन खाद्य तेल तयार केले जाते. या कारखान्याची उत्पादन क्षमता प्रतिदिन १५० मे.टन इतकी आहे. तसेच 'टिना ऑईल अॅन्ड केमीकल्स लि.' हया निर्यातक्षम उद्योगात सॉल्व्हंट एक्स्ट्रक्शन खाद्यतेल निर्माण केले जाते. या कारखान्यात सन २००३-०४ मध्ये गुंतविलेले भांडवल रु.२५ कोटी होते व ८५ कामगार कामावर होते. या कारखान्याची उत्पादनक्षमता प्रतिवर्ष ४८ हजार मे.टन इतकी आहे.[४७]

इ.स.१९९५ मध्ये इतर खाद्य (वनस्पती तूप वगळून) तेलाचे उत्पादन करणारे लातूर जिल्ह्यात नोंदणी झालेले २३ कारखाने होते त्यापैकी ५ कारखाने बंद होते. सुरू असलेल्या १८ कारखान्यात एकूण २७४ कामगार कामावर होते. त्यात २५६ पुरुष कामगार व १८ स्त्री कामगार होते. त्यांनी त्यावर्षी ६९ हजार ७१६ श्रमदिवस काम केले.[४८]

सन १९९५-९६ च्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणाच्या निकषास पात्र असणारे सदर सर्वेक्षणानुसार लातूर जिल्ह्यात ३ उद्योग संस्था खाद्य तेलनिर्मिती क्षेत्रात कार्यरत होत्या. त्यावर्षी त्यातील स्थिर भांडवल रु.५ कोटी ४० लाख ६१ हजार होते. खेळते भांडवल रु.५० लाख ६८ हजार होते. गुंतविलेले भांडवल रु.९ कोटी ८५ लाख ९६ हजार इतके होते. त्यात एकूण २४ कामगार कामावर होते. त्यात सदर वर्षी कामगारांच्या वेतनावर रु.७९ लाख ८५ हजार खर्च झाले. इंधनावरील खर्च रु.२ कोटी, ५ लाख ५२ हजार इतका होता आणि रु.८० कोटी ७६ लाख ८ हजार किंमतीचा कच्चा माल वापरण्यात येवून मुख्य व उपउत्पादनासह एकूण रु.८७ कोटी ७२ लाख ३५ हजार किंमतीचे उत्पादन करण्यात आले. या उद्योगसंस्थांना त्यावर्षी रु.१ कोटी १८ लाख ७४ हजाराचा निव्वळ नफा झाला.

इ.स.१९९८ मध्ये लातूर येथे 'लक्ष्मी इंडस्ट्रिज', हा आणि 'मे.ओंकार' असे दोन खाद्य तेल व पेंढ तयार करण्याचे कारखाने सुरू झाले. त्यात सन २००४-०५ यावर्षी गुंतविण्यात आलेले एकूण भांडवल रु.७ लाख होते त्यावर्षी त्यात एकूण रु.७ लाख ८० हजार किंमतीचा कच्चा माल वापरण्यात आला आणि उत्पादित झालेल्या मालाची एकूण विक्री किंमत रु.९ लाख इतकी मिळाली. त्यावर्षी या दोन्ही कारखान्यात मिळून एकूण ८ कामगार कामावर होते.[४९]

---

४६. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर आणि उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

४७. **संपदा** मासिक : औद्योगिक मराठवाडा विशेषांक-संपदा सुवर्ण महोत्सवी अंक-औरंगाबाद, सप्टेंबर १९९४, पृ.१५ आणि महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

४८. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा**-१९९५-९६, पृ.६१.

४९. उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

अनुक्रमणिका

इ.स.१९९९-२००० मध्ये जिल्ह्यात सोयाबीन, करडी, जवस, तीळ, सूर्यफूल व इतर गळीत धान्य यांची पीके एकूण ९५,२३९ हेक्टर इतक्या प्रचंड क्षेत्रावर घेतली गेली. त्यामुळे जिल्ह्यात सुरू असणाऱ्या खाद्य तेल उद्योगास लागणारा कच्चा माल मोठ्या प्रमाणावर जिल्ह्यातच उपलब्ध झाला. सन २००३ मध्ये खाद्यतेल, वनस्पती व शुध्दीकरण करणारे जिल्ह्यात नोंदणी झालेले ३१ कारखाने होते. परंतु यावर्षी त्यापैकी एकूण २२ तेल कारखाने बंद होते. चालू असलेल्या ९ कारखान्यात एकूण २२२ कामगार कामावर होते.[५०]

इ.स.२००५-०६ मध्ये जिल्ह्यात मध्यम व मोठ्या स्वरूपातील प्रस्थापित उद्योग क्षेत्रात समावेश असलेले ३ सॉल्व्हंट एक्स्ट्रक्शन कारखाने सुरू होते. त्यात त्यावर्षी एकूण गुंतवणूक रु.३८ कोटी ३१ लाखाची होती. तर १६५ कामगार त्यात कामावर होते.

ग्रामीण तेल उद्योगात रोजगाराची प्रचंड क्षमता आहे. आज खाद्य तेलाच्या मिल उद्योगात ८० टक्के तेलबीया गाळले जातात व त्याची रोजगार पुरविण्याची क्षमता महाराष्ट्रात एक लाखाच्या आसपास आहे. तर २० टक्के तेलबिया गाळण्यासाठी ग्रामीण तेल उद्योग महाराष्ट्रात ५ लाख लोकांना काम देत आहे. १०० टक्के तेलबिया तेल्यांना खाद्यतेल गाळण्यासाठी मिळाल्या तर, देशातील १० ते १२ लाख लोकांना रोजगार मिळेल. जिल्ह्यातही खाद्य तेलाचे उत्पादन करणाऱ्या ग्रामीण तेल उत्पादकानांही प्रोत्साहन दिल्यास या उद्योगाला उज्वल भविष्य आहे. लातूर जिल्ह्यात खाद्यतेल या उद्योगातील दुय्यम उत्पादन असणाऱ्या साबण उद्योगालाही भवितव्य आहे. त्याप्रमाणे जिल्ह्यात सोयाबीनचे मोठया प्रमाणावर उत्पादन होत आहे. परंतु शेतकऱ्यांना अपेक्षीत किंमत मिळत नाही. अशा सोयाबीनवर आधारित आधुनिक तेलगिरण्या, सोयाबीनपासून सोयाबीन पनीर, सोयाबीनचे दूध, सोयाबीन खारी, डाळ, सोयाबीन पीठ व सोयाबीन पासून इतर प्रोटीनयुक्त खाद्यपदार्थ बनविणाऱ्या उद्योगासाठी भरपूर वाव आहे. जिल्हयात खाद्यतेल उत्पादनासाठी उपलब्ध असलेली अनुकूल परिस्थिती व या उद्योगास येथे असलेले उज्वल भविष्य लक्षात घेऊन सन २००७ मध्ये राज्यशासनाने जिल्ह्यात लातूर येथे 'विशेष तेलक्षेत्र', निर्माण करण्याची घोषणा केली आहे.[५१]

को-ऑपरेटिव्ह ऑईल इंडस्ट्रीज लि.लातूर (डालडा फॅक्टरी): या डालडा उत्पादन करणाऱ्या जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रातील पहिल्या उद्योग संस्थेची ९ ऑगस्ट १९६३ रोजी नोंदणी करण्यात आली. या संस्थेचे कार्यक्षेत्र तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा हे होते, तर लातूर जिल्हा निर्मिती (१९८२) नंतरही लातूर जिल्हा आणि उस्मानाबाद जिल्हा असे दोन जिल्ह्यासाठी होते. या संस्थेच्या प्रकल्पाच्या स्थापनेच्या वेळी संस्थेच्या कार्यक्षेत्रात भुईमूग पीकाचे उत्पादन मोठया प्रमाणावर होत असल्याने त्यापासून या कारखान्यात प्रामुख्याने डालडा उत्पादित केला जात असे. हा कारखाना सुरू झाला त्यावर्षी या उद्योगसंस्थेचे एकूण भागभांडवल रु.२२ लाख ३७ हजार २३१ इतके होते. त्यावर्षी त्यातील एकूण कामगार संख्या ३२५ होती. सुरुवातीस या संस्थेच्या मालकीची एकूण ११२ एकर ६ गुंठे जमीन होती. या कारखान्यात तयार केल्या जात असलेल्या विविध उत्पादनाची दर दिवसाची उत्पादन क्षमता पुढीलप्रमाणे होती.

अ.क्र.	उत्पादन	दरदिवशी (टनामध्ये)
१	सॉल्वंट	४०.००
२	हायड्रोजिनेशन	३०.००
३	साबण उद्योग उत्पादन	००.५०
४	टिन कंटेनर्स	१००० (नग)

५०. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा**, सन २००३-०४, पृ.५९.

५१. तोंडारे, एस.जी. पूर्वोक्त पृ.२४ आणि लातूर जिल्हा कृती आराखडा (जिल्हा उद्योगकेंद्र, लातूर), सन २००५-०६ ते २००९-१०.

या उद्योग संस्थेचा संपूर्ण आशिया खंडामध्ये सहकारी तत्वावर चालणारी पहिली संस्था म्हणून नावलौकिक होता. पुढे काही वर्षे ही संस्था चांगल्या प्रकारे चालली. तथापि, कालांतराने जिल्ह्यातील पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे भुईमूग पिकाचे उत्पादन घटत गेले. परिणामत: या कारखान्यातील उत्पादनातही घट होऊन संस्था कर्जबाजारी झाली. त्यामुळे हा कारखाना सन १९७८ मध्ये बंद पडला आणि तो २७ फेब्रुवारी १९७८ मध्येच प्रथम अवसायनात घेण्यात आला. त्यानंतर अवसायन कालावधीमध्ये हा कारखाना चालू ठेवण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार सन १९८५ मध्ये मॉसिकॉल या संस्थेने या डालडा कारखान्याची संपूर्ण मालमत्ता ताब्यात घेण्याचा निर्णय घेऊन ह्या कारखान्याची चाचणी घेतली. त्यात त्यांना यश आले नाही त्यामुळे शासनाने पुन्हा दि.२५ ऑगस्ट १९८८ रोजी हा कारखाना 'वेस्टर्न इंडिया प्रॉजेक्ट कन्सल्टन्शी लि.'मुंबई यांना भाडे तत्वावर चालविण्यासाठी देण्याचा निर्णय घेतला. तथापि, तांत्रिक अडचणीमुळे हा निर्णय अमलात येऊ शकला नाही. पुढे हा कारखाना तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार नाही अशी धारणा झाल्याने शासनाने जिल्हाधिकारी लातूर यांच्या अध्यक्षतेखाली अवसायन कार्य संपुष्टात आणणेसाठी मॉनिटरिंग कमिटी नियुक्त केली. या कमिटीने संस्थेची अतिरिक्त स्थावर व जंगम मालमत्ता विक्री केली. या विक्रीमधून रु.१ कोटी २३ लाख २ हजार ८८१ इतकी रक्कम वसूल झाली. या रक्कमेमधून संस्थेची वेगवेगळी देणी चुकती करून रु.१ कोटी अतिरिक्त रक्कम शिल्लक राहिली होती. पुढे शासनाने १९९७ मध्ये या संस्थेवर अवसायकाचे सल्लागार मंडळ नियुक्त केले. या सल्लागार मंडळाने या संस्थेच्या उपरोक्त शिल्लक रु.१ कोटी निधीमधून या संस्थेचा कारखाना चालू करण्याचा प्रयत्न केल्यामुळे दि.१७ सप्टेंबर १९९७ रोजी शासनानेही पुन्हा एकदा या कारखान्याचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय घेऊन त्यावर प्रशासकीय मंडळाची नियुक्ती केली. या प्रशासकीय मंडळाने या उद्योगसंस्थेतील ऑईल मिल विभाग, जिनिंग विभाग (काही काळ कापूस वटणीचेही काम त्यात चालत असे.) तसेच रिफायनरी विभाग चालू करून काही अंशी कारखान्याचे कामकाज चालू केले. परंतु ही संस्था पुन्हा तोट्यात गेली. त्यामुळे ९ ऑगस्ट २००२ ला शासनाने सदरील प्रशासकीय मंडळ बरखास्त करून पुन्हा ही संस्था अवसायनात घेतली. ही उद्योगसंस्था प्रथम बंद पडली तेव्हा या संस्थेचे एकूण भागभांडवल रु.११ लाख ५ हजार ७१ इतके होते. सदर डालडा फॅक्टरी या नावाने ओळखला जाणारा कारखाना पुनरुज्जीवीत करण्याचे अनेक प्रयत्न झाले परंतु त्यास यश न आल्याने सदर संस्था आता कायमची बंद झाली आहे व अवसायन कार्य पूर्ण करण्यात येत आहे.[५२]

दुग्ध उत्पादन व दुग्धजन्यपदार्थ तयार करणे : दूध हे मानवाच्या सुदृढ वाढीसाठी एक अतिशय महत्त्वाचे सकस आहार आहे. लातूर जिल्हा हा डोंगर टेकड्यांचा प्रदेश आहे. विशेषत: उदगीर तालुका व लगतचा प्रदेश हा डोंगराळ भूप्रदेश असून अनेक जातीचे गवत या डोंगरमाथ्या-पायथ्यावर येते. येथील मारवेल, काटे करवेल इत्यादी ३२ प्रकारच्या गवताच्या जातींची नोंद शास्त्रज्ञांनी केली आहे. हा भाग हिरव्या कुरणांसाठी प्रसिध्द आहे. येथील गवत जनावरांच्या पैदाशीस, त्यांच्या संगोपनास अतिशय पोषक आहे आणि म्हणूनच हंडरगुळी, देवणी व उदगीर येथे अशा एकूण तीन जनावरांच्या बाजारपेठा आहेत. येथे दर आठवड्यास जनावरांच्या खरेदी विक्रीसाठी मोठा बाजार भरत असतो. देवणी जातीचा बैल तर अखिल भारतीय पशु प्रदर्शनात अनेक वेळा चॅम्पियन ठरलेला आहे. उत्पादनवाढीसाठी आता होस्टिन व जर्सी क्रॉसबीड करिता देवणी जातीच्या गायीस अग्रक्रम मिळाला आहे. यामुळे देखील येथे मोठ्या प्रमाणावर दूध उत्पादन होते. येथील दूध उत्पादन हा शेतीवर आधारित पुरक व्यवसाय आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान

५२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या माहितीवर तसेच भिंगे सुभाष, प्राध्यापक, दयानंद कला महाविद्यालय यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

दूध व्यवसायामुळे सुधारण्यास मोलाचे सहाय्य झाले. लातूर जिल्ह्यातील उदगीरचा डेअरी उद्योग हा खेड्यातील गरीब शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन बनला आहे. २० व्या शतकाच्या प्रारंभापासून उदगीरचा दुधापासून तयार केलेला 'खवा' (खोवा) प्रसिध्द आहे.

सद्यपरिस्थितीत लातूर जिल्ह्यानेही 'धवल क्रांतीची' जागा घेतली आहे. धवलक्रांतीसाठी या जिल्ह्याची नैसर्गिक परिस्थिती देखील पूर्णपणे अनुकूल आहे. उदगीर भागात दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते व तेथे सुरू करण्यात आलेल्या दुधावर प्रक्रिया करून दूध भुकटी तयार करण्याच्या प्रकल्पामुळे देखील उदगीरचे महाराष्ट्रातील 'डेन्मार्क' असे वर्णन केले जात होते. डेअरी व्यवसाय हा शास्त्रोक्त पध्दतीने केल्यास त्यापासून शेतीपेक्षा अधिक उत्पन्न मिळते त्यामुळे अलिकडे डेअरी हा व्यवसाय काहीजणांचा दुय्यम व्यवसाय न राहता तो प्रमुख व्यवसाय बनला आहे.

हा उद्योग शेतमजूर, शेतकरी, हमाल, रिक्षा आणि सुशिक्षित बेकार विद्यार्थी या सर्वांना रोजगार उपलब्धी करण्यासाठी फायद्याचा आहे. ह्या जिल्ह्यात दिवसेंदिवस डेअरी उद्योगाचे महत्त्व वाढत आहे आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळत आहे.[५३]

या भागातील शेतकऱ्यांचे जमीन धारण क्षेत्र कमी आहे त्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांकडे सर्व प्रकारची पशुधन संख्या कमीच आहे. त्यातही दूभती जनावरे देखील कमी संख्येनच असणार. दूध उत्पादन हा कृषि पूरक व्यवसाय असल्यामुळे शेतकरी प्रामुख्याने ग्रामीण भागातच राहतात आणि वैयक्तिकरित्या त्यांचेकडील कमी संख्येतील दुभत्या जनावराचे मिळणारे दूध देखील फारच अल्प प्रमाणात असल्यामुळे त्यांना त्या दूधाकरिता बाजारपेठ मिळवता येत नाही. शिवाय यासाठी शेतकऱ्यांना वेळ देखील मिळत नाही. त्यामुळे ही समस्या सोडविण्यासाठी गावपातळीवर सहकारी दूध संकलन संस्था किंवा सोसायट्या स्थापन झाल्या आणि त्या सोसायट्यांमार्फत दूध संकलन करून त्यास बाजारपेठ व दुधाला योग्य किंमत मिळवून दिली जाऊ लागली. या उद्देशासाठी जिल्ह्यातील उदगीर तालुक्यात (तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा) तोंडार या गावी जिल्ह्यातील पहिली दूध उत्पादक सहकारी संस्था, मर्यादित स्थापन करण्यात आली. या संस्थेने प्रत्यक्ष दूध संकलनास दिनांक ९.१२.१९६१ पासून सुरुवात केलेली आहे. सन १९९३-९४ पर्यंत या संस्थेची सभासद संख्या ८१९ व भागभांडवल रु.३५,०००/- होते. तर दूध संकलन २८० लिटर प्रतिदिन इतके होते. सदर दूध उत्पादक सहकारी सोसायटीच्या स्थापनेनंतर इतर ठिकाणीही अशा दूध उत्पादक सहकारी सोसायट्या स्थापन होऊ लागल्या.

जिल्ह्यात दूध उत्पादक सोसायट्या यशस्वीपणे कार्य करत होत्या. जेथे दुधाला खात्रीशीर मागणी होती अशा भागातील सोसायट्या अधिक यशस्वीपणे कार्य करू लागल्या. सन १९६३-६४ मध्ये जिल्ह्यात २७ दूध उत्पादक सहकारी सोसायट्या दोन दूध संघ आणि पाच तूप बनविणाऱ्या व एक खोवा (खवा) बनविणारी सोसायटी जिल्ह्यात कार्यरत होती. २७ दूध उत्पादक सोसायट्या आणि २ दूध संघ यांचे सदर वर्षी एकत्रित भागभांडवल रु.६९ हजार ७५२ होते. त्यांचा राखीव व इतर निधी रु.२ हजार ६४१ होता. खेळते भांडवल रु.१ लाख १९ हजार ८७५ इतके होते. त्यावर्षी त्यांनी खरेदी केलेल्या दुधाची किंमत रु.२ लाख ८८ हजार ८८१ होती, तर विक्री केलेल्या दुधाची किंमत रु.२ लाख ९७ हजार ५०७ इतकी प्राप्त झाली. सदर वर्षी सोसायट्या व संघ यांचा एकत्रित नफा रु.९ हजार २४१ इतका होता. सदर वर्षी तूप बनविणाऱ्या ५ सोसायट्यांचे ९१ सभासद होते. त्यांचे भागभांडवल रु.३०० होते. त्यांचे खेळते भांडवल

५३. तोंडारे, एस. जी. लातूर जिल्ह्यातील शेतीवर आधारित उद्योग, उदगीर प्रिंटिंग प्रेस, उदगीर, पृ.२६-२७.

रु.३४८ इतके होते.[५४] आणि खोवा (खवा) बनविणाऱ्या एका सोसायटीचे ४४ सदस्य होते. त्यांचे भागभांडवल रु.५०० होते, तर खेळते भांडवल रु.५४४ इतके होते.[५५]

सन १९६४-६५ पासून जिल्ह्यात उदगीर येथे शासकीय दूध योजना मलाई प्रकल्पाच्या रुपाने कार्यान्वित करण्यात आली. १९७१-७२ पासून मलाई प्रकल्पाचे रूपांतर दूध (संग्रह) योजनेत करण्यात आले. दूध योजनेत रूपांतर केल्यामुळे संकलित केलेल्या दुधावर प्रक्रिया करून दुधाची टिकावू क्षमता वाढवून मुंबई सारख्या शहरी भागात दुधाची वाहतूक करणे सोयीचे झाले. जिल्ह्यात दूधाचे संकलनात भरीव वाढ झाल्यामुळे अतिरिक्त शिल्लक दुधापासून व मराठवाड्यातील इतर जिल्ह्यातून येणाऱ्या अतिरिक्त दुधापासून दूध भुकटी तयार करता यावी म्हणून शासकीय दूध योजने अंतर्गत संपूर्ण शासनाची मालकी असलेल्या ११.७ मे.टन प्रतिदिन उत्पादन क्षमतेच्या दूध भुकटी (पावडर) प्रकल्पाची उदगीर येथे सन १९७८ मध्ये स्थापन करण्यात आली व त्यातील प्रत्यक्ष उत्पादनास सन १९७९ मध्ये सुरुवात झाली.

लातूर जिल्ह्यात मुलभूत सुविधा अंतर्गत दूध हाताळणी क्षमतेत वेळोवेळी वाढ करण्यात आलेली असून आज स्थितीत जिल्ह्यात मूलभूत सुविधा अंतर्गत पाच दूध शीतकरण केंद्रे व एक प्रक्रिया व दूध भुकटी प्रकल्प उदगीर येथे कार्यान्वित आहे. सद्या जिल्ह्याची प्रतिदिन दूध हाताळणी क्षमता १ लाख ८६ हजार लिटर इतकी आहे.

दूध हाताळण्यासाठी जिल्ह्यात असलेल्या दुग्धशाळा, त्यांचे स्थापना वर्ष, त्यातील यंत्रसामुग्री व त्यांची प्रतिदिन दुग्ध हाताळण्याची क्षमता पुढील प्रमाणे आहे.

(लिटर)

अ.क्र.	योजनेचे/केंद्राचे नाव	यंत्रसामुग्री	स्थापनावर्ष	हाताळणी क्षमता
१	शासकीय दूध योजना, उदगीर	दूध भुकटी प्रकल्प व दूध प्रक्रिया सयंत्र	५.११.१९७१	१,२०,०००
२	औसा	डेस्को (दूध थंड करण्याचे यंत्र) युनिट	१९.७.१९७७	२,०००
३	अहमदपूर	डेस्को (दूध थंड करण्याचे यंत्र) युनिट	१२.६.१९७८	२,०००
४	शिरुर ताजबंद	डेस्को (दूध थंड करण्याचे यंत्र) युनिट	११.११.१९७८	२,०००
५	निलंगा	डेस्को (दूध थंड करण्याचे यंत्र) युनिट	७.६.१९७८	१०,०००
६	लातूर*	शीत व डेस्को युनिट दूध प्रक्रिया सयंत्र	२४.८.१९९८	५०,०००
			एकूण	१,८६,०००

* दि.२३.८.१९९८ पर्यंत लातूर केंद्राची दूध हाताळणी प्रतिदिन क्षमता ४,००० लिटर होती.

जिल्ह्यात वरील ५ दुग्ध शीतकरण केंद्राकडून करण्यात आलेली प्रत्यक्ष दूध हाताळणी प्रतिदिन सन १९९१-९२ मध्ये ५८ हजार २१८ लिटर इतकी करण्यात आली. तर उदगीर केंद्रात दूध भुकटी उत्पादन त्यावर्षी २,१३३.६ मे.टन झाले आणि पांढरे लोणी उत्पादन १,२३२.३४ मे.टन झाले.

सन १९९५-९६ मध्ये या केंद्रात प्रतिदिन एकूण ५५ हजार १८४ लिटर दूध हाताळणी करण्यात आली. सन २००२-०३ मध्ये या केंद्रात प्रतिदिन ४५ हजार ७१६ लिटर प्रत्यक्ष दूध हाताळणी करण्यात

५४. जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
५५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ.४७२-७३.

आली. दि.३० जानेवारी २००३ पासून लातूर केंद्रातील दुग्ध हाताळणी प्रक्रिया महानंद यांचेकडे वर्ग करण्यात आले.

सन १९९३-९४ मध्ये जिल्ह्यात ६१४ नोंदणीकृत सहकारी दूध संस्था होत्या, त्यापैकी ३२६ दूध संस्था दूध संकलनाचे कामकाज करीत होत्या. दूध उत्पादकास दुधाच्या गुणप्रती प्रमाणे दूधाचे दर दिले जातात. हे दर महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार ठरविले जातात. जिल्ह्यात दूध सहकारी संस्था पातळीवर संकलित झालेल्या दुधाची वाहतूक सहकारी माध्यमातून लातूर जिल्हा दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ म., उदगीर मार्फत जिल्ह्यातील त्यावेळच्या ७ तालुक्यातून सकाळ व सायंकाळ पाळीत अनुक्रमे २७ व ३ असे एकूण दूध संकलन मार्गावरून वाहतूक करण्यात येते. सदरील वर्षीच्या आकडेवारीनुसार लातूर जिल्ह्यात उपलब्ध पशुधनाचा विचार केल्यास दुधाळ जनावरांपासून एकूण सुमारे ३ लाख ५७ हजार लिटर पेक्षाही अधिक लिटर दूध उत्पादन होणारे असल्यामुळे त्यापैकी सहकारी माध्यमातून सरासरी ३०,००० लिटर दूधाचे संकलन होत होते. शिल्लक राहिलेले दूध बाजारात खाजगी विक्रेत्यामार्फत विक्री केले जाते. त्यात लातूर जिल्ह्यात सहकारी माध्यमातून दूधगंगा दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संस्था म., मुरूड ता.जि.लातूर या संस्थेचे १०,००० लिटर प्रतिदिन क्षमतेचे एक शीतकरण केंद्र कार्यान्वित आहे. ते उस्मानाबाद जिल्हा दूध उत्पादक व पुरवठा संघ म., उस्मानाबाद मार्फत चालविण्यात येत असून दूध थंड केल्यानंतर मुंबई येथे महासंघामार्फत दूध विक्रीसाठी पाठविले जाते. या व्यतिरिक्त संस्थेच्या मालकीचा बर्फ कारखाना आहे. शासकीय दूध योजनेशिवाय इतर २ खाजगी संस्था स्वतंत्ररित्या दूध संकलन करीत आहेत. एक संस्था कपिला डेअरी लातूर ही खाजगी संस्था १०,००० लिटर प्रतिदिन क्षमतेसह कार्यान्वित आहे. दूसरी खाजगी संस्था मारुती डेअरी, लातूर-हरंगुळ रोड ही कार्यान्वित असून याची क्षमता ५००० लिटर आहे. या संस्था शासन दराप्रमाणे दूध खरेदी करून त्यावर प्रक्रिया करून स्वत:चे कपिला आणि मारुती या ब्रँड नावाने लातूर शहरात विक्री करतात.

जिल्ह्यात पहिला दुग्ध व्यवसाय सहकारी संघ दि.२४ सप्टेंबर १९८६ रोजी उदगीर येथे स्थापन झाला. त्यावर्षी त्याची सभासद संख्या ६९ व भागभांडवल रु.७५००/- होते.[५६] सन १९९८-९९ मध्येही हा एकच दुग्धव्यवसाय सहकारी संघ जिल्ह्यात कार्यान्वित होता. यावर्षी त्याची सभासद संख्या ४७२ होती. या वर्षात या संघामार्फत एकूण ७५ लाख ९५ हजार लिटर दुध संकलित करण्यात आले. याच वर्षी जिल्ह्यात दुग्ध उत्पादक सहकारी सोसायट्यांची संख्या ७०४ होती त्यांची एकूण सभासद संख्या ३६ हजार ७३० होती. या दुग्ध उत्पादक सहकारी सोसायट्यांनी यावर्षी एकूण ७५ लाख ९५ हजार लिटर दूध संकलित केले.[५७] सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यात एकूण १० तालुक्यातील नोंदणीकृत दुग्ध उत्पादक सहकारी सोसायट्यांची एकूण संख्या ८८५ होती. त्यांची सभासद संख्या ४५,१३५ असून त्यांचे एकूण भागभांडवल रु.४ लाख ९८ हजार ४६० इतके होते. यांचेकडून जिल्ह्यातील लातूर येथील महानंद यांचेकडे वर्ग केलेली योजना वगळता अन्य पाच शासकीय योजनाअंतर्गत यावर्षी एकूण प्रतिदिन २४ हजार २४५ लिटर प्रत्यक्ष दूध हाताळणी करण्यात आली. यावर्षी जिल्ह्याअंतर्गत वाटप झालेल्या दूधाची किंमत रु.३७ लाख ३८ हजार इतकी होती.[५८]

---

५६. जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
५७. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा लातूर**, १९९८-९९ पृ.१७२.
५८. जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

दिनांक ९ एप्रिल २००५ रोजी अहमदपूर तालुक्यात रुध्दा या गावानजीक 'राधिका मिल्कस्' हा खाजगी क्षेत्रातला दुधावर प्रक्रिया करून बायोप्रॉडक्स तूप, पनीर, चीज, चक्का, सुगंधी दूध, लस्सी इत्यादी उत्पादने तयार करण्याच्या उद्देशाने प्रकल्प सुरू करण्यात आला. यात म्हशीच्या दुधावर प्रक्रिया करून मराठवाड्यात उच्च प्रतीचे (६.०० फॅट) दूध उपलब्ध करून देणारा प्रकल्प आहे. पहिल्या वर्षी या प्रकल्पामध्ये दररोज सुमारे ५ हजार लिटर दुधाचे पाश्चरायझेशन करून ते पिशव्यामध्ये बंद करून ते बाजारात विक्री करण्यात आले. सद्या या प्रकल्पातील उत्पादनास प्रामुख्याने अहमदपूर येथील स्थानिक बाजारपेठेत या प्रकल्पामध्ये तयार करण्यात आलेल्या दूधाने भरलेल्या पिशव्यांची विक्री करण्यात येते.[५९]

शासकीय दूध योजना (दूध भुकटी प्रकल्प) उदगीर : हा प्रकल्प नोंदणीकृत असून सदर प्रकल्प १९७८ ला उभारण्यात आला असून प्रत्यक्ष दूध भुकटी व अन्य पदार्थ उत्पादनास सुरुवात झाली. तथापि, यापूर्वी देखील सुरुवातीस १९६४ मध्येच शासकीय दूध योजनेअंतर्गत तूप तयार करण्याचा प्रकल्प उदगीर येथे सुरू करण्यात आला. त्यानंतर १९७२ मध्ये दूध संग्रह प्रकल्प सुरू करण्यात आला आणि त्यानंतर सदरील दूध भुकटी प्रकल्प सुरू झाला. उदगीर येथील हा प्रकल्प पूर्णपणे महाराष्ट्र शासनाच्या मालकीचा असून त्याची संपूर्ण भांडवल गुंतवणूकही राज्य शासनाची आहे. प्रकल्पामध्ये वापरण्यात आलेली यंत्रसामुग्री ही मे.लार्सन अँड टुब्रो या कंपनीने उभारणी केलेली असून भारतीय बनावटीच्या यंत्रसामग्री बरोबरच काही सयंत्रे ही जर्मनी, डेन्मार्क येथून आयात केलेली आहेत. या प्रकल्पातील स्थिर भांडवल, खेळते भांडवल, एकूण गुंतविलेले भांडवल आणि यंत्र व सयंत्राच्या किंमतीची आकडेवारी सन १९८०-८१, १९९०-९१, २०००-०१ आणि २००५-०६ या वर्षासाठी खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

(रु.लाखात)

अ.क्र.	तपशील	१९८०-८१	१९९०-९१	२०००-०१	२००५-०६
१	स्थिर भांडवल	४,०८.६८	९,३२.८१	६,२०.०७	१०,४९.६६
२	खेळते भांडवल	३,१०.३२	१७,५०.२१	४०,३०.०३	११,४३.३७
३	एकूण गुंतलेले भांडवल	७,१९.००	२६,८३.००	४६,५०.१०	२१,९३.०३
४	यंत्र व सयंत्राची किंमत	१,५८.८०	१,४२.७९	१,११.१३	८१.६३

शासनाने औरंगाबाद विभागातील मुख्यत्वे लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या दुधासाठी बाजारपेठ उपलब्ध व्हावी. तसेच येथील शेतकऱ्यांना शेतीसाठी जोडधंदा उपलब्ध व्हावा म्हणून हा प्रकल्प सुरू करून शेतकऱ्यांना दूग्ध व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन दिले आहे. गाव पातळीवर सहकारी संस्थामार्फत दूध संकलन होऊन उदगीर प्रकल्पात प्रक्रियासाठी आणले जाते.

उदगीर प्रकल्पामध्ये मुख्यत्वे करून गायीचे दूध कच्चा माल म्हणून वापरले जाते. या गायीच्या दुधाचे फॅट किमान ३.५ % स्निग्धांश व ८.५% स्निग्धांश विरहित घनघटक एवढे असते. या दुधाची गुणप्रत तपासणी करण्यासाठी दुग्ध शाळेत अद्यावत प्रयोग शाळेची उभारणी केलेली आहे.

या प्रकल्पामध्ये कच्चा माल म्हणून गायीचे दूध लातूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड, परभणी या जिल्ह्यातील प्रकल्पांमधून उदगीर योजनेत इन्शुलेटेड दुग्धवाहिन्यातून आणले जाते व ही दूध पुरवठ्याची प्रक्रिया बारमाही स्वरुपाची आहे. कारखान्याची दूध स्वीकृतीची क्षमता प्रतिदिनी १ लाख २० हजार लिटर

५९. सन २००६-०७ च्या दर्शनिका विभागाच्या सर्वेक्षणावर आधारित.

असून भुकटी बनविण्याची क्षमता प्रतिदिन ११.७ मे.टन आणि पांढरे लोणी बनविण्याची क्षमता प्रतिदिन ५ मे.टन इतकी आहे. कारखान्यात सन १९८०-८१ मध्ये २०८ कामगार कामावर होते. त्यावर्षी रु.१३ लाख ७५ हजार त्यांच्या वेतनापोटी देण्यात आले. कामगारांची ही संख्या सन १९९५-९६ मध्ये वाढून ती ३५८ इतकी झाली व त्यावर्षी त्यांच्या वेतनावर कारखान्याने रु.१ कोटी ३९ लाख ३१ हजार खर्च केले. पुढे कामगाराच्या संख्येत घट होऊन ती सन २००५-०६ मध्ये ३१४ इतकी राहिली. त्यावर्षी या कामगारांच्या वेतनावर रु.३ कोटी ८० लाख ७७ हजार इतका खर्च करण्यात आला.

उदगीर प्रकल्पामध्ये मुख्यत्वे कच्चे दुधावर प्रक्रिया करून ते मुंबई येथील शासकीय योजनेस पाठविले जाते व अतिरिक्त दुधापासून दूध भुकटी, पांढरे लोणी उत्पादित केले जाते. लोणी ठराविक तापमानापर्यंत तापवून त्याचे तूप बनते. या प्रकल्पामध्ये दूध पिशव्यामध्ये भरण्याची प्रक्रिया केली जात नाही. संकलित झालेल्या कच्च्या दुधाची टिकाऊ क्षमता वाढविण्यासाठी ते पाश्चरायझर या सयंत्राव्दारे निर्जंतुकीकरण केले जाते. यासाठी दूध ७२.५ डि. से. पर्यंत तापवून ते १६ सेकंदात ५ डि. से. पर्यंत थंड केले जाते. या प्रकल्पात दुधाचे दूध भुकटीत व पांढऱ्या लोण्यामध्ये रूपांतर केले जाते. यासाठी दुधातील फॅट (मलई) हे विभक्तीकरण सयंत्राव्दारे वेगळे केले जातात व या फॅटचे (मलई) रूपांतर सयंत्राव्दारे पांढऱ्या लोण्यामध्ये केले जाते. या विभक्तिकरणातून मिळालेले स्निग्धांश विरहित दूध सयंत्रामध्ये आटवून त्यापासून स्प्रे ड्राईंग पध्दतीने दूध भुकटीमध्ये रूपांतरीत केले जाते.[६०] या कारखान्यामध्ये सन १९७८-७९ या पहिल्याच वर्षात ३६१ मे.टन दूध भुकटीचे उत्पादन झाले. तर तुपाचे उत्पादन ३८.८ मेट्रिक टन इतके झाले. या उत्पादनात सन १९८३-८४ मध्ये वाढ होऊन दूध भुकटीचे उत्पादन १,३०२.७ मेट्रिक टन इतके झाले व लोणी उत्पादन ९२१.८ मेट्रिक टन इतके झाले. तर, तुपाचे उत्पादन ७१.७ मेट्रिक टन झाले.[६१] सन १९८०-८१ मध्ये या कारखान्यातील सर्व उत्पादनाची एकूण विक्री किंमत रु. २ कोटी २० लाख ५८ हजार, सन १९९०-९१ मध्ये रु.१८ कोटी ३७ लाख १४ हजार, सन २०००-२००१ मध्ये रु.३६ कोटी १० लाख ९२ हजार इतकी प्राप्त झाली.

दूध भुकटीचे उत्पादन सन २००२ पासून बंद आहे. सद्या प्राप्त होणाऱ्या दुधाचे प्रमाण प्रतिदिन सरासरी १८ हजार लिटर्स असून त्या दुधावर प्रक्रिया करून ते मुंबई येथे पाठविले जाते. सन २००५-०६ मध्ये केवळ निर्जंतुक केलेल्या दुधाची विक्री किंमत रु.६ कोटी ८१ लाख ८५ हजार इतकी प्राप्त झाली. उदगीर प्रकल्प कार्यान्वित होऊन जवळ जवळ ३५ वर्षाचा कालावधी झाला आहे. यातील यंत्रसामुग्रीचे आयुष्यमान संपलेले असल्यामुळे ते निधीअभावी बदलता आलेले नाही. त्यामुळे उदगीर प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी सन २००६ मध्ये शासनाने निर्णय घेतला असून यासाठी आवश्यक निधी सदर आर्थिक वर्षात उपलब्ध होणे अपेक्षित आहे.[६२]

महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई.

महानंद दुग्धशाळा लातूर[६३] : लातूर येथील ५० हजार लिटर्स प्रतिदिन क्षमतेची शासकीय दूध योजना महाराष्ट्र शासनाकडून दि.६ फेब्रुवारी २००३ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाकडे हस्तांतरीत करण्यात आली आणि दि.१४ फेब्रुवारी रोजी 'महानंद' या नावाने कार्यान्वित करण्यात आली.

६०. महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना, उदगीर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
६१. तोंडारे, एस. जी. पूर्वोक्त, पृ.२९.
६२. महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना, उदगीर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
६३. महाव्यवस्थापक, महानंद दुग्धशाळा, लातूर युनिट यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

मराठवाड्यामध्ये दूध उत्पादन वाढीसाठी चालना देणे व अविकसित भागाचा विकास करणे, ग्रामीण शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावणे. तसेच ग्राहकांना पाश्चराईज्ड, होमोजिनाईज्ड सकस दूध उपलब्ध करून देणे यासाठी महाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प उभा केला. त्यानंतर महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाकडे लीजवर चालविण्यासाठी हस्तांतरीत केला. अविकसित भागामध्ये दूध उत्पादन वाढीस चालना देण्यासाठी शासनाने विशेष पॅकेज जाहीर केले असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी हा प्रकल्प 'महानंद' ने ताब्यात घेतला. मराठवाड्यातील बहुसंख्य गावांतील शेतकऱ्यांचे दूध गावपातळीवरील संस्थाव्दारे जिल्हा व तालुका सहकारी दूध संघामार्फत स्वीकारण्यात येते. त्यावर प्रक्रिया करून पॉलिथीन बॅगमध्ये दोन प्रकारचे दूध या कारखान्यामध्ये पॅकिंग करण्यात येते. त्यात पहिल्या प्रकारचे दूध म्हणजे गायीचे दूध होय. याचे फॅट ३.७ % व एसएनएफ ८.५% असते. दुसऱ्या प्रकारचे दूध म्हणजे टोण्ड दूध हे आहे त्याचे फॅट ३.० % व एसएनएफ ८.५% इतके असते. कच्च्या मालाची व विक्रीस तयार मालाची गुणप्रत म्हणजेच फॅट व इतर तपासणी करण्यासाठी शासनाने अद्यावत प्रयोगशाळा उभारलेली आहे. महानंद दुग्धशाळा, लातूर युनिट येथे फक्त गायीचे दूध व टोण्ड दूध याचेच पॅकिंग करून वितरीत करण्यात येते. या दुधाची गुणप्रत वाढण्यासाठी आणि दुधाची टिकण्याची क्षमता वाढण्यासाठी शीतकरण व पाश्चरायजेशन आणि होमोजिनाईजेशनची प्रक्रिया केली जाते.

शीतकरण प्रक्रियेसाठी दूध स्वीकृत केल्यानंतर लगेच ते शीतकरण यंत्रात सोडले जाते. पाश्चरायजेशन प्रक्रियेमध्ये शीतकरण यंत्रातून थंड झालेले दूध निर्जंतुकीकरणासाठी पाश्चराईजेशन यंत्रात सोडले जाते आणि होमोजिनायजेशन प्रक्रियेसाठी पाश्चराईज्ड दुधातील फॅटचे मायक्रॉन या यंत्राव्दारे आकारमान कमी केले जाते. त्यामुळे दूध घट्ट बनते व गायदुधातील पिवळेपणा कमी होतो. या प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर होमोजिनायीज्ड दूध पॅकिंग यंत्राच्या साहयाने १/२ लिटर व १/४ लिटरच्या पिशव्यामधून पॅकिंग केले जाते.

या प्रकल्पास संपूर्ण वर्षभर (३६५दिवस) मराठवाड्यातील जिल्हा/तालुका दूध संघाकडून दूध पुरवठा केला जातो. ५० हजार लिटर्स दुधाची क्षमता असलेल्या या प्रकल्पातील सन २००३-०४ या वर्षी सुमारे २०% क्षमता वापरात आली. तर सन २००५-०६ यावर्षी सुमारे ६०% क्षमता वापरात आलेली आहे. या उत्पादन क्षमतेसाठी दोन पाळ्यांमध्ये कामकाज चालते. सन २००३-०४ मध्ये यात १९ अकुशल कामगार कामास होते. त्यांच्या वेतनावर त्यावर्षी रु.२ लाख ५० हजार खर्च करण्यात आले. यावर्षी या प्रकल्पात इतर अधिकारी व कर्मचारी यांची संख्या ११ होती. अशाप्रकारे कामगार व कर्मचारी/अधिकारी यांची एकूण संख्या ३० होती. या सर्वांवरील वेतनाचा खर्च त्यावर्षी रु.१९ लाख २४ हजार इतका होता. सदर वर्षी या प्रकल्पात वापरण्यात आलेल्या कच्च्या मालाची किंमत रु.३० लाख होती. व उत्पादनाची किंमत रु.१ कोटी ७० लाख होती. त्या वर्षी रु.१ कोटी ४२ लाख किंमतीचे उत्पादनाची विक्री झाली. सन २००५-०६ मध्ये या प्रकल्पात २२ अकुशल कामगार कामास होते त्यांना त्यावर्षी एकूण रु.७ लाख ११ हजार वेतनासाठी देण्यात आले. अधिकारी व इतर कर्मचारी यांची संख्या २४ होती. अशाप्रकारे कामगार व अधिकारी/कर्मचारी यांची एकूण संख्या ४६ होती. वापरण्यात आलेल्या कच्च्या मालाची किंमत रु.३९ लाख होती. उत्पादित मालाची किंमत रु.८ कोटी ६८ लाख ७८ हजार होती आणि उत्पादनाची विक्री किंमत रु.८ कोटी ११ लाख ९२ हजार इतकी प्राप्त झाली.

या प्रकल्पामध्ये दुधाचे निर्जंतुकीकरण करून त्यात टिकाऊपणा आणल्यानंतर पॅकिंग केलेल्या दुधाची विक्री संपूर्ण मराठवाडा व कर्नाटकातील गुलबर्गा, बिदर, भालकी, आळंद, बसवकल्याण तसेच आंध्र प्रदेशातील हैद्राबाद, जहिराबाद, संगारेड्डी, आदिलाबाद, निजामाबाद, बोधन, म्हैसा इ. शहरांमध्ये केली

जाते. यात दुग्धजन्य पदार्थ जसे तूप, दही, ताक, श्रीखंड, पनीर इत्यादी बनवून स्थानिक बाजारपेठेत विक्री केले जाते. या प्रकल्पामध्ये सौर उर्जेवर पाणी गरम करून ते पाणी दूध निर्जंतूक करण्यासाठी वापरले जाते. अशा या सौर ऊर्जा प्रकल्पाची सविस्तर माहिती या प्रकरणामध्ये सुरुवातीस 'वीज निर्मिती व वितरण' या शीर्षकाखाली देण्यात आलेली आहे.

फळे परिरक्षण, प्रक्रिया आणि डबाबंदीकरण : या प्रवर्गात विविध फळे व पालेभाज्या टिकवणे, त्यावर विविध प्रक्रिया करणे, त्यापासून विविध खाद्य पदार्थ व पेये, जाम, तेल, रस, सरबत, सिरप, स्क्वॅशेस्, लोणची इत्यादी निर्माण करणे व ते दीर्घकाळ टिकविण्यासाठी हवाबंद बाटल्या व डब्यात भरणे तसेच नाशिवंत वस्तू कृत्रिम शीतगृहात ठेऊन त्यांचे प्रिझर्वेशन करणे इत्यादी उद्योगांचा समावेश होतो. लातूर जिल्ह्याचे हवामान प्रामुख्याने उष्ण व कोरडे आहे. जिल्ह्यातील सरासरी पर्जन्यमान ८५० मि.मी. आहे. जिल्ह्यात एकूण ७.२० लाख हेक्टर जमिनीपैकी अंदाजे ७५ ते ८० हजार हेक्टर जमीन पडीक असून जवळ जवळ १.५० लाख हेक्टर जमीन हलक्या प्रतीची आहे. मुख्यत्वे करून फळझाडे लागवडीस बऱ्यापैकी वाव आहे. जमिनीचा व हवामानाचा विचार करता जिल्ह्यात आंबा, आवळा, बोर, द्राक्ष, संत्रा, मोसंबी, कागदीलिंबू, पेरु, डाळिंब, सिताफळे, चिंच इत्यादी फळपिके घेता येतात. तथापि, जिल्ह्यात आंबा, द्राक्षे, डाळिंब, बोर, सिताफळे, पेरु, चिकु इत्यादी फळांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत आहे. सन १९९०-९१ ते २००५-०६ या कालावधीत लातूर जिल्ह्यामध्ये रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत एकूण २०,२२७ हेक्टर क्षेत्रावर विविध फळ पिकांची लागवड झालेली आहे.

अलिकडे महाराष्ट्रातील कृषि फळबाग उत्पादनात लातूर जिल्हा अग्रेसर होऊ पहात आहे. जिल्ह्यातील द्राक्ष, आंबा, डाळिंब, यांचे उत्पादन केवळ वेगळे असून ते उत्तम प्रतीची व निर्यात क्षमता असलेले आहेत. या फळांनी जिल्ह्यास जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे.

महाराष्ट्र शासनाने लातूर जिल्ह्याचा प्रामुख्याने **'केशर आंबा निर्यात झोन'** मध्ये समावेश केला आहे. त्यासोबतच द्राक्ष व डाळिंब यादेखील फळांची निर्यात जिल्ह्यातून होत आहे. त्यामुळे आंबा, द्राक्ष व डाळिंब या पिकाखालील क्षेत्र जिल्ह्यात झपाट्याने वाढत आहे. लातूर जिल्ह्यामध्ये द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी त्याच्या मालास किफायतशीर दर मिळण्यासाठी व द्राक्षाची विक्रीव्यवस्था करण्यासाठी 'लातूर जिल्हा द्राक्ष उत्पादक शेतकरी सहकारी संघ म., लातूर' या संस्थेची दिनांक २० फेब्रुवारी १९८५ रोजी स्थापना केली आहे. या संस्थेचे कार्यक्षेत्र लातूर जिल्ह्यापुरते असून संस्थेची एकूण सभासद संख्या ४८९ आहे. संस्थेच्या सर्व सभासदांचे मिळून सन २००४-०५ या वर्षी द्राक्ष पिकाखालील एकूण क्षेत्र सुमारे ८०० हेक्टर आहे. संस्थेमार्फत तज्ञ/शास्त्रज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांसाठी परिसंवाद दरवर्षी आयोजित करून त्यात द्राक्ष लागवडीबरोबरच पीकसंरक्षण, दर्जेदार निर्यात योग्य मालाचे उत्पादन, उत्पादित मालाची साठवणूक व निर्यातीसह विक्रीव्यवस्था यावर मार्गदर्शन करण्यात येते. या संस्थेच्या सभासदांनी उत्पादित केलेल्या द्राक्षांची साठवणूक करण्यासाठी सन १९९२-९३ यावर्षी राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांचे अर्थसहाय्यातून शीतगृह उभारले आहे. प्रशितगृहाची (pre-cooling) क्षमता ८ मे.टन असून शीतगृहाची (cold storage) क्षमता ६० मे.टन आहे. सन २००१-०२ पर्यंत जिल्ह्यात द्राक्षाखाली ३९० हेक्टर क्षेत्र होते. यावर्षी ७ कंटेनर म्हणजे ९८ मे.टन द्राक्षांची निर्यात झाली. सन २००४-०५ मध्ये संस्थेच्या शीतगृहामध्ये वेळोवेळी ठेवण्यात आलेल्या १९९ कंटेनर द्राक्षांची आणि २००५-०६ मध्ये २,८०० मे.टन (२१५ कंटेनर) द्राक्षांची निर्यात प्रामुख्याने इंग्लंड, हॉलंड, जर्मनी, बेल्जीयम इ.युरोपियन राष्ट्रांमध्ये करण्यात आली. या माध्यमातून सभासदांना साठवणूक व वाहतुकीचा सर्व खर्च वजा जाता प्रति किलो किमान रु.३० व रु.५५

एवढा दर मिळवून देण्यात संस्था यशस्वी ठरली आहे. संस्थेच्या साठवणूक व निर्यात सुविधेचा सध्या संस्थेचे ५० ते ६० टक्केसभासद लाभ घेत आहेत. अन्य सभासद त्यांच्या मालाची विक्री व्यवस्था देशांतर्गत बाजारपेठेत करीत आहेत. किल्लारी भागात द्राक्षाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे. या उत्पादनावर आधारित मध्यार्क, मणुके, हवाबंद डब्यातील रस इत्यादी उत्पादने तयार करणाऱ्या कारखान्यांना जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणावर वाव आहे.

लातूर जिल्ह्यात द्राक्षानंतर आंबा उत्पादक संघाची सन २००५-०६ मध्ये नोंदणी झालेली आहे. ही संस्था 'लातूर जिल्हा आंबा, फळे, भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, लातूर' या नावाने स्थापन करण्यात आली आहे. संस्थेचे १२० सभासद असून सभासदांचे केशर आंबा हे मुख्य पीक आहे. सर्व सभासदांचे एकत्रित ४५० हेक्टरचे क्षेत्र केशर आंब्याखाली आहे. या संस्थेच्या स्थापनेअगोदरही या जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी वैयक्तिक स्वरुपात 'केशर आंबा' विदेशात निर्यात केला आहे. सन २००२-०३ या वर्षात जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकरी श्री उत्तम भगवानराव जाधव रा.कडमुळी ता.चाकूर यांनी १४ मे.टन केशर आंबा इंग्लंड या देशात निर्यात केला आहे. सन २००५-०६ मध्ये अहमदपूर तालुक्यातील मोघा या गावातील केशर आंबा उत्पादक शेतकरी श्री.पंडीतराव शेळके यांनी ६०० किलो केशर आंबा हाँगकाँग येथे निर्यात केला आहे. जिल्ह्यामध्ये केशर आंब्याच्या चार बागा युरोगॅप प्रमाणित केलेल्या असून त्याखालील क्षेत्र ५० हेक्टर आहे. वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने लातूर जिल्ह्याचा 'केशर आंबा निर्यात झोन' मध्ये केलेल्या समावेशाचा निर्णय रास्त ठरवत लातूर जिल्ह्यात केशर आंब्याचे क्षेत्र, गुणवत्ता व उत्पादन सातत्याने वाढत असून जिल्ह्यातील केशर आंबा ग्राहकांच्या पहिल्या पसंतीवर उतरत आहे. संस्थेने स्थापनेचे पहिल्या वर्षापासून सभासदांच्या आंब्याची विक्री व्यवस्थेची काळजी घेतली आहे. २००५-०६ च्या आंबा हंगामात संस्थेने 'शेतकरी ते ग्राहक थेट विक्री व्यवस्था' ची सोय लातूरमध्ये चार विक्री केंद्रे स्थापन करून केली होती. संस्थेने स्वत:च्या 'आमराई' या ब्रॅण्डने उत्तम दर्जाचे पॅकिंग बॉक्स तयार केले होते. या उपक्रमास शहरातून चांगला प्रतिसाद मिळाला असून संस्थेचा स्वत:चा ब्रॅन्ड तयार होत आहे.

तसेच डाळिंब उत्पादक संघ स्थापन करण्यासाठी डाळिंब उत्पादकांनी संबंधित खात्याकडे प्रस्ताव सादर केला आहे. जिल्ह्यातील डाळिंब उत्पादक शेतकरी अन्य राज्यात डाळिंब फळांचे मार्केटिंग करून डाळिंब उत्पादनास चांगली किंमत मिळवत आहेत. अशाप्रकारे आंबा व द्राक्षे ही फळे परकीय चलन मिळवून देणारी फळपिके ठरत आहेत आणि डाळींब फळे देखील लवकरच परकीय बाजारपेठेत शिरकाव करण्याच्या तयारीत आहेत.

यापूर्वी जिल्ह्यात सन १९९१ मध्ये 'आसव प्राडक्ट' हा ऑरेंज, सोडा व लेमन तयार करणारा लघु उद्योग लातूर येथे सुरू झाला. त्यावर्षी त्यातील स्थिर भांडवल फक्त रु.२० हजार, खेळते भांडवल रु.१० हजार होते. उत्पादित मालाची किंमत रु.३५ हजार होती. यामध्ये ८ कामगार कामास होते. या उद्योगसंस्थेत तयार होणारे उत्पादनास स्थानिक बाजारपेठ उपलब्ध होती.[६४]

वर नमूद केल्याप्रमाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विविध फळांचे उत्पादन होऊ लागल्यामुळे जिल्ह्यात विविध फळांवर व पालेभाज्यांवर प्रक्रिया करून त्याचे विविध खाद्यपदार्थ बनविणे, त्या पदार्थांचे आयुष्यमान वाढविणे इत्यादीसंबंधीच्या उद्योग निर्मितीस सुरुवात झाली आहे. या प्रवर्गामध्ये भारतीय कृषि उत्पादनांचा आणि प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांचा जागतिक स्तरावर पुरवठा करणे आणि २१ व्या शतकाच्या वाटचालीतील

६४. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर आणि जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

'इंडिया व्हीजन २०२०' हे भारतीय महासत्तेचे तथा विकासाचे पर्व साध्य करण्यासाठी कृषि उत्पादन प्रक्रिया उद्योग क्रांतीमध्ये सहभाग घेणे हा विशाल दृष्टिकोन समोर ठेऊन लातूर जिल्ह्यात रेणापूर तालुक्यातील पानगाव या गावी दिनांक ७ जुलै २००३ रोजी 'स्वेधा ॲग्रो. व्हीजन प्रायव्हेट लिमिटेड,' ही विविध फळे, पालेभाज्या यांच्यावर विविध यांत्रिक व शास्त्रशुध्द प्रक्रिया करून त्यापासून विविध खाद्यवस्तू व पदार्थ तयार करणारी निर्यातक्षम उद्योगसंस्था स्थापन करण्यात आली. या उद्योगातील प्रत्यक्ष उत्पादनास जून २००४ मध्ये सुरुवात झाली. सन २००४-०५ व २००५-०६ मध्ये या कारखान्यातील प्रवर्तकाचे भागभांडवल रु.५० लाख, खेळते भांडवल रु.२५ लाख होते. यंत्र व सयंत्राची किंमत रु.९३ लाख होती. या कारखान्याची विविध पदार्थाची सरासरी उत्पादनक्षमता दर ताशी २ टन आहे. या कारखान्यात केशर, हापूस व तोतापुरी आंबा, टोमॅटो, पेरु, आवळा, पपई, चिंच, निंबू, सिताफळ इत्यादी फळे कच्चा पदार्थ म्हणून वापरण्यात येतात. या कारखान्यात उपरोक्त दोन्ही वर्षी ३० कामगार कामास होते. सन २००४-०५ मध्ये फक्त ५० दिवस काम चालल्यामुळे त्यांच्या मजूरीवर रु.४ लाख ३३ हजार खर्च करण्यात आले. तर सन २००५-०६ मध्ये १२० दिवस उत्पादन कार्य चालले त्यामुळे त्यांच्या मजुरीवर रु.१० लाख खर्च करण्यात आला.

सदर कारखाना हा कृषि उत्पादन निर्यात क्षेत्रामध्ये स्थापित करण्यात आलेला आहे. लातूर जिल्हा आणि बीड जिल्ह्यातील ३० कि.मी. परिसरात केशर आंबा उपलब्ध होण्याच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. तर कारखान्याच्या ५० कि.मी. परिसरामध्ये टोमॅटो, आवळा, चिंच, पपई, पेरु आणि इतर फळे उपलब्ध होतात, तर तोतापुरी आंब्यांचा पल्प (पाणी न मिसळता तयार होणारा फळाचा रस ज्याच्या साधारण एक ग्लास रसात पाच ते सहा ग्लास पाणी मिसळल्यास त्या फळाचे पिण्यायोग्य सरबत किंवा रस बनतो,) व कॉन्सन्ट्रेट (अधिक घट्टपणा असलेले द्रव्य), टोमॅटो प्युरी (ज्यात २०% पेक्षा अधिक गोडवा असतो), पेस्ट (२८% पेक्षा अधिक गोडवा ज्यात असतो) व केचप आणि सॉस, पेरुचा पल्प, अननसाची उत्पादने, आवळा, पपई यांचा पल्प, चिंचेचे कान्सन्ट्रेट आणि पेस्ट, लिंबाचे कान्सन्ट्रेट, सिताफळाचा पल्प, फळांचा रस, स्क्वॅशेस आणि नेक्टरर्स (गोड पेये), जाम आणि जेली इत्यादी पदार्थ तयार केले जातात. तसेच भाजीपाला हवाबंद डब्यात निर्जंतुक करून अधिक काळ टिकेल अशाप्रकारे पॅक केला जातो. सन २००४-०५ मध्ये या कारखान्यात केशर, अल्फान्सो आणि तोतापुरी आंब्यांचा पल्प तयार करण्यात आला. यावर्षी सुमारे ५०% उत्पादनक्षमता वापरात आली आणि उत्पादित मालाची किंमत रु.१९ लाख होती आणि विक्री रु.२ लाखाची करण्यात आली. सन २००५-०६ यावर्षी कारखान्याची ७०% उत्पादनक्षमता वापरात आली. यावर्षी कारखान्यात केशर, अल्फान्सो, तोतापूरी आंब्यांचे पल्प व अननसाची उत्पादने व टोमॅटो सॉस इ. तयार केले. या वर्षी उत्पादित झालेल्या मालाची किंमत रु.६८ लाख होती. यावर्षी रु.२२ लाख ४० हजार किंमतीच्या उत्पादनाची निर्यात करण्यात आली आणि यावर्षी एकूण रु.५३ लाख ५० हजार किंमतीच्या उत्पादनाची विक्री झाली. या कारखान्यातील उत्पादने आंतरराष्ट्रीय दर्जाची असल्यामुळे उत्पादन सुरु झाल्याच्या दुसऱ्याच वर्षी रु.२२ लाख ४० हजारचे उत्पादन निर्यात करण्यात आले व उर्वरित उत्पादन स्वदेशी बाजारपेठेत विकण्यात आले.[६५] डिसेंबर २००४ अखेर लातूरमध्ये 'मैत्री बहुउद्देशीय समाजसेवा संस्था, लातूर संचालित मैत्री फूड इंडस्ट्रिज' हा उद्योग सुरू झाला. यात कच्च्या काजूवर प्रक्रिया करून तो खाण्यायोग्य बनविला जातो. कच्चा काजू हा या जिल्ह्यात उपलब्ध होत नसला तरी काजू बिया कूजत नसल्यामुळे तसेच या जिल्ह्यातील हवामान कोरडे व उष्ण असल्यामुळे येथे तयार केलेल्या काजूची प्रत चांगली राहते आणि येथे मजुरांची सहज उपलब्धता होते त्याचप्रमाणे केवळ लातूर शहरामध्ये दररोज २

६५. व्यवस्थापक, स्वेधा ॲग्रो व्हीजन प्रा.लि., पानगाव यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

मे.टन प्रक्रिया केलेल्या काजूची विक्री होते यावरुन येथे या उत्पादनास प्रचंड मागणी व तयार बाजारपेठ उपलब्ध आहे. या उद्योगामध्ये वापरात येणारा कच्चा माल हा कच्च्या काजूबिया असून तो रत्नागिरी, गोवा, कणकवली, राजापूर, मालवण, चांदगड, गडहिग्लंज, पुणे, कोल्हापूर या ठिकाणाहून मागविला जातो. या उद्योगात १०० किलो कच्च्या काजू बियांवर प्रक्रिया केल्यानंतर २५ किलो खाण्यायोग्य काजू तयार होतो. सन २००५ मध्ये या उद्योगघटकाचे प्रवर्तक श्री.धनंजय गायकवाड यांचे प्रयत्नाने नाबार्डच्या सहकार्यातून ३० लोकांना प्रशिक्षित केले आहे. आजपर्यंत या त्यांच्या पुढाकाराने लातूरमध्ये काजूप्रक्रिया करणारे २२ युनिट कार्यरत आहेत. या सर्व युनिटमध्ये १ दिवसाला सरासरी ५०० किलो काजू निर्मिती केली जाते. याशिवाय सन २००६-०७ पासून सणाच्या कालावधीमध्ये प्रामुख्याने दिपावलीसाठी उपउत्पादन म्हणून काजूचिक्की, खारेकाजू, चटपटा काजू तयार करून लातूरच्या बाजारपेठेत विक्री केले जातात. [६६]

इ.स.२००४ मध्ये लातूर जिल्ह्यात फळे व भाजीपाला यांचे उत्पादन व प्रक्रिया करणे व साठवण करणारे (यात मासे, मटण या उत्पादनासंबंधी घटकांचाही समावेश आहे.) नोंदणी झालेले ३५ उद्योग घटकांपैकी १३ उद्योग घटक सुरू होते. त्यात एकूण ३०६ कामगार कामास होते.

जिल्ह्यात विविध फळबागाखाली झपाट्याने वाढणारे क्षेत्र व वरील माहिती लक्षात घेता जिल्ह्यात विविध फळांचे परिरक्षण, प्रक्रिया आणि डबाबंदीकरण (हवाबंद) या उद्योगास मोठया प्रमाणात वाव असल्याचे दिसून येते.

खाद्य पदार्थाचे उत्पादन या प्रवर्गातील उद्योगात लातूर जिल्ह्यात तयार करण्यात येणाऱ्या वर नमूद करण्यात आलेल्या सर्व खाद्यपदार्थ उद्योगांपैकी केंद्र शासनाच्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणाच्या निकषानुसार पात्र असणाऱ्या जिल्ह्यातील खाद्य पदार्थ उत्पादन उद्योगाची वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार सन १९८१-८३, १९८४-८५, १९९०-९१, आणि सन १९९३-९४ ते १९९६-९७ या वर्षांची सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक २ ते ८ मध्ये देण्यात आलेली आहे. १९९६-९७ या वर्षानंतर केंद्र शासनाचे प्रत्येक जिल्हावार वार्षिक औद्योगिक सर्वेक्षण बंद झाल्याची नोंद या पूर्वी करण्यात आलेली आहे.

पेये, स्पिरीट व तंबाखूची उत्पादने

इ.स.१९५१ मध्ये तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात तंबाखू व तंबाखूच्या पदार्थाचे उत्पादन करण्याच्या कार्यात १५२ व्यक्ति कार्यरत होते. त्यानंतर सन १९६१ मध्ये जिल्ह्यात पेये तयार करण्याच्या घरगुती स्वरूपातील व्यवसायात ३९८ पुरुष व १३८ स्त्रिया कार्यरत होत्या. तर घरगुती व्यवसायापेक्षा काहीशा मोठ्या प्रमाणात पेये तयार करण्याच्या उद्योगात ३३२ पुरुष आणि १३ महिला कामगार कार्यरत होते. या खेरीज तंबाखूची उत्पादने तयार करण्याच्या घरगुती स्वरूपातील व्यवसायात ९ पुरुष व ३६ महिला कार्यरत होत्या, व लघुउद्योग स्वरूपातील याच उद्योगात २० पुरुष व ११ महिला कामगार कार्यरत होत्या. सन १९६२-६३ मध्ये जिल्ह्यात विविध क्षेत्रातील लघुउद्योजक किंवा कारागीर यांनी समान हित जोपासणे आणि योग्य मजूरी प्राप्ती व उत्पन्नाच्या हमीच्या दृष्टीने एकत्र येऊन सहकारी सोसायटया स्थापन केल्या. या वर्षी जिल्ह्यात अशा एकूण १४१ सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यात निरा व ताडगूळ तयार करणाऱ्या व्यावसायिकांच्या ३ सहकारी संस्था जिल्ह्यात कार्यरत होत्या.[६७] लातूर जिल्हा

६६. मैत्री फूड इंडस्ट्रिज, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आणि सन २००६-०७ च्या दर्शनिका विभागाच्या सर्वेक्षणावर आधारित.

६७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ.४३५-३६, ४७४.

निर्मिती (१९८२) नंतर मात्र या नवीन जिल्ह्यात या प्रवर्गातील (पेय, तंबाखूची उत्पादने) उद्योगक्षेत्रात एकही सहकारी संस्था कार्यरत नाही. पुढे सन १९९१ मध्ये लातूर येथे 'आसव प्रॉडक्ट' हा ऑरेंज, सोडा, लेमन इत्यादी सॉफ्ट पेये तयार करण्याचा एक अगदी लहान स्वरूपातील उद्योग सुरू झाला. १९९२-९३ मध्ये त्यातील स्थिर भांडवल फक्त रु.२० हजार, खेळते भांडवल रु.१० हजार व उत्पादनाची किंमत रु.३५ हजार एवढी होती. या वर्षी त्यात ८ कामगार कामास होते. हे उत्पादन अल्प प्रमाणावर तयार करण्यात येत असल्यामुळे त्याची विक्री स्थानिक बाजारपेठेतच केली जाते.[६८]

सन १९९२-९३ मध्ये जिल्ह्यात मोठ्या उद्योग क्षेत्रामध्ये मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., चिंचोलीराव (वाडी) या कारखान्यातील उत्पादित मळी या उपउत्पादनापासून विविध प्रकारचे स्पिरीट तयार करण्यासाठी उभारण्यात आलेल्या आर्कशाळेतील प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात झाली. या आर्कशाळेतील सर्व प्रकारचे स्पिरीट तयार करण्याची एकत्रित प्रतिदिन उत्पादन क्षमता ३० हजार लिटर्स एवढी आहे. या आर्कशाळेत सन २०००-२००१ मध्ये रेक्टीफाईड स्पिरीटचे उत्पादन ६२ लाख ३२ हजार ७०० लिटर्स, ऑर्डिनरी डिनेचर्ड स्पिरीटचे उत्पादन १ हजार ९९३ लिटर्स आणि स्पेशल डिनेचर्ड स्पिरीटचे उत्पादन ३३ लाख लिटर्स एवढे झाले. या वर्षी २७ लाख ५४ हजार ०२५ लिटर्स रेक्टीफाईड स्पिरीटची विक्री करण्यात आली त्याची विक्री किंमत रु.२ कोटी ५८ लाख ९४ हजार प्राप्त झाली. २००० लिटर्स ऑर्डिनरी डिनेचर्ड स्पिरीटची विक्री किंमत रु.२१ हजार प्राप्त झाली. आणि ३२ लाख ९० हजार ४०० लिटर्स स्पेशल डिनेचर्ड स्पिरीटची विक्री करण्यात आली त्याची विक्री किंमत रु.२ कोटी ९८ लाख ९४ हजार प्राप्त झाली. सन २००४-०५ या वर्षी या आर्कशाळेत रेक्टीफाईड स्पिरीट, स्पेशल डिनेचर्ड स्पिरीट, इ.एन.ए. व इथेनॉल अशी चार प्रकारची उत्पादने तयार करण्यात आली. त्यात या वर्षी ऑर्डिनरी डिनेचर्ड स्पिरीट मात्र तयार करण्यात आले नाही. सदरील चार प्रकारचे पदार्थाचे एकूण उत्पादन यावर्षी ६८ लाख ८८ हजार ६६ लिटर्स एवढे झाले. यावर्षी (२००४-०५) उपरोक्त प्रकारचे स्पिरीट व अन्य उत्पादने याची एकूण २९ लाख २२ हजार ४०० लिटर्स एवढी विक्री करण्यात आली. त्याची एकूण विक्री किंमत रु.७ कोटी ३० लाख ३७ हजार एवढी प्राप्त झाली.[६९]

सन १९९२-९३ याच वर्षात वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात पेये व तंबाखूच्या पदार्थाचे उत्पादन करणारे ३ उद्योग सुरू होते. त्यातील एकूण स्थिर भांडवल रु.१३ कोटी ८१ लाख २० हजार, खेळते भांडवल रु.४ कोटी ६१ लाख ९१ हजार एवढे होते. त्यात गुंतविलेले भांडवल रु.१८ कोटी ४२ लाख १ हजार एवढे होते. त्यातील ६ कामगारांनी त्यावर्षी ३,९२४ श्रमदिन काम केले. त्यांना एकूण वेतन रु.१ लाख ४२ हजार देण्यात आले. या कारखान्यांमध्ये मुख्य व अन्य उत्पादने मिळून एकूण उत्पादन रु.७ कोटी ४९ लाख ४० हजार चे झाले.

सन १९९३-९४, १९९५-९६ आणि १९९६-९७ या वर्षासाठी वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील विविध प्रकारचे पेये व तत्सम पदार्थ व तंबाखूच्या पदार्थाचे उत्पादन करणाऱ्या कारखान्याची माहिती तक्ता कमांक ५, ७ व ८ मध्ये देण्यात आलेली आहे.

सन २००४ मध्ये जिल्ह्यात नोंदणी झालेल्या मादक पेये तयार करण्याचा लघु उद्योग क्षेत्रातील एक घटक सुरू होता त्यात दोन कामगार कामास होते.[७०]

---

६८. महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारीत.
६९. मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., चिंचोलीराव (वाडी) यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारीत.
७०. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा लातूर**, २००४-०५, पृ.९१.

जानेवारी २००७ मध्ये लातूर जिल्ह्यातील विकास सहकारी साखर कारखाना लि.,निवळी या साखर कारखान्याअंतर्गत उभारण्यात आलेल्या आसवणी (आर्कशाळा) या प्रकल्पातील प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात झाली. यावर्षी या आर्कशाळेमध्ये या साखर कारखान्यातील उत्पादीत मळी उपउत्पादनावर प्रक्रिया करून रेक्टीफाईड स्पिरीट तयार करण्यात येते. या आर्कशाळेची उत्पादन क्षमता प्रतिदिन ३० हजार लिटर्स एवढी आहे. या प्रकल्पामध्ये जानेवारी २००७ पासून १६ ऑगस्ट २००७ या कालावधीत एकूण ५५ लाख ७६ हजार लिटर्स रेक्टीफाईड स्पिरीटचे उत्पादन करण्यात आले. या कालावधीत प्रतिदिन सदरील स्थापित उत्पादनक्षमतेपेक्षाही जास्त प्रमाणात उत्पादन करण्यात आलेले आहे. या प्रकल्पात उत्पादित झालेले रेक्टीफाईड स्पिरीट हे निविदा मागवून इंडस्ट्रिज वापरासाठी विक्री केले जाते.[७१]

जिल्ह्यात सन १९९८-९९ मध्ये तंबाखूच्या पिकाखालील क्षेत्र १०० हेक्टर होते परंतु तंबाखूवर प्रक्रिया करणाऱ्या एकाही उद्योगाची नोंदणी जिल्ह्यात झालेली नव्हती.[७२]

वस्त्रोद्योग

या प्रवर्गात वटण व दाबणी, सूत गिरणी, कापड विणकाम, यंत्रमाग, हातमाग, रेडीमेड कपडे तयार करणे या उद्योगांचा समावेश आहे. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

कापूस वटण व दाबणी (कॉटण जिनिंग अॅन्ड प्रेसिंग) : इ.सन १८९१ साली लोकमान्य टिळकांनी रु.१५,००० व्याजाने घेऊन भागीदारीत 'लातूर जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी' तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूर येथे सुरू केली. ही फॅक्टरी लातूरच्या व्यापार, उद्योगाच्या विकासासाठी प्रेरक शक्ति ठरली. या फॅक्टरीत यंत्रावर कापूस पिंजून त्याची दाबणी करून गठ्ठे बांधले जात असे. ही जिनिंग फॅक्टरी 'टिळकांची गिरणी' म्हणून त्या काळात प्रसिध्द होती. या फॅक्टरीत लोकमान्य टिळकांची एक तृतीयांश भागीदारी होती. लातूर हे निजामाच्या हैद्राबाद संस्थानातील एक अग्रगण्य कापूस खरेदी विक्री-केंद्र होते. या ठिकाणी जिनिंग प्रेसिंग सुरू केल्यास ब्रिटिश अधिपत्याखालील प्रांतापेक्षा येथे जास्त स्वातंत्र्य मिळेल व निजामी राज्यातील दूर्बल घटकांमध्ये स्वातंत्र्याचे वारे संचारू लागेल तसेच मराठा या वर्तमानपत्राचे मालकी हक्क मिळविण्याकरिता काढलेल्या रु.६,००० च्या कर्जाची परतफेड आणि कापूस हे नगदी पीक असल्यामुळे लातूर व आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना कापसाची लागवड करण्यास उत्तेजन देणे हे उद्देश समोर ठेवून टिळकांनी ही फॅक्टरी सुरू केली. या फॅक्टरीमध्ये आणखी गुंतवणूक करण्यासाठी टिळकांनी एका सावकाराकडून पाच हजार रुपये कर्ज घेतले. टिळकांनी त्यांचा भाचा धोंडूमामा (धोंडोपंत) विद्वांस यांना लातूरच्या वटणी व दाबणी कारखान्याच्या देखरेखीसाठी ठेवले. या फॅक्टरीमध्ये टिळकांचे आणखी दोन भागीदार 'आबासाहेब परांजपे व पुण्याचे गणपतराव सहस्त्रबुध्दे' हे होते. इ.स.१८९१ ते १८९७ या काळात या फॅक्टरीस चांगलाच नफा झाला. इ.सन १८९७ मध्ये टिळकांना राजद्रोहाच्या खटल्यात १८ महिन्यांची शिक्षा होऊन त्यांची तुरुंगात रवानगी झाली. त्यामुळे त्याचवर्षी टिळकांचे भाचे धोंडोपंत विद्वांस हे 'केसरी' व 'मराठा' चे काम पाहण्याकरिता पुण्याला गेले. त्यामुळे आबासाहेब परांजपे यांचे नातेवाईक श्री निवास उर्फ काकासाहेब परांजपे या फॅक्टरीची देखभाल करू लागले परंतु त्यांच्यादेखरेखीखाली ही फॅक्टरी तोट्यात चालू लागली. असे असले तरी या फॅक्टरीमुळे लातूरच्या व्यापार व औद्योगिक वाढीस चालना मिळाली.

---

७१. विकास सहकारी साखर कारखाना लि.,निवळी यांचेकडील माहिती व २००६-०७ च्या दर्शनिका विभागाच्या सर्वेक्षणावर आधारित.

७२. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा लातूर**-२००३-०४, पृ.२९.

टिळकांनी सुरू केलेल्या या जिनिंग फॅक्टरीमुळे येथील लोकांच्या विचारसरणीमध्ये बदल होऊ लागले. पुण्यावरून 'केसरी व मराठा' तसेच 'ज्ञानप्रकाश' वर्तमानपत्र लातूरला येऊ लागले. या वर्तमान पत्रांमुळे लातूरचा वैचारिक कायापालट होवून स्वातंत्र्याचे नवीन वारे वाहू लागले. व्यापार व औद्योगिक वाढीमुळे निजामाने लातूर येथे १८९४ मध्ये मुन्सफी कोर्ट व १८९९ मध्ये बार्शीला जाणारा सिमेंटचा रस्ता तयार केला. इ.स.१९०० मध्ये टिळक लातूरला आल्यामुळे येथील नागरिकांना स्वातंत्र्याची नवी स्फूर्ती मिळाली. लातूरच्या फॅक्टरीने टिळकांच्या आर्थिक विचारांना प्रात्यक्षिक रूप दिले. परंतु पुढे लातूरची ही गिरणी कापूस उपलब्धते अभावी तोट्यात गेली.[७३]

सन १९५० च्या सुमारास उदगीर येथे फिरोजसेठना ही जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी सुरू झाली. त्यानंतर इ.स.१९६९ मध्ये लातूर येथे ३ वटण व दाबणी कारखाने सुरू होते. या कालावधीत कापसाची वटणी करण्यासाठी प्रतिक्विंटल दर रु.१०.५० होता, तर दाबणीसाठी दर प्रतिक्विंटल रु.७.५० होता. या काळात कापूस वटण कारखान्यातील कापसाच्या गाठी प्रामुख्याने मुंबई, सोलापूर व मद्रास (चेन्नई) येथे व सरकी मुंबईला तसेच इतर वनस्पती (तेल) बनविणाऱ्या उद्योग केंद्राकडे पाठविली जात असे. त्यापैकी सन १९०७ साली लातूर येथे स्थापन झालेल्या वटण व दाबणी कारखान्याचे १९७२ मध्ये स्थिर भांडवल रु.१ लाख ५० हजार होते. या कारखान्यातील त्यावर्षी वटण व दाबणी यंत्रांची किंमत रु.४० ते ५० हजाराच्या दरम्यान होती. या कारखान्यात ६४ कामगार कामावर होते. त्यांना दैनिक मजूरी रु.१.२५ ते रु.२ च्या दरम्यान दिली जात होती. या कारखान्यात प्रतिदिन कमाल १०० गाठी बनविल्या जात होत्या.[७४] सन १९७० मध्ये जिल्ह्यात २० वटण व दाबणी कारखाने सुरू होते. अलिकडे जिल्ह्यातील कापूस लागवडीचे क्षेत्र कमी झाल्यामुळे वटण व दाबणी कारखान्यांची संख्या कमी झाली.[७५]

सन १९८१-८३ च्या वार्षिक ऑद्योगिक सर्वेक्षणानुसार लातूर जिल्ह्यातील वटण व दाबणी कारखान्यांची संख्या ४ होती. त्यानंतर दोन कारखाने बंद पडले व १९८३-८४ मध्ये चालू असलेल्या कारखान्यांची संख्या २ झाली. येथील कापूस पिकासंदर्भात १९८८-८९ मध्ये जिल्ह्यात कापसाचे उत्पादन २,३०० मेट्रिक टन झाले.[७६] लातूर व निलंगा तालुक्यात जिल्ह्यात सर्वात जास्त कापूस उत्पादन झाले. शासनाच्या कापूस एकाधिकार खरेदी-विक्री योजनेअंतर्गत खरेदी केलेला कापूस खरेदी केंद्राच्या परिसरातील वटण व दाबणी कारखान्यात प्रक्रीया करण्यास प्राधान्य दिल्यामुळे लातूर जिल्ह्यातील हे उद्योग सुरू ठेवण्यात या योजनेचे महत्त्वाचे स्थान आहे. सन १९९०-९१ मध्ये अहमदपूर येथे शेतकरी सहकारी जिनिंग- प्रेसिंग संस्था म.ही गिरणी सुरू झाली. त्यात सभासदाचे भाग भांडवल रु.५० हजार होते. त्यावर्षी अहमदपूर येथे 'सोनी जिनिंग फॅक्टरी', 'रेड्डी जिनिंग फॅक्टरी' व 'जयश्री जिनिंग फॅक्टरी' 'राजर्षी शाहू सहकारी जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी' (लवकरच ही बंद पडल्याने अवसायनात घेण्यात आली.) व उदगीर येथे 'उदयगिरी जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी' सुरू होती या ५ जिनिंग फॅक्टरीमध्ये अनुक्रमे ३५,२०,५०,२० व ४० कामगार होते. सन १९९२ मध्ये जळकोट (नवीन तालुका) येथे बि.के.जिनिंग फॅक्टरी स्थापन झाली. त्यातील स्थिर भांडवल रु.५,३२,००० व खेळते भांडवल रु.५०,००० होते. त्यावर्षी या कारखान्यात रु.२ लाख ९८ हजार किंमतीचे उत्पादन झाले. त्यासाठी १७ कामगार होते. सन २००१ मध्ये अहमदपूर तालुक्यात 'अंधोरी' येथे साईनाथ जिनिंग फॅक्टरी सुरू झाली त्यातील सुरुवातीची गुंतवणूक रु.६ लाख व १२ कामगार होते.

---

७३. दै. केसरी, दिनांक ४ ऑक्टोबर, १९८४.
७४. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२,पृ.४४६, ४९५-९६.
७५. मराठवाडा जनता विकास परिषद : ५ वे अधिवेशन, लातूर २००५, स्मरणिका, पृ.७३.
७६. **मराठी विश्वकोश,** महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई १९९५, खंड-१५, पृ.३९८.

अनुक्रमणिका

सन २००३-०४ मध्ये उदगीर येथे 'शेतकरी सहकारी जिनिंग ॲन्ड प्रेसिंग मिल', व अहमदपूर येथे 'राजू जिनिंग फॅक्टरी' सुरू होती त्यात अनुक्रमे ६३ व ६५ कामगार होते. याचवर्षी सोमनाथपूर येथे 'शेतकरी सहकारी जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी' सुरू झाली. त्यात ५३ कामगार होते.[७७]

वार्षिक औद्यागिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील कापूस वटण व दाबणी करखान्यांची १९८४-८५, १९९०-९१,१९९४-९५ व १९९६-९७या वर्षाची सांख्यिकीय माहिती तक्ता क्र.१२ मध्ये दिली आहे.

कापड उद्योग : या भागात १९०८ च्या पूर्वीपासून धागा आणि सर्व कापड स्वस्तामध्ये आयात केले जाऊ लागल्यामुळे जिल्ह्यात फक्त जाडे भरडे कापड आणि धोतर, साड्यांचे कापड विणले जाऊ लागले. धनगर हे त्यांच्याकडील मेंढीच्या लोकरापासून ब्लँकेट किंवा घोंगडी तयार करीत होते. ते रु.२ ते रु.३ प्रमाणे प्रतीनगाची विक्री करीत होते.[७८] १९३४ च्या सुमारास मराठवाड्यात स्वामी रामानंद तीर्थ व गोविंद भाई श्रॉफ यांनी 'हैद्राबाद खादी समिती' स्थापन केली व तेलंगण आणि मराठवाडा भागात खादी केंद्रे स्थापन केली. पुढे राज्यपुनर्रचनेनंतर १९६२ मध्ये कायद्यानुसार मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती स्थापन करण्यात आली. त्याद्वारे मराठवाड्यातील जिल्हे व त्यातील अनेक तालुक्यात विविधप्रकारचे कापड उत्पादन व विक्री केंद्रे सुरू केली.[७९]

सन १९५१ मध्ये तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात सुती कापड तयार करण्याच्या उद्योगात १,७२१ व्यक्ति व कापडापासून बनविण्यात येणाऱ्या परिधान करावयाच्या कापड उद्योगात १,३४४ व्यक्ति कार्यरत होत्या. सुती कापड सोडून इतर प्रकारचे कापड व त्या पासूनच्या वस्तू तयार करणाच्या कार्यात ३४१ व्यक्ति कार्यरत होत्या. सन १९६१ मध्ये सुती कापड तयार करण्याच्या कार्यात जिल्ह्यात घरगुती स्वरूपाच्या व्यवसायात ४५२ पुरुष व १,०८४ स्त्रिया कार्यरत होत्या आणि बिगर घरगुती स्वरूपाच्या उद्योगात २९२ पुरुष कामगार व १८० स्त्री कामगार कार्यरत होते. किरकोळ प्रकारचे वस्त्र निर्मितीच्या घरगुती व्यवसायात २,४५९ पुरुष व ३४० स्त्री कारागीर होते, तर बिगर घरगुती व्यवसायात १,०९५ पुरुष व ५० स्त्री कारागीर कार्यरत होते. त्याच वर्षी जिल्ह्यात २१ विणकर सहकारी संस्था होत्या. त्यापैकी ९ हातमाग विणकर सहकारी संस्था, १० लोकर विणकर सहकारी संस्था व २ खादी विणकर सहकारी संस्था होत्या. या सर्व विणकर सहकारी संस्थांची सभासद संख्या २ हजार ६३७ होती. त्यांचे एकूण भागभांडवल रु.४५ हजार व खेळते भांडवल रु.२ लाख ७२ हजार होते. याच वर्षी जिल्ह्यात एकूण लोकसंख्येच्या दर १ लाख व्यक्तिमागे सूत कताई व विणकाम करणाऱ्यांची संख्या १२१ होती.

त्यावेळच्या उस्मानाबाद जिल्ह्यात सुती व लोकरी कापडाचे हातमागावरील विणकाम केंद्रे लातूर, उस्मानाबाद, परंडा, भूम,औसा, उदगीर, गुंजोटी व मुरुम येथे होती. ३१ मे १९६१ रोजी जिल्ह्यात नोंदणी झालेले १,५७१ सुती व ९८ बिगर सुती वस्त्र विणण्याचे हातमाग होते. त्यावर्षी कापूस व सूत विणाईचे प्रशिक्षण तेव्हाच्या, तसेच सद्याच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील लोहारा व नळदुर्ग येथे दिले जात असे.[८०] मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीने १९६७ मध्ये उदगीर व औसा येथे हातमागावरील कापड विणकाम केंद्रे सुरू केली. सन १९६७ मध्ये औसा येथे जनता हातमाग विणकर सहकारी संस्था स्थापन झाली.

---

७७. उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

७८. **द इम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया, व्हो. XIX** कॅलरेनन प्रेस, ऑक्स्फर्ड, १९०८, पृ.२७२.

७९. मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती, शाखा उदगीर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

८०. **उस्मानाबाद जिल्हा गॅझेटिअर**-१९७२, पृ.४३४ ते ४३७ आणि **भारतीय जनगणना जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, उस्मानाबाद,** १९६१, पृ.४०,४३.

१९७९ च्या सुमारास उदगीर भागात कोष्टी, चाटी व मोमीन या विणकरांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. त्यावेळी हातमागावर टेरिकॉटचे कापड विणून ते स्वस्त दरात बाजारात विकले जात असे. या कापडाचा दर्जा व किंमती मध्यम वर्गीयांना परवडेल अशा होत्या.[८१]

सन १९८२-८३ मध्ये लातूर जिल्ह्यात सुरू असलेल्या हातमाग सहकारी संस्थांची संख्या ९ होती. त्यांची सभासद संख्या २७४, भागभांडवल रु.१ लाख ५२ हजार, खेळते भांडवल रु.४ लाख २० हजार व राखीव व इतर निधी रु.३९ हजार होता. त्यात १३ कामगार होते. त्यांना त्यावर्षी देण्यात आलेल्या वेतनावरील खर्च रु.६४ हजार होता. त्यावर्षी या संस्थांमधील उत्पादनाची एकूण किंमत रु.१ लाख ७० हजार तसेच विक्रीची किंमतही रु. १ लाख ७० हजार होती. या संस्थांमधील एकूण हातमागाची संख्या १८ होती. या संस्थांनी त्यावर्षी निव्वळ नफा रु. ५ हजार मिळविला.[८२] सन १९८४-८५ मध्ये जिल्ह्यात सुती कापड विणण्याचेउद्योग लातूर, उदगीर, औसा व मुरूड येथे सुरू होते. जिल्ह्यात यावर्षी एकूण २८५ हातमाग खादी विणकाम करणारे होते. त्यापैकी निलंगा येथे १३१,औसा येथे २७, लातूर येथे २६, उदगीर येथे ५२ व अहमदपूर येथे ४९ हातमाग होते. या उद्योगामुळे बहुसंख्य लोकांना रोजगार उपलब्ध झाला होता.[८३] सन १९८६ मध्ये लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात बुधोडा येथे "ग्रामीण श्रमीक प्रतिष्ठान" या संस्थेने अंध व अपंग यांच्या पुनर्वसनासाठी व त्यांना स्वावलंबी तसेच मानाचे जीवन जगता यावे या उदात्त हेतूने त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रकारचे कापड निर्मिती केंद्राची स्थापना केली.

सन १९८८ मध्ये लातूर येथे "प्रवीण मार्ट" हा कापडापासून टोप्या व अंडरविअर तयार करण्याचा व १९८९ मध्ये कापडापासून तयार केल्या जाणाऱ्या वस्तूंमधील पँट, शर्ट, स्कूलड्रेस तयार करणारा "बॉस ड्रेस मटेरिअल" हा कारखाना सुरू झाला. या दोन्ही कारखान्यात १९९२-९३ मध्ये स्थिर भांडवल रु.१९ हजार व खेळते भांडवल रु.३० हजार होते. त्यात एकूण १० कामगार होते. या कारखान्यामध्ये तयार झालेल्या उत्पादनाची विक्री स्थानिक बाजार पेठेत होते. सन १९९१ मध्ये लातूर येथे "बालाजी गारमेंट" हा हाफपँट, शर्ट, अंडरविअर इ.तयार कपडे निर्माण करणारा कारखाना सुरू झाला. सन १९९२ मध्ये लातूर येथे तयार कापडापासून पँट, शर्ट व फ्रॉक तयार करणारा "न्यू गारमेन्ट" हा कारखाना सुरू झाला. बालाजी गारमेन्ट आणि न्यू गारमेन्ट या दोन्ही घटकांचे १९९२-९३ मधील एकत्रित स्थिर भांडवल रु.३१ हजार, खेळते भांडवल रु.३० हजार होते. यामध्ये तयार करण्यात आलेल्या उत्पादनांची एकूण किंमत रु.१ लाख ४० हजार होती. त्यामध्ये एकूण ५ कामगार होते. या दोन्ही घटकातील उत्पादनांची स्थानिक बाजारपेठेमध्ये विक्री होते.[८४] वर उल्लेख करण्यात आलेल्या सन १९८२-८३ मध्ये सुरू असलेल्या जिल्ह्यातील सर्व हातमाग सहकारी संस्था १९८२-८३ ते १९९२-९३ या दशकात बंद पडल्या. त्यानंतर जिल्ह्यात नवीन हातमाग सहकारी संस्थांची स्थापना झालेली नाही, असे लातूर जिल्हा उपनिबंधक यांचे माहितीवरून स्पष्ट होते.

सन १९९५ मध्ये लातूर जिल्ह्यात सुती कापड (सूत कताई ते कापड निर्मिती व त्यावरील प्रक्रियासह) उत्पादन क्षेत्रात ६ कारखाने सुरू होते. त्यात ७२४ कामगार होते. त्याच वर्षी जिल्ह्यात कापडाच्या वस्तू

---

८१. उदगीर शहर नगर परिषद उदगीर, रौप्य महोत्सवी स्मरणिका-उदगीर १९७९, पृ.१३, १४.
८२. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
८३. पूर्वोक्त. तोंडारे एस.जी., पृ.२१.
८४. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

(परिधान करण्याच्या वस्तू सहित) तयार करण्याचा एक कारखना सुरू होता. त्यात २० कामगार होते. सन १९९६ मध्ये जिल्ह्यात सुती कापड उत्पादन क्षेत्रात ८ कारखाने सुरू होते व त्यात एकूण १,०९२ कामगार होते.[८५]

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील सुती कापड उद्योगाची १९९३-९४, १९९५-९६ व १९९६-९७ या वर्षाची सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक १३ मध्ये दिली आहे.

सन १९९८ मध्ये जिल्ह्यात वस्त्रोद्योग या प्रवर्गातील उद्योगांमध्ये गिरणीमध्ये सूत, कापड तयार करणे व त्यावरील अन्य प्रक्रिया करणे या प्रकारातील २ उद्योगघटक कार्यरत होते. त्यात १९८ कामगार (१८७ पुरुष व ११ स्त्रिया) होते. स्वेटरसारखे हाताने विणकाम केलेल्या कापडाच्या उत्पादनामध्ये १ युनिट कार्यरत होते. यावर्षी त्यात ३५ कामगार (२५ पुरुष व १० स्त्रिया) होते. वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार १९९७-९८ मध्ये जिल्ह्यातील वस्त्रोद्योग प्रवर्गातील सुती कापडाचे उत्पादन करणाऱ्या मोठ्या उद्योगांचे एकूण स्थिर भांडवल रु.१कोटी १३ लाख २८ हजार, खेळते भांडवल (-) १० कोटी ४६ लाख ३५ हजार होते. त्यात कर्मचाऱ्यांची संख्या २५३ होती. त्यापैकी १९४ कामगार होते. त्यावर्षी त्यांच्या वेतनावर रु.१ कोटी ६८ लाख ७५ हजार खर्च करण्यात आले. त्यावर्षी या उद्योगातील एकूण मिळकत रु.२ कोटी ३७ लाख ६८ हजार होती. या उद्योगात रु.१३ कोटी ९६ लाख, ९५ हजार किंमीचे एकूण उत्पादन झाले. तसेच रु.१ कोटी ८२ लाख ४५ हजार इतक्या किंमतीची मूल्यवृध्दी झाली.[८६]

दिनांक ३१ मार्च १९९८ अखेर जिल्ह्यात २ हातमाग संस्था कार्यरत होत्या त्यातील हातमागाची संख्या १४७ होती व सभासदांची संख्या १२८ होती. त्यावर १३६ व्यक्ती काम करीत असत.[८७] सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यात सुती कापडांची उत्पादने, सूत कातणे, कापड विणणे व त्यावरील प्रक्रिया करणे या प्रवर्गातील नोंदणी झालेले ३ कारखाने होते. त्यापैकी १ कारखाना बंद होता व उर्वरित २ कारखाने चालू होते. त्यात एकूण, ९९ कामगार (१६९ पुरुष व ३० स्त्रिया) होते.[८८] त्याच वर्षाच्या अखेरिस जिल्ह्यात परिधान करावयाची कपडे तयार करणे, ड्रेसिंग व फरची (सुताची) रंगवणी (डाईंग) करणारे ३० लघु उद्योग घटक सुरू होते. त्यात एकूण १५८ कामगार होते. त्यातील एकूण गुंतवणूक रु.२४.५१ लाख होती, तर त्यावर्षी रु.१ कोटी ८५ लाख ६९ हजार किंमतीचे उत्पादन झाले.[८९]

इ.सन १९८१-८३, १९८४-८५, १९९०-९१ व १९९३-९४ ते १९९६-९७ या वर्षासाठी वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील वस्त्रोद्योग प्रवर्गातील (कापूस वटण व दाबणी कारखान्यांसह सूत कातणे व सर्व प्रकारचे कापड विणकाम करणे तसेच तयार कापडाच्या वस्तू तयार करणाऱ्या उद्योगासह) सर्व प्रकारच्या उद्योगांची सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक २ ते ८ मध्ये दिली आहे. तसेच या वस्त्रोद्योग प्रवर्गातील जिल्ह्यातील काही प्रमुख व उल्लेखनिय अशा उद्योग घटकांची माहिती पुढे स्वतंत्रपणे देण्यात आलेली आहे.

---

८५. महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा १९९५ व १९९६ पृ.५८६, ८७, ८८, ५९९ व ६००.
८६. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-लातूर जिल्हा**, १९९८-९९,पृ.६०, ६२, ६८.
८७. संचालनालय,हातमाग,यंत्रमाग वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या माहिती पुस्तिकेवरुन-पृ.५, ३६, ४५.
८८. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-लातूर जिल्हा**,२००४-०५,पृ.९५.
८९. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारीत.

अनुक्रमणिका

मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती (सूत व कापड उत्पादनाचे उपकेंद्र :उदगीर व औसा उपकेंद्र) :[९०] मराठवाड्यात स्वामी रामानंद तीर्थ व गोविंद भाई श्राफ यांनी १९३४ च्या सुमारास 'स्वावलंबन व स्वदेशीचा वापर' व राष्ट्रहिताच्या तत्त्वांसाठी हैद्राबाद खादी समिती स्थापन केली. त्या मार्फत राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेल्या कार्यकर्त्यांचा संच तयार करून त्यांच्या पुढाकाराने तेलंगणा व मराठवाड्यात अनेक खादी उत्पादन केंद्रे स्थापन केली. राज्य पुनर्रचनेनंतर १९६२ मध्ये कायद्यानुसार 'मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती' स्थापन करण्यात आली. या समिती मार्फत विविध ठिकाणी खादी उत्पादन व विक्री केंद्रे उभारल्यामुळे ग्रामीण भागातील बलुतेदार व कारागिरांना रोजगाराच्या संधी मिळाल्या व त्यातून त्यांना आर्थिक स्थैर्यही प्राप्त झाले. केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन यांनी 'रिबेट' द्वारा आर्थिक मदत केली. त्यामुळे मराठवाड्यात उदगीर, औसा, कंधार, देगलूर, धर्माबाद, पाथ्री, वसमत अशा अनेक गावांत खादी उत्पादन केंद्रांची स्थापना करण्यात आली. नांदेड, परभणी, औरंगाबाद, हिंगोली, बीड, परळी, अंबाजोगाई, लातूर, उस्मानाबाद, कळंब अशा अनेक शहरात विक्री केंद्रे स्थापन करण्यात आली. या संस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे १) या संस्थेच्या विविध उत्पादन केंद्रात तयार केलेल्या खादीची विविध विक्री केंद्रामार्फत महाराष्ट्रात वर्षाला सुमारे रु.५ कोटींची खादी विक्री करणारी सर्वात मोठी एकमेव संस्था आहे. २) राष्ट्रध्वजाची खादी (जी उदगीर येथे बनते) व राष्ट्रध्वज तयार करणारी ही महाराष्ट्रातील एकमेव संस्था आहे. ३) जीन खादी निर्माण करणारी देखील ही महाराष्ट्रातील एकमेव संस्था आहे. ४) नैसर्गिक वनस्पतीच्या रंग निर्मितीपासून खादी रंगाई करणारी ही राज्यातील एकमेव संस्था आहे. ५) देशातील विविध २२५ खादी संस्थांशी देवाण-घेवाण करणारी व वार्षिक रु.१५ कोटींची उलाढाल करणारी ही एकमेव संस्था आहे. ६) सन २००५-०६ अखेर २०० कार्यकर्ते व ३००० कारागीर व विणकरांना कायम काम देणारी अशा प्रकारची ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी एकमेव ग्रामोद्योग संस्था आहे. ७) ना नफा ना तोटा या तत्वावर चालणारी ही संस्था आहे. अशा प्रकारची वैशिष्ट्ये असलेल्या 'मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती' नांदेड या उद्योग संस्थेचे मुख्यालय नांदेड हे असून या संस्थेने मराठवाड्यातील अन्य जिल्ह्यात खादी उत्पादनाचें उपकेंद्रे निर्माण केली. त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्यातही (पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्यात) उदगीर आणि औसा या दोन ठिकाणी खादी उत्पादनाची केंद्रे स्थापन केली त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

उदगीर उपकेंद्र : इ.स.१९६७ मध्ये मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती नांदेड अंतर्गत उदगीर येथे खादी ग्रामोद्योग उपकेंद्र सुरू करण्यात आले. सुरुवातीस या उपकेंद्रामध्ये तेलघाणी काम, आंबाडा किंवा ज्यूट पासून तरटी (चटईचा प्रकार) निर्मितीचे काम केले जात होते. त्यावेळेस या उपकेंद्रात २५ महिला कारागीर काम करत होत्या. शिवाय सुरुवातीपासूनच येथे सूत कताईचे देखील काम चालत होते. सूतकताई करणाऱ्या कारागिरांकडे दोनत्राकी लाकडी चरखा होता. सूत उत्पादन त्यांच्या घरीच चालत असे. त्याचप्रमाणे कापड विणकामही घरोघरी चालत असे. त्यावेळी येथे १०० माग हे खड्डा माग होते. त्यामुळे सुताचा दर्जा चांगला राहत नसे व अशा सुतापासून कापड विणकाम करण्यास त्रास होत असे. त्यावेळी येथे दररोज दोन ते तीन मीटर कापड विणकाम होत असे. पुढे १९७४ पासून खादी उत्पादनात सुधारणा करण्यात आली. उदगीर येथील उपकेंद्रात बारात्राकी १०० चरखे तामीळनाडूतील कोईमतूर येथून आणण्यात आले. हे चरखे पायाने चालवायचे (पायडल चरखे) होते. त्यावेळी रुईचे कार्डिंगसाठी कार्डिंग मशीन व कार्डिंग केलेल्या रुईपासून पोणी बनविण्याचे कामासाठी फ्लायर मशीन व सुतासाठी बारात्राकी चरखा ही उपकरणे अथवा यंत्रे वापरण्यात येत होते. पोनीपासून सूत तयार केले जाते. नवीन चरख्यामुळे सुताची समानता वाढली होती व

९०. व्यवस्थापक, मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती नांदेड, उदगीर उपकेंद्र यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

बारात्राकी चरख्यामुळे सूत उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. त्यामुळे सुताचा साठा वाढत होता, पण खड्डा मागावर विणकाम जास्त होत नव्हते म्हणून १९८० मध्ये नेपाळी सेमी ॲटोमॅटीक लूम (पायडल माग) याचे ४० नग खरेदी केले. त्यावेळी त्याची एकूण किंमत रु.१ लाख ८ हजार होती.

उदगीर उपकेंद्रात ४० माग असून त्यात ६० टक्के कापडाचे उत्पादन राष्ट्रध्वजासाठी लागणाऱ्या कापडाचे सुरू होते. याशिवाय टॉवेल, नॅपकीन, सतरंजी, लुंगी, कॉटन शर्टींग, पॉली शर्टींग ही उत्पादने येथे तयार होतात. तथापि, सद्य:स्थितीत प्रामुख्यानें राष्ट्रध्वजाचे कापड विणाईचे काम येथे सुरू आहे. २००१-०२, २००४-०५ आणि २००५-०६ या वर्षातील यातील खेळते भांडवल अनुक्रमे रु.२३ लाख ७४ हजार ५४४, रु.२५ लाख ९६ हजार २७४ व रु.१२ लाख ९७ हजार २७२ होते. स्थिर भांडवलात रु.१ लाख ८ हजार ४०० किंमतीचे ४० नेपाळी पायडल सेमी ॲटोलूम (माग) होते. इलेक्ट्रिकल साईजिंग आहे त्याची किंमत रु.१ लाख ८७ हजार ५०० होती. या उपकेंद्रात २०५ सूत कताई कामगार व ६० विणाई कामगार होते. त्यांना २००१-०२ आणि २००५-०६ मध्ये अनुक्रमे रु.१० लाख ५१ हजार २४० आणि रु.५ लाख ३४ हजार ४८१ मजूरी देण्यात आली. याशिवाय एकूण ११० कर्मचारी सेवेत होते त्यापैकी २० कर्मचाऱ्यांना सन २००५-०६ मध्ये रु.२ लाख २५ हजार आणि २० अन्य कर्मचाऱ्यांना रु.५४ हजार वेतनापोटी देण्यात आले. या उपकेंद्रातील वार्षिक उत्पादन क्षमता १८ टन कापडाची आहे. येथील उत्पादन केंद्रात वर्षभरात सरासरी २९५ दिवस काम चालते. येथे वापरण्यात येणारा कच्चामाल कॉटनसूत बहुतांश येथेच तयार केले जाते. पॉलीमर इत्यादी धागा व इतर कच्चा माल प्रामुख्याने मध्य प्रदेशातील शिओर, पौनी, कर्नाटकातील चित्रदुर्ग येथून खरेदी केला जातो. सन २००१-०२, २००४-०५ आणि २००५-०६ या वर्षामध्ये अनुक्रमे रु.१० लाख २३ हजार ३०४, रु.११ लाख ९२ हजार ४३५ आणि रु.५ लाख ६२ हजार ७२१ किंमतीचा कच्चा माल उत्पादनासाठी वापरण्यात आला. उदगीर उत्पादन केंद्रात २००१-०२, २००४-०५ आणि २००५-०६ या वर्षामध्ये अनुक्रमे रु.४० लाख ३४ हजार ९५३, रु.४९ लाख ३६ हजार ६२३ आणि रु.१७ लाख ६३ हजार २१६ किंमतीचे उत्पादन झाले. त्याच वर्षात या उत्पादनापैकी विक्री झालेल्या मालाची किंमत अनुक्रमे रु.३५ लाख ३६ हजार ०५३, रु.४९ लाख १५ हजार ८९४ आणि रु.२२ लाख ८८ हजार ५४१ इतकी होती. या केंद्रातील माल मध्यवर्ती वस्त्रागार नांदेड येथे पाठविला जातो. तेथून मराठवाड्यातील विविध ठिकाणच्या २८ विक्री केंद्रांमध्ये विक्रीसाठी पाठविला जातो. उदगीर येथील विक्री केंद्रामध्ये एकूण १५ कर्मचारी कार्यरत आहेत.

इ.स.१९९५ पर्यंत महाराष्ट्र शासन व केंद्र शासन खादी मालावर रिबेट देत होते. म्हणून खादी विक्री मोठ्या प्रमाणावर होती. १९९७ पर्यंत वर्षाला ३ कोटी पर्यंत विक्री होत असे. सन १९९० ते १९९५ पर्यंत उत्पादन व विक्रीमध्ये वाढ झाल्यामुळे या केंद्रामध्ये नफा झाला. सन १९९५ पर्यंत महाराष्ट्र शासन खादी ग्रामोद्योग समितीकडून शासनाच्या सेवेतील सेवकांसाठी (चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी) खादी खरेदी करीत होते. त्या नंतर मात्र शासनाने आर्थिक मदत बंद केल्यामुळे कच्चामाल व खेळते भांडवल कमी होऊन उत्पादनात घट झाली.

औसा उपकेंद्र[९१] : इ.स.१९६७ मध्ये मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती नांदेडने औसा येथे एक खादी वस्त्रोत्पादनाचे उपकेंद्र स्थापन केले. या उपकेंद्राअंतर्गत अक्कलकोट व आजूबाजूच्या परिसरातील मैंदरगी, वागदरी, तोळनूर, करजगी, वळसंग गावांतील कारागिरांकडून विविध प्रकारचे खादी कापड

९१. कापसे, चंद्रकांत रामलिंग, व्यवस्थापक मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती, नांदेड, औसा उपकेंद्र, औसा यांच्या मुलाखतीवर व सन २००६-०७ मधील दर्शनिका विभागाच्या सर्वेक्षणावर आधारित.

विणकाम या केंद्राच्या नियंत्रणाखाली सुरू आहे. औसा खादी उत्पादन उपकेंद्रात सुरुवातीस फक्त सूतकताई केली जात असे. सन १९७२ पासून दोसुती जाड खादी जी शासकीय सेवेतील शिपायांसाठी शासन खरेदी करीत असे, असे कापड विणकामास औसा येथे सुरुवात झाली. पुढे १९८७-८८ मध्ये खादी विणकाम बंद होऊन सतरंजी, चादर विणकाम सुरू होते. येथे सूत कताईमध्ये २० ते १५० काऊंटचे सूत निर्माण केले जते. १०० काऊंटच्या पुढील मापाचे सूत हे तलम कापड विणकामासाठी वापरले जाते ह्या तलम कापड निर्मितीसाठी तयार केलेल्या सुतापासून औसा उपकेंद्राअतर्गत असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट (औसा येथून सुमारे १३० कि.मी.) परिसरातील वर उल्लेख केलेल्या गावांतील विणकरांकडून तलम असे मसलिन खादीचे विणकाम केले जाते. तेथील कारागीर साधी खादी, मसलिन खादी, धोती, शर्ट व कोटचे कापड, टॉवेल, लुंगी, नॅपकीन तसेच पॉलीवस्त्र (ज्यात ५० टक्के कॉटन व ५० टक्के पॉली फायबर वापरले जाते.) इत्यादि प्रकारचे वस्तनिर्मिती करतात. औसा येथील खादी उपकेंद्रातील सतरंजी व चादर उत्पादनासाठी लागणाऱ्या सुताव्यतिरिक्त उर्वरित सूत अक्कलकोट परिसरातील गावांमध्ये चालणाऱ्या विणकामासाठी पाठविले जाते. तसेच अक्कलकोट परिसरातील कारागीरही काही प्रमाणात तेथेच सूतकताई करतात. औसा येथे मसलिन कापडाच्या, सूतकताईसाठी राजकोटचे लाकडी १०० चरखे आहेत. सन २००३-०४ पर्यंत हे सर्व चरखे चालू होते. त्यावर १०० महिला काम करीत होत्या. सन २००३-०४ नंतर मसलिन सूत तयार करण्याचे ८० चरखे सुरू होते. त्यावर ८० महिला कारागीर होत्या. मध्यम प्रकारचे सूत कताईचे १०० चरखे १९९० पर्यंत पूर्णत: सुरू होते. त्यानंतर केवळ ६ चरख्यांवर सतरंजी व चादरसाठी सूतकताई केली जाते. या क्षेत्रातील कारागिरांना अन्य क्षेत्रात कामाचा अधिक मोबदला मिळू लागल्यामुळे उपकेंद्रातील कारागिरांची संख्या कमी होऊन अन्य चरखे बंद पडले. सन २००३-०४ पर्यंत औसा येथील सर्व प्रकारचे एकूण २०० चरखे सुरू होते. सद्या औसा येथील खादी उत्पादन केंद्रात एकूण ८६ महिला कारागीर कार्यरत आहेत. एका महिला कारागिराकडून दिवसाला मध्यम प्रकारचे सुताच्या सुमारे २० गुंडी (एका गुंडीत १०० मीटर धागा असतो.) उत्पादन केले जाते. तर मसलिन धागा (सूत) दिवसाला १७ ते १८ गुंडी उत्पादन केले जाते. अक्कलकोट अंतर्गत गांवामध्ये सूत कताईसाठी ११० चरखे असून त्यावर १०० कारागीर होते. औसा येथे २५ हातमागापैकी १० हातमागांवर सतंरजीचे व दोन हातमागावर चादरचे उत्पादन केले जाते. उर्वरित हातमाग कारागिराअभावी बंद आहेत. तथापि, सतरंजी व चादर विणकामासाठी एकूण २२ महिला कारागीर आहेत. अक्कलकोट येथे मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीचे ३५ हातमाग आहेत तर त्या परिसरातील गावातील कारागिरांकडे त्यांचे स्वत:चे हातमाग आहेत. तेथील कारागीर अक्कलकोट येथून सूत घेऊन कापड विणकाम करून औसा केंद्राकडे जमा करतात. तेथील कारागिरांना उक्ता पध्दतीने किंवा पीस वर्कवर मजूरी दिली जाते. औसा येथे विविध आकाराच्या सतरंजीचे विणकाम केले जाते. किमान ४ x ७ चौ.फूट आकाराच्या सतरंजी तयार केल्या जातात. सतरंजी निर्मितीस सद्या प्रति चौ.फुटाला रु.२१.२० इतकी किंमत पडते. चादर उत्पादनामध्ये येथे फक्त ५४ x ९० चौ.फूट या नियमित आकाराच्या चादरींचे उत्पादन केले जाते. चादरीच्या एका नगाची उत्पादन किंमत २००६-०७ मध्ये रु.२५६.५७ इतकी आहे. सन २००३-०४ पर्यंत टॉवेलचेही उत्पादन केले जात होते. त्याची साधारणत: १.५ मीटर लांबी व रुंदी ८० सें.मी.होती. याची प्रतिनग किंमत रु.८३ प्रमाणे होती.

औसा उपकेंद्राअंतर्गत सर्व प्रकारच्या वस्त्रनिर्मितीसाठी लागणारा कच्चा माल नांदेड येथील मुख्य कार्यालयाकडून पुरविला जातो. पॉलीवस्त्र निर्मितीसाठी, पॉली फायबर हे केरळातील त्रिचूर येथून नांदेड मुख्यालयामार्फत मागणीप्रमाणे पाठविले जाते. या केंद्राअंतर्गत विणकाम केलेले सर्व कापड नांदेड मुख्यालयास पाठविले जाते. तेथून ते मराठवाड्यातील सर्व विक्री केंद्रावर पाठविले जाते. सर्व चरखे व हातमाग, अन्य

अनुक्रमणिका

भांडवली वस्तू यांची खरेदी समितीच्या मुख्यालयाकडूनच केलेली आहे. तसेच मुख्यालयाकडून दरमहा कच्चामाल खरेदी, मजूरी, वेतन आणि इतर खर्चासाठी माहवार खर्च भागविला जातो.

औसा येथे सदर उपकेंद्रात सुताचे व कापडाचे रंगकामही केले जाते. अक्कलकोट उत्पादन केंद्राकडून प्राप्त होणाऱ्या कापडाचे रंगकाम येथे केले जाते. ब्लिचिंग व रंगवणी (डाईंग) च्या कामासाठी येथे ४ पुरुष असून त्यांना उक्ता पध्दतीने मजूरी दिली जाते. खादीचे १० ते १५ मीटरपर्यंतच्या कापड धुलाईसाठी सद्या रु.२ प्रतिठाण व सूत रंगविण्यासाठी प्रतिकिलो रु.२ प्रमाणे मजूरी दिली जाते.

इ.स.२००५-०६ मध्ये या केंद्रात (अक्कलकोट उत्पादन केंद्रासह) एकूण रु.२६ लाख ३५ हजार १२४ किंमतीचा कच्चा माल वापरण्यात आला. त्या वर्षी औसा येथे रु.२० लाख ३१ हजार ३४२ किंमतीचे सूत, २,०२६ नग सतरंजी व ५४३ मीटर खादी कापड उत्पादन झाले. या वर्षी सतरंजीचे उत्पादनाची किंमत रु.१३ लाख ७५ हजार ३८३ होती. या वर्षी औसा येथील कारागिरांना एकूण रु.७ लाख २८ हजार ६६० मजूरी देण्यात आली. अक्कलकोट केंद्रामध्ये याच वर्षी मध्यम खादीचे रु.१९ लाख ९० हजार ३१५, मसलिन खादीचे रु.२० लाख ४ हजार ९३१ किंमतीचे उत्पादन व रु.९३ हजार ३९५ किंमतीचे पॉलीवस्त्र निर्मिती झाली.

अंध, अपंग पुनर्वसन केंद्र, बुधोडा[९२] : इ.स.१९८६ मध्ये औसा तालुक्यातील बुधोडा या गावी ग्रामीणश्रमिक प्रतिष्ठाण या स्वयंसेवी संस्थेने जिल्ह्यातील अंध व अपंगाना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन त्यांना कायमस्वरूपी स्वयंरोजगार मिळवून देणे व त्यांच्या श्रमातून त्यांचे पुनर्वसन करता यावे यासाठी, अंध अपंग पुनर्वसन केंद्र सुरू केले. या केंद्रात सुतापासून हातमागावर टॉवेल, बेडशीट, चादर, सतरंजी, दवाखान्याचे ऑर्डरनुसार हव्या त्या रंगाचे व आकाराच्या कापडी वस्तू बनवून देणे, आसनपट्ट्या, शाल, उलन शाल इत्यादी वस्तूंचे विणकाम केले जाते. येथे १९९३ मध्ये नाबार्डव्दारे ४० लाभार्थ्यांसाठी उलन गालिचा निर्मितीचा प्रकल्पही सुरू करण्यात आला. या उत्पादन केंद्रात सन २००१ पासून जुन्या साड्यांपासून विविध आकारातील सतरंजी, जाड कारपेट, साडीचे साधे तसेच जाड आसन, साडयांची आसनपट्टी, पायपोस, शबनम बॅग, ज्यूट पायपोस इत्यादि उत्पादने तयार केली जातात. ही उत्पादने तयार करण्यासाठी या उद्योग संस्थेत २० हातमाग कार्यरत आहेत. ही संस्था सेवाभावी उद्योगसंस्था असल्यामुळे सन १९९१ मध्ये या संस्थेस आय.डी.बी.आय.यांचेतर्फे इमारतीसाठी अनुदान मिळाले. सन २००१ ते २००६ या कालावधीमध्ये या केंद्रात अस्थिव्यंगासाठी एकूण रु.५० हजार खर्च करून २ स्वतंत्र मशीन बनविल्या आहेत. सदर हातमागावरील विणकाम हे अंध व अपंग कारागिरांकडून केले जाते. या केंद्रातील सन २००५-०६ या वर्षातील स्थिर भांडवलात इमारत ज्याची सद्याची किंमत रु.२५ लाख आहे. मशीनची किंमत रु.५ लाख आहे. खेळते भांडवल रु.२ लाख आहे. येथील विणकामासाठी लागणाऱ्या कच्च्या मालात सूत, पॉलीस्टर, उलन (लोकर), कॉटन इत्यादींचा समावेश आहे. कच्चा माल प्रामुख्याने सोलापूर येथून खरेदी केला जातो. या केंद्रात प्रतिमाह सरासरी रु.२०,००० किंमतीचा कच्चा माल वापरण्यात येतो. वरील वर्षी उत्पादनाचा खर्च प्रतिमाह सरासरी रु.३० हजार इतका आला आहे आणि विक्री किंमत प्रतिमाह सरासरी रु.३५,००० इतकी मिळाली. येथील उत्पादित कापड व कापडाच्या वस्तू विक्रीसाठी लातूर, औरंगाबाद व पुणे येथे पाठविले जाते. तसेच हॉस्पीटल, वसतिगृह यांना ऑर्डरप्रमाणे माल बनवून दिला जातो. या केंद्रात एकूण २५ अंध व अपंग कारागीर आहेत. त्यापैकी १५ स्त्री आणि १० पुरुष कारागीर आहेत. यावर्षी यांच्या वेतनासाठी रु.४ लाख ५० हजार खर्च करण्यात अले. इतर कर्मचारी संख्या ५ आहे. त्यांच्या

९२. सचिव, ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान, बुधोडा यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

वेतनावर रु.१ लाख २० हजार खर्च करण्यात आले. येथे ज्यूट वस्तू प्रशिक्षण व निर्मिती केंद्रही राष्ट्रीय पटसन विकास केंद्राव्दारे सुरू केले आहे. या प्रकल्पात ज्यूटच्या वर उल्लेख केल्याप्रमाणे विविध वस्तू निर्मितीचे प्रशिक्षण दिले जाते. अंध कारागिरांना या वस्तूंचे विणकाम करणे सोपे व्हावे ह्याकरिता दोन विशिष्ट प्रकारचे हातमाग तयार करण्यात आले आहेत.

सूतगिरणी : सन १९६४ मध्ये लातूर येथे 'जवाहर सहकारी कापूस उत्पादक सूत गिरणी' ही लातूर शहरातील सहकारी तत्त्वावरील पहिली सूत गिरणी सुरू झाली. त्यामध्ये सुरुवातीची गुंतवणूक रु.६५ लाख व १२,००० चात्या होत्या.[९३] जवाहर सहकारी कापूस उत्पादक सूत गिरणीची सविस्तर माहिती पुढे स्वतंत्रपणे देण्यात आली आहे. उदगीर तालुक्यातील कापसाची उत्पादन क्षमता लक्षात घेऊन तेथील लोकांनी १९७६ मध्ये उदगीर येथे 'महात्मा फुले सहकारी सूत गिरणी' स्थापन केली. त्याची सविस्तर माहिती स्वतंत्रपणे पुढे देण्यात आली आहे. सन १९९० मध्ये लातूर येथे 'इंदिरा सहकारी सूत गिरणी' स्थापन झाली. त्यातील महत्त्वाच्या बाबींची माहिती पुढे स्वतंत्रपणे देण्यात आली आहे. सन १९९१ मध्ये 'प्रियदर्शनी अनुसूचित सहकारी सूत गिरणी' स्थापन झाली. या गिरणीतील सभासदांची संख्या १,२०० होती. या गिरणीचे २०००-०१ मध्ये भाग भांडवल रु.१ कोटी ९८ लाख ८९ हजार, स्थिर भांडवल रु.१९ लाख २ हजार व खेळते भांडवल रु. ५ कोटी ४ लाख ६७ हजार होते. त्यात सुरुवातीला तीन कर्मचारी होते. त्यावर्षी त्यांचे वेतनावर रु.१ लाख २६ हजार खर्च झाले. या गिरणीची उभारणी सुरू असल्यामुळे उत्पादनास सुरुवात झालेली नाही.

सन १९९४ मध्ये जिल्ह्यात औसा येथे 'राजीव गांधी सहकारी सूत गिरणी मर्यादित, औसा' ही या प्रवर्गातील सहकारी क्षेत्रातील मोठी सूत गिरणी स्थापन झाली त्यावेळी त्यातील सभासद संख्या २३९ होती. सन २०००-०१ पर्यंत या सूत गिरणीचे भाग भांडवल रु.३ लाख जमा झाले होते. संस्था नोंदणीकृत झाल्यापासून पुढे ९ वर्षात सदर सूतगिरणी चालू करणेसाठी कोणतेही प्रयत्न केले गेले नाहीत. त्यामुळे ही सूतगिरणी बंद स्थितीत असून भविष्यात या प्रकल्पाची उभारणी करू शकत नाही म्हणून ही संस्था दिनांक १९ जुलै २००४ पासून अवसायनात घेण्यात आली आहे.

इ.सन २००६-०७ या वर्षअखेरपर्यंत लातूर जिल्ह्यात ४ नोंदणीकृत सहकारी सूत गिरण्या असून त्यापैकी २ सहकारी सूत गिरण्या उत्पादनाखाली आहेत व उर्वरित २ सूत गिरण्यांपैकी प्रियदर्शनी अनुसूचित जाती सहकारी सूतगिरणी म.लातूर ही अद्याप उभारणी खाली आहे. या सूत गिरणीचे लातूर येथे उभारणीचे काम सदरील वर्ष अखेर ६५ टक्के पूर्ण झाले असून या सूत गिरणीचे २००६ मधील वसूल भाग भांडवल रु.१ कोटी ४९ लाख ९६ हजार आहे. सन १९९४ मध्ये औसा येथे स्थापन झालेली 'राजीव गांधी' सहकारी सूत गिरणी ही उत्पादन सुरू होण्यापूर्वीच उभारणी अभावी अवसायनात घेण्यात आली.[९४]

पुढे जिल्ह्यातील काही सूत गिरण्यांची माहिती स्वतंत्रपणे देण्यात आली आहे.

जवाहर सहकारी कापूस उत्पादक सूत गिरणी मर्यादित, लातूर[९५] : सन १९६४ मध्ये तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात लातूर येथे सहकारी तत्त्वावरील मोठ्या उद्योग क्षेत्रातील पहिली सूत गिरणी सुरू झाली. यातील सुरुवातीस भाग भांडवल रु.४९.२९ लाख व गुंतवणूक रु.६.५ लाख होती. यात त्यावर्षी

९३. भिंगे, सुभाष, पूर्वोक्त यांच्या माहितीवरून.
९४. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
९५. संचालक महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ म., मुंबई तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१२ हजार चात्या होत्या. १९८१ मध्ये यातील चात्यांची संख्या वाढून ती २८ हजार ७५० चात्या इतकी झाली. यावर्षी कारखान्याचे एकूण भाग भांडवल रु.११८.३२ लाख व राखीव निधी (घसारा वजा जाता) रु.१४८.३२ लाख होता. पुढे सन १९८५-८६ मध्ये या सूत गिरणीमध्ये स्थापित चात्यांची संख्या वाढून ती ४९ हजार ७५२ झाली. यावर्षी यातील एकूण भाग भांडवल रु.११९.३६ लाख, राखीव निधी रु.३१५.४० लाख होता. १९९२-९३ मध्ये या सूत गिरणीतील स्थिर भांडवल रु.९.२४ कोटी होते. या वर्षी त्यात रु.१४ कोटी चे उत्पादन झाले. त्यासाठी ७५७ कामगार होते. सन १९९५-९६ मध्ये या गिरणीतील चात्यांची संख्या कमी होऊन ती २५, ३३६ पर्यंत राहिली. यावर्षी त्यात राखीव निधी रु.३२५.४० लाख होता. यावर्षी यातील एकत्रित तोटा रु.१३ कोटी ८३ लाख १२ हजार होता. अलिकडील काळात लातूर जिल्ह्यात कापसाचे उत्पादन घटले व पुरेसा कापूस उपलब्धतेअभावी या गिरणीचा तोटा वाढत गेल्यामुळे ही सूत गिरणी पुढे सन १९९९मध्ये बंद पडली. त्यावेळी यात ७१६ कामगार होते.

म.फुले सहकारी सूत गिरणी मर्यादित, उदगीर[९६] : सन १९७६ मध्ये जिल्ह्यात उदगीर येथे सहकारी तत्त्वावर चालणारी मोठ्या उद्योग क्षेत्रातील म.फुले सहकारी सूतगिरणी स्थापन झाली. या गिरणीच्या उभारणीमध्ये काही अधिक कालावधी गेला. पुढे १९९० नंतर यातील उत्पादनास सुरुवात झाली. सन १९८५-८६ मध्ये या संस्थेत ८३२ सभासद होते. यावर्षी त्यातील एकूण भाग भांडवल रु.३ लाख २७ हजार, खेळते भांडवल रु.७ लाख २१ हजार होते. त्यावर्षी केवळ ३ कर्मचारी संस्थेचे प्रशासकीय कामकाज पाहत होते. सन १९९०-९१ मध्ये यातील सभासद संख्या १,४४७ झाली. यावर्षी यातील भाग भांडवल रु.१४ लाख ६९ हजार होते. सन २०००-०१ मध्ये या सूत गिरणीचे उत्पादन सुरू होते. यावर्षी यातील सभासद संख्या १,८०३ होती. यावर्षी यातील एकूण भाग भांडवल रु.३ कोटी ३१ लाख ०५ हजार, खेळते भांडवल रु.७ कोटी ५० लाख ९९ हजार होते. यंत्र व सयंत्रांची त्यावर्षी किंमत रु.६ कोटी ९६ लाख ५६ हजार होती. या गिरणीत यावर्षी ३८,६५० किलो ग्रॅ.सुताचे उत्पादन झाले. त्यासाठी ७५ कामगार होते. सदर सूत उत्पादनाची किंमत रु.२७ लाख ३२ हजार होती. उत्पादनासाठी रु.२० लाख ९० हजार किंमतीचा ५६,३१४ क्विंटल कच्चा माल वापरण्यात आला. यावर्षी वरील झालेल्या उत्पादनाची विक्री किंमत रु.३५ लाख ९२ हजार प्राप्त झाली.

या कारखान्यात चात्याऐवजी ३३६ 'रोटोर' स्थापित करण्यात आले आहेत. सन २००४-०५ मध्ये या उद्योग संस्थेची सभासद संख्या वाढून ती १,८३३ पर्यंत पोहोचली. त्यावर्षी यातील एकूण भाग भांडवल रु.३ कोटी ३१ लाख २९ हजार, खेळते भांडवल रु.७ कोटी २२ लाख ५० हजार होते. यावर्षी यातील कामगार संख्येत घट होऊन ती ६० झाली. त्यांचेकडून ६९,७५२ कि.ग्रॅ.सुताची निर्मिती करण्यात आली. त्यासाठी रु.३८ लाख ०२ हजार किंमतीचा कच्चा माल वापरण्यात आला, आणि उत्पादित मालाची विक्री किंमत रु.४० लाख १३ हजार इतकी प्राप्त झाली. सन २००५-०६ मध्ये ही गिरणी उत्पादनाखाली नसून यावर शासन नियुक्त प्रशासक मंडळ कार्यरत आहे.

इंदिरा सहकारी सूतगिरणी मर्यादित, लातूर[९७] : दिनांक २७ सप्टेंबर १९९० रोजी या सूत गिरणीची नोंदणी झाली व सन १९९४ मध्ये प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात झाली. या सूत गिरणीमध्ये प्रामुख्याने २०,३४,४० काऊंटचे सुताचे उत्पादन केले जाते. या सूत गिरणीमध्ये उत्पादन प्रक्रियेत वाया गेलेला कापूस व हार्डवेस्ट ही उपउत्पादने निर्माण होतात. यात सूत निर्मिती करताना दोन ते तीन प्रकारच्या

९६. उक्त कार्यालये.
९७. उक्त कार्यालय.

कापसाचे एकत्रिकरण (मिक्सिंग) करून सूत बनविले जाते. सूत निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल (सरकी विरहीत कापूस) हा महाराष्ट्र राज्य फेडरेशनच्या वेगवेगळ्या झोनमधून तसेच आंध्रप्रदेश व इतर राज्यातील खाजगी व्यापारी यांचेकडून खरेदी केला जाते. हा पुरवठा बारमाही असतो. या सूत गिरणीचे सन २०००-०१ मध्ये स्थिर भांडवल रु.३ कोटी १७ लाख ४३ हजार, गुंतविलेले भांडवल रु.१५ कोटी ९२ लाख होते. त्यावर्षी यातील यंत्र व सयंत्रांची किंमत रु.९ कोटी २४ लाख होती. यात ४,८६० चात्या व ३३६ रोटोर होते व त्यावर्षी यातील उत्पादन क्षमता १० हजार क्विंटल होती. सदर वर्षी त्यापैकी ८,७०० क्विंटलची उत्पादन क्षमता वापरात आली. त्यावर्षी रु.४ कोटी ७१ लाख ५८ हजार किंमतीचा कच्चा माल वापरण्यात येऊन रु.६०९ लाख किंमतीचे ८ लाख ६९ हजार ०५४ किलो सूत उत्पादन करण्यात आले. यासाठी २२५ कामगार होते त्यावर्षी सरासरी ३५७ दिवस या सूत गिरणीचे कामकाज चालले. परंतु यावर्षी या गिरणीस २० लाखाचा तोटा झाला. सन २००५-०६ मध्ये या सूत गिरणीतील चात्यांची संख्या ९,९०० होती. यावर्षी संस्थेचे ९७७ सभासद होते. भाग भांडवल रु.८ कोटी ७ लाख १० हजार, स्थिर भांडवल रु.३ कोटी ३६ लाख ८० हजार, यंत्र संयत्रांची किंमत रु.११ कोटी २३ लाख २१ हजार होती. या वर्षातील उत्पादन क्षमता ११,००० क्विंटल होती. या गिरणीत एकूण ११,४४३ क्विंटल कच्चा माल वापरण्यात आला व ९ लाख ०३ हजार ३४८ किलो सूत निर्मिती झाली. त्याची किंमत रु.६कोटी ६९ लाख ६२ हजार होती. यावर्षी यात २७२ कामगार होते. उत्पादन विक्री पासून रु.६ कोटी ५५ लाख ६६ हजार प्राप्त होऊन त्यावर्षी रु.२६ लाख एकूण नफा झाला. उत्पादित सूत सोलापूर, मालेगाव, इचलकरंजी, धूळे इत्यादी ठिकाणी मागणीप्रमाणे विक्री केले जाते.

यंत्रमाग : सन १९९०-९१ मध्ये लातूर जिल्ह्यात १ सहकारी यंत्रमाग संस्था कार्यरत होती. त्यातील सभासद संख्या २७ होती. सन १९९१ मध्ये लातूर येथे 'गजानन टेक्स्टाईल' हा यंत्रमागावर कापड तयार करण्याचा लघुउद्योग सुरू झाला. त्याचे १९९२-९३ मधील स्थिर भांडवल रु.२ लाख ७१ हजार, खेळते भांडवल रु.५० हजार होते. त्यावर्षी त्यात रु.२ लाख ५० हजार किंमतीचे उत्पादन झाले. यात उत्पादित केलेले कापड स्थानिक बाजारपेठेत विकले जाते. सदर वर्षी या कारखान्यात १० कामगार होते. दिनांक ३१ मार्च १९९८ अखेर महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ म., मुंबई यांच्या नियंत्रणाखालील उद्योग संस्थांमध्ये लातूर जिल्ह्यात १२८ यंत्रमाग होते. त्यांची सभासद संख्या १३६ होती. सन २००३-०४ मध्ये जिल्ह्यात ३ यंत्रमाग सहकारी संस्था कार्यरत होत्या. त्यात एकूण ७६ सभासद होते. त्यांचे भाग भांडवल रु.११ हजार होते. सन २००६-०७ मध्ये या संस्था बंद अवस्थेत होत्या.[९८]

लोकर व रेशीम उद्योग :

लोकर विणकाम : प्राणीज तंतूपैकी लोकर व रेशीम हे दोन प्रकार महत्त्वाचे आहेत. मेंढ्या, बकऱ्या, अपवादात्मकपणे ससे, उंट इत्यादी प्राण्यांची लोकर वस्त्र विणकामासाठी वापरता येते. त्यातही मेंढ्यांची लोकर स्वस्त असते. तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात सन १९०८ च्या सुमारास येथील धनगर त्यांच्याकडील मेंढ्यांच्या लोकरीपासून ब्लँकेट बनवत असत. त्याकाळात त्यानी तयार केलेले ब्लँकेट ही प्रती नग रु.२ ते ३ ला विकली जात असे. सन १९६१ मध्ये जिल्ह्यात वस्त्रोद्योग प्रवर्गातील लोकरीवस्त्र निर्मितीच्या उद्योगांपैकी घरगुती उद्योगात ४४२ पुरुष करागीर आणि ३६५ स्त्री कारागिर कार्यरत होते. तसेच बिगर घरगुती लोकरी वस्त्रोद्योगात १३ पुरुष आणि ८ स्त्री कामगार कार्यरत होते. याच वर्षी

९८. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर आणि संचालनालय, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य, नागपूर यांची माहिती पुस्तिका, पृ.५,३६,४५, तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

जिल्ह्यात १० लोकर विणकर सहकरी संस्था कार्यरत होत्या. सन १९६१ च्या जनगणना अहवालानुसार लोकर विणाईचे प्रशिक्षण चाकूर व निलंगा ह्या केंद्रात दिले जात असे.[९९] त्या काळात जिल्ह्यात ५,८८९ कामगार हे मेंढपाळ होते. त्यापैकी बहुतेकजण ब्लॅकेट, घोंगडी तयार करत असत. तसेच त्या काळात या भागातील लोकर विणकामासाठी लोकरीचा धागादेखील हैद्राबादहून आयात केला जात असे. त्यावेळी उदगीर येथे उत्तम प्रतीची कांबळी तयार केली जात होती. जिल्ह्यातील उदगीर तालुक्याच्या परिसरातील डोंगराळ भूप्रदेश व गवताची कुरणे ही मेंढी पालनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहेत व येथे मेंढीपालन हा प्रामुख्याने धनगर समाजाचा धंदा होता व आजही आहे. मेंढ्यापासून मिळणारी लोकर व त्यापासून तयार करण्यात येणाऱ्या कांबळी, स्वेटर्स व अन्य उपयोगी वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी सन १९७९ च्या सुमारास 'उदगीर उल सोसायटी' या सहकारी संस्थेची स्थापना करण्यात आली.[१००] सन १९८४-८५ मध्ये जिल्ह्यात लोकरी कापड विणण्याचे उद्योग लातूर, उदगीर, औसा व मुरूड येथे सुरू होते.[१०१] येथे लोकरीपासून वर उल्लेख केलेल्या वस्तूंखेरीज शालीचेही उत्पादन केले जाते. अलिकडच्या काळात यंत्रावर विणलेल्या सुबक, आकर्षक व स्वस्त लोकरी वस्तू तसेच तिबेट, लडाख, नेपाळ येथून या भागात येणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील उलनच्या वस्तूंशी येथील वस्तू स्पर्धा करण्यास असमर्थ ठरल्या. त्यामुळे पुढे हा उद्योग येथे नाममात्रस्वरूपात राहिला आहे. तथापि आजही बुधोडा येथील अंध, अपंग पुनर्वसन केंद्रात उलन शालीचे विणकाम केले जाते.

रेशीम उद्योग : सन १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात (पूर्वीचा उस्मानाबाद जिल्हा) रेशीम आयात करून रेशमी कापड विणण्याच्या कामात घरगुती व्यवसायात ८पुरुष व १ स्त्री कारागीर कार्यरत होते.[१०२] त्यानंतर पासून ते अद्यापपर्यंत जिल्ह्यात रेशमी कापड विणकाम चालत असल्याचा उल्लेख कोठेही आढळून आला नाही. तथापि, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, लातूरतर्फे जिल्ह्यातील मुरूड येथे एक तुती रेशीम प्रशिक्षण केंद्र चालविण्यात येते. तुतीची लागवड करून रेशीम उद्योगास उत्तेजन देण्याच्या शासनाच्या नवीन धोरणानुसार जिल्ह्यामध्ये तुतीची लागवड करण्याचे कार्य खादी ग्रामोद्योग मंडळाकडून व रेशीम कोश उत्पादनाची तांत्रिक माहिती व प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्याचे कार्य जिल्हा उद्योग केंद्राकडून करण्यात येते. मुरूड येथील या केंद्रात तुती कलमाची वाटप केंद्रे निश्चित करणे, अंडीपूंज पुरवठा करणे व कोश निर्मितीबाबत मार्गदर्शन करण्यात येते. सन १९८४-८५ मध्ये प्रथम लातूर जिल्ह्यातील मुरूड येथे ग्रामपंचायतीकडून करारावर ७.०७ एकर क्षेत्र जिल्हा रेशीम विकास विभागाने घेतले. त्यापैकी १ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड करून रेशीम पथदर्शक व प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली. या केंद्रामार्फत शेतकऱ्यांना रेशीम उद्योगाबाबत प्रात्यक्षिक माहिती देऊन प्रशिक्षणाची सोय करण्यात आली. त्याच वर्षी भिसे वाघोली ता., जि. लातूर येथे शेतकरी स्तरावर रेशीम उद्योग राबविण्यास सुरुवात झाली.

सन १९९०-९१ पासून खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत लातूर जिल्ह्यामध्ये उदगीर, निलंगा व लातूर या तालुक्यात शासनाच्या योजनेअंतर्गत रेशीम योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. या अंतर्गत उदगीर तालुक्यातील ३१, निलंगा तालुक्यातील १० व लातूर तालुक्यातील ६ गावांतील असे एकूण ४७ गावातील एकूण १०० शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले व या तीनही तालुक्यांतील एकूण ९९.१० एकर क्षेत्रावर तुतीची लागवड करण्यात आली आणि या तीन तालुक्यांतील ८२ प्रशिक्षित शेतकऱ्यांच्या शेतीतील रेशीम

९९. **भारतीय जनगणना, जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, उस्मानाबाद,** १९६१, पृ.४०,४३.
१००. उदगीर शहर-नगरपरिषद उदगीर, रौप्य महोत्सवी स्मरणिका-१९७९, उदगीर, पृ.१३,१४.
१०१. तोंडारे, एस.जी., पूर्वोक्त, पृ.२१.
१०२. **भारतीय जनगणना, जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, उस्मानाबाद** १९६१, पृ.४०,४३.

किडा संगोपनासाठी ८१ एकर क्षेत्र वापरण्यात आले. या शेतकऱ्यांना १२,७४५ अंडिपूंज वाटप करण्यात आले. लातूर जिल्ह्यातील रेशीम शेती करणाऱ्यांना रेशीम कोश विक्रिची सोय मुरूड ता.जि.लातूर येथील खरेदी केंद्रावर करण्यात येते. १९९०-९१ या वर्षी वरील तीन तालुक्यांत एकूण रु.९०,६४५ किंमतीचे २,६५३.९५० कि.ग्रॅ.कोश उत्पादन झाले, तर रु.७३,४८२ किंमतीचे १,४५५ कि.ग्रॅ.कोशाची खरेदी करण्यात आली. पूर्वी जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत खरेदी केलेले रेशीम कोश रेशीम धागा निर्मिती केंद्र पंढरपूर जि.सोलापूर येथील केंद्रास पुढील प्रक्रियासाठी व रेशीम धागा तयार करण्यासाठी पाठविण्यात येत होते. सन २००० नंतर मुरूड येथे रेशीम धागा निर्मितीसाठी 'रीलींग' केंद्र स्थापन झाले. त्याची माहिती पुढे देण्यात आली आहे.

सन १९९५-९६ या वर्षी लातूर जिल्ह्यातील लातूर, उदगीर, निलंगा, औसा तालुक्यातील एकूण २८ गावांतील एकूण ८९ शेतकऱ्यांना तुती लागवड व रेशीम किडा संगोपनविषयी प्रशिक्षण देण्यात आले. या चारही तालुक्यात एकूण ८९ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड करण्यात आली. ८९ पैकी ७८ शेतकऱ्यांनी रेशीम किडा संगोपनासाठी वापरलेल्या एकूण ७८ एकर क्षेत्रासाठी एकूण २५,७२० अंडिपूंज वाटप करण्यात आले. त्या पासून रु.७,८६,६३७ किंमतीचे एकूण ५,८४९.८५ कि.ग्रॅ.कोश उत्पादन झाले. त्यापैकी मुरूड खरेदी केंद्रावर रु.२६,५८१ किंमतीचे २,१०९ कि.ग्रॅ.कोश खरेदी करण्यात आले. यावर्षी कोश खरेदी करून प्रक्रिया करण्यासाठी पंढरपूर येथील केंद्रास पुरवठा करण्यात आले.

सन २०००-०१ मध्ये जिल्ह्यात लातूर, रेणापूर, औसा, अहमदपूर या तालुक्यांतील एकूण २६१ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड करण्याता आली. शेतकऱ्यांना ९६,३९० रेशीम किडा अंडिपूंज पुरवठा करण्यात आले. तर याचवर्षी रु.२८ लाख ९४ हजार ०४७ किंमतीचे २५,९७२ कि.ग्रॅ.कोश उत्पादन झाले. त्यापैकी मुरूड येथे रु.१६ लाख २३ हजार ४३१ किंमतीचे १३,७५६ कि.ग्रॅ.कोशाचे उत्पादन खरेदी करण्यात आले. २०००-०१ मध्ये मुरूड येथे खरेदी केलेल्या कोशावर प्रक्रिया करून रेशीम धागा तयार करण्यासाठी मुरूड येथेच रेशीम धागा निर्मिती केंद्र स्थापन करण्यात आले असून तेथे रेशीम धागा उत्पादन करण्यास सुरुवात झाली.

सन २००३-०४ मध्ये जिल्ह्यात लातूर, रेणापूर, औसा, अहमदपूर व चाकूर या एकूण पाच तालुक्यांतील ६५ गावांतील एकूण ५०९ एकर क्षेत्रावर तुती लागवड करण्यात आली. या वर्षी रेशीम किडा (अळी) संगोपनासाठी ४७६ एकर क्षेत्र वापरण्यात येऊन एकूण ९४,७१२ अंडिपूंज शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आले. यावर्षी रु.३२ लाख ८५ हजार ६२० किंमतीचे ३३,४५६ कि.ग्रॅ.कोशाचे उत्पादन झाले. त्यापैकी मुरूड येथे रु.१० लाख ३९ हजार २१९ किमतीचे ११,३०६ कि.ग्रॅ.कोश खरेदी करण्यात आले.[१०३]

रेशीम धागा निर्मिती (रीलींग) केंद्र-मुरूड[१०४] : सन २०००-०१ मध्ये जिल्ह्यात मुरूड येथे कोशापासून रेशीम धागा तयार करण्यासाठी रेशीम संचालनालय नागपूर यांच्या नियंत्रणाखाली लातूर जिल्हा रेशीम कार्यालयाअंतर्गत 'रीलींग' केंद्र स्थापन करण्यात आले. या रीलींग केंद्रामध्ये शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या रेशीम कोशांची खरेदी करणे, कोश ड्राय करणे व त्यापासून धागा निर्मिती म्हणजे रीलींग करणे इत्यादी कामे केली जातात. या केंद्रात सर्व कामकाज जॉबवर्क आधारावर व ठेकेदारी पध्दतीने केले जाते. सन २००१-०२ मध्ये या रीलींग केंद्रातील यंत्रसामग्रीमध्ये रु.४ लाख ९६ हजार भांडवल गुंतवणूक होती. या वर्षी या केंद्रात १८ कामगार होते त्यांना सदर वर्षी रु.१ लाख ९८ हजार २७८ कामाचा मोबदला देण्यात

१०३. जिल्हा रेशीम विकास अधिकारी, जिल्हा रेशीम कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
१०४. केंद्र प्रमुख, रीलींग केंद्र, मुरूड, ता. जि. लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

आला. उत्पादनासाठी रु.१५ लाख ५७ हजार ८९८ किंमतीचा कच्चा माल वापरण्यात आला व सुमारे ३२ मे. टन इंधन वापरण्यात आले. शिवाय रु.६,००० इतर खर्च करण्यात आला. या वर्षी रु.१७ लाख ९८ हजार ४८८ किंमतीचा रेशीम धागा उत्पादित करण्यात आला. सन २००५-०६ मध्येही या रीलींग केंद्रात १८ कामगार होते. या वर्षी त्यांना रु.१ लाख १५ हजार ३१९ कामाचा मोबदला देण्यात आला. या वर्षी उत्पादनासाठी सुमारे २१ मे.टन इंधन वापरण्यात आले. तसेच रु.४३ हजार ९५० ची नवीन यंत्रसामग्री खरेदी करण्यात आली. इतर खर्च रु.७ हजार ९८० करण्यात आला. तर रु.७ लाख ९७ हजार २५१ किंमतीचा कच्चा माल वापरुन रु.९ लाख २३ हजार ४७५ किंमतीचे रेशीम धाग्याचे उत्पादन करण्यात आले.

या केंद्रातील उत्पादित रेशीम धाग्याची विक्री रेशीम संचालनालय नागपूर यांचेमार्फत केली जाते.

रसायने व रासायनिक पदार्थ

या प्रवर्गात मूलभूत सेंद्रीय व असेंद्रीय रसायने व वायू उत्पादन (आम्ल, अल्कली व त्यांचे द्रावण, ॲसेटिलीन, प्राणवायू व नायट्रोजन वायू), खते व किटकनाशके, रंग, वार्निश व तत्सम उत्पादन, औषध उत्पादन, सुगंधी द्रव्ये, सौंदर्य प्रसाधने, केशभूषा साहित्य, सर्व प्रकारचे साबण, टर्पेंटाईन, आगपेटी, फटाके व इतर रासायनिक उत्पादन (इतरत्र उल्लेख नसलेले) करणारे मोठे, मध्यम व लघु उद्योग क्षेत्रातील कारखाने यांचा समावेश होतो.

साबण उद्योग : सन १९५१ मध्ये जिल्ह्यात मूलभूत औद्योगिक रसायने तयार करण्याच्या कामात ११ व्यक्ति कार्यरत होते तर अन्य रसायने तयार करण्याच्या कामात ३२ व्यक्ति कार्यरत होते. सन १९६१ मध्ये जिल्ह्यात रसायने व त्यापासूनची उत्पादने तयार करण्याच्या घरगुती स्वरुपातील व्यवसायात ४२ पुरुष व १७ महिला आणि बिगर घरगुती स्वरुपाच्या व्यवसायात ३१ पुरुष व ७ महिला कामगार होते.[१०५]

सन १९५८ मध्ये लातूरमध्ये साबण तयार करण्याचे दोन कारखाने सुरू झाले. सन १९६४ मध्ये या कारखान्यांतील भांडवली गुंतवणूक अनुक्रमे रु.१५,००० व १४,००० होती. त्यातील एका कारखान्याचे खेळते भांडवल रु.१ लाख ८५ हजार होते. तर दुसऱ्या कारखान्याचे खेळते भांडवल रु.२ लाख १५ हजार होते. त्यामध्ये वापरण्यात येणारा कच्चा माल मुंबई आणि इतर माल स्थानिक बाजारपेठेतून खरेदी केला जात असे. या दोन्ही कारखान्याची प्रत्येकी वार्षिक उत्पादन क्षमता १५० टन होती. यात तयार होणारे उत्पादन स्थानिक बाजारपेठेत विकले जात असे. यामध्ये एकूण २२ कामगार होते. त्यावेळी यातील कुशल कामगारास रु.१०० मासिक वेतन, तर अकुशल कामगारास मासिक वेतन रु.७५ दिले जात असे. यातील एक कारखाना १९६८ मध्ये लातूर येथील लातूर सहकारी औद्योगिक वसाहतीत स्थलांतरित होऊन त्याचवर्षी त्यात साबणाचे उत्पादन सुरू झाले. या कारखान्यात १९७१ मध्ये एकूण १६ कर्मचारी होते. त्यापैकी २ कुशल कामगार, १२ अकुशल कामगार आणि २ प्रशासकीय कर्मचारी होते. त्यावर्षी यामध्ये स्थिरभांडवल रु.२०,५०० आणि खेळते भांडवल रु.६८,००० होते.[१०६] या साबण कारखान्यानंतर नवीन साबण कारखाना सुरू झाला नसल्याचे जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांच्याकडून प्राप्त माहितीवरून दिसून येते.

---

१०५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर** १९७२, पृ. ४३५, ४३७.

१०६. कित्ता, पृ.४४६-४७ आणि कुलकर्णी, पुरुषोत्तम रामचंद्र यांचा अप्रकाशित शोधनिबंध (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद), 'इंडस्ट्रिअल इस्टेट इन मराठवाडा रिजन'-१९७३, पृ.२६७ ते २७०.

पेंटस् वार्निश, रंग व शाईचे उत्पादन : जिल्ह्यात सन १९६७ मध्ये लातूर येथे 'मयूर पेंटस्' हा पेंटस् आणि वार्निश तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यामध्ये सन २००४ मध्ये एकूण गुंतविलेले भांडवल रु.३ लाख होते. त्यावर्षी त्यात रु.१ लाख ७५ हजारचा कच्चा माल वापरण्यात येऊन रु.३ लाख किंमतीचे उत्पादन झाले. त्यात ३ कामगार होते. सन १९९३ मध्ये लातूर येथे 'कॅडमोसिल केमिकल्स', हा प्रिंटिंग (छपाईची) शाई व अन्य रसायने तयार करणारा कारखाना सुरू झाला. त्यात त्यावर्षी स्थिर भांडवल रु.२ लाख ७० हजार, खेळते भांडवल रु.१५ लाख होते. त्यावर्षी उत्पादित झालेल्या उत्पादनाची किंमत रु.१० लाख होती. त्यात ३ कामगार होते.[१०७]

रासायनिक खत उत्पादन : लातूर येथे 'मारुती फर्टोकेम लिमिटेड' हा रासायनिक खताचे उत्पादन करणारा मोठ्या उद्योग क्षेत्रातील कारखाना सन १९९८ मध्ये सुरू होता. त्यावर्षी त्यातील एकूण गुंतवणूक रु.२ कोटी ३६ लाख होती. त्यात त्यावर्षी १८ कामगार होते. त्यावर्षी त्यांनी ४,८८० श्रमदिवस काम केले. त्यानंतर जिल्ह्यात सेंद्रिय खत निर्मितीचा 'महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स इंडिया' हा उद्योग २००४ मध्ये लातूर येथे सुरू झाला. त्यातील सुरुवातीची गुंतवणूक रु.४४ लाख ४२ हजार होती. त्यात ५८ कामगार होते.[१०८]

औषधी व औषधी द्रव्य उत्पादन : जिल्ह्यात व्हेरोनिका लॅब्रोटरीज लि. हा औषधी निर्मितीचा मोठा कारखाना लातूर येथे सन १९९८ मध्ये सुरू होता. त्यावर्षी त्यातील गुंतवणूक रु.५ कोटी ५० लाख होती व त्यात ४० कामगार होते. परंतु पुढे सन २००० च्या सुमारास हा कारखाना बंद पडला.

मूलभूत सेंद्रीय व असेंद्रीय रसायने व वायू उत्पादन : मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना चिंचोलीराववाडी येथील कारखान्यातील ऊसाच्या मळीवर प्रक्रिया करून उपउत्पादने तयार करण्यासाठी सन १९९२-९३ मध्ये अर्कशाळा सुरू करण्यात आली. त्यात मद्यार्क व स्पेंट वॉशपासून मिथेन वायू तयार करून स्वत:साठी वीज उत्पादन करण्यात येत आहे. तसेच कारखान्यातील मोलॅसेस पासून रेक्टिफाईड स्पिरीट तयार करण्यात येते. हे स्पिरीट औद्योगिक वापरासाठी विक्री करण्यात येते. जानेवारी २००७ मध्ये विकास सहकारी साखर कारखाना लि., निवळी येथील अर्क शाळेत मोलॅसेस पासून रेक्टीफाईड स्पिरीट तयार करण्यास सुरुवात झाली. वरील दोन्ही साखर कारखान्यातील अर्कशाळेमध्ये निर्माण होणारे रासायनिक द्रव्याची सविस्तर माहिती या अगोदर पेये, स्पिरीट व तंबाखूची उत्पादने या शिर्षकाखाली देण्यात आली आहे.

तुरटी उद्योग : सन २००४-०५ या वर्षी चाकूर येथे 'प्रफुल्ल प्रॉडक्ट' हा तुरटी बनविण्याचा कारखाना सुरू होता. त्यात त्यावर्षी रु.२ लाख ५० हजार किंमतीचा कच्चा माल वापरून रु.२ लाख ७५ हजार किंमतीचे उत्पादन करण्यात आले. त्यावर्षी या कारखान्यात ५ कामगार होते.[१०९]

---

१०७. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१०८. सौदागर ए.एच.यांचा अप्रकाशित शोधनिबंध (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद), 'इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट ऑफ लातूर डिस्ट्रिक्ट सिन्स १९८५', पृ.८२, तसेच महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित आणि **जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, जिल्हा लातूर**, सन १९९८-९९, पृ.६१ व ६३.

१०९. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील रासायनिक उद्योग या प्रवर्गातील उद्योगांची सन १९९३-९४ व १९९६-९७ या वर्षाची सांख्यिकीय माहिती तक्ता क्र.५ व तक्ता क्र.८ मध्ये देण्यात आली आहे.

सन २००५-०६ मध्ये जिल्ह्यात रासायनिक उद्योग या प्रवर्गातील ३३ लघू उद्योग होते. त्यातील एकूण गुंतवणूक रु.२ कोटी १४ लाख आहे व २६४ कामगार होते. याचवर्षी लातूर येथे या प्रवर्गातील खतनिर्मितीचा १ मोठा कारखाना सुरू होता. त्यात रु.२ कोटी ३३ लाख गुंतवणूक व २६ कामगार होते.[११०]

रबर व प्लास्टिक उत्पादन

इ.स.१९६१ मध्ये जिल्ह्यात (तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा) रबर उत्पादने तयार करण्याच्या कार्यात १ व्यक्ति कार्यरत होती.[१११] सन १९८८ मध्ये उदगीर तालुक्यातील लोणी येथे 'मे.सोनवणे प्लास्टिक इंडस्ट्रिज' हा प्लास्टिकच्या चप्पल व बुट तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. लातूर येथे सन १९९० मध्ये 'उमा प्रॉडक्ट' हा प्लास्टिक कन्टेनर तयार करण्याचा कारखाना, 'भगवती रबर उद्योग' हा रबर कोटेड फॅब्रिक्स तयार करण्याचा कारखाना १९९१ मध्ये 'डिलक्स रिट्रेडिंग,' हा टायर रिट्रेडिंग करण्याचा कारखाना १९९२ मध्ये 'लता इंडस्ट्रिज' हा प्लास्टिक ग्रन्युअलस् तयार करण्याचा कारखाना तसेच 'लोटस प्लेस्को' हा कॅरिबॅग तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. याच वर्षी लोणी येथे अंबिका प्लास्टिक इंडस्ट्रिज हा प्लास्टिक बुट तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन १९९३ मध्ये लातूर येथे 'हश्मी प्लास्टिक प्रॉडक्टस्' हा पी.पी.बॅग तयार करण्याचा कारखाना, 'न्यू लकी टॉईज' हा पी.व्ही.प्लेबॉल तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. अंबिका प्लास्टिक इंडस्ट्रिजची २००४-०५ मध्ये एकूण गुंतवणूक रु.१० लाख होती. त्यात त्यावर्षी रु.९ लाख किंमतीचा कच्चा माल वापरण्यात येऊन रु.१२ लाख किंमतीचे उत्पादन झाले. त्यात १८ कामगार होते. या कारखान्या व्यतिरिक्त लातूर येथील ८ कारखान्यामध्ये १९९२-९३ मध्ये एकूण स्थिर भांडवल रु.३८ लाख ७४ हजार, एकूण खेळते भांडवल रु.२६ लाख ६५ हजार होते. त्यावर्षी त्यात झालेल्या उत्पादनाची किंमत रु.१ कोटी ६० लाख १० हजार होती. त्यात एकूण ६७ कामगार होते. सन २००४ मध्ये लातूर येथे 'पटेल रबर प्रॉडक्टस्' आणि 'नवजीवन टायर प्रा.लि.' हे अनुक्रमे प्लास्टिक बुट आणि टायर रिट्रेडिंग कारखाने तसेच त्यावर्षी लातूर येथे राज्य परिवहन महामंडळाची टायर नुतनीकरण करण्याची विभागीय कार्यशाळा सुरू होती. या ३ कारखान्यात त्यावर्षी एकूण ३९ कामगार होते. त्यापैकी राज्य परिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यशाळेतील कामगार १६ होते. त्यानी त्या वर्षात एकूण ४,३८९ श्रमदिवस काम केले. या कार्यशाळेत त्या वर्षात एकूण ३०४ दिवस काम चालले.

सन २००२ मध्ये अहमदपूर येथे 'एम.के.टायर्स' हा टायर रिट्रेडिंगचा कारखाना सुरू झाला. त्यात सुरुवातीची गुंतवणूक रु.१० लाख ४० हजार होती व त्यात ५ कामगार होते. लातूरमध्ये सन २००० मध्ये 'पांचाळ फायबर फर्निचर',हा फायबरचे फर्निचर तयार करण्याचा, सन २००१ मध्ये 'नॅशनल टायर्स रिट्रेडिंग', हा टायर नुतनीकरणाचा व 'अल-सफा टायर्स' हा टायर नुतणीकरणाचा कारखाना तसेच सन २००४ मध्ये 'समीर प्लास्टिकस्' हा प्लास्टिक गोळया ग्रॅन्युअल तयार करण्याचा कारखाना आणि 'मायक्रो प्लास्ट पॉलीमर्स' हा प्लास्टिक पिशव्या तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. या ५ कारखान्यातील सुरुवातीची एकूण गुंतवणूक रु.२३ लाख ४२ हजार होती व त्यात एकूण २२ कामगार होते.[११२]

---

११०. लातूर जिल्हा कृती आराखडा सन २००५-०६ ते २००९-१०, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर.

१११. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ.४३७.

११२. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर तसेच उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, नांदेड कार्यालय आणि राज्य परिवहन महामंडळ विभागीय कार्यशाळा यांच्या माहितीवरून.

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील रबर व प्लास्टिकच्या उद्योगाची सन १९९३-९४ ते १९९६-९७ या वर्षाची सांख्यिकीय माहिती तक्ता क्र.५ ते ८ मध्ये देण्यात आली आहे.

सन २००५-०६ मध्ये लातूर जिल्ह्यात लघुउद्योग क्षेत्रातील रबर व प्लास्टिक या प्रवर्गातील एकूण ४५ कारखाने सुरू होते. त्यावर्षी त्यातील एकूण गुंतवणूक रु.३ कोटी ११ लाख होती. त्यात एकूण २९२ कामगार होते.[११३]

कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण, प्रकाशने व संबंधित उद्योग

या उद्योगाअंतर्गत पल्प (कागदाचा लगदा), कागद, कागदी पुठ्ठा, वर्तमानपत्राचा कागद, पेपर बॉक्स, पेपर बॅग, विशेष उद्देशासाठी तयार केलेला कागद, वर्तमानपत्र, छपाई आणि प्रकाशन, नियतकालिके, पुस्तके, निर्देशिका, नकाशे, पाम्प्लेटस् इत्यादींची छपाई व प्रकाशन व तत्सम उद्योगांचा समावेश होतो.

कागद व कागदाच्या वस्तू : सन १९५१ मध्ये जिल्ह्यात (तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा) कागद व कागदाची उत्पादने तयार करण्याच्या कार्यात केवळ ३ व्यक्ति कार्यरत होत्या. सन १९६० मध्ये जिल्ह्यात औसा येथे हाताने बनविण्यात येणाऱ्या कागदाचे उत्पादन करणारा कारखाना हैद्राबाद खादी आणि ग्रामोद्योग समितीने स्थापन केला. या कारखान्यात कागद बनविण्यासाठी टाकाऊ कागद, चिंधी आणि कॉस्टिक सोड्यासारखी रसायने, राळेचे पाणी, रोझीन व तुरटी इत्यादी हर्बल द्रव्य कच्चा माल म्हणून वापरतात. टाकाऊ कागद स्थानिक बाजारातून तसेच बाहेरूनही खरेदी केला जातो. चिंधी काही प्रमाणात स्थानिक बाजार पेठेतून, तर काही प्रमाणात सोलापूर, नांदेड, लातूर व कर्नाटकातून मिळविली जाते. वापरण्यात येणारी काही रसायने पुणे व मुंबईहून आयात केली जात असत. सुरवातीस या कारखान्याच्या इमारत आणि यंत्रसामग्रीत एकूण गुंतवणूक रु.८९ हजार होती. त्यापैकी रु.५२ हजार यंत्रसामग्रीकरिता वापरले. यंत्रसामग्रीमध्ये धातूचे मुसळ (बिटर), कपड्याला इस्त्री करण्याचे मोठे यंत्र आणि चॉपर मशीन यांचा समावेश होतो. शिवाय लाकडी फळे किंवा चौकट्या देखील यात वापरल्या जातात. सुरवातीला या करखान्यात सरासरी वार्षिक रु.१०,००० इतके खेळते भांडवल होते.

या कारखान्यात उच्च प्रतीचा कागद, फाईलबोर्ड, ड्राईंगशीट आणि लेखन साहित्याचे उत्पादन केले जाते. यात तयार होणारा बाँडपेपर हा लेटरहेडसाठी वापरतात. पदवी प्रमाणपत्रासाठीही हाच पेपर वापरला जातो. हाताने तयार केलेल्या कागदाचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे हा कागद जेवढा जुना होईल तेवढी त्याची उपयोगीता वाढते. त्यामुळे या पेपरला एक्स्पायरीडेट नाही असे म्हणले जाते. ड्राईंगपेपर, रंगीत कार्डशीट, मॉटल पेपर व बाँडपेपर या चारपैकी जे उत्पादन हातावर घेतले ते प्रतिमहिना ३० रीम व फाईलबोर्ड ११ रीम उत्पादन क्षमता आहे. चिंधी कापणे आणि टाकाऊ कागदांचे वर्गीकरण अशी कामे स्त्रिया करतात. तर मुसळयंत्र हाताळणे, कागदाचे गठ्ठे उचलणे अशी कामे पुरुष करतात. १९६३-६४ मध्ये या कारखान्यात एकूण ४० कामगार होते. त्यापैकी २५ पुरुष व १५ स्त्री कामगार होते. त्यावेळी कुशल व अर्ध-कुशल कामगारांना अनुक्रमे रु.३ व रु.२.५० आणि अकुशल कामगारांना दिवसाला २ रुपये मोबदला दिला जात असे. त्यावर्षी वेतनावरील एकूण खर्च रु.१५ हजार ५०० होता. दिल्ली, कलकत्ता, मद्रास, मुंबई व पुणे या ठिकाणी कारखान्यातील कागदांची विक्री होत असे. सन २००६-०७ मध्ये या कारखान्यात रु.१ लाख ९१ हजार ८८३ किंमतीचा कच्चा माल वापरण्यात आला, पाणी खर्च रु.२५ हजार, विद्युत

११३. लातूर जिल्हा कृती आराखडा, जिल्हा उद्योग केंद्र लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

खर्च रु.६० हजार आणि यंत्रसामग्रीवरील खर्च रु.३५ हजार आणि इतर (चाळणी इत्यादिंवरील) खर्च रु.२२,००० झाला. इंधनावरील खर्च रु.३,६८७ झाला.[११४] सन १९६८ मध्ये लातूर येथे कागदाच्या पिशव्या तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. यात दिनांक ३१ मार्च १९७१ रोजी ५कामगार होते त्यापैकी १ प्रशासकीय कर्मचारी होता. उर्वरित ४ व्यक्ती अकुशल कामगार होते. या कारखान्याचे त्यावर्षी एकूण भांडवल रु.५५ हजार, स्थिर भांडवल रु.२६ हजार व खेळते भांडवल रु.२९ हजार होते.[११५] सन १९८२ मध्ये लातूर येथे 'मे महेश बुक्स' हा बुक्स तयार करणारा कारखाना सुरू झाला. सन २००४-०५ मध्ये त्यात गुंतविलेले भांडवल रु.३ लाख होते. त्यावर्षी त्यात रु.४ लाखाचा कच्चा माल वापरण्यात आला व रु.६ लाखाचे उत्पादन झाले. त्यावर्षी या कारखान्यात ४ कामगार होते.[११६]

सन १९९०-९१ च्या वार्षिक औद्योगिक सर्व्हेक्षणानुसार लातूर जिल्ह्यात कागद व कागदाच्या वस्तू तयार करणारे ३ कारखाने सुरू होते. त्यातील त्यावर्षी स्थिर भांडवल रु.५० हजार, खेळते भांडवल रु.१२ लाख ६९ हजार होते. त्यात रु.९ लाख २२ हजारचा कच्चा माल वापरण्यात आला आणि रु.२१ लाख ८२ हजारचे एकूण उत्पादन झाले. त्यात एकूण ६६ कामगार होते. त्यांच्या वेतनावरील खर्च रु.५ लाख २७ हजार होता. सन २००० मध्ये लातूर येथे 'सूर्या बुक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी', तसेच 'प्रिया नोटबुक्स इंडस्ट्रिज', हे दोन कारखाने सुरू झाले. यावर्षी त्यातील एकूण गुंतवणूक रु.११ लाख ३० हजार होती व त्यात एकूण १७ कामगार होते.[११७] सन २००१ मध्ये लातूर येथे 'ट्वेन्टीफस्ट सेंच्यूरी फार्मस्', हा संगणक स्टेशनरीचे उत्पादन करणारा कारखाना सुरू झाला. यामध्ये तामीळनाडू व आंध्रप्रदेशातून तसेच बल्लारपूर येथून संगणक प्रिंटरमध्ये वापरावयाचा पेपर रोल स्वरूपात मागवून त्यावर वेगवेगळ्या उद्येशासाठी वापरण्यासाठी ग्राहकाच्या मागणीनुसार डॉटमॅट्रीक प्रिंटरमध्ये वापरण्यासाठी त्यावर प्रक्रिया करून व पेपरच्या साईडला पंचींग करून डॉटमॅट्रीक प्रिंटरमध्ये वापरण्यासाठी वेगवेगळ्या आकारात ही स्टेशनरी ग्राहकाना पुरवठा केली जाते. यामध्ये प्रक्रिया करून संगणक पेपर एकाच वेळेस दोन कलरमध्ये उपलब्ध करून दिला जातो. तसेच पुरवठा करण्यात येणाऱ्या पेपरची दोन स्तरावर रचना (एकावर एक स्तर ठेऊन) कॉपी करण्यासाठी केली जाते व त्या दोन स्तरामध्ये एकवेळा वापरात आणला जाणारा कार्बन पेपर यंत्राच्या साह्याने त्यात इन्सर्ट केला जातो. लातूर जिल्ह्यातील सुरू असलेले सर्व साखर कारखाने, पुणे-मुंबई येथील औद्योगिक क्षेत्रातील संस्था, कंज्यूमर गुडस्, औषध विक्री इत्यादी विविध क्षेत्रामध्ये संगणकावर तयार करण्यात येणारे फॉर्मस्, विविध देयके, व्हाऊचर इत्यादीसाठी वापरात येणारा पेपर मागणी केलेल्या आकारात परिवर्तीत करून या संस्थेद्वारा पुरवठा केला जातो. सदर प्रक्रिया करण्यासाठी या उद्योग संस्थेत एक कन्व्हर्जन मशीन आहे त्यावर पॅक टू पॅक एकाच वेळेस दोन रंगात प्रिंटिंग केले जाते. तसेच एक कोलेटिंग मशीन आहे. या मशीनच्या साह्याने दोन पेपर मध्ये कार्बन बसविला (Fill) जातो. या उद्योग संस्थेची सन २००५-०६ मधील एकूण गुंतवणूक रु.१ कोटी होती व स्थिर भांडवल रु.७० लाख होते. त्या वर्षातील एकूण आर्थिक उलाढाल रु.४० लाखाची होती. या संस्थेत एकूण १५ कामगार आहेत त्यापैकी ६ अकुशल व ९ कुशल कामगार आहेत. त्या वर्षी त्यांच्या वेतनावर रु.४ लाख खर्च झाले. विक्री व्यवस्थेसाठी

११४. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर-**१९७२, पृ.४३५, ४४८-४९ आणि सन २००६-०७ मधील दर्शनिका विभागाच्या सर्वेक्षणावर आधारित.

११५. कुलकर्णी पुरुषोत्तम रामचंद्र यांचा अप्रकाशित शोधनिबंध (डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मराठावाडा विद्यापीठ, औरंगाबाद), 'इंडस्ट्रिअल इस्टेट इन मराठवाडा रिजन', १९७३, पृ.२६७ ते २७०.

११६. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

११७. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

महाराष्ट्रात प्रमुख ३० वितरक नेमले आहेत. सन २००३ मध्ये लातूर येथे 'कल्पकला हॅन्डमेड पेपर इंडस्ट्रिज' हा हाताने कागद बनविण्याचा कारखाना सुरू होता. त्यात २० कामगार होते.[११८]

छापखाने, प्रकाशने व संलग्न उद्योग : परळी वैजनाथ (बीड जिल्हा) येथील कै.वैजनाथराव गोपीनाथराव व्यवहारे यांनी इ.सन १९४६ मध्ये लातूरमध्ये 'न्यू सुधाकर प्रिंटिंग प्रेस' सुरू केली. सुरवातीस त्यात २ ट्रेडल मशीन, १ कटिंग मशीन व सर्व प्रकारचे टाईप होते. लातूर, उस्मानाबाद, परळी येथून काम मिळत असल्यामुळे रात्रंदिवस प्रेस सुरू असायची. आजच्या प्रमाणे त्याकाळी कामगार लोंकांची टंचाई नसे, त्यामुळे प्रेसमधील सर्व कामे सुरळीत चालत असत.[११९] सन १९५१ मध्ये (तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात) जिल्ह्यात मुद्रण आणि तत्सम सहायक उद्योगात एकूण ५२ व्यक्ति कार्यरत होते. सन १९६१ मध्ये मुद्रण आणि प्रकाशन क्षेत्रात घरगुती व्यवसायात ४ पुरुष व बिगर घरगुती उद्योगात ५५ पुरुष कार्यरत होते.[१२०] दिनांक १५ नोव्हेंबर १९६१ रोजी लातूर येथे सहकारी साहित्य मुद्रणालय सुरू झाले. त्यात छपाई स्टेशनरी ऑर्डरप्रमाणे तयार करून दिली जात असे. त्यात वापरण्यात येणारा कागद व शाई हा कच्चा माल लातूर बाजार पेठेमध्ये उपलब्ध होतो. साधारणत:साखर कारखाने, नागरी बॅंका, जिल्हा मध्यवर्ती बँक, मार्केट कमिटी, जिल्हा परिषद व शासकीय कार्यालयास लागणारी छपाई स्टेशनरी आर्डरप्रमाणे या मुद्रणालयाकडून छपाई करून देण्यात येते. या मुद्रणालयातील सन १९९०-९१, २०००-०१ व २००५-०६ या वर्षातील महत्त्वाच्या बाबींची सांख्यिकीय माहिती खालीलप्रमाणे आहे.[१२१]

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	तपशील	वर्ष		
		१९९०-९१	२०००-०१	२००५-०६
१	स्थिर भांडवल	७९,०००	८२,०००	८२,०००
२	खेळते भांडवल	--	३,००,०००	१०,२९,०००
३	यंत्र व सयंत्र	१,११,०००	२,३३,०००	७,७९,०००
४	कच्चा माल	१,८१,०००	६,४४,०००	८,०८,०००
५	उत्पादन	२,३२,०००	७,४४,०००	१८,९३,०००
६	विक्री किंमत	३,९२,०००	१४,२७,०००	१८,९३,०००
७	नफा	९,०००	२९,०००	२,७९,०००
८	कामगार वेतन	१,०८,०००	२,४८,०००	२,६३,०००
९	कामगार संख्या	११	१०	८

इ.सन १९८८ मध्ये लातूर मध्ये 'स्नेहा ऑफसेट' ह्या जिल्ह्यातील पहिल्या ऑफसेट प्रेसची नरेंद्र अग्रवाल यानी सुरुवात केली. त्यावेळी ग्राहकांना किंवा प्रेसमधील कर्मचाऱ्यांना ऑफसेट तंत्राचे अजिबात ज्ञान नव्हते. फक्त ट्रेडल छपाई व स्क्रीन प्रिंटिंग हे दोन छपाईचे माध्यमे सर्वांना महिती होते. परंतु

११८. सन २००६-०७ मधील दर्शनिका विभागाच्या सर्वेक्षणावर आणि उपसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

११९. 'रत्नमुद्रा' लातूर जिल्हा मुद्रक संघ आयोजित 'महाराष्ट्र मुद्रण परिषद ४६ वे अधिवेशन',लातूर,२००० ची स्मरणिका, लातूर.

१२०. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर** १९७२, पृ.४३५-३६.

१२१. मॅनेजर, सहकारी साहित्य मुद्रणालय लि., लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

ऑफसेट छपाईची सुरुवात झाल्यानंतर ताशी ५ ते ७ हजाराच्या गतीने मोठे शीटस् मशीन मधून बाहेर पडू लागले, तसेच मल्टीकलर छपाईदेखील करता येऊ लागली. त्या काळात डी.टी.पी., स्कॅनिंग, प्रिप्रेसच्या सुविधांचा लातूरमध्ये अभाव होता. त्यामुळे ऑफसेट सुरू होण्यापूर्वी अहोरात्र परिश्रम करून काम पूर्ण करावे लागत असे, परंतु या नवीन तंत्रामुळे हे काम अधिक सोपे झाले. आज ऑफसेट तंत्र खेड्यापर्यंत जाऊन पोहचले आहे.[१२२]

सन १९८९-९० मध्ये जिल्ह्यात छपाई या प्रवर्गातील वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणाअंतर्गत समाविष्ट होणाऱ्या उद्योग घटकांपैकी ३ छपाई उद्योग कार्यरत होते. त्यातील स्थिर भांडवल रु.१ लाख २३ हजार, खेळते भांडवल रु.१ लाख ४३ हजार, गुंतविलेले भांडवल रु.१ लाख ७८ हजार होते. त्यात २१ कामगारांनी ७,८९६ श्रमदिवस काम केले त्यांना त्यावर्षी रु.२ लाख ८० हजार मजूरी देण्यात आली. या मुद्रणालयांमध्ये त्यावर्षी रु.६ लाख ८७ हजाराचा कच्चा माल वापरण्यात येऊन रु.१२ लाख ३४ हजार किमतीचे उत्पादन झाले. त्यावर्षी सदर मुद्रणालयांना एकूण निव्वळ उत्पन्न रु.४ लाख ६८ हजार मिळाले.

जिल्ह्यातील अहमदपूर येथे सन १९८८ मध्ये 'गजानन प्रिंटिंग प्रेस' व १९९२ मध्ये 'मथुरा प्रिंटिंग प्रेस' सुरू झाल्या. त्यानंतर लातूरमध्ये सन १९९१ मध्ये 'अक्षर प्रिंटर्स', 'जाजू कॉम्प्यूटर', सन १९९२ मध्ये 'सद्गुरु कृपा प्रिंटर्स', औसा येथे १९९१ मध्ये 'के.के.प्रिंटिंग प्रेस', शिरुर अनंतपाळ येथे 'श्री.अनंतपाळ प्रिंटिंग प्रेस', उदगीर येथे 'बस्वेश्वर प्रिंटिंग प्रेस', उदगीर तालुक्यात तोंडार येथे 'कपिलेश्वर प्रिंटिंग प्रेस', या मुद्रण व छपाई प्रवर्गातील उद्योगसंस्था सुरू झाल्या. या छपाई संस्थांचे सन १९९२-९३ मध्ये एकूण स्थिर भांडवल रु.९ लाख ६५ हजार, खेळते भांडवल रु.३ लाख ८५ हजार हाते. उत्पादनाची किंमत रु.१५ लाख ५७ हजार होती. त्यात एकूण ३९ कामगार होते.[१२३]

सन १९९५ मध्ये लातूरमध्ये 'अक्षररचना' ही प्रेस सुरू झाली. त्यात सन २००६-०७ मध्ये १५ कामगार होते. जिल्ह्यात सन २००० मध्ये लातूर येथे 'कल्पना प्रिंटिंग प्रेस', 'रेनबो प्रिंटिंग अन्ड पॅकेजिंग इंडस्ट्रिज', अहमदपूर येथे 'संपन्न प्रिंटर्स', सुरू झाले. सन २००१ मध्ये लातूर येथे 'पांडुरंग ऑफसेट प्रिंटर्स', 'रामकृष्ण ऑफसेट', सुरू झाले. सन २००२ मध्ये लातूर येथे 'वर्मा ऑफसेट', 'चेतन ऑफसेट प्रिंटर्स', 'पृथ्वीराज ऑफसेटस्', 'शिवकैलास ऑफसेट', औसा येथे 'पांडुरंग ऑफसेट', अहमदपूर येथे 'ज्ञानेश्वर प्रिंटिंग प्रेस', ह्या प्रेस सुरू झाल्या. सन २००३ मध्ये लातूर येथे 'एक्स्पर्ट प्रिंटर्स, पब्लीशर्स अॅन्ड मॅन्युफॅक्चर्स', 'आभिमान ऑफसेट', ह्या प्रेस सुरू झाल्या तसेच २००४ मध्ये लातूर येथे 'व्यंकटेश ऑफसेट', ही प्रेस तर २००५ मध्ये उदगीर येथे 'बिदरकर ऑफसेट', ही प्रेस सुरू झाली. जिल्ह्यातील सन २००० ते २००५ पर्यंत सुरू झालेल्या १५ प्रिंटिंग प्रेसची सुरवातीची एकूण गुंतवणूक रु.१ कोटी ३८ लाख ८ हजार व कामगारांची संख्या ९३ होती.[१२४]

पत्रकारितेचा व मुद्रण व्यवसायाचा अन्योन्य संबंध आहे. बातमीचा मथळा, आकार व बातमीच्या आकारात कोणत्या टाईपमध्ये किती शब्द बसवावे लागतात हे पत्रकाराला माहीत असणे आवश्यक असते त्याशिवाय तो पूर्ण पत्रकार मानला जात नसे. ट्रेडल प्रिंटिंगच्या वेळेस खिळ्यांची जुळवणी करताना याची त्यानाही फार कसरत करावी लागत असे. या क्षेत्रातील जाणकाराकडून लातूरमध्ये पत्रकारिता सुरू झाली. सन १९६७ मध्ये बीड व लातूरहून 'चंपावती' नावाचे पत्र छापून प्रकाशित करण्यात येत असे. हे साप्ताहिक

१२२. 'रत्नमुद्रा' स्मरणिका, पूर्वोक्त.
१२३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
१२४. कित्ता.

होते परंतु सन १९७६ मध्ये 'सिध्देश्वर समाचार' नावाचे लातुरातील पहिले दैनिक वृत्तपत्र श्री सूर्यप्रकाश धूत यांनी प्रकाशित केले. त्यानंतर नवनवीन वर्तमानपत्रे जिल्ह्यातून प्रकाशित होऊ लागली. त्यात लातूर येथून नांदेडचे गोदातीर समाचार (लातूर आवृत्ती), दै.राजधर्म, दै.यशवंत (१९७६), दै.धाराशिव टाईम्स (१९७८), दै.मराठवाडा केसरी (१९८१), दै.मराठवाडा नेता (१९८२), दै.लातूर टाईम्स (१९८३), दै.जनजागर (१९८४), दै.लोकमत (१९८५), दै.भूकंप (१९८६), दै.शब्दमंथन (१९८७), दै.संवाद देशभक्त (१९८८), दै.प्रतिव्यवहार (१९८९), दै.एकमत (१९९१), सांज दैनिक लातूर समाचार (१९९३), दै.अस्तित्वाचा शोध घेणारा सुपुत्र (१९९५), सांज दैनिक प्रतिशक्ती (१९९६), उदगीर येथून दै.महिला एकजूट (१९९३), औसा येथून दै.गुरुधर्म (१९८१) व दै.मनोगत (१९९४) ही दैनिक वृत्तपत्रे प्रकाशित होऊ लागली. तर जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिकांमध्ये लातूर समाचार (१९६५), योगायोग (१९७४), महिला मुक्ती (१९८०), मुक्ती संग्राम (१९८२), नवनिर्माण (१९८५), उपेक्षितांचा आक्रोश (१९९१), मराठवाडा क्रांतीवीर (१९९३), औसा टाईम्स (१९९४) इत्यादींचा समावेश असून वृत्तपत्राच्या इतिहासाबाबत अधिक माहिती या गॅझेटिअरमधील 'संस्कृती' या प्रकरणात देण्यात आली आहे.

सन १९९५ मध्ये लातूर येथे 'वत्सला बळीराम प्रकाशन केंद्र, ऑफसेट प्रिंटर्स' ही छपाई व प्रकाशन उद्योग संस्था डॉ.सुनील बळीराम गायकवाड यांनी सुरू केली. ही जिल्ह्यातील ग्रंथ प्रकाशन करणारी पहिली प्रकाशन संस्था आहे. नवोदितांना प्रोत्साहन देण्यासाठी कोणत्याही लेखकाचे पहिले पुस्तकास प्रकाशन केंद्राकडून ५० % अनुदान देऊन नवोदितांना संधी देण्याचे उद्देशाने ही संस्था सुरू झाली. या संस्थेच्या प्रेसमध्ये १८x२३ इंच आकाराची छपाई होणारी ऑफसेट मशीन आहे. जिल्ह्यातील ग्रामीण परिसरातील लेखकांची पुस्तके मुद्रित करून प्रकाशित करण्याचेही काम या संस्थेद्वारे केले जाते. दिनांक १४ एप्रिल १९९६ रोजी या संस्थेकडून लातूर मधून प्रकाशित करण्यात येणाऱ्या मराठी दैनिक 'अस्तित्वाचा शोध घेणारा सुपुत्र', या दै.वृत्तपत्राच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन रस्त्यावरील एका भिकारी महिलेच्या हस्ते करण्यात आले. दैनिक आजही नियमित चालू आहे. या प्रकाशन केंद्राच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक लेखकांची पुस्तके सतत प्रकाशित केले जातात. निसर्गाची आराधना, अर्थात निसर्गोपचार, अनुभूती (काव्यसंग्रह), प्रखर देशभक्त, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सर्वस्वी (काव्यसंग्रह), मुद्रित माध्यम (शैक्षणिका पुस्तक), स्पर्धा परीक्षा (चालू घडामोडी), दु:खाचे जलसे (काव्यसंग्रह), अग्रिकल्चरल मार्केटिंग, हेल्थ ॲन्ड न्युट्रिशन ऑफ ट्रायबल चिल्ड्रन, द अब्युज्ड इत्यादी ग्रंथ वा काव्यसंग्रह या संस्थेकडून प्रकाशित करण्यात आले आहेत. या संस्थेत एकूण ७ कर्मचारी आहेत. लेखक स्वत:च खर्च करून छपाई करून घेऊन जातात व तेच स्वत: वितरणाची व्यवस्था करतात.[१२५]

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण, प्रकाशने व संबंधित उद्योग या प्रवर्गातील उद्योगाची सन १९८१-८३, १९८४-८५, १९९०-९१ व १९९३-९४ ते १९९६-९७ या वर्षाची सांख्यिकीय माहिती तक्ता क्र.२ ते ८ मध्ये देण्यात आली आहे.

सन २००५-०६ मध्ये लातूर जिल्ह्यात लघुउद्योग क्षेत्रातील पेपर उत्पादने व प्रिंटिंग उद्योगाची एकूण संख्या ९६ होती. त्यातील एकूण गुंतवणूक रु.७ कोटी २२ लाख होती व त्यात एकूण ५३८ कामगार होते.[१२६]

---

१२५. वत्सला बळीराम प्रकाशन केंद्र, ऑफसेट प्रिटर्स, लातूर या संस्थेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
१२६. लातूर जिल्हा कृती आराखडा सन २००५-०६ ते २००९-१०, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर.

मूलभूत व मिश्रधातू

या प्रवर्गात लोखंड, पोलाद व इतर धातूंचे मुख्यत्त्वे कास्टिंग व फोर्जिंग करणे, लोहमिश्रीत धातूचे उत्पादन व इतर धातू उत्पादन करणे, पोलाद वाकविणे, धातूची ओतकामे करणे, धातूच्या तारा तयार करणे. इत्यादी कारखान्यांचा समावेश होतो.

सन १९९५ मध्ये जिल्ह्यात प्राथमिक स्वरुपात लोखंड तयार करण्याचा कारखाना सुरू होता. सन २००३ मध्ये लातूर येथे सोने व चांदीचे कास्टींग व बार तयार करण्याचा कारखाना सुरू झाला त्यात त्यावर्षी रु.७ लाख १७ हजार गुंतवणूक होती व ११ कामगार होते. त्याच वर्षी लातूर येथे अग्रवाल 'आयर्न ॲन्ड स्टील वर्क्स' हा सी. आय. स्क्रॅपचा कारखाना, 'उत्कर्ष मेटल वर्क्स' हा मेटल हायस्टील तयार करण्याचा कारखाना, 'शारदा स्टील' हा मेटल राऊंडबार तयार करण्याचा कारखाना व 'प्रतिभा इंडस्ट्रिज' हा लोखंडी पाईप तयार करण्याचा कारखाना हे सुरू होते. या चार कारखान्यात एकूण १६२ कामगार होते. सन २००४ मध्ये जिल्ह्यात या प्रवर्गात ७ कारखाने सुरू होते त्यात १८१ कामगार होते.[१२७]

धातूच्या वस्तू व सुटे भाग

या प्रवर्गात टिनप्लेट किंवा इनॅमल्ड शीट मेटल पासून तयार केलेले धातूचे काम, कॅन, मेटल, बॅरल, ड्रम, पिंजरे, धातूच्या वस्तू, अवजारे, हार्डवेअर, भांडी, कंटेनर, इत्यादी फॅब्रीकेटेड धातूंचे उत्पादन, पेट्या, फर्निचर व फिक्श्चर, वजने-मापे, धातूचे कटलरी सामान किंवा वस्तू, किचन वेअर, लोखंडी दरवाजे, रोल शटर, खिडक्या, रेझर ब्लेड, बिद्रीच्या वस्तू, धातूचे मेडल बनविणे इत्यादी वस्तूंचा यात समावेश आहे.

सन १९४५ मध्ये तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात लातूर येथे 'पितळी भांडी' तयार करण्याचा एकमेव कारखाना स्थापन झाला होता. त्यावर्षी त्यातील एकूण गुंतवणूक रु.७० हजार होती. यामध्ये पितळी आणि तांब्याचे पत्रे, कठीण कोळसा, डाक, आम्ल, धातूंचा क्षार (मिश्रण) इत्यादी कच्चा माल वापरला जात असे. त्यावर्षी या कारखान्यात २२ कामगार होते. त्यापैकी ७ कुशल कामगार होते. त्याना उक्ता पध्दतीने वेतन दिले जाई. प्रतिसीअर (seer) रु.१.०० ते रु.१.३८ या दरम्यान त्याना मोबदल दिला जात असे. सन १९६३-६४ मध्ये या कारखान्यात एकूण ४६ टन पितळ आणि तांबे यांचा उपयोग करण्यात आला होता. तथापि, स्टेनलेस स्टीलची भांडी आणि काचेच्या वस्तू, प्लास्टिकच्या वस्तू तसेच चायना वस्तू अशा इतर प्रकारच्या वस्तूंची निर्मिती सुरू झाल्यानंतर पितळी वस्तूंची पिछेहाट झाली. नवीन प्रकारच्या वस्तूंचा शुध्द दर्जा, सुबक आकार व आकर्षक नक्षी यामुळे पितळी वस्तूंना मोठी स्पर्धा निर्माण झाली.

विसाव्या शतकाच्या चाळीसच्या दशकात जिल्ह्यात लोखंडी वस्तू आणि कृषि औजारे बनविणारे लहान व मध्यमआकाराचे असे एकूण२० कारखाने स्थापन झाले होते.त्यापैकी बरेचसे लातूर मध्ये होते.आणि इतर उस्मानाबाद, नळदुर्ग, भूम निलंगा आणि औसा येथे होते. या कारखान्यांमध्ये लोखंडी भांडी, थाळी, टोपल्या, लोखंडी गज व कडे, विळा, टिकास (कुदळ) इत्यादी वस्तू तयार केल्या जात होत्या. मुंबई व पुणे येथून कच्च्या मालाची आयात केली जात असे. या कारखान्यातील उत्पादनांना स्थानिक मागणी होती व ते स्थानिक बाजारातच विकले जाई.

---

१२७. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर तसेच उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित आणि **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा** सन २००४-०५, पृ.९३.

१९७० च्या दशकात जिल्ह्यात धातूच्या वस्तू तयार करणारी एक सहकारी उद्योग संस्था स्थापन झाली. त्यात लोखंडी दरवाजे खिडक्या, ग्रील, रोल शटर, स्टील फर्निचर, कैची इत्यादी वस्तूंची निर्मिती केली जात असे. या उद्योग संस्थेचे सुरुवातीचे स्थिर भांडवल रू.४० हजार व खेळते भांडवल रु. ५० हजार होते. यातील उत्पादनासाठी आवश्यक असणारा कच्चा माल लोखंड, वेल्डिंग रॉड, तांबे, पितळ हे मुंबई व पुणे येथून आणले जात असे. यावर त्याकाळात वर्षाला साधारणत: रु. ३५ हजार पर्यंत खर्च येत असे आणि ३,६०० युनिटपर्यंत मासिक इलेक्ट्रिक शक्तिचा वापर होत असे. त्यावेळी विजेचा दर प्रतियुनिट १५ पैसे प्रमाणे होता.[१२८]

सन १९६८ मध्ये लातूर येथे स्थापन करण्यात आलेले भार्गव रोलिंग शटर्स ॲण्ड स्ट्रक्चरल वर्क्स हा कारखाना असून त्यांनीच भारतातील पहिले एपॉक्सी पावडर कोटींग कपाटाचे उत्पादन करणारे मराठवाडा फर्निचर्स प्रा. लि. नावाने युनिट सुरू केले. जिल्ह्यात धातूच्या वस्तू व सुटे भाग या प्रवर्गातील सहकारी औद्योगिक वसाहती अंतर्गत सुरू असलेल्या कारखान्यांपैकी लातूर येथे सन १९६९ मध्ये 'मे.के.पी. धोंगडे' घागर आणि टोपली तयार करण्याचा कारखाना, १९७० मध्ये 'मे. एलोरा इंडस्ट्रिज' हा बिल्डिंग हार्डवेअर बनविण्याचा कारखाना, १९७१ मध्ये 'मे. गणेश इंडस्ट्रिज' लोखंडी सळई तयार करण्याचा कारखाना, १९७५ मध्ये 'मे. बस्वेश्वर स्टील इंडस्ट्रिज' ट्रक्टर ट्राली तयार करण्याचा कारखाना, १९७८ मध्ये 'रासुरे स्टील इंडस्ट्रिज' स्टील फॅब्रीकेशनचा कारखाना, १९८१ मध्ये 'मे. राहूल फॅब्रीकेटर्स' स्टील फॅब्रीकेशनचा कारखाना, १९८३ मध्ये 'मे मालपानी फॅब्रीकेटर्स' स्टील फॅब्रीकेशनचा कारखाना, हे कारखाने लातूर येथे सुरू झाले. तर उदगीर जवळील लोणी येथे सन १९८६ मध्ये 'मे. पांडुरंग मेटल इंडस्ट्रिज' पितळ व तांब्याची भांडी तयार करण्याचा कारखाना, त्याच वर्षात लोणी येथे 'मे. सुशिल इंजिनिअरिंग वर्क्स' हा फॅब्रीकेशनचा कारखाना सुरू झाला. लातूर येथे सन १९८९ मध्ये 'मुंदडा स्टील इंडस्ट्रिज' हा स्टील फॅब्रीकेशनचा कारखाना सुरू झाला. लोणी येथे सन १९९१ मध्ये 'मे. तपोवन इंजिनिअरिंग वर्क्स' हा फॅब्रीकेशनचा कारखाना सुरू झाला. चाकूर येथे सन १९९५ मध्ये 'ज्योती इंजिनिअरिंग इंडस्ट्रिज' हा फॅब्रीकेशनचा कारखाना सुरू झाला. लातूर येथे १९९७ मध्ये 'मे. दिनेश इंडस्ट्रिज', लातूर हा स्टील कपाटे तयार करण्याचा कारखाना, लातूर येथेच त्यावर्षी 'मे. लक्ष्मी ट्रॅक्टर्स' हा ट्रॅक्टर्स ट्रालीचा कारखाना, १९९८ मध्ये 'मे. लक्ष्मी इंडस्ट्रिज' हा स्टील फर्निचरचा कारखाना सुरू झाला आणि लोणी येथे सन २००१ मध्ये'मे. बेथेल इंजिनिअरिंग वर्क्स' हा फॅब्रीकेशनचा कारखाना सुरू झाला. सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये सुरू झालेल्या या प्रवर्गातील वरील १६ कारखान्यातील सन २००४-०५ मधील एकूण गुंतविलेले भांडवल रु.२ कोटी ४७ लाख होते. त्यात त्यावर्षी एकूण रु.२ कोटी २३ लाख किंमतीचा कच्चा माल उपयोगात आणून एकूण रु. २ कोटी ८८ लाख ५० हजाराचे उत्पादन तयार करण्यात आले. त्यावर्षी त्यात एकूण १९२ कामगार होते. तर त्यावर्षी उत्पादन विक्री किंमत रु.२ कोटी ८९ लाख होती. या कारखान्यातील उत्पादन विक्री ही प्रामुख्याने स्थानिक बाजार पेठेतच होते.[१२९]

जिल्ह्यातील सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये सुरू असलेल्या या प्रवर्गातील वरील कारखान्यांशिवाय जिल्ह्यात लातूर, उदगीर आणि इतरत्र सुरू झालेल्या लघु उद्योग क्षेत्रातील कारखान्यांपैकी वडवळ नागनाथ येथे सन १९८८ मध्ये 'श्रमिक इंजिनिअरिंग वर्क्स' हा स्टील फर्निचर तयार करण्याचा कारखाना, औराद (शाहाजनी) येथे सन १९९० मध्ये 'किसान मेकॉनिकल इंजिनिअरिंग ॲन्ड स्टील इंडस्ट्रिज' हा फॅब्रीकेशनचा कारखाना सुरू झाला. सन १९९१ मध्ये घरणी येथे 'त्रिमुर्ती वेल्डिंग वर्क्स' हा ग्रिल, स्टील दरवाजे तयार करण्याचा कारखाना, उदगीर येथे 'युनिक फॅब्रीकेशन वर्क्स' हा स्टील फर्निचर तयार करण्याचा कारखाना,

१२८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४३५, ४४४, ४४७-४८.

१२९. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

लातूर येथे 'हालकुडे इंडस्ट्रिज' हा बैलगाडीचे चाक बनविणे व स्टील फॅब्रीकेशनचा कारखाना, 'पिकोमॅटिक इंडस्ट्रिज' हा अल्युमिनिअम बॉबिन, क्लॅप, ११/३ ३ के.व्ही.लाईन हार्डवेअर तयार करण्याचा कारखाना, 'राज स्टील वर्क्स' हा केटीवेअर गेट, तिफण, फावडे, टिकास व कुळव इत्यादी कृषि अैजारे तयार करण्याचा कारखाना, 'डेकोहोम फर्निचर इंडस्ट्रिज' हा स्टील कपाटे तयार करण्याचा कारखाना, 'सम्राट स्टील' हा कृषि अवजारे, वाटर टॅन्क व फॅब्रीकेशनचा कारखाना, 'चंद्रोदय इंडस्ट्रिज' हा स्टोव्ह तयार करण्याचा कारखाना, 'संतोष मेटल' हा अल्युमिनिअम, तांब्याची भांडी तयार करण्याचा कारखाना, 'सिध्दनाथ इंजिनिअरिंग वर्क्स' हा स्टील फर्निचर तयार करण्याचा कारखाना, 'नामदेव स्टील इंडस्ट्रिज' हा स्टील फर्निचर तयार करण्याचा कारखाना, 'छारका ॲग्रो रिसर्च ॲन्ड प्रॉडक्ट' हा क्रेन, स्टील फर्निचर, बोअरिंग मशीन व फॅब्रीकेशनचा कारखाना, 'व्दारका स्टील इंडस्ट्रिज' हा मिरची कांडप व मळणी यंत्र, क्रेन, शेती अवजारे तयार करण्याचा कारखाना, 'साईनाथ ट्रेलर्स' हा ट्रॅक्टर ट्रॉली तयार करण्याचा कारखाना हे सर्व १९९१ मध्ये लातूर येथे सुरू झाले. त्यावर्षी उदगीर येथे 'मनिष फॅब्रीकेटर्स' ग्रिल, गेट व खिडक्या तयार करण्याचा कारखाना, 'शेख इंजिनिअरिंग वर्क्स' हा दरवाजे, खिडक्या व ग्रिल तयार करण्याचा करखाना हे सुरू झाले. सन १९९२ मध्ये लातूर येथे 'महालक्ष्मी इंडस्ट्रिज' हा क्रेन, स्टील फर्निचर तयार करण्याचा कारखाना, 'गंगणे स्टील इंडस्ट्रिज' हा स्टील फर्निचर, कॉट व शटर्स तयार करण्याचा कारखाना, 'मेहूल स्टील इंडस्ट्रिज' हा स्टील फर्निचर, कॉट व ग्रिल तयार करण्याचा कारखाना, 'जया इंडस्ट्रिज' हा स्टील फॅब्रीकेशन व फर्निचर तयार करण्याचा कारखाना, 'सावली स्टील इंडस्ट्रिज' हा स्टील फर्निचर, ग्रिल, गेट तयार करण्याचा कारखाना, 'लोटकर इंजिनिअरिंग वर्क्स' हा कृषि अवजारे व स्टोव्ह तयार करण्याचा कारखाना, 'दुर्गा स्टील इंडस्ट्रिज' हा लोखंडी दरवाजे, खिडक्या व शटर तयार करण्याचा कारखाना हे सुरू झाले. त्यावर्षी उजनी येथे 'न्यू कीर्ती इंजिनिअरिंग इंडस्ट्रिज' हा क्रेन, ग्रिल, कॉट व दरवाजे तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन १९९३ मध्ये लातूर येथे 'कृषिजय ट्रेलर्स 'ट्रक्टर ट्रेलर तयार करण्याचा कारखाना, 'गंगा इंडस्ट्रिज' हा बकेट, घमेले, घागर तयार करण्याचा कारखाना, 'शिव एजन्शीज' हा स्टील फर्निचरचा कारखाना हे सुरू झाले. यावर्षी उदगीर येथे 'फेरोज फॅब्रीकेटर्स' हा स्टील फॅब्रीकेशनचा कारखाना सुरू झाला. जिल्ह्यातील सहकारी औद्योगिक वसाहती खेरीज अन्य ठिकाणी सुरू झालेल्या धातूच्या वस्तू व सुटे भाग या प्रवर्गातील वर उल्लेख केलेल्या ३० कारखान्यातील सन १९९३ मध्ये एकूण स्थिर भांडवल रु.५० लाख व खेळते भांडवल रु.५७ लाख १५ हजार होते. त्यात त्यावर्षी झालेल्या उत्पादनाची एकूण किंमत रु.४ कोटी ३० लाख ९३ हजार होती. त्यात त्यावर्षी एकूण १६४ कामगार होते.

सन २००० मध्ये लातूर येथे 'अलकॅप्स इंडस्ट्रिज' हा अल्युमिनिअमचे विविध वस्तूंसाठीची झाकणे तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यावर्षी उदगीर जवळ सोमनाथपूर येथे 'सुयश ॲग्रीकल्चरल इम्प्लीमेन्टस्' हा कृषि अवजारे तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन २००१ मध्ये लातूर येथे 'अरुण बायंडिंग वायर' हा लोखंडी तार तयार करण्याचा कारखाना, 'जाधव ॲग्रो इक्विपमेंटस्' कृषि अवजारे तयार करण्याचा कारखाना हे सुरू झाले, सन २००३ मध्ये लातूर येथे 'लक्ष्मी बायंडिंग वायर इंडस्ट्रिज' हा लोखंडी तार तयार करण्याचा कारखाना आणि 'रेणुका स्टील इंडस्ट्रिज' हा लोखंडी सळई तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन २००० ते २००३ या दरम्यान सुरू झालेल्या वरील सहा कारखान्यातील सुरुवातीची एकूण गुंतवणूक रु.२० लाख ८७ हजार होती व त्यात एकूण ४० कामगार होते.

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार सन १९८४-८५, १९९३-९४, १९९४-९५ आणि १९९६-९७ या वर्षाची जिल्ह्यातील धातूच्या वस्तू आणि सुटे भाग तयार करणाऱ्या कारखान्यांची सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक ३, ५, ६ आणि ८ मध्ये देण्यात आली आहे.

अनुक्रमणिका

सन २००५-०६ मध्ये जिल्ह्यात धातूजन्य उत्पादने व फॅब्रीकेशनच्या वस्तू तयार करणारे एकूण २१० लघु उद्योग घटक कार्यरत होते. त्यातील एकूण गुंतवणूक रु.७ कोटी १२ लाख होती व त्यात एकूण १,०६० कामगार होते.[१३०] सद्याही लातूर जिल्ह्यातील उदगीर, मुरूड, तांदुळजा, दावणगाव व बोरगाव ही स्थाने अडकित्ते व कुलुपासारख्या वस्तूंच्या धातू उद्योगाकरिता ओळखली जातात.

परिवहन सामग्री, यंत्रसामग्री व सुटे भाग

या प्रवर्गात बांधकाम व खाणकाम उद्योगात वापरल्या जाणाऱ्या इतर जड यंत्र सामग्रीचे उत्पादन व दुरुस्ती, बॉईलर व स्टीम जनरेटर, अन्नप्रक्रिया उद्योग व वस्त्रोद्योगात लागणारी यंत्रे यांचे उत्पादन, साखर आणि बेकरी व मिठाई बनविणाच्या कार्यात वापरण्यात येणारी यंत्रे, औषधी किंवा रासायनिक उद्योगात वापरण्यात येणारी यंत्रे व अवजारे, रेफ्रीजरेटर, एअरकंडीशनर यांचे औद्योगिक व व्यापारी उपयोगासाठी उत्पादन, वस्तू उचलण्याचे आणि हाताळण्याची अवजारे, यांत्रिक हत्यारे, त्यांचे सूटे भाग आणि त्यांचे जोडकाम साहित्याचे उत्पादन, ग्राईंडिंग मशिन व लाकूड कापण्याचे कार्य करणाऱ्या मशिनचे उत्पादन, डिझेल इंजिन व त्याच्या सुट्या भागाचे उपादन करणारे उद्योग, शेतीत वापरण्यात येणारी यंत्रे तसेच परिवहन यंत्रे व त्यात वापरण्यात येणारे सुटे भाग इत्यादी उत्पादन करणाऱ्या उद्योगांचा समावेश होतो.

सन १९५१ मध्ये जिल्ह्यात यंत्रसामग्री व सुटे भाग तयार करण्याच्या कार्यात एकूण १३८ व्यक्ती कार्यरत असले तरी त्यापैकी अभियांत्रिकी कार्यशाळेत अधिक प्रमाण दुरुस्ती सेवा करणाऱ्यांचे होते. सन १९९१ मध्ये लातूर येथे 'प्रेसिडेंट प्रिसिजन टुल्स' हा मशिनरी टुल्स तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्याचवर्षी लातूर येथे 'प्रिस्टेज इंजिनिअरिंग' व्हल्यू लिफ्टर, पिस्टन बुश, किंगबुश, प्लायबुश तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन १९९२ मध्ये 'मायक्रो इंजिनिअरिंग' हा जिएम बुश, स्टीलबुश तयार करण्याचा कारखाना, 'अदनान डिझेल इंजिन्स' हा फ्युअल इंजक्शन इक्युपंप सर्व्हिसिंग चा कारखाना सुरू झाला. वरील या चार कारखान्यांचे सन १९९३ मध्ये एकूण स्थिर भांडवल रु.१३ लाख ७६ हजार व खेळते भांडवल रु.४ लाख १० हजार होते. त्यावर्षी त्यातील उत्पादनाची एकूण किंमत रु.१९ लाख १५ हजार होती. त्यात त्यावर्षी ३९ कामगार होते. सन २००३ मध्ये लातूर येथे 'श्री स्वामी समर्थ एअर कुलर्स' हा वातानुकुलीत यंत्र तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यात सुरवातीची गुंतवणूक रु.३० लाख होती व १५ कामगार त्यात कार्यरत होते. सन २००५-०६ मध्ये जिल्ह्यात लघुउद्योग क्षेत्रात यंत्रसामग्री उत्पादने तयार करणारे ८ कारखाने सुरू होते. त्यावर्षी त्यातील एकूण गुंतवणूक रु.२९ लाख होती व त्यात ३६ कामगार होते आणि वाहतूक वाहन ट्राली उत्पादन करणारे ७ लघुउद्योग घटक सुरू होते. त्यात त्यावर्षी एकूण गुंतवणूक रु.८ लाख होती व १९ कामगार होते.[१३१] वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील यंत्रसामग्री, परिवहन सामग्री व सुटेभाग तयार करणाऱ्या कारखान्यांची सन १९९३-९४ व १९९६-९७ या वर्षाची सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक ५ आणि ८ मध्ये देण्यात आली आहे.

इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक यंत्रसामग्री, साधने, उपकरणे व सुटे भाग

या प्रवर्गात विद्युत उपयोगाकरिता यंत्रसामग्री, उपकरणे व सुटे भाग तयार करणे, जसे जनरेटर, ट्रान्सफॉर्मर्स् (रोहीत्र), व्होल्टेज स्टॅबिलायझर्स्, इलेक्ट्रिक मोटार इत्यादी उपकरणे व त्यांचे भाग तयार

१३०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
१३१. कित्ता.

करणे. तसेच इन्शुलेटेड वायर व केबल (ऑप्टिकल फायबर केबलसह) तयार करणे, प्राथमिक सेल व बॅटरीज तयार करणे, ड्रायसेल तयार करणे, बॅटरीचे रिचार्जर तयार करणे, विविध प्रकरचे विद्युत दिवे, पंखे तयार करणे, इतर घरगुती वापरातील विद्युत उपकरणे तयार करणारे कारखाने, त्याच प्रमाणे संगणक व संगणकाधारित सिस्टिम तयार करणे इत्यादी उत्पादने तयार करणाऱ्या कारखान्यांचा समावेश होतो. सन १९८८ मध्ये लातूर जिल्ह्यात इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे उत्पादन करणारे एकूण ३९ लघुउद्योग घटक सुरू होते. त्यावर्षी त्यातील एकूण गुंतवणूक रु.१ कोटी ८८ लाख होती.[१३२] सन १९९० मध्ये लातूर येथे 'केनिन ट्रान्सफॉर्मर' हा विद्युत ट्रासफॉर्मर (रोहीत्र) तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्याचवर्षी उदगीरजवळ लोणी येथे 'पंकज एंटरप्राईजेस' हा टी.व्ही.अँटेना तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. १९९३ मध्ये लातूर येथे 'गजेंद्र इंडस्ट्रिज' हा व्होल्टेज स्टॅबिलायझर्स तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. वरील या तीन करखान्यांतील सुरुवातीची एकूण गुंतवणूक रु.६७ लाख ९८ हजार होती. या तीन पैकी दोन कारखान्यातील सन १९९३ मधील एकूण उत्पादनाची किंमत रु.६ लाख ६० हजार होती व त्यात १९ कामगार होते. तर उर्वरित एका कारखान्यात सन २००४-०५ मध्ये रु.४८ लाखाचा कच्चा माल उपयोगात आणून रु.५२ लाख किंमतीचे उत्पादन करण्यात आले. त्यात त्यावर्षी १० कामगार होते. सन २००३ मध्ये लोणी येथे 'पावर कन्ट्रोल्स' हा इलेक्ट्रिक उत्पादने तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यातील गुंतवणूक रु.३ लाख ७५ हजार होती व ७ कामगार होते.

सन २००५-०६ मध्ये लातूर जिल्ह्यात इलेक्ट्रिकल यंत्रसामग्री उत्पादन करणारे १६ लघुउद्योग घटक सुरू होते. त्यात त्यावर्षी एकूण गुंतवणूक रु.१ कोटी १० लाख होती व १९१ कामगार होते.[१३३]

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक यंत्रसामग्री, साधने, उपकरणे व सुटे भाग तयार कणाऱ्या कारखान्यांची सन १९९३-९४ व १९९६-९७ या वर्षांची सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक ५ आणि ८ मध्ये देण्यात आली आहे.

अधातू खनिज उत्पादने

या प्रवर्गात सिमेंटच्या वस्तू, प्लॉस्टर ऑफ पॅरिसच्या वस्तू, मातीच्या विटा, क्रॉंक्रिटच्या विटा, कौले, काच व काचेच्या वस्तू, दगडीवस्तू, मोझाईक टाईल, सिमेंटच्या जाळ्या, सिमेंटचे पाईप व खांब, मृदाशिल्प, चीनी मातीची भांडी इत्यादी उत्पादनांचा समावेश होतो.

सन १९५१ मध्ये तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात विटा, टाईल्स आणि मातीची बांधकामाची उत्पादने तसेच अधातू खनिज उत्पादने तयार करण्याच्या कामात एकूण २०८ कामगार कार्यरत होते. सन १९६१ मध्ये उद्योग विभागाने उदगीर येथे मातीच्या भांड्याचे व "बिद्री" कामाचे प्रशिक्षण केंद्र सुरू केले. सन १९६१ मध्ये लातूर येथे एका वीट कारखान्याची स्थापना झाली होती. त्यावर्षी त्यातील स्थिर भांडवल रु.११,७५० आणि खेळते भांडवल रु.१०,००० होते. त्यात २० कामगार होते. त्यापैकी १० कामगार कुशल कामगार होते. त्या काळात या उद्योगातील कामगारास देण्यात येणारी दैनिक मजूरी रु.४ ते ६ च्या दरम्यान असे. या कारखान्यातील वार्षिक विटा निर्मिती क्षमता २ लाख विटांची होती. या विटाना स्थानिक

१३२. सोदागर ए.एच. यांचा अप्रकाशित शोधनिबंध (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठ, औरंगाबाद), 'इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट ऑफ लातूर डिस्ट्रिक्ट सीन्स १९८५', पृ.८०.

१३३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

मागणी होती.[१३४] सन १९६८-६९ च्या सुमारास लातूर येथे सिमेंट पाईप तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यात मार्च १९७१ अखेर एकूण भांडवल रु.१ लाख २९ हजार ४०३ होते. त्यापैकी स्थिर भांडवल रु.५१ हजार होते. त्यावर्षी त्यात १८ कामगार होते.[१३५]

सन १९६५ मध्ये मुरूड येथे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (सद्याचे नाव: महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित) अंतर्गत सिमेंट खांब कारखाना सुरू झाला. ग्रामीण विद्युतीकरणासाठी आवश्यक सिमेंट खांबांची गरज पूर्ण करण्यासाठी हा कारखाना सुरू करण्यात आला. या कारखान्यात ८ मीटर व ९ मीटर लांबीचे सिमेंट खांब पूर्वबलित (Pre tensioning method) पध्दतीने तयार केले जातात. सन १९८९-९० मध्ये या कारखान्याने राज्यात सर्वाधिक उत्पादन करून प्रथम क्रमांक पटकावला आहे. सन २००५-०६ मधील या कारखान्याचे खेळते भांडवल रु.४२ लाख ६२ हजार होते. त्यात त्यावर्षी ९ अधिकारी व कर्मचारी आणि ३५ कामगार होते. त्यावर्षी कामगाराना एकूण रु.२१ लाख वेतन देण्यात आले. या कारखान्याची ८ मीटर खांबची वार्षिक उत्पादन क्षमता १२,००० आणि ९ मीटर खांबची वार्षिक उत्पादन क्षमता २ हजार ४०० खांब आहे. त्यावर्षी या कारखान्यात १८९ दिवस काम चालले. त्यावर्षी या कारखान्यात रु.१ कोटी ४ लाख ८१ हजार किंमतीचे उत्पादन झाले.[१३६]

सन १९९१ मध्ये मुरूड येथे 'विशाल वीट इंडस्ट्रिज', निलंगा येथे 'बालाजी वीट केंद्र', चाकूर येथे 'मारुती वीट उद्योग', गुगदाळ येथे 'घेटाळे वीट उद्योग', कव्हा येथे 'जे.आय.पटेल इंडस्ट्रिज', हे विटा तयार करणारे कारखाने सुरू झाले. त्याचवर्षी लातूर येथे 'स्टॅन्डर्ड मेकॅनिकल ॲन्ड इंजिनिअरिंग वर्क्स' हा सिमेंट कॉंक्रिट मिक्सर तयार करणारा कारखाना सुरू झाला. सन १९९२ मध्ये लातूर येथे 'समर्थ ग्रेनाईट प्रा.लि' हा ग्रेनाईट टाईल्स तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन १९९३ मध्ये कन्हेरि येथे 'सागर वीट उद्योग', 'महादेव वीट उद्योग', हे विटा तयार करणारे उद्योग तसेच कन्हेरि तांडा येथे 'स्वास्तिक वीट उद्योग', बोरगाव येथे 'राठी वीट उद्योग', अहमदपूर येथे 'साई वीट उद्योग' हे विटा तयार करणारे उद्योग सुरू झाले. सन १९९१ ते १९९३ दरम्यान सुरू झालेल्या वरील १२ वीट कारखान्यातील सन १९९३ मधील एकूण स्थिर भांडवल रु.१२ लाख ९३ हजार, खेळते भांडवल रु.१३ लाख ३० हजार होते. त्यावर्षी त्यात एकूण रु.८० लाख ६० हजार किंमतीचे उत्पादन झाले. त्यात एकूण १४० कामगार होते.

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील अधातू खनिज उत्पादन कारखान्यांची सन १९८१-८३, १९८४-८५, १९९३-९४, १९९५-९६ व १९९६-९७ या वर्षातील सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक २,३,५,७ व ८ मध्ये देण्यात आली आहे.

सन २००० मध्ये लातूर येथे 'रविश्री सिमेंट प्रॉडक्टस्' हा सिमेंटच्या जाळी तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्याच वर्षात औसा येथे 'रुपा स्पुन पाईप इंडस्ट्रिज' हा सिमेंट पाईप तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन २००३ मध्ये अहमदपूर येथे 'महेश वीट उद्योग' हा विटा तयार करण्याचा उद्योग सुरू झाला. या वरील ३ कारखान्यातील सुरुवातीची एकूण गुंतवणूक रु.१६ लाख २९ हजार होती. त्यात एकूण २१ कामगार होते.[१३७]

---

१३४. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ.४३५, ४५५.

१३५. कुलकर्णी पुरुषोत्तम रामचंद्र यांचा अप्रकाशित शोधनिबंध, (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद), 'इंडस्ट्रिअल इस्टेट इन मराठवाडा रिजन', १९७३, पृ.२७०, २७४.

१३६. उपकार्यकारी अभियंता (स्था), सिमेंट खांब कारखाना मुरूड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१३७. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

अनुक्रमणिका

लाकडाच्या वस्तू आणि फर्निचर

या प्रवर्गात लाकडी साहित्य, लाकूड चिरणे, खिडक्या, दरवाजे, लाकडी खेळणी, बैलगाडी, खोकी, फर्निचर व फिक्श्चर इत्यादी वस्तूंचे उत्पादन केले जाते. सन १९५१ मध्ये तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात फर्निचर व फिक्श्चर वगळून लाकडाची अन्य उत्पादने तयार करण्याच्या कार्यात ५,६७० व्यक्ति कार्यरत होत्या व फर्निचर आणि फिक्श्चर तयार करण्याच्या कार्यात ११४ व्यक्ति कार्यरत होत्या. सन १९६१ मध्ये लाकूड व लाकडी वस्तू निर्माण करण्याच्या घरगुती व्यवसायात ५,५६७ पुरुष व १,००५ स्त्री कामगार कार्यरत होते आणि बिगर घरगुती व्यवसायात ६१८ पुरुष व ५२ स्त्री कामगार कार्यरत होते.[१३८] सन १९९२ मध्ये लातूर जिल्ह्यात लाकडापासून फळ्या बनविणारे १२ कारखाने सुरू होते. त्यावर्षी त्यात ५६ कामगार होते.[१३९]

सन १९९१ मध्ये लातूर येथे 'एस.के.वुड फर्निचर वर्क्स' आणि 'माजी सैनिक फर्निचर ॲन्ड सॉ मिल' हे लाकडी फर्निचर तयार करण्याचे कारखाने सुरू झाले. त्याच वर्षी उदगीर येथे 'अकबर सॉ मिल' हा लाकूड कापणे व फर्निचर तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन १९९२ मध्ये औसा येथे 'जनता सॉ मिल' हा लाकूड कटाईचा कारखाना सुरू झाला. वरील या चार कारखान्यांचे सन १९९२-९३ मध्ये एकूण स्थिर भांडवल रु.१ लाख ८५ हजार, खेळते भांडवल रु.१ लाख १० हजार होते. त्यावर्षी त्यात एकूण रु.५ लाख ४४ हजार किमतीचे उत्पादन झाले. त्यात २३ कामगार होते.

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील लाकडाच्या वस्तू व फर्निचर तयार करणाऱ्या कारखान्यांची १९९३-९४ व १९९६-९७ या वर्षाची सांखिकीय माहिती तक्ता क्रमांक ५ आणि ८ मध्ये देण्यात आली आहे.

सन २००५-०६ मध्ये लातूर जिल्ह्यात लाकूड आधारित उत्पादने तयार करणारे ५४ लघुउद्योग सुरू होते. त्यातील एकूण गुंतवणूक रु.६० लाख होती व त्यावर्षी एकूण कामगार २१५ होते. शिवाय त्यावर्षी फर्निचर तयार करण्याचे जिल्ह्यात २४ लघुउद्योग सुरू होते. त्यातील एकूण गुंतवणूक रु.२७ लाख होती व त्यात एकूण ९६ कामगार होते.[१४०]

भांडवली वस्तू व यंत्र सामग्री दुरुस्ती

राज्य परिवहन महामंडळाने तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात १९६१ मध्ये लातूर बसआगार आणि १९७२ मध्ये उदगीर बस आगार कार्यान्वीत केले. लातूर जिल्हा निर्मिती (१९८२) नंतर १९८६ रोजी महामंडळाने लातूर विभाग सुरू केला. १९८६ मध्येच निलंगा, अहमदपूर व औसा येथे एस.टी. बस वाहनाची देखभाल व दुरुस्ती कार्यशाळा सुरू केल्या. त्यापूर्वी जिल्ह्यात अगदी अल्पप्रमाणात अभियांत्रिकी घटकाअंतर्गत दुरुस्ती सेवा कार्यशाळा होत्या. त्या काळात एक सहकारी अभियांत्रिकी संस्था कार्यरत होती. त्यात स्टील फर्निचर, ॲटोमोबाईल्स, इलेक्ट्रिक मोटार्स आणि यांत्रिकी उपकरणे यांची निर्मिती व दुरुस्तीचे काम केले जात होते. सन १९८३-८४ मध्ये जिल्ह्यात यंत्रसामग्री दुरुस्ती सेवा क्षेत्रातील उद्योगामधील एकूण स्थिर भांडवल रु.२७ लाख ७९ हजार, खेळते भांडवल रु.४७ हजार होते. त्यावर्षी या क्षेत्रात रु.१ कोटी ६२ लाख ६६ हजार किंमतीच्या दुरुस्ती सेवा देण्यात आल्या होत्या. त्यावर्षी दुरुस्ती सेवा कार्यात

---

१३८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४३५-३६.
१३९. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा,** १९९२-९३, पृ. ६४.
१४०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

एकूण ३०७ कामगार होते. त्यांच्या वेतनावर रु.५३ लाख १६ हजार खर्च करण्यात आले. यातील मूल्यवृध्दी रु.१ कोटी ३ लाख ७९ हजार होती.[१४१] सन २००५-०६ मध्ये जिल्ह्यात वाहन दुरुस्ती करणारे २० घटक सुरू होते. त्यातील त्यावर्षीची एकूण गुंतवणूक रु.४५ लाख होती व त्यात ९३ कामगार होते. त्याचवर्षी जिल्ह्यात गृह वस्तू दुरुस्ती करणारे ७ उद्योग घटक सुरू होते. त्यावर्षी त्यातील एकूण गुंतवणूक रु.११ लाख होती. त्यावर्षी त्यात एकूण २२ कामगार होते.[१४२]

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील भांडवली वस्तू व यंत्रसामग्री दुरुस्ती क्षेत्रातील कारखान्यांची १९८१-८३, १९८४-८५, १९९०-९१ आणि १९९३-९४ ते १९९६-९७ या वर्षांसाठीची सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक २ ते ८ मध्ये देण्यात आली आहे.

औद्योगिक वसाहती

लातूर औद्योगिक वसाहत : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १९७३ मध्ये लातूर बार्शी राज्य महामार्गावर २६३.२६ हेक्टर जमीन ताब्यात घेऊन लातूरला औद्योगिक वसाहतीची स्थापना केली. सदर औद्योगिक क्षेत्र लातूर शहरापासून ३ कि.मी.अंतरावर आहे. लातूर औद्योगिक क्षेत्रात पाणीपुरवठा, जलवितरणीका, अंतर्गत रस्ते, पथदिवे इत्यादी मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच महामंडळाने औद्योगिक क्षेत्रामध्ये सामाईक सुविधा केंद्र, विश्रामगृह, अग्निशमन केंद्र बांधलेले आहे. सामाईक सुविधा केंद्रात बँक, पोस्ट ऑफीस व उपहारगृह इत्यादीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या क्षेत्रात टिना ऑईल मिल, इंदिरा सहकारी सूत गिरणी, पटसन व्हॉल्व्ह, कपिला डेअरी, कीर्ती डाळ मिल, कीर्ती ऑईल व मारोती फर्टोकेम हे मोठे उद्योग आहेत. महामंडळाने लातूर औद्योगिक क्षेत्रात ५,९६० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडावर माहिती तंत्रज्ञान संकुलाची उभारणी केली आहे. यामध्ये २,५६६ चौ.मी. क्षेत्रफळाची माहिती तंत्रज्ञान इमारत, युटीलिटी सेंटर, मीटर रूम, अंतर्गत रस्ते, बगीचा इत्यादींचा समावेश आहे. हे संकुल पूर्ण झाले असून त्यात विविध आकाराचे ३१ गाळे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

येथील उद्योजकाची भूखंडाची वाढती मागणी लक्षात घेऊन महामंडळाने सध्याच्या लातूर औद्योगिक क्षेत्रापासून सुमारे ८ कि.मी.अंतरावर सन १९९८ मध्ये १,०७३.८३ हेक्टर जमीन संपादित करून त्यावर अतिरिक्त लातूर औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात येत आहे. त्यावर प्रथम टप्प्यातील विकास कामे (डांबरीकृत रस्ते, पथदिवे, जलवितरणीका इत्यादी) पूर्ण झाली आहेत. या क्षेत्रामध्ये मे.ग्रोईल्ड प्रा.लि. व मे.शुभलक्ष्मी फुडस, सारस्वत डाळ मिल हे उद्योग सुरू आहेत. लातूर जिल्ह्यात कृषि मालावर आधारित उद्योगास चालना देणेकरिता अद्यावत सुधारणा करण्याची मागणी पुढे आल्यामुळे अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रामध्ये फुड पार्ककरिता २०० हेक्टर व SEZ करिता २०० हेक्टर जमीन राखून ठेवलेली आहे. तसेच CRPF करिता २०० एकर जमीनीचा ताबा मार्च २००६ मध्ये देण्यात आला आहे.

जिल्ह्यात औसा व उदगीर येथे औद्योगिक विकास केंद्र विकसित करण्यात येत आहेत. अहमदपूर, निलंगा येथे लघु औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आले आहेत त्यांची तसेच लातूर औद्योगिक क्षेत्र, अतिरिक्त लातूर औद्योगिक क्षेत्र यांचे सन २००४-०५ पर्यंत क्षेत्र व त्यावरील भुखंडाविषयीची माहिती खाली दिली आहे.[१४३]

---

१४१. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४४४ व **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा**, १९८३-८४, पृ.८०.

१४२. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१४३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

अनुक्रमणिका

अ.क्र.	औद्योगिक वसाहतीचे नाव व ठिकाण	स्थापना वर्ष	औद्योगिक वसाहतीचे एकूण क्षेत्रफळ (हेक्टर/एकर)	विकसित केलेले भूखंड	वाटप केलेले	वाटपा-साठी तयार भूखंड	कारखाने	कामगार
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)
१	लातूर औद्योगिक क्षेत्र	१९७३	२६३.२६ हे.	७९०	७८०	१०	४८०	३,०१०
२	अतिरिक्त लातूर औद्योगिक क्षेत्र.	१९९८	१,०७३.८३ हे.	३६८	३०६	६२	४०५	२००
३	औसा औद्योगिक विकास केंद्र.	१९९१	८२.५५ हे.	१२७	११३	१४	७	६५
४	अहमदपूर लघु औद्योगिक क्षेत्र.	१९८९	२०.०० हे.	२२	१४	८	४	४५
५	निलंगा लघु औद्योगिक क्षेत्र.	१९९३	१७.७५ हे.	३३	३२	१	५	१६
६	उदगीर औद्योगिक विकास केंद्र.	प्रस्तावित	२०.०० हे.	--	--	--	--	--

लातूर, लोणी (उदगीर), चाकूर, औराद (शा.), मुरूड येथे सहकारी औद्योगिक वसाहती असून त्याची माहिती (२००४-०५ पर्यंतची) पुढे दिली आहे.[१४४]

अ.क्र	सहकारी औद्योगिक वसाहतीचे नाव	स्थापना	क्षेत्रफळ हेक्टर/एकर	भूखंड	कारखाने	कामगार
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१	लातूर इंडस्ट्रिअल इस्टेट को.ऑ.सोसायटी, लातूर.	१९६३	२६ एकर ३२ आर	१००	४५	४०९
२	उदयगिरी औद्योगिक वसाहत सह.संस्था, लोणी (उदगीर).	१९८०	७२ एकर	२००	५४	६५०
३	चाकूर औद्योगिक वसाहत सह.संस्था (म.), चाकूर.	१९८७	३५ एकर ३० आर	१२६	३	१५
४	जवाहर औद्योगिक सहकारी वसाहत (म.) औराद (शा.), ता.निलंगा.	१९८७	१० एकर ३० आर	५८	--	--
५	विलास औद्योगिक वसाहत, सह.संस्था. मुरूड.	१९९०	१० एकर	--	--	--

१४४. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

ग्रामोद्योग व कुटिरोद्योग

जिल्ह्यातील कुटिरोद्योगात हातमाग, चर्मोद्योग, सुतार व लोहारकाम, कुंभार उद्योग, ग्रामीण तेल, तांब्या पितळेची भांडी, लोकर विणकाम, हात कागद, वाख, मध उद्योग, वेत व बांबूची कामे इत्यादी महत्त्वाच्या उद्योगधंद्याचा समावेश होतो. त्यापैकी काही उत्पादक उद्योगधंदे पिढीजात कारागिरीच्या स्वरुपात तसेच बलुतेदारी पध्दतीने चालविण्यात येतात. ह्या क्षेत्रातील इतर उद्योगधंदे म्हणजे धुण्याचा साबण बनविणे, खडू बनविणे इत्यादी होत. त्याशिवाय बऱ्याच लघु उद्योगधंद्याकरिता कारागिरांच्या औद्योगिक सहकारी संस्थाही स्थापन झाल्या आहेत.

प्राचीन काळात भारतातील खेडी ही स्वयंपूर्ण होती. परकीय सत्तेमुळे तसेच वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत परावलंबीत्त्व येत गेले आणि येथील पारंपरिक ग्रामीण उद्योग अडचणीत येवून येथील अर्थव्यवस्था असंतुलित होऊन बेरोजगारीची समस्या वाढू लागली. ग्रामीण अर्थव्यवस्थेत संतुलित विकास घडवून आणणे व स्वयंपूर्णत: साध्य करण्यासाठी विविध संस्थांच्या परस्पर सहकार्यातून ग्रामीण भागाचा जलद विकास घडवून आणण्याच्या दृष्टिने स्वातंत्र्यानंतर संयुक्त महाराष्ट्र शासनाने ग्रामीण औद्योगिकरणासाठी योजना आखली. त्या अंतर्गत महाराष्ट्रातील खादी आणि ग्रामोद्योग कार्याच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने राज्य विधान मंडळाच्या कायद्यानुसर सन १९६२ मध्ये 'महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना केली. यानुसार मंडळामार्फत राज्यातील ग्रामीण भागात केंद्र शासन व राज्य शासनाच्या सहकार्याने अर्थसहाय्याच्या विविध योजना राबविण्यात येतात. यात प्रामुख्याने 'आर.ई.जी.पी (मार्जीन मनी) योजना,' 'विशेष घटक योजना', 'कारागीर रोजगार हमी योजना', 'ग्रामोद्योग वसाहत योजना' यांचा समावेश आहे. या अंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील गरजू लोकांना रोजगार, खेड्यातील कारागीर व बलुतेदार यांच्या उद्योगाचे स्थैर्य, स्वयंरोजगाराच्या क्षेत्राची व्यपक प्रमाणात वृध्दी, खादी व ग्रामोद्योगासाठी पतपुरवठा, कच्चा मालपुरवठ्याची शिफारस, कारागिरांचे तांत्रिक कौशल्य वाढविण्यासाठी उत्तेजन, तयार मालाच्या विक्रीस मदत, निवडक ग्रामोद्योगाचे प्रशिक्षण, खादी ग्रामोद्योगाच्या विकासास पोषक असे धोरण ठरविण्याबाबत शासनाशी प्रभावी संपर्क, स्थानिक साधन संपत्तीचा वापर करून ग्रामीण भागातील कारागिरांना रोजगार मिळवून देणे हे मंडळाचे उद्दिष्ट आहे. अलिकडे 'ग्रामोद्योग' म्हणजे ज्या गावाची लोकसंख्या २०,००० पेक्षा जास्त नाही अशा गावात सुरू केलेला उद्योग, (पूर्वी ही मर्यादा १०,००० पेक्षा कमी लोकसंख्येची होती.) ज्यात भांडवली गुंतवणूकीची रक्कम प्रति कारागीर किंवा कामगार रु. ५०,००० पेक्षा जास्त असणार नाही अशा उद्योगास 'ग्रामोद्योग' म्हणून संबोधण्यात येते.

मार्जीन मनीयोजना : जिल्ह्यातील या मंडळार्मात मार्जीनमनी योजनेखाली आर्थिक सहाय्य हे आयोग पुरस्कृत बँकेमार्फत देण्यात येते. या योजनेत वैयक्तिक उद्योजकासाठी व संस्था/सोसायटीकरिता प्रकल्प गुंतवणूकीची कमाल मर्यादा रु.२५ लाखापर्यंत आहे. प्रकल्पात १० टक्के इतकी रक्कम लाभधारकाने स्वत: गुंतवावयाची आहे. अनुसूचीत जाती/जमाती, महिला, अल्पसंख्यांक, माजी सैनिक व अपंग अशा लाभार्थ्यांना एकूण प्रकल्पाच्या ५ टक्के रक्कम स्वत: गुंतवावयाची असते. रु.१० लाखापर्यंतच्या प्रकल्प गुंतवणूकीवर २५ टक्के रक्कम ही दुराव्याची रक्कम (मार्जीन मनी) म्हणून बिनव्याजी कर्ज स्वरुपात मंजूर केली जाते. अनुसूचित जाती/जमाती, महिला, अल्पसंख्यांक, माजी सैनिक व अपंग अशा लाभार्थ्यांना ३० टक्के रक्कम मार्जीन मनी म्हणून मंजूर केली जाते. या योजनेअंतर्गत लातूर जिल्ह्यात सन २००३-०४ या आर्थिक वर्षात २३ उद्योजकांना रु.१८ लाख ६७ हजार बँकेकडून कर्ज वाटप करून सदर कर्जावर

मंडळामार्फत रु.९ लाख ९० हजार मार्जीन मनी देण्यात आले. सन २००५-०६ अखेर या आर्थिक वर्षात २५ उद्योजकांना रु.१८ लाख ४० हजार बँकेकडून कर्ज वाटप करून त्यावर मंडळातर्फे रु.५ लाख ९२ हजार मार्जीन मनी देण्यात आले.

विशेष घटक योजना : शासनाच्या २० कलमी कार्यक्रमाअंतर्गत अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखालील लाभधारकांना रोजगार उपलब्ध करणेसाठी व त्यांच्या ग्रामोद्योग उभारणीकरिता मंडळ विविध वित्तीय संस्थांकडून वित्त सहाय्य उपलब्ध करून देते. सदर कर्जावर मंडळामार्फत विशेष केंद्रीय सहाय्यातून रक्कम रु.१०,०००/- पर्यंत अथवा मंजूर कर्जाच्या ५० टक्के पैकी कमी असणारी रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात येते. या योजनेअंतर्गत लातूर जिल्ह्यात सन २००१-०२ या आर्थिक वर्षात १९ लाभार्थ्यांचे एकूण रु.४ लाख ०१ हजारचे कर्ज प्रकरणे मंजूर करून वाटप केले. त्यावर मंडळाने एकूण रु.१ लाख ४४ हजार अनुदान दिलेले आहे. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात ५१ लाभार्थांना एकूण रु.६ लाख ३२ हजारचे कर्ज प्रकरणे मंजूर करून वाटप केले. त्यापैकी ३७ लाभार्थ्यांना एकूण रु.२ लाख १६ हजार अनुदान वितरीत केले.

कारागीर रोजगार हमी योजना : ग्रामीण भागातील गरजू कारागिरांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सहकार कायद्यान्वये सन १९७२ मध्ये राज्यात प्रत्येक विकास गट स्तरावर बलुतेदार ग्रामीण कारागीर सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या असून लातूर जिल्ह्यात ५ संस्था कार्यरत आहेत. सदर संस्थांचे सद्या एकूण ५६,४७३ सभासद आहेत. या योजनेअंतर्गत सन २००२-०३ मध्ये नाबार्ड योजनेअंतर्गत लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत २०७ सभासदांना एकूण रु.१९ लाख ९९ हजार कर्ज वाटप करण्यात आले. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात या योजनेअंतर्गत ५१ सभासदाना एकूण रु.५ लाख ०५ हजार कर्ज वाटप करण्यात आले. तथापि, या योजनेअंतर्गत सन २००० ते २००६ अखेर या कालावधीत एकूण ५०५ लाभार्थीना एकूण रु.५० लाख ५० हजार कर्ज मंजूर करण्यात आले त्यापैकी वरील कालावधीत ४२८ सभासदांना एकूण रु.४२ लाख ५४ हजार प्रत्यक्ष कर्ज वाटप करण्यात आले होते.

ग्रामोद्योग वसाहत : मोठ्या, मध्यम आणि लघु उद्योगाच्या विकासाकरिता शासनाकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे औद्योगिक क्षेत्र तसेच सहकारी औद्योगिक वसाहतीची ठिकठिकाणी निर्मिती करून त्याद्वारे मोठ्या, मध्यम व लघु उद्योजकांना जागा, वीज, पाणी यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य चालू आहे. मात्र ग्रामोद्योगाच्या विकासाकरिता अशा प्रकारच्या सुविधा पुरविण्याची कोणतीही योजना अस्तित्वात नव्हती. ग्रामीण भागातील छोटे-छोटे उद्योजक/कारागीर हे विखुरलेले आहेत. त्यांचा उदरनिर्वाह ग्रामीण व कुटिरोद्योगावर अवलंबून आहे. हे उद्योग रोजगारक्षम असून ग्रामीण जनतेला रोजगाराचे मोठे साधन आहे. आजच्या यांत्रिकीकरणाच्या युगात हे उद्योग टिकून राहिल्यास ग्रामीण जनतेचा शहराकडे जाणारा लोंढा व शहरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या रोखण्यासाठी एम.आय.डी.सी.प्रमाणे उद्योग विकासासाठी वर उल्लेख केल्याप्रमाणे पायाभूत सुविधा लहान (टायनी) उद्योजक आणि कारागीर यांनाही याच धर्तीवर समुहामध्ये (कलस्टर) एकत्रित आणून गरजू कारागीर, सुशिक्षित बेरोजगार, उद्योजक यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने सन १९७९ पासून ग्रामोद्योग वसाहतीची संकल्पना सर्व प्रथम पुढे आणली आणि शासनाने दिनांक १२ मे १९९३ रोजी ग्रामोद्योग वसाहत स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार लातूर जिल्हा, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने जळकोट येथे गट क्र.१,२०९ मध्ये १ हेक्टर २१ आर जागा खरेदी केलेली असून सदर जागा

अनुक्रमणिका

विकसित करण्याकरिता आवश्यक असलेल्या पायाभूत सोयी सुविधा (रस्ते, वीज, पाणी इ.बाबत) एम.आय.डी.सी.कडून प्लॅन व इस्टिमेट रु.१० लाखाचा प्रस्ताव तयार करून २२ मार्च २००३ रोजी मंजूरीसाठी मंडळाच्या मुख्य कार्यालयास सादर केलेला आहे. येथे पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यानंतर ६० कारागिरांना उद्योग सुरू करण्यासाठी मदत होणार असून त्यामधून ९० कारागिरांना रोजगार निर्माण होणार आहे. याच धर्तीवर चाकूर तालुक्यातील नळेगाव येथे ग्रामोद्योग वसाहत स्थापण्यात येत आहे. यासाठी नळेगाव येथील गट क्र.८१८ मधील ८० आर जागा मंडळाने खरेदी करून जागा मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे.[१४५]

जिल्ह्यात चालणाऱ्या काही परंपरागत कुटिरोद्योगांची आणि त्यातील कारागिरांना सदर मंडळामार्फत देण्यात आलेल्या आर्थिक साहाय्याबाबतची माहिती पुढे देण्यात येत आहे.

हातमाग विणकाम उद्योग : लातूर जिल्हा निर्मिती (१९८२) पूर्वी तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात देखील हातमाग विणकाम हा पारंपरिक कुटिरोद्योग होता. तत्कालीन जिल्ह्यात उद्योग सर्वत्र पसरला होता. तथापि, लातूर, उस्मानाबाद, परंडा, भूम, औसा, उदगीर, गंजोटी आणि मुरुम या ठिकाणी हा उद्योग केंद्रीत झाला होता. जिल्ह्यात हातमागावरील विणकाम करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने कोष्टी आणि साळी (पद्मसाळी) समाजातील लोक होते. त्याचप्रमाणे धनगर समाजातील काही लोक लोकर विणकाम करीत असत. हातमागावरील विणकाम हा उपरोक्त समाजातील प्रमुख व पारंपरिक व्यवसाय होता. १९६१ मध्ये या उद्योगात १,५३६ कारागीर कार्यरत होते. कताई व विणाई करणाऱ्या कारागिरांची संख्या जिल्ह्यातील (तत्कालीन) एकूण लोकसंख्येच्या दर लाख व्यक्तिमागे १२१ होती. ३१ मे १९६१ रोजी जिल्ह्यात नोंदणी झालले १,५७१ सुती व ९८ बिगर सुती हातमाग होते.[१४६] जिल्ह्यात पूर्वी हातमाग हा प्रामुख्याने कौटुंबिक व्यवसाय होता व हा कारागिरांना वर्षभर पुरणारा रोजगार होता. यातून प्रत्येक कारागिरांना त्या काळात दर महिन्याला रु.१०० ते १५० दरम्यान उत्पन्न मिळत असे. बहुतेक विणकर त्यांचे उत्पादन सहकारी सोसायट्यांना आणि एजटांना विकत असत. काही विणकर विणलेले कापड स्वत: बाजारपेठेतून विकत असत. हातमाग विणकरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांच्या सहकारी सोसायट्या स्थापन करण्यात आल्या होत्या. सन १९६२-६३ मध्ये जिल्ह्यात ८ हातमाग विणकर सहकारी सोसायट्या, १० वूल विणकर सहकारी सोसायट्या आणि २ खादी विणकाम सहकारी सोसायट्या होत्या. सन १९६७ मध्ये जिल्ह्यात उदगीर व औसा येथे 'मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती नांदेड' अंतर्गत खादी ग्रामोद्योग उपकेंद्र सुरू करण्यात आले. यात हातमागावर कारागिरांकडून विणाई काम केले जात असे. ही दोन्ही उपकेंद्रे तालुक्याच्या ठिकाणी असून सदर गावांची लोकसंख्या २० हजार पेक्षा जास्त आहे. त्यामुळे याचा समावेश ग्रामोद्योगाच्या व्याख्येनुसार ग्रामोद्योगात होत नाही. तथापि, सदर दोन्ही हातमाग विणकाम उपकेंद्रांची सविस्तर माहिती याच प्रकरणात 'वस्त्रोद्योग' या शिर्षकाखाली या अगोदर देण्यात आली आहे.

सन १९७६ मध्ये औसा येथे जनता हातमाग विणकर सहकारी संस्था सुरू झाली. लातूर जिल्ह्यात सुती व लोकरी कापड विणण्याचे उद्योग लातूर, उदगीर, औसा व मुरूड येथे सुरू होते. लोकरी पासून घोंगडी, शाल वगैरे वस्तू विणल्या जातात. येथील हातमागावर साडी व धोती विणण्याचेही काम चालत

१४५. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहिती आणि महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई, ग्रामोद्योग सम्मेलन-२००५ औरंगाबाद, स्मरणिका, पृ.१३.

१४६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४५३ आणि **भारतीय जनगणना, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, उस्मानाबाद**,१९६१, पृ. ४३.

होते. जिल्ह्यात सन १९८४-८५ मध्ये खादीचे एकूण २८५ हातमाग युनिट होते. सन १९८६ मध्ये औसा तालुक्यातील बुधोडा या गावी ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठाण या स्वयंसेवी संस्थेअंतर्गत अंध व अपंग पुनर्वसन केंद्र सुरू केले. त्यात अंध व अपंगाना हातमागावर विविध वस्त्र निर्मितीचे प्रशिक्षण देऊन त्यांना कायमस्वरुपी स्वयंरोजगार मिळवून देऊन त्यांच्या श्रमातून त्यांचे पुनर्वसन करण्यात येत आहे. या केंद्राअंतर्गत हातमागावर चालणाऱ्या विणकामाची सविस्तर माहिती वस्त्रोद्योग या शिर्षकाखाली या अगोदर देण्यात आलेली आहे. सन १९९२-९३ मध्ये जिल्ह्यात ९ हातमाग विणकर सहकारी संस्था सुरू होत्या. त्यात एकूण ५५८ सभासद होते. त्यांचे भाग भांडवल रु.५९ हजार, खेळते भांडवल रु.२ लाख ९२ हजार होते. त्यात १३ कामगार होते. परंतु लवकरच या संस्था बंद पडल्या.[१४७] त्यानंतर लातूर जिल्ह्यात हातमाग विणकर सहकारी संस्था स्थापन झाल्या नसल्याचे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांच्याकडील माहितीवरून स्पष्ट होते. अलिकडे यंत्रनिर्मित दर्जेदार व सुबक आणि कमी किंमतीत वस्त्रे अन्य ठिकाणाहून जिल्ह्यात आयात होऊ लागल्यामुळे परंपरागत पध्दतीने चालणारा हातमाग विणकाम हा कुटिरोद्योग यंत्रनिर्मित वस्त्राशी स्पर्धा करू शकला नाही व याचा परिणाम म्हणून सद्या जिल्ह्यातील परंपरागत स्वरुपात चालणारा हातमाग विणकाम कुटिरोद्योग बंद पडला आहे.

सुतारकाम : सन १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात (पूर्वीचा उस्मानाबाद जिल्हा) सुतारकाम हेच उपजिविकेचे मुख्य साधन असलेले ५,१०० लोक होते. उस्मानाबाद, लातूर, भूम, परंडा, अहमदपूर, उदगीर, तुळजापूर, उमरगा अशा बहुतेक तालुक्यात कृषि उपकरणे बनविणे व दुरुस्त करणे तसेच फर्निचर, लाकडी तुळ्या तयार करणे इत्यादी कामे हे सुतार करायचे व आतादेखील ही कामे केली जातात. १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात २६९ माणसे खटारागाडी बनविण्याच्या व्यवसायात होती. त्यावेळच्या जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या दर लाख व्यक्तिमागे सुतारांची संख्या २८५ होती. ग्रामीण भागात हा व्यवसाय वंश परंपरेने व बलुतेदारी पध्दतीने चालणारा व्यवसाय होता व आजही अनेक खेड्यात हा व्यवसाय बलुतेदारी पध्दतीने सुरू आहे.[१४८]

सन १९७२ च्या सुमारास बांधकाम कंत्राटदाराकडून सुतारकामासाठी सुतारांची नियुक्ती केली जाई तेव्हा ते दैनंदिन मजूरीने काम करत. कुशल कारागिराला प्रतिदिन रु.५ ते ७ प्रमाणे दर मिळत असे. तर अकुशल सुताराला प्रतिदिन रु.२.५० ते ३.०० प्रमाणे दर मिळत असे. ग्रामीण व शहरी भागातील सुधारत्या राहणीमानामुळे विविध डिझाईनच्या लाकडी वस्तूस वाढती मागणी आहे. शहरातील सुतार साधारणपणे आधुनिक उपकरणे व पध्दती वापरतात.[१४९]

सन १९८५ मध्ये लातूर जिल्ह्यात २ सुतार सहकारी संस्था सुरू होत्या. त्यात एकूण २६ सभासद होते. त्यांचे भाग भांडवल रु.२ हजार व खेळते भांडवल रु.२ हजार होते. त्यावर्षी त्यात १५ कामगार होते. त्यावर्षी २ पैकी १ संस्थेला रु.३४ हजार नफा झाला तर १ संस्थेस रु.१ हजार तोटा झाला. सन २००५-०६ मध्ये लातूर जिल्ह्यात ५ सुतार सहकारी संस्था सुरू होत्या. त्यात एकूण १८२ सभासद होते. त्यांचे भाग भांडवल रु.७ हजार, खेळते भांडवल रु.१२ हजार होते. त्यात एकूण कामगार (कारागीर) ४९ होते. त्यावर्षी त्यांना एकूण रु.३२ हजार वेतन देण्यात आले. या संस्थांनी त्यावर्षी उत्पादनासाठी रु.३६

---

१४७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४५३, ४७२ आणि पूर्वाक्त तोंडारे एस.जी, पृ.२१ तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१४८. **भारतीय जनगणना, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, उस्मानाबद,** १९६१, पृ.४३.

१४९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४५१.

हजाराचा कच्चा माल उपयोगात आणून त्यापासून रु.१ लाख ०८ हजार किंमतीचे उत्पादन केले तर त्याची विक्री किंमत रु.१ लाख १९ हजार होती. त्यातील काही संस्थांना एकत्रित रु.६१ हजार नफा झाला तर काही संस्थांचा एकत्रित तोटा रु.८ लाख ९९ हजार होता.[१५०]

लातूर जिल्ह्यातील नेवळी, उजनी, आनंदवाडी, दावणगाव, आष्टा, शिवणी, हि.कवळी, हरंगूळ, बाकली, एकूरगा, शेंद, औराद (शा.), किनगाव, चापोली, उजळंब, नागदरवाडी, जानवळ, भडी, खरोसा, हिप्परगा, निटूर, मोर्तळवाडी इत्यादी ठिकाणी सुतारी उद्योगात गाड्या, दरवाजे, शेतीची अवजारे, खिडक्या इत्यादी लाकडाच्या वस्तू तयार केल्या जातात. सन १९९१-९२ मध्ये वरील गावांपैकी काही गावातील सुतार कारागिरांना एकूण रु.२ लाख १२ हजारची भांडवली सहाय्य जिल्ह्यातील महाराष्ट्र खादीग्रामोद्योग मंडळ कार्यालयामार्फत देण्यात आले. त्या अंतर्गत त्यावर्षी २६ कारागिरांना रोजगार उपलब्ध झाला व त्यांच्याकडून त्यावर्षी रु.३ लाख ८० हजाराचे उत्पादन करण्यात आले तर, त्याची विक्री किंमत रु.४ लाख ९० हजार प्राप्त झाली. सन २००४-०५ मध्ये खादी व ग्रामोग मंडळ जिल्हा लातूर कार्यालयामार्फत खादी आयोग निधीअंतर्गत सुतार-लोहारी कामासाठी जिल्ह्यातील २४१ कारागिरांना आर्थिक सहाय्य देण्यात आले त्यापैकी त्यांचे १९६ युनिट कार्यरत होते. या घटक (युनिट) अंतर्गत सन २००५-०६ मध्ये एकूण २७८ कारागिरांना रोजगार मिळाला. त्यात त्यावर्षी एकूण रु.२ कोटी ३५ लाख किंमतीचे उत्पादन झाले. त्याची विक्री किंमत रु.४ कोटी ७५ लाख ८० हजार होती. त्यावर्षी २७८ कारागिरांना एकूण रु.१ कोटी ७५ लाख ८० हजार मजूरी देण्यात आली.[१५१]

लोहारकाम : लोहार हा अद्याप ग्रामीण अर्थव्यवस्थेत बलुते पध्दतीतील आपले प्रमुख अस्तित्व टिकवून असलेला एक महत्त्वाचा घटक आहे. तथापि, नजीकच्या काळात ग्रामीण भागात अनेक ठिकाणी लोहाराकडून काही प्रमाणात बलुतेदारी पध्दती व काही प्रमाणात कामाच्या मोबदल्यात वस्तूच्या निर्मिती किंवा दुरुस्तीच्या स्वरुपावरून ठराविक दर आकारला जातो. जिल्ह्यातील बहुतेक गावांमध्ये लोहारकाम चालते. अनेक गावांत लोहारकाम व सुतारकाम ही दोन्ही प्रकारची कामे एकाच व्यक्तिकडून केली जातात. या व्यवसायात शेतीच्या कामात उपयोगात आणली जाणारी लाकडी व लोखंडी अवजारे तयार करणे, इमारतीचे साहित्य बनविणे, दैनंदिन वापरातील इतर लोखंडी वस्तू तयार करणे इत्यादी कामे केली जातात. ही कामे करणाऱ्यांना 'लोहार' या नावाने ओळखले जाते. सन १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात (तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा) १,३८० कारागीर लोहार कामात कार्यरत होते. जिल्ह्यातील तेव्हाच्या एकूण लोकसंख्येच्या दर लाख व्यक्तीमागे लोहारांची संख्या ९३ होती. ग्रामीण भागातील लोहार कारागीर हे अर्धकुशल असून त्यांचा वंशपरंपरागत व्यवसाय म्हणून ते हा व्यवसाय स्वीकारतात. ग्रामीण लोहारांकडून जुने, कालबाह्य हत्यारे आणि अवजारे वापरली जात होती. या कारागिरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जिल्हा खादीग्रामोद्योग कार्यालयामार्फत आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात लोहारकाम व सुतारकामाचे प्रशिक्षण देणाऱ्या पाच शाळा परंडा, अहमदपूर, निलंगा, भूम व चाकूर या ठिकाणी होत्या. अलिकडच्या काळात शेती उपयोगी अवजाराशिवाय या व्यवसायात लोखंडी पलंग, टेबल, खुर्च्या, पाळणे, लोखंडी दरवाजे, लोखंडी खिडक्या, लोखंडी ग्रील (सळ्या), लोखंडी गेट इत्यादी पक्का माल तयार करतात. पूर्वी दावणगाव येथील लोखंडाची कुलुपे प्रसिध्द होती. बहुतेक ग्राहक त्यांना हव्या असलेल्या वस्तू तयार करवून घेण्यासाठी आवश्यक असलेले लोखंड, लोखंडी शीट आणि लोखंडी बार ही स्वत: आणतात.

---

१५०. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१५१. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

जिल्ह्यातील किल्लारी, निटूर, मोर्तळवाडी, तेलगाव, हदगा, हि.कवळी, बाकली, राठोडा, अजनी, हिप्परगा, दावणगाव, मोघा, जानवळ, अजनसोंडा, पळसी, मुरढव, घरणी, तांदुळजा, म्हाळंगी, औराद (शा.) इत्यादी ठिकाणच्या लोहारकाम करणाऱ्या कारागिरांना जिल्हा ग्रामोद्योग विभागाकडून त्यांच्या व्यवसायासाठी वेगवेगळ्या वर्षी आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. सन १९९३-९४ मध्ये जिल्ह्यातील तांदुळजा, म्हाळंगी, औराद (शा.) इत्यादी ठिकाणच्या कारागिरांना एकूण रु.४४ हजार आर्थिक सहाय्य देण्यात आले. त्यातून ४ कारागिरांना रोजगार मिळाला त्यांचेकडून रु.९० हजार किंमतीचे उत्पादन झाले. त्याची विक्री किंमत रु.१ लाख २५ हजार मिळाली.[१५२]

कुंभार उद्योग : मातीची मडकी व विटा, मातीचे बाऊल किंवा वाट्या तयार करण्याच्या परंपरागत व्यवसायात प्रामुख्याने कुंभार लोक गुंतलेले आहेत. मातीची भांडी बनविणे हा जिल्ह्यात सर्वत्र आढळणारा एक महत्त्वाचा कुटिरोद्योग आहे. कुंभार ही मातीची भांडी घडविणारी एक धंदेवाईक जात आहे. या जातीच्या कुळासंबंधी प्रचलीत असलेल्या अनेक दंत कथा सोडून दिल्या तरी ऋग्वेदात मातीच्या भांड्यांचा उल्लेख आहे. यावरून कुंभार उद्योग हा अत्यंत प्राचीन काळातही अस्तित्वात होता हे सिध्द होते. कुंभार हा १२ बलुतेदारांपैकी एक असून तो मातीच्या घागरी, माठ, दुधाचे-ताकाचे डेरे, सुगडे, वेळण्या, पणत्या, लोटकी, रांजण, कोथळी इत्यादी वस्तू तयार करून पूर्वी शेतकऱ्यांना देत असे. मातीची मडकी रोखीने विकतात. तसेच बलुते पध्दतीनुसार त्यांना वर्षभर मातीच्या भांड्यांचा पुरवठा करावा लागतो व त्याबदल्यात त्यांना शेतकऱ्यांकडून हंगामात ठराविक धान्य मिळते. कुंभाराचा हा उद्योग वंशपरंपरागत व्यवसाय असून जिल्ह्यात (तत्कालीन उसमानाबाद जिल्हा) हा उद्योग प्रामुख्याने लातूर, उस्मानाबाद, तुळजापूर, उदगीर आणि परंडा येथे केंद्रीत झालेला होता. कुंभाराकडून मातीच्या भांड्याचे उत्पादन लहान प्रमाणावर केले जाते. या कार्यात कुंभाराचे सबंध कुटुंब एक घटक (Unit) म्हणूनच कार्यरत असते. कुटुंबातील पुरुष कौशल्याने मातीच्या भांड्याला आकार देतात आणि कुटुंबातील इतर सदस्य हे माती आणणे, चिखल तयार करणे इत्यादी कामे करतात.[१५३] सन १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात ह्या व्यवसायात २,२१७ माणसे कुंभाराची कामे करत होते. त्या वर्षी जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या दर लाख व्यक्तीमागे १५० कुंभार कारागीर होते. त्या काळात जिल्ह्यातील उद्योग विभागाने उदगीर येथे मातीच्या भांड्याचे व 'बिद्री' कामाचे प्रशिक्षण केंद्र सुरू केले.[१५४]

विटा बनविणे हा देखील कुंभाराचा वंशपरंपरागत व्यवसाय आहे. हा ग्रामोद्योग जिल्ह्यात सर्वत्र आढळतो. अलिकडे घरबांधकामाच्या कार्यात झालेल्या वाढीमुळे विटांच्या मागणीमध्ये वाढ झाली. सन १९६१ मध्ये या हस्तव्यवसायात एकूण ३,२१५ लोक कार्यरत होते. त्यापैकी ३,०६८ पुरुष होते व १४७ स्त्रिया होत्या. हा हंगामी उद्योग सामान्यत: ऑक्टोबर ते मे महिना या कालावधीत चालतो. पावसाळी हंगामात हा उद्योग बंद ठेवावा लागतो. माती व राख हे या उद्योगात वापरला जाणारा कच्चा माल होय आणि कोळसा व लाकूड हे इंधन म्हणून वापरले जातात. विटा भाजण्यासाठी भट्टी तयार केली जाते. त्याची क्षमता सर्वसाधारणपणे ५०,००० ते ७०,००० विटांची असते. सामान्यत: वीटेची लांबी, रुंदी व उंची अनुक्रमे ९ इंच, ४.५ इंच आणि ३ इंच असते. १९७२ च्या सुमारास १,००० विटांचा खर्च रु.३० ते ३५ दरम्यान असे

१५२. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४५२ आणि **भारतीय जनगणना, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, उस्मानाबाद,** १९६१, पृ.४३ तसेच जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१५३. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४५४

१५४. **भारतीय जनगणना, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, उस्मानाबाद,** १९६१, पृ.४३.

तर, याची विक्री किंमत रु.४० ते ५० दरम्यान राहत असे. विटांच्या वाढत्या मागणीनुसारही विटांच्या किंमतीत बदल होत आहे.

सन १९६१ मध्ये लातूर येथे (तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात) विटाच्या एका कारखान्याची स्थापना झाली. त्यातील स्थिर भांडवल रु.११,७५० आणि खेळते भांडवल रु.१०,००० होते. त्यात एकूण २० मजूर होते. त्यापैकी १० कामगार कुशल होते. त्याकाळात या उद्योगातील कामगारांना रु.४ ते ६ दरम्यान दैनिक मजूरी देण्यात येत असे.[१५५] सन १९६५ मध्ये लातूर येथे सहकारी क्षेत्रातील 'वीट उत्पादक सहकारी संस्था म., लातूर' ही (तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यातील) पहिली वीट सहकारी संस्था स्थापन झाली.

सन १९८२-८३ मध्ये जिल्ह्यात ५ वीट उत्पादक सहकारी संस्था सुरू होत्या. त्यात १०७ सभासद होते. त्यांचे एकूण भाग भांडवल रु.२५ हजार होते, खेळते भांडवल रु.६० हजार होते. त्यात रु.३५ हजाराचा कच्चा माल उपयोगात आणून रु.६० हजाराचे उत्पादन झाले. त्यावर्षी त्यातील या संस्थांचा एकत्रित निव्वळ नफा रु.१० हजार होता. त्यामध्ये त्यावर्षी ५ कामगार होते.

लातूर जिल्हा निर्मितीनंतर (१९८२) सन १९८७ मध्ये 'अंजना मागासवर्ग वीट उत्पादक औद्योगिक संस्था म.', जेवळी ही निलंगा तालुक्यात या नवीन जिल्ह्यातील पहिली विटा तयार करणारी सहकारी संस्था सुरू झाली. सन २०००-०१ मध्ये लातूर जिल्ह्यात १८ विटा तयार करणाऱ्या सहकारी संस्था सुरू होत्या. त्यात एकूण ३४७ सभासद होते. त्यांचे एकूण भाग भांडवल रु.१६ हजार होते. खेळते भांडवल रु.२३ हजार होते. त्यात ४८ कामगार होते. त्यांचेकडून रु.६२ हजारचा कच्चा माल उपयोगात आणून रु.१ लाख ४२ हजाराचे उत्पादन करण्यात आले. त्यावर्षी रु.१ लाख २८ हजारची विक्री झाली तथापि, संस्थाना एकूण रु.२ हजारचा तोटा झाला.[१५६]

जिल्ह्यात गुडसूर, तळेगाव, जढाळ, टाका, निटूर, मेथी, हगदळ, उजळंब, जगळपूर, देवंग्रा, एकूरगा, वरवटी, आशिव, माटेफळ, गरसुळी, एकूरगा रोड, घरणी, वाढोणा, जळकोट, शिरूर ताजबंद हरंगूळ, बेलकुंड, गोंदी, हाडोळती, यल्लादेवी, किनगाव, रायवाडी, चापोली इत्यादी ठिकाणी विटा व मडकी तयार केल्या जातात. सन २००४-०५ मध्ये सदरीलपैकी काही गावातील घटकांना जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळ कार्यालयामार्फत आर्थिक सहाय्य दिलेल्या १४५ घटकांपैकी ७८ घटक सुरू होते. त्यात त्यावर्षी एकूण ७७ कामगारांना रोजगार मिळाला. त्यांना त्यावर्षी रु.७४ लाख २५ हजार मजूरी देण्यात आली. त्यांचेकडून एकूण रु.१ कोटी ९१ लाख ४० हजार किंमतीचे उत्पादन झाले व त्याची विक्री किंमत रु.२ कोटी ६५ लाख ६५ हजार होती.[१५७]

चामडे (कातडे) कमावणे : जिल्ह्यात चांभार या जातीचे डोहर (ढोर) व चांभार असे दोन पोटभेद आढळतात. कातडी कमाविणे हा डोहर जातीतील लोकांचा व्यवसाय आहे. क्वचित प्रसंगी मातंग (मांग) समाजातील काही लोक कातडी कमाविण्याचे काम करत असत. कुटुंबातील व्यक्तिच हे काम करत असत. क्वचितच बाहेरची व्यक्ति या कामावर नेमली जाई. पूर्वीचा उस्मानाबाद जिल्हा आणि सद्याच्या लातूर जिल्ह्यातील अर्थव्यवस्था ही पूर्वीपासून प्रामुख्याने कृषिप्रधान आहे आणि येथील कृषि पशुंच्या साह्याने

---

१५५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४५५.

१५६. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१५७. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

पारंपरिक पध्दतीने केली जात असल्याने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पशुधन उपलब्ध आहे. उदगीर या तालुक्यात जनावरांच्या खरेदी विक्रीच्या तीन मोठ्या (हंडरगुळी, देवणी, उदगीर) बाजारपेठा आहेत. उदगीर येथील तसेच जिल्ह्यातील दुग्ध व्यवसाय प्रसिध्द आहे. त्याची सविस्तर माहिती अगोदर **'दुग्ध उत्पादन व्यवसाय'** या शिर्षकाअंतर्गत देण्यात आलेली आहेच. येथील दुग्ध व्यवसायासाठी गायी, म्हशींची पैदास व संगोपन मोठ्या प्रमाणात केले जाते. त्यामुळे जिथे पशुंची पैदास मोठ्या प्रमाणात होते, तेथे क्रमाने त्यांच्या मृत्युचे प्रमाणही अधिकच असणार याची प्रचिती उदगीर येथील आठवडी बाजारातील एक फरलांग केवळ चामड्याचा बाजार पाहून येते. जिल्ह्यात विविध ठिकाणच्या बाजारात विक्रीसाठी येणारे कातडे एजंट खरेदी करून ते पुढील प्रक्रियांसाठी सोलापूर, मद्रास येथे तसेच महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाच्या सातारा येथील कातडे कमावणी केंद्रात पाठवितात. तथापि, जिल्ह्यात काही प्रमाणात पारंपरिक पध्दतीनेही काही ठिकाणी कातडे कमाविण्याचे काम चालते. पारंपरिक पध्दतीने कातडे कमाविण्याच्या प्रक्रियेची माहिती उस्मानाबाद जिल्हा गॅझेटिअर १९७२ मध्ये 'उद्योगधंदे' या प्रकरणात देण्यात आलेली आहे.

पूर्वी कातडे कमाविणे हा कारागिरांचा वर्षभर चालणारा व्यवसाय होता परंतु कारागिरांस यापासून फार कमी उत्पन्न मिळत असे. या उद्योगात त्यांना १९६० च्या सुमारास महिन्याला रु.१०० आणि रु.१५० च्या दरम्यान उत्पन्न मिळत असे. तत्पूर्वी सन १९५१ मध्ये जिल्ह्यात चामडे उत्पादन करणारे आणि चामड्यापासून पादत्राणे बनविण्याच्या कार्यात ४,२५९ लोक कार्यरत होते. सन १९६१ मध्ये हा ग्रामोद्योग व कुटिरोद्योग जिल्ह्यातील बहुतेक सर्व मोठी वसती असलेल्या ठिकाणी आढळत असे. त्यावेळी हे उद्योग घटक उदगीर, परंडा, उमरगा, गंजोटी, सास्तूर, लोहारा, मुरुम, तुळजापूर, लामजना येथे केंद्रीत झाले होते. आर्थिक अडचणीमुळे कारागिरांना त्यांचा व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी कर्जे घ्यावी लागत. त्यामुळे या व्यवसायात मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूक अशक्य होती. कातडे कमाविणाऱ्यांच्या सहकारी सोसायट्यांच्या स्थापनेमुळे सोसायट्या त्यांना आर्थिक व तांत्रिक सहाय्य आणि बाजारपेठेच्या सुविधा उपलब्ध करून देत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली होती. मार्च १९६४ पर्यंत त्या वेळच्या (उस्मानाबाद) जिल्ह्यात कातडे कमाविणाऱ्यांच्या ३१ सहकारी सोसायट्या होत्या.[१५८]

सन १९८४-८५ च्या सुमारास लातूर जिल्ह्यात आधुनिक पध्दतीने मोठ्या प्रमाणावर कातडे कमाविण्याचा उद्योग केला जाऊ लागला. कातडे कमावण्याच्या उद्योगासाठी खादी ग्रामोद्योग तर्फे कर्ज दिले जाते. सदर वर्षी कातडी कमावण्याचे उद्योग मोठ्या प्रमाणात लातूर, उदगीर व लामजना येथे सुरू होते. त्या वर्षी जिल्ह्यात एकूण ९१ कातडी काम करणारे घटक (युनिट) होते.[१५९] सन १९९१-९२ मध्ये जिह्यातील चिंचोली व हाडोळती इत्यादी गावांतील कातडे कमाविणाऱ्या कारागिरांना जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालयाकडून अर्थसहाय्य देण्यात आले होते अशा घटकातील एकूण भांडवल गुंतवणूक रु.१ लाख व झालेल्या उत्पादनाची किंमत रु.१ लाख ५ हजार होती. त्यात ६ कामगार होते. सन १९९२-९३ मध्ये वडगाव व मुरुड येथील कातडे कमाविणाऱ्या कारागिरांना जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालयाकडून अर्थसहाय्य देण्यात आले. अशा घटकांतील एकूण भांडवल गुंतवणूक रु.१ लाख आणि या घटकांकडून झालेल्या उत्पादनाची किंमत रु.१ लाख ३० हजार होती. विक्री किंमत रु.१ लाख ७० हजार होती. त्यात ५ कामगारांना रोजगार मिळाला.[१६०]

---

१५८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४३५, ४५२-५३ आणि उदगीर शहर नगरपरिषद, उदगीर, रौप्यमहोत्सवी स्मरणिका १९७९, उदगीर, पृ.११, १२.

१५९. तोंडारे एस.जी., पूर्वोक्त, पृ.२२.

१६०. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

सन १९९३-९४ मध्ये जिल्ह्यात चामडे कमाविणाऱ्या ४ सहकारी संस्था सुरू होत्या. त्यात २६५ सभासद होते. त्यांचे एकूण भाग भांडवल रु.२० हजार, खेळते भांडवल रु.४२ हजार होते. त्यात ५ कामगार होते. त्यांच्याकडून रु.२५ हजार किंमतीचे उत्पादन झाले. त्यावर्षी उत्पादित मालाची विक्री रु.२५ हजारची होती. त्यावर्षी या संस्थांचा एकत्रित निव्वळ नफा रु.३ हजार होता.[१६१]

सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यात कातडे कमाविणे व चामड्याच्या वस्तू तयार करण्याचे २१ घटक (युनिट) सुरू होते. त्यातील एकूण गुंतवणूक रु.२ कोटी १७ लाख ४० हजार होती. त्यात ६१ कामगार होते. त्या वर्षी सदरील युनिट मध्ये रु.५० लाख ७७ हजार किंमतीचे उत्पादन झाले.[१६२]

चर्मोद्योग : या जिल्ह्यात चामड्यापासून बूट, चप्पल किंवा सँडल, कातडी पिशव्या, चामड्याचे दोर, पखाली, मोट, बैलाच्या गळ्यातील पट्टे व इतर किरकोळ वस्तू बनविल्या जात असत. हा परंपरागत उद्योग करणाऱ्यांना चांभार किंवा मोची असे संबोधले जाते. सन १९६१ मध्ये तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात जोडे तयार करणारे व दुरुस्त करणारे ३,१०८ कामगार होते. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या दर लाख व्यक्तीमागे जोडे बनविणारे व दुरुस्त करणारे २१० कारागीर होते.[१६३] सन १९९१-९२ मध्ये शिरुर ताजबंद, जळकोट इ. येथील चर्मोद्योग कारागिरांना तसेच सन १९९२-९३ मध्ये बोरगाव, नायगाव, शिरुर, हंडरगुळी, चाकूर, विळेगाव, किल्लारी येथील आणि सन १९९३-९४ मध्ये लिंबाळादाऊँ, खरोळा, देवणे (बू.) येथील चर्मोद्योग कारागिरांना जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालयामार्फत आर्थिक सहाय्य देण्यात आले. सन १९९१-९२ ते सन १९९३-९४ पर्यंत सहाय्य देण्यात आलेल्या सदरील गावातील कारागिरांच्या उद्योग घटकांतील एकूण भांडवल गुंतवणूक रु.४ लाख ३८ हजार होती. त्यातील एकूण कामगार संख्या ४१ होती. त्यात एकूण रु.८ लाख ९० हजार किंमतीचे उत्पादन झाले व रु.१० लाख ८७ हजार, किंमतीची विक्री झाली. सदरील ठिकाणी प्रामुख्याने बूट, जोडे, चप्पल इत्यादी वस्तू तयार केल्या जातात.[१६४]

सन १९९४ मध्ये औसा, तालुक्यात हसलगण येथे 'संत रोहीदास चर्मोद्योग औद्यागिक सहकारी संस्था, हसलगण' ही लातूर जिल्ह्यातील पहिली चर्मोद्योग सहकारी संस्था स्थापन झाली.[१६५]

सन १९९७ मध्ये जिल्ह्यात १९ चर्मोद्योग घटक सुरू होते. त्यातील गुंतवणूक रु.६८ लाख होती. त्यात १८४ कामगार होते व त्या वर्षी त्यातील एकूण उत्पादनाची किंमत रु.९० लाख होती.[१६६]

औसा तालुक्यात किल्लारी, शिरुर अनंतपाळ तालुक्यात उस्तुरी, बडूर येथे, उदगीर तालुक्यात मोर्तळवाडी येथे, जळकोट तालुक्यात शिरुर ताजबंद इत्यादी प्रमुख ठिकाणी सद्याही मोठ्या प्रमाणावर चर्मोद्योग चालतो. सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यात जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालयामार्फत आयोग निधी अंतर्गत ११ चर्मोद्योग संस्था आणि १५२ चर्मोद्योग कारागीर व्यक्तीना आर्थिक सहाय्य देण्यात आले. त्यापैकी १०८ युनिट सुरू होते. त्यामध्ये त्या वर्षी एकूण रु.६३ लाख ६४ हजार किंमतीचे उत्पादन झाले व विक्री किंमत रु.१ कोटी २६ लाख १३ हजार होती. त्या वर्षी त्यात १०८ मजूर होते त्यांना एकूण

१६१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
१६२. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
१६३. **भारतीय जनगणना, जिल्हा जनगणना, निर्देश ग्रंथ, उस्मानाबाद,** १९६१, पृ.४३.
१६४. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर यांच्या माहितीवरुन.
१६५. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.
१६६. पूर्वोक्त, ए.एच.सौदागर, पृ.८८.

रु.२६ लाख २९ हजार मजूरी देण्यात आली.[१६७] त्याचवर्षी जिल्ह्यात ३ चर्मोद्योग सहकारी संस्था सुरू होत्या. त्यात ३३ सभासद होते. त्यांचे एकूण भाग भांडवल रु.३ हजार, खेळते भांडवल रु.३ हजार होते. त्यात ११ कामगार होते. त्यावर्षी कामगारांना रु.१ लाख ६७ हजार एकूण वेतन देण्यात आले. त्यात त्यावर्षी रु.८ हजार किंमतीचा कच्चा माल उपयोगात आणून रु.१ लाख ५९ हजार किंमतीचे उत्पादन करण्यात आले. त्याची विक्री किंमत रु.१ लाख ६७ हजार प्राप्त झाली. तथापि त्यावर्षी संस्थांना एकूण रु.२ हजारचा तोटा झाला.[१६८] सन २००५-०६ मध्ये चर्मोद्योग क्षेत्रातील जिल्ह्यात २१ घटक सुरु होते त्यात ६१ कामगार होते. या घटकातील एकूण गुंतवणूक रु.२ कोटी १७ लाख होती.[१६९]

ग्रामीण तेल : यंत्राच्या साह्याने मोठ्या प्रमाणावर तेल गाळण्याचे कारखाने सुरू झाल्यावर बड्या भांडवलदारांच्या मिलबरोबर तेलघाण्यांना स्पर्धा करणे अशक्य झाले. तेली कुटुंबाकडून तेलघाण्यावर बैलाच्या साह्याने तेल गाळले जाई. पुढे बैलाच्या देखभालीच्या खर्चातही वाढ होऊन त्यांना तेलघाण्यावर तेल गाळणे खर्चीक झाले. परिणामतः हळूहळू तेलघाणे बंद पडू लागले व तेली बेकार होऊ लागले. तेव्हा त्यांना आधार देण्यासाठी त्यांच्या पारंपारिक उद्योगाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्रीय खादी ग्रामोद्योग आयोगाने ग्रामीण तेल उद्योगाला खास प्रोत्साहन दिले. त्यांच्या उत्पादनात वाढ व्हावी, यासाठी खादी ग्रामोद्योग आयोगाने संशोधन करून बैलघाणीऐवजी विजेवर चालणाऱ्या घाणीचे वितरण सुरू केले. ही तेल्यांना किफायतशीर ठरली. विजेवर चालणाऱ्या घाणीवर ग्रामीण भागात तेलबियांपासून गाळल्या जाणाऱ्या तेलास ग्रामीण तेल संबोधले जाते.[१७०]

सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यात ग्रामीण तेल गाळणाऱ्या ४ संस्था आणि २७ व्यक्तींना जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालयामार्फत आर्थिक सहाय्य देण्यात आले होते. परंतु यातील केवळ एकच युनिट त्यावर्षी कार्यरत होते. त्यात त्यावर्षी २४ मजूरांना रोजगार मिळाला. त्यावर्षी त्यांना रु.४ लाख १० हजार मजूरी देण्यात आली. या युनिटमध्ये त्यावर्षी रु.३३ लाख ६५ हजाराचे उत्पादन झाले व विक्री किंमत रु.३७ लाख ५५ हजार प्राप्त झाली.[१७१]

मध उद्योग : हा उद्योग या जिल्ह्यात अगदी अलिकडच्या काळापासून विकसित होऊ लागला आहे. राज्यातील डोंगराळ व जंगल विभागातील मधपाळांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खादी व ग्रामोद्योग मंडळाने मधविकास कार्यक्रम हाती घेतला आहे. मंडळामार्फत या उद्योगाचे प्रशिक्षण देण्यात येते व सवलतीच्या दरात मधपेट्यांचा, मधयंत्राचा पुरवठा करण्यात येतो. तसेच या उद्योगाअंतर्गत उत्पादन, संशोधन, मध प्रक्रिया, विक्री, राणी माशी पैदास इत्यादी कार्यक्रम मंडळामार्फत हाती घेण्यात येतात. लातूर जिह्यात मधनिर्मितीचा उद्योग, खादी ग्रामोद्योग मंडळाद्वारे चांगल्या प्रकारे सुरू आहे. लातूर जिल्ह्यामध्ये मधमाशांना उपयुक्त फुलोरा आहे. सन २००४-०५ मध्ये मंडळामार्फत ७ युनिटला ३१ मधपेट्या, १ मधयंत्र वाटप केले. ११८ वसाहती संकलन करून ६४७ कि.ग्रॅ.मधोत्पादन करण्यात आले व २० व्यक्तीना प्रशिक्षण

---

१६७. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१६८. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१६९. लातूर जिल्हा कृती आराखडा सन २००५-०६ ते सन २००९-१०, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांच्या माहितीवर आधारित.

१७०. तोंडारे एस.जी., पूर्वोक्त, पृ.२२,२३.

१७१. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

दिले. ५१ मधुबन वसाहती पकडण्यात आल्या. १५ नवीन वसाहती तयार करण्यात आल्या व ६० राणी कोष वाटप केले. याद्वारे २१ कि.ग्रॅ. मधोत्पादन मिळाले. सन २००५-०६ या वर्षात जिल्ह्यातील मधपालांनी ४,०७९ कि.ग्रॅ. आणि २००६-०७ या वर्षी २,३२६ कि.ग्रॅ.मधाचे उत्पादन काढले आहे. या मधावर प्रक्रिया करण्याचे केंद्र महाराष्ट्रात केवळ महाबळेश्वर येथेच आहे. लातूर येथे मराठवाडा व विदर्भातील मधावर प्रक्रिया करण्याचे केंद्र स्थापन करण्यास मराठवाडा पॅकेजअंतर्गत मंजूरी मिळाली आहे. यासाठी १८ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. सद्या जिल्ह्यातील ५ तालुक्यांतर्गत १६ गावांतील ४० लाभार्थी मध उद्योग करीत आहेत.[१७२]

वेत व बांबूकाम : या व्यवसायामध्ये बांबूपासून टोपल्या, सूप, दुरड्या, परड्या व करंडे, चटया, पंखे, चाळण्या इत्यादि वस्तू बनविल्या जातात. हा व्यवसाय प्रामुख्याने बुरूड व मांग जातीचे लोक करतात. हा त्यांचा वंशपरंपरागत धंदा आहे. सन १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या दर लाख व्यक्तिमागे टोपल्या विणणाऱ्यांची संख्या ११९ होती. औसा तालुक्यात किल्लारी येथे मोठ्या प्रमाणावर वेतबांबूचा उद्योग चालतो. सन १९९१-९२ मध्ये हाळी, चि.वाडी, भादा, बोरफळ, खांडगाव येथील व सन १९९२-९३ मध्ये आशिव, देवर्जन, महाळंगी आणि सन १९९३-९४ मध्ये उमरगा रेतू येथील वेतबांबू कुटिरोद्योग करणाऱ्या कारागिरांना (युनिटला) खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत आर्थिक सहाय्य देण्यात आले. या सर्व घटकामध्ये गुंतवलेले एकूण भांडवल रु.४८ हजार, उत्पादनाची किंमत रु.४७ हजार आणि विक्रीची किंमत रु.१ लाख १३ हजार होती. वरील सर्व घटकांकडून सूप, दुरडी, टोपली तयार केल्या जातात. सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यातील वेतबांबू काम करणाऱ्या ४ संस्था आणि २२ वैयक्तिक कारागिरांना, घटकांना खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून आयोगाच्या निधीअंतर्गत आर्थिक सहाय्य देण्यात आले. त्यापैकी १६ युनिट त्यावर्षी सुरू होते.त्यात त्यावर्षी १६ मजूर होते. त्यांना रु.३ लाख ९४ हजार मजूरी मिळाली. त्यावर्षी या घटकांचे एकूण उत्पादन रु.५ लाख ९९ हजार झाले व विक्री रु.९ लाख १३ हजार किंमतीची झाली.[१७३]

कामगार चळवळ

निजामी राजवटीत पूर्वीचा उस्मानाबाद जिल्हा औद्योगिकदृष्ट्या मागास होता. त्यामुळे येथील कामगार चळवळीलाही फारसे प्रोत्साहन मिळाले नाही. औद्योगिक कामगार संघटनांची संख्या येथे मोठ्या प्रमाणावर नव्हती. तथापि, अन्य क्षेत्रातील अनेक कामगार संघटना अलिकडे नोंदणीकृत झाल्या आहेत. लातूर मध्ये कामगार चळवळ हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या काळामध्ये सुरू झाली. लातूरातील सर्व गुमास्ते हमाल यांनी १९४६-४७ सालामाध्ये निजाम विरोधी लढ्याचा भाग म्हणून काम बंद केले होते. संघटित कामगार चळवळ ही १९६० पासून सुरू झाली. त्यासाली प्रथमच लातूर नगर परिषदेच्या सर्व कामगारांची एक युनियन स्थापन झाली. त्यांनी आपल्या मागण्यांसाठी मोर्चे, मिरवणुका वगैरे कार्यक्रम केले. त्यानंतर गुमास्ता संघटना, कापड दुकानातील नोकर संघटना सिनेमा कामगार युनियन, हॉटेल कामगार युनियन, प्रेस कामगार युनियन इत्यादी संघटना १९६० ते १९६५ च्या काळामध्ये स्थापन झाल्या परंतु १९६४ पर्यंत जिल्ह्यात केवळ चार नोंदणीकृत संघटना होत्या. त्यातील ३ म्युनिसिपल कामगार युनियन होत्या. त्यांचे एकूण १९५ सदस्य होते. तर १ एम्प्लॉईज युनियन ऑफ लँड मॉडगेज को ऑपरेटिव्ह सोसायटी ही संघटना होती. या संघटनेचे २८

१७२. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर आणि जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१७३. **भारतीय जनगणना, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, उस्मानाबाद,** १९६१, पृ.४३ आणि जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

सदस्य होते. १९६० ते १९६५ च्या काळामध्ये स्थापन झालेल्या कामगार संघटनांनी सेवा शाश्वती, किमान वेतन, ग्रॅच्युएटी कायदा लागू करणे, इत्यादि मागण्यांसाठी परिषदा, मोर्चे इत्यादि चळवळीच्या मार्गाचा अवलंब केला व हे सर्व कायदे लागू होऊन त्याचा लाभ कामगारांना मिळाला. १९७६ साली त्यावेळच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदांतील कामगार संघटनांची परिषद लातूर येथे घेण्यात आली. अखिल मराठवाडा कामगार युनियनच्या नेतृत्वाखाली या सर्व संघटना काम करीत होत्या, ही संघटना आयटकशी सलंग्न होती. लातूरमधील व जिल्ह्यातील सर्व वरील संघटना अखिल मराठवाडा कामगार संघटनेच्याच नेतृत्वाखाली काम करीत होत्या. लातूरला सन १९६३ मध्ये डालडा मिल स्थापन झाल्यानंतर त्यामधील तीनशे कामगारांची संघटना स्थापन झाली. आपल्या मागण्यांसाठी या संघटनेच्या नेतृत्वाखाली कामगारांचा दोनवेळा यशस्वी संप झाला. पुढे ही मिल बंद झाल्यानंतर मिलच्या जागेवरील प्लॉट काही कामगारांना देण्यात आले. सन १९६४ मध्ये लातूरात सहकारी तत्त्वावर जवाहर सहकारी सूत गिरणी हे मोठे युनिट सुरू झाले होते. या सूत गिरणीतील कामगारांची युनियन लातूरातील सर्वात मोठी युनियन होती. त्यात एकंदर १,६०० कामगार होते. पहिल्यांदा १९७४ साली यातील कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी संप केला व त्यांच्या वेतनवाढीच्या मागण्या मान्य झाल्या. नंतर १९७६ साली यात २० दिवसांचा संप झाला व शेवटी कामगार व व्यवस्थापनामध्ये करार होऊन संप मिटला व कामगारांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या. त्यानंतर १९८० साली याच कामगारांचा संप झाला त्यावेळी कामगारांतील फुटीमुळे दोन कामगार गटामध्ये संघर्ष होऊन एका कामगाराची हत्या झाली.[१७४] तथापि, नंतर कामगारांची एकजूट झाली. यावेळी श्री विलासराव देशमुख यांच्या मध्यस्थीने व्यवस्थापन व कामगार यांच्यामध्ये तडजोडीचा तहनामा झाला. त्यानंतर याच मिलमधील १९८४ मध्ये ७६ दिवसाचा संप झाला होता. पुढे ही मिल बंद पडली. याच सुमारास पॉवरलुम इंडस्ट्रिमधील कामगारांची संघटना स्थापन झाली. यात १५० सदस्य होते. निरनिराळ्या मागण्यांसाठी १९७० ते १९७८ या काळांत तीन वेळा कामगारांचा संप झाला. सूतमिल व पावरलुम मधील कामगार संघटना अखिल मराठवाडा कामगार संघटनेशी संलग्न होत्या. १९७० ते १९८० च्या काळामध्ये एस.टी. तील कामगारांची बडतर्फी मोठ्या प्रमाणात होती. या बडतर्फ कामगारांना एकत्र करून बडतर्फ कामगार संघटना स्थापन केली व श्री. भगवानराव देशपांडे यांचे नेतृत्वाखाली लातूरला आंदोलन सुरू केले. शेवटी परिवहन मंत्र्याशी बोलणी करून गंभीर आरोप नसलेल्या सर्व कामगारांना कामावर घेण्यात आले. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील सिनेमा कामगारांना कायद्याप्रमाणे काहीही सवलती मिळत नव्हत्या. सर्व सिनेमागृह कामगारांच्या संपामुळे बंद पडली. सिनेमा कामगारांनी शासनाच्या किमान वेतन समितीस लातूरला येणे भाग पडले व त्यांच्याशी बोलणी यशस्वी होऊन किमान वेतन व सेवाशर्ती लागू झाल्या.

उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यामध्ये साखर कारखान्यांतील कामगार संघटना कार्यरत होत्या. त्या प्रभावी होत्या. या संघटना लाल निशाण पक्षाच्या महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाच्या नेतृत्वाखाली चालत होत्या. किल्लारी व तेरणा साखर कारखान्यांतील कामगारांचे अनेक संप झाले त्यातील काही संपांचे नेतृत्व कॅ. माणिकराव जाधव यांनी केले. या संपातून बऱ्याच मागण्या पदरी पडल्या. साखर कामगार, गाडीवान व हमाल व शेतकरी यांच्या संयुक्त कृतिनेही काही समान मागण्यांचे आंदोलनही झाले. भूकंपाच्या काळात (१९९३) किल्लारी साखर कामगारांनी भूकंपग्रस्तांना बरीच मदत केली. शासकीय (शिक्षण क्षेत्रातील) कर्मचाऱ्यांचा महाराष्ट्रामध्ये जो प्रदीर्घ काळाचा संप झाला त्यास या सर्व संघटनेतील कामगारांनी पाठिंबा दिला व एक दिवसीय मातृभाषी लाक्षणिक संपही केलेला होता. येथील कामगार संघटनांनी आपल्या

१७४. देशपांडे भगवानराव (लातूर कामगार चळवळीतील नेते), औरंगाबाद यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

मागण्यांसाठीच चळवळी केल्या असे नसून सामाजिक परिवर्तनाच्या व सांस्कृतिक चळवळीमध्येही सहभाग घेतलेला आहे. सन १९९३ साली लातूरला 'विचार वेध' संम्मेलन झाले व कामगारांच्या निधीमधूनच झाले आणि या संम्मेलनाचे स्वागताध्यक्ष हे जिल्ह्यातील अनेक संघटनांचे अध्यक्ष असलेले श्री भगवानराव देशपांडे हे होते.[१७५]

दिनांक ५ मार्च २००१ रोजी किल्लारी येथील शेतकरी सहकारी साखर कारखान्यातील कामगारांनी विविध मागण्यासाठी संप केला तो व्यवस्थापनाच्या तडजोडीने दिनांक २० जून २००१ रोजी संपुष्टात आला.

सन २००६-२००७ या वर्षात जिल्ह्यात नोंदणीकृत एकूण ९० कामगार संघटना होत्या. त्यांची एकूण सभासद संख्या सुमारे १२,५०० पेक्षा अधिक होती.

सन १९८४ आणि सन २००१ या वर्षी २ कारखान्यात झालेल्या संपाची माहिती खाली दिलेली आहे.

अ. क्र.	कारखाना	संप सुरू झाल्याचा दिनांक	संप मिटल्याचा दिनांक	सहभागी कामगार संख्या
१	जवाहर सहकारी कापूस उत्पादक सूत गिरणी म., लातूर.	१६/१०/१९८४	३०/१२/१९८४	७१६
२	शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., किल्लारी.	०५/०३/२००१	२०/०६/२००१	७७३

जिल्ह्यात सन १९६३ मध्ये दोन औद्योगिक विवाद नोंदले गेले, ज्यात १२४ कामगारांचे ७२४ श्रमदिवस वाया गेले. जिल्ह्यात सन १९८४ मध्ये १ कारखान्यातील संपामध्ये ७१६ कामगारांच्या सहभागामुळे ७६ दिवस संप चालल्यामुळे ५४,४१६ श्रमदिवस वाया गेले.[१७६]

या जिल्ह्यात क्षतिपूर्ती कायद्यानुसार सन २००१ ते २००५ या कालावधीत अपघातग्रस्त कामगारांना दिलेली नुकसान भरपाईची किंवा सानुग्रह अनुदानाची माहिती पुढीलप्रमाणे आहे.[१७७]

वर्ष	कामगार संख्या	भरपाई (रुपये)	शेरा
२००१	१	१०,०००	सानुग्रह अनुदान
२००३	२	२,००,०००	सानुग्रह अनुदान
२००४	१	७५,०००	सानुग्रह अनुदान
२००५	५	१,५४,५६६	सानुग्रह अनुदान व नुकसान भरपाई

१७५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ.४५६-५७ आणि भगवानराव देशपांडे (लातूर कामगार चळवळीतील नेते), औरंगाबाद यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१७६. उपनिबंधक (श्रमिक संघ), कामगार उपायुक्त कार्यालय, औरंगाबाद आणि सहायक कामगार आयुक्त, लातूर तसेच शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., किल्लारी यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१७७. उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, नांदेड कार्यालय यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

अनुक्रमणिका

तक्ते

तक्ता क्रमांक : १

जिल्ह्यातील प्रमुख उद्योगांचे प्रतिशत प्रमाण

उद्योग	कारखाने		मूल्यवृध्दी		गुंतविलेले भांडवल		रोजगार		एकूण उत्पादन	
	१९९३-९४	१९९६-९७	१९९३-९४	१९९६-९७	१९९३-९४	१९९६-९७	१९९३-९४	१९९६-९७	१९९३-९४	१९९६-९७
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
खाद्य पदार्थ	८.८	९.३	५.०	५.९	१३.९	१५.३	१०.०	१३.०	९.२	१०.०
पेये, तंबाखू व तंबाखूचे पदार्थ	६.९	१०.४	१.४	१.३	१.२	०.८	११.४	११.०	२.१	१.४
सुती कापड	१०.०	७.०	०.८	०.३	०.६	०.२	४.५	३.०	१.१	०.७
लोकर, रेशीम व कृत्रिम तंतुचे कापड	०.५	०.३	०.२	०.७	०.५	०.९	०.३	०.६	०.४	१.०
तागाच्या वस्तू	..	०.३	..	०.१	..	०.१	..	०.१	..	०.१
कापडाच्या वस्तू	०.३	०.५	०.१	०.२	०.२	१.३	०.२	१.१	०.३	१.०
लाकडाच्या वस्तू आणि फर्निचर	०.४	०.६	०.१	०.२	०.३	०.३	०.६	०.३	०.१	०.१
कागद व कागदाच्या वस्तू, मुद्रण व प्रकाशन	५.४	६.२	०.८	३.०	२.३	६.१	२.०	११.२	१.८	३.५
रसायने व रासायनिक पदार्थ	५.६	६.७	६.०	५.८	६.५	३.९	५.३	४.५	६.०	६.७
रबर व प्लास्टिक उत्पादन	७.४	५.३	१०.७	५.७	१६.७	१६.९	८.५	६.७	११.९	१३.५
अधातू खनिज पदार्थ	१०.१	८.२	३.४	०.७	३.६	६.६	४.८	३.१	३.२	२.५
मूलभूत व मिश्रधातू	५.३	४.७	१.४	०.८	४.७	९.१	४.९	४.४	५.३	५.०
धातूच्या वस्तू व सुटे भाग	११.०	१२.७	५.५	३.६	५.१	६.४	९.०	११.३	५.२	८.८
यंत्रसामग्री व सुटे भाग	९.०	८.५	४.४	२.८	४.८	४.७	५.९	५.९	४.३	४.८
इलेक्ट्रिक यंत्रसामग्री, साधने, उपकरणे व सुटे भाग	७.६	८.०	१६.४	१२.०	१५.५	९.५	१०.७	८.३	१५.८	१०.७
परिवहन सामग्री व सुटे भाग	५.२	४.८	४०.७	५५.६	२१.९	१६.९	१६.५	११.१	३०.३	२८.२
इतर वस्तु उत्पादन	१.८	०.९	०.८	०.४	०.७	०.३	१.२	०.६	१.०	०.६
भांडवली वस्तू दुरुस्ती	२.५	२.२	०.९	०.४	०.३	०.१	२.९	१.९	०.६	०.३
दुरुस्ती सेवा	०.६	१.४	०.१	०.२	०.१	०.३	०.१	०.३	०.१	०.१

टीप : भारत सरकारच्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणाआधारे, जिल्ह्यातील उद्योगधंद्याबाबत (सन १९८१-८३, १९८४-८५, १९९०-९१ आणि १९९३-९४ ते १९९६-९७ या वर्षातील) सांख्यिकीय माहिती दर्शविणारे तक्ते पुढे दिले आहेत.

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : २

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योग, १९८१-१९८३

(रुपये हजारात)

बाब	खाद्य पदार्थ	वस्त्रोद्योग	कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण व प्रकाशन	दुरुस्ती सेवा*
१	२	३	४	५
कारखाने (संख्या)	१०	५	३	५
स्थिर भांडवल	२,१५,८९	२,९१,३७	४,०७	२४,८९
खेळते भांडवल	१,०६,१४	१,५०,३५	२,५२	२,२२
गुंतविलेले भांडवल	४,७६,०९	५,४२,५३	६,९८	२४,४४
अदत्त ऋण	३,५८,१८	३,७३,८९	३,३२	६५
एकूण श्रमदिवस (संख्या)	३,७२,२०७	२,९५,५८३	१६,८२२	१,१५,५८१
कामगार (संख्या)	१,६७४	७८१	४७	३०७
एकूण कर्मचारी (संख्या)	२,२४१	८९४	५६	३५८
कामगारांचे वेतन	४०,४४	२०,२६	१,४९	२९,७०
एकूण वेतन	७६,८४	४०,१४	१,८५	३७,५०
इंधन	२२,१२	३८,५४	३८	४,२८
कच्चा माल	८,७८,३०	४,८९,००	३,२०	१,११,९७
अन्य निविष्टी	१,६४,५५	१५,१५	७८	१,८४
एकूण निविष्टी	१०,६४,९८	५,४२,६९	४,३५	१,१८,०८
यंत्र व सयंत्र सामग्री	२,६९,२७	४,३८,७७	४,२१	५,८९
मुख्य उत्पादन	१०,५८,७५	६,६१,३५	८,१८	६,३६
अन्य उत्पादन	१,४०,८५	६,८३	०	१,५३,९७
एकूण उत्पादन	११,९९,६०	६,६८,१८	८,१८	१,६०,३३
घसारा	१९,३९	३५,६१	२८	१,२३
मूल्यवृध्दी	१,१५,२३	८९,८८	३,५५	४१,०२
इतर खर्च	४३,६१	२५,३२	४३	२
निव्वळ नफा	७१,६२	६४,५५	३,१२	४०,९९

* अधातू खनिज पदार्थ उत्पादनाच्या कारखान्यांची संख्या तीनपेक्षा कमी असल्यामुळे त्यांचा समावेश दुरुस्ती सेवा उद्योग यात केला आहे.

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : ३

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योग, १९८४-१९८५

(रुपये हजारात)

बाब	खाद्य पदार्थ	वस्त्रोद्योग (वटण व सूत निर्मिती)	कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण व प्रकाशन	धातूच्या वस्तू व सुटे भाग*	दुरुस्ती सेवा
१	२	३	४	५	६
कारखाने (संख्या)	१४	५	४	४	३
स्थिर भांडवल	२,१८,९३	५,२२,२५	४,८८	१,५३	२६,६७
खेळते भांडवल	(-)१८,३७	१४,८४	२,६८	८,५१	२८,८९
गुंतविलेले भांडवल	४,६२,२५	८,२३,२६	६,७१	५,७४	५५,५५
अदत्त ऋण	४,४२,३०	६,४३,२३	५,३५	२,३९	०
एकूण श्रमदिवस (संख्या)	३,५९,४४२	४,७४,१७८	२१,६४०	२०,१८६	१,३२,१४२
कामगार (संख्या)	१,४८९	१,२१२	५६	१००	३३४
एकूण कर्मचारी (संख्या)	१,९४३	१,३०२	७०	१०६	४०६
कामगारांचे वेतन	४७,६७	७६,९५	२,६१	२,६३	५०,७७
एकूण वेतन	९५,७३	१,०२,८५	३,५८	३,०५	६४,८९
इंधन	२०,९१	७९,२०	२८	५२	१३,५२
कच्चा माल	६,७७,४३	७,४९,४१	९,९३	५,००	१,०५,८३
अन्य निविष्टी	५४,६४	१०,५५	१,८९	५४	१,७४
एकूण निविष्टी	७,५२,९८	८,३९,१७	१२,१०	६,०७	१,२१,०९
यंत्र व सयंत्र सामग्री	३,०६,१२	६,८२,०१	७,३०	३,७२	४,९५
मुख्य उत्पादन	८,१५,०५	१०,४७,९९	१८,५१	१०,३५	०
अन्य उत्पादन	१६,३०	८१	०	५७	१,९१,१०
एकूण उत्पादन	८,३१,३५	१०,४८,८०	१८,५१	१०,९२	१,९१,१०
घसारा	२९,९३	५०,५८	६५	२१	१,११
मूल्यवृध्दी	४८,४४	१,५९,०६	५,७६	४,६४	६८,९०
इतर खर्च	४९,३२	६६,३७	९२	२७	०
निव्वळ नफा	(-)८८	९२,६९	४,८४	४,३८	६८,९०

* अधातू खनिज पदार्थ उत्पादनाच्या कारखान्यांची संख्या तीनपेक्षा कमी असल्यामुळे त्यांचा समावेश धातूच्या वस्तू व सुटे भाग तयार करणारा उद्योग यात केला आहे.

तक्ता क्रमांक : ४

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योग, १९९०-१९९१

(रुपये हजारात)

बाब	खाद्य पदार्थ	वस्त्रोद्योग (वटण व सूत निर्मिती)	कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण व प्रकाशन	भांडवली वस्तूंची दुरुस्ती
१	२	३	४	५
कारखाने (संख्या)	८	४	३	४
स्थिर भांडवल	१४,७०,६१	३,४७,००	५०	३७,४६
खेळते भांडवल	२६,४८,१८	(-) ५,४०,७०	१२,६९	४७,५६
गुंतविलेले भांडवल	५४,५०,०७	५,७८,०९	६,१७	८५,०३
अदत्त ऋण	१०,३१,६५	६,८८,९३	०	०
एकूण श्रमदिवस (संख्या)	७,७९,७५५	३,६१,३१८	१९,०५६	१,३०,८१८
कामगार (संख्या)	१,५५८	१,००५	६६	३०४
एकूण कर्मचारी (संख्या)	२,४७३	१,०८४	७५	४००
कामगारांचे वेतन	२,४६,५४	२,०५,०४	५,२७	९३,९६
एकूण वेतन	५,७४,४८	२,५२,७६	६,४६	१,३३,९१
इंधन	२,१३,३०	१,३१,३८	२,३४	१७,०४
कच्चा माल	७०,८०,३९	९,२६,९७	९,२२	१,६०,०७
अन्य निविष्टी	३,६०,९५	३२,६६	२,४०	२,८९
एकूण निविष्टी	७६,५४,६४	१०,९१,०१	१३,९६	१,८०,०१
यंत्र व सयंत्र सामग्री	२१,५८,५०	७,४०,९१	४,६७	५,४६
मुख्य उत्पादन	८३,५४,०६	१३,३६,९६	२१,८२	०
अन्य उत्पादन	७२,७५	१२,८१	०	१०,७७,५४
एकूण उत्पादन	८४,२६,८१	१३,४९,७७	२१,८२	१०,७७,५४
घसारा	३,४२,५७	४३,७९	२९	१,८५
मूल्यवृध्दी	४,२९,६०	२,१४,९७	७,५८	८,९५,६८
इतर खर्च	४,३४,७०	११,३३	१९	०
निव्वळ नफा	(-) ५,११	२,०३,६४	७,३९	८,९५,६८

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : ५

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योग, १९९३-१९९४

(रुपये हजारात)

बाब	खाद्यपदार्थ	पेये, तंबाखू व तंबाखूचे पदार्थ	वस्त्रोद्योग	लाकडाच्या वस्तू आणि फर्निचर	कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण व प्रकाशन	रसायने व रासायनिक पदार्थ
१	२	३	४	५	६	७
कारखाने (संख्या)	६६	५२	८१	३	४०	४२
स्थिर भांडवल	१,१०,१४,४५	७,९६,९६	१५,४६,५१	३,३४,२६	२६,३७,७३	६८,८८,५७
खेळते भांडवल	४६,६०,६२	६,४१,१५	(-)२,६६,९६	(-)१,९६,०३	१०,४७,६१	१९,६८,२८
गुंतविलेले भांडवल	२,१७,४०,७९	२०,१०,५३	२२,९०,३०	५,४०,०७	३६,०३,०५	१,०१,९७,७०
अदत्त ऋण	१,९५,९९,१२	९,८५,५०	१२,६८,३१	३,५३,१८	२१,१७,७६	३७,९३,०८
एकूण श्रमदिवस (संख्या)	१६,५२,०७०	१८,१०,९५४	८,०१,७०२	१,०७,५१४	३,१९,७०३	८,९२,७२०
कामगार (संख्या)	३,२८६	५,४२७	२,१०४	२९७	७९७	१,२८६
एकूण कर्मचारी (संख्या)	५,१५७	५,९३०	२,६५९	३४८	१,०४६	२,७७०
कामगारांचे वेतन	१०,२७,५२	३,६९,५५	४,४२,६८	४०,५४	१,७०,३६	२,९६,२६
एकूण वेतन	१९,३०,९९	४,९४,२६	६,२९,११	५५,३३	२,८५,७२	१२,२१,४३
इंधन	५,५७,८७	१,१७,३०	६,५८,०६	१७,९२	२,६२,४७	६,६२,६१
कच्चा माल	१,८७,१४,६९	४०,१७,८७	३२,८५,७६	२,०३,०६	३९,६३,२८	९१,७०,८२
अन्य निविष्टी	२४,४९,४४	४,८२,५६	३,४८,४७	५७,६४	२,४६,००	१८,३८,०२
एकूण निविष्टी	२,१७,२२,००	४६,१७,७३	४२,९२,०९	२,७८,६२	४४,७१,७५	१,१३,७१,४५
यंत्र व सयंत्र सामग्री	१०,४६,८५	७६,३०	१,७५,२६	१८,६६	२,४६,५३	५,५७,९४
मुख्य उत्पादन	२,५९,४५,१२	५७,१६,७८	६४,५२,१७	३,३७,३२	४९,२१,१७	१,६९,१९,११
अन्य उत्पादन	४,४८,२८	३,२२,८०	९,१९,६२	(-)१८,८६	३,६५,९६	२,३६,५०
एकूण उत्पादन	२,६३,९३,४०	६०,३९,५८	५३,७१,७८	३,१८,४६	५२,८७,१३	१,७१,५५,६०
घसारा	४,१०,१७	१,७३,६९	१,१२,३०	१४,८४	१,२६,१५	६,३३,२५
मूल्यवृध्दी	४२,६१,२२	१२,४८,१६	९,६७,३९	२४,९९	६,८९,२३	५१,५०,८९
इतर खर्च	१५,४७,२८	२,८१,८३	२,८३,९७	३,००	२,२१,८६	४,१८,१५
निव्वळ नफा	२७,१३,९४	९,६६,३३	६,८०,४३	२१,९८	४,६७,३७	४७,३२,७४

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : ५ क्रमश :

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योग, १९९३-१९९४

(रुपये हजारात)

बाब	रबर व प्लास्टिक उत्पादन	अधातू खनिज उत्पादन	धातूच्या वस्तू व सुटे भाग	यंत्रसामग्री, परिवहन सामग्री व सुटे भाग	इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक, यंत्रसामुग्री, साधने, उपकरणे व सुटे भाग	भांडवली वस्तूंची दुरुस्ती व दुरुस्ती सेवा*
१	८	९	१०	११	१२	१३
कारखाने (संख्या)	५६	७६	८३	१०६	५८	२४
स्थिर भांडवल	१,७८,९१,८८	२६,८२,४३	४१,१६,१९	२,५१,४७,९६	१,२१,८६,५९	२,७७,६६
खेळते भांडवल	४७,४४,३२	१५,९५,३८	३४,५८,९७	१,१३,६७,९५	९३,४३,३१	१,४०,८५
गुंतविलेले भांडवल	२,६२,१६,२६	५७,१३,६१	७९,९७,७९	४,१८,६०,९३	२,४२,४४,०५	४,९५,००
अदत्त ऋण	२३,१९,५८	२१,२४,२८	१९,८०,१८	८४,५०,४२	७७,३२,०२	१३,९१
एकूण श्रमदिवस (संख्या)	१४,८४,३९५	७,६०,८९८	१४,५७,,१६२	३६,४८,२८७	१९,९५,८४१	५,१४,५७१
कामगार (संख्या)	३,२१३	१,६५४	३,५६७	८,५९९	३,३२५	१,३३३
एकूण कर्मचारी (संख्या)	४,४०८	२,५०३	४,६९६	११,६३३	५,५५१	१,६०९
कामगारांचे वेतन	१३,१३,३२	३,१०,९५	९,६०,६६	४४,५०,२२	१२,०८,०१	५,३३,९८
एकूण वेतन	२२,७६,८०	७,०८,७२	१७,२३,२१	७१,५९,८५	२८,३७,७७	६,७५,९०
इंधन	१५,५५,९०	१७,५२,०४	६,६६,८९	२४,९८,३८	६,५१,४२	१,०९,९७
कच्चा माल	२,००,२६,२१	३३,८६,२७	७२,४४,२७	४,६६,४९,८८	२,५१,८४,६९	७,७५,६९
अन्य निविष्टी	१६,२७,४०	१०,०९,९३	१९,५३,०९	६८,२८,५४	३९,७६,२७	१,१०,९७
एकूण निविष्टी	२,३२,०९,५१	६१,४८,२५	९८,६४,२५	५,५९,७६,८०	२,९८,१२,३८	९,९६,६२
यंत्र व सयंत्र सामग्री	१८,२५,८३	३,५५,७०	५,३९,०९	३७,८८,७२	१३,५९,९५	३१,७६
मुख्य उत्पादन	३,३१,१९,९९	८७,०७,३१	१,४२,१६,७७	९,६९,५९,७१	४,२८,५१,७८	०
अन्य उत्पादन	७,०२,२१	६,५५,०८	६,२७,७१	१६,१३,३७	२२,८२,४१	१८,०५,७४
एकूण उत्पादन	३,३८,२२,२०	९३,६२,३९	१,४८,४४,४८	९,८५,७३,०८	४,५१,३४,१९	१८,०५,७४
घसारा	१४,४४,३९	२,९३,४६	२,८२,८३	४०,४२,२०	१२,८१,३६	३८,१६
मूल्यवृध्दी	९१,६८,३०	२९,२०,६८	४६,९७,४०	३,८५,५४,०८	१,४०,४०,४६	७,७०,९६
इतर खर्च	१०,४०,५०	४,५७,९८	६,९४,८१	१७,०६,१२	२२,६१,४२	१७,८१
निव्वळ नफा	८१,२७,८०	२४,६२,७०	४०,०२,५९	३,६८,४७,९६	१,१७,७९,०४	७,५३,१५

* भांडवली वस्तूंची दुरुस्ती व दुरुस्ती सेवा कारखान्यांची सांख्यिकीय माहिती एकत्रित देण्यात आलेली आहे.

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : ६

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योग, १९९४-१९९५

(रुपये हजारात)

बाब	खाद्यपदार्थ	वस्त्रोद्योग	कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण व प्रकाशन	रबर व प्लास्टिक उत्पादन	धातूच्या वस्तू व सुटे भाग	भांडवली वस्तूंची दुरुस्ती
१	२	३	४	५	६	७
कारखाने (संख्या)	२४	७	४	३	३	७
स्थिर भांडवल	३३,४७,७८	१,६५,३५	६,१७	३५,६२	३९	२४,७७
खेळते भांडवल	१८,१८,७९	(-)९,६५,९८	१६,९०	१,२०	१०,४५	५७,७७
गुंतविलेले भांडवल	१,४१,७१,५९	२,१६,७६	१६,५४	३६,८२	१०,४५	८२,५४
अदत्त ऋण	१५,४२,४२	१,२७,०८	०	०	३,५३	०
एकूण श्रमदिवस (संख्या)	८,८९,८६७	२,४६,१२५	२१,०१२	१६,९२६	९,५८५	१,९०,९६९
कामगार (संख्या)	१,७५३	७५९	६२	३७	२४	४३७
एकूण कर्मचारी (संख्या)	२,८०६	८५३	७१	४५	३०	५६३
कामगारांचे वेतन	४,४५,४६	१,६५,४९	७,५५	२४,१०	३,६२	२,२७,२९
एकूण वेतन	१०,२१,४५	१,९५,७२	९,४३	३१,८४	५,०६	३,०९,०६
इंधन	४,७०,६७	१,५७,५३	३,११	५,८१	१,५५	४१,१५
कच्चा माल	१,७८,२२,५४	१५,३०,३५	१७,८०	२,९५,०३	५,८६	५,६३,८०
अन्य निविष्टी	६,८७,६४	३३,७६	३,८०	३६	७१	५,४१
एकूण निविष्टी	१,८९,८०,८५	१७,२१,६५	२४,७१	३,०१,२०	८,१२	६,१०,३६
यंत्र व सयंत्र सामग्री	४६,७२,६३	५,६९,०३	६,१२	२३,८१	३,७५	७,२०
मुख्य उत्पादन	१,९७,१४,४३	१७,६३,७७	३७,९७	३,४६,९८	१२,७२	०
अन्य उत्पादन	७,९१,८७	२४,८१	२	०	१,२६	९,६५,०२
एकूण उत्पादन	२,०५,०६,३०	१७,८८,५८	३७,९९	३,४६,९८	१३,९८	९,६५,०२
घसारा	२,५५,१९	१५,२६	४०	१,४०	५	९८
मूल्यवृध्दी	१२,७०,२६	५१,६८	१२,८९	४४,३८	५,८१	३,५३,६९
इतर खर्च	१५,१७,५६	१४,२४	३३	०	०	०
निव्वळ नफा	१,३३,४६	३७,४४	१२,५६	४४,३८	५,८१	३,५३,६९

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : ७

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योग, १९९५-१९९६

(रुपये हजारात)

बाब	खाद्यपदार्थ	पेये, तंबाखू व तंबाखूचे पदार्थ	वस्त्रोद्योग	कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण व प्रकाशन	रबर व प्लास्टिक उत्पादन	अधातू खनिज उत्पादन	भांडवली वस्तूंची दुरुस्ती
१	२	३	४	५	६	७	८
कारखाने (संख्या)	२८	३	१३	६	३	३	७
स्थिर भांडवल	१५,९४,४९	११,७५,३६	१,६४,७०	१८,१४	३६,१९	४,३०,७३	२३,८५
खेळते भांडवल	२२,०३,०२	३,९७,०८	(-)९,७९,१३	८,४६	११,२७	१३,२४	३,७३
गुंतविलेले भांडवल	८१,८९,१६	१५,७२,४४	२,९७,७१	३५,५३	४७,४६	५,८३,२२	२४,४३
अदत्त ऋण	८,५९,९६	०	१,३८,६७	०	०	२,१२,४६	०
एकूण श्रमदिवस (संख्या)	७,९६,३४८	२०,९९१	२,८९,६७४	३२,२१४	१७,७५४	१,२०,४४७	२,१९,०९६
कामगार (संख्या)	१,१२८	५१	१,०९३	९३	३९	३००	४९०
एकूण कर्मचारी (संख्या)	२,५५९	७२	१,२१६	११३	५१	३९३	६३८
कामगारांचे वेतन	४,६७,३६	१६,३८	१,८९,०२	१०,९२	२२,२९	५८,९४	२,६३,८१
एकूण वेतन	११,४६,४५	३६,०८	२,६१,८२	१६,०६	३५,७१	१,०५,१९	४,१८,९८
इंधन	४,४१,३०	५८,५३	१,८३,३७	३,१९	१०,७३	३७,४८	१०,६६
कच्चा माल	१,९५,७९,३३	४,८०,३३	१७,९६,९२	३६,०६	४,४८,६९	७,९१,७५	५,८७,५३
अन्य निविष्टी	५,०९,६७	७२,६१	४६,००	६,०३	१९	५७,५३	१२,९२
एकूण निविष्टी	२,०५,३०,३०	६,११,४७	२०,२६,३०	४५,२८	४,५९,६१	८,८६,७७	६,११,११
यंत्र व सयंत्र सामग्री	२२,१६,४९	२०,३५,२३	५,८४,८५	८,८६	२५,०६	१,७८,२६	७,२०
मुख्य उत्पादन	२,१८,४४,४४	१०,८३,७३	२२,१६,४२	६६,७४	०	११,५०,३१	०
अन्य उत्पादन	२,२०,१४	३८	८१,६७	९	४,९६,७४	(-)१५,७३	१०,३१,०१
एकूण उत्पादन	२,२०,६४,५८	१०,८४,११	२२,९८,०९	६६,८३	४,९६,७४	११,३४,५८	१०,३१,०१
घसारा	१,७३,६२	१,०६,३९	१४,७५	८१	१,४२	२६,८९	९२
मूल्यवृध्दी	१३,६०,६४	३,६६,२५	२,५७,०५	२०,७४	३५,७१	२,२०,९३	४,१८,९८
इतर खर्च	७,९६,६२	१,६५,२८	१९,९९	६०	०	४६,४३	०
निव्वळ नफा	५,६४,०२	२,००,९७	२,३७,०६	२०,१४	३५,७१	१,७४,५०	४,१८,९८

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : ८

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योग, १९९६-१९९७

(रुपये हजारात)

बाब	खाद्यपदार्थ	पेये, तंबाखू व तंबाखूचे पदार्थ	वस्त्रोद्योग	लाकडाच्या वस्तू आणि फर्निचर	कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण व प्रकाशन	रसायने व रासायनिक पदार्थ
१	२	३	४	५	६	७
कारखाने (संख्या)	९२	१०३	८०	६	६२	६६
स्थिर भांडवल	३,३४,९६,१२	२५,६६,५७	६८,६३,१२	९,७२,४७	६०,५३,२९	१,११,९३,३८
खेळते भांडवल	२३,२२,०९	२,४४,९४	३०,२४,८५	(-)१,८३,४६	२,९५,७४,७४	२५,८७,४१
गुंतविलेले भांडवल	६,०२,३५,५४	३४,१३,४८	१,०१,०४,८२	१४,७५,३९	२,३९,२४,४२	१,५६,१५,६४
अदत्त ऋण	२,०८,०४,७१	१०,१७,११	५३,४६,७४	७,०९,९२	३१,१२,८५	३३,४२,६४
एकूण श्रमदिवस (संख्या)	३०,२४,८६७	२४,२८,९६३	९,५६,५६७	७५,०५५	२५,०३,९९४	१०,३०,६८२
कामगार (संख्या)	६,८३९	७,६०४	३,००५	१९२	६,३६०	१,८४९
एकूण कर्मचारी (संख्या)	९,६०१	८,०८४	३,७४८	२५२	८,२७४	३,३०८
कामगारांचे वेतन	१९,२७,७३	७,२२,३०	८,५९,२३	३३,१२	३८,४९,३३	७,२४,५३
एकूण वेतन	४३,८८,१८	१०,३९,७९	१५,१७,३७	६६,१०	५६,९२,१४	२२,१९,२५
इंधन	१८,५५,२३	२,२७,४४	१२,९१,०४	५३,८३	७,६९,६३	१४,०६,७२
कच्चा माल	३,८६,२९,८१	४६,२०,६२	९७,६६,७७	४,१०,६५	१,२०,३४,३७	२,३३,३४,१७
अन्य निविष्टी	३१,८१,३४	६,६८,३३	१३,३४,६१	१,०१,८२	१२,७३,३६	१९,९२,५१
एकूण निविष्टी	४,३६,६६,३९	५५,१६,३८	१,२३,९२,४२	५,६६,३०	१,४०,७७,३६	२,६७,३३,४०
यंत्र व सयंत्र सामग्री	२,३९,५३,१६	१८,३६,४१	८४,१०,३२	७,०१,१०	६०,७०,३२	७८,९८,७९
मुख्य उत्पादन	५,४९,५५,१९	७९,८१,९१	१,५४,५९,९६	६,३४,५३	१,९५,३८,९७	३,७०,५५,५७
अन्य उत्पादन	१३,४५,७०	३,४९,७३	८,१५,५३	१२,८३	५,९९,२९	१०,९३,२६
एकूण उत्पादन	५,६३,००,८९	८३,३१,६४	१,६२,७५,५१	६,४७,३६	२,०१,३८,२६	३,८१,४८,८३
घसारा	१७,५९,१०	३,४९,६६	१३,२६,६०	४८,१०	४,९८,६५	६,९०,१२
मूल्यवृध्दी	१,०८,७५,३९	२४,६५,६०	२५,५६,४८	३२,९६	५५,६२,२४	१,०७,२५,३२
इतर खर्च	४८,४०,१२	२,५७,६१	६,६५,८१	१,१७,६६	६,८२,०९	७,९७,३८
निव्वळ नफा	६०,३५,२७	२२,०७,९९	१८,९०,६७	(-) ८४,७०	४८,८०,१५	९९,२७,९४

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : ८ (क्रमशः)

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योग, १९९६-१९९७

(रुपये हजारात)

बाब	रबर व प्लास्टिक उत्पादन	अधातू खनिज उत्पादन	धातूच्या वस्तू व सुटे भाग	यंत्रसामग्री, परिवहन सामग्री व सुटे भाग	इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक, यंत्रसामग्री, साधने, उपकरणे व सुटे भाग	भांडवली वस्तूंची दुरुस्ती व दुरुस्ती सेवा*
१	८	९	१०	११	१२	१३
कारखाने (संख्या)	५३	८१	१२५	१३२	७९	३२
स्थिर भांडवल	४,७५,९१,६२	२,०९,१९,५२	१,०६,५३,७८	६,६३,०६,२९	२,३७,७४,८४	१६,५८,८३
खेळते भांडवल	९४,९६,३७	४४,६७,५५	८९,२५,५५	१,२२,४२,३३	२,१८,८९,१९	६,०२,६२
गुंतविलेले भांडवल	६,३०,४९,५०	२,५१,९८,८३	२,५२,७१,४५	८,५२,७७,१७	३,७४,७३,१९	२१,८७,२२
अदत्त ऋण	२,७९,००,१६	३१,८८,०२	२,२१,०८,१४	१,२५,५६,५९	७९,९०,१९	१,३८,२८
एकूण श्रमदिवस (संख्या)	१५,५६,३७९	६,७९,५१४	२६,२८,९५९	३९,४३,२२१	१९,४२,९३९	५,१६,८८५
कामगार (संख्या)	३,५९७	१,५७८	६,३५८	९,१५२	४,००४	१,३१०
एकूण कर्मचारी (संख्या)	४,९४८	२,२९१	८,३४५	१२,५६५	६,११९	१,६११
कामगारांचे वेतन	२२,०५,६६	४,५९,३६	२४,२८,२४	७०,२३,६१	१८,६२,८४	६,३१,७८
एकूण वेतन	४१,६७,५६	११,३२,१५	४७,४७,३५	१,३८,५२,२९	५४,७५,७९	९,२३,५८
इंधन	४३,३२,७९	३६,३७,४०	३५,०९,६३	४३,३९,४१	१३,९२,४८	१,३९,७९
कच्चा माल	५,३०,४७,३६	६०,८७,९५	३,३६,६४,७४	५,१६,१५,८७	२,८३,८०,३४	११,०६,५५
अन्य निविष्टी	४८,९०,४२	१९,००,८४	४०,३३,७९	१,२९,७३,३७	६०,१०,९६	१,०६,६२
एकूण निविष्टी	६,२२,७०,५८	१,१६,२६,१९	४,१२,०८,१६	६,८९,२८,६५	३,५७,८३,७७	१३,५२,९५
यंत्र व सयंत्र सामग्री	४,९४,५८,२५	१,८६,६४,४८	३,५८,१७,१०	७,०४,९०,८३	२,२७,६२,४७	३,५२,३९
मुख्य उत्पादन	७,२७,७३,२०	१,२६,१६,१५	४,७५,७५,६९१८	,४९,४५,७८	५,५६,९४,७५	२,५८
अन्य उत्पादन	३७,३७,३९	१५,९७,७९	२३,८८,४४	२४,१४,५५	५३,१६,३६	२५,५४,९६
एकूण उत्पादन	७,६५,१०,५९	१,४२,१३,९४	४,९९,६४,१३	१८,७३,६०,३३	६,१०,११,११	२५,५७,५४
घसारा	३७,७०,४०	१३,०९,८८	२२,४४,५०	१,१०,६४,१७	३१,४३,५०	४३,०६
मूल्यवृध्दी	१,०४,६९,६२	१२,७७,८६	६५,११,४७	१०,७३,६७,५२	२,२०,८३,८४	११,६१,५२
इतर खर्च	४०,६३,५९	१२,२१,०३	२७,२९,२०	२६,७८,५०	३५,५७,९३	८०,२०
निव्वळ नफा	६४,०६,०३	५६,८३	३७,८२,२७	१०,४६,८९,०२	१,८५,२५,९१	१०,८१,३२

* भांडवली वस्तूंची दुरुस्ती व दुरुस्ती सेवा कारखान्यांची सांख्यिकीय माहिती एकत्रित देण्यात आलेली आहे.

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : ९

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील डाळी तयार करणारे कारखाने

(रुपये हजारात)

बाब	१९९४-९५	१९९६-९७
कारखाने (संख्या)	१८	२१
स्थिर भांडवल	६३,४८	१,०२,६५
खेळते भांडवल	२,४८,६५	६,२३,१८
गुंतविलेले भांडवल	५,३४,७२	६,६९,१६
अदत्त ऋण	१,४७,८६	५,२०,४९
एकूण श्रमदिवस (संख्या)	१,१०,१४२	१,६७,५०५
कामगार (संख्या)	२१३	३९३
एकूण कर्मचारी (संख्या)	३५७	५१६
कामगारांचे वेतन	२४,८६	५६,३१
एकूण वेतन	५७,९०	९४,१५
इंधन	४७,७५	८२,८२
कच्चा माल	३४,९७,७८	८९,५४,४८
अन्य निविष्टी	५६,६९	१,३३,५५
एकूण निविष्टी	३६,०२,२२	९१,७०,८५
यंत्र व सयंत्र सामग्री	५७,८०	५८,५६
मुख्य उत्पादन	३६,४७,९९	९४,३६,९१
अन्य उत्पादन	६९,४९	७५,७०
एकूण उत्पादन	३७,१७,४८	९५,१२,६१
घसारा	१२,६०	१६,४५
मूल्यवृध्दी	१,०२,६६	३,२५,३१
इतर खर्च	६,६७,३३	१,४२,७५
निव्वळ नफा	(-) ५,६४,६६	१,८२,५६

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक : १०

लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे सभासद व भांडवल

(भांडवल व निधी--लाख रुपयांत)

कारखाना	स्थापना वर्ष	१९८५-८६				
		सभासद संख्या	भाग भांडवल	राखीव व इतर निधी	स्थिर भांडवल	खेळते भांडवल
१	२	३	४	५	६	७
शेतकरी सहकारी साखर कारखाना, किल्लारी.	१९६९	९,५०९	१,४०.९७	२,४८.१८	३,९४.५४	१,४१.३४
हनुमान खांडसरी शुगर मिल्स, हलगरा.	१९७४	. .	२.९०	. .	४.५५	७०.५७
जय जवान जय किसान सहकरी साखर कारखाना, नळेगाव.	१९८२	. .	१,१८.९४	०.१२	११.३०	१,७०.६४
मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, चिंचोलीराव (वाडी).	१९८४	१,२५०	१,५१.००	. .	२३.०६	. .
शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना, जाजनूर.	१९८९	. .	. .	. .	. .	. .
बालाघाट शेतकरी सहकारी साखर कारखाना, उजना.	१९९०	. .	. .	. .	. .	. .
प्रियदर्शिनी शेतकरी सहकारी साखर कारखाना, तोंडार.	१९९४	. .	. .	. .	. .	. .
पन्नगेश्वर शुगर मिल्स, पानगाव	१९९९	. .	. .	. .	. .	. .
विकास सहकारी साखर कारखाना, निवळी.	२०००	. .	. .	. .	. .	. .
श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना, बेलकुंड.	२०००	. .	. .	. .	. .	. .
रेणा सहकारी साखर कारखाना, निवाडा.	२००१	. .	. .	. .	. .	. .

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : १० (क्रमशः)

लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे सभासद व भांडवल

(भांडवल व निधी--लाख रुपयांत)

कारखाना	१९९५-९६				
	सभासद संख्या	भाग भांडवल	राखीव व इतर निधी	स्थिर भांडवल	खेळते भांडवल
१	८	९	१०	११	१२
शेतकरी सहकारी साखर कारखाना, किल्लारी.	१४,२९८	३,००.४७	५,८९.८८	७,१२.५८	१५,३९.२२
हनुमान खांडसरी शुगर मिल्स, हलगरा.	. .	४.४७	. .	११.४७	१,०९.६५
जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना, नळेगाव.	९,८५६	उ.ना.	९,११.०७	उ.ना.	१२,४०.३९
मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, चिंचोलीराव (वाडी).	उ.ना.	उ.ना.	उ.ना.	उ.ना.	१२,४०.३९
शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना, जाजनूर.	. .	. .	. .	. .	. .
बालाघाट शेतकरी सहकारी साखर कारखाना, उजना.	. .	. .	. .	. .	. .
प्रियदर्शिनी शेतकरी सहकारी साखर कारखाना, तोंडार.	. .	. .	. .	. .	. .
पन्नगेश्वर शुगर मिल्स, पानगाव	. .	. .	. .	. .	. .
विकास सहकारी साखर कारखाना, निवळी.	. .	. .	. .	. .	. .
श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना, बेलकुंड.	. .	. .	. .	. .	. .
रेणा सहकारी साखर कारखाना, निवाडा.	. .	. .	. .	. .	. .

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : १० (क्रमश:)

लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे सभासद व भांडवल

(भांडवल व निधी--लाख रुपयांत)

कारखाना	२०००-२००१				
	सभासद संख्या	भाग भांडवल	राखीव व इतर निधी	स्थिर भांडवल	खेळते भांडवल
१	१३	१४	१५	१७	१७
शेतकरी सहकारी साखर कारखाना, किल्लारी.	१८,९०५	५,०८.१६	९,८१.९०	१२,३१.७४	२७,९५.३१
हनुमान खांडसरी शुगर मिल्स, हलगरा.	. .	५२.७६	. .	१,९०.५४	४२.७०
जय जवान जय किसान सहकरी साखर कारखाना, नळेगाव.	९,९६६	३,६८.१०	११,५५.५२	. .	३९,०८.६५
मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, चिंचोलीराव (वाडी).	११,८९५	६,३२.५४	२७,७८.४१	४,२५.४४	५८,२५.६८
शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना, जाजनूर.	८,६०१	१५,१२.५२	१४,४२.८७	२३,९२.०९	६६,६७.०१
बालाघाट शेतकरी सहकारी साखर कारखाना, उजना.	१२,०००	१३,९८.३४	२,८९.५१	४८,६४.२३	१६,५४.३३
प्रियदर्शिनी शेतकरी सहकारी साखर कारखाना, तोंडार.	७,९६७	५,१७.३०	५.४०	४,५८.६२	. .
पन्नगेश्वर शुगर मिल्स, पानगाव	२,२५०	९,६०.२२	. .	१२,३४.७९	१,१३.०९
विकास सहकारी साखर कारखाना, निवळी.	. .	. .	. .	. .	. .
श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना, बेलकुंड.	५३८	११,५७.४३	०.६२	६,४६.६४	. .
रेणा सहकारी साखर कारखाना, निवाडा.	. .	. .	. .	. .	. .

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : १० (क्रमश:)

लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे सभासद व भांडवल

(भांडवल व निधी--लाख रुपयांत)

कारखाना	२००३-२००४				
	सभासद संख्या	भाग भांडवल	राखीव व इतर निधी	स्थिर भांडवल	खेळते भांडवल
१	१८	१९	२०	२१	२२
शेतकरी सहकारी साखर कारखाना, किल्लारी.	१९,०००	५,२१.९२	२८,१६.८३	१२,४३.४८	२३,२१.०५
हनुमान खांडसरी शुगर मिल्स, हलगरा.	. .	८१.४२	. .	१,१०.१०	३,११.३०
जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना, नळेगाव.	९,९६६	४,०२.१२	१४,५५.६७	. .	२२,६५.१६
मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, चिंचोलीराव (वाडी).	११,९५५	६,७४.१८	३२,६९.५३	५,७२.११	७०,६५.२४
शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना, जाजनूर.	९,०७५	१६,९७.५७	२३,५२.४५	४३,९३.३९	३४,८५.९२
बालाघाट शेतकरी सहकारी साखर कारखाना, उजना.	. .	. .	. .	. .	. .
प्रियदर्शिनी शेतकरी सहकारी साखर कारखाना, तोंडार.	८,४७६	१६,५८.३७	५,२१.००	२८,१०.५४	१४,२९.४४
पन्नगेश्वर शुगर मिल्स, पानगाव	२,५००	१२,०४.९५	. .	१०,९२.१२	३०,९४.०९
विकास सहकारी साखर कारखाना, निवळी.	७,१२०	१७,०६.५३	८,९५.२२	८२.७२	३७,२६.५९
श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना, बेलकुंड.	२,४७१	उ.ना.	६,०८.४७	१६,८७.६१	१३,४२.३९
रेणा सहकारी साखर कारखाना, निवाडा.	३,५८७	१,९८.८५	१,७९.३५	. .	१२,९६.०४

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : १० (क्रमश:)

लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे सभासद व भांडवल

(भांडवल व निधी--लाख रुपयांत)

कारखाना	२००४-२००५				
	सभासद संख्या	भाग भांडवल	राखीव व इतर निधी	स्थिर भांडवल	खेळते भांडवल
१	२३	२४	२५	२६	२७
शेतकरी सहकारी साखर कारखाना, किल्लारी.	१९,०००	५,२१.९२	२८,५१.८६	१२,४३.७७	१६,२३.५०
हनुमान खांडसरी शुगर मिल्स, हलगरा.	. .	१,०९.९४	. .	१,०८.४१	५,६४.९५
जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना, नळेगाव.	९,९६६	४,०२.१२	१५,१४.२७	. .	१६,२६.७३
मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, चिंचोलीराव (वाडी).	११,९५५	६,८७.०१	३४,७६.४१	५,७२.३८	४०,२४.७४
शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना, जाजनूर.	९,०७५	१७,७२.६६	२३,५३.०१	४३,६९.२३	२०,१३.७५
बालाघाट शेतकरी सहकारी साखर कारखाना, उजना.	. .	. .	. .	. .	. .
प्रियदर्शिनी शेतकरी सहकारी साखर कारखाना, तोंडार.	८,५५५	१९,२५.७६	७,९०.०७	२७,७७.३६	४,६४.७४
पन्नगेश्वर शुगर मिल्स, पानगाव	२,५६१	१२,१०.००	. .	१२,१७.००	२९,८८.५९
विकास सहकारी साखर कारखाना, निवळी.	७,१९६	१६,८६.५९	१०,९७.४९	३,६३.८०	२३,५२.८९
श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना, बेलकुंड.	२,४७१	११,५८.१३	६,०८.४७	१७,८१.२८	६,८५.२७
रेणा सहकारी साखर कारखाना, निवाडा.	३,५८७	११,३२.१८	२,४१.४८	उ.ना.	१८,३६.६४

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : ११

लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे उत्पादन

अ.क्र.	कारखाना	१९८५-८६ ऊस गळीत (लाख मे.टन)	१९८५-८६ साखर उत्पादन (हजार मे.टन)	१९८५-८६ मळी उत्पादन (हजार मे.टन)	१९८५-८६ उतारा टक्के	१९९५-९६ ऊस गळीत (लाख मे.टन)	१९९५-९६ साखर उत्पादन (हजार मे.टन)	१९९५-९६ मळी उत्पादन (हजार मे.टन)	१९९५-९६ उतारा टक्के
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१.	शेतकरी सहकारी साखर कारखाना, किल्लारी.	१.६०	१६.६१	उ.ना.	१०.३४	३.०६	३१.४५	उ.ना.	१०.३९
२.	हनुमान खांडसरी शुगर मिल्स, हलगरा.	०.१८	१.१२	०.०८	६.१२	०.३३	०२.१९	०.०९	६.६७
३.	जय जवान जय किसान सहकरी साखर कारखाना, नळेगाव.	. .	. .	. .	. .	२.८३	२८.३७	१०.००	१०.०२
४.	मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, चिंचोलीराव (वाडी).	. .	. .	. .	. .	उ.ना.	उ.ना.	उ.ना.	उ.ना.
५.	शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना, जाजनूर (झरी).	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
६.	बालाघाट शेतकरी सहकारी साखर कारखाना, उजना.	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
७.	प्रियदर्शिनी शेतकरी सहकारी साखर कारखाना, तोंडार	. . .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
८.	पन्नगेश्वर शुगर मिल्स, पानगाव	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
९.	विकास सहकारी साखर कारखाना, निवळी	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
१०.	श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना, बेलकुंड.	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .
११.	रेणा सहकारी साखर कारखाना, निवाडा.	. .	. .	. .	. .	. .	. .	. .	. .

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : ११ (क्रमश:)

लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे उत्पादन

अ.क्र. (कारखाना)	२०००-०१ ऊस गळीत (लाख मे.टन)	२०००-०१ साखर उत्पादन (हजार मे.टन)	२०००-०१ मळी उत्पादन (हजार मे.टन)	२०००-०१ उतारा टक्के	२००३-०४ ऊस गळीत (लाख मे.टन)	२००३-०४ साखर उत्पादन (हजार मे.टन)	२००३-०४ उतारा टक्के	२००४-०५ ऊस गळीत (लाख मे.टन)	२००४-०५ साखर उत्पादन (हजार मे.टन)	२००४-०५ उतारा टक्के
१	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०
१	२.१८	२२.५३	उ.ना.	११.०८	०.६१	६.३६	१०.२१	०.३०	२.८५	९.६२
२	०.४७	०३.७५	०.०४	७.९८	०.३६	०३.०६	८.४६	०.५८	०४.५६	७.८८
३	३.४२	३८.०१	१२.२७	११.१३	०.४८	०४.८६	१०.०२	०.१२	००.८०	७.३१
४	५.८४	७६.२९	२०.७६	१३.०७	३.४३	३८.०७	११.०७	३.११	३२.८२	१०.५३
५	४.४४	४८.६७	१६.८७	१०.९६	. .	. .	. .	. .	. .	. .
६	उ.ना.	उ.ना.	उ.ना.	उ.ना.	. .	. .	. .	. .	. .	. .
७	. .	. .	. .	. .	०.९०	०९.०२	१०.००	. .	. .	. .
८*	०.१३	१.४३	०.७५	१०.५१	३.११*	३२.६३	१०.४४	१.५६	१६.७०	१०.६८
९	. .	. .	. .	. .	२.०९	२२.९२	१०.९५	१.९६	२१.१८	१०.७९
१०	. .	. .	. .	. .	०.६८	०७.११	१०.४०	उ.ना.	उ.ना.	उ.ना.
११	. .	. .	. .	. .	१.२५	१३.२१	१०.६२	१.०९	११.२५	१०.३२

* पन्नगेश्वर शुगर मिल्स, पानगाव या कारखान्याचे आर्थिक वर्ष कंपनी कायद्याअंतर्गत १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर असे होते, कंपनीच्या लेखा कालावधीत कंपनी रजिस्टारच्या परवानगीने ते १ एप्रिल ते ३१ मार्च असा बदल झाल्यामुळे सन २००३.०४ मध्ये दर्शविलेले निष्कर्ष सन २००२ ते २००४ या कालावधीतील १८ महिन्यासाठीचे आहेत.

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : १२

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील कापूस वटण व दाबणी कारखान्याची माहिती

(रुपये हजारात)

बाब	१९८४-८५	१९९०-९१	१९९४-९५	१९९५-९६	१९९६-९७
कारखाने (संख्या)	४	३	६	९	६
स्थिर भांडवल	२,१२	७७	५,९५	२६,८१	३५,१८
खेळते भांडवल	४०	४६	७१	२,२८	(-)१०,८०
गुंतविलेले भांडवल	२,१५	८१	६,३०	२७,१९	३५,१८
अदत्त ऋण	१,३५	०	३,६१	२,५६	३०,४१
एकूण श्रमदिवस (संख्या)	२,४३४	११,५५९	१४,५८६	५४,३३३	२६,७२१
कामगार (संख्या)	०	१११	१०८	३४८	९९
एकूण कर्मचारी (संख्या)	८	१२६	१२९	३८१	१३२
कामगारांचे वेतन	०	२,४३	३,०२	२२,४५	७,७८
एकूण वेतन	२३	२,६८	४,७७	२६,६४	१०,०१
इंधन	१	५,०२	२,२१	१४,७४	२,५८
कच्चा माल	०	२७	३७	१,२४	१७
अन्य निविष्टी	९	१,३७	१,६८	८,१४	३,४२
एकूण निविष्टी	१०	२,६६	४,२६	२४,१३	६,१७
यंत्र व सयंत्रसामग्री	२,१६	१,२९	१०,५४	२१,९८	२४,६०
मुख्य उत्पादन	०	०	०	०	०
अन्य उत्पादन	२	८,१२	९,०५	६७,५५	२३,३४
घसारा	१२	६	४५	१,५४	२,९३
मूल्यवृध्दी	१९	५,४२	४,३४	४१,८८	१४,२४
इतर खर्च	०	०	०	२,६८	६,१०
निव्वळ नफा	१९	५,४०	४,३४	३९,२०	८,१४

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक : १३

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील सुती कापड उद्योग

(रुपये हजारात)

बाब	१९९३-९४	१९९५-९६	१९९६-९७
कारखाने (संख्या)	१	१	४
स्थिर भांडवल	२,४७,९९	१,२०,५४	१,७६,३९
खेळते भांडवल	(-)८,२७,४८	(-)९,९३,००	(-)९,८७,२८
गुंतविलेले भांडवल	२,८६,०७	२,३४,४७	३,७०,६७
अदत्त ऋण	१,९७,३३	१,२३,४७	२,४८,०३
एकूण श्रमदिवस (संख्या)	३,०९,४१३	२,१३,७१७	२,२५,९७०
कामगार (संख्या)	७९२	६९१	६९८
एकूण कर्मचारी (संख्या)	८६१	७६६	८२१
कामगारांचे वेतन	१,८१,१०	१,५८,७०	१,७२,५७
एकूण वेतन	२,२०,०१	२,१९,५९	२,५०,२८
इंधन	१,६५,५१	१,६१,०२	२,१३,३६
कच्चा माल	१०,६५,००	१५,६४,७०	१२,३५,८३
अन्य निविष्टी	३२,७४	३०,१८	५६,१५
एकूण निविष्टी	१२,६३,२६	१७,५५,९०	१५,०५,३३
यंत्र व सयंत्रसामग्री	६,१९,४४	५,२९,१८	५,१८,३३
मुख्य उत्पादन	१४,७३,२१	१९,४४,२०	१६,६५,४१
अन्य उत्पादन	२२,५२	१२,५८	३४,७०
घसारा	१९,७३	९,३४	१८,९६
मूल्यवृध्दी	२,१२,७५	१,९१,५५	१,७५,८२
इतर खर्च	००	१०,०४	२९,२९
निव्वळ नफा	२,१२,७५	१,८१,५१	१,४६,५३

अनुक्रमणिका

प्रकरण ६ : बँक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य

- सावकारी
- सहकारी चळवळ
- सहकारी बँका
- भूकंपग्रस्त भागात बँकेने केलेले कार्य
- उद्योगांना आर्थिक सहाय्य
- वाणिज्य बँका
- बँक पत योजना
- राष्ट्रीय बचत योजना
- व्यापार
- विनियमित बाजारपेठा व घाऊक व्यापारी केंद्र
- सहकारी विपणन
- राज्य व्यापार व रास्त भावाची दुकाने
- किरकोळ व घाऊक व्यापार
- आठवडे बाजार
- यात्रा
- वजन व मापे
- तक्ते

प्रकरण ६

बँक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य

बचत हा मानवी व्यवहाराचा पूर्वीपासून चालत आलेला स्थायीभाव आहे. पूर्वी सावकार व पतपेढ्या बँक व्यवसायाचे काम करीत असत. त्यांच्याकडून व्याज आकारले जाई. परंतु पैसा पुरविण्याची त्यांची कुवत बँकांच्या मानाने फारच मार्यादित होती. आज सर्वसामान्यांची बचत करण्याची कुवत वाढलेली आहे. इतकेच नव्हे तर प्रत्येक मिळवत्या व्यक्तीस भविष्यकालीन गरजा व संकटाना तोंड देण्यासाठी बचतीच्या रुपाने तरतूद करण्याच्या आवश्यकतेची जाणीव झालेली आहे. पूर्वीच्या काळीही लोकांना बचतीचे महत्व पटलेले होते. बचत करण्याची त्याच्यांमध्ये कुवत होती. परंतु त्या बचतीचा विनियोग करण्याची साधने उपलब्ध नसल्यामुळे ही बचत सोन्या-चांदीत अथवा इतर मौल्यवान वस्तूंमध्ये अडकून राहत असे. आता ही परिस्थिती बदललेली असून बचत हे आर्थिकदृष्ट्या समाज प्रगत होण्यासाठी लागणाऱ्या गुंतवणूकीचे एक महत्त्वाचे साधन आहे, आणि हे साधन बँका आणि तत्सम संस्था उपलब्ध करून देतात.

प्राचीन काळापासून भारतात विविध प्रकारची देवघेव करणाऱ्या संस्था अस्तित्वात होत्या. बौद्ध काळामध्ये असलेल्या व्यापारी संघांचे वर्णन जातक कथांमध्ये आढळते. संस्कृत साहित्यामध्ये श्रेणी, पूंग, संघ इत्यादी नावे आढळून येतात. दक्षिण भारतामध्ये त्यांना मणिग्रामम, नानादेशी अशी नावे आहेत. मणिग्रामम हा वणिकग्रामचा अपभ्रंश असावा. वैदिक साहित्यातून व्यापारी संघाला वणिक ही संज्ञा होती असे दिसते. विविध व्यापाऱ्यांच्या संघांची विशेष प्रतिष्ठा तत्कालीन राजदरबारात असे. सातवाहनाचे साम्राज्य हे गोदावरी व कृष्णा नदीच्या खोऱ्यात विकसित झाले होते. या प्रमुख नद्यांव्यतिरिक्त पूर्णा व मांजरा या नद्याही या परिसरात होत्या. या सर्व नद्यांमुळे कृषी क्षेत्राचा विकास होऊन या काळातील व्यापार बराच भरभराटीस आला होता. भूमार्ग व जलमार्गाव्दारे व्यापार चालत होता. या काळातील व्यापाराचे वैशिष्ट्य म्हणजे हा व्यापार बौद्ध धर्मियांच्या ताब्यात होता.[१] महाराष्ट्राच्या नागरी व ग्रामीण भागांमध्ये बऱ्याच आधीपासून लहान प्रमाणामध्ये वाणिज्य व तत्सम व्यवसायांवर उपजिविका करणारे लोक होते. प्राचीन काळी वस्तुविनिमय प्रचलित होता. तो पुढे बलुतेदारी सेवेच्या माध्यमातून बऱ्याच मोठ्या प्रमाणात रुढ असावा. यातून स्थानिक गरजा भागविण्यासाठी इतर प्रदेशांशी संपर्क साधून जी आयात निर्यात होई त्यास हुंडी पाठविणाऱ्या व सोडविणाऱ्या व्यापारी पेढ्यांही अस्तित्वात होत्या. वस्तुविनिमय करताना तो उत्पादक व ग्राहक यांच्यातच होत असे. यांच्यात मध्यस्थी करणारा दलाली वर्ग मोठ्या प्रमाणात मध्ययुगापर्यंत अस्तित्वात नव्हता.

यादव काळात जागतिक बाजारपेठेत क्रांतिकारक बदल झाले. पश्चिम आशिया आणि आफ्रिकेमध्ये नवीन मुस्लिम बाजारपेठ निर्माण झाली होती. भारतीय वस्त्रे व मसाल्याच्या पदार्थांना मागणी वाढली होती. उत्पादन प्रक्रियेमध्ये आमुलाग्र बदल झाला. त्याचा परिणाम म्हणजे पैठण, तेर, अंबाजोगाई यासारख्या नवीन बाजारपेठा अस्तित्वात आल्या. पैठणच्या

१. काटे, पी. व्ही. **मराठवाड्याचा इतिहास,** १९९९, पृ.६१.

रेशमी वस्त्रांचे परत एकदा वर्चस्व प्रस्थापित झाले. त्यामुळे मराठवाड्याची आर्थिक भरभराट झाली.[२] निझामाच्या राजवटीत जे जहागिरदार होते त्यापैकी अरब, रोहिले व पठाण सावकारी करीत असत.[३] कुर्डूवाडी ते लातूर रेल्वेलाईन १९११ मध्ये सुरू झाल्यामुळे लातूर जिल्ह्यात व्यापार विकसित होण्यासाठी साहाय्य मिळाले. जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी बाजारपेठा विकसित झाल्या. येथील व्यापारात प्रामुख्याने मारवाडी कोमटी, वाणी व लिंगायत अग्रेसर होते. जिल्ह्यातील व्यापारात कापसाचा व्यापार बराच मोठा होता. त्यामुळे सावकारांची संख्या अधिक होती.

सावकारी

ऋणको आणि धनको यांचे अस्तित्व फार पूर्वीपासूनचे आहे. प्राचीन शिलालेखात त्याचप्रमाणे ऐतिहासिक कागदपत्रांत त्यांचा पुरावा मिळतो.[४] खेड्यात कायमचे दुकान असलेल्या वाण्याचा धंदा एकंदरीत मंदीचा असला तरी त्याच्याजवळ रोकड रक्कम असल्यामुळे अडीअडचणीला शेतकऱ्यांना लागणारा रोख पैसा पुढे करून वाणी त्यावर सावकारी करीत होते. दुकानदारी आणि सावकारी या जोडधंद्यांचे परस्परावलंबित्व यादवांच्या काळातही होते. बी-बियाणे घेण्यासाठी, औतासाठी, बैल विकत घेण्यासाठी किंवा विहीर बांधावयाची असली तरी रोख रकमेवाचून अडलेल्या शेतकऱ्यांला कर्जासाठी गावच्या वाण्याकडे जाणे भागच होते. धंद्यातल्या अडचणी व रोजच्या प्रापंचिक गरजा भागविण्याकरिता, दुकानांत खरेदी केलेल्या सामानांची उधारीही साचत होती. सालउधारी आणि रोकड कर्ज यावर लावलेल्या व्याजबट्टयात भरपूर नफा काढण्यास वाव होता. किरकोळ सावकारीत व्याजाचा दर साधारणपणे सवाई, दिडी, दुणी इतका होता. पण काहीवेळा कुळाच्या अडचणींचा अंदाज घेऊन याहिपेक्षा चढा दर सावकार घेत असले पाहिजेत. एखादेवेळी असा प्रसंग गुदरे की, संसारातील दैनंदिन गरजेच्या आडकित्ता, शेताची पाटी, यासारख्या वस्तु पैशासाठी गहाण ठेवाव्या लागत. गहाणवटीचा व्यवहार सर्व लहानमोठे सावकार करीत होते. अशा प्रकारची सावकारी केवळ वाणी किंवा अन्य दुकानदारच करीत नव्हते, तर ज्याला जेवढे शक्य होईल तेवढ्याच भांडवलावर अगदी मामुली स्वरूपाच्या गहाणवटीत सामान्य मंडळी देखील व्याजाच्या आशेने लक्ष घालीत होती.[५]

तत्कालीन हैद्राबाद राज्यात सुद्धा मोठे सावकार होऊन गेल्याचा उल्लेख मिळतो. पुरणमल हा १८३०-४१ या दरम्यानच्या काळात मोठा सावकार हैद्राबाद राज्यात होता. त्याने कर्जापोटी वऱ्हाडवर खंडाचे हक्क मिळविले. त्याला काढून टाकल्यावर पुरणमलने निझामाला २० लक्ष पौंड (दोन कोटी रुपये) कर्ज दिल्याचा दावा केला होता. त्याच सुमारास मेसर्स पेस्टनजी आणि कंपनी ही कापसाचा व्यापार करणारी कंपनीसुद्धा शेतकऱ्यांना कापूस पिकविण्यासाठी अग्रिम रक्कम देत असे. त्याच वेळी राजा चंदूलालच्या सावकारीमुळे हैद्राबाद राज्याच्या महसुलावर फार मोठा विपरित परिणाम झाला होता. त्या काळात या व्यवसायाचे स्वरुप संघटित नव्हते. तरी देखील खेडी आणि शहरे यामधील नागरिकांच्या

२. कित्ता, पृ. ७९.
३. कित्ता, पृ. ११२.
४. **परभणी जिल्हा गॅझेटिअर**, १९८८, पृ. २४७.
५. पानसे, मु.ग., **यादवकालीन महाराष्ट्र,** (इ.स.१००० ते १३५०) मुंबई, १९६३ पृ. ८६-८७.

व्यावसायिक आणि वैयक्तिक कर्जाबाबत गरजा धनकोकडून भागविल्या जात. पूर्वीसुद्धा सावकारांचे संघ (Guild) असल्याचा उल्लेख सापडतो.[६]

सावकारीचा व्यवसाय एकाद्या विशिष्ट जातीकडून केला जात होता असे म्हणता येत नसले, तरी तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात हिंदू, मुसलमान, झेरॉष्ट्रीयन, ख्रिश्चन, शिख व जैन हे लोक हा व्यवसाय करीत असत. परंतु त्यामध्ये ब्राह्मणांची संख्या जास्त होती. खेडेगावातील जमीन मालक शेतकरी व शेतमजूर हे नेहमीच सावकाराकडून कर्ज घेत असल्यामुळे सावकार त्यांच्याकडून अव्वाच्या सव्वा व्याज घेत असत. मुख्यतः कर्ज घेणाऱ्यांमध्ये जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील लोक असत. ऋणकोनी घेतलेली कर्जाऊ रक्कम व त्यावरील व्याज वेळच्या वेळी परत न केल्यामुळे व्याजाची रक्कम बेसुमार वाढत असे. परिस्थितीनुसार व्याजाचा दर वेगवेगळा असे. रोख कर्जाऊ रकमेवर १० ते २० टक्के व कर्जाऊ स्वरूपात दिलेल्या वस्तूंवर २० ते ५० टक्के व्याज आकारले जाई. कर्जाऊ स्वरूपात दिलेल्या वस्तूंची परतफेड सवा व दिडीच्या स्वरूपात करावी लागे. रोख रकमेच्या कर्जासाठी घर, जमीन, सोने-चांदीचे दागिने, शेतमाल व भांडी यासारख्या वस्तू तारण ठेवाव्या लागत. बहुतेक सर्व सावकार कर्जाच्या मोबदल्यात जमिनी गहाण ठेवीत. ऋणकोने कर्ज परत न केल्यास सावकार जमिनीवर जप्ती आणित असे.[७] शेतकऱ्यांना पावसाळ्याच्या सुरुवातीस कर्जाऊ स्वरूपात धान्य देऊन धनको त्याची परतफेड पीक आल्यावर करून घेई. या व्यवहारात दिलेल्या कर्जाऊ धान्याच्या एक चतुर्थांश अधिक धान्य व्याज म्हणून आकारले जाई.

मराठवाड्यातील शेतकरी इतका कर्ज बाजारी झाला होता की, सन १९२२ ते १९३७ या काळात लागवडीखालच्या जमिनीपैकी दहा टक्क्याहून अधिक जमीन सावकारांनी हडप केली होती. मराठवाड्यातील सावकार अशिक्षित ऋणकोकडून दोन दस्तऐवजावर अंगठा उठवून घेत असत. त्यापैकी पहिला दस्तऐवज म्हणजे सावकारास लिहून दिलेले गहाणखत असे, तर दुसऱ्या दस्तऐवजानुसार आपण जमिनीचे मालक नसून कुळ म्हणून ती जमीन कशीत असल्याबद्दलचा करार केलेला असे. आपण मालक नसून केवळ कुळ आहोत असे लेखी कबूल केले असल्याचे कर्जबाजारी शेतकऱ्यास कळण्यासही अनेक वर्षे उलटावी लागत असत. तत्कालीन हैद्राबाद संस्थानात सहकारी चळवळीचा प्रसार झालेला नसल्यामुळे कर्जबाजारी शेतकऱ्याला सावकारांचे सारखे पाय धरावे लागत असत. त्यांचे भांडवल दरवर्षी दुपटीने वाढत असल्याचे आणि कर्ज म्हणून दिलेल्या छोट्या रकमांवरही ७५ ते १५० टक्के व्याज आकारीत असल्याचे हैद्राबाद संस्थानातील खेड्यांची पहाणी करणाऱ्या एस.एम.भरुचा या अभ्यासकास आढळले.[८]

सावकार आपल्या व्यवसायाचा उपयोग करून ऋणकोची पिळवणूक करी व गैरमार्गाने थकबाकीची वसुली करीत असे. ऋणकोचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी कायदे अस्तित्वात नसल्यामुळे त्यांना बरेच सोसावे लागत असे. म्हणून सावकाराच्या व्यवहारात सुसुत्रता

---

६. **परभणी जिल्हा गॅझेटिअर**, पृ. २४७-४८.
७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४६०.
८. फडके, य.दि. **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** पुणे, १९९३ खंड ४, पृ. ४८.

आणण्यासाठी हैद्राबाद सरकारने १९३९ (फसली १३४९) मध्ये हैद्राबाद सावकार अधिनियम अमलात आणला.[९]

हैद्राबाद सावकार अधिनियम (१९३९) दस्तूर उलमल खराज डेहेडागाव म्हणून प्रसिध्द असलेल्या या कायद्यानुसार महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांना सावकारी क्षेत्रावर नियंत्रण करण्याचे सर्व कायदेशीर अधिकार मिळाले. सावकारांना परवाना धारण करणे अनिवार्य करण्यात आले. त्यासाठी त्यांना २५ रुपये परवाना फी भरावी लागत असे. परवाने देणे, त्याचे नुतनीकरण करणे, खाते पुस्तिका तपासणे इत्यादी बाबी तहसिलदार किंवा महसूल अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत येत असत. कायद्यातील तरतूदी खालीलप्रमाणे होत्या—

(१) कोणताही सावकार परवान्याशिवाय व्यवसाय करू शकणार नाही.

(२) गैरप्रकार करणाऱ्या सावकाराचे परवाने तहसिलदार रद्द करू शकतात किंवा दोन वर्षे किंवा जास्त काळपर्यंत त्याच्या व्यवसायावर स्थगिती आणू शकतात.

(३) लेखा पुस्तकामध्ये व्यवस्थित हिशेब ठेवणे, दरवर्षी ऋणकोला खात्याचा तपशील लेखी देणे अशा अटी घालण्यात आल्या. खात्याचा तपशील मराठी भाषेत (विद्यमान जिल्ह्यासाठी) देण्याचे बंधन घालण्यात आले. तथापि लेखापुस्तक उर्दू भाषेत ठेवत असत.

परवाना प्राधिकाऱ्याला सावकाराची लेखा पुस्तके तपासण्याचे अधिकार दिलेले होते. प्रत्येक सावकाराने कर्जदाराला दिलेले कर्ज, परत केलेली रक्कम, शिल्लक देणे रक्कम, इत्यादी बाबत कोणत्याही प्रकारचा तपशील विलंब न लावता देण्याची तरतूद होती. अधिनियमानुसार तारणावरील कर्जाचा व्याजदर ९ टक्के आणि विनातारणावरील कर्जाचा व्याज दर १२ टक्के होता. त्यापेक्षा जास्त व्याज आकारण्यावर प्रतिबंध होता. कायद्यानुसार गैरप्रकार करणाऱ्यांना दंड व शिक्षेची तरतूद होती.

मराठवाडा महाराष्ट्रात विलीन करण्यात आल्यानंतर मराठवाड्यातील अन्य जिल्ह्याबरोबरच तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यासही फेब्रुवारी १९६० पासून १९४६ चा मुंबई सावकारी अधिनियम (१९४७ चा सुधारित अधिनियम क्र.३१ सहित) लागू करण्यात आला. त्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून दिनांक १६.८.१९८२ मध्ये स्वतंत्र लातूर जिल्हा निर्माण करण्यात आला. या कायद्यानुसार सावकारी व्यवसाय करणाऱ्यांनी परवाना धारण करणे, परवाना नुतनीकरण करणे, सरकारने ठरवून दिलेल्या दरानेच व्याजाची आकारणी करणे व त्याप्रमाणे प्रत्यक्षात वसुली करणे, कर्जवसुलीची जमा पावती कर्जधारकास देणे, कर्जे अदा पावती ऋणकोकडून घेणे, वर्षातून एक वेळ संबंधित ऋणकोस त्याची कर्जाची येणे रक्कम व व्याज रक्कम कळविणे. अशा जमा नावेच्या पावत्यांची एक प्रत ठराविक मुदतीत सहकार खात्यास पाठविणे इत्यादी बंधने आहेत. त्याचे पालन न करणाऱ्या धनकोस कायद्याने दंडाची व शिक्षेची तरतूद आहे. ही बंधने धनकोंच्या दृष्टीने जरी जाचक असली तरी ऋणकोंना त्याचा भरपूर लाभ मिळाला आणि सावकारी व्यवसायावर एक प्रकारचे नियंत्रण आले. अनधिकृतरित्या चालविल्या जाणाऱ्या सावकारी व्यवसायावर परिणामकारक प्रतिबंध घालण्यासाठी १९४६ चा मुंबई सावकारी अधिनियम व सुधारित अधिनियम जुलै १९७६ आणि जुलै १९७७ मध्ये दोन वेळा दुरुस्त्या करून त्या अंमलात आणलेल्या आहेत.

---

९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४६०.

इ.स.१९५६-५७ मध्ये तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात परवाना धारक सावकारांची एकूण संख्या ११८ होती. त्यापैकी उदगीर, औसा व लातूर या तालुक्यांमध्ये अनुक्रमे ६,५ व २० परवाना धारक सावकार होते. इ.स. १९५७-५८ ते १९६३-६४ या कालावधीतील तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यातील व लातूर जिल्ह्यात समाविष्ट असलेल्या तालुक्यातील परवाना धारक सावकारांची माहिती खाली दिली आहे.[१०]

तालुका	१९५७-५८	१९६०-६१	१९६३-६४
अहमदपूर	. .	७	१
उदगीर	८	४	३
औसा	५	१	१
निलंगा	. .	३	५
लातूर	२१	१०	६

दिनांक १६ ऑगस्ट १९८२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून स्वतंत्र लातूर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर १९८२-८३ मध्ये लातूर जिल्ह्यात परवाना धारक सावकारांची एकूण संख्या १६ होती. त्यावर्षी औसा तालुक्यात एकही परवाना धारक सावकार नव्हता. इ.स.२००४-०५ मध्ये जिल्ह्यातील परवाना धारक सावकारांची संख्या ५०५ होती.[११]

राष्ट्रीयिकृत तसेच सहकारी क्षेत्रातील बँक सुविधामध्ये अमुलाग्र बदल होऊन त्या संस्थांव्दारा मोठ्या प्रमाणावर ग्रामीण व शहरी भागात बँक पतपुरवठा होत असला तरी सावकारांचे महत्व कमी झालेले नाही. हे २००४-०५ मध्ये त्यांच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे दिसून येते. जिल्ह्यातील तालुकानिहाय अधिकृत सावकारांनी १९८४-८५ ते २००४-०५ या कालावधीत दिलेल्या व्यापारी व बिगरव्यापारी कर्जाची माहिती खाली दिली आहे.[१२]

(रुपये हजार)

	तालुका	वर्ष	सावकारांची संख्या	व्यापाऱ्यांना दिलेले कर्ज	बिगर व्यापाऱ्यांना दिलेले कर्ज
१.	लातूर	१९८४-८५	११	२७८,३८	९,४३
		१९९०-९१	८	५०,७०	५,०७
		१९९५-९६	१५	७६	. .
		२००४-०५	२५०	३०,६०	३६,०५
२.	अहमदपूर	१९८४-८५	५	. .	५
		१९९०-९१	२	५,९९	४,३३

१०. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४६१-६२.
११. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन, लातूर.
१२. कित्ता.

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
		१९९५-९६	. .	. .	. .
		२००४-०५	२५	५१,००	. .
३.	उदगीर	१९८४-८५	११	७९,१४	१,८९
		१९९०-९१	२	३७,७२	. .
		१९९५-९६	४०	६२५,७६	१४,८५
		२००४-०५	१२१	१७५,७२	४९,१७
४.	निलंगा	१९८४-८५	५	१७	४,८१
		१९९०-९१	५	३२,५४	. .
		१९९५-९६	१८	२३,०९	. .
		२००४-०५	३६	२१,००	. .
५.	औसा	१९८४-८५	२	२,६९	. .
		१९९०-९१	. .	. .	. .
		१९९५-९६	१	१२	. .
		२००४-०५	६	३,४९	. .
६.	रेणापूर	१९८४-८५	. .	. .	. .
		१९९०-९१	. .	. .	. .
		१९९५-९६	१	६३	. .
		२००४-०५	२०	२,१५	१,००
७.	चाकूर	१९८४-८५	. .	. .	. .
		१९९०-९१	. .	. .	. .
		१९९५-९६	४	११,१८	२,१०
		२००४-०५	११	२५,००	. .
८.	जळकोट	२००४-०५	५	६,१७	३२
९.	देवणी	२००४-०५	२१	६३,७५	४८
१०.	शिरुर अनंतपाळ	२००४-०५	१०	५,००	. .

जिल्ह्यात कृषी पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था आणि व्यापारी व सहकारी बँकांचे जाळे खेडोपाडी पसरल्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा सहकारी संस्था व बँकामार्फत भागविल्या जाऊ लागल्या आहेत. त्याचप्रमाणे कायद्यात बदल झाल्यामुळे ऋणकोवर होणाऱ्या जाचाची धार कमी झाली आहे. सर्वसामान्य शेतकरी व त्याचप्रमाणे सावकार हे सहकारी संस्थेचे सभासद होऊ शकतात. परंतु सहकारी संस्थांमध्ये सभासद असणाऱ्या सावकारांना संस्थेच्या पंच समितीमध्ये निवडून जाण्यास महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्याने प्रतिबंध केला असल्यामुळे बऱ्याच सावकारांनी आपला व्यवसाय बंद

केला. सावकारी व्यवहार हा दिवसेंदिवस संस्थेच्या व्यवहाराप्रमाणे नियमबद्ध व पद्धतशीर ठेवणे भाग पडत असल्यामुळे नियमानुसार व्यवहार करणे सर्वसामान्य सावकारांना त्यांच्या पूर्वीच्या अनिष्ट सवयीमुळे अडचणीचे झाले. त्यामुळे बऱ्याच सावकारांनी आपला व्यवसाय बंद केला.

कर्जमुक्तीसाठी शासकीय प्रयत्न : सावकारी व्यवसायावर शासनाचे नियंत्रण येईपर्यंत सावकार आणि शेतकरी यांच्यामधील संबंधात तणाव होता. त्यातूनच अनेकदा दंगे उद्‌भवले. इ.स. १८७५ चे दख्खनमधील दंगे (Deccan Riots) या नावाने प्रसिद्ध असलेल्या प्रचंड उद्रेकाने लोकांच्या तत्कालीन आर्थिक व सामाजिक जीवनावर बरेच परिणाम झाले. अशा प्रकारची परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून ब्रिटिश सरकारने १८७९ मध्ये डेक्कन ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलिफ ॲक्ट संमत केला. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी व्हावा व त्यांच्या जमिनी व मालमत्ता यावर सावकाराकडून जप्ती आणली जाऊ नये यासाठी हा अधिनियम संमत केला. निजामाच्या राज्यात मात्र २० व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत स्वतंत्र कृषी खाते नसल्यामुळे असा कायदा निजाम सरकारने केला नाही. मुंबई सरकारने १९३९ मध्ये मुंबई कृषी कर्ज निवारण अधिनियम संमत केला. हा कायदा तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यास मराठवाड्याचे महाराष्ट्रात विलीनीकरणानंतर लागू करण्यात आला.

इ.स.१९७५ मधील महाराष्ट्र राज्य कर्ज मुक्ती वटहुकुमाच्या अंमलबजावणीस सुरूवात झाली. तसेच महाराष्ट्र शासनाने १९८० मध्ये लहान शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची योजना राबविली. बहुसंख्य अल्पभूधारकांकडे शासन, सहकारी संस्था व बँका यांचेपैकी कोणाचे तरी कर्ज असे. त्यामुळे थकबाकीदारांना नवीन कर्ज घेताना अडचणी येऊ लागल्या. त्यामुळे त्यांचा कृषी विकासाची गती मंद झाली. त्यावर उपाय म्हणून शासनाने अल्पभूधारकांसाठी कर्जमाफीची योजना राबविली. त्याव्दारे शासनाने राज्यातील अल्पभूधारकांना सुमारे ४८ कोटी रुपयांची कर्जमाफी दिली. ही योजना शासनाच्या कृषी व सहकार खात्यातर्फे राबविली गेली. त्यानुसार पाच एकरापर्यंत कोरडवाहू जमीन असलेले व ज्यांचे वार्षिक उत्पन्न २,४०० रुपयांपेक्षा जास्त नाही, अशा अल्पभूधारकांकडे ३० जून १९७९ पर्यंत असलेली थकीत कर्जे माफ करण्याची योजना आखण्यात आली.

इ.स.१९८० च्या कृषी कर्जमाफीनंतर १९८८ पर्यत अनेक शेतकऱ्यांकडे प्राथमिक सहकारी संस्था व बँकेचे कर्ज थकल्यामुळे पुन्हा पूर्ववत स्थिती निर्माण झाली व शेतकऱ्यांना विकासासाठी आणखी कृषी कर्ज मिळणे दुरापास्त झाले. म्हणून शासनाने डिसेंबर १९८८ मध्ये थकबाकी पुनर्गठन योजना अमलात आणली. त्यानुसार कृषी कर्ज माफ न करता शेतकरी भरू शकेल असे थकीत कर्जाचे मुद्दल व व्याजाचे हप्ते पाडण्यात आले. यामुळे पहिला हप्ता भरल्यावर त्यास प्राथमिक सहकारी संस्था व सहकारी बँकाकडून शेती विकासासाठी पर्याप्त कर्ज मिळण्याची सुविधा प्राप्त झाली. इ.स.१९९० मध्ये लातूर जिल्ह्यातील ४५,९०० शेतकऱ्यांना १२०६.७३ लाख रुपये कृषी कर्ज माफी मिळाली.[१३] इ.स.१९९८-९९ मध्ये लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने व इतर जिल्हा बँकांनी एकूण ७९,०७८ शेतकऱ्यांना ५,४९.३४ लाख रुपये कृषी कर्जावरील व्याज माफ केले.

१३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर.

सहकारी चळवळ

शेतकऱ्यांचे कर्ज हा जसा आर्थिक तसाच सामाजिक प्रश्न झालेला आहे. शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून सरकारकडून तगाई मिळत असे. परंतु ती फारच कमी व अवेळी मिळे. व्यापारी बँकासुध्दा शेतकऱ्यांना कर्ज देत नसत. आणि त्यामुळे निरूपायास्तव त्यांना सावकाराकडून कर्ज घ्यावे लागे. अशा परिस्थितीत कर्जात बुडालेल्या शेतकऱ्याला त्यातून वर काढण्यासाठी सहकाराशिवाय अन्य मार्ग नव्हता. त्यातूनच शेती विकासासाठी कर्जे वा पैसा उपलब्ध करून देण्याकरिता व सावकारी पाशातून त्यांची सोडवणूक करण्यासाठी सहकारी पतपुरवठा संस्थांचा उगम झाला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ग्रामीण कर्ज समस्येने उग्र रूप धारण केले. इ.स.१८८९ मध्ये निजाम राजवटीने हैद्राबाद सहकारी अधिनियम अमलात आणला. तथापि या कायद्यान्वये देशातील इतर राज्यातही मल्टी युनिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट नुसार संस्थांची नोंदणी अनेक राज्यासाठी एक या तत्वानुसार केली जाऊ लागली. अशा नोंदलेल्या संस्थांची देखरेख, चौकशी, तपासणी, इत्यादी बाबत अनेक अडचणी येवू लागल्यामुळे त्यावेळच्या निजाम सरकारने सावकारांच्या जाचातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी व शेतकऱ्यांना ग्रामीण पतपुरवठा संस्थांव्दारे आर्थिक मदत मिळावी या हेतूने हिंदुस्थान सरकारच्या १९१२ च्या सहकारी कायद्याचे अनुकरण करून[१४] स्वतःचा १९१४ (१३२३ फसली) नंतर सहकारी कायदा मंजूर केला.[१५]

तत्कालीन हैद्राबाद संस्थानातील सर अकबर हैदरी यांनी इ.स.१९१४ ला सहकार कार्यालय सुरू केले व शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा केला. लघुउद्योजकांना साह्य देण्यास हैदरींनी **ट्रस्ट फंड** ची स्थापना केली व इ.स.१९२९ पासून साह्यता दिली.[१६]

सहकारी कायद्यानुसार उस्मानाबाद जिल्ह्यात फसली १३३८ मध्ये नोंद झालेली **रुइभर सहकारी पतपेढी** ही रुइभर या ठिकाणी स्थापन झालेली पहिली संस्था होती. या संस्थेचे कार्यक्षेत्र फक्त त्या खेड्यापुरतेच मर्यादित होते. सन १९५९ मध्ये या संस्थेचे रूपांतर मर्यादित दायित्व संस्थेत होवून तिच्या कार्यक्षेत्रात आणखी तीन खेड्यांचा समावेश करण्यात आला. त्यानंतर सर्व जिल्ह्यात सहकारी संस्थांचा प्रसार झाला. सुरुवातीस या संस्था शासन पुरस्कृत होत्या.[१७]

इ.स.१९३० च्या जागतिक आर्थिक मंदीच्या कालावधीमध्ये हिंदुस्थानच्या शेतीवर विपरित परिणाम झाला. शेतमालाच्या किंमती अवास्तव उतरल्या. ह्या आर्थिक मंदीने शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले.[१८] उस्मानाबाद जिल्ह्यात १९५०-५१ पर्यंत सहकारी संस्थांची फारशी वाढ झालेली नव्हती. सर अकबर हैदरी यांच्या प्रयत्नाने १९३७ मध्ये शासकीय बँक सुरू झाली व सन १९४१ ला (१३५१ फसली) हैद्राबाद स्टेट बँक ॲक्ट पास होवून तालुका व जिल्हानिहाय व्यवहार बँक शाखांमार्फत प्रारंभ झाले.[१९]

---

१४. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** १९८८, पृ. २५४.

१५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४६३.

१६. रोडे, सोमनाथ (संपा.), **निवडक शोध निबंध, मराठवाडा इतिहास परिषद,** औरंगाबाद, डिसेंबर २०००, पृ. ११९.

१७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ. ४६३-६४.

१८. **परभणी जिल्हा गॅझेटिअर**, १९८८, पृ. २५४.

१९. रोडे, सोमनाथ संपा, **निवडक शोध निबंध,** मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, २०००, पृ. ११९.

तत्कालीन हैद्राबाद संस्थानातील मराठी जिल्हे महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतर मात्र सहकारी चळवळीस चालना मिळून जिल्ह्यात सहकारी संस्था स्थापन झाल्या व त्यामुळे गरजूंना एकात्मिक पतयोजनेनुसार पैसा उपलब्ध होऊ लागला.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात उस्मानाबाद जिल्ह्यात १,३४५ सहकारी संस्था होत्या. त्यामध्ये दुधपुरवठा, तेलगिरण्या, मजूर सहकारी, विणकर सहकारी, इत्यादी संस्थांचा समावेश होता. त्यामुळे जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या सभासद संख्येत उल्लेखनीय वाढ झाली. जिल्ह्यातील १,३८८ खेडी सहकारी चळवळीच्या कक्षेत आली होती. जिल्ह्यात एकूण १,३७,००७ खातेदार होते. त्यापैकी तिसऱ्या योजनेच्या अखेरीस १,१६,३५० म्हणजे ८३ टक्के खातेदार सहकारी संस्थेचे सभासद होते. जिल्ह्यातील ९६६ विविध कार्यकारी सेवा संस्थांपैकी ६४४ संस्था कर्जाचा पुरवठा करण्याबरोबरच खत व बी-बियाण्यांचे आणि इतर मालाच्या वाटपाचे कार्यदेखील करीत असत.[२०]

इ.स. १९६५-६६ मध्ये उस्मानाबाद जिह्यात एकूण १,३२६ सहकारी संस्था होत्या. त्यांची सभासद संख्या २,११,०००, भाग भांडवल ४,१५.१५ लाख रुपये, राखीव निधी ७४.५८ लाख रुपये व खेळते भांडवल १७,७९.६४ लाख रुपये होते.[२१]

इ.स.१९८२ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून स्वतंत्र लातूर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आल्यानंतर सहकारी चळवळीस अधिकच चालना मिळाली. इ.स.१९८२-८३ मध्ये जिल्ह्यात एकूण १,५६२ सहकारी संस्था होत्या. तर १९९२-९३ मध्ये त्यामध्ये ८९१ नवीन सहकारी संस्थाची वाढ होऊन त्यांची संख्या २,४५३ झाली. लातूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची आकडेवारी खाली दिली आहे.[२२]

(रुपये हजार)

तपशील	वर्ष		
	१९८२-८३	१९९२-९३	२००४-२००५
संस्था (संख्या)	१,५६२	२,४५३	३,७२४
सभासद (संख्या हजार)	२,३८	४,८१	२७,६१,८६
भरणा झालेले भाग भांडवल	९,५५,६०	४,१५,९४	१,२४,५२,२६
स्वतःचा निधी	२,२०,७०	३३,२३,५८	१,०६,२४,७६
सहकारी भाग भांडवल	५८,१२	९,५६,२९	५३,९३,७७
संस्था भाग भांडवल	. .	. .	२,३२,००,८७
एकूण ठेवी	२,४२,८८	८३,७३,२९	९,४८,२२,३३
खेळते भांडवल	६५,१५,७५	३७४,५९,६९	१,५६,५९,३८
निव्वळ दिलेली कर्जे	१५,७९,१६	१,४१,८८,९०	१,०९,६५,८१
खरेदीची किंमत	१,१२,८७	२,२७,८३	४१,२६,७२
विक्रीची किंमत	१,१६,५४	२,३५,१२	२९,९१,५६
निव्वळ तोटा	६३,८८	९,६८,४८	३४,४७,८७

२०. **योजनेने आपल्यासाठी काय केले** ? उस्मानाबाद जिल्हा, १९६६, पृ. २५.

२१. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४६४.

२२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती.

सहकारी बँका

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक : तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात उस्मानाबाद व लातूर येथे प्रत्येकी एक अशा दोन मध्यवर्ती बँका होत्या. इ.स.१९५९ मध्ये या दोन्ही बँकाचे विलिनीकरण करून **दि उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.** ही बँक सुरू करण्यात आली. या बँकेचे मुख्य कार्यालय लातूर येथे होते.[२३] जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांना आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने या बँकेची स्थापना करण्यात आली. ही बँक जिल्ह्यातील सर्व प्राथमिक पतपेढ्यांच्या गरजा भागविण्यासाठी संयुक्त मध्यवर्ती वित्तसंस्था म्हणून काम करते. याशिवाय शेतकऱ्यांना शेतीची अवजारे, बैल व ऑईल इंजिने विकत घेता यावित म्हणून ही बँक सहकारी संस्थाना मध्यम मुदतीची कर्जेही देत असते.[२४] सन १९६०-६१ मध्ये या बँकेची स्थिती खालील प्रमाणे होती.[२५]

		(रुपये लाख)
१	एकूण सभासद संख्या	१,०८२
	(अ) वैयक्तिक	९५
	(ब) सहकारी संस्था	९८९
२	भरणा झालेले भाग भांडवल	१५.८७
३	राखीव आणि इतर निधी	१.४९
४	ठेवी-	
	(अ) वैयक्तिक	२१.६५
	(ब) संस्था व बँका	२१.६५
५	घेतलेली कर्जे	
	(अ) राज्य सहकारी बँका आणि रिझर्व्ह बँक यांचेकडून	६४.००
	(ब) सरकारकडून	१.४५
	(क) इतर	३.२१
६	खेळते भांडवल	१,२९.३२
७	रोख	
	(अ) हाती असलेली	३.०७
	(ब) बँकेतील	२४.७८
८	गुंतवणूक सरकारी आणि इतर विश्वस्त रोखे	०.२६

२३. **डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबूक,** उस्मानाबाद, सेन्सस ऑफ इंडिया, १९६१, पृ. ४०.
२४. **योजनेने आपल्यासाठी काय केले ?** उस्मानाबाद जिल्हा, १९६२, पृ. २६.
२५. **डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबूक,** उस्मानाबाद, १९६१, पृ. ४२.

९	हाती असलेल्या रोखीची ठेवींशी टक्केवारी	७.०९
१०	गुंतवलेल्या रकमांची ठेवींशी टक्केवारी	०.६०
११	येणे असलेली कर्जे	
	(अ) वैयक्तिक	०.०१
	(ब) संस्था	८४.२३
१२	येणे असलेल्या कर्जाची ठेवींशी टक्केवारी	१,९४.५५
१३	येणे असलेल्या कर्जाची खेळत्या भांडवलाशी टक्केवारी	६५.१४
१४	थकबाकी	६.६८
१५	थकबाकीची येणे असलेल्या कर्जाशी टक्केवारी	७.९३
१६	व्यवस्थापनाचा खर्च	२.२६
१७	व्यवस्थापन खर्चाची खेळत्या भांडवलाशी टक्केवारी	१.७५
१८	नफा	०.७२
१९	जिल्ह्यातील शाखांची आणि भरणा कार्यालयाची संख्या	११

इ.स.१९६३-६४ मध्ये या बँकेला सहा लक्ष रुपये निव्वळ नफा झाला होता.[२६] तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत या बँकेने १,४४,६०,००० रुपये अल्प मुदतीचे कर्ज वाटप केले होते. बँकेच्या ३३ शाखा (१९६५-६६) होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांना सुलभरित्या कर्ज पुरवठा होत असे. इ.स.१९६६-६७ मध्ये या बँकेचे भाग व खेळते भांडवल, ठेवी, आणि थकबाकी अनुक्रमे ६७.५९ लाख रुपये, ६,८४.०० लाख रुपये, २,६३.२० लाख रूपये व ४,५२.०० लाख रुपये होते.[२७]

उस्मानाबाद जिल्ह्याचे १९८२ मध्ये विभाजन करून लातूर जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर दिनांक १६ ऑगस्ट १९८४ मध्ये **लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,** लातूर येथे स्थापन करण्यात आली. या नवीन जिल्हा बँकेचा कार्यभार शासन नियुक्त अंतरिम समितीकडे दिनांक ९ फेब्रुवारी १९८७ पर्यंत होता. त्यानंतर दिनांक १० फेब्रुवारी १९८७ पासून पहिल्या लोकनियुक्त संचालक मंडळाने बँकेच्या कामकाजाचा कार्यभार स्वीकारला.[२८]

नवनिर्मित लातूर जिल्हा बँकेच्या कार्यक्षेत्रात संपूर्ण लातूर जिल्हा असला तरी नव्याने लातूर जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आलेली पूर्वीच्या अंबाजोगाई तालुक्यातील रेणापूर महसूल विभागातील ४३ खेडी व ११ वाड्या तसेच सहकारी संस्था यांचा आर्थिक व्यवहार बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे होता. इ.स.१९८४-८५ मध्ये या बँकेच्या एकूण ४६ शाखा होत्या. दिनांक १४.८.१९८४ रोजी बँकेची सभासद संख्या ८७२, एकूण ठेवी ११,९१.०१ लाख रुपये[२९] व भाग भांडवल १,३०.६८ लाख रुपये होते.

---

२६. **योजनेने आपल्यासाठी काय केले ?** उस्मानाबाद जिल्हा, १९६६, पृ. २६.

२७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ. ४६९.

२८. कार्यकारी संचालक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती.

२९. **लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,** ३ रा वार्षिक अहवाल, १९८५-८६, पृ. २,३,५.

सन १९९०-९१ मध्ये बँकेची एकूण सभासद संख्या १,११७ व एकूण भांडवल ५,५७,०५,००० रुपये होते. तर एकूण ठेवी ५०,३१.५० लाख रुपयांच्या होत्या. इ.स.२००४-०५ मध्ये बँकेची एकूण सभासद संख्या १,६६४ व १०४ शाखा होत्या. जिल्हा मध्यवर्ती बँकेची माहिती तक्ता क्र.१ मध्ये दिली आहे. या बँकेने केलेल्या कर्जपुरवठ्याची माहिती खाली दिली आहे.

अल्प मुदत पीक कर्ज वितरण : पीक उत्पादनासाठी अल्प मुदत पीक कर्ज वितरण करण्याची जिल्हा बँकेची मुलभूत जबाबदारी असून शेती व्यवसायातही नियोजन करून अधिक उत्पन्न देणारी पिके शेतकऱ्यांनी घ्यावीत म्हणून बँकेने प्रयत्न केले आहेत. ३० जून १९८६ अखेर ४३६.९१ लाख रूपयांचे प्रत्यक्ष कर्ज वाटप केले. त्यापैकी ६४.६० लाख रूपये ऊस पिकासाठी व उर्वरित ७२.३१ लाख रूपये खरीप पीकांसाठी वाटप केले. इ.स.१९९९-२००० मध्ये ५६७ सलग्न शेती संस्थांना ९,२३९.५३ लाख रूपये कर्ज वाटप केले होते. त्याचा तपशील खाली दिला आहे.

(रुपये लाख)

वर्ष	संलग्न शेती संस्था	कर्ज वितरण रक्कम
१९८७-८८	५१९	८,५१.७३
१९९१-९२	५६०	२५,५१.७९
१९९५-९६	५६३	५५,८०.१९
२००४-२००५ (मार्च २००५ अखेर)	५८०	६५,०१.२७

मध्यम मुदत कर्ज पुरवठा/पाणी पुरवठा योजना : जिल्ह्यात मोठ्या नद्या नसल्यामुळे शेतकरी विहिरीच्या पाण्याचा वापर शेतीसाठी करीत असत. त्यामुळे बागायती क्षेत्र अल्प होते. तथापि उपलब्ध असलेल्या नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधून दिल्यामुळे तसेच लहान व मध्यम तलाव प्रकल्प तयार झाल्यामुळे शेतीसाठी पाणी पुरवठ्याच्या क्षेत्रात वाढ झाली. शेतकऱ्यांना पाणी पुरवठ्याच्या साधनांसाठी बँकेने मोठ्या प्रमाणात कर्जाच्या विविध योजना राबविण्यास सुरुवात केल्यामुळे ओलिताखालील क्षेत्रात वाढ होण्यास मदत झाली. पाण्याचा काटकसरीने उपयोग करून उत्पादनात वाढ करता यावी म्हणून बँकेने स्प्रिंकलर ड्रीप इरिगेशन यासारख्या येाजना अमलात आणल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांना सबमर्सिबल पंप, विद्युत मोटार, पाईप लाईन खरेदीसाठी मध्यम मुदत कर्ज पुरवठा योजनेखाली ३१ मार्च १९९४ अखेर १०,६३९ सभासदांना १५,२४.०८ लाख रुपये कर्ज मंजूर केले. त्याची आकडेवारी खाली दिली आहे.

अनुक्रमणिका

(रुपये लाख)

तपशील	कर्ज मंजूरी					
	मार्च १९९४		मार्च २०००		मार्च २००४-२००५	
	सभासद संख्या	रक्कम	सभासद संख्या	रक्कम	सभासद संख्या	रक्कम
विद्युत मोटार	४,२०४	२,६४.००	६६०	७९.१९	. .	२८.३४*
पाईप लाईन	४,२०४	६,७७,७४	७३०	५,९७.२२	. .	. .
सबमर्सिबल पंप	२,२२०	५,७५.५३	. .	. .	. .	. .
ठिबक संच	११	६.८१	६	१.१८	. .	३१.८८

दीर्घ मुदत उपसा जलसिंचन योजना : जिल्ह्यातील कोल्हापुरी बंधाऱ्यात साठविलेल्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग करता यावा व शेतकऱ्यांना पाणी पुरवठा उपलब्ध करून द्यावा म्हणून प्राथमिक शेती सहकारी संस्था मार्फत मोठ्या प्रमाणातील उपसा जलसिंचन प्रकल्प सुरू करून ९ संस्थाचे (मार्च १९९४) २६२ सभासदांना २,१९.९६ लाख रुपये अर्थ सहाय्य केले. इ.स.२०००-२००१ मध्ये बँकेने पाणी पुरवठा योजनेतर्गत इलेक्ट्रिक मोटार व पाईप खरेदीसाठी कर्ज वाटप केले. त्यामुळे विविध माध्यमातून उपलब्ध होणारे पाणी शेतीसाठी वापरणे सामान्य शेतकऱ्यांनाही शक्य झाले. मार्च २००१ अखेर जिल्ह्यातील तीन उपसा जलसिंचन योजनेतील २५७ सभासदाना बँकेने कर्ज वाटप केले.[३०]

सर्वकष पीक विमा योजना : केंद्र शासन, राज्य शासन व भारतीय विमा निगम यांच्या संयुक्त विद्यमाने १९८५ पासून सर्वकष पीक विमा योजना राबविण्यास सुरुवात झाली. तथापि १९९९-२००० पासून या योजनेचे रूपांतर राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेत करण्यात आले. नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानीतून बचाव होण्यास व काही प्रमाणात कर्जभार कमी करण्यास ही योजना एक वरदानच आहे. इ.स.१९९० च्या खरीप हंगामात विविध पिकांसाठी एकूण ८८,७९९ सभासदांनी या योजनेत भाग घेतला होता. पीक कर्जाची विमा संरक्षित रक्कम १७,०१.६० लाख रुपये होती. त्यापोटी २०.९० लाख रुपये विमा हप्ता भरला होता. या वर्षी तूर पिकांसाठी नुकसान भरपाई म्हणून ०.४० लाख रुपये मिळाली.[३१] इ.स.१९९१ च्या खरीप हंगामात विविध पिकांसाठी एकूण ७१,१९७ सभासदांनी या योजनेत भाग घेतला होता. पीक कर्जाची विमा संरक्षित रक्कम १९,४४.५६ लाख रुपये होती. त्यापोटी २०.३४ लाख रुपये विमा हफ्ता भरण्यात आला. ज्वारी, भूईमूग, सुर्यफूल व तूर या पिकांसाठी जिल्ह्यात एकूण ५,९२,२२,००० रुपये पीक विमा नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळाली.[३२]

---

* यामध्ये पाईप लाईनचाही समावेश आहे.

३०. व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर यांचेकडून प्राप्त झालेली माहिती जून १९९४ व वार्षिक अहवाल, २०००-२००१, पृ. ११.

३१. लातूर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ८ वा वार्षिक अहवाल, १९९०-९१, पृ. १३.

३२. कित्ता, ९ वा वार्षिक अहवाल, १९९१-९२, पृ. १२.

ही योजना कर्जदारांना सक्तीची व बिगर कर्जदारांना ऐच्छिक स्वरूपाची आहे. इ.स.२०००-२००१ मध्ये खरीप हंगामात जिल्ह्यातील एकूण ९२,५७२ बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी १२ प्रकारच्या पिकांसाठी एकूण १,२१.३८ लाख रुपये विमा हप्ता भरला. राष्ट्रीय कृषि विमा योजनेत मोठ्या प्रमाणात शेतकरी सहभागी झाल्यामुळे खरीप पिकांना विमा संरक्षण देण्याचे कामी लातूर जिल्ह्याचा राज्यात व्दितीय क्रमांक होता. बँकेनी ९९,६५९ सभासदांच्या वतीने खरीप हंगामातील सर्व पिकांचा विमा संरक्षित करून १,३४,१०,००० रुपये विम्याचा हप्ता भरला. इ.स.२००३-०४ मध्ये बँकेने १,९९,५३४ सभासदांना ३५,२४.७४ लाख रुपये पीक विमा भरपाई दिली.

भूकंपग्रस्त भागात बँकेने केलेले कार्य : दिनांक ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या महाविनाशकारी भूकंपामुळे लातूर जिल्ह्यात अपरिमित प्राणहानी व वित्त हानी झाली. किल्लारी येथे केंद्रबिंदू असलेल्या भूकंपामुळे प्रभावित झालेली जिल्ह्यातील ६५ गावे भूकंप पिडीत गावे म्हणून शासनातर्फे घोषीत केली होती. या ६५ गावांचे कार्यक्षेत्रात ४२ विविध कार्यकारी संस्था व बँकेच्या १० शाखा होत्या. त्यापैकी किल्लारी येथील शाखा पूर्णपणे जमिनदोस्त झाली. त्यामध्ये बँकेचे दोन कर्मचारी मृत झाले. उर्वरित पाच शाखांच्या इमारतींना मोठ्या प्रमाणात तडे गेल्यामुळे व वारंवार होणारे भूकंप यामुळे या पाच शाखा अनुक्रमे रामानंदतिर्थ नगर, किल्लारी, उजनी, मातोला व जवळगा पोमादेवी या शाखा तात्पुरत्या शेडमध्ये सुरू करण्यात आल्या. भूकंपग्रस्त भागात बँकेने अल्प व मध्यम मुदत पीक कर्ज, पाईप लाईन, ट्रॅक्टर, जीप, विद्युत मोटार, दुभती जनावरे, द्राक्ष बाग व ग्रामीण कारागीर इत्यादी कारणासाठी ३१ मार्च १९९४ पर्यंत एकूण ६,१३१ सभासदांना १,१५.१९ लाख रुपये कर्ज वाटप केले. इ.स.२०००-०१ मध्ये १२,८६८ सभासदांना २४,२५.३७ लाख रुपये कर्ज वाटप केले. त्याची माहिती खाली दिली आहे.[३३]

तपशील	कर्ज वितरण			
	१९९५-९६		२०००-२००१	
	सभासद संख्या	रक्कम (लाख रुपये)	सभासद संख्या	रक्कम (लाख रुपये)
अल्प मुदत पीक कर्ज	८,९७६	५,०५.४८	१२,२६१	१९,११.८०
मध्यम मुदत कर्ज--				
पाईप लाईन	२४	७.९९	३७३	२,११.२७
सब मर्सिबल पंप	२३	६.२१	. .	. .
ट्रॅक्टर	५१	१,२१.९०	७६	२,४४.६२
जीप	१८	२८.८०	१०	२७.३५
विद्युत मोटार	२५	२.५२	१४६	२८.७३
दुभती जनावरे	६४१	३०.५०	. .	. .
द्राक्ष बागा	५	३.३६	२	१.६०
एकूण	९,७६३	७,०६.७६	१२,८६८	२४,२५.३७

३३. व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती जून १९९४ व जानेवारी २००२ आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लातूर, २१ वा वार्षिक अहवाल, २००३-२००४, पृ. १२.

बिगर शेती संस्थाना कर्ज वाटप : जिल्ह्यातील बिगर शेती व्यवसाय करणाऱ्या संस्थांना त्यांचे उद्योगाचे विकासासाठी व सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी आवश्यकतेनुसार बँकेकडून पतपुरवठा केला जातो. बँकेने मार्च १९९४ अखेर ३१८ संस्थांना ३७,१३.४१ लाख रुपये कर्ज वितरित केले. नाबार्ड व राज्य बँक यांनी ठरवून दिलेल्या निकषास अधिन राहून बँकेने राज्यातील जिल्ह्याबाहेरील सहकारी उद्योगांना सहभागी योजनतर्गत पतपुरवठा करून किफायतशीररित्या गुंतवणूक केली. राज्य सहकारी बँक जिल्ह्याबाहेरील उद्योगाच्या पतपुरवठ्यात 'लिड बँक' म्हणून काम करते व तिच्या माध्यमातून बँकेने (२०००-२००१ मध्ये) एकूण ३ सहकारी साखर कारखान्यांचे उभारणीसाठी रूपये १२ कोटीचे कर्ज मंजूर केले असून त्यापैकी २५ लाखाचा पतपुरवठा केला आहे. बँकेस राज्यात सर्व प्रथम साखर कारखाने उभारणीसाठी दीर्घ मुदती पतपुरवठा करण्यासाठी लिड बँक म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली. जिल्ह्यातील नव्याने उभारले जात असलेल्या विकास सहकारी साखर कारखाना व संत शिरोमणी मारूती महाराज सहकारी साखर कारखाना या दोन कारखान्यांसाठी 'लिड बँक' म्हणून कार्य करीत आहे. ३१ मार्च २००१ अखेर ९८ बिगर शेती संस्थाकडे ९,६६,८९,००० रुपये थकबाकी होती. या बँकेने २००३-०४ मध्ये जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील आठ साखर कारखान्यांना ४०,४९,००,००० रुपये कर्ज मंजूर करून ३७,७७,९२,००० रुपये कर्ज वाटप केले.

शासन पुरस्कृत योजना कर्ज : केंद्र व राज्य शासनाने दारिद्ररेषेखालील लाभार्थी व आर्थिक दुर्बल घटक यांचेसाठी पुरस्कृत केलेल्या विविध योजनांतर्गत जिल्ह्यातील लाभार्थीना कर्ज पुरवठा करून अनुदानाचा लाभ मिळवून देण्यासाठी बँक प्रयत्नशील असते. शासनाने स्वर्ण जयंती ग्राम स्वंयम् रोजगार योजनेतंर्गत लाभार्थीना वैयक्तिक व त्याचे समूह गटांना दुभती जनावरे, ट्रॅक्टर, विद्युत मोटार व पाईप खरेदीसाठी कर्जाचे वाटप केले जाते. शासन पुरस्कृत योजनांतर्गत कर्ज वाटपाचे शासकीय उद्दिष्ट दरवर्षी शासनाकडून ठरवून देण्यात येते. ते पूर्ण करण्यास बँक नेहमीच प्रयत्नशील असते. दि.३१ मार्च २००५ अखेर या योजनेतंर्गत दिलेल्या कर्जापैकी ६९ लाख रुपये येणे बाकी होते.

महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँक (भुविकास बँक) : तत्कालीन उस्मानाबाद व बिदर जिल्ह्यात एकाचवेळी दोन प्राथमिक भू तारण बँकाची स्थापना झाली. दिनांक ८ जानेवारी १९५६ रोजी उस्मानाबाद जिल्ह्यात, तर त्याचवेळी म्हणजे दिनांक १६ जानेवारी १९५६ रोजी उदगीर येथे (त्यावेळी उदगीर बिदर जिल्ह्यात होते.) या दोन्ही संस्थांची नोंदणी एकाचवेळी तत्कालीन हैद्राबाद राज्यात झाली. उस्मानाबाद बँकेचे कार्यक्षेत्र उस्मानाबाद, उमरगा, तुळजापूर, कळंब, परंडा व भूम तालुक्यात, तर उदगीर बँकेचे कार्यक्षेत्र उदगीर, लातूर, औसा, निलंगा व अहमदपूर या तालुक्यांमध्ये करण्यात आले. प्रारंभीच्या काळात या बँकेने तगाई कर्जे दिली.[३४] त्यानंतर जमीन खरेदी, सावकारांचे कर्ज

३४. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ. ४६७.

फेडणे यासाठी कर्जे दिली. या बँकेने नंतर नवीन विहिरी खोदणे, जुन्या विहिरींची दुरुस्ती, तेलयंत्रे, पंपिंग सेटस, पाईपलाईन्स इत्यादीसाठी कर्जे देण्यास प्रारंभ केला. १९५६ मध्ये राज्य पुनर्रचनेनंतर १९६० साली महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा लागू करण्यात आला आणि या बँकेचे नाव "भूविकास बँक" असे करण्यात आले. दीर्घ मुदतीचे कर्ज प्राध्यान्याने वैयक्तिक प्रकरणात देणारी ही एकमेव बँक त्यावेळी असल्यामुळे ती शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली. या बँकेच्या कर्जाचा बहुसंख्य शेतकऱ्यांनी फायदा घेतला.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर या बँकांनी सुमारे तीन कोटी रुपयांची दीर्घ मुदतीची कर्जे शेतकऱ्यांना देऊन जिल्ह्यातील शेती विकासाला आणि शेती उत्पादनवाढीला चांगलाच हातभार लावला.[३५] १९६०-६१ मध्ये बँकेची एकूण सभासद संख्या १३,९५० भरणा झालेले भागभांडवल रु.३.१४ लाख व खेळते भांडवल रु.४९.४९ लाख होते. याच वर्षी या बँकांनी रु.५.४५ लाखांचे कर्जवाटप केले.[३६] १९६६ मध्ये तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात या दोन्ही बँकाच्या एकूण ११ शाखा कार्यरत होत्या. १९६६-६७ मध्ये या बँकांनी एकूण रु.४३,०५,३००-०० चे कर्जवाटप केले.[३७]

राज्य शासनाच्या मे १९७३ च्या अध्यादेशाव्दारे सर्व प्राथमिक भूविकास बँकांचे राज्य सहकारी भूविकास बँकेत विलीनीकरण करण्यात आले, व या बँकचे नाव "महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँक" असे करण्यात आले. १९७५ साली या बँकेने जागतिक बँकेच्या आंतरराष्ट्रीय विकास यंत्रणेशी करार करून कृषी विकासाचे विविध प्रकल्प राबविण्यास प्रारंभ केला. त्यामुळे शेती विकासाच्या क्षेत्रात नवीन संकल्पना आल्या. शास्त्रशुध्द पायावर, उत्पादनाभिमुख कर्ज वाटपाची पध्दत स्वीकारण्यात आली. याच काळात म्हणजे १९७२ च्या सुमारास रिझर्व बँकेने कृषी विकासासाठी पुनर्वित्त देण्यासाठी कृषी पुनर्वित्त महामंडळाची म्हणजे ए.आर.डी.सी.ची स्वतंत्र यंत्रणा म्हणून स्थापना केली. १९८२ मध्ये याच महामंडळाचे रूपांतर स्वतंत्र केंद्रिय कायद्याने "राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेत" करण्यात आले. त्या अनुषंगाने दिनांक १ जुलै १९८८ पासून भूविकास बँकेचे नाव "महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक" असे करण्यात आले. म्हणजेच कृषी विकासाबरोबर ग्रामीण विकासाची जबाबदारी या बँकेवर सोपविण्यात आली. दिनांक १ ऑक्टोबर २००१ पासून पुन्हा ही बँक जिल्हा पातळीवर स्वतंत्रपणे नोंदविण्यात येऊन या बँकेचे नाव "लातूर जिल्हा प्राथमिक बहुउद्देशिय कृषी व ग्रामीण विकास बँक" असे करण्यात आलेले आहे. लातूर जिल्ह्याच्या निर्मितीपासून उदगीर येथे असलेली ही बँक आपोआपच लातूर जिल्ह्यासाठी कार्यरत झाली. नावातील वरील बदलानंतर या बँकेमार्फत कृषी विकासासाठी पूर्विच्या कारणांसह इतर अनेक कारणांसाठी कर्जे देण्यात येऊ लागली. त्यामध्ये शेतीच्या यांत्रिकीकरणासाठी हलयंत्रे, (ट्रॅक्टर) मळणीयंत्रे, क्रशर, थ्रेशर, विविध पिकांसाठी पाणी देता यावे म्हणून वैयक्तिक व सामुदायिक पाणीपुरवठा व उपसाजलसिंचन योजना, ठिंबक सिंचन, विविध प्रकारच्या फळबागांसाठी कर्जे ज्यात प्रामुख्याने द्राक्षबागा, डाळिंबाच्या बागा, पेरुच्या बागा इत्यादींचा समावेश होता. कोरडवाहू शेती किफायतशीर व्हावी यासाठी

३५. **योजनेने आपल्यासाठी काय केले ?** उस्मानाबाद जिल्हा, १९६६, पृ. २६-२७.

३६. **डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबूक,** उस्मानाबाद जिल्हा, १९६१, पृ. ४०.

३७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४६७-६८.

शेतीसाठी पूरक व्यवसायांना म्हणजे दुग्ध व्यवसायासाठी संकरित गाई व म्हशींना मेषपालन, बकरीपालन, वराहपालन, कुककुटपालन, मधुमक्षिकापालन इत्यादीसाठी कर्जे देण्यात आली. गोबरगॅससाठी कर्जे वितरित करून इंधनाचा व वीजेचा प्रश्न काही प्रमाणात सोडविण्यास मदत झाली. याच काळात मार्केट यार्डाचा विकास तसेच गावपातळीवरील सेवा सोसायटया, खरेदी विक्रीसंघ आणि सहकारी साखर कारखान्यांना एन.सी.डी.सी. योजनेअंतर्गत गोदामांची बांधकामे करण्यासाठी वित्त पुरवठा करण्यात आला. राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेने मान्य केलेल्या विविध २२ प्रकारच्या कुटीरोद्योगांना कर्जे मंजूर करण्यात आली. याचा परिणाम म्हणून जिल्ह्यातील शेती व ग्रामीण विकासाला चांगली चालना मिळाली.

या बँकेने लातूर जिल्ह्यात १९९५-९६ मध्ये ९९६ सभासदांना १००.३८ लाख रुपये कर्जवाटप केले आहे. इ.स. १९८३-८४ ते २००४-०५ या कालावधीत केलेल्या कर्जवाटपासंबंधी माहिती खाली दिली आहे.

(रुपये लाख)

तपशील	१९८३-८४	१९९२-९३	२००४-२००५
एकूण शाखा	. .	. .	५+१
एकूण सभासद	३३,९२२	४१,१९२	४३,७५४
भाग भांडवल	९७.०६	१,५१.३१	१,७३.६५
खेळते भांडवल	. .	. .	४७,०३.९६
ठेवी	. .	१,५३.०५	. .
मध्यम मुदतीची कर्जे	३,४८.७८	१,४७.१०	. .
दीर्घ मुदतीची कर्जे	७,४९.४४	१६,३७.१२	२८,६७.५५
वसूल झालेली कर्जे	१८,१२.०५	. .	१,६०.५८
थकित कर्जे	५९.९३	१,७०.७१	४,४६.२८

या बँकेने लातूर जिल्ह्यात १९८५-८६ मध्ये ९९६ सभासदांना १००.३८ लाख रुपये कर्ज वाटप केले होते. बँकेने दिलेल्या कर्जाची माहिती खाली दिली आहे.[३८]

वर्ष	सभासद	कर्ज पुरवठा (लाख रु.)
१९८७-८८	५३८	५२.७५
१९८९-९०	८१८	१,१२.३९
१९९१-९२	१,१३५	३,४९.५१
१९९३-९४	१,१८३	३,८५.६०
१९९५-९६	६८२	३,८०.५८
१९९९-२०००	२०	२.२४
२०००-२००१	०३	१२.१६

३८. जिल्हा शाखा व्यवस्थापक, म.रा.स.ग्रा.कृ. व ग्रा.वि.बँक मुंबई, शाखा उदगीर, यांच्याकडून प्राप्त झालेली माहीती, डिसेंबर १९९४ व जानेवारी २००२.

नागरी सहकारी बँका : नागरी बँकांचा मुख्य उद्देश सभासदांना व्यापारासाठी भांडवल उपलब्ध करून देणे. मालमत्ता खरेदीसाठी, लग्नकार्य, शिक्षण, इत्यादीसाठी कर्ज पुरवठा करणे हा आहे. या बँका शेतीसाठी देखील कर्ज पुरवठा करतात.

उस्मानाबाद जिल्ह्यात १९६०-६१ मध्ये एकूण १९ नागरी बँका व पतपेढ्या होत्या. त्यापैकी एक नागरी बँक, दोन नागरी पतपेढ्या व १६ वेतनदारांच्या सहकारी संस्था होत्या. त्यांची एकूण सभासद संख्या ४,६६२, भरणा झालेले भाग भांडवल १.२९ लाख रुपये व खेळते भांडवल ४.०८ लाख रुपये होते. या सहकारी संस्थांनी ८५,००० रुपये कर्ज वाटप केले होते.[३९] लातूर जिल्हा निर्मितीनंतर १९८४-८५ मध्ये जिल्ह्यात दोन नागरी सहकारी बँका होत्या. त्यांची सभासद संख्या ९,१६३ होती. जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची माहिती खाली दिली आहे.

(रुपये लाख)

तपशील	१९९०-९१	२००४-२००५
संस्था	२	१९
सभासद	१५,४४८	७०,१६६
वसूल भाग भांडवल	४२.३६	३८,४१.२२
राखीव निधी	२२.४०	१४,८५.७८
इतर निधी	३७.०२	४,९६.८१
ठेवी	११,०९.३१	२,४०,८९.०७
दिलेली कर्जे	१,५४.६८	१,३५,४२.०१
येणे कर्ज	७,९९.७७	१,३५,४२.०१
थकबाकी	२,७८.२०	११,१०.६३
नफा	१५.०९	२,९३.६१

लातूर जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या १९ नागरी सहकारी बँकांची ३१ मार्च २००६ ची माहिती खालीलप्रमाणे आहे.

३९. **डिस्ट्रिक्ट सेन्सस् हँडबूक,** उस्मानाबाद, १९६१, पृ. ४०.

(लाख रुपये)

अ.क्र.	बँकांची नावे	भाग भांडवल	निधी	ठेवी	कर्ज	नफा/तोटा
१	भिमाशंकर नागरी सहकारी, औसा.	१६.०५	०.१०	७६.७५	७२.८३	२.९५
२	डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी, निलंगा	२८.०४	१३१.६६	६१८.४६	४८७.४१	१०.९३
३	इंदिरा महीला सहकारी, लातूर	३१.३२	३८.०२	३९३.५७	२६३.१८	६.०४
४	जीजामाता महीला सहकारी, लातूर	१५.०३	१.४५	१५.०३	१४.२३	९.११
५	केदारनाथ अर्बन को-ऑप., लातूर	३६.१४	२९.९१	७७४.८९	४५१.२७	७२८.००
६	लातूर अर्बन को-ऑप., लातूर	१५४.८०	२८५.९३	५,०८०.७९	३,४१६.८८	७५.३९
७	लक्ष्मी अर्बन को-ऑप., लातूर	६५.०२	११९.७७	१,७४५.८५	१,१५६.७९	८.७३
८	महेश अर्बन को-ऑप., अहमदपूर	१९८.०३	३७४.२५	३,६१९.०४	२,७४९.९०	७९.३५
९	महाराष्ट्र नागरी सहकारी, लातूर	९९.९४	१६.६५	१,८८७	१,२२०.००	४.७७
१०	प्रियदर्शनी महीला सहकारी, लातूर	५४.६०	२४६.९५	१०५०.५४	७२४.०७	२६८.३८
११	राजीव गांधी सहकारी, लातूर	२८.०९	१.२७	३४६.४८	१९८.०९	१४.०९
१२	सहयोग अर्बन को-ऑप., उदगीर	६२.२७	४२.१८	१,५५९.०७	१,१६७.३७	१९.७९
१३	साईबाबा जनता सहकारी, लातूर	५१.७५	३४९.३३	७५३.५४	५६६.५३	१.१७
१४	सिध्देश्वर सहकारी, लातूर	२०५.११	८६१.२०	५००३.८८	३५३०.७४	३०.५२
१५	उदगीर अर्बन को-ऑप., उदगीर	५५.९७	४१.१०	१,०७८.७५	७६८.७८	१४.७५
१६	विठ्ठल नागरी सहकारी, लातूर	५९.२९	१४३.५४	२,३०७.६०	१,७१४.७१	१७.९७
१७	विकास नागरी सहकारी, लातूर	१३०.५६	१७.७५	७५६.८४	४२५.०६	१७.९७
१८	यशवंत नागरी सहकारी, लातूर	३३.१६	. .	२७३.८३	१४६.०५	४५.८१
१९	यशवंत अर्बन को-ऑप., उदगीर	४४.००	५२.४६	६३२.३६	४४१.५६	७.३७

(आधार:-जिल्हा उपनिबंधक को-ऑपरेटिव्ह सोसायटी लातूर यांनी पुरविलेल्या माहिती आधारे).

अनुक्रमणिका

प्राथमिक कृषि पतसंस्था : या संस्था बहुतांश ग्रामीण भागात असून शेतकरीच त्यांचे सभासद असतात. या पतसंस्थांचा मुख्य उद्देश शेतकरी सभासदांना बी-बियाणे, खते, कीटकनाशके, कृषी अवजारे, बैल व बैलगाड्या, इत्यादी खरेदीसाठी कर्ज पुरवठा करणे असल्यामुळे त्यांना शेतकरी सहकारी पतपेढ्या किंवा बहुउद्देशीय सेवा संस्था असेही म्हणतात. अशा संस्था आपले भांडवल निधी प्रामुख्याने जिल्ह्यातील मध्यवर्ती पतसंस्थेकडून उभा करतात. पहिली शेतकी पतसंस्था विळेगाव येथे १९३९ मध्ये स्थापन झाली.

इ.स.१९५०-५१ मध्ये जिल्ह्यातील १३९ शेती पतसंस्थाची सभासद संख्या ३,४६३ होती. या वर्षी त्यांचे भाग भांडवल ०.७१ लाख रुपये व खेळते भांडवल ३.१० लाख रुपये होते. इ.स.१९६०-६१ मध्ये अशा संस्थांची संख्या ९१३ व सभासद संख्या ५४,८३३, भाग भांडवल ३२.०२ लाख रुपये व खेळते भांडवल १,१८.२८ लाख रुपये होते. यावरून गेल्या दहा वर्षात अशा संस्थांच्या संख्येत व सभासद संख्येत वाढ झाल्याचे दिसून येते.[४०]

लातूर जिल्ह्याची (१९८२) निर्मिती झाल्यानंतर १९८२-८३ मध्ये प्राथमिक कृषी पतसंस्थांची एकूण संख्या ५६५ व सभासद संख्या १,५१,६७२ होती. या पतसंस्थांनी १९८२-८३ मध्ये अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीची ३,६०.७९ लाख रुपये कर्जे मंजूर केली होती. इ.स.१९९०-९१ मध्ये जिल्ह्यातील ५६८ संस्थाची सभासद संख्या २,०४,५९६ होती. या वर्षी ३५,४५.३५ लाख रुपयांची कर्जे मंजूर केली. त्यापैकी २८,८९.८४ लाख रुपये पीक कर्जे होती. या पीक कर्जापैकी ६२ टक्के कर्ज अन्नधान्य पिकाकरिता होते. जिल्ह्यातील प्राथमिक कृषी पतसंस्थांची माहिती खाली दिली आहे.

(रुपये हजार)

तपशील	१९९५-९६	२००३-२००४	२००४-२००५
संस्था	५७२	५८०	५८४
सभासद	२,८०,१८५	२५४,४६८	४४५,९९७
भाग भांडवल	११,३७,९२	१६,१९,६५	१७,०७,१४
शासकीय भाग भांडवल	३८,६१	१,५५,३४	८३,११
राखीव व इतर निधी	४०,१९	५३,३०	. .
खेळते भांडवल	१,१२,९७,१६	१,८३,०३,७३	१,२२,८१,२१
एकूण दिलेली कर्जे	६४,१३,८७	१,४१,६३,६८	१,३३,२३,४३
वसुल झालेली कर्जे	५७,४५,९९	५५,०८,३५	६९,२५,९२
येणे कर्ज	८०,५१,८८	९,११,८७,६९	८४,६०,११
नफा संस्था (संख्या)	२७३	१५९	१७०
तोटा संस्था (संख्या)	२९९	४२१	४१४
शेती उपयुक्त वस्तूंचे वाटप	. .	२७,२२	२८,०३

४०. **डिस्ट्रिक्ट सेन्सस् हँडबूक,** उस्मानाबाद, १९६१, पृ. ४२.

अनुक्रमणिका

बिगर शेतकी पतसंस्था

पगारदारांच्या सहकारी संस्था : उस्मानाबाद जिल्ह्यात १९६०-६१ मध्ये १६ पगारदारांच्या सहकारी संस्था होत्या. इ.स.१९६२-६३ मध्ये त्यांची संख्या १८ झाली. या वर्षी त्यांची सभासद संख्या १,०२७ होती.

लातूर जिल्हा निर्मितीनंतर जून १९८३ मध्ये जिल्ह्यात त्यांची संख्या १११ व भाग भांडवल ६९.२७ लाख रुपये होते. जून १९९० मध्ये या संस्थांची संख्या १४६ व सभासद संख्या २३,६४५ होती.

शेतकी बिगर पतसंस्था : या संस्थामध्ये प्रामुख्याने दुग्धव्यवसाय संस्था, मच्छीमार संस्था व कुक्कुट पालन संस्थांचा समावेश होतो. या संस्थांची माहिती तक्ता क्र.२ ते ४ मध्ये दिली आहे.

बिगर शेतकी बिगर पतसंस्था

विणकर सहकारी संस्था : तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात १९६०-६१ मध्ये २१ विणकरी सहकारी संस्था होत्या. त्यापैकी ९ हातमाग विणकर संस्था, १० लोकर विणकर संस्था व दोन खादी विणकर सहकारी संस्था होत्या. त्यांची एकूण सभासद संख्या २,६३७, भाग भांडवल ४५,००० रुपये व खेळते भांडवल २.७२ लाख रुपये होते.[४१] लातूर जिल्हा निर्मितीनंतर १९८२-८३ मध्ये लातूर जिल्ह्यात एकूण ९ हातमाग संस्था व सभासद २४७ होते. इ.स.१९९३-९४ मध्ये या संस्थांची सभासद संख्या ५५८ झाली. जिल्ह्यातील विणकर सहकार संस्थांची माहिती खाली दिली आहे.

(रुपये हजार)

तपशील	हातमाग सहकारी संस्था		यंत्रमाग सहकारी संस्था
	१९८२-८३	१९९२-९३	२००३-२००४
संस्था	९	९	३
सभासद	२७४	५५८	७६
भाग भांडवल	१५२	५९	११
खेळते भांडवल	४२०	२९२	७
राखीव व इतर निधी	३९	२४	१
कामगारांची संख्या	१३	१३	--
कामगारांना दिलेले वेतन	६४	. .	. .
उत्पादनांची किंमत	१,७०	. .	. .
विक्री किंमत	१,७०	. .	. .
कच्च्या मालाची किंमत	१,०५	. .	. .
निव्वळ नफा	०५	. .	. .
मागांची संख्या	१८	. .	. .

४१. **डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबूक,** उस्मानाबाद जिल्हा, १९६१,पृ. ४३

कुंभारकाम सहकारी संस्था : जिल्ह्यातील पहिली कुंभारकाम सहकारी संस्था १९५८ मध्ये खाडगांव येथे स्थापन झाली.[४२] इ.स.१९८२-८३ मध्ये जिल्ह्यात असलेल्या ५ कुंभारकाम सहकारी संस्थांची संख्या १९९३-९४ मध्ये १३ झाली. जिल्ह्यातील कुंभारकाम सहकारी संस्थाची माहिती खाली दिली आहे.

(रुपये हजार)

तपशील	१९८२-८३	१९९३-९४	१९९७-९८
संस्था	५	१३	१०
सभासद	१०७	५३७	३९६
भाग भांडवल	२५	३,११	३,१५
खेळते भांडवल	६०	१२,३१	१३,५०
राखीव व इतर निधी	१०	२,१६	२
कामगारांची संख्या	५	२६	१०५
कामगारांना दिलेले वेतन	५	८८	३२
उत्पादनांची किंमत	६०	१,७६	३,१९
विक्री किंमत	६०	७६	. .
कच्च्या मालाची किंमत	३५	१,३०	१,६५
निव्वळ नफा	१०	१६	१४

चर्मोद्योग सहकारी संस्था : लातूर जिल्हा निर्मितीनंतर एकलव्य लेदर गुडस ही पहिली सहकारी संस्था १४ सप्टेंबर १९८५ रोजी स्थापन झाली. इ.स. १९९३-९४ मध्ये अशा संस्थांची संख्या चार होती. चर्मोद्योग सहकारी संस्थांची माहिती खाली दिली आहे.[४३]

(रुपये हजार)

तपशील	१९९३-९४	२००२-२००३
संस्था	४	१
सभासद	४८	११
भाग भांडवल	६	. .
खेळते भांडवल	११	१
कामगारांची संख्या	४	८
कामगारांना दिलेले वेतन	. .	. .
उत्पादनाची किंमत	१	. .
विक्री किंमत	१	. .
कच्च्या मालाची किंमत	१	. .

४२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर.
४३. कित्ता.

कातडी कमविणाऱ्या सहकारी संस्था : लातूर जिल्हा निर्मितीनंतर १७ जुलै १९८४ रोजी लातूर येथे सुरू झालेली मागासवर्गीय चर्मोद्योग सहकारी संस्था ही जिल्ह्यातील पहिली संस्था होय. इ.स. १९९३-९४ मध्ये अशा संस्थांची संख्या चार व सभासद संख्या २६५, भाग भांडवल २०,००० रुपये व खेळते भांडवल ४२,००० रुपये होते. या वर्षी संस्थांना तीन हजार रुपये नफा झाला होता.[४४] इ.स.२००४-०५ मध्ये जिल्ह्यात एक संस्था कार्यरत होती व तिची सभासद संख्या १६ व भाग भांडवल ७,००० रुपये होते.

याव्यतिरिक्त जिल्ह्यात मजूर संस्था, गृहनिर्माण संस्था, वाहतूक संस्था व सहकारी औद्योगिक वसाहती असून त्यांची माहिती तक्ता क्रमांक ५ ते ८ मध्ये दिली आहे.

उद्योगांना आर्थिक सहाय्य

उद्योगांचे विकेंद्रीकरण व ग्रामीण भागात औद्योगीकरणाचा वेग वाढविण्यासाठी शासनातर्फे विविध योजना राबविण्यात येतात. जिल्हा पातळीवर नवीन उद्योग सुरू करणे, जून्या उद्योगांचा विकास करणे, लघु उद्योजकांना भांडवल मिळवून देण्यासाठी वित्तीय महामंडळे तसेच औद्योगिक आधारभूत गरजा उपलब्ध करून देणारी महामंडळे स्थापन झालेली आहेत. त्यांच्या कार्याचा आढावा खाली दिला आहे.

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ : हे महामंडळ उत्पादक काम करणाऱ्या सार्वजनिक उद्योग समुहास, सहकारी औद्योगिक संस्थेस व खाजगी उद्योजकांना कर्ज देण्यासाठी १९६२ मध्ये स्थापन करण्यात आले.[४५]

इ.स.१९८२ ते २००१ या कालावधीत महामंडळाने लातूर जिल्ह्यातील उद्योगांना दिलेल्या अर्थसहाय्याची माहिती खाली दिली आहे.[४६]

(रुपये हजार)

वर्ष	आलेल्या अर्जाची संख्या	मंजूर अर्ज	मागणी रक्कम	मंजूर रक्कम	वितरित केलेली रक्कम
१९८२-८३	५९	४५	७७,०८	७०,९१	१,०९
१९८५-८६	२३	१४	१५०,०४	७२,८६	७४,८०
१९९०-९१	४	४५	१५३,९०	१४५,०६	९०,८८
१९९५-९६	१७	१७	१८६,९०	१७६,७३	९६,९३
२०००-२००१	६	६	७०,८६	३९,९७	४२,८०

महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सिकॉम) : औद्योगीककरण व औद्योगिक क्षेत्रे निर्माण करण्यासाठी विकास पतपेढी म्हणून या महामंडळाची स्थापना ३१ मार्च १९६६ रोजी करण्यात आली. या महामंडळाने लातूर जिल्ह्यात ३१ मार्च १९९४ पर्यंत ९ उद्योगांना

४४. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर.
४५. राज्य सार्वजनिक उपक्रमांचे कार्य, १९९८-९९, पृ. २८३.
४६. शाखा व्यवस्थापक, महावित्त, लातूर, १२ डिसेंबर २००१.

१५५ लाख व १९९९-२००० मध्ये एका उद्योगास ५० लाख रुपयांचे अर्थसहाय्य दिले होते. महामंडळाने उद्योग घटकांना दिलेल्या आर्थिक सहाय्याची माहिती खाली दिली आहे.[४७]

(रुपये लाख)

वर्ष	मंजूर		वितरित रक्कम	
	घटक	रक्कम	घटक	रक्कम
१९९५-९६	. .	. .	२	६४
१९९६-९७	१	४७	. .	४७
१९९८-९९	१	५०	. .	. .

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ : औद्योगिक क्षेत्रे विकसित करून उद्योजकांना भूखंडाचे वितरण करणे हे या महामंडळाचे प्रमुख कार्य आहे. महामंडळाची औद्योगिक वसाहत लातूर येथे १९७३ मध्ये स्थापन झाली. या वसाहतीसाठी महामंडळाने २६३.२६ हेक्टर जमीन संपादन केली होती. परंतु उद्योजकांची वाढती मागणी लक्षात घेऊन १०७३.८३ हेक्टर जमीन संपादीत करून अतिरिक्त औद्योगिक वसाहतीची स्थापना केली. औसा, निलंगा व अहमदपूर येथे औद्योगिक वसाहती स्थापन करण्यात आल्या. महामंडळ वसाहतींच्या भूखंडांचा तपशील (२००४-०५) पुढीलप्रमाणे आहे.

औद्योगिक वसाहत	क्षेत्र (हेक्टर)	विकसित भूखंड वाटप केलेले (हेक्टर)	भूखंड	वाटपास उपलब्ध भूखंड
लातूर	२३६.२६	७९१	७८३	८
लातूर अतिरिक्त	१०७३.८३	२५४	१६०	९४
औसा	८२.५५	१२४	१०२	२२
निलंगा	१७.७५	३३	२८	५
अहमदपूर	२०.००	२१	१३	८

मराठवाडा विकास महामंडळ : सुशिक्षित बेरोजगारांना उद्योग सुरू करण्यासाठी वीज भांडवल उपलब्ध करून दिले जाते. तसेच विक्रीकर सूट योजनेनुसार आर्थिक सहाय्य, सर्वकष प्रोत्साहन योजनेनुसार अर्थसहाय्य आणि खास भांडवल प्रोत्साहन योजनेनुसार अर्थसहाय्य दिले जाते. इस.२००१-०२ मध्ये सर्वकष प्रोत्साहन योजनेनुसार महामंडळाने ३७.९२ लाख रुपये अनुदान दिले. महामंडळाने सर्वकष प्रोत्साहन योजनेनुसार दिलेल्या कर्जाची व अनुदानाची माहिती खाली दिली आहे.[४८]

४७. व्यवस्थापक, सिकॉम, लि., मुंबई.

४८. व्यवस्थापक, मराठवाडा विकास महामंडळ, औरंगाबाद, यांच्याकडून प्राप्त (मार्च, १९९९ व फेब्रुवारी, २००३).

(रुपये लाख)

योजनेचे नाव	सहाय्य मिळालेल्या उद्योग घटकांची संख्या	मदत कर्ज	अनुदान	एकूण
सप्रोयो ७९ (१९८३-८४ ते १९८९-९०)	१६७	३७.६०	२.७८	४०.३८
सप्रोयो ८३ (१९८४-८५ ते १९९५-९६)	१२९	. .	१,०६.४३	१,०६.४३
सप्रोयो ८८ (१९८९-९० ते १९९७-९८)	२०७	. .	७,६१.०३	७,६१.०३
सप्रोयो १९९७-९८	२१	. .	३१.५१	३१.५१
१९९८-९९	२२	. .	२१.५५	२१.५५
१९९९-२०००	१०	. .	०५.०२	०५.०२
२००१-२००२	१६	. .	३७.९२	३७.९२

तसेच या महामंडळाने १९८५-८६ ते १९९६-९७ या कालावधीत जिल्ह्यातील १,००० सुशिक्षित बेकार तरुणांना १,४७.०३ लाख रुपये बीज भांडवल उपलब्ध करून दिले होते. त्याचा तपशील खाली दिला आहे.

वर्ष	लाभार्थी	बीज भांडवल (रुपये लाख)
१९८५-८६	९९	५.००
१९८६-८७	१३०	१३.००
१९८७-८८	७८	८.५०
१९८८-८९	८६	१०.००
१९८९-९०	१०२	१३.८१
१९९०-९१	१७०	३४.००
१९९१-९२	१३६	२५.००
१९९२-९३	१०७	१६.५०
१९९३-९४	८५	१७.०२
१९९४-९५	१	०.६३
१९९५-९६	४	०.५७
१९९६-९७	२	३.००

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ : इ.स.१९९७-९८ मध्ये या महामंडळाने लातूर जिल्ह्यातील लघुउद्योजकांच्या २,५६.०० लाख रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली होती. तसेच १९९५ ते १९९८ या कालावधीत जिल्ह्यातील सात लघुउद्योगास ४९.९५० मे.टन (आयर्न ॲण्ड स्टील) कच्चा माल पुरविला होता. महामंडळाने जिल्ह्यात केलेल्या कार्याचा तपशील खाली दिला आहे.[४९]

४९. प्रमुख (प्रशासन), महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ, मुंबई, (डिसेंबर, २००१)

लघुउद्योग विकास महामंडळाने जिल्ह्यातील लघुउद्योजकांना पुरविलेला कच्चा माल खालीलप्रमाणे होता.

वर्ष	कच्च्या मालाचे नांव	परिमाण (मे.टन)	लाभार्थी उद्योग (संख्या)
१९९५-९६	आयर्न ॲण्ड स्टील	१४.८८१	३
१९९६-९७	आयर्न ॲण्ड स्टील	२६.५८५	३
१९९७-९८	आयर्न ॲण्ड स्टील	८.४८४	१

महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ : पशुधनांचा विकास करण्यासाठी आणि मेंढपाळ जमातीची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी या महामंडळाची १९७८ मध्ये स्थापना करण्यात आली.

लातूर जिल्ह्यात १९९०-९१ व १९९२-९३ मध्ये अनुक्रमे २४ मे.टन व २५ मे.टन लोकर उत्पादन व अनुक्रमे १०५०.९५ लक्ष लि. व ११८२.७८ लक्ष लि. दुध उत्पादन झाले.

महिला आर्थिक विकास महामंडळ : गरजू निराश्रीत महिलांना योग्य तो मोबदला व स्वयंरोजगार मिळवून देण्याच्या कामी मदत करण्याकरिता २४ फेब्रुवारी १९७५ मध्ये या महामंडळाची स्थापना झाली. या महामंडळाने जागतिक बँकेच्या सहाय्याने लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्त महिलांचे पूनर्वसन करण्याचे काम सप्टेंबर १९९५ मध्ये सुरू केले. राज्य शासनाने भूकंप पुनर्वसन कार्यक्रम लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यात राबविण्यासाठी १,००,००,००० रुपये दिले.[५०]

भूकंपाच्या नैसर्गिक आपत्तीमुळे लातूर जिल्ह्यातील महिलांची आर्थिक, सामाजिक व मानसिक स्थिती विस्कळीत झाली होती. म्हणून त्यांना स्वत:ची जाणीव करून देऊन जगण्याची इच्छा वृद्धींगत करण्यासाठी स्वयंसहाय्य बचत गटाची स्थापना करून त्यांना संघटीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सुरूवातीस बचत गटामध्ये महिला फक्त बचत करीत होत्या. त्यानंतर गटातून कर्ज घेऊन आपल्या दैनंदिन गरजा भागवू लागल्या. काही महिलांनी गटांमधून कर्ज घेऊन किराणा दुकान, बांगडी व्यवसाय, कापड दुकान, चहाचे दुकान, मिरची कांडप मशीन, चक्की व इतर पारंपरिक व्यवसाय सुरू केले.

बचत गटाची स्थिती

एकूण गट (एप्रिल १९९९)	एकूण बचत (रुपये)	कर्ज घेतलेल्या महिलांची संख्या	बचत गटांतर्गत झालेला कर्ज व्यवहार (रुपये)
२३२	१५,३०,४२०	१,३३६	१९,६३,९३३

महिला स्वावलंबन निधी : महिलांना काहीही तारण न ठेवता अत्यंत अल्प व्याजावर, कोणत्याही अटी वा नियमांची अडचण न येता त्यांना अर्थ सहाय्याची गरज भागविण्यासाठी

५०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, माविम मुंबई (एप्रिल, १९९९) यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती.

महिला स्वावलंबन निधी ची १९९८ मध्ये स्थापना करण्यात आली. हा फिरता निधी असून राष्ट्रीय महिला कोषाप्रमाणे आखण्यात आला. त्याच्या अंमलबजावणीसाठी एक संस्था नोंदणीकृत केलेली आहे. ही योजना फक्त लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील भूकंपग्रस्त महिलांकरिता असून सदर योजनेकरिता २,४०,००,००० रुपये प्राप्त झाले. या निधी अंतर्गत महिलांना अत्यंत अल्प व्याजावर (१३ टक्के प्रतिवर्ष) अल्प व दीर्घ मुदतीसाठी अर्थ सहाय्य देण्यात येते. या निधीतून दोन टप्प्यात एकूण ३१,४९,९१५ रुपये वाटप करण्यात आले. त्याचा तपशील खाली दिला आहे.

टप्पा	एकूण गट	एकूण रक्कम (रुपये)	अर्थसहाय्याचा उद्देश
पहिला	८६	२३,९३,०००	उद्योग, व्यवसाय सुरू करण्यासाठी
दुसरा	६०	७,५६,९१५	खते, बि-बीयाणेसाठी

मध्यवर्ती वित्त संस्था : लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मध्यवर्ती वित्त संस्था म्हणून कार्य करते. या बँकेने जिल्ह्यात १९८५-८६ मध्ये २,४९.५७ लाख रुपये कर्ज वाटप केले. इ.स.१९९०-९१ मध्ये विविध कारणांसाठी १४,२९.३२ लाख रुपये मध्यम मुदतीचे कर्ज वितरित केले. बँकेने दिलेल्या कर्जाची माहिती खाली दिली आहे.[५१]

(रुपये लाख)

तपशील	१९९५-९६	२०००-२००१	२००४-२००५
मध्यम मुदत कृषी कर्ज			
इलेक्ट्रिक मोटार	८७.८२	३,३३.८१	२८.३४
पाईप लाईन	२,८४.२३	२०,७९.३७	. .
सबमर्सिबल पंप	२,०८.२८	१३.७६	. .
द्राक्ष मंडप	५२.८३	५०.३८	३५.९२
ड्रीप	. .	. .	३१.८८
लिफ्ट इरिगेशन	२,२९.३१	२,२७.५७	०.०७
ट्रॅक्टर	६,४४.००	१३,७२.८५	१७.७५
ड्रीप	३,०२.४२	२,९१.१५	. .
फलोत्पादन	१३.१४	१.७३	. .
रेशिम उद्योग	१०.०४	०.०६	. .
दुभती जनावरे	२,३२.९४	१,६३.००	२१.८८
सा.का.भाग भांडवल खरेदी	१,८८.३८	१,४१.७६	. .
रुपांतर कर्जे	. .	७,९७.१०	९७,७३.११

५१. व्यवस्थापक, कर्जे नियंत्रण, लातूर जिल्हा म.स.बँ.लातूर यांच्याकडून प्राप्त झालेली माहीती. (जून १९९४, जानेवारी २००२ आणि जुलै २००५)

(१)	(२)	(३)	(४)
बिगर कृषी मध्यम मुदत कर्ज			
गोडावून बांधकाम	२.४१	०.०५	५८.९६
स्टॉफ हौसिंग	८२.२४	९७.९५	१,०७.२७
मध्यम मुदत मशिनरी खरेदी	. .	. .	. .
नाबार्ड/कंपोझीट	१,७१.३३	१,७७.१०	९.९०
स्टॉफ वाहन	४१.११	१७.७९	३.८६

जिल्ह्यातील बागायतदार संस्था सभासदांना त्यांच्या गरजेप्रमाणे वेळेवर कर्ज उपलब्ध व्हावे म्हणून चक्री पतपुरवठा योजना बँकेने कार्यान्वित केली. जून, १९८६ अखेर ६३ संस्थेतील ३०० सभासदांना ४०.६२ लाख रुपये कर्ज पुरवठा केला. तसेच मार्च, १९९२ अखेर या योजनेअंतर्गत केलेल्या कर्ज पुरवठ्यांपैकी १८.२८ लाख रुपये येणे बाकी व थकबाकी २.७७ लाख रुपये होती.[५२]

राष्ट्रीय कृषि आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) : या बँकेची स्थापना नॅशनल बँक फॉर ॲग्रिकलचर ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट ॲक्ट, १९८१ अन्वये जुलै, १९८२ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची कृषि पत पुरवठा ग्रामीण नियोजन व पत विभाग आणि कृषी पुनर्वित्त महामंडळ यांचे विलीनीकरण करून झाली. ही बँक ग्रामीण पत पुरवठ्याच्या संघटित संरचनेत शिखर संस्था म्हणून कार्य करते. बँकेने ग्रामीण भागातील उत्पादक कार्यक्रमासाठी वित्त पुरवठ्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या जिल्ह्यात बायोगॅस, रोपवाटिका, कुक्कूटपालन, मत्स्यव्यवसाय, दुध डेअरी, ग्राम विकास, लघुसिंचन, ग्रामीण विद्युतीकरण, रोपवाटिका व फळबाग, रेशीम उत्पादक, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम इत्यादीसाठी १९९४-९५, १९९९-२००० व २००४-०५ मध्ये अनुक्रमे ९,४१.२०, १६,५५.९९ व २,६५.९२ लाख रुपये वितरित केले.

वाणिज्य बँका

सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकेची पहिली शाखा लातूर येथे १६ डिसेंबर १९३३ रोजी स्थापन झाल्यापासून वाणिज्य बँकांच्या जिल्ह्यातील व्यवहाराचा प्रारंभ झाला. पहिल्याच आठवड्यात या बँकेच्या चालू खात्यात ५,२५,००० रुपये जमा झाले. तेथेच स्टेट बँक हैद्राबाद या बँकेची शाखा ९ डिसेंबर १९४४ ला स्थापन झाल्यावर १२ डिसेंबर १९४५ रोजी उदगीर येथे स्टेट बँक ऑफ हैद्राबादची स्थापना झाली. त्यानंतर ७ डिसेंबर १९५७ रोजी लातूर येथे बँक ऑफ महाराष्ट्रची स्थापना झाली.[५३]

डिसेंबर, १९६४ पर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यात फक्त पाच बँकांची शाखा कार्यालये कार्यरत होती. त्यापैकी तीन बँका व्यापारी दृष्ट्या महत्व असलेल्या लातूर शहरात होत्या. सरकारचे आर्थिक व्यवहार जिल्हा कोषागार आणि स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मार्फत चालत

५२. लातूर जिल्हा म.स.बँक, लातूर, ३ रा वार्षिक अहवाल, १९८५-८६, पृ.७ व ९ वा वार्षिक अहवाल, १९९१-९२, पृ.७.

५३. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४७८.

असत. स्टेट बँक ऑफ हैद्राबाद ही स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचे उपकेंद्र म्हणून काम करीत असे.

जुलै, १९६९ मध्ये झालेल्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर या व्यवसायाच्या विक्रेंद्रीकरणास वेग येऊन लहान शहरे व मोठ्या गावांना वाणिज्य बँकांच्या बऱ्याच शाखा स्थापन झाल्या. डिसेंबर, १९८५ मध्ये अशा बँकांच्या ७६ शाखा होत्या. त्यावेळी या बँकामधील एकूण खाती २,२६,२८५ व एकूण जमा रक्कम ३७४४ लाख रुपये होती.[५४]

सप्टेंबर, १९९१ मध्ये या बँकाच्या शाखांची संख्या ९२ झाली. त्यापैकी लातूर-१३, उदगीर-४ व अहमदपूर, औसा, जळकोट, किल्लारी, मुरुड व निलंगा येथे प्रत्येकी दोन व इतर ठिकाणी ६३ शाखा होत्या. या शाखामधील एकूण ठेवी ८९७८ लाख रुपये व दिलेली कर्जे ७२८८ लाख रुपये होती.[५५]

मार्च, २००० मध्ये जिल्ह्यात एकूण ९९ शाखा होत्या व त्यामध्ये एकूण खाती ४,१०,७७९ व एकूण जमा रक्कम ४,४६.५४ लाख रुपये होती. इ.स.२००४ मध्ये जिल्ह्यातील एकूण शाखांची संख्या ९८ झाली. त्यामध्ये एकूण खाती ४,२६,८९९ व एकूण जमा रक्कम ६,७६,९४ लाख रुपये होती. बँकांचा कृषी उद्योग, व्यापार व इतर क्षेत्रात केलेल्या उलाढालींचा मार्च, २००४ मधील तपशील खाली दिला आहे.

(रुपये लाख)

क्षेत्र	खाते संख्या	अदत्त रक्कम
कृषी	२५,९०७	८८,६७,८८
प्रत्यक्ष	२५,६०१	७५,९४,१६
अप्रत्यक्ष	३०६	१२,७३,७२
उद्योग	१,६४७	९४,२५,५७
खाणकाम व दगडखाण	७	१,३३,८३
वस्तूनिर्माण व संस्करण	१,५६४	८९,९५,२६
विज, गॅस व पाणी	३	८,५५
बांधकाम	७३	२,८७,९३
वाहतूक प्रक्रिया	८४१	५,६०,४६
व्यावसायीक व इतर सेवा	२,४००	२०,८७,३६
खाजगी कर्जे	१७,७३६	१२८,०७,००
ग्राहकोपयोगी वस्तू खरेदीसाठी	२,९९५	७,७७,०५
गृह	३,३९६	६५,७६,९७
इतर	११,३४५	५४,५२,९८
व्यापार	११,३४०	७६,०९,८४

५४. **बँकिंग स्टॅटिटिक्स बेसिक स्टॅटिस्टिक्स रिटर्न्स, व्हा.१४,** रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, जून-डिसेंबर १९८५, पृ.१७२.

५५. **बँकिंग स्टॅटिटिक्स बेसिक स्टॅटिस्टिक्स, रिटर्न्स, व्हा.१९,** रिझर्व्ह बँक इंडिया, मार्च, १९९५, पृ. ९३-९४, व व्हा.१४ रिझर्व बँक ऑफ इंडिया, मार्च १९९५, पृ.४६.

(१)	(२)	(३)
अर्थपुरवठा	३४	२,१०,३७
इतर	६०,९८	२५,८७,६५
एकूण पतपुरवठा	६६,००३	४४१,५६,१३
कुटीरोद्योग	७७९	३,७७,३०
इतर लघुउद्योग	५३१	३८,५८,४५

संयुक्त भांडवली कंपन्या

जिल्ह्यात मार्च १९८५ मध्ये फक्त एक सार्वजनिक संयुक्त भांडवली कंपनी अस्तित्वात होती. मार्च १९९४ मध्ये अशा संस्थाची संख्या ३६ होती. त्यापैकी खाजगी संस्था ३३ होत्या. मार्च १९९७ मध्ये जिल्ह्यातील संस्थांची संख्या ६१ झाली. त्यामध्ये खाजगी संस्था ५६ होत्या.

बँक पत योजना

पूर्वी वाणिज्य बँका कृषी विकासासाठी अर्थसहाय्य देत नसत. या प्रयोजनासाठी या बँकांचा उपयोग व्हावा यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाने बँकाकडील ठेवीच्या स्वरूपातील पैशाचा विनियोग कृषी विकासासाठी करण्याचे ठरविले. त्यानुसार लातूर जिल्ह्यासाठी १९८९-९० मध्ये पहिली पत योजना स्टेट बँक ऑफ इंडियाने राबविली. या पत योजनेत स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बरोडा, आंध्र बँक, अलाहाबाद बँक, सांगली बँक, कॅनरा बँक, बँक ऑफ इंडिया, युनाटेड वेस्टर्न बँक, मराठवाडा ग्रामीण बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भूविकास बँक, व महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ या संस्था देखील सहभागी झाल्या होत्या. डिसेंबर, १९९१ पर्यंत या योजनेअंतर्गत विविध कारणांसाठी जिल्ह्यातील ९३,१२० सभासदांना ४७,९४,६७,००० रुपये पतपुरवठा केला. इ.स.१९९७-९८ मध्ये दुसरी पत योजना राबविण्यात आली. त्यावेळी विविध कारणासाठी १,१५,१३६ सभासदांना १,१५,७१,५७,००० रुपये पत पुरवठा करण्यात आला. जिल्हा अग्रणी बँकेने वार्षिक ऋण योजनेनुसार जिल्ह्यात विविध कारणांसाठी केलेल्या पतपुरवठ्याची माहिती खाली दिली आहे. [५६]

तपशील	पत पुरवठा (रु. हजार)	
	१९९९-२०००	२००५-२००६
पीक कर्ज	१०,७६,९६४	१३,७५,२८२
मुदत कर्ज	२,७२,०६२	४,३४,४५१
कृषी कर्ज	१३,४९,०२६	१८,०९,७३३
लघु उद्योग व कुटीरोद्योग	७४,३३१	१,०५,०१२
व्यापार व सेवा	१,७१,८२५	६,५९,१४०

५६. अग्रणी बँक अधिकारी, भारतीय स्टेट बँक, लातूर (जून १९९९ व जानेवारी २००३) यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती.

*** वार्षिक ऋण योजनेतंर्गत जिल्ह्यातील विविध बँकांनी लातूर जिल्ह्यात सन २००५-२००६ मध्ये केलेल्या अर्थपुरवठ्याची माहिती**

(रुपये हजार)

बँकांची नावे	पीक कर्ज		पीक मुदत कर्ज		उद्योग		सेवा		एकूण	
	खाते	रक्कम	खाते	रक्कम	खाते	रक्कम	खाते	रक्कम	खाते	रक्कम
स्टेट बँक ऑफ इंडिया	२५८८	९२,७४६	११४०	३४,७१२	२३२	१६,८१२	११४२	१,८९,७६५	५०७८	३,३२,७३५
स्टेट बँक ऑफ हैद्राबाद	८७७	२३,०४०	६०२	४३,०६९	१३२	४४,१५५	८२८	१,१३,६८६	२४३९	२,२४,९५०
बँक ऑफ महाराष्ट्र	३७६६	८४,४५०	७३५	६८,३९५	३९	२६,९१०	१७५८	१,९६,८६५	६२९८	३,७६,६२०
सेंट्रल बँक इंडिया	८००	२६,८६०	१५०	५,५५०	१५	१,२२०	१९०	३३,९५०	११५५	६७,५८०
युनियन बँक ऑफ इंडिया	२०	१५६	२१	१३,९४५	१२	६८०	६२	६,७३०	१११	२१,५११
बँक ऑफ इंडिया	०	०	१२००	१,५०,०००	११	२,४५०	१८५	९९,५७५	१३९६	१,७२,०२५
देना बँक	११८	३,८६५	१८२	९,०९०	३२	४,३८०	१४२	२२,२१५	४७४	३९,५५०
केनरा बँक	५०	४,२६०	०	०	०	०	१०५	६,४३०	११५	१०,६९०
बँक ऑफ बरोडा	७०	१,६१५	२९	२,८८५	११	३,२२०	९३	१५,५८०	२०३	२३,३००
आंध्र बँक	०	०	०	०	०	०	२४	१,३२४	२४	१,३२४
सांगली बँक	१५	७५०	२५	२,३००	५	५००	४५	४,५००	९०	८,०५०
युनायटेड वेस्टर्न बँक	५३	१,४४०	६५	४,०३५	८	३,७००	१००	१५,१५०	२२६	२४,३२५
एम.जी.बी.	३२८०	८०,५००	८००	२५,०००	४०	१,०००	८२५	३२,५००	४९४५	९३,९०००
एल.डी.सी.सी.	१३२१२५	१०,४७,८५५	३४२०	१७,९१०	०	०	०	०	१३५५४५	११,१९,७६५
अलाहाबाद बँक	२६०	६,७४५	८३	३,५६०	७	२३५	२१	१,९२०	३७१	१२,४६०
एकूण . .	१४४०२२	१३,७५,२८२	८४५२	४,३४,४५१	५४४	१,०५,२६२	५५२०	६,६०,१९०	१५८५१४	२५,७३,८८५

* वार्षिक ऋण योजना, २००५-२००६, अग्रणी बँक, जिल्हा लातूर, भारतीय स्टेट बँक, मार्गदर्शी बँक विभाग, मुंबई, पृ. ३.

अनुक्रमणिका

आयुर्विमा महामंडळ

आयुर्विमा महामंडळाची स्थापना १ सप्टेंबर १९५६ रोजी झाली. त्यावेळी तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा सातारा आयुर्विमा महामंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या नियंत्रणाखाली होता. इ.स.१९५६ ते १९६३ या कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यात आयुर्विमा महामंडळाने ११,१९५ विमापत्र व ४,०७.४५ लाख रुपये विमा व्यवसाय केला होता.[५७] आयुर्विमा महामंडळाची शाखा लातूर येथे ऑगस्ट १९६२ मध्ये सुरू झाली. त्यानंतर महामंडळाच्या शाखा उदगीर (१९८६), अहमदपूर (१९९०), निलंगा (१९८८) व लातूर (१९९१) येथे स्थापन झाल्या. महामंडळाने १९८४-८५ मध्ये ७७.४ लाख रुपयांचा विमा व्यवसाय केला. त्यात १९९३-९४ मध्ये वाढ होऊन तो २३९.५४ लाख रुपये झाला. यावर्षी २७२ विमा प्रतिनिधी होते.

जिल्ह्यात आयुर्विमा महामंडळाने केलेल्या कार्याची माहिती खाली दिली आहे.[५८]

शाखा	१९९५-९६		२०००-२००१		२००३-२००४	
	विमापत्र (संख्या)	विमा रक्कम (लाख रुपये)	विमापत्र (संख्या)	विमा रक्कम (लाख रुपये)	विमापत्र (संख्या)	विमा रक्कम (लाख रुपये)
लातूर-१	७,६१६	४८.११	९,८२०	७३.९०	१४,४०१	१,१६,३८.५५
लातूर-२	५,१८३	२३.३६	८,३३१	५०.६५	९,४४८	६२,७८.००
उदगीर	४,५८४	२२.८३	६,९९५	३९.२६	१२,४४०	७७,०२.९४
अहमदपूर	४,८६५	२१.८३	५,९२६	३५.४५	८,६१९	५९,४५.८२
निलंगा	३,८४६	१८.१७	५,०७५	२८.५४	६,६५७	३९,२१.९६

राष्ट्रीय बचत योजना

इ.स.१९६४-६५ मध्ये तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात १४२ ब्रँच कार्यालये व ३५ सब-पोष्ट कार्यालयातून बचत योजना राबविली जात होती. इ.स.१९६२ ते १९६५ या कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यात १७,६३५ खातेदार होते व ३९,८१,५५६.६८ रुपये गुंतवणूक झाली होती.[५९]

इ.स.१९८२-८३ मध्ये लातूर जिल्ह्यात ६० लाख रुपये अल्पबचत गुंतवणूकीचे लक्ष्य असताना प्रत्यक्षात ८३.४८ लाख रुपये गुंतवणूक मिळविली. इ.स.१९९०-९१ मध्ये ६७५ लाख रुपये अल्पबचत गुंतवणूकीसाठी लक्ष्य असताना प्रत्यक्षात ७४५ लाख रुपये नक्त गुंतवणूक मिळविली. सन २००१- ते २००३-२००४ या कालावधीत गुंतवणूकीचा इष्टांक पूर्ण करून औरंगाबाद विभागात प्रथम क्रमांक मिळविला. अल्पबचत लक्ष्य व गुंतवणूकीची माहिती खाली दिली आहे.[६०]

५७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४८१.

५८. प्रशासन अधिकारी (नियोजन) भा.जि.वि.नि.औरंगाबाद, (फे.,२००३) यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती.

५९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४८६.

६०. सहाय्यक संचालक, अल्प बचत, लातूर, (मार्च, १९९९ व डिसेंबर, २००१) यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती.

(रुपये कोटी)

वर्ष	लक्ष्य	गुंतवणूक		एकूण अल्पबचत एजंट	एकूण महिला प्रधान एजंट
		ढोबळ	नक्त		
१९९३-९४	६.५०	१५.९२	. .	२५२	४२२
१९९५-९६	९.१५	१२.१९	. .	२३६	४८७
१९९७-९८	१८.१२	१८.६१	. .	२८६	९५४
१९९९-२०००	१८.००	५६.२९	२१.८९	३०४	१,०६२
२०००-२००१	२०.१६	५८.१०	२२.८१	३५३	१,७६६
२००४-२००५	४६.२१	१,१७.१४	६५.८६	१२२	१,४४६

जिल्ह्यातील अल्प बचत योजनेची आकडेवारी खाली दिली आहे.

(रुपये लाख)

योजना	२०००-२००१	
	ढोबळ	नक्त
टपाल कार्यालय बचत बँक	७,३९.३५	५.६१
पुनरावर्ती ठेव	२३,३६.२४	११,६६.५५
समयबद्ध ठेव खाते	१,१०.५३	(-) ४.३१
राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र ८ वी मालिका	४,८०.५३	२,८१.८३
इंदिरा विकास पत्र	. .	(-) १,७५.८५
राष्ट्रीय बचत योजना, १९८७	. .	(-) १९.९०
राष्ट्रीय बचत योजना, १९९२	६.७५	(-) ५४१
मासिक प्राप्ती योजना	५,००.३०	२,७५.५८
किसान विकास पत्र	६,८५.३४	(-) ५८.२८
इतर (जुनी प्रमाणपत्र)	. .	(-) १.८५
सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी	९,५१.२४	८,१६.५४

सन २००५ मध्ये जिल्ह्यात १,४४६ महिला क्षेत्रिय बचत एजंट असून त्यांच्यामार्फत १ लाख ९२ हजार आर.डी. खाती उघडण्यात आली असून दरमहा रुपये दोन कोटी ४३ लाख गुंतवणूक होते. तर १२२ अल्पबचत एजंटां मार्फत किसान विकासपत्र, मासिक प्राप्ती योजना, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे इत्यादी योजनांत दरमहा रुपये ४ कोटी गुंतवणूक होते. तसेच ३६५ शाळांमधून आर.डी. खाती सुरू करण्यात आली असून ग्रामीण भागात बचतग्राम योजनाही राबविण्यात येते.

व्यापार

व्यापारी मार्ग : तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात व्यापारी माल वाहतुकीसाठी सहा राज्य मार्ग होते. त्यावेळी सोलापूर-हैद्राबाद या महत्वाच्या राष्ट्रीय महामार्गावरून व्यापारी वाहतूक चालत असे. या महामार्गावरून सोलापूर-पूणे-हैद्राबाद व आंध्र प्रदेशातील काही व्यापारी केंद्राशी व्यापार चाले. या मार्गाचा उपयोग उस्मानाबाद जिल्ह्यातील दक्षिणेकडील काही भागातील वाहतुकीसाठी होत असे. उस्मानाबाद व तुळजापूर येथून जाणारा औरंगाबाद-जालना-सोलापूर या मुख्य रस्त्याला विभागून जाणाऱ्या बार्शी-नांदेड या रस्त्यावरून लातूर पर्यंत वाहतूक चालत असे. तसेच या रस्त्यावरून सोलापूर व जळगाव या शहरांशी व्यापार चाले. बार्शी-लातूर-नांदेड हा जिल्ह्याच्या मध्यभागातून पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणारा रस्ता जिल्ह्यातील मुख्य व्यापारी मार्ग असून जिल्ह्यातील मुख्य व्यापारी पेठ असलेल्या लातूर येथून पुढे अहमदपूर येथे अहमदपूर-उदगीर रस्त्यावरून जातो. या रस्त्याने बार्शी उस्मानाबाद आणि नांदेड जिल्हा जोडला आहे. उमरगा-लातूर हा व्यापारी मार्ग बार्शी-लातूर-नांदेड व सोलापूर-हैद्राबाद रस्त्यास जोडला आहे. हा रस्ता दक्षिणेकडील वाहतुकीस अत्यंत उपयुक्त असा आहे. यरमाळा व कळंब खिंडीतून जाणारा बार्शी-अंबेजोगाई या रस्त्याने बीड जिल्हा व बार्शी ही स्थानके जोडली आहेत. अहमदपूर-उदगीर या रस्त्याने स्थानिक वाहतूक सुरू आहे.[६१]

इ.स.१९०० मध्ये हैद्राबाद मनमाडला रेल्वेमार्गाने जोडण्यात आले. त्यामुळे नांदेड, परभणी व औरंगाबाद या जिल्ह्यांमध्ये व्यापार, उद्योगधंदे यांच्या विकासाला चालना मिळाली. कुर्डूवाडी ते लातूर या नॉरोगेजचा आरंभ १९११ पासून झाला. परभणी ते परळी रेल्वे १९२१ ते १९३१ या दशकात निर्माण झाली. परळी ते हैद्राबाद या रेल्वे लाइनचा शुभारंभ झाल्यामुळे मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील काही गावे व लातूर जिल्ह्यातील उदगीर इत्यादी गावांचा संपर्क हैद्राबादशी प्रस्थापित झाला. त्यामुळे या भागातील व्यापारास चालना मिळाली. या रेल्वेमार्गामुळे कापसावर आधारित जिनिंग प्रेसिंग कारखाने सुरू झाले व व्यापारात आमुलाग्र बदल झाला. लातूर हे प्रमुख व्यापारी केंद्र बनले. तसेच उदगीर येथील उंटाचा व्यापार प्रसिद्दीस आला. शासनाद्वारे प्रवासी वाहतुकीस प्राधान्य दिल्यामुळे रस्त्यांचा विकास मोठ्या प्रमाणात होऊ लागला. जलद वाहतुकीसाठी माल मोटारींचा व रेल्वेचा उपयोग होऊ लागला. (आधिक माहितीसाठी प्रकरण सात पहा).

मार्च १९९७ मध्ये लातूर जिल्ह्यात पानगाव, मूर्ती, मुरूड, निवळी, औसा रोड, हरंगूळ, लातूर, चाकूर, लातूर रोड, वडवल, नागनाथ, जानवळ, बेलशंकरगा, उदगीर, हेर लोहार ही रेल्वेस्थानके होती.

आकृतिबंधातील परिवर्तन : दळणवळणाची साधने, कृषि अर्थव्यवस्थेतील बदल, शासकीय धोरणे व आर्थिक नियोजन या कारणांमुळे व्यापार आकृतिबंधामध्ये बरेच परिवर्तन झालेले दिसून येते. शैक्षणिक विकास, शहरीकरण व सामाजिक सुधारणांचा देखील या आकृतिबंधावर

---

६१. **उस्मानाबाद डिस्ट्रिट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४९१.

प्रभाव पडलेला आहे. अशा प्रकारच्या परिवर्तनास स्वातंत्र्योत्तर काळात गती प्राप्त झाली. बँकांचे विकेंद्रीकरण व नवीन शाखांची निर्मिती याद्वारे व्यापारविषयक प्रथांना वेगळे वळण लागले. दळणवळणाच्या साधनात झालेल्या सुधारणा व वाढ यामुळे आयात-निर्यातीची व्याप्ती वाढली. पूर्वीची व्यापार परंपरा लोप पावली. व्यापार मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. कृषि उत्पादनात वाढ झाल्यामुळे जिल्ह्यातील कापूस, भूईमूग, करडई, तूर, उडीद इत्यादी कृषि माल जिल्ह्याबाहेर फार मोठ्या प्रमाणावर पाठविला जाऊ लागला.

जिल्ह्यात मध्यवर्ती सहकारी बँक, व्यापारी बँका व नागरी सहकारी बँकांमुळे व्यापारासाठी लागणारे भांडवल सहज उपलब्ध होऊ लागले. जिल्ह्यात १९३२ पासून कृषि माल व्यापार संघटित नियंत्रणाखाली आणून विनियमित बाजारपेठा सुरू करण्यात आल्या. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक न होता त्यांच्या उत्पादनास योग्य भाव मिळू लागला. शेतकरी आपला माल नियंत्रित बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात आणू लागला. या बाजारपेठा घाऊक व्यापाराची केंद्रे बनली आहेत. त्याशिवाय जिल्हा पातळीवर तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ स्थापन झाल्यापासून सहकारी संस्थाही व्यापार करू लागल्या आहेत.

आयात : उस्मानाबाद जिल्ह्यात पूर्वी कमी प्रमाणात मालाची आयात होत असे. ज्या मालाचे जिल्ह्यात उत्पादन होत नव्हते असाच माल आयात केला जात होता. उपभोग्य वस्तूच्या गरजेतूनच व्यापारामध्ये परिवर्तन झाले. त्याच बरोबर लोकांचे राहणीमान, त्यांच्या वाढत्या गरजा, त्यांच्या उत्पन्नामध्ये झालेली वाढ, आणि वाहतुकीची साधने यामुळे व्यापारामध्ये परिवर्तन झाले. घरबांधण्याच्या वाढत्या गरजेमुळे घरबांधणी साहित्याची मोठ्या प्रमाणात आयात करण्यात येत असे. त्यामध्ये लोखंडी बिम, खिळे, सळ्या व लोखंडी सामान मुंबई, कलकत्ता, हैद्राबाद, सोलापूर व पुणे येथून आयात केले जाई. सोलापूर, पुणे व मुंबई येथून किराणा माल, मुंबई, हैद्राबाद, सोलापूर, पुणे व कलकत्ता येथून स्टेशनरी व कटलरी साहित्य, मुंबई, अहमदाबाद, सूरत, मद्रास येथून चांगल्या प्रतीचे कापड, मुंबई, नागपूर, सोलापूर, मालेगाव, इचलकरंजी व सिकंदराबाद येथून मध्यम प्रतीचे कापड, मुंबई, बडोदा, कलकत्ता, अहमदाबाद व पनवेल येथून औषधे व औषधी द्रव्ये आयात केली जात. पुणे, नाशिक, मुंबई इत्यादी ठिकाणाहून घरगुती वापराची भांडी, जामनगर, मुंबई व पंजाब येथून काचसामान, मुंबई व हैद्राबाद येथून घड्याळे व छत्र्या, मुंबई, सोलापूर, कलकत्ता व हैद्राबाद येथून रेडिओ संच व विद्युत उपकरणे तसेच कोल्हापूर व अहमदनगर येथून गुळ आयात केला जात असे.[६२]

मुख्यत: मोठे व्यापारी इतर ठिकाणाहून लातूर येथे मालाची आयात करीत असे. तसेच एजंट (अभिकर्ता) किंवा प्रतिनिधी मार्फत किंवा व्यावसायिक कंपनीकडूनही माल आयात केला जाई.[६३] मुख्यत्वे शेंग, साखर, ऊस, तांदुळ व विजेची उपकरणे यांचा मोठ्या प्रमाणात आयात मालात समावेश असे.

---

६२. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४९१-९२.
६३. कित्ता, पृ. ४९२.

निर्यात : लातूर येथे भुईमूग शेंगाची महत्वाची व्यापार पेठ असून भुईमूग शेंग चा वायदा (Forward market) बाजारही आहे. या वायदा बाजारातून भुईमूग शेंगा विक्रीसाठी निर्यात केल्या जातात. लातूर खालोखाल उदगीर, अहमदपूर, कळंब येथील बाजारपेठेतून माल निर्यात केला जातो. लातूर येथील बाजारपेठेत १९६१ ते १९६४ या कालावधीत भुईमूग शेंगांची झालेली उलाढाल खाली दिली आहे.

तपशील	१९६०-६१	१९६१-६२	१९६२-६३	१९६३-६४
परिमाण (क्विंटल)	३,५३,१०१	३,२७,५३३	२,६२,२०२	१,५७,४९२
किंमत (रुपये)	२,५०,०९,७०८	२,१८,४५,७००	१,५९,५२,१२०	१,१४,१७,९०९

१९६३-६४ मध्ये उदगीर बाजार पेठेत २६,७५,१४४ रुपये किंमतीच्या ३६,१३६ क्विंटल भूईमूग शेंगांची उलाढाल झाली. तर लातूर बाजार समितीने मुंबई, पंढरपूर, कुर्डूवाडी, अमळनेर, कोचीन, मदूरा, अदोनी, अरोर, वीरुधानगर, रायपूरम व मद्रास येथे ६५,१४,०११ रुपये किंमतीच्या ७७,८७६ क्विंटल तेलबिया विक्रीसाठी निर्यात केल्या. भूईमूग शेंगेचा बाजार हैद्राबाद कृषि उत्पादन अधिनियम १९३० नुसार नियंत्रित केला होता. शेतकरी आपला माल कमिशन एजंटामार्फत (अडत्या) विकत असत. त्यामुळे एजंट स्वत:च जिल्ह्यातील किंवा इतर ठिकाणच्या मोठ्या व्यापाऱ्यामार्फत माल विकत घेत असत. उस्मानाबाद जिल्ह्यातून भूईमूग शेंगतेलबीया बरोबरच शेंग तेलही निर्यात केले जात असे. सर्वसाधारणपणे तेलगिरण्या तेल निर्यात करीत असत. लातूर येथे आठ व कळंब येथे चार तेल गिरण्या होत्या. भूईमूग तेलाची निर्यात मुंबई, पुणे, सोलापूर, जालना व अमळनेर येथे केली जाते. तर पूणे, अहमदनगर, कोल्हापूर व औरंगाबाद येथून पेंडसाठी चांगली मागणी असते. भूईमूग शेंग व शेंग तेलाचा व्यापार ऑक्टोबर ते फेब्रुवारी या दरम्यान मोठ्या प्रमाणात चालतो.

अन्नधान्ये : जिल्ह्यातून मुख्यत्वे ज्वारी, उडीद, तूर, मूग व गहू या अन्नधान्यांची निर्यात होत असे. ज्वारी व तांदूळ खरेदी विक्रीवर शासनाने बंदी घालून एकाधिकार खरेदी योजना राबविण्यास सुरुवात केली. एकाधिकार खरेदी योजनेनुसार लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा व कळंब येथून ज्वारीची निर्यात मोठ्या प्रमाणात होत असे. हंगामाच्या वेळी शेतकरी ज्वारी विक्रीस आणित असत. येथील सर्व व्यवहार हैद्राबाद ॲग्रीकल्चरल मार्केट ॲक्ट (१९३०) नुसार नियमित करण्यात आला होता. इ.स.१९६३-६४ मध्ये लातूर येथील मुख्य बाजारपेठेतून ६९,२९२ क्विंटल (किंमत रुपये ३६७,९६२) ज्वारीची उलाढाल झाली. मुंबई, सोलापूर, बार्शी, पुणे, हैद्राबाद, कोल्हापूर आणि मिरज येथे मोठ्या प्रमाणात ज्वारी निर्यात करण्यात आली होती. याशिवाय लातूर येथे उडदाचाही व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. इ.स.१९६३-६४ मध्ये लातूर येथून ५२,९६,२४६ रुपये किंमतीच्या ९२,८४५ क्विंटल उडदाची उलाढाल झाली.[६४]

६४. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४९४.

अनुक्रमणिका

लातूर बाजार समितीने १९६३-६४ मध्ये २,११,१४३ रुपये किंमतीचा ३,३३९ क्विंटल तांदूळ मिरज, कोल्हापूर, बार्शी, पंढरपूर आणि मदूरा येथे तर १५,२४,२३८ रुपये किंमतीचा २४,१७९ क्विंटल गहू मुंबई, पुणे, कोल्हापूर कुर्डूवाडी, पंढरपूर, हैद्राबाद, कोईमतूर, वीरुधानगर, रायपूर व मदूरा येथे निर्यात केला होता. या वर्षी ७६,७७,४२१ रुपये किंमतीची १,१८,३६५ क्विंटल कडधान्याची मदूरा, सलेम, वीरुधानगर, रायपूर, कोपल, अदोनी, सुरेंद्रनगर, मद्रास, हैद्राबाद, कोल्हापूर आणि मुंबई येथे निर्यात केली. अन्नधान्यांच्या किंमती मुंबई व हैद्राबाद येथील बाजारावर अवलंबून असत. बाजारातील अन्नधान्यांच्या किंमती मुंबई येथून ऑल इंडिया रेडिओवरून प्रसारित केल्या जात असत. जहाजाद्वारे बाहेर देशात पाठविण्यात येणारा माल रेल्वे वॅगन मधून तसेच माल मोटारीतून पाठविला जाई.[६५]

कापूस : जिल्ह्यातील बहुतांश कापूस स्थानिक जिनींग प्रेसिंगमध्ये प्रक्रिया करून विविध कापड गिरण्यांच्या ठिकाणी निर्यात केला जात असे. मुख्यतःउदगीर, लातूर व अहमदपूर या व्यापारी पेठांमध्ये कापसाची खरेदी-विक्री होत असे. उदगीर येथील कापसाची व्यापारी पेठ महत्वाची होती. तेथे सरासरी ६०,००० क्विंटल कापसाची वार्षिक उलाढाल होत असे. इ.स. १९६३-६४ मध्ये उदगीर येथील बाजार पेठेत ६५,४३,०५० रुपये किंमतीच्या ५८,१८० क्विंटल कापसाची उलाढाल झाली होती. या बाजारपेठेत उदगीर व अहमदपूर तालुक्यातील सरकी न काढलेला कापूस विक्रीस येत असे.[६६] शेतकरी व किरकोळ विक्रेत्यांनी येथे आणलेला कापूस खुल्या लिलाव पद्धतीने विकला जाई. जुनी व कालबाह्य झालेली फर्दी विक्रीची पद्धत बंद करून कापसाने भरलेली गाडी खुल्या लिलाव पद्धतीने विक्री होऊ लागली. या नवीन पद्धतीमुळे मालाच्या गुणवत्तेनुसार शेतकऱ्यांच्या मालास योग्य भाव मिळू लागला. कापसाचे वजन वटण गिरणीच्या परिसरातच केले जाई. कापसाची खरेदी-विक्री नोव्हेंबर ते फेब्रुवारी पर्यंत बाजार समितीच्या देखरेखीखाली चालत असे. तथापि डिसेंबर महिन्यात कापसाची आवक मोठ्या प्रमाणात होत असे. जिल्ह्यातील वटण व दाबण कारखान्यात कापूस वटणी प्रती क्विंटल १,०५० रुपये व दाबणी प्रती क्विंटल ७.५० रुपये दराने होत असे.[६७]

कापसाच्या गाठी मुख्यतः मुंबई, सोलापूर व मद्रासला पाठविल्या जात. तर सरकी मुंबई आणि तेल गिरण्या असलेल्या ठिकाणी पाठवित. जहाजातून पाठविण्यात येणारा कापूस रेल्वे व मालमोटारीतून पाठविला जाई. उदगीर येथून मुंबईस रेल्वेने माल पाठविण्याचा खर्च प्रती क्विंटल ७ रुपये येत असे. सोलापूर येथे निर्यात होणाऱ्या कापसाची वाहतूक मालमोटारीतून होत असे. मुंबई व सोलापूर येथील कापसाच्या व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी व एजंट जिल्ह्यातील कापूस खरेदी करीत. तर जिल्ह्यातील काही व्यापारी मुंबई येथील व्यापाऱ्यास कापूस विकत असत. कापूस खरेदी विक्रीचे दर मुंबई येथील कापूस बाजारावर ठरत असत. त्यामुळे स्थानिक व्यापारी मुंबई येथील व्यापाऱ्यांशी संपर्क ठेवून असत.[६८]

---

६५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४९४.

६६. मुख्यतः ४२२ या नावाने ओळखल्या जाणारे कापसाचे पीक घेतले जाई. त्यास चांगली किंमत मिळत असे.

६७. **उस्मानाबाद डिस्ट्रिकट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४९४.

६८. कित्ता, पृ.४९४-९५.

Maharashtra State Gazetteers

इतर निर्यात : कृषी उत्पादनांपैकी उडीद, तूर व डाळ तसेच इतर कडधान्य मुंबई, हैद्राबाद, मदूरा व दक्षिणेकडील इतर बाजार पेठेत पाठविली जात असत. लातूर येथील बाजार समितीने १९६३-६४ मध्ये १,५४,६९४ क्विंटल १,३९,४९,३१४ रुपये किंमतीचा गुळ मुंबई, पालघर, बारडोली, पुणे, अहमदाबाद, बारामती, अकलूज, सोलापूर, नांदेड, रायपूर, वीरुधानगर व सलेम येथे निर्यात केला होता.[६९]

इ.स.१९९१ मध्ये मुख्यत: ज्वारी, साखर, गहू, तूर, उडीद, भूईमूग शेंग, सूर्यफूल, कापूस, मिरची, दुधपावडर व कमावलेली कातडी निर्यात केली होती. मुख्यत: कापूस व तेलबिया मुंबई येथे विक्रीसाठी पाठविण्यात येत असे.[७०] तसेच लातूर, औसा, रेणापूर, निलंगा व उदगीर या तालुक्यातील द्राक्षे परदेशात निर्यात केली जातात.

विनियमित बाजारपेठा व घाऊक व्यापारी केंद्र

मुंबई राज्याने १९२७ मध्ये कापूस बाजार अधिनियम संमत केला. त्यावेळी हैद्राबादच्या निजाम राजवटीने हैद्राबाद कृषि बाजार अधिनियम, १९३० (हैद्राबाद अधिनियम क्र.११,१९३९ फसली) संमत केला.

सन १९३० च्या जागतिक मंदीच्या वेळी भारतातील कृषि उत्पादक आणखीनच भरडला गेला. त्यावेळी हैद्राबाद राज्यात जरी १९३० चा उपरोक्त अधिनियम लागू होता तरी तो फारच थोड्या ठिकाणी अंमलात आलेला होता. नंतरच्या कालावधीत तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात लातूर (१९३१), उदगीर (१९४१), कळंब (१९५३), उस्मानाबाद (१९६०), अहमदपूर (१९६०), निलंगा (१९६१) व मुरुम (१९६४) अशा एकूण सात कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन झाल्या होत्या.[७१] मराठवाडा महाराष्ट्रात समाविष्ट झाल्यानंतर १९३९ चा मुंबई कृषी उत्पादन बाजार (विनियमन) अधिनियम लागू झाला. या अधिनियमात कृषी मालाचे बाजारभाव ठरविण्याबाबत काही त्रुटी राहून गेल्यामुळे महाराष्ट्र शासनाने १९६३ मध्ये महाराष्ट्र कृषी उत्पादन बाजार (विनियमन) अधिनियम संमत करून त्याची अमलबजावणी १९६७ पासून सुरू केली.[७२]

उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन दिनांक १६ ऑगस्ट १९८२ पासून लातूर व उस्मानाबाद असे दोन जिल्हे निर्माण करण्यात आले. इ.स.१९८२-८३ मध्ये लातूर जिल्ह्यात लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा व औसा या तालुक्यांच्या ठिकाणी बाजार समित्या होत्या. त्यावर्षी या बाजारपेठांमध्ये एकूण १,८४,६८२ मे.टन कृषी मालाची आवक झाली होती. इ.स.१९९८ मध्ये जिल्ह्यात सात कृषी उत्पन्न बाजार समित्या व पानगाव, मुरुड, शिरुर ताजबंद, किनगाव, हाडोलती, जळकोट, देवणी, वाढवणा, हक्की, औराद शहाजनी, कासारशिर्सी, किल्लारी, उजनी, नव्हेगाव व चापोली येथे उप-बाजारतळ होते.

---

६९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४६.
७०. **डिस्ट्रिक्ट सेन्सस हँडबूक, लातूर,** १९९१, पृ.४६.
७१. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.४९७ ते ५३३.
७२. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** १९८८, पृ.२८८.

लातूर उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती (स्थापना २४ आक्टोबर १९३१) : या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात ११९ गावांचा समावेश असून मुरुड (१९८८) येथे उपबाजार आहे. या बाजारपेठेतील माल इतर बाजारेपठांतून विक्रीसाठी पाठविला जातो. ही बाजारपेठ पूर्वीपासूनच तेलबिया, कडधान्ये व गूळ विक्रीसाठी प्रसिद्ध आहे. मुख्य बाजार आवाराचे क्षेत्र १२.४३ हेक्टर व मुरुड उपबाजाराचे क्षेत्र ४.४४ हेक्टर आहे.

या बाजार आवारात १९६०-६१ मध्ये ५,७३,५२,६४६ रुपये किंमतीच्या १०,८३,२६० क्विंटल मालाची उलाढाल झाली. इ.स.१९९०-९१ ते २००४-०५ या कालावधीतील उलाढालीची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष	एकूण आवक (क्विंटल)	एकूण किंमत (रुपये)
१९९०-९१	१३,०७,६९७	७७,४७,५७,२४५
१९९५-९६	१४,०६,६२४	१,३५,८४,४२,९४१
२०००-२००१	१६,८९,४३१	१,८३,६१,०४,८६१
२००४-२००५(ऑक्टोबर-०४ ते जून ०५)	१८,३३,८०१	२,५४,३५,१०,९९५

बाजार समितीच्या आवारात कापूस, रुई, निरुपयोगी कापूस, गहू, ज्वारी, बाजरी, तूर, मूग, हरभरा, जवस, भूईमूग शेंग, साळ व तांदूळ, एरंडी, तीळ, करडई, गूळ, पाक, जव, जाई, सरकी, तंबाखू, कुळथी, कांगणी, रागी, बल्लार, मेथी, धने, मिरची, राई, मोहरी, लाख, कांदे, हळद, लोभा, लसून, वाटाणा, मटकी, उडीद, राजगीरा, कारळे, तेल, तूर, चिंच, सरस, साखर शुद्ध केलेली वगळून, शिरा, मका, ऊस, ताग, आंबे, सर्वप्रकारच्या डाळी, सोप, ओवा, आले, वरी, सरसव, आळशी, वाल, चवळी, घेवड्याच्या बीया, लिंबू, केळी, द्राक्षे, चिकू, खरबुजे, कलिंगड, पेरू, सिताफळ, बटाटे, टमाटे, पालेभाज्या व इतर भाज्या, रताळी, अंडी, कोंबड्या, गुरे, लोणी, दुध, चामडी व कातडी, वेलची, मीरी, बडीशेप, विड्याची पाने, जिरे, डिंक, गवत, वैरण, मध, मासळी, हिरडा, बांबू व लाख इत्यादी मालांचे विनियमन करण्यात येत असून गूळ, संकरित ज्वारी, तूर, मूग, उडीद, हरभरा, भूईमूगशेंग, तीळ, करडी, सूर्यफुल, सोयाबीन व चिंच इयादी कृषी मालासाठी ही बाजारपेठ प्रसिद्ध आहे. गूळ सोलापूर, पुणे, जळगाव, धुळे, जालना, विदर्भ, मध्यप्रदेश, राजस्थान येथे तर हरभरा, तूर, सूर्यफुल इत्यादी मालावर प्रक्रिया करून देशाच्या विविध भागात विक्रीसाठी निर्यात केला जातो.

बाजार समितीच्या आवारात कृषी मालाबरोबरच सन १९८० पासून जनावरांचीही खरेदी-विक्री करण्यात येते. इ.स.१९९६-९७ मध्ये गाय, म्हैस, बैल, रेडा, कालवड अशा एकूण ९,४००, शेळ्या-मेंढ्या ८,१२ व कोंबड्या ४,१०० ची विक्री झाली होती. पशुधनांच्या खरेदी-विक्रीची माहिती तक्ता क्र.९ मध्ये दिली आहे.

सन १९९५-९६ मध्ये समितीच्या आवारात ४८२ लिलाव ओटे होते. बाजार समितीस मुख्यतः बाजार कर व अनुज्ञाप्ती फी पासून १९६०-६१ मध्ये २,०९,९१४ रुपये उत्पन्न मिळाले

व २,५९,०५८ रुपये खर्च झाले. इ.स. १९९१-९२ ते २००४-०५ या कालावधीतील उत्पन्न व खर्चाची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष	उत्पन्न (रुपये)	खर्च (रुपये)
१९९१-९२	१,०१,१०,९१७	८४,९२,१५७
१९९६-९७	१,९१,४५,९४२	१,२३,१४,१९८
२०००-२००१	२,५७,९७,७९३	१,८८,०५,५३९
२००४-२००५ ऑक्टोबर २००४ ते जून २००५	३,१९,६०,२८४	२,२५,८५,३५५

इ.स.१९९७-९८ मध्ये समितीच्या आवारात एकूण अनुज्ञाप्ती धारकांची संख्या २,८५० होती. समितीच्या आवारातील, अधिकृत दलाल, व्यापारी, मापाडी इत्यादींची १९९५-९६ व २००३-०४ ची माहिती खाली दिली आहे.

तपशील	१९९५-९६	२००३-०४
अडते	८१७	१,१७६
अ वर्ग खरेदीदार	५५१	५७९
ब वर्ग खरेदीदार	७३	७५
क वर्ग खरेदीदार	२६	०८
ड वर्ग खरेदीदार	३८	१३
हमाल	१,०३९	१,८२६
तोलारी	१०	९
प्रक्रियाकार	६८	९५
दलाल	२	३
वखारवाला	१	४
मोटार वाहन	११६	५०
गाडीवान	. .	५०

उदगीर कृषि उत्पन्न बाजार समिती : (स्थापना १० ऑक्टोबर १९४६) या बाजार समितीचा मुख्य बाजार उदगीर येथे असून जळकोट (स्थापना २५.७.१९७४), देवणी (स्थापना १.११.१९७९) वाढवणा (स्थापना ८.२.१९९३) व हाळी (स्थापना ८.२.१९९३) येथे उपबाजार आहेत. मुख्य बाजार आवाराचे क्षेत्र ६.४७ हेक्टर असून जळकोट, देवणी, वाढवणा व हाळी उपबाजार प्रत्येकी ५.०९ हेक्टर, २.०२३ हेक्टर, २.४२८ हेक्टर व ३.२३७ हेक्टर आहेत. वाढवण व हाळी येथील उप-बाजार तळ अद्याप चालू करण्यात आलेले नाहीत. उदगीर बाजारपेठ ही व्यापारी दृष्ट्या जिल्ह्यातील महत्वाची बाजारपेठ असून उडीद, भुईमूग शेंग, सूर्यफुल, सोयाबीन या कृषिमालाबरोबर कापसाची उलाढाल मोठ्या प्रमाणावर होत असे.[७३]

या बाजारपेठेत उदगीर व अहमदपूर तालुक्यातील ५० टक्के कापसाची उलाढाल होत असे. समितीच्या आवारात नोव्हेंबर ते फेब्रुवारी पर्यंत कापसाची मोठ्या प्रमाणात उलाढाल

७३. कृ.उ.बा.स.उदगीर, यांनी पाठविलेली माहिती.

होते. पूर्वीची कापूस विक्रीची फर्दी पद्धत बंद करून कापसाने भरलेल्या गाड्या लिलाव पद्धतीने विकण्यात येऊ लागल्या. कापसाच्या बांधलेल्या गाठी मुंबई, मद्रास, सोलापूर व नांदेड येथील कापड गिरण्यांमध्ये पाठविला जात असे.

ही बाजार समिती साळी, गहू, ज्वारी, (पांढरी), ज्वारी (संकरित) बाजरी, हरभरा, तूर, मूग, उडीद, भूईमूगशेंग, सूर्यफुल, कापूस, सोयाबीन या कृषी मालासाठी प्रसिद्ध असून साळ, गहू, ज्वारी, बाजरी या मालाची ५० टक्के स्थानिक व लातूर जिल्ह्यात विक्री होते व ५० टक्के माल अमरावती, गुजरात इत्यादी ठिकाणी पाठविला जातो. तसेच तूर, हरभरा, उडीद हे मद्रास तामिळनाडू आणि दिल्ली, जालंधर इत्यादी ठिकाणी निर्यात केला जातो. तसेच कापूस एकाधिकार पद्धतीने खरेदी करून विक्रीसाठी निर्यात केला जातो.

बाजार समितीच्या आवारात सन १९६१-६२ मध्ये १,६७,१६,३४२ रुपये किंमतीच्या २,६८,५५८ क्विंटल कृषीमालाची उलाढाल झाली होती.[७४] इ.स.१९८५-८६ ते ३० जून २००५ या कालावधीतील कृषी मालाची उलाढाल खाली दिली आहे.

वर्ष	कापूस आवक (क्विंटल)	एकूण आवक (क्विंटल)	कापूस किंमत (रुपये)	एकूण आवक किंमत (रुपये)
१९८५-८६	१८,१८५	३,०४,९८३	९०,५४,९२३	१०,००,१०,५९५
१९९०-९१	३,८११	३,०२,३६६	२६,४६,७०४	१९,०७,६५,३२४
१९९५-९६	५६,७९२	४,३७,२२२	६,४१,४७,३७४	४९,०४,२०,६८७
२०००-२००१	२,२३२	४,३०,१६६	३२,१७,५५१	५३,२७,८६,२७६
३० जून २००५ अखेर	--	५,३७,७४८	--	८१,९९,८३,५८५

या बाजार समितीने १९९९-२००० मध्ये ७,२८,५४,५०१ रुपये किंमतीच्या पशुधनांची विक्री केली. इ.स.१९८५-८६ ते २०००-०१ या कालावधीतील पशुधनांची आवक व विक्रीची माहिती तक्ता क्रमांक १० मध्ये दिली आहे.

बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांसाठी शेतकरी भवन, गोडावून, पिण्याच्या पाण्याचा हौद, स्वच्छता गृह व व्यापाऱ्यांसाठी ११० दुकानांची सोय आहे. बाजार समितीस मुख्यत्वे बाजार कर व अनुज्ञाप्ती फी पासून १९६०-६१ मध्ये ५६,२१२ रुपये उत्पन्न मिळाले व ३३,४९६ रुपये खर्च झाले.[७५] इ.स.१९८५-८६ व ३० जून २००५ या कालावधीतील उत्पन्न व खर्चाची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष	उत्पन्न (रुपये)	खर्च (रुपये)
१९८५-८६	८,६१,५७१	५,३३,६०२
१९९०-९१	२८,२९,०८३	१५,६७,८१४
१९९५-९६	७१,४६,८५१	३४,७१,१००
१९९९-२०००	९०,८३,९९१	६९,०६,०८०
३० जून २००५ अखेर	२९,३६,४४९	६७,९५,२६९

७४. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.५१४.

७५. कित्ता, पृ.५०८.

सन १९६३-६४ मध्ये समितीने ८० जनरल कमिशन एजंट, ५० खरेदीदार, ३ दलाल व १०० किरकोळ विक्रेत्यांना परवाना दिला होता. इ.स.१९८५-८६ ते २००४-०५ या कालावधीत बाजार समितीच्या आवारातील अडते, खरेदीदार, प्रक्रियाकार इत्यादीची माहिती खाली दिली आहे.

तपशील	१९८५-८६	१९९०-९१	१९९५-९६	१९९९-२०००	२००४-२००५
अडते	३१०	३४५	४१०	७०२	६४
खरेदीदार	४१५	४८०	५३५	७१४	८२
प्रक्रियाकार	२०	२२	४०	४८	१०
हमाल	२१०	१७५	१८०	३३९	३८
वखारवाले	१	१	१	१	--
मापाडी	२	२	२	०५	--
मदतनीस	१४०	१३५	१४०	१५७	--
मिळालेली अनुज्ञाप्ती फी (रुपये)	६१,१५९	१,१६,५४९	२,६६,७३१	३,३८,४८२	३५,७९४

अहमदपूर कृषि उत्पन्न बाजार समिती : (स्थापना २१ एप्रिल १९५९) या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात तालुक्यातील १४५ खेड्यांचा समावेश आहे. मुख्य बाजार अहमदपूर येथे असून किनगाव व शिरुरताजबंद येथे उप बाजार आहेत. मुख्य बाजार आवाराचे क्षेत्र ६ हेक्टर असून किनगाव बाजाराचे क्षेत्र १.५ हेक्टर आहे. मुख्य बाजार समितीमध्ये भूईमूगशेंग, कापूस, ज्वारी व साळ या कृषी उत्पादनांची उलाढाल होते. लातूर-नांदेड हा महामार्ग अहमदपूर मधून जात असल्यामुळे कृषी मालाची व इतर वाहतूक चांगल्या प्रकारे होते.[७६] अहमदपूर तालुक्यात ही एकमेव बाजार पेठ असल्याने येथे तालुक्यातील सर्व माल विक्रीसाठी आणला जातो. इ.स.१९६३-६४ मध्ये येथे १७ **अ** वर्ग व्यापारी, १० **ब** वर्ग व्यापारी व तीन किरकोळ व्यापारी होते. इ.स.१९६०-६१ व १९६३-६४ मध्ये येथे अनुक्रमे रुपये १५,५६,००० किंमतीचा २६,९५० क्विंटल व १४,९६,२९० रुपये किंमतीच्या २२,३५० क्विंटल कृषी मालाची उलाढाल झाली होती. येथे सहकारी तत्वावर खरेदी-विक्रीचा व्यापार चालतो. अहमदपूर ता.को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी ही एकच सोसायटी बाजार समितीच्या आवारात अडतीचा व्यवहार करीत होती. येथे यावेळी मालावर प्रक्रिया व प्रतवारी करण्याची व्यवस्था नव्हती.[७७]

इ.स.१९९९-२००० मध्ये समितीच्या आवारात एकूण २१,५०,६१,८४५ रुपये किंमतीच्या २,१०,००६ क्विंटल मालाची उलाढाल झाली होती. सन १९८३-८४ ते २००४-२००५ या

७६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.५२०-२१.

७७. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, अहमदपूर यांनी (जानेवारी, २००३) पुरविलेली माहिती.

कालावधीत समितीच्या आवारात कृषी मालाची झालेली उलाढाल खाली दिली आहे.

तपशील	१९८३-८४	१९८७-८८	१९९०-९१	१९९५-९६	२००१-२००२	२००४-२००५
एकूण आवक (क्विंटल)	३१,०७३	१,१०,७४१	५६,३५६	१,८३,४१५	२,८४,६५०	८९,३१०
एकूण किंमत (रुपये)	१,०४,५७,५४०	४,७०,३५,१००	३,०६,७२,९००	१८,१५,३८,१५०	१८,१८,१५,७००	१०,५४,९२,८५०

बाजार समितीच्या आवारात कापूस, रुई, गहू, ज्वारी, बाजरी, तुर, मूग, मसूर, हरभरा, भूईमूग, जवस, साळ तांदूळ, एरंडी, तीळ, करडी, गुळ, जाई, सरकी, तंबाखू, कुलधी, कुमनी, रागी, वाल, मेथी, धने, मिरची, राई, लसून, कांदे, हळद, लाख, चवळी, वाटाणा, मटकी, उडीद, राजगीरा, मका, ऊस, आंबे, कारळ, आंबाडी, तूप, चिंच, सरसू, साखर, जीरा, बडीशेप, आले, सुर्यफूल व सर्व प्रकारच्या डाळी इत्यादी मालाचे विनियमन करण्यात येते.

इ.स.२००० पासून बाजार समितीने पशुधनांचा बाजार सुरू केला असून २०००-०१ मध्ये ४,८०० पशुधनांची विक्री केली. पशुधनांची आवक विक्रीची माहिती खाली दिली आहे.

(आवक व विक्री नगात)*

तपशील		२०००-२००१	२००१-२००२
गाय	आवक	७००	७००
	विक्री	७००	७००
बैल	आवक	३००	१५०
	विक्री	३०	१५०
शेळ्या	आवक	१,०००	१,५००
मेंढ्या	विक्री	१,०००	१,५००
म्हैस	आवक	२,८००	२,९००
	विक्री	२,८००	२,९००

इ.स.१९८३-८४ मध्ये बाजार समितीचे एकूण उत्पन्न २,२३,६३० रुपये व खर्च १,६९,६८५ रुपये होता. बाजार समितीस बाजार फी १,७९,८९२ रुपये व अनुज्ञाप्ती फी २०,६३० रुपये मिळाली होती. समितीचे उत्पन्न व खर्चाबाबतची माहिती खाली दिली आहे.

तपशील	१९८७-८८	१९९१-९२	१९९५-९६	२००१-२००२	१.१०.२००४ ते ३०.६.२००५
एकूण बाजार फी	३,४३,७७७	४,१२,४५८	१२,५४,७०७	१३,३१,६६३	--
एकूण अनुज्ञाप्ती फी	२१,००२	३९,८४२	३७,७०५	६०,५६४	--
एकूण उत्पन्न	४,१६,८१५	५,९६,४९६	१६,६२,३३३	२१,८१,२८९	२३,९२,९८२
एकूण खर्च	३,५६,६८७	५,२६,१४३	१२,५२,३२७	२०,११,०५१	२०,४८,८२८

* जनावरांच्या विक्रीवर बाजार फी वसूली नसल्यामुळे जनावरांची किंमत दिलेली नाही.

इ.स.१९८३-८४ मध्ये समितीच्या आवारात अनुज्ञाप्ती धारक अडत्ये ४५, **अ** वर्ग खरेदीदार १३६, **ब** वर्ग खरेदीदार ५६, हमाल २५८ व प्रक्रियाकार १५ होते. इ.स.१९९२-९३ ते २००४-०५ या कालावधीतील अनुज्ञाप्ती धारकांची माहिती खाली दिली आहे.

तपशील	१९९२-९३	२००१-२००२	२००४-२००५
आडते	१९	८६	. .
अ वर्ग खरेदीदार	१५१	२१८	६१
ब वर्ग खरेदीदार	४७	१२	२९
हमाल	२७२	२९४	३००
प्रक्रियाकार	१८	१२	५

चाकूर कृषि उत्पन्न बाजार समिती : (स्थापना १४ ऑगस्ट १९८७) या समितीचे कामकाज १९७२ पासून अहमदपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे देखरेखीखाली चालत असे. इ.स.१९८७ पासून चाकूर समितीचे कामकाज स्वतंत्रपणे सुरू झाले. समितीच्या कार्यक्षेत्रात अहमदपूर तालुक्यातील ९० गावांचा समावेश आहे. या बाजार समिती व्यतिरिक्त नळेगाव (स्थापना ३०.७.१९८१) व चापोली (स्थापना १९.१०.१९८९) येथे उप-बाजार आहेत. या बाजार आवारात वीज, पाणी, गोदाम, रस्ते इत्यादी सोयी आहेत.

समितीच्या आवारात शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेला, सर्व माल उघड लिलाव पद्धतीने विकला जातो. समितीच्या आवारात सर्व माल बहुतांशी बैलगाडी व ट्रॅक्टरने येतो. चाकूर हे रस्त्याने लातूर, नांदेड, उदगीर, मुखेड, अंबेजोगाई या बाजारपेठांशी जोडले असून परळी ते हैद्राबाद ही ब्रॉडगेज रेल्वे लाईनही जोडण्यात आली आहे. ही बाजारपेठ कापूस या कृषी मालासाठी प्रसिद्ध असून ज्वारी, बाजरी, तूर, मूग, मसूर, जवस, शेंगा, तांदूळ, एरंडी, तीळ, गुळ, भाजीपाला इत्यादी कृषी मालाची खरेदी-विक्री होते.

समितीच्या आवारात १९८७-८८ ते २००१-०२ या कालावधीत आवक झालेल्या कृषी मालाची माहिती खाली दिली आहे.

वर्ष	एकूण आवक (क्विंटल)	एकूण किंमत (रुपये)
१९८७-८८	१,०८,६४७	१,९५,४८,४७३
१९९५-९६	२४,७८४	३,१२,२८,५२०
२०००-२००१	७०,७८७	३,१४,१३,४७३
२००१-२००२	४२,०४१	२,३९,४०,२९६

इ.स.१९९९-२००० मध्ये चाकूर बाजार समिती **ब** वर्गात होती. त्यावर्षी समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे ३,४२,४१४ रुपये व ६,९९,२९४ रुपये होता. त्याची माहिती खाली दिली आहे.

वर्ष	एकूण उत्पन्न	एकूण खर्च	एकूण अनुज्ञाप्ती फी
१९८७-८८	१,५९,९१३	१,४८,९०३	. .
१९९०-९१	२,३६,६८९	२,२५,०८९	३०,०७१
१९९७-९८	४,१८,१७४	६,४९,१३६	. .
२०००-२००१	४,८०,३१६	६,५३,२७९	. .
२००१-२००२	४,१०,२९५	८,०६,३९८	१,२४,७१०

चाकूर बाजार समितीच्या आवारातील परवाना धारक व्यापाऱ्यांची माहिती खाली दिली आहे.

तपशील		१९९०-९१	२००१-२००२
अडते	नवीन	१०	. .
	नुतनीकरण	८९	२८
अ वर्ग	नवीन	३७	५०
	नुतनीकरण	९३	२७३
प्रक्रिया	नवीन	४	. .
	नुतनीकरण	१	२
स्वस्त धान्य	नवीन	४	. .
	नुतनीकरण	३	२३
ब वर्ग	नवीन	१३१	९४
	नुतनीकरण	१०२	४०१
प्रक्रिया	नवीन	१८	७
	नुतनीकरण	७	३५
स्वस्तधान्य	नवीन	१३	४
	नुतनीकरण	३	२४
हुंडेकरी	नवीन	. .	. .
	नुतनीकरण	२	१
अडते सहाय्यक	नवीन	२	. .
	नुतनीकरण	. .	. .
हमाल	नवीन	९	२६
	नुतनीकरण	८	५९

Maharashtra State Gazetteers

निलंगा कृषि उत्पन्न बाजार समिती : (स्थापना १९६०) या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात १४४ गावाचा समावेश आहे. मुख्य बाजार निलंगा येथे असून उपबाजार कासार सिरशी येथे आहे. मुख्य बाजार आवाराचे क्षेत्र ६.४० हेक्टर असून व्यापारी व शेतकऱ्यांसाठी तेथे आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. निलंगा हे रस्त्याने लातूर व बिदर या व्यापारी पेठाशी जोडले असल्याने येथील कृषी माल लातूर व बिदर येथे पाठविला जातो. इ.स.१९६३-६४ मध्ये या बाजार आवारात २१,३०,१३१ रुपये किंमतीच्या ३५,१५७ क्विंटल मालाची आवक झाली होती. या काळात समितीचे मालकीचे आवार नसल्यामुळे जागा भाड्याने घेऊन बाजार सुरू केला होता. या बाजार आवारात भुईमूग शेंग, उडिद, ज्वारी, गहू व गुळ या कृषी मालाची उलाढाल मोठ्या प्रमाणात होत होती.[७८]

बाजार समितीच्या आवारात कृषी मालाची झालेली उलाढाल खाली दिली आहे.

वर्ष	एकूण विक्री (क्विंटल)	एकूण किंमत (रुपये)
१९९६-९७	४४,७३३	७,१५,३३,२१९
१९९७-९८	४५,७०९	३,१०,७९,०६३
१९९८-९९	५०,५५६	५,९२,९३,१०५

समितीच्या आवारात तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, हरभरा, मुग, तुर, उडीद, भूईमूग शेंग, शेंगदाणा, एरंडी, जवस, करडी, कारळ, तीळ, मोहरी, अंबाडी, कापूस, रुई, गुळ, सरकी, राजगीरा, मसूर, वाटाणा, कुलथी, मटकी, मेथी, धने, चिंच, मिरची, लसूण, कांदे, हळद, लोणी, तूप, दुध, सरसू, ऊस, मका, साखर, बडीशेप, आद्रक, जिरा, नारळ, आंबा, मोसंबी, संत्री, लिंबू, सुपारी, इत्यादी कृषी मालाचे विनियमन करण्यात येते.

इ.स.१९९६-९७ ते १९९८-९९ या कालावधीतील समितीचे उत्पन्न व खर्चाची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष	उत्पन्न (रुपये)	खर्च (रुपये)
१९९६-९७	९,९१,०७८	११,३६,३८३
१९९७-९८	८,८४,९२३	१०,६७,६९८
१९९८-९९	७,८९,८२४	८,४३,३३९

सन १९९८-९९ मध्ये समितीचे परवाना धारक अडते **अ** वर्ग ४६, **अ** वर्ग खरेदीदार ९४, **ब** वर्ग खरेदीदार १४, **क** वर्ग खरेदीदार दोन, मापाडी १५, हमाल ३५ व प्रक्रियाकार दोन होते.[७९]

औसा कृषि उत्पन्न बाजार समिती : (स्थापना २ ऑक्टोबर १९८२) या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात ११४ खेड्यांचा समावेश आहे. मुख्य बाजार आवाराचे क्षेत्र ८.७ हेक्टर आहे. या बाजार समितीने ९ जानेवारी १९८३ पासून कृषी मालाची खरेदी विक्री सुरू केली. किल्लारी (स्थापना ३१.११.१९८४) व उजनी (स्थापना १४.११.१९९०) येथे उपबाजार

७८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.५२१.

७९. कृषि उत्पन्न बाजार समिती, निलंगा, १९९८-९९, वार्षिक अहवाल.

आहेत. किल्लारी उपबाजार तळ भूकंपानंतर बंद होता. तो २६ जानेवारी १९९४ रोजी सुरू झाला. हा उप-बाजार शासनाने तात्पुरत्या स्वरूपात दिलेल्या ८० x ८० मिटर जागेवर चालू आहे. बाजार समितीने शासनाकडे केलेल्या मागणीनुसार शासनाने किल्लारी भुकंपग्रस्त उप-बाजार तळासाठी ९.७१२ हेक्टर जागा किल्लारी गावच्या पुनर्वसन आराखड्यात आरक्षित केली आहे. तर उजनी उप-बाजार तळासाठी उजनी गायरान मधील जागा मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे.

औसा बाजार समिती उत्पन्न गटानुसार **क** वर्गात असून व्यापारी व शेतकऱ्यांसाठी तेथे आवश्यकत्या सुविधा उपलब्ध आहेत. या बाजार आवारात १९८५-८६ मध्ये ३३,२९,९८६ रुपये किंमतीच्या ५२,४८५ क्विंटल मालाची आवक झाली. इ.स.१९९०-९१ ते २००४-०५ या कालावधीत झालेल्या उलाढालीची माहिती खाली दिली आहे.

तपशील	१९९०-९१	१९९५-९६	२०००-२००१	२००४-२००५
एकूण आवक (क्विंटल)	१०,०३१	५८,३८४	५६,७७८	७२,२८१
एकूण किंमत (रुपये)	५५,२५,६४३	३,०८,१२,८०३	४,३०,९४,२०३	६,०३,८८,८११

या बाजार आवारात गहू, मूग, कारळ, मिरची, कांदा, एरंडी, सूर्यफुल, अंबाडी, तीळ, मोहरी, बाजरी, उडीद भुईमूग, हुलगा, हरभरा, भाजीपाला, धने, खपली, ज्वारी, तूर, जवस, करडी, मका, चिंच इत्यादी कृषी मालाचे विनियमन होते.

बाजार समितीने दिनांक २८.७.१९८३ रोजी पशुधनांचा बाजार सुरू केला. इ.स.१९९६-९७ मध्ये समितीच्या बाजार आवारात एकूण २५,८७५ पशुधनांची आवक व २०,३३३ विक्री झाली होती. इ.स.१९८४ ते २००१ पर्यंतची पशुधनांची-खरेदी व विक्रीची माहिती तक्ता क्रमांक ११ मध्ये दिली आहे.[८०]

मार्च १९९८ मध्ये औसा, उजनी व किल्लारी येथे ४९६ व्यापाऱ्यांना समितीने परवाने दिले होते. त्याची माहिती खाली दिली आहे.

तपशील	१९८५-८६	१९९०-९१	१९९८-९९	१९९९-२०००	२०००-२००१	२००४-२००५
एकूण व्यापारी	१२२	१२६	१३६	१३३	१२४	१११

सन २००४-२००५ मध्ये समितीस अधिकृत व्यापाऱ्याकडून ६२,४७७ रुपये परवाना फी मिळाली होती.

इ.स.१९८५-८६ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे १,३७,८१८ रुपये व १,४९,१७२ रुपये होता. उत्पन्न व खर्चाची माहिती खाली दिली आहे.

तपशील	१९९०-९१	१९९५-९६	२०००-२००१	२००४-२००५
एकूण उत्पन्न (रुपये)	२,२५,५५३	६,३२,८६८	१०,१२,७०६	१६,३२,९०७
एकूण खर्च (रुपये)	१,५४,६८०	४,८२,६३२	१०,४९,६९८	१३,३६,७९१

८०. कृषि उत्पन्न बाजार समिती, औसा यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीआधारे. (मार्च १९९८ व नोव्हेंबर १९९९)

रेणापूर कृषि उत्पन्न बाजार समिती : (स्थापना दिनांक ११.९.१९९८) या बाजार समितीचे कामकाज १९८५ पासून लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे देखरेखीखाली चालत असे. आगस्ट १९८८ पासून रेणापूर समितीचे कामकाज स्वतंत्रपणे सुरू झाले. या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात ७६ गावांचा समावेश आहे. मुख्य बाजार आवार तीन हेक्टर असून पानगाव (स्थापना ११.९.१९९८) येथे उपबाजार आहे. मुख्य बाजार आवारात व्यापारी व शेतकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत.

इ.स.२०००-२००१ या वर्षी बाजार समितीने ३,०८,१३,४७२ रुपये किंमतीच्या ६९,२४१ क्विंटल कृषी मालाची उलाढाल केली. इ.स.२००४-०५ मध्ये ३,९०,८७,३८१ रुपये किंमतीच्या ३१,३३१ क्विंटल मालाची आवक झाली. यावर्षी मार्केटिंग फेडरेशनने ४,९७,८६,९१७ रुपये किंमतीचा २९,७७७ क्विंटल कापूस खरेदी केला. रेणापूर ही कापूस, हैब्रीड व ज्वारीसाठी प्रसिद्ध बाजारपेठ असून लातूर येथे कापसाची निर्यात केली जाते. ही बाजार समिती कापूस, बाजरी, जवस, तीळ, सरकी, मोहरी, रानवत, लसून, डाळी, लिंबू, कलिंगड, पालेभाज्या, सोयाबीन, हिरडा, विड्याची पाने, रुई, तूर, भूईमूगशेंग, करडी, तंबाखू, वल्लोरे, लाख, वाटाणा, तेल, मका, केळी, पेरू जिरे व तांदूळ, गुळ व पाक, कुलथी, मेथी, कांदे, मटकी, चिंच, ऊस, द्राक्षे, सुर्यफुल, मासळी, गहू, मसूर, जव, कांगणी, धने, हळद, उडीद, ताग, आले, चवळी, चिकू, बटाटे, डिंक, विलायची, ज्वारी, हरबरा, एरंडी, जाई, मिरची, आंबे, वरी, खरबुजे, इत्यादी कृषी मालांचे विनियमन करते.

इ.स.२०००-०१ मध्ये बाजार समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे ४१०,७९५ रुपये व ३,४९,७१० रुपये होते. ते २००४-०५ मध्ये १०,६२,६४३ रुपये व ६,५४,३११ रुपये झाले.

समितीच्या आवारातील परवानाधारक व्यापारी व अनुज्ञाप्ती धारकांची माहिती खाली दिली आहे.

अनुज्ञाप्तीचा प्रकार	२०००-२००१	२००४-२००५
एकूण अडते	६६	५८
अ वर्ग खरेदीदार	४६	५२
ब वर्ग खरेदीदार	६	६
हमाल	३२	६०
प्रक्रियाकार	३	३
मिळालेली अनुज्ञाप्ती (रुपये)	२९,९२०	२०,८३४

सहकारी विपणन

शेतकऱ्यांच्या मालास योग्य भाव मिळावा या हेतूने सहकारी खरेदी विक्री संस्था स्थापन करण्यात आल्या. पतपुरवठा शेतीमालाशी संलग्न केल्यामुळे खरेदी विक्री संस्थाद्वारे शेतमालाची योग्य भावाने विक्री करून शेतकऱ्यांच्या गरजा भागविणे सुकर झाले आहे. तालुका पातळीवरील खरेदी-विक्री संघ प्राथमिक विपणन संस्था म्हणून ओळखली जाते.

शेतीसाठी अवजारे बी-बियाणे व खते पुरविणे व शेतमालाची किफायतशीर विक्री करणे ही प्राथमिक विपणन संस्थाची कर्तव्ये आहेत.

तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात उस्मानाबाद, निलंगा, उदगीर, परांडा, लातूर, औसा, भूम, कळंब, उमरगा, तुळजापूर व अहमदपूर येथे तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघ होते व उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट सहकारी मार्केटिंग सोसायटी, लातूरला होती. इ.स.१९६५-६६ मध्ये या सहकारी संस्थांनी एकूण ३,३६,२१,३०१ रुपये किंमतीच्या मालाची उलाढाल केली होती.

लातूर जिल्हा अस्तित्वात आल्यानंतर १९८३-८४ मध्ये लातूर येथे जिल्हा खरेदी-विक्री संघ व प्रत्येक तालुक्यात एक या प्रमाणे तालुका खरेदी-विक्री संघ कार्यरत होते. या संघानी केलेल्या कार्याची माहिती तक्ता क्रमांक १२ मध्ये दिली आहे.

राज्य व्यापार व रास्त भावाची दुकाने

जागतिक महायुद्ध काळात सर्वच जीवनोपयोगी वस्तूंची तीव्र टंचाई निर्माण झाली. त्यामुळे भाव वाढून काळ्या बाजारास प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे लोकक्षोभ वाढीत भर पडली. प्राप्त परिस्थितीत लोकक्षोभ कमी करण्यासाठी १९४२ मध्ये भारत सरकारने तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, साखर, रॉकेल, कापड, इत्यादी जीवनोपयोगी वस्तूंच्या खुल्या व्यापारावर नियंत्रण घालून त्या वस्तूंचे शिधावाटप केंद्रांमार्फत वाटप करण्यास सुरूवात केली. दुसऱ्या महायुद्धाच्या कालावधीत सक्तीच्या लेव्ही पध्दतीने ज्वारी, बाजरी व इतर अन्नधान्यांची खरेदी करण्यात आली. ही लेव्ही पद्धती १९४८ पर्यंत होती. हैद्राबाद राज्यातही युद्धजन्य परिस्थितीमुळे वस्तूंचा तुटवडा झालेला होता. त्यामुळे तेथेही अंशत: लेव्ही खरेदी कायद्याने अंमलात आणली होती.

युद्धकाळात उपभोग्य मालाच्या खुल्या व्यापारावर नियंत्रण घातले गेल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतींना आळा बसला आणि गरीब जनतेस रास्त भवाने अन्न धान्ये व जीवनोपगी वस्तू मिळू लागल्या. इ.स.१९५० मध्ये खुल्या व्यापारावर घातलेली नियंत्रणे शिथील केली गेली व १९५४ नंतर ती पुर्णपणे उठविण्यात आली. परंतु १९५६ च्या अन्नधान्य टंचाईमुळे वरील वस्तूंच्या खुल्या व्यापारावर पुन्हा नियंत्रण घालणे भाग पडले. तांदूळ व गव्हाच्या विक्रीसाठी विभाग पाडण्यात आले व धान्यांच्या व्यापारावर जिल्हाबंदी घालण्यात आली. धान्यांचा पुरवठा फक्त रास्त भावाच्या दुकानामधूनच करण्यात येऊ लागला. भारत सरकारने नोव्हेंबर १९५८ मध्ये अन्नधान्यांचा राज्य व्यापार करण्याचे ठरवून एप्रिल १९५९ पासून राज्य व्यापारास प्रत्यक्ष सुरूवात झाली.

साखर गहू, ज्वारी, रॉकेल इत्यादी दैनंदिन गरजांच्या वस्तू उपभोक्त्यांना विशेषत: गरीब जनतेस रास्त भावाने मिळाव्यात या उद्देशाने सरकारने रास्त भावांची दुकाने उघडण्यास प्रोत्साहन दिले.

तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात १९६४, १९६५ व १९६६ मध्ये अनुक्रमे ६३३; १,१८७ व १,१९२ रास्त भावाची दुकाने होती.[८१]

८१. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.५२९.

सन १९९४ मध्ये लातूर जिल्ह्यात १,२२२ व इ.स.२००५ मध्ये १,३४९ रास्त भावाची दुकाने होती. याव्यतिरिक्त अकार्यान्वित दुकानांची संख्या ७३ होती. तालुकानिहाय रास्त भावाची दुकाने खाली दिली आहेत.[८२]

तालुका	१९९५-९६			२०००-२००१		
	सहकारी संस्थाची दुकाने	खाजगी दुकाने	एकूण शिधापत्रिका	सहकारी संस्थाची दुकाने	खाजगी दुकाने	एकूण शिधापत्रिका
लातूर	९३	१३१	५९,७००	९९	१४५	१,१७,०००
औसा	४३	१३९	३२,०००	४३	१५५	६२,०००
निलंगा	५६	१७६	४५,५०५	४४	१३९	६५,४००
उदगीर	८०	१८०	५०,०००	४९	१०२	६६,०००
अहमदपूर	३९	१३८	२६,०००	२९	१३५	४६,७००
रेणापूर	३८	७६	१६,८६२	३८	७६	२६,९००
चाकूर	०	०	१४,७५७	२३	८९	४०,०००
जळकोट	०	०	०	१२	४६	५,०००
देवणी	०	०	०	२०	४५	१७,०००
शिरुर अनंतपाळ	०	०	०	७	४८	१३,०००

ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १५,००० रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा कुटुंबांना पिवळ्या शिधापत्रिकास पात्र ठरविण्यात आले असून जिल्ह्यात २०००-२००१ मध्ये पिवळ्या शिधापत्रिका १,१७,०००, पांढऱ्या शिधापत्रिका १८,००० व केशरी शिधापत्रिका ३,२४,००० चे वाटप करण्यात आले. पिवळ्या शिधापत्रिका धारकास प्रतीमहा प्रतीकार्ड २५ किलो गहू, १० किलो तांदूळ अनुक्रमे ५ रुपये व ६ रुपये किलोप्रमाणे पुरविण्यात येते. जून २००५ अखेरची माहिती खाली दिली आहे.

(मे.टन)

तालुका	कार्ड	अनुज्ञेय नियतन		उचल		वाटप	
	(संख्या)	गहू	तांदूळ	गहू	तांदूळ	गहू	तांदूळ
लातूर	२१,२३१	४५१	१८०	३४१	१९४	४४७	१८६
औसा	१३,६०९	२८८	११५	२७९	१०८	२३९	९८
रेणापूर	६,९४२	१४७	५९	४४	६४	१४४	६०
उदगीर	१४,६७७	३१२	१२५	१८०	६१	१२८	६०
निलंगा	१५,४८७	३२८	१३२	१२९	१३६	२१७	७९
अहमदपूर	१५,०६३	३२०	१२८	२५१	१११	२७६	१०८
चाकूर	९,२००	१९६	७८	१८५	७४	१५३	७०
देवणी	३,३४५	७१	२८	७१	२८	७२	२८
जळकोट	४,२५१	९०	३६	२२८	१०५	९२	३८
शिरुर अनंतपाळ	४,२२३	९०	३६	९०	३६	७१	२०
एकूण	१,०८,०२८	२,२९३	९१७	१,७९८	९१७	१,८३९	७४७

८२. जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर (जून १९९४ व मार्च १९९९) यांनी पाठविलेल्या माहिती आधारे.

किरकोळ व घाऊक व्यापार

पूर्वी किरकोळ वस्तूंची दुकाने लहान होती व त्यात मोजक्याच वस्तू विक्रीस ठेवल्या जात असत. गरजेनुसार लोक आठवडे बाजारातून वस्तू एकदम खरेदी करीत. लोकांच्या गरजा बदलत गेल्या, त्यानुसार किरकोळ दुकानांचे स्वरूपही बदलत गेले. हा बदल ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात मोठ्या प्रमाणात झाला. त्याचे मुख्य कारण म्हणजे नागरी भागात लोकांचे झालेले स्थलांतर होय.

जिल्ह्यामध्ये किराणा, कापड, स्टेशनरी, मिठाई, तयार कपडे, विजेची उपकरणे, भांडी इत्यादी विविध प्रकारची दुकाने आढळतात. अधिक लोकसंख्येमुळे नागरी भागात अशा दुकानांची संख्या अधिक आढळते. सन २००३-२००४ मध्ये घाऊक ग्राहक संस्थांची संख्या १७ व किरकोळ सहकारी संस्थांची संख्या ५० होती.

आठवडे बाजार

आठवडे बाजार फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. अन्नधान्य, डाळी, तेल, मसाले, गूळ, कापड, फळे, भाजीपाला, मासळी, तांबे-पितळीची भांडी इत्यादी विविध प्रकारच्या वस्तू या बाजारात विक्रीस आणल्या जातात. बाजारांच्या दिवशी फेरीवाले व व्यापारी आपापली दुकाने बाजारात लावतात. तसेच आसपासच्या खेड्यातील शेतकरीसुद्धा आपला माल बाजारात विक्रीस आणतात.

लातूर जिल्ह्यातील काही महत्वाच्या खेड्यांमध्ये आठवडी बाजार भरतात. सन १९९१ मध्ये जिल्ह्यातील ९१४ खेड्यांपैकी ५० खेड्यांमध्ये अशा प्रकारचे आठवडी बाजार भरत होते. त्यापैकी ४४ बाजार जवळच्या शहरांपासून १६ ते ५० कि.मी.अंतरावर व इतर ६ बाजार ६ ते १५ कि.मी. अंतरावरील खेड्यामध्ये होते. त्यांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे होती:-[८३] लातूर ११, अहमदपूर १०, उदगीर ८, निलंगा १२ व औसा ९.

यात्रा

बहुतांश यात्रा स्थानिक साधुसंतांच्या किंवा धार्मिक उत्सवानिमित्त भरतात. मोठ्या यात्रेत जनावरांची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणात होते. यात्रेत लहान-मोठे व्यापारी आपली दुकाने लावतात. अशा तात्पुरत्या दुकानांमधून शेतीमालाची मोठ्या प्रमाणात उलाढाल होते. लातूर येथील श्री सिद्धेश्वर जिल्ह्याचे ग्रामदैवत व श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्ध असून शहरातील जगदंबा मंदिरात नवरात्र महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करतात. उदगीर तालुक्यातील हत्तीबेट (देवर्जनजवळ) येथे दसऱ्याला (अश्विन शुद्ध १०) भरणारी यात्रा जिल्ह्यातील दुसरी महत्त्वाची यात्रा होय. तसेच उदगीर येथे पौष पौर्णिमेला हावगी स्वामींची यात्रा भरते. त्यावेळी भक्तगण आगीतून चालत जातात. त्याला "आग्गी" असे म्हणतात. येथे प्रत्येक एकादशीला हजारो भाविक गंगाराम महाराजांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी येतात.[८४]

सन २००७ नध्ये जिल्ह्यात भरणाऱ्या तालुकानिहाय यात्रांची माहिती खाली दिली आहे. लातूर तालुक्यात विविध ठिकाणी १८ यात्रा भरतात. त्यामध्ये लातूर येथील जिल्ह्याचे श्रद्धास्थान व ग्रामदैवत श्री. सिद्धेश्वर (माघ १३) यात्रा, लातूर शहरातील जगदंबा मंदिरात

---

८३. **डिस्ट्रिक्ट सेन्सस हॅण्डबुक,** लातूर, १९९१, पृ.४१ व ३७.

८४. कित्ता, पृ.४७.

नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात होतो. श्री. सिद्धेश्वर यात्रेत अंदाजे ४० ते ५० हजार लोक जमतात. औसा तालुक्यात एकूण १६ ठिकाणी यात्रा भरतात. त्यामध्ये देवतळ व खरोसा बेट येथे जगदंबा देवी (कोजागिरी पोर्णिमा) व किल्लारी येथे श्री. निलकंठेश्वर (राखी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी), अहमदपूर तालुक्यात एकूण १२ ठिकाणी यात्रा भरतात. त्यामध्ये रोकडा सावरगाव येथे श्री संत बापुदेव महाराज यात्रा (महाशिवरात्र), उदगीर तालुक्यात एकूण १० ठिकाणी यात्रा भरतात. त्यामध्ये शंभुउमरगा येथे महादेव यात्रा (मार्च) व उदगीर येथे हावगी स्वामी (जानेवारी) यात्रा भरते. निलंगा तालुक्यात एकूण २६ ठिकाणी, चाकूर तालुक्यात एकूण ११ ठिकाणी व शिरुर अनंतपाळ तालुक्यात उजेड येथे महात्मा गांधी (जानेवारी २६, २७ व २८) यात्रा भरते.[८५]

वजने व मापे

हैद्राबाद संस्थानात १९४७ पर्यंत एकरूप अशी वजने किंवा मापे अस्तित्वात नव्हती. त्यावेळी खेड्यात व शहरात वेगवेगळी वजने व मापे होती. मुंबई प्रांतात १८४७ मध्ये प्रमाणित वजने व मापे अस्तित्वात आली. एकोणीसाव्या शतकाच्या सहाव्या दशकात हीच वजने व मापे हैद्राबाद संस्थानात लागू केली होती. तरी त्यांचे काटेकोरपणे पालन केले जात नव्हते. मुंबई वजने व मापे कायद्यात १९३२ मध्ये दुरूस्त्या करण्यात आल्या. हीच वजने व मापे हैद्राबाद संस्थानातही लागू करण्यात आली व त्यानुसार हैद्राबाद वजने व मापे कायदा १३५६ फसली (१९४७) मध्ये मंजूर करून त्याच वर्षी अंमलात आणला. त्यानुसार जिल्ह्यात मापांचे पुढील प्रकार अस्तित्वात होते. वजने - आठ गुंजा = एक मासा, १२ मासे = एक तोळा, पाच तोळे = एक छटाक, सोळा छटाक = एक शेर, चाळीस शेर = एक मण, ३ मण = पल्ला आणि २० मण = एक खंडी, भुईमूगशेंग मोजण्यासाठी मात्र पल्ल्याचा वापर करीत असत. ही मापाची पद्धत आता उपयोगात नाही. द्रव पदार्थासाठी ६० मिनिम (एक मिनिम = एक थेंब) = १ फ्लुईड ड्रॅम (एक चहाच्या चमच्याएवढा), आठ फ्लुईड ड्रॅम - एक फ्लुईड औस (एक औस मोठ्या चमच्याएवढा असतो), पाच औस = एक जील, वीस औस किंवा चार जील = एक पिंट, दोन पिंट = एक क्वार्ट, चार क्वार्ट = एक गॅलन व साडे एकवीस गॅलन = एक बॅरल. लांबी मोजण्यासाठी तीन फूट = एक वार, १,७६९ फूट = एक फर्लांग व आठ फर्लांग = एक मैल, हे कोष्टक सर्वत्र अस्तित्वात होते. कोणत्याही विक्रेत्याने फसगत केली तरी चाचणी व तपासणीची शासकीय पातळीवर व्यवस्था नव्हती. कित्येक ठिकाणी व्यापारी दोन प्रकारची वजने व मापे वापरीत. शेतकऱ्यांकडून धान्य घेताना एक माप व गिऱ्हाईकाला वस्तू देतांना दुसरे माप वापरत. अनेक ठिकाणी वजनांऐवजी दगडांचा उपयोग केला जात असे. वजने व मापे जनतेच्या दैनंदिन व्यवहाराशी निगडित असल्यामुळे त्यांच्यात समानता आणण्याची गरज भासू लागली. त्यासाठी कमीत कमी दोष असलेल्या मेट्रीक पद्धतीसाठी १९५६ मध्ये केंद्र सरकारने मेट्रीक वजने व मापे अधिनियम संमत केला. त्यानुसार दहा वर्षांच्या आत मेट्रीक वजने व मापे अमलात आणण्याचे ठरले. या कायद्यावर आधारित असा मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अधिनियम, १९५८ हा कायदा मुंबई राज्याने संमत केला. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात हाच अधिनियम लागू करण्यात आला.

---

८५. पोलिस अधीक्षक लातूर, यांनी दिलेली माहिती.

तक्ता क्रमांक १

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची माहिती

(रुपये लाख)

तपशील	१९८४-८५	१९९०-९१	१९९५-९६	२०००-२००१	२००४-२००५
(१) सभासद	८७६	१,११७	१,३२७	१,४८८	१,६६४
संस्था	८७५	१,११६	१,३२६	१,४८७	. .
व्यक्ती	. .	. .	. .	. .	. .
राज्य शासन	१	१	१	१	. .
(२) वसूल भाग भांडवल	१,४१.४२	५,५७.०५	१०,९४.१७	२१,९५.१५	३१,३२.७८
सभासद	१,२६.४२	५,४०.५५	. .	. .	. .
शासकीय	१५	१६.५	१६.५	. .	. .
(३) राखीव व इतर निधी	१,३७.०४	४,०३.६७	८९.६६	३७,०३.८९	९८,९७.००
(४) ठेवी	१६,९६.०७	५०,३१.५०	१,३७,१३.३४	३,४६,३४.५४	४,६८,९५.४०
व्यक्ती	१३,३७.५२	३४,०८.५२	१,१४,३६.१७	२,४३,४२.३९	३,१६,५४.३२
संस्था	१,८९.८३	४,२४.८७	८,८६.४२	१९,९७.०२	९९,७७.६९
इतर	१,६८.७२	७,९८.११	१३,९०.७५	८२,९५.१३	५२,६३.३९
(५) घेतलेली कर्जे	६,०७.५१	३५,९७.८५	६५,८७.७५	९३,०७.१०	९२,१९.७२
(६) गुंतविलेले भाग भांडवल	५,५६.५२	१६,५०.३७	२१२.५	३,७६.५८	५,६८.९९
(७) गुंतवणूक	. .	. .	३७,००.८५	१,१४,९९.५२	१,२२,९१.८२
(८) दिलेली कर्जे	१९,५८.६२	९६,१२.१४	१,७६,०५.२७	३,७२,६८.७३	५,५०,९०.७५
शेती अल्प मुदत	१०,०८.५८	३९,२०.३६	७९,६१.४७	१,५१,२२.०१	१,६८,५६.१८
शेती मध्यम मुदत	१,७१.४२	१०,१०.८५	२०,७३.०५	५१,२३.६९	४,७१.८५
इतर	९.१२	३५,८४.१४	१,००,३८.४९	१,६७,४३.३२	३,३१,९९.७९
दिर्घ मुदत	७,६९.५०	९६.७९	३.९७	२,७९.७१	४८,६२.९३
(९) खेळते भांडवल	२९,२१.३१	१,११,५४.५६	२,४१,८९.६५	५,५२,१०.७३	७,७६,३४.४६
(१०) शाखा कार्यालये	४६	९६	७९	१०२	१,०३+१

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक २

जिल्ह्यातील दुग्धव्यवसाय सहकारी संस्थाची माहिती

(रुपये हजार)

तपशील	१९९९-२०००	२०००-२००१
१. एकूण संस्था	६६२	७२२
२. दूध संघ	२	२
३. सभासद	३८,०४९	४१,४९७
४. प्राथमिक दूध संस्था	. .	७२२
५. वसूल भाग भांडवल	१,०१८	१,०६९
६. राखीव इतर निधी	१,९०१	१,९८५
७. खेळते भांडवल	११,९२३	१२,५८९
८. दूध खरेदी (लिटर)	७३,७७४	८१,१५१
९. नफा	३,५१७	४,५०८
१०. तोटा	३,८२१	३,५४३

तक्ता क्रमांक ३

जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्थाची माहिती

(रुपये हजार)

तपशील	१९९९-२०००	२००४-२००५
१. एकूण संस्था	६९	७८
२. सभासद	१,३४५	१,९२०
३. वसूल भाग भांडवल	२९१	५९०
(अ) स्वत:चे	७८	९५
(ब) सरकारी	२१३	४९५
४. राखीव इतर निधी	४	९
५. कर्जे	६१	६८
६. पकडलेले मासे (मे.टन)	२,९१५	३,२१०
७. किंमत	५८,३००	६४,२००
८. विक्री	५८,३००	६६,५००
९. नफा	४३	२,३००
१०. तोटा	६८	. . .

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक ४

जिल्ह्यातील कुक्कुट पालन सहकारी संस्थाची माहिती

(रुपये हजार)

तपशील	१९९५-९६	२००१-२००२	२००४-२००५
१. एकूण संस्था	२१	२१	२५
२. सभासद	९८९	९९६	१,२१९
३. वसूल भाग भांडवल	३,३११	३,३४५	४,३७५
४. (अ) स्वत:चे	२,०११	२,०११	३,०११
(ब) सरकारी	१,३००	१,३००	१,३००
५. राखीव व इतर निधी	१,८४५	१,९१०	१,९२५
६. खरेदी	२,११५	२,१३०	२,१५५
७. विक्री	१,४४०	१,५५५	१,५९५
८. नफा	. .	३,३५५	२,७५०
९. तोटा	१०८	१३३	१३५

तक्ता क्रमांक ५

जिल्ह्यातील मजूर संस्था

(रुपये हजार)

तपशील	२००२-२००३	२००४-२००५
१. एकूण संस्था	४५८	४८७
२. सभासद	१०,६७७	१,४२५
३. वसूल भाग भांडवल	८,५५७	१,४८७
४. निधी	५,५७६	२८४
५. कर्जे	३,००	. .
६. (अ) सरकारी	२	२
(ब) जिल्हा मध्यवर्ती बँक	२,०१६	८,४३३
(क) इतर	. .	. .
७. दिलेली मजूरी	१,७६,९१२	१,४०,७६९
८. नफा संस्था संख्या	२४०	२०१
९. तोटा संस्था संख्या	२१८	२८६

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक ६

जिल्ह्यातील गृहनिर्माण संस्था

(रुपये हजार)

तपशील	२००२-२००३	२००४-२००५
१. एकूण संस्था	४१२	४२६
२. सभासद	८,२८१	९,७३६
३. वसूल भाग भांडवल	१,४७२	१,२१७
४. राखीव निधी	१,३६०	९६
५. बांधलेली घरे (संख्या)	२,१७३	५,१९७
६. कर्जे	४,८८९	४,०५५
१. सरकारी	. .	१,२१२
२. विमा कंपनी	३५०	. .
३. हौसिंग फायनान्स सोसायटी	२,९३६	२१,६७२
४. इतरांकडून	. .	. .
५. सेंट्रल फायनान्स एजन्सी	. .	. .
६. हौसिंग व डेव्हलपमेंट कार्पोरेशन	. .	३,४८७

तक्ता क्रमांक ७

जिल्ह्यातील वाहतूक सहकारी संस्था

(रुपये हजार)

तपशील	२००२-२००३	२००४-२००५
१. एकूण संस्था	१२	१२
२. सभासद	१३६	१३६
३. वसूल भाग भांडवल	१२३	१२,१०२
४. निधी	६५०	७३
५. कर्जे	. .	५०
६. मालकीची वाहने	१०३	१०५
७. वाहतूकीचे उत्पन्न	१११	. .
८. नफा (संस्था संख्या)	३	. .
९. तोटा (संस्था संख्या)	९	१२

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक ८

जिल्ह्यातील औद्योगिक वसाहती

(रुपये हजार)

तपशील	२००२-२००३	२००४-२००५
१. एकूण संस्था	५	६
२. सभासद	८१५	८००
(अ) संस्था	४	४
(ब) व्यक्ती	८११	८२६
३. वसूल भाग भांडवल	. .	९,६१५
(अ) स्वतःचे	२३,३६७	२,१८९
(ब) सरकारचे	१,०३,५४६	७,४२८
४. राखीव व इतर निधी	२,१७५	१,२६०
५. कर्ज	५६,६८४	४९८
कायम	. .	६,१३७
(अ) यंत्र सामग्री	५१,५८५	४,७७३
(ब) जमीन इमारत	५,१२,४०१	१,३९८
(क) इतर	१७	. .
६. बांधकाम पूर्ण केलेले	३,०५७	. .
७. नफा (संस्था संख्या)	४	४
८. तोटा (संस्था संख्या)	१	२

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक ९

लातूर उच्चतम कृषि उत्पन्न बाजारातील पशुधनांची खरेदी-विक्री.

(आवक नग, किंमत रुपये)

तपशील	आवक, किंमत	१९९५-९६	१९९७-९८	२००३-२००४
म्हैस	आवक	१,९९९	२,२६८	४,५२७
	किंमत	९,३१६,४५०	१,३०,०६,८००	३,३६,३०,४९१
बैल	आवक	४३४	४७४	८२७
	किंमत	१७,२८,७७५	२१,९६,०००	५०,४८,००१
वगार	आवक	१३६	१४३	१४७
	किंमत	५३३,३००	५५,९६,९००	९,१४,८८०
गाय	आवक	२३४	२४१	३३३
	किंमत	११,०७,३७०	१३,७८,३००	१,६०,९८१
गोऱ्हे	आवक	१३७	१५८	३४८
	किंमत	४,९०,४५०	७,७६,५००	२१,५१,९५०
कालवड	आवक	४४	४१	३०
	किंमत	१,३१,६००	१,५३,९५०	१,०६,६००
रेडा	आवक	१४	१२	२८
	किंमत	२५,३००	२१,३५०	१,४२,२००

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक १०

उदगीर कृषि उत्पन्न बाजार आवारातील पशुधनांची आवक व विक्री

(आवक-विक्री, किंमत-रुपये)

तपशील	आवक विक्री किंमत	वर्ष				
		१९८५-८६	१९९०-९१	१९९५-९६	२०००-२००१	२००४-२००५
म्हैस	आवक	६,३०७	९,७३६	६,५८८	५,५४४	. .
	विक्री	६,३०७	९,७३६	६,५८८	५,५४४	५,६४३
	किंमत	१,५७,६७,५००	४,८६,८०,०००	३,२९,४०,०००	३,३५,६१,०००	३,६३,१७,२००
बैल	आवक	३२६	५१६	१,१२७	४,११३	. .
	विक्री	३२६	५१६	१,१२७	४,११३	१,०९०
	किंमत	६,५२,०००	२०,६४,०००	५६,३७,०००	८,५४,६००	९५,२७,०००
गायी	आवक	५८०	६८५	१,४४२	१,०००	. .
	विक्री	५८०	६८५	१,४४२	१,०००	८०८
	किंमत	१४,५०,०००	२०,५५,०००	९६,८२,०००	१४,९४,०००	५२,५७,०००
शेळ्या/	आवक	४,९९१	८,८५४	६,२३४	३,६४४	. .
मेंढ्या	विक्री	४,९९१	८,८५४	६,२३४	३,६४४	८८७
	किंमत	३९,९२,८००	६१,९७,८००	६२,३४,०००	२३,८९,९१०	४,८४,५००
उंट	आवक	३५	२९	४२	८०	. .
	विक्री	३५	२९	४२	८०	. .
	किंमत	७०,०००	८७,०००	९,५०,०००	१६,१०,०००	. .
घोडे	आवक	३७१	३४१	१०३	१	. .
	विक्री	३७१	३४१	१०३	१	१०६
	किंमत	५,५६,५००	८,५२,५००	३,४७,०००	८००	३,७१,०००
गाढव	आवक	६	७	१६	५	. .
	विक्री	६	७	१६	५	. .
	किंमत	४,२००	४,९००	१९,२००	१२,५००	. .

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक ११

औसा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील पशुधनांची खरेदी-विक्री

(आवक नग-विक्री हजार रुपये)

तपशील		१९८५-८६	१९९५-९६	२०००-२००१	२००४-२००५
बैल	आवक	४,०५०	४,५९१	४,३०९	२,३६२
	विक्री	२,७०७	२,८५९	२,७४७	२,८२९
	किंमत	२,४३,६३,०००	२,३५,८६,७५०	२,६७,८३,२५०	२,३४,८७,४००
खोंड	आवक	२,२९२	३,००५	२,०५१	उ.ना.
	विक्री	१,३७५	१,७६५	१,३००	. .
	किंमत	१०,७२,५००	९७,०७,५००	१,१७,००,०००	. .
गाय	आवक	८८५	८७२	६३८	५९२
	विक्री	४१३	४८०	३८५	४६३
	किंमत	३३,०४,०००	२१,६०,०००	२१,१७,५००	२३,३२,३००
कालवड	आवक	२१५	२७६	१४९	उ.ना.
	विक्री	१०६	१२५	८७	. .
	किंमत	१,९०,८००	२,१२,५००	४,५६,७५०	. .
म्हैस	आवक	२,००५	२,१३६	२,८६५	१,९०६
	विक्री	१,०२०	१,२८२	१,१४७	१,५१७
	किंमत	९६,९०,०००	१,०२,५६,०००	१,७६,०००	१३,४६,३००
वागार	आवक	२३१	२५८	१९८	उ.ना.
	विक्री	११७	१३२	१०५	. .
	किंमत	२,५७,४००	२,६४,०००	१,८९,०००	. .
रेडे	आवक	८३	१२९	५२	उ.ना.
	विक्री	४१	७३	२४	. .
	किंमत	३४,८५०	५८,४००	२४,०००	. .
जर्सीगाय	आवक	१३४	१०५	९२	उ.ना.
	विक्री	६५	५९	५७	. .
	किंमत	९,१०,०००	८,८५,०००	६,५५,५००	. .
शेळी	आवक	६,८६०	७,३२४	८,३७३	उ.ना.
	विक्री	६,८६०	७,३२८	८,३७३	. .
	किंमत	७८,८९,०००	६१,५२,१६०	९६,२८,९५०	. .
बकरे	आवक	२,४४४	३,०१०	४,१८४	उ.ना.
	विक्री	२,४४४	३,०१०	४,१८४	. .
	किंमत	२५,६६,२००	१६,४०,४५०	६०,६६,८००	. .
मेंढ्या	आवक	२,०७३	३,०६२	१,७७०	१३,६९८
	विक्री	२,०७३	३,०६२	१,७७०	१३,६९८
	किंमत	२५,९१,२५०	१८,६७,९२०	२०,३५,५००	१,९७,८७,५००

सन २००४-२००५ मधील मेंढ्यांच्या उलाढालीत शेळयांचाही समावेश आहे.

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक १२

जिल्हा मध्यवर्ती व तालुका सहकारी संघ

(रुपये हजार)

तपशील	२००२-२००३	२००३-२००४	२००४-२००५
सभासद संख्या	१,०३७	१,०३७	१,४६६
१. संस्था	४०४	४०४	१,१०६
२. व्यक्ती	६३३	६३३	३६०
खरेदी			
कृषी उत्पन्न	८३,३०	१,६५,८९	. .
कृषी गरजा	. .	. .	१६६,७६
उपभोग्य वस्तू	३८,५३,५२	३९,०१,५२	२६,९०
विक्री			
स्वत: केलेली	४१,१४,१६	५०,३५,१०	२२०,६५
प्रतिनिधी	. .	. .	३९२
एकूण	४१,१४,१६	५०,३५,१०	२२४,५७
शेतकी गरजांची विक्री			
स्वत: व (प्रतिनिधी)	. .	. .	२१०,१९
खते	७७,०५	१२८,८७	१११,८०
बियाणे	३३,३२	६१,२९	७५,४३
शेतकी अवजारे	. .	८,५५	. .
इतर	. .	. .	१५,३१

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ७ : वाहतूक व दळणवळण

- ऐतिहासिक पार्श्वभूमि
- रस्ते विकास
- प्रमुख राज्य महामार्ग
- प्रमुख जिल्हा मार्ग
- इतर जिल्हा मार्ग
- ग्रामीण मार्ग
- नागरी रस्ते
- पूल
- वाहतूक प्रगणना
- हवाई धावपट्टी (विमान तळ)
- लोहमार्ग
- वाहने
- पर्यटकांसाठी सुविधा
- विश्रामगृहे
- राज्य परिवहन
- बसमार्ग
- डाक, तार, आणि दूरध्वनी सेवा
- आकाशवाणी
- दूरदर्शन
- तक्ते

प्रकरण ७

वाहतूक व दळणवळण

ऐतिहासिक पार्श्वभूमी :

लातूर जिल्ह्यात प्राचीन काळापासून रहदारीचे मार्ग अस्तित्वात असावेत आणि या जिल्ह्याचा देशाच्या इतर भागांशी या मार्गांव्दारे संपर्क आणि व्यापार चालत असावा. इसवी सन पूर्वीच्या ४ थ्या शतकात स्थापन झालेले मौर्य साम्राज्य दक्षिण भारतापर्यंत पसरले होते. त्या काळात मराठवाड्यातील तेर आणि शेजारच्या आंध्र व कर्नाटक या राज्यांना जोडणारा राजमार्ग लातूर जिल्ह्यातून जात असे. गुलबर्गा जिल्ह्यातील भिमा नदी काठावरील सध्याच्या सन्नती (प्राचीन सुवर्णगिरी) आणि तेर यांना जोडणारा राजमार्ग त्याकाळी लातूर जिल्ह्यातून जात होता. तसेच बलिपट्टण किंवा वाल्टिपट्टण येथून भारताचा रोमशी व्यापारी संपर्क होत असे. सन्नती आणि बलिपट्टण यांच्यातील संपर्क लातूर आणि तेर मार्गे होत असे.[१]

मराठवाडा प्रदेशावर सातवाहनांचे अनेक वर्षे राज्य असल्याचे ऐतिहासिक पुरावे आढळतात. या काळात व्यापार भरभराटीस आला होता. भूमार्ग आणि जलमार्गांव्दारे व्यापार चालत असे. त्या काळातील एकमार्ग म्हणजे पैठण-वेरूळ-पितळखोरा-बहाळ-भडोच हा होता तर दुसरा मार्ग पैठण-नेवासे-नाशिक-भडोच असा होता.[२] याच काळात महाराष्ट्रातील पैठण-भोकरदन-तेर(तगर)-नाशिक-जुन्नर-सोपारा-इत्यादी मोठी शहरे इतर शहरांशी रस्त्यांनी जोडली गेली होती. परंतु पेरिप्लसने वर्णिल्याप्रमाणे दक्षिण भारतातून भडोचला जाण्यासाठी घाटांमधून व डोंगराळ प्रदेशातून जाणारे मार्ग चांगले नव्हते. दळणवळणांच्या साधनांमध्ये बैलगाडी हे मुख्य साधन होते. जलद वाहतुकीसाठी बैल, घोडे, गाढवे यांचाही उपयोग होत असे. त्याप्रमाणे डोंगराळ भागामध्ये ज्या ठिकाणी बैलगाडी जाऊ शकत नसे अशा भागांमध्येही या जनावरांचा वाहतुकीसाठी उपयोग होत असे. काही वेळेस माल नेण्यासाठी हमालही करीत असत. चोरांपासून आपल्या मालाचे रक्षण व्हावे यादृष्टिने व्यापारी नेहमी काफील्याने किंवा जथ्याने (संयुक्तपणे) प्रवास करीत. निरनिराळ्या मंदिरांच्या ठिकाणी होणाऱ्या यात्रांप्रसंगी विशिष्ट जागी आपला माल जावून पोहचला पाहिजे यादृष्टिने ते त्यांचा प्रवास कार्यक्रम आखित. मुसलमान शासनकाळात बऱ्याच उपजातींनी काफल्याचा व्यवसाय स्वीकारला होता. ते एका गावावरून दुसऱ्या गावाला माल पोहचवित[३]. मोगल काळात बुऱ्हाणपूर-हैदराबाद मार्ग लातूर जिल्ह्यातील उदगीर मार्गे बिदर वरून जात होता अशी नोंद आहे.[४]

हैदराबाद राज्याच्या इम्पिरिअल गॅझेटिअर (१९०९) नुसार (तत्कालीन) उस्मानाबाद जिल्ह्यातील रस्त्यांची एकूण लांबी ४३७.७४ कि.मी. असून त्यापैकी २३१.७४ कि.मी. डांबरी आणि २०५.९९ कि.मी. खडीचे रस्ते होते. प्रमुख रस्ते पुढीलप्रमाणे होते :- लातूर ते ढोकी,

---

१. अधिक माहितीसाठी याच ग्रंथातील "प्राचीन काळ : इतिहास" पहावे.

२. काटे, पि. व्ही., "**मराठवाड्याचा इतिहास**" १९९९, पृ.६१.

३. **राज्य गॅझेटिअर, प्राचीन काळ, खंड-१, भाग-१,** २००२, पृ.६७१.

४. **हबीब इरफान, 'ॲन ॲटलास ऑफ दि मुघल एम्पाअर**, पृ.५८.

येरमाळा ते आंबा (बीड जिल्हा) बार्शी ते सोलापूर, उस्मानाबाद ते तांदुळवाडी, परांडा ते बार्शी आणि नळदुर्ग ते तांदुळवाडी.[५]

जुन्या उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सन १९१४ मध्ये २९७.७२ कि.मी. लांबीचे मार्ग होते. त्यामध्ये अहमदपूर-परांडा, तुळजापूर-येडशी, तुळजापूर-सोलापूर, हैदराबाद-सोलापूर, बार्शी-आंबेजोगाई या मार्गांचा समावेश होता. सन १९१४ ते १९३९ या काळात हैदराबाद सरकारने १०९.४३ कि.मी. लांबीचे रस्ते बांधले होते त्यामुळे १९३९ पर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यात ४०७.१६ कि.मी. लांबीचे रस्ते होते. यानंतर दुसरे जागतिक युद्ध आणि त्यानंतरच्या काळात रस्ते बांधण्याकडे लक्ष दिले गेले नव्हते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून मराठवाडा प्रदेशातून रेल्वे सेवा सुरू झाली. इ.स.१९०० मध्ये काचिगुडा ते हैदराबाद शहर मनमाडला रेल्वे मार्गाने जोडण्यात आले. परभणी ते परळी रेल्वे लाईन १९२१ ते १९३१ या दशकात निर्माण झाली, आणि परळी ते सिंकदराबाद या रेल्वे लाईनचा प्रारंभ झाला.

निझामी राज्यात दळणवळणाचा विकास झालेला नव्हता. पक्क्या सडका नसल्यामुळे व्यापारास अधिक चालना मिळू शकली नाही. निजामी राजवटीत इसवी सन १९४१ पर्यंत २२८३.६६ कि.मी. रस्ते होते. त्यात औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड, पैठण, रोटेगाव, अजिंठा हे रस्ते उल्लेखनिय आहेत. याशिवाय दुधना नदीवर पूल बांधण्यासाठी सुमारे दीड लाख रूपये खर्च करण्यात आले होते. उस्मानाबाद जिल्ह्यात हैदराबाद-सोलापूर रस्ता तयार करण्यात आला होता. त्याशिवाय परभणी जिल्ह्यात कोल्हा-मानवत रस्ता, नांदेड जिल्ह्यात नांदेड-माजलगाव आणि नांदेड-बासर रस्ता तर बीड जिल्ह्यात शहागड-बीड हे महत्त्वाचे रस्ते तयार करण्यात आले. या विविध रस्ते व पुलाच्या बांधणीसाठी सुमारे ३१ लाख रूपये खर्च करण्यात आले. तथापी, रस्ते तयार करण्याचे काम विशेष प्रभावीपणे हाती घेतले गेले नाही.[६]

परळी ते वैजनाथ हा ब्रॉडगेज मार्ग १९३३ मध्ये वाहतुकीसाठी सुरू केला. तत्पूर्वीच मिरज-लातूर नॅरोगेज रेल्वेमार्ग २१ एप्रिल १९०९ मध्ये निजाम सरकार आणि बार्शी लाईट रेल्वे कंपनी मध्ये झालेल्या लातूर एक्स्टेंशन करारानुसार १९११ मध्ये सुरू करण्यात आला. पूर्वी या रेल्वेस बार्शी लाईट रेल्वे म्हणून ओळखत होते.[७] लातूर जिल्ह्यात विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून रेल्वे हेच महत्त्वाचे दळणवळणाचे साधन होते. या काळात लातूर जिल्ह्यात वाहतुकीस योग्य असे पक्के रस्ते नव्हते. अस्तित्वात असलेले बहुसंख्य रस्ते केवळ बैलगाड्यांच्या संचारामुळे निर्माण झालेले धोपट मार्ग होते. त्यांची दुरुस्ती अथवा सुधारणा केली जात नव्हती. असे रस्ते पावसाळ्यात वाहतुकीस निकामी होत असत. त्यामुळे पावसाळ्यानंतर सुद्धा काही काळ जिल्ह्याच्या दळणवळणावर परीणाम होत असे. काही ठिकाणचे रस्ते मुरूम व दगडांनी तर काही रस्ते खडी व चिकणमाती घालून बनविलेले होते. उदगीर तालुक्यात काही ठिकाणी अजुनही उंटावरून वाहतूक चालते.

---

५. **इम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया, प्रॉव्हीन्शिअल सिरिज, हैद्राबाद स्टेट (१९०९)** पृ.२६५.
६. काटे. पि. व्ही., **मराठवाड्याचा इतिहास,** पृ.११५ व ११६.
७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.५३३-३४.

तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात १९५१ आणि १९६१ मध्ये अनुक्रमे ३७१.७५ कि.मी. आणि ७५८.०० कि.मी. लांबीचे रस्ते होते. तर १९६१ मध्ये जिल्ह्यात १७०.०० कि.मी. फक्त डांबरी रस्ते होते.[८] लातूर जिल्ह्याच्या निर्मिती नंतर १ एप्रिल १९८५ रोजी प्रमुख राज्य महामार्ग १२३ कि.मी., राज्य महामार्ग ३६२.३९ कि.मी., प्रमुख जिल्हामार्ग ६७३.१८ कि.मी. इतर जिल्हा मार्ग ७०७.९६ कि.मी. आणि ग्रामीण मार्ग ७६१.११ कि.मी. (एकूण २६२७.६४ कि.मी.) लांबीचे रस्ते होते. जिल्ह्याच्या निर्मितीनंतर खऱ्या अर्थाने रस्ते विकासाला गती प्राप्त झाली. जिल्ह्यात १९९१ मध्ये ७१९ खेड्यांना (७८.६७ टक्के) आणि ८७.७७ टक्के ग्रामीण लोकांना म्हणजेच १० खेड्यांपैकी ८ खेड्यांना वाहतुकीच्या सोयी उपलब्ध होत्या. तर ९१४ खेड्यांपैकी १९५ खेड्यांना (२१.३३ टक्के) वाहतुकीच्या कोणत्याही सोयी उपलब्ध नव्हत्या. जिल्ह्यातील ३९५ खेड्यांना (४३.२२ टक्के) पक्क्या रस्त्यांची सुविधा उपलब्ध होती.[९] निलंगा तालुक्यातील सर्व खेड्यांना आणि औसा तालुक्यातील ५१.९७ टक्के खेड्यांना दळणवळणाची सोय उपलब्ध होती. सन १९९१ मध्ये उदगीर तालुक्यातील ६९.११ टक्के खेड्यांना, औसा तालुक्यातील ६३.७८ टक्के खेड्यांना तर अहमदपूर तालुक्यातील फक्त १४.९१ टक्के खेड्यांना पक्क्या रस्त्यांची सोय उपलब्ध होती.

सन १९९२-९३ मध्ये कुर्डूवाडी-लातूर या नॅरोगेज लोहमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रुपांतर करण्याच्या कामास मंजुरी मिळाली होती. सध्या ब्रॉडगेजमध्ये रुपांतरणाचे काम प्राथम्यक्रमाने सुरू आहे.

रस्ते विकास

श्री जयकर यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय रस्त्यांच्या विकासासाठी नियुक्त केलेल्या (सन १९२७ मध्ये) समितीच्या शिफारसींनुसार १९३४ मध्ये इंडियन रोड काँग्रेसची स्थापना करण्यात आली. या संस्थेमार्फत त्यानंतरच्या रस्ते विकास योजना राबविण्यात येवू लागल्या. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रस्त्यावरील वाहतूक झपाट्याने वाढून त्यांची स्थिती फारच बिघडल्यामुळे केंद्र सरकारने १९४३ मध्ये नागपूरला देशातील सर्व घटक राज्यांच्या मुख्य अभियंत्यांची परिषद भरवून १९४१-६१ या कालखंडासाठी एक विस्तृत रस्ते विकास योजना आखली. ती नागपूर योजना म्हणून प्रसिद्ध झाली. या योजनेनुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी उद्दिष्ट ठरविण्यात आले. ज्या भागातील कृषि व्यवसाय विकसित असेल त्या भागातील कोणतेही खेडे मुख्य रस्त्यापासून आठ कि.मी. पेक्षा अधिक अंतरावर राहू नये या हेतूने योजना आखण्यात आली. देशांतर्गत रस्त्यांची राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्ग या प्रवर्गात वर्गवारी करण्यात आली. योजनेनुसार उद्दिष्टे निश्चित करताना निरनिराळ्या प्रवर्गातील रस्त्यांची लांबी "ग्रिड व स्टार" या दोन सुत्रांनुसार ठरविण्यात आली.

भारतातील सर्व राज्यांतील प्रमुख अभियंत्यांची दुसरी परिषद मुंबईला १९५९ मध्ये झाली. त्यामध्ये १९६१-८१ या मुदतीसाठी दुसरा वीस वर्षीय आराखडा तयार करण्यात

८. **जनगणना निर्देशग्रंथ, उस्मानाबाद जिल्हा,** १९६१.

९. **सेंन्सस ऑफ इंडिया, १९९१, सीरिज-१४, महाराष्ट्र, पार्ट बारा, अे ॲण्ड बी डिस्ट्रिक्ट सेंन्सस हॅण्डबुक, लातूर, व्हिलेज ॲण्ड टाऊन डिरेक्टरी, प्रायमरी सेंन्सस ॲबस्ट्रॅक्ट,** पृ.४१.

आला. या आराखड्यात प्रथमच निरनिराळ्या वर्गीकृत रस्त्यांसाठी मानके व विनिर्देश काय असावेत हे निश्चित करण्यात आले. सन १९७२-७३ च्या दुष्काळी परिस्थितीत भरपूर लांबीचे रस्ते बांधल्यामुळे महाराष्ट्रातील परिस्थितीत व वाहतूक प्रकारात फरक पडला. हा फरक लक्षात घेवून राज्याच्या १९६१-८१ रस्ते विकास योजनेत सन १९७६ मध्ये फेरफार व सुधारणा करण्यात आली. या सुधारित योजनेचे लक्ष्य मूळ १९६१-८१ योजनेच्या लक्ष्याच्या तुलनेत आदिवासी क्षेत्राकरिता ३३ टक्के व इतर क्षेत्राकरिता १६ टक्के इतके जास्त होते. महाराष्ट्राची सन १९८१-२००१ रस्ते विकास योजना मंजूर करण्यात आली असून ती १ ऑक्टोबर १९८६ पासून अंमलात आली आहे. या योजनेत प्रत्येक जिल्ह्यातील निरनिराळ्या वर्गांच्या रस्त्यांची उद्दिष्टे ठरविण्यात आली.

सदर रस्ते विकास योजनेचे सन १९९१ मध्ये पुनर्विलोकन करून रस्ते विकासासाठी रस्त्यांच्या गरजा लक्षात घेवून त्याआधारे निरनिराळ्या जिल्ह्यांची निरनिराळ्या प्रवर्गातील रस्त्यांची उद्दिष्टे ठरविण्यात यावी असे शासनाला अभिप्रेत होते. त्यानुसार १९८१-२००१ रस्ते विकास योजनेचे पुनर्विलोकन करण्यात आले. त्यावेळी पुढील मुद्दयांचा विचार करून सुधारित आराखडा तयार करण्यात आला. त्यानुसार प्रत्येक खेड्यास कमीत कमी एका रस्त्याची तरतूद करणे, ज्या वाड्या, तांडे, पाडे अशा उपवस्त्यांची लोकसंख्या १०० पेक्षा जास्त असेल व ज्या वाड्या मूळ गावापासून एक किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर असतील त्यांचे जोडरस्ते करणे, आदिवासी क्षेत्रातील मंजूर केलेल्या किंवा विचाराधिन असलेल्या विशेष कृती कार्यक्रमांमध्ये अंतर्भाव असलेले योजनाबाह्य रस्ते, डोंगराळ व दुर्गम भागाकरिता विशेष कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले योजनाबाह्य रस्ते, जिल्ह्यातील महत्त्वाच्या शहरांचे वळण रस्ते, नवीन रेल्वे मार्गांवरील रेल्वे स्थानकांना जवळच्या मुख्य रस्त्यांवरून जोडरस्ते, विविध औद्योगिक केंद्रे, साखर कारखाने, महत्त्वाची शैक्षणिक केंद्रे, पर्यटन केंद्रे इत्यादी स्थळांना जोडणारे रस्ते, इत्यादींचा समावेश करण्यात आला.

सन १९८१-२००१ रस्ते विकास योजना सुमारे १९८४ मध्ये तयार करण्यात आली व १९८६ पासून अंमलात आली. दरम्यानच्या काळात झालेली औद्योगिक प्रगती, पर्यटन केंद्रे, शैक्षणिक केंद्रे इत्यादींच्या विकासाचा विचार करून पुनर्विलोकन करणे आवश्यक होते. त्यानुसार केंद्र शासनाच्या धोरणाला अनुसरून राज्यात प्रती १०० चौ.किलोमीटरला ८३ कि.मी. रस्ते लांबी नियोजित करणे आवश्यक होते. त्यानुसार लातूर जिल्ह्यासाठी एकूण ५,९५२ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून एकूण ६,०४५.३ कि.मी. लांबीचे रस्ते प्रस्तावित करण्यात आले आहेत. असे करतांना आवश्यक तेथे दर्जोन्नतीचे प्रस्तावही विचारात घेतले आहेत.[१०]

१९८१-२००१ रस्ते विकास योजनेच्या मध्यावर्ती पुनर्विलोकनानुसार जिल्ह्यातील रस्त्यांच्या एकूण लांबीची उद्दिष्टे ६,०४५.०३ कि.मी. असून तालुकानिहाय एकूण रस्त्यांच्या लांबीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत - लातूर ९२३.४० कि.मी., रेणापूर ५१४.१३ कि.मी., चाकूर ५८३.०५ कि.मी., अहमदपूर ७९२.६४ कि.मी., उदगीर १,१४७.५८ कि.मी., निलंगा १,१००.८८ कि.मी. आणि औसा ९८३.३५ कि.मी.

१०. महाराष्ट्र शासन, मध्यावर्ती पुनर्विलोकन १९९१-२००१ रस्ते विकास योजना जिल्हा लातूर, पृ.३-४.

सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत ३१ मार्च २००४ पर्यंत एकूण ८५७.६८ कि.मी. लांबीचे रस्ते असून त्यातील प्रमुख राज्य मार्गांची लांबी १३३.३० कि.मी., राज्य महामार्गांची लांबी ३६३.९२ कि.मी., आणि प्रमुख जिल्हा मार्गांची लांबी ३६०.४६ कि.मी. होती. त्यापैकी ८५४.६८ कि.मी. लांबीचे डांबरी रस्ते असून फक्त ३.०० कि.मी. रस्ते खडीचे होते.

जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली ३१ मार्च २००४ पर्यंत एकूण ३९६३.४१ कि.मी. लांबीचे रस्ते असून त्यात प्रमुख जिल्हा मार्गांची लांबी १,०४६.२१ कि.मी., इतर जिल्हा मार्गांची लांबी १,३००.६५ कि.मी., ग्रामीण मार्गांची लांबी १,४४७.९३ कि.मी. आणि अवर्गीकृत रस्त्यांची लांबी १६८.६२ कि.मी. चा समावेश आहे. या रस्त्यांपैकी २,६५४.०२ कि.मी. चे डांबरी मार्ग असून १,१७७.०५ कि.मी. खडीचे मार्ग आहेत.[११]

तक्ता क्रमांक-१ मध्ये लातूर जिल्ह्यातील रस्त्यांची उद्दिष्टे व प्रत्यक्ष लांबी दिलेली आहे.[१२]

राष्ट्रीय महामार्ग (National Highways)

लातूर जिल्ह्यात एकही राष्ट्रीय महामार्ग उपलब्ध नाही.

प्रमुख राज्य महामार्ग (Major State Highways)

रत्नागिरी-सोलापूर-लातूर-नांदेड-नागपूर मार्ग (प्रमुख राज्य महामार्ग क्र. ३) : हा प्रमुख राज्य महामार्ग लातूर जिल्ह्यातून जातो. या राज्य महामार्गांची सुरुवात पश्चिम समुद्र किनाऱ्यावरील रत्नागिरीहून होऊन हा मार्ग कोल्हापूर-मिरज-सांगोला-मंगळवेढा-तुळजापूर नंतर लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील आशिव या गावात आग्नेय दिशेने प्रवेश करतो. तेथून तो उत्तरेकडे औसा, लातूर, चाकूर आणि अहमदपूर या तालुक्यांतून नांदेड जिल्ह्यात प्रवेश करतो. या मार्गांची जिल्ह्यातील एकूण लांबी १२३ कि.मी. असून तो संपूर्ण डांबरी आहे. हा मार्ग उजनी गावाजवळ कि.मी. क्रमांक-४४४/२०० वर तेरणा नदी, आशिव गावाजवळ कि.मी. क्रमांक ४४८/४०० वर आशिव नाला, पेठ गावाजवळ कि.मी. क्रमांक ४८०/०० वर तावरजा नदी, वासनगाव जवळ कि.मी. क्रमांक ५०१/०० वर मांजरा नदी आणि सांगवी गावाजवळ कि.मी. क्रमांक ५६२/२०० वर मनार या नद्यांना ओलांडतो. या महामार्गावरील सर्व लहानमोठ्या नद्या-नाल्यांवर पक्के पूल बांधलेले आहेत.

हा राज्य महामार्ग औसा, लातूर, चाकूर आणि अहमदपूर या तालुक्यांतून जात असल्याने वरील तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी शासकीय विश्रामगृहे आहेत. या मार्गावर औसा, लातूर, चाकूर, शिरूर ताजबंद आणि अहमदपूर ही मोठी गावे व शहरे आहेत. या मार्गावरच लातूर हे जिल्ह्याचे मुख्यालय असून व्यापारी बाजारपेठ आणि शैक्षणिक केंद्र म्हणून ते विकसित होत आहे. जवळच हवाई धावपट्टी सुद्धा आहे. हा राज्य महामार्ग विकाराबाद-परळी-वैजनाथ हा रेल्वेमार्ग लातूर तालुक्यातील लमान वाडीजवळ आणि मिरज-लातूर हा ब्राडगेज रेल्वेमार्ग-लातूर शहराजवळ ओलांडतो.

---

११. मार्गांच्या एकूण बेरजेच्या मूळ आकडेवारीत बऱ्याच ठिकाणी तफावत आढळते.

१२. सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिलेले आहेत.

प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ ला मिळणारे किंवा ओलांडून जाणारे मार्ग : ´या प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ ला पाटस-दौंड-रशीन-करमाळा-बार्शी उस्मानाबाद-बोरफळ-राज्यमार्ग क्र.६७ हा मार्ग मिळून संपतो. म्हसवड-माळशिरस-टेंभुर्णी-कुर्डूवाडी-बार्शी-लातूर राज्य मार्ग क्र.७७ हा लातूर येथे तिसगाव-पाथर्डी-पाडळसिंगी-पिंपळनेर-धारूर-लोखंडी सावरगाव-लातूर राज्यमार्ग क्र.१४४ हा लातूर येथे मिळतो. परळी-अंबाजोगाई-मुरुड-उजनी-लोहारा-जळकोट-अक्कलकोट राज्यमार्ग क्र.१६२ हा उजनी गावाजवळ आणि लातूर-निटूर-लांबोटा-देवणी-तोगरी राज्यमार्ग क्र.१६६ राज्यमार्ग, प्रमुख राज्य मार्ग क्र.३ ला लातूर जवळ ओलांडतो. शिरूर-ताजबंद-मुखेड-नरशी-बिलोली-बोधन रस्ता राज्यमार्ग क्र.२२५ प्रमुख राज्य मार्ग क्र.३ ला शिरूर जवळ, उदगीर वळण रस्ता राज्यमार्ग क्र.२१७ टेंभुर्णी जवळ मिळतो. औसा-लामजना-उमरगा-आळंद राज्यमार्ग क्र.१६४ ची सुरुवात औसा जवळील प्रमुख राज्यमार्ग क्र.३ पासून होते. लातूर-निटूर-लांबोटा-देवणी-तोगरी रा.मा.१६६ राज्यमार्ग लातूर जवळ प्रमुख राज्यमार्ग क्र.३ ला ओलांडतो. शिरूर-ताजबंद-मुखेड-नरशी-बिलोली-बोधन रस्ता राज्य मार्ग २२५ प्रमुख राज्य मार्ग क्र.३ ला शिरूर जवळ मिळतो. उदगीर वळण रस्ता राज्य मार्ग २१७ प्रमुख राज्य मार्ग क्र.३ ला टेंभूर्णीजवळ मिळतो.

प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ ला मिळणारे आणि सुरू होणारे प्रमुख जिल्हा मार्ग आणि इतर जिल्हा मार्ग खाली दिलेले आहेत.

प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ वरील बेलकुंड गावापासून प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १६ : (बेलकुंड-देवताळा-हासलगन-लोहारा ते जिल्हा सरहद्द, आणि प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१४) (प्रमुख राज्य मार्ग क्र.३ - बुधोडा-सेलू-खुंटेगाव-हासेगाववाडी-पानचिंचवली ते राज्य मार्ग क्र.१६६) ची सरुवात बुधोडा गावापासून होते. प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१३ प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ ला बुधोडा गावाजवळ मिळतो. तसेच प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१५ तावशीताड गावाजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१६ बेलकुंड गावाच्या पुढे, प्रमुख जिल्हा मार्ग ११ आणि १८ औसाजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग-९ उंबडगाजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग १३ व १४ बुधोडा गावाजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग-१० वासनगाव जवळ, प्रमुख जिल्हा मार्ग-२१ सारोळा गावा जवळ, प्रमुख जिल्हा मार्ग-२० ममदापूरजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग ४३ व ४५, आणि २२ चाकूर जवळ, प्रमुख जिल्हा मार्ग-३, चापोलीजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग-४२, तेलगावजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग-३९ माळेगावजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग-३८ टेंभूर्णीजवळ प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक-३ ला मिळतात. त्याशिवाय इतर जिल्हा मार्ग क्र.१०६, शिंदाळा गावाजवळ, इतर जिल्हा मार्ग क्र.१०२ वानवड गावाच्या पुढे, इतर जिल्हा मार्ग क्र.९६ आणि ११० औसाजवळ, इतर जिल्हा मार्ग क्र.४२ अहमदपूरजवळ प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ ला मिळतात.

- टिप :- प्रमा - प्रमुख राज्य मार्ग,
- रामा - राज्य मार्ग,
- प्रजिमा - प्रमुख जिल्हा मार्ग,
- इजिमा - इतर जिल्हा मार्ग.

राज्य महामार्ग

जिल्ह्यात सध्या सुमारे १८ राज्य महामार्ग असून या मार्गांव्दारे रस्त्यांचे जाळे विणले गेले असून वाहतूक व्यवस्था सुकर होण्यास फार मदत झाली आहे. जिल्ह्यात असलेल्या राज्य महामार्गांची वर्णनात्मक माहिती खाली दिली आहे.

१. **पाटस-दौंड-रशीन-करमाळा-बार्शी-उस्मानाबाद-बोरफळ ते प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक-३ (राज्य महामार्ग क्र.६७)**.—पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील पाटस गावापासून राज्य महामार्ग क्रमांक-६७ ची सुरुवात होत असून हा मार्ग दौंड-रशीन-करमाळा-बार्शी-उस्मानाबाद या मार्गाने शिवली गावाजवळ कि.मी. क्रमांक.२०७ वर लातूर जिल्ह्यात पश्चिमेकडून प्रवेश करतो आणि पुढे पूर्व दिशेने प्रवास करीत बोरफळ गावाजवळ प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ ला मिळतो. तसेच प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१५ आणि इतर जिल्हा मार्ग क्र.१०९ शिवली गावाजवळ मिळतात. त्याशिवाय इतर जिल्हा मार्ग क्र.१०७ आणि १०८ या राज्य महामार्गास मिळतात. या महामार्गाची जिल्ह्यातील लांबी १४.०० कि.मी. असून हा मार्ग डांबरी आहे. या मार्गावरून बारमाही वाहतूक चालते.

२. **म्हसवड-माळशिरस-टेंभूर्णी-कुर्डूवाडी-बार्शी-लातूर-(राज्य महामार्ग क्र.७७)**.-हा राज्य महामार्ग सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील म्हसवड गावापासून निघून ईशान्य दिशेने १७.२७ कि.मी. मार्गक्रमण करीत कारखेलनंतर सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करतो. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस-टेंभूर्णी-कुर्डूवाडी-बार्शी या मार्गाने लातूर तालुक्यातील मुरूड बुद्रुक गावाजवळ जिल्ह्यात प्रवेश करतो. हा महामार्ग जवळपास लोहमार्गाला समांतर दिशेने पश्चिमेकडून लातूर शहरात प्रवेश करतो आणि प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक-३ ला मिळतो. या मार्गाची जिल्ह्यातील लांबी ४४.२०० कि.मी. असून या मार्गावर मुरूड बुद्रुक, करकट्टा, मुरूड अकोला, ही मोठी गावे आणि लातूर शहर आहे. या राज्य मार्गाला मुरूड बुद्रुक येथे दक्षिणेकडून येणारा राज्य महामार्ग क्र.१६२ छेदतो आणि उत्तर दिशेने आंबेजोगाई शहराकडे जातो. कळंबहून वायव्य दिशेने धावणारा राज्य महामार्ग क्रमांक १६०, राज्यमार्ग क्रमांक-७७ ला लातूर शहराजवळ मिळतो. हा मार्ग डांबरी असून प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ ची ५.९० कि.मी. लांबी दर्जोन्नत करून राज्य महामार्ग क्रमांक ७७ मध्ये समाविष्ट केली आहे. या राज्य महामार्गाला बोरगावजवळ प्रमुख जिल्हा मार्ग क्र.६ छेदून जातो तर प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक-८ मुरूड अकोला गावाजवळ मिळतो तसेच प्रमुख जिल्हा मार्ग क्र.९ या राज्य महामार्गास मिळतो. इतर जिल्हा मार्ग क्रमांक ३ करकट्टा गावाजवळ, इतर जिल्हा मार्ग क्र.६ सारवरा गावाजवळ तसेच इतर जिल्हा मार्ग क्र.८ या राज्य महामार्गास मिळतात.

३. **तिसगाव-पाथर्डी-पाडळसिंगी-पिंपळनेर-धारूर-लोखंडी-सावरगाव ते लातूर (राज्य महामार्ग क्र. १४४)**.—हा राज्य महामार्ग अहमदनगर जिल्ह्यातील तिसगाव येथून राज्य महामार्ग क्र.१४८ पासून सुरू होऊन पाथर्डीहून बीड जिल्ह्यातील पाडळसिंगी-पिंपळनेर-धारूर मार्गे लोखंडी सावरगावहून रेणापूर तालुक्यातील लमाणतांडा गावाजवळ दक्षिण दिशेने प्रवास करीत लातूर तालुक्यातील महापूर गावाजवळ जिल्ह्यात प्रवेश करून लातूर शहरातील वळण रस्त्याला मिळतो. या महामार्गाची जिल्ह्यातील लांबी ३२.४९०

कि.मी. आहे. या महामार्गावर मांजरा नदीवर कि.मी. क्रमांक १९९.०० वरील महापूर येथे १९९८ मध्ये पूल बांधला आहे. या मार्गाचे डांबरीकरण झाले आहे. प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ ची १.३४ कि.मी. लांबी दर्जोन्नत करून राज्य महामार्ग क्रमांक १४४ मध्ये समाविष्ट केली आहे. या राज्य महामार्गास प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३ बीटरगावजवळ तसेच इतर जिल्हा मार्ग क्रमांक-१४ आणि १८ मिळतात. राज्य महामार्ग क्रमांक १४४ पासून राज्य महामार्ग क्र.१६६ ची सुरूवात होते.

४. **जामखेड-पाटोदा-मांजरसुंबा-केज-अहमदपूर-(राज्य महामार्ग क्र.१५६)**.—-जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील जामखेड गावापासून राज्य महामार्ग क्रमांक १५६ ची सुरुवात होवून तो बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुका स्थानापासून बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथून केज तालुका मुख्यालयापासून पुढे लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथे पश्चिमेकडून प्रवेश करतो. या मार्गाची जिल्ह्यातील लांबी २५.०० कि.मी. असून या मार्गावर किनगाव हे मोठे गाव आणि अहमदपूर हे शहर आहे. अहमदपूरला शासकीय विश्रामगृह आहे. या संपूर्ण मार्गाचे डांबरीकरण झाले आहे. राज्य महामार्ग क्र.१५६ ला राज्य महामार्ग क्र. २१७ मिळाल्यानंतर हा मार्ग अहमदपूरजवळ प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ ला मिळतो. त्याशिवाय प्रमुख जिल्हामार्ग क्र.१९, २३ आणि ३७ हे या राज्य महामार्गास मिळतात तसेच इतर जिल्हा मार्ग क्रमांक-३८ या राज्य महामार्गास मिळतो.

५. **कळंब-लातूर (राज्य महामार्ग क्र.१६०)**.—उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब या तालुका मुख्यालयापासून या राज्य महामार्गाची सुरुवात होवून तो वायव्य दिशेकडून कानडी बोरगावजवळ लातूर जिल्ह्यात प्रवेश करतो. तांदुळजा गावाजवळ या राज्य महामार्गाला राज्य महामार्ग क्रमांक-१६२ छेदतो. या मार्गावर कासारजवळा, काटगाव, भुईसमुंद्रा, हरंगुळ ही गावे असून लातूर शहराजवळ हा मार्ग राज्य महामार्ग क्रमांक-७७ ला मिळतो. या मार्गावरील भुईसमुंद्रा नाला (कि.मी. क्र.९/८२०), काटगावनाला (कि.मी.१३/९१०), जवळा नाला (कि.मी. क्र.१९/८६५) आणि तांदुळजा नाल्यावर पूल बांधलेले आहेत. हा मार्ग डांबरी असून त्याची लांबी ३३.७५ कि.मी. आहे. या राज्य महामार्गाला प्रमुख जिल्हा मार्ग क्र.६ गादवड गावाजवळ, प्रमुख जिल्हामार्ग क्र.९ तांदुळवाडीजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग क्र.७ भुईसमुंद्राजवळ आणि इतर जिल्हा मार्ग क्र.४ पिंपरीजवळ, इतर जिल्हा मार्ग क्र.५ कासारजवळा येथे आणि इतर जिल्हामार्ग क्रमांक-८ हरंगुळ (खुर्द) येथे मिळतो.

६. **परळी -आंबेजोगाई-मुरूड-उजनी -लोहारा-जळकोट-अक्कलकोट (राज्य महामार्ग क्र.१६२)**.—हा मार्ग बीड जिल्ह्यातील परळी या तालुका मुख्यालयापासून राज्य महामार्ग क्र.१५७ ने सुरू होतो आणि पुढे आंबेजोगाई येथून राज्य महामार्ग क्रमांक १६२ सुरू होतो. हा मार्ग साधारणपणे दक्षिण दिशेने मार्गक्रमण करीत लातूर जिल्ह्यातील देवळा गावाजवळ जिल्ह्यात प्रवेश करतो. तांदुळजा गावाजवळ हा मार्ग राज्य महामार्ग क्रमांक १६० ला छेदतो. या राज्य महामार्गावर तांदुळजा आणि मुरूड ही मोठी गावे आहेत. मुरूडजवळ राज्य महामार्ग क्रमांक ७७ आणि राज्य महामार्ग क्रमांक ६७ या मार्गास छेदतात. प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक.३ ला हा राज्य महामार्ग उजनी गावाच्या दक्षिणेस मिळतो. हा राज्य महामार्ग साधारणपणे उत्तरेकडून लातूर जिल्ह्याच्या सीमेला समांतर असा दक्षिण दिशेने

धावतो. या राज्य महामार्गावर मुरूड नाल्यावर पूल आहे. या मार्गाची जिल्ह्यातील लांबी ३५.०० कि.मी. असून रस्त्याचे डांबरीकरण झाले असून ३.५० कि.मी. रस्ता खडीचा आहे. या राज्य महामार्गाला प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ७ आणि १०, तसेच नवीन राज्य महामार्ग आणि इतर जिल्हा मार्ग क्रमांक १०५ आणि १०६ मिळतात.

७. **माकणी-कासारसिरशी-तांबाळा ते राज्य सीमेपर्यंत (राज्य महामार्ग.क्र. १६३)**.- उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील राज्य महामार्ग क्रमांक-१६२ वरील लोहारा खुर्द या गावापासून या राज्य महामार्गाची सुरूवात होत असून तो माकणी-सास्तूर मार्गे निलंगा तालुक्यातील कासारशिरसीहून तांबाळा गावापर्यंत पूर्व दिशेने धावतो आणि पुढे बिदर जिल्ह्यात प्रवेश करतो. या राज्य महामार्गाला राज्य महामार्ग क्रमांक-१६७ कासारशिरसीजवळ ओलांडून जातो. या मार्गाच्या २२.१० कि.मी. चे डांबरीकरण झाले असून ६.७० कि.मी. खडीचा मार्ग आहे. या राज्य महामार्गाला प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ३३, ३५ आणि ५२ तसेच इतर जिल्हा मार्ग क्रमांक १० आणि ८७ मिळतात.

८. **औसा-लामजना-उमरगा-आळंद (राज्य महामार्ग.क्र.१६४)**.— या राज्य महामार्गाची सुरुवात प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक-३ पासून औसा या तालुका मुख्यालयापासून होते. औसा गावापासून हा मार्ग आग्नेय दिशेने धावतो व लामजना फाटा येथून दक्षिणेकडे किल्लारी व त्यापुढेही धावतो. या राज्य महामार्गाला राज्य महामार्ग क्रमांक-१६५ मिळतो. हा मार्ग पुढे दक्षिण दिशेने उमरग्यापर्यंत धावतो. या राज्य महामार्गाला राज्य महामार्ग क्रमांक-१६३ मिळतो. या राज्य महामार्गावर औसा, लामजना आणि किल्लारी ही मोठी गावे आहेत. औसा येथे विश्रामगृह आहे. या मार्गाची जिल्ह्यातील लांबी २६ कि.मी. असून तो पूर्णपणे डांबरी आहे. या राज्य महामार्गाला प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१७, २९ (पारधेवाडीजवळ) प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३० किल्लारीजवळ मिळतो. तर प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१५ किल्लारीच्या दक्षिणेस आणि प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३१ मुदगडजवळ मिळतो. त्याशिवाय या राज्य महामार्गास इतर जिल्हा मार्ग क्र. ९७, ९८ व ९३ मिळतात.

९. **लामजना-निलंगा-भालकी (राज्य महामार्ग.क्र.१६५)**.— या राज्य महामार्गाची सुरुवात लामजना फाट्याजवळ राज्य महामार्ग क्रमांक-१६४ पासून होत असून तो आग्नेय दिशेने खरोसा, निलंगा येथून पुढे भालकीकडे धावतो. या राज्य महामार्गाला निलंग्याजवळ राज्य महामार्ग क्रमांक-१६७ ओलांडतो. या मार्गाची जिल्ह्यातील लांबी ३८.२० कि.मी. आहे. या राज्य महामार्गावर खरोसा, निलंगा आणि किल्लारी ही मोठी गावे असून निलंगा या तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी शासकीय विश्रामगृह आहे. या राज्य महामार्गास प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ११, १२, २१, २८, ३१, ३२, ३६ इत्यादी मार्ग मिळतात तसेच इतर जिल्हा मार्ग क्र.९३ आणि ९४ मिळतात.

१०. **लातूर-निटूर-लांबोटा-देवणी-तोगरी (राज्य महामार्ग.क्र.१६६)**.—हा मार्ग प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ पासून लातूर येथून सुरू होवून आग्नेय दिशेने निटूर गावापर्यंत धावतो आणि राज्य महामार्ग क्रमांक-१६७ ला ओलांडतो. निटूर ते लांबोटा हे अंतर राज्यमार्ग क्रमांक १६७ चे असून लांबोटा गावापासून राज्य महामार्ग क्रमांक-१६६ आग्नेय दिशेने देवणी आणि तोगरी गावापर्यंत धावतो. तोगरी गावाजवळ तो राज्यमार्ग क्रमांक-२१७ ला मिळतो.

अनुक्रमणिका

या मार्गाची जिल्ह्यातील लांबी ८३.०० कि.मी. असून ९.८० कि.मी. लांबी अन्य मार्गात समाविष्ट आहे. या मार्गाचे डांबरीकरण झाले असून निटूर, लांबोटा, देवणी आणि तोगरी ही मोठी गावे आणि लातूर शहर ही या राज्यमार्गावर आहे.

या राज्य महामार्गाला प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१३ भुसनी गावाच्या खाली, प्रमुख जिल्हा मार्ग क्र.-१४ पानचिंचोलीजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२८, प्रमुख जिल्हा मार्ग २१ हेही मार्ग मिळतात. प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२७ बोंबळी गावाजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४५, प्रमुख जिल्हा मार्ग-४७ वलांडीजवळ मिळतात. प्रमुख जिल्हा मार्ग-क्र.४९, राज्यमार्ग क्र.१६६ ला अचोला गावाजवळ, आणि प्रमुख जिल्हा मार्ग-क्र.२६ देवणी गावाजवळ ओलांडतो. प्रमुख जिल्हा मार्ग-क्र.५० देवणीजवळ राज्य महामार्ग क्र.१६६ ला मिळतो. या राज्य महामार्गाला इतर जिल्हा मार्ग-क्र.२४ बाभळगावजवळ, इतर जिल्हा मार्ग-क्र.९५ लोटगाजवळ मिळतात.

११. **धरणी-निटूर-निलंगा-कासारसिरशी-तुरोरी (राज्य महामार्ग.क्र.१६७)**.—प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक-३ वरील चाकूर तालुक्यातील धरणी गावापासून राज्य महामार्ग क्रमांक- १६७ ची सुरुवात होवून हा मार्ग दक्षिण दिशेने धावतो. या मार्गावर नळेगाव, निलंगा, कासार सिरशी, लिंबाळा, ही गावे आहेत. हा राज्य महामार्ग क्रमांक-१६८ ला नळेगावजवळ, निटूरजवळ राज्य महामार्ग क्रमांक-१६६ ला, आणि इतर अनेक ग्रामीण रस्त्यांना ओलांडतो. कासार सिरशीच्या पुढे उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा आणि त्याच तालुक्यातील तुरोरी गावापर्यंत धावतो. या राज्य महामार्गाची एकूण लांबी ६९.४० कि.मी. असून संपूर्ण मार्ग डांबरी आहे.

या राज्य महामार्गाला प्रमुख जिल्हा मार्ग- क्र.२४ नळेगावजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२० वेबनाळच्याजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२१ उजेड गावाजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२८, प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३५, भुतमुगळी गावाजवळ आणि प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३४ हत्तरगाजवळ मिळतो. त्याशिवाय इतर जिल्हा मार्ग क्र.३३ धरणीजवळ, इतर जिल्हा मार्ग क्र.८२ केळगावजवळ, इतर जिल्हा मार्ग क्र.८४, इतर जिल्हा मार्ग क्र.८६ हरीजवळगा गावाजवळ या राज्य महामार्गाला मिळतात. राज्य महामार्ग क्रमांक-१६३ कासारसिरशी गावाजवळ राज्य महामार्ग क्र.१६७ ला ओलांडतो.

१२. **रेणापूर-उदगीर-देगलूर (राज्य महामार्ग.क्र.१६८)**.—रेणापूर या तालुका मुख्यालयापासून या राज्य महामार्गाची सुरुवात झाली असून तो उदगीरपर्यंत आग्नेय दिशेने व पुढे पश्चिम दिशेने नांदेड जिल्ह्यातील देगलूरपर्यंत धावतो. या मार्गावर रेणापूर, नळेगाव, करडखेल, नागलगाव, टाकळी, मुक्रमाबाद ही गावे आहेत. रेणापूर व उदगीर येथे शासकीय विश्रामगृहे आहेत. या राज्य महामार्गाला प्रमुख राज्य महामार्ग क्र.३, राज्य महामार्ग क्रमांक १६७, राज्य महामार्ग क्रमांक २१७ हे मार्ग छेदून पुढे जातात, आणि राज्य महामार्ग क्रमांक २२२ उदगीरजवळ मिळतो. या मार्गाची एकूण लांबी ९८.०० कि.मी. असून त्यापैकी १.२० कि.मी. लांबी अन्य मार्गात समाविष्ट असून ९६.८० कि.मी. मार्गाचे डांबरीकरण झाले आहे. रेणापूरजवळून राज्य महामार्ग क्र.१६८ पासून राज्य महामार्ग क्रमांक १६९ ची सुरुवात झाली आहे. या राज्य महामार्गास प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१९ खरोळा गावाजवळ ओलांडतो. तसेच प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२०, ४५, ४६ हेही ओलांडतात. प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४७ करडखेल जवळ ओलांडतो तसेच प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४९ राज्यमार्ग क्र.२१७ ला ओलांडतो. या मार्गास इतर जिल्हा मार्ग क्र. ३३, ५८, ५९, ६०, ६५, ६८ हेही मिळतात.

अनुक्रमणिका

१३. **परळी-पानगाव-मुरढव-राज्य मार्ग क्र.१६८ ते रेणापूर (राज्य महामार्ग क्र.१६९)**.-बीड जिल्ह्यातील परळी येथून या राज्य महामार्गाची सुरुवात होत असून हा मार्ग सिकंदराबाद-परळी लोहमार्गाला पानगाव जवळ ओलांडतो. हा मार्ग दक्षिण दिशेने धावतो. तो राज्यमार्ग क्रमांक १६८ ला ओलांडून पुढे रेणापूरपर्यंत धावतो. या राज्य महामार्गावर पानगाव, पाथरवाडी, रेणापूर ही गावे आहेत. रेणापूर येथे शासकीय विश्रामगृह आहे. या मार्गाची लांबी १५.२० कि.मी. असून तो संपूर्ण डांबरी मार्ग आहे. या राज्य महामार्गाला प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक २ आणि ३ मिळतात. तसेच इतर जिल्हा मार्ग क्रमांक-१७ घनसरगावाजवळ मिळतो.

१४. **कण्हेरगाव नाका-जिंतूर-गंगाखेड-ढाळेगाव-अहमदपूर-शिरूर-ताजबंद-हळी-उदगीर-तोगरी-बिदर (राज्य महामार्ग क्र.२१७)**.—हिंगोली जिल्ह्याच्या उत्तरेकडे असलेल्या कण्हेरगाव नाका येथून राज्य महामार्ग क्रमांक-२०४ पासून राज्य महामार्ग क्रमांक-२१७ ची सुरूवात होते. हा मार्ग हिंगोली जिल्ह्यातील जिंतूर, परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, लातूर जिल्ह्यातील ढाळेगाव-अहमदपूर-शिरूर ताजबंद-हळी-उदगीर- तोगरी या मार्गाने कर्नाटकातील बिदर जिल्ह्यात प्रवेश करतो. या मार्गाची जिल्ह्यातील एकूण लांबी ८५.६३ कि.मी. असून अन्य मार्गात १२.०० कि.मी. लांबी अंतर्भूत आहे. शिरूर ताजबंद पासून अहमदपूरपर्यंत हा राज्य महामार्ग प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ वरून एकत्रित धावतो. या मार्गाची ७३.६३ कि.मी. लांबी आहे. या मार्गाचे डांबरीकरण झाले असून या मार्गावर ढाळेगाव, अहमदपूर, शिरूर ताजबंद, हळी, उदगीर व तोगरी ही मोठी गावे असून त्यापैकी अहमदपूर व उदगीर ही तालुका मुख्यालये असून तेथे शासकीय विश्रामगृहे आहेत. या राज्य महामार्गास प्रमुख जिल्हा मार्ग क्र. १९ अंधोरी गावाजवळ आणि प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३७ ढाळेवाडीजवळ ओलांडतो. या राज्य महामार्गावरील शिरूर ताजबंद येथून राज्य महामार्ग क्रमांक २२५ ची सुरुवात होते. या राज्य महामार्गास प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ४०, ४१, ४३, ४६, ४७ व ५० छेदून जातात तसेच इतर जिल्हा मार्ग क्रमांक ३८, ४८, ७२ आणि ७३ मिळतात. या राज्य महामार्गास तोगरी गावाजवळ राज्य महामार्ग क्रमांक-१६६ मिळतो.

१४ (अ) उदगीर वळण रस्ता - राज्य महामार्ग क्र.२१७, राज्य महामार्ग क्रमांक १६८ ते प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४६ (राज्य महामार्ग क्र.२१७) वर आहे.

१५. **गंगाखेड-राणी सावरगाव-खंडाळी-उजना ते प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ (राज्य महामार्ग क्र.२१९)**.—परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथून आग्नेय दिशेने राणी सावरगाव येथे हा मार्ग प्रवेश करतो आणि पुढे पूर्व दिशेने अहमदपूर तालुक्यातील खंडाळी गावातून उजना आणि पुढे मनार नदीच्या उत्तरेला असलेल्या सांगवी (सुनेगाव) च्या उत्तरेला प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक-३ ला मिळतो. या मार्गाची जिल्ह्यातील एकूण लांबी १३.८८ कि.मी. असून तो डांबरी आहे. या मार्गावर खंडाळी व उजना ही गावे आहेत. या राज्य महामार्गाला प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३७ खंडाळी गावाजवळ आणि इतर जिल्हा मार्ग क्र.४१ उजना गावाजवळ मिळतात.

१६. **कंधार-जाम-जळकोट-पाटोदा-कोळनूर-धोनसी ते राज्य मार्ग क्र.१६८ (राज्य महामार्ग क्र.२२२)**.— या राज्य महामार्गाची सुरुवात नांदेड जिल्ह्यातील कंधार या तालुका मुख्यालयापासून होत असून जाम मार्गे लातूर जिल्ह्यातील जळकोट या तालुका मुख्यालयापासून

पाटोदा बु.-कोळनूर वरून उदगीरजवळ राज्य महामार्ग क्रमांक-१६८ ला मिळतो. या मार्गावर जळकोट, कोळनूर व घोनसी ही गावे आहेत. जळकोट हे तालुका मुख्यालय आहे. यास जळकोटच्या उत्तरेला राज्य मार्ग क्र.२२५ छेदून जातो. या राज्य महामार्गास प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३९ केकतशिदगीजवळ मिळतो. प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४३ कोळनूर गावाजवळ, प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४८ घोनसी गावाजवळ छेदतात. प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४४ उदगीरच्या उत्तरेला मिळतो. या राज्य मार्गास इतर जिल्हा मार्ग क्रमांक ५३, ५५, ५६ आणि ५७ मिळतात.

१७. **शिरूर ताजबंद-मुखेड-नरशी-बिलोली-बोधन रस्ता (राज्य महामार्ग क्र. २२५).**—अहमदपूर तालुक्यातील शिरूर ताजबंद येथून या राज्य महामार्गाची सुरुवात होवून तो पूर्व दिशेने नांदेड जिल्ह्यात प्रवेश करतो. या मार्गाची लांबी २०.५० कि.मी. असून तो संपूर्ण डांबरी आहे. या मार्गावर शिरूर ताजबंद हे मोठे गाव आहे. राज्य महामार्ग क्रमांक २२२ ला हा जळकोटच्या उत्तरेला छेदतो. या मार्गास प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४० उंबरगा गावाजवळ मिळतो तसेच इतर जिल्हा मार्ग क्रमांक ४४, ४५, ४९ व ५० हे वरील राज्य महामार्गास मिळतात वा छेदून जातात.

१८. **प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक-३ ते विमानतळ-नेर-खोड-भेटा-भादा-औसा ते प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ नवीन राज्य मार्ग.**— या मार्गाची एकूण लांबी २५ कि.मी. असून तो पूर्णतः डांबरी आहे. या मार्गावर भादा व औसा ही गावे आहेत. हा मार्ग विमान तळासाठी तयार केला आहे. या मार्गाला इतर जिल्हा मार्ग क्रमांक ७, १०७, १०९ आणि १११ मिळतात.

प्रमुख जिल्हा मार्ग

लातूर जिल्ह्याची ३१ मार्च १९८५ ची रस्त्यांची स्थिती पुढीलप्रमाणे होती. प्रमुख जिल्हा मार्गांची एकूण लांबी १०१६ कि.मी. होती. त्यापैकी फक्त ५७.५२ कि.मी. लांबीचे रस्ते डांबरी आणि ७७९.४१ कि.मी. लांबीचे रस्ते खडीचे होते. मात्र त्यानंतरच्या वीस वर्षांच्या कालावधीत (३१ मार्च २००४) रस्ते विकासात आमुलाग्र बदल घडून आले. प्रमुख जिल्हा मार्गांच्या एकूण लांबीत विशेष फरक (१,०४६ कि.मी.) पडला नाही. तथापि या काळात सुमारे ९०० कि.मी. लांबीचे रस्ते डांबरी करण्यात आले असून खडीचे रस्ते फक्त ९३.६० कि.मी. चे होते.

सन १९८५ मध्ये एकूण प्रमुख जिल्हा मार्गांपैकी फक्त ५.६६ टक्के रस्ते डांबरी आणि ७६.७१ टक्के खडीचे रस्ते होते. तर सन २००४ मध्ये एकूण प्रमुख जिल्हा मार्गांपैकी ९१ टक्के रस्ते डांबरी आणि फक्त ८.९५ टक्के रस्ते खडीचे होते.

जिल्ह्यात सन २००४ मध्ये एकूण ५५ प्रमुख जिल्हा मार्ग होते. त्यापैकी लातूर तालुक्यात ९, रेणापूर तालुक्यात ६, औसा तालुक्यात-४, निलंगा तालुक्यात-१३, उदगीर तालुक्यात ११, अहमदपूर तालुक्यात ७ आणि चाकूर तालुक्यात १० प्रमुख जिल्हा मार्ग होते.

प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक-२० हा लातूर, निलंगा, अहमदपूर आणि चाकूर या चार तालुक्यांतून धावतो तर प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १९ हा लातूर, रेणापूर आणि अहमदपूर

आणि प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक-४५ हा निलंगा, उदगीर आणि चाकूर या प्रत्येकी तीन तालुक्यांतून धावतो. अनेक प्रमुख जिल्हा मार्ग दोन तालुक्यांतून मार्गक्रमण करतात.[१३]

लातूर जिल्ह्यातील प्रमुख जिल्हा मार्गांची वीस वर्षांतील प्रगती खालील विवरणपत्रात दिली आहे.

अ. क्र.	तालुका	३१ मार्च १९८५ ची रस्त्यांची स्थिती (कि.मी.) [१४]				३१ मार्च २००४ ची रस्त्यांची स्थिती (कि.मी.)[१५]			
		डांबरी	खडीचे	अपृष्ठांकित	एकूण	डांबरी	खडीचे	अपृष्ठांकित	एकूण
१.	लातूर	२६.००	११८.५१	२६.९०	१७१.४१	८९.००	९.५०	. .	९८.५०
२.	रेणापूर	. .	. .	. .	. .	९०.५३	११.००	. .	१०१.५३
३.	औसा	४.८०	११२.६३	६९.८७	१८७.३०	३६.८०	३.५०	. .	४०.३०
४.	निलंगा	१९.५०	१५०.९८	७.६६	१७८.१४	१९९.६१	२१.९०	. .	२२१.५१
५.	उदगीर	७.२२	१७७.०६	३१.५०	२१५.७८	२७६.३२	१९.७०	०.६०	२९६.६२
६.	अहमदपूर	. .	२२०.२३	४३.१४	२६३.३७	१११.८२	१०.५०	. .	१२२.३२
७.	चाकूर	. .	. .	. .	. .	१४७.९३	१७.५०	. .	१६५.४६
	एकूण	५७.५२	७७९.४१	१७९.०७	१०१६.००	९५२.०१	९३.६०	०.६०	१,०४६.२१

सन १९८५ मध्ये एकूण डांबरी रस्त्याच्या लांबीनुसार लातूर तालुक्यात ४५.२० टक्के, निलंगा तालुक्यात ३३.९१ टक्के, उदगीर तालुका १२.५५ टक्के औसा तालुक्यात ८.३४ टक्के रस्ते डांबरी होते तर सन २००४ मध्ये एकूण डांबरी रस्त्यांच्या लांबीनुसार उदगीर तालुक्यात २९.०२ टक्के, निलंगा तालुक्यात २०.९६ टक्के, चाकूर तालुक्यात १५.५३ टक्के रस्ते डांबरी होते. तर लातूर आणि रेणापूर या दोन तालुक्यांत ९.५० टक्क्यापेक्षा कमी रस्ते डांबरी होते तर औसा तालुक्यात फक्त ३.८६ टक्के रस्ते डांबरी होते. सन १९८५ मध्ये खडीच्या रस्त्यांच्या लांबीनुसार टक्केवारी अनुक्रमे अहमदपूर २५.९२%, उदगीर २१.२४%, औसा १८.४४%, निलंगा १७.५३%, आणि लातूर१६.८७% या प्रमाणे होती तर सन २००४ मध्ये निलंगा २३.४०%, उदगीर २१.०४%, चाकूर १८.६९%, रेणापूर ११.७५%, लातूर १०.१५%, अहमदपूर ११.२३%, आणि सर्वात कमी औसा तालुका ३.७४% अशी टक्केवारी होती. वरील टक्केवारीवरून तालुक्यांच्या क्रमात बदल झाला असल्याचे दिसून येते.

१९८१-२००१ रस्ते विकास योजना मध्यावर्ती पुनर्विलोकन प्रमाणे ३१ मार्च २००५ मध्ये प्रमुख जिल्हा मार्गांची एकूण लांबी १,६०२.३४ कि.मी. असून अस्तित्वातील एकूण लांबी १,४७६.६५ कि.मी. पैकी १,०५०.२१ कि.मी. लांबीचे रस्ते जिल्हा परिषदेकडे आणि ४७४.९६ कि.मी. लांबीचे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली होते.

१३. लातूर जिल्ह्यात सध्या दहा तालुके असले तरी सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर यांचेकडून सात तालुक्यांच्या उपलब्ध माहिती प्रमाणे ही नोंद आहे. देवणी, शिरूर-अनंतपाळ आणि जळकोट या तीन तालुक्यांची स्वतंत्र माहिती दिलेली नाही.

१४. महाराष्ट्र स्टेट रोड डेव्हलपमेंट प्लॅन १९८१-२००१ इंडेक्स स्टेटमेंट बुक, डिस्ट्रिक्ट लातूर, पृ.२९ ते ३३.

१५. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी जुलै २००५ मध्ये पाठविलेल्या माहितीवर आधारित.

त्यातील १,४४३.५७ कि.मी. रस्ते डांबरी, ७६.५० कि.मी. रस्ते खडीचे आणि ५.१० कि.मी. रस्ते मातीचे होते.

तक्ता क्रमांक २ मध्ये लातूर जिल्ह्यातील प्रमुख जिल्हा मार्गांची तालुकानिहाय माहिती दिली आहे.

इतर जिल्हा मार्ग

लातूर जिल्हा निर्मितीनंतर दिनांक ३१ मार्च १९८५ रोजी जिल्ह्यात ९५८.८४ कि.मी. लांबीचे इतर जिल्हा मार्ग अस्तित्वात होते. त्यात फक्त १३.९५ कि.मी. डांबरी आणि ६८२.८४ कि.मी. लांबीचे खडीचे रस्ते होते. इतर जिल्हा मार्गांच्या लांबीनुसार जिल्ह्यातील तालुक्यांचा क्रम पुढीलप्रमाणे होता[१६] : निलंगा तालुका (२६.५८ टक्के), लातूर तालुका (२४.९२ टक्के) उदगीर तालुका (२१.४९ टक्के). अहमदपूर तालुका (१५.४५ टक्के) आणि औसा तालुका (११.४६ टक्के), इतर जिल्हा मार्गांच्या एकूण लांबीपैकी १.४५ टक्के डांबरी आणि ७१.२२ टक्के खडीचे आणि २७.३३ टक्के अपृष्ठांकित रस्ते होते. तर वीस वर्षानंतर दिनांक ३१ मार्च २००४ रोजी इतर जिल्हा मार्गांच्या एकूण लांबी (१३००.६५ कि.मी.) पैकी ७४.२१ टक्के रस्ते डांबरी (९६५.२० कि.मी.) आणि २३.७३ टक्के (३०८.६५ कि.मी.) रस्ते खडीचे होते. वीस वर्षांच्या काळात ७२.७६ टक्के इतर जिल्हा मार्गांचे डांबरीकरण करण्यात आले आहे. या काळात इतर जिल्हा मार्गांच्या लांबीनुसार जिल्ह्यातील तालुक्यांचा क्रम पुढीलप्रमाणे होता. उदगीर तालुका (२२.२८ टक्के), निलंगा तालुका (१९.०६ टक्के), औसा तालुका (१८.६४ टक्के), लातूर तालुका (१३.९८ टक्के), अहमदपूर तालुका (१२.४२ टक्के), रेणापूर तालुका (७.७९%), आणि चाकूर तालुका (५.८३%). जिल्ह्यात दिनांक ३१ मार्च २००४ रोजी तालुकानिहाय इतर जिल्हा मार्गांची संख्या पुढील प्रमाणे होती. लातूर-१९, रेणापूर तालुका-११, औसा-२०, निलंगा-१९, उदगीर-२८, अहमदपूर-१८ आणि चाकूर-१०.

खालील विवरणपत्रात इतर जिल्हा मार्गांची वीस वर्षांतील प्रगती दर्शविली आहे.[१७]

अ. क्र.	तालुका	३१ मार्च १९८५ ची रस्त्यांची स्थिती (कि.मी.)				३१ मार्च २००४ ची रस्त्यांची स्थिती (कि.मी.)			
		डांबरी	खडीचे	अपृष्ठांकित	एकूण	डांबरी	खडीचे	अपृष्ठांकित	एकूण
१.	लातूर	३.००	१२८.०८	१०७.८७	२३८.९५	१६७.५५	११.०५	३.२०	१८१.८०
२.	रेणापूर	. .	. .	. .	. .	९३.५०	७.७०	. .	१०१.२०
३.	औसा	. .	८६.८९	२३.००	१०९.८९	१६२.८२	७१.६०	८.००	२४२.४२
४.	निलंगा	८.२०	२२८.४५	१८.१८	२५४.८३	२०५.२८	३७.७०	५.००	२४७.९८
५.	उदगीर	२.७५	१४१.७४	६२.५०	२०६.९९	१६७.१५	११८.४०	४.२०	२८९.७५
६.	अहमदपूर	. .	९७.६८	५०.५०	१४८.१८	१२४.६०	३६.२०	०.८०	१६१.६०
७.	चाकूर	. .	. .	. .	. .	४४.३०	२६.००	६.६०	७५.९०
	एकूण	१३.९५	६८२.८४	२६२.०५	९५८.८४	९६५.२०	३०८.६५	२६.८०	१,३००.६५

१६. इतर जिल्हा मार्गांच्या एकूण लांबीशी प्रत्येक तालुक्याच्या एकूण लांबीची टक्केवारी दिली आहे.
१७. मोटरेबल आणि अनमोटरेबल रस्ते एकत्र दर्शविले आहेत.

अनुक्रमणिका

सन १९८१-२००१ रस्ते विकास योजना (मध्यावर्ती पुनर्विलोकन) नुसार दिनांक ३१ मार्च २००५ रोजी इतर जिल्हा मार्गांची लांबी १,३८१.१४ कि.मी. असून निव्वळ लांबी १,३६४.३४ कि.मी. असून जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली १,२३०.०४ कि.मी. लांबीचे रस्ते असून ९८६.७० कि.मी. रस्ते डांबरी आणि २८९.६५ कि.मी. रस्ते खडीचे आणि २४.३० कि.मी. रस्ते मातीचे होते. लातूर जिल्ह्यातील इतर जिल्हा मार्गांची माहिती तक्ता क्रमांक-३ मध्ये दिली आहे.

ग्रामीण मार्ग

जिल्ह्याची अर्थव्यवस्था कृषि व कृषिद्योग यांच्यावर आधारित आहे. म्हणूनच शेतमालाचे अधिकाधिक उत्पादन वाढविणे आणि त्यास किफायतशीर बाजारपेठ उपलब्ध करून देणे यावर अवलंबून आहे. शेतमालाच्या अधिक उत्पादनासाठी सुधारित व संकरित पद्धतीचे बी-बियाणे, सुधारित कृषि अवजारे व यंत्रे तसेच नवनवीन शास्त्रीय पद्धतींचा उपयोग केला जात आहे. शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी ग्रामीण भागात वर्षभर रहदारीसाठी चांगल्या रस्त्यांची नितांत आवश्यकता आहे. ग्रामीण मार्ग हे ग्रामीण जीवनमान उंचावण्याचा हेतू साध्य करतात. ग्रामीण भागातील कृषी, शिक्षण, आरोग्य सेवा, वैद्यकीय मदत, डाकसेवा इत्यादी सुविधा चांगल्या प्रतीच्या रस्त्यांवरच अवलंबून असतात. त्याकरिता सामाजिक व आर्थिक विकासासाठी ग्रामीण रस्त्यांचे जाळे निर्माण करण्याची आवश्यकता भासते. सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकूण ९२२ गावे असून ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेली ९९, गावे ५०० ते ९९९ लोकसंख्येची २५३ गावे, १००० ते १९९९ लोकसंख्येची ३३१ गावे, २०००-४९९९ लोकसंख्येची २०३ गावे, ५०००-९९९९ लोकसंख्येची २९ गावे आणि दहा हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ८ गावे आहेत. यातील बहुतेक गावे ग्रामीण मार्गांव्दारे एकमेकांना जोडली गेली आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण रस्त्यांचा अभाव आणि दुर्दशा विचारात घेऊन नागपूर योजनेत ग्रामीण रस्ते बांधणीला विशेष महत्त्व देण्यात आले होते. स्वातंत्र्योत्तर काळातही ग्रामीण रस्ते विकासाकडे विशेष लक्ष देण्यात आले. त्यात हैदराबाद योजनेला विशेष महत्त्व आहे. लातूर जिल्ह्यात २००४ मध्ये ७१५ ग्रामीण मार्ग अस्तित्त्वात होते.

दिनांक ३१ मार्च १९८५ रोजी जिल्ह्यात ४३५.४८ कि.मी. लांबीचे ग्रामीण मार्ग अस्तित्वात होते. त्यापैकी फक्त ३.३१ कि.मी. लांबीचे डांबरी मार्ग आणि ३६७.६१ कि.मी. लांबीचे खडीचे मार्ग होते. तर दिनांक ३१ मार्च २००४ रोजी म्हणजे वीस वर्षात ग्रामीण मार्गांची लांबी १,४४७.९३ कि.मी. असून त्यापैकी ७१८.११ कि.मी. डांबरी, ६६६.२८ कि.मी. खडीचे मार्ग होते. एकूण ग्रामीण मार्गांपैकी ४९.६० टक्के मार्ग डांबरी आणि ४६.०० टक्के मार्ग खडीचे होते. जिल्ह्यातील ग्रामीण मार्गांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे होती : लातूर-९०, रेणापूर-७१, औसा-१०२, निलंगा-१२१, उदगीर-१४२, अहमदपूर-१०३ आणि चाकूर-७६.

खालील विवरणपत्रात जिल्ह्यातील ग्रामीण मार्गांची वीस वर्षातील प्रगती दर्शविली आहे.

अ. क्र.	तालुका	ग्रामीण मार्गांची ३१/३/१९८५ ची स्थिती (कि.मी.)				ग्रामीण मार्गांची ३१/३/२००४ ची स्थिती (कि.मी.)			
		डांबरी	खडीचे	अपृष्ठांकित	एकूण	डांबरी	खडीचे	अपृष्ठांकित	एकूण
१.	लातूर	. .	६०.०८	४.००	६४.०८	१२८.७५	४९.५०	. .	१७९.२५
२.	रेणापूर	. .	. .	. .	. .	७१.३०	२८.५०	. .	१०३.८०
३.	औसा	१.५०	५२.१०	७.५०	६१.१०	११०.४०	९२.५०	५.५०	२१९.००
४.	निलंगा	१.८१	१४९.५१	१०.१०	१६१.४२	१५५.९०	१०६.८३	१९.१४	२८१.८०
५.	उदगीर	. .	५०.६७	१७.९७	६८.६४	९४.७६	१६८.१५	११.७०	२८०.११
६.	अहमदपूर	. .	५५.२५	२४.९९	८०.२४	९९.७५	१३०.२०	. .	२३३.९५
७.	चाकूर	. .	. .	. .	. .	५७.२५	९०.६०	१.६०	१४९.९५
	एकूण	३.३१	३६७.६१	६४.५६	४३५.४८	७१८.११	६६६.२८	३७.९४	१,४४७.९३

१९८१-२००१ रस्ते विकास योजना (मध्यावर्ती पुनर्विलोकन) नुसार दिनांक ३१ मार्च २००५ रोजी जिल्ह्यातील ग्रामीण मार्गांची लांबी २,२८१.२० कि.मी. असून जिल्हा परिषदेच्या अंतर्गत १,१११.११ कि.मी. (सुटलेली नवीन लांबी १,१७०.०९ कि.मी.) पैकी ७४९.९१ कि.मी. डांबरी, ६७०.९८ कि.मी. खडीचे आणि ५४.७४ कि.मी. मातीचे रस्ते होते.

लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात १९९१ च्या जनगणनेच्या वेळी ३९५ खेड्यांना (४३.२२ टक्के) पक्क्या रस्त्यांची सोय उपलब्ध होती. उदगीर तालुक्यामध्ये ६९.११ टक्के खेड्यांना पक्क्या रस्त्यांची सोय उपलब्ध असल्यामुळे जिल्ह्यात या तालुक्याचा पहिला क्रमांक होता. तर औसा तालुक्याचा दुसरा क्रमांक असून तेथे ६३.७८ टक्के खेड्यांना पक्क्या रस्त्यांची सोय उपलब्ध होती. अहमदपूर तालुक्याचा जिल्ह्यात शेवटचा क्रमांक असून तेथे फक्त १४.९१ टक्के खेड्यांना पक्क्या रस्त्याची सोय उपलब्ध होती. लातूर तालुका ४५.५१ टक्के खेड्यांना, तर निलंगा तालुक्यातील ३५.२६ टक्के खेड्यांना पक्के रस्ते उपलब्ध होते. जिल्हा सरासरी नुसार ४३.२२ टक्के खेड्यांना पक्क्या रस्त्यांची सोय उपलब्ध होती.

नागरी केंद्रापासून ५१ कि.मी. पेक्षा दूर असलेल्या आणि पक्क्या रस्त्यांनी जोडलेल्या खेड्यांची टक्केवारी २५ टक्के असून नागरी केंद्रापासून असलेले अंतर अनुक्रमे ०-५, ६ ते १५, आणि १६ ते ५० कि.मी. अंतर असलेल्या खेड्यांचे प्रमाण अनुक्रमे ५१.९२ टक्के; ४९.२४ टक्के आणि ४०.०० टक्के होते.

१९९१ मध्ये एकूण ग्रामीण लोकसंख्येच्या ५९.३८ टक्के ग्रामीण लोकांना पक्क्या रस्त्यांची सोय उपलब्ध होती. त्यादृष्टिने विचार केल्यास उदगीर तालुक्याचा प्रथम क्रमांक (८२.५३ टक्के), आणि औसा तालुक्यांचा दुसरा क्रमांक (७४.८८ टक्के) लागतो. लातूर तालुक्याची (६१.४३ टक्के), जिल्हा सरासरीपेक्षा टक्केवारी अधिक असून निलंगा आणि अहमदपूर या दोन तालुक्यांची सरासरी जिल्हा सरासरी पेक्षा कमी आहे.

अनुक्रमणिका

१९९१ मध्ये ५०० लोकसंख्या असलेल्या १४० खेड्यांपैकी ३१ खेड्यांना (२२.१४ टक्के) पक्के रस्ते होते. तर ५००० व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या २४ खेड्यांपैकी २३ खेड्यांना पक्क्या रस्त्यांची सोय उपलब्ध होती.[१८]

नागरी रस्ते

जिल्ह्यात लातूर, उदगीर, अहमदपूर, औसा आणि निलंगा येथे नगर परिषदा कार्यरत आहेत. नगरपरिषदांच्या नियंत्रणाखाली ३१ मार्च २००४ मध्ये इतर योजनेखाली असलेल्या रस्त्यांची लांबी पुढीलप्रमाणे आहे : सिमेंट/काँक्रीटचे रस्ते २३० कि.मी., डांबरी रस्ते ५९९ कि.मी. खडीचे रस्ते ७८६ कि.मी. आणि इतर रस्ते १४५ कि.मी. लांबीचे होते.

लातूर नगरपरिषदेच्या नियंत्रणाखाली सन १९९३-९४ मध्ये सिमेंटचे रस्ते १३८.०० कि.मी., डांबरी रस्ते २८९.०० कि.मी. खडीचे रस्ते ३२५ कि.मी. लांबीचे होते. औसा नगरपरिषदेच्या नियंत्रणाखाली १९९३-९४ मध्ये डांबरी रस्ते ९.०० कि.मी. खडीचे रस्ते १० कि.मी. आणि इतर रस्ते २.०० कि.मी. होते. निलंगा नगरपरिषदेच्या नियंत्रणाखाली १९९३-९४ मध्ये डांबरी रस्ते १६.०० कि.मी. खडीचे रस्ते १०.०० कि.मी. आणि इतर रस्ते २०.०० कि.मी. लांबीचे होते. उदगीर नगरपरिषदांच्या नियंत्रणाखाली सन २००४ मधील रस्त्यांची लांबी दिली आहे. अनु. क्र. सिमेंट काँक्रीट १८.६५, डांबरी १७.१०, खडीचे ७९.१० कि.मी. असून एकूण रस्त्याची लांबी ११४.८५ कि.मी. होती.

तरसेवा

जिल्ह्यात बारमाही वाहणाऱ्या नद्या नसल्यामुळे तरसेवा उपलब्ध नाही.

पूल

जिल्ह्यातून प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक-३ जात असून या मार्गावरील तेरणा नदीवर उजनी गावाजवळ १९७४ मध्ये, आशीव गावाजवळील आशीव नाल्यावर १९९५ मध्ये, तावरजा नदीवर पेठ गावाजवळ १९९९ मध्ये आणि वासनगावजवळील नाल्यावर १९६८ मध्ये पूल बांधले. मांजरा नदीवर भातखेडा गावाजवळ १९८२ मध्ये, मनार नदीवर सांगवी गावाजवळ १९९९ मध्ये पूल बांधले. तिसगाव-पाथर्डी-पाडळासिंगी-पिंपळनेर-लोखंडी सावरगाव-लातूर-राज्य महामार्ग क्रमांक १४४ वर मांजरा नदीवर महापूरजवळ १९९८ मध्ये पूल बांधण्यात आला. जामखेड-पाटोदा-मांजरसुंभा-केज-अहमदपूर-राज्यमार्ग क्रमांक १५६ वर मनार नदीवर कोपरा गावाजवळ १९६३ मध्ये, पाटोदा गावाजवळील नाल्यावर १९५५ मध्ये पूल बांधले. लातूर-कळंब राज्यमार्ग क्रमांक- १६० वर एकूण चार पूल असून भुईसमुंद्रा

---

१८. **सेंसस ऑफ इंडिया, १९९१, सिरीज-१४, महाराष्ट्र , पार्ट बारा ए ॲण्ड बी डिस्ट्रिक्ट सेंसस हँडबुक लातूर, व्हिलेज ॲण्ड टाऊन डिरेक्टरी व्हिलेज ॲण्ड टाऊन वाईज प्रायमरी सेंसस ॲबस्ट्रॅक्ट,** पृ.४२ एचएफ ४१३७—३५

गावाजवळील नाल्यावर १९८२ मध्ये, काटगावजवळील नाल्यावर १९८३ मध्ये, जवळा गावाजवळील नाल्यावर १९८२ मध्ये, तांदुळजा गावाजवळील नाल्यावर १९८२ मध्ये पूल बांधण्यात आले. रेणापूर-उदगीर-देगलूर-राज्यमार्ग क्रमांक-१६८ वर रेणापूर जवळील रेणा नदीवर आणि बामणी नदीवर बामणी गावाजवळ १९९९ मध्ये पूल बांधले. फालेगाव-जितूर-गंगाखेड-अहमदपूर-उदगीर-राज्यमार्ग क्रमांक-२१७ वर मनार नदीवर सोरा गावाजवळ १९९० मध्ये पूल बांधला. तसेच राज्यमार्ग क्रमांक-१६२ वर मुरूड-जवळील नाल्यावर १९८८ मध्ये पूल बांधला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्ह्यात बांधलेल्या पुलांची माहिती तक्ता क्रमांक ४ मध्ये दिली आहे.

उड्डाण पूल[१९]

लातूर शहरात शिवाजी चौकात रहदारी जास्त असल्यामुळे तेथे उड्डाण पुलाचे बांधकाम दिनांक ७ नोव्हेंबर २००० ला सुरू करण्यात आले. या प्रकल्पात उड्डाणपूल, रेल्वे ओलांडणी पूल आणि भुयारी मार्गाचा समावेश असून त्याची प्रकल्प किंमत २३.८५ कोटी रूपये आहे. त्यातील उड्डाण पुलाच्या कंत्राटाची रक्कम ११.६९ कोटी रूपये आहे. उड्डाण पुलाची भरावासह (दोन्ही बाजुची) एकूण लांबी ७४८ मीटर असून प्रत्यक्ष उड्डाणपुल ४०२.२२ मीटर लांब आहे. उड्डाण पुलास एकूण १२ गाळे असून ११ आरसीसी भरीव खांब असून त्यापैकी ८ टी (T) आकाराचे आणि तीन उलट्या यू (∩) आकाराचे आहेत. एकूण रूंदी १२ मीटर असली तरी ११ मीटर रूंदीचा वाहनमार्ग आहे.

भुयारी मार्ग : शिवाजी चौक भागात भुयारी मार्ग बांधला असून त्याची लांबी ४२५ मीटर आणि रूंदी १२ मीटर, उंची ३ मीटर (हेड रूम) आहे. संपूर्ण आच्छादित भुयारी मार्ग १०० मीटर लांबीचा असून दोन्ही बाजुंच्या भिंतींना आर.सी.सी. आणि इटालियन फरशी लावली आहे.

उड्डाणपूल आणि भुयारी मार्गाचे काम २६ फेब्रुवारी २००२ ला पूर्ण झाले असून तो दिनांक १७ मार्च २००२ ला वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.

वाहतूक प्रगणना

जिल्ह्यात डिसेंबर २००२ मध्ये झालेल्या वाहतूक प्रगणनेवरून असे दिसून येते की, लातूर शहरातून जाणारा राज्यमार्ग क्रमांक १४४ वरील किलोमीटर क्रमांक ५/४०० येथील शिवाजी चौकात एकूण २७,१४४ वाहने (दैनिक सरासरी) धावल्याची नोंद झाली असून त्यात १३,४५१ जलदगती आणि २,९७४ मंदगती वाहनांचा समावेश असून तेथे २७,१४४ टन वाहतूक भार होता. त्यानंतर दुसरा क्रम प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक-३ वरील राजीव गांधी चौक, किलोमीटर क्रमांक ४८७/०० येथे एकूण १०,२७४ वाहने धावली असून त्यात ८,८७० जलदगती आणि १,४०४ मंदगती वाहनांचा समावेश होता. मात्र ४४,४७८ टन सर्वाधिक वाहतूक भार होता. वरील दोन मार्गांशिवाय लातूर शहरातून राज्यमार्ग क्रमांक १६० आणि

१९. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांच्याकडून मिळालेल्या माहितीवर आधारित.

१६६ आणि प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक-५ या तीन मार्गांवरील बाभळगाव नाका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ नाका आणि टिना ऑईल मिल या ठिकाणी (दैनिक सरासरी) जास्त वाहने धावल्याची नोंद झाली आहे. म्हणजेच लातूर शहरात दररोज जास्तीत जास्त वाहने धावत असून वाहतूक भारही जास्त आहे.

लातूर शहराबाहेरील राज्यमार्ग क्रमांक ७७ आणि १६७, प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक-१०, राज्यमार्ग क्रमांक १६५ आणि १६८ या मार्गांवरील अनुक्रमे मुरूड, निटूर, वासनगाव, लामजना आणि तिवटघ्याळ या नाक्यांवर जलदगती आणि मंदगती जास्त वाहने धावल्याची नोंद झाली असून तेथे वाहतूक भार जास्त आहे. डिसेंबर-२००२ मध्ये झालेल्या वाहतूक प्रगणने विषयीची[२०] आकडेवारी तक्ता क्रमांक-५ मध्ये दिली आहे.

लातूर जिल्ह्यात मे-२००५ मध्ये निरनिराळ्या मार्गांवर धावणाऱ्या जलदगती आणि मंदगती वाहनांची दैनिक गणती[२१] करण्यात आली असून त्या मार्गांवरील वाहतूक भाराची नोंद करण्यात आली असून त्याची माहिती खालीलप्रमाणे : प्रमुख राज्य मार्ग क्रमांक-३ वरील किलोमीटर क्रमांक ४८७/०० वरील लातूर येथील राजीव गांधी चौक येथे ११,७६० जलदगती आणि १,९३२ मंदगती वाहने (दैनिक सरासरी) धावली असून तेथे ५३,४६४ टन वाहतूक भार होता. जिल्ह्यातील हे सर्वाधिक वाहने धावणारे ठिकाण आहे. याच मार्गावरील थोरलेवाडी किलोमीटर क्रमांक ५४७/३०० येथे ४,१११ जलदगती आणि २३६ मंदगती वाहने धावली असून वाहतूक भार १६,५९९ टन होता. याच मार्गावरील औसा येथे किलोमीटर क्रमांक ४७०/०० येथे ४,७६९ जलदगती आणि २३२ मंदगती वाहने धावल्याची नोंद असून वाहतूक भार १५,८६५ टन होता. शिरूर ताजबंद येथे कि.मी. क्रमांक ५४३/०० येथे ४,६३४ जलदगती आणि ५९८ मंदगती वाहने धावली असून वाहतूक भार १४,३२६ टन होता.

परळी-आंबेजोगाई-मुरूड-लोहारा-जळकोट-अक्कलकोट- (राज्य मार्ग १६२) वरील मुरूड येथे कि.मी. क्रमांक ४५/०० वर ४,०१८ जलदगती आणि २,३३६ मंदगती वाहने धावली असून तेथील दैनिक वाहतूक भार १८,९३० टन होता. लातूर-कळंब रस्त्यावरील (राज्य मार्ग १६०) एम.आय.डी.सी. कि.मी. क्रमांक ०/२०० येथे ५,५२४ जलदगती आणि १,८३९ मंदगती वाहने धावली असून दैनिक वाहतूक भार १६,४०२ टन होता. औसा-लामजना-उमरगा-आळंद- खसगी रस्ता (राज्य मार्ग १६४) वरील औसा येथील कि.मी. क्र. ०.० वर ३,११८ जलदगती आणि २९५ मंदगती वाहने धावली असून दैनिक वाहतूक भार १५,८५० टन होता. तिसगाव-पाथर्डी-पाडलसिंगी-पिंपळनेर-धारूर-लोखंडी सावरगाव-लातूर (राज्य मार्ग १४४) वरील शिवाजी चौक लातूर कि.मी. क्र. ०५/४०० वर ८,५२६ जलदगती आणि ३,९८० मंदगती वाहने धावली असून तेथे १४,३८४ टन वाहतूक भार होता.

हवाई धावपट्टी (विमान तळ)

विमानसेवेकरिता लातूर येथील धावपट्टीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाव्दारे १९९०-९१ मध्ये पूर्ण करण्यात आले. त्याकरिता ९६.९० हेक्टर जमीन अधिग्रहित करण्यात

२०. **सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा लातूर,** २००४.

२१. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर यांनी ऑक्टोबर २००५ मध्ये पाठविलेल्या माहितीवर आधारित.

आली. धावपट्टीच्या बांधकामासाठी ११९ लक्ष रूपये खर्च झाला. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लातूर यांचेकडे ही धावपट्टी देखभाल आणि दुरूस्तीसाठी ११ मे २००० रोजी हस्तांतरित करण्यात आली. धावपट्टीचा आकार १६८० मीटर x ३० मीटर, टॅक्सी वेचा आकार १७३ x २३ मीटर, ॲप्रॉनचा आकार १०० मीटर x ७५ मीटर आहे. लातूर शहरापासून धावपट्टीचे अंतर १५ कि.मी. आहे. मोठी विमाने उतरण्याच्या दृष्टिने धावपट्टीच्या दोन्ही बाजू प्रत्येकी १५० मीटर प्रमाणे (३०० मी.) लांबी वाढविण्याचे खडी मुरूमाचे काम पूर्ण झाले असून तिच्या डांबरीकरणासाठी प्रस्तावित खर्च १,२३,७२,८०० रूपये आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या टर्मीनल इमारतीच्या नुतनीकरणासाठी प्रस्तावित खर्च १,१४,१५,३०० रूपये आहे. रात्रीच्या वेळी विमान उतरण्याच्या दृष्टिने बांधकाम करण्यात येणार आहे.[२२]

या विमानतळावर अति महत्त्वाच्या व्यक्तींची शासकीय विमाने किंवा हेलीकॉप्टर्स उतरविण्यात येतात. सध्या कोणत्याही खाजगी विमान कंपन्यांची दैनंदिन प्रवासी सेवा उपलब्ध नाही. या विमानतळाचा खाजगी कंपन्यांना वापर करण्यापूर्वी राज्य शासनाच्या विमान चालन संचालनालयाकडून पूर्व परवानगी घेण्यात येते.[२३] धावपट्टीवर विमान किंवा हेलीकॉप्टर नियंत्रणासाठी सद्यस्थितीत आधुनिक यंत्रणा उपलब्ध नाही. येथे ॲव्हरो जातीची छोटी विमाने उतरू शकतात.

सध्या मराठवाडा विभागात लातूर पासून सुमारे २९० कि.मी. अंतरावर असलेल्या औरंगाबाद येथे विमानतळ असून तेथे अंतर्देशिय विमान सेवा उपलब्ध आहे.

लोहमार्ग

लातूर जिल्ह्यात १४८ कि.मी. लांबीचे लोहमार्ग असून त्यात ८३ कि.मी. ब्रॉडगेज आणि ६५ कि.मी. नॅरोगेज लोहमार्ग आहेत. मिरज-लातूर या नॅरोगेज लोहमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याचे काम सुरू आहे. विकाराबाद-परळी-वैजनाथ रेल्वेची एक शाखा मोहमदाबाद-बिदर-उदगीर वाहतुकीकरिता सन १९३० मध्ये सुरू झाली. या लोहमार्गाचे एकूण अंतर ८१.५५ कि.मी. होते. लोहमार्गाची दुसरी विस्तारित शाखा उदगीर ते परळी-वैजनाथ वाहतुकीकरिता सन १९३३ मध्ये सुरू झाली असून तिचे अंतर ९४.९५ कि.मी. आहे. सन १८७८ च्या शेवटी ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वेने वाडी ते सिकंदराबाद या भागासाठी काम केले होते, आणि जानेवारी १८७७ ते १८८४ पर्यंत स्टेट रेल्वे एजन्सीने काम केले होते. एच.ई.एच निझाम गॅरेंटेड स्टेट रेल्वे कंपनीने या भागासाठी आणि सीमा भागात जानेवारी १८८५ ते १९३० पर्यंत एकत्र काम केले होते. उर्वरित भागाच्या बांधकामासाठी निजाम सरकारने निधी पुरविला होता आणि हे काम निझाम गॅरेंटेड स्टेट रेल्वे कंपनीने पूर्ण केले होते.[२४]

---

२२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लातूर यांनी २००५ मध्ये पाठविलेल्या माहितीवर आधारित.

२३. सहायक संचालक, विमान चालन संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या २००५ मध्ये पाठविलेल्या माहितीवर आधारित.

२४. **उस्मानाबाद जिल्हा गॅझेटिअर,** १९७२, पृ.५३१

सिकंदराबाद ते मनमाड, पुर्णा ते हिंगोली, सिकंदराबाद ते हैद्राबाद स्टेट फ्रंटिअर, परभणी ते परळी वैजनाथ ह्या सर्व लोहमार्गाचे काम निझाम्स गॅरेंटेड स्टेट रेल्वे कंपनीने ३१ मार्च १९३० पर्यंत पूर्ण केले होते.

विकाराबाद-परळी-वैजनाथ ब्रॉडगेज : हा रेल्वे मार्ग लातूर, चाकूर आणि उदगीर या तालुक्यांतून जात असून या लोहमार्गांची लांबी ६९.८५ कि.मी. आहे. ही रेल्वे लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यात प्रवेश करते. हा लोहमार्ग सपाट भागातून जात असून काही ठिकाणी लहान लहान टेकड्या असून हा प्रदेश निर्जन असा आहे. या लोहमार्गावरील स्थानके (विकाराबादपासून अंतर) वडवळ नागनाथ (२१० कि.मी.) आणि चाकूर (२०० कि.मी.) ही सर्व स्थानके पूर्वी अहमदपूर तालुक्यात होती, आता ती चाकूर तालुक्यात आहेत. उदगीर तालुक्यातील स्थानके लोहारा (१७८ कि.मी.) हेर (१८९ कि.मी.), उदगीर (१७२ कि.मी.), आणि बेलसकरगा (१६१ कि.मी.) ही आहेत. लातूर तालुक्यात पानगाव आणि मूर्ती ही स्थानके आहेत.

मिरज-लातूर रेल्वेमार्ग : या नॅरोगेज रेल्वेस पूर्वी बार्शी लाईट रेल्वे म्हणून ओळखत होते. निजाम राज्यात ही रेल्वे सन १९११ मध्ये सुरू झाली होती. हा रेल्वेमार्ग मिरज शहरापासून सुरू होवून तो उत्तर-पश्चिमेकडे लातूर तालुक्यातील मुरूड गावाजवळ जिल्ह्यात प्रवेश करतो व पुढे लातूर स्थानकाकडे धावतो. या लोहमार्गावरील स्थानके (कुर्डूवाडीकडून अंतर) लातूर २२०.४८ कि.मी., हरंगुळ २०४.३८ कि.मी.,औसा १८८.२९ कि.मी., निवळी १७०.५९ कि.मी., मुरूड १४४.८४ कि.मी. असून ती सपाट मैदानी भागातून जाते. या रेल्वे मार्गावरून लातूर-कुर्डूवाडी मिक्स्ड, लातूर-कुर्डूवाडी पॅसेजर आणि लातूर-कुर्डूवाडी मिक्स्ड पॅसेंजर या गाड्या धावत होत्या.

कुर्डूवाडी-लातूर रेल्वेचे रुपांतरण : मिरज-कुर्डूवाडी-लातूर या नॅरोगेज लोहमार्गाचे (३२९ कि.मी.) ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याच्या कामास सन १९९२-९३ मध्ये मंजुरी मिळाली. सन १९९५-९६ मध्ये लातूर-लातूर रोड या नवीन मार्गाकरिता भूसंपादनाचे काम सुरू झाले होते. याचवर्षी लातूर स्थानकाच्या इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आले. हे काम टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आले. प्रथम टप्प्यात लातूर ते लातूर रोड आणि कुर्डूवाडी ते पंढरपूर या लोहमार्गाच्या रूपांतरणाचे काम प्रगतीपथावर होते. ते अनुक्रमे मार्च २००१ व डिसेंबर २००३ मध्ये पूर्ण झाले. कुर्डूवाडी ते लातूर (१९९ कि.मी.) मार्गावरील माती भरावाचे आणि पुलाची कामे १९९९-२००० मध्ये सुरू होती. कुर्डूवार्डी ते पंढरपूर (५२ कि.मी.) रूपांतर पूर्ण झालेला लोहमार्ग मार्च २००१ मध्ये सुरू करण्यात आला. दुसऱ्या टप्प्यातील लातूर रोड ते लातूर (४२ कि.मी.) भागात २००१-२००२ मध्ये माती भरावयाचे व पुलांची कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर होती. कुर्डूवाडी ते लातूर (१५२ कि.मी.) या तिसऱ्या टप्प्याचे काम २००१-२००२ मध्ये हाती घेण्यात आले असून १७३ पैकी २९ लघुपूल व ८ मोठ्या पुलांपैकी ५ पुलांची कामे पूर्ण झाली होती. पंढरपूर-मिरज (१३७ कि.मी.) या चौथ्या व शेवटच्या टप्प्यातील काम लवकरच हाती घेण्याचे ठरले होते. २००३-२००४ मध्ये दुसऱ्या

टप्प्यातील लातूर ते लातूर रोड (४२ कि.मी.) भागाचे रूळ जोडणीचे काम पूर्ण झाले आहे. तिसऱ्या टप्प्यात कुर्डूवाडी ते लातूर (१५२ कि.मी.) भागातील मार्गाचे काम हाती घेण्यात आले असून ४३ लहान व ३ मोठ्या पुलांची कामे पूर्ण झाली आहेत. चौथ्या टप्प्यातील मिरज-पंढरपूर या मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. सन २००४-२००५ मध्ये दुसऱ्या टप्प्यातील लातूर ते लातूर रोड (४२ कि.मी.) आणि तिसऱ्या टप्प्यातील कुर्डूवाडी ते लातूर (१५२ कि.मी.) या टप्प्याची कामे पूर्ण झाली आहेत. या मार्गावरील ४३ लहान आणि ३ मोठ्या पुलांची कामे पूर्ण झाली आहेत.[२५]

सद्या मुंबईहून एक दिवसाआड मुंबई-लातूर दरम्यान धावणारी लातूर एक्सप्रेस परभणी-परळी-लातूररोड वरून लातूरला जाते व मुंबईस परत येते.

वाहने

लातूर जिल्ह्यात सन १९८५ मध्ये एकूण नोंदणीकृत सर्व वाहनांची संख्या फक्त ७,०७१ होती त्यापैकी ३,८७१ दुचाकी वाहने, ६१९ मोटार कार आणि जीप आणि १०७० ट्रक आणि लॉरीज होत्या. मात्र गेल्या वीस वर्षांत वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. सन २००५ मध्ये नोंदणीकृत वाहनांची एकूण संख्या १,०४,८२४ होती. त्यात मोटार सायकलींची संख्या सर्वाधिक म्हणजे ४७,७२९ होती. तक्ता क्रमांक ६ मध्ये जिल्ह्यातील नोंदणीकृत वाहनांची आकडेवारी दिली आहे.[२६]

रस्ते अपघात

जिल्ह्यात वाहनांच्या संख्येत मोठी वाढ झाल्यामुळे रस्ते अपघातांच्या संख्येतही वाढ झाली आहे. जिल्ह्यातील रस्ते अपघातांची १९९५ ते २००० ची आकडेवारी खाली दिली आहे.[२७]

वर्ष	प्राणघातक	गंभीर	किरकोळ दुखापती	दुखापती शिवाय	एकूण अपघात
१९९५	१२८	१३१	१४२	५१	४५२
१९९६	१०९	१४३	१७३	६४	४८९
१९९७	१५२	१९०	१५६	४८	५४६
१९९८	१२८	१९४	१४३	५०	५५५
१९९९	१२८	१४३	२११	५०	५३२
२०००	१५६	२११	१७३	५६	५९६

२५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, १९९२-९३ ते २००४-२००५.
२६. उप प्रादेशिक, परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय लातूर यांचेकडील माहिती.
२७. जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा लातूर यांचेकडील माहितीवर आधारित.

सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यात निरनिराळ्या वाहनांपासून झालेल्या अपघातांची आकडेवारी खालीलप्रमाणे दिली आहे.[२८]

अ. क्र.	वाहन प्रकार	अपघातांची संख्या	अपघातग्रस्त वाहनांची टक्केवारी
१	बस	७३	१००%
२	मालमोटारी	३२१	१००%
३	टॅक्सी	. .	. .
४	मोटारकार	७	१००%
५	मोटार सायकल	१७९	१००%
६	ऑटोरिक्षा	११५	१००%
७	जीप	२३४	१००%
८	इतर	१९९	१००%
	एकूण	१,१२८	१००%

पर्यटकांसाठी सुविधा

लातूर जिल्ह्यात पूर्वीपासून पर्यटन स्थळे विकसित केलेली नाहीत. त्यामुळे पर्यटन विभागाव्दारे पर्यटकांसाठी जिल्ह्यात विशेष सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. वास्तविक उदगीर किल्ला, औसा किल्ला, खरोसा लेणी अशी पुरातत्त्व विभागाची सुरक्षित स्मारके येथे आहेत.

विश्रामगृहे

प्राचीन किंवा मध्ययुगीन काळात या जिल्ह्यात धर्मशाळा किंवा सराई असाव्यात, विशेषत: उदगीर, औसा परिसरात पण त्याची नोंद उपलब्ध नाही. निजाम राजवटीत जिल्ह्यात विश्रामगृहांच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. स्वातंत्र्यानंतर राज्य सरकारने विश्रामगृहांच्या सुविधांमध्ये बरीच सुधारणा केली. शासकीय कामासाठी दौऱ्यावर येणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांसाठी सर्व सोयीने सुसज्ज अशी विश्रामगृहे जिल्ह्याच्या आणि तालुक्यांच्या ठिकाणी बांधण्यात आली आहेत. जिल्ह्यात सन २००४ मध्ये असलेल्या विश्रामगृहांची यादी तक्ता क्रमांक-७ मध्ये दिली आहे.[२९]

राज्य परिवहन

मराठवाड्यातील संघटित प्रवासी परिवहनाचा इतिहास सन १९३२ पासून सुरू होतो. तत्कालीन निजाम सरकारने परिवहन सेवेचे राष्ट्रीयीकरण करण्याची योजना सन १९३२ मध्ये सुरू केली होती. हैदराबाद राज्याच्या विभाजनानंतर मराठवाडा राज्य परिवहन अस्तित्वात आले आणि सार्वजनिक परिवहनासंबंधी स्वतंत्र शासकीय विभाग म्हणून कार्यरत होते.

२८. जिल्हा पोलीस अधीक्षक, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित.
२९. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर.

तत्कालिन मुंबई राज्य सरकारने प्रवासी वाहतुकीच्या राष्ट्रीयीकरणासाठी सन १९४९ मध्ये बॉम्बे स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (मुंबई राज्य मार्ग परिवहन महामंडळ) या स्वायत्त मंडळाची स्थापना करून त्यांचेकडे प्रवासी वाहतुकीचे काम सोपविले होते. नोव्हेंबर १९५६ च्या राज्य पुनर्रचनेनंतर तत्कालिन मुंबई सरकारच्या अधिकाराखाली असलेले ट्रान्सफर्ड रोड ट्रान्सपोर्ट अंडरटेकींग डिपार्टमेंट हे स्वतंत्र विभाग मराठवाड्यातील परिवहन सेवेकडे लक्ष देत असे. सन १९५९ मध्ये सर्व परिवहन सेवांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. दिनांक १ जुलै १९६१ ला ट्रान्सफर्ड रोड ट्रान्सपोर्ट अंडरटेकींग डिपार्टमेंट रद्द करून मराठवाडा राज्य परिवहन आणि विदर्भ विभागातील राज्य परिवहन सेवा मुंबई राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये विलीन करण्यात येवून पुनर्रचना केलेल्या महामंडळास महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ असे नाव देण्यात आले.[३०]

राष्ट्रीयीकरणापूर्वी मराठवाड्यातील वाहतूक सेवा खाजगी संस्थांकडे होती व त्यांच्या मालकीच्या बसगाड्या होत्या. परंतु ही बससेवा समाधानकारक नव्हती. प्रवासी वाहतूक करणाऱ्या अनेक संस्था एकाच मार्गावर प्रवासी वाहतूक करीत असल्यामुळे त्यांच्या आपसातील स्पर्धामुळे हा व्यवसाय तोट्यात चालत असे प्रवाशांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा किंवा सुरक्षा मिळत नसे. अनेकदा दुर्घटना घडून प्रवासी दुर्घटनाग्रस्त होत व अनेकदा त्यांना आपले प्राण गमवावे लागत. अशा दुर्घटना नेहमीच घडत असत. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर सरकारने परिवहन सेवेविषयी गांभिर्याने विचार करून मार्ग परिवहन सेवेचे राष्ट्रीयीकरण करण्याचे ठरविले. औरंगाबाद विभागातील उस्मानाबाद हा एक बस आगार होता. सन १९६१ पासून ही सेवा उस्मानाबाद जिल्ह्यात राबविली जात होती.

तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून १६ ऑगस्ट १९८२ ला लातूर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्यात सन १९६१ मध्ये लातूर बस आगार आणि १९७२ मध्ये उदगीर बस आगार कार्यान्वित झाले. जिल्हा निर्मितीनंतर सुमारे चार वर्षांनी १ मे १९८६ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा लातूर विभाग अस्तित्वात आला. त्यावेळी लातूर आणि उदगीर ही दोन बस आगारे होती. सन १९८६ मध्येच निलंगा, अहमदपूर आणि औसा येथे बस आगारे सुरू करण्यात आली.

लातूर जिल्ह्यात मध्य आणि दक्षिण-मध्य रेल्वेची एकूण १४८ कि.मी. लांबीचे लोहमार्ग आहेत. या जिल्ह्यात नौकानयनाची सोय उपलब्ध असलेली एकही नदी नाही. त्यामुळे बससेवा हेच प्रमुख वाहतुकीचे साधन आहे.

सन १९९१ मध्ये जिल्ह्यातील ९१४ खेड्यांपैकी १९५ खेड्यांना (२१.३३ टक्के) बसथांबा, तरसेवा किंवा वाहतुकीची कोणतीही सोय उपलब्ध नव्हती. १९५ खेड्यांपैकी १७८ खेड्यांतील ग्रामस्थांना ५ कि.मी. अंतरावर, १६ खेड्यांतील ग्रामस्थांना ५ ते १० कि.मी. अंतरावर आणि एका खेड्यास १० कि.मी. अंतरावर बससेवा उपलब्ध होती. बससेवेची सोय उपलब्ध असलेल्या ७१९ खेड्यांपैकी ८४ खेड्यांची लोकसंख्या ५०० पेक्षा कमी, ४६६ खेड्यांची लोकसंख्या ५०० ते १९९९, १४५ खेड्यांची लोकसंख्या २०००-४९९९ आणि उर्वरित २४

३०. **औरंगाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर** (रिवाईज्ड, १९७७) महाराष्ट्र शासन, पृ.५९४.

खेड्यांची लोकसंख्या ५००० किंवा त्यापेक्षा जास्त होती. खेड्यातील लोकसंख्येचा आकार वाहतुकीच्या सेवा उपलब्धतेसाठी महत्त्वाचा घटक आहे.[३१]

लातूर परिवहन विभागाच्या स्थापनेपासून सुमारे वीस वर्षांच्या कालावधीत या विभागाच्या नियत्यांच्या संख्येत १०१ टक्के, दैनिक सरासरी वाहतूक (कि.मी.) १४५ टक्के, बसगाड्यांमध्ये १०१ टक्के, बसमार्गांमध्ये २४.३८ टक्के, दैनिक सरासरी प्रवासी वाहतुकीमध्ये ६६.७७ टक्के वाढ होऊन बससेवेने जिल्ह्यातील ९०२ गावे जोडली गेली आहेत. बसमार्गांच्या संख्येत १७८ ने वाढ होऊन लांब पल्ल्याच्या सेवांमध्ये २८ ने आणि आंतर राज्य सेवा १९ ने वाढल्या आहेत.

लातूर परिवहन विभागाची वीस वर्षांची प्रगती (१ मे १९८६ ते ३१ मे २००५) खालील विवरणपत्रात दिली आहे.

अ. क्र.	तपशील	१ मे १९८६ ची स्थिती	३१ मे २००५ ची स्थिती	वीस वर्षांत झालेली वाढ
१	नियते	१८५	३७२	१८७
२	दैनिक सरासरी वाहतूक (कि.मी. मध्ये)	६२,२७०	१,५२,५५१.७	९०,२८१.७
३	एकूण बसगाड्या	२००	४०२	२०२
४	एकूण बसमार्ग	३२०	३९८	७८
५	दैनिक सरासरी प्रवासी वाहतूक	८८,१५५	१,४६,९३४	५८,७७९
६	बस आगारांची संख्या	३	५	२
७	कायम बसस्थानके	५	१६	११
८	तात्पुरती बसस्थानके	४	६	२
९	प्रवासी निवारे	३२	६४	३२
१०	रातराणी बससेवा	१०	२१	११
११	लांब पल्ल्याच्या बससेवा	१३	४१	२८
१२	आंतर राज्य बससेवा	२०	३९	१९
१३	निम आराम बससेवा	. .	२	२
१४	कर्मचारी संख्या	१,५२२	२,८५२	१,३३०
१५	विश्रांती गृहे	१०	१९	९
१६	बससेवेनी जोडलेली गावे	५८५	९०२	३१७

सन २००४ मध्ये लातूर विभागातील बससेवेव्दारे आगारनिहाय मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे :---- लातूर आगार २९.४७ टक्के, उदगीर आगार २४.६६ टक्के, निलंगा आगार १६.२० टक्के, अहमदपूर आगार १५.२६ टक्के, औसा आगार

३१. **सेन्सस ऑफ इंडिया, १९९१ सिरिज-१४, महाराष्ट्र**, डिस्ट्रिक्ट सेंन्सस हॅण्डबुक, लातूर, पृ.४१.

१४.४१ टक्के. पाच बस आगारांतून ४०७ बसगाड्यांव्दारे मार्च २००४ मध्ये ३९८ बसमार्गांवर दैनिक सरासरी १,४६,९३४ प्रवाशांची वाहतूक करून दैनिक उत्पन्न १९.२७ लक्ष रूपये प्राप्त केले.

लातूर विभागाची आगार निहाय माहिती खालील विवरणपत्रात दिली आहे.[३२]

क्र.	आगार	आगार स्थापना दिनांक	बस-संख्या	बसमार्ग	दैनिक प्रवासी	दैनिक उत्पन्न (लक्ष रू.)	वार्षिक उत्पन्न (लक्ष रू.)	चालक	वाहक
१	लातूर	१९६१	११५	१५०	४१,८०६	५.७०	२१८८.२१	२५६	२५९
२	उदगीर	१९७२	९८	१०५	३७,६७७	४.८५	१८३०.७७	२४३	२२७
३	निलंगा	२२.२.१९८६	७३	४४	२४,१२९	३.१२	१२०२.५९	१६१	१५३
४	अहमदपूर	१६.६.१९८६	६०	५५	२२,५४८	३.०४	११३३.२४	१४९	१२७
५	औसा	१७.८.१९८६	६१	४४	२०,७७४	२.५६	१०६९.७१	१२५	११२
	विभाग	१.५.१९८६	४०७	३९८	१,४६,९३४	१९.२७	७४२४.५२	९३४	८७६

लातूर बस आगारातून सुटणाऱ्या लांब पल्ल्याच्या बसगाड्या गुलबर्गा, गाणगापूर, अक्कलकोट, नागपूर, नाशिक, नारायणखेड, जळगाव, सोलापूर, सातारा, पुसद, पुणे, पंढरपूर, हैदराबाद, हुबळी, विजापूर, बिदर, मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद येथे जातात.

उदगीर बस आगारातून भिवंडी, बोरीवली, मुंबई, पुणे, शेगाव, औरंगाबाद, हैदराबाद, सोलापूर, अक्कलकोट, गुलबर्गा, निजामाबाद, मेहकर, माजलगाव, बाऱ्हाळी येथे बसगाड्या जातात.

औसा बस आगारातून औरंगाबाद, अकोला, नांदेड, सेलू, पुणे, जिंतूर, माजलगाव, कुर्ला येथे तर अहमदपूर आगारातून औरंगाबाद, जालना, सोलापूर, पंढरपूर, हैदराबाद, कोल्हापूर, बुलडाणा येथे बससेवा सुरू आहे.

तसेच आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्यातील हैदराबाद, गुलबर्गा, निजामाबाद, बाऱ्हाळी, गाणगापूर, हुबळी, विजापूर, बिदर या शहरांशी बससेवा सुरू आहे. ही बस सेवा त्या राज्यातील बसेस व्दारे होत असते.

लातूर विभागातून तुळजापूर, पंढरपूर, कोल्हापूर, परळी, शिर्डी, नाशीक, नांदेड, शेगाव, औंढा नागनाथ, अक्कलकोट, गाणगापूर, तेर या धार्मिक स्थळांना बससेवा पुरविली जात असून वरील बसमार्ग जास्त रहदारीचे आहेत.

"प्रवाशांच्या सेवेसाठी एस.टी." हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन "रस्ता तेथे एसटी" हे सूत्र विचारात घेवून ९०२ खेड्यांना तसेच तालुके आणि जिल्ह्यांच्या ठिकाणी बसगाड्या सोडण्यात येतात. प्रवाशांच्या मागणीप्रमाणे लांब पल्ल्याच्या रातराण्या व आंतरराज्य वाहतूक यात लातूर विभागाने लक्षणीय प्रगती केली आहे.

३२. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, लातूर विभाग, लातूर यांनी ऑगस्ट, २००५ मध्ये पाठविलेल्या माहितीवर आधारित.

बसगाड्यांची दुरूस्ती आणि यांत्रिकी कामासाठी विभागीय कार्यशाळा असून तेथे टायरांची कलनी करण्यासाठी टायर कलनीकरण प्लॅंट सुरू असून दररोज ३६ ते ४० टायरांचे नुतनीकरण केले जाते.[३३]

बसमार्ग

लातूर बस आगारात १५० औसा आगारात ४४, अहमदपूर आगारात ५५ आणि उदगीर आगारात १०५ बसमार्ग कार्यरत आहेत. त्यापैकी लांब अंतराच्या बसमार्गांची (१५० कि.मी. पेक्षा जास्त लांबीची) यादी खाली दिली आहे.

अ.क्र.	बसमार्गाचे नाव	अंतर (कि.मी.)	मार्ग
१	लातूर-गुलबर्गा	१९९.८	निलंगा, मंठाळ
२	लातूर-गुलबर्गा	१६१.९	औसा, उमरगा, आळंद
३	लातूर-गाणगापूर	१८०.१	औसा, उमरगा, आळंद
४	लातूर-औरंगाबाद	२८८.३	केज, बीड
५	लातूर-औरंगाबाद	२९४.३	केज, बीड
६	लातूर-औरंगाबाद	२९२.४	रेणापूर, केज
७	रेणापूर-अक्कलकोट	१५८.७	औसा, उमरगा, मुरूम
८	लातूर-नागपूर	५०५.५	अहमदपूर, नांदेड
९	लातूर-नाशिक	४६६.७	आंबेजोगाई, पाटोदा
१०	लातूर-नाशिक	४३९.७	भूम-जामखेड
११	लातूर-नारायण खेड	१८२.१	शिरूर, ताजबंद
१२	लातूर-जळगाव	४२१.२	आंबा, केज, बीड
१३	लातूर-सोलापूर	१७१.१	औसा, उमरगा
१४	लातूर-सातारा	३३६.६	बार्शी, बारामती
१५	लातूर-पुसद	२५९.०	नांदेड
१६	लातूर-पुणे	३२६.७	बार्शी, इंदापूर
१७	लातूर-पंढरपूर	१९५.२	बार्शी, कुर्डूवाडी
१८	लातूर-हैद्राबाद	३००.५	निलंगा, बिदर
१९	लातूर-हुबळी	४७०.००	सोलापूर, विजापूर
२०	लातूर-विजापूर	२३५.९	औसा, तुळजापूर
२१	लातूर-बिदर	१५१.०	औसा, निलंगा, भालकी
२२	लातूर-बिदर	१५५.१	नळेगाव, उदगीर
२३	लातूर-मुंबई	४८६.६	बार्शी, इंदापूर, पुणे
२४	लातूर-कोल्हापूर	३८६.३	औसा, उजनी, सोलापूर

३३. लातूर जिल्हा दशकपूर्ती महोत्सव १९९२, स्मरणिका, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर.

अनुक्रमणिका

(१)	(२)	(३)	(४)
२५	औसा-औरंगाबाद	३२०.२	लातूर, कळंब
२६	औसा-औरंगाबाद	३१३.५	आंबा, बीड, पानोठ
२७	औसा-अकोला	३५२.०	अहमदपूर, नांदेड
२८	औसा-नांदेड	१६६.४	लातूर, अहमदपूर
२९	औसा-सेलू	१९०.००	परळी, सोनपेठ
३०	औसा-पुणे	३४७.५	बार्शी, इंदापूर
३१	औसा-जिंतूर	२००.४	लातूर, परळी
३२	औसा-माजलगाव	१६७.४	लातूर, परळी
३३	औसा-कुर्ला (मुंबई)	५००.७	लातूर, बार्शी, पुणे
३४	अहमदपूर-औरंगाबाद	३०५.५	आंबा, केज
३५	अहमदपूर-जालना	२८०.०	आंबा, बीड, अंबड
३६	अहमदपूर-सोलापूर	१९५.८	लातूर, औसा
३७	अहमदपूर-पंढरपूर	२६२.८	लातूर, औसा
३८	अहमदपूर-हैदराबाद	२७४.५	उदगीर, बिदर
३९	अहमदपूर-कोल्हापूर	४५३.५	लातूर, तुळजापूर
४०	अहमदपूर-बुलडाणा	३०७.०	गंगाखेड, परभणी
४१	उदगीर-गुलबर्गा	१८१.४	वलांडी, हुलसूर
४२	उदगीर-औरंगाबाद	३४९.७	अहमदपूर, आंबा, बीड
४३	उदगीर-अक्कलकोट	१९६.००	देवणी, निलंगा
४४	उदगीर-पुणे	४००.५	लातूर, बार्शी, पुणे
४५	उदगीर-पुणे	४००.५	नळेगाव, लातूर
४६	उदगीर-हैदराबाद	२३२.०	भालकी, बिदर
४७	उदगीर-निजामाबाद	१६०.००	मुक्रमाबाद
४८	उदगीर-भिवंडी	६१२.००	निलंगा, सोलापूर
४९	उदगीर-मेहकर	१७१.००	लातूर
५०	उदगीर-मुंबई	५७०.७	लातूर, बार्शी, पुणे
५१	उदगीर-सोलापूर	२०१.५	निलंगा, उमरगा
५२	उदगीर-सोलापूर	२०८.१	नळेगाव, औसा
५३	उदगीर-माजलगाव	२०५.०	. .
५४	उदगीर-बोरीवली (मुंबई)	५६१.४	लातूर, कुर्ला
५५	उदगीर-बोरीवली	५७९.४	लातूर, कुर्ला
५६	उदगीर-बल्हाळी	१७५.०	लातूर
५७	उदगीर-शेगाव	३७६.६	नांदेड, हिंगोली

खाजगी बससेवा : लातूरच्या परिवहन कार्यालयाकडे भारतभर पर्यटन (All India Permit) वाहतुकीसाठी २००५ पर्यंत नोंदणी झालेल्या ३४ खाजगी बसगाड्या कार्यरत आहेत. या बसगाड्यांची साधारणपणे ४० आसनक्षमता असून तालुकानिहाय अशा बसगाड्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. लातूर-१५, औसा-४, चाकूर-२, शिरूर-अनंतपाळ-२, उदगीर-४, निलंगा-५, आणि अहमदपूर-१. या बसगाड्या खाजगी व्यक्तींच्या मालकीच्या असून त्यात विश्व ट्रॅव्हल्स्, लातूर आणि पुष्कराज ट्रॅव्हल्स्, हरंगुळ या पर्यटन संस्थांच्या बसगाड्यांचाही समावेश आहे. या खाजगी बसगाड्यांव्दारे देशाच्या विविध भागात आणि पर्यटन स्थळांना बससेवा पुरविली जाते.

त्याशिवाय जिल्ह्यात नोंदणीकृत ७९ कंत्राटी मोटार कार प्रवासी वाहतुकीसाठी वापरल्या जातात त्यांची आसनक्षमता १५ ते ४० पर्यंत असते. जिल्ह्याच्या सर्वच तालुक्यांत कंत्राटी मोटार कारव्दारे प्रवासी सेवा पुरविली जाते.

डाक, तार आणि दूरध्वनी सेवा

दख्खणमध्ये बातमीपत्रे आणि नियंत्रित डाक वाहतुकीचा उगम तेराव्या शतकात झाल्याची नोंद आढळते. सन १३१८ मध्ये दिल्ली राजवटीने पूर्व दख्खनमध्ये डाकसेवा विस्तारली होती.[३४] इ.स.१५९५ मध्ये मराठवाडा हा भाग सर्वसाधारणपणे दख्खन म्हणून संबोधला जात होता.[३५] कुतुबशाहीमध्ये तत्पर आणि कुशल डाकसेवा उपलब्ध असल्याची नोंद ट्रॅव्हर्निअरने आपल्या प्रवास वर्णनात केली आहे.[३६] फेरिस्ताच्या नुसार अकबराने त्याच्या राज्यात सर्वत्र डाकसेवा उपलब्ध करून दिली होती. प्रत्येक पाच कोसाच्या अंतरावर दोन घोडे आणि काही पायदळ लोक याकामी नेमले होते.[३७] मराठा काळात डाकसेवेस महत्त्वपूर्ण स्थान मिळाले नव्हते. मराठा काळात महाराष्ट्रातील डाकसेवा सरकारच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अस्तित्वात होती. त्याकाळात महाराष्ट्रात "सरकारी डाक" आणि "सावकारी डाक" या दोन प्रकारच्या डाकसेवा अस्तित्वात होत्या. मराठा डाक पद्धती महाराष्ट्रातील प्रमुख शहरांतून सुरू होती.[३८] मोगल सरकारात पोस्ट आणि गुप्तवार्ता ही महत्त्वाची खाती होती आणि "दरोगा" नावाचा अधिकारी त्याचा प्रमुख असे.[३९] सन १६८८ पर्यंत पट्टामार, कासीद आणि हरकारे हे कर्मचारी डाकसेवेत कार्यरत होते. त्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीने मद्रास आणि मुंबई येथील व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी डाक कार्यालये स्थापण्याचे आदेश दिले होते.[४०] हैदराबाद राज्यात इ.स.१८६९ मध्ये पोस्टाची व्यवस्था अस्तित्त्वात आली.[४१]

---

३४. शेरवाणी एच.के. आणि जोशी.पी.एम **हिस्टरी ऑफ मिडिव्हल डेक्कन (१२९५-१७७४) खंड दुसरा,** पृ.४५३ व ४५५.
३५. काटे,पि.व्ही. **मराठवाड्याचा इतिहास,** पृ.८१
३६. शेरवाणी एच.के. आणि जोशी.पी.एम.- पूर्वोक्त, पृ.४५७.
३७. कित्ता, पृ.४६१.
३८. कित्ता, पृ.४६०.
३९. कित्ता, पृ.४६४.
४०. कित्ता, पृ.४६७.
४१. काटे, पी. व्ही., "**मराठवाड्याचा इतिहास**" पृ.१०६.

सन १९६३ मध्ये मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांसाठी औरंगाबाद येथे मुख्य बटवडा कार्यालय होते. उस्मानाबादला सन १९६४ मध्ये स्वतंत्र विभागीय कार्यालय सुरू झाले. त्यावेळी या डाक कार्यालयाच्या नियंत्रणाखाली १० तार कार्यालये, ११ दूरध्वनी कार्यालये, ३८९ शाखा डाक कार्यालये आणि ४९८ पत्रपेट्या होत्या. आताच्या लातूर जिल्ह्यामध्ये १९६४ मध्ये पुढीलप्रमाणे डाक कार्यालये होती. अहमदपूर तालुक्यात ३३, उदगीर तालुक्यात २९, औसा तालुक्यात ३०, लातूर तालुक्यात २४, निलंगा तालुक्यात ४३ कार्यालये होती.[४२] सन १९९१ मध्ये जिल्ह्यातील ९१४ गावांपैकी फक्त २५० गावांना डाकसेवा उपलब्ध होती. त्याव्दारे सुमारे ५२.२७ टक्के ग्रामीण लोकसंख्येला डाकसेवा पुरविली जात होती तर ६६४ गावांना डाकसेवा उपलब्ध नव्हती. डाकसेवा उपलब्ध असलेल्या गावांपासून ४७८ गावे (७१.९९ टक्के) ५ कि.मी. अंतरावर होती, १३९ गावांना (२०.९३%) डाकसेवा ५ ते १० कि.मी. अंतरावर, तर ४७ गावांना (७.०८%) १० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर डाकसेवा उपलब्ध होती. डाकसेवा उपलब्ध असलेल्या २५० खेड्यांपैकी फक्त २ खेड्यांची लोकसंख्या ५०० पेक्षा कमी होती.[४३]

सन २००३-२००४ मध्ये लातूर जिल्ह्यात २८९ डाक कार्यालये आणि १२५ पत्रपेट्या असून ४२ पोस्टमन कार्यरत होते. जिल्ह्यातील २५८ खेड्यांना डाकसेवा उपलब्ध होती. बचत बँकेची सेवा २८९ डाक कार्यालयात उपलब्ध होती. लातूर जिल्ह्यातील डाक कार्यालयांची संख्या खालील विवरणपत्रात दिली आहे.[४४]

वर्ष	डाक कार्यालयांची संख्या	पत्र-पेट्यांची संख्या	पोस्टमनची संख्या	डाकसेवा उपलब्ध असलेल्या खेड्यांची संख्या	बचत बँकेची सोय असलेल्या डाक कार्यालयांची संख्या	तार कार्यालये
१९८२-८३	२४६	८८	४४	२२१	२४६	४५
१९८५-८६	२६५	९०	४४	२३६	२६५	७६
१९९०-९१	२६४	९८	४४	२३६	२६४	८८
१९९५-९६	२८५	१०४	४४	२५५	२८५	१२३
२०००-०१	२८७	१३१	४४	२५७	२८७	उ.ना.
२००३-०४	२८९	१२८	४२	२५८	२८९	उ.ना.

४२. **उस्मानाबाद जिल्हा गॅझेटिअर,** १९७२, पृ.५५५-५७.

४३. **सेन्सस ऑफ इंडिया, सिरिज-१४, महाराष्ट्र, डिस्ट्रिक्ट पार्ट बारा ए ॲण्ड बी सेन्सस हॅण्ड बुक लातूर**, व्हिलेज ॲण्ड टाऊन डिरेक्टरी, व्हिलेज ॲण्ड टाऊन वाइज प्रायमरी सेन्सस ॲबस्ट्रॅक्ट, पृ.४०.

४४. सुपरिटेंडेंड ऑफ पोस्ट, उस्मानाबाद, डिव्हीजन, उस्मानाबाद यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित.

दूरध्वनी सेवा

जिल्ह्यात १९८२-८३ मध्ये १,७२६ दूरध्वनी ग्राहक होते. त्यानंतर दूरध्वनींच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली. सन १९९० मध्ये दूरध्वनी ग्राहकांची संख्या ३,८०८ आणि १९९५-९६ मध्ये १३,८१३ होती. जिल्ह्यात ३१ मार्च २००५ मध्ये लातूर, औसा, निलंगा, उदगीर आणि अहमदपूर येथे मुख्य दूरध्वनी विनिमय केंद्रे असून जिल्ह्यात १४६ लहान विनिमय केंद्रे होती. पुढील विवरणपत्रात जिल्ह्यातील दूरध्वनी विनिमय केंद्रें आणि दूरध्वनी संख्या दिली आहे.

तपशील	मार्च - १९९२	मार्च - १९९५	मार्च - २०००	मार्च- २००४
(१)	(२)	(३)	(४)	(५)
दूरध्वनी विनिमय केंद्रे (संख्या)	३३	५१	९१	१४६
दूरध्वनींची एकूण स्थापित क्षमता (संख्या)	५,९३८	१६,८७४	४१,३३२	१,०२,३९२
कार्यान्वित दूरध्वनींची संख्या	४,८१९	८,३९४	३२,५१८	७५,२२६
दूरध्वनी प्रतिक्षा यादी (संख्या)	३,१५६	४,२५७	४,१५१	१,९८६

हजार लोकसंख्येमागे दूरध्वनींची घनता ३४.१९ टक्के आहे. लातूर, औसा, निलंगा, उदगीर, अहमदपूर, रेणापूर, चाकूर, जळकोट, देवणी, शिरूर-अनंतपाळ, औराद (शहाजनी) आणि मुरूड या १२ ठिकाणी ग्राहक सेवा केंद्रे आहेत.

जिल्ह्यात ३१ मार्च २००५ मध्ये शहरी विभागात लॅण्ड लाईनचे ४८,००० आणि ग्रामीण भागात ५४,६५२ दूरध्वनी ग्राहक (एकूण १,०२,६५२) होते. शहरी भागातील भ्रमणध्वनी (मोबाईल) धारकांची संख्या १७,८०० होती. कार्यान्वित असलेल्या दूरध्वनीची एकूण संख्या ७६,६१६ असून त्यात लॅण्डलाईन ७२,७९९, डब्ल्यू एल एल ची संख्या २,१२३ आणि तरंगची संख्या १,६९४ होती. जिल्ह्यात एकूण मोबाईल कनेक्शन १९,४०९ असून त्यात पोस्टपेड ७,६९५ आणि प्रिपेड मोबाईल कनेक्शनची संख्या ११,७१४ होती.

स्थानिक सार्वजनिक दूरध्वनी केंद्रांची संख्या (pco) ३,५०२, एसटीडी, पिसीओची संख्या २,१९६, डिपार्टमेंटल सीसीबी पिसीओची संख्या-६३, अपंग व्यक्तींनी चालविलेल्या सार्वजनिक दूरध्वनी केंद्रांची संख्या-४२, एकूण सार्वजनिक दूरध्वनी केंद्रांची संख्या ५,८०३ होती.[४५]

लातूर जिल्ह्यातील मार्च २००४ मधील दूरध्वनी विनिमय केंद्रे आणि दूरध्वनींची संख्या तक्ता क्रमांक-८ मध्ये दिली आहे.

४५. जनरल मॅनेजर, टेलीकॉम, भारत संचार निगम लि., लातूर यांचेकडून फेब्रुवारी २००६ मध्ये प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित.

आकाशवाणी (ऑल इंडिया रेडिओ)

भारतात नभोवाणीची सुरुवात साधारणपणे १९२६ मध्ये आणि म्हैसूर संस्थानाने १९३५ मध्ये स्थापिलेल्या रेडिओ केंद्रास "आकाशवाणी" हे नाव दिले होते. तेच नाव भारत सरकारने पुढे सर्व रेडिओ केंद्रांसाठी स्वीकारले. देशी-विदेशी बातम्यांचे संकलन करून बातमीपत्रे प्रक्षेपित करणे, देशाच्या योजनाबद्ध सर्वांगीण विकासाबाबतचे विचार व माहिती जनतेला पुरविणे, तसेच सांस्कृतिक विकासाकडेही मनोरंजक कार्यक्रम आखून लक्ष पुरविणे ही आकाशवाणीची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारतात ज्या अनेक विकासाच्या आणि लोक कल्याणकारी योजना सरकारने हाती घेतल्या त्यात आकाशवाणी विकास ही महत्त्वाची योजना होती. या माध्यमाव्दारे सामाजिक, वैज्ञानिक जागृती आणि ग्रामीण भागाचा विकास ही उद्दिष्टे प्रभावीपणे साध्य करणे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार भारत सरकारने ग्रामीण भागांमध्ये आकाशवाणी केंद्रे स्थापन करण्याचे धोरण स्वीकारले. त्यानुसार मराठवाडा विभागासाठी औरंगाबाद येथे आकाशवाणी केंद्र सुरू करण्यात आले. तथापि हे प्रादेशिक केंद्र मध्यंतरी बंद करण्यात आले होते ते पुन्हा २० सप्टेंबर १९७६ पासून कार्यान्वित करण्यात आले.

लातूर जिल्ह्यात स्वतंत्र आकाशवाणी केंद्र नाही. उस्मानाबाद आकाशवाणी केंद्रावरून पुर्नप्रक्षेपित केलेले कार्यक्रम या जिल्ह्यात रेडिओवर ऐकता येतात. उस्मानाबाद केंद्रावरून औरंगाबाद बरोबरच पुणे, मुंबई आणि नागपूर या केंद्रांवरून प्रसारित होणारे काही विशिष्ट कार्यक्रम पुर्नःप्रक्षेपित केले जातात. तसेच पुणे आणि मुंबई केंद्रांवरील प्रादेशिक बातम्या पुर्नःप्रक्षपित केल्या जातात. दिल्ली आकाशवाणी केंद्रावरून मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांतून प्रसारित होणारी राष्ट्रीय बातमीपत्रे आणि महत्त्वाचे कार्यक्रम उस्मानाबाद केंद्रावरून पुर्नःप्रक्षेपित होतात. या केंद्रावरून स्थानिक कार्यक्रमही प्रक्षेपित केले जातात.

सामुहिक रेडिओ संच सुविधा

महाराष्ट्र शासनाने आकाशवाणीव्दारे शैक्षणिक व सामाजिक जागृती करण्यासाठी ग्रामीण ध्वनीक्षेपण योजना अंमलात आणली होती. या योनेव्दारे ग्रामीण जनतेला रेडिओव्दारे शिक्षण, विकास व मनोरंजनासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग झाला. प्रारंभी ही योजना शासनाच्या प्रसिद्धी संचालनालयाव्दारे राबविली जात होती. परंतु या योजनेचा विस्तार वाढल्यामुळे ग्रामीण ध्वनिक्षेपण संचालनालय हे स्वतंत्र विभाग सुरू झाले. या योजनेनुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायती, सार्वजनिक ग्रंथालये किंवा सार्वजनिक ठिकाणी रेडिओ संच कमी किंमतीत उपलब्ध करून दिला जात होता. संच पुरविण्याखेरिज त्याची दुरूस्ती करणे व तो सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक ती मदत शासनाकडून दिली जाई. विद्युत पुरवठा असलेल्या ठिकाणी विजेवर चालणारे तर विज नसेल तेथे बॅटरीवर चालणारे रेडिओ संच पुरविले जात असत. सामुहिक रेडिओ संच केवळ सार्वजनिक उपयोगासाठीच व्हावा अशी धारणा होती. ग्रामीण जनतेला आकर्षक वाटणारे जास्तीत जास्त कार्यक्रम उपलब्ध करून

देण्याची मूळ कल्पना होती. शासनाकडून जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना पुरविलेले रेडिओ संच पुढिलप्रमाण (१९७२ मध्ये)- अहमदपूर तालुका-६५, औसा तालुका-५९, लातूर तालुका-६५, निलंगा तालुका-७६ आणि उदगीर तालुक्यात-४७ गावांना पुरविण्यात आले होते.[४६] शासनाने ही योजना बंद केली आहे.

दूरदर्शन

लातूर दूरदर्शन लघुप्रक्षेपण केंद्राचे उद्घाटन दिनांक ७ सप्टेंबर १९८४ रोजी झाले होते. या केंद्राची प्रक्षेपण क्षमता १०० वॉटस होती आणि २० किलोमीटर त्रिजेच्या अंतरापर्यंत या केंद्राचे कार्यक्रम दिसत होते.

सातव्या पंचवार्षिक योजनेत आंबेजोगाई येथे १० किलोवॅट क्षमतेच्या उच्चशक्ती प्रक्षेपण केंद्राला मंजुरी मिळाली व त्यानुसार दिनांक १८ सप्टेंबर १९९१ रोजी आंबेजोगाई येथे उच्च शक्ती प्रक्षेपण केंद्र स्थापन झाले. या केंद्राची क्षमता ७५ किलोमीटर त्रिज्येच्या परिसरापर्यंत आहे. त्यामध्ये लातूर जिल्हा समाविष्ट होतो. त्यामुळे लातूर येथील लघुप्रक्षेपण केंद्र १७ सप्टेंबर १९९१ ला बंद करण्यात आले.[४७]

आंबेजोगाई प्रक्षेपण केंद्रामध्ये स्टुडीओ आणि रेकॉर्डिंगची व्यवस्था नाही. हे केंद्र मुख्यतः दिल्ली आणि मुंबई दूरदर्शन केंद्राचे कार्यक्रम सहक्षेपित करते. ग्रामपंचायती, नगरपरिषदा आणि इतर सार्वजनिक संस्थांमध्ये शासकीय अनुदानातून दूरदर्शन संच सार्वजनिक दृकश्राव्य प्रयोजनार्थ उपलब्ध करून देण्यात आले होते.

ग्रामीण ध्वनीक्षेपण, उपविभागीय कार्यालय, लातूर यांनी जिल्ह्यातील ग्रामपंचायती, नगरपालिका आणि कृषिचर्चा मंडळे यांना वाटप केलेल्या दूरदर्शन संचाची आकडेवारी खालील विवरणपत्रात दिली आहे.

तालुका	वाटप केलेल्या दूरदर्शन संचाची संख्या		
	१९८८	१९९२	१९९३
लातूर	१२२	१६१	१६९
अहमदपूर	१०	३७	४१
उदगीर	निरंक	६	१९
निलंगा	१२	२५	२८
औसा	३२	४९	५३

४६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ.५५८-६२.

४७. केंद्र अभियंता, उच्च शक्ती प्रक्षेपण केंद्र, आंबेजोगाई यांनी सन १९९९ मध्ये पाठविलेल्या माहितीवर आधारित.

तक्ता क्रमांक-१

लातूर जिल्ह्यातील रस्त्यांच्या लांबीची उद्दिष्टे व प्रत्यक्ष लांबी

अ. क्र.	रस्त्याचा दर्जा	उद्दिष्टे (लांबी कि.मी. मध्ये)[४८]			रस्त्यांची अस्तित्वात असलेली लांबी[४९] (कि.मी.)		
					१-४-१९८५ रोजी		३१-३-२००५ रोजी
		१९६१-८१	१९८१-२००१	१९८१-२००१ रस्ते विकास योजना मध्यवर्ती पुर्नविलोकन	१९६१-८१	१९८१-२००१	मध्यवर्ती पुर्नर्विलोकना नुसार
१	राष्ट्रीय महामार्ग	--	--	--	--	--	--
२	प्रमुख राज्य महामार्ग	१२३.००	१२३.००	१३६.७०	१२३.००	१२३.००	१३३.३०
३	राज्य महामार्ग	३६२.३९	६६५.००	७३८.९५	३६२.३९	६००.००	७०३.९५
४	प्रमुख जिल्हा मार्ग	९००.००	१,३४८.००	१,६०२.३४	६७३.१८	८३६.९३	१,४७६.६५
५	इतर जिल्हा मार्ग	८१६.३२	२,०५०.००	१,३८१.१४	७०७.९६	६९६.७९	१,२३०.०४
६	ग्रामीण मार्ग	८०२.६५	१,३९०.००	२,२८१.२०	७६१.११	३७०.९२	१,१११.११
	एकूण	३,००४.३६	५,५७६.००	६,१४१.३३	२,६२७.६४	२,६२७.६४	४,६५५.०५

टिप :- ३१ मार्च २००५ रोजी जिल्ह्यातील रस्त्यांची निव्वळ लांबी ६,०४५.०३ कि.मी. होती. सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत १,२८७.१० कि.मी. आणि जिल्हा परिषदेअंतर्गत ३,४१६.४७ कि.मी. लांबीचे रस्ते होते. एकूण रस्त्यांपैकी ४,००४.७३ कि.मी. डांबरी आणि १,०४३.४० कि.मी. खडीचे व ८५.१४ कि.मी. मातीचे रस्ते होते.

४८. रोड डेव्हलपमेंट प्लॅन १९८१-२००१ इंडेक्स स्टेटमेंट बुक : डिस्ट्रिक्ट लातूर, पृ.१३.

४९. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांनी २००५ मध्ये पाठविलेल्या माहितीवर आधारित.

तक्ता क्रमांक-२

लातूर जिल्ह्यातील तालुकानिहाय प्रमुख जिल्हा मार्ग (३१ मार्च २००४ रोजी)

अ. क्र. (१)	प्रमुख जिल्हा मार्ग (२)	रस्त्यांची लांबी (कि.मी.) खडीचा रस्ता (३)	डांबरी रस्ता (४)	एकूण लांबी (५)
	लातूर तालुका			
१	राज्य महामार्ग क्र.१६२-नायगाव-माटेफळ-प्रमुख जिल्हा मार्ग-६-शिराळा-चिंचोळी बु.-गातेगाव-चिकुर्डा-आखखाई-भुईसमुंद्रा-जेवळी-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.५ वर (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.७)	१.००	१२.००	१३.००
२	प्रमुख जिल्हा मार्ग क्र.७-खंडाळा, हिसोरी-गोंदेगाव-राज्य महामार्ग क्र.७७-ढाकणी ते भेटा-राज्य मार्गावर (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.८)	. .	२३.००	२३.००
३	राज्य महामार्ग क्र.१६०-तांदुळवाडी-सामनगाव-चिकुर्डा-प्रमुख जिल्हा मार्ग-क्र.७-गातेगाव-मुरूड-(अ) राज्य महामार्ग क्र.७७, भोयरा-सावरगाव-ते प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१०-चिंचोलीराव-आलमला-उमरगा (बु.) ते प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ (प्रमुख जिल्हा मार्ग-क्र.९)	३.००	७.००	१०.००
४	जिल्हा सरहद्द ते अंधोरी-किनगाव-कारेपूर-तळणी-कासारखेडा-कोळपा-प्रमुख राज्य महामार्ग क्र.३-भातरखेडा-सोनवती-ते राज्य महामार्ग क्र.१६६ (प्रमुख जिल्हा मार्ग-क्र.१९)	३.५०	९.८०	१३.३०
५	प्रमुख जिल्हा मार्ग-क्र.२३-धानोरा-सताळा-व्हटी-महालंगी-जानवळ-शिवणखेड-राज्य महामार्ग क्र.१६८-भडी-प्रमुख राज्य महामार्ग क्र.३-ममदापूर-बोरी सलगरा-बोकनगाव-बिंदगीहाल-वांजरखेडा-हालकी, बेवनाळ-राज्य मार्ग क्र.१६७-भिंगोली-प्रमुख जिल्हा मार्ग-क्र.२५ ते शिरूर-अनंतपाळ (प्रमुख जिल्हा मार्ग-क्र.२०)	. .	१२.५०	१२.५०

(१)	(२)	(३)	(४)	(५)
६	लातूर-सारोळा-सोनवती-धनेगाव-बोरी-मुशिराबाद-सलगरा-हालकी-उजेड-बिंबराळ-बाकळी-राणी अंकुलगा-शिरोळ-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२७ ते राज्य महा मार्ग क्र.१६६ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२१)	. .	३.५०	३.५०
७	राज्य महामार्ग क्र.७७ मुरूड ते जिल्हा सरहद्द (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.५३)	. .	३.५०	३.५०
८	मुरूड ते पाडोळी जिल्हा सरहद्द (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.५४)	. .	५.००	५.००
९	जिल्हा सरहद्द डिघोळ (दे.) पोहरेगाव-अंदलगाव-सिंधगाव-सांगवी-दर्जी बोरगाव-आरजखेडा-साई-आर्वी ते राज्य महामार्ग क्र.१४४ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४)	. .	६.००	६.००
	एकूण	९.५०	८९.००	९८.५०
	रेणापूर तालुका			
१	जिल्हा सरहद्द ते फावडेवाडी-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१)	. .	५.२०	५.२०
२	राज्य महामार्ग क्र.१४४ ते बर्दापूर-हातोळा-तळेगाव-पानगाव ते राज्य महामार्ग क्र.१६९ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२)	५.००	२.८३	७.८३
३	जिल्हा सरहद्द-राज्य महामार्ग क्र.१६२ ते मोटेगाव-भोक्रंबा-डिघोळ-लाना-ईटी-खानापूर-राज्य महामार्ग क्र.१४४-वंजारवाडी-बिटरगाव-कामखेडा-भंडारवाडी-पाथरवाडी-माणूसमारवाडी-लंगरवाडी-कारेपूर-रायवाडी-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२०-झरी (खु) प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२३-हणमंत जवळगा-हिप्पळनेर-वायगाव-चापोली ते प्रमुख राज्य महामार्ग क्र.३(प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३)	४.००	२८.५०	३२.५०
४	जिल्हा सरहद्द-डिघोळ (दे) पोहरेगाव-अंदळगाव-सिंधगाव-सांगवी-दर्जीबोरगाव-आरजखेडा-साई-आर्वी ते राज्य महामार्ग क्र.१४४ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४)	२.००	२५.००	२७.००

Maharashtra State Gazetteers

(१)	(२)	(३)	(४)	(५)
५	जिल्हा सरहद्द-अंधोरी-किनगाव-कारेपूर-तळणी-कासारखेडा-कोळपा-प्रमुख राज्य महामार्ग क्र.३-भातखेडा-सोनवती ते राज्य महामार्ग क्र.१६६ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१९)	. .	८.००	८.००
६	जिल्हा सरहद्द-अंधोरी-किनगाव-कारेपूर-तळणी-कासारखेडा-कोळपा-प्रमुख राज्य महामार्ग क्र.३-भातरखेडा-सोनवती ते राज्य महामार्ग क्र.१६६ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१९)	. .	१८.००	१८.००
७	प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१९-तळणी-धवेली-जानवळ-वडवळ (ना)-प्रमुख जिल्हामार्ग क्र.२३-हाळी (खुर्द)-सरणवाडी-प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ (प्रमुख राज्य मार्ग क्र.२२)	. .	३.००	३.००
	औसा तालुका			
१	प्रमुख जिल्हा मार्ग क्र.७-खंडाळा-हिसोरी-गोंदेगाव-राज्य महामार्ग क्र.७७-ढाकणी ते भेटा-राज्य महामार्गावर (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.८)	. .	५.००	५.००
२	राज्य महामार्ग क्र.१६०-तांदूळवाडी-सामनगाव-चिकुर्डा-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.७-गातेगाव-मुरूड (अ)-राज्य महामार्ग क्र.७७-भोयरा-सावरगाव ते प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१०-चिंचोलीराव-आलमला-उमरगा (बु) ते प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.९)	. .	७.००	७.००
३	प्रमुख राज्य महामार्ग क्र.३ ते हसाळा-जमालपूर-हिप्परसोगा-हसेगाव-भुसणी ते राज्य महामार्ग क्रमांक-१६६ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१३)	३.५०	११.८०	१५.३०
४	राज्य महामार्ग क्र.१६४-कारला-कुमठा ते प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३० (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२९)	. .	१३.००	१३.००
	एकूण	३.५०	३६.८०	४०.३०
	निलंगा तालुका			
१	प्रमुख राज्य महामार्ग क्र.३-बुधडा-सेलू-खुटेगाव-हसेगाव वाडी-पानचिंचोली-ते-राज्य महामार्ग क्र.१६६ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१४)	. .	४.००	४.००

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२	प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२३-धानोरा-सताळा-व्हटी-महालंगी-जानवळ-शिवणखेड-राज्य महामार्ग क्र.१६८-भडी-प्रमुख राज्य महामार्ग क्र.३-ममदापूर-बोरी-सलगरा-बोकनगाव-बिंदगीहाळ-वांजरखेडा-हालकी-बेवनाळ-राज्य महामार्ग क्र.१६७-भिंगोली-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२५ ते-शिरूर अनंतपाळ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२०)	१२.१०	१०.४०	२२.५०
३	प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२४-सुगाव-हिप्पळगाव-थेरगाव-राज्य महामार्ग क्र.१६७-आरी-शिरूर अनंतपाळ-पांढरवाडी-दैठणा-शंभू उमरगा-देवर्जन ते शेकापूर-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४९ वर (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२५)	. .	२२.१५	२२.१५
४	राज्य महामार्ग क्र.१६७-लक्कड जवळगा-शिरूर अनंतपाळ-तळेगाव (दे) तिप्राळ-चवण हिप्परगा-तळेगाव-नेकनाळ-देवणी ते राज्य महामार्ग क्र.१६६-देवणी (बु.)-देवणी (खु.) गुरूनाळ-लासोना ते जिल्हा सरहद्द (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२६)	९.८०	२.७०	१२.५०
५	राज्य महामार्ग क्र.१६७-निटूर-शिरोळ-हेळंब ते राज्य महामार्ग क्र.१६६ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२७)	. .	१४.६६	१४.६६
६	राज्य महामार्ग क्र.१६६-तुपडी-शिवणी (को)-वडगाव-हाडगा-राज्य महामार्ग क्र.१६५-निलंगा-धानोरा-मदनसुरी-रामतीर्थ-कोकळगाव-नदीहत्तरगा-ते राज्य महामार्ग क्र.१६४ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२८)	. .	२४.६०	२४.६०
७	राज्य महामार्ग क्र.१६४-ते कारला-कुमठा ते प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३० (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२९)	. .	४.००	४.००
८	राज्य महामार्ग क्र.१६४-किल्लारी साखर कारखाना-सांगवी-जेवरी नणंद-निलंगा-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२८ वर (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३०)	. .	२५.२०	२५.२०
९	राज्य महामार्ग क्रमांक १६७-पेठ आणसरवाडा-बेंडगा-जांबगा-सोनखेड-सावरी-राज्य महामार्ग क्र.१६५ ते तगरखेड (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३२)	. .	२६.५०	२६.५०
१०	राज्य महामार्ग क्र.१६७-दादगी-भंगार-चिंचोली-स-चिंचोली-उस्तुरी-बडूर-ओंढा ते राज्य महामार्ग क्रमांक १६३ (प्रमुख जिल्हा मार्ग-क्र.३३)	. .	२१.७०	२१.७०

(१)	(२)	(३)	(४)	(५)
११	राज्य महामार्ग क्र.१६७-बडूर-कासार-बालकुदा-ते राज्य महामार्ग क्र.१६३ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३४)	. .	१३.५०	१३.५०
१२	प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३५-हलगरा-हालसी-तगरखेडा-औराद-राज्य महामार्ग क्र.१६५ वर (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३६)	. .	१२.००	१२.००
१३	प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४३-चाकूर-उजळंब-कबन सांगवी-राज्य महामार्ग क्र.१६८-येरोळ-साकोळ-जवळगा ते राज्य महामार्ग क्र.१६६ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४५)	. .	१८.२०	१८.२०
	उदगीर तालुका			
१	प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२४, सुगाव-हिप्पळगाव-थेरगाव-राज्य महामार्ग क्र.१६७-आरी-शिरूर-अनंतपाळ-पांढरवाडी-दैठणा-शंभू उमरगा-देवर्जन ते शेकापूर-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४९ वर (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२५)	. .	२३.००	२३.००
२	राज्य महामार्ग क्र.१६७-लक्कड जवळगा-शिरूर-अनंतपाळ-तळेगाव (दे)-तिप्राळ-चवण हिप्परगा-तळेगाव-नेकनाळ-देवणी ते राज्य महा मार्ग क्र.१६६-देवणी (बु.)-देवणी (खु.)-गुरुनाळ-लासोना ते जिल्हा सरहद्द (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२६)	५.००	३४.००	३९.००
३	राज्य महामार्ग क्र.१६७-निटूर-शिरोळ-हेळंब ते राज्य महामार्ग क्र.१६६ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२७)	. .	५.००	५.००
४	राज्य महामार्ग क्र.२२५-जगलपूर-कुमठा-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४१-शिवणखेड-वाढोणा (खु.) ते राज्य महामार्ग क्र.२१७ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४०)	. .	४.२०	४.२०
५	चाकूर-बोथी-शेळगाव-किणीयल्लादेवी-वाढोणा (बु.) कोळनूर-रावणकोळा ते जिल्हा सरहद (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४३)	१.००	३३.९२	३४.९२
६	प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४३-माळी हिप्परगा-डोंगरगाव-सुल्लाळी-प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४८-देवूळवाडी-कोदळी-मांजरी-अव्वल कोंडा-उदगीर-राज्य महामार्ग क्र.२२२ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४४)	६.२०	२२.८०	२९.६०

(१)	(२)	(३)	(४)	(५)
७	प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४३-चाकूर-उजळंब-कबन सांगवी-राज्य महामार्ग क्र.१६८-येरोळ-साकोळ-जवळगा ते राज्य महामार्ग क्र.१६६ (प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४५)	. .	७.००	७.००
शिरूर-अनंतपाळ	०१	४६७	-	-
उदगीर	०७	२,८३५	०३	१,४८३
एकूण ...	६५	३४,८४९	४५	२१,०५७

कोल्हापूर पध्दतीचे बंधारे : सन १९६७ पासून सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत नाला अथवा नदीतील पाणी अडवून उपसा सिंचनाने शेतीस दिले जाते. मार्च १९९२ पर्यंत जिल्ह्यात एकूण २० कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पूर्ण झाले होते व त्याद्वारे २, ८१७ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती. त्याच वर्षी जिल्ह्यात ४० बंधाऱ्यांचे काम प्रगतिपथावर होते. त्यापैकी १९९७-९८ पर्यंत २० बंधाऱ्याचे काम पूर्ण झाले होते. वरील सर्व बंधाऱ्यांपासून ४,३३५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती.

सन २००० मध्ये जिल्ह्यात उपसा जलसिंचनाच्या नऊ योजना पूर्ण झाल्या असून त्याद्वारे १,८७६ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झाले होते. प्रवाही सिंचनाखाली ६४४.१२ हेक्टर क्षेत्र असून याची लागवडीयोग्य क्षेत्राशी टक्केवारी १३.६१ टक्के होती. विहीरींद्वारे निर्माण झालेले सिंचन क्षेत्र विचारात घेतल्यास ही टक्केवारी १८.३२ इतकी येते. सन १९९० मध्ये झालेल्या सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात एकूण विहिरींची संख्या २३,२९१ होती. प्रती विहिरीस एक हेक्टर सिंचन क्षमता गृहीत घरल्यास २३,२९१ हेक्टर सिंचन क्षमता

निर्माण होते. परंतु यातील काही विहिरी प्रकल्पाच्या धारणक्षेत्रात येतात यास्तव अंदाजे १,४४५ विहिरी कमी करून उर्वरित २१,७५६ विहिरींद्वारे सिंचन निर्माण झाले असे गृहित धरून जिल्ह्यात वरील सिंचन योजनांमधून एकूण ८६,१६८ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती, तर १९९८-९९ मध्ये विहीरींद्वारे भिजणारे क्षेत्र ३४,९८० हेक्टर होते. पाटबंधाऱ्यांद्वारे भिजणाऱ्या क्षेत्रात वाढ झाल्याने विहीरींद्वारे भिजणारे क्षेत्र कमी झाले. जून २००० पर्यंत पंचवार्षिक योजनानिहाय पाटबंधारे प्रकल्पांची माहिती तक्ता क्र.२ मध्ये दिली आहे. प्रवाही सिंचनाशिवाय पाझर तलावांद्वारे अप्रत्यक्ष सिंचन क्षमता निर्माण होते. पाझर तलावाच्या लाभ क्षेत्रात येणाऱ्या विहिरींद्वारे सिंचन केले जाते. एका पाझर तलावाअंतर्गत साधारणपणे अप्रत्यक्षरित्या ३५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होते. जिल्ह्यात मार्च १९९५ पर्यंत ४७७ पाझर तलाव पूर्ण झाले असून त्यासाठी ३,२८४ लाख रुपये खर्च झाले. यापासून अप्रत्यक्षरित्या १३,८६० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. याचवर्षी २१० पाझर तलावांचे काम सुरू होऊन मार्च १९९७ पर्यंत १२९ तलावांचे काम पूर्ण झाले होते. गावतळ्यातील पाण्याचा उपयोग सिंचनासाठी केला जातो, अशी गावतळी १९९५ पर्यंत ३३ होती. त्यांच्या बांधकामावर ३६ लाख रुपये खर्च झाले.[४]

जिल्ह्यात २००४ मध्ये शेतीलायक क्षेत्र ६,७१,००० हेक्टर होते. त्यापैकी मोठ्या प्रकल्पाखाली २७,७४८ हेक्टर, मध्यम प्रकल्पाखाली २८,९३९ हेक्टर, लघु पाटबंधारे प्रकल्पाखाली १,३५,१०६ हेक्टर, उपसा सिंचन योजनेखाली १०,९५० हेक्टर व कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याखाली १२,४३६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली होते. सिंचनाखाली जिल्ह्यातील शेतीलायक क्षेत्रापैकी सिंचनाखाली एकूण क्षेत्र २,१८,१७५ हेक्टर होते. म्हणजे ३२.५१ टक्के क्षेत्र सिंचनाखाली होते. यातील बारमाही पिकाखाली ५६,३२२ हेक्टर होते.

सेवायोजन : रोजगार इच्छुकांना रोजगार मिळवून देण्यासाठी व व्यावसायिक मार्गदर्शनासाठी १९८२ मध्ये सेवायोजन कार्यालयाची स्थापना झाली. या कार्यालयाकडे नोंदणी झालेल्या उमेदवारांची माहिती तक्ता क्रमांक ३ मध्ये व तक्ता क्रमांक ४ मध्ये शैक्षणिक पात्रतेप्रमाणे नोंदणी झालेल्या उमेदवांची माहिती दिली आहे. सन १९८२ ते २००३ या कालावधीत रोजगार मिळालेल्या उमेदवारांची वर्गनिहाय आकडेवारी तक्ता क्रमांक ५ मध्ये दिली आहे. तसेच या कार्यालयामार्फत ज्या योजना राबविल्या जातात त्यांची माहिती खाली दिली आहे.

व्यवसाय मार्गदर्शन : तरूणांची आवड व कला आणि शैक्षणिक अर्हतेप्रमाणे ते ज्या व्यवसायासाठी जास्ती जास्त पात्र असतील त्या व्यवसायाचे मार्गदर्शन करणे हा या योजनेचा उद्देश आहे. व्यवसायाचे मार्गदर्शन केलेल्या व प्रशिक्षणासाठी पाठविलेल्या उमेदवारांची माहिती तक्ता क्रमांक ६ मध्ये दिली आहे.

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना : विविध व्यवसायाच्या प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे उमेदवारांचे कसब व पात्रता वाढवून त्याना रोजगार उपलब्ध करून देणे अथवा प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्याना स्वतंत्रपणे स्वयंरोजगार करणे शक्य व्हावे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेच्या प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांचा असून या कालावधीसाठी उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार शासनामार्फत १०० रूपयांपासून ४०० रूपयांपर्यंत विद्यावेतन देण्यात येते. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थींची माहिती तक्ता क्रमांक ७ मध्ये दिली आहे.

---

४. महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल, खंड १, तात्त्विक विवेचन, १९९९, पृ. ८७९.

वरील योजनांशिवाय या कार्यालयातर्फे शिकाऊ उमेदवारी योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत झालेले काम खालील विवरणात दिले आहे :—

वर्ष	अधिसुचित झालेली रिक्त पदे	पाठवणी केलेल्या उमेदवारांची संख्या
१९९४	२७	१९८
१९९५	२९	२०७
१९९६	३१	३०७
१९९७	३५	३१५
१९९८	३६	३१९
१९९९	२७	२२८
२०००	३६	३१८
२००१	३६	९१८
२००२	९९	६७७
२००३	१३५	९९५
२००४	६२१	६,२४१
२००५	२५८	२,९५८

विविध कल्याणकारी योजना

चौथ्या पंचवार्षिक योजनाकाळात क्षेत्र विकासाच्या कल्पनेस मूर्त स्वरूप प्राप्त झाले. नियोजनाच्या प्रारंभी सामुहिक विकास प्रकल्पसुध्दा क्षेत्र विकासाचाच भाग होता. विकास योजनांच्या फलश्रुतीस्तव अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम, जलसिंचन क्षमतेच्या पुरेपूर उपयोगासाठी लाभक्षेत्र विकास कार्यक्रम, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, अनुसूचित जन जातींच्या उन्नतीसाठी आदिवासी क्षेत्र उपाययोजना व रोजगार हमी योजना या क्षेत्र विकासाच्या योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. त्याचा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेवर अनुकूल प्रभाव पडत असल्याचे दिसून येते. या योजनांची थोडक्यात माहिती खाली दिली आहे.

ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम : ग्रामीण विभागातील दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम सहाव्या पंचवार्षिक योजनेत सुरू झाला. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम, ग्रामीण भुमीहीन रोजगार हमी कार्यक्रम या कार्यक्रमांना राष्ट्रीय पातळीवर महत्व देण्यात आले असून याद्वारे ग्रामीण विभागातील कुटुंबांचे उत्पन्न वाढविण्यात येते.

ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे उत्पन्न वाढवून त्याना दारिद्र्य रेषेवर आणण्यासाठी उत्पन्न वाढविणारे उद्योग सुरू करणे हा एकात्मिक ग्रामीण विकासाचा मूळ उद्देश आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाअंतर्गत पुरेसे उद्योग निर्माण होत नाहीत म्हणून पूरक उत्पन्नासाठी रोजगार निर्मिती कार्यक्रम सुरू करण्यात आले. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम आणि जवाहर योजना हे कार्यक्रम स्वतंत्र न राबविता एकात्मिक घटक म्हणून राबविण्यात येतात. याशिवाय क्षेत्र विकास कार्यक्रम हा पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू झाला.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन कार्यपध्दतीमध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार योजना, अवर्षण प्रवण क्षेत्र आणि रोजगार हमी कार्यक्रम या जिल्हास्तरीय योजना आहेत. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार या योजना केंद्र सहाय्यातील असून अनुक्रमे ५० टक्के व २० टक्के राज्य शासनाच्या हिस्स्याची तरतूद जिल्हा नियोजन व विकास मंडळास करावी लागते. याशिवाय रोजगार हमी योजनेकरिता अपेक्षित खर्चाच्या २५ टक्के तरतूद जिल्हा नियोजन व विकास मंडळास करावी लागते. राष्ट्रीय ग्रामीण विकास कार्यक्रम व ग्रामीण भुमीहीन रोजगार हमी कार्यक्रम या योजनेचा एक भाग म्हणून जीवनधारा योजना १९८८-८९ मध्ये सातव्या पंचवार्षिक योजनेत सुरू करण्यात आली. सन १९८८-८९ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व ग्रामीण भुमीहीन रोजगार हमी कार्यक्रम या दोन्ही योजनांचे विलिनीकरण करून जवाहर योजना ही नवीन योजना सुरू करण्यात आली. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व ग्रामीण भुमीहीन रोजगार कार्यक्रमाअंतर्गत जीवनधारा विहीर व निवास विरहीत अनुसूचित जाती व जमातींच्या कुटुंबांना घर बांधणी या योजना नव्याने सुरू करण्यात आल्या असून जवाहर रोजगार योजनेअंतर्गत चालू ठेवण्यात आल्या आहेत.

सहाव्या आणि सातव्या पंचवार्षिक योजनेत सदर कार्यक्रमास केंद्र शासन व राज्य शासन स्तरावर या जिल्हा योजनेस प्राधान्य देण्यात आले. सहाव्या पंचवार्षिक योजनेत या योजनेवर १६९.१० लाख रुपये खर्च झाला असून दारिद्र रेषेखालील १५,२६७ कुटुंबांना मदत देण्यात आली. सातव्या पंचवार्षिक योजनेत २६२.५३ लाख रुपये खर्च झाला असून १३,९६९ कुटुंबांना आर्थिक मदत देण्यात आली.

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम : ही योजना जिल्हा परिषद, राष्ट्रीयकृत बँका, नागरी सहकारी बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नोंदणीकृत पतपुरवठा संस्था, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, उद्योग व सेवा विभाग यांच्या सहकार्याने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येते. त्यासाठी या यंत्रणेची १९८१ मध्ये स्थापना करण्यात आली. तालुका पातळीवर गटविकास अधिकारी ही योजना राबवितात. या योजनेअंतर्गत नवीन विहीर खोदणे, जुन्या विहिरींची दुरूस्ती, इलेक्ट्रिक मोटार, ऑईल इंजिन, पाईप लाईन या कृषी तसेच बैलजोडी व बैलगाडी, दुभती जनावरे, शेळ्या-मेंढ्या पुरविणे, कुक्कुट पालन, मत्सोद्योग व छोट्या व्यापार सेवांसाठी वरील बँकामार्फत कर्ज देण्यात येते. त्यावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत अनुदान देण्यात येते. हे अनुदान अल्पभूधारक शेतकरी २५ टक्के, ग्रामीण कारागीर, बिगर शेतमजूर ३३.३३ टक्के तर अनुसूचित जाती जमातींच्या लाभार्थींना ५० टक्के या प्रमाणात दिले जाते.

जिल्ह्यातील एकूण कुटुंबांपैकी ३७.६६ टक्के कुटुंबे दारिद्र रेषेखाली जीवन जगतात. एकूण ७६,९०१ दारिद्र रेषेखालील कुटुंबांपैकी २६,८७९ कुटुंबे अनुसूचित जातीची आहेत. मार्च १९९२ पर्यंत ३६,३८४ कुटुंबांना आर्थिक मदत देण्यात आली. मार्च १९९२ पर्यंत १४,०९८ अनुसूचित जातीच्या कुटुंबांना मदत दिली असून त्यांची टक्केवारी ५२.४४ इतकी येते. या योजनेअंतर्गत झालेले काम तक्ता क्रमांक ८ मध्ये दिले आहे.

रोजगार हमी योजना : अल्पभूधारक, भुमीहीन शेतमजूर व बेरोजगारांना उत्पादक स्वरूपाचा रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९७२ मध्ये ही योजना सुरू केली. ही योजना सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होय. मे१९७२ मध्ये ही योजना लातूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात कार्यान्वित झाली. योजनेची उपयुक्तता लक्षात घेऊन २० डिसेंबर १९७४ रोजी शासनाने राज्य विधी मंडळात ठराव करून ग्रामीण भागातील प्रत्येक प्रौढास भारतीय संविधानातील राज्य धोरणाच्या निर्देशक तत्त्वानुसार काम मिळविण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त करून दिला. योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी उभारणे व साधनसंपत्ती वाढविण्यासाठी शासनाने १९७५ च्या महाराष्ट्र राज्य व्यावसायिक, व्यापारी व रोजगार अधिनियमानुसार

व्यापारी व पगारदारांवर १ एप्रिल १९७५ पासून कर बसविला. सन १९७७ मध्ये महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम मंजूर करून या योजनेला सांविधानिक स्वरूप देण्यात आले. अधिनियमाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९७९ पासून सुरू झाली. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४१ नुसार रोजगाराचा कायदेशीर हक्क प्राप्त करून देणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य होय.

जिल्हाधिकारी या योजनेचा सर्वाधिकारी असतो. योजनेखालील कामांसाठी उपाययोजना तयार करून मुख्य जिल्हा योजनेशी सांगड घालावयाची असते. ही प्रामुख्याने जिल्हा पातळीवरील योजना असल्यामुळे त्यासाठी जिल्हा योजनेमध्ये तरतूद केली जाते. योजनेखाली सुरू करावयाची बहुतांशी कामे उत्पादक स्वरूपाची असून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणे, ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून देणे हा योजनेचा मुख्य उद्देश असल्यामुळे कामाच्या एकूण खर्चाच्या ६० टक्के रक्कम मजुरीस्तवच खर्च केली जाते. राहण्याच्या ठिकाणापासून शक्यतो जवळ काम देण्याचा प्रयत्न केला जातो. मजुरांना मजुरी देताना किमान वेतन तत्त्वाचा अवलंब तसेच शेती काम उत्पादनावर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यावर सोपविली आहे. काम करू इच्छिणाऱ्या प्रत्येक प्रौढाने गावातील तलाठ्याकडे आपल्या नावाची नोंदणी करावयाची असते. कामाची मागणी केल्यापासून पंधरा दिवसाच्या आत काम पुरविले जाते. रोजगार देणे शक्य नसल्यास योजनेच्या फंडातून प्रतिदिनी दहा रूपयाप्रमाणे बेरोजगार भत्ता देण्यात येतो. तसेच पन्नास व्यक्तिंनी कामाची मागणी केल्यास नवीन काम सुरू करण्यात येते. योजनेखाली लघु पाटबंधारे, पाझर तलाव, सामुहिक विहिरी, मृदसंधारण, भूविकास, वन विकास व रस्ते विकासाची कामे केली जातात. रोजगार हमी योजनेखाली पुरविलेले काम व दुष्काळ निवारण योजनेखाली पुरविलेले काम यामध्ये फरक असतो. कारण रोजगार हमी योजनेखालील काम उत्पादक स्वरूपाचे व सामाजिक मालमत्ता निर्माण करणारे असते.

जिल्ह्यात मार्च १९९२ पर्यन्त २,०७,२३३ व्यक्तिंची रोजगार हमी योजनेखाली मजूर म्हणून नोंद झाली होती. प्रत्येक वर्षी साधारणपणे ६ ते ८ कोटी रुपये योजनेवर खर्च होतात. सन १९८६-८७ मध्ये राज्यात सर्वात जास्त १,०१,१५९ मजूर उपस्थिती लातूर जिल्ह्यात होती. यावर झालेला एकूण खर्च १३,६८.५३ लाख रुपये होता. जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेची माहिती तक्ता क्रमांक ९ मध्ये दिली आहे.

जीवनधारा योजना : ही योजना १९८९-९० मध्ये रोजगार हमी योजनेखाली सुरू करण्यात आली या योजनेद्वारे नवीन जवाहर विहीरी खोदण्यासाठी अनुदान दिले जाते. दारिद्र रेषेखाली अनुसूचित जाती जमातींशिवाय इतर कुटुंबांच्या जमिनीत विहीर खणून देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. सन १९९१-९२ मध्ये या योजनेअंतर्गत ५०० विहीरी खोदण्यात आल्या.

जवाहर रोजगार योजना : राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रम आणि ग्रामीण भुमीहीन रोजगार हमी कार्यक्रम एकत्र करून ही योजना १ एप्रिल १९८९ पासून सुरू झाली. ग्रामीण बेरोजगार आणि अंशकालीन बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देऊन ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावण्याचा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमाअंतर्गत केंद्र व राज्य शासन ८०:२० या प्रमाणात निधी उपलब्ध करून देतात. ही योजना ग्रामपंचायत पातळीवर राबविण्यात येते. एकूण तरतुदीच्या ८० टक्के रक्कम ग्रामपंचयतीस स्थानिक स्तरावर महत्त्वाच्या रोजगार निर्मितीच्या कामाकरिता खर्च करण्यासाठी दिली जाते. या योजनेअंतर्गत इंदिरा आवास व जीवनधारा विहिरी हे कार्यक्रम राबविण्यात येतात. जवाहर योजनेवर सातव्या पंचवार्षिक योजनेच्या (१९८५-८६ ते १९८९-९०) कालावधीत ३,९७.९९ लाख रुपये खर्च झाला व २८.४२ लाख मनुष्यदिन काम झाले. सन १९९८-९९ या वार्षिक योजनेत जवाहर रोजगार व इंदिरा आवास योजनेवर अनुक्रमे ४,२५.४७ लाख व ४,५७.८२ लाख रुपये खर्च झाले. सन १९९९-२००० पासून जीवनधारा योजना व जवाहर रोजगार योजना स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारे केंद्र सरकारने हा कार्यक्रम सुरू केला. याद्वारे ग्रामीण भागात रोजगार निर्माण करून जीवन विकसीत करण्यास्तव कायम स्वरूपाची सार्वजनिक मालमत्ता निर्माण करण्याकडे विशेष लक्ष दिले जाते. महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेमुळे ग्रामीण भागात रोजगार निर्माण होत असल्याने हा कार्यक्रम रोजगार हमी योजनेस पुरक म्हणून राबविण्यात येत होता. तथापि याद्वारे स्थायी स्वरूपाची सार्वजनिक मालमत्ता निर्माण करावयाची असल्याने हा कार्यक्रम सप्टेंबर १९८२ पासून स्वतंत्ररित्या राबविण्यासाठी विकास यंत्रणेकडे सोपविण्यात आला. या कार्यक्रमातील निधीचे जिल्हावार वाटप केंद्र सरकारने विहित केलेल्या तत्त्वांनुसार करण्यात येते. मजुरांना नेहमीचा शिधा पुरविण्याशिवाय एक किलो जादा धान्य दिले जाते. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीस शासनाचा प्रतिनिधी समजण्यात येते. कामाचे आराखडे गट पातळीवरील अधिकाऱ्यांकडून तयार करून पंचायत समित्यांची त्यास मंजुरी घ्यावी लागते. सामाजिक वनीकरण योजना व अनुसूचित जाती-जमातींच्या प्रत्यक्ष लाभांच्या योजनांची अंमलबजावणी, जिल्हा पातळीवरील फलोत्पादन व सामाजिक वनीकरण विभाग आणि समाज कल्याण अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येते. याबाबतची माहिती रोजगार हमी योजनेत दिली आहे.

जिल्ह्यात दुर्बल व असहाय्य व्यक्तिंच्या कल्याणासाठी " संजय गांधी निराधार अनुदान योजना ", समाजातील दुर्बल घटकातील व्यक्तिंना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध व्हावे व स्वतंत्र व्यवसाय सुरू करता यावा यासाठी कर्ज देणारी " संजय गांधी स्वावलंबन योजना ", ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील कामगारांना अर्थाजनाचे पुरेसे साधन उपलब्ध करून देण्यासाठी " ग्रामीण युवकांना स्वयंरोजगार प्रशिक्षण योजना " आणि ग्रामीण भुमिहीन रोजगार हमी कार्यक्रम, ग्रामीण बेरोजगार व अर्धबेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देऊन त्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी " जवाहर रोजगार योजना," सुशिक्षित बेकारांसाठी " रोजगार उत्तेजन कार्यक्रम (प्रशिक्षण) योजना " आणि सुशिक्षित बेकारांना अंशकालीन आर्थिक सहाय्य योजना कार्यरत आहे. याबाबतची माहिती खाली दिली आहे.

संजय गांधी स्वावलंबन योजना : दुर्बल घटकातील व्यक्तिंना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होऊन स्वतंत्र्य व्यवसाय करता यावा यासाठी महाराष्ट्र शासनाने २ ऑक्टोबर १९८० पासून ही योजना सुरू केली. पात्र उमेदवारास तारणाशिवाय २५,००० रूपयापर्यन्त बिनव्याजी कर्ज देण्याची तरतूद आहे. यामध्ये नियमित नोकरी करणारी एकही व्यक्ती नसलेल्या कुटुंबांना अग्रक्रम देण्यात येतो. जिल्ह्यातील लाभार्थींची आकडेवारी खालील विवरणात दिली आहे.

संजय गांधी स्वावलंबन योजनेसेंबंधी माहिती

वर्ष	लाभार्थी	अनुदान वाटप (रु.)	वर्ष	लाभार्थी	अनुदान वाटप (रु.)
१९८३-८४	८९१	४,६२,४४५	१९९३-९४	३४९	२,२३,१०३
१९८४-८५	१,४४५	४,९५,२००	१९९४-९५	२०३	१,३०,६२४
१९८५-८६	९८३	४,३५,१३३	१९९५-९६	२१५	१,२८,१९०
१९८६-८७	७८३	५,८०,०९०	१९९६-९७	८९१	७,३८,९४०
१९८७-८८	८६७	५,०८,५७८	१९९७-९८	७३८	१६,२८,६३५
१९८८-८९	१,५२४	९,४६,५००	१९९८-९९	१,२४२	१२,१५,७१५
१९८९-९०	९७६	५,८३,०६६	१९९९-२०००	१,३३०	१२,९८,६००
१९९०-९१	१,२२९	७,२३,०१८	२०००-२००१	९७५	१८,८९,७५०
१९९१-९२	६३२	४,३५,६२५	२००१-२००२	७०५	६,३७,८००
१९९२-९३	५२९	४,३०,८३९	२००२-२००३	५१४	४,३३,०००

संजय गांधी निराधार अनुदान योजना : दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासनाने २ ऑक्टोबर १९८० पासून ही योजना सुरू केली. वृध्दत्व, अपंगत्व अथवा असाध्य रोगामुळे उदरनिर्वाह करू न शकणाऱ्यांसाठी ही योजना आहे. पात्र व्यक्तिस दरमहा ६० रुपये मदत देण्यात येते. वरील योजनेअंतर्गत जिल्ह्यातील अर्थसहाय्य मिळाल्यांची माहिती खालील विवरणात दिली आहे :—

संजय गांधी निराधार योजनेसंबंधी माहिती

वर्ष	लाभार्थी	अनुदान वाटप (रु.)	वर्ष	लाभार्थी	अनुदान वाटप (रु.)
१९८३-८४	२,९३४	२०,१४,३६०	१९९४-९५	८,४०१	९३,७१,०५१
१९८४-८५	३,६१८	३२,१७,२४०	१९९५-९६	९,८०३	१,१०,७५,२१३
१९८५-८६	४,८२४	३३,८६,१८२	१९९६-९७	१०,५५४	१,३४,०५,६८२
१९८६-८७	५,२५५	४४,१३,९८३	१९९७-९८	१०,४३२	१,५१,४१,३६१
१९८७-८८	५,९३६	४४,३०,०४५	१९९८-९९	१२,०७१	१,६०,४१,९९१
१९८८-८९	७,१३९	७२,७३,०८०	१९९९-२०००	११,७५८	१,८६,९९,३४६
१९८९-९०	७,८१२	१,०२,०८,६९०	२०००-०१	१३,९५७	३,६२,८९,३५२
१९९०-९१	७,९२५	९९,५८,२७५	२००१-०२	२३,६२१	६,१०,५१,९२६
१९९१-९२	८,४०९	१,०१,९२,३५०	२००२-०३	२०,८१५	४,०४,००,८१३
१९९२-९३	१०,३८७	१,२७,६०,६०७	२००३-०४	१७,१२३	४,६५,५१,०४३
१९९३-९४	१०,४५०	९३,११,०१८			

सुशिक्षित बेकारांना अंशकालीन आर्थिक सहाय्य : ही योजना १ जानेवारी १९७९ पासून महाराष्ट्रात सर्वत्र सुरू करण्यात आली. योजनेच्या पहिल्या भागात पदवीधर व शालान्त परीक्षेनंतर पदविकाधारक उमेदवारांना अंशकालीन काम व अनुदान तर दुसऱ्या भागात शालांत परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना नोकरी मिळविण्यासाठी येणारा खर्च भागविण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याचा समावेश आहे. उमेदवारास महिन्यातून १५ दिवस काम देवून तीन वर्षापर्यन्त दरमहा १०० रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येते. योजनेच्या दुसऱ्या भागानुसार सहाय्यास पात्र उमेदवार महाराष्ट्रातून शालान्त परीक्षा उत्तीर्ण व २१ ते ३० वयोगटातील असावा लागतो. योजनेची अंमलबजावणी जिल्हाधिकारी व तहसीलदाराकडे सोपविण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील लाभधारकांची आकडेवारी खाली दिली आहे.[५]

वर्ष	भाग अ		भाग ब	
	लाभार्थी	खर्च रुपये	लाभार्थी	खर्च रुपये
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९८३-८४	१,१२९	३७,०९०	१,९९४	४,८००
१९८४-८५	७५	१,१२,४००	२३१	१८,३५०
१९८५-८६	१३९	३,६१,५५०	९०१	१,२३,३००
१९८६-८७	१२६	७,५२,७००	७७१	१,५८,०००

५. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, लातूर
एचएफ ४१३७—३९

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९८७-८८	१६९	४,४५,०५०	१,२७६	१,६१,२५०
१९८८-८९	७३९	४,३२,८५०	२,४९७	१,८०,९५०
१९८९-९०	१९१	४,९२,१००	१,२७२	१,९७,६५०
१९९०-९१	३१९	५,१७,६००	९२७	१,७३,३००
१९९१-९२	३५४	३,८२,९००	८५१	१,५८,३००
१९९२-९३	२८७	८,०९,६००	३९१	२,५०,१००
१९९३-९४	१७१	५,४५,४००	३८	२,२१,७५०
१९९४-९५	११५	५,८५,६००	१३३	१,४४,०५०
१९९५-९६	१,७२४	२१,३१,२८४	१,२३७	१२,७९,७९६
१९९६-९७	६११	२०,२०,१४७	११३	८,६७,६६०
१९९७-९८	५८०	२६,२६,१००	२,८०८	१५,९३,२००
१९९८-९९	९५४	५५,५६,९००	३७१	२९,०२,३००
१९९९-२०००	२४१	४८,८४,१००	२३३	१६,०८,८००
२०००-२००१	७,९९७	४८,८४,१००	१६,१४८	१६,०८,८००
२००१-२००२	७,९९७	४,०६,१००	१६,१४५	४४,२००
२००२-२००३	७,९९७	३,६७,८००	१६,२९२	१,५७,०००
२००३-२००४	७,९९७	-	१६,२९२	-
२००४-२००५	७,९९७	५८,८८,१००	१६,२९२	-

ट्रायसेम योजना : ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांतील १८ ते ३५ वयोगटातील कामगारांना अर्थार्जनाचे पुरेसे साधन उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात ही योजना एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमात समाविष्ट करून १९८१-८२ मध्ये सुरू करण्यात आली. याद्वारे उमेदवारांना शासकीय, निमशासकीय अथवा खाजगी संस्थामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध उद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील फक्त एकच व्यक्ती प्रशिक्षणासाठी पात्र असते. प्रशिक्षणासाठी अनुसूचित जाती-जमातींच्या महिलांना प्राधान्य दिले जाते. प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांचा असून उमेदवारास दरमहा ७५ ते २०० रूपयापर्यन्त विद्यावेतन व उपकरण खरेदीसाठी २५० रूपयापर्यन्त अर्थसहाय्य दिले जाते. प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून प्रशिक्षणांचा अभ्यासक्रम मंजूर करून घ्यावा लागतो. उमेदवाराची निवड गटविकास अधिकाऱ्यांमार्फत केली जाते. प्रशिक्षणानंतर लाभार्थीस स्वयंउद्योग सुरू करण्यासाठी उद्योग-सेवा-व्यापार योजनेखाली बँकाकडून प्रकल्प खर्चाच्या २/३ कर्ज व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून १/३ अनुदान देण्यात येते. जिल्ह्यात ही योजना सुरू झाल्यापासून प्रगतिदर्शक आकडेवारी खाली दिली आहे. सन १९९९-२००० पासून सदरील योजना स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आली.

अनुक्रमणिका

वर्ष	प्रशिक्षित लाभार्थी	बँकेकडून अर्थसहाय्य घेऊन स्वत:चा उद्योग सुरू केलेल्यांची संख्या	कर्ज न घेता रोजंदारी मिळाल्यांची संख्या
(१)	(२)	(३)	(४)
१९८३ ते १९८८	१,३७०	५८६	७८४
१९८८-८९	२११	१०९	१०२
१९८९-९०	२१३	८९	१२४
१९९०-९१	२२६	११५	१११
१९९१-९२	३३५	९७	२३८
१९९२-९३	५४१	१११	४३०
१९९३-९४	५१८	२२५	१९३
१९९४-९५	२०२	१५६	४६
१९९५-९६	१९५	२५	१७०
१९९६-९७	४२८	८६	३४२
१९९७-९८	१४७	९६	५१
१९९८-९९	४९६	६२	४३४

सन १९९९ पासून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र पुरस्कृत विविध योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येतात. यात प्रामुख्याने स्वर्णजयंती ग्राम रोजगार योजना, जवाहर ग्रामसमृध्दी योजना, आश्वासित रोजगार योजना व संपूर्ण ग्रामीण योजना. या योजनांमधून ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. इंदिरा आवास योजनेतून दारिद्र्य रेषेखालील गरजू व्यक्तिंना घरकूल बांधण्यासाठी व घर दुरूस्तीसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. नवीन अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत पाणलोट विकासाची कामे घेऊन जमिनीतील जलसाठा वाढविण्यात येतो. वरील योजनांची माहिती खाली दिली आहे.

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना : ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना त्यांच्या क्षमतेवर आधारीत मोठ्या प्रमाणावर लहान लहान उद्योग व्यवसायासाठी कर्ज व अनुदान उपलब्ध करून देणे तसेच लाभ देण्यात आलेल्या स्वयंरोजगारांना दारिद्र्य रेषेच्यावर आणण्यासाठी प्रतिमहा रु.२०० एवढे उत्पन्न मिळेल याची खात्री देणे. हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत झालेले काम खाली दिले आहे :—

(रुपये लाख)

तपशिल	१९९९-२०००	२०००-२००१	२००१-२००२	२००२-२००३	२००३-२००४	२००४-२००५
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
झालेला खर्च :						
तरतुद	३,४५.८०	२,३६.०३	१,३६.५६	१,३६.५६	१,४१.४९	२,३६.५६
उपलब्ध निधी	४,७९.०८	३,७५.९७	१,९६.७१	२,०३.९५	२,१६.८२	२,५२.२३
अनुदान	२,१४.२०	२,१०.५९	१,१५.२१	८७.७५	१,३०.७०	१,६४.१७

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
खेळते भांडवल	६.६४	३८.३०	२०.००	६३.६८	३८.५१	५७.६६
मूलभूत सुविधा	१,६७.६३	८४.७५	३८.२७	२७.३१	३३.६३	६.६७
प्रशिक्षण	९.३१	७.६९	८.८३	८.५८	११.८८	१९.११
अर्थ सहाय्य दिलेले :						
बचत गट	-	१५	३४	७३	१२०	१६०
स्वरोजगारी	१,९०९	२,१७९	१,१००	९,०१	१,२९७	१,६९९

संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना : मार्च, २००२ पासून जवाहर ग्राम समृध्दि योजना व आश्वासित रोजगार योजना बंद करून ही योजना सुरू करण्यात आली. रोजगार व अन्नधान्य यांचे माध्यमातून ग्रामीण भागातील दारिद्र रेषेखालील कुटूंबांना सामाजिक सुरक्षितता देणे, मनुष्य बळाच्या माध्यमातून ग्रामीण भागात जलसंवर्धन पाणलोट विकसित करणे हे या योजनेचे स्वरूप आहे. ही योजना पंचायतराज माध्यमामार्फत राबविली जाते. या योजनेअंतर्गत झालेले काम खाली दिले आहे :—

भौतिक प्रगती

वर्ष	योजनेचे नाव	उद्दिष्ट	साध्य	टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९९९-२०००	आश्वासित रोजगार	५७६	२२३	३८.७१
	जवाहर रोजगार	२,२४१	१,३७६	६१.४०
२०००.२००१	आश्वासित रोजगार	३२२	२२२	६८.९४
	जवाहर रोजगार	२,७५३	१,४७३	५३.५०
२००१-२००२	आश्वासित रोजगार	३७५	२७१	७२.२६
	जवाहर रोजगार	१,८६३	१,४५९	७८.३१
२००२-२००३	संपुर्ण ग्रामीण रोजगार भाग-१	७१८	४७५	६६.१५
	संपुर्ण ग्रामीण रोजगार भाग-२	२,१८०	१,४८०	६७.८८
२००३-२००४	संपुर्ण ग्रामीण रोजगार भाग-१	१,३०६	९२७	७०.९८
	संपुर्ण ग्रामीण रोजगार भाग-२	२,४३६	१,९९७	८१.९७
२००४-२००५	संपुर्ण ग्रामीण रोजगार	३,६९७	३,५४०	९५.७५

आर्थिक प्रगती

(रुपये लाख)

वर्ष	योजनेचे नाव	उपलब्ध निधी	झालेला खर्च	खर्चाची उपलब्ध निधीशी टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९९९-२०००	आश्वासित रोजगार	४,१८.४२	३,९२,.०४	९३.६९
	जवाहर रोजगार	८,२१.१४	७,९९.२०	९७.३२

Maharashtra State Gazetteers

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२०००-२००१	आश्वासित रोजगार	३,८७.३७	३,२६.८७	८४.३८
	जवाहर रोजगार	५,८५.४४	५,८२.९७	९९.५७
२००१-२००२	आश्वासित रोजगार	५,३६.३६	५,२३.३१	९७.५६
	जवाहर रोजगार	५,५३.३८	५,५१.९७	९९.७४
२००२-२००३	संपूर्ण ग्रामीण रोजगार भाग-१	५,९२.६०	५,६७.७९	९५.८१
	संपूर्ण ग्रामीण रोजगार भाग-२	५,४४.७९	५,४२.११	९९.५०
२००३-२००४	संपूर्ण ग्रामीण रोजगार भाग-१	६,४०.९७	६,२०.७८	९६.८५
	संपूर्ण ग्रामीण रोजगार भाग-२	७,०६.०९	६,७६.२६	९५.७७
२००४-२००५	संपूर्ण ग्रामीण रोजगार	१३,७९.१४	१३,७२.८६	९९.५४

इंदिरा आवास योजना : या योजनेतून दारिद्र्य रेषेखालील गरजू व्यक्तिंना घरकूल बांधण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. याशिवाय मुक्त वेठबिगार, अनुसुचित जाती, जमातीतील कुटुंबे, इतर प्रवर्गातील कुटुंबे, शारीरिकदृष्ट्या अपंग, सैनिकी कारवाईत कामी आलेल्या, संरक्षण, निमलष्करी दलातील कर्मचारी वर्गाची कुटुंबे, विधवा, माजी सैनिक व निमलष्करी दलाचे निवृत्त सदस्य यानाही या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजनेत प्रती लाभार्थी शासकीय अनुदानात केंद्र सरकार ७५ टक्के, राज्य शासन २५ टक्के, राज्य शासनाचा अतिरिक्त हिस्सा व लाभार्थीच्या मजुरीच्या स्वरूपातील हिस्सा असे एकूण रुपये ३०,००० अनुदान दिले जाते. यानंतर घराचा दर्जा सुधारण्यासाठी केंद्र व राज्य शासनातर्फे रु.१०,००० चे अनुदान दिले जाते. या योजनेअंतर्गत झालेले काम खाली दिले आहे :—

घरकुल

(रु.लाख)

वर्ष	भौतिक		आर्थिक	
	उद्दिष्ट	साध्य	उद्दिष्ट	साध्य
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९९९-२०००	१,२८७	१,६२६	३,८४.६३	३,८४.६२
२०००-२००१	१,२८७	१,१९४	३,९७.५२	३,९७.५१
२००१-२००२	१,३१६	१,३८१	४,१७.४५	४,१७.४५
२००२-२००३	१,२८४	१,१२५	१,४३.०८	३,७२.२७
२००३-२००४	१,४५४	१,३३५	४,७७.७५	४,३८.८७
२००४-२००५	१,५३०	१,६४९	३,७८.१०	३,७७.३९

घर दुरुस्ती

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२०००-२००१	६४३	४०६	९९.३७	९९.३७
२००१-२००२	६५८	७०५	७५.५३	७३.४१

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२००२-२००३	६४५	५१२	६६.३२	५६.१२
२००३-२००४	७२७	६०५	८२.९१	७२.७१
२००४-२००५	७६५	८८७	८६.९१	८५.९९

अवर्षण प्रवणक्षेत्र विकास कार्यक्रम : देशातील अवर्षण प्रवण क्षेत्रांसाठी ग्रामीण कामांचा एक कार्यक्रम सुरू करण्याचे केंद्र शासनाने १९७०-७१ मध्ये ठरविले. त्याच कार्यक्रमाला १९७३ मध्ये अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम असे नाव देण्यात आले. अवर्षण प्रवण क्षेत्रात स्थानिक पातळीवर पाणी अडविणे व जिरविणे हा महत्त्वाचा कार्यक्रम राबविला जातो. एकात्मिक पाणलोट विकासाअंतर्गत मृदसंधारण, जलसंधारण, वनीकरण व भूजल विकासाची कामे प्राधान्याने केली जातात. पाणलोट विकासाअंतर्गत झालेल्या कामामुळे जमिनीत ओलावा जास्त दिवस टिकून राहतो. जलसंधारणाच्या कामांमुळे भूजल पातळी वाढते. विहिरी खोदून पाणी वापरता येते. साधारणपणे २० ते २५ टक्के क्षेत्र सिंचनाखाली येते. पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यातून पर्जन्याधारित व सिंचीत अशा दोन्ही प्रकारच्या पिकांचे उत्पादन व सुरक्षितता वाढते व त्यामुळे अवर्षणाची तीव्रता कमी होण्यास मदत होते. सदर योजना स्वयंसेवी संस्था व शासकीय यंत्रणेमार्फत राबविण्यात येते. या योजनेबाबत योजनेनिहाय व वर्षनिहाय प्राप्त निधी, झालेला खर्च व भौतिक साध्याची माहिती खाली दिली आहे.

(रु. लाख)

योजनेचे नाव (१)	वर्ष (२)	उपलब्ध/ प्राप्त निधी (३)	झालेला खर्च (४)	भौतिक साध्य (५)
(१) नवीन अवर्षण	२०००-२००१	१,०४.१३	०.३३	४६ पाणलोट प्रगती
प्रवण क्षेत्र कार्यक्रम	२००१-२००२	१,७६.१४	४२.००	पथावर
	२००२-२००३	१,७३.५६	९९.९५	
	२००३-२००४	२,५६.०५	१,२२.३१	
	२००४-२००५	३,००.०८	२,९८.८०	
(२) हरियाली घर्तीवरील	२००३-२००४	३६.००	-	१६ पाणलोट प्रगती
अवर्षण प्रवण	२००४-२००५	७३.३६	४५.६०	पथावर
(३) एकात्मिक पडीक	२०००-२००१	७५.००	-	९ गावे
जमीन विकास	२००१-२००२	१,०३.१२	२८.८३	प्रगतीपथावर
कार्यक्रम	२००२-२००३	७७.२२	७५.८७	
	२००३-२००४	१.३५	१.३५	
	२००४-२००५	१,२१.८२	१,२१.८०	

भारतीय विकास लोक कार्यक्रम : [६] या कार्यक्रमाची मूळ कल्पना संयुक्त राष्ट्र संघाच्या कृषी व अन्न संघटनेने १९६० साली हाती घेतलेल्या भूकमुक्ती मोहिमेत आहे. विकसित राष्ट्रांमधील दानशूर संस्थांनी विकसनशील राष्ट्रातील उत्पादन वाढीसाठी हातभार लावावा असे या मोहिमेचे मूळ स्वरूप आहे. केंद्र सरकारने या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापून

६. भारतीय विकास लोक कार्यक्रम (महाराष्ट्र) प्रकल्प, भा.वि. लोक समिती, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

स्वयंसेवी संस्थांना योजना तयार करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात कृषी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून त्याद्वारे कार्यप्रकल्प अहवाल तयार करून केंद्राकडे पाठविले. या कार्यक्रमासाठी परदेशातून सहाय्य मिळविताना अंतर्गत निधी ही उभारण्याचे आवाहन केंद्रीय समितीने केले. सन १९७३ मध्ये केंद्रीय समितीने या कार्यक्रमाचे नामांतर भारतीय विकास लोक कार्यक्रम असे केले. त्याचवर्षी भारतीय विकास लोक कार्यक्रम या नवीन नावाने राज्य समितीची पुनर्रचना झाली. पुनर्रचित समितीने हे काम मोठ्या प्रमाणात करण्याचे ठरवून परकीय मदतीवर अवलंबून न राहता स्वत:चा निधी उभारून लहान योजनांना सहाय्य देण्याचा निर्णय घेतला. अंतर्गत निधी उभारून स्वयंसेवी संस्थांना सहाय्य देणारे महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य आहे. हा कार्यक्रम म्हणजे स्वावलंबन व स्वयंपुर्ततेची मोहिम असून त्याचे कार्य मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली चालते. कार्यक्रमासाठी निधी लोकांच्या सहभागातून उभा करण्यात येतो. त्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात, स्मरणिका काढण्यात येतात व रूपया निधीचा प्रचार करण्यात येतो. यात प्रत्यक्ष सहाय्य फक्त संस्थांनाच दिले जाते. तथापि, रोजगार उपलब्ध झाल्यामुळे व्यक्तिगत फायदा होतो. भारतीय विकास लोक कार्यक्रम अंतर्गत लातूर जिल्ह्यात पुढीलप्रमाणे काम करण्यात आले.

लातूर येथील श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेतर्फे दोन माध्यमिक शाळा, एक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चालविले जाते. संस्थेतर्फे ग्रामीण भागातून आलेल्या गरीब विद्यार्थ्यांना कमवा व शिका या योजनेअंतर्गत संस्थेच्या शेतात काम दिले जाते. संस्थेची स्वत:ची इमारत असून त्याव्यतिरिक्त १.६ हेक्टर (चार एकर) जमीन आहे. यापैकी ०.८१ हेक्टर लागवडीखाली आहे. भाविलोकने या संस्थेच्या दुग्धोत्पादन योजनेस ५७,००० रूपयांचे (सन १९८३) अर्थसाहय्य मंजूर करून दहा उन्नत जातीच्या गाईंच्या डेअरी योजनेसाठी मंजुरी दिली. यामध्ये गाई खरेदी करणे, गोठा बांधणे, पिण्याच्या पाण्याची सोय, गवत साठविण्यासाठी जागा इत्यादी बाबींचा समावेश आहे.

बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी १९६८ मध्ये लातूर येथे शिव छत्रपति शिक्षण संस्था स्थापन झाली. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे व शेती व्यवसायाचे शिक्षण देणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. शेती व्यवसायाबरोबर दुग्ध प्रकल्प, कुक्कुटपालन व इतर तत्सम उद्योगांची जाणीव करून देण्यासाठी संस्थेने १९७७ मध्ये १२.१४ हेक्टर जमीन लातूर - निटूर रस्त्यावर विकत घेतली. ही जमीन कोरडवाहू असल्याने संस्थेने जलसिंचनाकरिता विहीर व पाईपलाईनची सोय उपलब्ध होण्यासाठी भाविलोककडे प्रकल्प सादर केला. सन १९८५ मध्ये भाविलोकने या संस्थेस कृषी विकासासाठी १,००,००० रूपयाचे अर्थसहाय्य मंजूर केले. संस्थेने विहिरीचे बांधकाम पूर्ण करून ४.०५ हेक्टर (दहा एकर) जमीन पाण्याखाली येईल अशा पाईपलाईनचे काम पूर्ण केले. तसेच शेतीकरिता आवश्यक असलेली शेती अवजारे, गाडी व दोन बैल खरेदी केले. या जमिनीत ऊस तसेच नारळ, केळी, डाळिंब, पेरू व लिंबू या फळझाडांची लागवड करण्यात आलेली आहे. संस्थेने या भागातील जनावरांसाठी उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून पाण्याचा हौद बांधला.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या आदर्श दुग्धशाळा प्रकल्पासाठी भाविलोकने १९८५ मध्ये ५०,००० रूपयांचे अर्थसहाय्य दिले.

सन १९८६ मध्ये भाविलोक राज्य समितीतर्फे अहमदपूर तालुक्यातील राइवाडी, शिवनशेड कुमठा व जालबलगा येथे ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अनुक्रमे १०,०००, २०,००० व १०,००० रूपयांचे अर्थसहाय्य दिले आहे.

आर्थिक नियोजन

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने सर्वांगीण विकास व अर्थव्यवस्थेतील असमतोल दूर करण्यासाठी आणि उपलब्ध साधन सामग्रीचा पुरेपूर उपयोग करण्यास्तव आर्थिक नियोजनाचे धोरण स्वीकारले. राष्ट्रीय विकासाबरोबर प्रादेशिक असमतोल घालविणे हे नियोजनाचे मार्गदर्शक तत्त्व मानण्यात आले. त्यादृष्टीने भारत सरकार तसेच राज्य शासनाने १९५१-५२ पासून समयबध्द नियोजनास प्रारंभ केला. पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांमध्ये समाजवादी समाजरचना तयार करणे तर चौथ्या ते सहाव्या योजनांमध्ये सामाजिक न्याय देणे हे ध्येय ठेवण्यात आले. पहिली पंचवार्षिक योजना १९५१-५२ मध्ये, दुसरी पंचवार्षिक योजना १९५६-५७ ते १९६०-६१ मध्ये व तिसरी पंचवार्षिक योजना १९६१-६२ ते १९६५-६६ मध्ये कार्यान्वित करण्यात आली. त्यानंतर देशात आर्थिक बिकट परिस्थिती निर्माण झाल्यामुळे १९६६-६७, १९६७-६८ व १९६८-६९ साठी वार्षिक योजना राबविण्यात आल्या. सन १९६९-७० ते १९७३-७४ मध्ये चौथी तर १९७४-७५ ते १९८७-७९ मध्ये पाचवी पंचवार्षिक योजना राबविण्यात आली. ऑगस्ट १९८० मध्ये सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. ती १९८०-८१ ते १९८४-८५ मध्ये राबविण्यात आली. सन १९८५-८६ ते १९८९-९० मध्ये सातवी योजना व १९९२-९३ ते १९९६-९७ मध्ये आठवी पंचवार्षिक योजना राबविण्यात आली. त्यानंतर १९९७-९८, १९९८-९९, १९९९-२०००, २०००-२००१, २००१-२००२ व २००२-२००३ मध्ये वार्षिक योजना राबविण्यात आल्या. राज्य योजनेतील बहुसंख्य योजना सर्वसाधारण स्वरूपाच्या असून त्याचा फायदा सर्व जिल्ह्यांना मिळतो. सन १९८२ मध्ये लातूर जिल्हा नव्याने निर्माण करण्यात आला. या जिल्ह्यात स्वतंत्रपणे १९८०-८१ ते १९८४-८५ ही सहावी पंचवार्षिक योजना लागू करण्यात आली. हा जिल्हा १९८२ पूर्वी उस्मानाबाद जिल्ह्यात समाविष्ट होता. त्यामुळे या अगोदरच्या सर्व योजना उस्मानाबाद जिल्ह्यास लागू करण्यात आल्याने लातूर जिल्ह्याची स्वतंत्र विकासाबाबतची माहिती देणे शक्य नाही. त्यामुळे येथे सहाव्या योजनेपासूनची माहिती देण्यात आली आहे.

जिल्हा नियोजन : आर्थिक विकासाचा दर वाढविण्यास्तव नियोजन प्रक्रियेत लोकप्रतिनिधींचा सहभाग वाढविणे आवश्यक असल्याकारणाने पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये जिल्हा नियोजनाची संकल्पना मांडण्यात आली. या योजनेच्या आराखड्यात भारतीय नियोजन मंडळाने तद्विषयक मार्गदर्शक तत्वे विहीत केली. तथापि, तत्पुर्वीच जिल्हा नियोजनाचे तत्त्व महाराष्ट्र शासनाने स्वीकृत केले होते. दिनांक २० ऑगस्ट १९६९ रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यानी राज्य विधिमंडळासमोर निवेदन केले होते की, समतोल विकास साधण्यासाठी नियोजनबध्द विकासाच्या दृष्टीने जिल्हा हा पायाभूत घटक मानावा असा शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार विचारविनिमय करून महाराष्ट्र शासनाने २० ऑक्टोबर १९७२ रोजी केलेल्या ठरावानुसार प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा नियोजन मंडळ स्थापन करण्याचे ठरविले. या ठरावाच्या प्रस्तावात आरंभीय म्हटले आहे की, "नियोजनासाठी जिल्हा हा पायाभूत घटक मानावा आणि प्रत्येक जिल्ह्यासाठी दिर्घ दृष्टीने मार्गदर्शी योजना तयार करावी असे शासनाने ठरविले आहे. जिल्ह्या-जिल्ह्यामधील तसेच एकेका जिल्ह्याच्या अंतर्गत वेगवेगळ्या भागांमध्ये विकासाच्या बाबतीत जो असमतोल आढळतो तो अधिक अधिक प्रमाणात क्रमश: दूर करण्यास अशा योजनेची मदत होईल. आज उपलब्ध असलेले आणि भविष्यात निर्माण होणारे मनुष्यबळ आणि इतर प्रकारची साधन संपत्ती यांच्या आधारे शक्य असणारी विकासाची कमाल पातळी गाठण्याची संधी यामुळे प्रत्येक जिल्ह्यास मिळेल."

पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी १९७४-७५ मध्ये ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली. जिल्हा नियोजन मंडळाला जिल्हा नियोजन व विकास मंडळ असे नामाभिधान दिले. जिल्हा नियोजनाची पुढील दोन उद्दिष्टये ठरविण्यात आली :—जिल्ह्याच्या नैसर्गिक व इतर प्रकारच्या साधनांचा पूर्ण विकास करणे, सामाजिक-आर्थिक सुविधाबाबत १५ ते २० वर्षाच्या कालावधीत जिल्ह्या-जिल्ह्यांमधील विकासाबाबतचा

असमतोल नाहिसा करणे, जिल्हा योजनेचा आराखडा तयार करणे, मंजूर जिल्हा योजनेचा आराखडा तयार करणे, मंजूर जिल्हा योजनेच्या अंमलबजावणीवर नियंत्रण व देखरेख ठेवणे आणि अंमलबजावणी करणाऱ्या वेगवेगळ्या यंत्रणांमध्ये एकसुत्रता आणणे ही जिल्हा नियोजन व विकास मंडळाची कार्ये होत. जिल्ह्यातील लोकनियुक्त प्रतिनिधींचे (खासदार, आमदार व ग्रामीण स्वराज्य संस्थाचे प्रतिनिधी) मिळून हे मंडळ बनलेले असते. जिल्ह्याचा पालकमंत्री हा मंडळाचा व त्यांच्या कार्यकारी समितीचा अध्यक्ष असतो. जिल्हाधिकारी हा या मंडळाचा सदस्य सचिव असतो.

पाचव्या पंचवार्षिक योजनेतील योजनांची विभागणी राज्य पातळीवरील आणि जिल्हा पातळीवरील योजनांमध्ये करण्यात आली. राज्य शासनाद्वारेा योजनेवर जो एकूण नियोजित खर्च होणार होता त्यापैकी सुमारे ६० टक्के खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या मार्फत व्हावा, तेवढ्या भागाची जबाबदारी जिल्हा मंडळावर सोपवावी अशी कल्पना होती. त्यानुसार मोठे पाटबंधारे व उद्योग धंद्यासाठीची सामुहीक उत्तेजन योजना जिल्हा पातळीवरील योजनांमध्ये समाविष्ट केल्या. परंतु १९७६-७७ मध्ये व्यावहारीक कारणांसाठी याचे वर्गीकरण बदलून त्यांना राज्यपातळीवरील योजनांमध्ये समाविष्ट करण्यात आले. राज्याच्या योजनेमधील जिल्हा पातळीवरील योजनांचा भाग त्यामुळे सुमारे ४० टक्के झाला. पुढे अनुभवाने लक्षात आले की, ज्या योजनांचा समावेश जिल्हा पातळीवरील योजनांमध्ये केलेला असतो त्यापैकी काही योजनांचे नियोजन आणि त्यावरील निधींची तरतूद राज्य पातळीवर करणे आवश्यक ठरते. जेव्हा योजनाअंतर्गत नवीन योजना सुरू केल्या जातात किंवा केंद्र पुरस्कृत योजना भागीदारीच्या तत्त्वावर स्वीकारल्या जातात किंवा मोठ्या प्रमाणावर पैशाची तरतूद करावी लागते, तेव्हा अशा योजनांसाठी वेगळी वर्गवारी केली जाते. अशा योजनांना " राज्य पातळीवरील संचित निधी (स्टेट पूल) योजना " असे म्हणतात. त्यामुळे स्वाभाविकच जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत होणाऱ्या खर्चावरील भार थोडा कमी होतो. जिल्हा पातळीवरील नियोजनासाठी निधी उपलब्ध करण्याचे शासनाने सुत्र निश्चित केले आहे. त्यामध्ये जिल्ह्याची लोकसंख्या, मागास वर्गीयांची लोकसंख्या, नागरी लोकसंख्या, शेतीचा मागासलेपणा, किनारपट्टीवरील जिल्हे, अवर्षण प्रवण क्षेत्र या बाबींचा विचार केला जातो. त्याबाबत गरजेनुसार पुनर्मूल्यमापन केले जाते. या तंत्राचा उद्देश असा की, गरजेवर आधारित आर्थिक विकासाचा कार्यक्रम परिणामकारकपणे राबविणे शक्य व्हावे.

या नियोजन तंत्रानुसार लातूर जिल्हा नियोजन व विकास मंडळ नेमण्यात आले.

सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८१ ते १९८४-८५) : ऑगस्ट १९८० मध्ये झालेल्या राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीत सहाव्या योजनेची मुख्य वैशिष्ट्ये व योजनेची चौकट यांना मान्यता देण्यात आली. निरनिराळ्या विकास कार्यक्रमाखाली स्थापित क्षमतेचा पुर्णत: वापर करणे, स्वयं रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारणे, कृषी व्यवसाय आर्थिक दृष्ट्या लाभप्रद होण्यासाठी बहुउद्देशिय " बेनार योजना " हाती घेऊन आधुनिक सुयोग्य वापर, शेती व्यवस्थापन, अधिक जमीन लागवडीखाली आणणे, दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढविण्यासाठी दुधाचा महापूर कार्यक्रम, अवर्षण प्रवण भागात सुधारणा, गळीत व कडधान्य उत्पादन वाढविणे याबाबत विशेष कार्यक्रम राबविण्यात आले. योजनेत जिल्हा पातळीवरील कार्यक्रमांतर्गत झालेला खर्च खालीलप्रमाणे होता :—

विकास शीर्ष	खर्च (रु.लाख)	विकास शीर्ष	खर्च (रु.लाख)
कृषि व संलग्न सेवा	९,६०.५२	उद्योग व खाणकाम	४१.३३
ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम	१,१३.३९	वाहतूक व दळणवळण	४,०६.४८
		सामाजिक व सामूहिक सेवा	२६,३०.०४
जलसिंचन व विद्युत विकास	६,७४.२७		
		एकूण	... ४८,२६.०३

अनुक्रमणिका

सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-८६ ते १९८९-९०) : या योजनेत अन्न, रोजगार व उत्पादकता वाढविण्याचे प्रमुख ध्येय ठरविण्यात आले. प्रादेशिक असमतोल दूर करणे, हे राज्याच्या सातव्या योजनेचे महत्त्वाचे तत्त्व होते. योजनेत विकास शीर्षानुसार झालेला खर्च खाली दिला आहे :—

विकास शीर्ष	खर्च (रु.लाख)	विकास शीर्ष	खर्च (रु.लाख)
कृषि व संलग्न सेवा	३,०३.८४	उद्योग व खाणकाम	१,६३.९६
ग्रामविकास कार्यक्रम	१४,६९.०६	वाहतूक व दळणवळण	५,४९.२१
सिंचन व उर्जा	१२,६६.४७	सामाजिक व सामूहिक सेवा	२९,५८.१

वार्षिक योजना.—सन १९९०-९१ व १९९१-९२ मध्ये वार्षिक योजना राबविण्यात आली. या योजनेत विकास शीर्षानुसार झालेला खर्च खाली दिला आहे :—

विकास शीर्ष	खर्च (रु.लाख)	
	१९९०-९१	१९९१-९२
कृषि व संलग्न सेवा	६४.९८	७७.५०
ग्रामीण विकास	३,६२.०५	३,५७.६८
पाटबंधारे व पूरनियंत्रण	१,०३.३८	८८.९९
विद्युत विकास	१,०७.७९	१,२२.२१
उद्योग व खाणकाम	५८.४०	४५.५२
वाहतूक व दळणवळण	१,०२.५२	९५.१२
सामान्य आर्थिक सेवा	६२.५६	१,०९.०५
सामाजिक व सामूहिक सेवा	३,८५.४७	६,४८.२३
एकूण ...	१२,४७.१५	१५,४३.३

आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-९३ ते १९९६-९७) : आठवी पंचवार्षिक योजना १९९२-९३ ते १९९६-९७ या कालावधीसाठी राबविण्यात आली. योजनेत विकास शीर्षानुसार झालेला खर्च खाली दिला आहे :—

विकास शीर्ष	खर्च (रु.लाख)	विकास शीर्ष	खर्च (रु.लाख)
कृषि व संलग्न सेवा	१५,५८.५१	उद्योग व खाणकाम	२,०७.३६
ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम	३५,१०.६५	वाहतूक व दळणवळण	१२,९०.८४
पाटबंधारे व पूरनियंत्रण	१३,०६.९९	सर्वसाधारण आर्थिक सेवा	६,८०.७८
विद्युत विकास	१२,९१.१५	सामाजिक व सामूहिक सेवा	७०,१०.६६
		एकूण	१,६८,५६.९४

अनुक्रमणिका

वार्षिक योजना सन १९९७-९८, १९९८-९९ व १९९९-२००० : या कालावधीत वार्षिक योजना राबविण्यात आल्या. त्याचा विकास शीर्षानुसार झालेला खर्च खाली दिला आहे :—

विकास शीर्ष	खर्च (रु.लाख)		
	१९९७-९८	१९९८-९९	१९९९-२०००
(१)	(२)	(३)	(४)
कृषि व संलग्न सेवा	२,८७.२६	२,८३.६९	४,२५.३८
ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम	९,१०.३०	११,७८.७५	१०,२३.६६
पाटबंधारे व पूरनियंत्रण	१,६४.१७	३,८४.३७	३,६५.३९
विद्युत विकास	२,५७.६६	१,६०.२५	१,३२.७
उद्योग व खाणकाम	५८.३८	७४.४	६१.२७
वाहतूक व दळणवळण	२,२६.५९	२,९१.११	२,५७.९५
सर्वसाधारण आर्थिक सेवा	२,८८.५२	५,४९.९७	२.१८
सामाजिक व सामूहिक सेवा	१४,०७.२७	१७,२६.२५	२१,६५.०४
एकूण ...	३६,००.५५	४६,१८.७९	४४,३३.५७

वार्षिक योजना सन २०००-२००१, २००१-२००२ व २००२-२००३ : या कालावधीत वार्षिक योजना राबविण्यात आल्या. त्याचा विकास शीर्षानुसार झालेला खर्च खाली दिला आहे :—

(रुपये लाख)

विकास शीर्ष	२०००-२००१	२००१-२००२	२००२-०३
	खर्च	खर्च	खर्च
(१)	(२)	(३)	(४)
कृषि व संलग्न सेवा	१,२२.५०	६६.४३	४१.५२
ग्राम विकास कार्यक्रम	६,९१.९८	४,३१.६६	६,९३.०८
पाटबंधारे व पुरनियंत्रण	१,७२.२८	७२.१०	८६.२८
विद्युत विकास	३२.४६	३०.००	३०.००
उद्योग व खाणकाम१	२४.७६	२०.४२	२२.८३
वाहतूक व दळणवळण	२,३८.६१	२०.०५	६५.५३
सर्वसाधारण आर्थिक सेवा	५.००	०.००	१४.०७
सामाजिक व सामूहिक सेवा	११,८७.६१	७,२८.०२	५,१०.७८
एकूण ...	२४,७४.६१	१३,६८.६८	१४,६४.०९

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

वार्षिक योजना सन २००३-२००४ व २००४-२००५ : या कालावधीत वार्षिक योजना राबविण्यात आल्या. त्यांचा विकास शीर्षानुसार झालेला खर्च खाली दिला आहे :—

(रुपये लाख)

विकास शीर्ष	२००३-२००४	२००४-२००५
कृषि व संलग्नसेवा	५६.९१	६८.१७
ग्राम विकास कार्यक्रम	५,०१.७०	४,१४.६७
पाटबंधारे व पुरनियंत्रण	१,०८.८९	६९.४२
विद्युत विकास	७९.५७	६०.००
उद्योग व खाणकाम	१०.३२	१२.७३
वाहतूक व दळणवळण	१९.६१	३८.७२
सर्वसाधारण आर्थिकसेवा	१४.१०	-
सामाजिक व सामूहिक सेवा	३,७०.३७	३,५८.४०

मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद

वैधानिक विकास मंडळांची स्थापना : भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, भारताच्या राष्ट्रपतींनी "महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र) यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी आदेश १९९४" द्वारे निर्गमित केला. या आदेशा अन्वये राज्यामध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्याची तसेच संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) मधील परिच्छेद (ब) व (क) मध्ये दर्शविलेल्या बाबींच्या संदर्भात विशेष जबाबदारी महाराष्ट्राच्या राज्यपालांवर सोपविण्यात आली.

भारताच्या राष्ट्रपतींनी निर्गमित केलेल्या महाराष्ट्र राज्य आदेश १९९४ मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अधिकाराप्रमाणे, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, राज्यात, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या विभागांसाठी तीन स्वतंत्र वैधानिक विकास मंडळांची स्थापना केली. ही मंडळे ३० एप्रिल १९९४ रोजी स्थापन झाली.

विकास मंडळांची रचना : महाराष्ट्राच्या राज्यपालांनी सर्वप्रथम २५ जून १९९४ रोजी वैधानिक विकास मंडळे गठीत केली. प्रत्येक विकास मंडळावर प्रथम ७ सदस्य घेण्यात आले. त्यानंतर राज्यपालांच्या आदेशानुसार, दिनांक २९ जानेवारी १९९८ पासून प्रत्येक मंडळातील सदस्य संख्येत वाढ करण्यात आली. आता मंडळात अध्यक्षांसह एकूण ११ सदस्य असतात. त्यापैकी ५ सदस्य विषयातील तज्ञ सदस्य तर तीन लोकप्रतिनिधि व दोन पदसिध्द सदस्य व एक सदस्य सचिव असतो.

विकास मंडळाची कार्ये : मा. राज्यपालांच्या दिनांक ३० एप्रिल १९९४ च्या आदेशातील परिच्छेद ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विकास मंडळाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(अ) संपूर्ण राज्यातील विकास पातळीच्या तुलनेत योग्य निर्देशांकाच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध विकास क्षेत्रांची विकासाची सापेक्ष पातळी निश्चित करणे.

(ब) मंडळाच्या क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्याच्यादृष्टीने, तसेच त्या भागातील विकासाचा अनुशेष दूर करण्याच्यादृष्टीने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामाचे मूल्यमापन करणे.

(क) वार्षिक तसेच पंचवार्षिक योजनेच्या काळात विकास मंडळाच्या क्षेत्रातील विकास खर्चाच्या पातळ्या सुचविणे, आणि,

(ड) मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करणे व तो महाराष्ट्र राज्य विधिमंडळापुढे सादर करण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर व्यवहार्य असेल तेथवर तीन महिन्याच्या कालावधीत राज्यपालांना सादर करणे.

विकास कामाच्या खर्चासाठी निधीचे वाटप : विकास मंडळाच्या आदेशातील परिच्छेद ७ व ८ मध्ये, "विकास कामासाठी निधीचे वाटप व वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निधीच्या वाटपाचा निर्देश करणे" अशा मथळ्याखाली विकास निधीच्या वितरणाच्या कार्य पद्धतीचा तपशील देण्यात आला आहे,

(१) एकूण राज्याची गरज लक्षात घेऊन विकास मंडळाच्या क्षेत्रावरील विकास खर्चासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल समन्यायाने निधीचे वाटप व्हावे याची खातरजमा करतील.

(२) निधीचे समन्यायाने वाटप होईल याची खातरजमा करताना राज्यपाल,—

(अ) विकास मंडळाने कोणत्याही शिफारशी केल्या असल्यास, त्या विचारात घेतील, आणि,

(ब) निधीच्या वाटपाबाबत, राज्यपाल, त्यांना आवश्यक आणि योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तिचा किंवा व्यक्तिसंघाचा सल्ला घेऊ शकतील.

(३) राज्यपालांनी निधी किंवा नियतव्यय यांच्या ठरवून दिलेल्या वाटपाचा निर्देश राज्य विधिमंडळापुढे सादर करावयाच्या वार्षिक विवरणपत्रामध्ये करण्यात येईल, आणि उपरोक्त नियतव्ययाशी संबंधित विकास कार्ये राज्य शासनाकडून पूर्ण करण्यात येतील वा पूर्ण करून घेण्यात येतील, आणि अशा प्रकारे देण्यात आलेला निधी हा एका मंडळाच्या कार्यक्षेत्रातून दुसऱ्या मंडळाच्या कार्यक्षेत्राकडे वळविता येणार नाही.

मंडळाचा कालावधी : राज्यात तीन वैधानिक विकास मंडळांची स्थापना सन १९९४ मध्ये झाली. मंडळांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येऊन त्यांचा कार्यकाल ३० एप्रिल २००५ पर्यंत वाढविण्यात आला. राष्ट्रपतींच्या आदेशाप्रमाणे आता मंडळाचा कार्यकाल सन २०१० पर्यंत वाढविण्यात आला आहे.

निर्देशांक व अनुशेष समितीने निश्चित केलेला लातूर जिल्ह्याचा विकास अनुशेष(१९९४) : निर्देशांक व अनुशेष समितीने[७] सन १९९४ च्या किंमतीच्या आधारे महाराष्ट्र राज्याचा एकूण अनुशेष १४,००६.७७ कोटी रुपये निश्चित केला. त्यापैकी उर्वरित महाराष्ट्राचा ३,७६८.२० कोटी रुपये (२४.५४%); मराठवाड्याचा ४,०००.५५ कोटी रुपये (३०.१३%) तर विदर्भाचा ६,६२४.०२ कोटी रुपये (४५.३३%) होता. लातूर जिल्ह्याचा क्षेत्रवार अनुशेष पुढील तक्त्यात दाखविला आहे. लातूर जिल्ह्याचा एकूण अनुशेष ४५१.८९ लाख रुपये असून, जिल्ह्याचा भौतिक अनुशेषही दाखविला आहे. दिनांक ३१ मार्च २००५ पर्यंत निरनिराळ्या विकास क्षेत्राचा शिल्लक भौतिक अनुशेष ही खालील विवरणात दाखविला आहे.

---

७. बुकलेट ऑन रिमूव्हल ऑफ बॅकलॉग इंडिकेटिंग स्पेशल ऑउटलेज प्रोव्हाडेड फॉर २००५-२००६ ॲण्ड फिजिकल प्रोग्रेस मेड अप टू द एन्ड ऑफ ३१ मार्च २००५, प्लॅनिंग डिपार्टमेंट गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई.

निर्देशांक व अनुशेष समितीने निश्चित केलेला लातूर जिल्ह्याचा विकास अनुशेष[८]

(रु.लाखात)

अ.क्र.	विकास क्षेत्र	वित्तीय अनुशेष रक्कम (लाखात)	भौतिक अनुशेष (१९९४)	शिल्लक भौतिक अनुशेष (३१ मार्च २००५)
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	पाटबंधारे	३१७.००	(१) ५४.४५ (०००हेक्टर)	
२	रस्ते	३१.०९	(२) ४५ (कि.मी.) (मुख्य राज्य महामार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देणे.) गावजोडणी ६४	१७.७६ (००० हेक्टर) ०.००
३	सामान्य शिक्षण	००.२७	(३) उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा अनुशेष (संख्या) ९	२ (संख्या)
४	तंत्र शिक्षण	४.९६	(४) तांत्रिक शाळातील विद्यार्थ्यांचा अनुशेष (संख्या) ३३६	३.३६ (संख्या)
५	आरोग्य शिक्षण	६६.२३	(५) आरोग्य उपकेंद्राचा अनुशेष (संख्या) १४	०
६	पाणीपुरवठा	५.९४	(६) ग्रामीण व कुटीर रूग्णालयाचा अनुशेष (संख्या) ३	१ (संख्या)
७	भू-विकास, फलोत्पादन, मृद व जलसंधारण	२६.४०	(७) प्रतिलक्ष लोकसंख्येमागे खाटांचा अनुशेष (संख्या) ११४८	१ (संख्या)
८.	पशुवैद्यकीय सेवा	००.००	(८) जिल्हा रूग्णालयातील खाटांचा अनुशेष (१००)	०
९.	पंपाचे विद्युतीकरण	--		
	एकूण (१ ते ९)	४५१.८९	१००	०
			प्रतिदिन अतिरिक्त पाण्याच्या गरजेचा (नागरी) अनुशेष ५.९४ (द.लक्ष लिटर)	१.६९ (द.ल.लि.)

गाव जोडणी ६४ खेडी, तांत्रिक शाळातील विद्यार्थ्यांचा अनुशेष (३३६) हे प्रमुख होत. पुढील ३ वर्षात हा सर्व भौतिक अनुशेष दूर होणे अपेक्षित आहे.

किंमती व भावपातळी : किंमतीमधील चढउतारांचे लोकांच्या आर्थिक जीवनावर दूरगामी परिणाम होतात. म्हणून त्यांच्या राहणीमानाची पातळी किंमतीमध्ये होणाऱ्या चढउतारावर अंशत: अवलंबून असते. विशेषत: ज्याचे वेतन स्थिर असते अशा लोकांच्या आर्थिक परिस्थितीवर भाववाढीमुळे विपरित परिणाम होतो. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये भाव पातळी स्थिर राहणे ही एक अत्यंत महत्वाची बाब असते. प्रत्येक जिल्ह्यातील किंमती व भावपातळी सर्वसामान्यपणे राष्ट्रीय भाव पातळीशी निगडीत असतात. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील भाव पातळी भारतातील भाव पातळीपेक्षा फारशी भिन्न असू शकणार नाही. तथापि जिल्ह्यातील लोकांच्या राहणीमानाचा विचार करण्याच्या दृष्टीने भावपातळीचा अभ्यास करणे ही एक आवश्यक बाब आहे.

८. कित्ता.

सन १९८२ पर्यंत लातूर जिल्हा उस्मानाबाद जिल्ह्यात समाविष्ट होता. स्वातंत्र्यापूर्वी उस्मानाबाद जिल्हा भूतपूर्व हैद्राबाद संस्थानात असताना निजामी राजवटीतील प्रचलित रूपयाची क्रयशक्ती ब्रिटिश रूपयापेक्षा कमी होती. त्यामुळे उस्मानाबादमधील भाव पातळी ब्रिटिश अमदानातील प्रदेशात असलेल्या भाव पातळीनुरूप असणे शक्य नव्हते.

उस्मानाबाद जिल्ह्यातील १९०० पूर्वीच्या कालावधीसाठी किंमती विषयक आवश्यक सांख्यिकी माहिती उपलब्ध नाही. तथापि ढोबळपणे असे म्हणता येईल की, अलिकडील काळातील भाव पातळीशी तुलना करता मागील शतकात वस्तूंच्या किंमती अत्यंत कमी होत्या. सन १९०० मध्ये भीषण दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळी वर्षात उस्मानाबादमध्ये ज्वारी रूपयाला सव्वाचार शेर या दराने विकली जात होती. त्याचवर्षी ज्वारीची किंमत औरंगाबादमध्ये रूपयाला पाच शेर आणि बीड व नांदेडमध्ये रूपयाला पावणेचार शेर इतकी होती. वाहतुकीच्या साधनांच्या अभावी लांबच्या ठिकाणाहून वस्तू आणणे त्याकाळी बरेच कठीण होते. त्यामुळे दुष्काळ अथवा अवर्षण यासारखी आपत्ती कोसळल्यास वस्तूंच्या किंमती झपाट्याने वाढत असत. सन १९०० मध्ये रेल्वे वाहतूकीची सोय उपलब्ध झाल्यानंतर दुष्काळी व टंचाईग्रस्त प्रदेशात इतर ठिकाणाहून अन्नधान्य आयात करणे शक्य झाले. तेव्हापासून हैद्राबाद संस्थानातील प्रदेशात भाव पातळीत समानता येण्यास मदत झाली.

उस्मानाबाद केंद्रातील १८९०, १९०० व १९०१ या वर्षातील अन्नधान्याच्या किंमतीची सरासरी पातळी[९०] खाली दर्शविली आहे.

दशकातील सरासरी दर निजामी रूपयामध्ये

निवडक अन्नधान्य	परिमाण	१८९०	१९००	१९०१
तांदूळ	शेर	८	९	८
ज्वारी	शेर	२२	२१	१७
गहू	शेर	१३	१५	११

इ.स.१७०७ मध्ये ब्रिटिश रुपयाची किंमत निजामी राजवटीतील तेरा आणे नऊ पै इतकी होती. परंतु नंतरच्या कालावधीत हळूहळू निजामी रूपयाच्या क्रयशक्तीमध्ये बरेच चढउतार झाले, आणि परिणामत: निजामी रूपयाची ब्रिटिश रूपयातील किंमत कमी होऊ लागली. स्वातंत्र्यपूर्व काळात हैद्राबाद राज्यातील अन्नधान्याचा किंमती ब्रिटिश प्रदेशातील किंमतीपेक्षा बऱ्याच कमी होत्या. पुढील तक्त्यामध्ये १९१० ते १९२० या कालखंडातील गहू, तांदूळ व ज्वारी या वस्तूंच्या भावामध्ये झालेले चढउतार दर्शविले आहेत.

निवडक पिकांच्या वार्षिक सरासरी किरकोळ किंमतीचा निर्देशांक

वर्ष	गहू	तांदूळ	ज्वारी
(१)	(२)	(३)	(४)
१९१०-११	१२५	१२९	१३९
१९११-१२	१३६	१४१	१४७

९. सरासरी किंमतीमध्ये १८७७-७८, १८९९-१९०० या सारख्या तीव्र दुष्काळी वर्षातील किंमतीची पातळी वगळण्यात आली आहे.

१०. **इम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** प्रॉव्हिन्शिअल सिरिज, हैद्राबाद स्टेट, १९०९, पृ. ८४.

(१)	(२)	(३)	(४)
१९१२-१३	१६७	१५५	१९१
१९१३-१४	१७३	१५५	१८३
१९१४-१५	१७३	१४८	१४९
१९१५-१६	१४१	१२९	१४९
१९१६-१७	१४१	१२९	१६०
१९१७-१८	२५०	१७२	४००
१९१८-१९	४०९	२५८	४४०
१९१९-२०	३४६	२५८	२५९

पहिल्या महायुध्दाच्या कालावधीमध्ये उपभोग्य वस्तूंच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढल्या होत्या. विशेषत: ब्रिटिश प्रदेशामध्ये वस्तूंचे भाव बरेच वाढले होते. हैद्राबाद संस्थानामध्ये १९१५-१६ व १९१६-१७ साली महागाईची झळ फारशी जाणवली नाही. तथापि महायुध्दाच्या उत्तरार्धात १९१७-१८ मध्ये भाव पातळी सर्वोच्च होती. या कालावधीमध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी चांगला मोबदला मिळाला. सन १९२६ नंतर भाव पातळीतील चढ उताराची गती अतिशय मंद होती. त्यावर्षी कापसाची किंमत एकदम घसरली व त्या दशकाच्या अंतिम वर्षामध्ये कापसाची किंमत एकदम खाली आली. सन १९२९-३० च्या जागतिक आर्थिक मंदीचा हा परिणाम होता.

सप्टेंबर १९२९ ते मार्च १९३३ हा काळ आर्थिक मंदीचा होता. या कालावधीमध्ये सर्व वस्तूंच्या किंमती आणि विशेष करून शेतीमालाच्या किंमती फारच कमी झाल्या होत्या. एप्रिल १९३३ पासून १९३७ पर्यंतचा आर्थिक पुनरूज्जीवनाचा कालावधी म्हणता येईल. या काळात शेतमालाच्या किंमती पूर्ववत वाढू लागल्या व त्यानी मंदीपूर्व पातळी गाठली. यापुढील काळामध्ये दुसऱ्या महायुध्दाच्या प्रारंभापर्यंत पुन्हा आर्थिक मंदीची लक्षणे दिसू लागली. हैद्राबाद संस्थानातील अर्थव्यवस्थेवरसुध्दा जागतिक चढ उताराचे दूरगामी परिणाम झालेले होते. सप्टेंबर १९३९ मध्ये महायुध्दाचा प्रारंभ झाल्यानंतर आर्थिक तेजीचा प्रादुर्भाव होवून किंमती विलक्षण झपाट्याने वाढल्या होत्या. वस्तुत: महायुध्दाच्या प्रारंभीच्या काळात भाव पातळीमध्ये अचानक कृत्रिम टंचाईचा आभास निर्माण केला होता.

हैद्राबाद राज्यातील काही प्रमुख कृषी मालाच्या घाऊक किंमतीचे निर्देशांक खाली दर्शविले आहेत. उस्मानाबाद जिल्हा पूर्वी हैद्राबाद राज्याचा भाग असल्यामुळे पुढील आकडेवारी उस्मानाबाद (लातूर) जिल्ह्याची प्रातिनिधीक आहे असे म्हणणे उचित ठरेल.

वस्तू	१९३१-३२	१९३२-३३	१९३३-३४	१९३४-३५	१९३५-३६	१९३६-३७	१९३७-३८	१९३८-३९	१९३९-४०	१९४०-४१
तांदूळ	५०	५०	४७	५५	५४	५६	५८	५७	७४	७०
गहू	३७	३७	३६	३४	३३	४४	४७	४१	४६	४७
ज्वारी	४३	४३	४३	५४	४९	५३	५१	६१	६५	५५
बाजरी	४५	४५	४७	५०	५३	५९	५५	५९	६८	५७
हरभरा	३१	३१	३४	४०	३७	४८	५०	५२	५४	५४
तूर	३६	३४	३६	४५	४३	५०	५५	५१	५३	४९
कापूस	७५	७२	६७	७५	७४	७९	७३	७०	८४	७७
सरकी	७०	७३	६०	७०	६८	६२	६०	६७	७७	६७
जवस	४१	४३	४३	४३	४६	५०	५०	४८	४९	५१
एरंडी	५६	५८	४८	५०	५४	६४	६०	५९	७५	५९

अनुक्रमणिका

दुसऱ्या महायुध्द काळामध्ये भाव पातळी वाढल्यामुळे सट्टाबाजी व काळाबाजार करण्याची प्रवृत्ती दृष्टोत्पत्तीस आली. सतत वाढणाऱ्या मागणीचा फायदा घेवून व्यापाऱ्यांनी बराच माल भूमिगत करण्यास सुरूवात केली व त्यामुळे किंमती अधिकच वाढून ग्राहकांची पिळवणूक सुरू झाली. खुल्या बाजारातील परिस्थिती शासनाच्या नियंत्रणाबाहेर जाईल अशी भिती निर्माण झाली होती. प्राप्त परिस्थितीमध्ये ब्रिटिश सरकारने शिधा वाटप व भाव नियंत्रणाचे धोरण अमलात आणले होते. हैद्राबाद शासनाने देखिल याच धोरणांचा अंगिकार करून हैद्राबाद संरक्षण अधिनियमानुसार शासकीय सदस्यांची एक किमत यंत्रणा समिती स्थापन केली. प्रत्येक जिल्ह्यातील प्रथम दर्जाचे तालुकादार (जिल्हाधिकारी) यांच्या अधिकार क्षेत्रासाठी भाव पातळी नियंत्रक म्हणून नेमणूक करण्यात आली. किंमत पातळीवर नियंत्रण आणण्यास्तव जे विक्रेते ऑगस्ट १९३९ च्या शेवटच्या आठवड्यातील सरासरी किंमतीपेक्षा ५ टक्क्याहून अधिक भावाने वस्तूंची विक्री करतील अशा विक्रेत्यावर हैद्राबाद संरक्षण अध्यादेशाच्या (Defence of Hyderabad ordinancy) ८१ व्या कलमानुसार खटला भरण्यात येईल असा आदेश काढण्यात आला. या अध्यादेशाच्या कार्यकक्षेखाली सर्व अन्नधान्य, साखर, तूप व काही उपभोग्य वस्तू आणण्यात आल्या. त्याचप्रमाणे यंत्रनिर्मिती वस्तूंसाठी १० टक्क्यांची मर्यादा निर्धारित करण्यात आली. लातूर (उस्मानाबाद) जिल्ह्यामध्ये उपरोक्त अध्यादेशाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करण्यात आली.

उपरोक्त अध्यादेश, निर्यात व विनिमय यावरील निर्बंध आणि मानव नियंत्रणाबाबत केलेली कार्यवाही या सर्व घटकांचा परिणाम होऊन जानेवारी ते जुलै १९४० या सात महिन्यांच्या कालावधीमध्ये वाढत्या किंमतीना आळा बसला. त्याच सुमारास युरोपियन बाजारपेठ भारतीय मालासाठी युध्दजन्य परिस्थितीमुळे उपलब्ध होऊ न शकल्यामुळे निर्यात होणाऱ्या मालावर आपोआप बंधने पडली. त्यामुळे निर्यात होणाऱ्या वस्तूंच्या किंमती कमी झाल्या. तथापि परिस्थितीमुळे आयात मालाची तीव्र टंचाई जाणवू लागली व ज्या वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढल्या त्या वस्तूंमध्ये औषधे, औषधी द्रव्ये, रसायने, कापड, साखर, चहा व अनेक यंत्रनिर्मित वस्तूंचा समावेश होता त्याचबरोबर ब्रिटिश सरकारने आयात वस्तूंवर कडक निर्बंध लादले होते. परिणामत: आयात वस्तूंच्या किंमती अभूतपूर्व पातळीवर जावून पोहचल्या. विशेषत: अशा वस्तू सामान्य ग्राहकाला जवळ जवळ उपलब्ध नव्हत्या. स्थानिक विक्रेते संघाच्या साह्याने औषधे व इतर आवश्यक वस्तूंच्या घाऊक व किरकोळ किंमती निश्चित करून दिल्या होत्या. ग्राहकांच्या माहितीसाठी नियंत्रित केलेल्या वस्तूंच्या किंमतीची सूची किरकोळ औषधी दुकानावर प्रदर्शित करणे शासनाने अनिवार्य केले होते.

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात सर्वच वस्तूंच्या किंमतींमध्ये भरमसाठ वाढ झाली होती. सन १९४५ मध्ये युध्द संपल्यानंतरसुध्दा भाव पातळी खाली आली नाही. इतके मात्र खरे की, १७ सप्टेंबर १९४८ मध्ये हैद्राबाद संस्थान जेव्हा भारतामध्ये विलीन झाले तेव्हा तेथील भाव पातळी भारतातील भाव पातळीपेक्षा बऱ्याच प्रमाणात कमी होती. विशेषत: अन्नधान्य व शेतमालाच्या वस्तू मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांमध्ये बऱ्याच अंशी कमी होत्या. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये कोरियन युध्दाचे जागतिक अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम झाले. या परिस्थितीमुळे भारतामध्ये व त्याचबरोबर लातूर (उस्मानाबाद) जिल्ह्यामध्ये देखील भाव पातळी पुन्हा वाढू लागली. अन्नधान्याच्या किंमती पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या उत्तरार्धात कमी होऊ लागल्या. परंतु १९५५-५६ मध्ये पुन्हा वाढू लागल्या. भारत सरकारने वाढत्या किंमती व अन्नधान्य समस्या याबाबतीत चौकशी करण्यास्तव १९५५ मध्ये अन्नधान्य व आवश्यक वस्तू अधिनियम काढले. या अधिनियमानुसार आवश्यक वस्तूंचे उत्पादन, वितरण व व्यापार या बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक ते आदेश काढण्यासाठी शासनाला अधिकार देण्यात आले. या उपाययोजनांचा परिणाम होऊन भाव पातळी नियंत्रणाखाली आली.

एचएफ ४१३७—४०

अनुक्रमणिका

इ.स.१९५५ च्या अन्नधान्य व आवश्यक वस्तू अधिनियमानुसार मिळालेल्या अधिकारांमुळे राज्य शासनाला वेळोवेळी भाव पातळीवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले. सदरहू अधिनियमानुसार १९६६ मध्ये राज्य शासनाने महाराष्ट्र अन्नधान्य वाटप (द्वितीय) आदेश काढला. या आदेशामुळे शिधावाटप योजनांतर्गत येणाऱ्या अन्नधान्याचे नियंत्रण करणे शक्य झाले. सन १९६६ मध्ये साखर नियंत्रण आदेश व १९७२ मध्ये महाराष्ट्र शासनाने केरोसिन (कमाल किंमत निश्चिती) आदेश काढला. या आदेशान्वये निश्चित केलेल्या कमाल किंमतीपेक्षा अधिक किंमती आकारण्यास मनाई करण्यात आली.

इ.स.१९७५ मध्ये महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरण विनियम) आदेश काढण्यात आला हा आदेश शिधा वाटप वगळता संपूर्ण राज्यभर लागू करण्यात आला. सन १९७५ मध्ये महाराष्ट्र नियंत्रण कापड (वितरणाचे विनिमयन) आदेश काढण्यात आला. या आदेशानुसार घाऊक विक्रेते तसेच किरकोळ विक्रेते यांच्यामार्फत होणाऱ्या नियंत्रित कापडाच्या विक्रीवर नियंत्रण ठेवण्यात आले. सन १९६५ पासून ज्वारीची विक्री रास्त भाव दुकानातून होवू लागली.

इ. स. १९७०-७१ पासून अन्नधान्याच्या भावामध्ये भरमसाठ वाढ झाली. त्यामुळे अन्नधान्याच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी आणि जनतेला अन्नधान्य रास्त किंमतीत उपलब्ध करून देण्यासाठी १ एप्रिल १९७३ पासून गव्हाचा घाऊक व्यापार शासनाने ताब्यात घेतला. एप्रिल १९७४ मध्ये घोषित केलेल्या अन्नविषयक धोरणानुसार गव्हाची प्रापण किंमत दर क्विंटलला रु.१०५ निश्चित करण्यात आली. गव्हाच्या बाबतीत शिल्लकी साठा असलेल्या राज्यांमध्ये खुल्या बाजारात गव्हाची खरेदी करण्यास खाजगी व्यापाऱ्यांना परवानगी देण्यात आली. त्याचबरोबर लेव्ही गव्हाची किंमत दर क्विंटलला रु.१०५ निश्चित करण्यात आली होती. त्याबाबत शासनाने बरीच नियंत्रणे घालून दिली होती. खुल्या बाजारातील गव्हाची किंमत दर क्विंटलला रु.१०५ पेक्षा अधिक ठेवण्यास प्रतिबंध केलेला होता. तसेच १९६४ पासून जारी करण्यात आलेली "एक राज्य एक विभाग पध्दती" चालू ठेवण्यात आली. या धोरणानुसार सार्वजनिक वाटप पध्दती व त्याचबरोबर खुली व्यापार पध्दती यांचा अवलंब करण्यात आला होता. सन १९७०-७१ ते १९७८-७९ या कालावधीतील निवडक वर्षांमधील जिल्ह्यातील उपभोग्य वस्तूंच्या किरकोळ किंमती बद्दलची माहिती खाली दिली आहे :—

(मूल्य रूपयामध्ये)

वस्तू (१)	परिमाण (२)	१९७०-१९७१ (३)	१९७२-१९७३ (४)	१९७३-१९७४ (५)	१९७४-१९७५ (६)	१९७८-१९७९ (७)
भात	क्विंटल	६४.६६	१३०.८८	८०.००	९७.१८	१०७.६२
गहू	-"-	१००.४०	१३२.१५	२०८.००	२१२.४३	१४४.८८
ज्वारी	-"-	६५.६०	१०३.५५	१४८.०८	१६४.८०	१०६.३६
बाजरी	-"-	६८.८८	११५.४७	१०९.८३	११०.००	९९.२७
नाचणी	-"-	--	१६३.५५	१३१.००	१४६.००	--
मका	-"-	५३.००	९२.७१	१२१.००	१३०.००	८५.००
तूरडाळ	-"-	१३७.८०	१७९.६२	१९६.१७	२०१.४०	३७०.५२
हरभरा	-"-	८६.००	१४९.६८	२०८.६१	२०३.२८	२०३.३४
कापूस	-"-	--	१८०.५६	३८२.००	३८२.००	--
गूळ	क्विंटल	--	१६२.७६	३१५.४०	१६८.४०	११९.२५
भूईमूग	-"-	१५२.५०	२२४.००	२६९.५०	२६१.००	२२९.४१

अनुक्रमणिका

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
मिरची	-"-	--	२३७.००	२९७.८०	--	७००.००
एरंडी	-"-	१३६.२०	२००.८७	१८९.७५	२३८.२५	१८१.८४
जवस	-"-	१५५.७५	१८८.४०	३२२.४५	२६७.३३	२७४.८०
तीळ	-"-	२२६.८२०	२९८.९३	३४३.७१	३४८.४३	३६१.८६

इ.स.१९८२ ते १९९८ या कालावधीतील लातूर जिल्ह्यातील प्रचलित असलेल्या उपभोग्य वस्तूंच्या किरकोळ किंमती बद्दलची माहिती तक्ता क्रमांक १० मध्ये दिली आहे.

उपजीविकेचा आकृतीबंध : जिल्ह्यात २००१ मध्ये असलेल्या विविध व्यवसायातील कामगारांचे एकूण कामगारांशी शेकडा प्रमाण व कामगारांची उपजीविकेच्या साधनांनुसार वर्गवारी तक्ता क्रमांक ११ मध्ये दिली आहे. जिल्ह्यातील २००१ मधील तालुकावार कामगार महिला, पुरूष व त्यांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण तक्ता क्रमांक १२ मध्ये दिले आहे. जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेची स्थूल मानाने कल्पना येण्यासाठी महाराष्ट्रातील कामगारांचे शेकडा प्रमाणही दिलेले आहे.

घर : आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक घटकांबरोबरच राहणीमानावर कुटुंबांना उपलब्ध असलेला निवारा व त्याची बांधणी या घटकांचा फार मोठा प्रभाव पडतो. म्हणून राहणीमानाचा विचार करताना कुटुंबाच्या निवाऱ्याचा विचार करणे आवश्यक आहे. लातूर जिल्ह्यातील घरबांधणी पारंपरिक पध्दतीची आहे. जिल्ह्यात धाब्याचे व शहाबादी फरशीच्या साह्याने बनवलेले छप्पर असलेली घरे आहेत. ही घरे कच्च्या अगर पक्क्या विटा, चुना आणि मातीने बांधलेली आहेत. घरांच्या खिडक्या व दरवाज्यांसाठी सागाचे अथवा कडूनिंबाचे लाकूड वापरीत, क्वचित प्रसंगी यासाठी आंब्याचे लाकूडही वापरीत. घरे उत्तराभिमूक किंवा दक्षिणाभिमूक बांधलेली असत. शहरातील घर बांधणी आधुनिक पध्दतीची तर ग्रामीण भागात आधुनिक व पारंपरिक पध्दतिची असते. सन १९९१ च्या जनगणनेनुसार नागरी व ग्रामीण भागातील बांधलेल्या घरांच्या भिंती व छप्परांच्या बांधणीसाठी वापरलेल्या साधन सामग्रीवर घरांची संख्या तक्ता क्रमांक १३ मध्ये दिलेली आहे.

निवासी घरातील खोल्यांच्या संख्येवरून लोकांच्या राहणीमानाची कल्पना करता येते. खोल्यांच्या संख्येशी परिवाराच्या आकाराची सांगड घालून अभ्यास केल्यास राहणीमानावर स्पष्ट प्रकाश पडतो. तक्ता क्रमांक १४ मध्ये जिल्ह्यातील खोल्यांच्या संख्येनुसार वर्गीकरण दिलेले आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील वीज, शौचालय व पाणी पुरवठ्याच्या सोयीनुसार नागरी व ग्रामीण भागातील घरांची संख्या खाली दिली आहे. जिल्ह्यात घरांची एकूण संख्या ४१८०६७ असून त्यापैकी ९५०८३ घरे (२२.७%) नागरी भागात व ३२२९८४ घरे (७७.३%) ग्रामीण भागात आहेत. एकूण घरांपैकी ११.८% घरांना शौचालये असून, ६५.४% घरांना विजेची सुविधा व ८९.३% घरांना पाणी पुरवठ्याची सोय आहे.

बाब	एकूण घरे		शौचालय असलेली		विजेची सुविधा असलेली		पाणी पुरवठ्याची सोय असलेली	
	नागरी	ग्रामीण	नागरी	ग्रामीण	नागरी	ग्रामीण	नागरी	ग्रामीण
	९५,०८३	३,२२,९८४	४९,२७९	३९,९६९	७१,१५६	२,०२,२३७	७९,१६८	२,९४,११५
एकूण	४१८०६७		४९२४८		२७३३९३		३७३२८३	
एकूण घराशी प्रमाण			११.८%		६५.४%		८९.३%	

वेतन पातळी

शेतमजुरांचे रोजगारांच्या दृष्टिने नैमित्तिक आणि संलग्न असे दोन गटांत वर्गीकरण केले जाते. संलग्न शेतमजूर अथवा बांधिल कामगार हे कोणत्यातरी जमीनदाराशी संलग्न असतात आणि अशा शेतमजुरांना जमीनदारांकडून काही काळ सातत्याने काम मिळते. नैमत्तिक शेतमजुरांना मिळणारे काम अल्पकाळ असते व त्यांना रोजगाराची शाश्वती नसते.

निजामी राजवटीत जिल्ह्यातील वेतनपातळी अतिशय कमी होती. शेतमजूर व घरगुती नोकरांना वार्षिक ३० ते ६५ रुपये वेतन मिळत असे. त्याशिवाय वर्षाला एक कांबळे, चप्पल जोडी व दररोज एक वेळचे जेवण मिळत असे.

जिल्ह्यातील वेतनपातळी ही बदलत्या किंमती निर्देशांकानुसार बदलत असते. पहिल्या महायुध्दाच्या काळात व त्यानंतरच्या वर्षामध्ये वाढत्या महागाईनुसार वेतन पातळी उंचावलेली होती. परंतु १९३० च्या आर्थिक पुर्नप्रस्थापनेच्या काळात वेतन पातळीमध्ये थोड्या प्रमाणात का होईना वाढ झाली. सन १९३९ च्या युध्द काळापासून स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत भाव पातळीमधील वाढता क्रम कायम होता. परंतु श्रमिकांची मजबूत अशी संघटना नसल्यामुळे वेतन पातळीमधील वाढ ही भाव पातळीमधील वाढीपेक्षा फार कमी प्रमाणात होती.

लातूर जिल्ह्याचा महाराष्ट्रात समावेश करण्यात आल्यानंतर शेतमजुरांची स्थिती सुधारण्यासाठी योजण्यात आलेला महत्त्वाचा उपाय म्हणजे १९४८ च्या किमान वेतन कायद्याच्या कक्षेत १९७४ साली केलेल्या शेतमजुरांचा समावेष होय. स्थूलमानाने शेतमजुरांचे पुढील प्रमाणे वर्गीकरण करण्यात येते. शेतात काम करणारे शेतमजूर, सर्वसामान्य मजूर व कुशल काम करणारे कामगार. शेतमजुरांच्या वेतन पातळी वरून शेतमजुरांची जिल्ह्यातील आर्थिक स्थिती स्पष्ट होते. तक्ता क्रमांक १५ मध्ये जिल्ह्यातील कुशल व अकुशल मजुरांचे दैनिक मजुरीचे दर दिले आहेत.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील शेतमजुरांची वेतनपातळी सुधारून त्यांना किमान वेतन मिळावे या हेतूने शासनाने नियुक्त केलेल्या पागे समितीने १९७३ मध्ये राज्यातील शेतमजुरांची रोजगार स्थिती या संबंधिचा अहवाल सादर केला. या समितीने शेतमजुरांची वेतन निश्चिती करण्यासाठी संपूर्ण राज्याची तीन परिमंडळात विभागणी केली. पारदासानी व सुखटणकर समितीने निश्चित केलेल्या दिर्घकाळ टंचाईग्रस्त क्षेत्राच्या बाहेरील परंतु परिमंडळ एक मध्ये समाविष्ट क्षेत्राव्यतिरिक्त क्षेत्राचा अंतर्भाव परिमंडळ क्रमांक दोन मध्ये केला. शेतमजूर हा असंघटित कामगार असून त्याला संरक्षण देणे आवश्यक आहे या हेतूने १९७४ मध्ये शेतमजुरांना १९४८ चा किमान वेतन अधिनियम लागू करण्यात आला. तसेच सालदार, महिनेदार व रोजंदारीवरील शेतमजुरांनाही किमान वेतन ठरवून देण्यात आले. गेल्या काही वर्षात वाढलेल्या महागाईमुळे शासनाने १ नोव्हेंबर १९७८ मध्ये किमान वेतन दर वाढवून दिले होते. त्यामध्ये अकुशल कामगार व सालदार (वार्षिक दर) रुपये २,०००, अकुशल महिनेदार (मासिक दर) १६५ रुपये व अन्य अकुशल शेतमजूर (दैनिक दर) ५ रुपये असा होता. मार्च २००१ पासून महाराष्ट्र शासनाने वेतनाचे दर वाढविले आहेत. दुष्काळी भागात जानेवारी २००१ मध्ये किमान मजुरी ३५ रुपये होती यात वाढ करून मार्चपासून ती ४५ रुपये करण्यात आली. महापालिका क्षेत्र व पाटबंधारे प्रकल्पात येणारे सिंचन क्षेत्र व या दोन प्रकारात समाविष्ट न होणारे क्षेत्रातील किमान वेतनात सरसकटपणे वाढ करण्यात आली असून तेथील मजुरीचे दर अनुक्रमे ५१, ४१ व ४७ रुपये करण्यात आले आहेत.

फेब्रुवारी २००६ पासून राज्य शासनाने राज्यातील रोजगार हमी योजनेत मागेल त्याला वर्षातील ३६५ दिवस रोजगार उपलब्ध करुन देण्याची योजना सुरू केली तसेच केंद्रीय योजनेप्रमाणे राज्यातील मजुरांनाही ४५ रुपये ऐवजी ६५ रुपये मजूरी देण्याची व काम नसेल तेव्हा १५ रुपये बेकारभत्ता देण्याची योजना सुरू केली आहे.

अनुक्रमणिका

लातूर जिल्ह्यातील निरनिराळ्या आर्थिक व रोजगार विषयक प्रकल्पांचा/योजनांचा जिल्ह्यातील सामान्य जनतेच्या राहणीमानावर कसा परिणाम झाला हे अभ्यासणे महत्वाचे आहे. "आर्थिक विकासाची" संकल्पना आता खूप विस्तृत झाली असून, अलिकडेच यु.एन.डी.पी. (United Nations Development Programme) या संस्थेने (i) मानव विकास निर्देशांक (Human Development Index) व (ii) मानव दारिद्र्य निर्देशांक (Human Poverty Index) या संकल्पना विकसित केल्या आहेत. लातूर जिल्ह्याच्या संदर्भात या दोन संकल्पनेचे विश्लेषण पुढे दिले आहे.

लातूर जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक (Human Development Index) : अर्थशास्त्रात एकाद्या प्रदेशाचे/देशाचे सामान्य जनतेचे राहणीमान मोजण्यासाठी त्या प्रदेशातील दरडोई उत्पन्न हा एक प्रमुख निर्देशक (Indicator) समजला जातो. परंतु मागील १०/१५ वर्षात एकाद्या देशातील जनतेचे सर्वांगीण जीवनमान मोजण्यासाठी मानव विकास निर्देशांकाचा उपयोग केला जातो. मानव विकास निर्देशांक ही सकंल्पना विकसित करण्याचे श्रेय पाकिस्तानचे अर्थतज्ञ डॉ. महबुबुल हक व भारतीय अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक विजेते प्रा. अमर्त्य सेन यांना दिले जाते. संयुक्त राष्ट्र संघ विकास कार्यक्रम (United Nations Development Programme) ही संस्था जगातील साधारण १७३ देशांचे मानव विकास निर्देशांक प्रसिध्द करीत असते.

यु.एन.डी.पी. च्या सन १९९७ च्या अहवालात मानव विकासाची संकल्पना पुढील शब्दात मांडली आहे. "मानवी विकास म्हणजे जनतेच्या कल्याणाचा उच्च स्तर साध्य करून, त्यांच्या निवडीच्या प्रक्रिया विस्तारीत करणे होय. हाच मानव विकास संकल्पनेचा गाभा होय. त्यापैकी जनतेला अत्यावश्यक असणाऱ्या निवडी म्हणजे, दीर्घ व निरोगी जीवन, ज्ञानाची उपलब्धता व उत्तम जीवन जगण्यासाठी हवे असणारे उत्पन्न होय."

मानवी विकासाची संकल्पना येथेच संपत नाही, कारण इतर गरजा व निवडीसुध्दा जनतेच्यादृष्टीने महत्वपूर्ण आहेत. त्यात राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याची संकल्पनाही समाविष्ट आहे. त्याशिवाय व्यक्तिला नवनिर्माण व उत्पादक होण्याच्या संधिही उपलब्ध असाव्यात, व त्याला स्वाभिमानाने जगता येऊन त्याच्या मानवी हक्काची (Human Rights) हमी त्यास मिळावयास हवी.

वरील व्याख्येवरून दर डोई उत्पन्नापेक्षा मानव विकास निर्देशांकाची संकल्पना अधिक उपयुक्त, श्रेष्ठ व विस्तृत असल्याचे स्पष्ट होते. कारण त्यात दरडोई उत्पन्नाचा समावेश तर आहेच, याशिवाय शैक्षणिक व आरोग्य विषयक स्थितीचा समावेश आहे.

अलिकडेच केंद्रीय नियोजन मंडळाने भारतातील सर्व राज्यांचे मानव विकास निर्देशांक प्रसिध्द केले आहेत. महाराष्ट्र शासनाने सुद्धा, यु.एन.डी.पी. व केंद्रीय नियोजन मंडळाच्या सहकार्याने महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांचे मानव विकास निर्देशांक प्रसिध्द केले आहेत. त्यासंबंधी संक्षिप्त विश्लेषण करु. प्रत्येक जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक काढताना पुढील निर्देशांकांचा समावेश करण्यात आला.

अ. जिल्ह्याचे दर डोई उत्पन्न (१९९८-९९), स्थीर किंमती १९९३-९४ च्या.

ब. जिल्ह्याचा साक्षरता दर (२/३ भार देऊन).

क. विद्यार्थ्यांची शाळेत जाण्याची सरासरी वर्षे (१/३ भार देऊन).

ड. जिल्ह्याचा दर हजारी अर्भक मृत्यू दर. (सरासरी आयुर्मानाऐवजी).

वरील निकष वापरून लातूर जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक ०.४७ येतो, राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.५८ आहे, याचा अर्थ लातूर जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक राज्य सरासरीच्या बराच खाली

आहे. राज्यातील एकूण ३५ जिल्ह्यात लातूर जिल्ह्याचा क्रम १९ वा आहे. तसेच लातूर जिल्ह्याचे दर डोई उत्पन्न सन १९९८-९९ या वर्षी १३,६७७ रुपये होते. तर त्याच वर्षी राज्य दरडोई उत्पन्न २२,७६३ रुपये होते. राज्यातील ३० जिल्ह्यात लातूर जिल्ह्याचा क्रम १३ वा होता. दोनही निकषावर लातूर जिल्हा राज्य सरासरीच्या बराच खाली असल्याचे दिसते. जिल्ह्याचा आर्थिक विकास म्हणजेच जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकात वाढ करण्याचे धोरण होय. महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यानी मराठवाडा व विदर्भातील जिल्ह्यांचे मानव विकास निर्देशांक राज्य सरासरीच्या खूप खाली असल्यामुळे, सन २००६-२००७ च्या अंदाजपत्रकांत, खास तरतूद करून हे मानव विकास निर्देशांक सुधारण्याचे प्रयत्न केले जातील असे घोषित केले आहे. लातूर जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न मानव विकास निर्देशांक व मानव दारिद्र्य निर्देशांकाबाबत माहिती खालील विवरणात दिली आहे.

लातूर जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न,[११] मानव विकास निर्देशांक व मानव दारिद्र्य निर्देशांक[१२]

क्र.	बाब	
१.	जिल्ह्याचे दर डोई उत्पन्न (रु.) १९९८-९९	१३,६७७
२.	राज्यात क्रमांक (३५ जिल्ह्यांपैकी)	२९ वा
३.	राज्याचे दर डोई उत्पन्न (रु.) १९९८-९९	२२,७६३
४.	जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक (सन २०००)	०.४७
५.	राज्यात क्रमांक (३५ जिल्ह्यांपैकी)	१९ वा
६.	राज्याचा मानव विकास निर्देशांक (सन २०००)	०.५८
७.	जिल्ह्याचा मानव दारिद्र्य निर्देशांक (१९९३-९८)	१७.६६
८.	राज्यात क्रमांक (३० जिल्ह्यांपैकी)	१३ वा
९.	राज्याचा सरासरी मानव दारिद्र्य निर्देशांक	१६.२२

लातूर जिल्ह्याचा मानव दारिद्र्य निर्देशांक : (Human Poverty Index-HPI-I) : अलिकडेच यु.एन.डी.पी[१३] या संस्थेने जगातील विकसित व विकसनशील देशांचे मानव दारिद्र्य निर्देशांक प्रसिध्द केले आहेत. विकसनशील देशासाठी मानव दारिद्र्य निर्देशांक-१ तर विकसित देशासाठी मानव दारिद्र्य निर्देशांक-२, प्रसिध्द केले जातात. विकसनशील देशासाठी मानव दारिद्र्य निर्देशांक तयार करताना पुढील निकष (Indicators) वापरले जातात :—

१. जन्माचे वेळी ४० वर्षे न जगण्याची शक्यता असलेले लोकसंख्येचे प्रमाण.

२. प्रौढ निरक्षरतेचे प्रमाण.

३. शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध नसलेल्या लोकसंख्येचे प्रमाण.

४. वयानुरूप कमी वजन (Under weight) असणाऱ्या मुलांचे प्रमाण.

११. **मानव विकास अहवाल** महाराष्ट्र-२००२, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ११७.

१२. " बीऑड द ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स ", कामदार संगीता व बसाक अशोक, इकॉनिमिक अँड पॉलिटिकल विकली, ऑगस्ट २०, २००५, पृ. ३७५९-३७६५.

१३. **ह्यूमन डेव्हलेपमेंट रिपोर्ट,** २००५, ऑक्सफर्ड युनिव्हिर्सिटी प्रेस, पृ. ३४०-४२.

अनुक्रमणिका

वरील ४ निकष लोकसंख्या निरनिराळ्या क्षेत्रात किती प्रमाणात वंचित (Deprived) आहे हे दर्शविते. निरोगी व दीर्घ आयुष्य, ज्ञान व शिक्षण व उत्तम जीवनमान यापासून किती टक्के लोकसंख्या वंचित आहे याची कल्पना मानव दारिद्र्य निर्देशांकावरून येते. हा निर्देशांक किमान शून्य (म्हणजे वंचितता मुळीच नाही) ते १०० (कमाल वंचितता) या स्केलवर मोजला जातो.

अलिकडे, संगीता कामदार व अशोक बसाक[१४] या संशोधकांनी महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे मानव दारिद्र्य निर्देशांक प्रसिध्द केले आहेत. त्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्याचा मानव दारिद्र्य निर्देशांक १६.२२ असून, मुंबईचा सर्वात कमी (६.४८) तर राज्यात सर्वात तळाशी (३० वा) नांदेड जिल्ह्याचा २३.३९ आहे. लातूर जिल्ह्याचा मानव दारिद्र्य निर्देशांक १७.६६ असून राज्यात १३ वा क्रम आहे.

****

Maharashtra State Gazetteers

[१४] कित्ता, कामदार संगिता व बसाक अशोक.

तक्ता क्रमांक १

मोठे व मध्यम प्रकल्पामुळे भिजणारे क्षेत्र, जून १९९९ अखेर

अ.क्र.	बाब	मोठे प्रकल्प					मध्यम प्रकल्प						
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)
१	प्रकल्पाचे नाव	मांजरा	निम्न तेरणा	धरणी	तिरू	तावरजा	औराद शहाजनी	गिरकचाळ	रायगव्हाण	साकोळ	व्हटी	मसलगा	देवर्जन
२	प्रकल्पाचे स्थान	धनेगाव	माकणी	जोगाळा	याढोणा	शिरूर	औराद शहाजनी	गिरकचाळ	रायगव्हाण	टिपराळ	व्हटी	मसलगा	देवर्जन
३	काम पूर्ण झाल्याचे वर्ष	१९८२	१९९८-९९	१९६६	१९७१	१९८६	१९८२	१९८२	१९८२	१९९७	१९९२	१९९७	१९९७
४	प्रकल्पाचा अंदाजे खर्च (रू. लाख)	३९,४६.३७	१,१६,४३.००	१,०२.३२	१,६१.००	४.६१.७९	९४.००	२,४७.४८	१,५१.००	१४,१६.३०	३.००.००	१,०८७.००	८,०९.८७
५	कालव्याची एकूण लांबी (कि.मी.)	१,६८.००	९१.५०	२५.००	२९.००	२०.००	कालवा नाही	कालवा नाही	९९.५०	२७.५०	९९.१२	३०.४०	२६.९०
६	पूर्ण झालेले काम (कि.मी.)	१,६८.००	९०.००	२५.००	२३.००	२०.००	कालवा नाही	कालवा नाही	९९.५०	२२.५०	९९.१२	१८.००	२६.९०
७	पाणी साठवण कमाल क्षमता (द.ल.घ.मी.)	२,५०.००	१,६०.००	२५.००	२३.३२	२०.५३	३.६७	९.७८	१२.७०	१२.६९	९.५१	१३.५९	१२.४१
८	एकूण लाभक्षेत्र (हेक्टर)	२६,५२६	१९,९५४	३,८३४	३,२८९	४,०४०	१,२७१	३,६७२	२,५१९	२,५३८	२,४१२	२,६०८	२,१७०
९	लाभ क्षेत्रातील लागवडीलायक क्षेत्र (हेक्टर)	२३,६९०	१८,५५६	२,८३४	२,९८०	३,६०३	१,०३८	२,५५०	२,२६७	२,२७५	१,७६०	२,५१८	२,०५३
१०	प्रकल्प पूर्ण झाल्यावर ओलिताखाली येणारे क्षेत्र (हेक्टर)	१८,२२३	१५,५८७	२,८३४	२,३४८	३,६०३	८८३	२,५५०	१,७००	२,०६४	१,७६०	२,०८०	१,८८२

तक्ता क्र. २

पंचवार्षिक योजनानिहाय पाटबंधारे प्रकल्पांची माहिती, जून २००० पर्यंत

कालावधी (१)	मोठे प्रकल्प (२)	मध्यम प्रकल्प (३)	लघु पाटबंधारे (४)	उपसा सिंचन योजना (५)	भिजणारे एकूण क्षेत्र (हे.) (६)
तिसरी योजना (१९६१-६६)	-	-	१. माळेगाव २. देवंगरवाडी	-	१,१५४
तीन वार्षिक योजना १९६६-६७ १९६७-६८ १९६८-६९	-	(१) घरणी	१. चिंचोली (जो.) २. चिंचोली (ता) ३. तुंगी ४. नणंद ५. अपचुंदा ६. कासारबाल कुंदा ७. मुतेकर वाडी	-	७,२४१
चौथी योजना (१९६९-१९७४)	-	(१) तिरू	१. गोंदेगाव २. एकुर्गा ३. पिंपरी ४. अरसनाळ ५. हाडगा ६. गोताळ ७. शेडोळ	१. नदीह-तरगा २. औसद शहाजनी ३. गुजरंगा ४. शिरूर ५. किल्लारी ६. शिवणी ७. मातांगळी ८. कासारखेडा	८,६८३
पाचवी योजना (१९७४-१९७६)	-	-		१. वासनगाव २. चिकुडी ३. कार्ला ४. सोमदुर्ग	५,४८४

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्र. २—क्रमशः

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				५. बलकुंड ६. सारोळा ७. कल्लुर ८. चापोली ९. सुकणी १०. झरी ११. सोनखेड १२. धानोरा १३. देवणी	
दोन वार्षिक योजना १९७८-७९, १९७९-८०	मांजरा	-	१. केदारपूर २. निलंगा	-	१४,२३६
सहावी योजना (१९८०-८५)	-		१. तावरजा २. व्हटी ३. औराद (को.प.बं.) ४. गिरकचाळ	१. निवळी २. माळकोंडजी ३. यानवडा ४. नागरगाव ५. शिलवंतवाडी ६. पांढरवाडी ७. शिवणखेड ८. ढोरसांगवी ९. हावरगा १०. बोथी	१२,७३९
सातवी योजना (१९८०-८५)	-	१. रायगव्हाण	१. केसकरवाडी २. गरसुळी	महापूर	२,०३५

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्र. २—क्रमशः

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			३. भातखेडा		
दोन वार्षिक योजना (१९९०-९२)	निम्न तेरणा	-	१. घोणशी २. गांजुर ३. बाकी ४. येल्लेरी ५. नागराणा ६. मोघा ७. शिवणी को.प.बं.	-	६,३१५
आठवी योजना (१९९२-९७)	-	१. साकोळ २. मसलगा ३. देवर्जन	१. बिगीहाळ को.प.ब २. किल्लारी को.प.बं. ३. मुसणी को.प.बं. ४. महापूर को.प.बं. ५. कासारखेडा को.प.बं. ६. टाकळी को.प.बं. ७. गुंजरगा को.प.बं. ८. तगरखेडा को.प.बं. ९. मदनसुरी को.प.बं. १०. किल्लारी-२ को.प.बं. ११. हलकी को.प.बं.	-	१०,९१९
नववी योजना (१९९७-२०००)	-	-	१. सोनखेड को.प.बं. २. हसाळा को.प.बं. ३. राजेगाव को.प.बं. ४. जंगमवाडी	-	७,४३५

तक्ता क्र. २—क्रमशः

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			५. किनगाव ६. हळद वाढोणा ७. वायगाव ८. घसवाडी ९. थोडगा १०. तेलगाव ११. राक्षावाडी १२. कातपूर १३. बंडूर १४. मोरखड १५. दवसहिप्परगा १६. बोकणी		

आधार.—गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जिल्हावार पुस्तिका, जिल्हा लातूर, जून १९९९.

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक ३

लातूर जिल्ह्यातील सेवायोजन कार्यालयातील नोंदणी झालेल्या उमेदवारांची माहिती

वर्ष	नाव नोंदणी	अधिसूचित रिक्त पदे	नोकरीस लागलेल्या उमेदवारांची संख्या	वर्ष अखेर नोंदणी पटावरील उमेदवार
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९८२	१,०६०	१५	१३	२१,९१९
१९८३	७,९५१	२७१	९९	२२,२१३
१९८४	१०,८७२	४७७	३८८	३३,२७९
१९८५	९,६६०	१४५	१७६	३४,४१४
१९८६	८,९३०	५७३	१६८	४२,९७३
१९८७	१०,०६१	४२३	३९७	४०,३०९
१९८८	११,९२६	५५१	२८२	४५,९१३
१९८९	११,०९०	६०३	३७२	५२,९५४
१९९०	१०,५०९	९५९	२०२	५१,३२९
१९९१	९,९३४	३६०	१२९	५७,९१०
१९९२	११,५०६	५५१	१५१	६१,२२३
१९९३	१३,१४३	५१९	३६२	६१,६१३
१९९४	१७,४९४	४१२	१६२	६८,७०३
१९९५	१९,७३१	४३३	१८२	७९,६२६
१९९६	१४,५१४	५५६	२७९	८३,६०४
१९९७	१३,४२६	२९६	१७१	८५,५३२
१९९८	१३,०१५	३१५	८६	८५,४२४
१९९९	१८,५९९	६३२	५४	७७,८९४
२०००	१७,७७१	३५६	२०३	८३,३७०
२००१	११,९२६	६०१	२६६	८२,७३२
२००२	१४,५२५	५२५	०९५	७६,५३९
२००३	१८,४४१	८५२	१९९	७७,५८४
२००४	१८,२८५	६२१	७३	८२,०६२
२००५	७,०७१	२५८	१३	८३,८०७

आधार.—सेवायोजन कार्यालय, लातूर

Maharashtra State Gazeteers

तक्ता क्रमांक ४

नोंदणी पटलावर शैक्षणिक पात्रतेप्रमाणे उमेदवारांची माहिती

वर्ष (१)	एस.एस.सी. (२)	एच.एस.सी. (३)	पदवीधारक (४)	आयटीआय (५)	पदवीधर (६)	पदव्युत्तर (७)	एस.एस.सी. खालचे (८)
१९८३	१०,३८८	२९८	१४२	४८२	२,८६९	-	८,०३४
१९८४	१६,२५६	४६१	२३१	७४२	३,४४०	-	१२,१४९
१९८५	२०,४२४	४७५	२४६	८९१	२,३७३	-	१०,००५
१९८६	२८,६७२	५२५	३४५	१,१११८	२,६३२	-	९,६८१
१९८७	२७,४८१	४९५	३६०	१,१००	२,६३२	-	७,९५१
१९८८	३१,४०१	६९५	४८१	१,२९२	२,६५०	-	९,३९४
१९८९	३८,४६५	१,००७	५०१	१,१०९	१,१७०	-	९,९०२
१९९०	४०,२८१	१,१५२	५२५	१,३८९	२,५२९	-	९,४५३
१९९१	४२,८८२	१,३९५	४९२	१,३८४	२,६७४	-	९,०८३
१९९२	४५,२३२	१,९६६	५२९	१,६४७	३,०३९	-	८,८१०
१९९३	४६,३१०	१,८८०	५८१	१,९८९	२,६२५	-	८,२२८
१९९४	४८,०८१	२,१७४	५९३	२,०७१	२,९८४	-	६,७६४
१९९५	६६,४६७	३,१२०	४७७	२,५६०	४,२१०	८१	७,०८३
१९९६	६६,५८२	४,७२४	४८५	२,६२६	५,०५८	१०४	४,०२५
१९९७	६६,९८८	५,२२९	४७२	२,७५७	५,७८१	१११	४,१९४
१९९८	६८,६२३	३,२८७	५६२	२,८३३	५,८०८	११७	४,१९४
१९९९	५१,१६२	७,४३५	४७४	२,७३६	५,७२२	३९	२,३२६
२०००	६१,१११	८,९७१	५९०	२,६७२	६,४०४	४५	३,५७७
२००१	५८,९९६	९,९८५	६२८	२,६०७	६,४७०	४५	४,००१
२००२	४३,७५८	१४,३३३	५९८	१,८१०	७,७२३	४८	८,२६९
२००३	४३,२७२	१६,५९९	६५९	१,५१७	७,४८३	४०	७,७१४
२००४	४५,७९२	१९,५८४	५९६	१,२२१	७,८४२	४०	६,९८७
२००५	४७,९२६	१९,९९६	५२१	९८८	७,५९८	३१	६,७४७

आधार.—सेवायोजन कार्यालय, लातूर

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazeteers

तक्ता क्रमांक ५

रोजगार मिळालेल्या उमेदवारांची वर्गनिहाय माहिती

वर्ष (१)	अनुसूचित जाती (२)	अनुसूचित जमाती (३)	विमुक्त जाती भटक्या जमाती (४)	इतर मागावर्गीय (५)	अपंग (६)
१९८२	०६	—	०१	०१	०७
१९८३	४४	०९	०८	२५	१६
१९८४	५६	११	१५	५२	०३
१९८५	११२	१४	३७	१२	०८
१९८६	३०	०७	१५	२१	०१
१९८७	७६	१७	१५	४४	०८
१९८८	१६	०८	०८	३५	०४
१९८९	५१	४४	०६	४५	०२
१९९०	५२	२१	२०	२७	०८
१९९१	१६	५१	०३	०९	०३
१९९२	४०	१३	१०	१५	०७
१९९३	४६	४५	२५	४१	०१
१९९४	४४	२६	१३	१६	१०
१९९५	४१	१८	१८	३३	०४
१९९६	४६	०९	२८	५५	०३
१९९७	२९	२०	३०	२१	०५
१९९८	१९	०५	१०	१४	०२
१९९९	१३	०८	०९	०७	०१
२०००	०९	२०	४५	१७	—
२००१	१५	२५	१५	१३१	०२
२००२	१७	४	१	१०	०२
२००३	३०	३०	१९	४५	०५
२००४	१९	०६	०५	२२	०१

आधार.—सेवायोजन कार्यालय, लातूर

तक्ता क्रमांक ६

व्यवसाय मार्गदर्शन योजनेअंतर्गत झालेले काम

वर्ष	वैयक्तिक मार्गदर्शन केलेले उमेदवार	प्रशिक्षणासाठी पाठविलेले उमेदवार	प्रशिक्षणासाठी निवडलेले उमेदवार	व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य मिळालेले उमेदवार
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९८५	—	१८७	—	२२
१९८६	५९	३२६	१९	३३
१९८७	१०१	३८३	१६	४३
१९८८	१९	४७८	४३	६१
१९८९	११	५५३	४१	१०३
१९९०	६०	४३२	२३	१३५
१९९१	२१	६२३	३३	९७
१९९२	—	४४३	—	९०
१९९३	—	७२४	३६	३२
१९९५	—	२८	०३	१०१
१९९६	०५	६२	०६	१०६
१९९७	—	१,६०४	३५	१९८
१९९८	०९	८८	०२	२००
१९९९	—	२३४	—	३२५
२०००	४९०	५२८	३८	६२१
२००१	३२१	२९०	—	—
२००२	२८५	४०१	४१	—
२००३	१२३	१३५	४९	—
२००४	१६९	१,७८८	—	१,८६५
२००५	३०	—	—	३३३

आधार.—सेवायोजन कार्यालय, लातूर

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazeteers

तक्ता क्रमांक ७

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमाची माहिती

वर्ष	दिलेले लक्ष	रिक्त पदांची संख्या	पाठवणी केलेल्या उमेदवारांची संख्या	निवड झालेल्या प्रशिक्षणार्थिंची संख्या	एकूण खर्च (रू.लाख)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१९८३-८४	७५	९४	७९६	२७	०.०१९
१९८४-८५	७५	२८	२२२	२०	०.०९२
१९८५-८६	७५	६३	४३३	२६	०.०९
१९८६-८७	७५	३०९	१,९६४	६७	०.३६६
१९८७-८८	१००	१३२	४३६	६४	०.३०
१९८८-८९	७५	१४६	४१८	६१	०.२८४
१९८९-९०	७५	१६२	४१०	७६	०.२५
१९९०-९१	७५	१०६	२७६	५०	०.३२
१९९१-९२	७५	१२१	४८८	८६	०.३९
१९९२-९३	९०	१०३	३९०	५१	०.३१६
१९९३-९४	९०	११७	५४८	५३	०.३६
१९९४-९५	९०	११७	५४८	५३	०.३६
१९९५-९६	५०	८७	३९३	३१	०.२६९
१९९६-९७	१००	९८	३९४	३१	०.३०६
१९९७-९८	१००	११८	४५८	३६	०.२९८
१९९८-९९	१००	१०१	७७९	३०	०.३८५
१९९९-२०००	१०	९३	९३	९३	०.४०
२०००-२००१	५	९४	३४	५	०.२७
२००१-२००२	२०	३६	६७	२०	०.२०
२००३-२००४	३५	६०	१६५	३९	०.४३
२००४-२००५	७०	१२५	२२२	७३	०.६०

आधार.—सेवायोजन कार्यालय, लातूर

तक्ता क्रमांक ८

लातूर जिल्ह्यातील एकात्मिक ग्रामीण विकास योजनेचे लाभार्थी

(रुपये लाख)

वर्ष	नवीन लाभार्थी						जुने लाभार्थी					
	अनुसूचित जाती			महिला		इतर			अनुसूचित जाती			महिला		इतर		
	लाभार्थी	दिलेले	अनुदान	लाभार्थी	दिलेले अनुदान	लाभार्थी	दिलेले	अनुदान	लाभार्थी	दिलेले	अनुदान	लाभार्थी	दिलेले अनुदान	लाभार्थी	दिलेले	अनुदान
(१)	(२)		(३)	(४)	(५)	(६)	(७)		(८)	(९)		(१०)	(११)	(१२)		(१३)
१९८२-८३	५९८		४.५२	-	-	२,२५८	२८.२७		-	-		-	-	-	-	
१९८३-८४	१,८९९		९३.०७	१८९	-	४,५५४	४६.४५		-	-		-	-	-	-	
१९८४-८५	१,९०७		१७.९६	४२१	३.५०	४,१४८	४२.९९		-	-		-	-	-	-	
१९८५-८६	७२४		१४.५३	५४०	७.४३	१,८००	३५.७१		२१६	२.७०		४१	०.५२	८१६	१०.४८	
१९८६-८७	८४८		१४.२३	५६०	७.९५	१,९०६	३४.९१		८४७	१०.६२		२६१	३.०८	१,९००	२४.०१	
१९८७-८८	८९०		९३.२९	५४४	८.६८	१,९६०	३४.८९		१,२५८	१५.८३		३९४	४.८७	२,७१०	३५.९४	
१९८८-८९	१,५९४		२६.७५	१,०३३	१५.५२	३,९१०	६९.२२		५१२	६.३८		२१७	२.४४	१,०९६	१३.९८	
१९८९-९०	१,७४०		३१.९४	१,२६४	२०.२३	४,३९३	८३.७९		३८	०.४७		०२७	०.२९	०८७	१.१५	
१९९०-९१	२,०५१		५४.५५	१,४२३	२७.२७	३,६०८	८४.९७		३३	०.६६		०२०	०.३०	०६८	१.११	
१९९१-९२	१,९२७		५१.०८	१,४१३	२९.६८	३,५४०	८३.०९		७३	१.२८		०५७	०.८६	१५०	२.३०	
१९९२-९३	१,७५३		५३.८३	१,५१७	३४.६४	३,६५१	१३.९८		१०१	१.९८		०६९	१.००	२१४	३.४६	
१९९३-९४	२,३४९		८३.३५	२,२१३	५३.३७	५,५७०	१५९.०७		३९७	९.१८		३७४	७.६९	८३९	१५.९३	
१९९४-९५	२,६७५		१०९.६०	२,४६९	७६.७३	३,०१३	८१.२८		५१६	१३.६७		४०१	९.३७	५७५	९.८३	
१९९५-९६	१,२९७		६३.७०	१,४२९	५३.००	२,३५७	८५.५४		९५९	३०.८६		७९९	१७.०६	१,०४०	२४.९५	
१९९६-९७	७४६		३९.५०	८०१	३२.५०	१,८०३	७३.५०		६५४	२१.७२		५११	१४.८२	८७१	२३.३१	
१९९७-९८	४८२		२७.३९	४८५	२२.७२	१,६९२	७६.३८		५६७	१८.८०		४८१	१३.०८	८५८	२३.९१	
१९९८-९९	८८४		६७.३९	१९९	६३.८६	१,६५७	१२५.८३		३२१	१२.९८		०७६	९.२५	५६६	२०.३५	
१९९९-२०००	८८२		८३.४०	१,०२४	८३.३४	१,३८३	१३१.१६		-	-		-	-	-	-	

आधार.—एकात्मिक ग्रामीण विकास कार्यालय, लातूर

अनुक्रमणिका

Maharashtra Gazeteers

तक्ता क्रमांक ९

लातूर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेले काम

वर्ष	कामाचा प्रकार				झालेला एकूण खर्च (रू. लाख)	रोजगार निर्मिती मनुष्य दिवस
	पाटबंधारे संख्या	रस्ते संख्या	मृदसंधारण संख्या	वनीकरण संख्या		
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१९८२-८३	-	-	-	-	२,४४.८१	६१,२०,२५०
१९८५-८६	-	-	-	-	७.५७.७५	६३,१४,५९०
१९८९-९०	९	६६	२६	१४	६,६३.००	२८,३८,४३३
१९९०-९१	-	१०	१९०	-	५,०६.९३	२३,४१,३३३
१९९२-९३	६२	९६	६३	-	२१,७५.२२	८३,६८,९२८
१९९५-९६	९६	१०५	१५०	-	१२,९८.४७	३,२८,४९२
१९९८-९९	-	१०३	-	१९	२१,५६.६५	५५,००,०००
२००३-२००४	११२	६०	१७०५	८५	४३,०६.९६	८९,३८,०००

आधार.—जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा, अर्थ व सांख्यिकी कार्यालय, महाराष्ट्र शासन.
मुंबई, १९८२-८३, १९८५-८६, १९८९-९०, १९९०-९१, १९९२-९३, १९९५-९६, १९९८-९९, २००३-२००४.

Maharashtra State Gazeteers

तक्ता क्रमांक १०

जिल्ह्यातील महत्वाच्या वस्तूंच्या किरकोळ किंमती

(मूल्य रूपयात)

मालाचे वर्णन	परिमाण	१९८२	१९८४	१९८६	१९८८	१९९०	१९९२	१९९४	१९९६	१९९८
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
तांदुळ उत्तम	कि.ग्रॅ.	३.९६	४.९९	५.३७	६.७८	७.००	११.८४	१२.७३	१३.९०	१७.५९
तांदूळ मध्यम	-	३.३४	४.०५	४.३२	५.४६	५.३३	८.३५	८.०१	९.६७	१२.७६
गहू तांबडा	-	२.५२	२.५०	३.२०	३.८५	३.३९	५.९१	५.१९	६.८४	०८.७३
गहू बन्सी	-	३.७१	२.८५	३.४६	३.८६	३.५३	६.८९	६.९८	७.८३	१०.०४
ज्वारी पिवळी	-	१.३९	१.८६	१.६८	२.३९	१.९१	-	-	-	-
ज्वारी पांढरी	-	२.०७	२.३७	२.६३	३.९४	३.१९	६.१८	५.३७	७.५१	११.३३
बाजरी	-	१.८२	२.४७	२.५८	२.५६	२.३७	५.७०	४.७९	६.४७	६.३५
हरभरा डाळ	-	३.३०	४.४३	६.१२	९.९०	१०.५७	१०.२२	१८.१७	१३.१८	१९.५४
तूर डाळ	-	५.७२	७.३७	६.७९	९.७७	१२.६०	१७.३२	१८.१६	२७.२०	३६.७८
गुळ	-	२.४२	४.०१	४.७४	५.८६	५.२५	६.८५	११.४९	८.९९	१२.६७
मांस	-	१५.६०	१९.८३	२३.००	३१.००	३५.८३	४४.०७	५५.५१	७०.४२	८०.९८
मिरची सुकी	-	११.६५	१३.५१	१०.९७	२५.१०	३.९७	५१.४३	२८.३३	२६.८३	५७.०१
बटाटे	-	१.८५	२.२१	३.८३	३.२२	२.६६	५.१६	५.४१	६.७३	१२.९५
तंबाखू	-	११.०८	१५.०४	७.२१	२४.७८	२८.७०	३५.००	३५.००	-	-
धुण्याचा साबण ५०१ बार (एक नग)	एक नग	४.५५	६.३४	६.५३	८.६९	८.५०	१०.००	१०.००	१२.००	११.४२

आधार.—जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा, अर्थ व सांख्यिकी कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८२, १९८४, १९८६, १९८८, १९९०, १९९२, १९९४, १९९६, १९९८.

अनुक्रमणिका

Maharashtra Gazeteers

तक्ता क्रमांक ११

२००१ मधील विविध व्यवसायातील मुख्य काम करणारे व त्यांचे एकूण कामगारांशी शेकडा प्रमाण

बाब	महाराष्ट्र	जिल्हा	शेकडा प्रमाण	
			महाराष्ट्र	जिल्हा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
(१) मुख्य काम करणारे—	३,४७,४८,०५३	७,१२,८४९	८४.३९	८४.८१
१. शेतकरी	१,०१,८१,७०८	२,६१,९०४	२४.७३	३१.१६
२. शेतमजूर	७६,४१,२१९	२,४२,०४१	१८.५६	२८.८०
३. घरगुती उद्योगधंदे	८,१०,०८६	११,४७२	१.९७	१.३७
४. इतर	१,६१,१५,०४०	१,९७,४३२	३९.१४	२३.४९
(२) अल्पकालीन काम करणारे—	६४,२५,२९८	१,२७,६६९	१५.६१	१५.१९
१. शेतकरी	१६,३१,५६७	३८,०५५	३.९६	४.५३
२. शेतमजूर	३१,७४,०४३	७२,४७२	७.७१	८.६२
३. घरगुती उद्योगधंदे	२,७९,२३२	३,५८४	०.६८	०.४३
४. इतर	१३,४०,४५६	१३,५५८	३.२६	१.६१

आधार.—भारतीय जनगणना २००१, प्राथमिक जनगणना सार, सीरीज २८, खंड १

Maharashtra State Gazeteers

तक्ता क्रमांक १२

२००१ मधील एकूण कामगार पुरुष, महिला कामगार व त्यांचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण

राज्य/जिल्हा/तालुका	एकूण कामगार	पुरुष	महिला	शेकडा प्रमाण		
				एकूण कामगार	पुरुष	महिला
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
महाराष्ट्र राज्य	४,११,७३,३५१	२,६८,५२,०९५	१,४३,२१,२५६	४२.५०	२७.७२	१४.७८
लातूर जिल्हा	८,४०,५१८	५,२५,४५७	३,१५,०६१	४०.४०	२५.२६	१५.१४
लातूर	१,८९,७९३	१,३४,६६९	५५,१२४	९.१२	६.४७	२.६५
रेणापूर	५८,५८०	३३,२५८	२५,३२२	२.८१	१.६०	१.२१
अहमदपूर	८६,२९४	४९,९६३	३६,३३१	४.१५	२.४०	१.७५
जळकोट	३१,६६२	१६,८६८	१४,७९४	१.५२	०.८१	०.७१
चाकूर	६८,९८२	४०,४००	२८,५८२	३.३१	१.९४	१.३७
शिरूर-अनंतपाळ	३४,१५७	१९,७४८	१४,४०९	१.६४	०.९५	०.६९
औसा	१,२०,३६४	७३,१०२	४७,२६२	५.७८	३.५१	२.२७
निलंगा	१,१८,५२६	७३,४८८	४५,०३८	५.६९	३.५३	२.१६
देवणी	३९,२००	२२,५७१	१६,६२९	१.८८	१.०८	०.८०
उदगीर	९२,९६०	६१,३९०	३१,५७०	४.४६	२.९५	१.५१

आधार.—भारतीय जनगणना २००१, प्राथमिक जनगणना सार, सीरीज २८, खंड १

अनुक्रमणिका

Maharashtra State Gazeteers

तक्ता क्रमांक १३

भिंती व छप्परे यासाठी वापरलेल्या साधन सामग्रीनुसार घरांचे वर्गीकरण, २००१

तपशील (१)	ग्रामीण (२)	नागरी (३)	एकूण (४)
एकूण जनगणना घरे	३,३९,८४४	१,००,२१२	४,४०,०५६
छप्परांसाठी वापरलेली सामग्री			
गवत, पाने, वेळू, माती कच्च्या विटा व बांबू	३८,५२९	१,८६९	४०,३९८
प्लास्टिक किंवा पॉलिथिन	२,४४२	५८६	३,०२८
कौले	४,०४१	१,१५१	५,१९२
माती	१,३१८	१६९	१,४८७
जस्ताचे, धातूचे व अस्बेस्टॉस पत्रे	२,३५,९२१	४८,५५८	२,८४,७७९
विटा व चूना	२,४००	४८९	२,८८९
दगड	२,२९८	४३७	२,७२७
प्रचलित सिमेंट कॉंक्रिट	४४,११३	४४,५७२	८८,६८५
वर उल्लेखिलेल्या व्यतिरिक्त वापरलेली इतर सामग्री	८,७८२	२,०८१	१०,८६३
भिंतीची सामग्री			
गवत, पाने, वेळू, माती व बांबू	३०,४६३	१,९१९	३२,३८२
प्लास्टिक, पॉलिथिन	१,२०६	४२०	१,६२६
माती व कच्च्या विटा	४६,८०८	१७,३८२	६४,१९०
लाकूड	६,१२७	१,७१४	७,८४१
गॅल्वानाइजड लोखंडी किंवा इतर पत्रे	६,२७६	३,५३९	९,८१५
पक्क्या विटा	१,०९,०२१	६०,७०२	१,६९,७२३
दगड	१,२८,७९२	१०,९३७	१,३९,७२९
सिमेंट कॉंक्रिट	१०,०७९	३,४२४	१३,५०३
वर उल्लेखलेल्या व्यतिरिक्त वापरलेली सामग्री	१,०७२	१७५	१,२४७

आधार.—सेन्सस ऑफ इंडिया, टेबल्स ऑन हाऊसेस, हाऊसहोल्ड ॲमिनिटीज ॲंड ॲसेस्ट, सिरीज-२८, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र, खंड-१, २००१, पृ.१४५ व १५३.

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक १४

नागरी, ग्रामीण क्षेत्रातील घरांमधील खोल्यांचे संख्येनुसार वर्गीकरण, २००१

एकूण ग्रामीण नागरी (१)	घरातील सदस्य संख्या (२)	कुटुंबांची संख्या (३)	वेगळी खोली नसलेले (४)	एक खोली असलेले (५)	दोन खोल्या असलेले (६)	तीन खोल्या असलेले (७)	चार खोल्या असलेले (८)	पाच खोल्या असलेले (९)	सहा व त्यावरील खोल्या असलेले (१०)
एकूण	१	८,९६७	६६७	५,९५८	१,६४१	४४०	१४४	४४	७३
	२	२६,३२०	५८३	१६,३४६	६,९३५	१,५००	५६६	१४०	२५०
	३	३२,०३०	५४६	१७,४३८	९,९७३	२,५१३	९३१	२८४	३०५
	४	६३,०३०	८४६	२९,१४१	२२,४०४	६,३४८	२,८०५	७६७	७१
	५	८०,७०२	९९०	३५,१७३	२९,५८७	८,८९६	३,८७४	१,१२५	१,०५७
	६-८	१,२०,६९५	१,३६५	४३,८५४	४६,२६२	१६,४५६	८,०८३	२,२९८	२,३७७
	९ व अधिक	४१,५३९	३११	८,१८२	१३,३३३	८,२८१	५,९६१	२,४०३	३,०६८
ग्रामीण	१	७,२३२	५०४	४,८२४	१,३९१	३५२	९६	२३	४२
	२	२१,२९८	४६१	१३,६४५	५,५३५	१,१०३	३३३	७०	१५१
	३	२५,१४५	४१५	१४,३५७	७,८३५	१,७२३	५३४	१०४	१७७
	४	४८,९९८	६५८	२४,२८३	१७,६९२	४,१७४	१,५५२	२८२	३५७
	५	६४,२७४	७८५	२९,९१४	२३,९५४	६,२९९	२,३३३	४७४	५१५
	६-८	९६,५१२	१,१२५	३७,३२६	३७,९४८	१२,३७९	५,२९९	१,२९०	१,१८९
	९ व अधिक	३०,६५६	२४१	६,७१६	१०,६२४	६,०४८	४,०४७	१,४०१	१,५७९
नागरी	१	१,७३५	१६३	१,१३४	२५०	८८	४८	२१	३१
	२	५,०२२	१२२	२,७०१	१,४००	३९७	२३३	७०	९९
	३	६,८८५	१३१	३,०८१	२,१३८	८३०	३९७	१८०	१२८
	४	१४,०३२	१८८	४,८५८	४,७१२	२,१७४	१,२५३	४८५	३६२
	५	१६,४२८	२०५	५,२५९	५,६३३	२,५९७	१,५४१	६५१	५४२
	६-८	२४,१३८	२४०	६,५२८	८,७४८	४,०७७	२,७८४	१,०८८	१,१८८
	९ व अधिक	१०,८८३	७०	१,४६६	२,७०९	२,२३३	१,९१४	१,००२	१,४८९

आधार.—सेन्सस ऑफ इंडिया, टेबल्स ऑन हाऊसेस, हाऊसहोल्ड ॲमिनिटीज ॲंड ॲसेस्ट, सिरीज-२८, खंड-१, २००१, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र, पृ. ३०३.

अनुक्रमणिका

Maharashtra Academy of Competeteers

तक्ता क्रमांक १५

कुशल व **अकुशल** कामगारांच्या दैनिक **मजुरीचे** दर

(मजुरी रुपयात)

वर्ष	कुशल कामगार			अकुशल कामगार			इतर शेतमजूर		कष्टकरी
	सुतार	लोहार	चांभार	पुरूष	स्त्री	मुल	पुरूष	स्त्री	
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१९८२-८३	२९.१०	२९.१०	३३.७०	१४.००	७.९०	६.४२	११.६६	७.५३	१९.५७
१९८३-८४	३०.१०	२९.१०	३६.१२	१५.१२	८.३७	६.६८	१३.९५	८.०५	१९.८८
१९८४-८५	३०.००	२८.००	३४.३३	१५.००	१०.००	७.००	१५.००	९.४०	१५.००
१९८५-८६	३१.१६	३०.१७	३७.३३	१५.९२	१०.००	७.४०	१५.८३	१२.००	१५.००
१९८६-८७	३३.००	३२.९२	३८.९२	१७.०३	११.००	७.९२	१७.७८	११.००	१५.३२
१९८७-८८	३६.००	३५.९२	४०.९२	२०.०३	११.७०	८.४८	१९.७८	११.७३	१६.००
१९८८-८९	३९.००	३९.००	४४.००	२२.३३	१२.६८	८.९०	२१.०८	१०.५०	२१.०८
१९८९-९०	६३.००	५९.३३	६४.६७	४३.९२	२९.७३	२१.६३	४०.००	२८.०७	३१.६७
१९९०-९१	६२.७५	५७.१७	६०.७५	३७.२५	२८.२५	१८.०८	३७.०८	२६.३३	२९.६७
१९९१-९२	४८.०८	४८.००	५३.०८	२१.९२	१३.५०	१०.००	२२.०८	१३.००	१८.६७
१९९२-९३	४१.०८	३९.६७	४१.७५	२१.१७	१४.५०	११.५८	२१.६७	१४.२५	२३.४२
१९९३-९४	४०.३५	३८.४०	३९.९२	२३.८९	११.५८	१२.३६	२४.१०	११.१०	३०.०८
१९९४-९५	४३.६९	३६.०८	४३.५०	३०.५०	२२.८६	१८.०४	३०.३५	२१.७४	३८.३३
१९९५-९६	५४.३१	५०.६९	५५.२१	५१.१३	२३.३३	१९.४३	४८.१३	२३.७५	६२.१५
१९९६-९७	४२.६९	४१.५७	४२.३५	३०.३१	२०.७९	२०.००	२९.९२	१८.६९	२४.२५
१९९८-९९	१०५.४०	९९.२६	९६.१०	५७.५७	३३.२४	२०.०३	५१.९३	३५.१४	४०.९४

आधार.—सिझन व क्रॉप रिपोर्ट, कृषि आयुक्तालय, पुणे, महाराष्ट्र स्टेट, १९८२-८३ ते १९९८-९९.

Maharashtra Agro Marketeers

प्रकरण ९ : प्रशासन

- प्रास्ताविक
- प्राचीन प्रशासन विभाग
- मध्ययुगीन प्रशासन
- स्वातंत्र्योत्तर काळातील प्रशासन
- लोककल्याणकारी योजना
- जमीन महसूल
- भूमि अभिलेख विभाग
- पोलीस
- न्यायलये
- स्थानिक स्वराज्य संस्था
- पंचायत राज
- जिल्हा परिषद
- पंचायत समिती
- ग्रामपंचायती
- जलस्वराज्य
- नगरपालिका
- तक्ते
- परिशिष्ट

प्रकरण ९

प्रशासन

प्रास्ताविक : लातूर जिल्ह्यास प्राचीन काळापासून ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. या जिल्ह्यातील भूप्रदेशाचे जे पुरातत्वीय सर्वेक्षण झाले आहे, त्या आधारे व शेजारील जिल्ह्यांतील पुरातत्वीय माहितीच्या आधारे या जिल्ह्याच्या इतिहासाचा* व त्या अनुषंगाने विविध राजवटीतील प्रशासनाचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.-

ऐतिहासिक काळात लातूर परिसरात मानवी संस्कृतीच्या सर्व क्षेत्रात प्रगती होत गेली हे उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर येथील उत्खनित अवशेषांवरून स्पष्ट होते. इ. स. पूर्व ६ व्या शतकापासून भारतीय इतिहासाचा प्राचीन ऐतिहासिक कालखंड सुरू होतो. या कालखंडात भारताच्या विविध भागात १६ महाजनपदे असल्याची माहिती "अंगुत्तरनिकाय" आणि "सुत्तनिपात" या प्राचीन बौध्दधर्मीय ग्रंथांवरून मिळते. यापैकी 'अश्मक' आणि 'मूलक' ही दोन जनपदे दक्षिणेत गोदावरीच्या खोऱ्यात होती. मांजरा नदीकिनारी अश्मकाची बोधन राजधानी वसलेली होती.[१] लातूरही याच नदीच्या खोऱ्यात वसलेले असल्याने या जिल्ह्याचा समावेश या अश्मक मध्ये होत असावा. पुढील काळात अश्मकच्या दक्षिणेकडील प्रदेश "कुंतल" या नावाने ओळखला जाऊ लागला. त्यात अर्थातच लातूर जिल्ह्याचा समावेश होता.

मौर्य काळात संपूर्ण दक्षिणपथाचा समावेश असलेल्या एका प्रशासन विभागाचे मुख्यालय सुवर्णगिरीस होते. अलिकडील संशोधनावरून कर्नाटकाच्या गुलबर्गा जिल्ह्यातील सन्नती म्हणजेच सुवर्णगिरी[२] असे सिध्द झालेले हे स्थळ लातूरपासून जवळच असल्याने लातूर परिसराचा सन्नतीशी संपर्क असावा असे वाटते.

लातूर जिल्हा महाराष्ट्र, कनार्टक आणि आंध्रप्रदेश या तीन राज्यांच्या सरहद्दीवर असल्याने सातवाहनांच्या अस्तानंतर या प्रदेशात ज्या ज्या राजवटी झाल्या, त्यापैकी निदान काहींचा अंमल लातूर प्रदेशावर असावा असे वाटते. बदामीच्या चालुक्यांच्या कर्नूल आणि दायंदिने ताम्रपटातील स्थलनामांच्या पुनर्निश्चितीवरून लातूर आणि राष्ट्रकूट राजवंशाचा संबंध इ. स. च्या सातव्या शतकापर्यंत मागे नेला जाऊ शकतो. या दोन्ही ताम्रपटांव्दारे दान दिलेली गावे 'नलवाडी विषय' या प्रशासन विभागात समाविष्ट होती. या विषयाची निश्चिती लातूरपासून जवळच असलेल्या नळदुर्ग (जि. उस्मानाबाद) या प्राचीन स्थळाशी केली जाऊ शकते. बदामीच्या चालुक्यांच्या अगोदर व नंतर दक्षिणेत सत्तेवर आलेल्या राष्ट्रकुटांचे लातूर हे वसतिस्थान असल्याचा निर्णायक पुरावा प्राप्त होतो. त्यांच्या आणि त्यानंतरच्या कल्याणचे चालुक्य आणि देवगिरीच्या यादवांच्या राजवटीत येथील राजकीय आणि सांस्कृतिक प्रगतीस गती मिळाली.

---

* जिल्ह्याचा सविस्तर इतिहास प्रकरण क्र. २ मध्ये देण्यात आलेला आहे.

१. याजदानी, गुलाम, (संपा.), **अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन,** ऑक्सफोर्ड, १९६०, पृ. २६.

२. सर्मा, आय. के. ॲण्ड जे. वरप्रसादराव, "अर्ली ब्राह्मी इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम सन्नती", **जर्नल ऑफ दि एपिग्राफीकल सोसायटी ऑफ इंडिया,** खंड २३, पृ. ७९-८४.

राष्ट्रकुटांच्या काळात शैक्षणिक कार्यासाठी विद्वान ब्राहमणांना अग्राहाराच्या रुपात ग्रामदाने दिली जात. या जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील "नवकुंड झरी" हा असा अग्राहार असल्याचे राष्ट्रकूट राजा गोविंद तृतीयच्या झरिका ताम्रपटावरुन कळते. चालुक्य काळात सैनिकी किंवा प्रशासकीय सेवेचा मोबदला म्हणून अधिकाऱ्यांना गावे इनाम दिली जात.

इ. स. १२ व्या शतकाच्या अखेरीस यादवांनी चालुक्यांची राजधानी कल्याणपूर जिंकल्यामुळे लातूर परिसर यादव साम्राज्याचा भाग बनला. यादव नरेश दुसरा सिंघण याने आपला सेनापती खोलेश्वर याच्याकडे लातूर प्रदेशाचे प्रशासन सुपूर्द केले. त्याने या प्रदेशात बांधलेल्या मंदिरांची, वसविलेल्या अग्राहारांची व दिलेल्या भूमि व ग्रामदानांची अंबे शिलालेखात सविस्तर नोंद आहे.[३]

कान्हरदेव यादवाच्या राज्यकाळात लातूर हे कंधार, उदगीर आणि उमरगा या देशविभागांचा समावेश असलेले मण्डल विभागाचे मुख्यालय होते. इ. स. १३१८ मध्ये देवगिरीसह दक्षिणेवर दिल्लीच्या खिलजी सुलतानांची सत्ता प्रस्थापित झाली व दख्खनचा तत्कालिन भाग असलेला सध्याचा लातूर जिल्हाही त्या सत्तेचा भाग बनला. नंतरच्या कालावधीमध्ये या जिल्ह्यावर बहमणी, इमादशाही व निजामशाही इत्यादी राजघराण्यांचे अधिपत्य होते. पुढे इ. स. १६३६ मध्ये निजामशाहीचा शेवट होऊन या जिल्ह्याचा समावेश मुघल साम्राज्यात झाला. औरंगजेबाच्या मृत्यूसमयी या साम्राज्यातील व-हाड प्रांताचा गाझीउद्दीन फिरोजजंग हा राज्यपाल होता. पुढे दिलीच्या मुघल बादशहाने असफजहाँ या सेनापतीला त्याने मुघल साम्राज्यासाठी बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल इ. स. १७१३ मध्ये दख्खनचा सुभेदार नेमले व वंशपरंपरेने "निजाम-उल-मुल्क" हा किताब बहाल केला. अशाप्रकारे हैद्राबादचे निजामशाही घराणे उदयास आले. इ. स. १८५३ मध्ये निजामाने ब्रिटिशांशी केलेल्या तहान्वये व-हाडचा बराच मोठा भाग आणि सध्याच्या लातूर जिल्ह्याच्या काही भागाचा समावेश असलेला तत्कालिन उस्मानाबाद व रायचूर-दोआब हे जिल्हे ब्रिटिशांकडे सुपूर्द करण्यात आले.[४] या तहात जुलै १८६० मध्ये ब्रिटिश सरकारने सुधारणा करून रायचूर व उस्मानाबाद हे जिल्हे पुन्हा निजामाकडे सुपूर्द केले.[५] यावेळी उस्मानाबादचे मुख्यालय नळदुर्ग येथे होते व त्यात वाशी, औसा, कळंब, तुळजापूर, नळदुर्ग व धाराशिव हे तालुके समाविष्ट होते. यापैकी औसा तालुक्यात लातूरचा समावेश होता. इ.स.१८६७ मध्ये निजामाचा पंतप्रधान सर सालारजंग याने हैद्राबाद राज्यातील जिल्ह्यांची पुनर्रचना केली होती. त्यानंतर १९०४ मध्ये उस्मानाबाद जिल्हा अस्तित्वात येऊन लातूर हे तालुका मुख्यालय बनले. यावेळी उस्मानाबाद जिल्ह्यात दोन उपविभाग, सात तालुके व एक महाल होता. त्यापैकी उदगीर उपविभागात उदगीर, अहमदपूर आणि निलंगा हे तत्कालिन बिदर जिल्ह्यातील तालुके समाविष्ट होते. हा उपविभाग १९५६ मध्ये मुंबई राज्याच्या निर्मितीनंतर उस्मानाबाद जिल्ह्यात हस्तांतरित करण्यात आला. इ.स. १९४८ मध्ये निजामाची सत्ता संपुष्टात आल्यानंतर

३. खरे, ग. ह., **दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने,** खंड १, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३०, पृ ५५.

४. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ४५३.

५. गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट,** १९७२, पृ. ६०७.

इ. स. १९५० मध्ये सर्व तालुक्यांची पुनर्रचना करण्यात आली. त्यानुसार बिदर जिल्ह्यातील अहमदपूर, निलंगा व उदगीर हे तालुके उस्मानाबाद जिल्ह्यास जोडले गेले. १९६१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्याचे लातूर, उस्मानाबाद व उदगीर असे तीन उपप्रशासकीय विभाग होते. त्यापैकी लातूर उपविभागात लातूर, औसा, कलाम (कळंब) हे तालुके व भूम हा महाल होता. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून १६ ऑगस्ट १९८२ रोजी औसा, उदगीर, अहमदपूर, निलंगा व लातूर या तालुक्यांचा मिळून लातूर जिल्हा निर्माण केला. पुढे इ.स.१९९२ मध्ये रेणापूर व चाकूर आणि १९९९ मध्ये शिरुर-अनंतपाळ, देवणी व जळकोट या नवीन तालुक्यांचा त्यात समावेश करण्यात आला. अशा तऱ्हेने सध्या जिल्ह्यात एकूण दहा तालुके अस्तित्वात आहेत.

प्राचीन प्रशासन विभाग

बदामीच्या चालुक्यकालीन कोरीव लेखात लातूर जिल्ह्याशी संबंधित असलेल्या तीन प्रशासन विभागांचे उल्लेख आढळतात. ते म्हणजे 'नलवाडी विषय', 'चल्लिकीदेश' व 'उच्छिव चत्त्वारिंशत'. यापैकी नलवाडी विषयात लातूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागाचा समावेश होता. उच्छिव चत्त्वारिंशत हा त्याच्या अंतर्गत असलेला उपविभाग असावा. यापैकी नलवाडीचे मुख्यालय नळदुर्ग येथे, तर उच्छिव चे औसा येथे होते. लातूर जिल्ह्याच्या पूर्वेकडील भागाचा समावेश चल्लिकी किंवा चलिक्य देशात होता. त्याचे मुख्यालय बहुधा बिदर जिल्ह्यातील मोरखण्डी येथे असावे. विजयादित्याच्या बोरगाव ताम्रपटानुसार बदामीच्या चालुक्य काळात औसा हे चाळीस गावांचा समावेश असलेल्या छोटया प्रशासन विभागाचे मुख्यालय होते.

राष्ट्रकूट काळात ' विषय ' या मोठया आकाराच्या प्रशासन विभागाखालोखाल ' भुक्ती ' हा विभाग असे. भुक्तीचा उपविभाग १२ गावांचा समावेश असलेला छोटा संख्यादर्शक विभाग असे. राष्ट्रकूट काळात नलवाडी विषयाची जागा 'मुरुम्ब' विषयाने घेतली. याचे मुख्यालय उस्मानाबाद जिल्ह्याच्या उमरगा तालुक्यातील मुरुम येथे असल्याचा व या प्रशासन विभागात लातूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागाचा समावेश असल्याचा संकेत राष्ट्रकूट राजा गोविंद तिसरा याच्या लोहारा ताम्रपटावरुन मिळतो. याच्याच झरिका ताम्रपटावरून लातूर जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागाचा समावेश 'पोना' विषयात असल्याची व मुख्यालय होनाळी (ता. अहमदपूर) किंवा खुद्द अहमदपूर येथे असल्याची माहिती मिळते. राष्ट्रकूट काळातील प्रशासन व्यवस्थेत औसाचा समावेश मुरुम्ब विषयात होता.

कल्याणच्या चालुक्य राजवटीत छोटया व मोठया संख्यादर्शक प्रशासन विभागांची संख्या वाढत गेली. मुरुम येथील १० व्या शतकातील एका कोरीव लेखात 'चालुंके' नामक भागाचे वर्णन आहे. बदामीच्या चालुक्य काळातील 'चलिक्य' किंवा 'चल्लिकी' देशनामाचा तो या काळातील अवशिष्ट भाग आहे हे निश्चितच: परंतु प्रशासन हा विभाग-निदर्शक असण्याऐवजी तो प्रदेशवाचक उल्लेख असावा असे वाटते. कारण मुरुम येथील कल्याणच्या चालुक्यकालीन इतर कोरीव लेखात 'आळंदे १०००' आणि 'गज्जे ७००' अशा मोठया संख्येने दर्शविलेल्या प्रशासन विभागांची नोंद आहे. त्यापैकी 'आळंदे' चे मुख्यालय गुलबर्गा जिल्ह्यातील (कर्नाटक) आळंद हे होते व त्यात लातूर जिल्ह्याच्या आग्नेय भागाचा समावेश

होता, हे समकालीन कोरीव लेखांवरुन सिध्द होते. अशा मोठया विभागाचे विभाजन अनेक छोटया विभागांत करण्यात येई व त्याचा उल्लेख त्या विभागाच्या मुख्यालयाच्या नावाशी त्यात समाविष्ट असलेल्या गावांची संख्या जोडून केला जात असे. मुक्तरम्बाड (कानडी भाषेतील ३६ ही संख्या निदर्शक) हा 'आळंदे १०००' चा अशा प्रकारचा उपविभाग होता व त्यात निलंगा तालुक्यातील मुत्तलगावच्या भोवतालंच्या ३६ गावांचा समावेश होता. लातूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागाचा समावेश 'गज्जे ७००' या प्रशासन विभागात होत असे. तुळजापूरमधील 'गजेवाडी' हे त्याचे मुख्यालय होते. मोठया प्रशासन विभागाचे मुख्यालय बहुधा त्या विभागाच्या शासकाच्या वास्तव्य स्थानावरून निश्चित केले जात असे.

यादवांच्या प्रशासन व्यवस्थेत मण्डल, देश आणि खंपण नामक तीन प्रमुख प्रशासन विभाग होते. औसा आणि उदगीर ही देशविभागाची मुख्यालये असल्याची माहिती खोलेश्वराच्या आंबे शिलालेखावरून मिळते. यावरून सिंघणाच्या काळात जिल्ह्याचा पूर्व भाग उदगीर देशात, तर पश्चिम भाग औसा देशात समाविष्ट होता हे सिध्द होते. लातूर जिल्ह्याच्या उत्तर भागातील गावे 'खंदार (कंधार) देशविभागात' समाविष्ट असल्याचे व तत्कालिन प्रशासक गोपाल राठोड याचे वास्तव्य लातूर येथे असल्यामुळे लातूर हे मण्डल विभागाचे मुख्य ठिकाण बनले होते हे कान्हरदेवाच्या कान्हेगाव शिलालेखावरून स्पष्ट होते. यादव काळात औसा व उदगीर ही 'देश' या प्रशासन विभागाची मुख्य केंद्रे होती, तर लातूर हे देशविभागांचा समावेश असलेल्या मण्डल विभागाचे केंद्र असावे. यादव राजांनी आपल्या कारकिर्दीत बऱ्याच प्रशासकीय सुधारणा केल्या. विशेषतः त्यांच्या पदरी असलेल्या हेमाद्रि तथा हेमाडपंत या वास्तुकला व काव्यशास्त्रप्रविण मंत्र्याने बऱ्याच प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या. यादवांनंतर या प्रदेशाची सत्ता अनुक्रमे खिलजी, तुघलक, बहमनी या राजवंशांकडे गेली असली तरी प्रशासकीय व्यवस्थेत फारसा बदल झाला नव्हता.

मध्ययुगीन प्रशासन

प्राचीन भागात तत्कालिन राज्यकर्त्यांनी आपापल्या राज्यात ग्रामशासन (Village Administration) पध्दतीचा अवलंब केला होता. मुस्लिम राज्यकर्त्यांनीही भारतात पाय रोवल्यानंतर बहुतांशाने याच प्रशासन पध्दती पुढे चालू ठेवल्या. त्यांच्या राज्यपध्दतीवरही हिंदू राज्यपध्दतीचे ठसे उमटलेले दिसतात. मुघल साम्राज्य बंगाल, औंध, अलाहाबाद आणि दख्खन अशा सुभा नामक मोठमोठया प्रांतांमध्ये विभागलेले होते. प्रत्येक सुभा काही जिल्ह्यांमध्ये विभागलेला असे. त्यास 'सिरकार' (सरकार) म्हणत. त्याच्या प्रत्येक उपविभागास 'पिरगणा' किंवा 'मिहाल' असे नाव होते. तत्कालिन परगणे अथवा महाल हे सध्याच्या तालुक्यांच्या आकाराचे होते.[६]

मुघल काळात नांदेड-बिदर सुभा होता. त्यास पूर्वी सुभे तेलंगण किंवा सुभे नांदेड असे म्हणत. नंतर यास सुभे मुहंमदाबाद बिदर असे म्हणू लागले. या सुभ्यात नांदेड, औसा व उदगीर हे मराठी भाषिक प्रदेश होते.[७]

---

६. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४५४.

७. पगडी, सेतुमाधवराव, (अनु.), **मोगल दरबारची बातमीपत्रे,** म.रा. सा.सं.मंडळ, मुंबई, १९७८, प्रस्तावना, पृ. ५.

हैद्राबाद संस्थान किंवा राज्यही मुघल साम्राज्याचा एक सुभा होता. याच सुभ्यात सध्याचा लातूर जिल्हा अंतर्भूत होता. मुघलांनी रूढ केलेली महसूल पध्दतीच हैद्राबाद राज्यात स्वीकारण्यात आली होती. इ. स. १७४८-४९ या संघर्षमय काळात मराठे, फ्रेंच, इंग्रज आणि म्हैसूरचे राज्यकर्ते यांच्या स्वाऱ्यांमुळे हैद्राबाद राज्याचा बराचसा मुलूख त्यांच्या अधिपत्याखाली जाऊन पूर्वीच्या सहा सुभ्यांपैकी फक्त पाच सुभे व काही सिरकार (सरकार) हैद्राबाद राज्यात उरले होते, परंतु हे सुभेही दीर्घकाळपर्यंत राहिले नाहीत.

हैद्राबाद संस्थानचा कारभार मुख्यत्त्वे तेथील मुख्य प्रधानाने पहावा अशी पूर्वीची वहिवाट होती. एखादे विशेष प्रकरण असल्यासच ते आपल्याकडे पाठविण्याचे निजामाचे फर्मान होते. हैद्राबाद राज्यात (संस्थान) प्रशासनासाठी दिवाणी दफ्तर (दफ्तर-ई-दिवाणी) व मालदफ्तर (दफ्तर-ई-माल) अशी दोन ऑफिसे राजधानीमध्ये असत. तेथेच सरकारचा सर्व कारभार चाले. या दोन्ही ऑफिसच्या मुख्याधिकाऱ्यांना 'दफ्तरदार' असे म्हणत. जहागिरीची नोंद ठेवणे व सरकारचे हिशेब राखणे ही त्यांची कामे होती. राजधानीबाहेर पोलीस व न्यायालये नव्हती. तेथील सर्व व्यवस्था तालुकदारांकडे सोपविण्यात आलेली होती. त्यांच्याकडून जमीन महसूल घेणे एवढेच निजाम सरकार आपले काम समजत असे. पहिले सर सालारजंग यांनी ही अव्यवस्था मोडून एका नियोजनबध्द राज्याच्या विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू केली.[८]

इ. स. १७९९ मध्ये निजामाने इंग्रजांशी तह केला. या तहान्वये इंग्रजांचे हैद्राबादमध्ये वर्चस्व प्रस्थापित झाले व निजामाचे स्वातंत्र्य संपले.[९] त्यानंतर निजामाने ईस्ट इंडिया कंपनीबरोबर १२ ऑक्टोबर १८०० रोजी तैनाती फौजेचा तह[१०] केल्याने हैद्राबाद संस्थानाचे रुपांतर नेहमीसाठी संरक्षित राज्यामध्ये झाले.[११] निजामाच्या वर्चस्वाखाली असलेला मराठवाडयातील उस्मानाबाद जिल्ह्यांतर्गत लातूर जिल्ह्यातील प्रदेशही संरक्षित राज्याचा घटक बनला.

पहिल्या निजामानंतर दुसरा निजाम सत्तेवर आला. तोपर्यंत प्रशासनात अस्थिरता व अराजकता होती. या काळात शहानवाजखान (१७४८-१७५०), रघुनाथदास (१७५०-१७५१) व सय्यद लष्करखान यांनी दिवाणपदे सांभाळली.

दुसऱ्या निजामाच्या काळात राज्याच्या प्रशासनासाठी पायगा किंवा पायगाह (Horsehold troops), सर्फ-ई-खास, खालसा व जहागीर असे चार विभाग पाडण्यात आले होते. राजा हा अनियंत्रित सत्ताधीश असे. जहागीरदारांचे प्राबल्य वाढू नये म्हणून पायगा किंवा पायगाह या लष्करी पध्दतीचा उपयोग करण्यात येई. पायगाह म्हणजे रक्षक. त्यांचा खर्च भागविण्यासाठी मोठमोठया जमिनींची मालकी संबंधितांना देण्यात आली होती. पायगा-अमीर घराण्याचा मूळ पुरुष अबु-खैर-तेजजंग हा होता. त्याच्याकडेच निजामाने रक्षणाची जबाबदारी सोपविली होती.

८. शर्मा, रा. भी., **हैद्राबाद व देशी संस्थाने अर्थात हैद्राबादची राज्यपध्दती आणि संस्थानी स्वराज्याच्या चळवळी,** भाग १ ला, पुणे, १९२८, पृ. १०-११.

९. सरदेसाई, गो.स., **ब्रिटिश रियासत,** खंड २, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ. १७४.

१०. कुंटे, भ. ग. (संपा.), **स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश-मराठवाडा विभाग,** महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७६, पृ. २.

११. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.६१.

या काळात महसूल वसुलीसाठी लिलाव पध्दतीने गुत्तेदार नेमले होते. महसूल वसूल करणाऱ्यांना 'तालुकदार' असेही म्हणत. त्यांना सुभेदाराइतके प्रचंड अधिकार होते. पाटील-पटवाऱ्यांमार्फतही महसूल गोळा करण्यात येई. इस्लाम कायदयाप्रमाणे न्यायदान केले जाई. रुकनुद्यौला या दुसऱ्या दिवाणाने प्रशासनात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला होता, पण इ. स. १७७५ मध्ये त्याची हत्या झाली. तिसऱ्या निजामाच्या काळात असलेला दिवाण मीर आलम हा इंग्रजांशी एकनिष्ठ असल्यामुळे त्यावेळी प्रशासनाचे स्वरूप इंग्रज-धार्जिणे बनले होते. त्याच्या मृत्यूनंतर राजा चंदुलाल याने राज्यकारभाराची सुत्रे हाती घेऊन व पेशकार आणि दिवाण पदाचे अधिकार वापरून इ. स. १८०८ ते १८४३ पर्यंत हैद्राबाद राज्याचा कारभार इंग्रजांच्या मनाप्रमाणे हाकला.[१२] यावेळी राज्याची परिस्थिती गंभीर होती. सर जॉन के (Kaye) याने तत्कालिन प्रशासनाचे स्वरूप रेखाटलेले आहे ते असे- "सर्व प्रशासन सडलेले असून त्यात असंख्य दोष होते. भ्रष्टाचाराशिवाय कशाचीही भरभराट होत नव्हती. शासन केवळ नावाचेच उरलेले आहे".[१३] या काळातच पामर कंपनी नामक पेढीने निजामास वारंवार भरपूर कर्ज दिले होते. हे कर्ज सतत वाढत गेले. शेवटी सर्व राज्य पेढीच्या हाती गेले. या कर्जामुळे हैद्राबादच्या सर्वच जिल्ह्यातील परिस्थिती गंभीर बनली होती. लातूर जिल्हाही त्याला अपवाद नव्हता. या जिल्ह्यातही सर्वत्र अस्थिरता व अशांतता होती. ही अराजकता नष्ट करण्यासाठी डिसेंबर १८२० मध्ये इंग्रज लष्करी अधिकारी सदरलँड यास सैन्यासह उदगीरला पाठवावे लागले. त्याने लष्कराच्या सहाय्याने जिल्ह्यात शांतता प्रस्थापित केली. चंदुलालने सैन्याचा पगार देण्यासाठी पामर कंपनीकडून २५% दराने कर्जाऊ रक्कम घेतली. तसेच स्थानिक सावकारांकडूनही कर्ज घेतले. त्याच्या मोबदल्यात त्यांना महसूल गोळा करण्याचे अधिकार दिले. स्वाभाविकच प्रशासनात गैरव्यवहाराचे प्रमाण वाढले. इंग्रज रेसिडेंट रसेल व त्याचा उत्तराधिकारी सर चार्लस मेटकाफ यांनी युरोपियन अधिकाऱ्याची नियुक्ती करून जिल्हा प्रशासनात सुधारणेचा केलेला प्रयत्नही अयशस्वी झाला. यावेळी चंदुलालचा तनखाच दररोज एक हजार रुपये होता. गोविंदबक्षाने उत्तरप्रांत व चंदूलालने दक्षिण प्रांत असे दोघांनी दोन्ही प्रांत नाडले.[१४] लातूर जिल्हा दक्षिण प्रांतात असल्याने तेथील जनतेचे आर्थिक शोषण झालेच. अखेरीस निजामाने इ. स. १८५३ मध्ये तह करुन ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्जापोटी वऱ्हाड, नळदुर्ग व रायचूर हे जिल्हे इंग्रजांना तोडून दिले. यातील नळदुर्ग जिल्ह्यात सध्याच्या लातूर जिल्ह्याचा बराचसा भाग होता व त्याचे महसुली उत्पन्नही बऱ्यापैकी म्हणजे ५० लक्ष रूपये होते. या तहान्वये आत हैद्राबाद राज्यात केवळ चार सुभे राहिले होते. या संपूर्ण प्रदेशावर दिवाणी प्रशासक म्हणजेच पंतप्रधानाचे प्रत्यक्ष नियंत्रण असे. उपरोक्त चार सुभे एकूण १४ जिल्हे आणि ७३ तालुक्यात विभागलेले होते. त्यात पाच सर्फ-इ-खास तालुक्यांचा समावेश होता.[१५] पुढे या तहात सुधारणा करण्यासाठी इ. स. १८६० चा तह करून त्यान्वये इंग्रजांनी नळदुर्ग, व रायचूर हे २१ लक्ष रुपये महसुली उत्पन्नाचे जिल्हे निजामास परत केले. त्यान्वये सध्याच्या लातूर जिल्ह्याचा बहुतांश भाग निजामाकडे सोपविण्यात आला असे म्हणता येईल.

---

१२. सरदेसाई, गो. स., **मराठी रियासत,** खंड ८, पॉप्युलर प्रकाशन, १९३२. पृ. ३९१.
१३. फतेउल्लाखान, एम., **हिस्टरी ऑफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रिफॉर्मस इन हैद्राबाद स्टेट,** पृ.२४-२५.
१४. सरदेसाई, गो. स., **ब्रिटिश रियासत,** पूर्वोक्त, खंड २, पृ. २४२.
१५. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४५४.

हैद्राबाद राज्यातील आधुनिक युगाचे जनक म्हणजे सर सालारजंग-प्रथम हे होत. त्यांनी आपल्या दिवाण पदाच्या काळात (इ. स.१८५३-१८८३) राज्याच्या न्याय, महसूल, पोलीस, चलन, लष्कर, अर्थ, टपाल, शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम वगैरे विविध क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा केल्या. ठिकठिकाणी तालुकदारांचा मुशाहिरा ठरवून देऊन न्यायदानासाठी मुन्सफांच्या नेमणुका केल्या. प्रत्येक तालुकदाराच्या हाताखाली काही पोलीस व लष्करी शिपाई देऊन त्यांनी आपल्या भागात शांतता ठेवावी अशी जबाबदारी त्यांच्यावर टाकली. या पध्दतीला 'जमीयत जिल्हादारी' असे म्हणत. या जिल्हादारीवर देखरेख करण्यासाठी हैद्राबाद येथे एक कमिटी नेमण्यात आली होती. यानंतर मुन्शीखाना नावाचे ऑफीस सुरू करण्यात आले. सन १८५६ साली सरकारी तिजोरी खाते, १८६१ साली जकात खाते १८६२ साली न्याय खाते व १८६३ साली सचिवालय (Secretariet) सुरू करण्यात आले. १८६५ साली मुन्शी खात्याचे काम बोर्ड ऑफ रेव्हेन्यू कडे देण्यात आले.[१६] या काळात जमिनीची मोजणी व सारा आकारणीही करण्यात आली. मुलकी व फौजदारी न्यायालये स्थापन करण्यात आली. सालारजंग यांनी इ. स. १८६७ मध्ये 'जिल्हाबंदी पध्दती' नामक योजना कार्यान्वित करून राज्याची विभागणी पाच विभाग व १४ जिल्ह्यात केली. त्यातील उत्तर-पश्चिम विभागातील बीड जिल्ह्यात सध्याच्या लातूर जिल्ह्याचा अल्पसा भाग, तर पश्चिम विभागातील बिदर व नळदुर्ग जिल्ह्यात बहुसंख्य भाग मोडत होता. या काळात ब्रिटिशकालीन हिंदुस्थानातील प्रशासकीय यंत्रणाच हैद्राबाद राज्यात राबविण्यात आली. सालारजंग दुसरे यांच्या काळातही हीच परंपरा पुढे चालू ठेवली गेली. पुढे इ. स. १८८१ मध्ये जिल्हाबंदी पध्दतीचा विस्तार करण्यात येऊन दोन नवीन जिल्हे आणि एक उपजिल्हा (अमलदारी) निर्माण करण्यात आला. त्याचवेळी काही तालुक्यांची थोड्याफार प्रमाणात पुनर्रचना करण्यात आली. या महसुली विभागांमध्ये सर्फ-ई-खास आणि इतर दुमाला जमिनीचा समावेश करण्यात आला. इ. स. १८८१ च्या अखेरीस हैद्राबाद राज्य १८ जिल्ह्यात व हे जिल्हे १०९ तालुक्यात विभागण्यात आले. त्यानंतर स्थानिक परिस्थिती आणि गरजा लक्षात घेऊन इ. स. १९०५ मध्ये पहिल्या जमाबंदीनुसार महसूल विभाग आणि जिल्ह्यांची पुन्हा पुनर्रचना करण्यात आली.[१७]

हैद्राबाद राज्याच्या अर्थव्यवस्थेचा गाभा सरंजामी पध्दतीचा होता. पहिल्या निजामाने अनेक हिंदू सरदारांना प्रशासनाच्या महसूल विभागात नियुक्त केले होते, तर मुस्लिम सरदारांना जहागिरी देऊन त्यांच्यावर संरक्षणाची जबाबदारी सोपविली होती. त्याच्या काळात जहागिरीचे सर्फ-ई-खास, पायगा, जहागीर व संस्थांने असे चार प्रकार होते. पैकी सर्फ-ई-खास ही खुद्द निजामाची जहागीर होती. त्याचे सर्व उत्पन्न निजामालाच मिळे. सध्याच्या लातूर जिल्ह्यातील प्रदेशाचा या जहागिरीत समावेश नव्हता. पायगा हा यापूर्वी उल्लेखिलेला जहागिरीचा प्रकारही विद्यमान लातूर जिल्ह्यात नव्हता. इतर जहागिरीत छोटया-मोठया जहागीरदारांचा समावेश होत असे. लातूर जिल्ह्यातील एकूण गावांपैकी ३०% गावे अशा जहागीरदारांच्या मालकीची होती. त्यांना त्या गावासंबंधी सर्व मुलकी व लष्करी अधिकार होते. जनतेकडून किती सारा वसूल करावयाचा हे सर्वस्वी त्यांच्या इच्छेवर अवलंबून होते. लातूर जिल्ह्यात एकही संस्थान नव्हते.

---

१६. शर्मा, रा. भी., पूर्वोक्त, पृ. ११.

१७. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.४५४.

हैद्राबाद राज्यातील बहुतेक प्रशासनिक सुधारणा पहिल्या सर सालारजंगांच्या कारकिर्दीत झाल्या. त्यांनी प्रत्येक तालुकदाराच्या नियंत्रणाखाली त्या त्या भागातील शांतता व सुव्यवस्थेसाठी पोलीस व लष्करी सैनिक नियुक्त केले होते. इ. स. १८५६ नंतर जकात, न्यायालये आदी शासकीय विभाग निर्माण करण्यात आले. इ. स. १८६५ मध्ये मुलकी खात्याचे काम महसूल मंडळाकडे देण्यात आले. तेव्हापासून जमीन महसूल पध्दतीत आमुलाग्र बदल घडून आला. महसूल गोळा करण्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सरकारी तिजोरी ठेवण्यात आली. इ. स. १८८० च्या सुमारास पोलीस, आरोग्य, वन, शिक्षण वगैरे विभाग निर्माण झाले.

हैद्राबाद राज्यातील इ. स. १८८९ च्या दस्तूर-अल-अमल नुसार मराठवाडयातील जिल्ह्यात जिल्हा व तालुका बोर्डांची स्थापना करून त्यांचेकडे सार्वजनिक सेवा, शिक्षण, आरोग्य यासंबंधी कामाच्या जबाबदाऱ्या सोपविलेल्या होत्या. पाटील व पटवारी हे खेडयातील अधिकारी महसूल गोळा करण्याबरोबरच इतर मुलकी अधिकारही वापरीत. मुंबई राज्यात हे राज्य किंवा संस्थान इ. स. १९५६ साली समाविष्ट होईपर्यंत त्याचे प्रशासन निजाम राजवटीतील कायदेकानून अर्थात १८९३ च्या 'कानूंच' म्हणजे निजामाने दिलेल्या मूळ राजाज्ञांनुसार चाले.[१८] त्यात काहीवेळा सुधारणाही केल्या जात. मदार-उल-महाम किंवा मंत्री हा राज्याचा मुख्य नियंत्रक असे व मदतीसाठी वित्त, न्याय, सैनिकी व इतर खात्यांसाठी एकूण चार सहाय्यक मंत्री असत. त्यांना मुईन-उल-महाम असे म्हणत. अध्यक्ष व सदस्य मिळून बनलेल्या या मंत्र्यांच्या कौन्सिलपुढे महत्त्वाचे प्रश्न मांडले जात. त्यांच्या निवारणार्थ सार्वमत न झाल्यास तसे निजामास कळविले जाई, पण त्यानेही त्यावर हरकत न घेतल्यास अथवा निर्णयास विलंब लावल्यास कौन्सिलच्याच निर्णयावर शिक्कामोर्तब केले जाई.[१९] यातील वित्त सहाय्यक मंत्री हा वित्त, टाकसाळ, रेल्वे, खाणी व घोडयांची पैदास या खात्यांवर नियंत्रण ठेवत असे, तर न्याय सहाय्यक मंत्र्याच्या अखत्यारीत न्याय, तुरूंग, नोंदणी, वैद्यकीय, टपाल व धार्मिक संस्था ही खाती असत. सैनिकी मंत्र्याकडे काही दैनंदिन कामे, शाही सेवा सैन्य ही खाती, तर विविधांगी सहाय्यक मंत्र्याकडे पोलीस, सार्वजनिक बांधकाम, शिक्षण, नगरपालिका व स्वच्छता ही खाती असत. महसूल खात्यावर मंत्र्याचे प्रत्यक्ष नियंत्रण असे. तो त्यासंबंधीत जमीन महसूल, जमीन सर्वेक्षण, करनिर्धारण, इनामस्, जकात, अबकारी कर तसेच वने, शेती, व्यापार व स्थानिक फंड यावर नियंत्रण ठेवी. खात्याचे सर्व सचिव त्या त्या मंत्र्याच्या खात्याचे काम करुन घेण्यास जबाबदार असत. उदा. वित्त विभाग, अकाऊंट जनरल ऑफीस व ऑडीट खात्यावर नियंत्रण ठेवी. सार्वजनिक बांधकाम खाते सचिवाच्या नियंत्रणाखाली असे. त्याअंतर्गत जलसिंचन खाते व त्याच्या इतर विभागांसाठी दोन अधीक्षक अभियंते मदतनीस असतो. न्याय विभागाचे उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशाकडे नियंत्रण असे. त्याच्या सहाय्यार्थ पाच सहाय्यक न्यायाधीश असत. जिल्हा पोलीस दल व तुरुंगाचा कारभार पोलीस महानिरीक्षकाकडे, शहर पोलीस खाते कोतवालाकडे, जकात खाते आयुक्ताकडे, शिक्षण खाते संचालकाकडे, मुद्रांक व टाकसाळ खाते अधीक्षकाकडे, पोस्ट खाते पोस्ट मास्तर जनरलकडे, वैद्यकीय खाते संचालकाकडे तर वनखाते जंगल रक्षकाकडे कारभारासाठी असे. सुभ्याच्या कारभारासाठी सुभेदार (आयुक्त)

---

१८. **इंपेरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** प्रॉव्हिन्शियल सिरीज, हैद्राबाद स्टेट, १९०९, पृ. ५०-५१.
१९. कित्ता.

असत. त्यांना लष्करी व मुलकी अधिकार होते. प्रत्येक जिल्हा प्रथम तालुकदार (जिल्हाधिकारी) च्या नियंत्रणाखाली असे. त्यांना व्दितीय व तृतीय तालुकदार हे सहाय्यक असत. तालुक्याचा प्रमुख तहसीलदार असे. त्याच्याकडे महसूल व मुलकी कामाचा भार असे. त्याच्या मदतीसाठी पेशकार (सहाय्यक) व गिरदावर (महसूल निरीक्षक) हे अधिकारी होते.

पुढे प्रथम १९४८ मध्ये भारतीय संघराज्यात व त्यानंतर इ. स. १९५६ मध्ये हे राज्य किंवा संस्थान मुंबई राज्यात विलीन झाल्यानंतर निजाम राजवटीतील कायदे व मुंबई राज्यातील प्रचलित कायदे यातील भिन्नता लक्षात घेऊन त्या कायदयांचे निरसन करण्यात आले व महाराष्ट्रातील कायदे या भागास लागू करण्यात आले. सध्या महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत समान कायदे प्रचलित आहेत.[२०] मुंबई राज्यात विलिनीकरणानंतर व १९८२ च्या जिल्हा निर्मितीनंतर जिल्ह्याचा समतोल विकास साधण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारीपासून ग्रामपातळीवरील ग्रामसेवक व तलाठी यांच्या नियुक्तीने शासकीय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. तसेच जनतेला विकास कार्यात सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने 'पंचायतराज पध्दतीचा' स्वीकार करण्यात आला.

शेती व शेतसारा : जिल्ह्यात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. हैद्राबाद संस्थानातील इतर जिल्ह्यांप्रमाणे या जिल्ह्यातही शेतकऱ्यांकडून किती शेतसारा वसूल करावा यावर इ. स. १८५३ पर्यंत कोणतेच बंधन नव्हते. दिवाणी प्रदेशात निजाम सरकारने सर्व मुलूख अनेकांना 'इजारा' पध्दतीने दिला होता. जो कोणी सरकारला जास्त रक्कम देईल त्यास 'इजारा' मिळावयाचा. इजारदारांनी मनमानीपणे रयतेस नागवून पैसा उकळला. देशमुख, देशपांडे, सरदेशपांडे व मोहरील हे वंशपरंपरागत अधिकारीही इजारदारांना शेतसारा वसुलीत सहाय्य करीत. ही वसुली अत्यंत निर्दयपणे करण्यात येत असे.[२१] हैद्राबाद संस्थानातील विविध जिल्ह्यांमधील गोळा झालेल्या शेतसाऱ्यापैकी देशमुखास साडेतीन टक्के, देशपांडे यास अडीज टक्के, तर सरदेशपांडेस एक टक्का रक्कम दिली जाई. मोहरील लेखनाचे काम करीत असे. चलनात एकसूत्रता नसल्याचा फायदा इजारदार घेत. दुष्काळप्रसंगी सरकार दिवाणी क्षेत्रातील शेतसाऱ्यामध्ये २५% सूट देत असे, पण जहागिरीमधील शेतकऱ्याला ही सूट नसे. निलंगा व औसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक दुर्दशेची माहिती कर्नल मेडोज टेलर याने नोंदली आहे.

सर सालारजंग प्रथम यांच्या कारकिर्दीत इ. स. १८६६ पासून जिल्हा प्रशासनाची जबाबदारी तालुकदार व तहसीलदारांवर सोपविण्यात आली. तेव्हापासून शेतसारा रोखीने घेण्याची रयतवारी पध्दत सुरू करण्यात आली. इ. स. १८७६ मध्ये महसूलविषयक सर्वेक्षणाला आरंभ होऊन ते काम इ. स. १८८२ पर्यंत चालले. इ. स. १९१९ नंतर निजाम सरकारने शेतसाऱ्यात प्रचंड वाढ केली. केवळ औसा तालुक्यात ३०% ने शेतसाऱ्याचा दर वाढविला.[२२]

---

२०. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.४५५.

२१. सरदेसाई, गो. स., **ब्रिटिश रियासत,** खंड-२, पूर्वोक्त, पृ. २४२.

२२. भालेराव अनंत, **हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा,** स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, १९८७, पृ. ८८.

प्रादेशिक बदल : पूर्वी नोंदविल्याप्रमाणे इ. स. १८५३ च्या तहानुसार त्याच वर्षी इंग्रजांकडे रायचूर-दोआबासह सुपूर्द केलेला उस्मानाबाद जिल्हा सदर तहात इ. स. १८६० मध्ये सुधारणा करून इंग्रजांनी तो पुन्हा निजामाकडे सोपविला.[२३] इ. स. १९०४ पर्यंत नळदूर्ग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या जिल्ह्याचे मुख्यालयही नळदुर्ग येथेच होते. याच वर्षी या जिल्ह्याचे नामकरण उस्मानाबाद असे करण्यात आले व मुख्यालयही उस्मानाबाद येथे नेण्यात आले. इ. स. १९०५ मध्ये या मुख्यालयासह वाशी व नळदुर्ग हे तालुके रद्द करून वाशी कलाम(कळंब) मध्ये, तर नळदूर्ग तुळजापूरमध्ये समाविष्ट करण्यात आला. औसा तालुक्याचे मुख्यालय लातूरला नेऊन त्याचे नाव लातूर तालुका असे करण्यात आले. मराठवाडयातील उस्मानाबाद हा प्रांत निजामच्या स्वत:च्या मालमत्तेतील सर्फ-ई-खास प्रकारात मोडणारा सर्वात मोठा प्रांत होता. हा प्रांत सर्फ-ई-खास (मर्जर) कायद्यानुसार इ. स. १९४९ मध्ये भारत सरकारकडे वर्ग करण्यात आला. इतर जहागीर प्रांतही सरकारने त्याच वर्षी आपल्याकडे घेतले. यामुळे सर्व तालुक्यांच्या हद्दी पुन्हा इ. स. १९५० मध्ये निश्चित कराव्या लागल्या. त्यात औसा व उमरगा हे दोन नवीन तालुके व भूम या पेठा किंवा तालुक्याची निर्मिती करण्यात आली. याच वर्षी सोलापूर जिल्ह्यातील ११ खेडी या जिल्ह्यात व या जिल्ह्यातील ५२ खेडी सोलापूर जिल्ह्यात हस्तांतरित करण्यात आली. इ. स. १९५६ च्या राज्य पुनर्रचनेंतर्गत हा जिल्हा मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला. यावेळी अहमदपूर, निलंगा आणि उदगीर हे बिदरमधील तालुके उस्मानाबाद जिल्ह्यात हस्तांतरित करण्यात आले व प्रशासनासाठी उस्मानाबाद, लातूर व उदगीर असे तीन उपविभाग पाडण्यात आले. त्यापैकी लातूर उपविभागात लातूर, औसा, कलाम (कळंब) व भूम हे तालुके, तर उदगीरमध्ये उदगीर, निलंगा व अहमदपूर हे तालुके समाविष्ट होते. माजी मुख्यमंत्री बॅ. अ. र. अंतुले यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात दिनांक ५ ऑक्टोबर १९८१ रोजी लातूर जिल्हा निर्मितीची घोषणा केली. त्यानंतर दि. १६ ऑगस्ट १९८२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा व औसा या पाच तालुक्यांचा समूह वेगळा करण्यात येऊन सध्याचा लातूर जिल्हा निर्माण करण्यात आला. पुढे इ. स. १९९२ मध्ये अहमदपूर तालुक्यातील चाकूर सर्कल क्षेत्रास व बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई तालुक्यातील रेणापूर सर्कल क्षेत्रास तालुक्याचा दर्जा देऊन हे दोन्ही तालुके लातूर जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले. त्यानंतर पुन्हा २६ जून १९९९ रोजी निलंगा तालुक्याची पुनर्रचना करून शिरूर-अनंतपाळ हा ५३ गावांचा, उदगीर तालुक्याची पुनर्रचना करुन देवणी हा ५७ गावांचा आणि उदगीर व अहमदपूर या तालुक्याची पुनर्रचना करुन जळकोट हा ४७ गावांचा तालुका निर्माण करण्यात आला. हे नुतन तीनही तालुके उदगीर महसूल उपविभागाच्या कार्यक्षेत्रात सामिल करण्यात आले आहेत.[२४] जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी तहसीलदार हे प्रभारी अधिकारी आहेत.

---

२३. **महाराष्ट्रातील जिल्हे-लातूर,** पुस्तिका,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र शासन,मुंबई, पृ.८-९.

२४. महाराष्ट्र शासन, **राजपत्र,** भाग-४, ब, महसूल व वनविभाग, मुंबई, १४ ऑगस्ट, १९९२; २३ व २५ जून १९९९.

स्वातंत्र्योतर काळातील प्रशासन

विभागीय आयुक्त : राज्याच्या एकूण सहा प्रशासकीय विभागांपैकी औरंगाबाद प्रशासकीय विभागात लातूर जिल्ह्याचा अंतर्भाव करण्यात आला आहे. प्रशासकीय कामकाजासाठी औरंगाबाद येथे विभागीय आयुक्त हा अधिकारी नियुक्त केलेला आहे. हल्लीचा विभाग हा सर्वसाधारणपणे ऐतिहासिक काळातील सुभ्याच्या बरोबरीचा आहे. हैद्राबाद संथानात इ. स. १८०५ च्या सुमारास सुभ्याच्या कामकाजाच्या नियंत्रणासाठी सरसुभेदार हा मुलकी व लष्करी अधिकारी असे, परंतु आजचा विभागीय आयुक्त व पूर्वीचा सरसुभेदार यांच्या अधिकारकक्षेत बरीच विभिन्नता आहे. प्रामुख्याने सरसुभेदार या लष्करी अधिकाऱ्यास आपले दुय्यम अधिकारी नेमण्याचे अधिकार होते.[२५] तो हैद्राबाद सरकारच्या थेट नियंत्रणाखाली कार्यरत असे. पुढे १ ऑगस्ट १९४९ (१ मेहर १३५८ फसली) रोजी सुभेदारीचा अस्त करून सरकारमधील सेक्रेटरी दर्जाच्या तीन अधिकाऱ्यांचे बोर्ड ऑफ रेव्हेन्यू (महसूल मंडळ) निर्माण करण्यात आले. या मंडळाला तत्कालिन प्रथम तालुकदार (जिल्हाधिकारी) दर्जाचा सेक्रेटरी, दुय्यम तालुकदार (उपजिल्हाधिकारी) दर्जाचे तीन सहाय्यक सेक्रेटरी व रजिस्ट्रार (नोंदणी अधिकारी) मदत करीत असत. जमीन महसूल, जकात व इतर तत्सम उत्पन्न मिळविणाऱ्या खात्यांच्या कारभारासाठी हे मंडळ जबाबदार असे.[२६]

स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक विकास, जमीन सुधारणा, सामाजिक विकास यांचा वाढता वेग आणि शासनाच्या प्रशासनासंबंधीच्या इतर गरजा लक्षात घेऊन पर्यवेक्षण, समन्वय आणि तपासणी या कामासाठी उच्च दर्जाचे अधिकार असलेली यंत्रणा निर्माण करण्याच्या दृष्टीने विभागीय अधिकाऱ्याचे पद निर्माण करण्यात आले. त्यानंतर विकास, जमीन सुधारणा आणि इतर प्रशासकीय बाबींसंबंधी त्या त्या विभागापुरते व्यापक अधिकार व कर्तव्ये बजावण्यासाठी इ.स.१९५७ मध्ये 'मुंबई आयुक्त कायदा' (बॉम्बे कमिश्नर्स ॲक्ट) करण्यात येऊन त्यान्वये विभागीय अधिकाऱ्याचे पद बदलून ते विभागीय आयुक्त असे करण्यात आले.[२७]

आयुक्त हा जमीन महसूल संहिता आणि नियम, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, भूनिर्धारण अधिनियम, कायदा व सुव्यवस्था, अन्न व नागरी पुरवठा, अल्पबचत आणि अन्य प्रशासकीय बाबींचे नियंत्रण करणारा त्या विभागाचा मुख्य अधिकारी असतो. या कामी त्यास सहाय्यक आयुक्त, नगर रचनाकार, उपसंचालक-अल्पबचत इत्यादी अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांचे सहाय्य लाभते. राज्यपातळीवरील सचिव आणि जिल्हा पातळीवरील जिल्हाधिकारी यामध्ये दुवा साधण्याचे काम आयुक्त करतो. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमान्वये त्याला त्यासंबंधी अनेक कर्तव्ये पार पाडावी लागतात. सार्वजनिक रस्ते व मार्ग यासंबंधी आदेश मंजूर करणे, कर आकारणीत बदल व पुनर्मुल्य निर्धारण करणे, उपविभागाच्या हद्दी बदलणे, नगरपालिका व शासनामधील जमिनीचे वाद मिटविणे, टंचाई व दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करणे, तत्संबंधी कामांना अग्रक्रम देणे, विभागातील

२५. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४५६, ४५७.
२६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६०८.
२७. कित्ता.

जिल्हाधिकारी व अन्य महसूल अधिकाऱ्यांच्या कारभारावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, महसूल कार्यालये, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या कामकाजाची तपासणी आदी विविध कामे आयुक्त पार पाडतो. विभागीय प्रशासक म्हणून शासनाने आयुक्तास महत्त्वाचे अधिकार प्रदान केलेले आहेत.

जिल्हाधिकारी : निजाम राजवटीत प्रशासकीय कारभाराच्या सोयीसाठी जिल्ह्यांची आखणी करून प्रत्येक जिल्ह्यासाठी इ. स. १९०५ मध्ये प्रथम तालुकदाराची नियुक्ती करण्यात आली होती.[२८] त्यांना महसूल आणि न्यायविषयक अशी दोन्ही प्रकारची कामे करावी लागत. वर वर्णिलेल्या महसूल मंडळात प्रथम तालुकदाराचा समावेश असे.[२९] हे पद जिल्हाधिकारी दर्जाचे असे. जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था राखण्याची संपूर्ण जबाबदारी त्याच्यावर असे.

परंपरागतदृष्टया जिल्हाधिकारी हा शासनाचा जिल्ह्यातील मुख्य प्रशासनिक अधिकारी समजला जातो. खरे पाहता जिल्हा पोलीस प्रमुखादी विविध खात्यांचे प्रमुख हे जिल्हाधिकाऱ्याप्रमाणेच आपापल्या खात्यांचे मुख्य असतात. मात्र जिल्हाधिकारी त्यांचा प्रमुख नसला तरी जिल्हा प्रशासनातील सर्वाधिकार त्यास शासनाने बहाल केलेले आहेत. त्यामुळे शासनाचा संपर्काधिकारी या नात्याने तो जिल्हा पोलीस प्रमुखादी विविध अधिकाऱ्यांना कायदा व सुव्यवस्था किंवा अन्य विकास विषयक कामांबाबत आदेश देऊ शकतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सत्तेचे विकेंद्रीकरण व प्रशासन लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारकक्षेत बरीच वाढ करण्यात आली, परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उदयानंतर त्या संस्था आपापल्या अधिकारक्षेत्रात विकासकामे करीत असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांवर मर्यादा पडल्या आहेत. तरीही त्याचे प्रशासनातील शासनाचा प्रतिनिधी म्हणून महत्त्वाचे स्थान आहे. जिल्ह्यातील महसूलविषयक व इतर प्रशासकीय कामे, शांतता व सुव्यवस्था राखणे आणि लोकांच्या हितसंबंधाची जपणूक करणे याची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यावर असते. जिल्ह्यात नैसर्गिक आपत्ती व दंगेधोपे झाल्यास त्याची प्रत्यक्ष चौकशी करून तत्संबंधी अहवाल शासनास सादर करणे व आदेशानुसार कार्यवाही करणे ही कामे त्याच्याच अखत्यारीत येतात.

समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने विकास योजनांची आखणी व अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हा नियोजनाची संकल्पना इ. स. १९७२ पासून महाराष्ट्रात साकार झाली. या विकास योजनांची आखणी व अंमलबजावणीचे महत्त्वाचे कार्य जिल्हाप्रमुख या नात्याने जिल्हाधिकाऱ्यास पार पाडावे लागते. या कामासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर एक समन्वय समिती नियुक्त करण्यात आलेली असते. जिल्हाधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली या समन्वय समितीमार्फत जिल्ह्यात विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.

वस्तुतः जिल्हाधिकाऱ्याचे कार्यक्षेत्र जिल्ह्यातील जमीन व जमीन महसुलाच्या कामाभोवती केंद्रित झालेले असले तरी याव्यतिरिक्त त्याच्या कामात निवडणुका, दुष्काळ निवारण,

२८. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५१.
२९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६०८.

शिधावाटप, पुनर्वसन, अल्पबचत, जिल्हा नियोजन, रोजगार हमी इत्यादी कामांची भर पडली आहे. ऑगस्ट १९८२ मध्ये जमीन महसूल वसुलीचे काम जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आले होते. तथापि, ते प्रभावी न ठरल्याने परत जिल्हाधिकाऱ्याकडे वर्ग करण्यात आले.

जिल्हाधिकारी हा विविध समित्यांचे अध्यक्षपद भूषवित असतो. त्यास निरनिराळ्या अधिनियमांची अंमलबजावणी करण्याकरिता अधिकार प्रदान केलेले आहेत. त्याच्या काही महत्वाच्या कामांबाबत खाली ऊहापोह केला आहे.

महसूल : हैद्राबाद जमीन महसूल कायदा (१३१७ फसली) व इतर कायदयांनुसार जिल्हाधिकाऱ्यास महसुलासंबंधी विस्तृत अधिकार दिलेले आहेत. तो विभागीय आयुक्तांस गौण म्हणून काम करतो.[३०] महसूल गोळा करणे, मोजणे, हिशेब ठेवणे या बाबीस तो जबाबदार असतो. दुष्काळग्रस्त किंवा टंचाई उद्‌भवलेल्या भागात शेतसाऱ्यात सूट देणे किंवा माफ करणे यासाठी जिल्हाधिकाऱ्यास शासनाची परवानगी घ्यावी लागते. हैद्राबाद जमीन महसूल कायद्याच्या ६१ व्या कलमानुसार बिगरकृषी जमिनीच्या महसुलाचे कृषियोग्य जमीन महसुलात रुपांतर करण्याचे त्यास अधिकार आहेत. याकरिता या कायदयान्वये प्राप्त झालेल्या अनेक अधिकारांचा तो वापर करतो. दि. १६ ऑगस्ट १९८२ रोजी जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यावर जमीन महसूल वसुलीचे जिल्हाधिकाऱ्याचे काम जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आले होते, परंतु तत्संबंधी प्रत्यक्ष कार्यवाहीचा अनुभव लक्षात घेऊन पुन्हा हे काम जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविण्यात आले. या कामाशिवाय जिल्हाधिकारी कार्यालयाकडून भारतीय मुद्रांक अधिनियम, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, मुंबई दारुबंदी अधिनियम, हैद्राबाद इरिगेशन ॲक्ट, दि इंडियन कोट फीस ॲक्ट, दि बॉम्बे सेल्स टॅक्स व दि बॉम्बे इंटरटेनमेंटस् ड्युटी ॲक्ट खाली विविध कर व शुल्क गोळा केले जाते. याशिवाय विविध कायदयांन्वये शेतकऱ्यांना दिलेली कर्जे व तगाई वगैरेंची देणी गोळा केली जातात. वन विभागाच्या प्रशासनाची जबाबदारी वन कायदयानुसार अप्रत्यक्षरित्या जिल्हाधिकाऱ्याची असते. यासाठी तांत्रिक बाबींमध्ये विभागीय वन अधिकारी त्यास मदत करतो. मुंबई दारुबंदी अधिनियमान्वये जिल्ह्यात मद्य विक्री दुकानांचे परवानेही जिल्हाधिकाऱ्याकडून दिले जात. आता हे काम राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या जिल्हा कार्यालयाकडे सोपविण्यात आलेले आहे. कमाल जमीन धारणा निश्चित करून अतिरिक्त जमिनीचे वाटप करण्याचे व आदिवासींना जमिनी प्रदान करण्याचे अधिकारही जिल्हाधिकाऱ्यास आहेत.

जिल्हाधिकारी जिल्हा कोषागाराचा प्रभारी अधिकारी असला तरी तो कोषागाराच्या दैनंदिन कामकाजात भाग घेत नाही, मात्र कोषागाराचे सर्वसामान्य व्यवस्थापन व कर्तव्य यासाठी तो थेट सरकारला जबाबदार असतो. रोख शिल्लक, स्टँप यांच्या नोंदी ठेवणे, कोषागारातील अमुल्य वस्तुंचे जतन करणे यासही तो जबाबदार असतो. नोंदी व हिशेब तपासणी याबाबतीत तो व त्याच्या हाताखालील जिल्हा कोषाधिकारी मुख्य नोंदणी अधिकाऱ्यास जबाबदार असतात. जिल्हाधिकाऱ्यास काही सहाय्यक अधिकारीही याकामी मदत करीत असतात. प्रांत अधिकारी आणि तहसीलदारांकडून जमिनीसंबंधिच्या अपिलावर त्याला अंतिम निर्णय घ्यावा लागतो.[३१]

---

३०. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६०९.

३१. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४५९.

जिल्हा दंडाधिकारी : जिल्ह्यातील सर्व कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचा प्रमुख म्हणून जिल्हाधिकाऱ्यास जिल्हा दंडाधिकारी या नात्याने महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. याबाबतीत त्याची सर्व कर्तव्ये कार्यकारी स्वरूपाची असतात. भारतीय दंडविधान व फौजदारी कार्यप्रणाली संहिता नुसार त्याला अनेक अधिकार असतात. जिल्ह्यात कायदा पालन तसेच शांतता व सुव्यवस्थेसाठी त्याला पार पाडावयाच्या कर्तव्यात कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडून रेकॉर्ड मागविणे, क्रिमीनल प्रोसिजर कोड सेक्शन ५०३ ते ५०६ नुसार पुरावे तपासण्यासाठी समिती नेमणे, कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या निर्णयावरील प्रतिवाद (अपील्स) ऐकून पुनर्निर्णय देणे इत्यादींचा त्यात समावेश होतो. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी त्याला व्यापक अधिकार आहेत. भारतीय शस्त्रे अधिनियम, १८७८ खाली तो शस्त्र परवाने देण्याचे काम करतो. पोलीस ठाण्यांचे रेकॉर्ड तपासण्याचेही त्यास अधिकार आहेत. तसेच नवीन फौजदारी कार्यप्रणाली संहिता आणि मुंबई पोलीस अधिनियम याखालील फौजदारी प्रकरणांवरही तो कार्यवाही करतो. जिल्हा सरकारी वकिलाने फौजदारी कार्यप्रणाली संहिता कलम ३७८ नुसार पाठविलेली अपील प्रकरणे जिल्हा दंडाधिकारी तपासणी करून शासनास, उच्च न्यायालयात खालील कोर्टाच्या आदेशाविरुध्द अपील दाखल करण्याकरिता पाठवितो.

महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनिमय) नियम, १९६६ अन्वये जिल्हा दंडाधिकारी चित्रपटगृहे बांधण्याकरिता ना हरकत प्रमाणपत्र देतो. सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा व कार्यक्रम यांना अनुज्ञाप्ती देण्यासंबंधी व त्यांचेवर नियंत्रण ठेवण्याबाबतचे नियम, १९६० अन्वये प्रयोगाकरिता परवाने द्यावे लागतात. सध्या लातूर जिल्ह्यात एकूण १८ कायमस्वरुपी चित्रपटगृहे असून त्यांची एकत्रित आसनक्षमता १२,४८० इतकी आहे. याचबरोबर २७ व्हिडीओ केंद्रे सुरु असून त्यांची एकत्रित आसन क्षमता १,२८८ इतकी आहे. सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात चित्रपटगृहे व व्हिडीओ केंद्रे यापासून १७७.८८ हजार रूपये करमणूक कर वसूल करण्यात आला होता.[३२]

जिल्हा दंडाधिकारी म्हणून पार पाडावयाच्या उपरोक्त कर्तव्यांव्यतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यास इतरही अनेक कर्तव्ये पार पाडावी लागतात. जिल्हा समन्वय समिती आणि शासनाच्या निरनिराळया योजनांची माहिती जनतेला देण्यासाठी बैठका घेतल्या जातात. या बैठकींचे अध्यक्षस्थान स्वत: जिल्हाधिकारी भूषवितो. जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या रोजगार हमी योजनांतर्गत कामांवरही जिल्हाधिकाऱ्याचे नियंत्रण असते.

भारतीय उन्माद अधिनियम, १८८९ नुसार दिवाणी न्यायालयाकडून आलेल्या प्रतिवेदनांनुसार (अपील्स) जिल्हाधिकाऱ्याला संबंधित व्यक्तिंनी धारण केलेल्या मालमत्तेबाबत न्यायालयाकडे अहवाल पाठवावा लागतो. तसेच दिवाणी न्यायालयाकडून आलेल्या आज्ञाप्तीच्या आदेशांची हैद्राबाद जमीन महसूल कायदा, १३१० फसली च्या सेक्शन १४४ नुसार अंमलबजावणी करावी लागते. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने अशा प्रकरणात भूमी अभिलेख कार्यालयाकडून जमिनींची विभागणी करून घेऊन उपरोक्त कायदयाच्या सेक्शन ५४ खाली सन २०००-२००१ मध्ये आज्ञाप्तीच्या ५५ प्रकरणांपैकी नऊ प्रकरणे निकालात काढली, तर ४६ प्रकरणे शिल्लक होती. सन २००४-२००५ या वर्षात अशी २९ प्रकरणे प्राप्त झाली होती. त्यापैकी २० प्रकरणे निकाली काढण्यात आली होती.

---

३२. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** लातूर जिल्हा, २००३-२००४, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००५, पृ. १६६.

महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम, १९६५ मधील कलम ३०८ खाली नगरपालिकांनी बेकायदेशिररीत्या केलेले अथवा सार्वजनिक शांततेला उपद्रवकारक असलेले ठराव रद्द करणे किंवा त्यांची अंमलबजावणी करण्यास मनाई करण्याचे काम जिल्हाधिकाऱ्यास करावे लागते. या अधिनियमानुसार नगरपालिकांकडून जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविले जातात, तसेच अनुदान व इतर अनुदाने मिळण्यासाठी त्रैमासिक अहवाल पाठविले जातात. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ नुसार ग्रामपंचायतीचे एकूण सभासद ठरविणे, सरपंच व उपसरपंच यांच्या निवडणुका घेणे, सभासद पात्रता, निवडणुकीची वैधता ठरविणे, अविश्वास ठराव वगैरे बाबतची कार्यवाही त्याला करावी लागते. जिल्हा परिषदेचे सदस्य, अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंचायत समित्यांचे सदस्य आणि सभापती यांच्या निवडणुकाही जिल्हाधिकाऱ्याच्या देखरेखीखाली होतात. जिल्हा परिषदेने संमत केलेले ठराव सार्वजनिक हिताच्या दृष्टीने हानिकारक असतील तर जिल्हाधिकारी ते रद्द करू शकतो. जिल्ह्यात काही कारणांमुळे गंभीर स्थिती निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांना सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी वा अन्य कामांसाठी कार्यवाही करण्याचे आदेश देतो. अशा त-हेने जिल्हा परिषदेच्या कामकाजावरही त्याला देखरेख करावी लागते.

उपविभागीय अधिकारी : प्रशासकीय सोयीसाठी जिल्ह्याची लातूर व उदगीर अशा दोन महसुली उपविभागात विभागणी केलेली असून उपजिल्हाधिकारी दर्जाचा उपविभागीय अधिकारी त्या त्या उपविभागाचा प्रशासकीय प्रमुख असतो. लातूर जिल्ह्यात असे दोन उपविभागीय अधिकारी असून ते व इतर उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकाऱ्यास मदत करतात. याशिवाय जिल्हाधिकाऱ्यास दैनंदिन कामकाजात मदतीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी असतो. उपजिल्हाधिकाऱ्यांकडे भूसुधारणा, इनाम खालसा, जिल्हा पुरवठा, विशेष भूसंपादन, दुष्काळ व भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन आदि स्वतंत्र्य खात्यांचा कारभार असतो. या सर्वांवर जिल्हाधिकाऱ्याचे प्रत्यक्ष नियंत्रण असते. नियोजन व विकास कार्यक्रमाच्या व्यापकतेमुळे सन १९६० पासून उपजिल्हाधिकाऱ्याच्या कामात वाढ झालेली आहे. विकास योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी उपविभागीय अधिकाऱ्यांवर सोपविली जाते. उपविभागीय अधिकारी हा तहसीलदार व जिल्हाधिकारी यामधील दुवा असतो. हा अधिकारी हैद्राबाद जमीन महसूल कायदा, १३१७ फसली व इतर कायदयान्वये जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार वापरून तहसीलच्या कारभारावर लक्ष ठेवतो. याबाबतचे काही अधिकार मात्र जिल्हाधिकारी राखून ठेवतात.[३३]

तहसीलदार व मंडल निरीक्षक यांच्या कारभारावर उपविभागीय अधिकाऱ्याचे नियंत्रण असते. सरकारी जमिनीची निगा व त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे काम त्याला करावे लागते. तहसीलदारांच्या निर्णयाविरुध्दच्या अपिलांची सुनावणी करून सरकारी आज्ञाप्तीच्या (डिक्री) कार्यवाहीबाबत महत्त्वाची कामे करावी लागतात. याशिवाय पीक पाहणी, आणेवारीची तपासणी, पिकाच्या उत्पन्नाचे लक्ष्य निर्धारण, जमीन महसुलात सूट देणे, अधिकार अभिलेखांची चौकशी, सरकारी महसुलाची देखभाल, संपत्तीचे

३३. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६१७-१८.

उत्तराधिकार, भूसंपादन, जमिनीची कमाल मर्यादा ठरविणे इत्यादी कामे उपविभागीय अधिकाऱ्यांला करावी लागतात.

तालुका दंडाधिकाऱ्याचे साधारण अधिकार त्याला असल्यामुळे तो उपविभागीय दंडाधिकारी म्हणूनही काम पाहतो. त्यासंबंधीचे त्याचे अधिकार क्रिमीनल प्रोसिजर कोड मधील कलम ३ मध्ये निर्देशिलेले आहेत. यात तालुका दंडाधिकाऱ्याला आदेश देण्याचे अधिकार, शांतता व सुव्यवस्थेसाठी पोलीस दल मागविण्याचे अधिकार (सेक्शन १०७ व १४४), सेक्शन १०८, १०९ व ११० अन्वये नागरिकांना संरक्षण देण्याचे अधिकार, पोलीस तपास सुरू असताना सेक्शन १६४ अंतर्गत जाबजवाब नोंदवून घेण्याचे तसेच चौकशी व तपासाचे अधिकार यांचा समावेश होतो. जिल्ह्यातील अन्य न्यायदंडाधिकारी व विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडील नोंदी तपासण्याचे व त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकारही त्याला राज्य सरकारकडून प्रदान केले गेले आहेत.[३४] त्याने पार पाडावयाच्या कर्तव्यात जिल्हाधिकाऱ्यास आपल्या विभागातील महसूल, शांतता व सुव्यवस्था यासंबंधी घटनांची माहिती देणे, जंगल वसाहती, तगाईस मंजुरी, रोजगार हमी योजनेत सुरू असलेल्या दुष्काळी कामांवर देखरेख व भूसंपादनासंबंधी कामांचा समावेश होतो.

तहसीलदार : हा तालुक्याचा मुख्य महसुलाधिकारी असल्याने त्याच्यावर तालुक्यातील महसूल व मुलकी कामांचा भार असतो. निजाम राजवटीत त्याला यासाठी पेशकर (सहाय्यक) व गिरदावर (महसूल निरीक्षक) हे मदतनीस असत.[३५] प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तहसीलदार व दोन नायब तहसीलदार असत. जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांना तहसीलदार महसुलासंबंधी मुलभूत स्वरुपाची मदत करतात. निजामकाळात उस्मानाबाद, लातूर व उदगीर तहसील वगळता इतर सर्व तहसील व महाल मध्ये प्रत्येकी एक उपकोषागार असे व तहसीलदार त्याचा प्रमुख असे. प्रत्येक तहसील व महाल मध्ये महसूल व जमीन सुधारणा कामासाठी सरासरी दोन नायब तहसीलदार व तीन अव्वल कारकून किंवा पेशकर, आठ ते दहा कारकून, तीन महसूल निरीक्षक व सात चतुर्थवर्ग कर्मचारी असत.[३६] आजही साधारणतः हीच पध्दत रूढ असून तहसीलदार हाच तालुका उप-कोषागाराचे काम पाहतो. कोषागारात विविध मार्गाने जमा झालेल्या पैशातूनच सरकारी खर्च भागविण्याची त्याची जबाबदारी असते. तालुक्याच्या ठिकाणी स्टॅम्प्स्, मुद्रांक पेपर इत्यादींची विक्री केली जाते. या सर्वांचा मासिक अहवाल तो जिल्हा कोषागार अधिकाऱ्याकडे पाठवितो. त्याच्या अनुपस्थितीत अव्वल कारकुनावर उपकोषागाराची जबाबदारी असते.

तालुक्याचा मुख्य महसूल अधिकारी या नात्याने तहसीलदाराकडून सरकारी वसूल गोळा करणे हे महसूल खात्याचे मुलभूत कर्तव्य होय. महसुलासंबंधी त्याच्या कामाच्या

३४. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६१७-१८.
३५. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५१.
३६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६१९.

आधारावर उपजिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांची तत्संबंधी पुढील निर्णयाची दिशा ठरते. जमीन महसुलाचा वार्षिक दर व त्याची वसुली यासंदर्भात तहसीलदार हा उपरोक्त दोन्ही अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार संपूर्ण तालुक्यातील महसूल गोळा करतो. याची पूर्वतयारी म्हणून तो प्रत्येक वर्षी अंतरिम जमाबंदीची प्रक्रिया राबवितो. निजामकाळात या प्रकारास 'शेरेनवीशी' असे म्हणत.[३७] तहसीलदाराच्या सूचनेनंतरच जमीन महसुलात सूट वा तहकुबी द्यावयाची याचा निर्णय जिल्हाधिकारी घेतात.

तहसीलदारांना याव्यतिरिक्त तगाई कर्ज, पोटहिस्सा मोजणीकर, विक्रीकर, उत्पन्न कर, उत्पादन शुल्क व इतर सरकारी महसूल वसुलीची कामे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या करावी लागतात. पीक आणेवारी तोच जाहीर करतो.

पदसिध्द तालुका दंडाधिकारी म्हणून तहसीलदारास काही न्यायिक कर्तव्येही पार पाडावी लागतात. बॉम्बे सेपरेशन ऑफ ज्युडीसियल ॲण्ड एक्झिक्युटिव्ह फंक्शन्स (एक्स्टेन्शन) व क्रिमिनल प्रोसिजर कोड, १९५८ अंतर्गत तहसीलदारास शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ते अधिकार आहेत.[३८] त्यादृष्टीने तो मुलकी अधिकारी असतो. त्याच्या इतर कामात मामलेदार कोर्टस् कायद्यानुसार चौकशी आणि आदेश, दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी, जमीन महसूल वसुली अर्जाबाबत निर्णय, प्रत्येक खेडयातील अधिकार अभिलेखांच्या संबंधातील तंटयाची चौकशी इत्यादी कामांचा समावेश होतो. तालुक्यात घडणारे गुन्हे किंवा प्रक्षोभक घटना याबाबत तो जिल्हाधिकारी वा उपजिल्हाधिकाऱ्यांना माहिती पुरवितो.[३९] तालुक्यातील सर्व राजकीय घटना, साथीच्या रोगांचा उद्‌भव व जनतेच्या कल्याणासंदर्भातील राबविल्या जाणाऱ्या उपाययोजना यांचीही तो त्यांना माहिती देत असतो.[४०]

पंचायतराज स्थापनेनंतर गटविकास अधिकाऱ्याची नेमणूक झाल्यापासून तहसील प्रशासनातील तहसीलदाराचे महत्त्व काही अंशी कमी झाले आहे. तरीसुध्दा अल्पबचत, नागरी पुरवठा, सार्वजनिक आरोग्य आदि अनेक विकास योजनांच्या अंमलबजावणीत तो मोलाची भूमिका बजावतो. दुष्काळग्रस्त परिस्थिती, विस्थापितांचे पुनर्वसन, भूमिहिनांना घरकुले, संजय गांधी निराधार योजना, बेघरांसाठी निवारा इत्यादी महत्त्वाची कामे त्याला करावी लागतात. तालुक्याच्या ठिकाणी असणाऱ्या पोलीस निरीक्षक, उपनिबंधक, वनक्षेत्र अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी वगैरे अधिकारीही आपापल्या कार्यक्षेत्रात तहसीलदाराच्या मदतीने कर्तव्ये पार पाडीत असतात. थोडक्यात, तालुका पातळीवर तो जिल्हाधिकाऱ्याप्रमाणेच सरकारचा प्रतिनिधी असून जिल्हाधिकाऱ्याप्रमाणेच आपली कर्तव्ये पार पाडीत असतो. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी त्याच्याकडून प्रत्यक्ष काम करणे अपेक्षित नसले तरी तो जिल्हाधिकाऱ्यास या संस्थांच्या कारभाराची माहिती पुरविणारा मुख्य स्त्रोत असतो. ही सर्व कामे तो नायब तहसीलदारांच्या मदतीने पार पाडतो.

---

३७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६१९.
३८. कित्ता.
३९. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४६२.
४०. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६२१.

मंडल निरीक्षक : लातूर जिल्हा निर्मितीपूर्वी उस्मानाबाद जिल्ह्यात मंडल (circle) निरीक्षकाऐवजी प्रत्येक तालुक्यात तीन ते चार महसूल निरीक्षक असत. हे निरीक्षक ३० ते ४५ खेडयांच्या मंडळाचे प्रमुख असत. मराठवाडा विभागात या पदास 'गिर्दवार' किंवा 'गिरदावर' असे नाव होते.[४१] सध्या तहसीलदारांच्या कामकाजात मदतीसाठी मंडळ निरीक्षकाची नियुक्ती केली जाते. आपल्या मंडळातील सर्व गावांचा महसुली कारभार सांभाळणाऱ्या खेडयातील तत्संबंधित अधिकाऱ्यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे, पिकांची चौकशी, आणेवारी, तगाईसंबंधी कामे, कृषिविषयक सांख्यिकीय माहिती गोळा करणे, गुरांची शिरगणती, अधिकार अभिलेखांची निगा राखणे, कूळ कायदे व इतर दस्तऐवजांची सोय पाहणे, जमीन महसुलासंबंधित कामे, ग्रामअधिकाऱ्यांना प्रशिक्षण, सरकारी जमिनीवरील अतिक्रमण रोखणे आदी अनेक कर्तव्ये त्याला पार पाडावी लागतात. त्याच्या अधिकाराखाली सुमारे ४० ते ६० गावे असतात.

ग्राम अधिकारी : निजामी राजवटीत येथे पटवारी (कुलकर्णी), माळी (माली) पाटील आणि पोलीस पाटील असे तीन वंशपरंपरागत ग्रामअधिकारी होते.[४२] मराठवाडा विभागात तेव्हा या अधिकाऱ्यांचे काम आजच्यासारखे केवळ तलाठयाला दिले जात नसे. त्यासाठी वरीलप्रमाणे वेगवेगळी नियुक्ती केली जाई. काही विशिष्ट प्रकरणात त्यांना त्यांच्या कामाबद्दल महसूलमुक्त जमीन दिली जाई. पटवारी हा जमीन महसूल गोळा करून त्याची नोंद ठेवणे यासाठी जबाबदार असे. माळी पाटील त्यास याकामी मदत करीत असे. शिवाय गावास भेट देणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांनाही तो मदत करीत असे. काही कारणामुळे हे ग्रामधिकारी आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी आपल्यातर्फे गुमास्ता नेमीत. मात्र त्याच्या कामास पटवारी जबाबदार असे. उपजिल्हाधिकाऱ्याला हे अधिकारी नेमण्याचे अधिकार होते. तो या अधिकाऱ्यांच्या वारसांना विरासत मंजूर करीत असे.[४३]

हैद्राबाद संस्थानातील प्रत्येक खेड्यात एक पाटील व एक पटवारी (कुलकर्णी) होता. पण ज्या खेड्यातील महसूल ५०० रु. पेक्षा अधिक असे, तेथे दोन पाटील असत. इ. स. १८७७ पर्यंत पाटील, पटवाऱ्यांना इनाम जमिनी देण्यात आलेल्या होत्या. परंतु त्यानंतर त्यावर शेतसारा आकारण्यात आला.[४४]

स्वातंत्र्यानंतर हैद्राबाद अबॉलिशन ऑफ इनामस् ॲण्ड कॅश ग्रॅन्टस् ॲक्ट, १९५४ अन्वये वंशपरंपरागत पटवारी पध्दत १ जुलै १९६० रोजी बंद करण्यात येऊन त्याऐवजी नवीन तलाठी पध्दत अस्तित्वात आली. या दिनांकापर्यंत जे पटवारी होते, त्यांचीच तलाठी म्हणून नियुक्ती करण्यात आली. जे या योजनेस राजी नव्हते, त्यांना त्यांचे हे वंशपरंपरागत वतन रद्द केल्यामुळे नुकसान भरपाई देण्यात आली.[४५]

---

४१. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६२१.
४२. कित्ता पृ. ६२३.
४३. कित्ता.
४४. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४६३.
४५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.६२३.

दि महाराष्ट्र रेव्हेन्यू पाटील (अबॉलिशन ऑफ ऑफीस) ॲक्ट, १९६२ हा कायदा, १ जानेवारी १९६३ रोजी कार्यान्वित करून त्यान्वये वंशपरंपरागत महसूल पाटील व पोलीस पाटील यांची पदे रद्द करून त्याऐवजी या दिनांकापासून पगारी तत्वावर पोलीस पाटलांची नियुक्ती करण्यात आली. पगारी तत्वावर न नेमल्या गेलेल्या पाटलांना नुकसान भरपाई देण्यात आली.[४६]

कमी दर्जाची कामे करणाऱ्या सेवकांना शेठसंधी, रामोशी किंवा मजकुरी या नावाने ओळखले जाई. परंतु दि बॉम्बे इन्फेरिअर व्हिलेज वतन अबॉलिशन ॲक्ट, १९५८ नुसार १ फेब्रुवारी १९६२ रोजी ही वंशपरंपरागत पदे अस्तंगत करून पगारी तत्वावर कोतवाल नेमण्याची प्रथा सुरू करण्यात आली. वरीलप्रमाणे जे असे लोक कोतवाल नेमले गेले नाहीत, त्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात आली. सध्या प्रत्येक गावी एक किंवा दोन कोतवाल आहेत. ते सरकारी अधिकारी, पोलीस पाटील व तलाठयांना त्यांच्या कामात मदत करतात.

लोककल्याणकारी योजना

लोककल्याण कार्यक्रमांतर्गत निरनिराळ्या योजना हाती घेतल्या जातात. या योजना राबविण्याचे काम मुख्यत: जिल्हाधिकाऱ्याला करावे लागते. त्यापैकी काही योजनांची माहिती खालीलप्रमाणे :-

संजय गांधी निराधार अनुदान योजना : महात्मा गांधींच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून दिनांक २ ऑक्टोबर १९८० रोजी महाराष्ट्र शासनाने ही योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत वयोवृध्द आणि निराधार स्त्रिया व पुरुष अपंग व्यक्ती यांना चरितार्थासाठी दरमहा ६० रुपये, तर एकाच कुटुंबातील अशा दोन व्यक्तींना १५० रु. अनुदान देण्यात येते.[४७] या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा व तालुका पातळीवर समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या योजनेखाली योजनावर्षी ५,९७६ लाभार्थींना ५३,१८,०३४ रु., तर १९९०-९१ मध्ये ७,९२५ लाभार्थींना ९९,५८,२७५ रुपये अनुदान रुपात देण्यात आले. सन २०००-२००१ मध्ये एकूण १३,९५७ लाभार्थींना वितरित केलेल्या अनुदानाची रक्कम ३,६२,८९,३५२ रुपये इतकी होती, तर सन २००३-२००४ या वर्षामध्ये १७,१२३ लाभार्थींना ४,६५,५१,०४३ रुपये अनुदानाचा लाभ देण्यात आला.

संजय गांधी स्वावलंबन योजना : ही योजनाही उक्त तारखेपासूनच सुरू झालेली आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील बेरोजगार, सुशिक्षित बेकार, विधवा स्त्रिया यांना उपजीविकेसाठी स्वयंरोजगार सुरू करता यावा म्हणून बिनव्याजी कर्ज देण्यात येते. या योजनेखाली योजनावर्षी ८७३ लाभार्थींना ५,७५,५३२ रुपये, तर १९९०-९१ मध्ये १,२२९ लाभार्थींना ७,२३,०१८ रु. कर्ज देण्यात आले. सन २०००-२००१ मध्ये एकूण ९७५ लाभार्थींना कर्जवाटप केलेली रक्कम १८,८९,७५० रुपये इतकी होती. हीच संख्या सन २००२-२००३ मध्ये ५१४ लाभार्थींना ४,३३,००० रुपये कर्ज अशी होती.

---

४६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.६२४.

४७. जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांनी पाठविलेल्या माहिती आधारे.

नेहरु रोजगार योजना: या योजनेंतर्गत शहरी लघुउदयोगांना कर्जपुरवठा करणे, रोजगार उपलब्ध करून देणे व पदवीधर सुशिक्षित बेकारांना प्रशिक्षण देणे अशा योजना राबविल्या जातात. १९९०-९१ या वर्षी अशा ६६ सुशिक्षित बेकारांच्या प्रशिक्षणावर १.६३ हजार रुपये खर्च करण्यात आले. याच वर्षी ७७८ स्वयंरोजगार लाभार्थींना ३३.८९ हजार रुपये, तर ४,५३६ सुशिक्षित बेकारांना ४,५३,६०० रुपये बेकारभत्ता वाटण्यात आला. ही योजना १९९८-९९ पर्यंत कार्यरत होती.

भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन[४८] : जिल्ह्यात दि. ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या विनाशक भूकंपाची जिल्ह्यातील ७०९ गावांना झळ पोहोचली आहे. त्यातही सर्वात जास्त झळ पोहोचलेल्या अशा २७ गावांचे पुनर्वसन करावयाचे काम सुरू आहे. या भूकंपात प्रचंड जीवित व वित्त हानी झाली. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या वारसांना तसेच अपंगाना आर्थिक सहाय्य देण्यात आले. या आपत्तीत अंदाजे ८७,००० घरांना भूकंपामुळे नुकसान पोहोचले होते. त्यासाठी सर्वात जास्त हानी झालेल्या १६८ गावातील ४५,४२७ घरमालकांना घर दुरुस्तीसाठी पहिला हप्ता म्हणून रु. १३.५५ कोटी रुपये व दुसरा हप्ता म्हणून ४.१५ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. घरदुरुस्ती किंवा पुनर्बांधणीची पध्दत गावोगाव माहीत व्हावी यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावात एका घराची निवड करून त्याप्रमाणे घर बांधण्याचे प्रात्यक्षिक, प्रकल्प व्यवस्थापन गटामार्फत करण्यात येत आहे. भूकंपग्रस्त भागात भूकंपरोधक नमुना घरांचे बांधकाम केले जात आहे. शासनामार्फत घरांच्या बांधकामासाठी एकूण ८०५ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. भूकंपग्रस्त भागातील लोकांना अन्नधान्य, तेल, वगैरेच्या पुरवठयाबरोबरच शेतकऱ्यांना बैलजोडया देण्यासाठीही खर्च करण्यात आलेला आहे. या सर्व कामावर अतिरिक्त जिल्हाधिकारी (भूकंप पूनर्वसन) यांचे नियंत्रण असते.

जमीन महसूल

पूर्वेतिहास : प्राचीन प्रशासकीय रचनेसंबंधी कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये काही उल्लेख आढळतात. त्यानुसार प्रत्येक गावातील किंवा ग्रामसमुहातील विविध प्रकारची जमीन आणि महसूल इत्यादींचे सविस्तर अभिलेखाविषयक विवरण ठेवणारे अधिकारी होते हे ज्ञात होते. प्रत्येक खेडयाची महसूल निश्चितीसाठी उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशा तीन प्रकारात विभागणी करण्यात येत असे. जमिनीच्या एकूण धान्य उत्पादनापैकी १/३ किंवा १/४ भाग महसूल म्हणून गोळा केला जाई.[४९]

अकबराच्या राजवटीत तोडरमल या मंत्र्याने राज्याचा खर्च भागविण्यासाठी जमीन महसुलाव्दारे निश्चित स्वरुपाच्या उत्पन्नाची, तरतूद केली होती. जमीन महसुलासाठी त्याने असल-इ-जया-इ नामक नवीन पध्दत निर्माण केली. त्याकरिता त्याने प्रथम सर्व्र जमिनीचे सर्वेक्षण व मोजणी करून, तसेच सुपीक, मध्यम व बरड अशी प्रतवारी ठरवून सारा निश्चित

४८. यासंबंधी विस्तृत माहिती याच ग्रंथातील प्रकरण ४ - **कृषि व जलसिंचन** मध्ये देण्यात आलेली आहे.
४९. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४६४.

केला. अकबराच्या राजवटीत प्रत्येक बिघावर शेती उत्पन्नाच्या १/४ सारा आकारला जाई. गावागावातून वसूल केल्या जाणाऱ्या या साऱ्यास 'तनख्वाह' म्हणत.[५०] नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतसारा माफ केला जाई अथवा सूट दिली जाई.

दख्खनमध्ये दिवाणपदावर असणाऱ्या मुर्शिद कुलीखान याने औरंगजेबाच्या कारकिर्दीत महसूलविषयक सुधारणा केल्या. दख्खनमध्ये तोपर्यंत शेतसारा पध्दत रुढ होती, परंतु मुघलांच्या लढाया आणि वारंवार दीर्घकालावधीचे दुष्काळ यामुळे हवालदिल झालेला शेतकरी आपली घरेदारे सोडून परागंदा झाल्यामुळे पिकाऊ जमिनी ओस पडल्या होत्या. साऱ्याचा दरही निरनिराळया ठिकाणी वेगवेगळा असल्यामुळे वसुली अधिकाऱ्यांच्या मर्जी व मुजोरीला शेतकरी वर्ग बळी पडत असे. त्यासाठी कुलीखानाने प्रथम परागंदा रयतेचे पुनर्वसन करण्याचे प्रयत्न केले. खेडयांमध्ये पुनर्वसाहत करून व त्यावर संबंधीत अधिकाऱ्याच्या नेमणुका करून खेडयातील जीवन सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. जमिनीची मोजणी करण्यासाठी त्याने हुशार भूमापक नेमले व त्यांच्याकडे त्या कामाशिवाय पूर्ण मोजणी झालेल्या जमिनीच्या तुकडयांची यादी आणि शेतजमिनीची वर्गवारी करण्याचे काम सोपविले. ज्या खेडयांसाठी अधिकारी नव्हते, त्यांच्यासाठी त्याने रयतेची सहानुभूतीपूर्वक काळजी घेणारे व शेतीसुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील राहणारे नवीन अधिकारी नेमले.

या सर्व सुधारणा तोडरमलच्या पध्दतीवर आधारलेल्या असल्या तरी स्थानिक परिस्थितीतील फरकानुसार त्यात बदल करण्याचे काम मुर्शिद कुलीखानाने केले. ज्या ठिकाणचे शेतकरी मागासलेले होते, लोकसंख्या कमी होती किंवा वसाहती दूरदूर होत्या अशा ठिकाणी त्याने दर नांगरी उत्पन्नाचा ठराविक भाग वसूल करण्याची जुनी पध्दत पुढे रूढ केली. या पध्दतीत शेतकरी बैलजोडी व नांगराच्या मदतीने कसल्या जाणाऱ्या शेती उत्पन्नाचा काही भाग महसूल म्हणून देत असे. इतर ठिकाणी मात्र प्रत्यक्षात येणारे उत्पन्न विभागून घेण्याची पध्दत अंमलात आणली. उत्तर हिंदुस्थानात प्रचलित असलेली सखोल पध्दती त्याने दक्षिणेत अंमलात आणली. यात दर बिघामागे ठरलेल्या दराप्रमाणे पेरणीपासून कापणीपर्यंतच्या काळातील धान्याचा दर्जा, धान्याची बाजारातील किंमत आणि पेरणीसाठी वापरलेली जमीन प्रत्यक्ष मोजल्यानंतर शेतसारा वसूल केला जाई. हीच पध्दत मुघल सुभ्यात प्रचलित होऊन पुढे अनेक शतके ती मुर्शिद कुलीखानाची शेतसारा पध्दती म्हणून ओळखली जाऊ लागली.[५१]

सतराव्या शतकाच्या सुरुवातीस निजामशाही सरदार मलिक अंबरने स्वत:ची जमीन महसूल पध्दत रूढ केली.[५२] तोडरमलच्या पध्दतीचीच ही सुधारित आवृत्ती होती. यात जमिनीची पाहणी व उत्पादनक्षमता लक्षात घेऊन शेतसारा ठरविला जाई. सरकारकडून महसुली शेतकऱ्यांना खेडी भाडे तत्त्वावर कसण्यास दिली जात. त्याबद्दल त्यांना प्रतिरुपया १ १/२ आणा मोबदला मिळे. त्यावेळी महसूल हा मुख्यत्वे पैशातच गोळा केला जाई.[५३] आसफजहा निजाम-उल-मुल्क याने स्वत:चा सवतासुभा निर्माण केल्यानंतर इ.स. १७२३ मध्ये ही पध्दत हैद्राबाद राज्यात चालू केली.

---

५०. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६०
५१. कुंटे, भ. ग., **औरंगजेबाचा इतिहास**, पृ. १३३.
५२. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २६६.
५३. कित्ता.

हैद्राबाद संस्थानातील जमीन महसुलाची पध्दती बऱ्याच अंशी मुंबई इलाख्यातील रयतवारी पध्दतीसारखीच होती. हैद्राबाद संस्थानात दिवाणी किंवा खालसा जमीन आणि निजामाची सर्फ-ई-खास व इतर जहागिरी असे जमीन महसुलासाठीच्या पध्दतीचे सामान्यत: दोन प्रकार होते. खालसा जमिनी रयतवारी पध्दतीने शेतकरी वर्गाकडे होत्या. सरकार केवळ शेतसाऱ्यापुरतेच हक्कदार होते. जोपर्यंत शेतकरी शेतसारा देतो, तोपर्यंत त्याच्याकडून जमीन काढून घेण्याचा सरकारला अधिकार नव्हता. दर ३० वर्षांनी सर्वेक्षण व शेतसाऱ्याची फेरआकारणी केली जात असे. शेतजमिनीचा उपयोग अन्य कामासाठी केल्यास साऱ्याच्या दहापट दंड आकारून शेतकऱ्याकडून शेत काढून घेण्याचा सरकारला अधिकार होता. सन १८६६ पूर्वी सारा वसुलीचे काम वार्षिक मक्त्याने महसूल कंत्राटदारांना दिले जाई. त्याबदल्यात त्यांना काही टक्के अडत घेता येत असे,[५४] पण १८६६ मध्ये जिल्हा प्रशासनाची सुरुवात झाल्यानंतर पूर्वीच्या शेतसारा पध्दतीमध्ये बदल करून सन १८८० मध्ये मूळ जमीन मोजणी व जमाबंदीचे काम सुरू करण्यात आले. ते काम १८८४ मध्ये पूर्ण झाले.[५५] याच वर्षी रोख महसूल देण्याची रयतवारी पध्दत सुरू करण्यात आली.[५६] फेरआकारणीच्या वेळी जमीन महसुलात वाढ केली जाई. त्यामुळे हैद्राबाद संस्थानात जमीन महसुलाचे उत्पन्न बरेच मोठे होते. सन १८८३ मध्ये सध्याच्या लातूर जिल्ह्याचा काही भाग अंतर्भूत असलेल्या तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्याचा जमीन महसूल १०.२२ लाख ते ११.४ लाख रुपये होता. यावेळी कोरडवाहू जमिनीवर सरासरी दोन रुपये, जास्तीत जास्त तीन रुपये व कमीतकमी $\frac{१}{४}$ रुपये असा साऱ्याचा दर होता, तर ओलिताखालील जमिनीवर तो वरीलप्रमाणेच अनुक्रमे आठ रुपये, १५ रुपये व $\frac{२}{८}$ रुपये होता. १९०१ मध्ये या जिल्ह्याचा जमीन महसूल १०.९४ लाख रुपये होता.[५७] याचवर्षी निलंगा तालुक्यातून १.६ लाख रुपये, तर उदगीर तालुक्यातून ३.१ लाख रुपये जमीन महसूल गोळा झाला होता.[५८]

रयतवारी पध्दती : सन १८६६ मध्ये जिल्हा प्रशासनाची सुरुवात झाल्यानंतर पूर्वी वणिल्याप्रमाणे रयतवारी पध्दती सुरू करण्यात आली. या पध्दतीमध्ये रयतेला सर्व शेतजमीन सरकारकडून मिळालेली असते. मराठवाडयातील सर्व जिल्ह्यांचे या पध्दतीने सर्वेक्षण करून सारा आकारणी करण्यात आली होती. जो जमीन महसूल भरण्यात प्राथमिकदृष्टया पात्र असे त्यास हैद्राबाद संस्थानात किंवा मराठवाडा विभागात पट्टेदार म्हणत. याची व्याख्या अशी - 'जी व्यक्ती जमीन महसुलाच्या रुपात सरकारला प्रत्यक्ष कर देते व तिचे नाव शासकीय दप्तरात नोंदलेले आहे, त्यास पट्टेदार म्हणावे.' अर्थात नियमित महसूल देण्याच्या अटीवरच त्याचे जमीन धारणाधिकार अवलंबून होते. याकामी तो अयशस्वी ठरल्यास तो पट्टेदारी हक्क अर्थात जमीन गमावत असे. पट्टेदारास शेतावर घर बांधण्याची परवानगी होती. तथापि शेतीचा उपयोग शेतीव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी केल्यास साऱ्याच्या दसपट दंड आकारून

---

५४. **सेन्सस ऑफ इंडिया,** १९६१, डिस्ट्रिक्ट सेन्सस हॅण्डबूक, उस्मानाबाद, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १९६६, पृ. ३.

५५. कित्ता.

५६. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४६५.

५७. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २८७.

५८. कित्ता, पृ.२८९.

शेतजमीन काढून घेण्यासाठी सरकारला अधिकार होता. शेतात खाणी आणि भूमिगत द्रव्य मिळाल्यास त्याचे मालक सरकार असे.[५९] अशा प्रकरणात जमीन सरकारजमा झाल्यावर त्या जमिनीचा लिलाव करुन थकित महसूल भरणाऱ्यालाच पट्टेदार म्हणून सदर जमीन दिली जात असे.[६०] ही पट्टेदारी साधारणत: एक वर्षाची असे, परंतु पट्टेदार नियमित सारा भरणी करण्याचा अधिकार अर्थात पट्टेदारी पुढेही चालू ठेऊ शकत असे. पट्टेदार एका नोटीशीव्दारे ही जमीन त्यागू किंवा विकू शकत असे, किंवा आपले पट्टेदारीचे हक्क दुसऱ्यास हस्तांतरीत करू शकत असे. सरकारच्या पूर्वपरवानगीने तो ही जमीन कुळालाही कसू देऊ शके. अशा कुळांना 'शिकमिदार' म्हणत.[६१] मात्र अशा शिकमिदारकडून जमीन कसत असला तरी तोच पट्टेदार असे. हैद्राबाद ॲक्टमध्ये जमीन महसूल व प्रत्यक्ष जमिनीचा ताबा या दोन बाबीत तफावत ठेवण्यात आली होती. त्यामुळे पट्टेदाराच्या गैरहजेरीत शिकमिदारकडून महसूल वसूल करण्यात येत असे. पट्टेदाराच्या मृत्यूनंतर त्याच्या मृत्यूपत्रात ज्याचे नाव असे तो किंवा तोही हयात नसल्यास पट्टेदाराच्या वारसातील जेष्ठ आप्तेष्टाचे नाव पट्टेदार म्हणून, तर इतर वारसांचे नाव शिकमिदार म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडून नोंदले जाई. ही पध्दत हैद्राबाद रेकॉर्ड ऑफ राइटस् इन लँड रेग्युलेशन, १३५८ फसली (१९४९) या कायदयामुळे रद्द करण्यात आली.[६२] परिणामी मराठवाडयातील सर्व जिल्ह्यातील भू-अभिलेखात पट्टेदार व शिकमिदार ही नावे न आढळता त्यांची नोंद वहिवाटदार म्हणून करण्यात आली आहे. रयतवारी पध्दतीचे 'पट्टेदार' व 'शिकमिदार' असेही अन्य दोन प्रकार होते. ज्यावेळी दोन किंवा अधिक शेतकरी एकत्रितपणे शेतजमीन कसत तेंव्हा त्यास 'पोटपट्टेदारी' म्हणत. शेतीचा खर्च व नफा-नुकसान पोटपट्टेदारांत सारखे वाटले जाई. पट्टेदार हा पोटपट्टेदारांना काढू शकत नसे.[६३]

इतर पध्दती : इतर जमीनधारणा पध्दतीमध्ये जागीर (जहागीर), इनाम, पनमक्ता (मक्ता) किंवा ताहुद सरबस्त, पेशकश, अग्रहार आणि इजारा या पध्दतींचा समावेश होतो. 'जागीर' म्हणजे एक किंवा अनेक गावांची मुक्त जागीर किंवा देणगी होय. हिची अल्-तमघा किंवा इनाम-अल्-तमघा ही वंशपरंपरागत जागीर, झात जागीर ही वैयक्तिक कारभारासाठी दिलेली जागीर, पैगाह जागीर ही निजामासाठी सैन्य बाळगणाऱ्या सरदारांसाठीची जागीर व तनख्वाह-इ- महलत ही स्थानिक कर गोळा करून सरकारजमा करणाऱ्यांसाठीची जागीर अशी चार प्रकारात विभागणी केलेली होती.[६४] इनाम जमिनी धर्मादाय संस्थांना दिल्या जात. या जमिनींना शेतसारा कमी किंवा माफ असे. पनमक्ता (मक्ता) किंवा ताहुद सरबस्ता ही सर्वसाधारणत: जागीर पध्दतीसारखीच असे. फक्त यात जमीनधारक महसुलाची ठराविक रक्कम सरकारजमा करीत असे. मराठवाडयात या पध्दतीस 'पालम्पत' असेही नाव होते. यात पनमक्तेदाराकडे असलेल्या जमिनीचा शेतसारा कायम स्वरुपाचा असल्यामुळे त्यात

५९. शर्मा, रा. भी., पूर्वोक्त, भाग १, पृ. ३४.
६०. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५८.
६१. कित्ता.
६२. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६२८-२९.
६३. शर्मा, रा. भी., पूर्वोक्त, भाग १, पृ. ३५.
६४. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५८.

वाढ करता येत नसे. इनाम कमिशनने पनमक्तेदारांच्या पुष्कळ जमिनी खालसा केल्या. ही पध्दत सन १८६६ मध्ये सर सालारजंग याने बंद केली. पेशकश पध्दतीत खेडे हे ठराविक महसूल आकारून देणगी म्हणून दिले जाई. ही पध्दत उत्तर हिंदुस्थानात प्रचलित होती. हैद्राबाद राज्यातील सर्व जहागीरदारांनरा पेशकश तत्वावर धारणाधिकार बहाल केलेले होते. अग्रहार पध्दतीमध्ये हिंदू देवालयांच्या व्यवस्थेसाठी एक किंवा अधिक खेडी देणगीदाखल देण्यात येत. ही खेडी महसूलमुक्त असत. इजारा पध्दतीमध्ये ३०-४० वर्षांसाठी पडीक किंवा ओसाड खेडी भाडेपट्टीने देणगीदाखल देत, तथापि इजारदार पहिली तीन किंवा पाच वर्षे भाडे देत नसे. त्यानंतर त्यास $\frac{१}{५}$ ते $\frac{१}{१०}$ भाडे द्यावे लागे. त्यानंतर शेतसाऱ्याच्या अंतिम मर्यादेपर्यत यात दरवर्षी वाढही होत असे.[६५] ही पध्दत सन १९०५ मध्ये बंद करण्यात आली.[६६] भूधारकांचे पट्टेदार, पोटपट्टेदार, शिकमीदार आणि असामी शिकमी असे चार वर्गही होते.

ज्या जमिनीचा महसूल निजामाच्या खाजगी खर्चासाठी वापरला जाई त्या जमिनींना सर्फ-ई-खास जमिनी म्हणत. हैद्राबाद राज्यात मराठवाडयातील उस्मानाबाद प्रांत हा निजामाच्या स्वत:च्या मालमत्तेतील म्हणजे सर्फ-इ-खास चा सर्वात मोठा प्रांत होता.[६७] मराठवाडयात जिरायत जमिनीस सरासरी दर एकरी एक रुपया एक पैसा इतका सारा होता. सारा वसुलीचे काम महसूल कंत्राटदारांना मक्त्याने दिले जाई. त्याबदल्यात त्यांना १०% दलाली मिळत असे, परंतु जिल्हा प्रशासनास १८६६ मध्ये सुरुवात झाल्यानंतर तालुकदार व तहसीलदार आदी अधिकारी नियुक्त करून रोखीने शेतसारा देण्याची पध्दत हैद्राबाद संस्थानात सुरू करण्यात आली. सन १८७६ मध्ये महसूलविषयक सर्वेक्षण सुरू होऊन ते सन १८८२ मध्ये पूर्ण झाले. त्यानुसार पुढील ३० वर्षांकरिता शेतसाऱ्याचे दर निश्चित करण्यात आले.[६८]

मूळ जमाबंदीच्या वेळी म्हणजे १८८० मध्ये प्रत्येक प्रकारच्या जमिनीची वेगवेगळी वर्गवारी करून त्यानुसार शेतसारा निश्चित करण्यात आला होता. जमाबंदीच्या दुसऱ्या फेरपाहणीच्या वेळीही ही वर्गवारी न बदलता जमाबंदीच्या मुदतीत जमीनमालकांनी जमिनींमध्ये केलेल्या सुधारणांचा लाभ कोणताही नवा कर न आकरता त्यांना सर्वसाधारणपणे घेऊ देण्यात आला. यामुळे दुसऱ्या फेरपाहणीतही जमिनीच्या प्रत्येक तुकडयामागे शेतसाऱ्याचे तुलनात्मक प्रमाण पहिल्या फेरपाहणीच्या वेळेइतकेच सर्वसाधारणपणे राहिले आणि दोन जमाबंदीच्या वेळी करण्यात आलेली शेतसाऱ्यातील वाढ सर्व विभागात सारखीच लागू करण्यात आली. तत्कालीन लातूर विभागातील मूळ जमाबंदीचे व जमीन मोजणीचे काम सन १८८४ पर्यंत पूर्ण करण्यात आले. सन १९०१ मध्ये औसा तालुक्यात लातूर व औसा ही दोन शहरे होती. त्यातील लातूरमध्ये १३० खेडी व २६ जागीर खेडी होती.[६९] यावर्षी औसा, निलंगा व उदगीर तालुक्याचा जमीन महसूल अनुक्रमे १.७, १.६ व ३.१ लाख रुपये होता.

६५. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५९.

६६. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४६६. रा. भी. शर्मा यांच्या मते ही पध्दत निजामाने सन १९०९ मध्ये बंद केली. पहा. शर्मा, रा. भी., **हैद्राबाद व देशी संस्थाने अर्थात हैद्राबादची राज्यपध्दती आणि संस्थानी स्वराज्याच्या चळवळी, भाग-१,** पुणे, १९२८, पृ.३५.

६७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.१.

६८. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४६६.

६९. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २६८.

१९०५ मध्ये वडवाल राजुरा तालुक्यातील काही गावे निलंगा व उदगीर तालुक्यात, तर उदगीर तालुक्यातील काही गावे नांदेडमधील देगलूर तालुक्यात समाविष्ट करण्यात आली.[७०]

तत्कालिन लातूर व अन्य तालुक्यांना हैद्राबाद राज्याचेच जमीन महसुलाबाबतचे नियम व कायदेकानून लागू होते. ते भूतपूर्व मुंबई राज्यातील बॉम्बे लॅण्ड रेव्हेन्यू कोडवर आधारित होते. त्यामुळे त्या राज्यातील महसूल पध्दतीचा त्यांवर प्रभाव होता. याच नियम व कायदयांना नंतर दस्तूर-उल्-अमल असे म्हटले जाऊ लागले. सन १९०७ पूर्वी जमीन महसुलाच्या प्रशासनासाठी कायदे करणारे मंडळ स्थापन झाले नव्हते. त्यानंतर याच वर्षी हैद्राबाद लॅण्ड रेव्हेन्यू ॲक्ट, VIII, १३१७ फसली (१९०७) हा जमीन महसुलासंबंधीचा कायदा मराठवाडा विभागास लागू करण्यात आला. या कायदयानुसार जमिनीची दोन गटात विभागणी करण्यात आली होती. १) दिवाणी किंवा खालसा जमीन. या जमिनीचे व्यवस्थापन सरकारकडे असल्याने त्यावरील महसूलही सरकारजमा होत असे. २) विशिष्ट कारणासाठी ज्या जमिनीवर पूर्ण किंवा कमी दराने महसूल आकारला जाई अशी जमीन. या दुसऱ्या गटातील जमिनीचे दोन प्रकार होते. पहिल्या प्रकारात सर्फ-ई-खास ही निजामाची स्वत:ची जमीन व दुसऱ्या प्रकारात जागीर व इनाम जमीन होती. पैकी सर्फ-ई-खास वरील महसूल सन १९४९ पर्यंत निजामाच्या तिजोरीत जमा होई. सर्फ-ई-खास हा प्रकार सर्फ-ई-खास मर्जर रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ नुसार रद्द करून त्याखालील मालमत्ता सरकारजमा करण्यात आली. त्यानंतर जागीर व इनाम जमिनीवरच महसूल आकारणी केली जाऊ लागली. तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्याचा $\frac{१}{३}$ भाग या प्रकारच्याच जमिनीने व्यापला होता. या जमिनीचे सहा प्रकार होते. सन १९४९ मध्ये या जागीर रद्द होऊन त्यांचे व्यवस्थापन हैद्राबाद जागीर्स अबॉलिशन रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ खाली घेण्यात आले. या रद्दीकरणामुळे सन १९५० मध्ये सर्व तालुक्यांच्या हद्दी बदलाव्या लागल्या. त्यामुळे औसा तालुक्याची निर्मिती झाली.[७१] जागीर खेडयातील साऱ्याचा दर लगतच्या सरकारी खेडयापेक्षा सर्वसाधारणत: जास्त होता, पण स्वतंत्र भारतातील शासनाने समन्यायी तत्वाने हा दर शेजारच्या सरकारी खेडयातील साऱ्याच्या दराच्या पातळीवर आणल्याने पुष्कळ जमीनधारकांना त्याचा लाभ झाला.

पुढे सन १९५० मध्ये जागीर व पैगाह जमिनींचे एकत्रिकरण करून त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. सेटलमेंट कमिशन, हैद्राबाद च्या आदेशानुसार यावेळी फसली १३४२ (इ. स. १९३३) मध्ये औसा तालुक्यातील पैगाह गावांचे पैगाह एजन्सीतर्फे सर्वेक्षण करण्यात आले. जुन्या पैगाह गावांना यावेळी हैद्राबाद सरकारने करांमध्ये २५% कायम सूट, तर जागीर गावांना २५% सूट मंजूर केली. जुन्या जागीर खेडयांचे सन १९५१-५२ व १९५६-५७ मध्ये सर्वेक्षण करून ती पुन्हा जागीर खेडी म्हणून घोषित करण्यात आले.[७२] सर्वेक्षण पध्दत व करनिश्चितीस कायदेशिर मान्यता असावी म्हणून दि हैद्राबाद लॅण्ड रेव्हेन्यू ॲक्ट, १९०७ पास करण्यात आलेला होता. यान्वये मूळ किंवा पुनर्रचित दराने महसूल गोळा

७०. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २६८, २८९-९०

७१. **सेन्सस ऑफ इंडिया,** १९९१, सिरीज १४, महाराष्ट्र, पार्ट XII, डिस्ट्रिक्ट सेन्सस हॅण्डबूक, लातूर, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १९९५, पृ. १२.

७२. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ६२५.

करण्याचे अधिकार शासनास देण्यात आले. यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील जे तालुके निवडले गेले, त्यात सध्याच्या लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर व निलंगा तालुक्याचा समावेश होता.[७३]

इनाम जमिनी महसूलमुक्त होत्या. व्यक्ति किंवा संस्थेला विशिष्ट सेवेकरीता त्या देणगी म्हणून देण्यात येत. या जमिनी अहस्तांतरणीय होत्या, पण हैद्राबाद अबॉलिशन ऑफ इनामस् ॲक्ट, १९५४ अन्वये धार्मिक किंवा धर्मादाय कार्य तसेच विशिष्ट शासकीय सेवेसाठी दिलेल्या इनाम जमिनींव्यतिरिक्त सर्व इनामे रद्द करण्यात येऊन त्यावर पूर्ण सारा आकारण्यात आला. जे इनामस् खालसा करण्यात आले आहेत, त्यांचे कब्जेहक्क जमीन मालकाला किंवा कुळाला देण्यात आले आहेत. मात्र त्यासाठी त्यांनी सरकारला त्या कब्जेहक्काची किंमत किंवा पूर्वीच्या जमीन मालकाला नुकसान भरपाई देण्याची अट घालण्यात आली आहे. १९५७ व १९५९ च्या अमेंडींग ॲक्टनुसार जिल्ह्यातील जमिनीच्या बाबतीत मधला हितसंबंधियांचा वर्ग नष्ट करण्यात येत आहे. विविध कायदयांमुळे सध्या लातूरसह सर्व मराठवाडा विभागात देवस्थान किंवा धर्मादाय कार्यासाठी देणगी दिलेल्या जमिनींव्यतिरिक्त अन्य करमुक्त जमीन नाही.[७४]

हैद्राबाद जमीन (जादा आकारणी) अधिनियम, १९५२ अन्वये जिल्ह्यातील सर्व जिरायत जमिनीवर जमीन महसुलाच्या १२.५% आणि जलसिंचनाखालील जमिनीवर ६.२५% जादा आकार बसविण्यात आला. काही जहागिरीखालील खेडयांच्या बाबतीत जमीन मोजणी आणि जमाबंदीचे काम सरकारच्या जमीन मोजणी आणि जमाबंदी विभागाकडून केले जात होते, तर काही खेडयांच्या बाबतीत जहागीदारांच्या स्वतःच्या नोकरवर्गाकडून हे काम केले जात असे.

या जिल्ह्यातील सारा आकारणीची पध्दत स्थूलमानाने महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच आहे. याबाबतीत महसूल प्रशासनाचे काम राज्यातील प्रचलित अधिनियमांनुसार केले जाते. हे अधिनियम व प्रथा संपूर्ण राज्यासाठी समान आहेत. जेथे जमिनीचे हस्तांतरण अन्य धारणाधिकारानुसार झालेले असेल अशा प्रकरणांखेरीज इतर बाबतीत वहिवाटीशिवाय कोणताही अधिकार मान्य केला जात नाही. त्यामुळे कोणत्याही ठिकाणची जमीन शासनाने तशी दिली नसल्यास ती जमीन महसूलपात्र समजली जाते.

मराठवाडा विभागातील सर्व जिल्ह्यात २६ जानेवारी १९६५ रोजी सर्वसामान्य कुळांकडे जमिनीचे मालकी हक्क सक्तीने हस्तांतरीत करण्याची तरतूद करण्यात आली. त्यादिवशी जमीनधारणा असलेल्या सर्वसामान्य कुळांना त्या जमिनीची खरेदी करण्यास पात्र ठरविण्यात आले. अशांना त्या जमिनीचे मालक समजण्यात आले. खासकरून माजी सैनिकांसाठी ही योजना राबविण्यात आली. जिल्ह्यातील रयतवारी पध्दती सर्वेक्षण, वर्गीकरण, जमाबंदी व मुल्यनिर्धारण यावर आधारित असून जमीन महसूल ठरविताना कृषीयोग्य जमीन, बिगरशेती जमीन आणि इतर उपयोगाखालील जमिनीचे मूल्यनिर्धारण करताना जमिनीचा प्रकार, मूल्यांकन व उत्पादनक्षमता विचारात घेतली जाते. साधारणतः ३० वर्षानंतर मूल्यनिर्धारण केले जाते. मूल्यनिर्धारण आणि फेरतपासणीचे काम जमाबंदी विभागाकडून केले जाते.

---

७३. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६२६.

७४. कित्ता, पृ. ४१२.

महसूल विभागातर्फे प्रत्येक खेडयासाठी जमिनीबाबतचे हक्क नोंदणीपत्रक स्वतंत्ररित्या ठेवण्यात येते. त्यात मालकी, कूळ वहिवाट किंवा इतर हक्काची नोंद केलेली असते. वार्षिक साऱ्याचे हिशेब या पत्रकाधारे केले जातात.[७५] तक्ता क्र. १ मध्ये तत्कालीन मूळ पाच तालुक्यातील सन १९५१ ते १९६० या १० वर्षातील जमीन महसूल आकारणीचा दर दर्शविला आहे.

कूळसंरक्षण: ज्या पध्दतीखाली वहिवाटदार जमीन धारण करतात त्याला वहिवाटदारी जमीन धारणा पध्दत म्हणतात. या पध्दतीत अप्रतिबंधित व प्रतिबंधित जमीन असे दोन प्रकार आहेत. पैकी पहिल्या प्रकारात जमीन दुसऱ्याकडे हस्तांतरित करण्यास, विकण्यास किंवा गहाण ठेवण्यास प्रतिबंध नाहीत, तर दुसऱ्या प्रकारात अशी बाब फक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीनेच होऊ शकते. सन १९६० पूर्वी मराठवाडा विभागात प्रतिबंधित वहिवाटदारी नव्हती.[७६] महाराष्ट्रात इनामदार, मालगुजर, जमीनदार आणि खोत यांच्याकडे जमीन मालकी व शेतसाराविषयक अनेक प्रकारचे हक्क होते.[७७] मराठवाडयात रयतवारी पध्दतीचे प्राबल्य असले तरी इजारा, कौल, इनाम व जागीर सारखी वहिवाटदारीही होती. अप्रतिबंधित वहिवाटदारीमध्ये वर उल्लेखिल्याप्रमाणे जमीन इतरांना हस्तांतरित करता येत असल्यामुळे व अशा जमिनी इनामदार, खोत, जमीनदार वगैरे संपन्न वर्गाकडे असल्यामुळे स्वत: जमीन न कसता कुळांकडून जमीन कसणाऱ्यांचा एक वर्ग १९ व्या शतकाच्या अखेरीस निर्माण झाला. हा वर्ग जमिनीचा वापर शेतीऐवजी व्यापारी गुंतवणूक म्हणून करू लागल्याने तो व प्रत्यक्ष जमीन कसणारी कुळे यांच्यातील असंघटीतपणा वाढत जाऊन वहिवाटदारी पध्दती निर्माण झाली.[७८] यातून जमिनमालकांकडून भाडेतत्वावर जमीन घेऊन कसण्याची स्पर्धा निर्माण झाल्याने पर्यायाने शेतीउत्पन्न कमी होऊन महसूली उत्पन्न कमी होऊ लागले. यातून मार्ग काढण्यासाठी नियोजन मंडळाने कुळांना जमीन मालक बनविण्यासाठी काही तरतुदी सुचविल्या. त्यानुसार सरकारने सरकार व कुळांमधील मध्यस्थ नष्ट करण्यासाठी असलेल्या असामी शिक्मी ॲक्ट, १३५४ फसली, (१९४५) च्या जागी अधिक परिणामकारक असा हैद्राबाद टेनन्सी ॲण्ड ॲग्रिकल्चरल लॅण्डस् ॲक्ट, १९५०, हा कायदा गठीत केला. त्यातूनही अपेक्षित फलनिष्पत्ती न झाल्याने १९५४, १९५७ व १९५९ चे सुधारणा (अमेंडमेंडस्) कायदे करण्यात आले.[७९] त्यानुसार जमीन मालकांकडून जमीन मालकी व शेतसाऱ्याचे हक्क काढून घेऊन प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यास (कूळ) ते माफक रक्कम भरपाई म्हणून भरल्यावर बहाल करण्यात आले. या कायदयांमुळे 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व लागू केल्याने बऱ्याच जमिनी कुळांच्या मालकीच्या झाल्या, शिवाय जमीन मालकांची जमीनधारणाही या कूळ कायदयांमुळे मर्यादित झाली. परिणामी कृषीविकास सुलभ झाला.

---

७५. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४६८.
७६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.४१८.
७७. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४६९.
७८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.४१८.
७९. कित्ता , पृ.४१८, ४२२.

कुळाने द्यावयाच्या खंडाची कमाल मर्यादा निश्चित करणे आणि कुळांना त्यांच्या वहिवाटीसंबंधात सुरक्षितता प्राप्त करून देणे हा कूळविषयक कायदे करण्याचा मुख्य उद्देश होता. मुदत संपल्यावरही कूळवहिवाट रद्द होत नसे, तसेच कायदयाने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा कुळाने द्यावयाचा खंड शेतसाऱ्याच्या तीन ते पाच पटीपेक्षा जास्त असू नये असे बंधनही घालण्यात आले. पुढे सन १९६० मध्ये सरकारने भूमिहिनांनाही जमीन देण्याचे धोरण अवलंबिले. त्यानुसार काही तरतुदी सूचवून व त्यात सुधारणा करून त्या १९६० च्या कायदयात रुपांतरित केल्या. या सुधारणांमुळे मराठवाडयातील वहिवाटदारी पध्दती ही पश्चिम महाराष्ट्रातील वहिवाटदारी पध्दतीसारखी झाली.[८०]

कमाल जमीनधारणा अधिनियम : व्यक्तिगत जमीनधारणेवर कमाल मर्यादा निश्चित करण्यासाठी शासनाने शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ हा २६ जानेवारी १९६२ पासून महाराष्ट्रात कार्यान्वित केला. त्यानुसार सिंचनाखालील जमिनीचे पाण्याच्या उपलब्धतेनुसार कमाल क्षेत्र १८ ते ४८ एकर असे ठरविण्यात आले. कोरडवाहू जमिनीबाबत राज्याची एकूण सात प्रकारच्या स्थानिक क्षेत्रात विभागणी करून त्या प्रत्येक क्षेत्रासाठी ६६ ते १२६ एकर अशी कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. पुढे ही मर्यादाही कमी करण्याच्या उद्देशाने वरील १९६१ च्या कायदयात १९७५ साली सुधारणा करण्यात आली. त्यानुसार सुधारित कमाल मर्यादा क्षेत्रासाठी व्यक्तिऐवजी कुटुंब हा बदल समजण्यात येऊन बागायत जमिनीसाठी १८ ते ३५ एकर, तर कोरडवाहू जमिनीच्या बाबतीत निश्चित पावसाच्या क्षेत्रातील भातलागवडीखालील जमिनीकरिता ३६ एकर व इतर सर्व जमिनींकरिता ५४ एकर एवढी कमाल मर्यादा ठरविण्यात आली. सन १९६१ चा मूळ कायदा व सन १९७५ चा सुधारित कायदा यान्वये अतिरिक्त जमिनी ताब्यात घेऊन त्या जमीनधारकांना नुकसान भरपाई देण्यात आली.

१९७५ च्या अधिनियमानुसार १९९४ पर्यंत लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जमातींच्या १६ लोकांना ४५ एकर ३७ गुंठे जमीन प्रत्यार्पित केली होती. सन २०००-२००१ पर्यंत जिल्ह्यात अतिरिक्त ठरविलेल्या जमिनीचे क्षेत्र मूळ कायदयानुसार २१९७.२९ हेक्टर होते. त्यापैकी १८७९.४६ हेक्टर क्षेत्र शासनाच्या ताब्यात देण्यात आले. यासंबंधित सुधारित कायदयाखाली जिल्ह्यात अतिरिक्त ठरलेल्या जमिनीपैकी या वर्षापर्यंत अनुसूचित जातीच्या व्यक्तिंना ८७०.३५ हेक्टर, अनुसूचित जमातीच्या व्यक्तिंना २१.३६ हेक्टर आणि इतर जाती-जमातींच्या व्यक्तिंना ९८७.७५ हेक्टर जमिनीचे वाटप करण्यात आले.

आदिवासी लोकांच्या अज्ञान व कर्जबाजारीपणामुळे त्यांच्या जमिनी बळकावण्याच्या प्रकारास आळा घालण्यासाठी शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ नुसार काही निर्बंध घालूनही हे प्रकार न थांबल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि कुळवहिवाट विधी (सुधारणा) अधिनियम, १९७४; तसेच महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित कार्यवाही अधिनियम, १९७४ असे दोन अधिनियम संमत केले. पैकी पहिला अधिनियम दि. ६ जुलै १९७४ पासून अमलात आलेला आहे. यात संबंधित कायदयांच्या

८०. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.४१८.

तरतुदींचा भंग करून दि. ६ जुलै १९७४ पूर्वी आदिवासींच्या मालकीची जमीन बिगर आदिवासींच्या ताब्यात असल्यास ती मूळ आदिवासी मालकाला परत करण्याची तरतूद आहे. अशा जमिनींचे शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय केलेले हस्तांतरण बेकायदेशीर ठरविण्यात आले आहे. या अधिनियमांनुसार कायदेशीर व्यवहाराने दि. १ एप्रिल १९५७ ते ६ जुलै १९७४ या मुदतीत आदिवासींच्या ज्या जमिनी बिगर आदिवासींकडे आहेत, त्याही जमिनी आदिवासींना प्रत्यार्पित करण्याबद्दलच्या त्यात तरतुदी आहेत. तथापि, लातूर जिल्ह्यात आदिवासी जमिनीचे क्षेत्र नाही.[८१] त्यामुळे आदिवासींना जमीन वाटप करता आलेले नाही.

खातेपुस्तिका: शेतकऱ्याला कर्ज अथवा इतर काही शासकीय लाभ घेणे सुलभ व्हावे या उद्देशाने शासनाने महसूल विभागातर्फे शेतकऱ्यांना खातेपुस्तिका दिलेल्या आहेत. त्यात जमिनीविषयक नोंदी, भूधारकाचे अधिकार अभिलेख, जमीन धारणा क्षेत्र, प्राथमिक सहकारी सोसायटी, भूविकास बँक व राष्ट्रीयीकृत बँकांकडून घेतलेले कर्ज व परतफेड आणि धान्याची लेव्ही इत्यादींची नोंद ठेवली जाते. सन १९९०-९१, २०००-२००१ व २००४-२००५ या वर्षी जिल्ह्यात अनुक्रमे ३,४७,८५०; ४,४५,३५८ व ३,९६,१९६ खातेदार होते. तथापि या कालावधीत खातेपुस्तिकांचे वितरण करण्यात आलेले नव्हते.[८२]

भूमि अभिलेख विभाग

जमीन महसूल, जमाबंदी व अधिकार अभिलेख इत्यादीसाठी व शेतजमिनीच्या मोजणीसाठी वर्गीकरणाचे काम, त्याचप्रमाणे नागरी व ग्रामीण विभागातील बिगरशेतीखालील जमिनीच्या मोजणीचे काम या विभागाकडून केले जाते. त्यात प्रारंभिक जमीन मोजणी, पुनर्मोजणी, पोटहिस्सा मोजणी, गावठाण मोजणी, नागरी मोजणी आणि अशाच इतर कामांचा समावेश होतो. लातूर जिल्ह्यात सध्या या विभागाची जिल्हा कार्यालयाव्यतिरिक्त सात तालुका भूमि अभिलेख कार्यालये आहेत. नवनिर्मित देवणी, जळकोट व शिरुर-अनंतपाळ तालुक्यात अद्याप अशी कार्यालये नाहीत. त्यामुळे देवणी व जळकोट तालुक्याचे यासंबंधित काम उदगीर कार्यालयाकडून, तर शिरुर-अनंतपाळ तालुक्याचे काम निलंगा कार्यालयाकडून पार पाडले जाते.[८३] सन १९९४ पूर्वी जिल्ह्यासाठी एकत्रिकरण अधिकारी व सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी अशी पदे होती. तथापि, ऑक्टोबर १९९४ पासून या पदांऐवजी शासनाने अनुक्रमे अधीक्षक व तालुका निरीक्षक अशी पदे निर्माण केली आहेत. त्यामुळे आता जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख हा अधिकारी जिल्ह्यातील भूमि अभिलेख विभागाचा प्रमुख म्हणून काम पहातो. भूनोंदणी अधीक्षक, औरंगाबाद विभाग यांना तो सर्व तांत्रिक प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष मदत करतो. त्यासाठी त्यास आवश्यक कर्मचारी वर्ग दिलेला असतो. तालुका पातळीवर तालुका निरीक्षक हे या विभागाची संबंधित जबाबदारी पार पाडतात. ते जिल्हा अधीक्षकांच्या आदेशाने काम करतात. नोंदीविषयक सर्व व्यवहारही ते जिल्हा अधीक्षकांच्या वतीने पार पाडतात. खाजगी जमिनीच्या मोजमापाची कामे नियमानुसार करून ठराविक शुल्क घेणे, सर्व्हे रेकॉर्डमधून आवश्यक त्या नोंदी व नकाशे अर्जदारांना पुरविणे, जिल्हा अधीक्षकाच्या

८१. **जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर** कडील माहितीवर आधारित.

८२. कित्ता.

८३. **जिल्हा भूमि अभिलेख कार्यालय,** लातूर कडील माहितीवर आधारित.

सहीचे आवश्यक बदलासंबंधीचे कमी-जास्त पत्रक तयार करणे वगैरे कामे त्यांना करावी लागतात. सध्या सर्व्हे मामलतदाराच्या नियंत्रणाखाली असलेले पोट-हिस्सा सर्व्हेअरचे कर्मचारी सर्व्हे नंबरच्या उपविभागाचे मोजणीचे काम व भूमि अभिलेख ठेवण्याचे काम करतात. पावसाळयात हे कर्मचारी ग्राम अधिकाऱ्यांसाठी हिस्सावार करआकारणी व नकाशाच्या आराखड्याची नक्कल बनविणे तसेच आकारफोड तक्ता तयार करण्याचे काम करतात. सध्या शासन राज्यातील सर्व शेतकऱ्यांना ७/१२ चे संगणकीकृत उतारे देण्याची मोहीम राबवीत आहे. त्यान्वये ऑगस्ट २००५ पर्यंत ६,२२,२७९ इतक्या ७/१२ च्या मोफत संगणकीय उताऱ्यांचे वितरण खातेदारांना करण्यात आले. तसेच सेतू सुविधा केंद्रातून ४६,१२४ उताऱ्यांचे सशुल्क वितरण करण्यात आले.

जमाबंदी : व्यक्तीशः धारण केलेल्या जमिनीची महसूल आकारणी निश्चित करण्याचे काम या विभागाकडून केले जाते. पूर्वी जमिनीच्या पोतावरून म्हणजेच जमिनीतील कसाची खोली, त्यातील गुण-दोष यावरून शेतजमिनीचे वर्गीकरण केले जात असे. बागायत जमिनीचे पाटस्थल आणि मोटस्थल असे दोन प्रकार होते. त्यापैकी पहिल्या प्रकारात नैसर्गिक जलस्त्रोताव्दारे, तर दुसऱ्या प्रकारात उदंचन पध्दतीने पाणी पुरविले जाई. जेथे या दोन्ही पध्दतीने पाणी उपलब्ध असेल तेथील जमीन मिश्र प्रकारात गणली जाई. या सर्व प्रकारच्या जमिनीस वेगवेगळे दर होते.[८४]

हैद्राबाद लॅण्ड रेव्हेन्यू ॲक्ट, १९०७ गठीत झाल्यानंतर वरील वर्गीकरणाच्या पध्दतीत बदल करण्यात आला. जमीन ओलिताखाली आणण्याची पध्दत पूर्णपणे बदलून टाकण्यात आली. जमिनीचा कस पाहून वर्गीकरण करण्याच्या पूर्वीच्या पध्दतीऐवजी जमिनीतील माती व वाळू यांच्या प्रमाणानुसार, तसेच पाटस्थल व मोटस्थलला कोरडवाहू जमीन समजून कर बसविला गेला. खेडयात अशा जमिनीवर उच्च कोरडवाहू म्हणून वेगळे दर असत. हैद्राबाद राज्यातील करनिश्चितीकरणाची जी सर्वसाधारण तत्वे होती, त्यानुसार कोरडवाहू पीक जमीन, बागायत जमीन व भातजमीन यांना स्वतंत्र व जास्त कर असे.[८५]

सध्या जमिनीची उत्पादनक्षमता आणि त्या प्रदेशातील इतर परिस्थितीचा विचार करून जमाबंदी करण्यात येते. अशारितीने निश्चित करण्यात आलेल्या महसुलाची जमाबंदी साधारणपणे ३० वर्षांसाठी असते. जिल्ह्यातील जिराईत व बागाईत जमिनीसाठी अनुक्रमे ८० आर व २० आर असे प्रमाणभूत क्षेत्र ठरविण्यात आलेले आहे.[८६]

जिल्ह्यात एकूण ९४५ गावे असून सर्व गावांमध्ये जमाबंदी निश्चित करण्यात आलेली आहे. पूर्वी जहागीर असलेल्या गावांमध्ये आवश्यक तेथे सूट देऊन फेरजमाबंदी करण्यात आलेली आहे. आतापर्यंत जिल्ह्यात खालसा मूळ सर्व्हे १२८९ फसली (१८८०), रिव्हीजन सर्व्हे १३२२ फसली (१९१३) व जहागिरी मूळ सर्व्हे १३४७ फसली (१९३८) अशा तीन वर्षी जमाबंदी निश्चित करण्यात आली होती. तथापि, आता जमाबंदीचा कालावधी संपलेला आहे. स्वातंत्र्यानंतर खालसा गावात मूळ महसुलात ७२/०.१२ एवढी वाढ केली गेली, तर

८४. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६२६.

८५. कित्ता, ६२६-२८.

८६. **जिल्हा भूमि अभिलेख कार्यालय,** लातूर कडील माहितीवर आधारित.

जहागीर गावात ७.५८४/०.३३ एवढे रिमिशन दिले गेले.[८७] जिल्ह्यात सध्या एकूण लागवडीलायक सर्वसाधारण क्षेत्र ५,११,३०० हेक्टर असून सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात ९.७० लाख रुपये जमीन महसूल प्राप्त झाला होता.

जिल्हा भूमापन: भूमापनाची व जमाबंदीची कामे पूर्ण झाल्यावर ग्रामवार व तालुकावार भूमि अभिलेख ठेवून त्यांचे जतन केले जाते. त्यात वारसा, खरेदी-विक्री, शेतीचे बिगरशेती उपयोगासाठी वर्गीकरण व भूसंपादनामुळे झालेले बदल इत्यादींच्या नोंदी करून अभिलेख अद्ययावत केले जातात. या कामासाठी १९९० ते १९९४ पर्यंत जिल्ह्यात १४ भूकर मापक होते, तर सध्या ३० भूकर मापक कार्यरत आहेत.

शासकीय जमिनीच्या मोजणी व्यतिरिक्त इतर जमिनीची मोजणी जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत बंद असते. सीमा निश्चित करण्याविषयीची खाजगी प्रकरणे दाखल करून घेऊन ती निकालात काढली जातात. सध्या एका सर्हे नंबर किंवा गटासाठी सर्वसाधारणपणे मोजणीसाठी प्रति दोन हेक्टरी ५०० रुपये, सत्वर मोजणीसाठी १,००० रुपये व अतिसत्वर मोजणीसाठी १५०० रुपये शुल्क आकारले जाते. याशिवाय स्वेच्छेने किंवा न्यायालयाव्दारे जमिनीची किंवा भूखंडांची मोजणी करण्यात येते. सन १९९० ते २००१ या कालावधीत जिल्हा भूमापन कार्यालयाकडून एकूण ९,५०० भूखंडांची मोजणी करण्यात आली होती व त्यापासून ४१,५०,००० रुपये शुल्क प्राप्त झाले होते, तर सन २००२ ते ऑगस्ट २००५ या कालावधीत एकूण ३,५६४ भूखंडांच्या मोजणी पासून ४५,०९,१०० रुपये शुल्क प्राप्त झाले होते.[८८]

धारण जमिनीचे एकत्रिकरण : जमिनीची तुकडेबंदी आणि तुकडेजोड करण्यासाठी मुंबई अधिनियम, १९४७ हया उपबंधान्वये राज्यातील शेतजमिनीचे एकत्रिकरण करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. ही योजना सन १९७२ मध्येच उस्मानाबादला व पर्यायाने लातूर जिल्ह्याला लागू करण्यात आली. या पध्दतीमध्ये स्थानिक क्षेत्र व प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करून तुकडयांचे हस्तांतरण करण्यावर व नवीन तुकडे पाडण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. जमिनीच्या निरनिराळया प्रकाराकरिता प्रमाणभूत क्षेत्र निश्चित केले असून अधिकार अभिलेखांमध्ये जमिनीच्या तुकडेबंदीच्या नोंदीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. महसूल विभागाकडून अधिनियमांच्या पहिल्या भागाची अंमलबजावणी ग्रामस्तरावर करण्यात येते, तर दुसऱ्या भागातील उपबंधानुसार जमिनीच्या एकत्रिकरण योजनेचे काम केले जाते. या योजनेकरिता गावे निवडण्याचा हेतू प्रथम अधिसूचित करण्यात येतो. त्यानंतर एकत्रिकरण अधिकारी गावांमध्ये प्रत्यक्ष काम हाती घेतात. त्यानंतर प्रत्यक्ष योजनेचा मसुदा अधिनियमांच्या उपबंधानुसार करण्यात येतो. या योजनेमध्ये शेतकऱ्यांकडील शेतजमिनीचे विखुरलेले तुकडे एकत्र करून त्यांचे कमीत कमी संलग्न गट तयार करण्यात येतात. त्यामुळे खर्च, श्रम यात बचतीबरोबरच शेतकऱ्यास शेती सुधारणा करण्यास मदत होते, शिवाय उत्पादनवाढीसही प्रोत्साहन मिळते. ऑगस्ट २००५ अखेरपर्यंत लातूर तालुक्यातील ११४ गावे, रेणापूर तालुक्यातील ७४ गावे, चाकूर तालुक्यातील ७९ गावे, निलंगा तालुक्यातील

८७. **तालुका भूमि अभिलेख विभाग, लातूर,** कडील माहिती.
८८. कित्ता.

७० गावे, औसा तालुक्यातील ६१ गावे, उदगीर तालुक्यातील ७८ गावे आणि अहमदपूर तालुक्यातील १०४ अशा एकूण ५८० गावातील शेतजमिनीचे एकत्रिकरणाचे काम पूर्ण झालेले आहे.[८९]

नागरी भूमापन व गावठाण योजना : शेतजमिनीच्या प्रारंभिक महसुलाच्या मोजणीवेळी शहरे व गावे यातील गावठाणाखालील क्षेत्राचे भूमापन केले नव्हते. त्यामुळे व्यक्तिगत मालकीचे हक्क दर्शविणारे अधिकार अभिलेख नकाशे उपलब्ध होत नव्हते. असे अभिलेख व नकाशे तयार करण्याच्या दृष्टीने व विकास योजना तयार करणे सोपे जावे म्हणून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ७९ व १२६ मधील तरतुदीनुसार ऑगस्ट २००५ पर्यंत लातूर जिल्ह्यातील लातूर, औसा, रेणापूर, अहमदपूर, चाकूर, उदगीर व निलंगा या सात तालुक्यातील मिळून १२९ गावांचे नगर भूमापनाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर गावांसाठी आता परिरक्षणाचे काम सुरू आहे. नगर व गावठाण भूमापनासाठी होणारा खर्च शुल्करुपाने खातेदारांकडून वसूल केला जातो. यासाठी एका सर्व्हे नंबर किंवा गटासाठी पूर्वी वर्णिल्याप्रमाणेच शुल्क आकारले जाते.[९०] या भूमापन योजनेमुळे अकृषक मालमत्तेवर महसूल आकारणी करण्यास व विकसनशील नगरांसाठी विकास योजना हाती घेण्यासही मदत होते.

राज्यातील सर्व गावांतील गावठाण मोजणी योजनेला शासनाने १९६४ सालीच मंजुरी दिलेली आहे. सध्या या योजनेखालील भूमापनाचे काम दोन हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांपुरते मर्यादित आहे. लातूर जिल्ह्यात सध्या शहर व गावठाण भूमापनाचे काम कोठेही सुरू नाही.

पोलीस

पोलीसांचे प्राथमिक कर्तव्य कायदा व सुव्यवस्था राखणे हे असले तरी त्यात गुन्हा रोखणे व तपास करणे, गुन्हेगार पकडणे, तुरुंगात पाठविणे, पहारा करणे, खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, गुन्हेगारांवरील खटले चालविणे या कामांचा समावेश होतो. सध्या त्यांना वाहतूक नियंत्रण, वाहन तपासणी, अटक वारंट बजावणे, स्फोटक मालाची तसेच विषारी औषधांच्या दुकानांची तपासणी करणे, प्रसंगी आग विझविणे, जखमींना रुग्णालयात दाखल करणे, पासपोर्ट तपासणे आदी कर्तव्येही पार पाडावी लागतात. नैसर्गिक आपत्तीच्या वेळीही ते लोकांच्या मदतीसाठी धावून जातात.

सर सालारजंग प्रथम दिवाणपदी आरुढ होईपर्यंत हैद्राबाद संस्थानात स्वतंत्र पोलीस यंत्रणा नव्हती.[९१] महसूल अधिकाऱ्यावर विविध विभागातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी होती. त्यासाठी त्याच्या नियंत्रणाखाली पोलीस यंत्रणा ठेवली जात असे. इ. स. १८६६ मध्ये संस्थानात जिल्हानिर्मिती झाल्यावर जिल्ह्यांसाठी नियमित व स्वतंत्र पोलीस दल निर्माण करून ते महसूल अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली ठेवले गेले, परंतु ही व्यवस्था

---

८९. अधीक्षक, भूमि अभिलेख, लातूर कडील माहिती.

९०. तालुका भूमि अभिलेख विभाग, लातूर कडील माहितीवर आधारित.

९१. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४७३ व शर्मा, रा. भी., **हैद्राबाद व देशी संस्थाने अर्थात हैद्राबादची राज्यपध्दति आणि संस्थानी स्वराज्याच्या चळवळी,** भाग पहिला, पुणे १९२८, पृ.५७.

समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर इ.स. १८६९ मध्ये संस्थानात सदर-उल-महम किंवा पोलीस मंत्री हे नवीन पद निर्माण करून त्यास पोलीसविषयक सर्व अधिकार बहाल करण्यात आले. वर्षभरानंतर संस्थानातील प्रत्येक विभागासाठी सदर मोहतमीम नेमण्यात आले, पण इ.स. १८८४ मध्ये हे पद रद्द करून त्याऐवजी जिल्हा पोलीस महानिरीक्षक हे पद निर्माण करण्यात आले.[९२] त्यावेळी त्यांचा हुद्दा 'सदर-उल-महम' असा होता. पुढे त्यात मुईन-उल-महम किंवा सहाय्यक मंत्री, असा बदल करण्यात आला.[९३] यावेळी जिल्ह्यातील पोलीसांवर प्रथम तालुकदाराचे नियंत्रण होते व जिल्हा पोलीस अधीक्षक (मोहतमीम) त्यास उपकार्यकारी म्हणून देण्यात आला होता. याशिवाय गुप्त पोलीस शाखा तयार करून तिचे नियंत्रण वऱ्हाडमधील लष्करी अधिकाऱ्याकडे देण्यात आलेले होते. जिल्हा पोलीस खात्यापासून शहर पोलीस खाते अलग होते. त्यामुळे जिल्हा पोलीस खात्याव्यतिरिक्त हैद्राबाद राज्यात सर्फ-इ-खास, दिवाणी किंवा खालसा, आणि पैगाह व जागीर पोलीस अशा तीन भिन्न प्रकारच्या पोलीस यंत्रणा होत्या.[९४]

निजामी राजवटीत जिल्हाधिकारी हे पोलीस यंत्रणेचे प्रमुख होते. पोलीस अधीक्षक त्यांना कामात सहाय्य करीत असत. गुप्त पोलीस संघटना निवडक अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली होती. त्यांच्या मदतीसाठी अमीर, जमादार, दफादार आणि इतर पोलीस अधिकारी होते.[९५]

सन १९२२ मध्ये न्यायिक आणि कार्यकारी शाखा वेगळया करण्यात येऊन महसूल अधिकाऱ्याकडे न्यायिक यंत्रणेची आणि जिल्हाधिकाऱ्याकडे कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सोपविण्यात आली. थोडक्यात, हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन होईपर्यंत म्हणजे सप्टेंबर १९४८ पर्यंत तेथे थोड्याफार फरकाने सर सालारजंग यांनी निर्मिलेली पोलीस यंत्रणा अस्तित्वात होती. त्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्यापासून लातूर जिल्हा वेगळा झाल्यानंतर राज्याच्या इतर जिल्ह्यांप्रमाणे येथे पोलीस यंत्रणा कार्यरत झाली.

लातूर जिल्हा निर्मितीपूर्वी सन १९६१ मध्ये लातूर तालुक्यात लातूर शहर, लातूर ग्रामीण आणि गेटगाव (गातेगाव) येथील पोलीस ठाण्यांच्या अधिकारक्षेत्रात अनुक्रमे १, ५६ व ५९ खेडी; औसा तालुक्यात औसा, किल्लारी व भादा येथील पोलीस ठाण्यांच्या अधिकारक्षेत्रात अनुक्रमे ४१, ४३ व ३५ खेडी; उदगीर तालुक्यात उदगीर, वाढोणा व देवणी येथील पोलीस ठाण्यांच्या अधिकारक्षेत्रात अनुक्रमे ६९, ६४ व ६२ खेडी; अहमदपूर तालुक्यातील अहमदपूर, चाकूर व किनगाव येथील पोलीस ठाण्यांच्या अधिकारक्षेत्रात अनुक्रमे ७६, ६४ व ५२ खेडी, तर निलंगा तालुक्यात निलंगा, शिरुर-अनंतपाळ व कासार-शिरसी येथील पोलीस ठाण्यांच्या अधिकारक्षेत्रात अनुक्रमे ६९, ६२ व ६३ खेडी होती.[९६] प्रशासनाच्या सोयीसाठी जिल्हा निर्मितीपूर्वी असलेल्या लातूर व उदगीर या दोन उपविभागांची जिल्हा निर्मितीनंतर लातूर-ग्रामीण, लातूर-नागरी व उदगीर अशा तीन उपविभागात विभागणी करण्यात आली. याचवेळी मुरुड पोलीस ठाणे व एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे अशी दोन पोलीस ठाणी व नागरी हक्क संरक्षण खाते नव्याने निर्माण करण्यात आले.

---

९२. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ७०.

९३. कित्ता.

९४. कित्ता. पृ. ७१.

९५. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, ४७३.

९६. **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, उस्मानाबाद जिल्हा,** १९६१, म. शासन, मुंबई, १९६६, पृ. ७.

ऑगस्ट १९८२ मध्ये जिल्हा निर्मिती झाल्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्यास असलेले अप्पर पोलीस अधीक्षकांचे पद लातूर जिल्ह्यात वर्ग करण्यात आले. यावर्षी जिल्ह्यात १७ पोलीस ठाणी व १६ पोलीस चौक्या होत्या. १९९४ मध्ये त्यात तीन पोलीस ठाण्यांची भर पडून ही संख्या २० झाली. सन १९८२ मध्ये गुन्हेगारांसाठी असलेल्या १६ अटक-कोठडयातही भर पडून १९९४ मध्ये त्या १८ झाल्या. सन २००० मध्ये जिल्ह्यात असलेली २२ पोलीस ठाणी, १४ पोलीस चौक्या व २० अटक-कोठडयांमध्ये सन २००५ अखेरपर्यंत कोणतीच वाढ झालेली नव्हती. जिल्हा निर्मितीवेळी महिला पोलीस दलाचीही स्थापना करण्यात आली. यावेळी त्यात एक महिला पोलीस हवालदार व तीन महिला पोलीस शिपाई होते, तर १९९४ मध्ये सहा महिला पोलीस शिपाई होते. सन २००० व सन २००५ अखेरीस ही संख्या अनुक्रमे ३ व १७ आणि ३ व ४१ इतकी वाढली.

वर उल्लेखिल्याप्रमाणे जिल्ह्यात लातूर ग्रामीण, लातूर शहर व उदगीर हे तीन उपविभाग व १७ पोलीस ठाण्यांमार्फत पार पाडावयाच्या कायदा व सुव्यवस्थेच्या कर्तव्यासाठी सन २००५ अखेरीस एक पोलीस अधीक्षक, एक अतिरिक्त पोलीस अधीक्षक, आठ पोलीस उप-अधीक्षक, २० पोलीस निरीक्षक, १५ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ५४ पोलीस उप-निरीक्षक, ३९३ पोलीस हवालदार व ८२७ पोलीस शिपाई होते. सन १९९० मध्ये पोलीस मुख्यालयासाठी प्रशस्त इमारत उभारण्यात आली आहे.

जिल्ह्यात सन १९८५, १९९०, २००० व २००४ या वर्षी अनुक्रमे २,८४५, ३,८७७, ५,८२५ व ६,८८० इतके दखलपात्र गुन्हे, तर याच वर्षांमध्ये अनुक्रमे २,३९३९, ५,०७८, ७,२२४ व ९,६६८ इतके अदखलपात्र गुन्हे घडले होते.

सशस्त्र पोलीस दल : जिल्ह्यात सशस्त्र पोलीस दल असून त्यावर राखीव पोलीस उपनिरीक्षकाची शस्त्रागारप्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या दलातील सशस्त्र पोलीसांना विविध प्रकारची रिव्हॉल्वर्स, रायफल, मस्केट, स्टेन कार्बन, गॅस गन अशा प्रकारची शस्त्रे पुरविण्यात येतात.

सध्या वेगाने विस्तारित व आधुनिकीकरण होत असलेल्या लातूर शहरासाठी स्वतंत्र वाहतूक शाखा व नियंत्रण कक्ष अस्तित्वात नव्हते. ते १९८५ मध्ये अस्तित्वात आल्यानंतर सुरुवातीला त्यात कर्मचारी व अधिकारी असे एकूण ३९ एवढे संख्याबळ होते. जुलै २००५ अखेरीस वाहतूक शाखेत तीन अधिकारी व ३६ कर्मचारी, तर नियंत्रण शाखेत सात अधिकारी व १२ कर्मचारी होते.

जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणी बिनतारी संदेश यंत्रणेने जोडलेली असून वाढोणा पोलीस ठाण्याअंतर्गत जळकोट येथे तात्पुरती बिनतारी संदेश यंत्रणा सुरू करण्यात आलेली आहे. बिनतारी संदेश विभागात सात पोलीस उपनिरीक्षकांव्यतिरिक्त प्रमुख यंत्रचालक, सहाय्यक यंत्रचालक, रेडीओ तंत्रज्ञ, वीजतंत्री कारागीर व कर्मशाळा मदतनीस असे अन्य कर्मचारी कार्यरत आहेत. रात्रीच्या गस्तीसाठी बिनतारी संदेश यंत्रणेने सुसज्जित अशी

वाहने अधिकारी व कर्मचाऱ्यांसहित तैनात असतात. त्यांचा पोलीस नियंत्रण कक्षाशी सतत संपर्क असतो. जिल्हा निर्मितीनंतर जिल्ह्यास एकूण ३४ वाहने पुरविण्यात आली होती. सन २००० व जुलै २००५ च्या अखेरीस त्यांची संख्या अनुक्रमे ७८ व ९० इतकी होती. त्यातील वर्षनिहाय अनुक्रमे ४५ व ५३ वाहने बिनतारी संदेश यंत्रणायुक्त होती. सन २०००-२००१ व सन २००४-२००५ या आर्थिक वर्षी पोलीस दलाचा एकूण खर्च अनुक्रमे १३,८२,२०,८०८ रुपये व १८,४९,१८,०८० रुपये होता.

पोलीस कल्याण योजना : जिल्हा निर्मितीनंतर येथील पोलीस दलासाठी पोलीस कुटूंब कल्याण निधी योजना राबविण्यात आली. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी नांदेड नाका येथे ६३, लेबर कॉलनी येथे ७६, गांधी चौक येथे ११, बाभळगाव येथे ३४८ व नावदरगल्ली येथे १ अशी एकूण ४९९ निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत. त्यांची स्वत:च्या मालकीची निवासस्थाने बांधण्यासाठीही याच योजनेंतर्गत इ.स. १९८८ मध्ये लातूर-बार्शी मार्गानजीक जमीन खरेदी करण्यात आली आहे. याशिवाय शिवाजीनगर पोलीस स्थानक येथे कर्मचाऱ्यांकरिता अद्यावत सोयींनी युक्त असे विश्रांतीगृह बांधण्यात आलेले आहे. पोलीस वसाहत, नांदेड नाका येथे कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी बालवाडी बांधण्यात आलेली आहे. बाभळगाव व उदगीर येथील पोलीस वसाहतीत कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी शिवणकाम वर्ग चालविण्यात येतात. कर्मचाऱ्यांच्या मनोरंजनाकरिता प्रत्येक पोलीस स्थानकाला दूरदर्शन संच पुरविण्यात आलेले आहेत, तर पोलीस कल्याण निधी योजनेंतर्गत बँक कर्ज घेऊन काही पोलीसांना मोटार सायकली पुरविण्यात आलेल्या आहेत. याच योजनेखाली त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय सोयीही उपलब्ध करून दिल्या जातात.

लातूर जिल्ह्यासाठी स्वतंत्र कारागृह अद्याप नाही, परंतु लातूर, अहमदपूर, निलंगा व उदगीर येथे प्रत्येकी एक न्यायिक कोठडी आहे. प्रासंगिक कैद्यांना तीन महिन्यापर्यंतच्या सजेसाठी या कोठडयांमध्ये ठेवले जाते व त्यापुढील शिक्षेसाठी उस्मानाबाद येथील जिल्हा कारागृहात पाठविले जाते.

नगरसेना (होमगार्ड) : नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण, अंतर्गत सुरक्षा, अत्यावश्यक सेवा सुरळीत चालू ठेवणे, नैसर्गिक व मानवनिर्मित संकटांना संघटितपणे तोंड देणे आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामी पोलीस यंत्रणेस मदत करणे या उदात्त हेतूने दि. ६ डिसेंबर १९४६ रोजी माजी पंतप्रधान श्री.मोरारजी देसाई यांनी होमगार्डस् संघटनेची स्थापना केली व मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७ अन्वये ही संघटना कायदेशिररित्या राज्यात सर्वत्र स्थापन करण्यात आली. ही मानसेवी संघटना असून सार्वजनिक कार्याची आवड असलेले सुजान नागरिक स्वत:चा नोकरी/व्यवसाय सांभाळून व आवश्यक ते प्रशिक्षण घेऊन देशाच्या या महान कार्यात सहभागी होण्यासाठी या संघटनेचे सभासद होतात. इतर वेळी ते सर्वसाधारण नागरिक असतात. नगरसेनेच्या कार्याचा व्याप पूर्वीपेक्षा वाढला असून या सेनेची पथके गरजेच्या काळात सरकारला मदत करतात. नगरसैनिकांना भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांनी ठरवून दिलेल्या १० शिबिरातून दरवर्षी शारीरिक कवायत, शस्त्र कवायत, पदक कवायत, शस्त्र प्रशिक्षण, प्रथमोपचार, अग्निशमन, विमोचन, लाठी कवायत,

जमाव नियंत्रण, रिव्हॉल्वर चालविणे, नकाशा वाचन, बॉम्ब हल्ल्यापासून बचाव, गोळीबार, प्रशिक्षण, तसेच वाहतूक आणि इतर नागरी जीवनाशी संबंधित असे प्रशिक्षण दिले जाते. मोठया शहरांच्या बाबतीत बस वाहतूक, दूरध्वनी सेवा याबाबतही त्यांना प्रशिक्षण दिले जाते. या संघटनेचे मुख्यालय मुंबई येथे असून शासनाने नियुक्त केलेल्या महासमादेशकांच्या नियंत्रणाखाली ही संघटना कार्य करते. जिल्हा पातळीवर जिल्हा समादेशक या संघटनेच्या कार्याचा व्याप सांभाळतात, तर तालुका पथके तालुका पातळीवरील समादेशकांच्या अधिपत्याखाली काम करतात. जिल्हास्तरावर या संघटनेत कमांडंट आणि अनेक सहाय्यक अधिकारी असतात. ही संघटना डिव्हीजन, कंपनी, प्लाटून्स व सेक्शन अशा चार स्तरांमध्ये विभागलेली असते.

उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन लातूर जिल्हा अस्तित्वात आल्यानंतर जून १८८४ मध्ये जिल्हा समादेशक, होमगार्डस् यांचे कार्यालय लातूर येथे अस्तित्वात आले. यावर्षी जिल्ह्यात २३६ शहरी व १५० ग्रामीण असे एकूण ३८६ नगरसैनिक होते. सन १९९४ साली जिल्ह्यात लातूर, औसा, निलंगा, उदगीर व अहमदपूर येथे तालुका पथके होती व त्यांना शहरी, ग्रामीण व महिला सैनिक मिळून १००० सैनिक भरतीचे लक्ष्य देण्यात आले होते. सन २००४ साली हेच लक्ष्य ११५० (पु.१०५०, १००) इतके होते. त्यासाठी ९५५ (पु.८६०, म. ९५) सैनिकांची भरती करण्यात आली होती.

उल्लेखनिय कामगिरी : या संघटनेचे जिल्हा कार्यालय अस्तित्वात आल्यानंतर जिल्ह्यातील अनेक संकटप्रसंगी तसेच निवडणूक बंदोबस्त, धार्मिक उत्सव व इतर आवश्यक त्यावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामी जिल्ह्यातील नगरसैनिकांनी पोलीस यंत्रणेस व नागरिकांस भरीव मदत केलेली आहे. सन १९८७ मध्ये आंध्र प्रदेश पंचायत राज्य निवडणूक काळात या जिल्ह्यातील १०० नगरसैनिक व अधिकाऱ्यांनी बंदोबस्तासाठी मोलाची कामगिरी बजावली होती. सन १९९३ च्या विनाशकारी भूकंपात संघटनेच्या कर्मचारी-अधिकाऱ्यांनी शेकडो लोकांचे प्राण वाचविले होते. या कार्यालयात ६५० पुरुष व महिलांनी भाग घेतला होता.

वरील कार्याव्यतिरिक्त संघटनेतर्फे वृक्षारोपण, रक्तदान, नेत्रदान, कुटूंबकल्याण, अल्पबचत, ग्रामसफाई आदी उपक्रमही राबविले जातात. येथील नगरसैनिक दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात तसेच अखिल भारतीय होमगार्डस् व नागरी संरक्षण क्रीडा स्पर्धेत हिरिरीने भाग घेतात.

न्यायालये

निजाम-उल-मुल्क हैद्राबादचा सत्ताधीश बनल्यानंतर मुघलकालीन न्यायसंस्थेची जी घटना होती, तीच त्याने पुढे चालू ठेवली. मुघल राजवटीत न्यायदानासाठी काजी असत. सर्वसाधारणपणे १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत दिवाणी आणि फौजदारी न्यायासंबंधीचे अधिकार तालुकदार, मामलतदार आणि पाटील या महसूल अधिकाऱ्यांकडे सोपविलेले होते. हैद्राबाद संस्थानात स्वतंत्र अशी न्यायदान व्यवस्था नव्हती,[९७] तर परंपरा व रुढी यांच्या

९७. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४७८.

आधारे न्यायदानाचे काम चालत असे. खेडेगावातील किरकोळ तक्रारींचे न्यायदान पाटील करीत. त्यांचा निकाल प्रतिवादींना मान्य नसल्यास त्याची सुनावणी पाटलांच्या पंचायतीसमोर होत असे. तेथेही वाद निकाली न निघाल्यास त्याची सुनावणी मामलतदारापुढे होई. याबाबतीतले अंतिम अधिकार सुभेदाराला होते. वारसा हक्क, जागीर, वतन, पैशाचे व्यवहार, अहस्तांतरणीय मालमत्ता इत्यादी प्रकारच्या खटल्यांचे निकाल देण्याचे काजी व मुक्ती यांना अधिकार होते.

इ.स. १८४५ मध्ये हैद्राबाद संस्थानाचे पंतप्रधानपद नबाब सिराज-उल-मुल्ककडे आले. त्याच्या कारकिर्दीत दाव्याच्या रकमेवर दरसाल १२% व्याज आकारले जाई. फौजदारी गुन्हयाकरिता शिक्षा ठरविण्यासाठी न्यायाधिशाची नेमणूक करण्यात आली होती. जिल्ह्याचे न्यायविषयक काम मुन्सिफ आणि आदिल हे करीत असत. हुशार व लायक काजींची मुन्सिफ आणि मीर आदिल या पदांवर नेमणूक केली जात असे. त्यांनी दिलेला न्याय अंतिम समजला जाई. काही महत्त्वाचे खटले मात्र हैद्राबाद येथील फौजदारी अदालतीसमोर फेरतपासणीसाठी पाठविण्यात येत. जिल्हा न्यायालयात दिवाणी आणि फौजदारी खटल्यांच्या निकालासंबंधी नियमांची मार्गदर्शिका तयार करण्यात आली होती.

निजामशाहीतील दिवाणी व फौजदारी न्यायदान : हैद्राबाद राज्यात या कामासाठी उच्च न्यायालयासहीत १२३ दिवाणी व २७१ फौजदारी न्यायालये होती, पण फक्त ७९ तहसीलदार आणि पाच नायब तहसीलदार दिवाणी अधिकार वापरीत.[९८] जेथे मुन्सीफ नेमलेले असत तेथे तहसीलदारास दिवाणी न्यायदानाच्या कामाचा भार नसे. राज्यात असे १५ मुन्सीफ होते व ते ५०० रु. पर्यंतचा दावा चालवित असत. जिल्हा नागरी कोर्ट हे नाजिम-(निजाम)-इ-दिवाणी या नावाने जिल्हा दिवाणी न्यायाधिशाच्या नियंत्रणाखाली कार्यरत होते. प्रथम वर्ग तालुकदार हा जिल्ह्याचा मुख्य न्यायदंडाधिकारी असे. त्याच्या गैरहजेरीत जिल्हा दिवाणी न्यायाधीश हा सहदंडाधिकारी या नात्याने त्याचे अधिकार वापरीत असे. व्दितीय व तृतीय वर्ग तालुकदार आणि तहसीलदार हे न्यायदानातील दुसऱ्या व तिसऱ्या दर्जाचे अधिकार वापरीत.[९९] प्रत्येक तालुका तहसीलदाराच्या नियंत्रणाखाली होता. उपरोक्त सहदंडाधिकारी ५,००० रु. पर्यंतचा दावा चालवित. त्यातही फक्त पाच प्रथम वर्ग तालुकदार दिवाणी अधिकार वापरीत. नाजिम (निजाम)-इ-सुभा किंवा विभागीय न्यायाधीश रु. ५,००० व त्यापेक्षा जास्त किंमतीचा दावा चालवित. तहसीलदार किंवा मुन्सिफकडून प्रथम वर्ग तालुकदाराकडे किंवा नाजिम-इ-दिवाणीकडे, तर नाजिम-इ-दिवाणी किंवा प्रथम वर्ग तालुकदाराकडून नाजिम-इ-सुभाकडे अपिल करता येत असे. ३०० रु. पर्यंतच्या दाव्याच्या दिवाणी तक्रारीत उपकोर्टाच्या निकालावर जिल्हा कोर्ट समाधानी असल्यास त्यावर अपिल करता येत नसे, पण उजळणी होऊ शके. तसेच ५०० रु. पर्यंतच्या दाव्यावर लघुवाद न्यायालयाच्या उपन्यायाधिशाने दिलेल्या निकालावरही अपिल करता येत नसे, पण त्याची उच्च न्यायालयात उजळणी होऊ शके.

---

९८. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५४.

९९. कित्ता. पूर्वोक्त, पृ. २६५.

फौजदारी न्यायाच्या बाबतीत तहसीलदार तृतीय दर्जाचे, तर व्दितीय व तृतीय वर्ग तालुकदार व्दितीय दर्जाचे न्यायालयीन अधिकार वापरीत. वर म्हटल्याप्रमाणे प्रथम वर्ग तालुकदार हा जिल्ह्याचा मुख्य व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी असे. फौजदारी तक्रारीच्या बाबतीत (खुनाचा प्रयत्न वगळून) नाजिम-इ-सुभा ५००० रु. पर्यंतचा दंड करू शकत असे, पण कायदयात त्यावर पुनरिक्षण होण्याची तरतूद होती. इतर बाबतीत उच्च न्यायालयाचे निर्णय अंतिम असत. शहराच्या इतर न्यायदंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या तीन महिन्यांपेक्षा जास्त नसलेल्या शिक्षेवर किंवा १०० रु. पर्यत दंडाच्या शिक्षेसाठी मुख्य शहर न्यायदंडाधिकाऱ्यापुढे अपिल करता येत असे, मात्र त्यापेक्षा जास्त दंड किंवा शिक्षेविरुध्द उच्च न्यायालयात अपिल करता येत असे. यासाठीच्या मूळ दाव्याच्या सुनावणीकरिता उच्च न्यायालय सत्र न्यायाधिशाचे अधिकार वापरीत असे. उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठांना १४ वर्षे शिक्षेचे अधिकार होते, पण आजीवन तुरुंगवासासाठी उच्च न्यायालयाने तसा प्रस्ताव मंत्र्याकडे पाठवावा लागे. मृत्यूदंडाच्या शिक्षेवर निजामाचे शिक्कामोर्तब आवश्यक असे. मोठे जागीरदार, संस्थानिक आपापल्या क्षेत्रात दिवाणी व फौजदारी असे दोन्ही प्रकारचे न्यायीक अधिकार वापरीत व तसा ठराविक कालावधीचा अहवाल राज्याच्या न्यायविभागाकडे पाठवित.[१००]

सर सालारजंग यांनी हैद्राबाद राज्याच्या पंतप्रधानपदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर प्रथमच प्रशासकीय कामकाजाबरोबर न्यायालयीन कामकाजात मूलगामी सुधारणा केल्या. त्यांनी इ.स. १८५५ मध्ये मुन्सिफ आणि मीर आदिल यांची दिवाणी दावे आणि फौजदारी खटल्यांच्या चौकशीसाठी नेमणूक केली. दरोडेखोरी, चोऱ्या आणि इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी १८५८ पासून सुसज्ज फौजा तयार करण्यात आल्या. सन १८७० साली सर सालारजंग यांनी कायदे करण्यासाठी एक कमिटी नेमली होती. त्यानंतर १८९० साली लॉ कमिशन नावाची एक संस्थाही निर्माण करण्यात आली होती. त्यानंतर फक्त कायदे करणे या उद्देशाने कायदेमंडळाची (Legislative Council) सन १८९३ मध्ये स्थापना करण्यात आली. या मंडळाच्या सभासदांची संख्या २५ होती.[१०१] पुढे निजामाने १९१९ मध्ये मुख्य राज्यकारभाराचे काम कार्यकारी मंडळ (Executive Council) नेमून त्याकडे सुपूर्द केले जाईल असे फर्मान काढले होते. तथापि, त्यापूर्वीच निजामाने स्वतःकडे सर्व अधिकार घेतांना १९१४ मध्ये मंत्रिमंडळ (Cabinet Council) अस्तित्वात आणले होते. पण तेही वरील १९१९ च्या फर्मानाने रद्द करून नवीन कार्यकारी मंडळ (Executive Council) अस्तित्वात आणले होते.[१०२]

यानंतरच्या काळात न्यायदान व्यवस्थेत बदल करण्यात आले. सन १९२१ पर्यंत न्यायशाखा स्वतंत्र नव्हती. महसूल विभागाकडे न्यायदानाची जबाबदारी होती. तथापि, या वर्षी हे खाते शासकीय संबंधापासून अलग करण्यात आले व नवीन पध्दतीनुसार जिल्ह्यातील न्यायदान व्यवस्थेच्या प्रमुखपदी जिल्हा आणि सत्र न्यायाधिशांची नेमणूक करण्यात आली. असे असले तरी जिल्हाधिकारी हे आजही मुख्य जिल्हा न्यायदंडाधिकारी म्हणून काम पाहतात. उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांनाही न्यायदंडाधिकाऱ्याचे अधिकार देण्यात

---

१००. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५५.
१०१. शर्मा, रा. भी., पूर्वोक्त, पृ. १२.
१०२. कित्ता, पृ. ९.

आलेले आहेत. त्यांना कार्यकारी दंडाधिकारी (Executive Magistrate) म्हटले जाते. याशिवाय जिल्ह्यात प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी असतात. त्यापैकी काहींना फौजदारी व्यवहार संहिता (Criminal Procedure Code) मधील १०७ आणि १४५ या प्रकरणांखाली येणाऱ्या खटल्यांबाबत चौकशी करण्याचे अधिकारी दिलेले आहेत. याशिवाय १४३, १४४,१६४ आणि १७४ या प्रकरणांखालीही येणाऱ्या खटल्यांच्या चौकशीचे अधिकार देण्यात आलेले आहेत. जिल्ह्यामध्ये फौजदारी खटले चालविणाऱ्या इतर न्यायदंडाधिकाऱ्यांवर जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्याचे कोणत्याही स्वरुपाचे प्रशासकीय नियंत्रण नसते.[१०३] जिल्हा दिवाणी व सत्र न्यायाधिशाला तालुका पातळीवर सहाय्यक म्हणून तालुका न्यायदंडाधिकारी मदत करतात.

फौजदारी न्यायदान : लातूर जिल्हा व सत्र न्यायालयाची स्थापना डिसेंबर १९८२ मध्ये झाली. या न्यायालयाच्या प्रमुखपदी जिल्हा व सत्र न्यायाधीश असतात. त्यांच्या अधिकारकक्षेत संपूर्ण जिल्हा येतो. ते दिवाणी आणि फौजदारी (खुनाचे खटले वगळून) स्वरुपाचे मूळ दावे आणि अपिल यासंबंधीचे काम पाहतात. लातूर जिल्हा निर्मितीपूर्वी उस्मानाबाद जिल्ह्यासाठी उस्मानाबाद येथे एक अतिरिक्त सत्र न्यायाधीश असत. त्यांच्या कार्यक्षेत्रात लातूर, औसा, निलंगा, अहमदपूर व उदगीर या सध्याच्या तालुक्यांचा समावेश होता. इतर तालुके उस्मानाबादच्याच सत्र न्यायाधिशांच्या अखत्यारित होते.[१०४] सध्या अलीकडील देवणी, शिरुर-अनंतपाळ व जळकोट हे नवीन तालुके वगळता प्रत्येक तालुक्यात एक न्यायालय असून दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ व कनिष्ठ स्तर) त्याचे प्रमुख असतात. न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश या दोघांचाही संवर्ग एकच असतो व ते फौजदारी संहिता अन्वये प्राप्त अधिकारांच्या मर्यादेत सर्व प्रकारचे फौजदारी खटले हाताळतात. जिल्ह्यात सन २००१ अखेरीस जिल्हा व सत्र न्यायाधिशांच्या मदतीस दोन सहजिल्हा न्यायाधीश व चार अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश होते. शिवाय तालुका पातळीवरील दिवाणी न्यायाधीशही आहेत.[१०५] तथापि, जुलै २००५ अखेरपर्यंत सहजिल्हा न्यायाधीश नियुक्त केले गेले नव्हते. मात्र अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशांची संख्या आठ इतकी करण्यात आली. सत्र न्यायाधिशाला एखादी शिक्षा किंवा आदेशात बदल करण्यासंबंधीच्या शिफारशीसही ते प्रकरण आदेशार्थ उच्च न्यायालयाकडे पाठविण्याचे अधिकार आहेत.

दिवाणी न्यायदान : दिवाणी व्यवहार संहितेत अभिप्रेत असल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा न्यायालय असावे व ते मूळ अधिकारिता असलेले जिल्ह्यातील प्रमुख न्यायालय असावे अशी तरतूद मुंबई दिवाणी अधिनियमात केलेली आहे. जिल्हा न्यायाधीश जिल्ह्यातील सर्व दिवाणी न्यायालये व त्यांच्या आस्थापनांचे नियंत्रण करतात. त्यांना दुय्यम असणाऱ्या सर्व न्यायालयांच्या कामकाजाची तपासणी करणे किंवा आपल्या सहाय्यकांकडून तपासणी संबंधीचे काम करून घेणे आणि कायदयामध्ये तरतूद नसलेल्या प्रकरणांच्या बाबतीत

१०३. **सेन्सस ऑफ इंडिया,** १९६१, डिस्ट्रिक्ट सेन्सस हॅण्डबूक, उस्मानाबाद, महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९६६, पृ.७.

१०४. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६१४.

१०५. जिल्हा व सत्र न्यायालयाकडील माहिती.

आवश्यक वाटतील ते आदेश देणे इत्यादी कामे त्यांना करावी लागतात. निर्णयासाठी काही प्रकरणे उच्च न्यायालयाकडे पाठविण्याचे अधिकार जिल्हा न्यायाधिशांना असतात. जिल्हा न्यायाधिशांना मूल्याच्या दृष्टीने २५ हजार रु. पेक्षा कमी किंमतीच्या कब्जाविषयी मूळ दाव्यांविषयीचे संकीर्ण अर्ज विशेष अधिनियमानुसार सहाय्यक न्यायाधिशांकडे पाठविता येतात. सहायक न्यायाधिशांना जिल्हा न्यायाधिशांकडे दाखल करण्यात आलेली दुय्यम न्यायालयाच्या हुकूम व आदेशाविरुध्दची अपिले आणि तो जी सत्र न्यायाधिशाकडे पाठवू शकेल अशी अपिले यांचे कामकाज चालविण्याचे अधिकार आहेत.

दुय्यम न्यायालयाचे प्रमुख म्हणून दिवाणी न्यायाधीश काम पाहतात. त्याचे वरिष्ठ व कनिष्ठ असे स्तर असून जिल्ह्यात ते सुमारे दहा हजार रुपयांपेक्षा जास्त किंमतीचे दिवाणी दावे चालवितात.[१०६] दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांच्या अधिकारकक्षेत जिल्ह्यातील कनिष्ठ स्तराच्या दिवाणी न्यायाधिशांच्या अधिकाराखालील सर्व मूळ दावे व दिवाणी स्वरुपाचे कामकाज यांचा अंतर्भाव होतो. सध्या जिल्ह्यात सहा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), १४ दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), व एक मुख्य न्यायदंडाधिकारी (जिल्हाधिकारी) आहेत. मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांचे कार्यालय लातूर येथे आहे.

लातूर येथील जिल्हा न्यायाधीश फौजदारी न्यायालयाचे खटले चालवितात. हे खटले कनिष्ठ न्यायालयाने पूर्व चौकशी केलेले असतात. फौजदारी न्यायाधिशांना अस्तित्वात असणाऱ्या कायदयाप्रमाणे शिक्षा सुनावण्याचे अधिकार आहेत. ते उच्च न्यायालयाच्या संमतीने मृत्यूदंडाचीही शिक्षा फर्मावू शकतात. जिल्ह्यात प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी त्यांच्या अधिकारक्षेत्रात मोडणाऱ्या फौजदारी खटल्यांचे निकाल देतात.

सध्या जिल्ह्यात लातूर, निलंगा व अहमदपूर येथे वरिष्ठ स्तर आणि कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालये आणि औसा, उदगीर, चाकूर येथे केवळ कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालये आहेत. सन १९९०-९१ मध्ये जिल्ह्यात १५ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी होते. सन २००५ च्या अखेरीस ही संख्या १४ झाली. लातूर शहरात आजमितीस विविध प्रकारची २७ न्यायालये असून उदगीर, अहमदपूर व निलंगा येथे प्रत्येकी चार आणि औसा व चाकूर येथे प्रत्येकी दोन न्यायालये आहेत. याचबरोबर लातूर शहरात ८०० वकील (पुरुष-६७५, महिला-१२५), उदगीरमध्ये २१० (पु.१८५,म.२५), अहमदपूरमध्ये ७०(पु.६५,म.५) निलंगामध्ये ६८(पु.६५, म.३), औसामध्ये ५५ व चाकूर शहरात ३८(पु.३६, म.२) वकिलीचा व्यवसाय करतात.

सन १९८५-८६ मध्ये जिल्हा व सत्र न्यायालयाचा खर्च १२,१७,४६८ रुपये, १९९०-९१ मध्ये ६,८४,१६२ रुपये व २०००-२००१ मध्ये ३,४३,३६,७१२ रुपये असा होता.

---

१०६. जिल्हा व सत्र न्यायालयाकडील माहिती.

जिल्ह्यातील दाखल झालेले फौजदारी व दिवाणी खटले.[१०७]

वर्ष	दिवाणी	फौजदारी
१९८५	५,८१३	११,६८७
१९९०	१३,०७१	१२,२१०
१९९५	५,३१५	१६,३८९
२००१	१०,१४६	३०,४१६
२००४	९,१८६	२२,३५५

निर्णय दिलेले फौजदारी व दिवाणी खटले.[१०८]

वर्ष	दिवाणी	फौजदारी
१९८५	३,३४१	११,५०४
१९९०	८,४३०	११,४१३
१९९५	४,३७९	१६,३४२
२००१	९,७२६	२६,७७९
२००४	९,५३५	२१,२२५

जिल्ह्यात निरनिराळ्या स्वरुपाचे दाखल झालेले आणि शासनाच्या वतीने जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता यांनी निकालात काढलेले दिवाणी व फौजदारी खटले.[१०९]

वर्ष	दिवाणी		फौजदारी	
	दाखल	निकाली	दाखल	निकाली
१९८५	१,३४२	३१९	१,२९३	५६४
१९९०	१,१९०	७३२	८३२	७६३
१९९५	१,२८०	५८३	९५८	९००
२००१	१,३३२	२०१	७४२	८५२
२००४	१५४	३६	७८८	८४

या व्यतिरिक्त सन २००४ च्या अखेरपर्यंत दाखल झालेल्या २,०९७ भूसंपादन प्रकरणांपैकी ६०१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. सन २००४-२००५ या आर्थिक वर्षाचा जिल्हा व सत्र न्यायालयाचा खर्च ४,९५,४०,९६४ रुपये इतका होता.

१०७. जिल्हा व सत्र न्यायालयाकडील माहिती.

१०८. कित्ता.

१०९. कित्ता.

लोकन्यायालये :[११०] जिल्ह्यात न्यायसंस्थेव्दारा लोकन्यायालये भरवून कित्येक वर्षे प्रलंबित असलेली प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात येतात. लातूर जिल्ह्यात सन १९९०-९१ ते आतापर्यंत एकूण १४६ लोकन्यायालये भरविण्यात आली. त्यात एकूण २२,७२१ प्रकरणे दाखल करून घेऊन ८,००६ प्रकरणे निकाली काढण्यात आली. याव्यतिरिक्त सन २००० ते २००४ या कालावधीत मोटर अपघात दाव्यासंबंधी दाखल करण्यात आलेल्या ४८३ प्रकरणांपैकी १८५ प्रकरणे झटपट निकाली काढण्यात आली. जनतेचाही अशा लोकन्यायालयांकडे ओढा असल्याचे ही आकडेवारी दर्शविते.

लोकन्यायालयांव्यतिरिक्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत कायदेविषयक साक्षरता कॅम्प्स आयोजित केले जातात. सन २००० ते २००४ या कालावधीत लातूर तालुक्यात सात, औसा तालुक्यात आठ, अहमदपूर तालुक्यात १०, निलंगा तालुक्यात सात, उदगीर तालुक्यात नऊ व चाकूर तालुक्यात सहा असे एकूण ४७ कायदेविषयक साक्षरता कॅम्प्स घेण्यात आले. त्यात साधारणतः बावीस हजार लोकांनी भाग घेतला.

मोटर अपघात दावा न्यायाधिकरण :[१११] हे न्यायाधिकरण जिल्हा न्यायालय परिसरात कार्यरत असून त्यात सन २००० ते २००४ पर्यंत खालीलप्रमाणे प्रकरणे दाखल करून निकाली काढण्यात आली.

वर्ष	दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या	निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या
२०००	५५५	३२९
२००१	५३५	३६९
२००२	५७७	५१४
२००३	५०७	३६२
२००४	४५६	५९४

स्थानिक स्वराज्य संस्था

इ. स. १८८४ च्या दस्तूर-अल-अमल अन्वये मराठवाडयात जिल्हा व तालुका बोर्डाची स्थापना करण्यात आली.[११२] हैद्राबाद संस्थानात इ. स. १८८७ मध्ये लोकल बोर्डाची स्थापना झाली व ते हैद्राबाद येथील मध्यवर्ती मंडळाच्या (सेंट्रल बोर्ड ॲक्ट हैद्राबाद) देखरेखीखाली ठेवण्यात आले. हे मध्यवर्ती मंडळ (सद्र) इ. स. १८९४ मध्ये बरखास्त करण्यात आले आणि सुभेदारास पाच हजार रुपयांपर्यंतची स्थानिक हिताची कामे मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आले. त्यानंतर लोकल बोर्डावर महसूल मंडळाचे नियंत्रण ठेवण्यात आले व दहा हजार रुपयांपर्यंतच्या कामांना मंजुरी देण्याचे प्राधिकार देण्यात आले. मात्र यापेक्षा जास्त रकमेच्या कामांना मंत्र्याची मान्यता घ्यावी लागे.[११३]

हैद्राबाद संस्थानात इ. स. १९०१ मध्ये १३ जिल्हा मंडळे (District Boards) आणि

११०. **लोकन्यायालय कार्यालय,** लातूर कडील माहिती.
१११. **जिल्हा व सत्र न्यायालय,** लातूर कडील माहिती.
११२. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४८३.
११३. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.६४.

७० तालुका मंडळे होती. त्यांची सभासद संख्या अनुक्रमे १८२ आणि ५६० इतकी होती,[११४] तर सन १९२५ मध्ये १५ जिल्हा मंडळे व १०३ तालुका मंडळे होती.[११५] जिल्हा मंडळात सर्वसाधारणपणे प्रथम तालुकदार हा अध्यक्ष असे व तो सर्व तालुका बोर्डाच्या कामावर लक्ष ठेवीत असे. नगरपालिकांच्या कारभारावरही त्याचे लक्ष असे. जिल्हा मंडळात अध्यक्षाव्यतिरिक्त १३ सदस्य असत. पैकी सात अवैधानिक (non-officials) सदस्य हे जमीनदार, प्रसिध्द व्यापारी व वकील वर्गातून निवडलेले असत. वैधानिक (official) सदस्यांमध्ये अध्यक्षांव्यतिरिक्त महसूल मुख्यालयातील महसूल सहाय्यक, जिल्हा अभियंता, पोलीस अधीक्षक, जिल्हा वैद्यकीय अधिकारी, तहसीलदार व शाळेचे मुख्याध्यापक असत. जिल्हा बोर्डाला दोन हजार रुपयांपर्यंतच्या कामांना मंजुरी देण्याचा अधिकार होता.[११६] तालुका बोर्ड हे जिल्हा बोर्डाची कनिष्ठ शाखा असे व त्यात व्दितीय किंवा तृतीय तालुकदार व तहसीलदार हे दोन शासकीय, तर तीन अशासकीय सदस्य असत. त्यातही तहसीलदार हा अध्यक्ष असे. तालुक्याशी संबंधित कामांवरील खर्चावर तालुका बोर्ड नियंत्रण ठेवीत असे. या खर्चास जिल्हा बोर्डाची मंजुरी लागे. तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद वगळता प्रत्येक तालुक्यात स्थानिक बोर्ड होते.[११७] यात सध्याच्या लातूरमधील जुन्या तालुक्यांचा समावेश होता.

ही स्थानिक मंडळे जमा करीत असलेल्या स्थानिक उपकरांच्या उत्पन्नातून रस्ते बांधणे व दुरुस्ती, शाळा, दवाखाने व विश्रांतीगृहे बांधणे, देखभाल करणे इत्यादी लोकोपयोगी कामांवर खर्च केला जात असे. स्थानिक उपकर शेतसाऱ्याबरोबरच वसूल केला जाई. हे उपकर ग्राम पोलीस निधी-चार पैसे, शिक्षण निधी-दोन पैसे, रस्ते निधी-दोन पैसे, वैद्यकीय निधी-एक पैसा, सामान्य सुधारणा निधी-तीन पैसे असे होते. वरील बाबींव्यतिरिक्त शहरातील रस्तेदुरुस्ती, पूल, उपमार्ग, तरीपार, दवाखाने, धर्मशाळा, सराई, बाजार, विहिरी, बागा, दिवाबत्ती, स्वच्छता, शहर पोलीस व स्थानिक मंडळांच्या शाळा, जनावरांचे रोग यावरही ही बोर्डे खर्च करीत.[११८]

महाराष्ट्रात विदर्भ वगळता जिल्हा मंडळे संपूर्ण राज्यात कार्यरत होती. लातूर जिल्हा अंतर्भूत उस्मानाबाद जिल्ह्यात ५,००० व त्यापेक्षा जास्त लोकसंख्येच्या प्रत्येक खेड्यात सन १९४१ पासून ग्रामसंस्थांचे कार्य सुरू होते. स्वातंत्र्यानंतर लोकांच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शासनाने पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम हाती घेतला. सन १९५२ मध्ये निवडक विभागात प्रायोगिक योजना म्हणून समाजविकासाच्या कार्यक्रमांना सुरुवात करण्यात आली. या निवडक विभागांना समाजविकास प्रकल्प समजण्यात येऊ लागले. त्यानंतर विस्तार संघटनेच्या रुपाने एक कायम यंत्रणा स्थापण्याचे शासनाने ठरवून प्रत्येक प्रकल्प विकास गटासाठी एक प्रकल्प वा विकास सल्लागार मंडळ नेमण्यात आले. हाती घ्यावयाच्या कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्याच्या कामी सल्ला देणे हे या मंडळाचे काम होते. राज्य पुनर्रचनेनंतर व्हिलेज पंचायत ॲक्ट पास करून पूर्ण राज्यास लागू करण्यात आला. या कायदयान्वये प्रत्येक जिल्ह्यात ग्रामपंचायत मंडळ (Village Panchayat Mandal) स्थापन करण्यात आले. या मंडळाव्यतिरिक्त पाच किंवा त्यापेक्षा जास्त खेड्यांच्या समुहासाठी गट न्यायपंचायतीही स्थापन करण्यात आल्या.[११९]

११४. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.६४.
११५. शर्मा, रा. भी., पूर्वोक्त, भाग १, पृ. १९.
११६. कित्ता, पृ. ६४.
११७. **इम्पेरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २६६.
११८. कित्ता, पृ. ६५.
११९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६८०.

पंचायत राज

कालौघात ग्रामविकासाची पातळी खाली येण्यामागील कारणमिमांसा शोधणे आणि सामुहिक विकास योजनांचा आशय, कार्यपध्दती व कामाचा उरक इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यासाठी शासनाने इ. स. १९५७ मध्ये बलवंतराय मेहता समितीची स्थापन केली होती. अभ्यासाअंती समितीला असे आढळून आले की, सामुहिक विकास योजना किंवा राष्ट्रीय विस्तार योजना लोकांच्या नेतृत्त्व शक्तीला आवाहन करण्याच्या कामी अयशस्वी ठरलेल्या आहेत. स्थानिक मंडळांनीही या कार्यक्रमात विशेष उत्साह दाखविला नाही. त्यावर उपाय म्हणून जिल्हा, तालुका व ग्राम पातळीवर जबाबदाऱ्या व सत्तेचे विकेंद्रीकरण करावे, विभागातील विकास कामांची संपूर्ण जबाबदारी त्या त्या संस्थांकडे सोपवून सरकारचे मार्गदर्शन, देखरेख व पैसा उपलब्ध करून देण्याचे अधिकार आपल्याकडे ठेवावेत अशी शिफारस या समितीने केली. त्याशिवाय जिल्हा पातळीवरील जिल्हा कमिटी किंवा जिल्हा स्थानिक मंडळाला (District Local Board) जिल्हा परिषद, ब्लॉक डेव्हलपमेंट कमिटीला किंवा तालुका मंडळाला पंचायत समिती व ग्रामपातळीवरील स्थानिक किंवा ग्रामपंचायत मंडळाला ग्रामपंचायत असे नाव देण्यात यावे असेही सुचविले.

दि. १२ जानेवारी १९५८ रोजी भरलेल्या राष्ट्रीय विकास बैठकीत मेहता समितीने केलेल्या शिफारशी मान्य झाल्या व त्यानुसार लोकशाही विकेंद्रीकरण करण्याचे भारत सरकारने ठरविले. सर्वप्रथम राजस्थान व त्यानंतर आंध्रप्रदेश राज्याने हे पंचायत राज स्विकारले. महाराष्ट्रात पंचायत राज स्थापण्याकरीता १ मे १९६० रोजी मा.वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आपला अहवाल १५ मार्च १९६१ रोजी सादर केला. समितीने केलेल्या शिफारशीनुसार तयार केलेले विधेयक काही किरकोळ फेरबदलासह दि. ८ सप्टेंबर १९६१ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act) या नावाने संमत झाले व राज्यात दि. १ मे १९६२ पासून खऱ्या अर्थाने पंचायत राज प्रशासन निर्माण झाले. त्यानुसार शासनाने जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदा, गटपातळीवर पंचायत समित्या आणि ग्रामपातळीवर ग्रामपंचायतींची स्थापना केली.

१९६१ च्या महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमानुसार जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची स्थापना झाल्यावर त्यावेळी अस्तित्वात असलेल्या जिल्हा स्थानिक मंडळ (District Local Board), जिल्हा शाळा मंडळ, तालुका मंडळ, जिल्हा विकास मंडळ व ग्रामपंचायत मंडळ या संस्था रद्द करण्यात आल्या.

बॉम्बे व्हिलेज सॅनिटेशन ॲक्ट, १८८९, बॉम्बे डिस्ट्रिक्ट व्हॅक्सिनेशन ॲक्ट १९५६, हैद्राबाद डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिटीज ॲक्ट १९५६, बॉम्बे लोकल फंड ऑडीट ॲक्ट, १९३०, बॉम्बे व्हिलेज पंचायत ॲक्ट, १९५८, व महाराष्ट्र जिल्हा परिषदस् ॲण्ड पंचायत समितीज् ॲक्ट, १९६१ या अधिनियमांन्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या कामकाजाची विभागीय आयुक्त विहित नियमानुसार तपासणी करतात. अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीच्या वैधतेबद्दल निर्माण होणाऱ्या विवादांचा निर्णय घेणे, जिल्हा परिषदेच्या क्षेत्राबाहेरील खर्चाला मंजुरी देणे, आस्थापनेवरील खर्चावर नियंत्रण ठेवणे इत्यादी अधिकार आयुक्तांना

आहेत. सन १९६५ मध्ये महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज ॲक्ट पास झाल्यानंतर नगरपालिकांवरील आयुक्तांचे नियंत्रण काढून घेण्यात आले. त्यांच्या मदतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या दर्जाच्या उपायुक्ताची नियुक्ती केली जाते. तो आयुक्तांच्या कार्यालयातील विकास शाखेचा प्रभारी अधिकारी असतो. जिल्हाधिकाऱ्याचा जिल्हा परिषदेचा कामकाजाशी व जिल्हा परिषद, तालुका पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुका याकामी प्रत्यक्ष संबंध येतो.

जिल्हा परिषद

१९६१ च्या महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमानुसार जिल्ह्यात दि. १६ ऑगस्ट १९८२ रोजी जिल्हा परिषद आणि पाच पंचायत समित्या स्थापन करण्यात आल्या. हेतू हा की, लोकशाही संस्थांच्या विकासास चालना मिळावी आणि अधिकार व कामे यांचे विकेंद्रीकरण करून विकास योजनांत तसेच स्थानिक व सरकारी कारभारात जनतेला अधिकाधिक प्रमाणात भाग घेता यावा. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या स्थापनेमुळे पूर्वीच्या जिल्हा स्थानिक मंडळ (District Local Board), जिल्हा शाळा मंडळ (District School Board) आणि तालुका मंडळ या कायदयाने प्रस्थापित झालेल्या संस्थांची जागा आता जिल्हा परिषदेने घेतलेली आहे. त्यामुळे जिल्हा विकास मंडळासारख्या अन्य संस्थेच्या कामाचा अर्थातच जिल्हा परिषदेच्या कामात समावेश करण्यात आला. तथापि, नगरपालिकांचे क्षेत्र जिल्हा परिषदेच्या अधिकारक्षेत्रातून वगळण्यात आले असल्यामुळे नगरपालिकांवर या फेरबदलाचा काही परिणाम झालेला नाही.[१२०] जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या अधिकारक्षेत्रात अनुक्रमे जिल्हा व तालुके येतात. लातूर जिल्हा परिषदेचे क्षेत्रफळ ७,३०४ चौ.कि.मी. असून त्यात ९१६ गावांचा समावेश होतो.[१२१]

जिल्हा परिषदेचे कामकाज स्थायी समिती आणि अर्थ, शिक्षण, सहकार, शेती, आरोग्य व बांधकाम या विषय समित्यांमार्फत चालते. स्थायी समिती ही प्रमुख व महत्त्वाची समिती असून तिचे सभापती म्हणून जिल्हा परिषदेचे अध्यक्ष काम पाहतात, तर सहापैकी दोन विषय समित्यांचे सभापती म्हणून उपाध्यक्ष काम पाहतात. उर्वरित चार विषय समित्यांसाठी प्रत्येकी दोन ठराविक समित्यांच्या अध्यक्षपदी एक असे दोन नियुक्त सभापती असतात. उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे स्थायी समितीचे सचिव म्हणून, तर विविध खातेप्रमुख हे संबंधित विषय समित्यांचे सचिव म्हणून काम पाहतात. सर्व विषय समित्यांचे सभापती हे स्थायी समितीचे पदसिध्द सभासद असतात. स्थायी समिती ही परिषदेच्या कारभाराची धुरा सांभाळणारी समिती असल्यामुळे तिच्याकडे महत्त्वाची कामे सोपविलेली असतात. सर्व समित्यांच्या सदस्यांचा कालावधी जिल्हा परिषदेच्या कालावधीबरोबर संपतो. या सर्व समित्या एकल संक्रमणीय मताव्दारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पध्दतीनुसार उभारल्या जातात. त्यामुळे त्या त्या समित्यांवर सर्व पक्षांना आणि हितसंबंधितांना प्रतिनिधित्व मिळते.

राष्ट्रीय किंवा राज्य विकास योजनांच्या संबंधातील बांधकामे व योजना याबाबत जिल्हा परिषदांना राज्य सरकार आदेश देऊ शकते. जिल्हा परिषदेकडून संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा, यशवंत ग्राम

---

१२०. **सेन्सस ऑफ इंडिया,** १९६१, **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट,** बॉम्बे, १९६६, पृ. ७ व ८.
१२१. **वार्षिक अहवाल,** २०००-२००१, जिल्हा परिषद, लातूर.

समृध्दी योजना व संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम प्रकल्प या राज्यपातळीवरील लोककल्याणाच्या योजना राबविल्या जातात. सरकारचे विभागीय व राज्य पातळीवरील अधिकारी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवून मार्गदर्शन करतात. थोडक्यात, सावधगिरीच्या काही बाबी उदा. कायदा व सुव्यवस्था, न्यायविषयक कामे व संशोधनात्मक विकास कामे वजा करून सरकारची विकास व प्रशासन विषयक सर्व कामे या संस्थांवर अर्थात लोकांच्या कर्तृत्वावर व साधनसामग्रीवर सोपविलेली आहेत.

लातूर जिल्हा परिषदेची नवीन निवडणूक फेब्रुवारी २००२ मध्ये झालेली आहे. त्यातील जनतेने निवडणुकीव्दारे निवडून दिलेल्या सदस्यांची संख्या ५८ इतकी आहे. या ५८ सदस्यात अनुसूचित जातीचे सात, अनुसूचित जमातीचा एक, मागासवर्ग प्रवर्गातील ११ पुरुष सदस्य व पाच महिला सदस्या, अनुसूचित जातीतील चार महिला सदस्या, व सर्वसाधारण गटातील ११ महिला सदस्यांचा समावेश आहे.

वित्तव्यवस्था : जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या प्रमुख बाबी म्हणजे स्थानिक निधी उपकर, पाणीपट्टीवरील कर आणि व्यवसायकर हे होत. जिल्हा परिषदेला जिल्ह्यात राबवावयाच्या योजनांसाठी प्रथम वित्तीय तरतूद करावी लागते. त्यासाठी वरीलप्रमाणे कर वसूल केले जातात. त्यात महसुलाच्या प्रत्येक रुपयामागे २० पैसे आणि पाणीपट्टीच्या प्रत्येक रुपयामागे जास्तीत जास्त १९ पैसे या दराने उपकर वसूल करण्याची तरतूद आहे. याशिवाय जिल्हा परिषद उदयोगधंदे, व्यापार, मनोरंजन आणि यात्रेकरु यांवर कर बसवू शकते. तसेच जमीन व इमारती यावर खास कर व आणखीही अन्य कर बसवू शकते. विशिष्ट स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क अर्धा टक्क्याने वाढवून त्यायोगे मिळणारी रक्कम सरकार जिल्हा परिषदेला देऊ शकते.[१२२]

जिल्हा परिषदेला राज्य शासनाकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीत जिल्हा परिषदेच्या क्षेत्रात जमा झालेल्या जमीन महसुलाच्या ७०% रकमेचा समावेश असतो, परंतु जेव्हा ही रक्कम तत्कालिन जनगणनेनुसार दरडोई दोन रुपयांपेक्षा कमी असेल त्यावेळी ही तूट भरून काढण्यासाठी जिल्हा परिषदेला समानीकरण अनुदान (equalisation grant) देण्यात येते. जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आलेल्या विशिष्ट बांधकामांसाठी व विकास योजनांसाठी खर्चाच्या किमान ७५% एवढे प्रयोजन अनुदान (purposive grant) सरकार जिल्हा परिषदेला देते.[१२३] याशिवाय आस्थापना अनुदान (establishment grant) देते. ज्या जागांचा समावेश जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३, जिल्हा सेवा वर्ग-३ आणि वर्ग-४ यामध्ये केलेला आहे आणि ज्या जागा जिल्हा परिषदेकडे बदली करण्यात आलेल्या आहेत त्या जागांवरील सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार व भत्ते यांच्या सरासरी वार्षिक खर्चाच्या ७०% रकमेइतके अनुदान देण्यात येते. याखेरील तूट समायोजन अनुदान (deficit adjustment grant) देण्यात येते. तसेच विकासकामे लवकर पूर्ण होण्याकरिता आणि पंचवार्षिक योजनांतर्गत अन्य कामांसाठी काही उत्तेजनपर अनुदाने दिली जातात. जर जिल्हा परिषद अगर पंचायत समित्या यांच्या प्रस्तावानुसार राज्य सरकारने संपूर्ण जिल्ह्यात किंवा एखादया

१२२. **सेन्सस ऑफ इंडिया,** १९६१, **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट,** पूर्वोक्त, पृ. ९.
१२३. कित्ता.

गटविभागात जमीन महसुलावर अधिनियमाव्दारा ठरवून दिलेल्या किमान दरापेक्षा अधिक दराने उपकर बसविला तर त्या जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीला राज्य सरकारकडून दरवर्षी स्थानिक उपकर सापेक्ष अनुदान दिले जाते.[१२४] तक्ता क्रमांक-२ मध्ये जिल्हा परिषदेचे सन २००४-२००५ चे उत्पन्न व खर्च दिलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी : भारतीय प्रशासन सेवेच्या वरिष्ठ श्रेणीतील हा अधिकारी जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाचा असतो. याशिवाय उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि विविध विभागांचे विभागप्रमुख हे जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी असतात. हे सर्व राजपत्रित अधिकारी असतात व सरकार त्यांची इतर जिल्ह्यात बदली करू शकते. उपमुख्य कार्यकारी अधिकारी हा उपजिल्हाधिकारी दर्जाचा असतो. तो जिल्हा परिषदेचा सचिव म्हणून काम पाहतो. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमाच्या तरतुदीच्या अंमलबजावणीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गटपातळीवरील गट विकास अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

जिल्हा परिषदेचा नित्याचा कारभार पाहण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची असून जिल्हा परिषद अध्यक्ष व जिल्हा परिषद यांच्या देखरेखीखाली त्याला सर्व विकास कार्ये पहावी लागतात. जिल्हा परिषदेचे ध्येय-धोरण ठरवितांना प्रशासकीय तज्ञ म्हणून त्याला नेहमीच पुढाकार घ्यावा लागतो. जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक तयार करून ते अर्थ आणि प्रशासन किंवा स्थायी समितीला सादर करण्याचे काम हाच अधिकारी करतो. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास निविदा करारास मंजुरी देण्याचा अधिकार आहे, शिवाय ठराविक किंमतीपर्यंतची कामे व योजनाही मंजूर करण्याचा अधिकार आहे. हा अधिकारी जिल्हा परिषद, राज्यशासन व जिल्हा परिषदेचे पदाधिकारी यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतो. तो शासनाला जिल्हा परिषदेच्या कारभाराचे अहवाल सादर करतो. जिल्हा परिषदेच्या प्रशासनासाठी हा अधिकारी विभागीय आयुक्तास जबाबदार असतो.

अध्यक्ष : जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींमधूनच अध्यक्षाची निवड केली जाते. जिल्हा परिषदेचे सर्व कार्य त्याच्याच देखरेखीखाली चालते. जिल्हा परिषदेच्या विकास कार्याच्या शासकीय यंत्रणेचा तो प्रमुख असतो. त्याने घेतलेल्या निर्णयाला जिल्हा परिषदेची मंजुरी लागते. त्यास बरेच प्रशासकीय अधिकार असून त्यात वित्तीय व कार्यकारी प्रशासनावर लक्ष ठेवणे व त्यासंबंधी बाबी जिल्हा परिषदेसमोर ठेवणे, कागदपत्रांची तपासणी करणे, आणिबाणीच्या परिस्थितीत एखादया कार्याच्या अंमलबजावणीबाबत हुकूम देणे इत्यादी बाबींचा समावेश होतो. जनतेच्या दृष्टीने अहितकारक असलेले एखादे काम तो थांबवू शकतो किंवा तहकूब करू शकतो. यानंतर ही बाब तो स्थायी समिती व तत्संबंधी विषय समितीसमोर ठेवतो. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष हा अध्यक्षांचे सर्व अधिकार वापरतो.

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमार्फत सुरू असलेल्या योजनांची माहिती या ग्रंथात अन्यत्र दिलेली आहे.

---

१२४. **सेन्सस ऑफ इंडिया,** १९६१, पूर्वोक्त, पृ. ९.

पंचायत समिती

जिल्ह्यातील जळकोट, देवणी व शिरुर-अनंतपाळ हे नवीन तालुके किंवा गट वगळता पूर्वीच्या प्रत्येक गटासाठी (तालुका) महाराष्ट्र जिल्हा परिषदा ॲण्ड पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये पंचायत समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. गट पातळीवरील पंचायत समितीमध्ये गट क्षेत्रातून निवडून आलेल्या व स्वीकृत केलेल्या सभासदांचा समावेश होतो. सहकारी सभासद म्हणून गटक्षेत्रात शेतमालाच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थेचे अध्यक्ष आणि स्वीकृत सदस्य म्हणून गटक्षेत्रात शेतीविषयक व्यवहार करणाऱ्या सहकारी संस्थेचे अध्यक्ष यांचा समावेश होतो. सरपंचही पंचायत समितीचे सभासद असतात. त्यांची संख्या गटक्षेत्रातील प्रत्येक मतदारसंघातून दोन या प्रमाणात आहे. जिल्हा परिषदेप्रमाणेच पंचायत समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांमधून पदसिध्द सभापती व उपसभापती निवडले जातात.[१२५] सभापतीस सभा बोलाविणे, प्रशासन आणि समितीचे हिशेब व अभिलेख यांच्या बाबतीत गटात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवावे लागते.

पंचायत समितीला गट अनुदानातून कोणत्याही कामास किंवा विकास योजनांना मंजुरी देणे, त्यांची अंमलबजावणी करणे, देखरेख ठेवणे, कारभार पाहणे आणि त्यासाठी खर्च करणे इत्यादी कामे करावी लागतात. जिल्हा परिषदेप्रमाणे पंचायत समित्यांच्याही विषय समित्या असतात.

गटविकास अधिकारी : पूर्वी वर्णिल्याप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीचे पदसिध्द अधिकार जिल्हा व गट पातळीवर अनुक्रमे मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. गटविकास अधिकारी पंचायत समितीचे सचिव म्हणून काम करतात. त्यांना विकास गटाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून कोणतेही माहितीपत्रक, हिशेब, विवरणपत्र किंवा अहवाल मागविण्याचा अधिकार आहे. पंचायत स्तरावरील विकास योजनांची अंमलबजावणी करतांना त्यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे आदेश अंमलात आणणे, पंचायत समितीला पैसे खर्च करण्यास मंजुरी देणे, सरकारी मालमत्तेचे संवर्धन करणे वगैरे कामे करावी लागतात.

सन १९६१ मध्ये तत्कालिन पंचायत समित्यांमध्ये समाविष्ट असलेल्या खेडयांची संख्या, क्षेत्रफळ व लोकसंख्या खालील कोष्टकात दर्शविलेली आहे.[१२६]

पंचायत समिती	क्षेत्रफळ चौ. मैल	वस्ती असलेली खेडी	१९६१ ची लोकसंख्या
लातूर	४०८.५	११५	१,०२,०९४
उद्‌गीर	६२४.४	१७४	१,५३,७८५
औसा	४५२.९	११२	१,१२,८०९
निलंगा	५२७.०	१८००	१,५३,८८९
अहमदपूर	५९९.५	१८९	१,५७,१६२

१२५. **सेन्सस ऑफ इंडिया,** १९९१, सिरीज १४, महाराष्ट्र, पार्ट XII A & B डिस्ट्रिक्ट सेन्सस हॅण्डबूक, लातूर, महाराष्ट्र स्टेट, मुंबई, १९९५, पृ. ८.

१२६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६९०.

पंचायत समिती स्तरावर विविध क्षेत्रातील विकास योजना राबविण्यासाठी गटविकास अधिकाऱ्याशिवाय शिक्षण विस्तार अधिकारी, विस्तार अधिकारी (पशुसंवर्धन), उपअभियंता (बांधकाम विभाग), विस्तार अधिकारी (कृषी) आणि वैद्यकीय अधिकारी हेही महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

सध्या लातूर जिल्ह्यातील १० गटांसाठी एकूण १० पंचायत समित्या स्थापन केलेल्या असून त्यांची २००३-२००४ मध्ये एकूण सदस्यसंख्या १६८ होती. पंचायत समित्यांची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे-

पंचायत समिती, लातूर : ही पंचायत समिती १ मे १९६२ रोजी स्थापन झाली. लातूर जिल्हा निर्मितीपूर्वी हा तालुका उस्मानाबाद जिल्ह्यात अंतर्भूत असतांना या पंचायत समितीच्या अधिकार क्षेत्रात एकूण ११५ खेडी होती व क्षेत्रफळ ४०८.५ चौ.कि.मी. होते. १९८१ च्या जनगणनेनुसार या समितीच्या अधिकारक्षेत्रात एकूण १७२ गावे (२ निर्जन) व त्यासाठी १४९ ग्रामपंचायती कार्यरत होत्या. यावेळी जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रापैकी या तालुक्याचे क्षेत्र २१% होते. सन १९९०-९१ मध्ये या समिती क्षेत्रात १७८ गावे व ३२ वाडया होत्या. ग्रामपंचायतीच्या संख्येत मात्र वाढ झालेली नव्हती. त्यानंतर जिल्ह्यातील काही तालुक्यांची पुनर्रचना करण्यात येऊन काही नवीन तालुके निर्माण करण्यात आले. सध्या लातूर पंचायत समितीचे क्षेत्रफळ १,००४ चौ.कि.मी. इतके असून गावांची संख्या १२० इतकी आहे. या गावांचा कारभार १०८ ग्रामपंचायती व ग्रुप ग्रामपंचायती पाहतात. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आरोग्य, शिक्षण, शेती, पाणीपुरवठा आदी क्षेत्रात विकासाचे प्रयत्न करण्यात आले. त्याचाच परिणाम म्हणून २००५ पर्यंत या पंचायत समिती क्षेत्रात एक ग्रामीण रुग्णालय, आठ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३८ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, १६ पशुप्रथमोपचार केंद्रे, १५७ प्राथमिक व सहा माध्यमिक शाळा आहेत. सन २००५ अखेरीस या पंचायत समितीची प्रभाग सदस्य संख्या १८, तर जिल्हा परिषद सदस्य संख्या नऊ होती. १८ सदस्यात अनुसूचित जातीचे चार, इतर मागासवर्गीय गटाचे पाच व सहा महिला सदस्यांचा समावेश होता.

लातूर तालुक्यात स्वतंत्र, संयुक्त व प्रादेशिक अशा एकूण १०५ पाणीपुरवठा योजना आहेत. त्यापैकी ८० योजनांव्दारे दरडोई ४० लिटर प्रतिदिन पाणी पुरवठा केला जातो. या योजनांचे ग्रामपंचायतींमार्फत पाणी वितरण केले जाते. उर्वरित २५ योजना सध्या बंद आहेत.

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षाचे पंचायत समितीचे सर्व मार्गांनी मिळालेले उत्पन्न ४,८५,१३८ रुपये, तर विविध विकास विषयक बाबींवर ४,६०,६५० रुपये खर्च करण्यात आले होते.

पंचायत समिती, औसा : लातूर पंचायत समितीसोबतच म्हणजे १ मे १९६२ रोजी स्थापन झालेल्या या पंचायत समितीचे सध्याचे क्षेत्रफळ १,२४८.६१ चौ.कि.मी. इतके असून सन १९९०-९१ मध्ये एकूण १३३ खेडयांसाठी १०५ ग्रामपंचायती कार्यरत होत्या. सन २००१ व सन २००५ च्या अखेरीस या तालुक्यात १३२ गावे व पाच ओसाड गावे होती. त्यांच्यासाठी ११० ग्रामपंचायती व २५ ग्रुप ग्रामपंचायती कार्यरत होत्या. या वर्षांपर्यंत आवश्यक सेवा-सुविधांमध्येही भर पडत गेली. परिणामी सध्या या पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात सात प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३६ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, दोन ग्रामीण रुग्णालये, १६ पशुप्रथमोपचार केंद्रे व १७० प्राथमिक शाळा आहेत. याशिवाय खाजगी प्राथमिक शाळा ११, माध्यमिक शाळा

३१, तसेच १२ कनिष्ठ व तीन वरिष्ठ महाविद्यालये कार्यरत आहेत. पंचायत समितीची एकूण सदस्य संख्या १८ इतकी असून त्यात अनुसूचित जाती/जमातीचे तीन, इतर मागासवर्गीय पाच व सहा महिला सदस्यांचा समावेश आहे. महिलांसाठी सन १९९६-९७ पासून ३०% जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. १९७०-७१, मध्ये या पंचायत समितीस जमीन महसुलाच्या रुपाने ६२,७३७ रुपये, १९८०-८१ मध्ये ८३,४०५ रुपये, १९९०-९१ मध्ये १,५६,७५० रुपये, तर २०००-२००१ मध्ये ७,०२,९५३ रुपये इतके उत्पन्न प्राप्त झाले होते. सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात पंचायत समितीचे सर्व मार्गांनी मिळालेले वार्षिक उत्पन्न ४,३३,६७२ रुपये, तर विविध बाबींवर झालेला खर्च एकूण रु. ३,२०,८०५ इतका होता.

औसा तालुक्यातील ७८ गावांना स्वतंत्र नळयोजना, रोजगार हमी योजनेंतर्गतच्या विहिरी व अन्य स्त्रोतांव्दारे दैनिक ४५,५७,८६५ लिटर पाणी पुरवठा, २९ गावांना औसा प्रादेशिक पाणी पुरवठा योजना व जुन्या स्वतंत्र नळ योजना उद्‌भवाव्दारे एक दिवसाआड ४४,८०,००० लिटर पाणी पुरवठा आणि १० गावांना औसा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस घेण्यात आलेल्या पुरक उद्‌भवाव्दारे व रोजगार हमी योजनेंतर्गतच्या विहिरींव्दारे दैनिक ४,७३,६४५ लिटर पाणी पुरवठा केला जातो.

पंचायत समिती, निलंगा : १९८१ च्या जनगणनेनुसार निलंगा तालुक्याचे क्षेत्रफळ जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी १९% म्हणजे १,३८७.५ चौ.कि.मी. होते. या तालुक्यासाठी पंचायत समिती १ मे १९६२ रोजी स्थापन झाली. १९९०-९१ मध्ये या पंचायत समितीचे क्षेत्रफळ १,३८५.५ चौ.कि.मी. म्हणजे जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी १२% होते. १९८०-८१ मध्ये पंचायत समितीच्या अधिकारक्षेत्रातील एकूण २०२ गावांचा (१० निर्जन) १२४ ग्रामपंचायती कारभार पहात होत्या, तर १९९०-९१ मध्ये याच २०२ गावांसाठी १२७ ग्रामपंचायती होत्या. सन २००१ पर्यंत गावांच्या संख्येत वाढ किंवा घट झालेली नसली तरी ग्रामपंचायतीची संख्या १५३ व ग्रुप ग्रामपंचायतींची संख्या ३८ वर गेली. या समितीसाठी सध्या १८ पंचायत सदस्य व जिल्हा परिषदेसाठी नऊ जिल्हा परिषद सदस्य निवडून पाठविले जातात. सध्या पंचायत समितीचे क्षेत्रफळ १०४८.८६ चौ.कि.मी. आहे. सन २०००-२००१ मध्ये या पंचायत समितींचे सर्व मार्गांनी मिळालेले उत्पन्न २०,३०,०५६.१३ रुपये, तर खर्च ८,३७,०९७ रुपये एवढा होता.

सन २००४-२००५ या वर्षात समितीच्या क्षेत्रात दोन ग्रामीण रुग्णालये, सात प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३८ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, एक युनानी दवाखाना व १७ पशुचिकित्सालये होती. यावर्षी तालुक्यात २०३ प्राथमिक शाळा, ५४ माध्यमिक शाळा, १२ उच्च माध्यमिक व दोन महाविद्यालये होती. तसेच ११२ ग्रामपंचायती व ३९ ग्रुप ग्रामपंचायती होत्या.

तालुक्यातील एकूण ३५ गावांना जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा योजनांमधून, तर अन्य ५० गावांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत दरडोई ४० लिटर पाणी पुरवठा करण्यात येतो. तथापि उन्हाळयात पाणी तुटवड्यामुळे व अन्य काही कारणांमुळे काही गावांचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येतो.

अनुक्रमणिका

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात या पंचायत समितीचे वार्षिक उत्पन्न रु. ७,४९,१३४ होते, तर विविध विकासविषयक बाबींसाठी ६,०३,८३२ रुपये खर्च करण्यात आले होते.

पंचायत समिती, उदगीर : या तालुक्यासाठी दि. १ मे १९६२ रोजी पंचायत समिती स्थापन झाली. उस्मानाबाद जिल्ह्यात समाविष्ट असतांना सन १९७० ते १९८१ पर्यंत या तालुक्याच्या कक्षेत १३२; व १९९०-९१ मध्ये १४९ ग्रामपंचायती होत्या. सन २०००-२००१ मध्ये या पंचायत समितीच्या कार्यकक्षेत १८७ गावे होती व त्यासाठी १६६ ग्रामपंचायती व १९ ग्रुप ग्रामपंचायती कार्यरत होत्या. त्यानंतर १९९९ मध्ये या तालुक्याची पुन्हा पुनर्रचना केली गेल्याने सन २००४-२००५ अखेरीस पंचायत समितीचे क्षेत्रफळ ७८५.८० चौ.कि.मी. इतके झाले. साहजिकच गावांच्या संख्येत घट होऊन ती केवळ ९५ इतकी झाली. त्यांचा कारभार ८५ ग्रामपंचायती व आठ ग्रुप ग्रामपंचायती पहात होत्या. सन १९८२ मध्ये लातूर जिल्हा निर्मिती झाल्यानंतर इतर तालुक्यांप्रमाणे या तालुक्याच्या विकासाकडेही लक्ष पुरविण्यात आले. विशेषत: सन २०००-२००१ पर्यंत या पंचायत समितीच्या क्षेत्रात नऊ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ४९ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे स्थापन झाली होती. २३६ प्राथमिक व १३ माध्यमिक शाळाही सुरू होत्या. तथापि, वर म्हटल्याप्रमाणे तालुका पुनर्रचनेमुळे सन २००४-२००५ अखेरीस प्राथमिक आरोग्य केंद्रे पाच, उपकेंद्रे २५, एक ग्रामीण रुग्णालय, पाच पशुचिकित्सालये व २१ पशुउपचार केंद्रे तालुक्यात उरली. याशिवाय प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या संख्येतही फरक पडून त्या अनुक्रमे १२७ व नऊ इतक्या झाल्या.

मार्च २००२ मध्ये या पंचायती समितीसाठी झालेल्या निवडणुकीत दोन अराखीव, चार महिला, तीन अनुसूचित जाती/जमाती व तीन इतर मागासवर्ग अशा एकूण १२ सदस्यांची निवड करण्यात आली होती. तथापि, तालुका पुनर्रचनेमुळे प्रभाग संख्या २२ वरून १२ झाल्याने सन २००४-२००५ अखेरीस १२ तालुका सदस्यात दोन अनुसूचित जातीच्या व एका अनु.जमातीच्या महिला सदस्याचा तसेच दोन मागास प्रवर्गाच्या व मागास प्रवर्गातील एका महिलेचा समावेश होता. सन १९८०-८१ मध्ये या समितीला जमीन महसूल अनुदानाच्या रुपाने ९७,१७६ रुपये, १९९०-९१ मध्ये २,४८,५७४ रुपये, तर २०००-२००१ मध्ये ९,६६,५६७ रुपये उत्पन्न प्राप्त झाले. याच तीनही वर्षी विविध विकास कामांवर झालेला खर्च अनुक्रमे २,१७,६५४ रुपये, ५,११,०४३ रुपये व ७,०१,२८४ रुपये होता. सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात या पंचायत समितीचे सर्व मार्गांनी मिळालेले वार्षिक उत्पन ५,७०,५०० रुपये व खर्च, २,४२,१७० रुपये होता.

पंचायत समिती, चाकूर : दि. १४ मार्च १९९७ रोजी संस्थापित झालेल्या या पंचायत समितीचे क्षेत्रफळ ६८८चौ.कि.मी. असून त्यातील एकूण ८५ गावांच्या कारभारासाठी ७२ ग्रामपंचायती व चार ग्रुप ग्रामपंचायती कार्यरत आहेत. स्थापना वर्षापासूनच या पंचायत समितीत महिलांसाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. पंचायत समितीवर एकूण १२ सदस्य निवडून पाठविले जातात. त्यात अनुसूचित जाती व जमातीचा प्रत्येकी एक व चार महिला सदस्या असतात. सध्या या समितीच्या अधिकार क्षेत्रात एक ग्रामीण रुग्णालय, तीन प्राथमिक आरोग्य केंद्रे, २३ आरोग्य उपकेंद्रे, तसेच १० पशुप्रथमोपचार केंद्रे

आहेत, तर ११४ प्राथमिक व चार माध्यमिक शाळा ज्ञानदानाचे अविरत कार्य करीत आहेत. सन २०००-२००१ या वर्षी पंचायत समितीस ४,७९,९३१ रुपये अनुदान प्राप्त झाले होते, तर विविध विकास कार्यावर २,१५,२५४ रुपये खर्च झाले होते. सन २००४-२००५ या आर्थिक वर्षी पंचायत समितीचे वार्षिक उत्पन्न २,९३,६७४ रुपये तर खर्च १,९१,४१९ रुपये होता.

पंचायत समिती, अहमदपूर : १९८१ च्या जनगणनेनुसार या तालुक्याचे क्षेत्र तत्कालिन जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रापैकी २१% म्हणजे १,५७८.१ चौ. कि.मी. होते. सध्या हे क्षेत्रफळ ७८३.१५ चौ.कि.मी. इतके आहे. या तालुक्यासाठी दि. १ मे १९६२ रोजी पंचायत समिती गठीत करण्यात आली. सन १९८०-८१ मध्ये या समितीच्या अधिकारक्षेत्रातील २१६ गावांसाठी (२ निर्जन) १५९ ग्रामपंचायती कार्यरत होत्या, तर १९९०-९१ मध्ये २२२ गावांसाठी १८५ ग्रामपचायती व २२ ग्रुप ग्रामपंचायती कार्यरत होत्या. सन २००१ अखेरीस गावांची संख्या १२२ इतकी कमी होऊन १०७ ग्रामपंचायती त्यांचा कारभार पहात होत्या. सन २००५ च्या अखेरपर्यंत गावांच्या संख्येत वाढ किंवा घट झाली नाही, पण ग्रामपंचायतींची संख्या ९७ इतकी झाली. या वर्षापर्यंत समितीच्या कार्यक्षेत्रात पाच प्राथमिक आरोग्य केंद्रे, २४ उपकेंद्रे, एक ग्रामीण रुग्णालय, १२ पशुवैद्यकीय दवाखाने, १८६ प्राथमिक व ४७ माध्यमिक शाळा, १३ उच्च माध्यमिक शाळा व सहा महाविद्यालये होती.

पंचायत समितीवर एकूण १२ सदस्य व जिल्हा परिषदेवर सहा सदस्य निवडून पाठविले जातात. पंचायत समितीच्या १२ सदस्यात अनुसूचित जाती व जमातीचा प्रत्येकी एक सदस्य व मागासवर्ग घटकातील दोन सदस्य असतात. महिलांसाठीही ३०% आरक्षण आहे. या समितीने सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात दलित वस्ती सुधार योजनेवर २७.९७ हजार रुपये, जवाहर रोजगार व ग्रामीण रोजगार योजनेवर ६६.८७ हजार रुपये आणि इंदिरा आवास योजना व घरदुरुस्ती योजनेवर अनुक्रमे ३३.५९ व ५.२१ हजार रुपये खर्च केले. या वर्षी पंचायत समितीचे सर्व मार्गांनी मिळविलेले उत्पन्न ४,८१,३०४ रुपये, तर खर्च १,८५,००० रुपये होता. सन २००४-२००५ या आर्थिक वर्षी हेच उत्पन्न १,३६,३६०.७५ रुपये व खर्च १,७३,४०४ रुपये होता.

पंचायत समितीमार्फत तात्पुरती पाणी पुरवठा योजना, कायम स्वरुपी पाणी पुरवठा योजना, हातपंप, विद्युत पंप व सार्वजनिक विहिरी याव्दारे बहुतांश गावांना दरडोई दैनिक ३० लिटर पाणी पुरवठा करण्यात येतो.

पंचायत समिती, शिरुर-अनंतपाळ : निलंगा तालुक्याची पुनर्रचना करून शासनाने २६ जून १९९९ रोजी ३३० चौ.कि.मी. क्षेत्रफळाचा शिरुर-अनंतपाळ हा नवीन तालुका निर्माण केला. या तालुक्यासाठी दि.२७.१२.२००१ रोजी पहिली पंचायत समिती गठीत करण्यात आली. सध्या या तालुक्यात एकूण ५४ गावांसाठी ४५ ग्रामपंचायती व सात ग्रुप ग्रामपंचायती कार्यरत आहेत. समितीचे सहा वार्ड असून त्यातून समितीवर सहा सदस्य, तर जिल्हा परिषदेवर तीन सदस्य निवडून पाठविले जातात. समितीवरील सहा सदस्यात इतर मागास प्रवर्गातील एक, अनुसूचित जाती-जमातीचा एक व दोन महिला सदस्या असतात. स्थापनावर्षापासूनच या समितीत महिलांसाठी ३०% आरक्षण सुरू करण्यात आलेले आहे.

सध्या त्या समितीच्या अधिकारक्षेत्रात ६० प्राथमिक शाळा, नऊ माध्यमिक व ११ उच्च माध्यमिक शाळा, एक महाविद्यालय, दोन प्राथमिक आरोग्य केंद्रे, ११ उपकेंद्रे, १५ खाजगी दवाखाने, एक खाजगी रुग्णालय व सहा पशुप्रथमोपचार केंद्रे आहेत.

सध्या हातपंप, विद्युत पंप, नळ योजना, विहिरी व कच्च्या विहिरी (आडे) यामार्फत तालुक्यातील ५७ गावांना दरडोई दैनिक ४० लिटर पाणी पुरवठा करण्यात येतो. याशिवाय सन २००४-२००५ मध्ये दोन गावांना दोन खाजगी टँकरव्दारे व २१ गावे व पाच वाड्यांना ४६ खाजगी विहिरी/बोअर विहिरींव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला होता. या वर्षी समितीचे सर्व मार्गानी मिळालेले उत्पन्न ९७,४७९ रुपये व खर्च मागील शिल्लकेसह २,२०,९८१ रुपये होता.

पंचायत समिती, जळकोट : उदगीर व अहमदपूर तालुक्यांची पुनर्रचना करून शासनाने २६ जून १९९९ रोजी जळकोट हा ३५३ चौ.कि.मी. क्षेत्रफळाचा नवीन तालुका निर्माण केला आहे. या तालुक्यातील एकूण गावांची संख्या ४७ असून त्यासाठी ४३ ग्रामपंचायती व एक ग्रुप ग्रामपंचायत कार्यरत आहे. या तालुक्यासाठी दि. ११ जानेवारी २००२ रोजी पहिल्या पंचायत समितीची स्थापना करण्यात आली. या समितीचे सहा वार्ड असून त्यातून समितीवर सहा व जिल्हा परिषदेवर तीन सदस्य निवडून पाठविले जातात. समितीच्या सहा सदस्यात इतर मागास प्रवर्गातील तीन व अनुसूचित जातीतील एक सदस्य असतो. समितीच्या कार्यक्षेत्रात ६६ प्राथमिक शाळा, २४ माध्यमिक व १२ उच्च माध्यमिक शाळा, तीन महाविद्यालये, दोन प्राथमिक आरोग्य केंद्रे, १३ उपकेंद्रे व १५ खाजगी दवाखाने आहेत. जळकोट तालुक्यातील सुमारे ३७ गावांना नळयोजना, विद्युत पंप व हातपंपांव्दारे दरडोई दैनिक ४० लिटर या प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो. त्यापैकी जळकोट कायम पाणीपुरवठा योजनेव्दारे दैनिक ५० लिटर प्रमाणे पाणीपुरवठा केला जातो. सन २००४-२००५ या वर्षी पंचायत समितीचा तालुका पुनर्रचना हस्तांतरीत योजनेंतर्गत जमा वित्त निधी ५,४६,८४,६६३ रुपये व विविध योजनांवरील खर्च ५,३०,०१,०३९ रुपये होता, तर अभिकरण योजनेंतर्गत जमा वित्त निधी ४८,५१,६०० व विविध योजनांवर २७,३१,८४६ रुपये खर्च करण्यात आले होते. याशिवाय यशवंत ग्राम समृद्धी योजना, पंचायत समिती उपकर योजना व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी मिळालेल्या अनुदानातून त्या योजनांवर ७५,७६,०८४ रुपये खर्च करण्यात आले.

पंचायत समिती, देवणी : उदगीर तालुका क्षेत्राची पुनर्रचना करून शासनाने दि. २६ जून १९९९ रोजी देवणी हा ४३५ चौ.कि.मी. क्षेत्रफळाचा नवीन तालुका निर्माण केला आहे. या तालुक्यातील एकूण गावे ५७ असून ४८ ग्रामपंचायती व आठ ग्रुप ग्रामपंचायती त्यांचा कारभार सांभाळतात. या तालुक्यासाठी दि. ९ डिसेंबर २००१ रोजी पंचायत समिती गठीत करण्यात आली. समितीची पहिली निवडणूक दि. १४ मार्च २००२ रोजी पार पडली. या समितीचे सहा प्रभाग असून निवडून आलेल्या सहा सदस्यांत दोन महिला सदस्या व एक अनुसूचित जातीचा सदस्य आहे. समितीच्या कार्यक्षेत्रातून जिल्हा परिषदेवर तीन सदस्य निवडून पाठविले जातात. सध्या समितीच्या क्षेत्रात एकूण ७१ प्राथमिक शाळा, २४ माध्यमिक शाळा, तीन महाविद्यालये व एक ग्रामीण रुग्णालय तसेच १८ खाजगी दवाखाने आहेत.

सन २००३-२००४ या आर्थिक वर्षी पंचायत समितीचे उत्पन्न २,०४,५८० रुपये, तर खर्च १,४८,६९१ रुपये होता. सन २००४-२००५ या वर्षी उत्पन्नात वाढ होऊन ते २,२३,०६८ रुपये व खर्चही १,८०,९२१ रुपये इतका झाला होता.

पंचायत समिती, रेणापूर : इ. स. १९९२ मध्ये मूळ बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई तालुक्यातील रेणापूर सर्कल क्षेत्रास तालुक्याचा दर्जा देऊन रेणापूर तालुका या नावाने तो लातूर जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला. त्यानंतर मार्च १९९७ मध्ये या तालुक्यासाठी पहिली पंचायत समिती स्थापन करण्यात आली. समितीचे क्षेत्रफळ ५८० चौ. कि. मी. इतके असून त्यात ७९ गावांचा अंतर्भाव आहे. या गावांसाठी ६१ ग्रामपंचायती व पाच ग्रुप ग्रामपंचायती कार्यरत आहेत. स्थापना वर्षापासूनच या समितीत महिलांसाठी ३०% आरक्षण सुरू करण्यात आले आहे. सन २००५ च्या अखेरीस समितीच्या कार्यक्षेत्रात पाच प्राथमिक आरोग्य केंद्रे, २१ उपकेंद्रे व एक ग्रामीण रुग्णालय अशा आरोग्य सुविधा असून ९६ प्राथमिक व २३ माध्यमिक शाळा, तीन वस्तीशाळा व दोन महाविद्यालये आहेत.

रेणापूर तालुक्यातील बहुतेक सर्व गावांना एकूण ६७४ हातपंप व १६२ वीजपंपांव्दारे दैनिक दरडोई ४० लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो. तथापि, काही वेळा अपुरे पाणी किंवा हातपंप व वीजपंपातील बिघाडामुळे काही गावांना अनियमित पाणीपुरवठा होतो. सन २००४-२००५ या आर्थिक वर्षी पंचायत समितीस उपकर, अल्पबचत व अन्य माध्यमातून १,७६,५१७ रुपये इतके उत्पन्न प्राप्त झाले होते; तर प्रशासन, कृषी, पशुसंवर्धन, समाजकल्याण, महिला व बालकल्याण वगैरे बाबींवर एकूण ९२,२७२ रुपये खर्च झाले होते.

ग्रामपंचायती

या संस्थेचे अस्तित्व प्राचीन काळापासून टिकून असल्याचे दिसते. संस्कृत व पाली वाङ्.मयातही ग्रामपंचायतींचे उल्लेख सापडतात. या संस्थेत कमीत कमी पाच सदस्य असावेत. त्यामुळेच त्यास हे नाव मिळाले असावे. इ. स. ९ व्या व १० व्या शतकातील अनेक शिलालेखांतील उल्लेखावरून दक्षिण भारतात ग्रामपंचायती राजमान्य असल्याचे आढळते.[१२७]

मराठवाड्यातील २,५०० ते ५,००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक खेड्यात किंवा एकपेक्षा अधिक खेड्यांसाठी १९४१ च्या अधिनियमानुसार ग्रामपंचायत किंवा गटग्रामपंचायतींची स्थापना करण्यात आली होती. सन १९५१ चा हैद्राबाद ग्रामपंचायत कायदा पास होण्यापूर्वी तहसीलदार प्रत्येक खेड्यातील प्रौढांची एक यादी तयार करून जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवित असे. जिल्हाधिकारी त्यातून आवश्यक तेवढया सदस्यांची निवड करीत. सरपंच व मानसेवी

१२७. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४९२.

सचिवही याच यादीतून निवडण्यात येत, परंतु यासंबंधी १९४१ चा कायदा पास झाल्यानंतर ग्रामपंचायतींना निवडणुकीचे तत्व लागू करण्यात आले. या कायद्याने न्यायपंचायतही स्थापन करण्यात आली. पुढे १९५६ च्या हैद्राबाद ग्रामपंचायत कायद्यानुसार ग्रामसभा स्थापन करण्यात आल्या. या कायदान्वये ग्रामपंचायतींना सरकारी मंजुरीने जमीन महसुलावर उपकर लावण्याचे अधिकार देण्यात आले. जमीन महसुलाव्यतिरिक्त अन्यही काही आवश्यक कर लागू करण्यात आले.

राज्य पुनर्रचनेनंतर संमत करण्यात आलेल्या १९५८ सालच्या बॉम्बे व्हिलेज पंचायत ॲक्टनुसार लोककल्याण आणि विकासाची सर्व कामे ग्रामपंचायतींकडे सोपविण्यात आली. हाच कायदा राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना लागू करण्यात आला. या कायद्यातील सेक्शन ६३ नुसार एकमेकालगतच्या पाच पेक्षा कमी नसलेल्या समूह किंवा गट ग्रामपंचायतींसाठी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील नागरी व गुन्हेगारी न्यायासाठी न्यायपंचायत[१२८] स्थापन करण्यात आलेली आहे. गटग्रामपंचायतीमधील प्रत्येक गावातून निवडून आलेल्या सदस्यांपैकी एक सदस्य या न्यायपंचायतीमध्ये आपल्या गावाचे प्रतिनिधीत्व करतो. त्यामुळे न्यायपंचायतीमधील कमीत कमी सदस्य संख्या पाच असते. न्यायपंचायतीची मुदत गट ग्रामपंचायतीबरोबर संपते. या पंचायतीच्या निकालाविरोधात जिल्हा व सत्र न्यायालयात अपील करता येते.

रचना : ग्रामपंचायतीसाठी कमीत कमी पाच व जास्तीत जास्त १५ सदस्य गुप्त मतदान पध्दतीने निवडले जातात. ग्रामपंचायतीमध्येही पंचायत समितीप्रमाणे अनुसूचित जाती-जमाती व महिलांकरिता जागा राखीव ठेवल्या जातात. ग्रामपंचायतीच्या निवडून आलेल्या सदस्यांमधून सरपंच व उपसरपंच यांची नियुक्ती केली जाते. ग्रामपंचायतीचा कार्यकाळ सर्वसाधारणपणे पाच वर्षे एवढा असतो. सरपंच हा प्रमुख असल्याने त्याच्याच अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतीच्या सभा होतात. ग्रामपंचायतीमध्ये पंचायत समितीप्रमाणे विषय समित्या असतात.

कार्य : बॉम्बे व्हिलेज पंचायत ॲक्ट १९५८ च्या सेक्शन ४६ अन्वये ग्रामनिधी उभारून त्याव्दारे ग्रामविकासासाठी अल्प व दीर्घ मुदतीच्या लहान-मोठया उत्पादक व कल्याणकारी योजना राबविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर टाकण्यात आलेली आहे. त्यात शेती सुधारणा, लघुसिंचन, शाळा व इतर सार्वजनिक इमारती उभारणे, ग्रामस्वच्छता व आरोग्य, विहिरी, रस्ते व पुलांचे बांधकाम, दिवाबत्ती आदि विकासविषयक अनेकविध कामांचा समावेश होतो.

---

१२८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ७००-७०१.

उस्मानाबाद जिल्ह्यात समाविष्ट असतांना १९६१ मध्ये तत्कालिन तालुक्यांत खालीलप्रमाणे ग्रामपंचायती, समूह किंवा गट ग्रामपंचायती व खेड्यांचा समावेश होता.[१२९]

तालुका	वस्ती असलेली खेडी	स्वतंत्र ग्रामपंचायती	समूह ग्रामपंचायती	समूह ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट असलेली गावे
१	२	३	४	५
लातूर	११५	६८	२१	४७
उदगीर	१७४	४९	५८	१२४
औसा	११२	५०	३२	६८
निलंगा	१८०	७५	४५	११८
अहमदपूर	१८९	६८	५२	१२२

ग्राम सचिवालय योजना : गावपातळीवर महत्त्वाच्या खात्यांचा समन्वय रहावा व जनतेची नित्याची कामे त्वरेने व्हावीत या दृष्टिकोनातून राज्यातील सर्व महसूल मंडळांच्या मुख्यालयी ग्रामसचिवालय बांधण्याची योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. एकूण १५०० महसूल मंडळाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी ग्राम सचिवालय बांधण्याचे शासनाचे धोरण आहे. याबाबतचा आदेश दि. २७ डिसेंबर १९९९ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. शासनाने या योजनेचा समावेश "१०० दिवसांचा विशेष कार्यक्रम" यामध्ये केलेला आहे. त्यानंतर दि. २ एप्रिल २००२ व दि. १९ ऑक्टोबर २००२ च्या शासन निर्णयान्वये महसूल मंडळांच्या मुख्यालयाखेरीज इतर गावातही अशी ग्राम सचिवालये बांधण्याबाबत कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. ग्राम सचिवालय इमारतीचे प्रशासकीय नियंत्रण व मालकी संबंधित जिल्हा परिषदेकडे राहणार आहे. या सचिवालयांमध्ये ग्राम पंचायत कार्यालय, महसूल मंडळ कार्यालय, तलाठी कार्यालय, सहकारी संस्था कार्यालय, महिला व बालविकास कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीचे कार्यालय तसेच कृषि व पाटबंधारे ही कार्यालये समाविष्ट असतील. जागेच्या उपलब्धतेनुसार महसूल मंडळ मुख्यालयी इतर शासकीय कार्यालयांना देखील ग्राम सचिवालयामध्ये सामावून घेता येईल. थोडक्यात, ग्राम सचिवालयांमुळे ग्रामीण जनतेच्या अडीअडचणी व तक्रारींची तात्काळ दखल घेऊन, शासनाच्या विविध खात्यात समन्वय साधला जाऊन जनतेच्या कामाचा त्वरीत निपटारा होईल.

१२९. रकाना क्र. ५ मधील आकड्यात वाड्यांच्या संख्येचा समावेश असल्याने क्र.३ व ५ च्या रकान्यातील आकडे क्र. २ च्या रकान्यातील आकड्यांशी जुळणार नाहीत. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६९७.

ग्रामस्वराज्य : स्व. राजीव गांधी पंतप्रधान असतांना त्यांनी पंचायत राज्यास संविधानात्मक दर्जा देण्याचे प्रयत्न सुरू केले. त्याची फलनिष्पत्ती म्हणून १९९२ साली भारतीय संविधानात ७३ वी घटनादुरूस्ती झाली. या दुरूस्तीमुळे पंचायतीस संविधात्मक दर्जा मिळाला व ग्रामसभेसारखे प्रत्यक्ष लोकशाहीत सहभागी होण्याचे व्यासपीठ प्राप्त झाले. गावाच्या कारभारात लोकांचा सहभाग वाढविण्याचे अत्यंत प्रभावी साधन म्हणून ग्रामसभेकडे पाहण्यात येते. या ग्रामसभा जास्तीत जास्त सुदृढ व्हाव्यात, त्यांच्या बैठका वेळेत व्हाव्यात, लोकांचा प्रभावी सहभाग रहावा यासाठीचे अनेक उपाय महाराष्ट्र शासनाने हाती घेऊन त्यांचा समावेश मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये करण्यात आला. या अधिनियमानुसार सरपंच किंवा उपसरपंच यांना त्यांच्या पदावरून दूर करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या सदस्यांपैकी १/३ सदस्यांनी तसा प्रस्ताव मांडून व त्या प्रस्तावास २/३ सदस्यांनी बहुमताने मान्यता दिल्यास सरपंच किंवा उपसरपंचास आपले पद सोडावे लागते. विकासाच्या योजना आखणे, त्यांची अंमजबजावणी करणे, त्यासाठीच्या खर्चाची तरतूद करणे, झालेल्या खर्चाचे हिशेब तपासणे, त्यावर टीका-टिपणी तयार करणे इत्यादीसारख्या अनेक जबाबदाऱ्या ग्रामस्वराज्य योजनेखाली ग्रामसभेवर सोपविण्यात आलेल्या आहेत. ग्रामविकासाचा वार्षिक आराखडा तयार करणे, कामाचे नियोजन करणे, त्यामध्ये गावाचा सहभाग वाढविणे हे अधिकार ग्रामसभेचे आहेत. ग्रामसभेस दिलेले अधिकार व त्यामध्ये दिवसेंदिवस घातली जाणारी भर हे लोकांचा विकासामध्ये सहभाग व निर्णय प्रक्रियेमधील सहभाग वाढविण्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. गावातील मतदारांपैकी १५ टक्के किंवा १०० मतदार हजर राहिल्यास ग्रामसभा घेता येतात. ग्रामसभा हे "सहभागी लोकशाही" चे प्रतिक आहे.

संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान : ग्रामीण परिसर स्वच्छ रहावा म्हणून ज्यांनी परिश्रम घेतले, त्या संत गाडगेबाबा यांच्या नावाने हे अभियान सन २०००-२००१ पासून राबविण्यात येते. पूर्वीच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा, ग्रामीण भागातील महिला व बाल कल्याण, आदिवासी व मागासवर्गियांचे कल्याण व जवाहर रोजगार योजना या सर्व योजना संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानात विलीन करण्याचा निर्णय शासनाने २००२-२००३ या आर्थिक वर्षापासून घेतलेला आहे. या अभियानाचा उद्देश गावचा विकास व्हावा, गाव स्वच्छ व घाणमुक्त व्हावे, ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेचे जीवनमान सुधारावे हा आहे. या योजनेंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्राम पंचायतींना स्व. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणार्थ बक्षिसे देण्यात येतात. तसेच संत गाडेगाबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या प्रचार/प्रसिध्दीसाठी उत्कृष्ट बातम्या देणाऱ्या पत्रकारांनाही राज्य व जिल्हा स्तरावर बक्षिसे देण्यात येतात.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत कुटुंब कल्याण, पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन, सामाजिक एकता यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना जिल्हा स्तरावर, विभाग स्तरांवर व राज्य स्तरावर बक्षिसे देण्यात येतात.

एचएफ ४१३७—४५अ

अनुक्रमणिका

या अभियानांतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील सर्वात स्वच्छ अशा तीन उत्कृष्ट ग्रामपंचायतींना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नावाने रू.५, ३ व २ लाखाचे बक्षीस देण्यात येते. या अभियानांतर्गत सन २०००-२००१ या वर्षी लातूर जिल्ह्यातील हाडोळती, ता.अहमदपूर; रामवाडी-खरोळा, ता.रेणापूर व औराद शाहजनी, ता.निलंगा आणि महाळंगी, ता. चाकूर (विभागून) यांना अनुक्रमे पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. सन २००१-२००२ यावर्षी आरसगाव, ता.देवणी; महाळंगी, ता. चाकूर देऊळवाडी, ता.उदगीर व दापेगाव, ता. औसा (विभागून) आणि या ग्रामपंचायती बक्षीसपत्र ठरल्या. सन २००२-२००३ या वर्षी महाळंगी, ता. चाकूर ; देऊळवाडी, ता. उदगीर ; काळमाथा, ता. औसा या ग्रामपंचायती तर सन २००३-२००४ या वर्षी गंगापूर, ता. उदगीर ; कवळी, ता. औसा व पिंपरीअंबा, ता. लातूर या ग्रामपंचायती बक्षीसपात्र ठरल्या. सन २००४-२००५ यावर्षी कवळी, ता. औसा; सताळा, ता.अहमदपूर व मसलगा (खु.) ता. औसा या ग्रामपंचायतींनी अनुक्रमे पहिले, दुसरे व तिसरे बक्षीस मिळविले.

निर्मल ग्राम पुरस्कार योजना : संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत ही योजना राबविण्यात येते. या योजनेद्वारे शासनाने 'हागंदारीमुक्त गाव' ही अभिनव लोकचळवळ सुरू केली असून त्यास उत्तम प्रतिसाद लाभत आहे. या योजनेतील प्रयोगामुळे उंचावणारी स्वच्छतेची स्थिती व आरोग्यमान विचारात घेऊन केंद्र शासनानेही, उघड्यावरील प्रातर्विधीची पद्धत पूर्णपणे बंद करण्यासंदर्भात निर्मल ग्राम पुरस्कार ही योजना दि.२० जून २००३ रोजी जाहीर केली. या योजनेनुसार १००% घरे व शाळांमध्ये शौचालयाची सुविधा निर्माण करून त्यांचा वापर करणाऱ्या व हांगदारीमुक्त व स्वच्छ परिसर असलेल्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांना रू.२ लाख ते ५० लाखाची बक्षिसे देण्यात येतात. लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यातील चिमाची वाडी, लिंबगाव, अडोलवाडी; औसा तालुक्यातील चिंचोली जोगन, अशीव; रेणापूर तालुक्यातील शेलू (खु), शिरूर-अनंतपाळ तालुक्यातील शेंद व देवणी तालुक्यातील डोंगरेवाडी आणि नागतीर्थवाडी या ग्रामपंचायतींना प्रत्येकी २ लाख रू. ची बक्षीसे मिळालेली आहेत.

इंदिरा आवास योजना : ही योजना एप्रिल १९८९ पासून डिसेंबर १९९५ पर्यंत जवाहर रोजगार योजनेची उपयोजना म्हणून पुढे चालू ठेवण्यात आली होती. सदर योजना केंद्र शासनाने दि. १ जानेवारी १९९६ पासून स्वतंत्रपणे राबविण्याचे ठरविले. तसेच शासनाने सदर योजना राबविण्यासाठी त्यात दि.१ एप्रिल १९९९ पासून थोडे बदल केले आहेत. त्यानुसार आता नवीन घरकुले बांधण्यासोबतच टिकाऊ नसलेल्या कच्च्या घरांचा दर्जा सुधारून त्यांचे अर्ध पक्क्या व पक्क्या घरांमध्ये रूपांतर करण्यात येते. या योजनेकरिता केंद्र व राज्य शासन अनुक्रमे ७५:२५ या प्रमाणात अनुदान देतात व खर्च सोसतात. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जातीतेतर/अनुसूचित जमातीतर/ग्रामीण गरीब व्यक्तींनाही घरे मोफत उपलब्ध करून देणे हे या योजनेचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. मार्च २००६ अखेरपर्यंत लातूर जिल्ह्यात या योजनेद्वारे १,५३० घरकुलांचे उद्दिष्ट साध्य करावयाचे होते. ते उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करण्यात येऊन त्यानंतरही ११९ घरकुले बांधण्यात आली.

जलस्वराज्य

ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम : पाणी ही मुलभूत गरज असल्याने केंद्र व राज्य शासनाने या कार्यक्रमास प्रथम प्राधान्य दिलेले आहे. त्याची परिणती म्हणून सन २०००-२००१ पासून केंद्र शासनाने जाहीर केलेल्या 'पंतप्रधान ग्रामोदय योजने' तही ग्रामीण पाणीपूरवठा कार्यक्रम समाविष्ट केला आहे.

साध्या विहिरी, विंधण विहिरी, लघु पाणीपुरवठा योजना, नळ पाणीपुरवठा योजना अशा उपाय योजनांद्वारे ग्रामीण भागात पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यात आले आहे. पावसाळ्यानंतर पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणाऱ्या गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येतात. त्याचप्रमाणे दुषित पाणीपुरवठा असलेल्या भागासाठी शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतात. सुधारित धोरणानुसार आता हा कार्यक्रम 'मागणी आधारित व लोकसहभाग' या तत्त्वानुसार राबविण्यात येत आहे. याद्वारे दरडोई दरदिवशी ४० लिटर या प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध केले जाते. या कार्यक्रमात योजना निश्चितीपासून ते योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यात व व्यवस्थापनात लोकांचा सक्रीय सहभाग ग्रामसभेद्वारे अनिवार्य केला असून योजनेच्या भांडवली खर्चाच्या १० टक्के भाग लाभार्थ्यांनी लोकवर्गणी म्हणून खर्च करावयाचा आहे. तसेच योजनेच्या देखभाल व दुरूस्तीचा १०० टक्के खर्च लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामसभेच्या मान्यतेने 'ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती' ची स्थापना करण्यात येते. योजनेसंबंधी सर्व आर्थिक व्यवहार करण्याचे अधिकार या समितीस आहेत. रू.७५/- लाखापर्यंत स्वतंत्र गावाच्या नळ पाणीपुरवठा योजना, साधी विहीर,विंधन विहीर हे कार्यक्रम जिल्हा परिषदा राबवितात. या कार्यक्रमांतर्गत स्वजलधारा योजनाही राबविण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यात मार्च २००५ अखेरपर्यंत ३० गावे ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आली होती.

नागरी पाणीपुरवठा कार्यक्रम : नागरी जनतेला पुरेसा शुद्ध पाणीपुरवठा करणे ही प्रत्येक महानगरपालिका/नगरपालिकेची जबाबदारी आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून २१ महानगरपालिका, २२१ नगरपालिका व ३ नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा व जलनि:स्सारण योजनांची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करते. राज्य शासनाकडून नगरपालिकांना वर्गवारीनुसार अनुदान व कर्ज मंजूर केले जाते. राज्य शासनाने या कार्यक्रमासाठी सर्व नगरपालिका/महानगरपालिकांना १० टक्के लोकवर्गणी लागू केली आहे. सन २००५-२००६ मध्ये यासंबंधीत एकूण १९५ मोठ्या योजना प्रगतीपथावर होत्या. त्यात लातूर नगरपरिषदेसाठीच्या योजनेचा समावेश होता. नागरी पाणीपुरवठा कार्यक्रमात या जिल्ह्यातील चार शहरे समाविष्ट करण्यात आली आहेत.

उत्पन्न व खर्च : घरपट्टी व मालमत्ता कर, जकात, बाजार कर, जत्रा आदी उत्पन्नाच्या बाबींबरोबरच ग्रामपंचायतीस जिल्हा परिषदेचे अनुदान मिळते. हे अनुदान खेड्यातून वसूल केलेल्या जमीन महसूलाच्या ३०% इतकी रक्कम आणि दरडोई एक रुपया धरुन होणारी रक्कम या दोहोतील जी अधिक असेल तेवढ्या रकमेचे असते. सन १९७२-७३ पासून हे अनुदान १००% देण्यात येते. त्यापैकी ५०% रक्कम ग्रामपंचायतींना ग्रामीण रोजगार योजनांवर खर्च करावी लागते. तक्ता क्र. ३ मध्ये जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची सद्याची संख्या व सदस्य संख्या आणि तक्ता क्र.४ व ५ मध्ये जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचे सन २००३-२००४ या वर्षाचे उत्पन्न व खर्चाची आकडेवारी दिलेली आहे.

नगरपालिका

हैद्राबाद संस्थान किंवा राज्य दिनाक १७ डिसेंबर १९४८ रोजी निजामी राजवटीतून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात विलीन झाले. त्यापूर्वीही हैद्राबाद संस्थानात नगरपालिका अस्तित्वात होत्या. पण त्या लोकनिर्वाचित किंवा लोकशाही तत्त्वावर आधारित नव्हत्या, तर

शासननियुक्त होत्या. त्याकाळी निवडणूकीच्या माध्यमातून नगरसेवक निवडले जात नसत. थोडक्यात, या नगरपालिका खऱ्या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्था नव्हत्या. नगरपालिकांचे कार्यालयीन प्रशासनही उर्दू भाषेतून चालत असे. हैद्राबाद संस्थान स्वतंत्र होण्यापूर्वी आणि नंतरही काही वर्षे या नगरपालिका **Municipal Commitees** आणि **Town Commitees** अशा दोन वर्गात विभागलेल्या होत्या. त्यात सध्याच्या लातूर जिल्ह्यातील लातूर, उदगीर, औसा, निलंगा व अहमदपूर या नगरपालिकांचा समावेश होता.

हैद्राबाद संस्थानाच्या विलिनीकरणानंतरही हैद्राबाद संस्थानातील नगरपालिकांना **The Hyderabad Municipal and Town Committees Act, 1951** हा कायदा लागू होता. पुढे हैद्राबाद संस्थान १९५६ मध्ये मुंबई राज्यात विलीन झाल्यानंतर हा कायदा बदलून त्याचे नाव **The Hyderabad District Municipalities Act, 1956** असे केले गेले. त्यातही **City Municipality** आणि **Town Municipality** असे दोन वर्ग होते. याच कायद्यान्वये नगरपालिकांचा कारभार चालविला जात होता.

नगरपालिकांवर सरकारच्या वतीने जिल्हाधिकारी व आयुक्त यांचे नियंत्रण असे. नगरपालिकांचे सर्व प्रस्ताव किंवा शिफारशी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सरकारला सादर केल्या जात. जिल्हाधिकाऱ्यास नगरपालिकांच्या निवडणुकीसंबंधी निर्णय घेण्याचे व त्यांची कर्तव्ये ठरविण्याचे अधिकार होते. त्यादृष्टीने हा अधिकारी नगरपालिकांच्या प्रशासनासाठी जबाबदार असे.[१३०] मुंबई राज्यात व पर्यायाने महाराष्ट्र राज्यात विलिनीकरणानंतर १९६५ चा महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज ॲक्ट संमत करून त्यान्वये जिल्हाधिकारी व आयुक्तांचे नगरपालिकांवरील नियंत्रण काढून ते संचालक, नगरपालिका प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सोपविण्यात आले.[१३१] त्यानंतर महाराष्ट्र राज्यातील नगरपालिकांसंबंधीचे कायदे या नगरपालिकांनाही लागू करण्यात आले. सध्या नगरपालिका पूर्णपणे लोकनियुक्त असून त्यांच्या अधिकारक्षेत्रातील विकास कामांची जबाबदारी त्यांच्यावर सोपविलेली आहे. नगरपालिकांच्या कारभारात अनुसूचित जाती-जमातींना प्रतिनिधित्व देण्यासाठी त्या सदस्यांच्या राखीव जागा ठेवण्यात येतात.

नगरपालिकांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असून काही विशिष्ट परिस्थितीत ही मर्यादा एक वर्षाने वाढविण्याचे किंवा त्याअगोदर बरखास्त करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवलेले आहेत. मुख्याधिकारी हा शासकीय अधिकारी नगरपालिकेचा मुख्य प्रशासक असतो.

जिल्ह्यातील सर्वात जुन्या व शहरी नगरपालिका म्हणून लातूर व उदगीर नगरपालिकांचा उल्लेख करता येईल. सन १९३५ साली स्थापन झालेल्या या दोन्ही शासननियुक्त नगरपालिकांची सदस्य संख्या १९७० मध्ये अनुक्रमे २३ व १७ होती.[१३२]

कार्ये

हैद्राबाद डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट, १९५६ च्या सेक्शन ८६ अन्वये नगरपालिकांवर आपापल्या क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते, व दिवाबत्तीची सोय करणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, सार्वजनिक जागा, गटारे, रस्ते स्वच्छ करणे, तरणतलाव व सार्वजनिक बागबगिच्यांची देखभाल, घरांना नंबर व रस्त्यांना नावे देणे, जन्ममृत्यू नोंद ठेवणे, सार्वजनिक लसीकरण करणे, पशुदवाखाने उभारणे आदी कामे करावयाचे बंधन आहे.

---

१३०. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६१३

१३१. कित्ता पृ. ६९६

१३२. कित्ता, पृ. ६९१

कार्ये : हैद्राबाद डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट, १९५६ च्या सेक्शन ८६ अन्वये नगरपालिकांवर आपापल्या क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते, व दिवाबत्तीची सोय करणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, सार्वजनिक जागा, गटारे, रस्ते स्वच्छ करणे, तरणतलाव व सार्वजनिक बागबगिच्यांची देखभाल, घरांना नंबर व रस्त्यांना नावे देणे, जन्ममृत्यू नोंद ठेवणे, सार्वजनिक लसीकरण करणे, पशुदवाखाने उभारणे आदी कामे करावयाचे बंधन आहे.

उत्पन्न : जमीन व इमारती कर, जकात कर, वाहन कर, प्राणी व नौका कर, व्यवसाय-व्यापार कर, जाहिरात कर, अचल मालमत्तेच्या हस्तांतरणावर कर, यात्रा कर व सरकारच्या संमतीने इतरही काही करांव्दारे नगरपालिका उत्पन्न गोळा करतात. असे असले तरी हे कर नगरपालिकांचे खर्च भागविण्यास पुरेसे नसल्याने सरकार त्यांना आवर्त व अनावर्त (Recurring & Non-recurring) या शीर्षकाखाली पाणीपुरवठा, सांडपाणी योजना, साथीच्या रोगांना आळा, कर्मचाऱ्यांचे भत्ते, रस्त्यांची देखभाल इत्यादी बाबींसाठी अनुदान देऊन त्यांच्या उत्पन्नात भर टाकते. तक्ता क्र. ६ मध्ये नगरपरिषदांच्या १९७१-७२, १९८०-८१, १९९०-९१, २०००-२००१ व २००३-२००४ या वर्षातील उत्पन्न व खर्चाचा गोषवारा दिलेला आहे.

लातूर जिल्ह्यातील नगरपालिकांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे----

लातूर नगरपरिषद : तत्कालीन हैद्राबाद राज्यातील लातूरमध्ये पूर्वी वर्णिल्याप्रमाणे १९३५ साली शासन नियुक्त नगरपालिका अस्तित्वात आली होती.[१३३] अर्थात ती लोकनिर्वाचित नव्हती. हैद्राबाद संस्थानाच्या भारतीय संघराज्यातील विलिनीकरणानंतर ही नगरपालिका बरखास्त होऊन ऑगस्ट १९५२ मध्ये नवीन लातूर नगरपरिषद अस्तित्वात आली. यावेळी लातूरसह हैद्राबाद राज्यातील नगरपालिकांना The Hyderabad Municipal and Town Committees Act,१९५१ हा कायदा लागू होता. या कायद्यान्वये स्थापन झालेली ही नगरपरिषद Municipal Committee अर्थात City Municipality होती. त्यावेळी पंधरा हजार किंवा त्याहून अधिक लोकसंख्येसाठी Municipal Committee आणि पाच हजार ते पंधरा हजारपेक्षा कमी लोकसंख्येसाठी Town Committee होती. लातूर शहराची लोकसंख्या तेव्हा २० हजार असल्याने तेथे Municipal Committee अस्तित्वात आली. पुढे The Hyderabad District Municipalities Act, १९५६ नुसार ही नगरपरिषद City Municipality बनवून लातूरला शहराचा दर्जा प्राप्त करुन देण्यात आला. शहर नियोजन कायदा त्या काळी या शहराला लागू करण्यात आला होता. त्यान्वये गंजगोलाई व तिच्या अवतीभवतीचा परिसर विकसित झालेला होता. तथापि शहराचा जुना भाग मात्र या कायद्यानुसार विकसित झाला नव्हता.

त्या काळात नगरपरिषदेचे अध्यक्ष आणि कार्यकारी अधिकारी यांचा मोठा दरारा असे. नगराध्यक्ष हे पदही अतिशय सन्मानाचे मानले जात होते.श्री. चंद्रशेखर बाजपाई हे लातूर नगरपरिषदेचे पहिले अध्यक्ष होते. लातूर शहराच्या विकासातील त्यांचे योगदान भरीव व महत्त्वाचे आहे. त्यांनी तीनवेळा लातूरचे नगराध्यक्षपद भूषविले होते. त्यांच्यानंतर माणिकराव सोनवणे, शिवराज पाटील-चाकूरकर, तमन्नप्पा उटगे, मदनलाल बियाणी, अबूबकर सिद्दीकी, ॲड. रामकिशन मालू, मन्मथअप्पा लोखंडे, भाऊसाहेब सावे, प्रदीप राठी, विक्रम गोजमगुंडे, एस.आर. देशमुख, मधुकर कोकाटे, श्रीमती शारदा कांबळे, विक्रमसिंह चव्हाण व डॉ. जनार्दन वाघमारे यांनी लातूरचे नगराध्यक्षपद भूषविले आहे. जिल्ह्यातील 'अ' दर्जाच्या या नगरपरिषदेचे एकूण क्षेत्रफळ ३२.५३ चौ.कि.मी. एवढे आहे. सन १९७० मध्ये या

१३३. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.६९१.

नगरपरिषदेचे २३ प्रभाग होते. त्यात अनुसूचित जाती-जमातीसाठी तीन व महिला सदस्यांसाठी दोन प्रभाग राखीव होते. परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर २००१ रोजी झाली. यावर्षी प्रभागांची संख्या २० एवढी होती. त्यातून निवडून आलेल्या सदस्यात अनुसूचित जातीचे १०, अनु. जमातीचा एक, इतर मागासवर्गाचे १८ व ११ महिला सदस्यांचा समावेश होता. याशिवाय पाच नामनिर्देशित सदस्य होते. सध्या नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रात जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, तीन नगरपरिषद दवाखाने, एक फिरता नगरपरिषद दवाखाना व एक शासकीय पशु चिकित्सालय आहे. नगरपरिषदेच्या वरील तीन दवाखान्यांपैकी एका दवाखान्यात आंतररुग्ण सुविधाही उपलब्ध आहे. तेथे कुटुंब-कल्याण शस्त्रक्रियांही नियमितपणे केल्या जातात. अन्य दोन दवाखान्यांमध्ये फक्त बाहयरुग्ण सुविधा उपलब्ध आहे. फिरत्या दवाखान्यामार्फत वेळापत्रकानुसार दररोज सकाळ-संध्याकाळ झोपडपट्टी विभागात आरोग्य सेवा पुरविल्या जातात. तसेच A.N.M. कार्यक्रमांतर्गत आठवडयातून दोनदा लसीकरण सत्राचे आयोजनही केले जाते.

लातूर नगरपरिषदेमार्फत नगरपालिका क्षेत्रात २३ प्राथमिक शाळा चालविल्या जातात. या शाळांमध्ये शालेय पोषण आहार, मागासवर्गीय मुलांमुलींना उपस्थिती भत्ता, गणवेश, शिष्यवृत्ती परीक्षा, विविध स्पर्धा या योजना राबविण्यासोबतच सर्व मुलांची आरोग्य तपासणीही केली जाते.

पाणी पुरवठा : नगरपरिषदेमार्फत शहरासाठी पाणी पुरवठयाच्या योजनाही राबविल्या जातात. सध्या दरडोई ९० लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा केला जातो. त्यासाठी साई व नागझरी येथे परिषदेच्या मालकीचे बंधारे आहेत. तेथील पाणी अनुक्रमे अंबाजोगाई रोड जलशुध्दिकरण केंद्र व वरवंटी जलशुध्दिकरण केंद्राकडून शुध्द करून शहरास रोज २४ द.ल. लिटर पाणी पुरविले जाते. याशिवाय धनेगाव येथील मांजरा धरणातीलही पाणी हरंगुळ व वरवंटी जलशुध्दिकरण केंद्राकडून शुध्दिकरण करून शहरास पुरविले जाते. वरील ठिकाणी पाणी उपलब्ध नसल्यास भंडारवाडी धरणातून पाणी उचलले जाते व शहरास पुरविले जाते. असे असले तरी वरील बंधारे व धरणांची पाणी साठवण क्षमता मुळातच कमी असल्याने उन्हाळ्यात या शहरास तीव्र पाणी टंचाईस तोंड दयावे लागते. या समस्येवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मांजरा धरणातील पाण्याच्या उपलब्धतेसाठी 'लातूर पाणी पुरवठा योजना, टप्पा-पाच' ही १२९.४७ कोटी रु. खर्चाची योजना मंजूर केलेली आहे. ही योजना शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अल्प वेळात पूर्णत्वास नेऊन पाणी पुरवठा योजनेचा आगळा वस्तुपाठ घालून दिला आहे. सध्या या योजनेतून दररोज ३४ द.ल. लिटर पाणी पुरवठा पहिल्या टप्प्यात सुरू करण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत हरंगुळ येथे दररोज आठ कोटी लिटर पाणी शुध्द करण्याची क्षमता असणारे जलशुध्दिकरण केंद्र बांधण्यात आले आहे.

एकात्मिक शहर विकास योजना : आठव्या पंचवार्षिक योजना काळात लातूर शहरासाठी एकात्मिक शहर विकास योजना मंजूर करण्यात आली होती. सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून वित्तीय सहाय्य अनुज्ञेय होणाऱ्या घटकांसाठी २२०.०५ लक्ष रुपये व हुडको वा इतर वित्तीय संस्थेकडून अर्थसहाय्य होऊ शकणाऱ्या घटकांसाठी ४४०.३३ लक्ष रुपये अशा एकूण ६६०.३८ लक्ष रुपयांच्या योजनेचा समावेश होता. तदनंतर सन २००२ मध्ये सुधारित एकात्मिक शहर विकास योजना मंजूर करण्यात आली. ८५९.११ लक्ष रुपये किमतीच्या या योजनेसाठी १५० लक्ष रुपये केंद्रिय अनुदान, १४० लक्ष रुपये राज्य अनुरुप अंशदान व ५६९.११ लक्ष रुपये इतर वित्तीय संस्थांकडून कर्जरुपाने प्राप्त व्हावयाचे होते. त्यापैकी

नगरपरिषदेस १३९ लक्ष रुपये केंद्रिय अर्थसहाय्य, व ९२,६६,७०० रुपये राज्य अनुरुप अंशदान इतके अर्थसहाय्य प्राप्त झालेले असून नगरपरिषदेने आतापर्यंत या योजनेवर ६,२०,५२,५६९ रुपये इतका खर्च केला आहे.

नगरपरिषद शहरविषयक विकासाच्या या बाबींव्यतिरिक्त रस्ते बांधणी व दुरुस्ती, शहर विद्युतीकरण, बालोद्यान विकास, नाना-नानी पार्क, कचऱ्यापासून वीज व खत निर्मिती प्रकल्प, व्यापारी संकुल बांधणे वगैरे योजनाही राबविते.

विविध क्षेत्रातील उत्तम कामगिरीमुळे नगरपरिषदेला राष्ट्रीय जनगणना पारितेषिक, नागरी वृक्षमित्र पुरस्कार आणि संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानाचे विभागीय व राज्य स्तरावरील प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच अक्षय नागरी योजनेसाठीही लातूर शहराची निवड झालेली आहे. सन २००४-२००५ या वर्षी नगरपरिषदेचे सर्व मार्गानी मिळालेले एकूण महसुली उत्पन्न ३,२५,७६१ हजार रुपये, इतर विविध बाबींवर ३,४६,४१५ हजार रुपये खर्च झाले होते.

मांजरा नदीच्या काठावर अश्मयुगीन काळातील मानवी अस्तित्त्वाच्या खूणा व सुमारे पन्नास हजार वर्षांपूर्वीचे हत्ती, गेंडा, रानम्हैस यांचे जीवाश्म सापडले आहेत. स्वाभाविकपणे या प्राण्यांच्या अस्तित्त्वासाठीचे योग्य पर्यावरण त्या वेळी येथे होते. किल्लारी भूकंपामूळे एकूणच महाराष्ट्राच्या भौगोलिक जडणघडणीचा नव्याने विचार सुरू झाला. आर्कियन खडकामध्ये असलेल्या प्राचीन भ्रंशावर नव्याने हालचाली झाल्यामुळे हा

Maharashtra State Gazetteers

भूकंप झाला असे मत व्यक्त केले गेले. वास्तवात आर्कियन खडकात साठवलेली ऊर्जा केव्हाच मुक्त झाली आहे. या मृत भूस्तर भ्रंशाचे पुनर्जीवन होऊन नव्याने हालचाली (Reactivation) होत आहेत. नव्याने भूस्तर हालचालींमुळे उत्क्रम भूभ्रंश (Rerersedault) झाले. महाराष्ट्र हा भूप्रदेश भूकंपदृष्ट्या स्थिर आहे ही धारणा नव्याने तपासण्यासाठी ही घटना कारणीभूत ठरते. शिवाय याविषयीची सज्जता हा एक न संपणारा विषय ठरतो. स्थलांतर हा याचा पर्याय ठरू शकत नाही हे देखील स्पष्ट झाले. या सर्व दृष्टीने लातूर जिल्ह्याचे योगदान निश्चितच नोंद घेण्यासारखे आहे. भूकंपग्रस्तांचे इतक्या मोठ्या प्रमाणात नियोजनबद्ध रीतीने झालेले पुनर्वसन हे संपूर्ण देशात आदर्शवत मानले जाईल. सर्व मानवी प्रवृत्तींचे दर्शन होऊनसुद्धा निर्मितीक्षम कार्याची क्षमता लातूर जिल्ह्याने स्पष्ट केली हे विशेष.

प्राचीन भारतातील सोळा महाजन पदांपैकी अश्मक या जनपदात लातूरचा समावेश होता. कालांतराने अश्मकाच्या दक्षिण भागाला कुंतल हे नामाभिधान प्राप्त झाले. स्वाभाविकपणे लातूरचा समावेश कुंतल जनपदात झाला. मौर्य काळात इ. स. पू. चौथ्या शतकात या भागाचा अंतर्भाव कर्नाटकातील सन्नती (सुवर्णगिरी) या प्रशासकीय विभागात होई. लातूरजवळील तेर (तगर) ते सन्नती यांना जोडणारा राजमार्ग या जिल्ह्यातून जात होता. शिवाय बलिपट्टण या स्थानाशी सुद्धा सातवाहन काळात या प्रदेशाचा संपर्क होता. लातूरच्या सांस्कृतिक इतिहासाचा तेव्हापासून प्रारंभ होतो असे मानता येते. विशेषत: तगर येथे आढळलेल्या जनपदाच्या स्वतंत्र नाण्यावरून असेही मानता येईल की, ' तगर-लत्तलूर ' हे एक स्वतंत्र जनपद असावे. सातवाहन काळात लातूर जिल्ह्याचा भूभाग या जनपदाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असावा. वाकाटक काळामध्ये वत्सगुल्म शाखेचा देवसेन याच्या प्रभुसत्तेखाली लातूर परिसर होता. ' नांगरकट-उत्तरामार्ग ' या प्रशासकीय विभागात हा भाग येई. इ. स. ६८२ मध्ये सातव्या शतकाच्या उत्तरार्धात लातूर हे राष्ट्रकूटांचे मूळ स्थान असल्याचे श्री. अ. स. अळ्तेकर यांच्यासारख्या ज्येष्ठ संशोधकाने स्पष्ट केले आहे. बदामीच्या चालूक्य काळात ' उच्छिव चत्वारिंशत ' औसा हा चाळीस स्थानांचा अंतर्भाव असणारा एक स्वतंत्र प्रशासकीय विभाग होता. बोरगाव ताम्रपटात याविषयी नोंद आहे. हा विभाग 'नलवाडी' (नळदूर्ग) या मुख्य विषयविभागाचा उपविभाग असावा. एकूण आजच्याच प्रमाणे विविध प्रशासकीय विभागाची निर्मिती व त्यांच्या कमीअधिक होणाऱ्या सीमारेषा विविध राजवटीच्या काळातही आढळतात.

राष्ट्रकूट राजवंशाच्या काळात लातूर राजकीय हालचालीचे केंद्र होते. मानूरच्या राष्ट्रकूटांनी लातूर येथे येऊन वास्तव्य केले. त्यांनी येथे गढीवाड्यांची उभारणी केली. यावेळी लातूर स्थलमहात्म्यातील नोंदीप्रमाणे 'रट्टगिरी' या नावाने ओळखले जाई. रट्टनौर-लत्तनौर-लत्तलूर-लातूर या क्रमाने या स्थानाच्या नावात झालेले परिवर्तन स्पष्ट होते. या वंशातील बलाढ्य असलेल्या दंतीदूर्ग या राष्ट्रकूट राजाची मूळ शाखा लातूर येथीलच होती. दंतीदूर्गाने वेरूळ येथील लेण्यांची निर्मिती केली. कर्नाटकातील मयुरखंडी (मोरखंडी) येथील गोविंदपुत्र अमोघवर्ष हा 'लत्तलुरपूरवराधीश्वर' आणि 'लत्तलूरपूरपरमेश्वर' अशी बीरुदे धारण करीत असे. या राजांच्या दानलेखातून स्पष्ट होते की यांचा लातूर क्षेत्राशी निकट संबंध होता. सन ८०० च्या नंतर लातूर क्षेत्रात राष्ट्रकूटांचे सत्ताकेंद्र आणि त्याचबरोबर शैक्षणिक कार्यासाठी त्यांनी दिलेले अग्रहार विकसित झाल्याचे दिसतात. अहमदपूर तालुक्यातील झरीका (नवकुंडझरी), उमरगा तालुक्यातील लोहारा बुद्रुक तसेच अगदी सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड आणि एरंडोली या स्थानांची नोंद यादृष्टीने उल्लेखनीय आहे. राष्ट्रकूटांची मूळ शाखा जवळपास अर्धशतकापेक्षा जास्त काळ लातूर येथे नांदली. पुढे ८५० मध्ये त्यांनी मान्यखेट येथे स्थलांतर केले. प्रसंगोत्पात त्यांनी मोरखिंडी तसेच मालखेड (जि. बिदर, कर्नाटक), कंधार (जि. नांदेड), बोधन (जि. निजामाबाद, आंध्रप्रदेश) याठिकाणी सत्ताकेंद्र विकसित केले. सुगंधावती (जि. बेळगाव) येथील सौदंतीच्या रट्ट

घराण्यातील कान्हरदेव हा स्वत:ला 'लत्तलूरपूरविनिर्गत' म्हणवतो. याच शाखेचा मूळ पुरुष कृष्ण हा 'कंधारपूरवराधिश्वर'असे बिरुद धारण करतो. हे मूळ लातूरचे होते. राष्ट्रकूट राजकन्या कल्याणीच्या चालूक्यांना दिली होती. तर लातूरच्या रट्टांनी आंध्रातील कुल्पक आणि ओरिसातील संभलपूर येथे राज्य संपादन केले. याविषयीची नोंद त्यांच्या अभिलेखातून उपलब्ध आहे. विशेष म्हणजे कल्याणीच्या चालूक्यांचा महासामंत राणक धाडिदेव हा लातूरचा होता. त्याचा दंडनायक हाही लातूरचाच होता. या बाबी या स्थानावरील विजिगुषु व महत्त्वाकांक्षी राजपुरुषांची नोंद करतात. कल्याणीच्या चालुक्याच्या अकराव्या शतकातील पाप विनाशक मंदिरातील लेखात या स्थानाची नोंद 'लत्तलौर' अशी करून हे नगर दिव्य, पूरश्रेष्ठ व वेदविद्येचे केंद्र असल्याचे नोंदवले आहे.

या जिल्ह्यात मिळालेल्या एकूण शिलालेखापैकी अनेक लेख कल्याणीच्या चालूक्य राजवटीशी संबंधित असून कन्नड लिपित आहेत. चालूक्य राजा सहावा विक्रमादित्य याचा सेनापती भीम आणि त्याचा दण्डनायक पुत्र कालिदास याने हिप्पळगाव व गणेशवाडी येथे अनेक मंदिरे उभारली तसेच पाठशाळा व जलाशयाची निर्मिती केली. महाराष्ट्राच्या जलव्यवस्थापनात आवर्जून नोंद घ्यावी असा 'भीमसागर' हा जलाशय गणेशवाडी येथे सन ३० नोव्हेंबर १०९९ मध्ये निर्माण करण्यात आला. याविषयीचे पुरातत्त्वीय अवशेष व शिलालेख या स्थानावर उपलब्ध आहेत. येथे पाशुपत शैवपंथीयांचे तसेच पर्वतावली आम्नायाच्या शिवलिंगी संतान शाखेचे वास्तव्य होते. पुढे बसवेश्वराने वीरशैव पंथाचे पुनर्संघटन केले. त्याविषयीची पार्श्वभूमी शिवलिंगी संतान व सरस्वती मंडपाद्वारे गणेशवाडी येथून तयार होत होती असे म्हणता येईल. पाचवा भिल्लम या यादव राजाने कल्याणीच्या चालूक्य राजावर आपले प्रभूत्व निर्माण केले. याचवेळी वरंगळ येथे काकतीय राजवंशाची स्थापना झाली. स्वाभाविकपणे या परिसरात यादव व काकतीयांच्या परस्पर प्रभुसत्तेसाठीचा संघर्ष झाल्याचे जाणवते. यादवांचा सेनापती खोलेश्वर याच्या नियंत्रणाखाली ' औसदेश ' आणि ' उदगीरदेश ' हे विभाग होते. याविषयीची नोंद अंबाजोगाई लेखात उपलब्ध आहे. काकतीयाच्या गणपती याने काही काळ नांदेड जिल्ह्यातील भोकर व लातूर जिल्ह्यांतील उदगीर येथे ताबा मिळविला. पुन्हा हा प्रदेश कान्हरदेव यादवांनी सन १२५८ मध्ये हस्तगत केला.

जिल्ह्याशी संबंधित अभिलेखाचा जरी विचार केला तरी वाकाटकराजा देवसेन, बदामी चालुक्याचा पहिला विक्रमादित्य, विनयादित्य, राष्ट्रकूट वंशातील ध्रुव, तिसरा गोविंद, पहिला अमोघवर्ष, दुसरा विजयसिंह, सोमेश्वर पहिला, विक्रमादित्य सहावा, सोमेश्वर तिसरा, यादव राजवंशातील सिंघनयादव, कान्हरदेव आणि सौदंतीचे रट्ट या विविध राजवंशातील राजांचा प्रत्यक्ष या भागांशी संपर्क होता हे स्पष्ट होते.

प्राचीनकाळात तगर प्रमाणेच धाराशिव व अन्य क्षेत्राचा विकास होत होता. लातूर परिसरातील या स्थानांबरोबरच खरोसा लेण्याची निर्मिती बदामीच्या चालूक्य काळात झाली. या लेण्या बौद्ध, जैन व हिंदु धर्मांचे प्रतिनिधित्व करतात. राष्ट्रकूट व उत्तरकाळात जैन आणि पुढे लिंगायतांचा प्रभाव जाणवतो. औसा येथे प्रमुख जैनपीठ होते. करकण्डचरियु या ग्रंथाचा कर्ता कनकामर याचे वास्तव्य कल्याणीच्या चालूक्य काळात औसा येथे होते. जैन धर्मीयांसंबंधीची सविस्तर नोंद रामलिंग मुद्गड येथील शिलालेखात आली आहे. येथे मुनी दामनंदी सिद्धांतदेव याच्या आधी दिवाकरनंदी घनकिर्ती आणि अभयनंदी या जैन आचार्यांची नोंद उपलब्ध आहे. श्वेतांबर व दिगंबर पंथीयांचा समन्वय साधणाऱ्या 'यापनीय' संघाच्या अनुयायांचे वास्तव्य लातूर परिसरात आढळते.

या क्षेत्रात लातूर येथील सिद्धेश्वर मंदिर, केशवराज मंदिर, भूतेश्वर मंदिर तसेच निलंगा येथील नीलकंठेश्वर मंदिर, पानगाव येथील विठ्ठल मंदिर, औसा तालुक्यातील बोरगाव, तसेच बोरी, बल्लाळ चिंचोली, मुरुड आणि

गंगापूर याशिवाय अहमदपूर तालुक्यातील झरी बुजुर्ग आणि शिरुर अनंतपाळ, रामलिंग मुदगड, निटूर, भूतमुंगळी येथील विविध मंदिरे या क्षेत्रांच्या दहाव्या ते तेराव्या शतकांपर्यंत होत जाणाऱ्या विकासाची साक्ष देतात. विविध धर्मांच्या बरोबर शैक्षणिक केंद्र पाठशाळा व त्यासाठी म्हणून दिलेले अग्रहार हे या क्षेत्रातील शैक्षणिक परंपरा अधोरेखित करतात.

मध्ययुगात इस्लामिक सत्तेचा प्रभाव या क्षेत्रात होता. खिलजी नंतर बहमनीची सत्ता येथे नांदली . पंधराव्या शतकात गुलबर्गा व बिदर येथे बहमनीच्या विघटनातून नवीन सत्ताकेंद्रे अस्तित्वात आली. औसा येथील सुभेदार कासिम बरीद याने बरीदशाहीची स्थापना केली. या कालखंडात औसा व उदगीर किल्ल्याने विविध संघर्ष अनुभवले यातूनच येथील किल्ल्यांचा विकास झाला. लष्करी व महसूल केंद्रा बरोबर मध्ययुगीन नगररचनेचे उत्तम उदाहरण म्हणून या स्थानांची नोंद करता येते. सतराव्या शतकाच्या प्रारंभी मलिक अंबर याने औसा ताब्यात घेतले. इ. स. १६३६ मध्ये निजामशाहीची अखेर होऊन लातूर जिल्ह्याचा समावेश मोगल साम्राज्यात झाला. उत्तर काळात हैद्राबादचा निजाम आणि पेशवे यांच्यातील संघर्ष उदगीर तांदुळजा परिसरात झाला. याच काळात जिल्ह्यात विविध गढी-वाड्यांची निर्मिती झाली. उत्तर मध्ययुगीन संस्कृतिचे एक वैशिष्ट्य म्हणून याची नोंद प्रथमच या दर्शनिकेत घेण्यात आली आहे. यानंतर झालेल्या स्वातंत्र्याच्या लढ्यातसुद्धा या गढीवाड्यांचे स्वत:चे असे वेगळेपण जाणवते.

निजामी सत्तेविरुद्धचा सर्वंकश संघर्ष हे एक रोमहर्षक पर्व होते. साधारणत: सन १९३८ पूर्वीचा इतिहास हा उद्योगपर्व या सदरात येईल. १९३८ ते १९४६ हे आंदोलनाचे पर्व होते. १९४६ ते ४७ प्रक्षोभक पर्व मानावे लागते तर १९४७ ते ४८ हे प्रत्यक्ष मुक्ती पर्व होय. हैद्राबाद संस्थानाला आणि पर्यायाने आजच्या लातूर जिल्ह्याला १७ सप्टेंबर १९४८ रोजी जे स्वातंत्र्य मिळाले त्याचे श्रेय आर्य समाज, महाराष्ट्र परिषद व स्टेट कॉंग्रेस यांना द्यावे लागते. समाजातील सर्व घटक या आंदोलनात सहभागी होते. अनेकांनी यासाठी आत्माहुती दिली. या आंदोलनाला विविध पैलू असल्याचे दिसतात. गेल्या काही दशकात या संदर्भात विद्यापीठ पातळीवर होणाऱ्या बहुविध संशोधनामुळे अनेक बाबी नव्याने स्पष्ट होत आहेत. निजाम शासनाच्या धोरणाविरुद्ध जनतेचा सर्वंकष उठाव वैशिष्ट्यपूर्ण होता.

साधारणत: १८५१ नंतर वहावी ही एक प्रभावी चळवळ होती. तिचा हेतू इंग्रज व निजामांची सत्ता उलटून टाकणे हा होता. लातूर जिल्ह्यातील मुबारीज उद्दौला व त्याच्या सहकाऱ्यांनी उठाव केला. शेख अब्दुल्ला हे या चळवळीचे नेतृत्व करीत. उदगीर येथील अब्बास अली खान यांनी केलेल्या कामगिरीचा परिणाम म्हणून त्यांची जहागीर काढून घेण्यात आली. १८५७ च्या आंदोलनाचे पडसाद हैद्राबादप्रमाणे लातूर जिल्ह्यामधील उदगीर व निलंगा येथे उमटल्याचे दिसते. १८५७ ते १८६४ पर्यंत सशस्त्र उठावाची एक मालिका सुरू होती. यात रामराव उर्फ जंग बहाद्दुर हे नेतृत्व करत. लातूरचा नेकराम टेलर, बाजीराव पाटील, विठोजी खंडोजी यांसारखी मंडळी यात सहभागी होती. परिणामी ब्रिटिशांनी कोर्टमार्शल करून अहमदाबाद येथे बहात्तर लोकांना फाशी दिली.

याच काळात आर्य समाजाची चळवळ सामाजिक प्रबोधनाचे कार्य करीत होती. उदगीर येथील पं. बन्सीलाल आणि पं. श्यामलाल या बंधूंचे काम विशेष उल्लेखनीय होते. शासकीय दडपशाहीविरुद्ध समाजप्रबोधनाचे काम करतानाच नागरी स्वातंत्र्य व समाजप्रबोधनासाठीही लढा दिला गेला. सन १९३८-३९ मध्ये आर्य समाजाने केलेल्या सत्याग्रह आंदोलनात जवळपास १२००० लोकांचा सहभाग होता. निलंग्याचे शेषराव वाघमारे, लातूरचे दिगंबरराव शिवणगिकर, अहमदपूरचे निवृत्ती रेड्डी, दिगंबरराव लाटकर नेतृत्व करीत होते. याच काळात लातूर येथे लोकमान्य टिळकांनी भेट दिली होती. १९१५ मध्ये हैद्राबाद येथे सोशल

सर्व्हिस लीगची स्थापना झाली. १९१९ मध्ये लातूर येथे पाचवी शिक्षण परिषद झाली. यातून शैक्षणिक सामाजिक व आर्थिक सुधारणांची मागणी होत होती. यात हिंदूंबरोबर मुसलमानांचाही मोठ्याप्रमाणात सहभाग होता. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आंदोलनाचा विस्तार होत होता तसतसे या भागातील केशवराव कोरटकर, वामनराव नाईक, देवीसिंह चौहान अशा अनेकांचा सहभाग घडून आला. १९३७-३८ या दोन वर्षांत विविध घडामोडींना वेग आल्याचे दिसते. महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन १ व २ जून १९३८ रोजी लातूरला झाले. बॅ. श्रीनिवासराव शर्मा हे अध्यक्ष होते. याच वेळी लातूरला महिला परिषदही झाली. राजकीय जागृतीच्या प्रयत्नांबरोबरच निजामी सत्तेविरुद्धचा जो संघर्ष सर्वच थरांत झाला त्यात आर्य समाजाबरोबर हिंदू महासभेचाही सहभाग होता. याच वेळी सुरू असलेले ' वंदे मातरमचे ' आंदोलन व विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी नागपूर विद्यापिठाने घेतलेली भूमिका याची नोंद घ्यावी लागेल. या सर्व बाबींची नोंद 'ईस्टर्न टाईम्स', 'डेक्कन टाईम्स' सारख्या वृत्तपत्रांमधून होत होती. 'इत्तेहद-उल-मुसलमीन' ही संघटना स्वातंत्र्य आंदोलनात अत्यंत उपद्रवकारक ठरली. कासिम रझवी हा लातूर येथीलच होता. परिणामी तीव्र दडपशाही होत होती. उलट याचा प्रतिकार जनतेतून उत्स्फूर्तपणे होत होता. आर्य वीर दल, किसान वीर दल यासारखे तरुणांचे गट अन्यायाविरुद्ध प्रतिकार करीत. हाडोळीचे मोहनराव पाटील यांचा लढा उल्लेखनीय ठरतो. ७ ऑगस्ट १९४७ ला मुक्तीसंग्रामाचे शेवटचे पर्व सुरू झाले. स्वामी रामानंदतीर्थ यांनी 'हिंदी संघराज्य समावेश दिन' म्हणून ७ ऑगस्ट घोषीत केला. परिणामी आंदोलन तीव्र झाले. २ सप्टेंबर १९४७ राष्ट्रीय ध्वज दिन पाळण्याचे ठरविण्यात आले. लातूर येथील गोलाईतील टॉवरवर तिरंगा झेंडा लावण्याचे श्रेय रघुवीर शिंदे, श्यामराव किल्लारीकर, करणसप्पा हांडे यांच्याकडे जाते. १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन साजरा करणे, जंगल सत्याग्रह, साराबंदी आंदोलन, शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, खेडी स्वतंत्र करणे, लेव्ही भरण्यास नाकारणे यासारख्या अनेक बाबींतून संघर्ष तीव्र होत गेला. दिगंबरराव बिंदू यांनी दिल्ली येथे महात्मा गांधींबरोबर चर्चा करून सरहद्दीबाहेर सशस्त्र कॅम्प उभारण्याचा मनोदय स्पष्ट केला होता. निजामी राज्याच्या सीमेवर उभारलेले कॅम्प प्रत्यक्ष कृती करणारे होते. चिंचोली, गोडेगाव, वाघोली यांसारखे कॅम्प कार्यरत होते. १५ ऑगस्ट १९४८ च्या स्वातंत्र्यदिनाचा पहिला वाढदिवस साजरा करण्यासाठी फुलचंद गांधी यांच्या नेतृत्वाखाली पासष्ट गावांच्या समूहाचे मूक्तीपूर स्वराज्य स्थापन करण्यात आले. यांसारख्या अनेक बाबींचा परिणाम म्हणून १७ सप्टेंबर १९४८ ला लष्करी कार्यवाही होऊन मराठवाडा स्वतंत्र झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत मराठवाड्याचा कुठल्याही अटीशिवाय असलेला सहभाग व त्यातून पुढे झालेली वाटचाल महत्त्वपूर्ण ठरते. आज महाराष्ट्राचे नेतृत्व करणारा व देशपातळीवर नेतृत्व पुरविणारा लातूर जिल्हा सर्व क्षेत्रात अग्रेसर आहे.

लातूर जिल्ह्याला अभिमानास्पद असा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. 'रत्नपूर महात्म्य' या स्थल महात्म्यात मयूरध्वज व त्याचा पूत्र ताम्रध्वज या पौराणिक राजवंशांचा संबंध रत्नपूर स्थानाशी दाखविला आहे. ऐतिहासिकदृष्ट्या राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष पहिला हा लत्तलूर या नगरीचा अधिपती होता. राष्ट्रकूट, चालूक्य व यादव काळात हे एक संपन्न नगर होते. जिल्ह्यामध्ये जैन, महानुभाव, वारकरी, लिंगायत, रामदासी, गानपत्य, दत्त या संप्रदायाबरोबरच नागेश संप्रदायाचे अस्तित्त्व किल्लारी येथे होते. विनयादित्याच्या (इ. स. ५९९) कासारशिरसी ताम्रपटाची नोंद दर्शविते की, चालुक्य काळात येथे विद्वानांना वेदाभ्यासासाठी दान दिले होते. विक्रमादित्य सहावा याच्या काळातील गणेशवाडी येथे सन १०९९ चा शिलालेख आहे. या लेखात शिवलिंगी-संतान परंपरा तसेच लाकुलेश्वरमत व पर्वतावली संप्रदाय या शैव परंपरा येथे अध्ययन व अध्यापन करीत होत्या. यासाठी गणेशमंदिर व पाठशाळा उभारण्यात आल्या. तसेच विशेष अनुदान उपलब्ध करून देण्यात आले होते. या जिल्ह्यात विद्येची आराधना आजही सुरू आहे.

संत परंपरेचा विचार करता नागेश संप्रदायातील संत कवी, तसेच सारसा येथील शिवकालीन गणेशनाथ महाराज यांचा 'गोरक्षबोध' हा ओवीबद्ध ग्रंथ. उदगीर येथील वीरशैव संप्रदायातील हवगीस्वामी यांचा मठ, निलंगा येथील वीरनाथ महाराज ज्यांनी वीर शैव आणि वारकरी संप्रदायाचा समन्वय घडवून आणला व लिंगायत वारकरी संप्रदायाची स्थापना केली. मल्लनाथ महाराजांनी ही परंपरा पुढे चालविली. याच मालिकेत रंगनाथ कृष्ण दीक्षित उर्फ सेलूकर महाराज यांची नोंद करावी लागते. यांनी सोमयागी यज्ञ परंपरा चालवली. किशन महाराज साखरे हे पानचिंचोली ता. निलंगा येथील होते. त्यांनी ज्ञानेश्वरीची ताम्रपटावर मुद्रित प्रत तयार केली. अशा कितीतरी संतांची भूमी म्हणून याचा उल्लेख करावा लागतो.

साहित्यिकांच्या परंपरेत या जिल्ह्याचे योगदान उल्लेखनीय आहे. सेतू माधवराव पगडी निलंगा येथील होते. श्री. देवीसिंह चौहान यांचे प्राच्यविद्येतील योगदान उल्लेखनीय आहे. तसेच प्राचार्य ना. य. डोळे, श्री. प्र. इ. सोनकांबळे, डॉ. चंद्रकांत देऊळगावकर, डॉ. विनय अपसिंगेकर, प्रा. प. म. शहाशिंदे, प्रा. कृष्णचंद्र ज्ञाते, श्री. शंकर झुल्पे, श्री. रा. र. बोराडे, डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. सूर्यनारायण रणसुभे, डॉ. नागोराव कुंभार अशा अनेकांनी विविध क्षेत्रात केलेले काम उल्लेखनीय आहे. नव्या पिढीतील अतुल देऊळगावकर आणि जयदेव डोळे सारखी मंडळी हा वारसा पुढे चालवित आहेत. अर्थात ही नोंद प्रातिनिधीक आहे.

एकूणच जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्ये, इतिहास आणि सांस्कृतिक परंपरा, लोकजीवन, कृषी व जलसिंचन यातील नवीन प्रयोग, नैसर्गिक आपत्तीसाठी स्वतंत्रपणे घेतलेला सर्वंकश आढावा आणि उद्योगधंदे, सहकारी साखर उद्योगांचे यश, फळबाग उत्पादनाची होणारी परदेशी निर्यात, बँक व्यवसाय व्यापार व वाणिज्य, वाहतूक व दळणवळण या क्षेत्रातील उपलब्धी आणि आर्थिक विकासाचा वेग, प्रशासन, सामाजिक सेवा क्षेत्रातील कार्य आणि संपूर्ण जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा ज्यात कला, नाट्य, क्रीडा साहित्य परंपरेचा सर्वंकष वेध घेण्याचा प्रयत्न झाला आहे. जिल्ह्यातील पर्यटन स्थळे, ज्यात ऐतिहासिक व धार्मिक महत्त्वाची स्थाने यांचा परिचय आला आहे.

मूलतः गॅझेटिअरसारख्या ज्ञानशाखेची सातत्याने होणारी वाटचाल आणि पुनरावृत्ती ही निरंतर सुरू असणाऱ्या संशोधन प्रक्रियेचा एक भाग ठरतो. विभाग प्रमुखांसह सर्व सहकाऱ्यांनी केलेले प्रत्यक्ष सर्वेक्षण विविध पातळीवरील शासकीय व निमशासकीय संस्था तसेच व्यक्तींकडून प्राप्त झालेली माहिती याचे संकलन व संपादन करताना संपादक मंडळाचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन यातून साकारलेला हा ग्रंथ आहे. जिल्हा निर्मितीची पंचवीस वर्षे होताना पूर्ण झालेचे लातूर गॅझेटिअर ऐतिहासिक संदर्भ साहित्यात मोलाची भर घालेल असा विश्वास आहे.

लातूर जिल्हा दर्शनिका (गॅझेटिअर) प्रकाशित करताना त्यात जाणीवपूर्वक विविध क्षेत्रातील विकासविषयक माहिती दिली असून या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणून ज्याची नोंद करता येईल अशी ग्रामनिर्देशिका दिली आहे. परिणामी ग्रंथाची पृष्ठसंख्या विचारात घेता ग्रंथ हाताळण्याच्या दृष्टीने सोईचा व्हावा या दृष्टीने ही दर्शनिका नागपूर जिल्हा दर्शनिकेप्रमाणे दोन भागात प्रकाशित करण्यात येत आहे. प्रथम भागात प्रकरण १ ते ९ याचा समावेश करण्यात आला असून दुसऱ्या भागात प्रकरण १० ते १२ आणि ग्रामनिर्देशिकेचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

या विभागाच्या वतीने सर्व पूर्व प्रकाशित राज्य व जिल्हा दर्शनिका तसेच ब्रिटिश कालिन जिल्हा गॅझेटिअर्स यांचे ई-बुक आवृत्तीमध्ये रूपांतर करण्याचे काम पूर्ण झाले असून महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर (www.maharashtra.gov.in.) ते उपलब्ध करून देण्यात आले आहे. या क्षेत्रात विभागाने

केलेले काम निश्चितच उल्लेखनीय आहे. राज्य दर्शनिका मालिकेत महाराष्ट्रातील "वनस्पतीशास्त्र आणि वनसंपदा" या ग्रंथाचे प्रकाशन झाले असून "औषधी वनस्पती" या राज्य गॅझेटिअरची दुसरी आवृत्ती आम्ही नुकतीच प्रकाशित केली आहे ही बाब विशेषत्वाने नोंदविता येईल तर 'लँड ॲण्ड इट्स पिपल' या गॅझेटिअरचे मुद्रण सुरू आहे. जिल्हा गॅझेटिअर ग्रंथामध्ये नांदेडचे काम सुरू आहे.

विविध विषयांतील माहिती संकलन करताना प्रकाशनास विलंब होत असल्याची जाणीव व विभागाच्या मर्यादा लक्षात घेऊन आम्ही ही दर्शनिका प्रकाशित करीत आहोत. मूळात एक भौगोलिक कोश या प्रारंभिक संकल्पनेपासून ब्रिटिशांना प्रशासनासाठी माहिती पुरविणारा ग्रंथ आणि आज बदलत्या दृष्टिकोनातून समाजाभिमुख शासन या संकल्पनेचा स्वीकार केल्यावर विविध क्षेत्रातील विकासविषयक संकल्पनांचा आराखडा मांडताना सहाय्यभूत ठरणारा ग्रंथ म्हणून ही दर्शनिका अपेक्षित आहे. या दृष्टीने झालेला प्रयत्न सर्व स्तरांतील संशोधक, विद्यार्थी, अभ्यासू नागरिक आणि प्रशासक यांना उपयुक्त ठरेल अशी आशा व्यक्त करतो.

मुंबई,
महाराष्ट्र दिन,
१ मे २००८
(चैत्र कृ. ११ शके १९३०).

डॉ. अरुणचंद्र शं. पाठक,
कार्यकारी संपादक व सचिव.

Maharashtra State Gazetteers

ऋणनिर्देश

भारतामध्ये गॅझेटिअर निर्मितीसाठी म्हणून तत्कालिन ब्रिटिश शासनाने बॉम्बे प्रेसिडेन्सी आणि सेंट्रल प्रोव्हिन्सेस अशा दोन स्वतंत्र केंद्रांसाठी काम केले. यातून गॅझेटिअर निर्मितीच्या दोन स्वतंत्र परंपरा रूढ झाल्या. असे असले तरी निजामी अंमलाखाली असलेल्या मराठवाड्यासाठी जिल्हानिहाय, विस्तृत गॅझेटिअर लिहिली गेली नाहीत. केवळ औरंगाबाद जिल्ह्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात गॅझेटिअर लिहिले गेले. हे या विभागाने २००६ मध्ये पुनर्मुद्रित स्वरूपात उपलब्ध करून दिले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तत्कालिन मराठवाड्याच्या ५ जिल्ह्यांसाठी भारत सरकारने निश्चित केलेल्या आकृतीबंधाप्रमाणे इंग्रजीमधून जिल्हा गॅझेटिअर ग्रंथाची निर्मिती करण्यात आली. आजच्या लातूर जिल्ह्याचा अंतर्भाव प्रामुख्याने तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्यात होत असे.

तथापि नव्याने अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्रातील एकूण जिल्ह्यांपैकी लातूर जिल्ह्यासाठी प्रथमच जिल्हा दर्शनिका प्रकाशित करण्यात येत आहे. स्वाभाविकपणे संपूर्णत: नव्याने लिहिलेली ही दर्शनिका प्रकाशित करताना जिल्ह्याच्या सर्वांगिण वैशिष्ट्यांचा परिचय व्हावा या दृष्टीने प्रयत्न झाला. असे असले तरी ग्रंथातील माहिती संकलित केल्यानंतर प्रकाशनास बराच विलंब होत असल्यामुळे यामध्ये अपरिहार्यपणे मंदन अवधी (Time Lag) गेलेला आहे. हे मी नम्रपणे नमूद करतो. वस्तूत: प्रत्यक्ष ग्रंथ प्रकाशित होईपर्यंतच्या प्रक्रियेत विविध पातळ्यांवर अनेकांचे सहकार्य लाभले आहे. विविध शासकीय कार्यालये, निम-शासकीय कार्यालये व संस्था तसेच अनेक मान्यवर जिज्ञासू अभ्यासक व जाणकार मार्गदर्शक, संपादक मंडळ सदस्य यांच्या मदत, मार्गदर्शन व सक्रिय सहभागाशिवाय ग्रंथ पूर्ण करणे शक्य नव्हते. सर्व पातळीवर हा सहभाग लाभला. या ग्रंथाचे काही वेगळेपण म्हणून ठळकपणे अधोरेखित करता येईल. त्यात कृषी व जलसिंचन प्रकरणांतर्गत स्वतंत्र प्रकरणच व्हावे या पध्दतीने नैसर्गिक आपत्तीविषयीचे व त्यानंतर लातूर जिल्ह्याचे एकूण योगदान याची विस्तृत नोंद केली आहे. ही नोंद आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात सर्वांसाठी आदर्श ठरावी अशीच आहे. तसेच जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामविषयीचे तपशील पुरविणारी ग्रामनिर्देशिका (Directory of Village and Towns) दिली आहे. यासाठी प्रामुख्याने जिल्हा परिषद व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या गटविकास अधिकारी (बी.डी.ओ.) आणि ग्रामसेवकांनी दिलेले सहकार्य निश्चित मोलाचे आहे.

लातूर जिल्हा गॅझेटिअर ग्रंथनिर्मितीची संकल्पना आणि प्रत्यक्ष ग्रंथ निर्मिती या कालावधीमध्ये दोन संपादक मंडळांचे मार्गदर्शन लाभले. प्रथम संपादक मंडळातील डॉ. जनार्दन वाघमारे सर, निवृत्त कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड यांचे योगदान मोलाचे राहिले.

डॉ. वाघमारे सर केवळ संपादक मंडळ सदस्य म्हणूनच नव्हे तर एक जाणकार व्यक्ती, साहित्यिक व योग्य मार्गदर्शक अशा विविध स्वरूपामध्ये ग्रंथ निर्मितीमागे होते. नवीन संपादक मंडळामध्ये डॉ. के. बी. पाटील, कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यासह ज्येष्ठ सदस्य म्हणून डॉ. म. के. ढवळीकर, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, डॉ. भा. ल. भोळे, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. सूर्यनारायण रणसुभे, डॉ. जयकुमार मगर, प्राचार्य स. दि. महाजन, प्राचार्य डॉ. भागवतराव ढेंगळे, डॉ. प्रभाकर देव, डॉ. श्रीनिवास ओमनवार, डॉ. एस. जी. देवगावकर, डॉ. शेषराव मोरे यांचे योगदान लाभले. विशेषत: जिल्ह्याशी संबंधित असणारे ज्येष्ठ साहित्यिक व कृतीशिल कार्यकर्ते म्हणून मी डॉ. नागोराव कुंभार व डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांचा विशेषत्वाने उल्लेख करू इच्छितो.

एचएफ—४१६९-२अ

विद्यमान ग्रंथामध्ये सहयोगकर्ते लेखक म्हणून पुढील मान्यवरांनी योगदान दिले आहे.

भूगोल प्रकरण एक मध्ये जिल्ह्याचे भौगोलिक वैशिष्ट्य या भागाचे लेखन डॉ. जयकुमार मगर यांनी केले आहे. डॉ. र. सु. पप्पू यांनी भूशास्त्र व खनिज संपत्ती यावर लेखन केले आहे. किल्लारी भूकंपाच्या पार्श्वभूमीवर यांनी शास्त्रीय पध्दतीने या भागाचा मागोवा घेतला. डॉ. वा. ना. नाईक यांनी वनसंपदा या भागाचे लेखन केले असून वडवळ येथील औषधी वनस्पतींची विस्तृतपणे नोंद घेतली आहे.

इतिहास या प्रकरणात प्राचीन काळाविषयीचे लेखन डॉ. हरिहर ठोसर यांनी केले आहे. हे लेखन करताना त्यांनी जिल्ह्याच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून घेतलेला आढावा प्रथमच या दर्शनिकेत घेण्यात आला. मध्ययुगीन इतिहासाचे लेखन प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे व डॉ. सुनिल पुरी यांनी केले आहे. आधुनिक कालखंडासंदर्भात मूळ लेखन डॉ. पी. व्ही. काटे यांनी केले असून ते परिपूर्ण करण्यासाठी म्हणून संपादक मंडळ सदस्य डॉ. भागवतराव ढेंगळे सर व डॉ. शिवराज बोकडे यांनी योगदान दिले आहे. याच प्रकरणामध्ये लातूर जिल्ह्याशी संबंधित कोरीव लेखांची तालिका व कोरीव लेखातील स्थलनामे हे परिशिष्ट डॉ. हरिहर ठोसर यांनी करून दिले आहे. तर लातूर जिल्ह्यातील मध्ययुगीन शिलालेख व नाणी या विषयीची नोंद श्री. दिलीप बलसेकर यांनी केली आहे.

कृषी व जलसिंचन या प्रकरणात नैसर्गिक आपत्तीविषयी विशेषत: भूकंपप्रवण क्षेत्र व त्यानंतरचे कार्य या संदर्भातील नोंद डॉ. अ. शं. पाठक यांनी केली आहे. तर जिल्ह्यातील क्षतिग्रस्त स्मारकांचे जतन यासंदर्भात श्री. के. दे. कावडकर यांनी लेखन केले आहे. या प्रकरणातील भूकंपाची ऐतिहासिक नोंद हे परिशिष्ट महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक यांनी केले आहे. संस्कृती या प्रकरणामध्ये जिल्ह्याच्या सांस्कृतिक वारशाचा सर्वांगानी नोंद करण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. सु. ग. जोशी यांनी लातूर जिल्ह्यातील वैदिक परंपरा व प्राचीन वाङ्मयाचा परिचय करून दिला आहे. तसेच शिलालेख व ताम्रपटामधून व्यक्त होणाऱ्या साहित्य परंपरेची त्यांनी नोंद केली आहे. जिल्ह्यातील साहित्य व संत परंपरा याविषयीचे लेखन प्रा. भगवान काळे यांनी केले असले तरी त्या जिल्ह्यातील जाणकारांबरोबर केलेल्या चर्चेनंतर काही अधिक माहितीची नोंद डॉ. सूर्यनारायण रणसुभे, श्री. नागोराव कुंभार यांसारख्या मान्यवरांनी केली आहे. हिंदी साहित्याच्या संदर्भात डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी केलेली नोंद उल्लेखनिय आहे. जिल्ह्याच्या संगीत परंपरेसंदर्भात स्थानिक मान्यवरांबरोबर झालेल्या प्रत्यक्ष मुलाखतीनंतर अधिक नोंद केलेली आहे. नाट्यक्षेत्राच्या संदर्भात प्राचार्य क. हे. पुरोहित, प्राचार्य विभाकर मिरजकर यांच्याबरोबरच श्री. श्रीराम गोजमगुंडे यांच्याशी झालेला संवाद तसेच दै. लोकमतचे संपादक श्री. जयप्रकाश दगडे यांनी वेळोवेळी काढलेल्या विशेषकांचीही नोंद घेण्यात आली आहे. चित्रपटक्षेत्रात या जिल्ह्याचे योगदान विशेष उल्लेखनिय आहे. शिल्पकला व चित्रकला याविषयी श्री. महारुद्र मंगनाळे, प्रा. पंडितराव देशमुख यांच्या लेखनाचा उपयोग झाला असून श्री. दत्ता बनसोडे तसेच श्री. लहरीकांत शहा यांनी आपली चित्रे या दर्शनिकेसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रासंदर्भातील विस्तृत नोंद प्रा. नंदकुमार मेगदे यांनी केली आहे. याप्रमाणे विविध तपशील देण्याचा प्रयत्न झाला असला तरीही या सर्वंकष नोंदी नसून प्रातिनिधीक नोंदी आहेत असेच मानावे लागेल. जिल्ह्यातील वृत्तपत्र व पत्रकारिता याविषयीची नोंद करताना श्री. सुधाकर कुलकर्णी व अन्य मान्यवर यांच्याशी झालेला संवाद तसेच उदगीर येथील श्री. दिनकर कुलकर्णी, श्री. सुभाष देशपांडे, डॉ. सुधाकर देशमुख तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची मदत झाली आहे. दर्शनिकेतील प्रकरणे संपादक मंडळ सदस्य तसेच जिल्ह्याशी संबंधित स्वीकृत सदस्यांनी पाहिली आहेत. शिवाय डॉ. र. पु. कुरुलकर व सुभाष देशपांडेसारख्या अभ्यासकांनी संबंधित प्रकरणे पाहिली आहेत. प्रेक्षणीय स्थळे या

प्रकरणामध्ये डॉ. सुनिल पुरी यांनी मध्ययुगीन गढी-वाड्याविषयी लेखन केले असून ही नोंद या दर्शनिकेचे वेगळेपण ठरावे. जिल्ह्यातील हुतात्मा स्मारकांची तालिका जिल्हाधिकारी कार्यालयाने उपलब्ध करून दिली असून ग्रामनिर्देशिकेचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या सहकार्याने शक्य झाले आहे. याप्रकारे गॅझेटिअर निर्मिती प्रक्रियेत अनेकांचा सहभाग राहिला असल्याने या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

गॅझेटिअर लेखनाच्या प्रक्रियेत या कार्यालयातील सर्वश्री दि. प्र. बलसेकर, सहसंपादक, रा. र. हनवतकर, उपसंपादक, त्रिं. मा. केंद्रे, प्र. रा. गवळी, ध. जि. नावडकर, हे संशोधन अधिकारी तसेच के. झिं. राऊत, सु. श्री. गायकवाड, रा. स. कुंभार, शा. का. मर्गज, अं. रा. पवार, तु. भा. सुकाळे, वै. व. पुजारी, दि. वि. भगत, चा. पां. शेवाळे, रा. र. वळवी, श्री. श. दराडे, स्व. शै. फडके या सर्व सहायक संशोधन अधिकाऱ्यांबरोबरच कार्यालयातील लघुलेखक, सहायक तसेच विविध स्तरावरील कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे व महाराष्ट्र सदुर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांनी जिल्ह्याचे नकाशे पुरविले असून व्यंकटराव नाईक बावणे यांचे छायाचित्र व निलंगा येथील शिल्पपट याचे छायाचित्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संग्रहालय यांच्या सौजन्याने देत आहोत. ग्रंथाची सुबक छपाई एका मर्यादित वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल श्री. प. ज. गोसावी, संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशन, मुंबई तसेच व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व त्यांचे सर्व सहकारी यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

हे गॅझेटिअर व्हावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करून आग्रही रहाणारे मा. ना. श्री. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री, श्री. अशोक चव्हाण, मंत्री, सांस्कृतिक कार्य, श्री. राणा जगजितसिंह पाटील, राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचा मी ऋणी आहे. या विभागास सातत्याने प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणारे डॉ. जॉयस शंकरन, अपर मुख्य सचिव व श्री. भूषण गगराणी, सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचा मी ऋणी आहे.

Maharashtra State Gazetteers

मुंबई,
महाराष्ट्र दिन,
१ मे, २००८
(चैत्र कृ. ११ शके १९३०).

डॉ. अरुणचंद्र शं. पाठक,
कार्यकारी संपादक व सचिव.

प्रकरण १० : सामाजिक सेवा

- शिक्षण
- प्रौढ शिक्षण
- प्राथमिक शिक्षण
- माध्यमिक शिक्षण
- कनिष्ठ महाविद्यालये
- उच्च शिक्षण
- शिक्षक प्रशिक्षक
- तंत्रशिक्षण
- ग्रंथालये
- आरोग्य
- सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सेवा
- कुटुंब कल्याण
- लातूर जिल्ह्यातील खाजगी वैद्यकीय सेवा
- समाज कल्याण
- जिल्हा परिषद योजना
- धर्मादाय व सेवाभावी संस्था
- राजर्षी शाहू महाविद्यालय आणि 'लातूर पॅटर्न'
- तक्ते

प्रकरण १०

सामाजिक सेवा

जिल्ह्यातील विविध स्तरांवरील शिक्षण, ग्रंथालय सुविधा, सार्वजनिक आरोग्य, समाजकल्याण व धर्मादाय स्वयंसेवी संस्था या सामाजिक सेवांचा इतिहास व आधुनिक प्रकाशित माहिती या प्रकरणात दिलेली आहे.

शिक्षण

प्रस्तावना : इ.स. १३१८ पर्यंत सध्याचा लातूर जिल्हा देवगिरीकर यादवांच्या राज्याचा एक भाग होता. त्यानंतर अल्लाउद्दीन खिलजीचे दक्षिणेवर आक्रमण झाल्यापासून हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळेपर्यंत लातूर जिल्हा हा सतत परकीय अंमलाखाली असल्याने तेथील लोकांना राजकीय हक्क व मुक्त नागरी जीवनाचा पुरेपूर उपभोग कधीच घेता आला नाही. मात्र हा प्रदेश हैद्राबादच्या निजामाच्या अधिपत्याखाली असताना इ.स. १८५४ मध्ये निजामाचा मुख्य प्रधान सर सालारजंग याने राज्याचा कारभार सुधारण्याच्या दृष्टीने न्याय, शिक्षण, पोलीस वगैरे खात्यांना संघटित स्वरुप प्राप्त करून दिले. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेचा (१८८५) परिणाम देशाच्या इतर भागाप्रमाणे हैद्राबादमध्येही झाला व वेगवेगळ्या सामाजिक संस्था, सभा व वाचनालयांची स्थापना झाली. इ.स. १९१४ मध्ये निजामाने राज्यकारभाराची सर्व सुत्रे आपल्या हातात घेतली व १९१८ मध्ये उस्मानिया विद्यापीठाची स्थापना झाली.

केशवराव कोरटकर, वामनराव नाईक यांच्या प्रयत्नाने सामाजिक परिषदांना चालना मिळाली. तद्नुसार प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व स्त्री शिक्षणाकडे सरकारला लक्ष पुरविणे भाग पडले. परिणामत: राज्यात अनेक शाळा, वाचनालये व वसतिगृहे स्थापन करण्यात आली.

सर सालारजंग यांच्या सुधारणा, आर्य समाजाची विचारसरणी, राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना, सामाजिक परिषदा या माध्यमांद्वारे हैद्राबाद संस्थान व अनुषंगाने लातूरमध्ये नवीन विचार प्रवाह रुजू लागले. परिणामत: प्रजाजन आपले नागरी हक्क प्राप्त करून घेण्यासाठी सतत प्रयत्नशील बनू लागले.

या प्रकरणात लातूर जिल्ह्यातील स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण तसेच आरोग्य व समाजकल्याण या विषयी परामर्श घेतलेला आहे.

इ.स. १९२०-१९२५ च्या सुमारास श्री.गणपतराव बेंबळे यांनी राष्ट्रीय शाळेच्या रुपाने 'ज्ञानप्रकाश' प्रथम लातूरमध्ये आणला. तर श्री.बाबूळगावकर मास्तर, स्वामी मास्तर यासारख्या शिक्षकांच्या शाळा, ज्याला गावठी शाळा म्हणता येईल अशा शाळांतून शिक्षणाची जाण असणाऱ्या समाजाची मुले उजळणी व व्यवहारात उपयोगी पडणारे गणित व अक्षर ओळख करून देत होते. शिवाय लातूर, उदगीर ठिकाणी काही व्यक्तिगत स्वरुपाच्या पण संस्कृत अभ्यासाचे वर्ग चालत, असे असले तरी लातूर जिल्ह्याच्या संदर्भात आर्य समाजाचे योगदान मोठे होते. धर्म जागृतीच्या दृष्टीने का होईना, शैक्षणिक चळवळीचा पाया घातला दिगंबरराव शिवणगीकर व सहकाऱ्यानी लातूरमध्ये आर्यसमाजाची चळवळ सुरू केली. तर उदगीर येथे हुतात्मा श्यामलालजी यांच्या प्रेरणेतून शैक्षणिक चळवळीचा प्रारंभ झाला.

स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण, शिक्षण प्रशासन व शिक्षण संस्थांचा विकास (१८५३-१९४८) : इ.स. १८५४ पर्यंत निजामी राजवटीत शैक्षणिक विकास अत्यल्प झालेला होता. शिक्षण संस्था फारच थोड्या होत्या. शासनही त्याबाबत फारसे प्रयत्नशील नव्हते. राज्यात हिंदुस्थानी पध्दतीच्या शाळा होत्या, त्यामधून उर्दू माध्यमातून लेखन, वाचन आणि प्राथमिक गणित शिकविले जात. सर्वसाधारणपणे गावाचे महत्व व लोकसंख्या लक्षात घेऊन शिक्षकांना वेतन न देता वस्तूंच्या स्वरूपात मोबदला दिला जात असे. इ.स.१८५९ मध्ये प्रत्येक जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी प्रत्येकी एक पर्शियन व एक उर्दु शाळा काढण्याचे आदेश मुख्य प्रधान सर सालारजंग यांनी दिले. १८७८ पासून संस्थानातील शाळांमध्ये शुल्क आकारण्याची सक्ती करण्यात आली. १८८३ हे वर्ष शिक्षणाच्या इतिहासात महत्वाचे ठरले. त्या वर्षी सार्वजनिक शिक्षणाला (Public Instruction) इतर मोठया खात्यामध्ये वरचा दर्जा प्राप्त होऊन वार्षिक अडीच लाख रुपयांची तरतूद अंदाज पत्रकात करण्यात आली. प्रत्येक सुभ्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी उच्च माध्यमिक शाळा उघडण्यात येऊन जिल्ह्यात वेगवेगळया ठिकाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा स्थापन करण्यात आल्या. इ.स. १८९१ पासून माध्यमिक शाळेच्या परीक्षा सुरू करण्यात आल्या. पुढे १८९४ ला पाठयपुस्तक समिती व शिक्षण मंडळाची स्थापना झाली. हैद्राबाद राज्यात १८९९ मध्ये शिक्षकांना प्रशिक्षण देणारी पहिली शाळा सुरू करण्यात आली आणि १९०१ च्या सुमारास शिक्षकांना वेतनश्रेणी देण्याची पध्दत अस्तित्वात आली. त्याच प्रमाणे अर्हता नसलेल्या प्राथमिक शिक्षकांना कमी करण्यात आले. वेतनाचा दर पूर्व प्राथमिक शाळेत १० ते १५ रुपये होता, तर उच्च माध्यमिक शाळेत १५ ते २५ रुपये होता. माध्यमिक शाळेत इंग्रजी ही प्रथम भाषा समजली जात होती. माध्यमिक शाळा मॅट्रिक पर्यंत शिक्षण देत असत. हैद्राबाद राज्यात परीक्षा घेण्यास्तव सक्षम संघटना नसल्यामुळे या शाळा मद्रास विद्यापीठाशी परीक्षेसाठी संलग्न केलेल्या होत्या. शासन नियुक्त सल्लागारांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या विस्तारासाठी केलेल्या सुचनेप्रमाणे बऱ्याच सुधारणा झाल्या. इ.स. १९११ पासून शाळांच्या संख्येत व विद्यार्थ्यांच्या संख्येत झपाटयाने वाढ झाली व शिक्षणावरील खर्च अर्ध्या शतकातच ६१ लाखावरुन ९७ लाखापर्यंत वाढला. १९२२ पासून मोफत शिक्षणाची सोय केली गेली.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात लातूर जिल्ह्यातच नव्हे तर हैद्राबाद संस्थानातील इतर कुठल्याही जिल्ह्याच्या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध नव्हती. हैद्रबाद शहरामध्ये तीन कला महाविद्यालये होती, त्यापैकी निजाम महाविद्यालय व औरंगाबाद महाविद्यालय ही मद्रास विद्यापीठाशी संलग्न केलेली होती. दार-ऊल-ऊलम किंवा ओरिएंटल महाविद्यालयाचे विद्यार्थी पंजाब ओरिएन्टल टायटल परीक्षेसाठी पाठविले जात होते. ही तिन्ही महाविद्यालये शासन चलित संस्था (State Institutions) होत्या. संस्थानातील या महाविद्यालयांपैकी निजाम महाविद्यालय हे सर्वात मोठे व चांगले होते. हे महाविद्यालय १८७५ मध्ये स्थापन झाले होते. अघोरनाथ चट्टोपाध्याय हे काही वर्षे या महाविद्यालयाचे प्राचार्य होते. संस्थानातील विविध जिल्ह्यातील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी हैद्राबादला येत असत. तेथे त्यांच्यासाठी वसतिगृहाची सोय उपलब्ध होती.

पुढे सन १९१९ (२१ मेहीर १३२८फसली) रोजी उस्मानिया विद्यापीठ महाविद्यालय (Osmania University College) उघडण्यात आले आणि तद्नंतर दार-ऊल-ऊलम त्यामध्येच समाविष्ट करून थिऑलॉजी विभाग निर्माण करण्यात आला. अशा प्रकारे सन १९२२ (१३३१ फसली सालाच्या) अखेरीस हैद्राबादमध्ये निजाम महाविद्यालय आणि उस्मानिया विद्यापीठ महाविद्यालय ही दोन महाविद्यालये होती. इ.स.१९२७ मध्ये औरंगाबाद, वरंगळ आणि गुलबर्गा येथे उर्दू माध्यमाची इंटरमिजिएट महाविद्यालये सुरू करण्यात आली. औरंगाबाद इंटरमिजिएट महाविद्यालयात मराठी हा एक विषय म्हणून शिकविण्यात येई. हैद्राबादेत उस्मानिया विद्यापीठ, निजाम कॉलेज व सिटी कॉलेज मध्ये मराठी शिकविण्याची सोय होती.

अनुक्रमणिका

हैद्राबाद राज्याच्या शैक्षणिक इतिहासातील एक अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणजे उस्मानिया विद्यापीठाची स्थापना हा होय. तत्कालिन निजाम सर मीर उस्मान अलीखान बहादूर याने आपल्या शिक्षण सल्लागारांच्या शिफारशींनुसार १९१८ मध्ये उस्मानिया विद्यापीठाची स्थापना केली. विद्यापीठामध्ये बऱ्याच विद्याशाखा सुरू केलेल्या होत्या. त्यामध्ये धर्मज्ञान शाखेचा समावेश होता. या विद्यापीठामध्ये केवळ उर्दू माध्यमातून अध्यापन केले जात होते. विद्यापीठाचे स्वरुप निवासी अध्यापनात्मक होते. इतर साहित्याचे उर्दूमधून भाषांतर करून ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे ही मोलाची कामगिरी या विद्यापीठाने केली होती. विद्यापीठात सर्व प्रथम भाषांतर केंद्राची स्थापना झाली. त्या प्रयोजनार्थ सुरूवातीला आठ भाषांतरकार सुप्रसिध्द उर्दू लेखक मौलवी अब्दुल हक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत होते. उर्दू माध्यमातून अध्यापन व शिक्षण घ्यावयाचे असल्याकारणाने मॅट्रिक्युलेशन व पदवी परीक्षांसाठी लागणाऱ्या क्रमिक पुस्तकांचे व संदर्भ ग्रंथाच्या भाषांतराचे काम १९२१ (१३३१ फसली) पर्यंत पूर्ण करण्यात आले. विद्यापीठाने १०० विद्यार्थी राहू शकतील एवढी दोन वसतिगृहे बांधली होती. उस्मानिया विद्यापिठाच्या स्थापनेमुळे उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध झाली. त्यामुळे विद्यालयांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली. निजामी राज्यात शालेय शिक्षणाबरोबरच इतर खास विषयांचे शिक्षण देणाऱ्या संस्थाही उदयास आल्या होत्या. सार्वजनिक बांधकाम विभागातील दुय्यम सेवेतील कर्मचाऱ्यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी वरंगळ येथे पहिली अभियांत्रिकी शाळा स्थापन करण्यात आली. ही शाळा १८९६ मध्ये हैद्राबादला स्थलांतरीत करण्यात आली. इ.स.१८९९ मध्ये कायदेविषयक शिक्षण देणाऱ्या शाळेची स्थापना हैद्राबाद येथे करण्यात आली. वरंगळ येथील वैद्यकीय शाळा १८९६ मध्ये हैद्राबाद येथे हलविण्यात आल्याने विज्ञान शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली. या शाळेस शासनाची मदत होती व निवासी शल्य चिकित्सक तिचे मुख्य होते. इ.स. १८९९ मध्ये शासकीय मदतीने संस्कृत शाळा हैद्राबाद येथे सुरू करण्यात आली. इ. स. १९०५ मध्ये उपरोक्त शाळा काही अंशी शिक्षण विभागाच्या अंतर्गत समाविष्ट केल्या होत्या. इ.स. १९३५ नंतर शिक्षण सल्लागारांनी केलेल्या शिफारशीनुसार दुय्यम शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात येऊन तांत्रिक व औद्योगिक शिक्षण खात्याची स्थापना करण्यात आली. १९३७ मध्ये माध्यमिक स्तरावर मातृभाषा हे अध्ययनाचे माध्यम मान्य करण्यात आले.

निजामी राज्यात स्त्री शिक्षणाला उत्तेजन मिळत नव्हते. हैद्राबाद येथील जनाना शाळेच्या स्थापनेनंतर सुशिक्षित लोकांचा स्त्री शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन काही अंशी बदलला. इ.स. १९२१ ते १९३१ या दशकात स्त्रियांसाठी माध्यमिक विद्यालय व महाविद्यालय हैद्राबादला सुरुझाले. याच दशकात हैद्राबाद शहर, वरंगळ, औरंगाबाद व गुलबर्गा येथे स्त्रियांसाठी चार प्रशिक्षण शाळा सुरू झाल्या. हैद्राबाद येथील मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था राज्यातील इतर उर्दू शाळांना प्रशिक्षित शिक्षिका पुरवित असे. वरंगळ, औरंगाबाद, गुलबर्गा येथील शाळातून अनुक्रमे तेलुगु, मराठी व कानडी शिक्षकांची गरज भागविली जात होती.

निजामी राज्यात सर्व जाती व धर्माच्या विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश अनुज्ञेय होता. १९३५ मध्ये शासनाने अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी खास शाळा सुरू करण्याची योजना आखली. १९४१ च्या जनगणनेनुसार हैद्राबाद राज्यात एकूण ७२ खास शासकीय शाळा व विद्यार्थ्यांची संख्या जवळजवळ ३,००० होती. मुसलमान विद्यालयांमध्ये मुसलमान शिक्षक, तर हिंदू विद्यालयांमध्ये हिंदू शिक्षकांची नियुक्ती होत असे. ते शक्य नसल्यास मुसलमान, ख्रिश्चन किंवा क्वचित हिंदू शिक्षकांची नियुक्ती केली जाई. विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या व इतर साहित्य मोफत पुरविले जात होते. शिष्यवृत्तीसाठी येणाऱ्या अर्जांचा सहानुभूतिपूर्वक विचार करून होतकरु विद्यार्थ्यांना शुल्क माफ करण्यात येत असे.

अनुक्रमणिका

शिक्षण क्षेत्रातील प्रगती बरोबर प्रौढ शिक्षण मोहीम शिक्षण विभागातर्फे राबविण्यात आली. हैद्राबादमध्ये १० प्रौढ शिक्षण शाळा, गुलबर्गा येथे ८ शाळा व औरंगाबाद आणि नांदेड येथे २६ शाळा होत्या. या शाळा बहुतेक खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जात होत्या. काही शाळांना शिक्षण विभागाकडून अनुदान दिले जात होते. शासकीय प्रौढ शिक्षण शाळा मोफत शिक्षण देत असत. हैद्राबादमधील प्रौढ शाळांमध्ये नियमानुसार १६ वर्षांच्या आतील विद्यार्थ्यांना प्रवेश नव्हता. परंतु १६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या नोकरी करणाऱ्या मुलांना प्रौढ शिक्षणांची परवानगी होती.

निजामी राजवटीमध्ये मराठी, कन्नड व तेलुगु भाषिक प्रदेशांचा समावेश होता. उर्दूला मात्र राजभाषेचा दर्जा होता. सरकार दरबारी तसेच शासन यंत्रणेमध्ये उर्दूचाच उपयोग केला जात होता. ग्राम पातळीवरील व्यवहार जरी मराठी भाषेत चालत, तरी तालुका व जिल्हा संस्थान पातळीवरील सर्व शासकीय व्यवहार उर्दू माध्यमातून चालत असे. अर्थातच मराठीला मानाचे स्थान तर नव्हतेच पण फारच कमी दर्जा होता. शासकीय नोकरी प्राप्तीसाठी उर्दूलाच महत्व देण्यात येत असे. याचा परिणाम असा झाला की, मराठीच्या अध्ययन व अध्यापनाला फारच गौण स्थान प्राप्त झाले.

मराठी माध्यमातून प्राथमिक शिक्षणाची सोय होती तथापि इयत्ता पाचवी पासून मराठी माध्यमाची तरतूद नव्हती. परिणामी पाचवीपासून पुढच्या परभाषेतील शिक्षणामुळे बरेच विद्यार्थी शिक्षणाचा त्याग करीत असत. त्याचबरोबर पाचवीपासून अभ्यासक्रम झेपणार नाही या सबबीवर विद्यार्थ्याला उर्दू माध्यमातील इयत्ता चवथीच्या वर्गांमध्ये बसवले जाई. साहजिकच विद्यार्थ्याचे एक वर्ष वाया जाते हे पाहून पालकांनी आपल्या मुलांना प्राथमिक शिक्षण मराठी ऐवजी, उर्दू भाषेतून द्यावयास सुरूवात केली. इष्ट बदल तर घडून यावा पण आपल्यावर दोषरोप तर होऊ नये म्हणून शिक्षण खाते अशा पालकांकडून खालील प्रमाणे मजकूर लिहून घेत असे. "जरी माझ्या मुलाची मातृभाषा मराठी असली तरी मी स्वखुशीने त्याला उर्दूतून शिक्षण देऊ इच्छितो त्याला उर्दू प्राथमिक शाळेमध्ये प्रवेश देण्यात यावा." त्याकाळी शिक्षण खात्याची दप्तरे अशा प्रकारच्या शेकडो अर्जांनी भरलेली आढळून येत.

मराठी प्राथमिक शाळेमध्ये उर्दू हा आवश्यक विषय म्हणून इयत्ता तिसरी पासून शिकविला जात असे. ही शिक्षण विषयक चमत्कारिक परिस्थिती निवारण्याचे दृष्टिने मराठवाड्यातील जनतेने खूपच प्रयत्न केले. तद्नुसार १९३७ मध्ये अनुकूल निर्णय मिळाला. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र या निर्णयाची अंमलबजावणी पूर्णपणे कधीच झाली नाही.

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच दुय्यम शिक्षणाची परिस्थितीही तितकीच असमाधानकारक होती. पाचवीपासून सातवी पर्यंत मराठी हा आवश्यक विषय असे, पण आठवीमध्ये मात्र मराठी, गणित वगैरे विषय ऐच्छिक असत. त्यात जो विद्यार्थी गणित घेत नसे त्याला महाविद्यालयामध्ये शास्त्र विषय घेऊन वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शाखांमध्ये शिक्षण घेणे अशक्य होई. यामुळे वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा शास्त्राचे पदवीधर होऊ इच्छिणारे विद्यार्थी आठवी पासूनच मराठीचा निरोप घेऊन ऐच्छिक गणिताकडे वळत.

मुलींना सातवी पर्यंत मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याची सोय होती. पण पाचवीपासून उर्दू हा आवश्यक विषय म्हणून त्यांच्यावर लादण्यात येई. इयत्ता आठवीपासून माध्यम उर्दू आहे. याकरिता मुलींनी पाचवी पासून उर्दू शिकलेले बरे असा त्यांना उपदेश करण्यात येई. ज्या पालकांना आपल्या मुलींना उर्दू शिकविण्याची इच्छा नव्हती त्यांना लेखी निवेदन द्यावे लागे की, "मी आपल्या मुलीला सातवीच्या पुढे शिक्षण देणार नाही."

अनुक्रमणिका

अशा कठीण परिस्थितीतही हैद्राबादची विवेकवर्धिनी, गुलबर्ग्याचे नुतन विद्यालय, परभणीचे नुतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन व शारदा मंदिर या[१] शिक्षण संस्थांनी बहुमोल कामगिरी बजावली. प्रसंगी शासनकर्त्यांचा रोष पत्करूनही आपले शैक्षणिक कार्य पार पाडले. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे कै. विजापूरकरानी राष्ट्रीय शिक्षणाचा पाया घातला, तसाच पाया या शिक्षण संस्थांनी मराठवाडयात घातला.

निजामी राजवटीमध्ये उर्दूला प्राधान्य असताना हैद्राबाद मधील प्रमुख मराठी समाज सुधारकांनी मराठीला राजकीय स्थान नसले तरी सामाजिक स्थान प्राप्त व्हावे या दृष्टीने काही प्रयत्न सुरू केले होते. केशवराव कोरटकर, वामनराव नाईक आणि गणपतराव हर्डीकर[२] यांच्या प्रयत्नाने २५ ऑक्टोबर १९०७ रोजी[३] हैद्राबाद येथे "विवेक-वर्धिनी" नावाची शिक्षण संस्था स्थापन करण्यात आली. संस्थेचे कार्य वरील जबाबदार व्यक्तींनी हाती घेतल्याने हैद्राबादच्या सधन व मान्यवर महाराष्ट्रीय व्यक्तींनी या शिक्षण संस्थेस भरपूर वित्तसहाय्य केले. गणपतराव हर्डीकर यांनी प्राथमिक शिक्षणाचे वर्ग सुरू केले व दोन-चार वर्षाच्या प्रयत्नाने या शिक्षण संस्थेने मराठी सातवी पर्यंत शिक्षण देणाऱ्या चार शाळा हैद्राबाद येथे सुरू केल्या. मराठी माध्यमातून शिक्षणाची होत असलेली प्रगती व मराठी वजनदार पुढाऱ्यांचे दडपण यामुळे निजामाला फायनल परीक्षा मंडळ स्थापन करणे भाग पडले. अशा त-हेने हैद्राबाद येथे मराठी भाषेच्या शिक्षणाला स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर संस्थेने उस्मानाबाद वगैरे भागात आपल्या शाखा उघडल्या. "विवेकवर्धिनी" संस्थेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी हे पुढे मोठे कार्यकर्ते, समाजसुधारक व विद्वान म्हणून नावाजले गेले. त्यावेळच्या विद्यार्थी वर्गातून र. मु. जोशी, वाघमारे, हणमंतराव वैष्णव, धुंडीराज बहादूर यांची पहिली पिढी शिक्षण घेऊन बाहेर पडली.

हैद्राबाद संस्थानात जिल्ह्याच्या ठिकाणीच एक हायस्कूल असे आणि त्याचे माध्यम उर्दू असे. मराठी माध्यमाची व विद्यार्थ्यांवर राष्ट्रीय संस्कार करणारी एखादी शाळा काढण्याचे विचार व्यंकटराव यांच्या मनात घोळत होते. तळेगावचे विजापूरकरांचे 'समर्थ' विद्यालय ते मुद्दाम पाहून आले होते.

१९२१ च्या गणेश चतुर्थीस व्यंकटराव व अनंतराव या बंधूंनी हिप्परग्यास राष्ट्रीय शाळेचा प्रारंभ केला. या शाळेत देवीसिंह चौहान यांनी माध्यमिक शिक्षण घेतले व त्याच शाळेत पुढे शिक्षक म्हणूनही काही दिवस काम केले.[४] १९२१ साली संपूर्ण देशभर स्थापन झालेल्या राष्ट्रीय विद्यालयांच्या बरोबरच ही शाळा ही स्थापन झाली असली तरी इतर राष्ट्रीय विद्यालये व ही शाळा यात फरक होता. महाराष्ट्र टिळक विद्यापीठाने निश्चित केलेला अभ्यासक्रम राष्ट्रीय महाविद्यालये शिकवत व राष्ट्रीय विद्यापीठ शालांत परीक्षा घेई. इंग्रजी शासनाने मान्य केलेला अभ्यासक्रम राष्ट्रीय शाळात शिकवला जात नसे. मात्र हिप्परग्याच्या शाळेने सोयीसाठी असा निर्णय घेतला होता की, मुंबई विद्यापीठाच्या शालांत परीक्षेसच मुलांना बसवायचे. या निर्णयातही बंडखोरी अशी होती की, शाळा हैद्राबाद संस्थानच्या हद्दीत असतानाही शाळेने हैद्राबाद संस्थानने निश्चित केलेला अभ्यासक्रम व उर्दू माध्यम स्वीकारले नव्हते. मराठी माध्यमातून मुंबई राज्यात मान्य असलेला अभ्यासक्रम शिकविणारी ही संस्थानातील एकमेव शाळा होती. तसेच रुढ विषयांबरोबरच मुलांवर देशभक्तीचे संस्कार करणारी त्यांना व्यायामाची गोडी लावण्याचा प्रयत्न करणारी व जातीपाती, आर्थिक उच्चनिचता विसरावयाला लावून मुलांत संघभाव व भ्रातृभाव वाढविणारी ही शाळा होती.

---

१. चपळगावकर नरेंद्र, **कर्मयोगी संन्यासी**, मौज प्रकाशन, मुंबई, १९९९, पृ. ४४.

२. कित्ता, पृ. ८४.

३. कित्ता, पृ. ८४.

४. जोशी, सु. ग. (संपा.), **देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ**, मार्च १९९९ (दोन शब्द यामधील उल्लेख).

अनुक्रमणिका

शाळेतील महत्वाच्या उपक्रमांपैकी एक म्हणजे १५ मिनिटांचा तास शालेय अभ्यासक्रमा व्यतिरिक्तच्या या तासात मुलांच्या वर देशभक्तीचे संस्कार करण्यासाठी जोसेफ मॅझिनी, डी व्हॅलेश यासारख्या देशभक्तांची चरित्रे आणि छत्रपति शिवाजी, राणा प्रताप यासारख्या ऐतिहासिक महापुरुषांच्या कथा सांगितल्या जात. कधी ज्ञानेश्वरीतील एखादी ओवी, तर कधी तुकारामचा अभंग समजावून सांगितला जाई.[५] हिप्परगा येथील संस्थेचा पसारा वाढू लागला व त्यातीलच काही कार्यकर्त्यांनी व्यंकटराव देशमुख यांच्या संमतीने आंबेजोगाईस योगेश्वरी या नावाने एक शिक्षण संस्था सुरू केली. आर्य समाज या धार्मिक कार्य करणाऱ्या संस्थेनेही आपापल्या मंदिरातून शैक्षणिक कार्य चालविले होते.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सबंध भारतात जे वैचारीक आंदोलन झाले त्यातूनच सार्वजनिक राष्ट्रीय संस्था, विशेषत: शिक्षण संस्थांचा जन्म झाला, त्याचवेळी अत्यंत प्रतिगामी आणि अप्रगत अशा देशी संस्थानातही त्याचे पडसाद उमटले. सरस्वती भुवन शिक्षण संस्था मातृभाषेतून शिक्षण देण्याचे उद्दिष्ट समोर ठेऊन १९१५ मध्ये औरंगाबाद येथे सुरू झाली.[६] ही मराठवाड्यातील सर्वात जुनी शिक्षण संस्था आहे. उस्मानिया विद्यापीठाची स्थापना व उर्दू भाषेचे वर्चस्व यामुळे संस्थेस काही उर्दू माध्यमाचे वर्गही चालवावे लागले. परंतु संस्थेने मराठी माध्यमासाठी पाठपुरावा चालुच ठेवला, याच संस्थेच्या मुलींसाठी असलेल्या शारदा मंदिर हायस्कूलमध्ये मात्र उर्दूचा मुळीच शिरकाव होऊ दिला नाही. यासाठी सरकारी रोष पत्करला व अनुदानावर तिलांजली सोडली. संस्थेच्या विद्यार्थीनींना कधी नागपूर विद्यापीठाच्या तर कधी नाथीबाई ठाकरसी विद्यापीठाच्या मॅट्रिक परीक्षांना पाठविले जात असे. संस्थानी कारभाराविरुध्द आंदोलनासाठी जिल्हा पातळीवरील सामाजिक कार्यकर्त्यांना शैक्षणिक आघाडीवरही लढा द्यावा लागला.[७]

स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण, शिक्षण प्रशासन व शिक्षण संस्थांचा विकास : १९४८ पूर्वी लातूर जिल्हा तेव्हाच्या उस्मानाबाद जिल्ह्याचा व पर्यायाने हैद्राबाद राज्याचा भाग होता. त्या राज्याची कार्यालयीन व शैक्षणिक भाषा उर्दू हीच होती. पर्शियन आणि अरेबीक या परकीय भाषांना उत्तेजन देण्यात आले होते. इंग्रजी ही दुय्यम भाषा म्हणून शिकविण्यात येत असे. या राज्यात कुठल्याही सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची कोणतीही तरतूद करण्यात आली नव्हती. या राज्यातील सर्व माध्यमिक आणि प्राथमिक शाळा सरकार मार्फत चालविण्यात येत असत. खाजगी संस्थांना नाउमेद केले जात असे एवढेच नव्हे तर उर्दू माध्यमातूनच सर्वांना शिक्षण मिळावे या उद्देशानेच उस्मानिया विद्यापीठाची स्थापना करण्यात आली होती.[८]

१९४८ नंतर हैद्राबाद राज्य भारतीय संघराज्यामध्ये विलिन झाल्यानंतर या राज्यात उर्दू भाषेच्या माध्यमा ऐवजी, शिक्षणासाठी मुलांच्या मातृभाषेचे माध्यम स्वीकारण्यात आले. यावेळी स्वयंसेवी शाळा सुरू करण्यास उत्तेजन मिळत होते. हैद्राबाद राज्यातील बहुसंख्य मुले मराठी मातृभाषिक असल्याने बहुतेक शाळांमध्ये मराठी हेच शिक्षणाचे माध्यम स्वीकारण्यात आले. मात्र यावेळी मराठी भाषेऐवजी प्राथमिक स्तरावर इतर भाषा इतर माध्यम म्हणून स्वीकारण्याचे तत्वही अमलात आणण्याचे प्रयत्न सुरू होते. हे काम नंतर नवीन शाळा स्थापन करून त्यात इंग्रजी व उर्दू भाषेचे माध्यम स्वीकारून साध्य करण्यात आले. तदसंबंधी स्थिती दर्शविणारी आकडेवारी खालील विवरणपत्रात दिली आहे.

---

५. चपळगावकर नरेंद्र, पूर्वोक्त, पृ. ४१, ४२.
६. सरस्वती भुवन शिक्षण संस्था औरंगाबाद यांचे पत्रावरून.
७. **परभणी जिल्हा गॅझेटिअर**, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ५०९.
८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९७२, पृ. ७०५.

सन १९५१ - १९५६ मधील शैक्षणिक विकास दर्शक विवरणपत्र

तालुका	शाळा	१९५१	१९५६
अहमदपूर . .	प्राथमिक शाळा	उ. ना.	८६
	माध्यमिक शाळा	४	९
लातूर . .	प्राथमिक शाळा	उ. ना.	७९
	माध्यमिक शाळा	४	५
उदगीर . .	प्राथमिक शाळा	उ. ना.	७६
	माध्यमिक शाळा	४	५
औसा . .	प्राथमिक शाळा	उ. ना.	३१
	माध्यमिक शाळा	१	१
निलंगा . .	प्राथमिक शाळा	उ. ना.	७४
	माध्यमिक शाळा	३	५

साक्षरता आणि शैक्षणिक स्थिती : सर्व सामान्यपणे मराठवाडा आणि आजचा लातूर जिल्हा हा महाराष्ट्राचा अप्रगत भाग होता. निरक्षरतेचे प्रमाण अतिशय मोठे होते. बऱ्याच काळपर्यंत मराठवाडा विभाग दुर्लक्षित राहिल्याने या विभागाचा विकास झाला नव्हता. परंतु अलिकडे राबविलेल्या विविध योजनांमुळे व शासनाने दिलेल्या अग्रक्रमामुळे येथील परिस्थिती बदलण्यास मदत झाली. साक्षरतेच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. सन १९५१ ला जिल्ह्याची साक्षरता ८७,०२२ होती, ती १९६१ ला २,५२,०१४ पर्यंत वाढली[९] (सदर आकडेवारी तत्कालीन संपूर्ण उस्मानाबाद जिल्ह्याची आहे.) ही वाढ घडवून आणण्यासाठी राज्य सरकार व काही स्वयंसेवी संस्थांनी साक्षरता प्रचार आणि प्रसार करण्यासाठी मोलाचे प्रयत्न केलेले आहेत. १९५१ला साक्षरतेची एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात जी टक्केवारी होती (१०.०६) ती १९६१ ला १७.०५ एवढी झाली.

निरक्षरता दूर करण्याच्या उदेशाने राज्याने १४ ते ५० वयोगटातील निरक्षरांसाठी " ग्राम शिक्षण मोहीम " विस्ताराचे दृष्टीने हाती घेतली. याचा योग्य परिणाम मिळविण्यासाठी समाजकार्यकर्ते, ग्राम पुढारी सर्व स्तरावर कार्यरत होते, या मोहिमेने ४०१ खेड्यांत पैकीच्या पैकी साक्षरता मिळविली. परंतु वरचेवर निरक्षरांचे प्रमाण वाढत होते ते १,५०,६५६ एवढे झाले. त्यासाठी आणखी ३५० खेड्यांत ही योजना राबविण्यासाठी २ लाख निरक्षरांचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.

१९९१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ५५.५७ टक्के लोक साक्षर असून महाराष्ट्रात टक्केवारी ६५% आहे. साक्षरतेचे प्रमाण ग्रामिण भागापेक्षा नागरी भागात अधिक आहे. ग्रामीण भागात एकूण ५१.६३ व नागरी भागात एकूण ७०.८७ टक्के लोक साक्षर आहेत.[१०] ग्रामीण भागामध्ये तालुकानिहाय टक्केवारीमध्ये विशेष फरक आढळत नाही. लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागाची अधिक टक्केवारी म्हणजे ५३.०२ असून कमी टक्केवारी उदगीर तालुक्याच्या ग्रामीण भागाची आहे. नागरी भागामध्ये

९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ. ७०६
१०. **सेंसस ऑफ इंडिया, १९९१,** सिरीज, १४, पार्ट-७-अे आणि बी डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक, पृ.२९.

अधिक टक्केवारी ७३.१३ टक्के उदगीर शहराची आहे. त्या खालोखाल लातूर शहराचा क्रमांक ७१.८६ टक्के येतो, आणि कमी टक्केवारी ६४.९४ निलंगा शहराची आहे. तसेच पुरुष - स्त्री साक्षरतेच्या प्रमाणामध्ये बरीच तफावत दिसून येते. पुरुष-स्त्रियातील साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ७०.४७ व ४१.७४ टक्के आहे. ग्रामीण भागातील पुरुषांची जास्त टक्केवारी ६८.७१ टक्के अहमदपूर तालुक्यात आहे. तर सर्वात कमी टक्केवारी ६५.८२ टक्के औसा तालुक्यात आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण स्त्रियांचे बाबतीत अधिक टक्केवारीचे प्रमाण लातूर तालुक्याचे आहे, ते म्हणजे ३७.२५ टक्के. सर्वात कमी टक्केवारी अहमदपूर तालुक्याची असून ती ३५.२३ टक्के इतकी आहे. नागरी भागाच्या संदर्भात सर्वात जास्त पुरुषांची टक्केवारी उदगीर शहराची ८४.४५ टक्के व सर्वात कमी अहमदपूर तालुक्याची ७८.४४ टक्के आहे. स्त्रियांचे बाबतीत अधिक टक्केवारी उदगीर शहरात ६०.३७ टक्के व सर्वात कमी निलंगा शहराची ४९.६९ टक्के आहे. ग्रामीण भागातील एकूण साक्षर लोकसंख्येपैकी पुरुष व स्त्रियांची टक्केवारी अनुक्रमे ६७.१८ व ३५.३५ टक्के आहे. तर नागरी भागामध्ये त्यांचे प्रमाण अनुक्रमे ८२.८३ व ५७.४४ टक्के आहे. ग्रामीण भागातील स्त्री पुरुषापेक्षा शहरी भागातील स्त्री पुरुषामध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.[११]

सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण (सर्वसाधारण) ७२.३० एवढे आहे.[१२]

प्रौढ शिक्षण : १६ ऑगस्ट १९८२ ला लातूर जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर त्याच वर्षापासून जिल्हा प्रौढ शिक्षणाचे कार्यालय स्थापन झाले. या अंतर्गत ग्रामीण कार्यात्मक साक्षरता योजनेची ३०० व राज्य शासनाची ५०० प्रौढ शिक्षण केंद्रे कार्यान्वीत झाली. ही योजना डिसेंबर १९९१ ला बंद होऊन संपूर्ण साक्षरता अभियान सुरू झाले. प्रौढ शिक्षणाची जाणिव जागृती, कार्यात्मकता व साक्षरता ही तीन अंगे असून त्यानुसार १५ ते ३५ वयोगटातील निरक्षर स्त्री-पुरुषांना या योजनेत सहभागी करून घेण्यात येते.

राज्य प्रौढ शिक्षण योजनेस जिल्ह्यात सुरुवातीपासूनच चांगला प्रतिसाद मिळाला. सन १९८३-८४ ला जिल्ह्यात १२० प्रौढ शिक्षण केंद्रे कार्यरत होती व त्यात पुरुषांपेक्षा महिलांचा सहभाग लक्षणीय होता. १९९१-९२ मध्ये ५०० केंद्रातून एकूण १४,६८२ प्रौढांनी प्रौढ शिक्षण घेतले त्यापैकी पुरुष ५,३६९ तर महिला ९४९३ होत्या. जिल्ह्यातील प्रौढ शिक्षण केंद्रे व त्यातील प्रौढ यांची माहिती पुढील विवरणपत्रात दिली आहे.

ग्रामीण कार्यात्मक साक्षरता, राज्य प्रौढ शिक्षण, स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयांद्वारे राबविण्यात आलेले प्रौढ शिक्षण इत्यादी द्वारा साक्षर झालेल्या अनु. जाती, जमातींच्या प्रौढांची संख्या १९८३-८४ मध्ये ७१५ होती. त्यामध्ये अनु. जातीचे पुरुष ३८७ व महिला ३२८ होत्या. अनु. जमातीच्या प्रौढांची संख्या निरंक होती. सन १९९१-९२ मध्ये अनु. जातीच्या प्रौढांची संख्या ४,५६५ होती यामध्ये पुरुष १७४२ व महिला २८२३ होत्या. अनु. जमातींची संख्या ६५२ होती. त्यामध्ये पुरुष २६३ व महिलांची संख्या ३८९ होती.[१३]

---

११. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, १९९२-९३, पृ. ७

१२. **शिक्षणावर दृष्टिक्षेप**, २०००-२००१, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, पृ. २१.

१३. शिक्षणाधिकारी, निरंतर शिक्षण, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवरुन.

योजना सुरू झाल्यापासून प्रौढ शिक्षण घेतलेल्या पुरुष व महिलांची तालुका निहाय आकडेवारी दर्शविणारा विवरणपत्र :—

अ.क्र.	तालुका	पुरुष	महिला	एकूण
१	लातूर . .	२१,७६२	३२,४४५	५४,२०७
२	औसा . .	२९,०२२	४०,३६९	६९,३९१
३	निलंगा . .	१०,१३१	१५,८३०	२५,५६१
४	उदगीर . .	०९,२३४	१५,९१४	२५,१४८
५	अहमदपूर . .	११,४९७	२०,७१४	३२,२११
	एकूण . .	८१,६४६	१,२५,२७२	२,०६,९१८

निरंतर शिक्षण योजना : लातूर जिल्ह्यात १ जानेवारी १९९९ पासून निरंतर शिक्षण केंद्र कार्यान्वित करण्यात आले असून जिल्ह्यात ५३ प्रमुख निरंतर शिक्षण केंद्र, ४७७ निरंतर शिक्षण केंद्र असे एकूण ५३० केंद्र आहेत. १ जानेवारी १९९९ ते ३१ डिसेंबर २००२ पर्यंत ५३० निरंतर शिक्षण केंद्र सुरू होती. ऑक्टोबर २००० पर्यंत ५३० निरंतर शिक्षण केंद्र सुरू होती. ऑक्टोबर २००० ते ३१ डिसेंबर २००१ पर्यन्त प्रशिक्षण प्रेरकांनी विनामोबदला तत्वावर काम केलेले आहे. या योजनेवर साधारणपणे ६७.८७ लक्ष रुपये केंद्रिय अनुदानातून खर्च केले गेले. या नंतर केंद्र शासन पुरस्कृत निरंतर शिक्षण योजनेसाठी आर्थिक तरतूद उपलब्ध न झाल्यामुळे २००२ पासून निरंतर शिक्षण केंद्रास स्थगिती दिली गेली. जिल्ह्यातील प्रौढ शिक्षण केंद्रे व त्यात दाखल झालेले प्रौढ यासंबंधीची आकडेवारी या प्रकरणाच्या शेवटी तक्ता क्रमांक १ मध्ये दिली आहे.

लातूर जिल्हा सन १९९१-९२ मध्ये संपूर्ण साक्षरतेसाठी निवडला गेला. या जिल्ह्यात १५ ते ३५ वयोगटासाठी संपूर्ण साक्षरता अभियान राबविण्यात आले.

संपूर्ण साक्षरता अभियानामध्ये ज्या नवसाक्षरांनी यशस्वीरित्या भाग १,२ व ३ पूर्ण केले त्यांच्यासाठी चौथी बोर्ड परीक्षा मंडळ, जिल्हा परिषद, लातूर यांचेमार्फत चौथी बोर्ड परीक्षा (एतदर्श) आयोजित केली होती.

सदर परीक्षेस बसलेल्या नवसाक्षरांची आकडेवारी खालील विवरणपत्रात दिली आहे.

अ.क्र.	तालुका	परीक्षेस नाव नोंदविलेले नवसाक्षर (संख्या)	परीक्षेस उपस्थित नवसाक्षर (संख्या)	उत्तीर्ण झालेले नवसाक्षर (संख्या)
१	लातूर	८,४९५	५,९९५	५,४२४
२	अहमदपूर	१८,८४१	१५,०९१	१४,७१४
३	औसा	७,४९५	५,४४३	५,३१२
४	निलंगा	७,४७३	६,३६५	६,३१२
५	उदगीर	११,३१३	९,३९२	९,३३२
	एकूण	५३,६१७	४२,२८६	४१,०९४

पूर्व प्राथमिक शिक्षण : जिल्ह्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणास पात्र ठरणाऱ्या बालकांना शिक्षण देण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदेमार्फत पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा चालविल्या जातात. खालील विवरणपत्रात पंचायत समिती निहाय शाळांची संख्या व विद्यार्थी संख्या दर्शविण्यात आली आहे. जिल्ह्यामध्ये सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापर्यंत एकूण १३२ पूर्व प्राथमिक शाळा नोंदवल्या होत्या.

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये १९५१-६१ मध्ये अस्तित्वात असलेल्या शाळांची आकडेवारी.[१४]

संस्था	वर्ष		
	१९५१	१९५६	१९६१
(१) प्राथमिक शाळा	५००	७६२	१,२२४
मुले	२८,०००	४४,३६२	७७,३८०
मुली	७,०००	९,५८५	२५,५३१
एकूण विद्यार्थी	३५,०००	५३,९४७	१,०२,९११
शिक्षक	१,०००	१,४४३	२,८३४
(२) माध्यमिक शाळा	३३	४९	६४
मुले	१३,००१	१६,७९७	१६,४४५
मुली	१,८५२	२,६०१	३,३९६
एकूण विद्यार्थी	१४,८५३	१९,३९८	१९,८४१
शिक्षक	४७८	७१०	८८६

जिल्हा परिषदेकडून चालविल्या जाणाऱ्या पूर्व प्राथमिक शाळा व त्यावरील पटनोंदणी-२०००-२००१[१५]

अ.क्र.	पंचायत समिती	पूर्व प्राथमिक शाळा व पटनोंदणी			एकूण
		शाळा संख्या	मुले	मुली	विद्यार्थी
१	लातूर . .	२७	१,४६२	१,३७५	२,८३७
२	औसा . .	३३	१,२८९	१४४	२,४३३
३	निलंगा . .	०४	१७४	१६२	३३६
४	उदगीर . .	१५	१,०४१	९८८	२,०२९
५	अहमदपूर . .	४५	१,३६३	१,२९४	२,६५७
६	चाकूर . .	१५	१,२८६	१,१४१	२,४२७
७	रेणापूर . .	१९	९७४	८६०	१,८३४
	एकूण . .	१५८	७,५८९	५,९६४	१४,५५३

१४. जिल्ह्यात एकशिक्षकी शाळा नाहीत.
१५. जिल्हा परिषद, लातूरकडील माहिती.

जिल्ह्यामध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्य जिल्हा परिषद पार पाडते. जिल्हा परिषद, लातूर मार्फत चालविल्या जाणाऱ्या पूर्व प्राथमिक शाळांची संख्या व विद्यार्थी संख्या तालुकानिहाय पुढील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेली आहे.

पूर्व प्राथमिक शाळा व पट नोंदणी सन २००३-२००४

अ.क्र.	पंचायत समिती	शाळा संख्या	मुले	मुली	एकूण विद्यार्थी
१	लातूर . .	१५	७५१	५०६	१,२५७
२	औसा . .	२९	८१६	६१५	१,४३१
३	निलंगा . .	०४	१८०	०८०	२६०
४	उदगीर . .	१४	७६०	३०४	१,०६४
५	अहमदपूर . .	३९	१,१८०	८६०	२,०४०
६	चाकूर . .	२१	६४४	४३०	१,०७४
७	रेणापूर . .	१५	७६१	३११	१,०७२
	एकूण . .	१३७	५,०९२	३,१०६	८,२०८

जिल्ह्यातील २००३-०४ मधील खाजगी प्राथमिक शाळांची संख्या (तालुका निहाय) लातूर १०, औसा १२, निलंगा २४, उदगीर ५२, अहमदपूर २३, चाकूर ४, रेणापूर १०, अशी एकूण १३५ इतकी आहे.

जिल्ह्यातील २००३-०४ या वर्षातील खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची (तालुका निहाय) संख्या लातूर १४१, औसा ४२, निलंगा ७६, उदगीर १२४, अहमदपूर ५८, चाकूर ४८, रेणापूर २७ अशी एकूण ५१६ इतकी आहे.[१६]

जिल्हा परिषद, लातूर बरोबरच नगरपरिषद, लातूरही आपल्या क्षेत्रात प्राथमिक शिक्षण देण्याचे कार्य करते. सन २००१ आणि सन २००४-०५ या वर्षी नगरपरिषदेच्या २३ प्राथमिक शाळा कार्यरत होत्या.[१७]

नगरपरिषद, लातूर मार्फत कार्यरत असलेल्या प्राथमिक शाळांमध्ये शालेय पोषण आहार, मागासवर्गीय मुला मुलींना उपस्थिती भत्ता, गणवेश, अप्रगत मुला मुलींसाठी जादा वर्ग अध्यापन, शिष्यवृत्ती परीक्षा, क्रिडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, योगासन वर्ग, वृक्षारोपन, स्नेहसंमेलन, शैक्षणिक सहल, वनभोजन, शालेय आरोग्य तपासणी इत्यादी उपक्रम राबविले जातात.

शिक्षणामुळे मूल्यांचे संस्कार, संवर्धन आणि संरक्षण व्हावे असे अभिप्रेत असते. या क्षेत्रातही प्रबोधनाची जाण विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापासून झालेली आढळते. हैद्राबाद एज्युकेशनल कॉन्फरन्स नावाची संस्था १९१५ मध्ये स्थापन झाली. या संस्थेद्वारा हैद्राबाद (१९१५), औरंगाबाद (१९१६), हैद्राबाद (१९१७ व १९१८), लातूर (१९१९) आणि परभणी (१९२०) या ठिकाणी शैक्षणिक परिषदा घेण्यात आल्या. शिक्षण क्षेत्रात पाश्चिमात्य पध्दतीचे शिक्षण आरंभ करावे, विज्ञान, तंत्रज्ञान व व्यवसाय शिक्षण हे अभ्यासक्रमात अंतर्भूत

१६. प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद, लातूर सन २००३-२००४, पृ. ९४.
१७. नगरपरिषद, लातूरने पाठविलेल्या माहितीवरून.

करण्यात यावेत यावर भर देण्यात आला. इ. स. १९१९ च्या लातूर परिषदेत माध्यमिक शिक्षणाचे माध्यम मातृभाषा हेच असावे आणि मुसलमान विद्यार्थ्याप्रमाणे हिंदू विद्यार्थ्यांनाही धार्मिक शिक्षण देण्यात यावे हे ठराव पारीत करण्यात आले.

बंद ज्ञानाचे दरवाजे ठोठावण्यासाठी व जनतेची ज्ञानतृष्णा भागविण्याचे एक साधन म्हणून २१ ऑगस्ट १९२८ रोजी हैद्राबाद येथे जनता शिक्षण परिषद ही संस्था स्थापन करण्यात आली. केशवराव कोरटकर हे या संस्थेचे अध्यक्ष होते. उर्दू माध्यमाची सक्ती रद्द करून जनतेला मातृभाषेतून शिक्षण द्यावे यासाठी प्रयत्न आरंभ झाले. तसेच शिक्षण क्षेत्रात खाजगी प्रयत्नांचा श्रीगणेशाही करण्यात आला. त्याचे प्रत्यंतर म्हणजे उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा या गावी १९२१ च्या विजयादशमीस औसाचे अनंतराव कुलकर्णी व व्यंकटराव देशमुख यानी एक निवासी माध्यमिक शाळा सुरू केली. बाबासाहेब परांजपे व स्वामी रामानंद तीर्थ हे या शाळेतच शिक्षक होते. शिक्षण क्षेत्रातील प्रबोधनाचे हे लोण हळूहळू चाकूर (१९३५), उदगीर (१९३७), लातूर (१९३८), या गावी पोहचले. तेथेही ज्ञानदानासाठी शिक्षण संस्था काढण्यात आल्या.

मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच लातूरमध्ये स्त्री शिक्षणाची आबाळच होती. उर्दू माध्यमामुळे मुलींच्या शिक्षणात खंड पडत असे. स्त्री शिक्षणाला चालना देण्यासाठी श्री.पुरणमल लाहोटी यांनी लातूर जिल्ह्यात पहिली मुलींची शाळा काढली. त्यातीलच १९४२ मध्ये लातूरात हिंदी माध्यमाची माध्यमिक शाळा काढली. तसेच सौ. सुशिलाबाई दिवाण यांनी इ. स. १९४२ मध्ये महिला विद्यामंदिर ही मुलींची शाळा स्थापन केली. या शाळेचे पुढे १९४६ मध्ये गोदावरी कन्या पाठशाळेत रुपांतर झाले. १९३५ नंतर मराठवाड्यात ज्या शैक्षणिक संस्था निघाल्या त्यांचे प्रेरणास्थान स्वामीजी व बाबासाहेब परांजपे आणि हिप्परग्याची शाळा हेच होते.[१८]

हैद्राबाद प्राथमिक शिक्षण कायदा १९५२ हा जिल्ह्यातील ६ ते ११ वयोगटातील बालकांसाठी लागू करण्यात आला. प्राथमिक शिक्षणासंदर्भात उस्मानाबाद जिल्ह्याने जलद विकास केला आहे. जिल्ह्यातील प्राथमिक शाळांची संख्या १९५०-५१ मध्ये ५०० होती ती डिसेंबर १९६६ मध्ये १,६४० झाली. १९४७ पूर्वी नवीन शाळा स्थापनेवर निजाम सरकारने निर्बंध घातल्यामुळे अगदी थोड्या शैक्षणिक संस्था जिल्ह्यात कार्यरत होत्या. या १६४० प्राथमिक शाळांपैकी ४३ शाळा ह्या अनुदानीत होत्या, ११२ शाळा ह्या विणकाम, सुतकाम, सुतारकाम आणि शेतीविषयक प्रशिक्षण देणाऱ्या होत्या. या कालावधीत प्राथमिक शाळा स्तरावरील विद्यार्थ्यांची एकूण संख्या १,७४,५८८ इतकी होती. त्यापैकी १,१४,०३४ मुले आणि ६०,५५४ मुली होत्या. सदर शाळेतील शिक्षकांची संख्या ४,५११ होती, त्यापैकी ४,१३० पुरुष आणि ३८१ महिला होत्या. ४,५११ शिक्षकांपैकी २,६४० प्रशिक्षित होते. या १६४० प्राथमिक शाळांपैकी २३२ शाळा जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या जागेत भरत. बैठक खोलीसाठी भाड्याच्या जागेची व्यवस्था करण्यात आली होती. केवळ २० प्राथमिक शाळांकडे खेळाच्या मैदानांची सुविधा होती.

जिल्ह्यात मुलभूत प्रशिक्षण देणारी पाच महाविद्यालये होती. त्यापैकी तीन उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातील मुरुड आणि उदगीर येथे कार्यरत असणारी महाविद्यालये शासनामार्फत चालविण्यात येत होती. उर्वरीत दोन महाविद्यालये नळदुर्ग आणि तुळजापूर येथे कार्यरत होती व ती खाजगी संस्थाकडून चालविली जात होती.[१९]

---

१८. **शारदीय**, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, प्रका. श्यामलाल अभियांत्रिकी महाविद्यालय, उदगीर, पृ. १९०.
१९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ. ७०८, ७०९.

प्राथमिक शिक्षण : प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे ध्येय साध्य करण्यासाठी ३ ते ५ वयोगटातील मुलांची पटनोंदणी करणे आणि त्यांचे शाळेत नियमित उपस्थित राहणे जरुरी आहे. या योजनेची उद्दिष्टये पुढील प्रमाणे आहेत :—

(१) मुलांना शाळेच्या वातावरणाची ओळख करून देणे,

(२) मुलांच्या मनावर उत्तम छंद बिंबविणे,

(३) हसत खेळत मुलांच्या बुध्दिचा विकास करणे,

(४) गळतीचे प्रमाण कमी करणे इत्यादी.

जिल्हा स्तरावरील बालभवनाकरीता अनुदान : ५ ते १४ वयोगटातील बालकांना त्यांची विचार क्षमता विकसित करणे व कौशल्य, आत्मविश्वास, व्यक्तिमत्व यांचा विकास होण्यासाठी या योजनेखाली बालभवन स्थापन करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत बालभवनमध्ये होणारे विविध कार्यक्रम उदा. चित्रकला स्पर्धा, संगीत, गोष्टी सांगणे इत्यादीसाठी अनुदान दिले जाते. या योजनेचे कार्यान्वयीन अधिकारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद हे आहेत.[२०]

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली १९९७ पर्यंत १,५४२ प्राथमिक शाळा होत्या. खालील विवरणपत्रात १९८२-८३ ते १९९६-९७ पर्यंतची प्राथमिक शाळांची आकडेवारी दिलेली आहे.[२१]

पहिल्या पंचवार्षीक योजनेच्या अखेरीस जिल्ह्यात ३७ मूलोद्योग शाळा होत्या. १९५९-६० मध्ये ही संख्या ५३ पर्यंत वाढली आणि ३१ मार्च १९६२ रोजी ती ११६ होती.[२२]

सन १९८२-८३ मध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या ५३,२१३ होती. त्यामध्ये मुलांची संख्या २८,१६९ आणि मुलीची संख्या २५,०४४ होती. ती १९९६-९७ मध्ये १,५४,४२० (मुले ७९,६८७, मुली ७४,७३३) झाली.

वर्ष	अनु.जाती		अनु.जमाती		भ.जमाती		विमुक्त जाती		इतर मागासवर्ग		एकूण मागासवर्गीय	
	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली
१९८२-८३	१६१०	१,४६५	३,४६७	२,४२३	३,४८९	२,४४८	२,१२३	२,४७७	१७,४८०	१६,२३१	२८,१६९	२५,०४४
१९९१-९२	११,३४०	९,३३२	४,३३८	३,४८३	५,४१०	४,७६७	४,३१२	३,२८९	१८,९६३	१६,४१०	४४,३६३	३७,२८१
१९९६-९७	३२,१६५	३०,८२४	६,७३१	६,५२५	७,८२९	६,६८६	६,०२९	४,६२६	२६,९३३	२६,०७२	७९,६८७	७४,७३३

जिल्ह्यात २००३-०४ या वर्षी १,४८५ प्राथमिक शाळा, ३६७ माध्यमिक शाळा, १२१ उच्च माध्यमिक शाळा व ३३ महाविद्यालये होती. २००३-०४ या वर्षात उपरोक्त सर्व संस्थामध्ये ६,६३,१३२ विद्यार्थी होते. प्राथमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थी संख्या व त्यांची टक्केवारी पुढीलप्रमाणे होती.[२३]

अ.क्र.	शैक्षणिक स्तर	विद्यार्थी संख्या	टक्केवारी
१	पूर्व प्राथमिक/प्राथमिक	३,९८,७७१	६०.१३
२	माध्यमिक	१,४१,२८५	२१.३१
३	उच्च माध्यमिक	९७,१८७	१४.६६
४	महाविद्यालयीन	२५,८८९	३.९०
	एकूण	६,६३,१३२	१००.००

२०. लातूर जिल्ह्याची वार्षिक योजना : १९९८-९९. योजनांची माहिती दर्शविणारी पुस्तिका, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, लातूर, पृ. ३८.

२१. लातूर जिल्हा परिषदे कडून आलेल्या माहितीनुसार.

२२. **जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ**, उस्मानाबाद, १९६१, पृ. २७.

२३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा, अर्थ सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, २००३-०४, पृ. १२.

लातूर येथे १९४२ पासून श्री.मारवाडी राजस्थान विद्यालय हिंदी माध्यमातून शिक्षण देण्याचे कार्य करते. हे कार्य आजही अविरतपणे चालू आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या सहा शाळा २०००-२००१ मध्ये जिल्ह्यात कार्यरत होत्या.[२४] तक्ता क्र. २ मध्ये सन १९८२-८३ ते सन १९९६-९७ या वर्षातील प्राथमिक शाळांची आकडेवारी दिलेली आहे.

माध्यमिक शिक्षण : जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण हे जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्याच्या निगराणीखाली आहे. शिक्षणाधिकारी हे प्राथमिक आणि माध्यमिक शाळेच्या पर्यवेक्षीय कामासाठी सर्वस्वी जबाबदार आहेत. त्याचप्रमाणे सर्व सरकारी व खाजगी प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि प्रशिक्षण संस्था (प्राथमिक शिक्षकांच्या) आणि अशा प्रकारच्या इतरही शाळेवर प्रशासकीय नियंत्रण ठेवण्याचे काम हे शिक्षण विभागाचे आहे. शिक्षणाधिकारी सर्व माध्यमिक शाळांवर नियंत्रण ठेवतात, त्यांची तपासणी करतात. यात बहुउद्देशीय शाळांचाही समावेश होतो. मात्र नगरपरिषदेच्या शाळांचा यात समावेश होत नाही.

लातूर जिल्ह्याची निर्मिती होण्यापुर्वीचे अगोदर उस्मानाबाद जिल्ह्यातील १९५१ ते १९६१ या कालावधीतील माध्यमिक शाळांची आकडेवारी दर्शविणारे विवरणपत्र खालीलप्रमाणे दिले आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यात मध्ये असलेल्या माध्यमिक शाळांची आकडेवारी.[२५]

बाब	वर्ष		
	१९५१	१९५६	१९६१
माध्यमिक शाळा (संख्या)	३३	४९	६४
मुले (संख्या)	१३,००१	१६,७९४	१६,४४५
मुली (संख्या)	१,८५२	२,६०१	३,३९६
एकूण विद्यार्थी (संख्या)	१४,८५३	१९,३९८	१९,८४१
शिक्षक (संख्या)	४७८	७१०	८८६

लातूर जिल्ह्याच्या निर्मिती नंतर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची आकडेवारी खालील विवरणपत्रात दिलेली आहे.

तपशील	१९८२-८३	१९८५-८६	१९९१-९२	१९९३-९४	१९९४-९५	१९९५-९६	१९९६-९७
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६))	(७)	(८)
एकूण माध्यमिक शाळा (संख्या)	१५८	२२९	३३८	३३९	३५४	३३९	३१४
मराठी माध्यम शाळा (संख्या)	१५८	२२९	३३८	३३९	३५४	३३९	३१४
इंग्रजी माध्यम शाळा (संख्या)	—	—	—	—	—	—	—
इतर माध्यम शाळा (संख्या)	—	—	—	—	—	—	—
एकूण शिक्षक (संख्या)	२,६७६	३,०९१	४,८२६	५,१४१	३,२३०	२,१८०	३,०८७
प्रशिक्षित पुरुष (संख्या)	२,३०६	२,५४५	३,८८३	४,११४	२,३२०	१,४००	२,५०५
प्रशिक्षित स्त्रि (संख्या)	२६५	३९५	७५६	७७०	७७२	५३७	२७८
अप्रशिक्षित पुरुष (संख्या)	७४	११९	१५२	२०५	७४	१७४	२७२
अप्रशिक्षित स्त्रि (संख्या)	३१	३२	३५	५२	५४	६९	३२
एकूण विद्यार्थी	७२,७३७	८९,२५३	१,२७,१०७	१,५३,७९५	३४,०९२	१६,८३७	१५,५१८
मुले (मराठी माध्यम)	५२,६३०	६२,३८२	७५,०१४	९५,४९३	२२,३२०	५,०५०	७,६७८
मुली (मराठी माध्यम)	२०,१०७	२६,८७१	५२,०९३	२८,३०२	११,७७२	११,७८७	१०,८४०
मुले (इंग्रजी माध्यम)	—	—	—	—	—	—	—
मुली (इंग्रजी माध्यम)	—	—	—	—	—	—	—

२४. शिक्षणावर दृष्टीक्षेप, २०००-२००१, शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे, पृ. ५९.

२५. **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ,** उस्मानाबाद, १९६१, पृ. २२९.

सध्या जिल्ह्यात बहुसंख्य माध्यमिक शाळा या खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जातात. जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची एकूण संख्या १९९८ मध्ये ४८४ होती.

लातूर जिल्हा निर्मितीपूर्व व निर्मितोत्तर जिल्ह्यातील शिक्षणविषयक माहितीदर्शक विवरणपत्र*

अ.क्र.	बाब	वर्षे				
		१९६०-६१	१९७०-७१	१९८०-८१	१९९०-९१	२०००-०१
१	प्राथमिक शिक्षण					
	अ) संस्था	१,२२४	१,६४०	१,७३२	१,१४७	१,३६७
	ब) विद्यार्थी (हजारात)	१०३	१९४	२९१	२३६	३३२
	क) शिक्षक (हजारात)	३	६	७	६	८
	ड) प्रतीशिक्षक विद्यार्थी	उ. ना.	उ. ना.	उ. ना.	उ. ना.	४२
२	माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण					
	अ) संस्था	६४	२२८	२५४	२७४	४७७
	ब) विद्यार्थी (हजारात)	२०	८०	११४	१४१	२२५
	क) शिक्षक (हजारात)	१	१	४	५	६
	ड) प्रतीशिक्षक विद्यार्थी	उ. ना.	उ. ना.	उ. ना.	उ. ना.	३५
३	महाविद्यालयीन शिक्षण					
	अ) संस्था	४	१२	१८	१४	३३
	ब) विद्यार्थी (हजारात)	उ. ना.	७	१३	२२	२६
	क) शिक्षक (हजारात)	१	१	१	१	१
	ड) प्रतीशिक्षक विद्यार्थी	उ. ना.	उ. ना.	उ. ना.	उ. ना.	२७

कनिष्ठ महाविद्यालये : कनिष्ठ महाविद्यालये उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये समाविष्ट असून ती १९७३-७४ नंतरच स्थापन झाली आहेत. सन १९७३-७४ पूर्वी १ली ते ७वी पर्यंत प्राथमिक शाळा व ८ वी ते ११ वी पर्यंत माध्यमिक शाळा असा शैक्षणिक आकृतिबंध होता. त्यावेळी अर्थातच महाविद्यालयीन पदवी परीक्षा अभ्यासक्रम चार वर्षांचा होता. तथापि ही स्थिती पश्चिम महाराष्ट्रातच होती. विदर्भ व मराठवाडा विभागात वेगळा शैक्षणिक आकृतिबंध होता. मराठवाड्यात पदवी अभ्यासक्रमापूर्वी १०वी नंतर एक वर्षाचा पूर्व पदविका अभ्यासक्रम पी.यु.सी. आवश्यक मानला जाई. या संपूर्ण विभागांमध्ये एकसूत्रता आणण्याच्या धोरणानुसार शासनाने १९७२ मध्ये १०+२+३ हा संपूर्ण राज्यासाठी एकच समान शैक्षणिक आकृतिबंध स्वीकारला व त्यानुसार १९७३-७४ या वर्षापासून ८व्या इयत्तेमध्ये माध्यमिक शिक्षणाचा नवीन आकृतिबंध कार्यान्वित करण्यात आला व तीन भाषा, गणित, विज्ञान आणि सामाजिक अभ्यास हे विषय सक्तीचे करण्यात आले. त्यानुसार १९७५-७६ च्या शैक्षणिक वर्षापासून सुधारित शैक्षणिक आकृतिबंधानुरुप दहावीची शालांत परीक्षा घेण्यास प्रारंभ झाला. त्यानंतर + २ स्तरावरील ११ वी व १२ वी चा उच्च माध्यमिक अभ्यासक्रम

* सन १९६०-६१, १९७०-७१ व १९८०-८१ या वर्षाची आकडेवारी उस्मानाबाद जिल्ह्याची असून त्यात लातूरचा समावेश आहे. ही माहिती सांख्यिकीय संक्षेप ग्रंथ, शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे १९७०-७१ च्या अहवालातून घेतलेली आहे. १९९०-९१ व २०००-२००१ या वर्षाची माहिती जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर, २००४-२००५ यामधून घेतली आहे.

कार्यान्वित झाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे ११ वी व १२ वी चे वर्ग आवश्यकतेनुसार सक्षम उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांना जोडण्यात आले. या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या महाविद्यालयीन अभ्यासक्रमाची ओळख करून देण्याबरोबरच अभियांत्रिकी व वैद्यकीय वगैरेसारख्या व्यावसायिक शिक्षणासाठी लागणारी पूर्वपीठिकाही तयार करण्यात येते. सन १९९७ पर्यंत जिल्ह्यात ११७ कनिष्ठ महाविद्यालये होती.

उच्च शिक्षण

स्वातंत्र्यपूर्व काळात जिल्ह्यात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नसल्याने बहुतांश विद्यार्थी हैद्राबाद येथे उच्च शिक्षणासाठी जात असत. सन १९६१ पर्यंत जिल्ह्यात एकही महाविद्यालय नव्हते. ही समस्या दूर करण्यासाठी व परिसरातील विद्यार्थ्यांना इथल्या इथे महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे यासाठी १९६१ च्या एप्रिल महिन्यात दयानंद शिक्षण संस्था अस्तित्वात आली. संस्थेने कला, वाणिज्य, विज्ञान व पुढील काळात विधी महाविद्यालयही सुरू केले. त्यानंतर श्री. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर (१९७०), उदयगिरी महाविद्यालय, उदगीर (१९६२), महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर (१९६९), राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर; मा.दिनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजनी; महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा इत्यादी महाविद्यालयांची स्थापना झाली.[२६] इ.स. १९९७ मध्ये जिल्ह्यात १२ वरिष्ठ महाविद्यालये होती. त्यांची संख्या २००४-०५ अखेर २० झाली. ही सर्व महाविद्यालये कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांची आहेत. याशिवाय तीन अभियांत्रिकी महाविद्यालये, सात तंत्रनिकेतने (यातील एक मुलींसाठी निवासी तंत्रनिकेतन लातूर येथे आहे. दोन वैद्यकीय महाविद्यालये (अलिकडे एक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय स्थापन करण्यात आले आहे.) दोन चित्रकला महाविद्यालये, तीन शारिरीक शिक्षण महाविद्यालये, दहा अध्यापक पदविका महाविद्यालये, एक शेतकी महाविद्यालय आणि एक पशुधन व दुग्धविकास महाविद्यालय इत्यादी महाविद्यालये होती. वरील सर्व महाविद्यालये नव्याने स्थापन झालेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न आहेत. तक्ता क्र. ३ मध्ये जिल्ह्यातील महाविद्यालयांची यादी देण्यात आलेली आहे.

अलिकडे महाविद्यालयांच्या तपासणीत 'नॅक' ने मूल्यांकन दिलेल्या महाविद्यालयांची माहिती थोडक्यात दिली आहे.

१. दयानंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय : दयानंद शिक्षण संस्था, एप्रिल १९६१ ला स्थापन झाल्यानंतर दयानंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना ६ जून १९६१ साली झाली. दयानंद शिक्षण संस्थेचे हे महाविद्यालय सुरुवातीस तीनही शाखांसाठी एकत्रितच चालविण्यात येत होते. वरचेवर विद्यार्थी संख्या वाढू लागल्याने विज्ञान शाखेचे स्वतंत्र महाविद्यालय १९६७ मध्ये स्थापन करण्यात आले. आज संस्थेची एकूण चार महाविद्यालये आहेत. दयानंद कला महाविद्यालय, दयानंद विज्ञान महाविद्यालय, दयानंद वाणिज्य महाविद्यालय व दयानंद विधी महाविद्यालय इ.

या महाविद्यालयातून इयत्ता अकरावी पासून एम.ए.एम.कॉम., एम.एसस्सी. पर्यंतचे पदव्युत्तर शिक्षण तसेच पी.एचडी. संशोधनाची सोयही येथे उपलब्ध आहे. या महाविद्यालयांना स्वतंत्र ग्रंथालये, प्रयोगशाळा, वसतिगृह, क्रिडांगण या सोयी उपलब्ध आहेत. या चारही महाविद्यालयात एकूण ५,५०० विद्यार्थी शिक्षण घेत असून ४ प्राचार्य, १५० प्राध्यापक, ४५ कर्मचारी व ६० सेवक कार्यरत आहेत.

२. राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर : लातूरच्या शिव छत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना १९६८ ला झाली. त्यानंतर १९७० साली राजर्षी शाहू महाविद्यालयाची स्थापना केली. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून त्याच्या चारित्र्य संवर्धन, मूल्यांची जोपासना, गुणवत्तेनुसार शिक्षण, उच्च गुणवत्ता इ. साध्य करण्याच्या उद्देशाने या

२६. संबंधित शिक्षण संस्थांनी पाठविलेल्या माहितीवरुन.

महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. "लातूर पॅटर्न" मुळे या महाविद्यालयाचा बराच लौकिक झाला. या महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही विद्याशाखांमधून शिक्षण घेण्याची सोय आहे. अर्थशास्त्र व भूगोल या अभ्यासक्रमात पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे. ३,४४५ विद्यार्थी येथे शिक्षण घेतात (१९९५-९६ प्रमाणे) १३० शिक्षक ७६ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. महाविद्यालयास भव्य असे ग्रंथालय असून ग्रंथालयामध्ये ८१,३८३ ग्रंथ तर १७० नियतकालिके आहेत.

३. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर : धर्मवीर पूज्य सिदैक्य-निरपाक्ष स्वामी देशिकेंद्र महाराज लातूर यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने केवळ ८८ विद्यार्थी संख्येवर १९६३ मध्ये श्री देशिकेंद्र विद्यालयाची स्थापना करण्यात आली. पुढे याचेच नाव महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था व महाविद्यालयाचे नाव महात्मा बसवेश्वर महाविद्यालय असे ठेवण्यात आले. या महाविद्यालयात कला, विज्ञान व वाणिज्य या विद्याशाखांमधून शिक्षण घेण्याची सोय आहे. समाजकार्य पदवी अभ्यासक्रमाचीही सोय येथे आहे. महाविद्यालयास स्वतंत्र असे ग्रंथालय असून १,३४,००० ग्रंथ उपलब्ध आहेत. संस्थेकडे १४० प्राध्यापक, २०७ अध्यापक, १५० शिक्षकेतर कर्मचारी व ९,७७४ विद्यार्थी आहेत.

४. महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर : महात्मा गांधी यांच्या ग्रामीण भारताचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने महात्मा गांधीच्या जन्मशताब्दी वर्षात अहमदपूर येथील शिक्षण प्रेमींनी विचार विकास मंडळ या संस्थेची स्थापना १९६९ साली करून या महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयास विद्वान, प्रशिक्षित अनुभवी प्राध्यापक वृंद लाभला आहे. सन १९९५-९६ मध्ये ८९ प्राध्यपक, ३६ शिक्षकेतर कर्मचारी येथे कार्यरत आहेत. २७२० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयास समृद्ध असे ग्रंथालय असून त्यामध्ये एकूण ४९,१९३ ग्रंथ आहेत. यामध्ये क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ आहेत.

५. मा. दिनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजनी : महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील औराद शहाजनीमधील काही लोकांनी परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'ज्ञान' हेच एकमेव औषध समजून महाराष्ट्र वैदिक विद्यालय व तद्नंतर महाराष्ट्र विद्यालय व पुढे "शारदोपासक शिक्षण संस्था" स्थापन केली. या संस्थेने मा. दिनानाथ मंगेशकर या महाविद्यालयाची स्थापना १५ जून १९७० साली कला व वाणिज्य या विद्याशाखांनी केली. शिक्षणाबरोबरच महाविद्यालयात 'कमवा व शिका' योजना, विद्यार्थी दत्तक योजना, राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा स्पर्धा, विषय परिषदांचे आयोजन गांधी विचार यात्रा, साक्षरता अभियान, व्याख्यानमाला, महिला मेळावे, संगणक शिक्षण प्रशिक्षण, सामान्य ज्ञान परीक्षा वर्ग, संगीत व चित्रकला इ. उपक्रमही राबविले जातात. महाविद्यालयात ३४ प्राध्यापक, १५ शिक्षकेतर कर्मचारी व १,०२८ विद्यार्थी आहेत (१९९५-९६ प्रमाणे) महाविद्यालयास सुसज्ज असे ग्रंथालय असून त्यामध्ये २६,७७० ग्रंथ, ६३ नियतकालिके, ४ साप्ताहिके, ४ पाक्षिके, ३१ मासिके, १ त्रैमासिक व द्विमासिक व १२ वृत्तपत्रे आहेत.

६. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर : महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेने १९६२ ला या महाविद्यालयाची स्थापना केली. सुरुवातीला पी.यु.सी. आर्टस् व कॉमर्स एवढीच परवानगी होती. सुरुवातीला या महाविद्यालयात १२० विद्यार्थी होते त्यात १२ विद्यार्थीनी होत्या. आज अकरावीपासून एम.ए., एमएस्सी. पर्यंतचे वर्ग या महाविद्यालयात चालतात. कला, वाणिज्य विज्ञान शाखेतील सर्व शिक्षण येथे घेता येते. मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास व भूगोल या विषयात एम.ए. गणित, अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स, रसायन शास्त्र व डेअरी सायन्स यामध्ये एम.एस्सी., आणि किमान कौशल्यावर आधारित शिक्षण घेण्याची सोय आहे. व्यावसायिक शिक्षणाची सोय आहे. मराठी व अर्थशास्त्र या विषयात पी.एचडी. करण्याची सोय आहे. या महाविद्यालयात १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात ६० प्राध्यापक, २९ अध्यापक, २३ कर्मचारी व ३१ सेवक आहेत. या महाविद्यालयात ३,००६ विद्यार्थी तर ३९९ विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. खेळण्यासाठी विस्तीर्ण क्रीडांगण असून विविध प्रकारचे देशी विदेशी खेळ खेळण्याची सोय आहे. महाविद्यालयास भव्य व सर्व

सोईयुक्त ग्रंथालय असून त्यात जवळपास ९०,००० पुस्तके आहेत. यात दुर्मिळ व संदर्भासाठी आवश्यक असलेल्या पुस्तकांचा फार मोठा साठा आहे. विविध विषयातील व सामान्य ज्ञानाची १५० नियतकालिके व १६ वृत्तपत्रे येतात. पदवी पदव्युत्तर महिला व प्राध्यापक यांना चार स्वतंत्र अभ्यासिकेची आणि विद्यार्थ्यांसाठी रात्र अभ्यासिकेचीही सोय आहे. विज्ञान विभागासाठी विभागीय ग्रंथालय आहे.

नवोदय विद्यालय : लातूर शहरालगत नवोदय विद्यालयाची स्थापना चिंचोलीराववाडी येथे मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या हद्दीत झालेली आहे. सध्या या ठिकाणी हे विद्यालय कार्यरत आहे.

शिक्षक प्रशिक्षण : प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक तयार करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यामध्ये एकूण ११ अध्यापक विद्यालये चालविण्यात येत असून त्यातील एक अध्यापक विद्यालय उर्दू माध्यमाचे आहे.

सन १९८२-८३ या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यात उदगीर व मुरुड येथील दोनच अध्यापक विद्यालये होती. सन १९९६-९७ मध्ये ही संख्या ११ झाली. सन १९९६-९७ नुसार जिल्ह्यात ११ अध्यापक विद्यालये असून ६४० विद्यार्थी शिक्षक प्रशिक्षण घेत आहेत. या अध्यापक विद्यालयांतील शिक्षकांची संख्या १९९६-९७ नुसार ५९ आहे.

तंत्रशिक्षण[२७] : आपल्या देशात कोणत्याही योजनेची आखणी करताना जास्तीत जास्त सेवा संधीची निर्मिती आणि उपलब्ध मनुष्य बळाचा वापर या बाबींवर विशेष भर देण्यात येत आहे. मनुष्यबळाचा सर्वांगिण विकास करावयाचा असल्यास शिक्षण व प्रशिक्षण देऊनच तो उत्तम प्रकारे साध्य करता येऊ शकतो. समाज जीवनाची गरज लक्षात घेऊन ज्या तांत्रिक शिक्षणाची आखणी करण्यात येते व कालानुरुप त्यात विकास घडवून आणण्यात येतो अशा तंत्रशिक्षणाचे सध्याच्या जगात फार महत्वाचे स्थान आहे. सध्याचे युग हे तंत्रयुग किंवा तज्ज्ञांचे युग आहे. जगातील सर्व देशांनी तंत्रशिक्षणाचे महत्व ओळखून आपल्या नियोजनात त्यासाठी येणाऱ्या खर्चाची योग्य अशी तरतूद केलेली आहे. दुसऱ्या महायुध्दात काही देश बेचिराख होऊनसुध्दा तंत्रज्ञानाच्या जोरावर उभे राहिले व आज जगात ती राष्ट्रे प्रभावी शक्तिशाली राष्ट्रे म्हणून उभी आहेत.

तंत्रशिक्षणाचा उद्देश केवळ तांत्रिक, कुशल कारागिर किंवा शिक्षित तंत्रज्ञ निर्माण करणे एवढाच नसून समाजास उपयुक्त नागरिक पुरविणे हाही आहे. तांत्रिक शिक्षणावर होणारा खर्च व त्याकरिता केलेली सांपत्तिक गुंतवणूक ही पर्यायाने राष्ट्रविकासाकरिता केलेली गुंतवणूकच असते. कुशल तांत्रिक कारागिर व शिक्षित अभियंते यांच्याद्वारे राष्ट्राच्या उत्पादनवाढीचा कार्यक्रम गतिमान होऊ शकतो.

सध्याचे शिक्षण व सेवायोजन विभागांतर्गत असलेला तंत्रशिक्षण हा विषय शासनाने प्रथम १९४८ साली तंत्रशिक्षण संचालनालयाची निर्मिती करून त्यांच्याकडे सोपविला. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून महाराष्ट्र राज्यात सर्व प्रकारच्या तंत्रशिक्षण संस्थांची संख्या वाढविण्यात आल्यामुळे या संचालनालयाचा विस्तार करण्यात आला. संचालनालयाचे प्रशासन कार्यक्षम होण्याकरिता त्याची विभागीय कार्यालये स्थापन करण्यात आली.

भारत सरकाने १९५३ साली तेव्हाच्या उस्मानाबाद जिल्ह्याला एक खाजगी तंत्रनिकेतन देण्याची योजना आखली. बाबासाहेब परांजपे हे खासदार असल्यामुळे १९५६ साली भारतातील पहिले खाजगी तंत्रनिकेतन लातूरला सुरू झाले. हैद्राबाद मुक्ति संग्रामात भरीव आर्थिक मदत करणारे श्री. पुरणमल लाहोटी यांचे नाव तंत्रनिकेतनाला दिले.[२८]

---

२७. महाराष्ट्रातील तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अहवालावरून, १९८७-८८, पृ. १ व २.

२८. बाबासाहेब परांजपे फाऊंडेशन लातूर, यांनी प्रकाशित केलेल्या हँडबीलावरून, प्रकाशक शिवाजी माडे.

सन १९६३ च्या ऑगस्ट पर्यंत राज्यातील तंत्रनिकेतने व इतर काही तांत्रिक संस्थेतील पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्याचे काम तंत्र शिक्षण संचालनालय करीत होते. त्यानंतर स्वतंत्र तंत्र परीक्षा मंडळ स्थापन करण्यात आले व त्याकडे या परीक्षा घेण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

सातव्या पंचवार्षिक योजनेत नविन शैक्षणिक धोरण जाहिर करण्यात आले. त्यामध्ये अधिक दोन (+२) स्तरावर व्यवसाय शिक्षणाकरीता भर देण्यात आला आहे. व्यवसाय शिक्षण दोन प्रकारचे आहे. पहिला प्रकार हा द्विलक्षी अभ्यासक्रम असून त्यामध्ये विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रम हा ऐच्छिक विषय होऊ शकतो आणि पुढे उच्च शिक्षणाकरीताही जाऊ शकतो. दुसऱ्या प्रकारास किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम असे म्हटले असून त्यात जास्त भर प्रात्यक्षिकावर दिलेला असून हा अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १२ वी नंतर पुढील अभ्यासक्रम उपलब्ध नाही.

सध्या लातूर जिल्ह्यात अधिक दोन (+२) स्तरावर द्विलक्षी अभ्यासक्रम राबविणाऱ्या १० संस्था असून त्या लातूर ४, उदगीर ५, अहमदपूर १ या प्रमाणे आहेत. त्यामध्ये एकूण ८ अभ्यासक्रम असून त्यात एकूण ८२५ विद्यार्थी आहेत. किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम २५ संस्थेतून चालविला जातो त्यात एकूण १४ अभ्यासक्रम असून ३,००० विद्यार्थी आहेत. या सर्व संस्था तालुक्यांच्या ठिकाणी असून त्यांची तालुका निहाय माहिती खालील विवरणपत्रात दिली आहे.

अ.क्र.	तालुका	संख्या	विद्यार्थी
(१)	(२)	(३)	(४)
१	अहमदपूर	३	३६०
२	उदगीर	५	६००
३	औसा	३	३६०
४	निलंगा	३	३६०
५	लातूर	११	१,३२०
	एकूण ...	२५	३,०००

सन २००३-०४ अखेर जिल्ह्यात ८ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तर १ अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. शासकीय व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांची प्रवेश क्षमता १,६९९ आहे.

पदवी अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था ३ असून त्यांची पहिल्या वर्षासाठी प्रवेश क्षमता ६०० आहे. पदविका अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था ६ असून त्यांची पहिल्या वर्षासाठी प्रवेश क्षमता ८७० आहे. व्यवसाय शिक्षण संस्था (माध्यमिक व उच्च माध्यमिक गट) ६८ असून त्यांची प्रवेश क्षमता २,७२० इतकी आहे.[२९] तसेच जिल्ह्यात पूर्व माध्यमिक स्तरावर तांत्रिक विषय शिकविणाऱ्या ३ खाजगी व २ शासकीय तंत्रशाळा आहेत. यात एकूण १,४४० विद्यार्थी शिक्षण घेतात. लातूर तंत्रशाळेत खास मुलींकरीता तारतंत्री (वायरमन) अभ्यासक्रम चालू आहे.[३०]

२९. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा,अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,सन २००३-०४,पृ. ५.

३०. लातूर जिल्हा, यथार्थदर्शी योजना, १९९२-९७, पृ.११४.

ग्रंथालये

स्वातंत्र्यपूर्व काळात समाजप्रबोधनास चालना मिळण्याच्या उद्देशाने व आर्य समाजाच्या प्रेरणेने लातूर जिल्ह्यात बलभिम वाचनालय, लातूर (१९३०), मारवाडी वाचनालय, लातूर (१९३९), शिवानंद मोफत वाचनालय, चाकूर (१९३५), संग्राम वाचनालय, उदगीर (१९४२) या ठिकाणी वाचनालये निघाली. त्यामुळे प्रबोधन व लोकजागृतीस चालना मिळाली.[३१]

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रंथालय चळवळीचा एक भाग म्हणून अहमदपूर येथे १९५७ मध्ये नगर वाचन मंदिर या वाचनालयाची स्थापना झाली. तदनंतर निलंगा, औसा, औराद शहाजनी इत्यादी ठिकाणी वाचनालयांची स्थापना झाली.

सन १९९० च्या अखेरीस जिल्ह्यात जिल्हा ग्रंथालय आणि पाच तालुका ग्रंथालये होती. त्यातील लातूर व उदगीर येथील ग्रंथालये 'अ' दर्जा प्राप्त असून उर्वरीत ग्रंथालये 'ब' दर्जाची आहेत. जिल्ह्यात इतरही ग्रंथालये आहेत. लातूर जिल्ह्यात आज मित्तीस कार्यरत असलेल्या एकूण ग्रंथालयांची सविस्तर माहिती मिळविणेसाठी लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचा आधार घेणे आवश्यक आहे.

लातूर जिल्हा ग्रंथालय संघ : ग्रंथालय चळवळीचा प्रचार व प्रसार गतीमान होवून ग्रंथालये लोकाभिमुख व्हावीत यासाठी सार्वजनिक ग्रंथालये उघडण्यास मार्गदर्शन व सहकार्य करणे, मान्यताप्राप्त ग्रंथालयांच्या अडीअडचणी सोडविणे, त्यासाठी ग्रंथालय कार्यशाळा, मार्गदर्शन शिबिर, ग्रंथ प्रदर्शने, ग्रंथालय अधिवेशन घेणे, व वाचकांमध्ये वाचनाभिरुची वाढविणे इत्यादी उद्दिष्ट पूर्तीसाठी लातूर जिल्हा ग्रंथालय संघ, संघाचे अध्यक्ष ॲड. त्रिंबकदास शंकरलाल झंवर यांचे अध्यक्षतेखाली कार्यरत आहे. हुतात्मा स्मारकाच्या इमारतीत संघाचे कार्यालय कार्यरत आहे.

जिल्ह्यातील ग्रंथालयांचे उपक्रम : नगर परिषद लातूर मार्फत चालविण्यात येत असलेले शिवछत्रपती ग्रंथालय हे जिल्ह्यातील एक समृध्द ग्रंथालय असून ग्रंथालयाच्या वतीने 'शिवछत्रपती व्याख्यानमाला' दिवाळी अंकांचे प्रदर्शन, नवीन ग्रंथांचे प्रदर्शन, प्रासंगिक ग्रंथ प्रदर्शन, स्पर्धा परीक्षेची अभ्यासिका इत्यादी उपक्रम राबविले जातात. संशोधक, अभ्यासक व विद्यार्थी या ग्रंथालयाचा संदर्भासाठी सतत आधार घेतात.

बचत ग्रंथालय लातूर : हे ग्रंथालय निबंधस्पर्धा, चित्रकला स्पर्धा आयोजित करते. जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत चालणारे महाराष्ट्रातील हे एकमेव ग्रंथालय आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी मा.उमेशचंद्र सरंगी यांनी या ग्रंथाची मुहूर्तमेढ रोवली. याप्रमाणेच शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्याची, कायदे, नियम व परिपत्रकांची अद्यावत माहिती मिळावी या उद्देशाने तत्कालीन जिल्हाधिकारी मा. राजीव जलोटा यांनी 'राजस्व ग्रंथालय' स्थापन केले. हेही महाराष्ट्रातील एक चांगले उदाहरण आहे.[३२]

वेदप्रतिष्ठान सार्वजनिक ग्रंथालय : या ग्रंथालयातर्फे दर महिन्याला विविध क्षेत्रातील व्यक्तिंचे व्याख्यान आयोजित करण्यात येते. बालवाचक मेळावे, वाचन स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा इत्यादिंचेही आयोजन करण्यात येते. जिल्ह्यातील करकट्टा येथील जयप्रकाश नारायण ग्रंथालय हे देखील वाचनस्पर्धा,

---

३१. **'शारदीय'** अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, श्यामलाल अभियांत्रिकी महाविद्यालय, उदगीर १९९८, पृ.१९०.
३२. अडसुळे पांडुरंग, कार्यवाह, जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवरून.

व्याख्यानमाला, ग्रंथ प्रदर्शन इत्यादींचे आयोजनाबरोबरच ग्रामस्वच्छता अभियान राबविते. शामलाल वाचनालय, उदगीर ; विकास वाचनालय, औसा; अमरज्योती ग्रंथालय, वडवळ नागनाथ; महात्मा गांधी वाचनालय, उदगीर इत्यादीतर्फेही अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

पुरस्कार प्राप्त ग्रंथालये : विकास वाचनालय औसा, बचत ग्रंथालय लातूर, दादाराव कराड सार्वजनिक ग्रंथालय रामेश्वर यांना महाराष्ट्र शासन ग्रंथालय संचालनालयाचे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक पुरस्कार प्राप्त झाले. तसेच शिवछत्रपती ग्रंथालय, नगर परिषद, लातूर यांना राष्ट्रवादी काँग्रेस सार्वजनिक ग्रंथालय विभाग, ग्रंथालय सन्मान पुरस्कार प्राप्त झाला आहे.

उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार : नगर परिषद लातूरच्या शिवछत्रपती ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. पांडूरंग अडसुळे यांना कै.वसंत वरखेडकर आस्थवाईक ग्रंथपाल पुरस्कार, महाराष्ट्र शासन ग्रंथालय संचालनालय डॉ.एस.आर.रंगनाथ उत्कृष्ट ग्रंथालय सेवक पुरस्कार, जीवन विकास ग्रंथालय औरंगाबादचा विभागीय उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार, जिल्हाधिकारी लातूर यांनी उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानपत्र देऊन गौरव केला आहे. अमरज्योती व ग्रंथालय, वडवळ नागनाथचे ग्रंथपाल श्री.सूर्यकांत शिरसे यांनाही अशा स्वरुपाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

खालील विवरणपत्रात जिल्ह्यातील ३१ मार्च २००१ ची तालुकावार वाचनालयांची आकडेवारी व त्यांचा दर्जा दर्शविला आहे.[३३]

ग्रंथालयाचा दर्जा व त्यांची आकडेवारी, २००१

अ.क्र.	जिल्हा		तालुका			इतर				एकूण
(१)	(२)		(३)			(४)				(५)
	अ	ब	अ	ब	क	अ	ब	क	ड	
अहमदपूर	-	-	-	१	-	-	६	२०	२५	५२
उदगीर	-	-	१	-	-	१	-	२२	१८	४२
औसा	-	-	-	१	-	-	१	१८	११	३१
निलंगा	-	-	-	१	-	-	३	७	१६	२७
लातूर	१	-	१	-	-	१	२	१२	१४	३१
	१	-	२	३	-	२	१२	७९	८४	१८३

३३. ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई, यांनी पाठविलेल्या माहितीवरुन.

खालील विवरणपत्रात जिल्ह्यातील शासनमान्य ग्रंथालयांची तालुकानिहाय यादी (३१ मार्च २००८) दिलेली आहे.[३४]

शासनमान्य ग्रंथालयाची तालुका निहाय यादी (३१/३/२००८)
तालुका निहाय यादी, जि. लातूर

अ.क्र.	तालुका	जिल्हा		तालुका			इतर				योजनेत्तर	योजना	योजनेत्तर
		अ	ब	अ	ब	क	अ	ब	क	ड	एकूण		एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)
१	अहमदपूर	०	०	०	१	०	०	१०	३०	१०	५१	६	५७
२	उदगीर	०	०	१	०	०	१	२२	२४	१७	६५	८	७३
३	औसा	०	०	१	०	०	०	१८	४२	२०	८१	६	८७
४	चाकूर	०	०	०	१	०	०	५	२४	६	३६	४	४०
५	जळकोट	०	०	०	१	०	०	५	१६	४	२६	६	४२
६	देवणी	०	०	०	०	०	०	४	१३	८	२५	५	३०
७	निलंगा	०	०	०	१	०	०	११	१४	२४	५०	९	५९
८	रेणापूर	०	०	०	१	०	०	३	२०	१६	४०	४	४४
९	लातूर	१	०	१	०	०	२	१३	३२	२३	७२	८	८०
१०	शिरुर अनंतपाळ	०	०	०	१	०	०	५	१०	१०	२६	७	३३
	एकूण	१	०	३	६	०	३	९६	२२५	१३८	४७२	६३	५३५

आरोग्य

लातूर हे पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील एका तालुक्याचे मुख्यालय होते. स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंत उस्मानाबाद जिल्हा म्हणजे पर्यायाने लातूरसुध्दा निजामी राजवटीच्या अधिपत्याखाली होता. या जिल्ह्यातील आरोग्य सुविधांचा सुरुवातीपासून मागोवा घेता असे लक्षात येते की, आयुर्वेदिक पध्दती हा भारतीय संस्कृतिचा अतिशय महत्त्वाचा घटक असला तरी भारतातील मुस्लिम राज्यकर्त्यांमध्ये आयुर्वेदिक सिध्दांतांच्या बाबतीत कमालीची पोटतिडीक होती. मात्र ते युनानी पध्दतीच्या औषधोपचारास मान्यता देत असत. जे हकीम मुघल साम्राज्याच्या वेळी आपला युनानी पध्दतीचा व्यवसाय देशामध्ये करीत होते, मुघल साम्राज्याच्या उतरत्या कळेबरोबरच त्यांनीही आपला आश्रय गमावला त्यामुळे युनानी हकीमांना दख्खनमार्गे स्थलांतर करावे लागले.

भारतीय भूमीवर इंग्लिश डॉक्टरांचे आगमन १७ व्या शतकात झाले. ब्रिटिश सत्तेच्या भारतातील विकासाबरोबरच पाश्चिमात्य शिक्षणाचा व औषधोपचाराचा देशामध्ये वरचष्मा निर्माण झाला. तरीही जिल्ह्यामध्ये एवढे अज्ञान आणि अंधश्रध्दा होती की, आपल्या आरोग्याच्या समस्या सोडविण्याच्या बाबतीत जिल्ह्यातील लोक उदासिन होते.[३५]

३४. ग्रंथालय संचालनालय मुंबई, यांनी पाठविलेल्या पुस्तिकेवरुन.
३५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७२, पृ. ७१३.

स्वातंत्र्यपूर्व काळातील आरोग्य व्यवस्था : निजामी राज्यात सुरुवातीला स्वतंत्र आरोग्य खाते नव्हते. हैद्राबाद राज्यात पहिली वैद्यकीय शाळा सन १८४६ साली स्थापन झाली. या वैद्यकीय शाळेने आरोग्य सेवेसाठी हैद्राबाद व वऱ्हाड येथील दवाखान्यांकरीता वैद्यकीय अधिकारी व इतर दुय्यम दर्जाच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. सुरुवातीला उर्दूतून व १८८४ पासून इंग्रजी माध्यमातून प्रशिक्षण देण्याची सोय केली.

सर सालारजंग यांच्या कारकीर्दीत स्थापन झालेल्या न्याय, महसूल, पोलीस आणि किरकोळ खात्याची कामे करण्यासाठी नियुक्त केलेल्या विभागीय मंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभाग कार्यरत होता. राज्यातील जन्म, मृत्यूची नोंद पोलीस पाटील ठेवत असत.

इ. स. १८८० च्या सुमारास वैद्यकीय विभाग सुरू करण्यात आला. हैद्राबाद शहरात व उपनगरांत १८८४-८५ मध्ये ६ रुग्णालये व जिल्ह्याच्या ठिकाणी ४८ दवाखाने होते. संस्थानातील सर्व जिल्ह्यांतील दवाखान्यांची संख्या इ. स. १८९१ मध्ये ६७ तर १९०१ मध्ये ८४ इतकी झाली. सर्व दवाखान्यांमधून सर्व प्रकारच्या बाहयरुग्णांवर उपचार करण्यात येत होते. लहान व मोठया शस्त्रक्रीयाही करण्यात येत होत्या. उस्मानाबाद जिल्ह्यात १० रुग्णालये, ३ दवाखाने, ४० खाटांच्या सोयीसह कार्यरत होते. ज्यामध्ये १९०१ ला २३,९०० रुग्णांवर उपचार करण्यात आले त्यामध्ये १०४ अंतर्रुग्ण होते. सामान्यपणे कॉलरा, कांजण्या, ज्वर हे साथीचे रोग १९६१-६४ या कालावधीत जिल्ह्यात मोठया प्रमाणात होते. कॉलऱ्याच्या रुग्णांसाठी १९६२ मध्ये किल्लारी, तेर समुद्रवाणी, होर्टी, माकणी, चिंचोली-काजळी, दाडकी, औराद शहाजनी, जनगाव, कोकलगाव, होळी व बोरसुरी इत्यादी ठिकाणी वेगळे दवाखाने उभारण्यात आले होते.[३६]

उस्मानाबाद या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी एक सरकारी सामान्य रुग्णालय, एक नागरी रुग्णालय व लातूर येथे एक क्षयरोग चिकित्सालय कार्यरत होते. जिल्ह्यातील आयुर्वेदिक, युनानी आणि इतर १४ वैद्यकीय संस्थांचे नियंत्रण जिल्हा परिषदेकडे होते. नगरपालिका प्रसूतिगृहांचे आयोजन करीत असे. जिल्ह्यात १४ ॲलोपॅथीक दवाखाने कार्यरत होते. त्यातील काही आजच्या लातूर जिल्ह्यातील निलंगा, उदगीर, अहमदपूर, औसा इत्यादी ठिकाणी कार्यरत होते. १५ आयुर्वेदिक दवाखानेही कार्यरत होते. त्यातील काही आजच्या लातूर जिल्ह्यातील मातोळा, किल्लारी, जळकोट, वाढोणा, गुंजोटी जेवळी येथे होते. तसेच उस्मानाबाद, येरमाळा, नळगीर या ठिकाणी युनानी दवाखाने कार्यरत होते.

या शिवाय खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणारे २७ हकीम जिल्ह्यात होते. त्यापैकी आजच्या लातूर जिल्ह्यात लामजना, चिंचोली बल्लाळनाथ, लोदगा, हेर, देवर्जन, हाडोळती, मदनसूरी, शिरुर अनंतपाळ, बोरी, सावरगाव, उजनी, वलांडी, सुगाव, नळेगाव आणि आंबुलगा या ठिकाणी ते आपला व्यवसाय करीत होते.

उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली एकूण १५ प्राथमिक आरोग्य केंद्रे होती. आजच्या लातूर जिल्ह्यातील हंडरगुळी, किनगाव, चाकूर, औराद-शहाजनी, देवणी, कासार सिरशी, बेलकुंड, मुरुड या गावी ती कार्यरत होती.[३७] औसा, निलंगा, उदगीर, अहमदपूर याठिकाणी नागरी दवाखाने तर लातूर येथे कुटीर रुग्णालय व नगर परिषद रुग्णालय कार्यरत होते.

मराठवाड्यामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात लातूर हा प्रगतशील तालुका म्हणून कार्यरत होता.

---

३६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. १३-१७.

३७. कित्ता, पृ. २२-२३.

महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याच्या मानाने मराठवाड्यातील आरोग्य सेवा तितकीशी प्रगत नव्हती. मराठवाड्यातील समाजामध्ये असलेले अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा या सर्व बाबी आरोग्य सेवा देण्यामध्ये अडचणीच्या ठरत होत्या. तसेच आरोग्य सेवा देणाऱ्या संस्थांचे प्रमाणही अत्यल्प होते. एक लाख लोकसंख्येला एक प्राथमिक आरोग्य केंद्र अशा मानकानुसार आरोग्य सेवा दिल्या जात होत्या. या सेवा देत असताना साहित्य सामग्री व साधनांची खूप कमतरता होती. विस्तृत कार्यक्षेत्र व अपूरा कर्मचारी वर्ग यामुळे तळागाळातील जनतेपर्यंत आरोग्य सेवा पुरविणे जिकीरीचे होते.

लातूर जिल्हा निर्मितीच्या वेळी लातूर येथे कस्तुरबा गांधी स्मारक सूतिकागृह अस्तित्वात होते. हे सूतिकागृह १९५२ पासून कार्यरत होते. त्याच्या शिलान्यासासाठी (कोनशिला समारंभासाठी) भारताचे पहिले पंतप्रधान श्री.जवाहरलाल नेहरु हे दि.२७.०९.१९५२ रोजी लातूर येथे आाले होते. आज कस्तुरबा गांधी या नावाने कस्तुरबा जिल्हा स्त्री रुग्णालय कार्यरत आहे. त्याचेच रुपांतर लातूर स्वतंत्र जिल्हा अस्तित्वात आल्यानंतर प्रथम कुटीर रुग्णालय व नंतर जिल्हा रुग्णालय करण्यात आले.[३८] लातूर जिल्ह्यात त्यावेळी ९ प्राथमिक आरोग्य केंद्रे अस्तित्वात होती. त्यातील एक पूर्वीच्या बीड जिल्ह्यातील रेणापूर येथे होते.

अहमदपूर, उदगीर, निलंगा व औसा या ठिकाणी स्वतंत्र नागरी दवाखाने कार्यरत होते. याशिवाय लातूर शहरात नगर परिषद रुग्णालय व जिल्हा क्षयरोग रुग्णालय कार्यरत होते. एवढया तुटपुंज्या आरोग्य संस्थांच्या माध्यमातून आरोग्य सेवा पुरविण्यात येत होत्या. असे असले तरी सहा राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची पूर्तता करण्यात येत होती.

सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सेवा

लातूर येथे जिल्हा रुग्णालयाची स्थापना १६ ऑगस्ट १९८२ मध्ये झाली. राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वानुसार बिगर आदिवासी क्षेत्रात ३०,००० लोकसंख्येसाठी एका आरोग्य केंद्राची स्थापना व आदिवासी भागासाठी २०,०००लोकसंख्येसाठी एका प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करण्यात यावी तसेच बिगर आदिवासी क्षेत्रात ५,००० लोकसंख्येसाठी व आदिवासी क्षेत्रात ३,००० लोकसंख्येसाठी एका उपकेंद्राची स्थापना करण्यात यावी. त्याच प्रमाणे ५प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता १ ग्रामिण रुग्णालय स्थापन करण्यात यावे असा मापदंड आहे. त्याप्रमाणे जिल्ह्यात १९८५-८६ साली ४६ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ८ ग्रामीण रुग्णालये व २४८ उप केंद्रे कार्यान्वीत करण्यात आली आहेत. तसेच सामान्य रुग्णालय जे पूर्वीपासूनच अस्तित्त्वात होते त्यात वाढ करण्यात आली आहे.[३९]

जिल्ह्यातील आयुर्मान सर्वसाधारणपणे ५८ वर्षे आहे. जन्माचा अंदाजित दर हा १९८१ साली ३२ होता तो १९८८ साली २८.५ इतका कमी झालेला आहे. त्याच प्रमाणे मृत्यू दर सुध्दा १९८१ साली ९.६ पासून ते १९८८ साली ८ वर आलेला दिसून येतो. १९९१ साली जन्मदर २७.१ होता तर मृत्यूदर ६.३ होता व बालमृत्यूचा दर ४८ होता. सन २००१ मध्ये जन्मदर २४.६ व मृत्यूदर ५ वर आला. बालमृत्यूचे प्रमाण ३८.९ होते.

जिल्ह्यात एकूण २४८ उपकेंद्रे आहेत ती सर्व उपकेंद्रे बिगर आदिवासी भागात असून लातूर जिल्हा हा बिगर आदिवासी जिल्हा आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे ही त्रिस्तरीय पध्दतीत दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

---

३८. कोनशिलेवरील मजकूरांवरून.

३९. लातूर जिल्हा यथार्थदर्शी योजना, १९९२-९७, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, लातूर, पृ. ११५-११६.

जन्म-मृत्यू : जन्म मृत्यू नोंदणीचे काम शहरी भागात नगरपरिषदा आणि ग्रामीण भागात स्थानिक निबंधक (ग्रामसेवक) करतात. ग्रामीण भागात या कामाचे लोकांनी काटेकोर पालन करावे या दृष्टीने लघुपट, भित्तिपत्रके, आकाशवाणी, पंचायतीच्या मासिक सभा आणि दवंडी याद्वारे मार्गदर्शन केले जाते.

१९९१ व २००१ चे जिल्ह्यातील जन्म-मृत्यू दर, बाल मृत्यू दर आणि स्त्री-पुरुष प्रमाण (दर हजार लोकसंख्येमागे) खालील तक्त्यात दर्शविले आहे.[४०]

सन	क्षेत्रफळ चौ.कि.मी.	जन्मदर	मृत्यूदर	बालमृत्यू दर	स्त्री-पुरुष प्रमाण	नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण	ग्रामीण लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण	लोकसंख्येची घनता (प्रति चौ.कि.मी.)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)
१९९१	७१५७	२७.१	६.३	४८	९४४	२०.४	७९.६	२३४
२००१	७१५७	२४.६	५	१०२	९३५	२३.५६	७६.४४	२९१

रोग व प्रतिबंधक उपाय : आधुनिक औषधे व उपचार पध्दतीच्या संशोधनापूर्वी कॉलरा, देवी, गोवर, घटसर्प, क्षय, धनुर्वात, पोटाचे व आतडयाचे विकार, हिवताप तसेच ताप व श्वसनविषयक होणाऱ्या रोगांमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण जास्त असे. परंतु आता विविध रोगांना नागरीकांपासून दूर ठेवण्यासाठी अत्याधुनिक औषधोपचाराबरोबरच विविध रोगांवर संशोधनपूर्वक तयार करण्यात आलेल्या लसी देण्यात येतात. परिणामत: मृत्यू प्रमाण बरेच खाली आले आहे. देवी या रोगाचे तर समूळ उच्चाटन केल्याचा दावा करण्यात येतो. बी.सी.जी., ट्रिपल पोलिओ या लसींच्या परिणामकारक अंमलबजावणीमुळे संबधित रोगांचे प्रमाणही बरेच खाली आले आहे. पुढे काही रोगांवरील प्रतिबंधक उपायाबाबत माहिती दिली आहे.

हिवताप निर्मूलन योजना : जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात या रोगाची लागण झाली होती. या रोगाचे निर्मूलन करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन कार्यक्रमांतर्गत (NMEP-National Malaria Eradication Programme) लातूर येथे ऑगस्ट १९५८ ला एक युनिट स्थापन करण्यात आले. मलेरिया निर्मूलन कार्यक्रम हा साधारणपणे तीन विभागात विभागला होता. (१) हल्ला करणे (२) एकत्रिकरण (३) परिरक्षा-सुस्थितीत ठेवणे. सन १९५८ ते १९६१ या कालावधीत प्रत्येक वर्षीच्या जून ते ऑक्टोबर महिन्यात प्रत्येक घरात डी.डी.टी. फवारण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला.[४१] त्यासाठी लातूर मुख्यालय असलेले एक हिवताप निर्मूलन पथक जिल्ह्यात स्थापन करण्यात आले.[४२]

४०. **सेंसस ऑफ इंडिया**, १९९१, सिरीज-१४, महाराष्ट्र, पार्ट-१२-अे आणि बी, ९ पृ. १ व जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवरून.

४१. **लातूर जिल्हा यथार्थदर्शी योजना**, १९९२-९७, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, लातूर, पृ. १२१, १२३.

४२. **जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ**, उस्मानाबाद, १९६१, पृ. २८.

हिवताप निर्मूलन कार्यक्रम : सन १९५३ पासून राज्यात हिवताप नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यातील प्रमुख टप्पे खालीलप्रमाणे आहेत :—

१९५३ - राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रम.

१९५८ - राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम.

१९७७ - सुधारीत योजना.

१९७९ - बहुउद्देशीय आरोग्य सेवा.

१९९५ - हिवताप कृती योजना नुसार हिवताप विरोधी उपाययोजनाची अंमलबजावणी.

१९९७ - जागतिक बँक अर्थसहाय्यित हिवताप नियंत्रण प्रकल्पाची १६ आदिवासी जिल्ह्यांत अंमलबजावणी.

२००० - राष्ट्रीय हिवताप प्रतिरोध कार्यक्रम.

२००४ - राष्ट्रीय किटकजन्य रोगनियंत्रण कार्यक्रम.

सन २००१-०२ पासून चालू वर्षापर्यंत हिवताप नियंत्रणातील जिल्ह्याची वर्षनिहाय प्रगती खालील विवरणपत्रात दिलेली आहे :—

वर्ष	घेतलेले व तपासलेले रक्त नमुने (आकडे लाखात)	एकूण हिवताप रुग्ण	पीएफ
(१)	(२)	(३)	(४)
२००१-०२	३.१६	४३५	५९
२००२-०३	३.२४	२४९	३५
२००३-०४	३.१४	१५५	३८
२००४-०५	३.०३	१६८	२७
२००५-०६	०.३७	२०	०१

केंद्र व राज्य शासनाच्या आधीन राहून जिल्ह्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध हिवताप विरोधी योजना खालील प्रमाणे आहेत.[४३]

(अ) सर्वेक्षण : (१) नवीन हिवताप रुग्ण शोधण्यासाठी जिल्ह्यातील सर्व वाड्या (पाडे), वस्ती यांचे गाव पातळीवर सर्वेक्षण.

(२) हिवतापासाठी अतिसंवेदनशील विभागात साप्ताहिक तर उर्वरीत भागात पंधरवाडा सर्वेक्षण.

(३) तापाच्या रुग्णांना गावातच नेहमीसाठी हिवताप विरोधी क्लोरोक्विन गोळयाचा उपचार उपलब्ध व्हावा म्हणून जिल्ह्यातील प्रत्येक गावात एक गोळया वाटप केंद्र आहे. सध्या जिल्ह्यात ९९४ क्लोरोक्विन गोळया वाटप केंद्र कार्यरत आहेत.

४३. आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवरुन.

(ब) प्रयोगशाळा : जिल्ह्यात एकूण २९ प्रयोगशाळा तंत्रज्ञ उपलब्ध आहेत. २ ते ३ आरोग्य केंद्रांतील रक्त नमुने तपासणीसाठी एक प्रयोगशाळा कार्यरत आहे. जिल्ह्यात १९ ठिकाणी प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

(क) डास नियंत्रणासाठी उपाय योजना : (१) किटकनाशक फवारणी करणे.

(२) जीवशास्त्रीय उपाययोजना - यामध्ये डासोत्पत्ती स्थानामध्ये डासअळी भक्षक गप्पी मासे सोडण्यात येतात.

(३) किटकनाशक भारीत मच्छरदाण्या-२००१ मध्ये जिल्ह्यातील दोन गावात मच्छरदाण्यांचे वाटप करण्यात आले.

(ड) हिवताप प्रतिरोध महिना जून २००५ : केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जनतेमध्ये हिवताप कार्यक्रमाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी जून महिना हिवताप प्रतिरोध महिना म्हणून या कार्यालयामार्फत तसेच वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या मार्फत विविध उपक्रमाद्वारे गाव पातळीपर्यंत राबविण्यात येतो. उपरोक्त हिवताप विरोधी उपाय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्यातील हिवताप परिस्थिती नियंत्रणात आहे.

डेंगीताप : जिल्ह्यात मागील दोन वर्षांपासून डेंगी रुग्ण आढळून येत आहेत. डेंगी उद्रेकाची मागील ३ वर्षातील माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

अ.क्र.	वर्ष	उद्रेक	एकूण		एनआयव्हीकडे पाठविलेले रक्त, जल नमुने	डेंगी विषाणूयुक्त
			ताप रुग्ण	मृत्यू		
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१	२००२-०३	००	००	००	००	००
२	२००३-०४	०३	२४	००	२४	०९
३	२००४-०५	०७	२०	००	२०	१४
४	२००५-०६ मे अखेर	००	०२	००	०२	००

जिल्ह्यातील डेंगी ताप उद्रेकाची संख्या लक्षात घेऊन प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांमार्फत दरमहा निवडक गावात किटक शास्त्रीय सर्वेक्षण करण्यात येते. या कर्मचाऱ्यांच्या किटकशास्त्रीय पाहणीतील निकषानुसार डेंगी तापाच्या साथीच्या नियंत्रणासाठी पाहणीतील निकषानुसार खालील प्रमाणे उपाययोजना राबविण्यात येतात. तसेच जिल्ह्यातील डेंगी ताप नियंत्रणासाठी वर्ष २००५-०६ साठीच्या कृती कार्यक्रमातील ठळक मुद्ये खालील प्रमाणे आहेत.

- हिवतापाच्या निष्कर्षासाठी ताप रुग्णांचे रक्त नमुने घेऊन रुग्णांना गृहितोपचार.
- तपासणीअंती आढळून येणाऱ्या रुग्णांना समूळ उच्चाटनासाठी उपचार.
- हिवताप रुग्ण आढळून न आल्यास डेंगी तापाच्या साथीची शक्यता गृहित धरुन निवडक.

- ताप रुग्णांचे रक्त, जल नमुने एनआयव्ही (राष्ट्रीय विषाणु विज्ञान संस्था) पुणे येथे विषाणू परिक्षणासाठी पाठविणे.

- एडिस एजिप्टाय डासाचे नमुनेही एनआयव्ही, पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविणे.

याशिवाय यासंबंधातील सर्वतोपरी काळजी घेण्याविषयी नागरिकाना सांगणे.

हत्तीरोग : जिल्ह्यातील हत्तीरोगाचा शोध घेण्यासाठी दिनांक १६ ऑगस्ट २००४ ते दिनांक ३१ ऑगस्ट २००४ या कालावधीत हत्तीरोग शोध मोहिम हाती घेण्यात आली होती. त्यानुसार जिल्ह्यात २,३२४ हत्तीरोग रुग्ण आढळून आले. त्यात अंडवृध्दी १,५१६ तर इतर बाहय लक्षणेयुक्त ८१६ आहेत. जिल्ह्यातील जळकोट, उदगीर, देवणी या तालुक्यांतून हत्तीरोग रुग्णांचे प्रमाण लक्षणीय आहे. त्यामुळे यावर्षी लातूर जिल्हा एमडीए (मास ड्रग ॲडमिनीस्ट्रेशन) अंतर्गत एक दिवसीय सामुदायिक औषधोपचारासाठी निवडण्यात आला आहे. यामध्ये २ वर्षाखालील बालके, गरोदर माता तसेच गंभीर रुग्ण सोडून सर्व लोकसंख्येत वयोमानानुसार डिईसी गोळया वाटप करून खाऊ घालणे. या मोहिमेच्या यशस्वीतेकरीता स्वयंसेवी संस्था अंगणवाडी कार्यकर्ती यांना सामावून घेण्यात येणार आहे.

जिल्ह्यात १९८५ साली एकूण ८५७ हिवतापाचे रुग्ण आढळून आले. त्यावेळी वार्षिक हिवताप निर्देशांक ०.६४ होता. १९९१ सालात लातूर जिल्ह्यात १,९५३ हिवताप रुग्ण आढळून आले व वार्षिक हिवताप निर्देशांक १ वर गेला तो ०.५ वर आणण्याचे प्रयत्न चालू आहेत.

क्षयरोग नियंत्रण : क्षयरोगाचे योग्य निदान व उपचार होण्याच्या दृष्टीने लातूर येथे क्षयरोग चिकित्सालयाची स्थापना करण्यात आली. १९६३ मध्ये या चिकित्सालयात अंतर्रुग्ण म्हणून उपचार केलेल्या रुग्णांची संख्या १,८३६ होती. तर बाहयरुग्ण म्हणून उपचार करण्यात आलेले रुग्ण ५९,१५३ होते. म्हणजे दिवसाला सरासरी रुग्ण ६०.६६ आणि ४२८.२८ एवढे होते. सदर वर्षी करण्यात आलेला एकूण खर्च रुपये २,३२,६२५ एवढा होता. तर १९६४ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात ३ सरकारी रुग्णालये होती. या रुग्णालयापैकी उस्मानाबाद येथील मुलकी रुग्णालयात (सार्वजनिक रुग्णालयात) व्यवसाय उपचार प्रयोगशाळा आणि क्ष-किरण विभाग व ६० खाटांची सोय होती. एक रुग्णवाहिकाही या रुग्णालयाकडे होती. लातूर येथील सरकारी (मुलकी) रुग्णालयात ३८ खाटांची सोय होती. लातूर येथील छाती चिकित्सालयात १२ खाटांची सोय होती. [४४]

क्षयरोगाची लागण झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा तो होऊच नये यासाठी प्रतिबंधक उपाय योजले जातात त्याचाच एक भाग म्हणून बी.सी.जी. लस बालकांस टोचण्यात येते. सन १९९३-९४ मध्ये ४६,०५३ बालकांना लस टोचण्याचे उद्दिष्ट होते, परंतु प्रत्यक्षात ४६,२२० बालकांना लस टोचण्यात आली. [४५]

जिल्ह्यात क्षयरोगाचे प्रमाण दर हजारी १५ ते २० इतके आहे. त्यामध्ये २५% रुग्ण बेडका क्षयरोगाचे जंतू असणारे रोगी असतात. बाकीचे बेडका क्षयरोगाचे जंतू नसणारे असतात. परंतु त्यांचे रोगनिदान क्ष किरणाने घेण्यासारखे असते. क्षय रोगाचे निर्मूलन करण्यासाठी बाहय रुग्णांतून थुंकी नमुना घेण्याचे १८,६६८ लक्ष्य ठेवण्यात आले होते, ते १००% साध्य करण्यात आले.

---

४४. **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ,** उस्मानाबाद, १९६१, पृ. २८.

४५. लातूर जिल्हा यथार्थदर्शी योजना, १९९२-९७, जिल्हा नियोजन व विकास मंडळ लातूर, पृ. १२०.

१९९०-९१ सालात बेडका क्षयजंतू असलेले एकूण १,२७६ रुग्ण व क्ष किरणाने ३,३९३ रुग्ण शोधण्यात आले त्यांचे प्रमाण वार्षिक उद्दिष्टांच्या ८२ व १०३% होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लोकजागृती अत्यंत आवश्यक आहे. म्हणून वारंवार आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे अशा प्रसार माध्यमातून क्षयरोगाविषयी प्रसार होणे उपयुक्त आहे. थुंकी दुषीत नवीन रुग्ण शोधण्यासाठी १,०१८ लक्ष्य ठेवण्यात आले होते. प्रत्यक्षात ८०५ म्हणजे ७९% लक्ष्य साध्य करण्यात आले. शोधलेले थुंकी दुषीत रुग्ण औषधोपचारासाठी ठेवण्याचे लक्ष्य ८०५ होते ते साध्य करण्यात आले. औषधोपचाराच्या माध्यमाने थुंकी दुषीत रुग्ण बरे करण्याचे लक्ष्य ८७९ होते. ते प्रत्यक्षात ६५% इतके पूर्ण झाले. [४६]

नारु निर्मूलन कार्यक्रम : १९८५ साली जिल्ह्यात तीन गावे नारुग्रस्त होती. ज्यामध्ये २२ रुग्ण शोधले गेले होते. या कार्यक्रमांतर्गत शुध्द व सुरक्षित पाणी पुरवठा करण्यासाठी तेथील असुरक्षित पाणी साठ्याचे सुरक्षित पाणी साठ्यात रुपांतर करण्यात आल्यामुळे जिल्ह्यात १९९१ या वर्षात एकही नारुरुग्ण आढळला नाही. निलंगा व उदगीर हे नारुग्रस्त तालुके राज्याच्या सीमेवरील तालुके आहेत. या दोन तालुक्यांतील सर्व गावे अतिजोखमीची समजून तेथे मासिक नारु सर्वेक्षण करण्यात येऊन त्यांची गुणवत्ता पडताळणी करण्यात आली. [४७]

कावीळ [४८] : लातूर जिल्ह्यातील ९४५ गावात व शहरी भागात साथीच्या रोगाचा प्रादूर्भाव होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाही नियमितपणे करण्यात येते. ग्रामपंचायती मार्फत पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या शुध्द-अशुध्दतेबाबत आरोग्य खात्याकडून नियमित तपासणी करण्यात येते. त्यामुळे अनेक जलजन्य आजारावर उदा. हगवण, अतिसार, गॅस्ट्रो, कॉलरा, विषमज्वर, पोलिओ, कावीळ इत्यादी रोगांच्या साथीस प्रतिबंध घालता येतो. दुषीत पाण्यापासून जवळपास ८० टक्के जलजन्य आजारांचे रुग्ण आढळून येतात. ते पाणी शुध्दीकरणामुळे टाळता येते.

लातूर जिल्हा झाल्यापासून मोठया प्रमाणावर अहमदपूरमध्ये 'कावीळ' ची साथ उद्‌भवली होती. त्यानंतर १९९२-९३ मध्ये अधिक पावसामुळे उदगीर शहरात गॅस्ट्रो व कॉलऱ्याची साथ पसरली होती. त्यानंतर मोठा उद्रेक झालेला नाही.

चिकुनगुन्या [४९] : लातूर जिल्ह्यात ताप/डेंगी/चिकुनगुन्याचा उद्रेक सर्वप्रथम मौजे बोरुफळ येथे दि.६ डिसेंबर २००५ व रेणापूर येथे दि.१२ डिसेंबर २००५ रोजी सुरुवात झाली. जिल्ह्यात ३१९ गावात तुरळक व उद्रेक स्वरुपात लागण झाली होती. एकूण ४८,००१ रुग्णांवर उपचार करण्यात आले. हिवताप पाहणी कामी सर्वांचे रक्तनमुने घेऊन तपासण्यात आले. त्याच बरोबर हिवताप नसल्याचे निदर्शनास आल्यास ४८७ रुग्णांचे रक्तजल नमुने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथे पाठविण्यात आले. सामान्य रुग्णालय लातूर येथे १७३ रक्तजल नमुने पाठवून 'एलायजा' टेस्ट करण्यात आली. प्राप्त अहवालाचे अवलोकन करता चिकुनगुन्या व काही गावात डेंगू साथ असल्याचे स्पष्ट झाले.

---

४६. वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद लातूर, सन, २००१-२००२, पृ. १२.
४७. लातूर जिल्हा यथार्थदर्शी योजना, १९९२-९७, जिल्हा नियोजन व विकास मंडळ लातूर, पृ. १२१, १२३.
४८. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद लातूर, यांनी पाठविलेल्या माहितीवरुन.
४९. कित्ता.

सदर लागण 'एडिस एजिप्ती' या डासांद्वारे होत असल्याचे व सदर डास रांजण, माट, पाणी साठवण्याच्या टाक्या, हौद, कुलरमधील पाणी, रिकाम्या बाटल्या, डबे, नारळाच्या करवंटया, टायर्स इ. ठिकाणी लाखोनी तयार होत असल्याचे निदर्शनास आले. या अनुषंगाने दिनांक १५ व २२ एप्रिल २००६ या दिवशी पूर्ण जिल्ह्यात 'ड्राय डे' (कोरडा दिवस) संदेश पोहचवून कार्यवाही करण्यात आली. त्याच बरोबर दर आठवडयात एक दिवस 'ड्राय-डे' (कोरडा दिवस) पाळण्याबाबत जनतेत जाणीव जागृती करण्यात आली.

सदर साथ नियंत्रणात आणण्यासाठी लातूर येथे नियंत्रण कक्षाची स्थापना करून त्याद्वारे संपूर्ण जिल्ह्यावर नियंत्रण करण्यात येत होते. ही साथ आटोक्यात आणण्यासाठीचे सर्व प्रयत्न आरोग्य विभागाने केले. पुन्हा अशी साथ उद्‌भवू नये यासाठीही दक्षता घेण्यात येत आहे. त्याकरीता पाण्याचे साठे दर आठवडयाला एकदा रिकामे करावेत, या साठयाच्या आतील बाजू व तळ घासून, पुसुन कोरडया करून पुन्हा वापरण्याविषयी व पाण्याचे साठे झाकून ठेवण्याविषयी जनतेस आवाहन करण्यात आले. कारण दुषीत डास चावल्यानंतर कोणालाही हा रोग होऊ शकतो. ताप, डोके दुखी, मळमळ, अंगावर पुरळ येणे, सांधेदुखी ही याची प्रमुख लक्षणे आहेत. त्या दृष्टिने खबरदारी घेण्याचे सर्वसामान्य जनतेस सांगण्यात आले.

अंधत्व निवारण : अंधत्व निवारण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांची नोंद करून त्यांच्यावर जिल्हा पातळीवरील पथकामार्फत शस्त्रक्रिया केल्या जातात. जिल्ह्यात अंधत्वाचे प्रमाण १९८५ साली दर हजारी ४ इतके होते. राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमांतर्गत १९८५ ते १९९२ या काळात झालेल्या १,८५,५०० मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे प्रमाण दर हजारी जवळजवळ ३ टक्के कमी झाले.[५०]

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम : या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात अनेक उपक्रम राबविण्यात येतात. १९५४-५५ पासून भारतात सुरू झालेल्या या कार्यक्रमाबरोबर लातूर येथेही कुष्ठरुग्णांवर डॅप्सोन या एकमेव औषधीच्या साहयाने उपचार सुरू करण्यात आले.

कुष्ठरोगावरील उपचारासाठी जिल्ह्यात झोनल लेप्रसी ऑफिसर (ज्यांचे नंतर सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग असे नामकरण झाले.) यांच्या अधिपत्त्याखाली लातूर व उदगीर येथे ग्रामीण भागासाठी प्रत्येकी एक कुष्ठरोग नियंत्रण पथक व त्याच प्रमाणे नागरी भागासाठी पर्यवेक्षीय नागरी कुष्ठरोग पथक ही यंत्रणा व ग्रामीण भागात जिल्हा परिषदे मार्फत पाहणी, शिक्षण व उपचार केंद्रामार्फत कुष्ठरोगावर उपचार करण्यात येत.

१९८१-८२ साली जिल्ह्यात कुष्ठरुग्णांची संख्या १४,५६४ होती, व कुष्ठरुग्णाचे दर हजारी लोकसंख्येशी प्रमाण ११.७३ होते. या कालावधीत जिल्ह्यात कुष्ठरुग्णांवर उपचारासाठी कुष्ठरोग नियंत्रण पथकाअंतर्गत १९६२-६३ पासून असलेल्या ९ सेक्टर्सची संख्या आणखी ११ सेक्टर्सनी वाढविण्यात आली. याच बरोबर लातूर येथील कुष्ठरोग नियंत्रण पथकाखाली १९६९-७० पासून असलेले १५ सेक्टर्स कार्यरत होते. शहरी भागासाठी उदगीर येथे २ व लातूर येथे ४ युएलसी स्थापन झालेल्या होत्या.

डिसेंबर १९९७ पासून जिल्ह्यात जागतिक बँकेच्या साहयाने बहुविध औषधोपचार प्रकल्प सुरू करण्यात आला. या पध्दतीत कुष्ठरुग्णांवर रिफाम्पीसीन, लॅम्प्रीन व डॅप्सोन या औषधांचा उपयोग सुरू झाला.

पूर्वी कुष्ठरोगावरील उपचाराचा कालावधी निश्चित नव्हता व उपचारही प्रभावी नसल्यामुळे बरे होण्याचे प्रमाण अत्यंत नगण्य होते. परंतु एमडीटीचा वापर अत्यंत कमी कालावधीचा म्हणजे संसर्गजन्य

५०. जिल्हा आरोग्य अधिकारी, लातूर, कडील माहिती, पृ. १२०.

रुग्णास २ वर्षे व असांसर्गिक रुग्णास १ वर्षे या प्रमाणे औषधोपचार केला जात असे मात्र औषधोपचार प्रभावी असल्यामुळे रुग्ण निश्चित बरे होत.

१९९६ पासून कुष्ठरोगावरील औषधोपचाराचा कालावधी आणखी कमी करण्यात येऊन तो सांसर्गिक रुग्णासाठी १ वर्षे तर असांसर्गिक रुग्णासाठी ६ महिने ठेवण्यात आला. कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत बहुविध औषधोपचार प्रकल्प प्रभावीपणे राबविल्याने जिल्ह्यातील कुष्ठ रुग्णांचे १९८२ साली दर हजारी सुमारे १२ इतके असलेले प्रमाण २००५-०६ अखेर दहा हजारी लोकसंख्येस ०.६ इतके खाली आले आहे. शासनाने ठरविलेले कुष्ठरुग्ण इलिमिनेशनचे ध्येय लातूर जिल्ह्याने जून २००५ साली साध्य केले.

कुष्ठरोग इलिमिनेशनचे ध्येय साध्य करत असताना जिल्ह्यात ३० जानेवारी २००० ते ६ फेब्रुवारी २००० व ऑक्टोबर २००० ते मार्च २००४ या कालावधीत सुधारित कुष्ठरोग इलिमिनेशन मोहीम, त्याच बरोबर स्वेच्छा निदान केंद्रावर स्वत:हून कुष्ठरोगाच्या निदानासाठी निदान केंद्राची स्थापना अशा मोहीमा राबवून जनतेत कुष्ठरोगाविषयी जनजागृती करण्यात आली. कुष्ठरोगाबाबत जनतेत असलेले गैरसमज, त्यांच्या मनात असलेली भिती व अंधश्रध्दा दूर करून व त्याचबरोबर शासनाकडे असलेल्या प्रभावी औषधोपचाराची जनतेस माहिती देऊन लोकांमधील या रोगास लपविण्याची प्रवृत्ती दूर करून स्वेच्छेने निदानासाठी हजर राहणे बाबतचीही योजना अत्यंत परिणामकारकरित्या राबविली गेली.

बहुविध औषधोपचार प्रकल्पाची जिल्ह्यात सुरुवात करताना आणखी एक महत्वाचा व संशोधनाबाबत प्रकल्प १९८८ मध्ये इंटरनॅशनल कॅन्सर रिसर्च सेंटर, मुंबई येथील डॉ. देव यांचे मार्फत सुरू करण्यात आला. हा प्रकल्प कुष्ठरोगाविरुध्दची लस निर्माण करण्याचे काम करतो. (आयसीआरसी व्हॅक्सीन) हा प्रकल्प १९८८ ते १९९३ पर्यंत राबविण्यात आला. या प्रयोगाचे निष्कर्ष जरी जाहीर करण्यात आले नसले तरी कुष्ठजंतूचा संसर्ग कमी करण्यात त्याची मदत झाली असा संस्थेचा दावा आहे.

लातूर जिल्ह्यात कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी अनेक योजना राबविण्यात येतात.

(१) कुष्ठरोग्यांसाठी लातूर येथे स्वयंभू कुष्ठ वसाहत आहे. या वसाहतीत ६५ रुग्ण व त्यांचे नातेवाईक राहतात. त्यांना नगरपरिषदेमार्फत इंदिरा आवास योजनेखाली पक्की घरे देण्यात आलेली आहेत. या ठिकाणी शासनामार्फत त्यांना दर आठवडी ठरलेल्या दिवशी (दर मंगळवारी) वैद्यकीय अधिकारी व कुष्ठ तंत्रज्ञामार्फत मोफत उपचार, मलमपट्टी इत्यादी करण्यात येतात.

संजय गांधी निराधार योजना, समाजकल्याण खात्यांमार्फत त्यांना खडू बनविणे, सायकल दुरुस्ती, कोंबडी /शेळी पालन इत्यादी प्रकारच्या स्वयंरोजगारासाठी कर्ज दिले जाते. त्याचबरोबर त्यांना रेल्वे/एस. टी. प्रवासासाठी सवलतीच्या दरात पास दिले जातात.

अंत्योदय योजनेखाली जिल्ह्यातील कुष्ठरुग्णांना धान्याचा पुरवठा होतो. गरजू कुष्ठरुग्णांना दरवर्षी जिल्हा कुष्ठरोग समिती मार्फत मोफत एमसीआर चप्पल, गॉगल व चादरी देण्यात येतात. विकृती आलेल्या कुष्ठरुग्णावर दरवर्षी शासनामार्फत व मिरज येथील रिचर्डसन लेप्रसी रुग्णालयामार्फत पुनर्रचनात्मक शस्त्रक्रीया केल्या जातात.

नाशिक येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात योग्य त्या कुष्ठरुग्णास स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देण्याची सोय आहे.

कुष्ठरोग निवारणार्थ या जिल्ह्याने केलेल्या उत्कृष्ट कामाची नोंद आंतरराष्ट्रीय पातळीवर युनोने घेतली आहे.[५१]

५१. डॉ. शेंडगे यांनी पाठविलेल्या माहितीवरून.

कुटुंब कल्याण : जिल्ह्यात कुटुंब नियोजनाची स्वतंत्र सुरूवात १९८२ पासून करण्यात आली. सदरहू योजनेचा उद्देश कुटुंब मर्यादित ठेवून जीवनमान उंचावणे व लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणे असा असल्यामुळे या कार्यक्रमामध्ये जिल्हा निर्मिती पासूनच प्राधान्याने नियोजनबध्द आखणी करून त्याप्रकारे प्रत्यक्षात अंमलबजावणी केलेली आहे.

कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत कुटुंब मर्यादित ठेवण्यासाठी तांबी, गर्भनिरोधक गोळ्या व निरोध इत्यादी साधनांचा वापर करण्यात येतो.[५२] जिल्ह्यात एकूण १० तालुके, १० पंचायत समित्या, ०५ नगरपालिका, आणि ७८८ ग्रामपंचायती (९४५ गावे) आहेत.

जिल्ह्यातील आरोग्य संस्थांची माहिती खालील प्रमाणे आहे.[५३]

(१) वैद्यकीय महाविद्यालय	१ + १	(८) प्राथमिक आरोग्य केंद्रे	४६
(२) जिल्हा रुग्णालय	०१	(९) आयुर्वेदिक दवाखाने	०७
(३) जिल्हा क्षयरोग रुग्णालय	०१	(१०) आयुर्वेदिक वै. महाविद्यालय	०२
(४) स्त्री रुग्णालय	०१	(११) युनानी दवाखाने	०१
(५) नगरपरिषद रुग्णालय	०१	(१२) होमियोपॅथी वैद्य महाविद्यालय	०१
(६) ग्रामीण रुग्णालये	०९	(१३) आरोग्य उपकेंद्र	२४८
(७) नागरी दवाखाने	०४	(१४) ए.बा.वि.से.यो.प्रकल्प	१०

उपरोक्त शासकीय आरोग्य संस्थाबरोबरच शासकीय जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्र १९८३ पासून कार्यरत आहे. खास बाब म्हणजे या केंद्राच्या बांधकामासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने मदत केलेली आहे. त्याबरोबर आरोग्य कार्यक्रमाचे नियोजन व नियंत्रण करण्याचे दृष्टिने येथे उपसंचालक, आरोग्य विभाग यांचे कार्यालयही कार्यरत आहे. त्यांच्या अखत्यारीत लातूर, उस्मानाबाद, बीड व नांदेड हे जिल्हे येतात.[५४]

लातूर येथे रुग्णांची संभाव्य गरज लक्षात घेऊन रक्त संकलनासाठी भालचंद्र रक्तपेढी (Bhalchandra Blood Bank) कार्यरत आहे. या पेढीतर्फे जिल्ह्यात चार ठिकाणी रक्त साठा ठेवण्याची सोय आहे. डॉ.भालचंद्र हे प्रसिध्द नेत्रतज्ज्ञ म्हणून नावाजले होते. त्यांनी आपल्या हयातीत हजारो नेत्रशस्त्रक्रीया विनामूल्य केल्या. त्यांचा गौरव म्हणून त्यांच्या १० जून या जन्मदिनी हा दिवस 'नेत्रदिन' म्हणून महाराष्ट्र शासनातर्फे पाळण्यात येतो.

महाराष्ट्र राज्यात (मुंबई राज्यात) कुटुंब कल्याण कार्यक्रम १९५७ पासून कार्यरत असून महाराष्ट्र राज्याने सदर कार्यक्रमात १३ वेळा राष्ट्रीय पारितोषिके मिळविली आहेत. या कार्यक्रमाचा १००% टक्के खर्च भारत सरकार करते. महाराष्ट्रात हा कार्यक्रम आपली बांधीलकी म्हणून लोकांच्या सहकार्य व सहभागाने राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात सदर कार्यक्रम जिल्हा स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत म्हणजेच जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येत आहे. या कामासाठी लोकांत जाणीव निर्माण करण्याच्या हेतूने विविध ठिकाणी प्रशिक्षण शिबिरे घेऊन जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जातो. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश जनन

५२. डॉ. शेंडगे यांनी पाठविलेल्या माहितीवरून.
५३. आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवरून.
५४. डॉ.शेंडगे यांनी पाठविलेल्या माहितीवरून.

प्रमाण कमी करून लोकसंख्या विस्फोटाचे नियंत्रण करणे हा आहे. जननप्रमाण घटण्यासाठी खालील उपाय योजनांचा नवीन कार्यपध्दतीत अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

(१) सर्व स्तरांतील नेतृत्वाला या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी करून त्यांचे मार्फत लोकांना प्रत्यक्ष सहभागी करून घेणे.

(२) लोकांमधील सर्व तऱ्हेची भिती, पूर्वग्रहदुषीत, चुकीच्या कल्पना इत्यादी गोष्टी नाहिशा करण्यासाठी आरोग्य शिक्षणाचा कार्यक्रम आयोजित करणे.

(३) सर्व सरकारी व स्वयंसेवी संस्थांना या कार्यक्रमात सहभागी करून घेणे.

(४) मुलीचे लग्नाचे वय वाढविण्यासाठी लोकसहभाग मिळविणे, दोन मुलांत अंतर वाढविण्यासाठी जनजागृती करणे.

(५) एक किंवा दोन मुलीवर शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या दाम्पत्याचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार तसेच दोन मुलीवर शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या दाम्पत्याच्या प्रत्येक मुलीच्या नावे रु.५०००/- (रुपये पाच हजार) चे राष्ट्रीय बचत प्रमाण पत्र काढणे इत्यादी योजनांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत लोकसंख्या कमी करण्यासाठी पाळणा लांबविणे आणि पाळणा थांबविणे हे कार्यक्रम मुख्यत्वे आयोजित केले जातात. पाळणा लांबविण्यासाठी निरोध, तांबी व गर्भनिरोधक गोळया या विवाहित जोडप्यासाठी वापरण्यात येत असून त्यायोगे दोन मुलांत अंतर वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. दोन किंवा तीन अपत्यानंतर पाळणा लांबविण्यासाठी करायचा उपाय म्हणून निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्यात येते.

कुटुंब कल्याण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे सन २००० पासून लातूर जिल्ह्याचे जन्मप्रमाण खालील प्रमाणे आहे.[५१]

२००० - २६.२, २००१ - २३.७, २००२ - २३.००, २००३ - २३.४, तर २००४ - २२.६

लातूर जिल्ह्यातील कुटुंब नियोजन कार्यक्रमविषयक आकडेवारी

वर्ष	केंद्रे		कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया		वापरली गेलेली संततीनिरोधक साधने	
	स्थानिक प्रा.आ.केंद्रे	फिरती	पुरुष	स्त्री	नाव	संख्या
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१९९४-९५	४०	--	--	१४,३६८	१. गर्भनिरोधक गोळ्या	१०,९४९
					२. निरोध	९,२५८
					३. तांबी	११,८५१
२०००-२००१	४६	--	१०	१५,९७५	१. गर्भनिरोधक गोळ्या	७,५५३
					२. निरोध	१२,५६२
					३. तांबी	१०,१६६
२००४-२००५	४६	--	२०३	१७,५१९	१. गर्भनिरोधक गोळ्या	९,१७८
					२. निरोध	९,०९७
					३. तांबी	१०,३१२

५५. आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवरून.

कुटुंब कल्याण कार्यक्रम आणि स्वयंसेवी संस्था

कुटुंब कल्याण कार्यक्रम शासकीय संस्थाप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वयंसेवी संस्था यांनी चालविलेल्या रुग्णालयांमार्फत राबविला जातो. या संस्थांमार्फत कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करणे, गर्भाशय वलय/कॉपर-टी बसविणे संतती प्रतिबंधक साधनांचे वाटप, माता-बाळ संगोपन सेवा, शैक्षणिक कार्य इत्यादी कार्य केली जातात.

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी संबंधित संस्थाकडील रुणालयांमध्ये राखीव खाटा सुसज्ज ठेवल्या जातात, त्या स्थानिक व स्वयंसेवी संस्थांना राखीव खाटा सुसज्ज ठेवण्यासाठी सहाय्यक अनुदान दिले जाते.

केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या माणकानुसार प्रत्येक राखीव खाटेच्या मोबदल्यात एका वर्षासाठी एकूण ६० कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया होणे बंधनकारक आहे. त्याप्रित्यर्थ एका राखीव खाटेसाठी एका वर्षाला रु.६,००० सहाय्यक अनुदान दिले जाते.[५६]

ग्रामीण कुटुंब कल्याण सेवा : ही सेवा ग्रामीण भागासाठी असून ग्रामीण भागात कुटुंब कल्याण उपकेंद्रे कार्यरत आहेत.

नागरी कुटुंब कल्याण सेवा : राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत नागरी कुटुंब कल्याण सेवा व आरोग्य सुविधा (हेल्थ पोस्ट) या योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. या योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत आहेत. या योजनेमार्फत महानगरपालिका व नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविला जातो. हा कार्यक्रम राबविण्यासाठी स्थानिक व स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेण्यात येतो. या संस्था या कार्यक्रमात स्वेच्छेने सहभागी झाल्या असून त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या कार्याचा विचार करता त्यांना केंद्र शासन आर्थिक सहाय्य अनुदानाच्या स्वरुपात देते.

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम[५७] **:** भूकंपापासून मानसिक आजाराच्या संदर्भातील सामाजिक समस्येचे गांभीर्य जाणून केंद्र शासनाने ऑगस्ट १९८२ मध्ये राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमाची सुरुवात केली. त्याप्रमाणे जिल्ह्यातील सर्व जनतेला लाभ होण्याच्या दृष्टीने या कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. त्याचा एक भाग म्हणून जिल्हा रुग्णालयात दहा खाटांचा मनोविकृती विभाग सुरू करण्यात आला आहे. या विभागात आंतररुग्ण व बाहयरुग्ण सेवा उपलब्ध असून त्यातील तज्ञ डॉक्टरांची सेवा, इ.सी.टी व समुपदेशन सेवा उपलबध आहेत.

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टये खालील प्रमाणे आहेत.

(१) मानसिक आरोग्य सेवा ही इतर आरोग्य सेवेबरोबर दूर खेड्यापाडयात पोहोचविणे.

(२) मानसिक आरोग्य सेवेतील निरनिराळी कामे व जबाबदाऱ्या योग्य प्रकारे नेमून देणे.

(३) सर्वसाधारण आरोग्य सेवेमध्ये मानसिक आरोग्य सेवा एक अविभाज्य घटक बनविणे.

(४) या सर्व योजना सामाजिक विकासाच्या योजनेशी निगडित करणे.

---

५६. कार्यक्रम अंदाजपत्रक, कुटुंब कल्याण कार्यक्रम, महाराष्ट्र शासन, २००४-०५ पृ. २७.

५७. कार्यक्रम अंदाजपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, २००४-०५, पृ. ११.

लातूर जिल्ह्याची कुटुंब नियोजनातील आकडेवारी

वर्ष	केंद्रे		कुटुंब नियोजन		वापरली गेलेली विभायक साधने		
	स्थानिक	फिरती	पुरुष	स्त्री	तांबी	ओपी	निरोध
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१९८२-८३	०९	०१	१,५८५	१०,०६९	५७१	२६,२०८	१,३०,७५२
१९८५-८६	०९	--	४४६	१४,६०४	१२,३२१	५३,७८९	११,४२,५९८
१९९०-९१	०९	--	०६	१२,२७७	९,७६२	१,१३,४१२	१६,३२,५८१
१९३२-९४	०९	--	०७	१४,०३३	११,६४४	१,३५,६५५	२४,८९,६१६

माता व बालसंगोपन कार्यक्रम : कुटुंब कल्याण कार्यक्रमाची यशस्वीता ही माता व बाल संगोपनाच्या कार्यक्रमावरच अवलंबून आहे. नोव्हेंबर १९६९ पासून तो राज्यात कार्यान्वीत करण्यात आला. लातूर जिल्हा हा सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रमात निवडण्यात आला आहे. या करीता गरोदर माता व ० ते १ वर्षे वयोगटातील बालकांना १००% लसीकरण करण्यासाठी विशेष पाउले उचलण्यात आली आहेत. साधारणत: एकूण लोकसंख्येच्या ३% बालके ० ते १ वर्षे वयोगटातील असतात. लसीकरणाने प्रतिबंध होणाऱ्या रोगांना दरवर्षी १००% लसीकरण करण्याचे उद्दिष्ट असते. याचाच अर्थ असा की, ४४,४५० मुलांचे दरवर्षी लसीकरण झाले पाहिजे. लातूर जिल्ह्यात २ तालुक्यांत एकात्मिक बालविकास योजना लागू करण्यात आली आहे.

सन १९९३-९४ मध्ये या योजने अंतर्गत ४६,२२० बालकांना बी.सी.जी. लस देण्यात आली. प्रत्यक्षात हे उद्दिष्ट ४६,०५३ एवढे होते, ट्रिपल ४४,७०० बालकांना, पोलिओची लस ४५,१७० बालकांना, डी.टी. ३६,६५३, टी.टी. ५,३०९, जीवनसत्व 'अ' ४१,७७४ तर लोहयुक्त गोळया ४३,५१४ मातांना आणि ४३,५७८ बालकांना देण्यात आल्या.[५८]

पल्स पोलिओ लसीकरण : जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पोलिओ निर्मूलन कार्यक्रम महाराष्ट्रात कार्यान्वित असून सन १९९५-९६ पासून पल्स पोलिओ लसीकरण मोहिमांमुळे राज्यातील पोलिओ रूग्णांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. सदर मोहिम लातूर जिल्ह्यातही १००% यशस्वी करण्यात आली आहे. सन १९९९-२००० सालातील पहिली दोन सत्रे यशस्वीरित्या पार पडली. सातत्याने ही मोहिम या जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ० - ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओचे दोन डोस दिले जातात. या शिवाय ज्या ठिकाणी पोलिओचा रूग्ण आढळून येतो त्या व त्याभोवतीच्या कार्यक्षेत्रात विशेष पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविण्यात येते. सन २००३-०४ सालात जिल्ह्यात मॉपअप राऊंड २९/६-४/७/०३ पहिला व १०/८-१६/८/०३ दुसरा राबविण्यात आला.[५९]

५८. लातूर जिल्हा यथार्थदर्शी योजना, १९९२-९७, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, लातूर, पृ. १२१-१२३.
५९. कार्यक्रम अंदाजपत्रक, २००४-०५, कुटुंब कल्याण कार्यक्रम, पृ. १९. आणि जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.लातूर यांनी पाठविलेल्या माहिती आधारे

शालेय आरोग्य कार्यक्रम : शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम १९९६ पासून मोहिम स्वरुपात राबविण्यात येतो. हा कार्यक्रम शालेय विद्यार्थ्यांमधील आजारपणाचे व मृत्यूचे प्रमाण कमी करणे, वैयक्तिक व परिसर स्वच्छता विद्यार्थ्यांच्या अंगी बाणविणे, आरोग्यदायी व सशक्त पिढी निर्माण करणे या उद्देशाने राबविण्यात येतो. यामध्ये प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ते ४ मधील मुलांची वैद्यकीय तपासणी करणे, आजारी व सदोष मुलांना उपचार देणे, आवश्यकता भासल्यास पुढील उपचार व अन्वेषणासाठी मुलांना जिल्हा रुग्णालयाकडे, सुपर स्पेशिअलिटीकडे शिफारस करून पाठविणे, गंभीर आजारी मुलांचा उपचारासाठी पाठपुरावा करणे. उदा. हृदय शस्त्रक्रिया, टॉन्सील्स इत्यादींचा समावेश आहे.

शालेय आरोग्य तपासणी अहवाल माहे ऑक्टोबर २००५ अखेर :

शालेय आरोग्य कार्यक्रम

(अ) एकूण प्राथमिक शाळांची संख्या १,२१० एकूण तपासलेल्या प्राथमिक शाळांची संख्या मासिक २८६ प्रगतपर १,२१०

(ब) एकूण माध्यमिक शाळांची संख्या ६१० एकूण तपासलेल्या माध्यमिक शाळांची संख्या मासिक ० प्रगतपर ०

(क) एकूण आश्रम शाळांची संख्या ६४ एकूण तपासलेल्या आश्रम शाळांची संख्या

पहिली तिमाही ० ०

दुसरी तिमाही ५ ४४

तिसरी तिमाही ० ०

(ड) शालेय आरोग्य तपासणी अहवाल माहे ऑक्टोबर ०५ अखेर जिल्हा परिषद, लातूर.

बाब	प्राथमिक शाळा		मा. शाळा		प्राथमिक आश्रम शाळा					
	मासिक	प्रगतपर	मासिक	प्रगतपर	पहिली तिमाही		दुसरी तिमाही		तिसरी तिमाही	
					मा.	प्र.	मा.	प्र.	मा.	प्र.
एकूण हजेरीपटावरील विद्यार्थ्यांची संख्या	२,४५,९६०	२,४५,९६०	----	----	----	----	१७,६३८	१७,६३८	-----	----
तपासलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	५२,०३२	१,३४,१७१	----	----	----	-----	१,९११	१,०४७	-----	----
दोषी विद्यार्थी संख्या	१३,८६५	३२,३०९	----	----	----	-----	१३५	८७६	-----	----
कुष्ठरोग	२	४	----	----	----	-----	----	----	----	-----
क्षयरोग	----	----	----	-----	----	----	----	-----	----	-----
खरुज	७४१	१,३२७	----	-----	----	----	४०	१४९	----	-----
दंतक्षय (केरीज)	१,४८५	५,४२३	----	-----	----	----	८३	२०५	-----	----
पोलिओने आलेले अपंगत्व	----	----	----	-----	----	----	----	-----	-----	----
अ जीवनसत्वाचा अभाव	----	----	----	-----	----	----	----	-----	-----	----
रातांधळेपणा	४९१	१,६३३	----	-----	----	----	३१	१०३	----	-----
कान फुटणे	५२४	१,३१८	----	-----	----	----	३९	११४	----	-----
कृमी संसर्ग	३,५९५	६,०१७	----	-----	----	----	२०	२१५	----	-----
रक्तक्षय	१,२४१	३,७७२	----	-----	----	----	२०४	३००	----	-----
इतर आजार	२,३६९	५,६२४	----	-----	----	----	३१	९४	----	-----

या सर्व विद्यार्थ्यांवर जाणीवपूर्वक उपचार करण्यात आले.

Maharashtra State Gazetteers

आश्रम शाळेतील मुलांना आरोग्य सेवा देणे : आश्रम शाळेतील मुलांची दर तीन महिन्यांत एकदा वैद्यकीय तपासणी करणे, आजारी व सदोष मुलांना उपचार व सेवा पुरविणे.

सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना (सुधारित) : राज्य शासनाने सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेत ज्या कुटुंबानी एक किंवा दोन मुलीनंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करून घेतली असेल व ज्यांना मुलगा नाही त्यांना प्रोत्साहनात्मक बक्षीस जाहीर केले आहे. सदरची योजना ही दारिद्रयरेषेखालील कुटुंबाना लागू होते. सदर योजनेनुसार एक मुलगी असल्यास रू. १०,००० व दोन मुली असल्यास प्रत्येकी रू. ५,००० प्रमाणे रू. १०,००० भारतीय युनिट ट्रस्टच्या चिल्ड्रन कॅरिअर योजनेखाली युनिट देण्यात येतात. सदर योजनेखालील रक्कम १८ वर्षे पूर्ण होताच देय असणार आहे. उपरोक्त मुली १०वी उत्तीर्ण झाल्यास त्यांना रु.५०००/- ची ५ वर्षाची राष्ट्रीयीकृत बँकेतील मुदत ठेव देण्यात येणार आहे. मात्र त्यांनी २० वर्षापर्यंत विवाह न केल्यास त्या सदर लाभास पात्र ठरणार आहेत.

राज्य सरकार आणि जिल्हा परिषद लातूर हे पुरवित असलेल्या आरोग्य सेवेबरोबरच शहरातील नागरिकांना आरोग्य सुविधा प्रदान करण्याचे कार्य नगरपरिषद लातूरच्या आरोग्य विभागामार्फत पार पाडण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून सन २०००-०१ या वर्षी नगरपरिषद क्षेत्रामध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय, लातूर, जिल्हा स्त्री रुग्णालय लातूर, नगरपरिषद दवाखाना पटेल चौक, लातूर, नगर परिषद दवाखाना भोईगल्ली लातूर, नगरपरिषद दवाखाना खोरीगल्ली लातूर, इत्यादी केंद्रे आरोग्य सेवा पुरविण्यासाठी कार्यरत होती. तसेच सरकारी पशुचिकित्सालय, लातूर कार्यरत होते.

सन २००४-०५ मध्ये उपरोक्त केंद्राव्यतिरिक्त नगरपरिषद दवाखाना, लेबर कॉलनी लातूर व नगरपरिषद फिरता दवाखाना (Mobile Dispensary) इत्यादी कार्यरत होते.[६०]

नगर परिषद दवाखाना, लातूर

कृती कार्यक्रमविषयक माहितीदर्शक विवरणपत्र

अ.क्र.	दर्शक	२००१-०२	२००२-०३	२००३-०४	२००४-०५
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	नळी, नलिका	१,४६६	१,४८६	१,३३९	७५३
२	तांबी	८४९	९६१	१,२१०	१,०१५
३	गर्भ निरोधक गोळ्या	३,२३२	३,५२९	११,११६	१,१५७
४	निरोध	१,६४२	२,४१५	१०,५९०	१,०१६
५	मुख्य शस्त्रक्रिया	९२	७०	९०	७३
६	लघु शस्त्रक्रिया	९६	१२४	१०५	९७
७	बाहय रुग्ण	५८,६९६	५३,७६३	६२,७२२	७,०८१
८	आंतर्रुग्ण	१,६६३	१,४२६	१,६५८	२,३२०
९	प्रसूति	९०१	९०३	९६६	९४१
१०	प्रसूतीपूर्व काळजी	६,१०५	६,२५०	६,५९४	२,२२०

लातूर जिल्ह्यातील खाजगी वैद्यकीय सेवा : शासकीय यंत्रणेशिवाय जिल्ह्यातील खाजगी वैद्यकीय सेवा पाहता ह्या जिल्ह्यातील तालुके निजाम इलाख्यात असल्याने १९४० पर्यंत जवळजवळ पारंपारिक आयुर्वेदिक पठडीतील वैद्य आणि तत्कालीन मुस्लीम पद्धतीतील युनानी हकीम यांच्याशिवाय कोणतीही

६०. नगर परिषद, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवरुन.

आरोग्यसेवा उपलब्ध नव्हती. १९४० नंतर प्रत्येक तालूक्यात शासकीय सेवा उपलब्ध होऊ लागली. खाजगी क्षेत्रात पारंपारिक वैद्य आणि युनानीशिवाय हैद्राबादच्या आयुर्वेदिक कॉलेजमधून पास झालेले GCAM (ग्रॅज्यूएट कोर्स इन आयुर्वेदिक मेडिसन) पदवीधारकही १९५० च्या सुमारस येऊ लागले. त्यांनी आयुर्वेदिक सेवेशिवाय आधुनिक वैद्यकीय ॲलोपॅथिक सेवा देण्यास सुरूवात केली. पण ही सेवा अत्यंत तुटपुंजी होती आणि जिल्ह्याच्या किंवा काही प्रमुख तालुक्यांच्या ठिकाणीच उपलब्ध होती. १९६० नंतर मात्र ही सेवा संख्येने आणि गुणवत्तेने काही प्रमाणात प्रसार पावू लागली. १९६० मध्ये लातूर येथे दोन ॲलोपॅथिक पदवीधर व १०-१२ आयुर्वेदिक शाखेचे डॉक्टर्स होते तेथे आज सर्व शाखांचे तज्ज्ञ डॉक्टर्स मिळून ही संख्या ४५० च्या जवळपास गेली आहे. उदगीरमध्ये १ किंवा २ ॲलोपॅथिक पदवीधर डॉक्टर्स व ५-६ आयुर्वेदिक शाखेचे पदवीधर होते तेथे आज विविध शाखांतील तज्ज्ञ मिळून डॉक्टर्सची संख्या २०० च्या जवळपास गेली आहे. पण लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की ही वाढ फक्त शहरामधूनच दिसून येत होती. ग्रामीण भागात वैद्यकीय सेवेची वानवाच होती. १९८० नंतर मात्र वैद्यकीय सेवेची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ जोमाने झाल्याचे चित्र दिसते. १९८० नंतरच ही अशासकीय खाजगी वैद्यकीय सेवा ग्रामीण भागातही अल्प प्रमाणात का होईना दिसून येऊ लागली.

लातूरात बहुतेक विशेष सेवा (स्पेशालिस्ट) उपलब्ध आहेत. ह्रद्याच्या शस्त्रक्रिया, मेंदूच्या अतिप्रगत शस्त्रक्रिया, कॅन्सर क्ष-किरणोपचार आमि इंद्रियरोपण अशा अत्याधुनिक सेवा सोडल्यास सर्व सेवा आज लातूरात उपलब्ध आहेत. १ ह्रद्यरोग तज्ज्ञ (कार्डिऑलॉजिस्ट), २ प्लास्टिक सर्जन्स, २ लहान मूलांच्या विकाराचे शल्यविशारद (पीडिॲट्रिक सर्जन्स), २ मज्जातंतुशल्यविशारद (न्यूरॉसर्जन्स), १ मूत्ररोग शल्यचिकित्सक (युरॉलॉजिस्ट), ७ मानसोपचार तज्ज्ञ (सायकॉलॉजिस्ट), ३२ सामान्य औषधोपचार तज्ज्ञ (जनरल फिझिशिअन्स), ७ छातीच्या विकाराचे तज्ज्ञ (चेस्ट फिझिशिअन्स), १४ कान, नाक, घश्याचे शल्यचिकित्सक (इएनटी सर्जन्स), ६८ स्त्री रोग तज्ज्ञ (गाइनॅकॉलॉजिस्टस), ४२ लहान मुलांचे विशेषज्ञ (पीडिॲट्रिशन्स), ३० शल्यचिकित्सक (जनरल सर्जन्स), २५ डोळ्यांचे विशेषज्ञ (ऑप्थलॉमॉलॉजिस्ट), २५ अस्थिरोग तज्ज्ञ (ऑर्थोपेडिक सर्जन्स), २१ विकृतिविज्ञान तज्ज्ञ (पॅथॉलॉजिस्टस), १२ क्ष-किरणचित्रविद्या विशारद (रेडिऑलॉजिस्टस), २२ भूल तज्ज्ञ (ॲनेस्थेटिस्टस), ७ त्वचारोग तज्ज्ञ, १ मधुमेह तज्ज्ञ (डायबेटॉलॉजिस्ट), ४ पदव्युत्तर दंत विशारद (डेन्टिस्ट), ३ भौतिकोपचार तज्ज्ञ (फिझिऑथेरपिस्टस), २७ सामान्य वैद्यकीयसेवक (प्रॅक्टिशनर्स), २७ पदवीधारक दंत वैद्य (डेन्टिस्टस), १४२ आयुर्वेदिक शाखेचे पदवीधर (बीएएमएस), ४२ होमिऑपॅथिक शाखेचे पदवीधर (डीएचएमएस) असे जवळजवळ ४५० पदव्युत्तर पदवी किंवा पदविका असलेले (M.D., M.S.D.Ch., D.Ortho, DGO.D इ.) आणि पदवीधर (MBBS, BAMS, DHMS) असलेले डॉक्टर्स वैद्यकीय सेवा पुरवत आहेत. या शिवाय ३ अशासकीय रक्तपेढ्या (ब्लडबँक), १७ मोठी रुग्णालये आणि १ अशासकीय वैद्यकीय महाविद्यालय आहे व त्यांचेही एक रुग्णालय आहे. पण एकाच छताखाली सर्व वैद्यकीय सेवा पुरवणारी ३-४ च रुग्णालये आहेत. त्यात विवेकानंद रुग्णालय प्रमुख आहे. बहुतेक सर्व विशेषज्ञांची खाजगी रुग्णालये आहेत. त्यात जवळजवळ १००० खाटांची सोय आहे. ३ अतिदक्षता सेवा (आयसीयु) व ३ अर्भकांकरिता अतिसेवा (एनआयसीयु) दक्षता विभाग आहेत. गावात दोन सीटी स्कॅन व एक एमआरआय ह्यासारख्या अत्याधुनिक तपासणीच्या सुविधा आहेत. पण धर्मदाय (चॅरिटेबल) रुग्णालये १-२ च आहेत. लातूर तालुक्यात मुरुड येथे २ ॲलोपॅथीक पदवीधर, ८ आयुर्वेदिक पदवीधर, तर ३ आर. एम. पी. आहेत.

लातूर अशासकीय वैद्यकीयसेवेत आघाडीवर असले तरी जिल्ह्यात इतर ठिकाणी वैद्यकीयसेवा इतक्या अधिक प्रमाणात दिसत नाही. उदगीर, निलंगा आणि अहमदपूर ही तालुक्याची ठिकाणे सोडली तर औसा, रेणापूर, जळकोट, देवणी, चाकूर, शिरुर अनंतपाळ या तालुक्यांच्या गावी खाजगी क्षेत्रात वैद्यकीयसेवा सुधारण्यास बराच वाव आहे.

अनुक्रमणिका

उदगीर येथे ६ सामान्य औषधोपचार तज्ज्ञ, २ छातीच्या विकाराचे तज्ज्ञ, ३ नाक, कान, घश्याचे तज्ज्ञ, १० स्त्री रोग तज्ज्ञ, ९ लहान मुलांचे विशेषज्ञ, ७ शल्यचिकित्सक, ६ अस्थिरोग विशेषज्ञ, ८ डोळ्यांचे विशेषज्ञ, २ क्ष किरणचित्रविद्या विशारद, ५ भूलतज्ञ, १ त्वचारोग चिकित्सक असे एकूण ६० पदव्युत्तर पदवीधर किंवा पदविका घेतलेले डॉक्टर्स आहेत. शिवाय १० ॲलोपॅथिक पदवीधर (MBBS), ८ दंतवैद्य (BDS), ४५ आयुर्वेदिक पदवीधर डॉक्टर्स (BAMS) आणि ६ होमिऑपथी डॉक्टर्स (DHMS) कार्यरत आहेत. उदगीर येथे खाजगी आयुर्वेदिक कॉलेज आहे आणि त्यांचेही रुग्णालय आहे. २ विशेष दक्षता विभाग (आयसीयू) आहेत. १५० ते २०० खाटांची सोय आहे. लायन्स या अशासकीय सेवाभावी संस्थेने सुरु केलेले एक धर्मदाय नेत्र रुग्णालय आहे. उदगीर तालुक्यात हळ्ळी येथे १ ॲलोपॅथी तर ४ आयुर्वेदिक पदवीधर आहेत.

अहमदपूर येथे ३ सामान्य औषधोपचार तज्ज्ञ, ४ छातीविकार तज्ज्ञ, २ नाक, कान, घश्याचे विशेषज्ञ व ३ लहान मुलांचे तज्ज्ञ, ४ शल्यचिकित्सक, ४ स्त्री रोग तज्ज्ञ, २ अस्थिरोग तज्ज्ञ, १ डोळ्याचे तज्ज्ञ, १ क्ष-किरणचित्रविद्या विशारद, १ विकृतिशास्त्र तज्ज्ञ, २ भूलतज्ञ असे जवळपास ३० पदव्युत्तर पदवी किंवा पदविका घेतलेले डॉक्टर्स आणि २० ॲलोपॅथिक पदवीधर, २ दंतविशारद, ५ आयुर्वेदिक पदवीधर आणि ४ होमिऑपॅथिक पदवीधर सेवा रुजू करत आहेत. क्ष-किरणचित्रविद्या विशारद, विकृतिशास्त्र तज्ज्ञ आणि भूलतज्ज्ञ सोडल्यास सर्व विशेषज्ञांची रुग्णालये आहेत. एकाच छताखाली सर्व सेवा देणारे किंवा धर्मदाय रुग्णालय नाही. तालुक्यातील शिरुर ताजबंद या गावी ७ आयुर्वेदिक पदवीधर आहेत. किणगाव येथे ७ आयुर्वेदिक पदवीधर आरोग्य सेवा देत आहेत. हडोळती येथे १ ॲलोपॅथिक पदवीधर तर ७ आयुर्वेदिक पदवीधर सेवा करत आहेत.

निलंगा येथे २ सामान्य औषधोपचार तज्ज्ञ, ४ स्त्रीरोग तज्ज्ञ, १ शल्यचिकित्सक, १ कान, नाक, घसा तज्ज्ञ, २ भूलतज्ज्ञ, १ डोळ्याचे विशेषज्ञ, १ त्वचारोग विशेषज्ञ, २ लहान मुलांचे तज्ज्ञ असे १३ पदव्युत्तर पदवी किंवा पदविका असलेले डॉक्टर्स आहेत. शिवाय ५ ॲलोपॅथी पदवीधर आणि १५ आयुर्वेदिक शाखेचे पदवीधर आहेत. विशेषज्ञांची स्वत:ची रुग्णालये आहेत. तालुक्यात औराद शहाजहानी येथे १ लहान मुलांचे तज्ज्ञ, ५ ॲलोपॅथी पदवीधर आणि १२ आयुर्वेदिक शाखेचे पदवीधर आहेत. निटूर येथे १५ आयुर्वेदिक पदवीधर आहेत. मदनसुरी येथे ८ आयुर्वेदिक पदवीधर तर कासार शिरशी येथे १ ॲलोपॅथिक पदवीधर तर १० आयुर्वेदिक पदवीधर कार्यरत आहेत. निलंगा तालुक्यात एकही धर्मदाय रुग्णालय नाही. एक खाजगी अति दक्षता विभाग आहे.

औसा येथे एकही पदव्युत्तर पदविका किंवा पदवी घेतलेला डॉक्टर नाही. ४ ॲलोपॅथिक पदवीधर, २५ आयुर्वेदिक पदवीधर आणि ५ होमिऑपॅथिक पदवीधर सेवा रुजू करत आहेत. औसा तालुक्यात किल्लारी येथे ४ ॲलोपॅथिक पदवीधर, ८ आयुर्वेदिक पदवीधर तर २ होमिऑपॅथीक पदवीधर आहेत.

रेणापूर येथे १ लहान मुलांचे तज्ज्ञ, १ ॲलोपॅथिक पदवीधर ७ आयुर्वेदिक पदवीधर तर १ होमिऑपॅथी आहेत.

शिरुर अनंतपाळ येथे १ ॲलोपॅथिक पदवीधर, ५ आयुर्वेदिक पदवीधर, तर १ होमिऑपॅथी पदवीधर तर २ आर. एम. पी. आहेत.

जळकोट येथे १ ॲलोपॅथिक पदवीधर तर ४ आयुर्वेदिक पदवीधर आहेत.

देवणी या तालुक्याच्या गावी २ लहान मुलांचे तज्ज्ञ डॉक्टर तर ६ आयुर्वेदिक पदवीधर आहेत. तालुक्यातील वलांडी या गावी ६ आयुर्वेदिक पदवीधर आहेत.

अनुक्रमणिका

चाकूर या गावी २ लहान मुलांचे तज्ज्ञ डॉक्टर तर ७ आयुर्वेदिक पदवीधर डॉक्टर आहेत. नळेगाव येथे २ ॲलोपॅथिक तर ६ आयुर्वेदिक पदवीधर आहेत. चापोली येथे ३ आयुर्वेदिक पदवीधर आहेत.

लातूर जिल्ह्यातील आरोग्यसेवा ही एकांगी (lop sided) बनली आहे. काही भागात प्रगती तर काही भागात प्रगतीचा अभाव असे चित्र दिसते. शिवाय नागरी आणि ग्रामीण हा फरकही लक्षणीय आहे. आजही काही गावात अशिक्षित, वैदुकडूनच उपचार केले जातात. शिक्षणाने प्रगती होत असली, तरी पुरेशा संख्येने आरोग्यसेवक उपलब्ध नाहीत. खाजगी सेवा वरचेवर महाग होत आहे. डॉक्टर्सच्या संख्येच्या प्रमाणात इतर आरोग्यसेवक (नर्सेस, लस देणारे, सर्वेक्षण करणारे, दाया, इ.) पुरेसे उपलब्ध नाहीत. त्यामुळे महानगरातील रुग्णालयांसारखी दर्जेदारसेवा सर्वच ठिकाणी रुग्णांना उपलब्ध करून देणे, रुग्णालयांना अवघड जाते.[६१] सर्वसाधारपणे खाजगी आरोग्य सेवेची माहिती येथे दिली आहे. वर नमूद केलेल्या ठिकाणाशिवायही काही ठिकाणी वैद्यकीय सेवा उपलब्ध असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

खाजगी क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉ. विठ्ठल लहाने (प्लॅस्टिक सर्जन) यांना त्यांनी केलेल्या नाविन्यपूर्ण कामाकरिता नोव्हेंबर २००७ मध्ये अमेरिकेतील प्रतिष्ठीत समजला जाणारा ' माईल स्टोन ॲवॉर्ड ' हा पुरस्कार मिळाला.

आरोग्य विभागाची भूकंपातील कामगिरी : ३० सप्टेंबर १९९३ रोजी लातूर जिल्ह्यात झालेल्या प्रलयंकारी भूकंपामध्ये ६१ गावे भूकंपग्रस्त होती. त्यावेळी आरोग्य विभागाने सुनियोजन करून आरोग्य सेवा अत्यंत प्रभावीपणे राबविल्यामुळे प्रलयंकारी भूकंपानंतरही व पावसाळा असतानाही कोणत्याही रोगाची साथ आली नाही. याबाबीची नोंद संयुक्त राष्ट्र संघटनेने घेवून महाराष्ट्र शासनाची प्रशंसा केली होती.

सन १९९४-९५ मध्ये प्लेग सदृश साथीच्या रोगाने औसा तालुक्यात थैमान घातले होते. त्यावेळीही यावर मात करण्यासाठी नियंत्रक पथकांची स्थापना करून नियंत्रण करण्यात आले.

सद्यस्थिती पाहता जिल्ह्यात एकूण २४८ उपकेंद्रे, मुरुड, रेणापूर, उदगीर, अहमदपूर, चाकूर निलंगा, देवणी, औसा, कासारशिर्शी या ठिकाणी ग्रामीण रुग्णालये कार्यरत होती. लातूर येथे जिल्हा रुग्णालय, जिल्हा क्षयरोग रुग्णालय, कस्तूरबा गांधी स्त्री रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच एक खाजगी वैद्यकीय महाविद्यालय, उदगीर व निलंगा येथे कार्यरत आहे. चार ठिकाणी नागरी दवाखाने, सात आयुर्वेदिक दवाखाने, एक युनानी दवाखाना, तसेच लातूर येथे एक आयुर्वेदिक व एक होमियोपॅथी महाविद्यालय कार्यरत आहे.

समाज कल्याण

शासनाच्या पूर्वीच्या मागासवर्गीय कल्याण विभागाचे १९५६ मध्ये समाजकल्याण विभाग असे नामांतर करण्यात आले. सन १९६२ मध्ये जिल्हा परिषदेच्या निर्मितीपासून समाजकल्याण खात्याचे काम जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आले. प्रथम २१ सप्टेंबर १९७१ पासून शासकीय समाजकल्याण योजना राबविण्यासाठी "जिल्हा परिषद समाजकल्याण समिती" गठीत करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम राखीव ठेवण्यात येऊन त्यातून स्थानिक स्तरावरील समाजकल्याण योजना समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, तर जिल्हा पातळीवरील राज्यस्तरीय योजना शासकीय जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येतात. समाजकल्याण विषयक योजनांच्या कार्यवाहीत सुसंगती आणण्यासाठी दिनांक १ मे १९८३ पासून समाजकल्याण व आदिवासी कल्याण असे दोन स्वतंत्र विभाग करण्यात आले. सन १९९१ मध्ये महिला, बाल व अपंग विकास विभागाची निर्मिती करण्यात आली.

६१. डॉ. सुधाकर देशमुख, उदगीर यांनी विविध उपलब्ध संदर्भाआधारे दिलेली माहिती.

समाजकल्याणात मागासवर्गीयांचे कल्याण तसेच अपंग, महिला व बाल कल्याणाच्या योजना अंतर्भूत आहेत. या कार्याचे मुख्यत्त्वे दोन भाग असून पहिल्या भागात मागासलेल्या वर्गाची विविध योजनांद्वारे शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती करणे, तर दुसऱ्या भागात प्रामुख्याने शारीरिक व मानसिक व्यंग असलेल्या व्यक्ती व अनाथ, निराधार, संकटात असलेल्या महिला आणि अनाथ व गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळलेल्या बालकांचे कल्याण व पुनर्वसन यांचा समावेश आहे.

शासनाच्या जिल्हा समाजकल्याण कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना

मागासवर्ग कल्याण : मागासलेल्या वर्गामध्ये शिक्षण प्रसार व्हावा म्हणून शासनाने विविध शैक्षणिक स्तरानुरुप विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक सवलती दिल्या असून त्यात शिष्यवृत्ती, वसतिगृहे व आश्रमशाळा, अनाथगृहे, कुटुंब व बाल कल्याण केंद्रे, संमत शाळा / रिमांड होम यांचा समावेश आहे.

भारत सरकार शिष्यवृत्ती योजना : केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत ज्यांच्या पालकाचे मासिक उत्पन्न रुपये १,५०० ते २,००० पेक्षा अधिक नाही अशा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या वसतिगृहात राहणाऱ्या व न राहणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमानुसार अनुक्रमे दरमहा रुपये ६५ ते १२५ व रुपये ११५ ते २५० शिष्यवृत्ती दिली जाते. यातील अनुसूचित जातीकरिता केंद्र सरकार तर अनुसूचित जमातीकरिता राज्य सरकार शिष्यवृत्ती देते.

सन १९९०-९१ व सन २०००-०१ मध्ये केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आली आहे :—

अ.क्र.	वर्ष १९९०-९१	लाभार्थी विद्यार्थी	वर्ष २०००-०१	लाभार्थी विद्यार्थी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	भारत सरकार शिष्यवृत्ती अ.जा. नॉन प्लॅन	३,८३७	भारत सरकार शिष्यवृत्ती अ.जा. नॉन प्लॅन	४,६७२
२	भारत सरकार शिष्यवृत्ती भ.वि.जा. नॉन प्लॅन	७०३	भारत सरकार शिष्यवृत्ती भ.वि.जा. नॉन प्लॅन	६,३१६
३	भारत सरकार शिष्यवृत्ती अ.जा. योजनेतर	१,३७४	भारत सरकार शिष्यवृत्ती विशेष मागास प्रवर्ग योजनेत्तर	१५६
४	भारत सरकार शिष्यवृत्ती भ.वि.जा. योजनेतर	३८५	भारत सरकार शिष्यवृत्ती अ.जा. योजनेतर	३,०९९
५			भारत सरकार शिष्यवृत्ती भ.वि.जा. योजनेतर	३७
६			निर्वाह भत्ता भ.वि.जा. योजनेतर	१४
७			निर्वाह भत्ता अ.जा. योजनेतर	२४
८			निर्वाह भत्ता भ.वि.जा. योजनेतर	०.१०

व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांच्या वसतिगृहांत राहणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारतर्फे एक योजना राबविली जाते. या योजनांव्यतिरिक्त जिल्ह्यात राज्य सरकार पुरस्कृत दलित वस्ती सुधारणा योजना, अस्पृश्यता निवारण प्रचार योजना राबविली जाते.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहे : या वसतिगृहात विद्यार्थ्यांची निवास व जेवणाची सोय मोफत करण्यात येते. शिवाय विभागीय स्तरावर ५० रुपये दरमहा दरडोई व अन्य बाबी व पुरक खर्चासाठी १०० रुपये दरमहा दरडोई देण्यात येतात. तसेच गणवेश व पुस्तके मोफत पुरविण्यात येतात. जिल्ह्यात

२००४-०५ मध्ये शासकीय वसतिगृहांमध्ये २९४ मुले व २७२ मुलींना प्रवेश देण्यात आला. जिल्ह्यामध्ये एकूण १४ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. याशिवाय जिल्ह्यात खाजगी संस्थांची एकूण ८३ अनुदानप्राप्त वसतिगृहे आहेत. शासनातर्फे अशा वसतिगृहांसाठी प्रत्येक मुला व मुलीमागे दरमहा १२५ प्रमाणे १० महिन्यांकरीता अनुदान दिले जाते.

या शिवाय समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती पुढे देण्यात आलेली आहे.

मागासवर्गीयांचे कल्याण : या विभागात अनुसूचित जाती यांच्या कल्याणासाठी विविध योजना प्रामुख्याने तीन विभागात राबविण्यात येतात.

(१) शैक्षणिक योजना

(२) आर्थिक उन्नतीच्या योजना

(३) सामाजिक व इतर सामुहिक योजना

शैक्षणिक योजनांमध्ये खालील योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

(१) भारत सरकारच्या शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या.

(२) शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देण्यापासून सूट देणे व शिष्यवृत्ती देणे.

(३) मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृह उघडणे व चालविणे.

(४) मागासवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे चालविण्याकरीता स्वेच्छा संस्थांना सहाय्यक अनुदान देणे.

(५) सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विशेष निर्वाह भत्ता देणे.

(६) बालवाड्यांना सहाय्यक अनुदान देणे.

(७) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देणे.

(८) अस्वच्छ उदयोगधंदयात असलेल्यांच्या मुलांना शालांत परीक्षापूर्व शिष्यवृत्या.

(९) व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न असलेल्या वसतिगृहांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे.

(१०) वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांकरीता पुस्तकपेढ्या इत्यादी

(११) माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची योजना.

(१२) सफाई कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा.

(१३) शिकवणी व संलग्न योजना.

(१४) राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार व शिष्यवृत्त्या (चार योजना).

(१५) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना (मागेल त्याला प्रशिक्षण)

(१६) इयत्ता ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.*

---

* कार्यक्रम अंदाजपत्रक २००६-२००७ सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, पृ.६.

आर्थिक विकासाच्या योजना खालील प्रमाणे आहेत.

(१) मोटार व वाहन चालक प्रशिक्षण योजना.

(२) अत्याचारात बळी पडलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील व्यक्तींना अर्थसहाय्याची योजना.

(३) आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर मदत.

(४) गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देणे.

(५) कन्यादान योजनेखाली नवदाम्पत्यांना अर्थसहाय्य.

(६) अनु. जाती व नवबौध्द युवकांना सैनिकी व पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण देणे.

सामाजिक व इतर सामुहिक योजनांमध्ये खालील योजनांचा समावेश आहे.

(१) अस्पृश्यता निवारण कार्यक्रम.

(२) राज्यातील समाजसेवकांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर "दलित मित्र" म्हणून सन्मान.

(३) सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील उत्कृष्ट संस्थांना पारितोषिक देणे.

(४) जातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करणे.

(५) मागासवर्गीय घरबांधणी योजना.

(६) दलित वस्ती सुधारणा योजना.

(७) सामाजिक न्याय निर्देशांक निर्मिती व उपाय योजना.

उपरोक्त योजनांबाबत मंत्रालयीन स्तरावर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीचे आदेश निर्गमित करण्यात येतात. तसेच सदर योजना राबविण्यात येणाऱ्या अडीअडचणी लक्षात घेवून सदर योजना वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. या योजनेच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही संबंधित कार्यासने शासनाने वेळोवेळी दिलेल्या शासकीय आदेश व सूचना लक्षात घेऊन पार पाडतात.

जिल्हा परिषद, समाजकल्याण विभाग लातूर ही जिल्ह्यातील मागासवर्गीयांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवित असली तरी महाराष्ट्र शासनाने समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक-बीजीटी २०००/प्र.क्र.१५५/ अर्थसंकल्प दिनांक ४.११.२००० अन्वये समाजकल्याण विभागाकडे असलेल्या एकंदर ३८ योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केल्या आहेत.

समाजकल्याण विभागाकडील सेवायोजन नोंदणीचे काम रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडे तर 'दारुबंदी प्रचार कार्य' ही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर मार्फत राबविलेल्या योजना : अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येत असलेल्या शासकीय योजना.

(१) माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परीक्षा फी देणे : या योजनेमध्ये विद्यार्थ्यांना त्याचे व पालकांचे उत्पन्न लक्षात न घेता सर्व पातळीवर शिक्षण शुल्क व शालांत परीक्षा शुल्क देण्यापासून सूट देण्यात येते. शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती शाळेंना करण्यात येते.

(२) **मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती देणे**- माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या वर्गात प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.२०० व इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना रु. ४०० शिष्यवृत्ती दिली जाते.

(३) **इयत्ता ५ वी ते ७ वी मधील मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती देणे** - ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाचा दर्जा उंचावा म्हणून इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या सर्व मागासवर्गीय मुलींना रु. ३०० प्रमाणे शिष्यवृत्ती दिली जाते.

(४) **मागासवर्गीय मुलींसाठी बालवाड्या चालविणे** : ग्रामीण भागातील लहान मुला-मुलींना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून ही योजना सुरू करण्यात आली आहे.

(५) **मागासवर्गीय वसतिगृहांना सहाय्यक अनुदान** : मागासवर्गीय मुलामुलींना शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची राहण्याची व जेवणाची सोय व्हावी म्हणून सेवाभावी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या वसतिगृहांना प्रती विद्यार्थी रुपये ३०० दरमहा या प्रमाणे १० महिन्यांचे अनुदान दिले जाते. सन १९९०-९१ सालात जिल्ह्यात एकूण ७३ वसतिगृहे होती.

(६) **आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन, अर्थसहाय्य** : समाजातील जातीयता नष्ट व्हावी म्हणून राज्य शासन व केंद्र शासन ५०% हिस्सा या प्रमाणे ही योजना राबविते. यामध्ये एक व्यक्ती मागासवर्गीय व दुसरी व्यक्ती सवर्ण हिंदु अथवा इतर मागासवर्गीय असल्यास लाभार्थ्यास रु.१५,०००/- प्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येते.

(७) **ग्रामीण भागातील मागासवर्गीयास लोखंडी पत्रे पुरवठा करणे** : ग्रामीण भागातील मागासवर्गीयांच्या घरावरील गवत, छपरे काढून टिन पत्रे घालणे या योजनेमधून प्रती लाभार्थ्यास ६ पत्रे दिली जातात.[६२]

जिल्हा परिषद योजना

शासनाच्या आदेशानुसार जिल्हा परिषदेने आपल्या उत्पन्नातून मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी किमान १५% रक्कम खर्च करावयास पाहिजे. त्यानुसार समाजकल्याण विभागामार्फत सन १९९०-९१ मध्ये जिल्हा परिषदेने आपल्या उत्पन्नातून रक्कम रुपये १०,४४,७४२ मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च केले. या रक्कमेतून मागासवर्गीयांच्या गृहनिर्माण संस्थांना रुपये २,५०,३००, बायोगॅस सयंत्रधारक यांना प्रोत्साहन म्हणून रुपये ५०,७६२, मागासवर्गीय महिलांना शिवणकला प्रशिक्षणासाठी रुपये १,५१२, तसेच जीवनधारा योजनेखाली पूरक अनुदान रुपये ११,३००, गणवेश पुरवठयासाठी रुपये १,९९,९९४, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वासंतिक वर्ग चालविणे रुपये ४३,८५०, कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी रुपये ४,७५३, नैसर्गीक आपत्तीखालील मागासवर्गीयांना मदत रुपये २४,७००, मागासवर्गीयांना लोखंडी पत्रे पुरवठा करणे रुपये ३,९९,५५०, तसेच मागासवर्गीय वस्तीत समाजमंदीर दुरुस्तीसाठी रुपये ५३,५८२, महिला मंडळाला अर्थसहाय्य देणे रुपये १५,२४३ इतकी रक्कम खर्च करण्यात आली.

---

६२. वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद, लातूर, सन २०००-२००१, पृ. १३.

सन २००३-०४ मध्ये जिल्ह्यात मुलांची ८१ तर मुलींची १४ अनुदानित वसतिगृहे कार्यरत होती. तालुकानिहाय आकडेवारी खालील विवरणपत्रात दिली आहे.[६३]

अ.क्र. (१)	तालुका (२)	मुलांचे वसतिगृह (३)	मुलींचे वसतिगृह (४)	एकूण (५)
१	लातूर	१८	०६	२४
२	रेणापूर	०२	००	०२
३	औसा	०६	०१	०७
४	चाकूर	०६	००	०६
५	अहमदपूर	१२	०१	१३
६	जळकोट	०२	००	०२
७	निलंगा	०७	०२	०९
८	शिरुर अनंतपाळ	०४	००	०४
९	उदगीर	२२	०४	२६
१०	देवणी	०२	००	०२
	एकूण ...	८१	१४	९५

आश्रमशाळा : जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या मुलांनाही शिक्षण मिळावे या उद्देशाने स्वयंसेवी संस्थांमार्फत आश्रमशाळा स्थापन करण्यात आलेल्या आहेत. त्यांना शासन आर्थिक सहाय्य देते. सन २०००-०१ या वर्षी जिल्ह्यात प्राथमिक ३९ तर माध्यमिक २५ अशा एकूण ६४ आश्रमशाळा कार्यरत होत्या. या दोन्ही प्रकारच्या आश्रमशाळांचा एकूण ६,१०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

मागासवर्गीय गृहनिर्माण योजना : मागासवर्गीयांसाठी राबविण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनेची माहिती खालील विवरणपत्रात देण्यात आलेली आहे.

वर्ष	संख्या	सभासद संख्या	अनुदान मंजूर रक्कम (रुपये)	खर्च (रुपये)
१९८२-८३	०७	३२१	६,१८,७५०	६,१८,७५०
१९९०-९१	२३	८४४	२३,९८,४००	२३,९८,४५०
२०००-०१	३७	१,०१५	४४,९०,०७०	४४,९०,०७०

अनाथगृहे : लातूर जिल्ह्यामध्ये अनाथ बालकांसाठी सन २०००-०१ मध्ये २२ अनाथगृहे असून त्यामधील आश्रितांची संख्या ४९५ होती.

शासकीय संमत शाळा : सन २०००-०५ मध्ये जिल्ह्यात ५ संमत शाळा असून लाभार्थी संख्या ३०० आहे. त्यातील २४ जणांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

अपंग कल्याण : शारीरिकदृष्टया अंध, मुकबधीर, अस्थिव्यंग, मतिमंद मुलांच्या शिक्षणासाठी शासन विविध उपक्रम राबविते. त्यामध्ये प्रामुख्याने मुकबधीर, अस्थिविकलांग, मनोविकलांग अपंग व्यक्तिंना कृत्रिम अवयव पुरविणे, अपंगांना मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे, अपंग व्यक्तिंसाठी मिश्रगट संकूल, अपंग

६३. वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद, लातूर, सन १९९०-१९९१, पृ. २३५,२३६.

विद्यार्थ्यांना शालांतपूर्व शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, शारीरिकदृष्ट्या अपंगांना पुनर्वसनासाठी वित्तीय सहाय्य, अपंगांना मार्गदर्शन व सल्ला इत्यादी उपक्रमांचा अंतर्भाव होतो.

अपंगांसाठी शासन अपंग संस्था चालवित असून जिल्ह्यात सन २००२-०३, २००३-०४, २००४-०५ यावर्षी अंधासाठी एक संस्था कार्यरत असून त्यात ५० लाभार्थी होते.[६४]

शासनाबरोबरच स्वयंसेवी संस्थाही जिल्ह्यामध्ये अपंगांसाठी कार्यरत आहेत. सन २००२-०३ मध्ये जिल्ह्यात अंधांच्या ४, मुकबधीर ५, अस्थिव्यंग १६, तर मतिमंदांच्या ७ संस्था कार्यरत असून ४० लाभार्थी होते. सन २००४-०५ मध्ये संस्थांची हिच संख्या अनुक्रमे ४,१२,२७,१० असून लाभार्थी संख्या ४० आहे.

अपंगांचे शिक्षण व पुनर्वसन : अपंगाचे व्यक्तिमत्त्व विकसित होण्याच्या दृष्टीने त्यांचे शिक्षण आणि तत्सम दैनंदीन व्यवहार सर्वसाधारण मुलांबरोबर होणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्या दृष्टीने संमिलित तत्त्वावर शिक्षणास उत्तेजन देणे अपंग विद्यार्थ्यांना फायद्याचे ठरते. या उद्देशाने अपंग शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबविली जाते. सदरहू योजनेचा लाभ इयत्ता १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मिळतो. मासिक शिष्यवृत्ती खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आली आहे.[६५]

अ.क्र.	इयत्ता	अपंगत्वाचा प्रकार	शिष्यवृत्ती दर दरमहा रुपये
(१)	(२)	(३)	(४)
१	इयत्ता १ ली ते ४ थी	अंध, अस्थिव्यंग, कुष्ठरोग मुक्त	५०
२	पायरी वर्ग ते इयत्ता ४ थी	कर्णबधीर	५०
३	इयत्ता ५ वी ते ७ वी	अंध, कर्णबधीर, अस्थिव्यंग, कुष्ठरोग मुक्त	७५
४	मान्यता प्राप्त विशेष शाळातील वयाच्या १८ वर्षापर्यंत.	मतिमंद व मानसिक आजार	७५
५	इयत्ता ८ वी ते १० वी	अंध, कर्णबधीर, अस्थिव्यंग, कुष्ठरोग मुक्त	१००

अपंग विद्यालयातील मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना : अस्थिव्यंग, मूकबधीर, अंध, मानसिक व कुष्ठरोगमुक्त विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे या दृष्टीने ही योजना कार्यान्वीत करण्यात आली. १० वी नंतरचे पुढील शिक्षण पूर्ण होईपर्यंत या योजनेचा लाभ अपंग विद्यार्थ्यांना मिळतो. यात तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाचाही अंतर्भाव आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता, कायद्याप्रमाणे शिष्यवृत्ती रकमेव्यतिरिक्त मिळतो. शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट नाही. कायद्याप्रमाणे अपंगत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. अभ्यासक्रमाचे गट करून प्रत्येक गटास खालील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार शिष्यवृत्ती देण्यात येते.[६६]

अ.क्र.	अभ्यासक्रमाचा गट	दरमहा निवासी/अनिवास	दरमहा निवासी/अनिवासी अंधांना वाचक भत्ता (दरमहा)	
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रुपये	रुपये	रुपये
१	अ	१९०	४२५	१००
२	ब	१९०	२९०	१००
३	क	१९०	२९०	१००
४	ड	१२०	२३०	७५
५	इ	९०	१५०	५०

६४. समाजकल्याण कार्यालय लातूर, यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

६५. कार्यक्रम अंदाजपत्रक, २००४-०५, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, पृ. १०६.

६६. कार्यक्रम अंदाजपत्रक, २००४-०५, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, पृ. १०७, १०९.

प्रशिक्षित अपंगांना आर्थिक मदत : अपंगाच्या पुनर्वसनाचा अंतिम उद्देश त्यांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी करणे हा असतो. अनेक प्रशिक्षित अपंगांना प्रशिक्षणानंतर लगेच नोकरी मिळविणे अतिशय कठीण जाते. अशा परिस्थितीत त्यांना प्रशिक्षणाच्या अनुरोधाने स्वतंत्र काम करण्याकरीता रुपये ५०० ते १,००० पर्यंत वस्तू स्वरुपात आर्थिक सहाय्य देण्यात येते. महिला व बाल विकास विभागामार्फत समाजातील महिला व बालक या दुर्बल घटकांचे प्रश्न हाताळण्यासाठी महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे-१, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई व राज्यातील सर्व जिल्हानिहाय जिल्हास्तरीय कार्यालये व नागरी प्रकल्प स्थापन केलेली आहेत. सदर कार्यालयांमार्फत महिला कल्याण, बाल कल्याण, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नागरी प्रकल्प, महात्मा गांधी प्रशिक्षण संस्था पुणे, सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा अधिनियम योजना, भिक्षा प्रतिबंध योजना इत्यादी योजना राबविल्या जातात. जिल्हास्तरीय कार्यालयातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे सर्व योजनानिहाय काम पाहतात.

महिला विकास : महिला विकासाच्या योजना प्रामुख्याने दोन प्रकारात राबविण्यात येतात. मुली / स्त्रियांचा अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ या कायद्यांतर्गत नैतिक संकटात सापडलेल्या स्त्रियांच्या संरक्षण व पुनर्वसनासाठी महिला संरक्षण गृहे स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच दुसऱ्या कल्याणकारी उपक्रमामध्ये निराश्रीत, आर्थिकदृष्टया मागास, परित्यक्ता, विधवा, विविध व्यवसायाभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या मुली या प्रकारामध्ये येणाऱ्या महिलांच्या पुनर्वसनासाठी महिला राज्यगृहे (वसतिगृहे), आधारगृहे, माहेर योजना इत्यादी योजना/संस्था कार्यरत आहेत. महिलांच्या व्यक्तिगत प्रगतीसाठी विद्यावेतन, स्वयंरोजगार, महिला प्रशिक्षण केंद्र, विवाहभत्ता इत्यादी योजना कार्यरत आहेत. केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत महिलांच्या कल्याणासाठी नोकरी करणाऱ्या महिलांकरीता वसतिगृहे, अल्पमुदतीची निवासस्थाने इत्यादी योजनांचा समावेश आहे.

महिला कल्याण योजनेंतर्गत जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयाकडून महिला राज्यगृहे व अल्पमुदती निवासगृह चालविण्यात येतात. २००२-०४ या वर्षी महिला राज्यगृहामध्ये १८ महिला होत्या. येथे त्यांची अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय केली जाते. त्याचबरोबर त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. उपरोक्त १८ महिलांपैकी २००२-०४ यावर्षी एकूण १६ महिलांचे पुनर्वसन करण्यात आले.

महिलांसाठी कार्यरत असलेल्या अल्पमुदती निवासगृहांमध्ये सन २००२-०४ मध्ये १२० महिला होत्या. त्यापैकी ४८ महिलांचे पुनर्वसन करण्यात आले.

बाल विकास : बाल विकासाचा कार्यक्रम दोन प्रकारे राबविण्यात येतो. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० या कायद्यांतर्गत निरिक्षणगृहे व बालगृहे चालविण्यात येतात. हा उपक्रम उन्मार्गी लागलेल्या अवखळ व बाल गुन्हेगारी प्रवृत्तीकडे झुकलेल्या विधी संघर्षित व जपणूक आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना संरक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राबविला जातो. तसेच अनाथ व निराधार मुलांच्या पुनर्वसनासाठी बालगृहे, अनाथालये, डेस्टीटयूट होम या संस्था कार्यरत आहेत. दत्तक योजनेंतर्गत अनाथ मुलांना सक्षम कुटुंबामध्ये संगोपनासाठी देण्याची योजना देखील बाल विकासामध्ये समाविष्ट आहे. या सर्व योजना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, लातूर हे राबवितात.

पोषण आहार कार्यक्रम / सकस आहार योजना : या योजनेतंर्गत नागरी विभागातील गलिच्छ वस्त्यांमधील महिला व बालकांना सकस आहार पुरविणे, समाजातील दुर्बल घटकातील, शहरी विभागातील गलिच्छ वस्त्यांमधील गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, सहा वर्षापर्यंतच्या मुलांची पूरक पोषण आहाराची उणीव दूर करणे इत्यादी कार्यक्रम राबविले जातात.

अनुक्रमणिका

एकात्मिक बाल विकास सेवा योजना : या योजनेंतर्गत गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, ० ते ६ वयोगटातील मुलांना पुरक पोषण आहार देणे, आरोग्य तपासणी, प्राथमिक आरोग्य निगा, संदर्भ सेवा, रोग प्रतिकार क्षमता कार्यक्रम, लस टोचणी कार्यक्रम, सर्व पोषण व आरोग्य शिक्षण, अनौपचारिक पूर्व प्राथमिक शिक्षण देणे इत्यादी उपक्रम बालविकास अधिकाऱ्यामार्फत राबविले जातात.

शासकीय बालगृहे व विशेषगृहे : गुन्हेगारी प्रवृत्तीकडे झुकणाऱ्या व उन्मार्गी मुलांचे निरिक्षण करण्यासाठी व त्यांना सुधारण्यासाठी बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० अन्वये परिविक्षा अधिकारी यांच्या देखरेखीखाली शासकीय निरीक्षण गृहामध्ये प्रथम ठेवले जाते. त्यानंतर पुनर्वसन, शैक्षणिक व योग्य ती दखल घेण्यासाठी प्रथम त्यांना बाल न्यायालयापुढे उभे करून नंतर शासकीय बालगृहे व विशेष गृहात ठेवले जाते. तेथे मुलामुलींना जीवनावश्यक सुविधा पुरविण्यात येतात व त्यांचे पुनर्वसन करण्यात येते. मुंबई मुलांचा कायदा १९४७ अन्वये कार्यरत असलेली पाच वर्गीकरण केंद्रे ही बालन्याय अधिनियम, १९८६ मध्ये वर्गीकरण केंद्राची तरतूद नसल्याने वरिष्ठ बालगृहे म्हणून शासनाने घोषीत केलेली आहेत.

बालगृहे चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनाही अधिनियम २००० अन्वये मान्यता देण्यात आलेली असून या संस्थांना प्रत्येक मुलामुलीमागे दरमहा रुपये ७५० दरानुसार मुलांच्या पोषण, उन्नती व शिक्षणासाठी अनुदान दिले जाते.[६७]

धर्मादाय व सेवाभावी संस्था

शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रिडा विषयक क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने कार्यरत असलेल्या अनेक संस्था जिल्ह्यात आहेत. त्यामध्ये १८६० च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट खालील नोंदणीकृत संस्थांचा समावेश होतो. स्वातंत्र्योत्तर काळात अशा संस्थांचे नियमन १८६० च्या अधिनियमाखेरीज १९५० च्या बॉम्बे पब्लिक ट्रस्ट अधिनियमाखाली केले जाते. यासाठी लातूर येथे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाचा उपविभाग असून त्यावर सहाय्यक धर्मादाय आयुक्तांची नेमणूक केलेली आहे. माहे मार्च २००५ अखेर जिल्ह्यातील नोंदणीकृत विविध संस्थांची संख्या खालील विवरणपत्रात देण्यात आलेली आहे.

अ.क्र. (१)	नोंदणीकृत संस्थेचा प्रकार (२)	संख्या (३)
१	शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक	८,७४४
२	क्रिडा विषयक	२,७३५
३	वाचनालये	२,३७०
	एकूण ...	१३,८४९

ग्रामीण विकास लोकसंस्था, अहमदपूर : "गावाकडे (खेड्यांकडे) चला" या महात्मा गांधीच्या संदेशातून प्रेरणा घेऊन, ग्रामीण भागाला कर्मभूमी मानून सर्वांगीण ग्रामीण विकास अर्थात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास साधण्याच्या उद्देशाने आणि ग्रामीण भागातील गरीब, भूमिहीन, बालकामगार आणि वंचित यांचे प्रश्न आणि हक्क समजावून सांगून त्यांची उकल करण्यासाठी संस्थेची स्थापना १५ ऑगस्ट १९८३ रोजी अहमदपूर येथे करण्यात आली.

६७. कार्यक्रम अंदाजपत्रक, महिला व बाल विकास विभाग, २००४-०५, पृ. १.

सध्या संस्था बालमजुरी निर्मूलन व पुनर्वसन, भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन, रोजगारासाठी शेतमजूर संघटन, नैसर्गिक संसाधने विकास कार्यक्रम, शेती व पिण्यासाठी पाणी, महिला मुक्ति प्रबोधन आणि विकास, बहुउद्देशिय प्रशिक्षण केंद्र इत्यादी विषयावर लातूर, परभणी, उस्मानाबाद या जिल्ह्यांतून काम करते.

साथ - परिवर्तन व ऐक्यासाठी सामाजिक उठाव : गावोगावी महिला, युवक, शेतमजूर यांना रचनात्मक कार्यासाठी प्रेरीत करणे, संघटन बांधणी व संचालनासाठीच्या तंत्र कौशल्यासह सक्षम बनविणे. या समुहांना साथ देत राहणे, तळागाळातील अंतिम माणूस व विविध योजना, शासकीय, निमशासकीय संस्था यांच्यामध्ये दुवा साधणे, समाजाचा मानसिक, बौध्दिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास साधणे, भारतीय घटनेतील जीवनमूल्ये रुजवून नवसमाज निर्मितीचे प्रयत्न करणे, परिवर्तन व ऐक्यासाठी सामाजिक उठाव करणे या मुख्य उद्दिष्टांची पूर्ती करण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना लातूर येथे करण्यात आली.

स्वयंसहायता समूह (बचत गट) समूह कृती संगम प्रक्रीया, सुवर्ण जयंती, ग्रामस्वयंरोजगार योजना, महिला मंडळे उभारणी, युवक मंडळे उभारणी बाल व मनुष्यबळ विकास, समाज कार्यकर्ते उभारणी, पंचायतीराज, एडस् विरोधी जनजागृती, माता बाल आरोग्य, ग्राहक चळवळ इत्यादी प्रकारची कृती कार्ये संस्थेतर्फे राबविली जातात.

माता बाल केंद्र, लातूर (१९७६) : स्त्रियांचे प्रश्न आणि अनाथ बालके यांच्या समस्यांची उकल करण्याच्या दृष्टीने या केंद्राची स्थापना करण्यात आली. स्त्रियांचे हक्क आणि अन्यायावरील कायदे व शिक्षा कोणत्या इत्यादीची जाणीव होण्याच्या दृष्टीने महिलांसाठी जागृती शिबिरांचे आयोजन करण्यात येते. दु:खी, पीडीत महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांचे संसार जोडण्यासाठी या केंद्रातर्फे "कुटुंब सल्ला केंद्र"ही चालविण्यात येते. दु:खी, निराधार, परित्यक्ता व समस्याग्रस्त महिलांना थोडा काळ आसरा मिळावा या दृष्टीने "अल्पमुदती निवास गृह" चालविले जाते.

बालकांसाठी बालवाडी सुदृढ मन व चांगले संस्कार घडविण्यासाठी झाशी राणी उद्यान स्थापण्यात आले आहे. संगणक प्रशिक्षण या केंद्रातून देण्यात येते. तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येतात.

नारी प्रबोधन मंच, लातूर (१९८४) : महिला व बालकांच्या संपूर्ण विकासासाठी या मंचाची दिनांक १४ ऑगस्ट १९८४ स्थापना करण्यात आली. महिला मेळावे व महिला जागृती कार्यक्रम, महिला बचत गट, महिला मंडळ सक्षमीकरण, महिला स्वावलंबनासाठी आर्थिक मदत, अंधश्रध्दा निर्मूलन, कौटुंबिक सल्ला केंद्र अशा प्रकारचे कार्यक्रम मंचातर्फे राबविण्यात येतात.

समता बहुउद्देशीय शिक्षण संस्था : सामाजिक विकास आणि मुलभूत सेवांपासून वंचित असणाऱ्या लोकांपर्यंत पोहोचणे आणि त्यांना संघटीत करून सामाजिक विकासाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना झाली. समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत जाऊन त्यांना स्वयंसहायता समूहाच्या माध्यमातून संघटीत करणे, नियमित बचत करून त्यांची सर्वप्रथम स्वत:च्या कुटुंबात त्यानंतर बँकेत व पर्यायाने समाजात पत निर्माण करण्यासाठी संस्था कार्यरत आहे. कौशल्य प्रशिक्षण, महिला संघटन आणि उद्योजकता विकास, महिलांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री, माहिती तंत्रज्ञान कार्यक्रम, जाणीव जागृती कार्यक्रम, कृषी विकास कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविले जातात.

अफार्म संघटना (१९६९) : अफार्म ही मुंबई विश्वस्त निधी कायदयाखाली नोंदविलेली, शेती, भू-जल आणि ग्रामीण विकासाचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील सेवाभावी संस्थांची संघटना आहे. तिचे मुख्य

कार्यलय पुणे येथे असून लातूर येथे शाखा कार्यालय कार्यरत आहे. १९६९ साली स्थापन झालेल्या या संस्थेच्या आज महाराष्ट्रातील १०९ स्वयंसेवी संस्था सदस्य आहेत. देशाला भेडसावणाऱ्या समस्यांमध्ये ग्रामीण विकास ही सर्वाधिक महत्त्वाची समस्या आहे. खेड्यातील जीवनाच्या प्रत्येक बाबतीत तातडीने लक्ष पुरविणे आवश्यक आहे. शेती, आरोग्य, पशुसंवर्धन, वनीकरण, ग्रामोद्योग, कुटुंबकल्याण, पर्यावरण अशा अनेक क्षेत्रात लोकांसाठी नव्हे तर लोकांबरोबर काम करणे नितांत गरजेचे आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी सदस्य संस्थांना सोबत घेऊन ही संघटना कार्य करते. महिला विकास कार्यक्रम, कृषी विकास कार्यक्रम, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, आपत्ती निवारण कार्यक्रम, संशोधन व संकलन कार्यक्रम, आदिवासी व दुर्बल घटक विकास कार्यक्रम इत्यादी समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येतात.

समाजभारती लातूर (१९८३) : शहरी आणि ग्रामीण महिलांचा विकास, शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती देऊन शेती विकास विषयक प्रकल्प राबविणे, उर्जा विकास, शिक्षण, ग्रामोद्योग, पाणलोट क्षेत्रविकास, ग्रामीण विकास कार्य, इत्यादी उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी या संस्थेची स्थापना १९८३ साली करण्यात आली.

महिला, मुले, मुली, भूमिहीन, शेतमजूर, शेतकरी, अपंग इत्यादींना लाभ मिळवून देण्यासाठी संस्थेतर्फे जाणीव जागृती, बचतगट कार्यक्रम, राष्ट्रीय एकात्मता शिबीर, पशु चिकित्सा शिबीर यासारख्या विविध विषयांवर शिबीरांचे आयोजन करून प्रबोधन करण्यात येते.

बहुजन हिताय विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृह, लातूर (१९९३-९४) : या संस्थेची स्थापना १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात झाली. भूकंपग्रस्त विद्यार्थ्यांना व गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, एकंदरीत समाजाच्या कल्याणाकरीता काम करणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

या संस्थेतर्फे विक्रमनगर येथे मुलींचे तर प्रकाशनगर येथे मुलांचे वसतिगृह चालविण्यात येते. मुलींच्या वसतिगृहात ८० विद्यार्थीनी तर मुलांच्या वसतिगृहात ६७ विद्यार्थी असून त्यांना सर्व सुविधा मोफत पुरविल्या जातात. याशिवाय बालवाडया, शिवणवर्ग इत्यादी चालविण्यात येतात.

बाल विकास महिला मंडळ, लातूर (१९८६) : बालविकास महिला मंडळ लातूर या सेवाभावी संस्थेची स्थापना १९८६ साली झाली.

या संस्थेतर्फे खालील उपक्रम राबविण्यात येतात.—

(१) **शिशू सदन** : ० ते ६ वर्षे वयोगटातील अनाथ बालकांसाठी हे सदन काम करते. या बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. सध्या या सदनामध्ये २४ बालके आहेत.

(२) निराश्रित बालकांसाठी (६ ते १८ वर्षे) हे गृह चालविले जात असून त्यांच्या अन्न, शिक्षण व पुनर्वसनासाठी संस्था कार्य करते.

(३) **काम करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह** : या वसतिगृहाची स्थापना १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात झाली असून नोकरी व्यवसायानिमित्त लातूर शहरात आलेल्या महिला व मुलींच्या राहण्याची सोय आहे. सध्या १०० महिला व मुली या वसतिगृहाचा लाभ घेत आहेत.

(४) **संगणक प्रशिक्षण** : घटस्फोटीत, हुंडापिडित, परित्यक्ता, विधवा, निराधार, कुमारी माता इत्यादी अडचणीत असलेल्या महिला व मुलींना भोजन, निवास व व्यवसाय प्रशिक्षणाची मोफत सोय. त्यांना संगणक, टंकलेखन, शॉर्टहँड, बुक बायडिंग, शिवण व कर्तन, खडू, मेणबत्ती, अगरबत्ती, ब्युटी पार्लर व फळ प्रक्रिया इत्यादी प्रशिक्षण देण्यात येतात. या कालावधीत महिला व मुली यांचेसाठी अल्पमुदती वसतिगृहाची सोय आहे.

(५) **व्यसनमुक्ती व उपचार केंद्र** : व्यसनाधिन व्यक्तींना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी हे केंद्र चालविले जाते, येथे त्यांना वैद्यकीय तसेच मानसिक दृष्टीने मार्गदर्शन केले जाते.

(६) **समुपदेशन व मदत केंद्र** : महिलांना त्यांच्या कौटुंबिक, सामाजिक समस्या सोडविण्यासाठी कायदेविषयक मदत व मार्गदर्शन दिले जाते.

या शिवाय मूल दत्तक योजना, महिला बहुउद्देशिय केंद्र असे समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येतात.

गणेश शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर : गेल्या १६ वर्षापासून हे मंडळ मानवी जीवनात येणाऱ्या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. मंडळातर्फे खालील उपक्रम राबविण्यात येतात.

१. **शिशुगृह** : सदर संस्था व केंद्र शासनाच्या मान्यतेने ० ते ६ वयोगटातील, निराधार, अनाथ, बेवारस, मुलांना प्रवेश देऊन त्यांचे संगोपन करते. गरजू व सक्षम पालकांना मुले दत्तकही दिली जातात.

२. **व्यसनमुक्ती केंद्र** : व्यसनी बांधवांना व्यसनमुक्ततेसाठी सल्ला व उपचार देता यावेत यासाठी व्यसनमुक्ती केंद्र चालविले जाते. व्यसनाधिन व्यक्तीवर येथे ३५ दिवस उपचार केला जातो. तो वैद्यकीय, मानसिक सल्ला व उपचार पध्दतीने, हमखास बरा होतो.

३. **अल्प मुदती निवास केंद्र** : या केंद्रात, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत, निराधार, कुमारी माता अशा संकटग्रस्त महिला व मुलींसाठी, टंकलेखन, उत्पादन प्रशिक्षण, शिवण व कर्तन, छपाई, पुस्तक बांधणी, खडू, अगरबत्ती, मेणबत्ती तयार करण्याचे प्रशिक्षण विनामूल्य देण्यात येते. तसेच भोजन व निवासाची मोफत सोय आणि पुनर्वसनासाठी मदत केली जाते.

४. **वृध्दाश्रम** : ज्या वृध्दांना कुठलाही आधार नाही अशा वृध्दांची पूर्णपणे काळजी घेतली जाते. त्यांना दोन वेळचे जेवण, औषधोपचार, कपडे, राहण्याची व करमणुकीची पूर्ण व्यवस्था केली जाते.

५. **काम करणाऱ्या महिलांचे वसतिगृह** : नोकरी करणाऱ्या महिला व व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण घेणाऱ्या मुली व महाविद्यालयीन विद्यार्थीनींसाठी अल्पदरात राहण्याची सोय तसेच पाळणागृहाची सुविधा उपलब्ध आहे.

याशिवाय समुपदेशन व मदत केंद्र, एडस् विषयी जाणीव जागृती शिबिरांचे आयोजन, महिला बचतगट, महिला बहुउद्देशिय केंद्र, बालकाश्रम असे विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविले जातात.

लातूर जिल्हा आरोग्य विषयक एडस् हस्तक्षेप कार्यक्रम (१९९६) : या शिक्षण मंडळाची स्थापना ३१ मे १९९६ रोजी झाली आहे.

समाजातील विविध सामाजिक समस्यांची सोडवणूक, अन्याय, अत्याचार, गुंडागर्दीचा नायनाट, समाजातील दुर्बल घटकांचा सन्मान, शिक्षण, आरोग्य, हक्कांची जाणीव, माणूसकीची जपणूक,अशा विविध समस्यांची सोडवणूक करून समाजाला एक चांगली दिशा देण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण सोसायटी, मुंबई व श्री. गणेश बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ, लातूरच्या वतीने लातूर शहर व विभागातील वेश्या व्यावसायिकांसाठी एडस् हस्तक्षेप प्रकल्प नोव्हेंबर २००२ पासून कार्यरत आहे. यात वेश्या व्यावसायिकांना एच.आय.व्ही.एड्सची शास्त्रीय माहिती देवून वातावरण निर्मिती करणे, निरोध वापरण्यासाठी प्रवृत्त करणे, लैंगिक आजारावर मोफत उपचार करणे, वेश्या व्यावसायिकांच्या मृत्यूनंतर त्यांचा अंत्यविधी करणे, गुंड, दलाल यांच्या विळख्यातून त्यांची मुक्तता करणे, त्यांच्यासाठी भाऊबीज, दिपावली, राखी पोर्णिमा या प्रकारचे सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम घडवून आणणे व त्यांच्यामध्ये जाणीव जागृती करणे, त्यांचे पुनर्वसन करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे.

अनुक्रमणिका

वेश्या व्यावसायिक, अंध, अपंग, निराधार, विधवा, परित्यक्ता, समाजातील दुर्बल घटक हे संस्थेचे लाभार्थी आहेत. याशिवाय वेश्या व्यावसायिकांसाठी मोबाईल एस.टी.डी. क्लिनिक, टी.बी. च्या रुग्णांसाठी मोफत उपचार केंद्र, फिरते प्रदर्शन इत्यादी उपक्रम राबविले जातात.

ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान, बुधोडा : औसा तालुक्यातील बुधोडा या गावी ही संस्था कार्यरत आहे.

१८ ते ३६ या वयोगटातील अंध व अपंगांना संस्थेमार्फत स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देवून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे या उद्देशाने ही संस्था कार्य करते. हातमाग, विणकाम, खडू बनविणे, केनिंग वर्क, झाडू बनविणे इत्यादिंचे प्रशिक्षण दिले जाते. ४ वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यास याच केंद्रात रोजगार दिला जातो. सध्या अंध, अपंग अशी एकूण १२ जोडपी येथे कार्यरत आहेत. त्यांच्या निवास व भोजनाची सोय संस्थेमार्फत केली जाते. या शिवाय महिला समुपदेश व मदत केंद्र, सुधारित जैव इंधने व स्वयंपाक साधनांचे व्यावसायिकरण, ग्रामीण महिला विकास प्रकल्प, आदर्श गाव योजना, शिवाम्बू योग व निसर्ग उपचार केंद्र इत्यादी उपक्रम राबविले जातात.

यातील महत्त्वाचे म्हणजे शिवाम्बू योग व निसर्ग उपचार केंद्र हे होय. या केंद्रात कर्करोग, दमा, मूळव्याध, सोरायसीस, मधुमेह, लकवा, अल्सर, पोटाचे विकार, पोठीचे आजार, मणक्याचे आजार इत्यादी साध्य असाध्य रोगावर उपचार करून त्यांना रोगमुक्त केले जाते. या केंद्रात २० बेडची व्यवस्था असून आजपर्यंत १,००० रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत.

संस्थेतील विविध लाभार्थीची संख्या पुढील विवरणपत्रात दर्शविण्यात आली आहे.

अ.क्र.	उपक्रमाचे नाव	सन २०००-०१ लाभार्थी संख्या	सन २००४-०५ लाभार्थी संख्या
(१)	(२)	(३)	(४)
१	अंध अपंग स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्र	३०	३०
२	अंध अपंग पुनर्वसन केंद्र	२०	२०
३	महिला समुपदेश व मदत केंद्र	--	९६
४	सुधारित जैव इंधने व स्वयंपाक साधनांचे व्यावसायिकरण	--	१०,०००
५	ग्रामीण महिला विकास प्रकल्प	६००	१,०००
६	आदर्श गाव योजना	२,५००	२,५००
७	शिवाम्बु योग व निसर्ग उपचार केंद्र	--	१,०००

संस्थेने राबविलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांबद्दल संस्थेस विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

(१) उत्तम संस्था पुरस्कार	१९९४	एनवायके	लातूर
(२) कै.आण्णासाहेब सहस्त्रबुध्दे रचनात्मक कार्य पुरस्कार.	१९९५	परीवर्तन	औरंगाबाद
(३) चेतनाश्री पुरस्कार	१९९७	चेतना युवा मंच	उजेड
(४) व्यवसाय सेवा पुरस्कार	१९९८	रोटरी क्लब	लातूर
(५) समाजसेवा पुरस्कार	१९९८	दै.मनोगत	औसा
(६) जीवन गौरव पुरस्कार	२०००	डॉ. जगदिश	चिपळूण
	२००१	गोडबोले	सामाजिक संस्था
(७) राजर्षी शाहू महाराज पुरस्कार	२००५	राजे मल्हारराव ट्रस्ट	लातूर

अनुक्रमणिका

विवेकानंद वैद्यकीय संशोधन संस्था, लातूर : लातूर शहरात स्थित असलेली ही वैद्यकीय संस्था विवेकानंद रुग्णालयाच्या माध्यमाने शहरातील व जिल्ह्यातील रुग्णांची सामाजिक बांधिलकीच्या भावनेने सेवा करीत आहे.

लातूर जिल्ह्यातील किल्लारी आणि परिसराला ३० सप्टेंबर, १९९३ रोजी भूकंपाचा तीव्र धक्का बसला तेव्हा या रुग्णालयाचा चमू आवश्यक डॉक्टर, कर्मचारी, औषधे व इतर आवश्यक साहित्यासह किल्लारी परिसरात स्वत:च्या वाहनाने भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी रवाना झाला. शासकीय यंत्रणेपाठोपाठ भूकंपग्रस्त ठिकाणी पोहोचलेला हा पहिला चमू होता.

लातूर येथील विवेकानंद रुग्णालयाच्या मुख्य वास्तूत मोठ्या प्रमाणावर रुग्ण अपेक्षित असल्याने सर्व सिध्दता केली. रुग्णांची प्राथमिक तपासणी, वर्गवारी, प्राथमिक उपचार, प्रवेश देणे, क्ष-किरण चिकित्सा, निदान, उपचार व शस्त्रक्रीया यासाठी डॉक्टर व कर्मचारी यांचे गट पाडून कामाचे वाटप केले. त्याशिवाय जवळच्या राजस्थान शिक्षण संस्थेमध्ये रुग्णांची व्यवस्था करून तेथे उपचार कार्य पूर्ण केले. या व्यतिरिक्त रुग्णालयाची सर्व नित्यकामे पूर्णपणे स्थगित करून सर्वशक्ति भूकंपग्रस्थांच्या सहाय्यासाठी वापरली. उपचाराबरोबरच अन्न, पाणी, कपडे, यांची तातडीने सोय व भूकंपक्षेत्राशी सतत संपर्क ठेवला होता.

या कालावधीत इतर उपचारांबरोबरच १०० लहान-मोठ्या शस्त्रक्रीया करण्यात आल्या. याकामी कुठेही व्यत्यय येऊ नये म्हणून समविचारी संस्थांशी बैठक घेवून समन्वय, नियोजन, कार्यवाहीची दिशा निश्चित करण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारे या पध्दतीने कार्यपूर्ती होईपर्यंत सहा आठवडे काम चालले होते.

एक वर्ष पर्यंत भूकंपक्षेत्रातून येणाऱ्या कोणत्याही रुग्णास कोणत्याही आजारासाठी पूर्ण मोफत उपचाराची सोय केली. स्वीकृत रुग्णाला पूर्ण उपचार होईपर्यंत आधार, आवश्यक ती फिजिओथेरॅपी, उपकरणे व पुनर्वसन यासाठी सक्षम - सुसूत्र यंत्रणा उपलब्ध केली. आलेल्या सर्व रुग्णांचे वैद्यकीय उपचार संपून पूर्ण पुनर्वसन होईपर्यंतची जबाबदारी पार पाडली. सुमारे एक वर्ष हे काम चालू राहिले.

या भूकंपात सर्वात कमी वयाचे म्हणजे केवळ १० दिवसांचे अर्भक सापडले. हेच अर्भक म्हणजे सर्वात कमी वयाचा भूकंपग्रस्त, रुग्णालयाने त्याचा स्वीकार करून **'निवेदिता'** असे नामकरण केले.

शासनाने घेतलेली दखल : शासनातर्फे या संस्थेला प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात आले, १९९४ मध्ये फी फाऊंडेशन राष्ट्रीय पुरस्कार तसेच मा. श्री. के. आर. नारायणन् (तत्कालिन उपराष्ट्रपती) यांचे हस्ते **'अपघात रुग्णालय'** या विशेष प्रकल्पाचे उद्घाटन केले गेले. किल्लारी भूकंप - आपत्कालिन नियोजन या विषयावर अनेक चर्चासत्र, परिसंवाद यात सहभाग. एस. ओ. एस. चिल्ड्रन्स व्हिलेज लातूर - दुसऱ्या महायुध्दामध्ये अनाथ झालेल्या बालकांच्या हालअपेष्टा पाहून डॉ. हरमन मेइनर (Dr. Hermann Gmeiner) यांच्या समोर एस.ओ.एस. चिल्ड्रन्स व्हिलेज ही कल्पना आली. युध्दातील अनाथ बालकांना त्यांनी सर्वतोपरी मदत पुरविली. त्याच बरोबर ऑस्ट्रेलियामध्ये (Tyrol) टेरॉल खिंड या ठिकाणी पहिल्या एस.ओ.एस.चिल्ड्रन्स व्हिलेजची सुरूवात झाली. आज मित्तीला जगातील १२७ देशांमध्ये ही संस्था कार्यरत आहे.

भारतामध्ये दिल्लीजवळ १९६४ साली श्री.जे.एस.कौल यांनी या संस्थेची स्थापना केली. आज भारतात ३२ एस.ओ.एस.व्हिलेजेस आणि १२२ संलग्न प्रकल्प १५,००० बालकांची काळजी वाहतात. त्यांना बालोद्यान पध्दतीवर शिक्षण देणाऱ्या शाळा, सामाजिक आणि आरोग्य केंद्रे इत्यादी सुविधा पुरविल्या जातात.

अनुक्रमणिका

किल्लारी परिसरात भूकंपामध्ये अनाथ झालेल्या बालकांना आधार देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने या संस्थेचे एक केंद्र येथे स्थापन करण्यात आले. एस.ओ.एस.चिल्ड्रन्स व्हिलेज या नावाने कार्यरत असलेल्या या केंद्रामध्ये एकूण १२ घरे, कार्यालय, शाळा, दवाखाना इत्यादींचा समावेश असलेले एक स्वतंत्र गाव कार्यरत आहे. एका घरामध्ये १० बालके व एक माता असे याचे स्वरूप आहे. अनाथ किंवा कोणत्याही बालकाच्या वाढ आणि विकासामध्ये 'आई'चे योगदान मोठे असते ही नस ओळखूनच अनाथ बालकांना 'आई' मिळवून देण्यात आलेली आहे. एका 'आई' वर १० बालकांच्या संगोपन व पालनपोषणाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यांच्यासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाचे सर्व अधिकार तिला देण्यात आलेले आहेत. थोडक्यात आई आपल्या पोटच्या मुलासाठी जे-जे करते ते सर्व येथे उपलब्ध आहे. त्यांचे कपडे लत्ते पाहणे, त्यांच्या आवडी निवडी जोपासणे, त्यांची सर्वतोपरी काळजी वाहणे, याबद्दलचे सर्व स्वातंत्र्य तिला असून ती या कामी सदैव दक्ष असते. या कामाचे मानधन तिला मिळत असले तरी ती या संस्थेची नोकर नसते. घरातील व्यक्ती या नात्याने ती कार्यरत असते.

भूकंपानंतर १२० अनाथ बालकांना आधार देऊन त्यांचे सर्वतोपरी संगोपन व पुनर्वसन करण्याचे कार्य ही संस्था लातूर येथे करीत आहे.

अनार्य रुरल डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च सोसायटी (आर्डर्स) अहमदपूर (१९९९) : या संस्थेची स्थापना १९९९ मध्ये झाली आहे. ग्रामीण भागाचा सर्वंकष विकास करणे, यामध्ये ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा प्रसार करणे, महिला, युवक यांचा विकास, अंधश्रध्दा, दारुबंदी विषयी प्रबोधन, साहित्य, कला व संस्कृति संवर्धन, पर्यावरण जाणीव जागृती, लोकसंख्या नियंत्रण प्रकल्प राबविणे इत्यादी उपक्रम राबविले जातात. खास करून बचत गट व महिला मंडळे याबाबत संस्थेचे चांगले काम आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे फाऊंडेशन तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संस्था उदगीर येथे कार्यरत आहेत.

अशा स्वरुपाचे कार्य करणाऱ्या अनेक संस्था जिल्ह्यात कार्यरत आहेत. त्या सर्वांचीच माहिती गॅझेटिअरच्या पृष्ठमर्यादेमुळे देणे शक्य नाही. त्यामुळे जिल्ह्यातील काही ठळक संस्थांचाच या ठिकाणी थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

राजर्षी शाहू महाविद्यालय आणि 'लातूर पॅटर्न'

लातूर आकृतिबंध (पॅटर्नची) पार्श्वभूमी : बहुजन समाजातील काही ध्येयवादी व्यक्तींनी लातूर येथे शिव छत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना १९६८ मध्ये केली. या संस्थेतर्फे १९७० मध्ये 'राजर्षी शाहू महाविद्यालय' या नावाने पदवी पर्यंतचे महाविद्यालय सुरू करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राध्यापक खाजगी शिकवणीचे वर्ग घेणार नाहीत हे कटाक्षाने सुरूवातीपासून संस्थेने पाहिले व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नामुळे शिक्षणातील एक अनोखा आकृतीबंध निर्माण झाला, त्यालाच 'लातूर पॅटर्न' असे म्हटले जाऊ लागले.

१९७० च्या दशकात संपूर्ण मराठवाड्यातील विद्यार्थी हे स्पर्धेच्या युगात खूप मागे होते. मराठवाड्यातील वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेणारे बरेचसे विद्यार्थी हे मराठवाड्याच्या बाहेरचे असत. या व्यावसायिक अभ्यासक्रमाला मराठवाड्यातील फार थोडे विद्यार्थी पात्र ठरत होते. या परिस्थितीत डॉ. गोपाळराव पाटील, डॉ. जे. एम. वाघमारे, प्रा. अनिरुध्द जाधव आणि संस्थेचे पदाधिकारी व शिक्षक आपण काय करू याचा विचार करत. यातूनच सामाजिक व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी आपण सर्व दीर्घ मुदतीच्या सुट्ट्या तसेच धार्मिक सण व उत्सवाच्या सुट्ट्या कमी करून या विद्यार्थ्यांसाठी जादा वर्ग घ्यावेत, परीक्षेचा सराव करून घ्यावा असा निर्णय प्राध्यापकांनी सामुहिकपणे घेतला.

अनुक्रमणिका

अध्यापनाला नियोजनाची जोड : अभ्यासक्रमातील प्रत्येक विषयाचे अध्यापन कसे करावे याचे प्रशिक्षण संबंधित शिक्षकांना दिले. उदा. अभ्यासक्रमातील प्रत्येक घटक व त्याचे उपघटक हे ठळकपणे फळयावर लिहिणे, क्रमाक्रमाने प्रत्येक घटक व उपघटक विद्यार्थ्यांना समजेल अशा शब्दात समजावून सांगणे, विद्यार्थ्यांना प्रत्येक उपघटक समजला आहे, याची खात्री झाल्यानंतर लगेच त्याचे महत्त्वाचे मुद्दे लिहून देणे, दर महिन्याच्या अभ्यासक्रमावर घटक चाचणी घेणे, संपूर्ण अभ्यासक्रम विशीष्ट वेळेत संपवून बोर्डाच्या व सीईटीच्या धर्तीवर अनेक सराव परीक्षा घेणे. प्रत्येक सराव परीक्षेला विद्यार्थ्यांसमोर ठराविक गुणांचे उद्दिष्ठ ठेवणे, दिलेली उद्दिष्ठे प्राप्त करण्यात सर्व विद्यार्थ्यांना पारितोषिके देवून त्यांची नावे श्रेय फलकावर लिहिणे, त्या-त्या महिन्यातील अध्यापन प्रभावीरित्या झाले की, नाही याची पडताळणी वर्गात जाऊन विद्यार्थ्यांकडून करून घेणे, विद्यार्थी व पालकांच्या वर्षातून किमान दोन संयुक्त बैठकांचे आयोजन करणे, बोर्ड व विद्यापीठ परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर सर्व गुणवत्ता धारक विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा एकत्रित खास समारंभात सत्कार करणे तसेच संबंधित शिक्षक सतत कार्यशील रहावेत म्हणून दिलेल्या उद्दिष्ठांची पूर्ती करणाऱ्या शिक्षकांचा त्यांच्या कुटुंबासहीत शिक्षक दिनी खास समारंभात पुरस्कार देवून सत्कार करणे, शिक्षक व संस्थाचालक यांच्यासाठी महाराष्ट्रातील व देशातील नामवंत शिक्षण संस्था व शाळा महाविद्यालये या ठिकाणी शैक्षणिक सहलींचे आयोजन करणे अशा सर्व गोष्टींचे नियोजन सुरूवातीलाच करतात.

हा उपक्रम सतत १० वर्षे परिश्रमपूर्वक राबविल्यामुळे १९८० साली १२ वी परीक्षेत या महाविद्यालयाचे तीन विद्यार्थी बोर्डाच्या गुणवत्ता यादीत येऊ शकले. सतत नवनवीन प्रयोग केल्याने दरवर्षी १२ वी परीक्षेत गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वरचेवर वाढत गेली. गेल्या २० वर्षात १२ वी बोर्ड परीक्षेच्या गुणवत्ता यादीतील एकूण विद्यार्थ्यांपैकी ३० ते ४०% विद्यार्थी या महाविद्यालयाचे आहेत. तसेच विद्यापीठाच्या बी. कॉम परीक्षेत गेली १० वर्षे पहिले दोन विद्यार्थी या महाविद्यालयाचे असतात.

वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी या महाविद्यालयातील विद्यार्थी सामान्य प्रवेश परीक्षेत (सीईटी) कमी पडू नयेत म्हणून विशेष नियोजन व प्रयत्न करून सामान्य प्रवेश परीक्षेची (सीईटी) खास तयारी येथील विद्यार्थ्यांकडून करून घेतली जाते.

राजर्षी शाहू महाविद्यालयाने निर्माण केलेल्या या वातावरणाचा चांगला परिणाम या जिल्ह्यात इतर संस्थांवरही झाला. बारावीप्रमाणे दहावीच्या निकालात सुध्दा अनेक वेळा राज्यातून पहिले येणारे विद्यार्थी हे लातूर जिल्ह्याचे व गुणवत्ता यादीत सर्वाधिक संख्येने येणारे विद्यार्थी याच जिल्ह्यातील असतात.

दहावीसाठी लातूर येथील देशीकेंद्र विद्यालय, केशवराज विद्यालय, ज्ञानेश्वर विद्यालय, बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, राजस्थान विद्यालय यांनी सतत उत्कृष्ठ निकालाची परंपरा निर्माण करून स्वत:चा ठसा कायम केला. बारावीच्या परीक्षेत जिल्ह्यातील राजर्षी शाहू महाविद्यालय, दयानंद विज्ञान महाविद्यालय, बसवेश्वर महाविद्यालय व अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालय यांचेकडे लातूर आकृतिबंधाचे श्रेय जाते.

महाराष्ट्र शासनाने २००० पासून आदर्श शिक्षक पुरस्काराप्रमाणेच आदर्श शिक्षण संस्थांनासुध्दा पुरस्कार सुरू केले. पहिला पुरस्कार लातूरच्या शिवछत्रपती शिक्षण संस्थेला देऊन गौरव केला. दहावी व बारावीचे निकाल उंचावण्यासाठी लातूर पॅटर्नचा अंगिकार महाराष्ट्रातील सर्व संस्थांनी करावा, असे परिपत्रक महाराष्ट्र शासनातर्फे काढण्यात आले. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या पातळीवर महाविद्यालयांचे मुल्यांकन करणाऱ्या नॅक या संस्थेने राजर्षी शाहू महाविद्यालयाला गुणासहीत ध्अ' श्रेणी दिली. यामधून विविध विद्यालयास प्रेरणा प्राप्त झाली आहे.

सन २००६-०७ मध्ये झालेल्या शालांत व माध्यमिक परिक्षेत लातूर पॅटर्नने मिळवलेले यश लक्षणीय आहे. शिवाय सीईटी परिक्षेतसुद्धा वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक १

जिल्ह्यातील प्रौढ शिक्षण केंद्रे व त्यात दाखल झालेले प्रौढ

		१९८३-८४				१९९१-९२			
अ.क्र.	तालुका	केंद्र संख्या	पुरुष	महिला	एकूण	केंद्र संख्या	पुरुष	महिला	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१	अहमदपूर	६०	८६०	९४०	१,८००	२९९	३,३२७	५,६०९	८,९३६
२	उदगीर	३०	४२०	४८०	९००	--	--	--	--
३	निलंगा	--	--	--	--	--	--	--	--
४	औसा	३०	४०५	४८०	८८५	१३	१६६	१२०	२८६
५	लातूर	--	--	--	--	१८८	१,८७६	३,७६४	५,६४०
	एकूण ...	१२०	१,६५०	१,९००	३,५८५	५००	५,३६९	--	१४,६८२

तक्ता क्रमांक २

प्राथमिक शाळांची आकडेवारी, सन १९८२-८३, ते १९९६-९७

तपशील	१९८२-८३	१९८५-८६	१९९१-९२	१९९३-९४	१९९४-९५	१९९५-९६	१९९६-९७
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८))
प्राथमिक शाळा, एकूण	१,०५०	१,०९६	१,०२३	१,०२३	१,२५३	१,२९८	१,५४२
मराठी माध्यम	१,०५०	१,०९६	१,०२३	१,०२३	१,२५३	१,२९८	१,५४२
शिक्षक संख्या, एकूण	४,४८१	४,९५३	५,१५७	६,०६४	६,०४४	८,२५९	१०,४७९
प्रशिक्षित पुरुष	३,३६५	४,०२६	४,५१७	५,१८७	६,४७४	६,६१२	७,४०३
प्रशिक्षित स्त्रिया	२८३	५५२	४५४	२०३	१,२२३	१,२७७	१,८१३
अप्रशिक्षित पुरुष	२६४	२७०	१४४	६०१	२८९	२४०	९१९
अप्रशिक्षित स्त्रिया	४१	१०५	४२	७३	१२८	१३०	३४४
विद्यार्थी एकूण	१,८८,०९२	२,०३,३७८	१,८३,५६७	१,७८,९२३	२,०४,७३३	२,२०,२४९	२,१७,२८०
मुले मराठी माध्यम	१,०६,८९४	१,११,२१६	९६,३०४	८१,५९९	१,०१,९६७	१,१७,७००	९९,६७२
मुली मराठी माध्यम	७८,१९८	९२,१६२	८७,२६३	८७,३२४	१,०२,७६६	१,०२,५४९	१,१७,६९८
मुले इंग्रजी माध्यम	--	--	--	--	--	--	--
मुली इंग्रजी माध्यम	--	--	--	--	--	--	--

तक्ता क्रमांक ३

लातूर जिल्हयातील महाविद्यालयांची यादी-- सन १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००२*

अ.क्र.	महाविद्यालयाचे नाव	विद्याशाखा	स्थापना वर्ष
(१)	(२)	(३)	(४)
१.	दयानंद कला महाविद्यालय, लातूर	कला	१९६१
२.	दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर	वाणिज्य	१९६०
३.	दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर	विज्ञान	१९६१
४.	महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर	कला, वाणिज्य, विज्ञान व समाज कार्य	१९७०

* आधार - वार्षिक अहवाल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, २००२.

Maharashtra State Gazeteers

(१)	(२)	(३)	(४)
५.	राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर	कला, वाणिज्य, विज्ञान	१९७०
६.	महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर	कला, वाणिज्य व विज्ञान	१९६२
७.	श्री.शिवाजी महाविद्यालय, उदगीर	कला, वाणिज्य व विज्ञान	१९६८
८.	श्री. हावगी स्वामी महाविद्यालय, उदगीर	कला, वाणिज्य व विज्ञान	१९७२
९.	महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर	कला, वाणिज्य, विज्ञान व वाणिज्य व्यवस्थापन.	१९६९
१०.	मा. दिनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजनी.	कला, वाणिज्य व विज्ञान	१९७०
११.	महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा	कला, वाणिज्य व विज्ञान	१९७०
१२.	श्री. कुमार स्वामी महाविद्यालय, औसा	कला, वाणिज्य व विज्ञान	१९७१
१३.	संभाजी महाविद्यालय, मुरुड.	कला व वाणिज्य	१९९०
१४.	लोकमान्य वरिष्ठ महाविद्यालय, चाकूर	कला व वाणिज्य	१९९०
१५.	शिवाजी महाविद्यालय, रेणापूर	कला व वाणिज्य	१९९३
१६.	डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, लातूर	कला, वाणिज्य व विज्ञान	१९९४
१७.	दयानंद विधी महाविद्यालय, लातूर	विधी	१९७१
१८.	कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव.	कला	१९९४
१९.	शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव	कला	१९९८
२०.	उज्ज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणशी	कला व वाणिज्य	१९९८
२१.	पं.दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी	कला	१९९८
२२.	संजीवनी महाविद्यालय, चाकूर	कला	१९९९
२३.	कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती.	कला	१९९९
२४.	शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ	कला	२०००
२५.	महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर	कला	२०००
२६.	अहिल्यादेवी कला महाविद्यालय, जळकोट	कला	२००१
२७.	श्री. शिवाजी वरिष्ठ महाविद्यालय, किल्लारी	कला, वाणिज्य व विज्ञान	२००१
२८.	विकास कला महाविद्यालय, बोरी	कला व विज्ञान	२००१
२९.	संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट	कला	२००१
३०.	श्रीमती सुशिलादेवी देशमुख महाविद्यालय, लातूर.	शास्त्र, वाणिज्य, सामाजिक शास्त्रे.	१९९१

या शिवाय जिल्ह्यात साधारणपणे १५ अध्यापक विद्यालये, २ वैद्यकीय महाविद्यालये, ३ शारिरीक शिक्षण महाविद्यालये, होमिओपॅथी, फार्मसी, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने, शेतकी शाळा, कार्यरत आहेत.

अनुक्रमणिका

तक्ता क्रमांक ४

जिल्हा परिषद अनेक शिक्षकी शाळा, पटनोंदणी*

सन २०००-०१

अ.क्र.	पंचायत समिती	इयत्ता १ ली ते ४ थी प्राथमिक शाळा				इयत्ता १ ली ते ७ वी			
		शाळा	मुले	मुली	एकूण	शाळा	मुले	मुली	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१	लातूर	८९	१२,७८०	१२,२६१	२५,०४१	१६७	३१,४६४	२,९५,१३५	३०,९७७
२	औसा	९५	९,४७३	८,८३१	१८,३०४	९९	१४,४०८	१३,५९२	२८,०००
३	निलंगा	७८	७,४०४	४,५१४	११,९१८	११८	१९,४४१	२१,८०७	४१,२४८
४	उदगीर	१३५	८,९१५	७,९२९	१६,८४४	१७४	२४,५८८	२४,१२५	४८,७१३
५	अहमदपूर	१०९	५,९३३	५,३३६	११,२६९	९४	१२,२९८	११,८४८	२४,१४६
६	चाकूर	५७	२,४७६	२,१९७	४,६७३	५८	६,५८०	७,८०६	१४,३८६
७	रेणापूर	५०	१,७९९	१,७३८	३,५३७	५३	५,९१३	६,४५५	१२,३६८
	लातूर नगरपालिका	१५	६६३	७०७	१,३७०	०८	७१६	७३६	१,४५२
	एकूण ...	६२८	४९,४४३	४३,५१३	९२,९५६	८११	१,१५,४०८	३,८१,५०४	२,०१,२९०

* आधार जिल्हा परिषद अहवाल सन २०००-२००१, पृ. ११८.

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक ५

जिल्ह्यातील मोफत शिक्षणाचे सार्वत्रिकरण सन २०००-२००१*

अ.क्र.	पंचायत समिती	बहुशिक्षकी शाळा व पटनोंदणी			प्रत्यक्ष नोंदणी			वयोगट ११ ते १३			प्रत्यक्ष नोंदणी		
		मुले	मुली	एकूण	मुले	मुली	एकूण	मुले	मुली	एकूण	मुले	मुली	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)
१	लातूर	५४,६३२	४९,३७२	१,०४,००४	५१,४६८	४८,६७०	१,००,१३८	४,५७२	४,३४३	८,९१५	४,२७०	४,११०	८,३८०
२	औसा	२२,६६९	२२,६६९	४६,३५९	२२,४७२	२१,३३४	४३,८०६	३,६७२	३,४७०	७,१४२	३,२८८	३,२११	६,४९९
३	निलंगा	२७,४८८	२७,४८८	५३,८३१	२३,९४८	२६,९८९	५०,९३७	६,३४४	५,९७८	१२,३२२	६,१७२	५,६४२	११,८१४
४	उदगीर	३४,२४९	३४,२४९	७०,१७३	३२,८६५	३३,६४७	६६,५१२	६,३४७	५,९७८	१२,३२५	६,२२९	५,३१८	११,५४७
५	अहमदपूर	२२,२९८	२२,२९८	४६,७३७	२३,६३९	२१,६७१	४५,३१५	३,८९०	३,६४८	७,५३८	३५,५७७	३,४१६	६,९९३
६	चाकूर	११,९९१	११,९९१	२४,६६३	११,७९०	९,६३८	२१,४६८	१,५७९	१,६७७	३,२५६	१,४८०	१,२४८	२,७२८
७	रेणापूर	९,६७५	९,६७५	२०,१४९	९,८४४	८,७४७	१८,३९१	१,९४५	१,७६२	३,७०७	१,८४५	१,६७०	३,५१५
	एकूण ...	१,८८,९७४	१,७७,७४२	३,६५,९१६	१,७६,०२६	१,७०,७४१	३,४६,७६७	२८,३४९	२६,८५६	५५,२०५	२६,८६१	२४,६९५	५१,४७६

* आधार : जिल्हा परिषद अहवाल सन २०००-२००१, पृ. ११९.

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ११ : संस्कृती

- ऐतिहासिक परंपरा आणि सांस्कृतिक वारसा
- लातूर जिल्ह्यातील वाङ्मयीन परंपरा
- वैदिक परंपरा आणि लातूर जिल्हा
- लातूर जिल्ह्यातील शिलालेख आणि ताम्रपट
- संत परंपरा
- साहित्य व साहित्यिक
- हिंदी साहित्यिक
- संगीत
- नाट्यक्षेत्र
- चित्रपट
- शिल्पकला व चित्रकला
- लोककला
- क्रीडा
- जिल्ह्यातील नेतृत्व
- वृत्तपत्रे व पत्रकारिता
- परिशिष्ट-एक
- सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या योजना

प्रकरण ११

संस्कृति *

ऐतिहासिक परंपरा आणि सांस्कृतिक वारसा

लातूर जिल्ह्याला तसा फार मोठा प्राचीन वारसा आहे. 'रत्नापूर माहात्म्य' या अपूर्ण स्वरूपात सापडलेल्या हस्तलिखितात तसेच जैमिनी अश्वमेध आणि स्कंद पुराण यात गौरवाने उल्लेखिलेल्या मयुरध्वज आणि त्याचा पुत्र ताम्रध्वज या प्रतापी राजांची वैभवशाली राजधानी म्हणजे आजचे लातूर. त्या काळी या शहराचे नाव 'रत्नापूर' असल्याचा उल्लेख सापडतो. मात्र इतिहास संशोधकांच्या मते या शहराचे प्राचीन नाव 'लत्तलूर' होते. लातूर या ग्रामनामाचा संदर्भ सातव्या-आठव्या शतकापासून मिळतो. प्रामुख्याने मराठी, कानडी आणि संस्कृत भाषेतील शिलालेखात, ताम्रपटात तो आलेला असून मराठी भाषेत एक वेळा, संस्कृतमध्ये तीन वेळा, तर कानडीत सहा वेळा हा उल्लेख सापडतो. यात लत्तनूर-लत्तलूर-लतनौर-रट्टनोर असा उल्लेख आहे.

श्रीमंत प्रौढ प्रताप चक्रवर्ती श्री.कान्हेराव हा राज्य करीत असतांना त्याचा "पादपदनोपजीवी राठोड वंशोद्भव सोमवंश कुलात नव केशवजी देवीच्या वराने लाभलेला लत्तलौरपुराचा प्रसाद" असा उल्लेख उदगीर तालुक्यातील कानेगाव (कान्हेगाव) येथील शिलालेखात आढळतो. हा ३५ ओळींचा शिलालेख मराठी भाषेत असून त्याचा काळ सन १२५८ आहे. तसेच राजा कृष्णदेवाने होमहवनासाठी दान दिलेल्या गावांच्या नोंदी या शिलालेखात आहेत.

लातूर शहरात भूतनाथाचे एक प्राचीन मंदिर असून शेजारी पापविनाश हे भव्य तीर्थ आहे. मंदिरात अस्पष्ट असा शिलालेख असून त्याचे वाचन[१] प्रसिध्द इतिहास संशोधक श्री.ग.ह.खरे यांनी केले आहे.

हा महत्त्वपूर्ण शिलालेख असून त्याची तिथी १० फेब्रुवारी ११२८ ही येते. या शहराचे प्राचीन नाव 'लत्तलौर' होते हे सिध्द होते. तसेच या नगरीत पाचशे विद्वानांचे वास्तव्य होते

---

* या प्रकरणाच्या काही मजकुराचे लेखन प्रा.डॉ.सुर्यनारायण रणसुभे, प्रा.भगवान काळे, श्री.सु.ग.जोशी व श्री.सुधाकरराव कुलकर्णी यांनी केले आहे.

[● संपादकीय टीप : या प्रकरणातील एकूण नोंदी या सर्वंकष नोंदी नसून त्या प्रातिनिधीक आहेत.]

१. भूतनाथ मंदिरातील लेख : स्वस्त्यास्ति विस्त्रुगुणैक निश्चिश्च ल्युक्य वंशो यशो (श:) कुसुम वासितकि काय: शंभोरवा प्रजननी जनरं जनश्रीय कामिनी विपुल कुंतल मडलाभ तस्मि (तीस्मून) आहवल्लदेव नृपतिर्ज्जा तो पृथिव्या (व्या:) पति तत्सून परर्मीदं देव इति (या:)
ख्यातो महन्द्र प्रभ: । तस्यात्म प्रथवे जयांकिततनो भूलोक मल्ले नृपे । राज्यं शासति रामवस्तसु विपुल धर्म्या - मसप्रजा आस्तिदिव्यं पुरस्रेष्ठं लत्तलौरा भिधान कम । महाजनै: पंचशतैब्बे विम्दान्नि पोषित देवस्ति प्रथित स्तत्र नाम्नापाप विनाशानं यं दृष्ट्वा देवदेवेश सिध्यति मनुजा भुवि।। (ग.ह.खरे संपा., **दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने**, खंड १) या लेखाचा कालही दुसऱ्या भागावर कोरलेला आहे - शक नृप कालात ए कोग पंचाश दुतरे। वत्सर सहस्र अतीते १०४९ प्लवंग संवत्सरे फाल्गूनमासि - शुक्लपक्ष म्यां शुक्र वासरे।

हेही लक्षात येते. कल्याणीचा चालुक्य राजा आहवमल्ल, त्याचा मुलगा परमर्दि व त्याचा मुलगा भूलोकमल्ल अशा तीन पिढ्यांचा यात उल्लेख आहे. प्रत्यक्षात आहवमल्ल,परमर्दि व भूलोकमल्ल ही नावे नसून पहिला सोमेश्वर, त्याचा पुत्र सहावा विक्रमादित्य व त्याचा पुत्र तिसरा सोमेश्वर या राजांची ही बिरुदे आहेत. या संदर्भात आणखी एक महत्त्वपूर्ण नोंद सापडते ती म्हणजे हिरे मुदनूरच्या शिलालेखात उल्लेखिलेला महामंडळेश्वर जोगमरस, माडगीहाळ शिलालेखात उल्लेखिलेला कुंतल देशी जोगम बिज्जल आणि तालिकाड जोग मनूप हे तीन वेगवेगळे राजे नसून जोगमरसाचा उल्लेख तीन वेगवेगळ्या नावाने आलेला आहे. तेर येथील त्रिविक्रम मंदिरातील शिलालेखातही जोगमरसाचा उल्लेख आहे. जोगमरसाच्या पत्नीचे नाव तारादेवी असे असून तिच्या कन्येचा-सावळादेवी हिचा विवाह चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याच्याशी झाला होता. शके १००० ची ही घटना आहे. याच विक्रमादित्याचा उल्लेख लातूरच्या भूतनाथ मंदिराच्या शिलालेखात आहे.

'सिध्देश्वर' हे या नगरीचे ग्रामदैवत असून येथे सिद्धेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात बाराव्या शतकातील एक शिलालेख आहे. तो पुढीलप्रमाणे वाचला गेला आहे.

"स्री सिध्देश्वर देवस्य वसते हार ने य अकाधारो अरी एं ग्रोम हलं निवर्त नानि ३६ प्रतिपालनयिम् । ब्राह्मण तपो धना नामधिकारो हरेत वसुंधरोषष्ठी वर्ष सहस्राणि विष्ठायां जायाते क्रिमि (मि:) मंगल मह श्री."।

हा शिलालेख दहा ओळींचा असून सिध्देश्वर देवाला ३६ निवर्तने भूमि दिल्याचा उल्लेख त्यात आहे. या भूमिवर ब्राह्मण, तपस्वी यांचा कसलाही अधिकार नसल्याचा स्पष्ट उल्लेखही यात करण्यात आला आहे. शिरूर-अनंतपाळ तालुक्यातील गणेशवाडी येथेही एक लेखयुक्त शिळा सापडली आहे. या शिळेवर एकूण तीन लेख कोरलेले असून त्यापैकी दोन लेख चालुक्य नृपति विक्रमादित्य सहावा याचे असून तिसऱ्या लेखात राजवंशाचा उल्लेख नाही. गणेशवाडी हे चालुक्य काळात पाशुपत शैव पंथाचे किंवा शिवलिंगी सन्तानाचे मुख्य पीठ होते. या पंथाच्या गणेशवाडी येथील पाठशाळेच्या संचालनासाठी शैव आचार्यांची नियुक्ती करण्यात आल्याची नोंद या लेखात केलेली आहे.[२] या नोंदीवरून या नगरीचे प्राचीनत्व लक्षात येते.

महापराक्रमी राष्ट्रकूट राजांची लातूर ही वतनभूमी होय. या नगरीचे ते मूळ रहिवासी होते. त्यामुळे लातूरचे मूळनाव 'रट्टल अरु' असे असावे. 'अरु' हा कानडी शब्द असून त्याचा अर्थ 'गाव' असा आहे. म्हणजे रट्टलचे गाव ते 'रट्टल अरु' असे असावयास हरकत नाही. सातवाहन, कलचुरी, राष्ट्रकूट, चालुक्य, होळसळ, यादव या घराण्यातील राजांनी या प्रदेशावर राज्य केले असे उल्लेख प्राचीन कागदपत्रे, शिलालेख आणि ताम्रपटांतून आढळतात. राष्ट्रकूट म्हणजे राष्ट्रनायक, देशाच्या विशाल भागाचा अधिपती होय. या राष्ट्रकुटांच्या मानपूरचे राष्ट्रकूट, विदर्भाचे राष्ट्रकूट, मान्यखेटचे राष्ट्रकूट आणि लातूरचे राष्ट्रकूट अशा शाखा होत्या. म्हणजेच फार मोठा भूप्रदेश राष्ट्रकुटांच्या ताब्यात होता. लातूरहून गेलेले राष्ट्रकूट राजे स्वत:स लत्तलूरपुरविनिर्गत, लत्तलूरपुरपरमेश्वर, लत्तलूरपुरवरेश्वर, लत्तलुरपुरवराधिश्वर इत्यादी बिरुदे गौरवाने लावीत. राष्ट्रकूट राजे साहित्य, नाट्यकलेचे

२. या शिलालेखाविषयी सविस्तर माहिती **प्रेक्षणीय स्थळे** या प्रकरणात दिलेली आहे.

उपासक होते. वेरूळचे पाषाण शिल्प त्यांच्याच काळात खोदले गेले. अशा महापराक्रमी राष्ट्रकूट राजांची लत्तलूर (लातूर) ही वतनभूमी होय. याशिवाय निळगुंद शिरुरच्या शिलालेखात 'लत्तलूर', सौदत्तीच्या शिलालेखात 'लत्तलूर', भोजच्या ताम्रपटात 'लत्तनूर', सितावल्दी (सीताबर्डी) येथील शिलालेखात 'लत्तलौर' असे या शहराचे प्राचीन उल्लेख आढळतात.

राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष पहिला हा 'लत्तलूर' या नगरीचा पहिला अधिपती होता. त्यानेच हे शहर वसविले अशी नोंद सापडते. राष्ट्रकूट, चालुक्य आणि यादव काळात एक वैभवसंपन्न अशी ही नगरी होती. याशिवाय औसा, उदगीर, किल्लारी अशा काही नगरांनाही प्राचीन वैभवसंपन्न इतिहास आहे. राष्ट्रकूट आणि बदामीच्या काळात औसा ही एक प्रगत नगरी होती. जैन साहित्यात या नगरीचा 'असाई' असा उल्लेख आढळतो, तर काही कागदपत्रांत 'उच्छीव' असाही उल्लेख आढळतो. 'उच्छी' हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ श्रेष्ठ किंवा प्रमुख असा होतो. बदामीच्या चालुक्यांच्या काळात गज्जे-४० हे चाळीस गावांच्या समुहाचे मुख्य केंद्र होते. जिनसेन या आठव्या शतकातील लेखकाने औसा नगराचा औच्छ असा उल्लेख केला आहे. जैनमुनी कनकामर रचित 'करकण्डचरिय' या ग्रंथात 'असाई नगरी' असे नाव आढळते. यादवांच्या सैन्याची छावणीही (बिड) तिथे होती. जैन धर्माचे पीठही होते. येथील किल्ल्याचे बांधकाम बहमनी काळात झाले. निजामशाहीच्या पडत्या काळात मलिक अंबर याने हा किल्ला जिंकून त्याची डागडुजी केली होती. 'उच्छी ' हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ श्रेष्ठ किंवा प्रमुख असा होतो.

लातूर शहरात जैनांचे वास्तव्य होते. सम्राट अमोघवर्ष (इ.स.८१४ ते ८८०) हा धर्मनिष्ठ जैन राजा होता. जैन धर्माला राजाश्रय मिळाल्यामुळे अनेक मठ-मंदिरे या परिसरात उभारली गेली. श्री. मूलनायक १००८ चिंतामणी पार्श्वनाथांचे मंदिर, जैन गल्लीतील दिगंबर जैन मंदिर, भगवान शांतीनाथाची सात फूट उंचीची मूर्ती याची साक्ष आहे. लातूर येथील दिगंबर जैन मंदिरामध्ये भट्टारक परंपरा जुनी आहे. जनार्दन नावाचे कवी या भट्टारक परंपरेतील असून ते भट्टारक चंद्रकीर्ती यांचे शिष्य होते. त्यांनी श्रेणिक पुराण हा चाळीस अध्यायांचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात जैन व जैनेतर मराठी वाङ्मयाचा लेखकाचा असलेला अभ्यास व्यक्त होतो. चतुर्थांचे भट्टारक जीनसेन हे सेतवाल जैनांचे भट्टारक विशालकीर्ती म्हणून ओळखले जातात. हे भट्टारक पीठ विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात विराम पावले.

लातूर शहरात लिंगायत समाज मोठ्या प्रमाणात आहे. शिवभक्त असलेला हा समाज 'चौदा घर' व 'पाचशे घर' या दोन मठांना खूप मानतो. या मठांची स्थापना नेमकी केव्हा झाली हे सांगता येणे अवघड आहे. पण या दोन्ही मठांत भाद्रपद वद्य पक्षात भव्य स्वरुपात सप्ताह साजरे होतात. चौदा घर मठात होणारा उत्सव झंगिन्नप्पा महाराज व सिध्दमलस्वामी यांच्या नावाने साजरा होतो. लातूरमध्ये दुसरा मठ पाचशे घर या नावाने प्रसिध्द असून येथेही शिवमंदिर आहे. मन्मथ स्वामींच्या मूर्तीची स्थापनाही या मठात केली आहे.

लातूर ही नगरी प्राचीन, ऐतिहासिक आणि वैभवशाली नगरी असून या नगरीत अनेक राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक स्थित्यंतरे झाली आहेत. कधीकाळी या नगरीत सिध्देश्वर, आत्मलिंग, सोमेश्वर, रत्नेश्वर, घृष्णेश्वर, धुलेश्वर, भीमाशंकर, अमलेश्वर, भूतेश्वर, भैरवेश्वर, हाटकेश्वर रुद्र आणि ज्योतिर्लिंग रामेश्वर अशी बारा ज्योतिर्लिंगे व सिध्दतीर्थ, नृसिंह तीर्थ, भोगतीर्थ, नागतीर्थ, स्वामीतीर्थ, पद्मतीर्थ, रामतीर्थ आणि पुष्कर अशी आठ तीर्थ होती. त्यातील आज काही अवशेषरुपात येथे आढळतात, तर काही आजही उत्तम स्थितीत आहेत. या प्राचीन मंदिरे व तीर्थांवरून कधीकाळी ही नगरी वैभवसंपन्न असल्याचे जाणवते. राष्ट्रकूट, चालुक्य, यादव, मुघल यांच्या काळात लातूर शहराला प्रशासनात महत्त्वपूर्ण स्थान होते व आजही या नगरीचा महाराष्ट्रभर गौरवाने उल्लेख केला जातो.

अनुक्रमणिका

लातूर जिल्ह्यातील वाङ्मयीन परंपरा[3]

लातूर नगरीची प्राचीनता शिलालेख-ताम्रपटांद्वारा पौराणिक ठरते. ही परंपरा विविध साधनांनी परिपूर्ण आहे. आधार वाङमयात हस्तलिखिताचा क्रमांक पहिला ठरतो. या संदर्भात लातूर जिल्ह्यात साधारणतः संस्कृत आणि मराठी हस्तलिखिते पाच हजारांपर्यंत प्राप्त होतील. या संदर्भात विविध प्रयत्नांचा, संग्रहांचा आढावा घेतला जाणार आहे. हा आढावा सर्व धर्म-संप्रदाय आणि पंथांचा आहे. यात वैदिक संस्कृतिचा प्रभाव दिसून येतो. पण हा आढावा परिपूर्ण आहे असे नाही.

मागील काळात प्रत्येक गावी पोथी-ग्रंथ वाचनाची परंपरा होती. यात एकाने मूळ ओवी वाचावी आणि दुसऱ्याने त्याचा भावार्थ विवरणात्मक पध्दतीने विषद करावा-सांगावा. यात श्रीधर स्वामीकृत हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, महिपतीकृत भक्तविजय, भक्ती लिलामृत आदी ओवीबध्द ग्रंथ मिळून ही परंपरा चालू होती. सध्या कालमानानुसार ती लोप पावत आहे.

ज्याला क्षरण किंवा झीज नाही ते अक्षर. ही परंपरा वेदकाळापासून सुरू झाली. प्राचीन भारतीय साहित्यात अक्षरांचा उपयोग सुरू झाला. या काळात लेखनासाठी भूर्जपत्रे आणि ताडपत्रे यांचा उपयोग होत असे. नंतर सुधारणा होऊन स्थिर स्वरूपात असणाऱ्या, चिरकाल टिकणाऱ्या ताम्रपटांचा उपयोग होऊ लागला. नंतरच्या काळात राजा अशोकाचे प्रस्तरलेख पाषाणावर कोरलेले दिसू लागले. नंतर प्रगती होऊन बऱ्याच कालांतराने कागदाचा शोध लागून त्याचा प्रसार झाल्यावर, बहुतेक सर्व लेखन कागदावर होऊ लागले. नवीन सुधारणा होऊन मुद्रणकलेचा शोध लागताच लेखनकलेचा प्रचंड प्रसार झाला.

सर्व अध्ययन संस्कृत भाषेत असे. सर्व ग्रंथांची हस्तलिखिते संस्कृत भाषेत असत. ही साधने असलेल्या संग्रहास 'सरस्वती भांडागार' असे म्हणत असत. या साधनांचा संग्रह मठ-मंदिरात, राजवाड्यात तसेच देशमुख-देशपांडे यांच्या संग्रहातही असे. अध्ययनार्थ ही साधने लिहून ठेवण्यासाठी भूर्जपत्रे आणि ताडपत्रांचा उपयोग होत असे. ही साधने लिहून घेण्यासाठी लेखकांना परगावास पाठवून अपेक्षित ग्रंथांची हस्तलिखिते त्यांच्याकडून लिहून घेत असत.

भूर्जपत्रावर लिहिलेला दुसऱ्या-तिसऱ्या शतकातील अतिप्राचीन ग्रंथ (पोथी) 'धम्मपद' खरोष्ट्री लिपित आहे. सहाव्या-सातव्या शतकातील हस्तलिखिते अद्याप सुरक्षित आहेत. देवगिरी यादवांचे राज्य इ.स. १३१८ ला लयाला गेले. याच काळात इस्लामी राजवटीने लाखो पोथ्यांचा संग्रह नष्ट केला. मठ-मंदिरे संपविण्यात आली. विचार-आचार-सदाचार मंदावले. केवळ इस्लामी यादवी सत्तेने हिंदू अवशेष आणि हिंदू ग्रंथ नष्ट केले. इस्लामी प्रभाव वाढला. याच काळात महानुभावांचा 'लीळाचरित्र' ग्रंथ नष्ट झाला. हा ग्रंथ नष्ट होण्याचे कारण मुस्लिमांच्या धाडी हेच आहे. सर्वत्र पळापळी आणि दंगेधोपे होत असत. याच काळात शिवकालास प्रारंभ झाला. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, अनुभवामृत, हरिपाठ आणि अभंग मिळणेही कठीण झाले. नंतर पैठणच्या एकनाथ महाराजांनंतर काही काळ बरा गेला. पण इस्लामी प्रभाव असल्याने हिंदुत्वाचा अभाव जाणवू लागला. तेराव्या-चौदाव्या शतकातील लेखन परंपरा फार कमी प्रमाणात उपलब्ध आहे. मराठवाड्यावर आणि लातूर जिल्ह्यावर इ.स.१३५० ते १९४७ पर्यंत म्हणजे ५९७ वर्षे इस्लामी प्रभाव होता.

३. या भागाचे लेखन सु.ग.जोशी, लातूर यांनी केले आहे.

लातूर जिल्ह्यात शेकडो-हजारो हस्तलिखित पोथ्या उपलब्ध आहेत. मांजरा-तेरणा-तावरजा नदीकाठी अद्याप महानुभाव, रामदासी, गाणपत्य, दत्त, वारकरी आदी परंपरा टिकून आहेत. निलंगा, बेलकुंड, अहमदपूर (राजूर), शिरूर अनंतपाळ, किल्लारी, औसा, वाढवणा या प्राचीन स्थळी या परंपरा आहेत. निलंगा येथील कै. गोविंदाचार्य केसरी यांचा संग्रह पिढीजात आहे. यांच्या पूर्वजांची ग्रंथलेखन आणि ग्रंथ संग्रह परंपराही प्राचीन आहे. यांच्या पूर्वजांनी विविध शास्त्रांत प्राविण्य संपादन केले होते. अनेक ग्रंथांची निर्मिती आणि अनेक ग्रंथांचा संग्रह करून 'सरस्वती भांडार' निर्माण केले होते.* ही परंपरा सतराव्या-अठराव्या शतकापासूनची आहे. हा 'केसरी संग्रह' सध्या कोठे आहे, हे मात्र कळत नाही. निलंगा येथील अनेक आचार्य घराणी हस्तलिखित संग्रहांनी अद्याप संपन्न आहेत. याच गावी नीलकंठ मंदिराच्या पवित्र परिसरात श्री. समर्थ रामदास प्रेरित मठ आहे. येथील अधिपती अण्णाप्पा गोस्वामी-गोसावी यांनी मुसलमानी राज्यात मठ निर्माण केला. यासोबत भालकी, भातंब्रे, पांगरी आणि कसबे तडवळे येथेही मठ स्थापन केले. या मठांत हजारो पोथ्यांचा संग्रह होता. समर्थभक्त कै. शंकर श्रीधर देव यांनी हा संग्रह येथून धुळे येथे नेऊन तेथे 'श्री. समर्थ वाग्देवता मंदिर' स्थापन केले. हा संग्रह सुरक्षित असून अभ्यासूंना उपलब्ध आहे. श्री. अण्णाप्पा यांच्या कविता-रचना धुळे येथील 'रामदास-रामदासी' या मासिकात प्रकाशित झालेल्या आहेत.

श्री. गणेशनाथ यांची समाधी उजनी (ता.औसा) येथे आहे. यांच्या गाथा प्रकाशित आहेत. यात अभंग, पदे आणि भारूडे, आरत्यांचा समावेश आहे. यांचा अप्रकाशित काव्यग्रंथ - 'गोरक्षबोध' हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध आहे. यात नाथसंप्रदायाचे सोप्या भाषेत विवरण आहे.

या गोरक्षबोधाचे हस्तलिखित सारसा (ता.लातूर) येथे उपलब्ध झाले. गणेशनाथ शिवकालीन संत होते. शिवाजी राजांची आणि गणेशनाथांची भेट झाल्याची कथा महिपती महाराजांनी आपल्या 'भक्तविजय' च्या ५५ व्या अध्यायात दिली आहे. या हस्तलिखितात किल्लारी येथील नागेश संप्रदाय व किल्लारी परंपरेतील काही रचना प्राप्त झाल्या. या बाडातील विविध संतांच्या रचना अद्याप अप्रकाशित असून महत्त्वपूर्ण आहेत. या विषयावर नागेश संप्रदाय-किल्लारी परंपरा असा निबंध तयार आहे.

औसा नगरीची प्राचीनता इसवी सनाच्या सातव्या-आठव्या शतकापासून उपलब्ध आहे. काही ताम्रपटांत या नगरीचा उच्छिव-औच्छ-आसई-औसा असा संदर्भ येऊन गेला आहे. कनकामरकृत 'करकंडचरियु' या जैन मुनींच्या ग्रंथात धाराशिव-खानापूर-लेणींच्या संदर्भात 'आसई' असा संदर्भ प्राप्त आहे.

औसा येथील वे.शा.सं.कै. बाबुराव पाठक यांच्या संग्रहातील श्रीधर स्वामीकृत 'वेंकटगिरी माहात्म्या' त लेखनिकाने आपली पूर्वीची बालाजीची परंपरा सोडून श्री. नागेश संप्रदायी परंपरा स्वीकारल्याची नोंद आहे. हे लेखनिक स्वत:ची ओळख किल्लारी संदर्भात देतात. किल्लारीचे प्राचीन आणि पौराणिक नाव 'ब्रह्मपुरी' असे आहे. नंतर या नगरीस किल्लारी

* डॉ. ग.वा.तगारे यांनी या विद्वान घराण्यातील विद्वत्तेवर, या रचनांवर डॉ. बा.आं.मराठवाडा विद्यापीठ पत्रिकेत प्रदीर्घ लेख लिहिला आहे.

म्हणू लागले. मूलतः या गावाचे नाव 'किल्ला-रूई' असे आहे; पण म्हणताना 'किल्लारी' असा उच्चार प्राप्त झाला. 'ब्रह्मपुरी' म्हणजे जेथे चार वेदांचे, सहा शास्त्रांचे आणि ६४ कलांचे अध्ययन होते, ती नगरी. ही ब्रह्मपुरी देवगिरी यादवांच्या राजवटीपासून म्हणजे बाराव्या-तेराव्या शतकापासून उपलब्ध आहे.

महाराष्ट्रात वीरशैव संस्कृतिचे महान योगदान आहे. ही परंपरा कर्नाटकातून महाराष्ट्रात आली. संत शिरोमणी श्री. मन्मथ स्वामी हे मराठी वीरशैव संत आणि सत्पुरुष होते. यांच्या अनेक रचना उपलब्ध आणि प्रकाशित आहेत. यांचा 'परम रहस्य' हा महत्त्वपूर्ण आणि स्वतंत्र ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या हस्तलिखित पोथ्यांमधील शक १६७९ ची चाकूर प्रत, शक १७९७ ची हडोळती प्रत आणि कालविरहित अनेक प्रती या परिसरात उपलब्ध झाल्या. प्राचीन मराठी आणि वीरशैव साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक अहमदपूर (राजूर) वीर मठाचे अधिपती डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या संग्रहात अनेक पोथ्यांचा संग्रह अद्याप सुरक्षित आहे. तसेच चाकूरचे निवृत्त प्राचार्य शांतीतीर्थ स्वामी यांचा संग्रहही मोलाचा आहे.

औसा येथील वीरशैव विद्वलभक्त वीरनाथ मल्लनाथ महाराजांचा संग्रह त्यांच्या वंशजांनी सांभाळून ठेवला आहे. सध्याचे अधिपती ह. भ. प. श्री. गुरूबाबा वरील परंपरा चालवितात.

वाढवणा (ता. उदगीर) येथे चैतन्य परंपरेतील संग्रह आहे. या परंपरेतील अनेक रचना येथे उपलब्ध आहेत. या मठाचा 'हरिपाठ' महत्त्वपूर्ण आहे. यासारखी अनेक धार्मिक संस्थाने अभ्यासूंची वाट पाहत आहेत. श्री.सु.ग.जोशी यांनी 'मराठवाडा संशोधन मंडळ' येथे काही पोथ्यांचा संग्रह केलेला आहे.

अनेक घरांत, मठांत, गावांत काही तरी संग्रह असतो. तेथपर्यंत जाऊन पुनः पुन्हा भेटून अभ्यास केल्यास या जिल्ह्यात साधारणतः पाच हजार पोथ्यांचा-हस्तलिखितांचा संग्रह होऊ शकेल.

वैदिक परंपरा आणि लातूर जिल्हा *

लातूर जिल्ह्यातून वाहणाऱ्या मांजरा, तेरणा, देव नदीकाठी आणि परिसरात विद्वानांची अतिप्राचीन[४] परंपरा आहे. ही परंपरा सहाव्या-सातव्या शतकापासून लिखित आधारासह दिसून येते.

कासारशिरसी ताम्रपटाचा[५] काळ शक ५२१ (इ.स.५९९) असा आहे. चालुक्य नृपती विनयादित्याने विद्वान वासुदेवाला या परिसरात अध्ययन केंद्र काढण्यासाठी, ते चालविण्यासाठी, सोबत यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान व प्रतिग्रह या षट्कर्मात रममाण व्हावे, यासाठी देव-मांजरा नदीकाठी चंदवुरि (चांदोरी) आणि इतर गावे दान दिली. नंतरच्या शक १०२१ (इ.स.१०९९) च्या गणेशवाडी शिलालेखात[६] या नृपतीने संस्कृतच्या अध्ययनासाठी पिप्पलग्राम (हिप्पळगाव) वेदाध्ययन केंद्र आणि नित्योपयोगी कलेसाठी पाठशाला स्थापन

---

* या भागाचे लेखन सु.ग.जोशी, लातूर, यांनी केले आहे.

४. जोशी, सु.ग., "लातूर नगरीतील वैदिक संस्कृतिचे महत्त्व", **दै.एकमत** (लातूर), १०.२.२००४, वर्ष १३, अंक १७२.

५. कोलते, वि.भि., "विनयादित्याचा कासारशिरसी ताम्रपट", **महाराष्ट्रातील काही ताम्रपट आणि शिलालेख**, मुंबई, १९८७.

६. कित्ता, "गणेशवाडी शिलालेख".

केली अशी नोंद आहे. सोबत शिवलिंगी संतान परंपरेचा मूलतः अभ्यास करण्यासाठी छात्रोपयोगी साधनसुबत्ता प्राप्त करून दिली. नंतरच्या कान्हेगाव शिलालेखानुसार (इ.स.१२५८) यादव नृपतीने लोक जागृती, लोक कल्याण आणि वेद-वेदांगांच्या अध्ययनासाठी वेद केंद्र स्थापन केले. नंतर सोळाव्या-सतराव्या शतकात निलंगा नगरी, नीलकंठेश्वर देवालयाच्या पंचक्रोशीत गोविंदाचार्य[७] केसरी यांनी वरील वैदिक परंपरा रक्षण करून अनेक ग्रंथांची निर्मिती केली. यांचा जन्म वैशाख शुक्ल द्वादशी, शके १५९२ (इ.स.२१ एप्रिल १६७०) ला झाला. त्यांनी श्रीनृसिंह-मंत्र-राजोपाष्टी-विधि, श्रीनृसिंह-तापिनि-भाष्य, श्रीनृसिंह-तापिनि-उपनिषद्, होरा-कौस्तुभ, पध्दति कौस्तुभ जातक आणि परिभाषालंकार आदी ग्रंथांची निर्मिती केली.

अठराव्या शतकाच्या शेवटच्या दशकात आणि एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत चाकूर येथे चूडामणिसुत विट्ठल होऊन गेले. यांच्या संस्कृत रचना अत्यल्प असून अद्याप अप्रकाशित आहेत.

लातूर जिल्ह्यातील शिलालेख आणि ताम्रपट *

लातूर जिल्ह्यातील सर्वात प्राचीन संदर्भ शक ५२०-५२१ (इ.स.५९९) च्या कासारशिरसी ताम्रपटाद्वारे उपलब्ध आहे. हा ताम्रपट मु.पो.कासारशिरसी (ता.निलंगा) येथील श्री.दिनकरराव बाळाजीराव पाटील यांच्या घरी उपलब्ध झाला. हा ताम्रपट तीन पत्र्यांचा व ५० ओळींचा आहे.[८] या ताम्रपटामुळे या परिसरातील काही प्राचीन स्थलनामे प्रथम प्रकाशात आली. सोबत देवणी येथील देवनदीचा प्रथम संदर्भ येथे प्राप्त होतो. देव नदी आणि प्राचीन मंजरी (वांजरा/मांजरा) नदी संगमासोबत-मंजरी नदी स्रोतसंगम- हेच दानभूमीचे स्थल आहे. यातील अलंदी हे ग्रामनाम अणंदि म्हणजे जवळच असलेले आळंदी हेच असावे. संगमापासून जवळच सावली हे प्राचीन सावल्लीग्राम असे आहे. जवळच असलेले प्राचीन खेर गाव आजचे खेड असावे. तसेच चंदवुरि हे आजचे चांदोरी असावे. प्राचीन कुसुवंडूरु हे आजचे कुसनूर आहे. यातील काही ग्रामनामे उपलब्ध नाहीत.

या जिल्ह्यातील दुसरा प्राचीन संदर्भही कासारशिरसी ताम्रपटातून प्राप्त होतो. याचा काळ शक ६१९ (इ.स.६९७) असा आहे.[९] या ताम्रपटातील काही संदर्भ प्रथम स्पष्ट होत नव्हते. हा ताम्रपट तीन पत्र्यांचा आणि ४२ ओळींचा असून भाषा संस्कृतच आहे. या ताम्रपटामुळे काही नवे संदर्भ प्राप्त होऊन नवा आशय निर्माण होतो. "चल्लिकी" म्हणजे चालुक्यांचे मूळ नाव. हा भाग खरोसा लेणी परिसराचा आहे. हा भाग किल्लारीच्या जवळ आहे; कारण किल्लारीचे प्राचीन-पौराणिक नाव ब्रह्मपुरी[१०] असे आहे, तर मूळ नाव 'किलाखई' असे आहे. यातील दान घेणारा विद्वान गृहीतसहस्र म्हणजे सामवेदी ब्राह्मण. याचे नाव कोत्तिशर्मा असे

७. तगारे, ग.वा., "गोविंदाचार्य ॲण्ड हिज वर्कस", **मराठवाडा विद्यापीठ पत्रिका**, खंड २, अंक २, फेब्रुवारी, १९६२, पृ.२४-३२.

* या भागाचे लेखन सु.ग.जोशी, लातूर, यांनी केले आहे.

८. कोलते, वि.भि., पूर्वोक्त, "विनयादित्याचा कासारशिरसी ताम्रपट", क्रमांक ६, पृ.६०-८१.

९. कोलते,वि.भि., पूर्वोक्त, "विजयादित्याचा कासारशिरसी ताम्रपट", क्रमांक ८, पृ.१०३-११७.

१०. औसा येथील कै. बाबूराव पाठक याचे घरी उपलब्ध झालेल्या श्रीधरस्वामींच्या एका पोथीनुसार किल्लारीच्या एका कुलकर्ण्याने पूर्वीचे दैवत दूर करून नवे दैवत धारण केले. या संदर्भात याने ही पोथी पूर्ण लिहून प्रत सिध्द केली. यात त्याने वरील संदर्भ दिला आहे.

आहे. याचा निवास कोत्तल शिवणी असावा. 'गृहीतसहस्र' म्हणजे ज्याने एक हजार ऋचा प्राप्त केल्या, अभ्यासल्या तो. यावरून आजचा संदर्भ असा की, प्राचीन काळी हा परिसर वेद-वेदांगाचा अभ्यास परिसर असावा. या परिसरात चारही वेदांचा अभ्यास होत असे. या परिसरास अध्ययन-अध्यापनभूमी मानली जाते.

काही ग्रामनामांचे संदर्भ आजही उपलब्ध होतात. जमलग्राम म्हणजे जवळगा, मुगुली म्हणजे आजची कलमुगली आहे. बाराशे-तेराशे वर्षांपूर्वी तेरणा-मांजरा दरम्यानच्या या परिसरात वेदाध्ययन होत होते.

तिसरा कासारशिरसी ताम्रपट डॉ. देवीसिंग चौहान यांना प्राप्त झाला. याचा काळ शक ७०५ (इ.स.७८३) असा आहे. यात या परिसरासंदर्भात अधिक वृत्तांत नाही. पण या तीन ताम्रपटांमुळे या परिसराची-जिल्ह्याची वैदिक परंपरा नव्याने प्राप्त होते.

बाराव्या-तेराव्या शतकातील 'नवोपलब्ध कल्पसमूह'[११] या ग्रंथात खरोसा या नगरीचा संदर्भ वैद्यकशास्त्रातील रसविद्येशी जोडता येतो.

चौथा संदर्भ गणेशवाडी[१२] शिलालेखाचा आहे. गणेशवाडी हे गाव नसून हिप्पळगावचा परिसर आहे. जवळच नळेगाव असून तेथेच शिवपूर (प्राचीन सिंदाळे) आहे. येथील भग्नमंदिरात एक अप्रकाशित कानडी लेख आहे. हा शिलालेख ५२ ओळींचा संस्कृत भाषेत असून याचा काळ शक १०२१ (इ.स.१०९९) असा आहे. हाही परिसर प्राचीनता दर्शविणारा आहे.

चालुक्य नृपती विक्रमादित्याने पिप्पलग्राम - हिप्पळगाव येथे भीमसमुद्र नामक तलाव निर्माण केला. या परिसरात वेद-वेदांगाच्या अध्ययनासाठी अध्ययन केंद्र स्थापले. सोबत देवालय आणि पाठशाला स्थापन केली. येथे शिवलिंगी परंपरा सुरू करून लाकुलीश्वर आगमाचा अभ्यासही सुरू केला. या अध्ययन केंद्राच्या अधिपती/कुलपतीस राहण्यासाठी सुंदर सदन बांधून दिले. सर्व छात्रांची भोजन-निवासाची सोय केली. या लेखातील काही ग्रामनामे आजही उपलब्ध आहेत. पिप्पलग्राम म्हणजे आजचे हिप्पळगाव (ता.निलंगा). कानडीमध्ये 'ह' चा उच्चार 'प' असा होतो. यावरून पिप्पलगावचे हिप्पळगाव झाले. हे ठिकाण लातूरपासून २० कि.मी. वर आहे. यातील शिलाकरग्राम म्हणजे आजचे सलगरा आहे. शुष्कग्राम म्हणजे आजचे सुगाव आहे. या 'सुगाव' येथे अलीकडील कालविरहीत मराठी भाषेतील लेख प्राप्त झाला आहे.

पाचवा संदर्भही उपरोक्त गावीच आहे.[१३] हा शिलालेख ६४ ओळींचा असून त्यात विविध वृत्तांत वर्णिला आहे. याचा काळ वरीलप्रमाणे शक १०२१ (इ.स.१०९९) असा आहे. या लेखाचा प्रारंभ 'ओनमः' असून 'शुभम्' असा अंतिम संदर्भ आहे.

'भीमनाथ प्रशस्ती' असा मूलतः संदर्भ असला, तरी यात भीमसेनापती, भीमचमूपती अशी प्रशस्तीसाठी विविधता दर्शविली आहे. शिवलिंगी संतान परंपरा वा शासन असाही संदर्भ आहे. येथे अध्यापक म्हणून गुणरत्ननिधि, ज्ञानसरोवर अशा गुणीजनांची नेमणूक होती. ही

११. सैद महंमद, **कल्पसमूह**, (संपा.बा.ना.मुंडी), प्रस्तावना-डॉ.रा.चिं.ढेरे, पुणे.
१२. कोलते, वि.भि., पूर्वोक्त, "गणेशवाडी शिलालेख (१)", पृ.१५१-१८४,
१३. कित्ता, "गणेशवाडी शिलालेख (२)", पृ.१५१-१८४,

सर्व मंडळी अध्ययन-अध्यापनात पारंगत असून केवळ अध्ययन हाच विचार येथे चालत असे. चालुक्य नृपतींचा आदेश पालन करून अध्ययनकेंद्र चालवत असत. यातील मेघंकर म्हणजे मेहेकर असा संदर्भ डॉ.कोलते देतात आणि ते स्थान विदर्भातील ठरवितात. पण ते स्थान कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील 'मेहेकर' नामक गाव असून तेही पौराणिक आहे.

सहावा संदर्भही गणेशवाडी येथील लेखाचा आहे.[१४] या लेखातून शिवलिंगी संतान परंपरा आणि तेथील आचार्य मंडळींची विद्वता दिसून येते, या परिसरात यम, नियम, स्वाध्याय, ध्यान, धारणा, जप, समाधी आणि षड्गोपहर यांना अधिक महत्त्व होते. कारण यातून विशुध्द कीर्तीचा, निष्कलंक चारित्र्याचा सहवास सर्वांना लाभत असे. येथे शिवलिंगी संतानरुपी परंपरा प्राप्त होत असे. काश्मिरी शैव परंपरा अभ्यासली जात असे. पर्वतावली परंपरा, शिवलिंगी संतान परंपरा व लाकुलागम परंपरांचा अभ्यास होत असे. यावरून हा परिसर मागील पंधराशे-सोळाशे वर्षांपासून ज्ञानपरंपराधिष्ठित आहे. केवळ ज्ञानासाठी अध्ययन आणि अध्यापन चालत असे. अहमदपूर (राजूर), चाकूर, नळेगाव, शिवपूर, खरोसा, किल्लारी, औसा, मूळज हा परिसरही प्राचीन आहे. चाकूरचे नवे क्षेत्र आजचे भूषण आणि मागील परंपरेचा आदर्श ठरते.

सातवा शिलालेख लातूर नगरीचा आहे. लातूर हे प्राचीन आणि पौराणिक नगर आहे. या नगरीचा सिध्दईश्वर साक्षात 'सिध्द' होऊन गेला. 'रत्नापूर-माहात्म्यात' याचा महिमा वर्णिला आहे. पापनाश शिलालेख या माहात्म्याच्या समकालीन आहे. पापनाश मंदिरात असलेला लेख शक १०४९ (इ.स.११२८) चा आहे. त्यात भूलोकमल्ल सोमेश्वर याची कुळकथा आहे. सोबत पापनाश-पापविनाश-भूतनाथेश्वराची स्तुती व 'लातूर' चा प्राचीन संदर्भ 'लत्तलौर' असा आहे. हा लेख प्रा.ग.ह.खरे[१५] यांनी प्रथम प्रकाशित केला. 'लातूर' ग्रामनामाचा प्रथम संदर्भ कर्नाटकातील शक ७८८ (इ.स.८६६) च्या शिरूर शिलालेखात आला आहे. हाच संदर्भ पुढे अनेक लेखांत विविध प्रकारांनी आला आहे. या संदर्भात "रत्नापूर माहात्म्य"[१६] या सर्वगुणसंपन्न क्षेत्रमाहात्म्याने लातूर नगरीचा महिमा शब्दबध्द केला आहे. येथे असलेली लिंगस्थाने, सिध्दस्थाने व नंदीमठाची परंपरा सर्वांना आकर्षित करते.

आठवा शिलालेख गरसोळी (ता. रेणापूर) येथील आहे. हा लेख डॉ.ग.ह.खरे[१७] आणि डॉ.श्री.वा.चितळे यांनी प्रकाशित केला. याचा काळ शक १०७१ किंवा १०७२ (इ.स.११५०) असा आहे. याची भाषा मराठी आहे. महामंडलेश्वर उदयादित्याच्या महाप्रधानाने राजदित्य-देवाचे मंदिर बांधले, या देवाच्या अंगभोगासाठी काही भूमि दान केली, या संदर्भात हा लेख आहे. यात एकही ग्रामनाम आलेले नाही. हा शिलालेख मराठवाड्यातील दुसरा असून महाराष्ट्रातील नववा[१८] आहे.

---

१४. कोलते, वि.भि., "गणेशवाडी शिलालेख" (३), पूर्वोक्त, पृ.१५१-१८४,

१५. खरे, ग. ह., **दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने,** खंड-१, भा.इ.सं.मं., पुणे.

१६. **'रत्नापूर माहात्म्य'** अप्रकाशित ग्रंथ.

१७. मराठवाडा संशोधन मंडळ, **वार्षिक,** १९७४, लातूर, १९७५, पृ.१८.

१८. 'मराठी कोरीव लेख कोश' मुद्रणाधीन.

नववा शिलालेख कान्हेगाव (ता.शिरुर-अनंतपाळ) येथील आहे. याचा काळ शक ११८० (इ.स.१२५८) असा असून याचे संपादन डॉ. शं. गो. तुळपुळे[१९] यांनी केले. यादव राजा कान्हरदेवाचा मांडलिक गोपालदेवाने स्वकीयांसाठी व स्वजनांसाठी मोठा यज्ञ करून त्याची पूर्तता केली. यात लातूर साठी 'लत्तनौर' असा संदर्भ आला आहे. इतरही काही ग्रामनामे आली आहेत. हा शिलालेख कालानुक्रमे मराठवाड्यातील पंधरावा असून मराठीतील तो ५० वा आहे.

दहावा शिलालेख रेणापूर येथील महादेव मंदिरातील शिळेवर असून केवळ एका ओळीत याची नोंद आहे. याचा काळ शक १२२३ (इ.स.१३०१) असा आहे. इतर नोंदी काहीही नाहीत. सध्या तो मंदिराच्या दुरूस्तीकामात दिसेनासा झाला आहे. हा शुध्द मराठीतील लेख आहे.

अकरावा ताम्रपट ता. चोबळी (अहमदपूर) येथील आदर्श शिक्षक श्री. अण्णाराव पाटील यांचेकडे डॉ.शिवलिंग शिवाचार्य स्वामी महाराज यांच्या कृपेने प्राप्त झाला. याची भाषा मराठी असली तरी लिपी मोडी आहे. तो एकूण २६ ओळींचा आहे. याचे प्रकाशन सु. ग. जोशी[२०] यांनी केले आहे. यात चोबळी हे ग्रामनाम 'चोखळी' असे आहे. अहमदपूरचा संदर्भ 'वरवाल राजूर' असा आहे. याचा काळ शक १४८७ (इ.स.१५६५-६६) असा आहे. या ताम्रपत्राचे महत्त्व मोलाचे आहे, कारण इ.स.१४५८ ला मोडी लिपी कागदावर लिहिली जात असे. पण ताम्रपत्रात तसे दिसून येत नाही. मोडी कोणी निर्माण केली याचे निश्चित उत्तर प्राप्त होत नाही. हुमायून बादशहाने काढलेली ही सनद आहे. हा परिसर आणि येथील पाटील घराणे जुने आहे. या ताम्रपटात तीन चतुर्थांश शब्द परभाषीय आहेत. उपरोक्त बादशहाकालीन जमीन महसूल छटाक, नवटाक, पावशेर या मापाने नोंदला जात असे.

बारावा शिलालेख औसा नगरीत प्राप्त झाला आहे. हा लेख औसा येथील किल्ल्याच्या आतील बाजूस उजव्या दारावर आहे. हा अरबी-फार्शी-मराठी असा संमिश्र आहे. याचा काळ सुहूर सन ९६६ (इ.स.१५६५-६६) असा आहे. तो मुस्लिम कालनिर्देश पध्दतीप्रमाणे 'सिता सितैन तिसा' व 'मेयाह' अशा दोन प्रकारे शब्दांच्या संकेतांनी केला आहे. याचे संपादन डॉ. यू. म. पठाण[२१] यांनी केले आहे.

तेरावा शिलालेख चाकूर येथील आहे. याचा काळ शक १५२२ (इ.स.१६००) असा आहे. हा लेख असलेली समाधी प्राचार्य 'श्री. शांतितीर्थ स्वामी' यांच्या घरामागे आहे. यात एकूण आठ ओळी असून पहिल्या सहा ओळी स्पष्ट दिसतात; पण नंतरच्या दोन ओळी अस्पष्ट आहेत. जीव समाधी आणि शिवसमाधी पैकी समाधिस्थ स्वामींनी शिवसमाधी स्वीकारली आहे. याची भाषा शुध्द मराठी असून अलंकारयुक्त आहे. ग्रामनामाचा संदर्भ नाही. हा लेख अद्याप अप्रकाशित आहे.

चौदा व पंधरा नंबरचे शिलालेख औसा येथील किल्ल्यात चंद्रबारवेवर खंदकाच्या दिशेने आहेत. दोन्ही लेख शक १५२९ (इ.स.१६०७) चे आहेत. हे मुर्तजा निजामकालीन असून लिपी नागरी असली, तरी भाषा अरबी-फार्सी आहे. यात ग्रामनामांचा संदर्भ नाही.

---

१९. तुळपुळे, शं. गो. (संपा.) **प्राचीन मराठी कोरीव लेख,** क्र.३१, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९३, पृ. १५१.
२०. मराठवाडा संशोधन मंडळ, **वार्षिक,** पूर्वोक्त, पृ.६८-७०.
२१. पठाण, यू.म., (संपा.), **मराठवाड्यातील मराठी शिलालेख**, डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन, औरंगाबाद, १९८९.

सोळावे, सतरावे व अठरावे शिलालेख औसा शहरात असून त्यापैकी एक जैनांच्या वापीवर व अन्य दोन मुस्लिमांच्या बारवेवर आहेत. संदर्भ समान असून बारव कोणी, केव्हा बांधली याचा आणि इतर संदर्भ आहे. भाषा शुध्द मराठी आहे. त्यांचे काळ शक १५४८, शक १५५८ आणि १६०८ असे आहेत.

एकोणिसावा शिलालेख मु.पो.अलमला (ता.औसा) येथे असून हा लेख शक १६१० (इ.स.१६८८) चा आहे. याचा दाता सादप्पा हा असून याचे आडनाव सकरसेठी/साखरशेटे असे आहे. बारव बांधणीचा काळ नोंदविला आहे.

संत परंपरा

लातूर जिल्ह्याला संतपरंपराही उल्लेखनीय आहे. या परंपरेत लेखन-काव्यादि साहित्य निर्माण करणारे संतही आहेत. निलंगा तालुक्यातील कासार-शिरसी येथे चौदाव्या शतकाच्या अखेरीस असलेल्या नागेश संप्रदायातील अलमखान नावाच्या एका मुसलमान कवीचा उल्लेख आढळतो. त्याची काही पदे आज उपलब्ध आहेत. नागेश लीलामृताच्या ३९ व्या अध्यायात या संताचा संदर्भ येतो. त्यांची समाधी निलंगा तालुक्यात जाजम मुगळी येथे आहे.

विट्ठलशास्त्री : विट्ठलशास्त्री चाकूरकर उर्फ चुडामणीसुत या सत्पुरुषाची जन्मभूमी चाकूर तालुक्यातील चाकूर हे गाव असून त्यांचा जन्म शके १७३२ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव चुडामणी. दुर्दैवाने कुमार वयातच विट्ठलशास्त्री आई-वडिलांच्या सुखाला पारखे झाले. वनवस संस्थानचे मूळ पुरुष श्री. गुरु माधवाचार्य यांनी त्यांचे पुत्रवत पालन केले, अनुग्रह दिला. शास्त्रीबुवा पुराण सांगत, प्रवचन करीत. सरस्वतीची त्यांच्यावर पूर्ण कृपा होती. ते कीर्तन-प्रवचनात स्वतःच्याच काव्याचा वापर करीत. संसाराविषयी त्यांनी केलेले चिंतन महत्त्वपूर्ण आहे.

संसार चक्र जणू दुपारची साऊली। जे चालवील ते खरे विठो माऊली।।

कधी महाली रमला दिवस कळेना निशा। कधी कवडीसाठी फिरत असे दश दिशा।।

विट्ठलशास्त्रींनी महाराष्ट्रभर कीर्तन, प्रवचन करून समाजाला आत्मभान दिले. मुखेडच्या दशरथेश्वर मंदिराचा जीर्णोध्दार केला. शास्त्रीबुवांनी स्फूट काव्याबरोबरच अनेक आख्यान काव्ये लिहिली. प्रामुख्याने सुभद्राहरण, सीतास्वयंवर, शकुंतला, शुकचरित्र, चंद्रकला, अहिरावण, श्रीयाळ चरित्र इत्यादी आख्यान काव्ये खूपच गाजली. कटाव, आरत्या, गौळणी, आदी वाङ्मय प्रकारात त्यांनी विपुल लेखन केले. संस्कृत भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. भर्तृहरीच्या शतकत्रयावर समश्लोकी टीका, अमरकोशावर टीका आणि महिम्नावर टीका असे त्यांनी तीन टीका ग्रंथ लिहिले. त्यांची कविता अत्यंत रसाळ अन काळजाला स्पर्शून जाणारी होती. आयुष्याच्या शेवटी त्यांनी संन्यासाश्रम स्वीकारला आणि वयाच्या ६५ व्या वर्षी शके १७९२ च्या कार्तिकशुध्द षष्ठीस त्यांनी आपले जीवनकार्य संपविले. चाकूरला त्यांची समाधी आहे. शास्त्रीबुवांचा प्रचंड काव्यसंग्रह अद्याप अप्रकाशित आहे. प्रबोधन हा त्यांच्या लेखनाचा धर्म होता. त्यांच्या काव्यात यमक, अनुप्रास, रुपक आदी अलंकारांची रेलचेल असे. शास्त्रीबुवांची काही पदे, काही कविता पाच ते दहा ओळींच्या आहेत. पण त्या आशयगर्भ आहेत. रचना पांडित्यपूर्ण आहे.

गणेशनाथ महाराज : हे शिवकालीन कवी होते. त्यांच्या काही स्फूट कवितांचे संकलन डॉ.प्रभाकर मांडे यांनी केले. त्यांचा 'गोरक्षबोध' हा १८०० ओव्यांचा अपूर्ण ग्रंथ आज उपलब्ध आहे. त्यात नाथसंप्रदायाचे सोप्या भाषेत विवरण आहे. त्यांची समाधी औसा तालुक्यात मांजरा नदीच्या काठी 'सारसा' या गावी आहे. त्यांचे शिष्य विट्ठलनाथ यांची समाधी उमरगा तालुक्यातील 'माडज' या गावी असून त्यांनीही बरेच काव्य लेखन केले आहे. गणेशनाथांनी शिवाजी महाराजांना कानोपदेश केला होता असा संदर्भ संत महिपती देतात.

शामात्मज रामचंद्र : उध्दव चिद्घनाच्या परंपरेत शामात्मज रामचंद्र हे सत्पुरुष होऊन गेले. यांचा मठ उदगीर तालुक्यातील वाढोणा या गावी आहे. त्यांनी लिहिलेला 'हरिपाठ' सन १९३६ साली प्रकाशित झाला अशी नोंद सापडते. यांची बरीच रचना अप्रकाशित आहे.

आनंदमूर्ती वा आनंदस्वामी : हे रामदासी संप्रदायाचे असून त्यांची समाधी आणि मठ निलंग्यास आहे. सतराव्या शतकातील या संताने बरीच पद्य रचना केली. पण ती अद्याप ग्रंथबद्ध झालेली नाही. स्वप्न मंदोदरी, हनुमंत जन्म आणि काही पदे आजही लोकांच्या ओठावर आहेत. त्यांची कविता रसाळ आहे.

सेलूकर महाराज : हजारो वर्षांपासून या देशात प्रचलित असलेली यज्ञपरंपरा रंगनाथ कृष्ण सेलूकर दीक्षित यांनी जनमानसात रुजविली. ते एक श्रेष्ठ सोमयागी यज्ञ पुरुष होते. पाश्चिमात्य राष्ट्रातील अनेक अभ्यासकांनी त्यांच्या यज्ञ सोहळ्यात उपस्थित राहून यज्ञ संस्थेचा अभ्यास केला. अशा सत्पुरुषाची औसा तालुक्यातील सेलू ही जन्मभूमी होती. वडील सद्गुरु कृष्ण दीक्षित यांच्या बरोबर त्यांनी भारत भ्रमण केले. श्री. क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे मौन दीक्षा घेतल्यानंतर अवघ्या पाच-सहा वर्षात सोमयागाची सप्त संस्था पूर्ण करून देशभर त्यांनी शिष्य-संप्रदाय वाढविला. तसे ते स्वातंत्र्य सैनिक; पण मानधन विनम्रपणे नाकारून त्यांनी त्यागमय जीवनाचा आदर्श सर्वांसमोर उभा केला.महाराजांनी कधी जातीभेद पाळला नाही. तसेच पशुहत्येशिवाय सोमयाग करून यज्ञ संस्थेत क्रांती केली. महाराजांनी सोमयाग मालिकेचा प्रारंभ १९८० साली नांदेड येथे सुरू केला. देशभर सोमयाग करून या यज्ञाची सांगता गंगाखेड येथे केली. गवायमन सत्र सोमयाग हा तेरा महिन्यांचा यज्ञ होता. दि. २६ एप्रिल १९९९ ते दि. १७ मे २००० या यज्ञकाळात त्यांनी संपूर्ण उपवास केला. यापूर्वी अशा यज्ञाची नोंद उपलब्ध नाही. एका निर्धन माणसाने उभारलेली ही यज्ञसृष्टी त्यांच्या आध्यात्मिक उंचीची साक्ष होय.

साखरे महाराज : 'स्वस्तिश्री' या सांस्कृतिक मराठी मासिकाचे संस्थापक व संपादक गुरुवर्य किसन महाराज साखरे यांचा जन्म सन १९४० साली निलंगा तालुक्यातील पानचिंचोली या गावी झाला. संत साहित्याचे गाढे अभ्यासक असलेल्या साखरे महाराजांचे भाषेवर कमालीचे प्रभुत्व आहे. कीर्तन-प्रवचनातून ते गेली चाळीस वर्षे समाजप्रबोधन करीत आहेत. त्यांनी श्री. ज्ञानेश्वरी सत्संग मंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर 'ग्रंथराज श्री. ज्ञानेश्वरी अभ्यास केंद्रां' ची निर्मिती केली. १९९० साली त्यांनी पावणेतीन क्विंटल वजनाच्या व पाचशे फूट लांबीच्या तांब्याच्या पत्र्यावर संपूर्ण ज्ञानेश्वरी कोरून एक चिरंजीव प्रकल्प पूर्ण केला आणि श्री. ज्ञानेश्वर मंदिराची उभारणी केली. ते संत ज्ञानदेव अध्यासन समितीचे अध्यक्ष असून त्या समितीद्वारे त्यांनी पुणे विद्यापीठामध्ये श्री. ज्ञानदेव अध्यासनाची निर्मिती केली.

श्री. क्षेत्र देहू-आळंदी विकास परिसर समितीचेही ते अध्यक्ष आहेत. सार्थ ज्ञानेश्वरी, विचारसागर, वृत्ती प्रभाकर, अद्वैतसिध्दि, अद्वैत मकरंद, श्री. ज्ञानेश्वर महाराजांची वेदनिष्ठा या व अशा अनेक ग्रंथांचे त्यांनी लेखन केलेले आहे. आतापर्यंत त्यांनी महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, तामिळनाडू इत्यादी राज्यांत कीर्तन-प्रवचनातून समाजप्रबोधनाचे कार्य केलेले आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांना नागपूरच्या छत्रपती सेवा प्रतिष्ठानचा जिजामाता विद्वत पुरस्कार, कॉसमॉस पुरस्कार, डॉ. यु. श्री. कानडे पुरस्कार या व अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. साखरे महाराज हे सध्या अनेक आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी असून संत वाङमयाचे गाढे अभ्यासक, ज्ञानेश्वरीचे भाष्यकार, प्रभावी व्याख्याते, कार्य संस्कृति जपणारे एक थोर संत म्हणून ते मराठवाडा व महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत.

हावगी स्वामी : अठराव्या शतकात उदगीर येथे हावगी स्वामी नावाचे वीरशैव संप्रदायातील संत होऊन गेले. त्यांचा उदगीर येथे मठ आहे. प्रतिवर्षी पौष महिन्यात त्यांची यात्रा भरते. ग्रामीण भागातील सर्व समाजातील, सर्व थरांतील लोक या यात्रेत सहभागी होतात. कर्नाटकातून येणाऱ्या भाविकांचीही यात्रेसाठी फार गर्दी होते. यानिमित्ताने पशु प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. दुसरा दिवस 'आग्गी' (अग्नी) चा असतो. ही यात्रा प्रतिप्रदा ते पौर्णिमेपर्यंत चालते. या काळात 'हावगी स्वामी चरित्रग्रंथा'चे पारायण तसेच भजन कीर्तनाचा कार्यक्रम केला जातो. स्वामींच्या पालखीची मिरवणूकही काढली जाते. याच काळात मन्मथ स्वामींच्या ग्रंथाचेही पारायण होते. यात्रेत पूर्वी नाटके व मनोरंजनाचे कार्यक्रम होत. आता डोणगाव येथेही हावगी स्वामींचे पीठ स्थापन झाले आहे.

शंकरलिंग स्वामी : उदगीर शहराच्या मध्यभागी यांचा मठ आहे. शंकरलिंग स्वामी वारकरी संप्रदायाचे अनुयायी होते. येथे देगलूरच्या गुंडा महाराजांची गुरू परंपरा मानली जाते. संत तुकाराम महाराजांकडून शंकरलिंग स्वामींच्या आजोबांना दृष्टांत झाल्याची दंतकथा आहे. सध्या मठाधिपती असलेले श्री. आडय्या स्वामी हे शंकरलिंग स्वामींचे नातू होत. शंकरलिंग स्वामींची यात्रा प्रतिवर्षी मार्गशीर्ष शु. १० रोजी भरते. पौर्णिमेस पालखी निघते. देगलूरकर महाराजांची परंपरा असल्याने त्यांच्या घराण्यांतील महाराजांच्या कीर्तनानेच यात्रेची सांगता होते. यात्रेच्या काळात ख्यातनाम कीर्तनकार व प्रवचनकारांची कीर्तने व प्रवचने होतात. पंडित धारूरकर शास्त्री, वा.ल.मंजूळ यासारख्या ख्यातनाम कीर्तनकार व प्रवचनकारांनी येथे सेवा केली आहे. हावगीस्वामी व शंकरलिंग स्वामी यांच्या यात्रेच्या काळात 'संगीत' मंत्राभिषेक केला जातो हे या यात्रांचे वैशिष्ट्य होय.

वीरनाथ महाराज : यांचा जन्म निलंगा येथे शके १६९२ मध्ये एका शैव कुटुंबात झाला. तथापि, त्यांचा ओढा मात्र विठ्ठल भक्तीकडे होता. ते दरवर्षी पंढरपूर यात्रा करीत. पुढे त्यांनी वारकरी पंथाचे अनुयायित्व स्वीकारून वीरशैव व वारकरी संप्रदायाचा समन्वय घडवून आणणाऱ्या लिंगायत-वारकरी संप्रदायाची स्थापना केली व या संप्रदायाचे पीठ म्हणून येथे मठ स्थापन केला. वीरनाथांच्या काळात निलंगा हा प्रांत कधी निजामाकडे, तर कधी इंग्रजांकडे असे. त्यामुळे मराठी मनाच्या, माणसाच्या व अध्यात्माच्या होणाऱ्या कुचंबणेतून

मार्ग काढून हिंदू वा मुसलमान असा वाद वाढू न देता दोन्ही धर्मियांना भागवत धर्माच्या झेंड्याखाली आणण्याचे कार्य वीरनाथांनी केले. त्यांचे गुरू गुंडा महाराज यांनी त्यांना उपदेश देताना प्रसाद म्हणून दिलेली वीणा औसा येथील नाथ मंदिरात अद्यापही आहे. या मंदिराचा पायाही वीरनाथ महाराजांनी घातला व त्यावरील बांधकाम त्यांचे पुत्र व शिष्य मल्लनाथ महाराजांनी पूर्ण केले.

चक्रीभजन ही गुंडा महाराजांची देण आहे. तेच भजन त्यांचे शिष्य वीरनाथ महाराज करीत. औसेकर परंपरेत ही पध्दत आजही चालू असून यावेळी वर उल्लेखिलेली वीणा वाजविली जाते. इ.स.१८०४ मध्ये स्वतः शंकराचार्यांनी वीरनाथ हे गुरूमंत्र देण्यास योग्य असल्याचा निर्वाळा दिला. लोहगाव येथे त्यांनी संत तुकारामांच्या शीळेची स्थापना करून एकनाथ षष्ठीचा उत्सव सुरू केला. लोहारा, वैराग, कानेगाव येथेही त्यांनी नाथषष्ठी उत्सव सुरू केले. पत्नी निधनानंतर ते औसा येथे आले व नाथ मंदिराचा पाया घातला. पीरपाशा या सुफी संताने त्यांना आपला हिरवा फेटा व शाल भेट म्हणून दिला होता. वीरनाथांनी सुमारे ३,५०० अभंग रचलेले असून ते अद्याप अप्रकाशित आहेत.

मल्लनाथ महाराज : हे वीरनाथांचे पुत्र व शिष्य होत. यांचा जन्म शके १७६७ मध्ये औसा येथे झाला. वीरनाथांनी समाधिस्थ होण्यापूर्वी त्यांना दीक्षा दिल्यानंतर ते धर्मप्रसाराचे कार्य करू लागले. त्यांनी सुरुवातीच्या काळात औसा येथे नाथषष्ठी उत्सव साजरा केला. त्यानंतर त्यानी काशी क्षेत्री भागवत धर्माचा प्रसार करून तेथे भागवत पंथाचे निशाण रोवले. संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला तत्त्वज्ञानाची भक्कम बैठक देऊन या संप्रदायाचा शके ११३४ मध्ये पाया रचला व त्यावर भली मोठी इमारत उभारण्याचे कार्य पुढील संतांनी केले. शके १४९५ मध्ये भागवत ग्रंथाची काशी क्षेत्री हत्तीवरून मिरवणूक काढून तेथील सर्व विद्वानांनी नाथ भागवताचा, त्यातील तत्वज्ञानाचा व मराठी भाषेचा गौरव केला. त्यानंतर मल्लनाथ महाराजांनी एकनाथांच्या भागवताला काशी क्षेत्री हत्तीवरून मिरविण्याचा मान नाथांनंतर ३२५ वर्षांनी मिळवून दिला. यावेळी काशीक्षेत्री झालेल्या भागवत सप्ताहाच्या निमित्ताने वारकरी संप्रदायाचे एक अध्वर्यू संत धुंडामहाराज देगलूरकर हेही उपस्थित होते. याच मल्लनाथांनी औसा येथील विलोभनीय नाथ मंदिराचे बांधकाम पूर्ण केले. 'वीरनाथे रचिला पाया । मल्ला केलासे कळस ।' असा हा प्रकार आहे.

संत वीरनाथांच्या देहविसर्जनानंतर अवघ्या दहाव्या वर्षी या अव्दैत धर्म प्रसाराची जबाबदारी मल्लनाथांनी स्वीकारली. या कामी त्यांना उत्साह व प्रेरणा देणारी एक शक्ति म्हणजे त्यांच्या कनिष्ठ मातोश्री महादामाई आईसाहेब या होत. त्यांच्याच आश्रयाने व आज्ञेने त्यांनी आपल्या कार्यास सुरुवात केली. सांप्रदायिक पध्दतीने पायी चाळ, अंगात डगला, डोईस मुंडासे, गळ्यात नारदवीणा व हातात चिपळ्या घेऊन, मुखाने विठ्ठल गुणगान करीत, तुकाराम नामदेवादि संतांच्या १४ अभंगानी पांडुरंगास आळवून, प्रेमळ अंतःकरणाने, भक्तिभावाने चक्रीभजन करणे व ते अनेकांमध्ये रूजविणे हे कार्य त्यांनी केले. मल्लनाथ महाराज निव्वळ उपदेश करीत नसत, तर 'आधी केले मग सांगितले' या न्यायाने वागत. त्यांच्या धर्मप्रसाराचे कार्य हे ठराविक समाजापुरते मर्यादित नव्हते. हिंदू-मुस्लिम ऐक्य व शिव-विष्णू ऐक्य अशी महत्त्वाची कामगिरी त्यांनी केली. धर्मप्रसाराच्या कामी लिंग प्रतिमा व विष्णू प्रतिमा यांतून निर्माण झालेला 'शिखावाद' सर्वश्रुत आहे. सर्वसामान्यांना करमणुकीच्या साधनेतून भक्ति-ज्ञान मिळावे म्हणून नाथांनी 'भारूड' सारखी रचना करून त्यांना भक्तिमार्ग दाखविला.

धर्म प्रसाराच्या कार्याबरोबरच मल्लनाथांनी उत्तम प्रकारचे वाङ्मयही निर्माण केले. त्यात किमान ८०० ते ९०० अभंग गाथा आहेत. गुरूभक्तिपर, योगसाधनेपर, करूणापर, बोधपर व काही स्फुट अभंगांचा त्यात समावेश आहे. याशिवाय गुरू वीरनाथ महाराजांचे 'वीर लीलामृत' हे पद्य स्वरूपातील चरित्र तसेच राका बंका चरित्र, रामकृष्ण अवतार चरित्र, गुरूगीता व ज्ञानेश्वरीसारामृत हे ग्रंथही त्यांच्या नावे आहेत. वयाच्या ६९ व्या वर्षी म्हणजे शके १८३६ मध्ये ते समाधिस्थ झाले.

विरूपाक्ष स्वामी देशिकेंद्र महाराज (१८८८-१९७५) : निजाम राजवटीत लातूर जिल्ह्यात व पर्यायाने संपूर्ण मराठवाड्यात वीरशैव साहित्य परंपरा सुरू करण्याचे, तिचे जतन करण्याचे व ती वाढवण्याचे काम विरूपाक्ष स्वामी देशिकेंद्र महाराज यांनी केले. इ.स. १९१६ मध्ये त्यांनी वीरशैव बुक डेपोची स्थापना केली. ते वीरशैव विषयक धार्मिक पुस्तके सोलापूर, मुंबई, पुणे व कर्नाटकातील अल्प साक्षर लोकांना पुरवित. ते स्वत: विद्वान लेखक, वक्ते व प्रवचनकार होते. त्यांनी वीरशैव साहित्यातील मराठवाड्यातील पहिले पुस्तक जुलै १९१८ मध्ये 'वीरशैव धर्मामृत' या नावाने प्रकाशित केले. हे पुस्तक सिद्धमलस्वामी शिवयोगी औसेकर यांनी लिहिलेले आहे. त्यात सामान्य जनांसाठी धर्माची शास्त्रोक्त माहिती शिव-पार्वती संवाद रुपाने सात निबंधात ग्रंथित केली आहे. देशिकेंद्र महाराजांनी त्यानंतर १९२० च्या विजयादशमीला 'वीरशैव धर्मप्रकाश' नामक मासिक सुरू केले. पुढे त्याचे 'लिंगागी धर्मीय शिक्षण प्रकाश' असे नामांतर करून ते १२ वर्षे चालविले. या काळात बसवेश्वरांचे बालपण, वीरशैव विवाहविधी, शिवपंचमहायज्ञ, ज्ञानाचे दागिने, वैराग्यशिरोमणी अक्कमहादेवी चरित्र व रावबहादूर मल्लप्पा वारद चरित्र आदी ग्रंथ लिहून प्रकाशित केले. त्यांचा 'ओवीबद्ध गुरूमाहात्म्य' हा ग्रंथ मात्र ते प्रकाशित करू शकले नाहीत. त्यांनी स्वत: लातूरला देशिकेंद्र छापखाना सुरू केला होता.

देशिकेंद्र महाराज प्रेरित पिढीचे साहित्य : तरूण लेखकांना लिहिण्यास प्रेरित करण्यासाठी देशिकेंद्र महाराजांनी 'शिक्षण प्रकाश' हे मासिकही चालविले होते. त्यामुळे वै.मा.शेटे, महेशशंकर नागुरे, संगय्या स्वामी, होन्नय्या स्वामी, उमाशंकर संकाये, सी.एल.हिरेमठ आदी लेखकांच्या हातून साहित्य-निर्मिती झाली. त्यापैकी नागुरे यांनी शहाणपणाच्या गोष्टी, वीरशैव तत्वप्रवेश, स्त्री नीतिसंग्रह ही पुस्तके तर, वै.मा.शेटे यांनी पंचाचार्य व विरक्तवाद, देशिकेंद्र महाराज चरित्र (१९५५) ही पुस्तके व 'विवेक जागृती' हे नाटक लिहिले. शेटे यांनी वीरशैवांसाठी संग्राम हे पाक्षिक, विभूती हे हिंदी त्रैमासिक, साप्ताहिक हिमालय व लातूर टाईम्स हे वृत्तपत्र चालविले होते. संगय्या स्वामी यांनी संत साहित्याला वाहिलेले 'कपिलधार' मासिक सुरू केले होते. याशिवाय संगमेश्वर स्तोत्र, अनेक आरत्या व आर्याही लिहिल्या. याच वेळी उदगीरहून 'कल्याणमाला' भाग १,२ व ३ ही पुस्तके वीरशैव समाजातर्फे प्रकाशित करण्यात आली. या काळातील उदगीर येथून प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांतून बसवेश्वर विषयक हिंदी कविता, बापूअय्या हळ्ळीकर, धर्मवीर राचय्या स्वामी हुंडेकर, धर्मपालजी, शंकर भजनिक आदींच्या हिंदी रचना समाविष्ट असत. शाहीर मेनकुदळे यांचेही अनेक पोवाडे प्रसिद्ध झाले आहेत.

विरूपाक्ष शेटे (१८७०-१९४१) : हे मूळ निलंग्याचे असले तरी त्यांचे वास्तव्य सोलापूर येथेच होते. त्यांना 'शरण साहित्या' चा उत्तम परिचय असल्याने त्यांनी महात्मा बसवेश्वर व सिद्धरामेश्वर यांच्यावर बरेच अभंग लिहिले आहेत. त्यातील बरेच कथात्मक आहेत. त्यांची ही अभंग गाथा त्यांनी इ.स. १९२५ मध्ये सोलापूरहून प्रकाशित केली होती.

भावंडीबाई (१८८८-१९५५) : या पहिल्या वीरशैव कवयित्री होत. यांचे ४६० अभंग गुरूगाथांसमवेत (भाग २) प्रसिद्ध झाले आहेत. स्त्री जीवनाचे दाहक चित्रण त्यांच्या अभंगात आढळते.

काशीनाथ हवा (१८७८-१९४०) : यांनी 'मल्लेश्वर मुद्रिके' त १,००० अभंग लिहिले आहेत. त्यापैकी ४५० अभंग अद्याप अप्रकाशित आहेत. त्यांनी अष्टक, पाळणे व आरत्याही लिहिल्या. ते हावगी स्वामी मठाचे मानकरी शिष्य होते.

शिवलिंग शिवाचार्य महाराज : यांनी हिमालयातील तपश्चर्येनंतर येथे येऊन प्रथम शिवपाठ, आगमोक्त शिवार्चन पद्धती ही पुस्तके लिहून धर्मप्रचार सुरू केला. त्यांनी अनेक संतांच्या गाथांचे संपादन व प्रकाशन केले आहे. वीरशैव संप्रदायाचा प्रमुख धर्मग्रंथ 'सिद्धांतशिखामणी' यावर भाष्यग्रंथही लिहिला. शिवलिंग महाराज बहुभाषाकोविद होते. त्यांच्या प्रेरणेने मराठवाड्यात वीरशैव साहित्य संशोधनाला चालना मिळून डॉ. चंद्रकांत देऊळगावकर, डॉ. राम तोंडारे, डॉ. भि.शि. स्वामी यांनी प्रबंध लेखन केल्याने अन्य विद्यापीठांत वीरशैव विषयावर अभ्यास सुरू झाला आणि वीरशैवांच्या मराठी साहित्याला महाराष्ट्र शारदेच्या दरबारात मानाचे स्थान मिळू शकले.

शांतितीर्थ संगय्या स्वामी-चाकूरकर : यांनी मन्मथ स्वामींची गुरूगीता संपादित करून इ.स. १९७३ मध्ये प्रसिद्ध केली. अलिकडेच त्यांनी श्री. काशीजगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठाच्या 'वीरशैव सिद्धांत प्रवीण' परीक्षेसाठी 'वीरशैवांची स्फूट कविता' या पुस्तकाचे संपादन केले आहे.

चन्ना वारद (१८६५-१९३७) : हे मूळचे नळेगावचे होत. व्यापारानिमित्त ते लातूरला आले. लातूर येथे पाचशेघर मठात शिवभजन परंपरा रूढ होती. चन्ना वारद यांना मन्मथ स्वामी परंपरेतील संतांच्या अभंगांचा परिचय होता. त्यापासून स्फूर्ती घेऊन त्यांनी अभंगरचना, भारूडे, आरत्या, पदे, दोहरे अशा रचना केल्या. त्यांच्या अभंगगाथा इ.स. १९२६ मध्ये प्रसिद्ध झाल्या. अद्यापही त्यांचे काही अभंग अप्रकाशित आहेत.

गुरूदास साखोळकर (१८७९-१९४३) : हे निलंगा विरक्त मठाचे शिष्य होत.त्यांनी लिंगपाठ, तीर्थपाठ, प्रसादपाठ, जंगमपाठ अशी शिवपाठ पद्धतीने अभंगरचना केली आहे. त्यांची अभंगगाथा १९१४ मध्ये बार्शीहून प्रसिद्ध झाली. या गाथेचा दुसरा भागही प्रसिद्ध झाला आहे.

संगप्पा हावगीअप्पा कल्याणे : हे अहमदपूर मठाचे शिष्य होते. त्यांचे काही अभंग लातूरच्या 'शिक्षण प्रकाश' मासिकात प्रसिद्ध झाले आहेत. मडिवाळ स्वामींची पंचपदीही त्यांनी लिहिली आहे. 'गुरूलीलामृत' हा त्यांचा ओवीबद्ध ग्रंथ (अपूर्ण) 'लिंगेश्वरवाणी' मासिकातून प्रसिद्ध झाला आहे.

सदानंदबुवा जोडजवळेकर (१८८०-१९४०) : हे कीर्तनकार व प्रवचनकार होते. त्यांच्या आरत्या, पाळणे, आख्याने प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी लिहिलेली भारूडे मात्र अप्रकाशित आहेत.

सांब बापू काळे (१८९२-१९२७) : हे सदानंदबुवा जोडजवळेकर यांच्या सहवासात असल्याने यांनीही पदे, आरत्या, आर्या व श्लोक रचले आहेत. त्यांच्या रचना 'शिक्षण प्रकाश' (लातूर) व 'मुक्तगुच्छमाला' मासिकातून (नाशिक) प्रकाशित झाल्या आहेत. या द्वयींच्या रचना प्रासादिक व नादमधूर आहेत. रेणापूर तालुक्यातील खरोळा गावी दत्तजयंती निमित्त व अन्य उत्सव प्रसंगी दत्तमंदिरात सदानंद महाराज 'ललित नाट्य' साजरे करून त्याद्वारे समाजप्रबोधन करीत. हीच परंपरा परमानंद, सहजानंद व पूर्णानंद महाराजांनी पुढे चालविली.

यात्रा-उत्सव

चैत्र शु. द्वादशीला देवणी येथे महादेवाची यात्रा भरते. या यात्रेची विशेषता म्हणजे येथे 'काठीची लग्ने' लावतात. काठी झेंड्याने व फुला-पानांनी सजवून वाजत-गाजत आणली जाते व तिचे महादेवाशी लग्न लावले जाते. 'महादेव बारशीची यात्रा' म्हणून ही यात्रा ओळखली जाते.

गुडसूर येथेही माघ पौर्णिमेस यात्रा भरते व विठ्ठलाचा उत्सव साजरा केला जातो. यादिवशी पथनाट्य स्वरुपाची सोंगे सादर केली जातात. हा कार्यक्रम सहा-सात दिवस चालतो. लोकसंगीत व लोककलेचा हा एक आगळावेगळा प्रकार आहे. माघ पौर्णिमेस येथील विठ्ठल मंदिरात मोठा उत्सव होतो. विठ्ठल मूर्तिची रथातून मिरवणूक काढली जाते. कलगी-तुऱ्याचे कार्यक्रमही सादर केले जातात. नंतरच्या काळात दलित वस्तीमध्येही अशाच विठ्ठल मंदिराची स्थापना होऊन असाच उत्सव तेथेही साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. येथील लोकांवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव असून नित्यनियमाने श्रध्दापूर्वक एकादशी व भजनाचे कार्यक्रम केले जातात. सवर्ण आणि दलित समाजातील भक्तिभावना व ऐक्यभावनेचा संगम झाल्याचे येथे पाहावयास मिळते. औसा येथील मल्लिकार्जून स्वामींचा मठही प्रसिध्द आहे.

उदगीर शहरातही दसऱ्या दिवशी आर्य समाजाच्या पुढाकाराने मिरवणूक काढली जाते. ब्राह्मण गल्लीतील बालाजी मंदिरात सात दिवस उत्सव साजरा केला जातो. या उत्सवाची विशेषता म्हणजे गिरी बालाजीप्रमाणेच अभिषेक आणि नैवेद्य केला जातो.

लातूर जिल्हा हा कर्नाटकाच्या सीमेलगत असल्याने कर्नाटकातील 'वेळा अमावास्या' (वेळामास, वेळामासी) संपूर्ण जिल्हाभर साजरी केली जाते. या अमावास्येला शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्व आहे. या दिवशी शेतात लक्ष्मीची पूजा बांधून इष्टमित्रांसह वनभोजन केले जाते.

याचप्रमाणे आषाढी अमावस्येला संपूर्ण जिल्ह्यातच 'मरीआईची' यात्रा भरते. या दरम्यान साथीचे रोग पसरण्याचा संभव मोठ्या प्रमाणावर असतो. त्यांचे निवारण करण्याची किंवा ते पसरू न देण्याची क्षमता मरीआई (मरीमाता) या देवीकडे असल्याची समजूत समाजात रूढ आहे. म्हणून तिला प्रसन्न करण्याच्या उद्देशाने लिंबू, अंडे व कोंबडे इत्यादींचा नैवेद्य देऊन तिची मनोभावे पूजा केली जाते. यादिवशी खासकरून स्त्रियांच्या अंगात देव संचारण्याचे प्रकार फार होतात. विशेषतः बहुजन समाज ही अमावास्या मोठ्या प्रमाणावर साजरी करतो.

वरील यात्रांशिवाय जिल्ह्यात अन्य ठिकाणीही विविध देव-देवता, संत-महात्मे यांच्या यात्रा साजऱ्या केल्या जातात.

साहित्य व साहित्यिक[२२]

मराठवाड्यावर अनेक शतके निजामाचे राज्य होते. त्यामुळे शिक्षणाची व प्रशासनाची भाषा ही उर्दूच होती. मराठीचा वापर अत्यंत अल्प होता. मोडी लिपीत थोडेबहुत लेखन होत असे. दि.१७ सप्टेंबर १९४८ ला हैद्राबाद राज्य स्वतंत्र भारतात विलीन झाले, मराठवाडा निजामाच्या गुलामगिरीतून मुक्त झाला, तरीही या विभागाचे राजकीय, प्रशासकीय आणि शैक्षणिक संबंध हैद्राबादशीच जोडलेले होते. सर्वत्र उर्दू भाषेचेच वर्चस्व होते. मराठी लेखन नाममात्र होत असे. तरीही मराठी भाषा वाढावी, त्यातून लेखन व्हावे म्हणून प्रामुख्याने सर्वश्री डॉ. नांदापूरकर, रा. ब. माढेकर, न. शें. पोहनेरकर, र. म. भुसारी, भालचंद्र महाराज कटाळेकर या व अशा मान्यवर साहित्यिकांनी विशेष प्रयत्न केले. मराठवाडा साहित्य परिषदेचे या संदर्भातील कार्य महत्त्वपूर्ण असून 'प्रतिष्ठान' या मासिक मुखपत्राने लेखकांची एक पिढीच घडविली आहे.

मराठवाडा महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतर म्हणजे १९६० नंतर मराठवाडाभर शैक्षणिक संस्था वाढल्या, गावोगाव ग्रंथालये उघडली गेली. त्यामुळे वाचकवर्ग, लेखक वर्ग वाढला आणि अवघ्या चाळीस-पंचेचाळीस वर्षात मराठवाड्याचे मराठी सारस्वत समृध्द झाले. यात लातूर परिसराचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे.

लातूर शहर हे व्यापारी शहर व शिक्षण पंढरी म्हणून ओळखले जाते. साधारणत: १९८० पूर्वीपासूनच लातूर जिल्ह्यात अनेक दिग्गज लोक लिहीत होते. देवीसिंह चौहान, अबुबकर सिद्धीकी, डॉ. सूर्यनारायण रणसुभे, डॉ. जे. एम. वाघमारे, डॉ. चंद्रकांत देऊळगावकर, डॉ. विनय अपसिंगेकर, प्रा. वसंत जाधव, प्रा. फ. म. शहाजिंदे, प्रा. कृष्णचंद्र ज्ञाते, शंकर झुल्पे, अशोक पोतदार, जयप्रकाश दगडे इत्यादी लेखक, समीक्षक, कवी, आपापल्या परिने वेगवेगळ्या वाङमय प्रकारात मोलाची भर घालत होते. यातील काही काळाच्या पडद्याआड गेलेले असले, तरी उर्वरित जोमाने लेखन करीत आहेत. शिक्षणाचा झालेला प्रचंड विस्तार, त्यामुळे आलेले स्वत्वाचे भान, जीवनशैलीत पडलेला फरक, आर्थिक स्तरातील बदल, मध्यमवर्गियांची वाढलेली संख्या या सर्व बाबींचा परिणाम म्हणून अनेक नवीन हातांमध्ये लेखणी आली. लिहिणाऱ्यांची संख्या वाढली, वेदना-व्यथा कागदावर उमटू लागल्या आणि अनेक वेगवेगळ्या वाङमय प्रकारातून साहित्य निर्मिती होऊ लागली.

सिध्दीकी : स्व. अबुबकर सिध्दीकी यांनी उर्दू व हिंदीतून कविता, गजला लिहिल्या होत्या, तर देवीसिंह चौहान यांनी भाषाशास्त्रज्ञ म्हणून देशपातळीवर मान्यता मिळविली होती. मध्यमवर्गियांच्याच जीवन जाणिवेत रमणाऱ्या साहित्याला छेद देऊन ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर संबंध ग्रामीण संस्कृति उभी करणाऱ्या डॉ. शेषराव मोहिते यांच्या 'असं जगणं तोलाचं', 'धुळपेरणी' या कादंबऱ्या साहित्य विश्वात आपला वेगळा ठसा उमटवणाऱ्या आहेत. त्यांच्या या कादंबऱ्यांना अनेक साहित्य संस्था आणि महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळालेले आहेत.

---

२२. दैनिक **लोकमत**, रौप्यमहोत्सवी वर्ष, ९ जानेवारी २००६, व्हिजन लातूर; **दिंडी**, विशेषांक, २४ वे मराठवाडा साहित्य संमेलन, २००३, लातूर आणि लातूरमधील काही मान्यवरांच्या प्रत्यक्ष मुलाखतीवर आधारित.

देवीसिंह चौहान (१९११-२००४) : मराठवाडा आणि महाराष्ट्रभर ज्यांचा गौरवाने उल्लेख केला जातो, असे ज्येष्ठ इतिहास संशोधक देवीसिंह चौहान हे औसा तालुक्यातील नागरसोगा या गावचे होत. दि. २ मार्च १९११ रोजी त्यांचा जन्म झाला.[२३] मुंबई विद्यापीठातून मॅट्रिक परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर ते काही वर्षे हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळेत शिक्षक होते, तर स्वामी रामानंद तीर्थ हे मुख्याध्यापक होते. त्यांच्याच नेतृत्त्वाखाली त्यांनी हैद्राबाद मुक्ति संग्रामात सहभाग घेतला. १९४१ साली नागपूर विद्यापीठातून त्यांनी एल. एल. बी. ही पदवी मिळविली. काही वर्ष ते मराठवाडा प्रदेश काँग्रेसचे चिटणीस म्हणूनही कार्यरत होते. नागपूर कराराच्या वेळी मराठवाड्याचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी स्वाक्षरी केलेली आहे. १९३८ साली उमरगा येथे त्यांनी भारत विद्यालयाची स्थापना केली. त्यानंतर ते हैद्राबाद राज्यात कॅबिनेट मंत्री बनले, तर राज्य पुनर्रचनेनंतर मुंबई राज्याचे उपमंत्री बनले.

राजकारणात सक्रिय असतानाही त्यांनी आपल्या लेखन, वाचन आणि संशोधनात खंड पडू दिला नाही. अर्थशास्त्र, भाषाशास्त्र आणि वेदकालीन समाज हे प्रामुख्याने त्यांचे लेखनाचे विषय होते. मराठी, हिंदी, इंग्रजी, फार्सी व उर्दू भाषेवर प्रभुत्व असल्याने त्यांनी एकूण अकरा ग्रंथ लिहून प्रकाशित केलेले आहेत. दक्खिनी हिन्दीतील इतिहास, मराठी आणि दक्खिनी हिन्दी, शूलिक आणि प्राकृत, भारत ईराणी संश्लेष आणि ऋग्वेद : समस्या आणि उकल ही त्यांची मराठी भाषेतील ग्रंथसंपदा असून हिंदीत १) फूलबन : इब्न निशाती-कृत २) जंगनाम ए आलिम अलीखान : हुसेनकृत ३) तारीखे इस्कंदरी : नुस्रतीकृत ४) पर्णालि-पर्वत ग्रहणाख्यान : जयराम पिण्डे कृत ५) इब्राहीम नामा : अब्दुलकृत आणि पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराने प्रसिध्द केलेला Understanding Regveda हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांच्या सर्वच लेखनाला संदर्भमूल्य असून चोखंदळ वाचक आणि अभ्यासकांना ते मार्गदर्शक आहे. सन १९७२-७३ या वर्षी 'मराठी आणि दक्खिनी हिन्दी', तर १९७४-७५ मध्ये 'भारत ईराणी संश्लेष' या ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट ग्रंथ निर्मितीचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

१९५७ पासून त्यांनी संशोधनावरच लक्ष केंद्रित केले. सन १९६४ ते १९७० या काळात त्यांची महाराष्ट्र राज्याच्या लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून नेमणूक झाली. तसेच त्यांनी स्थापन केलेल्या भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्षपदही त्यांनी काही काळ सांभाळले. पण वयाची ८० वर्षे उलटेपर्यंत संशोधन हेच त्यांचे आवडते क्षेत्र होते. ते आपल्या संशोधनासंबंधी लेख लिहीत राहिले. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेचे वार्षिक, डेक्कन महाविद्यालयाची पत्रिका, भारत इतिहास संशोधक मंडळाची पत्रिका, इंडियन लिंग्विस्टिक्स, अखिल भारतीय प्राच्य विद्या परिषदेचे नियतकालिक, इतिहास परिषदेचे नियतकालिक, रॉयल एशियाटिक सोसायटीचे नियतकालिक, निरनिराळ्या विद्यापीठांची संशोधनपर नियतकालिके, मुंबई मराठी संशोधन पत्रिका, नवभारत, प्रतिष्ठान, समाज प्रबोधन पत्रिका, युगवाणी, साधना, महानुभाव पत्रिका, महाराष्ट्र साहित्य पत्रिका इ.नियतकालिकांतून त्यांचे लेख सातत्याने येत राहिले. त्यांनी जवळजवळ २५० संशोधनपर लेख लिहिले. त्यातील एकेका विषयावरचे लेख संग्रहरूपाने त्यांनी प्रसिध्द केले.

---

२३. कुंभार, नागोराव (संपा.), "चिरस्मृत डॉ. देवीसिंह चौहान", (ले. कल्याण काळे) **विचारशलाका**, नियतकालिक, एप्रिल ते सप्टेंबर २००५, जोड अंक ७२ व ७३, पृ.२२-२८.

सन १९८९ मध्ये त्यांनी आपल्या मित्रांच्या सहकार्याने लातूर येथे 'वेदप्रतिष्ठान' ही संस्था स्थापन केली आणि वेदग्रंथांचा शास्त्रशुदध अभ्यास करण्याची सोय उपलब्ध करून दिली. वयाची ऐंशी वर्षे उलटल्यानंतर त्यांच्या लेखनाचा झंझावात मंदावला. सन १९९९ साली म्हणजे त्यांच्या वयाच्या ८८ व्या वर्षी त्यांना अर्पण केलेला 'डॉ. देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ' प्रसिध्द झाला. जवळजवळ ३८ विद्वानांनी या गौरवग्रंथासाठी लेखन केले असून वेदापासून ते बारव स्थापत्यापर्यंत अनेक विषयांवरचे लेख त्यात आले आहेत. त्यांच्यासारख्या विद्याप्रेमी, व्यासंगी विद्वानाच्या व्यासंगाचा, संशोधनकार्याचा औचित्यपूर्ण सत्कार या गौरवग्रंथाच्या निर्मितीने झाला असेच म्हणावे लागेल.

देवीसिंहजी बहुभाषाकोविद होते. मराठी, हिन्दी, उर्दू, फार्सी, संस्कृत, इंग्रजी या भाषांवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. या भाषांतील संशोधनपर लेखनाशी त्यांचा जवळून परिचय होता. आचार्य वि. प्र. लिमये यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी ऋग्वेदाचा सखोल अभ्यास केला होता. ऋग्वेदाकडे ते धार्मिक ग्रंथ म्हणून नव्हे, तर आर्य संस्कृतिच्या उदयकाळातील पाऊल-खुणांचा दस्तऐवज म्हणून पाहात होते. संस्कृत मध्येही ते पद्यबध्द रचना करू शकत असत. भारतविद्येच्या अभ्यासकांच्या नजरेतून सुटलेली अनेक नवनवीन संशोधनक्षेत्रे त्यांना उपलब्ध झाली.

श्री. देवीसिंह चौहानांचे दक्खिनी हिंदी संबंधीचे संशोधनही फार मोलाचे आहे. उर्दू-फार्सीच्या अभिमान्यांनी तिच्याकडे तुच्छतेनेच पाहिले होते. ती जवळजवळ १९३० पर्यंत अभ्यासकांकडून दुर्लक्षितच राहिली होती. वि.का.राजवाडे, डॉ. अब्दुल हक इ. विद्वानांनी तिची थोडीफार ओळख करून दिली होती. पण मराठीत तरी निदान तिचा साग्रसंगीत परिचय करून देण्याचे श्रेय श्री. देवीसिंह चौहान यांच्याकडेच जाते. त्यांनी तिच्या संदर्भात अनेक लेख लिहिले. ते सर्व त्यांच्या 'मराठी आणि दक्खिनी हिन्दी' या ग्रंथात समाविष्ट आहेत. या ग्रंथाला भाषा विभागातील सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणून महाराष्ट्र राज्य पारितोषिक मिळाले होते.

त्यांच्या संशोधनाचा दुसरा विषय म्हणजे भारत-इराण यांच्यातील भाषिक संबंध हा होय. यातील इराण सध्याचा इराण देश नसून ते एक उपभाषाकुल आहे. त्यात सोग्दिया (चूलिक) देशाच्या सुग्द चूलिक, शूलिक, खोतन देशाच्या खोतनी, शक, अफगाणिस्तानची पश्तो, बलुचिस्तानची बलुची या उपभाषांचा प्रामुख्याने समावेश होतो. या सर्व भाषांची जनकभाषा ती इराणी भाषा आणि त्या भाषेचा प्रदेश तो इराण देश होय, अशी व्यापक भूमिका या संकल्पनेमागे आहे.

श्री. चौहान यांचे महाराष्ट्रातील विविध नियतकालिकांतून मराठी भाषेत १५७, हिंदी भाषेत १६, उर्दू भाषेत १३ आणि इंग्रजीत ५३ संशोधनपर लेख प्रसिध्द झालेले आहेत. सन १९८७ मध्ये भारतीय भाषांचे एक शिष्टमंडळ भारत सरकारने रशियात पाठविले होते. त्यात चौहान गुरुजींचा समावेश होता.चौहानांचे एकूण संशोधन कार्य लक्षात घेऊन १९८७ साली मराठवाडा विद्यापीठाने त्यांना डी.लिट ही सन्माननीय पदवी देऊन त्यांचा गौरव केला. अमेरिकेतील विविध विद्यापीठांत त्यांची भारतीय भाषेच्या संदर्भात अभ्यासपूर्ण व्याख्याने झाली.

सेतुमाधवराव पगडी (१९१०-१९९४) : शासकीय नोकरी सांभाळून ज्यांनी अफाट वाचन-लेखन आणि संशोधन केले असे ज्येष्ठ इतिहास संशोधक कै. सेतुमाधवराव श्रीनिवास पगडी यांचा जन्म दि.२७ ऑगस्ट १९१० रोजी निलंगा या गावी झाला. वडील श्रीनिवासराव निलंग्यास पेशकार होते. त्यांच्या सतत होणाऱ्या बदलीमुळे पगडींची शिक्षणाची खूपच हेळसांड झाली. तरीही ते बनारस व अलाहाबाद विद्यापीठातून अनुक्रमे बी.ए. व एम.ए.च्या परीक्षा विशेष गुणवत्तेने उत्तीर्ण झाले. रामचंडी प्रसाद सुवर्ण पदकाचे ते मानकरी होते. जिल्हाधिकारी तसेच शिक्षण व गृहखात्यातील सचिव यासारख्या महत्त्वपूर्ण पदांवर त्यांनी काम केले आहे. राज्य पुनर्रचनेनंतर त्यांनी मुंबई राज्याचे शिक्षण उपसचिव तसेच अर्थ खात्याचे संयुक्त सचिव म्हणून कर्तव्य बजावले. याशिवाय महाराष्ट्र राज्य दर्शनिका (गॅझेटिअर्स) विभागाचे कार्यकारी संपादक व सचिव म्हणून नावलौकिक मिळविला. एक प्रामाणिक, शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ते परिचित होते.

कै.सेतुमाधवराव पगडी[२४] एक श्रेष्ठ इतिहासकार या नात्याने केवळ महाराष्ट्रालाच नव्हे, तर संपूर्ण देशाला सुपरिचित होते. राज्यशास्त्र, राजकारण, साहित्य व इतिहास या विषयात पगडींना विशेष रुची होती. त्यांनी या विषयांची शेकडो पुस्तके वाचून काहींचे परिक्षणही केले. आंध्रप्रदेशातील आदिलाबाद या आदिवासी परिसरातील गोंड व कोलमी आदिवासी लोकांच्या बोली भाषेचे व्याकरण लिहून काढण्याची साहित्यिक प्रतिभा बाळगणारे पगडी 'वरंगळच्या काकतीय राजांचा इतिहास' लिहून आपली इतिहासातील विद्वत्ताही सिद्ध करतात. साहित्य व इतिहास संशोधन या दोन क्षेत्रातील त्यांचा संचार विस्मयकारक स्वरूपाचा असाच आहे. ४० कवी, २५ आत्मचरित्रकार, १० विनोदी लेखक आणि २५ प्रबंधकार अशा एकूण १०० उर्दू साहित्यिकांचा परिचय त्यांनी महाराष्ट्राला करून दिला. साहित्य व इतिहास या दोन्ही विषयात मिळून त्यांनी जी ६४ पुस्तके लिहिली, त्यापैकी ५० पुस्तके मराठीत व १४ पुस्तके इंग्रजीत आहेत. यातील ३३ पुस्तके इतिहास संशोधनाशी संबंधीत आहेत. 'जीवनसेतु' हा त्यांचा आत्मचरित्रपर ग्रंथ आहे. विविध मासिके व दैनिकांतून त्यांचे अदमासे एक हजारपेक्षा जास्त लेख प्रसिध्द झाले आहेत. मराठी, संस्कृत, इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलगू, उर्दू, फार्सी, पर्शियन व अरबी या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. मोगल दरबाराची बातमीपत्रे व मोगल सरदारांच्या पत्रव्यवहाराचा सुमारे पाच हजार पाने भरतील एवढा फार्सी मजकूर त्यांनी मराठीत अनुवादित करून त्याआधारे मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधनात्मक लेखन केले. त्यांनी लिहिलेला संशोधनपर जवळजवळ प्रत्येक ग्रंथ हा संदर्भग्रंथ असून मराठी सारस्वतात त्यांचे कार्य सुवर्णाक्षरांनी लिहावे असेच आहे.

इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात सेतुमाधवराव पगडी यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याची दखल घेऊन १९८५ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने त्यांना डी.लिट. ही सन्माननीय पदवी देऊन, तर महाराष्ट्र शासनाने सन १९९१ मध्ये त्यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला; एवढेच नव्हे, तर मुंबई विद्यापीठात त्यांच्या नावे इतिहास संशोधनासाठी शिष्यवृत्ती सुरू केली. भारत सरकारनेही त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल सन १९९४ मध्ये त्यांना 'पद्मभूषण' किताबाने गौरवांकित केले. एक व्यासंगी इतिहासकार, प्रभावी वक्ता व कुशल प्रशासक म्हणून त्यांनी महाराष्ट्र व भारतात लौकिक संपादन केला होता.

२४. कुंभार, नागोराव (संपा.), ''कै.सेतुमाधवराव पगडी : एक इतिहास पंडित'' (ले.प्रा.डॉ.शिवकुमार पाटील) '**विचारशलाका**', पूर्वोक्त पृ.१२-१८.

जनार्दन वाघमारे : नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे हे लातूर तालुक्यातील कवठा या गावचे रहिवासी. एक पुरोगामी विचारवंत म्हणून त्यांचा महाराष्ट्रभर लौकिक आहे. लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाचे ते अनेक वर्षे प्राचार्य होते. ते एक व्यासंगी आणि प्रभावी वक्ते असून अनेक शासकीय व अशासकीय पुरस्काराने सन्मानित आहेत. अमेरिकन निग्रो साहित्य आणि संस्कृति, हाक आणि आक्रोश, साहित्य चिंतन, समाज परिवर्तनाच्या दिशा, आजचे शिक्षण : स्वप्न आणि वास्तव्य, महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण, प्राथमिक शिक्षण : यशापयश आणि भवितत्व, शिक्षण : समाज परिवर्तन व राष्ट्रीय विकास व्यक्तिवलय (व्यक्तिचित्रण), संवाद (भाषणसंग्रह), मूठभर माती (आत्मचरित्र), चिंतन एका नगराध्यक्षाचे व चिंतन एका कुलगुरूचे ही त्यांची काही प्रसिध्द पुस्तके असून विविध नियतकालिकांतून ते सातत्याने लेखन करीत असतात. याशिवाय डॉ.वाघमारे यांनी 'बखर एका खेड्याची' ही सामाजिक आशयाची कादंबरी लिहून या वाङ्मय प्रकारात एक दमदार पाऊल टाकले आहे. त्यांच्या 'चिंतनयात्रा' या पुस्तकाला तसेच 'अमेरिकन निग्रो साहित्य आणि संस्कृति' या ग्रंथास राज्य शासनाचा उत्कृष्ट ग्रंथ-निर्मितीचा पुरस्कार,तर 'समाज परिवर्तनाच्या दिशा' या ग्रंथास महाराष्ट्र फाऊंडेशनचा २५ हजार रुपयांचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. दलित साहित्य, समाज परिवर्तन आणि शिक्षण हे डॉ.वाघमारे यांच्या चिंतनाचे आणि लेखनाचे विषय होत. नुकताच त्यांचा 'द होरायझन्स ॲण्ड बियॅाण्ड' हा लेख संग्रह प्रसिध्द झाला आहे. त्यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून उभारलेले औसा तालुक्यातील 'चलबुर्गा' हे जाती-पाती विरहीत गाव 'राष्ट्रीय सेवाग्राम' म्हणून ओळखले जाते.

या जिल्ह्याने मराठवाड्याला दिलेल्या दोन कुलगुरूंमध्ये डॉ. जनार्दन वाघमारे आणि डॉ. शिवाजीराव नाकाडे यांचा समावेश आहे.

लक्ष्मण गायकवाड : साहित्य अकादमीच्या पुरस्काराने सन्मानित झालेले प्रसिध्द लेखक श्री. लक्ष्मण गायकवाड यांची लातूर तालुक्यातील धनेगाव ही जन्मभूमी होय. दि. २३ जुलै १९५६ रोजी त्यांचा जन्म झाला. सध्या मुंबई येथेच ते वास्तव्यास आहेत. शिक्षण पूर्ण होताच त्यांनी आपले आयुष्य समाज कार्यासाठी समर्पित केले. विमुक्त भटके संघर्ष महासंघाचे ते संस्थापक अध्यक्ष असून मुंबई येथे भरलेल्या पहिल्या जागतिक परिषदेमध्ये त्यांनी दलित समाजाच्या उन्नतीसाठी आवाज उठविला. त्यांच्या 'उचल्या' या कादंबरीस साहित्य अकादमीचा एक लाख रुपयांचा पुरस्कार मिळाला. याशिवाय महाराष्ट्र गौरव पुरस्कार, समता पुरस्कार, संजीवनी पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. 'उचल्या' ही कादंबरी हिंदी, इंग्रजी, कन्नड, तेलुगू, उर्दू, फ्रेंच, बंगाली इत्यादी भाषांत भाषांतरीत झालेली असून वयाच्या ३४ व्या वर्षी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळविणारे ते पहिले भारतीय होत. 'चिनी मातीतील दिवस' या त्यांच्या प्रवास वर्णनातील एक धडा इयत्ता नववीच्या पाठ्यपुस्तकात समाविष्ट करून त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे.

रा. रं. बोराडे : महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाचे माजी अध्यक्ष व प्रसिध्द ग्रामीण कथा-कादंबरीकार श्री. रा. रं. बोराडे यांची जन्मभूमी लातूर जिल्ह्यातील काटगाव ही होय. त्यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या

परभणी, वैजापूर व औरंगाबाद येथील महाविद्यालयांचे ते माजी प्राचार्य आहेत. शालेय जीवनापासूनच लेखन-वाचनाची आवड असलेल्या श्री. बोराडे यांचा १९६२ साली 'पेरणी' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. याद्वारे त्यांनी ग्रामीण माणसांच्या कथा आणि व्यथा साहित्यात चित्रित करून नागरी माणसाला ग्रामीण जीवनाची ओळख करून दिली. आतापर्यंत त्यांचे कथासंग्रह, कादंबरी, वगनाट्य मिळून एकूण तीस पेक्षा अधिक ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. त्यात 'पेरणी', 'ताळमेळ', 'वरात', 'नातीगोती', 'बोळवण', 'वाळवण', 'फजितवाडा', 'माळरान', 'राखण', 'गोंधळ' आणि 'खोळंबा' इत्यादी कथासंग्रहांचा समावेश आहे. त्यांच्या 'मळणी', 'पाचोळा', 'पाच ग्रामीण नाटिका' या ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्.मय निर्मितीचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. 'पाचोळा' कादंबरीस 'भैरू रतन दमाणी' पुरस्कार, तर 'चारापाणी' कादंबरीला मराठवाडा साहित्य परिषदेचा 'नरहर कुरुंदकर' पुरस्कारही प्राप्त झालेला आहे. वाङ्.मयीन क्षेत्रातील त्यांच्या या गौरवास्पद कार्याबद्दल त्यांना स्वा.सै.विनायकराव चारठाणकर प्रतिष्ठानच्या 'सेवा गौरव' पुरस्काराने गौरवांकित करण्यात आलेले आहे. महाविद्यालयीन अभ्यासक्रमात त्यांच्या पुस्तकांचा समावेश आहे. कोपरगाव येथे झालेले नगर जिल्हा साहित्य संमेलन, धर्माबाद येथे झालेले मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलन व हिंगोली येथे झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भुषविले होते. ते उत्तम कथा-कथनकार म्हणूनही परिचित आहेत. सध्या विविध सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक संस्थांचे ते पदाधिकारी आहेत. ग्रामीण भागातील नवलेखक व कवींना प्रोत्साहित करण्यासाठी ते कार्यरत असतात. त्यांच्यासाठी ते शिबिरेही आयोजित करतात. आपल्या ग्रामीण लेखनाने त्यांनी मराठी सारस्वतात स्वतःचे स्थान निर्माण केले आहे.

श्री. दि. इनामदार : रामचंद्र महाराज पारनेरकर यांनी 'मराठीचे टागोर' म्हणून गौरविलेले श्री. दि. इनामदार यांची जन्मभूमी व वतन भूमी लातूर ही असून येथेच त्यांच्या प्रतिभेला पंख फुटले. बँकेत आकडेमोड करणाऱ्या या माणसाने शब्दांचे अक्षर लेणे उभे करून, एकापेक्षा एक सरस काव्यसंग्रह चोखंदळ वाचकांच्या हाती दिले. याद्वारे मराठी सारस्वतात स्वतःच्या पाऊलखुणा उमटवून त्यांनी फार मोठा लौकिक संपादन केला. त्यांचे शिवगान, फुल फुलता राहिना, नभ मातीच्या कुशीत, दिंडी जाय दिगंतरा, दिवे सांडिले प्रवाही, बुध्दिदाता श्री. गणेश, जाऊ अमृताच्या गावा, हे माय मातृभूमी, मुक्तीचा येळकोट, रिध्दीसिध्दीचा नायक, श्री. रामरक्षा भावानुवाद, सत्यंवद गोदावरी इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. मराठी चित्रपटासाठीही त्यांनी गीत लेखन केलेले असून शिवगान, अमृताचे बोल, जाऊ अमृताच्या गावा या काव्यसंग्रहांवर आधारित संगीतमय कार्यक्रम सादर केलेले आहेत. इनामदार हे विविध वाङ्.मयीन संस्थांचे पदाधिकारी असून उदयोन्मुख साहित्यिकांना प्रोत्साहन देऊन त्यांनी अनेकांना लिहिते केले. त्यांची छत्रपती शिवाजी, भगवान महावीर, तुका झालासे कळस, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही संगीत रुपके औरंगाबाद आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित झालेली आहेत. याशिवाय शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमातही त्यांच्या कविता समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. त्यांची 'सत्यंवद गोदावरी' ही नाट्यसंहिता आकाशवाणीवर विशेष गाजली. साहित्यातील या बहुमोल कार्याबद्दल त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे.

कल्याण इनामदार : यांचे वास्तव्य आज जरी नोकरीनिमित्त पुण्यास असले, तरी त्यांची जन्मभूमी लातूर हीच आहे. त्यांना वाचन-लेखनाचा छंद शालेय जीवनापासूनच जडलेला आहे. आजपावेतो महाराष्ट्रातील विविध नियतकालिकांतून त्यांच्या दोन हजाराहून अधिक कविता प्रकाशित झालेल्या आहेत. अबोलीची नक्षी, नाद, झोत, आत्मविभोर या काव्यसंग्रहांबरोबरच कथा, कादंबरी, समीक्षा, बालवाङ्मय या प्रकारात त्यांची ७५ पेक्षा अधिक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. आकाशवाणी आणि दूरदर्शनवरूनही त्यांच्या कवितांचे प्रसारण झालेले आहे. दिल्ली येथील भारतीय बालशिक्षा परिषदेने आयोजित केलेल्या संमेलनात मराठीतील बाल वाङ्मयाच्या वैशिष्ट्यपूर्ण लिखाणासाठी राष्ट्रपतींच्या हस्ते मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. आकाशवाणी, दिल्ली तर्फे प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या सर्व भाषिक राष्ट्रीय कविसंमेलनातही त्याचा सहभाग होता. 'मराठीतील गीत रचना : स्वरूप आणि विकास' या प्रबंधासाठी त्यांना पुणे विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळालेली आहे. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार तसेच विविध सामाजिक-सांस्कृतिक संस्थांचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांची कविता आशयगर्भ असून काळजाला स्पर्शून जाणारी आहे. त्यामुळे चोखंदळ रसिक वाचकांनी त्यांच्या साहित्याचे मनापासून स्वागत केले.

नागोराव कुंभार : 'विचारशलाका' या दर्जेदार वैचारिक त्रैमासिकाचे संपादक प्रा.डॉ.नागोराव कुंभार हे लातूर येथील बसवेश्वर महाविद्यालयात तत्वज्ञान या विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. 'विचार शलाका'चा प्रत्येक अंक संग्राह्य असून 'समाजप्रबोधन' हा धर्म त्यांनी निष्ठेने पाळल्यामुळे सन १९९५ मध्ये महाराष्ट्र फाऊंडेशनने उत्कृष्ट वैचारिक नियतकालिकासाठीचा पन्नास हजार रुपयांचा विशेष पुरस्कार 'विचार शलाकास' देऊन प्रा. कुंभार यांचा गौरव केला. लातूर जिल्हा पत्रकार संघाचा दिवाळी अंकाचा प्रथम "दर्पण" पुरस्कारही या त्रैमासिकास दोन वेळा प्राप्त झाला आहे. प्रा. डॉ. कुंभार हे याशिवाय अनेक पुरस्कारांनी सन्मानित असून त्यांची संपादित आणि लिखित ग्रंथसंख्या तीस पेक्षा अधिक आहे. प्रामुख्याने गं. बा. सरदार : व्यक्ती व विचार, न्याय म्हणजे काय ?, ग्रामीण विकास : समस्या व उपाय, समाजसुधारक महात्मा फुले, उदार मतवाद, शैक्षणिक समस्या व उपाय, मंडल आयोग : शोध आणि बोध ही त्यांची काही संपादित पुस्तके, तर आचार्य शं.द.जावडेकर, भूकंप : एक नैसर्गिक आपत्ती, मुस्लिम साहित्य व समाज चिंतन, भ्रष्टाचार : स्वरूप आणि संदर्भ, सामाजिक कार्याच्या दिशा, विचार तरंग ही त्यांची गाजलेली काही पुस्तके आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे पहिले अधिष्ठाता (डीन) व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले आहे. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळाचेही ते सदस्य होते. विभागीय, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील परिसंवादात त्यांचा सातत्याने सहभाग असतो. अनेक चर्चासत्रांचे, उद्बोधन शिबिरांचे ते आयोजन करतात. अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक संस्थाचे ते पदाधिकारी आणि सदस्य असून व्यासंगी आणि प्रभावी व्याख्याता म्हणून महाराष्ट्रभर त्यांचा लौकिक आहे. एक तत्त्वचिंतक म्हणूनही ते प्रसिध्द आहेत.

अनुक्रमणिका

सु. ग. जोशी : हे जिल्ह्यातील एक प्रथितयश संशोधक व अभ्यासक आहेत. गेली अनेक वर्षे ते मराठवाडा संशोधन मंडळाचे अध्यक्ष म्हणून धुरा सांभाळीत आहेत. सन १९७४, १९७६ व १९७७ यावर्षी त्यांनी या मंडळाचे वार्षिक अंक प्रकाशित केले. याद्वारे त्यांनी ८१ लेखकांचे ८१ लेख संपादित केले. ते प्राचीन हस्तलिखितांचे संग्राहक आहेत. विशेषत: स्थानमाहात्म्य व मराठवाड्यातील प्राचीन-मध्ययुगीन मराठी शिलालेखांवर त्यांचा अभ्यास आहे. देवीसिंग चौहान गौरव ग्रंथाचे त्यांनी संपादन केलेले असून विविध दैनिके, अंक, वार्षिके यात ते सातत्याने प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाच्या संदर्भात लेखन करीत असतात.

पंडितराव देशमुख : यांची 'खजुराहो' नामक ऐतिहासिक कादंबरी इतिहासाचा एक विस्तृतपट घेऊन चित्रबध्द शैलीत लिहिलेली लक्षणीय कादंबरी आहे. कवी, कथाकार व दैनिक 'लोकमत' च्या लातूर आवृत्तीचे संपादक असलेल्या जयप्रकाश दगडे यांनी केवळ कविताच लिहिल्या नाहीत, तर 'युध्दस्य कथा रम्य:' हे सैनिकांच्या जीवनावर एक आगळे-वेगळे वैशिष्ट्यपूर्ण असे पुस्तक लिहिले आहे. याशिवाय 'तिन्ही सांजा' हा कविता संग्रह प्रकाशित केला आहे. ते उत्तम वक्तेही आहेत.

लामजना येथील सुरेंद्र पाटील यांनी ग्रामीण जीवनावर अस्सल कथा लिहिल्या. त्यांच्या 'आंतरभेगा' या कथासंग्रहाला प्रतिष्ठेचा पुरस्कारही मिळालेला आहे. भास्कर बडे यांनीही साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

ना. य. डोळे[२५] : मिशनरी वृत्तीने उदगीर येथे कॅालेज चालविणारे प्राचार्य डॉ. ना. य. डोळे यांचा उल्लेख विचारवंत, साहित्यिक व समाजसेवक म्हणून विशेषत्वाने करावा लागतो. पुणे विद्यापीठाच्या पहिल्या पीएच.डी. विद्यार्थ्यांपैकी डॉ. डोळे हे एक होत. ते मूळचे उदगीरचे नसले, तरी एस. एम. जोशींच्या प्रेरणेने ते उदगीरला आले व येथलेच होऊन गेले. शैक्षणिक गुणवत्तेपेक्षा शिक्षणाचा प्रसार त्यांना अधिक महत्त्वाचा वाटत होता. प्राचार्य म्हणून त्यांनी केलेल्या शैक्षणिक प्रयोगाचे सविस्तर विवेचन त्यांनी आपल्या 'प्राचार्य' या पुस्तकात केलेले आहे. प्राचार्य पदावर काम करताना आलेले अनेक अनुभव त्यांनी या पुस्तकात रेखाटलेले आहेत. याशिवाय राज्यशास्त्रावरही त्यांनी विपुल लेखन केलेले आहे. काश्मिर समस्या, स्वदेशी जागरण, हैद्राबाद मुक्तिसंग्राम, रा.स्व.संघ व सेवादल, शिक्षण आणि जागतिकीकरण या विषयावरील त्यांची पुस्तके प्रसिध्द आहेत. महाराष्ट्र फाऊंडेशनकडून त्यांना काश्मिरवरील पुस्तकासाठी पुरस्कार मिळाला आहे. तसेच चारठाणकर पुरस्काराचेही ते मानकरी आहेत. अनेक सन्माननीय व्यासपीठांवर त्यांनी अभ्यासपूर्ण व्याख्याने दिली. एक विचारवंत म्हणून त्यांची ख्याती अवघ्या महाराष्ट्रात पसरली होती.

उदगीरचे प्राध्यापक अरूण प्रभुणे व प्रा. प्रदीप पोळ हे लेखक आहेत. यापैकी प्रभुणे यांचे टीकालेख अनेक नियतकालिकांमधून प्रसिध्द झाले आहेत. त्यांनी मराठी नाटकांवर प्रबंध लिहिला असून नुकतेच त्यांचे 'नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या अस्वल लोककथा' हे पुस्तक प्रसिध्द झाले आहे. या पुस्तकास सन २००५-०६ चा राज्य शासनाचा उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीचा 'संत गाडगे महाराज पुरस्कार' प्राप्त झाला आहे. उदगीर येथील श्री. निरोबे यांनी कानडी बसव वचनांचे मराठी भाषांतर केले आहे. श्री. दुबे यांनी उस्मानाबाद येथील

२५. यांच्यासंबंधी काही माहिती डॉ. सुधाकर देशमुख, उदगीर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

श्री. माणिकप्रभूंच्या तत्त्वज्ञानावर प्रबंध लिहिला आहे. लातूरचे पहिले खासदार रा. भी. दिवाण हे स्वातंत्र्य सैनिक होते. बाबासाहेब परांजपे हेही स्वातंत्र्य सैनिक व श्रेष्ठ वक्ते होते. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील काम उल्लेखनीय आहे. उदगीर येथील पंडित अनंताचार्य शिरोळे हे संस्कृत भाषातज्ञ म्हणून ख्यातकिर्त आहेत. भागवत कथेचे ते उत्तम निरूपण करतात.

लातूर जिल्ह्यात लातूर नंतर उदगीर हे शहर सांस्कृतिक घडामोडी, साहित्यिक चळवळ, संगीत प्रबोधन, संगीत मैफिली आणि शैक्षणिक कार्यासाठी प्रसिध्द आहे. या शहरात मराठी सोबतच उर्दू व कानडी भाषा बोलल्या जातात. या तिन्ही भाषांतील लेखक, कवी येथे आहेत. परंतु सर्वांचा उल्लेख करणे शक्य होत नाही. नव्याने आलेल्या अस्तित्व भानामुळे तळागाळातील माणूस आता लिहिता होत आहे हे लातूर जिल्ह्याचे वैशिष्ट्य होय.

७० ते ८० च्या दशकात कविता लिहिणारे प्रा. वसंत मा. चव्हाण हे आपल्या तीव्र सामाजिक जाणीवेतून व मानवी असहाय्यतेतून आपले अनुभव व्यक्त करतात. सौ. माधवी कवी यांनीही तत्त्वज्ञानपर आणि भारतीय संस्कृतिवर पुस्तके लिहिली आहे. रमेश चिल्ले यांनी शेतकरी जीवनावर 'ओस झाल्या दिशा', 'नांगरून पडलेले शतक' अशा कविता लिहिल्या आहेत. याशिवाय डॉ.प्रणिता चाकूरकर, नरसिंग इंगळे, राजकुमार पांचाळ, संजय घाडगे, संजय जमदाडे, डॉ. शिवाजी जवळगेकर इत्यादी कवीही लिहीत आहेत.

चंद्रशेखर मलकमपट्टे, प्रकाश कळे यांनी शेतकरी जीवनावरच्या कविता केल्या आहेत, तर मधूनच अंत्यत तरल, संवेदनाक्षम अशा गीतकाव्याच्या वळणावरील कविता योगिराज माने यांनी आपल्या 'रानशीळ' या कविता संग्रहात संग्रहित केलेल्या आहेत.

भगवानराव देशमुख हे ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक आहेत. त्यांचा 'काव्यज्योती' हा निवडक कविता संग्रह प्रकाशित झालेला आहे. उस्मानाबाद येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. त्यांनी हिप्परग्याच्या शाळेचा इतिहास सांगणारे पुस्तक व अनेक लेख प्रसिद्ध केले आहेत. मराठी, संस्कृत, उर्दू, फार्शी, व इंग्रजी या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. सुप्रसिध्द प्रकाशक रा. ज. देशमुख यांच्यासोबत त्यांनी देखमुख आणि कंपनी या प्रकाशन संस्थेची स्थापना केली. लातूर येथील 'वेदप्रतिष्ठान' या संस्थेच्या संस्थापकांपैकी ते एक होत. या संस्थेचे ते सचिवही होते.

माधव कदम हे वादग्रस्त सीमा भागातील रहाणारे असून उदगीर येथे त्यांचे वास्तव्य आहे. प्राथमिक शिक्षक म्हणून निवृत्त झालेल्या माधव कदम यांचे मळा, मातीचा ओलावा, क्षितिज फिरे गरगरा व पाटाचं पाणी हे कविता संग्रह प्रसिध्द असून या साहित्याने त्यांची कवी म्हणून महाराष्ट्राला ओळख करून दिलेली आहे. वरील कवितासंग्रहांपैकी 'पाटाचं पाणी' या कविता-संग्रहाचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या एम.ए. द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आलेला आहे. औसा येथील कमल ठकार याही प्रसिद्ध कवयित्री आहेत.

दिनकर कुळकर्णी यांनी लोकसाहित्यातील कथाबंध यावरील प्रबंध व अनेक लेख लिहिलेले आहेत. श्री. सुभाष देशपांडे यांचे विविध नियतकालिके, वृत्तपत्रे यातून समीक्षात्मक तसेच सहकार, बँकिंग, व्यवस्थापन विषयक लेख प्रसिद्ध झाले आहेत. 'अमेरिका जशी

भावली तशी' हे त्यांचे पुस्तक प्रकाशनाच्या प्रतिक्षेत आहेत. साहित्य, सहकार, व्यवस्थापन, सामाजिक प्रश्न इत्यादीवर त्यांनी अनेक व्याख्याने दिली आहेत. डॉ. सुधाकर देशमुख यांचेही वृत्तपत्र, नियतकालिके यातून अनेक वैचारिक लेख प्रसिद्ध झाले आहेत.

सुप्रसिध्द कथालेखिका आणि कादंबरीकार सौ. अनुराधा वैद्य या लातूरच्या असून त्यांची कथा संग्रह व कादंबऱ्या मिळून तीसपेक्षा अधिक पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांना अनेक पारितोषिकेही मिळालेली आहेत. मूळच्या उदगीरच्या असलेल्या सुप्रसिद्ध कथालेखिका सौ. वृंदा दिवाण यांचेही दहापेक्षा अधिक कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. सौ.वैद्य व दिवाण या दोघीही सध्या औरंगाबाद येथे स्थायिक झालेल्या आहेत.

बालसाहित्यिक आणि कथाकार डॉ. चंद्रकांत दत्तोपंत देऊळगावकर हेही मूळचे गुलबर्ग्याचे; पण नोकरीच्या निमित्ताने लातूर येथे स्थाईक झालेले आहेत. साने गुरुजींच्या साहित्य संस्कारांमुळे त्यांनी बाल-साहित्य लेखन केले. यात चंद्रावरील कलंक व इतर कथा, सोनिया व इतर कथा, परोपकारी विठू व इतर कथा, असीम त्याग व इतर कथा या प्रकाशित पुस्तकांचा समावेश असून 'घरटं' हा कथासंग्रही प्रकाशित झालेला आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, महाराष्ट्र राज्य नाट्य परिनिरीक्षण मंडळ इत्यादींवर त्यांनी सदस्य म्हणून कार्य केलेले आहे. वीरशैव संप्रदायातील संतश्रेष्ठ मन्मथ स्वामींवर संशोधन करून त्यांनी मराठवाडा विद्यापीठास प्रबंध सादर केला आहे.

चंद्रशेखर कपाळे : गुलबर्गा येथील शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झालेले डॉ. चंद्रशेखर कपाळे यांची उदगीर ही जन्मभूमी आहे. त्यांनी 'मराठी वीरशैव संत कवी बसवलिंग यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास' हा प्रबंध शिवाजी विद्यापीठास सादर केला. गंधवती (काव्यसंग्रह), साहित्य संवेद (संशोधनपर लेखसंग्रह), मराठी वीरशैव संत कवी बसवलिंग : चरित्र आणि वाड्.मय व श्री. सिध्दान्त शिखामणी आणि वचनोघात ही त्यांची लिखित व अनुवादित पुस्तके प्रकाशित आहेत. १९१७ साली 'मराठी वीरशैव संत कवी बसवलिंग : चरित्र आणि वाड्.मय' या ग्रंथास कर्नाटक मराठी साहित्य परिषदेचा कै. द. बा. चाफेकर पुरस्कार, तर 'साहित्य संवेद' व 'श्री. सिध्दान्त शिखामणी' या ग्रंथास १९९३ चा गुलबर्गा विश्व विद्यालयाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर, या संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत.

औराद शहाजनी येथील मा. दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रा.फकीर महबुब शहाजिंदे हे उमरगा तालुक्यातील सास्तूरचे रहिवासी आहेत. तथापि, त्यांचे कार्यकर्तृत्व लातूर जिल्ह्यातच घडलेले आहे. उत्तम कवी आणि लेखक म्हणून त्यांचा लौकिक आहे. त्यांची कविता चोखंदळ वाचकाला अंतर्मुख करणारी असून एक सर्जनशील कवी म्हणून महाराष्ट्रभर ख्याती आहे. त्यांचे 'निधर्मी', 'आदम' व 'ग्वाही' हे काव्य संग्रह,'मी तू' ही कादंबरी व 'शेतकरी' हे कथाकाव्य प्रसिद्ध आहे. 'मी तू' या पत्रात्मक कादंबरीतून त्यांनी अल्पसंख्यांकांच्या भावविश्वाला हळुवार स्पर्श केला आहे. 'निधर्मी' या काव्यसंग्रहात त्यांनी त्यांच्या वाट्याला आलेले दाहक अनुभव मांडले आहेत. त्यांच्या 'शेतकरी' या ग्रंथास महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. याशिवाय सारांश, अनुभव व इत्यर्थ हे दोन समीक्षा ग्रंथही

प्रकाशित झालेले आहेत. १९९४ साली 'हमीद दलवाई पुरस्काराने' त्यांना गौरवांकित करण्यात आलेले आहे. १९९२ साली सोलापूर येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भुषविले होते.

प्र. ई. सोनकांबळे : औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाचे सेवानिवृत्त उपप्राचार्य प्र. ई. सोनकांबळे हे लातूर जिल्ह्याचे रहिवासी होत. उदगीर तालुक्यातील सुल्लाळी हे त्यांचे जन्मगाव. आठवणीचे पक्षी, पोत आणि पदर, असं हे सगळं ही त्यांची प्रकाशित पुस्तके आहेत. त्यापैकी 'आठवणीचे पक्षी' या त्यांच्या आत्मचरित्राचा अनुवाद गुजराथी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतही झालेला आहे. या पुस्तकाला रयत शिक्षण संस्थेचा 'मुकादम पुरस्कार' व महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती'चा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. त्यांचे हे आत्मचरित्र मनाला अस्वस्थ करणारे असून वाचकालाही अंतर्मुख करणारे आहे.

ललिता गदगे : या अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालयात इंग्रजीच्या प्राध्यापिका असून 'फसवी क्षितिजे' हा त्यांचा पहिला काव्य संग्रह, तर 'आयुष्याच्या काठाकाठाने' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध आहे. 'अग्निजळ' या दुसऱ्या काव्यसंग्रहाला मराठवाडा साहित्य परिषदेचा पुरस्कार, तर 'आयुष्याच्या काठाकाठाने' या पुस्तकास महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. अलिकडेच त्यांचा 'खिडकीतील आभाळ' हा ललित गद्य संग्रह प्रकाशित झालेला आहे. स्त्रियांचे भावविश्व समर्थ शब्दात व्यक्त करणारी एक प्रतिभासंपन्न कवयित्री म्हणून त्या प्रसिद्ध आहेत.

प्रकाश भातांब्रेकर : साहित्य अकादमीचे विभागीय सचिव प्रकाश भातांब्रेकर यांचा जन्म निलंगा या गावी दि.१० मे १९४७ रोजी झाला. १९८८ साली साहित्य अकादमीच्या सचिवपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मराठी, हिन्दी, इंग्रजी व गुजराथी भाषेवर त्यांचे प्रभुत्व असून त्यांनी आतापर्यंत ३४ मराठी ग्रंथांचे हिंदीत व ४ हिंदी व ५ गुजराथी ग्रंथांचे मराठीत भाषांतर केलेले आहे. सिंहासन, विस्फोट, त्रिशंकू, भिक्षुणी, वन रूम किचन, दुर्दम्य, पानगिरा, अखिलत, रोषनी की तलाश, शनिवार-रविवार, सह्याद्रीचे वारे या व अशा अनेक ग्रंथांचा मराठी,हिंदी व गुजराथी भाषेत अनुवाद करून त्यांनी साहित्य क्षेत्रात स्वतःचे स्थान निश्चित केले आहे. त्यांच्या अनेक साहित्य कलाकृतींना पुरस्कार मिळालेले आहेत. यात प्रामुख्याने 'सिंहासन' या कादंबरीला भारत सरकारच्या शिक्षण विभागाचा पुरस्कार, सांगली साहित्य अकादमीचा पुरस्कार व भारतीय अनुवाद परिषदेचा पुरस्कार मिळालेला आहे. याशिवाय 'दुर्दम्य' या कादंबरीस मानव विकास बळ विभागातर्फे पुरस्कार देऊन हिंदी प्रचारक म्हणून त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे. तसेच 'गजानन माधव मुक्ति बोध पुरस्कारा'नेही ते सन्मानित आहेत. आतापर्यंत त्यांची ३४ पुस्तके, ९० कथा आणि ५७५ पेक्षा अधिक लेख प्रसिध्द झालेले आहेत.

अखंड परिश्रम व सखोल चिंतनातून त्यांनी आपल्या आयुष्याला आकार दिला. तसेच मराठवाड्यातील अनेक लेखकांना व्यासपीठ मिळवून दिले. १९९७ साली त्यांनी भारतीय लेखकांच्या चमुचे नेतृत्त्वही केले होते. भातांब्रेकरांची दमदार लेखणी चोखंदळ वाचकाला खिळवून ठेवणारी असून त्यांचे शब्दांवर कमालीचे प्रभुत्व आहे. त्यांनी राष्ट्रीय पातळीवर मराठी लेखकांची ओळख करून दिली.

निलंगा तालुक्यातील हाडोळती येथे जन्मलेले आणि सध्या धुळे येथे स्थायिक झालेले श्रीपाल सबनीस आज मराठीतील एक नामवंत समीक्षक म्हणून अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहेत. विविध नियतकालिकांतून ते सातत्याने लेखन करीत असतात. ब्राम्हणी सत्यशोधक, उगवतीचा क्रांतीसूर्य, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, समतोल समीक्षा, भारतीय प्रबोधन आणि नव आंबेडकर वाद, सुर्व्यांच्या कवितेची इहवादी समीक्षा, मुक्तंक, इहवादी संस्कृतीचा शोध, परिवर्तनवादी प्रवाहाची तौलनिक समीक्षा ही त्यांची काही प्रसिध्द पुस्तके आहेत. डॉ. सबनीसांच्या समीक्षेतून जीवनवादी दृष्टीकोनाचा आग्रह दिसून येतो.

शंकरमहाराज खंदारकर (कंधारकर) : वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून यांनी कीर्तन-प्रवचनाद्वारे भागवत धर्माची खूप मोठी सेवा केली. शंकर महाराज मूळ कंधारचे. त्यांचे चिरंजीव डॉ.यशवंत शंकर साधु हे उदगीर येथे नोकरी निमित्त स्थायिक झाले. त्यांनी स्वत:ही संत साहित्यावर लेखन केले आणि वडिलांची पुस्तकेही प्रसिध्द केली. प्रामुख्याने अनुभवामृतभाष्य, तुकाराम महाराज गाथा, सार्थ एकनाथी भारूडे, इत्यादी ग्रंथ प्रसिध्द आहेत. डॉ. यशवंत साधु हे संत साहित्याचे गाढे अभ्यासक असून जणू संत साहित्य हा त्यांचा श्वास आहे. वडिलांची पंढरीच्या वारीची परंपरा त्यांनी कायम ठेवली आहे. ते उत्तम प्रवचनकार असून कै.शंकरमहाराज खंदारकर या संस्थेचे अध्यक्षही आहेत. या संस्थेच्या वतीने खंदारकर महाराजांची सर्व पुस्तके पुनर्प्रकाशित करण्यात आलेली आहेत. त्यांच्या 'गवाक्ष' या ग्रंथाचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बी. ए. च्या अभ्यासक्रमात संदर्भग्रंथ म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. 'निळोबाची अभंगवाणी : आकलन व आस्वाद' या त्यांच्या ग्रंथास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'तुळशीदास वाघ संत साहित्य पुरस्कार' प्राप्त झालेला आहे.

अखंड वाचन, लेखन आणि चिंतन करणारी मराठवाड्यात जी माणसे आहेत, त्यात डॉ. विनय अपसिंगेकर यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल. उस्मानाबाद जिल्ह्यातील अपसिंगा हे त्यांचे जन्मगाव होय. त्यांचे मूळ आडनाव जोशी, पण अपसिंगेकर याच नावाने ते प्रसिध्द आहेत. तारकांच्या खुणा, कविता खेड्याच्या, पहाटपक्षी हे त्यांचे प्रसिध्द काव्यसंग्रह असून हा कवी कधी झाड होऊन, तर कधी फुलपाखरू होऊन भोवतालच्या जगाचे तटस्थपणे चित्रण करीत असतो. बालसाहित्यात देखील अपसिंगेकरांनी मोलाची भर टाकली आहे. त्यांचे विविध नियतकालिकांतून सातत्याने लेखनकार्य सुरू असते.

डॉ.श्रीराम गुंदेकर : लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत असलेले डॉ.श्रीराम गुंदेकर हे मूळचे बीड जिल्ह्यातील रहिवासी असून आंबेसावळी हे त्यांचे जन्मगाव होय. 'महात्मा ज्योतिबा फुले : संदर्भ, विचार आणि वाङ्मयीन कार्य' या विषयावर शोध निबंध लिहून त्यांनी डॉक्टरेट पदवी मिळविली आहे. ग्रामीण कथाकार म्हणून त्यांचा लौकिक आहे. उचल (ग्रामीण कथासंग्रह), महात्मा ज्योतिबा फुले : विचार आणि वाङ्.मय, लगाम (ग्रामीण कथासंग्रह), ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन, ढगाची तहान (बालसाहित्य) ही त्यांची काही प्रसिध्द पुस्तके आहेत. त्यांच्या वरील प्रबंधास मराठवाडा साहित्य परिषदेचा 'स्व.श्री. नरहर कुरुंदकर पुरस्कार' तसेच 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट वाङ्.मय निर्मितीचा पुरस्कार' मिळालेला आहे. याशिवाय त्यांच्या आजवरच्या लेखनासाठी

अहमदपूर येथून दिला जाणारा 'डॉ. नागनाथ कोतापल्ले पुरस्कार' प्राप्त झालेला आहे. कोपरगाव येथून दिला जाणारा 'भी. ग. रोहमारे पुरस्कार'ही त्यांच्या 'उचल' या कथासंग्रहास मिळाला आहे. यातील काही कथांचा अनुवाद हिंदी, तेलुगू आणि फ्रेंच भाषेत झालेला आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत असलेले भारत मुरलीधर सातपुते यांचा जन्म लातूर जिल्ह्यातील गातेगाव येथे झाला. आकाशवाणी, दूरदर्शन वरून त्यांनी काव्य वाचनाचे कार्यक्रमही केलेले आहेत. मराठवाडा साहित्य संमेलन, ग्रामीण साहित्य संमेलन, दलित साहित्य संमेलन, अस्मितादर्श साहित्य संमेलन आदी संमेलनात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. 'जगणं माणसाचं', 'भूकंपानंतरची मने', 'कोपरखळ्या', 'गुगली', 'फिरक्या', 'हे तिरंगी झेंड्या', 'साक्षरता गाणी', 'साक्षरतेचं चांगभलं', 'नागू वेडा कसा' ही त्यांची काही प्रकाशित पुस्तके आहेत. त्यात 'फिलगुड', 'भिकारी', 'पुढारी' आणि 'हे भारत देशा' या कवितासंग्रहांचा समावेश आहे. त्यांच्या साहित्य कलाकृतींना अस्मिता दर्श युवा साहित्य पुरस्कार, यशराज वाङ्मय पुरस्कार, आद्यकवी मुकुंदराज पुरस्कार, अंकुर पुरस्कार आदी पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे. त्यांच्या सामाजिक भाष्यावरील वात्रटिकाही प्रसिध्द आहेत.

अतुल देऊळगावकर : हे नव्या पिढीचे लेखक व पत्रकार आहेत. समाज प्रबोधन व पर्यावरणाचा वेध ही त्यांच्या लेखनाची मुख्य प्रेरणा आहे. यामुळेच महाराष्ट्र कृतज्ञता निधी तर्फे सुरू करण्यात आलेला पुरस्कार पहिल्यांदा देऊळगावकरांना मिळाला. या शिवाय पत्रकारितेतील प्रतिष्ठेचा स्टेटस्मन, कलकत्ता तर्फे दिला जाणारा पुरस्कार त्यांना मिळालेला आहे. 'डळमळले भूमंडळ' या त्यांच्या गाजलेल्या पुस्तकात त्यांनी किल्लारी परिसरात झालेल्या भूकंपाचा व त्यानंतरच्या परिणामांचा विविध अंगाने शोध घेतला आहे. 'लॉरी बेकर' हा आधुनिक ब्रिटिश वास्तुशास्त्रज्ञ गेली पन्नास वर्षे भारतात किफायतशीर घरांचे प्रकल्प राबवितो. श्री. देऊळगावकरांनी 'लॉरी बेकर' नावाच्या आपल्या पुस्तकात लॉरी बेकरच्या व्यक्तिमत्वाचा व त्याच्या वास्तुशिल्पांचा शोध घेतला आहे. वास्तुशिल्पांवर मराठीतून जी मोजकी पुस्तके लिहिली गेली आहेत, त्यात या पुस्तकाचे विशेष महत्त्व आहे. 'बखर पर्यावरणाची आणि विवेकी पर्यावरणवाद्यांची'या त्यांच्या पुस्तकास सन २००५-२००६ चा राज्य शासनाचा उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीचा 'रँग्लर परांजपे पुरस्कार'प्राप्त झाला आहे.

'शब्द' नामक वार्षिक अंक सन १९९९ पासून लातूर येथून नियमितपणे प्रकाशित होतो. मराठी भाषेतून प्रसिध्द होणाऱ्या या अंकाचे कार्यकारी संपादक अतुल देऊळगावकर व संपादक शंकर झुल्पे हे आहेत. 'शब्द' चे आतापर्यंत सात दर्जेदार अंक प्रकाशित झालेले आहेत. कविता, कादंबरी व वैचारिक साहित्याची परिक्षणे, कवितविषयक चिंतन, तसेच महाराष्ट्रातील नामवंत कवी, कथाकार आणि उदयोन्मुख कवी-कथाकार यांच्या साहित्याने हा अंक समृध्द असतो. 'चित्रप्रदर्शन' हा विभागही यात आवर्जून देण्यात येतो. यात भारतातील विविध कलादालनांतून दरवर्षी भरणाऱ्या चित्रप्रदर्शनांची दखल घेतलेली असते. थोडक्यात, समकालीन भारतीय कला, साहित्य व संस्कृतिविषयक परिक्रमा असे या अंकाचे स्वरूप असते.

मूळ लातूरचे, पण सध्या उस्मानाबाद येथे स्थायिक झालेले वेदकुमार वेदालंकार यांचे हिंदी आणि मराठी साहित्यातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. मराठीतील उत्कृष्ट अशा काही ऐतिहासिक कादंबऱ्यांचा त्यांनी अत्यंत सरस असा हिंदी अनुवाद केला आहे. प्रामुख्याने शिवाजी सावंताची 'छावा', रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा', रणजित देसाई यांची 'श्रीमानयोगी' यांचा त्यात समावेश आहे. सध्या महाराष्ट्र शासनाच्या वतीने म. ज्योतिबा फुले यांच्या समग्र साहित्याच्या हिंदी अनुवादाची जबाबदारी श्री. वेदकुमार यांच्यावर टाकण्यात आली आहे. त्याची फलनिष्पत्ती म्हणून शासनाच्या वतीने फुले यांच्या समग्र वाङ्मयाचे तीन खंड हिंदीतून प्रकाशित झालेले आहेत. वेदकुमार यांचे 'संत गोरा कुंभार : काव्य व जीवन' हे मराठीतील पुस्तक, तर 'कही अनकही' हा हिंदी काव्यसंग्रह प्रकाशित आहे.

उदगीर येथील हावगीस्वामी महाविद्यालयाचे प्राचार्य कृष्णचंद्र ज्ञाते हे उदगीरचेच रहिवाशी आहेत. साहित्य आणि संगीत या दोन्ही क्षेत्रात त्यांना उत्तम गती असून सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. नवी दिल्ली येथील 'इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस' या पुरस्काराने ते सन्मानित आहेत. 'कोमल रिषभ' हा त्यांचा पहिला कविता संग्रह, तर 'दादरा' हा समीक्षा ग्रंथ प्रसिद्ध आहे. यापैकी दादरा या ग्रंथास 'यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार' मिळालेला आहे. 'भारतीय संगीत : स्वरुप आणि प्रयोजन' हा त्यांचा प्रबंध मौज प्रकाशनाने प्रसिध्द केलेला आहे. 'प्रतिदिन' ही त्यांची प्रसिध्द कादंबरी असून विविध नियतकालिकांतून त्यांनी दर्जेदार लेखन केलेले आहे. चि. त्र्यं. खानोलकरांवर समीक्षा लिहून त्यांनी वाङ्मयात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांचे संगीत कलेतील कामही थोर असेच आहे.

शि. बा. स्वामी (मानखेड) : यांनी विविध विषयांवर लेखन केलेले आहे. विशेषत: त्यांची 'परमरहस्यातील परम अर्थ'ही लेखमाला 'ज्ञानप्रसाद' मासिकातून (कोल्हापूर) प्रसिद्ध झाली. आता ती पुन्हा 'श्री. पलसिद्ध दर्शन' मासिकातून चालू केली आहे.

अहमदपूर मठाचे पट्टशिष्य लिंगप्पा शेटे यांनी लिहिलेले 'मडिवाळाष्टक' व 'माझी आई ' या पुस्तिका प्रसिद्ध झाल्या आहेत. तसेच श्रीमती शोभा मुखेडकर यांचा 'पुष्पांजली' हा भक्तिकाव्यसंग्रह, तर सौ. रेखा अष्टुरे यांचे 'वचनामृत', रेवय्यास्वामी नावदगीकरांचे चरित्र व इतरही ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत. वीरशैव दर्शन, ज्ञानप्रकाश आदी मासिकांतून या सर्वांचे स्फूट लेखन चालू असते. याशिवाय प्रा. म. ई. तंगावार, शिवदास लखादिवे, राम लखादिवे, कमलाकर कबाडे, सौ. शांता वारद आदिही साहित्यसेवा करीत आहेत.

हावगीस्वामी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रभुदेव स्वामी यांचेही बसवेश्वर विषयक लेखन प्रसिद्ध आहे. उदगीरचे डॉ. शंकरराव कप्पिकेरी व डॉ. शिवराज हळ्ळीखेडे यांचे हिंदी भाषेतील लेखन प्रसिद्ध आहे. श्री. राजेंद्र जिरोबे यांनी लिहिलेले 'महात्मा बसवेश्वर व पददलित शिवशरण' व 'वचन बसवेश्वरी' (भाग १ ते ३) हे ग्रंथही उल्लेखनीय आहेत.

प्रा. डॉ. सोमनाथ रोडे, प्रा. अरविंद हिंगमिरे व प्रा. जी. के. शेटकार यांनीही इतिहास व अन्य विषयांवर लेखन केलेले आहे. त्रिंबक खपले हेही लेखन करतात.

सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती सरोज अहंकारी या लातूरच्या असून सामाजिक क्षेत्राबरोबरच साहित्य क्षेत्रातही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. १९९८ साली त्यांना शासनाचा

'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार' मिळाला. पुष्पांजली, चांदणं फुललं, खाऊ घ्या खाऊ, लिहू मी पुस्तक ?, तीन एकांकिका, चिऊचा घास, काव्यसुगंध, चंद्रमा, कुल्फी मलई, तारांगण, शूरा मी वंदिले, फुलराणी ही त्यांची प्रकाशित पुस्तके आहेत. यात प्रामुख्याने बालवाड्.मय आहे. विविध संस्थांच्या त्या पदाधिकारीही आहेत.

दलित माणसांच्या व्यथा अत्यंत समर्पक आणि परिणामकारक शब्दांत मांडणारे कथाकार श्री. तु. लिं. कांबळे यांनी मोजकेच, पण अत्यंत दर्जेदार लेखन केलेले आहे. 'मांजरा काठची माणसं' या पुस्तकातून त्यांनी मांजरा नदीच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या माणसांच्या जीवनाचा, त्यांच्या बोलीचा नेमक्या शब्दात वेध घेतला आहे.

लातूरचे बंकट पुरी हे नवोदित कथाकार व कवी म्हणून जिल्ह्यात उदयास येत आहेत. स्थानिक जिल्हा साहित्य संमेलने, शब्दशिल्प साहित्य संमेलन, लातूर; विचारवेध साहित्य संमेलन, लातूर; मराठवाडा साहित्य संमेलने, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने यात ते सातत्याने आपला कवी व कथाकार म्हणून सहभाग नोंदवितात. अनेक वृत्तपत्रे, मासिके, दिवाळी अंक यातून त्यांच्या आवतन, श्रध्दांजली, शिवाशिव, जखम, ठिगळ अशा अनेक निवडक कथा प्रकाशित झालेल्या आहेत. विविध कवी संमेलने, व्याख्यानमाला, प्रबोधन शिबिरे वगैरे उपक्रमातही ते सक्रिय सहभागी असतात.

काव्यक्षेत्रात अनेक पुरस्कार मिळविणारे डॉ. संजय जमदाडे हे लातूरचे रहिवाशी आहेत. त्यांचे 'घुसमट' व 'काव्यांगण' हे काव्यसंग्रह अनुक्रमे १९९३ व १९९७ मध्ये प्रकाशित झाले, तर 'मानस' हा चारोळी काव्य संग्रह इ.स.२००० मध्ये प्रकाशित झाला. मानव संसाधन मंत्रालय, दिल्ली, तर्फे दिल्या जाणाऱ्या जिल्हास्तरीय नेहरू युवा पुरस्काराचे ते मानकरी आहेत. त्याशिवाय काव्यज्योत पुरस्कार, भागीरथी काव्य ज्योत पुरस्कार, समाजसेवा पुरस्कार, गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार, मॅन ऑफ दि इयर पुरस्कार (केंब्रिज) अशा अनेक राज्यस्तरीय व अन्य पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. जिल्ह्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी म्हणूनही ते काम करीत आहेत.

हिंदी साहित्य

चंद्रभानु सीताराम सोनवणे यांची औसा तालुक्यातील मोगरगा ही जन्मभूमी आहे. त्याचे शिक्षण गुरुकुल कांगडी, आग्रा येथे झाले. हिंदीतील एक जेष्ठ समीक्षक व व्याकरण शास्त्राचे अभ्यासक म्हणून त्यांचा महाराष्ट्रभर लौकिक आहे. त्यांचे हिंदी भाषेत हिंदी गद्य साहित्य को आर्यसमाज की देन, विपात्र : एक सृजनात्मक उपलब्धि, साहित्यशास्त्र, कथाकार राजेंद्र यादव, अवतरण : शोधमंत्र के संदर्भ में, धर्मवीर भारती का साहित्य : सृजन के विविध रंग आदी एकूण दहा ग्रंथ प्रसिध्द असून त्यांनी दोन मराठी कादंबरींचा हिंदीत अनुवादही केलेला आहे. अनेक शासकीय व अशासकीय संस्थांनी त्यांच्या या लेखनाची नोंद घेऊन त्यांना सन्मानित केले. हिंदी साहित्य अकादमीनेही मराठी भाषिक हिंदी लेखक म्हणून सन १९९३ मध्ये 'गजानन माधव मुक्तिबोध पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव केला आहे, तर हैद्राबादच्या हिंदी प्रचार समितीने 'साहित्याचार्य' या पदवीने त्यांना सन्मानित केले आहे.

हिंदी व मराठी भाषेवर प्रभुत्व असलेले सूर्यनारायण रणसुभे हे मुळचे गुलबर्ग्याचे. तथापि, नोकरी निमित्त ते लातूरला स्थाईक झालेले आहेत. अलाहाबाद विद्यापीठातून एम. ए. (हिंदी)

ही पदव्युत्तर पदवी परीक्षा ते प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या मानव्य विद्याशाखेचे ते पहिले अधिष्ठाता (डीन) होत. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. त्यांची एकूण ३२ लिखित, अनुवादित व संपादित पुस्तके प्रकाशित असून यापैकी २३ हिंदीत, तर नऊ मराठी भाषेत आहेत. त्यात 'आधुनिक मराठी साहित्य का प्रकृतिमूलक इतिहास', 'कहानीकार कमलेश्वर : संदर्भ और प्रकृति,' 'देश विभाजन और हिंदी कथा साहित्य', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', 'उन्नीसवी सदी और हिंदी साहित्य', 'यादों के पंछी', 'हिंदू', 'उठाईगीर', 'समाजपरिवर्तन की दिशाएँ', 'हैद्राबाद मुक्ति-संग्राम आणि मी', 'गिरीकंदरातून', 'परिवर्तन : संकल्पना आणि वास्तव', 'स्पंदन', 'अक्करमाशी', 'खोटं सत्य', 'साक्षीपुरम' इत्यादी अनेक पुस्तकांचा समावेश आहे. अशा प्रकारे अनुवादाच्या क्षेत्रात प्रचंड काम करणारे आणि वेगवेगळ्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित झालेले डॉ. रणसुभे यांनी आतापर्यंत कथा, कांदबऱ्या, समीक्षा, चरित्रे, ललित, संपादन, वैचारिक असे विविध साहित्य-प्रकार लिलया हाताळले आहेत. 'आठवणीचे पक्षी' या मराठी पुस्तकाचा हिंदीत उत्कृष्ट अनुवाद (यादों के पंछी) केल्याबद्दल त्यांना १९८४ मध्ये राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. याशिवाय महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी तर्फे 'गजानन माधव मुक्तिबोध पुरस्कार', तर हिंदी प्रचार सभा, हैद्राबादच्या वतीने १९९३ साली 'साहित्य वाचस्पति' ही सन्माननीय पदवी प्रदान करण्यात आली आहे. साहित्य अकादमीने प्रकाशित केलेले त्यांचे मूळ उर्दूतून असलेले 'संरचनावाद, उत्तर संरचनावाद और प्राच्य काव्यशास्त्र' हे पुस्तक मराठीतून आलेले आहे. समीक्षेवर सैध्दांतिक चर्चा करणारे हे वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक आहे. हिंदी शोध-निर्देशक म्हणून त्यांनी आजपर्यंत १४ विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्राप्त करून दिलेली आहे.

अंबादास देशमुख हे या जिल्ह्यातील हिंदी साहित्यिकांपैकी एक होत. त्यांची आतापर्यंत हिंदी और मराठी की व्याकरणीक कोटियाँ, भाषा-विज्ञान एवं हिंदी भाषा, भाषिकी, हिंदी भाषा एवं भाषा-शिक्षण, भाषा विज्ञान, हिंदी भाषा का परिचय, हिंदी तथा मराठी में लिंग-विधान, एक व्यक्तिरेकी अध्ययन, समान स्रोत और भिन्न वर्तन-शब्दावली आदी एकूण ११ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. याशिवाय गद्य गौरव एवं व्यावहारिक हिंदी या पुस्तकाचे त्यांनी संपादनही केलेले आहे.

जयक्रांती कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे हिंदीचे प्राध्यापक असलेले चंद्रशेखर लोखंडे यांची नये युग की ओर आर्यसमाज, हैद्राबाद मुक्तिसंग्राम का इतिहास व कुछ गीत कुछ संगीत (मुक्तक काव्य) इत्यादी पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. डॉ. अल्लाबक्ष जमादार यांचीही 'उग्र' कृत अपनी खबर : एक मूल्यांकन, भाषा कम्प्युरिंग तथा प्रयोजनमूलक हिंदी ही हिंदी पुस्तके व काही अनुवादित पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. प्रा. अहमद चाऊस 'बेहाल' यांचा यादों की बंदिश हा हिंदी-मराठी चारोळी संग्रह व और जिंदगी मुस्कुराने लगी हा कविता संग्रह प्रकाशित आहे. प्रा. डॉ. रब्बानी शेख यांची हिंदीतून तीन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. याशिवाय डॉ. नागनाथ कुंटे व डॉ. सतीश यादव देखील हिंदीतून लिहीत असतात. हे सर्व हिंदी साहित्यिक आपापल्या परीने हिंदी साहित्य समृध्द करण्याच्या प्रयत्नात असतात.

एचएफ—४१६९-८अ

अनुक्रमणिका

वरील साहित्यिकांव्यतिरिक्त सध्या लातूरच्या साहित्यिक विश्वात कवी म्हणून प्रा. राजा होळकुंदे, शंकर झुल्पे, प्रा. शिवाजी जवळगेकर, प्रा. मलकमपट्टे, किशन घारोळे, प्रा. वसंत मा. जाधव, प्रा. लक्ष्मण दांडेकर, योगीराज माने, प्रकाश काळे, रमेश चिल्ले व डॉ. प्रणिता चाकूरकर आदी नावांचा उल्लेख करावा लागतो, तर कथाकार म्हणून चंद्रकांत विचारे, बी. एम. देशमुख, जी. जी. कांबळे वगैरेंची नोंद घ्यावी लागते. समीक्षक म्हणून डॉ. शंकरानंद येडले, प्रा. करजकर, प्रा. गो. न. मग्गीरवार, प्रा. डॉ. माधव गादेकर वगैरेंनी महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. वैचारिक साहित्यात मोलाची भर घालणारे डॉ. शेख रब्बानी,संपा. बंडू गणपती जोशी हे सातत्याने १३ वर्षे केवळ आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विषयाला वाहिलेले पाक्षिक 'वर्धिष्णू', शिरूर ताजबंद येथून प्रकाशित करीत आहेत. यामुळे संबंधित विषयाला एक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

महिलांसाठी लातूर येथे 'लोकमत सखी मंच' ची स्थापना झाली आहे. या मंचच्या कार्यक्रमांना महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती असते. याशिवाय 'माध्यम' या संस्थेचीही आवर्जून दखल घ्यावी लागते. पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने होणारी चर्चा असो, साहित्यिकांच्या किंवा राजकीय क्षेत्रातील व्यक्तिंच्या प्रकट मुलाखती असो, या संस्थेने एक वेगळा ठसा उमटविला आहे. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून काही महत्त्वाचे उपक्रम या संस्थेने राबविले आहेत. बाबरी मस्जीद विध्वंसानंतरच्या तणावपूर्ण वातावरणात या संस्थेने हिंदू-मुस्लिम संवाद घडवून आणला. लहरीकांत शहा, जयप्रकाश दगडे, डॉ. हंसराज बाहेती, रामानुज रांदड, बी. एम. देशमुख, विजय भोयरेकर, प्रभाकर येरोळकर, रमेशचंद्र जाजू, दिलीप आरळीकर, राजाभाऊ कुलकर्णी आणि डॉ. माशाळकर यांनी उभारलेल्या या संस्थेने लोकांच्या अपेक्षा वाढविल्या आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला, राजर्षी शाहू व्याख्यानमाला यांनी लातूरकरांना उत्तमोत्तम व्याख्याने ऐकण्याची संधी दिली आहे. चंद्रकांत देऊळगावकर, नंदकिशोर भार्गव, वगैरे अनेक मंडळी या क्षेत्रात वय विसरून काम करताना दिसतात. अलीकडेच सुरू झालेल्या 'पूर्णानंद व्याख्यानमाले' नेही लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले आहे. विचारवेध साहित्य संमेलन, मराठी कादंबरीवरील चर्चा, मराठवाडा साहित्य संमेलन, ८ वा विविध कला महोत्सव, दक्षिण-मध्य सांस्कृतिक मंडळाने घेतलेला लोकोत्सव अशा भरगच्च कार्यक्रमांनी लातूरचे सांस्कृतिक जीवन समृध्द केले आहे.

सुधाकर देशमुख यांनी आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ उदगीर येथे १९८६ पासून 'उज्ज्वला देशमुख व्याख्यानमाला' सुरू केली आहे. या व्याख्यानमालेत मराठी वाङ्मयातील विविध प्रवाह, नाट्यचळवळ, अर्थशास्त्र व जलव्यवस्थापन तसेच सामाजिक, राजकीय व तत्त्वज्ञान याविषयासंबंधी महाराष्ट्रातील नामवंत विद्वान व विचारवंतांची व्याख्याने दरवर्षी आयोजित केली जातात. डॉ. देशमुख यांचे लेखन अनेक वृत्तपत्रे व मासिकांमधून प्रसिध्द झालेले आहे. त्यांचे शल्यचिकित्सेवरही पुस्तक प्रसिध्द असून राष्ट्रवादावरील पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

लातूर येथे १९५४ साली दिवाकर कृष्ण केळकर व १९६८ साली र. म. भुसारी यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा साहित्य संमेलने झाली. त्यानंतर २००३ मध्ये डॉ. सुधीर रसाळ यांच्या अध्यक्षतेखाली लातूर येथे २४ वे मराठवाडा साहित्य संमेलन पार पडले.

डोळस प्रवास, रचनात्मक कामाची आवड, सर्वधर्मीय बांधवांची सेवा यामुळे माधव बावगे, भारत सातपुते, संदीप जगदाळे, अशोक देडे यांना नेहरू युवा पुरस्काराचे मानकरी होण्याची संधी प्राप्त झाली. त्यामुळे अन्य ध्येयवादी तरुणांच्या इच्छाशक्तिला प्रेरणा आणि समाजबळ देण्याचे कार्य झाले आहे. मनिषा तोकले या तरूणीने आज संपूर्ण महाराष्ट्रात महिलांना सत्ताधारी बनण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण करणारी प्रबोधन गीते रचून त्याद्वारे व्याख्याने, परिषदा गाजविल्या आहेत.

संगीत[२६]

मराठवाडा विभाग ललित कलांच्या दृष्टीने प्राचीन काळात अतिशय संपन्न होता; किंबहुना साहित्य, संगीत, शिल्प, नाट्य आदी ललित कलांचे पीठ म्हणूनही या विभागाचा गत इतिहास उज्ज्वल स्वरुपाचा आहे. अशा कलांची थोर परंपरा मराठवाडा विभागाला लाभलेली आहे. मानवी जीवन अधिक सुसंस्कृत करण्याच्या दृष्टीने ललित कलांचे माध्यम केवळ उपयुक्तच नव्हे, तर अत्यावश्यक आहे. देवगिरीचा राजा रामदेवराव यादव याचा कालखंड संगीत कलेच्या दृष्टीने अतिशय संपन्न होता. त्याची राजधानी असलेल्या देवगिरी शहराचे सांस्कृतिक वैभव मोठे होते, तर पैठण आणि अंबाजोगाई ही नगरे सांस्कृतिक आणि कलात्मक दृष्टीने संपन्न होती. रामदेवराव यादव यांच्या पदरी श्रेष्ठ संगीतकार आणि अभिजात गायक-कलावंत गोपाल नायक आपल्या दीडशे गायक-वादक कलावंतासह आश्रयास होता. राजा रामदेवराव याचे वडील कृष्णदेवराव यांच्या पदरीही संगीत कलाशास्त्रातला आद्य संगीतकार व "संगीत रत्नाकर" या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा लेखक संगीततज्ञ शारंगदेव देवगिरीस होता. संगीताला राजाश्रय मिळाल्यामुळे राज्यभर, प्रामुख्याने मराठवाडाभर संगीताचा प्रचार व प्रसार अधिक गतीने झाला. हिंदुस्थान ख्यालगायकीचा शुभारंभच इथे झाला. संगीताच्या प्रांतात अनेकांनी आपले अस्तित्व सिध्द केलं. अंबाजोगाईचे सर्वज्ञ दासोपंत यांचा संगीत क्षेत्रात फार मोठा दबदबा होता. त्यांचे दाक्षणिय आणि भारतीय या दोन्ही संगीत शास्त्रांवर प्रभुत्व होते. त्यांनी बांधलेल्या अनेक रागांतील चिजा आजही लिखित स्वरुपात उपलब्ध आहेत. दासोपंत स्वतः थोर तालशास्त्रज्ञ होते याचा प्रत्यय त्यांनी बांधलेल्या चिजातील अक्षरमात्रावरून कळून येतो. यापैकी काही चिजा गाऊन शंकर बापू तालसम्राट बनले, तर बीडच्या विष्णू नारायण भातखंडे यांनी संगीत कलेला लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी लातूरला मराठवाडा संगीत संमेलनाचे आयोजन करून ते यशस्वीही केले. यासाठी अनेक कलावंताची साधना कारणी लागली होती. आज जिल्हाभर संगीत कलेचा फार मोठा विस्तार झालेला आहे. या क्षेत्रातील काहींचा उल्लेख सुवर्णाक्षरांनी करावा असाच आहे.

---

२६. अनवले, सुधीर, "लातूर जिल्ह्यातील संगीताची चळवळ", दैनिक **लोकमत**, रौप्यमहोत्सवी वर्ष, पूर्वोक्त; **दिंडी**, विशेषांक, पूर्वोक्त आणि लातूरमधील काही मान्यवरांच्या प्रत्यक्ष मुलाखतीवर आधारित.

लातूरची संगीत परंपरा जुनी आहे. येथील सांस्कृतिक क्षेत्रात संगीत, नाटक, सिनेमा, चित्रकला, शिल्पकला आदी ललित कलांमधील कलावंत प्रसिध्द आहेत. सन १९३७ मध्ये लातूरला 'जॉली क्लब' नावाची एक संगीत संस्था स्व. प्रभूअप्पा निगुडगे यांच्या प्रेरणेने स्थापन झाली होती.[२७] पोलीस ॲक्शन पूर्वीचा हा काळ होता. संगीताला हवा तसा राजाश्रय या काळी नव्हता. तरीही जॉली क्लबचे काही प्रमुख सदस्य-त्रिंबकअप्पा गिरवलकर, महबूब साहेब मास्तर, विनायकराव आळंदकर, लिंगप्पा इंडे, गंगाधरराव गुजलवार, हरीभाऊ कोटलवार यांनी लातूरमध्ये संगीताचे अनेक कार्यक्रम केले. यातूनच प्रेरणा घेऊन स्वातंत्र्यपूर्व काळात श्री. भीमाशंकरप्पा पंचाक्षरी, श्री. गुजलवार नरहरी, श्री. महंमद साब (पेटीवाले), श्री. वसंतराव आळंदकर यांच्यासारख्या संगीतवेड्या लोकांनी 'ज्योती क्लब' स्थापन केला होता. बालगंधर्व, कुमारगंधर्व, भीमसेन जोशी, सरस्वती राणे, जोत्स्ना भोळे आदी श्रेष्ठ कलावंतांना पाचारण करून लातूरकरांना ते सुरांची मेजवानी देत. कधी आझाद चौकातील मन्मथ स्वामींच्या मठात, तर कधी काळे गल्लीतील रामलिंगेश्वर मंदिरात त्यांच्या मैफिली होत असत. त्यामागे संगीतापासून आनंद घ्यावयाचा व तो इतरांना वाटावयाचा एवढाच हेतू असे. पुढे ज्योती क्लबने आपले नामांतर 'गुरूवार क्लब' असे केले. या क्लबमध्ये पंचाक्षरी यांच्याव्यतिरिक्त श्री. मेनकुदळे, बाबुअप्पा पारशेट्टी, शिवाप्पा अंकलकोटे, श्री. महावीर शर्मा, श्री. शिवनगीकर, प्रा. वारद आदी मान्यवरांचा सक्रीय सहभाग होता. अगदी सुरुवातीला प्रल्हाद आष्टेकर, राम करंदीकर, पं. शांताराम चिगरी, पं. के.एन.बोळंगे या संगीततज्ञांनी येथे संगीत शिक्षक म्हणून काम केले. दर गुरूवारी भजन म्हणण्यासाठी तत्कालिन संगीतप्रेमी एकत्र येत. त्यातूनच नवतरूण गाणे शिकू लागले. हळूहळू भजनाला शास्त्रीय संगीताची बैठक प्राप्त झाली. १९८४ पासून हा क्लब 'गुरूवार संगीत महाविद्यालयात' रूपांतरीत झाला. पंचाक्षरी अप्पांच्या प्रेरणेने आज अध्यक्ष मालू व सचिव प्रा. के. एस. वारद, पं. विठ्ठलराव जगताप व श्री. शंकर जगताप हे या महाविद्यालयाचा कारभार पाहतात. या विद्यालयातून दरवर्षी ५०-६० विद्यार्थी संगीत साधना करतात. येथे संगीत विशारद पर्यंतचे शिक्षण दिले जाते.

लातूरच्या संगीत आणि कलाक्षेत्राच्या वाटचालीत अव्याहतपणे व्यग्र असणारे व्यक्तिमत्त्व म्हणून श्री. भीमाशंकरप्पा पंचाक्षरी यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. आज मराठवाड्यातील सांस्कृतिक क्षेत्रात लातूरने संपादन केलेल्या स्थानात त्यांनी अत्यंत मोलाची भर टाकली आहे. सांस्कृतिक क्षेत्रातील हे एक आगळे-वेगळे भूषण आहे. वयाच्या २० व्या वर्षापासून संगीत मैफिलीत स्वतःला हरवून घेणारे ते सच्चे रसिक आहेत. उपरोक्त जॉली क्लबच्या स्थापनेपासून अप्पांना संगीताचे विशेष आकर्षण वाटू लागले. संगीतासोबत त्यांनी कुस्तीचा छंदही जोपासला आहे.

सन १९५६ मध्ये स्थापन झालेल्या कलोपासक मंडळाचे ते काही वर्षे अध्यक्ष होते. १९६१ मध्ये त्यांनी 'नवयुवक नाट्य मंडळा' ची स्थापना करून त्याद्वारे प्रतिवर्षी नामांकित कलावंताचे संगीत कार्यक्रम आयोजित करणे, राज्य नाट्य स्पर्धेत नवनवीन नाटके सादर करणे यात भरीव यश संपादन केले. आतापर्यंत पं. भीमसेन जोशी, किशोरी आमोणकर,

२७. वारद, के.एस., "भीमाशंकरप्पा पंचाक्षरी-संगीताचे उपासक", **स्मरणिका**, ५ वे मराठवाडा संगीत संमेलन, लातूर, १९८१.

डॉ. वसंतराव देशपांडे, पं. जगदीश प्रसाद, कुमार गंधर्व, प्रभा अत्रे, शोभा गुर्टू, हरिप्रसाद चौरसिया, रोहिणी भाटे, अप्पासाहेब जळगावकर, जितेंद्र अभिषेकी, पं. जसराज, मालिनी राजूरकर, श्रीकांत देशपांडे, परवीन सुलताना, अब्दूल हकीम जाफरखान यासारख्या कित्येक नामवंतांनी पंचाक्षरी अप्पांच्या आग्रहास्तव लातूर नगरीला हजेरी लावून लातूरच्या रसिकांचा 'रसिक कान' तयार केला. श्री. पंचाक्षरी अप्पांच्याच सान्निध्यात तयार झालेला पांडुरंग मुखडे आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तबलावादक म्हणून परिचित आहे.

पुण्यात सुमारे गेल्या ५२ वर्षांपासून प्रतिवर्षी 'सवाई गंधर्व स्मृती संगीत महोत्सव' साजरा होतो. या महोत्सवास श्री. पंचाक्षरी अप्पा पंढरीच्या वारकऱ्याप्रमाणे अव्याहतपणे आजपर्यंत संगीताची पताका घेऊन जात राहिले आहेत. या महोत्सवाचे मराठवाड्यातील एकमेव चोखंदळ रसिक म्हणूनच त्यांचा उल्लेख करावा लागेल. अशा या गुणी कलावंत रसिकाचा १९८५ मध्ये लातूर नगरपरिषदेने यथोचित सन्मान केला. तसेच मराठवाडा संगीत प्रसारक मंडळानेही १९८७ मध्ये औरंगाबाद येथे त्यांचा विशेष सत्कार केला. अशा तऱ्हेने संगीत क्षेत्रात दीर्घ काळ एखाद्या तपस्व्याप्रमाणे जीवन जगण्याचे भाग्य श्री. पंचाक्षरी अप्पांना लाभले आहे. 'संगीत तेथे पंचाक्षरी अप्पा आणि पंचाक्षरीअप्पा तेथे संगीत' हे समीकरण म्हणूनच त्यांच्या संदर्भात अप्रस्तुत ठरणार नाही.

संगीत विशारद ही पदवी धारण करून संगीत कलेची उपासना करणारे व आपापल्या परीने या कलेचे चांगले प्रदर्शन करणारे जिल्ह्यातील अनेक संगीत उपासक व कलाकार संगीत विद्यालयांची स्थापना करून संगीताची सेवा करीत आहे. १९५८ साली उदगीरला पंडित रामदास अनवले यांनी संगीत महाविद्यालयाची स्थापना करून याची सुरुवात केली, तर १९६१ साली लातूरला संगीत महर्षी बाबा बोरगावकर यांनी प्राथमिक स्वरूपात 'सरस्वती संगीत विद्यालया' ची स्थापना केली. त्याचवेळेस लातूरला वर उल्लेखिलेला गुरूवार क्लबही कार्यरत होता.

लातूर तालुक्यातील खंडापूरचे कै. वसंतराव खेडकर यांनी तत्कालीन हैद्राबाद संस्थानात संगीत क्षेत्रात अपूर्व कामगिरी केलेली आहे. बराच काळ ते संगीत मैफिलींमध्ये आणि हैद्राबाद रेडिओवर गायन करीत. हैद्राबादच्या विवेक वर्धिनी हायस्कूलमध्ये ते संगीत शिक्षक होते. संगीतातील एम.एम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली होती. त्यांचे अनेक शिष्य हैद्राबादमध्ये आजही संगीत सेवा करीत आहेत.

१९८० पासून निलंगा तालुक्यात जिजाबाई काटेजवळगेकर (गायन), श्री. पोतदार (बासरीवादक), अहमदपूर तालुक्यात बाळासाहेब पागे व श्री. पंतोजी यांच्यासोबत लक्ष्मीकांत वतनी वकील (बासरीवादक) हे कलेचे उपासक व आश्रयदाते निर्माण झाले, ज्यांच्यामुळे काही प्रमाणात संगीतासाठी अनुकूल वातावरण तयार झाले. आज निलंगा व अहमदपूर तालुक्यात रामभाऊ गवळी, श्री. दहातोंडे हे संगीत विद्यालयाच्या माध्यमाने संगीत प्रसाराचे कार्य करीत आहेत. रेणापूर तालुक्यात खरोळा येथे जगन्नाथ कागले, खरोळेकर महाराज यांनी संगीत नाटकाची परंपरा व त्यान्वये शास्त्रीय संगीत प्रसार केला. त्यांचा वारसा आज महादेव बन, बालाजी पांचाळ हे चालवित आहेत. चाकूर तालुक्यात श्री. के. एन. बोळंगे गुरूजी यांच्यामुळे भजनात रमणाऱ्या वारकऱ्यांपर्यंत संगीताचा प्रसार झाला. त्यामुळे संगीतास

लोकमान्यता मिळाली असे म्हणावयास हरकत नाही. आज हा वसा श्री. शिवाजी कोडे हे निष्ठेने चालवित आहेत.

औसा तालुक्याने तर मुकेश जाधव नामक एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचा तबलावादक दिला आहे. त्यांनी भारतातील जवळजवळ सर्वच नामांकित कलाकारांना साथसंगत केली आहे. तबला-सोलो वादनात त्यांच्या तयारीचे वादक कमीच आढळतात. आतापर्यंत जवळपास ८ ते १० वेळा त्यांनी परदेश दौरा केला आहे. औसाचे जीवन कुलकर्णी हेही तबलावादक असून सोलो वादनातीलही ताकदीचे कलाकार आहे. मुकेश जाधव व पांडुरंग मुखडे यांनी देशातील सर्व संगीत संमेलनांमध्ये सहभागी होऊन वाहवा मिळविली आहे.

उजनीचे (ता. औसा) पांडुरंग मुखडे हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कीर्तिचे तबलावादक म्हणून सुपरिचित आहेत. श्री. भीमाशंकरप्पा पंचाक्षरी यांची अचूक निवड, श्री. अप्पा जळगावकरांची आत्मियता, श्रीकांत देशपांडे यांचे सहकार्य आणि औदार्य शीलवृत्ती यातून या मातीत घडलेला हा कलावंत अल्पवयात प्रसिध्दी पावला आहे. त्यांना तबल्याचे प्राथमिक शिक्षण घेण्यास पंचाक्षरी अप्पांनी सर्वतोपरी सहकार्य केले. पांडुरंग मुखडेंनी पं. भीमसेन जोशी, डॉ. वसंतराव देशपांडे, पं. जसराज, पं. कुमार गंधर्व, पं. जितेंद्र अभिषेकी या दिग्गज कलावंतांना तबला साथ केली आहे. श्रीकांत देशपांडे, अप्पा जळगावकर व पांडुरंग मुखडे यांनी १९८४-८५ मध्ये अमेरिका, कॅनडा, फ्रान्स, लंडन आदी देशांमध्ये आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले होते.

लातूर जिल्ह्यातील सर्वात जुने असे उदगीरच्या 'अनवले संगीत महाविद्यालया' चे संस्थापक सुरमणी कै. पं. रामदास अनवले गुरूजी हेच मराठवाड्यातील सर्वात प्रथमचे आकाशवाणी कलाकार होत. उस्ताद रशीद अलीखान व उस्ताद गुलाम रसूल साहेब यांच्या मार्गदर्शनानंतर त्यांनी स्वयंप्रतिभेने कलेचे प्रदर्शन केले. उदगीरला पहिला तंबोरा त्यांनीच आणला. या संगीत महाविद्यालयातून आतापर्यंत हजारो विद्यार्थी शिकून बाहेर पडले आहेत. त्यातील अनेकजण सद्या दूरदर्शन, आकाशवाणी कलावंत म्हणून तसेच संगीत शिक्षक व प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अनवले गुरूजींचे कार्यक्रम मुंबई, पुणे, औरंगाबाद, परभणी, गुलबर्गा व बंगलोर आकाशवाणी केंद्रांवरून प्रसारित झाले आहेत. अक्कलकोटचे अ. भा. संगीत संमेलन, हैद्राबादचे विश्वआर्य संमेलन, अनेक मराठवाडा संगीत संमेलने व हरिदास संगीत महोत्सवात त्यांनी अविस्मरणीय गायन केलेले आहे. परभणी आकाशवाणी केंद्रात कार्यक्रम सादर करताना त्यांचे निधन झाले. त्यांच्या शिष्य परंपरेत वामन पाचंगे, व्यंकटराव स्वर्णकार, ससाणे गुरूजी, विलास राजहंस, प्रा. सुधीर अनवले, सुमंत शिंदे, सौ.मीरा कुलकर्णी, शिवराज साखरे, प्रा. भालचंद्र गरूड, शिवाजी डिगोळे, प्रा. कृष्णा अनवले, अशोक पांचाळ, डॉ. डी. एल. सूर्यवंशी, रतिकांत घोगरे, भास्कर मोरे, कल्लय्या स्वामी, महेंद्र कांबळे, विष्णूदास पुढेवाड, जयेंद्र कुलकर्णी, सिध्दार्थ कांबळे, पंढरीनाथ सोनवणे, सोमेश्वर काळगे, प्रशांत जंगाले, सौ. वैशाली बोरोलकर, राजकुमार कांबळे, फुलचंद काळे, गौतम तिकटे, नामदेव भदाडे, भरत हुमनाबादे, नितीन संगमे, श्रीनिवास बिराजदार, सौ. छाया बाजुळगे अशा असंख्य विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

संगीत क्षेत्रात महर्षी बाबा बोरगावकरांचे कार्य गौरवाने नोंद करावे असेच आहे. त्यांनीच लातूरमध्ये पहिला तंबोरा आणला. बोरगाव ही त्यांची जन्मभूमी. वयाच्या नवव्या वर्षापासून

ते संगीत क्षेत्राकडे ओढले गेले. विरप्पा मास्तरांनी त्यांना प्रथम संगीताचे पाठ दिले. त्यानंतर वयाच्या सोळाव्या वर्षी ते संगीत मास्तर झाले. या काळात त्यांनी संगीत नाटकांचे दिग्दर्शनही केले. सन १९५५ ते १९६१ या कालावधीत त्यांनी लातूर येथे संगीत वाद्ये बनविण्याचा कारखाना सुरू केला, तर १९६३ साली लातूर येथेच पहिल्या 'सरस्वती संगीत विद्यालया' ची स्थापना केली. या संगीत विद्यालयात अध्यापिका म्हणून संगीतरत्न कृष्णाबाई रायदुर्गकर व अध्यापक म्हणून नारायणराव जोगळेकर रुजू झाले. त्या काळात हे दोघे नामवंत गायक म्हणून प्रसिध्दीस पावले होते. आज या संगीत विद्यालयाची भव्य वास्तू उभी असून याच नगरीत 'भारतीय संगीत कला संशोधन केंद्र' हा भव्य प्रकल्प उभा केला गेला आहे. या विद्यालयाच्या पाच शाखा आज लातूर शहरात कार्यरत आहेत. बाबा बोरगावकरांचे हे काम श्री. गोविंदराव बोरगावकरांनी पुढे चालविले.

ज्येष्ठ संगीतकार महर्षी बाबा बोरगावकर यांचे सूरमणी डॉ. बाबुराव बोरगावकर व तालमणी डॉ. राम बोरगावकर हे नातू होत. त्यापैकी बाबुराव बोरगावकर हे 'शिक्षण संगीत अलंकार' या पदवीने विभूषित असून उपरोक्त सरस्वती संगीत महाविद्यालयाचे संचालक आहेत. याशिवाय आर. एस. कॉलेज, लातूर येथे संगीत विभाग प्रमुख म्हणूनही ते जबाबदारी पार पाडीत आहेत. आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित असलेल्या बाबुरावांनी भारतातील प्रामुख्याने हरिदास संगीत समारोह, गुणीदास संगीत समारोह, अलाहाबाद संगीत महोत्सव, दीपचंद्रिका संगीत संमेलन, तालसम्राट कंठे महाराज स्मृती समारोह, बनारस विश्व विद्यालय; आराधना संगीत संमेलन, हैद्राबाद; ललीत कला मंडळ, बिदर; बालगंधर्व जन्मशताब्दी, परभणी व पं. विष्णू दिगंबर पलुस्कर संगीत महोत्सव, आग्रा, येथील संगीत समारोहांमध्ये तसेच इंदौर, पुणे, मुंबई, दिल्ली या व अशा अनेक शहरांत संगीत समारोहांत प्रभावी गायन सादर केलेले आहे. ते आकाशवाणी कलावंत व उत्कृष्ट हार्मोनियम वादकही असल्यामुळे अनेक मान्यवर गायकांना त्यांनी गायन-वादनात साथ-संगत केलेली आहे.त्यांनी स्वत: विविध बंदिशींची निर्मितीही केलेली आहे.

सरस्वती संगीत महाविद्यालयाचे प्राचार्य तालमणी डॉ. राम बोरगावकर यांनी अत्यंत अल्पकाळात महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर फार मोठा लौकिक संपादन केला. ताल शास्त्रात अल्पवयात डॉक्टरेट मिळविणारे महाराष्ट्रातील ते पहिले तबलावादक ! त्यांनी संगीताचे पहिले धडे आजोबा बाबा बोरगावकर व काका गोविंदराव बोरगावकर यांच्याकडे घेतले. वयाच्या सातव्या वर्षापासून तबला वादनास सुरुवात करणारे डॉ.राम यांचा आज आकाशवाणी आणि दूरदर्शनचे प्रतिथयश कलावंत म्हणून लौकिक आहे. प्रसिध्द तबला सम्राट पं. शारदा सहायजी यांच्याकडे त्यांनी बनारस येथे जवळपास दीड तप अध्ययन केले आहे. प्रामुख्याने सवाई गंधर्व संगीत समारोह, पुणे; गुणीदास संगीत समारोह, हरिदास संगीत महोत्सव, अलाहाबाद संगीत महोत्सव, दीपचंद्रिका संगीत संमेलन, पं. विष्णू दिगंबर पलुस्कर संगीत संमेलन, आग्रा; कल के कलाकार आज के कलाकार संगीत संमेलन, सूरसिंगार संसद, मुंबई; इंडियन म्युझिक सोसायटी, हैद्राबाद; अ. भा. संगीत संमेलन, आग्रा; दीपचंद्रिका महोत्सव, इंदौर; भटजी बापू संगीत समारोह, हैद्राबाद आदी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संगीत महोत्सवात भाग घेऊन पं. सी. आर. व्यास, पं. जितेंद्र अभिषेकी, डॉ. प्रभा अत्रे, आशा खाडिलकर, अजय पोहनकर, कला रामनाथ अशा दिग्गज कलावंताना वादनात

साथ-संगत केलेली आहे. लातूरच्या 'मराठवाडा संगीत कला अकादमी' चे आणि सरस्वती संगीत महाविद्यालयाचे ते विद्यमान प्राचार्य असून 'संगीत सरगम' नामक साप्ताहिकाचे संपादक आहेत. काशी विश्वविद्यालयाचा युवा गुणवत्ता पुरस्कार, प्रयाग संगीत समितीचे सुवर्ण पदक अशा तबला वादनातील अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेले डॉ.राम बोरगावकर गेल्या काही वर्षांपासून स्व.विष्णू दिगंबर पलुस्कर पुण्यतिथी संगीत महोत्सव आणि तानसेन संगीत समारोहाचे आयोजन करीत आहेत. सन २००४, २००५ आणि २००६ या तीन वर्षांसाठी महाराष्ट्र शासनातर्फे सांस्कृतिक पुरस्कार जाहीर झालेले असून त्यात डॉ. राम बोरगावकर यांना वाद्यसंगीत विषयक पुरस्कार मिळाला आहे.

बोरगावकर बंधुंनी 'मराठवाडा संगीत कला अकादमी' स्थापन करून अनेक संगीत संमेलने लातूर येथे आयोजित केली व मराठवाड्यातील कलाकारांना पुणे, मुंबई येथे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. सरस्वती संगीत कला महाविद्यालय हे मराठवाड्यातील पहिले संगीत महाविद्यालय बोरगावकर बंधुंनी सुरू केले. हे बंधु संगीत अभ्यासकांना घडविण्याचे कार्य सातत्याने करीत आहेत.

बोरगावकर बंधुंच्या शिष्य परंपरेतील कल्लप्पा शहाबादे, वसंत पोतदार, प्रकाश सेठ, प्रा. विजयकुमार धायगुडे, विद्या मार्कंडेय, विजयश्री. सावरीकर, सूर्यकांत गिरी, अच्युतराव टेकाळे, ग्रीष्मा देशपांडे, सुहास शास्त्री, राजेंद्र भोसले, हरि जोशी, विश्वनाथ स्वामी, स्मिता औटी, लक्ष्मण श्रीमंगले, सुनिता मोरे, धनंजय सरपाळे, सौ. सरोज देशमुख, रेवती मसलेकर, सीमा जोशी, सविता जोशी, अभय करंदीकर, अनिल डोळे, तसेच मंगेश, गणेश, मधुवंती, सरस्वती बोरगावकर अशा असंख्य विद्यार्थ्यांचा उल्लेख करता येईल.

पं. शांताराम चिगरी गुरुजी हे अंध असतानाही त्यांचे संगीत क्षेत्रातील योगदान अत्यंत लक्षणीय आहे. कर्नाटकाच्या विजापूर जिल्ह्यातील खैनूर ही त्यांची जन्मभूमी आहे. मुंबई येथील दादरच्या अंधशाळेत त्यांनी संगीताचा अभ्यास केला. पं. नारायणराव व्यास (मुंबई), पं. ओंकारनाथ ठाकूर (गुजराथ), पं. विनायकबुवा पटवर्धन (पुणे) या संगीत क्षेत्रातल्या महान गायकांकडे त्यांनी गायनाचे, तर कंठे महाराजांचे शिष्य पं. बद्रीप्रसाद मिश्रा (बनारस), अहमदखान धिरकवाँ (फारुखाबाद), खलिफा नथ्युखाँ (कलकत्ता)यांच्याकडे तबल्याचे शिक्षण झाले. गायन-वादनाबरोबरच ते व्हायोलीन, सतार, बासरी, पखवाज, ढोलके इत्यादी वाद्येही अत्यंत सहजपणे वाजवतात. तबला वादनाचे शिक्षण अनेक गुरूंकडे झाल्यामुळे विद्यार्थ्यांना वेगवेगळे बाज शिकविणारे ते या प्रांतातील एकमेव गुरू आहेत. वयाच्या चौदाव्या वर्षीच मुंबई येथील कालबादेवी मंदिराच्या सभागृहात जगप्रसिध्द सतार वादक पं. रविशंकर यांच्या सोबत त्यांनी साथ-संगत केली होती. याशिवाय सरोद वादक पं. अल्लाउद्दीनखाँ साहेब यांना तबल्याची साथ, तर लता मंगेशकर आणि माणिक वर्मानाही त्यांनी साथ-संगत केली होती. अलबेला, हमदर्द या हिंदी चित्रपटात त्यांनी संगीताची धुरा वाहिली होती. १९७३ मध्ये त्यांनी गुरुवार क्लब, लातूर येथे नोकरी धरली. त्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र लातूर हेच झाले. या अंध गायकाने उत्तमोत्तम शिष्य घडविले. मराठवाड्यातील झाकीर अशी ख्याती मिळविणारा संगीत क्षेत्रातला तेजस्वी तारा मुकेश जाधव हा त्यांचाच शिष्य आहे. या शिवाय त्यांचे अनेक शिष्य संगीत क्षेत्रात सन्मानाने उभे आहेत. त्यांच्या अर्धांगिनी सौ.शकुंतला देवी याही उत्तम

गायिका आहेत. काही वर्ष त्या डेहराडूनला संगीत शिक्षिका होत्या. सन १९७७ मध्ये लातूरमध्ये चिगरी गुरूजी व सौ. शकुंतलादेवी यांनी 'सुरताल संगीत महाविद्यालयाची' स्थापना केली. पं. नारायणराव व्यास, पं. विनायकराव पटवर्धन, पं. ओंकारनाथ ठाकूर, पं. बद्रीप्रसाद मिश्रा, उस्ताद थिरकवॉ, उस्ताद नथ्थुखॉ यांच्याकडे चिगरी गुरूजींनी मार्गदर्शन घेतले. शांतारामजी चिगरी यांच्या गायन-वादनाच्या अनेक मैफिली महाराष्ट्र, कर्नाटक, कलकत्ता व आंध्र प्रांतातील प्रमुख नगरांत होऊन 'चैत्रपल्लवी पुरस्कार', 'कलाश्री. पुरस्कार', 'संगीत सागर', 'संगीतकला शिरोमणी' अशा अनेक पुरस्कार व पदव्यांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. संगीत हेच त्यांचे सर्वस्व आहे. नामवंत तबलावादक प्रा. अण्णा भोसले, गिरीष नाईक, उत्तम चिगरी, प्रणेश पोरे, खंडेराव कुलकर्णी, अंगद गायकवाड, हणमंत पांचाळ, राहुल सोनवणे, केशवराव सूर्यवंशी, संदीप जगदाळे ही त्यांची समर्थ शिष्य परंपरा आहे.

निसर्गत: गोड आवाज, स्वर, लय, तालाची योग्य समज असलेल्या वृषाली विठ्ठलराव कोरडे यांनी अल्पवयातच फार मोठा लौकिक संपादन केला. त्यांनी महाराष्ट्रातील शास्त्रीय गायन-वादनाच्या अनेक मैफिलींमध्ये गायन केलेले असून प्रसिध्द संगीतकार व गायक श्रीधरजी फडके यांच्या 'फिटे अंधाराचे जाळे' या प्रसिध्द कार्यक्रमात त्या सहभागी झाल्या होत्या. याशिवाय प्रा.शिवदासजी देगलूरकर यांच्या समवेत 'स्वरधारा', 'रागरंग' व 'राष्ट्रभक्ती ले हृदय में' या संगीत सभेत महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. त्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित असून सध्या लातूर येथील दयानंद कॉलेजमध्ये संगीताच्या प्राध्यापिका म्हणून काम करीत आहेत.

महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक आदी प्रांतात आपल्या संगीत मैफिलींनी रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारे प्रा. देवेंद्र बालमुकुंद कुलकर्णी हे सध्या लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयात संगीत विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. प्रा. शिवदासजी देगलूरकर व पं. रमेश कानोले हे त्यांचे सांगितिक गुरू होत. 'चंद्र आहे साक्षिला', 'संतवाणी', 'वंदे भारत मातरम्' या भावगीत, भक्तिगीत व देशभक्तिपर गीतांच्या विशेष कार्यक्रमानिमित्ताने महाराष्ट्र व इतर राज्यात त्यांनी आपली कला सादर केलेली आहे. प्रा. कुलकर्णी हे अनेक पुरस्कारांनी सन्मानित असून जयसिंगपूर येथील राष्ट्रीय पातळीवर सुगम गायन स्पर्धेत त्यांनी द्वितीय क्रमांक मिळविला होता.

शालेय जीवनापासूनच शास्त्रीय आणि सुगम गायन स्पर्धेत घवघवीत यश संपादन केलेले शशिकांत उमाकांत देशमुख यांचे वास्तव्य सध्या लातूर येथे असून त्यांचे सांगितिक गुरू संगीतरत्न प्रा. शिवदासजी देगलूरकर व प्रणेश पोरे हे आहेत. स्वतंत्ररित्या अनेक खाजगी मैफिली व संमेलनांत यशस्वी सहभाग घेतलेल्या देशमुख यांना अंबाजोगाईच्या बालगंधर्व संगीत महाविद्यालयाचा 'शिष्योत्तम' पुरस्कार प्राप्त झालेला आहे. गुरुवर्य देगलूरकर यांच्या समवेत त्यांनी महाराष्ट्र, आंध्र, गुजराथ, कर्नाटक, उत्तरप्रदेश इत्यादी प्रांतातील मैफिलींमध्ये सहभाग घेतलेला आहे.

महाराष्ट्र बँकेतून मॅनेजर म्हणून सेवानिवृत्त झालेले प्रसिध्द गायक राजा काटे यांची जन्मभूमी कळंब हे गाव असले, तरी गेली अनेक वर्ष ते लातूर येथेच वास्तव्य करून आहेत. सांगितिक गुरू जितेंद्र अभिषेकी यांच्याकडे त्यांनी सहा वर्ष गायन-अध्ययन केलेले आहे.

अनुक्रमणिका

विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात सुगम गायनाच्या मैफिली रंगविणारे राजा काटे गेली तीस वर्षे मुंबई, पुणे व औरंगाबाद आकाशवाणीवरून निरंतर सुगम गायन करीत आहेत. अभिनय कलेच्या आवडीमुळे दहा पेक्षा अधिक नाटकांत विविध भूमिका करून अभिनयाचे रौप्यपदक प्राप्त केलेले आहे. ''झटपट करू दे खटपट'' आणि ''चिचपट'' या मराठी चित्रपटांना, दूरदर्शनवरील अनेक सुगम संगीत कार्यक्रमांना तसेच इंडियन नॅशनल थिएटरच्या ''जगन्नाथ'', तर बिर्ला ग्रुपच्या ''जाग उठा है रायगड'' या व्यावसायिक नाटकांना त्यांनी संगीतसाज चढविला आहे. अनेक संगीत संमलेनात गायन केलेल्या काटे यांचे स्वरावर विलक्षण प्रभुत्त्व आहे.

देशविदेशातील रसिक श्रोत्यांना आपल्या तबला वादनाने मंत्रमुग्ध करणारे गिरीष नाईक यांची जन्मभूमी-कर्मभूमी लातूर, परंतु कार्यक्षेत्र मात्र संपूर्ण महाराष्ट्र. मिरज येथील किराणा घराण्याचे संस्थापक कै.अब्दुल करीमखाँ यांच्या पुण्यतिथी संगीत समारोहात ते नियमित हजेरी लावतात. ज्येष्ठ संगीत दिग्दर्शक राम कदम यांच्याकडे सहायक दिग्दर्शक म्हणून त्यांनी सहा वर्षे काम केलेले आहे. १९७४ साली मुंबईच्या 'सूरसिंगार संसद' अंतर्गत 'कलके कलाकार' या कार्यक्रमात सोलो तबला वादन करून त्यांनी सूरसिंगार संसदचा 'तालमणी किताब' पटकाविला आहे. मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात लता मंगेशकर, स्व.हेमंत कुमार, तलत महेमुद, राजकुमारी व पाकिस्तानची नूरजहाँ या महान गायक कलाकारांसोबत त्यांनी संगीत साथ केलेली आहे. १९८२ साली त्यांनी मेलोडी मेकर्स बरोबर कार्यक्रमासाठी तीन महिने मॉरिशसचा परदेश दौरा व याच वर्षी स्व.किशोरकुमार, धर्मेंद्र, हेमामालिनी, हेलन,अनुराधा पौडवाल यांच्या सोबत अमेरिका, कॅनडा, वेस्ट इंडिज, लंडन आदी देशांचा दौरा केला होता. भारतात स्व. किशोर कुमार यांच्याबरोबर कलकत्ता, बेंगलोर, पुणे, मुंबई, दिल्ली आदी शहरांत आयोजित कार्यक्रमात त्यांचा सहभाग होता. 'सूरसागर के मोती' ही हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतावर आधारित कॅसेट तसेच 'करो जागरण बाबा का' ह्या भजनाच्या कॅसेटमध्ये संगीतकार म्हणून त्यांनी आपली भूमिका बजावली आहे.

किशनराव देशमुख, रमाकांत बनशेळवीकर, माधवराव सोनार, प्रा. डॉ. कृष्णचंद्र ज्ञाते, शाम घनपाटी या गायकांनी उदगीरमधील संगीत चळवळीला प्रारंभ केला. हे सर्वजण गात असत. शिवाय अनेक मोठ्या गायकांचे कार्यक्रम आयोजित करीत असत. प्रा. ज्ञाते यांनी तर शास्त्रीय संगीतावर 'संगीताचे स्वरूप व प्रयोजन' हा स्वतंत्र ग्रंथ लिहिला आहे. उदगीर येथील 'कलावैभव' आणि 'रूपवेध' या दोन संस्थांनी, तसेच डॉ. प्रमोद देशमुख यांनी शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि सुगत संगीताचे अनेक कार्यक्रम आयोजित करून यशस्वी केलेले आहेत. 'रूपवेध' व डॉ. देशमुख फक्त शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम घेतात, तर 'कलावैभव' सर्व प्रकारच्या संगीताचे कार्यक्रम आयोजित करते. वरील गायक कलाकारांपैकी शाम घनपाटी हे सुधीर फडक्यांची गाणी, तर प्रभाकर निलेगावकर हे भीमसेन जोशींची गाणी गातात.

१९७२ मध्ये उस्मानाबादचे शाम नळदुर्गकर यांच्या अधिपत्याखाली उदगीर येथे उस्मानाबाद जिल्हा संगीत संमेलन आयोजित करण्यास प्रा. ज्ञाते, सुभाष देशपांडे, प्रा. रा. वा. गचके वगैरे अनेकांनी हातभार लावला. या संमेलनात अनेक नामवंत गायक व वादक कलाकारांनी आपली कला सादर करून वाहवा मिळविली.

फेब्रुवारी १९८१ च्या १२, १३ व १४ तारखेस लातूरमध्ये ५ वे मराठवाडा संगीत संमेलन भरले होते. या संमेलनात पं.जितेन्द्र अभिषेकी, पं.बसवराज राजगुरू, पं. भीमसेन जोशी, पं. हरिप्रसाद चौरसिया, हिराबाई बडोदेकर या संगीत क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या महान गायकांसोबत प्रा.रामदास अनवले, बाबुराव बोरगावकर, राजाभाऊ काटे, के. एन. बोळंगे (गुरूजी), श्रीमती जिजाबाई काटेजवळगेकर, सौ. नलिनी देशपांडे, सौ. आशालता करलगीकर, श्रीमती चित्ररेखा देशमुख, सरोजिनी वडगावकर, डॉ. श्रीमती सुहासिनी कोरटकर, नाथराव नेरलकर, एस. एम. वैद्य, डॉ. आर. एम. स्वामी, शिवदास देगलूरकर, डॉ. प्रकाश संगीत, श्रीकांत देशपांडे, प्रा. मोहोळकर, गिरीश गोसावी, कमलाकर परळीकर, रमेश कानोले, यशवंत क्षीरसागर, कु. महेन्द्र टोके, कु. ज्योत्स्ना कासार या मराठवाडा व अन्य भागातील दिग्गज गायकांनी आपली गायनकला पेश केली होती. या सर्व कलावंताना पं. झाकीर हुसेन, रमेश सामंत, पांडुरंग मुखडे, सतीशचंद्र चौधरी, गणपत पुजारी, पेन्टर बसलिंगप्पा झाडबुके, राम कुसंगे, प्रकाश ठाकूर, अप्पा जळगावकर, बंडोपंत साठे, शंकर वैरागकर, शिवदास देगलूरकर, के. एन. बोळंगे, वसंतराव पूसकर या तेवढ्याच तोलामोलाच्या कलाकारांनी तबला व हार्मोनियम साथ केली होती.[२८] या संमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य नरहर कुरूंदकर, तर कार्याध्यक्ष भीमाशंकरप्पा पंचाक्षरी हे होते. या संमेलनाने मराठवाड्यातील रसिकांना संगीतानंदाने तृप्त केले होते.

या संमेलनाच्या प्रेरणेतूनच लातूरमध्ये दि. २५ व २६ नोव्हेंबर १९८७ रोजी 'कला संस्कार' या संस्थेने 'कला संस्कार संगीत महोत्सवाचे' आयोजन केले होते. या संगीत सोहळ्यातही पं. जसराज, अप्पासाहेब जळगावकर, श्रीकांत देशपांडे, पांडुरंग मुखडे, सौ. वीणा सहस्त्रबुध्दे, उस्ताद उस्मान खान, मधुप मुद्‌गल, नाथराव नेरलकर, सतिश कौशिक, आनंद बदामीकर, शेखर सरोदे, विठ्ठल जगताप या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या गायक व वादक कलाकारांनी आपल्या कलेने रसिकांना मंत्रमुग्ध केले होते. याच महोत्सवात लातूरचे भूषण असलेले श्री. भीमाशंकरअप्पा पंचाक्षरी यांचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात आला.

भारतीय अभिजात संगीताचे जतन करणे, त्याची अभिरूची जनतेत वाढविणे, संशोधन कार्यास चालना देणे, कलाकार व विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, मेळावे, चर्चा, संमेलने घेणे इत्यादी उद्देश डोळ्यासमोर ठेवून 'कला संस्कार' या संस्थेची वाटचाल सुरू आहे. या संस्थेने १९८३ व १९८५ मध्ये 'आय.टी.सी. संगीत संमेलन' व एक संगीत समारोह रसिकांच्या सेवेत सादर केला होता. कलासंस्कारच्या व्यासपीठावरून वरील ख्यातनाम कलाकारांव्यतिरिक्त डॉ. एम. राजम, शाहीद परवेझ, पं. ब्रिजभूषण काबरा, डॉ. मुखर्जी, डॉ. कानन इत्यादी महान गायक कलाकारांचे कार्यक्रम सादर झालेले आहेत.

आज उदगीरमध्ये मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या संगीत चळवळीची पार्श्वभूमी कै. बलभीमराव हिंगे, प्रा. बा. वि. पोतदार, अनवले गुरूजी या दिग्गजांनी तयार केली आहे. या चळवळीला वाढविण्यासाठी गोपाळ जोशी, बंगडे दांपत्य,पं. रामदास अनवले, गोपाळ मणूरकर, प्रा. पी. के. कुलकर्णी, वामन मोरे, सुभाष देशपांडे, लक्ष्मणराव आंबेसंगे, सौ. सुनंदा गचके, श्रीमती निर्मला डोळे, श्रीमती मीनाताई घनपाटी, भीमाशंकर पारसेवार,

२८. **स्मरणिका,** ५ वे मराठवाडा संगीत संमेलन, लातूर, फेब्रुवारी १९८१.

ॲड. ए. टी. पाटील वगैरे मंडळींनी हातभार लावला आहे. प्रा. रा. वा. गचके हे तर अनेक वर्षे 'कलावैभव' चे अध्यक्ष आहेत. त्यांना चंद्रकांत गुक्कावार आणि भास्कर पट्टमवार यांनी नेहमीच आर्थिक सहकार्य केलेले आहे.

१९६८ पासून गंजगोलाईत 'जय जगदंबा नवरात्र महोत्सव' चालतो. महाराष्ट्रातील जवळजवळ २०० ते २५० उदयोन्मुख कलाकारांनी या व्यासपीठावरून आपली कला सादर केली आहे. मागील १५ वर्षांपासून 'अष्टविनायक संगीत प्रतिष्ठान' द्वारे महाराष्ट्र पातळीवर संगीताला प्रोत्साहन मिळावे म्हणून दरवर्षी श्री. प्रदीप राठी व ॲड. नारायण मार्डिकर यांच्या मार्गदर्शनाखाली संगीत स्पर्धा घेतल्या जातात.

सध्या मैफिली गाजविण्याची क्षमता असणाऱ्या जिल्ह्यातील कलाकारांमध्ये खंडेराव कुलकर्णी या आकाशवाणी कलाकाराचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. याशिवाय किरण भावठाणकर, प्रा. कृष्णा अनवले, रमाकांत स्वामी, सौ. सरोज बोरगांवकर, शंकर जगताप, लक्ष्मण श्रीमंगले, विजयकुमार धायगुडे, संदीप जगदाळे, अंगद गायकवाड, सोमनाथ किडीले, चंद्रकला गायकवाड, मंगेश, गणेश, मधुवंती बोरगांवकर ही भविष्यातील काही आश्वासक नावे, ज्यांच्यावर लातूर जिल्ह्यातील रसिक नजर ठेवून आहेत. कै. ब. दा. हिंगे यांचेही संगीतात योगदान आहे.

वसंतराव पूसकर हे लातूरमधील एक मान्यवर बासरीवादक तथा हार्मोनियम वादक म्हणून प्रसिध्द आहेत. तबला विशारद प्रा. बालाजी सूर्यवंशी हे गुरूवार संगीत विद्यालय, लातूर येथे अध्यापक म्हणून काम करतात. देविदासराव चाकूरकर हेही हार्मोनियम व तबलावादक आहेत, तर लातूर तालुक्यातील रहिवाशी असलेले श्री. गोपीनाथ श्रीरंग डोपे हे उत्तम पखवाजवादक आहेत. यांच्याव्यतिरिक्त जिल्ह्यातील अनेक कलाकार वादन क्षेत्रात कार्यरत आहेत.

नवोदित तरूण कलाकारांना व्यासपीठ मिळावे या हेतुने प्रेरित होऊन 'अष्टविनायक प्रतिष्ठान' तर्फे गेल्या दशकापासून राज्यस्तरीय संगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यातही प्रदीप राठींचा पुढाकार असतो.

नृत्य ही कलाही आता लातूरच्या सांस्कृतिक वातावरणात मूळ धरू लागली आहे. सौ. नभा बडे या 'नुपूरा संगीतालय' च्या माध्यमाने गेल्या ७-८ वर्षांपासून लातूरमध्ये कथ्थक नृत्याचे शिक्षण देत आहेत. तसेच गिरीश नाक हे पाश्चात्य संगीत अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

नाट्यक्षेत्र[२९]

मराठवाडा ही संतांची भूमी आहे असे गौरवाने म्हटले जाते. त्याचप्रमाणे ही नाट्यभूमी आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. महाराष्ट्रातील नाट्यपरंपरेचा आढावा घेतला तर मराठवाड्याचे योगदान लक्षणीय आहे. नाट्याचे विविध प्रकार या भूमीत रूजले आहेत.

२९. मग्गीरवार, गो.न., "लातूरची सांस्कृतिक एकाधिकारशाही," दैनिक **लोकमत**, रौप्यमहोत्सवी वर्ष, पूर्वोक्त; **दिंडी**, विशेषांक, पूर्वोक्त; प्रा.रा.पा.गचके, उदगीर व क.हे.पुरोहित, लातूर यांनी पाठविलेली माहिती आणि लातूरमधील काही मान्यवरांच्या प्रत्यक्ष मुलाखतीवर आधारित.

एकांकिका, तीन अंकी नाटके, वगनाट्ये, गोंधळ, तमाशा, लोकनाट्य, सत्यशोधक जलसे, आंबेडकरी जलसे, वाघ्या-मुरळीचा जागर, भारूड आदी सर्व नाट्यप्रकार मराठवाड्यात दिसून येतात. आंध्र आणि कर्नाटक हे दोन्ही प्रदेश मराठवाड्याला जवळ असल्याने दशावतारी खेळ, सवाल-जबाबाचे खेळ मराठवाड्याच्या सीमावर्ती भागात दिसून येतात.

जवळपास २५५ वर्षे मराठवाड्यावर निजामाची सत्ता असल्यामुळे सर्वत्र उर्दूचेच वर्चस्व होते. शिक्षणाची आणि प्रशासनाची भाषा उर्दूच असल्यामुळे मराठी भाषेची अवस्था अत्यंत दयनीय होती. बोटावर मोजण्याएवढ्याच मराठी शाळा होत्या आणि काही मराठवाडी माणसे मराठी भाषा जगविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होती. अशा परिस्थितीत साहित्य-संगीत-नाट्य कला गतिमान होण्याची सुतराम शक्यता नव्हती. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा खूपच मागासलेला होता. १९६० साली मराठवाडा महाराष्ट्रात विलीन झाला आणि संपूर्ण चित्रच बदलले. शिक्षणाची गंगा घराघरापर्यंत आली. मराठवाडी माणसाचा आत्मविश्वास वाढला, त्याला विकासाच्या वाटा गवसल्या. कृषि उद्योगाबरोबरच त्याने सांस्कृतिक क्षेत्रातही गरूडझेप घेतली आणि अवघ्या ४५ वर्षात मराठवाडा महाराष्ट्राचा केंद्रबिंदू बनला. लातूर जिल्हाही याला अपवाद नाही.

मराठवाड्यात लोकरंगभूमीचा आविष्कारही दखलपात्र आहे. कीर्तन, गोंधळ, जागरण, भारूड, वाघ्या-मुरळीचे जागरण, वासुदेव, बहुरुपी, गंगासागर हे लोकधर्मी नाट्यप्रकारही येथे रूढ आहेत. इ.स.च्या पहिल्या शतकात पैठण येथील सातवाहन हाल राजाने नाट्य व काव्याला राजाश्रय दिल्याचे संदर्भ गाथासप्तशती मध्ये आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने भारावलेली मंडळी वेगवेगळ्या माध्यमांतून त्यांच्या विचाराच्या प्रचार-प्रसारासाठी स्वत:हून पुढे आल्याचे दिसून येते. महात्मा फुलेंच्या प्रभावामुळे सत्यशोधक जलसे सुरू झाले, तर डॉ. बाबासाहेबांच्या प्रभावामुळे आंबेडकरी जलसे सुरू झाले. जलसाकारांना अशी पूर्वपरंपरा असल्याने पूर्वाश्रमीच्या तमासगीरांनी पारंपरिक तमाशा, त्यातील देवदेवता, अध्यात्म, श्रृंगार, राधा-कृष्ण, गवळणी यांना फाटा देऊन आंबेडकरी विचाराला वाहिलेला नवा कला प्रकार 'जलसा' या नावाने सुरू केला. भीमराव कर्डकांपासून ते आजच्या लोकनाट्यापर्यंत ही जागृती सुरू आहे. मराठवाड्यात आज गावोगावी नाट्य संस्था कार्यरत आहेत.

तमाशा-लोकनाट्य हा आधुनिक वाङ्मय प्रकार मराठवाड्यात सुरू करण्याचे श्रेय हरिभाऊ अन्वीकर यांना दिले पाहिजे. स्वत:च्या मालकीचा भव्य तंबू, तीन ट्रक्स, एक जीप, ६०-७० कलावंतांचा ताफा याद्वारे जवळपास ४० वर्षांपासून अखंड भ्रमंती करून सादर केलेल्या प्रयोगांमुळे ते ख्यातकीर्त झाले. दलित रंगभूमीला मराठवाड्यानेच जन्म दिला. म. भी. चिटणीस, अविनाश डोळस, दत्ता भगत, खुशाल कांबळे, बाबुराव गायकवाड, प्रभाकर वराळे, सुखराम हिवराळे, रामदास कांबळे, प्रकाश शिरसाट, प्रकाश त्रिभुवन, गंगाधर पानतावणे ही या क्षेत्रातील सर्व मंडळी मराठवाड्यातीलच आहे.

येलम समाजात सुरू असलेला कोल हा नृत्य प्रकार व यावेळी सादर होणाऱ्या नकला, अमावास्येची शिवारपूजा, पोळ्याचा उत्सव, नागपंचमी, विशिष्ट समाजातील अश्वपूजा तसेच कुंभारांचा गणेश उत्सव, नकट्या नागोबा व गौराई पूजन या सर्वांमध्ये विद्यमान काळातील नाट्य व संगीत परंपरेचे मूळ शोधावे लागेल.

अनुक्रमणिका

लातूर येथील नाट्य चळवळ रूजविण्याचे काम रामलिंग मंदिरापुढील कार्यक्रमाच्या अनुषंगाने झाले. त्यामध्ये हणमंतराव रेणापूरकर, मुक्तिराम जमदाडे, देविदासराव जमदाडे, प्रभाकरराव कोळपकर यांची नोंद घ्यावी लागते. हणमंतराव रेणापूरकरांनी प्रथम नाटकाचे पडदे बनविले. ते स्त्री भूमिकाही करीत.

लातूरवासियांना नाटकाचे वेड फार पूर्वीपासून असावे. त्यादृष्टीने सन १९४२ ते १९६० या काळात डोकावल्यास मुक्ताराम जानकर आणि हणमंतराव रेणापूरकर अशी नावे पुढे येतात. जुन्या लातूरमधील रामलिंगेश्वर मंदिरात त्याकाळी मुक्ताराम जानकर नाटक बसवायचे. अगदी खेड्यात होतात तसे प्रयोग त्याकाळी या मंदिरात होत. ते स्वत: व रामभाऊ लवटे यांनी नाटकांत कामेही केली. किमान १०-१५ वर्षे तरी हा क्रम चालू होता. अर्थात या काळात स्त्री भूमिका पुरूषच करायचे. देवीदासराव आराध्ये व त्रंबकराव नाईक यांनीही संगीत नाटके केली. त्यांच्या नाटकांमध्ये किसनराव सौताडेकर स्त्री भूमिका करायचे. ते उत्तम पेटीही वाजवायचे. याच काळात हणमंतराव रेणापूरकरांनी कवडीचुंबक, पाणिग्रहण, पुढारी पाहिजे अशी छोटी छोटी नाटके मेळाव्यातून सादर केली. त्यांनी नाटकांच्या माध्यमातून लातूरमधील बऱ्याच सुविद्य मंडळीना जोडले होते. देविदासराव जमदाडे आणि प्रभाकरराव कोळपकर यांनी तर त्यांच्या नाटकांत स्त्री-भूमिका वठविल्या होत्या. जीवनधर व हेमलता शहरकर यांनीही त्यांच्या नाटकात भूमिका वठविल्या होत्या.

लातूर हे पूर्वीपासूनच सांस्कृतिक चळवळीचे केंद्र आहे. जुन्या उस्मानाबाद जिल्ह्यात असतानाही संगीत, नाटक, चर्चा, संमेलने, आदी सांस्कृतिक घडामोडी लातूरलाच केंद्रीत असत. बालगंधर्व नाटक मंडळींचा लातूरमध्ये महिना महिना मुक्काम असे. येथील हनुमान चौकातील बंदिस्त जागेत त्यांची नाटके होत. कलेच्या क्षेत्रात लातूर जिल्ह्याने लौकिक प्रस्थापित केलेला आहे. ज्याकाळात साधे नाटकही बसवणे अवघड होते, त्याकाळात लातूरच्या नाट्यरसिकांनी 'पुन्हा पुन्हा मोहेंजोदारो', 'गेंडा', 'फांस' सारखी प्रायोगिक नाटके रंगमंचावर आणली. राज्य नाट्य स्पर्धेत एकट्या श्रीराम गोजमगुंडे यांनी तब्बल आठ पदके मिळविली आहेत.

सन १९६० पर्यंत सांस्कृतिक चळवळीला पोषक असे वातावरण येथे नव्हते. अभ्यासावर लक्ष केंद्रित केलेली 'राजस्थान विद्यालय' ही लातूर शहरातील एकमेव शिक्षण संस्था होती. याच संस्थेत राजा म्हैसकर आणि मालती म्हैसकर हे पुण्याचे दांपत्य शिक्षक म्हणून रूजू झाल्यानंतर लातूरच्या नाट्यक्षेत्रात नाट्यक्षेत्राला प्रोत्साहक असे वारे वाहू लागले. उभयतांना नाटकाचे चांगलेच वेड असल्याने त्यांनी प्रारंभीच्या काळात सहकारी शिक्षकांच्या सहकार्याने लातूर शहरात नाट्यचळवळीचा शुभारंभ म्हणून काही नाटके बसवून सादर केली.

सुरुवातीला त्यांनी 'तुझं आहे तुजपाशी' हे पु. ल. देशपांडे यांचे नाटक बसविले. त्यात हेमलता शहरकर, हेमा केदार, कुमुदिनी जुन्नरकर, नलिनी गायकवाड, जीवनधर शहरकर, वासुदेवराव बेंबलकर, सूर्यकांतराव जोशी, विनायकराव माचिले व स्वत: राजाभाऊ इत्यादी शिक्षकवृंदाने भाग घेऊन लातूर, उदगीर येथील प्रयोगांना रसिकांची दाद मिळविली. हेच नाटक १९५६ च्या राज्य नाट्य स्पर्धेत औरंगाबाद केंद्रात पहिले आले. त्यात हेमलता शहरकर यांना अभिनयाचे रौप्य पदक, तर वासुदेवराव बेंबलकरांना प्रशस्तिपत्र मिळाले.

Maharashtra State Gazeteers

अंतिम स्पर्धेत मुंबईलाही या नाटकाचा प्रयोग झाला. मुंबईत सादर झालेले हे पहिले नाटक. त्यानंतर मिळणारा प्रतिसाद पाहून म्हैसकर दांपत्याने दिनांक १४ जानेवारी १९५६ रोजी 'कलोपासक मंडळ' ही नाट्य संस्था स्थापन केली व लातूरकरांना नाटकांची नव्याने गोडी लावली. या संस्थेने प्रारंभीच्या काळात 'देवमाणूस', 'भाग्यवान', 'चिमणीचं घर', 'राणीचा बाग', 'मुंबईची माणसं', 'सैनिक नावाचा माणूस', 'प्रेमा तुझा रंग कसा', 'संगीत कुलवधू', 'कोरीव लेणी', 'सागर माझा प्राण', 'कालाय तस्मै नमः', 'दूरचे दिवे' यासारखी नाटके नाट्य स्पर्धेच्या निमित्ताने बसविली आणि अभिनयाची व दिग्दर्शनाची पारितोषिकेही मिळविली. त्यामुळे अत्यंत अल्पकाळात 'कलोपासक' या नाट्य संस्थेचा संपूर्ण महाराष्ट्राला परिचय झाला. याच मंडळाने बसविलेल्या व गाजलेल्या 'रंभा' या नाटकात भूमिका करणाऱ्या रजनी जोशी व कमलाकर पुराणिक यांना राज्य नाट्य स्पर्धेत (१९५९) रजत पदक मिळाले होते, तर नाटकाला प्रथम पारितोषिक मिळाले होते. शिवाय अन्य ५ पारितोषिके मंडळाला मिळाली होती. याच नाटकाने मराठवाड्यात कलोपासक मंडळाला लौकिक मिळवून दिला. या मंडळाने त्यानंतर 'लग्नाची बेडी', 'मीही आहे एक जटायू', 'गुड बाय डॉक्टर', 'आम्ही सारे घोडेगावकर', 'गेंडा' अशी अनेक नाटके सादर केली. 'दंबद्वीपचा मुकाबला' या नाटकाने तर अंतिम राज्य नाट्य स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकाविला. त्यात स्मिता परचुरे यांना अभिनयाचे पदक मिळाले. ताराचंद बडजात्यांकडे दिग्दर्शनाचे शिक्षण घेतलेले व नाटकाची चांगली जाण असणारे प्रा. विभाकर मिरजकर यांनी कलोपासकाला बरीच वर्षे चांगले रूप देण्याचा प्रयत्न केला.

१९६० ते १९७० या दशकात लातूर शहरात अनेक शैक्षणिक संस्था सुरू झाल्या. साहित्य-संगीत-नाट्य कलेला चांगलीच गती मिळाली. श्रीराम गोजमगुंडे आणि त्यांचे काही सहकारी 'कलोपासक' या नाट्य संस्थेतून बाहेर पडून त्यांनी 'रसबहार' ही नाट्य संस्था सुरू केली. मात्र यामुळे कलोपासक मंडळात निर्माण झालेली फार मोठी पोकळी भरून काढण्यासाठी प्रा.विभाकर मिरजकरांनी एकापेक्षा एक सरस नाटके बसवून संस्थेला अधिक गतिमान केले. 'गेंडा', 'नाटककाराच्या शोधात', 'सहा पात्रे', 'तुघलक', 'राजा इडिपस', 'महानिर्वाण', 'महापूर', 'पाहिजे जातीचे', 'शांतता कोर्ट चालू आहे', 'गुडबाय डॉक्टर', 'गोची' ही नाटके रंगभूमीवर आणून व विभागीय आणि राज्य पातळीवर पारितोषिके मिळवून संस्थेचा लौकिक वाढविला. मनासारख्या नाटकांसाठी विभाकर मिरजकरांनी 'गेंडा', 'पाचामुखी', 'अनादि-अनंत', 'आपण सारे घोडेगावकर' अशी नाटके स्वतः लिहिली. त्यापैकी 'आपण सारे घोडेगावकर' या नाटकास नाट्य लेखनाचे प्रथम पारितोषिकही मिळाले. कलोपासक या नाटय संस्थेच्या उभारणीत सर्वश्री प्रा.विभाकर मिरजकर, प्राचार्य क. दे. पुरोहित, प्रा. रविंद्र गोवंडे, श्रीराम गोजमगुंडे, सुनंदा खांडेकर, स्मिता परचुरे, सुनेत्रा देशपांडे, जयंत दिवाण, राजा काटे, लता पत्की या कलावंतांचा सिंहाचा वाटा आहे.

राजा म्हैसकर, जयंत दिवाण, प्रभाकर कोळपकर, क. हे. पुरोहित, श्रीराम गोजमगुंडे, रविंद्र गोवंडे, माधवी गोवंडे, डॉ. रामभाऊ अलूरकर, मालती कानडे, कमल कोळपकर, कुमुदिनी लेले, उषा गाडगीळ, लता पत्की, डॉ. विनायक रबडे, रामचंद्र बुचके, सी. डी. देऊळगांवकर, अभिमन्यु नेत्रगावकर, अतुल देऊळगावकर, सूर्यकान्त वैद्य, गुरूपाद पत्थरगी, शिरीष पोफळे, जोत्स्ना कुकडे, गो. मा. देशमुख, स्मिता व शरद परचुरे आदिंनी कलोपासकाच्या

नाटकांतून लक्षणीय भूमिका वठविल्या. यापैकी विभाकर मिरजकर, सूर्यकांत देशमुख, अतुल देऊळगावकर, ज्योत्स्ना कुकडे, स्मिता परचुरे, सूर्यकान्त वैद्य, स्मिता पिंपरकर, रविंद्र गोवंडे, सुनंदा खांडेकर, सत्यविजय जाधव वगैरे कलावंतांनी प्रादेशिक पातळीवर अभिनयाची रौप्यपदके व प्रमाणपत्रे मिळविली. स्मिता परचुरे व ज्योत्स्ना कुकडे यांना अंतिम स्पर्धेतही अभिनयाचे रौप्य पदक मिळाले. स्मिता परचुरे यांना तर साहित्य परिषदेमार्फतही अभिनयाचे पारितोषिक मिळाले. सद्या श्रुतिकांत ठाकूर वगैरे मंडळी ही धुरा वाहत आहेत. डॉ. अफजलपूरकर यांचेही नाव या क्षेत्रात अग्रणी आहे.

सन १९६६ मध्ये या संस्थेचा दशवार्षिक महोत्सव प्रसिध्द अभिनेत्री उषा किरण यांच्या उपस्थितीत साजरा झाला. त्यामध्ये गायन-वादनाचे कार्यक्रम व एकांकिका सादर करण्यात आल्या. मंडळातील दिग्दर्शक, अभिनेते व पडद्यामागे काम करणाऱ्या कलावंतांचा स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला.

कलोपासकने गो. मा. देशमुख, रविंद्र गोवंडे, विभाकर मिरजकर यासारखे दिग्दर्शकही लातूरला दिले. आतापर्यंत या मंडळाने राज्य नाट्य स्पर्धेत सातत्याने भाग घेतला आहे.

१९८१ मध्ये मंडळाने आपल्या स्थापनेचा रजत महोत्सव साजरा केला. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीकांत मोघे, सुहासिनी मुळगावकर हे जेष्ठ कलावंत व महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे उपस्थित होते. यानिमित्त 'गुड बाय डॉक्टर' या नाटकाचा प्रयोग झाला, परिसंवाद झाले. लातूरच्या सांस्कृतिक जीवनाला समृद्ध करणाऱ्या राजाभाऊ म्हैसकर, भीमाशंकरप्पा पंचाक्षरी, श्रीराम गोजमगुंडे आदी श्रेष्ठ कलाकारांचा मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

कलोपासक मंडळाने नाटकाबरोबरच शहरात दर्जेदार संगीताच्या मैफिली आयोजित केल्या. नाटक, संगीत यावर चर्चा घडवून आणल्या. या संस्थेपासून प्रेरणा घेऊन भीमाशंकरप्पा पंचाक्षरी यांनी १९६१ मध्ये 'नवयुवक नाट्य मंडळ' स्थापन केले. यात महत्त्वाची भूमिका पंचाक्षरी हेच निभावीत होते. त्यांच्याइतका तळमळीने काम करणारा संगीतवेडा माणूस विरळाच । त्यांच्या काळात पार पडलेला एक संगीत महोत्सव तर लातूरकरांच्या स्मरणात कायम राहील. या मंडळाच्या मंचावरून विविध प्रयोग सादर केले जात. पंचाक्षरी हे सातत्याने कुमार गंधर्व महोत्सवात हजेरी लावीत. त्यांचा 'हयवदन' (१९७८) चा प्रयोग चांगलाच गाजला होता. पु.ल.देशपांडे लिखीत 'रद्दीवाला', 'चिक्कीवाला', 'सैनिक', 'तुघलक' यासारखे प्रयोगही केले गेले. जयंत दिवाण, राजा काटे, विजय भोयरेकर, विलास उदगीरकर, के.एस.वारद यांनी 'नवयुवक' नावारूपास आणले. नवयुवकने 'घराबाहेर' (१९६१), 'डॉ. कैलाश' (१९६५), 'जिद्द' (१९६६), 'हा खेळ सावल्यांचा' (१९७१), 'बर्थ डे पार्टी' (१९७३), 'वल्लभपूरची दंतकथा' (१९८२), 'रंग सावल्या' 'एका घरात होती' (१९८३) 'चक्रव्युह' सारखी प्रमुख नाटके रंगमंचावर आणली. या नाटकांतून मुख्यत्वे सूर्यकांतराव जोशी, राजा काटे, जयंत दिवाण, रविन्द्र गोवंडे, प्रभाकरराव कोळपकर, गोविंद आंबेकर, श्रीराम गोजमगुंडे, सुनिता कुळकर्णी, कमल कोळपकर, अजय बेलूरकर यांनी भूमिका साकारल्या होत्या. या मंडळाच्या 'हा खेळ सावल्यांचा', 'मुकं करोती वाचालम्' या नाटकांनी प्रादेशिक पातळीवर बक्षिसे मिळविली. नंतर ती मुंबईत अंतिम स्पर्धेतही सादर करण्यात

आली. यापैकी 'मुकं करोती वाचालम्' हे नाटक जयंत दिवाण यांनी लिहिले होते. भीमाशंकरप्पा पंचाक्षरींच्या निवृत्तीनंतर सूर्यकान्तराव जोशी हे या मंडळाची धुरा सांभाळीत आहेत. उदगीरला 'कलावैभव' या संस्थेने नाट्य चळवळीचा प्रारंभ केला. तसेच लहान मुलांमध्ये अभिजात कलेबाबत अभिरूची जोपासली जावी या हेतून स्थापन झालेल्या 'रंगमंच' या संस्थेचीही या क्षेत्रातील वाटचाल महत्त्वाची आहे. प्रदीप कुलकर्णी, बाळकृष्ण धायगुडे, संजय आयाचित, श्रुतिकांत ठाकूर, नंदकुमार कुलकर्णी, डॉ. सत्यविजय जाधव, प्रभाकर कोळपकर, सूर्यकांतराव जोशी, जीवनधर रहाटकर, प्रा. गेंडेगावकर, प्रा. क. हे. पुरोहित या नाट्यकर्मींनी आपल्या अभिनयाने लातूर शहराचा लौकिक वाढविला.

त्यानंतरच्या काळात १९६९ साली 'रसबहार' नाट्यसंस्थेचा उदय झाला. प्रसिध्द नाट्य-सिने कलावंत श्रीराम गोजमगुंडे हे रसबहारचे संस्थापक, आधारस्तंभ व प्रेरणास्थान. तसे गोजमगुंडे यांचे घराणे शेतकऱ्याचे. पण राजस्थान विद्यालयात शालेय शिक्षण सुरू असताना त्यांना नाटकाची ओळख झाली. 'शेपटीचा साप' या बालनाट्यात त्यांनी प्रथम भूमिका केली. नंतर 'वेड्याचे घर उन्हात', 'आमचं नाव बाबुराव' या नाटकांत भूमिका केल्या. नंतर वर उल्लेखिलेली रसबहार नाट्यसंस्था स्थापन करून व त्याद्वारे 'कथा कुणाची व्यथा कुणा' हे नाटक सादर करून अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळविले. त्यानंतर चाकोरी बाहेरचे विषय घेऊन 'पुन्हा पुन्हा मोहोंजोदारो' (एन. आर. नंदी यांच्या मूळ 'मरो मोहंजोदारो' या तेलगु नाटकाचे मराठी रुपांतर), हे नाटक राज्य नाट्यस्पर्धेअंतर्गत कामगार कल्याण स्पर्धेसाठी अत्यंत ताकदीने सादर करून अंतिम स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळविले. प्रायोगिक नाटकांपासून ते लोकनाट्यापर्यंत रस व गती असलेल्या श्रीराम गोजमगुंडे यांनी या काळात 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी', 'फांस', 'भिरभिरतं पाखरू', 'वणवा', 'प्रश्न', 'चकवा', 'शेवंती जिती हाय' ही दर्जेदार नाटके सादर केली. यापैकी १९७३ मध्ये 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' हे नाटक मुंबई येथे कामगार मंडळाच्या अंतिम स्पर्धेत सादर केले गेले. त्यास पहिले पारितोषिक मिळाले. त्यानंतर 'बाजार' हे नाटक मंडळातर्फे रंगमंचावर आणले गेले. पुढे १९७६ मध्ये 'बंदिशाळा' (व. आ. डहाके यांच्या अधोलोक कादंबरीचे नाट्यरूपांतर) हे नाटक स्पर्धेत सादर होऊन त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. 'फांस' (१९७२) या दोनपात्री प्रायोगिक नाटकाने संपूर्ण महाराष्ट्राला गोजमगुंडेंची नोंद घ्यायला लावली. यात लता पत्की यांचा सहभाग मोठा होता. श्रीराम गोजमगुंडे कंपनीचे नाटक कोणत्याही स्पर्धेत गेले की, बक्षीस घेऊनच यायचे. त्यांचा अनुभव आणि अभिनय लक्षात घेऊन मुंबईच्या काही व्यावसायिक नाट्यसंस्थांनी त्यांना निमंत्रित केले. काही वर्षे विविध नाटकांत उल्लेखनीय भूमिका केल्या. त्यांच्यापासून अनेक नाट्य कलावंतांनी प्रेरणा घेऊन नाट्यसृष्टीत स्वतःच्या पाऊलवाटा निर्माण केल्या, रंगभूमीवर वज्रखुणा उमटविल्या.

'रसबहार' च्या निमित्ताने लातूरमध्ये गुणी कलाकारांचा व रसिकांचा एक चांगला ग्रुप निर्माण झाला. क.हे.पुरोहित, रविंद्र गोवंडे, मदन व मंजिरी चंद्रात्रे, राजकुमार पोतदार, अनिरूध्द जंगापल्ले, राजपाल बादाडे, बन्सी सूर्यवंशी, लता पत्की, मोहना महाळंग्रेकर, रेवण शाबादे, सिध्देश्वर बिराजदार, रमाकांत पाटील, दिपक निलंगेकर, शालिनी दळवी, सुधनवा पत्की यांच्यासोबतच अनेक नवोदित कलाकार रसबहारशी जोडले गेले. हरिभाऊ

औरादकर (प्रकाशयोजना), पंडितराव सोनवणे (ध्वनी) व दिलीप सौताडेकर (नेपथ्य) ही मंडळीही 'रसबहार' च्या यशाची भागीदार आहेत. याच काळात गोडमगुंडे यांनी चंदेरी दुनियेत प्रवेश करून 'झटपट करू दे खटपट' हा चित्रपट काढला व संपूर्ण महाराष्ट्रात धमाल उडवून दिली. कल्पक दिग्दर्शक, लेखक आणि अभिनेता या तिन्ही भूमिका त्यांनी यशस्वीपणे वठविल्या. 'राजा शिवछत्रपती' या गाजलेल्या मराठी चित्रपटातील राजा शिवाजीची भूमिका करणारे श्रीराम गोजमगुंडे हे सिनेसृष्टीतील एक मान्यवर निर्माते आणि दिग्दर्शक म्हणून ओळखले जातात.

लातूरच्या कलोपासक, रसबहार व नवयुवक नाट्य मंडळांच्या नाट्यकर्मींचा महाराष्ट्रात चांगलाच दबदबा होता. राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत एकावर्षी तर प्रथम, द्वितीय व तृतीय अशा तिन्ही क्रमांकाची पारितोषिके लातूरच्या नाटकांना लाभली होती हा इथला गौरवशाली इतिहास आहे. आजही लातूरची नाट्यचळवळ जोमाने सुरू आहे, ज्यात नव्या दमाचे रंगकर्मी बालकृष्ण धायगुडे, त्र्यंबक खानापुरे, संजय आयाचित सारखे अनेक गुणी कलावंत आघाडीवर आहेत.

यानंतर या क्षेत्रात काहीशी डोकावलेली मरगळ बाळकृष्ण धायगुडे, शैलेश गोजमगुंडे, प्रभृतींनी अथक परिश्रमाद्वारे दूर करून पूर्वीचा लौकिक मिळविण्याचा सार्थ प्रयत्न केला. यापैकी बाळकृष्ण धायगुडे हे लातूरच्या नाट्यक्षेत्रात आवर्जून घेतले जाणारे नाव होय. लातूरमधील कामगार क्षेत्रातील आणि वंचित व उपेक्षित वर्गातील कलावंतांना प्रकाशात आणण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. 'निर्मिती' (१९८५) या आपल्या संस्थेमार्फत त्यांनी 'श्रमसाफल्य मंडळा' तील त्यांच्या तरूण साथीदारांच्या सहकार्याने अनेक नाटके सादर केली. त्यात 'ऐंशी कोटी किडे', 'लाल मुंग्या चावत नसतात', 'माकडीन', 'अथ मनुष्य जगन हं', 'मा अस् साबरीन', 'हनम्याची मरीआई ' 'काळोख देत हुंकार', 'पोस्टर', 'तनमाजोरी', 'भाकवान', 'रातराणी', 'गांधी कधी येणार', 'पाचामुखी', 'पुन्हा पुन्हा मोहोंजोदारो' इत्यादी एकांकिका व नाटके सादर करून रसिकांची वाहवा मिळविली. यातील बहुसंख्य नाटके उपेक्षित, शोषित व ग्रामीण माणसांच्या प्रश्नांवर भाष्य करणारी आहेत. संस्थेची अनेक नाटके कामगार स्पर्धेत सादर होऊन त्यांना भरघोष बक्षिसेही मिळाली आहेत. नाटकांच्या दिग्दर्शनाची जबाबदारी मुख्यत: श्री. बाळकृष्ण धायगुडे यांनीच सांभाळली. या संस्थेमुळे सुनिल कुलकर्णी, खाजाबानू बुऱ्हाण, शोभा घोडके, ज्योती दरकले, बाळकृष्ण धायगुडे, मोहन माने, विठ्ठल बेवनाळे, अजय बेलूरकर, प्रमोद चौधरी, एजाज शेख, कल्याण वाघमारे, प्रशांत अग्रोया, सुभाष भिंगे, नागसेन गायकवाड, राजकुमार पोतदार, संतोष चरके, भारत थोरात, स्मिता कुलकर्णी इत्यादी कलावंत प्रकाशात आले.

श्री. बाळकृष्ण धायगुडे व प्रशांत अग्रोया यांना अनुक्रमे 'पोस्टर' व 'रातराणी' या नाटकांसाठी अभिनयाचे रौप्यपदक मिळाले. सामाजिक प्रश्नांविषयी जनजागृती करण्यासाठी पथनाट्याचा वापर लातूरमध्ये 'निर्मिती' या संस्थेनेच प्रथम केला. त्यासाठी स्वत: धायगुडे यांनी पथनाट्ये लिहिली. बाबरी मशीद विध्वंस प्रकरणानंतर त्यांनी लिहिलेल्या 'एक जातं असतं' या पथनाट्याचे अनेक प्रयोग झाले. 'एका लाकूडतोड्याची कथा' हे नाटकही त्यांनी लिहिले. त्यांनी अनेक एकांकिकाही लिहिल्या असून त्या लातूरमध्ये व अन्यत्र सादर केलेल्या आहेत.

अनुक्रमणिका

कै. मंगेश होळीकर यांनी सादर केलेली 'पाईपलाईन' ही एकांकिका खूप गाजली. लातूरमधील अनेक गुणी कलाकारांना घडविण्याचे श्रेय होळीकरांकडे जाते. खाजाबानू बुऱ्हान यांनाही 'भाकवान' या नाटकातील भूमिकेबद्दल कामगार कल्याणमध्ये रौप्य, तर वीज मंडळात प्रथम पारितोषिक मिळाले.

शैलेश गोजमगुंडे लिखित-दिग्दर्शित 'उरूस' या एकांकिकेस बंगलोरच्या अखिल भारतीय एकांकिका स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले. अभिनय व दिग्दर्शनाचे पारितोषिकही या एकांकिकेने पटकावले. 'झी मराठी' आयोजित अंतिम नाट्य स्पर्धेतही या एकांकिकेने दुसरा क्रमांक पटकावून उत्कृष्ट अभिनयाचे पदकही पटकाविले. शैलेश यांचे दुसरे नाटक 'जस्ट फॉर फन' विभागीय नाट्य स्पर्धेत केंद्रात पहिले आले.

'रंगवेध' (१९९६) या संजय आयाचित यांच्या मंडळानेही लातूरच्या सांस्कृतिक पटलावर आपली छाप उमटविली आहे. 'प्रदक्षिणा', 'उंबरठा', 'प्रेम कहाणी', 'बाकी इतिहास' 'असंच आणि इतकंच', 'अज्ञाताचा प्रवास', 'वटवट सावित्री' ही त्यांनी सादर केलेली नाटके फार गाजली. प्रादेशिक नाट्यस्पर्धेत त्यांच्या 'असंच आणि इतकंच', 'बाकी इतिहास' या नाटकांसाठी सुनिता कुलकर्णी यांना अभिनयाचे रौप्य पदक, तर त्र्यंबक खानापुरे व गीता देशमुख यांना प्रशस्तिपत्रे मिळाली.

'रंगवेध' ने नाट्य महोत्सव, नाट्य प्रशिक्षण शिबीर, व्यक्तिमत्त्व विकास शिबीर असे उपक्रमही राबविले आहेत. सुचेता वाघमारे, उषा पिंपळे, अर्चना कुंटे, राजा सांगवीकर, महात्मा मोरे, मनोज महाजन, अजय बेलूरकर, सुधीर राजहंस या रंगवेधशी संबंधित कलाकारांचा येथे आवर्जून उल्लेख करावा लागेल.

लातूर येथील बंकट छगनराव पुरी हे नाट्यकलावंत म्हणून उदयास येत आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, महिला नाट्य महोत्सव, बालनाट्य स्पर्धा, साहित्य आराधना मंडळ, उमरगा वगैरे संस्थांच्या स्पर्धांमध्ये त्यांनी लिहिलेल्या व दिग्दर्शित केलेल्या नाटकांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. पथनाट्य स्पर्धेतही त्यांनी पारितोषिके मिळविलेली आहेत. याव्दारे त्यांचे जनजागृतीचे प्रयत्न सतत सुरू असतात. ८० व ८६ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनात त्यांनी 'राज्याभिषेक होतोय मराठीचा' या नाट्याचे सादरीकरण केले होते. हिंदी चित्रपट निर्मिती करण्याचाही त्यांचा प्रयत्न आहे. प्रसंगानुरूप ते हस्ताक्षर, चित्रकला, खेळ, एकपात्री प्रयोग, कथाकथन वगैरे विविध स्पर्धांचे आयोजन करीत असतात. जिल्ह्यातील विविध सेवाभावी संस्था व संघटनांचे पदाधिकारी असलेल्या श्री. पुरी यांना अपंग, हुंडाबळी, एडस्, व्यसनमुक्ती, साक्षरता, अंधश्रद्धा निर्मुलन वगैरे अनेक क्षेत्रातील कामाबद्दल महाराष्ट्र शासनाचा १९९६ चा 'गुणवंत कामगार पुरस्कार' राज्यपालांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता.

लातूरचे डॉ. संजय जमदाडे हे नाट्य व चित्रपट कलावंत आहेत. त्यांनी अनेक राज्यस्तरीय नाटकांमध्ये भूमिका केलेल्या आहेत. शिवाय अनेक जाहिरातपट व 'झटपट करू दे खटपट', 'हळद रूसली कुंकू हसलं', 'ओटी ही खणानारळाची' वगैरे चित्रपटांमध्ये भूमिका साकारलेल्या आहेत. हिंदी चित्रपट निर्मिती करण्याचाही त्यांना प्रयत्न आहे. 'स्वागतम् १९९६' या व्हि.डी.ओ. फिल्मची निर्मिती करून त्यांनी अनेक नवोदित कलावंताना व्यासपीठ निर्माण करून दिले. विविध सामाजिक कार्यातही ते सहभागी असतात.

अनुक्रमणिका

विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या वतीने लातूर येथे पु. ल. देशपांडे नाट्यस्पर्धा दरवर्षी घेतली जाते. अलीकडेच सुरू झालेल्या या उपक्रमाला चांगले यश मिळत आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून दर्जेदार नाटकांचे देखणे प्रयोग येथे होतात. फाऊंडेशनने यशस्वी नाटकांना भरघोष बक्षीसे देण्याची परंपराही सुरू केली आहे. अमित देशमुख यांचे प्रोत्साहन आणि चंद्रशेखर दंडिमे, बाळकृष्ण धायगुडे यांचे विशेष परिश्रम यामागे आहेत.

लातूरच्या नाट्यचळवळीतून श्रीमती रजनी मुथा, जयंत दिवाण आणि विजय दिवाण हे कलावंत निर्माण झाले. नाटक, सिनेमा आणि दूरदर्शन मालिका या माध्यमांतून ते नाट्यसेवा करतात.

याशिवाय अशोक व नंदकुमार कुलकर्णी बंधू, कल्याण वाघमारे, नागसेन कामेगावकर, किरण माने, पवन माने, योगेश पुणेकर, शशिकांत डोंगरे हेही आपल्या परीने नाट्य व एकांकिका सादर करण्यास प्रयत्नशील असतात. 'कलारंग' हे मंडळही नाट्यक्षेत्रात कार्यरत आहे. चंद्रकला भार्गव आणि मोहन माने यांनी पथनाट्य हा प्रकार यशस्वीपणे हाताळला आहे. भार्गव यांचे 'मुलगी झाली हो' आणि माने यांनी सादर केलेले बाळकृष्ण धायगुडे लिखित-दिग्दर्शित 'एक जातं असतं' ही पथनाट्ये गाजली. कामगार कल्याण केंद्राच्या तसेच महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या नाट्य व एकांकिका स्पर्धांमध्ये लातूरकरांनी बराच काळ वर्चस्व गाजविले होते. यात व्यंकट यादव यांचा प्रयत्नाचा खास उल्लेख करावा लागेल. त्यांनी आक्रोश, बाजार, तनमाजोरी, भाकवान या नाटकांचे प्रयोग केले. त्यांच्या गटामध्ये विट्ठल बेवनाळे, संजय निरगुडे, मल्लिनाथ शाबादे, शिवराज निला, दिनकर कुलकर्णी, गुणवंत कुलकर्णी यांचा समावेश आहे. विद्यापीठातर्फे होणाऱ्या युवक महोत्सवात तर लातूरकरांची नेहमीच आघाडी राहिली आहे.

लातूर जिल्ह्यात उदगीर शहर हे सांस्कृतिकदृष्ट्या एक संपन्न शहर आहे. येथे संगीत, नाटक, साहित्य या क्षेत्रात सातत्याने घडामोडी घडत असतात. उदयगिरी महाविद्यालयाच्या स्थापनेनंतर प्राचार्य ना.य.डोळे आणि अन्य नामवंत विचारवंत व शिक्षणतज्ञ यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक घडामोडींना चांगलाच वेग आला. याच महाविद्यालयातील प्रा. चंद्रकांत भालेराव यांनी नाट्य चळवळीला प्रारंभ केला. त्यांनी पु. ल. देशपांडे यांचे 'अंमलदार' हे नाटक सादर केले. सन १९६२ ते १९६४ या कालावधीत त्यांनी नाट्य चळवळ रूजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यासोबत सौ.कमल भालेराव, रमाकांत बनशेळवीकर व इतर कलावंत सहभागी होते; पण प्रा. भालेराव उदगीर सोडून गेल्याने या नाट्य चळवळीत काहीसा खंड पडला.

१९७४ साली उदगीरला 'कामगार कल्याण केंद्राची' स्थापना झाली. या केंद्राचे व्यवस्थापक राजेंद्र जाधव यांनी प्रा. मनोहर हिबारे आणि प्रभाकर निलेगावकर यांच्यासह कामगार कल्याण स्पर्धेसाठी 'हॅलो, मी बोलतोय' आणि 'थुग्गरा' ही नाटके सादर केली. परभणी येथे झालेल्या नाट्यस्पर्धेत प्रा. हिबारे यांना अभिनयाचे पारितोषिक मिळाले. या कामी अशोक पुढाले, उदय जोशी आणि अजित चव्हाण यांचे सहकार्य होते. त्यानंतर काही वर्षांनी प्रा. बा. वि. पोतदार यांनी प्रा. मनोहर हिबारे, प्रभाकर निलेगावकर, दिलीप महालिंगे, इकबाल, अजित चव्हाण, मधुसूदन कोटलवार व कुमारी बिरादार यांच्यासह औरंगाबाद येथे कामगार

कल्याण केंद्राच्या नाट्यस्पर्धेत सादर केलेल्या 'बेईमान' या नाटकास एकूण पाच पारितोषिके मिळाली. याच गटाने सौ. सुनंदा गचके यांच्यासह परभणी येथे १९८० साली झालेल्या कामगार कल्याण स्पर्धेसाठी 'गाठ माझ्याशी आहे' हे राजकीय ढंगाचे नाटक सादर केले. नंतर वरील मंडळींनी पुढाकार घेऊन 'कलावैभव' या संस्थेची स्थापना केली. त्यात प्रा. रा. वा. गचके यांचाही सहभाग होता. या संस्थेतर्फे 'तुझं आहे तुजंपाशी' हे पु. ल. देशपांडे यांचे नाटक स्पर्धेत सादर करण्यात आले, तर औरंगाबाद येथील स्पर्धेसाठी 'बेईमान' हे वसंत कानेटकरांचे नाटक सादर करण्यात आले. प्रा. रा. वा. गचके यांनी त्यात एक भूमिका केली होती. सोलापूर स्पर्धेसाठीही संस्थेने 'गगनभेदी' हे नाटक सादर केले होते. कलावैभव संस्थेतर्फे उदगीरमध्ये संगीताचे व नाटकांचे कार्यक्रम अद्यापही सादर केले जातात.

उदगीर येथील श्री. प्रभाकर निलेगावकर यांनी स्वलिखित व स्वदिग्दर्शित 'अस्सल माणसे इरसाल नमुने' या एकपात्री प्रयोगाचे महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा प्रांतात ६०० पेक्षा जास्त प्रयोग केले आहेत. यात त्यांनी ४८ प्रकारच्या भूमिका केल्या आहेत. त्यांचे प्रयोग अजुनही चालूच असतात. 'इथे ओशाळला मृत्यू' या नाटकातील त्यांनी औरंगजेबाची भूमिका गाजविली होती. डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी नाट्यशास्त्राची एम.ए. पदवी प्राप्त केली आहे. त्यांना अनेक बक्षीसेही मिळालेली आहेत. प्रा. हिबारे, प्रा. पोतदार, श्री. बसवराज पाटील, नागराळकर इत्यादींनीही अनेक नाटके बसविली.

परंपरेने सुरू असलेल्या सांप्रदायिक रूढी व प्रथा यांनी आजच्या प्रायोगिक आणि व्यावसायिक नाट्य व संगीत चळवळीला प्रेरणा दिली आहे. रेणापूर तालुक्यातील खरोळा येथे असलेली नाट्यपरंपरा शतकापेक्षा जुनी आहे. सुरुवातीस सदानंद महाराज यांनी येथील दत्तमंदिर-उत्सव प्रसंगी 'लळित नाट्य' सादर केले. सदानंद महाराजांनंतर परमानंद, सहजानंद, पूर्णानंद महाराजांनी ही लळित नाट्य परंपरा पुढे सुरू ठेवली. दत्तमंदिराच्या भव्य प्रांगणात रंगमंच उभारून कार्यक्रम साजरे केले जात. कालानुरूप येथील नाटकांमध्ये रंग, वेश, केशभूषा, संवाद, संगीत, पडदे यांचा उपयोग होत गेला. इ.स. १९५२ नंतर ध्वनिक्षेपकाचा वापरही होऊ लागला. रूक्मिणी-स्वयंवर, संत कान्होपात्रा, गोकुळचा चोर, संशय-कल्लोळ, संगीत मानापमान, एकच प्याला, नेकजात मराठा, शहा शिवाजी, द्रौपदी वस्त्रहरण, जयजय गौरीशंकर इत्यादी पारंपरिक नाटके येथे सादर केली गेली होती. या उपक्रमात शेषाचार्य पुराणिक, श्यामदेव जोशी, आप्पाराव कुलकर्णी, बबन पसारकर, पं. देवजोशी, कृष्णाचार्य आनंद गोसावी इत्यादी जुन्या पिढीतील कलाकारांनी आज नाट्य चळवळ जिवंत ठेवण्यास मदत केली आहे. याकामी मार्गदर्शक म्हणून वसंत पुराणिक, अच्युतराव देशपांडे, गणेश भूतडा, शंकराप्पा धमगुंडे, पांडुरंग तोष्णीवाल, देवीदास घुंगर्डे, रामनाथ राठी, पितांबरराव ठाकूर, किशन देव, देवीदास कुलकर्णी, विठ्ठलाचार्य आनंदगोसावी, नारायण कपाळे, शिवदासप्पा मोतंफळे यांचे मौलिक योगदान आहे. शंकराप्पा धमगुडे यांनी पाच दशकांपेक्षा अधिक काळ नेपथ्यकार म्हणून धुरा सांभाळली. संगीत नाटकांच्या कामी नरहर बुवा, गणदेव जोशी, दिगंबर कुलकर्णी, वसंत पुराणिक, ज्ञानोबा गोंदरकर, सोमनाथ दवणे, अंगद पांचाळ, किशन देव, किशन कागले, दत्ता कागले इत्यादिंचे महत्त्वाचे सहाय्य झाले आहे. शंकराप्पा धमगुंडे यांच्याकडे हस्तलिखीत आणि मुद्रित स्वरूपात नाटकांच्या संहिता संग्रहित आहेत. लातूर येथील चंद्रकला भार्गव यांच्या ग्रुपने 'मुलगी झाली हो' या एकपात्री नाटकाचे अनेक प्रयोग केलेले आहेत.

अनुक्रमणिका

खरोळा येथे नाट्यमंडळ व नाट्यकलाकारही आहेत. तथापि, शतकोत्तर परंपरा असूनही या कलाकारांमध्ये व्यावसायिकपणा न भिनता केवळ प्रबोधन, मनोरंजन आणि आत्मिक समाधान याच उद्देशाने येथे नाटके सादर केली जातात. महापूर या गावीही लहान-मोठे नाट्यप्रयोग होतात.

चित्रपट

नाट्यक्षेत्राप्रमाणे चित्रपट क्षेत्रातही मराठवाड्यात लातूरनेच पहिले पाऊल उचलले. यातही श्रीराम गोजमगुंडे यांचेच नाव अग्रस्थानी आहे. त्यांनी नाटकांप्रमाणेच चंदेरी दुनियेत प्रवेश करून लातूरचा लौकिक सर्वदूर नेला. कल्पक दिग्दर्शक, लेखक आणि प्रथितयश अभिनेता या तीनही भूमिका त्यांनी यशस्वीपणे वठविल्या. 'राजा शिवछत्रपती' या गाजलेल्या मराठी चित्रपटातील राजा शिवाजीची भूमिका करणारे श्रीराम गोजमगुंडे हे सिनेसृष्टीतील एक मान्यवर निर्माता-दिग्दर्शक व अभिनेते म्हणून ओळखले जातात. साधारणतः रसबहार नाट्य संस्थेच्या स्थापनेदरम्यानच (१९६९) गोजमगुंडे यांनी 'झटपट करू दे खटपट' हा चित्रपट काढून महाराष्ट्रात धमाल उडवून दिली. त्यानंतर 'गड जेजुरी जेजुरी', 'निखारे', 'आपलेच दात आपलेच ओठ', 'सुळावरची पोळी', 'झाकोळ', 'पिंजरा प्रितीचा' वगैरे मराठी चित्रपटांत महत्त्वाच्या भूमिका करून व 'पारध', 'या सुखांनो या', 'झटपट करू दे खटपट' या चित्रपटांचे दिग्दर्शन करून मराठी सिने जगतात आपला ठसा उमटविला आहे. त्याशिवाय 'बंदिनी' व 'तिसरा डोळा' अशा गाजलेल्या दूरदर्शन मालिकांमध्येही त्यांनी महत्त्वाच्या भूमिका केल्या आहेत. सध्या ते 'चलबिचल' नावाच्या चित्रपट निर्मितीत व्यग्र आहेत.

श्रीराम गोजमगुंडे नंतर उल्लेख करावा असे दुसरे नाव म्हणजे भालचंद्र गोजमगुंडे. त्यांचा 'थैमान' चित्रपट तसेच श्री. शिवणगे यांच्या 'हळद रुसली कुंकू हसलं' आणि प्रशांत अग्रोया यांच्या 'श्रद्धा' या दूरदर्शन मालिकेतील भूमिकेने लातूरकरांची मान उंचावली गेली.

चित्रपट क्षेत्रात लातूर जिल्ह्याचा ठसा देशपातळीवर उमटविण्याचे श्रेय श्री. रितेश विलासराव देशमुख यांना द्यावे लागते. मागील तीन-चार वर्षांमध्ये त्यांनी फिल्म इंडस्ट्रीमध्ये आपला उत्तम जम बसविला आहे. तीन तास धमाल मनोरंजन करणारा अभिनेता ही त्यांची नवी ओळख आहे. पाचगणी, पुणे आणि मुंबई येथील शिक्षणानंतर अमेरिकेत शिकत असतांना त्यांनी अभिनयाचे शिक्षण घेतले. हैद्राबादचे प्रसिद्ध चित्रपट निर्माते रामोजी राव यांच्या 'तुझे मेरी कसम' या हिंदी चित्रपटात त्यांना काम करण्याची प्रथम संधी मिळाली. त्यानंतर 'क्या कूल है हम', 'मालामाल विकली', 'मस्ती', 'ब्लफ मास्टर' हे त्यांचे त्यानंतर प्रदर्शित झालेले हिंदी चित्रपट होत. त्यानंतर अलिकडेच प्रसिद्ध हिंदी अभिनेता अमिताभ बच्चन यांच्याबरोबर 'डरना जरुरी है' या चित्रपटात काम करून त्यांनी अभिनयातील एक विशिष्ट उंची गाठली आहे. सध्या ते याच क्षेत्रात व्यग्र आहेत.

अत्यंत अल्पवयात नाट्य व चित्रपट सृष्टीत स्वतःचा ठसा उमटविणाऱ्या कु.अर्चना पाईकराव या औराद शहाजानीच्या होत. नृत्य, नाट्य आणि रंगभूमी या तिन्ही क्षेत्रात राज्य व अखिल भारतीय पुरस्काराने त्या सन्मानित आहेत. अखिल भारतीय नृत्य स्पर्धेत रौप्य पदक व कर्नाटक राज्य खुल्या नृत्य स्पर्धेत त्यांनी सुवर्ण पदक पटकविले आहे. दिल्ली येथे संपन्न झालेल्या भारतीय बाल कल्याण परिषदेसाठी त्यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले होते.

'रंगारंग-९६' व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृति प्रीत्यर्थ नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ युथ वेलफेअर, भुसावळ द्वारा आयोजित 'सोलोडान्स' नृत्य स्पर्धेतही त्यांनी प्रथम क्रमांक मिळविला होता. दिल्ली दूरदर्शनवरून प्रसारित होत असलेल्या 'स्वाभिमान' या हिंदी मालिकेमध्ये, 'मरणयातना' या टेलिफिल्ममध्ये आणि 'हुलकावणी' व 'बायको नवऱ्याची माय' या दोन व्यावसायिक नाटकांत त्यांनी प्रमुख भूमिका साकारलेल्या आहेत. प्रथितयश अभिनेत्री होण्याचे स्वप्न बाळगलेल्या अर्चना पाईकराव यांना अल्प वयातच अभिनयाची जाण आहे, शिवाय त्या उत्कृष्ट नृत्यांगना असून चित्रकलेतही त्यांना उत्तम गती आहे.

श्री. अजित शिरोळे हेही चित्रपटक्षेत्रात व्यग्र आहेत. त्यांनी एकमेका साह्य करू, लग्नाचे करू नका विघ्न, थरकाप, संघर्ष वगैरेंसारख्या अनेक लघुपटांचे लेखन व दिग्दर्शन केलेले आहे. अलिकडेच त्यांनी 'सासरची का माहेरची' हा मराठी चित्रपट दिग्दर्शित केला आहे.

मराठवाड्यात सर्वात आधी लातूरकरांना फिल्म सोसायटीच्या माध्यमातून कलात्मक चित्रपट पाहावयास मिळाले. एकेकाळी 'संवाद फिल्म सोसायटी' ने सत्यजित रे, मृणाल सेन यांचे चित्रपट तसेच इतर कलात्मक चित्रपट लातूरकरांना दाखविले. अतुल देऊळगावकर, प्रदीप कुळकर्णी, धनंजय कुळकर्णी आणि सहकाऱ्यांनी 'संवाद फिल्म सोसायटी' लातूरकरांमध्ये रुजविली. आता 'अभिजात फिल्म सोसायटी' लातूरकरांचे लक्ष वेधून घेत आहे. या संस्थेने 'चिल्ड्रेन ऑफ हेवन', 'पोस्टमन इन द माऊंटन' सारखे अनेक कलात्मक चित्रपट दाखविले. सद्या अमोल गोवंडे, शाम जैन, जितेंद्र पाटील ही मंडळी अभिजातला सामान्य माणसापर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. बंकट पुरी, डॉ. संजय जमदाडे वगैरेंसारखे अनेक कलावंतही या क्षेत्रात आता पाय रोवीत आहेत.

शिल्पकला व चित्रकला[३०]

अजिंठा आणि वेरूळ या जगप्रसिद्ध लेण्यांनी मराठवाड्याला कलेच्या क्षेत्रात संपन्न व समृद्ध केले आहे. या लेण्यांशिवाय पितळखोरा, धाराशिव, खरोसा येथील लेण्यातील शिल्पकला अत्यंत रेखीव आहे. प्रामुख्याने मराठवाड्यात फार मोठ्या संख्येत प्राचीन मंदिरे असून त्यावरील शिल्पकला ही अत्यंत देखणी आहे. काही मंदिरांच्या मंडोवरावर व जंघा भागावर हिंदू देवदेवतांच्या प्रतिमा कोरल्या आहेत. या देव प्रतिमा व गुहा मंदिरातील देव प्रतिमा यांच्यातील शैलीत काही प्रमाणात साम्य, तर काही प्रमाणात वेगळेपणही जाणवते. यासाठी निलंगा येथील मंदिराचा व त्यातील प्रचूर शिल्पांचा तसेच कवठापाटी येथील सूर्यप्रतिमेचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल.

लातूर उस्मानाबाद जिल्ह्याच्या सीमेवर तांदूळजा या गावी सरदार नाईक-बावने यांची भव्य गढी आहे. या गढीच्या वारसांकडे बराच मोठा चित्रसंग्रह उपलब्ध झाला आहे.

३०. मंगनाळे, महारूद्र (संपा.), **बातमीमागची बातमी,** चित्रकला विशेषांक, मुक्तरंग प्रकाशन, लातूर, २००१; **लेणी,** स्मरणिका, २७ वे मराठवाडा साहित्य संमेलन, जालना, जानेवारी २००६, मराठवाडा साहित्य परिषद व मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना; प्रा.पंडितराव देशमुख, 'मराठवाड्यातील चित्रकलेची पदचिन्हे', **दिंडी,** स्मरणिका, पूर्वोक्त, पृ.९३-१०३ यातील माहिती व मान्यवरांच्या मुलाखतीवर आधारित. शिल्पकलेसंबंधी अधिक माहिती याच ग्रंथातील **प्रेक्षणीय स्थळे** या प्रकरणात दिलेली आहे.

हे नाईक-बावने घराणे कला व काव्यगुणसंपन्न होते असे जाणवते. त्यापैकी काहींच्या नावावर काही काव्यरचनाही आहेत. श्री. जानोजीराव नाईक-बावने यांनी हा संपूर्ण चित्रसंग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ऐतिहासिक वस्तु संग्रहालयास सानुग्रह भेट दिला आहे. डॉ. सतिश देशमुख यांच्या संपादनाखाली विद्यापीठाने तो १९८४ मध्ये प्रकाशित केला. त्यात कांग्रा, मुघल, रजपुत आणि दख्खनी शैलीतील २९ लघुचित्रे आहेत. त्यातील ३ चित्रे मुघल शैलीतील, ३ रजपूत शैलीतील आणि २ कांग्रा शैलीतील आहेत. उर्वरित दख्खन शैलीची आहेत.

येथील लघुचित्रांमध्ये व्यंकटराव नाईक-बावने यांचे अश्वारूढ चित्र, जगजीवनराव नाईक-बावने यांचे बैठकीवर बसलेले चित्र, कृष्णराव निंबाळकरांचे चित्र, नवाब दाऊदखानाचा लढाई प्रसंग, राधाकृष्ण इत्यादी चित्रे अत्यंत विलोभनीय आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठवाड्याच्या कलाभिसरणात कला महाविद्यालयांनी निर्णायक भूमिका बजाविली. औरंगाबाद येथे मराठवाड्यातील पहिले कला महाविद्यालय म्हणून 'नूतन कला मंदिर' (सद्याचे यशवंत चित्रकला महाविद्यालय) सुरू झाले. त्यानंतर नांदेड येथे वसेकरांनी चित्रकला महाविद्यालय सुरू केले. त्यानंतर बीड येथे पी. के. चोले यांनी व्यंकटस्वामी शिक्षण संस्थेच्या सहकार्याने कैलास कलानिकेतन व त्यानंतर दोन वर्षातच याच संस्थेने लातूर येथे चित्रकला महाविद्यालय सुरू केले. तेथे पी. के. चोले आणि प्रा. तानाजी चव्हाण यांनी अत्यंत जोमदारपणे कामास सुरुवात केली. तुकाराम कुलकर्णी यांनीही या चित्रकला महाविद्यालयात कामास सुरुवात केली.

१९७३ साली स्थापन झालेल्या लातूरच्या चित्रकला महाविद्यालयाने केवळ मराठवाड्यातीलच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील कलेवर आपला ठसा उमटविला आहे. चोले व चव्हाण या द्वयींच्या पारदर्शक प्रवाही तंत्राने रसिकांना मोहिनी घातली. प्रवाही जलरंगांवर हुकूमत मिळवित त्यांनी निसर्गचित्रणात अनेक प्रयोग केले. चोले यांनी इथला उन्हाळा, प्रकाशाची तीव्रता आणि सावल्या आपल्या चित्रणात अचूक पकडल्या.

चित्रकलेच्या क्षेत्रात जुन्या काळातील कलावंत कै. वारे गुरूजी यांच्या जादूने अनेकांना चित्रकलेचे वेड लावले होते. लातूरमध्ये आर्ट गॅलरीचा अभाव असला, तरी साहित्य संमेलनांच्या निमित्ताने भरणारी चित्र प्रदर्शने व अन्य माध्यमे याद्वारे लातूर जिल्ह्यातील कलावंतांची चित्रे लातूरच्या कलाप्रेमी रसिकांपर्यंत पोहोचतात. आपल्या चित्रांनी व फोटोग्राफीने सर्व लातूरकरांवर ज्यांनी विशेष छाप पाडली, त्या लहरीकांत शहा यांचा उल्लेख येथे करावाच लागतो. तसेच पंडितराव देशमुख, परशुराम चोले, शशिकांत डोंगरे, अनिल जोशी, तुकाराम कुलकर्णी, ताराचंद निकम, सुरेंद्र जगताप, दत्ता बनसोडे, प्रशांत साळुंके, तानाजी चव्हाण, बाबुराव कोळे, राजकुमार बनाळे, बालाजी चव्हाण, शिल्पकार अंकुश डोंगे, ग्राफीक्सच्या क्षेत्रातील कीर्ती गोरखे या सर्वांनी कलेच्या क्षेत्रातील आपला लौकिक राखला आहे.

लातूरच्या 'हॅाटेल पंचवटी' आणि 'हॅाटेल चाणक्य' यातील लक्षवेधक शिल्पे साकारणारे अंकुश डोंगे यांनी लातूरच्या शिल्पकला क्षेत्रात स्वतःचे स्थान निश्चित केलेले आहे. लातूरच्या चित्रकला महाविद्यालयातील पदवी प्राप्तीनंतर त्यांनी मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मधून शिल्पकलेची पदवी मिळविली. सुप्रसिध्द शिल्पकर्ता पिलो पोचखानवाला,

शिल्पकार बी. विठ्ठल, शिल्पकार खानविलकर, शिल्पकार पाटकर, चित्रकर्ता बी. प्रभा व अडिवरेकर या दिग्गजांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना काम करावयास मिळाले. १९८५ मध्ये त्यांच्या शिल्पांचे मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत शिल्प प्रदर्शन भरले होते. लोकमनावर भारतीय शिल्प कलेचा असणारा प्रचंड प्रभाव, भारतीय शिल्प कलेतील दैनंदिन जीवनाचे दर्शन व विविध भाव-भावनांचे उत्कट शिल्पांकन यांचा नकळत मनावर होत असलेला परिणाम डोंगे यांच्या शिल्पांवर झालेला दिसून येतो. विविध खेळ, स्त्री-पुरूषांची दैनंदिन कामे, पाठीशी मूल बांधून नदीवर कपडे धुण्यास जाणारी स्त्री, लाकडे गोळा करणारी स्त्री, ढोल वाजविणारा पुरूष, गाडी ओढणारा हमाल, विविध देवता मूर्ती, विविध प्राणी मूर्ती वगैरे मानवाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असणारे विषय, सर्व कलात्मक मूल्ये व संकेत सांभाळून त्यांनी साकारले आहेत. आतापर्यंत त्यांनी हॉटेल पंचवटी व हॉटेल चाणक्यखेरीज अनेकविध हॉटेल्स, व्यापारी संकुले, घरे, ऑफिसेसमध्ये भारतीय शिल्पकलेच्या प्रभावाखाली शिल्प निर्मिती केली आहे.

चित्रकार सुरेश उबाळे यांचीही चित्रकारासोबत शिल्पकार म्हणून नोंद करावी लागते. हे कलाशिक्षक असून त्यांनी शिल्पकलेमध्ये आपले प्राविण्य सिध्द केलेले आहे. शिल्पकलेचा कलावंत म्हणून लातूर मधील हॉटेल प्रीतममधील १८ × ४ फूट आकाराचे 'बाजीराव मस्तानी' हे उठावशिल्प त्यांनीच साकारलेले आहे. बार्शीहून लातूरमध्ये प्रवेशतांना विमानतळाच्या प्रवेशदारी मांजरा हनुमान रस्त्यावर उभारण्यात आलेल्या वायुदूत शिल्पाने लातूरकरांना अनेक वेळा मोहविले असेल. येथूनच अनेक म्युरल्स, कॅनवास पेंटिंग, स्टेज डेकोरेशन, इंटिरिअर डेकोरेशन, उठावशिल्प व सर्वतोरचित शिल्पांचे काम करण्याचा त्यांचा प्रवास सुरू झाला. आतापर्यंत त्यांनी लातूरशिवाय औरंगाबाद, नांदेड, रायचूर, म्हैसूर अशा शहरांमध्ये उल्लेखनीय शिल्पे साकारलेली आहेत. त्यांनी रायचूर येथे एका कलासंग्राहकाच्या बंगल्यात साकारलेले गरूड शिल्प व लातूरच्या जनता बँकेच्या मुख्य शाखेत साकारलेले डॉ. हेडगेवार यांचे अर्ध व्यक्तिशिल्प ही खास गौरविली गेलेली शिल्पे आहेत. याशिवाय औरंगाबादच्या तापडिया नाट्यमंदिरावर ३५ फूट लांब व १२ फूट उंचीचे फायबर ग्लास माध्यमातील म्युरल 'कलेची उपासना' या विषयावर तयार केले आहे. त्याची औरंगाबादमध्ये आजही तारीफ होते. याच माध्यमातील संत ज्ञानेश्वरांचे ध्यानस्थ अवस्थेतील म्युरल त्यांनी लातूर-अंबाजोगाई रस्त्यावरील एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या उद्यानातील प्रार्थनास्थळावर उभारले आहे. तेही वाखाणले जाते.

प्राचार्य परशुराम कि. चोले हे उदगीर तालुक्यातील कोळनूर गावचे रहिवासी आहेत. लातूरच्या चित्रकला महाविद्यालयात ते प्राचार्य होते. घरातील सांप्रदायिक वातावरणामुळे लहानपणी ते भिंतीवर राम, लक्ष्मण, हनुमान यांची चित्रे शाई व गेरूने रेखाटीत. निसर्गचित्रण (लॅण्डस्केप), स्मरणचित्रे, रचनाचित्रे व कलेचा इतिहास याविषयाची त्यांना आवड आहे. या महाविद्यालयातून त्यानी नामवंत व कलेच्या प्रांतात नवी परंपरा निर्माण करणारे चित्रकार निर्माण केले. चोले यांच्या चिंतनगर्भ व आशयप्रधान चित्रांना नवनिर्मितीचा स्पर्श लाभलेला असतो. अनेक दृश्य अनुभवांवर आधारलेली बरीच निसर्गचित्रे त्यांनी जलरंगात साकारलेली आहेत. त्यांच्या चित्रांमध्ये ऊन, सावल्या व प्रकाश हे काळजीपूर्वक चितारल्यामुळे त्यांची

चित्रे अधिक जिवंत वाटतात. दूरचा भास, सलग असणारी झाडे यांची नाती त्यांनी अधिक नाजुकपणे हाताळलेली आहेत.

चित्रकला, फोटोग्राफी आणि डिझाईन मधील हरहुन्नरी कलाकार म्हणून लहरीकांत शहा यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. फार कमी रंगात न्हाणारा, परंतु चित्रकलेत आपले स्थान मजबूत केलेला असा हा चित्रकार आहे. गतिशील व नृत्यप्रधान घाटदार रेषा ही त्यांच्या चित्रांची पहिली ओळख. रेषांना प्रचंड गती, त्यातील झेपावण्याची धमक आणि वीर, पशुधन, बैल, घोडे यांच्यातील धावण्याचे बळ शहा यांच्या पुष्कळशा चित्रांतून जाणवत राहते. त्यांच्या चित्रांत सूर्य प्रतिमाही येतात. स्थिरतेपेक्षा वेगाला आणि रूध्दतेपेक्षा गतिशीलतेला आत्मभान देणाऱ्या रंगरेषा लहरीकांत शहा हे त्यांच्या चित्रांतून क्रांतिकारी पध्दतीने जिवंत करतात हे विशेष. बैल, घोडे यांच्या मुद्रा आभाळाकडे भिडवून त्यातून धमक आणि स्वाभिमान, कर्तृत्व आणि गती दृग्गोच्चर करणारी त्यांची चित्रे दर्शकाच्या नजरेलाही गतीप्रधान बनवितात. रंगांना कागदावर घोड्यांसारखे उधळून देणाऱ्या या चित्रकाराचे लातूरच्या कला क्षेत्रातील स्थान पक्के आहे. चित्रकलेसाठी व फोटोग्राफीसाठी ते आता कॅम्प्युटरचाही उपयोग करू लागले आहेत. लातूर जिल्हा कोर्टाच्या इमारतीवरील म्युरल हे शहा यांच्या कलेची झलक दाखविणारा एक नमुना आहे. तसेच हॉटेल पंचवटीमधील त्यांचे चित्रकाम लातूरकरांची मान उंचावणारे असेच आहे. या हॉटेलच्या हॉलच्या भिंतींवरील घोड्यांची चित्रे दर्शकाचे लक्ष वेधून घेतात. विशेष म्हणजे याकामासाठी ब्रश न वापरता रंगाच्या बशीत बोळा बुडवून त्यांनी चित्रे रंगविली आहेत. त्यांनी काढलेल्या स्केचेसची संख्या लाखात मोजावी लागेल. हजारो फोटोग्राफ, शेकडो पेंटिंग्ज, इंटिरिअर डेकोरेशनची कित्येक कामे तसेच चाणक्य, राऊ व ब्रिज हॉटेल्सचे इंटिरिअर डेकोरेशन त्यांनीच केले आहे. त्यांना छायाचित्रणासाठीची अनेक आंतरराष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत. अंतर्गत सजावट आणि मंचसज्जा या क्षेत्रात आज तरी ते मराठवाड्यात आघाडीवर आहेत. त्यांची वृत्तपत्रीय रेखाटने, अनेक झटपट कवींना चारोळ्या लिहिण्यास उद्युक्त करतात. त्यांनी अनेक नियतकालीके व पुस्तकांची वेष्टने आवर्जून बनविली आहेत.

मुरली लाहोटी व शंकर झुल्पे ही या कलाक्षेत्रातील काव्यात्मक आणि आत्मभान उन्नत करणारी ठळक अशी अन्य दोन नावे आहेत. समाज आणि संस्कृति, सृष्टी आणि निसर्ग, परंपरा आणि समूह यांना अप्रतिम बारकाव्यांसह त्यांनी आपल्या परिपूर्ण चित्रांमधून प्रकट केले आहे. रेखांकनावर लोकविलक्षण प्रभुत्व, आकार आणि व्यक्तिमत्त्व यांच्याविषयी भान, जाण, रंग भरण्याचे सफाईदार कलामूल्य, शिवाय निर्माणक्षम चित्रे काढताना कलावंताची म्हणून असणारी समरस वृत्ती यांचा स्पर्श लाहोटी किंवा झुल्पे यांच्या चित्रांमधून जाणवतोच जाणवतो. या उभय चित्रकारांचे कार्य विस्मरणात जमा होणार नाही एवढे अप्रतिम आहे.

लातूरच्या चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी चव्हाण हे चित्रकार आहेत. जलरंगातील निसर्ग चित्रकलेचा त्यांना छंद आहे. त्यांचे जलरंगतंत्र खूपच भिन्न आहे. मऊ, गोंडस जलरंगांची अतिशय धाडसी हाताळणी त्यांच्या जलरंगात जाणवते. कुंचल्याच्या अभिसाधन क्रियेतून त्यांनी निर्मिलेले निसर्गाचे अनन्यसाधारण आभास प्रेक्षणीय असतात. याशिवाय कॅनवासवरही ते तैलरंगात निसर्गचित्रे साकारतात. निसर्गातील चैतन्य, छायाप्रकाशामुळे

समोरच्या चित्राला लाभणारे परिमाण, चित्रदृष्यातील सौंदर्यवादी दृष्टीने चित्रणासाठी निवडलेला भाग, ताल, तोल, गती अशा सर्व बाजूंचे भान ठेवून निसर्गचित्रण करणारा हा एक सजग चित्रकार कलावंत म्हणून परिचित आहे. त्यांची निसर्गचित्रे चैतन्यस्पर्शी असतात. त्यांच्या चित्रांतील लांबची झाडे, घरे, डोंगर, दूरचे क्षितिज, तेथील निळसर धूसरता, निसर्गाचा विशालपणा, ढगांच्या हालचालींतून निर्माण होणाऱ्या गूढ आकृती, पाण्याचा प्रवाहीपणा व अवखळता, डोहातली गंभीर गूढता असे निसर्गाचे भावविभोर नजारे त्यांच्या चित्रांतून डोकावतात. त्यांनी महाराष्ट्र पातळीवरील वॉटर कलर प्रायोगिक शैलीत सर्वोत्कृष्ट पारितोषिक मिळविले आहे. लातूर, सांगली, पलूस, कोल्हापूर आदी ठिकाणी त्यांची चित्रप्रदर्शने झाली आहेत.

प्रा. पंडितराव देशमुख हेही जिल्ह्यातील एक चित्रकार आहेत. आपल्या चित्रांमधून ते निर्मितीच्या प्रेरणा साकार करतात. त्यादृष्टीने त्यांची चित्रे वैविध्यपूर्ण असतात. त्यांनी विद्यार्थीदशेतच १९७४ मध्ये मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये चित्रप्रदर्शन भरविले होते. तसेच लातूरच्या चित्रकला महाविद्यालयात काम करताना नवी दिल्लीच्या ब्रिटिश कौन्सिल लायब्ररीत ऑल इंडिया फाईन आर्टस् ॲण्ड क्राफ्ट्स मध्ये १९७५ साली प्रदर्शन भरविले होते. या प्रदर्शनातील 'कलींग' या चित्रात रेखाटलेल्या घोड्यांच्या चित्राचे अनुकरण नंतर अनेक कलाकारांनी केलेले आढळते. बीड येथील जवाहर भुवनमध्ये, पुन्हा जहांगीर आर्ट गॅलरीत व नंतर लातूर येथे त्यांची चित्रप्रदर्शने भरली होती. लातूरच्या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन तत्कालीन उपराष्ट्रपती मा. बी. डी. जत्ती यांनी केले होते, तर वाराणसी येथील प्रदर्शनाचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान मा. मोरारजी देसाई यांनी केले होते. नंतर हैद्राबाद, लातूर, पुणे, नाशिक अशा अनेक ठिकाणी त्यांनी चित्रप्रदर्शने भरविली. त्यांची तैल रंगावर हुकूमत असून रंगविज्ञान आणि रचनाचित्रे यावर त्यांचा व्यासंगी अभ्यास आहे. पॅरिस येथील Les Artistres du xxe siecle (Artists and Masters of 20th Century) या कलासंग्रहात त्यांची निरवयव शैलीतील चार चित्रे समाविष्ट असून अनेक पोर्ट्रेट्स आणि रचनाचित्रे खाजगी तथा शासकीय संग्राहकांच्या संग्रही आहेत. आता केवलाकारी निरवयव शैलीत आणि तैलरंगातील दृकप्रत्ययवादी निसर्ग चित्रणावर ते भर देतात.

प्रा. पंडितराव देशमुख यांच्या पुढाकाराने चित्रकारांच्या एका गटाने 'क्रिएटर्स क्रियेशन-७९' या नावाचे प्रदर्शन १९७९ साली लातूर येथे भरविले होते. केवळ संदर्भ चित्रांसाठी वापरल्या जाणाऱ्या 'क्रोकवेल' या माध्यमाचा 'सोलो' स्वरूपात अत्यंत प्रभावीपणे वापर या गटाने केला. त्यात अनंत निकम, शंकर झुल्पे, चित्रा राजेंद्र आदी कलावंतानी केलेल्या कामाचा प्रभाव आजही टिकून आहे. 'क्रिएटर्स-७९' पासून प्रेरणा घेऊन लातूरच्या कलाकारांनी फार मोठे कार्य पुणे, मुंबई, औरंगाबाद वगैरे ठिकाणी उभे केले आहे.

शिक्षकाने केवळ शिक्षकच न राहता कलेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक होईल अशी चित्रकारिता निर्माण करण्याचे काम प्रा. ताराचंद निकम यांनी केले आहे. समाजऋणाचा भाग म्हणून आपल्या कलाकृतीतून, ज्ञानातून समाजाला जास्तीत जास्त देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. प्रा. निकम हे मूळचे नाशिक जिल्ह्याचे असले, तरी त्यांनी लातूरच्या कला महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून कलासेवा केलेली आहे. निसर्ग सौंदर्याचा खनिजा जगापुढे ठेवता

ठेवता त्यांना रंगरेषांची ओढ लागली. निसर्गाच्या सहवासातच त्यांना चित्र रेखाटण्याचा छंद लागला. त्यांची शेकडो निसर्गचित्रे प्रदर्शित झाली आहेत. त्यापैकी अनेकांना पारितोषिकेही मिळालेली आहेत. त्यांच्या अनेक चांगल्या चित्रांमध्ये 'छोटा कैलास' आणि 'भीमाशंकर' ही निसर्गचित्रे विशेष वर्णावी अशी आहेत. ते प्रवाही जलरंगाचा वापर करतात. या चित्रांमध्ये आकाशाच्या पार्श्वभूमीवर भव्य व प्रमाणबध्द मंदिरे चितारताना सोबतच चिंच, गुलमोहोर, लिंब, बाभळ इत्यादी झाडांची भव्यता त्यांच्या वैशिष्ट्यांसह रेखाटलेली आहे. छोट्या कैलासचे चित्रण त्यांनी एका वेगळ्याच अनामिक ओढीने केल्याचे जाणवते. मध्यान्हीनंतर चित्रीत केलेल्या या निसर्गचित्रात शांत रस सर्वत्र ओसंडून वाहत आहे. अंबाजोगाई, परळी, लातूर, रामलिंग येथील निसर्गातील सौंदर्यस्थळे त्यांनी आपल्या अनेक निसर्गचित्रांमध्ये टिपलेली आढळतात. पुणे, लातूर, बीड अशा ठिकाणी त्यांनी चित्र प्रदर्शने भरविली होती.

दत्ता बनसोडे हे लातूर जिल्ह्यातील एक चित्रकार व उत्तम कला शिक्षक आहेत. मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्मधून त्यांनी कलाक्षेत्रातील पदवी प्राप्त केलेली आहे. त्यांची बहुतेक चित्रे अजिंठा शैलीत बुध्दाच्या जीवनावर चितारलेली आहेत. मानवी आकृत्या वास्तव, हुबेहूब व अर्थपूर्ण करण्यासाठी ज्या रंगरेषांचा ते उपयोग करतात, त्यातच त्यांचे कला सामर्थ्य जाणवते. 'राजस्थानी बाहुली' या चित्राने त्यांच्या अनेक चित्रकृतींमध्ये मानाचे स्थान मिळविलेले आहे. रंगचित्रांसाठी ते बहुधा कृष्णधवल रंगांचाच उपयोग करतात.

रंगरेषातील सूर छेडणारे समर्थ चित्रकार म्हणून सुरेंद्र जगताप प्रसिध्द आहेत. मूळचे लातूरचे असणाऱ्या जगताप यांनीही मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्मधून चित्रकलेची पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी चित्रनिर्मितीत नाना प्रयोग करून आपल्या चित्रकार मित्रांसोबत चित्रप्रदर्शनेही भरविली आहेत. डिसेंबर १९९९ मध्ये मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत भरलेले त्यांचे चित्र प्रदर्शन चांगलेच गाजले. त्यांची चित्रे काव्यात्म पातळीवरचा तरल भावानुभव व्यक्त करतात. नग्नतेतील प्रत्ययकारी वास्तव हा त्यांच्या कलाभिव्यक्तितील मुख्य अभ्यास विषय आहे. स्वदेशी रंगसाधनांच्या माध्यमान्वये ते चित्र विषयाला काव्यात्म पातळीवर पोहोचवितात. त्यांच्या चित्रांतील नग्नाकृती बीभत्स न वाटता नैसर्गिक व सहज सुंदरतेचा प्रत्यय देतात. सहजता हाही त्यांचा एक विशेष गुण म्हणता येईल. चित्रविषयाला सुयोग्य अशी रंगसंगती व रंग हाताळणीतून चित्राला प्राप्त होणारा पोत ही बाबही लक्ष वेधून घेते. हा चित्रकार आपल्या चित्रकृतीतून आस्वादकालाही आपल्या स्वप्निल भावविश्वात गुंतवून ठेवतो. त्यांच्या रंगरेषांतील जादू मोहमयी व लक्षणीय आहे.

शशिकांत डोंगरे हे खरे तर नाट्य कलावंत. नाट्य दिग्दर्शन व अधून मधून लोक संगीताची धून आळवित वाद्ये वाजविण्याचाही त्यांना छंद आहे; पण याचबरोबर चित्रकलेतही अभिव्यक्तिचे काही नवे आयाम तयार करण्यासाठी कॅनव्हासवर कुंचला चालविणारे ते एक प्रयोगशील चित्रकारही आहेत. हा चित्रकार निसर्गातील झाडे, घरे व अन्य आकार यात फारसा अडकून पडत नाही. तो आत्मानुभूतीच्या अभिव्यक्तीसाठी निसर्गातील काही दृष्यांचा हवा तसा वापर करताना आढळतो. एखाद्या निसर्ग दृष्याचा आपल्या मनावर काय परिणाम झाला, यापेक्षा आपली स्वतःची भावावस्था त्या निसर्ग दृष्यातून अभिव्यक्त करण्याकडे त्यांचा ओढा आहे. म्हणूनच त्यांची निसर्गचित्रे ही विषयापेक्षा आशयावर केंद्रित अशी उत्तम

चित्रे आहेत. आस्वादकाची नजर कॅनव्हासवर खिळवून त्याला विचारप्रवण बनविणारी त्यांची चित्रे असतात. त्यांच्या निसर्गचित्रांमधून त्यांनी चित्रांत ओतलेल्या भावनेचे सामर्थ्य जाणवते. निसर्गचित्रांशिवाय तैलचित्रेही ते तितक्याच समर्थपणे साकारतात. तैलरंगात जलरंगासारखे पारदर्शक परिणाम साधणारे प्रयोगही त्यांनी केले आहेत. पुढ्यातला निसर्ग व स्वत:चे आत्मभान यांचा एकरुप व त्याचवेळी नवनिर्माणाकडे झेपावणारा कुंचला अशी किमया या चित्रकाराला साद्य झाली आहे. शशिकांत डोंगरे, विजयकुमार बैले व बालाजी चव्हाण या चित्रकार त्रिकुटाने 'सेनानी साने गुरूजी' ही चित्रमालिका तयार केली होती.

निसर्ग चित्रकार म्हणून लातूरचे प्रा. तुकाराम कुलकर्णी यांच्याही नावाचा उल्लेख अटळ आहे. त्यांची चित्रे निसर्गाच्या जिवंतपणाचा आभास निर्माण करणारी असतात. त्यांच्या चित्रांतील दृष्याची गतिमानता दर्शकाचे लक्ष वेधून घेते. त्यांच्या निसर्ग चित्रांमध्ये विविधता डोकावते, त्यापेक्षा रेषाप्रधान अलंकारिक शैलीतील त्यांची पेन ड्रॉईंग्ज अधिक लोभस वाटतात. नारीश्रृंगाराचे विविध पैलू त्यांच्या या रेखांकनात उमटले आहेत. विशेषत: उंचावरून खाली पडणारा धबधबा, बाभळीच्या झाडाची काही चित्रे येथील दर्शकांच्या पसंतीस उतरली आहेत. रेखाचित्रे काढण्यातही त्यांचा हातखंडा आहे. नवी दिल्ली येथील ALFAS या कलादालनात प्रा. पंडितराव देशमुख यांच्या समवेतचे त्यांचे चित्रप्रदर्शन बरेच गाजले. त्यानंतर मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत, लातूर व नांदेड येथेही त्यांची चित्रप्रदर्शने भरली होती.

रंगांच्या दुनियेत वाहून घेणारे दुसरे कलावंत म्हणजे तुका जाधव. निसर्गाच्या मुक्त आविष्कारातून निर्माण होणारा निसर्गाचा ठसठशीतपणा रेखाटणारे ते चित्रकार आहेत. मानवी मनाच्या स्पंदनाच्या विशाल सृष्टीत ते रमून जातात. सतत परिवर्तनीय असलेल्या मानवी देहाचे अंतर्बाह्य सौंदर्य ते उत्तमरित्या साकारतात. तारूण्याचा लयलूटपणा, विशाल अनुभव, सृष्टीची खळखळ या बाबी रंगजाणिवेच्या मुक्त आविष्कारातून ते प्रतीत करतात.

मानवाच्या सुप्त मनामध्ये घडणाऱ्या घडामोडींचे प्रतिबिंब चित्रात चित्रित करण्याचा प्रयत्न करणारे मुरूड येथील कलाकार शिवाजी काळे यांनी 'घर' हा विषय घेऊन चित्रनिर्मिती केली आहे. 'घर' हे आचार-विचार निर्मितीचे केंद्र असल्याने त्याचे प्रतिबिंब त्यांच्या चित्रांत जाणवते. चित्रकलेसाठी त्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती तसेच ललितकला अकादमी, नवी दिल्ली या संस्थेचीही शिष्यवृत्ती प्राप्त झाली होती. एक प्रथितयश चित्रकार म्हणून त्यांचे नाव घेतले जाते.

औराद शहाजनी येथील मा. दिनानाथ मंगेशकर महाविद्यालयात रेखाकला व रंगकाम विभागाचे प्रमुख म्हणून काम करणारे श्री. सुरेन्द्र पाटील हेही चित्रकार आहेत. लातूरच्या चित्रकला महाविद्यालयात स्केचिंग व पोट्रेट स्पर्धेत त्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. कलाविश्व महाविद्यालय, सांगली, येथेही त्यांच्या पोट्रेटला तसेच 'मृत्यू' या रचनाकृतीस महाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त झाले होते. सांगली येथे त्यांचे वैयक्तिक चित्रप्रदर्शनही भरले होते.

लक्ष्मण रामदासी हे मूळ बार्शीचे असले, तरी त्यांचा मुक्काम लातूर येथेच असतो. त्यांना निसर्गाचे यथार्थ चित्रण करण्याचा छंद आहे. त्यांना चित्रकलेबद्दल शैक्षणिक कालखंडात किर्लोस्कर, गरवारे, हिंदुस्तान पेट्रोलियम, लेडी सुंदराबाई अग्रवाल, बी.के.पी.एस. सोसायटी

व वर्ल्ड लाईफ या संस्थांची पारितोषिके प्राप्त झालेली आहेत. जाहिराती, कॅलेंडर्स मुखपृष्ठे, इतर संकल्पना वगैरे चित्रकलेतील छंद ते जोपासत आहेत.

हरंगुळ खुर्द गावचे दगडू रणखांब हे चित्रकार १९८६ पासून लातूर नगर परिषदेच्या शाळेत कला शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना निसर्गचित्रणात विशेष आवड असली, तरी त्यांची खरी ओळख सिने बॅनर्स, अक्षरलेखन, जाहिरात फलक या गोष्टींमधून होते. अशा प्रकारची असंख्य कामे त्यांनी केलेली आहेत. शिवाय निसर्गचित्रेही रेखाटलेली आहेत.

प्रतिकूल परिस्थितीतही चित्रकलेचा छंद जपणारा कलावंत म्हणून श्री. गंगाधर शिंदे यांच्याकडे अंगुलीनिर्देश करावा लागतो. खेडोपाडी भांडी विकून आपली उपजीविका करणाऱ्या शिंदे यांनी यासोबतच कलेची साधनाही सुरू ठेवलेली आहे. बालपणापासून त्यांना चित्रे काढण्याची आवड असल्याने आंतर-शालेय व रोटरीच्या स्पर्धांमध्ये तसेच अन्य विविध स्पर्धांमध्ये त्यांनी जवळपास तेरा पारितोषिके पटकाविलेली आहेत. त्यांनी लातूरच्या चित्रकला महाविद्यालयात चित्रकलेचे शिक्षण घेतले. खासकरून त्यांनी निसर्गचित्रे चितारलेली आहेत. राज्य पातळीवरील कला प्रदर्शनातही त्यांची चित्रे वाखाणली गेली आहेत. त्यांना नामवंत चित्रकारांची चित्रे संग्रहित करण्याचा छंद आहे. अशा कितीतरी चित्रकारांची चित्रे त्यांच्या संग्रही आहेत. आपली सर्व चित्रे त्यांनी अनिल जोशी या चित्रकार मित्राकडे जतन करून ठेवलेली आहेत.

चित्रकलेसाठी धान्य व काड्यांचा अनोखा वापर करणारे कलावंत म्हणून श्री. त्र्यंबक पोखरकर यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांना बालपणापासूनच चित्रकला आणि हस्तकलेची आवड होती. कला शिक्षक म्हणूनही त्यांनी काम केले आहे. सुरुवातीला त्यांनी टाकाऊ वस्तूंपासून दिपावली भेटकार्डे बनविली. यात त्यांनी गडद पार्श्वभूमीवर गव्हाच्या, साळीच्या, बाजरीच्या व ज्वारीच्या काड्या, सूर्यफुलाचे चिपाड आणि त्यात असणारा थर्माकोलसारखा पांढरा भाग, सूर्यफुलांच्या बियांवरील कवच, मक्याच्या कणसावरील पाचोळा या सर्वांचा फेविकॉलच्या सहाय्याने भेटकार्डामध्ये उपयोग केला. यातूनच पुढे अलंकारिक आकार व डिझाईन्सची साधी साधी निसर्गदृष्येही तयार केली. साळीच्या अर्धवट जळालेल्या काड्याही ते चित्रात वापरत. झाडाच्या बुंद्याच्या आधाराला उभ्या राहिलेल्या एका आदिवासी स्त्रीचे त्यांनी साकारलेले पोट्रेट विशेष असे आहे. तिचा चेहरा, नाक, डोळे, केसांची रचना, दाग-दागिने, मोत्यांच्या माळा, दंडातील वाक्या, नाकातील मोती, कमरेचे वस्त्र, खणाची चोळी आणि ओठावर उमटलेले स्मितही काड्यातूनच साकारलेले आहे. या चित्राची दिशा बदलताच केवळ दागिनेच चमकतात ही याची विशेषता होय. त्यानंतर त्यांनी यासारखी अनेक व्यक्तिचित्रे, कल्पनाचित्रे व शोपीस म्हणता येतील अशी असंख्य चित्रे या माध्यमातून तयार केली आहेत. त्यांच्या चित्रांचे प्रदर्शनही राज्यातील अनेक शहरांत भरविण्यात आलेले होते. शिवाय त्यांच्या चित्रांपैकी सात चित्रे कॅलिफोर्निया व एक चित्र श्रीलंकेत प्रदर्शनासाठी पाठविण्यात आलेले होते.

लातूरच्या चित्रकला क्षेत्रात विजयकुमार बैले आणि बालाजी चव्हाण ही जोडगोळी चांगलीच मान्यता पावली आहे. त्यापैकी उदगीरच्या श्यामार्य कन्या हायस्कूलमध्ये चित्रकला शिक्षक असलेले विजयकुमार बैले हे लातूर तालुक्यातील मळवटी गावचे रहिवासी होत.

त्यांनी शालेय कारकिर्दीत विविध चित्रकला स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळविलेली आहेत. लातूरच्या चित्रकला महाविद्यालयात शिकतानाही त्यांनी चित्रकला स्पर्धा गाजविल्या. औरंगाबादच्या शासकीय कला महाविद्यालयात शिकतांना त्यांनी स्केचिंगसाठी नवनवीन माध्यम शोधण्यावर भर दिला. हे शिक्षण चालू असतानाच कला महाविद्यालयात त्यांच्या रेखाटनांचे प्रदर्शन भरविण्यात आले. राज्य कला प्रदर्शनात विद्यार्थी गटात त्यांच्या Unborn या क्रिएटिव्ह पेंटिंगला प्रथम पारितोषिक मिळाले. सेनानी साने गुरूजी ही आव्हानात्मक चित्रमालिका त्यांनी बालाजी चव्हाण व शशिकांत डोंगरे यांच्यासोबत तयार केली होती.

या जोडगोळीतील दुसरे कलावंत बालाजी चव्हाण हेही लातूरचे आहेत. उदगीरच्या शामलाल विद्यालयात ते कलाशिक्षक आहेत. शालेय कारकिर्दीतच त्यांनी चित्रे काढायला सुरुवात केली. त्यांनी राज्य पातळीवरील बालचित्रकला स्पर्धेतील पारितोषिक पटकाविले होते. शिल्पकलेचे शिक्षण त्यांनी सांगली येथे घेतले. ते वास्तववादी रेखाटन करतात. त्यांनी व विजयकुमार बैले यांनी अनेक चित्रे साकारली आहेत. चव्हाण यांचे मूर्तीकलेचे प्रयोगही चालू असतात.

'स्वप्नांचा सुमनहार' हा श्री. गणपत भडके या चित्रकाराच्या कलाचित्रांचा एक छोटासा संग्रह असून त्याचे प्रदर्शन त्यांनी जहांगीर आर्ट गॅलरी, मुंबई येथे भरविले होते. कसदार सौंदर्य, हळुवार भावूकता व वैश्विक गूढरम्यता यांचे मनोज्ञ मिश्रण त्यांच्या नव्या कलाकृतीत दिसून येते. ललित कला अकादमीचे सर्वोच्च पारितोषिक, विभागीय ललितकला अकादमी, लखनौ चे बहुमूल्य बक्षिस आणि राज्य सरकारचे सर्वश्रेष्ठ पारितोषिक त्यांच्या चित्रांना मिळाले आहे. श्री. भडके हे प्रतिभाशाली चित्रकार असून निसर्गात दडलेली सत्ये आणि मानवी मूल्ये यांचा ते सतत प्रत्ययकारी शोध घेत असतात. पुष्प सजावट आणि लतावल्लरी यासारखे निसर्गरम्य कलाविषय त्यांच्या चित्रांतून अभिव्यक्त होतात.

आनंद पांचाळ या चित्रकाराच्या कलाकृतीतून बालकांच्या इच्छापूर्तीचा संदेश देण्याचा प्रयत्न केलेला असतो. त्यांच्या चित्रांमध्ये निरागस बालमनांच्या संतुष्ट इच्छा-आकांक्षांचे चित्रण असते. तसेच रंगपटाच्या माध्यमांतून विचारशीलता, रंगयोजना, अवकाश विभाजन आणि मानवी शरीराची ठेवण यांचा चित्रात सुरेख सुसंवाद साधण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

प्रशांत साळुंके हे निसर्ग चित्रकार आहेत. विशेषत: पावसाळ्यातील निसर्गाचे चित्रण त्यांच्या चित्रांमध्ये असते. पावसाळ्यात निसर्गातील रंगात होणारे बदल व आकारांना स्वत:च्या आत्माविष्कारातून प्रगट करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

चित्रकलेत कॅम्प्युटरच्या सर्वाधिक क्षमतांचा वापर करणारा कलावंत म्हणून कीर्ती गोरखे ओळखले जातात. सन १९९२ साली त्यांनी लातूर येथील आपल्या राहत्या घरात 'आर्टी कम्युनिकेशन' ही डी.टि.पी सेवा सुरू केली. विशेषत: ॲनिमेशन या प्रकारांत ते आपली कला प्रदर्शित करतात. ग्राहकांच्या मनातील कल्पना ओळखून ती कलाकृतीत बसविणे या कामात ते पारंगत आहेत.

राजाभाऊ बनाळे हे मुळचे बीड जिल्ह्यातील रहिवाशी आहेत. तथापि, लातूरच्या श्री. देशीकेंद्र विद्यालयात ते कलाशिक्षक म्हणून काम करतात. त्यांच्या व्यक्तिचित्रणात जीवनातील आनंद, भविष्याबद्दलच्या आकांक्षा, भाव-भावना यांचे प्रभावीपणे सादरीकरण

केलेले असते, तर निसर्गचित्रात निसर्गातील वैविध्य रंगबध्द केलेले असते. त्यांचे व्यक्तिचित्रण रंगीत कागदावर पोस्टर रंगात व वास्तववादी स्वरूपात साकार केलेले असते.

स्वातंत्र्योत्तर काळातील कलावंत म्हणून उदगीर येथील अब्दुल अपाभाई अलमेलकर यांनी आपल्या खास शैलीने चित्रकलेचे दालन फुलविले आहे. जागतिक स्तरावर त्यांच्या कलेची नोंद घेतली गेली आहे. देशी-विदेशी कलासंग्राहकांच्या संग्रहात भारतीय कलेचे वेगळे वळण म्हणून त्यांची चित्रे जोपासली गेली. प्रामुख्याने गोंड, माडिया या आदिवासी जमातींच्या वस्त्यांवर राहून त्यांच्या दैनंदिन जीवनाचे त्यांनी आपल्या खास चित्रशैलीत चित्रण केले आहे.

लातूरच्या चित्रकला महाविद्यालयातून शिक्षण घेऊन गेलेल्या अनेक गुणी चित्रकारांनी आज केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशपातळीवरही चित्रकलेच्या क्षेत्रात आपला प्रभावी ठसा उमटविला आहे. त्यातील अनेकांची चित्रे आज देश-विदेशात विकली जातात, त्यांची सातत्याने प्रदर्शने सुरू असतात. अशांपैकी आनंद पांचाळ, विजय गिल्ले, दत्ता बनसोडे, सुरेंद्र जगताप, उत्तम चापटे, शिवाजी काळे अशी कितीतरी नावे सांगता येतील. याशिवाय जाणीवपूर्वक असे कलावंत घडविणारे जेष्ठ चित्रकार परशुराम चोले, प्रा. तानाजी चव्हाण, प्रा. पंडितराव देशमुख, प्रा. ताराचंद निकम हे लातूरच्या कला महाविद्यालयाचे कलाध्यापक त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रकलेमुळे महाराष्ट्रात ख्यातनाम आहेत.

सद्या मुंबईत कार्यरत असलेले लातूर जिल्ह्यातील अनेक कलावंत प्रगतिपथावर आहेत. त्यात दिलीप खोमणे (जे.जे.स्कूल ऑफ आर्टस्चा सुवर्णपदक विजेता), दिपक खोगरे, प्रा. तुका जाधव, प्रा. अनंत निकम, प्रा. मोग्गलान श्रावस्ती, प्रा. शिवाजी जाधव, प्रा. बापुसाहेब झांजे, प्रा. दत्ता बनसोडे, शिवाजी काळे, उत्तम चापटे, प्रा. मधुकर मुंढे, गणपत भडके, प्रा. गफार, आनंद पांचाळ, विजय गिल्ले, प्रा. प्रदीप चव्हाण, प्रा. नितीन निकम, आनंद माळी, विजय बेळगावे, नितीन उटगे, अमृतराज कोबन, प्रा. बालाजी उबाळे, प्रा. संजय उबाळे, प्रा. हौसेराव पाटील, प्रा. गोपाळ डोंगे, प्रा. सुरेंद्र जगताप, ओमप्रकाश रजपूत, चंद्रजीत यादव, अनिता देशपांडे आदी अनेक तरूण कलाकार मुंबईच्या कलाक्षेत्रात आपला अमीट ठसा उमटवून आहेत. त्याशिवाय प्रा. अविनाश सातपुते, प्रा. सुरेंद्र पाटील, बालाजी चव्हाण, प्रदीप व्यवहारे, बाबू कोळ्ळे, विजयकुमार बैले, अनिल जोशी, अरविंद माने, दयानंद सूर्यवंशी, गुरूमूर्ती कोळ्ळे, दगडू रणखांब, सुरेश उबाळे यांचीही कला निर्मिती प्रभावी ठसा उमटवून आहे.

लोककला

महाराष्ट्रातील बहुजन समाजात लोकप्रिय असलेल्या कला म्हणजे गोंधळ, तमाशा, बहुरुपी, वाघ्या मुरळी, दशावतार, वासुदेवाची गाणी, शाहिरी, भेदिक लावणी या होत. या कलांनी मराठी माणसांचे रंजन, प्रबोधन केले आहे. लोककला आणि लोककलावंत म्हणजे मराठी माणसाची अस्मिता, मराठी माणसांचे वैभव! लातूर जिल्हाही याला अपवाद नाही. शेकडो लोककलावंतानी ही कला अत्यंत परिश्रमपूर्वक जपली आहे. आजही जत्रा म्हटले की, फड लागलेलाच असतो. पोवाडा आणि लावणीने लोककलेचा गोफ विणलेला असतो.

उदगीर तालुक्यातील डोंगरशेळकी या गावातील बंजारा तरुणांनी सेवालाल महाराज भजनी मंडळाची स्थापना करून लोककलेच्या माध्यमातून अंधश्रध्दा निर्मूलन, व्यसनमुक्ती, हुंडाबंदी, पर्यावरण संरक्षण व कुटुंब नियोजनचे फार महत्त्वपूर्ण काम केले.

उदगीरचा लोककलावंत शिवाजी राठोड यांनी शहरी आणि ग्रामीण भागातून साक्षरता अभियान आणि व्यसन मुक्ती यावर अधिक लक्ष केंद्रित करून लोककलेच्या माध्यमातून प्रबोधन केले. त्यांच्या अनेक रचना प्रसिध्द असून बंजारा गीतांची ऑडिओ कॅसेट आणि कविता संग्रह प्रसिध्द आहे. औरंगाबाद आकाशवाणी केंद्रावरून त्यांचे अनेक कार्यक्रम प्रसारित झाले आहेत.

औसा तालुक्यातील भाटा येथील रहिवासी अरविंद कुलकर्णी हे उत्तम पेटीवादक असून गेल्या पन्नास वर्षात अनेक नाटकांत काम करून त्यांनी आपली कला सादर केली. तसेच कमलाबाई जळगावकर लोकनाट्य तमाशा मंडळ, आनंद लोकनाट्य तमाशा मंडळ, छबुताई नगरकर तमाशा मंडळ इत्यादींच्या व्यासपीठांवरून पेटीवादक आणि लोककलावंत म्हणून समाजाचे रंजनाबरोबर प्रबोधनही केले. त्यांनी लातूर येथे 'कै.शाहीर रामजोशी लोकनाट्य सहकारी संस्था' स्थापन केली आहे. कुलकर्णी यांनी काही चित्रपटांतही भूमिका केल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने मराठी चित्रपट आणि नाटकांप्रमाणे आता तमाशा, कोकणातील दशावतार, विदर्भातील खडीगंमत आणि शाहिरी या लोककलांना त्यांच्या कला टिकविण्यासाठी अनुदान घोषित केले आहे. त्यानुसार पूर्ण वेळ तमाशा सादर करणारे मोठे फड व हंगामी तमाशा सादर करणारे फड यांना अनुक्रमे ३० हजार व १५ हजार रुपये, कोकणातील दशावतार मंडळी यांना १५ हजार रुपये तसेच विदर्भातील खडीगंमत कलापथके आणि शाहिरी कला पथके, पारंपरिक लावणी सादर करणारी कलापथके यांना सात हजार रुपये याप्रमाणे प्रत्येक प्रयोगासाठी अनुदान देण्याचे निश्चित केले आहे. शिवाय तंबू साहित्य, वाद्य, वेशभूषा आदी खर्चासाठी वरीलपैकी एका कलापथकाला २५ हजार रुपये ते दोन लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येईल. हे अनुदान एकदा देण्यात येईल. वरील प्रकारच्या कलापथकांना एका वर्षात जास्तीत जास्त २० प्रयोगांसाठी हे अनुदान देण्याचे शासनाने जाहीर केले आहे.

क्रीडा[३१]

निजाम काळात मराठवाड्यात कुस्ती, कबड्डी, खो-खो, आट्या-पाट्या, विटी दांडू, मल्लखांब, सुरपारंब्या, पच्चासी, भवरा असे एक ना अनेक पारंपरिक खेळ प्रचलित होते. निजामी राजवटीत ब्रिटिशांच्या तैनाती फौजेच्या मराठवाड्यातील वावरामुळे अनेक पाश्चिमात्य चालीरीतींसह अनेक प्रकारचे खेळही मराठवाड्यात खेळले जाऊ लागले. यात प्रामुख्याने व्हॉलीबॉल, क्रिकेट, फूटबॉल आदि क्रीडाप्रकार लोकप्रिय होत गेले. सन १९८२ साली लातूर जिल्हा अस्तित्वात आला.

---

३१. या भागाचे लेखन प्रा. नंदकुमार मेगदे, (क्रीडा विभाग, श्री. गुरूगोविंदसिंगजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, नांदेड) यांनी केले आहे.

भाषावार प्रांतरचनेनंतर अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागातील उस्मानाबाद जिल्ह्यात लातूर हा एक मोठा तालुका होता. लातूर मध्ये कुस्ती, खो-खो, कबड्डी या पारंपरिक क्रीडाप्रकारांबरोबर व्हॉलीबॉल या पाश्चात्य खेळाची मुळे खोलवर रूजली आणि लातूरने अनेक राष्ट्रीय दर्जाचे क्रीडापटू राज्याला दिले. उदगीर, अहमदपूर, औसा, निलंगा आदी दहा तालुक्यांचा समावेश असलेल्या स्वातंत्र्योत्तर लातूर जिल्ह्यातील क्रीडा विषयक घडामोडींचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

कुस्ती : कुस्ती ह्या प्राचीन भारतीय क्रीडाप्रकाराची पाळेमुळे या जिल्ह्यात खोलवर रूजलेली आहेत. सिध्देश्वर जत्रेत शेवटच्या दिवशी कुस्त्यांचा फड रंगतो. दूरदूरवरून 'पहेलवान' खास कुस्ती खेळण्यासाठी येथे येतात. 'रूस्तुम-ए-हिंद' हा गौरव संपादन केलेले पैलवान हरिश्चंद्र बिराजदार यांचे बालपण लातूर मध्येच गेले. मारवाडी राजस्थान विद्यालयाचे ते माजी विद्यार्थी होत. कुस्तीमध्ये आजही लातूर शहर आघाडीवर आहे. गोरख वाघमारे, काका पवार, अप्पा सगरे हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत खेळलेले कुस्तीगीर आहेत.

लातूर मध्ये आर्य समाजाची व्यायामशाळा होती. तसेच रामलिंगेश्वर मंदिरात पारतंत्र्याच्या काळात व्यायामशाळा चालत असत. आज श्री. माणिकराव जोगी हे व्यायामशाळा चालवतात. तसेच उदगीर सारख्या तालुक्याच्या शहरात देखील त्या काळात राष्ट्रसेवादल व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व्यायामशाळा/आखाडे चालत असत. व्हॉलीबॉल, खो-खो, कुस्ती, बॅडमिंटन व क्रिकेट या व अशा अन्य खेळांत लातूर जिल्ह्याचे तरुण व विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय पातळीवर आघाडीवर होते व आजही आहेत. प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व काळात जातीय दंगली अधिक प्रमाणात होत, तेव्हा स्वसंरक्षणासाठी काही तरुणांनी एकत्र येऊन व्यायाम शाळा सुरू केल्या. लातूरमध्ये १९३४ साली जैन व्यायाम शाळा, १९४० मध्ये श्रध्दानंद व्यायाम शाळा, १९४२ मध्ये बलभीम व्यायाम शाळा तसेच रामलिंगेश्वर तालीम, चौदा घर मठ तालीम यांची स्थापना झाली. या व्यायाम शाळांना स्वातंत्र्य लढ्यातील प्रतिकाराची आणि सरकारच्या जातीय व धर्मांध आक्रमणाचा विरोध करणारी केंद्रे म्हणून ओळखले जाई. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळातही या व्यायाम शाळांना योग्य वळण लागावे म्हणून स्व. किशनराव हलवाई, स्व. भैरुसेठ महाराज पाराशर, स्व. आसारामजी परांडेकर, स्व. दिगंबरराव शिवणगीकर, डॉ. शिरीषचंद्र कडतने, गणपतराव बाजुलगे, देविदासराव जगदाळे, अब्दुल हमीद, महम्मद युसूफ, सौ. कमलाबाई माढेकर यांनी प्रयत्न केले. या व्यायामशाळा आज आधुनिक साधनांनी युक्त असून त्या केवळ कुस्त्यांचे आखाडे न राहता तेथे सर्व खेळ खेळले जातात. स्वातंत्र्योत्तर काळात विविध ठिकाणच्या यात्रांमधून रंगणारे कुस्त्यांचे फड पुढे भारतीय कुस्तीगीर संघटनेच्या नियंत्रणाखाली आले आणि कुस्ती विशिष्ट नियमांनुसार स्पर्धात्मक दृष्टीने खेळली जाऊ लागली. आमदार दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हा कुस्तीगीर संघटनेची वाटचाल सुरू असून सर्वश्री रावसाहेब मुळे-बाभळगावकर, रावसाहेब मुळे-अंकोलीकर, हे संघटनेला दिशादर्शन करीत आहेत.

१९६२ साली रणवीर क्रीडामंडळ स्थापन झाले अन लातूरच्या क्रीडा क्षेत्रात चैतन्य निर्माण झाले. प्रामुख्याने गेल्या चाळीस वर्षात सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनायक धानुरे, भाऊसाहेब सावे, पांडुरंग शेळके यांच्या मौलिक सहकार्यामुळे महाराष्ट्रातच नव्हे, तर अखिल

भारतीय पातळीवर या मंडळाने नेत्रदिपक कामगिरी बजावली. सर्वश्री विनायक धानुरे, बाबू बोळेगावकर, राजू पुरोहित, शिवराज जिरगे, विजय सोलंकी, सुरेश धानुरे, कोलिन पुरोहित, संजय कुलकर्णी, मल्लिकार्जून माळी, हरिश्चंद्र सरतापे, नरेंद्र बंकाले, रामदेव दायमा, कु. शिरीष मुळे, कु. संगीता पाटील, कु.सुरेखा पोतदार या खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर विविध खेळ खेळून घवघवीत यश संपादन केले. रणवीर मंडळातील या खेळाडूंना शाहूराज सोनवणे, बसवणअप्पा कौळखेरे आणि विश्वनाथ निगुडगे यांचे विशेष सहकार्य लाभले.

श्री. हरिश्चंद्र बिराजदार हे मूळचे रामलिंग मुद्‌गड (ता. निलंगा) येथील मल्ल असून त्यांनी 'महाराष्ट्र केसरी' (१९६९) व 'रूस्तुम-ए-हिन्द' (१९७२) हे अनुक्रमे राज्य व राष्ट्रीय किताब मिळवून अनेक ख्यातनाम मल्लांना अस्मान दाखविले. एडिनबरो (स्कॉटलॅण्ड) येथे संपन्न झालेल्या राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेत (१९७२) बिराजदार यांनी ८२ किलो वजन गटात भारताचे प्रतिनिधित्व करून सुवर्णपदक पटकाविले. सन १९७२-७३ साली संपन्न झालेल्या आशियायी क्रीडा स्पर्धेत (एशियाड) ८२ किलो वजन गटातही सुवर्णपदक पटकावित आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे नाव उज्ज्वल केले. पुण्याच्या गोकुळ वस्ताद तालमीत कार्यरत असलेल्या बिराजदारांना महाराष्ट्र शासनाने 'शिवछत्रपती' हा सर्वोच्च क्रीडापुरस्कार देऊन गौरवांकित केले. यापूर्वीही 'पुणे रत्न' पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांच्या क्रीडाक्षेत्रातील कामगिरीचा परमोच्च बिंदू म्हणून केंद्र सरकारने सन २००६ मध्ये त्यांना अत्यंत प्रतिष्ठेचा असा 'ध्यानचंद जीवनगौरव पुरस्कार' जाहीर केला. सध्या त्यांच्यावर शासनाने महाराष्ट्र कुस्तीसंघटक पदाची जबाबदारी टाकलेली आहे. त्यांनी अनेक नामवंत मल्लांना मार्गदर्शन केलेले आहे.

श्री. काका पवार हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मल्ल मुळचे साई येथील रहिवासी असून त्यांनी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या ४८ किलो वजन गटातील अजिंक्यपद सतत १० वर्षे, तर ५२ किलो वजन गटातील राष्ट्रीय सुवर्णपदक सहावेळा पटकाविले आहे. इराण, इराक, मॉस्को, ऑस्ट्रेलिया अशा अनेक ठिकाणच्या आंतरराष्ट्रीय कुस्तीस्पर्धांमध्ये सहभागी होऊन पवार यांनी कॅडेट ग्रुपमध्ये सुवर्णपदक पटकाविले आहे. श्री. पवार यांना उत्कृष्ट क्रीडापटू म्हणून महाराष्ट्र शासनाचा 'शिवछत्रपती पुरस्कार' आणि भारत सरकारचा 'अर्जुन पुरस्कार' (२०००) हे सर्वोच्च क्रीडा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे.

श्री. गोविंद पवार हे काका पवार यांचे ज्येष्ठ बंधू होत. ते महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या ७४ किलो वजन गटातील सुवर्णपदक विजेते असून त्यांनादेखील महाराष्ट्र शासनाचा 'शिवछत्रपती' हा सर्वोच्च क्रीडा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

श्री. अप्पासाहेब सगरे हे मुळचे रामलिंग मुद्‌गड येथील रहिवासी असून त्यांनी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या ५२ किलो वजन गटात पाच वेळेस सुवर्णपदक पटकावित राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. श्री. सगरे यांनी ५२ किलो वजन गटात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्तीस्पर्धेत दोनवेळा सुवर्णपदक पटकाविलेले असून सध्या त्यांना भारत सरकारतर्फे वयोवृध्द खेळाडू म्हणून राष्ट्रीय मानधन योजने अंतर्गत मासिक मानधन दिले जाते.

श्री. शामराव लटपटे हे गांजुर गावचे रहिवासी असून त्यांनी चंद्रपूर येथे संपन्न झालेल्या राज्यस्पर्धेत ६८ किलो वजन गटात सुवर्णपदक, तर मुंबई येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदक पटकाविले आहे (१९७३).

श्री. रघुनाथ खलंगे हे जानवळ येथील पहिलवान असून त्यांनी सन १९६२-६५ दरम्यान अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविलेला आहे.

श्री. रावसाहेब मुळे-अंकोलीकर यांनी सन १९७० साली त्रिवेंद्रम (केरळ) येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय शालेय कुस्ती स्पर्धेतील ६२ किलो वजन गटात (१९ वर्षे वयोगट) सुवर्णपदक पटकाविले, तर श्री. व्यंकट पवार यांनी ६५ किलो वजन गटात सहभाग नोंदविला. याशिवाय श्री. मुळे यांनी १९७१ साली इंफाळ (मणिपूर) येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय शालेय कुस्तीस्पर्धेतील १९ वर्षाखालील ६८ किलो वजन गटात सुवर्णपदक आणि १९७४ साली ठाणे येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या अधिवेशनानिमित्त भरलेल्या स्पर्धामध्ये ६२ किलो वजन गटात रजतपदक पटकाविले.

सर्वश्री धोंडीराम लहाने, मधुकर खलंग्रे, एन. एस. शिंदे, विठ्ठल कांबळे, आरिफ शेख, ईश्वर बिराजदार आदिंसारख्या अनेक मल्लांनी राज्य, राष्ट्रीय व आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग नोंदवित लातूर जिल्ह्याचे नाव कुस्तीक्षेत्रात देशभर परिचित केले.

कबड्डी : हा खेळ लातूर जिल्ह्यात मोठ्या जोमाने खेळला जातो. सन १९८२ साली जिल्हा कबड्डी संघटनेची स्थापना करण्यात आली. अहमदपूर येथे संघटनेचे मुख्यालय असून 'शिवछत्रपती क्रीडा संघटक' पुरस्कारप्राप्त श्री. चंद्रकांत पाटील हे अध्यक्ष आणि प्रा. गणपतराव माने सचिव पदाची धुरा सांभाळीत आहेत. आज जिल्ह्याच्या सर्वदूर ग्रामीण भागातून कबड्डीचे सामने मोठ्या उत्साहात आयोजित केले जातात. शालेय स्पर्धा, ग्रामीण स्पर्धा, राज्य संघटनेच्या विविध वयोगटातील स्पर्धा, राष्ट्रीय स्पर्धा आणि आंतरविद्यापीठ स्पर्धा अशा विविध स्तरावरील कबड्डी स्पर्धामधून लातूर जिल्ह्याचे खेळाडू सहभागी होत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करतात.

राष्ट्रीय स्तरावरील विविध कबड्डी स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या लातूर जिल्ह्यांच्या खेळाडूंनी जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांची नावे पुढीलप्रमाणे :---

राष्ट्रीयस्तर शालेय स्पर्धा : सर्वश्री प्रेमनाथ आकनगिरे, रविकांत आकनगिरे, निलकंठ देपे, बब्रुवान पन्हाळे, लिंबाजी बेद्रेपे, ज्ञानोबा गोविंदवाड, बळीराम तरवडे, दयानंद साकळे, विनोद लखनगिरे, भिमसेन गायकवाड, वेदप्रकाश भिंगे, विनोदखाँ शेख, महेमुद शेख, दिलीप पुंडे, लक्ष्मण तुरेवाल, किरण करखेलीकर, उत्तम केंद्रे, राजेंद्र करमोडे, पद्माकर कोल्हे,गुणाजी हनमंते, कुमारी ललिता आकनगिरे, उषा हनवते, ठकु गोडभोरले, भावना पंचासरे, ज्ञानेश्वरी जाधव, प्रणिता वांगे, संजना दत्तनुरे, स्वाती जाधव, आशा कवडेकर.

राष्ट्रीय स्तर ग्रामीण स्पर्धा : सर्वश्री प्रभाकर अंधोरीकर, जयप्रकाश कोरे, प्रताप वांगे, हनुमंत कोतवाड, नागेश कटकमवार, वालाजी गोरे, हनुमंत मुरूडकर, संजय आकनगिरे, भरत मामडगे, शिवाजी तेलंगे, व्यंकट शिंदे, अंगद कोतवाड, सुकुमार भातकिरे, उत्तम बेल्लाळे, देविदास मुरूळे, शिवशंकर पंचगल्ले, कुमारी सुकुमार बिराजदार, शोभा हनवते,

शशिकला वाघमारे, शारदा वांगे, ज्योति जोनाडे, प्रणिता मुसने, आशा वाघमारे, वनिता संपते, छाया बिराजदार.

राष्ट्रीय स्तर किशोर/कुमार गट स्पर्धा : सर्वश्री यशवंत गायकवाड, रामेश्वर बेल्लाळे, दिपक कंदे, बब्रुवान रोकडे, उमेश घुगे, शिवाजी कोंडनगीरे, राजकुमार वाघमारे, कुमारी नसरत करखेलीकर, मंदोदरी सुडे, सुरेखा जगताप (कर्णधार, महाराष्ट्र संघ).

आंतर-विद्यापीठ स्पर्धा : सर्वश्री चंद्रकांत पाटील, श्रीरंग बंडापल्ले, सोपानराव खोत, वैजनाथ शिंदे, सुभाष सूर्यवंशी, बाबुराव टकले, कांचन चाटे, ज्ञानोबा काटापल्ले, किशन बुद्ढे, चंद्रकांत पोटे, माणिक बडे, भास्कर सूर्यवंशी, विनायक काळे, संभाजी लकुळे, आनंद मोरे, अंकुश शिंगडे, संजय चाटे, व्यंकट घोटाळे, रहिम पठाण, चंद्रकांत बाचपल्ले, विनायक रोकडे, ॲड. जाधव, नागनाथ कांदे, वाल्मिक नागरगोजे, ईश्वर यादव, धर्मपाल गायकवाड, बाबु नलवाड, उत्तम केंद्रे, राजाभाऊ बडे, जगन्नाथ कांबळे, विद्याधर कोपले, कुमार अरविंदा वाघमारे, कु. शिला वाघमारे, निलावती सोनकांबळे.

महात्मा गांधी संघ, अहमदपूरने संबंध राज्यभर आपल्या दैदिप्यमान खेळाने महाराष्ट्राला चकित केले. राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्याचा ध्यास घेतलेल्या व जिल्हाभर कबड्डीचा प्रचार आणि प्रसाराचे व्रत घेतलेल्या प्रा. गणपतराव माने यांना महाराष्ट्र शासनाने 'शिवछत्रपती क्रीडा संघटक पुरस्कार' (१९८६-८७) व महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेतर्फे 'ज्येष्ठ कबड्डी कार्यकर्ता' पुरस्कार (२००५) देऊन सन्मानित केले आहे. सर्वश्री धर्मपाल गायकवाड आणि चंद्रकांत पाटील यांनादेखील महाराष्ट्र शासनातर्फे अनुक्रमे २००४-२००५ व २००५-२००६ या सालासाठीचा 'शिवछत्रपती क्रीडासंघटक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. श्री. बी.एम. नलवाड ह्या क्रीडा शिक्षकास २००१-२००२ साली जिल्हा पातळीवरील 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

खो-खो : हा लातूर जिल्ह्यातील लोकप्रिय भारतीय क्रीडाप्रकार. कै. शाहुराज सोनवणे हे जिल्हा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांच्या निर्वाणानंतर आ. दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली संघटनेची वाटचाल सुरू असून प्रा. बी. एन. पाटील हे कार्याध्यक्ष, तर प्रा. विश्वनाथ गायकवाड हे सचिव म्हणून कार्यरत आहेत. यात बाबासाहेब गायकवाड, वैशाली मुंढे, वर्षा रूद्रवार सारख्या अनेक खेळाडूंनी विविध राष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्त्व केलेले आहे. यातील अन्य खेळाडूंची नावे पुढीलप्रमाणे :—

कोलीन पुरोहित, विजय सोळंकी, मल्लीनाथ माळी, नरेंद्र बंबाळे, रामदेव दायमा, बालाजी मस्के, नानासाहेब काळे, बाबुराव हिंडोळे, सुरेश धानुरे, संजय उबाळे, मैनोद्दीन मणियार, संजय कुलकर्णी, हनुमंत जक्कलवार, बाबासाहेब गायकवाड (उपकर्णधार), सत्यनारायण शिंदे, शालिवाहन पुदाळे, गणेश यादव ,सुधीर मिरकुले, अनुज मिसाळ, कुमारी संगीता पाटील, कौशल्या गहुदळे, संगिता राऊत, वैशाली मुंढे (कर्णधार), संगिता सुराणा, वर्षा रूद्रवार (कर्णधार), सुचिता ठाकुर, ज्योति मुंढे, सिमा रंगदळ, मनिषा गुळवे, अमृता वाकडे, वर्षा मानाळे, जयश्री. शहाणे, रिझवाना शेख, मुडपे आदि खेळाडूंनी विविध राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व व त्यातील काहींनी नेतृत्व केलेले आहे. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि स्वामी रामानंद तीर्थ

मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या दोन्ही विद्यापीठांच्या वतीने जिल्ह्याच्या अनेक खेळाडूंनी आंतर-विद्यापीठ स्पर्धांमध्ये आपले कौशल्य पणाला लावले आहे.

प्रा. बी. एन. पाटील यांनी सन १९७५-८० दरम्यान महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेचे सहसचिव पद, पंच, सांख्यिकी मंडळाचे सचिव पद, राष्ट्रीय स्पर्धेत (आदिलाबाद, आन्ध्रप्रदेश) सहभागी झालेल्या महाराष्ट्राच्या पुरूष संघाचे प्रशिक्षक पद अशा अनेक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडलेल्या आहेत. प्रा. विश्वनाथ गायकवाड यांनी सन १९९४-९८ दरम्यान महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेचे सचिव पद व सन २०००-२००४ दरम्यान तांत्रिक समिती सदस्य ह्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. खो-खो क्षेत्रातील कामाची पावती म्हणून प्रा. विश्वनाथ गायकवाड यांना महाराष्ट्र शासनाने 'शिवछत्रपती क्रीडा संघटक पुरस्कार' (२०००-२००१) देऊन गौरवांकित केले, तर प्रा. तात्यासाहेब कदम यांना खो-खो च्या क्षेत्रातील योगदानाबद्दल सन २००२-२००३ साली महाराष्ट्र शासनातर्फे जिल्हास्तरावर दिला जाणारा 'उत्कृष्ट क्रीडा कार्यकर्ता' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

व्हॉलीबॉल : वर उल्लेखिलेल्या भारतीय क्रीडा प्रकारांनंतर व्हॉलीबॉल हा पाश्चात्य क्रीडाप्रकार लातूर जिल्ह्यातील सर्वाधिक लोकप्रिय असलेला खेळ होय. व्हॉलीबॉल जिल्हा संघटनेची स्थापना सन १९८५ च्या दरम्यान झाली. माजी मंत्री श्री. बाळासाहेब जाधव (शिरूर ताजबंद) हे अध्यक्ष, तर प्रा. डी. डी. हंडे (औसा) हे सचिव पदाची जबाबदारी सांभाळीत आहेत. लातूर जिल्ह्याच्या व्हॉलीबॉल खेळाला एक मोठी परंपरा आहे. सन १९५५-६० च्या दरम्यान सर्वश्री केशवराव सोनवणे (माजी मंत्री), नईमोद्दीन वकील, ॲड. भारतलाल बाजपेयी, ॲड. ढगे आदी लातूर शहरातील प्रतिष्ठित मंडळी स्वत: व्हॉलीबॉल खेळत आणि दरवर्षी एक स्पर्धा देखील आयोजित करीत. उदगीर शहरात सन १९५८ च्या सुमारास तत्कालीन पोलिस उपअधीक्षक श्री. सावंत यांच्या पुढाकाराने गणेश उत्सवाची सुरुवात होऊन त्यात व्हॉलीबॉलसह अनेक क्रीडास्पर्धांचे आयोजन सुरू झाले. सर्वश्री अब्दुल्ला वकील, रशिद व आंध्रपदेश पोलीस दलात निरीक्षक असलेले खालेद (जे स्वत: व्हॉलीबॉलचे आंतरराष्ट्रीय खेळाडू होते) या कादरी बंधूंनी व्हॉलीबॉल कसा खेळावा याचे उदगीरमध्ये प्राथमिक धडे दिले. सन १९६०-८० या कालखंडात उदगीर हे व्हॉलीबॉलमुळे महाराष्ट्रभर परिचित झाले. याचे सारे श्रेय श्री. प्रभु केरबा पुदाले यांना नि:संशयपणे जाते.

व्हॉलीबॉल स्पर्धेत शिवाजीराव नलावडे, किशन सोमाणी आणि पाळणे बंधु हे आघाडीवर होते. फ्रेंडस व्हॉलीबॉल क्रीडा मंडळ आणि महाराष्ट्र क्रीडा मंडळाने लातूरचा लौकिक वाढविला. शेख इरफान यांची तेहरान (इराण) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली होती, तर परवेज शेख याने बंगलोर येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघाचे कर्णधारपद सांभाळले होते. मोईज शेख, कलीम शेख, संजय राजुरे, युसूफ शेख, इम्रानखान या मंडळाच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. सर्वश्री प्रभु पुदाले, लक्ष्मणराव बोरोळकर, हनुमंत पाटील (तोंडार), शिवलिंग बिरादार, मतीन कादरी, गोपीनाथ केंद्रे, यशवंत जालनापूरकर, वसंत पाटील, अतिख कादरी या खेळाडूंच्या संघाने राज्यस्पर्धेत विजेतेपद (१९७४-७५) पटकाविले. याच वर्षी प्रभु पुदाले यांनी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व देखील केले. सर्वश्री ज्ञानोबा तिरूके,

अब्दुल गणी, अंकुश पाटील, राजकुमार पटवारी, पंचप्पा दळगडे, मोईज शेख, आझम, महेश पाळणे अशा एक ना अनेक खेळाडूंनी आंतर-विद्यापीठ, राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले.

श्री. शिवहरराव पाळणे हे व्हॉलीबॉलला वाहून घेतलेले जिल्ह्यातील एक उमदे व्यक्तिमत्व. त्यांना व्हॉलीबॉलच्या विकासासाठीच्या प्रयत्नांची पावती म्हणून महाराष्ट्र शासनाने 'शिवछत्रपती क्रीडा संघटक पुरस्कार' (१९८५-८६) देऊन सन्मानित केलेले आहे.

श्री. अतिक कादरी हे मूळचे उदगीरचे. त्यांनी मुंबईच्या मोरारजी मिल्स तर्फे अनेकवेळा राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. त्यांना महाराष्ट्र शासनाने 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' देऊन सन्मानित केले असून ते सध्या अमेरिकेत वास्तव्यास आहेत.

आनंदवाडी (ता.उदगीर) येथील रहिवाशी असलेले व सध्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवाहन महामंडळ, उस्मानाबाद येथे सेवेत असलेले श्री. अंकुश पाटील यांनी राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' (१९८५-८६) देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

श्री. शेख मसिहुद्दीन नईमुद्दीन उर्फ परवेज शेख हे मुळचे उस्मानपुरा येथील रहिवासी असून, सध्या राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्स लि., अहमदनगर येथे सिनीयर मार्केटिंग फायनान्स म्हणून कार्यरत आहेत. आर.सी.एफ. व महाराष्ट्र राज्यातर्फे चौदा वर्षे (१९७९-१९९२) राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या लातूरच्या या सुपुत्राला महाराष्ट्र शासनाने 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' (१९८६-८७) देऊन सन्मानित केले आहे. त्यांनी सन १९८२ मध्ये दिल्ली येथे संपन्न झालेल्या एशियन ट्रायल गेम्स मध्ये महाराष्ट्राचे आणि १९८८ साली मुंबई येथे संपन्न झालेल्या इंडो-यु.एस.एस.आर. सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले होते.

श्री. बाबुराव डोणगांवकर यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे व्हॉलीबॉल राष्ट्रीय स्पर्धेत अनेक वेळा महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केलेले आहे. सन १९८२ साली दिल्ली येथे संपन्न झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत खेळाडूंचे निवासस्थान ते क्रीडांगण या वाहतूक व्यवस्थेची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली होती.

श्री. देशीकेंद्र विद्यालय, लातूर च्या मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने शालेय स्तरावर राज्यभर मोठा दबदबा निर्माण केला होता. कु. मेघा मुळजे या लातूर जिल्ह्याच्या महिला खेळाडूने सन २००१ मध्ये निझामाबाद (आंध्रप्रदेश) येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय महिला क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या व्हॉलीबॉल संघात सहभाग घेतला होता.

बास्केटबॉल : बास्केटबॉल जिल्हा संघटनेची स्थापना १९८२ साली श्री. शिवराजअप्पा चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. प्रा. बी. एन. नलवाड हे या संघटनेचे सचिव असून अहमदपूर येथे संघटनेचे मुख्यालय आहे. बालाजी पवार, सुनिल लामतुरे, शेख गफ्फार, शरद माने, मनोज रेड्डी, शेख नजीब, शशांक माने, राकेश आरदवाड, बबन चोपडे आदी खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले, तर युनूस गोलंदाज, सुरेन्द्र पाटील, अशोक पाटील, राधेशाम भगत, बासेद पठाण, शिवाजी हरणे, रितेश पाटील, अमित रेड्डी,

सलीम शेख, संदिप रायबोळे, सुशांत घाटोडे, प्रविण नलवाड, विनोद लाठकर, सय्यद एजाज, महेश पावले, राजेंद्र मुसळे, बजरंग जाधव, राजु जाधव, दिपक जाधव, गंगाधर छापडे, आसिफ शेख वगैरे असंख्य खेळाडूंनी राज्य व आंतरविद्यापीठ स्पर्धेत आपला सहभाग नोंदविलेला आहे. या जिल्हा संघटनेने अहमदपूर येथे सन २०००, २००१, २००२, २००३ साली राज्य स्तरावरील मुलामुलींच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

महाराष्ट्र क्रीडा मंडळाची स्थापना १९८४ साली झाली. याच मंडळाने सुरेश काळे, सुनील कांबळे, दिनकर पाटील, सुनील जाधव, हेमंत इंडे हे राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू निर्माण केले. या सर्व खेळांडूना प्रदीप सोनवणे, सुभाष काळदाते, प्रदीप राठी, एस. बी. पाळणे, बी. एम. दलगडे आणि डॉ. पठाण यांचे मार्गदर्शन लाभले. कु. आरती चव्हाण हिने काही खेळांत ११ वर्षाखालील गटात पाचवा क्रमांक मिळविला. भारतातील पहिल्या दहात येणाऱ्या प्रत्येक खेळातील खेळाडूंना मार्गदर्शन करण्याचे शासनाचे धोरण असून त्या खेळाडूंमधून निवडलेली ती एकमेव खेळाडू आहे. या शिवाय कु. किरण चामले ही एक उत्तम खेळाडू म्हणून महाराष्ट्रभर गाजते आहे. मराठवाडा विद्यापीठातर्फे उल्हास भोयरेकर, दिवाकर शेट्टी, अशोक मांडवीकर हे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत खेळलेले खेळाडू आहेत.

हॅन्डबॉल : १९८८ साली डॉ. अशोक सांगवीकर यांच्या अध्यक्षतेखाली हॅन्डबॉल जिल्हा संघटनेची स्थापना झाली. प्रा.बी.एन.नलवाड हे संघटनेचे सचिव असून संघटनेच्या कार्याचे मुख्य केंद्र अहमदपूर येथे आहे. या खेळात सर्वश्री शेख अयुब, सुरेंद्र बंबडे, महेश पौळे, मनोज रेड्डी, हेमंत गुट्टे, रितेश पाटील, जगरूप कराड, अमित रेड्डी, प्रकाश सुरकुटे, सुनिल सुरकुटे, अनिल फड, सुनिल शेटकार, शरद माने, गणेश पवार, सचिन पडीले, राकेश आरदवाड, शंकर परांडे, अप्पाराव फड, संदिप शास्त्री, स्वप्नील पेन्सलवार, महेश उगीले (कर्णधार), विलेश भंडारे, गजानन बिरादार, शशिकांत कांचे, प्रविण ससाणे, राहुल पांढरे, धिरज लामतुरे, राजाभाऊ मदने, राहुल घोडके, नितीन पबीतवार, लखन काळे, राजेश चौहान, प्रशांत नरवटे, अमोल किणीकर, धनंजय बहीर, दिपक डुरे, मुकेश कांबळे आदी खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले, तर संजय पवार, व्ही.व्ही.निजवंत, के. एच. जाधव, भास्कर कांबळे, रवि भुर्कापल्ले, शेख एकबाल, वैजनाथ सननुक, राजु सोनकांबळे, शेख सिकंदर, रहीम पठाण, रवि सोनकांबळे, राजु घोगरे, दुलेखान पठाण, चंद्रकांत डांगे, कैलास जाधव, चंद्रकांत गुट्टे, विनोद गायकवाड, रवि शेळके, अमित रेड्डी, विशाल तोगरे, संजय चाटे, महेश पवळे, नरसिंग दराडे, दिपक जाधव, देवानंद सूर्यवंशी, आशिष हिंगणे, महबुब सय्यद वगैरेसारख्या असंख्य खेळाडूंनी आंतरविद्यापीठ स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला आहे.

या जिल्हा संघटनेने सन २००१ व २००५ साली शालेय पातळीवरील राज्यस्पर्धा अहमदपूर येथे यशस्वीरित्या आयोजित केली होती.

क्रिकेट : श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या नेतृत्त्वाखाली सन १९८३ साली जिल्हा क्रिकेट संघटनेची स्थापना झाली. प्रा. भरत चामले हे या संघटनेचे संस्थापक सचिव आहेत.

माजी उपजिल्हाधिकारी श्री. काझीम हुसेन, न्यायाधीश श्री. सप्रे, रेल्वे स्टेशन मास्तर श्री. घाटनेकर, हिन्दुस्तान लिव्हर कंपनीचे अधिकारी श्री. पटभद्री अशा जुन्या मंडळींनी सन १९५३ दरम्यान लातूर मध्ये क्रिकेटची सुरुवात केली. त्या छोट्याशा सुरुवातीचे आज मोठ्या संघटनेत रूपांतर झाले असून सध्याचे अध्यक्ष श्री. कमलेश ठक्कर यांच्या नेतृत्वाखाली राज्य संघटनेच्या विविध स्पर्धांमधून जिल्ह्याचे अनेक खेळाडू चमकत आहेत.

श्री. प्रसाद कानडे यांनी चेन्नई येथील एम.आर.एफ. पेस अॅकॅडमी मध्ये १९८६-८८ दरम्यान जलदगती गोलंदाजीचे प्रशिक्षण घेतले. सन १९८९ मध्ये महाराष्ट्रातर्फे 'रणजी ट्रॉफी' या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत पदार्पण करीत त्यांनी सन १९९७ पर्यंत 'देवधर ट्रॉफी', 'विल्स ट्रॉफी' व 'दुलिप ट्रॉफी' या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. ते सध्या पुण्यात स्थायिक आहेत. कानडेंच्या पावलावर पाऊल टाकत सर्वश्री किशोर भिकाने, अक्षय तांदळे व गणेश सूर्यवंशी यांनी १९ वर्षे वयोगटातील, तर आशिष सूर्यवंशी याने १७ वर्षे वयोगटातील राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे.

हेमंत बोरा, उल्हास भोयरेकर, दिवाकर शेट्टी, कृष्णा राव, अशोक मांडवेकर, महेश बेंबडे, विजय खानापुरे, सुशिल सुडे, मोहसिनखान, सिकंदर शेख, सत्यजित देशमुख, अशोक गडदे, अभिनव मोहिते आदी खेळाडूंनी आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे.

बॅडमिंटन : श्री. अजित कामदार यांच्या अध्यक्षतेखाली १९५३ साली बॅडमिंटन जिल्हा संघटनेची स्थापना झाली असून अॅड. आशिष बाजपेयी हे सचिव आहेत. सन १९५३ साली अॅड. भारतलालजी बाजपेयी, श्री. काझीम हुसेन, नगर पालिकेचे मुख्याधिकारी श्री. गिब्ज अशा प्रतिष्ठित मंडळींनी लातूरमध्ये बॅडमिंटन हा खेळ सुरू केला. १५ फूट उंची असलेल्या टाऊन हॉलमध्ये गॅसबत्ती लावून हा खेळ खेळला जात असे. त्यानंतर सन १९८६ साली बचत भवनमध्ये आणि सन २००० पासून जिल्हा क्रीडा संकुलाच्या भव्य हॉलमध्ये बॅडमिंटनचा आनंद लुटला जात आहे.

श्री. आशिष बाजपेयी, कु. मिरा निरगुडे, नागरडोंगरे, सर्वश्री पंकज पाठक, प्रसाद चिंचोलकर, भास्कर रेड्डी, निलेश सोमाणी, मंगेश कुलकर्णी, आनंद खुब्बा, आकाश कामदार, कृष्णा अडसुळ, सचिन चामे, प्रशांत मांगुळकर आदिंनी बॅडमिंटन आंतरविद्यापीठ स्पर्धेत भाग घेतला होता.

म. बसवेश्वर महाविद्यालयात कार्यरत असलेल्या प्रा. भास्कर रेड्डी यांनी १९९२-९३ साली राष्ट्रीय शालेय स्पर्धेत व १९९६-९७ साली पुरुष राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. १९९६-२००१ सालापर्यंत त्यांनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॅडमिंटन स्पर्धेत नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचेही प्रतिनिधित्व केले होते.

कुमारी आरती चव्हाण, शितल चापसी, वैशाली तेरकर यांचा सहभाग असलेल्या मुलींच्या संघाने १९८४-८५ साली राज्य बॅडमिंटन स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. जिल्हा संघटनेने सन १९८४-२००६ या कालावधीत चार वेळा ज्युनियर व तीन वेळा सिनियर राष्ट्रीय अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले होते.

अनुक्रमणिका

मैदानी खेळ : १९८५ साली प्राचार्य डॉ. ना. य. डोळे यांच्या अध्यक्षतेखाली लातूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेची स्थापना झाली. प्रा. निळकंठ बंडेप्पा संकाये हे या संघटनेचे सचिव आहेत.

सन १९९१ साली त्रिचुर येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेतील थाळीफेक या क्रीडा प्रकारात श्री. शेख जैनोद्दीन याने, तर कटक येथे सन १९९१ साली संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेतील १०० मी. धावणे या क्रीडाप्रकारात श्री. शेख फैयाजोद्दीन याने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. सांगली येथे सन १९९१-९२ साली संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेतील लांब उडी या क्रीडा प्रकारात श्री. एम. डी. जोशी याने आणि कु. सविता श्रीमंगले हिने सन १९९८-९९ साली निझामाबाद (आंध्रप्रदेश) आणि रोहतक (हरियाणा) येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये ३००० मी. धावणे या क्रीडाप्रकारात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. कु. लक्ष्मी कांबळे हिने सन २००२-२००३ साली जलपायगुडी (पश्चिम बंगाल) येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत ५ कि.मी. चालणे या क्रीडा प्रकारात, तर श्री. दिम दस्तगीर डांगे याने १५०० मी. धावणे या क्रीडा प्रकारात सन २००५-२००६ साली भिवानी (हरियाणा) येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. तसेच श्री. विक्रम चिंते व कु. अनिता किनकर यांनी देखील राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे.

सध्या शिरूर ताजबंद येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात कार्यरत असलेल्या प्रा. भास्कर माने यांनी मैदानी खेळात अनेक मैदाने गाजविली आहेत. सन १९९४-९५ साली पुणे येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेतील ४०० मी. व ८०० मी. धावणे या क्रीडा प्रकारात त्यांनी अनुक्रमे तिसरा व दुसरा क्रमांक, तर ४ × ४०० मी. रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. याच वर्षी मुंबई येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेतील ८०० मी. धावणे या क्रीडा प्रकारात त्यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.

रशिद कुरेशी, विट्ठल गिते, शेख इस्लाईल, अमृत वाकुडे, प्रकाश वाडकर, संजय कुलकर्णी, भास्कर माने, युसुफ रहिमी, अजय दंडवते, लक्ष्मण केंद्रे, व्ही. आर. फड, प्रल्हाद केंद्रे, विनायक थोरे, सूर्यकांत चावले, शेख अहमद रसुलसाब, बाळासाहेब उगले, शेख जैनोद्दीन, विक्रम चिंते, प्रभाकर कांबळे, कुमारी रुक्मिणी मुंडे, पुष्पा कोरे, सविता श्रीमंगले, शेख शबाना अ. रहीम, लक्ष्मी कांबळे, हुसेनबी पठाण, कविता कलवले आदिंसारख्या अनेक खेळाडूंनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेतील विविध क्रीडाप्रकारात आपले कौशल्य दाखविलेले आहे.

फूटबॉल : फूटबॉल हा उदगीर तालुक्यात अत्यंत लोकप्रिय असलेला क्रीडाप्रकार आहे. जिल्हा परिषद हायस्कूलच्या मैदानावर व्हॉलीबॉल, कबड्डीसह फूटबॉल हा क्रीडा प्रकार साधारणपणे १९५८-६० पासून चालतो आहे तो तत्कालीन शिक्षक श्री. अब्दुल रहमान यांच्या प्रेरणेमुळे. उदगीरने या जिल्ह्याला सय्यद नुर, अझिम ख्वाजा, अब्दुल बारी, बसवा भानु, वैजनाथ महाजन, भीम बडी हवेली, विश्वनाथ हुडगे, अविनाश रायचूरकर, काशिनाथ रंगवाल आदी नामांकित फूटबॉलपटू दिले आहेत.

शेख पाशा, इस्तीयाख कादरी, प्रकाश वाडकर, जहुर सिद्दीकी, कलीम हाश्मी, सय्यद इमरान हाश्मी, शेख नजीब मोमीन, बहाऊद्दीन जहागीरदार, सय्यद नुर, शेख इस्माईल, सय्यद वासिफ हाश्मी, हसन कादरी, सय्यद इमाम, सलिम अतनुरकर, परवेज कादरी, नबीजी माजीद अहमद अशा अनेक खेळाडूंनी आंतर विद्यापीठ फूटबॉल स्पर्धेत आपले कौशल्य पणाला लावले आहे.

बॉल बॅडमिंटन : जिल्हा बॉल बॅडमिंटन संघटनेची स्थापना श्री. बाबासाहेब भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झाली. श्री. नानासाहेब माने हे या संघटनेचे सचिव आहेत. अहमदपूर येथे संघटनेचे मुख्यालय आहे. रेल्वे, टेलिफोन आदी शासकीय खात्यातील दक्षिण भारतीय कर्मचाऱ्यांनी स्वातंत्र्यानंतर बॉल बॅडमिंटन हा खेळ लातूर जिल्ह्यात सुरू केला.

सन २००० मध्ये भिलई येथे संपन्न झालेल्या ज्युनियर नॅशनल बॉल बॅडमिंटन स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या श्री. शेख असद चांद पाशा या खेळाडूस उत्कृष्ट उदयोन्मुख खेळाडू पुरस्कार देण्यात आला. शेख असद यांनी सन २००१ मध्ये संपन्न झालेल्या इंडो-नेपाळ बॉल बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते.

विजय कांबळे, विक्रम चिंते, विनोद चिंते, सतिश डोंगे, सचिन चिडगुप्पे, बालाजी कुंभार, जावेद मिर्झा, अशोक हलसे, शेख असद, श्रीगणेश बुजरे, व्यंकट गुणाले, शिवाजी हरणे, सुभाष गुट्टे, विजय कुंटे, पद्माकर कोम्पले आदी असंख्य खेळाडूंनी विविध राज्य, राष्ट्रीय व अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये नैपुण्य दाखविलेले आहे.

याशिवाय टेबल टेनिस, बुध्दीबळ, हॉकी, मलखांब, योगासने आदी क्रीडाप्रकार देखील जिल्ह्यात चालू असतात. क्रीडा क्षेत्राला समर्पित असलेले अनेक प्रशिक्षक, शारीरिक शिक्षक व प्राध्यापकांमुळे लातूर जिल्हा क्रीडा क्षेत्रात समृध्द झालेला आहे.

देशभर विविध क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातर्फे खेळलेल्या काही खेळाडूंची नावे पुढील प्रमाणे आहेत :—एस.के.कोराळे, उत्तम भोईवार, सुरेश जाधव, अशोक काळे, गोरख वाघमारे, सरंसापे हरिश्चंद्र, गिता गिरवलकर, सुवर्णा आर्य, संगीता सुराणा, रुपाली कोंडेकर, शबाना सय्यद, कु. जे. बी. नाडे, चंद्रकांत कांबळे, प्रकाश आयरेकर, दयानंद उजळंदे, एस. एस. सोनवणे, मनिषा पाटील, अंकुश भोसले, संभाजी कोळणे, लहू भोसले, अर्जून म्हस्के, नारायण धनगावकर इत्यादी.

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत मराठवाडा विद्यापीठातर्फे खेळलेले काही विद्यार्थी पुढीलप्रमाणे :--- कु. के. व्ही. नरहरे, कु. व्ही. ए. परंडेकर, एस. के. साळुंके, कु. एस. एस. जाधव, कु. ए. एन. चव्हाण, एस. एस. मुसने, कु. के. सी. बनसोडे, एस. जी. पवार, कु. सी. एस. ठाकूर, एन.जी. पेठकर, व्ही. एस सोनटक्के., अशोक भोसले, कु. विजया सावरीकर, पांडुरंग ढगे, सिताराम शितोळे, चंद्रकांत माने, एन. आर. तोरे, एस. व्ही. सुरवसे, कु. एस. एस. मुळे, पी. जी. शिरसाठ, टी. एन. कदम, जी. पी. वाघमारे, कु. ज्योती कुलकर्णी, बंडू कुलकर्णी, नाना काळे, सुरेखा पोतदार, अरुणा शिराळकर, अनिता भोईटे, वनमाला जाधव, शिला वाडे, शर्मिला नाडे, संगीता पाटील, रमेश गोमारे, मिनाक्षी तोलापुरे, संगीता राऊत इत्यादी. यांची क्रीडा क्षेत्रातील कामगिरी उल्लेखनीय आहे.

केंद्रशासन व महाराष्ट्र शासन यांच्या क्रीडा व युवक सेवा मंत्रालयातर्फे उत्कृष्ट क्रीडा सेवेबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेल्या लातूर जिल्ह्यातील मान्यवर व्यक्ती

अ.क्र.	नाव	पुरस्काराचे नाव	क्षेत्र	वर्ष
१	श्री. शिवहरराव पाळणे	शिवछत्रपती क्रीडा संघटक	व्हॉलीबॉल	१९८५-८६
२	प्रा. गणपतराव माने	शिवछत्रपती क्रीडा संघटक	कबड्डी	१९८६-८७
३	प्रा. माधवराव बावगे	राष्ट्रीय युवा पुरस्कार	युवकसेवा	१८८९-९०
४	प्रा. विश्वनाथ गायकवाड	शिवछत्रपती क्रीडा संघटक	खो-खो	२०००-०१
५	प्रा. तात्यासाहेब कदम	जिल्हा क्रीडा कार्यकर्ता	खो-खो	२००२-०३
६	श्री. धर्मपाल गायकवाड	शिवछत्रपती क्रीडा संघटक	कबड्डी	२००४-०५
७	आ. श्री. चंद्रशेखर भोसले	राज्य युवा पुरस्कार	युवकसेवा	२००५
८	श्री. चंद्रकांत पाटील	शिवछत्रपती क्रीडा संघटक	कबड्डी	२००५-०६
९	श्री. हरिश्चंद्र बिराजदार	शिवछत्रपती क्रीडा संघटक पुरस्कार	कुस्ती	१९७२-७३
		ध्यानचंद जीवनगौरव पुरस्कार	कुस्ती	२००५-२००६

जिल्ह्यातील नेतृत्व : प्रसिध्द संसदपटू व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री. शिवराज विश्वनाथ पाटील[३२] हे चाकूरचे होत. सन १९३५ मध्ये जन्मलेल्या श्री.पाटील यांनी जिल्हा, राज्य व देशपातळीवर मानाची विविध पदे भूषविली आहेत.१९६७ ते १९७२ या काळात ते लातूर नगरपरिषदेचे सदस्य होते. त्यानंतर त्यांनी लातूर युवक काँग्रेस समितीचे अध्यक्षपदही भूषविले आहे. जगत जागृती शिक्षण संस्थेचे सभासद असलेले श्री. पाटील यांची १९७२ मध्ये महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून निवड झाली होती. राज्य शासनाच्या विविध व महत्त्वाच्या खात्यांचे राज्यमंत्री व कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. १९७७-७८ या काळात ते महाराष्ट्र विधान सभेचे उपाध्यक्ष, तर १९७८ ते ७९ या काळात अध्यक्ष होते. त्यानंतर त्यांनी केंद्रीय राजकारणात प्रवेश करून तेथेही आपल्या नावाचा ठसा उमटविला आहे. सातव्या लोकसभेपासून ते सतत लोकसभेवर निवडून आले आहेत. १९९०-९१ या काळात नवव्या लोकसभेचे उपाध्यक्ष म्हणून, तर १९९१-९६ या काळात दहाव्या लोकसभेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी देशाच्या राजकारणात आपली छाप पाडली आहे. सध्या ते देशाचे विद्यमान गृहमंत्री म्हणून आपले कर्तव्य बजावित आहेत. त्यांनी 'माय मेमरीज' हे आत्मचरित्रपर पुस्तक लिहिले आहेत.

डॉ. शिवाजीराव भाऊराव निलंगेकर-पाटील[३३] हे निलंग्याचे सुपुत्र होत. त्यांचा जन्म दिनांक ९ फेब्रुवारी १९३१ रोजी ननंद येथे झाला. राजकारण व समाजकारणाची आवड असलेल्या डॉ. पाटील यांनीही जिल्हा पातळीपासून ते राज्य पातळीपर्यंत अनेक महत्त्वाची

३२. **हूज हू, थर्टीन्थ लोकसभा,** लोकसभा सेक्रेटरिएट, न्यू दिल्ली, २०००, पृ.७५०-७५२.

३३. दहावी महाराष्ट्र विधानसभा १९९९, **सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय,** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई, २०००, पृ.४९२-४९४.

पदे भूषविलेली आहेत. महाराष्ट्र शिक्षण संस्था, निलंगा चे ते संस्थापक अध्यक्ष असून या संस्थेमार्फत त्यांनी अनेक प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये व वसतिगृहे सुरू केलेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ते स्थापनेपासून सिनेट सदस्य आहेत. उस्मानाबाद व लातूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ते कटिबद्ध आहेत. १९४८ च्या हैद्राबाद मुक्ती संग्रामात त्यांचा सक्रिय सहभाग होता. सन १९६२ ते ६७ या काळात ते उस्मानाबाद जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे सदस्य होते. सन १९६२ पासून १९९५ पर्यंत ते सतत विधानसभेवर निवडून गेले होते. या काळात त्यांनी शासनाच्या विविध खात्यांचे राज्यमंत्री व कॅबिनेटमंत्री म्हणून कर्तव्य बजावलेले आहे. दि.३ जून १९८५ ते दि.७ मार्च १९८६ या काळात तर त्यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविले आहे. त्यानंतर १९९० मध्ये त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडली होती. सन १९९९ मध्ये त्यांची महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड झाली होती. सध्या ते राजकारणाबरोबरच समाजकार्यातही व्यग्र आहेत.

लातूर जिल्ह्याच्या व पर्यायाने महाराष्ट्राच्या विकासाला खऱ्या अर्थाने चालना देणारे नेतृत्व म्हणून महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री श्री. विलासराव दगडोजीराव देशमुख[३४] यांच्याकडे अंगुलीनिर्देश करावा लागेल. दि. २६ मे १९४५ रोजी जन्मलेल्या श्री. देशमुख यांचा सुरुवातीपासूनच राजकारण व समाजकारणाकडे ओढा होता. ग्रामपातळीपासून ते देशपातळीपर्यंत चमकलेले नेतृत्व म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागतो. सन १९७१ ला त्यांनी दुष्काळ निवारण समितीचे चिटणीस म्हणून आपल्या समाजकारणाचा श्रीगणेशा केला. त्यानंतर भारत स्काऊट आणि गाईड, लातूर लोकल असोसिएशन; लातूर कृषि उत्पन्न बाजार समिती, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अशा विविध संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वाची पदे भूषविली आहेत. सन १९७४ ते १९७६ या काळात ते आपल्या बाभळगाव ग्रामपंचायतीचे सरपंच होते. त्यानंतर त्यांनी उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे सदस्य व लातूर तालुका पंचायत समितीचे उपसभापती म्हणून कर्तव्य बजावले आहे. तालुका इंदिरा काँग्रेसचे ते अध्यक्षही होते.

सन १९८० ते १९९५ व १९९९ ते २००४ या काळात त्यांनी बहुमताने विधानसभेवर निवडून जाऊन विविध खात्यांचे राज्यमंत्री व कॅबिनेट मंत्री म्हणून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. दि. १८ ऑक्टोबर १९९९ ते १८ जानेवारी २००३ या काळात त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषवून महाराष्ट्राची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कठोर निर्णय घेतले व त्याची अंमलबजावणीही केली. त्यात इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषय व माहिती तंत्रज्ञानावर भर देणारे नवे औद्योगिक धोरण, जैव तंत्रज्ञान धोरण, जुन्या झोपड्यांना कायद्याने संरक्षण, ग्रामसभांना सर्वाधिकार, वाड्या-तांड्यातील मुलांसाठी वस्तीशाळा, राज्य अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना, संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अनुदानात वाढ,मुद्रांक शुल्क आणि नोंदणी कार्यालयांचे संगणकीकरण, नवी मुंबई येथे विशेष आर्थिक क्षेत्रास मंजुरी, गुटखा बंदी, मुंबईस जागतिक दर्जाचे शहर बनविण्याच्या कामास सुरुवात,

३४. अकरावी महाराष्ट्र विधानसभा २००४, **सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय,** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई, २००५, पृ.३७८-३८१ व डॉ.सुदर्शन मोरे यांनी पुरविलेल्या माहिती आधारे.

राज्यातील सर्व शेतकऱ्यांना अपघात विमा योजनेचे संरक्षण वगैरे अनेक निर्णयांचा समावेश आहे. आतापर्यंतच्या काळात त्यांनी जपान, थायलंड, फिलिपाईन्स, तैवान, हाँगकाँग, प. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांचे अभ्यास दौरे केले आहेत. ऑक्टोबर २००४ मध्ये त्यांची विधानसभेवर बहुमताने निवड झाल्यानंतर दि. १ नोव्हेंबर २००४ पासून ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी कार्यरत आहेत.

लातूर जिल्ह्याच्या विकासात मोलाची भूमिका पार पाडीत असलेले व्यक्तिमत्व म्हणून श्री.दिलीपराव देशमुख यांच्याही नावाचा उल्लेख अटळ आहे. सन १९८८ पासूनच ते राजकारण, विशेषत: समाजकारणात रस घेऊ लागले. मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट, लातूर; दयानंद शिक्षण संस्था, बाभळगाव; वेगवेगळ्या कुस्ती परिषदा, अन्य क्रीडा संघटना, कृषी उत्पन्न बाजार समिती, लातूर; मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक विभागीय मंडळ (मराठवाडा विभाग), औरंगाबाद अशा कित्येक संस्थांमध्ये त्यांनी मानाची व जबाबदारीची पदे सांभाळली आहेत. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस अशा पक्षांतर्गत संघटनेच्या माध्यमातून ते सन १९९२-९७ या काळात लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष बनले. त्यानंतर २००१ मध्ये त्यांची महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड झाली. वित्त व नियोजन खाते तसेच उच्च व तंत्रशिक्षण व रोजगार हमी योजना खात्याचे राज्यमंत्री म्हणून त्यांनी प्रभावीपणे काम केलेले आहे.

वरील लोकनेत्यांव्यतिरिक्त किसनरावजी देशमुख, माणिकराव जाधव, भगवानरावजी नागरगोजे, म. ब. सांगवीकर, श्री. तोंडचीरकर, वसंत काळे, पद्माकर पाटील, दिनकरराव माने, रामचंद्र नावंदीकर, गोविंद केंद्रे, विनायकराव जाधव (पाटील), श्रीमती रुपाताई निलंगेकर-पाटील, बब्रुवान खंदाडे, चंद्रशेखर भोसले, त्र्यंबक कांबळे, संभाजीराव निलंगेकर-पाटील यासारखे अनेक लोकप्रतिनिधी जिल्ह्याच्या विकासासाठी झटत आहेत. नव्या पिढीतील तरुणांनीही आता राजकारण व समाजकारणात प्रवेश केला असून तेही आपापल्या परीने जिल्ह्याच्या व पर्यायाने राज्याच्या विकासकार्याची जबाबदारी पार पाडीत आहेत.

वृत्तपत्रे व पत्रकारिता[३५]

भारतीय स्वातंत्र्यापूर्वी लातूरसह मराठवाड्यातील अन्य जिल्हे निजामी राजवटीखालील हैद्राबाद संस्थानात समाविष्ट असल्याने वृत्तपत्र व्यवसाय व पत्रकारितेच्या इतिहासाचा जिल्हानिहाय स्वतंत्ररित्या वेध घेता येत नाही. असा वेध हैद्राबाद संस्थानाच्या भारतीय संघराज्यातील विलिनीकरणानंतरच घेता येतो. तोपर्यंत मराठवाडा हा भूभाग नजरेसमोर ठेवूनच वृत्तपत्र व्यवसायाच्या इतिहासाचा मागोवा घ्यावा लागतो. त्यामुळे लातूर जिल्ह्यालाही भारतीय स्वातंत्र्यापर्यंत वृत्तपत्र व पत्रकारितेचा स्वतंत्र इतिहास नाही. त्यानंतरचा इतिहास मात्र उज्ज्वल आहे. आजच्या मराठवाडा विभागातील मराठी वा अन्य भाषिक पत्रव्यवसायाचा इतिहास फार जुना नाही. मराठवाड्यातील आजचे जिल्हे जुन्या हैद्राबाद संस्थानात होते.

३५. या विभागाच्या लेखनासाठी रा.के.लेले यांच्या **मराठी वृत्तपत्रांचा इतिहास** या ग्रंथाचा व अद्ययावत माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. **मराठी वृत्तपत्रांचा इतिहास**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४, पृ.६४२-४३,८२५-४४,१०८२-८३.

हे मराठी भाषिक जिल्हे व खुद्द हैद्राबाद शहरातही मराठी भाषिकांची संख्या मोठी आहे; पण तेव्हा उर्दूचा पराकाष्ठेचा वरचष्मा असल्याने, मराठी शिक्षण मिळणेही दुरापास्त असे. यामुळे वृत्तपत्र काढण्यास परवानगी मिळणे दुष्करच होते. हैद्राबाद संस्थानात १८६४ साली इंग्रजी व १८७८ साली उर्दू वर्तमानपत्रे निघाली; पण मराठी वृत्तपत्र निघण्यास आणखी काळ जावा लागला. प्रामुख्याने राज्य पुनर्रचनेनंतर तो प्रदेश इतर मराठी भाषिकांशी निगडित झाला तेव्हाच साधारणतः ही वृत्तपत्रे निघू लागली. 'औरंगाबाद समाचार' नावाचे एक वृत्तपत्र इ.स. १८८३ मध्ये सुरू होते. हे पत्र १८८२ च्या अखेरपासून प्रसिद्ध होऊ लागले असावे. ते शिळाप्रेसवर छापले जाई. आजच्या लातूरमध्येही हे पत्र उपलब्ध असे.

इ.स.१८९७ साली 'निजाम वैभव' नावाचे एक वृत्तपत्र निघू लागले होते. १९०६-०८ पर्यंत 'भाग्येश-विजय' नावाचे एक पत्र सुरू होते. १९०८-०९ च्या सुमारास औरंगाबाद व बीड येथे शिळाप्रेसवर काही साप्ताहिके निघत असत; पण ती अल्पजीवी व अल्पपरिणामी ठरली. मात्र तत्कालिन लातूर भागातून असे वर्तमानपत्र किंवा साप्ताहिक निघत असल्याची नोंद आढळत नाही. मराठवाड्यात बाहेरून येणाऱ्या पत्रांवर निर्बंध होते; एवढेच नव्हे, तर रेडिओच्या वार्ता ऐकण्यावरही बंधने होती. त्यामुळे मराठी पत्रकार प्रवृत्ती ही कमी-अधिक प्रमाणात इ.स. १८९४ पासून प्रकटनाची सारखी धडपड करीत असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसते. यावर्षी रामचंद्र वासुदेव कुलकर्णी यांचे हैद्राबादहून 'भाग्यनगर', इ. स. १८९७ ला नरसो मुकुंदराव यांचे 'भाग्येश-नगर', तसेच इ.स. १८९८ ला 'चंपावती' व 'गुलबर्गा-समाचार' ही पत्रे शिळा प्रेसवर निघत असल्याचे सरकारी ऐतिहासिक कागदपत्रांवरून समजते. यावेळी केसरी, काळ, हिंदू-पंच, नवा काळ, लोकशक्ती, त्रिकाळ, ज्ञान प्रकाश, चित्रमय जगत, किर्लोस्कर, स्त्री, मनोहर अशी बाहेरची दैनिके व मासिके मराठवाडा विभागात येत.

सन १९४८ साली हैद्राबाद संस्थान निजामी सत्तेतून पोलिस कारवाईने मुक्त झाल्यानंतर १९५६ साली राज्य पुनर्रचनेन्वये मराठवाडा विभाग इतर मराठी भाषिक मुलुखाशी जोडला गेला. त्यानंतरच मराठवाडा विभागात वृत्तपत्रांचा खऱ्या अर्थाने मुक्त संचार सुरू झाला. यावेळेपर्यंत दीर्घकाळ हैद्राबाद संस्थानचा घटक राहिलेल्या मराठवाड्यात प्रजेला कोणतेही नागरिक स्वातंत्र्य नव्हते. 'मुकी बिचारी कुणी हाका' अशा अगतिक अवस्थेत लोकांना जीवन कंठावे लागत होते. सर्वच संस्थानी मुलूख सरंजामी अवस्थेत होता. आधुनिकतेपासून अनेक योजने दूर असलेल्या राजवटीत नागरिकांचे जीवन सर्व बाजूंनी गुदमरून गेले होते. सामाजिक जीवन जणू नव्हतेच ! प्रजेला आपली दुःखे बोलून दाखविण्याचे, लिहून प्रकट करण्याचे किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे नागरिक स्वातंत्र्य नसल्याने हैद्राबाद संस्थानातील प्रजेला प्रथम मनुष्य म्हणून, नागरिक म्हणून जगण्यास शिकविण्याची गरज होती. अशा प्रतिकूल स्थितीत वृत्तपत्रांचा उदय होणे अशक्य होते.

असे असले, तरी हैद्राबाद शहरात मराठी भाषिक वस्ती आजही बरीच आहे. शिवाय राजधानीचे शहर म्हणूनही तेथे मराठी पत्र सुरू करण्याचा प्रयत्न झाल्याचे आढळते. १८७७ साली 'दख्खन पंच' नामक उर्दू पत्र हैद्राबादेत निघाले होते. वासुदेवराव औरंगाबादकर नावाच्या एका मराठी भाषिकाने १८८४ साली हैद्राबादेत 'मुशीर-इ-दक्कन' नावाचे उर्दू दैनिक सुरू केलेही होते; पण यातही हैद्राबादलाच निघालेल्या 'निजाम-विजय' या मराठी

साप्ताहिकाचा खास उल्लेख करावा लागेल. हे पत्र काढण्यात लक्ष्मण बळवंत फाटक यांचा पुढाकार असला, तरी नांदेडचे दिगंबरराव बिंदू यांचेही त्यांना पत्राच्या कामात चांगले सहाय्य असे. हे गृहस्थ पुढे हैद्राबाद राज्याचे गृहमंत्रीही बनले होते. वृत्तपत्रातून लेखन करण्याची त्यांना आवड होती. लक्ष्मणराव फाटक यांनी 'बोध' नावाचे जे मासिक सुरू केले होते, त्यातही दिगंबरराव बिंदू लेखन करीत असत.

'बोध' मासिक सरकारी अवकृपेने लवकरच बंद पडले; पण फाटक व बिंदू यांची लेखनाची आवड व गरज अपुरी राहिली होती. त्यासाठी या दोघांनी फाटकांच्या मालकीच्या एका छोट्या हॅण्डप्रेसच्या आधारावर साप्ताहिक सुरू केले. याच्या लेखनाची जबाबदारी बिंदू सांभाळीत. 'निजाम-विजय' साप्ताहिकाचा पहिला अंक दि.१२ डिसेंबर १९२० रोजी प्रसिद्ध झाला. या पत्रात राजकीय स्वरूपाचे लेख लिहू नयेत असे बंधन असूनही बिंदूंनी असे अनेक लेख बेधडकपणे लिहिले. या पत्राने मराठी जनतेत लोकजागृती करण्यासाठी तत्कालिन बिकट परिस्थितीत बहुमोल कामगिरी बजावली. पुढे या पत्राचे लक्ष्मणरावांचे चिरंजीव वासुदेवराव फाटक यांनी 'लोकविजय' असे नामांतर करून मराठवाडा महाराष्ट्रात सामील होईपर्यंत चालविले. यावेळी महाराष्ट्रातून येणाऱ्या अनेक पत्रांवर बंदी होती. नुसता छापखाना सुरू करण्यासाठी लागणारी निजाम सरकारच्या एक्झिक्युटिव कौन्सिलची परवानगी वर्षानुवर्षे मिळत नसे. वृत्तपत्रस्वातंत्र्याची गळचेपी केली गेली होती. सरकारमान्य पत्रेही सर्वसामान्य माणसाला वाचण्यास उपलब्ध होऊ नयेत म्हणून सरकारने वाचनालयेही राजकीय संस्थांच्या यादीत समाविष्ट केली व वर्तमानपत्रे वाचणे मुश्किल करून ठेवले होते. वाचनालयात नियमित येणाऱ्यांची पोलिसांकडून नोंद घेतली जात असे.

अशी परिस्थिती असली तरी पूर्वोक्त 'मुशीर-इ-दक्कन' या उर्दू दैनिकाचे चालक वासुदेवराव औरंगाबादकर यांनी एक मराठी साप्ताहिक काढण्याचे ठरवून परवानगीही मिळविली. त्या पत्राचे नाव 'नागरिक' असे होते व संपादनाची सुत्रे देविदासराव महाजन यांच्याकडे देण्यात आली होती. हे पत्र प्रथम हैद्राबादहून निघणार होते. या पत्राचा पहिला अंक दि.१० एप्रिल १९२९ रोजी गुढी पाडव्याच्या दिवशी प्रसिद्ध होऊन लातूरसह संपूर्ण मराठवाड्यात उपलब्ध करून देण्यात आला. या पत्रात बाबली दीक्षित यांची व्यंगचित्रे प्रसिद्ध होत असत. पुढे या पत्राचे संपादन महाजनांनंतर पाध्ये नावाचे गृहस्थ करू लागले; पण त्यांनीही हे काम सोडल्यावर दिगंबरराव बिंदू याची संपादकीय जबाबदारी सांभाळीत होते.

१९२९ मध्ये 'गश्ती निशान ५३ ' म्हणून गाजलेले काळे पत्रक काढून निजाम सरकारने सर्व प्रकारच्या सभा व पत्रांवर बंदी घातली. वर उल्लेखिलेले 'निजाम-विजय' साप्ताहिकही यामुळे सहा महिने बंद ठेवावे लागले. याच आपत्तीमुळे 'नागरिक' पत्र दि.८ ऑगस्ट १९३१ रोजीचा अंक प्रसिद्ध होऊन बंद पडले. 'राजहंस' नावाचे एक मराठी मासिकही काही दिवस चालविण्यात आले होते.

वृत्तपत्र व्यवसायाच्या वरील इतिहासानंतर प्रामुख्याने 'मराठवाडा' साप्ताहिकाकडेच वळावे लागते. मराठवाड्यातील पत्रकारितेचा इतिहास फार मोठा नसला तरी, लढ्यातील तिच्या कामगिरीमुळे तो महत्त्वाचा खासच आहे. लातूरसह मराठवाड्यातील तत्कालिन पत्रे

म्हटली म्हणजे 'अमरज्योती', 'निजाम-विजय', 'मराठवाडा' अशी काही हाताच्या बोटांवर मोजता येण्यासारखी वृत्तपत्रे आणि लक्ष्मणराव फाटक, श्री. के. गोळेगावकर, आनंदराव वाघमारे असे काही जुन्या पिढीतील थोडकेच झुंजार संपादक आठवावे लागतात. मराठवाडा साप्ताहिक दि.१० फेब्रुवारी १९३८ रोजी जन्माला आले. हा काळ हैद्राबादमध्ये राजकीय चळवळीची बांधणी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. यामुळे चळवळीसाठी स्वतंत्र विचाराच्या निर्भय पत्राची तीव्र गरज भासू लागली होती. अशा पत्रासाठी निजाम सरकारची परवानगी मिळविणे हे काम सोपे नव्हते. उर्दू व्यतिरिक्त संस्थानात मराठी, तेलुगू व कन्नड भाषिकांची संख्या मोठी असूनही त्या भाषांतील वर्तमानपत्रांसाठी परवानगी मिळत नसे. बाहेरून येणाऱ्या वर्तमानपत्रांवर तत्परतेने बंदी घालण्यात येत असे. तरीही शेजारच्या प्रांतातील उदा. नागपूरचे 'महाराष्ट्र', अकोल्याचे 'मातृभूमी', पुण्याचे 'संस्थानी स्वराज्य' इत्यादी पत्रांचे त्या बाबतीत चांगले सहाय्य मिळत असे.

'मराठवाडा' साप्ताहिकाचे संस्थापक व संपादक आनंद कृष्ण वाघमारे यांनाही निजाम सरकारने हैद्राबाद संस्थानात हे पत्र सुरू करण्यास परवानगी दिली नव्हती. परिणामी या पत्राचा पहिला अंक पुण्यात छापून तेथूनच प्रसिद्ध करण्यात आला. पत्राच्या पहिल्याच अंकातील सातस्तंभी अग्रलेखात आनंदराव वाघमारे यांनी आपले हृदगत प्रकट करतांना इंग्रज सरकार व निजाम यांच्याविरूद्ध असंतोषाचा डोंब उसळून टाकला. वाघमारेंचा हा तोफखाना पुढे केव्हाच थांबला नाही. 'मराठवाडा' साप्ताहिक निघणे ही मराठवाड्यातील लोकांसाठी एक रोमांचकारी घटना होती. लोकांच्या मनावर या पत्राने आपले अधिराज्य प्रस्थापित केले होते. अर्थात या भाग्याबरोबर सतत निजामी सत्तेचा गळफास मानेभोवती वागवत या पत्राला खूप सोसावेही लागले. हे पत्र पुण्याहून निघत असल्याने ते बंद करणे निजाम सरकारला शक्य झाले नाही म्हणून त्याच्या विनंतीवरून हिंदुस्थान सरकारने संस्थानिकांच्या संरक्षणाच्या कायद्याचा (प्रिन्सेस प्रोटेक्शन ॲक्ट) आधार घेऊन या साप्ताहिकावर बंदी घातली. तथापि, आनंदराव वाघमारे यांनी स्वस्थ न बसता लागलीच 'नागरिक' या नावाने ते पत्र प्रसिद्ध केले. त्यावरही बंदी घालण्यात आली. त्यानंतर वाघमारेंनी नवीन नावाने पत्र काढावे व निजाम सरकारने ते बंद करावे असा पाठशिवणीचा खेळ सतत चालू राहिला. पुढील दहा महिन्यांच्या अवधीत मराठवाडा, नागरिक, संग्राम, रणदुंदुभी, समरभूमी, हैदराबाद स्वराज्य, मोगलाई, कायदेभंग, सत्याग्रह, कथाकल्प, संजीवनी अशी अकरा नावे बदलली; पण प्रत्येक वेळी पत्र बंद पाडण्यात आले. शेवटी खुद्द वाघमारे यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरून त्यांना २१ महिने कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. अशा तऱ्हेने विविध अवतारातील 'मराठवाडा' पत्राचे प्रकाशन बंद पडले.

यानंतर हैद्राबाद स्टेट काँग्रेसने हैद्राबादच्या मुक्तीसाठी उभारलेल्या लढ्याकरिता पुन्हा पत्राची गरज निर्माण झाली. यामुळे आनंदराव वाघमारे यांनी पुण्याऐवजी मुंबईहून दि.१३ मार्च १९४८ रोजी 'मराठवाडा' साप्ताहिक पुन्हा सुरू केले. यावेळीही हैद्राबाद राज्यात 'मराठवाडा' गुप्त रितीने जाऊ लागला. कारण सरकारी धोरण अधिक खुनशी बनले होते. दि.१७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती पत्करल्यानंतरच या पत्राचा

वनवास संपला. यानंतर हे पत्र आपल्या हक्काच्या भूमीत, हैद्राबाद येथे गेले व दि.१ एप्रिल १९४९ पासून ते अर्धसाप्ताहिक म्हणून प्रसिद्ध होऊ लागले. यावेळी अनंतराव भालेराव, हे सहसंपादक म्हणून काम पहात होते व आनंदराव वाघमारे त्यातून निवृत्त झाले होते. त्यानंतर हे पत्र औरंगाबादला नेण्यात येऊन अनंतराव भालेराव दि.२१ मे १९५३ पासून 'मराठवाडा' चे अधिकृत संपादक झाले. पुढे लवकरच त्याची लोकप्रियता पाहून दि. १५ ऑगस्ट १९६८ रोजी त्याचे दैनिकात रूपांतर करण्यात आले. या मराठवाडा पत्राला मराठवाड्यात आणि महाराष्ट्रात इतरत्रही, विशेषत: जाणकारांत विशेष प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे शिल्पकार म्हणून अनंतराव भालेरावांचा लौकिक आहे. एक ध्येयवादी पत्रकार हीच त्यांची खरी ओळख आहे.

निजामी राजवटीत वर्तमानपत्रांवर बंधने असली, तरी लातूर व अन्य ठिकाणांच्या बातम्या मुंबई, पुणे, सोलापूर या ठिकाणांहून प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रात प्रसिध्द होत असत. 'मराठवाडा' साप्ताहिकात त्या प्रकर्षाने दिल्या जात. तथापि, या दैनिकांचे हैद्राबाद संस्थानात प्रतिनिधी नेमण्यास निजाम सरकारची परवानगी नसे. या काळात आर्य समाज आणि काँग्रेस संघटनेच्या वार्ता संकलित करण्याचे काम लातूरमधील वृत्तपत्र विक्रेते व स्वातंत्र्य सैनिक स्व. शंकर माधव जडे आणि आर्य समाजाचे कार्यकर्ते मंगलदेव आर्य करीत. तथापि, बातम्यांचे स्वरूप व व्याप्ती अगदीच मर्यादित व नगण्य असे.

स्वातंत्र्योत्तर काळात साधारणत: १९५५ पासून सोलापूर, पुणे, मुंबई, औरंगाबाद आणि नांदेड येथून प्रकाशित होणाऱ्या वर्तमानपत्रांनी आपले प्रतिनिधी लातूर व अन्य जिल्ह्यात नेमण्यास सुरुवात केली. ज्येष्ठ पत्रकार जीवनधर शहरकर (गुरूजी) हेच प्रारंभी दै. सोलापूर समाचार, संचार, विश्वसमाचार (सोलापूर), सकाळ, केसरी (पुणे), लोकसत्ता, नवशक्ति, मराठा, नवभारत टाईम्स (मुंबई), अजिंठा व मराठवाडा (औरंगाबाद), प्रजावाणी व गोदातीर समाचार (नांदेड) आदी बहुसंख्य दैनिकांचे एकमेव प्रतिनिधी होते. आता वयोमानापरत्वे गुरूजींनी या कामाचा भार कमी केलेला आहे. ही सर्व पत्रे लातूरमध्ये उपलब्ध होतात.

या पत्रांव्यतिरिक्त लातूरमध्ये परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, बीड येथून निघणारी वर्तमानपत्रे व साप्ताहिके येतात. १९६७ साली बीड व लातूरहून 'चंपावती' पत्र निघण्यास सुरुवात झाली. तेव्हा मोतीराम वरपे हे लातूर आवृत्तीचे संपादक होते. सध्या लातूरमध्ये प्रतोद, बीड समाचार, जनक्रांती, लौकिक, त्रिशूळ, आंदोलन, माजलगाव टाईम्स, गोदातरंग ही मराठवाड्यातील काही पत्रे येतात. ही बहुतेक सर्व साप्ताहिकेच आहेत.

नांदेड येथे पत्रकारितेच्या व्यवसायात असलेले श्री. सूर्यप्रकाश धूत १९७६ साली लातूरमध्ये आले आणि त्यांनी लातूर येथून पहिले दैनिक सुरू करण्याचा बहुमान संपादन केला. त्यांच्या संपादकत्वाखाली १९७६ मध्ये 'सिध्देश्वर समाचार' नावाचे दैनिक प्रकाशित होऊ लागले. त्यानंतर हळूहळू नवनवीन वर्तमानपत्रे प्रकाशित होऊ लागली. त्यात नांदेडचे गोदातीर समाचार (लातूर-आवृत्ती), यशवंत, संवाद, राजधर्म, लोकमत, मराठवाडा नेता, लातूर समाचार, भूकंप, देशभक्त या दैनिकांचा समावेश आहे. ही सर्व दैनिके प्रकाशनात सातत्य टिकवून आहेत. सर्व वृत्तपत्रांना राजाश्रयाबरोबरच लोकाश्रयही मिळाला आहे.

अनुक्रमणिका

'लातूर की आवाज' नावाचे एकमेव हिंदी साप्ताहिक सध्या लातूरमधून प्रकाशित होत असते. एका हिंदी भाषिक अध्यापकाने हिंदी भाषेतील पहिले साप्ताहिक सुरू करण्याचा हा प्रयत्न केला आहे.

स्थानिक दैनिके व साप्ताहिके यांच्या खेरीज मुंबई, पुणे, औरंगाबाद, सोलापूर, नांदेड या ठिकाणाहून प्रकाशित होणाऱ्या वर्तमानपत्रांचा मोठा वाचक वर्ग लातूर शहरात व जिल्ह्यात आहे. मूलत: मोठी बाजारपेठ असा नावलौकिक असलेले लातूर हे शहर शिक्षणातही अग्रेसर बनले आहे. बहुभाषिकांचे वास्तव्य हा या शहराचा खास गुणधर्म आहे. त्यामुळे मुंबई व अन्य ठिकाणाहून येणाऱ्या गुजराती, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी या दैनिक वर्तमानपत्रांचाही वाचकवर्ग या शहरात व पर्यायाने जिल्ह्यात आहे. दैनिक 'एकमत' हे लातूर शहरातून प्रकाशित होणारे व सध्या सर्वात जास्त खप असलेले दैनिक आहे.

दि.१६ ऑगस्ट १९८२ रोजी महाराष्ट्राच्या भौगोलिक नकाशवर लातूर जिल्हा साकारला. त्यानंतर ग्रामीण भागात दळणवळणाची व शिक्षणाची साधने उपलब्ध झाली. शासन, वृत्तपत्रे आणि पत्रकार यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करणा-या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे जिल्हा माहिती कार्यालय लातूर येथे स्थापन झाले. हे कार्यालय आणि पत्रकार संघटनांच्या समन्वयाने लातूर येथे 'पत्रकार भवन' उभारले आहे. तहसिल नजिकची जागा या प्रयोजनासाठी दिली आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी आपल्या स्वेच्छा निधीतून पत्रकार भवन निर्मितीसाठी दहा लाख रुपयांची देणगी दिली आहे. या भवनाच्या निर्मितीत जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत मिटकरी, कोषाध्यक्ष चंद्रकांत झेरीकुमठे व पत्रकार अनंतराव कुलकर्णी यांचा सिंहाचा वाटा आहे. यात बाहेरगावाहून येणाऱ्या पत्रकारांच्या तसेच पत्रकारितेसंबंधीत अधिकारी व प्रतिनिधींच्या निवासाची सोय आहे.

प्रा. डॉ. ना. य. डोळे यांचे चिरंजीव जयदेव डोळे हे पत्रकार सध्या पुणे विद्यापीठात वृत्तपत्रविद्या विभागात प्राध्यापक आहेत. त्यांनी 'मराठवाडा वृत्तपत्रात' पत्रकार म्हणून काम करून पत्रकारितेच्या क्षेत्रात ठसा उमटविलेला आहे. याशिवाय 'साधना' मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. त्याचबरोबर पत्रकारितेमध्ये प्रांतिय पातळीवरचे अनेकवेळा पुरस्कार मिळविणाऱ्या डोळस, अभ्यासू, सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या व निष्ठेने पत्रकारिता करणाऱ्यांमध्ये जयप्रकाश दगडे, रामराव गवळी, रामकुमार रायवाडीकर यांचा आवर्जून समावेश करावा लागेल.

जिल्ह्यातील दैनिके आणि साप्ताहिके यासंबंधीची यादी अनुक्रमे परिशिष्ट-एक व परिशिष्ट-दोन मध्ये पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

परिशिष्ट - एक

लातूर जिल्ह्यातील दैनिके

अ.क्र (१)	दैनिकाचे नाव व स्थळ (२)	संपादक (३)	सुरू झाल्याचे वर्ष (४)
१	दैनिक गोदातीर समाचार, लातूर	डॉ. रविंद्र रसाळ	१९६१
२	दैनिक राजधर्म, लातूर	जयप्रकाश माने	१९७०
३	दैनिक सिध्देश्वर समाचार, लातूर	सूर्यप्रकाश धूत	१९७६
४	दैनिक यशवंत, लातूर	प्रा.बी.व्ही.मोतीपवळे	१९७६
५	दैनिक धाराशिव टाईम्स, लातूर	नरसिंह शेंडगे	१९७८
६	दैनिक मराठवाडा केसरी, लातूर	अशोक देशपांडे	१९८१
७	दैनिक गुरुधर्म, औसा	चंद्रकांत हंचाटे	१९८१
८	दैनिक मराठवाडा नेता, लातूर	प्रा. रामेश्वर बद्दर	१९८२
९	दैनिक लातूर टाईम्स	ओमप्रकाश आंबेकर	१९८३
१०	दैनिक जनजागर, लातूर	प्रा. मोहन कांबळे	१९८४
११	दैनिक लोकमन, लातूर	चंद्रकात झेरीकुमठे	१९८५
१२	दैनिक भूकंप, लातूर	अशोक चिंचोले	१९८६
१३	दैनिक शब्दमंथन, लातूर	सौ. विजया दुनाखे	१९८७
१४	दैनिक संवाद देशभक्त, लातूर	सी. एल. पाटील	१९८८
१५	दैनिक प्रतिव्यवहार, लातूर	पी. टी. मुनाळे	१९८९
१६	दैनिक एकमत, लातूर	जयसिंहराव देशमुख	१९९१
१७	सांज दैनिक लातूर समाचार	विवेकानंद जडे	१९९३
१८	दैनिक महिला एकजूट, उदगीर	व्यंकट सगर	१९९३
१९	दैनिक मनोगत, औसा	चंद्रशेखर राचट्टे	१९९४
२०	दैनिक अस्तित्वाचा शोध घेणारा सुपूत्र, लातूर	सुनिल गायकवाड	१९९५
२१	सांज दैनिक प्रतिशक्ती, लातूर	अशोक मिटकरी	१९९६

Maharashtra State Gazeteers

परिशिष्ट - दोन

लातूर जिल्ह्यातील साप्ताहिके

अ.क्र.	साप्ताहिकाचे नाव व स्थळ	संपादक	सुरू झाल्याचे वर्ष
(१)	(२)	(३)	
१	लातूर समाचार, लातूर	दयानंद जडे	१९६५
२	योगायोग, लातूर	शिवाजी शेंडगे	१९७४
३	महिला मुक्ती, उदगीर	सौ. विजया काटीकर	१९८०
४	मुक्तीसंग्राम, लातूर	आर. आर. वाघमारे	१९८२
५	सेवाभाव, अहमदपूर	केशव घोनसे पाटील	१९८३
६	नवनिर्माण, उदगीर	सुरेश पाटील नेत्रगावकर	१९८५
७	वसंत शोभा, उदगीर	सौ. निर्मला बांगे	१९८७
८	लातूर की आवाज, लातूर	प्रा. विजयकुमार शिंदे	१९८८
९	लाडीगोडी, लातूर	सिध्देश्वर बिराजदार	१९८९
१०	उपेक्षितांचा आक्रोश, लातूर	तुकाराम बनसोडे	१९९१
११	विमोचन, उदगीर	विजयकुमार चिल्लरगे	१९९२
१२	रामेश्वर, लातूर	प्रभाकर शिरुरे	१९९२
१३	विचार स्वातंत्र्य, लातूर	अशोक कुलकर्णी	१९९३
१४	आमचा दंडवत, लातूर	राजेंद्र वनारसे	१९९३
१५	मराठवाडा क्रांतीवीर, अहमदपूर	सौ. अलका कुलकर्णी	१९९३
१६	बालाजी समाचार, लातूर	चंद्रकांत इंद्राळे	१९९३
१७	हांक, लातूर	रामविलास बजाज	१९९४
१८	वैभवलक्ष्मी, लातूर	चंद्रकांत मिटकरी	१९९४
१९	औसा टाईम्स, औसा	सौ. कल्पना कुलकर्णी	१९९४
२०	संतसेना समाचार, लातूर	बस्वराज स्वामी	१९९५
२१	अन्वेष, लातूर	देवदत्त गिरी	१९९५
२२	उदगीर परिसर, लातूर	उमाकांत हिरालाल	१९९५
२३	उधळण, लातूर	मधुकर चलमले	१९९५
२४	अखबार-ए-अजीम, लातूर	शेख अजीम अहमद	१९९६

परिशिष्ट - तीन

* देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या शहीद वीरांचा आम्हाला अभिमान वाटतो. आजपर्यंत झालेल्या युद्धात प्रामुख्याने १९६२ ते भारत-चीन युद्ध, १९६५ व १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध तसेच १९९९ चे भारत-पाक कारगिल युद्ध प्रसंगी आणि अन्य वेळी सेवा बजावताना शहीद झालेल्यांची ही यादी आहे.

अ.क्र.	नाव	पत्ता	हुद्दा	शहीद दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	बिरादार श्रीरंग गोविंदराव	मु. धनेगाव, ता. उदगीर, जि. लातूर.	नाईक	१७-९-१९६५
२	मुळे चंद्रसेन	मु. धानोरा, ता. निलंगा, जि. लातूर.	शिपाई	१३-३-१९६८
३	सावंत बलवंत बाबुराव	मु. मालेगाव, ता. चाकूर, जि. लातूर.	नाईक	मार्च १९६९
४	शिंदे उद्धव	अमर सैनिक निवास, पेट्रोल पंपा-समोर, सोमनाथपूर, ता. उदगीर जि. लातूर.	गनर	५-१२-१९७१
५	शिंदे वैजनाथ तुळशीराम	मु. निलंगा, जि. लातूर.	शिपाई	११-१२-१९७१
६	खानापुरे मलिकार्जुन रामलिंगाप्पा	सैनिक कॉलनी, खदगाव, गायरान-लातूर.	शिपाई	१९-५-१९७५
७	नरहरे पांडूरंग सोपान	मु.पो. हैबतपूर, ता. उदगीर, जि. लातूर.	सिग्नल	११-११-१९७५
८	जाधव पांडूरंग गोविंदराव	ता. उदगीर, जि. लातूर.	हवालदार	१०-४-१९८५
९	पोतदार शिवाजी शंकरराव	जळगाव, ता. निलंगा, जि. लातूर.	नाईक	३-२-१९८७
१०	जाधव चंद्रकांत विठोबा	मु. धानोरा, ता. निलंगा, जि. लातूर.	नाईक	२-१०-१९९२
११	चव्हाण कमलाकर दत्तात्रय	मु. कोनाली डोंगर, पो. मंगरुळ, ता. जळकोट, जि. लातूर.	नाईक	७-७-१९९३
१२	माले बालाजी बाबूराव	मु.पो. पानगाव, ता. रेणापूर, जि. लातूर.	लान्स नाईक	३-७-१९९९
१३	धाराशिवकर कृष्णकांत चंद्रकांत	मातृछाया, डॉ. आंबेडकर सोसायटी जि. लातूर.	कॅप्टन	७-७-१९९९
१४	उटके बाळासाहेब रामभाई	मु.पो. तांबरवाडी मोगरा, ता. औसा, जि. लातूर.	नाईक	११-६-२०००

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या योजना

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे शासकीय पातळीवरील सांस्कृतिक कार्यासंबंधीच्या विविध योजना राबविण्यात येतात. या राज्याच्या सांस्कृतिक अंगाची जनतेस माहिती व्हावी, एकप्रकारचे भावनिक ऐक्य निर्माण व्हावे, तसेच सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थाना प्रोत्साहन मिळून त्यांच्या कामाचा व्याप वाढविण्यासाठी वाव मिळावा या हेतुने राज्य नाट्य महोत्सव, राज्य चित्रपट महोत्सव, तसेच संगीत, नृत्य, तमाशा, कीर्तन, भजन, लोककला इत्यादींचा विविध कला महोत्सव आयोजित करण्यात येतो. याशिवाय या संचालनालयातर्फे नाट्य प्रशिक्षण शिबिरे, तमाशा प्रशिक्षण शिबिरे, बालनाट्य प्रशिक्षण शिबिरे, कीर्तन व शाहिरी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतात. तसेच ध्वनीमुद्रित

* पाटील, श्रीराम, **मायबोलीचा मराठवाडा**, योगेश प्रकाशन, औरंगाबाद, २००४, पृ.१९६ ते १९९.

संगीताकरिता संग्रहालय ही योजनाही राबविण्यात येते. आर्थिक स्थिती चांगली नसलेल्या वृध्द व अपंग कलाकारांना आर्थिक मदत दिली जाते. सन १९९२-९३ पासून कला क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'राज्य पुरस्कार' ही योजनाही या संचालनालयातर्फे कार्यान्वित करण्यात आली आहे.

वरील योजनांव्यतिरिक्त साहित्यिकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी राज्य पुरस्कार देण्याची योजना या संचालनालयातर्फे १९९२-९३ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दिल्ली येथील 'फुलवालों की सैर' व 'कुलु दशहरा' महोत्सवात भाग घेण्यासाठी कलापथके पाठविण्यात येतात. साहित्य, कला, क्रीडा व विज्ञान या क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी केलेल्या महनीय व्यक्तींना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. १९९६ पासून ही योजना सुरू झाली आहे. या योजनेंतर्गत रू.५ लाख रोख, शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन पुरस्कारार्थींचा सत्कार करण्यात येतो.

मराठी चित्रपट क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'चित्रपती व्ही. शांताराम पुरस्कार', हिंदी चित्रपट क्षेत्रातील योगदानाबद्दल 'राजकपूर पुरस्कार', तर लोककला क्षेत्रातील योगदानाबद्दल 'विठाबाई नारायणगावकर लोककला जीवन गौरव पुरस्कार' देण्यात येतो.

राज्य शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या वरील सर्व योजना व हौशी नाट्यस्पर्धा अर्थात राज्य नाट्य महोत्सवामुळे मराठी रंगभूमीला अनेक नवीन नाटककार, दिग्दर्शक, कलाकार व तंत्रज्ञ मिळत गेल्याने मराठी व्यावसायिक रंगभूमी अप्रत्यक्षरित्या संपन्न होत आहे. एकूण २१ केंद्रांवर प्रादेशिक मराठी नाट्यस्पर्धा घेण्यात येतात. त्याशिवाय संगीत नाट्यस्पर्धा व संस्कृत नाट्यस्पर्धा प्रत्येकी एका केंद्रावर व हिंदी नाट्यस्पर्धा दोन केंद्रांवर घेण्यात येतात, तर व्यावसायिक रंगभूमीवरील कलेला उत्तेजन देण्याच्या उद्देशाने १९८६-८७ पासून व्यावसायिक नाट्यस्पर्धा आयोजित करण्यात येतात. याचबरोबर महाराष्ट्रातील रंगभूमीस भविष्यात उत्तम रंगकर्मींची कमतरता भासू नये आणि बाल कलाकारांमधील कलागुणांना उत्तेजन व प्रोत्साहन देऊन भावी काळात त्यांच्यामधून उत्तम कलाकार निर्माण व्हावेत या हेतूने मराठी बालनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.

मराठी चित्रपट व्यवसायाला मदत करण्याच्या उद्देशाने शासनाने १९६२ साठी पहिला 'मराठी चित्रपट महोत्सव' आयोजित केला. या योजनेमुळे मराठी चित्रपटांचा दर्जा व संख्येत वाढ होऊन गुणी व ख्यातनाम कलाकार, निर्माते, दिग्दर्शक व तंत्रज्ञ चित्रपटसृष्टीला लाभले. या महोत्सवानिमित्त पारितोषिके दिली जातात.

मराठी चित्रपट निर्मात्यांनी तयार केलेले कलात्मक व शास्त्रोक्त दर्जाचे चित्रपट सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचा एक भाग म्हणून प्रतिवर्षी प्रथम आलेल्या सात चित्रपटांचा महोत्सव आयोजित केला जातो. १९८५ पासून या महोत्सवात माहितीपटांचाही समावेश करण्यात आलेला आहे. सन १९९२-९३ पासून पारितोषिक वितरण समारंभ ऑस्कर ॲवार्ड धर्तीवर आयोजित करण्यात येतो.

पूर्वी संगीत, नृत्य, तमाशा, लोककला, कीर्तन या कलांच्या महोत्सवाचे एकच केंद्र असे. तथापि, आता या योजनांचा लाभ महाराष्ट्रात प्रतिवर्षी जास्तीत जास्त लोकांना उपलब्ध करून देण्यासाठी १९८६-८७ पासून या महोत्सवाचे स्वरूप बदलण्यात येते. आता राज्यात निरनिराळ्या १५ ठिकाणी आठ दिवसांचा विविध कलामहोत्सव आयोजित करण्यात येतो.

या संचालनालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या इतर महोत्सवात प्रजासत्ताक दिन व महाराष्ट्र दिनी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यापैकी प्रजासत्ताक दिनी संचालनात भाग घेण्यासाठी महाराष्ट्राचा चित्ररथ दिल्लीत पाठविण्यात येतो. दिल्ली येथे पाठविलेल्या अनुक्रमे 'गणेशोत्सव', 'हापूस आंबा' व 'बापू स्मृति' या चित्ररथांना सलग तीन वर्षे प्रथम क्रमांकाची पारितोषिके मिळविणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य असून त्यास केंद्र सरकारचा 'वैजयंती चषक' मिळाला आहे. महाराष्ट्र दिनीही मुंबईव्यतिरिक्त सहा जिल्हा मुख्यालये असलेल्या सहा शहरात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याची योजना आहे. सन २००५-२००६ या वर्षापासून गानसम्राज्ञी श्रीमती लता मंगेशकर पुरस्कार, लावणी नृत्य महोत्सव, फुलवालोंकी सैर, सद्भावना दिन, कुलु दशहरा महोत्सव, महाराष्ट्र भूषण पुरस्कार, प्रजासत्ताक दिन, तमाशा फड महोत्सव व महाराष्ट्र दिन, आदिवासी संगीत नृत्य महोत्सव इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यापैकी आदिवासी संगीत नृत्य महोत्सव १९९१-९२ पासून आयोजित करण्यात येतो. मुघल बादशहा दुसऱ्या अकबराच्या बेगमने नवसफेड म्हणून ख्वाजा का दर्गा व योगमायाजी मंदिर, दिल्ली येथे अनुक्रमे चादर व फुले वाहिली होती. त्याप्रीत्यर्थ एकात्मिकतेचे प्रतिक म्हणून फुलवालोंकी सैर हा उत्सव दिल्ली येथे मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येतो. यामध्ये प्रत्येक राज्यातून फुलांचे पंखे व कलापथकांचे कार्यक्रम सादर केले जातात.

महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषिकांना मराठी संस्कृति व सामाजिक बाबींची माहिती व्हावी, या हेतूने प्रतिवर्षी राज्याबाहेर नामवंत कलावंतांच्या चित्रपटाचा व नवीन पारितोषिक विजेत्या चित्रपटांचा मराठी चित्रपट महोत्सव आलटून-पालटून आयोजित करण्यात येतो.

मराठी रंगभूमीवरील उत्कृष्ट कलावंतांच्या कामगिरीचे भावी पिढ्यांना ज्ञान व्हावे व त्यांच्या कलेचा आस्वाद त्यांना घेता यावा म्हणून सध्या मराठी रंगभूमीवर सादर करण्यात येणाऱ्या उत्कृष्ट मराठी नाटकांचे युमॅटिक कॅसेट्स वरून व्ही.एच.एस. कॅसेटवर ध्वनिचित्रीकरण करून ध्वनीमुद्रित संगीत संग्रहालय, रंगभवन, मुंबई येथे त्या जतन करण्यात आलेल्या आहेत. यात आतापर्यंत १८ संगीत नाटके, ९ इतर नाटके व ९ नाट्य-रंगकर्मीच्या मुलाखती ध्वनिचित्रीत करून जतन करण्यात आलेल्या आहेत.

शासनाने महाराष्ट्रातील मान्यवर वृध्द कलाकार व साहित्यिक इत्यादींना मानधन देण्याची योजना तयार केली असून ती त्या त्या जिल्हा परिषदांकडे वर्ग केलेली आहे. सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात लातूर जिल्ह्यातून अशा २८३ जुन्या कलाकारांना १७.०५ हजार रू. रक्कम मानधन म्हणून देण्यात आली आहे.

सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या सदस्यांनी नाट्य, संगीत, नृत्य इत्यादी कलांच्या विकासाकडे लक्ष पुरवून त्यांचा विकास साधावा या उद्देशाने कार्य करणाऱ्या संस्थाना सहाय्यक अनुदानही देण्यात येते.

पारंपरिक मराठी नाटकांचा अभिलेखागार : रंगभूमीवरील करमणुकीच्या कार्यक्रमांमुळे भारताचे सार्वभौमत्त्व आणि एकात्मता किंवा राज्याची सुरक्षितता, परकीय राज्याबरोबर असलेले मित्रत्त्वाचे संबंध व सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता व नीतिमत्ता यांना बाधा येऊ नये, न्यायालयाचा अपमान होऊ नये, तसेच या कार्यक्रमांमुळे कोणत्याही क्षेत्रातील श्रेष्ठ व सुप्रसिध्द व्यक्तींची बदनामी होऊ नये म्हणून या कार्यक्रमांचे परीक्षण करण्यासाठी जुलै १९५४ मध्ये रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाची नेमणूक करण्यात आली आहे. या मंडळावरील पदाधिकारी मराठी, हिंदी, संस्कृत व इंग्लिश भाषेतील लिखाणांचे परीक्षण करतात, तर मानसेवी वाचक इतर भाषेच्या लिखाणाचे परीक्षण करतात.

प्रकरण १२ : प्रेक्षणीय स्थळे

- अहमदपूर
- आलमला
- उजनी
- उदगीर
- औसा
- कळमगाव
- कानेगाव
- कासार-शिरसी
- किल्लारी
- खरोसा
- गणेशवाडी
- गंगापूर
- चिंचोली बल्लाळनाथ
- डोंगरशेळकी
- तळीखेड
- देवर्जन
- नवकुंड झरी/झरी बुद्रुक
- नांदगाव
- निटूर
- निलंगा
- पानगाव
- बाभळगाव
- बोरगाव
- बोरी
- भूतमुगळी
- मातोळी
- मुरूड
- रामलिंग मुदगड
- रेणापूर
- लातूर
- वडवळ-नागनाथ
- श्रीकृष्ण सत्यसाईधाम
- शिरूर अनंतपाळ
- शिवपूर
- साई
- सोमनाथपूर
- हरेगाव
- हिप्पळगाव
- मध्ययुगीन गढी-वाडे

प्रकरण - १२

प्रेक्षणीय स्थळे

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये मराठवाड्याचे स्थान अनन्यसाधारण असे आहे. काही वेळा तर मराठवाड्याने संपूर्ण दक्षिणेच्याच नव्हे, तर भारताच्या इतिहासातही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांचा यात सहभाग आहे.

सन १९८२ पूर्वी लातूर जिल्हा हा अविभाजीत उस्मानाबाद जिल्ह्याच्या कक्षेत मोडत होता. या परिसराचा प्राचीन इतिहास गौरवशाली आहे. अश्मयुगीन मानवी संस्कृतीच्या पाऊलखुणा या भागातील मांजरा, तेरणा आदि नद्यांच्या खोऱ्यात उमटलेल्या आहेत. रेणापूर तालुक्यातील हरवाडी, खुलगापूर येथे मांजरा नदीच्या पात्रात सुमारे पन्नास हजार वर्षांपूर्वीचे हत्ती, गेंडा व रानम्हशीचे जीवाश्म आढळले आहेत. त्यावरून या काळात मांजरा नदीच्या परिसरात अश्मयुगीन मानवाच्या समकालीन प्राण्यांची वसतिस्थानेही असावीत असा पुराजीवशास्त्रज्ञांचा अंदाज आहे. इ.स.७-८ व्या शतकात हा परिसर बदामीच्या चालुक्यांच्या अमलाखाली होता. त्यामुळे या राजवंशाच्या अनेक दानपत्रांत मराठवाड्यातील स्थळांची व व्यक्तिंची नोंद आढळते. चालुक्य वंश मूळचा ज्या "चालुक्य" देशातील होता तो देश म्हणजे उस्मानाबाद आणि लातूर जिल्ह्यातील प्रदेश होय हे दर्शविणारे अभिलेखीय पुरावे या भागात उपलब्ध झाले आहेत.[१] चालुक्य काळात या परिसरात उमटलेल्या सांस्कृतिक प्रगतीच्या पाऊलखुणा तर खरेासा येथील कोरीव लेणींच्या रूपाने आजही दिसत आहेत. खुद्द निलंग्याचे नीलकंठेश्वर मंदिर, तळीखेडचे सोमनाथ मंदिर, रामलिंग-मुद्‌गड मंदिर, सरवडीचे वैष्णव मंदिर, मदनसुरीचे मदनानंद मंदिर, सावरी व हलगऱ्याचे शिवमंदिर, औरादचे अंबा मंदिर व हनुमान मंदिर, तांबाळा व शेळगी येथील प्राचीन भव्य मंदिरांचे अस्तित्व दर्शविणारी शिल्पे, मालेगावचे व शेंदचे मंदिरावशेष व देवताशिल्पे, कासार बालकुंदा येथील अवशेष, मसलगा येथील सुटी शिल्पे, विविध ताम्रपट, शिलालेख, विटा व खापरे, वीरगळ व सतीशिळा आजही समृध्द वारसा बोलका करतात.

मराठवाड्यातील कलावशेषांमधील अनेक मध्ययुगीन देवालये कलात्मकदृष्ट्या मराठवाड्याच्या भोवतालच्या परिसरातील मध्ययुगीन देवालयांचाच वारसा सांगणारी आहेत. मराठवाड्याच्या दक्षिणेस लगतच असलेल्या म्हैसूर मधील होयसळ स्थापत्य शैलीचा बराच प्रभाव लातूर-उस्मानाबाद जिल्ह्यातील देवालयांवर प्रकर्षाने जाणवतो. कर्नाटकातील चालुक्य मंदिर स्थापत्य शैलीचाही प्रभाव दर्शविणारी काही देवालये मराठवाड्यात आढळतात. देवगिरीकर यादवांच्या काळातील काही अप्रतिम वास्तू-अवशेषही या परिसरात आढळतात. इ.स.८ व्या ते १४ व्या शतकापर्यंतच्या सर्वच देवालयांना पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे येथेही "हेमाडपंती"

१. ठोसर, हरिहर, "लातूर-धाराशिव परिसरातील ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास," **डॉ.देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ** (संपा.सु.ग.जोशी.), मराठवाडा इतिहास संशोधन मंडळ, लातूर, १९९९, पृ.१४६-१४७.

हे संबोधन लावले जाते. मंदिरांप्रमाणेच लातूर जिल्ह्यात उदगीर व औसा हे भुईकोट किल्ले मध्ययुगीन इतिहासाच्या साक्षीसाठी आजही तग धरून आहेत. याशिवाय लातूरचे सिध्देश्वर व शिरूर-अनंतपाळचे अनंतपाळ मंदिर, निलंग्याचे नीलकंठेश्वर मंदिर आदि प्राचीन व प्रेक्षणीय मंदिरे असून खरोसा येथे उल्लेखनीय अशी प्राचीन लेणीही आहेत.

लातूर जिल्ह्यात सर्वत्र जाणवते ते जुन्या घरांचे वेगळेपण. गावप्रमुख, पाटील, पटवारी यांची अशी गढीसारखी मोठी प्रशस्त घरे किंवा वाडे आहेत. जिल्ह्यातील बहुसंख्य सधन शेतकरी, तसेच कुणबी, लिंगायत व वंजारी समाजातील सधनांचेही असे वाडे आहेत. या वाड्यांच्या किंवा घरांच्या चोहोबाजूस इतिहासकालीन तटबंदीसदृश उंच दगडी भिंतींचे कुंपण आजही दिसते. या भिंतीस, मुख्य प्रवेशद्वार आणि ज्यास दिंडी दरवाजा असलेला जो काहिसा खुजा व लहान दरवाजा असतो. भिंतीच्या आवारात साजेसे दगडी घर, विहीर, जनावरांचा गोठा वगैरे गोष्टी असतात. घरावर विशेषत: पत्रे असतात. ते वाऱ्याने उडून जाऊ नयेत म्हणून त्यावर वजनदार दगड ठेवलेले असतात. या घरांच्या दगडी भिंती व छपरावरील दगड यामुळेच येथील सन १९९३ च्या रौद्र भूकंपात अपरिमित जीवितहानी झाली होती. अलिकडे मात्र लातूर जिल्ह्याचे वेगाने शहरीकरण होणे सुरू असून आता मोठ्या प्रमाणात सिमेंट-कॅंक्रिटची घरे बांधण्याकडे लोकांचा कल वाढू लागला आहे, फ्लॅट संस्कृतीचाही आता जिल्ह्यात शिरकाव झाला आहे.

लातूर जिल्ह्यात बहुसंख्येने हेमाडपंती प्रकारातील मंदिरे व त्यांचे अवशेष सापडतात. या बहुतेक सर्व मंदिरांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची शुष्कसंधी रचना व त्यात आढळणारे स्तंभरचनासाम्य. या रचनेत प्रथम चौरसाकृती तळखडा, स्तंभमध्य त्यावरिल वर्तुळाकार घटक, त्यावरील भागात चौरसाकृती घटक, स्तंभशीर्ष व स्तंभाधार कीचक, तरंग हस्त असा क्रम असतो.

सांप्रत प्रकरणामध्ये जिल्ह्यातील ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनदृष्ट्या प्रेक्षणीय अशा काही मोजक्या स्थळांची माहिती देण्यात आलेली आहे. सर्वच स्थळे वा वास्तूंची माहिती विस्तारभयास्तव देता येत नाही. शिवाय अशा प्रकारच्या संशोधन प्रकल्पामध्ये विश्वसनीय माहितीच्या उपलब्धतेवर काही मर्यादा पडत असतात. प्रत्येक घटकाची, स्थळांची दस्तऐवजावर आधारित माहिती मिळणे दुरापास्त असते. तरीही सखोल प्रयत्न आणि प्रत्येक स्थळाचे समक्ष सर्वेक्षण करून माहिती प्राप्त केलेली आहे. प्रत्येक स्थळाची माहिती वर्णानुक्रमे दिलेली असून जिल्ह्यात प्राप्त झालेल्या काही मोजक्या शिलालेखांची माहिती दिलेली आहे, तर काही शिलालेखांचा ग्रंथाची पृष्ठमर्यादा लक्षात घेऊन ओझरता उल्लेख केलेला आहे.

अहमदपूर

अहमदपूर : (ता. मुख्यालय, १८° ४०' उ.,७६° ००' पू.) : येथील एकमेव प्राचीन वास्तु म्हणजे नागेंद्रभारती यांचा मठ. त्यात अक्कलकोट स्वामींचे गुरु स्वामी चंचलभारती यांची समाधी आहे. या मठातील सर्व बांधकाम दगडी आहे. मठातील वास्तुचा आकार अंदाजे ३० चौ.मी.असा आहे. मठाच्या प्रवेशव्दाराच्या उजवीकडे नागेंद्रभारती व त्यांचे शिष्य गजेंद्रभारती यांच्या समाधी आहेत. स्वामी चंचलभारती यांच्या समाधिमंदिरातील मखरामध्ये त्यांचे तैलचित्र व त्यांनी केलेली ग्रंथरचना ठेवलेली आहे. येथे स्वामी भगवानभारती यांचेही छोटेसे समाधिमंदिर उभारलेले आहे.

अनुक्रमणिका

श्रावण महिन्यात येथे धार्मिक ग्रंथ-पारायण व एक लाख बिल्वदलांचा अभिषेक केला जातो, तर चैत्रात स्वामी चंचलभारती यांच्या पोथींचे पारायण केले जाते. या दोन्ही प्रसंगी स्वामींचे हजारो शिष्यगण येथे येतात. लिंगायत पंथियांचे हे श्रद्धास्थान आहे.

या समाधींव्यतिरिक्त शहरात बालाजी, महादेव, माहूरची देवी व दत्तात्रयाचे मंदिर आहे, परंतु त्यांचे बांधकाम वास्तुशास्त्रीयदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण ठरत नाही. येथे नुस्रतुल्ला-शाह-कादरी नामक दर्गाही आहे.

आलमला

आलमला : (ता.औसा, १८° १५' उ., ७६° ३०' पू.) : औसाच्या उत्तरेस पाच कि.मी.वर हे खेडे असून गावातील एका पडक्या घराच्या आवारात भूगर्भात तीन मी.खोल व सुमारे तीन चौ. मी. आकाराचे तळघर आहे. रामनाथ महाराज नामक सत्पुरूषाची यात समाधी आहे. आत उतरण्यासाठी उंच अशा केवळ तीनच पायऱ्या असून या व्दारातून एकावेळी एकच माणूस आत उतरू शकतो. ही समाधी प्राचीन असल्याचे ग्रामस्थ सांगत असले, तरी येथे वास्तुशास्त्रीयदृष्ट्या विशेष अशी वैशिष्ट्ये आढळत नाहीत.

या समाधीपासून काही अंतरावर असलेल्या दक्षिणाभिमुख मारूती मंदिराच्या गर्भगृहात दीड मीटर उंचीची काळ्या पत्थरात घडविलेली मारूतीची मूर्ती आहे. गर्भगृहावरील घुमटाकृती शिखरावर चहुबाजूंना आठ देवकोष्ठे (देवळी) आहेत. शिखरावर कळस आहे. या मंदिराशेजारीच शिवलिंगेश्वराचे पश्चिमाभिमुख मंदिर आहे. गर्भगृहात शिवलिंग असून गर्भगृहाचे प्रवेशव्दार ठेंगणे पण दगडी आहे. गर्भगृहावर सुशोभित असे कमळाकृती दोन टप्प्यांचे शिखर असून त्याच्या चतुष्कोनावर चार नंदींची स्थापना करण्यात आली आहे. याशिवाय शिखरावरील देवकोष्ठांमध्ये विविध देवदेवतांच्या मूर्ती प्रतिष्ठापित केलेल्या आहेत. यात शिवमूर्ती सन्मुख आहे. गर्भगृहासमोर नंदी आहे. या मंदिराशेजारी २१ पायऱ्यांची दगडी बांधणीची एक जुनी पुष्करणी आहे.

उजनी

उजनी : उजनी (ता.औसा, १८° ०५' उ., ७६° १५' पू.) : औसाच्या नैऋत्येस १५ कि.मी. अंतरावरील या गावात गणेशनाथ महाराज नामक स्थानिक सत्पुरूषाचा मठ व त्यात समाधी आहे. या विष्णूभक्ताने सन १६७६ मध्ये येथे समाधी घेतली. त्यांची प्रतिसमाधी सारसा (ता.लातूर) येथेही आहे. गणेशनाथांनी अनेक पदरचना केलेल्या आहेत. त्यांच्या गाथा प्रकाशित असून त्यात अभंग, पदे, भारुडे व आरत्यांचा समावेश आहे. त्यांचे उर्वरित अप्रकाशित काव्य " गोरक्षबोध " नामक हस्तलिखित ग्रंथस्वरुपात उपलब्ध आहे. या पोथीत नाथसंप्रदायाचे सोप्या भाषेत विवरण आहे. महिपतीच्या संतचरित्रात गणेशनाथांवर एक अध्याय असून त्यांनी शिवाजी महाराजांना कानोपदेश केला असा संदर्भही आहे.[२] ' भक्तिविजय ' ग्रंथातील ५५ व्या कांडात त्यांची व महाराजांची भेट झाल्याचा उल्लेख आहे.[३] महिपतीच्या संतचरित्रात उजनी आणि सारसा या दोन्ही ग्रामनामांचा उल्लेख आहे.[४] सारसा गाव मांजरा

---

२. जोशी., सु.ग., " नवोपलब्ध गोरक्षबोध ", **शारदीय**, प्राचीन विभाग, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, उदगीर, १९८८, पृ.७९-८१.
३. गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९७२, पृ.८०५.
४. कित्ता.

नदीकाठी, तर उजनी गाव तेरणा नदीकाठी आहे. गणेशनाथांचे सर्व संदर्भ रामदासी वाङ्मयातही प्राप्त होतात. सारसा व उजनी परिसरात रामदासी पंथ अवतीभवती पसरलेला आहे.

दंतकथेनुसार हा संत दररोज एका नवीन व्यक्तीस शिष्यत्वाची दीक्षा देत असे. येथील मठाचे बांधकाम साधेच असून त्यात त्यांचे प्रमुख शिष्य श्री शूभनाथ व काशीनाथ यांच्या समाधी आहेत. येथेच दीड मीटर उंचीच्या एका वेदीवर विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती, तर मठाच्या मध्यभागी गणेशनाथांची समाधी आहे. या मठाची १९९३ च्या भूकंपात थोडी हानी झाल्याने दुरुस्ती करण्यात आलेली आहे. कार्तिक महिन्यात येथे जत्रा भरते.

उदगीर

उदगीर [५] **:** (ता.मुख्यालय, १८° ४५' उ., ७६° ४५' पू.) : मध्ययुगीन कालखंडामध्ये विकसित झालेल्या स्थानांना प्राचीन - ऐतिहासिक वारसा असून अशा स्थानांमध्ये उदगीर व औसा या प्राचीन नगरांचा समावेश होतो. सध्या लातूरनंतर दुसरी बाजारपेठ म्हणून उदगीर हे नगर ख्यात आहे. या शहराची वसाहत कोणत्याही मार्गाने जवळ येईपर्यंत दिसत नाही. उत्तर दिशेव्यतिरिक्त सर्व दिशांना टेकड्या आहेत. त्यामुळे शहराचे संरक्षणाच्या दृष्टीने असलेले भौगोलिक स्थान शहराच्या नैसर्गिक सौंदर्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते. उदगीर शहर व परिसराच्या ऐतिहासिकतेचा पुढीलप्रमाणे परामर्श घेता येईल.

नगर रचना : नगररचनेच्या दृष्टीने विचार करता उपलब्ध पुरातत्वीय पुरावे, वास्तु अवशेष व अभिलेख यांच्या विस्तृत सर्वेक्षणानंतर उदगीर हे मध्ययुगीन अन्य नगरांसारखेच एक नगर असले, तरी त्याचे स्वतःचे वेगळे अस्तित्व असल्याचे जाणवते. आज उभ्या असलेल्या काही मध्ययुगीन वास्तुंवरुन हे नगर इस्लामिक राज्यकर्त्यांनी विकसित केल्याचे लक्षात येते. मध्ययुगीन शहर रचनेचा नमुना म्हणून याच्याकडे पाहता येईल. प्रामुख्याने बहमनी व त्यांच्या विविध शाह्या व पुढे मुघल कालखंडामध्ये याचा विकास झाला. आज आदर्श शहर रचनेची वैशिष्ट्ये येथे पहावयास मिळतात. येथील नगर रचनेमध्ये प्रकर्षाने लक्षात येणारी गोष्ट म्हणजे नगराच्या सुरक्षिततेसाठी असलेली तटबंदी होय. उदगीर शहराला भक्कम अशी तटबंदी बांधलेली होती हे येथे अद्याप असलेल्या वेशींच्या अवशेषांकडे बारकाईने पाहिल्यास दिसते. आज या तटबंदीचा बहुतांश भाग नामशेष झाला असून काही ठिकाणीच तिचे विस्कळीत स्वरूपात अवशेष पहावयास मिळतात.

स्वातंत्र्यापूर्वी शहराची वस्ती या तटभिंतीच्या आत वसलेली होती. या तटभिंतीस सहा वेशी होत्या. परंतु वस्तीची चौफेर वाढ झाल्यानंतर उदगीरचा इतिहास जागवणाऱ्या या तटभिंतीस व वेशींना सुरक्षिततेच्या नावाखाली जमीनदोस्त करण्यात आले. त्यामुळे या वेशींवरील हिजरी ११०२ मधील शिलालेख व इतर नोंदी आज ग्रंथालयीन संदर्भाव्यतिरिक्त आढळून येणे अशक्य झाले आहे.

या तटास चार दिशेस चार प्रमुख वेशी होत्या. त्यांची नावे अशी :- १. शहराच्या पूर्वेस निडेबन गावाच्या दिशेने असलेली निडेबन वेस, २. पश्चिमेस तळे वेस किंवा तालाब वेस, ३. उत्तरेस किल्ला वेस व ४. दक्षिणेस देवणी गावाकडे जाणारी देवणी वेस. याशिवाय

५. या स्थळाचे लेखन हे प्रत्यक्ष सर्व्हेक्षण तसेच राठोड, पी. सी. यांच्या **उदगीर-एक सांस्कृतिक अभ्यास**, एम्. फिल. प्रबंध, डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९८७ व राठोड, रा. था. यांच्या **उदगीर : इतिहास आणि स्मारके,** उदयगिरी महाविद्यालय उदगीर, १९६८ या ग्रंथावर आधारित आहे.

पेठदरवाजा किंवा पेठवेस आणि कंधार वेस या दोन उपवेशी होत्या. येथील देवणी व तळे वेशीच्या बाहेर फार मोठ्या प्रमाणात वस्ती वाढल्याने तटाचे कसलेच अवशेष दिसत नाहीत, परंतु पेठ वेस, कंधार वेस व निडेबन वेशीच्या ठिकाणी ठळकपणे असे अवशेष दिसतात. या वेशींपैकी कंधार व पेठ वेशीच्या उजव्या कमानीवर फार्शी शिलालेख कोरलेला आहे.

रस्ते : वरील चार प्रमुख वेशींना जोडणारे मुख्य व अन्य उपमार्ग तयार करण्यात आले होते. शहराच्या मध्यभागी सध्या असलेल्या चौकास चौबारा या नावाने आजही ओळखले जाते. ही एक इमारत असून यास चौबारा, म्हणण्याचे कारण, या इमारतीच्या चारही बाजूस चार मोठे रस्ते आहेत. असा चौबारा बिदर व अंबाजोगाई शहरातही आहे. ३० मीटर उंच व ७ मीटर रुंदीची ही दुमजली इमारत अगदी जुनी असून अष्टकोनी बुरुजाच्या आकाराची आहे. काळ्या घडीव दगडाने बांधलेली ही इमारत पक्क्या बांधणीची असून साधारण: १ मीटर उंच जोत्यावर उभी आहे. पण हे जोते सध्या रस्त्याच्या वाढलेल्या उंचीमुळे दिसत नाहीत. यास चारही बाजूंनी कमानी असून वरच्या मजल्यावर जाण्यासाठी जिना आहे. या इमारतीच्या पेठ दरवाजाजवळ असलेल्या धर्मशाळेसारख्या किंवा मठसदृष्य वास्तूचे दगड व किल्ल्यातीलही काही दगड पन्हाळ्यांसारखे आहेत. मध्ययुगीन काळात नागरी प्रशासनाचे मुख्य कार्यालय म्हणून या वास्तूचा वापर होत असावा. यात पूर्वी उदगीरचे पोलीस ठाणे होते.

चौबारा येथून निघणाऱ्या चार रस्त्यांपैकी पहिला देवणी वेशीकडे, दुसरा तळे वेशीकडे, तिसरा किल्ला वेशीकडे व चौथा निडेबन वेशीकडे जातो.

सध्याच्या आधुनिक नगररचनेत मुख्यमार्ग व उपमार्गालगत असणाऱ्या वसाहतीतून जाणाऱ्या छोट्या रस्त्यास गल्ली किंवा बोळ म्हटले जाते. यांची रुंदी बैलगाडी जाऊ शकेल इतकी असते. या मार्गावर असलेल्या घरांच्या कोपऱ्यांना विशेषत: रस्त्याच्या वळणावर असलेल्या इमारतींना वर्दळीचे धक्के बसू नयेत म्हणून पायथ्याशी मोठाल्या शिळा बसविलेल्या आहेत. शहराच्या वस्तीमध्ये विशेषत: प्रतिष्ठीत समाजाच्या वस्तीतील गल्लींमध्ये दगडी फरशी बसविलेली आहे. ती उत्तर मध्ययुगातील आहे.

गृहरचना : येथे घरालाच वाडा म्हणण्याची प्रथा आहे. हे वाडे काळे पाषाण, चुना किंवा पांढऱ्या मातीने बांधलेले असतात. प्रवेशव्दार मोठे असते व त्याच्या बाजूस ढाळज असतात. वाडा विशेषत: चौकोनी-गोलाकार असतो व त्याभोवती दगडी कुंपण असते. मध्यभागी अंगण, एका बाजूस स्नानगृह, पाकगृह, धान्य कोठार, तर दुसरीकडे गाई-बैलांचे गोठे व विहीर असते. वाड्यात समोर बैठकीची सदर असते.

पाणी पुरवठा : उदगीरला पूर्वी तलाव व विहिरींमार्फत पाणी पुरवठा होत असे. नगरात दोन प्रकारच्या विहिरी आहेत. स्वतंत्र वापरासाठी वाड्यात व दुसरी सार्वजनिक विहीर. नगरात सध्या १५ जुन्या विहिरी आहेत. त्यांचे बांधकाम गोलाकार किंवा चौरस स्वरुपात काळ्या दगडांनी (फाडी) केलेले आढळते. विहिरींच्या एका बाजूस वरून ते तळापर्यंत दगडी पायऱ्या असतात. काठावर गुरांना पाणी पिण्यासाठी दगडी किंवा लाकडी ढोण असते. या १५ विहिरी पुढीलप्रमाणे १. हजरत ख्वाजा सदरोद्दिन पाशा कादरीच्या दर्ग्याजवळची तीन पायऱ्यांची बीच बावली नामक विहीर. यास तीन शिड्यांची विहीर असेही म्हणतात. हिचे पाणी कधीच आटत नाही, २. भूतबावली. हिचे पाणी चवदार असल्याने दूधबावली असेही म्हणतात, ३. बीरसीन्दी बावडी, ४. हजरत चांद साहबच्या दर्ग्याची विहीर, ५. कुंडा बागेची विहीर,

६. खतीबची विहीर, ७. हावगी स्वामीची विहीर, ८. राजमहंमदची विहीर, ९. मरकत गल्लीची विहीर, १०. धर्मशाळेची विहीर, ११. मोमीन गल्लीची विहीर, १२. देशमुख बागेची विहीर, १३. धबापूर विहीर, १४. रुस्तूम विहीर व १५. रेकडी विहीर. याव्यतिरिक्त मखमलची विहीर, तळे वेस व पेठ वेशीच्या बाहेरची विहीर या जुन्या असल्या तरी नंतरच्या काळातील आहेत.

उदगीरचा प्राचीन इतिहास : लातूर जिल्ह्यातील प्राचीन नगरांपैकी हे एक नगर होय. उदगीरच्या किल्ल्याच्या आतील भागात महंत उदागिरी स्वामींची समाधी आहे. त्यांच्या नावावरून या नगरास उदगीर असे नाव पडल्याची एक आख्यायिका आहे. परंतु या आख्यायिकेत काही तथ्य नसावे, कारण जैन वाङ्मयात त्या धर्माचे एक पीठ म्हणून उदगीरचा उल्लेख आहे.[६] या समाधीचा काळ समजण्यास काहीच साधन नाही, परंतु ती मध्ययुगातील वाटते. कदाचित उदगीरची नाम-व्युत्पत्ती मुस्लिम राजवटीत झाली असावी असाही एक मतप्रवाह आहे. तथापि, त्याहीपेक्षा ज्याप्रमाणे देवगिरीच्या टेकडीवरून त्याच्या पायथ्याशी असलेल्या नगरास देवगिरी हे नाव पडले, तद्वतच उदगीरभोवती असलेल्या बालाघाट डोंगररांगेचे नाव उदयगिरी असावे व त्यावरून या नगरास उदगीर नाव मिळाले असावे ही शक्यता जास्त सबळ वाटते.[७]

ऐतिहासिक काळात उदगीर हे एक खेडे असावे. मात्र नगर म्हणून याचा उदय निश्चितपणे केव्हा झाला हे सांगता येत नाही. उदगीर परिसरात तेर व लातूर येथे सापडलेल्या सातवाहनकालीन अवशेषात सातवाहन घराण्याने या परिसरावर राज्य केल्याचे अनेक पुरावे उपलब्ध झाले आहे. तथापि, उदगीरचे अस्तित्व दर्शविणारा एकही सबळ पुरावा उपलब्ध झालेला नाही. तसेच त्यानंतरच्या वाकाटक राजसत्तेचाही या परिसराशी निकटचा संबंध असल्याचा पुरावा उपलब्ध झालेला नाही, पण वाकाटकांच्या राजवटीत "नंदीकड विषय" (नांदेड) हे प्रशासनाचे मुख्यालय होते व त्या "विषयात" तत्कालिन उस्मानाबाद जिल्ह्याचा समावेश होत असे.[८] नांदेड जिल्ह्यातील बोरगाव दानपत्रानुसार इ.स.६ व्या शतकाच्या मध्यावधीत दक्षिणेत स्थापन झालेल्या बदामीच्या चालुक्यांची सत्ता औसा-उमरगा प्रदेशावर होती असे प्रत्ययास येते. या दानपत्रात औसा-उमरगा येथील ब्राह्मणांना खेडी दान दिल्याचे उल्लेख आहेत. राष्ट्रकुटांचाही उदगीरशी संबंध स्पष्ट झालेला नाही, पण याच काळात उदगीरचे नागरीकरण झाले असण्याची शक्यता आहे. कल्याणीचा चालुक्य राज्य विक्रमादित्य सहावा याने महाराष्ट्रातील सर्व प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ट केला होता. त्याची बरीच दानपत्रे उपलब्ध आहेत. त्यानंतरच्या शिलाहार घराण्याचाही उदगीरशी संबंध असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अशाप्रकारे तटबंदीचे अवशेष, प्रवेशव्दारे, शहर व परिसरातील वास्तूवशेष यावरून या नगराच्या प्राचीनत्वाचा यादव कालापर्यंत तरी मागोवा घेता येतो. या नगराचा सर्वात जुना उल्लेख सिंघण यादवाच्या राजवटीतील सेनापती खोलेश्वर याच्या अंबाजोगाई येथील इ.स.१२२८ (शके ११५०) च्या शिलालेखात उदगिरी या नावाने आलेला आहे.[९] यात खोलेश्वराने सकलेश्वर

६. या ग्रंथासाठी हरिहर ठोसर यांनी "लातूर जिल्ह्याचा सांस्कृतिक इतिहास" या विषयावर केलेल्या लेखनावर आधारित.
७. ठोसर, हरिहर, **हिस्टॉरिकल जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, दि एपिग्राफीकल सोसायटी ऑफ इंडिया, म्हैसूर, २००४, पृ.२८६.
८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.४०.
९. ठोसर, हरिहर, उपरोक्त, पृ.३९४.

देवाच्या विशेष भोगासाठी दान दिल्याची जशी नोंद आहे, तशी खोलेश्वराच्या अमलाखाली असलेल्या ज्या देशविभागांचे उल्लेख आहेत, त्यात औस देश (औसा) आणि उदगिरी (उदगीर) देशांचा समावेश असल्याची नोंद आहे. म्हणजेच त्याकाळी हे देशविभागाचे मुख्य केंद्र होते.[१०] हा लेख सकलेश्वर मंदिर स्थापन झाल्यानंतरचा आहे. उदगीर हे काकतियांच्या सरहद्दीवरील ठाणे असल्यामुळे तेथे यादव सैन्याची छावणी (बिड) होती.

कान्हरदेव यादवाच्या शिलालेखातही उदगीरचा उल्लेख तपशीलाने आला आहे. तो असा[११] - " शके ११८०, कालयुक्त संवत्सर, मार्गशीर्ष शु.१०, गुरूवार या दिवशी व्दारावती पूर्वराधीश्वर - विष्णू - वंशोद्भव - यादवकूल - कालीका - भास्कर, आंध्रप्रदेशाच्या राजाच्या अंत:करणातील शल्य, गुर्जर नृपतीचा पराभव करणार श्री कान्हरदेव हा राज्य करीत होता. त्याच्या पादपदोपजीवी राठोड वंशोद्भव सौमवंशी कुळात नवकेश्वरी देवीच्या वराने लाभलेल्या प्रसादाचा आहे. लत्तलोरपुराचा अधिष्ठाता थोरनारायण श्रीपादचार्य यांचा पुत्र श्रीमंत महाराज यांचा पुत्र श्रीगोपालदेव याने स्वकियांच्या अभ्युदयार्थ केलेल्या लक्ष होमांची संपूर्णता व्हावी म्हणून उदयगिरी व तुरे यांच्या दुवाडा मधील वास करणाऱ्यांनी नरसिंहदेवाप्रीत्यर्थ हे वरील गाव दान केले आहे. उदगिरी म्हणजे उदगीर ह्या नावाचे उत्पन्न या लक्ष होमाच्या खर्चासाठी करून दिलेले आहे."

वरील दोन्ही शिलालेखांवरून यादव काळात उदगीर हे लष्करी व प्रशासकीय विभागांपैकी एक असावे असे वाटते. यादव काळात उदगीर हे वरंगळच्या काकतीयांच्या सरहद्दीवरील ठाणे असल्यामुळे तेथे यादव सैन्याची छावणी (बिड) अस्तित्वात होती. ही छावणी बहुधा उदगीर किल्ल्याच्या परिसरातच असावी. काकतीयांच्या एका कोरीव लेखातील माहितीवरून समजते की, यादव आणि काकतीय यांच्यात झालेल्या लढाईत निदान काही काळ तरी उदगीरवर काकतीयांचा ताबा प्रस्थापित झाला होता.[१२] परंतु यादवांनी उदगीर पुन्हा जिंकून घेतले. सिंघण यादवाच्या कारकिर्दीत उदगीरचा समावेश सेनापती खोलेश्वराचे वास्तव्य असलेल्या अंबादेश मंडळात होता. कान्हरदेव यादवाच्या राजवटीत खंदार (कंधार, जि.नांदेड) व उदगीर हे लातूर येथे वास्तव्य असलेल्या गोपाल राष्ट्रौड याच्या अधिकारकक्षेत समाविष्ट होते. रामचंद्र यादवाच्या कारकिर्दीतील लेख लातूर जिल्ह्यात आजवर जरी उपलब्ध झालेला नसला, तरी महानुभाव साहित्यातील नोंदीवरून व महिकावतीच्या बखरीनुसार त्याचा पुत्र सहावा भिल्लम हा यादव राजवटीच्या अखेरीस उदगीरचा शासक असल्याची माहिती मिळते.[१३] उदगीरची जडणघडणही प्रामुख्याने यादव काळातच झाली. हा प्रदेश सलग तीन शतके म्हणजे यादवांच्या अंतापर्यंत त्यांच्याच अमलाखाली होता. त्यानंतर इ.स.१२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने यादवांचा पराभव करून देवगिरी जिंकले. त्यानंतर हसन बहमनीने या प्रदेशावर ताबा बसविला. त्यामुळे उदगीरचा समावेश साहजिकच बहमनी राज्यात झाला. बहमनींच्या विघटनानंतर सत्तापरिवर्तनानुसार उदगीर किल्ला व लगतच्या प्रदेशावर बरीदशाही, निजामशाही व आदिलशाहीने आलटून पालटून स्वामित्त्व गाजविले. इ.स.१५७९ ते १६३६ पर्यंत तरी उदगीर निजामशहाच्या अधिपत्याखाली होते. त्यानंतर सन १६३६ मध्ये उदगीरवर मुघलांची सत्ता प्रस्थापित झाली.

१०. कित्ता
११. तुळपुळे, शं.गो., **प्राचीन मराठी कोरीव लेख,** पुणे, १९६३, पृ.१५१.
१२. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **डॉ. देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ**, पृ.१५१.
१३. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, लातूर जिल्ह्याचा सांस्कृतिक इतिहास.

सन १६७० मध्ये शिवाजी महाराज उदगीर किल्ल्यास वेढा देण्यासाठी आल्याची तक्रार तत्कालिन किल्लेदार सोहराबखान याने औरंगजेबाकडे केली होती. ते पत्र २० जानेवारी १६७१ चे आहे. पुढे दिल्लीतील सत्ताबदलानंतर सय्यद बंधू दक्षिणेच्या सुभेदारीवर आले. त्यांनी पेशवा बाळाजी विश्वनाथ याच्याशी हातमिळवणी केली. इ.स.१७१५ मध्ये त्यांच्यात एक तह झाला. त्यान्वये मराठ्यांना उदगीरचा समावेश असलेल्या बिदर सुभ्यासह मुघल साम्राज्यातील सहा सुभ्यातून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे हक्क मिळाले. ही सनद पेशवा बाळाजी विश्वनाथ याने २० मार्च १७१९ रोजी दिल्लीहून आणली. मराठे अशी वसुली करीत असले तरी त्यांनी उदगीरला स्वत:चे अधिकारी किंवा किल्लेदार नेमले नाहीत.

हैद्राबादच्या निजामी राजवटीत उदगीर हे तालुक्याचे ठिकाण होते. या काळात इंग्रज साम्राज्याची हद्द निजामाच्या राज्यास येऊन भिडल्यामुळे पुढील राजकारणाच्या दृष्टीने तडजोड म्हणून निजामाने इ.स. १८०० मध्ये इंग्रजांशी तैनाती फौजेचा तह करून आपले राज्य टिकवून धरले. या तहान्वये उदगीरचा समावेश असलेला उस्मानाबाद व रायचूर हे जिल्हे इंग्रजांकडे गहाण ठेवले. पण १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दातील मदतीबद्दल इंग्रजांनी ते पुन्हा निजामास इ.स.१८६० साली परत केले. यानंतर हा प्रांत भारतीय स्वातंत्र्यापर्यंत निजामाच्याच वर्चस्वाखाली होता. सन १९५६ पर्यंत उदगीर, बिदर जिल्ह्यात समाविष्ट होते. परंतु १९५६ च्या राज्य पुनर्रचनेनंतर ते उस्मानाबाद जिल्हयाचा तालुका बनले. त्यानंतर लातूर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर तालुका म्हणून उदगीर या जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले.

उदगीर किल्ल्याचा इतिहास : उदगीर येथे असलेल्या भुईकोट किल्ल्यामुळे हे शहर प्रसिध्द आहे. जिल्हा मुख्यालयापासून ६५ कि.मी. अंतरावर असलेला हा किल्ला इ.स.१९९३ च्या भूकंपात क्षतिग्रस्त झालेला आहे.

हा किल्ला कधी व कोणाच्या राजवटीत बांधला गेला याची अद्याप निश्चिती झालेली नाही. इ.स.१४९३ च्या सुमारास बहमनी काळात हा किल्ला बांधला गेला[१४] असा एक विचार प्रवाह आहे. कदाचित यादव राजवटीत उदगीर किल्ल्याचा पाया घातला गेला असावा. कारण उदगीरच्या ऐतिहासिक कालखंडास यादव काळापासूनच सुरुवात झाली. महमुदशहा बहमनी इ.स.१४८२ मध्ये गादीवर आला. त्याने इ.स.१४९२ मध्ये कासीम बरीदला उदगीर, कंधार आणि औसाचा किल्ला जहागीर म्हणून दिला होता. यावरून बरीदशाहीचा संस्थापक कासीम बरीद याच्या पूर्वीही हा किल्ला अस्तित्वात होता. बहमनी घराण्यातील एकूण चौदा राजांपैकी आठ राजांनी गुलबर्गा राजधानीवरून राज्य केले. उदगीर या ठिकाणी काही लक्षवेधक गोष्ट असल्याशिवाय एवढ्या लांबच्या ठिकाणी त्यांचे लक्ष वेधले गेले नसावे. ही लक्षवेधक गोष्ट म्हणजेच किल्ला असावा. यानंतरच्या बहमनी राजांच्या काळात उदगीर किल्ल्याचा विशेष विकास झाला असावा. कारण किल्ल्याच्या बाह्य तटाची बांधणी ही बिदर किंवा गोवळकोंड्याच्या किल्ल्याच्या तटासारखी असून त्यात हिंदू मंदिरांचे दगड बसविलेले आढळतात. हिंदू व जैनांची मंदिरे पाडून किल्ले बांधण्याची पध्दत बहमनी राज्यात सर्रास रुढ होती. दुसरे म्हणजे कल्याणी (आताचे बसवकल्याण) हे चालुक्यांच्या राजधानीचे ठिकाणही उदगीरपासून दक्षिणेस केवळ ४० मैलांवर आहे. या

१४. **इम्पेरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया**, प्रॉव्हिन्शियल सिरीज, हैद्राबाद स्टेट, गव्हर्नमेंट प्रिंटींग प्रेस, कलकत्ता, १९०९, पृ.२९२.

राजधानीचाही उदगीर किल्ल्याच्या जडणघडणीवर परिणाम झाला असावा. किल्ल्यातील काही इमारतीही इतर इमारतींच्या मानाने, विशेषत: बाहेरील तटाच्या मानाने खूप जुन्या वाटतात. हिंदू राजांच्या काळात, विशेषत: मातीचे गढीसारखे किल्ले बांधले जात. त्याच मातीचा उपयोग नंतरच्या मुस्लिम राजांनी बांधकामासाठी करून घेतल्याने मूळ वास्तू नष्ट झाल्या. यावरून असाही निष्कर्ष काढता येईल की, किल्ल्याचा पाया दक्षिणेतील चालुक्य राजांच्या काळात घातला गेला व बहमनी राजांनी या किल्ल्याचा नंतर मोठ्या प्रमाणात विकास केला.

या किल्ल्याचा लेखी उल्लेख प्रथम फेरिस्ताच्या लिखाणात आढळतो. उदगीर किल्ल्यात आणि जवळपासच्या जुन्या इमारतींमध्ये काही अरबी आणि फार्शी शिलालेख मिळालेले आहेत. त्यावरून व इतिहासाच्या वेगवेगळ्या ग्रंथांतून उदगीरचा इतिहास जुळविण्यास मदत होते. किल्ल्याचा सलग इतिहास मात्र बहामनी काळापासून उपलब्ध होतो. बहमनी वंशाचा चौदावा राजा महमुदशहाच्या (इ.स.१४८२-१५१८) काळात दस्तूर दिनार या सरदाराचे बंड यशस्वीपणे मोडून काढल्याप्रीत्यर्थ कुली कुतूब यास वैयक्तिक खर्चासाठी महमुदशहाने उदगीर किल्ला एक वर्षासाठी दिला होता. त्यानंतर बिदर येथे झालेली परदेशी व दक्षिणी मुस्लिमांमधील दंगल शमविल्याप्रकरणी महमुदशहाने कासीम बरीद यास इ.स.१४९२ मध्ये हा किल्ला जहागीर म्हणून बहाल केला होता. बरीदने खानसाहेब यास उदगीरचा किल्लेदार म्हणून नेमले. कासीम बरीद इ.स.१५०४ मध्ये स्वतंत्र झाल्यावर त्याने आपला पुत्र अमीर बरीदला हा किल्ला दिला. कासीम बरीदने औसा, कंधार व उदगीर येथे आपल्या नावे खुत्बा पढला जावा असे हुकूम सोडले होते. पुढे बहमनींच्या विघटनानंतर इ.स.१५१६ मध्ये बरीद आणि माहूरचा जहागीरदार खुदावंतखान हबशी यांच्यात उदगीर येथे लढाई होऊन हबशी मारला गेला व किल्ला पुन्हा अमीरच्याच ताब्यात राहिला. अमीर बरीदच्या काळात आदिलशाहीबरोबर संघर्ष झाला होता. अमीरच्या मृत्युनंतर त्याचा पुत्र अली बरीदशहा राजा झाला. त्याच्या काळात बुऱ्हान निजामशहाने इ.स.१५४७[१५] मध्ये उदगीर किल्ला जिंकला. फेरिस्ताच्या मताप्रमाणे निजामशहाने इ.स.१५४८ मध्ये बिदरवर मोहीम काढून त्यानंतर एक वर्षाने म्हणजे इ.स.१५४९ मध्ये उदगीर किल्ला जिंकून कराराप्रमाणे स्वत:स सामिल झालेल्या दर्या इमादशहाकडे सुपूर्द केला. पण इमादशहाने बरीदला हा किल्ला बक्षीस दिला. त्यामुळे पुढे बराच काळ हा किल्ला बरीदशहाकडेच राहिला. त्यानंतर मुर्तझा निजामशहा (इ.स.१५६५-१५८८) याने तो निजामशाहीत समाविष्ट केला. तो मुघल आक्रमणापर्यंत निजामशहाकडेच होता. निजामशहाचा येथील किल्लेदार मलिक मर्जान हबशी किंवा अमीरखान याने मुर्तझा निजामशहाच्या काळात या किल्ल्यावर काही इमारती बांधल्या. किल्ल्यातील एका जुन्या वास्तुच्या काळ्या दगडाच्या कमानीवर फार्शी शिलालेख आहे. त्यात बुऱ्हानशहाने उदगीरचा किल्ला घेतला व इ.स.१५७९ (हिजरी ९८४) मध्ये म्हणजे ३२ वर्षांनी ही कमान बांधल्याचा उल्लेख आहे.[१६]

---

१५. इ.स.१५०८ मध्ये बुरहान निजामशहाने किल्ला जिंकला, डॉ.म.ग.कुंटे, **अहमदनगरची निजामशाही**, १९६२, पृ.३१७. सन १५४५ मध्ये बुरहान निजामशहाने अली बरीदच्या ताब्यातील हा किल्ला काबिज केला, प्रो.एच.के.शेरवानी, **हिस्टरी ऑफ मेडिवल डेक्कन (१२९५-१७२४),** खंड १, १९७३, पृ.३२०. इ.स.१५४७-४८ मधील आदिलशहावरील मोहिमेत बुरहान निजामशहाने या किल्ल्याचा पाडाव केला व १५४८ च्या शेवटी तो राजधानीस परतला, एम.एच.गोपाल, **दि हिस्टरी ऑफ दि विजयनगर एम्पायर,** खंड १, १९७८, पृ. १९४.

१६. राठोड, रा.था.,पूर्वोक्त, पृ.१५-१६.

निजामशाही नष्ट करण्यासाठी मुघल बादशहा शहाजहान इ.स.१६३० मध्ये दक्षिणेत आला. त्याने खान दौरान यास उदगीर व औसा किल्ला काबिज करण्यासाठी पाठविले. या काळात उदगीरचा किल्ला मजबूत व महत्त्वाचा समजला जाई. खानाने १९ जून १६३६ रोजी किल्ल्याजवळचे गाव जिंकून किल्ल्यास सुरुंग लावले. त्यामुळे किल्लेदार सिद्दी मुफ्तह याने शरणागतीची बोलणी सुरू केली. परंतु किल्ला सोडण्यासाठी भरमसाठ रकमेची मागणी केल्याने मुघलांनी वेढा आवळून सुरुंग उडविले. त्यात किल्ल्याचा तट कोसळला. परंतु बालेकिल्ला मजबूत होता. तरीही शेवटी तीन महिन्यांच्या वेढ्यानंतर मुघलांनी २८ सप्टेंबर १६३६ रोजी किल्ला काबिज केला.[१७] तसा उल्लेखही किल्ल्यातील एका कमानीवरील फार्शी शिलालेखात आहे. तसेच जैनखान कोका या सरदाराचा पुत्र गुलाम मोगलखान कोका याची इ.स.१६३७ मध्ये या किल्ल्याचा किल्लेदार म्हणून नियुक्ती केली गेली असाही त्यात उल्लेख आहे. मोगलखानापूर्वी खुदावन्तखान हाही या किल्ल्याचा किल्लेदार होता. मोगलखान त्यानंतर इ.स.१६४८ पर्यंत किल्लेदार होता. त्यानंतर सजावरखान उल्मुल्क उर्फ मिर्झा हुसामोद्दिन हा सन १६५७ पर्यंत उदगीरचा किल्लेदार होता. हैद्राबादच्या निजामी राजवटीतही याच्याच घराण्याकडे किल्लेदारी होती. सजावरखान नंतर इहतीमामखान हा इ.स.१६५७ मध्ये उदगीरचा किल्लेदार झाला. त्यानंतर हुसामोद्दिनचा पुत्र सोहराबखान (नियामतुल्ला) याची किल्लेदारीवर नियुक्ती झाली. त्याची अनेक बातमीपत्रे अप्रकाशित स्वरुपात हैद्राबादच्या दफ्तरखान्यात आहेत. शिवाजी महाराजांच्या सैनिकांच्या या भागातील धामधुमीमुळे तो त्रस्त झाला होता. त्यानंतर रजिउद्दिन मुर्शीद कुलीखान हा दोन वर्षे येथील किल्लेदार असावा.[१८] त्याच्यानंतर अन्वरखान व त्यानंतर सन १६८१ मध्ये खातमखानास याची किल्लेदारी बहाल करण्यात आली. त्याने किल्ल्यात अनेक महाल उभारले होते. याच्या अमदानीतील एक शिलालेख किल्ल्यात आहे. खातमखानाच्या जागी काही काळ सय्यद जैनुबाबीद्दिन हा बदली होऊन आला होता. त्यानंतर मुघल किल्लेदार म्हणून सय्यद मुस्तफाची नेमणूक झाली. तो सन १६९३ पर्यंत उदगीरचा किल्लेदार होता. त्यानंतर महम्मद याह्या यास त्या जागी नियुक्त करण्यात आल्याची नोंद औरंगजेबाच्या "फार्शी अखबार" मध्ये आहे.

महम्मद याह्यानंतर इ.स.१७०१ मध्ये पुन्हा मिर्झा हुसामोद्दिन याच्या घराण्याकडे किल्लेदारी सोपविण्यात आली. इ.स.१७२४ मध्ये याचाच पुत्र मिर्झा निजामुद्दिन अली व त्यानंतर हुसामुल्लाखान हा किल्लेदार झाला. त्यानंतर मुघलांचा हैद्राबादचा सुभेदार चिनकिलीचखान उर्फ निजाम-उल-मुल्क याच्याकडे उदगीर प्रांत व किल्ला देण्यात आला. तो स्वतंत्र झाल्यानंतर त्याच्या काळात हुसामुल्लाखानाचा पुत्र यारजंग हा उदगीरचा किल्लेदार होता.

दक्षिणेत निजामाच्या उदयापासून निजाम व मराठ्यांचे संबंध अधिकाधिक गुंतागुंतीचे झाले होते. त्याच्या राजकीय डावपेचांमुळे दक्षिणेत मराठ्यांच्या राजकारणाला धोका निर्माण झाला होता. त्यामुळे त्याचा पूर्ण पाडाव करण्याच्या हेतूने मराठे पुण्याहून उदगीरला आले.

---

१७. पगडी, सेतुमाधवराव, **शिवचरित्र - एक अभ्यास**, १९७१, पृ.१९४; सरदेसाई, गो.स. **मराठी रियासत**, खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८८, पृ.८१ नुसार १७ ऑगस्ट १६३६ रोजी खानाने किल्ल्याला वेढा दिला. दोन सुरुंग उडताच किल्ला कब्जात आला.
१८. राठोड, पी.सी., पूर्वोक्त, पृ.३६.

तेथे निजाम व मराठे यांच्यात सन १७६० मध्ये तुंबळ लढाई झाली. ही उदगीरची लढाई[१९] म्हणून ओळखली जाते. या लढाईचे वर्णन अनेक इतिहासकारांच्या ग्रंथात आहे. यात निजामाचा पराभव होऊन त्याने मराठ्यांकडून जाचक अटीवर तह स्वीकारला. हाच १७६० चा इतिहास प्रसिध्द उदगीर तह होय. यान्वये निजामाने मराठ्यांना ६०[२०] लक्ष रुपयांचा मुलूख दिला. त्यात पूर्ण औरंगाबाद सुभा, बिदर, विजापूर सुभ्याचा बराचसा भाग, दौलताबाद, असीरगढ, बऱ्हाणपूर, खानदेशातील काही किल्ले आणि विजापूर सुभ्यातील शहरे यांचा समावेश होता. पण पुढच्याच वर्षी म्हणजे सन १७६१ मध्ये झालेल्या पानिपतच्या लढाईच्या संकटामुळे या तहाची अंमलबजावणी होऊ शकली नाही.[२१]

इ.स.१८१९ व १८२० मध्ये निजाम राजवटीविरूध्द मराठवाड्यात बंड झाले. त्यापैकी उदगीर येथील देशमुखाचे बंड प्रसिध्द आहे. १८२० मधील या उठावात देशमुखाने हा किल्ला बळकावला होता. पुढे १८२६ मधील वहावी कटाचा सुगावा लागून चौकशी करण्यात आली तेव्हा या किल्ल्यात अन्नधान्य व दारुगोळ्याचा मोठा साठा केलेला होता असे उघडकीस आले होते.

किल्ल्याचे वर्णन : उदगीर शहराच्या उत्तरेस चौबारा ते किल्ला वेस या मार्गाने सरळ गेल्यास पुढे सखल भागात सध्या राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा असलेला उदगीरचा भुईकोट किल्ला दिसतो. कृत्रिम खंदक आणि तटापेक्षा नैसर्गिक दऱ्याखोऱ्यानींच किल्ल्याचे संरक्षण अधिक मजबूत झालेले आहे. इतर किल्ल्यांप्रमाणे हा किल्ला उंच टेकडीवर नसून, तो ज्या टेकडीवर वसलेला आहे ती टेकडी एका खोल दरीतील दोन खोऱ्यांच्या आत आहे. किल्ल्याच्या पश्चिमेला व पूर्वेला या खोऱ्यांचे फाटे फुटलेले आहेत, तर उत्तरेला मोठी दरी आहे. म्हणजेच पूर्व, पश्चिम व उत्तरेस नैसर्गिक खोरे व दक्षिणेस उदगीर शहर वसलेले आहे. किल्ल्यात जाण्यापूर्वी वस्ती लागते. ती संपल्यावर शहर व किल्ला या दरम्यान सध्या उद्ध्वस्त स्थितीतील तटभिंत लागते. ही भिंत पेठ वेशीपासून किल्ला वेशीपर्यंत आहे. ज्यावेळी ही भिंत अस्तित्वात होती, तेव्हा गावातून किल्ल्यात प्रवेश करण्याचा 'किल्ला वेस' हा एकच मार्ग होता. ही भिंत ओलांडल्यानंतर डावीकडे दिसते ती ओसाड, जुनी वास्तू म्हणजे सरकारी व गैरसरकारी प्रवाशांसाठीची तत्कालिन धर्मशाळा (सराई) होती. या वास्तुच्या सध्या केवळ भिंती आणि अकरा स्तंभ उभे असून छत पडलेले आहे.

खंदक : किल्ल्याच्या सभोवती १२ मीटर खोल व ६ मीटर रुंदीचा खंदक असून त्याची रुंदी सर्वत्र समान नाही. खंदक पार करून जाण्यासाठी त्यावर २७ मीटर लांबीचा व ६ मीटर रुंदीचा दगडी पूल आहे. खंदकाची भिंत दगडी असून उदगीरच्या पश्चिमेस असणाऱ्या तलावातील पाणी यात सोडण्याची व्यवस्था होती. सध्या खंदकात गाळ साचलेला आहे.

---

१९. यासंबंधी सविस्तर विवेचन याच ग्रंथातील प्रकरण : २ **" इतिहास "** मध्ये देण्यात आलेले आहे.
२०. याबाबत इतिहासकारांमध्ये एकमत नाही. वासुदेवशास्त्री खरेंच्या मते ६२ लाखाचा मुलूख, रियासतकारांच्या मते ६० लाखाचा मुलूख, तर अस्सल कागदपत्रांनुसार ४५ लाखांचा मुलूख द्यावा लागला.
२१. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **डॉ.देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ** पृ.१५१.

तटबंदी : खंदक पार केल्यावर अद्यापही सुस्थितीत व मजबूत असलेला किल्ल्याचा बाह्यतट लागतो. तटाचा परिघ ७७५ गज (सुमारे ६७० मीटर) असून तटाची उंची नऊ मीटर आहे. किल्ल्यात प्रवेश करतेवेळी तटाच्या उजवीकडील भिंतीच्या तीन दगडांवर हत्ती कोरलेले आहेत, तर एका दगडावर दोन हत्तींची झुंज दर्शविली आहे. त्यांच्या पाठीवरील अंबारी, गोंडे, साखळ्या स्पष्ट दिसतात. प्रत्येक हत्तीवर एक माणूस बसलेला आहे. हे दगड याच परिसरातील भवानीच्या हेमाडपंती मंदिरांचे आहेत. या तटाच्या आत संपूर्ण किल्ल्याभोवती दुसरी त्याहीपेक्षा उंच तटभिंत आहे. अशाप्रकारे खंदक, तट, उपतट बांधून किल्ल्याच्या संरक्षणाची काळजी घेतलेली दिसते.

बुरूज : किल्ल्यातील एकूण बुरुजांची संख्या १९ आहे. पहिल्या तटाला १२ बुरूज असून त्यावर सैनिक व तोफा ठेवण्याची सोय आहे. दुसऱ्या तटास सात बुरूज असून त्यापैकी पूर्वेकडे व पश्चिमेकडे असलेल्या दोन मुख्य बुरुजांना अनुक्रमे जमाना बुरूज व चांदणी बुरूज अशी नावे आहेत. रामन्ना नामी वतनदाराच्या आजोबाच्या आजोबाला जिवंत गाडल्याची जी आख्यायिका येथे सांगितली जाते, ती याच जमना बुरुजाची आहे. हे दोन्ही विशाल आकाराचे टेहाळणी बुरूज असून त्यावरून १२-१३ कि.मी. पर्यंतचा प्रदेश नजरेच्या टप्प्यात येतो. या बुरुजांवरून तोफा डागण्याचे काम केले जाई. याशिवाय दोन्ही तटांवरून बंदुकींचा मारा करण्यासाठी तटांना जागोजागी जंग्या ठेवलेल्या आहेत.

प्रवेशद्वार : पहिल्या तटास किल्ल्याचे प्रवेशव्दार असून त्याची उंची १२ मीटर व रुंदी २.२५ मीटर आहे. याच्या दरवाजांवर लोखंडाचे मजबूत आवरण आहे. डाव्या हातास काटकोनात असलेल्या या प्रवेशव्दारासमोर भिंत असल्याने तेथे पोहोचेपर्यंत हे प्रवेशव्दार दिसत नाही. मात्र आज हे व्दार पूर्णपणे नष्ट झालेले आहे. हे प्रवेशव्दार पार केल्यानंतर उजवीकडे एक आठ फूट लांबीची गल्ली लागते. हिची रुंदी शेवटपर्यंत असमान आहे. हा मार्ग सरळ उदागीरबाबाच्या मठापर्यंत जातो.

पहिल्या प्रवेशव्दारापासून दुसरे प्रवेशव्दार १७ मीटर दूर अंतरावर आहे. दोन्हींच्या दरम्यानच्या वळणदार मार्गावर सैनिकांना लपण्यासाठी कमानीदार सात चौक्या (गार्डरुम्स्) आहेत. हे प्रवेशव्दारही पहिल्या प्रवेशव्दारासारखेच मजबूत आहे. येथील एका चौकीतून राजवाड्यात जाण्याचा एक गुप्त मार्ग आहे. हे दुसरे प्रवेशव्दार म्हणजे दुसऱ्या तटाचे प्रवेशव्दार होय.

तिसऱ्या प्रवेशव्दाराची उंची पहिल्या दोन प्रवेशव्दारांपेक्षा तुलनेने अधिक आहे. हे ही अतिशय मजबूत असून त्यास " अंधारी दरवाजा " नावाने ओळखले जाते. दुसऱ्या व तिसऱ्या प्रवेशव्दारादरम्यान सहा चौक्या आहेत. येथेच एक ३ मीटर खोलीचा हौद असून त्यातील पाणी वरच्या मजल्यावर नेले जात असावे, असे येथे दिसणाऱ्या पाण्याच्या मोटेच्या चिन्हावरून स्पष्ट होते. येथेही दोन्ही बाजू मिळून १० चौक्या असून त्यातील सहाव्या चौकीतून वरील भागात जाण्याचा गुप्त मार्ग आहे. या प्रवेशव्दारानंतर राजवाडा चौकात प्रवेश करता येतो.

तोफा : किल्ल्याच्या बाह्य तटाच्या सर्व बुरुजांवर तोफा ठेवण्याची सोय आहे. सध्या किल्ल्यात १२ लहान-मोठ्या तोफा आहेत. पूर्वेकडील जमना बुरुजावर येथील सर्वात मोठी पंचरशी तोफ आहे. चांदणी बुरुजावरही ३ मीटर लांबीची मकराकृती मुख असलेली तोफ आहे. ती सर्व दिशांना फिरवता येण्याजोगी आहे. इतर तोफा किल्ल्यात वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. किल्ल्याच्या पूर्वेस व उत्तरेस अंदाजे एक-एक कि.मी. अंतरावर लहान घुमट्या बांधलेल्या असून त्यांचा उपयोग दिवट्या पेटवून शत्रुच्या आगमनाचा इशारा कळविण्यासाठी होत असे. इथपर्यंतचा प्रदेश किल्ल्यातील तोफांच्या माऱ्याच्या टप्प्यात होता.

चोर दरवाजे : पहिल्या दरवाजाकडून उदागीर बाबाच्या मठाकडे जाणारा मार्ग व उत्तर-पूर्व दिशेकडून दुसऱ्या तटाच्या लहान दरवाजापासून पुढे निघणारा मार्ग शत्रुपक्षास गोंधळात टाकणारा आहे. बालेकिल्ल्यातून बाहेर पडण्यास व दुसऱ्या तटाचे संरक्षण करण्यासाठी या लहान दरवाजाचा उपयोग होई. किल्ल्याच्या उत्तरेस नक्षीमहालाच्या पाठीमागे बुरुजाच्या बाजूने एक भुयारी गुप्त मार्ग आहे. याचा उपयोग आणिबाणीप्रसंगी बाहेर पडण्यासाठी होत असावा. इतर जे तीन बुजलेले गुप्तमार्ग आहेत ते खंदकाखालून किल्ल्याच्या वेशीपलीकडे बाहेर पडत असावेत.

कोठार : किल्ल्यात धान्याचे कोठार दिवाण-ए-खास महालाच्या बाजूस आहे. त्याच्या बाजूसच पाणी कोठार किंवा हौद आहे. दारुकोठार किल्ल्याच्या पूर्वेस एका बुरूजाजवळ आहे. सध्या या वास्तू क्षतिग्रस्त आहेत.

पाणी पुरवठा : पाण्यासाठी उदागीर मठाजवळ एक विहीर आहे. येथील पाणी मोटेच्या सहाय्याने किल्ल्याच्या दुसऱ्या तटाजवळील दोन हौदात साठविले जाई. किल्ल्यात या विहिरीव्यतिरिक्त अन्य विहीर किंवा तलाव नसल्याने हेच पाणी संपूर्ण किल्ल्यास पुरविले जात असे. दुसऱ्या तटाजवळील हौदातील पाणी पुन्हा मोटेच्या सहाय्याने तटावर नेले जाई. पण येथे पाण्याचा साठा न करता किल्ल्याच्या उत्तर व पश्चिम भागाकडे पाणी नेले जाई. उत्तर भागासाठीचे पाणी खापरी नळांच्या सहाय्याने कचेरीच्या समोरच्या हौदात व त्यातून किल्ल्याच्या मध्यभागी असलेल्या सर्वात मोठ्या हौदास व त्यातील कारंज्यास पुरविले जाई. तेथील दिवाण-ए-खास, दिवाण-ए-आम, नक्षीमहल आदि महालांना तसेच तेथील अन्य कारंज्यानाही हे पाणी पुरविण्यात येई. धान्य कोठाराजवळील पाण्याच्या हौदातही हेच पाणी सोडले जाई.

दुसऱ्या तटावर उदंचन केलेले पश्चिम भागासाठीचे पाणी खापरी नळांच्या सहाय्याने पुढे जनाना महल, बुरूज यांच्या बाजूने पहिल्या दरवाजाच्या आतील बाजूस असलेल्या ३ मीटर खोल व १.५ मीटर रुंदीच्या हौदात प्रथम सोडले जाई. येथून राजमहल, गादीमहल, स्नानगृह, हवामहल इत्यादी ठिकाणी पाणीपुरवठा होई.

राजवाडा : हा किल्ल्याच्या पूर्वेकडील उंच महाल होय. त्यात लहान स्वरूपात आवश्यक त्या सर्व गोष्टी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. याचे बांधकाम बहमनी शिल्पकलेचे वाटते. या इमारतीचा बराच भाग पडलेला आहे. महमुदशहा बहमनीच्या काळात बगदाद, इराण, तुर्कस्थान, रोम येथील स्थापत्य विशारदांनी येथे अनेक इमारती उभारल्या होत्या. या राजवाड्यावर पडझडीच्या अवस्थेत असलेली गगन महल ही वास्तू बहमनी कालखंडातील कलेचा उत्तम नमुना आहे.

बहमनीनंतरच्या कालखंडात बांधलेल्या राजवाड्याची इमारत किल्ल्याच्या तिसऱ्या प्रवेशव्दाराच्या बाजूस आहे. या इमारतीत कमानींच्या आधारे अनेक महल किंवा दालने उभारण्यात आली होती. त्यातील काही बऱ्यापैकी शाबूत आहेत, तर काही सध्या अवशेषरुपात दिसतात. त्यांचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे :-

खास महल : किल्ल्याच्या उत्तर भागातील ही इमारत उद्ध्वस्त स्थितीत आहे. कमानींनी जोडलेल्या १८ दगडी खांबांवर ही इमारत उभी होती. याच्या तिन्ही बाजूस इतर महल आहेत. दर्शनी भाग पाच कमानींचा होता. यासमोर मोठे अंगण आहे. ही इमारत मंडपासारखी असूनही त्याला तुळ्यांऐवजी दोन खांबातील अंतर कमी करून त्यावर शिलाण्याचे छत करण्यात आले होते. याचे बांधकाम दगड, चुना व वाळूने केले होते.

दिवाण-इ-खास : किल्ल्याच्या उत्तर भागातील नक्षी महालासमोर ही वास्तू जीर्ण अवस्थेत आहे. हिचा दर्शनी भाग उत्तरेकडे असून समोर चौकोनी हौद आहे. बाजूच्या मोकळ्या जागी बाग असावी. कमानींनी जोडलेल्या दहा खांबांवर ही वास्तू उभारलेली असून पाठीमागे सलग भिंत आहे. या वास्तूची लांबी अधिक व रुंदी कमी आहे.

दिवाण-इ-आम : ही खास महलच्या पूर्वेकडे त्याच धर्तीवर बांधलेली वास्तू खास महलपेक्षा आकाराने मोठी होती.

हवामहल : किल्ल्याच्या पूर्व दिशेस बुरुजाइतक्या उंचीच्या वा वास्तूचा बराचसा भाग पडलेला आहे. समोर मोठे अंगण असलेली ही वास्तू दुमजली होती. यास मनोरा असून वास्तूच्या बाजूच्या भिंतीत कबुतरखाना तयार करण्यात आला होता.

नक्षीमहल : किल्ल्याच्या उत्तरेकडील ही वास्तू दक्षिणाभिमुख आहे. समोरच दिवाण-इ-खास महल, मध्याभागी हौद व बागेसाठी मोकळी जागा आहे. दहा खांबांवर ही वास्तू उभारलेली असून पाठीमागेही दोन मजली इमारत उभारण्यात आली होती. याच्या वरच्या मजल्यावर झरोका आहे. तो दोन खांबावर आधारित असून सज्जासारखा पुढे झुकलेला आहे. या वास्तूच्या कमानींवर वेलबुट्टीची नक्षी असून ते नक्षीकाम येथील सर्वोत्कृष्ट नक्षीकाम होय.

Maharashtra State Gazetteers

अनुक्रमणिका

जनानखाना : ही वास्तू किल्ल्याच्या तिसऱ्या दरवाजाशेजारी आहे. याची मागील भिंत म्हणजे दुसऱ्या तटाची भिंत होय. ही दुमजली इमारत येथील सर्वात भव्य इमारत आहे. या इमारतीच्या पश्चिमेस गादीमहल आहे. या इमारतीच्या खालील मजल्यावर कचेरी असावी. वरच्या मजल्यावर कमानदार घुमटाकृती सज्जात झरोके आहेत. या वास्तूस दोन प्रवेशव्दारे असून त्याव्यतिरिक्त एक गुप्त व्दारही आहे. वरच्या मजल्यावर जनानखाना आहे. हैदराबादच्या निजामी राजवटीत उदगीर हे तालुक्याचे ठिकाण होते. तेव्हा या इमारतीत तहसील व उपजिल्हाधिकारी कार्यालय असल्याने त्यावेळी येथे काही नवे बांधकाम व रंगकाम करण्यात आल्याचे दिसते. यास " तहसील कचेरी " असेही म्हणतात.

तिजोरी : जनानखाना व कचेरीच्या पूर्व दिशेस ही वास्तू आहे. या वास्तूच्या सर्व बाजू भिंतींनी बंदिस्त असून या वास्तूत प्रवेशासाठी कचेरीतून प्रवेशव्दार आहे. मुघल किल्लेदार इहतीमामखानच्या काळात उदगीरजवळील लोहारा गावच्या लोहाराने बनावट चावी वापरून ही तिजोरी फोडली होती.

रंगीन महल : तहसील कचेरीच्या ओट्यास लागून हाफीज मौलाना मोइनुद्दीनची कबर आहे. या कबरीच्या पश्चिमेला सुमारे ३१ मीटर अंतरावर ही दुमजली इमारत आहे. ही इमारत थोड्या उंचीवर असून त्यात छोटी छोटी तीन दालने आहेत. या इमारतीच्या वरील भागातून किल्ल्याचा पश्चिमेकडील खंदक आणि दूरवरचा प्रदेश दिसतो. सध्या ही इमारत उद्ध्वस्त अवस्थेत आहे. पूर्वी यावर तोफा होत्या. यास लागूनच एक लहान बुरूज आहे. ही इमारत म्हणजे शिपाई व सरदारांच्या करमणुकीचे महत्त्वाचे साधन होते.

खातमखान किल्लेदाराचे जुने घर : हे घर किल्ल्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या दरवाजादरम्यान आहे. तहसील कचेरीच्या अंगणातून डावीकडे वळल्यास हे घर लागते. हे खूप जुने व पडक्या स्थितीत आहे. छत पूर्णत: पडलेले असून भिंतीनाही भेगा पडलेल्या आहेत. हे दुमजली घर किल्ल्यातील सर्व घरांपेक्षा उंचावर होते. येथे एका हिरवट रंगाच्या दगडावर शिलालेख असून त्यातील नोंदीनुसार खातमखानने हिजरी १०९४ (इ.स.१६८५) मध्ये याचे बांधकाम केल्याचे स्पष्ट होते. येथे मोकळ्या जागी काळ्या दगडावरही एक शिलालेख आहे. त्यातील उल्लेख " ही साधारण इमारत खातमखाँ दिद व दोस्त बेगम मोगल यांच्या काळात तयार झाली " असा आहे. नंतरच्या काळातील किल्लेदारांनी या घराचे रुपांतर कबुतरखान्यात केल्याचे दिसते.

सजावारुल मुल्कचे घर : अंधार बावडीच्या बाजूला असलेल्या मगरव्देजा बुरुजामागे हे घर आहे. यात प्रवेशासाठी खातमखानाचे घर पार करून जावे लागते. या घराचा पहिला दरवाजा सात फूट उंच व चार फूट रुंदीच्या काळ्या दगडाच्या कमानीचा आहे. कमानीच्या बांधकामासाठी शिशासारख्या धातूचा वापर केल्याचे दिसते. या कमानीवर दोन्ही बाजूस दोन शिलालेख असून त्यात शेर उद्धृत केले आहेत. त्यांचा अर्थ असा :- १. शाहआलम मूर्तझा निजामशहाच्या काळात ही इमारत बांधली गेली. २. या राजाच्या काळातच अशी इमारत तयार होऊ शकली. अन्यथा कोणीही अशी भव्य इमारत उभारू शकला नसता.

या कमानीची शिल्पकला चार-मिनारच्या धर्तीची आहे. या कमानीतून आत गेल्यावर एका मोठ्या मोकळ्या अंगणात १८x१२ मीटरच्या दगडी चौरस ओट्यावर ही इमारत बांधलेली आहे. यात ओसरीमागे ओसरी अशा क्रमाने चार मोठ्या ओसऱ्या आहेत. सध्या या इमारतीचे संपूर्ण छत पडले आहे. येथे मोठे व जाड असे तीन स्तंभावशेष पडलेले असून ते हिंदू मंदिराचे आहेत.

हमामखाना : किल्ल्याच्या पश्चिमेस असलेली ही वास्तू दुमजली असून ती बसक्या आकाराची वाटते. पश्चिमेकडील भागाचे पाणी याच्या पहिल्या मजल्यासाठी वापरले जात असे. तळमजल्यावर कारंज्यांच्या सहाय्याने पाणी अंगावर घेता येईल अशी सोय होती. हे स्नानगृह गुप्त असल्याचे भासते. दुसरा मजला घुमटाकृती आहे. या मजल्यावर पश्चिमेकडे झरोकाही आहे.

जामा मशीद : तहसील कचेरीच्या दक्षिणेला ही मशीद आहे. यात तीन कमानी आहेत. या मशिदी समोर एक सुंदर अष्टकोनी हौद असून त्यात पोहण्याची सोय होती. ही मशीद अद्याप साधारण अवस्थेत आहे.

नबाब जानीचे घर : जामा मशिदीच्या पूर्वेस, साधारणतः २१.५ मीटर अंतरावर उपजिल्हाधिकारी कचेरीमागे ही वास्तू आहे. यासमोर खूप मोठे अंगण आहे. या घराचे दक्षिण व उत्तर अशा दोन भागात विभाजन झालेले आहे. पहिल्या भागात ओसरीमागे ओसरी अशा क्रमाने कमानीयुक्त दोन ओसऱ्या आहेत. समोर ३.६५x२.१३ मीटर लांबी-रूंदीचा एक हौद, शिवाय अंगणातही एक हौद आहे. जहांगीर यारजंगचा मुलगा नबाब जानी याने घर बांधल्याचे सांगतात. दुसरा भाग पहिल्या घराच्या अगदी समोर उत्तराभिमुख आहे. सध्या दोन्ही भाग पडक्या अवस्थेत आहेत.

अच्छी बेगमची माडी : नबाब जानीच्या घराच्या दुसऱ्या भागास लागूनच ही तीन मजली पूर्वाभिमुख वास्तू आहे. या वास्तूत सुंदर नक्षीकाम आहे. वैभवाच्या काळात ही वास्तू किल्ल्याच्या आकर्षणाचे स्थान असावे. या ठिकाणाहून पूर्वेकडील पूर्ण खंदक व दूरवरचा प्रदेश दिसतो.

रोशन महल : ही वास्तू अच्छी बेगमच्या माडीच्या उत्तर-पश्चिमेस किल्ल्याच्या दुसऱ्या तटाच्या आतील भिंतीस लागून आहे. या वास्तूतून दुसऱ्या तटाच्या बाहेर जाण्याचा मार्ग उत्तरेकडील भुयारी मार्गाजवळून किल्ल्याबाहेर जातो. या महालात जाण्याचा सरळ मार्ग म्हणजे जामा मशिदीकडील एक कमान पार करून डावीकडे वळल्यास या महालात प्रवेश करता येतो.

या वास्तूचे दोन भाग असून दोन्हींना मिळून रोशन महल म्हणतात. या दोन्ही इमारती चौकोनी दगडी ओट्यावर बांधलेल्या आहेत. दोन्ही इमारतीत प्रत्येकी दहा कमानी असून त्या दगडी स्तंभांवर आधारित आहेत. या इमारतीस गच्ची असून येथील वेलबुट्टीचे नक्षीकाम रेखीव आहे. या इमारतीचे वैशिष्ट्य म्हणजे भिंतीत दोन्ही बाजूंना दरवाजाच्या आकारात केलेले खुबीदार नक्षीचे काम. ते पाहण्यासारखे आहे. ओसरीला लागून घरासमोर १.५x१.५ मीटरचा दगडी हौद आहे. या वास्तूचे छत सध्या पडलेले असून केवळ भिंती उभ्या आहेत.

Maharashtra State Gazetteers

या वास्तुच्या दुसऱ्या भागात जहांगीर यारजंगचा दरबार भरत असे. यास ओसरीच्या दोन्ही बाजूनी वर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. ही वास्तू दुमजली आहे. याच्या भिंतीवरही सुंदर नक्षीकाम केलेले आहे. याही इमारतीच्या ओसरीस १.५×१.५ मीटरचा दगडी हौद आहे. घरासमोर मोठे अंगणही आहे. जहांगीर यारजंगच्या काळात या इमारतीचे बांधकाम झालेले आहे.

शमशाद महल : जामे महजीद (मशीद) समोरील रस्त्याने गेले असता या महलमध्ये प्रवेश करता येतो. या वास्तूचे बांधकामही रोशन महलसारखेच असून ओसरीला हौदही आहे. एखाद्या बेगमचे नाव या महालास दिले असावे. या वास्तूच्या उत्तरेसही एक घर आहे. त्यास दिलदार बेगमचे घर असे संबोधतात.

उदागीरबाबाची समाधी : बाह्य तटाचे पहिले प्रवेशव्दार पार केल्यानंतर लगतच उजवीकडे जाणारी गल्ली उदागीरबाबाच्या समाधीपर्यंत जाते. ही समाधी पहिल्या व दुसऱ्या तटाच्या दरम्यानच्या भागात बांधलेली आहे. ९ ते १० मीटर खोल गुहेसारख्या भागात काही पायऱ्या उतरून गेल्यावर ही समाधी दृष्टीस पडते. ही समाधी ३.६ चौ.मी. आकाराच्या खोलीत १.५ मी. आकाराच्या चबुतऱ्यावर आहे. यास कमी उंचीचे व्दार असून समाधीचे बांधकाम हल्ली रंगीत संगमरवराने सुशोभित करण्यात आलेले आहे. समोर राम-सीता, डाव्या बाजूस सूर्यनारायण व उजव्या बाजूस विष्णू यांच्या संगमरवरी मूर्ती आहेत. समाधीच्या डाव्या बाजूस एक तलाव व पाण्याचे टाके आहे, तर उजवीकडे मंडपासारखे एक दालन आहे. निजाम काळात निजाम सरकारकडून या समाधीच्या व्यवस्थेसाठी काही मदत मिळत असे. याच उदागीरबाबाच्या नावावरून या नगरास हे नाव पडल्याचा एक मतप्रवाह आहे. गुढीपाडव्यापूर्वी सात दिवस येथे हरिनामसप्ताह उत्सव केला जातो. आषाढात येथे यात्राही भरते.

किल्ला परिसरातील मध्ययुगीन उद्याने व स्मारके : मध्ययुगातील अनेक उद्यानांचे अवशेष अद्यापही उदगीर येथे आहेत. ही सर्व उद्याने उदगीर परिसरात विखुरलेली आहेत. त्यापैकी महत्त्वाची पुढीलप्रमाणे :-

गुंड्याचा बाग : ही बाग राजे मोहम्मदसाहब व चांदसाहब यांच्या दर्ग्याच्या मध्यभागी आहे. या बागेसाठी सय्यद चांदसाहबने जमीन दिली होती. नंतर गुंड्या नामक व्यक्तीने या बागेची देखभाल केली. म्हणून तिचेच नाव या बागेस दिले असावे.

बाग-ए-मकबूल : ही बाग हावगी स्वामींच्या मठाच्या पूर्वेस होती. या बागेची जागाही मोठी होती. सध्या या बागेचे अस्तित्व जाणवत नसून त्या जागेत लोकवस्ती मात्र बरीच वाढली आहे.

बाग-ए-किल्ला : उदगीर किल्ल्यासमोर दक्षिणेस सराईसमोर मोकळ्या जागी ही बाग होती. अद्यापही तेथे मोठा चौकोनी हौद व पाण्याच्या खापरी नळांचे अवशेष दिसतात.

बाग-ए-मेहमुदी : यास बागबंदी असेही नाव आहे. उदगीर तलावाच्या उत्तरेस व किल्ल्याच्या पश्चिमेस ही बाग आहे. ही बाग दोन एकर जमिनीवर असून सभोवती सध्या पडक्या स्थितीतील तटबंदी आहे.

अनुक्रमणिका

या बागेत स्नानगृहाची दुमजली पडकी वास्तू आहे. ही वास्तू तेथील एका विहिरीला लागून बांधलेली असून विहिरीच्या चोहोबाजुंनी कमानी व कट्टे आहेत. विहिरीला मोटांचे अवशेष स्पष्ट दिसतात. या विहिरीचेच पाणी या वास्तूतील हौदात येत असे. या वास्तूवरील वेलबुट्ट्या आणि इतर नक्षीकाम अत्यंत रेखीव व मोहक आहे. ही वास्तू महमुदशहा बहामनीच्या काळातील असावी.

या इमारतीत दोन मजबूत हौद असून एक स्नानगृह आहे. या दोन्ही हौदांसमोर ६ चौ.मीटर लांबी-रुंदीचा व १.५ मीटर खोलीचा, वरील भाग चौकोनी व आतील भाग अष्टकोनी अशा आकाराचा कारंजीयुक्त आणखी एक हौद आहे. यातच विहिरीचे पाणी घेतले जात असे. कदाचित बाजूच्या दोन्ही हौदात ते अग्नीच्या सहाय्याने विशिष्ट पद्धतीने गरम केले जात असे. दिल्ली व बिदर येथील मध्ययुगातील अशा प्रकारच्या हौदात किंवा स्नानगृहात यापध्दतीने पाणी गरम करण्याची व्यवस्था होती. हीच पध्दत येथेही असावी. या दोन्ही हौदांखाली एक-एक छिद्रही आहे.

सध्या स्नानगृहाची वास्तू व हौद यांची पडझड झालेली आहे. हौदावर एक शिलालेख कोरलेला दगड होता. हा दगड उदगीर किल्ल्यात जतन करून ठेवलेला आहे. त्यातील उल्लेखावरून असे सिध्द होते की, हा सुंदर हौद इ.स.१७५८ (हिजरी ११६३) मध्ये बांधण्यात आलेला होता. तो बांधणाऱ्याचे नाव लुत्फूअली हिस्सामुल्लाखान असे आहे. हा किल्लेदार होता. बहमनींचा चौदावा वंशज महमुदशहाच्या काळात या बागेची निर्मिती झाल्याने बागेसही हे नाव पडले असावे. तथापि, यासंबंधी मतमतांतरे आहेत. ही वास्तू शाही परिवारासाठी स्नानगृह म्हणून वापरात होती. बाजुच्या खोल्या कपडे बदलण्यासाठी किंवा मनोरंजन किंवा अन्य कारणासाठी वापरल्या जात असाव्यात.

या बागेत कुमार महल नावाची एक पडकी इमारत आहे. आठ कमानीयुक्त असलेली ही इमारत ३ मीटर रुंद, ५.४८ मीटर लांब आणि ३.६५ मीटर उंच आहे. इमारतीच्या पश्चिम भागाकडे आतून वर जाणाऱ्या पायऱ्या आहेत. याचे बांधकाम मजबूत होते. पण सध्या ते पडक्या स्थितीत आहे. ही इमारत महमूदशहा बहमनीच्या काळातच बांधली गेली असावी. बाग-ए-मेहमुदीस लागूनच दक्षिणेस एक तळे आहे. याच तळ्यातील पाणी बागेसाठी वापरले जात होते. त्याअर्थी हे तळेही जुने आहे.

बाग-ए-हिस्साम : उदगीरे शहराच्या पश्चिमेस तीन कि.मी. अंतरावर बनशेळकी रस्त्यालगतच्या या स्थळी सुस्थितीतील ही " राज्य संरक्षित वास्तू " आहे. भव्य आकाराची ही तीन मजली वास्तू एका मोठ्या उद्यानात उभारलेली असावी. आज उद्यान नसले तरी ही वास्तू मात्र बऱ्यापैकी अवस्थेत येथे आहे. उदगीर परिसरातील हे महत्त्वाचे ऐतिहासिक स्मारक आहे. या वास्तूची माहिती याच वास्तूमध्ये असलेल्या शिलालेखांवरूनही समजते. काळ्या घडीव दगडात बांधलेल्या या वास्तूची थोडी पडझड झालेली आहे. वास्तूचा तळमजला विशाल असला तरी त्याची उंची इतर मजल्यांच्या तुलनेत कमी आहे. यात अनेक स्तंभ उभारलेले आहेत. कदाचित हे धान्यकोठार असावे. वास्तूच्या दोन्ही बाजूस आतूनच वरच्या मजल्यावर जाण्यासाठी चिंचोळे जिने आहेत.

अनुक्रमणिका

पहिल्या मजल्यावर साधारणत: ४.५ x ७.५ मी. आकाराने दोन चौक असून त्यापैकी बाहेरील चौकास कमानदार तीन प्रवेशव्दारे आहेत. यातून दुसऱ्या चौकात जाण्यासाठीही एक कमानदार प्रवेशव्दार आहे. या चौकास चोहोबाजूस चार कमानयुक्त सज्जे असून पूर्वेकडील बाजूस नगारखाना मंडप आहे. शिवाय दोन्ही चौकांच्या बाहेर साधारणत: ४.५ x ६ मी. आकाराचे उघडे दालन आहे. यास चौकही म्हणता येईल. वर उल्लेखिल्याप्रमाणे या चौकाच्या तिन्ही प्रवेशव्दारांवर अरबी भाषेतील चार शिलालेख आहेत. त्यातील दुसऱ्या शिलालेखात " ही वास्तू इ.स.१६५४ (हिजरी १०५९) मध्ये शहाजहानच्या कृपेने तयार झाली " असा उल्लेख आहे, तर पहिल्या शिलालेखातील मजकुराचा अर्थ असा- " मनुष्य, इमारत किंवा कोणतीही वस्तू असो, त्याच्या आयुष्याचे खरे ज्ञान फक्त ईश्वरालाच आहे. हुजूर पैगंबराचा ज्यांना पाठिंबा आहे त्यांना ईश्वरी अंश प्राप्त होतो." तिसऱ्या लेखातील उल्लेख असा - " हिसामोद्दीनखानाच्या कृपेने आणि उदारतेने हा स्वर्गासारखा सहलीचा बाग तयार झाला. गौजखाँच्या काळात या बागेच्या नित्य प्रगतीमुळे नावीन्य वाटत होते." चौथ्या लेखात हिसामोद्दीनखानाने त्याची वंशावळ दिलेली आहे.

दुसऱ्या मजल्यावर अंदाजे ४.५ x ७.५ मी. आकाराचा चौक असून त्यास चोहोबाजूस कमानीयुक्त सज्जे आहेत. चौकास घुमटाकृती नक्षीदार छत असून बाहेरील बाजूसही तेवढ्याच आकाराचा दुसरा एक चौक आहे. पूर्व दिशेकडे एक दालन आहे. कदाचित ते प्रार्थनाघर असावे.

शेवटचा व तिसरा मजला दोन्ही मजल्यांपेक्षा आकाराने लहान असूनही त्यावर अंदाजे ४.५ x ३ मी. आकाराचा चौक व त्यावर अष्टकोनी घुमटाकृती छत आहे. हे छत आठ स्तंभांवर आधारित आहे. या संपूर्ण वास्तूस चुन्याचा गिलावा केलेला आहे. ही वास्तू इराणी शिल्पकलेचा एक चांगला नमुना ठरावी. इमारतीची रचनाही एखाद्या शाही कबरीसारखी भासते.

या वास्तूच्या पश्चिमेस साधारणत: ४.५ चौ.मी.आकाराचा पायऱ्या असलेला उत्तम स्थितीतील हौद व शेजारीच उंच पण छोट्याशा इमारतीवर पाण्याचे दोन लहान टाके आहेत. इमारतीस असलेल्या दगडी रहाटांच्या अवशेषावरून स्पष्ट होते की, हौदातील पाणी रहाटाव्दारे वर ओढले जात असावे. म्हणजेच ही स्नानगृहाची वास्तू असावी. खालील हौदात कारंज्याचेही अवशेष दिसतात. स्नानगृहाशेजारील विहिरीचे पाणी या हौदात व संपूर्ण बागेस पुरविले जात असावे. (या बागेचे आलेखन ग्रंथात दिले आहे.)

बाग-ए-शाम : ही बाग उदगीरच्या पश्चिमेस किल्ल्यापासून पाच मैलांवर आहे. या बागेतही एक भव्य वास्तू आहे. या वास्तूचा हवामहल प्रमाणे उपयोग होत असावा. या बागेभोवती तटभिंतीचे अवशेष दिसतात.

धर्मशाळा : पेठ वेशीच्या दक्षिणेकडे काही अंतरावर ही फार जुनी धर्मशाळा (सराई) आहे. साधारणत: तीनशे वर्षापूर्वी हिचे बांधकाम केलेले असावे. धर्मशाळेचे प्रवेशव्दार अगदी उंच असून दरवाजातून आत गेल्यावर उजवीकडे मारुती मंदिर लागते. आत मोठे अंगण असून काळ्या दगडाची फरशी बसविलेली आहे. या धर्मशाळेत एकूण ३० कमानयुक्त छोटी दालने आहेत. प्राचीन व मध्ययुगात घरे, मंदिरे, मशिदी किंवा धर्मशाळांच्या बांधकामात हिंदू व मुसलमान अशा कमानींचा उपयोग करीत असत असे किल्ल्यातील काही इमारती व ही

धर्मशाळा पाहिल्यानंतर वाटते. या धर्मशाळेचे चार भाग आहे. वर उल्लेखिलेल्या मारुती मंदिरात तेरा, पूर्वेकडील भागात चार, दक्षिणेकडील भागात वेगळ्या पध्दतीची पाच व पश्चिमेकडील भागात आठ कमानयुक्त दालने आहेत. त्यापैकी पाच दालनात उतारु राहू शकत होते, तर तीन कमानी विहिरीसाठी वापरण्यात आलेल्या आहेत. मात्र विहिरींचे जुने रुप पालटण्यात आले आहे.

सध्या ही धर्मशाळा खाजगी मालमत्ता असून वर उल्लेखिलेल्या कमानी विटांनी बंद करून खोल्या तयार करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे धर्मशाळेचे मूळ स्वरुप नष्ट झालेले आहे.

हजरत मीर मुसासाहेब कादरी दर्गा : उदगीरच्या पश्चिमेस नांदेड-उदगीर रस्त्यालगत एका टेकडीवर हा उदगीरमधील सर्वात मोठा दर्गा आहे. याच्या नऊ पायऱ्या चढून गेल्यावर पहिला दरवाजा लागतो. हा ४.५ मीटर उंचीचा आहे. याच्या दोन्ही बाजूंना चौकोनी ओटे आहेत. या दरवाजातून आत गेल्यावर १९ पायऱ्या चढून दर्ग्यात प्रवेश करता येतो. २१.९४ चौ.मीटर आकाराच्या कट्ट्यावर बांधलेल्या या दर्ग्याच्या इमारतीची उंची ९ मीटर आहे. पूर्वी दर्ग्याच्या व्यवस्थेसाठी १२ एकर जमीन देण्यात आली होती. पण आता तशी व्यवस्था नाही. सध्या या दर्ग्याचे नुतनीकरण झालेले आहे. दर्ग्यालगत हा दर्गा बांधणाऱ्या अब्दुल्लाबेग याची कबर असून कबरीवर शिलालेख आहे. या टेकडीवर एक लहान मशीदही आहे.

हजरत ख्वाजा शेख सदरोद्दीनचा दर्गा : हा दर्गा किल्ल्याच्या दक्षिणेकडे लोकवस्तीत आहे. चौकोनी ओट्यावर बांधलेल्या या दर्ग्याच्या व्यवस्थेसाठी १२५ एकर जमीन देण्यात आली होती. पण सध्या ही व्यवस्था नाही. याच्या इमारतीवर शिलालेख वगैरे नाहीत. परंतु भोवती असलेल्या थडग्यांवर दोन आलेख कोरलेले आहेत.

या व्यतिरिक्त उदगीर नगर व परिसरात जुने व नवे असे एकूण १८ दर्गे आहेत. त्यात शाह मोहम्मद गदरी, शाह सैलानी, मौलाना मोईजोद्दिन मौज, राजमहंमदसाहब, सय्यद चांदसाहब, शाह हुसेन अब्दूल, मकबूल शाह गदरी, शाह हुसेन अफजल टिटिकी, खानखाँ शरीफ हे प्रमुख जुने दर्गे आहेत.

मशिदी : उदगीर व परिसरात काही मध्ययुगीन व उत्तर मध्ययुगीन जुन्या मशिदी आहेत. त्यातही हा भाग ज्यांच्या अधिपत्याखाली होता ते शियापंथीय राज्यकर्ते असल्याने येथे शियापंथियांच्या एक कमानयुक्त मशिदी अधिक होत्या, पण त्यानंतर येथे सुन्नी पंथियांची संख्या वाढल्याने त्यांच्याकडून या मशिदींचे तीन कमानींच्या मशिदीत रुपांतर केले गेले. येथील सुन्नीपंथीय प्रमुख मशिदी पुढीलप्रमाणे :- जामे मशीद, मोहल्ले पानचक्की, मोहल्ले हफ्त बिरादरान, मोहल्ले लदाफ, बेगजीसाब मशीद, मोहल्ले अमिरीपुरा, दर्गाशाह सैलानी मशीद, मशीद इदगा, मशीद ख्वाजापुरा आणि मशीदशाह मोहंम्मद कादरी मशीद. शियापंथियांच्या मशिदी पुढीलप्रमाणे :- मोहल्ले खसाबन मशीद, राजमोहम्मदसाहब मशीद, सय्यद चाँद मशीद, ख्वाजा सदरोद्दीन मशीद, पेठ दरवाजा मशीद, सय्यद मुसा कादरी साहब मशीद, काली मशीद, मशीदे दर्गा, मीर मुसासाहब, मशीद मकबरे नवाबन मशीद आणि अंधरुन खोला मशीद. वरील बहुतांश मशिदींचे नुतनीकरण करण्यात आलेले आहे.

अनुक्रमणिका

सोमनाथ मंदिर : महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या पूर्वेस काही अंतरावर असलेले उदगीर परिसरातील हे शिवमंदिर महत्त्वाचे सौंदर्य स्थळ आहे. शहराच्या पेठ वेशीतून या मंदिराकडे जाता येते. मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी उजव्या बाजूला मोठी दगडी गणेश प्रतिमा लागते. हे शिवमंदिर कोणी आणि केव्हा बांधले याविषयीची माहिती उपलब्ध नाही. परंतु बांधकाम ३०० ते ३५० वर्षांपूर्वीचे असावे. हे मंदिर त्रिगर्भी प्रकारातील असून व्दारमंडपाच्या दोन्ही बाजूस दोन मंडप आहेत. मंडपाच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी एक उपगर्भगृह व समोर मुख्य गर्भगृह आहे. सर्व गर्भगृहांपूर्वी अंतराळ लागते. गर्भगृहाचे दगडी व्दार कमी उंचीचे आहे. त्यामुळे आत नमूनच प्रवेश करावा लागतो. गर्भगृहात शिवलिंग आहे. मंदिर शिखरही उंच व मोहक आहे. या मंदिरास लागूनच डावीकडे चौकोनी तीर्थकुंड आहे. त्यात गोमुखातील पाणी पडते. हे गोमुख इ.स.१८६३ साली येथे स्थापलेले आहे. त्यामानाने तीर्थकुंड फार जुने आहे. यात उतरण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत. मंदिराच्या पश्चिमेस मोठ्या पिंपळ वृक्षाजवळ एक तलाव असून त्यातील पाणी नळाच्या सहाय्याने गोमुखात येते. श्रावण महिन्यात या मंदिरात भाविक गर्दी करतात. या मंदिराच्या देखभालीसाठी पूर्वी जमीन देण्यात आली होती. त्यापासून ९०० रु. वार्षिक उत्पन्न येत होते. ही जमीन म्हणजे सध्याची मंदिराभोवतालची जमीन असावी, पण ती सध्या खाजगी मालकीची आहे.

अंबाबाई मंदिर : सोमनाथ मंदिरापासून थोड्याच अंतरावर देवी अंबाबाईचे हे मंदिर आहे. याचे बांधकाम उदगीर किल्ल्यातील उपजिल्हाधिकाऱ्याच्या कचेरीच्या वास्तूसारखे आहे. मंदिराच्या बांधकामावरून ते ३०० वर्षापेक्षाही जुने असावे असे दिसते. मंदिर भव्य चौकोनी दगडी कट्ट्यावर बांधलेले असून मंदिरासमोर आणि मंदिराच्या दक्षिण बाजूस कमानीयुक्त खोल्या असलेली धर्मशाळा आहे. या कमानींचे उदगीरच्या धर्मशाळेतील कमानींशी साधर्म्य आहे. या कमानींना लागूनच बाहेरच्या बाजूने पाण्याचा एक मोठा कल्लोळ आहे. याचेही बांधकाम मजबूत असून त्यात स्नान केल्यास चर्मरोग नष्ट होतात असा येथील लोकांचा विश्वास आहे. कल्लोळाचा आकार १५x१० मीटर आहे. परंतु याची देखभाल नसल्यामुळे यातील पाण्याचा इतर कारणासाठी वापर होत नाही.

येथील रहिवाश्यांच्या मते मंदिराच्या ठिकाणी पूर्वी मशीद होती. ती पाडून हिंदू लोकांनी हे मंदिर उभारले. काहींच्या मते पूर्वी येथे भवानीचे भव्य मंदिर होते. उदगीरचा किल्ला ताब्यात घेतल्यानंतर औरंगजेबाने हे मंदिर पाडून तेथेच मशीद बांधली. मंदिराच्या उजव्या बाजूस पडलेल्या भिंतीचे अवशेषही दिसतात. त्यावरून तरी ही भिंत अतिशय जुनी वाटते. औरंगजेबानंतर हिंदू लोकांनी चिडून ती मशीद पाडून हे मंदिर बांधले असावे.

१४.६३ चौ.मीटर आकाराच्या गर्भगृहात तुळजापूरच्या अंबाबाईची साक्षात प्रतिकृती आहे. मंदिरामागे एक दगडी विहीर असून त्यास मोटेचे अवशेष दिसतात. ही विहीर इतकी प्रशस्त आहे की, लोक त्यास तलाव म्हणतात. विहिरीशेजारी सीताकुंड व त्यापुढे दुसरी एक लहान विहीर आहे, मोठ्या विहिरीचे पाणी नळामार्गे देवीमंदिरात नेण्यात आलेले आहे.

औसा शहराप्रमाणे हे शहरही आता जुनी कात टाकून आधुनिकीकरणाकडे वेगाने वाटचाल करीत आहे. आधुनिकीकरणामुळे नगरास रेखीवपणा येत असून लातूर खालोखाल जिल्ह्यातील महत्त्वाची बाजारपेठ म्हणून या नगराचा विकास होत आहे. मुळात उदगीर हे मध्ययुगीन काळातील मोठे प्रशासकिय केंद्र आणि व्यापारपेठ म्हणून प्रसिद्ध होते. हे पूर्व वैभव पुन्हा या शहरास व्यापाराच्या संदर्भात प्राप्त होत आहे.

औसा

औसा : [२२] (१८° १५' उ., ७६° ३०' पू.) : हे लातूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण आहे. मांजरा नदीची उपनदी असलेल्या तावरजा नामक नदीस मिळणाऱ्या एका छोट्या ओढ्याच्या काठाशी वसलेले हे विकसनशील शहर आहे. लातूरच्या दक्षिणेस मांजरा नदीच्या पठारावरील हे शेवटचे टोक होय.

नगररचना : मध्ययुगीन काळात दक्षिण भारतातील ज्या शहरांना अधिक महत्व प्राप्त झाले, त्यात इतर शहरांबरोबरच औसा या नगराचा समावेश होतो. औसा हे शहर म्हणून याच काळात स्वतंत्रपणे विकास पावले होते. हा विकास खासकरुन मुस्लिम राज्यकर्त्यांच्या काळात झालेला आहे. त्यामुळे मध्ययुगीन नगररचनेचा नमुना म्हणून औसाकडे पाहता येईल. या काळात नगराच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्याभोवती तटबंदी किंवा नगरकोट बांधण्यात येत. औसा शहराभोवतीही भक्कम अशी तटबंदी होती असे तेथील अवशेषांवरून वाटते. आज या तटबंदीचा बहुतांश भाग नष्ट झालेला आहे. शहराच्या पश्चिमेकडील भुसार वेस व ब्राह्मण गल्ली वेस यांचे अवशेष विस्कळीत स्वरुपात येथे दिसतात. पूर्व दिशेस निलंग्याकडे जाणारी वेस आहे. यास बिदर वेस असेही म्हटले जात असे. उत्तरेस लातूर वेस आहे, तर दक्षिणेस औसा किल्ल्यासमोर खंदकाजवळ खंदकगल्ली वेस आहे. अशा रितीने तटबंदीस चार दिशांना चार वेशी होत्या.

रस्ते व गृहरचना[२३] : रस्ते व गृहरचनेच्या बाबतीत उदगीर व औसाच्या रचनेत कोणताही फरक नाही. कारण ही दोन्ही नगरे बहुतांश वेळा एकाच राजवटीच्या नियंत्रणाखाली असत. त्यामुळे या दोन्ही नगरातील वास्तूरचनेत फारसा फरक जाणवत नाही. साहजिकच उदगीरप्रमाणेच प्रमुख वेशींना जोडणारे मुख्य मार्ग व अन्य उपमार्ग तयार करण्यात आले होते.

पाणीपुरवठा : मध्ययुगीन औसाच्या विकासात पाणी पुरवठ्यासाठी तत्कालीन प्रशासकांनी मुलभूत प्रयत्न केल्याचे दिसते. त्या पार्श्वभूमीवर नगरात विहिरी व बारवा पाहावयास मिळतात. नगरात स्वत:च्या वाड्यात खोदलेली स्वतंत्र विहीर व दुसरी सार्वजनिक विहीर असे विहिरींचे दोन प्रकार आढळतात. येथे काझी, विहीर, हालकुडे गल्लीतील विहीर, जलालशाही मशिदीजवळील विहीर या सार्वजनिक विहिरी आहेत. यांचे बांधकाम थोड्याफार फरकाने सारखेच आहे. या परिसरात उपलब्ध असलेल्या काळ्या दगडाच्या मुबलकतेमुळे विहिरी व इमारतींसाठी त्याचा मोठ्या प्रमाणात वापर केल्याचे दिसते. शहरात काही ठिकाणी षटकोनी व अष्टकोनी आकाराच्याही विहिरी आहेत.

---

२२. या स्थळाचे बहुतांश लेखन हे प्रत्यक्ष सर्वेक्षणावर, तसेच डॉ. सुनिल पुरी यांच्या **औसा : एक मध्ययुगीन नगर आणि किल्ला**, एम्.फिल.प्रबंध, आणि ठोसर, हरिहर यांच्याकडून या विषयावर प्राप्त झालेल्या लेखनावर आधारित आहे.

२३. याच प्रकरणातील ' **उदगीर** ' या स्थळाची माहिती पहावी.

औसाचा प्राचीन इतिहास : या स्थळास दीड हजार वर्षांची ऐतिहासिक परंपरा आहे. लातूर जिल्ह्यातील हे एक महत्त्वाचे ऐतिहासिक व सांस्कृतिक केंद्र आहे. औसा हे प्राचीन काळातील कुंतल देशाचा एक भाग होता. या देशात तत्कालिन उस्मानाबाद, सोलापूर, सांगली व मिरज हा प्रदेश मोडत होता.

औसा हे प्राचीन काळापासून विविध नावांनी संबोधले गेले आहे. याचा सर्वात प्राचीन उल्लेख इ.स.च्या ७ व्या शतकातील बदामीचा चालुक्य राजा विजयादित्य याच्या बोरगाव (जि.नांदेड) ताम्रपटात आलेला आहे. त्यात याचा 'उच्छीव चत्वारिंशत' असा नामोल्लेख असून ते ४० गावांचा समावेश असलेल्या छोट्या प्रशासन विभागाचे मुख्यालय असल्याची नोंद आहे.[२४] यादव सेनापती खोलेश्वर याच्या शके ११५० मधील अंबाजोगाई शिलालेखात 'औस देश' असा याचा उल्लेख आहे. इ.स.८ च्या व्या शतकातील जिनसेन नामक लेखकाने त्याचा 'औच्छ' असा उल्लेख केलेला आहे. मोनियर विल्यम्सच्या संस्कृत शब्दकोशात 'उच्छी' या संस्कृत शब्दाचा अर्थ प्रमुख, प्रसिध्द किंवा विख्यात (Prominent) असा दिला आहे. त्यावरून इ.स. ७-८ व्या शतकात तरी हे या भागातील प्रमुख नगर असावे. या नावावरूनच 'उच्छीव' या स्थलनामाची व्युत्पत्ती झाली असावी व ती उच्छीव-औच्छ-औस-औसा अशा अपभ्रंश रुपाने बदलत गेली असावी.[२५]

जैन मुनी "कनकामर" हे औशाचे होते. कनकामर विरचित 'करकण्डचरियु' या ग्रंथातील माहितीच्या आधारे औसाचे प्राचीनत्व इ.स.च्या प्रारंभिक काळापर्यंत मागे जाऊ शकते, मात्र कोरीव लेखाच्या आधारे ते इ.स.च्या ७ व्या शतकाच्या मागे जाऊ शकत नाही. राष्ट्रकूट व चालुक्य काळात औसा हे दिगंबर जैनांचे दक्षिणेतील प्रमुख पीठ होते. जैन वाङ्मयात या नगरास 'औच्छ' नावाने, तर यादवकालीन कोरीव लेखात 'औस' या नावाने संबोधण्यात आले आहे, जे प्रचलित नावाशी जवळचे आहे. वरील करकण्डचरियु ग्रंथात या नगराचे 'असाई नगरी' असे नाव नमूद केले आहे. पौराणिक वाङ्मयात मात्र या नगरीचा उल्लेख येत नाही. 'बुऱ्हाणे-मासिर' चा कर्ता सय्यद अलाबिन याने औसातील बहमनी कालखंडातील यादवी, अंतर्गत कलह व राजकीय घडामोडींचा वृत्तांत दिला असून हे सर्व फार्शी लिखाण ग्रंथरुपाने प्रकाशित झालेले आहे. याशिवाय गुलशने-इब्राहिमी, मासिरे, आलमगिरी व औरंगजेबाच्या दरबारची 'अखबार' ची फार्शी कागदपत्रे, निजाम-मराठे संबंधाची फार्शी कागदपत्रे, तसेच औसा नगरीत विविध ठिकाणी प्राप्त झालेले बारव लेख, वापिलेख, भित्तीलेख, मंदिरलेख, व्दारलेख आणि प्रदक्षिणापथ लेख यामधून औसाचा इतिहास समजतो.

जैन वाङ्मयातील औसाविषयीच्या वर्णनावरून या नगराच्या प्राचीन काळातील सांस्कृतिक योगदानाची यथार्थ कल्पना येते. राष्ट्रकूट सम्राट अमोघवर्ष याचा गुरु जैन मुनी जिनसेन याने 'औच्छ' नगराचा समावेश दक्षिणेतील प्रमुख जैन पीठात केला आहे. अमोघवर्ष व जिनसेनाचे जवळचे संबंध आणि या राजाचे लातूर येथील वास्तव्य लक्षात घेता औसाला जैन धर्मपीठाचे स्थान प्राप्त करून देण्यात त्याचे व जिनसेनाचे योगदान असण्याची शक्यता आहे. राष्ट्रकूट काळातील प्रशासन व्यवस्थेत औसाचा समावेश मुरुम्ब विषयात होता.

---

२४. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **डॉ.देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ**, पृ.१४५.
२५. कित्ता, पृ.१४५-१५०.

राष्ट्रकूट काळातील औसाचे जैन धर्मपीठ म्हणून असलेले स्थान कल्याणच्या चालुक्य राजवटीतही कायम असल्याचे प्रत्यंतर उपरोक्त करकण्डचरियु या ग्रंथातील औसाच्या सविस्तर वर्णनावरून मिळते. कल्याणचा चालुक्य राजा पहिला सोमेश्वर हा जैन धर्माचा आश्रयदाता आणि पुरस्कर्ता होता हे त्याच्या काळात मुरुम (मुरुम्ब) व रामलिंग मुद्‌गड येथे बांधल्या गेलेल्या जैन बसतीवरून स्पष्ट होते, परंतु कलचुरींच्या राजवटीत बिज्जलाचा मंत्री बसवेश्वर याने इ.स.१२ व्या शतकाच्या उत्तरार्धात स्थापन केलेल्या वीरशैव पंथाच्या व पुढे यादव काळात लोकप्रिय झालेल्या वारकरी पंथाच्या प्रभावामुळे या काळात जैन धर्माचा लोकाश्रय कमी होत गेला. त्यानंतर मध्ययुगीन काळात औसा येथील वीरशैव संत वीरनाथ महाराज यांनी वारकरी पंथाचे अनुयायित्व स्वीकारुन वीरशैव व वारकरी संप्रदायाचा समन्वय घडवून आणणाऱ्या लिंगायत-वारकरी संप्रदायाची स्थापना केली व या पंथाचे पीठ म्हणून औसाला मठ स्थापन केला.

औसा हे बदामीच्या चालुक्य राजवटीपासून मध्ययुगीन काळातील मुघल राजवटीपर्यंत राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रात निरंतर अग्रेसर होते. बदामीच्या चालुक्यांच्या प्रशासनात औसा हे नलवाडी विषयांतर्गत असलेल्या छोट्या प्रशासन विभागाचे मुख्यालय होते व त्यात औसाच्या सभोवतालच्या ४० गावांचा समावेश होता हे वर्णिले आहेच. विजयादित्याच्या बोरगाव ताम्रपटात औसा व उमरगा येथील ब्राह्मणांना खेडी दान दिल्याचे उल्लेख आहेत. निलंगा तालुक्यातील कासार-शिरसी ताम्रपटावरून या प्रदेशावर बदामीच्या चालुक्यांची सत्ता होती असे प्रत्ययास येते. खरोसा लेणींमध्येही चालुक्य काळातील स्थापत्याचा प्रभाव आढळतो. कल्याणच्या चालुक्य काळात औसाचा समावेश 'गज्जे-७००' नामक प्रशासन विभागात होता. डॉ.ठोसरांनी गज्जे-७०० चे साम्य निलंग्यातील गुंजोटीशी दाखविले आहे. शिलाहार घराण्याचाही औसाशी संबंध असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यादव राजवटीत औसा हे 'औस देश' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रशासन विभागाचे मुख्यालय होते. येथे यादवांच्या सैन्याची कायम छावणी (बिड) होती. ही छावणी व मुख्यालय बहुदा औसा किल्ल्याच्या परिसरातच असावी. त्यापूर्वीच्या काळातील उच्छिव हे नगरही किल्ल्याच्या परिसरातच असणे शक्य आहे.

यादवानंतर औसावर बहमनींची सत्ता स्थापन होऊन त्याचा विकास झाला. या काळात औसाचे राजकीय व प्रशासकीय महत्त्व वाढले होते.

औसा किल्ल्याचा इतिहास :

औसा येथील मुख्य आकर्षण म्हणजे शहराच्या दक्षिणेस ३.२१ कि.मी. अंतरावर ५.५२ हेक्टर क्षेत्रात उभा असलेला भुईकोट किल्ला. इ.स.१२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर स्वारी करून यादवांना मांडलिक बनविले. तथापि, त्यानंतर यादवांनी पुन्हा उचल खाताच इ.स.१३१८ मध्ये त्यांचे राज्य संपविण्यात आले व दक्षिण भारतात मुस्लिम राजवटीचा पाया घातला गेला. बहमनींच्या राजवटीत इ.स.१४६६ मध्ये महमूद गवान याची बहमनींचा मुख्य वजीर म्हणून नियुक्ती झाली. आपल्या वजिरीच्या काळातच त्याने औसा किल्ला बांधला.[२६] इ.स.१४८१ मध्ये महमूद गावानचा खून झाल्यानंतर पुढील दहा वर्षातच बहमनी राजवटीची शकले होऊन दक्षिणेत पाच नवीन शाह्या अस्तित्वात आल्या. बिदरच्या

२६. हा किल्ला प्रामुख्याने दख्खनी सुलतानांमधील संघर्षाच्या काळात बहमनी राजवटीच्या उदयाआधी बांधला गेला. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, १९७२, पृ.७५५.

महमूदशहा बहमनींने (इ.स.१४८२-१५१८) बिदरचा सुभेदार कासीम बरीद यास बिदर मधील देशी व परदेशी लोकांमधील दंगे शमविल्याबद्दल औसा प्रांताबरोबरच कंधार, उदगीर व औसाचा किल्ला जहागीर म्हणून दिला होता. हाच बरीद पुढे बहमनींचा प्रधान बनल्यानंतर त्याने औसा, उदगीर व कंधार येथे आपला जम बसवून स्वत:चे स्वातंत्र्य जाहीर केले. कासीम बरीदने महमूदशहास बाजूस सारण्याचा बेत केल्याचे कळताच इ.स.१४९९ मध्ये युसूफ आदिलशहा, मलिक अहमद आणि इमाद-उल्-मुल्क यांनी बरीदवर चढाई केली. बरीदने माघार घेतली. शेवटी त्याने महमूदशहाकडे राज्यकारभार सोपविला व तो स्वत: औसाच्या जहागिरीत राहिला, पण पुन्हा त्याने महमूदशहास वेढा देण्याचा प्रयत्न करताच युसूफ आदिलखान, सुलतान मलिक, कुतूब-उल्-मुल्क व इतर सरदारांनी बरीदला पळवून लावले. ही घटना इ.स.१५०४ मधील आहे. कासीम बरीदने औसाच्या किल्ल्यात आश्रय घेतला. त्याच्या मृत्यूंनतर त्याचा पुत्र अमीर बरीद हा महमूदशहाचा वजीर बनला. त्याच्यानंतर इ.स.१५२९ पासून १५७९ पर्यंत त्याचा पुत्र अली बरीद हा गादीवर होता. याच काळात त्याच्याकडून औसाचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी बुऱ्हान निजामाने इ.स.१५४८ मध्ये किल्ल्याला वेढा दिला. किल्ल्याखाली सुरुंग लावून किल्ल्यावर तोफांचा भडीमार केला. यावेळी किल्ल्यावर बरीदशाहीचा किल्लेदार होता. परंतु त्याच्याकडे पुरेसा फौजफाटा नव्हता. त्यामुळे किल्ल्याला भगदाड पडून निजामशाही सैन्य आत घुसू लागताच निजामासोबत असलेल्या दर्या इमादशहास मध्यस्थ करून अली बरीद निजामास शरण आला व त्याची चाकरीही पत्करली.[२७] यानंतर निजामाने यावर आपला किल्लेदार नेमला. याच काळात निजामशाहीत मलिक अंबर या कर्तबगार पुरुषाचा उदय झाला होता. बरीदकडून किल्ला हस्तगत केल्यानंतर मलिक अंबरने याचे नाव 'अंबरापूर' असे ठेवले. पुढे हे नाव 'अमरापूर' असे झाले.[२८] मात्र त्यानंतर औसा असे नाव कधी झाले त्याचा इतिहास ज्ञात नाही. कदाचित 'उच्छिव' या संस्कृत शब्दापासून ते बनले असावे.

बुऱ्हान निजामशहाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र हुसेन निजामशहा गादीवर आला. त्याच्या काळात तुर्कखान हा औसाचा किल्लेदार होता. याच्या काळात किल्ल्याचा लोहबंदी दरवाजा उभारण्यात आला. तशी नोंद तेथील शिलालेखात आहे. मलिक अंबरने मुघलांपासून बचाव करण्यासाठी अल्पवयीन मुर्तझा निजामशहास काही काळ या किल्ल्यावर सुरक्षित ठेवले होते.[२९] मुर्तझाच्या काळात काही वर्षे राजधानी औसा येथे होती व तटबंदीची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करण्यात आली होती. त्याच्या येथील वास्तव्याच्या काळात किल्ल्यातील तोफांवर त्याची नावे कोरलेली आढळतात.

इ.स. १५४८ ते १६३६ पर्यंत औसा अहमदनगरच्या निजामशाहीकडे होते. यातील शेवटच्या पर्वात मुघलांनी दक्षिणेवर मोहीम काढली. यावेळी मलिक अंबरचा मृत्यू (इ.स.१६३६) झालेला असल्याने निजामशाही अंतर्गत बंडाळीने पोखरल्याचा फायदा उठवून मुघल बादशहाने

---

२७. कुंटे, भ.ग.,पूर्वोक्त **अहमदनगरची निजामशाही**, पृ.९२-९३, ३१७. प्रो.एच.के.शेरवानी नुसार इ.स.१५४५ मध्ये बुऱ्हानने अली बरीदकडून हा किल्ला काबिज केला, **हिस्टरी ऑफ मेडिवल डेक्कन** (१२९५-१७२४), खंड १, पृ.३२०. एम.एच. गोपालनुसार सन १५४७-४८ मध्ये बुऱ्हान निजामशहाने आदिलशाहीवर स्वारी केली होती. त्यावेळेस त्याने आदिलशहा व बरीदशहाचा पराभव करून हा किल्ला जिंकला व १५४८ च्या शेवटी तो राजधानीस परतला. **दि हिस्टरी ऑफ दि विजयनगर एम्पायर**, खंड १, १९७८, पृ.१९४. अशा विविध नोंदी मिळतात.

२८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७५५.

२९. सरदेसाई, गो.स., **मुसलमानी रियासत**, भाग-१, के.बी.ढवळे प्रकाशन, मुंबई, १९५९, पृ.२३८; सर.जे.सरकार, **हिस्टरी ऑफ औरंगजेब**, खंड १ व २, १९७३, पृ.२४.

खान दौरान या सरदारास २० हजार सैन्यानिशी इ.स. १६३५ मध्ये औसा काबिज करण्यासाठी पाठविले. दि. ८ मे १६३५ रोजी औसापासून दोन कोसांवर मुघलांनी डेरा टाकला. यावेळी निजामशाहीकडून होणाऱ्या प्रतिकारास न डगमगता तोंड देऊन त्यांनी औसावर जोराचा हल्ला केला. यावेळी औसावर भोजपाल नामक राजपूत किल्लेदार होता. त्याचा मुघलांपुढे टिकाव न लागल्याने त्याने १९ ऑक्टोबर १६३६ रोजी किल्ला खान दौरानच्या स्वाधीन केला.[३०] त्यानंतर मुबारकखान नियाजी याची किल्लेदार म्हणून नियुक्ती झाली. त्याने इ.स.१६४२ पर्यंत ही किल्लेदारी सांभाळली असावी. हा औसाचा पहिला मुघल किल्लेदार होय. त्यानंतर उजबेकखान हा येथे १० वर्षे किल्लेदार होता. औरंगजेब बादशहा झाल्यानंतर बर्खुरदारखान याची औसाचा किल्लेदार म्हणून त्याने नियुक्ती केली. दि.२४ जानेवारी १६७० च्या नोंदीनुसार शिवाजी महाराज या परिसरात आल्याची तक्रार बर्खुरदाराने औरंगजेबाकडे केली होती. इ.स.१६५६ पर्यंत औसावर मुघल किल्लेदार होते. यानंतर काही काळ औसा आदिलशहाच्या ताब्यात होते असे दिसते.

इ.स. १६८१ पूर्वी सुहराबखान हा औसाचा किल्लेदार होता. त्याच्या काळात औसा येथील जामा मशीद बांधली गेली. मशिदीजवळील शिलालेखात सुहराबखानाचा उल्लेख आहे. त्यानंतर दि. २० जून १६८१ रोजी सय्यद अन्वरखानास २५०० जात व १५०० स्वारांच्या मनसबीसह औसाची किल्लेदारी मिळाली. इ.स.१६८५ मध्ये ताजुद्दिन उर्फ मुर्शीद कुलीखान हा येथील किल्लेदार होता, पण तो अल्पकाळ असावा. इ.स. १६९४ मध्ये औसाचा किल्लेदार व फौजदार नसरुल्ला याच्या जागी मुहम्मद सादुल्लाखानास नेमण्यात आले. त्यास ५०० जात व १०० स्वारांची मनसब होती. त्यात पुढे २०० स्वारांची भर घालण्यात आल्याचे औरंगजेबाच्या दरबाराच्या बातमीपत्रावरून दिसते. मुईनखान ३ ऑगस्ट १६९७ पासून औसाचा किल्लेदार असल्याचे हैदराबादच्या दप्तरखान्यात असलेल्या नळदुर्गचा किल्लेदार सय्यद यादगार हुसेन याच्या पत्रसंग्रहातून कळते. ९ ऑगस्ट १६९९ रोजी धारुरचा फौजदार उजबेकखान याच्याकडे औसा, निलंगा हा भाग सोपविण्यात आला. मुघल काळात स्वत: शिवाजी महाराज व त्यानंतर संभाजी महाराजांनाही या प्रदेशात मोहीम काढली होती.

इ.स. १७०३ च्या अगोदर असदुल्ला हा औसाचा किल्लेदार होता. त्यानंतर त्यास कंधारच्या किल्लेदारीवर पाठवून औरंगजेबाने ९ फेब्रुवारी १७०३ रोजी परांड्याचा फौजदार व किल्लेदार इज्जतखान यास औसाच्या फौजदारीवर नेमले.[३१] पुढच्याच वर्षी २७ सप्टेंबर १७०४ रोजी सजावरखानास एक हजार जात व ६०० स्वारांच्या मनसबीसह औसाची किल्लेदारी बहाल करण्यात आली, पण त्याचवर्षी १८ नोव्हेंबरला त्याच्या जागी पुन्हा इज्जतखानास आणण्यात आले.[३२] अब्दूल अजीजखान हा ही काही काळ औसाचा किल्लेदार होता. त्यास औरंगजेबाने " खिदमत तलबखान " ही पदवी दिली होती.[३३]

---

३०. सरदेसाई गो. स. **मराठी रियासत**, खंड १, मुंबई, १९८८, पृ.८१.

३१. पगडी, सेतुमाधवराव अनुवादित, **मोगल दरबारची बातमीपत्रे**, खंड ३, (मूळ लेखक-जदुनाथ सरकार, **अखबारात-ए-दरबार-इ-मुअल्ला)**, म. रा. सा. संस्कृती मंडळ, मुंबई, १९८९, पृ.२२, ४२६.

३२. कित्ता, पृ.४६६.

३३. पगडी, सेतुमाधवराव अनुवादित, **मराठे व निजाम : उर्दू-फार्सी साधने**, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन, मुंबई, १९६१, पृ.१७.

इ.स.१६३६ ला औसा ताब्यात आल्यापासून त्यावर मुघलांची सत्ता अबाधित चालू होती. पूर्वी वर्णिल्याप्रमाणे बर्खुरदारखानाने शिवाजी महाराज औसा किल्ल्यास वेढा देण्यासाठी आल्याची तक्रार केली होती. याचा अर्थ औसा किल्ल्यासाठी शिवराजाच्या मराठा सेनेने प्रत्यक्ष प्रयत्न केला होता. पुढे संभाजी राजांनीही स्वत: औसा परिसरात मोहीम काढली होती. त्यांना रोखण्यासाठी औरंगजेबाने खान बहादूर यास औसाला पाठविले होते. तथापि, संभाजी राजे प्रत्यक्ष औसाला आल्याची नोंद नाही. छत्रपती राजारामाच्या काळातही मराठ्यांच्या फौजा औसा परिसरात होत्या. यावेळी ख्वाजा नसरुल्ला हा औसाचा मुघल किल्लेदार होता. मराठ्यांचा या प्रदेशात बंदोबस्त करण्यासाठी नांदेडचा सुभेदार अब्दुल्लाखान यास ताकीद दिल्याची माहिती मुघल दरबारच्या १९ जून १६९४ च्या बातमीपत्रावरून मिळते.

इ.स.१७०० मध्ये मराठ्यांच्या फौजा औसा भागात होत्या. औसाचा किल्लेदार मुईनखानाने त्यांच्यावर हल्ला करण्याची परवानगी मागितली होती. याच वर्षी झुल्फिकारखानाने आपल्या फौजा धनाजी जाधवांच्या पारिपत्यासाठी परांडा, आष्टी, नांदेड, औसा व उदगीर या भागात पाठविल्या होत्या. इ.स.१७०६ मध्ये औरंगजेबाने पुन्हा एकदा धनाजीवर आपल्या फौजा रवाना केल्या. धनाजी यावेळी धर्मापुरी घाट, परळी, औसा, तुळजापूर मार्गे महादेवाच्या डोंगरात निघून गेला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शहाजादा मुअज्जमच्या राजवटीत पेशवा बाळाजी विश्वनाथ याच्याशी सय्यद बंधूंनी इ.स.१७१५ मध्ये तह केला होता. या तहान्वये मराठ्यांनी दक्षिणेतील सहा सुभ्यात चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे हक्क मिळविले होते. त्यावेळी त्यातील विजापूर सुभ्यात औसाचा समावेश होत होता. म्हणजे यावेळी युध्द न करताही मराठ्यांचे औसावर प्रभुत्व निर्माण झाले होते. ही सनद बाळाजी विश्वनाथ याने २० मार्च १७१९ रोजी दिल्लीवरून आणली. औसा परगण्यातील चौथाई व सरदेशमुखी वसुलीसाठी मराठ्यांनी नेमलेले काही अधिकारी पुढीलप्रमाणे : खंडोगर बंडगर, चिमणाजी माणकेश्वर, जगजीवन परशराम, होनाजी अनंत, रजाजी विश्वनाथ, चांदो हिटरे व राघो शिवदेव, गणोजी कोलेकर, खानाजी व महादजी बंडगर, पदाजी व हैबत बंडगर, त्र्यंबक ढमढेरे, संताजी जाधव, देवजी खांडेकर, धनाजी जाधव, यशवंत महादेव, जिवला चिटणीस, व्यासराव, सुर्याजी पांढरे, फत्तेसिंग भोसले, रत्नोजी पांढरे, कृष्णराव मल्हार, संताजी पांढरे, जयसिंग जाधव, बापूजी हशमराव, सुलतान ढवरे, वाघोजी कदम व बाबुराव चिटणीस. खानाजी, पदाजी, नरहरी रामचंद्र व महादजी बंडगर यांस १५८ महालांची सरदेशमुखी, दिली होती.

यानंतर दक्षिणेस इ.स.१७२४ मध्ये औरंगजेबाचा सरदार चिनकिलीचखान याने निजाम-उल-मुल्क ही पदवी धारण करून हैदराबाद येथे स्वतंत्र राज्याची स्थापना केली. औसाही या राज्यात समाविष्ट होते.

इ.स.१७६० मध्ये निजाम व मराठे यांच्यात उदगीर येथे लढाई झाली. या लढाईच्या वेळी औसा हे लष्करी हालचालीचे मुख्य केंद्र होते. यावेळी निजाम बंधूंनी औसाच्या किल्ल्यात आश्रय घेतला होता. बरेचसे युध्द-साहित्यही या किल्ल्यात ठेवले होते. मराठ्यांनी किल्ल्यास

चार दिवस वेढा दिला. शेवटी शरण येऊन निजाम तहास राजी झाला. सदाशिवराव भाऊने निजामावर 'उदगीर तहाच्या' नामुष्कीच्या अटी लादल्या.[३४]

हैदराबादच्या निजामाच्या काळात औसा हे महत्त्वाचे स्थान व तालुक्याचे ठिकाण होते. मख्खनलाल याच्या 'यादगारे मख्खनलाल' (इ.स.१८२०) या ग्रंथात अशी माहिती[३५] आहे की, हैदराबाद राज्याचा मुशीरुल्मुल्क हा दिवाण होता व त्याच्याकडे औसाची किल्लेदारी होती. रूक्नुद्दौलाच्या दिवाणपदाच्या काळात (इ.स.१७६३ ते १७७५) त्याने सात वर्षे या किल्ल्यात अज्ञातवासात घालविली. त्यानंतर दिवाण झाल्यावर त्याने ही किल्लेदारी आपला भाऊ दलामिया शजीजंग याच्याकडे सोपविली. त्याच्या वंशात ही किल्लेदारी बराच काळ चालू होती.

राघोबादादाने नारायणराव पेशव्याच्या वधानंतर (ऑगस्ट १७७३) रघुजी भोसले (नागपूरकर) यास सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे दिल्याने नाराज होऊन साबाजी भोसले निजामास मिळाला. साबाजीस साथ न देण्याबद्दल दादाने निजामास बजावूनही त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे राघोबादादाने याच वर्षी निजामावर स्वारी करून औसा किल्ला काबिज केला, पण मराठ्यांनी तो ताब्यात न ठेवल्याने पुन्हा त्यावर निजामाने कब्जा मिळविला.

इ.स.१८०० मध्ये निजामाने इंग्रजांशी केलेल्या तहान्वये उस्मानाबाद व रायचूर हे जिल्हे इंग्रजांकडे गहाण ठेवले होते. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाच्या वेळेस औसा इंग्रजांकडेच होते. या युध्दातील मदतीबद्दल बक्षीस म्हणून इंग्रजांनी निजामास १८०० च्या तहान्वये गहाण ठेवलेले उस्मानाबाद व रायचूर जिल्हे १८६० साली परत केले.

इंग्रज अधिकारी कर्नल मेडोज टेलर नळदुर्गचा कलेक्टर असतांना (इ.स.१८५३-५७) त्याचे काही काळ या किल्ल्यात वास्तव्य होते. या काळात किल्ल्यातील सर्वात उंच इमारत बालाहिसार (जानुमा महल) चे बांधकाम झाले. हे बांधकाम कर्नल मेडोज टेलरने केल्याचा उल्लेख सापडतो.

हैदराबाद मुक्ती संग्रामातही औसा हे महत्त्वाचे केंद्र होते. यात औसा व परिसरातील गावांतील अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी भाग घेतला होता, लढा दिला होता व शिक्षाही भोगल्या होत्या.

किल्ल्याचे वर्णन : दक्षिणेतील सर्वच मध्ययुगीन किल्ल्यांना महत्त्वाचे स्थान आहे. सह्याद्रीच्या रांगांतील डोंगरी किल्ल्यांएवढे दक्षिणेतील भुईकोट किल्लेही महत्त्वपूर्ण ठरतात. दक्षिणेतील बहमनी राजे व त्यांच्या पाच शाह्यांच्या कारकिर्दीत महत्त्वपूर्ण ठरलेल्या किल्ल्यात औसा किल्ल्याचा समावेश होतो. खोलगट भागात असलेल्या या पूर्वाभिमुख किल्ल्याच्या चोहोबाजूस उंच पठारे आहेत. त्यामुळे किल्ल्याचा मुख्य भाग जरी लपलेला दिसत असला तरी किल्ल्याकडे कोणत्याही बाजूने येणारे सैन्य दूरवरून दिसू शकते हे या किल्ल्याचे महत्त्वाचे भौगोलिक वैशिष्ट्य होय. अगदी जवळ गेल्याशिवाय हा किल्ला दृष्टीपथात येत नाही. चौकोनी आकाराच्या या किल्ल्याचे क्षेत्रफळ १३ एकर आहे. किल्ल्यातील काही वास्तू व तटबंदीच्या काही भागावर तुर्क व युरोपियन स्थापत्य शैलीचा प्रभाव दिसतो. सध्या हा किल्ला उद्ध्वस्त स्थितीत आहे.

---

३४. उद्गीरच्या लढाईसंबंधी सविस्तर माहिती याच ग्रंथातील प्रकरण-२ **इतिहास** मध्ये पहावी.

३५. पगडी, सेतुमाधवराव अनुवादित, मराठे व निजाम : उर्दू-फार्सी साधने पृ.११७-१८.

खंदक : हा किल्ला भुईकोट असल्याने त्याच्या भोवती ३८ मीटर रुंदीचा खंदक आहे. काळ्या दगडांनी बांधलेल्या या भक्कम खंदकाची रुंदी काही ठिकाणी कमी-जास्त असली तरी जमिनीपासून उंची मात्र सर्वत्र साधारणत: ६ मीटर आहे. खंदकाच्या समोरील बाजूस तीन विहिरी असून या विहिरींमुळे खंदकात पाणी कायम असे. चोहोबाजूस खंदकात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. सध्या हा खंदक गाळाने बुजलेला आहे व जेथे बुजलेला नाही तेथे पाणी साचून त्याचा वापर कपडे धुणे, आंघोळ करणे वगैरेसाठी केला जातो. खंदकात काही ठिकाणी भर टाकून तेथे वस्तीही उभारण्यात आली आहे. काही ठिकाणी झाडेझुडूपे वाढलेली आहेत. खंदकाच्या काही भागात तर शेतीही केली जाते. किल्ल्याच्या पश्चिमेकडील खंदकातील बुरुजावर मूर्तझा निझामशहा याच्या काळातील दोन शिलालेख आहेत. खंदकात प्रवेश करण्यासाठी लोहबंदी दरवाजा पार करावा लागतो.

तटबंदी : या किल्ल्यास काळ्या दगडांनी बांधलेली भक्कम दुहेरी तटबंदी आहे. प्रथम खंदकाची भिंत म्हणजे रेवणी, त्यानंतर खंदक, बाह्य तट किंवा कोट व आतील तटबंदी अशाप्रकारे तटबंदीचे बांधकाम आहे. बाह्य तटापेक्षा उपतटाची उंची जास्त आहे. कोट व परकोट यातून घोडेस्वार जाण्याएवढी रुंद जागा आहे. तटभिंत साधारणत: ७० फूट उंचीची आहे. त्यातून खंदकात उतरण्यासाठी गुप्त मार्ग आहेत. तटभिंतीस अर्धवर्तुळाकार भक्कम बुरुजांनी संरक्षित केलेले आहे.

बुरूज व जंग्या : खंदकाच्या जवळच्या म्हणजे बाह्य तटास २३ भक्कम बुरूज असून त्यावर सैनिक ठेवण्याची व्यवस्था होती. दुसऱ्या म्हणजे उपतटास १९ बुरूज आहेत. किल्ल्याच्या पूर्वेकडील मुख्य बुरूजाला बुलंद बुरूज असे नाव आहे. बहुतेक सर्व बुरुजांवरुन आजुबाजूच्या संपूर्ण परिसरावर देखरेख ठेवता येत असे. बुरुजांवर तोफा ठेवून त्या हव्या त्या दिशेने डागण्याची सोय होती. यासाठी बुरुजांवर ठिकठिकाणी जागा सोडली असल्याचे आढळते. मध्ययुगीन कालखंडामध्ये युध्दशास्त्राच्या दृष्टीने किल्ल्याचे बांधकाम करण्याची ही पध्दत दक्षिण भारतात सर्वत्र आढळते. मुर्तझा निजामशहाच्या काळात पश्चिमेकडील बुरूजाची दुरुस्ती करण्यात आल्याची नोंद येथील शिलालेखात आहे.

येथील बुरूज गोलाकार तसेच कोनाकृती असून पसरट आहेत. बुरुजांना असलेले कंगोरे त्रिकोणाकृती, तर काही ठिकाणी चौकोनाकृतीही आहेत. या कंगोऱ्यांना दोन-दोन छिद्रे म्हणजे जंग्या असून त्यायोगे लांब अंतरावरील शत्रूंवर आणि तटांशी भिडलेल्या शत्रूंवर मारा करता येत असे. तटातील जंग्या खालच्या बाजूस तिरकस दिशेत असून त्यातून बंदुकींचा मारा करता येई. काही ठिकाणी तीन-तीन जंग्यातून एकाच ठिकाणी मारा करता येण्याजोगी या जंग्यांची रचना आहे, तर काही ठिकाणी एकच बंदूकधारी तीन-तीन ठिकाणी मारा करू शकेल अशीही काही जंग्यांची रचना आहे. जेथे शत्रू तटाशी पोहोचण्याचा संभव असे तेथील जंग्या अधिक तिरकस रचनेत आहे. अशा प्रकारच्या जंग्या संपूर्ण तटास आहेत.

तोफा : "वाकियाते मुमालिकते विजापूर" या उर्दू ग्रंथात किल्ल्यातील तोफांची संख्या ११[३६] दिलेली आहे. त्यांची नावे पुढीलप्रमाणे - निजामशाही, कुंती (कंटी), बहेतरी (बहत्तरी), भोसली, कडक बिजली, सेथू (सीथू), लालखानी, लुसरी (लहरी), शेरदही

३६. पुरातत्त्व विभाग, औरंगाबाद यांच्याकडील नोंद.

(शेरदहाने), लमछडी व काला पहाड तोफ. या मुख्य तोफा असाव्यात. कारण उपतटाच्या काही बुरुजांवर लहान-मोठ्या तोफा आहेत.[३७] काही तोफांवर आदिलशाही व निजामशाही राजवटीतील तुर्की अभियंत्यांची नावे अंकीत केलेली आहेत. पूर्वेकडील बुलंद बुरुजावर सर्वात मोठी 'महम्मद-बिन-हुसेन निजामशहा' असा फार्शी भाषेत नामोल्लेख असलेली २.४ मी. लांब व २५ सें.मी. व्यासाची पंचधातूची अजस्त्र तोफ आहे. यातून दगडी व लोखंडी गोळे उडविले जात. या तोफेचे तोंड राक्षसासारखे असून ती सर्व दिशांना फिरविता येई. येथे दगडी व लोखंडी तोफगोळे पहावयास मिळतात. या तोफेच्या माऱ्याचा टप्पा किल्ल्यापासून तीन कि.मी. अंतरावरील सुलतान टेकडीपर्यंत होता.

किल्ल्याच्या पश्चिमेकडील बुरुजावरील तोफ २ मीटर ८ इंच लांबीची व १० इंच व्यासाची असून तिचे तोंड मकराकृती आहे. प्यारीबिबीच्या कबरीजवळील बुरुजावरही ३ मीटर ५ इंच लांबीची व चार इंच व्यासाची पंचधातुची तोफ आहे. याच्या शेजारीच दुसरीही एक पंचधातूची तोफ असून त्यावर कोरलेली इंग्रजी अक्षरे पुसट झालेली आहेत. ही तोफही ३ मीटर ३ इंच लांब व पाच इंच व्यासाची आहे. किल्ल्यातील सर्वात लांब लोखंडी तोफ मशिदी नजीकच्या बुरुजावर आहे. तिची लांबी ३ मीटर ८ इंच व व्यास सहा इंच आहे. या सर्व मोठ्या तोफा बहुतेक पूर्वी वर्णिलेल्या मुख्य तोफांमधील असाव्यात.

प्रवेशव्दारे : किल्ल्यात चिनी, अहशमा, लोहबंदी, अशफखान, नौबत, सादात व घड्याळ अशी सात महाव्दारे (दरवाजे) आहेत. यातील मुख्य व्दार म्हणजे लोहबंदी दरवाजा. किल्ल्याच्या पूर्वेस हा दरवाजा असून तो ओलांडून खंदकात प्रवेश करावा लागतो. त्यानंतर पुन्हा खंदक चढून वर यावे लागते. या प्रवेशव्दारास लाकडी दरवाजा आहे. प्रवेशव्दाराची उंची जमिनीपासून साधारणत: पाच मी., तर रुंदी तीन मी. एवढी आहे. यावर लोखंडी पट्ट्या व २० खिळे ठोकलेले आहेत. त्यामुळे यास 'लोहबंदी' म्हटले जाते. या दरवाजाजवळ येण्याकरीता अंदाजे ४० मी. चे अंतर चालल्यावर एक मोठा ओटा लागतो. त्यापासून पुढे आल्यानंतर हे प्रवेशव्दार लागते. किल्ल्याच्या तिसऱ्या प्रवेशव्दाराच्या आतील भिंतीवर उजव्या बाजूस अरबी, फार्शी व मराठी मिश्रीत एक शिलालेख आहे. त्यात खान तुर्कखान या ठाणेदाराच्या कारकिर्दीत हे लोहबंदी प्रवेशव्दार उभारल्याची नोंद आहे. याचा काळ सुहूर सन ९६६ (इ.स.१५६५) असा आहे. सध्या या प्रवेशव्दाराचे दोन्ही बुरूज ढासळत आहेत. खंदकातून वर चढल्यानंतर साधारणत: ११ मीटर अंतरावर प्रत्यक्ष किल्ल्यात प्रवेश करण्यासाठीचे अहशमा नामक दुसरे प्रवेशव्दार लागते. याचा आकार कमानदार असून कमानीच्या वर गजथर शिल्पपट्टी आहे. यात एकूण १४ हत्ती अंकित केलेले आहेत. हे प्रवेशव्दार खूपच प्रेक्षणीय आहे. हे एका बुरुजात बनविलेले असून बुरूज, त्याच्या माथ्यावरील प्रक्षेम (झरोका), तळाशी प्रवेशव्दार आणि लोखंडी पट्ट्या मारलेले लाकडी दरवाजे एवढ्या गोष्टी एकाच वेळी नजरेत भरतात. या प्रवेशव्दाराची तळापासून छतापर्यंतची उंची नऊ मीटर आहे. याच्या दोन्ही बाजूस पहारेकऱ्यांच्या चौक्या असल्याच्या खुणा दिसतात. प्रवेशव्दाराच्या वर एक सज्जा असून त्यास कमानदार तीन खिडक्या आहेत. तसेच दोन्ही बाजूस दोन स्तंभ असून त्यांचे स्तंभशीर्ष कमलदलाकृती आहे. या प्रवेशव्दारास 'उल्मुल्क व्दार' असेही म्हणतात.[३८]

---

३७. पुरी, सुनिल, पूर्वोक्त, पृ.९६.

३८. अकलुजकर लता, **नळदुर्गचा किल्ला आणि परिसर**, पीएच.डी. प्रबंध, डॉ.बा.आं.मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९९३, पृ.४११.

तिसरे प्रवेशव्दारही एका बुरुजातच आहे. हे व्दार चौकोनाकृती व कमानयुक्त आहे. सध्या यास दरवाजा नाही, मात्र अडसर बसविण्याची जागा आहे. कदाचित दरवाजा कालौघात नष्ट झाला असावा. व्दाराची उंची सात मी. ८० से.मी. व रुंदी तीन मी. आहे. व्दाराच्या दोन्ही बाजूस वर असलेल्या प्रक्षेमांवर एकूण ४७ हत्ती असलेली एक गजथर शिल्पपट्टी असून हत्तीच्या माळेचे तोरण लावल्यासारखा तो देखावा दिसतो. शिल्पपट्टीच्या मधोमध मानवी शिल्पे असून दोन मानव शिकस्तीने हत्तींना रोखून धरीत आहेत असा देखावा कोरलेला आहे. या व्दाराच्या डाव्या बाजूस जिन्याच्या १५ पायऱ्या चढून व्दारमाथ्यावर पोहोचता येते. येथे दोन मिनारवजा स्तंभ आहेत. तसेच नगारखाना आहे. या प्रवेशव्दारातून आत गेले की, डाव्या-उजव्या बाजूस बसक्या व लांब आकाराच्या वास्तू दिसतात. कमानयुक्त आयताकृती आकाराचे चौथे प्रवेशव्दारही एका बुरूजातच आहे. याची उंची सात मी.७५ से.मी. आहे. व्दारमाथ्यावर असलेल्या प्रक्षेमातून (झरोका) खाली शत्रूवर तेल, उकळते पाणी फेकण्यासाठी झरोके आहेत. व्दाराच्या माथ्यावर एक मिनारवजा स्तंभ आहे. याचे संपूर्ण बांधकाम दगडी आहे.

किल्ल्याचे पाचवे प्रवेशव्दार भिंतीत असून ते लांबट आकाराचे आहे. यास दरवाजे नाहीत. याच्या पुढील भागावर मध्यभागी दोन लहान कोनाडे आहेत. येथून काही अंतर चालल्यानंतर लोहबंदी व्दारासारखे सहावे व्दार लागते. याठिकाणी सध्या एकच लाकडी दरवाजा व त्यावर लोखंडी पट्ट्या मारलेल्या आहेत. हा उर्ध्व गोलाकार कमानीचा आहे. यातून आत गेल्यानंतर राजवाडा लागतो.

राजवाडा असलेला चौक ओलांडल्यानंतर सातवे प्रवेशव्दार लागते. हे चौकोनी आकाराच्या भिंतीत बांधलेले असून व्दारमार्गात एकात एक लहान होत जाणाऱ्या चार कमानी आहेत. माथ्यावर नाजूक नक्षीकाम असलेली शिल्पपट्टी आहे. या प्रवेशव्दारातून तळघराकडे जाणारा रस्ता आहे. येथे सर्व प्रवेशव्दारांच्या बाबतीत लक्षात येते की, लोहबंदी प्रवेशव्दार वगळता इतर व्दारांच्या दरवाजांवर कोठेही अणकुचीदार खिळे वापरलेले नाहीत. या किल्ल्यात मनुष्य वस्तीपेक्षा घोडदळ जास्त ठेवले जात असल्याने कदाचित दरवाजांना खिळे मारले नसावेत. सर्व प्रवेशव्दारादरम्यानच्या मार्गावर दोन्ही बाजूस पहारेदारांच्या चौक्या आहेत. किल्ल्यातील घोड्यांच्या अनेक तबेल्यांवरून या किल्ल्याचा वापर मुख्यतः घोडदळासाठी होत असावा असे दिसते.

गुप्त मार्ग : किल्ल्यात ठिकठिकाणी खंदकात उतरण्यासाठी गुप्त मार्ग आहेत. विशेषत: अहशमा दरवाजाच्या डाव्या-उजव्या बाजूस हे मार्ग आहेत. एक गुप्त मार्ग गावाबाहेर असलेल्या सुलतान टेकडीपर्यंत जात होता असे सांगितले जाते. आणिबाणीप्रसंगी राजपुरुषांना किल्ल्याबाहेर सुखरुप जाता यावे यासाठी मुख्य तटातूनही काही गुप्त मार्ग आहेत.

किल्ल्यातील बहुतेक सर्व वास्तू उद्ध्वस्तावस्थेत आहेत. तरीही ज्या काही अवशेषरुपात आहेत, त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

राणी महल : चौथे प्रवेशव्दार ओलांडून डाव्या बाजूस एका लहान पायवाटेने गेल्यास ही उद्ध्वस्त वास्तू दिसते. चौकोनी आकाराच्या, पण सध्या छतही नसलेल्या या वास्तूच्या केवळ भिंती शिल्लक आहेत. भिंतीना सर्वत्र लहान कोनाडे आहेत. या वास्तूस तीन व्दारे

आहेत, तर पूर्वेस खिडकी आहे. यातील मुख्य दरवाजा तीन मी. १५ सें.मी. उंचीचा आहे. ही वास्तू १५ मी., ५० सें.मी. लांब व १० मी., ९० सें.मी. रुंद आहे. सध्या असलेल्या भिंतींची उंची तीन मीटर आहे. या वास्तूचे बांधकाम दगड व विटांनी केलेले असले तरी किल्ल्यातील ही सर्वात जास्त उद्ध्वस्तावस्थेतील वास्तू होय. यात अन्य कोणते बांधकाम दिसत नाही, पण मध्यभागी जमिनीत खोदलेला हौद आहे. त्यात कारंजाचीही सोय होती. महालात गारवा व सौंदर्य निर्मिती करणे हा त्यामागील उद्देश असावा. हौदाचा आकार २ मी. ४० सें.मी. लांब १ मी. ८० सें.मी. रुंद व १ मी. २५ सें.मी. खोल आहे.

जानुमा महल : पाचव्या प्रवेशव्दाराजवळच्या गोलाकार बुरुजावरील ही वास्तू कर्नल मेडोज टेलर याने बांधली आहे.[३९] यास मेडोज टेलरचे निवासस्थान असेही म्हणतात. ही वास्तू पाश्चात्य स्थापत्यशैलीचा नमुना असून येथून किल्ल्यातील व सभोवतालचा परिसर चांगला दृष्टीपथात येतो. सध्या या पडक्या अवस्थेत असलेल्या वास्तूमध्ये प्रवेश करण्यासाठी ३६ पायऱ्या चढाव्या लागतात. वास्तूचा दर्शनी भाग ४ मी. लांब व २ मी. ९० सें.मी. रुंद असून तेथून आत जाण्यासाठी कमानदार दरवाजा आहे. मुख्य वास्तू ५ मी. ५० सें.मी. लांब व ४ मी. १५ सें.मी. रुंदीची आहे. पूर्व व पश्चिम भागास वरील बाजूस एकूण चार अर्धगोलाकार प्रवेशव्दारे आहेत. या वास्तूच्या बांधकामात दगड व विटांचाही वापर केलेला दिसतो. वास्तूचा दर्शनी भाग पडल्यामुळे ती एखाद्या अर्धगोलाकार सज्जाप्रमाणे दिसते. यात पाच गोलाकार स्तंभ होते. पण ते सध्या कोसळलेले आहेत. या वास्तूचा 'हवामहल' म्हणूनही उपयोग होत असावा.

राजवाडा : पाचव्या प्रवेशव्दारातून पुढे आल्यावर राजवाडा चौकात ही चौरसाकृती वास्तू आहे. यास राजवाडा असे म्हटले जाते. या वास्तूच्या तीन बाजू एकखणी, तर एक बाजू दोन खणी आहे. वास्तूच्या चारही बाजूस मोठमोठे व्हरांडे आहेत. वास्तूचा आकार साधारणतः २८ मी. लांब, १० मी.रुंद व ५ मी. उंच असा आहे. या इमारतीतच मध्ययुगात तहसील कार्यालय होते. त्या काळात येथील कमानी बुजवून येथे दारे व खिडक्या बसविल्या गेल्या. ही वास्तू दगडी असून त्यास तहसील कार्यालय असतांना प्लॅस्टर केलेले आहे. याचे छत सपाट आहे. ही अद्याप चांगल्या स्थितीत आहे. येथील एका ओट्यावर व्यालशिल्प आहे.

तळघर किंवा पाणी महल : किल्ल्यातील सर्वात उत्तम स्थितीत असलेली वास्तू म्हणजे हे तळघर. यास पाणीमहल असेही म्हणतात. ही वास्तू पूर्णतः जमिनीखाली असल्याने जमिनीच्या वर तिचे अस्तित्व जाणवत नाही. यात उतरण्यासाठी पायऱ्यांचा निमुळता मार्ग आहे. अजस्र अशा बारा स्तंभावर याचे छत पेललेले आहे. या तळघरातून एक भुयारी मार्ग गावाबाहेरील तीन कि.मी. वरील सुलतान टेकडीपर्यंत जात होता असे सांगितले जाते. ही वास्तू पाणीमहल म्हणून ओळखली जात असली तरी ती गुप्त बैठकांसाठीचा खलबतखानाही असावा. हे तळघर अंधारमय आहे. या तळघरावर हौद निर्माण केलेला आहे. त्यामुळे या तळघराचा संशयही येत नाही. सध्या गाळाने भरलेल्या या हौदात येथील तवे विहिरीचे पाणी सोडले जात असल्याच्या खाणाखुणा दिसतात. २३×१५ मीटर आकाराच्या या तळघरामुळे शेजारील दारु कोठारात थंडावा रहात असे.

---

३९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ७५५.

वर वर्णन केलेल्या वास्तूंव्यतिरिक्त येथे रंगमहल, लंगरखाना, गंगा- जमना कोठारे, घोड्यांचे अनेक तबेले अशा कित्येक इमारती होत्या. पण त्या सध्या पूर्णपणे नष्ट झालेल्या आहेत. तबेल्यांचे मात्र बऱ्यापैकी अवशेष आहेत. राणीमहालाच्या पाठीमागे किल्लेदाराचा वाडा होता. तोही आज अवशेषरुपात आहे. पण या वाड्याच्या आतील एका भिंतीवर पूर्वीच वर्णिल्याप्रमाणे एक शिलालेख आहे. तो अरबी-फार्शी-मराठी असा संमिश्र आहे. त्यातील कालनिर्देश 'सु' म्हणजे सुहूर सनाचा असून मुस्लिम कालनिर्देश पध्दतीप्रमाणे 'सिता', 'सितैन', 'तिसा' व 'मेयाह' अशाप्रकारे शब्दसंकेतांनी ९६६ असा सन सूचित केलेला आहे.[४०] खान तुर्कखान या किल्लेदाराच्या कारकिर्दीत लोहबंदी दरवाजा उभारण्यात आल्याची नोंद या लेखात आहे. 'खा' म्हणजे खान आणि 'सु' म्हणजे सुहूर सन हे शब्दसंक्षेपही यात आहेत. पहिल्या ओळीतील 'दरवाजा' या शब्दातील 'र' या वर्णाचे वळण यादवकालीन आहे.[४१]

दारुकोठार : हे तळघराच्या बाजूस असून ते पडक्या अवस्थेत आहे. साधारणतः १५ मी. लांब, ८ मी. रुंद व ५ मी. उंचीचे हे कोठार दोन खोल्यांचे होते. याच्या छतावर जाण्यासाठी पायऱ्या, तर आत उतरण्यासाठी पश्चिमेकडून मार्ग आहे. यात दारुगोळा साठविला जात असे.

पाणीपुरवठा व्यवस्था : किल्ल्याच्या पाण्याच्या गरजेसाठी किल्ल्यात तीन विहिरी आहेत. यापैकी अहशमा प्रवेशव्दारासमोर एक, त्याच्या डाव्या बाजूस दुसरी व खंदकात तिसरी विहीर आहे. किल्ल्याच्या परकोटातही तवे विहीर, अंधेरी विहीर व चांदबावडी (परियोंकी बावडी) अशा तीन विहिरी असून चांदबावडी बुरुजाच्या आत आहे. मुख्य किल्ल्यात कटोरा बावडी आहे. याशिवाय जानुमा महलच्या बुरुजाच्या पायथ्याशी परकोटात एक बारव आहे. या सर्व विहिरीतील पाणी मोटेच्या सहाय्याने वर किल्ल्यात जाई. तवे विहिरीवर तव्यासारखे झाकण असल्यामुळे त्यास तवे विहीर नाव पडलेले दिसते. किल्ल्याच्या पूर्व भागासाठी तवे विहिरीचे पाणी मोटेने वर खेचून प्रथम हौदात व हौदातील पाणी तळघरास खापरी नळांच्या सहाय्याने पुरविले जाई. इशरत महल नामक वास्तूसही याच विहिरीचे पाणी पुरविले जात असे.

किल्ल्याच्या पश्चिम व दक्षिण भागासाठी चांद बावडी मधून पाणी पुरवठा केला जात असे. या विहिरीचे पाणी मोटेने वर खेचून पश्चिमेकडील बुरुजावरील हौदात साठविले जात होते व तेथून खापरी नळांच्या सहाय्याने इमारतींना ते पुरविले जात होते. कटोरा बावडीचे पाणीही अशाच प्रकारे किल्ल्यास पुरविले जात असे.

जानुमा महल असलेल्या बुरुजाच्या तळाशी जी बारव आहे, त्यातील पाणी राजवाडा व जानुमा महलला पुरविले जात असे. या महलच्या उत्तर भागात पाण्याचे मोठे भांडे ठेवण्याची जागा आहे. येथील खाली सांडलेले पाणी वाहून जाण्यासाठी एक छिद्रही आहे.

---

४०. पठाण, यु.म. (संपा.), **मराठवाड्यातील मराठी शिलालेख**, डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९८९, पृ.५९.
४१. कित्ता.

खंदकात पाण्याचा साठा कायम रहावा म्हणून अहशमा प्रवेशव्दारासमोरील, प्रवेशव्दाराच्या डाव्या बाजूकडील व खुद्द खंदकातील विहिरीचे पाणी त्यात सोडले जात असे. याशिवाय गरजेनुसार तवे विहिरीतीलही पाणी त्यात सोडण्यात येत होते.

मशीद : किल्ल्यात राजवाड्यालगत एक मशीद आहे. मशिदीच्या इमारतीची लांबी साधारण आठ मी., रुंदी सहा मी., व उंची सात मीटर आहे. मशिदीस दर्शनी भागावर तीन मोठ्या कमानी, तर आत नऊ कमानी आहेत. मशिदीच्या मधोमध खुत्बा पढण्याची जागा आहे. मशिदीसमोरील मोठा चौकोनी हौद सध्या गाळाने भरलेला आहे. मशिदीत उजव्या बाजूस दिवाबत्तीसाठी कट्टा असून भिंती कोनाडेयुक्त आहेत. चार खांबांवर पेललेल्या घुमटाकृती छतावर कमलदलाची नक्षी अंकित आहे. छतावर जाण्यासाठी जिना आहे. येथे दोन्ही बाजूस स्तंभ आहेत. तसेच पाणी वाहून जाण्यासाठी दगडी पन्हाळ आहे. मशिदीशेजारीच हजरत बुऱ्हानुद्दीन उर्फ सैय्यद सादत नामक अवलियाचा पडक्या स्थितीतील दर्गाही आहे.

मराठवाड्यातील बहुतेक किल्ले हे बहमनी व त्यांच्या पाच शाह्यांच्या काळात विकसित झाले. त्यामुळे या किल्ल्यांच्या बांधकामात साम्य दिसून येते. मराठवाड्यातील उदगीर, औसा, धारुर, परांडा व नळदुर्ग येथील किल्ले भुईकोट स्वरुपाचे आहेत. नळदुर्गचा किल्ला जोडकिल्ला असला तरी त्याहीपेक्षा औसा किल्ला मजबूत वाटतो. खंदक, तटबंदी, तटांमधील परकोट, मुख्य प्रवेशव्दारातून आत वळणे घेत जाणारा रस्ता, फसवे दरवाजे, लहान-मोठे बुरूज, घोड्याच्या पागा, रक्षकांच्या चौक्या, मैदाने या आवश्यक लष्करी सोयींबरोबरच नागरी सुविधांच्या बाबतीतही या किल्ल्यांमध्ये सारखेपणा आढळतो. परंतु औसा किल्ल्याच्या विशिष्ट अशा भौगोलिक स्थानामुळे हा किल्ला सतत संघर्षात राहिला होता. त्यामुळे येथे नागरी सुविधा फारशा आढळत नाहीत.

शहर परिसरातील स्मारके :

दर्गे : हजरत खाकीशहा दर्गा हा येथील सर्वात जुना दर्गा आहे. हा किल्ल्याच्या उत्तरेस एका मोकळ्या जागी दगडी चौकोनी ओट्यावर बांधलेला आहे. याशिवाय येथे हजरत मीर मेहंदीशहा दर्गा, हजरत ख्वाजा नक्षबंदी दर्गा व हजरत बुऱ्हाणशहा ताजुद्दीनबाबा दर्गा हे सुफी संतांचे दर्गे आहेत.

तेली गुंबद : शहराच्या पश्चिमेस दोन कि.मी.वर भादा रस्त्यावर दगड्या विहिरीजवळ ही वास्तू आहे. येथे एक शिळा असून त्यावरील शिलालेखात हा गुंबद हिजरी १०३४ मध्ये बांधल्याचा उल्लेख आहे. याशिवाय असाच दुसरा एक गुंबद शहराच्या उत्तरेस व तिसरा पश्चिम दिशेस भादा रस्त्यावर आहे.

औसा येथील उद्याने : औसाच्या वेगवेगळ्या भागात उत्तर मध्ययुगीन बागांचे अवशेष पाहावयास मिळतात. त्यातील महत्त्वाची उद्याने पुढीलप्रमाणे :-

जांबबाग : ही किल्ल्याच्या पाठीमागे असून त्यात जांबाच्या झाडांची संख्या जास्त असल्याने त्यास जांबबाग म्हणतात. कर्नल मेडोज टेलरच्या काळात औसाचे मामलेदार मल्हारराव बोकिल यांनी ही बाग तयार केली होती.

सराबाग : किल्ल्याच्या लोहबंदी प्रवेशव्दारासमोर एक फर्लांग अंतरावर सय्यद सादत दर्ग्याच्या पाठीमागे ही बाग आहे. आज ही बाग नसली तरी तेथे एक पडीक इमारत आहे. ही इमारत म्हणजे मेडोज टेलरचे निवासस्थान होते असे सांगितले जाते.

जामा मशीद : औसा शहराच्या बाजारपेठेत, औरंगजेबाच्या दख्खन मोहिमेच्या काळात विजापूर स्थापत्यानुसार बांधलेली ही मशीद आहे.[४२] ही विजापूरच्या मशिदीसारखी आहे. काळ्या दगडांनी बांधलेल्या या मशिदीचा दर्शनी भाग अर्धचंद्राकृती कमानयुक्त आहे. छत गोलाकार असून वर कळसाकडे ते निमुळते होत गेलेले आहे. येथील प्रार्थना हॅाल १२x८ मीटर आकाराचा आहे. मशिदीच्या चारही कोपऱ्यावर चार छोटे छोटे मिनार आहेत. येथे खुत्बा पढण्याच्या जागेतील एका कोनाड्यात पर्शियन भाषेतील दोन शिलालेख आहेत. त्यात औरंगजेब बादशहा व सोहराबखान यांचा नामनिर्देश असून मशीद इ.स.१६८० मध्ये बांधल्याच्या उल्लेखही आहे. मशिदीची इ.स.१९८९ मध्ये दुरुस्ती करण्यात आलेली असून ती 'राज्य संरक्षित स्मारक' म्हणून घोषित केलेली आहे.

मशिदी : औसा येथे काही मध्ययुगीन व उत्तर मध्ययुगीन मशिदी आहेत. त्यातही सुन्नी व महेदवी पंथाच्या मशिदींचा भरणा आहे. त्यात जामे मशीद, काझी मशीद, मशीद-ए-जलालशाही, कुरेशी मशीद, जमालशहा मशीद, शहानुसरत मशीद व खाकीशहा मशीद यांचा समावेश होतो. यातील बहुतांश मशिदींचे नुतनीकरण झालेले आहे.

मठ : औसा येथील बहुतांश मठ हे लिंगायत वीरशैव पंथाचे आहेत. या मठांमध्ये विशिष्ट अशी गुरु परंपरा असून धर्मविषयक आचरण व धर्मपालनाचा उपदेश केला जातो. मठ हे प्रामुख्याने ज्ञानदान कार्य करणाऱ्या शिक्षण संस्थेसारखे असतात.

औसा हे कल्याणी (आताचे बसवकल्याण) पासून केवळ ८० कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे बसवेश्वराच्या लिंगायत पंथाचा औसा येथील मठ व त्यातील मूर्तींवर परिणाम दिसून येतो. औसा नगरीत लिंगायत तत्वज्ञान पीठे कार्यरत आहेत.

येथील सर्वात जुना मठ म्हणजे षट्स्थल ब्रह्मचारी चरमूर्ती महंत स्वामी मठ हा होय. याचे संस्थापक भाललोचनस्वामी हे होते. भूसार वेशीजवळ त्यांनी हा मठ स्थापन करून वीरशैव तत्वज्ञानाचे व धर्मप्रसाराचे कार्य केले. याच मठात कुमारस्वामी महंत होऊन गेले. त्यांच्या नावे या मठातर्फे एक महाविद्यालयही चालविले जाते. येथील पटवप्पा स्वामी मठाची स्थापना शांतीवीरस्वामी यांनी केलेली आहे. या मठाच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी श्री निरंजनस्वामी या त्यानंतरच्या पिठाधिकाऱ्यांच्या नावे वसतीगृह चालविले जाते. स्वामी गल्लीतील नंदीमठाची स्थापना गुरुपादस्वामी यांनी केली. या मठामध्ये महालिंगस्वामी, बसय्यास्वामी आदी महंत होऊन गेले. येथे बसवेश्वर जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या सर्व मठांमध्ये धर्मशिक्षण दिले जाते. येथील महंताना गुरुमंत्र देण्याचा अधिकार आहे.

४२. **इंपेरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया**, प्रॉव्हिन्सियल सिरीज, हैदराबाद स्टेट, गव्हर्नमेंट प्रिंटींग प्रेस, कलकत्ता, १९०९, पृ.२६०-६१.

शहराच्या पूर्वेस निलंगा वेशीजवळ सुंदरगिर महाराज मठ व पश्चिम गावाच्या बाहेर पद्मगिरी महाराज मठ हे दशनाम गोसावी पंथाचे मठ आहेत. त्यांची स्थापना केव्हा झाली याची माहिती उपलब्ध होत नाही.

याव्यतिरिक्त तेली गल्लीत उदासी महाराजांचा मठ आहे. ते मूळचे पंजाबचे. पण महंत वीरनाथ महाराज यांच्या प्रेरणेने ते औसा येथे आले व मठाची स्थापना करून येथेच राहिले.

या सर्व मठांत महंतांच्या समाध्या व शिवलिंग आहे. त्या त्या महंतांचे भक्तगण परंपरेने पुढे या मठांचे कार्य सुरू ठेवतात.

वीरनाथ-मल्लनाथ मंदिर : भागवत परंपरेतील लिंगायत-वीरशैव पंथियांचे हे मंदिर भुसार गल्लीमध्ये आहे. या मंदिराचा पाया घालणारे वीरशैव महंत वीरनाथ यांचा जन्म शके १६९२ (इ.स.१७७१) मध्ये निलंगा येथे एका शैव कुटुंबात झाला. मात्र त्यांचा ओढा विठ्ठल भक्तीकडे होता. ते दरवर्षी पंढरपूर यात्राही करीत. पुढे त्यांनी वारकरी पंथाचे अनुयायित्व स्वीकारुन वीरशैव व वारकरी संप्रदायांचा समन्वय घडवून आणणाऱ्या लिंगायत-वारकरी संप्रदायाची स्थापना केली व या पंथाचे पीठ म्हणून येथे मठ स्थापन केला. त्यानंतर या मंदिराची फसली १२५९ मध्ये पायाभरणी करून जोत्यापर्यंतचे बांधकाम केले व शके १७७७ (इ.स.१८५५) मध्ये ते समाधिस्थ झाले.[४३] त्यांनी सुमारे ३५०० अभंग रचलेले असून सर्व अप्रकाशित हस्तलिखिते येथे सुरक्षित ठेवलेली आहेत.

महंत वीरनाथ महाराजानंतर त्यांचे सुपुत्र मल्लनाथ महाराज यांनी या उत्कृष्ट व विलोभनीय कोरीवकाम असलेल्या दुमजली मंदिराचे काही बांधकाम पूर्ण केले. मल्लनाथ महाराजांचा जन्म शके १७६७ (इ.स.१८४५) मध्ये औसा येथे झाला. वीरनाथ महाराजांनी समाधिस्थ होण्यापूर्वी त्यांना दीक्षा दिल्यानंतर ते धर्मप्रसाराचे कार्य करू लागले. वीरनाथ महाराज गावो-गावी फिरून नाथषष्ठी उत्सव साजरा करीत. मल्लनाथांनी मात्र सुरुवातीच्या काळात औसा येथेच हा उत्सव साजरा केला. यावेळी औसास पंढरपूरचे स्वरुप प्राप्त होत असे इतक्या मोठ्या प्रमाणावर येथे भाविकांची गर्दी होत असे. काशी येथेही त्यांनी नाथषष्ठीचा उत्सव करून तेथे भागवत पंथाचे निशाण रोवले. याव्यतिरिक्त हैद्राबादलाही त्यांनी असाच उत्सव साजरा केला होता. धर्मप्रसाराच्या कार्याबरोबरच त्यांनी ८०० ते ९०० अभंग रचलेले आहेत. ते प्रसिध्द झालेले आहेत. याशिवाय आपले वडील व गुरू वीरनाथ ह्यांचे **वीरलीलामृत** नामक पद्य स्वरुपात चरित्रही लिहिले आहे. त्यांच्या नावे **ज्ञानेश्वरी रसामृत** नामक ग्रंथही आहे. त्यामुळे मल्लनाथांना आपल्या गुरुपेक्षाही जास्त प्रसिध्दी मिळाली आहे. मल्लनाथांनंतर त्यांचे सुपुत्र वीरनाथ गुरू महाराज (गुरुबाबा) येथील उत्तराधिकारी झाले.

मल्लनाथ महाराजांनी बांधलेले हे भव्य व पूर्णतः कलाकुसरयुक्त मंदिर काळ्या स्फटिक दगडात बांधलेले असून त्यावर बांधकाम पूर्ण केल्याची तारीख तसेच गुरू परंपरेतील आणि दशावतारातील काही कोरीव मूर्तिशिल्पे आहेत. आकर्षक अशा कोरीवकामाने अलंकृत केलेले मंदिराचे प्रवेशव्दार ओलांडून आत गेल्यावर ३.५२ चौ.मी. आकाराच्या सभामंडपातील वैशिष्ट्यपूर्ण अशा दहा स्तंभाच्या बाजूस पीठे आहेत. सर्व स्तंभ सुशोभित कमानींनी

४३. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७५६.

जोडलेले आहेत. मंडपाच्या चारही कोपऱ्यांवरील चार स्तंभांची विशेषता म्हणजे त्यांना जुळ्या स्तंभांसारखा वैशिष्ट्यपूर्ण व कलात्मक आकार देण्यात आलेला आहे. असा स्तंभप्रकार सहसा कुठेही आढळत नाही. येथील कमानीही आकर्षक कोरीवकामयुक्त आहेत. मंडपात संत व देवदेवतांच्या तसबिरी आहेत. मंदिर व्दिदल पध्दतीचे असून गर्भगृहाच्या जागी उंच पीठावर वीरनाथ, त्यांची पत्नी साध्वी महादामाई, पुत्र मल्लनाथ व नातू वीरनाथ गुरू महाराज यांच्या चांदी व पितळी पत्र्याने मढवलेल्या समाधी आहेत. वीरनाथ समाधीशेजारी त्यांनी स्थापलेले संत एकनाथांचे चांदीच्या पत्र्याने मढवलेले सिंहासन आहे. याच्या डावीकडे वीरनाथांचे गुरू गुंडा महाराज देगलूरकर यांची समाधी, तर मल्लनाथाच्या समाधीच्या डावीकडे चांदीचा मुकूट ल्यालेली विठ्ठलमूर्ती आहे.

वरील मजल्यावर मध्यम आकाराची तीन देवकोष्ठे असून त्यांच्या दोन्ही बाजूस तशीच, पण लहान आकाराची प्रत्येकी दोन देवकोष्ठे आहेत. संपूर्ण मंदिर अंतर्बाह्य कोरीवकामाने अलंकृत आहे. येथे ज्येष्ठ शुध्द व्दादशीपासून सात दिवस यात्रा भरते. गुरुबाबाने येथून दरवर्षी आषाढी व कार्तिकी वारीसाठी पंढरपूरला पालखी नेण्याचा पाडलेला प्रघात आजही चालू आहे.

या मंदिराच्या पाठीमागे लागूनच बालाजीचे लहानसे मंदिर आहे. शहराच्या दक्षिणेसही साधारणतः दीड कि.मी. अंतरावर लिंगायतपंथीय गुरुपाद स्वामींचे समाधिमंदिर आहे. विजयादशमीस येथे भाविकांची गर्दी लोटते. हे मंदिर शिवप्पा हालकुडे नामक व्यक्तिने बांधल्याचे म्हटले जाते. मंदिरात गुरुपाद स्वामींची समाधी आहे.

राममंदिर : हे मंदिर किल्ल्याच्या बाजूस आहे. गोपाळबुवा डोंगरे महाराज यांना राम, लक्ष्मण, सीता, हनुमान, बिभिषण, वाली, सुग्रीव, रामपुत्र लव व कुश यांचा मूर्तीसंच सुलतान टेकडी येथे सापडला व त्यांनी या मंदिरात सर्व मूर्तींची स्थापना केल्याचे सांगितले जाते. काळ्या पाषाणात बनविलेल्या या मूर्तींना रामनवमीच्या वेळी वस्त्र नेसवून पूजा-अर्चा केली जाते. मंदिराच्या बाहेर काही दगडी शिल्पांचे अवशेषही विखुरलेले दिसतात.

जैन मूर्ती शिल्प : गावाच्या मध्यवस्तीत असलेल्या जैन वसाहतीत एका भुयारवजा खड्ड्यात हे दिगंबर जैन मंदिर आहे. याच्या गर्भगृहात दोन संगमरवरी मूर्ती असून त्यावर नागफणा उभारलेला आहे. या जैन मूर्ती घोटीव असून आकर्षक आहेत. त्यांच्या डाव्या बाजूस दिगंबरावस्थेतील एक उभी मूर्ती आहे. या मूर्तीशेजारी जैनांच्या चोवीस तीर्थंकरांच्या लहान मूर्ती आहेत.

औसा नगरीत दहा शिलालेख आहेत. आज येथे असलेले जैन मंदिर साधारणतः ३०० वर्षापूर्वीचे आहे. या मंदिरात शक १५४६ चा एक शिलालेख प्राप्त झालेला आहे. येथे उपलब्ध असलेल्या देवयंत्राचा काळ शक १५४४ असा येतो.

कालौघात वेगाने होणाऱ्या आधुनिकीकरणामुळे या शहराचेही आता जुने रुप पालटण्यास सुरुवात झालेली असून आधुनिकीकरणाचा परिणाम बांधकाम स्थापत्यावर प्रकर्षाने दिसून येऊ लागला आहे. दळणवळणाच्या लक्षणीय सोयींमुळे हे शहरही आता राज्य व पर्यायाने देशाच्या नकाशावर ठळकपणे प्रतिबिंबीत होणार आहे

कळमगाव

कळमगाव : (ता.शिरूर-अनंतपाळ, १८° ३०' उ., ७६° ००' पू.) : तालुका मुख्यालयापासून दक्षिणेस ५ कि.मी. अंतरावरील या गावाच्या पश्चिमेस बेटवजा एक टेकडी आहे. ही टेकडी पिवळसर दगडापासून बनलेली असून स्थानिक भाषेत या दगडाला केंगला दगड असे म्हणतात. या टेकडीतच सुमारे १५.९ मी. लांब व १४ मी. रुंदीचे व ७.३ मीटर उंचीचे एक लेणे आहे. या लेणीकडे जाण्यासाठी सरळ असा रस्ता नसल्याने व लेणे दुर्लक्षित असून पडक्या अवस्थेत टिकून आहे. लेणीच्या दर्शनी भागात दोन स्तंभ असून ते तीन कमानींनी जोडलेले आहेत. लेणीमध्येही दोन स्वतंत्र स्तंभ असून उर्वरित भितीस्तंभ आहेत. त्यांचा आकारही वैशिष्ट्यपूर्ण आहे. टेकडीचा दगड अत्यंत ठिसूळ असल्याने संपूर्ण लयनस्थापत्य ओबडधोबड स्वरुपात टिकून आहे.

याच टेकडीत शिव मंदिर असून त्यादृष्टिने उपरोक्त लेणेही शैवपंथीय असावे असा कयास बांधता येतो. या मंदिराचीही दुरावस्था असल्याने येथील मूर्तीची निश्चित ओळख पटत नाही. तथापि, त्यातील एक गणेशमूर्ती व दुसरी हनुमान मूर्ती असावी.

कानेगाव

कानेगाव (ता.उदगीर, १८° १५' उ., ७६° ५५' पू.) : उदगीरच्या नैऋत्येस १४ कि.मी. वर व पूर्वीच्या हेर रेल्वे स्थानकापासून नऊ कि.मी. अंतरावर हे खेडेगाव आहे. या खेड्यात यादव नृपति कान्हरदेव (कृष्णदेव) याचा संस्कृत व मराठी अशा संमिश्र देवनागरी लिपीतील शके ११८०, कालयुक्त संवत्सर, मार्गशीर्ष शुध्द १०, गुरुवार, ७ डिसेंबर, इ.स.१२५८ या तिथीचा एक शिलालेख सापडलेला आहे.[४४] या लेखाचे प्रथम वाचन, संपादन व संशोधन डॉ.शं.गो.तुळपुळे यांनी 'प्राचीन मराठी कोरीव लेख' या ग्रंथात केले आहे. या लेखातील स्वकीय अभ्युदयार्थ कृत लक्षहोमा संपूर्णता एङ हे वाक्य सोडले तर मराठी वळणाचे अन्य वाक्य लेखात आढळत नाही. हा लेख म्हणजे एक होमलेख आहे.[४५]

व्यक्तिनामे : या शिलालेखात 'कान्हारदेव' (कान्हरदेव) यादवाचा उल्लेख १३ व्या ओळीत केलेला असून यादवांचे नेहमीचे बिरुद 'स्त्रीमतप्रौढ प्रतापचक्रवर्ति' याच ओळीत आहे.[४६] याशिवाय कान्हरदेवाचा मांडलिक गोपालदेव व गोपालदेवाचा पूर्वज थोरनारायण श्रीपादाचार्य या व्यक्तिनामांचा उल्लेख आहे.[४७]

ग्रामनामे-व्यक्तिनामांबरोबरच लत्तनौर : सध्याचे लातूर, तूर्रे - हेरच्या पूर्वेस ४० कि.मी. वरील सध्याचे तुरुरी, सखवल - कानेगावच्या पूर्वेस ४.८ कि.मी. वरील सध्याचे साकोळे (सखोले), खंधार - हेरच्या पूर्वेस ४८ कि.मी. वरील त्याच नावाचे गाव (१३ व्या शतकात देशनाम म्हणून प्रसिध्द असावे), उजलं - हेरच्या पश्चिमेस ६.४ कि.मी. वरील सध्याचे उजळंब, कखरणे - हेरच्या उत्तरेस ९.६ कि.मी. वरील काखनाळ (काखनळी), उदयगिरी - सध्याचे उदगीर व कोणे[४८] या ग्रामनामांचा नामोल्लेख आहे. डॉ.हरिहर ठोसरांच्या मते ते कोणे नसून कोणेयग्राम म्हणजे उदगीरमधील कानेगाव आहे.[४९]

---

४४. देव, शां. भा., **महाराष्ट्र व गोवे शिलालेख - ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भसूची,** म.रा.सा.सं.मंडळ, मुंबई, १९८२, पृ.६१.
४५. पठाण, यु.म., **मराठवाड्यातील मराठी शिलालेख**, डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९८९, पृ.३९.
४६. कित्ता.
४७. देव, शां.भा., उपरोक्त पृ.६१.
४८. कानेगावचा उल्लेख कोणेयग्राम या शब्दाने ३१ व्या ओळीत केलेला आहे. पठाण, यु.म., पूर्वोक्त, पृ.३९.
४९. ठेसर, हरिहर, पुर्वोक्त, **हिस्टॅरिकल-जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पृ.२४०-४१.

उद्देश : या शिलालेखात कान्हरदेवाचा मांडलिक राठोड वंशीय सोमवंश कुळातील गोपालदेव याने स्वकियांच्या कल्याणासाठी केलेल्या एक लक्ष होमांची पूर्तता होण्यासाठी काही गावे दान दिल्याची नोंद केलेली आहे. त्यानुसार ही गावे लातूर जिल्ह्याचा अहमदपूर आणि उदगीर तालुका, उस्मानाबाद जिल्ह्याचा उमरगा तालुका व नांदेड जिल्ह्याच्या कंधार तालुक्यातील होत. यावरून यादव कान्हरदेवाच्या काळात गोपालदेव राठोड (राष्ट्रोड) हा या विभागाचा शासक होता व त्याचे मुख्यालय लत्तलौर म्हणजे लातूरला असल्याचे स्पष्ट होते.[५०]

कासारशिरसी

कासारशिरसी : (ता.निलंगा, १७° ५५' उ., ७६° ४५' पू.) : निलंग्यापासून दक्षिणेस २५ कि.मी. अंतरावरील या खेडेगावात गावचे तत्कालिन पोलीस पाटील दिनकरराव बाळाजीराव यांच्याकडे बदामीचा चालुक्य नृपति विजयादित्य याच्या अमदानीतील शके ६१९[५१] चा एक अस्सल आणि विनयादित्याचा शके ५२०[५२] चा बनावट असे दोन ताम्रपट मिळाले आहेत. यापैकी विजयादित्याचा ताम्रपट संस्कृत भाषेतील असून लिपी दाक्षिणात्य वळणाची व पश्चिमी चालुक्य नृपतींच्या इतर शासनातील लिपीप्रमाणे आहे. हा ताम्रपट वैशाख पौर्णिमा, शके ६१९ (गत वर्ष), इ.स.६९६-६९७ प्रथम शासनवर्ष या तिथीचा आहे.

व्यक्तिनामे : यात चालुक्य नृपति पुलकेशी वल्लभ, पुलकेशी वल्लभचा पुत्र चालुक्य नृपति कीर्तिवर्मन, कीर्तिवर्मनचा पुत्र चालुक्य नृपति सत्याश्रय, सत्याश्रयाचा पुत्र चालुक्य नृपति विक्रमादित्य, विक्रमादित्याचा पुत्र चालुक्य नृपति विनयादित्य, विनयादित्याचा पुत्र चालुक्य नृपति विजयादित्य या राजकुलीन व्यक्तिनामांचा उल्लेख आहे. याशिवाय प्रभाकर - दान स्वीकारणारा, गृहीतसाहस्त्र, भारव्दाज गोत्री ब्राह्मण, प्रभाकर - दान स्वीकारणारा, षडंगविंद, भारव्दाज गोत्री ब्राह्मण, नरेंद्रादित्य -दानाची विनंती करणारा, श्रीहर्ष -उत्तरापथेश्वर, रामपुण्य वल्लभ - ताम्रपट लिहिणारा महासांधिविग्रहिक याही व्यक्तिनामांचा उल्लेख आहे.

ग्रामनामे : वरील व्यक्तिनामांसोबत मोरखंडी - कासार शिरसीच्या आग्नेयेस १२ कि.मी. वरील बीड जिल्ह्यातील हुमणाबाद तालुक्यातील मोरखंडी, रासेनपूर - अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील राशिन असावे, जमळग्राम -मोरखंडीच्या पश्चिमेस १९.२ कि.मी. वर जाजनमुगळी गाव असून त्याच्या वायव्येस २४ कि.मी. वर उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यात घ्जवळगङ बेट आहे. हे प्रस्तुत ताम्रपटातील जवळग्राम असावे; मुगुळि - कासार शिरसीच्या ईशान्येस २४ कि.मी. वर कल-मुगुली व मोरखंडीच्या पश्चिमेस १९.२ कि.मी. वर जाजनमुगली ही गावे आहेत. ही सर्व व पुल्लवादलि (ओळख पटत नाही.) या ग्रामनामांचा यात उल्लेख आहे. डॉ.हरिहर ठोसरांच्या मते यातील मोरखंडी-कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील मोरखंडी, चल्लिकादेश - लातूर, उस्मानाबाद व बिदर जिल्ह्यांच्या लगतचा भाग, मुगुली ऐवजी मुग्गली - लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील तडमुगली, जमलग्राम- निलंगा तालुक्यातील मनेजवळगा व पुल्लवादलि ऐवजी बुल्लवाडलि-हे निलंगा तालुक्यातील बोरमुली गाव असावे.

---

५०. तुळपुळे, शं. गो., **प्राचीन मराठी कोरीव लेख**, पुणे, १९६३, लेख क्र.३१.

५१. कित्ता, पृ.९५-९६.

५२. कोलते, वि.भि., **महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख**, म.रा.सा.सं.मंडळ, मुंबई, १९८७, पृ.६०-७७ आणि ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **हिस्टॉरिकल जिओग्रॅफी ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा**, पृ. १४४, १५०.

उद्देश : चालुक्य नृपति विजयादित्याच्या अमदनीतील या ताम्रपटाचा मुख्य उद्देश छल्लुंकी देशातील मोरखंडीच्या पश्चिमेकडील मुगुळि व पुल्लवादलि या गावांच्या मध्ये असलेले जवळग्राम हे गाव भारव्दाज गोत्री प्रभाकर व कौशिक गोत्री कोत्तिशर्मन या ब्राह्मणांना दान दिले हे नमूद करण्याचा आहे. महासांधिविग्रहिक श्री रामपुण्यवल्लभ याने हा लेख लिहिला.

येथील दुसरा ताम्रपट हा बदामीचा चालुक्य नृपति विनयादित्य याचा बनावट ताम्रपट आहे.[५३] काही संशोधकांनी त्यामुळे त्याच्याकडे दुर्लक्ष केले. परंतु तरीही त्यातील माहिती संशोधकांना उपलब्ध होणे अनेक दृष्टीने उपयुक्त ठरण्याचा संभव आहे.

या ताम्रपटाचे एकूण तीन पत्रे आहेत. त्यातील पहिल्या व तिसऱ्या पत्र्याला एकाच बाजूवर आणि दुसऱ्या पत्र्याच्या दोन्ही बाजूंवर मजकूर कोरलेला आहे. लिपी नागरी असून अक्षराचे वळण उत्तर भारतीय अक्षरांच्या स्वरुपाचे आहे. विनयादित्याचे आतापर्यंत उपलब्ध झालेले सर्व ताम्रपट दक्षिण भारतीय अक्षरांच्या वळणाचे आहेत. या ताम्रपटाची भाषा अशुध्द संस्कृत आहे. कोरकाच्या चुकांमुळेही अशुध्दपणात भर पडली आहे.

तिथी : हा ताम्रपट गत शकवर्ष ५२०, कालयुक्त संवत्सर, वैशाख अमावास्या, गुरुवार, सूर्यग्रहण या तिथीचा आहे. या दिवशी इंग्रजी तारीख ३० एप्रिल ५९९ ही होती, परंतु चालुक्य नृपति विनयादित्याची कारकीर्द शके ६०३ ते ६१८ (इ.स.६८१ ते ६९६) ही इतिहासमान्य आहे. त्याच विनयादित्याचा हा प्रस्तुत ताम्रपट ८२ वर्षांनी अगोदरचा आहे. त्यामुळे तो बनावट वाटणे स्वाभाविक आहे.

व्यक्तिनामे : यात पुलकेशीवल्लभ, त्याचा पुत्र कीर्तिवर्मा, त्याचा वडीलभाऊ विजयादित्य, त्याचा पुत्र विक्रमादित्यदेव व त्याचा पुत्र विनयादित्यदेव या वंशावळीनुक्रमे व्यक्तिनामे आहेत. अर्थात इतिहासमान्य चालुक्य वंशावळीशी प्रस्तुत ताम्रपटातील वंशावळ जुळत नाही.

ग्रामनामे : विनयादित्याच्या राज्यात अमरावती - ७०० हा एक जिल्हा होता. पण ही अमरावती कुठे होती हे निश्चित सांगता येत नाही. याव्यतिरिक्त उल्लेख असलेल्या ग्रामनामांमध्ये वीरिगे चाळीस - हे कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील भालकी तालुक्यात असलेले वीरि नामक खेडे असावे, वल्लत - वीरिच्या वायव्येस ३.७ कि.मी. वरील 'बलद' गाव असावे, मंजरी नदी - मांजरा नदी, अणंदि ग्राम - मांजरा नदीच्या पश्चिमेकडील काठापासून सुमारे १.६ कि.मी. आत असलेले 'अळंदी' गाव असावे, खेट - अळंदीच्या वायव्येस मांजरा नदीच्या उत्तर तीरावरील 'खेर' गाव असावे. मंजरीनदीस्रोतसंगम - खेरच्या पूर्वेस सु.१.६ कि.मी. वरील देवन व मांजरा नदी संगमावरील संगम गाव, सावल्लिग्राम - संगमच्या उत्तरेस सु. २.४ कि.मी. वरील सावली गाव, चंदवुरिग्राम - सावली पासून पूर्वेस ८ कि.मी. वरील चंदवुरी गाव, वेंडकुंदेचंदवुरीच्या पूर्वेस १.६ कि.मी. वरील बेंडकोंडा गाव, कुसुवंडरु 'बलदडच्या पूर्वेस ६.४ कि.मी. वरील कुसनूर गाव, निडचव्वे, पुणिंदि आणि दर्षसल्ल (गावांची ओळख पटत नाही) या ग्रामनामांचा समावेश आहे.

---

५३. कोलते, वि.भि., पूर्वोक्त, **महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख**, पृ.६०-६७.

उद्देश : चालुक्य नृपति विनयादित्याने अमरावती - ७०० या विषयातील वीरिगे - चाळीस म्हणजे वीरिगे नावाने ओळखल्या जाणाऱ्या चाळीस गावांच्या समुहातील 'वल्लत' नामक गाव वासुदेव व्दिवेदी भट्टाला त्याचे पादप्रक्षालन करुन व हातावर पाणी सोडून दान दिले होते.

किल्लारी

किल्लारी : (ता.औसा, १८° ००' उ., ७६° ३०' पू.) : तालुका मुख्यालयापासून आग्नेयेस १६ कि.मी. अंतरावर असलेले हे गाव १९९३ च्या रौद्र भूकंपानंतर जगाच्या नकाशावर ठळकपणे प्रतिबिंबित झाले. राज्य शासनाने या व अन्य भूकंपग्रस्त गावांमध्ये भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाची मोहीम युध्दपातळीवर राबवून त्यांचे नियोजनपूर्वक पुनर्वसन केलेले आहे. त्या अंतर्गत भूकंपग्रस्तांना भूकंपरोधक घरे बांधून देण्यात आलेली आहेत. भूकंपात पूर्णत: उजाड झालेल्या या गावात आता लोकवस्ती दिसू लागली आहे.

या गावात नीलकंठेश्वराचे इ.स. १६ ते १७[५४] व्या शतकातील मंदिर व १३[५५] व्या शतकातील देवी मंदिर होते, परंतु भूकंपात दोन्ही मंदिरांना प्रचंड हानी पोहोचल्याने नीलकंठेश्वर मंदिराचे काही ठिकाणी मूळ स्वरूप तेच ठेवून व काही ठिकाणी नवीन बदलांसह नव्याने बांधकाम करण्यात आलेले आहे. देवी मंदिराचेही नव्याने बांधकाम सुरू आहे.

कुमठा

कुमठा : (खु.) ता. उदगीर येथे जुने मारुती मंदिर आहे.

खरोसा

खरोसा : (ता.औसा, १८° १५' उ., ७६° ३०' पू.) : औसाच्या आग्नेयेस २० कि.मी. वर लातूर-बिदर महामार्गालगत असलेल्या या गावाच्या पूर्वेस ०.४ कि.मी. अंतरावर कुरुंद किंवा जांभा दगडापासून बनलेल्या एका ठेंगण्या टेकडीत हिंदू लेणी कोरलेल्या असून त्या दक्षिणोत्तर विखुरलेल्या आहेत. या स्थळाच्या प्राचीनत्वाचा उल्लेख कुठल्याही अभिलेखात आढळत नाही. परंतु लयनस्थापत्य व शैलीवरून त्या बदामीच्या चालुक्यांच्या काळातील म्हणजे इ.स.६-७ व्या शतकातील असाव्यात असे विद्वानांचे मत आहे.

चालुक्य राजवंशाचे मूळ वास्तव्य ज्या 'चलुक्य' पर्वतावर होते, त्या पर्वतावर कार्तिकेय, सप्तमातृका इत्यादि देवतांची देवालये होती असे वर्णन चालुक्यांच्या दानपत्रांत आढळते. विशेष म्हणजे या परिसरास 'चलुक्य देश' उल्लेखिणारे अभिलेखीय पुरावे कासार-शिरसी व मुरुम येथे सापडले आहेत. या परिसरात चालुक्य आडनावाची घराणी आजही अस्तित्वात आहेत. त्यामुळे या लेणीही चालुक्यकालीन असाव्यात. वर म्हटल्याप्रमाणे येथे कार्तिकेय आणि सप्तमातृकांची देवालयेही आहेत. या सर्व पुराव्यांवरून खरोसाच्या या टेकडीचे प्राचीन नाव 'चलुक्य पर्वत' असे असावे.[५६]

या लेणी धाराशीवच्या पूर्वेस ६९.२० कि.मी. अंतरावर आहेत. येथील अपरिष्कृत (Coarse) जांभा प्रस्तरातील ठिसूळ मिश्रणामुळे येथे उत्तम प्रकारचे शिल्प निर्माण होऊ शकले नाही.

---

५४. पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, कडील माहिती.

५५. कित्ता.

५६. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **देवीसिंह चौहान गौरवग्रंथ**, पृ.१५२ व **हिस्टॉरिकल जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पूर्वोक्त, पृ. २७६.

येथील स्थिती आणि लेणींच्या दूरवरच्या स्थानामुळे महादेव लेणे वगळता या समुहातील कोणतीच लेणी सौंदर्य वा शिल्पवैशिष्ट्यांबाबत दखल घेण्याजोगी नाहीत. महादेव लेणे जर अन्यत्र चांगल्या प्रस्तरात असते, तर ते येथील संकल्पनाचित्रातील (design) पुरेसा सविस्तरपणा लक्षात घेतल्यास अतिशय सुंदर लेणे दिसले असते हे मान्य करावे लागेल. शिल्प-गुणवत्तेच्या दृष्टीने महादेव लेण्याखालोखाल येथील लाकोला लेण्याचा क्रमांक लागतो. इतर लेणी मात्र ओबडधोबड असून दखलपात्र नाहीत. 'दि केव्ह टेंपल्स ऑफ इंडिया' या फर्ग्युसन आणि बर्जेसच्या ग्रंथात या लेणीसंबंधी सविस्तर माहिती दिली असून ती १९७२ च्या उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरमध्ये जशीच्या तशी उद्धृत केली आहे.[५७] ती व प्रत्यक्ष सर्व्हेक्षणावर आधारित माहिती पुढीलप्रमाणे-

या लयन-समुहात लेणी या प्रकारात मोडणारी दहा लेणी आहेत. येथील कुरुंद प्रस्तर कमालीचा ठिसूळ आणि सच्छिद्र असल्यामुळे लेणे क्र.३, ४, ५ व ६ वगळता इतर लेणींमध्ये झीज व पडझड झाल्यामुळे वास्तुशास्त्रीय, शिल्पशास्त्रीय आणि वर्गीकरणाकरिता उपयुक्त व्यवच्छेदक वैशिष्ट्ये लोप पावली आहेत. उपरोक्त चार लेणींची स्थितीही काहीशी अशीच असली तरी तेथील उपलब्ध अवशेषांवरून मूळ लयनस्थापत्याची कल्पना येऊ शकते.

या टेकडीच्या दक्षिण टोकाला १३.७१ मी. रुंदीचे पुरेशा उंचीचे एक लेणे आहे. त्याचा दर्शनी व छताचा भाग कोसळल्याने पुरेशी माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. या लेण्याच्या किंचित उत्तरेस, छतभागात खालून पिरॅमिडसारख्या शिखराची नक्कल केलेले साधे मंदिरसदृश लेणे आहे. त्यापुढे ३.६६ x १.८२ मी आकाराचे आत लहानसे दालन असलेले ओबडधोबड लेणे आहे. या लेण्यासमोर खडकात ४.५ मी. लांबीचे दालन (recess) कोरलेले आहे. या लेण्यास लागूनच उत्तरेस दुसरे एक १.०५ x ०.९१ मी. आकाराचे लहान एकाश्म (Monolithic) मंदिरवजा लेणे आहे. त्याला लहान प्रवेशव्दार असून त्याचे वरील छतही उपरोल्लेखित लेण्याप्रमाणेच कोरलेले आहे. येथून पुढे बऱ्याच अंतरापर्यंत टेकडीच्या कड्यास (scrap) लागून लेणी नाहीत. त्यानंतर या लयन-समुहातील प्रमुख व मोठा लयन-समूह लागतो. त्यात प्रथम ३.३५ ते ४.५७ मी. रुंद व ३.३५ ते ४.४७ मी. लांब (खोल) अशा अनियमित आकाराच्या दगड-गाळाने भरलेल्या एका शैलगृहास मागे वेदी (Shrine) किंवा कोनाडा आहे.

त्यापुढे उत्तरेस ५.४९ मी. अंतरावर ७.१६ ते ७.७७ मी. रुंद आणि ५.०५ मी. लांब (खोल) अशा अतिशय अनियमित अशा एका लेण्याच्या उत्तर भिंतीस एक दालन आहे. दक्षिण भिंतीतही अर्धवट सोडलेले दालन (कक्ष) आहे. या लेण्याची एकही भिंत सरळ किंवा काटकोनात नाही. यात अतिशय ओबडधोबड आकाराची तीर्थंकराची पद्मासनातील मूर्ती असल्याने हे जैनांचे लेणे असावे. शासनाच्या पुरातत्त्व विभागाने यास समुहातील पाचवा क्रमांक दिला आहे.

लेणे क्र.३ : उपरोक्त लेण्याच्या थोडे पुढे गेल्यावर खडकात कोरलेल्या मोकळ्या दालनाचे आणि बहुधा पाणपोढीचे अवशेष दृष्टीस पडतात. येथेच टेकडीवर जाण्यासाठी सोपानमार्ग

५७. फर्ग्युसन, जेम्स ॲण्ड बर्जेस, जेम्स, **दि केव्ह टेंपल्स ऑफ इंडिया**, लंडन, १८८०; **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, १९७२ पृ.७६६-७३

असून तो पार केल्यानंतर वर २७.४३ मी. वर या समुहातील मुख्य व भव्य लेणे आहे. हे दुमजली आहे. प्रत्येक मजल्यावरील मंडपांची उभारणीही दोन-दोन भागात केलेली आहे. अनियमित आकाराचे (विथान) हे लेणे १५.२४ मी. खोल (लांब) व २१.३३ मी. रुंद आहे. यातील प्रत्येक मजल्यावरील मंडप एकमेकालगत असल्याने एकातून दुसऱ्यात प्रवेश करता येतो. लेण्यासमोरील प्रांगणात उत्तरेकडील अर्धमध्यात असलेल्या अष्टकोनी स्तंभाच्या स्तंभशीर्षावरील (Capital) नक्षीकाम झिजले असून त्याच्या शिरोभागी ३० सें.मी. लांबी-रुंदीचा एक खोल खळगा आहे. कैलास लेण्यातील स्तंभाप्रमाणे या स्तंभावरही त्रिशूल किंवा उजेडासाठी मशाल ठेवण्यासाठी ही योजना केली गेली असावी. तळमजल्यावरील उत्तरेकडील मंडपात ओबडधोबड चौरसाकृती १६ स्तंभ असून त्यातील सात स्तंभ वगळता इतर स्तंभांवरील स्तंभशीर्ष व त्यावरील तरंगहस्त झिजलेल्या स्थितीत आहेत. या मंडपात अगदी मागे गर्भमंदिर (shrine) असून त्याच्या वेदिकेभोवती प्रदक्षिणापथ खोदलेला आहे. गर्भमंदिराच्या मागील भिंतीवरील शिव, विष्णू व ब्रम्हाच्या मूर्ती असलेले शिल्प पुसट झाले आहे. त्यात मध्यभागी शिवमूर्ती असून तिचे शीर तुटलेले आहे. तिच्या उजव्या उर्ध्व हस्तात परशू व डाव्या उर्ध्व हस्तात लहानसे त्रिशूल असून दोन्ही अधोहस्त मांड्यांवर विसावलेले आहेत. या शिल्पातील ब्रम्हदेवाची मूर्ती त्रिमुखी आहे.

तळमजल्यावरील दक्षिणेकडील मंडप उत्तरेकडील मंडपापेक्षा १.९६ मी. इतका खालील पातळीवर खोदलेला असून त्यात उतरण्यासाठी सात पायऱ्यांचा सोपान आहे. या दक्षिणेकडील मंडपासमोरील वामनभिंतीस (पटल=Screen or low wall) दोन्ही बाजूस दोन स्तंभ असून वर भरभक्कम व्दारमाथा (lintel) आहे. आत उघडी ओवरी (veranda) आहे. त्यात दक्षिण बाजूस एक राकट व्दारपाल आहे. उत्तरेकडील व्दारपाल अर्थसंस्कारित आहे. दक्षिणेकडील हा मंडप म्हणजे बौध्द चैत्यगृहाची केलेली ढोबळ नक्कल होय. मंडपाच्या चारही कोपऱ्यात प्रत्येकी एक-एक चौकोनी स्तंभ उभारण्याची व त्याच्यामागे पाखा (aisle) करण्याची योजना होती असे दिसते, पण ही योजना पूर्णत्वास गेली नसल्याचे येथे दिसते. मागील देव्हाऱ्यात ओळखू न येण्याच्या स्थितीतील मूर्ती असल्या तरी त्या ब्रम्हा, विष्णू व महेशाच्या असाव्यात.

या लेण्याच्या पुढील बाजूस एक लहान शिवलिंग आहे. उत्तरेकडील तळमंडपाच्या डाव्या भिंतीत वरील (उर्ध्व) मजल्यावरील मंडपात जाण्यासाठी सोपानमार्ग आहे. या उत्तर उर्ध्व मंडपाला प्रत्येक बाजूस प्रत्येकी तीन स्तंभ आहेत. शिवाय मध्यभागी असलेल्या स्तंभावर उभे कंगोरे कोरलेले आहेत. उर्वरित स्तंभांना बाह्य बाजूने लागून असलेल्या पाखा अरुंद व ठेंगण्या आहेत. मंडपात मागील बाजूस गर्भमंदिर असून त्याच्या चारही कोपऱ्यांवर व्दारपालयुक्त चार मोठे चौरसाकृती स्तंभ आहेत. गर्भमंदिरात मध्यभागी विशाल आकाराचे शिवलिंग असून त्यासमोर जमिनीत पेटती मशाल ठेवण्यासाठी किंवा त्रिशूल ठेवण्यासाठी एक खळगा आहे.

दक्षिणेकडील प्रशस्त उर्ध्व मंडप ९.१४ x १६.४६ मी. लांबी-रुंदीचा आहे. याच्या प्रत्येक भिंतीच्या बाजूस प्रत्येकी चार स्तंभ असून त्यावर पेललेले छत सपाट व गर्भमंदिराच्या बाजूने उतरते आहे. मंडपात गर्भमंदिराभोवती प्रदक्षिणापथ आहे. परंतु आग्नेय बाजूची पडझड झाल्याने तो भाग ढिगाऱ्याने बुजलेला आहे. गर्भमंदिरात १.६८ मी. उंचीच्या विरुप (defaced) झालेल्या ब्रम्हा, विष्णू व महेशाच्या मूर्ती आहेत.

अनुक्रमणिका

या संपूर्ण लेण्याच्या गृहमुखाच्या (facade) वर उत्तर बाजूस शिल्प होते. पण ते झिजल्यामुळे ओळखता येत नाही. या गृहमुखावर उत्तर उर्ध्व मंडपाच्या बाहेरील भागात अनेक आकारहीन देवकोष्ठांमध्ये ओबडधोबड शैवशिल्प दिसून येते.

लेणे क्र.४ : लेणे क्र.३ च्या उत्तरेस १५.२४ मी. वर 'महादेव लेणे' म्हणून ओळखले जाणारे १८.२९ × १९.५१ मी. आकाराचे हे भव्य व प्रशस्त लेणे आहे. या लेण्याचे स्वरुप पुढे नंदीमंडप, मंडप आणि गर्भगृह किंवा गर्भमंदिर असे आहे. लेण्याचे गृहमुख १३.२६ मी. लांबीचे असून लेण्यास समोर वामनभिंत आहे. तिच्यामागे चार चौरसाकृती स्तंभ आहेत. या स्तंभांना वर निमुळत्या होत गेलेल्या स्तंभाधारांवर स्तंभशीर्ष आहेत. मंडपाच्या छतास प्रत्येक स्तंभावरील तीन अशा सहा स्तंभावलींनी आधार दिला आहे. लेण्यास गृहमुखाजवळ चार, मंडपात अठरा आणि गर्भमंदिरासभोवताली चार असे एकूण सव्वीस स्तंभ आहेत. गर्भमंदिर सर्वतोभद्र असून भोवताली प्रदक्षिणापथ आहे. गर्भमंदिराभोवतालच्या चारही स्तंभांमध्ये प्रत्येकाचा आकार खाली अष्टकोनी तळखडा, सोळा पन्हाळ्यांचा मध्यस्तंभ, वर जाड चौरसाकृती खंड आणि त्यावर स्तंभशीर्ष असा आहे. या स्तंभशीर्षाचा खालचा भाग शंखाकृती (conoidal) कपोताच्या सूचीखंडाचा (frantum fluted) असून वरील भाग काहीसा साध्या अष्टकोनी खंडाचा आहे.

लेण्यातील गर्भमंदिराचा आकार ४.८८ × ३.५५ मी. लांब-रुंद आणि २.४३ मी. उंच असून त्यास चारही बाजूने प्रवेशव्दारे आहेत. येथील शिवलिंग मोठे (०.९० मी उंच) असून त्याची शाळुंखा जमिनीपासून ०.६ मी. उंचीवर आहे. गर्भमंदिराच्या समोरच्या प्रवेशव्दारास दोन्ही बाजूस राकट व्दारपाल त्यांच्या हातातील गदेवर कललेले आहेत. हे व्दार वरील बाजूस निमुळते असून त्याच्या दोन्ही बाजूस अर्धस्तंभ आहेत. व्दारपालांच्या बाह्यबाजूस मानवी शीरधारी दोन विशाल नाग आहेत. त्यांच्या शेपट्या एका माणसाने आपल्या हातात पकडलेल्या असल्याने नागांची मस्तके खाली झुकली आहेत. व्दाराच्या खाली असलेल्या पायरीच्या प्रत्येक बाजूस व व्दारपालांच्या खाली हत्तीचे उठावशिल्प असल्याने व्दारपाल हत्तीच्या पाठीवर उभे असल्याचा भास होतो. गर्भमंदिराच्या दक्षिण व्दाराच्या बाजूस एक उंच दांपत्यशिल्प आहे. यातील पुरुष व्दारासमिप असून तो आपल्या हातातील भल्यामोठ्या गदेच्या बाजूने झुकलेला आहे. महिलेजवळ एक बटू परिचारक आहे. गर्भमंदिराच्या उत्तर व्दाराला लागूनही असेच दांपत्यशिल्प आहे, परंतु तेथे बटू परिचारक नाही.

या लेण्याच्या बाजूच्या भिंतीवर मोठाले शिल्पपट आहेत. त्यातील काही शिल्पे एवढी क्षतिग्रस्त झालेली आहेत की, ती ओळखताही येत नाहीत. धाराशीव लेणे क्र.१५ च्या व कैलास लेण्याच्या प्राकार भिंतीप्रमाणे या लेण्याच्या दक्षिण भिंतीवर वैष्णव व उत्तर भिंतीवर शैव कथात्मक शिल्पपट आहेत.[५८] कधीकाळी ही शिल्पे गिलाव्याने गुळगुळीत करण्यात आली होती. दक्षिणेकडील भित्तिस्तंभास लागून असलेल्या शिल्पपटांत गदा व तलवारधारी सैनिक युध्दपवित्र्यात उभे आहेत. त्याखालील शिल्पपटात दोन हत्ती आणि बऱ्याच विरुप झालेल्या मानवी आकृती आहेत. या शिल्पपटापलीकडे दोन मल्लांच्या कुस्तीपवित्र्यातील प्रतिमा आहेत. याखालील मोठ्या शल्पपटात एका मानवाने (बहुधा कृष्णाने) मानवी शीरधारी नागाची (कालियाची) जीभ डाव्या हाताने खेचली असून उजव्या हाती आसूड पकडले आहे. नागाच्या डोक्यावर पाच फणा आहेत. हात प्रार्थना स्वरुपात जोडलेले असून शेपटी वेटोळे घातलेल्या स्थितीत आहे. त्याच्या डाव्या बाजूस तशाच अवस्थेत नागाच्या

५८. जामखेडकर, अ.प्र., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर : महाराष्ट्र : इतिहास-प्राचीन काळ, खंड १, भाग २, **स्थापत्य व कला,** महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ.९८.

प्राणदानाची भिक्षा मागणारी नागीण आहे. यावरून हे शिल्प कालियामर्दन प्रसंगाचे असावे असे काहींचे मत आहे. या शिल्पातील खालील भागांतील प्रतिमा पुसट झालेल्या आहेत. या शिल्पपटाच्या वरील भागातील शिल्पपटात एक मानव एका घोड्याचे तोंड पकडून उभा आहे. बहुतेक हा घोड्याचे रुप घेतलेल्या केशी नामक राक्षसवधाचा प्रसंग असावा. दुसऱ्या एका दृष्यात एक मानव उजव्या हाताने एका बैलाचे मस्तक मुरगाळत आहे. त्यात त्याने बैलाचे मुसके व एक शिंग पकडलेले दर्शविले आहे. या दृष्यातील इतर आकृती ओळखता येत नाहीत.

याच भिंतीवर दुसऱ्या एका शिल्पपटात विष्णूचे वराह व वामन अवतार साकारलेले आहेत, तर भिंतीच्या पूर्वेकडील शेवटच्या बाजूस विष्णूच्या नरसिंहावतारातील हिरण्यकश्यप वधाचा प्रसंग साकारलेला आहे. यात नरसिंहाच्या दोन्ही उर्ध्व हस्तांमध्ये अनुक्रमे शंख व चक्र असून दोन्ही अधोहस्तांनी तो हिरण्यकश्यपाचे पोट फाडीत आहे. हिरण्यकश्यपाच्या डाव्या हातात ढाल व उजव्या हातात उगारलेली तलवार आहे. हे दृष्य सध्या भग्नावस्थेत आहे. याशेजारील शिल्पपटात विष्णूच्या कृष्णावतारातील दृष्य आहे. त्यात कृष्णाने गोवर्धन पर्वत उचललेला असून पर्वताखाली व्रज देशातील गाईंचा कळप आहे. गाईंचा आकार ओबडधोबड असून हा कळप नरसिंहावतार व कृष्णावतार या प्रसंगाच्या मधोमध आहे.

या भिंतीजवळून वळतांना डाव्या बाजूस लहानशा देवकोष्ठात मागे कार्तिकेय किंवा महासेन या युध्ददेवतेची प्रतिमा कोरलेली आहे.

या लेण्यातील प्रदक्षिणापथाच्या दक्षिण भिंतीवर भिंतीच्या शेवटापासून एका दालनापर्यंतच्या भागावर ३.६६ मी. लांबीचा शिल्पपट आहे. त्यात उजवीकडे अश्वारुढ रथावर दोन उंच धनुर्धारी धनुष्यास प्रत्यंचा लावून शरसंधानाच्या पवित्र्यात एकमेकालगत उभे आहेत. त्यांच्या मागे एक उंच मुकूटधारी व एक स्त्री आलिंगन अवस्थेत आहे. रथाचा सारथी तुलनेने खूपच लहान आहे. या दृष्याच्या वरील भागात सात धनुर्धारी व गदाधारी योध्दे असून त्यांच्या डाव्या बाजूस दोन प्रेक्षक दांपत्ये आहेत. हे प्रसंग रामायण वा महाभारतातील असावेत.

प्रदक्षिणापथाच्या पाठीमागील भिंतीत आणखी एक मोठा शिल्पपट असून त्यात सात मानवी प्रतिमा कोरल्या आहेत. त्यांच्यातील चार जण अवजड सामान वाहून नेत आहेत, तर एकजण एक स्तंभ उभारीत आहे किंवा काहीतरी अर्पण करीत आहे. त्याच्या पायाखाली आणखी एक जण दबा धरून बसला आहे किंवा हातापाया पडत आहे. या दृष्यात एक स्तंभ आहे व त्याच्या बाजूस दोन व्यक्ती आरामात पहुडलेल्या असून त्यांच्यामागे तीन मानवी प्रतिमा आहेत. त्यात दोन पुरुष व स्त्री प्रतिमा आहे. या दृष्याच्या डाव्या बाजूस वरील भागात चार पुरुष एका महिलेसह नृत्यमग्न आहेत. या दृष्याच्याही वर एका पहुडलेल्या माणसाची तीन परिचारिका सेवा करीत असल्याचे व त्याच्या पायाशी तीन पुरुष आशाळभूत नजरेने पाहत असल्याचे दृष्य आहे. या दृष्याच्या उजव्या बाजूस आणखी एक धनुर्धारी मोठ्या धनुष्यासह उभा असून जवळच उत्क्षेपावस्थेत (uplifted hands) बसलेली एक महिला आहे.

गर्भमंदिराच्या उत्तरेकडील व मागील भिंतीवर एक धनुर्धारी व दोन लढणाऱ्या मानवी प्रतिमा आरेखित केलेल्या आहेत. या दृष्याच्या वरील भागात पाच-सहाजण पूजा किंवा सविनय प्रार्थना करीत असल्याचे दृष्य आहे.

प्रदक्षिणापथाच्या उत्तरेकडील भिंतीवर भग्न व विरुप झालेल्या शिल्पसमुहात एक उंच पुरुष व चार स्त्रिया रेखीत केलेल्या आहेत. या दृष्याच्या पश्चिमेस एका लहान कक्षाचे प्रवेशव्दार असून त्याच्या डावीकडे समुद्रमंथनाचा एक मोठा शिल्पपट आहे. त्यात वासुकीच्या डोक्यास एका दैत्याने पकडले असून त्याच्या मदतीसाठी तीन दैत्य मागे उभे आहेत. शेपटीच्या बाजूकडील उभ्या असलेल्या सहा देवता प्रतिमांपैकी तिघांनीच वासुकीची शेपटी पकडली आहे. मंदार पर्वताच्या माथ्यावर ब्रम्हदेव व दुसरी एक चतुर्भूज देवता असून पर्वताखाली आधार देणारा विष्णू दर्शविला आहे. येथील एका उघड्या कक्षातही विष्णूसारखी मूर्ती आहे.

पूर्वी वर्णिल्याप्रमाणे या लेणीच्या उत्तरेकडील भिंतीवर शैव कथनात्मक शिल्पपट आहेत. त्यातील कैलास पर्वत उचलणारा रावण हे विशेष दृष्य म्हणून उल्लेखिता येईल. याच्या किंचित डाव्या बाजूस बसलेले शिवपार्वती, उभा नंदी व सभोवताली नाचगाण्यात मग्न अनेक शिवगण आहेत. शिवाच्या तांडव नृत्याच्या दुसऱ्या दृष्यात त्याच्या गुडघ्याजवळ पार्वती आणि पायापाशी काही लहान प्रतिमा आहेत.

लेणे क्र.६ : याचा विन्यास व शिल्पवैशिष्ट्यानुसार हे लेणे बदामीच्या तीन हिंदू लेणीसारखेच असल्यामुळे याचा निर्माणकाळही तोच असावा. त्यामुळे हे लेणे सहाव्या शतकाच्या उत्तरार्धातील असावे असे ढोबळमानाने सांगता येईल. तथापि, ज्या प्रस्तरात ते खोदले आहे, त्यातील अपरिष्कृत भौतिक सामग्रीमुळे (coarse material) त्याचा तंतोतंत निर्माणकाळ ठरविणे कठीण आहे.

महादेव लेणीच्या किंचित उत्तरेस असलेल्या एका अपूर्णावस्थेतील कक्षवजा लेणीपासून १८.२५ मी. अंतरावर 'लाकोलाचे लेणे' म्हणून ओळखले जाणारे हे लेणे आहे. सहा पायऱ्या चढून या लेणीत प्रवेश करता येतो. लेणीस समोर चार व आत २४ स्तंभ आहेत. हे सर्व स्तंभ चौरसाकृती (२ चौ. फूट) आहेत. हे लेणे १२.५० ते १४.९३ मी. रुंद व प्रदक्षिणापथाच्या मागील भिंतीपर्यंत १७.६८ मी. व ३.१४ मी. उंचीचे आहे. समोर वामनभिंत असून मंडपात उतरण्यासाठी चार पायऱ्यांचा सोपान आहे.

या लेणीतील दक्षिणेकडील एका दालनात मागील भिंतीवर पाच स्त्री प्रतिमा, डाव्या भिंतीवर एक पुरुष व एक स्त्री प्रतिमा आणि उजवीकडील भिंतीवर गणपती आणि एक पुरुष प्रतिमा असून ते सर्व नृत्यमग्न आहेत. यातील मागील भिंतीवरील एक मानवी प्रतिमा अश्वमुखी आहे. याच दिशेच्या मागील कक्षात एक विरुप झालेली व्दिभूज पुरुष प्रतिमा आहे.

गर्भमंदिरात असलेली १.८२ मी. उंचीची चतुर्भूज विष्णूमूर्ती येथील दगडापेक्षा वेगळ्या दगडात घडविलेली असल्याने ती दुसरीकडून आणून येथे प्रतिष्ठापित केलेली दिसते. मूर्तीच्या डावीकडील उर्ध्व हस्तात चक्र व अधोहस्तात शंख असून उजवीकडील उर्ध्व हस्तात मोठी गदा व अधोहस्तात काहीतरी गोलाकार वस्तू आहे. कदाचित ते सुदर्शन चक्र असावे. विष्णूने उंच मुकूट परिधान केलेला असून त्याचे तेजस्वीपण दर्शविण्यासाठी मागील बाजूस प्रभावळ कोरलेली आहे.

या लेणीच्या उत्तर बाजूस असलेल्या सोपान मार्गाने पुढील दुसऱ्या लेणीत उतरता येते. त्यात चार स्तंभ व बाजूस भित्तिस्तंभ आहेत. हे स्तंभ भग्न पावले आहेत. हे लेणे ६.४ मी. रुंद व ७.०१ मी. लांब असून त्याच्या मागील भिंतीत लहान देव्हारा आहे. या लेणीच्या दुतर्फा भग्नावस्थेतील गवाक्षजाले आहेत.

उपरोक्त लेणीच्या वरील बाजूस दोन दालनवजा लेणी असून त्यातील एकात भिंतीवर ओबडधोबड कोरलेला गणपती आहे, तर मागील भिंतीत लहान वेदी आहे.

या दोन्ही लेणींच्या मधील जागेत एका हत्तीने संपूर्ण खडक उचलल्याचे दर्शविण्याची योजना असावी, परंतु हे काम अर्धवट सोडून दिलेले दिसते. यापुढील लेणे बहुधा मोठे असावे. त्याचे संपूर्ण छत कोसळल्याने आकाराचा अंदाज येत नाही, शिवाय मागील भिंतीच्या खोदकामातील अनियमिततेमुळे ते अर्धवट सोडून दिलेले असावे.

या लेणीच्या उत्तर बाजूस आणखी एक कमी उंचीचे लेणे आहे. त्याच्या मंडपात महादेव लेणीतील स्तंभांप्रमाणे दोन अष्टकोनी स्तंभ आहेत. मंडप ५.१८ मी. रुंद व ७.०१ मी. लांब आकाराचा असला तरी गर्भमंदिराच्या मागील प्रदक्षिणामार्ग मात्र १०.६१ मी. लांबीचा आहे. हे लेणे अतिशय अनियमित आकाराचे असून गर्भमंदिराची आतील बाजू २.२५ चौ.मी. आहे. त्यात छिन्नविछिन्नावस्थेतील विष्णुमूर्ती आहे.

टेकडीच्या कड्याच्या (scarp) वर तीन-चार दालनवजा लेणी आणि लहान गर्भमंदिरे आहेत. यानंतर येथे समोरील बाजू ७.७७ मी. व पाठीमागची बाजू १३.२८ मी. रुंद असलेले आणि ९.३० मी. लांबीचे व २.५९ मी. उंचीचे एक लेणे आहे. त्याला समोर पहिल्या रांगेत दोन स्तंभ व दोन भित्तिस्तंभ, दुसऱ्या रांगेत दोन स्तंभ आणि शेवटच्या तिसऱ्या रांगेत चार स्तंभ आहेत. या लेणीच्या मागील भिंतीस लागनू २.४३ चौ.मी. आकाराचे गर्भमंदिर आहे. येथे प्रदक्षिणापथ नसून लांबुळक्या वेदीवर नंतर केव्हातरी कठीण दगडाचे शिवलिंग प्रतिष्ठापित केलेले आहे. या लेणीत उत्तरेकडे आणखी दोन कक्ष असून दुसऱ्या कक्षात दक्षिणेकडील भिंतीत गणेश आणि महिषासूरमर्दिनीची प्रतिमा कोरलेली आहे.

पूर्वोक्त महादेव लेणे व क्र.३ च्या दुमजली लेण्यासमोर टेकडीच्या चढावावर भग्नावस्थेतील सात-आठ एकाश्म मंदिरे आहेत. त्यातील काही शैव व काही वैष्णव आहेत.

टेकडीच्या उत्तर टोकाच्या परिक्षेत्रात सुमारे चाळीस लहान-लहान एकाश्म मंदिरे आहेत. त्यातील काहींना समोर गृहमुखे आहेत. तेथील शिल्पावरून ती लिंगायत पंथाच्या उदयाआधीची असावीत असे अनुमान काढता येते. ती बहुधा वर लिहिल्याप्रमाणे बदामीच्या चालुक्य काळातील असावीत.

या लयनसमुहातील शैव व वैष्णव लेणींना त्यांचे तलविन्यास, वास्तुशास्त्रीय वैशिष्ट्ये, निरनिराळे देव व देवतामूर्तीची मूर्तिशास्त्रीय वैशिष्ट्ये इत्यादी बाबींमुळे ब्राम्हणी लयनस्थापत्यात महत्त्वाचे स्थान आहे. तथापि, प्रस्तराच्या ठिसूळ आणि सच्छिद्र स्वरुपामुळे या लेण्यांच्या स्थपतींवर आणि शिल्पकारांवर अनेक मर्यादा पडल्या असाव्यात हे उघड आहे.[५९] शासनाने या लयनसमुहास राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा दिलेला आहे.

याच टेकडीच्या माथ्यावर नंतर संत सावता माळी मंदिर, परिपाशा दर्गा व रेणुकादेवी मंदिर बांधण्यात आले आहे. यापैकी रेणुकादेवी मंदिरास भूकंपात हानी पोहोचल्याने त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. या मंदिरासमोर दोन दीपमाळा आहेत. येथे नवरात्रीत यात्रा भरते.

---

५९. जामखेडकर, अ.प्र., पूर्वोक्त, **महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर**, पृ.९८.

खरोसापासून उत्तरेस १५ कि.मी. अंतरावर हसेगाव नामक खेड्याजवळील एका टेकडीच्या पूर्व बाजूस दोन विशाल गुंफा खोदलेल्या होत्या. पश्चिमेकडील बाजूसही १४.९३ x १२.५० मी. आकाराच्या एका विशाल गुंफेमध्ये गर्भगृह व प्रदक्षिणापथ होता मंडपात प्रत्येक रांगेत चार अशा तीन स्तंभरांगा होत्या. सध्या या टेकडीतील सर्व गुंफांची संपूर्णत: पडझड झालेली आहे.

गणेशवाडी

गणेशवाडी : [६०] (ता.शिरुर-अनंतपाळ, १८° २०' ते २५' उ., ७६° ४५' ते ५५' पू.) : हे खेडेगाव तेथील केशवभारतींची समाधी, शिवमंदिर व तेथे आढळलेल्या प्राचीन शिलालेखांसाठी प्रसिध्द आहे.

केशवभारती यांच्या समाधीजवळील एका शिळेवर एकूण तीन लेख कोरलेले आहेत. त्यापैकी दोन लेख चालुक्य नृपति विक्रमादित्य सहावा याचे असून तिसऱ्या लेखात राजवंशाचा उल्लेख नाही.

गणेशवाडी या स्थलनामाची व्युत्पत्तीच तेथील हेरंब किंवा गणेश मंदिराच्या नावातून झालेली आहे. गणेशवाडी हे चालुक्य काळात पाशुपत शैव पंथाचे या भागातील महत्त्वाचे पीठ होते. या पंथाच्या पर्वतावली आम्नायाच्या 'शिवलिंगी संतान' शाखेच्या अनुयायांचे तेथे वास्तव्य होते. पाशुपत पंथाच्या कालमुख उपपंथातील पर्वतावली आम्नायाचे मुख्य पीठ आंध्रप्रदेशातील श्रीशैल मल्लिकार्जून हे असून गणेशवाडी येथे त्याची शाखा होती. ती 'शिवलिंगी सन्तान' म्हणून ओळखली जात असे. यावरुन गणेशवाडी हे शिवलिंगी सन्तानाचे मुख्य पीठ असल्याचे स्पष्ट होते. या पंथाच्या गणेशवाडी येथील पाठशाळेच्या संचालनासाठी शैव आचार्यांची नियुक्ती करण्यात आल्याची नोंद या लेखात केलेली आहे.[६१]

उपरोक्त शिलालेखांमधील चालुक्य नृपति विक्रमादित्याचा पहिला लेख शिळेच्या डाव्या बाजूस असून तो संस्कृत भाषेत व देवनागरी लिपीमध्ये कोरलेला आहे. हा लेख २४ वे शासनवर्ष, शके १०२१ प्रमाथी संवत्सर, मार्गशीर्ष पौर्णिमा, सोमवार[६२], चंद्रग्रहण, बुधवार (३० नोव्हेंबर १०९९) या तिथीचा आहे.

व्यक्तिनामे : या लेखात त्रिभुवनमल्लदेव (विक्रमादित्य) - चालुक्य नृपति, भीमनाथ - दान देणारा महाप्रधान दंडनायक, तत्पुरुष पंडित - दान स्वीकारणारा ब्राम्हण, क्रियाशक्ति पंडित - तत्पुरुष पंडिताचा गुरू व वादिरुद्र पंडित - क्रियाशक्ति पंडिताचा गुरू या व्यक्तिनामांचा उल्लेख आहे.

ग्रामनामे : वरील व्यक्तिनामांबरोबरच कल्याणपूर - कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील सध्याचे कल्याणी, पिप्पलग्राम - निलंगा तालुक्यातील हिप्पळगाव, शिलाकरग्राम - हिप्पळगावच्या नैऋत्येकडील ६.४ कि.मी. वरील सध्याचे सलगर गाव (असावे) व शुष्कग्राम - हिप्पळगावाजवळील सूगाव (असावे) या ग्रामनामांचा उल्लेख आहे.

---

६०. देव, शां. भा., पूर्वोक्त, पृ.१३७-३९.

६१. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ,** पृ.१५९.

६२. डॉ.वि.भि.कोलते यांच्या मते बुधवार हा वार बरोबर आहे. पिल्ले जंत्रीनुसारही गत शक १०२१ प्रमाथी संवत्सराच्या मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेला बुधवार येतो. त्यामुळे शिलालेखातील कालनिर्देश वाराच्या दृष्टिने बरोबर ठरत नाही. 'सोमवार' ऐवजी या ठिकाणी 'सौम्यवार' असा शब्द असावा व कोरकाने तो चुकीने 'सोमवार' असा कोरला असावा. डॉ.वि.भि.कोलते, पूर्वोक्त, **महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख,** पृ.१५५

उद्देश : चालुक्य नृपति विक्रमादित्याकडून त्याचा महाप्रधान दंडनायक भीमनाथ याने पिप्पलग्राम (सध्याचे हिप्पळगाव) हे गाव मिळवून तेथे भीमसमुद्र सरोवराच्या काठावर ब्रम्हा, विष्णू, महेश्वरादी देवतांची देवालये बांधली. त्यांच्या पूजे-अर्चेसाठी व तेथील सरस्वती मंडपातील तपस्वी आणि विद्यार्थी यांच्या उदरनिर्वाहाच्या सोयीसाठी पिप्पलग्राम येथील ५०० निवर्तने भूमी या मंदिरांसाठी दान देण्यात आली. तसेच तेथे पाशुपतपंथीय पीठ स्थापन करून त्याच्या व्यवस्थेसाठी तत्पुरुष पंडित नामक शैव आचार्याची नेमणूक करण्यात आली. त्याचप्रमाणे भीमेश्वर देवाच्या 'पुरुविधानार्थ' गावात राहण्यासाठी जागा दिली अशा बाबी नमूद करणे हा या लेखाचा उद्देश आहे. या आचार्याने व याच्या उत्तराधिकाऱ्यांनी गणेशवाडी येथे पाठशाळा स्थापन केली. त्यामुळे अल्पावधीत हे एक प्रमुख शैव पीठ व शैक्षणिक केंद्र बनले.[६३]

चालुक्य नृपति विक्रमादित्य सहावा याचा दुसरा लेख संस्कृत भाषेत असून तो आजच्या देवनागरी लिपीच्या वळणाला जुळणाऱ्या नागरी लिपीत आहे. हा लेखही पहिल्या लेखाच्याच तिथीचा आहे.

व्यक्तिनामे : यात त्रिभुवनमल्लदेव (विक्रमादित्य) - चालुक्य नृपति, भीमनाथ- आत्रेय गोत्री ब्राम्हण महाप्रधान, वल्लभट्ट - भीमनाथाचा पिता, शियुभट्ट - वल्लभट्टाचा पिता, आदित्यभट्ट - शियभट्टाचा पिता, जयावती-वल्लभट्टाची पत्नी व भीमनाथाची माता, जोगलदेवी किंवा जोगवा - भीमनाथाची पत्नी व कालिदास - दंडनायक, प्रशस्तीचा लेखक व भीमनाथाचा पुत्र या व्यक्तिनामांचा उल्लेख आहे.

ग्रामनामे : या लेखात मेघकर - बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर, पिप्परिकखेट- मेहकरच्या नैऋत्येकडील पिंपरखेड (असावे), नांदीतट - नांदेड, वाग्धिका - नांदेडच्या पश्चिमेस सहा कि.मी. वरील वाघी, भुवनाचल - ओळख पटत नाही, शिवपुर - गोदावरी व कौम नदीच्या उत्तरेस सहा मैलांवरील शिवपूर किंवा नांदेड जिल्ह्यातील शिवपुरी (असावे), मुरंबिका - उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील मुरुम किंवा नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील मुरंबी हे गाव (असावे), कल्याणपुरी - बिदर जिल्ह्यातील हुमणाबाद तालुक्यातील कल्याणी, कल्लुंबर - कंधार तालुक्यातील आजचे कलंबर हे गाव (असावे) व पिप्पलग्राम - निलंगा तालुक्यातील हिप्पळगाव (असावे) या ग्रामनामांचा समावेश आहे.

उद्देश : यात महाप्रधान भीमनाथ याची प्रशंसा केलेली असून त्याच्या धर्मकृत्याचे वर्णन केले आहे. याच शिळेवरील तिसऱ्या लेखात राजवंश वा राजाचा उल्लेख नाही. हा संस्कृत भाषेतील लेखही नागरी लिपीत आहे. यात वादिरुद्र - शिवलिंगी संतानातील सर्वश्रेष्ठ, क्रियाशक्ति पंडित - वादिरुद्राचा शिष्य, त्रिलोचनार्य पंडित - क्रियाशक्ति पंडिताचा धाकटा भाऊ, तत्पुरुष पंडित - क्रियाशक्ति पंडिताचा दुसरा भाऊ व शिष्य आणि श्रीकंठमुनी या व्यक्तिनामांचा उल्लेख आहे. सात शिवलिंगी संतानातील काही आचार्यांची वर्णने आली आहेत.

---

६३. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ**, पृ.१५९.

उद्देश : लेखाचा मुख्य उद्देश पिप्पलग्राम येथे भीमनाथाने बांधून दिलेल्या मंदिरातील आचार्य तत्पुरुष पंडित याची गुरूपरंपरा वर्णन करण्याचा आहे.

येथेच भव्य असे शिवमंदिर असून ते इ.स.१३ ते १४ व्या शतकातील असावे. मूळचे हे हेरंब गणेशाचे मंदिर. पण त्यात शिवलिंगाची स्थापना करून त्यास शिवालय बनविण्यात आले आहे. सध्या हे मंदिर केवळ गर्भगृह व अंतराळ या स्वरुपात शिल्लक आहे. या मंदिराचा सभामंडपही आज अस्तित्वात नसून त्या जागी पत्र्याचा मंडप उभारलेला आहे. अंतराळास एक प्रवेशव्दार असून त्यालगतच जालवातायन (खिडकी) आहे. मुळात हे मंदिर कदाचित त्रिदल मंदिर असावे.

या मंदिराच्या गर्भगृहाच्या प्रवेशव्दाराजवळ चंद्रशिळा आहे. हे प्रवेशव्दार पद्मपत्र, मनुष्य, स्तंभ, व्याल व कमलवेल असे मालिनी वर्गातील पंचशाखी आहे. व्दाराच्या वरील भागावर गंधर्व व ललाटावर गणेश आहे. सेवकांमध्ये कलशधारिणी, चौरीधारिणी, शैवव्दारपाल व त्याची पत्नी असून त्यानंतर इतर पुरुष सेवक नजरेस पडतात. खालील बाजूस सिंह व गजप्रतिमा, मंडारकावर पुरुष प्रतिमा तसेच बाजूस कीर्तिमुख आहे. प्रवेशव्दाराच्या वर उत्तरंग शिळेवर प्रतिमायुक्त पाच लहान देवकोष्ठे आहेत.

पूर्वी वर्णिल्याप्रमाणे पाशुपत शैव पंथाच्या पर्वतावली आम्नायाची गणेशवाडी येथील पाठशाळा या हेरंब मंदिरात भरविली जात असे. या पाठशाळेत शिकणाऱ्या शिष्य व आचार्यांच्या उदरनिर्वाहासाठी सेनापती भीमाने गणेशवाडी येथील भूमी दान दिल्याची व त्या भूमीच्या जलसिंचनासाठी तसेच तेथे स्थायिक असलेल्या आचार्य व शिष्यांच्या दैनंदिन उपयोगासाठी आपल्या नावावर भीमसमुद्र नामक जलाशय बांधल्याची नोंदही प्रस्तुत शिलालेखात करण्यात आलेली आहे. गणेशवाडी या स्थलनामाची व्युत्पत्ती याच मंदिराच्या नावातून झालेली आहे. या पाठशाळेस लागून त्रैपुरुष देवतांची मंदिरे बांधण्यात आल्याची माहितीही या शिलालेखात आहे. हेरंब मंदिरात भरविण्यात येणाऱ्या पाठशाळेचे नाव 'सरस्वती मंडप' असे होते. या मंडपाचा कुलपती असलेल्या तत्पुरुष पंडिताची व त्याच्या पूर्वाचार्यांची प्रशस्ती वरील तीनपैकी एका लेखात करण्यात आलेली आहे. सरस्वती मंडप नामक ही पाठशाळा निवासी शिक्षण संस्था होती.

यापूर्वी वर्णन केलेल्या शिलालेखाच्या ईशान्येस नैसर्गिकरित्या उपलब्ध असलेल्या पाणलोट क्षेत्रातील पाणी कल्पकतेने अडवून 'भिमतडाग' किंवा 'भीमसमुद्र' नामक प्राचीन जलाशयाची निर्मिती करण्यात आली होती. जलसिंचन आणि दैनंदिन वापरासाठीच्या पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात आलेल्या धरणांचे तत्कालिन स्वरुप कसे होते याचे उदाहरण म्हणजे विक्रमादित्य सहावा याचा सेनापती भीमनाथ याने बांधलेला हा जलाशय होय. दोन नैसर्गिक टेकड्यांच्या मधोमध दगडी भिंत उभारून बनविलेले हे धरण आता आतील बाजूस गाळाने बुजलेले असले तरी भिंतीचे अवशेष आजही येथे स्पष्टपणे दिसतात. येथील दुष्काळी कामात हीच भिंत तोडून तेथे पाझर तलावासाठी मातीचा बंधारा बांधण्यात आला आहे. या जलाशयामध्ये आजुबाजूच्या शिवारातील पाणी जमा होते. अशाच प्रकारचा जलाशय भीमनाथाने कलुंबरक (कलंबर, ता.कंधार, जि-नांदेड) येथेही निर्माण केल्याची नोंद उपरोक्त शिलालेखात आहे. वर वर्णिलेले हेरंब मंदिर याच भीमसमुद्राच्या काठावर उभे आहे. एका बाजूला हेरंब मंदिर आणि दुसऱ्या बाजूला नैसर्गिक टेकडीवर चामुण्ड मंदिर होते.

गंगापूर

गंगापूर : [६४] (लातूर ता.,१८° २०' उ., ७६° ३०' ते ५५' पू.) : लातूरच्या वायव्येस नऊ कि.मी. अंतरावरील या खेडेगावात येथील ग्रामदेवता गंगादेवीचे हेमाडपंती मंदिर असून याच देवीच्या नावावरून या गावास 'गंगापूर' नाव पडल्याचे येथे सांगितले जाते. मंडप व मंडपास जोडलेली मुख्य गर्भगृहासहीत तीन गर्भगृहे असा या मंदिराचा तलविन्यास असून मंदिर ७.६२ x ६.१० मी. आकाराचे आहे.

मंडप : मंडपात कोरीवकामयुक्त चार स्तंभ व दोन्ही बाजुच्या भिंतीत प्रत्येक दोन भित्तिस्तंभ आहेत. मंडपात दोन्ही बाजुस असलेल्या देवकोष्ठांपैकी डाव्या देवकोष्ठामध्ये खंडोबा, तर उजवीकडील देवकोष्ठात नृसिंह विराजमान आहे. मंडपाच्या दोन्ही बाजूस असलेल्या उपगर्भगृहांमध्ये कोणत्या मूर्ती होत्या याचा बोध होत नाही. सध्या उभय उपगर्भगृहे बरीचशी बुजविलेली आहेत. दोन्ही उपगर्भगृहांचे प्रवेशव्दार प्रत्येकी दोन रेखीव स्तंभांने सुशोभित आहे. मंडपाचे छतही भौमित्तिक नक्षीने सजविलेले आहे. भूकंपात या मंदिरास, विशेषत: मंडपास हानी पोहोचल्याने त्याच्या प्रवेशव्दारी असलेल्या स्तंभांना सलग्न भिंत उभारून त्यायोगे मंडपाच्या छतास आधार दिला गेल्याने हे स्तंभ सध्या मंडपातूनच दिसू शकतील अशा भित्तिस्तंभात रुपांतरित झाल्याचे दिसते.

गर्भगृह : मुख्य गर्भगृहाच्या प्रवेशव्दाराच्या डाव्या बाजूस साधारणत: जमिनीपासून काहीशा उंचावर असलेल्या शिल्पपटावर गणेश व सुरसुंदरींची उठावशिल्पे कोरलेली आहेत, तर उजव्या बाजूस मंदिरवजा देवकोष्ठात विष्णूच्या वराह अवताराची सूबक मूर्ती आहे. अशी मूर्ती सहसा कोणत्याही मंदिरात दृष्टीस पडत नाही. गर्भगृहाच्या व्दारशाखा मनोहारी कोरीवकामाने अलंकृत आहेत. आत पारंपारिक शिवलिंग असून गंगादेवीची मूर्ती मात्र गर्भगृहाबाहेर आहे. मंदिरास बाहेरील बाजूने असलेले उभे कंगोरे लक्ष वेधून घेतात. मंदिराच्या शिखराची स्थानिक रहिवाशांनी डागडुजी केल्याने याचे मूळ स्वरुप लुप्त झाले आहे. नंदी मात्र मंदिराबाहेर एका उंच चबुतऱ्यावर आहे. वास्तविक तो मंडपात असणे स्वाभाविक होते. कदाचित नंतर कधीतरी त्याची स्थापना मंदिराबाहेर करण्यात आली असावी. एप्रिल-मे महिन्यात गंगादेवीचा १५ दिवस वार्षिक जत्रोत्सव साजरा केला जातो.

चिंचोली बल्लाळनाथ

चिंचोली बल्लाळनाथ : (ता.लातूर, १८° ००' ते ४०' उ., ७६° ००' ते ४५'पू.) : लातूरच्या वायव्येस १८.४ कि.मी. अंतरावर वसलेल्या या गावात भैरवनाथाचे प्राचीन मंदिर आहे. मंदिराभोवतालचे १८.२९ x १२.१९ मी. क्षेत्र दगडी भिंतीने बंदिस्त असून या प्रांगणात हे ४.५७ x ३.०५ मी. आकाराचे पक्क्या घडीव दगडाचे मंदिर आहे. मंडपातील नंदी

६४. प्रत्यक्ष सर्वेक्षणावर आधारित.

कलात्मकतेने साकारलेला आहे. गर्भगृहात भैरवनाथाची काळ्या पाषाणातील एकसंघ मूर्ती असून बाजूस शिवलिंगही आहे व या दोहोंमध्ये संगमरवरी चबुतऱ्यावर चांदीच्या पत्र्याने मढवलेल्या पादुका स्थापित केल्या आहेत. मंदिर प्राचीन असले तरी प्राचीन स्थापत्यशास्त्रीय वैशिष्ट्ये फारशी दिसत नाहीत. श्रावणातील प्रत्येक सोमवारी येथे भक्त गणांची गर्दी होते. चैत्र वैद्य अष्टमी व कार्तिक वद्य अष्टमीला येथे जत्रा भरते.

गावात याव्यतिरिक्त सत्यदेवी, राममंदिर, दत्तमंदिर, विठ्ठल मंदिर, महादेव मंदिर व हनुमान मंदिरही आहे.

डोंगरशेळकी

डोंगरशेळकी : (ता.उदगीर, १८° २५' उ., ७६° ०५'पू) : उदगीरच्या उत्तरेकडील १२ कि.मी. अंतरावरील या गावास स्थानिक संत धोंडूतात्या यांच्या समाधिमंदिरामुळे प्रसिध्दी मिळाली आहे. आपल्या आयुष्यातील अखेरची ५-१० वर्षे ते याच गावी राहिले व येथेच त्यांचे निर्वाण झाले. त्यांच्या स्मरणार्थ सन १९३२ मध्ये प्रथम छोटे समाधिमंदिर व सभामंडप बांधला. त्यानंतर १९८९ मध्ये मोठा सभामंडप बांधण्यात आला. आधुनिक बांधकाम प्रकारातील या पूर्वाभिमुख मंदिराचे काही बांधकाम दगडी, तर काही सिमेंट-कॉंक्रिटने केलेले आहे. मंदिरातील समाधीच्या डावीकडे रुद्राक्षमालाधारी धोंडूतात्यांची संगमरवरी आकर्षक मूर्ती आहे. मंदिरास शिखरही आहे. मंदिराच्या उत्तरेस पर्यटक व भाविकांच्या कार्यक्रमांसाठी असलेल्या मोठ्या प्रांगणात व्यासपीठ बांधण्यात आलेले आहे.

मंदिराच्या प्रवेशव्दारासमोर आधुनिक स्थापत्याचे, वैशिष्ट्यपूर्ण पश्चिमाभिमुख सूर्यमंदिर असून त्यातील उंच चबुतऱ्यावर संगमरवरी सूर्य मूर्ती आहे. धोंडूतात्या हे सूर्योपासक असल्याने सन १९९९ मध्ये हे मंदिर बांधण्यात आले. या मंदिरावर चौस्तरीय उत्फुल्ल कमळाकृती शिखर व कळस आहे. शिखराच्या उजव्या कोपऱ्यावर संत ज्ञानेश्वर, तर डाव्या कोपऱ्यावर संत तुकारामाची मूर्ती आहे.

या मंदिरालगत हनुमान मंदिरही आहे. याचेही शिखर पंचस्तरीय उत्फुल्ल कमळाकृती असून शिखरास असलेल्या देवकोष्ठांमध्ये विविध देवतामूर्तींची योजना केलेली आहे.

तळीखेड

तळीखेड : (ता.निलंगा, १८° ०५' उ., ७६° ४५'पू.) : निलंग्याच्या पूर्वेस १४ कि.मी. अंतरावरील या खेडेगावी १३ व्या शतकातील हेमाडपंती शिवमंदिर आहे. जटाशंकर अथवा सोमेश्वर मंदिर या नावाने ते ओळखले जाते. या मंदिराचा तलविन्यास बलसाने येथील महादेव मंदिर अथवा निलंग्याच्या नीलकंठेश्वर मंदिराप्रमाणे व्दारमंडप, मंडप, मंडपाच्या दोन्ही बाजूस दोन उपगर्भगृहे, अंतराळ व मुख्य गर्भगृह असा त्रिगर्भी प्रकारातील आहे. हे मंदिर उत्तराभिमुख आहे. मंडपात कोरीवकामयुक्त चार स्तंभांची चतुष्की असून त्यावरील करोटक पध्दतीच्या छतास मध्यभागी उत्फुल्ल पुष्पाकृती आहे. मंडपात विष्णू, दत्त, वराह-अवतार, नरसिंह अवतार, अर्धनरनारी-नटेश्वर, उमामहेश, मातृकापटासारखा ११ प्रतिमांचा उभा पट, लक्ष्मी-विष्णू, मोदक गणेश, पार्वतीचे एकीभूत शिल्प व शेषशायी विष्णू अशी मूर्तिशिल्पे आहेत. मंडपाच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण भिंतीत आतील बाजूस रिकामी देवकोष्ठेही आहेत.

अनुक्रमणिका

मंडप व मुख्य गर्भगृहाच्या मध्ये अंतराळ आहे. यात दोन्ही बाजूस प्रत्येकी एक देवकोष्ठ आहे. मुख्य गर्भगृहात शिवलिंग आहे. मंडपाच्या डाव्या बाजुकडील उपगर्भगृह जमीन पातळीपेक्षा खाली असल्याने त्यात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. यातही शिवलिंग व त्यासमोरील अंतराळात नंदी आहे.

मंदिरावर उभ्या पन्हाळ्यांचे पंचस्तरीय शिखर असून त्याच्या खालील स्तरात देवकोष्ठे आहेत. मंदिरासमोर तीन उभी नागशिल्पे, तीन वीरगळ, गजलक्ष्मी, गणेश, कोरीव कमल व सतीशिळेवर कानडी किंवा तेलुगू भाषेतील शिलालेख आहे. त्याचा बराच भाग घासलेला असल्याने तो अद्याप वाचला गेला नाही.

मंदिर परिसरात अन्य मंदिरांचे अवशेष असून अन्य काही मूर्तिशिल्पे पहावयास मिळतात. त्यात एकादशरुद्र हे विशेष शिल्प आहे. त्यात एका शिलेवर ११ रुद्र असून समभागात उभ्या स्थितीत चतुर्भूज शिवप्रतिमा आहेत.[६५]

देवर्जन

देवर्जन : (ता.उदगीर, १८° २०' उ., ७६° ५५'पू.) : उदगीरच्या नैऋत्येस २५ कि.मी. अंतरावरील या गावात 'हत्तीबेट' नामक टेकडी असून त्यावर काही लेणी, गंगाराम महाराज नामक सत्पुरुषाची समाधी व टेकडीच्या उतारावर खोदकाम करून तेथे स्थानिक ग्रामस्थांनी बांधलेली छोटी-छोटी मंदिरे आहे.

लेणी असलेल्या खरोसा येथील टेकडीप्रमाणे ही टेकडीही ठिसूळ व सच्छिद्र अशा जांभा दगडाची आहे. या टेकडीवर पश्चिमेकडील उतारावर स्थानिक ग्रामस्थानी अंदाजे २५ मी. खोल विहीरवजा खड्डा खोदून गोल जिन्याप्रमाणे त्यात उतरण्यासाठी पायऱ्या तयार केल्या आहे. त्यात सध्या खड्ड्याबाहेर असलेल्या पाताळेश्वर शिवलिंगाची स्थापना करण्याची व खड्डयातील पाणी पश्चिमेकडील उतारावर गोमुख बसवून त्यातून ते बाहेर काढण्याची योजना आहे. त्यायोगे गावात एक आकर्षण निर्माण करण्याचा ग्रामस्थांनी स्तुत्य प्रयत्न केल्याचे जाणवते. या खड्ड्याच्या प्रवेशव्दारी डाव्या बाजूस असलेल्या पश्चिमाभिमुख दोन लहान गुंफांपैकी एकात छोटेसे मारुती मंदिर व दुसऱ्यात दत्तमंदिर आहे.

या टेकडीच्या दक्षिण बाजूकडील उतारावर दोन शैलगृहे असून त्यातील एकात 'गंगाराम महाराज' नामक सत्पुरुषाची साधीशी समाधी आहे. बाजूच्या दुसऱ्या शैलगृहात मागील भिंतीवर तीन फूट उंचीची शेषशायी विष्णूमूर्ती व त्याच्या उजव्या बाजूस गरुडमूर्ती कोरण्यात आली आहे. या लेण्याचे छत साधे व नक्षीविरहित असून ते तीन स्तंभ व दर्शनी भिंतीतील दोन भित्तिस्तंभावर आधारित आहे.

या टेकडीच्या पूर्वेकडील पायथ्याशी असलेल्या हत्तीच्या अर्धवट आकाराच्या एका खडकावरून या टेकडीस 'हत्तीबेट' असे नाव पडले असावे. या टेकडीच्या माथ्यावरही दक्षिण टोकास 'सीतेचे न्हाणीघर' नामक एक चौरसाकृती खड्डा व एक भुयारी खड्डा आहे. या खड्ड्यातून गावाबाहेर जाणारा, पण सध्या बुजलेला एक भुयारी मार्ग होता असे येथे सांगितले जाते.

६५. व्यास, प्रकाशचंद्र, "निलंगा तालुक्यातील ऐतिहासिक ठेवा", **शारदीय**, पूर्वोक्त, पृ.८२-८६. तथापि, माया शहापूरे यांनी "लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील शिल्पकला आणि वास्तुकला" या आपल्या पीएच.डी.च्या शोधप्रबंधात प्रथम एकादशरुद्र शिल्पाची नोंद केलेली आहे (अप्रकाशित प्रबंध-डेक्कन कॉलेज, पुणे २००४).

दर पौर्णिमेस गंगाराम महाराजांच्या समाधी-दर्शनासाठी येथे भाविक येतात. दसऱ्यास येथे यात्राही भरते. या टेकडीवरून आजुबाजूच्या परिसराचे विहंगम दृष्य दिसते.

नवकुंड झरी/झरी बुद्रूक

नवकुंड झरी/झरी बुद्रूक : (ता.चाकूर, १८° ३०' उ., ७६° ५०'पू.) : राष्ट्रकूट तिसऱ्या गोविंदाच्या इ.स.८०३ मधील झरिका ताम्रपटाव्दारे व इ.स.८१२ मधील शिरसो-लोहारा ताम्रपटाव्दारे दिलेली ग्रामदाने धाराशिव निवासी ऋष्यप्यभट्ट यास दिलेली होती. त्यापैकी झरिका म्हणजे हेच झरी बुजूर्ग (बुद्रूक) किंवा नवकुंड झरी होय.[६६] त्याचा समावेश ज्या पोना विषयात होत होता ते चाकूर जवळील होनाळी गाव होय. झरिका या दान दिलेल्या गावाच्या भोवती असलेली इतर गांवेही लातूरमध्ये आजही अस्तित्वात आहेत. राष्ट्रकूट काळात शैक्षणिक कार्यासाठी विव्दान ब्राह्मणांना अग्राहाराच्या रुपाने ग्रामदाने दिली जात. या अग्राहारांत विद्यार्थ्यांना धार्मिक व व्यावहारिक शिक्षण दिले जात असे. नवकुंड झरी हे अशा अग्राहारांपैकी एक असल्याची माहिती वरील ताम्रपटाव्दारे मिळते.[६७]

पूर्वी येथे पाण्याची नऊ कुंडे होती म्हणून यास नवकुंड झरी हे नाव पडल्याचे सांगतात. सध्या केवळ तीनच कुंडे आहेत. गावात तीन मंदिरांचे एक मंदिर-संकूल असून सिध्देश्वर हे त्यातील मुख्य मंदिर होय. उत्तराभिमुख असलेले हे मंदिर पूर्वी त्रिगर्भी प्रकारातील असावे. पण उजवीकडील बाजूच्या उपगर्भगृहाच्या जागी सध्या केवळ मोकळा चौकोनी भाग व त्यासमोर नंदी आहे. डावीकडील गर्भगृह काहीसे खोलगट असून त्यात असलेले शिवलिंग सतत पाण्यातच असते. हे पाणी शेतात नेऊन टाकल्यास शेतातील पिकाची उंदरांकडून नासधूस होत नाही अशी श्रध्दा आहे.

मंडपासमोरील मुख्य गर्भगृहातही शिवलिंग आहे. मंडपात चार स्तंभांची चतुष्की असून स्तंभांवर शेषशायी विष्णू, कृष्णलीला, नरसिंहावतार, हत्ती, पक्षी वगैरेंच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. मंडपातच सप्तमातृकापट, नंदीवर बसलेले शिवपार्वती व नागशिळा यांच्या प्रतिमा आढळतात. या मंदिराची विशेषता म्हणजे सध्या अस्तित्वात असलेल्या दोन्ही गर्भगृहांवर शिखरे आहेत.

संकुलातील दुसऱ्या एका मंदिराचे फक्त अंतराळ व गर्भगृह एवढाच भाग शिल्लक असून बाकी सर्व उद्ध्वस्तावस्थेत आहे. उत्तराभिमुख असलेल्या या मंदिराच्या गर्भगृहात नरसिंहमूर्ती आहे. त्यावरून ते विष्णूमंदिर असावे. येथे एक पूर्णत: झिजलेली शिलालेख आहे.

येथील तिसऱ्या मंदिराचेही अंतराळ व गर्भगृहच शिल्लक आहे. अंतराळात काही देवकोष्ठे असून त्यात गणपती, शिव व विष्णू यांच्या मूर्ती आहेत, तर गर्भगृहात शिवलिंग आहे. या शिवलिंगामागे जमिनीत एक मोठा दगडी रांजणू पुरलेला असून त्यातून संकुलातील कथित नऊ कुंडांना सदोदित पाणी उपलब्ध होई असे सांगतात. त्यातील सध्या असलेल्या एका कुंडात नरसिंह, शेषशायी विष्णू व शिवाची मूर्ती आहे. त्या सतत पाण्यातच बुडालेल्या असतात. दुसरे एक कुंड घ्यांभाराचे कुंडङ म्हणून ओळखले जाते. संकुलात वीरगळ, भग्न मूर्तीचे अवशेष व एक दीपमाळ आहे. येथे महाशिवात्रीस उत्सव साजरा होतो.

---

६६. ठोसर, हरिहर, **लातूर जिल्ह्याचा सांस्कृतिक इतिहास** या पूर्वोक्त विषयावरील लेखनावर आधारित.
६७. कित्ता.

नांदगाव

नांदगाव : (ता.लातूर, १८° २५' उ., ७६° ३०' ते ४५' पू.) : लातूरच्या उत्तरेस १२ कि.मी. वरील या गावी इ.स. १३ ते १४ व्या शतकातील हेमाडपंती प्रकारातील एक शिवमंदिर आहे.

या पूर्वाभिमुख मंदिराचा मंडप, मुख्य गर्भगृह व दोन उपगर्भगृहे असा त्रिगर्भी तलविन्यास आहे. मात्र इतर मंदिरांप्रमाणे अन्य दोन्ही उपगर्भगृहांमध्ये मूर्ती नाहीत. मंडपात मुख्य गर्भगृहासमोर एक मोठा व एक लहान असे दोन नंदी आहेत. मुख्य गर्भगृहात शंकराचा पितळी तांदळा (मुखवटा) व शिवलिंग आहे. या मंदिराचे शिखरही तळीखेड येथील शिवमंदिराच्या शिखरासारखे पंचस्तरीय आहे. इ.स.१९९३ च्या भूकंपात हे मंदिर बरेचसे क्षतिग्रस्त झाले आहे.

निटूर

निटूर : [६८] (ता.निलंगा, १८° ०५' उ., ७६° २०' पू.) : लातूर शहरापासून ३३ कि.मी. अंतरावरील हे गाव लातूर-बाभळगाव-निलंगा मार्गावर वसलेले आहे. या गावाचे मूळ नाव 'निष्ठुरी' असे असल्याचे येथे सांगितले जाते. त्याचाच अपभ्रंश होऊन ते 'निटूर' झाले असावे. हे गाव व परिसर प्राचीन ऐतिहासिक अवशेषांनी संपन्न आहे.

गावास निलंगावेस, उजेडवेस, मुख्यवेस व ताजपुरी वेस अशा चार वेशी होत्या. वेशींच्या बांधकामाचे येथे अवशेष आढळतात. प्रत्येक वेशीवर मारुती मंदिर आहे. पूर्वी गावाभोवती बाराही ज्योतिर्लिंगांची मंदिरे होती असे सांगतात. आजमितीस गावात विविध देवतांची एकूण १७ मंदिरे आहेत. त्यापैकी महत्त्वाच्या मंदिरांची माहिती पुढीलप्रमाणे :-

सोमेश्वर मंदिर : गावातील हे मंदिर सांबस्वामी या नावानेही ओळखले जाते. १६ ते १७ व्या शतकातील या मंदिराचा केवळ गाभारा शिल्लक आहे. त्यात शिवलिंग आहे. मंदिराच्या बांधकामासाठी वापरलेल्या दगडांवर विविध देवदेवतांची उठावशिल्पे व कलाकुसर होती हे येथे इतस्तः विखुरलेल्या अवशेषांवरून दिसून येते. गर्भगृहावर सध्या सिमेंट कॉंक्रिटचे शिखर बांधलेले आहे. सन १९९३ च्या भूकंपात या मंदिराची हानी झाली.

मंदिराच्या गर्भगृहासमोर एक नंदी व त्याच्या बाजूस अन्य एक नंदी आहे. गर्भगृहाच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर सप्तमातृकांची नावे असलेला लेख कोरलेला आहे. गर्भगृहाच्या पाठीमागे शेजारी एका शिळेवर नागप्रतिमा व त्याच्या बाजूलाच ब्रम्हदेवाची मूर्ती आहे. मूर्तीच्या तीन मुखांपैकी मुख्य मुख दाढीधारी आहे. कानात कर्णकुंडले आहेत.

गर्भगृहाच्या पाठीमागे भिंतीत हनुमान अंकित केला आहे. बाजूलाच विकसित कमलपुष्प कोरलेली एक शिळा आहे. गर्भगृहाच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर सप्तमातृकापटही कोरलेला आहे.

६८. प्रत्यक्ष सर्वेक्षण व डॉ. सु. रा. पुरी आणि डॉ. प्रशांत सु. देशमुख, 'निटूर येथील ऐतिहासिक अवशेष', **शोधनिबंध पत्रिका**, मराठवाडा इतिहास परिषद, २३ वे राज्यस्तरीय अधिवेशन, औरंगाबाद, यावर आधारित.

हेमाडपंती मंदिर : सोमेश्वर मंदिराच्या पाठीमागे आणि लिंगायत स्मशानभूमीच्या दरम्यान असलेले हे मंदिर नक्की कोणत्या देवतेचे हे समजत नसले, तरी हे यादवकालीन म्हणजेच १३ व्या शतकातील वैष्णव मंदिर असावे. कारण मंदिरातील स्तंभांवरील नागफणा व शीर्षस्थानी कीचक ही यादवकालीन मंदिर-स्तंभांची वैशिष्ट्ये येथे आढळतात. या प्राचीन मंदिराची रचना मुखमंडप, मंडप, अंतराळ व गर्भगृह या पध्दतीची आहे. परंतु मंदिरास शिखर नाही. तसेच सध्या मुखमंडपही नष्ट झालेला आहे. त्याचे अवशेष येथे इतस्तत: विखुरलेले आढळतात.

साधारणत: २९.२६ चौ.मीटर आकाराच्या मंडपाच्या उभय बाजूस देवकोष्ठे आहेत. मंडपाचे छत साधे व समतलवितान असून ते आठ फूट उंचीच्या चार स्तंभांवर पेललेले आहे. हे स्तंभ गोलाकार आकाराचे असले तरी त्यावर भौमित्तिक नक्षी कोरलेली आहे, तर बाजूचे भित्तीस्तंभही नक्षीयुक्त व काहीसे चौकोनी आकाराचे आहेत.

त्यापुढील २.५६×२.२६ मीटर आकाराच्या अंतराळाच्या प्रवेशव्दाराच्या जागी दोन स्तंभ आहेत. याचे छत व भिंती साध्या, सपाट आहेत.

गर्भगृहाचा आकार २.५९×३.५५ मीटर असून त्याच्या भिंतींवरही कोणतेच अलंकरण नाही. तथापि, प्रवेशव्दाराच्या ललाटावर गणेश अंकित केलेला आहे, तर पायथ्याशी दोन्ही बाजूस एक-एक कीर्तिमुख कोरलेले आहे. डाव्या बाजूस पायथ्याशीच व्दारपाल व त्याखाली हत्ती कोरलेले आहेत. हे व्दारपाल चतुर्भूज असून त्यांच्या उजव्या व डाव्या उर्ध्वहस्तांमध्ये अनुक्रमे डमरू व त्रिशूल, तर अधोहस्तांपैकी उजवा हस्त अभयमुद्रेत आणि डाव्या हस्तामध्ये गदा आहे. येथेच डाव्या बाजूस एक चामरधारी सेविकाही शिल्पांकित केलेली आहे.

गर्भगृहात २.३ फूट उंचीच्या चबुतऱ्यावरील शिळेवर शीर्षरहीत नागमूर्ती आहे. या मूर्तीच्या खालील डाव्या व उजव्या बाजूस दोन लहान स्त्रीमूर्ती आहेत. या अलंकृत मूर्तींचा एक हात मांडीवर विसावलेला आहे. या गर्भगृहाचा बाह्य भाग पूर्णत: ढासळलेला आहे.

केदारेश्वर मंदिर : सोमेश्वर मंदिरापासून पुढे काही अंतरावर पाटील गल्लीत हे मंदिर आहे. मूळ मंदिर हेमाडपंती पध्दतीचे होते. पण ते पूर्णत: पाडून त्याजागी सिमेंट कॉंक्रिटचे मंदिर उभारण्यात आले आहे. मूळ मंदिराच्या शिळा इतस्तत: पडलेल्या असून मंदिराबाहेरील पिंपळवृक्षाखाली त्यातील काही मूर्तिशिल्पे ठेवलेली आहेत. त्यातील कार्तिकेयाची पंचमुखी मूर्ती २.१० फूट उंच आहे. मूर्तीचे हात तुटून नष्ट झालेले असले तरी तिच्या डाव्या बाजूस असलेल्या मयूर शिल्पावरून ही मूर्ती कार्तिकेयाची असावी हे स्पष्ट होते.

याच मूर्तीच्या बाजूस अन्य एक मूर्ती आहे. ३.६ फूट उंचीची ही मूर्ती भंगलेली असून तिचे तुटलेले शीर्ष बाजूस ठेवलेले आहे. मूर्तीच्या मुकूटात शिवलिंग व नेत्र अंकित केलेला असून गळ्यात नरमुंडमाळ आहे. याच मूर्तीच्या डाव्या बाजूस असलेली मूर्ती भैरवाची असावी असे वाटते. या मूर्तीच्याही भालप्रदेशावर तृतीय नेत्र व गळ्यात नरमुंडमाळ दिसते. येथे १.८ फूट उंचीची व्दारपालाचीही एक मूर्ती आहे.

केदारेश्वर मंदिराच्या गर्भगृहात एका मूर्तीचे केवळ पायापासून गुडघ्यापर्यंतच्या भागाचे अवशेष आहेत. येथे दोन नंदीही आहेत.

अनुक्रमणिका

सादनाथ मंदिर : ग्रामदेवतेचे मंदिर असलेले हे शिवमंदिर गावच्या दक्षिण भागात एका उंच टेकडीवर आहे. मंदिरासमोर एक दिपमाळ व तिच्या पायथ्याशी एक शिलालेख असलेली शिळा आहे. मंदिरास मंडप व गर्भगृह नव्याने बांधलेला असून मंडपात नंदी, तर गर्भगृहात शिवलिंग आहे. साधारणत: १७ चौ.मीटर आकाराच्या गर्भगृहावर अलीकडे नव्याने शिखर बांधण्यात आलेले आहे.

वर उल्लेखिलेल्या शिलालेखाच्या शिळेचा आकार ४.९ x १.६ फूट असा आहे. या शिळेच्या वरील भागात एक कलश कोरलेला आढळतो. डाव्या बाजूस चंद्र-सूर्य, त्याखाली शिवलिंग, बाजुलाच एक पुरुषाकृती व त्याखाली डावीकडे दोन प्राणी कोरलेले आहेत. या शिल्पांकनाच्या समोर एक आकृती व त्याखाली लेख कोरलेला आहे. हा लेख १५ ओळींचा असून पहिल्या चार ओळी देवनागरी, तर नंतरच्या ओळी हळेकन्नड भाषेतील आहेत. याच्या डाव्या बाजूसही काही अस्पष्ट अक्षरे आहेत.

याच शिळेच्या आजुबाजूस १.४ x १.२ फूट आकाराचे पाच विरगळही आहेत. त्यापैकी एकावर धनुर्धारी व दुसरीवर नागफणा शिल्पांकित केलेला आहे. मंदिराच्या बाहेर डाव्या बाजूसही पाच विरगळ आढळतात. मंदिराच्या प्रवेशव्दाराच्या डाव्या-उजव्या भिंतीच्या दरम्यानही काही विरगळ आढळतात. अल्प कोरीवकाम केलेले हे विरगळ म्हणजे धारातीर्थी पडलेल्या विरांच्या स्मारकशिळा होत. साधारणत: त्यावर तीन भागात हे कोरीवकाम केलेले आढळते.

पार्श्वनाथ मूर्ती : येथील निलंगा वेशीजवळील रोकडोबा हनुमान मंदिराच्या ओट्याच्या उजव्या बाजूस जैन पार्श्वनाथाची ३ x २ फूट आकाराची पद्मासनातील मूर्ती आहे. मूर्तीच्या कानात कर्णकुंडले, छातीवर चिन्ह व डोक्यावर नागाच्या सात फण्यांचे छत्र आहे. बाजुलाच दोन चामरधारी अप्सरा दर्शविलेल्या आहेत. मराठवाड्यात अनेक ठिकाणी अशा प्रकारच्या पार्श्वनाथाच्या मूर्ती आढळतात.

याच मंदिराच्या ओट्यावर केवळ शीर असलेली एक मूर्ती आहे. तिचे अन्य भाग येथे आढळत नाहीत. पार्श्वनाथाच्या मूर्तीच्या शेजारी असलेल्या शेंदूरमंडीत मूर्तीस येथे तुळजाभवानी मानले जाते. प्रत्यक्षात ती हनुमान मूर्ती असावी असे वाटते.

केशवराज मंदिर : निरगुडे गल्लीत हे मूळ हेमाडपंती विष्णू मंदिर आहे. या मंदिराचे पूर्वाभिमुख मूळ प्रवेशव्दार बंद करून आता उत्तराभिमुख नवीन प्रवेशव्दार निर्माण करण्यात आले आहे. मंडपात एकूण चार स्तंभ असून त्यावरील छत करोटक पध्दतीचे आहे. गर्भगृहात विष्णूची शंख, चक्र, पद्म व गदाधारी पाषाणमूर्ती आहे.

गावात या मंदिरांव्यतिरिक्त रोकडोबा हनुमान मंदिर, विरोबा मंदिर व अन्य एक मारुती मंदिर आहे.

निलंगा

निलंगा : (ता.मुख्यालय, १८° ०५' उ., ७६° ४५' पू.) : निलंगा तालुक्यातील कित्येक गावात विखुरलेल्या प्राचीन व मध्ययुगीन वास्तू व अन्य अवशेषांवरून तसेच उपलब्ध विविध ग्रंथांवरून निलंग्यासंबंधीची माहिती प्राप्त करता येते. ऐतिहासिक ठेवा म्हणून या साधनांचे महत्त्व मोठे आहे. 'नीलकंठेश्वर माहात्म्य' हा संस्कृत ग्रंथ त्यासाठी महत्त्वाचा आहे. या ग्रंथाचे मराठी गद्य हस्तलिखितही उपलब्ध आहे. त्याआधारे निलंगा व परिसराचा कथात्मक, सामाजिक, धार्मिक संदर्भ उपलब्ध होतो. तसेच निलंगा, खरोसा, तळीखेड, मदनसुरी, कर्नाटकातील मैलार (खानापूर) ची देवताकुंडे, तीर्थे, धर्म, परंपरा व भूगोलाची माहिती उपलब्ध होते. या तालुक्यात ठिकठिकाणी असणाऱ्या भव्य, प्राचीन मंदिरांचे अस्तित्व सांगणारी शिल्पे व दगड आजही प्राचीन समृध्द वारसा बोलका करतात.

तेरना नदीच्या उत्तर किनाऱ्यावर वसलेले हे शहर हेमाडपंती प्रकारातील नीलकंठेश्वर मंदिरासाठी परिचित आहे. खरोसा शैलगृहांपासून उत्तरेस हे २५ कि.मी. अंतरावर आहे. या नगरासंबंधी दंतकथा अशी - कृतयुगात निलंगा येथे शूरसेन नामक शिवभक्त राजा व त्याची विष्णूभक्त राणी राहत होती. त्यांच्या भक्तिने त्यांना हरिहर प्रसन्न झाले. वरादाखल राजा-राणीने देवांना येथेच वास करण्याची विनंती केली. त्यामुळे हरिहराने निर्लिंगी क्षेत्री वास केला. हरिहर तीर्थ, सरस्वती तीर्थ, प्रयाग तीर्थ, लक्ष्मी तीर्थ अशी बारा तीर्थे निलंग्याच्या आसपासच्या भागात आहेत. भविष्योत्तर पुराणांतर्गत 'निलंगेश्वर माहात्म्य' नामक १० अध्याय व ५३४ श्लोकांची पोथी आहे. त्यात ही कथा आहे. निलंग्याला त्यात 'नाभीक्षेत्र' असे संबोधले आहे. त्यात या मंदिराची महती सांगणाऱ्या अनेक कथा आहेत.[६९]

नीलकंठेश्वर मंदिर : मुख्य गर्भगृह व दोन उपगर्भगृहे असलेल्या या त्रिकुटेश्वर मंदिराचा निर्माणकाळ कल्याणीच्या चालुक्य काळातील म्हणजे १२ व्या शतकातील असावा. याचे स्थापत्यही प्रामुख्याने चालुक्य-होयसळ पध्दतीचे असून मराठवाड्यातील मंदिर स्थापत्याच्या प्रगतीचा पुढील टप्पा दर्शविणारे आहे.[७०] रामलिंग - मुद्‌गड येथील शिलालेखानुसार नरवैद्य नारायणभट्टाने हे मंदिर चालुक्य काळात बांधले असावे. शहराच्या मध्यभागी असलेले हे सुमारे १५ चौ. मी. आकाराचे चौरसाकृती मंदिर पूर्वाभिमुख असून ते अंतर्बाह्य प्रचूर शिल्पाने सुशोभित करण्यात आलेले आहे. त्याच्या बाह्य भिंती प्रतिमाशिल्पांनी पूर्णपणे भरलेल्या आहेत. त्यात महिषासूरमर्दिनी, नृत्यशिव, हरिहर, वराह, चामुण्डा, रतिमदन, सुरसुंदरी, गौरी, भैरव इत्यादी उत्कृष्टतेने साकारलेल्या प्रतिमांचा समावेश आहे. त्यातील सुरसुंदरीची मूर्ती अत्यंत सुंदर व देखणी आहे. ही सुंदरी उभी असून डाव्या पायावर तिने आपला यौवनभार सांभाळला आहे. तिच्या उजव्या हातात फळांनी लगडलेली आंब्याची डहाळी असून ती डोक्यामागे लपविण्याच्या लटक्या प्रयत्नात ती दंग आहे. पण तिच्याकडील पोपटाचे लक्ष आंब्याच्या फळाकडे न जाता तो तिच्या उन्नत उरोजालाच फळ समजून चोच मारीत आहे. असे हे अत्यंत रेखीव आणि कल्पनारम्य शिल्प आहे. येथील इतर भिंती, स्तंभ व व्दारशाखाही कोरीव शिल्पांनी समृद्ध आहेत.

---

६९. प्रत्यक्ष गवेक्षणाआधारे घेतलेली नोंद.

७०. देव, प्रभाकर, 'कला व शिल्प - मध्ययुग: मराठवाडा,' **महाराष्ट्रातील पुरातत्त्व**, (संपा. ह.धी. सांकलिया, म.श्री.माटे), म.रा.सा.सं.मं., मुंबई, १९७६, पृ.१००

या त्रिगर्भी मंदिराच्या व्दारमंडपास लागून मुख्य मंडप, अंतराळे व त्यापुढे गर्भगृहे आहेत. मंडपाच्या दोन्ही बाजूची रचना एकसमान असून प्रथमदर्शनी हा मंडप क्रुसाच्या आकाराचा (crossier or cross shaped) भासतो, तर गर्भगृहे तारकाकृती (stellate star shaped) आहेत. उत्तर, पश्चिम व दक्षिणेकडील कोन प्रत्येकी अकरा कोनी मंडळाच्या (panel) मध्यभागी येतात, तर अकरा कोनांचे मंडळ (panel) अंत:कक्ष (antechamber) आणि प्रवेशमार्गाच्या भागात लुप्त आहे. धर्मापुरी व पानगाव येथील मंदिरांच्या आराखड्यातील अर्धमंडपाची जागा नीलकंठेश्वर मंदिराच्या आराखड्यात गर्भगृहाने घेतली आहे. त्यामुळे डॉ. प्रभाकर देव यांच्या मतानुसार या दोन अधिक गर्भगृहांच्या योजनेमुळे मंदिराचा आकार बिल्वदली बनला आहे. होयसळ पध्दतीच्या देवालयांच्या स्थापत्यात बिल्वदलीय आराखडे प्रामुख्याने वापरले जात. या पध्दतीचा स्पष्ट प्रभाव या मंदिरावर जाणवतो.

मुख्य गर्भगृह आतील बाजूने २.७ चौ.मी. आकाराचे असून ते मंडपाच्याच पातळीत आहे. यात असलेले शिवलिंग अर्थातच येथील प्रमुख उपास्य दैवत आहे. गर्भगृहाचे १.६ x ०.७८ मी. आकाराचे प्रवेशव्दार कोरीवकामाने सुशोभित आहे. हे प्रवेशव्दार सप्त व्दारशाखी म्हणजेच हस्तिनी वर्गातील, तर बाजूच्या दोन्ही उपगर्भगृहांची प्रवेशव्दारे पंचव्दारशाखी म्हणजेच नंदिनी वर्गातील आहेत.[७१] मुख्य गर्भगृहाच्या प्रवेशव्दाराच्या व्दारशाखांमधील पहिल्या दोन उभ्या पट्ट्या अनुक्रमे पर्ण व पुष्पशाखेच्या, तिसरी विद्याधरशाखा, चौथी स्तंभशाखा, पाचवी व्यालशाखा, सहावी स्तंभशाखा आणि सातवी पुन्हा पुष्पशाखा अशा आहेत. येथील व्दारशाखेवर केवळ शिवाच्या चतुर्भूज प्रतिमा आहेत. त्याने आपल्या तीन हातांमध्ये अनुक्रमे डमरू, कवटी आणि शक्ति (त्रिशूळ) पकडलेली असून उजवा अधोहस्त अभयमुद्रेत आहे.[७२] या व्दारशाखांच्या खाली शैव प्रतिहारींच्या प्रतिमा तसेच कुंभवाहिनी (गुप्त काळातील कलेप्रमाणे गंगा व यमुनेचे द्योतक) आणि चामरधारिणींची शिल्पे आहेत. व्दारललाटावर अर्धपर्यंकासनातील (अर्धमंचकावर उपदेश मुद्रेत) गणेश बिंब आहे.

अंतराळ २.७१ x १.८१ मी. आकाराचे आयताकार असून त्याचे छत लक्षवेधी आहे. त्यात एकात/एक अशा लहान होत जाणाऱ्या आयताकृती आहेत. छताची ही नक्षी ठराविक अंतरापर्यंत मर्यादित आहे. आता मंडपाच्या छताची पुनर्बांधणी करण्यात आली आहे.

मुख्य मंडप तिन्ही बाजूंच्या अंत:कक्षासह ८.७३ चौ.मी. आकाराचा आहे. मंडपात मध्यभागी ३.३ चौ.मी. आकाराच्या रंगशिलेसह उभारलेली मध्य विथि (nave) असून तिच्या चहुबाजूंनी कंगणी ठेवलेल्या आहेत. या मंडपातील अतिरिक्त स्तंभरांगांनी मध्यविथिभोवती एक अतिरिक्त सभाकक्ष (lobby) निर्माण झाला आहे. मध्यविथिच्या चारही कोपऱ्यांवरील चार स्तंभांची उंची प्रत्येकी २.५३ मी. आहे. झोडगेच्या महादेव मंदिराप्रमाणे येथील मंडपालाही चौकटीचे प्रवेशव्दार नाही. मंडपाच्या प्रवेशभागाच्या दोन्ही बाजूस वामनभिंती असून त्यांच्या पलिकडे लागूनच बाह्यबाजूने भौमितिक नक्षीयुक्त जालवातायने आहेत. अंत:कक्षातील डाव्या व उजव्या बाजूच्या देवळ्यांमध्ये (niches) अनुक्रमे गणेश व विष्णू मूर्ती प्रतिष्ठापित केल्या आहेत, तर दक्षिणाभिमुख व उत्तराभिमुख देवळ्यांमध्ये अनुक्रमे सप्तमातृका पट्टिका आणि महिषासूरमर्दिनी प्रतिमा आहे.

७१. देगलूरकर, जी.बी., **टॅंपल आर्किटेक्चर ॲण्ड स्कल्पचर ऑफ महाराष्ट्र**, नागपूर युनिव्हर्सिटी, नागपूर, १९७४, पृ.५५.
७२. कित्ता, पृ.११३.

मंडपातील दक्षिणाभिमुख दुय्यम गर्भगृह विष्णूस समर्पित आहे. येथील अंतकक्ष २.२५ चौ.मी. आकाराचा असून याचे प्रवेशव्दार मुख्य गर्भगृहाच्या प्रवेशव्दारापेक्षा लहान आहे. हे प्रवेशव्दार नंदिनी वर्गातील असून १.६५ मी. उंच व ०.८२ मी. रुंद आहे. या प्रवेशव्दाराच्या शाखांच्या (Jambs) खाली चामरधारिणी आणि वैष्णव व्दारपाल[७३] प्रतिमा आहेत. या गर्भगृहात अतिशय मोहक अशी केशवमूर्ती प्रतिष्ठापित केलेली आहे. १.५ x ०.९ मी. आकाराच्या शिल्पपटात ही मूर्ती आहे. या चतुर्भूज मूर्तीच्या उजव्या उर्ध्व हस्तात चक्र, डाव्या उर्ध्वहस्तात शंख, तर उजव्या व डाव्या अधोहस्तात अनुक्रमे गदा व पद्म आहे.

गर्भमंडपातील दुसरे उत्तराभिमुख दुय्यम गर्भगृह हर-गौरीस समर्पित आहे. याची रचनाही विष्णूच्या गर्भगृहासारखीच आहे. याच्या नंदिनी वर्गातील पंचशाखी प्रवेशव्दाराच्या शाखांखाली अर्थातच शैव प्रतिहारी आहेत. येथील व्दारललाटावर देवी प्रतिमा आहेत.[७४] अंत:कक्षात १.५५ x ०.७५ मी. आकाराच्या वेदीवर गणेश व कार्तिकेयासह हर-गौरीची उत्कृष्ट प्रतिमा आहे. ही हर-गौरी म्हणजे उमामहेश्वरालिंगन आसनमूर्ती आहे. येथील शिव सव्यललितासनात बसलेला असून पार्वती त्याच्या डाव्या अंकावर वामललितासनात बसलेली आहे. या चतुर्भूज शिवाच्या उजव्या उर्ध्व हस्तात त्रिशूल व याच बाजूचा अधोहस्त अक्षयमालाधारी अभयमुद्रेत आहे. डाव्या उर्ध्व हस्ताने त्याने पार्वतीस आलिंगले आहे. डावा अधोहस्त पार्वतीच्या पाठीमागे असल्याने दिसत नाही. पार्वती मात्र व्दिभूज असून तिने उजव्या हस्ताने शिवाच्या मानेस विळखा घातला आहे. तिच्या डाव्या हस्तात बीजपूरक (महाळुंगी) आहे. सुकुमार देहाच्या पार्वतीने कंठी मुक्ताहार, केयूर, कुंडल, मेखला, नुपूर, पादपत्रे अशी विविध अलंकार धारण केले आहेत, तर जटाधारी शिवाने कंठी मुक्ताहार, बाहुभूषणे, उदरबंध, मेखला, प्रलंबहार इत्यादी अलंकार धारण केले आहेत.

या शिल्पाच्या तलपटावरील प्रतिमा हर-गौरी मूर्तीबाबत काही उल्लेखनीय वैशिष्ट्ये दर्शवित असून तेथे गणेश व कार्तिकेय यांच्या चामरधारिणीसह अन्य मूर्ती आरोहित आहेत, परंतु नोंद घेण्यासारखे वैशिष्ट्य म्हणजे येथे गोधा (घोरपड) हे पार्वतीचे वाहन चित्रित केले आहे. थोडक्यात, ही गोधासनाभवेद्गौरी असल्याने या मूर्तीस हर-गौरी म्हणणे उचित ठरते.[७५] अशा प्रकारच्या मूर्ति रामलिंग मुद्गड, धर्मापुरी वगैरे ठिकाणी सापडल्या आहेत.

मंडप नवरंग वर्गातील असून त्याच्या छताच्या बांधकामात तुळ्यांचा उपयोग केलेला आहे. तिन्ही अंतराळे, मुखमंडप किंवा व्दारमंडप आणि तिन्ही गर्भगृहे यांची छते सपाट व नक्षीविरहीत आहेत. मंडपाचे छत मात्र सप्तमातृका, कीर्तिमुखे, नृत्यांगणा आदी प्रचूर शिल्पाने गौरवांकित करण्यात आलेले असले, तरी याच्या बऱ्याचशा भागाची पडझड झाल्याने या भागावरील शिल्प आता नष्ट होत चालले आहे.

मंडपाला अतिशय प्रमाणबध्द असे प्रत्येकी २.५३ मी. उंचीचे सोळा स्तंभ आहेत.[७६] ते बीडच्या कंकालेश्वर मंदिरातील स्तंभांप्रमाणे अतिशय कौशल्याने कोरलेले आहेत. स्तंभ

---

७३. जेम्स बर्जेस यांनी आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया, व्हॉ.३, पृ.२१ वर हे शैव प्रतिहारी म्हटले असले, तरी डॉ.जी.बी.देगलूरकर यांच्या निरीक्षणानुसार हे वैष्णव पध्दतीचे व्दारपाल आहेत. **टेंपल आर्किटेक्चर ॲण्ड स्कल्पचर ऑफ महाराष्ट्र**, १९७४, पृ.५५ तळटीप.

७४. जेम्स बर्जेस, उपरोक्त, पृ.२०

७५. देगलूरकर, पूर्वोक्त, पृ. ११६.

७६. यातील तीनही अंत:कक्ष आणि मुख्य मंडपासमोरील आठ स्तंभ अतिशय बारीक नक्षीकामाने अलंकारित आहेत. बर्जेस, उपरोक्त, प्लेट २०, फिगर-१.

साधारणत: चौरसाकृती आहेत. स्तंभाधारांवर (brackets) चहुबाजूंनी चतुर्भूज कीचक असून त्यांनी मस्तकावर चतुमुखी खंड (Four Faced Member) तोलून धरले आहेत. तळखडा (Base), स्तंभमध्य (shaft) आणि स्तंभशीर्ष (Capital) हे क्षितिजसमांतर भौमितिक नक्षीने (Moulding) युक्त आहे. स्तंभमध्याच्या चौरसाकृती खंडावर कीर्तिमुख, किन्नर यासारख्या प्रतिमा[७७] व रामायण-महाभारतातील काही कथाविषय[७८] शिल्पित केले आहेत.

गर्भगृह आणि गर्भमंडपाच्या बाह्य भिंतीवर एकसारखे साचेबंद शिल्पकाम आहे. पीठापासून उपानाची (उपानह - पायाजवळची जागा) सुरुवात होते. पण बहुतांश मंदिरांचे पीठ जमिनीत बुजलेले आढळते. या मंदिराच्या उपानांवरही साचेबंद नक्षीकाम आहे. त्यावर उत्तर भारतीय शिल्पपध्दतीप्रमाणे प्रसंगविशेष शिखरांच्या लघुप्रतिकृतीचे सुशोभिकरण आहे. या उपानांवरील लघुप्रतिकृती शिखरांना मध्यभागी परस्परछेदी (intresecting) सुत्रांचे (strings) थर (course) आहेत. त्यांच्यावर समांतर समभूज चौकोनांच्या (lozenges) नक्षीकामाचे कुमूद (torus), व खंड (member) आहेत. त्यावर चैत्यकमानींवर आढळते तशी आणि करवतीसारखे कंगोरे असलेली रुंदमुखी पद्मनक्षिकापट्टी आहे. याच्याही वर आणखी केवळ नक्षिपट्टिका आहे.[७९]

मंडोवराची सुरुवात कर्णपट्टिकेपासून (उपान संपल्यावर काटकोनाची पट्टिका) होते. त्यावर गर्भमंडपातील स्तंभांसारख्या प्रतिकृती आहेत. मंडोवरावरील खोल कोनांमुळे त्याची वेगवेगळ्या क्षितिजसमांतर विभागांमध्ये विभागणी झाली आहे. या अलग-अलग विभागांमधील नक्षीकामात वर्तुळाकार पुष्पगुच्छे (rosettes), त्रिकोणी सुशोभित पट्टिका (fillets) आणि कीर्तिमुखांच्या जोड्या यांचा समावेश आहे. येथील पीठ पाच नक्षीपट्टिकांनी मर्यादित केले आहे. मंदिराच्या तारकाकृती (stellate) विन्यासाने बाह्यभिंतीवर प्रचूर (offset) नक्षीकाम दाखविले आहे. हा विन्यास कोन्यांचे बाहुल्य (multiplicity) दर्शवित असून प्रक्षेपण (projection) आणि कप्प्यांमुळे (recesses) येथे एक चित्रपट परिमंडल (chiaroseuro zone) तयार झाले आहे. भिन्न भिन्न मंदिरांचा अभ्यास करता असे दिसते की, येथील कप्पे शिल्पांनी पुरेपूर भरले आहेत. बाह्यभिंतीतील देवकोष्ठांमधील नऊ प्रतिमांशिवाय या भिंतीवर उपरोक्त कप्प्यांमध्ये आणखी १०३ प्रतिमा होत्या. सध्या त्यातील ८३ प्रतिमा अस्तित्वात असून भिंतीचा काही मूळ भाग पडल्यामुळे उर्वरित प्रतिमा नाहीशा झाल्या आहेत. उर्वरित ८३ प्रतिमांमध्ये केवळ तीनच पुरुष प्रतिमा असून बाकी स्त्री प्रतिमा बहुतकरून सुरसुंदरींच्या आहेत.

येथे प्रत्येक गर्भगृहाच्या बाह्य भिंतीवर तीन अशी एकूण नऊ प्रमुख देवकोष्ठे आहेत. यांची रचनाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. देवकोष्ठांचे दोन्ही बाजूचे अर्धस्तंभ आणि वरची लघुशिखरे अतिशय सुंदरतेने कोरलेली आहेत. यातील काही देवकोष्ठे रिकामी असली तरी ज्यांमध्ये मूर्ती आहेत, त्यात महाकाली, शिव, विष्णू, नृसिंह, महिषासूरमर्दिनी आणि वराह या देवतांचा समावेश आहे. बाह्य भिंतीवरील दुहेरी छज्जाच्या वर आता शिखराचे अवशेष दिसत नसले,

---

७७. बर्जेस, पूर्वोक्त, पृ. २१.

७८. देव प्रभाकर, पूर्वोक्त, **महाराष्ट्रातील पुरातत्त्व,** पृ. १००.

७९. बर्जेसने याचे वर्णन केलेल नसले, तरी तो म्हणतो की, उपानावर १.८० ते २.१० मी. उंचीपर्यंत नक्षी असून त्याची तुलना तो गुमली (गुजरात) च्या नवलाख मंदिराच्या पीठाशी (basement) करतो. **ऑर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया,** खंड ३, पृ.२२; खंड २, पृ.१७९, तळटीप. बर्जेस या मंदिराचा निर्माणकाळ ११ व्या शतकाचा उत्तरार्ध किंवा १२ वे शतक असा वर्तवितो - **रिपोर्ट ऑन दि ॲन्टिक्विटीज ऑफ काठियावाड ॲण्ड कच्छ**, १८७४-७५, पृ.१८१, तर एच.डी.सांकलिया नवलाख मंदिराचा काळ १२ वे किंवा १३ वे शतक असा वर्तवितात. **ऑर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ गुजरात**, मुंबई, १९४१, पृ.१०२.

तरी पूर्वी कधी काळी या शिखराने संपूर्ण मंदिरवास्तूचे सौंदर्य अलंकारिकतेने आणि डौलदारपणे खुलविले असावे यात शंका नाही.

कल्याणीच्या चालुक्यकालीन मंदिरांमध्ये सप्तमातृका, कीर्तिमुखे आणि वराह-अवतार इत्यादी शिल्पांची ज्या कलात्मकतेने आणि कल्पक शैलीने मांडणी केलेली असते, तशीच मांडणी निलंगा येथील या नीलकंठेश्वर मंदिराच्या शिल्पातही असल्याने या मंदिराचा निर्माणकाळही तोच म्हणजे १२ वे शतक हाच असावा.[८०] रझाकारांच्या काळात मंदिराचे मोठे नुकसान करण्याचा प्रयत्न केला, मूर्ती फोडल्या. या मंदिराचा १९४७ नंतर जीर्णोध्दार करण्यात आला आहे.

श्री समर्थ शिष्य आण्णाप्पा यांचा मठ : आण्णाप्पा यांनी निलंगा येथे मठ स्थापन केला होता. त्यांना आनंमूर्ति हे नांव मिळाले. गावाबाहेर शेतात 'श्रीराम' अशी नोंद असलेली त्यांची समाधी व अन्य तीन समाध्या आहेत. फाल्गुन वद्य १४ ही पुण्यतिथी असते.

जामा मशीद : नीलकंठेश्वर मंदिरापासून जवळच असलेली बाजारपेठेतील ही मशीद औरंगजेबाच्या राजवटीत बांधल्याचे मानले जाते. मुस्लिम स्थापत्य शैलीतील या मशिदीभोवती तटबंदीवजा भिंत होती. सध्या या मशिदीचा काही भागच शाबूत आहे. मशिदीचा खुत्बा (प्रार्थनेची जागा) असलेले सभागृह १३.७२ x ७.६२ मी. आकाराचे असून त्यात प्रत्येकी तीन स्तंभांच्या चार रांगा आहेत. सर्व स्तंभ कमानीनी एक दुसऱ्याशी संलग्न असून त्यातील दर्शनी भागातील चार स्तंभांपैकी मधल्या दोन स्तंभांच्या कमानींमधून मशिदीत प्रवेश करता येतो. छतावर चारही कोपऱ्यांना चार मिनार असून मध्यभागी मोठे घुमट आहे.

शहरात याव्यतिरिक्त हजरत पिर पाशा काद्रीचा दर्गा आहे.

पानगाव

पानगाव : (ता.रेणापूर, १८° ३५' उ., ७६° ३५' पू.) : बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथपासून दक्षिणेस ३० कि.मी. किंवा लातूरच्या ईशान्येस ४० कि.मी. वरील या गावात मध्ययुगीन मंदिर स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना विट्ठल मंदिराच्या स्वरुपात येथे सापडतो. गावाच्या मध्यभागी असलेले हे अप्रतिम आणि भव्य असे मंदिर आजही चांगल्या अवस्थेत आहे. मूर्तीभंजनामुळे विद्रूप झालेले येथील मूर्तीशिल्पही या मंदिराच्या शिल्पसौंदर्यात फारशी बाधा आणत नाही. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराचा तलविन्यास मुखमंडप, अर्धखुल्या मंडपास लागून दक्षिणोत्तर अर्धखुले अर्धमंडप, अंतराळ आणि गर्भगृह असा सप्तरथ प्रकारातील आहे. या मंदिराची बरीचशी वैशिष्ट्ये होट्टल येथील सिध्देश्वर मंदिर आणि धर्मापुरी येथील केदारेश्वर मंदिरांच्या वैशिष्ट्यांशी मिळतीजुळती आहेत.[८१] त्यांचाही तलविन्यास असाच आहे.

असे असले तरी या मंदिराचे मंदिर-स्थापत्य थोडेसे भिन्न प्रकारचे आहे. या मंदिरासमोर एक मोठा मंडप आहे. डॉ.प्रभाकर देव यांच्या मते मुळात त्याचे स्वरुप गोपूर असे असावे.[८२] तसे असेल तर आता जरी दिसत नसली तरी पूर्वी कधीकाळी या मंडपाला जोडूनच मंदिराची सीमाभिंत असली पाहिजे.

---

८०. देगलूरकर, पूर्वोक्त, पृ.५७. तथापि, काही विव्दानांनीही तो अलग-अलग दर्शविला आहे. प्रभाकर देव यांच्या मते तो ११ व्या शतकातील उत्तर चालुक्यकालीन असावा. **टेंपल्स ऑफ मराठवाडा**, जयपूर, १९९३, पृ.१३०; तर **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरमध्ये** तो १२ वे ते १३ वे शतक असा दर्शविला आहे. पृ.७९०.
या परिसरात उपलब्ध मूटेशिल्प नृत्यरत शीव आणि नृसिंह जे एकाच शिल्पशीळेवर कोरलेले आहेत. हे शिल्प मराठवाडा विद्यापीठाच्या संग्रहालयात ओटेमाबाड येथे असून त्यांचे छायाचित्र ग्रंथात दिले आहे.

८१. जामखेडकर, पूर्वोक्त, पृ.२०८.

८२. कित्ता, पृ.१९६.

मंदिराची वास्तुशास्त्रीय वैशिष्ट्ये व शैली लक्षात घेता हे मंदिर इ.स.च्या ११ व्या शतकात बांधले गेले असावे.[८३] मंदिराच्या चौथऱ्यावर चढतांना पायऱ्यांच्या दोन्ही बाजूस देवकोष्ठे कोरलेली आढळतात. आधीच नमूद केल्याप्रमाणे मंडप अर्धखुला आहे. म्हणजेच प्रवेशमार्गाचा अपवाद वगळता मंडपाच्या सर्व बाजूंनी वेदिकेच्या वामनभिंती आहेत. येथे असलेली जालवातायनांची रचना होयसळांच्या देवालयीन पध्दतीनुरुप आहे.[८४] वेदिकेच्या बाह्यांगावर आलटून-पालटून येणारे अर्धस्तंभ आणि देवकोष्ठे यांचे अलंकरण आहे. देवकोष्ठांमध्ये नृत्यांगण आणि वादकांच्या मूर्ती आहेत. अर्धस्तंभावर शिखरांच्या प्रतिकृती साकारलेल्या आहेत, तर मंडपाचा अंतर्भाग सूरसुंदरींच्या मूर्तिशिल्पांनी अलंकृत करण्यात आला आहे. या सूरसुंदरींचे स्वरुप ' हस्तावरील सपाट पट्टीवर असलेल्या मूर्ती ' असे आहे. होयसळांच्या आश्रयाखाली बांधलेल्या मंदिरांमध्येही अशाच मूर्ती आढळतात. तथापि, शैलीच्या दृष्टिकोनातून त्या उत्तर चालुक्यांच्या काळातील, म्हणजेच नंतरच्या कर्नाटक शैलीच्या शिल्पांशी मिळत्याजुळत्या आहेत.

मंडप : मंडप एकूण २२ पूर्णस्तंभांवर आणि आठ वामनस्तंभावर पेललेला आहे. त्यातील १८ स्तंभ परिघ भागात, तर मध्याभागी चार स्तंभांची चतुष्की आहे. शिवाय मंडपाच्या वेदिकेवर आठ वामनस्तंभ आहेत. स्तंभांचा घटनाक्रम या संपूर्ण प्रदेशात आढळणाऱ्या मंदिरांतील स्तंभांसारखा म्हणजे चौरस तळखडा, त्यावर तीन अष्टकोनी घटक, त्यातील प्रत्येक दोन लगतच्या अष्टकोनी घटकांच्या मधोमध वर्तुळाकार भाग, त्यावर चौरस भाग, उद्‌गमसदृष्य घटक, त्यावर भरणी व शिरावटी असा आहे. स्तंभांचे शीर्ष आणि स्तंभांवरील तुळई यांना जोडणाऱ्या हस्तपटलावर बाहेरील बाजूने सज्जाला विविध अविष्कारातील सूरसुंदरींच्या मूर्तीचाच उपयोग करण्यात आलेला आहे. याठिकाणी असलेले हे मूर्तिशिल्प केवळ अप्रतिमच ! साधारणपणे एक मीटर उंचीच्या या हस्तपटलावरील तितक्याच उंचीच्या या रेखीव शरीरयष्टीच्या मूर्तींनी अनेकविध अलंकार धारण केलेले आहेत. येथील मूर्तिशिल्प या जिल्ह्याच्याच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या तत्कालिन शिल्पवैभवात वेगळेपणाने उठून दिसणारे ठरावे. काकतीय शिल्पकलेचा प्रभाव या मूर्तिशिल्पांवर आधिक्याने जाणवतो.[८५] मंडपाच्या मागच्या भिंतीत अंतराळाच्या व्दाराच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी एक देवकोष्ठ आहे.

गर्भगृह : याचा तलविन्यास सप्तरथ प्रकारातील असून बाह्यांग सूरसुंदरींच्या मूर्तिशिल्पाने अलंकृत आहे. धर्मापुरी येथील मूर्तीपेक्षा पानगाव येथील मूर्ती अधिक मोहक, सडपातळ व कमनीय आहेत. त्यातही शालभंजिका, यक्षिणी, मदनिका आणि अप्सरांची मूर्तिशिल्पे अधिक मोहक आहेत. मंदिराच्या बाह्य भिंतीवरील मूर्तिशिल्पांपैकी नृसिंह, वराह, शिव, विष्णू व भैरव इत्यादी मूर्तिशिल्पे विशेष वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

गर्भगृहांच्या व्दारावर खालील भागात शैव व्दारपाल आहेत. गर्भगृह आतून साधे सपाट असून छतही सपाट आहे. अशास समतलवितान म्हणून ओळखले जाते. गर्भगृहासमोरील गोपूर सदृश्य मंडपात नंदी आहे हे पाहता हे मूळचे शैव देवालय असून त्याचे नंतर विठ्ठल

८३. देव, प्रभाकर, पूर्वोक्त, **महाराष्ट्रातील पुरातत्व,** पृ.१००.
८४. कित्ता, पृ.१९६,
८५. देव, प्रभाकर, उपरोक्त पृ.१००.

मंदिरात म्हणजेच वैष्णव मंदिरात रुपांतर झाले असावे असा डॉ.प्रभाकर देवांप्रमाणे समज होईल, पण गर्भगृहाच्या भद्रावरील देवकोष्ठातील वैष्णवमूर्ती पाहता डॉ.देव यांच्या मताचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे.[८६] हे मुळात वैष्णव मंदिर होते. शिखर पूर्णत: पडून गेलेल्या महाराष्ट्रातील इतर अनेक मंदिरांपैकी हे एक अप्रतिम मंदिर आहे.

बाभळगाव

बाभळगाव (ता.लातूर) : लातूर पासून आग्नेयेस ७ कि.मी.वर जवळच असलेली एक ही लहान वसाहत आहे. या वसाहतीचे अस्तित्व किमान यादव काळापासून असावे. यादव काळातील एखाद्या मंदिराची वास्तू येथे असावी. त्याचे काही घटक अवशेष या परिसरात आढळतात. निश्चितपणे यादव काळातील (१३ वे शतक) म्हणता येतील अशी काही मूर्ती शिल्पे येथील महादेव मंदिराच्या समोर ठेवलेली आहेत.

यामध्ये भैरवाचे मोठे शिल्प उल्लेखनीय असून साधारण १ मीटर उंचीचे हे शिल्प आहे. चार हात असणारा भैरव प्रदक्षिणा क्रमाप्रमाणे कट्यार, डमरू, पाश, आणि कपाल (पानपात्र) धारण करणारा आहे. पायालगत एका बाजूस कुत्रा व दुसऱ्या बाजूस गण दाखविला आहे. पानपात्र असलेल्या हातालगत नरमुंड दिसते आहे. विस्फारलेल्या जटा, भाळावर नरमुंडपट्ट धारण केलेला हा भैरव प्रमाणबद्ध असून त्रिभंगात उभा आहे. अन्य मूर्ती शिल्पांमध्ये भैरवीची मूर्ती उल्लेखनीय असून प्रेतवाहन असलेली त्रिभंगात दाखवलेली ही मूर्ती सर्पमेखला, पोटावर विंचू, लंबस्तने अशा वैशिष्ट्यांनी युक्त आहे. या चतुर्हस्त मूर्तीच्या हातीसुद्धा कट्यार, डमरु, पाश, खंडीत हात, पानपात्र, नरमुंड, दाखवले आहेत. पायालगत दोन्ही बाजूंनी गण दर्शविले आहेत. झिजलेल्या स्थितीतील उत्तर काळातील एक सूर्य प्रतिमा येथे असून ती समभंगामध्ये उभी आहे. तिच्या दोन्ही हातात सूर्यफूल दाखविले आहे. याचठिकाणी नंतरच्या काळातील म्हणजेच सोळाव्या-सतराव्या शतकातील काही मूर्ती शिल्पे असून यात तीन वीरगळ शिल्पे, दोन सती शिळा व अन्य काही शिल्पे आहेत.

दगडोजी देशमुख यांची गढी : गावात मध्यभागी श्री.दगडोजी व्यंकटराव देशमुख यांच्या नावाने ओळखली जाणारी ही गढी आहे. या गढीचे क्षेत्रफळ २२८१.२ चौ.मीटर असून मध्ययुगीन गढीची वैशिष्ट्ये स्पष्ट करणारी ही गढी आहे. मुळात चार मुख्य बुरूज आणि त्यापुढील संरक्षक भिंत व त्याला असलेला एक जास्तीचा बुरूज अशा प्रकारची होती. गढीचे प्रवेशद्वार उत्तराभिमुख आहे. प्रवेशद्वाराजवळच दोन्ही बाजूस बुरूज दिसतात अर्धवर्तुळाकार बुरूज दगडी चिऱ्यात बांधले आहेत. आत प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूस ढाळज आहेत. समोरच आतील दुसरे प्रवेशद्वार दिसते. येथे उजव्या बाजूस मोकळी जागा असून घोड्यांसाठी तबेल्यांची सोय आहे. मुळात मातीच्या भेंड्यापासून उभारण्यात आलेले बुरूज आणि ही एकूण वास्तू आज काळाची गरज लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणामध्ये परिवर्तीत करण्यात आली असली तरी आपले मूळ अस्तित्व स्पष्ट करणारी आहे.

महादेव मंदिर : सतराव्या शतकाच्या प्रारंभी दशकात उभारण्यात आलेले हे शिवमंदिर एखाद्या यादव कालीन मंदिराप्रमाणेच मूळ आराखडा असलेले आहे. गर्भगृह, अंतराळ, सभामंडप अशी याची रचना आहे. सभामंडप सोळा गोलाकार दगडी स्तंभावर उभा असून चतु:ष्कोनी तलविन्यास असणाऱ्या या मंदिराची धाटणी व बांधकाम हे निश्चितपणे

८६. जामखेडकर, अ. प्र., पूर्वोक्त, पृ.१९७.

सतराव्या शतकाच्या प्रारंभी दशकातील ठरते. अंतराळात एक नंदी असून गर्भगृहाच्या प्रवेशद्वारालगत डाव्या बाजूस गणेश व उजव्या बाजूस फणाधारी नागशिल्प आहे. प्रतिवर्षी चैत्र महिन्यात येथून शिखर शिंगणापूर येथील श्री शंभू महादेवासाठी काठी आणि कावड जाते.

भानुदास पिटले घराण्याकडे या मंदिराचे पुजारीपण असून प्रतिवर्षी कावड घेऊन जाण्याची पद्धत, मंदिराची धाटणी, मंदिरालगतच असलेली गढी व संबधीत मंदिर, वीरगळ, शिल्प आणि सती शिळा या बाबी मध्ययुगीन सत्ता, संघर्ष, प्रतिष्ठा आणि श्रद्धा यांचा वारसा स्पष्ट करणाऱ्या आहेत. गावामध्ये गेल्या काही दशकापूर्वी नव्याने दुरुस्त केलेले मारुती मंदिर आहे. तसेच गणपती, देवी अशी अन्य काही लहान मंदिरे असून मशीदही आहे.

बोरगाव

बोरगाव : (ता.औसा, १८° १५' उ., ७६° ३०' पू.) : औसाच्या वायव्येस १८ कि.मी. अंतरावरील या खेडेगावी नकुलेश्वराचे सर्वसाधारण आकाराच्या विटांपेक्षा मोठ्या विटांमध्ये बांधलेले मंदिर होते. हे मंदिर नकुल या पांडवाने बांधले होते असा समज आहे. सन १९८६ मध्ये या प्राचीन मंदिराचा जीर्णोध्दार करतांना मूळ जागेवरील शिवलिंग न हलविता संपूर्ण मंदिराचे आधुनिक पध्दतीने बांधकाम करण्यात आल्याने मंदिराचे प्राचीन स्वरुप नष्ट झाले आहे. मंदिरापुढील प्रशस्त प्रांगणात मात्र तत्कालिन वाटाव्या अशा दोन दगडी दीपमाळा आहेत.

पूर्वाभिमुख असलेल्या या मूळ मंदिराच्या बांधकामासाठी वापरलेल्या विटा ३० x ४५ सें.मी. आकाराच्या होत्या. त्या हलक्या व उच्च दर्जाच्या असून जीर्णोध्दारासाठी पुन्हा वापरण्यात आलेल्या आहेत. सध्या मंडप व गर्भगृह असा तलविन्यास असलेल्या या नव्या मंदिराच्या मंडपात प्रत्येकी आठ स्तंभांच्या दोन स्तंभरांगा आहेत. मंडपाच्या भिंतीतही १२ देवकोष्ठे तयार करून त्यात ज्योतिर्लिंगे स्थापण्याची योजना आहे.

गर्भगृहात शिवलिंग असून शेजारी नकुलेश्वराची मुखवटाधारी अर्धमूर्ती आहे. गर्भगृहावरील २० मी. उंचीच्या आकर्षक चौस्तरीय शिखराचे बांधकाम तामिळनाडूतील स्थापत्य-विशारदांनी केलेले आहे. त्याच्या खालील तीन स्तरात विविध देवतांच्या मूर्ती असलेली सुबक देवकोष्ठे आहेत. चौथ्या स्तरावर आकर्षक अशा कंगोऱ्यांचे अलंकरण आहे. याच्या चारही कोपऱ्यांवर चार नंदीची स्थापना केलेली आहे.

या मंदिराच्या प्रांगणात खोदकाम करतांना संस्कृत-मराठी मिश्रीत देवनागरी लिपीतील एक संपूर्णतः झिजलेला शिलालेख प्राप्त झाला असून त्याचे वाचन करणे दुरापास्त आहे. आषाढ व श्रावणात येथे नामसप्ताह कार्यक्रम व जत्रा भरविली जाते. यावेळी नकुलेश्वराच्या पालखीची मिरवणूकही काढतात. मंदिराच्या आवारात मानपुरी बुवा नामक सत्पुरूषाची साधी समाधी आहे.

बोरी

बोरी : (ता.लातूर, १८° ००' ते २०' उ., ७६° ०५' ते ४०' पू.) : लातूरच्या आग्नेयेस १४ कि.मी. अंतरावर मांजरा नदीकिनारी वसलेल्या या गावात ऋषीनाथ नामक स्थानिक सत्पुरुषास वाहिलेले हेमाडपंतीसदृश असे प्राचीन दगडी मंदिर आहे. मंदिराच्या रचनेवरून त्याचा बांधकाम काळ सुमारे इ.स.१३ वे शतक असावा.[८७] या उत्तराभिमुख मंदिराभोवतीची

८७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७५९

मूळ दगडी भिंत भग्न पावल्याने आता नवीन भिंत उभारण्यात आलेली आहे. ऋषीनाथांच्या समाधिस्थळीच नंतर हे मंदिर उभारण्यात आल्याचे येथे सांगितले जाते.

या मंदिरास सन १९९१ मध्ये नवीन मंडप जोडण्यात आलेला आहे. तसेच सप्टेंबर १९९३ च्या भूकंपात या मंदिराची बरीच हानी झाल्याने मंदिराचे प्रवेशव्दार व गर्भगृह वगळता इतरही भागाचे नवीन बांधकाम करण्यात आलेले आहे. तथापि, त्यामुळे हेमाडपंती वास्तुशैलीची वैशिष्ट्ये लुप्त झाली आहेत. भूकंपामुळे ढासळलेले मंदिराचे अवशेष आवारातच पुरून ठेवण्यात आलेले आहेत.

या मंदिराच्या दक्षिण कोपऱ्यात देवकोष्ठामध्ये चांदीचा मुकूट ल्यालेली अंबाबाईची दगडी मूर्ती आहे. मूर्तीचे डोळे कोणत्यातरी चमकदार खड्याने मंडीत आहेत. गर्भगृहातील ऋषीनाथ मूर्तीचेही स्वरुप या प्रकारचेच आहे. गर्भगृहासमोर नंदीची योजना केलेली असून गर्भगृहाभोवतीच्या प्रदक्षिणा मार्गास लागून वर्तुळाकार स्तंभयोजना करण्यात आलेली आहे. मंदिरास लहानशे शिखर व कळसही आहे. वैशाख शुध्द षष्ठीला दोन दिवस येथे वार्षिकोत्सव साजरा होतो.

भूतमुगळी

भूतमुगळी (ता.निलंगा, १८° ०५' उ., ७६° ४५' पू.) : निलंग्याच्या दक्षिणेस १४ कि.मी. वरील या खेडेगावी कोरीवकामयुक्त व शिल्पाकृतीयुक्त ' सदाशिव मंदिर ' नामक शिवमंदिर आहे. या मंदिराचा मुखमंडप वगळता इतर भागाचे निलंग्याच्या नीलकंठेश्वर मंदिराशी साम्य दिसते. मुखमंडप, मंडपास संलग्न असलेली अंतराळासहीत दोन उपगर्भगृहे व मुख्य गर्भगृह असा या मंदिराचा तलविन्यास आहे.

मुखमंडपाच्या जोत्यावर बाह्य बाजूने १५ सें.मी. उंचीचा मूर्तिशिल्पपट असून त्यात विविध देवता रेखीत केलेल्या आहेत. प्रवेशव्दाराच्या दोन्ही बाजूस साधारणत: एक मी. उंचीच्या कक्षासनावर प्रत्येकी १.५ मी. उंचीचे कलाकुसरयुक्त पाच-पाच स्तंभ आहेत. याच्या छतास नीलकंठेश्वर मंदिराच्या मंडपाच्या छतासारखेच क्षिप्तोक्षिप्त प्रकारचे नक्षीकाम असून मधोमध पूर्ण विकसित पुष्परचना साकारलेली आहे.

मंडपाच्या मध्यभागी कमी उंचीची रंगशिळा आहे. या रंगशिळेच्या चारही कोपऱ्यांवर असलेले चार स्तंभ आकार व कोरीवकामाच्या दृष्टीने मंडपातील अन्य स्तंभांहून थोडा वेगळेपणा दर्शवितात. मंडपात प्रत्येकी तीन स्तंभाच्या दोन स्वतंत्र स्तंभावली आहेत. शिवाय दोहोबाजूस तीन-तीन भित्तिस्तंभ आहेत. मंदिरातील बहुतांश स्तंभांच्या उभारणीत गोल व चौकोनी घटकांचा वापर करण्यात आला आहे. मंडपाच्या सर्व स्तंभांच्या आकारबध्द व समांतर उभारणीमुळे बनलेल्या चतुष्कींच्या छतावर मुखमंडपाच्या वितानासारखे क्षिप्तोक्षिप्त पध्दतीचे कोरीवकाम केलेले आहे. रंगशिळेचे करोटक पध्दतीचे वितान त्याहीपेक्षा आकर्षक व विविधांगी आहे.

मंडपाच्या डावीकडील उपगर्भगृहाचे प्रवेशव्दार बहुशाखी मालिनी वर्गातील असून त्यावर उत्तम कोरीवकाम करण्यात आलेले आहे, तर व्दाराच्या शाखांखाली स्त्रीमूर्तीपट आहे. ललाटबिंबावर गणेश अंकित केलेला आहे. अंतराळात देवकोष्ठ वा मूर्तिशिल्प नसले, तरी गर्भगृहात एका उंच वेदीवर विष्णूची तीन फूट ९० सें.मी. उंचीची पाषाण मूर्ती आहे. या

Maharashtra State Gazetteers

वेदीच्या पीठावरही नक्षीकाम असून उपगर्भगृहाचे वितानही मुखमंडपाच्या वितानासारखेच आहे.

उजवीकडील उपगर्भगृहाचे प्रवेशव्दार व त्याच्या बहुशाखी व्दारशाखाही मालिनी वर्गातील आहेत. याच्या अंतराळात मात्र दोन रिक्त देवकोष्ठे आहेत. याही उपगर्भगृहात एका उंच वेदीवर तीन फूट उंचीचीच विठ्ठल-रुक्मिणीची कोरीव पाषाण मूर्ती आहे. या उपगर्भगृहाच्या वितानाचे डावीकडील उपगर्भगृहाच्या वितानाशी साम्य दिसते.

मुख्य गर्भगृहापुढील अंतराळाचे छतही मुखमंडपाच्या छतासारखेच आहे. अंतराळात नंदी व डाव्या बाजूस शेषशायी विष्णूची तीन फूट लांबीची, तर उजवीकडील बाजूस तेवढ्याच उंचीची चतुर्भूज देवीची मूर्ती आहे. तिच्या चार हस्तांपैकी उजवा अधोहस्त अभयमुद्रेत असून अन्य हातात विविध आयुधे आहेत. मुख्य गर्भगृहाचे प्रवेशव्दारही बहुशाखी असून वर इतर नक्षीशाखांसमवेत दोन्ही बाजूस एक-एक स्तंभशाखाही आहे. या गर्भगृहातील तुलनेने कमी उंचीचे असलेले शिवलिंग अर्थातच या मंदिराचे उपास्य दैवत आहे. हे शिवलिंग कमी उंचीचे असले तरी रुंद आकाराचे असून त्यावर शिवाचा पितळी तांदळा ठेवलेला आहे. गर्भगृहाचे वितानही मंडपाच्या वितानासारखेच आहे. मंडोवरही थोडेफार नीलकंठेश्वर मंदिराच्या मंडोवरासारखेच आहे, पण मंदिरास शिखर नाही.

मंदिरासमोर उद्ध्वस्तावस्थेतील चौरसाकृती विशाल पुष्करणी आहे. कदाचित ती मंदिराच्या समकालीन असावी.

महादेव मंदिर : सदाशिव मंदिरापासून काही अंतरावर असलेल्या या प्राचीन मंदिराचा तलविन्यास मंडप व गर्भगृह असा आहे. मूळ उत्तराभिमुख असलेल्या या मंदिरास पश्चिम दिशेसही एक प्रवेशव्दार आहे व तेच सध्या मुख्य समजले जाते. मंडपात चार स्तंभांची चतुष्की असून स्तंभरचना चौकोनी तळखडा व त्यावर गोल स्तंभमध्य व स्तंभशीर्ष अशी आहे. मंडपाचे वितान क्षिप्तोत्क्षिप्त प्रकारातील असून मध्यभागी विकसित कमलपुष्पाची रचना केलेली आहे.

सध्या या मंदिराच्या बहुतांश भागाचा जीर्णोध्दार करण्यात आला आहे. जीर्णोध्दारीत गर्भगृहात अंदाजे दोन फूट उंचीच्या चौकोनी वेदीवर शिवलिंग प्रतिष्ठापित केलेले आहे. मंदिराच्या जीर्णोध्दारामुळे केवळ मंडपातील स्तंभ व छत यावरूनच मंदिराची प्राचीनता कळते. प्राचीनत्वाची अन्य लक्षणे लुप्त झाली आहेत.

या मंदिरासमोर आधुनिक शिल्पशैलीतील तुळजाभवानी मंदिर व मारुती मंदिर आहे.

मातोळा

मातोळा (ता.औसा, १८° ०५' उ., ७६° २०' पू.) : औसाच्या नैऋत्येस १४ कि.मी. अंतरावरील या गावी खंडोबाचे उत्तर मध्ययुगातील दगडी मंदिर आहे. येथे धनगर समाजाची मोठी वस्ती असून हे या गावचे ग्रामदैवत आहे. मंदिरास वास्तुशास्त्रीय मूल्य असलेली विशेष वैशिष्ट्ये नाहीत.

मातोळापासून ३.२१ कि.मी. वर 'देवतळे' नामक स्थळी अंबादेवीचे मध्ययुगीन काळात बांधलेले मोठे मंदिर आहे. या पूर्वाभिमुख मंदिरास प्रशस्त मंडप व गर्भगृह आहे. तथापि, यासही फारशी वास्तुशास्त्रीय वैशिष्ट्ये नाहीत. मंदिरासमोर देवतळे नामक मोठा तलाव

आहे. आश्विन पौर्णिमेस येथे यात्रा भरते. या मंदिरालगत नाथमहाराजांचा मठ आहे. त्यात दत्तात्रयाची मूर्ती आहे. मार्गशीर्षात येथे दत्तजयंती साजरी होते.

मुरुड

मुरुड (ता.औसा, १८° २०' उ., ७६° १०' ते १५' पू.) : लातूरच्या पश्चिमेस ३७ कि.मी. अंतरावरील या गावाचे मूळ नाव ' मैदाचे मुरुड ' असे असून त्याचा ' गवळ्याचे मुरुड ' असाही नामोल्लेख केला जातो. या गावात मुरुडेश्वराचे ३० x १५ मी. लांबी-रुंदीचे प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर येथील पुजाऱ्याकडे असलेल्या सनदपत्रानुसार ५०० वर्षांपेक्षाही जुने असावे. सुरुवातीस या मंदिराचे पूजेचे अधिकार ज्या गुरव घराण्याकडे होते त्या घराण्याचा पूर्वज गिरी नामक साधू होता.[८८] या मंदिराचा ५० वर्षांपूर्वी जीर्णोध्दार करण्यात आला आहे. त्यामुळे मंदिराची प्राचीन वास्तुशिल्पीय वैशिष्ट्ये लुप्त झाली आहेत. जीर्णोध्दारावेळी मंदिरास प्रशस्त मंडप जोडलेला आहे. येथील ग्रामदैवत असलेल्या या मंदिराच्या गर्भगृहात एकसंघ दगडात घडविलेले शिवलिंग असून गर्भगृहावर चुना व विटांनी बांधलेले शिखर आहे. शिखरास देवकोष्ठाप्रमाणे लहान कोनाडे ठेवल्याने शिखराची विलोभनीयता वाढली आहे. महाशिवरात्रीस येथे यात्रा भरते.

याव्यतिरिक्त गावात विठ्ठल, हनुमान व तुकाई देवी मंदिर ही जुनी, तर बालाजी, दत्तात्रय, सिध्दीविनायक व भैरवनाथ ही अर्वाचीन व फारसे वास्तु वैशिष्ट्ये नसलेली मंदिरेही आहेत.

रामलिंग मुद्‌गड

रामलिंग मुद्‌गड (ता.निलंगा, १८° १५' उ., ७५° ५५' पू.) : तेरणा नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर निलंग्याच्या दक्षिणेस २३ कि.मी. अंतरावरील या गावी सोमलिंग, राम-लिंगेश्वर पार्श्वनाथ व हनुमानाचे मंदिर आहे. त्यापैकी रामलिंगेश्वराचे हेमाडपंती प्रकारातील मंदिर उत्तराभिमुख आहे. उत्तरेकडील प्रवेशव्दारानजीक विहीर असून लगतच उंच दीपमाळ व एका स्तंभसदृश शिळेवर नागशिल्प कोरलेले आहे. मंदिर हेमाडपंती स्वरुपाचे असल्याने त्या प्रकारची सर्व वैशिष्ट्ये येथे पहावयास मिळतात. गर्भगृहात मोठे शिवलिंग आहे.

या मंदिरासमोर उत्तर बाजूस सुंदर कलाकृतीचे चालुक्यकालीन सोमलिंग मंदिर आहे. मंदिरात नृसिंह व इतर देवतांच्या मूर्ती आहेत, तर गावच्या पूर्वेकडील पार्श्वनाथाच्या मंदिरात पार्श्वनाथाची मोठी स्थानक मूर्ती आहे. डोक्यावर नागछत्र आहे. या मंदिराचा नव्याने जीर्णोध्दार केलेला असल्याने प्राचीन वास्तुवैशिष्ट्ये लुप्त झाली आहेत.

या मंदिरांपैकी हनुमान मंदिराकडे संशोधकांचे लक्ष वेधले जाते ते त्या मंदिराच्या प्रांगणात असलेल्या शिलालेखामुळे. हा शिलालेख कल्याणचा चालुक्य नृपति विक्रमादित्य सहावा याचा आहे. लेखाची भाषा व लिपी कन्नड असून तो चालुक्य विक्रम संवत, ३२, इ.स. ११०७ चा आहे.[८९] यात चालुक्य नृपति विक्रमादित्य सहावा, दान देणारा दंडनायक नरवैद्य नारायणभट्ट ही व्यक्तिनामे असून मुदगोलु या ग्रामनामाचा त्यात उल्लेख आहे. या लेखात दंडनायक नरवैद्य नारायणभट्टाने स्वत: मुदगोलु येथे स्थापन केलेल्या नीलकंठेश्वराला दिलेल्या जमिनीची देणगी नमूद केली आहे.

---

८८. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ.७७९.

८९. देव, शं.भा., पूर्वोक्त पृ.३१४.

या शिलालेखातील नोंदीनुसार रामलिंग-मुदगड हे चालुक्यकालीन जैन पीठ असल्याची माहिती मिळते. तसेच याठिकाणी १२ व्या शतकात एक 'जैन बसदी' अस्तित्वात असल्याची व त्या बसदीचे प्रमुख आचार्य म्हणून दामनंदी सिध्दान्तदेव या जैन मुनींची नेमणूक करण्यात आल्याची माहिती मिळते.[९०] प्रस्तुत शिलालेखात आचार्य दामनंदीच्या गुरुपरंपरेची सविस्तर माहिती नमूद करण्यात आली आहे. त्याशिवाय विविध काळात त्या बसदीला दिलेल्या दानांची व त्या काळातील बसदीच्या जैन आचार्यांची माहिती नमूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार या शिलालेखातील मजकुराची विभागणी अ, ब, क आणि ड अशा चार भागात करण्यात आलेली आहे. ब, क, आणि ड या विभागात अनुक्रमे दिवाकरनंदी, धनकीर्ती आणि अभयनंदी या जैन आचार्यांच्या नावांची नोंद करण्यात आलेली आहे. यावरुन कल्याणच्या चालुक्य राजवटीत आणि त्यानंतरच्या काळातही लातूर परिसरातील एक प्रमुख जैन पीठ म्हणून रामलिंग मुदगडची ख्याती असल्याचा निर्णायक पुरावा मिळतो.[९१] सध्या ही जैन बसदी अस्तित्वात नसली तरी गावभर विखुरलेले घडीव आणि कोरीव दगड तिच्या भूतकाळातील अस्तित्वाची साक्ष देतात. या गावी नारायणभट्ट नरवैद्य याने नीलकंठेश्वर नावाचे शिवालय बांधल्याची नोंदही तेथील एका शिलालेखात आढळते. कदाचित तो उल्लेख निलंग्याच्या मंदिराचाही असू शकेल.[९२]

रेणापूर

रेणापूर (ता.मुख्यालय, १८° ३०' उ., ७६° ३५' पू.) : मूळ बीड जिल्ह्यातील या शहराचा समावेश जिल्हा पुनर्रचनेंतर्गत आता लातूर जिल्ह्यात करण्यात आला आहे. या शहरात रेणुकादेवीचे प्राचीन हेमाडपंती मंदिर आहे. मंडप, अंतराळ व गर्भगृह असा या मंदिराचा तलविन्यास असून मंदिराच्या प्रवेशव्दारासमोर दोन दगडी दीपमाळा आहेत. त्यातील उजव्या बाजूच्या दीपमाळेस एखाद-दुसरा धक्का दिल्यास ती हालते. या दिपमाळेस शीर्षापर्यंत जाण्यासाठी जिना आहे. वर जिना जेथे संपतो तेथे एक खिडकी आहे. दोन्ही दीपमाळांवरील शिखर कोसळलेले आहे. डावीकडील दीपमाळेच्या शिखराच्या ठिकाणी सिमेंटचा अशोकस्तंभ उभारण्यात आलेला आहे.

मंडपाचा आकार ६ x १० चौ.मी. असा चौरसाकृती असून त्यात प्रत्येकी चार स्तंभांच्या दोन स्तंभावली आहेत. हे सर्व स्तंभ एकमेकांशी कमानींनी जोडलेले आहेत. मंडपातून अंतराळात जातांना दोन्ही बाजूच्या भिंतीत एक-एक देवकोष्ठ असून त्यात देवमूर्ती आहेत. यापुढे ४.५ चौ.मी. आकाराचे अंतराळ असून त्यात मध्यभागी एका शिळेवर रेणुकादेवीच्या पादुकांचे उठावशिल्प आहे.

गर्भगृह ३.०४ चौ.मी. आकाराचे असून त्यात एका पीठावर रेणुकादेवीचा तांदळा आहे. या तांदळ्यामागे चांदीची प्रभावळ आहे. या देवीवर स्थानिक रहिवाशांची अपार श्रध्दा आहे. वैशाख पौर्णिमेस येथे तीन दिवस जत्रा भरते. मंदिरासमोर रेणुकादेवीतीर्थ नामक पुष्करणी आहे. येथे शिवलिंग, नंदी व गणेशमूर्तीही आहे.

---

९०. शेळके, जी.सी., **ए हिस्टरी ऑफ मराठवाडा रिजन**, अनपब्लिशड् थेसिस, धारवाड विद्यापीठ, १९७९, पृ. ४, ८.
९१. कित्ता.
९२. कित्ता.

येथून जवळच ‘ उघड्या महादेवाचे मंदिर ’ नावाचे शिवमंदिर आहे. पूर्वी येथे चोहोबाजूस उघड्या जागेत केवळ शिवलिंग व त्यासमोर काळ्या दगडात घडविलेला नंदी होता. सध्या मंदिरावर ३ x ३ मी. आकाराचे छत बांधले आहे.

येथेच छोटेसे पूर्वाभिमुख नाग मंदिर असून मंदिरात नागाचे एका शिळेवर कोरलेले उठावशिल्प आहे. येथेच शिव-पार्वतीची दगडात कोरलेली मूर्ती आहे. या मंदिरात एकूण पाच लहान नंदी आहेत. येथे शके १६३८ (इ.स.१७१६) चा मराठी भाषेतील एक शिलालेख आढळला आहे. यात राजवंश वा राजाचा, ग्रामनामांचा किंवा स्थळांचा उल्लेख नसून कान्होजी व बंगाजी या कोरकांची नावे तेवढी आहेत.[९३]

लातूर

लातूर (जिल्हा व तालुका मुख्यालय, १८° २०' उ., ७६° ३०' पू.) : या ग्रंथात अन्यत्र या जिल्ह्याच्या नवनिर्मितीसंबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे.

इतिहास :

मांजरा व तावरजा नद्यांच्या खोऱ्यामध्ये हे प्राचीन नगर वसलेले आहे. या नगराच्या पूर्व व उत्तरेस मांजरा नदीचे व दक्षिणेस तावरजा नदीचे सुपीक खोरे आहे.

या नगरीची प्राचीनता स्पष्ट करणारे पुरावे इ.स.च्या ६ व्या शतकापासून १४ व्या शतकापर्यंत उपलब्ध आहे.[९४] ही नगरी सातवाहन काळापासून सर्वश्रृत आहे. लातूर हे ग्रामनाम राष्ट्रकूट काळात राष्ट्रकुटांच्या शिलालेख-ताम्रपटांत रट्टनौर (रट्टांचे पूर) या नावाने उल्लेखित होते.[९५] याचे प्राचीन संदर्भ कन्नड, संस्कृत व मराठी शिलालेखांमधूनही प्राप्त होतात. हे शिलालेख कासारशिरसी, गणेशवाडी (ता.निलंगा), लातूर, औसा, रेणापूर, चाकूर, कानेगाव (ता.उदगीर), बोरगाव, आलमला, हिपरसोगा (ता.औसा), सुगाव, शिरुर ताजबंद (ता.अहमदपूर) वगैरे ठिकाणी प्राप्त झालेले आहेत. निळगुंद, शिरुर तसेच इट्टगी, सौदत्ती, मंटूर येथील शिलालेखात लातूरचे प्राचीन नाव ‘लत्तलूर’ असे नोंदलेले आहे. तेरदळ लेखात ‘लत्तनूर’ तर कल्होळे येथील लेख, भोज येथील ताम्रपट व सौदत्तीच्या आणखी एका लेखात ‘लत्तनूर’ असाच शब्द योजलेला आहे. सिताबर्डी (नागपूर) येथील शिलालेखात लातूरचे ‘लत्तलौर’ असे रुप योजले आहे.[९६] या लेखाचा काळ शके १००८, शुक्रवार, वैशाख शु.३, प्रभवनाम संवत्सर, इ.स.८ एप्रिल १०८६ असा आहे. हा लेख विक्रमादित्य (सहावा) याच्या राजवटीतील आहे. या लेखाचा मुख्य उद्देश विक्रमादित्याचा महाराष्ट्रकूटवंशीय मांडलिक महासामंत धाडिभंडक याचा ‘लत्तलौर’ निवासी दंडनायक वत्सगोत्री पद्मनाभभट्टाचा पुत्र वासुदेव याने दिलेल्या दानाची नोंद करणे हा आहे.[९७] उपरोक्त कानेगाव शिलालेखाचा काळ शके ११८०, कालयुक्तनाम संवत्सर, मार्गशीर्ष शु.१०, गुरुवार, इ.स.७ डिसेंबर १२५८ असा आहे. यात ‘लतनौर’ असे ग्रामनाम उल्लेखिलेले आहे.[९८] त्यात

---

९३. देव, शां. भा., पूर्वोक्त, पृ.३१८.
९४. जोशी, सु.ग., ‘लातूर ग्रामानामाचा शोध’, **निवडक शोध निबंध**, खंड ५, मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, २००० पृ. १४७-४९
९५. देशमुख, गो.वि., ‘लातूर हेच राष्ट्रकुटांचे मूळस्थान - एक टिपण’, **निवडक शोध निबंध**, खंड ४, मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, १९९९, पृ.१३२-३५.
९६. कित्ता, आणि ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **हिस्टॉरिकल जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पृ.१८८
९७. किलहार्न, (संपा), **‘नागपूर म्युझियम शिलालेख’,** चालुक्य विक्रमादित्य (६वा) इ. आय १८९४-९५ खंड-३, पृ-३०४-३०६ आणि देव, शां.भा. (संपा), पूर्वोक्त पृ. २०४.
९८. तुळपुळे, शं.गो. (संपा.) **प्राचीन मराठी कोरीव लेख**, पुणे,१९६३, लेख क्र.३१, पृ.१५१-१५५.

कान्हरदेवाचा मांडलिक राठोड वंशीय सोमवंश कुळातील गोपालदेवाने स्वकियांच्या कल्याणार्थ केलेल्या एक लक्ष होमांचा उल्लेख असून त्या होमांची पूर्तता व्हावी म्हणून काही गावे दान दिल्याची नोंद आहे. डॉ.फ्लीट यांनी प्रथमत: लत्तलूर म्हणजे छत्तीसगडमधील 'रत्नापूर' असे वर्तविले होते. याचे कारण म्हणजे संस्कृतमध्ये 'ल' व 'र' यांची अदलाबदल असल्याने लत्तनूरपूरचे रतनपूर व्युत्पादने जरा सुलभ होते. डॉ.फ्लीट यांचा हा सिध्दान्त डॉ.खरे यांनी मांडून नंतर तो खोडूनही काढला.[९९] डॉ.फ्लीट यांनीही संशोधनाअंती आपले मत बदलून मराठवाड्यातील लातूर हेच पूर्वीचे 'लत्तलूर' होय असा अभिप्राय दिला.[१००]

मध्यप्रदेशातील उज्जैन येथील संशोधक डॉ.बा.ना.मुंडी यांना सैद महमद यांच्या 'कल्पसमूह' नावाच्या वैद्यकीय ग्रंथाचे हस्तलिखीत प्राप्त झाले. त्यात लातूरचे ग्रामनाम 'लातनूर' असे आहे.[१०१]

लातूरचे पौराणिक नाव रत्नपूर किंवा रतनापूर असे असावे व त्याचेच पुढे लत्तनूरपूर असे झाले असावे. लातूर हे बदामीच्या चालुक्य काळात अस्तित्वात असल्याचे विक्रमादित्याच्या इ.स.६८२ मधील कर्नुल (आंध्रप्रदेश) ताम्रपटातील या स्थलनामाच्या उल्लेखावरून सिध्द होते. सातव्या शतकात ते रत्नगिरी (रट्टनगिरी) आणि रट्टगिरी या नावांनी ओळखले जात होते. या ताम्रपटामुळे अनेक स्थळांची नव्याने ओळख होऊ शकली. या लेखात रट्टगिरी व रट्टनगिरी असे स्थलनाम आहे. डॉ.हरिहर ठोसर यांनी रट्टगिरी म्हणजेच लातूर रोड रेल्वे स्टेशनजवळील हकनीबाबा नामक टेकडी होय असे प्रतिपादन केले आहे. शक्य आहे की, आद्य राष्ट्रकूट राजांनी या टेकडीशेजारी नगर उभारले असावे. कारण मूळ रत्नपूर किंवा लत्तनूरपूर हे मांजरा नदीच्या किनारी वसले होते, तर सध्याचे लातूर त्या नदीच्या दक्षिणेस नदीपासून १० कि.मी. वर आहे. म्हणजेच कालौघात ते सध्याच्या स्थळी स्थलांतरित झाले असावे. यावरून बदामीच्या चालुक्यांच्या काळात राष्ट्रकूट व लातूरचे संबंध होते असे स्पष्ट होते. थोडक्यात, लत्तलूर हे राष्ट्रकुटांच्या सर्व शाखांचे मूळस्थान होते असे सिद्ध होऊ शकते. तसे असेल तर या स्थळाची प्राचीनता अजून तीन ते चार शतकांनी मागे जाऊ शकते. या प्राचीन नगरीचे सार्थ वर्णन 'रत्नपूर माहात्म्य' या पोथीत विस्ताराने आढळते. या लातूरचे प्राचीन नाव 'रत्नपूर' व ती ताम्रध्वज राजाची राजधानी असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. या माहात्म्यात 'लातनूर' असाही संदर्भ आहे.[१०२] त्या काळात मांजरा नदीच्या काठावर वस्ती असल्याचे म्हटले आहे. ही माहिती म्हणजे केवळ आख्यायिका नसून ती ऐतिहासिक घटनांवर आधारित आहे हे कर्नूल ताम्रपटातील 'रत्नगिरी' या लातूरच्या चालुक्यकालीन नावावरून स्पष्ट होते. तसेच लातूरजवळ मांजरा नदीच्या काठावर जे ओस वस्तीचे अवशेष दिसतात त्यावरून रत्नपूर माहात्म्यातील हे नगर मूळात नदी काठावर असल्याच्या माहितीस दुजोरा मिळतो. हे माहात्म्य स्कंदपुराणांतर्गत असून यात लातूर नगरीतील १२ लिंगस्थाने आणि आठ तीर्थस्थानांचा उल्लेख आहे.[१०३] पापनाश-भूतनाथ या देवस्थानात असलेले 'कल्लोळ' या पोथीत उल्लेखिलेले आहे. यात मांजरा नदी 'वंजरा-वज्जुला' या नावाने वर्णिली आहे. या माहात्म्याचा काळ साधारणपणे इ.स. १३-१४ वे

९९. किलहार्न, पूर्वोक्त आणि शा.भा.देव, पूर्वोक्त

१००. देशमुख, गो.वि., पूर्वोक्त, पृ.१३२-३५.

१०१. बा.ना.मुंडी, (संपा.)] **कल्पसमूह,** पुणे, १९८८, पृ.२०-२१

१०२. जोशी, सु.ग., पूर्वोक्त, 'लातूर ग्रामनामाचा शोध' **निवडक शोध निबंध,** खंड ५, पृ.१४७-४९. आणि ठोसर, हरिहर, **हिस्टॉरिकल जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पूर्वोक्त, पृ. २८४-५२४.

१०३. कित्ता.

शतक हा असावा.[१०४] ही संस्कृत पोथी असून त्यात ४५ अध्याय व १०१२ संस्कृत श्लोक आहेत. प्रत्येक अध्यायाअंती 'श्रीस्कंदपुराणे उत्तरखंडे रत्नपूर माहात्म्ये सुतशौनक संवादे' असा उल्लेख आहे. या पोथीत लातूरला 'सिध्दक्षेत्र' असे संबोधले आहे आणि तेथे सिध्देश्वर, आत्मलिंग, सोमेश्वर, रत्नेश्वर आदी १२ लिंगे आहेत, शिवाय केशव, नृसिंह, लक्ष्मी, पार्वती, महादेव अशी जवळजवळ आणखी ४० लिंगे आहेत असा उल्लेख आहे. मात्र यापैकी प्रत्यक्षात फारच थोडी आढळतात. विक्रमादित्याच्या काळातील रत्नगिरी किंवा रट्टगिरी हे बहुदा लातूरच्या जुन्या वस्तीचे नाव असावे.

लत्तलूरचे मूळ रुप 'रट्टनुरु' किंवा 'रट्टरुरु' असावे. या शब्दांच्या अपभ्रंशातूनच नंतर 'लत्तनुर' व 'लतलूर' अशी साधी रुपे तयार झाली असावीत.[१०५] लत्तलूरपासूनच 'लत्तलौर' व 'लातूर' ही रुपे बनल्याचे डॉ.फ्लीट यांनी दर्शविले आहे.

पूर्वी हा भाग सातवाहन साम्राज्यात तसेच शक व चालुक्यांच्या पूर्वार्धातील साम्राज्यात समाविष्ट होता.[१०६] इ.स.८ व्या व ९ व्या शतकात हा परिसर राष्ट्रकुटांच्या राज्याचा एक भाग होता. त्यांचे लातूर हे या परिसरातील सर्वात मोठे नगर होते. शिवाय राष्ट्रकुटांची राजधानी मान्यखेट (मालखेड, जि.गुलबर्गा, कर्नाटक) ही या विभागाला लागून असल्याने त्या काळात या नगराला विशेष महत्त्व होते.

राष्ट्रकूट अमोघवर्षाचे शिरुर आणि निळगुंद येथील कोरीव लेख हे लत्तलूरचा उल्लेख असलेले सर्वात प्राचीन कोरीव लेख (इ.स. नवव्या शतकाचा उत्तरार्ध) मानले जात होते, परंतु इ.स.६८२ मधील कर्नूल (आंध्रप्रदेश) लेखातील रट्टगिरी या स्थलनामावरून बदामीच्या चालुक्य काळातही लातूर येथे रट्टांचे किंवा राष्ट्रकुटांचे वास्तव्य असल्याचा पुरावा मिळतो. डॉ.आळतेकरांनी लातूर हेच राष्ट्रकुटांचे मुलस्थान असल्याचे जे मत व्यक्त केले होते, त्यास या नव्या पुराव्यामुळे पुष्टी मिळते. त्याशिवाय अनेक विव्दानांनीही हे पुराव्यानिशी सिध्द केलेले आहे.

या स्थलनामाची व्युत्पत्ती रट्ट किंवा राष्ट्रकूट राजवंशाच्या नावाशी निगडित आहे हा कै.ग.ह.खरे यांचा अंदाज पूर्वी वर्णिलेल्या कर्नूल ताम्रपटावरून खरा ठरला आहे. राष्ट्रकूट तिसऱ्या गोविंदाने लातूर जवळील मोरखण्डी येथे राजधानी हलविल्यानंतर त्याचा व युवराज अमोघवर्षाचा या नगराशी संपर्क वाढत गेला व हे ग्रामाचे 'पूर' बनले. अमोघवर्षाची बहुदा ही निवासी राजधानी असावी. रत्नापूर माहात्म्यातील ताम्रध्वज म्हणजे हा अमोघवर्षच असावा. स्थलमाहात्म्यातील आख्यायिकांतील नावे बदलली तरी तिच्यामागे ऐतिहासिक घटना असतात हे 'बेरुळ शिवालय माहात्म्या' तील राष्ट्रकूट पहिल्या कृष्णाच्या एलराजा या नावावरून स्पष्ट झाले आहे. तथापि, राष्ट्रकूट काळात निवासी राजधानी असूनही केवळ अमोघवर्षाच्या शिरुर आणि मुळगूंद कोरीव लेख्याव्यतिरिक्त राष्ट्रकुटांच्या इतर कुठल्याही साधनात या नगराचा उल्लेख आढळत नाही. या लेखात लातूरचा 'पुरुर' म्हणजे श्रेष्ठ नगर असल्याचा जो उल्लेख आला आहे, त्यावरून नवव्या शतकात लातूर हे त्या काळातील शहराच्या परिमाणानुसार मोठे नगर असल्याचे प्रतीत होते.

---

१०४. जोशी ,पूर्वोक्त, निवडक शोध निबंध, पृ.१४७-१४९.

१०५. देशमुख, गो.वि., पूर्वोक्त, पृ.१३२-३५.

१०६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.४१.

राष्ट्रकूट राजे स्वत:स लत्तलूरपुरवराधीश, लत्तलूरपुरपरमेश्वर, लत्तलूरपुरवरेश्वर, लत्तलूरपुरवराधीश्वर अशी बिरुदे लावीत. राष्ट्रकूट अमोघवर्ष पहिला याचा नामोल्लेखही याच बिरुदांनी लत्तलूर सम्राट या अर्थी केला गेला आहे.[१०७] तो स्वत: लत्तलुरीचा सम्राट असल्याचा अभिमान बाळगत असे. राजगादी गेल्यावरही अमोघवर्ष काही वर्षे लातूरमध्ये राहिला असावा व त्यामुळे त्याला प्रथम हे बिरुद लावले गेले असावे असे डॉ.ठोसरांचे मत आहे. असे असल्यास निदान त्याच्या काळात तरी लातूर ही राज्यकर्त्या राष्ट्रकुटांची राजधानी नि:संशय असावी. राष्ट्रकूटांच्या अनेक ताम्रपटांवर लत्तलूरपुरवराधीश्वर असा शब्दप्रयोग योजलेला दिसतो. राष्ट्रकूटकालीन कलावैभवाची साक्ष देणारे अनेक शिल्प-भग्नावशेष सिध्देश्वर मंदिराच्या परिसरात विखुरलेल्या अवस्थेत सापडतात. त्यानंतरच्या काळात या वंशातील विविध व्यक्तिंनी बाहेर जाऊन कर्नाटकातील बेळगावजवळील सुगंधावती उर्फ सौदत्ती तसेच महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाडा विभागातील छोट्या-छोट्या राज्यात सामंत किंवा प्रशासनाधिकाऱ्यांची पदे प्राप्त केली, पण लत्तलूरशी असणारा संबंध तोडला नाही. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे याच राष्ट्रकूट कुलातील परचक्रशल्य नामक राजा इ.स. च्या १२ व्या शतकात ओरिसातील संबळपूरहून राज्य करीत असल्याचा व तो महाराष्ट्रकूट (राष्ट्रकूट) वंशातील असल्याचा बारगर ताम्रशासनात उल्लेख आहे.[१०८] या काळात लातूरचे राजकीय किंवा प्रशासकीय महत्त्व वाढते नसले, तरी ते धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र बनले होते. येथील सिध्देश्वर मंदिरही बहुधा याच काळात म्हणजे इ.स.१२ ते १३ व्या शतकात बांधले गेले असे लातूर येथील दुसऱ्या एका शिलालेखावरून सिध्द होते.

सौदत्तीच्या रट्टांनी आपल्या अभिलेखात आपण लत्तलूरहून सौदत्ती येथे स्थलांतरीत झाल्याची नोंद केली आहे.[१०९] तेही स्वत:स लत्तलूरपुरवराधीश्वर, लत्तलूरपुरवरेश्वर व लत्तलूरपरमेश्वर अशी बिरुदे लावून घेत होते. सिताबर्डी लेखात धाडिभंडक (धाडिदेव) या राष्ट्रकूट महासामन्तास व त्याचा अधिकारी वासुदेव यास लत्तलौरविनिर्गत असे विशेषण लावले आहे. लत्तलौरविनिर्गत म्हणजे लातूरहून आलेले किंवा लातूर सोडून आलेले होय.[११०]

लातूर येथील महारट्ट कुळातील कान्हरदेव नामक शासकाच्या उपलब्ध झालेल्या एका ताम्रपटावरून तो कल्याणचा चालुक्य राजा जयसिंह दुसरा याचा मांडलिक होता हे समजते. तो स्वत:स लत्तलूरपुरविनिर्गत आणि महारट्ट भम्मह याचा वंशज (बहुधा प्रपौत्र) म्हणवितो. याचा अर्थ रट्ट भम्महाचे वास्तव्य लातूर येथे होते व तो लातूरच्या रट्ट उर्फ राष्ट्रकूट वंशातील होता हे या ताम्रपटामुळे प्रकाशात आले. शिवाय कल्याणचा चालुक्य राजा तैलप दुसरा (तैल) याचा भम्मह हा सासरा होता. म्हणजेच त्यांची लातूर ही सासरवाडी होती हे ऐतिहासिक सत्य उघडकीस आले. त्याची राणी जाकव्वा उर्फ लक्ष्मी ही भम्महाची कन्या होती. थोडक्यात, मान्यखेटचे (मालखेड) राष्ट्रकूट, सौंदर्याचे रट्ट तसेच विदर्भातील राष्ट्रकूट महासामंत धाडिदेव, महारट्ट भम्म हेही आपल्या अभिलेखांमध्ये आपला या नगराशी संबंध दर्शवितात.[१११]

---

१०७. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.२३.

१०८. देशमुख गो. वि., पूर्वोक्त, आणि ठोसर हरिहर, **हिस्टॉरिकल जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा,** पूर्वोक्त, पृ. ५२४,-५९५.

१०९. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.२३ आणि ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **हिस्टॉरिकल जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पृ.५२४

११०. देशमुख, गो. वि., पूर्वोक्त.

१११. ठोसर हरिहर, पूर्वोक्त, **देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ**, पृ.१५८ आणि **हिस्टॉरिकल जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पूर्वोक्त, पृ.५२४.

यादवांच्या काळात या भागावर राज्य करणारा मांडलिक गोपालदेव हा ही आपण लत्तनौरच्या राष्ट्रौड वंशातील असल्याची नोंद आपल्या कानेगाव शिलालेखात करतो. त्यावरूनही या स्थलनामाची व्युत्पत्ती या राजवंशाच्या नावातून झाली हे सिध्द होते. इ.स.१११४ मध्ये रत्नराज किंवा रत्नेश्वर याने हे नगर वसविले असा एक विचारप्रवाह मध्यंतरी सुरू झाला होता, पण लत्तलूरचा प्रथम संदर्भ इ.स.८६६ (शके ७८८) चा आढळतो. रत्नराज किंवा रत्नेश्वराच्या अगादेर २०० वर्षे लत्तलूरचा संदर्भ प्राप्त होतो. यानंतर श्री.वा.र.वर्दे- वालावलकर यांनी 'गोयकारांची गोयाभायली वसणूक' (पैले खंड) मध्ये गोवा प्रांतातील लोटली म्हणजे लत्तनूर असा सिध्दांत मांडला, पण यासही डॉ.ग.ह.खरे यांनी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' त उत्तर देऊन निरुत्तर केले.[११२]

यादव राजवटीत लातूरला सर्वप्रथम राजकीय आणि प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाल्याची माहिती कान्हरदेव यादवाच्या कानेगाव शिलालेखावरुन मिळते. त्यानुसार गोपाल राष्ट्रौड हा या काळात यादवांचा प्रशासनाधिकारी होता व त्याच्या अधिकारक्षेत्रात लातूर जिल्ह्यातील उदगीर आणि नांदेड जिल्ह्यातील कंधार 'देशाचा' समावेश होता. त्याचे वास्तव्य लातूर येथे होते. त्यावरुन लातूर हे या काळात देशविभागाचा समावेश असलेल्या मंडल विभागाचे मुख्य केंद्र असावे असे दिसते.

येथील पापविनाश-भुतेश्वर मंदिरातील शिलालेखात "लत्तलौर" हे एकच स्थलनाम आहे. शेवटचा राष्ट्रकूट राजा कक्कल किंवा दुसरा कर्क यांचा तैलप किंवा तैल दुसरा या चालुक्य राजाने पराभव केला. त्यानंतर लातूरवर कल्याणीच्या चालुक्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. तथापि, त्यांनी लातूरच्या नावात कोणताच बदल केला नाही.

लातूर नगराचा उल्लेख असलेले बहुतेक कोरीव लेख कल्याणच्या चालुक्य राजवटीतील आहेत. खुद्द लातूर येथे जे दोन शिलालेख उपलब्ध झाले, त्यात कल्याणचा चालुक्य राजा सोमेश्वर तिसरा याचा एक असून त्यात लातूरचा उल्लेख "लत्तालौर" असा आहे. हा शिलालेख शके १०४९ (इ.स.११२८) मधील आहे. या सोमेश्वरास "सर्वज्ञ चक्रवर्ती" अशी बिरुदावली होती. तो विव्दानही होता. त्याने "अभिलषितार्थ चिंतामणी" हा ग्रंथ लिहिला.[११३] याच शिलालेखात लातूरला "दिव्य" आणि "पूरश्रेष्ठ" अशा गौरवयुक्त विशेषणांनी वर्णिले असून ते वेदविद्येचे केंद्र[११४] असल्याची व येथे वेदविद्येत पारंगत असलेल्या ५०० महाजनांचे वास्तव्य असल्याची नोंद त्यात आहे. येथील भूतेश्वर शिवमंदिर आणि पापविनाशन तीर्थाचाही त्यात उल्लेख असून ते आजही त्याच ठिकाणी निदान अवशिष्ट स्वरुपात तरी अस्तित्वात आहे. त्यांचाही निर्माता राजा सोमेश्वर हाच असल्याचे काहींचे मत आहे. थोडक्यात, लातूर हे ग्रामनाम इ.स.च्या ८ व्या शतकापासून लत्तलूर, लत्तनूर, लत्तनौर, लातुनूर असे होत शेवटी लातूर असे झाले.

मध्ययुगीन बहमनी व मुघल सत्तेच्या नियंत्रणाखाली हा भाग होता. या शहरास उदगीर किंवा औसा शहरासारखी तटबंदी नव्हती, परंतु हे शहर व पर्यायाने जिल्हा बहुदा एकावेळी

११२. तुळपुळे, शं.गो. (संपा.), पूर्वोक्त, पृ.१५१-१५५.

११३. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, ४७

११४. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **देवीसिंग चौहान गौरव ग्रंथ**, पृ.१५८ आणि **हिस्टॉरिकल जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा** पृ.५२४.

एकाच राजवटीच्या नियंत्रणाखाली असे. त्यामुळे वास्तुरचना, नगररचना, रस्ते, पाणीपुरवठ्याचे स्त्रोत यांच्या रचनेत फारशी तफावत जाणवत नाही. सध्या लातूर ही महाराष्ट्रातील अग्रगण्य बाजापेठ गणली जाते. हे पूर्वी मिरज-बार्शी-लातूर या नॅरोगेज रेल्वेचे शेवटचे स्थानक होते. सध्या हा रेल्वेमार्ग बंद करण्यात आलेला असून लातूरपासून ५ कि.मी. अंतरावर लातूर नावाचे नवीन रेल्वे स्टेशन बांधण्यात आलेले आहे. लातूरहून ३२ कि.मी. अंतरावर दक्षिण-मध्य ब्रॉडगेज रेल्वेचे "लातूर रोड" स्थानक आहे. सध्या हे शहर विकासविषयक सर्वच क्षेत्रात वेगाने प्रगती करीत असून त्याचे आधुनिकीकरण वेगाने होत आहे.

लातूर पेठेची वैशिष्ट्यपूर्ण रचना :

पन्नास वर्षांपूर्वीचे लातूर शहर व सध्याचे विकसनशील लातूर शहर यांच्या तुलनेत फार मोठा फरक आहे. भविष्यात लातूर शहराचा विस्तार वाढणार आहे याची येथील बऱ्याच जाणकारांना कल्पना असावी. म्हणूनच भविष्यातील लातूर शहराचा विकास व विस्तार नजरेसमोर ठेवून निजामी राजवटीतील गुलबर्ग्याचे तत्कालिन सुभेदार (आयुक्त) राजा इंद्रकर्ण यांच्या हस्ते लातूर बाजारपेठेचा समावेश असलेल्या आझमजंग विभागाच्या निर्मितीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. यातील वैशिष्ट्यपूर्ण अशा गंजगोलाईचा नगर रचनाकार श्री. फैय्याजुद्दीन साहेब यांनी सन १९४६ मध्ये आराखडा तयार केला. या आराखड्यात गंजगोलाईभोवती संपूर्ण बाजारपेठेशी सुसंगत असे १६ रस्ते येतील अशी व्यवस्था होती. त्यानुसार गंजगोलाईची रचना करण्यात आली. त्यामुळे गंजगोलाईची वास्तू व तिच्याभोवती सर्व दिशांनी येऊन मिळणारे रस्ते ही रचना सूर्य व त्यापासून निघणाऱ्या सूर्यकिरणांसारखी भासते. शहराच्या सौंदर्यात अभूतपूर्व अशी भर टाकणारी अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना महाराष्ट्रात क्वचितच आढळेल. याच गंजगोलाईच्या परिसरात असणाऱ्या बाजारपेठेचा महाराष्ट्रातील काही अग्रगण्य बाजारपेठांमध्ये समावेश होतो.

गंजगोलाईच्या जुन्या वास्तूचे सध्या आधुनिकीकरण व सौंदर्यीकरण करण्यात आलेले असले, तरी तिच्याभोवतीच्या विशिष्ट नागरी रचनेमुळे या वास्तूचे विस्तारीकरण करण्यात अडचणी येतात. त्यामुळे गंजगोलाईच्या गोल आकाराच्या वास्तूमुळे यातील जगदंबा मंदिराचाही आकार गोलाकार ठेवावा लागला आहे. येथे सन १९६८ मध्ये श्री जय जगदंबा नवरात्र महोत्सव मंडळाने पहिल्या सार्वजनिक उत्सवाची सुरुवात केली.

गंजगोलाईच्या जागेवर पूर्वी अष्टभुजा देवीची एक छोटीशी मूर्ती होती. त्याच जागी ऑक्टोबर १९८९ मध्ये एक गोलाकार मंदिर बांधून त्यात या देवीची प्रतिष्ठापना करण्यात आली. या मंदिरास केवळ गर्भगृह असून त्यात ही काळ्या पाषाणातील ९० सें.मी. उंचीची अष्टभुजा जगदंबा मूर्ती आहे. मूर्तीच्या डोक्यावर सुवर्णमुकूट असून चार स्तंभांच्या कलाकुसरयुक्त व नेत्रदिपक मखरात ही मूर्ती विराजमान आहे. गर्भगृहाची लाकडी व्दारचौकटही कलाकुसरयुक्त आहे. गर्भगृहाभोवती गोलाकार प्रदक्षिणामार्ग असून त्यात १२ स्तंभ उभारलेले आहेत व ते कमानींनी एकमेकांशी कलात्मकरित्या जोडलेले आहेत. गर्भगृहासमोर नंदीच्या जागी सिंह आहे. गर्भगृहाच्या बाह्य भिंतीत गोलाकार प्रदक्षिणामार्गात अनेक देवकोष्ठे असून त्यातही विविध देवतामूर्ती विराजमान आहेत. यात शिवलिंग व नंदीही आहे. गंजगोलाईच्या संपूर्ण वास्तूवर त्रिस्तरीय घुमटवजा शिखर असून त्यावर नक्षीदार देवकोष्ठे व त्यात विविध देवतामूर्ती प्रतिष्ठापित केलेल्या आहेत. पश्चिमाभिमुख असलेल्या या वास्तूच्या उंच शिखराचे

लातूर शहरातून कोठूनही दर्शन होते. वास्तूभोवती तटबंदीसारखी एकमजली इमारत असून त्यास चार बाजूस चार प्रवेशव्दारे आहेत.

बुद्धविहार : शहरात बोधेनगर येथे नव्याने एका बुद्धविहाराची निर्मिती करण्यात आलेली आहे. एका प्रशस्त जागी एक कृत्रिम टेकडी तयार करून त्यावर पद्मासनात ध्यानस्थ अवस्थेतील विशाल बुद्धमूर्ती साकारण्यात आलेली आहे. या मूर्तीची शांत व प्रसन्न मुद्रा दर्शकावर निश्चितच परिणाम करते. येथील बुद्धविहारात प्रवेश केल्यावर एका गुहेत गेल्याचा भास होतो. या विहारात पहुडलेल्या अवस्थेत साधारणतः ५.४८ मी. लांबीची विशाल बुद्धमूर्ती आहे. शयनासनातील या मूर्तीचा एक हात मानेखाली असून हे शिल्प अजिंठा लेणीतील मूर्तिशिल्पाची आठवण करून देते. भव्यतेच्या दृष्टीने या मूर्तीचा विशेषत्त्वाने उल्लेख करावा लागतो. लातूरमध्ये याशिवाय लिंबुनी बौद्ध विहार, सिद्धार्थ बौद्ध विहार, वैशाली बौद्ध विहार यासारखी बौद्ध धर्मियांची प्रार्थनास्थळे आहेत.

मुस्लिम प्रार्थनास्थळे : लातूर नगरीत मुस्लिम धर्मियांच्या ११ मशीदी, ४ दर्गे व एक इदगाह आहे. ईदगाह या ठिकाणी मुस्लिम बांधव ईदच्या दिवशी सामुहिक नमाज पढतात. मस्जिद व ईदगाह या ठिकाणी केवळ मुस्लिमच जात असले तरी दर्ग्यात हिंदूही लोक जातात व पिरास भजतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे येथील हजरत सुरतशहावलीचा दर्गा होय. या दर्ग्याच्या उरूसात वरील दोन्ही धर्माचे लोक सहभागी होतात. हजरत सुरतशहावलीच्या यात्रेतही सर्वधर्मीय लोक पहावयास मिळतात.

जैनधर्मीय प्रार्थनास्थळे : लातूर-उस्मानाबाद जिह्यात दक्षिण भारताप्रमाणे जैन धर्माचा प्रभाव प्राचीन काळापासून आहे. विशेषतः राष्ट्रकूट काळात वेरुळ, कंधार, धारुर प्रमाणेच लातूर (लत्तलूर) या स्थानांचा विकास झाला. तसेच जैन धर्मालाही प्रोत्साहन मिळाले. परिणामी येथील जैन परंपरा किमान दहाव्या शतकापर्यंत मागे जाते.

श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर : लातूर नगरीतील ऐतिहासिक देवस्थानांमध्ये या मंदिराचा समावेश होतो. यामुळे लातूरमध्ये जैन संस्कृतिही प्राचीन काळापासून असल्याचे सिद्ध होते. हे मंदिर किंवा देवस्थान जैन गल्ली येथे आहे. या मंदिराच्या भुयारातील मूलनायक पार्श्वनाथाची १.२१ मी. उंचीची पद्मासनातील ध्यानमग्न अवस्थेतील मूर्ती रेखीव व कलापूर्ण आहे. ही मूर्ती भव्य आणि अप्रतिम असून तिच्या डोक्यावर सप्तफणी नागफणा आहे. ही मूर्ती राष्ट्रकूट उत्तरकालीन असावी. या मूर्तीच्या डाव्या बाजूस २४ तीर्थकरांच्या मूर्ती आहेत, तर उजव्या बाजूस श्री सुपार्श्वनाथ भगवानाची काळ्या पाषाणातील मात्र अलिकडील काळातील मूर्ती आहे.या मंदिरातील हे सर्वात अप्रतिम व प्रमुख शिल्प होय.

या जैन मंदिरात काही ठिकाणी असलेले जुने बांधकाम, विस्तीर्ण असे भव्य मंदिर व अनेक जैन तीर्थकरांच्या मूर्ती जैन धर्मियांच्या इतिहासाची आठवण करून देतात. या मंदिराचे भुयार, मधला भाग व दुसरा मजला असे तीन भाग आहेत.

मंदिराच्या तिन्ही भागात प्रत्येकी एक असा स्वतंत्र गाभारा आहे. त्यापैकी मधल्या भागातील गाभाऱ्यात चिंतामणी पार्श्वनाथाची तीन फूट उंचीची पद्मासनबद्ध अशी दुसरी मूर्ती

आहे. ही मूर्ती सुमारे ६०-७० वर्षापूर्वी बलविलेली असावी. या मूर्तीच्या डोक्यावर नागफणा नसून तिच्या पायावर नागफणा हे चिन्ह आहे. तिच्याच समोर डोक्यावर नागफणा असलेली आणखी एक पार्श्वनाथाची मूर्ती आहे.

मंदिराच्या चैत्यालगत २४ तीर्थकरांच्या पितळी मूर्ती आहेत. या चैत्यालयाच्या उजव्या बाजूस आदिनाथाची मूर्ती असून याचे चिन्ह 'वृषभ' आहे. ही मूर्ती या मंदिराचे वेगळे वैशिष्ट्य ठरते. ही मूर्ती आम्र वृक्षावली सिंहासनावर आरूढ आहे. तिच्या उजव्या हातात आंब्याची डहाळी व डाव्या हातात 'कुष्मांडक' फूल आहे.

भगवान शांतीनाथाची मूर्ती : ही या मंदिरातील २.१३ मीटर उंचीची येथील सर्वात उंच मूर्ती आहे. ही मूर्ती भुयाराजवळ पूर्वाभिमुख अशी उभ्या अवस्थेत असून ती काळ्या पाषाणापासून बनविलेली आहे. मूर्तीचे कोरीवकामही विलोभनीय आहे. या मूर्तीजवळच दक्षिणभिमुख अशी श्री क्षेत्रपाळाची मूर्ती आहे. सर्व जैन देवतांमध्ये ही एकमेव अशी शेंदूरधारी मूर्ती आहे. याशिवाय या मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावरील शांत अशा गाभाऱ्यात भगवान महावीरांची शुभ्र स्फटिकाची मूर्ती विराजमान आहे. 'सिंह' हे या मूर्तीचे चिन्ह आहे. या मूर्तीच्यावर उंच शिखर आहे.

लातूर शहरातील रस्ते व चौकांचे सौंदर्यीकरण आणि श्रद्धा यांचा मिलाफ साधावा या दृष्टीने शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौतम बुद्ध, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, महात्मा बसवेश्वर, शिवाजी महाराज, शाहु महाराज, अण्णाभाऊ साठे, यशवंतराव चव्हाण, माणिकराव सोनवणे व राजीव गांधी या थोर विभुतींचे पूर्णाकृती/अर्धाकृती असे एकूण १४ पुतळे बसविण्यात आलेले आहेत.

लातूर या स्थानाची माहिती आपणास रत्नापूर महात्म्यातून मिळते. त्यात विविध ज्योतिर्लिंगे व विष्णुमंदिराची नोंद आहे, शिवाय आठ तीर्थांचाही संदर्भ रत्नापूर माहात्म्यात आहे. सिद्धतीर्थ, नृसिंहतीर्थ, भोगतीर्थ, नागतीर्थ, स्वामीतीर्थ, पद्मतीर्थ, रामतीर्थ व पुष्करतीर्थ ही ती अष्टतीर्थ होत. आजच्या पापनाशिनी तीर्थाचाही रत्नापूर माहात्म्यात उल्लेख आहे.

सिध्देश्वर मंदिर : लातूरमधील प्राचीन मंदिरांमध्ये या मंदिराची गणना होते. हे भव्य दगडी मंदिर पश्चिमाभिमुख आहे. सिध्देश्वर ही लातूरची ग्रामदेवता असून हे मंदिर पुराणकालीन राजा ताम्रध्वज याच्या काळात बांधल्याचे सांगितले जाते.[११५] लातूरच्या ईशान्येस सुमारे २०० मी. अंतरावर असलेल्या या मंदिराचा इ.स.१९१० मध्ये जीर्णोध्दार करण्यात आलेला असला तरी मंदिराची प्राचीन वैशिष्ट्ये शक्यतो लुप्त होणार नाहीत याची दक्षता घेण्यात आलेली आहे. लातूर जिल्ह्यातील हे सर्वात भव्य मंदिर आहे. या मंदिराचा उल्लेख रत्नपूर माहात्म्य या पोथीतही आहे.

मंदिराभोवती ४८.७७ x ३६.५८ x६.१० मी. आकाराचा दगडी परकोट असून त्याला दक्षिण, उत्तर व पश्चिमेस प्रवेशव्दारे आहेत. पैकी पश्चिमेचे मुख्य प्रवेशव्दार होय. आतील बाजूस परकोटास लागून चहुबाजूंनी यात्रेकरुंसाठी ५२ खोल्यांची धर्मशाळा आहे. मंदिराच्या दक्षिण प्रवेशव्दाराजवळ बाहेर पुष्करणी आहे.

---

११५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७७६

मंडप : मंडप व गर्भगृह असा मंदिराचा मूळ तलविन्यास असला तरी त्याला नवीन भव्य मंडप जोडण्यात आला आहे. मूळ मंडप २३.७७ x १३.७१ मी. आकाराचा असून तो चारही बाजूने मोकळा आहे. मंडपात १० साधे स्तंभ असून ते एकमेकांना कमानींनी जोडलेले आहेत. गर्भगृहासमोरील चार स्तंभांमुळे मंडप दोन भागात विभागला गेला आहे. मंडपात एका आयताकृती नक्षीदार शिळेवर ६० सें.मी. उंचीचा तशाच नक्षीने मढविलेला नंदी आहे. मंडपात इतरत्र नक्षीकाम नसले तरी छतास कोरीव नक्षीकाम आहे. मूळ मंडपास जोडलेला नवीन मंडप भव्य आकाराचा असून त्यात ३,००० व्यक्ती बसू शकतात. तो धार्मिक समारंभादी कार्यासाठी वापरला जातो.

गर्भगृह : गर्भगृह ७.६२ x ४.५७ मी. आकाराचे असून त्याचे प्रवेशव्दार कमी उंचीचे असले तरी बहुशाखी नक्षीदार व्दारशाखांमुळे ते आकर्षक दिसते. व्दारललाटावर गणेश बिंब साकारलेले आहे. व्दारशाखांच्या पायथ्याशी दोन चामरधारिणी व व्दारपालांच्या लहान मूर्ती आहेत. याशिवाय दोन्ही बाजूस देवकोष्ठांमध्ये गणपतीची प्रतिष्ठापना केलेली आहे. गर्भगृह मंडप-पातळीच्या खाली असल्यामुळे त्यात उतरण्यासाठी चार पायऱ्या आहेत. आत वेदीवर सिध्देश्वराची तांबे व पितळपासून बनविलेली मूर्ती आहे. यासमोरील खोलगट भागात शिवलिंग आहे. सध्या गर्भगृहाच्या सर्व भिंती संगमरवराने सजविल्यामुळे मूळ प्राचीन स्थापत्य-वैशिष्ट्ये लुप्त झाली आहेत. संगमरवरी फरशीवर मोर पक्षी व फुले चितारण्यात आली आहेत. गर्भगृहाचे वितान करोटक पध्दतीचे आहे. बाह्य भिंतीवर जंघा भागावर गणपती व सूरसुंदरीचा शिल्पपट आहे. मागील बाह्य बाजूस दोन्ही कोपऱ्यावर शिखराकडे जाणारे दोन सोपानमार्ग असून त्यापैकी डावीकडील सोपानाच्या पायथ्याजवळ एका देवकोष्ठात हर-गौरीची एकाश्म मूर्ती, तर उजव्या बाजूकडील सोपानाच्या पायथ्याजवळील देवकोष्ठात मूर्तीऐवजी शिलालेख आहे.

गर्भगृहावरील गच्चीत ९.१४ मी. उंचीचे चौस्तरीय शोभीवंत शिखर आहे. त्याच्या चारही कोनांवर नंदीच्या दोन-दोन जोड्या प्रतिष्ठापित केलेल्या आहेत. शिखरास देवकोष्ठे असून त्यांमध्ये शिव, पार्वती, राम, लक्ष्मण, दत्तात्रय, सरस्वती, लक्ष्मी व विष्णू यांच्या मूर्ती आहेत. शिखरावर कळस नाही. मंदिराभोवतीच्या दक्षिणेकडील परकोटाच्या एका खोलीत शिवलिंग व नंदी आहे. या शिवलिंगास "आत्मलिंग" म्हणतात.

वर उल्लेखिलेला शिलालेख संस्कृत देवनागरी लिपीत असून यात राजा, राजवंश, वर्ष वा तिथी किंवा स्थळाचा उल्लेख नसला तरी लिपीवरून तो अंदाजे इ.स. १२ ते १३ व्या शतकातील असावा.[११६] लेखात व्यक्तिनामांचाही उल्लेख नाही. या लेखशिलेची लांबी-रुंदी २.७ व १.१ ते १.४ फूट आहे. आरंभी शाळुंखासह लिंग व वाममुख नंदी असून त्याखाली १० ओळींचा लेख आहे.[११७] लेखाखाली मोकळी जागा आहे.

उद्देश : सिध्देश्वराला ३६ निवर्तने जमीन दान देणे, त्यावर ब्राह्मण व तपस्वी यांचा अधिकार नाही असे निश्चित करणे हा या लेखाचा उद्देश आहे.[११८]

ज्या खेड्यातील जमीन दानामध्ये मिळाली त्याचे नाव वाचता येणे दुरापास्त आहे.

---

११६. देव, शं.भा., पूर्वोक्त, पृ.३१९.

११७. खरे, ग. ह. , **दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने**, खंड २, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३०, पृ.९०.

११८. देव, शं. भा., उपरोक्त, पृ.३१९

रत्नेश्वर मंदिर : सिध्देश्वर मंदिराच्या मुख्य प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजूस मंदिर आवारातच हे छोटेसे दगडी मंदिर आहे. यास केवळ गर्भगृह असून त्यात पारंपरिक आकारापेक्षा मोठ्या आकाराचे शिवलिंग आहे. गर्भगृहाच्या व्दारशाखा कोरीव असून व्दारशाखांच्या दोन्ही बाजूस नृत्यमुद्रेतील सूरसुंदरींचा शिल्पपट आहे. वर सप्तस्तरीय शिखर असून मंदिराच्या चारही कोपऱ्यांवर व्दिमुखी चार नंदी प्रतिष्ठापित केलेले आहेत.

या मंदिरालगतच लहानशा नागमंदिरात शिळेवर शेषशायी विष्णूचे उठावशिल्प आहे. अशाच एका शिळेवर पंचमुखी नागाची प्रतिमा कोरलेली आहे. या मंदिराचे शिखर नव्याने बांधलेले आहे.

रत्नेश्वर मंदिरासमोरील २१.९१ x २९.६० मी. आकाराच्या "तीर्थ" नामक पुष्करणीत उतरण्यासाठी दक्षिणेकडील दिशेने पायऱ्या आहेत. याच्या डाव्या-उजव्या भिंतींमध्ये देवकोष्ठे असून लगतच सूरसुंदरी शिल्पे आहेत. मागील भिंतीच्या डाव्या कोपऱ्यातील चौस्तंभी देवकोष्ठवजा लघु मंदिरात खंडित शिवलिंग आहे. या मंदिराच्या पायथ्याशी एक लहान कुंड आहे, तर बाजूच्या भिंतीत ६० सें.मी. उंचीच्या गणेशमूर्तीचे देवकोष्ठ आहे.

लातूरला महाशिवरात्रीपासून पुढे सात दिवस ६.०८ हेक्टर क्षेत्रात सिध्देश्वराची मोठी यात्रा भरते. या सात दिवसात सुमारे दहा लाख भाविक यात्रेस भेट देतात. संपूर्ण लातूर शहर व आसपासच्या परिसरासही यावेळी यात्रेचे स्वरुप प्राप्त झालेले जाणवते. या यात्रेत मोठी व्यापारी उलाढाल होते, शिवाय करमणुकीचे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. कुस्तीस्पर्धाही होतात. कुस्तीस्पर्धेतील विजेत्यास रोख पारितोषिकासह चांदीची गदा व "सिध्देश्वर केसरी" हा किताब, तर उपविजेत्यास चांदीचे कडे बहाल केले जाते. यात्रेसाठी संपूर्ण जिल्ह्यातून राज्य परिवहन महामंडळाच्या जादा गाड्या सोडण्यात येतात.

पापविनाश भुतेश्वर मंदिर : या मंदिरात असलेल्या शके १०४९ (इ.स.११२८) च्या शिलालेखातील उल्लेखावरुन हे मंदिर चालुक्यकालीन असावे व हा काळ चालुक्य नृपति सोमेश्वर तिसरा याचा असल्याने बहुधा ते त्यानेच बांधले असावे.[११९] रत्नपूर माहात्म्यात या मंदिराचा उल्लेख असून भुतेश्वर स्तुती किंवा माहात्म्यही त्यात सांगितले आहे.

या पूर्वाभिमुख मंदिराचा तलविन्यास मंडप व गर्भगृह असा असून इ.स.१९८८ मध्ये जीर्णोध्दार करताना अंदाजे ६ x ३ मी. आकाराचा मंडप जोडण्यात आला आहे. असे असले तरी गर्भगृहाची मूळ स्थिती बदलण्यात आलेली नाही. गर्भगृहाभोवती ९० सें.मी. रुंदीचा प्रदक्षिणापथ आहे. गर्भगृहाचा अंतःकक्ष ३.१० चौ.मी. आकाराचा असून तो जमीन पातळीच्या निम्नस्तरात आहे. त्यात भुतेश्वर लिंग व पार्वतीची मूर्ती आहे. प्रवेशव्दाराच्या एका बाजूस कालभैरव व दुसऱ्या बाजूस गणेश मूर्ती आहे. मंदिरावर शिखर आहे. तथापि, मंदिरास उल्लेखनीय असे शिल्पकाम नाही. असे असले तरी या मंदिराची प्राचीनता वादातीत आहे.

उत्तर दिशेकडे मंदिरालगतच एक विशाल पुष्करणी आहे. ४५.७२ x ६०.९६ मी. आकाराच्या या प्राचीन पुष्करणीस तीर्थकुंड किंवा पापविनाशन तीर्थ म्हणतात. त्यात उतरण्याकरिता पूर्व व दक्षिण बाजूने पायऱ्या आहेत. याच्या काठावर मारुती व शनैश्वराचे लहानसे मंदिर आहे.

११९. देशमुख, गो.वि.,पूर्वोक्त, पृ.१३२

सुरुवातीस उल्लेखिल्याप्रमाणे भुतेश्वर मंदिराच्या मंडपात गर्भगृहाच्या डाव्या बाजूस कोपऱ्यात एक शिलालेख आहे. पूर्वी तो गर्भगृह व मंडप यांना दुभंगणाऱ्या भिंतीपाशी डाव्या बाजूस अर्धवट पुरलेला होता. त्यामुळे जमिनीत पुरलेल्या भागावर मजकूर कोरलेला नाही. हा शिलालेख पूर्वी पापविनाशन तीर्थकुंडालगतच्या विहिरीत होता व तेथून तो मंदिरात आणण्यात आला असे येथील काहीजण सांगतात. हा शिलालेख म.म.दत्तो वामन पोतदार व जेष्ठ इतिहास संशोधक प्रा.ग.ह.खरे यांनी वाचला व तो भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे यांनी प्रसिध्द केला.

वर्णन : हा लेख असलेल्या स्तंभवजा दगडाची लांबी व रुंदी अनुक्रमे २.५ व १ फूट असून जाडी १० इंच आहे. याच्या तीन बाजूंवर लेख आहे व चौथ्या बाजूवर शिल्पे कोरलेली आहेत.[१२०] लांबीपैकी वरचा पाच इंच भाग चोहोबाजूंनी निमुळता केला आहे. याच्या तीनही बाजूंवरील लेख पुसट व खराब झालेले असले तरी त्याचे वर उल्लेखिलेल्या संशोधकांनी वाचन केलेले आहे.

अक्षरवटिका : अक्षरांचे स्वरुप शक संवत्सराच्या ११ व्या शतकातील नागरी अक्षरांशी जुळणारे आहे. पृष्ठमात्रा वापरलेली दिसत नाही. लेखाची भाषा संस्कृत आहे व लिपी संवत्सराच्या ११ व्या शतकातील देवनागरी आहे.[१२१] न् ऐवजी अनुस्वार वापरला आहे. काही ठिकाणी श ऐवजी स वापरला आहे.[१२२]

तिथी : याची तिथी शके १०४९, प्लवंग संवत्सर, फाल्गून शुक्ल अष्टमी, म्हणजेच शुक्रवार १० फेब्रुवार इ.स.११२८ ही आहे.[१२३]

व्यक्तिनामे : या लेखात आहवमल्ल (सोमेश्वर प्रथम), त्याचा पुत्र परमर्दि (विक्रमादित्य सहावा) व परमर्दिचा पुत्र भूलोकमल्ल (सोमेश्वर तृतीय) या चालुक्य नृपतींच्या व्यक्तिनामांचा उल्लेख आहे. यात भूलोकमल्ल याची वंशावळ दिल्यानंतर लत्तलौर येथील पापविनाशन देवाची स्तुती केलेली आहे. या शिलालेखाचे महत्त्व असे की, वंशावळीत सोमेश्वर व्दितीयचा उल्लेख नाही.

स्थळ : या लेखात लत्तलौर असे एकच स्थलनाम असून त्यासबंधी वाचन पुढीलप्रमाणे :—

अस्ति दिव्य पुरस्रे, ष्ठं लत्तलौराभिधा(षा)नकं (का) ! महाजनैः (नै) पं

च(पच)शतैर्व्व्देदविभ्दिर्न्निषे(दे)वितं ॥ देवो (स्ति) प्रथितस्तव (त्र) नाम्ना

पापविनाशनः ! यं (ये) दृष्टवा देवदेवेशं सिध्यं (ध्दां) ति (ती) मनुजा भु (भ) वि ॥[१२४]

अर्थ : पूर्वी प्राचीन काळात लत्तलूर नावाचे मोठे नगर होते. त्या काळातील वैदिक व पुराणिक यांनी या नगरास सन्मानित केले होते. अशा प्रकारचे लातूर येथील भूतनाथ भुतेश्वर हे तीर्थक्षेत्र मानवाला पवित्र करणारे सिध्दक्षेत्र व तीर्थक्षेत्र आहे.

रामलिंगेश्वर मंदिर : शहरातील हे मंदिरही पौराणिक राजा ताम्रध्वज याच्या राजवटीतील असल्याचे सांगतात.[१२५] मंदिराभोवती दगडी परकोट आहे. इ.स.१९४८ मध्ये गर्भगृहास

१२०. कित्ता, पृ.१३२-३५.
१२१. देव, शं.भा., पूर्वोक्त, पृ.३१९.
१२२. खरे, ग. ह., पूर्वोक्त, पृ.८५.
१२३. देव, शं. भा., पूर्वोक्त, पृ.३१९
१२४. खरे, ग.ह., पूर्वोक्त, पृ.८९-९०
१२५. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ.७७७

४४.२० x १०.६७ मी. आकाराचा विशाल पत्री मंडप जोडण्यात आला आहे. मंडपाच्या सर्व बाजूस देवदेवता व रामायण-महाभारतातील प्रसंग चितारण्यात आले आहे.

मूळ मंदिराचे केवळ गर्भगृह शिल्लक आहे. बाकी मंदिरास प्राचीनता दर्शविणारे घटक नाहीत. गर्भगृहात शिवलिंग असून त्याच्या माथ्यावर तडा गेलेला आहे. त्यासंबंधीच्या दंतकथेनुसार एका लढाईत रामलिंगेश्वराच्या एका भक्त राजास लागलेला तलवारीचा एक वार या लिंगावरही उमटला.[१२६] मंडपात नंदी आहे. गर्भगृहावर साधे शिखरही आहे.

राममंदिर : रामगल्लीतील या मंदिराभोवती दगडी परकोट आहे. त्यास उत्तर, दक्षिण व पूर्व बाजूस प्रवेशव्दारे आहेत. मंदिरास २१.२३ x १५.२४ मी. आकाराचा आधुनिक बांधकाम शैलीतील मंडप असून त्यापुढे तीन चौरस मीटर आकाराचे मूळ गर्भगृह आहे. त्यात राम, सीता व लक्ष्मणाची मूर्ती प्रतिष्ठापित आहे. गर्भगृहाभोवती प्रदक्षिणा मार्ग आहे. या मंदिरास फारशी वास्तुशास्त्रीय वैशिष्ट्ये नाहीत. रामनवमीस येथे यात्रा भरते.

केशवराज मंदिर : पूर्वाभिमुख असलेले हे प्राचीन दगडी मंदिर काहीसे हेमाडपंतीसदृश[१२७] असून त्यात विष्णूचे सुंदर मूर्तिशिल्प आहे. दिल्लीतील नॅशनल म्युझियममधील केशवराज मूर्तीप्रमाणेच ही मूर्ती असल्याने ती निर्विवाद प्राचीन आहे. १.१२९ मीटर उंचीची ही स्थानक मूर्ती आहे. उत्तरेकडील बाजूसही प्रवेशव्दार असलेल्या या मंदिराचा आकार १९.८१ x १८.२८ मी. आहे. मंदिराच्या दक्षिणेस जीर्णावस्थेतील काही लहान धर्मशाळांचे अवशेष आहेत. काही अवशेष मंदिराभोवतीच्या परकोटाचे असावेत असे दिसते.

अष्टविनायक मंदिर[१२८] **:** शहराच्या शिवनगर भागातील हे आधुनिक स्थापत्य-शैलीतील आकर्षक मंदिर आकाराने अष्टकोनी आहे. मंदिर बांधकामात संगमरवराचा कलात्मकरित्या मुक्तहस्ते वापर केलेला आहे. मंदिराच्या प्रवेशव्दाराजवळच चौरसाकृती मुखमंडप किंवा गणेशमंडप आहे. त्यावर सुंदर व लक्षवेधक लघुशिखर असून त्यात गणेशमूर्ती स्थापित केली आहे.

यानंतर दर्शकाचा अष्टकोनी मंडपात प्रवेश होतो. मंडपात आठ स्तंभ आहेत. त्यायोगे तयार झालेल्या अष्टकोनांमध्ये महिरपयुक्त देवकोष्ठे योजून त्यात अष्टविनायकांच्या मूर्ती प्रतिष्ठापित केलेल्या आहेत. मंदिरास सज्जाही आहे. मदिरास इतर मंदिरांसारखे मंडपासमोर गर्भगृह नसून ते मंडपातच निर्माण केलेले आहे. त्यात तांब्यासारख्या धातूपासून बनविलेल्या आकर्षक मखरात गणेशाची सुमारे ९० सें.मी. उंचीची प्रसन्नचित्त संगमरवरी मूर्ती आहे. गर्भगृहाभोवती प्रदक्षिणापथ आहे, तर नंदीच्या जागी ३० सें.मी. उंचीची मूषक मूर्ती आहे. गर्भगृहावर कलात्मक शिखर असून त्यावर देवदेवता, मानव, पक्षी व प्राण्यांच्या प्रतिमा शिल्पांकित करण्यात आलेल्या आहेत.

मंदिरासमोरच मंदिरसन्मुख शांतचित्त सदाशिवाची सुमारे ३.६ मी. उंचीची धातूची भव्य स्थानक मूर्ती असून ती कमळाकृती चबुतऱ्यावर स्थापित केलेली आहे. मूर्तीच्या डाव्या हस्तात जमिनीवर टेकलेले त्रिशूळ आहे. शिवाच्या जटेतून पाण्याची धार सोडून येथे आकर्षण निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

---

१२६. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ७७७

१२७. कित्ता.

१२८. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणावर आधारित.

मंदिराच्या दक्षिण दिशेस आवारातच एक कृत्रिम धबधबा निर्माण तयार करून त्यात वीणावादक सरस्वतीची मूर्ती प्रतिष्ठापित केलेली आहे. मंदिराभोवती उत्तम बगिचा आहे. शहराचे हे आधुनिक सौंदर्यस्थळ बनले आहे.

गौरीशंकर मंदिर : शहराच्या दक्षिणेस कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात जमिनीच्या पातळीपेक्षा ४.५ मी. उंचीच्या पीठावर संगमरवरी दगडात बांधलेले हे आधुनिक स्थापत्य शैलीतील विलोभनीय मंदिर आहे. मुखमंडप व मंडप असा तलविन्यास असलेल्या या चौरस आकाराच्या पूर्वाभिमुख मंदिराच्या मंडपातच गर्भगृह आहे. मंडपात स्तंभ नाहीत. पण मंदिरास चारही बाजूने सज्जा आहे. गर्भगृहात वेदीवर हर-गौरी व बालगणेशाचे संगमरवरी नयनरम्य मूर्तिशिल्प आहे. गर्भगृहावर शिखरही आहे. मंदिराभोवती उत्तम बगिचा आहे.

लातूर-औसा हमरस्त्यालगतचा 'विराट हनुमान' व विमानतळाजवळील 'वायुदूत' यांची अत्यंत कलात्मकरित्या साकारलेली शिल्पे व लगतचा परिसर लातूर शहराच्या सौंदर्यात निश्तिच मोलाची भर टाकतो. लातूर शहराचा सध्या झपाट्याने कायापालट होत असून गेल्या दोन दशकात शहरात नवीन उड्डाणपूल, बसस्थानक, भव्य शासकीय विश्रामगृह व अन्य वास्तू निर्माण करण्यात आलेल्या आहेत. अग्रगण्य व्यापारी पेठ म्हणूनही या शहराचा लौकिक सतत वाढत असून शैक्षणिक केंद्र म्हणूनही ते सर्वमान्य झाले आहे. ब्रॉडगेज रेल्वेनेही हे शहर भारतातील अन्य शहरांशी जोडले गेले आहे.

वडवळ-नागनाथ

वडवळ-नागनाथ : (चाकूर ता., १८° ३०' उ., ७६° ५०' पू.) या गावातील अंदाजे ९० एकर क्षेत्रफळाच्या संजीवनी बेटामुळे हे गाव जिल्ह्यात प्रसिध्दीच्या झोतात आले आहे. यास बेट म्हटले जात असले तरी ती एक लहानशी टेकडी आहे. या बेटावर ७० पेक्षा जास्त दुर्मिळ आयुर्वेदिक औषधी वनस्पती सापडल्या आहेत. त्यात शंखपुष्पी, राजहंस, अश्वगंधा, ब्रम्हवंदी, चंदन, खडकशेपू, दुग्धिका, बावची, अगस्ता, अडुळसा, अमरवेल, आपटा, आस्कंद, काटे धोत्रा, कुलिथ, करटोळ, उपळसरी, गुळवेल, डुकरकंद, तुपकडी, देवडांगर, निर्गुडी, घेवडा, चांदवेल, अर्कमुळा, इंदिवर, इंद्रपुष्पी, इंद्रवारुणी, आवळा, इसबगोल, तालपर्णी, ककुंदर, कपोतका, नागकेशर, खापरखुटी, कोळसुंदा, खाजकोलती, घंटापाटली, शतावरी या व अन्य वनस्पतींचा समावेश आहे. कै.बापूसाहेब पाटील शिक्षण प्रसारक मंडळाने या बेटाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी चालविलेल्या प्रयत्नातून एका तज्ञ समितीने या बेटाची पाहणी करुन या वनस्पती शोधून काढल्या. या समितीने संजीवनी बेटाच्या विकासासाठी काही मौलिक शिफारशी केल्या आहेत. त्यात येथे आयुर्वेदिक वनस्पती संशोधन केंद्र उभारणे ही महत्त्वाची शिफारस आहे.

दरवर्षी उत्तरा नक्षत्रात अनेक रुग्ण या बेटावर येतात. तीन दिवस उपाशीपोटी येथील कोणत्याही वनस्पतींची फक्त पाने खातात. चौथ्या दिवशी बेटाच्या पायथ्याशी असणाऱ्या तळ्याच्या पाण्यात काळ्या साळीचा भात शिजवतात व गायीच्या तुपात मिसळून खातात. यामुळे कोणताही रोग बरा होतो असा त्यांचा समज आहे. परंतु कोणती वनस्पती खाल्ल्याने कोणता रोग बरा होतो याची त्यांना माहिती नसल्याने हे रुग्ण कोणत्याही वनस्पतीची पाने तर खातातच, पण काही रोपटीही उपटून घेऊन जातात. त्यामुळे नैसर्गिक संपत्ती असणाऱ्या या दुर्मिळ वनस्पती हळूहळू कमी होत आहेत. यास्तव या वनस्पतींची होणारी हानी टाळण्यासाठी

व या बेटाचे संवर्धन करण्यासाठी वैधानिक विकास महामंडळाने पुढाकार घेऊन या बेटाच्या विकासाचा निर्णय घेतला आहे. येथील दगड व मातीत ३२ टक्के लोह असल्याचे निदर्शनास आले आहे. आता महाराष्ट्र शासनानेही या बेटाच्या संवर्धन व विकासकामे हाती घेतली आहेत. लकरच हे जिल्ह्यातील एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून नावारुपास येईल यात शंका नाही. या ठिकाणच्या वनऔषधी विषयीचा तपशील प्रकरण १ भूगोल-वनसंपदा मध्ये दिला आहे.

नागनाथ मंदिर : वडवळ-नागनाथ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या एका स्वतंत्र वसाहतीत यादवकाळात बांधण्यात आलेल्या हेमाडपंती पध्दतीचे शिव मंदिर आहे. मंदिराचे मूळ स्वरूप अस्तित्त्वात नसले तरी पाताळ-लिंगी गर्भगृह मूळ स्वरूपात असून या गर्भगृहाच्या प्रवेशव्दारावरील ललाटबिंबावर गणेश आहे. द्वारशाखा ५ शाखी असून खाली शैव द्वारपाल आहे. मूळात असलेले अंतराळ व सभामंडप आज अस्तित्त्वात नाही. येथे नव्याने स्लॅब टाकला आहे. लगतच यादवकालीन काही शिल्प अवशेष व विरगळ आहे.

श्रीकृष्ण सत्यसाई धाम

श्रीकृष्ण सत्यसाई धाम[१२९] (चाकूर ता., १८° ३०' उ., ७६° ५०' पू.) : महाराष्ट्रात अल्पावधीत प्रसिध्द पावलेल्या व चाकूर येथील निसर्गरम्य व वनराईने नटलेल्या, साई नंदनवनम् परिसरातील श्रीकृष्ण सत्यसाई गजानन प्रतिष्ठान निर्मित, श्रीकृष्ण सत्यसाई धामात दि. १६ जुलै २००१ रोजी पुट्टपर्ती येथील महंत श्री सत्यसाई बाबा यांच्या हस्ते येथील नवनिर्मित शिवालयासहित एकूण नऊ मंदिरातील ४० विविध देवदेवतांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना संपन्न झाली. श्री सत्यसाईबाबा यांच्यावरील श्रध्देचे प्रतिक म्हणून या साई नंदनवनम् परिसराचा तीर्थक्षेत्र म्हणून विकास होत आहे. हे स्थळ चाकूर-आनंदवाडी रस्त्यावर आहे. चाकूरपासून एक कि.मी. अंतरावर असलेल्या या साई नंदनवनम् परिसराची स्वागत कमान प्रथमतः दर्शकाच्या नजरेस पडते. मंदिर परिसराच्या ईशान्य कोपऱ्यात ५×६ मीटरची ही पूर्वाभिमुख मुख्य व आकर्षक कमान आहे. येथेच प्रथम गणेशवंदन करुन मंदिर संकुलात प्रवेश होतो. यापुढे सुमारे १२० मीटरवर रामदरबार हे छोटेसे मंदिर असून त्यात राम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांच्या आकर्षक व लक्षवेधी संगमरवरी मूर्ती आहेत. याच्या उत्तर बाजूस विठ्ठल-रूक्मिणीचे मंदिर असून मंदिर व त्यातील मूर्ती सुंदर आहेत. यापुढे सुमारे ९० मीटरवर संतोषी माता मंदिर असून त्यात मातेची १.५२ मीटर उंचीची अतिशय सुंदर व देखणी संगमरवरी मूर्ती आहे. हा सर्व परिसर चढावाचा व काहीसा डोंगराळ असल्याने येथे पायऱ्या तयार करण्यात आलेल्या आहेत. या मार्गातच शेगावचे श्री गजानन महाराज, मारुती महाराज दस्तापूरकर व उत्तरेश्वर माऊली पिपंरीकर यांची हुबेहूब मूर्ती असलेले मंदिर आहे.

यानंतर येथील मुख्य व आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेले शिवमंदिर लागते. या मंदिराच्या प्रवेशव्दारासमोर विशाल आकाराचा कल्लोळ किंवा तिर्थाची निर्मिती करण्यात आली आहे. येथील हे अनोखे असे शिवलिंगाच्या आकाराचे मंदिर ७० मीटर लांब व ३० मीटर उंचीचे आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे मंदिराच्या गजदरबारातून मंदिरातील मूर्ती व कळसाचे एकाचवेळी दर्शन होते. या संपूर्ण मंदिरास शिवलिंगाचा आकार दिलेल्या शाळुंखेची (पिंडीचा वरचा भाग) उंची १०.९७ मीटर एवढी आहे, तर दाक्षिणात्य स्थापत्य कलेची जोड दिलेल्या

१२९. श्रीकृष्ण सत्यसाई धामकडील माहिती पुस्तिकेवर व प्रत्यक्ष सर्वेक्षणावर आधारित.

गर्भगृहात २.७४ मीटर लांब व १.२१ मीटर उंचीचे काळ्या संगमरवरातील शिवलिंग आहे. या शिवलिंगास अभिषेक केलेले पाणी थेट कल्लोळात जाते. याच गर्भगृहात भगवान श्रीकृष्णाची गायीसह प्रसन्न मुद्रेतील १.८२ मीटर उंचीची देखणी व मन प्रसन्न करणारी मूर्ती आहे. या मूर्तीलगत शिर्डीच्या साईबाबांची पांढऱ्याशुभ्र संगमरवरातील मूर्ती आहे, तर डाव्या बाजूस खुद्द श्री सत्यासाई बाबांनी स्वहस्ते स्थापन केलेली त्यांचीच मूर्ती आहे. या मंदिराच्या सभामंडपाची सात हजार भाविक बसण्याची क्षमता आहे. तसेच मंदिराच्या तळमजल्यात दोनशे भाविक ध्यानाला बसतील एवढे मोठे ध्यानमंदिर आहे. या मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावर भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणारे व दशावतारातील दृष्ये चितारलेले कलादालन उभारलेले आहे. हे मंदिर दक्षिणोत्तर असून पूर्व व पश्चिम बाजूस ६ मीटर अंतरावर सुबक व आकर्षक कलेचा नमुना असलेल्या १८ कमानी आहेत. मंदिराच्या उजव्या बाजूस अष्टविनायक मंदिर व त्यात गणेशाची काळ्या संगमरवरातील १.५२ मीटर उंचीची मूर्ती आहे. या मंदिरासमोर लहान असे नवग्रह मंदिर आहे, तर डाव्या बाजूकडील कार्तिक स्वामी मंदिरात कार्तिक स्वामीची स्थानक मूर्ती आहे. येथील पश्चिम बाजूच्या भव्य प्रांगणात पार्वतीची काळ्या संगमरवरातील स्थानक मूर्ती असलेले मंदिर व शेजारीच पांढऱ्या संगमरवरातील गायत्री देवीची कोरीव व लक्षवेधक मूर्ती असलेले छोटे मंदिर आहे.

शिवमंदिराच्या मागे ९० मीटर अंतरावरील एका लहान टेकडीवर श्री सत्यसाई बाबांचे निवासस्थान आहे. या निवासाच्या प्रवेशव्दारासमोर शांती, प्रेम, अहिंसेचा संदेश देणारा ३.३५ मीटर उंचीचा सर्वधर्म स्तंभ आहे. या प्रवेशव्दारात दोन गजराज स्वागतासाठी नित्य सज्ज असतात. या व्दारातून आत गेल्यास शिर्डीच्या साईबाबांची १.८२ मीटर उंचीची ब्रॉंझची मूर्ती दिसते. दोन मजल्याच्या या निवासस्थानाच्या चोहोबाजूस आकर्षक कमानी व अद्ययावत पध्दतीचा बगिचा आहे.

येथील सत्यसाई गजानन प्रतिष्ठानतर्फे शिक्षण, आरोग्य, बालविकास, वेदशाळा, पशुउपचार केंद्र, गोरक्षण केंद्र, औषधालय, निसर्गोपचार केंद्र, ग्रंथालय, व्यापारी संकूल व अन्य समाजोपयोगी उपक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. शिवाय येथे विस्तीर्ण वनराई विकसित करण्यात आलेली असून त्यात मुख्यत्वे केशर जातीच्या आंब्यांचे पीक घेण्यात येते. याच परिसरात टेकडीच्या पायथ्याशी पर्यटकांसाठी नौकाविहाराची सोय व्हावी म्हणून एक जलाशय, बालकांसाठी खेळणी व भक्तांच्या निवासाच्या सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. हे स्थळ जिल्ह्यातील एक महत्त्वपूर्ण व आकर्षक पर्यटन स्थळ म्हणून विकसित होत आहे.

शिरूर - अनंतपाळ

शिरूर - अनंतपाळ[१३०] (ता.मुख्यालय, १८° ४०' उ., ७५° ५०' पू.) : हे नवनिर्मित तालुक्याचे गाव घरणी नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर वसलेले आहे. हे गाव कल्याणीच्या चालुक्यांच्या अमदानीतील एक महत्त्वाचे स्थान असल्याची माहिती येथील अनंतपाळ मंदिरातील चालुक्यकालीन शिलालेखावरून मिळते. हा शिलालेख चालुक्य विक्रमादित्य सहावा (इ.स.१२ वे शतक) याचा आहे. शिरूर येथील अनंतपाळ आणि सोमनाथ या दोन शिवालयांचे वर्णन या शिलालेखात आहे.[१३१] त्यापैकी केवळ अनंतपाळ मंदिरच आज येथे अस्तित्वात आहे.

१३०. रौप्य महोत्सवी विशेषांक, श्री.अ.नु.विद्यालय, शिरूर अनंतपाळ; डॉ.हरिहर ठोसर लिखित, **हिस्टॉरिकल, जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा** हा ग्रंथ व प्रत्यक्ष सर्वेक्षणावर आधारित.

१३१. शेळके, जी. सी., **ए हिस्टरी ऑफ मराठवाडा रिजन,** पूर्वोक्त, पृ. ४, ९ व हरिहर ठोसर, उपरोक्त, पृ. ६८४.

तथापि, शहरात अनेक ठिकाणी मंदिराच्या शिळा व सुटी शिल्पे विखुरलेली आढळतात. कदाचित ते सोमनाथ मंदिराचे अवशेष असावेत. शिलालेखातील माहितीनुसार या मंदिरात 'घटिकास्थान' किंवा पाठशाळा चालत होती व घटिकास्थानाचे संचालन गुरूदेव नामक आचार्यांकडे होते. शिक्षणाच्या अनुपलब्धतेमुळे विविध प्रदेशातील विद्यार्थी शिक्षणासाठी शिरुरला येऊन राहत अशी नोंदही त्यात आहे. यावरून असे स्पष्ट होते की, शिरूर-अनंतपाळ येथे कल्याणच्या चालुक्यांच्या काळात अशी 'मंदिर-शाळा' होती. म्हणजेच इ.स.११ व १२ व्या शतकात शिरूर हे या प्रदेशातील महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र तसेच बाजाराचेही शहर होते. या शिलालेखात या मंदिराच्या निर्माणकर्त्याचे नाव नाही.

प्राचीन काळी मंदिरांची नावे त्यांच्या निर्मात्याच्या नावावरून निश्चित करण्याची प्रथा रूढ होती. उदा.हिप्पळगावचे भीम सेनापतीने बांधलेले भीमेश्वर मंदिर. याच न्यायाने या मंदिराचा निर्माता अनन्तपाळ नामक कोणीतरी असावा. कदाचित कल्याणीचा चालुक्य नरेश सहावा विक्रमादित्य याचा मंत्री अनन्तपाळ दण्डनायक हा असावा.[१३२] शिरूर या ग्रामनामासही उपपदाच्या रूपाने अनन्तपाळचे नाव लागले आहे. त्यावरून चालुक्यकाळी शिरूर येथे अनन्तपाळ दंडनायकाचे वास्तव्य असावे किंवा हे गाव त्याला राजाकडून मिळाले असावे.[१३३] सिंघण यादवाचा सेनापती खोलेश्वर याचे वास्तव्य अंबाजोगाईस असल्याने त्याकाळी ते 'खोलनायकाचे अंबे' या नावाने ओळखले जात असे. त्याच्या कन्येने बांधलेले अंबाजोगाई येथील एक मंदिर खोलेश्वर मंदिर म्हणून ओळखले जाते. थोडक्यात, शिरूर येथील मंदिराचे नाव आणि या ग्रामनामास जोडले गेलेले 'अनन्तपाळ' हे उपपद या स्थानाशी अनन्तपाळ दण्डनायकाचा संबंध सूचित करतात. कदाचित हे गाव अनन्तपाळास विक्रमादित्याने कायमचे दिले असावे व त्यावरून त्यास अनन्तपाळ असे नाव जोडले गेले असावे.[१३४]

या गावाचे मूळ नाव श्रीपूर असे होते. येथील अनंतपाळ मंदिरात असलेल्या उपरोक्त कन्नड भाषेतील शिलालेखामध्ये या नावाचा उल्लेख आहे असे म्हैसूर येथील संशोधक डॉ.व्यंकटेश राव यांचे मत आहे. 'श्री' म्हणजे लक्ष्मी व 'पूर' म्हणजे गाव. म्हणजेच लक्ष्मीचे गाव ते श्रीपूर. या नावाचा कालौघात अपभ्रंश होऊन ते शिरूर असे झाल्याचे काहींचे मत आहे, तर डॉ.हरिहर ठोसरांच्या मते या शिलालेखात 'शिरिउरी' असे नाव आहे व तेच शिरूर-अनंतपाळचे जुने नाव असावे. हे नाव संस्कृत श्रीपुरी शब्दावरून आले असावे. इ.स.१२ व्या व १३ व्या शतकात हे या प्रदेशातील महत्त्वाचे स्थळ होते. अनंतपाळ हे या गावचे ग्रामदैवत आहे. त्यामुळे त्यास शिरूर-अनंतपाळ या नावाने ओळखले जाऊ लागले. वतनदार पाटील घराण्यातील भोजराज नामक प्रसिध्द व्यक्तीच्या नावावरूनही या गावास काही काळ 'भोजराज शिरूर' असे संबोधले जाई. पण या व्युत्पतीबाबतच्या आख्यायिकेनुसार या गावचे ग्रामदैवत शिव आहे. कन्नडमध्ये गावास ऊर म्हणतात. त्यावरून यास शिववूर व पुढे अपभ्रंशाने शिरूर नाव पडले असावे.

---

१३२. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ,** पृ.१५९.
१३३. कित्ता.
१३४. कित्ता, पृ.१५९ आणि पूर्वोक्त, **हिस्टॅरिकल जिऑग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पृ.५८१-५८२

पूर्वी या नगराभोवती तटभिंत होती. तिचे अवशेषही काही ठिकाणी दृष्टीस पडतात. तिच्या भिंतीचा पाया १.५ ते २ मी. रूंदीचा होता व तो मोठाल्या दगडांनी बांधलेला होता. त्यावर सफेद मातीच्या विटांची भिंत होती. गावात प्रवेश करण्यासाठी तटभिंतीस उत्तर व दक्षिण बाजूस दोन मुख्य प्रवेशव्दारे (वेशी) होती. त्यांचे अवशेष आजही दिसतात. शिवाय पूर्वेस व पश्चिमेसही अन्य दोन लहान प्रवेशव्दारे होती. गावातील प्रमुख रस्ते दक्षिणोत्तर असून पूर्व-पश्चिमेकडून येणारे इतर रस्ते त्यांना काटकोनात येऊन मिळतात.

अनंतपाळ मंदिर : स्थापत्यशैलीवरून हे वेसर शैलीतील चालुक्यकालीन मंदिर असावे. हे विष्णूचे असले तरी काही विव्दानांच्या मते पूर्वी कधीकाळी ते शिवमंदिर असावे. पूर्वाभिमुख असलेले हे मंदिर निलंग्याच्या नीलकंठेश्वर मंदिराप्रमाणे त्रिगर्भी असून व्दारमंडप, मंडप, अंतराळ, उपगर्भगृह असा तलविन्यास आहे. मंदिर सुमारे एक मीटर उंचीच्या पीठावर बांधण्यात आलेले आहे. व्दारमंडपाच्या दोन्ही बाजूस हुबेहूब तसेच दोन मंडप असणे ही या मंदिराची विशेषता होय. हे तीनही मंडप सर्वतोभद्र प्रकारातील आहेत.

मंडप : मंडपाचे संपूर्ण बांधकाम अंतर्बाह्य अत्यंत रेखीव व सुरेख आहे. मंडपात शेषशायी विष्णू व त्याच्या इतर अवतारातील मूर्ती आहेत. मंडपाच्या दोन्ही बाजूस असलेल्या उपगर्भगृहांसमोर व मुख्य गर्भगृहासमोर कोरीवकामयुक्त शिल्पांकनाने नटलेली अंतराळे आहेत. मुखमंडप, मंडप व अंतराळांचे छत करोटक पध्दतीचे आहे. मंदिराच्या तीनही बाजू सर्वतोभद्र असल्या तरी मंडपात कलाकुसरयुक्त आठ स्तंभांची विशिष्ट पध्दतीने योजना केलेली असल्यामुळे प्रत्यक्षात या बाजू बंदिस्तच वाटतात. हे सर्व स्तंभ तळाशी चौरसाकृती तळखडा, त्यावर अष्टकोनी भाग, त्यावर पुन्हा चौरसाकृती खंड, त्यावर गोलाकार स्तंभमध्य, स्तंभशीर्ष व चहुबाजूंनी स्तंभाधार अशा स्वरूपातील असून स्तंभखंडांवर नक्षीकाम व देवतांच्या प्रतिमा आहेत. उत्तर बाजूकडील उपगर्भगृहाच्या प्रवेशव्दाराच्या ललाटावर गरूड प्रतिमा व पायथ्याशी दोन्ही बाजूस वैष्णव व्दारपाल आहेत. या उपगर्भगृहात असलेली रमा-माधवाची मूर्ती हेच येथील मुख्य उपास्य दैवत आहे.

दक्षिणेकडील उपगर्भगृहात वेदीवर उमा-महेश्वराची मूर्ती विराजमान आहे. मुख्य गर्भगृहापुढील अंतराळात एका देवकोष्ठामध्ये गणेशासह सप्तमातृकापट आहे, तर गर्भगृहात शिवलिंग आहे. थोडक्यात, या मंदिराचे निलंग्याच्या नीलकंठेश्वर मंदिराशी काहीसे साम्य आहे.

नारायण मंदिर : गावाच्या पूर्वेस संपूर्णतः अनंतपाळ मंदिर-स्थापत्य शैलीचेच पश्चिमाभिमुख असे नारायण मंदिर आहे. त्यामुळे संपूर्ण वर्णनाऐवजी वेगळ्या अशा वैशिष्ट्यांचीच येथे नोंद घेण्यात येत आहे. मुखमंडप, मंडप, अंतराळ व त्रिगर्भगृहे असा या मंदिराचा तलविन्यास आहे. अनंतपाळ मंदिराप्रमाणे मात्र येथील स्तंभांवर कोरीव शिल्पांकन नाही. मुख्य गर्भगृहाच्या ललाटावर गणेशाऐवजी गरूड आरूढ झालेला आहे. त्यावरूनही हे विष्णूमंदिर असल्याचे सिध्द होते. तरीही मुख्य गर्भगृहात शिवलिंग आहे हे विशेष. मुख्य मंडपात एका बाजूस गरूडारूढ लक्ष्मी-नारायणाची मूर्ती आहे. डावीकडील उपगर्भगृहात शिवपार्वती आहेत. मंदिराच्या बाह्य भिंतींवर मिथुन शिल्पे व नर्तिकांच्या कोरीव प्रतिमांचे शिल्पांकन आहे. अनंतपाळ मंदिरातील कन्नड भाषेतील शिलालेखात या मंदिराचा उल्लेख आहे असे म्हैसूरचे संशोधक डॉ.व्यंकटेश राव यांचे मत आहे.

अनुक्रमणिका

मल्लिकार्जून मंदिर : हे मंदिर पूर्वाभिमुख असून वरील दोन्ही मंदिरांसारखीच याची बहुतांश रचना आहे. याच्या गर्भगृहात शिवलिंग आहे. या मंदिराच्या पूर्वेस सध्या बुजलेली प्राचीन पुष्करणी आहे.

सन १९९३ च्या भूकंपात या सर्व मंदिरांना थोडीफार हानी पोहोचलेली आहे.

सात बुरुजांची गढी : श्री.संभाजीराव पाटील यांच्या मालकीची ही गढी सात बुरुजांची आहे. पूर्वाभिमुख असलेल्या या गढीच्या बाह्य भिंतीची उंची १३.५ मी. आहे. ही मध्ययुगातील गढी असावी. या वास्तूच्या स्वरूपाकडे पाहिल्यावर हा साक्षात गडकोटच भासतो. येथील ऐकीव परंपरेप्रमाणे या गढीचा बांधकामकाळ ३०० वर्षांपूर्वीचा असावा. गढीचे क्षेत्रफळ सुमारे पाऊण हेक्टर आहे. काळ्या दगडात बांधलेल्या या गढीच्या पश्चिम व दक्षिण बाजूस सात बुरूज आहेत. सर्व बुरूजांवरून शत्रुवर मारा करण्यासाठी जंग्या आहेत. आणिबाणी प्रसंगी एका बुरुजातून गुप्त मार्गाने ३-४ कि.मी. वरील एका टेकडीपाशी पोहोचता येते असे सांगितले जाते.

शिवपूर

शिवपूर (ता.शिरूर - अनंतपाळ, १८° ४०' उ., ७५° ५०' पू.) : या गावाचे प्राचीन नाव 'सिंधाण' असे होते. या गावातील प्राचीन म्हणून नोंद घेण्यासाठी एकमेव वास्तू म्हणजे चोहोबाजूंनी प्रवेशमार्ग असलेली पुष्करणी होय. काहीशा उद्ध्वस्तावस्थेतील या पुष्करणीच्या पश्चिमेकडील प्रवेशमार्ग बंद करून तेथे मंदिर उभारण्यात आले आहे. प्रवेशमार्गाच्या दुतर्फा देवकोष्ठे आहेत. चार टप्प्यात बांधलेल्या या पुष्करणीची खोली सात मीटर आहे. येथे एका शिळेवर नागयुगूलाची प्रतिमा कोरलेली असून येथेच कन्नड भाषेतील एक पूर्ण झिजलेला शिलालेख आहे. बाजूला महादेव व मारूती मंदिर तसेच तात्या महाराज नामक सत्पुरुषाचे मंदिर आहे.

साई

साई (ता.लातूर, १८° २५' उ., ७६° ३०' पू.) : लातूरच्या उत्तरेस सात कि.मी. अंतरावरील या निसर्गरम्य पर्यटनस्थळी मांजरा नदीस बंधारा घालून पाणी अडवले आहे. नौकानयन व जलक्रीडा करण्यासाठी येथे जिल्ह्यातून तसेच लगतच्या जिल्ह्यांतूनही पर्यटक येतात. नगरपालिकेने येथे पर्यटकांसाठी निवासस्थाने बांधलेली आहेत. येथील बगिच्यात लहान मुलांसाठी खेळण्याची साधने आहेत. तथापि, हे पर्यटन स्थळ काहीसे दुर्लक्षित आहे.

सोमनाथपूर

सोमनाथपूर[१३५] (ता.उदगीर, १८° ३५' उ., ७६° १५' पू.) : हे गाव उदगीर शहरापासून साधारणत: तीन कि.मी. अंतरावर असून या गावात दोन प्राचीन मंदिरे आहेत. या दोन्ही मंदिरांचा काळ समजण्यास कठीण असला तरी त्यांचे बांधकाम सुमारे ४०० वर्षांपूर्वीचे असावे असे येथील ग्रामस्थ सांगतात. यापैकी एक मंदिर जगदंबा देवीस वाहिलेले आहे. या मंदिराचा तलविन्यास केवळ मंडप व गर्भगृह असा आहे. या सर्वतोभद्र प्रकारातील मंडपाचा आकार साधारणत: ९×६ मीटर असून त्यात स्तंभ नाहीत. स्तंभांच्या जागी कमानी उभारून व त्यांनाच स्तंभाकार बनवून मंडपाच्या साध्या सपाट छतास आधार दिलेला आहे. या मंदिराचे अधिष्ठान २.५ मीटर इतके उंच असून त्यावर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. या

१३५. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणावर आधारित.

अधिष्ठानात मंडपाच्या आकाराएवढी भुयारवजा खोली आहे. सध्या ती बंद आहे. कदाचित त्यात कोणा साधूची ध्यानधारणा होत असावी.

सुमारे ४.५ चौ.मीटर आकाराच्या गर्भगृहाचे प्रवेशव्दार १.२० मीटर उंचीचे असून व्दारललाटावर गणेशबिंब आहे. गर्भगृहात वस्त्रप्रावरणे ल्यालेली जगदंबेची मूर्ती आहे. गर्भगृहावर साधे शिखरही आहे. हे मंदिर प्राचीन असले तरी संपूर्ण मंदिरास विशेष उल्लेख करावा अशी स्थापत्यशास्त्रीय वैशिष्ट्ये किंवा कोरीवकाम नाही.

या मंदिराचे आवार विस्तीर्ण असून मंदिरासमोर दोन ठेंगण्या दगडी दीपमाळा आहेत, तर मंदिराच्या दोन बाजूस कमानयुक्त तटभिंत आहे. ही भिंत बरीच रूंद असल्याने कमानींमुळे निर्माण झालेल्या खोल्यांसारख्या जागेचा वापर यात्रेकरूंना राहण्यासाठी होत असावा. या मंदिराचा ट्रस्ट केलेला असून नित्य पूजे-अर्चेसाठी येथे पुजारी आहेत. या तटभिंतीच्या बाहेर सुमारे ९x७ मीटर आकाराची एक पुष्करणी असून त्यात उतरण्यासाठी एकाबाजूस तीन पायऱ्या आहेत. यातील पाण्याचा वापर स्नानासाठी व अन्य धार्मिक कार्यासाठी केला जातो.

येथील दुसरे मंदिर हे शिवमंदिर असून मंडप, अंतराळ व गर्भगृह असा त्याचा तलविन्यास आहे. मंदिराचा सर्वतोभद्र प्रकारातील मंडप साधारणत: ७x६ मीटर आकाराचा असून याही मंदिराच्या मंडपात जगदंबा मंदिराप्रमाणेच प्रत्यक्ष स्तंभ नसून कमी उंचीच्या पाच स्तंभाकृती कमानी आहेत व त्यावर मंडपाचे छत पेललेले आहे. या पाच कमानींपैकी प्रत्येकी दोन कमानी मंडपाच्या दोन्ही बाजूस व एक कमान मंदिराच्या दर्शनी भागात असून या एका कमानीचा उपयोग मंडपाचे व पर्यायाने मंदिराचे प्रवेशव्दार म्हणून केला जातो. अन्य कमानींमधूनही मंदिरात प्रवेश करता येतो.

मंडपापुढील अंतराळात पारंपारिक आकाराच्या नंदीपेक्षा लहान आकाराचा नंदी व दोन्ही बाजूस एक-एक उघडे दालन आहे. त्यापैकी डावीकडील दालन काही धार्मिक साहित्य ठेवण्यासाठी खोलीमध्ये रूपांतरित करण्यात आलेले आहे. अंतराळ किंवा मंडपात कोणतेही अन्य अलंकरण नाही.

मंदिराचे गर्भगृह ३.५ चौ.मीटर आकाराचे असून त्यास सुमारे १.५ मीटर उंचीची व्दारचौकट व व्दारललाटावर गणेशबिंब आहे. व्दारशाखांवर कोणतेही अलंकरण नाही, पण गर्भगृहाचे वितान आकर्षक भौमितिक नक्षीने युक्त आहे. त्यास उभे कंगोरे आखून आतून शिखरासारखे निमुळते केलेले आहे. याच्या तीनही बाजूकडील भिंतीत छोटी चौरस आकाराची तीन देवकोष्ठे आहेत. तथापि, ती रिक्त आहेत. गर्भगृहात मध्यभागी शिवलिंग प्रतिष्ठापित केलेले आहे. गर्भगृहावरील शिखर चौस्तरीय असून त्यावर कळसही आहे. या मंदिरासही उल्लेखनिय अशी वास्तुवैशिष्ट्ये नाहीत.

जगदंबा मंदिराप्रमाणेच या मंदिरासन्मुख ९.१४ मीटर आकाराची काहीशी ढासळत्या अवस्थेतील एक पुष्करणी आहे. यास येथे 'तीर्थ' असे सबोधले जाते. याच्या चारही बाजूस प्रत्येकी सात पायऱ्या असून त्यापैकी समोरच्या बाजूकडील एका पायरीस गोमुख बसविण्यात आलेले आहे. या गोमुखातून पाण्याची धार सतत या पुष्करणीत पडत असते. या पुष्करणीत मध्यभागी तळाशी एक शिवलिंग असल्याचे सांगतात. परंतु ते मध्यभागी नसून ज्यायोगे

त्यावर पाण्याची धार पडेल (जलाभिषेक) इतक्या अंतरावर ते गोमुखाच्या समोर असावे. तथापि, ते पुष्करणीतील पाण्यामुळे दिसत नाही.

गावात या मंदिरांव्यतिरिक्त शनिमंदिर, गणेशमंदिर व बोधनची आई मंदिर नामक अन्य मंदिरे आहेत. त्यापैकी बोधनची आई मंदिरात वार्षिकोत्सव साजरा होतो.

हरेगाव

हरेगाव (ता.औसा, १८° ०५' उ., ७६° ३०' पू.) : औसा शहराच्या दक्षिणेस १८ कि.मी. अंतरावरील या गावात संत एकनाथ व नामदेव या प्रसिध्द संतद्वयांची मंदिरे आहेत. दोन्ही मंदिरांना चौकोनी मंडप व वर्तुळाकार गर्भगृहे, वर शिखर व कळसही आहे. नामदेव मंदिराच्या गर्भगृहात त्यांच्या पादुकांसोबत विठ्ठल-रखुमाईची मूर्ती आहे, तर एकनाथ मंदिरात या सर्वांबरोबरच व्यंकटेशाचीही मूर्ती आहे. या मंदिराच्या आग्नेय कोपऱ्यात एक भुयारवजा दालन असून त्याचा उपयोग एकनाथ ध्यानधारणेसाठी करीत असा येथे दृढ समज आहे. यात्रेकरुंसाठी या मंदिरास एक नवीन मंडप जोडण्यात आला आहे.

नामदेव मंदिराबाबतच्या दंतकथेनुसार नामदेवांनी ज्ञानेश्वरांसोबत भारतातील तीर्थस्थळांच्या यात्रा केल्यावर येथे येऊन या मंदिरापासून एक फर्लांग अंतरावरील एका वटवृक्षाखाली मुक्काम केला. तेथेच सध्या बुजलेल्या अवस्थेत असणाऱ्या काशीकुंडात ते स्नान करीत. नामदेव या मुक्कामी असताना एक वृध्द माणूस तीन फर्लांग अंतरावरून त्यांच्या दर्शनासाठी नित्य येत असे. पण नंतर त्याने एवढे अंतर चालण्याचा आपला त्रास वाचावा म्हणून नामदेवांना आपल्या गावी मुक्काम करण्याची विनंती केली. त्यानुसार वृध्दास मागे न पाहण्याच्या अटीवर पुढे चालण्यास सांगून ते स्वत: एका गजमुख आकाराच्या शिळेवर बसून निघाले, पण एक फर्लांग अंतर कापल्यानंतर वृध्दाने अविश्वासाने मागे वळून पाहिल्याने शिळा तेथेच थांबली व नंतर त्याच ठिकाणी हे नामदेव मंदिर उभारण्यात आले. मंदिराच्या मंडपात ही गजमुखी शिळा असून भाविक तिची श्रध्देने पूजा करतात. आषाढ शुध्द एकादशीला नामदेवांच्या पुण्यतिथीनिमित्त येथे दोन दिवस यात्रा भरते.

हिप्पळगाव

हिप्पळगाव (ता.शिरूर-अनंतपाळ, १८° २०' उ., ७६° ४५' पू.) : या गावाची किंवा या प्राचीन स्थळाची नोंद चालुक्य नृपति विक्रमादित्य सहावा याच्या गणेशवाडी शिलालेखात आहे. विक्रमादित्याचा सेनापती भीमनाथ व त्याचा पुत्र कालिदास दण्डनायक यांनी हिप्पळगाव येथे मंदिरे बांधल्याची माहिती विक्रमादित्याच्या या शिलालेखावरून मिळते. विक्रमादित्य याच्याकडून त्याचा महाप्रधान दंडनायक भीमनाथ याने पिप्पलग्राम हे गाव मिळवून तेथे भीमसमुद्र सरोवराच्या काठी ब्रम्हा, विष्णू व महेश्वरादी देवतांची देवालये बांधली, त्यांच्या पूजे-अर्चेसाठी व तेथील सरस्वती मंडपातील तपस्वी आणि विद्यार्थी यांच्या उदरनिर्वाहासाठी पिप्पलग्राम येथील ५०० निवर्तने भूमी दान दिली, तसेच तेथे पाशुपतपंथीय

पीठ स्थापन करून त्याच्या व्यवस्थेसाठी तत्पुरुष पंडित नामक शैव आचार्यांची नेमणूक केली.[१३६] या गोष्टी नमूद करणे हा या लेखाचा उद्देश होता. भीमनाथाने येथे बांधलेले शिवालय आजही उत्तम स्थितीत आहे.

पूर्वाभिमुख असलेले हे मंदिर प्राचीनतेची साक्ष पटविते. मंदिर त्रिगर्भी असून मुखमंडप, मंडप, मंडपाच्या दोन्ही बाजूस अंतराळासहीत दोन उपगर्भगृहे, अंतराळ व मुख्य गर्भगृह असा त्याचा तलविन्यास आहे. मुखमंडप सर्वतोभद्र असून त्याच्या दोन्ही बाजूच्या अर्धभिंतींवर प्रत्येकी एक स्तंभावली आहे. यातील काही स्तंभांच्या स्तंभखंडांवर असलेल्या स्त्री-पुरूष प्रतिमांमध्ये धानस्थ योगींच्याही प्रतिमा आहेत. स्तंभशीर्षे कीचकयुक्त तरंगहस्तांनी अलंकारित आहेत.

मंदिराचा मंडप थोड्या उंच अधिष्ठानावर आहे. स्तंभावलींनी रेखीत केलेल्या या मंडपातील स्तंभउभारणीत चौरसाकृती तळखडा, त्यावर अष्टकोनी व पुन्हा चौरसाकृती स्तंभमध्य व त्यावर षटकोनाकृती स्तंभशीर्ष अशा घटकांचा आखीव मिलाफ साधण्यात आलेला आहे. मंडपात दोन रिक्त देवकोष्ठे आहेत.

दोन्ही बाजूच्या उपगर्भगृहांपुढील अंतराळे देवकोष्ठरहीत व मूर्तिविरहीत आहेत. उपगर्भगृहांपैकी उत्तर व दक्षिण बाजूच्या उपगर्भगृहात अनुक्रमे महिषासूरमर्दिनी व शेषशायी विष्णूची उंच अधिष्ठानावरील मूर्ती आहे.

मुख्य गर्भगृहापुढील अंतराळातील दोन्ही बाजूच्या देवकोष्ठांमध्येही अनुक्रमे महिषासूरमर्दिनी व शेषशायी विष्णूची मूर्ती आहे. तीनही गर्भगृहांच्या व्दारशाखा पुष्प, स्तंभ व सपाट अशा त्रिशाखी आहेत. त्यांच्या ललाटबिंबावर गणेशाचीही स्थापना केलेली आहे. मुख्य गर्भगृहात शिवलिंग असून तेच मुख्य उपास्य दैवत आहे.

या मंदिरालगत विटांनी बांधलेली, पण सध्या उद्ध्वस्तावस्थेतील बारव आहे. गणेशवाडी येथील विक्रमादित्याच्या शिलालेखात या बारवेची नोंद आहे.

जिल्ह्यात याव्यतिरिक्त अनेक ठिकाणी मंदिरावशेष तसेच शिल्पावशेष आढळतात. हालकी गावातील शिवमंदिरासारखी फारशी वास्तुशास्त्रीय व शिल्पशास्त्रीय वैशिष्ट्ये नसलेली कित्येक मंदिरे व हिप्परसोगा (ता. औसा) येथील ऐतिहासिक अवशेषांसारखे शिल्पावशेष जिल्हाभर आढळतात, तद्वतच लातूर-उमरगा मार्गावर कवठापाटी या गावी इतरत्र क्वचितच आढळणारे सूर्यमंदिर आढळते, हेही विशेष. उद्ध्वस्त स्थितीतील या मंदिरात मुकूट, कमलपुष्प, कंठमाला, कटीबंध, मेखला, वनमाला इत्यादी आभुषणे व अलंकार ल्यालेली सूर्याची सुरेख मूर्ती आहे. मंदिर व मंदिरावशेषांप्रमाणेच हुमायून बादशहाचा चोबळी ताम्रपट, कृष्णदेवरायाचा लातूर ताम्रपट यासारखे ताम्रपट व जळगाव (ता. देवणी) गावातील तीन शिलालेखांसारखे अन्य शिलालेखही आढळतात. तथापि, पृष्ठमर्यादेमुळे सर्वच बाबींची सविस्तर नोंद घेता येणे शक्य होत नाही.

---

१३६. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, **देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ**, पृ.१५९.

मध्ययुगीन गढी-वाडे*

१) गढीची पूर्वपीठिका : 'गढी' या शब्दाचा अर्थ लहान आकाराचा भुईकोट किल्ला किंवा मातीचा किल्ला. देशमुख, देशपांडे, पाटील हे ग्रामअधिकारी स्वत:साठी अशा गढ्या बांधीत असत.[१]

मानवाला मानवी जीवनाच्या समृद्धीबरोबर हिंस्र पशूंच्या उपद्रवापेक्षा शेजारील मानवी संकटाच्या परिहाराची अधिकाधिक आवश्यकता वाटत गेली. अतिप्राचीन काळापासून भारतात व भारताबाहेर संरक्षणासाठी नगरे आणि राजवाडे तटबंदींनी संरक्षित केलेले आढळतात. हरप्पा आणि मोहोंजोदोडो येथील उत्खननामध्ये उंच तटबंदीयुक्त नगरे आणि इमारती यांचे अवशेष सापडले असून तटबंदी शास्त्रात बरीच प्रगती त्या काळातही (इ.स.पूर्व ३५००) झालेली आढळते.[२] भारताप्रमाणेच ग्रीस, तैग्रीस, आशिया मायनर इ.ठिकाणी अशाच प्रकारची तटबंदी अस्तित्वात होती.[३]

भारतात ऋग्वेद,[४] मनस्मृती, रामायण, महाभारतात दुर्ग म्हणजे किल्ल्याविषयी उल्लेख आलेले आहेत.[५] कौटिलीय अर्थशास्त्रातही दुर्गाविषयी चर्चा केलेली आहे.[६]

मुस्लिमांचे भारतात आगमन झाल्यावर एतद्देशीय युद्ध पद्धती, युद्ध तंत्र व संरक्षण तंत्रात झपाट्याने बदल होऊ लागला. मध्ययुगीन भारतातील तटबंदी ही प्रामुख्याने सैनिकी स्थापत्य स्वरुपाची असून तिचे सैनिकी स्थापत्य कलेच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान आहे. यामध्ये राज्यकर्त्यांची सत्ता आणि प्रभाव दिसून येतो. संरक्षणात्मकदृष्ट्या त्यांची वेगळी रचना पाहून दर्शक प्रभावित होतो. शत्रुवरही मोठे दडपण (दबाव) येत असे.[७] तटबंदीचे विविध प्रकार, वैशिष्ट्यपूर्ण बुरूज, प्रवेशद्वारांची रचना, नागमोडी व्दारमार्ग, विशिष्ठ ठिकाणी ठेवण्यात आलेल्या जंग्या ही तत्कालिन दुर्गरचनेची प्रमुख वैशिष्ट्ये होत.[८] मध्ययुगीन कालखंडातही संपूर्ण गावाला तटबंदी असे. त्याचबरोबर महत्त्वाच्या व्यक्तीच्या राहत्या वास्तुलाही संरक्षणासाठी तटबंदीची आवश्यकता भासत असे. जेव्हा गुन्ह्यांची संख्या वाढली, संरक्षणाची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर भासू लागली आणि सर्वच ठिकाणी लष्कर ठेवणे अशक्य झाले तेव्हा त्या त्या गावातील प्रमुख व्यक्तींनी गढीचीं उभारणी केली. महाराष्ट्रात सर्वत्र असणारे गढ्या व वाडे हे याचे उत्तम उदाहरण आहे.[९]

---

* या भागाचे लेखन डॉ.प्रा.सुनील पुरी (कुमारस्वामी महाविद्यालय, औसा) यांनी केले आहे.

१. दाते,य.रा.आणि कर्वे,चि.ग., **महाराष्ट्र शब्दकोश**, विभाग-३, वरदा बुक्स, पुणे, १९८८, नवी आ.,पृ.क्र.९३४-९३५. (पांढऱ्या मातीची भिंत किंवा विटांची अतिशय रूंद भिंत)

२. ए. कोरोत्काया, **भारत के नगर-एक ऐतिहासिक सिंहावलोकन**, रादुगा प्रकाशन, मॉस्को १९८४ (हिन्दी आवृत्ती), पृ.३४ ते ३५. सिंधु संस्कृतीत दुर्ग (किल्ला) या वास्तुला महत्त्वाचे स्थान होते. दुर्ग सामान्यत: नगरातील सर्वात उंच ठिकाणी निर्माण केला जात असे. पर्याप्त उंच जागा नसेल तर कृत्रिम रीतीने त्याची उंची वाढविली जाई. उदा. हडप्पा येथील दुर्ग ज्या ठिकाणी स्थित आहे, त्याची उंची ९ ते १५ मीटर आहे आणि आकार आयताकृती (१९०×३८० मीटर) आहे. विशेष म्हणजे उत्तरकालीन भारतात असा आकार सर्वाधिक प्रचलित आहे.

३. टॉय,सिडने, **दि हिस्टी ऑफ फोर्टीफिकेशन**, विल्यम हिलमन लिमिटेड, लंडन, १९५५. या ठिकाणीही उंच तटबंदीयुक्त नगरे आणि राजवाडे यांचे अवशेष उत्खननात आढळले आहेत.

४. आपटे,प्र.प्रा., 'प्राचीन वास्तूशास्त्रीय संकल्पना आणि आधुनिक संदर्भ', भा.इ.सं.मं., **त्रैमासिक** अंक ६३, पुणे, ऑक्टोबर, १९८४, पृ.६९.

५. बेंद्रे,वा.सी., **गटकोट दुर्ग आणि त्यांची वास्तु**, मुंबई, १९६५, पृ.८ ते १४. मनुस्मृतीच्या सातव्या अध्यायात दुर्गाबद्दल चर्चा आहे.

६. कुलकर्णी,र.पु., **कौटिलीय अर्थशास्त्रातील शिल्पशास्त्र**,म.सा.सं.मं., मुंबई, २००४, पृ.४२-४९. अर्थशास्त्रातील दुसऱ्या अधिकरणातील २१ व्या प्रकरणात 'किल्ल्याची बांधणी' या मथळ्याखाली दुर्गातील संरक्षण विषयक बाबींची माहिती आलेली आहे

७. टॉय,सिडने, **द स्ट्रॉंगहोल्डस् ऑफ इंडिया**, विल्यम हिलमन लिमिटेड, लंडन, १९४७, पृ.१ व २.

८. काटे,पं.व्यं. आणि देशपांडे,प्र.न., **'मध्ययुगीन तटबंदी : काही वैशिष्ट्ये'**, **मराठवाडा विद्यापीठ पत्रिका**, vol.IX, No.I, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, जुलै, १९६९, पृ.२९.

९. नरवणे,एम.एस., **फोर्टस् ऑफ महाराष्ट्रा**, एपीएच पब्लीशिंग कॉरपोरेशन, न्यु दिल्ली, १९९४, पृ.१९.

१) गढी विषयी नोंदी : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वीही अशा गढ्या असत. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापना करताना किल्ले व गढीचे महत्त्व लक्षात आले होते. त्यातील धोकाही त्यांना माहीत होता. म्हणूनच ते म्हणतात, "किल्ले व गढीया बळकाऊन आम्हाशी बेदिल."

दक्षिणेत मुघलांचे वर्चस्व निर्माण झाल्यावर औरंगजेबाच्या काळात त्याच्या लष्करी डावपेचातील महत्त्वाचा घटक म्हणजे ठाणी व ठाणेदार. एखादा प्रदेश ताब्यात आला की, त्याच्या बंदोबस्तासाठी मुघल सरदार तेथे लष्करी ठाणे कायम करीत. ठाण्यात पडकी गढी असल्यास ती दुरुस्त करीत, नसल्यास नवीन बांधीत.

ठाणेदाराच्या दिमतीला पाच-पन्नास स्वारांपासून पाचशे पर्यंत स्वार असत. जेथे मुघल-मराठा संघर्षाची शक्यता कमी, तेथे ठाणी कमी असत.[१०]

'मुघल दरबारच्या बातमीपत्रात' महाराष्ट्रातील फलटण,[११] पालम (जि.परभणी),[१२] मंगळवेढा,[१३] खडक वासला[१४] आष्टा[१५] औरंगाबाद सुभ्यातील मौजे जामरूद येथील[१६] गढ्यांच्या नोंदी आढळतात.

'ऐतिहासिक फार्सी साहित्यङ खंड सहा मध्ये अकोला,[१७] कल्याण-भिवंडी,[१८] मुल्हेर,[१९] जळगाव,[२०] अकोले (जि.नगर)[२१] येथील गढीचा उल्लेख आहे. इ.स.१७९५ मधील मराठे व निजाम यांच्यातील संघर्षात निजामाने निंबाळकरांच्या खर्डा (जि.नगर) येथील गढीत आश्रय घेतला होता.[२२]

लातूर जिल्ह्यातील या संदर्भातील काही नोंदी आढळतात. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

इ.स.१६५६ ते १६८५ या काळातील म.हाशमी या दख्खनी उर्दूतील प्रसिद्ध कवीने आपल्या लिखाणात दक्षिणेतील प्रसिद्ध अशा ४०-५० नगरांचा उल्लेख केला आहे. या बहुतेक ठिकाणी गढी वा किल्ले आहेत. हाशमीच्या गजलांमध्ये उदगीर व बडूर (ता.निलंगा) या ठिकाणांचा उल्लेख आहे.[२३] इ.स.१६६२ मध्ये परगणे वडवळ (सुभा नांदेड) येथे दावल नावाचा अधिकारी होता[२४] असा वडवळ (ता.चाकूर) चा उल्लेख आहे. एप्रिल-मे १६९४ च्या बातमीपत्रात, नळदुर्गकडील बातम्यांवरून कळते की, मराठ्यांचे सरदार अल्लाउद्दीन व जसवंत (हणमंतराव) हे सैन्य घेऊन या प्रदेशात आले आहेत. नळेगाव (?) च्या जहागिरीच्या गुमास्त्याने त्यांच्याशी युद्ध केले. पण कच खाऊन तो गढीत जाऊन बसला असा उल्लेख आहे.[२५]

---

१०. पगडी, सेतुमाधवराव, **मोगल दरबारची बातमीपत्रे**-भाग-१, मुंबई, १९७८, (प्रस्तावना), पृ.सात.
११. कित्ता, १० जुलै, १६९४ चे पत्र, भाग-एक, पृ.५०.
१२. कित्ता, एप्रिल १६९४ ते १९ जून १६९४, भाग-एक, पृ.६५.
१३. कित्ता, ५ सप्टेंबर, १६९४, भाग-एक, पृ.७९.
१४. कित्ता, २४ डिसेंबर, १७०३, भाग-३, मुंबई, १९८३, पृ.१५०.
१५. कित्ता, दि.५ नोव्हेंबर, १६८९ चे पत्र, भाग-१, पृ.५.
१६. कित्ता, दि.९ ऑक्टोबर, १७०४ चे पत्र, भाग-३, १९८३, पृ.४३३.
१७. खरे,ग.ह. (संपा.), **ऐतिहासिक फार्सी साहित्य**-खंड-सहा, (औरंगजेबाच्या दरबारचे अखबार), पुणे, १९७३, पृ.२३२, (दि.१७ डिसेंबर, १६८२ चे पत्र).
१८. कित्ता, पृ.२४९, (८ जानेवारी, १६८४ चे बातमीपत्र).
१९. कित्ता, पृ.३७२, (८ जानेवारी, १६८५ चे बातमीपत्र).
२०. कित्ता, पृ.३८७,३८८, (२६ मार्च, १६८५ चे बातमीपत्र)
२१. थोरात,मा.भी. (संपा.), **ऐतिहासिक सनदा व पत्रे**, मुंबई, १९७३, पृ.३६.
२२. मोटे,ह.वि., (संग्राहक), **त्र्यंबक शंकर शेजवळकर - निवडक लेख संग्रह**, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९७७, पृ.१२२.
२३. चौहान,देवीसिंह, **दक्खिनी हिन्दीतील इतिहास व इतर लेख**, मुंबई, १९७३, पृ.२८,२९, (त्यापैकी उदगीर येथे किल्ला आहे व बडद (ता.निलंगा) येथे देशपांडेची गढी आहे.)
२४. हुसेन,युसूफ (संपा.), सिलेक्टेड वर्क्स ऑफ डेक्कन (इ.स.१६६० ते १६७१), हैद्राबाद, १९५३, पृ.१५,१६.
२५. पगडी, सेतुमाधवराव (संपा.), पूर्वोक्त, पृ.५७,५८

Maharashtra State Gazeteers

दि.१२ जानेवारी १७६० च्या एका पत्रात पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतो. मौजे दाबका-हटकरांचा गाव होता. तो मारिला. गढी पाडिली. चंद्रसेन जाधव यांचा दीड दोन हजार मुक्काम आज शुक्रवारचा उदगीरीवर आम्हा जवळून तीन साडेतीन कोसावर आहे.[२६]

अभिलेखीय नोंदीमध्ये औसा तालुक्यातील नेमिवंताच्या गढीमधील विहिरीत फार्सी भाषेतील शिलालेख आढळला आहे. परंतु त्याचे वाचन उपलब्ध न झाल्यामुळे फारशी माहिती उपलब्ध झाली नाही.[२७] त्याचप्रमाणे उजेड (ता.शिरूर, अनंतपाळ) येथील वाड्यातील विहिरीत उर्दू व देवनागरी भाषेतील शिलालेख आहे.

कोरंगळा (ता.औसा) आणि खरोळा (ता.रेणापूर) येथील गढीतील घराण्यांकडे असलेले ताम्रपट स्व.देवीसिंग चौहान यांच्या सहकार्याने ग.ह.खरे यांनी भारत इतिहास संशोधन मंडळासाठी दिले आहेत. परंतु त्यांचे वाचन उपलब्ध झाले नाही.[२८]

२) गढी-भूमी परीक्षण आणि तंत्र (गढीची माती तयार करण्याची पद्धती) :

एखादी वास्तु तयार करावयाची झाल्यास त्यासाठी आवश्यक असणारी जमीन कशी आहे या संदर्भात प्राचीन काळापासूनच विचार केला जात असे. भूमी परीक्षणाबाबत बहुतेक सर्व प्राचीन ग्रंथात एकसारखेपणा आहे. समरांगण सुत्रधार, मानसार, बृहत्संहिता, अपराजितपृच्छा, हयशीर्ष पश्चरात्र, शिल्पदीपक, राजवल्लभ, अग्निपुराण, मत्स्य पुराण यामध्ये भूमी परिक्षणाबाबत उल्लेख आहेत. पण भूमी परिक्षण तंत्र वैदिक युगातही प्रचलित होते. 'शतपत ब्राह्मणात' याचे उल्लेख आहेत.[२९]

गढी बांधताना लागणारी माती तयार करण्यासाठी ती माती चाळून घेतली जाई ही माती २१ दिवस भिजत ठेवली जाई. त्यामध्ये बेल, भेंडी, गुळ, सळ, लिद, कात, साबुदाणा असे चिकटपणा निर्माण करणारे पदार्थ मिसळले जाते.[३०] माती लोण्यासारखी मऊ करण्यासाठी, एकजीव होण्यासाठी रोज तुडवित असत. काही ठिकाणी रेडा, हत्ती याकडून माती तुडविली जाई किंवा धुम्मसाने कुटली जाई किंवा घाण्यामध्ये रगडली जाई. अशा घाण्याचे अवशेष

---

२६. पगडी, पूर्वोक्त, **मोगल दरबारची वातमीपत्रे**, उदगीर प्रकरण-१७६० (पेशवे दफ्तरातून निवडलेली कागदपत्रे) दि.१२-१-१७६० चे पत्र (विठ्ठल सदाशिव विंचुरकर यांचे पत्र.), सेंट्रल प्रकाशन मुंबई, १९३०, पृ.१८.

२७. प्रत्यक्ष सर्व्हेक्षणाच्या आधारे.

२८. कोरंगळा (ता.औसा) येथील गढीतील देशपांडे घराण्यातील श्री.व्यंकटेश देशपांडे यांनी सांगितलेली माहिती. खरोळा (ता.रेणापूर) येथील गढीतील देशमुख घराण्यातील व्यंकट देशमुख यांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे.

२९. कुलकर्णी,र.पु., **'भारतीय वास्तुशास्त्र'**, श्री मध्यभारत हिन्दी साहित्य समिती, इंदौर, १९९५, पृ.१ ते १०. (या ग्रंथात प्राचीन ग्रंथाच्या आधारे वास्तुच्या भूमी परीक्षणाबाबत चार परीक्षा दिलेल्या आहेत. १) खड्डा खोदणे, २) खड्डयात योग्य पाणी भरणे, ३) खड्डयात बीज लावण, ४) पाणी भरलेल्या खड्डयात बाण मारणे. या पद्धतीपैकी पहिल्या पद्धतीद्वारे मातीची माहिती मिळते. या पद्धतीद्वारे मातीची पारगम्यता पाहून भूमी परिक्षण केले जाई.

३०. कित्ता, यामध्ये इमारतीच्या पायाजवळ खुर्चीच्या आकाराचा खड्डा करून त्यामध्ये दगळ, वाळू, बाजरी, कंकड घालून ते पक्के बनविण्यासाठी त्याला कुटत असत. कुटाईच्या वेळी खड्डयात पाणी भरत. बाजरी व वाळू इ.स्थिरी करणासाठी पाण्यामुळे संपृप्त होत असे. अशी माती घनीभूत होत असे हे लोकांना माहीत असे. मातीची कुटाई धुम्मस द्वारा करीत असत. माती हत्तीद्वारेही तुडवित असत. कुलकर्णी,र.पु., **'भारतीय वास्तुशास्त्र'**, पृ, १-१७. या ग्रंथात भूमी परीक्षणासाठी दोन प्रकरणे दिलेली आहेत. यामध्ये बांधकामासाठी चुना, गवत, गूळ मळून बुजवित, गरजेनुसार त्यात राळ साबुदाणा, डिंक वगैरे घालीत. गवत मातीला धरून ठेवते म्हणून त्याचाही वापर होत असे. खांडगे, मंदा-**'वैभव पेशवेकालीन वाड्याचे'**, पुणे-२००२, (आ.दुसरी), पृ.१४५.

वडवळ (ता.चाकूर) येथील गढी मध्ये आहेत.[३१] नांदेड जिल्ह्यातील रिसनगाव (ता.कंधार) येथील गढी शेजारी माती तयार करण्याचा घाणा आहे.[३२] माती एकजीव झाल्यावर आवश्यक त्या आकाराच्या मातीच्या विटा तयार करीत. त्यांना भेंडे असे म्हणत. हा आकार सर्वत्र सारखा नसे. खालच्या विटा भार पेलण्यासाठी मोठ्या असत. वरच्या विटा कमी भाराच्या असत. या विटा प्रखर उन्हात वाळविल्या जात. पावसाचा प्रत्यक्ष परिणाम पाहण्यासाठी त्या पावसाखाली ठेवीत. काही ठिकाणी पाण्याच्या धारेखाली किंवा वाहत्या ओढ्यात भेंडा धरून त्यांची परीक्षा घेतली जाई. गढीची सर्व शक्ती भेंड्यामध्ये असे. अशा विटा एकावर एक ठेवून त्याच मातीच्या मळब्याने तिचे बांधकाम केले जात असे. भेंडा एका व्यक्तिला उलचणार नाही याची खात्री केली जाई. ही माती तयार करण्याऱ्यांचा एक वर्ग असे. २४ डिसेंबर, १७०३ च्या एका पत्रात पुढील मजकूर आहे— राजगड परिसरातील ठाणेदार मनसुरखान लिहितो, ठाण्यातील लोकांचे रक्षण होणे आवश्यक आहे. गढी तयार करण्यासाठी लागणारे सामान अजून हाती आले नाही. औरंगजेबाने यासाठी दोनशे बेलदार व अधिकारी मुकरर केले. २४ डिसेंबर १७०३ च्या दुसऱ्या एका पत्रात पुणे विभागाचा ठाणेदार शिवसिंग याने विनंती पत्र लिहून मागणी केली की, दोनशे बेलदार आणि एकोणतीस कामगार यांना खडकवासल्याची गढी बांधण्यासाठी तैनात करण्यात यावे. यावरून बादशहाने आज्ञा केली की, हमीद-उद्दीन खानबहादूर यांनी हे काम पहावे.[३३]

यावरून गढी बांधण्यासाठी बेलदार वर्ग व अधिकारीही नेमले जात. 'मराठा आर्किटेक्चर' या ग्रंथात गढी विषयी माहिती दिलेली आहे.[३४]

लातूर जिल्ह्यातील गढीचे/वाड्याचे स्वरूप : गढी हे गावातील महत्त्वाच्या व्यक्तीचे राहण्याचे ठिकाण असल्यामुळे गाव आणि गढी यांचे नाते असे. गढी बांधण्यासाठी गावाची रचनाही लक्षात घेतली जाई. सहसा उंच ठिकाणी गढी असायची. काही ठिकाणी कृत्रिम रीतीने उंची वाढविली जाई. गढीचा वापर करणाऱ्या मालकाचे वतन किती मोठे आहे यावर गढीच्या बांधकामाचे स्वरूप ठरत असे. त्याच्या उत्पन्नाचाही बांधकामावर परिणाम होत असे. सहसा गढीचे गावातील स्थान पश्चिम दिशेस असायचे. गढीतील लोकांना मोकळी हवा मिळावी हा त्यामागील उद्देश होता.

गढी बांधावयाची जागा भक्कम असणे गरजेचे असे. असे जर झाले नाही, तर गढीची भिंत उभी राहायची नाही. म्हणून एखाद्या वेळेस प्राणी बळी सुद्धा दिला जात असे. पाया हा गोट्यांनी भरलेला असे. ओझ्याने भिंतीला तडा जाऊ नये म्हणून भिंत रूंदीला जास्त असे पाया पाच फुटापेक्षा जास्त नसें. गढी किंवा वाडा उंचावरच असायचा. बहुतेक ठिकाणी गढीतील प्रवेशासाठी चोपेवरूनच जावे लागे.

---

३१. वडवळ गढीच्या नकाशामध्ये अशा घाण्याची जागा दाखविली आहे.

३२. एकताटे,उषाताई, **नांदेड जिल्ह्यातील गढी-वाडे-एक अभ्यास**, भारत इतिहास संकलन समिती, पुणे, २००३, छायाचित्र क्र.११.

३३. पगडी,सेतुमाधवराव (संपा.), **मोगल दरबारची बातमीपत्रे**, भाग-३, मुंबई, १९८९, पृ.१५०.

३४. माटे,एम.एस., **मराठा आर्किटेक्चर**, पुणे, १९५९, पृ.५० ते ५९. यात संपूर्ण गढीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये याविषयी चर्चा केलेली आहे.

शस्त्रास्त्रांमध्ये झालेल्या बदलांचाही परिणाम गढीच्या बांधकामावर झाला. त्यामुळे गढीची उंची रुंदी वाढत गेली. काही ठिकाणी पूर्णपणे दगडी बांधकामाच्या किल्ल्यासारख्या गढी आहेत. शिरूर-अनंतपाळ, दावणगाव (ता.उदगीर), करखेली (ता.उदगीर), जवळगा (ता.देवणी) येथील गढ्या उदाहरणादाखल सांगता येतील. मजबूत तटबंदी, बुरूजांवर तोफेसाठी बांधलेले ओटे, तटबंदीच्या बाहेर असलेल्या जंग्या हा शस्त्रास्त्र सुधारणेतील झालेला बदलांचा परिणाम होता.

उंटावरच्या तोफा व बैलगाडीवरून वाहून न्यावयाच्या तोफेंचा गोळा वर जाणार नाही याची काळजी घेतली जाई. गढीचा खालचा भाग दगडांचा ठेवला जात असे. त्यामुळे गढीमधील दगडांच्या भिंती ५ मीटर दगडी असत. त्यामुळे ५ मीटरपर्यंत खिडकी नसायची. वर मातीची भिंत असे. पीर असू नये अशी संकल्पना असायची. गढीचा सर्व कारभार गढीतूनच केला जाई.

अ) संरक्षण व्यवस्था : गढीची तटबंदी (तटभिंती) : गढी बंदिस्त करण्यासाठी गढीच्या बाहेरील परिघावर उभारलेली भिंत म्हणजे तटबंदी, विटा, माती, दगड यांच्या साह्याने तटबंदी उभारली जाई. विटांनी बांधलेली गढी फक्त तांदुळजा (ता.लातूर) येथे आहे. काही ठिकाणी तटबंदी दगडांची व काही ठिकाणी मातीचीही असे. तटबंदीची उंची साधारणपणे १२ मीटरपर्यंत (शिरूर अनंतपाळ.), तर काही ठिकाणी ती कमी-जास्त आढळते. आतल्या बाजूने तटावर चढण्यास पायऱ्या असणे, तटावर गस्तीसाठी पहारेकऱ्याला फिरण्यास जागा ठेवणे अशा कारणासाठी तटाची रुंदी जास्त ठेवली जाई. करखेली, (ता.उदगीर), दावणगाव (ता.उदगीर)। येथील तटभिंतीची रुंदी ३.६५७ मीटर असून शिरूर अनंतपापळ येथील गढीच्या दक्षिणेकडील तटबंदीची रुंदी ५.७९१ मीटर आहे. वरील गढ्या काळ्या दगडाच्या आहेत. या तटबंदीच्या भिंतीवर १.५२४ मीटर जाडीची संरक्षक भिंतही (कठडा) आहे. करखेली (ता.उदगीर) येथील अशा संरक्षक भिंतीवर मातीची भिंत नसून त्या ठिकाणी चुन्याचा गिलावा केलेला आहे.

बहुसंख्य गढीच्या तटबंदी या पांढऱ्या मातीत बांधलेल्या असून त्या १५ फुटापर्यंत दगडी व वर मातीच्या आहेत. काही ठिकाणी या दगडाच्या भिंती कमी-जास्त उंचीच्या आढळतात. काही ठिकाणी तटबंदीच्या भिंती केवळ दगडांच्या आहेत. नागराळ (ता.देवणी), वडवळ (ता.चाकूर), जळकोट, ताडतावशी (ता.औसा), कोरंगळा (ता.औसा), धामणगाव (ता.जळकोट), झरी बु. (ता.चाकूर) येथे वरीलप्रमाणे तटबंदीची भिंत आढळते. खरोसा (ता.औसा), वांजरवाडा (ता.जळकोट), कोष्टगाव (ता.रेणापूर), कोळगाव (ता.रेणापूर), पानचिंचोली (ता.निलंगा), किनी यल्लादेवी (ता.उदगीर), चापोली (ता.अहमदपूर), ढोरसांगवी (ता.जळकोट) इ.ठिकाणी मातीच्या तटभिंती आहेत.

वाड्याच्या भिंती रूंद व वाडे चिरेबंदी असत. उजेड (ता.शिरूर अनंतपाळ), बेलकुंड (ता.औसा), रेणापूर, हरंगुळ (ता.लातूर), हाळी (ता.उदगीर), मसलगा (ता.निलंगा), तळीखेड (ता.निलंगा), आंबेगाव (ता.निलंगा), तोंडचिर (ता.उदगीर), लासोना (ता.देवणी) व निलंगा येथील वाड्याच्या भिंती चिरेबंदी काळ्या दगडांनी बांधलेल्या आहेत.

बुरूज : तटाच्या भिंतीबरोबर बांधले जाणारे आणि तटापासून बाहेरच्या बाजूला पुढे आलेले अर्धगोलाकृती किंवा इतर आकाराचे भरीव बांधकाम म्हणजे बुरूज.[३५] बुरूज हे संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे काम करत असतात. बुरूज ही पहारेकऱ्याची जागा. सामान्यपणे बुरूजाच्या आत पहारेकऱ्याला जागा असायची. बुरूजामुळे तटबंदीला मजबुती येते. तटाच्या मानाने याची बांधणी मजबूत आणि माथ्यावर जास्त मोकळी औरस-चौरस जागा असते. तटाच्या भिंतीना जागोजागी तटात बांधलेल्या या बुरूजांमुळे मजबुती येत असेच, शिवाय तटाजवळ येऊन भिडणाऱ्या सैनिकांवर शस्त्रास्त्रांचा मारा करता येई. तटाच्या माथ्यावर जास्त जागा असल्यामुळे तेथे तोफा, तोफेसाठी लागणारा दारूगोळा व इतर सामान, तोफ उडविणारे सैनिक, त्या शिवाय इतर सैनिक या सर्वांना सामावून घेतले जाई. दावणगाव (ता.उदगीर), करखेली (ता.उदगीर) हाडोळी (ता.निलंगा) येथील बुरूजांवर तोफा ठेवण्यासाठी ओटा बांधलेला आहे. वरील तीनही गढीतील बुरूजांपैकी हाडोळी येथे आग्नेय दिशेच्या बुरूजामध्ये व करखेली, दावणगाव येथे वायव्य दिशेतील बुरूजामध्ये खोल्या आहेत. जवळगा (ता.देवणी) येथील गढीतील बुरूजाच्या आतून अंतर्गत रस्ता असल्याचे सांगितले जाते. तेथे आग्नेय बुरूजामध्ये देवता मंदिर आहे असे समजते.

बुरूजांचे आकार अर्धगोलाकृती, चौकोनी, षटकोनी किंवा अष्टकोनी असत. उदा.वडवळ (ता.चाकूर) येथील एक बुरूज अष्टकोनी आकाराचा आहे, तर हाडोळी (ता.निलंगा) येथील अष्टकोनी आकाराचा आहे. जवळगा (ता.देवणी) येथील बुरूज षटकोनी आकाराचा आहे. चौकोनी आकाराचा एकमेव व एकच बुरूज, तांदुळजा (ता.लातूर) येथील गढीला आहे. मातीचे बुरूज बहुसंख्य ठिकाणी असून हे बुरूज १५ फूट उंचीपर्यंत दगडी आहेत. काही ठिकाणी तीन बुरूज एकत्रित आहेत. उदा.कारेपूर (ता.रेणापूर) येथील गढीच्या आग्नेय दिशेकडील बुरूज करखेली (ता.उदगीर) येथील गढीतील बुरूजावर जाण्यासाठी दोन प्रवेशद्वारे आहेत. हाडोळी (ता.निलंगा) येथील बुरूज अतिशय उंच असून वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

गढीची प्रवेशद्वारे : प्रवेशद्वार जेवढे मजबूत असे तेवढी गढीची सुरक्षितता भक्कम असे. 'दि स्ट्रॉंग होल्डस् ऑफ इंडिया' या ग्रंथात[३६] किल्ल्याच्या प्रवेशद्वाराविषयी माहिती दिलेली आहे. ही प्रवेशद्वारे मजबूत बांधणीची असून यातून घोडेस्वार सहजपणे घोड्यावर बसून आत येईल एवढ्या उंचीची असत. शक्यतो जाडजूड मजबूत लाकडी फळ्या, लोखंडी पट्टयांनी एकमेकांना जोडून दरवाजा केलेला असे. यासाठी लाकूड सागवानी किंवा उंबराचे वापरले जाई. या दाराच्या पाठीमागे दगडी भिंतीमध्ये आतून आडवा अडसर घातला की, दरवाजा बाहेरून उघडण्यासाठी तो फोडावाच लागत असे. शिवाय दरवाज्याला कड्याकुलुपेही असत. एवढे मोठे दरवाजे सतत उघडणें व लावणे केवळ एका व्यक्तीसाठी अवघड असे. त्यासाठी मोठ्या दरवाज्यातच खालच्या बाजूस वाकून एका व्यक्तीला प्रवेश करता येईल असा छोटासा दरवाजा असे. त्यास 'दिंडी दरवाजा' म्हणत. असे दिंडी दरवाजे भेटा (ता.औसा), साकोळ (ता.शिरूर), अनंतपाळ, वडवळ (ता.चाकूर) येथे आहेत. शिरूर-अनंतपाळ येथील गढीच्या मुख्य दरवाज्याला लोखंडी पत्रा लावलेला आहे.

---

३५. नरवणे, एम.एस., **फोर्ट ऑफ महाराष्ट्र**, पृ.२०.

३६. टॉय, सिडने, **दि स्ट्रॉंग होल्डस् ऑफ इंडिया**, पूर्वोक्त, पृ. ४, ५.

गढीच्या संरक्षण व्यवस्थेत प्रवेशदरवाजा ताब्यात येणे यास जास्त महत्त्व असे. दरवाज्यावर वर्चस्व मिळविले की, गढी जिंकल्यातच जमा होई. त्यामुळे गढीचे दरवाजे मजबूत तर असत, परंतु शत्रूंने प्रवेशद्वारावर हल्ला केल्यास त्यांच्यावर प्रतिहल्ला करण्यासाठी मुख्य प्रवेशद्वाराच्या समोरच काही ठिकाणी बुरूज आहेत. उदा. शिरूर अनंतपाळ, रावणगाव (ता.उदगीर) येथे अशी व्यवस्था आहे. हाडोळी (ता.निलंगा) येथे बुरूज एकच असून तो गढीच्या आग्नेय दिशेस असून तेथून गढीचे प्रवेशद्वार पूर्णपणे दृष्टीपथात येते.

गढीला परकोट असत. काही ठिकाणी परकोटातील प्रवेशद्वार हेच गढीचे मुख्य प्रवेशद्वार आहे. कोरंगळा (ता.औसा), भेटा (ता.औसा), तांदुळजा (ता.लातूर), जळकोट, वडवळ (ता.चाकूर), हरंगुळ (ता.लातूर), हाळी (ता.उदगीर), गुडसुर (ता.उदगीर), गातेगाव (ता.लातूर), नागराळ (ता.देवणी) ही त्याची काही उदाहरणे देता येतील.

गढीमधील मुख्य इमारतीत सहजासहजी प्रवेश होत नसे. त्यासाठी अनेक दरवाजा पार करावे लागत. काही ठिकाणी सात दरवाजे आहेत. उदा. वडवळ (ता.चाकूर) व जळकोट येथेही सात दरवाजे होते. सध्या चारच दरवाजे दिसतात.

काही ठिकाणी प्रवेशद्वारमार्ग नागमोडी वळणाचा असे. आतील मुख्य दरवाज्यात प्रवेश करण्याअगोदरच बुरूजाला वळसा घालूनच जावे लागत असे. उदा.हाळी (ता.उदगीर) येथे दुसऱ्या दरवाज्यापासून तिसऱ्या दरवाज्याकडे जाताना बुरूजाला वळसा घालून नागमोडी वळणाने जावे लागते. अशीच रचना मसलगा (ता.निलंगा) येथील वाड्यात आहे. फरक एवढाच आहे की, येथे पहिले प्रवेशद्वार ते दुसरे प्रवेशद्वार यामध्ये ही रचना आढळते. वडवळ (ता.चाकूर) येथेही दुसऱ्या प्रवेशद्वाराकडून तिसऱ्या प्रवेशद्वाराकडे जातांना बुरूजाला वळसा घालून जावे लागते. परंतु या ठिकाणी चोप नाही.

प्रवेशद्वारातून आत आल्यावर दुसरा दरवाजा येईपर्यंत पायऱ्या चढताना किंवा चोप चढून आल्यानंतर शत्रूवर अचानक हल्ला करण्यासाठी दुसऱ्या दरवाज्याच्या समोर आडोसा निर्माण केलेला आहे. अशी व्यवस्था तांदुळजा (ता.लातूर), बडूर (ता.निलंगा) येथे आढळते. यामध्ये तांदुळजा येथील रूंद तटभिंतीवर तशीच रूंद संरक्षक भिंत उभारण्यात आली आहे. या दोन्हीमध्ये फरक इतकाच आहे की, तांदुळजा येथे मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमुख आहे व बडूर येथे उत्तराभिमुख आहे. जळकोट व वांजरवाडा (ता.जळकोट) येथेही अशी व्यवस्था असावी, परंतु संरक्षक भिंत पडलेली असल्यामुळे स्वरूप निश्चित लक्षात येत नाही. साकोळ (ता.शिरूर अनंतपाळ) येथील गढीच्या मुख्य प्रवेशद्वारापासून दुसऱ्या दरवाज्यापर्यंत कमानी आहेत व त्याव्दारे आडोसा निर्माण केलेला आहे.

आत प्रवेश केल्यावर नागमोडी वळणाच्या मार्गाची रचना महाळंगी (ता.चाकूर), वडवळ (ता.चाकूर), जवळगा (ता.देवणी) येथील गढीमध्ये आहे. महाळंगी येथील गढीचे प्रवेशद्वार उत्तराभिमुखी, तर जवळगाच्या गढींचे प्रवेशद्वार पूर्वाभिमुख आहे. वडवळ येथील गढीचेही प्रवेशद्वार पूर्वाभिमूख आहे. खरोळा (ता.रेणापूर) येथील गढीचे प्रवेशद्वार दक्षिणमुखी आहे. तर पश्चिममुखी प्रवेशद्वारे देवणी व लोहारा (ता.उदगीर) येथील गढीत आढळतात. पण सर्वसाधारणपणे बहुतेक ठिकाणी गढीचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमुख वा उत्तराभिमुख आहे.

मुख्य प्रवेशद्वाराच्या वरच्या बाजूस काही ठिकाणी गवाक्ष/झरोका आहेत. गुंजोटी (ता.अहमदपूर), हडोळती (ता.अहमदपूर) येथील वाड्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर, तर लासोना (ता.देवणी), डिघोळ देशमुख (ता.रेणापूर), भोकरंबा (ता.रेणापूर), हाळी (ता.उदगीर), करखेली (ता.उदगीर), वडवळ (ता.चाकूर), शिरूर-अनंतपाळ येथील गढीच्या मुख्य प्रवेशद्वारावर असे झरोखे आहेत. भोकरंबा (ता.रेणापूर) येथील वाड्याच्या दुसऱ्या मजल्यावर व त्याच्या वरच्या भागात, प्रत्येकी एक झरोका आहे. रेणापूर येथे तटबंदीच्या भिंतीतच मुख्य प्रवेशद्वाराच्या जवळ खिडकी आहे. खरोळा (ता.रेणापूर) येथे वाड्यांच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस पहारेकऱ्यांच्या उत्कृष्ट अशा खोल्या आहेत.

जंगी /चर्या : जंगी म्हणजे तटातून खाली बंदुकीचा मारा करण्यासाठी ठेवलेले छिद्र. हे छिद्र खालच्या बाजूस तिरकस असते व त्यात बंदूक ठेऊन मारा करता येतो. तटबंदीच्या परकोटाला मध्ययुगीन काळात जंग्या ठेवण्याची प्रथा होती. शत्रुने हल्ला केल्यास परकोटाला असलेल्या अर्धदलाच्या आडोशाला उभे राहून प्राकार फालिकेतून बाणांचा वर्षाव करीत असत. बंदुकीचा वापर सुरू झाल्यावर जंग्यांच्या आकारात फरक घडून आला. "आकाश भैरव कल्प" या ग्रंथात जंग्यांचा उल्लेख आला असून तटाला क्रमाक्रमाने छिद्र पाडावीत असे सुचविले आहे.[३७] १६ व्या शतकानंतर फक्त अर्धदलाच्या आडोशाला उभे राहून छिद्राच्या बाहेरच्या अंगास असलेल्या दोन किंवा तीन टोकातून वेगवेगळ्या ठिकाणी बंदुकीचा मारा करण्याची कल्पना अस्तित्वात आली. काही ठिकाणी जंग्यांच्या आतील बाजूस दोन टोक असून त्याचा उपयोग भिन्न ठिकाणी मारा करण्यासाठी होऊ लागला.[३८] अशी अवस्था फक्त ज्या गढीस दगडी तटबंदी आहे. अशाच ठिकाणी आहे. उदा.शिरूर अनंतपाळ, करखेली (ता.उदगीर), दावणगाव (ता.उदगीर), हाडोळी (ता.निलंगा). हाडोळी येथील बुरूजातील अशा जंग्यांमधूनच जेजलांच्या साह्याने मोहनराव पाटील यांनी १९४८ साली रझाकारांविरूद्ध लढा दिला होता.[३९] रेणापूर येथील वाड्याच्या मुख्य प्रवेशदाराच्या तटभिंतीला जंग्या आहेत.

तोफा : छोट्या तोफा हे गढीवरील लांब अंतरावरील शत्रूसैन्याची धूळदाण उडविण्याचे सर्वात महत्त्वाचे आणि परिणामकारक शस्त्र होते. शत्रुला गढीजवळ येऊ न देण्याचे काम तोफा करीत. मोठ्या तोफांचा वापर किल्ल्यामध्ये केला जाई. हत्तीवरून मारा करण्याच्या तोफेला 'पील नाला' व उंटावरून झाडणाऱ्या तोफेला 'शुतरनाला' म्हणत.[४०] लातूर जिल्ह्यातील काही गढयांमध्ये छोट्या तोफा आहेत. त्या अतिशय गंजलेल्या आहेत. उदा.कोपरा (ता.अहमदपूर) येथील छोटी लोखंडी तोफ व तांदुळजा (ता.लातूर) येथील पंचधातूची छोटी तोफ. हाडोळी (ता.निलंगा) येथे रेकल्याचा उल्लेख आहे. रेकला म्हणजे लहानशी तोफ होय.[४१]

---

३७. बेंद्रे, वा.सी., पूर्वोक्त, **गडकोट-दुर्ग आणि त्यांची वास्तु,** पृ.७३.
आकाश भैरवकल्प चतुः विंशःपटलः ।
न्यग्रोधार्धदलाभानि मध्ये छिद्रयुतानि च ॥
शृगाणि कल्पयित्वाथ पंक्तिश्वच्छ समन्ततः ॥१७॥

३८. काटे, पं.व्य., आणि देशपांडे, प्र.न., 'मध्ययुगीन तटबंदी : काही वैशिष्ट्ये,' **मराठवाडा विद्यापीठ, पत्रिका** vol-Ix.No.१, जुलै, १९६९, पृ.२९ ते ३५.

३९. पोतदार, वसंत, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, आष्टा (कासार),** १९८४, (दु.आवृत्ती), पृ.१३१ ते १४३.

४०. भोसले, प्रविण, **दुर्गरचना,** सुकृत प्रकाशन, सांगली, २००५, पृ.२५.

४१. पोतदार, वसंत, उपरोक्त, पृ.१३३.

टेहळणीची जागा :

टेहळणीची जागा म्हणजे गढीतील/वाड्यातील सर्वात उंच ठिकाणे. अशा टेहळणीच्या जागेवरून संपूर्ण वाडा व गाव दृष्टीक्षेपात येते. अशी उंच ठिकाण वडवळ (ता.चाकूर), देवडीच्या वर तिसऱ्या प्रवेशद्वाराच्या वरील भागावर साकोळ (ता.शिरूर अनंतपाळ), सताळा (ता.अहमदपूर) व हाडोळी (ता.निलंगा) येथे आहेत.

शस्त्रांस्त्रांची खोली (शस्त्रभांडार) : प्रत्येक गढीवर शस्त्रास्त्रांची खोली असते. गड-किल्ल्यात हरएक लढाऊ वस्तुंचा संग्रह म्हणजे 'जकीरा' असे.[४२] या खोलीला बळद असेही म्हणत.[४३] स्वातंत्र्यानंतर याचे महत्त्व फारसे राहिले नाही व शस्त्रेही सरकारजमा करण्यात आली. अशा शस्त्रास्त्रांची खोली वडवळ (ता.चाकूर) येथे होती.

गुप्तद्वार : गुप्तद्वार हे गढीपेक्षा किल्ल्याचे महत्त्वाचे अंग ठरते. गढी म्हणजे लहान आकाराचा किल्ला. प्रत्यक्षात येथील कोणत्याही गढीला गुप्तद्वार आढळले नाही. परंतु त्या संदर्भात काही आख्यायिका, शिरूर अनंतपाळ, हाळी (ता.उदगीर), येरोळ (ता.शिरुर अनंतपाळ) येथे प्रचलित आहेत. काही ठिकाणी महिला वर्गासाठी स्वतंत्र जिना असे. उद.वडवळ येथे तिसऱ्या दरवाज्याच्या देवडीमधून वरच्या मजल्यावर जाणारा रस्ता आहे. तो तेथून सरळ स्वयंपाकगृहाकडे जातो.

धान्य कोठार : गढीमध्ये/वाड्यामध्ये प्रामुख्याने वतनदार रहात असत. ज्या वतनदाराची उत्पन्नाची साधने जास्त किंवा जमा होणारा महसूल धान्याच्या स्वरूपात असे, त्या गढी/वाड्यात लादण्यांची व तळघरांची संख्या जास्त दिसते. बहुतेक सर्व गढी/वाड्यात लादण्यांची व्यवस्था आहेच. सर्वात मोठे लादण्यांचे दालन रेणापूर येथील पाटलांच्या वाड्यात असून ते १४.३२५ मीटर लांब व ९.४४८ मीटर रूंद आहे. हे दालन १२ स्तंभांवर आधारलेले असून हे स्तंभ ६ फूट व ५ १/२ फूट, (१.८२ ते १.६७ मी.) एवढ्या उंचीचे आहेत. या दालनाशिवाय वाड्यात इतरही अनेक लादण्या आहेत. त्या आता बंद करण्यात आलेल्या आहेत. तळघराकडे जाणारा मार्गही सुरक्षित असे.

वाहतुकीची साधने : मध्ययुगीन काळात वाहतुकीसाठी घोडा, उंट यांचा वापर केला जाई. काही वतनदार हे सरदार होते. त्यांचे स्वत:चे सैन्यही असे. उदा.तांदुळग्याचे नाईक बावने सरदार हे फत्तेसिंग भोसले (अक्कलकोट) यांच्या सैन्यात घोडदलाचे प्रमुख सरदार होते.[४४] परंतु हैद्राबाद राज्याने तैनाती फौज स्वीकारल्यानंतर त्याचे महत्त्व राहिले नाही. ब्रिटिशांची कॉन्टिनेन्टल फौज हैद्राबाद राज्याचे अंतर्गत व बहिर्गत संरक्षण करीत असे. त्यामुळे स्वत:चे घोडदळ असा प्रकार राहिला नाही. परंतु घोडा हेच वाहतुकीचे प्रमुख साधन राहिले. बहुतेक सर्वच गढी-वाड्यात घोडे होते असे अनेकांच्या मुलाखतीनंतर दिसून येते. अशा घोड्याचे तबेले गढी/वाड्यात प्रामुख्याने असत. जळकोट येथील घोड्यांच्या तबेल्याची जागा आजही सुस्थितीत आहे. औसा येथील हालकुडेच्या वाड्यात तबेल्याची स्वतंत्र जागा आहे. बाभळगाव

४२. बेंद्रे, वा.सी., पूर्वोक्त, **गड-कोट-दुर्ग आणि त्यांची वास्तु**, पृ.३५.

४३. खांडगे, मंदा, पूर्वोक्त, पेशवेकालीन वाड्याची रचना, नकाशा क्र.६. बळद (शस्त्रे वगैरे ठेवण्यास.)

४४. कानोले, तात्यासाहेब, 'तांदुळग्याचे नाईक बावने सरदार व मराठ्यांच्या इतिहासातील त्यांची कामगिरी', भा. इ. आणि सं. **त्रैमासिक**, मुंबई, एप्रिल १९६६, पुस्तक ९ वे, पृ. ६३.

(ता.लातूर) येथील गढीत घोडे आहेत. वाहतुकीचे दुसरे महत्त्वाचे साधन म्हणजे उंट, कोरंगळा (ता.औसा), वडवळ (ता.चाकूर) येथे उंटासाठी पीलखाना होता. मांजरी (ता.लातूर) येथील गढीमध्ये एकेकाळी उंटही होते. येथील गढीमध्ये उंटावर ठेवण्याचे खोगीर तेथील गढीत छताला टांगलेले आढळते.

ब) गढीची/वाड्याची वैशिष्ट्ये : साधारणत: गढीतील घराची रचना चौकोनाकृती किंवा आयताकृती असे. संपूर्ण घराचे बांधकाम चौकास केंद्र समजून त्याभोवती केले जात असे.

१) **चौक** : चौकाचे क्षेत्रफळ घराच्या बांधकामाशी सुसंगत असे. घराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आतल्या बाजूस चौक असे. त्याच्या तिन्ही बाजूंनी बाधकाम करीत असत. चौकाचे बांधकाम घराच्या उंचीशीही सुसंगत असे. पायाच्या बाजूचे बांधकाम कोरीव दगडात असे. दगडी बांधकामाचे जोड (Joint) अतिशय बारीक असत. हवा व प्रकाश येण्यासाठी पुरेपूर सोय केली जात असे. सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळी सूर्यप्रकाश भिंतीवर पडत असे. त्यामुळे वाड्याचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत असे.

घरातील सर्व सांडपाणी चौकातूनच बाहेर जात असे. पाईपद्वारे किंवा नालीद्वारे ते बाहेर काढले जाई. धार्मिक उत्सवाच्या वेळी व इतर प्रासंगिक कार्यक्रमात हा चौक छोटेसे दिवे व अन्य काचेच्या दिव्यांनी सुशोभित केलेला असे. चौकाच्या समोरच एक बैठकीची खोली असे. यालाच दिवाणखाणा असेही म्हणत. याचा उपयोग स्वागत कक्षासाठी होत असे. दिवाणखाण्याचा उपयोग घरगुती वापरासाठीरही होत असे. त्याशिवाय सदर म्हणूनही त्याचा उपयोग होत असे. दिवाणखाण्याच्या पाठीमागे दोन्ही बाजूना अनेक खोल्या असत. त्यांचा वापर घरगुती कारणासाठी होत असे. उदा.स्वयंपाकगृह, साठवण खोली, देवघर, स्त्रीकक्ष, स्नानगृह इत्यादी. जनावरांचा गोठा जेथे असेल तेथे भिंती उंच असत. तेथे क्वचितच इतरांना प्रवेश असायचा.

वरच्या मजल्यावर जाण्यासाठी रूंद भिंतीतच अंधारात अरूंद असा जिना असे. सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याची अशी रचना असावी. दुसऱ्या मजल्याचे बांधकाम चौकानाच्या चोहोबाजूने होत असे. चौकाच्या समोर खिडकीपर्यंतचा भाग बंद असे. उर्वरित भागात लाकडी नक्षीकाम व त्यानंतर खिडकी असे. त्याच्या पाठीमागे शयनकक्ष असत. दुसऱ्या मजल्यावर हवामहल असे. पूर्ण बांधकाम लाकडी खांबावर पेललेले असे. घरातील सदस्यांच्या संख्येनुसार घराच्या बांधकामाचा विस्तार होत असे. या सर्व बांधकामाचे उद्दिष्ट संरक्षण हेच होते.

स्वयंपाकगृह : दिवाणखाण्याला लागून किंवा बाजूला स्वंयपाकगृह असे. स्वंयपाकगृहाच्या भिंतीची उंची दोन मजली एवढीही काही ठिकाणी असे. स्वंयपाकगृहात हवा खेळती राहण्यासाठी ही सोय असे. स्वयंपाकगृहावर बांधकाम होत नसे. छताच्या ठिकाणी एक झरोखा असे. धूर जाण्यासाठी व सूर्यप्रकाश येण्यासाठी याचा उपयोग होत असे. स्वंयपाकगृहाच्या एका कोपऱ्यात सांडपाण्याची नाली असे. त्याद्वारे पाणी बाहेर जात असे. उदा.हालकुडेंचा वाडा, औसा.

जोते (Plinth) : लातूर जिल्ह्यातील गढी/वाडे या सर्व वास्तू इ.स.१७५० ते १८१८ या उत्तर मराठा कालखंडातील आहेत.[४५] त्यांच्या बांधकामाच्या तंत्रात प्रचंड विस्तारित भिंती व

४५. माटे, एम.एस., पूर्वोक्त, **मराठा आर्किटेक्चर**, पृ.५२.

भक्कम दरवाजांचा समावेश असे. जाड भिंतीतून चोर पायऱ्या व लादण्या असत. खोल पायऱ्या करून त्यावर भिंतीचे बांधकाम करीत. जोत्यावर प्रकाश येण्यासाठी जोत्याची उंची वाढविलेली असे. तळघराच्या भिंती घडीव दगडांच्या बांधलेल्या असत. त्यामुळे त्या मजबूत आणि सुशोभित वाटत असत. उदा.भेटा, ता.(औसा) येथील गढीतील तळघर व जोता.

जोत्यावरच्या पहिल्या मजल्याचे बांधकाम दगडी असे. त्यासाठी चुनखडीत किंवा पांढऱ्या मातीच्या चिखलाचा उपयोग केला जात असे. चूना बांधकामाच्या मजबूतीसाठी वापरत. दगड कोरीव असत. चुन्याव्यतिरिक्त केलेले घडीव दगडाचे बांधकाम उत्कृष्ट समजत. हे बांधकाम पूर्व नियोजित असून त्यासाठी गवंड्याना सूचना दिलेल्या असत.

दर्शनी भागाच्या भिंती १.२१९ मीटर जाडीच्या असत. जाड भिंतीतूनच पायऱ्या असत. त्याला तडे जाऊ नये म्हणून लाकडी फळ्यांचा आधार दिलेला असे. दावण गाव (ता.उदगीर) येथे अशा फळ्या आजही दिसतात. घराच्या आतील भिंतींना गिलावा केलेला असे.

तळमजला : तळघराच्या वरच्या बाजूस तळमजला असे. वरची बाजू चिखल, दगड, विटांद्वारे तयार केली जात असे. त्यावर लाकडी बांधकाम होत असे.

घराचे छत (Roof) : छतासाठी लाकडी फळ्या असत (माळवद). त्यावर चुना किंवा चुना मिश्रीत चिकन मातीचा लेप देत. त्याला उतार दिला जात असे. पाणी वाहून जाण्यासाठी सोय केलेली असे.

पाणी पुरवठा व्यवस्था : जवळपास सर्व गढी/वाड्यात पाणी पुरवठ्यासाठी आड किंवा विहिरीची सोय असे. ज्या गढीत किंवा वाड्यात पाण्याची सोय नसे, ती गढी परिपूर्ण नसे, ज्या ठिकाणी पाणी पुरवठ्यासाठी विहीर असे त्याठिकाणी घरातील सदस्यसंख्या जास्त असे किंवा गायी, गुरे, इतर जनावरे यांची संख्या तरी जास्त असे. जळकोट, वडवळ (ता.चाकूर), भेटा (ता.औसा), तांदुळजा (ता.लातूर), गुडसूर (ता.उदगीर), आंबेगाव (ता.निलंगा), चाकूर, करखेली (ता.उदगीर), दावणगाव (ता.उदगीर), पानचिंचोली (ता.निलंगा) येथे मोठ्या विहिरी आहेत. बडूर (ता.निलंगा) व गुडसर येथील आड वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या आडाला दोन दरवाजे आहेत असे सांगण्यात येते. तथापि, झाडीझुडपे वाढल्यामुळे ते प्रत्यक्ष पाहता येत नाहीत. वरच्या मजल्यावरून पाणी घेता यावे म्हणून काही ठिकाणी सोय केलेली आहे. उदा.गुडसूर (ता.उदगीर), औसा (हालकुडेंचा वाडा), साकोळ (ता.शिरूर अनंतपाळ) येथे वरच्या मजल्यावरून आडापर्यंत जाण्यासाठी तटभिंतीतच स्वतंत्र जिना केलेला आहे. रेणापूर येथील पाटलाच्या वाड्यात तळमजल्यातील एका खोलीतच आड आहे. या खोलीच्या छताला एक झरोखा आहे. त्यातून वरच्या मजल्यावरुन पाणी घेता येत असे. तळीखेड (ता.निलंगा) येथील वाड्याच्या आतल्या भागात पाणी नेण्यासाठी वेगळ्या प्रकारची रचना केलेली आहे. एका कोरीव दगडी कुंडात पाणी सोडण्यासाठीची व्यवस्था आहे. अशीच रचना येरोळ (ता.शिरूर अनंतपाळ) येथे आहे.

सांडपाणी व्यवस्था : काही ठिकाणी शौचकुपाची व्यवस्था तटबंदीच्या भिंतीमध्येच केलेली आढळते. उदा.साकोळ व दावणगाव (ता.उदगीर) येथे तटबंदीच्या भिंतीतच शौचालयाची व्यवस्था आहे. दक्षिण तटभिंतीत स्त्रियांसाठी व उत्तरेकडील तटभिंतीत पुरूषांसाठी व्यवस्था आहे. दोन्ही शौचालयात फरक आहे तो फक्त आतमध्ये हवा येण्यासाठी. उत्तरेकडील तटभिंतीच्या आत एक आडोसा भिंत आहे. त्याला एक खिडकी ठेवलेली आहे. दक्षिणेकडील

तटभिंतीत छोटे-छोटे झरोके ठेवेले आहेत. लासोना येथील भाऊसाहेब पाटलाच्या वाड्यात वाड्याचा नैऋत्येकडील भागात तटभिंतीत शौचालय आहे. या शिवाय नागराळ (ता.देवणी), हाळी (ता.उदगीर), धामणगाव (ता.जळकोट), शिरूर-ताजबंद (ता.अहमदपूर) व रेणापूर येथील वाड्यात नैऋत्येस शौचालय असून आजही ते वापरात आहे. वास्तुशास्त्रानुसार शौचालय नैऋत्य दिशेस असते.[४६]

दर्शनी भागावरील लाकडी कोरीव काम : वाड्याचा दर्शनी भाग इतर भागापेक्षा जास्त आकर्षक व इतर भागाच्या मानाने किंचित पुढे आलेला असतो. चौकटीवर कोरीव काम केले जाई. सज्जाही सुशोभित असे. वरच्या भागात दगडी सज्जा हा फक्त साकोळ (ता.शिरूर अनंतपाळ) येथेच आहे. दुसऱ्या मजल्यावरील वेगळ्या प्रकारचा सज्जा भोकरंबा (ता.रेणापूर) येथे आहे. व्दार सपाट फळ्यांचे असे. त्यास लोखंडी पट्टया मारून ते जोडलेले असायचे. दरवाज्याच्या पुढे आडव्या लाकडी पट्टया फिरकीच्या साह्याने मजबूत करत. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजुंनी पहारेकऱ्यांच्या खोल्या असत (गार्ड रूम). त्याला छोट्या देवळ्या असत. येथे प्रवेशकर्त्यांची तपासणी करून मगच त्याला प्रवेशाला परवानगी असायची. खरोळा (ता.रेणापूर) येथील अशा प्रकारची रचना अतिशय उत्कृष्ट आहे. वडवळ (ता.चाकूर) येथेही प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस खिडक्या आहेत. दरवाज्याच्या वरील भागातही खिडक्या असत.[४७] उदा. लासोना येथील प्रवेशद्वारावर अशी खिडकी आहे.

दरवाज्याची चौकट : मध्ययुगीन कालखंडातील इतर कलाकृतीसमवेत दारे ही सुध्दा महत्त्वाची कलाकृती आहे. बहुसंख्य गढी/वाड्यांची दारे ही दोन पद्धतीची होती. मुख्य दरवाजा अतिशय मोठा मजबूत व भक्कम असायचा. परंतु आतील घराचा दरवाजा हा लहान असायचा. दर्शनी भागाच्या चौकटीवर नक्षीकाम असे. उदा.तळीखेड (ता.निलंगा) येथील गोपाळराव पाटील यांच्या वाड्याची चौकट किंवा लासोना (ता.देवणी) येथील व्यंकटराव पाटील यांच्या वाड्याची चौकट. तत्कालिन मुस्लिम जहागीरदारांच्या घराची चौकट साधी असून त्यावर नक्षीकाम केलेले असे. उदा.चापोली (ता.चाकूर) येथील रशिदमियाँ पापामियाँ देशमुख यांच्या गढीची चौकट, निलंगा येथील अब्दुल कादर यांच्या वाड्याची चौकट.

दरवाजे : सर्वसाधारण दरवाजे साधे व भक्कम असत. गढीचे/वाड्याचे संरक्षण हाच त्यांचा हेतू असल्यामुळे दारे अतिशय मजबूत, लाकडी फळ्यांची व उंच असत. काही ठिकाणी ती कमानदार असत. उदा.रेणापूर येथील राजे यांच्या वाड्यातील प्रवेश दरवाजा व दावणगाव (ता.उदगीर) येथील भंडे यांच्या गढीचा दरवाजा. साधारणत: घरातील आतील दरवाजा कमी उंचीचा व अधिक नक्षीकाम केलेला असे. उदा.हालकुडेंच्या वाड्यातील दरवाजा.

इतर लाकडी नक्षीकाम :

अ) **खांब** (Pillar)- प्रवशेद्वारातून आत आल्यावर प्रथम उघडा चौक लागतो. चौकाच्या सभोवताली छताला आधार म्हणून मोठ्या स्तंभांची रचना केलेली असे. मध्ययुगीन कालखंडात लाकडी खांब आणि तुळई (Beam) सुशोभित केलेली असे. यात खांब हे भार धारण करणारे

४६. पिम्पळे, सुधीर, **स्थापत्य वेद**, सरस्वती विहार, इंदौर, २००५, पृ.१४०,१४५.
४७. मोरवंचीकर, आर.एस., **वूड वर्क इन वेस्टर्न इंडिया**, पुजा पब्लिशर्स, दिल्ली, १९९४, पृ.३९.

असल्याचे त्यांची बांधणी काळजीपूर्वक केली जात असे. उभ्या खांबावर आडवी तुळई असते. येरोळ (ता.शिरूर-अनंतपाळ), लासोना (ता.देवणी), पाटोदा (ता.जळकोट), उजेड (ता.शिरूर अनंतपाळ), निलंगा, करखेली (ता.उदगीर), साकोळ (ता.शिरूर-अनंतपाळ) येथील दिवाणखान्यात लाकडी नक्षीकाम केलेले स्तंभ आहेत. हे स्तंभ दगडी तळखड्यावर (Pedestal) उभे केलेले असत. तळखेडे कोरीव असत. चौकाच्या तिन्ही बाजूंनी छताच्या पुढे येणाऱ्या आलेल्या लाकडी भागावर नक्षीकाम केलेले असे. त्यास पानपट्टी नक्षी असे म्हणत. उदा.हालकुडेंचा वाडा औसा.

कमान (Arches) : वाड्यात उंच व लाकडी नक्षीकामयुक्त कमानी असत. कमानी तीन प्रकारच्या आहेत. १) छोट्या कमानी, २) मध्यम आकाराच्या कमानी व ३) विस्तारित मोठ्या कमानी. कमानी बैठकीच्या ठिकाणी असत. कमानीच्या आकारमानानुसार सुशोभिकरण असायचे. जेथून कमान सुरू झाली त्या भागापासून कमान सुशोभित केली जाई.

मुघलांच्या काळातील कमानी या अधिक सुसंगत, साध्या व सुशोभित असायच्या. साकोळ (ता.शिरूर-अनंतपाळ), येरोळ (ता.शिरूर अनंतपाळ), उजेड (ता.शिरूर अनंतपाळ), करखेली (ता.उदगीर), पाटोदा (ता.जळकोट), तळीखेड (ता.निलंगा) येथील वाड्यात नक्षीदार कमानी आहेत. साकोळ येथील वाड्यात दगडी कमानीयुक्त सज्जा ही आहे.

खिडक्या : खिडक्या लाकडी व लहान असत. त्याची बांधणी विटांमध्ये केलेली असे. महिलांचा मोठा वावर आहे तिथे फक्त छोटासा झरोका असे. तळमजल्यावर खिडक्या नसत. पहिल्या मजल्यावर बाह्य भिंतीत काही खिडक्या असत. अती उंचीवरही छोट्या खिडक्या असायच्या. मुख्य प्रवेशद्वाराच्या वर खिडकी असे. त्याला झरोखा दर्शन या नावाने ओळखले जाई.

काही खिडक्या सुशोभित दोन खांबांमध्ये घट्ट बसविलेल्या असत. उदा.औसा येथील हालकुंडेंच्या वाड्यातील खिडकी. वाढवणा (ता.उदगीर) येथील गढीच्या पूर्वेकडील बाजूस काही कमानीयुक्त खिडक्यांचे अवशेष आहेत.

क) गढी-वाड्यातून लढला गेलेला हैद्राबाद मुक्ती संग्राम : १९३७ ते १९४८ हा हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महत्त्वाचा कालखंड आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रमातील अनेक पैलूंवर विविध लेखकांनी प्रकाश टाकला आहे. येथे लातूर जिल्ह्यातील गढी-वाड्यातून लढल्या गेलेल्या मुक्ती संग्रामातील लढ्याची थोडक्यात ओळख करून घ्यावयाची आहे.

१८५७ च्या उठावानंतर १८६७ च्या भालकी येथील कटात आष्टा व शिरूर येथील गढ्यांचा सहभाग होता असा उल्लेख सापडतो. या गढ्यांना राजुरा (अहमदपूर) व उदगीर येथील फौजेच्या तुकड्यांनी वेढा घातला होता.[४८] या कटात चाकूरचे भीमराव पाटीलांचा सहभाग असल्याचा उल्लेख आहे. हे भीमराव पाटील चाकूर येथील गढीचे मूळ मालक होत.[४९]

---

४८. पगडी, सेतुमाधवराव, **१८५७ चे आणखी काही पैलु,** परचुरे प्रकाशन, मुंबई,२०००, पृ.१२२,१२३, कुंटे, भ.ग., स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, (मराठवाडा विभाग), मुंबई, १९७६, पृ.४३४,४३५.

४९. राजेश्वर, पाटील-चाकूरकर यांनी सांगितलेली माहिती.

१९३७ ते १९४८ या कालखंडातील हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यात लातूर जिल्ह्यातील हाडोळी (ता.निलंगा), शेळगी (ता.निलंगा), मेहकर (ता.निलंगा), तांदुळजा (ता.लातूर), तोंडचीर (ता.उदगीर) येथील गढ्या सहभागी झाल्या होत्या.

निलंगा तालुक्यातील हाडोळी या ठिकाणी मोहनराव पाटील यांच्या गढीवर ३ मार्च १९४७ रोजी रझाकारांसमवेत सशस्त्र झुंज झाली. मोहनराव पाटलांच्या गढीला १३.७१६ मीटर उंच व १८.५९२ मीटर व्यासाचा अष्टकोनी चिरेबंदी बुरूज आहे. ही गढी क्रांतीकारकांचे आश्रयस्थान होती. मोहनराव पाटलांनी सहा जेजलांच्या साह्याने (जेजल म्हणजे ३६५ सें.मी. लांबीची व १२ सें.मी. व्यासाची बंदुकीपेक्षा तिप्पट जाड नळी असलेली व मागे ६० ते ७५ सें.मी. लाकडी तुंबा असलेली एक प्रकारची मोठी प्रचंड बंदूक) आणि तीन रेकलांच्या साह्याने (रेकला म्हणजे लहानशी तोफ) दिलेला लढा प्रसिद्ध आहे. सर्व जाती-जमातीच्या लोकांनी गढीत राहून त्यांना या लढ्यात मदत केली होती. बुरूजाच्या गाभाऱ्यातील खोलीत त्यांचे कुटूंब राहात होते. या खोलीत दारूगोळ्याचा साठाही प्रचंड प्रमाणात होता.[५०]

तोंडचीर (ता.उदगीर) येथे वत्सलाबाई पाटील यांची मजबूत गढी होती. किसनगीर नावाची एक क्रांतीकारक व्यक्ति पाटील बाईंचा गुमास्ता म्हणून काम पहात असे. त्याच्यामार्फत वत्सलाबाईना सांगून तादलपूरचा पाटलाने मुक्ती लढ्यातील गढी किसान दलाच्या ताब्यात देण्याची विनंती केली. पाटील बाईंनी आनंदाने गढी रिकामी करून दिली होती.[५१]

कोळखेड (ता.उदगीर) येथील अप्पाराव पाटील यांनी खतगावच्या दोन रोहिल्यांना ठार मारले होते. रझाकारांना ही बातमी समजताच त्यांनी पाटलांचे घर पेटविले. पाटलांचा वाडा इतका मोठा होता की, वाड्यात लहान-मोठ्या सत्तर चौकटी होत्या. रझाकारांनी आतील धान्य जाळून टाकले. हे धान्य किसानदलाच्या लोकांना मिळत असे.[५२] तोंडचिर, रामघाट येथे किसान दलाबरोबर रझाकारांची १२ ऑगस्ट १९४८ ला लढाई झाली. या लढाईत उदगीरहून शंभर हत्यारी पोलीस, त्यांचे अधिकारी, पठाण, रोहिला आणि हजार-बाराशे रझाकार सामिल झाले होते. या लढाईत रझाकारांनी माघार घेतली. किसान दलाच्या कार्यकर्त्यांनी सोलापूरला जायचे ठरविले. अटरगा-सावरीजवळगा-कसगी-केसरजवळगा-वागदरी यामार्गे ते लिंगदलीच्या भाऊराव पाटलांच्या गढीत हत्यारे ठेवून सोलापूरला गेले. तेथे स्वातंत्र्य सैनिक भाई छन्नुसिंग चंदेले यांनी या किसान दलाचे स्वागत केले.[५३] निजामी राज्याच्या कक्षेपलिकडे सोलापूर येथील मुक्ती आंदोलकांची मोठी छावणी होती.

किसान दलाच्या कार्यकर्त्यांना शेळगी (ता.निलंगा) येथील त्रिवेणीबाई पाटील या महिलेने आपल्या गढीत आश्रय दिला होता. ही बातमी औराद येथील पोलीस ठाण्यास समजली. त्यानंतर झालेल्या संघर्षात तीन पोलीस ठार झाल्यावर पोलिसांनी पळ काढला. किसान दलाच्या कार्यकर्त्यांना हत्यारे विकत घेण्यासाठी सात हजार रुपये रोख व चांदीची नाणी

---

५०. पोतदार, वसंत, पूर्वोक्त, पृ.१३१ ते १४२.
५१. कित्ता, पृ.१४६, आणि तोंडचीर येथील स्वातंत्र्य सैनिक किसनराव पाटील व दत्तुगिर तोंडचीरकर यांची मुलाखत.
५२. कित्ता, पृ.१५८.
५३. कित्ता, पृ.१६५.

देऊन आपल्या देशबांधवाच्या रक्षणासाठी या पैशाचा उपयोग करा असे त्रिवेणीबाई पाटील यांनी सांगितले. त्या स्वतः घोड्यावर स्वार होऊन रायफल तलवारीसह मोहिमेवर जात असत.[५४]

१९४८ मध्ये मेहकर (ता.निलंगा) येथे किसान दलाचे कार्यकर्ते येताच रझाकार, पठाण व रोहिले यांनी गावातील मजबूत गढीचा आश्रय घेतला. मेहकरमधील एका अज्ञात महिलेने ही बातमी किसान दलाच्या कार्यकर्त्यांना सांगितली. किसान दलातील कार्यकर्त्यांनी गढीला वेढा घातला. गढीतून या कार्यकर्त्यांवर गोळीबार सुरू झाला. त्यात बातमी देणारी महिला ठार झाली.[५५]

तांदुळजा (ता.लातूर) येथील गढीतील जगजीवन उर्फ युवराज नाईक बावने, स्वातंत्र्य सैनिक अण्णासाहेब बावने, नारायणराव उर्फ तात्यासाहेब बावने यांनी रझाकारांविरूद्ध लढा पुकारला होता. रझाकारांवर झालेल्या पोलीस कारवाईनंतर रझाकार परत जात असताना गढीवर हल्ला होणार अशी बातमी मिळाली. त्यावेळी गढीतील नारायणराव उर्फ तात्यासाहेब बावने यांनी धैर्याने लढा दिला. तांदुळजा गावच्या उत्तरेस राडी या गावी चार तास गावकऱ्यांनी झुंज दिली. दारूगोळा संपत आल्यावर गावकरी परत गढीत आले. गढीतील बुरूजावरून (पूर्व/उत्तर) स्वतः अण्णासाहेब बावने यांनी रझाकारांवर छोटी तोफ उडविली होती. तोफेच्या आवाजाने रझाकार पळून गेले. ती तोफ आजही यांच्या घरी पहावयास मिळते.[५६]

कोरंगळा (ता.औसा) येथील गढीमध्ये देवीसिंग चौहान, शेषराव वाघमारे, श्री.अपसिंगेकर या क्रांतीकारकाचा वावर असायचा. हे क्रांतीकारक येथे बॉम्ब तयार करीत असावेत असा रझाकारांना संशय होता. गढीतील देशपांडे घराण्याचा या स्वातंत्र्य सैनिकांना आश्रय असे. त्यामुळे रझाकारांनी गढीतील लोकांची झडती घेतली होती.[५७]

सताळा (ता.अहमदपूर) येथील शंकरराव पाटील यांच्या गढीतून रझाकारांविरूद्ध लढा दिला गेला होता.[५८] भोकरंबा (ता.रेणापूर) येथील हाके पाटलांच्या वाड्यावर हल्ला झाला होता. मुकूंदराव आबाजी पाटील यांनी तो हल्ला परतावून लावला होता.[५९]

जिल्ह्यातील काही गढ्या व वाडे[६०] :

वडवळ येथील अण्णासाहेब बापूराव पाटील यांची गढी : मौजे वडवळ (ता.चाकूर) हे गाव लातूर या जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणापासून ३२ कि.मी.अंतरावर आहे. मुघल कालखंडात वडवळ हे परगण्याचे ठिकाण होते. इ.स.१६६२ मध्ये येथे दावल या नावाचा मुस्लिम

---

५४. पोतदार, वसंत, पूर्वोक्त, पृ.१६८, स्वातंत्र्य सैनिक स्व.त्रिवेणीबाई पाटील यांची कन्या श्रीमती हरीबाई पंढरीनाथ हलगरकर याची मुलाखत.

५५. कित्ता, पृ.१६९.

५६. स्वातंत्र्य सैनिक अण्णासाहेब नाईक बावने, तांदुळजा गढी यांची मुलाखत.

५७. कोरंगळा येथील स्वातंत्र्य सैनिक राम जोशी यांची मुलाखत.

५८. पंडितराव साहेबराव महाळंगीकर यांनी सांगितलेली माहिती.

५९. श्रीमती दौपदीबाई बळीराम हाके-पाटील, भोकरंबा, यांची मुलाखत.

६०. लातूर जिल्ह्यातील काही निवडक गढी/वाड्यांची येथे नोंद घेण्यात आलेली आहे. ही नोंद प्रतिकात्मक असून जिल्ह्यातील बहुतांश गढी/वाड्यांची यादी या प्रकरणाच्या शेवटी दिलेली आहे.

अधिकारी कार्य करीत होता. परगणे वडवळ हे नांदेड सुभ्यातील अहमदपूर तालुक्यात होते.[६१] इ.स.१७०७ ते १७५० या काळातील शाहू दफ्तरातील कागदपत्रांच्या सूचीमध्ये पदाजी माणकोजी व संताजी बंडगर, गोपाळराव सरसुभेदार, जगजीवन परशराम, पंतप्रतिनिधी फत्तेसिंग भोसले, राणोजी, संताजी, कामजी व जिवाजी बंडगर यांची नावे वडवळ येथील मोकासे संदर्भात आढळतात.[६२] इ.स.१८६७ मध्ये रामराव उर्फ जंगबहादूर हा नानासाहेब पेशव्यांचा हितचिंतक वडवळ येथे आला होता. पुढे तो भालकी येथे पकडला गेला. या खटल्यासंदर्भात पुढील माहिती आढळते. रामराव उर्फ जंगबादूर याने आनंदराव पाटील (मौजे शिरूर-परगणे वडवळ) यांना २५ हजार रुपयाच्या हुंड्या देऊन गढी तयार करण्यास सांगितले.[६३] हे आनंदराव पाटील म्हणजेच वडवळ येथील अण्णासाहेब बापूराव यांचे पणजोबा होत.[६४]

वडवळ गावात प्रवेश करतानाच ही उंच गढी लक्ष वेधून घेते. ही गढी अण्णासाहेब बापूराव पाटील यांच्या घराण्यातील आहे. परकोटा व्यतिरिक्त गढीचे क्षेत्रफळ १८५६.३ चौरस मीटर आहे. ही गढी चौकानाकृती असून त्यास पाच बुरूज, पाच चौक व सात दरवाजे आहेत. परकोटाचे बुरूज आता नाहीसे झालेले आहेत. पण ईशान्य दिशेचा परकोटातील बुरूज अस्तित्त्वात आहे.

गढीचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमूख असून परकोटाच्या पूर्वेस वेस आहे. यास बंक असे म्हणतात. ही वेस ३.६५७ मीटर उंच व २.७४३ मीटर रूंद आहे. या वेशीमध्ये पूर्वी एक प्रचंड दरवाजा होता. आता तो अस्तित्वात नाही. या दरवाज्याला बांधण्यात येणारे साखळदंड आजही तेथे दिसतात. वेशीच्या प्रवेशद्वाराच्या बाह्य तटभिंतीत दोन्ही बाजूस दोन देवळ्या आहेत. उजव्या बाजूस मशाल अडकविण्यासाठी असलेला लोखंडी साचा (ब्रॅकेट) आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस भिंतीत खिडक्या आहेत. डाव्या बाजूची खिडकी नंतरच्या कालखंडात मोठी केलेली आहे. दरवाज्याच्या पाठीमागे अडसर लावण्याची जागा असून या अडसराला कुलूप लावण्याची पद्धत येथे दिसून येते. आतमध्ये प्रवेश केल्यावर दोन्ही बाजूंनी ३.९६२ मीटर लांब व २.७४३ मीटर रूंद या आकाराच्या खोल्या (ढाळज) आहेत.

वेशीमधून आत प्रवेश केल्यावर उत्तर बाजूस एक मोठी भिंत बांधलेली आढळते. या भिंतीत एक दरवाजा आहे. आतमध्ये मोकळी जागा आहे. हा सर्व भाग परकोटाचा आहे दुसरे प्रवेशद्वार पूर्वाभिमुख असून वेशीपासून ४०.५३८ मीटर अंतरावर आहे. या प्रवेशद्वारास ३.०४८ मीटर उंच व २.७४३ मीटर रूंदीचा भक्कम लाकडी दरवाजा (दिंडी दरवाजा) आहे. या दरवाज्याच्या आग्नेय दिशेस काही अंतरावर एका घाण्याचे अवशेष आहेत. दुसऱ्या दरवाज्याच्या पाठीमागे अडसर लावण्याची जागा आहे. दरवाज्यांतून प्रवेश केल्यावर दक्षिणेस तटबंदीच्या भिंतीतच कमानीदार खोल्या आहेत. या खोल्यांना दोन खिडक्या आहेत. कमानीतच एक दरवाजा असून तो अलीकडच्या काळातील दिसतो. याला लागूनच एक मोठा षटकोनी आकाराचा बुरूज आहे. या आकाराचा हा गढीतील एकमेव बुरूज होय. दुसऱ्या दरवाज्यातून

६१. हुसेन, युसूफ (संपा.), **सिलेक्टेड वकाई ऑफ डेक्कन**, हैद्राबाद, १९५३, पृ.१५,१६.
६२. खोबरेकर, वि.गो., (संपा.), **शाहू दफ्तरातील कागदपत्रांची सूची**, खंड-१, पृ.५७५.
६३. पगडी, सेतुमाधवराव, पूर्वोक्त, **१८५७ चे आणखी काही पैलु**, पृ.१२२,१२३.
६४. अण्णासाहेब पाटील, वडवळ, यांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे.

प्रवेश केल्यावर उत्तरेस एक आडवी भिंत व एका खोलीचे अवशेष दिसतात. येथे पूर्वी पीलखाना (हत्ती बांधण्याची जागा) होता.[६५] उंटावरून बसून सहजपणे दुसऱ्या दरवाज्यातून प्रवेश करता येत असे. पीलखान्याला लागूनच एक आडवी भिंत बाधलेली आहे. या भिंतीला एक दरवाजा आहे. या बाजूला पूर्वी सेवकांची घरे होती. सेवकांसाठी पाणी पुरवठ्यासाठी वेगळी व्यवस्था होती.

षटकोनी बुरूजामध्येच दुर्गादेवीचे ठाणे आहे. या बुरूजाला वळसा घालून पुढे आल्यावर समोर एक दरवाजा दिसतो. हे गढीतील तिसरे प्रवेशद्वार होय. हा दरवाजाही पूर्वाभिमुख आहे. या दरवाजाच्या वरील भागात एक खोली असून त्यास तीन खिडक्या आहेत. या खिडक्यांच्या उत्तरेस तटबंदीच्या वरच्या बाजूस एक छोटी खिडकी आहे. ही टेहळणीची जागा आहे. या तीन खिडक्यांच्या वरील बांधकाम विटांचे आहे. त्यात आणखी तीन खिडक्या आहेत. तिसरा दरवाजा ३.२०० मीटर रूंदीचा आहे. दरवाजाची चौकट पुष्पशाखायुक्त आहे. तिसऱ्या दरवाज्यातून आत आल्यावर डाव्या व उजव्या बाजूला ढाळज आहेत. त्यांना येथे देवडी म्हणतात. डाव्या बाजूची देवडी २.७४३ मीटर लांब व २.१३३ मीटर रूंद आहे, तर उजव्या बाजूची देवडी ३.६५७ मीटर लांब व २.७४३ मीटर रूंद आहे. या देवडीच्या ईशान्येस वरच्या मजल्यावर जाण्यासाठी जिना आहे. वरच्या मजल्यावरील खोलीतूनच गढीतील मुख्य इमारतीत जाण्यासाठी गुप्त मार्ग आहे. गढीतील महिलांना परस्पर बाहेर जाण्यासाठी याचा उपयोग होत असे. तसेच संकटकाळीही याचा उपयोग होत असे. तिसऱ्या प्रवेशद्वारातून आत आल्यावर समोर चौक आहे. देवडीपासून ८.८३९ मीटर अंतरावर कचेरीची जागा होती. आता या ठिकाणी दवाखाना आहे. चौकाच्या उत्तर बाजूस पूर्वी तबेला होता. आता त्या जागी नवीन बैठकीची खोली बांधली आहे.

चौकाच्या दक्षिणेस आडवी भिंत आहे. या भिंतीला लागूनच ७ पायऱ्या वर चढल्यानंतर २.४० मीटर उंच आणि १.२५ मीटर रूंदीचे पश्चिमामुख चौथे प्रवेशद्वार लागते. प्रवेशद्वाराच्या ललाटी गणेश बिंब कोरलेले आहे. या ठिकाणी भिंतीची रूंदी २.४० मीटर आहे. प्रवेशद्वारातून आत आल्यावर समोर छोटा चौक आहे. चौकाच्या उत्तरेस तटभिंतीला लागूनच जिना आहे. १२ पायऱ्यानंतर वरच्या मजल्यावर जाता येते. चौकाच्या पश्चिमेस बैठकीची खोली आहे. ही दोन मजली वास्तु आहे. याला आता नवीन स्वरूप देण्यात आले आहे. पूर्वी या बैठकीच्या खोलीला तीनखणी म्हणत. बाहेरून येणाऱ्या व्यक्तींची भेट किंवा गोपनीय बैठक या तीनखणी खोलीत होत असे. चौकाच्या दक्षिणेस उत्तराभिमुखी पाचवे प्रवेशद्वार आहे. हे प्रवेशद्वार २.१३३ मीटर उंच आणि १.२९५ मीटर रूंद येवढ्या मोजमापाचे आहे. या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस सांडपाणी जाण्यासाठी व्यवस्था केलेली आहे. प्रवेशद्वारातून आत आल्यावर समोर छोटा चौक आहे. चौकाच्या पूर्वेस, प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस एक लादणी आहे. चौकाच्या दक्षिणेस सहावे प्रवेशद्वार आहे. यातून आत आल्यावर लागतो तो आयताकृती चौक. या ठिकाणी आता जनावरांचा गोठा आहे. चौकाच्या पूर्वेस बैठकीची खोली आहे. सहाव्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर समोरच सातवे प्रवेशद्वार दिसते. हे गढीतील मुख्य इमारतीचे प्रवेशद्वार आहे. प्रवेश करतानाच दोन्ही बाजूस तटभिंतीतच वर

६५. "पीलखाना" या शब्दाचा अर्थ हत्ती बांधण्याची जागा असा होतो. "पागा" म्हणजे घोडे ठेवण्याची जागा. असे असले तरी या भागात मात्र उंटाचा व्यापार प्रचलित असल्यामुळे उंट ठेवण्याच्या जागेला पीलखाना असे म्हटले आहे.

जाण्यासाठी जिना आहे. त्यास डाव्या बाजूस १० पायऱ्या व उजव्या बाजूस १५ पायऱ्या आहेत. वरच्या दोन्ही बाजूस टेहळणीसाठी झरोखे आहेत. अशीच रचना शिरूर-अनंतपाळ येथील गढीतील मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वाराला आहे.

सातव्या प्रवेशद्वारातून आतमध्ये प्रवेश केल्यावर समोर चौक आहे. चौकाच्या तिन्ही बाजूंनी ९१ से.मी. उंचीचा चौथरा आहे. तिन्ही बाजूंना ओसरी असून ही ओसरी आता आधुनिक पद्धतीने सजविण्यात आलेली आहे. ओसरीच्या पाठीमागे अनेक खोल्या आहेत. चौकाच्या नैऋत्य दिशेस देवघर आहे. पश्चिमेस उतरंडीची खोली असून याच्या बाजूला शस्त्रास्त्रांची खोली होती. आता त्याचा उपयोग धान्य साठविण्यासाठी व इतर कामासाठी केला जातो. चौकाच्या दक्षिणेस व पूर्वेस इतरदालने आहेत. चौकाच्या आग्नेय दिशेस स्वंयपाकगृह आहे. त्यासाठी ओसरीतूनच जावे लागते. याचे स्वरूपही पूर्वीसारखेच आहे. स्वंयपाकघरातूनच पूर्वेस एकस दरवाजा आहे. या दरवाज्यातून उत्तरेकडील देवडीकडे म्हणजेच तिसऱ्या प्रवेशद्वारावरील खोलीकडे व दक्षिणेकडील स्नानगृहाकडे जाता येते. त्या पलीकडे पूर्वेकडील तटबंदीची भिंत आहे. गढीच्या आग्नेय दिशेस स्वयंपाकगृहाच्या पाठीमागे स्नानगृह व पाणी पुरवठ्यासाठी आड आहे. स्नानगृहाला लागूनच गढीची दक्षिणेकडील तटबंदी आहे. या तटबंदीतच एक कमान आहे. गढीमध्ये जास्त सदस्य असतील तर स्वयंपाकासाठी या जागेचा उपयोग होत असे. दक्षिणेकडील तटबंदीतच एक लादणी आहे. या लादणीची आता पडझड झालेली आहे. गढीच्या नैऋत्येकडील बुरूजावर पीर व मोकळी जागा आहे. या मोकळ्या जागेच्या उत्तरेस एक दरवाजा असून या दरवाज्यातून आयताकृती चौकात येता येते.

गढीच्या परकोटात आग्नेय दिशेस मोकळ्या मैदानात पूर्वी एक आड होता. आता तो पूर्णपणे बुजविलेला आहे. गढीच्या दक्षिणेस १४.५० मीटर लांब x ७.५० मीटर रूंदीची आयताकृती बारव आहे. त्यावर मोटेची सोय आहे. बारवेत उतरण्यासाठी २४ पायऱ्यांचा जिना आहे. तो उतरत असतानाच डाव्या भिंतीत एक खोली लागते.

गढीचा पाचवा बुरूज वायव्य दिशेस आहे. गढीची दक्षिणेकडील बाह्य तटबंदी ढासळलेली आहे. परकोटाची तटबंदीचीही पडझड झालेली आहे.

औसा येथील लिम्मणअप्पा विरूपाक्षअप्पा हालकुडे यांचा वाडा : औसा येथील प्रसिद्ध मल्लीनाथ मंदिराच्या उत्तरेस औसा येथील दानशूर जमीनदार लिम्मणअप्पा विरूपाक्षअप्पा हालकुडे यांचा वाडा आहे. लिम्मणअप्पा या घराण्यात दत्तक म्हणून आले. लिम्मणअप्पा हालकुडे यांचे पणजोबा शिवाप्पा हालकुडे यांनी हा वाडा बांधल्याचे सांगितले जाते. औसा येथील वीरनाथ मल्लीनाथ मंदिर व हा वाडा समकालीन असल्याचे सांगितले जाते. हे मंदिर १२५९ फसली मध्ये बांधण्यास सुरूवात झाली असे त्या मंदिरातील शिलालेखावरून समजते. हालकुडे घराण्यातील शिवाप्पा हालकुडे यांनी औसा शहराच्या दक्षिणेस असलेले गुरपाददेव मंदिरही बांधले आहे. लिम्मणअप्पा हालकुडे यांनी सर्वोदय नेते शंकरदेव यांच्या हस्ते १५ जानेवारी १९५६ या दिवशी औसा येथील खादी ग्राम उद्योगाला ३ १/२ एकर जमीन दान दिली आहे. हालकुडे यांचा पूर्वी सुरंजी तयार करण्याचा (सुरंजी हे रंगासाठी वापरत असत) कारखाना होता.

हालकुडेचा हा वाडा आता लिम्मणअप्पा विरूपाक्षअप्पा हालकुडे यांच्या नावाने ओळखला जातो. हा वाडा संपूर्ण चिरेबंदी असून वाड्याचे प्रत्यक्ष बांधकाम २४.३८४ मीटर लांब व २२.८६० मीटर रूंद आहे. वाड्याच्या पाठीमागे हे बांधकाम ३१.६९९ मीटर लांब आणि पश्चिमेकडे १४.६३० मीटर रूंद आहे. दक्षिणेकडे २५ चौ.मीटर रूंद मोकळे मैदान आहे. हा वाडा दोन चौकी आहे. वाड्याचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमूख असून त्याची उंची २.४३८ मीटर व रूंदी १.५२४ मीटर आहे. दरवाज्याची चौकट पुष्पशाखी आहे. वरच्या मजल्यावर मुख्य प्रवेशद्वाराच्या वर विटांचे बांधकाम असून वरच्या विटकामात चार लाकडी खिडक्या किंवा गवाक्ष आहेत. दरवाज्याच्या दोन्ही बाजूस दिवा किंवा मशाल लावण्यासाठी लोखंडी ब्रँकेट (साचा) आहेत. दरवाज्याच्या पाठीमागे अडसर लावण्याची जागा आहे. पाच पायऱ्यानंतर प्रवेशद्वारातून आत येता येते.प्रवेश केल्यानंतर दरवज्याच्या पाठीमागे दोन्ही बाजूस तटभिंतीत एक-एक छोटी देवळी आहे. आतमध्ये प्रवेश करताच तिन्ही बाजूंना ओसरी लागते. ओसरीमध्ये पूर्व बाजूस तीन छोटी लाकडी फरताळे आहेत. ओसरीच्या जोत्याची उंची १.०९२ मीटर आहे. ओसरीचे माळवद २० खणी आहे. ओसरीस दोन्ही बाजूस लाकडी पट्टी लावलेली आहे. ओसरीवर येण्यासाठी चौकाच्या आग्नेय व वायव्य दिशेस चार-चार पायऱ्या आहेत. ओसरीनंतर पाठीमागे दक्षिणेस व उत्तरेस दोन-दोन खोल्या आहेत. या खोल्या पाहुण्यांसाठी असत. पैकी उत्तरेकडील खोल्या नंतर तयार केलेल्या आहेत आता त्याचा वापर कमी आहे. ओसरीनंतर समोरील चौकात प्रवेश होतो. हा चौक ७.१३७ मीटर लांब व ५.८९२ मीटर एवढ्या आकाराचा आहे. चौकाला प्रथम मजल्याच्या पातळीवर लोखंडी सळ्यांची चौकट टाकून आधार दिला आहे. (१९९३ च्या किल्लारी भूकंपानंतर)

पहिल्या चौकातूनच वाड्याच्या दुसऱ्या चौकात मध्ये जाण्यासाठी २.२६० मीटर उंचीचे व १.५२४ मीटर रूंदीचे दुसरे प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस पणत्या ठेवण्यासाठी छोट्या देवळ्या आहेत. ओसरीतून वाड्याच्या आत जाण्यासाठी आणखी एक दरवाजा आहे. हा दरवाजा १.५२४ मीटर उंच व ०.९१४ मीटर रूंद आकाराचा आहे. दुसऱ्या प्रवेशद्वाराच्या उत्तरेस आणखी एक २.१५९ मीटर उंच व १.३७१ मीटर रूंद या आकाराचा दरवाजा आहे. या दरवाजातून तबेल्याकडे तसेच वाड्याच्या पाठीमागे जाता येते. पाच पायऱ्यानंतर दुसऱ्या द्वारातून प्रवेश होतो. हे प्रवेशद्वारही पूर्वाभिमुख आहे. या प्रवेशद्वाराच्या वर एक खोली आहे. यातून पहिल्या चौकात व दुसऱ्या चौकात होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवता येते. दुसऱ्या दरवाज्यातून प्रवेश केल्यावर उजवीकडे तटभिंतीतच वरच्या भागाकडे जाण्यासाठी १३ पायऱ्यांचा जिना आहे.

वाड्यातील दुसरा चौक प्रशस्त आहे. या चौकात ईशान्य आणि वायव्य दिशेकडून पडवीवर येण्यासाठी चार-चार पायऱ्या आहेत. पडवीचे माळवद १३ खणी आहे. पडवीचे लाकडी नक्षीकाम सुरेख असून या नक्षीकामास पानपट्टी नक्षी म्हणतात. पडवीत प्रवेश केल्यावर समोरच देवघर आहे देवघरातूनच दक्षिणेस एक दरवाजा आहे. येथून गुरांच्या गोठ्याकडे जाणारा मार्ग आहे. देवघरातच तटभिंतीत दोन लादण्या आहेत.

देवघराला लागून कोठीघर आहे. याचा उपयोग भांडी ठेवण्यासाठी केला जाई. कोठी घराला लागून उत्तरेस एक खोली आहे तिचा उपयोगही सामान ठेवण्यासाठी केला जातो.

याला लागूनच उत्तरेकडे वर जाण्यसाठी जिना आहे. दुसऱ्या चौकाच्या उत्तरेस असणाऱ्या तीन खोल्या म्हणजे शयनकक्ष होत दुसऱ्या चौकाच्या दक्षिणेस पडवीतून पाकगृहाकडे प्रवेश करता येतो. दरवाज्यातून आतमध्ये प्रवेश केल्यावर डाव्या बाजूस एक जिना आहे. या जिन्यातून दुसऱ्या प्रवेशद्वाराच्या वरव्या भागात असलेल्या खोलीत जाता येते. पाकगृह अतिशय मोठे असून या खोलीच्या भिंती उंच आहेत. छताला वरच्या बाजूस एक झरोखा आहे. धूर बाहेर जाण्यासाठी व प्रकाश आत येण्यासाठी ही व्यवस्था आहे. पाकगृहात ईशान्य बाजूस एक लादणी आहे. या लादणीच्या बाजूला एक दरवाजा आहे. यातून पडवीमध्ये येता येते. पाकगृहाच्या पश्चिमेस एक दरवाजा असून त्यामधून बाजूच्या खोलीत जाता येते. पाकगृहाच्या पूर्वेस एक दरवाजा असून त्यामधून स्नानगृहाकडे जाता येते. स्नानगृहातून पडवीमध्येही जाता येते व ओसरीमध्येही जाता येते. या मार्गात भिंतीत झरोका आहे त्यातून वाड्याचे पहिले प्रवेशद्वार पूर्णपणे दिसते.

पहिल्या चौकातून एक मार्ग टाक्याकडे म्हणजे तबेल्याकडे जातो. याचा उलेख वर आलेला आहे. या मार्गे तबेल्यात व वाड्याच्या पश्चिम भागात जाता येते. तबेल्यात पाच घोडे राहतील अशी व्यवस्था होती. घोडे बांधण्यासाठी असणाऱ्या लोखंडी कड्या आजही तेथे दिसतात. या मार्गात डाव्या बाजूस एक तळघर आहे. या मार्गातूनच वाड्याच्या बाहेर जाण्यासाठी उत्तर बाजूस दरवाजा आहे.

वाड्याच्या पाठीमागे पाणी पुरवठ्यासाठी आड आहे. त्या पलीकडे गुरांचा गोठा आहे. पाठीमागे मोकळी जागा आहे. या जागेत चुना दळण्यासाठी पूर्वी घाणा होता असे सांगितले जाते. आता या जागेत गोबर गॅस प्रकल्प आहे. हा मराठवाड्यातील पहिला गोबर गॅस प्रकल्प होता असे श्री हालकुडे यांनी सांगितले. गाई-गुरांना बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र दरवाजा आहे. वाड्याच्या पाठीमागील उत्तर बाजूच्या दगडी तटभिंतीचा पाया २.१३ मी. उंच असून वर पांढऱ्या मातीची भिंत आहे. वाड्याच्या पश्चिमेस एक दरवाजा होता. पण तो सध्या अस्तित्वात नाही.

एकूण मध्ययुगीन महाराष्ट्राचा विचार करता साधारणतः १५ वे ते १८ वे शतक हा चारशे वर्षाचा काळ अत्यंत अराजकतेचा होता. या काळात महाराष्ट्रातील जनतेने संरक्षणासाठी अभूतपूर्व झुंज दिली आहे. या काळात महाराष्ट्रातील अनेक गावागावातून बांधल्या गेलेल्या या वास्तु या संघर्षाच्या साक्षीदार आहेत. युरोपच्या इतिहासातील मध्ययुगीन किल्ले, गढ्या जशी सरंजामशाहीची प्रतिके आहेत, तव्देत महाराष्ट्रातील गढ्या प्रजेचे संरक्षण व आक्रमकांशी संघर्ष यांचे प्रतिक आहेत. या गढ्या तत्कालिन काळातील सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाची साधनेही आहेत. गेल्या ५० वर्षांच्या कालखंडात बांधल्या गेलेल्या या वास्तु त्या प्रदेशातील वातावरणाचा परिचय करून देतात. हा काळ वतनदारी/सरंजामशाहीचा होता. त्यामुळे वतनदारांची ही संरक्षित घरे (गढ्या व वाडे) ज्यांनी ती बांधली, त्यांचे विचार, मनस्थिती, त्यांच्या कल्पना या संबंधीचा त्यावरून अंदाज बांधता येतो. त्याचप्रमाणे या वास्तु बांधणाऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्तरांचा, राजकीय कर्तृत्वाचा व धार्मिक समजुतीचाही बोध या वास्तु करून देतात. त्यांचा इतिहास शोधण्याचा प्रयत्न येथे केला आहे. गढ्या-वाड्यांच्या संदर्भात ८० पेक्षा जास्त ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन शक्य तेवढी माहिती गोळा

करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या वास्तु खाजगी मालकीच्या आहेत. त्यामुळे काही ठिकाणी माहितीसाठी खूप सहकार्य मिळाले, ऐतिहासिक कागदपत्रे काही ठिकाणी आहेत. कागदपत्रे १९४८ नंतर सरकारजमा केल्याचे सांगितले गेले.

१९९३ च्या किल्लारी येथील विनाशकारी भूकंपाचा या गढ्या/वाड्यावर खूपच परिणाम झाला आहे. औसा, निलंगा तालुक्यात याचा परिणाम खूप जाणवतो. काही गढ्या काळाच्या ओघात नष्ट झालेल्या आहेत. काही ठिकाणी १९९३ च्या भूकंपानंतर गढीमधील वास्तव्य कमी झाले. त्याचा परिणामही या गढी/वाड्यांवर झाला. काही ठिकाणी इतकी झाडी झुडपे वाढली आहेत. एकेकाळी गजबजलेल्या या वास्तु आज ओसाड झाल्या आहेत. उत्पन्नाचे साधन कमी झाल्यामुळे या मोठ्या वास्तुंची देखभाल करणे काही जणांना शक्य होत नाही, त्याचा परिणामही या वास्तुंवर झाला आहे. गेल्या २५० वर्षातील या वास्तुंची काळाच्या ओघात मोठी हानी होत आहे. गत इतिहासाचे हे गढी/वाडे साक्षीदार आहेत. सतराव्या शतकात आणि त्या पूर्वीच्याही काळात सामाजिक आणि आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू म्हणजे खेडे होते. वतनदार, मिरासदार, बलुतेदार आणि उपरी ही गावगाड्याची चार प्रमुख चक्रे होती. पाटील हा गावचा प्रमुख असे. यालाच ग्रामणी अथवा ग्रामप अशी सज्ञा होती. गावचा पाटील हा सामान्यतः मराठा समाजातील असे. परंतु काही ठिकाणी, ब्राह्मण, जैन, लिंगायत अथवा अन्य जातीचे पाटील असल्याचीही तुरळक उदाहरणे आढळतात. एखाद्याने पाटीलकीचे वतन विकत घेतले असेल अथवा राजाने स्वखुशीने एखाद्या व्यक्तिला पाटीलकी बहाल केली असेल किंवा गोतसत्तेने एखादा माणूस पाटील म्हणून निवडला असेल तर हा अधिकार अन्य जातीकडे जाण्याची शक्यता असे. कुळकर्णी हा गावाचा दुय्यम दर्जाचा अधिकारी आणि पाटलाचा सहाय्यक असे. कागदपत्रांतून त्याचा उल्लेख गावकुलकर्णी अथवा ग्रामलेखी असा केला आहे. देशमुख आणि देशपांडे हे परगण्याचे वतनदार अधिकारी होत. अनेक खेड्यांचा मिळून परगणा होत असे. देशमुख हा परगण्यातील सर्व पाटलांचा नायक आणि देशपांडे हा सर्व कुलकर्ण्याचा नायक होता. देशमुखी वतन हे सामान्यतः मराठा समाजाकडे असे. पण मराठवाड्यात हे वतन ब्राह्मणाकडेही असे. धर्मांतरामुळे काही ठिकाणी हे वतन मुसलमानांकडेही गेले आहे. काही ऐतिहासिक घराणी सुद्धा या गढी/वाड्यात नांदताना दिसतात. उदा.परगणे शिरढोण (जि.उस्मानाबाद) व निलंगा येथील देशपांडे घराणे हे अदिलशाही काळापासून येथे आहे. निलंगा येथील अब्दुलकादर देशमुख (अली अदिलशहा पासून हे घराणे येथे आहे) व चाकूर येथील पाटील घराणे या घराण्यातील ज्ञात मूळ पुरूष म्हणजे भीमराव पाटील यांचे नाव रामराव उर्फ जंग बहादूर म्हणून १८६७ च्या भालकी कटात आढळते. शिरूर अनंतपाळ येथील आनंदराव पाटील हे ही नाव या घटनेत आढळते. भेटा (ता.औसा) येथील नेमिवंत घराणे म्हणजे १७९५ च्या खर्ड्याच्या लढाईत कारणीभूत ठरलेल्या हैद्राबादच्या मुजीर-उल-मुल्क याचा दिवाण हरी नेमिवंत याचे वंशज असावेत असे वाटते. एकूण किमान १७ व्या शतकापासून गढी वाडे या वास्तू आणि त्यांचे महत्त्व या परिसरात कमी अधिक प्रमाणात अस्तित्वात आहे. किंबहुना मध्ययुगीन सत्तासंघर्षामध्ये त्यांचे स्थान अनन्यसाधारण असे होते. जिल्ह्यातील गढी-वाढ्यांची नोंद केवळ प्रातिनिधीक स्वरूपात घेतली आहे. यामुळे त्यांचे अस्तित्व स्पष्ट होते.

लातूर जिल्ह्यातील गढी/वाडे यांची सूची.

अ.क्र. (१)	गावाचे नाव (२)	तालुका (३)	गढीतील घराणे (४)	समाज (५)
१	हरंगुळ (खुर्द)	लातूर	चंद्रकांत पाटील (झुंजे पाटील)	लिंगायत
२	तांदुळजा	”	हणमंतराव माधवराव नाईक बावने/ अण्णासाहेब नाईक बावने	मराठा/राजपूत
३	गातेगाव	”	नातसिंह किसनराव देशमुख	मराठा
४	मांजरी	”	मुरहरराव देशपांडे/राघवेंद्र देशपांडे	ब्राह्मण
५	बाभळगाव**	”	दगडोजीराव देशमुख	मराठा
६	महापूर*	”	चंद्रराव अनंतराव माने पाटील/ तुकाराम माने पाटील/हाळे पाटील	मराठा/हटकर
७	बोरी*	”	माधवराव पाटील/रामराव यादवराव पाटील.	मराठा
८	सलगरा (बु.)	”	बलभीम दिगंबरराव पाटील	ब्राह्मण
९	लातूर*	”	ॲड.विजयकुमार शेटे	लिंगायत
१०	झरी (बु.)	चाकूर	भगवानराव शंकरराव देशपांडे	ब्राह्मण
११	झरी (खु.)	”	भाविकराव साहेबराव सुर्यवंशी	मराठा
१२	चापोली	”	रशिदमियाँ पापामियाँ देशमुख	मुस्लिम
१३	चाकूर	”	शिवराज पाटील/विलास पाटील/ गुणवंत पाटील.	लिंगायत
१४	घरणी	”	व्यंकटराव वसंतराव शिंदे(पाटील)	मराठा
१५	वडवळ	”	अण्णासाहेब बापूराव पाटील	लिंगायत
१६	जानवळ	”	लक्ष्मणराव अण्णाराव पाटील चावडीकर (मूळ आडनाव पवार)	मराठा
१७	महाळंगा	”	पद्माकर पाटील	मराठा
१८	आटोळा*	”	शामराव पाटील	ब्राह्मण
१९	नळेगाव*	”	माणिकराव पाटील	लिंगायत
२०	शिरूर-अनंतपाळ	शिरूर अनंतपाळ	संभाजी पाटील	लिंगायत
२१	उजेड	”	ख्वाजा चांद पटेल	मुस्लिम
२२	येरोळ	”	माणिकराव पाटील	लिंगायत
२३	साकोळ	”	बापूराव हरभाजी पाटील	लिंगायत
२४	हिप्पळगाव*	”	श्रीमती मीराबाई पाटील	लिंगायत
२५	राणी* अकुलगा.	”	नागशेट्टी देशमुख	लिंगायत
२६	बडूर	निलंगा	मूळ गढी देशपांडेची होती.	ब्राह्मण
२७	उस्तुरी	”	कंठप्पा माधवराव पाटील	लिंगायत
२८	हाडोळी	”	मोहनराव पाटील (सबनीस)	ब्राह्मण

Maharashtra State Gazetteers

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२९	रामलिंग* मुद्गड	”	भिमराव पाटील	लिंगायत
३०	तळीखेड	”	गोपाळराव गोविंदराव पाटील	मराठा
३१	निलंगा	”	अब्दुल कादर देशमुख	मुस्लिम
३२	पानचिंचोळी	”	विक्रम गोविंदराव पाटील	ब्राह्मण
३३	शेळगी*	”	श्रीमती त्रिवेणीबाई पाटील	मराठा
३४	आंबेगाव	”	धर्मराज देशमुख	ब्राह्मण
३५	मसलगा	”	बाळासाहेब पाटील	मराठा
३६	निटूर*	”	नारायण दाजीबा पाटील	मराठा
३७	हाळी	उदगीर	काशीराव रावसाहेब माने पाटील	मराठा
३८	शंभु उमरगा	”	माणिकराव मजलीसराव पाटील	कायस्थ प्रभु
३९	लोहारा	”	दिलीप शेषराव पाटील	मराठा
४०	करखेली	”	विठ्ठलराव रामराव कुळकर्णी	ब्राह्मण
४१	किनी यल्लादेवी.	”	ख्वाजामियाँ देशमुख	मुस्लिम
४२	तोंडचिर	”	किसनराव नारायणराव पाटील	मराठा
४३	दावणगाव	”	गोरखनाथ भंडे (मूळ गढी अनंत राजे यांची)	
४४	गुडसूर	”	श्रीमती प्रेमलाबाई दत्तात्रेयराव कुळकर्णी.	ब्राह्मण
४५	वाढवणा	”	इकबाल अहमद देशमुख-ग्रामपंचायत वाढवणा.	मुस्लिम
४६	देवर्जन*	”	गंगाधरराव साकोळकर	लिंगायत
४७	देवणी	देवणी	ग्रामपंचायत देवणी	—
४८	लासोना	”	व्यंकटराव बिशंभरराव पाटील	मराठ
४९	लासोना	”	भाऊसाहेब पीराजी पाटील	मराठा
५०	जवळगा	”	पुरूषोत्तम निळकंठराव पाटील	गुरव
५१	नागराळ	”	मलशेट्टी वीरशेट्टी पाटील	लिंगायत
५२	तळगाव*	”	किसन पाटील	—
५३	जळकोट	जळकोट	गुरूनाथ रामराव देशमुख	लिंगायत
५४	वांजरवाडा	”	भाऊसाहेब गोविंदराव देशमुख	मराठा
५५	धोणसी	”	जब्बारमियाँ पापामियाँ देशमुख	मुस्लिम
५६	धामनगाव	”	लक्ष्मणराव पाटील	ब्राह्मण
५७	क्षेरसांगवी*	”	काशीराज पाटील	मराठा
५८	पाटोदा*	”	जनार्दनराव विठ्ठलराव पाटील	वंजारी
५९	लाली (खु.)	”	हनमंतराव पाटील	—
६०	लाली (बु.)	”	दुर्गाजी नाईक	—
६१	ताडतावशी	औसा	बाबासाहेब देशपांडे/रावसाहेब देशपांड.	ब्राह्मण

(१)	(२)	(३)	(४)	(५
६२	कोरंगळा	”	व्यंकटेश देशपांडे/दिनकरराव देशपांडे/देविदासराव देशपांड.	ब्राह्मण
६३	भेटा	”	विलास नेमिवंत	ब्राह्मण
६४	बेळकुंड	”	गोविंदराव विश्वासराव देशमुख	ब्राह्मण
६५	औसा	”	लिम्मणअप्पा विरूपाक्षअप्पा हालकुडे.	लिंगायत
६६	खरोसा	”	दासगाव नृसिंह पाटील	ब्राह्मण
६७	कोळगाव	रेणापूर	शिवाजी गोपाळराव हाके	हटकर
६८	पानगाव	”	बाळकृष्ण आबासाहेब चव्हाण (चौहान).	राजपूत/मराठा
६९	बिटरगाव	”	वसंतराव साहेबराव चव्हाण-देशमुख (चौहान)	राजपूत/मराठा
७०	कोष्टगाव	”	अन्वरमियाँ रहिम देशमुख	मुस्लिम
७१	भोकरंबा	”	दिलीप व्यंकटराव हाके-पाटील	हटकर
७२	रेणापूर	”	मधुकर पाटील	ब्राह्मण
७३	रेणापूर	”	गंगाधर गुंडेराव राजे	हटकर
७४	खरोळा	”	निळकंठराव देशमुख	मराठा
७५	कारेपूर	”	जनार्दनराव राजेसाहेब/लालासाहेब/बाळासाहेब माने	मराठा
७६	खलंग्री*	”	अमितमियाँ गुलाम महमद देशमुख/गंगाधर माने	मुस्लिम/मराठा
७७	डिघोळ*	”	दादासाहेब देशपांडे	ब्राह्मण
७८	डिघोळ*	”	नरसिंगराव देशमुख	मराठा
७९	दर्जी बोरगाव*	”	हरिश्चंद्र बाजीराव माने	मराठा
८०	शिरूर-ताजबंद	अहमदपूर	भगवानराव पाटील	ब्राह्मण
८१	कोपरा	”	सुधाकरराव पाटील	ब्राह्मण
८२	गुंजोटी	”	गोविंदराव देशमुख/बाळासाहेब देशमुख.	मराठा
८३	हडोळती	”	गणेशराव कुळकर्णी	ब्राह्मण
८४	सताळा	”	शंकरराव पाटील महाळंकर	मराठा
८५	किनगाव*	”	रहमतमियाँ चाँदमियाँ देशमुख	मुस्लिम

* गढीचे अवशेष शिल्लक किंवा गढी नष्ट झालेली आहे.

** जुन्या गढीच्या जागेवर नवीन बांधकाम किंवा मूळ गढीमध्ये काळानुसार बदल केले गेले आहेत.

\+ वरील नावे घराण्यातील फक्त एका व्यक्तिची आहेत.

Maharashtra State Gazetteers

लातूर जिल्हा ग्रामनिर्देशिका *

लातूर जिल्हा ग्राम निर्देशिका देतांना तालुक्यातील गावांची नावे वर्णानुक्रमे दिली असून तालुक्याचा क्रम आद्याक्षरानुसार लावलेला आहे.

स्तंभ (१) : गावाचे नाव.

स्तंभ (२) : तालुका मुख्यालयापासून गावाची दिशा आणि अंतर कि.मी. मध्ये.

स्तंभ (३) : गावाचे एकूण क्षेत्र (हेक्टर), एकूण कुटुंबाची संख्या आणि गावाची एकूण लोकसंख्या

स्तंभ (४) : डाकघर असलेले गाव व अंतर (कि.मी.).

स्तंभ (५) : जवळच्या रेल्वे स्थानकाचे नाव व अंतर (कि.मी.).

स्तंभ (६) : आठवडी बाजाराचे स्थान, बाजार दिवस आणि अंतर (कि.मी.).

स्तंभ (७) : बसस्थानक असलेल्या जवळच्या गावाचे नाव आणि अंतर (कि.मी.)

स्तंभ (८)**: पिण्याच्या पाण्याच्या सोची : वि = विहिरी, विंवि = विंधण विहिरी, कूवि = कूपविहिरी, कून = कूपनलिका, त = तलाव, नयो = नळयोजना, झ = झरे, इसा = इतर साधने, हापं = हातपंप, विपं = विजपंप.

स्तंभ (९) : प्राआकें = प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राआउकें = प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, आद = आयुर्वेदिक दवाखाना, अॅद = अॅलोपॅथिक दवाखाना, कुरु = कुटिर रुग्णालय, नद = नगरपालिका दवाखाना, माबासंकें = माता बाल संगोपन केंद्र.

स्तंभ (१०) : किरकोळ माहिती - शाळांची माहिती - प्राशा = प्राथमिक शाळा, माशा = माध्यमिक शाळा, म = महाविद्यालये, औसं = औद्योगिक संस्था, आशा = आश्रमशाळा, ग्रापं (ग) = गटग्रामपंचायत, ग्रापं = ग्रामपंचायत,

सहकारी संस्था : पससं = पतपुरवठा सहकारी संस्था, शेससं = शेतकरी सहकारी संस्था, औससं = औद्योगिक सहकारी संस्था, मससं = मजूर सहकारी संस्था, विससं = विणकर सहकारी संस्था, मच्छिससं = मच्छिमार सहकारी संस्था, पापुससं = पाणीपुरवठा सहकारी संस्था, बससं = बहुउद्देशीय सहकारी संस्था.

इतर : या = यात्रा, उ = उरूस, मं = मंदिरे, जैमं = जैन मंदिरे, म = मठ, मद = मस्जिद, दगा = दरगा, इद = इदगा, च = चर्च, बुवि = बुद्धविहार, धशा = धर्मशाळा, व्याशा = व्यायामशाळा, ग्रंल = ग्रंथालये, क्रिमं = क्रिडामंडळे, विगृ = विश्रामगृह, वीज, दूध्व = दूरध्वनी, पवैद = पशु वैद्यकीय दवाखाना, गुद = गुरांचा दवाखाना, पसुआकें = पशुसुधार आधारभूत केंद्र, पप्रकें = पशुप्रथमोपचार केंद्र, कृरेकें = कृत्रिम रेतन केंद्र, कृरेउकें = कृत्रिम रेतन, उपकेंद्र, त = तलाव, कोपबं = कोल्हापूर पद्धतीचे बंधारे . विकाससेसो = विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी.

---

* प्रत्येक पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी, यांनी पाठविलेल्या गावांच्या महितीवर आधारित असून ती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांचे कार्यालयाकडून पडताळून घेण्यात आली आहे.

** स्तंभ क्र. ८ ते १० मध्ये संक्षेप रुपे आहेत.

तालुका - अहमदपूर

गावाचे नाव	तालुका मुख्यालया पासून दिशा व अंतर (कि. मी.)	गावाचे क्षेत्र (हेक्टर) कुटुंबांची संख्या, एकूण लोकसंख्या	डाकघर, तारघर अंतर (कि. मी.)	रेल्वे स्थानक, अंतर (कि. मी.)	आठवडी बाजार, बाजार दिवस, अंतर (कि. मी.)	बस स्थानक (अंतर) कि. मी.	पिण्याच्या पाण्याच्या सोयी	आरोग्य केंद्र	इतर माहिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
अजनी (खु.)	दक्षिण, १४ कि.मी.	५६४.५७, २२,७१, ९९८.	शिरुर (ताज.), १४ कि.मी.	उदगीर, ३५ कि.मी.	शिरुर (ताज.), गुरुवार, २ कि.मी.	स्थानिक	वि., कुवि., नयो.	शिरुर (ताज)	१ प्राशा, विकाससेसो, पपुससं, १ पात, २ मं, १ धशा,वीज.
अहमदपूर	तालुका मुख्यालय	१८.१५ ची.कि.मी., ६,०७५, ३५,८०५.	स्थानिक	लातूर रोड, ३३ कि.मी.	स्थानिक, सोमवार	स्थानिक	वि., कुवि., नयो.	प्राआकें.	प्राशा, माशा, मवि, औससं, नपा, विकाससेसो, पपुससं, शेरससं, औससं, मससं, मच्छीससं, बउससं, दूध, दूद, १२मं, ४म, ८मद, ३ दगा, १ इद, १ धशा, २ ग्रंल, १ छिमं, शाविगृ, वीज, पवैद.
आनंदवाडी स्थानिक/आंधोरी	आग्नेय, ४ कि.मी.	२९६.००, १२२, ६५१.	झाळोब्ळी, ४ कि.मी.	लातूर रोड, ४० कि.मी.	झाळोब्ळी, मंगळवार, ४ कि.मी.	झाळोब्ळी, ४ कि.मी.	वि., कुवि., नयो.		१ प्राशा, शापं, १ कोपवं, १ मं, वीज.
आंधोरी	वायव्य, १६ कि.मी.	१,४१९.२४, ७८९, ३,९७९.	किनगाव,	गंगाखेड, ३५ कि.मी.	गुरुवार	स्थानिक	वि., कुवि., नयो, विपं.	प्राआकें.	२ प्राशा, २ माशा, १ मवि, शापं, विकाससेसो, मससं, दूद, ३ पात, १ त, ६ मं, १ मद, १ दगा, १ इद, २ छिमं, २ ग्रंल, पवैद, वीज.
आवेगाव	आग्नेय, १५ कि.मी.	५१६.६५, १६६, ८८०.	शिरुर (ता.), ३ कि.मी.	लातूर रोड	शिरुर (ता.), गुरुवार, ३ कि.मी.	स्थानिक			१ प्राशा, शापं, विकास सेसो, १ पात, १ मं, १ मद, १ ग्रंल, वीज.
उगीलेवाडी	पश्चिम, ८ कि.मी.	१२१.७३, ८२, ४१९.	हिप्परगा (का.), २ कि.मी.	लातूर रोड, ४० कि.मी.	किनगाव, बुधवार, १२ कि.मी.	स्थानिक	वि., कुवि., नयो.	प्राआकें.	१ प्राशा, १ माशा, शापं (गृ), विकाससेसो, पपुससं, १ पात, १ कोथ्रं, २ मं, १ मद, १ धशा, १ ग्रंल, पवैद, वीज.
उजना	उत्तर, १८ कि.मी.	१,३९८.९२, ५४८, २,६७९.	गंगाहिप्परगा, ३ कि.मी.	गंगाखेड, ४० कि.मी.	राणी सावरगाव, मंगळवार, ७ कि.मी.	स्थानिक	वि., कुवि., नयो.	प्राआकें	२प्राशा, १माशा, शापं, विकाससेसो, दूध्य, दूद, ४त, २मं, १मद, १ इद,२ बुवि, १ समं, १ ग्रंल, १ छिमं, वीज.

Maharashtra State Gazeteers

उमरगा (कोटे)	दक्षिण, १५ कि.मी.	१,१५४.९६, ३३५, १,७५३.	स्थानिक	लातूर रोड, १८ कि.मी.	यापोली, बुधवार, ५ कि.मी.,(ज.वा.) हंडरगुळी,रविवार, १२ कि.मी.	स्थानिक	वि., त.		१ प्राशा, १ माशा, ग्रापं, विकास सेसो, पपुससं, दूध्व, ४ पात, ५ कोपवं, २ त, १ मं, १ म, १ मद, १ ग्रंल, यात्रा, वीज.
उमरगा, यल्लादेवी	दक्षिण, १७ कि.मी.	८१८.९०, ३०९, १,७३५.	यापोली, ३ कि.मी.	लातूर रोड, १५ कि.मी.	यापोली, बुधवार, (ज.वा.), हाळी -हंडरगुळी, रविवार, १० कि.मी.	स्थानिक	वि., कुवि., नयो.		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, मससं, पपुससं, १ पात, २ मं, वीज.
उळी	पूर्व, १२ कि.मी.	१४५.२८, १०२, ५९४.	हिप्पळगाव ४ कि. मी.	लातूर रोड, २८ कि.मी.	आहमदपूर, सोमवार, १२ कि.मी.	स्थानिक	नयो.		१ प्राशा, ग्रापं (म.), विकाससेसो, शेससं, २ मं, वीज.
काजळ. हिप्परगा	पश्चिम, ८ कि.मी.	९६३-२७, ३५१, १,८९३.	स्थानिक	लातूर रोड, ४२ कि.मी.	आहमदपूर, सोमवार, १२ कि.मी., (ज.वा.), किनगाव, बुधवार, १० कि.मी.	स्थानिक	कुवि., हापं.		१ माशा, ग्रापं (ग), विकाससेसो, पपुससं, २ कोपवं, १ मद, १ ग्रंल, वीज.
काळेगाव	उत्तर, ४ कि.मी.	६०३.७२, २२०, १,४९५.	अहमदपूर, ४ कि.मी.	गंगाखेड, ४० कि.मी.	आहमदपूर, सोमवार, ४ कि.मी.	स्थानिक	नयो, हापं.		२ प्रशा, ग्रापं (ग), शेससं, मससं, १ पात, २ मं, १ मद, वीज.
काळेगाववाडी	उत्तर, ७ कि.मी.	उ. ना.	अहमदपूर, ७ कि.मी.	गंगाखेड, ४० कि.मी.	आहमदपूर, सोमवार, ७ कि.मी.	स्थानिक	कुवि.		१ प्राशा, १ मं, वीज.
किनगाव	पश्चिम, २० कि.मी.	२,४६२.६०, १,६६५, १६,७८१.	स्थानिक	कारेपूर, १७ कि.मी.	स्थानिक, बुधवार	स्थानिक	वि, कूवि, त, नयो, हापं.	प्राआके.	४ प्राशा, ५ माशा, २ मवि, १ औससं, ३ इसं, १ आशा, ग्रापं, विकाससेसो, मससं, मच्छीससं, दूध्व, दूद, १ पात, ४ मं, २ म, ३ मद, ४ दगा, १ इद, १ वुवि, १ व्याशा, ३ ग्रंल, २ छिमं, यात्रा, ऊरुस, शाविगृ, वीज.
किनी	आग्नेय, १२ कि.मी.	५२७.३८, ९९४, ९७१.	सावरगाव (थोट), ३ कि.मी.	लातूर रोड, ५० कि.मी.	हाळोळ्ती, मंगळवार, ६ कि.मी.	स्थानिक	वि, कुवि.		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, २ मं, वीज.

Maharashtra State Gazeteers

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
किनी किदू	ईशान्य, ९ कि.मी.	४२७.३८, ९२४, ९७१.	सावरगाव (थोट), २ कि.मी.	लातूर रोड, ३५ कि.मी.	हाळेळ्ती, मंगळवार, ५ कि.मी.	स्थानिक	वि, नयो, हापं.		१प्राशा, ग्रापं, विकाससेसेसो, बउससं, ३मं, १धशा, वीज.
कुमठा (दु.)	आग्नेय २० कि.मी.	१,५१२.६३, ६४१, ३,१९२.	स्थानिक	उदगीर, ३५ कि.मी.	इंदरगुळी, रविवार, १४ कि.मी.	स्थानिक	वि., कुवि., नयो.		२ प्राशा, १ माशा, ग्रापं, विकाससेसेसो, पपुससं, मससं, १ पात, ७ कोपबं, १ मं, १ मद, १ दगा, १ इद, २ ग्रंल, पवैद, वीज.
केंद्रेवाडी	नेऋत्य, १६ कि.मी.	३३७.००, १४८, ७४१.	चिखली, ३ कि.मी.	कोरपूर, २४ कि.मी.	किनगाव, बुधवार, ६ कि.मी.	कोपरा, ६ कि.मी.	कुवि.		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसेसो, पपुससं, २ मं, वीज.
कोकणगा.	पूर्व, ५ कि.मी.	३६१.०४, १४७, ८६६.	अहमदपूर, ५ कि.मी.	लातूर रोड, ३० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ५ कि.मी.	अहमदपूर, ५ कि.मी.	कुवि.		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ मं, २ धशा, दूध्य, यात्रा, वीज.
कोपरा	पश्चिम, १६ कि.मी.	७५९.८७, ३३६, १,८३५.	किनगाव, ४ कि.मी.	स्थानिक	किनगाव, बुधवार, ४ कि.मी.	स्थानिक	कुवि, त, नयो.		१ प्राशा, १ माशा, ग्रापं, विकाससेसो, पपुससं, १ पात, १ कोपबं, २ मं, १ मद, १ बुवि, वीज.
कोळेवाडी	वायव्य, २२ कि.मी.	४०५.००, १६३, ८९४.	किनगाव, २ कि.मी.	कारेपूर, १९ कि.मी.	किनगाव, बुधवार, २ कि.मी.	किनगाव, २ कि.मी.	वि, त, नयो, हापं.		१ प्राशा, ग्रापं, दूध्य, १ पात, ३ मं, १ ग्रंल, वीज.
कौडगाव	नेऋत्य, २५ कि.मी.	२००.४३, १८६, ५९१.	कुमठा (दु.), ३ कि.मी.	उदगीर, ३५ कि.मी.	हाळी, रविवार, १२ कि.मी.	कुमठा (दु.), ३ कि.मी.	वि. नयो.		१ प्राशा, ग्रापं, १ मं, वीज.
खरवाडी	आग्नेय, २२ कि.मी.	४५८.५५, २३०, १,२७२.	वायगाव, ५ कि.मी.	उदगीर, २५ कि.मी.	हाळी, रविवार, ५ कि.मी.	वायगाव, ५ कि.मी.	वि. नयो.		२ मं, वीज.
खंडाळी	उत्तर, २५ कि.मी.	२,६२५.००, ६५८, ३,७७१.	स्थानिक	गंगाखेड, ३० कि.मी.	राणी सावरगाव, मंगळवार, ८ कि.मी.	अहमदपूर, २५ कि.मी.	वि, कुवि, त, नयो, हापं.		२ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, पापुससं, २ पात, २ मं, १ मद, १ ब्रिमं, वीज.

Maharashtra State Gazeteers

खानापूर	पश्चिम, २४ कि.मी.	२५३.००, १८१, ६८४.	किन्नगाव, ४ कि.मी.	कारेपूर, १३ कि.मी.	किन्नगाव, बुधवार, ४ कि.मी.	स्थानिक	कुवि., नयो, हापं.	१ प्राशा, ग्रापं, १ मं, वीज.
गंगाहिप्परगा	उत्तर, २१ कि.मी.	१,५०४.६७, ३७६, १,८८५.	स्थानिक	गंगाखेड, ४३ कि.मी.	राणी सावरगाव, मंगळवार, १० कि.मी.	उजना, ३ कि.मी.	वि, कुवि, त, नयो.	प्राआकें ३ प्राशा, १ माशा, ग्रापं (ग), विकाससेसेसे, मध्यमेसमं, दूध्य, २ पात, १ मं, २ समं, १ ग्रंल, १ ळिमं, वीज.
गादेवाडी	आग्नेय, २० कि.मी.	२९६.२७, ५४८, ८८७.	वायगाव पाटी, ३ कि.मी.	उदगीर, २५ कि. मी.	हाळी, रविवार, ५ कि.मी.	वायगाव पाटी	हापं.	१ प्राशा, विकाससेसेसे, २ मं, वीज.
गुगदळ	उत्तर, ११ कि.मी.	४९४.५५, १२५, ७१७.	सांगवी (सु.), ११ कि.मी.	लातूर रोड, ३४ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १५ कि.मी.	हगदळ, २ कि.मी.	नयो.	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसेसे, १ मं, वीज.
गुडेवाडी	वायव्य, २० कि.मी.	८३३.३५, १७०, ८५५.	किन्नगाव, १४ कि.मी.	गंगाखेड, २७ कि.मी.	किन्नगाव, बुधवार, १४ कि.मी.	अंधोरी, ४ कि.मी.	वि, त, नयो, हापं.	१ प्राशा, ग्रापं, २ पात, १ मं, वीज.
गुंजोटी	पश्चिम, २८ कि.मी.	७७२.७३, २५७, १,७८६.	सताळा, ४ कि. मी.	कारेपूर, १० कि.मी.	किन्नगाव, बुधवार, ८ कि.मी.	स्थानिक	कूवि, नयो, हापं.	१ प्राशा, ग्रापं, दूध्य, १ मं, वीज.
गोथाळा	नैऋत्य, १० कि.मी.	७५९.४५, १८८, ९८७.	सावरगाव (ए.), ५ कि.मी.	लातूर रोड उ. ना.	अहमदपूर, सोमवार, १० कि.मी.	स्थानिक	वि, कूवि.	१ प्राशा, १ त, १ मं, वीज.
चिखली	वायव्य, २५ कि.मी.	१,२६३.०४, ५१३, २,४३२.	स्थानिक	कारेपूर, ३० कि.मी.	किन्नगाव, बुधवार, ४ कि.मी.	स्थानिक	कुवि, नयो.	प्राआकें. १ प्राशा, १ माशा, ग्रापं, विकाससेसेसे, ४ मं, १ ग्रंल, वीज.
चिलखा	वायव्य, ७ कि.मी.	५७०.८२, १३३, ६४२.	अहमदपूर, ७ कि.मी.	लातूर रोड, ६० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ७ कि.मी. (ज.वा.), हाळीहडरगुळी, रविवार, २७ कि.मी.	सोरापाटी, ३ कि.मी.	कुवि., हापं,	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसेसे, वीज.
चोवळी	आग्नेय, १५ कि.मी.	६०५.००, २४०, १,३७७.	शिरुर (ता.), ५ कि.मी.	उदगीर, २८ कि.मी.	हाळी, रविवार, ७ कि.मी.	स्थानिक	वि, नयो.	१ प्राशा, ग्रापं (ग.), विकाससेसेसे, १ पात, १ वेरेग्वं, २ त, २ मं, १ मद, २ कुवि, १ व्यागा, १ ग्रंल, १ ळिमं, वीज.

Maharashtra State Gazeteers

तालुका - अहमदपूर—क्रमश :

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
जवळगा	पूर्व, ५ कि.मी.	९९९.६२, ७७, ३५६.	कोकणगा, १ कि.मी.	लातूर रोड, ३० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ५ कि.मी.	कोकणगा, १ कि.मी.	कुवि.		१ प्राशा, ग्रापं (ग.), विकाससेसो, १ पात, १ मं, वीज.
जांब	पूर्व, १२ कि.मी.	२३४.५७, ८४, ४७९.	तिर्वा, ५ कि.मी.	लातूर रोड, २८ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १२ कि.मी.	उत्री, २ कि.मी.	नवो, हापं.		१ प्राशा, ग्रापं (ग.), विकाससेसो, शेससं, २ मं, वीज.
टाकळगाव	उत्तर, ८ कि.मी.	२०९.१८, ९०, ४२६.	अहमदपूर, ८ कि.मी.	गंगाखेड, २० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ९ कि.मी.	शेनकूड, १ कि.मी.	वि.		१ प्राशा, १ मं, वीज.
टाकळगाव (क)	पश्चिम, १४ कि.मी.	८०६.००, ४१५, २,४२०.	परचंडा (पो.), २ कि.मी.	लातूर रोड, ४२ कि.मी.	किनगाव, बुधवार, १० कि.मी.	स्थानिक	वि, कुवि., त, नवो, हापं.		२ प्राशा, १ माशा, ग्रापं, पापुससं, १ पात, १ कोपर्व, १त, १ मं, १ मद, १ ग्रंल, वीज.
टेमुर्णी	ईशान्य, ४ कि.मी.	३७१.८५, १८५, ८९७.	अहमदपूर, ४ कि.मी.	लातूर रोड, ३२ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १३ कि.मी.	स्थानिक	वि.		१ प्राशा, शेससं, १ पात, १ मं, १ दगा, वीज.
ढाळेगाव	उत्तर, १२ कि.मी.	२०९.१२, ५३२, २,८१०.	स्थानिक	गंगाखेड, १५ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १२ कि.मी.	स्थानिक	वि, कूवि.	प्राआकें.	१ प्राशा, १ माशा, १ मवि, १ आशा, ग्रापं, विकाससेसो, २ पात, ७ कोपर्व, ६ मं, १ मद, ३ घशा, १ व्याशा, वीज.
तळेगाव	दक्षिण, ६ कि.मी.	७६.२.००, २५७, १,१०१.	अहमदपूर, ६ कि.मी.	लातूर रोड, २० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ६ कि.मी.	अहमदपूर, ६ कि.मी.	कूवि, नवो, हापं.	प्राआकें.	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, पापुससं, दूध्य, ३ पात, २ मं, पवैद, वीज.
तांबट सांगवी	वायव्य, ७ कि.मी.	९९३.६६, १८५, ६७४.	अहमदपूर, ७ कि.मी.	गंगाखेड, ४० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ७ कि.मी.	स्थानिक	वि.		१ प्राशा, १ माशा, विकाससेसो, १ मं, वीज.

Maharashtra State Gazetteers

तिर्थ	ईशान्य, १५ कि.मी.	४५६.२३, २३५, ६,९९८.	स्थानिक	लातूर रोड, १५ कि.मी.	अहमदपूर, १५ कि.मी.	स्था	हापं.	१ प्राशा, १ नाशा, ग्रापं, विकाससेसो, पपुससं, बउससं, १ त, ३ मं, २ धशा, वीज.
तेलगाव	दक्षिण, १८ कि.मी.	६७९.००, ३०१, ६,६५६.	स्थानिक	लातूर रोड, २० कि.मी.	चापोली, मंगळवार, ४ कि.मी.	तेलगाव पाटी, २ कि.मी.	वि, कूवि, त, नयो.	१ प्राशा, १ नाशा, ग्रापं, विकाससेसो, पपुससं, बउससं, ३ मं, २ धशा, वीज.
थोडगा	ईशान्य, ५ कि.मी.	१,१८१.१३, ४१५, २,९९२.	अहमदपूर, ५ कि.मी.	उदगीर, ४० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ५ कि.मी.	स्थानिक	वि, कूवि, त.	१ प्राशा, ग्रापं (ग), ३ मं, १ धशा, वीज.
थोरलीवाडी	पूर्व, ८ कि.मी.	३२६.००, १७५, ७८१.	शिरुर-ताजबंद, २ कि.मी.	लातूर रोड, ३२ कि.मी.	शिरुर ताजबंद, गुरुवार (ज.वा.), शुक्रवार,२ कि.मी.	स्थानिक	कूवि, नयो.	१ प्राशा, १ मं, वीज.
दगडवाडी	वायव्य, २५ कि.मी.	२३४.४०, १७५, ७८७.	किनगाव, २कि.मी.	कोरेपूर, २० कि.मी.	किनगाव, बुधवार, ५ कि.मी.	स्थानिक	वि, नयो.	१ प्राशा, ग्रापं, पपुससं, १ पात, १ त, १ मं, विज.
देवकरा	वायव्य, २५ कि.मी.	५५९.७७, २५८, १,७५३.	किनगाव, ५ कि.मी.	कारेपूर, २५ कि.मी.	किनगाव, बुधवार, ५ कि.मी.	स्थानिक	वि, त, हापं, नयो.	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, पपुससं, १ पात, १ त, २ मं, यात्रा, वीज.
धसवाडी	वायव्य, १६ कि.मी.	१,१७८.००, ४१६, २,३२९.	खंडाळी, ४ कि.मी.	कारेपूर, २० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १६ कि.मी.	स्थानिक	नयो.	ग्रापं, विकाससेसो, मससं, ४ कोपवं, १ त, २ मं, वीज.
धानोरा (खु.)	ईशान्य, ९ कि. मी.	५१२.९६, तिर्थ, २ कि.मी.	तिर्थ, २ कि.मी.	लातूर रोड, ३२ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ९ कि.मी.	स्थानिक	नयो, हापं.	१ प्राशा, १ नाशा, ग्रापं (ग), विकाससेसो, पपुससं, सेससं, मससं, पापुससं, १ पात, २ वेशवं, २ मं, १ मद, वीज.
धानोरा (बु.)	पश्चिम, २४ कि.मी.	१,३३९.००, ४७२, २,६४९.	किनगाव, १० कि.मी.	जानवळ, २५ कि.मी.	किनगाव, बुधवार, १० कि. मी.	स्थानिक	वि., कूवि, त, नयो.	१ प्राशा, १ नाशा, ग्रापं (ग), विकाससेसो, पपुससं, सेससं, मससं, पापुससं, १ पात, २ वेशवं, २ मं, १ मद, वीज.

Maharashtra State Gazeteers

तालुका - अहमदपूर—क्रमश :

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
नरवटवाडी	वायव्य, १९ कि.मी.	५४८.४६, १०१, ५५१.	किनगाव, १६ कि.मी.	गंगाखेड, २३ कि.मी.	किनगाव, बुधवार, १६ कि.मी.	अंधोरी, ४ कि.मी.	वि, कूवि, नवो, विपं.		१ प्राशा, ग्रापं, १ पात, १ मं, वीज.
नागझरी	उत्तर, २३ कि. मी.	४०१.०६, १६०, ७४८.	खंडाळी, १ कि.मी.	गंगाखेड, ४३ कि.मी.	राणी सावरगाव, मंगळवार, १० कि.मी.	नागझरी पाटी, २ कि.मी.	वि, कूवि,		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ पात, १ मं, १ ग्रंल, १ क्रिमं, यात्रा, वीज.
नागठाणा	पश्चिम, १९ कि.मी.	५५४.१७, १५५, ८३७.	तिर्था, ३ कि. मी.	लातूर रोड, १२ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १९ कि.मी.	टाकळगाव, ३ कि.मी.	हापं.		ग्रापं (ग), त, १ मं, विज.
नांदुरा (खु.)	पश्चिम, १० कि.मी.	३०४.२९, १३७, ७३०.	अहमदपूर, १० कि.मी.	लातूर रोड, २० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १० कि.मी.	स्थानिक	कूवि		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, २ कोपवं, २ त, १ मं, वीज.
नांदुरा (बु.)	नैऋत्य, १० कि.मी.	८५०.९३, २४८, १,४६४.	अहमदपूर, १० कि.मी.	लातूर रोड, २० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १० कि.मी.	स्थानिक	कूवि, त.		१ प्राशा, १ नाशा, १ ग्रापं, विकाससेसो, २ पात, १ त, २ मं, १ दशा, यात्रा, वीज.
परघंडा	पश्चिम, १२ कि.मी.	७३०.००, ३२८, १,६१०.	स्थानिक	लातूर रोड, ५२ कि.मी.	किनगाव, बुधवार, १२ कि.मी.	हिपरगा, कजळ, ५ कि.मी.	कूवि, हापं.		१ प्राशा, ग्रापं (ग), १ कोपवं, २ मं, १ मद, १ धशा, वीज.
पाटोदा	वायव्य, १२ कि.मी.	६५८.००, १४१, ६९०.	किनगाव, १० कि.मी.	लातूर रोड, ४६ कि.मी.	किनगाव, बुधवार,१० कि.मी.	स्थानिक	वि., कूवि.		१ प्राशा, ग्रापं (ग), विकाससेसो, १ पात, १ कोपवं, १ मं, १ मद, १ धशा, वीज.
पार	वायव्य, ९ कि.मी.	२६७.४०, ७७, ४००.	ढाळेगाव, ३ कि.मी.	गंगाखेड, ४२ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ९ कि.मी.	स्थानिक	कूवि.		१ प्राशा, ग्रापं, इससे, १ पात, १ मं, वीज.

Maharashtra State Gazetteers

फरोपूर	नैऋत्य, १५ कि.मी.	१,७२.३२, ५६, २९८.	उमरगा कोर्ट, १.५ कि.मी.	लातूर रोड, २५ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १५ कि.मी.	स्थानिक	वि.	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ मं, वीज.
ब्रम्हपुरी	पश्चिम, ८ कि.मी.	४७६.७५, १३५, ७२९.	सावरगाव रोकडा	लातूर रोड, २१ कि.मी.	किनगाव, बुधवार, २० कि.मी.	काजळ हिप्परगा, ३ कि.मी.	वि.	१ प्राशा, विकाससेसो, १ मं, वीज.
ब्रम्हवाडी	दक्षिण, १० कि.मी.	२३६.००, १७७, ५७५.	सावरगाव (घोट), १२ कि.मी.	लातूर रोड, ३५ कि.मी.	अहमदपूर, १० कि.मी.	मोघा, २ कि.मी.	नवो.	१ प्राशा, ग्रापं (ग), २ मं, वीज.
बाबळदरा	आग्नेय, २२ कि.मी.	४९०.९७, १८४, ९४२.	जगळपूर, ५ कि.मी.	लातूर रोड, ३० कि. मी.	हाळेळवी, मंगळवार, ५ कि.मी.	स्थानिक	वि, कूवि, त.	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ पात, २ मं, १ ग्रंल, वीज.
बेलूर	दक्षिण, ८ कि.मी.	७२९.००, २७०, १,३७२.	अहमदपूर, ८ कि.मी.	लातूर रोड, ३२ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ८ कि.मी.	अहमदपूर, ८ कि.मी.	नवो, हापं.	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, पापुससं, १ पात, १ त, २ मं, वीज.
बोठखा	आग्नेय, २० कि.मी.	४२७.५४, ५७१, ९६९.	वायगाव, ७ कि.मी.	गंगाखेड, ५५ कि.मी.	हाळी, रविवार, ५ कि.मी.	स्थानिक	वि, त, नवो.	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ पात, १ मं, १ मद, १ ग्रंल, वीज.
बोरगाव (खु.)	वायव्य, १२ कि.मी.	२२१.००, ८१, ३६८.	ढाळेगाव, ५ कि.मी.	लातूर, ७७ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १२ कि.मी.	स्थानिक	वि, नवो. कूवि.	१ प्राशा, ग्रापं (ग), पापुससं, १ पात, १ कोपवं, १ मं, वीज.
भुतेकरवाडी	नैऋत्य, १६ कि.मी.	३७८.९०, १२३, ६१२.	सावरगाव, २ कि.मी.	लातूर रोड, ३८ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १६ कि.मी.	स्थानिक	वि, कूवि, त.	२ प्राशा, ग्रापं, १पात, १ कोपवं, १ मं, १ ग्रंल, वीज.
महादेववाडी	आग्नेय, ८ कि.मी.	२७२.००, १७२, ६५०.	शिरुर ताजबंद, २ कि.मी.	लातूर रोड, ३२ कि.मी.	शिरुर ताजबंद, शुक्रवार, (ज.बा.), गुरुवार, २ कि.मी.	शिरुर ताजबंद, २ कि.मी.	नवो.	१ प्राशा, १ पात, २ मं, वीज.

Maharashtra State Gazetteers

तालुका - अहमदपूर—क्रमश :

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
माकणी	दक्षिण, १५ कि.मी.	७८५.१८, २९८, ५,७०८.	चाकोली, ७ कि.मी.	उदगीर, २७ कि.मी.	हाळी, रविवार,	स्थानिक	नवो.		१ प्राशा, विकाससेसो, १ पात, १ त, ३ मं, १ बुवि, वीज.
मानखेड	पश्चिम, २० कि.मी.	४३३.८४, १७६, ९८७.	किनगाव, ६ कि.मी.	लातूर रोड, २० कि.मी.	किनगाव, बुधवार, ६ कि.मी.	किनगाव, ६ कि.मी.	कूपि, त, नवो, हापं.		१ प्राशा, ग्रापं (ग), औससं, बउससं, २ पात, १ कोपबं, २ मं, वीज.
मावळगाव	वायव्य, १० कि.मी.	५५६.०६, २२५, ५,१८४.	अहमदपूर, १० कि.मी.	लातूर रोड, ४० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १० कि.मी.	स्थानिक	नवो.		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ पात, १ मं, १ दगा, यात्रा, ऊरुस, १ ग्रंल, वीज.
माळेगाव (खु.)	ईशान्य, ३ कि.मी.	३५२.००, १८७, ९६३.	अहमदपूर, ३ कि.मी.	लातूर रोड, २७ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ३ कि.मी.	स्थानिक	वि.		१ प्राशा, ग्रापं, दूध्य, ३ पात, २ मं, वीज.
मांगदरी	ईशान्य, १५ कि.मी.	४३८.४६, ९९, ५६४.	सावरगरव (थोट), १२ कि.मी.	लातूर रोड, ४० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १५ कि.मी.	सिंदगी (बु.), ३ कि.मी.			१ प्राशा, ग्रापं (ग), १ पात, १ मं, १ इद, वीज.
मांडणी	पश्चिम १३ कि.मी.	उ. ना. २६१, १,४०९.	वळसंगी, ५ कि.मी.	लातूर, २० कि.मी.	शिरुर ताजबंद, गुरुवार, ३ कि.मी.	शिरुर ताजबंद, ३ कि.मी.	वि, नवो.		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, कोपबं, २ मं, १ मद, १ दगा, १ ग्रंल, वीज.
मुळकी	नैऋत्य, १६, कि.मी.	४३२.८८, १४६, ८०६.	उंबरगा कोर्ट, १ कि.मी.	लातूर रोड, १२ कि.मी.	चापोली, ३ कि .मी., बुधवार, (ज.ग.), हरंगुळी, रविवार, १२ कि.मी.	स्थानिक	वि, त, नवो.		१ प्राशा, १ माशा, ग्रापं (ग), विकाससेसो, पशुससं, दूध्य, दूद, २ पात, २ मं, वीज.

Maharashtra State Gazetteers

मेधी	दक्षिण, १० कि.मी.	३५०.२०, ५९६, ९८१.	उंबरगा फोर्ट, ३ कि.मी.	लातूर रोड, २० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १० कि.मी.	स्थानिक	वि.	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ मं, १ व्याशा, वीज.
मोघा	ईशान्य, ८ कि.मी.	८१६.४६, २३०, १,०९१.	सावरगाव, ६ कि.मी.	लातूर रोड, ४० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ८ कि.मी.	स्थानिक	नयो.	२ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ त, १ मं, पवैद, वीज.
मोहगाव (क.)	पश्चिम, २३ कि.मी.	२४९.००, ११८, १,०१७.	किनगाव, ३ कि.मी.	कारेपूर, १७ कि.मी.	किनगाव, बुधवार, ३ कि.मी.	किनगाव, ३ कि.मी.	कूपि, हापं.	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, दूध्य, ३ मं, १ ग्रंल, वीज
मोळवण	२५ कि.मी.	२९०.००, १३५, ७९२.	किनगाव, ५ कि.मी.	कारेपूर, २५ कि.मी.	किनगाव, बुधवार, ५ कि.मी.	किनगाव, ५ कि.मी.	वि, कूपि, हापं.	१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, पपुससं, १ पात, १ त, १ मं, वीज.
येलदरवाडी	वायव्य, २० कि.मी.	८२८.९५, १६२, ८००.	अंधोरी, ५ कि.मी.	गंगाखेड, ३५ कि.मी.	अंधोरी, बुधवार, ५ कि.मी.	स्थानिक	वि., त., नयो.	१ प्राशा, ग्रापं, १ पात, १ मं, वीज.
येस्तार	वायव्य, १० कि.मी.	४९५.३२, १८८, ९२९.	अहमदपूर, १० कि.मी.	लातूर रोड, ६० कि.मी.	अहमदपूर., सोमवार, १० कि.मी.(ज.बा) हाळी हंडरगुळी, रविवार, ३० कि.मी.	स्थानिक	हापं.	२ प्राशा, १ नाशा, ग्रापं, पपुससं, दूध्य, वीज.
राळगा	उत्तर, १६ कि.मी.	६४६.९२, ११५, ४९८.	सांगवी (सुनेगाव), ५ कि.मी.	लातूर रोड, ३२ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १६ कि.मी.	स्थानिक	नयो, हापं.	२ प्राशा, ग्रापं (ग), दुग्ध -व्यससो, २ पात, २ मं, १ धशा, वीज.
रुई	उत्तर, १५ कि.मी.	६९८.९६, २८५, १,५०६.	सांगवी (सुनेगाव), २ कि.मी.	लातूर रोड, ३५ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १५ कि.मी.	सांगवी (सुनेगाव), २ कि.मी.	वि. कूपि, हापं.	१ प्राशा, ग्रापं (ग), विकाससेसो, शेससं, १ पात, ३ मं, १ मद, वीज.

Maharashtra State Gazeteers

तालुका - अहमदपूर—क्रमश :

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
रुई तांडा	ईशान्य, १५ कि.मी.	२३७.०४, ५६, २७६.	सांगवी (सुनेगाव), ५ कि.मी.		अहमदपूर, सोमवार, १५ कि.मी.	स्थानिक	नयो.		१ माशा, १ आशा, ग्रापं (ग), १ मं, १ धशा, वीज.
रूध्दा	उत्तर, ९ कि.मी.	३६३ १९४, ९८०.	गंगा हिप्परगा, ३ कि.मी.	गंगाखेड	अहमदपूर, सोमवार, ९ कि.मी.	स्थानिक	वि., नयो.		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ पात, ३ मं, १ धशा, वीज.
लांजी	वायव्य, ५ कि.मी.	६२८.५६, २५२, १,२६८.	अहमदपूर, ५ कि.मी.	गंगाखेड, ४० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ५ कि.मी.	स्थानिक	वि., नयो.		१ प्राशा, ग्रापं (ग), विकाससेसो, मससं, २ कोपबं, १ मं, १ मद, वीज.
लिंगधाळ	दक्षिण, १० कि.मी.	२७७.५७, १३२, ७१६.	तेलगाव, ६ कि.मी.	लातूर रोड, २० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, २० कि.मी.	लिंगधाळ घाटी, १ कि.मी.	कूवि.		१ प्राशा, ग्रापं, २ मं, वीज.
लेंडेगाव	वायव्य, १६ कि.मी.	२५२.९२, १०१, ६८१.	ढाळेगाव, ४ कि.मी.	लातूर, ७७ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १६ कि.मी.	स्थानिक			१ प्राशा, ग्रापं (ग), विकाससेसो, पापुससं, १ पात, १ मं, वीज.
वरवंटी	ईशान्य, १३ कि.मी.	३३९.९७, १०१, ५६८.	सांगवी (सुनेगाव), ६ कि.मी.		अहमदपूर, सोमवार, १३ कि.मी.	स्थानिक	वि., हापं.		१ प्राशा, ग्रापं (ग), १ पात, १ मं, वीज.
वरवंटी तांडा	ईशान्य, १५ कि.मी.	२७६.२१, ८६, ४२७.	सांगवी (सुनेगाव), ५ कि.मी.		अहमदपूर, सोमवार, १५ कि.मी.	स्थानिक	वि., हापं.		१ प्राशा, ग्रापं (ग), १ मं, वीज.
वळसंगी	आग्नेय, १५ कि.मी.	९०३.२८, ४५६, २,३०६.	स्थानिक	लातूर रोड, २० कि.मी.	शिरुर ताजबंद, गुरुवार, ५ कि.मी.	स्थानिक	नयो.	प्राआकें.	१ प्राशा, १ माशा, ग्रापं, विकाससेसो, पपुससं, मससं, १ पात, १ त, २ मं, १ मद, ३ धशा, १ ग्रंल, दूध्य, वीज.

Maharashtra State Gazeteers

वंजारवाडी	उत्तर, १२ कि.मी.	४३८.००, ५१३, ४६१.	खंडाळी, ३ कि.मी.	लातूर रोड, ५० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १२ कि.मी.	अहमदपूर, १२ कि.मी.	नवो.		१ प्राशा, ग्रापं, दूध्य, २ पात, १ त, १ मं, वीज
वायगाव	आग्नेय, १८ कि.मी.	६४८.५६, ३९८, २,०८२.	स्थानिक	उदगीर, २५ कि. मी.	हाळी, रविवार, ५ कि.मी.	स्थानिक	वि, कूपि, नवो.		१ प्राशा, १ माशा, ग्रापं, विकाससेसो, पपुससं, बउससं, ३ पात, ३ मं,१ दगा, २ धशा, वीज.
विळेगाव	वायव्य, १६ कि.मी.	१,०५७.००, ३०९, १,६२५.	हिप्परगा कावजळ, ५ कि.मी.	लातूर रोड, ५२ कि.मी.	किन्नगाव, बुधवार, १३ कि.मी.	हिप्परगा कावजळ, ५ कि.मी.	कूपि, ग्रापं.		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ कोपबं, २ मं, १ समं, वीज.
वैरागड	वायव्य, १६ कि.मी.	३७६.७०, १२२, ६४७.	ढाळेगाव, ४.५ कि.मी.	लातूर, ७७ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १६ कि.मी.	स्थानिक	वि., नवो.		१ प्राशा, ग्रापं (ग), विकाससेसो, पापुससं, १ पात, १ कोपबं, १ मं, वीज.
शिरुरताजबंद	आग्नेय, १० कि.मी.	१,८४८.००, १,६०३, ९,९९१.	स्थानिक	लातूर रोड, ३० कि.मी.	स्थानिक, गुरुवार, (ज.बा.), शुक्रवार.	स्थानिक	वि, कूपि, त, नवो.	प्राआकें.	२ प्राशा, २ माशा, १ मवि, ग्रापं, विकाससेसो, पपुससं, शेससं, मच्छीससं, १ पात, २ त, ६ मं, २ मद, १ धशा, १ ग्रंल, १ छिंम, यात्रा, पवैद, वीज.
शिवणखेड (खु.)	ईशान्य, २८ कि.मी.	१,०१२.६५, ४८७, २,६९८.	कुमठा (खु.), ४ कि.मी.	उदगीर, ४० कि.मी.	इंदरगुळी, रविवार, १३ कि.मी.	स्थानिक	कूपि.		१ प्राशा, १ माशा, ग्रापं, विकाससेसो, २ कोपबं, ४ मं, १ मद, १ समं, वीज.
शेनकुड	उत्तर, ७ कि.मी.	३२६.३५, १६०, ७१०.	अहमदपूर, ७ कि.मी.	गंगाखेड, ४० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, ७ कि.मी.	शेनकुड फाटा, १ कि.मी.	नवो.		१ प्राशा, ग्रापं, २ कोपबं, २ मं, वीज.
शेळी	उत्तर, १० कि.मी.	३०५.६८, ८४, ३८५.	अहमदपूर, १० कि.मी.	गंगाखेड, ४२ कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १० कि.मी.	अहमदपूर, १० कि.मी.	वि., त.		१ प्राशा, ग्रापं, १ पात, १ मं, वीज.
सताळा	पश्चिम, २५ कि.मी.	१,२२३.००, ५३५, २,५४९.	किन्नगाव, १० कि.मी.	जानवळ, २० कि.मी.	किन्नगाव, बुधवार, १० कि. मी.	स्थानिक	वि, कूपि, त, नवो.	प्राआकें.	१ प्राशा, १ माशा, १ मवि, ग्रापं, विकाससेसो, पपुससं, शेससं, पापुससं, १ पात, १ कोपबं, ५ मं, १ मं, १ मद, १ दगा, १ इद, १ ग्रंल, पवैद, यात्रा, वीज.

Maharashtra State Gazeteers

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
सय्यदपूर (खु.)	आग्नेय, २१ कि.मी.	३८५.००, १७७, ७८९.	वावगाव, ७ कि.मी.	लातूर रोड, ३२ कि.मी.	हाळी, रविवार, ७ कि.मी.	स्थानिक	वि, नवो.		१ प्राशा, ग्रापं, विकाससेसो, १ पात, १ मं, वीज.
सलगरा	दक्षिण, १० कि.मी.	३००.६०, ५०९, ५२४.	शिरुर, ५ कि.मी.	लातूर रोड, २० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १० कि.मी.	स्थानिक	कूवि.		१ प्राशा, ग्रापं, १ मं, वीज.
सावरगाव (थोट)	पूर्व, १४ कि.मी.	५६३.००, २८९, १,७४०.	स्थानिक	लातूर रोड, ४० कि.मी.	हत्तीलत्ती, मंगळवार, ३ कि.मी.	स्थानिक	वि, कूवि, नवो.		१ प्राशा, १ माशा, ग्रापं, विकाससेसो, शेससं, १ कोषवं, ३ मं, १ मद, वीज.
सावरगाव (रोकडा)	नैऋत्य, १४ कि.मी.	९९१.१०, ६७५, २,८९५.	स्थानिक	लातूर रोड, ४० कि.मी.	अहमदपूर, सोमवार, १४ कि.मी.	स्थानिक	वि, कूवि, त. प्राआउकें.		२ प्राशा, १ माशा, ग्रापं, विकाससेसो, बउससं, १ पात, १ कोपवं, १ त, ३ मं, १ मद, १ ग्रंल, १ छिन्नं, पवैद, यात्रा, वीज.
